मराठी शब्दकोश

सहावा खंड

(य - ते - ज्ञ)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

मराठी शब्दकोश

सहावा खंड

(य ते ज्ञ)

संपादन

प्राचार्य रामदास डांगे

•

संपादन सहयोगी

- पूर्णिमा लिखिते
  एम. ए.
- अरुण प्रभुणे (पुणे)
  एम. ए. बी. एड. पीएच. डी.
- सुप्रिया महाजन
  एम.ए. (संस्कृत)
- संदीप तापकीर
  एम.ए (इतिहास, मराठी)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ -मुंबई

◆ **मराठी शब्दकोश(सहावा खंड)**

❧

◆ **प्रथम आवृत्ती**
जुलै २०१३

❧

◆ **प्रकाशक**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवीन्द्र नाट्य मंदिर, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५.

❧

◆ **© प्रकाशकाधीन**

❧

◆ **अक्षरजुळणी**
सौ. चेतना विकास वडके
शब्दमाधुरी, पुणे.
भ्रमणभाष : ९८९०९८४९२७

❧

◆ **मुद्रक**
व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय
पुणे ४११००१.

❧

◆ **किंमत : रुपये** ₹ 249

निवेदन

२००६ वर्षाच्या एप्रिलमध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर मी ज्या अनेक जुन्या आणि नव्या वाङ्मय प्रकल्पांना चालना दिली त्यामध्ये 'मराठी शब्दकोश' या प्रकल्पाची योजना महत्त्वाची होती. गेल्या सात वर्षांच्या काळामध्ये या कोशप्रकल्पाचा सातत्याने पाठपुरावा करून तो सहा खंडांमध्ये परिपूर्ण अवस्थेला नेला. या कोश प्रकल्पातील शेवटचा आणि सहावा खंड वाचकांच्या हाती देताना मला आनंद होत आहे.

मंडळाचे पहिले अध्यक्ष मान्यवर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मुळात हा शब्दकोश प्रकल्प संकल्पिलेला होता. त्याबद्दलची माहिती मी पहिल्या खंडाच्या सुरुवातीला दिलेली आहे. तर्कतीर्थांनी शब्दकोशाचे दहा खंड संकल्पिलेले होते व त्यामध्ये सुमारे दीड लक्ष शब्द समाविष्ट करावे, असे त्यांनी ठरविले होते; परंतु पुनर्विचारान्ती अनावश्यक सामासिक किंवा विशेषनामात्मक तसेच थोडाफार रूपभेद असलेले शब्द नव्या शब्दकोशामधून गाळावेत व त्याऐवजी अनेक नव्या प्रचलित शब्दांचा समावेश करावा, जेणे करून हा शब्दकोश आजच्या महाराष्ट्रीय पिढीला जवळचा वाटू शकेल व तो भाषेच्या दृष्टीनेही अधिक उपयुक्त ठरेल, असे ठरविण्यात आले. या योजनेनुसार एकूण सहा खंडामध्ये सुमारे १ लक्ष २५ हजार शब्द अंतर्भूत असलेला नवा शब्दकोश सिद्ध करावा, असा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतरच्या गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला आहे. ग्रामीण भागामध्ये महाविद्यालयांचे जाळे विस्तार पावलेले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील बहुजन समाज शिक्षण घेऊन लिहू, वाचू लागला आहे. दलित आणि ग्रामीण साहित्यामध्ये हा नवशिक्षित ग्रामीण समाज आपापल्या भागातील शब्दसंपदा समाविष्ट करून प्रमाण मराठी भाषा अधिकाधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. या शब्दकोशामध्ये या भाषिक परिवर्तनाचे चित्र काही प्रमाणात प्रतिबिंबित झाल्याचे वाचकांना दिसून येईल. दरम्यान महाराष्ट्रातील बोलीभाषांचा पद्धतशीर अभ्यास आणि संशोधन करण्याच्या उद्दिष्टाने मंडळाने अमरावती, औरंगाबाद, जळगाव आणि मुंबई येथील विद्यापीठांच्या मराठी विभागांना अर्थसाहाय्य देऊन त्यांच्यामार्फत त्या त्या भागातील बोलीभाषांचे व वाक्प्रचाराचे कोश निर्माण करण्याचे काम स्वतंत्रपणे सुरू केलेले आहे. येत्या वर्षभराच्या काळात हे काम पूर्णावस्थेला गेले म्हणजे त्याला संकलित स्वरूप देऊन एक वेगळा शब्दकोश या प्रकल्पाला पुरवणी म्हणून जोडण्याचा विचार आहे. ही पुरवणीसुद्धा प्रमाण मराठी भाषेला शब्दवैभवाच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

तर्कतीर्थांच्या वेळेपासून स्थगित राहिलेला हा महत्त्वाचा वाङ्मय प्रकल्प मला माझ्या कार्यकालामध्ये पूर्ण करता आला याचा आनंद व समाधान मला आज लाभत आहे. हा शब्दकोश प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मला प्रा. रामदास डांगे, डॉ. प्रमोद तलगेरी, शासनाचा मराठी भाषा विभाग यांचे बहुमोल सहकार्य लाभले, त्या सर्वांचा मी आभारी आहे.

मुंबई
दिनांक – ५ ऑगस्ट २०१३

मधु मंगेश कर्णिक
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मनोगत

'मराठी शब्दकोशा' च्या ' य ते ज्ञ' वर्णांकित ह्या सहाव्या आणि शेवटच्या खंडाने हा वाग्यज्ञ पूर्ण होत आहे. प्रस्तुत खंड अभ्यासकांच्या स्वाधीन करताना हाती घेतलेले काम पूर्ण झाल्याचे समाधान वाटत असले तरी ते समाधान निर्भेळ स्वरूपाचे नाही, याची मला जाणीव, आणि म्हणून खंतही आहे. प्रस्तुत कोशातील उणे-अधिकांची भर-गळ पुरवणी खंडात शुद्धिपत्रासह देऊन हे काम अधिक निर्दोष आणि पूर्णतेच्या कक्षेत येणारे व्हावे असा आमचा प्रयत्न असेल.

पुरवणी खंडात जुन्या नव्या कोशांच्या आधारे, राहिलेल्या काही महत्त्वाच्या शब्दांचा अंतर्भाव करण्याचा मानस आहे. अगदी अलीकडे उपलब्ध झालेल्या, शब्दकोशातील शब्दांची निवड करण्याचे कामही सुरू झाले आहे. 'मराठी शब्दकोशा' चे काम करीत असताना काही अभ्यासकांकडे शब्दसंग्रहाचे काम सोपविले होते, हे पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. आम्हाला प्राप्त झालेल्या शब्दसंग्रहांतील डॉ. प्रदीप कर्णिक (मुंबई) - जुन्या नियतकालिकांतून सिद्धहस्त लेखकांनी उपयोगात आणलेल्या शब्दांचा संग्रह, डॉ. सुखदेव ढाणके (अमरावती) आणि त्यांचे सहकारी डॉ. विनायक त्रिपत्तीवार- दलित वाङ्मयातील शब्दसंग्रह, डॉ. मीरा गरूड - ज्ञानेश्वरीच्या मुद्रित आणि हस्तलिखित प्रतींच्या आधारे सिद्ध केलेल्या आमच्या 'मूलपाठदीपिका श्री ज्ञानदेवी' ग्रंथातील नवे शब्द किंवा नवे अर्थ यांचा संग्रह, डॉ. बाळकृष्ण लळीत (शिरूर) -कोकणी शब्दसंग्रह यांचाही अभ्यास सुरू केला आहे.या पुरवणी खंडामध्ये काही परीशिष्टे देण्याचा विचार आहे. त्यामध्ये भारतीय संस्कृती कोश, संख्याकोश इत्यादींच्या आधारे मराठी संस्कृतीच्या दृष्टीने महत्त्वाची असणारी स्थाने, व्यक्ती, नद्या इत्यादींची नोंद करण्यात येईल. त्याचप्रमाणे महत्त्वाच्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द देण्याचा विचार चालू आहे. याशिवाय उपसर्ग, सामान्यरूपे इत्यादींचा यात समावेश असेल.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने अमरावती, औरंगाबाद, जळगाव आणि मुंबई येथील विद्यापीठांतील मराठी विभागांकडे सोपविलेले बोलींच्या कोशांचे काम पूर्ण होत आलेले आहे. त्यातील महत्त्वाच्या शब्दांचा समावेश प्रस्तुत पुरवणीत करण्याचा आमचा मानस आहे.

प्रस्तुत शब्दकोशाच्या सहा खंडांत एक लक्ष बारा हजारांपेक्षा अधिक शब्द संगृहीत झालेले आहेत; त्यात पुरवणी खंडातील शब्दांची भर पडून ही शब्दसंख्या सव्वा लक्षाच्या घरात जावी असा अंदाज आहे. ही संख्या अपेक्षेपेक्षा थोडी कमी आहे. कारण आहे, साधित शब्द, अ, न किंवा बे यांनी साधित झालेले नकारार्थी शब्द, छोटेमोठे सामासिक शब्द यांची काटछाट.

प्रस्तुत कोशकार्य करीत असताना अनेक सुहृदांनी मोठ्या आत्मियतेने प्रोत्साहन दिले किंवा मार्गदर्शन केले. त्या सर्वांचा नामनिर्देश करणे शक्य होणार नाही. तथापि ख्यातकीर्त शब्दकोशतज्ज्ञ डॉ. प्रमोद तलगेरी, सर्वांगसुंदर मराठीचा ध्यास असणाऱ्या, आता कै. सौ. सत्त्वशीला सामंत, संतवाङ्मयाचे समर्थ शब्दार्थकोशकार श्री. रा. शं. नगरकर, मराठी व्याकरणाच्या प्रसिद्ध अभ्यासिका डॉ. लीला गोविलकर, मराठी वरील कन्नड प्रभावाचे अभ्यासक श्री. रं. शा. लोकापुर, अहिराणीचे कोशकार डॉ. रमेश सूर्यवंशी (कन्नड) इत्यादींच्या प्रोत्साहनामुळे ही वाटचाल सुकर झाली. भारत इतिहास संशोधक मंडळाचे सचिव डॉ. श्री. मा. भावे आणि त्यांचे सहकारी यांच्या सहकार्याची नोंद घेणे कर्तव्याचाच एक भाग आहे.

मंडळाचे अध्यक्ष श्री. मधू मंगेश कर्णिक, सहस्रचंद्रदर्शनाच्या वयातही मोठ्या उत्साहाने पाठपुरावा आणि पाठराखण करण्यात मुळीच कमी पडत नाहीत. मंडळाच्या सचिवा सौ. मीनाक्षी रा. पाटील यांचे प्रोत्साहक अनुशासन म्हणजे शास्त्रपूत अधिकस्य अधिकं फलम्!

- प्राचार्य रामदास डांगे



मराठी वर्णमालेतील सव्विसावे व्यंजन व एकेचाळिसावे अक्षर.

'य' पासून सुरू होणारे शब्द येथे न आढळल्यास 'ए' मध्ये पाहावेत.

यऊल पु. तरस; एक रानटी व हिंस्र प्राणी. (कु.)

यकदान न. कातड्याने मढवलेली लाकडी पेटी.

यकबयक अचानक; अकस्मात: 'दगा करून यकबयक घांटावर येईल'– पुणे अख. भाग २, पृ. ११५.

यकरंगी स्त्री. एकतानता.

यकरूप क्रिवि. १. केव्हाही. २. एकंदर:'ते आलियावर महार दारियाबाहेर यकरूप न निघते.'– पेद २६.१६८.

यकवाद तलवार अडकवण्यासाठी गळ्यात घालण्याचा पट्टा: 'श्रीमंतास भरजरी पोशाख व तरवार यकवाद व तुरा मोत्याचा दिल्हा.' – परंद भाग ३, पृ. १११.

यकसीर किमया.

यकंगबाजी स्त्री. तलवारीचे द्वंद्वयुद्ध : 'तलवारीचे युद्ध महाराष्ट्रात फार प्रिय असे वर्णन केले आहे. यास यकंगबाजी म्हणतात.' – व्याज्ञा.

यकी स्त्री. लघवी; मूत्रोत्सर्ग.

य(ये)कीन पु. खात्री; सत्य; निष्ठा; निश्चय; विश्वास.

क्रिवि. खचित; निश्चित; पूर्णपणे; खात्रीने : 'आम्ही हरामखोर असें खचित यकीन जालें असल्यास आम्हांस परिच्छिन्न गोशमाली करावी.' – ऐस्फुले ४९. [अर. यकीन्]

यकृत पु. न. १. उजव्या कुशीत असणारे पित्ताशय; (इं) लिव्हर. २. यकृत वाढले किंवा फुगले असता होणारा रोग. [सं.]

यकृब पु. घोड्याच्या तोंडावरील भोवरा. हा जबड्यावर असेल तर चांगला, खाली असेल तर वाईट. – अश्वप १. १०२.

यगानगत स्त्री. ऐक्य; सख्य; मैत्री; विश्वास : 'बाळाजीराव यांनीं आम्हांस यगानगतीचे मार्गे जें सांगून पाठविलें ती दोस्ती त्यांचे पाठीमागें आम्ही अदा केली.' – मइसा ५८६. [फा. यगानगत्]

यच्चयावत, यच्चावत अ.सर्व; झाडून सगळे; असणारे सर्व; एकही न वगळता. [सं. यत्+च+यावत्]

यजणे सक्रि. होमहवन करणे; यज्ञ करणे; पुजणे: 'जे इष्टयज्ञ यजावे । ते हविर्मंत्रादि आघवें ।' – ज्ञा ४. १२०.

यजन न. १. यज्ञ; होमहवन (स्वत: करिता व स्वत: केलेले; 'याजन' याच्या विरुद्ध अर्थ). २. एखाद्या हविर्द्रव्याचे हवन. [सं. यज् = यज्ञ करणे]

यजमान पु. १. यज्ञकर्म करणारा; स्वर्गादी फले प्राप्त व्हावीत म्हणून याग करणारा; यज्ञाचा खर्च इ. चालविणारा मुख्य मनुष्य. २. (ल.) धनी; मालक; कुटुंबाचा मुख्य; एखाद्या उपाध्यायाचा आश्रयदाता. ३. (बायकी) नवरा; पती. ४. वेश्येचा धनी; उपपती. ५. गोमंतकातील देवस्थानचा (गोवा हद्दीच्या बाहेरील) कुळावी.(गो.) [सं.]

यजमान पु. ज्याच्या शरीरावर किंवा शरीरात दुसरे जंतू, कृमी अथवा प्राणी वास करून राहतात असा मनुष्य, प्राणी किंवा वनस्पती.

यजमानकृत्य न. १. जोशी किंवा उपाध्यायाने यजमानाच्या घरी करावयाचे धर्मकृत्य. २. धर्मकृत्यांबद्दल उपाध्यायास यजमानाकडून मिळणारा पैसा.

यजमानी पु. लग्न इत्यादी समारंभातील मुख्य मनुष्य. (कु.)

यजित वि. महाग; अप्राप्य; मोंताद.

यजि(जी)त शरण. 'अजित'चे अशिष्ट रूप

यजितखत न. अजितपत्र; हरल्याबद्दलचे लेखी निवेदन; कबुलीजबाब.

यजीत(द) खत न. सोडचिठ्ठी. [फा. आझाद=मुक्त]

यजिता, यज्वा वि. यज्ञ करणारा; यजनकर्ता : 'जेथ यजितयाचा कामु पुरे। यज्ञींचें विधान सरे। मागुतें जेथूनि वोसरे। क्रियाजात।' –ज्ञा ४.१५०.

यजु:, यजुर्वेद पु. चार वेदांपैकी दुसरा वेद; यज्ञकांडाबद्दल विशेष माहिती देणारा वेद. [सं.]

यजू पु. माध्यंदिन; यजुर्वेदशाखीय. [सं. यजु:]

यटक–के न. बैलगाडीचे जू बांधण्याचा दोर; जोखडाला बांधलेला नाडा; जोत जुंपण्याचे सामान; दोर, पट्टे इ.(को.)

यटक स्त्री. न. खुबी; मर्म; युक्ती.

यडकतणे सक्रि. त्रास होणे, अडचणीत येणे. (माण.)

य(ये)डताक न. १. घोटाळा; अडचण; विसंवाद. २. वेडपट; अडाणी.

यडताकणे क्रि.हेलपाटे घालणे.

यडपट, यडपा वि.वेडपट; वेडा.

यड्ड न. मस्ती; खोडसाळपणा. [क.]

यति–ती पु. १. पद्याच्या चरणातील थांबण्याची जागा; अक्षराचे अवसान, विसावा. २. (संगीत) लयीचा गतिनियम. [सं.]

यति–ती पु.१. संन्यासी; मनोविकारांना ताब्यात ठेवणारा. २. जैन भिक्षू. [सं. यति]

यतिभंग पु. वृत्तात पदान्ती यावयाचा यती पदाच्या मध्ये आल्यास होणारा दोष. उदा. 'पुढे माझा नारायण तरुण तो पुत्र तिसरा।'– या ओळींत नारा या अर्धपदावरच यती येतो. यास यतिभंग म्हणतात. [सं. यम्]

यती पु. १. प्रयत्न करणारा. २. मोक्षाकरिता प्रयत्न करणारा संन्यासी. ३. यज्ञ करणारा. [सं. यतिन्, यत् = प्रयत्न करणे]

यत्किंचित क्रिवि. थोडा सुद्धा; थोड्या प्रमाणात; थोडेसे. [सं.]

यत्ता स्त्री. इयत्ता; मर्यादा; प्रमाण.

यत्न पु. खटपट; उद्योग; परिश्रम. [सं.]

यत्नत: क्रिवि. प्रयत्नाने; खटाटोपाने. [सं.]

यत्नवाद पहा: **पौरुषवाद**

यथा अ. १. जसा–शी–से; ज्याप्रमाणे. २. या शब्दाचा पुष्कळ संस्कृत शब्दांशी समास होतो. तेथे याचा अर्थ त्या त्या प्रमाणे, त्याचे उल्लंघन न करिता असा प्राय: होतो.उदा. यथाशक्ती, यथामती इ. [सं.]

यथाकथंचित अ.१. कसा तरी; काही झाले तरी; चांगल्यावाईट किंवा योग्यायोग्य मार्गाने. २. यदाकदाचित, कदाचित, जर शक्य झालेच तर; शेकडा एक शक्यतेने; अगदी पराकाष्ठेने.

यथाकथा क्रिवि. १. योग्य रीतीने ; जसे पाहिजे त्याप्रमाणे; म्हटल्या-सांगितल्याबरहुकूम. २. (विरू.) फार झाले तर; कदाचित; चुकून.

यथातथा अ. कसा तरी; कष्टाने; जेमतेम.

यथानिगुती, यथातथ्य-योग्य क्रिवि. यथार्थपणे; योग्य रीतीप्रमाणे;जसे असेल तसे; खरे; खरेपणाने; स्पष्ट.

यथापूर्व क्रिवि. पूर्वीप्रमाणे;पहिल्यासारखे; पूर्ववत.

यथामूल क्रिवि. मुळानुसार.

यथायथा क्रिवि. १. जसजसा; जसा जसा; तथातथा शब्दाबरोबर प्रयोग. २. कसेतरी; सरासरी; जितक्यास तितके; बेताबेताचे; अल्प.

यथार्थ वि. १. बरोबर; खरे; जसे घडले त्याप्रमाणे; वास्तविक; योग्य रीतीने. २.अन्वर्थ; नावाप्रमाणे; शब्दाप्रमाणे. उदा. भूपाल, जलधी, आतपत्र. हे शब्द यथार्थ होत, कारण प्रत्येक शब्दावरून आपणास त्या शब्दवाचक वस्तूचे वर्णन किंवा माहिती कळते.

क्रिवि. उचितपणाने; योग्यपणाने; सत्यतेला धरून; खरेपणाला अनुसरून.

यथार्ह क्रिवि. योग्यतेप्रमाणे; शोभेसे. [सं. यथा+अर्ह]

यथावकाश, यथावसर क्रिवि.सवडीनुसार; वेळ मिळेल तेव्हा.

यथावत क्रिवि. यथायोग्य; जसे आहे तसे: 'तसें समस्तही श्रुतिजात। ठाके लाजलें ऐसें निवांत। तें मीचि करी यथावत। प्रकटोनिया ।' - ज्ञा १५.४३५. [सं. यथावत्]

यथाविभव क्रिवि. ऐपतीप्रमाणे; सामर्थ्यानुरूप; मिळकतीला धरून.

यथावृत्त क्रिवि. घडल्याप्रमाणे; जसे झाले तसे;खरेपणाने.

यथाशक्ती-शक्य क्रिवि. आपल्या शक्तीप्रमाणे; ऐपतीनुसार; कर्तृत्वानुसार.

यथाश्रुत क्रिवि. १. ऐकल्याप्रमाणे; ऐकलेल्या गोष्टीबरहुकूम. २. जसे शिकला त्याप्रमाणे; आपली बुद्धी न चालविता फक्त गुरूने पढविल्याप्रमाणे. ३. काव्याचा अर्थ लावताना फक्त पदांचा अर्थ दिसतो त्याप्रमाणे; यौगिक अर्थाने; व्यंग्यार्थ लक्षात न घेता.

यथासंभव क्रिवि. १. शक्यतेप्रमाणे; अंदाजाप्रमाणे. २. ऐपतीप्रमाणे; साधनानुकूलतेप्रमाणे.

यथासांग क्रिवि. पूर्णपणे; काही न्यून न ठेवता; कोणतीही गोष्ट कमी न करता; सांगोपांग; शास्त्रात सांगितल्याप्रमाणे. [सं.यथा+स+अंग]

यथास्थित क्रिवि. १. कालानुरूप; परिस्थितीप्रमाणे. २. भरपूर; यथेच्छ; रग्गड; पुरेपूर; पूर्णपणे; जितके पाहिजे असेल तितके. ३. जसे होते तसे; यथायोग्य. ४. पूर्वीची चांगली अवस्था न पालटता;पूर्वीप्रमाणे.

यथेच्छ-च्छा-ष्ट क्रिवि. १. भरपूर; विपुल; इच्छेला येईल तसे, तितके; इच्छेप्रमाणे. २. स्वैर; मन मानेल तसे; अनिर्बंधपणे. [सं. यथा+ इच्छा; यथा+ इष्ट]

यथोचित क्रिवि. योग्य दिसेल तसे;लायकीप्रमाणे;अनुरूप. [सं.यथा+उचित]

यदगुदी स्त्री. (बायकी) गडबड; धांदल. (कर.)

यदाकदाचित शअ. जर करता; जर कदाचित.[सं. यदा+कदा + चित्]

यदूळ क्रिवि. हा वेळपर्यंत; इतका वेळ; वादूळ. [सं. इयत् + वेला]

यदृच्छया क्रिवि. सहज; प्रयत्नाशिवाय: 'यांचेविण यथाकाळें । यदृच्छया जें जें मिळे । तें तें सेवी सकळ मंगळ। गुरुवाक्यमेळें स्वानंदें।' - एभा३.५००. [सं.यदृच्छा शब्दाचे तृतीयेचे एव. रूप]

यदृच्छा स्त्री. १. योगायोग; आपोआप संभव; सहज गती; परमेश्वराची इच्छा; ईश्वरेच्छा. २. स्वच्छंदीपणा; स्वैरपणा. [सं.]

यद्यपि, यद्यपिचेत् उअ. जरी. [सं. यदि+अपि]

यद्वा क्रिवि. अथवा; अगर; किंवा. [सं.]

यबाव पु. १. (शेतकऱ्यांत रूढ) १. हावभाव. २. अजागळपणा; चाळा.

यम पु. १. प्राण्याला त्याच्या मरणानंतर पापपुण्याचा निवाडा करून त्याप्रमाणे नरकाला किंवा स्वर्गाला पाठविणारी देवता (ही सामान्यत: पाप्यांना शिक्षा करणारी देवता असेच मानण्यात येते); कृतांत; काळ; यमधर्म.२. (ल.) कर्दनकाळ; निर्घृण मनुष्य; भयंकर दिसणारा मनुष्य.[सं.] (वा.) **यमाच्या दाढेत असणे-पडणे-सापडणे-जाणे** -१. मृत्युमुखात असणे-पडणे-सापडणे.२. (ल.) मोठ्या संकटात असणे-पडणे-सापडणे; अतिशय हाल करणाऱ्याच्या तावडीत सापडणे.

यम पु. १. नियमन; मनोविकार ताब्यात ठेवणे; इंद्रियदमन. आत्मसंयमन. २. अष्टांग योगातील पहिले अंग. [सं.]

यम, यमल न. जुळे भाऊ; जोड.

वि. जुळा; जावळा; जोडीपैकी एक. [सं.]

यमक न. एक शब्दालंकार. कवितेच्या एका चरणात किंवा चरणार्धात जी अक्षरे ज्या क्रमाने संनिध असतील त्याच क्रमाने दुसऱ्या चरणात किंवा चरणार्धात त्याची आवृत्ती झाली म्हणजे हा अलंकार साधतो.याचे अनेक भेद आहेत. या अलंकारातील प्रत्येक ओळीतील अक्षरसमूहाचा अर्थ प्राय: निराळा असतो. [सं.] (वा.) **यमकाला यमक मिळवणे, साधणे, लावणे, बसवणे, मिळणे, लागणे, बसणे** - १. जशास तसे; तोडीस तोड. २. होला हो करणे; प्रत्येक गोष्टीला होकार देणे; अनुमती देणे; होयबा करणे.

यमकुं(कों)ड पु. १. नरककुंड; पाप्यांना शासन करण्याकरिता त्यांना कोंडून ठेवण्याचे यमाचे कुंड.२. (ल.) तुरुंग;कैदखाना. (गो.)[सं.]

यमगंड पु. मृत्युकाळ; मरणकाळ; गंडांतर; मृत्युयोग.

यमघंट पु. (ज्योतिष.) एक योग. रविवारी मघा, सोमवारी विशाखा, मंगळवारी आर्द्रा, बुधवारी मूळ, गुरुवारी कृत्तिका, शुक्रवारी अनुराधा, शनिवारी हस्त याप्रमाणे त्या त्या वारी ती ती नक्षत्रे आली असता यमघंटयोग समजावा.'- ज्योतिषसार, पृ.२२.

यमझाडी स्त्री. संकट: 'सांपडलासी यमझाडी ।' - नामना १९.

यमणे सक्रि. नियमन करणे.

यमदिशा स्त्री. दक्षिण दिशा; यमाच्या वसतिस्थानाची दिशा.

यमदूत पु. १. माणसाचे प्राण हरण करून नेणारा यमाचा दास.२. (ल.) निष्ठुर अंत:करणाचा, क्रूर मनुष्य.

यमद्वितीया स्त्री. कार्तिक शुद्ध द्वितीया; भाऊबीज.

यमन न. दमन; ताब्यात ठेवणे;निग्रह; संयमन. [सं.]

यमन पु. (संगीत) एक राग. हा कल्याण रागाचा एक प्रकार आहे म्हणून

त्याला यमनकल्याण असेही म्हणतात. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर.

यमन(नी)बिलावल पु.(संगीत) बिलावल रागाचा एक प्रकार. गानसमय दिवसाचा पहिला प्रहर.

यमपुरी–लोक स्त्री.पु. १. यमाची राजधानी; पापी लोकांना शासन करण्याची यमाची जागा. २. तुरुंग. ३. यमपुरीतील यातना दाखवणारा कळसूत्री बाहुल्यांचा खेळ.

यमी वि.१. यमनियम किंवा यम साधणारा; संयमी; इंद्रियनिग्रही.२. योगी पुरुष. ३. ताब्यात ठेवणारा; नियमन करणारा; आवरून धरणारा.

यमुनेचा खडा, यमुनी स्त्री. यमुना नदीत सापडणारा एक प्रकारचा काळा खडा, हा अंगठीत बसवून त्यावर सोनेरी अक्षरे कोरतात.

ययाति–ती फेब्रुवारी महिन्यातील एक नक्षत्र, तारका.

यरकाल न. बैलगाडीची साटी व जू यांना जोडणारा दांडा.(बे.)
[क. येर=उचलणे + काल=पाय]

यरीवाही क्रिवि. दुसरीकडे; दुसऱ्या बाजूला : 'श्रीकरा धरूनि उचलुनि यरीवाही गाढा घातला.'–गोप्रच १७३. [सं. इतर]

यरेकर पु. सुकाणू धरून बसणारा. (कु.)

यर्भक वि.आळशी; मठ्ठ. [सं. अर्भक]

यलपाडी वि. स्त्री. वेड पांघरणारी; ढोंगी.

यलम स्त्री. १. सोडत; लॉटरी. (गो.) २. मंत्र. [अर. इलम = विद्या]

यलम्मा स्त्री. १. यलम्मा देवीची जोगतीण. २. परशुरामाची आई; रेणुका.

यल्गार स्त्री. हल्ला; आक्रमण; चढाई.

यव पु. १. एक धान्य; सातू; जव. २. हाताच्या बोटावरचे यवाच्या आकाराचे चिन्ह.३. यवाच्या दाण्याची लांबी; लांबीचे एक परिमाण. सहा मोहऱ्यांच्या दाण्यांच्या लांबीबरोबर हे असते. [सं.]

यवन पु. म्लेंच्छ; आयोनिया देशातील मनुष्य; आर्यवंशीय नसलेला मनुष्य; हल्ली सामान्यत: मुसलमान या अर्थी हा शब्द योजतात. [सं.]

यवनाचार्य पु.१. मुसलमान शास्त्री; मुसलमानांतील विद्वान किंवा पंडित. २. रमल शास्त्र हिंदूत फैलविण्याकरिता मुसलमान झालेला कोणी एक ब्राह्मण.

यवनानी स्त्री. अरबी अगर फार्शी (फारशी) अक्षरलिपी. [सं.]

यवनास पु.अव.१. श्रम; त्रास; दगदग;कंटाळवाणे व मेहनतीचे काम. २. त्रस्त अवस्था; अतिशय त्रासिक स्थिती.

यवनी स्त्री. यवन स्त्री; मुसलमान स्त्री.
वि. यवनासंबंधी; यवनाचा.

यवस न. गवत;तृण;चारा. [सं.]

यवक्षार पु. जवाच्या पानांच्या राखेपासून तयार केलेला क्षार.

यव्हानळ पु.जोंधळा. [सं.यावनाल]

यव्हानळी करणे जोंधळा विकणे.

यश न.१. दैवाची अनुकूलता; चांगले नशीब; सुदैव. २.जय; विजय; सुपरिणाम; साफल्य. ३. आपल्या सत्कृत्यांबद्दल इतरांकडून मिळणारी वाहवा; उपकाराच्या जाणिवेचे अस्तित्व पाहून मिळणारा आनंद. ४. कीर्ती; प्रसिद्धी.[सं.यशस्] (वा.) ० **लाभास येणे–** चांगला मोबदला मिळणे; आशा फलद्रूप होणे.

यशवंत, यशस्मा(स्वा)न, यशस्वी वि.१. कीर्तिमान; प्रसिद्ध; नावलौकिक मिळविलेला; विजयी. २. सुदैवी; नशीबवान;भाग्यवंत; भगवान; सुखी; भरभराटीत असलेला. ३. यश देणारा;ज्याच्या अस्तित्वाने किंवा सान्निध्याने यश मिळते अशी (वस्तू); शुभगुणी; लाभदायक.

यशस्कर वि. १. यश देणारे; कीर्तिकर; प्रसिद्धी करणारे. २. स्तुत्य; माननीय; आदरणीय. [सं.यशस् + कृ = करणे]

यशापयश न. कीर्ती किंवा अपकीर्ती; मानापमान; स्तुती किंवा निंदा.

यष्टि–ष्टी, यष्टिका स्त्री. काठी. [सं.]

यष्टिचीत वि. (क्रिकेट) चेंडू क्रीझच्या बाहेर खेळण्याच्या प्रयत्नात यष्टिरक्षकाने चेंडू यष्टींना लावून 'बेल्स' उडवून फलंदाजाला बाद करणे.

यष्टिमधु–धू पु. ज्येष्ठमध.

यष्टिरक्षक पु. क्रिकेट या खेळात यष्टींच्या मागे उभा राहून चेंडू अडवणारा, प्रसंगी झेल घेणारा वा फलंदाजाला यष्टिचीत करणारा खेळाडू. (इं.) विकेटकीपर.

यसवार, यस्वार पहा : **वेसवार**

यसा पु. अव. कोळिष्टके.

यस्वाल पु.बादशहाच्या स्वारीपुढे चालून जातीने व्यवस्था राखणारा अधिकारी.

यहसान न. १. उपकार; कृपा. २. सत्य. ३. निष्ठा; विश्वास; एहसान.
[अर. इहसान्]

यहसानमंद कृतज्ञ. [फा. इहसान् मंद]

य(ये)ळकोट न. १. सात किल्ले; तट असलेली जागा.२. खंडोबाला ओवाळताना उच्चारण्याचा शब्द; खंडोबाचा जयजयकार.
[क. येळकाटि=सात किल्ले]

यळि(ळी)ल वि. निष्फळ.–शर.

यक्ष पु. एक देवयोनी; उपदेवता; कुबेराचा सेवक. (हे यक्ष कुबेराच्या खजिन्यावर किंवा बागेवर नेमलेले असतात.)[सं. यक्ष्= पूजा करणे]
(वा.) **यक्षिणीची कांडी फिरणे** – अकल्पित रीतीने स्थिती पालटणे.

यक्षकर्दम न. पु. सुगंधी उटी; कुंकुम, अगरू, कस्तुरी, कर्पूर आणि चंदन अशा पंचद्रव्यांचे सुवासिक उटणे.

यक्षगान न. एक संगीतप्रकार; लोकगीत;विष्णुदास भावे यांच्यापूर्वीची एक नाट्यरचना; यक्षगान या वाङ्मयीन नृत्य–नाट्य प्रकारांतून नट–नट्यांमार्फत ऐतिहासिक कथांचे सादरीकरण केले जाते.

यक्षधन–वित्त न. पुरून ठेवलेले द्रव्य, ठेवा, साठा; उपयोग न करता ज्याचे फक्त रक्षण करावयाचे असे धन.

यक्षधूप पु.१. राळ; सर्जरस; एक ज्वालाग्राही पदार्थ.२. टर्पिण तेल.

यक्षप्रश्न पु. (ल.)कठीण प्रश्न.

यज्ञ पु. १. याग; होम. २. बलिदान; एखादी वस्तू देवतेस अर्पण करण्याची क्रिया; (ल.) त्याग. ३. धर्मकृत्य; ईश्वरविषयक कर्म.
[सं. यज् = पूजा करणे]

यज्ञकुंड न. यज्ञाच्या वेळी होमात आहुती टाकण्यासाठी केलेली जागा; होमकुंड; वेदी.

यज्ञदीक्षा स्त्री.यज्ञ करण्याचे व्रत. हे व्रत घेताना व्रत घेतल्याचा दाखला म्हणून काही तरी खूण घ्यावयाची असते. यावरून यज्ञदीक्षा म्हणजे ती खूण असाही अर्थ होतो. उदा. यज्ञकंकण.

यज्ञमुख पु.अग्नी.

यज्ञवृक्ष पु. यज्ञाला ज्यांचे लाकूड उपयोगी पडते असे वृक्ष-पिंपळ, पळस, औदुंबर, रुई, शमी, खैर व आघाडा इत्यादी निघंटूमध्ये वेहेकळ व नदीवड किंवा खुजावड यांनाही यज्ञवृक्ष म्हटले आहे.

यज्ञीय वि. १.यज्ञासंबंधी. २.बली देण्यास योग्य. [सं.]

यज्ञोपवीत न. जानवे. (हल्ली हे सुताचे नऊ पदरी तीन फेरे असलेले झाले. प्राचीन काळी ते उपवीत म्हणजे विणलेले वस्त्र होते.) [सं]

यंता वि. नियमन करणारा; दाब ठेवणारा; सूत्रधार. [सं.यन्तृ]

यंत्र वि. १. साधन; हत्यार; कोणतेही एखादे काम सुलभतेने, कमी वेळात, कमी प्रयासाने होण्यासाठी तयार केलेले गुंतागुंतीचे उपकरण; कळ; युक्ती. पहा : **मशीन** १. २. बंदूक; तोफ ; कोणतेही अशा रीतीचे संहारसाधन. ३. रहाट; रहाटगाडगे. ४. देवतेच्या पूजेला लागणारी इच्छा पूर्ण करणारी एक गूढरेखात्मक आकृती. उदा. स्वस्तिक, कमळ वगैरे. यांनी पिशाचबाधा होत नाही. ५. जादू. ६. प्राणायाम. ७. कळाशी. ८. वाद्य. ९. बिंदू ; त्रिकोण, पंचकोन इ. अनेक आकृतींनी तयार केलेले देवताबोधक चिन्ह. हे देवतेचे सर्व स्वरूप बिंदुकोनात्मक चिन्हांनी नियंत्रित करते. १०. योनी; स्त्रीचे जननेंद्रिय. 'कुयोगिया द्रव्ययंत्रसेवेत व धर्मापासोनि जाव'- लीचउ ३८२.

यंत्रगोळ पु. तोफेचा गोळा.

यंत्रण न. यंत्राचे काम.

यंत्रणा स्त्री.कार्य किंवा कार्यवाही सुरळीतपणे चालावी म्हणून स्थापन केलेली व्यवस्था, रचना.

यंत्रधारी पु. हत्यारबंद; शिपाई.

यंत्रमानव पु. कामाच्या गरजेप्रमाणे बनवलेला यांत्रिक मानव. हा स्मृतीत साठवलेल्या सूचना व परावर्तित झालेली माहिती यांवरून सर्व कामे करतो. (इं.) रोबोट.

यंत्रयुग न. औद्योगिक क्रांतीनंतर सुरू झालेले, जास्तीत जास्त यंत्रांचा उपयोग करणारे, उत्पादन वाढवणारे व गतिमान युग.

यंत्रशास्त्र न. यंत्रांसंबंधी ज्यात विवेचन केलेले असते असे शास्त्र; पदार्थाच्या स्थिरावस्थेचे व गतिमान अवस्थेचे विवेचन करणारे शास्त्र. याचे स्थितिशास्त्र व गतिशास्त्र हे दोन विभाग असतात.

यंत्रित वि. नियंत्रित केलेला; नियमित बांधलेला; ताब्यात ठेवलेला.

यंत्री पु.यंत्र चालविणारा.

यंत्रीकरण न.यंत्राकडून काम करुन घेण्याचे तत्त्व.

यंदा क्रिवि. या वर्षी; चालू साली. [फा.आयंदा]

यंदो पु.चूल कोरलेला दगड. (गो.)

या उअ. १.अथवा; किंवा; अगर. २. संबोधनाचा अथवा आश्चर्य व्यक्त करणारा शब्द.

या, आ एक प्रत्यय. हा प्रत्यय सकर्मक क्रियापदांना लागला म्हणजे कर्तृत्ववाचक विशेषण तयार होते. उदा. गोड बोलणे- गोडबोल्या; वाट मारणे- वाटमाऱ्या; प्राण घेणे-प्राणघेण्या.

याक न.पु.तिबेटमध्ये आढळणारे एक जनावर. याचा उपयोग उंच प्रदेशात माल वाहून नेण्यासाठी करतात.

याकुती स्त्री. साखर, मसाला इत्यादी घालून केलेले भांगेचे मिश्रण; घोटा. [फा.]

याकूत न. माणिक; तांबड्या रंगाचे एक रत्न. उत्तम याकूत भारत, सैबेरिया, श्रीलंका, इराण व ब्राझील या देशांत सापडतात. [अर.]

याग पु. १. यज्ञ; हवन; होम. २. पूजा. [सं.यज्=पूजा करणे]

यागी वि. १. यज्ञ करणारा; यजमान. २. संतप्त; दुःखी; रुष्ट; खिन्न; वैषम्ययुक्त. [हिं.]

यागीगारी स्त्री. बंड.

याचक पु. भिकारी; भीक मागणारा, मागण्यास आलेला मनुष्य. [सं.याच्=मागणे]

याचकी, याचकाई स्त्री. भिकारीपणा.

याचणे सक्रि. मागणे; विनंती करणे; प्रार्थना करणे; भिक्षा मागणे; एखाद्यापाशी एखादी वस्तू मागणे. [सं.याच्=भीक मागणे]

याचन-ना न.स्त्री. भिक्षा; भीक; विनंती; अर्ज;प्रार्थनापूर्वक मागणे.

याचनीय वि. भीक मागण्यासारखी; भिक्षा मागण्यास किंवा घालण्यास योग्य, लायक. [सं.]

याचिका स्त्री. न्यायालयाकडे केलेला तक्रारअर्ज.

याचित वि.मागितलेले; ज्याच्या जवळ याचना केली तो (मनुष्य).[सं.]

याचिता वि. भिक्षा मागणारा; भिकारी; याचक.

याजक, याजी पु. यज्ञकर्म चालविणारा उपाध्याय; ऋत्विज इ. [सं.]

याजन न. यजमानाकरिता यज्ञासंबंधी सर्व व्यवस्था पाहून तो तडीस नेणे; उपाध्याय, ऋत्विज इ. चे होमासंबंधीचे काम. [सं.]

याजुष वि. १. यजुर्वेदासंबंधी; यजुर्वेदातील.२.यजुर्वेदी; यजुःशास्त्री; यजुर्वेदात सांगितल्याप्रमाणे विधी व कर्मे करणारा. [सं. यजुस्]

याज्य न. यज्ञाचा विषय; मुख्य विषय-हेतू.

यात-ती स्त्री. ब्राह्मण इ. जात;वर्ग; भेद; वर्ण.

यात वि. १. गेलेला; गत. २. मिळालेला; संपादित. [सं.या=जाणे]

यात स्त्री. मोटवण. [क. याता]

यातन न. १. फेड; प्रतिकार. २. सूड.

यातना स्त्री. हाल; अपेष्टा; तीव्र दुःख; वेदना; त्रास;कष्ट. [सं.]

यातायात स्त्री. १. येरझार;जा-ये;खेप;हेलपाटा. २. त्रास; श्रम; कष्ट; भानगड. ३. (ल.) जन्म-मृत्यू; जननमरण; पुनः पुन्हा जन्मणे आणि मरणे.

यातायाती स्त्री. जातिभेद; जातीजातीतील फरक.

यातु, यातुधान पु. राक्षस. [सं. यातु=जादू, यातुधान=जादूगार]

यातुशक्ती स्त्री. संपूर्ण विश्वात वास करणारी संवर्धक व संहारक शक्ती.

यात्रा स्त्री. १. देवतादर्शन, तीर्थस्नान इ. करता निरनिराळ्या पुण्यक्षेत्री जाऊन तेथे तीर्थस्नान, देवदर्शन, क्षौर, ब्राह्मणभोजन इ. विधी करून येणे; क्षेत्रसंचार. २. यात्रेकरूंचा समुदाय-समूह. ३. जत्रा; उत्सव. ४. (ल.) फुकट पडलेला हेलपाटा; निष्कारण प्रवास. ५. देशांतरास

गमन; संचार; पर्यटन.६.(ल.) मरण; मृत्यू.

यात्रे(त्रा)करू–री, यात्रेस्थ, यात्रिक वि. यात्रा करणारा; तीर्थक्षेत्रास जाणारा; वारकरी; प्रवासी. [सं.यात्रिक]

याथार्थिक वि. खरे असेल तसे; योग्य; बरोबर; रास्त; न्याय्य; सत्यता आणि खरेपणाला धरून; औचित्याला अनुसरून.

याद स्त्री. १. स्मरण; आठवण; एखादी गोष्ट लक्षात ठेवणे, आणणे. २. यादी; फेरिस्त; सूची; स्मरणार्थ टिपण; यादी लिहिलेला कागद. ३. अर्ज; विज्ञापनापत्र.(याद ही एखाद्या विशेष दर्जाच्या मनुष्याकडून येते आणि अर्ज हा सामान्य किंवा गरीब मनुष्याकडचा असतो.) [फा. याद्]

याद, यात्दस न. जलचर; मत्स्य; मासा. [सं. यादस्]

यादगा(गि)री स्त्री. १. आठवण; स्मृती; स्मरण. २. आठवण राहण्याकरिता खूण; स्मारक. [फा. याद्+गार]

याददास्त स्त्री. १. सूची; रोखा; सूचिबद्ध कागद. २. गायकांना येणाऱ्या ध्रुपद, ख्याल इ. चा थोडाबहुत भरणा.
वि. यादी देणारा. पहा : **याद** [फा. याद्+ दास्त्]

यादबूद स्त्री. १. निश्चित यादी; ठराव; दस्तऐवज; लेख. २.स्मरणार्थ खूण–लेख. [फा. याद्+ बुद्]

यादव पु. १. यदूचा वंशज; कृष्णाचे कूळ. २. एक राष्ट्र.

यादवान न. जन्मकालीन तिथिवारादी ज्या कागदावर लिहिलेले असते असा कागद; जन्मलग्नपत्रिका; टिपण.

यादवी स्त्री. (कृष्णावतारात यादव दारूने धुंद होऊन आपसांत लढले, त्यामुळे त्यांचा नाश झाला. यावरून)आपसांतील कलह; भाऊबंदकीची भांडणे; गृहकलह.

यादी स्त्री. १. स्मरणार्थ टिपण; याद; फेरिस्त. २. संस्थानिकांनी केलेला अर्ज.

यादीचा वि. चांगली स्मरणशक्ती असलेला.

यादृश वि. जसा; ज्याप्रमाणे; ज्यासारखा. [सं.]

यान न. १. ज्यात किंवा ज्यावर बसून जातात असे साधन, वाहन. उदा. गाडी, विमान इत्यादी. २. जाणे; गमन; प्रवास. ३. आगगाडीचा डबा.

याप्य वि. (वैद्यक.)असाध्य (रोग); पथ्य न पाळल्यामुळे झालेला (आजार); औषध चालू असेपर्यंत शमणारा व परत जोर धरणारा (रोग). [सं.]

याबू पु. लहान घोड्याची एक जात. [फा.]

याम पु. १. प्रहर; दिवसाचा आठवा भाग. २. तीन तासांचा पहारा. ३. सहनशीलता. ४. थांबणे; विश्रांती; मुक्काम. [सं.]

यामद्वय न. १. दिवसाचे किंवा रात्रीचे दोन प्रहर. २. विशेषत: सूर्योदयानंतरचे दोन प्रहर.

यामार्ध न. वारपरत्वे प्रत्येक दिवशी अर्धा प्रहरपर्यंत असणारा वाईट मुहूर्त; कुमुहूर्त.

यामिकी स्त्री.गतिविषयक शास्त्र.

यामिनी स्त्री. रात्र. [सं.]

याम्य वि. दक्षिणेकडचा; दक्षिण दिशेचा. [सं.]

याम्योत्तर रेषावृत्त एका ध्रुवापासून दुसऱ्या ध्रुवापर्यंत मध्यरेषेस लंबरूपाने छेदून जाणारी रेषा; मध्यान्हरेषा; रेखावृत्त.

याम्योत्तर वृत्तपात याम्योत्तर वृत्ताचा विषुववृत्ताशी होणारा छेद.

याय स्त्री. वेळ : 'आभूटमा याय कयत नाही. आयसेल बाई दयत नाही.' – खावा. ५.(अहि.) (वा.) **याय पाडनं, याय पडीत पाडनं** – खाडा करणे; कामावर न जाणे.(अहि.)

यायी पु. अवचित येणारा प्रसंग; अडचणीची वेळ.
वि. जाणारा; गमन करणारा; प्रवासी; उतारू. [सं.]

यार पु. १. मित्र; स्नेही; दोस्त; मदतनीस. २. जार; धगड; प्रेमी, वेश्येचा प्रियकर. ३. हत्तीबरोबर चालणारा भालाईत. ४. प्रेमपात्र; माषूक.[फा. यार; सं. जार(द्वितीयार्थी)] (वा.) **० देणे** – संकटकाळी मदत करणे; (जरूरीचे वेळी) उपयोगी पडणे.

यारदा–दी वि. १. ठेंगणे व लहान; ओझ्यापाझ्याच्या कामी उपयोगी पडणारे; हलक्या व ठेंगण्या जातीचे (घोडे). २. हलक्या कामाला उपयोगी पडणारा; सर्वसामान्य; हलका; कमी योग्यतेचा (मनुष्य, पशू इ.)..३. लहान परंतु बळकट अशा बट जातीची (तट्टू, घोडी).

यारी स्त्री. १. मैत्री; अत्यंत सख्यभाव; दोस्ती; निकट स्नेह. २. मदत; साहाय्य. (क्रि. देणे) [फा.]

यारी स्त्री. ओझे उचलण्याचे यंत्र.यात मुख्यत: कप्प्या असतात. (इं.)क्रेन.

यारे(र)दी पु. देशपांड्याचा मदतनीस; वतनाची देखरेख करणारा; गुमास्ता.
स्त्री. त्या गुमास्त्याची वंशपरपरेने चालत आलेली मालमत्ता– हुद्दा – जागा इ. [फा. यारी–दिह्]

यार्ड पु. तीन फूट; तीन फुटांचे माप; वार; गज. [इं.]

यावच्चंद्रदिवाकरौ क्रिवि. चंद्रसूर्य आहेत तोपर्यंत; सदासर्वकाळ; अनंत काळपर्यंत; चिरकाल. [सं.यावत्+चंद्र +दिवाकर]

यावत् अ. जेथपर्यंत; जोपर्यंत.
वि. जितका; जेवढा. (तावत् या शब्दाच्या बरोबर उपयोग.)[सं.]

यावत्तावत् न. (बीजगणित) अव्यक्त संख्या आणि अंक यांमधील संबंध; अव्यक्तसंख्यादर्शक अक्षर.
क्रिवि. बेताचे; विशेष सांगण्यासारखे नसलेले; अधिक नव्हे व तुटपुंजेही नव्हे असे.

यावनाल पु. जोंधळा; जोंधळ्याचा दाणा. [सं.]

यावनी वि. यवनाची; यवनासंबंधी.

यावा पु. १. उदय; प्रवेश; आगमन. २. प्रभाव; धैर्य; सामर्थ्य; बल. ३. ओघ; प्रवाह. ४. आवेग; आवेश; फेरा; संचार; तडाखा; कचका. ५. स्वारी. ६. महत्त्व; श्रेष्ठता.

यावांका पु. धैर्य; पुरुषार्थ.

याज्ञिक न.१.यज्ञयाग;सामान्यत: यज्ञसमारंभ.२. लग्न, मुंज यांतील उपाद्धिक.
पु.१. यज्ञ करणारा; अग्निहोत्री; यज्ञ करणारा पूर्वमीमांसक. २. लग्न, मुंज इ.धर्मकृत्य चालविण्याचे अनुष्ठान जाणणारा ब्राह्मण. [सं.यज्ञ]

याज्ञिकी स्त्री. याज्ञिकाचे काम; लग्न, मुंज इ. धर्मकृत्ये चालविण्याचे काम व तत्संबंधी मंत्रतंत्र वगैरे.

वि. याज्ञिकासंबंधी; याज्ञिकाचा. [सं.]

यांत्रिकपणा पु. तेच तेच काम निर्जीवपणे होत राहण्याची चैतन्यहीन अवस्था.

यिव, यीव स्त्री. बकऱ्याच्या मानेचे मांस; मानेतील मांसाचा तुकडा. [यिव= मान, सं. ग्रीवा?]

यिवकुकडी स्त्री. मानेतील आणि ढुंगणातील मांसाचे तुकडे. (एखादा बकरा अगर मेंढा कापला असता या दोन भागांतील मांसावर महाराचा हक्क असे.)[यिव=मान+कुकडी= ढुंगण, मागचा भाग; अवशिष्ट भाग]

यीस्ट न. पाव हलका करण्यासाठी व मद्य करताना वापरायचे द्रव्य.[इं.]

यीस्टसेल पु. शेवाळ्यातील पिवळट भाग. [इं.]

यीळ दिवस. (ना.)

यींदा पु. नांगरास हाळीस बसण्याकरिता पाडलेले भोक; कुऱ्हाड, कुदळ इ. ना दांडा बसविण्याकरिता असलेले भोक; नेढे. (माण.)

युक्त वि. १. जोडलेला; मिळवलेला; मिसळलेला; जुळविलेला. २. सहित; संपन्न. (समासात) चिंतायुक्त, शोकयुक्त इ. ३.तत्पर; तयार; (अभ्यासात अगर कामधंद्यांत) गुंतलेला; गढून गेलेला; सदोदित लक्ष देत असलेला. ४. (योग) योगात निमग्न झालेला; योगाभ्यासी.५. योग्य; रास्त; उचित; शोभेसा; जुळणारा. [सं.युज्= जोडणे]

युक्ताथिला वि.आस्तिक्य- भावना असलेला.-हंको.

युक्ति-क्ती, युक्त स्त्री. १. शक्कल; खुबीदार कल्पना; शोधक बुद्धी. २. कसब; खुबी; कल्पना; कौशल्य (शक्तीच्या विरुद्ध). ३. (एखाद्या यंत्रातील) कळ;मख्खी; किल्ली; मखलाशी.४. युक्तता; औचित्य; विवेक; प्रमाण; नियमितपणा. ५. ऐक्य; मिश्रण; मिळणी; एकत्रीकरण; एकी. ६. निष्काम कर्म करण्याची हातोटी.(वा.) **युक्तीस येणे** - मनास पसंत पडणे; योग्य, युक्त वाटणे, दिसणे.

युक्तिघोष पु. बंधरूपी मंत्रघोष:'तेथ संयमाग्नीची कुंडे । इंद्रियद्रव्याचेनि पवाडे । यजिती उदंडे। युक्तिघोषे।' -ज्ञा ८.५०.

युक्तित्रय न. (योगशास्त्र) वज्रासन, जालंदर आणि उड्डियान असे तीन बंध.-ज्ञा ४.१२७.

युक्तिप्रयुक्ती स्त्री.नाना प्रकारच्या युक्त्या; बरे-वाईट उपाय. [सं.]

युक्तिबाज-मान-वंत-वान, युक्त्या वि. युक्त्या जाणणारा, लढविणारा; हुशार; सुपीक डोक्याचा; शोधक; निरनिराळे उपाय योजणारा.

युक्तिवता क्रिवि. कौशल्याने; युक्तीने; खुबीने; हुशारीने; लबाडीने. [सं. युक्ति+ वत्]

युक्तिवाद पु. तर्कशास्त्रास अनुसरून नव्हे, पण सामान्य व्यवहारास पटेल असा युक्तीने केलेला वाद.

युक्तिसार वि. बरोबर; योग्य; रास्त; पटण्यासारखे; औचित्याला धरून असलेले.

युग न.१. कृत, त्रेता, द्वापार आणि कली असे विश्वाचे कालमापक मोठाले चार विभाग. २. मोठा कालविभाग; वरील चारही कालविभाग मिळून होणारा काळ; चारही युगांचा काळ. [सं.] वि. चार संख्या (युगे चार मानली आहेत त्यावरून).

युग न. १. जोडी; दोन वस्तू; युग्म; द्वय. उदा. कर्णयुग, वस्त्रयुग. २. जोखड; धुरा. [सं. युग्म]

युगधर्म पु.कालमाहात्म्य; त्या कालातील लोकांची प्रवृत्ती. [सं.]

युगपत क्रिवि. एकत्र; एकदम; एकाच वेळी. [सं.]

युगानुयुग-गे क्रिवि. कित्येक युगांपर्यंत.

युगान्त पु. १. युगाचा शेवट. २. चारी युगांनंतर येणारा प्रलयकाळ.

युगुत वि. युक्त; प्राप्त: 'तयाते योगयुगुतु म्हण।'- ज्ञा ६.३५८.

युगुति स्त्री. तर्क : 'मां आह्मी ठाको हे युगुति। निमले चि कीर।' -ज्ञा १८.१६९६.

युगुल, युगल, युगूळ न. जोडी;द्वय; दोन वस्तू. [सं.युगुल]

युग्म न. १. द्वय; जोडी. २. जोडपे; मिथुन; मेहूण. ३. वाक्यरचनेने व अर्थाने एकत्र जोडल्यामुळे दोन्ही मिळून अर्थ पूर्ण होणारे श्लोकद्वय. ४. (गणित.) प्रमाणात असलेल्या दोन संख्या. (यातील पहिलीस अग्रसर व दुसरीस उपाग्रसर म्हणतात.-ध्वअं १०४.) [सं. युज्=संयोग करणे, जोडणे]

युग्मक न. जीव तयार करणारी पेशी; वनस्पतीतील लैंगिक प्रजननाचे कार्य करणारी पेशी.

युत वि.जोडलेला; संबद्ध; युक्त; एकत्र असलेला. [सं. यु= जोडणे]

युति-ती स्त्री.१.(ज्यो.) चलग्रहांचे एका दक्षिणोत्तर रेषेत जवळ-जवळ येणे.२. मिलाफ ; जोड; एकत्र येणे. ३. (गणित.) बेरीज. [सं. यु]

युद्ध न. १. लढाई; रणकंदन. २. भांडण; मारामारी; झुंज; दोन व्यक्तींचा, पक्षांचा झगडा, लढा, सामना. [सं. युद्ध, युध्=लढणे]

युद्धखोर वि. लढाई, युद्ध करण्यास तयार, उत्सुक; मारामारीची, युद्धाची खुमखमी असलेला; युद्ध व्हावे अशी इच्छा करणारा.

युद्धमान वि.पु.ज्याने युद्ध सुरू केले आहे असा;युद्धात सामील असलेला.

युनानी वि. १.मुसलमानी वैद्यकासंबंधी; यवनी. २. ग्रीक (भाषा व लोक). [फा.]

युनिट न. १. उपयोगात आणलेली वीज मोजण्याचे परिमाण; एक हजार वॅट एक तास जळणे = एक युनिट. २. एक; एकांक; एकम. ३. व्यक्ती; व्यष्टी; एक बीज. ३. मूलमान; मूलपरिमाण; मापनपरिमाण. [इं.]

युनेस्को संयुक्त राष्ट्रसंघाची शैक्षणिक, शास्त्रीय आणि सांस्कृतिक कार्य करणारी संघटना. [इं.]

युनो संयुक्त राष्ट्रसंघ. दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील काही राष्ट्रांनी जागतिक शांततेसाठी निर्माण केलेली संस्था. [इं.]

युयुत्सु-त्सू वि. युद्धास उत्सुक; लढाऊ वृत्तीचा. [सं.]

युरिया न. एक सेंद्रिय पदार्थ. खत म्हणून वापर. [इं.]

युरेजन-जिअन-शिअन वि. हिंदी स्त्री व युरोपियन पुरुष यांच्या संबंधापासून झालेली (संतती). [इं.]

युरेनस पु. आपल्या ग्रहमालेतील सूर्यापासून सातव्या क्रमांकाचा ग्रह; प्रजापती ग्रह. [इं.]

युरेनियम न. किरणोत्सारी धातुस्वरूप मूलद्रव्य; अणुशक्तीचा स्फोट घडवून आणण्यास उपयुक्त. याचा रंग पांढरा असतो. निसर्गात

आढळणाऱ्या मूलद्रव्यांपैकी सर्वांत जड. [इं.]

युरेमिआ पु. रक्तातील युरिआचे प्रमाण. [इं.]

युरोडॉलर पु. युरोपियन युनियनने प्रचारात आणलेले नवे चलन. [इं.]

युरोपियन वि. युरोप खंडातील; युरोप खंडासंबंधी. [इं.]

युक्ष ऊस; 'अग्राकडूनि युक्षरस। मुळा येता आगळा सुरस।'- मुआदि २.५७. [सं.इक्षु]

युवक पु. तरुण.

युवकरण न.पुन्हा तारुण्य प्राप्त करून देणे.

युवति-ती स्त्री. तरुण स्त्री; सोळा ते तीस वर्षांपर्यंत वयाची स्त्री.[सं.]

युवन न.१. यौवन; तारुण्य. २. स्तन. [सं. यौवन; हिं. जोबन]

युवराज-जा पु. १. गादीचा वारस; ज्येष्ठ राजपुत्र. २. राजाने राज्यकारभार चालविण्यासाठी मदतीस घेतलेला व त्याच्या नंतर गादीवर बसणारा राजपुत्र किंवा दुसरा एखादा इसम. [सं. युवराजा]

युवराज्य न. गादीवर बसण्यासाठी नियुक्त केलेल्या मनुष्याचे कर्तव्य आणि स्थान, हुद्दा; पदवी; युवराज हे पद. [सं. यौवराज्य]

युवा पु. १. तरुण पुरुष; तारुण्यावस्थेत प्रवेश करणारा मनुष्य (सोळा ते चाळीस वर्षांपर्यंतच्या पुरुषालाही युवा म्हणतात). २. साठ संवत्सरांतील नववे संवत्सर. [सं.]

युंज स्त्री. २७ नक्षत्रे तीन समभागात विभागली असताना होणाऱ्या भागाचे नाव.

यूका स्त्री. ऊ. [सं.]

यूथ पु. कळप; तांडा; समूह; समुदाय (विशेषत: पशू,पक्षी यांचा).[सं.]

यूथचारी वि. कळप करून राहणारा. [सं. यूथचारिन्]

यूप पु. खांब; स्तंभ; यज्ञस्तंभ. [सं.]

'ये' पासून सुरू होणारे काही शब्द इथे न आढळल्यास 'ए, वे' मध्ये पाहावेत.

ये सना. या; ह्या.

ये उद्‌गा. सलगीचे संबोधन. [सं.ए.]

येउ(ऊ)ते वि. १. एवढे.२.एवढेसे.
क्रिवि. येथे. [सं.यावत्]

येऊनजाऊन क्रिवि. १. प्रसंगाने; कायमचे नव्हे; मधून-मधून यावे अशा प्रकारे. २. सरतेशेवटी; बाकी; शेवटचे कृत्य, उपाय, साधन म्हणून. ३. फार तर. ४. नेहमी; सतत.

येऊल पु. १.मुंग्यांची एक जात. २. पहा : **यऊल** (को., गो.)

येकनपसी वि. एकटा; एकाकी; मदतीला कोणी नसलेला.

येकबेग अ. एकदम; ताबडतोब. [फा.]

येकसर वि. एकजात; ब्रह्म.

येकसुई स्त्री. स्नेह. [फा. यक्सू]

येकाड्या वि. एका छपराचे घर. (झाडी)

येकुणा वि. दीड दुमता.- शर.

येकूल १. रंगभूषा. २. एकटा स्वैर फिरणारा मोठा डुक्कर.

येगमाज तडजोड; स्नेह; क्षमा; कृपा: 'याजबदल राजे नाखूष होत्सातेही येगमाज करून ब्रह्महत्येचा संकोच धरून रजा दिली.'- पेद भाग २५, पत्र क्र. ४२.

येट पु. १. चाकाची लोखंडी धाव. २. तणशीची लांब वेणी.(झाडी) [सं. वेष्टन]

येट-टी स्त्री. मडक्याच्या बुडाशी आधारासाठी ठेवलेली तणशीची बैठक. (झाडी) [सं. वेष्टन]

येटण १. शेतकऱ्याला मशागतीसाठी उपयोगात येणारी साधने. उदा. बैलगाडीचे जू बांधणे, औत जुंपणे इ. साठी नाडा, दोर. २. खुबी; मर्म; युक्ती.

येटणे सक्रि. १. जुपणे; जोडणे. २. वेढणे; ग्रासणे : 'चांद पुनवेचा त्याला येटिल गिऱ्यांन' - राके २६६. - लोसाको

येटाळा पु. मोहल्ला; विभाग. (व.)

येड स्त्री.घोड्यास दिलेला इशारा; प्रेरणा. (क्रि. करणे, देणे.) (व.)

येडगा पु. धनगराचा उपाध्याय.(को.)

येडजाना वि. निरक्षर; अडाणी.

येडधन न. खूप मोठ्या प्रमाणावर आलेले/येणारे उत्पन्न.(अहि.)

येडबडणे क्रि. गोंधळून जाणे; भांबावणे.

येडीकुंटी स्त्री.आऊत.

येडुळ बेडूळ वि. ओबडधोबड. (व.)

येडे न.लिंगायतांनी आपल्या जंगमास (गुरूस) पाठविलेले अन्नाचे ताट.

येणगर न. जोंधळ्याची एक जात.

येणी स्त्री. गंजिफाच्या खेळातील राजाचा वजीर असणाऱ्याकडून पान येण्याचा हक्क.

येणे न.एखाद्याकडून यावयाचा असलेला पैसा; यावयाची रक्कम; उगवावयाचे कर्ज.

येणे अक्रि. १. आगमन करणे;आलेला असणे; दाखल असणे. २. विद्यमान झालेला असणे; प्राप्त होणे.३. एखाद्याजवळ, एखाद्याकडे ओढवणे; समीप जाणे.४. एखाद्याला माहीत असणे; एखाद्याकडून करण्याजोगे असणे; अवगत होणे; जाणणे. ५. उद्‌भवणे; उत्पन्न होणे (राग, लोभ, विषयवासना, दया इ.). ६. बितणे; प्राप्त होणे.७. उत्पन्न होणे; उद्‌भवणे (फुले, फळे,पाने इ.). ८. भरणे; मिळून होणे; बरोबर असणे. ९. उतरणे; योग्य आकारात, स्थितीत दिसणे. १०. होणे; एखाद्या स्थितीला, अवस्थेला प्राप्त झालेला किंवा पोचलेला असणे. ११. संभाव्य, जरूर, उपयोगी, योग्य, उचित होणे. १२. अवलंबणे (मार्ग इ.). १३. पासून निघणे, उत्पन्न होणे, तयार होणे (दुधापासून लोणी इ.). १४. प्रवासाला जाण्याकरता निरोप घेताना 'जाणे ' ह्या अर्थी ह्या शब्दाचा उपयोग करतात, कारण ह्या प्रसंगी ' जाणे' शब्दाचा उपयोग अशुभ मानतात. [सं. यान = गमन करणे]

येणेकडून, येणेकरून क्रिवि. यामुळे; या कारणाने.

येणेनावे क्रिवि. यामुळे.

येताजाता पु. उतारू; मार्गस्थ; प्रवासी.

येता पायऱ्या प्राप्तीचा किंवा अनुकूल काळ. चलती; भरभराट.

येतेकरी पु.१. येणारा मनुष्य. २. शास्त्र, कला इ.त्वरित आत्मसात करणारा मनुष्य.

येथे क्रिवि. या ठिकाणी. [सं. अत्र; प्रा.एत्थ]
येन स्त्री. वीण; जननाचा मोसम; विण्याचा काळ. (व.)
येन न. जपानी नाणे. [ज.]
येनाडी स्त्री. १. येनाचे रान. २. झुडूप. ३. गुरांचा गोठा.
येन्टम वि. बावळट; मूर्ख. (अहि.)
येबिन पु. पौत्र; नातू. [फा.]
येर, येरी–रे सना.१. दुसरा; तो एक; उल्लेख केलेला मनुष्य; अन्य; इतर. २. हा; जवळचा. पूर्ववाक्यात ज्याचा नामनिर्देश केलेला असतो, त्याचा पुन्हा उल्लेख कर्तव्य असता ह्या सर्वनामाचा प्रयोग करितात; तो; हा. [सं. अपर, अवर; सं. अन्यतर–अण्णयर–यर=येरू]
येर स्त्री. हातातील कडे. (झाडी) [सं. वलय]
येरघर न. ब्रह्मस्वरूप.
येरजा (झा) र, येरधार स्त्री. १. कंटाळवाणी व निष्फळ जा–ये; खेप; हेलपाटा. २.(ल.) जन्ममरणाचा फेरा. [येरे+ जारे]
येरजावाई पु. जावयाच्या भावास तुच्छतेने म्हणतात.
येरदेर पु. वारस. (गो.)
येरना क्रि. उकळत्या भातातील पाणी काढणे. पहा : **वेळणे**
येरली स्त्री.१. एका माशाचे नाव.२. धान्याची कणंग. (कु.)
येरवाडी–ळी क्रिवि. लौकर; वाजवीपेक्षा अगोदर. [सं. अपरवेला]
येरवान न. लग्नात वधूवरांकडून परस्परांस येणारा शिधा. (कु.)
येरंडे न.सापाची एक जात.
येरांस पु. १. नातेवाईक मनुष्याची मालमत्ता मिळणे. २. इतरांश; वारसा.
येरिका स्त्री. लव्हाळा; लव्हाळ्याची एक जात.
येरूवास्ता पु. वेळूचा कोवळा कोंब. (झाडी) [सं. वेणुवंश]
येरूव्या स्त्री.अव. चाराएवढी एक प्रकारची आंबटगोड फळे. (व.)
येरूसाती स्त्री.वेळूबनातील अळंबी. (झाडी) [सं. वेणुछत्रिक]
येरे, येरं न. सुकाणू. (गो.)
येरे घुंवडावप मार्गास लावणे; दिशा दाखविणे. (गो.)
येरेभर न. येरे धरून बसण्याचे होडीचे टोक. (गो.)
येऱ्ह, येहर स्त्री. विहीर.– लोसाको
येल स्त्री. घराच्या छताचा मुख्य वासा.(अहि.)
येल–ला न. स्त्रियांच्या दंडावरील एक दागिना: स्त्रियांचे बाहुभूषण; वेला, वेळा. (अहि.)
येल औताला जू बांधण्यासाठी रबरी गोल मांडोळी. ही सायकलच्या टायरसारखी असते. वरून रबर व आतून तारा असतात.
येल(ल्)ची पु. वकील; प्रतिनिधी; तह ठरविणारा वकील. – पया ४५४. [तु.ईल्ची]
येलणे अक्रि. खोड्या, चेष्टा करणे; त्रास देण्याच्या हेतूने वात्रटपणा करणे; वेडेविद्रे चाळे करणे; गमजा करणे. (ना., व.)
येलपाड्या वि. लाडीगोडी लावणारा; चोंबडा. (व.)
येलबा वि. लाडावलेला. (झाडी)
येलबायल्या वि. नपुंसक. (व.)
येलशीपना पु. वाह्यातपणा. (व.)
येलसेल वि. संपूर्ण; शेवटपर्यंत. (व.)
येला पु.विटंबना; अवहेलना: 'माहा जीव गेला । नका करूं माहे येले ।' – वलो ६७.(व.) [सं.हेला]
येलारना क्रि.१. वेलीवर येणे. २. चाळे करणे. ३.आलाप घेणे. (झाडी) [सं. वल्लि]
येली स्त्री. लाकडाच्या लांब ठोकळ्यास चार–पाच उभ्या खुंट्या बसवून कपाशी पेरण्याकरिता केलेले औत. (व.)
येले न. कच्च्या चामड्याची दोरी असलेले नांगराच्या उपयोगाचे औत. हे मांग लोक करतात.
येल्हावणे अक्रि. फाजीलपणा करणे; इत्रावणे. (व.)
येल्हावन १. रडणे. २. गाणे म्हणणे.
येवन्या स्त्री. दु:ख; आपदा. (झाडी) [सं. योनी]
येवशी स्त्री. वेश्या. – लोसाको.
येवंतणे सक्रि.पहा : **वेव(वं)तणे**
येवा पु. १. येणे, आगम, आगमन ह्या अर्थी जावा शब्दाशीच प्रयोग होतो. २. दुसऱ्याकडून येणे असलेला पैसा. ३. (ल.) लाभ; प्राप्ती; मिळालेला नफा. ४. शोभा; लावण्य; रूप; देखणेपणा. ५. योग्यता; शोभिवंतपणा; प्रशस्तपणा (वस्त्रे, भूषणे यांचा).
येवा पु. १. पाण्याचा लोंढा; शेतात जाणारा ओहळ. २. आवक. (झाडी)
येविं क्रिवि. जंव; त्याप्रमाणे : 'एथ कां पां हा उगला। म्हणौनि कृष्णें येविं पाहिला ।'– माज्ञा ११.१५३.
येशेल न. गोडेतेल; खावयाचे तेल; अळशीचे तेल. (व.)
येस स्त्री. झापा, फाटक. (खा. अहि.); पहा : **वेस**
येसकी स्त्री. (कृषि.) मोठी शिवळ. (पुणे)
येसणा वि. इतका; असा : 'ग्रामा येसणा विस्तारू।' – गीता २.२७७. [सं. ईदृश]
येसपार पु. ठावठिकाणा; पत्ता.
क्रिवि. आठवण.
येस(सू)र न.पहा : **वेसवार**
येसवार स्त्री. मसाल्याची आमटी. (व.) [सं. वेसवार]
येसाय स्त्री. तालीम (नाटक इ. कांची). (गो.)
येस्कड् स्त्री. फाटक.(झाडी) [सं. वेष्टन]
येस्की टेकू, आधार.
येळ, येळा न. १. वेळा. २. सोन्याचे अगर चांदीचे कडे.(चंद्रपुरी)
येळवणे न. कटाची आमटी. पहा: **वेळवण**
येळाइतु पु. कैवारी; साह्यकर्ता.
येळिलवाणे वि. ओशाळे : ' येळिलवाणें करूं नये। आपणासी। ' – दास १४.१.५४.
येळील वि. १. अळणी: 'येळील केले।' – दावि ४०. २.ओशाळा; लज्जित. –दावि ४०.३. कंटाळा.
येळोळ सत्कार.
येंग पु.१. चढ; चढाव.(व.) २. तफावत. ३. अडचण. (झाडी)

येंगरट, येंगाड्या वि. बावळट; नेभळट.
येंड न. मासे धरण्याचे एक प्रकारचे जाळे. (को., हेट.)
येंडी स्त्री. तडीस दोघांनी पागण्याचे जाळे. (कु.)
येंडी स्त्री. एरंडी. (व.)
येंबरा पु. वस्तरा घासण्याचा दगड.
यें(हें)वाळे न. पाणसर्पाची एक जात. (को.)
योक पु. गिरदा; खांदेपट्टी: 'योक प्रमाणेंच कापडाच्या लांबींतून कॉलर काढावयाची असते.' – शिकशि १.६०. [इं.]
योग पु. १. जुळणी; जोड; मिलाफ; संग; संयोग; संलग्नता; लग्न. २. परस्परसंबंध; ऋणानुबंध; संगत. (समासात) कालयोग; दैवयोग, प्रारब्धयोग इ. ३. आध्यात्मिक अथवा भाविक भक्ती अगर ध्यान, चिंतन करून होणारे ब्रह्मैक्य; ध्यानपूजा, मानसपूजा, समाधी व त्यासंबंधी नियम व आसने; प्राणायामादिक साधनांनी चित्तवृत्तीचा किंवा इंद्रियांचा निरोध करणे. ४. मार्ग;साधन; आत्मसाधन या अर्थी. भक्तियोग, कर्मयोग, ज्ञानयोग इ.; संक्षेपाने नुसता योग अगर कर्मनिष्ठा. ५. खगोलाचे २७ भाग (ज्यावरून चंद्र-सूर्याचे अक्षांश-रेखांश मोजतात ते). ६. संबंध; जवळ येणे:' ग्रहांचे कालांश (वस्तुत: भोग) सूर्याच्या इतके झाले म्हणजे त्याचा सूर्याशी योग झाला किंवा युती झाली असे म्हणतात.' – सूर्य २३. ७. उपाययोजना ; वस्तूचा उपयोग; विनियोग; कार्यार्थ साधना, प्रयत्न. ८. इष्टता; योग्यता; समत्व. ९. (गणित.) रक्कम; रास; बेरीज. १०. साधन; युक्ती: 'एकच योग (साधन अगर युक्ति) आहे.'-गीर ५६. ११. मिठी; कवळा. १२. कार्यकुशलता. १३. संधी: 'योग बरवा हा पुन्हा घडेना।'– दावि २४२. १४. (वैद्यक.) इलाज; उपाय; औषध. १५. मोठा लाभ: 'मग योग योग ऐसा सहसा उठला वळी महा शब्द ।' – मोकर्ण ७.३५. १६. जारणमारण; जादूटोणा. १७. ईश्वरी संकल्प. १८. समाधिशास्त्र. १९. तत्त्वज्ञान. २०. व्युत्पत्ती; व्युत्पत्तिमूलक अर्थ. २१. सूत्र; नियम; कायदा. २२.(ज्यो.) विशिष्ट तिथी, वार, नक्षत्र यांचे साहचर्य येणे. उदा. रविवारी हस्त आले असता त्यास अमृतसिद्धी योग म्हणतात. [सं. युज्=जोडणे] **० पडणे** – अडचण, चिंता, विचार पडणे : ' नासरजंगाची शरीर प्रकृती स्वस्थतेची नाही. याकरिता योग पडला आहे.'– पेद २८, पृ. ४४.
योगक्रिया स्त्री. बैजिक राशींची बेरीज आणि वजाबाकीने एकत्र केलेली पदे.
योगतारा पु. नक्षत्रातील मुख्य तारा.
योगधर्म पु. कर्तव्य; सद्गुण; योग्याचे विशेष कर्म.
योगनिद्रा स्त्री.विश्वप्रलयानंतरची व विश्वोत्पत्तीपूर्वीची ब्रह्मदेवाची झोप; ईश्वराची निद्रावस्था; योगमाया; सहजस्वरूप स्थिती.
योगपट पु.१. श्रेष्ठ भोग. २. संन्यासदीक्षेचा एक प्रकार; संन्याशाने धारण करावयाची विशिष्ट वस्त्रे. ३. (ल.) संन्यास घेतल्यावर त्यासंबंधी पाळावयाचे नियम वगैरे: 'ते योगपटाची मवणी । जीवीं अनियम चिंतवणी।'– ज्ञा १६.३३२.
योगमाया स्त्री. ईश्वराची मायारूप शक्ती; भ्रम; माया.
योगमुद्रा स्त्री. बद्धपद्मासनाचा एक प्रकार. बद्धपद्मासनात असताना कपाळ हळूहळू जमिनीवर टेकविण्याची मुद्रा.
योगराज गुग्गुल-ळ एक प्रकारचे रसायन;मात्रा.
योगरूढ वि. व्युत्पत्तीने ज्याचा प्राप्त अर्थ व रूढ अर्थ हे जुळतात असा (शब्द).जसे -अंगरखा, जलधर, पंकज, भूधर. काही शब्द यौगिक, काही रूढ आणि काही योगरूढ असतात.
योगसमाधी स्त्री. ध्यानात आत्म्याचा लय.
योगक्षेम पु.न. निर्वाह; चरितार्थ; उदरपोषण.
पु. एखाद्याला हवे असेल ते मिळवणे व मग त्याचे रक्षण करणे.
योगायोग पु. १. दैवगती; अनपेक्षित अशी घडलेली काही गोष्ट; बनाव. २. अनुकूल काळ आणि प्रतिकूल काळ. ३. पूर्वसूचना न मिळता पण योग्य, नेमक्या वेळी घडणारी गोष्ट.
योगारूढ वि. योगी; योगनिष्णात: ' तोच पुरुष योगारूढ म्हणजे पूर्ण योगी झाला.' – गीता ६९४.
योगासन न.योगाभ्यास करणाऱ्या योग्याची विशेष प्रकारच्या पद्धतीने बसण्याची रीत.
योगिनी स्त्री. १. दुर्गादेवीची परिचारिका. २. योगाभ्यासी.३. जोगीण. [सं.]
योगी पु.१. योगसाधन करणारा; योगमार्गास लागलेला मनुष्य. २. योगसाधनेचा उपयोग जादूगिरीच्या रूपाने करून लोकांस चमत्कार दाखविणारा मनुष्य: ' भारतीय वाङ्मयात योगी याचा अर्थ बडा जादूगार असा होतो.'-ज्ञाको (य)६५. ३. (सामा.) संन्याशी अथवा भक्त.
योगे शअ. मुळे.
योगेश्वर पु. १. श्रेष्ठ योगी; सर्वात श्रेष्ठ प्राणी; नावाजलेला योगी. भक्त; संन्याशी; साधू. २.कृष्ण.
योग्य वि. १. शोभेलसे; अनुकूल. २. मान्य; संमत; बरोबर. ३. अनुरूप; उचित. ४. उत्कृष्ट; श्रेष्ठ. [सं.]
योग्यता स्त्री. पात्रता.
योजक वि. १. क्लृप्ती काढणारा; युक्तिवान.२. व्यवस्थापक; योजना करणारा. ३. जोडणारा; लावणारा; संयोजक. ४. (गणित.) मिळवावयाचा; बेरीज करावयाचा (आकडा , रक्कम). ५. (चुकीने) शोधून काढलेले; योजलेले.
योजणूक पहा : **योजना**
योजणे क्रि. १. लावणे;नेमणे; एखाद्याला एखाद्या कामी नेमणे किंवा स्थापिणे. २. व्यवस्था लावणे; उरकणे; रचणे. ३. विचार करून ठरविणे; शोध लावणे; डोक्यातून काढणे; युक्ती काढणे; साधन मिळविणे ; एखादी गोष्ट अशी अशी, या या प्रकारे करावी इ.ठरवणे. ४. निश्चय करणे; निश्चित करणे; नेमणे; नेमस्त करणे. ५. देणे; ठेवणे: 'यदुच्या देहीं जरेसि योजीन।'– मोआदि ११.६४. ६.आश्रय करणे: 'जें बुद्धियोगा योजिलें। तेंचि पारंगत चाहले।' –ज्ञा २.२२७. [सं. युज्=योजना करणे]
योजन न. १. रस्त्याची लांबी अगर अंतर मोजण्याचे माप; चार कोस; नऊ मैल.(कित्येकांच्या मते ५ मैल.) २. योजना; बेत इ.[सं.]
योजना स्त्री. १. व्यवस्था; रचना; ठराव. २. बेत; धोरण; अंदाज; कल्पना; संकल्प; युक्ती. ३.नेमणूक; लावणे; जोडणे; रुजू करणे. ४. मोठ्या कार्यासाठी कामाचे तपशील व क्रम ठरवणे.

योजित वि. १. रचलेले; ठरविलेले; उपयोगात आणलेले. २. हुडकून काढलेले; शोधलेले; मनाने ठरविलेले; संकल्पित. ३.जोडलेला; लावलेला; नेमलेला; निश्चित, नेमस्त केलेला; जुळलेला; जुळविलेला. [सं.]

योज्य वि. १. योजण्यास योग्य. २. (गणित.) जीत काही रक्कम, संख्या मिळवावयाची आहे अशी (संख्या). [सं.]

योध पु. योद्धा; वीर: ' हरुनि यशो-धन गो-धन योध अगणित क्षयासि नेऊन।' -मोविराट ६.५२.

योधसंराव पु. युद्धतयारीच्या सुरुवातीस सूचना देण्याचा आवाज; शंख फुंकणे; लढाईत स्फुरण येण्यासाठी ओरडण्याचा शब्द (हरहर महादेव इ.). [सं.]

योद्धा पु . शूर पुरुष; वीर; लढाऊ शिपाई; लढवय्या. [सं.]

योनि-नी स्त्री. १. स्त्रियांचे जननेंद्रिय. २. जन्मस्थान; झरा; उगम; त्या त्या पदार्थाचे उत्पत्तिकारण. ३. जगाचे निमित्त कारण (ईश्वर, काल, स्वभाव इ.). ५. होमकुंडाच्या मेखलेस पश्चिमभागी केली जाणारी शाळुंकेसारखी आकृती. [सं.]

योनिनासा पु. स्त्रीजननेंद्रियाचा भाग.

योनिभ्रंश पु. योनी बाहेर येणे. [सं.]

योनिसंकर पु. उत्तम,अधम वर्णाचा मिलाफ; मिश्र संतती; जारज उत्पत्ती.

योवणे सक्रि. उचलणे; तोलणे:' सिंगी योउनि कविळासपुरी। घालील ऐसे मोहोरां ' -उह १३२५.

योषा, योषित्, योषिता स्त्री. १. स्त्री. २. व्यभिचारी स्त्री; अपतिव्रता. [सं. युष्= सेवा, चाकरी करणे]

यौक्तिक वि.१. कृत्रिम; बौद्धिक; कसबाचे.२. सामासिक अथवा संयुक्त (शब्द अथवा प्रत्यय). जसे : - देवभक्त, विद्वान. ३. योगविषयक. [सं.]

यौगिक वि. प्राकृतिक; प्रत्यय किंवा इतर अनेक अर्थवंत शब्द यांचा परस्पर योग होऊन अवयव शक्त्यनुरोधाने अर्थ होण्याजोगा सिद्ध झालेला (विशिष्ट शब्द); शब्दावयवांवरून निघणारा (अर्थ).

यौतक न. स्त्रीधनाचा एक प्रकार. [सं. युज्, युति]

यौतिक मास नक्षत्रप्रदक्षिणेनंतर सूर्याची युती होण्यास चंद्राला २ दिवस ५ तास आणखी लागतात. ह्या कालास यौतिकमास किंवा चांद्रमास म्हणतात. हा मास २९ दिवस, १४ तास आणि १४ मिनिटे ह्यांनी पूर्ण होतो.

यौवन न. तारुण्य; वयात येणे; पूर्ण वाढ (शरीराची). [सं.]

यौवनकंटक-पीटिका पु. स्त्री. तरुणपणी कफ , वात, पित्त यांपासून शेवरीच्या काट्यासारखे तोंडावर येणारे फोड अगर पुटकुळ्या; मुरमे; तारुण्यपीटिका. [सं.]

यौवराज्य न.युवराजाचे म्हणजे राज्याचा जो कायदेशीर वारस त्याची कर्मे, कर्तव्ये किंवा अधिकार; युवराजाचे पद किंवा अधिकार. [सं.]

■■■



र मराठी वर्णमालेतील बेचाळिसावा वर्ण व सत्ताविसावे व्यंजन.

र स्त्री.रड; रडणे या अर्थी संकेताने; किंकाळणे; रडणे : 'करि बहु ज्यातें मानुनि पतितेज:सारपुंज राका र।'– मोअनु ३५५. (वा.) **र चा पाढा वाचणे, र चे गाणे लावणे, सांगणे, मांडणे**– १. दुबळेपणा दाखवणे. २. कसा तरी काळ कंठणे. ३. पोरकटपणे वागणे.

रईबुट्टा पु. भाताची एक जात.

रई(ही)स पु. १. सरदार; जहागीरदार. २. श्रीमंत, मोठा माणूस. ३. राहणारा; रहिवासी. (व.)
वि. शौकीन; मिजासी. [अर.]

रकटा पु. १. दोरा; आगवळाकरिता वापरावयाचा दोऱ्याचा किंवा रेशमाचा, केळीच्या सोपाचा, गंगावनाचा तुकडा, गवताची पात, चिंधी वगैरे. २. करगोट्याकरिता वळलेला दोर वगैरे.

रकटे न. १. फाटके घोंगडे, कांबळे. २. लक्तरे; जुने, फाटके वस्त्र. ३. (तुच्छतार्थी) जुना शेला, धोतर, उपरणे इ.
[क. रद्दु =जाडेभरडे कापड]

रकबा पु. १. (अप. रुकबा) गावाभोवतालची जमीन; गाव, खेडे, परगणा वगैरेंची हद्द अगर प्रदेश; किल्ल्याच्या सभोवतालचे मर्यादित क्षेत्र. २. गुलाम; बंदी.[अर.रकबह = गळ्याभोवतालची कडी, साखळी]

रकबा बंदी गावच्या जमिनींची (पडीत, वहीत, इनामी इ.) माहिती देणारा तक्ता, कागद; जमाबंदीचा तक्ता.

रकमपात स्त्री. दागदागिने.

रकमबंद–वार क्रिवि. एकेक बाब घेऊन; कलमवार; अंशाअंशाने.

रकमाला पु. १.बाबींची, जिनसांची यादी; वस्तूंचा हिशेब. २. जमाबंदी; जमीनमहसुलाचे हिशेबपत्र.

रकमी वि. १. ठरावीक; निश्चित; कायम (जमाबंदी). २. कलमी.

रकस १. कलावंतिणीचा नाच. २. नर्तिका.

रकाणा पु. दाण्यात रस भरण्याच्या वेळचा पिकातील दाणा; कणीस भरण्याच्या वेळचा दाणा.

रकाना पु. कागदास उभी घडी पाडून अगर आखून केलेला भाग; कागदाचा उभा भाग; स्तंभ; वर्तमानपत्रातील स्तंभ; (इं.) कॉलम. [अर.रुक्न्=स्तंभ] (वा.) **रकान्यास आणणे, येणे** – बरीच किंमत आणणे, येणे; हिशेबात लिहून ठेवण्याइतकी किंमत आणणे, येणे.

रकाना–णा पु. माज; उन्मत्तपणा. (व.)

रकार पु.१. रडगाणे; रडणे; र करणे; बोंबलणे. २. ईर्षेचा अभाव व त्यामुळे येणारा ढिलेपणा. ३. अपयश; नाश; ओंफस (काम, योजना इ.चा.). (क्रि.होणे, करणे.)

रक्क(क)म स्त्री. १. हिशोबाची बाब; कलम; गोष्ट; अंकराशी. २. खूण; चिन्ह; हस्ताक्षर; लेख. ३. जात; प्रकार; तऱ्हा. (व.) ४. चीजवस्तू; डाग; दागिना. ५. विशिष्ट द्रव्यसंख्या, आकडा; परिमित द्रव्य; ऐवज. ६. पोटगी; भत्ता; खर्ची. ७. कोणत्याही पदार्थांचे विशिष्ट प्रमाण. ८. तह, ठराव, करार वगैरेंचे कलम. – पया ३२०. ९.अट; मुद्दा. [अर.रक्म्] (वा.) **रकमेवर ठेवणे** –जागच्या जागी, दाबात ठेवणे. **रकमेस येणे** – १. किंमतवान होणे; मूल्यवान होणे. २. हिशेबात धरण्याइतकी किंमत येणे; व्यापार, देवघेव अगर व्यवहार वगैरेची किंमत निश्चित होणे; मूल्य ठरविण्याइतके निश्चित स्वरूप प्राप्त होणे.

रक्ट(क्टा) ण–न न. (विणकाम) वशारण्याच्या गाठी दिल्यावर दोन बोटे इतका विणलेला लुगडे इ. वस्त्राच्या करळ्यांचा भाग.

रक्त न. पृष्ठवंशीय प्राण्यांच्या धमन्या व नीलांतून वाहणारा तांबड्या रंगाचा द्रव; शरीरातील एक द्रवरूप धातू.
वि. १. रक्तासारखा लाल; लालभडक. २. रंगविलेले; रंगीत. ३. आषक; अनुरक्त; सवय, लळा, ओढा असलेला. [सं.] (वा.) **० आटविणे, रक्ताचे पाणी आणि हाडाचे मणी करणे** –१. फार मेहनत करणे. २. अतिशय इमानाने आणि मेहनतीने काम करणे. **रक्ताची आण** –(ल.) निकराची शपथ; पहा : **बंदाखाली बसणे**

रक्त शाई. [फा. रख्त]

रक्तओढ स्त्री. रक्त पडते अशी हगवण; रक्त जाणे.

रक्तकणिका स्त्री. रक्तातील वर्तुळाकार व मध्यभागी अंतर्वक्र असणारा लहान कण.

रक्तकंठ पु. कोकीळ पक्षी.

रक्तकांचन पु.एक डोंगरी झाड; तेंटू, तेंतू.

रक्तगोलक पु. (शाप.) रक्ताचा थेंब, बिंदू इ.; (इं.) ब्लड ग्लोब्यूल.

रक्तचंदन पु. एक वृक्ष; तांबडा चंदन; याच्या बाहुल्या, खेळणी इ.करतात.

रक्ततालू वि. घोड्याचा एक प्रकार : 'ताळूचे ठिकाणीं तांबडा, दारूप्रमाणें नेत्र; मानेवरील केस आरक्तवर्ण आणि बाकी सर्व अंग तांबडें अशा घोड्यास रक्ततालू म्हणतात.' – अश्वप १.२३.

रक्तधातु–तू पु. तांबडा खडू; तांबडा हरताल.

रक्तनेत्र वि. तांबडे, लाल डोळे असलेला (घोडा). हे अशुभ चिन्ह होय.

रक्तप–पा पु. स्त्री. १. राक्षस. २. ढेकूण. ३. जळू. [सं.रक्त + पा = पिणे]

रक्तपरमा–में पु.न. जननेंद्रियाचा रोग; शिश्नाद्वारे रक्त वाहण्याचा आजार. [सं.रक्तप्रमेह]

रक्तपात पु. खून; कापाकापी; मारामारी; कत्तल; रक्त सांडणे. [सं.]

रक्तपिती स्त्री. महारोग; महाव्याधी; गलतकुष्ट रोग. [सं.]

रक्तपित्त पु.न. नाक, तोंड इत्यादीतून रक्तस्राव होणे.

रक्तपेढी स्त्री. वेगवेगळ्या गटाचे रक्त संग्रही ठेवणारी व मागणीनुसार उपलब्ध करून देणारी संस्था.

रक्तबं(बों)बाळ वि. रक्ताने भरलेला, माखलेला; अंगातून अतिशय रक्त वाहत असलेला.

रक्तबाऊ–हु पु. सन्निपात ज्वर. अंगावर तापाचे तांबडे चकंदळे उठणे.

रक्तबिदी स्त्री. रक्ताने माखलेली जमीन.

रक्तबीज पु. १. ज्याच्या रक्तापासून नवीन असुर उत्पन्न होई असा एक असुर. २. ढेकूण. ३. (ल.)तांबडे दाणे असलेले डाळिंब. [सं.]

रक्तबोळ पु. एका झाडाचा औषधी तांबडा डिंक, गोंद.

रक्तमान्य वि. लढाईमध्ये केलेल्या कार्याबद्दल, झालेल्या जखमांबद्दल

बक्षीस दिलेल्या, सारा माफ (जमिनी).

रक्तमुखराग पु. (नृत्य.) वीर, रौद्ररस किंवा मद्याची धुंदी दाखविण्याची तोंडावरील लाली, तेज.

रक्तमोक्षण न. शरीरातील नासके, गोठलेले, साकळलेले रक्त फासण्या टाकून किंवा जळवा लावून शरीर बाहेर काढणे.

रक्तमाँडळी स्त्री. एक जातीचा साप. हा चावला असता तोंडातून रक्त वाहते. (गो.)

रक्तरोडा-रोह(हि)डा पु. एक प्रकारचे झाड, औषधी वनस्पती; रगतरोडा. पाने भोकरीच्या पानासारखी, फळे मिऱ्याहून मोठी, गोल व तांबड्या रंगाची असतात. [सं.रक्तरोहितक]

रक्तवान पु. १. शाई विकून निर्वाह करणारा. २. घराला शाई पुरवणे, द्रोण, पाने आणून जेवणाचे वाटप करणे या कामावरचा घरचा नोकर. - वाडबाबा १.९३.

रक्तवाहिनी स्त्री.जीमधून रक्त वाहत असते अशी शरीरातील शीर, नलिका. [सं.]

रक्तविकार, रक्तविपाक पु. रक्तदोष; रक्तातील बिघाड. [सं.]

रक्तशोषक वि. १. रक्त शोषून घेणारा (प्राणी). २. (ल.) जुलमाने पैसे उकळणारा.

रक्तशोषण न. १. (आजारामुळे) रक्त कमी होणे; अंगातील रक्त कमी करून कृश करणे. २. (ल.) लोकांकडून त्यांच्या शक्तीबाहेर पैसे उकळणे. [सं.]

रक्तसंक्रमण न. निकोप व्यक्तीचे रक्त दुसऱ्या गरजू व्यक्तीला देणे.

रक्तसंहती स्त्री. रक्तजलाचे प्रमाण कमी झाल्यामुळे तांबड्या पेशींच्या संख्येत होणारी वाढ.

रक्तसांड स्त्री. फासण्या टाकून रक्त काढणे. (को.)

रक्तस्राव पु. रक्त जाणे, वाहणे. [सं.]

रक्ता वि. (संगीत.) पंधराव्या श्रुतीचे नाव. [सं.]

रक्ताचोवर क्रिवि. रक्तबंबाळ. (झाडी.)

रक्ताभिमान पु. एका रक्ताच्या नात्यांचा, सगोत्रतेचा अभिमान, जागृती; जातीचा जागतेपणा.

रक्तार्श पु. रक्ती मूळव्याध. शौचाच्या वाटेने रक्त पडणे. [सं.]

रक्तावरोध पु. रक्त वाहायचे थांबणे; रक्ताचे अभिसरण होण्याचे थांबणे; रक्ताचा विशिष्ट जागी संचय होणे. [सं.]

रक्ताशय पु. शरीरातील रक्तसंचयाची जागा; हृदय. [सं.]

रक्तासन न. तांबड्या दुपारीचे झाड.

रक्ताक्ष वि. १. तांबड्या लाल डोळ्याचा (घोडा). २. तांबडा; लाल (मोती, रुद्राक्ष). [सं.]

रक्ताक्षी पु. साठ संवत्सरांतील अठ्ठावन्नावे संवत्सर.

रक्तांक पु. रक्तामधील प्रत्येक घनमिलिमीटरमध्ये आढळणाऱ्या लाल अगर पांढऱ्या रक्तपेशींचे निश्चित केले जाणारे प्रमाण.

रक्तांजनी वि. एकरंगी पांढरा असून डाव्या कुशीवर फक्त तांबडी टिकली असलेला (घोडा). - अश्वप १.९७. [सं. रक्त + अंजन]

रक्ति-क्ती स्त्री. १.अनुराग. २. रंग. [सं.]

रक्तिका वि. (संगीत.) सातव्या श्रुतीचे नाव. [सं.]

रक्तिमा पु. तांबडेपणा; लालपणा; लाली. [सं.]

रक्तिया वि. लाल रंगाची छटा असलेला (हिरा). हा अशुभ मानतात.

रक्ती स्त्री. १.अपघाताने गोठलेले रक्त. २. बाळंतिणीच्या बाराव्या दिवशी बकऱ्याच्या रक्तात गरम पाणी व मसाला मिसळून केलेला पदार्थ.

रक्ती-क्त्या मूळव्याध पहा : **रक्तार्श**

रक्सा पु. मळणी करून कणसे गोळा केल्यानंतर खाली गळालेले धान्य.

रख वि. (सांकेतिक) (भाजीपाला बाजार) तीन ही संख्या.

रखडणी स्त्री. रेंगाळत चालणे, काम करणे, रेंगाळणे; रेंगत चालणे.

रखडणे क्रि. १. कष्टात दिवस काढणे; कसे तरी चालणे; ढकलणे; खितपत पडणे; एखादे कार्य धड न होता त्यातून आपली सुटका होणार नाही अशा कंटाळवाण्या स्थितीत राहणे. २.भटक्या मारणे. ३. दुखण्यात खितपत पडणे. ४. ढुंगणाने सरकत जाणे; खुरडणे. [ध्व. खरडणे वर्णव्यत्यास]

रखडपट्टी-पाटी स्त्री. भटकणे; हिंडणे; (एखादी गोष्ट मिळवण्यासाठी केलेली) त्रासदायक पायपीट.

रखतवाणी स्त्री. मजूरकाम.

रखमंडळ न. १. राख पसरलेली जागा. २.(ल.) घाण जागा; उकिरडा.

रखरख स्त्री. १. कडक ऊन; आग; भकभक; धगधग; तीव्र उष्णता. २. रोगामुळे पोटात पडणारी आग; खाखा. ३.तीव्र भूक किंवा शोष.

रखरखणे अक्रि. १. रखरख होणे; प्रदीप्त होणे; जळजळीत असणे. २. घसा कोरडा होणे; अतिशय भूक किंवा तहान लागणे. ३. तीव्र दाह, आग आग होणे; तापणे. ४.रुक्ष, शुष्क होणे (जमीन, प्रदेश).

रखरखाट पु. १. पहा : **रखरख** २,३. २.रुक्षता; शुष्कपणा; रखरखीतपणा (प्रदेश इत्यादीचा). [रखरखचा अतिशय]

रखरखीत वि. १.स्निग्धांशविरहित; कोरडा; भरभरीत; कठीण (खाण्याचा पदार्थ). २. कोरडा; नापीक; निर्जल; थंडावा नसलेला (प्रदेश, प्रांत). ३. धगधगीत; अतिशय तप्त.

रखवालदार पु. रक्षक; राखण करणारा; पहारेकरी. [सं.रक्ष्=राखणे; प्रा रक्ख; देप्रा. रक्खवाल; हिं. रखवाला]

रखवाली स्त्री. राखण; पहारा; संरक्षण, संभाळ.

रखा पु.जागल्या :'मुलकी खात्यामार्फत ठेवलेले रखे.'-(बडोदे) स्वारीनियम. २.६. [सं.रक्षा; प्रा. रक्खा]

रखा स्त्री. राख; भस्म. (को.) [सं.रक्षा; प्रा. रक्खा]

रखाखणे अक्रि. फार धगधगणे.

रखाडी स्त्री. राख.

रखाद-त स्त्री. रद्दी.(व.) [फा.रख्त=माल, सामान]

रखी स्त्री. खंडणी : 'तलहेटी दिल्लीचे सदर महाली रखी म्हणजे खंडणी दरसाल घेतात.'- मशियाका ४७३.

रखेली स्त्री.१. राख. २.उपपत्नी; बाळगलेली स्त्री. ३. नाटकशाळा.

रख्त पु.न. १.जिंदगी; सामान. २.कापडचोपड.[फा.रख्त् =मालमत्ता]

रख्तखाना १. कापडखाना. २.सरकारी कचेरी, कोठी.

रख्तवीन पु. शाई तयार करणारा. [फा.]

रख्या स्त्री. रक्षा; राख; होमकुंडातील राख; विभूती; भस्म. (अहि.)

रग स्त्री. १. इंगा; नांगा. २. ईर्षा; मिजास; मस्ती; जोर; गुर्मी; ताठा, मग्रूरी. (क्रि. जिरणे, उतरणे इ.) ३. उत्साह; जोर; सहनशक्ती. ४. तीव्रता; कडकपणा; प्रभाव; वेग; सोसाटा. जसे :- पावसाळ्याची, वाऱ्याची रग. ५. कळ; वेदना; दु:ख; अवघडणे. (क्रि. लागणे, येणे.) ६. धमनी; नस; स्नायू; शीर; नाडी. ७. वेदना; पोट, हातपाय, डोके, डोळे इ. अवयवांमध्ये सारख्या येणाऱ्या कळा.[फा.रग = धमनी] (वा.) ० **लावणे** - तगादा लावणे.

रगटा-टे पु.न.पहा : **रकटे**

रगड स्त्री.भरपूरपणा; (सामा.) रगडा; चंगळ; वैपुल्य.
वि. भरपूर; मुबलक. [अर. रघद्=विपुलता]

रगड स्त्री. पाणी भरावयाची कावड.

रगडणी स्त्री. विणून झालेले कापड गुंडाळण्याचा रूळ फिरविणारे लाकूड.

रगडणे सक्रि. १. (काही पदार्थ) चेपणे; दडपणे. २. लाटणे; बळकावणे. ३. दाबणे; जोराने चोळणे; मालिश करणे. ४. खाणे. उदा. 'त्याने पंचवीस लाडू रगडले.' ५. निष्काळजीपणाने करणे. ६. घासणे; पीठ करणे; चिरडणे. ७. दटावणे : 'सांगेल कोण दुसरा भीष्महि सांगेल ज्या न रगडूनी।'-मोउद्योग १.१९. ८.नाश करणे; मारून टाकणे.

रगडणे क्रि. चावणे.

रगडपट्टी स्त्री. १.चंगळपट्टी; भरपूर पुरवठा; विपुलता. २.दडपशाहीचे, कसे तरी उरकलेले, धसमुसळेपणाचे काम; धडपड.

रगडमल्ल वि. १. दांडगा; रानवट; युक्तीचा उपयोग न करता केवळ शरीरबळाने काम करणारा; ओबडधोबड. २.ज्यात नाजूकपणा, सुबकता नाही आणि सामान्य रीतीपेक्षा आकाराने जो मोठा आहे असा (दागिना, पदार्थ, पात्र, वस्त्र इ.).

रगडा पु. १. लहान जागेत अनेक माणसे जमली असता होणारी दाटी; चेंगराचेंगरी. २.रस काढायचा चरक. ३. कुचंबणा; अव्यवस्थित कारभार. ४.नाश. ५. ढीग; मोठे ओझे; भार; घाई वगैरे. ६.उखळातील उभा वरवंटा; वाटण्याचा दगड.

रगडा पु. मल्लखांबावरून खाली उडी टाकताना हात सोडल्यावर मानेस वर दिलेला हिसडा: 'मल्लखांबास छाती टेकून ती हिसका मारून वर उचलावी या क्रियेस रगडा मारणे म्हणतात.'- व्याज्ञा ३.५१.

रगडा पु. १. चूर्ण; मर्दन; चुराडा. २. एक खाद्यपदार्थ; दाटसर रस्सा.

रगडून क्रिवि. १. खूप जोराने. २. मनमुराद. ३. आवेशाने.

रग(गा)ड्या वि. १. आडदांड; दडप्या; गर्दीतून, अडचणींतून वाट काढणारा. २. विचित्र; बेफिकीर; ओबडधोबड काम करणारा.

रगतरोटी स्त्री. (रक्तात केलेली भाकरी) १. (ल.) सैन्यातील नोकरी; जीमध्ये जीव धोक्यात असतो अशी नोकरी. २. (ल.) लढाईत केलेल्या कामाबद्दल मिळालेले वतन इ.

रगदार वि. १. जोरदार; पाणिदार; मस्त; रंगेल; उन्मत्त; मिजासखोर; ऐटबाज. २. जिवंत; उत्साही; ईर्षेबाज, तगडा (मनुष्य, पशू इ.).

रगदारी स्त्री. उत्साह; ईर्षा; कस;जिवंतपणा; चैतन्य.

रगबा पु. पहा : **रकबा**

रगमोड स्त्री. गर्वहरण; मानहानी; मस्ती घालविणे- जाणे.

रगरगा वि. सुदृढ; ताजे.

रग(घा)स न. गुठे; दिंड; शेत नांगरल्यानंतर डिखळे फोडण्याचा औत. (राजा.)

रगळी स्त्री. पिरपिर; कुरकूर; रडगाणे. [ध्व.]

रगाटणी स्त्री. मागाचा एक भाग; फणीतून धागे ओवल्यानंतर जिला बांधतात ती काठी.

रगाडा-डी पु.स्त्री. १.गर्दी. २. उसाचा रस काढण्याचा चरक.

रगावनं अक्रि. मस्त, मगरूर होणे.

रगेल वि. १. अंगात पुष्कळ रग असलेला (मनुष्य, घोडा). २. ताठलेला; गर्विष्ठ; मस्त; गुर्मीखोर; अहंमन्य; मिजासखोर; बेगुमान.

रघटले न. वेळूचा पाळणा. (बे.)

रच पु. १. ढीग; रचना; रचाई. २. रचण्याची क्रिया. ३. रचलेली वस्तू. ४. रचून केलेला ढीग किंवा केलेली रास. [सं.रच् =रचना करणे]

रचणावळ स्त्री. जुळवण्याची, एके जागी ठेवण्याची मजुरी, किंमत.

रचणी, रचणूक स्त्री. १. रचण्याची क्रिया. २. रचना; व्यवस्था; व्यवस्थित लावणे. [सं.रचना]

रचणे उक्रि. १. मांडणे; जुळवणे; व्यवस्थितपणे ठेवणे; उरकणे. २. पदार्थाच्या एका थरावर दुसरा, दुसऱ्यांवर तिसरा अशा प्रकारे वस्तूंची रास करणे. ३. उभे करणे; उभारणे; मांडणे. ४. शब्दांची, विचारांची योग्य प्रकारे मांडणी, जुळणी करून ग्रंथ, श्लोक इ. निर्माण करणे; (कादंबरी, गोष्ट, बनावट हकिकत इ.) आपल्या कल्पनेने सांगणे, लिहिणे. ५. (माप, योजना) ठरविणे; आखणे.
अक्रि. तन्मय होणे : 'तूं संत स्तवनीं रचसी। तरी कथेची से न करिसी ।' - ज्ञा ५.१४१. [सं.रच् = रचना]

रचना स्त्री. १. वस्तूंची वगैरे व्यवस्थित मांडणी; वस्तू एकावर एक किंवा एकापुढे एक ठेवणे. २. घर, मांडव, भिंत, गवताची गंजी इ. ची उभारणी. ३.कल्पनेने निर्माण केलेली काही वस्तू, गोष्ट इ. ४. ग्रंथ, मसलत, श्लोक इ. ची उत्तम प्रकारची जुळणी. ५. घटना; जुळणी; स्वरूप; घडण. ६.हार, दागिना, यंत्र इ. चे भाग विशिष्ट प्रकारे जुळवून त्यांची विशिष्ट प्रकारे केलेली जुळणी. ७. मांडणे, बनविणे, उभारणे, निर्मिणे, जुळविणे, घडविणे, गुंफिणे इ. क्रियांनी झालेला किंवा अस्तित्वात आलेला पदार्थ. [सं.रच्]

रचनास्वत्व न. छपाई हक्क; प्रकाशनाधिकार; (इं.) कॉपीराईट.

रचनांतरण न. परिवर्तन; रूपांतर.

रचभर वि. लवलेश.

रचमेच पु. उपद्व्याप : 'जया रचमेचची भीति। सदा जनेशी संगती।'- ज्ञाप्र २३५.

रचयिता वि. रचना करणारा. [सं.]

रचलेपणा पु. स्थिरपणा; सुखरूपता : 'म्हणे पावो धडफडील। तरी स्वामीची निद्रा मोडैल । रचेलपणा पडैल । झोती हन।'- ज्ञा १३.२५६.

रचाई स्त्री.१. रचण्याची क्रिया; सरणी; त्यामुळे झालेला पदार्थ. २.अशा

सिद्धतेसाठी द्यावे लागलेले द्रव्य. ३.व्यवस्था; तजवीज; व्यवस्थित लावणी; जुळणी. ४.रचना; मांडणी; उभारणी.

रचावा पु. रचना.

रचित वि. १.रचलेला; जुळविलेला; मांडलेला; व्यवस्थित ठेवलेला, लावलेला. २. योजलेले; बेत केलेले; जुळविलेले; बांधलेले (पुस्तक, कविता, फुले वगैरे); आखणी; अंदाज केलेले. [सं.]

रचित्र न. मूळ वस्तूप्रमाणे पण अस्सल नव्हे अशी वस्तू बनविणारा.

रचोरची क्रिवि. घाईने.

रच्चक स्त्री. भडिमार; एकसारखा मारा. (व.)

रज पु. न. १. धुळीचा कण; धूळ. २. फुलांतील परागाचा कण. ३. सोने इ. चा एक बारीक कण. ४. सत्त्व, रज, तम या त्रिगुणांतील दुसरा गुण. ५. स्त्रियांचा मासिक विटाळ. ६.घासून साफ करण्यासाठी वापरायची पूड.[सं.] (वा.) **रजाचा गज करणे–** १.अतिशयोक्ती करणे; थोड्याचे अति करणे. २. पुष्कळ काळ पोसणे; लहानाचे मोठे करणे.

रज(जा)ई स्त्री. लेप; दुलई; उबदार पांघरूण; दोन कपड्यांच्यामध्ये कापूस घालून शिवून पांघरण्यासाठी केलेले वस्त्र. [फा.रजाई]

रजई स्त्री. रूजवात; आधार : 'पंचायतीमध्ये कागदपत्राचे रजईने न बोलावे.'– ऐको.पुर.

रजक पु. धोबी; परीट. [सं.]

रजकिनी स्त्री. परटीण नावाची पक्षीण.

रजगाड्या वि. घाणेरडा.(झाडी)

रजगी स्त्री. विक्रीला अयोग्य अशा, मोड म्हणून आलेल्या सर्व जिन्नसांची खिचडी, मिसळ, भेसळ.

रजगुडाई स्त्री. लाडीगोडी. (व.)

रजत न. चांदी; रुपे. [सं.]

रजतपट पु. सिनेमाचा पडदा.

रजतमहोत्सव एखाद्या महत्त्वाच्या घटनेला, संस्थेच्या स्थापनेला २५ वर्षे पुरी झाली म्हणून करण्यात येणारा समारंभ; रौप्य महोत्सव.

रजतवणी स्त्री. रुपेरी, चांदीचा मुलामा.

रजनी स्त्री. आरसा घासण्यासाठी केलेली राखेची किंवा इतर द्रव्याची पोटळी.

रजनी स्त्री. रात्र; निशा. [सं.]

रजनी स्त्री. हळद. [सं. रंजनी]

रजनीमुख न. प्रदोष; संध्याकाळ; संधिप्रकाश. [सं.]

रजपज स्त्री. सर्वसाधारणपणा; मर्यादितपणा; माफकता. [रज द्वि.]

रजपजचा,रजापजाचा,रजपताचा वि.माफक; मर्यादित; हलका.

रजपूत पु.राजपुतान्यातील एक हिंदू जात व त्या जातीतील व्यक्ती. [सं. राजपुत्र]

रजब पु. मुसलमानी वर्षाचा सातवा महिना. [अर. रजब्]

रजबन रेजिमेंट.

रजबली–ल्ली स्त्री. रदबदली; मध्यस्थी.

रजस्वला वि. स्त्री. विटाळशी; ऋतुमती; ऋतुस्नात.

रजा स्त्री. १. एखाद्या कार्याविषयी एखाद्याची अनुमती; संमती; आज्ञा; परवानगी : 'तेतून जैसी रजा सादीर होईल, त्याप्रमाणे वर्तणूक केली जाईल.' – मइसा ८.७. २. सुटी; नोकरास नोकरीवरून काही काळ किंवा पूर्णपणे दिलेली मोकळीक. ३.एखाद्याला आपल्या जवळून इतरत्र जाण्यास दिलेली परवानगी. ४. नियमित सरणीने चाललेल्या कामात विश्रांतीसाठी, करमणुकीसाठी किंवा अन्य उद्देशासाठी झालेला खंड; चालू कामात विश्रांतीसाठी ठेवलेला वेळ. [अर.रझा]

रजा पु. खत.(झाडी) [सं.रज]

रजाचिठी–ट्ठी–ड्डी स्त्री. १. अनुज्ञा; परवानगी. २. घालवून देण्याचा हुकूम ज्या कागदावर लिहिलेला, नोंदलेला असतो असा कागद. ३. गैरहजेरीबद्दल लेखी परवानगी, पास; रजेचा अर्ज.

रजामं(वं)द वि. कबूल. [फा. रिझामन्द]

रजावंती, रजावं(मं)दी स्त्री. १. संमती; मर्जी; खुशी. २. समजूत. ३. परवानगी; स्वतंत्रता; मोकळेपणा. ४. आपखुशी; स्वसंमती. [फा.रिझामन्दी]

रजिस्ट(ष्ट)र न. १.नोंदवही; नोंद. २.पोस्टाकडून पावती घेऊन जोखमीचे कागदपत्र पोस्टाच्या विशेष संरक्षणाने पाठवण्याची सोय. [इं.]

रजी स्त्री. धूळ; धुराळा. [सं.रज]

रजोगुण पु. सत्त्व, रज, तम या तीन गुणांपैकी दुसरा. कामक्रोधादी मनोविकार या गुणाच्या प्राबल्याने उत्पन्न होतात. [सं.]

रजोगुणी वि. ज्यामध्ये रजोगुण पुष्कळ व प्रधान आहेत असा; विकारी; विषयी; कामुक. [सं.]

रजोदर्शन न. अगदी पहिले विटाळशीपण; ऋतुप्राप्ती; न्हाण. [सं.]

रज्ना क्रि. जमीन सुपीक करणे. (झाडी)

रट पु. लोंढा; लोट : 'चार हजारांचा रट एकदाच आला.'–ऐलेसं ४४.१.

रटणे अक्रि. १. बेडकाचे ओरडणे. २. ओरड करणे. ३.(मुलाने) एकदम किंचाळून रडणे; किंकाळी फोडणे. ४. बडबड करणे; टकळी लावणे. ५. घोकणे; घोकून पाठ करणे.[ध्व.] (वा.) **र ट प करणे** –थोडे थोडे वाचणे; अडखळत वाचणे.

रटपिटी स्त्री. रेटारेटी; मारपीट.

रटम(र)ट स्त्री. हुरहुर. [ध्व.]

रटम(र)ट–टा क्रिवि. (तांदूळ इ. जिन्नस) शिजताना होणाऱ्या पाण्याच्या आवाजाप्रमाणे; पाणी उकळत असता होणाऱ्या आवाजाप्रमाणे.

रटम(र)टणे क्रि. १. रटरट असा आवाज होणे. २. (अपचनाने अथवा जंतामुळे पोटात) गुरगुरणे, वाजणे.

रटरट न. खलबत.

रटरटाट पु. जोराचा रटरट असा आवाज.

रटाला–ल्या, रटेल वि. १. लठ्ठ; दांडगा; जाड; भरभरीत (दागिना, पदार्थ).२. धष्टपुष्ट; अगडबंब; ओबडधोबड; जाडजूड; अवाढव्य; विचित्र; चमत्कारिक; वातूळ; स्थूल (व्यक्ती). ३. राकट; रासवट; रानटी (काम, कामगार).

रट्ट–ठ पु. १. दाटी; गर्दी; मोठा जमाव. २. जाडी, ओबडधोबड भाकरी

किंवा पोळी; रोठ. ३.ओबडधोबड काम; विद्रूप अगर अवाढव्य वस्तू अथवा प्राणी.

रट्टा, रेटा पु. बाहू; हात. [क.रट्टे=हात]

रट्टा पु. हाड.

रट्टा, रट्या, रेटा पु. १. टोला; तडाखा; जोराचा धक्का. २. (कामाचा) नेट किंवा दडपण, काळजीमुळे मनावर दाब. ३. मुसंडी (लहान अरुंद मार्गाने जाताना). (क्रि. मारणे). ४.ओबडधोबड, विद्रूप वस्तू. ५. अवाढव्य, अचाट खर्च; ढिगारा (वस्तूंचा). ६. अतिशय दाब अगर चिरडून टाकण्यास समर्थ असा धक्का.[ध्व.] (वा.) **रट्टे-घट्टे, खाणे, पडणे** - १. सराव होणे. २. टक्केटोणपे खाणे.

रट्टावून क्रिवि. रेटून; भरपूर.

र(रं)ठ, रट वि. १.राठ; कठीण; गाठ्याळ (लाकूड). २. कठीण; टणक (नारळ, फळ). ३. जाड; भरड (पीठ). ४. कठोर; कर्कश (भाषा, शब्द). ५. कडक, नापीक (जमीन). ६.भक्कम; घटमूट (शरीर). ७.(सामा.) रटाला, रटेल या अर्थी. ८. सोशीक.

रड स्त्री. १. एकसारखे, न थांबता रडणे. २.तक्रार; पिरपिर.

रडकथा स्त्री. दुःख, संकटे यांची कंटाळवाणी हकिकत.

रडका-ता-वा वि. १.सदा रडत असणारा; रडण्याची अगर चिरचिरण्याची सवय असलेला; नेहमी तक्रार करणारा; गाऱ्हाणे सांगणारा. २. दुःखी; कष्टी; निराश; निरुत्साही (चेहऱ्याचा अगर बोलणारा). ३. ज्याचे हातून कोणतेच काम चांगले होत नाही, तडीस जात नाही असा. ४. रडताना होतो तसा (आवाज,चर्या). ५.कंटाळवाणे (भाषण इ.).

रडकी बोरान आप्तांच्या मृत्यूनंतर मुली किंवा बहिणी यांसारख्या सासरहून आलेल्यांना परत पाठवताना नेसवली जाणारी साडी.

रडकुंडा-डी वि. (अति दगदग, त्रास, वेदना, श्रम, दुःख यामुळे) रडण्याच्या बेतास आलेला; डोळे पाण्याने भरून आले आहेत असा.

रडकूळ स्त्री. रडकुंडी आलेली व्यक्ती.(गो.)

रडखडणे क्रि. (सामा.) रखडणे; जडपणे आणि मंदपणे हलणे, चालणे.

रडगाणे, रडगाऱ्हाणे न. पहा : **रडकथा**

रडगात्या वि. सदा आपल्या दुःखाच्या रडकथा, गाऱ्हाणी सांगणारा.

रडणे अक्रि. १. अश्रू, आसवे गाळणे. २. विषाद वाटणे; शोक करणे. ३. (ल.)अपयश येणे; ठेचाळणे; आपटणे; नष्ट होणे; बंद पडणे; अनादराने बाजूला ढकलला जाणे. ४.नुकसान होणे. ५. एखादी गोष्ट घडणे, करणे, सुरू करणे या अर्थी तुच्छतेने योजतात. ६. निंदणे. सक्रि. (निंदेने) चालविणे; करणे. [सं.रट्; प्रा. रड]

रडतखडत, रडतपडत, रडतकसत क्रिवि. मोठ्या कष्टाने; इच्छेविरुद्ध कसेबसे; रेंगाळत; आळसल्यासारखे; नाइलाजाने; बिगारीने; मंदपणाने.

रडतगोत्र-घोडे-राव, रडत राऊत न. पु. सदोदित कुरकुरणारी व्यक्ती; नेभळट, कर्तबगारी नसलेला, उत्साहरहित मनुष्य; दुसऱ्याने सक्ती केल्यावरच काही काम करणारा. (वा.) ० **राऊत घोड्यावर बसविणे** - एखाद्या कामास निरुत्साही मनुष्याला पाठविणे अगर त्याला काम सांगणे; काम करण्याचे मनात नसणाऱ्याला बळजबरीने कामास लावणे.

रडता पहा : **रडका**

रडतोंड्या वि. ज्याचा सर्वकाल रडण्याचा स्वभाव आहे असा; मेषपात्र; दुर्मुखलेला; नेहमी रडगाणे गाणारा; कुरकुर करणारा.

रडपंचक न. (प्रपंचातील ओढाताण व दुःख यामुळे) नेहमीचे रडगाणे अगर रडकथा.

रडविणे सक्रि. १. रडायला लावणे, दुःख देऊन रडीस आणणे; त्रास देणे; चिडविणे. २. दुःखकारक प्रसंगाच्या वर्णनाने किंवा देखाव्याने एखाद्याला अश्रू गाळायला लावणे. ३. (ल.) नाश करणे; वाढ खुंटविणे; ऊर्जितावस्थेस येऊ न देणे. ४. नैसर्गिक किंवा नैमित्तिक कारणांमुळे समारंभ, पीकपाणी याचे नुकसान होणे, विरस होणे.

रडार न. पु. रेडिओ लहरींच्या साहाय्याने आकाशातील वा पृथ्वीवरील दूरच्या वस्तूचे स्थान संगणकासारख्या पडद्यावर दाखविणारी यंत्रणा.

रडारड स्त्री. कोणी गेला, मेला इ. कारणाने मोठे दुःख झाले असता अनेकांनी एकदम रडू लागणे; (सामा.) रडणे; शोक करणे.

रडारोई-वी स्त्री. मोठा शोक व रडणे; छाती, ऊर बडवून रडणे; मोठा आक्रोश; आरडाओरड.

र(रं)डी, रड्डी स्त्री. १. (सामान्यतः रडी) भान जाऊन खेळात खोटे खेळणे; खेळात चिडणे. (क्रि. घेणे, खाणे, येणे). २. वाटेल तेव्हा डोळ्यांतून पाणी, अश्रू आणणारी स्त्री.

र(रं)डीखोर वि.चिडखोर; खेळात खोटे बोलणारा.

र(रं)डीवाल वि. रडण्याची सवय, असलेला; चिरडीस जाणारा.

रडु(डू)रडू न. स्त्री. सारखे रडणे; चिरचिर; किरकिर.
क्रिवि. रडतरडत; मुळमुळीतपणे; दीनवाणीपणाने.

रडू, रडें न. १. रडण्याची क्रिया. २. रडण्याचा आवेश. (क्रि. कोसळणे). ३. शोक, भय, दुःख, प्रेम, हर्ष इ. कारणांनी अंतःकरण शिथिल होऊन डोळ्यांत अश्रू येणे, तोंड पसरणे, कंठध्वनी निघणे इ. विकारविशेष उत्पन्न होणे; रडणे.

रड्या १. पहा : **रडतगोत्र.** २.(ल.)चालण्यास, कामास मंद असा (बैल इ.). ३. सारख्या सबबी, कारणे सांगणारा (इसम).

रण पु. १. युद्धभूमी. २. युद्ध; संग्राम; लढाई.
न. १. तंटा; आवेशाचे भांडण; जोरजोराचा वादविवाद. २. वाळूचे मैदान. उदा. कच्छचे रण. [सं.]

रण व्रण.(तंजा.)

रणकर्कश वि. चिकाटीने लढणारा; रणशूर.

रणकंडु-डू स्त्री.पु. युद्धाची खुमखुमी. [सं.]

रणकंदन-ळ न. निकराची लढाई; कापाकापी; परस्परांमध्ये आवेशाने हाणामारी, अरेतुरे होते असे तुंबळ युद्ध; नाश.

रणकुदळ वि. १.भांडखोर. २. लठ्ठ व वातूळ (व्यक्ती).

रणखंदल-ळी, रणखु(खुं)दळ-ळा स्त्री. न. पु.पहा : **रणकंदन** [सं.रण + कृंतन]

रणखांब पु. १. रणस्तंभ; एकमेकांवर हल्ला करून जाणाऱ्या दोन सैन्यांमध्ये

पुरलेला खांब; लढाईस उत्सुक झालेल्या दोन सैन्यांमधील खुणेचा खांब. या खांबाचा सैनिकांना एकत्र जमण्यास खुणेसारखा उपयोग होत असे. २. स्मारकासाठी उभारलेला रणयूप. [सं.रणस्तंभ]

रणगरी स्त्री. आरमार. – के १.५.३६.

रणगाडा पु. १. लढाईत तोफा किंवा दारूगोळा वाहून नेणारा; बैल, घोडे यांनी ओढावयाचा तोफेचा गाडा. २. (ल.) ओझे वाहण्यासाठी उपयुक्त मोठा गाडा.

रणगाढा वि. कसून लढणारा.

रणघर न. युद्धसाहित्य साठविण्याचे कोठार; माऱ्याची जागा.

रणघंघाळ न. रणवाद्य.

रणघाई स्त्री. १. युद्धातील पराकाष्ठेची गडबड; हातघाई. २.जोराचा, नेटाचा प्रयत्न. ३. गडबडीने, घाईने होणारे काम.

रणघाल्या वि. ऐन लढाईच्या दिवशी विश्वासघात, निराशा करणारा; दगा देणारा; हातपाय गाळणारा (घोडा, मनुष्य); ऐन वेळी अवसान सोडणारा; अवसानघातकी.

रणचत्व(त्वा)र न. रण; युद्धाचे मैदान; रणभूमी.

रणछतरी स्त्री. सैन्याच्या भोवती पहारा करणाऱ्या हत्यारबंद पहारेकऱ्यांना उभे राहण्याकरिता केलेली तात्पुरती लाकडी खोली.

रणजोडवे न. पायाच्या अंगठ्यातले चांदीचे वळे.

रणजोत स्त्री. १. डोळ्यास थंडावा आणणारे औषध. २. वैदूची कांडी. ३. (ल.) चुणचुणीत, हुशार मुलगा.

रणजोध न. कमळबीज.

रणझुंजार वि. पराक्रमी; शूर; लढवय्या.

रणठाण पु. पवित्रा; युद्धाकरिता उभे राहण्याची पद्धती.

रणतुरा पु.युद्धात विजयी झाल्याचे चिन्ह म्हणून पागोट्यांत, शिरोवेष्टणांत खोचण्याचा तुरा, दागिना इ. (वा.) ०**लावणे** – पराक्रमी वीराप्रमाणे डौलात चालणे, जाणे; मिरविणे.

रणतुरा–तूर्य पु.न. रणात वाजवावयाचे वाद्य.

रणदिस होणे बेजार होणे; थकणे; रंजीस येणे. (माण.)

रणद्वीप न. जमीन; खलाटी; भाट; वलाटी.

रणधुमाळी स्त्री. धुमश्चक्री; हातघाई; निकराची लढाई; युद्धातली गडबड.

रणधेंडा पु. लग्नात वधूवरांना खांद्यावर घेऊन नाचतात त्याप्रमाणे रणात नाचणे.

रणनवरा वि. १. मर्द; शूर; उत्साही (वीर). २. स्वारीवर असताना अथवा हिंडताना ज्याला आपल्यापुढे वाद्ये वाजतगाजत ठेवण्याचा अधिकार अथवा मान आहे असा (योद्धा). ३. स्फुरण येऊन लढणारा. ४. बेफाम; बेहोष.

रणपंडित पु. लढवय्या; युद्धकलेत निष्णात; सफाईने शस्त्र चालविणारा.

रणबहिरी, रणभेरी स्त्री. रणभेरी; एक मोठे कर्ण्यासारखे वाद्य.
वि. रणशूर; लढाईत धीट असलेला.

रणबावरा वि. १. लढाईसाठी अथवा युद्धासाठी बेफाम. २. (ल.)भयंकर उतावळा; अत्यंत उत्सुक.

रणबोका वि. १. गलेलठ्ठ; गब्बू व अधाशी आणि विषयी (प्राणी). २. फार मोठा (खांब, तुळई, ओझे इ.).

रणमंडल–ळ न. १. एक प्रकारचा व्यूह; योद्ध्यांची वर्तुळाकार उभारणी. २. रणभूमी; रणमैदान; रणांगण.

रणमोहरी–रे स्त्री. न. रणवाद्य.

रणरण स्त्री. उन्हाचा भयंकर ताप; कडक ऊन. [ध्व.] (वा.) ०**करणे** – (सूर्य, तापामुळे शरीर इ.) भयंकर तापणे, जळणे.

रणरणीत वि. अतिशय जळजळीत, कडक; प्रखर (सूर्य, ऊन, अग्नी, दुपार इ.).

रणरंग पु. लढाईची हातघाई; घनचक्कर; युद्धाचे भीषण स्वरूप; युद्धाचा भयंकर देखावा; युद्धाच्या वेळची गडबड, गोंधळ; रणांगण.

रणरंगधीर वि. रणामध्ये धीट; वीर; रणवीर; युद्धात पराक्रम करणारा.

रणरागिणी–चंडिका–मर्दिनी स्त्री. पराक्रमी स्त्री.

रणवट पु. १. रणांगणातील स्थान. २. वीरचिन्ह : 'कीं हा (मुकुट) माथां असतां रणवट । न भंगे तुझा ।'– कथा २.४.१२८.

रणविंदान न. युद्धकौशल्य.

रणशिंग न. युद्धाच्या वेळी योद्ध्यांना बोलावण्यासाठी, उत्साह येण्यासाठी वाजविले जाणारे शिंग. [सं.रणशृंग]

रणशूर पु. घोड्याच्या शुभलक्षणांपैकी एक गुण, लक्षण.
वि. युद्धात धीट, पराक्रमी, माघार न घेणारा; वीर. [सं.]

रणसंकुल न. हातघाईची लढाई. [सं.]

रणसांडी स्त्री. पराभव.

रणसौरा वि. पराक्रमी; शूर; रणशूर.

रणा(णां)ग स्त्री. फोड येऊन आग होणारा रोग; खवडे इ.

रणालगी स्त्री. टिमकी. (बे.)

रणांगण, रणक्षेत्र न. जेथे युद्ध खेळले जाते ती जमीन, स्थान.

रत न.१. संग; संयोग; सुरतभोग; मैथुन. २.करमणूक.
वि. रमलेला; रममाण झालेला; निमग्न; गुंगून गेलेला; तल्लीन; अनुरक्त : 'ज्यांचें कृष्णीं तन मन जालें रत ।' – तुगा १२. (समासात) कामरत–कर्मरत, स्त्रीरत, विषयरत इ. [सं.रम् = खेळणे, क्रीडा करणे]

रतणे अक्रि. १.आनंदित होणे. २. आसक्त होऊन खेळणे; रममाण होणे; सहजासहजी गुंग होणे. ३. भटकणे; बागडणे; करमणूक करून घेणे. ४. मैथुनात आसक्त होणे; विषयसुखात निमग्न होणे; संभोगणे. ५. एकरूप होणे. [सं.रम्,रत]

रतनआबली स्त्री. एक फुलझाड; त्याचे फूल. (गो.)

रतनकूप–कुंड न. उत्तम पोसलेले, पिकलेले आणि तेजस्वी इ. फळ.

रतनगुंज स्त्री.गुंजेचा एक प्रकार; ढोरगुंज. पहा : **रत्नगुंज**

रतनजोत पहा : **रणजोत**

रतनजोध पहा : **रणजोध**

रतनबाव स्त्री. कालव्याचे किंवा पाटाचे पाणी आत घेऊन बाग शिंपण्यासाठी केलेला खळगा; विहीर, खाच, हौद. (राजा.)

रतनाडू पु. रताळे.(झाडी) [सं.रक्तालु]

रतनाळ–ळू–ळे न. रताळे. (व.)

रतन्या पु.शिरा घोटण्यास केलेला मोठा लाकडी सराटा, उलथणे. (व.)

रतन्या वि. घाणेरडा. [सं.रत्न]

रतल, रत्तल पु.१. सुमारे १५ औसांचे म्हणजे ३६ सुरती रुपयांइतके वजन; काहींच्या मते साधारण १६ .०६ औंस, तर काहींच्या मते १२ औंस; सध्या ४० रुपये भाराचे वजन प्रमाण मानतात. २.(सामा.) अर्धा शेर; पौंड. [अर.रत्ल]

रतावा पु. रात्रीचा हल्ला : 'लालीचे लष्करावरी रतावा पडून बहुत सोलदाज वगैरे कित्येक सरदार सही मारून.'– तंजाशिला ९४.

रतावू पु. रताळू. (अहि.)

रताळी–ळू–ळे स्त्री. न. एक कंद; रताळ्याचे झाड, वेल; गोडा बटाटा; पांढरे व तांबडे अशा याच्या दोन जाती आहेत. [सं.रक्तालु]

रतांजली स्त्री. रक्तचंदन.– मुंव्या १६३.

रति–ती स्त्री. (दैवाची रति याचा संक्षेप.) सद्दी; नशीब. (क्रि. फिरणे, अनुकूल होणे). [सं. रति]

रति–ती स्त्री. १. काही विषयांबद्दल असणाऱ्या प्रेमामुळे त्याबद्दल वाटणारी आसक्ती, इच्छा. २.मैथुन; संभोग; स्त्रीसंग. ३.मदनाची, कामदेवाची स्त्री. ४. विषय; कामवासना; कामेच्छा; शृंगाररसाचा स्थायीभाव. ५. आनंद; सुख. ६. क्रीडा; विलास. [सं.]

रति–ती स्त्री. हिरे, मोती इ. वजन करण्याची एक बी, गुंज.

रति क्रिवि. अगदी बारीक.

रतियुद्ध न. संभोग; सुरतक्रीडा.–नि.८.७५.

रतिवंत वि. दैववान; भाग्यशाली.

रतीब पु. १. उकाडा; रोजचे नियमित द्यावयाचे अन्न वगैरेचे प्रमाण; ठरावीक खुराक देणे, खाणे इ. २. रोज नियमित वापरासाठी घेण्याचा पदार्थ. ३. खुराक; पौष्टिक अन्न. [अर.रतिबह, रातिबा]

रती(ति)भर वि. किंचित; थोडेसुद्धा; कणभर. (नकारार्थी)

रत्न न. १. हिरा, माणिक, पाचू इ. मूल्यवान खनिज पदार्थ.२. एखाद्या जातीतील, समुदायातील किंवा वर्गातील रत्नाप्रमाणे उत्कृष्ट व्यक्ती. उदा. पुत्ररत्न, कन्यारत्न. ३. शोभा देणारा, सौंदर्य वाढविणारा, संसार, सभा वगैरेस ज्याच्या योगाने शोभा येते असा पदार्थ. ४. समुद्रमंथनापासून उत्पन्न झालेल्या चंद्र, अमृत, लक्ष्मी इत्यादीं चौदा गोष्टींपैकी प्रत्येक. ५. (उप.) मूर्ख मनुष्य.

रत्नकोटी स्त्री. विपुल संपत्ती.

रत्नखचित–जडित वि. हिरे, माणके इ. रत्ने जडवलेले. [सं.]

रत्नखेवणी स्त्री. रत्नजडित बिजवरा, अलंकार.

रत्नगर्भा, रत्नसू स्त्री. पृथ्वी. (पृथ्वीच्या गर्भात रत्नांच्या खाणी असतात.)

रत्नगुंज एक झाड. याला लांब शेंगा येतात. एकेका शेंगेत ८-१० गुंजा असतात. पूर्वी सोन्याचांदीचे वजन करण्यास वापरीत असत; वाल.

रत्नदीप पु. दिव्यासारखा लखलखीत प्रकाश देणारे स्वयंप्रकाशी रत्न.

रत्नभुंगेरा पु. एक प्रकारचा कीटक.

रत्नशाळा स्त्री. जव्हेरी बाजार.

रत्नाकर पु. १. रत्नांची खाण. २.(ल.)समुद्र (याच्या तळाशी रत्ने असतात म्हणून). ३. रामेश्वरापासून अलीकडील पश्चिमेच्या बाजूचा समुद्र. [सं. रत्न + आकर] (वा.) ० **आळविणे** – काम न करता (रडत, बोंबलत) परत येणे; अपयश घेऊन येणे. ० **करू लागणे** – टिपे गाळणे; आक्रोश करणे; रडकथा गाणे : 'शंकरराव यांस पाठवीत होतो, पण ते रत्नाकर करू लागले. यास्तव फिरोन 'जा' म्हणोन चर्चा केली नाहीं.'– ऐलेसं ४३६.

रत्नी स्त्री. नाचणी धान्याची एक जात. [सं.रत्न]

रत्ब पु. ठराव; करार : 'मुरादखानाने वाजीद अलीखानाशी फार रत्ब केला आहे.'– मइसा १.१९४. [अर.रब्त्]

रथ पु. १. देवाची मूर्ती इ.ची मिरवणुकीची गाडी. २. घोड्यांनी ओढत नेण्याचे राजादिकांचे वाहन; राजेशाही गाडी. ३. लढाईतील वाहन; आत बसून लढण्याची गाडी. ४. रथी; रथावरील योद्धा. ५. पृथ्वी : 'चळित रथ रथाचा नाथ संतुष्ट मोदे।'– मुरा बाल १०२. [सं.]

रथकार–कारक पु. १.रथ बनविणारा सुतार; गाड्या तयार करणारा. २. एक जात. हिचा उद्‌भव माहिष्य जातीचा पुरुष व करण अगर लेखक जातीची स्त्री अशा दांपत्यापासून आहे.

रथचर्या स्त्री. रथ फिरविण्याची कला. – व्याज्ञा ३६.

रथबाळाणे न. रथाच्या भोवतालचा सज्जा : 'रथबाळाणयावरी । बैसलीया सुंदरी:'–उह १६२.१. [सं.रथ–अलिंद]

रथभार पु. रथासारखी वाहने असलेली युद्धसामग्री. [सं.]

रथयात्रा स्त्री. जगन्नाथादी देवाच्या मूर्तींची रथातून मिरवणूक काढण्याचा समारंभ.

रथसप्तमी स्त्री. माघ शुद्ध सप्तमी. या दिवशी सूर्य रथावर आरोहण करतो अशी कथा आहे. या तिथीपासून दिवस वाढत जातो. [सं.]

रथि, रथिक पु. चक्रवाक पक्षी. [सं.रथिक]

रथित्र न. पृष्ठभाग सपाट करण्याचे यंत्र.

रथी पु. १. रथात बसणारा; रथाचा मालक; मुख्य स्थानी रथावर बसणारा योद्धा. २.रथात बसून एकटा लढणारा वीर. [सं.रथिन्]

रथोद्धता स्त्री. एक समवृत्त. ह्याच्या प्रत्येक चरणात ११ अक्षरे आणि र, न, र, ल, ग हे गण असतात. [सं.]

रथ्य पु. गाडीचा घोडा. [सं.]

रथ्या स्त्री.१. रथांचा समूह. २. चवाठा. ३. राजमार्ग; हमरस्ता. [सं.]

रद, रदन पु. दात. [सं.]

रद, रद्द वि. १. काढून टाकलेले; बातल. २.फेकलेले; बाजूला सारलेले. ३. खोडलेले; नामंजूर. ४. निरुपयोगी झालेले; टाकाऊ.
स्त्री. परतवणे; फेड. [अर.रद्,रद्द]

रदकर्ज न. १. कर्जमुक्त होणे.२. कर्ज म्हणून दिलेले द्रव्य. ३. कर्जफेड.

रदनक न. सुळा.

रदबदल–ली स्त्री. १. मध्यस्थी; तहाची वाटाघाट; तहचर्चा. २.वकिली; शिष्टाई; तरफदारी. ३.एखाद्याला भीड घालणे; मनवळवणी. [फा.रद्द–उ–बदल]

रदबातल वि. (कायदा) कायद्याने अमलात आणताच येणार नाही असा करार. – घका ९२.

रदळ वि. घाणेरडा; गदळ. (मुंबई)

रदीम न. रेडियम.– शब्दानंद.

रद्दा पु. १. (इमारतीसाठी) माती, शेण इ. चा तुडवून तयार केलेला गारा; चिखल. २. पेंड. (व.) ३. लगदा; गरगट. ४. चळत; थर. (झाडी)

रद्दी–द्दा स्त्री. निरुपयोगी झालेल्या कागद इ. चा समुदाय.
वि. कुचकामी; बिनकामाचा; टाकाऊ.

रधवणे–ने क्रि. सतावणे; रडकुंडीस आणणे; हातघाईवर आणणे; त्रासवणे. (व.); [सं.रुध्] पहा : **रुधणे–रुधवणे.**

रनखणे न.खच; सडा; रास : 'थोरांचे रनखणे पडिले असे.'–लीचपू३६३.

रनाळा–ळी पु. स्त्री. उन्हाळा–ळी. (को., कुलाबा)

रन्नावणे अक्रि. १.आळसावणे; सुस्त बसणे. २. शेफारणे; माजणे. (व.)

रप, रपका पु. १. धपाटा; गपका; गुद्दा; चापट. २.मऊ, ओलसर पदार्थ आपटल्याचा होणारा आवाज. ३. मऊ व कठीण पदार्थांच्या संयोगाने निघणारा आवाज. [ध्व.रप]

रपकण–कन–कर–दिशी क्रिवि. धपाटा मारणे, ओलसर, मऊ, कठीण पदार्थाशी घासून जाणे, चिखल वगैरे पदार्थात पाय जाणे इत्यादी प्रसंगी होणाऱ्या झपाट्याचे व तीक्ष्ण आवाजाचे अनुकरण करून. [ध्व.]

रपट स्त्री. (अप) तक्रार; (इं.) रिपोर्ट.

रपटणे क्रि. बडवणे.

रपटा पु. गूळ, चिंच, चिखल वगैरेंचा लिबलिबीत, पातळ लगदा.

रपत् स्त्री. सवय.(झाडी)

रपाटखान वि. सामान्य प्रमाणापेक्षा अधिक वाढलेला याअर्थी योजावयाचा शब्द; गबदुलखान.

रपा(प)टणे क्रि. १. दपटणे; रगडणे. २.एखादी गोष्ट, एखादे काम तडकाफडकी, घाईघाईने आणि आचरटपणाने करणे; त्वरेने करून टाकणे. उदा. हाकत राहणे, ढकलणे, हात उगारणे, बलात्कार करणे इ.

रपाटा पु.१. जोरात मारलेली चपराक; रपदिशी आवाज होऊन मारलेला गपका; गुद्दा. २. सामान्य आकारापेक्षा एकदम मोठ्या आकाराची वस्तू. ३. वेग; चलाखी; जीत भयंकर जोर आहे अशी क्रिया; झपाटा.

रपाटून क्रिवि. सपाटून.

रपाट्या पहा : **रगड्या**

रपापा,रपा(प)रप क्रिवि. भराभरा, एकसारख्या केलेल्या आघाताच्या आवाजाचे अनुकरण करून. (क्रि. मारणे, धोपटणे.)

रपारपी स्त्री. चेंडू पाठीत मारून खेळावयाचा खेळ.

रपेट स्त्री.१. घोडदौड; दौड. २.व्यायाम; सहल. ३.घसरती जागा. [हिं.]

रपेट बातमी; खबर.

रपोट पु. (अप)अहवाल, वृत्तांत.–पैमा. [इं.रिपोर्ट]

रफडा पु. धामधूम. (व.)

रफरफ स्त्री.१. अत्यंत अव्यवस्था; सावळा गोंधळ. २.नाश; चुथडा; चिंधड्या; पूर्ण विध्वंस; नासाडी (काम, धंदा, संसार इ.ची). [ध्व.]

रफल स्त्री. हलकी लोकर. (काश्मिरी)

रफा पु. १.विचका; बिघाड; चिवडा. २. डिवचाडिवच; कालवणे व टाकून देणे; मातेरे; नाश; विचका. ३.निराकरण :'थोडेच दिवसांत खलश रफाही होईल.'–मइसा. ५.१५७. [अर.रफ्अ]

रफा(फी)कत स्त्री. स्नेह; सख्य; मैत्री. [अर.रिफाकत्]

रफाड न. मोकळे मैदान; खुली जागा. (व., ना.)

रफादफा, रफेदफे स्त्री. १.निवाडा; उरक; निकाल. २. (कर्जाची) फेड, निवारण : 'देणेदाराची कोचवण किती आहे याची रफेदफे धनी अथवा आपण करून मला मोकळे करावे.'–होकै २०.
वि. निकालात काढलेले; उरकलेले; पार पाडलेले. [अर.रफ्अ द्वि.]

रफायत, रफाहीयत स्त्री. भरभराट. [अर.]

रफार पु. 'र'चा अर्धा उच्चार दाखवण्यासाठी पुढील अक्षरावर दिलेले अर्धवर्तुळाकार चिन्ह. उदा. कर्म, पूर्व .

रफि(फी)क पु. स्नेही; मित्र; रक्षणकर्ता; सामील; दोस्त: 'हल्ली रफीक होऊन सेवा करून दाखवू.' – इमं २६०. [अर.रफीक]

रफू पु. कापूस; रुई.

रफू पु.स्त्री. १.कापडाचे छिद्र विणून बुजविणे; तुणणे; वस्त्राचे छिद्रादी बुजविण्याकरिता युक्तीने सुते भरून संधान करण्याचा एक प्रकार. २. या क्रियेने युक्त असा वस्त्रभाग. ३. जुन्या छपरावर नवीन गवत व पाने पसरणे. (क्रि. करणे). [अर.रफव; फा.]

रफूक पु. मेहेरबानी; स्नेह : 'एके ठिकाणी रफुकाचे कलम असावे.' – पया २२१. [अर. रेफक]

रफूकरी, रफूगार पु. रफू करणारा; रफूचे काम करून उपजीविका करणारा; तुणणारा. [फा.रफूगर]

रफूचक्कर होणे पळून जाणे. [फा.]

रब स्त्री. चाल; रीत. (व.) [सं. रव किंवा फा. रफ्त]

रबक न. एक तंतुवाद्य; सारंगी. [अर.रुबाब; फ्रें.,इं.रेबेक]

रबकण–कन–कर–दिशी पहा : **रपकण**

रबका पु. १. झपाटा; धपाटा(आवाज होईल असा). (क्रि. मारणे, देणे.) २. कोणताही अवाढव्य, अगडबंब पदार्थ.

रबखा पु. दरारा. (व.)

रबडगा पु. १. अनेक कामांचा दबडगा; रगाडा; रगडा. २. कामाची गर्दी; गडबड; घाई इ.

रबडणे अक्रि. रखडणे; फार काम, कष्ट करणे किंवा सोसणे.

रबडा पु.चिखल; रद्दा; गारा.[ध्व.रब!](वा.) ० **काढणे, लावणे** – एखाद्या झाडाचे मूळ अथवा साल उगाळून गंध काढणे.

रबडी स्त्री. राबडी; दुधावरची मलई; कढईच्या बाजूला ही मलई लागून वाळल्यावर कढईत राहिलेल्या दुधात ती मिसळून व साखर घालून हा पदार्थ तयार करतात. [हिं.]

रबर न. जाड, हलक्या प्रतीचे भरड, नि:सत्त्व अन्न.

रबर न. १. एका झाडाच्या चिकापासून होणारा पदार्थ. याचे पुष्कळ उपयोग असतात. २. पेन्सिलने लिहिलेले खोडण्यासाठी वापरायची वस्तू.

रबरब–बा क्रिवि. चिखलातून चालताना, चिखलात पाय रुतताना होणाऱ्या आवाजाचे अनुकरण. [ध्व.रब]

रबरबीत वि. ज्याचा गोळा करता येत नाही इतका पातळ झालेला (चिखल, पीठ इ.).

रब(ब्ब)ल न. भिंत रचण्याचे किंवा सडकेवर घालावयाचे ओबडधोबड दगड; डबर. [इं.]

रबाब-द न. एक तंतुवाद्य. लाकूड कोरून हे तयार करतात व गजाने वाजवितात. [फा.]

रबाब पु. १. रुबाब; धाक; दरारा. (प्र.) २. डौल; ऐट. [फा.रू= चेहरा + आब =तेज] **रबाब-रूबाब कसणे** - धाक, दपटशा दाखविणे.

रबिलाखर पु. अरबी वर्षाचा चौथा महिना. [अर.रबीउल्-आखिर]

रबिला(लो)वल पु. अरबी वर्षाचा तिसरा महिना. [अर.रबी-उल्-अव्वल]

रबीसोस पु. ज्येष्ठमधाचा शिरा.- मुंव्या ११३.

रबूक वि. १. विशाल; प्रचंड, फारच अवाढव्य (वाडा, पशू, मनुष्य, वस्तू इ.). २. अत्यंत विपुल; समृद्ध; भरपूर (माल, पाणी, पीक, आंबे इ.).

रबेत-द-रबेता-दा पु. १.जोराचा रट्टा किंवा तडाखा; ठोसा(आवाज होईल इतक्या जोराचा). (क्रि. मारणे, देणे.) २. राबता; वहिवाट; प्रघात; चाल. ३. व्यासंग; सवय. [अर.रब्त,रफ्त]

रबेस-द वि. अवाढव्य; मोठा; राक्षसी; प्रचंड.

रब्बा पु. अफू तयार करताना अफूच्या बोंडातील रस पातळ कापडाच्या थैल्यात भरतात. त्या रसाचा थैलीच्या बाहेर येऊन चिकटणारा भाग. [अर.रूब्ब् = रस]

रब्बी, रबी, रबीधान्य स्त्री. न. पर्जन्यकाळच्या अखेरीस पेरून वसंत ऋतूत कापावयाचे पीक; वैशाखी पीक. [अर. रबीई = वासंतिक]

रब्बी पु.भाताचे फोलपट.

रमजान पु. अरबी वर्षाचा ९ वा महिना. या महिन्यात मुसलमान लोक दिवसा उपवास (रोजा) करतात. [अर.रमझान्]

रमजान(नि)गाई स्त्री. रमजान महिन्यात उपवास न करण्याबद्दलचा दंड; एक कर.

रमढोल न. प्रचंड, अवाढव्य वस्तू.
वि. विशाल; प्रचंड; अवाढव्य; बेडौल आणि मोठे.

रमण पु. १. उपभोक्ता; रममाण होणारा, आवड असणारा पुरुष. २.नवरा. ३. जार. ४. मन्मथ.
न. १. मैथुन. २.एखाद्या विषयात मन रमणे, गुंतणे; क्रीडा; विहार.
वि.१.सुखविणारा; प्रिय. २.मोहक; सुंदर. [सं.रम्]

रमणा पु.१.बाग; क्रीडास्थान; रम्य स्थल. २. चोहोबाजूंनी बंद स्थान; दक्षिणा वाटण्याची जागा; कोंडी. ३.(ल.) ब्राह्मणांना दक्षिणा वाटण्यासाठी किंवा तदर्थ खर्चलेली रक्कम. ४.अनेक मंडळींनी केलेला गोंधळ किंवा गोंगाट. (क्रि. माजविणे); गर्दी. ५. (इमारतकाम) जिन्याच्या आरंभी किंवा शेवटी जिन्याच्या दारापुढे असलेली चौकोनी जागा. [सं.रम्=रमणे]

रमणी स्त्री. १. तरुण, सुंदर स्त्री. २.पत्नी; बायको. ३. (सामा.) स्त्री. [सं.]

रमणीक, रमणीय वि. रम्य; आनंददायक; मनोहर; शोभिवंत (स्थल, मूर्ती, काव्यार्थ इ.). [सं.रमण]

रमणूक स्त्री. १.चैनीखातर फिरणे; विहार. २.मनोरंजन; करमणूक.

रमणे अक्रि. १. एखाद्या विषयाची, सुखाची गोडी लागल्यामुळे तेथे मन गुंतणे, राहणे. २. आनंद देणाऱ्या गोष्टींत काळ घालविणे. ३.रेंगाळणे; गमणे. संभाषणात किंवा खेळण्यात वेळ घालविणे. ४.विलास करणे; मैथुनार्थ संगत होणे, जुळणे. ५.चैन पडणे. [सं.रम्]

रमतर(ग)मत, रमते रमते क्रिवि. १. स्वस्थपणे; सुखाने; सहज; बिन त्रासाने; घाई न करता; विशेष तसदी न घेता (काम करणे इ.). २. निसर्गरमणीय ठिकाणी स्वत:ची करमणूक करून घेत (क्रि. जाणे, येणे, चालणे इ.).

रमता राम भटक्या, फिरस्ता, प्रवासी माणूस; विशेषत: तीर्थे हिंडणारा गोसावी. [रमणे राम]

रममाण-न वि. रमणारा; आसक्त; गुंग; तल्लीन.

रमरमाट,रमराट पु. ओंगळ किंवा घाणेरड्या पदार्थांची रास; ढिगारा (खरकटी भांडी, उष्टी पाने इ.चा). [सं.राम + राष्ट्र]

रमराडी स्त्री. वाळू; चिखल.

रमल न. रेतीवर किंवा कागदावर काढलेल्या रेघांवरून अथवा फाशावरून शकुन पाहण्याची विद्या; यावनी फलज्योतिषशास्त्र. मूळ देवदूत जिब्रईलने प्रेषित दनियल यास वाळूवर रेषा काढून त्यावरून भविष्य वर्तविण्याची ही कला शिकविली. [अर.रम्ल्]

रमली वि.रमल जाणणारा; रमलशास्त्राप्रमाणे भविष्य सांगणारा.

रमा-मी स्त्री.१. लक्ष्मी. २. शोभा. [सं.]

रमाकांत-नाथ-नाथक-पति-रमण-वर १. विष्णू. २. (उप. सांकेतिक) रडणे; आरडणे. (रमारमण यातील दोन्ही शब्दांत आरंभी र आहे.) [सं.] (वा.) ० **आळविणे** - १.(उप.) रडणे; भेकणे. २. पोराप्रमाणे असाहाय्यतेने ओरडणे. ३. रमणे; गमणे; रेंगाळणे.

रमात करणे थट्टेवारी घालविणे.

रमारम, रमारमी स्त्री. १. बेतास बेत; जमा आणि खर्च यांची बरोबरी; तोंडमिळवणी; नफा-तोटा सारखाच असणे, होणे. २. समता; सारखेपणा (गरीब-श्रीमंत, नफा-तोटा, बरे-वाईट इ.चा). (क्रियाविशेषणासारखाही उपयोग होतो.)

रमिक वि. रमणीय. (ना.)

रमी स्त्री. पत्त्यांतील एक खेळ.

रमु(मो)जी वि. विनोदी; गमत्या; विचित्र; चित्ताकर्षक; हसविणारा (वक्ता, त्याचे भाषण).

रमूज स्त्री. १. खेळ; क्रीडा; करमणूक; गंमत; मौज :'कोण दिसेना प्राणप्रियकरे, चल रंगमहाली रमूज करू।' - सला ३४. २. स्वत:ची करमणूक करून घेणे; खेळणे; विहरणे. ३. झालेले मनोरंजन, करमणूक. ४. (समासात) मनोरंजन करणारी गोष्ट. [अर.रमूझ]

रमेदी स्त्री. चर्च; ख्रिश्चन लोकांचे प्रार्थनास्थळ; पोर्तुगीज लोकांतील देऊळ.

रम्य वि. रमणीय; मनोहर; आनंददायक; सुंदर. [सं.]

रम्या स्त्री. (संगीत.) विसाव्या श्रुतीचे नाव. [सं.]

रय पु. वेग. [सं.]

रय(य्य)त स्त्री. १. प्रजा (राजाची); लोक; जनता. २. कूळ (शेतमालकाचे); शेतकरी; जमीन कसणारे लोक. [अर.रईयत्]

रयतभाग पु. रयतेचा, कुळाचा वाटा, मेहनताना.

रयतवार क्रिवि. कूळ अगर प्रजा यांच्याशी प्रत्यक्ष रीतीने; प्रत्येक कुळाशी स्वतंत्रपणे.

रयतवारी, रयतपद्धत स्त्री. रयतेने जमिनीचा वंशपरंपरेने उपभोग घ्यावा अशी व्यवस्था; प्रत्येक कुळाशी सरकारने साऱ्याचा स्वतंत्र ठराव करण्याची पद्धती. [फा. रईयत्वारी]

रयतानी स्त्री.रयत; कुळे; शेतकरी (समुच्चयाने).

रयतावा पु. १. रयत, कूळ यांची स्थिती, कामे, कर्तव्ये वगैरे. २. जमिनीचा सारा - चावडी (कुळांवर बसविलेली).

रया स्त्री. १. किंमत; मोल; गुण; योग्यता (मनुष्य, पदार्थ, धंदा इत्यादींची). (क्रि. जाणे) २. वजन; मान; पत; दर्जा. ३.कांती; शोभा; तेज: 'तेजें गुणें उत्तर ते रया रे।' - दावि ३७९.

रया पु.राजा.

रया, राय स्त्री. गैरसोय; वाईट अवस्था.

रया, रयात, रयायत स्त्री. १.कीव; कृपा; क्षमा; माफी: 'सबब तुम्हावर रयात करून...' थोमारो १.४५. २. आदब; भीड :'परंतु तुम्ही आता शास्त्राची आज्ञा उलट करून आपले मगरूरीने रया सोडून देऊन त्या सतीस मारिता.'- ऐटि २.३४. ३. भीड. ४. दान; देणगी. (क्रि. देणे, करणे). [अर.रिआयत्]

रया, रयान-नी-या, राया स्त्री. प्रजा; शेतकरी वर्ग. [अर. रआया रईयतचे अनेकवचन] (वा.) ० **उतरणे** - दैन्य नाहीसे होणे.

रयाळ पु. एक चांदीचे, स्पेन देशातील नाणे. [स्पॅनिश; इं.रियल]

रली विनोद; मस्करी; थट्टा.

रव पु. रोह; पालेभाजी, भात वगैरेंचा अति लहान अंकुर; रोप. (कु.) [सं. रुह्=रुजणे]

रव पु. १. ध्वनी; शब्द. २. गुणगुणाट; गोंगाट; आवाज. ३. नाव; कीर्ती; स्तुती; गुणानुवाद. [सं.रू=आवाज करणे]

रव पु.स्त्री. १. रस्ता. २. परिपाठ; शिरस्ता; चाल; रूढी : 'येथे एक वेळ लटके पडले म्हणजे मनुष्यास पुन्हा जवळ उभे राहू देत नाहीत. येथील रव या प्रकारचा.'- मइसा ८.२२०. ३. रांग; ओळ. ४. वंश; परंपरा. (वा.) ० **पडणे** - वाट होणे, रहदारी चालणे.

रवई पु. माहीतगार; रोजच्या संबंधातील व्यक्ती.

रवका पु. एखाद्या रवाळ पदार्थाचा जमलेला, तोडून काढलेला लहानसा गोळा; तुकडा (गूळ, मध, तूप इ.चा); लचका.

रवखंदळ स्त्री. न. नाश; दाणादाण; पराभव.

रवखांब पु. पहा : **रवी** २

रवण स्त्री. १.रांग; ओळ. २.वावरण्यास प्रशस्त स्थळ. ३. वेळ; प्रहर. ४. गस्त.

रवणे क्रि. राहणे. (कु.)

रवरव पु. १. किड्यांनी भरलेला नरक; एकवीस महानरकांतील एक नरक. २. बुजबुजाट (माशा, उवा, डास इत्यादींचा).
क्रिवि. वळवळ करणाऱ्या किड्यांनी बुजबुजल्याप्रमाणे; बुजबुजाट होऊन. (क्रि.किडे पडणे). [सं.रौरव]

रवरव स्त्री. १. चपळता : 'आंगीचिया रवरवा। ढळता कैसा सांधावा।'- शिव १००२. २. कसकस: 'कांटाळौनि आंग करी रवरव।'- साप्र ७२६. [सं.रौरव]

रवरव-वी स्त्री. १. बधिरता (अवयवांची); मुंग्या येणे. २. कणकण; कचकच (ज्वराची); शहारे; अंग मोडून येणे. ३. पोटात विष गेल्याने होणारा दाह. ४. विंचू चावल्याच्या वेदना. ५. मुंग्या चावल्याने होणारी आग; हुळहुळ. ६. अक्कलकारा, पिंपळी इ. खाल्ल्यामुळे जिभेची होणारी चुरचुर, झणझण.
क्रिवि. गर्दी करून, पुष्कळ. [ध्व.]

रवरवणे क्रि. शरीर किंवा शरीरावयव रवरवीने युक्त होणे; रवरव होणे.

रवरवीत वि. ताठ.

रवला पु. (सोनारी) चार गुंजांपेक्षा जास्त वजनाच्या सोन्याचा आटवून तयार झालेला गोळा.

रवस पु. जोर. (बे.)

रवसड स्त्री. विपुलता. (व.)

रवसडणे क्रि. आवेशाने चालून जाणे; जोराने अंगावर चालून जाणे.

रवळणे न. सोनाराचा एक ठसा.

रवळनाथाचे कूळ १. ज्याचे घरी धान्यादिकांची आठचार दिवसांची देखील बेगमी नाही असा दरिद्री, कंगाल माणूस. (राजा.) २. बावळट मनुष्य. (गो.)

रवळा पु. गडबड; कोलाहल. (व.)

रवंदा पु. पातळ चिखल.

रवा पु. १.कण (बंदुकीची दारू, साखर, वाळू इ.चा). २. मध किंवा कढविलेले तूप इ. न डिवचता ठेवून दिले असता त्यात उत्पन्न होणारे कण. ३.भरडलेले गव्हाचे पीठ, सांजा, कणीक, तांदळाचे पीठ इत्यादीत राहतो तो जाड कणांश. ४. खडा; ढेप (गुळाची, साखरेची). ५. सोन्याचांदीचा रज; सोने आटवून केलेला लहान गोळा. ६. दिव्यामध्ये तापलेल्या तेलातून बाहेर काढावयाचा सोन्याचा किंवा धातूचा तुकडा. ७. जो उगाळतात, ज्याचे गंध, कुंकू वगैरे करतात, तो तांबडा हळकुंडाचा तुकडा; विशिष्ट क्षाराची पुटे देऊन तांबडे केलेले हळकुंड. ८. रहाटाच्या कणेकडास बसविलेले आढीस जोडणारे उभे लाकूड; आरा. ९. दागिन्यावरील कंकर; पेरांच्या आवटीची मुद्रा, ठसा; सोनाराच्या पेराची आवटी नावाच्या ठशांतील खांच (ज्यात सोने, चांदी इ. चा पातळ पत्रा ठोकला असता त्यात फुगा उत्पन्न होतो). (वा.) ० **करणे** - घोटणे; घट्ट करणे; पाठ करणे; अभ्यास करणे: 'त्याचा फायदा पेच रवा (पाठ) करण्याच्या कामास फार झाला.'- प्रतिआत्म ५२८.

रवादार पु. अनुमोदक; साथी; मित्र : 'तुम्ही सरकार नुकसानीचे रवादार काही नाही.'- मइसा ७५६. [फा.रवा+दार]

रवानकी-गी स्त्री. १.बिदागी; जातेवेळची देणगी. २. पाठवणूक; पाठविणे. ३. पत्रोत्तर; उत्तराकरिता पत्र पाठवणे:'श्रीमंत वसईचे मुक्कामी असता बहुत पत्रें आपलीं आलीं व त्यांच्या रवानग्याही बहुत जाल्या.'- मइसा ६.५८२. ४.मालाची निर्यात; विक्रीसाठी जिन्नस, माल परगावी,

दूरदेशी पाठविणे. ५.एखाद्या कार्याच्या उद्देशाने देशांतरी फौज, दारूगोळा, गलबते इ. पाठविणे. ६.पाठवणीच्या वेळी द्यावयाची आगाऊ खर्ची . [फा.]

रवाना पु. परवानगी; परवाना; अनुज्ञापत्रक; पासपोर्ट.
वि. पाठविलेला; धाडलेला; मार्गस्थ केलेला (कागद, माणूस इ.). (क्रि.करणे, होणे).

रवाळ–ळी वि. कणीदार.

रवाळणे, रवाळे न. सोनाराचे एक हत्यार; गड्डीच्या दरामध्ये सोन्याच्या मण्याचे दोन अर्धगोल (छकले) तयार करताना सोन्याच्या तुकड्यावर उभी करून वर ठोकले असता, वरचा ठोका सोसणारी (रवीसारखी) काडी; नक्षी उठविण्याचा खिळा.

रवि–वी स्त्री. गलबतावरील चारी बाजूंना वावरता येण्याजोगा माळा. (को.)

रवि–वी पु. थापटणे; वीट सपाट करण्याचे हत्यार.

रवि–वी पु. १ .सूर्य. २. रुईचे झाड. ३. उजवी नाडी; इडानाडी.[सं.]

रविकांत, रविग्रावा पु. सूर्यकांत; ज्यात सूर्याचे किरण एका बिंदूत केंद्रीभूत होऊन विस्तव पडतो असा दगड. [सं.ग्रावन्=धोंडा]

रविपत्र न. (गोलाकार) बाणाचे चक्र. [सं.]

रविवार–वासर पु. आदितवार; आठवड्याचा पहिला वार.

रविसंक्रमण न. १. सूर्याचे एका राशीतून दुसऱ्या राशीत जाणे. २.विशेषत: मकरराशीत जाणे; मकरसंक्रमण; संक्रांत.

रवी स्त्री. १. घुसळण्याचे साधन; घुसळणे. २.घराचा मजला किंवा छप्पर उंच करावयाचे असता भिंतीवर ठेवले जाणारे लहान खांब प्रत्येकी . घराच्या तुळयांवरच इंद्रकट दिले असता मांडावण ठेंगणी होते. म्हणून त्या तुळयांवर असे दीड–दोन हात उंचीचे खांब देऊन माळ्याची उंची वाढवतात. ३.पखालीत वरून पाणी भरताना तोंड (मुंढा) उघडे राहावे म्हणून त्यात घातल्या जाणाऱ्या बांबूच्या कांबट्या. (रव्या असा अव. प्रयोग.)

रवी स्त्री. गुऱ्हाळावरील अकरा माणसांचा समूह. (सामा.) गुऱ्हाळावरील कामकरी मंडळी.

रवेकड न. १.रहाटाच्या आसाभोवतीचा आरा. २. चाकाचे आरे काढण्यास योग्य असा लाकडाचा तुकडा.

रशना स्त्री. १. दोरी. २.लगाम. ३. कंबरपट्टा. [सं.]

रशी स्त्री. रसाचा गूळ होण्याच्या अवस्थेपूर्वीचा कढलेला रस.

रशेला वि. रसभरीत : 'बूट गंगु हैबतीचे रशेले रिझाऊ ।'– प्रला १५३. [हिं.रसीला]

रश्मि–श्मी पु. १. प्रकाशकिरण; सूर्यास्तासमयीचा सौम्य प्रकाश; तेज. २.दोरी; रज्जू; रस्सी. ३. लगाम. [सं.]

रश्मीकोस पु. कोसाचा एक प्रकार. हा १.५२ मैलाचा असे.

रस पु. १. चव; रुची; आस्वाद; स्वाद. २. चीक; द्रव; पान, फूल, फळ इ. तील पातळ अंश. ३. ऊस, आंबा यातून निघणारा द्रवपदार्थ. ४. अर्क. ५. अन्नपचन झाल्यानंतर तयार होणारा द्रवपदार्थ. यापासून रक्त व घाम बनतो. ६. धातूचे द्रवरूप; कोणत्याही धातूचा वितळून केलेला द्रवपदार्थ; सोने, चांदी इ.ची अग्निसंयोगाने झालेली द्रवरूप स्थिती. ७. (साहित्य.) अंत:करणाच्या वृत्तीचे काही कारणाने उद्दीपन झाल्यामुळे त्या उद्दीपनाचा अनुभव शब्दात प्रकट करण्यास होणारी प्रेरणा. हे नऊ रस आहेत. ८. (ल.) गोडी; आवड; मनोरमता; मोहकता (प्रसंग, साहित्य, भाषण, व्यापार इ.तील). ९. प्रीती; प्रेम; अनुराग. १०. कस; योग्यता: 'ऐसियांचा कोण मानितो विश्वास। निवडे तो रस घाईं डाईं।'–तुगा ३३६२. ११. खाणीतील मीठ; खनिजक्षार (गंधक, मोरचूत इ.). १२. पारा. १३. पुरुषाचे वीर्य किंवा रेत. १४. विष. १५. उत्तेजक द्रव्य (तेल, मसाला, साखर, मीठ इ.). (संस्कृतमध्ये असे अनेक प्रतिशब्द या शब्दाला आहेत.) १६. पाणी. १७. दूध. १८. रसायन; औषध. १९. नारळाच्या रसात गूळ मिळवून तयार केलेले पातळ पेय. २०. मध. [सं.] (वा.) ० **रक्षिणे** – गोडी राखणे; संधान जुळविणे. **रसी उतरणे** – पाय इ. अवयव सुजणे; फुगणे (घोड्याचे). **रसो पडणे** – वादविवादात रंगून जाणे; तन्मय होणे.

रसकणे स्त्री. धुसफूस.
अक्रि. मजेत असणे; सुखाच्या, आनंदाच्या अगर मनाजोग्या कामात गुंग होणे, रमणे.

रसकस पु. १. रसज्ञता. – शर. २. रसाचा कस; रंग; बहार; गोडी. (क्रि. जाणे, घेणे.) : 'भोग आतां रसकस घे बरी ही संधी सापडली ।'– प्रला १९९.

रसकस–घस स्त्री. १. भांडण; बोलाचाली; वाद; धुसफूस. (क्रि. करणे, लावणे, मांडणे.) २. कचकच; ताप चढण्यापूर्वी होणारी अवस्था. ३. रोमांच; शहारे. (क्रि. येणे, वाटणे.) ४. अप्रीती, नावड. (कु.) ५. घासाघीस; जिकीर.

रसकसणे क्रि. १. कसकसणे; अंगावर काटा अगर शहारे येणे. २. हुज्जत घालणे.

रसकापूर पु. पारायुक्त पांढरा कापूर अगर कापराचा गंधक, पारा, मीठ इ. शी केलेला संयोग, मिश्रण; एक औषधी पदार्थ. [सं.रसकर्पूर]

रसकी स्त्री. जखमेतून गळणारे नासके पांढरे पाणी; लस. (बे.)

रसखुंटणा पु. धातूचे गज, सळया तोडण्याची छिनी.

रसगळ पु. मासे पकडण्याचे साधन.

रसगु(गो)ल्ला पु. पनीरपासून बनवलेली बंगाली गोड मिठाई.

रसडी स्त्री. दोरी. [अर. रसन् = दोरी तुल;सं.रशना, रश्मि]

रसडोळस पु. मर्मज्ञ; रसिक :'ते वाचितां ये रसडोळसें । भावलिखित ।' – रुस्व ३६. [सं.रस+ म.डोळा]

रसद पु. मेघ. [सं.]

रसद स्त्री. १.सैन्यासाठी साठविलेला, पाठविलेला दाणागोटा; धान्य. २. कमाविसदाराने केलेला आपल्याकडील मुलखाच्या वसुलाचा भरणा; मामलेदाराने एखाद्या परगण्याचा इजारा घेतला असता सरकारात आगाऊ भरावी लागणारी रक्कम; गावच्या वसुलाचा सरकारात भरणा. ३.स्वारीवरील सैन्याच्या खर्चास दिलेला पैसा. ४. पेढी–हुंडीवाल्याने आपल्या गुमास्त्यास पाठविलेला पैसा. ५. (व्यापक) सैन्यामागून जाणारा दाणावैरणीच्या जनावरांचा तांडा, सैन्यामागून जाणारी माणसे इ. ६. (सामा.) दाणावैरण, दारूगोळा,

सैन्य, पैसा इ. युद्धसामग्री. [फा.रसद्]

रसद स्त्री. विषप्रयोग करण्यात कुशल. [सं.]

रसदभरणा पु. मामलतीसंबंधी रसदेचा भरणा; फौजेचे बडदास्तीकरिता गावागावांतून पाठविले जाणारे धान्य, दारूगोळा इ. सामान.

रसदी वि. अंदाजी वसुलाइतक्या खजिन्यात भरलेल्या रकमेच्या तारणावर घेतलेला (गाव, प्रांत); सरकारांत रसद देऊन घेतलेला.

रसदे पु. सैन्यास रसद पोहोचविणारे.

रसन पु. दोरी. [सं. रशना=दोरी]

रसनगार पु. दोर वळणारा; दोर तयार करण्याचा धंदा करणारा.

रसना स्त्री.१. जीभ; जिव्हा. २. चव; आवड. [सं.]

रसपात्र न. अन्न ठेवण्याचे भांडे.

रसपुष्प न. पाऱ्याचे एक संयुग. [सं.]

रसपूजा स्त्री. औषधाबद्दलची किंमत; वैद्याचे शुल्क :'रसपूजा धरोनि पोटीं । वैद्य औषधांच्या सोडी गाठी।'- एभा ११.१०४४.

रसपे न. गाढवावर नेता येण्याइतके ओझे (धान्य इ. चे).

रसबाळ-बाळी-बेळी-बेळ स्त्री. केळ्याची एक जात (सोनकेळ्याप्रमाणे). [क. रसबाळे]

रसभरित वि. १. रसाने युक्त अगर भरलेले; रसपूर्ण (फळ इ.). २. (ल.) चटकदार; गोड; मनोरंजक; सुंदर (भाषण, वर्णन इ.). [सं.]

रसभंग पु. १. गोडी जाणे; काव्यग्रंथ, गायनादिसंबंधी वाचकश्रोत्यांचा विरस. २. बेरंग; सौंदर्यनाश. ३. उत्साह, उमेद यांवर विरजण पडणे.

रसभावना स्त्री. पुटे देण्याची रीत; किमयेची रीत.

रसम, रस्म,रसमख स्त्री. चाल; रीत. [फा. रस्म=नियम, चाल]

रसमस स्त्री. गडबड.

रसमालगे न. मार.(कु.)

रसरशी(सी)त वि. १. रसाळ; रसपूर्ण. २. भर ज्वानीने युक्त; तारुण्याने मुसमुसलेली. ३. प्रखर; प्रज्वलित; तापून लाल झालेले.

रसरसणे अक्रि. १. रसाने पूर्ण भरून असणे. २.(अग्नी) प्रज्वलित असणे; धगधगणे. ३. तापणे; जळजळीत असणे; जळजळणे (तापात अंग, डोळे, उष्णतेने पाणी, तवा इ.). ४. ऐन तारुण्यात, भर ज्वानीत असणे. ५. भर-भरांत असणे (देवी, गोवर इ. रोग, ज्या त्या हंगामात उत्पन्न होणारे पदार्थ इ.).

रसरंग पु. मकरसंक्रांतीच्या दिवशी ब्राह्मणांना आणि सुवासिनींना दोन पात्रात भरून देतात तो गूळ आणि कुंकू; संक्रांतीचे हळदीकुंकू.

रसरंग पु.१. रागरंग; परिस्थिती; धोरण. २. आनंद.

रसराज पु. एक औषध; मौक्तिक, प्रवाळ,पारा, सोने, चांदी, अभ्रक, कांतलोह, वंग या सर्वांची भस्मे समभाग घेऊन त्यास गुळवेलीच्या रसाच्या आणि शतावरीच्या रसाच्या सात सात भावना दिलेले रसायन. हे उरक्षतनाशक व कामोद्दीपक आहे. [सं.]

रसराय पु. शृंगाररस : 'निर्यास गेलें । रसरायाचें।' - भाए ९९.

रसवडी स्त्री. तोंडी लावण्याकरीता मसाल्याचे बाकर भरून केल्या जाणाऱ्या हरभऱ्याच्या पिठाच्या वड्या. पहा : **पाटवडी**

रसवत्ता स्त्री. कवित्व; स्फूर्ती; रसपरिपोष; काव्यकौशल्य.

रसवस स्त्री. कटकट; त्रास. [ध्व.]

रसवंती स्त्री. १.वाणी; वाचा (रसाचे अधिष्ठान मानली जाणारी); वक्तृत्व; (प्र.) गोड भाषण. २. जीभ. ३.एक वनस्पती.

रसवादी पु. वनस्पतीची परीक्षा व निवड करणारा; वैद्य.

रसवान वि.१. रसभरीत; रसयुक्त-पूर्ण. २.चवदार; स्वादिष्ट; मिष्ट. [सं.]

रसविक्रय पु. (तेल, मीठ, लोणी, साखर, दूध, तूप इ.) रसाळ, पोषक पदार्थांची विक्री. धर्मशास्त्रांत हा दोष मानला आहे. [सं.]

रसवृत्ति-त्ती स्त्री. शृंगारादिक रसभाव. (क्रि. प्रकट करणे)

रससिद्धी स्त्री. १. रसायनशास्त्राचे ज्ञान. २. किमया; रासायनिक गुणांची निर्मिती करण्याची कला अवगत असणे.

रससिंदूर पु. एक रासायनिक औषध; मात्रा (पारा, गंधक व नवसागर यापासून केलेली). [सं.]

रससोय स्त्री. १. स्वयंपाक. २. पक्कान्न.

रसज्ञ वि. १.पहा : **रसिक.** २.योग्यता जाणणारा; महत्त्व ओळखणारा. ३. वैद्य. [सं.]

रसज्ञतावात, रसज्ञानवात पु. एक वातदोष; फक्त चव ओळखण्याची जाणीव शिल्लक राहून बाकी ज्ञानेंद्रियांच्या सर्व जाणिवा नष्ट करणारा वात.

रसा स्त्री. पृथ्वी. [सं.]

रसागळा वि. रसपूर्ण.

रसाणे न. अव. रसरशीत निखारे. [ध्व.रस्]

रसाणे पु. अव. तलवारीच्या मुठीवर सोने, चांदी वगैरे चढविण्याचे काम करणारे लोक; रासायनिक.-प्रश ३०. [सं.रसायन]

रसातल-ळ न. सप्तपाताळांपैकी एक; खालचा पाताळलोक.[सं.] (वा.) **रसातळास-तळी जाणे-बुडणे** - पूर्णपणे नाश होणे.

रसानगी स्त्री. दुसऱ्याच्या मार्फत अगर चिठ्ठीने दिलेली परवानगी. वि. दुसऱ्याच्या मार्फत पाठविलेले. [अर.]

रसाभास पु. १. कृत्रिम, खोटी भावना; अनुचितपणे प्रवृत्त केलेला रस. उदा. पशुपक्ष्यादिकांचे शृंगार वर्णन करणे, हा शृंगाररसाभास झाला. २.अशा तऱ्हेचे काव्य अगर नाटक. ३.स्थायीभाव नावाखाली येणाऱ्या अष्टरसांपैकी एकाचे केलेले खोटे आविष्करण; अशा रसाचे (काव्य, नाट्य इ. रूपाने) केलेले दिग्दर्शन. ४.काही खोट्या बतावणीने खरी भावना दडवून ठेवणे. [सं.]

रसाभेंडा दोर; लाकडे वगैरे सामान.

रसायण-न न. १. पारद, गंधक इ. कांचा रांधा करून केलेल्या मात्रा, भस्मे व इतर औषधे. २.रसज्ञ, सिद्ध पुरुषाने केलेले अमृत. ३.रससिद्धी; धातुपरिवर्तनविद्या; किमया. ४.(रसायनक्रिया करताना फार चपळाई लागते यावरून) अत्यंत निकड; नेट. (क्रि. लावणे, लागणे.) ५. शिकरण. (कु.) [सं.रसायन] (वा.) **० लागणे** - आच लागणे; चटका बसणे :'अद्यापि शत्रूस रसायनच लागलें नाहीं, मग त्याने तह कां करावा?'- ऐलेसं १५५९.

रसायण-न न. १. धातुपोषण. २. अर्थहीन, वरवरचे बोलणे; दुसऱ्याला

भुलवण्याजोगे बोलणे; बहाणा; सबब: 'भगवंतरायाचा तलास करून हस्तगती झाला तरी घेऊन येतो ऐसे रसायनाच्या गोष्टी करून चित्रकूट पर्वतामध्ये आहे तेथे येऊन बसले.'- पेद १४.९. २. वरवरचा स्नेह; सलोखा :'सर्वांसी रसायेण चंदरोज या प्रान्तांत राहणे तर राहावे.'- पेद १५.७९. ३. समजूत; सलोखा; मिलाफ. 'होळकरांचे मते रसायण करून द्यावे असे आहे.' -पेद ९.८२. ४. कारस्थान; भानगड; मसलत : 'वरकड इकडील वर्तमान - सोलापुराकडील रसायण लवकर होईलसे दिसत नाही.' - पेद ३७.११०. (वा.) **रसायणावर घालणे** - वाटाघाटी, सामोपचार किंवा तहाचे बोलणे सुरू करणे: 'आम्ही रसायणावर घालून सदाशिवपंतास तेथे बोलविले काय आणि त्याणी दंगा आरंभिला. उत्तम न केले.'-पेद ३०, पृ.९४.

रसायनशास्त्र न. मूलद्रव्ये, त्यांचे गुणधर्म व मूलद्रव्यापासून होणारी संयुगे यांचा अभ्यास करणारे शास्त्र.

रसायनाकर्षण, रसायनप्रीति-ती न. स्त्री. १.विजातीय परमाणू ज्या शक्तीने एकत्रित होतात ती शक्ती. २. दोन किंवा अधिक तत्त्वांना एकत्र करून नवीन पदार्थ उत्पन्न करणारी आणि त्या नव्या पदार्थांतल्या तत्त्वांना पुन्हा निराळे होऊ न देणारी शक्ती.

रसायनी वि. १. रसादी धातू उत्तम प्रकारे तयार करणारी. २. मुत्सद्दी; कारस्थानी : 'बाळाराम शेट रसायनी, बाहेर दुजागी (द्वैतभाव) न दिसू देता क्रम चालविला.'-होकै १७५.

रसाळ-ल वि. १. रसभरीत; ज्यामध्ये रस पुष्कळ आहे अशी. २. रसयुक्त; मधुर; गोड. ३. चटकदार; मनोरंजक; आवडेलसे (भाषण). ४. बरका (फणस). ५. गमतीचे, विनोदी, हास्यजनक (भाषण). ६. खमंग; चांगले मुरलेले; चमचमीत (पाक, लोणचे, ओला पदार्थ). ७. रसिक; रसज्ञ: 'तू सांग तो वर तुला रुचला रसाळे।'-नल ९१.

रसाळी स्त्री. १.आंबरसाचे जेवण. (व.) २.उसाच्या चरकाचे खालचे लाकूड, काटवट.

रसांजन न. डोळ्यात घालावयाचे एक औषध.

रसिक वि. १. नृत्य, गायन, काव्य इ.ची विशेष आवड असून त्यातील मर्म जाणणारा; सहृदय. २. गमतीदार बोलण्याने स्वत:चे व दुसऱ्याचे मन रिझवणारा. ३. गमत्या; विनोदी. ४. भावनाप्रधान. ५. चवदार; स्वादिष्ट; मधुर. ६. (ल.)आल्हाददायक; सुखोत्पादक. [सं.]

रसिक संप्रदाय एक संप्रदाय. या संप्रदायात राम-सीता यांची युगुल उपासना केली जाते. शान्त, दास्य, वात्सल्य, सख्य व मधुर या पाच रसांनी युक्त उपासना ही या संप्रदायाची साधना आहे.

रसीद स्त्री. पावती; पोच (रसद भरल्याची); माल पोचल्याचा दाखला. [फा. रसीद्; तुल. इं.रिसीट]

रसुलो स्त्री. घोड्याचा खुरासंबंधी एक रोग. यात गुडघ्यापासून पायास खुरापर्यंत गळवे होतात. -अश्वप २.२५७.

रसोई स्त्री. स्वयंपाक.

रसोत्कर्ष पु. १. बहर; समृद्धी; संपन्नता; वैपुल्य; उधाण; ऊत; मोहर. २. गायन, नृत्य, संगीत, साहित्य इत्यादींमध्ये जो रस प्रकट करायचा असतो त्याचा पूर्ण परिपोष.

रस्ता पु. १.मार्ग; वाट. २.चाल; वहिवाट; नियम. [फा.] (वा.) **० करणे** - वसाहत किंवा वस्ती करणे, मुक्काम करणे : 'मराठ्यांच्या त्रासामुळे खोकरी येथील वस्ती मोडून तेथील सर्व लोक मुरूडास येऊन रस्ता करून राहिले.'- ज ८३.

रस्तेबंदी स्त्री. १. रस्ते तयार करण्याचे काम. २. रस्तादुरुस्ती. [फा.]

रस्सा पु. पुष्कळ रस असलेली भाजी; मसाला इ. घालून केलेले पातळ तोंडी लावणे (बटाटा, मटण इ. चे).

रस्सा-स्सी पु. स्त्री. मोठी जाड दोरी; दोर; कासरा; दोरखंड. [अर. रसन्.; सं. रश्मि]

रस्सीखेच स्त्री. दोरओढीचा विलायती खेळ.

रहकला पु. बैलगाडी. पहा: **रेकला** [हिं.रहकला]

रहगुज(द)री वि. १. वाटसरू; फिरस्ता. २. वतनदार नसलेला. [फा.रह् = रस्ता + गुझर]

रहदारी स्त्री. १. माणसाचे जाणे-येणे; मालाची ने-आण; वर्दळ; जा-ये; राबता. २. जकात; पट्टी. ३. जकातमाफीचा परवाना. [फा.राह-दारी]

रहमान वि. दयाळू. [अर.]

रहवर-ळ पु. वेगवान घोडा : 'मित्ररथीचा जैसा रहवर । बलाढ्य सुंदर तैसेचि।' -ह २२.३६. [फा.रहवार]

रहवाई वि. राहणारा.

रह(हि)वाल स्त्री. घोड्याची धावण्याची चाल.

रहवाळ न. घोडदळ :'त्याहून मागे रहवाळ आले ।' - सारुह ७.५४.

रहसाळी स्त्री. रहस्य; दृढ मैत्री; एकमेकांशी वागण्यांतील गोडीगुलाबी आणि प्रेमळपणा.

रहस्य न. १. गुप्त गोष्ट; खासगी गोष्ट; गौप्य. २. मैत्री, स्नेह, प्रेम; परस्परांचा सख्यभाव: 'रहस्य राखून रंग मारला.'-ऐपो २५३. ३. विनोद; खेळ; गंमत; चेष्टा; थट्टामस्करी; बागडणे; बोलणे. ४.मुख्य उद्देश; तात्पर्य; महत्त्वाचा मुद्दा; खोच. ५.गोडी; फायदा; चांगलेपणा. [सं.](वा.) **रहस्यात येणे** - खुलणे; रंगात येणे.

रहस्यकथा स्त्री. एक वाङ्मय प्रकार. गुन्हेगारी कथा; गुप्तहेरकथा.

रहंवर पु. १. पहिल्या प्रतीचा, दर्जाचा रथ; श्रेष्ठ रथ. २.(सामा.) रथ. [सं.रथवर, रंह:(= गती); प्रा. रहवर]

रह:स्थान न. गुप्त जागा; एकांत जागा; खासगी जागा. [सं.]

रहा स्त्री. १. मार्ग; वाट : 'रघुनाथराव यांस सुरतेहून खुस्कीचे रहाने मुंबईस रवाना केले.' - ऐलेसं ७.३५७०. २. रीत. ३. वागणूक; वर्तन. [फा. रह]

रहाकळ स्त्री. न. कावरेबावरे होणे. पहा : **राहकळ**

रहाट पु. १. विहिरीतून पाणी काढण्यासाठी वापरण्याचे एक साधन. २. यंत्राचे चाक (पाणी काढण्याच्या, सुतास पीळ देण्याच्या दोऱ्या वळण्याच्या उपयोगी); (सामा.) एखाद्या यंत्राचे चाक. ३. यंत्र. ४.कांड्यावर सूत भरण्याचे साधन. ५. सूत कातण्याचा चरखा. [सं. अरघट्ट; प्रा.अरहट्ट-रहट]

रहाट पु. घोष :'ब्रह्मानंदरससमा नांती (= नांदती) देदिकांचे (= वेदिकांचे) रहाट.'-कला ९. [सं.रट्]

रहाटगाडगे न. स्त्री. १. वर गाडग्यांची अगर पोहऱ्यांची माळ असलेले रहाटाचे मोठे चक्र. २. (ल.) नशिबाचे नेहमी होणारे फेरफार; चांगली किंवा वाईट परिस्थिती; ऐहिक व्यापार; खालीवर होणे (प्रपंच,व्यवहार इ.ची). ३. एकसारखी देवघेव; व्यवहार.

रहाटणे क्रि. १. एखाद्या कामात अभ्यस्त होणे; रुळणे; काम-धंदा अंगवळणी पडणे. २. वागणे; वर्तणे.

रहाटपाळणा पु. यात्रेत अनेक पाळणे बांधलेले फिरते चक्र; जत्रेतील खालीवर फिरणारा पाळणा.

रहाटवड स्त्री. रहाट तयार करण्यास लागणारी साधने (कणा, रवे, खापेकड, लोटे, तुंबे इ.). (को.)

रहाटवणी न. रहाटाचे पाणी; रहाटगाडग्याने काढलेले पाणी.(को.)

रहाटागर पु.न. रहाटाने पाणी देऊन तयार केलेले पीक, मळा, शेत.

रहाटी स्त्री. १. आंबे, बाभळी, सुरमाड इ. ची निबिड राई; जाळी; दाट झाडी. २.किल्ल्याच्या पायथ्याची झाडी (जीमध्ये थोडीशी वस्ती असते अशी).

रहाटी स्त्री. १. पायरहाट; पायाने चालविण्याचे रहाटगाडगे. २. सूत उकलण्याकरिता ज्यावर प्रथमत: सूत ताणतात ते चाक.

रहाटी स्त्री. १.पद्धत; रीत; शिरस्ता; पूर्वीपासून चालत आलेला प्रघात; योग्य मार्ग. २. (काव्य) वागणूक; वर्तणूक.

रहाट्या पु. १. रहाट चालविण्यास नेमलेला अगर नेमण्यास लायक मनुष्य, पशू. २. दोन्ही बाजूंच्या वतीने खेळणारा खेळाडू. ३. एकदा एक तर एकदा दुसरी बाजू घेणारा; दुटप्पी; वेळ येईल तसे वागणारा. ४. (ल.)व्यवस्थापक; प्रमुख. ५.(लग्न व समारंभात) वेतन न घेता काम करणारा. ६. ओझे वाहून शिवाय वाट दाखविणारा वाटाड्या; हमाल व वाटाड्या.

रहाड-डी स्त्री. १. राड; चिखल. २. शिमग्यात धुळवडीसाठी केलेली चिखलाची खळी. ३. धुळवडीत खेळणे; धुळवड. ४. चिकचिक; राड (जमीन, रस्ता यावरील). ५. चिकचिक; रेवडी (नासके कलिंगड, पाघळलेला गूळ इत्यादीचा). पहा : **राड**

रहाडण स्त्री. खापराचा तवा; परळ. (व.)

रहाडा-डी पु. १. रगाडा; गर्दी; गडबड (लग्न, मेजवानी इ.ची). २. (सामा.) गलका; गोंधळ; धामधूम इ. (क्रि. घालणे, पडणे, असणे.)

रहाडी स्त्री. एक बारीक जातीचा कळक; चिवाटी.

रहाण-णे न. १. ज्यामध्ये पिशाच-संचार होतो असे शरीर. २. अंगात दैवत आणवून बोलविणे. एखाद्याच्या अंगी पिशाचाचा संचार व्हावा म्हणून देवभगत करतात तो वाद्यांचा गजर. (क्रि. घालणे, माजवणे.) ३. (ल.) एखादा मनुष्य मरायला टेकला असता किंवा मेला असता होणारी रडारड.

रहाण न. कामाचा ढीग; तुंबलेले काम. (ना.)

रहा(ह)णी स्त्री. वागणूक; वर्तणूक; वहिवाट; चाल; पद्धत. रहणीस लागणे-लावणे असा प्रयोग येतो. [फा.राह]

रहादार पु. १.वाटसरू; वाहतूक करणारा :'वाणी उदमी वगैरे रहादार यांस लुटून वाटा मारितात.'- वाडसमा २.१५५. २. मार्ग-रक्षक: 'मांग, रामोसी व रहादार.'- भाअ १८३७. [फा.राहदर्]

रहारास्त वि. योग्य; न्याय्य; सरळ; प्रामाणिक, बिनचूक (भाषण, वागणूक). [फा. राह् + रस्त]

रहारीत स्त्री. चालरीत: 'सांप्रत त्यांची रहा-रीत मराठे लोकांप्रमाणेच आहे.'-भाजुऐगो २७.

रहासाळी स्त्री.(को.) पहा : **रहसाळी**

रहाळ स्त्री. (समासात उपयोग) प्रांत; देश; परगणा; जिल्हा. उदा. पुणे रहाळ, नाशिक रहाळ इ. २. विवक्षित भाग, हद्द (प्रांताची); गावातील वस्तीचा विशिष्ट भाग; वाडी. ३. वेटाळे.

रहाळ-ळी स्त्री. पु. १. दाट परिचय; सहवास; घरोबा; निकट स्नेहसंबंध. २.(क्र.) येणाऱ्या-जाणाऱ्यांची गर्दी, दाटी; वर्दळ.

रहाळणे क्रि.१. चांगला परिचित होणे; दाट घरोबा असणे. २. अंगवळणी पडणे; सवय होणे.

रहाळसहाळ, रहाळसाळ वि. १. खुल्या दिलाचा; मोकळा; मनमिळाऊ. २. (व्यापक) मनमोकळी; दिलजमाईची; प्रेमळ (भाषा).

रहाळी पहा : **रहाटी**

रहित वि. शिवाय; खेरीज; वर्जित. (समासात उपयोग) उदा. जलरहित, धनरहित. [सं.]

रहि(ही)त वि. १. (हिशेबी) बाकी; अवशिष्ट; मागच्या खर्चात न आलेले. उदा. रहित आढावा-जमाखर्च इ. २. राहिलेले; शिलकी; अद्याप करावयाचे असलेले. ३. तहकूब; रद्द असलेले.

रहिवास पु. १. राहणे; वस्ती; मुक्काम; निवास; वास्तव्य. २. घर; निवास; राहण्याचे ठिकाण : 'मजवेगळा रहिवास । परिमळास असेना ।' - एभा १३.३४६. ३. येणे-जाणे; रूढी; चालीरीती; रिवाज. (अहि.)

रहिवास चाल घोड्याची एक चाल; बसणाराचे अंग हलू न देता घोड्याने जाणे.

रहिवासणे क्रि. १. वस्ती, मुक्काम करणे; राहणे. २.स्थिर होणे; चिकटणे; रमणे.

रहिवासी वि. वसती करून राहणारा; स्थायिक.

रही स्त्री. १. रांग. पहा : ३ **रव** ३. २.पायाची धूळ : 'वंदिल्या हृषिकेशाच्या रही ।'-अफला ५९.

रहुपणी स्त्री. हिवाळ्यात भाताला मोड आणून ते पेरणे; रोपण. (राजा.)

रहू पु. (प्र.) (को.) पहा : **रोह** [सं. रूह]

रहेपट स्त्री. थापटी; थापड. (ना.)

रहोपहो पहा : **रोहोपोहो**

रळप(फ)ळ स्त्री. १. गोंधळ; गैरव्यवस्था; बेशिस्त; घालमेल (परिस्थिती, काम, वस्तू इ.ची): 'ऐसें कां जालें मजही न कळे । कीर्तनाचे रळेपळे जगीं।'- तुगा १२८९. २. बेचैनी; दु:ख; अस्वस्थता. ३. जळफळ; भांडण. ४. थट्टा. पहा : **रळी**

रळी स्त्री.१. विनोद; थट्टा; मस्करी; कौतुक : 'तेथें सोयरीकीचिया संबंधीं । रळी बोलो।'-ज्ञा ११.५४४. २. लडिवाळपणे धरलेला आग्रह; हट्ट. ३. तंटा; भांडण. ४. चेष्टेने, वेडेवाकडे बोलून केलेली

थट्टा; खोडी. ५. विटंबना.

रळी वि. ठपका.

रक्षक, रक्षकगण, रक्षणाईत, रक्षपाळ १. रक्षणकर्ता; संरक्षण करणारा. २. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीचे रक्षण करणारे हत्यारबंद शिपाई. ३. पहारेकरी; शिपाई. ४. पहारेकरी; रखवाल्या; राखण्या. ५ (ल.) कृपण; चिक्कू. [सं.]

रक्षणे क्रि. सांभाळ करणे; राखणे; जपणे. (वा.) **रक्ष रक्ष होणे** – अगदी अगतिक दशा प्राप्त होणे; त्राही त्राही भगवान अशी अवस्था येणे.

रक्षा स्त्री. १. राखण; जोपासना. २. सुरक्षितपणा. ३. (कशाची बाधा होऊ नये म्हणून) मनगटावर बांधतात तो अभिमंत्रित ताईत; गंडा. ४.श्रावणी पौर्णिमेला हातात बांधावयाची राखी. ५.लाख. ६. प्रसूत स्त्री आणि तिचे मूल यांच्या गळ्यात इडापिडा टाळण्यासाठी सहाव्या दिवशी सठीची पूजा करून तिला वाहून बांधतात तो दोरा. ७.राख; भस्म. ८. रखेली; ठेवलेली स्त्री.

वि. रक्षण केलेली; रक्षित. [सं.]

रक्षापात्र न. सिगारेट किंवा विडीची राख झटकण्याचे किंवा टाकण्याचे भांडे. [सं.]

रक्षाबंधन न. श्रावणी पौर्णिमेस करतात तो, बहिणीने भावाच्या हातांत राखी बांधण्याचा विधी. [सं.]

रक्षावा पु. रक्षण : ' जेणें जेणें मागें रिघावा करील तैसा तैसा रक्षावा ।'– गीता १.६९४.

रक्षित वि. राखलेले; सांभाळलेले; संरक्षित; सुरक्षित.

रक्षी पु. १. संरक्षक; पालक. २. पहारेकरी; रखवालदार.[सं.रक्षिन्]

रक्षोविधी पु. राक्षसविवाह.

रक्षोहण न. रक्षणाच्या मंत्रांचे पठण; स्तोत्रगान.

रंक वि. १. मतिमंद; मूर्ख. २. कंजूष. ३. गरीब, दीन (माणूस). ४. लाचार; क्षुद्र; राजा किंवा राव या शब्दाच्या जोडीने येतो.

पु. भणंग; समाजातील हलक्या दर्जाचा माणूस. [सं.]

रंक न. जीवत्व : 'भीतरीं नसतां रंक । लोक प्रसीध वाजविति संख ।' – ऋ ९३.

रंकक्रिया स्त्री. भिकाऱ्याप्रमाणे वागणूक.

रंग पु. १. एखाद्या वस्तूतून बाहेर पडणाऱ्या किरणांच्या वेगवेगळ्या तरंगलांबीची डोळ्यांना होणारी दृश्य प्रतीती. एखाद्या वस्तूवर प्रकाश पडला असता ती वस्तू ज्या रंगाची असेल, त्या रंगाच्या किरणाशिवाय इतर किरण शोषले जाऊन त्या रंगाचे किरणच फक्त बाहेर टाकते. त्यास रंग म्हणतात. २. रंगाची पूड; पदार्थाला तांबडा, काळा इ. कोणताही वर्ण देण्याचे द्रव्य; रंगविण्याचे द्रव्य. ३. (ल.)तेज; तेजस्विता; चकाकी; भपका. ४. गायन, कीर्तन, तमाशा, भाषण इत्यादीतील लोकांचे मनोरंजन होण्याजोगे विशेष गाणे, बजावणे, नृत्य इत्यादी करमणुकीचे प्रकार, मजा, शोभा, आनंद. ५. देखणेपणा; उत्कृष्टता; चांगली स्थिती (मनुष्य, वृक्ष, बाग, शेत इ. पदार्थांची किंवा संसार, व्यवहार इ. ची). ६. देखावा; आकार; ढब; डौल; घाट. ७. अंदाज; चिन्ह; परिस्थिती; प्रसंग; संधी. ८. सोंगट्यांचे चार भिन्न प्रकार; गंजिफाचे निरनिराळे दहा प्रकार; पत्त्यांच्या चार बाजू प्रत्येकी. ९. तमाशा; खेळ. १०. रंगण; क्रीडास्थान (नाट्य, नृत्य इ. चे); हौदा; आखाडा; रंगभूमी; सभागृह; सभामंडप. ११. नवरा; पती. (समासात स्त्रीच्या नावापुढे योजतात.) उदा. सीतारंग. १२. विचार; बेत. १३. तऱ्हा; ढोंग.१४. महत्त्व : 'या कारणें कांहीं रंग । राखोन जावे ।'– दास १७.७.२१. १५. विवाह, शिमगा इ. प्रसंगी एकमेकांच्या अंगावर टाकतात ते केशर इ. चे रंगीत पाणी किंवा ते टाकण्याचा समारंभ. १६. प्रेक्षकांचा किंवा श्रोत्यांचा समुदाय. १७. चुना; सफेती; उजळा. (क्रि. देणे) १८. रंगभूमी. १९. उत्कर्ष; संभव; संधी. २०. डूब; वाण. २१. प्रकार. २२. (कलांचा) उत्कर्ष. २३. वर्तन; वातावरण. [सं. रञ्ज; फा.] (वा.) ० **उडणे**– मूळचा रंग जाणे, फिका होणे; तेज कमी होणे. ० **उतरणे** – १. कालांतराने रंग कमी होणे, उडणे. २. रंग व्यवस्थित सर्वत्र पसरणे. ० **करणे** – मजा मारणे; मौज करणे. ० **खेळणे** – विवाहादी प्रसंगी एकमेकांच्या अंगावर रंग उडविणे. ० **चढणे** – अंमल, निशा, मद, धुंदी येणे. ० **चढविणे** – योजना आखणे; तर्क बांधणे; विश्वास ठेवणे. ० **दिसणे** –एखादी गोष्ट होईलशी वाटणे, आकारमान येणे; संभव असणे. ० **देणे** – गुलाल उधळणे; जयजयकार करणे. ० **भरणे, माजणे**– भरास येणे; जोमात येणे; मजा येणे. ० **मारणे** – बाजी मारून नेणे. ० **राखणे, रंगाची मोट बांधणे** – विजयाने, वैभवाने हुरळून न जाता सभ्य आणि सौम्य वर्तन कायम ठेवणे; आपल्या प्रतिपक्षावर वादात किंवा काही कामात विजय मिळविल्यास सद्भावनेने वागणे; अशा प्रसंगी कठोरपणा न करणे; त्याला न हिणविणे; अधिक पेचात ढकलण्याचा प्रयत्न न करणे. **रंगाचा भंग करणे** – आनंदाचा विरस करणे. **रंगात येणे** – तल्लीन होणे; रंगून जाणे. **रंगास चढणे** – शोभा प्राप्त होणे; खुलून दिसणे; पूर्णतेस येणे; विकास पावणे; भरास येणे. [सं.]

रंगकला स्त्री. चित्रात योग्य रंगांची निवड व ते योग्य तऱ्हेने वापरण्याचे कौशल्य.

रंगचित्र न. दिग्दर्शन कौशल्य; नाट्यसंहिता तंत्र; रंगमंच तंत्र.

रंगछाया स्त्री. गायनपद्धती : 'वारा धावे भलतेया । तैसी माझी रंगछाया ।' नाम १४९१. [सं.]

रंगजोडवे न. स्त्रियांच्या पायाच्या बोटात घालावयाचे चांदीचे वळे.

रंगटेड पु. भामट्यांचा नाईक. – गुजा १७.

रंगडी, रंगडी ढंगडी–धंगडी स्त्री. १. ढंग; चाळा. २. फसगंमत; फसवेगिरी; खोडी; लबाडी; डावपेच इ. (अनेकवचनी उपयोग.)

रंगढंग न.पु. १. युक्ती; कारवाई; फंद; चाळा; लटपट; कावा. (क्रि. करणे, मांडणे, चालविणे.) २. रागरंग; स्वरूप; एकंदर देखावा. ३. नाचरंग वगैरे; स्वच्छंदी आचरण; चैन; विलास.

रंगण न. अंगण.

रंगण न. १. मंडळ; वर्तुळाकार वाट, प्रदेश; भजनासाठी भक्तमंडळी गोलाकार धरतात तो फेर. २. खेळाची जागा; खेळाचे गोल मैदान. ३. अंगण; प्राकार. ४. भोवरा इ. खेळाचे वर्तुळ, हद्द. ५. घोडे फिरविण्याचे मैदान. ६. नाटकगृह; नर्तनगृह. ७. सभा; मंडळी

(खेळासाठी जमलेली). [सं.रंगांगण] (वा.) **रंगणात येणे** – १. प्रतिपक्षाशी लढावयासाठी पुढे सरसावणे; सामन्यास छातीठोकपणे येणे; धैर्याने पुढे येणे. २. देखत, समोर आरोप करण्यास धजणे.

रंगणटोला पु. रंगणांत भोवरा फेकणे; चिंगाटी फेकणे.

रंगणावळ स्त्री. रंगविण्याबद्दलची मजुरी; रंगविण्याचा खर्च.

रंगणे अक्रि. १. काही आनंद, करमणूक, सुखास्वाद इ. मध्ये गढून जाणे किंवा तल्लीन होणे (गाणे, ईश्वरभक्ती वगैरेंत); तन्मयता पावणे. २. कपडा विशिष्ट रंगाचा होणे; रंग घेणे; रंगीत होणे; विशिष्ट वर्णयुक्त होणे. ३. रंगात येणे; भर येणे. [सं. रञ्ज्]

रंगत स्त्री. सजावट. [सं.]

रंगदळा स्त्री. वि. रंगविलेली : 'कीं रंगदळा चाडरीया। चैतन्याचीया।- शिव ३८०. [सं. रंग]

रंगदेवता स्त्री. १. गाणे- बजावणे, कथा, पुराण, प्रवचन, व्याख्यान इत्यादींना जिच्या प्रसादाने रंग येतो, यश मिळते अशी एक कल्पित देवता; खेळात रमणीयता आणणारी देवता. २. खेळांची अधिष्ठात्री देवता. [सं.]

रंगद्रव्ये न. अव. १. (रसा.) सूर्यकिरणांचा काही विशिष्ट भाग नष्ट करून टाकणारी द्रव्ये. २. रंगविण्याच्या कामी लागणाऱ्या वस्तू, पदार्थ. ३. वनस्पती किंवा प्राणी यांच्या बाह्यत्वचेमध्ये आढळणारे आणि त्याला विशिष्ट रंग प्राप्त करून देणारे द्रव्य. उदा. हिरव्या वनस्पतींमधील हरितद्रव्य किंवा रक्तातील लाल रक्तपेशी. [सं.]

रंगध्वनि–नी स्त्री. गोड लकेर.

रंगपट पु. रंगभवनातील, नाटकगृहातील पात्रांना रंगवण्याची खोली; पात्र रंगून तयार होण्याकरिता केलेली जागा. [सं.]

रंगपंचमी स्त्री. फाल्गुन वद्य पंचमी. या दिवशी एकमेकांवर रंग उडवितात.

रंगपाटी स्त्री. रंग तयार करून ठेवतात ती सपाट पाटी; (इं.) पॅलट.

रंगबहार पु. १. मौज; कमालीचा आनंद, सुख; आनंदाची लूट. २. भव्य, आनंददायक दृश्य; थाटमाट. ३. नाना प्रकारच्या करमणुकी, खेळ, कसरती किंवा त्या जेथे चालतात ते ठिकाण. ४. मुबलकता; पीक इत्यादींची आनंदप्रद रेलचेल.

रंगभंग पु. विरस; आनंदाचा नाश; मध्येच एकदम येऊन खेळ थांबविणे, बंद करणे; खेळातील आनंद, गोडी नाहीशी करणे; रसभंग.

रंगभूमिका स्त्री. कीर्तनाची जागा.

रंगभूमी स्त्री. १. नाटकगृह; प्रयोग किंवा नाटक करून दाखविण्याची जागा; सभागृह; सभामंडप. २. मर्दानी खेळांचे मैदान; रणांगण. [सं.]

रंगभूषा स्त्री. नाटकातील पात्रास सजवणे; रंगरंगोटी.(क्रि.करणे)

रंगमहाल पु. विलासमंदिर; दिवाणखाना; आरसे व तसबिरी लावून सुखोपभोग घेण्यासाठी केलेले घरातील दालन; श्रीमंत लोकांची आरशांनी, रंगीबेरंगी चित्रांनी सुशोभित केलेली विलास करण्याची खोली; (विशेषत:) निजण्याची खोली. [फा.]

रंगमंडप पु. सभामंडप.

रंगमंडपी स्त्री. खेळाची अथवा करणमुकीची जागा. [सं.]

रंगमाळ स्त्री. लग्न वगैरे समारंभाच्या मिरवणुकीपुढची नक्षत्रमाळा; रंगीबेरंगी कागदांची अथवा बेगडांची फुले कातरून दोऱ्यात ओवून काठीला बांधून लग्नकार्यात धरण्याच्या माळा.

रंगमाळा स्त्री. १. रांगोळीची चित्रे. २. सिंहासन अथवा मूर्तीचे देवालय यांच्या भोवती तिन्ही बाजूंनी बसविलेल्या लाकडी अगर धातूच्या सोंगट्या अथवा निरनिराळ्या आकृतीची चिन्हे. ३. नक्षत्रपुंज; तारे. ४. नक्षत्रमाळा; (सामा.) रंगमाळ. [सं.]

रंगमूर्ती स्त्री. ज्याच्यामुळे समारंभास विशेष शोभा येते असा मनुष्य अथवा मूर्ती; कृष्णाचे बालस्वरूपी लाकडी अथवा धातूचे चित्र; श्रीकृष्णाची मूर्ती. [सं.]

रंगमेजी वि. कृत्रिम; वरकरणी; तोंडदेखले; पहा : **रंगामेजी.**

रंगमेळ पु. रंगमिलाफ; रंगसंगत; रंगसंवाद.

रंगयोजना स्त्री. इष्ट परिणाम साधण्यासाठी निवडलेले व दिलेले रंग.

रंगरस पु. आनंद; हर्ष.

रंगरूट पु. सैन्यात नवीन भरती होणारा शिपाई.
वि. धटिंगण; आडदांड. [इं. रिक्रूट]

रंगरूप न. आकार, रंग, वर्ण, चर्या, देखावा इ. (फळ, व्यापार, व्यक्ती इ. चा); बाह्यस्वरूप.(वा.) **रंगरूपास आणणे–** चांगल्या स्थितीस आणणे; निरोगी करणे; ऊर्जित दशेस आणणे.

रंगरेज पु. रंगारी. [फा. रंगरेझ्]

रंगरेजी स्त्री. रंग देणे; रंगविणे; सफेती. [फा.]

रंगरोगण न. १. तेलिया रंग. २. सामान्यत: रंग देणे, साफसूफ करणे वगैरे क्रिया. [फा. रंग-इ- रौघम्]

रंगलाल वि. चैनी (मनुष्य).

रंगलूट स्त्री. (गंजिफाचा खेळ) गंजिफाच्या डावात सर्वांची पाने एका रंगाचीच पडली असता तो हुकूम फुकट जाऊन सर्वांनी लुटून घेणे.

रंगवट स्त्री. खेळण्याची जागा; क्रीडांगण; रंगण.

रंगवणी न. रंगाचे पाणी.

रंगवणे सक्रि. १. रंगाई; रंग चढवणे;(केस) रंगवणे; (इं.)डाइंग. २. चितारणे.

रंगवल्ली स्त्री.रांगोळीने काढलेले चित्र. पहा : **रांगोळी**

रंगशाळा, रंगांगण स्त्री. न. नाटकगृह; खेळाचे मैदान; तालीम; नर्तनशाला; जेथे नाटकांतील पात्रे रंगवितात ती जागा. [सं.]

रंगशिला, रंगशिळ स्त्री. १. दगडी पाटा. २. देवाच्या मूर्तीपुढील मोठी कीर्तनकाराची जागा; शिळा; पंढरपूरच्या विठोबाच्या पुढील मोठी शिळा (यावर भक्त नाचतात). [सं.]

रंगसफेदी स्त्री. सारवासारव; मुलामा; वरून झिलई.
[सं. रंग + फा. सफेत]

रंगसभा स्त्री. १. खेळ अथवा करमणूक यासाठी असलेली जागा. २. खेळाडू अगर मनोरंजन करणारी मंडळी.

रंगसही स्त्री. तिफाशी खेळात पक्क्या रंगाच्या चारही सोंगट्या पटाच्या चारही बाजू हिंडून आपल्या पटाच्या डाव्या बाजूकडील घराच्या ओळीत येऊन बसणे.

रंगसाज पु. चित्रकार.

रंगसाहित्य न. १. सिंदूर वर्णाचे लेपन. २. आनंद निर्माण करणारे साहित्य.
रंगस्थल न. रंगण. पहा : **रंगभूमी**
रंगाई स्त्री. रंगणावळ; रंग देण्याची मजुरी, किंमत. (हिं.) [फा.]
रंगाकार पु. रंग
रंगाचळ न. रंगाचा भर; आनंद; उत्साह.
रंगाची (रंगीत) तालीम रंगभूमीवर नाटक होण्यापूर्वी खाजगी रीतीने सर्व रंगभूषा करून प्रयोग करून पाहणे.
रंगामेज पु. १. चितारी. २. (ल.) ढोंगी, दांभिक इसम. [फा. रंगामेझ]
रंगामेजी स्त्री. १. आरसे, चित्रे इत्यादींनी सुशोभित करणे; दिवाणखाना इत्यादीला वेगवेगळे रंग देऊन चित्रे, वेलबुट्टी काढून त्याचे सौंदर्य वाढवणे. २. (ल.) दांभिकता; कृत्रिमता; कुटिलता.
रंगारी पु. कपडे रंगविणारा; वस्त्रे रंगवून उपजीविका करणाऱ्यांची एक जात. [सं. रंज्; फा.]
रंगारी हिरडा पहा : **चांभार(री)हिरडा**
रंगारून क्रिवि. १. सोबतीने. २. काळजीपूर्वक.
रंगार्‌ना क्रि. सांभाळणे; बाळगणे; सोबत करणे.(झाडी)
रंगालय न. नाट्यशाळा. [सं.]
रंगाला न. चामडे ताणून घोटण्याचे साधन. हे सुताराच्या पटाशीसारखे पण बोथट धारेचे असते.(राजा.)
रंगाळ वि. गडद रंगाचे : 'रंगाळ कुंकमाचा ठसा.'– सव ४२. [सं. रंग]
रंगांगण पहा : **रंगशाला**
रंगिन न. चांदीवर सोन्याचा पत्रा चढवून तयार केलेले जरतार.
रंगिला वि. रंगेल; ख्यालीखुशालीचा; चैनी; विषयी; खेळाडू. [हिं.]
रंगी स्त्री. जुगार; जुवा; पत्त्याचा एक खेळ.
रंगी वि. चांगल्या वर्तणुकीचा. [फा.; हिं.]
रंगी, रंगीन, रंगील वि. रंगीत; रंगविलेले. २. पहा : **रंगेल**
रंगीढंगी वि. रंगेल; चंगीभंगी; व्यसनी.
रंगीत वि. रंगी; रंगविलेले; रंग असलेले; कुसंबा, हिंगूल इ. रंगांनी रंगविलेला (पदार्थ, वस्त्र, लाकूड इ.).
रंगीबेरंगी वि. अनेक रंगांचा.
रंगील १. सुंदर; रंगेल; प्रेमळ. २. कबुतरांची एक जात.
रंगेरा पु. वेलीसारखे झाडास विळखे घालणारे एक झाड.
रंगेरी स्त्री. (गंजिफांचा खेळ) अखेरीस म्हणजे सर्व खेळाच्या शेवटी खेळणाराची अखेरी दोघांनीही मारली, तिघांचेही पान एकाच रंगाचे निघाले, तर होणारा डाव.
रंगेल–ला–ली वि. आनंदी; विनोदी; खेळाडू; खेळकर; चैनी; विषयी; विलासी; ललितकलाप्रिय; गाणे, तमाशा इत्यादींचा आस्वाद, मस्करी यांची अधिक आवड असलेला; आनंदी; रसिक; इष्कबाज.
रंगेहाथ क्रिवि. प्रत्यक्ष कृती करताना. (क्रि. पकडणे)
रंघळणे सक्रि. १. फरफटत नेणे; फराफरा ओढणे. २. वस्त्र इ. बरेच वापरून गुधडणे, मळविणे.
अक्रि. रेंगाळणे; मागे पडणे.
रंज पु. १. दुःख; नाखुशी; खेद; त्रास. २. उद्वेगजन्य वैराग्य.[फा. रंज:]
रंजक पु. १. रंगारी. २. चितारी. ३. उत्तेजक पदार्थ.
वि. १. रंजविणारा. २. करमणूक करणारा; आनंद देणारा. [सं.]
रंजक स्त्री. १. बंदुकीच्या कान्यावर घालतात ती दारू; बार भरण्याची, ठासण्याची दारू. २. बार; दारू उडणे; बार होणे. ३. बाण अथवा शस्त्रास्त्रांची लढाई. ४. वखारीत अगर कोठारांत साठ्याकडे भरून जाणारी पिठाची, दारूची (सुरंगी) गाडी; दारूगोळ्याची गाडी, डबा; दारूगोळा. [फा. रब्जक्] (वा.) ० **उडणे, झडणे–** कज्जा किंवा भांडण एकदम किंवा जोराने सुरू होणे. ० **खाणे** – दारू जळून बार न उडणे. ० **देणे, पाजणे, भरणे** – एखाद्यास काही काम करावयास भर देणे, उठविणे; चेतविणे.
रंजकदाणी–दानी–दान स्त्री. न. बंदुकीच्या दारूची पिशवी अगर शिंग; कान्याची दारू ठेवण्याचा डबा.
रंजकीची विड्री बंदुकीचा घोडा, काटा.
रंजगंज पु. किटण; कीट; तांबरा (धातू, लाकूड इ.वरील). [गंज द्वि.]
रंजगंज–रंजीगंजी स्त्री. ओढाताण; हलाखी; अडचणी. [रंज द्वि]
रंजणे उक्रि. १. एखाद्या वस्तूच्या किंवा विषयाच्या अवलोकनात, मननात, वाचनात, श्रवणात, आस्वादनात, आनंदात तल्लीन होणे; रंगणे; मोहित होणे; गुंगून जाणे; एकतानता होणे; आल्हादणे; सुप्रसन्न होणे (सौंदर्य, उत्कृष्टता यामुळे). २. मनोरंजन करणे. [सं. रंज्]
अक्रि. दुःखी, कष्टी होणे.
रंजणे गांजणे त्रासणे, दुःखित, पीडित होणे, असणे. [फा. रंज:]
रंजन न. १. करमणूक; मौज; गाणे, सुभाषित इ. विषयांच्या आस्वादनाने दुःख, त्रास नाहीसे होऊन मनास होणारा आनंद; सुख. २. रंग; तांबड्या चंदनाचे लाकूड, खोड. [सं. रंज्]
रंजनी स्त्री. (संगीत.) सहाव्या श्रुतीचे नाव. [सं.]
रंजवण स्त्री. करमणूक.
वि. मनाचे रंजन करणारे.
रंजित वि. अनुरंजित; आनंदित; उल्हासित; अत्यंत संतुष्ट; प्रसन्न.[सं.]
रंजी स्त्री. वैताग; कंटाळा; त्रास. [फा. रंजिश्]
रंजीस वि. खिन्न झालेला; कंटाळलेला; त्रासलेला; दुःखित; असंतुष्ट; निराश; थकलेला; दमलेला; त्रस्त.
रंझळणे अक्रि. प्रयत्न निष्फळ होण्यामुळे किंवा विलंबामुळे एखाद्या कामात व्यत्यय येणे. पहा : **रेंघळणे**
रंझाड पु. एक हिंदू जात. (व.)
रंझाड वि. ओंगळ; घाणेरडे.
रंडका वि. १. गरीब; निरुपयोगी. २. विधवा (स्त्री) अगर विधुर (पुरुष). ३. (ल.) नागवा; उघडा; कफल्लक; दरिद्री; कृपण; करुणास्पद स्थिती असलेला. ४. फायदा नसलेला; निरुपयोगी. ५. लाभरहित (धंदा).
रं(रां)डकी, रंडकीमुंडकी स्त्री. विधवेसंबंधी तिरस्कारयुक्त व करुणाजनक शब्द; विधवा; निराश्रित व दुर्बल विधवा. [सं. रंडा]
रंडगोलक पु. गोलक नावाचा वर्ग व त्यातील व्यक्ती; विधवेला जारापासून उत्पन्न झालेली संतती.
रंडा स्त्री. १. विधवा स्त्री; रंडकी. २.जारिणी; स्वैर स्त्री. [सं.]

रंडागीत न. १. विधवेची कहाणी, गीत. २. विधवेच्या शोकासारखे गाणे; (ल.) वाईट काव्य. ३. बदसूर गायन, पठण, भाषण किंवा वाचन.

रंडापति–ती वि. १. ज्याने रांड बाळगलेली आहे असा; रंडीबाज; छिनाल. २. (ल.) बायक्या; बाईलबुद्ध्या; स्त्रीलंपट; स्त्रैण.

रंडापंडित वि. बायकांत निर्लज्जपणे बोलणारा; थापा मारणारा; बढाई मारणारा; गर्विष्ठ; घमेंडखोर; घमेंडानंदन. [सं.]

रंडिरा स्त्री. साखर.

रंडी स्त्री. १. वेश्या; नाचणारी स्त्री. (हिं.) २. दासी; रखेली. ३. पत्त्यांच्या खेळातील राणी. ४. एक क्षुद्र देवता. [सं. रंडा]

रंडीबाज वि. वेश्येचे, परस्त्रीचे ज्याला व्यसन आहे असा; बाहेरख्याली; व्यभिचारी.

रंडीखोर वि. चिडखोर; खेळांत खोटे बोलणारा.

रंडीवाल वि. पहा : **रडीवाल**

रंडु(डो)ला वि. १. बायक्या. २. स्त्रैण; बाईलबुद्ध्या.

रंडेय पु. रंडीपुत्र; वेश्यापुत्र; विधवापुत्र; अनौरस मुलगा.

रंद–ध पु. गळू, फोड इ. मधून निघणारा रक्तमिश्रित पू; लस. [सं.रद्]

रंधणे क्रि. छिलणे; तासणे; लाकूड साफ करणे; रंधा फिरविणे.

रंधन न. १. शिजविणे; रांधणे; पाकक्रिया. २. शिजलेले पदार्थ; स्वयंपाक : 'किं धाला बैसे पाहीं। रंधनाच्या।'– अमृ ५.६४.

रंधनाळा पु. स्वयंपाकाकरिता केलेला, खणलेला चर. – ऐको.

रंधप पहा : **रांधप**

रंधा पु. १. सुताराचे लाकूड साफ, सपाट करण्याचे एक हत्यार. २. त्या हत्याराने लाकूड साफ करणे. (क्रि. करणे) [फा. रन्दा]

रंधागोल पु. लाकडाची कड गोल व साफ करण्याचे हत्यार.

रंधागोलची स्त्री. १. काठ, कड रंध्याने गोल करणे; रंध्याने केलेली गोलाकार वस्तूची साफसुफी. (क्रि. करणे) २. छताचा एक प्रकार.

रंधापट्टी स्त्री. गिलावा साफ करण्याची पट्टी.

रंध्र न. १. छिद्र; भोक; वेज. २. भगदाड; डोंगरातील गुहा. ३. (ल.) व्यंग; उणीव; दोष; बिंग. ४. (ल.) नाजूक भाग; मर्म; वर्म. [सं.]

रंध्रशलाका, रंध्रसळ स्त्री. न. भोक पाडण्याची सळई.

रंध्रान्वेषी पहा : **छिद्रान्वेषक, छिद्रान्वेषी** [सं.]

रंध्रिका स्त्री. एक वाद्य: 'ढोल दमामे मृदंग चंग । शंक रंध्रीका स्वरशृंग।'– स्वादि ८.५.९५.

रंपाळे वि. अवाढव्य; अगडबंब. (कुलाबा, को.)

रंबाट न. कामाची गर्दी. (बे.)

रंभा स्त्री. १.कदली वृक्ष; केळ. २. स्वर्गातील सुंदर स्त्री; एक अप्सरा. ३. वेश्या. ४. (उप.) स्थूल, कुरूप व अव्यवस्थित वस्त्राची, पिंजारलेल्या केसांची बाई, विशेषत: मुलगी. [सं.]

रंभा पु. (चर्म.) कातडे कापण्याचे हत्यार. हे रापीपेक्षा वेगळे असते. स्त्री. गवत काढण्याचे खुरपे.

रंभातृतीया स्त्री. १. मार्गशीर्ष शुद्ध तृतीया. २. या तिथीचे व्रतविशेष.

रंभानंदन–पुत्र पु. कापूर : 'अग्नीस विझवाबया रंभानंदन। आवेशेकरून लोटला।' – रावि १४.१७६.

रंभापुतळी स्त्री. खुरपे.

रंवदळ स्त्री. रहदारी; गडबड.

रंवद(दा)ळणे सक्रि. १.पादाक्रांत करणे. २. डिवचणे. ३. तुडविणे; ढवळणे (नासाडी होईल अशा प्रकारे); घुसळणे; हलवणे; रेंदाळणे (पाणी, चिखल).

राइ स्त्री. लिहिलेली ओळ :'जरि वेचु असता तुझा गइ। तरी मनोधर्मीची पुसती राइ.'– निर्वेद ६८. [सं.राजी]

राई स्त्री.१. मोहरी. २. बारीक कण. [सं.राजिको] (वा.) **राईचा पर्वत करणे** – एखादी हकिकत, बातमी फुगवून सांगणे; अतिशयोक्ती करणे. वि. क्षुद्र; निरुपयोगी; क्षुल्लक : 'स्वप्रकाशा प्रकाश काई । दृष्टान्त विचार अवघे राई ।' – ज्ञाप्र १०४.

राई स्त्री.तलवारीच्या धारेचा प्रकार. – प्रश ५४.

राई स्त्री. १.बन; दाट झाडी. २. रांग. [सं.राजी]

राई स्त्री. बाई. (झाडी)

राई स्त्री. (सोनारी) तांबे. [सं.रक्त]

राईकाई वि. बारीक कण, तुकडे झालेले.

राईत न. चिंच.
वि. आंबट चवीचे.

राईभर क्रिवि. अगदी थोडे.

राउत पु. अपानवायू : 'येक राउत साहिती।' – दास १८.९.१७.

राउताळी–ळे स्त्री. न. शिपाई; दळ; सैन्य.

राउती स्त्री. चांदीचा डाख देताना उपयोगात आणावयाचे मिश्रण.– जनि (पारिभाषिक शब्दयादी) १२.

राउतै न. १. राऊतपणा; स्वारी. २.घोडदौड : 'निघाला राउतै करीतु । असिवारापुढे ।' – शिव १००२.

राउ(ऊ)ळ पु. १. महाराज; राजा. २. श्रीकृष्ण परमात्मा; देव: 'भवमोचके चरित्र । राउळाची ।' – ज्ञाप्र ९५२. ३. छोटे, रजपूत जातीचे जहागीरदार. ४. गुरु; श्रेष्ठ पुरुष. ५. एक जात किंवा तिच्यापैकी एक व्यक्ती. हे भैरवाचे भक्त असून कोष्टीकामाकरता लागणारे कुंचले, फण्या इ. तयार करतात. वई तयार करणारी जात. –ज्ञाको ९.१.३१.(नाशिक) ६. बदरीनारायणाचा नंबुद्री ब्राह्मण जातीचा पुजारी. ७. पहाटे हातात मोठा त्रिशूळ घेऊन दोहरा म्हणत भीक मागणारा भिकारी.
न. १. घर; राजवाडा. २. देऊळ; मंदिर. [सं.राजकुल]

राउ(ऊ)ळगण न. राजमंदिर : 'काइंवो बोलणें रांउळगणांत ।'– धवळे पू ७.२.

राउळार न. राऊळ; राजवाडा.

राऊ पु. १. राजा. २.(सांकेतिक) थोरले बाजीरावसाहेब पेशवे किंवा गादीवर बसलेले बहुतेक सर्व पेशवे. – पया २९१.

राऊत पु. १. घोडेस्वार. २. घोड्याचा खासदार, मोतद्दार. ३. रजपूत. ४. मांगास ही संज्ञा लावतात. ५. (ढोरकाम) वादी. [सं.राजपुत्र]

राऊ(उ)तवाड पु. राजापेक्षा कनिष्ठ दर्जाचा पुरुष :'रायापासौनि राऊतवाडू। हे ब्रीद सत्य केले।' – शिव ५१८.

राकट वि. १. शरीराने बळकट; गलेलठ्ठ; गावंढळ; कणखर व टणक. २. हातात घेतलेल्या कामातील धोके, अडचणी यांचा विचार न करता अंगधिटाईने एखाद्या कामात पडणारा (मनुष्य, त्याचे शरीर); साहसबुद्धी; वज्रदेही.

राकटाई स्त्री. राकटपणा; कणखरपणा; टणकपणा; मनाचे धाडस; धिटाई.

राकडला वि. अधाशी. (व.)

राकडू वि. नीरस; शुष्क; वीट आणणारा :'आनंदु होअे गोडू । फुन तोही नावेकु रांकडू ।' – शिव १३४.

राकधनी स्त्री. पौर्णिमेच्या आल्हादकारक, आनंददायक, प्रकाशाची विपुलता, रेलचेल : 'दारूण संसारु दु:काळीं । जेणें परमानंदाची रांकधनी केली ।'– शिव ५.

राकव न. हरणाच्या केसांचे वस्त्र. –मसाप ४५.६.

राकस पु.राक्षस; भूतपिशाच. [सं.राक्षस]

राकसभुकस वि. रानवट; अव्यवस्थित राहणी असणारा. (व.)

राका स्त्री. पौर्णिमा. [सं.]

राकुली स्त्री. पाडसाच्या गळ्यातील मंतरलेला, केसांचा ताईत.(झाडी) [सं.रक्षावली]

राकून पु. अस्वलाकृती, कुत्र्याएवढा मोठा, मांसाहारी प्राणी. हा उत्तर अमेरिका व उष्ण कटिबंध यात आढळतो.–प्राणिमो ३०.

राकेल न. घासलेट; मातीचे तेल. एक खनिज पदार्थ. काही ठिकाणी याचे झरे आहेत. [इं.रॉक् = खडक + ऑईल = तेल]

राख स्त्री.भस्म; जळल्यानंतर राहिलेला अवशेष.[सं.रक्षा] ० **सावडणे** – प्रेत जाळल्यानंतर ती राख भरून टाकणे; अस्थी गोळा करणे.

राख स्त्री. रखेली; ठेवलेली स्त्री; उपस्त्री. [सं.रक्ष्=राखणे]

राखडी स्त्री. स्त्रियांचा वेणीत घालावयाचा एक अलंकार; केशभूषण.

राखण स्त्री. न. १. राखणे; ठेवणे; रक्षण करणे. २. रक्षक म्हणून ठेवलेला मनुष्य; रखवाली. ३. रक्षकाचे, रखवालदाराचे वेतन. ४. पिशाचादी उपद्रवापासून आपले रक्षण व्हावे म्हणून ग्रामदेवतेस दरमहा किंवा दरवर्षी अर्पण केलेला नारळ; बळी. ५. भुते, उंदीर, टोळ इत्यादिकांच्या उपद्रवापासून माणसे, प्राणी, शेते इत्यादीकांना मंत्र, तंत्र, मानता इत्यादी उपायांनी मुक्त करून सुरक्षित ठेवण्याची क्रिया; भुतादिकांचा बंदोबस्त करणे. ६.(क्र.) पूर्ण अभाव होऊ नये म्हणून घरात राखून ठेवलेले अल्पस्वल्प धान्यादी खाद्यपदार्थांचे परिमाण; घर म्हणून ठेवलेला पदार्थ. ७. अतिशय कुरूपतेमुळे व अक्राळविक्राळपणामुळे घराचे व त्यातील स्त्रियांचे चेटकापासून रक्षण करण्यास समर्थ म्हणून मानलेली स्त्री. (मावळ)

न. ब्राह्मणांत प्रसूतीनंतर तिसऱ्या दिवशी सुईण बाळंतिणीच्या खोलीतील एक कोनाडा सारवून, रांगोळी काढून, त्यावर गंधाची बोटे ओढून व आत पैसा, सुपारी टाकून ठेवते ते मडके; किंवा बाळंतिणीच्या दहा दिवसांत तिच्या जेवणाच्या वेळी तिच्या खोलीत निखारा व त्यावर थोडा भात टाकून ठेवलेले मडके. [सं.रक्षण]

राखण(णे)करी, राखणदार, राखणा, राखणाई(इ)त, राखणार पु. १. रखवालदार; पहारेकरी. २. गुराखी.

राखणा पु. पाने खाणारा एक लहान किडा.

राखणावळ स्त्री. १. गुराख्याची मजुरी, वेतन. २. राखणे; रक्षण करणे; काळजी घेणे.

राखणी स्त्री. राखणे; सांभाळणे; ठेवणे; बाळगणे इ.

राखणे सक्रि.१. रक्षणे; रक्षण करणे; रखवाली करणे; जबाबदारी घेणे; अपकारापासून वाचवण्याकरिता आपल्या ताब्यात घेणे. २. ठेवणे; उरविणे; पुढच्या काळाकरिता किंवा काही उद्देशाने ठेवून देणे. ३. खर्चल्याशिवाय ठेवणे (सामर्थ्य, जोर). ४. चोरून ठेवणे; पोटात किंवा मनात ठेवणे. ५. एखाद्या पदार्थावर ओघाने एखादी क्रिया करावी लागत असेल तर ती न करता तो पदार्थ तसाच ठेवणे; आहे त्या स्थितीत राहू देणे. ६. करणे; ठेवणे; एखादा पदार्थ स्थित्यंतर न पावू देता ठेवणे; बनविणे व कायम करणे. ७. स्त्रीने पुरुषास किंवा पुरुषाने स्त्रीस उपभोगार्थ बाळगणे, ठेवणे. ८. ठेवणे; धरणे; पाळणे; हेळसांड, अवज्ञा न करणे; एका बाजूला पडू न देणे. ९.व्यवस्थित, योग्य स्थितीत ठेवणे. १०. पालन करणे; न ढळणे (वचन, आज्ञा, प्रतिज्ञा). [सं.रक्षण]

राखण्या पु. गुरे राखणारा; गुराखी.

राख(खा)मंडळ न. राख पसरलेली जागा. (को.) पहा : **रखमंडळ**

राखरांगोळी स्त्री. पूर्ण नाश; विध्वंस; जाळून पोळून केलेला सत्यानाश (देश, गाव, शेत, कुटुंब, काम यांचा). (क्रि.करणे, होणे.)

राखले स्त्री. हुंडी विकत घेणाऱ्याची स्थिती, पेशा, अधिकार, पतदर्शक योजावयाचा शब्द.

राखवड, राखाडा–डी स्त्री. १. राखेची रास, ढीग. २. राख विखुरलेली जागा. ३. राख.(को.)

राखवडा पु. राखुंडी.

राख(खा)वळ स्त्री. राखणावळ; राखण्याबद्दलची मजुरी, वेतन.

राखाडी स्त्री. १.पसरलेली किंवा एकत्र ढीग केलेली, साचलेली राख. २.(सामा.) राख. (को.) ३. एक रंग (वस्त्राचा).

राखांदुली स्त्री. (बायकी) दुहेरी दोरा पिवळा करून घेऊन, त्यात दोन सोन्याचे मणी आणि हळकुंड व वेखंड यांचे तुकडे बांधून मुलाचे नाव ठेवण्याच्या वेळी बाळंतिणीच्या गळ्यात बांधला जाणारा दोरा.

राखांदुळी स्त्री. बाळंतीण झाल्यापासून तिसऱ्या किंवा पाचव्या दिवशी बाहेरची बाधा होऊ नये म्हणून बाळंतिणीच्या खोलीच्या दाराशी राखेने भरून ठेवलेले भांडे.

राखी स्त्री. १. पिशाचापासून रक्षण व्हावे म्हणून श्रावण शुद्ध पौर्णिमेस हातात बांधतात तो रेशमाचा, कलाबतूचा अथवा कापसाचा दोरा; रक्षासूत्र. २. श्रावण पौर्णिमेदिवशी बहिणीने भावाला बांधावयाचा रेशमी दोरा.

राखी पाडवा राखी पौर्णिमेच्या पुढील दिवस. ब्राह्मणाच्या तीन मोठ्या भिक्षा मागण्याच्या दिवसांपैकी हा एक आहे.

राखील स्त्री. १. गुरे, शेत इ. राखण्याचे काम. (को.) २.गुराख्यास गुरे राखण्याबद्दल द्यावयाचे वेतन.

वि. राखलेला; बाळगलेला (रखेली, प्राणी, पक्षी इ.).

राखीव वि. राखलेला; राखून ठेवलेला.

राखीसमुख स्त्री.न. (ग्रा.) राक्षसांची दिशा; दक्षिण दिशा. क्रिवि. दक्षिणाभिमुख; दक्षिणेकडे. पहा : **गंगमोहरा** [सं.राक्षसमुख]

राखु(खो)ळ–ळी स्त्री. १. गुरे राखणे; वळणे. (क्रि. घालणे) २. गुरे राखण्याची मजुरी; राखणावळ.

राखुं(खों)डा पु. राखेचा ढीग; राखेची खळी.

वि. १. ओठ तुटलेला (मनुष्य). पहा : **राखोडे.** २. मिशा यावयाच्या वयात ज्याला मिशा आल्या नाहीत असा (पुरुष).

राखुंडी स्त्री. १.गोवरीच्या राखेचा ढेपसा. २.(ल.) करपून काळा झालेला भात, भाकर इ.

राखोटी स्त्री. राख.

राखोया वि. रखवालदार; पहारेकरी; देखरेख करणारा.

राखोळा पहा : **पाठराखणा**

राखोळा पु. तुटक्या ओठाचा.

राखों(खो)डा वि. राखेप्रमाणे रुक्ष, निकस, भरभरीत (जमीन, बुरुम, पीठ, विशिष्ट चूर्णे).

राखोंडी स्त्री. १.राखुंडी. २. (ल.) नाश.

राखोंडे पहा : **राखोळा**

राख्या वि. स्त्रीने ठेवलेला (यार).

राग पु. १. क्रोध; संताप; कोप. २. संस्कृतात हा शब्द क्रोध किंवा दु:ख, आनंद, क्रोध, इच्छा, हेवा इ. मनोविकार सामान्यत: दर्शवतो.[सं.] (वा.) ० **नाकावर असणे** – लवकर रागास चढणे; लवकर चिडणे.

राग पु. १. रंग; वर्ण; छटा. २. रंगविणे; रंग देणे; रंजन. ३. लाली; आरक्तपणा. ४. प्रीती; आवड. [सं.राग, रंज्]

राग पु. (संगीत) पाच स्वरांपेक्षा कमी नाही असा वादी-संवादी स्वर व आरोह-अवरोह यांनी शोभा आल्याने जो जनमनरंजनास योग्य होतो असा स्वरसमुदाय. षड्जादी स्वरांची परस्पर जुळणी केल्याने गायनास योग्य होणारा त्यांचा रचनाविशेष. हल्ली प्रचारात सुमारे दीडशे राग मानतात.

रागणे सक्रि. रागावणे.

रागबा(वा)गा स्त्री. घोड्याला चाल शिकवण्यासाठी बांधलेली दोरी.

रागमाला–ळा, रागमालि (ळि) का स्त्री. १. गीताचा एक प्रकार; स्वरांची किंवा अनेक रागभेदांची मालिका; निरनिराळ्या रागांत म्हणता येण्यासारखे गीत. २. किल्ली दिली असता अनेक रागांचे सूर ज्यामधून निघतात असे यंत्र; पियानोफोर्ट नामक वाद्य. [सं.राग+माला]

रागमालेची चित्रे राग गायले जात असता त्यांचा प्रभाव काय दिसतो हे दर्शविणारी चित्रे. उदा. मेघमल्हार हा राग घेतला तर मोर हर्षभरित होऊन आपला रमणीय पिसारा उभारतो इ.

रागरंग पु. १. गाणे व खेळणे; खेळ, मौज व ख्यालीखुशाली. २. लक्षणे व चिन्हे; साधारण स्वरूप, सुमार (कामांचा, गोष्टीचा). ३. संभव; पूर्वसूचना; बरे-वाईट स्वरूप. जसे: पावसाचा रागरंग पहा, तसे निघा.

रागालप्ति–प्ती स्त्री. (संगीत.) वर्ण, अलंकार, गमक ह्यांच्या साहाय्याने रागाचे पूर्ण स्वरूप दाखवून त्यात रागाचे आविर्भाव व तिरोभाव दाखविणे. [सं.]

रागालाप पु. (संगीत.) ग्रह, अंश, न्यास, मन्द्र, तार, अपन्यास, अल्पत्व, बहुत्व, षाडवत्व, औडुवत्व ह्या रागाच्या विशेषांचे प्रकाशन ज्यात होते अशी स्वररचना. [सं.]

रागावणे अक्रि. कोपयुक्त, रुष्ट होणे; संतापणे.

रागा(घा)वळी–ली स्त्री. घोड्याच्या पाठीवरील जाळीदार झूल.

रागिणी स्त्री. १. मिश्र किंवा पोट राग; मंजूळ स्वर असलेला गायनातील राग. २. विलासिनी; अनुरक्त स्त्री. [सं.राग]

रागिष्ट, रागीट वि. कोपिष्ट, संतापी, तामसी.

रागी स्त्री. एक धान्य; नाचणी. [सं.]

रागी वि. १. मनोविकार असणारा (तीव्र आवेशी, आस्थेवाईक, अनुरत, शीघ्रमनोविकारी, सहृदय, रसिक इ.). २.विषयी; आसक्त. ३. शोक असलेला : 'तेथ रागी प्रतिमल्लाचा ।'– ज्ञा १८.४९०. [सं.राग]

रागीसांडी वि. विषयासक्त.

रागेचे वि. आवडीचे.

रागेजणे, रागेणे अक्रि. १. रागावणे. २. रंगयुक्त होणे; रंगणे : 'रागेजली अरुण कांति विराजवी ते ।'– नल ९८.

रागोळ न. खळ्यातील कणसे गोळा करण्याचे लाकडी साधन. (माण.)

राघ न. मोठे पाप; महापातक. [सं.]

राघव पु. एक अवाढव्य व काल्पनिक मासा. (राघव आणि तिमिंगल हे दोघे भूगोलाभोवती एकमेकांचा पाठलाग करीत असून जेव्हा त्यांची गाठ पडेल तेव्हा पृथ्वीची वरील बाजू खाली व खालची वर अशी ती फिरली जाऊन ग्रस्त होईल अशी समजूत आहे.) [सं.]

राघवदास लाडू रवा, साखर व खवा यांचा लाडू. यास चुरमा अथवा राधाविलास असेही म्हणतात.

राघावळ स्त्री. १. निळीची एक जात. २.तांबड्या रंगाच्या लुगड्याचा एक प्रकार.

राघावळी वि. राघावळ नावाच्या निळीसंबंधी; तिने रंगविलेले (वस्त्र). स्त्री. रंगीत कफनी. [सं.रंग]

राघू पु. (विणकाम) गातडीच्या मध्यभागी असलेली एक जाड लाकडी खुंटी. हिच्यातून दोर इकडून तिकडे फिरतात.

राघू–घो पु. १. शुक; पोपट. २.(ल.) हदग्याच्या फुलांतील हिरवे तंतू. ३. (लावणी इ. मध्ये ल.) प्रियकर; दोस्त.

राघोडा पु. १. कर्जाऊ घेतलेल्या रकमेवर व्याज म्हणून हंगामावर देऊ केलेले धान्य इ. किंवा पैसा ; अशा रीतीने पैसा देण्याघेण्याची चाल. २. काढा.

राघोभरारी स्त्री. राघोबादादा ज्याप्रमाणे अतिशय त्वरित स्वारी करीत असे त्याप्रमाणे केलेली स्वारी :' जर्मनीची ही राघोभरारी पाहून सारे जग दिग्मूढ झाले.'–के १९.४.१९४०.

राच स्त्री. सैन्यातील सर्व शिपायांनी एकत्र जेवण करण्याची पद्धत. (गो.) [पोर्तु.]

राचनिक वि. बांधकामासंबंधी; जुळणीसंबंधी.

राज पु. गवंडी; बेलदार; चुन्याचे काम करणारा. (व.,ना.)

राज सिंध प्रांती गाव वसविणारी घराणी. यांना समुच्चयाने 'राज' म्हणत.

राज, राज्य न.(खेळात) एखाद्या खेळाडूवर अथवा एखाद्या पक्षावर आलेला डाव. (ना.) [सं.राज्य]

राजअंबीर पु. गंभीर स्वभावाचा, सभ्य नायक.
वि. बादशाही; भव्य; नामी; उत्कृष्ट (मनुष्य, देश, पोशाख, बोलण्याची ढब, कोणतीही गोष्ट). [सं. राजा + अर. अमीर]

राजआवळी स्त्री. आवळीचा एक प्रकार. या झाडास लहान फळे येतात. याला हरपरेवडी, रानआवळी असेही म्हणतात.

राजकडी स्त्री. विशिष्ट प्रकारची कानांतील कडी; एक कर्णभूषण.

राजकारण न. १. राज्यासंबंधी मसलत; खोल व गूढ मसलत. २. एखादी गोष्ट घडण्यामागील गुप्त, छुपे कारण. ३. शासनसंस्थेसंबंधी गोष्टी; राजनीती. ४. चातुर्य.

राजकारणी वि. खोल मसलत करणारा; मुत्सद्दी.

राजकी स्त्री. १. राजाचे वैभव.(राजा.) २. राजकीय वातावरण.
पु. राजाचा नोकर.
वि. राजापासून उत्पन्न होणारी; राजासंबंधाची (सत्ता, जुलूम, कृत्ये).

राजकीय वि. राजासंबंधी; राजाचा; राजविषयक (व्यवहार, कारभार, मनुष्य इ.). [सं.]

राजकुमार-कुंवर पु. १. राजपुत्र. २. पुनर्वसू नक्षत्र. [सं.]

राजकैदी-बंदी राजद्रोहामुळे तुरुंगात कैद केलेला राजकारणी पुरुष; सरकारविरुद्ध अराजकता माजविणारा म्हणून कैद केलेला मनुष्य.

राजगिरा पु. एक प्रकारचे तृणधान्य व त्याचे झाड. हे झाड तांबड्या माठासारखे असते. ह्याला तांबड्या मखमालीसारखी फुले येतात. ह्याच्या बियास राजगिरा म्हणतात. [सं.राजगिरी]

राजगिरी स्त्री. वि. आकाशाला भिडणारी; अस्मानगिरी.

राजगोंड स्त्री. (शहराचा, गावचा) मोठा रस्ता.

राजगोंडा पु. पालखीच्या दांडीला मध्यभागी बांधलेला, लोंबता, हातात धरावयाचा गोंडा.

राजग्रह पु. जोर; जबरदस्ती; सरकारी दडपण : 'इतकियांनसी राजग्रहाकडून बलत्कारे जोरावरीने दगड घातलेया ते काही प्रांत लागणार नाही.'- शिचसा खंड १२, पृ.२९.

राजघोस स्त्री. एक वेल. हिच्या पानांच्या काढ्याचा देवी इ. आजारात उपयोग करतात.

राजचिन्ह न. १. राजेपणाचे चिन्ह; राजाचे छत्र, चामर इ. वैभव. २. (सामुद्रिक.) नशिबी सिंहासनावर बसण्याचा योग आहे असे दाखविणारी खूण, लक्षणविशेष किंवा विशेष गोष्ट (आजानुबाहुत्व इ.). ३. राजाची मोहोर, शिक्का, किंवा सही (नाणे, पत्र इ.कांवरील). ४.(राजाच्या सह्या अस्पष्ट, वाचण्यास कठीण असतात यावरून ल.) फरपट्याचे, बिरखुडी, वाईट लपेटीचे, दुर्बोध अक्षर. [सं.]

राजचुडा पु. सोनेरी वर्खाच्या बांगड्या.

राजटिटवी स्त्री. पिवळसर रंगाची टिटवी.

रा(रां)जण-णी स्त्री. बकुळीच्या जातीतील एक झाड. फळ बकुळासारखेच, पण पिवळ्या रंगाचे असून गोड असते. ही झाडे गुजराथेत भरपूर आढळतात. [सं.राजादन]

राजणे अक्रि. १. शोभणे; प्रकाशणे. २.समाधान होणे. [सं.राज्]

राजतिलक पु. १. राजांमध्ये श्रेष्ठ; सार्वभौम राजा. २. राजटिळा. ३. राज्याभिषेक. [सं.]

राजदरबार पु. १. राजाची कचेरी; न्यायसभा. २. प्रजेची गाऱ्हाणी ऐकण्याकरिता बसावयाची राजाची जागा.

राजदंड पु. १. राजाने केलेली शिक्षा, बसविलेला दंड. २. जातिबहिष्कृत केलेल्या मनुष्यास जातीत परत घेताना त्याने राजास देण्याचा दंड. ३. राजाच्या हातातील अधिकारदर्शक काठी.

राजदंत पु. चौकडीचे दात; पदार्थ तोडावयाचे दात; पुढील दात.[सं.]

राजदानी स्त्री. फितुरी; भेद. - ऐको.

राजदूत पु. १. राजाचा नोकर; हुजऱ्या, सेवक; जासूद. २. सरकारचा परदेशातील वकील, प्रतिनिधी. [सं.]

राजद्रोह पु. १. सरकारबद्दल अप्रीती; राजाविरुद्ध कट, बंड; फितुरी. २. राज्य व राजसत्ता यांविरुद्ध गुन्हा. ३. (कायदा) शासनाविरुद्ध द्वेष, तिरस्कार किंवा बेदिली बोलून, लिहून, शब्दांनी, खुणांनी किंवा इतर रीतींनी उत्पन्न करणे.

राजद्वार न. १. न्यायदान जिथे चालते तो राजवाडा; राजदरबार. २. राजवाड्याचा दरवाजा. [सं.]

राजधन न. राजाचा महसूल, उत्पन्न. [सं.]

राजधर पु. राजकुमार. [सं.]

राजधर्म पु. राजकारण; राज्यकारभारविषयक विचार.

राजधर्म पु. १. राज्यकारभार चालविण्याकरता मार्गदर्शक असा शास्त्रांत सांगितलेला कायदा, अनुशासन. २. राजास योग्य किंवा शोभणारा गुण, राजगुण (कार्योपदेशकौशल्य, प्रगल्भता इ.). ३.राजाचे कर्तव्य.

राजधातू पु. (कित्येक कवींनी लोखंडास हे नाव दिले आहे म्हणून) लोखंड.

राजधानी स्त्री. १. देशाच्या कारभाराचे मुख्य शहर. २. राजाचे वसतिस्थान. [सं.]

राजधान्य न. एक धान्य; सांवा. [सं.]

राजधारी पु. एक प्रकारचा तमाशा.- कलावंतखाते (बडोदे) १३८.

राजनिती स्त्री. राजघराण्यातील स्त्री. :'(रुक्मिणी) परियेळे वोवाळिली : राजनिती :' - रुस्वन ३९१.

राजनिष्ठा स्त्री. राजासंबंधी, सरकारसंबंधी आदर, पूज्यबुद्धी. [सं.]

राजनीति-ती स्त्री. १. राज्यव्यवहारशास्त्र. आन्वीक्षिकी किंवा तर्कविद्या, त्रयी किंवा धर्मविद्या, वार्ता किंवा अर्थविद्या व दंडनीती असे राजनीतीचे चार भेद आहेत. २. नीती; नीतिशास्त्र. [सं.]

राजन्य पु.क्षत्रिय. [सं.]

राजपट्ट पु. राजाचा शिरताज; राजाचे ललाटपट्ट. [सं.]

राजपत्र-लेख न. पु. राजाचे पत्र; देणगीपत्र, सनद. [सं.]

राजपसंत वि. १. राजे व अमीर उमराव यांस मान्य असणारा. २.(ल.) सर्वोत्कृष्ट; उंची; खासा; नामी. [सं. राजा + फा. पसन्द]

राजपंचक न. ज्यात राजापासून जुलूम किंवा नासधूस होते असा ज्योतिषीय गणिताने येणारा काल. [सं.]

राजपिढी स्त्री. राजधानी. [सं.राजन्-पिठ]

राजपीठ न. १. राजाचे आसन, सिंहासन. २. राजधानीचे शहर. [सं.]

राजपीढी पु. राजपुरुष : 'रवमदे पातले राजपीढी ।' -गस्तो ४३.

राजपुत्र पु. १. राजाचा मुलगा. २. क्षत्रिय. [सं.]

राजपुरुष पु. १. सरकारी अधिकारी, नोकर. २. राजाच्या चाकरीतील कोणीही लहान-मोठा मनुष्य. [सं.]

राजब(व)नसी वि. राजवंशाचा. हा हिंदी शब्द मराठी लावण्यांतून नेहमी येतो. [हिं.]

राजबाबती स्त्री. राजास द्यावयाचा वसुलाचा चौथा भाग. पहा : **चौथ**

राजबिराजी स्त्री. राज्यक्रांती; बंडाळी; अराजक.

राजबिं(पिं)डा वि. अतिशय सुंदर व रुबाबदार (पुरुष). राजासारखा अथवा अत्यंत देखणा, सुंदर आणि तेजस्वी (मनुष्य).

राजबीज वि. १.राजाच्या बीजाचा, वंशाचा. २. (ल.) सुस्वभावी व सुंदर (मुलगा).

राजबेत पु. राजदंड. (को.)

राजभोग पु. सरकारचा हक्क. [सं.]

राजमठ पु. ब्राह्मणांचे निवासस्थान.

राजमंडल-ळ न. १. राजांचा समुदाय. २. राजकीय मंडल; राजा भोवतालचे मंत्री इ. [सं.]

राजमंदिर न. १. सौध; राजवाडा. २. (लावणी, शृंगारविषयक काव्य इ. कांत) विलासमंदिर; रंगमहाल; अंत:पूर इ. [सं.]

राजमा, राजमाष पु. जाड वालासारखे एक कडधान्य. [सं.]

राजमान्य वि. १. राजाने मान देण्यास योग्य; पूज्य; श्रेष्ठ; वरिष्ठ. २. ज्याला पत्र पाठवावयाचे किंवा ज्यांचा उल्लेख करावयाचा त्याला सन्मानार्थ कागदोपत्री लावले जाणारे विशेषण. ३. सर्वांस पसंत पडेल असे. ४. ज्याची नोंद शासनाने घेतली आहे असे. [सं.]

राजमार्ग पु. १.राजाचा हमरस्ता; सार्वजनिक रस्ता. २.(ल.) सर्व लोकांनी मान्य व पसंत केलेली चाल, वहिवाट, रहाटी. [सं.]

राजमुद्रा स्त्री. १. राजाची मोहोर; तिचा शिक्का; ठसा. २. राजाच्या छापाचे नाणे. [सं.]

राजमेचू पु. हिरवा पाषाण; उत्तम नक्षीचा दगड :'रत्नखचित सुकुमारा। नानाविधा पत्रवेलीस विकारा। राजमेचूचिया ।' - नरुस्व १.३२.

राजमोह(हो)रा वि. १. शहाणा; शूर किंवा विद्वान (मनुष्य); विद्या, शौर्य इ. गुणांनी प्रसिद्ध असलेला, तेजस्वी (पुरुष). २. देखणा व छबीदार (मनुष्य); राजबिंडा.

राजयक्ष्मा पु. क्षयरोगाचा एक भेद; कफक्षय. [सं.]

राजयोग पु. १. हठयोगाहून भिन्न असा योगाचा साधा व सोपा प्रकार; प्राणनिरोध इत्यादीकरता अंत:करण एकाग्र करून भगवत्स्वरूपी लावण्याचा उपाय. प्रत्येकाच्या ठायी असणारे अनंत ज्ञान व अनंत शक्ती पातंजल योगसूत्रातील अष्टांगयोगसाधेनेने जागृत करणारा योग. २. राज्य मिळवून देणारा पत्रिकेतला ग्रहयोग. ३. श्रेष्ठ, सर्वोत्कृष्ट योग; प्रापंचिक वैभव व संपत्ती उपभोगत असतानाही त्यातून आत्म्याची भिन्नता ओळखून आत्मचिंतनाचा अभ्यास चालू ठेवणे. [सं.]

राजरा स्त्री. अव. (नेहमी अनेकवचनी उपयोग) कुलाचाराच्या प्रसंगी तबकात ठेवलेल्या देवीच्या सात मूर्ती. [सं.राजेश्वरी = एक देवी]

राजरीति-ती स्त्री. सर्वसामान्य पद्धती. [सं.]

राजरु(रो)शी स्त्री. सार्वजनिक आणि स्वतंत्र परवानगी; उघड व पूर्ण स्वतंत्रता; मुभा. [सं.राजा + फा. रूशन]

राजरो(रु)स क्रिवि. १.उघडपणे; प्रसिद्धपणे; स्वतंत्रपणे; अनियंत्रितपणे; बेधडक. २.दिवसाढवळ्या. [सं.राजा + फा. रूशन]

राजर्षि-र्षी पु. तपश्चर्येने ज्याने ऋषी ही उच्च पदवी मिळविली आहे, असा क्षत्रिय; तपस्वी क्षत्रिय; राजांमधील ऋषी.

राजवट-टा-टी पु. स्त्री. १. एखाद्या राजाचा, राज्याचा, अंमलाचा, कारकिर्दीचा काळ; कारकीर्द. २. अंमलाचा,वर्चस्वाचा काळ; (सामा.) चलतीचा काळ. ३. सामान्य चाल, रीत, संप्रदाय, वहिवाट. क्रिवि. राज्यांत, अंमलात; कारकिर्दीत.

राजवटा पु. हमरस्ता; राजमार्ग.

राजवाडा पु. राजाचा वाडा; राजमंदिर; प्रासाद.

राजवालभ धूप केशर, कस्तुरी, अगर, तगर, कृष्णागीर, नागरमोथा, चंदन, कापूरकचरी, गवला, कचरा घालून केलेला धूप; दशांग धूप.

राजविद्या स्त्री. सर्व विद्यांमध्ये श्रेष्ठ विद्या; अध्यात्मविद्या. [सं.]

राजवेळ, राजावळी स्त्री. राजाचा शिक्का; राजमुद्रा.

राजवैद्य पु. १. वैद्यकशास्त्रात पारंगत असलेला वैद्य. २. राजाचा वैद्य. [सं.]

राजशक पु. ज्येष्ठ शुद्ध १३, आनंदनाम संवत्सर, शके १५९६. या वर्षी शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यारोहणानिमित्त सुरू केलेला शक.

राजश्रियाविराजित वि. १. राजाच्या तेजाने व शोभेने विभूषित; लक्ष्मीने राजासारखा सुशोभित असा. २. बरोबरीच्या गृहस्थास पत्र लिहावयाचे असता त्याच्या सन्मानार्थ हा शब्द त्याच्या नावापूर्वी विशेषणाप्रमाणे योजतात; पत्राचा मायना. [सं.]

राज(जे)श्री पु. १.राजाची पदवी; राजाचे वैभव; राजासंबंधी बोलताना सन्मानार्थ योजावयाचा शब्द. २. सामान्य माणसास पत्र लिहिताना त्याच्या नावापूर्वी हा शब्द आदरार्थ योजतात. ३. (विनोदार्थी) विचित्र, तऱ्हेवाईक माणूस. ४. (सामा.) गृहस्थ.

राजस वि. १. रजोगुणप्रधान; रजोगुणासंबंधी. २. रागीट; विषयी; लोभी इ. पहा : **रजोगुण व गुण** [सं. रजस्]

राजस-सी वि. १. सुकुमार व देखणा; सुरेख; सुंदर. २.शृंगारिक नायक.

राजसवाणा वि. राजस; सुंदर; सुकुमार आणि देखणा.

राजसी वि. १. रजोगुणयुक्त; रागीट. पहा : **राजस** २. २. राजकीय थाटाचे; बादशाही; भव्य; खासा; नामी (मनुष्य, कृत्य, वस्तू). [सं.राजस्]

राजसूय पु. सार्वभौम राजाने करावयाचा यज्ञ. (हा यज्ञ सार्वभौमत्वाचे द्योतक म्हणून राज्याभिषेकसमयी मांडलिक राजांसह केला जातो.) अथवा राजाचे म्हणजे सोमलतेचे सवन (कंडन) ज्यात करतात तो यज्ञ. [सं.]

राजहंस पु. १. चोच आणि पाय तांबडे व वर्ण पांढरा असा पक्षी. दूध व पाणी एकत्र केले असता त्यातून दूध तेवढे वेगळे करण्याची शक्ती याला आहे असे मानतात. २.(लावणी, शृंगारिक काव्य) प्रियकर; नायक. ३. एक झाड. ही झाडे लहान, भुईसरपट असतात. त्याची पाने बारीक व जोडलेली असतात. याला तांबूस रंगाची बारीक फुले व बारीक शेंगा येतात. [सं.]

राजा पु. १. प्रजेचे पालन करणारा; राज्याचा प्रमुख; नृप; छत्रपती. २. लहान राज्ये व थोडकी प्रजा असलेले संस्थानिक व सरदार. ३. (मंडळीचा, टोळीचा) नायक; मुख्य. ४. सजातीय पदार्थसमुच्चयात श्रेष्ठ मानलेला. ५. अन्न, वस्त्र इत्यादी भरपूर असल्यामुळे ते मिळविण्याचे कष्ट किंवा काळजी ज्यास करावी लागत नाही असा मनुष्य. ६. गंजिफाच्या बाजूतील मुख्य. पत्त्यातील एक चित्राचे पान. ७. (बुद्धिबळाच्या खेळात) डावातील मुख्य मोहरा. ८. वर्षाचा शास्ता म्हणून मानलेला ग्रह. वर्षेश ग्रह. ९.(ल.) वेडा; मूर्ख; स्वेच्छ वर्तन करणारा मनुष्य. १०. कसरीची राणी. [सं.] (वा.) **राजाप्रधान सोडणे** - (बायकी) चातुर्मासात भात व वरण हे मुख्य पदार्थ वर्ज्य करणे.

राजागर न. १. राजाचा बाग. २. रायभोग तांदळाचे शेत.

राजा चगनं डोके फिरणे; बुद्धिभ्रष्ट होणे. (अहि.)

राजानक्र न. अधिकारक्षेत्र.

राजान्न न. उत्तम तांदळाचा भात; रायभोग. [सं.राज्य-अन्न]

राजावर्त, लाजवर्द पु. एक हलका, कमी प्रतीचा हिरा. (इं.) लापिसलॅझूली. याचा मुख्य रंग निळा, कधी तांबूस पिवळाही सापडतो. [सं.]

राजावळ स्त्री. १. तांदळाची एक जात. २. तांबड्या रंगाच्या लुगड्याचा एक प्रकार. ३. वर्षाचा अधिपती, मंत्री इ. ग्रह दाखविणारा पंचांगाच्या आरंभीचा भाग; संवत्सर फल.

राजाळू न. पांढऱ्या अळवाची जात. ह्याच्या पानाचा देठ लांब व जाड आणि कांदा मोठा असतो.

राजाज्ञा पु. राजाच्या प्रधानांपैकी (अष्टप्रधानांपैकी नव्हे) एक.
स्त्री. १. राजाची आज्ञा, शासन. २.निखालस व खसखशीत हुकूम, आदेश.

राजांगण-णे न. १.राजाच्या, श्रीमंत लोकांच्या वाड्यापुढे रिकामी राखलेली, मोकळी जागा. २. राजवाड्याच्या समोरचा चौक. ३. चौसोपी घरास मध्ये असलेले चतुष्कोणी अंगण.

राजि-जी स्त्री. १. रांग; ओळ; पंक्ती; समुदाय. २.राई; वन.

राजिक वि. राजकीय : 'राजिक देविक उद्वेग चिन्ता ।'- दास ११.३.५.

राजिल पु. दोन तोंडे असलेला साप.

राजी स्त्री. गंजिफातील शब्द; राजेरी देणी.

राजी स्त्री. बांबूच्या झाडांचा समूह; बेट. [सं.राजि]

राजी वि. क्रिवि. १.खुशी; तयार; कबूल; मान्य. २. संतुष्ट; समाधानी. ३. स्वाधीन; अनुकूल: 'वाजीचे मन जाणता सकळही राजी शिपाई जया ।'- २२. [अर.राझी]

राजीक न. १. राजाचा जुलूम; अन्याय. २. सैन्याच्या स्वाऱ्यांमुळे होणारी नासधूस; लढाई व तिच्यामुळे होणारी अव्यवस्था, धुळधाण. ३. राजाचे काम. ४. क्रांती; बंड. [राजा]

राजीखुशी-षी स्त्री. मर्जी; मान्यता; पूर्ण कबुली.

राजीनामा पु. १. शेवटच्या निकालाचा वादीकडून लेखी स्वीकार; बेदावापत्र: 'हर्दो वादियांचे राजीपणे राजीनामे लेहून घेऊन.'- मइसा १५.४७. २.एखाद्याची आज्ञा मान्य असल्याचे लेखी कबुलीपत्र; कबुलायत :'बेपारी मजकुराचे कापड झाडियानसी देऊन त्याचा राजीनामा पाठवून देणे.'- मइसा ६.६०६. ३.नोकरी सोडण्याविषयीचे वरिष्ठांना लिहिलेले पत्र. ४.(बुद्धिबळाचा खेळ) प्रतिपक्ष्याची मात कबूल करणे. ५. तडजोड. [फा.राझीनामा]

राजीनी स्त्री. कलावंतीण.

राजीबिराजी स्त्री. सुख-दुःख; संकट:'राजीबिराजीचे दिवस, सर्व वस्तवानीसह कुटुंब एका किल्लेत, तेव्हा स्थळाची मजबुदी पाहिजे.'- ऐलेसं ५.२२१२.

राजीबेराजी, राजीक बेराजीक स्त्री. न. निर्नायकी; बेबंदशाही; एक राजा गादीवरून दूर झाल्यापासून दुसरा येईपर्यंतचा मधील काळ.

राजीमते क्रिवि. स्वसंतोषे : 'श्रीसत्यदेवाची स्थापना कोंडसकर खोत व भिडे यांनी मिळून राजीमते केली.'-आडिवऱ्याची महाकाली ४२.

राजीरजावंती-दी स्त्री. मान्यता; कबुली; राजीखुशी; परवानगी.

राजीव पु. पती; प्रियकर.

राजीव न. सूर्यविकासी कमळ. [सं.]

राजुक पु. प्रतिनिधी.

राजू स्त्री. गलबतावरील दोरखंड. यालाच 'लंगरदोर' असेही म्हणतात; विशेषत: जाड व मोठा दोर. [सं.रज्जू]

राजू वि. कबूल.

राजेरजवाडे पु.अव. संस्थानिक; सरदार इ.

राजेळ-ळी, राजकेळ स्त्री. न. केळीची एक जात व फळ. हे केळे सहा ते बारा इंच लांब व त्रिधारी असते. ह्याची सुकेळी करतात.

राजोट्या पु.१.कुटुंबातील कर्ता पुरुष; घरातील मुख्य कारभारी. २. लुडबुड करणारा, चोंबडा मनुष्य. (ना.)

राजोपचार पु. १. राजत्वास योग्य असे आदर, उपचार; राजास उचित असे उपचार (छत्र धरणे, चवरी-मोरचेल वारणे इ.). २.सात्त्विक, सौम्य औषधयोजना, शस्त्रक्रिया इत्यादी नाजूक प्रकृतीच्या माणसास सोसण्याजोगा औषधादी उपचार. [सं.]

राजोरवाट पु. दोन ओढ्यांचा संगम. [सं.]

राज्य न. १. प्रजेपासून कर घेऊन तिचे पालन करणे असा राजाचा अधिकार किंवा काम. २. राजाचा अंमल; हुकमत. ३. राजाच्या सत्तेखालचा प्रदेश. ४. राष्ट्र; कायद्याने राहण्यासाठी संघटित झालेले

व एका विशिष्ट देशात राहणारे लोक; एका ठरावीक प्रदेशात दंडशक्तीच्या साहाय्याने न्याय व शांतता प्रस्थापित करण्यासाठी स्थापित केलेला मनुष्याचा समाज. ५. कोणत्याही व्यवहारात दुसऱ्यास न जुमानता स्वतंत्रपणे वागण्याजोगे एखाद्याचे असणारे आधिपत्य. ६. खेळांतील डाव, हार. [सं.राजन्]

राज्यक्रांत–ति–ती स्त्री. १. राज्याधिकाऱ्यांत आणि राज्यपद्धतीत जबरदस्तीने घडवून आणलेली उलथापालथ. २. राजाचा जुलूम. युद्ध, आक्रमण इ. मुळे राज्यात माजलेली गडबड. [सं.]

राज्यघटना स्त्री. राज्यव्यवस्थेसंबंधीचे मूलभूत कायदे व धोरण.

राज्यलोट स्त्री. राज्यक्रांती; राज्य बुडणे.

राज्याभिषेक पु. १. राज्यारोहणप्रसंगी महानदी, समुद्र इत्यादिकांचे पाणी आणून त्याने अमात्य, पुरोहितादिकांनी मिळून राजावर विधिपूर्वक अभिषेक करण्याचा, राजाला गादीवर बसविण्याचा समारंभ. २. राज्याधिकाराची वस्त्रे देणे. [सं.]

राज्यांग न. राज्याची मुख्य अंगे. ही स्वामी, अमात्य, सुहृत, कोश, दुर्ग, राष्ट्र व बल अशी सात आहेत. यातच कोणी पौरश्रेणी व पुरोहित यांचा समावेश करतात. [सं.]

राज्योपचार पु. सरकारी अधिकाऱ्याचे काम, कर्तव्य. [सं.]

राट पु. (राजा., खा., अहि.) पहा : **रहाट**

राट्या पु. (नाविक) शिडाची दोरी टांगून ठेवण्याची जागा. (हेट.)

राठ वि. १. आडदांड; अडाणी; रानटी (मनुष्य). २. कणखर; चिवट; खडखडीत व कठीण (माती, पीठ इ.). ३. चरचरीत; भरभरीत (केस, कापड इ.). ४. खरबरीत (रुक्ष पदार्थामुळे होणारी जिभेची अवस्था). ५. कर्कश; बेसूर (आवाज). ६. कठीण व ओबडधोबड; कसातरी केलेला (जिन्नस). पहा : **रठ**

राड स्त्री. लुटून, पाडाव करून आणलेले लोक : 'दहा हजार राड लष्करांत आली आहे.'– पेद २०.९३.

राड स्त्री. भांडण; गोंधळ; घोटाळा; संकट.

राड स्त्री. १. शिमग्याच्या दिवशी आत पाणी घालून ज्यात चिखल केलेला असतो तो मोठा खळगा; होळीची खाच. २. नाचणे; क्रीडा. ३. रेबडे, वेंदाड; बाण; चिखल. ४. रस्त्यावर, मार्गावर पाणी पडून, पाऊस पडून झालेली ओल. ५. कचरा; वाळलेला पाला; गुऱ्हाळाच्या चुलाण्याखाली जाळण्याकरिता घातलेला पालापाचोळा. ६. धगधगीत निखाऱ्यांनी युक्त असणारी भूमी, खळी इ. [क. राडि] (वा.)

० बांधणे – भिंतीला पाऊस लागू नये म्हणून आडोसा बांधणे; झड बांधणे.(बे.)

वि. घाण; गढूळ; रेंदाड(पाणी इ.).

राडरूड क्रिवि. अकस्मात; वेगाने (येणे).

राडवाळि–ळी वि. राजकारणदक्ष : 'प्रस्तुत नारायणे बाहाळिये । जन्म देऊनि राडवाळिए ।'–ऋ ७.

राडा पु. १. पसारा; कामाचा रगडा; कचका. २.भानगड : 'याउपर गुता राडा फार करून राहिला नाहीं. '–पेद १.४३. ३. खोल चिखल, रेबड. ४.आकांत; रडारड (मृत्यूसमयी होणारी). ५. हाणामारी.

राडा जहाजाचा एक प्रकार.

राडिके न. विनोदाचे उत्तर, भाषण, वचन :'देशकाळें निऱ्हां राडिकें । '– शिव ११९.

राडी स्त्री. १.चिखल. २. धगधगीत निखाऱ्यांची खाई. (राडी चालणे हा एक नवसाचा प्रकार आहे.)

'राण' याचा अर्थ व या शब्दापासून सुरू होणारे सामासिक शब्द 'रान' मध्ये पहा.

राणटा वि. गावंढळ : 'तेथे त्या राणटा स्त्रीजाति ।'– रास ५.६४.

राणा पु. १. पुजारी; भोप्या; बडवा; गुरू : 'तव तो राणा लिंगाची तर्पणा करोनि, राणा रायेमाते रहावा.'–उच २३५.२. राजा. ३. मुख्य नायक. [सं.राजन् ; प्रा. राण; हिं. राजा]

राणि(णी,ण)वसा पु राणीची, राजांच्या बायकांची राहण्याची, बसण्या–उठण्याची जागा; अंत:पूर; जनानखाना.

राणी स्त्री. १.राजपत्नी; राजाची स्त्री. २.(पत्त्यांचा खेळ) राणीच्या चित्राचे पान. [सं.राज्ञी]

राणीखेत पु. कोंबड्यांना विषाणूंपासून होणारा, मज्जासंस्थेवर गंभीर परिणाम करणारा एक घातक रोग.

राणीमाशी स्त्री. मधमाशी; आकाराने मोठी असून अंडी घालणारी, नेहमी पोळ्यांत राहणारी मधमाशी. कामगार माश्यांहून वेगळी.

राणीराउत, राणीराउ(व)ताणी पु.स्त्री. श्रीमंत व दरिद्री हा भेद; श्रीमंती, वैभव, निर्धास्तपणा किंवा धिटाई दाखविण्याकरिता भाषणसंप्रदायांत योजलेला शब्द.

राणी(णि)व स्त्री. १. राजाचा अधिकार; राजेपण; राजपद: 'ना तरि राणीव सांडावी।'– शिव ४७५. २. राज्य. ३. राज्यसुख :'मजवीण भोगा सुखे राणीव।'– मुआदि १८.६९. ४. अधिकार; सामर्थ्य : 'भक्तीसी राणीव जाली ।'– उगी ४७.

राणीव पु. अंधार : 'जैसी कापुरदीपान्ती । राणिवी लोपावे ज्योति'– तसा ७१७. [सं.]

राणीवी स्त्री. राज्य; समृद्धी. [प्रा.]

राणेपण न. मोठेपण :'परि राणेपणें शाङ्र्गधरा । बोला हे तुम्ही।'– ज्ञा१०.३२३.

राणो पु. बंडखोर मनुष्य.

रात पु. रक्तिमा; तांबडेपणा; डोळ्यांची आरक्त स्थिती. [सं.रक्त]

रात स्त्री. १. रात्र. २. रातकिडा. [सं.रात्रि]

रातकिडा–धुई पु. स्त्री. रात्री किर्र आवाज काढणारा एक किडा.

रातड वि. किंचित तांबडा (तांदूळ, विशिष्ट फळे, डोळे इ.).

रातडी स्त्री. तांबड्या जोंधळ्याची एक जात.

रातढोकरी स्त्री. बगळा. (झाडी)

रातणे अक्रि. १. रतणे; अनुरक्त होणे; भुलणे; भाळणे. २. रमणे; रत होणे; विलास करणे : 'आपुली अंगना रातली परा ।'– मुआदि ३४.९. [सं.रत]

रातनबाव, रातंबाव पहा : **रतनबाव**

रातब पु. रतीब; खुराक. [अर.]

रातबा मसाला रोजचा खुराक व इतर योग्य खर्च : 'तेथील कमाविसदार यांस तुम्ही रातबा मसाले विशी कागद व जासूद जोडी देणे.'- पया ९.२.

रातबि(बे)रात स्त्री. संकटाचा, धोक्याचा, अनुपपतीचा काळ; वेळप्रसंग. क्रिवि. १. संकटकाळी, रात्रीबेरात्री. २. रातोरात. ३. दिवस-रात्र न पाहता. [हिं.]

रातराणी स्त्री. एक सुगंधी फुलझाड. याच्या फुलांना रात्री वास येतो.

रातवडा पु. एका रात्रीचे काम. (गो.)

रातवणी न. १. (बायकी) रात्री हातपाय धुण्याकरिता, शौचाकरिता किंवा पिण्याकरिता ठेवलेले पाणी. २. फार गरम पाणी. (कु.) ३. लग्नात वधू-वरांना खेळण्यासाठी केलेले लाल पाणी.

रातवा पु..१. रात्रीचा सर्व काळ. २. रात्रीचा पाऊस. ३. बुजू नये म्हणून घोड्याला रात्री बाहेर काढणे. (क्रि. देणे) (वा.) ० **खपणे** - रात्रीसुद्धा चाल करणे : 'रातवा खपोन उजाडता प्रात:काली त्याचा मुक्काम होता तेथे गेलो.'-पेद ३९, पृ.११८.

रातव्याचा रुपया लग्नाच्या दिवशी नवरा मुलगा नवरीच्या घरी येताना उपाध्यायास द्यावयाचा रुपया.

रातं(तां)बा पु. न. १. रातंबीचे फळ; कोकंब. २. तांबड्या रंगाची आंब्याची जात.

रातंबी स्त्री. अमसुलाचे झाड. हे झाड कोकण, मलबार, उत्तर कानडा या भागांत होते. ह्याच्या फळास रातंबे किंवा कोकंब म्हणतात. फळातील मगज खातात, पाण्यात कोळून साखर घालून त्याचे सरबत करतात. बियांचे तेल खाण्यास व औषधास उपयोगी आहे.[सं.रक्तम]

रातंबेल न. रातंबीच्या बियांचे तेल; कोकंबतेल.

राता पु. तांदळाची एक जात. तांबडे तांदूळ; तांबसाळ.
वि. १. काळसर तांबडा (तांदूळ, फळे, खाण्याचे कंद). २. तांबूस (डोळे). ३. तांबूस रंगाचा. [सं.रक्त = तांबडा]

रातावणे अक्रि. रात्र पडणे; होणे. [रात]

रातालू-ळे न. पहा : **रताळे**

रातांजन पु.न. १.एक झाड. २. एक सुगंधी पदार्थ.

रातांधळा वि. ज्याला रात्री मुळीच दिसत नाही असा.

रातिवळा पु. रात्री गुरांच्या पुढे टाकलेली वैरण, ओले गवत. (को.)

रातिवा पु.१.हल्ला; धाड; रात्रीचा हल्ला : 'तिये करिताति रातिवा : शस्त्रें मन्मथाचीं'- रुस्व ५९१. २. रात्र; रात्रपणा.

रातोरात-ती क्रिवि. १. रात्रीच्या रात्री; दिवस उगवण्याची वाट न पाहता; रात्रीच्या वेळी. २. सर्व रात्र; रात्रभर; मध्यरात्रीच्या वेळी.

रात्र स्त्री. १. रजनी; सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचा काळ; पृथ्वी दैनंदिन गतीने आपल्या आसाभोवती फिरताना तिचा सूर्याने अप्रकाशित असलेला अर्धा भाग. २.रातकिडा; झिल्ली.[सं.रात्रि] (वा.) ० **ओरडणे** - रातकिड्यांच्या आवाजाने भारणे, नादणे. ० **वैऱ्याची जाणे** - अतिशय दु:खात व हालात दबावाखाली रात्र जाणे. **मरती रात्र झाली** - शपथेचा एक प्रकार. पहा : **बंदाखाली बसणे**

रात्रवीर्त पु. रात्री घातलेला छापा : 'त्या फौजेचें पारिपत्य रात्रवीर्त करून आणने.' - पेद. ३६, पृ.८४.

रात्रशाळा स्त्री. दिवसा कामधंदा करणाऱ्या अभ्यासू शिक्षणार्थींना रात्री शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणारी शिक्षणसंस्था.

रात्रंदिवस, रात्रंदिस क्रिवि. रात्री व दिवसा; अहर्निश; अहोरात्र; सर्वदा.

रात्रिचाप पु. अवकाशातील एका नक्षत्र ताऱ्याचे नाव.

रात्रिवर्ती क्रिवि. रात्री; भर मध्यरात्री.

रात्रिं(त्रि)चर पु. १.निशाचर; राक्षस. २. चोर. [सं.]

रात्रौणे अक्रि. रात्र करणे : 'ऐसेआंही यावें रात्रौनि सायासीं।' - शिव १८३.

राद्धांत पु.सिद्ध केलेले सत्य; प्रमाणाने सिद्ध केलेली, ठरविलेली खरी गोष्ट किंवा अनुमान; सिद्धांत. [सं.]

राधा स्त्री. १. कृष्णसखी; अनयाची स्त्री. २. नाचकामाकरिता स्त्रीवेष धारण करणारा पुरुष.

राधाई मावशी (जादूगार व कोल्हाटी लोकांत) नळीच्या तोंडाशी असलेली नाचणारी बाहुली.

रान न. (जंबिया) चड्डीच्या काढणीजवळील मांडीवरचा पुढील भाग; आपल्या हातातील जंबियाने जोडीदाराच्या उजव्या मांडीवर चड्डीच्या काढणीजवळ मारणे. [फा.]

रान न. १.जंगल; वन; विशेषत: जंगलातील खुजा, ठेंगण्या झाडाझुडपांचा समुदाय. २.तळवट; माळ; रुक्ष प्रदेश; नापीक व निर्जन प्रदेश. ३. मनुष्यास उपभोग्य असा भाजीपाला इत्यादींहून भिन्न असे तण, गवत, उपद्रवी-निरुपयोगी वनस्पती इ. ४. शेतात उगवणारे गवत; तण. ५. शेत. ६. झाडी; राई; बन. ७. देश; प्रदेश; भाग. ८. विदेश; परका मुलूख :'परस्परें या रानांतील उमराव व रजवाडे यांस पत्रें देऊन तुमची कुमक करवितो.' -भाब १३.९.(ल.) फार मोठी वाढलेली. (वा.) ० **उठणे** - लोक खवळणे; जनप्रक्षोभ होणे. ० **उठविणे, जागविणे, काढणे, हाकणे**- शिकारीकरिता धडधड आवाज करून सावजांना जागे करणे; झाडीतून पारध, सावज बाहेर हुसकणे. ० **काढणे** - १. जंगल-जमीन लागवडीस आणणे. २. रानाचा, जंगलाचा शोध लावणे. ० **खवळणे** - १.एखाद्यावर खवळणे; उठणे (श्वापदे). २. अतिशय क्षुब्ध होणे (राग, भूक, लोभ, काम इ. कांनी). ० **घेणे** - १. रानांत पळून जाणे (गुरांनी). २. चुकीच्या मार्गाचा स्वीकार करणे ३. बारगळणे. ३. पहा : **रानात शिरणे**. ० **फुटणे**- चारही दिशांना धावणे. ० **बदलणे, सोडणे, पारखे होणे** - आपले मन किंवा उद्देश बदलणे; एखाद्या संबंधीचा आपला विचार फिरविणे; आपला पूर्वीचा मुद्दा सोडून देणे. ० **भारणे** - १. सर्व प्रदेशावर जादू, मंत्र टाकणे. २. यथास्थित पैसे चारणे. ० **मारणे** -मोठ्या प्रमाणात लाच घेणे. **रानात, आडरानात पडणे** - एकटे सापडणे; उदास होणे. **रानात शिरणे, रानी रिघणे** - (संभाषणप्रसंगी) सरळ मार्ग सोडून अयोग्य गोष्टी सांगत बसणे; विषयांतर करणे; बहकणे.

रानआळू न. पावसाळ्यात उगवणारे, पांढऱ्या रंगाचे तेरे अळू.

रानक(ग)ट वि. १. खेडवळ; गावंढळ; रानावनातील (मनुष्य, पशू). २. वन्य; लागवडीशिवाय उगवणारा.

रानकरी पु. रान्या; गवत; लाकूडफाटा इ. आणण्याकरिता रानात फिरणारा माणूस.

रानकाकडी स्त्री. एक प्रकारची औषधी वनस्पती. (झाडी)

रानकाढ्या वि. शिकार करण्यासाठी रान काढण्याकरिता लावलेला (मनुष्य); पारध्याकरिता सावज कचाट्यात आणणारा.

रानकापशी स्त्री. रानातील कापशीचे झाड. हिचे बी लहान व वाटोळे असून देवकापशीचे मोठे व लांबट असते.

रानकेळ–ळी स्त्री. केळीची जंगली जात. हिच्या पानावर जेवतात. हिचा कांदा उकडून किंवा वाळवून त्याचे पीठ करून खातात. पहा: **कवदर**

रानखरडा पु. जमिनीची प्रत्यक्ष केलेली मोजणी, मापणी इत्यादीचा आराखडा.

रानगा स्त्री. रानटी गाय. (झाडी)

रानगांजा–ज्या पु. एक औषधी मूळ; सालवण. याची पाने बेलाप्रमाणे त्रिदळ असून यास निरनिराळ्या रंगाची फुले येतात. याचे मूळ सर्व प्रकारच्या तापावर गुणकारी आहे.

रानगोवरी स्त्री. जंगलात सापडणारे इतस्तत: पडलेले शेण, शेणी.

रानचिमणी स्त्री. १. चिमणीसारखा एक लहान पक्षी. २.जांभळी व पांढरी फुले येणारे एक झाड.

रानजाई स्त्री. उंच वाढणारे वेलासारखे झुडूप.

रानट–टी–टे–ठी पहा : **रानक(ग)ट**

रानडुक(क्क)र पु. न.भारतात सर्वत्र आढळणारा, आखूड पायांचा, राठ व विरळ केस असलेला, काळसर रंगाचा, निमुळत्या तोंडाचा, सुळे असलेला, अतिशय ताकदवान प्राणी.

रानताट न. जेवणाचे ताट म्हणून वापरण्याचे झाडाचे पान; पत्रावळी.

रानतुळस स्त्री. एक वनस्पती; वैजयंती. ही तुळशीसारखीच असते. पाने मात्र मोठी असतात. हिला मंजिऱ्या येतात. बी काळे, किंचित तांबूस व खसखशीएवढे असून पाण्यात घातले असता फुगते. हे तुकुमराई (सबजाचे बी) प्रमाणे असते. यासही तुकुमराई म्हणतात.

रानतूर स्त्री. एक लहान पिवळ्या फुलांचे झुडूप.

रानदांडगा वि. १. आडदांड; रानटी; धिप्पाड; राक्षसी काम करणारा. २. सर्व तऱ्हेची शस्त्रे घेऊन शत्रूचा किंवा लुटारू धाडीचा प्रतिकार करण्याकरिता जाणारा शेतकरी गावकरी.

राननिंबोणी–निंबूण स्त्री. एक मोठे काटेरी झाड.

रानपासरा पु. दुकानदारीची झिंबड.

रानपाळ वि. नापीक; भुकिस्त; बरड; भातशेतीला फारशी उपयुक्त नाही अशी (जमीन).

रानपिंपळ पहा : **पारोसा पिंपळ**

रानभरी–भरू क्रिवि. १.भयभीत; घाबरलेला; पलायमान; परागंदा (पशू, मनुष्य). २. (ल.) चैनीकरिता इतस्तत: भटकण्याच्या हेतूने ज्याने आपली बायकापोरे सोडली आहेत असा. ३. रानोमाळ. (वा.) ०**होणे** – १. रस्ता चुकणे; आडरस्त्यास जाणे. २.गोंधळणे; घाबरणे; घाबरे होणे.

रानमसूर स्त्री. एक जंगली झाड. ही झाडे महाबळेश्वराकडे पुष्कळ होतात. ह्याचे बी मसुरासारखे असते.

रानमाणूस न. १. एक प्रकारचा वानर. २.(ल.) रानटी, खेडवळ माणूस.

रानमोगरा पु. जिची पाने अरुंद असतात अशी जाई.

रानरावताण–णी न. स्त्री. पहा : **रावताण**

रानव(वा)ट स्त्री. मोठ्या रस्त्यापासून फुटलेली रानाकडे जाण्याची वाट. वि. १. जंगली; लागवड न केलेली, साफ न केलेली (जमीन). २. पहा : **रानक(ग)ट.** ३. असंस्कृत.

रानवडी पु. शाळूचा एक प्रकार.

रानवत न. वन्य वृक्षांचे पान; ज्यांची पाने सामान्यत: भोजनाकरिता, पुड्याकरिता उपयोगी पडत नाहीत अशा झाडाचे पान. (राजा.)

रानवन न. १. (व्यापक) रान; जंगली प्रदेश. २.रानात फिरणे; वन्य पदार्थावर उपजीविका करणे किंवा निर्वाहाकरिता वन्य पदार्थ शोधणे. (क्रि. करणे, पाहणे, फिरणे, हिंडणे.)

रानवा पु. लागवडीस न आणलेली पडीक जमीन; जंगल; रान.

रानवाळूक न.(थट्टेने, ल.) दगड. (वा.) ०**चारणे**– दगड मारणे.

रानशकट्ट पु. एक जंगली जनावर :'रानशकट्ट आणि रीसे।'– दास ३.७.९.

रानशेण–शेणी स्त्री. १. पहा : **रानगोवरी**. २.जेव्हा एखाद्या मनुष्याचे ज्ञान, समज, सामर्थ्य किंवा संपत्ती यासंबंधी पूर्णपणे निषेध दाखवावयाचा असतो, तेव्हा उपमानाप्रमाणे योजलेल्या (शेण, गोवऱ्या, माती, धूळ, दगड, धोंडा, राख इ.) शब्दांपैकी हा एक शब्द आहे. उदा. 'त्याला रानशेणीचे पीठ समजते = त्याला काय समजते?'

रानशेर, रानशेवगा पु. एक वनस्पती; हुरा.

रानसठ(ट)वी स्त्री. सटवीचे रूप धारण करणाऱ्या देवीचे किंवा दुर्गेचे नाव :'उच्छिष्टचांडाळी रानसटवी जखणी ।'– ह १३.६८.

रानसोडवण स्त्री. रान तोडून साफ केल्याबद्दलची जकात. – अस्पृ ३५.

रानसोवर–सोरू पु. रानडुक्कर.

रानहल्या पु. गवा.

रानी स्त्री. काटे असलेली मासोळी. [सं.राज्ञी]

रानीपरज स्त्री. गुजराथेतील सुरतपासून नवापूरपर्यंत राहणारे रानटी लोक.

रानोमाळ क्रिवि. १. रानात आणि माळात. २. तजावजा; अव्यवस्थित; अस्ताव्यस्त रीतीने; पांगून. ३. (ल.) पसरल्यासारखे; इकडे-तिकडे अस्ताव्यस्त फेकल्यासारखे. (क्रि. होणे)

रानोरान क्रिवि. रानावनांतून; दरीखोऱ्यांतून; सर्व देशभर.

रान्या वि. रानावनांतील; खेडवळ; गावंढळ; रानकरी; रानट.

रान्ह–न्हे पहा : **रांधण**

राप पु. घराची बाजू, पडवी. (बे.)

रा(रां)प पु. १. तुरटपणा; विशिष्ट फुलांचा व वनस्पतींचा तुरट आणि आंबट रस. २. कोवळी सुपारी किंवा तुरट पदार्थ ज्यांत शिजविला आहे असे पाणी; फळे, फुले इ.कांच्या द्रवाच्या अंगी असलेला काळा इ. रंग. ३. गवत, केरकचरा इत्यादींचा ढीग किंवा पसारा. स्त्री. पावसाळी हवा.

रा(रा)पण स्त्री. मासे धरण्याचे मोठे जाळे; अनेक जाळी एकत्र करून केलेले मासळी धरण्याचे साधन. (कु.)

रापणी स्त्री. मासे पकडण्याच्या जाळ्याची दुरुस्ती.

रापणी स्त्री १.चाचपणी; दाबणी. २.चाचपून शोधणे.

रा(रां)पणे अक्रि. १. हवेवर उघडे ठेवल्यामुळे किंवा लोखंडाशी संबंधामुळे काळे होणे (तुरट किंवा आंबट फळ, भाजीपाला), काळवटणे. २. छानदार छटा येणे; रंगणे : 'तया अनुरागाचेया चोळे । रापें इंद्रियांचें मैळे ।'- उगी ७९६. ३. चांगल्या रीतीने भिनणे, मिसळला जाणे, मुरणे (मसाल्याने खार, क्षारांनी खत इ.) ४. अढीच्या उष्णतेमुळे गुणविशिष्ट आणि स्वादिष्ट होणे (आंबे इ.). ५.आत खोल भिनणे व छटा येणे (खार, मीठ, क्षार, रंग). ६. सर्व अंग व्यापणे; सर्व शरीरावर परिणाम होणे (ताप, उपदंश इ. आजार, विष किंवा दुसरे रोगकारक द्रव्य, औषध यांचा). ७. असा विकार भोगणे (अंग, शरीर यांनी). ८. सर्वत्र पसरणे व विश्वासास पात्र होणे (आवई, बातमी). ९. पूर्ण, सतेज, टवटवीत, चिवट दिसणे (पूर्वी कृश व निस्तेज असलेला मनुष्य). १०. व्यापणे व ताब्यात, कबजात घेणे. ११.(ल.)परिचित, चांगला माहीतगार होणे.

सक्रि. हिसकावून घेणे.

रापणे, रांपा न.पु. सुपारीवरचा पापुद्रा सोलण्याचे, तुरट किंवा आंबट फळे कापण्याचे एक हत्यार. (राजा.); रांपो. (कु.) [प्रा.रंप=छिलणे]

रापणे सक्रि. १.चाचपणे; पाहण्याकरिता दाबणे व चिवळणे. २. (आट्यापाट्यांचा खेळ) मुयदंड नामक लांब मध्यरेषेवरून चालणे; अशा रीतीने खेळगड्यांना ती रेषा ओलांडू न देणे.

अक्रि. (अंधारात) चाचपून पाहणे; चाचपडणे.

रापदळी स्त्री. शरीर हलविणे; अंगविक्षेप.

रापविणे सक्रि. एखादी क्रिया काही वेळ चालू ठेवणे; मुरविणे; रंग येऊ देणे; रंगास चढू देणे.पहा : **रापणे**

रापा पु. (चर्म) चामडे कापण्याचे दुधारी हत्यार.

रापा स्त्री. पावसाळा; एकसारखी सतत वृष्टी.

रा(रां)पी-पा स्त्री. १. चांभाराचे कातडे कापण्याचे उलट्या खुरप्याच्या आकृतीचे हत्यार; कापणी. २. लहान रापा. पहा : **रापणे**

[प्रा.रंच=छिलणे]

राफजी पु. (तुच्छतार्थी) बोहरी लोक. - मासिक मनोरंजन, पृ.१०६, फेब्रु. १९३५.

राब स्त्री. १. काकवीपेक्षा दाट असा उसाच्या रसाचा रांधा. २.रुग्णाला प्यायला देण्याचे पेय. ३. तेला-तुपाचा गाळ, बेरी. ४. पीठ घालून दाट केलेले आणि कढविलेले साखर घातलेले पाणी.

[दे.प्रा.रब्बा; हिं. राब]

राब पु. १. रोपाकरिता भाजलेली जमीन.(को.) २. अशा रीतीने तयार केलेल्या जमिनीवर केलेले रोप. ३. जमीन भाजण्याकरिता लागणारे गवत, पाने, केरकचरा, टहाळ इ. (वा.) ० **बरडळणे** - भाजलेली जमीन नांगरून दांताळ्याने ढेकळे फोडून सारखी करणे.

राब पु. १. रीत; सवय. २. स्वभाव. ३. वारंवार जाणे-येणे; एखादे कृत्य पुन:पुन्हा करणे; अभ्यास; वापर. (क्रि. घालणे, पाडणे.) ४. आटोकाट मेहनत; श्रम. ५. धुमाकूळ. ६. कुटुंबातील माणसांची वर्दळ; पसारा.

राबड स्त्री.चिडचिड; रेंदा; चिखल; गाळ; खळबळ; रेबड.

राबड स्त्री. मेहनत; श्रम; कष्ट; कष्टाचे काम.

राबडणे अक्रि. मेहनत, श्रम करणे.

राबडी स्त्री. १. पहा : **रबडी**. २. पातळ गूळ. ३.पातळ चिखल.

राबणावळ स्त्री. ओढाळ जनावरास ताळ्यावर आणून ते कळपाबरोबर चालण्याकरिता गुराख्यास द्यावयाचे वेतन, बक्षीस. (को.)

राबणी स्त्री. टहाळ, शेण, गवत, बारीक माती घालून रोपटा तयार करणे व भाजणे; भाजावळ; दाढ.

राबणी वागणूक १. ये-जा; वापर; राहणे; जन्म घालविणे. २. सवयीचा, परिचित होणे. ३. पहारा; चाकरी. ४. (व्यापक) लागवड; नांगरणी; शेतीचे काम. (क्रि.राखणे)

रा(रां)बणे अक्रि. १. सवयीचे होणे; परिचित होणे (परक्या कळपाशी गाय इत्यादी, नुकताच शाळेत घातलेला मुलगा, घरास रानमांजर, ओझ्यास खांदा, पाठ इ.). २. चांगला मळलेला असणे (रस्ता); वारंवार लिहिण्यामुळे शाईने सारवल्यासारखा होणे (खर्डा). ३. नित्य येणे-जाणे असणे; राबता असणे (रस्ता, मैदान, जमिनीचा तुकडा यावरून); वारंवार जाणे-येणे असणे (एखाद्याच्या घरात, जागेत). ४. विशिष्ट रीतीने, सवयीने जन्म घालवणे; वापरणे; परिचित होणे. ५. मेहनत, श्रम करणे.

राबणे सक्रि. जमीन नांगरणे, लागवडीस आणणे.

राबता पु. १. महारांकडून हक्काने करून घेण्यात येणारे सरकारी काम किंवा त्या कामाच्या मोबदल्यात त्यांच्याकडून घेण्यात येणारा पैसा. २. कष्टाची सवय.

वि.मेहनत करणारा.

राबता पु. १. वारंवार जाणे-येणे; येणाऱ्या-जाणाऱ्यांची गर्दी, वर्दळ; वापर; परिपाठ; अभ्यास; सवय; पुन: पुन्हा घडणे (एखाद्या कृत्याचे). २. ऋणानुबंध; स्नेह; दळणवळण. ३.चालू लागवडीची (जमीन).

[अर.रफ्त]

राबत्या पु. १. सार्वजनिक काम करणारा महार; वतनी महार. २. मालकाच्या शेतात काम करणारा मजूर.

राबना क्रि. अनैतिक संबंधातून गर्भवती असणे. (झाडी)

राबरी स्त्री. उसाचा पुरता न कढविलेला रस, काकवी.

न. घट्ट न झालेला, पातळ गूळ.

राबला वि. स्वकष्टार्जित. (झाडी)

राब(भ)स वि. १. ठोसर (नांगली, कांग, कुळीथ, राळे, सावा इ. धान्ये). २. अरबट चरबट; वाईट (अन्न, जेवण). ३.घाणेरडा; अव्यवस्थित; डुकरासारखा खाणारा किंवा तशा प्रकारे खाण्याची सवय.

राबाचे पाणी पारोसे पाणी; फारच ढवळलेले किंवा डचमळलेले पाणी; वापरलेले पाणी.

राभस्य न. १.अविचार; दांडगेपणा. २.अविचाराचे भाषण.[सं.रभस्]

राम पु.१. परशुराम, रामचंद्र, बलराम यांस सामान्य संज्ञा. २.(विशेषत:) श्रीरामचंद्र. ३. (ल.) सामर्थ्य; तथ्य; जीव. उदा. त्या उपरण्यात आता काही राम उरला नाही. ४. (सांकेतिक) (सीता किंवा सीताबाई = अधेली. त्याप्रमाणे) रुपया. ५.वाईट बातमी ऐकली असता किंवा दुसऱ्याने बोललेल्या दोषादिकांचा निषेध करीत असता हा शब्द उच्चारतात.[सं.रम् = रमणे] (वा.) ०**म्हणणे, होणे** - मरणे; मरण्यास सिद्ध होणे; मरणोन्मुख होणे. **रामभरोसे असणे** - परमेश्वरावर हवाला ठेवून राहणे.

राम पु. १. खेळाचा एक डाव. २. पती. (अहि.)

रामकली-ली (भैरव) स्त्री. संगीतात एक राग. गानसमय प्रात:काल.

रामकाटी-ठी स्त्री. बाभळीची एक जात. हिला पुळाटी किंवा रामबाभळ असेही म्हणतात. ही सामान्य बाभळीपेक्षा अधिक उंच, सरळ व गेंदेदार असते.

रामकाठी वि. पांढरे, रेशमी काठ असलेले (वस्त्र).

रामकुंड न. १. नाशिकला गोदावरीवर असलेले एक कुंड, तीर्थ (स्नान करणे, मृताच्या अस्थी टाकणे इ. करिता). २. (यावरून) कोणत्याही नदीकाठी असलेले असे कुंड, तीर्थ.

रामकृष्णपंथ पु. आराध्य दैवतांची नावे (राम, कृष्ण, गोविंद, हरी इ.) उच्चारण्याचा पंथ, संप्रदाय.

रामगा पु. भुताचे नाव अगर जात. (माण.)

रामगोळा पु. (रामनवमीच्या फराळाकरता केलेला) ताकात भिजविलेला लाहीपिठाचा गोळा.

रामचंगी स्त्री. मोठी बंदूक.

रामजनी स्त्री. गाणारी कसबीण, वेश्या.

रामटेकचाबऱ्या वि. आळशी; ऐतखाऊ. (झाडी)

रामटोला पु. १.विटीदांडूच्या खेळात विटीवर दांडूने मारलेला पहिला टोला. (क्रि. मारणे) २.(ल.) जोराचा प्रहार (काठीचा, मुठीचा). ३. मोठी व जाड भाकरी. ४.(सामा.) मोठी, प्रचंड वस्तू.

रामठ-ठा पु. हिंग.

रामत(ती)ळ न. कारळे. (को.) [गु.]

रामतुळस स्त्री. एक प्रकारची तुळस; पांढरी तुळस.

रामथडी स्त्री. पितळेचे मोहरे (चकचकीत, गुळगुळीत) मणी.

रामदास (सांकेतिक) एक आणा.

रामदासी-शी पु. श्रीसमर्थ रामदासांनी स्थापलेल्या संप्रदायातील व्यक्ती.

रामपत्री स्त्री. खोटी, नकली जायपत्री; मायपत्री.

रामपात्र न. पाणी पिण्याचे पितळी भांडे; फुलपात्र. [सं.]

रामपुरी वि. १. रामपूरचे पोलाद. - प्रश २४. २. एक प्रकारचा सुरा.

रामप्रतिज्ञा स्त्री. सत्य व खात्रीचे वचन. [सं.]

रामप्रहर, रामपाहार, रामपारा पु. सूर्योदयापासून पहिले तीन तास; पहिला प्रहर; पवित्र, देवाधर्माचा काळ.

रामफळ-ळी स्त्री. एक फळझाड व त्यांचे फळ. हे झाड बरेच उंच असते. हे फळ मोठे असून रंग तांबूस असतो. चवीस सीताफळापेक्षा किंचित गोड. हे वातहारक आहे. [सं.;गुज.रामफल]

रामबाण (रामाने सोडलेला बाण कधीही व्यर्थ जात नसे यावरून ल.) खात्रीचे, ठाम, अचूक वचन, करार, भविष्य इ.

पु. पाणकणीस.

रामभजन पु. कानउघडणी. (झाडी)

राममं(मां)दार पु. एक वृक्ष; मांदाराचा, रुईचा एक भेद. [सं.]

रामयुद्ध न. एक वनस्पती; सहा; काकमुद्रा; मुद्गपर्णी.

रामरग(गा)डा पु. पराकाष्ठेची दाटी, गर्दी (लोकांची, काळजीची, कामांची, उद्योगांची).

रामरट्टा पु. १. मोठा प्रहार; रपाटा (काठीचा, मुठीचा); रामटोला. (क्रि. दाखविणे, देणे.) २. कचका; भार (अवाढव्य उद्योगाचा, कामाचा). ३. घोटाळा; गोंधळ. ४. दाटी; चेप; गर्दी.

रामरमाई स्त्री. नमस्कार; स्वागत. (झाडी)

रामरस पु. मीठ. [प्रा.]

रामरक्षा स्त्री. १. रामाचे एक सुप्रसिद्ध स्तोत्र. २. हे स्तोत्र म्हणून अभिमंत्रिलेली विभूती, राख. ३.(निंदार्थी) लाहीपीठ, बाळंतलिंबाची पाने, मिरच्या इत्यादिकांची रास. [सं.]

रामराज्य न. १. ज्यात लोकांचे सर्व शत्रूंपासून रक्षण केले जाते व न्यायाने व चांगल्या रीतीने राज्य केले जाते असे राज्य; श्रीरामचंद्राने केले तसे उत्कृष्ट, सुखाचे व शांततेचे राज्य. २. रागे भरण्यास कोणी नसल्यामुळे (मुलांनी) केलेले स्वैर वर्तन. [सं.]

रामराम पु. ब्राह्मणांशिवाय इतर लोकांकडून दुसऱ्याच्या सन्मानार्थ एका हाताने वंदन करताना उच्चारला जाणारा शब्द. अशा प्रकारचा शब्द पत्रलेखनातही योजतात. (वा.) ०**ठोकणे** - (एखादे काम, व्यक्ती यांना त्रासून, कंटाळून) सोडून देणे,एखाद्याचा निरोप घेणे.

रामरामी स्त्री. १.परस्परांनी परस्परांस रामराम करणे. २. रामराम करता येण्यापुरती ओळख.

रामरोट पु. जाड पोळी, रोटी. (ना.)

वि. धटिंगण; आडदांड.

रामलीला स्त्री. आश्विन महिन्यात उत्तर हिंदुस्थानात काही ठिकाणी रामाच्या चरित्राचे केले जाणारे नाटक, प्रयोग. [सं.]

रामवचन न. सत्य भाषण, वचन. [सं.]

रामविनोद पु. विदूषक; खुशमस्कऱ्या.

रामा स्त्री. १. सुंदर, रमणीय स्त्री. २.(सामा.) स्त्री. [सं.]

रामाठा-ठ्या, रामेठी-ठा पु.स्त्री. रानातील एक फुलझाड. ह्याला पिवळे झुपकेदार फूल येते. हे महाबळेश्वरच्या डोंगरावर पुष्कळ सापडते.

रामानुज पु. वैष्णवांमधील एक पंथ, भेद. [सं.]

रामायण न. १. वाल्मीकीने लिहिलेले रामचरित्रवर्णनपर महाकाव्य. २. (ल.) लांबलचक; कंटाळवाणी गोष्ट; चऱ्हाट. ३.अस्ताव्यस्त पसारा. ४.घालमेल; गोंधळ. [सं.]

रामोसी-शी पु. १. एक जात व तिच्यापैकी एक व्यक्ती. २.(ल.) बिलंदर.

राय न. १.सोन्याचा डाख बसविताना उपयोगात आणण्याचे मिश्रण.

२.(सोनारांत प्रचलित) तांबे.

राय स्त्री. मत; अभिप्राय. [फा.]

राय न. १. मातीच्या मडक्यांना चकाकी आणण्यासाठी कुंभार वापरतो ती माती. २. भोग; कष्ट; हेळसांड. (अहि.)

राय पु. राजा; नृप. पहा : **राव** [सं.राजा]

रायआवळा–ळी स्त्री. पु. रायआवळ्याचे झाड व त्याचे फळ. ह्यास हरपररेवडी असेही म्हणतात.

रायकुरा–री पु.स्त्री. एक कोकणी झाड. डाक घेऊन जाणारे शिपाई रात्रीच्या वेळी ह्याच्या लाकडांचा दिवटीसारखा उपयोग करतात.

रायकेळ स्त्री. न. केळीची एक जात व तिचे फळ. हे तांबड्या जातीच्या केळ्यासारखे असते. [दे.]

रायगिडगिडी स्त्री. लहान नगारा.

रायघावळ न. दोन धागे काळे व एक धागा मावडा असे उभार व आडवणासही दोन दोरे काळे, एक मावडा. किनार कोणत्याही प्रकारची, असे विणलेले लुगडे.

रायघोळ स्त्री. एक प्रकारची भाजी.

रायचिकण स्त्री. चिकण माती.

रायजनी स्त्री. १. राजनीती. २. विचार करणे. [फा.]

रायडे वि. (सोनारी धंदा) तांबे मिसळलेले (सोने).

राय(ये)ण न. कडू वृंदावन. पहा : **राटोण**

रायणी स्त्री. एक झाड; खिरणी. [सं.राजादनी; प्रा.]

राय(या)त स्त्री. कृपा; अनुग्रह; मेहर. [अर.रेआयत्]

रायते न. कोशिंबिरीच्या उपयोगी मुळा, गाजर, काकडी इ. चिरून किंवा किसून त्यात मोहऱ्या, दही इ. घालून केलेले तोंडीलावणे; लोणचे. (व., ना.) (वा.) **रायतं करनं** – १. मुरवत ठेवणे. २. विनाकारण साठवणे; उपयोग न करता ठेवून देणे. (अहि.)

रायदिंडा पु. एक झाड, दिंड्याचा एक भेद.

रायधडक पु. घाव : 'मग रायधडक निशान लागला ।'– संत राजी रु १३.

रायनी स्त्री. लोणचे; रायते.(व.)

रायपी पु. सोवळेकरी. (कु.)

रायपुरी वि. १. रायपूर शहरासंबंधी (साखर, लुगडे, खण इ.). २. मऊ. पु. (सांकेतिक) भामटा.

रायबारी वि. मंगलकार्यात राबणारा. (गो.)

रायबोर स्त्री. न. एक वृक्ष व त्याचे फळ.

रायभुलावण स्त्री. राजास भुलवणारी किंवा मोह घालणारी स्त्री; सुंदर व मोहक स्त्री; सुंदरी; परी; अप्सरा.

रायभोग पु. तांदळाची एक जात.

वि. राजाने खाण्याजोगा; उत्तम (पदार्थ). [सं. राज + भोग]

रायमाड पु. १. ज्यापासून माडी काढतात ते माडाचे झाड. (को.) २. सरकारी हक्काचा माड.

रायमुनी स्त्री. १. एक फुलझाड व त्याचे फूल. २. फिरस्ते लोक.

रायरंद –ग पु. (महारांचे) मनोरंजन करण्यासाठी येणारे बहुरूपी.

रायराजेंद्र पु. राजाच्या एखाद्या प्रधानाची पदवी.

रायराय वि. राईएवढे; बारीक, लहान.

रायली स्त्री. लबाडी.

रायवण न. कारले.

रायवणी न. १. कच्च्या आंब्यात मोहरी, हिंग वगैरे मिसळून केलेले तोंडीलावणे. पहा : **मोहरवणी**. २. मोहऱ्यांचे पाणी.

रायवळ न. जंगली लाकूड (इमारतीकरिता तयार होऊन पडलेले).

वि. १. साधा किंवा जंगली साया, शिसव (खैर व फणस याशिवाय)किंवा काहीच्या मते साया व शिसव यांखेरीज सर्व हलक्या लाकडांस लावण्याचे विशेषण. २. सामान्य; वन्य; निकृष्ट; कलमी किंवा इरसाल नसलेला (आंबा, आवळा, जांभूळ इ.).

रायविनोदी वि. बहुरूपी व माकडचेष्टा करणारा; मस्कऱ्या; नकल्या.

राया पु. १. डौलाने बोलताना फाकडे, फंदी, अफीणबाज इत्यादीकांनी स्वत:स लावलेली ऐश्वर्याची व वैभवाची पदवी. २. नवरा; जिवलग.[सं.राज्=प्रकाशणे; राय] (वा.) **रायाप्पा नाइकांचा फराळ करणे** – थंडा फराळ करणे; फक्त पाणी पिणे.

रायांगण न. देवळापुढील अंगण.

रारा उद्‌गार. १. मंत्र: 'करुणेचा रारा करी । ठाऊनि अविद्या विष उतरीं।' – उगी ७७९. २. यंत्र. ३. निंबाची डहाळी.

रारावणे, रोराण करणे अक्रि. रडणे; रीरी करणे. [ध्व.]

राव पु. १. नृप; राजा. २. नावापुढील सन्मानाची एक पदवी. ३. एक मराठा जात व त्यातील एक व्यक्ती. पहा : **मराठा**. ४. समशेर बहादूर; तिस्मारखा. ५.दक्षिण हिंदुस्थानात देशस्थ ब्राह्मण, मराठे, जैन आणि शेंबेगार राव ही पदवी लावतात. गोणी विणकरांची पेरिके नावाची जातही कधी-कधी राव पदवी लावते. ६. पेशवाईत विशिष्ट शौर्य गाजविल्याबद्दल एखाद्या व्यक्तीस दिली जाणारी पदवी.[सं.राज, राय] (वा.) **० खाली आले** – एखादा मोठा मनुष्य घोड्यावरून, मोठ्या पदावरून खाली आला असता त्यास उद्देशून निघणारा उद्‌गार. **० घोड्याखाली येणे** – राव मरणे. **रावाचा रंक होणे** – मोठ्या, श्रीमंत माणसाला दारिद्र्य, गरिबी येणे.

रावकी स्त्री. १. रावाची स्थिती, गुण; रावपणा. २. रावाचा हुद्दा, दर्जा किंवा मोठेपणा; वैभव.

रावखंडा वि. १. तुटका; तुटलेला (ओठ). २. ओठतुट्या. ३. (ल.) आ पसरणारा. ४. खिंडार पडलेला; उघडा व भकास दिसणारा; विशोभित (वाडा, घर, खिंड, खाडी). [सं.राजी + खंड]

रावखंडे न. तुटका ओठ.

रावजी पु. पुरुषास लावण्याचा बहुमानाचा शब्द. [रावा]

रावण न. रंग; राप.

रावण पु. १. रामाने मारलेला लंकेचा राजा. २.(ल.) (निंदेने) शरीराने मोठा असा टोणगा, बोका इ.[सं.रू = शब्द करणे] (वा.) **रावण किंवा रावणाची लंका जळणे** – कानाची भोके बोटांनी बंद केली असता ऐकू येणाऱ्या आवाजास म्हणतात. **० माजणे, मातणे, होणे–** अतिशय ताळेबाज, उद्धट, शिरजोर होणे.

वि. शत्रूस रडावयास लावणारा. [सं.]

रावण कावळा पहा : **द्रोणकाक**

रावणखोत वि. दांडगा; टणक (मनुष्य). (राजा.)

रावणफळ न. एक वन्य फळ. याचे रामफळाच्या उलट गुणधर्म असल्यामुळे ह्यास हे नाव आहे.

रावणभात पु. अतिशय तिखट मसालेभात.

रावणराज्य न. १.अंदाधुंदीचा प्रदेश. २. अंदाधुंदी; झोटिंगपातशाही. ३. बेबंदपणा. [सं.]

रावणवेला स्त्री. विशिष्ट वेळ, काळ. ही लढाई करण्यास, स्वारीवर निघण्यास अशुभ असते.

रावणाचा लेक (ल.) १. फुशारखोर, अरेराव मनुष्य. २. ताठेबाज, कह्यांत न राहणारा मनुष्य.

रावणाचा वाजंत्री डास.

रावणाची खाई (ल.) सर्व खाणारी, गट्ट करणारी, ग्रस्त करणारी जागा, धंदा, काम इ. ज्यांत सर्व काही खपते ते. जसे – कच्च्याबच्च्यांचा संसार, अगस्तीचे पोट, अधिक वाढलेले शहर.

रावणावळ स्त्री. रंगणावळ; रंगविण्याची मजुरी. (ना.)

रावणी स्त्री. चांभाराची कुंडी.

रावणी स्त्री. उबारा; अंडी उबवण्यासाठी केलेली व्यवस्था; रोवण. (कु.)

राव(वि)णे न. लेप.
सक्रि. रंगविणे.

रावणे सक्रि १. राहणे; थांबणे. २. भुकेने ओरडणे; ओरडणे.[सं.रू]

रावण्या स्त्री. अव. प्रार्थना; विनवण्या. (क्रि. करणे)

रावताण–णी स्त्री. घोडेस्वारांनी केलेली लूटमार, नासधूस; रानटी, लुटारू किंवा रानात हिंडणारे ह्या अर्थी किंवा प्रकर्षार्थी ह्या शब्दापूर्वी रान शब्द जोडतात.

रावनपोवन वि. १. क्षुल्लक. २. अनाहूत.(झाडी)

रा(रां)वस पु. तांबड्या रंगाचा समुद्रातील मासा.

रावळी स्त्री. देवदासी; देवळी. – ऐरा २०३.

रावळी स्त्री. रायआवळा.

रावळूक स्त्री. केस झडणे. (गो.)

रा(रां)वा वि. रावखंडा; ओठतुटका.

रा(रां)वा पु. १. राघू; पोपट. २. दळलेली हळद.

रावेणी स्त्री. लोणच्याचे पाणी; पाडाचे आंबे उकडून केलेले रायते. पहा : **रायनी**

रा(रां)वेरी स्त्री. तांबड्या रंगाच्या कपड्याचा एक प्रकार.

राशा–शी वि. १. मध्यम प्रतीचा. पहा : **राशी.** वि. २. नपुंसक; नामर्द. ३. दुर्बळ; मूर्ख. ४. वेडसर.

राशि–शी स्त्री. १. रास; ढीग. २. सरसकट ढीग; ढिगारा; सळमिसळीचा समवाय. ३.मूळ घटक. ४. गणिताच्या क्रियेकरिता मांडलेला आकडा किंवा आकडे (धन, गुण्य, भाज्य इ.). ५. बेरीज, एकंदरी.६.(आकण, निकण, मणी यांहून भिन्न) कणसाच्या पहिल्या मळणीपासून झालेली धान्याची रास. पहा : **मदन.** (वा.) ० **पुंजीस येणे** – राशीस, साठ्यास पडणे; (खर्च वेच भागून) निव्वळ नफा म्हणून उत्पन्न होणे; खिशात पडणे; संग्रही पडणे.

राशि–शी, राश स्त्री. नक्षत्र चक्राच्या किंवा क्रांतिवृत्ताच्या कल्पित बारा भागांपैकी कोणताही एक भाग; रास; तारांचा पुंज.[सं.] (वा.) **राशीस बसणे, लागणे** – १. अनिष्ट असणे (ग्रह). २. तीव्र वैरामुळे एखाद्याचा नाश करण्याकरिता त्याचा पाठलाग करणे. ३. एखाद्याच्या खणपटीस बसणे, हात धुवून पाठीस लागणे. ४. मन लावून, एकचित्ताने अभ्यास करणे.

राशिकूट न. दोन माणसांच्या जन्मकाली उच्च असलेल्या दोन राशी किंवा लग्नाच्या वेळी घटित पाहताना दिसून येणारी वधूवरांच्या परस्पर राशींची अनुकूलता. [सं.]

राशि(श)घटित न. जन्मपत्रिकेवरून वधूवरांची मैत्री, विरोध याविषयीचे ज्ञान; वधूवरांचे घटित. [सं.]

राशिचक्र न. १. भचक्र; भमंडल, राशिमंडल. २. नक्षत्रांचा समूह.

राशिपातन न. १. ढिगारा करणे. २. चढाओढीमुळे भाव उतरवणे; देशांतर्गत भाव पडू नये म्हणून जास्त असलेला माल बाहेरच्या देशात स्वस्त किमतीने विकणे.

राशिभोग पु. राशीतून ग्रहाचे गमन. [सं.]

राशियत स्त्री. अमदानी; कारकीर्द; अंमल. पहा : **रियासत**

राशी वरप्रस्थान; वर आपल्या जानवश्याहून वधुगृही जाण्यास निघणे.

राशीवर क्रिवि. मळलेल्या धान्याच्या ढिगावर; खळ्यावर; मळणी झाल्याबरोबर.

राष्ट्र न. १. देश; राज्य; मंडल; प्रांत. २. धार्मिक, सामाजिक व राजकीय आपलेपणा असलेला लोकसमुदाय; एका विचाराची व एकाच मनोभावनेने प्रेरित झालेली देशातील जनता. ३. जमलेला समुदाय; पुष्कळ मंडळी; मेळा; वृंद. ४.प्रस्थ; कारभार; वैभव. (ना.) [सं.]

राष्ट्रगीत न. घटनामान्य, राष्ट्राच्या गौरवार्थ रचलेले आणि गायले जाणारे गीत.

राष्ट्रध्वज पु. सर्व राष्ट्रास आणि घटनेस मान्य असे वर्ण व चिन्हांकित निशाण, झेंडा.

राष्ट्रपती पु. संघराज्याचा संविधानात्मक प्रमुख.

राष्ट्रसभा, राष्ट्रीय सभा स्त्री. भारतातील सर्वांत मोठी, देशव्यापी राजकीय संघटना; काँग्रेस.

राष्ट्रसंघ पु. जगातील राष्ट्रांमध्ये समेटाचे कार्य करणारी संस्था. [सं.]

राष्ट्रा(ष्ट्र)ण न. १. झुंड; जमाव (दंग्यांतील); अस्ताव्यस्त मेळा. २. मोठा पसारा (अवाढव्य कामाचा, सामानाचा); मोठा राडा (जेवणावळीनंतर अन्नाचा); विखुरलेली अडगळ. [सं.राष्ट्र]

राष्ट्रीयत्व न. १. देशाचे नागरिकत्व. २. स्वदेश व पूर्वज यांच्याविषयी आदर, अभिमान. [सं.]

राष्ट्रीय शिक्षण ज्या शिक्षणाने राष्ट्राची इभ्रत व संपत्ती वाढून त्याची इतरांवर छाप बसेल असे राष्ट्र बनविण्यासारखे शिक्षण.

राष्ट्रीयीकरण न. खाजगी उद्योगधंदे, बँका इ. सरकारी मालकीचे करणे.

राष्ट्रोळी स्त्री. १. वड, पिंपळ वगैरे झाडावर असणाऱ्या देवादिकांप्रीत्यर्थ

दिवे लावणे. २. क्षुद्र देवता.

रास स्त्री. विष्ठा.

रास पु. अ. नग, संख्या दाखविणारा शब्द. रास हा घोड्यांची संख्या सांगण्याकरिता योजतात. [अर.रास = डोके]

रास स्त्री. (मिठागरी) वजनी एक हजार सहाशे मण मीठ.[सं.राशी]

रास क्रिवि. शिवण सरळ; तिरकस नव्हे असे (बेतलेला कपडा किंवा कपडा बेतणे).

वि. १. उभे (कापड). २.चिकणी (सुपारी). (व.) ३.अनुकूल; योग्य. (व.) [फा.रास्त]

रास स्त्री. पहा : **२. राशि–शी**

रास स्त्री. १. ढीग; राशी. पहा : **राशि.** २. सरसकट ढीग. ३.खळ्यांतील धान्याचा ढीग. (व.) ४. कणसे मळून वाळवून स्वच्छ केलेला धान्याचा ढीग. ५. (गणित) मुद्दल व व्याज मिळून झालेली रक्कम.[सं.राशि](वा.) **० भरणे** – खळ्यातील जमिनीवर धान्याची रास करणे. **० येणे** – वठणीवर येणे; मार्गावर येणे : 'गनिमास दबाऊन हालखुद राखावे. तेव्हा गनीम रास येतील.' – राज १, पृ. ५१.

रास, रासोत्सव पु. गवळ्यांचा गाण्याचा, नाचण्याचा, खेळण्याचा उत्सव; कृष्णाने गोपींबरोबर केलेली नृत्यक्रीडा.

रासकरदन, रासकर्दन न. एक जिन्नस मोडून दुसरा जिन्नस नवीन केला असता मोडले ते नावे व नावे केले ते जमेस लिहिण्याची जमाखर्ची पद्धत; दुबेरजी; एकत्र करणे; गोळाबेरीज करणे; जमेनावे करणे. [अर.रास (= डोके) + फा. करदन]

रासकूट, घटित, नाम पहा : **राशिकूट**

रासक्रीडा–लीला स्त्री. कृष्ण आणि गोपी यांनी केलेले मंडलाकार नृत्य.

रासचारी पु. रासप्रसंगाचे नाटक करून दाखविणारे लोक.

रासणी स्त्री. सांगडीचा किंवा जोताचा म्होरक्या बैल.

रासणे सक्रि. कापणे; मारणे :'पाताणे प्रभू जातीत देवक स्थापनेच्या वेळी पशूवधाऐवजी कोहळे कापतात. त्यास कोहळे रासणे म्हणतात.' ज्ञाको १०.२४८.

रासन न. लोढणे.

रासना स्त्री. एक औषधी वनस्पती. पहा : **रास्ना**

रासनाहणे–न्हाणे–न्हाण न. १. लग्नात वरपक्षीय स्त्रियांना वधूपक्षीय स्त्रियांकडून वाद्ये वाजवून न्हायला घालण्याचा समारंभ. २. (ल.) रमतगमत, खेळत, पुष्कळसे गरम पाणी घेऊन केलेले स्नान [सं. रास + स्नान; फा. रास (= डोके) + स्नान]

रासनी–णी स्त्री. बी पेरल्यावर ते झाकून टाकण्यासाठी शेतात फिरवावयाचा औत; रेकला; भुईमूग पेरल्यानंतर वरची माती साफ करण्याचे गुठे.(माण.)

रासन्या वि. रासनी हाकणारा.

रासपूजा स्त्री. मळलेल्या धान्याच्या राशीची पूजा.

रासबेरी स्त्री. न. १. एक झुडूप व त्याचे फळ. २. त्या फळांच्या रसाचे पेय. हे लालसर असते.

रासभ पु. गर्दभ; गाढव. [सं.]

रासमाथा पु. खळवट; शेतमाल तयार होऊन खळ्यात धान्याच्या राशी पडण्याचा हंगाम.

रासमाथा–माथ्यास क्रिवि. शेतातील धान्य काढून, मळून, त्याची रास केल्यानंतर (सावकार देणे, वाढणे, घेणे इ.).

रासवट वि. १. राशी; राशीचा; मधल्या पायरीचा, गुणाचा; मध्यम; सामान्य. २. हलक्या किंमतीचा, दणगट. ३. आडदांड. (व.)

रासवटा पु. पहा : **रासोटा**

रासवळ वि. १. सामायिक. २. साधारण प्रतीचा. (को.)

रासावे न. ऱ्हस्व.

रासिवा पु. राशी (रास).

रासी वि. १. मध्यम प्रतीचे. २. हलकी (माडी, दारू इ.). (को.); पहा : **राशी**

रासी वि. अनुकूल. (झाडी) [सं.राशि]

रासुं(झां)डा पु. धान्याची मळणी पूर्ण झाल्यानंतर खळ्यावर स्वयंपाक करून धान्याच्या राशीला नैवेद्य दाखवून जेवण्याचा समारंभ. पूर्वी क्वचित राशीला बकऱ्याचा बळी देण्याची चाल असे.

रासोटा पु. रास काढून नेल्यानंतर राहणारा खळ्यावरील धान्याचा अवशेष. ह्यावर महाराचा हक्क असतो.

रासौभा पु. सडा; वर्षाव. [सं. रासि; क. ओब्बु]

रास्त–स्ती वि. १. खरा; न्याय्य; योग्य नेकीचा; नीतीचा; सरळ (मनुष्य, भाषण, कृत्य, आचरण). २.खरे; प्रामाणिक; नक्की; पूर्ण मेजाचे (वजन, माप).

क्रिवि. खऱ्या रीतीने; न्यायाने; नेकीने; प्रामाणिकपणाने.[फा. रास्त]

रास्तकौली–गोई स्त्री. सत्यवक्तेपणा; खरेपणा; सत्य भाषण.[फा.]

रास्तगो वि. खरे बोलणारा; सत्यवादी. [फा.]

रास्ता पु. लुगड्याची एक जात, प्रकार; पांढऱ्या किंवा कोणत्याही रंगाच्या उभ्या काड्या असलेले लुगडे.

रास्तार न. पसारा. (व. घाटी); पहा : **राष्ट्रा(ष्ट्र)ण**

रास्ना पु. एक औषधी वनस्पती; कोलिंजन; मुंगुसवेल. सर्व प्रकारच्या वायूवर द्यावयाचा रास्नादी काढा प्रसिद्ध आहे. साप, विंचू यांच्या दंशावर ह्याचा कांदा ठेचून बांधतात. [सं.रास्ना; हिं. रासन]

राह, रहा स्त्री. १. मार्ग; रस्ता. २.वाट; अवधी; मार्गप्रतीक्षा. ३. सरळ मार्ग; योग्य वागणूक. [फा.राह]

राहकळ स्त्री. न. १. कावरेबावरे होऊन गरगरा फिरणे (भ्यालेल्या गुरांच्या कळपाने). २. निकराची झोंबाझोंबी व ओढाताण (जिवावर उदार होऊन झगडणाऱ्या माणसांची).

राहगुजरी स्त्री. एक प्रकारचा कर. [फा.]

राहट स्त्री. झाडी; अरण्य; जाळी. पहा : **रहाटी**

राहट स्त्री. राहटी.

राहटण–णे स्त्री. न. वर्तणूक; व्यापार.

राह(हा)टणे उक्रि. आचरणे; वर्तणे.

राहटवणी, राहट्या, राहसाळी पहा : **रहाटवणी, रहाट्या** इ.

राहटी स्त्री. १. वागणूक; पहा : **रहाटी.** २. क्रम; रीती. ३. व्यापार;

व्यवहार. ४. संसार. [फा.राह]

राह(हा)डी स्त्री. १. राड; चिखल. २. (विष्ठा इ. दुर्गंधीयुक्त पदार्थांनी भरलेली)खाच.

राहणी स्त्री. पेहराव; रीत; रिवाज; आचार-विचार; वागणूक; रूढी.

राहणीमान न. रीतिरिवाज, कपडे इ.वर एकूण खर्च करण्याचे प्रमाण.

राहणे अक्रि. १. नांदणे; वास करणे; असणे; मुक्काम करणे. २. एका स्थितीत टिकणे. ३. मावणे; समाविष्ट होणे (भांड्यात पदार्थ). ४. खळणे; थांबणे; बंद होणे; शेवट होणे. ५. मागे पडणे; तातपुरते बाजूला टाकले जाणे; न संपता पडून राहणे; तात्पुरते बंद पडणे (काम इ.). ६. उरणे; शिल्लक असणे; हातात, खिशात शिल्लक, बाकी म्हणून असणे. ७. मागे घेणे; थांबणे. ८. शिथिल होणे; असमर्थ होणे (अवयव, इंद्रिये); मोडावणे; खचणे (सामर्थ्य, दम). ९. ठेवला जाणे; पदरच्या माणसाप्रमाणे, चाकराप्रमाणे असणे; कामावर, दिमतीस असणे. १०.(आयाचा शेवटी असणाऱ्या धातुसाधितांबरोबर ह्या क्रियापदाचा प्रयोग असता) मागे फिरणे, थांबणे असा अर्थ होतो. उदा. मारले नाही मारायाचा राहिला. ११. (तिरस्कारार्थी) असू देणे; बाजूस सारणे; दुर्लक्ष करणे. [सं.रह= थांबणे]

राहतक न. १. राहतेपण. २. (ल.) राहण्याची क्रिया.

राहदार वि. १. मार्गदर्शक. २. नाकेवाला. [फा.]

राहवणे अक्रि. सहन होणे.

राह(हा-हि)वलेपण न. रंगेलपण.

राहा, राहाट, राहाटवणी, राहाड, राहण, राहाणे, राहादारी, राहासाळी पहा : **रहाट, राहट इ.**

राहा स्त्री. १. पद्धती; रीत; तऱ्हा; डाव. २. पट्ट्याची फेक; घाई किंवा हात; हूल, काट, वार, पलटी, वगैरे काही ठरावीक क्रिया मिळून राहा होतो. [अर.]

राहाटमाळ स्त्री. रहाटगाडगे.

राहाटी स्त्री. १. पहा : **रहाटी.** २. घडलेला प्रकार, प्रसंग.३. भांड्यांची उतरंड. ४. प्रवृत्ती; धाव. [सं.अर-घट्ट]

राहाड स्त्री. धगधगीत निखाऱ्यांची खाई.

वि. परिपक्व (दाणा). [सं.हरित]

राहाण-णे पहा : **रहाण**

राहाणे न. अंगात दैवत आणणे. पहा : **रहाण**

राहावा पु. राहणे; राबता; वहिवाट; रहिवास.

राहित्य न. रहितता; शून्यता; अभाव. [सं.रहित]

राहु-हू पु. १. ज्याचे शिर विष्णूने धडापासून वेगळे केले असा एक दैत्य. याचे डोके राहू ग्रह व धड केतू ग्रह झाला. यांच्यामुळे सूर्य-चंद्रास ग्रहणे लागतात. २. (ज्यो.) भूमिच्छाया; वरचा पातबिंदू. (वा.) **राहूकेतू मागे लागणे, राहू सारखा मागे लागणे, येणे, पाठ घेणे** – खनपटीस बसणे; एखाद्याच्या मागे लागून त्याला अतिशय सतावणे.

राहु(हो)टी स्त्री. लहान तंबू.

राहुसंपात पु. ज्याप्रमाणे भूमध्यवृत्त आणि क्रांतिवृत्त ही एकमेकांस २३।। अंशाचा कोन करून छेदितात, त्याप्रमाणे चंद्राची कक्षा व क्रांतिवृत्त ही एकमेकांस ५ अंशाचा कोन करून छेदितात. ती ज्या दोन बिंदूंतून छेदितात, त्यापैकी एकास राहुसंपात म्हणतात. -सृष्टी ११३. [सं.]

राहून राहून अ. पुन:पुन्हा; थांबून थांबून; अधूनमधून. [राहणे]

राळ स्त्री. आवड; आसक्ती. [का. राळा]

राळ स्त्री. १. एक ज्वालाग्राही डिंकासारखा पदार्थ. ज्यापासून हा डिंक निघतो, ती झाडे. ही झाडे बंगाल, अबूचा पहाड व उत्तर भारतात होतात. २. रातकिडा. हा उदी रंगाचा, सरलपक्ष कीटक बिळात राहतो. ३. (ल.) नासलेली, बिघडलेली, विचका झालेली, भंगलेली, फजिती झालेली, मोडलेली स्थिती. (क्रि.करणे, उडवणे.) ४. हुर्रेवडी; फटफजिती. ५. चांदीसोन्याची लगड, वीट. [सं.राल]

राळपाट पु. एखाद्या जिन्नसाला नक्षी काढताना तो जिन्नस चिकटून राहण्यासाठी राळ लावलेला चौकोनी, वाटोळा लाकडी तुकडा.

राळवण न. राळ्याची ताटे, पेंढा; कणसे तोडल्यानंतरचे ताट; राळे बडविल्यानंतर राहिलेले गवत.

न.स्त्री. (ल.) शिणलेली, पुष्कळ भ्रमलेली स्थिती.

राळसाळ स्त्री. केरकचरा; उरले सुरले अवशेष, वगळ.

वि. टाकाऊ, रद्द.

राळा पु. एक प्रकारचे हलके तृणधान्य. ह्याचा भात वगैरे करतात.

राक्षस पु. १. मानुष किंवा अमानुषरूप देवांचा शत्रू; कुबेराचा सेवक व त्याच्या निधींचा रक्षक; स्मशानात जाण्यायेण्याची सवय असणारा, मृत शरीरांना सजीव करणारा, उग्र पिशाच म्हणून निरनिराळ्या रीतींनी वर्णिलेला देव किंवा पिशाच; असुर; दानव; दैत्य. २. क्रूर, भयंकर, अकराळ-विकराळ, अधाशी, झोपाळू, तामसी मनुष्य. ३. साठ संवत्सरांतील एकोणपन्नासावे संवत्सर. [सं.]

राक्षसगण पु. (ज्यो.) जन्मकाळच्या नक्षत्रावरून केलेल्या देवगण, मनुष्यगण व राक्षसगण ह्या तीन वर्गातील शेवटचा वर्ग. [सं.]

राक्षसमुखी-मोहरा-मोरा-मोहरी क्रिवि. दक्षिणाभिमुख; दक्षिणेकडे. पहा : **गंगमोहरा** [सं.]

राक्षसविधी-विवाह पु. विवाहाच्या आठ प्रकारांपैकी एक प्रकार; बळजबरीने केलेला विवाह; पालकांच्या व कन्येच्या इच्छेविरुद्ध तिचे हरण करणे. [सं.]

राक्षस(सी)वेळ-वेळा स्त्री. सूर्यास्त व रात्र यांच्या मधील काळ; तिन्हीसांजा. [सं.राक्षस+वेला]

राक्षसान्न न. तामस अन्न (बाजरी, उडीद, मसूर, राळा, मिरची इ.).[सं.]

राक्षसी-शी स्त्री. १.राक्षसाची बायको; राक्षस स्त्री.२. दुष्ट स्त्री.

वि. १. राक्षसांच्या संबंधी; राक्षसास योग्य. २. प्रचंड; साहसी; मनस्वी (कृत्ये). ३. आसुरी; तामसी; अघोरी (उपाय). ४. कुत्सित; अयोग्य. ५. जबर (आहार, भूक). [सं.राक्षस]

राक्षसी भाषा संस्कृतच्या अपभ्रंशाने बनलेली व नाटकात राक्षसांच्या, पिशाचांच्या तोंडी घातलेली, हेंगाडी भाषा.

राक्षसी मुलूक-ख नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेश.

राक्षसी विद्या राक्षस आणि पिशाच यांना काबूत आणण्याची, त्यांना ताब्यात ठेवण्याची विद्या.

राज्ञी स्त्री. राणी; राजपत्नी. [सं.]

रांक स्त्री. दिमाख; अभिमान; मगरूरी. (तंजा.)

रांग स्त्री. १. ओळ; हार; आवली; पंक्ती; श्रेणी. २. बरोबरी; समान दर्जा. ३. गंजी; ढीग. – वशाप ८.५१.२४५. (व.) ४. दोन्ही बाजूंस असलेली उतरती कडा किंवा ओळ. उदा. दोन्ही बाजूंस उतार असून मध्ये उंचवटा असलेल्या बांधावरून जाणारा मार्ग; एका बाजूस डोंगर व दुसऱ्या बाजूस खोल कडा तुटलेला अशी डोंगरातील अरुंद वाट; धक्क्याच्या लांबीचा पृष्ठभाग. [सं.राजि]

रांगडा पु. गुजराथ व मेवाड यांमधील एका प्रदेशाचे नाव; तेथील व्यक्ती. वि. अडाणी; रीतभात ठाऊक नसलेला. [हिं. रान्गडा]

रांगण न. कुंभाराच्या भट्टीतील राख.

रांगणी स्त्री. मोठी, रुंद, रेखांकित व किंचित गोल अशी शिंप. हातावर गंधाचा लेप करून त्यावर रेषा उमटवण्याकरिता हिचा पुष्कळ उपयोग करतात. (को.)

रांगणे अक्रि. हात व गुडघे टेकून पुढे जाणे, सरपटणे. [सं.रिंगण]

रांगवळी स्त्री. रांगोळीवर किंवा धुळीत उमटलेला ठसा : 'हाडांची रांगवळी करावी.'–लीचउ ३७५. [सं. रंग–अवली]

रांगसारांगुस स्त्री. एखादे ठिकाण नाखुशीने सोडून जाताना त्या जागेभोवती रेंगाळणे, घोटाळणे. (राजा.)

रांगा पु. स्थिर किंवा शांत समुद्राची पट्टी.

रांगोळी, रांगवळी स्त्री. १. देवापुढे, मेजवानीत चित्रे, निरनिराळ्या आकृती काढण्याकरिता तयार केलेली शिरगोळ्याची, तांदळाची किंवा दुसऱ्या वस्तूची भुकटी; पूड. २. वरील भुकटीने काढलेली रेघ, आकृती, चित्र, वेल इ. [सं.रंज्=रंग देणे; रंगवल्ली; रंग+ओळ] (वा.) **०करणे–** (ल.) सत्यानाश, विध्वंस करणे; ठार मारणे.

रांगोळे, रांगोळणे न. बारीक भोके पाडलेली, तांबे इ. धातूची नळी. हीत रांगोळी भरून ही जमिनीवर ओढली असता चित्रविचित्र आकृती उमटतात.

रांघळणे सक्रि. फरपटत नेणे. पहा : **रंघळणे** १

रांज स्त्री. १. झऱ्यांनी बनलेला पाण्याचा डोह. (कु.) २. समुद्रास मिळणारा ओढ्याचा भाग. (कु.)

रांज(झ)ण पु. मातीचे किंवा धातूचे पाणी साठविण्याचे मोठे भांडे; डेरा. [दे.]

रांज(झ)णवा(व)डी स्त्री. डोळ्याच्या पापणीला होणारा फोड; अंजिणी; आंजरली.

रांज(झ)णी स्त्री. १. लहान रांजण. २. रोजच्या वापरासाठी वर काढलेले तांदूळ ठेवावयाचे भांडे. (को.)

रांजणी स्त्री. विहीर खोदल्यावर ज्या जागेपासून, ती वर बांधत आणतात तो भाग; विहिरीचा बांधकामाचा तळ, पाया.

रांजनवडि–डी स्त्री. पाण्याचे रांजण ठेवण्याची जागा. [देशी.रांजण]

रांड स्त्री. १. (निंदार्थी) विधवा. २. दासी; गणिका; कलावंतीण; वेश्या. ३. (तिरस्कार, राग किंवा अनाथ स्थिती दाखवावयाची असता) स्त्रीजात; बायको : 'तुझी रांड रंडकी झाली.'– नामना ९२. ४. (निरुद्योगीपणामुळे, नवरा मेलेल्या स्त्रीच्या स्थितीप्रमाणे) बिघडलेली, अतिशय खालावलेली स्थिती; दुर्दशा. ५. (निंदेने) भित्रा, नीच, नामर्द मनुष्य; युद्धातून पळून जाणारा सैनिक. ६. पत्त्यातील राणी.

रांडअंमल, रांडकारभार पु. १. स्त्रीराज्य. २. नेभळा, अयशस्वी कारभार.

रांडका पु. विधुर; ज्याची बायको मेली आहे असा पुरुष.

रांडकाम न. १. बायकांनी करायचे काम. २. विधवेचे काम; बाहेरील आडकाम किंवा रानातील गवत कापणे इ. काम.

रांडखळी वि. विधवा झालेली. (गो.)

रांडखांड–भांड–सांड स्त्री. स्त्रियांना लावावयाचा रांड, बाजारबसवी, बटीक इ. अर्थाचा अभद्र शब्द, शिवी. [रांड द्वि.]

रांडगळा पु. १. टिपेचा सूर. २. बायकी आवाज.

रांडगा वि. रंडीबाज. (राजा., तंजा.)

पु. वेश्येचा मुलगा; विधवेला अनीतीच्या मार्गाने झालेला मुलगा.

पु. महार जातीचा बलुतेदार. याला वतन इनाम जमीन असते. याचा हक्क कर्नाटकातील लक्ष्मीच्या जत्रेत रेडा मारण्याचा असतो. (बे.)

रांडगाठ स्त्री. विशिष्ट आकाराची गाठ, ढिली गाठ. पहा : **बाईलगाठ**

रांडगाणे–गाऱ्हाणे न. पिरपिर; बायकी कुरकुर; रडगाणे.

रांडचाल स्त्री. भित्रेपणा; नामर्दपणा; बायकीपणा.

रांडछंद–पिसे–बाजी पु. न. स्त्री. रंडीबाजीचा नाद; रांडेचे व्यसन.

रांडतगादा पु. (साऱ्याच्या किंवा कर्जाच्या) पैशाची (पिठ्या, शिपायाने नव्हे) कुळाकडे सौम्य रीतीने केलेली मागणी. (कुण.) ह्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यास आपणास मुखत्यारी आहे असे कुणबी मानतो. पहा : **कुणबी**

रांडपण, रांडपाटा न.पु. १. वैधव्य. (को.) २. नाश; नादानपणा.

रांडपोर न. १. बायकामुलांसह एखाद्या ठिकाणचे सर्व रहिवासी लोक. २. एखाद्याच्या पदरी असलेले बायको, मुले इ. कुटुंब, खाटले. ३. रंडकीचे मूल. ४. दासीपुत्र; वेश्येचे मूल. (वा.) **रांडपोर की राजपोर** – रंडकीचा मुलगा किंवा राजाचा मुलगा हे दोघेही अनियंत्रित व अशिक्षित असतात. यावरून बेबंद व निर्धास्त माणूस.

रांड(डा)पोरे न. अव. १. घर, गाव, देश यांतील मुख्य कर्त्या पुरुषाहून इतर बायका, मुले इ. सर्व माणसे. २.समाजातील हलक्या दर्जाचे लोक.

रांडमस्ती–मांस स्त्री. न. १. पतिमरणानंतर विधवेस येणारा लठ्ठपणा व जोम. २. (ल.) नियंता नाहीसा झाल्याबरोबर एखाद्या माणसास येणारी टवटवी; चपळाई; धिटाई.

रांडमाणूस न. १. (दुर्बलत्व दाखवावयाचे असता) स्त्री; स्त्री जाती; स्त्रीमात्र. २. (तिरस्कारार्थी) बुळा, निर्जीव, बायक्या, भित्रा मनुष्य.

रांडमुंड स्त्री. १. केशवपन केलेली, अनाथ व अनुकंप्य अशी विधवा. २. (शिवी) रांड; बोडकी; अकेशा थेरडी; विधवा.

रांडरळी स्त्री. विधवा.

रांडरांगोळी स्त्री. (व्यापक) रंडीबाज व बदफैली. [रांड द्वि.]

रांडरांडोळी स्त्री. १. पहा : **रांडरळी.** २. शिंदळकी. ३. रंडीबाजी.

रांड(रू)रूं न. (तिरस्काराने) विधवा स्त्री.

रांडरोट–टा–टी पु. स्त्री १. आपल्या मरणानंतर बायको विधवा होईल यासाठी लग्नाच्या वेळी नवऱ्याने तिच्या तरतुदीकरिता दिलेले वेतन; बाइलवाटा. रांडरोटाची चाल मुख्यत्वे गुजरातमध्ये आहे. २. लढाईत मेलेल्या माणसाच्या बायकोला निर्वाहाकरता दिलेली जमीन इ. [हिं.]

रांड(डा)रोटा पु. स्त्रीने मजुरी करून मिळवलेला पैसा.

रांड(डा)व वि. १. रंडकी झालेली; विधवा (स्त्री). २.पहा : **रांडका**

रांडवडा–ळा पु. १. सर्व बायकामाणसे; घरात सत्ताधारी पुरुष नसल्यामुळे होणारे स्त्रियांचे प्राधान्य. २. स्त्रियांच्या कडाक्याच्या भांडणातील शिवी; रंडकी, रांड, बटकी, बाजारबसवी इ. शिव्यांची मालिका. (क्रि. गाणे, वाजवणे.)

रांडवडा पु. तोडातोडी.

रांड(डा)वा स्त्री. १. विधवा स्त्री. २. बालविधवा, बालरांड. (माण.)

रांडवाटा पु. वैधव्य.

रांडसांध स्त्री. विधवेचा कोपरा. (वा.) **रांडसांधीस बसणे** – घरात उदास होऊन बसणे.

रांडा(ड)वणे अक्रि. १. विधवापणाच्या केविलवाण्या स्थितीस प्राप्त होणे. २. (ल.) फिसकटणे; मोडावणे; नासणे; बिघडणे; भंग पावणे (व्यापार, मसलत, काम).

रांडु(डू)ल स्त्री. १. (अनीतीच्या मार्गाने) विधवेस झालेली मुलगी. २.(उपहासाने) विधवा स्त्री. (को.)

रांडेचा वि. १. अनैतिक संबंधापासून झालेला. २. पादपूरणार्थक किंवा उद्‌गारवाचक शब्द. (ग्राम्य) ३. एक ग्राम्य शिवी.

रांडेचा, रांडेचा मारलेला वि. स्त्रीवश; स्त्रीलंपट.

रांडेचा आजार पु. गर्मी(रोग).

रांडेच्या उद्‌गा. (प्रेमळ) एक शिवी.

रांडे(डि)च्यानो उद्‌गा. (बायकी) रखेलीपासून झालेल्या मुलांना उद्देशून बोललेल्या शब्दावरून पुष्कळदा आश्चर्य व्यक्त करण्याकरिता, पण क्वचित निरर्थकपणे निघणारा उद्‌गार.

रांडोळी स्त्री. १. (करुणेने, तिरस्काराने) विधवा स्त्री. २. विधवेप्रमाणे वागणूक. ३. विटंबना. ४. कुचाळी, थट्टा : 'करिता गोपिकांसी रांडोळी।'– एभा ६.३६५. ५. मारामारी; कत्तल : 'निकरा जाईल रांडोळी।'– एरुस्व ६.९. ६. क्रीडा. ७. नाश : 'कीं भीष्मदेवें चरणातळीं। केली कामाची रांडोळी।'– जै २४.७. [राड]

रांड्या, रांड्या राऊ(व)जी, रांड्या राघोजी वि. १. रंडीबाज; रांडछंदी; रांडव्यसनी. २. बायक्या; बाइल्या; नामर्द. ३. बाईलवेडा. ४. बायकांत बसून किंवा त्यांच्या बरोबर फिरून गप्पा मारण्यात आनंद मानणारा (मनुष्य); गप्पीदास.

रांदायणी, रांधवणी स्त्री. स्वयंपाकीणबाई. [सं.रंधन]

रांधचे कुड, रांधणी, रांते, रांधते घर स्त्री. स्वयंपाकघर. (कु.)

रांधण–न न. मातीचा तवा; पदार्थ भाजण्याचे खापर. [सं.रध्]

रांधण–न न. १. शिजविणे; रांधणे; उकडणे; पाकक्रिया. २. रांधण्याचे भांडे, मडके. ३. स्वयंपाक. ४. चूल. (गो.) [सं.रध्–रंधन]

रांधणा, रांधवणा पु. स्वयंपाकी. [सं.रंधा]

रांधणीपल्ल न. चूलखंड. (गो.)

रांध(दा)प न. १. शिजविणे; उकडणे. २. रांधलेले पदार्थ; स्वयंपाक.

रांधपखण न. स्वयंपाकघर. (हेट.)

रांधपी पु. १. स्वयंपाकी; आचारी. २. (नाविक) जहाजावर जेवण तयार करणारा इसम. (हेट.)

रांधय न. एक प्रकारची आमटी.

रांधवणी न. स्वयंपाकाची खरकटी भांडी व हात धुतलेले पाणी.

रांधा पु. १. रसायन; शिजवून केलेले मिश्रण; पाक; काला : 'शरीर अवगुणांचा रांधा।'– तुगा ७३९. २. रसायन तयार करण्याची क्रिया, कृती. ३. शिजविणे. ४. शिजलेले अन्न.

रांबा(ब)ड–डा वि. भटकणारा; स्वैर वागणारा; उनाड. (राजा.)

रांबा(ब)डकी स्त्री. स्वच्छंदी वर्तन; उनाडकी. (राजा.)

रांबी स्त्री. एक खेळ. एका खांबाभोवती नारळाच्या चोडांची रास करतात व त्या राशीतून चोडे पळविण्याचे काम एक पक्ष व राखण्याचे काम हार असलेला पक्ष करतो.– मसाप ७.२५४.

रिक(की)ब–बी स्त्री. घोड्यावर बसण्यासाठी व नंतर पाय ठेवण्यासाठी दोन बाजूंना सोडलेल्या दोन कड्यांपैकी प्रत्येक. [अर.रकाबे]

रिकवि(वी)णे सक्रि. १. रिचविणे; रिकामे करणे. २. बारदानात (पदार्थ) कोंबून–कोंबून भरणे. [सं.–रिक्त; प्रा.रित्त, रिक्क]

रिकाब दाल रिकबीची वादी; रिकबीचा चामड्याचा पट्टा.

वि. रिकबीच्या जागी भोवरा असणारा (घोडा). हा अशुभसूचक मानतात; रिकाब भोवरी. [अर.]

रिकामका–चा वि. १. रिकामा; निरुद्योगी; कामधंदा नसलेला. २. बिनफायद्याचा; निरर्थक.

रिकामचावडी–टेकडी स्त्री. १. निरुद्योगी लोकांची चकाट्या पिटीत बसण्याची जागा, अड्डा. २. निरुपयोगी लोकांचा समूह, टोळी, कंपू.

रिकामचेष्टा स्त्री. अव. निरूपयोगी माणसाचे चाळे, उपद्‌व्याप; रिकामपणाच्या खोड्या.

रिकामचोट–टवळा–टेकडा–डेंग वि. निरुद्योगी; आळशी (मनुष्य); उपयोग न येता पडून राहिलेली (वस्तू).

रिकामटी, रिकामणूक, रिकामीक स्त्री. सवड; फुरसत; रिकामा वेळ.

रिकामपण–णा न. पु. फुरसत; सवड; कामात न गुंतल्यामुळे मिळणारी सावकाशी; सुट्टी; रजा; विश्रांती; फुरसतीची वेळ.

रिकामा वि. १. ज्यात काही नाही असा; पोकळ. २. (ल.) निराधार; तथ्यांश नसलेला; कोरडा; पुराव्याने, प्रमाणाने, उदाहरणाने ज्याची सत्यता, यथार्थता सिद्ध करता येत नाही असा (वाद, विधान, हकिकत). उदा. रिकामा डौल, रिकामी स्तुती. ३. ज्या जागेवरील अधिकारी किंवा काम करणारा मनुष्य अद्यापि नेमण्यात आलेला नाही किंवा रजेवर गेलेला आहे अशी (जागा). ४. निरर्थक; व्यर्थ; निष्फळ; खोटा (दगदग, पायपिटी, चौकशी, बोलणे). ५. जरूर ती

सामग्री, हत्यारे इ. साधन ज्याचे जवळ नाही असा. ६. ज्याला नोकरी, उद्योगधंदा नाही असा; बेकार; निरुद्योगी. ७. उपयोगात नसलेली, कामात न गुंतविलेली (वस्तू, गाडी इ.). ८. एकाकी; उद्दिष्ट न साधलेला; प्रयोजनशून्य; फलशून्य. ९. ज्यास कोणी मालक नाही असा (देश, मुलूख इ.). [प्रा.रिक्क + कम्म] (वा.)**रिकामी तपसील (करवं)** – कारण नसता तोंड खुपसणे, हस्तक्षेप करणे. (अहि.)

रिकाम्या रानी क्रिवि. विनाकारण; फळाची आशा किंवा संभव नसता; व्यर्थ; निरर्थक.

रिकांडी स्त्री. (विणकाम) कापडामध्ये आडवे सूत भरण्याकरिता सूत गुंडाळलेली कांडी.

रिकेटी वि. मुडदूस; लहान मुलांना होणारा एक रोग.

रिक्त वि. १. रिकामा; रिता; पोकळ; मोकळा; कोरडा. २. (ल.) विहीन; (जवळ काही) नसलेला. [सं.रिच्=रिकामे होणे]

रिक्तिका स्त्री. खिंडार; भगदाड.

रिक्थ न. वडिलोपार्जित संपत्ती. पारिभाषिक पदावली तयार करताना हा शब्द वापरला जातो. [सं. रिक्थं]

रिखाटा पु. सोट; बिनफांदीचे झाड.
वि. एकलकोंडा; एकटा; सडा. [सं.रेषा, रेखा]

रिग पु. अवकाश; सवड; इच्छा.[सं.रिंग] (वा.)**रिगरिग जाणे, करणे** हळूहळू जाणे; अति सावकाश चालणे. (कु.)

रि(रिं)गणे अक्रि. १. पहा: **रिघणे** १. २. उद्युक्त, तयार होणे. [सं.रिंग्=जाणे, हालणे; दे. रिग्ग]

रिग(घ)निग, रिगिनिगी, रिघीनिघी स्त्री. ये-जा; येणे-जाणे.

रिग(घ)भ-मु, रिगु-गू, रीग पु. रिघाव; प्रवेश; अवकाश; शिरकाव.

रिग(घ)वणी, रिगवणे, रिघणी स्त्री. न. १. प्रवेश. २. आरंभ.

रि(री)गा(घा)वा पु. पहा : **रिग(घ)वणी**

रिगिनिगि-गी स्त्री. श्वासोच्छ्वास.

रिघ, रीघ पु. १. रिघाव; प्रवेश. २. समज; ज्ञान.

रिघणे अक्रि. १. दाटीमध्ये किंवा अडचणीच्या जागेमध्ये बळाने प्रवेश करणे; शिरणे; घुसणे. २. जाणे; निघणे; आत जाणे. ३. तोंड लावणे. ४. सुरण, रताळे इ. कंद जमिनीत मोठे वाढणे, पोसणे, धरणे. ५. घडणे; घडून येणे.

रिचवणी स्त्री. रिकामे, रिते करणे.

रिच(चा)वणे अक्रि. १. ढासळून पडणे; कोसळणे; तुकडे-तुकडे होऊन पडणे (रास, ढीग, भिंत, विहीर इ.). २. जोराने किंवा वेगाने (पाऊस, झाडाची पाने किंवा फळे, पोत्यातील धान्य, जखमेतून रक्त इ.) गळणे; बाहेर पडणे; वाहणे; उसळणे. ३. न पचलेले अन्न जोराने बाहेर येणे (ओकारीच्या रूपाने किंवा मळाच्या रूपाने); जोराचा रेच किंवा वांती होणे. ४. (विनोदाने) घोड्यावरून पडणे.
सक्रि. १. (एखाद्या बारदानातील जिन्नस ओतून ते) रिकामे करणे; ओतणे; खाली करणे; बाहेर काढून टाकणे. २. आदळणे; रागाने फेकणे; आपटणे; बाजूस फेकणे; कोसळणे; वरून पडणे; नजरेआड करणे. ३. साठविणे; ढीग करणे; भरणे; धान्य पोत्यात भरणे, साठविणे. ४. गिळंकृत करणे; दाबणे; उपटणे. [सं.रिच्=रिकामे करणे]

रिज स्त्री. रीझ; कृपा; मेहेरनजर. [दे.]

रिझ(ज)णे अक्रि. संतोष पावणे; आनंदित होणे; संतुष्ट होणे; रंजन होणे; समाधान पावणे. [सं.ऋध; प्रा.रिज्झ; हिं.रीझना]

रिझाऊ वि. मोहक; पसंत पडण्यासारखे; आनंददायक; चित्तरंजक; रम्य.

रिझा(झ)क वि. प्रिय, प्रियकर; आवडता; रिझविणारा. लावणीत व पोवाड्यांत या शब्दांचा उपयोग केला जातो.

रिट पु. एखाद्या व्यक्तीला विशिष्ट गोष्ट करणे अथवा न करणे याविषयी न्यायालयाने दिलेला लेखी आदेश. [इं.]

रिटी वि. ओसाड. (झाडी) [सं.रिक्त]

रिठा-ठे पु. रिंगे; कपडे धुण्यासाठी साबणाऐवजी वापरले जाणारे फळ. याच्या गराचा साबणासारखा फेस होतो. याचे पाणी विषनाशक आहे. [सं.अरिष्ट; रिष्ट; प्रा.रिट्ठ]

रिठी स्त्री. रिठ्याचे झाड.

रिठेमाळ स्त्री. दृष्टमण्यांची माळ. रिठ्याच्या फळात जी काळी व कठीण बी असते, तिचे बजरबट्टू अथवा दृष्टमणी करतात.

रिठो(टो)ळ पु. बेकार; टोळ भैरव; उनाड किंवा उच्छृंखल मनुष्य.

रि(री)ण न. देणे; कर्ज; ऋण. [सं.ऋण; प्रा.रिण]

रिणकर-री वि. १. धनको; सावकार. २. कर्जदार; रिणको; कर्ज घेणारा.

रिता वि. १. पोकळ; मोकळा. २. रिकामा; निष्कांचन. ३. वाचून; विरहित; गरज, कमतरता किंवा अभाव असलेला. ४. उपाशी. ५. अकारण. ६. पोचट.

रिताड स्त्री. १. माल टाकून रित्या झालेल्या गाड्या, बैल, तट्टे इ. २. रिकामे असण्याची स्थिती.
न. रहाटगाड्यावरील रिकाम्या लोट्यांची माळेची बाजू.

रिताभरला वि. होय नाही; केले किंवा न केले; असा तसा; बरा वाईट; बरोबर किंवा चूक.

रिती-ति वि. रिकामी; मोकळी; व्यर्थ; कमी. पहा : **रिकामा**

रिते वि. सहज. (गो.)

रितेपण न. अज्ञान.

रिते सोप वि. निरर्थक.

रिद्धि-द्धी स्त्री. १. संपत्ती; समृद्धी; ऐश्वर्य. २. स्वाभाविक सिद्धी; पूर्व जन्मीच्या तपाने मिळालेली सिद्धी. [सं.ऋद्धि]

रिद्धिसिद्धी-द्धी स्त्री. संपत्ती व परिपूर्णता यांच्या दर्शक रिद्धी आणि सिद्धी नावाच्या गणपतीच्या दोन दासी. (वा.) **(एखाद्याच्या घरी) ०पाणी भरणे** – एखाद्याकडे संपत्ती आणि यश भरपूर असणे.

रिद्धी स्त्री. वृद्धी; सोयर; जननाशौच. (व.) [सं.वृद्धि]

रिपट-टे न. थालिपीठ; लहान पानगा. (व.)

रिपरिप स्त्री. १. पिरपिर; कटकट; एकसारखे मागत राहणे; दुखणाइताची कुरकुर; निकडीची भुणभुण. २. सारखे दोष देत राहणे; धमकीवजा बडबड; टकळी. ३. सतत पडणारा कंटाळवाणा पाऊस. [ध्व.]
क्रिवि. पिरपिरत; किरकिरत; झुमझुमत; गुरगुरत.

रिपाड-र पु. न. छपराचे ओंबण; कारवी; भिंतीचे कूड.
रिपु-पू पु. शत्रू; वैरी; दुष्मन. [सं.]
रिबटी स्त्री. रेंदा; चिखल; राडा.
रिबडी स्त्री. दाट आमटी; चिखलासारखा दाट पदार्थ. (नगरी)
रिब(बि)न स्त्री. रेशमी किंवा कृत्रिम धाग्याची फीत. [इं.]
रिबाड न. चिखल. (राजा., कुण.)
रिबिट न. दोन्ही बाजूंनी ठोकून सपाट करून मारावयाचा खिळा. [इं.]
रिमीरिमी मृदंगाचा आवाज. [ध्व.]
रियास(ष)त स्त्री. १. राजवट; राज्य; सत्ता. २. राज्यविस्तार. [फा.रियासत्]
रिवरिवणे, रिवरिव पहा : **रवरव**
रिवाज पु. रूढी; चाल; शिरस्ता; वहिवाट; रीत; पद्धत. [अर.रिवाज्]
रिवायत स्त्री. कथा; कीर्तन; प्रवचन. [अर.]
रिश्टर न. भूकंपाची तीव्रता मोजण्याचे एकक. [इं.]
रिश्ते(स्ते)दार पु. नातेवाईक; आप्त; संबंधी. [हिं.]
रिश्वत स्त्री. लाच. [अर.; हिं]
रिष्क पु. जाच; जुलूम. [अर.]
रिस स्त्री. राग; क्रोध; चीड; त्रास. [हिं.;सं.रोष]
रिसाड वि. १. घाणेरडा; ओंगळ. २. आळशी.
रिसाल पु. कर्तव्य; काम; पत्र धाडणे; पुस्तक; प्रबंध; लहान टापू.[अर.]
रिसाल(ले)दार पु. रिसाल्याचा मुख्य अंमलदार. [अर.]
रिसाला पु. १. घोडदळ; घोडेस्वारांची पलटण; स्वारांचे पथक (साधारण १०० जणांचे). २. सरंजाम; सामग्री. [अर.रिसाल]
रिसीक पु. छलक. (कु.)
रिसीव्ह वि. श्रेष्ठ.- मनको.
रिसीव्हर पु. १. घेणारा; वादातील मिळकत किंवा दिवाळे काढलेल्या मनुष्याची मालमत्ता आपल्या ताब्यात घेऊन तिची व्यवस्था लावण्याकरिता कोर्टाने नेमलेला मनुष्य. २. दूरध्वनी, दूरदर्शक किंवा रेडिओमधील एक उपकरण. [इं.]
रिस्त स्त्री. पहा : **रसद**
रिष्टे न. खड्ग; तलवारीचा एक प्रकार.- प्रश १५. [सं.]
रिक्षा स्त्री. कमी अंतरासाठी प्रवास करण्याचे तीन चाकी वाहन. [जपानी किशा= आगगाडी]
रिंग स्त्री. १. अंगठी. २. वळे, कडी, कडे, वसवी, मुदन इ. कोणतीही वर्तुळाकार वस्तू. [इं.]
रिंग प्रवेश.
रिंगण न. वर्तुळाकार जागा; सर्कशीतील खेळ करण्याचे वर्तुळाकार स्थान; रंगण.
रिंगण न. मुलांचे रांगणे; सरपटणे; घसरणे; सरकणे. [सं.रिंग्=जाणे, हालणे]
रिंगणखेच स्त्री. मुलांचा एक खेळ.
रिंगण चेंडू पाच किंवा त्याहून जास्त गड्यांनी गोलाकार रिंगणात चेंडूने खेळण्याचा एक खेळ.
रिंगणा पु. शाळू.
रिंगणा पु. (इमारतकाम) घराच्या तातऱ्याच्या खालची व खांबांच्या आधारावर असलेली खांबणी, लहान तुळई, कडी.
रिंगणी स्त्री. एक काटेरी औषधी रोपटे. ही पित्तकारक, अग्निदीपक, मलभेदक व वातनाशक आहे. [दे. गु. प्रा. रिंगणी; हिं. रेंगनी]
रिंगणी, रिंगी स्त्री. पहा : **रिठा-ठे**
रिंगणे न. लहान मुलांची तोंडात घालून चोखण्याची वस्तू; चोखणी.
रिंगण्या पु. १. ज्याने बैल लंगडू लागतो असा एक वातविकार. २. हा विकार झालेला बैल.
रिंगनं न. खेळाचा प्रकार (व.) [सं.रिंग]
रिंगरिंग स्त्री. लहान मुलांची पिरपिर.
रिंगळू न. वांगे. [गु.]
रिंगा पु. घोकणी; कुरकुर.
रिंगी स्त्री. दोन बैलांची लहान गाडी; शर्यतीमध्ये वापरली जाणारी विशिष्ट प्रकारची, लहान आकाराची बैलगाडी; रेकला. [सं.अणुरंगा=गाडी]
रिंगोळी स्त्री. रिंग ठोकण्याचे हत्यार.
रिंच्छोली स्त्री. पंक्ती; ओळ. -मसाप २.६८.
रिंदिसा वि. रंजिस; दु:खी; काळजीने व्यथित.
री स्त्री. १. गायनातील स्वरसप्तकांपैकी दुसरा स्वर. २. मुख्य गायकाचे गायन चालले असता त्याचा साथीदार त्याच्या मागोमाग म्हणत जातो ते त्याचेच सूर.[ध्व.] (वा.) **०ओढणे** – १. दुसऱ्याच्या सुरांत सूर मिळविणे. २. दुसऱ्याच्या म्हणण्यासारखेच म्हणणे; पुनरुच्चार करणे.
रीग-घ स्त्री. रिगवणी; रीघावा; रिंगणे.
रीगावी स्त्री. प्रवेशद्वार.
रीघ स्त्री. एकामागून एक येणे, रांग. (क्रि. लागणे)
रीचविणे क्रि. परतवून लावणे.
रीझ-ज स्त्री.१. करमणूक; आनंद; रंजन. २. आवड; पसंती; प्रीती; कृपा; खुशी; अगत्य. [सं.रंजन; हिं.रीझ]
रीझबूज स्त्री. सुखसमाधान.
रीट पु. भूखंड; घराची जागा.(झाडी) [सं.रिक्त]
रीठ न. बखळ; पडक्या घराची जागा; ओसाड पडलेली जागा; ओसाड व मोडकळीस आलेले घर. (वा.) **रीठावर दिवा न लागणे**– नि:संतान होऊन घर पडणे, ज्याचे रीठ होते तेथे कोणीही घर न बांधणे. **रीठा येणे** – जीवावर येणे. (व.)
रीढकास्थि-स्थी स्त्री. पाठीच्या कण्याची हाडे; मणके.
रीत, रीतभात स्त्री. रीती; प्रघात; मार्ग, पद्धत, चाल; वहिवाट.[सं.रीति]
रीतरवेस पु. चाल; रीत; पद्धत; वागणूक. [सं.रीति+फा. रवेश]
रीतसर वि. रीतीला अनुसरून; वहिवाटी-रूढीप्रमाणे; सशास्त्र.
रीति-ती स्त्री. १. पद्धत; तऱ्हा; वहिवाट; प्रचार. २. सवय; चाल; सराव. ३. रिवाज; शिरस्ता; रूढी; एखाद्या ठिकाणची वहिवाट. ४. (साहित्य.) लेखनप्रकार. [सं.रीति]
रीतिभूत पु. भूतकाळाचा एक प्रकार. क्रिया सतत चालली होती, असे हा काळ दाखवितो.

रीप स्त्री. ओंबण करण्याकरिता केलेल्या लाकडाच्या पट्ट्यांपैकी प्रत्येक; तक्ते उभे चिरून चार-चार बोटे रुंदीच्या (वाशांवर मारून ओंबण करण्याकरिता) केलेल्या पट्ट्या; ओंबण; पांजरण.

रीफ पु. कठडा.

रीम न. कागदाचे वीस दस्ते (चोवीस कागदांचा एक दस्ता याप्रमाणे); ४८० कागद. [पोर्तु.रेमा; इं.]

री री करणे रेंगाळणे; सावकाश, मंदगतीने चालणे.

रील-ळ न. पु. सूत गुंडाळण्याचे चक्र; (इं.) बॉबीन. [इं. रील]

री(रीं)स पु.न. १. अस्वल. २. (ल.) आळशी; घाणेरडा मनुष्य; ओंगळ, मूर्ख माणूस. [सं.ऋष]

रीस स्त्री.१. अपराध; गुन्हा; चूक. २. असंतोष; गैरमर्जी; राग. ३. त्रास; कंटाळा; तिटकारा. ४. किळस; वीट; शिसारी. (व.) ५. भय; भीती.६. राग; चीड; घुस्सा. [सं.रोष]

रीस स्त्री. विराणी; आगीचा प्रसार होऊ नये म्हणून भोवतालची जाळलेली जागा; ईर.-बदलापूर २८५. [सं.वीर्य]

रीसी स्त्री. मूळव्याध.-वैद्यकबाड ४६. [सं.अर्श]

'रु'पासून सुरू होणारे शब्द इथे न आढळल्यास 'ऋ' मध्ये पहावेत.

रुइ पु. रोही; नीलगाय.
[सं.रोहित्(मृगविशेष)-रोहिअ-रोही-रूई. भाअ १८३३]

रुई-य-वी, रुइटी स्त्री. १. कापसाचे झाड. २. निवडून, सरकी काढून स्वच्छ केलेला कापूस; पिंजलेला कापूस. [हिं.रू]

रुइटीफूल, रुईफुली न. १. रुईचे फूल. २. रुईच्या फुलासारखे वस्त्रावर अगर दागिन्यावर काढलेले फुलाचे चित्र, आकृती.

रुई, रुईमांदार स्त्री. मंदार वृक्ष; एक पांढऱ्या फुलांचे झाड.

रुईमंडळ-मांजऱ्या न. पु. रुईच्या झाडाशी केलेला विवाह; अर्कविवाह.

रुईरयात, रूरयात पु. भीड-मुरवत.

रुईरुई क्रिवि. कसाबसा; कष्टाने; सायासाने.

रुकनं क्रि. थांबणे; थबकणे; काम बंद होणे. (अहि.)

रुकशांग स्त्री. बांडगूळ; आंब्यावर वाढणारी वनस्पती. [सं.वृक्षांग]

रुकसत, रुक्सत स्त्री. रजा; रवानगी. [अर.रूख्सत्]

रुका, रूक्का पु. १. पै; आण्याचा बारावा भाग. २. जमीन मोजण्याचे एक परिमाण. ३. पत्र; रोखा; पत्ता; कोष्टक; यादी. ४. सोने; द्रव्य; धन. ५. अर्धा आणा.- इमं ४५.[अर.रूक्आ; तुल.सं.रुक्म=सोने]

रुका अडका-विस्वा पु. पैसा अडका; संपत्ती.

रुकार पु. १. संमती; अनुमती; परवानगी; होकार. (क्रि.देणे) २. संमतीलेखाची नक्कल केल्यावर रुजवात घेतल्याबद्दल रु अक्षर लिहून केलेले चिन्ह (रूजवात घेणे यातील पहिल्या अक्षरावरून).

रुकारणे अक्रि. संमती देणे; दाखविणे; पसंती दर्शविणे.
सक्रि. हो म्हणणे; अनुमती देणे.

रुकावट स्त्री. प्रतिरोध; अडथळा; विरोध; प्रतिबंध; अडवणूक. [हिं.]

रुक्न पु. स्त्री. १. खांब; आधार; मदत. २. उमराव; राज्याचा आधारस्तंभ; एक पदवी, हुद्दा. उदा. रुक्नुद्दौला. ३. कवितेचा चरण. [फा.]

रुख पु. १. तोंड; चेहरा. २.बाजू; दिशा; बिंदू. [हिं.] (वा.) **० घेणे** - तोंड देणे. (ना.)

रुख पु. बुद्धिबळातील हत्ती. [फा.]

रुख स्त्री. इच्छा; रोख. [हिं.]

रुख, रूंख, रुखा पु. १. झाड; वृक्ष. २. खोड, फांद्या तोडलेले झाड; बोडके झाड; खोडाचा खालचा भाग. ३. रहाटगाड्याच्या कनेकडांची टोके टेकवलेले आडवे लाकूड; त्यापैकी प्रत्येक.[सं.वृक्ष; फ्रें.जि.रूक]

रुखट वि. रुक्ष; कोरडा.

रुखणे अक्रि. रागे भरणे; रागावणे. [सं.रूष्]

रुखय स्त्री. एका जातीचा साप. हा बहुधा झाडावर आढळतो.[सं.वृक्ष]

रुखरुख स्त्री. चिंता; टोचणी; (एखादी वस्तू हरवली असता किंवा दुष्कृत्याची अगर मूर्खपणाच्या कृत्याची आठवण झाली असता होणारा) पश्चात्ताप; चुटपुट; चटका; हुरहुर; खेद. [ध्व.]

रुखरुखित वि. ओसाड; रखरखीत.

रुखवत न. १. लग्नात नवरा मुलगा वधूच्या घराकडे लग्नासाठी जाण्यापूर्वी वधूपक्षाकडून वराच्या घरी त्याला व त्याच्या स्नेह्यांना देण्यात येणारा उपहार; किंवा असा उपहार देण्याचा समारंभ. (क्वचित हा समारंभ वरप्रस्थानानंतर वधूमंडपातही करतात.) २. अशा प्रकारच्या फराळाची सामग्री, सामान. [फा. रिषवत् = लाच; रुषवत् = देणगी]

रुखसत, रुसकत स्त्री. १. रजा; सुटी. २. परवानगी; निरोप; सोडवणूक. ३.विरोध. ४. नोकरी सोडणे.
वि. रवाना केलेला; पाठविलेला; सोडलेला; मोकळा; कामावरून काढलेला. [अर.रुखसत्]

रुखा वि. १.रुक्ष; नीरस; बेचव; शुष्क; कोरडा (भक्ष्य पदार्थ). २. ओसाड; वृक्षरहित व जलशून्य; रखरखीत; भयाण (प्रदेश). ३. कठोर; निर्दय; मायाविरहित (बोलणे, भाषण). ४. कर्णकटू; घोगरा; कानाला गोड न लागणारा; बेताल (आवाज, स्वर, गाणे इ.). [सं.रुक्ष]

रुखा पु. जोडकाम करण्याचे हत्यार.

रुखाडगिरी स्त्री. गिर्यारोहण.

रुखा(खां)डी-ड्या, रुखी, रुख्या वि. झाडावर चढण्यात पटाईत; नेहमी झाडावर चढणारा. [रुख; सं.वृक्ष]

रुखाडू न. ताडावर किंवा माडावर चढताना पायाला दोरीचा घातला जाणारा फासा; पायंडा. [रूख]

रुखाळू न. झाडावर वाढणारे एका जातीचे अळू.

रुखो पु. पिपासारखे उंच लाकडाचे भांडे. ताक ठेवण्याकरिता याचा उपयोग करतात.

रुगरदा, रुगर्दा पु. कापूस भरून केलेला तक्क्या.
वि. कापसाने भरलेली (उशी, गिरदी इ.).

रुगु पु. (निंदार्थी) ऋग्वेदी.

रुग्ण वि. रोगी; रोगग्रस्त; आजारी. [सं.]

रुग्णपट पु. उठून चालता न येणाऱ्या रुग्णाला झोपवून नेण्याचे साधन; (इं.) स्ट्रेचर.

रुग्णवाहिका स्त्री. गंभीर परिस्थितीतील रोग्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी वापरण्यात येणारी मोटारगाडी; (इं.) ॲम्ब्युलन्स.

रुग्णालय न. आजाऱ्यांना ज्या ठिकाणी ठेवून औषधोपचार केले जातात अशी इमारत; (इं.) हॉस्पिटल.

रुच स्त्री. रुची; चव; गोडी.
न. मीठ. (कुण.)
वि. रुचकर. [सं.रुचि]

रुचक न. एक अल्कली.
वि. रुचकर; स्वादिष्ट.

रुच(चि)कर वि. स्वादिष्ट; मधुर; चवदार; चव आणणारे.

रुचणे अक्रि. १. आवडणे; गोड लागणे. २. शोभणे; शोभून दिसणे; योग्य दिसणे; बरोबर वाटणे. ३.(चुकीने उपयोग) रुतणे.[सं.रुच्]

रुचि–ची स्त्री. १. गोडी; चव (पदार्थात असणारी); स्वाद; रसाळपणा. २.रसनेंद्रियांत असणारी चव घेण्याची शक्ती; तोंडाला असणारी चव. ३. आवड; गोडी; आनंद; सुख. ४. मीठ. (को.) ५. कांती; प्रभा; तेज. ६. शोभा. [सं.रुच् = १. आवडणे. २. शोभणे; प्रकाशणे.]

रुचिकर वि. १. पहा : **रुचकर**. २. करमणूक करणारा; रंगविणारा; रंजविणारा; रमणीय. [सं.]

रुचिकलिका स्त्री. चवीची जाणीव करून देणारे जिभेवरील छोटे–छोटे उंचवटे.

रुचिर वि. मोहक; सुंदर. [सं.रुच् = प्रकाशणे]

रुचीक वि. १. रुचकर; स्वादिष्ट; आवडणारे. २.(ल.) रमणीय; रमविणारे.

रुचीकि–की, रुचिक पहा : **रुई**

रुच्य वि. १. रुचकर; मिष्ट; चवदार. २. सुखदायक; मनोरंजक.

रुजणे अक्रि. १. कोंब येणे; मोड फुटणे; (एखादे रोपटे) जमिनीतून वर येणे. २.लागणे; उगवणे; फुटणे; जगणे; वाढणे. ३. (उपदेश इ.चा) परिणाम होणे; फलद्रूप होणे; बिंबणे. [सं.रुह=रुजणे,वाढणे]

रुजवट वि. उगवलेले; रुजलेले; मोड आलेले; कोंब फुटलेले; पालवलेले; मूळ धरलेले (बी किंवा रोप).

रुजवण न. फुटलेला अंकुर; उगवलेले, मूळ धरलेले बी किंवा रोप; रुजण्याकरिता पेरलेले किंवा लावलेले बीज अगर रोप.

रुज(जु)वात स्त्री. (निरनिराळे हिशेब, कागद, लिखाण, यादीतील कलमे इ.) समक्ष ताडून पाहणे; कबुली; समक्षता; प्रत्यय; लक्ष्य; सत्यता; खरेपणा; निष्ठा. (क्रि. घेणे, करणे, घालणे इ.)[अर. रुजूअत्, रुजूअ]

रुजवाती वि. ज्याची रुजवात घ्यावयाची आहे असे (कलम, रक्कम इ.).

रुजा स्त्री. १. रोग; पीडा; दु:ख. २. ज्या ठिकाणी रोमरंध्र बंद झाल्यामुळे गळलेले केस परत येत नाहीत ती जागा. [सं. रुज्]

रुजामा पु.१. रू म्हणजे कापूस भरलेली बिछाईत, पातळ गादी; २. जाजम; सतरंजी; जमिनीवर अंथरण्याची बैठक. ३. रुदार अंगरखा. [फा.]

रुजु वि. सरळ. [सं.ऋजु]

रुजुवणे अक्रि. १. फेडणे; पूर्ण करणे. २. सरळ करणे.

रुजुवातपत्रक न. तिजोरीतून काढून आणलेली रक्कम जमा केली किंवा नाही ते पाहून त्याचा ठेवलेला दाखला.

रुजू स्त्री. १. निष्ठा. २. संमती; कबुली. ३. रुजवात. (क्रि. घेणे, घालणे, पाहणे.) [अर.रुजूअ] (वा.) ० **घालणे, ० होणे** – भेटणे; नजर देणे; सन्मुख येणे; अंकित म्हणविणे; हजर होणे. ताडून पाहणे.
वि. १. (एखादे काम करण्यास) तयार; तत्पर; राजी; कबूल. २. हजर; गुदरलेला; दाखल; सादर; सरकारजमा; जप्त. ३. मान्य; पसंत; संमत; रुकार दिलेला. ४. सही–शिक्का केलेला; पसंती दर्शविलेला. ५.सामील; बाजूचा. ६. बरोबर; दुरुस्त केलेला. मालक सर्व पत्रांच्या खाली व मोर्तबाखाली रुजू या अर्थी रू असे लिहीत असे. लिहिण्यात चूक झाली तर तो मजकूर न खोडता पुढे रुजू लिहून नंतर शुद्ध मजकूर लिहीत म्हणजे पूर्वीचा मजकूर रद्द समजत. उदा. पीलगोंडे घेतले रुजू भागानगर घेतले. म्हणजे पीलगोंडे न घेता भागानगर घेतले.

रुजूगुदस्त वि. मागील वर्षी पसंत होऊन दाखल झालेला.

रुजूमु(मो)काबला पु. पहा : **रुजवात**

रुटकेबंदी स्त्री. रुटका या मापाप्रमाणे ठरविलेला सारा, जमीनमहसूल.

रुटूखु(गु)(घु)टू–ट क्रिवि. मंदगतीने, हळूहळू, सावकाश, धीरे–धीरे (घोड्यांची चाल किंवा कामाची गती). (वा.) ० **करणे** – बारीक–सारीक कामे करणे; पुष्कळ लहान–लहान धंदे करणे; नाना उद्योग करून कसे तरी पोट भरणे.

रुट्टू पु. तगादा. (बे.)

रुठणे सक्रि. मारणे; बडविणे.

रुड पु. १. रेघा ओढण्याचे लाकडी गोल साधन. २. आगगाडीचे पट्टे,रुळ.

रुण न. ऋण; कर्ज; देणे. पहा : **रि(री)ण** [सं.रूज]

रुणझुण स्त्री. मंजूळ आवाज; झुमझुम; बारीक मधुर आवाज (विशेषत: घागऱ्या, पैंजण इ.चा); गोड आवाज. [ध्व.]

रुणझुण–णा क्रिवि.गोडपणाने; मंजुळपणाने.

रुणझुणकार पु. मधमाश्यांचा गुंजारव; बाणांचा सू सू आवाज.

रुणझुणणे अक्रि. १. रुणझुण आवाज करणे; गोड नाद निघणे; मंजूळ वाजणे (पैंजण, नुपूर). २. गुंतणे; घोटाळणे.

रुणरुणणे अक्रि. (वेगाने जाणारा गोफणीचा दगड, बंदुकीची गोळी इ.) सू सू वाजणे; घू घू करणे; गुंगणे. [ध्व.]

रुणा पु. १.झुरणी; सतत होणारे दु:ख; हृद्रोग. (को.) २.उतरती कळा. [ध्व.अथवा सं. रणरण]

रुणी स्त्री. अळी; कीड. अनेक वचन – रुण्य. (व.)

रुत क्रिवि. योग्य रीतीने; निश्चितपणे. [सं.]

रुतण–न स्त्री. पहा : **रुपण**

रुतणी,रुती स्त्री. चिखल.

रुतणे अक्रि. १. बोचणे; टोचणे; खुपणे; मऊ पदार्थात कठीण पदार्थ शिरणे; घुसणे; फोडून आत शिरणे; चेपून शिरणे. २. अडकून पडणे; रुपणे; बुडून अडकणे; चिकटून पडणे; पुरला जाणे; पुरलेला असणे.

३. मोकळेपणाने पसरणे; वावरणे.

रुतनं क्रि. पसंत न पडणे; न आवडणे.(अहि.)

रुतबा, रुत्बा पु. दर्जा; पदवी; अधिकार, योग्यता. [अर.रुत्बा]

रुती स्त्री. रुतण; अडकवण.

रुत्वत पु. दर्जा; योग्यता; अधिकार. [अर.रुत्था]

रुदणे अक्रि. रडणे. [सं.रुद्]

रुदन न. रडणे; शोक. [सं.]

रुदबा–वा पु. दरारा; ऐट. (झाडी)

रुदवणे सक्रि. गुंतविणे. (कर.)

अक्रि. गुंतणे; व्यापणे; कार्यमग्न असणे.

रुदंती स्त्री. रुद्रवंती, एक वनस्पती. या वनस्पतीपासून पाणी टपकते. म्हणून हिला हे नाव पडले आहे. [सं.रुद्]

रु(रो)दित न. रडणे; रुदन; शोक; रडारड.

रुद्ध वि. १. अडकलेले, अडथळा आलेले. २. थांबविलेले. ३. वेढलेले; गुंतलेले. ४. गहिवरलेला; दाटून आलेला (आवाज, कंठ). [सं.]

रुद्र पु. १. शंकराचा एक अवतार; शंकर. २. ब्रह्मदेवाच्या कपाळापासून उत्पन्न झालला देव; देवताविशेष. ३. अकराचा समुदाय; अकरा ही संख्या. ४. शिवस्तोत्र. ५. रुद्रताल. ह्या तालात अकरा मात्रा व पाच विभाग असतात. ६.अकरावा रुद्र; मारुती; हनुमान; वानरगण.

वि. भयंकर; रडविणारा. ७. रुद्राचा मंत्र. [सं.]

रुद्रकाठी वि. तीन धागे काळे व एक पांढरा, नंतर एक काळा व एक पांढरा असे उभार व आडवणही त्याच प्रकारचे, किनार कोणतीही असे (लुगडे).

रुद्रगाठ स्त्री. १.कापड विणताना त्यात चौकटीसारखे उठविलेले चिन्ह. २. क्रोशाच्या सुईवरील विणकामातील एक प्रकार.

रुद्रपिशाच पु. न. १. काशीत केलेल्या पापाचे क्षालन होईपर्यंत (काशीत मेल्यानंतरही) पिशाचयोनीत राहिलेला जीव. २.(ल.) शीघ्रकोपी, अविचारी, रागीट मनुष्य.

रुद्रबलि–ली पु. रुद्रदेवतांना अर्पण केलेला मांसाचा बळी.

रुद्रभूमि–मी स्त्री. स्मशान; मसणवटी.

रुद्रमळी स्त्री. अंधारी; झापड.

रुद्रयोनि–नी स्त्री. १. काशी येथील विश्वेश्वराच्या देवळाबाहेरील खडकांतून गेलेला भुयारासारखा प्रदक्षिणेचा मार्ग. ह्या मार्गात मनुष्य मेल्यास तो रुद्रपिशाच होतो. हा मार्ग उतरता आहे व ब्रह्मयोनीचा मार्ग चढावाचा आहे. २. लांब व अरुंद गल्ली; बोळकंडी. पहा : **ब्रह्मयोनी**

रुद्रवात स्त्री. चार बोटे लांबीची अकरा सुतांची वात. अशा वातींचा लक्ष लावतात.

रुद्रविंशति स्त्री. प्रलयकाळ. (माधवग्रंथात हाच शब्द रुद्रवंश, रुद्रवंशी असा आला आहे. साठ संवत्सरांतले शेवटचे वीस संवत्सर रुद्र देवतेचे म्हणजे संहारदेवतेचे असल्यामुळे ते अनिष्ट मानतात.)

रुद्रवीणा पु. वीण्याचा एक प्रकार. ह्याचा आकार तंबोऱ्यासारखा असतो.

रुद्रावतार पु. १. शिवाचा अवतार; शिवाचे उग्रस्वरूप. २. (ल.) तापट किंवा रागीट मनुष्य; तामसी व्यक्ती.

रुद्राक्ष पु. १.एक वृक्षविशेष आणि त्याचे फळ. याचे वृक्ष मोठे असून पाने गंगेरीसारखी असतात. या झाडाच्या फळांतील बिया म्हणजे रुद्राक्षमणी. २. शंकराचा डोळा; शिवनेत्र.

[सं.रुद्र = शंकर + अक्षन् = डोळा]

रु(रुं)धणे सक्रि. १. अडवणे; रोधणे; अडथळा आणणे; प्रतिबंध करणे. २. व्यापणे; बंद करणे; वेढणे; भरून काढणे. [सं.रुध्]

रु(रुं)धणे, रुंधवणे अक्रि. १.अडथळा येणे; अडकून पडणे; थांबणे. २.(रस्ता, वाट, जागा इ.) माणसे, गाड्या इ.च्या दाटीमुळे अडणे किंवा त्यातून जाणे कठीण किंवा अशक्य होणे; भरून जाणे; पूर्ण भरल्याने बंद होणे. ३. उद्योगधंद्यात गुंतलेला असणे; एखाद्या गोष्टीने व्यापला जाणे; एखाद्या कामात अडकला जाणे; गुंतणे. [सं.रुध्]

रुधा वि. अडकलेला; अडलेला.

रुधिर न. रक्त.

पु. मंगळ हा ग्रह.

वि. तांबडा. [सं.]

रुधिरतंतू पु. (शारीरशास्त्र) रक्तातील तंतू, दोर; रक्तामधील एक पांढरे तंतुमय द्रव्य. ह्या द्रव्यामुळे रक्त गोठते.

रुधिरद्रव पु. रक्ताचे कण ज्यात असतात असे द्रव; रक्ताधार जल; रक्तकणधारी रस.

रुधिरपेशी स्त्री. रक्तगोलक; रक्तात असणारा तांबडा किंवा पांढरा गोलक.

रुधिरलसिका स्त्री. रक्त थिजल्यावर त्यातून वेगळे होणारे पाणी.

रुधिराभिसरण न. रक्ताचा शरीरात सर्वत्र होणारा संचार; हृदयातून सर्व शरीरभर व शरीराच्या सर्व भागांतून परत हृदयात रक्ताचे जाणे-येणे.

रुधिरोद्गारी पु. साठ संवत्सरांतील सत्तावन्नावे संवत्सर.

रुनी स्त्री. तांदळातील एक प्रकारचा किडा.

रुपटका, रुपटकी, रुपडी पु. स्त्री. रुपयाबद्दल तुच्छतादर्शक शब्द.

रुपडली स्त्री. घोड्याच्या खोगिराच्या खालचे वस्त्र; घामोळे.

रुपडे न. १. रूप; सुंदर रूप; गोजिरवाणी आकृती. (प्र.) २. रूपवान मूल. ३. कवच. (गो.) ४. मुखवटा; चेहरा. [सं.रूप]

रुपण स्त्री. न. रुतण; मऊ जमीन; भुसभुशीत जागा; (जमीन, मांसल भाग किंवा सामान्य पदार्थ यांचा) रुपले जाण्यासारखा भाग.

रुपणी स्त्री. (पुरण्यासाठी) पुरुष-दीड पुरुष उंचीची काठी. (को.)

रुपणे पहा : **रुतणे**

रुपद स्त्री. एक धातू. ही अनाम्लिक असून रजतासारखी पांढरी असते. ती हवेत उघडी राहिल्यास तिचे प्राणिद बनते.

रुप(पा)या, रुपा पु. १. भारतीय चलनाचे नाव. (पूर्वीचे सोळा आणे किमतीचे चांदीचे नाणे. निरनिराळ्या राज्यांतील व निरनिराळ्या टांकसाळीतील रुपयांना निरनिराळी नावे होती. ज्या परगण्याचे, देशाचे नाव रुपयाला असे, त्या परगण्यात, देशात तो चाले.) २. धन;

संपत्ती; पैसा; नाणे.[सं.रुप्यक, रुपे] (वा.) ० **मोडणे, रुपयाची मान मोडणे** – रुपयाचे नाणे किंवा खुर्दा, मोड करणे.

रुपवाटे न. रुप्याचे भांडे. [सं.रुप्य]

रुपा वि. पांढऱ्या अंगावर काळे किंवा तांबडे ठिपके असलेला (बैल).

रुपे न. १. रजत; अशुद्ध चांदी. हा मौल्यवान धातू प्राचीन काळापासून नाणे, दागिने इ.करिता उपयोगात आणल्या जाणाऱ्या धातूंपैकी आहे. हा धातू फार प्रसरणक्षम व घनवर्धनीय आहे. २. चंगकांचन खेळातील एक रंग. ३. जोंधळ्याचा हिरवा पाला. [सं. रुप्य; प्रा. रुप्य]

रुपेरी स्त्री. (जर.) नुसती चांदीची जरतार.

वि. १. रुप्याचे केलेले. २. रुप्याचा मुलामा दिलेले. ३. रुप्यासारखे.

रुपेरी काटा बाभळीचा पांढरा काटा.

रुपेरी चाबुक पैसा; दाम.

रुपेरी डोळे पांढरे डोळे; कवडीसारखे डोळे. (वा.) ० **करणे** – मरणे. **रुप्याचे डोळे होणे** – अंतकाळ आल्यामुळे डोळे पांढरे होणे; मरणोन्मुख होणे.

रुपेरी निखल (निलख) १. छीट; चित्रवस्त्र; खडी किंवा चित्रे अगर वेलबुट्टी काढलेले कापड. २. रौप्यपट. [फा.]

रुपेरी बेडी (ल.) पैशाच्या लालचीने करून घेतलेले बंधन.

रुबकार क्रिवि. १. सन्मुख; जवळ ठेपलेली; निश्चित; समक्ष; पुढे. २. तन्मयतेने; सलक्ष्य. [फा.रु+ब+कार्]

रुबगुंड–डी पु. १. पाट्यावरवंठ्याऐवजी तामीळ प्रांतात वापरण्यात येणारा घाण्याच्या तत्त्वावर बनविलेला उखळातील उभा वरवंटा. (तंजा.) २. वैश्वदेव करण्याचे कुंड. [त; क.]

रुबणे सक्रि. रुबगुंडात पदार्थ वाटणे. (तंजा.)

रुबया पु. एक महिन्यापर्यंत निघणारा घोड्याचा दात. – अश्वप १.११६.

रुब(बु)रु, रुबेरुब, रोबरो क्रिवि. १. समक्ष; समोर; समोरासमोर; प्रत्यक्ष. २. अपेक्षित; नजीक. [फा.रु–ब–रु]

रुबाई स्त्री. १. चतुष्पदी; चार चरणांची कविता. २. विवाहगीत.[फा.]

रुबाब पु. १. दरारा; ऐट; मिजास; ताठा. २. दमामा; एक तऱ्हेचा ताशा; पहा : **रबाब** [अर. रु + आब]

रुबी स्त्री. डाळी; चटई. (व.)

रुमझुम स्त्री. घुंगरांचा आवाज. [ध्व.]

क्रिवि. मंजूळ आवाजाने; घुंगरांच्या आवाजाने.

रुमड–डा पु. १.औदुंबर; उंबर.२. जून शहाळे; कोवळा परंतु शहाळ्याहून जून असा नारळ.

वि. असोला (नारळ). (कु.)

रुम(म्ह)डी–णी–णे, लुमणे स्त्री. न. नांगर, वखर, डवर, तिफण, कोळपे इ. चा दांडा–मूठ.

रुम(म्ह)णबाक, रुमणी पु. शेताचा किंवा बखळीचा रुमणीच्या वळणासारखा बाक किंवा वळण.

रुमणमोड्या वि. १. रुमणे धरणारा; नांगर हाकणारा; नांगऱ्या. २. गावंढळ; खेडेगावी राहणारा; खेडूत.

रुमना क्रि. अंगात वारे येणे. (झाडी)

रुमाल पु. १.चौकोनी वस्त्र; फडका; तोंड पुसणे, हात पुसणे इ. करिता उपयोगात आणावयाचे वस्त्र. २. डोक्याला गुंडाळण्याचे चौकोनी वस्त्र. ३. वेष्टनवस्त्र; कागद, वह्या इ. गुंडाळून बांधून ठेवण्याचे कापड. ४. जमाखर्चाचे कागद इ. फडक्यांत बांधून केलेले गाठोडे; दप्तर. ५.राजेरजवाडे इत्यादींच्या वर वारण्याचे शेल्यासारखे वस्त्र. ६. तहाचे निशाण. (लढाईत सेनापतीने किंवा राजाने रुमाल फिरविला तर तो दुसऱ्या पक्षाच्या राजास किंवा सेनापतीस शरण गेला असे पूर्वी समजत.) ७. देशपांड्याला किंवा कुलकर्ण्याला दिलेली इनाम जमीन. (या लोकांना रुमाल किंवा दप्तर बाळगावे लागे म्हणून हे नाव.) ८. उपरणे(खा); हुर्माल. (को.) [फा. रु=चेहरा + माल=फडके]

रुमाल पु. एक फूट अंतर; रुमालभर अंतर : 'त्यांना वाटले होते की सर्व विहीर एक रुमाल खोल गेली की दहा आणे झाले.' – स्मृतिचिन्हे १३९.

रुमाली स्त्री. (व्यायाम) मुद्गल फिरविण्याचा एक प्रकार.

पु. १.चड्डी; लंगोट. (माळवी) २.शरीर आत जाईल असे भिंतीला किंवा धाब्याला पाडलेले भोक. – गुजा १०. (बेरडी) ३. कबुतराचा एक प्रकार, जात.४. रुमालासारखी पातळ, गोल फिरवून, उंच उडवून केली जाणारी मैद्याची रोटी.

वि. चौकोनी.

रुमाली गज कापड मोजण्याचा १४ तसूंचा गज.

रुमाली घडी चोळखण इत्यादींची एक प्रकारची त्रिकोणी घडी; शिंपी घडी.

रुमाली पाटी दोन, तीन पायल्या धान्य राहील अशी बांबूची टोपली.

रुमाली रस्ता एकमेकांस काटकोनात छेदणारे रस्ते.

रुमोरुम वि. पूर्ण. (व.)

रुम्हनं न. १. रुमडी–णी. २. पिंजण्याच्या धनुकलीचा दोरा किंवा तार.

रुरो स्त्री. दगडांची रास; उभे दगड मांडून केलेली मांडणी; बांध; ऐरण.

रुलणे मोकळेपणे पसरणे; वावरणे.

रुष्ट वि. १. रागावलेला. २. रुसलेला; नाराज; नाखूष.[सं. रुष्=रागावणे]

रुष्टी स्त्री. राग; क्रोध; राग आल्याची स्थिती; रुसवा.

रुसक(स्क)त पहा : **रुखसत**

रुसका वि. बारीक–सारीक गोष्टीवरून वारंवार रागावणारा किंवा रुसणारा.

रुसणे अक्रि. १. मित्र इ. जवळच्या व्यक्तीने केलेली गोष्ट आपल्या मनास न आल्याने त्याने आर्जव करून समजूत काढावी अशा तऱ्हेचा भावनापूर्वक कोप येणे; रागावणे; घुस्सा येणे; नाखूश होणे; राग धरणे; अबोला धरणे. २. (ल.) दूर करणे; नाश करणे; नाहीसे करणे. ३. झाकणे; दडवणे. ४. त्याग करणे; टाकणे. ५. मारणे. ६. विटणे. [सं.रुष्;फ्रें.जि.रुश]

रुसणे फुगणे रागावणे आणि चरफडणे; घुम्यासारखे बसणे.

रुसवा पु. राग; घुस्सा; रुसण्याची क्रिया; रुसलेपणा.

रुसु(सू)म पु. १. देशमुख व देशपांड्याचा जमिनीच्या उत्पन्नातील भाग; कर; फी; हक्क म्हणून देण्याचे देय; हक्क; शेकडावळ; दरसाल मिळणारी नक्त नेमणूक. [अर.रस्म् =(चाल,रीत) चे अव]

रुस्त वि. धाडशी.(गो.)

रुस्त(स्तु)मी स्त्री. शौर्य; शक्ती; पराक्रम; धारिष्ट्य.

रुस्तु(स्तू)म पु. मोठा पराक्रमी व धाडसी पुरुष. [फा.]

रुह, रोही स्त्री. नीलगाय.

रुळणे अक्रि. १. लोळणे. २.लोंबणे; सैलपणे किंवा मोकळेपणे हलणे. ३. (अलंकार, केस इ.) शोभा देत हलणे; झुलणे. ४. शोभणे; सुंदर दिसणे. ५. (वस्त्र, दागिना इ.) वापरण्याने चोळवटणे; चुरगळणे. ६.झाकणे; लोपणे. ७. परिचय होणे; सराव होणे; वहिवाटणे; एखाद्या कामात किंवा नोकरीवर किंवा काही मंडळीत परिचित होणे; भीड मोडणे; परिपाठ पडणे. ८. एखाद्या विषयात सफाई येऊन प्रगती होणे, होऊ लागणे. ९. शरण येणे.

सक्रि. गुंडाळणे; घडी घालणे; चुरगाळणे. [सं.रुट्]

रुळलेला वि. वहिवाटलेला; परिचित; वापराने सोयीचा किंवा सुखकारक झालेला; ज्याच्या अंगवळणी एखादी गोष्ट पडली आहे असा; एखाद्या शास्त्रात, कामात अगर कलेत वहिवाटलेला.

रु(रु)ळे न. स्त्रियांनी पायाच्या घोट्यावर घालण्याचा एक अलंकार; पैंजण.

रुक्ष वि. १. शुष्क; कोरडे; ओलावा नसलेले; स्निग्धतारहित. २. कोरडा; कठीण; बेचव; रसहीन; पाणी किंवा रस नसलेला (खाद्यपदार्थ). ३. पाणी किंवा झाडे नाहीत असा; वृक्षहीन; वालुकामय; ओसाड; रखरखीत (प्रदेश). ४. कठोर; कर्कश; बेसूर; ज्यामुळे मन रमत नाही असे; रस, कारुण्य अगर माधुरी नाही असे (भाषण, लिखाण, गायन). [सं. रुक्ष् = कठोर बोलणे]

रुक्ष पु. रीस; अस्वल. [सं.ऋष]

रुक्षांग न. दुसऱ्या झाडावर वाढणारे एक झाड. याला फक्त पात्या येतात. ते झाडाच्या ढोलीत किंवा खोबणीत वाढते. याच्या पात्यांचा रस हगवणीवर घेतात. (को.) [सं.वृक्षांग].

रुंगणे अक्रि. मंदावणे; रेंगाळणे. (व.)

रुंगळणे अक्रि. बारीक होणे; कृश होणे; वाळणे; उतरणे.

रुंगाळा पु. कृशता; क्षीणता; काटकुळेपणा; किरकोळपणा.

वि. १.कृश; बारीक; किरकोळ; पातळ. २. काटकुळा; सडपातळ; किडकिडीत.

रुंगे न रुपे. - शर.

रुंजणे अक्रि. रुंजी घालणे. [ध्व.]

रुंजी स्त्री. १. गुंजारव; भ्रमराचे गुणगुणणे. २. (एखाद्या वस्तूभोवती) गुणगुणत घातलेली घिरटी, चक्कर, फेरी. ३.पारव्यांचे किंवा कबुतरांचे (एकमेकांचे मागे लागून) घिरट्या घालणे व घुमणे. [ध्व.]

रुंड-ढ, रुंडके न. १.शिर; मुंडके; धडापासून वेगळे केलेले डोके. (अव.)चुकीने धड : 'शिर रूंडा भेट केली ।'- ऐपो २.२८. २. लाकूड वगैरेचा ओंडा, ठोकळा. [सं.]

रुंढ-ढी स्त्री. दुर्गादेवीच्या देवळातील कौल घेताना उचलून पाहण्याचा दगड. पहा : **उचला**

रुंद, रुंदेला वि. विस्तीर्ण; चवडा; आडवा; विस्तृत. [सं.वृंद]

रुंद पु. जखमेतील पू. (व.)

रुंद(दा)ट-ड-ळ वि. अधिक रुंदीचा; अधिक विस्तृत.

रुंदती स्त्री. रडारड.

रुंदसो, रुंदाड, रुंदा वि. रुंद; मोठा; विस्तृत. (कु., गो.)

रुंदावणे अक्रि. रुंद होणे; (शरीर) फुगणे; लठ्ठ होणे.

रुंदावा, रुंदी पु. स्त्री. रुंदपणा; पन्हा; चवडाई; आडवी लांबी.

रुंदुला न. रुंद तोंडाचे सुगड, मडके.-मसाप २.१८९. (चि.)

रुंबड पहा : **रुमड** [हिं.रूई]

रू पु. १.पिंजलेला व सरकी काढलेला कापूस. २. कापूस. (खा.)[सं.रूत]

रू पु. एक प्रत्यय. हा लघुतादर्शक प्रत्यय पाणिनीय स्टरच् प्रत्ययापासून निघाला आहे. उदा. वाघरू =व्याघ्रतर; वासरू =वत्सतर.

रू न. १. गंजिफाची पुढची बाजू. २. फौजेची आघाडी; रोख. ३.भीड; धाक; अब्रू.[फा.रूअ] (वा.) **रूवाकडून मागणे** - गंजिफाच्या डावात उतारीनंतर पोटाकडून म्हणजे चवडीच्या खालच्या बाजूने पान मागणे.

रूईने क्रिवि. शिरस्त्याप्रमाणे. [अर.रूय]

रूख न. पाण्यातील नाव; पाण्यावरून जाण्याकरिता केलेले लाकडी साधन; डोंगा.(चंद्रपुरी) [सं.वृक्ष]

रूख पु. १. झाड; वृक्ष. २. रहाटगाडग्याच्या कणेकडाची टोके ज्या दोन आडव्या लाकडांवर टेकलेली असतात ती प्रत्येक. ३. शाखारहित झाड; झाडाचा सोट. ४. झाडाचा बुंधा. [सं.वृक्ष]

रूख पु. १. तोंड. २. लक्ष्य; रोख; दिशा; इरादा; रीत. [अर.] (वा.) ० **न देणे** - समोर न बोलणे. ० **मिळविणे** - सलोखा करणे. (व.)

रूखनळणी स्त्री. कमळाचा वेल. [सं.वृक्ष+नलिनी]

रूच स्त्री. १. स्वाद; चव; लज्जत; रसाळपणा. २. स्वाद घेण्याची, ओळखण्याची शक्ती. ३. आवड; गोडी; चव; रुची; नाद.[सं.रुचि]

रूचक, रूचकास्थि-स्थी न. १.ज्या हाडाचे दात बनतात ते हाड. पहा : **अस्थि-स्थी.** २. एक उपरत्न. हे पिवळे, हिरवे, पिंगट, शुभ्र वर्णाचे असते. हे काश्मीरमध्ये सापडते.

रूटक्का-का पु. जमीनमोजणीचे बिघ्यापेक्षा लहान परिमाण. [फा.]

रूढ वि. १. उगवलेला; उत्पन्न झालेला. २. वृद्धिंगत; वाढलेला. ३.प्रचारात किंवा चालू असलेला. ४.सर्वसामान्य; माहीत असलेला; प्रसिद्ध (मत, संप्रदाय, कल्पना, व्यवहार, चाल इ.). ५. कुप्रसिद्ध; वाढलेले; प्रसृत झालेले. ६. लोकसंकेताने किंवा रूढीने ठरलेला अर्थ सांगणारा (शब्द).

रूढणे अक्रि. १. प्रसिद्ध होणे; रूढ होणे; प्रचारात येणे; पसरणे. २. उत्पन्न होणे; वाढणे; तयार होणे. ३. बोलणे. - शर. [सं.रुह् = वाढणे]

रूढपण न. १.प्रतिष्ठा. २. प्रचारात येणे. [सं.रूह]

रूढि-ढी, रूढ स्त्री. १. वाढ. २. उत्पत्ती. ३.प्रसार; फैलाव; प्रसिद्धी. ४. चाल; वहिवाट; शिरस्ता; संप्रदाय; प्रघात. ५. कीर्ती; प्रसिद्धी; योग्यता. ६. केवळ लोकसंकेतावरून ठरलेला अर्थ.

रूदार वि. ज्यात कापूस भरलेला आहे असे; मऊ. [हिं.]

रूप न. १. बाह्य स्वरूप; देखावा. २. आकार; आकृती; दृश्य पदार्थ. ३. चेहरा; तोंडवळा; मुद्रा; मुखवटा. ४. (न्यायशास्त्र) डोळ्यांनी दिसणारे पदार्थाचे रंग आणि आकार हे धर्म; नेत्र ह्या इंद्रियाचा विषय. ५. नमुना; विशेष मासला; ठरावीक ठेवण; विशिष्ट घडण; अवस्था; स्थिती. ६. सौंदर्य; शोभा; तेज; पाणी; भूषण; शोभादायक गुण; बांधेसूदपणा. ७. मूळ धर्म; स्वभाव; गुणधर्म; मूळ अवस्था. ८.(व्याकरण) नामाचे अगर धातूचे प्रत्यय इ. लावून सिद्ध झालेले स्वरूप, स्थिती. ९.(व्याकरण) कोणताही धातू विधी अगर निषेध या अर्थी चालविला असता त्याचे होणारे रूपांतर. रूपे दोन आहेत – करणरूप व अकरणरूप. १०. तादात्म्य; प्रतिबिंब; सोंग; सारखेपणा; वेष. ११. (गणित) एक ह्या संख्येची संज्ञा; बीजगणितातील व्यक्त संख्या. १२. एक परिमाण दुसऱ्या परिमाणात नेले असता होणारा बदल. १३.(वैद्यक) निदानाचा दुसरा प्रकार. १४. एखाद्या कामाचा श्रेयस्कर किंवा प्रशसंनीय परिणाम; चीज; फलद्रूपता. १५. निरूपण. १६. मोल; महत्त्व. १७. सफलता.

पु. चंगकांचनी गंजिफातील सातवा रंग. [सं.]

रूपक न. (साहित्य) एक अर्थालंकार. यात उपमान आणि उपमेय यांचा अभेद वर्णिलेला असतो.

रूपक पु. (संगीत) कर्नाटक संगीतपद्धतीतील एक ताल.

रूपकार न. मूर्ती; प्रतिमा; प्रतीक.– ख्रिपु.

रूपकालप्ति–ती स्त्री. (संगीत) चिजेचे बोल व तिचा ताल ह्याने रागाचे प्रकाशन करणे.

रूपकालाप पु. (संगीत) रागविस्तार करीत असता यात चिजेची अक्षरे व ताल नसून स्वरांच्या समुदायांचे वेगळाले भाग पाडून केलेले रागाचे मंडन किंवा रागविस्तार असतो.

रूपजस्ती स्त्री. १. रुप्याचा मुलामा. २. जर्मन सिल्व्हर.

रूपरत्नपरीक्षा स्त्री. नाणी आणि रत्ने यांची परीक्षा; चौसष्ट कलांपैकी एक कला.

रूपरंग पहा : **रंगरूप**

रूपरेखा–षा स्त्री. १.बाह्य देखावा; बाह्य मर्यादा. २. घाट; आंगलट; बांधा; मूर्तिमंत स्वरूप. ३. आराखडा; कच्चा नकाशा.

रूपलिपी स्त्री. सारणी; सूत्र.–साठे : रासायनिक परिभाषा; (इं.) फॉर्म्युला.

रूपवती स्त्री. सुंदर स्त्री; देखणी स्त्री. [सं.]

वि. सखी; मैत्रीण.

रूपवान वि. १.सुंदर; देखणा; चांगल्या बांध्याचा. २. रूप असलेला; आकृती असलेला; आकारयुक्त. [सं.]

रूपस न. १. स्वरूप; सौंदर्य. २. मूर्ती.

वि. चांगल्या आकाराचा; सुंदर; रूपवान; नीट–नेटका; सुरेख; शोभिवंत; देखणा.

रूपातीत वि. निराकार.

रूपावलि–ली–ळी स्त्री. नामे किंवा क्रियापदे यांचे प्रत्यय लावल्यानंतर होणारी रूपे दिलेले पुस्तक.

रूपाळु–ळू वि. रुपवान; फक्कड; सुंदर; सुरेख. [गु.]

रुपांतर न. १. अन्य रूप; दुसरे स्वरूप; नवे स्वरूप. २. फरक; बदल.

रूपांतरण न. एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाणे.

रूपिकी स्त्री. सजीवांच्या बाह्यरचनेचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणारी जीवशास्त्राची उपशाखा.

रूपी वि. रूप घेतलेला; त्यासारखा; एखाद्याची आकृती धारण केलेला.

रूबकार पु. हुकूम; आज्ञा. [हिं.]

रूबकारी स्त्री. सुनावणी.

रूमी सुरा पुढे रुंद होत जाणारा सुरा.

रूळ पु. १. वाटोळी आखणी. २. आगगाडीचा लोहमार्ग. ३. छापताना टाइपास शाई लावण्याचे साधन. ४.रस्त्यावरील खडी दाबण्याचा वाटोळा दगड अगर लोखंडी यंत्र.[इं.रूलर, रोलर] (वा.)**(एखादा प्रश्न भलत्या) रुळावर नेणे** – गैरमुद्द्याचे, अप्रस्तुत बोलणे.

रूळी स्त्री. अव. नियम; कायदे. [इं. रूल]

रूं न. खवडा; डोक्यातील फोड. अव. रुवा असे होते.

रे उद्गा. अरे; हे (हाक मारताना उपयोग).

रेक स्त्री. चंगळ; विपुलता; रेट; रेलचेल.

रेकटी स्त्री. रेघोटी; बारीक रेघ.

रेकणे अक्रि. १. (म्हैस, रेडा इ. नी) ओरडणे. २. घोगऱ्या आवाजाने बोलणे, गाणे; कर्कश शब्दाने बोलणे; मोठ्याने हाक मारणे. ३. चरफडणे; पिरपिरणे; असंतुष्टपणाने ओरडणे.

[सं.रेष् = अव्यक्त शब्द करणे]

रेकत क्रिवि.१. हळू; जडपणे; आळसटपणाने; आळसावत; मंद गतीने. २. (म्हैस अभिलाषेने ओरडत येते त्याप्रमाणे) लालचीने, आपण होऊन, उत्सुकतेमुळे धावत (येणे).

रेकला पु.लहान भांडे. – तंजा.

रेकला पु. १.छकडा; एक्का; एक बैलाची गाडी. २. जमिनीत बी पेरल्यानंतर वर माती लोटण्याचे औत; कुळव. ३. सुरुंग लावून खडक फोडण्याचे एक साधन. ४. एक प्रकारची तोफ; एक बंदुकीसारखे हत्यार.

[हिं.रहकला]

रेकाट्या वि. म्हशीसारख्या आवाजाचा; रेकत बोलणारा; घोगऱ्या आवाजाचा; कर्कश आवाज असलेला.

रेकॉर्ड न. १. दप्तर; कागदपत्रे; फाईल; मागील पत्रव्यवहार अगर प्रकरणे यांचे टाचण; एके जागी टाचून ठेवणे. २. आलेख; ध्वनिलेख; यंत्राच्या साहाय्याने घेतलेला गाण्याचा आलेख; फोनोग्राफची तबकडी.[इं.]

रेक्झीन न. जाड रोगण केलेले कापड; कृत्रिम चामडे. [इं.]

रेक्ता पु. हिंदुस्थानी किंवा फारसी भाषेतील गीताचा एक प्रकार.

[फा. रेखताह्]

रेख स्त्री. रेघ. [सं.रेषा]

रेखक न. मोठी, ठळक अक्षरे काढण्यासाठी वापरली जाणारी लेखणी; (इं.) मार्करपेन.

रेखणा वि. रेखीव.

रेखणे सक्रि. १.(जमीन, कागद, भिंत इ. वर)रेषा किंवा रेघोट्या,चित्र

इ. काढणे. २. घासून गुळगुळीत करणे. ३. (देव, साधू इ.च्या प्रतिमा, मूर्ती) मनात ठसवून घेणे; कल्पिणे. ४. अंग, कपाळ इ. वर (गंध इ.नी) रेघांच्या रूपाने चिन्हित करणे; कोरणे; नीट करणे; प्रमाणात लावणे, काढणे. ५. वस्त्राच्या चुण्या किंवा डोक्याच्या केसांच्या पट्ट्या चापूनचोपून बसविणे. ६.वर्णन करणे; बिंबविणे; ठसा उमटविणे; चित्रित करणे.

रेखला, रेखलिया वि. १.नीटनेटका; प्रमाणबद्ध. २. कोरीव; कोरलेला; रेखलेला; सुंदर. ३. योग्य; बरोबर; तंतोतंत. ४.चित्र काढलेला.

रेखा स्त्री. १. रेघ; रेषा. २.काढलेले चित्र किंवा आकृती. ३. मर्यादा; सीमा. ४. रांग; पंक्ती; ओळ. ५.हात, बोटे इत्यादीवरील जन्मजात चिन्हे. ६. लंका व मेरू यांना जोडणारी दक्षिणोत्तर रेषा; याम्योत्तरवृत्त; ध्रुवांमधून जाणारी रेषा; शून्य रेखांश. ७. काव्यरचना. ८. यथोक्त कर्म. ९. (नृत्य.) नृत्यामध्ये अंग प्रत्यंगांची प्रेक्षकांना आनंद देणारी मनोहर ठेवण. [सं.रेषा]

रेखा पु. रसाविष्करणाची रीत किंवा शैली. [सं.]

रेखागणित न. भूमिती.

रेखाटणी, रेखणी स्त्री. १.आकृत्या किंवा रेषा काढणे, आखणे. २. वर्णन; विस्तार; आखणी. ३.आखण्याचे पट्टी इ. साधन; रूळ.

रेखाटणे सक्रि. १.(कागद, भिंत इ. वर) चित्र, आकृती, शब्द इ. काढणे. २.(कागद, भिंत इ. वर) अव्यवस्थितपणे रेघोट्या काढणे; रेघा काढून विरूप करणे; चितारणे.

रेखाटा पु. नकाशा; आराखडा; रेषाचित्र.

रेखाटी स्त्री. आखण्याकरिता केलेला लाकडी गोल गज; (इं.) रूळ.

रेखापात पु. पहा: **याम्योत्तररेषावृत्त**

रेखांकन न. मांडणी; (इं.) ले-आऊट.

रेखांतर न. रेखांश; पहिल्या रेखावृत्तापासूनचे पूर्व-पश्चिम अंतर.

रेखांश पु. कोणत्याही स्थळाचे पहिल्या याम्योत्तरवृत्तापासून पूर्वेकडील किंवा पश्चिमेकडील अंशात्मक अंतर.

रेगर वि. काळी(जमीन).-ज्ञाको.

रेगाडे चिकण काळी माती.

रेघ स्त्री. १. रेषा; ओळ. २. काही आकृतीची मर्यादा. ३. चेहरा; न्हाव्याकडून कपाळावरील केसांची कोरलेली महीरप. (क्रि.धरणे) (क्रि.ओढणे, काढणे, फोडणे.)[सं.रेषा] (वा.) ० **ओढून (काढून) देणे** - एखाद्याच्या वर्तनाला शिस्त लावून देणे. ० **मारणे** - हद्द ठरविणे; ओळ काढणे. **रेघेरूपास आणणे, येणे, चढणे** - उत्कर्षाच्या स्थितीस पोचविणे, पोचणे. **(काढल्या) रेघेने, रेघे चालणे, वागणे, करणे** - ठरवून दिल्याप्रमाणे वागणे.

रेघ न रेघ क्रिवि. पूर्ण; खडान्‌खडा; बारीकसारीकसुद्धा.

रेघरूप न. १.पदार्थाची घटना किंवा आकारमान. २. पदार्थांचे स्वरूप. ३. उत्कर्षाची स्थिती; भरभराट; पूर्णपणा.

रेघांचा प्रश्न (फलज्यो.) भविष्य पाहण्याची एक पद्धत; हनुमानप्रश्न.

रेघी वि. रेघांनी युक्त अशी; पाव, अर्धा, पाऊण यांच्या निदर्शक एक, दोन, तीन उभ्या रेघांनी युक्त.

रेघोटी स्त्री. (वाकडीतिकडी) रेघ; रेषा; ओळ.

रेघोतळी स्त्री. (सोनारी) दागिना किंवा भांडे यांच्यावर नक्षीच्या नाजूक रेषा उमटविण्याचे किंवा ओरखडून काढण्याचे सोनाराचे एक हत्यार; गुजरणी. पहा : **छटकारा**

रेच पु. १. मनुष्य जेवण्यास बसला असता कोणी भरत्या पायांचा मनुष्य तेथे आला किंवा त्या जेवणाराला कोणाची दृष्ट लागली तर त्या जेवणाराची अन्नावर एकदम उत्पन्न होणारी अरुची, मळमळणे, वांती. (क्रि.भरणे,उतरणे, लागणे.) २. एखाद्याच्या पाठीत किंवा दुसऱ्या अवयवात थंडी वगैरे कारणांनी उत्पन्न होणारा ताठपणा. ३. खुमखुमी; गर्व; हिंमत; ताठा; तोरा; गुर्मी. ४.(एखाद्यास) पुष्कळ मारणे; जोराचा मार; ठेचणे. (राजा., कुण.) ५. अपचननाशाचा एक तोडगा. (को.) (वा.) ० **उतरणे, मोडणे, करणे** - १. पाठीच्या शिरा मोडून ती हलकी करणे; पाठीचा ताठपणा, करक, उसण इ. जोराचा धक्का मारून किंवा चिमट्याने मास ओढून-ताणून नाहीसा करणे. २. गर्वहरण करणे; खोड मोडणे.

रेच, रेचन पु. १. ढाळ; जुलाब; रेचकामुळे झालेले शौच; गुदद्वारे जोराचे मलविसर्जन. २.पहा : **रेचक** न. ३. सारक औषधांचा प्रयोग. [सं.रिच् = रिकामा करणे]

रेचक न. ढाळक; जुलाबाचे औषध; सारक औषध.

पु. प्राणायाम करताना आत घेतलेला श्वास बाहेर टाकणे; पूरकाने ओढलेला वायू कुंभकात स्थिर झाल्यानंतर तो सोडणे.

वि. सारक.

रेचक अंगहार (नृत्य.) उजवा हात रेचित करून शरीराची उजवी बाजू वाकवून रेचित करणे. ती बाजू ताठ करून पुन्हा डाव्या बाजूस त्याच क्रियांची आवृत्ती करणे. शेवटी क्रमाने रेचित उरोमंडल व कटिच्छिन्न करणे.

रेचक कटि-टी (नृत्य.)नृत्यामध्ये दोन्ही पाय अंचित करून कंबर खाली घालविणे.

रेचकना पु. दुबेळक्या लाकडास दोन आडव्या काठ्या बांधून केलेले कुंपणाचे, वाडग्याचे फाटक; बेडे. (ना.)

रेचक निकुट्टककरण न. (नृत्य.) उजवा हात रेचित करून उजवा पाय निकुट्टित करणे; डावा पाय ह्या बाजूपासून त्या बाजूपर्यंत हलवणे.

रेचक भुवई (नृत्य.) नृत्यामध्ये एखादी भुवई गमतीने वर उचलली म्हणजे दुसऱ्या भुवईची होणारी स्थिती.

रेचक मान (नृत्य.) नृत्यामध्ये कंबर निवृत्त करू लागताच शरीराला एक प्रकारची गती मिळते. ही गती मिळण्यापूर्वीची स्थिती.

रेचक संयुक्तहस्त (नृत्य) हंसपक्ष हात वर करून फिरविणे व मग आपल्यासमोर पसरून उताणे करणे.

रेचका पु. भार; कामाचा बोजा. (कर.)

रेचणे अक्रि. कापसातील सरकी काढणे; लोडणे.

रेचणे सक्रि. सोडणे; नाकाने वायू सोडणे.

रेचन न. फुप्फुसात दाबून धरलेला वायू बाहेर सोडणारी नाडी.

रेचना क्रि. व्यवस्थित ठेवणे.(झाडी.) [सं.रच्]

रेचा पु. कापूस वठण्याचे, सरकी काढण्याचे यंत्र. (व.)

रेचावड स्त्री. लागवड.

रेचित वि. १. मोकळे केलेले; सोडलेले. २. कोठा साफ झालेला.

रेज पु. १.धातूचा कण; लहान तुकडा. २.लहान नाणे. ३.एक कोंबडा. ४.मजूर; मोलाने लावलेली मुले. [सं.रजस]

रेजकदाणी स्त्री. दारू ठेवण्याचे पात्र; छरे किंवा बंदुकीच्या गोळ्या ठेवण्याचे पात्र. [फा.रेझगी]

रेजग(गा)ण पु. न. १.सोन्याचांदीचे कण. २. दागिने, नाणी, भांडीकुंडी इ. चे तुकडे, कण इ. ३. कपडा बेतल्यावर उरणारे कापडाचे लहान तुकडे (समुच्चयाने). ४.बंदुकीचे छरे.

रेजगा(गि)री स्त्री. १.बंदुकीच्या गोळ्या, छरे वगैरेंचा मारा; गोळागोळी; शिलक; रंजक. २.लढण्याचे कौशल्य; शौर्य. ३. तोफेतून उडविण्यात येणारे धातूचे तुकडे. [सं.रजस्; फा. राजगिरी]

रेजगी स्त्री. १. मोड; किरकोळ नाणे; चिल्लर; खुर्दा. २.फोडलेल्या, तासलेल्या लाकडाचे किंवा दगडाचे तुकडे, खंड, धलप्या इ. समुच्चयाने; नव्या कापडाचे तुकडे. (तंजा.) [फा. रेझगी]

रेजा पु. १. उंची कापडाचा लहानसा तुकडा; (सामा.) तुकडा; किरकोळ वस्तू. २. लाकडी गज; (जाळीत बसवितात तो) खिडकीचा गज. (को.) ३. फाशांवरील पगडा; टिंब (सकरेजा - दोन फाशांवरील दान. सहा आणि एक). ४. भुकटी. - मुंव्या ३५. ५. सोन्याच्या किंवा चांदीच्या लांब लगडी पाडण्याकरिता धातूचा रस ओतण्याचे दोन्ही टोकास बंद असलेले लोखंडी साधन; मूस; भट्टी. ६.(विणकाम) पदर इत्यादी नसलेला सनगाचा काही भाग, तुकडा. ७. कारागिराच्या हाताखालचा सांगकाम्या मजूर.(व.) [सं.रजस्; फा. रेजाह् = कापडाचा तुकडा]

रेजा वि.खुजा; गिड्डा.

रेजाबाकी स्त्री. वस्त्राचा अवशिष्ट भाग; बेगमीच्या धान्यापैकी काही अवशेष.

रेजावट स्त्री. रोजगार.

रेजीम न.पहा : **रीम** [पोर्तु.]

रेजो पु. १.गज. २. हात्चा. ३. सोन्या-चांदीची वीट; लगड करण्याचा साचा.पहा : **मूस, रेजा** ५ [सिंधी]

रेट-ठ न. (अशिष्ट) १. जाडा रोट; जाडीभरडी भाकरी. २. वाळलेल्या भाकरीचा तुकडा. (व.)

रेट स्त्री. पु. १. गर्दी; दाटी; खेचाखेच. २. वस्तू पुढे सरकविण्यासाठी त्याला मागून लावलेला जोर; मागून दिलेला दाब; धक्का. ३. भार; जोर; वजन.(व.) ४. दांडगा किंवा उद्दाम मनुष्य. (व.)

रेट वि. पुष्कळ; अतिशय; खूप.

रेटकपणा पु. रेटून नेण्याचा गुण; काम जोराने पुढे नेण्याचा किंवा करविण्याचा गुण.

रेटणी स्त्री. रेटण्याची, नेट देण्याची, पुढे ढकलण्याची क्रिया; ढकलणी.

रेटणे सक्रि. १. पदार्थाला पुढे जाण्यासाठी गती देणे, ढकलणे; मागून दाब घालणे; खुपसणे. २. (काही अनिष्ट प्रसंग) प्रतिकार करून थांबविणे; सांभाळून धरणे; थोपविणे. ३. (कठीण काम) नेटाने पार पाडणे; (धंदा, नोकरी, उद्योग इ.) विघ्नास न जुमानता चालविणे. ४. कष्टाने चालविणे; संकटाच्या स्थितीत दिवस काढणे किंवा कंठणे. ५. (खाद्यपदार्थ) अधाशीपणाने खाऊन टाकणे; गिळणे.

अक्रि. १. सरकणे; स्थानभ्रष्ट होणे; आपली जागा सोडणे; (फार दाबामुळे खांब, तुळई इ.) कलणे. २. (धान्य, पाणी इ.) विपुल होणे; पिकणे; अमर्याद, अतिशय होणे. उदा. पीक रेटले.

रेटमकहाणी स्त्री. भाकडकथा.

रे(रें)टा पु. धक्का; नेट; जोर.

रे(रें)टाई स्त्री. १. रेटणी; धक्का; ढकलाढकली. २.(ल.) जोर; जुलूम; बळजबरी; धटाई; दांडगाई. ३. संकटे, विघ्ने इ.न जुमानता काम चालू ठेवण्याची क्रिया. ४. चालढकल.

रेटारेट-टी स्त्री. १. ढकलाढकल; खेचाखेच; कलण्याची क्रिया. २. (ल.) चालढकल; हेळसांड; दुर्लक्ष.

रेटूक न. (तुच्छतेने) जाड भाकरी, पोळी, पापड इ.

रेटून क्रिवि. १.जोराने; आवेशाने. २. मोठ्या प्रमाणात. ३. स्पष्टपणे; भीडमुरवत न ठेवता.

रेड स्त्री. आंबे, फणस, धान्ये इ. चे वैपुल्य; समृद्धी; रेलचेल; चंगळ. (क्रि.होणे, पडणे.) [हिं.]

रेडका पहा : **रेडू**

रेडकू, रेडू(डु)क न. १.पारडू; म्हशीचे पोर. २.(तुच्छतेने) म्हैस.

रेडणे अक्रि. शिंपणे; ओतणे. [गु.]

रेडा पु. म्हशीच्या जातीचा नर; हल्या; टोणगा; महिष. [सं.रिष् = हिंसा करणे]

रेडा, रेडका पु. (विशेषत: रेडका) बटवा (पिशवी) उघडण्याच्या दोन दोऱ्यांपैकी प्रत्येक; तडकणीसाठी गोणी, पोते इ. वर घातलेला दोरीचा फास.

रेडिओ पु. नभोवाणी. [इं.]

रेडी स्त्री. पारडी; लहान म्हैस (दूध देऊ लागण्यापूर्वीच्या स्थितीतील).

रेडिअम स्त्री. पिचब्लेड नावाच्या खनिज द्रव्यापासून मिळणारा अतिशय दुर्मीळ असा धातू. याचा सन १८९८ मध्ये शोध लागला. यात प्रकाश धरून, साठवून ठेवण्याची शक्ती आहे. [इं.]

रेडिओग्राफी स्त्री. वस्तूंच्या अंतरंगांचे छायाचित्र क्ष-किरण किंवा गामा किरण यांच्या साहाय्याने मिळविण्याची प्रक्रिया. वैद्यकीय क्षेत्रातील मानवी शरीरातील दोषांचे निदान करण्यासाठीची पद्धत. [इं.]

रेडू पु. बसणाऱ्यांना खाली पाय सोडून बसता येईल अशा प्रकारची हलकी, उघडी गाडी; पायटांगी गाडी; रेडका.

रेडे अननस जंगली अननसाचे झाड. याच्या पात्यांची दोरखंडे करतात.

रेडे जत्रा १. गावच्या देवीला सोडलेल्या रेड्याला बांधून ठेवता येत नसे. तो गावाला त्रास देतो, पिकांची नासाडी करतो. यावर उपाय म्हणून आषाढ महिन्यात त्याचाच देवीला बळी देत व त्याचे जेवण करीत. हा मान महारांकडे असे. २. रेड्याला देवीसमोर बळी देण्याचा विधी.

रेडे मान(ण)गा एक प्रकारचा वेळू, बांबू.
रेडे मुसळे जाड्या भाताची एक जात.
रेणवी स्त्री. खाऱ्या पाण्यातील माशांची एक जात.
रेणु–णू पु. स्त्री. १. धूळ; केर; रजकण. २. फुलांतील पराग.३. पाण्याचा थेंब. ४. पित्तपापडा.५. मूलद्रव्यातील अणूंच्या जोडण्यातून तयार झालेला व स्वतंत्र अस्तित्व असलेला घटक.
रेणे न. जे गवत, कडबा इ. खाऊ लागले नाही, केवळ दुधावरच आहे अशा वासराची, रेडकाची विष्ठा. (राजा.)
रेणोल पोर्तुगीज सैन्यातील एक प्रकार. – वसई मोहीम.
रेत न. १.पुरुषाचे वीर्य; धातू; शुक्र; पुरुषाच्या शरीरातील गर्भोत्पादक धातू. २.(शंकराचे रेत) पारा. [सं.रेतस्]
रेतमल पु. (इं.) सॅण्डपेपर. (झाडी)
रेताई स्त्री. चकाकी आणण्यासाठी दिलेली मजुरी.
रेताड वि. रेती पुष्कळ असलेली, नापीक (जमीन, माती).
रेती–त–तु स्त्री. पु. १. वाळू; अगदी बारीक वाळू. २. (सोनारी धंदा) बारीक कणांच्या रूपाने असलेली सोन्याची पूड. [सं.रेत्, रेतजा]
रेदा पु. तंबाखूची जुडी.
रेनकोट पु.पावसापासून बचावासाठी घालावयाचा कोट; बरसाती.[इं.]
रेप स्त्री. तापामध्ये अंगात उठणारी शिणिक; शिणक.
रेप स्त्री. झड; जोराची वृष्टी.
रेप,रेपन स्त्री. पु. दाट चिखल; चिखलाचा लादा. (वा.) **रेपावर रेप घालणे, बसविणे** – अधाशीपणाने एकावर एक खाणे.
रेपणे अक्रि. काही हालचाल न करता सुस्तपणाने, घट्ट चिकटून बसणे; चिखलाच्या गोळ्याप्रमाणे (लठ्ठ मनुष्याने) फतकल मारून बसणे.
रेपा स्त्री. (विशेषत: अनेकवचनी) १.थंडीतापामुळे अंगात उठणाऱ्या वेदना; शिणका. २. आमांशाने पोटात निघणाऱ्या कळा, वेदना, मुरडा.
रेफ पु. स्त्री. रफार; र हे अक्षर; 'अर्ध र' दर्शक चिन्ह; अक्षराच्या डोक्यावरचे 'र' चे अर्धवर्तुळाकृती चिन्ह. उदा. अर्क या शब्दातील क या अक्षरावरील चिन्ह. [सं.रिफ् = कर्कश नाद करणे]
रेब स्त्री. १.मऊ चिखल; राड; खातेरा. २.समुद्राच्या काठावर येणारा मऊ गाळ. (को.)
रेबट स्त्री. चिखलाची जागा. (गो.)
रेबटणे सक्रि. (पदार्थाला) तेल, तूप इ. वाटेल तसे चोपडणे; माखणे.
रेबड न. घाण; रक्तमिश्रित पू.
स्त्री. चिखल, शेण, गू. इ. चा ढीग अगर पसारा; रेंदाड; घाण; रबडा; चिखलाची जागा.
रेबडणे सक्रि. (भांडे, अंग इ.) बरबटविणे; माखणे; चोपडणे; फासणे. अक्रि. बरबटलेले असणे किंवा होणे; (रस्ता, शरीर, नाक, तोंड, भांडे, वस्तू इ.) माखलेले असणे.
रेबडी–टी स्त्री. १.पाघळून पातळ झालेला गूळ. (राजा.) २.बिलबिलीत झालेले फळ; जास्त पिकल्याने आंबा, फणस इ. चा लिबलिबीत झालेला गर; कुजून शेण झालेला जिन्नस.
रेबो पु. चिखल; गारा. (गो.)
रेभ स्त्री. (भिंत,जमीन इ. तील) भेग; फट; चीर. (प्रा.)
रेमटकहाणी स्त्री. कंटाळवाणी हकिकत; लांबलचक गोष्ट.
रेमसना क्रि. घासणे. (झाडी)
रेम्या,रेमे(म्या)डोक्या वि. १.मंद; अनुत्साही. २.मूर्ख; मठ्ठ; बुद्धिहीन; दीर्घसूत्री. (रे आणि मे बावळटपणाचे निदर्शक आवाज यावरून.)
रेरे स्त्री. न. १.पिरपिर; रड. २. अति संथपणाने किंवा मंद गतीने काम करण्याचा प्रकार. ३.धैर्य गमावणे; धीर खचणे; अनुत्साह. ४. एखादे काम करताना चालविलेली कुरकुर; वेळ काढणे.
रेरे, रेरेरे उद्गा. (आश्चर्य व दु:ख यांचा निदर्शक उद्गार) अहाहा; अरेरे; हाय हाय.
रेरे स्त्री. हाक; जोराची हाक; परत परत बोलावणे.
रेल स्त्री. १.वैपुल्य; समृद्धी; चंगळ. २.महापूर; लोंढा. (क्रि.येणे) ३. रेती; बारीक वाळू. ४.भयंकर जोराचा पाऊस.[हिं.रेल; प्रा. रेल्ल]
रेलचे(पे,टे)ल स्त्री. अघळपघळ पुरण्याइतके एखाद्या पदार्थाचे वैपुल्य.
रेलणे अक्रि. १.कलणे; झुकणे; (भिंत इ. चे बांधकाम) खचून तिरके होणे; एका बाजूला तोलणे, पडणे; सरकणे. २.एखाद्याला टेकून उभे राहणे; टेकणे; दुसऱ्यावर भार देऊन राहणे; रेटणे. ३.(साखर, मीठ इ. ची रास ओली झाल्याने) विरघळून पडणे; भिंत इ. ढासळणे; पडून तुकडे होणे. ४. (कपाळाचा घाम, पू, रक्त, भिंतीचा रंग) झिरपणे; गळून पडणे; उडून जाणे. [अर. रेलना; सं.लुठ्; प्रा.]
रेलवे पु. आगगाडीचा रुळाचा मार्ग; रूळ.
स्त्री. (ल.) आगगाडी. [इं.]
रेला पु. पाण्याचा लोंढा; दाब.
रेव स्त्री. प्रार्थना: 'मी रेव करित आसे.' – पंचो १२२.६.
रेव स्त्री. १. बारीक वाळू; रेती. २. धान्यांत वगैरे असणारी बारीक रेती; साखर, दळलेले पीठ इत्यादीकांतील कचकच.
न. १.आकाशात पसरलेले लांबलचक, पांढऱ्या ढगाचे पट्टे किंवा तशा पट्ट्यांनी व्याप्त असे आकाश. २. गाळ.
रेवट, रेवठील वि. वाळूची; रेताड; पुष्कळ वाळू, खडे असलेली (जमीन).
रेवठा पु. वाळूचा किंवा रेतीचा ढीग; रास.
रेवड स्त्री. १. कांबळे, घोंगडे इ. च्या दशा वळून, गुंफून किंवा दुसरे रंगीत सूत, रेशीम इ. भरून गुंफलेला गोफासारखा पट्टा. (क्रि. घालणे, वळणे.) २. लपेट. (को.) ३. परवड.
रेवडा पु. १.वाळू; रेती.(को.) २.रेताड जागा; खडे असलेली जागा.
रेवडावप क्रि. (फडका इ.) डोक्याला गुंडाळणे. (गो.)
रेवडी स्त्री. १. साखरेच्या किंवा गुळाच्या पाकात तीळ घालून केलेले लहान–लहान गोळे. २.(ल.) फजिती; एखाद्याचा उडविलेला बोऱ्या; लाजिरवाणी स्थिती. [हिं.]
रेवडी स्त्री. फुलोरा; तुरा; कणीस. (झाडी)
रेवण स्त्री. १. किल्ल्याच्या तटाच्या बाहेर किंवा खंदकाच्या बाजूला संरक्षणासाठी घातला जाणारा मातीचा ढीग. (यावरून ल.) उतरण,

घसरगुंडी. २. खंदक, विहीर इ.च्या खाचा भरण्याची माती, दगड इ.; भरताड. ३. रुतण; रुपण; दलदलीची जागा; भुसभुशीत जागा.

रेवणी स्त्री. १. खंदकाच्या बाहेर घातलेली मातीची वरवंडी; रेवण. २. तटाखाली खंदकाच्या पुढे असते ती थोडी जागा. किल्ल्याच्या रक्षणार्थ असणाऱ्या बाहेरील चौक्यांची जागा. ३. किल्ल्याच्या बाहेरील प्रदेश; परिखावलय. ४. किल्ल्याच्या मुख्य दारावरील खंदकापलीकडचा संरक्षक बुरूज. ५. खंदकाच्या पुढे असलेला कडा.

रेवणे क्रि. कंठणे; व्यतीत करणे.

रेवणे अक्रि. १. (भिंत, खांब, विहीर इ.) खाली दबणे; खाली जाणे; आरणे; रेलणे. २.चिखलात अडकून पडणे; रुपणे; रुतणे. ३.(नदी, विहीर, खड्डा इ.) भरणे; माती-गाळ इ. नी भरून येणे. ४. (दुखणे, कैफ, भूत इ.)अंगांत शिरून, भिनून राहणे, मुरणे. ५. एखाद्या ठिकाणी अगर एखाद्या धंद्यात पुष्कळ काळ राहणे किंवा मुरणे; मुरब्बी बनणे. सक्रि.(विहीर, खाच इ.) भरून काढणे.

रेवती स्त्री. १. सत्ताविसावे नक्षत्र. २. बलरामाची बायको. ३.चमेलीच्या जातीचे एक झाड. ४. अधेली; अर्धा रुपया. (बलरामास राम म्हणतात व रुपयाचे सांकेतिक नाव राम असल्याने बलरामाच्या पत्नीचे नाव हे अधेलीकरिता सांकेतिक नाव झाले.)

रेवनी पु. राजस्व अधिकारी. (झाडी) [इं. रेव्हन्यू]

रेवलिआ स्त्री. रेव. [दे.]

रेवले वि. रुतण्याजोगे.

रे(रें)वसळ वि. रेवाळ; रेताड; रेवट; रेती असलेले (स्थळ, जागा).

रेवंदसार पहा : **रेवाचिनीचा शिरा**

रेवा पु. १. पहा : **रेव** २. धुके; खार.

रेवा स्त्री. १. नर्मदा नदी. २. पृथ्वी. [सं.]

रेवा पु. (संगीत)एक राग. गानसमय सायंकाल.

रेवाचिनी स्त्री. एक औषधी वनस्पती. चीन, हिमालय, पूर्वबंगाल व सिलोन येथील जंगलात रेवाचिनीची (गांबोजची) झाडे आढळतात. हे झाड ६-७ हात उंच असते. औषधात वापर. [सं.रेचनी]

रेवाचिनीचा शिरा रेवाचिनीतील राळमय पिवळे द्रव्य. याचा रेचक म्हणून, तसेच रंग व शिल्प यामध्ये उपयोग होतो.

रेवाडी जोडा मारवाडी साधा जोडा.

रेवाळ-ळे न. १.वाळू; रेती; धान्यातील कचकच; धान्य पाखडून, चाळून राहिलेली रेव, गदळ इ. २. मुरूम; वाळूयुक्त जागा. ३. दाट धुके; विरळ ढग.

रेवाळ वि. माती, रेती, कचकच, वाळू इ. मिसळलेले; रेताड; रेतीची.

रेवाळणे क्रि. वाळूत रुतणे.

रेवाळे न. बिनवासाची भाताची एक जात.

रेवीपे(टे)वी क्रिवि. काही इकडे तिकडे सांडले, काही गुराने खाल्ले, काही पोरांनी उडविले, काही कुजले, काही गेले इ. प्रकारांच्या अव्यवस्थेमुळे नासधूस होऊन. [रेव द्वि.किंवा रेव + पेव]

रेश-शा स्त्री. पहा : **रेषा**

रेशनिंग न. आहाराला आवश्यक धान्ये व तेल यांचा ठरवून दिलेल्या भावाने पुरवठा करण्यासाठी सरकारने अमलात आणलेली योजना.

रेशमाचा किडा ज्याच्यापासून रेशीम मिळते तो किडा.

रेशमी वि. १. रेशमाचे. २.(ल.) रेशमासारखे मऊ; खरखरीत नव्हे असे. ३. सौम्य; गरीब.

रेशमी गज जमीन मापण्याचा गज. ह्यांची लांबी १८ तसू होती.

रेशमी मुसलमान मुसलमान योद्ध्यांची एक जात. ह्यांच्या दंडाला रेशमी गंडा बांधून शत्रूवर सोडले जात असे.

रेशीम न. तुतीच्या किंवा एरंडाच्या पानांवर उपजीविका करणाऱ्या एका जातीच्या किड्यापासून निघणारा, वस्त्रे इ.करण्याच्या उपयोगी असा धागा, दोरा, कृमिज तंतू. [फा.रेशम् अब्रीशम]

रेशीमगाठ स्त्री. १.(पती-पत्नी, जीवात्मा व देह इ. मधील) कधीही नष्ट न होणारा संबंध; जन्माची गाठ. २. सुखकर बंधन.

रेशीमदाल सूत्रतंतू; रेशमाचे तंतू; रेशमी धागे.

रेषा स्त्री. १. रेघ; रेखा; ओळ. २.तंतू. ३.आंब्यातील धसकटे किंवा तंतुमय भाग. [सं.] (वा.) ० **उम(प)टणे** – अकल्पित रीतीने भाग्य उदयास येणे. ० **ओ(का)दून देणे** – एखाद्याच्या वागणुकीला मर्यादा घालून देणे. ० **काढणे** – जंगलाच्या हद्दीवर पन्नास फूट जागा जाळणे.

रेषावृत्त पहा : **रेखा** ६

रेषे पु. चिखल. (को.)

रेस पु. १. आण्याचा पंचविसावा भाग; रुपयाचा ४०० वा भाग. २.एक तांब्याचे एकपंचविसांश आणा किमतीचे पोर्तुगीज नाणे.[पोर्तु.रीस]

रेस स्त्री. घोड्यांची शर्यत; घोडदौडीचा जुगार. [इं.]

रेसभर वि. थोडासा; अत्यल्प; यत्किंचित. (बहुधा निषेधार्थी प्रयोग).

रेसिडेंट पु. संस्थानिकांच्या दरबारी असणारा इंग्रज सरकारचा प्रतिनिधी.

रेसिडेंसी स्त्री. संस्थानातील इंग्रज वकिलात. [इं.]

रेहकणे अक्रि. पहा : **रेकणे**

रेहकी, रेंगी स्त्री. बैलगाडी. (ना.)

रेहटणे अक्रि. १.रेटणे; तडस लागेपर्यंत खाणे. (ना.) २.चोप देणे.

रेहटा पु. विष्ठेचा पोह; शेणाचा गोळा; फोतका. (व.)

रेहदेह पु. हलगर्जीपणा; निष्काळजीपणा; हेळसांड.

रेहपट, रहे(ह्या)पट स्त्री. थप्पड; जोराची चापट. (ना., व.)

रेहूस साहूस सर्दीमुळे घोड्याला होणारा रोग. यामुळे घोडा जमिनीवर निजला तर उठू शकत नाही. – अश्वप २.३००.

रेहेकला पु. सुरुंग उडविण्याचे हत्यार. – पेशवेकालीन महाराष्ट्र ५३४.

रेहेका पु. सजविलेली बैलगाडी. [हिं. रहकला]

रेहेटना सक्रि. घासणे; मालीश करणे. (झाडी)

रेहेपाडा पु. ओरखडा. (झाडी)

रेळरेट वि. भरपूर; चिक्कार.

रेळा पु. (रंग, साखर, मीठ इ.चा) ओघळ; पाझर. (को.)

रेंगडी स्त्री. एखाद्या अवयवाला येणारा पेटका. (क्रि.वळणे)

रेंगणीया स्त्री. मिरचीची एक जात. या जातीची मिरची मोठी असते. – कृषि ५६८.

रेंगणे अक्रि. १. रांगणे; सरपटणे. २. एखादे काम आळसाने, मंद गतीने अगर अनुत्साहाने करीत राहणे; चुकारपणा करणे.[सं.रिंख् रिंग्]

रेंगरेंग स्त्री. किरकिर; पिरपिर.(ना.) पहा : **रिंगरिंग**

रेंगसणे अक्रि. बोचणे.

रेंगळ स्त्री. रेलचेल; चंगळ; वैपुल्य; समृद्धी.

रेंग(गा,घ)ळणे अक्रि. १.आळसावणे; आळस भरणे; आळसाने अगर मंद गतीने काम करीत राहणे; मागे पडणे, राहणे. ३. अतिशय कष्ट केल्याने दमणे.

रेंगळा न. चांभाराचे एक हत्यार. (कु.)

रेंगापोंगा पु. दुर्बळ लोकांचा समूह.

रेंगी पहा : **रिंगी**

रेंगोना पु. रडगाणे. (झाडी)

रेंघळणे अक्रि.१.पहा : **रेंग(गा,घ)ळणे**. २. आजारात खितपत पडणे; कुचमणे. ३.घसरत चालणे; (उतारावरून) घसरणे. ४. नाना प्रकारची विघ्ने येऊन (काम) रखडणे. ५. प्रयत्न निष्फळ झाल्याने एखाद्या कामात व्यत्यय येणे.

रेंजणी वि. सदोदित दुखणाईत; नेहमी आजारी. (गो.)

रेंजणे सक्रि. पूज्यभाव, आदर बाळगणे; भिणे; धाक बाळगणे. (निषेधार्थी प्रयोग).

रेंजणेवचे क्रि. सदोदित आजार लागणे. (गो.)

रेंजर पु. जंगलखात्याचा फिरता अधिकारी. [इं.]

रेंजी स्त्री. खरूज. (गो.)

रेंड पु. (विटीदांडूचा खेळ) विटीचे एक टोक हातात धरून दुसरे जमिनीकडे करून ती खाली सोडून जमिनीस लागण्यापूर्वी वरच्यावर तिच्यावर टोला मारून ती फेकणे; कोठे कोठे लेंड अगर चिठ्ठी म्हणतात. - मखेपु १८.

रेंडमुंड वि. आडमुठा; विचार न करणारा; आडदांड. (व.)

रेंद, रेंदग(गू)ड, रेंद(दा)ड, रेंदा स्त्री. पु. न. १. घर, गुरांचा गोठा इ.तील केरकचरा किंवा गदळ. २. चिखल; घाण. ३. तेल, तूप इ.च्या बारदानातील गाळ; पाण्यात जमलेला मातीचा अंश; मातीमुळे गढूळ झालेले पाणी. ४. व्रण, गळू इ. तील दाट पू, रक्त. ५. शेणाची रास. ६. पाघळलेला गूळ. ७. राड; खातेरे. (वा.) **रेंदा, रेंदाड, रेंदगड, रेंदगूड काढणे** - झोडपून काढणे; रक्त निघेपर्यंत मारणे.

रेंद वि. आळशी; मंद; सुस्त;जड.

रेंद न. १. ताडीमाडीचा मक्ता. २. दारूचा गुत्ता. ३. दारू गाळण्याची भट्टी; पहा : **रेंदसरा** (राजा., कु.)

रेंद(दे)करी पु. १.मक्तेदार. २. दारू, ताडी विकणारे लोक.

रेंदवणी न. गढूळ, गदळ पाणी.

रेंदसरा पु. १. पाणी पाझरून येण्यासाठी किंवा पडण्यासाठी ठेवलेले भांडे. २. दारू गाळण्याची भट्टी.

रेंदा पु. १. दारू गाळण्यासाठी आंबविलेला, कुजत घातलेला पदार्थ. २. पितळ करताना मिसळण्याचा पदार्थ. ३. सोन्यात घालण्याचे हीन.

रेंदाड, रेंदग(गू)ड वि. चिखलाने भरलेले; घाण किंवा धूळमिश्रित (पाणी, तेल, तूप, रक्त इ.).

रेंदाव(वि)णे अक्रि.१. (पाणी इ.) गढूळ, घाण होणे. २. (गळू इ.मध्ये) पू साचणे; पुवाने डबडबणे; पू गळण्यासारखे बरबरीत होणे. सक्रि. (पाणी इ.) गढूळ करणे; घाण करणे.

रेंदे न. अबकारी कर; दारूगाळणीवरील सरकारी कर.

रेंदेर पु. भंडारी; माडी,ताडी इ. काढणारी जात. (गो.)

रेंद्या वि. रबरबीत.

रेंप, रेप १. मोठा दगड; शिळा; खडक. २.(ल.) अगडबंब माणूस; राक्षसी माणूस, पशू इ.

रेंबट स्त्री. रमत गमत, सुस्तपणे काम करणे; दीर्घसूत्रीपणा; चेंगटपणा. [प्रा.]

रें(रों)बटणे सक्रि. १. खुपसणे; शिरकावणे. (राजा.) २. जोराने दाबणे, चेपणे.

रेंबट्या-टी वि. मंदपणे किंवा सुस्तपणे काम करणारा; चेंगट; दीर्घसूत्री; भटक्या; आळशी.

रॅकेट १.टेनिस, बॅडमिंटन इ. खेळांत फूल, बॉल मारण्याचे साधन. २. आरडाओरड; कल्लोळ. ३. अयोग्य मार्गाने पैसे मिळविण्याचा धंदा; असा धंदा करणारी टोळी. [इं.]

रैव(वा)स स्त्री. १. रिवाज; रीत. २. समारंभ. [फा. रवेश]

रो पु. रोह; मोड आलेले भात. - चित्रकृषि २.७. [सं. रुह]

रोऊळ स्त्री. शेवाळी. (हेट.)

रोक स्त्री. आडकाठी; अडथळा. (झाडी) [हिं.]

रोकड स्त्री. १.नाणे; रोख पैसा; रोख रक्कम. २. सोने, चांदी, रत्ने इ. ऐवज. [सं.रोक; हिं.]

रोकड कसर बट्टा; छापील किमतीमध्ये सूट; (इं.) डिस्काउंट.

रोकड बाजार कंपनीचे शेअर्स बाजारात विकले जाऊन तिचे जमते ते भांडवल.

रोकडवही स्त्री. कीर्द वही.

रोकडा-ड वि. १. प्रत्यक्ष सोने नाणे इ. रूपात असलेला (ऐवज); रोख (रक्कम); नगदी. २.(ल.) रोखठोक; स्पष्ट; प्रत्यक्ष; मूर्तिमंत; साक्षात; धडधडीत (शिवी, प्रत्युत्तर इ.). ३. ताबडतोबीचा; लगोलगीचा. क्रिवि. आता; इतक्यातच; सध्या; या घटकेला.

रोकडी हुंडी दर्शनी हुंडी; दिल्याबरोबर पैसे मिळतील अशी हुंडी.

रोकड्या पु. सावकाराचा किंवा सराफाचा खजिनदार; प्रवासात सराफाचे पैसे बाळगणारा.

रोकण न. हरकत; अडथळा; रोखण. [गु.]

रोकवणी न. विटाळ झाला असता एकवार स्नान करून पुन्हा शुद्धीसाठी डोक्यावरून घ्यावयाचे पाणी.

रोकथाम स्त्री. प्रतिबंधक उपाय; अडथळा. (झाडी)

रोख वि.१.रोकड, नगदी रुपये, होन इ. (ऐवज). २.तयार; प्रत्यक्ष; उधार न राखता प्रत्यक्ष दिलेला. ३.(ल.) रोखठोक; रोकडा; तरबेज (उत्तर, जबाब इ.). [सं. रोक]

रोख पु.१.झोक; वळण; नेम; दिशा; कल; भार; ध्येय; बाक.

२. कटाक्ष; रागावून लावलेली टक. ३.(ल.) धोरण; उद्देश; हेतू; बेत; मन. ४.(कुस्ती) डाव करणाऱ्याचा डाव चालू न देणे ही क्रिया. [फा.]

रोखठोक वि. १. जिन्नस विकत घेतला तेव्हाच देण्याचा, दिलेला; उधारीचा नसलेला. २. (ल.) पहा : **रोख** ३
क्रिवि. निर्भीडपणाचे; आत-बाहेर न ठेवता.

रोखण-णी स्त्री. १. रंधा; लाकूड तासून सपाट करण्याचे हत्यार. २. रंध्याने लाकूड तासणे; रंधणे; रोखणे. [हिं.]

रोखणे सक्रि. १. दाखविणे; नेम धरणे; बंदूक, तोफ इ. चा विवक्षित लक्ष्याकडे रोख करणे. २. सपाट करणे; समपातळीत आणणे; रोखणीने साफ करणे.

रोखणे सक्रि.१. एकसारखे लक्ष्य लावून पाहणे; न्याहाळणे; निरीक्षणे; हेतू धरून टक लावून पाहणे. २. नेम धरणे; निशाण धरणे; नेम लावणे.

रोखणे सक्रि. १. अडविणे; थांबविणे; पुढे येऊ न देणे; प्रतिरोध करणे; ग्रासणे. २. व्यापणे; ताब्यात घेणे; घेरणे. [हिं.;सं. रुद्ध]

रोखपाल न.१.एखाद्या दुकानात वस्तू, जिन्नस इ. विकल्यावर येणाऱ्या पैशांची जबाबदारी असणारी व्यक्ती. २. बँकेतील बचत ठेवी, चेक/धनादेश जमा करणे इ. व्यवहार सांभाळणारा पदाधिकारी. ३. रोख रक्कम सांभाळण्याची व आर्थिक व्यवहारांची नोंद ठेवण्याची जबाबदारी असणारा किंवा त्या कामांसाठी नेमलेला मनुष्य. रोकडिया; कोशपाल; खजांची; खजिनदार; (इं.)कॅशिअर.

रोख रक्कम (जमाखर्च) ज्या रकमेचा ऐवज शिलकेत प्रत्यक्ष पडतो ती रक्कम.

रोखा पु.१. कर्जखत; कर्ज घेतल्याचा लेख. २. दस्तऐवज; करारनामा; करारपत्र; लेख; कागद; पत्र. ३. आज्ञापत्र; साऱ्याचा अथवा माल पुरवठ्याचा सरकारी हुकूम; करारमाफक तगादा व वरात काढणे; मागणीपत्र; ताकीदपत्र; जरुरीचा हुकूम. ४. हुंडी. [अर.रुक्आ]

रोखारोखी स्त्री. १. पहा : **रोखी** १. २. समक्ष भेट, बोलाचाल.
क्रिवि. वि. पहा : **रोखठोक** [रोख द्वि.]

रोखी स्त्री. १.ताबडतोब पैसे देऊन किंवा घेऊन, उधार न ठेवता केलेला व्यवहार. २. नाणे; पैसा; नगदी (पैशांचा व्यवहार या अर्थी). (ह्या शब्दाचा रोखीचा, रोखीने इ. प्रत्ययान्त रूपांतच विशेष उपयोग होतो.)

रोखीवाले वि. रोखीने; रोख पैसे देऊन. (अहि.)

रोखेबाजार पु. रोखे व भाव यांची देवघेव पद्धतशीर रीतीने होण्यासाठी मोठमोठ्या शहरांतून त्यांचे विशिष्ट बाजार निर्माण होतात व ज्यामध्ये ऋणलेखांची खरेदी-विक्री चालते अशा बाजारविषयक संस्था; (इं.) स्टॉक एक्सचेंज.- काळेकृत व्यापारी उलाढाली.

रोग पु. १. राग. २. रंग. (खा., भिल्ली)

रोग पु.१.मोठे दुखणे; आजार; प्रकृतीतील बिघाड, विकृती. २. शरीरप्रकृतीतील बिघाडाचे कारण. ३.(फळाफुलांतील) नासका अगर किडका भाग. ४.विकृतिकारक पदार्थ; रोगकारक वस्तू, अन्न इ. ५. दुसऱ्याचे चांगले पाहून होणारे दुःख किंवा त्रास; ज्यामुळे मन दुखावते असा (चिंता, मत्सर इ.) रोग. ६. रोगट, तिरस्करणीय, घाणेरडा, कुजकट पशू किंवा मनुष्य.[सं.रुज् = रोग होणे] (वा.)
० मोडनं - नष्ट करणे; रस्त्यातून हटवणे. (अहि.)

रोगट वि. १.रोगाने किंवा दुखण्याने पछाडलेला; आजारी. २.खुरटलेला; मुरडलेला; रोग झालेला (भाजीपाला, फळे इ.).

रोगटणे अक्रि. १.रोग होणे; विकृती जडणे; आजारी पडणे. २.(झाड, वेल, फळ, फूल इ.) खुरटणे; मुरडणे; कीड लागणे.

रोगड्या-ळ्या वि. आजारी; रोगाने झिजलेला; अशक्त; नाजूक प्रकृतीचा.

रोगण, रोग(गा)न न. १.तेलिया रंग; तेल, राळ, मेण इ.चे चिकट मिश्रण; (इं.) व्हार्निश. हे लाकडास लावल्याने लाकूड पाण्याने भिजत नाही व तकतकीत दिसते. २. वरील चिकट मिश्रणाचे माखण; तेलिया रंगाचा हात; व्हार्निशचे सारवण.३.चरबी; तेल; तुपासारखा पदार्थ. हा पदार्थ इराणात सर्वत्र मिळतो. याचा उपयोग भाताबरोबर व रोटीबरोबर खाण्यासाठी करतात. - सारसंग्रह २.२३२.[फा.रौघन्]

रोगणे, रोगणणे अक्रि. रोगाने झिजणे; क्षीण होणे; रोड होणे.

रोगमल्ल पु. सदा रोगी; रोग व दुखणी यांनी जर्जर झालेला मनुष्य.

रोगमसाला वि. (तिरस्कारार्थी उपयोग) मरतुकडा. (ना.) पहा : **रोगमल्ल**

रोगराई स्त्री. १. लहान-मोठे रोग; दुखणी-पाखणी. २. वाईट गुण. ३.एखाद्या वस्तूचे उपद्रवकारक, विकृती उत्पन्न करणारे गुण.

रोगरे न. (सोनारी) वेळा पिळण्याचा चिमटा.

रोगवणी न. १. रोगाची बीजे बरोबर वाहून नेऊन कोठा स्वच्छ करणारे रोग्याच्या पोटातून बाहेर पडणारे पाणी, मल, ओकारी इ. २. भाजीपाल्यांतील शिजवून किंवा आंबवून काढलेला अहितकर रस, पाणी. ३. पिकावर रोग आणणारा पाऊस; आश्लेषा नक्षत्राचा पाऊस.

रोगवारे न. रोगराई; क्षुल्लक दुखणे.

रोगी, रोगिया, रोगिष्ट-ष्ठ वि.१. ज्याला दमा, कुष्ट, मेह असा कायमचा पूर्ण बरा न होणारा रोग जडला आहे असा; आजारी; दुखणाईत. २. अहितावह; अपथ्यकर; रोगकारक.

रोगीण स्त्री. देवीची भक्तीण. या नेहमी आजारी असतात. पहा : **भावीण**

रोगेजना क्रि. आजारी पडणे; बिघडणे. (झाडी) [सं.रोग]

रोगेल-ला,रोगलेला, रोग्या वि. रोगट.

रोगो वि. आळशी. (कु.)

रोगोत न. रक्त.(भिल्ली, खा.)

रोचक न. पादेलोण.
वि. पहा : **रुचकर**

रोचकता स्त्री. आवड; गोडी.

रोचणे सक्रि. टोचणे; भोसकणे; खुपसणे.
अक्रि.शिरणे; घुसणे; रुतणे; बोचणे.

रोचन न. १.स्वाद; गोडी; रुची उत्पन्न करण्याचा गुण. २.स्वादामुळे उत्पन्न झालेला मोहकपणा, आनंद. ३.गोरोचनाचे संक्षिप्त रूप.[सं.]

रोचना स्त्री. १.रुचकरपणा; चवदारपणा; गोडी. २.रमणीयता; सुखदायित्व.

रोज न. झेंडूचे फूल. (गो.)

रोज न. (नाविक) गलबताच्या बांधकामास लागणारे प्रारंभीचे मुख्य लाकूड. ही रोज प्रत्येक गलबताला पुढे व मागे अशी दोन असतात. पुढील रोज हे मुख्य होय.

रोज पु. १. दिवस (२४ तास); अहोरात्र. २. दिवसाची मजुरी; एका दिवसाचा पगार. ३. सरकार किंवा सावकार इत्यादिकांकडील तगाददार आला असता त्याचा आपल्याकडून खोळंबा होऊन दिवस मोडल्यामुळे त्याला द्यावे लागणारे पैसे.

क्रिवि. प्रत्यही; प्रतिदिवशी; दररोज; प्रत्येक दिवसाला. [फा.रोझ]

रोजकरी पु. रोजच्या बोलीने कामावर ठेवलेला गडी.

रोजकाम न. १.दररोजचे काम. २. प्रत्येक दिवसाचे काम जिच्यात टिपून ठेवलेले असते ती वही; (इं.)डायरी.

रोजकीर्द स्त्री. १.दिनचर्या; (इं.)डायरी. २. रोजचा जमाखर्च ठेवण्याची वही; रोजखर्डा. ३. कुटुंबाच्या रोजच्या नित्य गरजा; त्यासाठी लागणारा खर्च. (क्रि. चालणे) [फा.]

रोजखरडा–खर्डा पु.व्यापाऱ्याचे रोजच्या रोख विक्रीचे कच्चे टाचण.

रोजगार पु. १.धंदा; चाकरी; नोकरी; उद्योग; पोट भरण्याचे किंवा निर्वाहाचे साधन; पैसा मिळविण्याचा उद्योग. २. कोणताही उद्योग; काम. [फा.]

रोजगुदस्त–स्ता क्रिवि. (जमाखर्चातील शब्द) काल; आदल्या दिवशी. [फा.]

रोजचा वि. नित्याचा; नेहमीचा.

रोजदार, रोज(जि)नदार पु. रोजमुऱ्याने काम करणारा; मजूर.

रोजदार पु. रमजान महिन्यात उपवास करणारा मुसलमान. (ना.)

रोजदुकू पु. रोजमुरा.(राजा., कुण.)

रोजना स्त्री. रडणे; शोक. [सं.रोदन]

रोजनामा पु. (कायदा) एखाद्या फिर्यादीचे किंवा कोर्टाचे रोजच्या कामाचे टाचण, टिपण.

रोजनिशी–नामा–नामचा पु.स्त्री. १. पहा : **रोजकीर्द** २. २. रोजची हकिकत लिहिण्याची वही; दैनंदिनी. [फा.]

रोजम(मा,मु)रा,रोझमरह पु. मजुरी; मुशाहिरा; दिवसाचे वेतन, पगार.

रोजमरी स्त्री. वासाच्या पानांचे झाड. [इं.]

रोजमेळ पु. १. रोजच्या जमेचा व खर्चाचा मेळ. २. पहा : **रोजकीर्द**

रोजयीना पु.धावा; जप; आळवणी.

रोजवडा (कारकून लोकांत रूढ) एका दिवसाचा जमाखर्च; हिशेब.

रोजवारी स्त्री. रोजच्या कामाच्या हिशेबाचे पुस्तक. (माहेवारी, सालवारी इ. प्रमाणे हा शब्द सारावसुली खात्यात रूढ आहे.)

रोजंदारी,रोज(जि)नदारी स्त्री. रोजची मजुरी; रोजच्या रोज केलेल्या कामाबद्दल दिले जाणारे वेतन.

रोजा पु. मुसलमानांतला उपवास; निरशन. रमजान महिन्यात मुसलमान लोक हे उपवास करतात. या उपवासात सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तानंतर जेवणाची मुभा असते. [फा.]

रोजारोजी स्त्री. रोजमरा; हातावरचे पोट; रोज मिळवून रोज खर्च करणे.

क्रिवि. मिळवावे आणि खावे अशा रीतीने. [रोज द्वि.]

रोजि(जी)ना पु. रोजची मजुरी; मुशारा.

वि. क्रिवि. दररोज; प्रत्येक दिवशी. [फा.रोझीना]

रोजी स्त्री. १. कुटुंबाचा एक दिवसाचा खर्च; रोजचा खर्च. २. दिवसाचे वेतन; पगार; मजुरी. ३.(ल.) दुसऱ्याकडून रोजच्या रोज मिळणारी वस्तू; रोजचा भत्ता; रोज मिळणारे अन्न. ४. मोहरमात फकिरास केलेले दान; भिकाऱ्यास दिलेला पैसा. [फा.]

रोजी स्त्री. ग्रास; घास. (गो.)

रोजी पु. तीन वर्षे टिकणाऱ्या झाडाचा कापूस. – कृषि ८३५. (बडोदे)

रोझा–जा पु. १. समाधी मंदिर; दर्गा; थडगे. २. बाग. (औरंगाबादेजवळ रोझा नावाचे जे गाव आहे, तेथे मूळची बाग होती.) [अर. रौझा]

रोझेल स्त्री. अंबाडीची एक जात; तांबडी अंबाडी.

रोट, रोट(टि,ड)गा पु. कणकेचा भाकरीसारखा जाड व भाजलेला गोळा; जाड मोठी भाकरी, भाकर.पहा : **रोडगा.** [हिं.;फा.रोटिलो] (वा.)

० मागणे – घासदाणा मागणे (एक प्रकारचा कर).

रोटक–का पु. रोटी; भाकरी.

रोटपाट पु. पोळपाट. (खा.)

रोटपात्र न. चपाती किंवा भाकरी खाण्याची थाळी.

रोटपीर पु. पिराचा प्रसाद.

रोट–टी व्यवहार भिन्न जातीतील लोकांनी एकमेकांच्या हातचे खाणे; अन्नव्यवहार.

रोटसुटी स्त्री. भरीतरोडगा: 'बहिरव खंडेराव, रोटसुटींसाठीं देव।'– तुगा ७९१.

रोटा पु. १. पहा : **रोटी** १,२. २.अन्न. ३. पोटापाण्याची चिंता.

रोटी स्त्री. १. भाताची एक जात. २.माशाची एक जात. (झाडी)

रोटी स्त्री. १.पोळी; चपाती; मैद्याची, कणकेची भाकर. २.पाव. [दे.प्रा.रूट्टिया, रोट्टग; हिं.]

रोटी–ठी स्त्री. फुले येणारे झुडूप.

रोटी–डी वि. खेळात लबाडी करणे किंवा चिडणे. (ना.)

रोठ पु. केशर, साखर, बदाम, दूध इ. घालून केलेली रव्याची जाड पोळी.

रोठ पु. विरोध. – मनको.

रोठा–टा पु. नारळाच्या झाडाला लागणारा किडा. हा नारळाचे झाड खोडातून खराब करतो.–कृषि ७५७.

रोठा–टा,रोठी–टी, रोठी सुपारी पु.स्त्री. पिकून तयार झाल्यावर झाडावरून काढलेली सुपारी; मोठी पांढरी सुपारी.

रोठे(टे)लाट स्त्री. १.दुसऱ्याला फसविताना स्वत:च फसणे. (क.) २. अतिशयपणा; वैपुल्य; उधळेपणा.

रोठ्या वि. मूर्ख; धडधाकट परंतु मद्दड; ठोंब्या (मनुष्य).

रोड पु. मोठा रस्ता. [इं.]

रोड,रोडका–गा वि. कृश; बारीक; क्षीण; वाळलेला; शेलाटा; फाटक्या अंगाचा; रोडावलेला.[क.रोडि;सं.रूद्=रडणे–रुद्र– रुड्ड– रोड]

रोडकी स्त्री.कोकिळेच्या जातीचा एक पक्षी.

रोडगा पु. रोटगा; रोट. आठ भाग गव्हाचे पीठ व एक भाग हरभऱ्याचे पीठ घेऊन त्यात ओवा, हिंग, मीठ, तूप घालून त्याची जाड पोळी

निखाऱ्यावर भाजली म्हणजे हा रोडगा होतो.-योर १.७५.

रोडगेला वि. साधारण रोडका; जरासा काटकुळा; बारीकसा.

रोडणे, रोडावणे, रोडेणे, रोडेजणे अक्रि. रोड, कृश होणे; वाळणे; सुकून जाणे; खराब होणे. (राजा.)

रोडणे क्रि. कोरडे पडणे.

रोडणे क्रि. ठोकून बसविणे; जमिनीत पुरणे.

रोडमल्ल पु. (विनोदाने)अत्यंत कृश मनुष्य.

रोडा पु. पहा : **रक्तरोडा** (वनस्पती)

रोडा पु. भाजलेल्या विटेचा तुकडा; दगडाची कपरी. [हिं.]

रोडी स्त्री. १.विटांचे, दगडाचे तुकडे; रस्त्यासाठी खडी. २. बारीक-बारीक दगडांचा ढीग; रास; दगडधोंडे.

रोड्या, रोडा वि. (निंदेने)कृश; अशक्त; फाटक्या अंगाचा; बारीक.

रोणसो वि. रोडका; कृश. (गो.)

रोतडी वि. खोट्या पद्धतीने खेळणारा.

रोदन न. रडणे; शोक; रुदन. [सं.]

रोदा पु. आतड्याची केलेली तात; साव; तार. [फा.रूदा]

रोद्द पु. रोज: 'ती रोद्दिही हाक्काली उठीने...'-भिल्ली २७. (खा.)
[रोज; तुल; सं.रौद्र; प्रा. रोद्द = अहोरात्रीचा पहिला मुहूर्त]

रोध पु.१.विरोध; अडथळा; प्रतिबंध; अटकाव. २. विरोध; शिरकाव न होऊ देणे; भरून गेल्यामुळे बंद होणे. उदा. द्वाररोध, मार्गरोध. [सं.]

रोधणे सक्रि. १. (वाट, रस्ता) बंद करणे; अडविणे. २. विरोध; शिरकाव न होऊ देणे; भरून गेल्यामुळे बंद होणे [सं.]

रोधणे क्रि. हडकणे.

रोना पु. कागाळी; समस्या; रडगाणे. (झाडी) [हिं.]

रो(रों)प-पा न. पु. १.लहान झाड; कोवळे झाड. २. बी पेरून रुजल्यानंतर उपटून दुसरीकडे व्यवस्थित लावावयाचे रोप. ३. (ल.) पुढे मोठे होणारे आणि सध्या लहान व नुकतेच जन्मलेले किंवा उत्पन्न झालेले आशास्थान.

रोप स्त्रीं. भाताची लावणी.-चित्रकृषि २.७.

रोप पु. बाण : 'दुर्योधननृप मूर्छित केला भेदुनि उरांत रोपानें ।' -मोभीष्म ४.१. [सं.]

रोपटा-टे-डा-डे पु. १. लहान, फोफावणारे परंतु उपटून दुसरीकडे लावता येण्याजोगे (आंबा, फणस इ. चे)झाड. २.फुलझाडाचे किंवा भाजीपाल्याचे रोप; लहान झाड.

रोपटा पु. रोप तयार करण्याकरता भाजून, खणून तयार केलेली जागा.

रोपण न. १.लावणी; पेरणी. २.बीजसंभव; आरोपण; आधान. २.दूषण लावणे; आरोप करणे; दोष देणे.

रोपणे उक्रि. १.(झाड) लावणे; पेरणे; रोवणे. २. खुपसणे; खोंबसणे; घुसविणे; रोवणे.३. घुसणे; आत जाणे; शिरणे; शिरकणे.

रोपदल न. नारळ-सुपारीचे रोपे. (को.); पहा : **रोप** २

रोपमळा पु. विकण्यासाठी रोपे तयार करतात ते ठिकाण; (इं.) नर्सरी.

रोपवाटिका स्त्री. बाग; उपवन; वनोद्यान.

रोपा पु. १.(सामा.) पहा : **रोप**. २.नारळ येण्यापूर्वीचे नारळाचे कोवळे झाड. (को.)

रोपी स्त्री. रोप; सुपारीचे लहान, (सुपाऱ्या येण्यापूर्वीचे) कोवळे झाड.(को.)

रोपित न. दोषारोप. (क्रि. करणे)
वि. लावलेले; पेरलेले (बी); स्थापित. [सं.रोप]

रोपीटोपी वि. (बालभाषा) चिमुकले; लहानसे; इवलेसे.

रोपीतक न. खंजिऱ्याचा पवित्रा.-प्रश १८. [सं.]

रोब, रोआब पु. धाक; दरारा; सलाबत; रुबाब; ऐट. [अर.रूआब्]

रोम न. शरीरावरील केस; लव. [सं.]

रोमकूप, रोमरंध्र पु. न. शरीराच्या कातडीवरील फार बारीक भोक.[सं.]

रोमट न. शिमग्यातील एक खेळ. (गो.) पहा : **रोंबाट**

रोमडी स्त्री. जळू; रक्त पिणारा, चिखलात आढळणारा किडा.(अहि.)

रोमरक्षा, रोमरक्षा व्यतीपात स्त्री. अव. पु. एखाद्या कामाचा निरर्थकपणा दाखविण्याकरता हे शब्द योजतात. या शब्दाचा एकवचनी प्रयोग काही वेळा धूळ, राख, माती याप्रमाणे होतो.

रोमशांति-ती स्त्री. जननेंद्रियावरील केस काढणे. [सं.]

रोमहर्ष पहा : **रोमांच**

रोमहर्षण न. १. रोमांच उभे राहणे. २. भय, धाक दाखविणे. [सं.]

रोमहर्षवायु-यू पु. ज्यात रोमांच उभे राहून फार हसू येते असा वातविकार.

रोमंथ, रोमंथन पु. न. पहा : **रवंथ** [सं.]

रोमारोम वि. नखशिखांत.

रोमाळ वि. केसाळ; फार केस असलेला.

रोमांच, रोमाचळ पु. अतिशय आनंद, भय, प्रीती इ. विकारांच्या प्राबल्याने अंगावर उभा राहणारा काटा; अंगावरील केस (लव) ताठ उभे होणे.

रोमांचित वि. आनंदातिशयाने किंवा इतर विकृतीमुळे ज्यावर केस उभे राहिले आहेत असे (शरीर); ज्याच्या अंगावर काटा उभा राहिला आहे असा (माणूस).

रोमे न. तुंबडी; दूषित रक्त काढण्याचे साधन; रोंबे.

रोयली स्त्री. (नाविक) एक प्रकारचा लहान (गलबताचा) नांगर. याला वर उलट वळलेले पाच पाय (आकडे) असतात; लोयली. (कु.,हेट.)

रोराण न. १.घुशीचा एकदम होणारा रो रो असा मोठा आवाज. २.(ल.) गोंगाट; पोरांच्या ओरडण्याचा गलका किंवा गलबला. ३.थोड्या कारणावरून झालेले शिवीगाळ, मारहाण प्रकारचे मोठे भांडण.[ध्व.]

रोरावणे, रोरणे अक्रि. १.गुरगुरणे. २.(घुशीने) रो रो असा आवाज करणे; वारे, पाणी अतिशय वेगाने आवाज होऊन वाहणे.

रो रो अ. १.(घुशीप्रमाणे) रो रो अशा आवाजाने. २. सू सू करीत; बाणाच्या गतीमुळे होणाऱ्या आवाजाने. [ध्व.]

रोरोबाजी स्त्री. कालापव्यय. (झाडी)

रोव पु. मोड आलेले पेरण्याचे बी; रहू; रोप; नुकतेच रुजून वर आलेले बी; कोंब. [सं.रुह-रोह; दे.प्रा.रोव]

रोवण-णी स्त्री. न. पेरणे; पेरणी. (को.)

रोवण स्त्री. १. जमिनीचा मऊपणा व भुसभुशीतपणा. २.(नदीच्या, ओहोळाच्या काठाचा) जमिनीचा खच, पडझड. ३. पुष्कळ बिळे,

भोके असलेली स्थिती (जमिनीची अति लागवडीने किंवा कुळविल्याने, नांगरल्याने झालेली). (वा.) ० **घेणे** - (कोंबडीने) अंडी उबविणे. (गो.)

रोवणदिवली-दिवा-दिवी स्त्री. पु.१.प्रवासात उपयोगी, पाहिजे तेव्हा जमिनीत रोवता येणारा, लांब लोखंडी दांडा असलेला एक दिवा; ठाणवई. २.(ल.)आळशी माणूस.

रोवणी स्त्री. दिव्याचा एक प्रकार; कंदील ठेवण्याची जागा.

रो(रो)वणे सक्रि. १.(खांब, खुंटी, झाड) जमिनीत पुरणे; घट्ट बसविणे; स्थिर करणे. २.पेरणे; लावणे (बी इ.). ३.खुपसणे; खोचणे; टोचणे; शिरकावणे. ४. दाबणे; दाबून ठेवणे.

अक्रि. शिरणे; घुसणे; रुतणे; आत जाणे; टोचणे. [सं.रोपण]

रोवळणे सक्रि.(तांदूळ इ.) रोवळीत घालून धुणे.

रोवळा पु. १. मोठी रोवळी. २. एक माप; (कैली) खंडीचा एकसष्ठांश.

रोवळी स्त्री.तांदूळ, भाजी धुण्यासाठी वापरण्यात येणारी विशिष्ट बांबूची, धातूची परडी; दुरडी. [क.ओरोळगि]

रोवंत(थ)णे,रोवंथ पहा : **रवंथपणे, रवंथ**

रोवा पु. चामड्यावर नक्षी उठविण्याचे साधन.

रोवाई स्त्री. भातलावणी. (झाडी)

रोवाडू वि. आळशी; एक शिवी.(झाडी) [सं.रोहित]

रोशणाई स्त्री. १.(दिव्यांचा) लखलखाट; चकचकाट. २.असंख्य दिवे लावून सण करणे; दीपोत्सव; दिवाळी. ३.(ल.) आनंद; उत्साह; रमणीयता; शोभा (एखाद्या स्थळाची, प्रसंगाची). ४.आरास; शोभिवंत करणे; शृंगारणे.

रोशन पु. प्रकाश.

वि. १.विशद; स्पष्ट; श्रुत. (क्रि.करणे) २. लखलखीत; सुरेख. [फा.रौशन]

रोशनदान पु. न.झरोका; साणे.

रोशननाईक पु. मशालजी.

रोशनशुद्ध वि. माहीत झालेला; ज्ञात.

रोशनी स्त्री. उजेड. पहा : **रोशणाई**

रोशे, रोशेल गवत न. एक प्रकारचे गवत. याचे तेल काढतात.[सं.रोहित]

रोशेल, रोषा पु. न. रोशे गवतापासून काढलेले औषधी तेल. (वातविकारावर उपयोगी).

रोष पु.राग; रुसवा; क्रोध; नाखुशी; संताप. [सं.]

रोषणाई ना. चकचकाट; लखलखाट; दीपोत्सव.

रोषणे न. अव. पहारा; रोखणी; नजर ठेवणे.

रोस पु. आमटी.(गो.)

रोसडनं क्रि. धावून जाणे; भुंकणे; खेकसणे; ओरडणे. (अहि.)

रोह पु. रोव; रहू; कोंब; मोड; अंकुर; मोड आलेले धान्य. [सं.रुह]

रोह पु. हरीण; रोही.

रोह पु. आरंभ; वाढ: 'आणि वाढे जव मोहो । तव तव विषइं रोहो ।'- ज्ञा १६.३६८. [सं.]

रोहक न. खटाई; खरड; पिठ्ठा; हड्डी नरम होणे. (व.)

रोहक पु. भूत; ब्रह्मराक्षस. [सं.]

रोह(हं)क पु. रोख; मनाचा कल; प्रवृत्ती.

रोहकणे सक्रि. १. रोखणे; धरणे; अडविणे; थांबविणे. २. व्यापणे; पछाडणे; वेढणे. [सं.रोधन; प्रा.रोहण]

रोहका पु. रवंथ. (व.,ना.)

रोह(हि)टी स्त्री. उगवते धान्य; धान्य पेरल्यानंतर प्रथम दिसणारा अंकुरांचा समुदाय.

रोह(हि)डा पु. १. एक औषधी झाड; रक्त-रोहिडा; मंजिष्ठा. २. एक किल्ला; विचित्रगड. [सं.रोहित]

रोहपोह पु. उगवणी; वसुली; जमवाजमव. [सं.रुह-रोह.द्रि]

रोहंत,रोहमंत पु.स्त्री. रवंथ; चघळणे. [सं.रोमंथ]

रोहिण स्त्री. पु. मुंग्यांचे वारूळ. - ख्रिपु. [सं.रोहण]

रोहिणी स्त्री. १. सत्तावीस नक्षत्रांपैकी चवथे नक्षत्र.२. नऊ वर्षांची कुमारिका. ३. वीज. ४. रोही जातीची हरिणी. ५. मृगजळ. ६.(संगीत) एकोणिसाव्या श्रुतीचे नाव. ७. शुद्ध रक्त वाहून नेणारी रक्तवाहिनी. हिला चुकीने धमनी म्हणतात. ८. रोहीण; एक वृक्षविशेष; रक्तरोहिडा; मंजिष्ठा. या झाडाच्या सालींचा रंगासाठी उपयोग होतो. ९. बलारामाची आई. [सं.]

रोहिणी पु. एक प्रकारचे लोह; पोलाद. -प्रश २२. [सं.]

रोहिणीरोग पु. चाळपुळीचा रोग.

रोहिणीशकटभेद पु. रोहिणीच्या दोन ताऱ्यांतून शनी हा ग्रह जाणे. हा योग अत्यंत अनिष्ट व अनर्थकारक मानतात. [सं.]

रोहित पु. लांब मान व पाय असलेला लाल-गुलाबी पिसे असणारा, बाकदार चोचीचा पक्षी.

रोहित्र न. बदलत्या दिशेच्या विद्युतप्रवाहाचा दाब कमी करण्याचे किंवा वाढविण्याचे उपकरण; (इं.) ट्रान्सफॉर्मर.

रोही स्त्री. १.गोड्या पाण्यातील एक मासा. २.काळवीट; नीलगाय. हा आकाराने बैलाएवढा, रंगाने काळसर पांढरा असतो. [सं.रोहित;प्रा.रोहिअ]

रोहे पहा : **रोही** २

रोहे न. अगदी कोवळे झाड; रोप. (को.)

रोहो पु. १. आरंभ; सुरुवात. २. उत्पत्ती; उपक्रम. ३. वाढ; वृद्धी; दृढता. ४. अंकुर. [सं.रूह]

रोहोकना पु. घासण्याची पट्टी. (झाडी) [सं.रोधन]

रोहोपोहो पु. १. व्यवहार; दळणवळण; ये-जा; घसट. २. परिचय; ओळख.

रोळणे सक्रि. रेलणे; कल देणे.

रोळा पु.१.वृष्टी. २. सडा. ३. समुदाय. [तुल.इं.रोल]

रोंगन पु. तबल्याची शाई. (झाडी) [फा. रोधन]

रोंगा वि.१.रोडका; कृश अंगाचा; रोगट; आजारी दिसणारा. २.सुकट व आंबट चेहऱ्याचा; रुसलेल्या चेहऱ्याचा.

रोंगाळणे अक्रि. १. रोगट असणे; आजाराने अशक्त होणे. २.रेंगाळणे; झिजणे.

रोंगोपाग न. (कोळी) बारीक मासे पकडण्याचे,घनपागहून लहान जाळे. (राजा.)

रोंघावणे अक्रि. रेंगाळणे; हळूहळू चालणे.(व.)

रोंडनारो वि. तोडणारा. (खा.,भि.)

रोंडी स्त्री. रडी; चिडणे. (ना.) पहा: **रडी**

रोंबटणे, रोमटणे सक्रि. खुपसणे; (डोळा, मातीचा गोळा, पोट इत्यादिकांमध्ये बोट, लाकूड, कट्यार इ.) भोसकणे; जोराने दाबून आत शिरकावणे; आत चेपणे, दाबणे. (राजा.)

रोंबाट न. १.शिमग्यातील खेळकऱ्यांचा जमाव (आरडाओरड करीत जाणारा); घोळका; शिमग्यातील नृत्य. (कु.) २.(ल.) गोंधळ; गडबड. पहा : **रोंभा**

रोंबे(बी) न. स्त्री. दूषित रक्त काढण्याची तुंबडी. (को.)

रोंभा,रोंभाडा पु. १.घोटाळा; पसारा; लिंगाड. (ना., व.) २.आक्रोश; ओरडणे. ३. घोटाळा; वांधा.

राँबा पु.(सुतारकाम) सामता; टोपण; छिद्र पाडण्याचे हत्यार.

रौका-ळा पु. रवका; जखमेवरील खपली; खबळ; पापडी.

रौखे पु. अव. पैसा.

रौद्र पु. १.राग; क्रोध; कोप. २. नवरसांपैकी एक रस.
वि.१. रुद्रासंबंधी; शिवाचा; शंकराचा. २. भयंकर; अत्यंत भीतिदायक; उग्र; अक्राळविक्राळ ३. तामसी; रागीट; रागावणारा.

रौद्री वि.स्त्री. (संगीत) आठव्या श्रुतीचे नाव.

रौद्री पिंडीनृत्य त्रिशुळाच्या आकृतीत उभे राहून नर्तकांनी केलेले नृत्य.

रौनक स्त्री. १.सौंदर्य; शोभा. २.(ल.) महत्त्व; उच्च दर्जा. [फा.]

रौप्य न. रुपे; चांदी.
वि. चांदीचे; रुप्याचे. [सं.]

रौप्यमहोत्सव पहा : **रजतमहोत्सव**

रौप्यशृंखला स्त्री. १. रुप्याची साखळी. २. (ल.) सरकारी पगार, नोकरी.

रौरव पु. एकवीस महानरकांतील एक महानरक. पहा : **रवरव** [सं.]

रौक्ष्य न. रुक्षत्व; काठिण्य; कोरडेपणा; कठोरपणा; तापटपणा.

रौंड न. रुंड; धड; कबंध. [सं.रुंड]

रौंदळी स्त्री. रोवलेला दिवा; रोवणदिवा. (व.)

रौंदळी स्त्री. पातळ चिखल.

ऱ्याऱ्या स्त्री.पु. १. लहान मुलांचे रडणे; ट्यां ट्यां. २.(ल.) हताश होऊन, भिऊन मुलाप्रमाणे वागणे; रे रे करणे. [ध्व.]

ऱ्हद पु. डोह; नदीतील खोल पाण्याची जागा. [सं.]

ऱ्हस्व वि. १.आखूड; कमी लांबीचा. २.गिड्डा; ठेंगणा. [सं.]

ऱ्हस्व दृष्टि-ष्टी लांबच्या गोष्टी स्पष्ट न दिसण्याचा दृष्टिदोष.

ऱ्हस्व स्वर ज्याच्या उच्चारणास एकमात्रात्मक काळ लागतो असा (अ,इ,उ,ऋ,ऌ) स्वर.

ऱ्हास पु. नाश; उतरती कळा. [सं.]

ऱ्ही स्त्री. लज्जा; लाज. [सं.]

■■■



ल मराठी वर्णमालेतील त्रेचाळिसावा वर्ण व अठ्ठाविसावे व्यंजन.

लई–ई वि. पुष्कळ; मोठ्या संख्येचा,परिमाणाचा.(कुण.) पहा : **लय**

लई स्त्री. चिकी; चिकटवण्यासाठी मैदा, बारीक पीठ इ. ची केलेली खळ.

लक–ख वि. लक्ष (संख्या). [अर.लक; सं. लक्ष]

लककण–कन–कर–दिशी क्रिवि. १. चक्ककण; झककण.२. झटक्यात; क्षणात.

लकचे अक्रि. तोल जाणे. (गो.)

लकट(डं)णे उक्रि.१.(प्र.) लगटणे.२. लोटणे; ढकलणे.[सं.लग+ट]

लकड स्त्री. १. अतिशय उंच वाढलेले माडाच्या जातीचे झाड. २. शरीराने कृश, सोटासारखा उंच असलेला मनुष्य. (को.) [सं. लगुड]

लकडकोट पु. मोठमोठी लाकडे जमिनीत उभी पुरून भिंताडासारखी उभारून केलेले आवार; लाकडाची तटबंदी; मेढेकोट. [हिं. लकडकूट]

लकडखाना पु. १. इमारतीची किंवा जळाऊ लाकडे ठेवण्याची घरातील स्वतंत्र जागा. २. लाकडाची वखार. [हिं. लकडखानह्]

लकडदिवी वि. रोडका; लुकडा; उंच व कृश.

लकडवाला पु. इमारतीची किंवा जळाऊ लाकडे विकणारा. [हिं.]

लकडा पु.१. मोठी काठी. २. वाळलेला, रोड झालेला मनुष्य. ३. वाळलेला व लाकडासारखा कडकडीत झालेला पदार्थ (कपडा, भाकरी इ.).

लकडी स्त्री. १. लाकडाप्रमाणे घट्ट होईपर्यंत कढवलेला उसाचा रस; लाकडासारखा कडक झालेला गुळाचा पाक; गुळाचा एक प्रकार. २. लाकूड; काठी; जोंधळ्याचा एक प्रकार. ३. वेताची, बांबूची वगैरे काठी. ४. बांबूची काठी हातात घेऊन दोन प्रतिस्पर्ध्यांनी खेळण्याचा मारामारीचा खेळ. [हिं.] (वा.) **लकडीवाचून मकडी वठ(ळ)त नाही** – माकडचेष्टा इत्यादी सौम्य उपायांनी बंद होत नाहीत, त्याला मारच पाहिजे.

लकडी पेंढी होळीसाठी मुलांनी घरोघर फिरून मागितलेली लाकडे, ओंडके व गवत इ. (को.)

लकड्या पहा : **लकडा** २

लकणे क्रि. डुलक्या घेणे : 'कोंबडे जागरण झालेल्या पोरासारखे लकू लागते.' – शेलूक १०.

लकतुवाय न. प्रेमळपणा; प्रेम. (गो.)

लकपक वि. चकपक; चापचोप; ठाकठीक; नीटनेटका; छानदार. [लक्ष् द्वि.]

लकब स्त्री. १. धाटणी; पद्धत; शैली; ढब. २. वाईट सवय, रीत; दुर्गुण; खोड. ३. आसक्ती; व्यसन. [अर. लकब् =टोपणनाव]

लकलक वि. क्रिवि. चकचकीत; झणझणीत; लक्क (वीज, झिलईची भांडी इ.प्रमाणे); दिपल्याप्रमाणे. (क्रि. करणे, होणे.) [सं. लष्]

लकलकणे अक्रि. पोटात भुकेने कालवाकालव होणे.

लकवा पु. वातरोग; अर्धांगवायू.

लका–क्का पु. कबुतराची एक जात. याची दूम नेहमी उभारलेली व पसरलेली असते, मानेचा झोंक पाठीकडे असतो. – मपु ३, पृ. ६८. [अर. लक्का]

लकाकणी स्त्री. चकाकणी; चमकणी; झळकणी.

लकाकणे अक्रि. अतिशय चमकणे; लखलख करणे; झळकणे.

लकाकी स्त्री. चकचकी; चकाकी; पराकाष्ठेची रोषणाई, तेज.

लकार–च्या, लकारविल्हा, लकारविल्ह्यातला वि. (लबाड, लुच्चा इ. शब्दांचा 'ल' ने आरंभ होतो यावरून सांकेतिक) लबाड; लफंगा; लुच्चा.

लकारी स्त्री. (सांकेतिक) लबाडी;लुच्चेगिरी. लबाडी शब्दाशी हा जोडून योजतात.

लका(की)री पु. एक जात व तिच्यातील एक व्यक्ती. हे लोक लाखेच्या बांगड्या, कंगण्या व इतर अलंकार करतात व रोगणे (वारनिसे) देतात. [हिं. लकहिरा]

लकीर स्त्री. रेषा; रेघ; पट्टी; ओळ. [हिं.]

लकी(के)री स्त्री. १. तेज; चकाकी; जिल्हई. २. (ल.) माधुर्य; मोहकता; छबदारी; आकर्षकता (गाण्यात, बोलण्यात इ.). (क्रि. मारणे) ३. चुणूक; छटा; वास; गंध (रंग, स्वाद, राग इ. मध्ये एखाद्या वेगळ्या गुणाचा). (क्रि. मारणे) : 'ओल्या रंगात कोणत्याही रंगाची लकेरी पाहिजे असल्यास...'– मॅरट २३. ४. काठ; किनार (जरीची इ.). [सं. लष् प्रकाशने]

लकीलक्क वि. क्रिवि. पहाः **लखलखीत**

ल(लि)कुच न. एक फळ; लिकुच : 'लकुच कटुचि अमृतकराकरवीं हीं शर्करेंत घोळविला ।' – मोवन ९.६८.

लकेर स्त्री. १. (गाण्याची) तान. २. छटा.

लक्कण–न–र, लक्कदिशी पहाः **लककण** इ.

लक्तर न. १. चिंधी. २. फाटलेली वस्तू, वस्त्र. [सं. लक्तक; फा. लत्र] (वा.) **लक्तरे वेशीवर टांगणे** –अब्रूचे, गैरवर्तनाचे इ. वाभाडे काढणे.

लक्ताळ पहाः **लकताड**

लखणी स्त्री. १. पेंग; झोपेमुळे येणारी डुलकी. २. झोप. (कु.)

लखणे अक्रि. पेंग; डुलकी येणे. (कु.) [सं. लख्=हालणे]

लखणे सक्रि. लक्ष ठेवणेः 'आपणपें कव्हणी न लखेः आपण कव्हणातें न देखे ।'– उगी ४९४. [सं. लक्ष्]

लखन न. वाईट सवय; स्वभावदोष. (अहि.)

लखपचोतरी, लखपचोत्री स्त्री.(लाख संख्येवर आणखी पाच) १. खोटे किंवा भरमसाट अवास्तव बोलणे; बाता; गप्पा. २. (काहींच्या मते लाख सारवणे यावरून) पोकळ जिल्हई; दिखाऊपणा; असत्य बोलणे; खोटेपणा (मनुष्याचा, दृश्याचा).

लखपचोतऱ्या वि. १. खोट्या, निराधार गोष्टी सांगण्याची किंवा थापा मारण्याची खोडी असलेला. २. दिखाऊ; पोकळ; नकली.

लखपती पु. लक्षाधीश; प्रचंड श्रीमंत. [सं.]

लखमा पु. अर्धांगवायू. (क.) पहाः **लकवा**

लखलख स्त्री. १. चकचकणे; चकाकणे.२.तीव्र भूक; वखवख.
क्रिवि. हुडहुडी : 'लखलख करीत हींव वाजत असे'- लीचपू ३६८.

लखलखणे अक्रि. १. चमकणे. २. तीव्र भूक लागणे.[सं. लष्, लघ्]

लखलखाट, लखलखी पु. स्त्री. अतिशय प्रकाश; तेज; चकचकाट.

लखलखीत वि. १. चकचकीत; झगझगीत. २. (ल.) स्वच्छ; निर्मळ; नामी; चकपक (मनुष्य, वस्त्र, सामान इ.). ३. (उप.) साफ उघडा; नागवा; सुनका; सुना.

लखलाभ पु. (लाख रुपयांचा लाभ) १. अतिशय मोठा लाभ. २. दुकानदाराकडून एखादी वस्तू विकत घेतली असता, गिऱ्हाइकाला ती लाख मोलाच्या योग्यतेची होवो अशी इच्छा दर्शविण्यासाठी दुकानदार काढतो ते उद्गार.

लख(ख)लू(लो)ट स्त्री. पु. वैपुल्य; प्राचुर्य; रेलचेल.
वि. क्रिवि. विपुल; प्रचुर.

लखेरा पहा : **लका(की)री**

लखोटा पु. १. पाकीट. २. बंद केलेले, मुद्रा उमटवलेले पत्र.
[सं लाक्षा; क. लकोटु - टे ; म.लाखोटा]

लख्ख-क्क न. १. वीज इ. कांचे तेजस्फुरण होणे किंवा तसा भास होणे; लकलक करणे; चक्क; चमक. २. आकस्मिक भीती; आकस्मिक दुःखाचा धसका; धक्का.
वि. १. स्पष्ट; ठसठशीत. २. पहा : **लखलखीत** १. ३. छानदार; सुरेखा. [ध्व.]

लग पु. १. खांबावर आडवी टाकलेली तुळई. २. आधार; लगा.
पु. स्त्री. अवयव, अंग, फांदी इ. मोडली असता ती तुटून न पडता ज्याच्या योगाने लोंबत राहते तो भाग. २. दोन भूभागांना जोडणारा जमिनीचा पट्टा; संयोगभूमी. ३. (दोन पक्ष, व्यक्ती इ. मधील) दुवा; जोड. ४. संबंध; घरोब्याचे नाते. ५. काठ; कड. ६. कागद, कापड इ. च्या कडेला. ६. रिकामी जोडलेली जागा.
क्रिवि. संलग्न; जवळ; लागू; लागून असणारे.

ल(लं)ग स्त्री. (कारकुनी शब्द) दुकलमी यादीपैकी एखादा कलम अपुरा राहिल्यास तो दुसऱ्याच्या बरोबर करण्यासाठी पहिल्या कलमात रकमेच्या ठिकाणी शून्य व पुढे लग शब्द लिहून करतात ती पूर्णता.
[म. लागणे; फा. लन्ग् = लंगडा]

लगट पु. स्त्री. १. नेटाचा व निश्चयाचा पाठलाग (कोणत्याही विषयाचा, वस्तूचा);(शब्दशः व ल.) शक्तीचा व बुद्धीचा अत्यंत उपयोग करणे; संघटित व नेटाचा प्रयत्न. २. जोराचा हल्ला; चालून जाणेः 'तो एकदाचि कोप संसप्तक योधसंघ करि लगट ।' - मोकर्ण ३३.२१. ३. पाठ न सोडणे; पिच्छा पुरवणे; चिकटणे.
स्त्री. १. दाट, घनिष्ठ मैत्री; घसट. २. (वाईट अर्थी) जवळीक; अंगाशी अंग लावणे. (क्रि. करणे)
वि. चिकटून राहणारा; पाठ न सोडणारा; चिकट.

लगट स्त्री. १. मोठी पास. २. पशूंच्या, विशेषतः बैलाच्या पाठीवरून पाण्याच्या घागरी आणण्यासाठी ठेवण्याची लाकडी किंवा लोखंडी चौकट; पशूंच्या पाठीवरील घागरी प्रत्येकी. (वरघाटी)

लगटणे सक्रि. १. चिकटवणे; चिकटायला लावणे. २. मिसळणे ; भेसळ करणे. उदा. श्रीवर्धनच्या सुपारीत भोवरगावची सुपारी लगटतात. ३. ढकलणे; दपटणे; लाटणे; रगडणे; रपाटणे.
अक्रि. १. चिकटणे. २.(ल.) (फळाफुलांचे) दाट घोस लागणे. ४. पोचणे; लागणे; पावणे; ठेपणे. [सं लग्+म.ट]

लगड पु. बहिरी ससाणा; कावळ्यासारखा एक मांसभक्षक पक्षीः 'लगडझगड जळखंडे वाटोवाट ।'- ऐपो २४२.

लगड स्त्री. हिशेब; पाड. (व.)-दाकोपु.

लगड स्त्री. सोने, चांदी इ. धातूंची कांब, वीट.

लगड स्त्री १. माकण; पहा :२ **लगट** २. २. ओझे.

लगडणे अक्रि. पहा : **लगटणे** १,२

लगडत(थ)गड स्त्री. १. (साधनसामग्री किंवा फुरसत नसल्यामुळे) काम अपुरे करणे; रगडणे. २. अनेक मसलती, बेत योजणे; अनेक उपाय, क्लृप्त्या काढणे.
क्रिवि. कसेतरी; निष्काळजीपणाने; वरवर. [ध्व.]

लगत स्त्री. १. जोड; संधी; जोडलेपणा; समीपता; भिडून असणे (जमीन, शरीर वगैरेंचे). २. सोयरीक; नाते. ३. दाट परिचय; घसट.
क्रिवि.१. जवळ; निकट. २. लगोलग. ३. अनुक्रमे; खंड न पडता.

लगतग स्त्री. १. एखाद्याने ठेवलेली ठेव बळकावणे. २. धंद्यातील लबाडी, अप्रामाणिक व्यवहार.

लगतमजकूर पु. परिच्छेद, भाग न पाडलेला (लेखी किंवा तोंडी) मजकूर.

लगत-ता लखोटा १. हुंडीपत्राचा मजकूर आत लिहून त्याच हुंडीपत्राला चिकटवून पाठवलेला कागदाचा लखोटा. २. आतील मजकूर व वरील पत्ता निरनिराळ्या बंदांवर नसून एकाच बंदावर असतात ते पत्र; पत्र व लखोटा एकच असा प्रकार.

लगतहुंडी स्त्री. सूचनेचे पत्र सोबत असलेली हुंडी.

लगता पु. १. पहाः **लगत** स्त्री. १.२. शेजारी, भिडून असलेला प्रदेश; सरहद्द प्रदेश; सीमाप्रांत.
वि . लागून, जोडून असलेला.

लगता जाब १. हुंडीबरोबर घडी करून हुंडीला चिकटवलेले हुंडीच्या सूचनेचे पत्र. २. हुंडीच्याच लिफाफ्यात लिहिलेली हुंडीविषयीची सूचना, जाब.

लगता लोळ १. मागे लोंबणारा वस्त्राचा घोळ. २. मालिका; माळ; लांबण शेते, मळे, झाडे इ. ची, आश्रितांची, वस्तूंची, साधनांची.

लगताळ स्त्री. पु. मालिका; हार; एकसारखा क्रम. (क्रि. लागणे, लावणे.)

लगताळा-ळ्या वि. १. चिकट; पिच्छा पुरवणारा. २. अंगावरील वस्त्राचा घोळ मागे टाकणारा; कपडे फरफटवीत जाणारा; (ल.) गबाळा; भोंगळ.

लगती वि. १. विवाहाने संबंध असलेला; सोयरा; नातेवाईक. २. स्नेहाचा; प्रेमाचा.

लगत्व न. लघुगुरुभाव;अक्षरांच्या लघुत्वगुरुत्वाचे भेदक तत्त्व. - सह्या. जून ३७.

लगदन न. मऊ खाद्यपदार्थाचा हाताने, तोंडाने तोडलेला तुकडा; लचका. (राजा.)

लगदा पु. १. लादा; भिजवून, चांगला मळून तयार केलेला गोळा (चुना, चिखल, कणीक इ. चा). २. पहा : **लग्दन** : 'रिपुहृदयांचे चि तोडिती लगदे।'– मोकर्ण २१.२१. ३. घट्ट पदार्थ (चिघळणारा गूळ, पळपळीत भात इ.). ४. (समासात) पचपचीत व मऊ. (भात, पीठ, भाजी इ. शब्दांशी विशेषणाप्रमाणे योजतात.) ५. पुंजका; गोळा; गुंता (केस, कागद, पाने इ. चा). ६. कागद बनवण्यासाठी तयार केलेला गोळा.

लगदा पु. १. लाखेचे पुरण; लाखेचे मढवण (दागिन्यांना केलेले). २. बांगडीचा एक प्रकार; लाखेने मढवलेली बांगडी. ३. (ल.) खोटे सोने.

लगदालगदी स्त्री. हिसकाहिसकः 'शाकंभट (लगदालगदी करीत) त्या माझ्या खडावा.' – संन्यख ९८.

लगधग स्त्री. १. (घाईने, चलाखीने) जाणे, येणे, काम करणे; झटपट; लगबग; चपळता. २. गडबड; धावपळ. [ध्व.]

लगन, लगनकळा–चिट्ठी इ. लग्न शब्दापासून होणारे शब्द 'लग्न' मध्ये पहा.

लगपूज न. (कारकुनी शब्द) कलमी यादीपैकी एखादा कॉलम अपुरा राहिल्यास तो दुसऱ्याच्या बरोबर करण्यासाठी पहिल्या कॉलममध्ये रकमेच्या ठिकाणी लिहितात ते शून्य.

लगफग क्रिवि. जोराच्या वाऱ्याने कपड्याच्या फडफडण्याप्रमाणे आवाज होऊन; फडफड. [ध्व.]

लगबग स्त्री. १. घाई व गडबड; त्वरा; उतावळी. २. झटपट; चलाखी. ३. उत्सुकता.

लगब(ल)ग – गा – गे, लगबगून क्रिवि. घाईने; गडबडीने.

लगबगी–ग्या वि. सदा घाईत असलेला; अतिशय उतावीळ.

लगभग क्रिवि. (चुकीने) सरासरी. [हिं.]

लगर स्त्री. (मोत्यांचा, फुलांचा) सर.

लगर वि. आडदांड; उर्मट; बंडखोर.

लगलग स्त्री. १. घाई; उताविळी; लगबग. २.अधाशीपणा. (ना.) [सं. लग्न; म. लग द्वि]

लगसगी स्त्री. गजबज; गडबड : 'नासामार्गे प्राणाची रिगिनिगी। प्रवेश निर्गमाची लगसगी।' – विसिं ५.७५.

लगहीन पु. गवंडीकामाचे हत्यार. (को.)

लगा पु. (विणकाम) सुताचे ५ किंवा १० थोक एकत्र ताणून केलेला ताणा.

लगा पु. १. धिरा; लग; आधार; आश्रय : 'रक्षी द्रौणीतें जो दृढ होतो आयुचा लगा मरणीं ।'– मोकर्ण ११.६९. २. (ल.) संबंध; नाते; धागादोरा; सूत; संबंधाचे दळणवळणाचे साधन. ३. संधी, उद्देश, लक्ष या अर्थी पहाः **लांग** १, २,३,१३. [सं. लग्]

लगाम पु. स्त्री. १. घोड्याला ताब्यात ठेवण्यासाठी व वळवण्यासाठी त्याच्या जबड्यात अडकवलेली लोखंडी साखळी, कडी; मुखयंत्रण. २. वरील साखळी, कडी अनीनीला किंवा जेराला लावून केलेले नियंत्रणसाधन; वादी. ३. स्वाधीनसूत्र; मार्गदर्शकत्व; व्यवस्था; ताबा. ४. कुस्तीचा एक डाव. जोडीदाराला खालती धरून घोड्याला लगाम देतात त्याप्रमाणे आपली दोन बोटे जोडीदाराच्या गालफडात घालून त्याला चीत करणे. [फा. लिगाम्] (वा.) ० **घालणे** – आळा घालणे, नियंत्रण आणणे. ० **तुटणे** – १. दुर्दशा होणे. २. आवाक्याबाहेर जाणे.

लगामी वि. क्रिवि. १. स्वाधीन; अधीन. २. व्यवस्थित; शिस्तशीर.

लगाव पु. १. लागाची,माऱ्याची जागाः 'येथे येऊन लगाव पाहून त्याचे रक्षणास सातशे प्यादा नेमिला.' – पेद २६.१०१. २.नेम; रोख. [हिं. लगाउ]

लगाव पु. १. संबंध; संधान. २. आवड. [हिं.]

लगाव – ऊ वि. लागास येणारा; योग्य; कामी येणारा. (कुण.)

लगाव(वि)णे उक्रि. (चाबूक, काठी इ. नी) मारणे; ठोक देणे. [हिं. लगाना]

लगिन्या बैल कालवडीशी लग्न लावून मोकाट सोडलेला गोऱ्हा; सांड; पोळ.

लगी स्त्री. १. निशाण; पताका; झेंडा (विशेषतः स्वारीपुढे चालवतात तो): 'जाधव चवाण घोरपडे घाटगे लग्या भडकती जरी।'– ऐपो २३२. २. खांबांच्या माथ्यावर ठेवलेली तुळई; लग. [हिं.; सं लगुड, लग्]

लगीत वि. लागवडीत असलेली; वहीत–(जमीन). (व.)

लगीत वि. पुष्कळ. (व.)

लगीन न. लग्न. [अप. लग्न]

लगीन गोष्ट–घर इ. पहाः **लग्न गोष्ट**

लगे, लगेलगे–धूम–ढोले उद्गा. एखाद्याला उत्तेजन देणे, चेतविणे या कामी योजण्याचा शब्द. धन्य!,वाहवा!, भले! २. क्रिवि. लगोलग; तत्काळ; क्षणात; झपाट्याने.(कोल्हाटी, भोरपी इ. नी ढोलके वाजवून जलद व वारंवार काढलेला उद्गार).

लगेच क्रिवि. लागलीच; तत्काळ.

लगेढोल स्त्री. चटपट व चलाखी (कामाची). (क्रि. लागणे) (वा.) ० **वाजवणे**–मोठमोठ्याने गवगवा करणे; प्रशंसा करणे; प्रोत्साहन देणे.

लगेतगे करून क्रिवि. घाईने व अर्धवट.

लगेलगे स्त्री. घाई; गर्दी; उतावळी.

लगेसा स्त्री. वि. जरूर असेल तितका; लागेल तेवढाच.

लगेहात क्रिवि. १. त्याच वेगाने–दमात. २. दुसरी एखादी गोष्ट करीत असताना; त्याचवेळी. ३. (सामा.) लागलीच; पाठीमागून; ताबडतोब.

लगोरिया फेर घोड्याची एक चाल. – विछ ९९.

लगोरी स्त्री. १. चेंडूने पाडण्यासाठी एकावर एक रचलेले लाकडाचे किंवा खापराचे सात वर्तुळाकार चपटे तुकडे प्रत्येकी. २. अशा रीतीने रचलेल्या विटा, दगड इ. चेंडूने पाडण्याचा खेळ. [क. लगे]

लगोल(ला)ग क्रिवि. पाठोपाठ; लागलीच मागून; खंड न पडता; अविरत; एकसारखे. [लग् द्वि.]

लगोंडा पु. १. एका ठिकाणी चिकटणारा गोळा (केसांचा, पानांचा, दोऱ्यांचा, कागदांचा इ.). २. लगदा; गुंता; चिकटा; चिकटण.

३. चिकटलेपणा; चिकटलेली स्थिती. .

लग्गा पु. १. संधी; डल्ला. (ना.) २. संधान; वशिला. [सं. लग्]

लग्न न. १. सोयरीक; शरीरसंबंध; विवाह; परस्परांना अनुरुप अशा स्त्री-पुरुषांमध्ये नवरा-बायको हा संबंध उत्पन्न करणारा एक संस्कार. पहाः **विवाह**. २. मुहूर्तावर केलेला विवाहसमारंभ.३. ऐक्य; साहचर्यः 'मग लग्नी जेविं ॐकारु। बिंबींचि विलसे।' -ज्ञा ८.११६. ४. योग; मुहूर्त; समयः 'कुळे शोधूनि दोन्ही । कुमारें चि सुलग्नीं। मेळविलीं प्रजासाधनीं। हेतु जरि।' - राज्ञा १६.३०१. ५. क्रांतिवृत्तातील प्रत्येक राशीबरोबर एकामागून एक वर येणारा विषुववृत्ताचा विभाग; विवक्षित काळी उदयाचलाशी संलग्न असणारी राशी. ६. राशीचा उदयकाळ; राशीत सूर्याचा गमनकाळ. (अहोरात्रात एकंदर बारा राशींची बारा लग्ने होतात.) ७. (फज्यो.) कुंडलीतील प्रथम स्थान. [सं.] (वा.) ० **नाहणे** - विवाहविधीत सांगितलेली नहाणी व इतर संस्कार करून घेणे; लग्नसोहळा उपभोगणे. (गो.) **बसवणे** - सबंध वऱ्हाड कापून काढणे. वि. १. संयुक्त; संबद्ध; चिकटलेले. २. (ल.) निरत; आसक्त; तल्लीन.

लग्नक पु. हमीदार; जामीन राहिलेला माणूस.

लग्नकळा स्त्री. लग्नसमारंभामध्ये नवरीच्या चेहऱ्यावर दिसणारे किंवा दिसतेसे वाटणारे तेज; टवटवी.

लग्नकुंडली स्त्री. जन्मकाळी पूर्वेकडे उदय पावलेल्या राशीचा दर्शक अंक पहिल्या घरात मांडून तेथून डावीकडे क्रमाने प्रत्येक घरात तदनुरोधाने राशी व त्या राशींचे ग्रह लिहून तयार केलेले बारा घरांचे कोष्टक. [सं.]

लग्नगंडान्त पु. कर्क-सिंह, वृश्चिक-धनू, मीन-मेष या लग्नांच्या संधीची एक घटका. जसे :- कर्केची शेवटची अर्धी व सिंहेची पहिली अर्धी मिळून एक घटका. [सं.]

लग्नगीत न. विवाहगीत; मंगलाष्टक. [सं.]

लग्नगोष्ट-ष्टी न. एव. स्त्री. अव. १. एखाद्याचे लग्न व्हावे किंवा दुसरा एखादा हेतू पूर्ण व्हावा म्हणून त्या माणसाची केलेली प्रशंसा, शिफारस. २. अनुरागयुक्त पोकळ, निरर्थक बोलणी; मदतीची खोटी आश्वासने.

लग्नघटि(ट)का स्त्री. १. लग्न किंवा मुंज लावण्यासाठी ज्योतिषशास्त्रात शुभ म्हणून सांगितलेला मुहूर्त. २. घटिकापात्र; मुहूर्त साधण्यासाठी पाण्यात टाकलेले, वेळ मापण्याचे अर्धगोलाकृती भांडे. ३. असा निश्चित केलेला व साधलेला काळ, मुहूर्त. ४. (ल.) आणीबाणीची वेळ, प्रसंग. [सं. लग्नघटिका]

लग्नघर न. १. जेथे लग्नसमारंभ चालला आहे असे, जानोशाचे घर. २. (ल.) लग्नातल्याप्रमाणे माणसांनी गजबजलेले घर; लग्नासारखा भरमसाट खर्च चालला आहे, आनंदीआनंद आहे असे घर.

लग्नचिटी-ठी-ट्ठी स्त्री. १. (सरकारकडून पूर्वी शूद्रादिकांना मिळत असे तो) लग्नाचा परवाना. २. लग्नाचा मुहूर्त लिहिलेला, जोश्यांनी केलेला कागद. ३. आमंत्रणपत्रिका.

लग्नचुडा पु. लग्नात नवरीला व तिच्या बाजूच्या वऱ्हाडणींना बांगड्या भरण्याचा विधी. हा घाण्याच्या पूर्वी होतो.

लग्नटका-क्का पु. लग्न लागल्याबद्दल पूर्वी शूद्रांकडून घेतला जाणारा सरकारी कर.

लग्नथर पु. न. लग्नासाठी घेतलेले कापडचोपड. [दे.]

लग्नपत्रिका स्त्री. वधूवरांच्या पत्रिकांवरून लग्नाचा मुहूर्त निश्चित करून उभयकुळांच्या उल्लेखासह तो ज्यावर लिहून ठेवतात तो कागद. लग्नापूर्वी याची पूजा करतात. [सं.]

लग्नप्याला पु. नवऱ्यामुलाने लग्नासाठी मुलीकडे जाण्याचा समारंभ, वरघोडा. - बदलापूर २६९. (तेली)

लग्नभुज पु. (ज्यो.) मेषादिक लग्नाचा भुज; चारकांड.

लग्नशुद्धी स्त्री. ठरवलेल्या कार्याच्या आरंभासाठी राशींची निर्दोषता. [सं.]

लग्नसराई, लगीनसराई स्त्री. (मार्गशीर्षापासून ज्येष्ठापर्यंत) लग्नाचा हंगाम.

लग्नसाडा न. १. लग्नात वधूपक्षाकडून वराच्या आईला देण्यात येणारी साडी. २. (काही प्रांतात) वराकडून वधूला देण्यात येणारे उंची वस्त्र, पैठणी.

लग्नाचा-ची वि. १. लग्नाच्या संबंधाचा (नवरा, बायको). २. उपवर; लग्नायोग्य वयाचा.

लग्नाक्षता स्त्री. अव. लग्नात वधूवरांनी एकमेकांवर टाकलेल्या अक्षता.

लग्नीक वि. बांधलेला. (गो.) पहाः **लग्नक**

लग्या अ. फासे, जुगार या खेळातील एक संज्ञा.

लघटा पु. चिकट टिकला.-लोसाको ३१९.

लघवी, लघ्वी स्त्री. १. मूत्र; रक्तशुद्धीकरणाच्या प्रक्रियेत मूत्रपिंडामध्ये तयार झालेला व मूत्राशयात साठलेला टाकाऊ द्रव. २. मूत्रविसर्जन. (क्रि. करणे)

लघ(घो)ळ स्त्री. १. मालिका; रांगा; ओळ. २. लांबलचक भाषण; पाल्हाळू. ३. दीर्घसूत्री व नीरस बोलणे. [सं. लघ्वी =लहान गाडी+आली=ओळु]

लघ(घा)ळ वि. १. पुढे-पुढे करणारा; लाघवी; लाळघोट्या. २. अतिशय बडबड्या; बोलका. ३. लोचट; चिकट; कोडगा. [सं. श्लाघा, श्लाघालु]

लघ(घा)ळणे क्रि. फार बोलणे; लाळघोटेपणा करणे.

लघळपणा, लघाळकी पु. स्त्री. १. लाळघोटणी; लोचटपणा. २. गप्पा; अतिशय बडबड. [सं.श्लाघ्]

लघिमा पु. १. हलकेपणा; कमीपणा. २. अष्टमहासिद्धींपैकी एक सिद्धी; पराकाष्ठेचा, निसर्गबाह्य हलकेपणा. ३. हळुवारपणाः 'ऐसिया लघिमा चालता।'-ज्ञा १३.२५५. [सं.]

लघु-घू वि. १. हलका; जड नाही असा. २. लहान; छोटा (आकाराने). ३. ऱ्हस्व (स्वर). ४. (संगीत.) एकमात्राकाल. ५. हलका; क्षुल्लक; क्षुद्र (योग्यतेने): 'बकी सुमति ताटका लघु न हे भली लाजशी।'-केका ५५. [सं.]

लघुउद्योग पु. अव. भांडवल, कामगार व उत्पादन कमी प्रमाणात असणारे उद्योग.

लघुकथा स्त्री. एक वाङ्मयप्रकार. शक्य तितक्या परिणामकारक रीतीने आणि शक्य तेवढ्या कमी पात्रांच्या व प्रसंगांच्या साहाय्याने सांगितलेली

गोष्ट.

लघुकरण न. १. आकार कमी करणे. २. भावी काळात मिळणारी रक्कम एकदम घेतल्यास ती ठरावीक दराने कमी करणे. ३. अंशराशीकरण करणे. ४. दीर्घकाळची शिक्षा कमी करणे.

लघुकोण–न पु. (भूमिति.) काटकोनापेक्षा लहान असलेला कोन.

लघुकोनत्रिकोण पु. (भूमिति.) ज्या त्रिकोणाचे तिन्ही कोन लघुकोन असतात तो त्रिकोण.

लघुग्रह पु. अव. (ज्यो.) मंगळ व गुरू या ग्रहांच्या मध्ये असणारे व अवकाशात सूर्याभोवती फिरणारे लहान आकाराचे ग्रह.

लघुचित्र न. १. मोठ्या चित्राचे लहान आकार केलेले चित्र. २. मोठ्या आकाराच्या शिल्पाची हुबेहूब केलेली लहान आकाराची प्रतिमा.

लघुचीर न. रुमालासारखे वस्त्रः 'शुभलघुचीर हातीं घेऊनी । हरीवरूनि वारीत रुक्मिणी।'–ह २७.७१.

लघुतम साधारण भाज्य (गणित.) दिलेल्या संख्यांनी निःशेष भाग जाईल अशी सर्वांत लहान असणारी भाज्य संख्या.

लघुत्व न. १. हलकेपणा. २. लहानपण. ३. (ल.) क्षुद्रता; मान्यतेने हलकेपण; वैभव, ऐश्वर्य, गांभीर्य किंवा अधिकार यांचा अभाव, उणेपणा. ४. अवमानाची, हलकेपणा आल्याची भावना.

लघुत्वस्वीकार पु. (मानस.) कमीपणा घेणे (विशेषतः आपल्यातील खऱ्या किंवा काल्पनिक उणिवांची भरपाई करण्यासाठी).

लघुदंती वि. लहान दात असणारा (घोडा). घोड्याचे एक अशुभ चिन्ह.

लघुनित स्त्री. लघुशंका; लघवी करणेः 'गोसावी तेयातें लघुनिती घेऊनि जाती, दोन्ही श्रीचरण धरूनि मूतिती. '– लीच ३.

लघुनिबंध पु. एखाद्या मुद्द्याचे थोडक्यात चटकदार वर्णन.

लघुन्यास पु. पूजेतील लहान देवतास्थापन विधी. न्यासाचा एक प्रकार.

लघुपरिहार पु. लघवी : 'तंव गोसावी लघुपरिहारासि बिजें केलें.'– लीच३. [सं.]

लघुपुस्तक न. एखाद्या विषयावर माहिती देणारी पुस्तिका.

लघुपेटिका स्त्री. कागदपत्रे ठेवण्यासाठी/नेण्यासाठी वापरतात ती चामडे, धातू इ. ची बॅग/पिशवी; पत्रधानी. (इं.) अटॅची.

लघुमंगल न. उपनयन व विवाह यांशिवाय बाकीची जातकर्मादिक कर्मे, संस्कार. [सं.]

लघुमालिनीवसंत पु. एक रसायन, मात्रा.

लघुमूत्र न. लघवी दाबून धरणे; मूत्रनिग्रह.
वि. मूत्रनिग्रह करायला समर्थ असणारा. [सं.]

लघुरिक्थ पु. विशिष्ट संख्या मिळवण्यासाठी विशिष्ट संख्येला त्याच त्याच संख्येने किती वेळा गुणावे लागेल ते सांगणारी संख्या. (इं) लॉग. उदा. १० X १० X १०=१०००. म्हणून ३ हा अंक १००० चा लघुरिक्थ; घात.

लघुरुद्र पु. शिवावरील अभिषेकाचा प्रकार; रुद्राच्या अकरा एकादशनी. [सं.]

लघुलहरी स्त्री. अव. 'रेडिओ'च्या १० ते १०० मीटर्स लांबीच्या ध्वनिलहरी.

लघुलिपी स्त्री. तोंडाने सांगितलेला मजकूर लवकर लिहून घेता यावा म्हणून तयार केलेली चिन्हांकित लिपी.

लघुलेखक पु. लघुलेखन करणारा.

लघुलेखन न. ऐकलेले भाषण ठरावीक चिन्हे वापरून लवकर व थोड्या जागेत लिहून घेणे. (इं.) शॉर्टहँड. [सं.]

लघुवाह्या स्त्री. समुद्रफळाचा वेल; निपल; हिज्जल; इज्रल.– मसाप ४५.३. [सं.]

लघुवृत्त न. लहान वृत्त; गोलाला मध्याखेरीज इतर ठिकाणी सरळ पातळीने कापले तर तेथे होणारे गोलाच्यापेक्षा लहान त्रिज्येचे वर्तुळ.

लघुशंका स्त्री. १: लघवी; मूत्रविसर्जन करणे. २. मूत्र. [सं.]

लघुसुदर्शन चूर्ण एक ज्वरनाशक चूर्ण. यात गुळवेल, पिंपळी, हिरडेदळ, सुंठ, लवंग, काडेचिराईत इ. औषधी असतात. [सं.]

लघुहस्तपत्रक न. जाहिरातपत्रक.

लघूपाय पु. प्रमाण मानलेल्या उच्चाराहून वेगळा केलेला उच्चारः 'लघूपाय हा पारिभाषिक शब्द प्राचीनच आहे.' – विश्रब्ध खंड २, पृ. ३५८.

लघ्वक्ष पु. (ज्यो.) बृहदक्षाशी लंबरूप असणारा व्यास.–सूर्य २२.

लघ्वी स्त्री. नाजूक स्त्री; परी. [सं.]

लचक स्त्री. १. कचक; उसण; मुरगळणे. (क्रि. भरणे इ.) २. उसण भरल्याने होणारी वेदना; चमक. (क्रि. मारणे) ३. चट; चटक; आवड; छंद. (क्रि. लागणे) [ध्व.लच्; हिं. लचकना]

लचकणी स्त्री. १. लचक भरलेली असणे. २. उडी मारणे; दचकणे.

लचकणे अक्रि. १. लचक भरणे; शिरेवर शीर चढून वेदना होणे; मुरगाळणे. २. उडी मारणे; दचकणे; अकस्मात दूर सरकणे; घसरणे. ३. मुरडणे; ठुमकणे. [सं. लस्ज्, लज; हिं. लचकना]

लचकंड–द न. काटा कोरण्याचे, कापण्याचे व उपटण्याचे (सुई, चिमटा इ.) शस्त्र ज्यात आहे अशी कडी. (व.) [सं लुच्= कापणे, उपटणे]

लचका पु. १. चट; चटक; ओढा; ध्यास. २. अकस्मात भरलेली लचक.

लचका पु. हाताने, दातांनी तोडलेला तुकडा; चावा.

लचकुटा पहा : **लतकुटा**

लचणे अक्रि. कचणे; खचणे. [हिं. लचना]

लचलच – चा, लचालचा क्रिवि. चाटण्याच्या आवाजाचे अनुकरण करून. [ध्व.]

लचला लवंगला वि. १. थकलाभागला; दुखावलेला;लंगडा – लुळा झालेला (पुष्कळ चालण्याने, ओझी वाहण्याने). २. (ल.) उठवणीला, मोडकळीला आलेला; बुडालेला (व्यापारी).

लचा(च्या)ड–ळ वि. १. बडबड्या; वाचाळ. २. लांडा कारभारी; चुगलखोर. ३. रिकामटवळा; क्षुद्र बोलणारा. ४. लोचट. ५. लाचखाऊ. ६. बेशरम. (व.)

लचा(च्या)ड(ळ)की, लचा(च्या)ळी स्त्री. १. रिकाम्या गप्पा मारणे. २. चुगलखोरी; कुचाळी; हलकटपणा; छिछोरी.

लचां(चं)ड–डी न. स्त्री. १. घोटाळ्यात घालणारे काम; अडचण; संकट. २. घोटाळ्याची स्थिती; कातर; पेचाटी. ३. उलाढाल; भानगड; झेंगट; कुलंगडे. ४. तोहमत; तुफान. ५. एखादे गोंधळवणारे साहस, गोष्ट;

त्रासदायक युक्ती. [सं. लरज्]

लचांडखोर, लचांडी वि. १. नाही-नाही ती लचांडे करण्याची खोड असणारा. २. द्वाड; लुडबुड्या; कळलाव्या; भांडण लावणारा. ३. (सामा.) लुच्चा; भामटा.

लच्छा पु. स्त्रियांच्या पायातल्या साखळ्या; पैंजण. (अहि.)

लच्छासाग पु. (संगीत.) एक राग. बिलावल रागाचा एक प्रकार. गान-समय दिवसाचा पहिला प्रहर.

लज स्त्री. लाज. (गो.) [सं. लज्-लज्जा]

लजितीफजिती स्त्री. फजिती; बेअब्रू; छीः थूः. [फजिती द्वि.]

लज्जत स्त्री. १. रुची; स्वाद; गोडी; खुमारी. २. चटक; वाईट सवय; खोडी. (क्रि. करणे) ३. छटा; वास; गंध; छाया; चुणूक. [अर. लइझत्]

लज्जतदार वि. रुचकर; स्वादिष्ट.

लज्जा स्त्री. १. लाज; विनय; सभ्यता, मर्यादा दर्शवणे. २. लाजरेपणा; लाजाळूपणा. ३. भीड; संकोच. [सं.]

लज्जाकज्जा, लज्जेकज्जेने क्रिवि. लाजेकाजेने.

लज्जा होम पहाः **लाजाहोम**

लज्जित वि. लाजलेला; शरमिंधा.

लज्जेचा वि. १. लाजाळू. २. विनीत; मर्यादशील. ३. लाजिरवाणे (कृत्य).

लट - ठ पु. सोडगा; सोटा. [हिं. लठ]

लट स्त्री. १. गुह्येंद्रियावरील केस; शेंट. २. गुंतागुंत (केस इ. ची). [हिं.]

लट स्त्री. १. साठ कागदांचा संच. (व.) २. लाट. - मसाप २.१०५. (राजा., कुण.)

लटक स्त्री. १. लकब; धाटणी; रीत; तऱ्हा; ढब(गाणे, बोलणे इ. ची). २. सवय; रीतः'हरिभजनाची लाव लटक ।'- राला ९१. ३. खोड; वाईट सवय, चाल. [हिं.]

लटक पु. खोडसाळ, दुष्ट मनुष्य.

लटक न. एक वृत्त, चाल. उदा. 'बजे सनई घनघोर । नगारनकी लगे झोर। बाजे कर्णा बंभोर । दिसों नाद घूमती ।' - अकक २.३३.६९.[हिं.]

लटकण-कन-कर-दिनी-दिशी क्रिवि. अकस्मात किंवा वेगाने उठणाऱ्या, उडणाऱ्या, उसळणाऱ्या मनुष्याच्या किंवा वस्तूच्या क्रियेचे दर्शक; त्यावेळी होणाऱ्या आवाजाचे अनुकरण होऊन. [ध्व.]

लटकण न. एक दागिनाः 'ते समई शर्फूदौला यास.....लटकण व भुजबंदी दिले'- पेद ३९.१५०.

लटकणे अक्रि.१. लोंबणे; ओथंबणे; लोंबकळणे. २. नखऱ्याने ठुमकत चालणे.

लटकन पु. कंदील; टांगता दिवा. (ना., व.)

लटका पु. थरकाप; लटलट कापणे.

लटका-की वि. १. खोटा; खरा नसलेला; वस्तुस्थितीच्या विरुद्ध. २. लबाड; विश्वासघातकी; अप्रामाणिक; लुच्चा. ३. व्यर्थ; रिकामा; निष्फळ. ४. अन्याय्य; वृथा; अयुक्त; अयोग्य. ५. अधू; व्यंग असणारा (अवयव, इंद्रिय). [सं. लट्ट=वाईट सवयी असणारा]

लटकाफटका-बिटका, लटकालांडा, लटका(को)रा वि. खोटा; लुच्चा; विश्वासघातकी. [लटका द्वि.]

लटकावणी स्त्री. टांगणी; लोंबणी; लटकत ठेवलेली स्थिती.

लटकाव(वि)णे सक्रि. १. टांगणे; लोंबत ठेवणे. २. ऐटीने, झोकात अंगावर घेणे, धारण करणे (पागोटे, शाल, दागिना). ३. पटकावणे; आत्मसात करणे; (दुसऱ्याची वस्तू) लांबवणे, ढापणे. [हिं. लटकाना]

लटकावा पु. बसमध्ये वगैरे धरून उभे राहण्यासाठी छपरापासून खाली सोडलेला दोर, साखळी वगैरे.

लट(टि)केपण न. लबाडी; खोटेपण.

लटपट स्त्री. १. चलाखी; जलद हालचाल. २. (पेच घालून खेळताना, खेळ रंगात आला असताना, चिमण्या इ. पक्षी भांडताना, वाद-विवादात दिसून येणारी) धडपड; खळबळ. ३. घाई; उतावीळपणा; धांदल. ४. तळमळ; अस्वस्थता. ५. भीतीने होणारा थरकाप; घाबरगुंडी. ६. हमरातुमरी; अरेतुरे; बोलाचाली; भांडण. (क्रि. झडणे, होणे, लागणे.) ७. ओढाताण; झटापट. (निंदार्थी) लबाडी; फसवेगिरी. क्रिवि. ढिला बसवलेला खांब; खुंटा; खिळा इ. च्या हलण्याच्या रीतीचे किंवा आवाजाचे अनुकरण होऊन. [ध्व.; सं. लट्+पट्]

लटपटणी स्त्री. डगडगणे; लटलट हलणे.

लटपटणे अक्रि. १. सैल असल्याने, ढिलेपणामुळे डगमगणे; हालणे (खांब, खुंटा, खिळा). २. फसणे; फिसकटणे; बिघडणे; नासणे; रसातळाला जाणे; नष्ट होणे. ३. (निरुपयोगी म्हणून) दूर, बाजूला फेकला जाणे; नापसंत, रद्द केला जाणे; गाळला जाणे. ४. निस्तेज होणे; फिके पडणे; वजन न पडणे. ५. गोंधळणे; घाबरणे.

लटपटपंची उद्गा. (पोपट, डोल) पोपटाला बोलायला शिकवतात ते शब्द. स्त्री. १. (ल.) घोटाळा; गोंधळ. २. फसवण्याच्या उद्देशाने केलेले धरसोडीचे, गोंधळवणारे भाषण. ३. लबाडी; फसवेगिरी. ४. बढाई; शेखीच्या गोष्टी.

लटपटीत वि. १. डगमगताना आवाज करणारा; डगडगणारा, खिळखिळा (खांब, खिळा इ.). २. (ल.) डळमळीत; अस्थिर; अनिश्चित; चंचल (अधिकार, नेमणूक, काम इ.).

लटपट्या वि. १.चपळ; चलाख; झटपट्या. २. धांदरट; गडबड्या. ३. पुढे पुढे नाचणारा; लुडबुड्या. ४. लबाडी करणारा; फसवा.

लटलट-टा क्रिवि. कापण्याच्या, जलद हलण्याच्या रीतीचे दर्शक, डगडग हलण्याच्या आवाजाचे अनुकरण होऊन. (क्रि. करणे) [ध्व.]

लटलटणे अक्रि. १. झोके खाणे; डोलणे; वाऱ्यावर स्वच्छंदपणे डुलणे; झोळकंबणे. २. कापणे; थडथडणे; अत्यंत चंचल असणे. ३. डगमगणे; डगडग हलणे. ४. लुडबुडणे; लुब्रेपणाने, दुसऱ्याला त्रास होईल अशा रीतीने पुढे-पुढे करणे. ५. (मोती इ.) पाणीदार व चकचकीत दिसणे. ६. (चेहरा, वर्ण) टवटवीत, प्रसन्न दिसणे. [सं. लुठ्, लठ्]

लटा पु. जुने, फाटलेले कांबळे; घोंगडीचा जुना तुकडा. (कु., हेट.) [हिं. लत्ता=चिंधी; सं. लक्तक्]

लटारणा वि. फार मोठा; जंगी; अवजड; प्रचंड.

लटारु वि. १. केसाळ. २. जटाधारी. (झाडी) [सं. लट्ट]

लटांबर-ळ न. १. सामानसुमान व खटले; प्रवासात बरोबर असणारे ओझे. (सामान, गुरेढोरे, बायकामुले). २. घोटाळ्यात घालणारा किंवा लोढणे म्हणून सोबत बाळगावा लागणारा (नोकरांचा, गुरांचा) समुदाय; (वस्तूंची, जिनसांची) रास, माल. ३. गुंतागुंतीचे, घोटाळ्याचे काम, कृत्य (वाद, कज्जा इ.). [सं. श्लथांबर (शलोप)?]

लटिंगा पु. आखूड व जाड (दोन-तीन हात लांब) लाकूड; काठी; सोडगा; दांडके. [सं. यष्टि; प्रा. लट्ठी]

लटिवाद, लटीकवाद पु. खोटे बोलणे; खोटे बोलण्याचा दोष; खोटेपणा.

लटी स्त्री. १. लेखा. २. लटके : जैं उपसंहारौनि कीजै लटि। तैं मी चि आहे' - ज्ञा ७.३०.

लटीपुटी स्त्री. खोटेपणा. [सं. लट् + पुट]

लटुपटु, लटु(टू)फ(ब, बु)टू, लटफट्या, लट(टू) ब(बु) ट्या, लटु(टू) फटूट्या पहाः **लुटुपुटू** इ.

लटुऱ्या वि. लुडबुड्या. (व.) [सं. लट्]

लटू वि. अज्ञानी : 'करि उदार कथा भलता लटू ।' - वामनचरित्र ४. [सं. लट]

लटे न. लोकरीचे वस्त्र; हलके घोंगडे. -चित्रकृषि २.७.

लटोर पु. १. पहाः **लटिंगा**. २. जोंधळ्याची मोठी व टप्पोरी जात; अरगडीतील एक भेद. ३. एक वनस्पती.

वि. भक्कम, जाड, लठ्ठ (मनुष्य, वस्तू); आखूड व जाड.

लट्ट-ट्टा पु. (अश्लील) पुरुषाचे जननेंद्रिय.

लट्ठ पु. भोवरा.-व्याज्ञा १.१५७.

लठ स्त्री. १. लाठी; काठी; सोटा. (व.) २. कापड मोजण्याचा गज. ३. मूर्ख किंवा अशिक्षित मनुष्य. [हिं.]

लठणे अक्रि . गडबडा लोळणे; लोळण घेणे. [सं. लुठन]

लठबाजी स्त्री. झोडंपट्टी; चोपणे; चोप.

लठाईत वि. १. लाठी बाळगणारा. २. धश्चोट. (व.)

लठुंगा वि. भक्कम; राकट; मजबूत; बळकट; अटस.

लठ्ठ पु. १. सोटा; जाड काठी. २. जळणाचे ओबड-धोबड लाकूड; ओंडके.

वि. १. विलक्षण मोठा, भक्कम; जाड; धसाडा (मनुष्य, वस्त्र, भांडे, पशू, वस्तू). २. स्थूल; फोपशा. [क.लट्ट-ड्ड, सं. धष्ट; यष्टि]

लठ्ठनिरंजन, लठ्ठंभारती, लठ्ठाश्रम-श्रमी, लठ्ठूबगाड्या, लठ्ठेश्वर पु. (मूळ गोसाव्यासंबंधी रूढ) शरीराने धष्टपुष्ट, दांडगा मनुष्य (विशेषतः निरक्षर व अडाणी).

वि. १. धष्टपुष्ट. २. बेफिकीर. ३. दांडगा. ४. मूर्ख.

लठ्ठा पु. जाड काठी; सोटा. (व.)

लठ्ठा-ठ्ठू-ठ्या वि. पहा : **लठ्ठ**

लठ्ठा पु. मांजरपाट (कापड). (माळवी)

लठ्ठाई स्त्री. दांडगाई; जनावराप्रमाणे धुडगूस.

लठ्ठामिश्रई स्त्री. १. उर्मटपणाचे वर्तन; दांडगाई. २. लठ्ठालठ्ठी. [हिं.लठ्ठ+मिश्र=मैथिली ब्राह्मणाची पदवी]

लठ्ठालठ्ठी स्त्री. सोटे, दांडकी इ. नी परस्परांमध्ये चालणारी मारामारी.

लठ्ठ्या पु. (बायकी) १. दांडगा; स्वैर; मोकाट. २. एखाद्या स्त्रीने ठेवलेला माणूस; जार.

लड स्त्री. पानांचे ओझे; भारा.

लड स्त्री. १. सर; माळ (मणी, मोती, फुले इ. ची). २. रेशमाची, जरीची, सोन्याचांदीची गुंडी. ३. कापसाची लांबट व चापट पट्टी. [सं. लट; पं.लडी]

लडथड स्त्री. १. वादग्रस्त, अनिश्चित गोष्ट. २. वादाची जागा, मुद्दा; (हिशेबात, पत्रव्यवहारात) विवादास्पदता. ३. वरील गोष्टीसाठी वाद; तंटा; झटापट. ४. भानगड; घोटाळा.

वि. (बायकी) अस्वच्छ; ओंगळ; अर्धवट केलेले.[ध्व.; लढणे द्वि.]

लडथड, लडथडवाणा-णी करणे सतावणे; (मुलाने) त्रास देणे.

लडथडणे अक्रि. मध्ये येऊन अडथळा करणे; लुडबुडणे; भांडण, वाद उत्पन्न करणे. [सं. लत्+त्रद्]

लडथड्या वि. १. नेहमी वाद,फिर्याद करायला सज्ज; कज्जेदलाल. २. गोंधळ घालणारा; घोटाळा करणारा. ३. (व्यापारधंद्यात) खटपटी करणारा. ४. गबाळा; अर्धवट कामे करणारा.

लडदू-धू वि. १. धटिंगण; धट्टाकट्टा; भक्कम. २. गबदूल.३. रिकामा; निरुपयोगी.

लडब(फ)ड वि. १. लटलट होणे; ढिलाई; शिथिल झालेली स्थिती; फडफडत इतस्ततः झोळकंबणे; (यंत्र, एखादी रचना,कपडे इ.चे) लोंबणे. २. लवलवीतपणा; शैथिल्य; बलहीनता (शरीराची). ३. व्यग्रता व क्षुब्धता (जीवाची). ४. घोटाळा; विसकळीत स्थिती. ५. पहाः **लुडबुड**

क्रिवि. १. ढिलेपणाने; शैथिल्याने; लटपटा. २. अव्यवस्थितपणे. [ध्व.]

लडबडणी स्त्री. १. डगमगणे; लडबडा हलणे. २. लुब्रेपणाने, दुसऱ्याला त्रास होईल अशा रीतीने मध्ये हात घालणे; चोंबडेपणा करणे.

लडबडणे अक्रि. १. डगमगणे; लटपटणे; ढिलेपणामुळे इतस्ततः हलणे. २. मध्ये शिरणे; लुडबुड करणे. ३. बरबटला, लपेटला जाणे.

सक्रि. लपेटणे; माखणे. [सं. लर्ब्+बर्ब्; सं.लड्+बल्]

लडबडलाटण्या-लाट्या वि. १. दांडगा; उद्दाम. २. बेपर्वाईने, दांडगेपणाने लुडबुड करणारा.

लडबडीत वि. १. माखलेला; भरलेला; चोपडलेला. २. (प्र.) लटपटीत; डळमळीत; खिळखिळीत.

लडबड्या वि. भलत्याच, त्रासदायक रीतीने लुडबुड करणारा.

लडलड क्रिवि. लाडाने; लाडेलाडे; लडिवाळपणे. (क्रि. बोलणे, करणे.) [सं.लड्; म.लाडे]

लडा पु. मेंढा. (प्रां.)

लडाकडा क्रिवि. वारंवार; एकसारखाः 'मामाच्या रे घरीं। नको जाऊं लडा-कडा। येऊ दे गाडीघोडा।' - सह्या फेब्रु १९३६.

लडालडा पहाः **लडलड**

लडिवाळ स्त्री. लाटदेशीय स्त्री. [सं. लाटी]

लडिवाळ-ळी पु. स्त्री. १. लाडिकपणा; लाडीगोडी. २. लाड; कौतुक; कोड.

लडिवाळ–ड–ळा, लडिबाळ वि. १.आवडीचा; प्रिय; लाडका. २. लाडीगोडीची, लडिवाळपणाची(भाषा). [सं. लाड्+म. वाळ]

लडेलटके पु. अव. अडथळे; गुंते; अडचणी; घोटाळे.

लडो पु. मार; ताडन. (गो.)

लड्डु वि. मूर्ख; मंदबुद्धीचा; जड. [सं. लट्, लड्; क. यड्ड, हेड्ड]

लड्डुमुडगे पु. लड्डाचा खेळ. (बे.)

लड्डु–डू पु. लाडू. [सं.]

लढ स्त्री. १. समुद्रातून, नदीतून वाहत किनाऱ्यावर आलेला गाळ, रेंदा. २. गुंतागुंत; गुंताडा. ३. (ल.) भानगड; घोटाळा. [हिं. लट]

लढ–ढे न. १. शेतातील माल वाहून नेण्यासाठीची बिनतट्ट्याची, लांबट, पुढे निरुंद व मागे रुंद होत गेलेली बैलगाडी. (खा.,व.) २. कपाशी वाहण्याची गाडी. (खा.)

लढण स्त्री. सवय; मोड; वळण. (व.)

लढणे सक्रि. १. युद्ध करणे. २. झगडणे; भांडणे; तंटा करणे. ३. (ल.) स्पर्धा, चढाओढ करणे; टक्कर मारणे. [हिं. लढना;सं.रध्] (वा.) **लढून पडणे** – मोठ्या औत्सुक्याने, उत्कंठेने एखाद्यावर झटून पडणे; तुटून पडणे.

लढत स्त्री. युद्ध; झुंज; लढा.

लढता वि. लढाऊ; युद्धकुशल.

लढव(वा)ई, लढाऊ वि. १. झुंजार; रणधीर; रणशूर. २. लढाईला योग्य (घोडा, मनुष्य, जहाज, रथ, शस्त्र). [हिं.]

लढवणे सक्रि. १. झुंजवणे. २. स्पर्धा करायला लावणे. ३. चालवणे; करणे; योजणे; उपयोग करणे (मसलत, युक्ती इ.).

लढवय्या पु. लढाईत तरबेज असलेला मनुष्य; योद्धा. [हिं.]

लढंतगढंत स्त्री. कुस्ती; डावपेच; झोंबी: 'ही माणसे तालमीच्या नादांतील होती. तीं तात्यासाहेबांबरोबर जोर, बैठका काढीत. त्यांच्याशी लढंतगढंत खेळत.'–प्रतिआत्म २५१.

लढा पु. १. लढत; युद्ध, झुंज. २. भांडण; तंटा; वाद; वादाचा विषय. ३. प्रतिबंध; अडथळा; निरोध; हरकत; निग्रह करणारे, आड येणारे कारण. ४. गुंता; गुरफटा.

लढाई स्त्री. १. भांडण, तंटा करणे. २. सामना; रण; संग्राम. ३. युद्ध; युद्धसंसार. [हिं. लडाई]

लढे, लढेगाडं न. बैलगाड्याचा एक प्रकार. (अहि.)

लणे अक्रि, घेणे; आणणे : 'ईठ्ठल कसा म्हने लय रखमा मनी काठी, कशी लऊ तुमनी काठी दारे संतसनी दाटी'– लोसको. (अहि.) [गु. ले]

लत स्त्री. १. खोड; दुर्गुण; वाईट सवय. (क्रि. लागणे, जडणे). २. उणीव; सदोषता. ३. फजिती. ४. युक्ती. ५. वेड; पिसे. [सं. लट; हिं.]

लत स्त्री. (प्र.) लत्ता; लाथ: 'ज्ञानरहित सदा लत खाती।' – दावि ७६१.

लतकुटा–ठा, लतकुटार–कोडगा–गाढव–खोर–खोरा वि. निर्लज्ज, निगरगट्ट; वाईट गोष्टींना चिकटणारा;निंदा, शिव्या, मार यांना न जुमानणारा. [क. लत्तुखोरा]

लतखोरा पु. १. बाहेरच्या चौकटीच्या उंबऱ्याप्रमाणे आतल्या चौकटीचा खालचा आडवा तुकडा. २. जिन्याच्या पायरीला लावलेले लाकूड. (व., घाटी) ३. (ल.) लतकुटा.

लतमला पु. घोड्याच्या गुडघ्यावरील रोग. – अश्वप २.२८८.

लता स्त्री. १. सरपटणारी किंवा झाड इ.च्या आधाराने वर चढणारी वनस्पती; वेल. २. फांदी; डहाळी. ३. पाण्याची लाट: 'ठेलीया समुद्रीचीया लता। वाहो विसरलीया सरिता.'– उह १९९५. [सं.]

लताड न. पडकी भिंत. (कु.)

लताबंध(नृत्त) पु. (नृत्य.) नर्तकांनी निरनिराळ्या तऱ्हेने जाळे विणल्याप्रमाणे उभे राहून नृत्य करणे.

लतारणी स्त्री. (नाविक) नावेवरील शीड हाकारण्यासाठी डोलकाठीच्या धाकट्या गाल्यांतून भरून घेतलेली दोरी. ही दोरी मागच्या हरसाला अडकवतात व पुढच्या टोकाला लोखंडी कड्याला वेढा देऊन ते टोक दोरीत मिळवतात व त्या कड्यात बोंबाचा हूक अडकवून लतारणी खेचून बांधतात.

लता(टा)वणे अक्रि. १. वाईट मार्गाला लागणे; बिघडणे. [सं. लट्]

लतिका स्त्री. लता; वेल. [सं.]

लती, लतेला वि. लहरी. (व.,ना.)

लत्त–त्ता स्त्री. पु. लगतचा प्रदेश; सरहद्द. पहा: **लगता**

लत्तरबाळ्या स्त्री. अव. चिंध्या. [फा. लत्त्र=लत्तर+म.बाळी]

लत्ता पु. चिंधी; धडफा. [फा.]

लत्ता स्त्री. लाथ; पायाने मारणे. [सं.] (वा.) **लत्तेस शनी असणे**– शनी हा ग्रह जन्मस्थानापासून द्वितीयस्थानी असणे.

लत्ती स्त्री. फडफड उडणारी चिंधी; फाडलेली धांदोटी. [सं.]

लत्त्याबत्त्या स्त्री. अव. चिंध्या आणि लकतऱ्या. [लत्ती द्वि.]

लथ(था)डणे अक्रि. लपेटले, बरबटले जाणे.

लथडपथड, लथडालथड स्त्री. १. नाश; विघात; मोडतोड; लाथाडणे. २. चालढकल; घालघुसर (कामाची). (क्रि. लावणे)

लथडपथड क्रिवि. चालढकलीने; हलगर्जीपणाने. [लथडणे द्वि.]

लथडवा पु. प्रहार: 'मुष्टी लत्ता लथडवा थडका ।' – मुवन २.५४.

लथळा पु. कलह; भांडण. –ऐको.

लथाबळ वि. १. गबाळ; गैरशिस्त. (वेणी, कुंकू व लुगडे नीट नसणाऱ्या मुलीस म्हणतात). (व.) २. लावडी.

लथ्थड स्त्री. १. लहानसा फेरफटका; फेरी; उभ्या–उभ्या भेट. २. नुकसान. (व.) [हिं. लताड]

लदडफदड वि. घाणेरडा; बरबटलेला. [लथडणे द्वि.]

लदबदणे अक्रि. भरून जाणे; लादलेले असणे. [लदणे द्वि.]

लदाव पु. १. ज्यावर कमान रचतात ते मातीचे किंवा लाकडाचे काम. २. कमानीखालचा, कमानदार दरवाजाचा, खिडकीचा भराव. ३. लादलेले ओझे. [हिं. लढाऊ; म लादणे]

लदू वि. बळकट; मोठा; लडदू.– ऐको.

लद्दा पु. १. चिकटलेपणा (केस, कागद इ. चा); लगदा. २. चिकटलेला गोळा. ३. (इतर अर्थी) पहा: **लादा**

लप स्त्री. बाक; वाकणे. (क्रि. खाणे) [ध्व.]

लपकणे अक्रि. थांबणे; थबकणे. (व.) [ध्व. लप]

लपका पु. ओलसर व मऊ पदार्थाचा गोळा; लगदा. [ध्व. लप]

लपगि–गी स्त्री. लपण्याची इच्छाः 'लपगि धरुनि एके पर्वतीं तो निघाला।'– कृष्णकौतुक १३, अकक २.२६.

लपटणे न. (ढोर, न्हावी) वस्तरा चटपटण्यास लागणारे चामडे.

लपटणे अक्रि. चिकटणे. [सं. लिप्त; हिं. लिपटना]

लपडाक वि. चापट; थापट. [हिं. लपट; पं. लक्ता]

लपण स्त्री. १. लपण्याची जागा; आडोसा; आसराः 'आपभयें पळतां यासी । लपणी मिळाली भ्रमापासी ।'– एभा १३.१५. २. स्वतःला लपवणे; दडणे. (क्रि. घेणे, करणे, धरणे, साधणे.) ३. रहस्य; खुबीः 'या ब्रह्मविद्येच्या लपर्णी।'– दास ७.७.५७.

लपणाछि(शिच)पणी, लपीथपी स्त्री. पु. लपंडावाचा खेळ.

लपणे अक्रि. दडणे; छपून, गुप्त राहणे. [सं. लप्]

लपंडाव–ई पु. स्त्री. १. लपण्याचा व शोधून काढण्याचा खेळ. २. (ल.) तोंड चुकवणे; उघड न बोलणे; गुप्तपणा. ३. (ल.) कपट; लबाडी; छद्मी, चोरटी कृत्ये.

लपाटी स्त्री. एक प्रकारचा चारा. (क.)

लपेट पु. स्त्री. भोवतालचे आच्छादन; आवरण; मढण (कपड्याचे, कातड्याचे, चिखलाचे, रंगाचे).

स्त्री. १. घेर; परीघ; वेढा. २. उष्ण वाऱ्याची झळ; थंड वाऱ्याचा बाधक झपाटा, झोड. ३. हल्ला; धाड (साथीची). ४. साथ; सार्वत्रिक आजार. ५. भाषणाची, बोलण्याची हातोटी (आतील डावपेच इ. इतरांना कळू नये अशी); सारवासारव करण्याची कला. (क्रि.मारणे) ६. लटपट; कावा. ७. ढब; धाटणी; पद्धत. ८. पदर; पट्टी.[सं. लिप्; हिं. लपेट]

लपेटणी स्त्री. गुंडाळणी; वेष्टण; लेप.

लपेटणे सक्रि. गुंडाळणे; झाकून टाकणे. [सं. लिप्; हिं. लपैटना]

लपेटवा वि. लटपटीचे; कावेबाजपणाचे.

लपेटा पु. १. पहा : **लपेट** पु. स्त्री. २. ज्यांच्या भोवती सोन्याची किंवा चांदीची तार गुंडाळलेली आहे अशा काचेच्या बांगड्या. [हिं.]

लपेटी स्त्री. लबाडीचा व्यवहार; लटपट. (वा.) **लपेटीखाली, लपेटून नेणे–** गुप्तता राखून वेळ मारून नेणे; सारवासारव करणे.

लपेटीचा वि. १.लटपटीचा; लबाडीचा. २.गूढ; गुप्त (भाषण, काम).

लपेटीदार वि. लपेटी, वळणे असणारे (अक्षर, भाषण).

लपोटशंख पहाः **लबोडशंख**

लप्पक पु. दंडारीसारखा पण कमी माणसे असलेला लोकनृत्याचा एक प्रकार : 'वऱ्हाडात लप्पक नावाचा... प्रकारही अधूनमधून दिसतो?' –मलोत पृ. ३१.

लप्प(फ्फ)ड स्त्री. थप्पड; जोराची चपराक. (ना.) [हिं.; ध्व.]

लप्पंछप्पं न. १. लपंडाव. २. शेखीचे बोलणे; अप्रासंगिक, टाळाटाळीचे बोलणे.

लफडा–डे पु. न. १. सतावणारे, त्रासदायक काम, संकट; अडचण. २. लचांड; झेंगट. ३. निष्फळ व खडतर वाद; रिकामी बाचाबाची.

लफरा वि. फितूरः 'लटका लफरा लष्करांत ठेवूं नये.'–ऐको.

लफलफणे अक्रि. १. (जनावराची कास, पोट इ.) थलथल हलणे. गडबडीने, असंबद्ध बोलणेः 'वाचा लफलफीत जडत्वें गाढी ।'– एभा २२.५३०. [ध्व.]

लफंगा–ग्या–घा–घ्या वि. १. लुच्चा; फसव्या. २.नुसत्या वल्गना करण्यात हुशार. ३.काहीतरी सबबी पुढे करणारा; चुकवाचुकवी, टाळाटाळी करणारा. ४.थापा, पोकळ वचने देण्यात पटाईत.

[अर. लफाझ्=बडबडचा; हिं.; तुर्की=लफंग]

लफंगे, लफांग–गे न. १. लचांड; संकट; अडचण; पेच. २. वाईट, निरर्थक गप्पागोष्टी; कुटाळक्या. ३. गैरफायदा; उलाढाल; कचाट.

लफाट पु. अंगठा. (ना.)

वि. १. लबाड. २. लुच्चा; हाताळ. (व.)

लफाट्या वि. बाता झोकणारा; बाताड्या; लफंगा. (व.)

लफाड न. मैदान; मोकळे अंगण. (व.)

लफ्केबाज वि. तुर्रेबाज. (व.) [हिं. लप्पा]

लफ्फा पु. १. किनखाब; जरीचे कापड; मोठा जरीचा पदर (शेला, पागोटे इ. चा). [हिं. लप्पा]

लफ्फा पु. स्त्रियांचा गळ्यालगत घालण्याचा एक दागिना.

लफ्फा पु. १.गोल इमारती लाकूड; लाकूड चौरस करण्यासाठी वरच्या अंगाचा करवतून काढलेला तक्ता. २.खांबाला, तुळईला बळकटी येण्यासाठी जोड दिलेला तुकडा. [सं. लिप्त]

लफ्फेदार वि. किनखापी किंवा जरतारीच्या काठाचे; मोठ्या पदराचे (शेला, पागोटे इ.).

लफ्याचा वि. जरीचा : 'एखादा महाशंख लफ्याचा पदर लावून पुढे आला की शकुन उत्तम.'– नि २३०.

लब न. कोरफड. (उत्तर को.)

लब स्त्री. १. (क्व.) ओठ. २.निरोपाचे काम. (हा अर्थ सार्वत्रिक आहे. पहिला अर्थ क्वचित आणि लाक्षणिक व काल्पनिक प्रयोगात दिसून येतो. जसेः– घेऱ्याची लब (=शेंडीच्या मुळाभोवती असणारा घेऱ्याचा ओठ). [फा. लब्]

लबई स्त्री. निरोपाचे काम; लब.

लबकणे अक्रि. चटक लागणे. [सं. लब्]

लबकणे अक्रि. (चेंडू इ. पकडण्याच्या तयारीने) पुढे वाकणे.

लबदा पु. ओला गोळा. पहाः **लगदा**

लबदालोळ वि. भिजलेला; पार चिंब झालेला.

लबराण न. (नाविक) डोलकाठीचा तोल जाऊ नये म्हणून बांधलेल्या दोरखंडांपैकी प्रत्येक. यांचा उपयोग क्रेनप्रमाणे होतो.

लबलब स्त्री. बडबड; जिभेची त्वरित गती.

क्रिवि. (निंदार्थी) जलद बोलताना, खाताना होणाऱ्या ओठांच्या आवाजाचे अनुकरण होऊन, करून. (क्रि. खाणे, जेवणे इ.) [ध्व.]

लबलबणे अक्रि. लाडीगोडीने बोलणे. [सं. लब्; फा. लब्]

लबलबीत वि. पातळ.

लबाड न. चेन्नई भागातन होणारे एका जातीचे विड्याचे पान. (ना.)

लबाड वि. १. खोटे; असत्य; अप्रामाणिक. २. सात्त्विक नसलेला;

अंगच्या सद्‌गुणांविरुद्ध वर्तन करणारा. ३. लुच्चा; गुलाम. (लडिवाळपणे मुलांना म्हणतात.) [हिं.]

लबाडझबाड-लचाड वि. खोटा; थोतांड्या; नीच; लुच्चा.

लबाडनकशी न. (विणकाम) एक प्रकारचे लुगडे. पोत कोणताही, किनार रेशमी किंवा सुती व किनारीमध्ये गोम नसून त्या जागी पांढरे साधे घर भरून घेतलेले असे लुगड्याचे वाण.

लबाडी, लबाडकी स्त्री. १. खोटेपणा; फसवेगिरी; दुटप्पीपणा. २. खोटे, बनावट कृत्य; कपट. ३. (कायदा) एखाद्याचा लाभ किंवा नुकसान व्हावे या इराद्याने केलेले कृत्य.

लबाडी स्त्री. १.अवजड ओझे किंवा गठ्ठा आवळून बसवण्यासाठी व घट्ट करण्यासाठी योज़लेली युक्ती (काठी घालून दोरी पिळणे इ.). २. दगड उचलायला किंवा उचकटायला लावलेली तरफ. ३. सैल दोरी पकडता यावी म्हणून तिला बांधलेला काठीचा तुकडा; लवटी. ४.वाशाच्या माथ्यातून शिरकवलेली आडवी काठी. (क्रि. घालणे)

लबालब स्त्री. रेलचेल; वैपुल्य. (व.)

लबूक वि. लवचीक काड्या असलेला (पतंग).

लबूद वि. १.आसक्त; परायण. २.नादी. [सं.लुब्ध]

लबे स्त्री. निरोपाचे काम. [फा. लब्]

लबेद वि. गलेलठ्ठ; धट्टाकट्टा; जोरकस. [हिं. लबेदा=सोटा]

लबेदा पु. १. प्रवासात बरोबर असलेले बायकामुले, जनावरे इ. खटले: 'श्री. अणे यांना सामानाचा फारसा लबेदा नको असतो.' - स्वभावचित्रे १२३. २.(ल.) लचांड; अडचण.

लबोड वि. अडाणी; खोटा; असत्य.

लबोडशंख-शिंग वि. (एका खोट्या शंखाच्या गोष्टीवरून) मोठेपणाने, उगाच आश्वासने द्यायची, पण कृती करायची नाही अशा स्वभावाचा.

लब्ध वि. १. संपादिलेला; मिळवलेला; मिळालेला. २. (गणित) काढलेला; निघालेला; प्राप्त. (भाजकाने भाज्य भागले असता येणारे फल, अनुमान.) ३. शब्द, वाक्य इ. पासून व्यंजनेने निघालेला (अर्थ). ४. (समासात पूर्वावयव असता) ज्याने मिळवले आहे असा. उदा. लब्धप्रतिष्ठित, लब्धधन इ. [सं.]

लब्धप्रतिष्ठा-शिष्ठाई स्त्री. कोरडी प्रतिष्ठा; प्रौढी; पोकळ गर्व.

लब्धप्रतिष्ठित वि. १.ज्याने प्रतिष्ठा मिळवली आहे असा. २.(निंदार्थी) अधिक कीर्ती इ. मिळवण्याचा प्रयत्न न करता पूर्वीच्या भांडवलावर जगणारा. ३.(निंदार्थी) खोटी प्रतिष्ठा मिरवणारा. ४.फाजील लुडबुड्या.

लब्धवस्तू स्त्री. पुराणकाळाचा शोध घेताना सापडलेली महत्त्वाची वस्तू.

लब्धशूरत्व न. बढाई; फुशारकी. [सं.]

लब्धि-ब्धी स्त्री. १. संपादन; लाभ; प्राप्ती. २.फायदा; नफा. ३. (गणित) भागाकार. [सं.]

लब्ध्या वि. लब्धप्रतिष्ठ. [सं.]

लब्भा(ब्भे)चाटू वि. बनावट; खोटे करणारा; पदरचे रचणारा; बात्या.

लब्भा (ब्भु,ब्मु)शाई स्त्री. १. बनावट गोष्ट; खोटे लेख इ.; लबाडी. २. वायफळ, पोकळ बोल; बाता.

लभणे पहा : **लाभणे**

लभरीचभरी वि. १. उतावीळ; आगाऊ; उथळ (स्वभाव). २. अधाशीपणे खाणारी. (अहि.)

लभाशाई वि. लघळ. (दादर)

लभ्य न. लाभ; फायदा; प्राप्ती.

वि. १. मिळवणे शक्य, योग्य; मिळण्यासारखे. २. (चुकीने 'लब्ध' ऐवजी) मिळालेला; मिळवलेला. [सं.लभ्]

लभ्यमान वि. लाभणारा; मिळणारा. [सं.लभ्]

लभ्यांश पु. १. लाभ; मिळकत. २. मिळवलेली गोष्ट. [सं.]

लमाण पु. १. (धान्य, मीठ यांची वाहतूक करणारी) एक जात व त्यातील व्यक्ती; वंजारी. २. त्यांच्या टोळीचे लोक, गुरे व सामान; वाट चालत असलेली किंवा तळ देऊन राहिलेली या लोकांची एक टोळी. [हिं. लंबाडा]

लमाणलंगडी पु. मुलांचा एक खेळ. - मखेपु ११०.

लमाणी वि. लमाण जातीची, संबंधी (जनावर, भाषा, चाली).

लय पु. १. (वादनात) ताल देण्याच्या क्रियेतील विश्रांतीचा काळ. याचे द्रुत, मध्य, विलंबित हे प्रकार आहेत. २. (वादनात, नृत्यात, चालण्यात) समकाल. ३. गायन, वादन, नृत्य यांचे ऐक्य. ४. (एका पदार्थाची दुसऱ्याशी तद्रूपता झाल्याने त्याचा होणारा) लोप; नाहीसेपणा. ५. (खर्चामुळे, वापरामुळे) खलास होणे; नाश; क्षय. ६. झोप. ७. राजयोग समाधीला होणारे दुसरे विघ्न. ८. प्रलय; जगाचा नाश. ९. चित्ताची एकाग्रता, एकतानता. [सं.]

लय पु. १. निवास; घर : 'मग गोकुळी यशोदेचां लइं वाढले' - श्रीकृच १. २. समावेश: 'गगनीं गगन लया जाये ।'- ज्ञा १८.१०३९.

लय स्त्री. पु. वाद्य वाजवल्यानंतर मागे काही काळपर्यंत राहणारा त्याचा नाद, ध्वनी.

लय वि. क्रिवि. १. अतिशय; पुष्कळ; पराकाष्ठेचा; मायंदळ. २. (विशेषणाच्या आरंभी जोडल्यास) अतिशय; फारच.(ग्रामीण)

लयकारिका न. प्राणिपेशीतील व पेशीबाहेरील पचनाला कारणीभूत ठरणारे महत्त्वाचे अंगक.

लयकाळ येणे अक्रि. संभार, परिवार येणे. (व.)

लयक्रिया स्त्री. १. संहारकार्य. २. गाण्यात ताल धरणे. [सं.]

लयलूट स्त्री. रेलचेल; समृद्धी. (कुण.)

लयस्थ वि. तटस्थ; समाधीत असलेला : 'लयस्थें एके '- ज्ञा ११.१२९.

लयास जाणे १. तद्रूप, एक होणे. २. विनाश होणे; नाहीसे होणे.

लर्जा-जी पु. स्त्री. (संगीत) अनाद्रुत काळात हाताची तयारी असल्याचे दाखवण्यासाठी स्वरांचा कंपितपणा करून दाखवण्याची क्रिया. - कला १३८. [फा. लर्झा = कंप]

ललक स्त्री. इच्छा. (झाडी) [हिं.]

ललकार-री, ललकारणी पु. स्त्री. १. पुकारणे; हाक मारणे; (विशेषत:) दरबारात राजाचे आगमन सूचित करण्यासाठी चोपदार देतात ती आरोळी. २. ओरडणे; मोठ्या आवाजात सांगणे. ३. उच्च स्वरात गाणे.

ललकारणे अक्रि. १. मोठ्याने पुकारणे; हाक मारणे. २. मोठ्याने ओरडणे, म्हणणे (दवंडी पिटताना इ.). ३. (चालण्याची घाई करायला) सांगणे;

(जनावराला हाकताना) ओरडणे. ४. ओरडणे; गर्जना करणे.
सक्रि. १. ओरडून हाक मारणे. २. गाणे; गायन करणे. ३. आव्हान देणे. [ध्व.; हिं. ललकारना]

लल(लि)त पु. (संगीत.) एक राग. गानसमय रात्रीचा चौथा प्रहर.

ललन न. १. क्रीडा. २. कंपन. [सं.]

ललना स्त्री. १. स्त्री; महिला. २. स्वैरिणी, विलासिनी स्त्री. [सं.]

लललल उद्गा. निराशेचा किंवा विस्मयाचा उद्गार; चचचच!

ललाट न. १. कपाळ. २. दोन भुवयांमधला भाग. [सं.]

ललाटरेषा–खा स्त्री. कपाळावरील लेख; दैव; नशीब. [सं.] (वा.) ०**उभी राहणे** – दैव अनुकूल होणे.

ललाम नं. १. रत्न. २. भूषण. ३. शोभा. ४. चिन्ह. ५. कपाळावरचे चिन्ह.
वि. सुंदर. [सं.]

ललामक पु. मुंडावळी.

ललित न. १. (छंद) एक वृत्त. चरणात ११ अक्षरे. र, ज, स, ल, ग हे गण. २. स्त्रियांची रागविकारदर्शी लक्षणे; भाव (आळसाने आळोखेपिळोखे देणे, लोळणे इ.). ३. विलास; शृंगार. ४. स्त्रीचे नृत्य. ५. पहा: **लळीत**
वि. १. सुंदर; रमणीय; सुरेख. २. स्वैर; विलासी; विषयी (स्त्री). ३. कोमल.

ललित पु. वि.(साहित्य.) एक अलंकार. वर्णनीय प्रकृत अर्थाचे वर्णन न करता त्याच्या प्रतिबिंबरूप अप्रकृत अर्थाचे वर्णन करणे. [सं.]

ललितकथा स्त्री. अनेक प्रसंगांची गोष्टीरूपाने चतुराईची मांडणी; गुंफण.

ललितकला स्त्री. काव्य, गायन, वादन, चित्र, नृत्य इ. सौंदर्यविषयक कोमल कला. (इं.) फाईन आर्ट. [सं.]

ललित वाङ्मय, साहित्य सर्जनशील, प्रतिभेचा स्पर्श असलेला, सौंदर्यशाली, मनाला रिझवणारा, मनोरंजक वाङ्मयप्रकार. [सं.]

ललिता स्त्री. १. स्वैरिणी स्त्री. २. सुंदर स्त्री. ३. सामान्य स्त्री.

ललिता पंचमी १. आश्विन शुद्ध पंचमी हा दिवस. २. या दिवशी केलेली ललितादेवीची पूजा. [सं.]

ललुपतु, ललुपत्तु, ललोपतो न. स्त्री. आंजारणी–गोंजारणी, भोळावणी; लाडीगोडी; खुशामत; आर्जव. [देप्रा. लालि]

ललेथापे स्त्री. थापटणे व शांत करणे; गोंजारणे; कुरवाळणे. [क. लाली + थाप]

ललोपती स्त्री. वारंवार केलेली विनवणी; खुशामत; हांजी–हांजी. (अहि.)

लल्ल वि. चंचल.–शर.

लल्ला पु. आमिष; मधाचे बोट; प्रलोभन. (क्रि. लावणे, दाखवणे, देणे.)

लल्ल्या वि. १. बावळट. २. छांदिष्ट. (झाडी)

लल्हावणे अक्रि. १. लालचावणे. (व.) २. किंचाळणे; विव्हळणे. (अहि.)

लव स्त्री. १. (दाढी, मिशी, डोके इ. ठिकाणी असणाऱ्या राठ केसांवाचून) पाठ, पोट, हात, पाय इ. अवयवांवरील बारीक, मऊ केस; अंगावरील केस. २. प्राण्यांच्या कातडीवरील मऊ केस; लोकर. ३. खराऱ्याने निघालेले घोड्याच्या अंगावरचे केस व मळ. [सं.लोम]

लव स्त्री. पागोळी; वळचण : 'लवेचें पाणी दक्षिणेस काढून दिलें.'– भाइसंमं.

लव पु. १. अणू; सूक्ष्म अंश. २. (फज्यो.) अंश; भाग. ३. अपूर्णांकाचा अंश (वरचा भाग). ४. तुकडा: 'शरधारी रिपूगणाचे लव । करिन ऐसें जाणावें।'–जै २९.१३. ५. छत्तीस निमिषांइतका काळ: 'निमिष निमिषार्ध त्रुटि लव क्षण।'–एभा २.७५५. ६. क्षण.
वि. थोडा; अत्यल्प: 'प्रभुची दे न भीति लवलीला।' – मोभीष्म ४.४०. [सं.]

लवक वि. किंचित.

लवक न. १. (वानस.) प्रकाशसंश्लेषण घडवून आणणारा पानात असणारा भाग. २. (जीव.) शरीराच्या भागांना रंगरूप देणारा अविद्राव्य पदार्थ. उदा. काळ्या लवकामुळे केस काळेभोर दिसतात.

लवकर न. अवधी; अवकाश; (आधीची) वेळ; उशिराच्या उलट.
क्रिवि. १. त्वरेने; घाईने. २. चटकन; पुष्कळ वेळ जाण्यापूर्वी. ३. आधी; नेहमीच्या वेळेपूर्वी.

लवकळी स्त्री. हलकल्लोळ. (व.) [ध्व.]

लवकंड स्त्री. १. लोळकंड; एकमेकांवर उड्या मारणे व लोळणे; (खेळात, भांडणात कुत्री, मांजरे इ. ची) झोंबाझोंबी. २. (ल.) गर्दी; दाटी; रेटारेटी.

लवका, लवकिरा वि. लवचीक; मृदू; नरम; वाकणारे; नमणारे: 'हें पाठीचे हाड बळकट असून लवकें असावें लागतें.' –मपु ६ (आ. दुसरी), पृ. २५६.

लवका पु. हाताने, तोंडाने तोडलेला तुकडा; लचका (मऊ खाद्यपदार्थाचा).

लवखाद स्त्री. (घाईने, उतावीळपणाने घेतलेली) उडी; झडप; झाप (काही वस्तू देणगी यांवर). (क्रि. पडणे)

लवचीक वि. १. न मोडता वाकणारा; लवणारा; लवका. २. स्थितिस्थापक. ३. हट्टी, आग्रही नसणारा; दुसऱ्याचे ऐकणारा (माणूस).

लवचीकता स्त्री. कोणत्याही घन वस्तूला ताण देऊन तो सोडल्यावर ती पूर्वस्थितीला येण्याचा गुणधर्म.

लवट स्त्री. ओझे, भारा आवळून बांधण्यासाठी त्याच्याभोवती बांधलेल्या दोरीत घातलेली काडी, चीप. (वा.) **लवटी घेणे** – गाठ मारताना सैल दोऱ्यांमध्ये एक हात काठी घालून ती पिळवटून न हालेशी झाल्यावर करकचून बंद बांधणे.

लवटव पु. वरवरचे प्रेम; लाडीकपणा: 'जावया परपुरुषाशीं । लवोटवो लावी निज पतीसी।'–एभा २१.२७४.

लवटी क्रिवि. उलटीकडून: 'मग संयमाची धाटी। सूनु मुरुडिलिया लवटीं'– ज्ञा १२.४७.

लवटी स्त्री. ओझे, भारा आवळून बांधण्यासाठी त्याच्या भोवताली बांधलेल्या दोरीत घातलेली काडी, चीप.

लवटे वि. १. लवण्याजोगे. २. लवलेले.

लवडसवड–डी स्त्री. लगबग; तातडी; त्वरा.

लवड(डी)सवडी क्रिवि. झपाट्याने; जलदीने चटपटीने.

लवडा पु. पुरुषाचे जननेंद्रिय; शिश्न; लिंग. [हिं.]

लवडेलूट स्त्री. (अशिष्ट) १. अतिशय रेलचेल; मोठे वैपुल्य. २. (ल.) मातीमोल स्थिती.

लवण न. मीठ; क्षार. [सं.]
पु. क्षार रस.
वि. खारट; खारे; क्षारयुक्त.

लवण न. स्त्री. १. खोलगट, सखल जागा; बतखल. (सामा.) खोल, आत गेलेला भाग; खळगा. जसे:-पायाची-मानेची-हाताची लवण. २. वळण; वाकण (रस्त्याचे, नदीचे). ३. लहानसा ओढा; नाला. ४. उतार; उतरती जागा. ५. लीनता; लवणे. [सं.]

लवणजल न. (खारे पाणी) समुद्र. [सं.]

लवणता स्त्री. समुद्राच्या एक किलोग्रॅम पाण्यात विरघळलेल्या क्षारांचे प्रमाण; क्षारता.

लवणत्रय न. शेंदेलोण, पादेलोण व बिडलोण ही तीन लवणे. [सं.]

लवणपंचक न. संचळ (पादेलोण), सैंधव, बिडलोण, औद्भिद (जमिनीत उकरून निघालेल्या खाऱ्या पाण्यापासून सूर्यकिरणांच्या किंवा अग्नीच्या साहाय्याने झालेले मीठ) व समुद्राच्या पाण्यापासून झालेले मीठ. [सं.]

लवणभंजन न. (उप.) १. पूज्यतेचे व नम्रतेचे मोठे अवडंबर करणे; लवून नमस्कार करीत पूज्यतादर्शक शब्दांनी संबोधणे, बोलणे: 'पंडित भेटती समत्सर। लवणभंजन अतिनम्र।'-एभा १०.१७३. २. अतिनम्रता; आदर; आर्जव.

लवणभांडे न. खोलगट भांडे : 'तो लवणभांडा पचावा: पाहार च्यारी'-रकौ १५७.

लवणशाक-ख पु. स्त्री. खारावलेली फळे, भाज्या; लोणचे. [सं.]

लवणस्तंभ पु. चुनखडकांच्या प्रदेशात भूपृष्ठाखाली निर्माण झालेल्या गुहेच्या छतातून झिरपणाऱ्या पाण्यात असलेल्या क्षारामुळे छतापासून तळाकडे खांबासारखा झालेला भाग.

लवणा वि. ओणवा. (व.)

लवणी स्त्री. १. वाकलेल्या अवयवाच्या खालील लवण; खळगी. २. बाक; वक्रता; कमान (रस्त्याची इ.); लवणातील आत गेलेला भाग.

लवणे न. १. लाट : 'परततें लवणें'-कला १६.२. २. दार: 'सार्धी लवणें उघडौनि पाहिले.'- लीच ३.

लवणे अक्रि. १. वाकणे; दबणे. २. तळपणे (वीज). ३. (डोळा) स्फुरणे. ४. कलणे (मनोवृत्ती, मन); (मनदेवता-पिंगळी) वाहणे ह्या अर्थी मन, मनदेवता, मनपिंगळी इ. शब्द कर्तृस्थानी वापरतात. ५. उडणे; उडी मारणे. ६. लीन, नम्र होणे. ७. थरथरणे: 'लवती पापण्या'-नाम १६७. ८. उमटणे: 'मुहुर्त्ती तुज बत्तिसी लविनली'-गरा १५०. [सं. लीन, नमन; हिं. नौना; पं. नौणा]

लवथवणे अक्रि. १. लवलवीत, स्थूल होणे. २. लोंबणे : 'अमुप लवथविती कातडी।'-दास ३.१.१९.

लवथवि(वी)त वि. थलथलीत; लवलवीत. [लवणे द्वि.]

लवथा पु. हाताने धरून ओढलेला शरीरातील मांसाचा गोळा; लचका. (राजा.)

लवदार न. जुने, फाटके वस्त्र; बोंदर. (कु.)

लवधट वि. १. निष्काळजी; बेपर्वा; अविचारी. २. दुराग्रही; हट्टी. (प्रां.)

लवन पु. १. पाणी वाहून जाण्याचा पाट. २. पहा : **लवण** ३, ४

लवना पु. सूप: 'साळीचं तांदूळ उभ्या लवन्यांनं पाखडी'-लोसाको.

लवनी स्त्री. एक प्रकारचे सीताफळ. [सं.]

लवफळ न. लव या झाडाचे फळ. हे लहान, पण फणसासारखे आंबटसर असते.

लवबाक स्त्री. लवणे व वाकणे या क्रिया: 'नाचतांना तिचे शरीराची हालचाल व लवबाक अशी सफाईदार होती---'-पाणकळा ७८.

लवमात्र क्रिवि. १. किंचितही; अल्पसेही. २. किंचित काळ; क्षणभर.

लवलकी वि. नाजूक पाकळ्यांचा व किमती, भारी : 'शंकर पुशी कीं म्हादेव पुशी कीं लवलकीचा हार ग' - लोसाको.

लवलट क्रिवि. एकाला एक जोडून असलेले : 'तैसे जाणं लवलटें। दोन्ही जिथें एकवटे।' - ज्ञा १३.९५६.

लवलव स्त्री. १. (बोलताना जिभेच्या लवण्यावरून) बडबड; लबलब. २. हालचाल; वळवळ.

लवलव स्त्री. १. लुसलुशीतपणा; कोमलता. २. टवटवी; उत्सुकता: 'तया अवधानांचिया लवलवा। पाहतां व्याख्यान चढलें थावा। चौगुणें वरी।'-ज्ञा १३.११५०.

लवलवणे अक्रि. १. जलद व चपळाईने वाकणे व वळणे (अतिशय लवचीकपणामुळे); वळवळणे (साप, किडा इ.). २. (ल.) बोलण्यासाठी उत्सुकतेने फुरफुरणे; वळवळणे (जीभ); स्फुरण चढणे.

लवलवा-व क्रिवि. १. जलद बोलण्याचे अनुकरण करून; लबलब. २. घाईने; गर्दीने; लवकर.

लवलवाट पु. (लवलवचा अतिशय) १. उत्कंठा; उत्सुकता. २. घाई.

लवलवीत वि. १. लवचीक. २. मऊ व दबणारे (लोणी, मळलेली कणीक, शिजलेला भात इ.); लवथवीत.

लवलक्षण न. देखणेपणा; सौंदर्य; चारुता. (राजा.)

लवलाव पु. चळवळ; लवलव.

लवलाह पु. १. वेग; त्वरा. २. सामर्थ्य.

लवलाह-ही-हे क्रिवि. झटपट; जलदीने; झटक्यात.

लवली स्त्री. एक झाड. पहा: **हरपरेवडी** [सं.]

लवंग स्त्री. १. उष्ण हवा व भरपूर पाऊस असणाऱ्या प्रदेशात वाढणारी वनस्पती. २. हिचे फळ. मलाका व अंबोयना बेटात हिचे उत्पादन अधिक होते. लवंगा या लवंगांच्या झाडाच्या न उमललेल्या, वाळलेल्या कळ्या असतात. मसाल्यांमध्ये, सुगंधी पदार्थांत, तेलासाठी उपयोग. ३. लवंगेच्या आकाराचे एक कर्णभूषण. [त. इलवंगम्; सं.]

लवंग-क स्त्री. पहार. (गो.) [सं. लोहांग]

लवंगकाचरी-सुपारी, लवंगचुरी-चूर स्त्री. पु. कोवळी असताना लवंगेच्या आकाराच्या तुकड्यासारखी कातरलेली, शिजवलेली सुपारी; कोणत्याही आकाराची लहान खांडे केलेली, शिजवून वाळवलेली सुपारी.

लवंगणे अक्रि. लचकणे; मुरगाळणे; दुखावणे.

लवंगपट्टा पु. दालचिनी. (तंजा.)

लवंगपिंपळी स्त्री. पिंपळीची अतिशय लहान जात.

लवंगफूल न. लुगड्याचा एक प्रकार. लुगड्यावरील लवंगेच्या आकाराचे फूल.

लवंगल पु. (शाप.) लवंगाच्या तेलातील मुख्य घटक. (इं) युजेनोल.

लवंगादि वटी (आयु.) एक चूर्ण किंवा त्याची गोळी.

लवंगी वि. १. लवंगेची. २. लवंगेप्रमाणे बारीक, लहान किंवा तिखट (मिरची).

लवंगी स्त्री. १. साधी काठी.- गुजा ६२. (कोळी) २. लोहंगी; लोखंडाची वेटाळी जागोजाग लावून मजबूत केलेला प्राणघातक सोटाः 'बिचवा लवंगी गुरगुज सांग सोंटा बरची फेंकिती।'- ऐपो १०९.

लवंगी फटाका आकाराने बारीक पण मोठा आवाज करणारा फटाका.

लवंगेल न. लवंगेचे तेल.

लवं(व)घा पु. दाह; शोष; अतिशय तहानः 'तैसाचि लवंघा सुटे। मग भुईं ना सेजे सांटे। पाणियाचें न सुटे। तोंडोनि पात्र।'-ज्ञा १७.१४९.

लवंचक न. उभारणी; पोकळपणा; निरर्थकत्वः 'आतां द्वंद्वाचें लवंचक। सांडूनि दुणीचें कंचुक।'- अमृ ५.३३.

लवंडणे सक्रि १. उलंडणे; पालथे पाडणे. २. उलंडून सांडणे.

अक्रि १. उलटणे; सांडणे; एका बाजूला किंवा पालथे पडणे. २. घसरून पडणे. (को.) ३. (बिछान्यावर) निजणे; आडवे होणे; वामकुक्षी करणे. [सं. लुठ्-लुठ्]

लवंडा पु. १. मुलगा. (व.) २. पोऱ्या; गुलाम.[हिं. लौंडा; फा.लवन्द]

लवंडी स्त्री. १. बटीक; दासी. २. वेश्या. ३. रखेली. [फा.लवन्द]

लवंडीचा वि. एक शिवी; दासी, वेश्या इ. चा मुलगा; जारज.

लवा-व्हा पु. एक पक्षी. [सं. लाव, लावक]

लवा पु. १. सत्ता. २. निशाणा; पताका. (आदि.) ३. लवाजमां. [अर. लीवा=निशाण]

लवाजमा पु. १. नोकर-चाकर; पदरचे लोक; मोठेपणा, डौल दिसण्यासाठी बाळगावा लागणारा परिवार. २. पहाः **लवाजीम**

लवाजीम पु. १. हक्क. २. करः 'हक-दक वगैरे लवाजीम कूल जे असतील ते वसूल करुन सरकारांत जमा करणें.'-वाडबाबा २.४५. [अर. लवाझिम्]

लवाद पु. १. विवाद्य प्रश्नावर निर्णय देणारी, त्रयस्थ व नियुक्त केलेली व्यक्ती; मधस्थ; पंच; दोन पक्षांत तडजोड करणारा. २. मध्यस्थी; तडजोड (कोर्टात न जाता खाजगी रीतीने केलेली). [अर. लवाझ]

लवादकोर्ट न. आपसातले तंटे सरकारी न्यायकोर्टात न नेता पंचांमार्फत तोडून घेण्यासाठी स्थापन केलेली सरकारमान्य संस्था.

लवादनामा पु. लवादाने दिलेला निवाडा.

लवादी स्त्री. लवादाचे काम; पंचायत.

वि. लवादाच्या, मध्यस्थीच्या संबंधाचा.

लवावर्डी स्त्री. गवत कापून नेण्याचा मक्ता.- ऐपो.

लविंत्र न. कोयता. [सं.]

लविथपी स्त्री. लपंडाव.

लवेलागणी स्त्री. (पडवी व शेजार) संबंध; ऋणानुबंध; (ल.) विश्व किंवा प्रवृत्ती आणि मायाः 'भणाल लवे लागणिचा। तरि मध्यें लटिका वायांचा।' - ऋ ४४.

लवोटणे अक्रि. पुढे-पुढे करणे.

लवोट(थ)वो पु. १. आर्जव; लाडिकपणाः 'धनवंता पुरुषापाशीं। स्त्री लवोटवो करी कैशी।'-एभा २३.३३६. २. आदरातिथ्यः 'वोस घरासि वस्तीसि पहांहो। निर्जीव पाहुणा आला राहो। त्याचा कोण करी लवोथवो।'- एभा २१.४८८.

लव्हं(व्हां)गी स्त्री. गदा; लवंगी.

लव्हा वि. लवकर पीक देणारे. (बे.)

लव्हा, लव्हाळा पु. तृणविशेष; दर्भासारखे गवत. हा चार फूट वाढतो व ओढ्याच्या आणि खाडीच्या तीरांवर सामान्यतः आढळतो. याचा घराची छपरे, चटया इ. साठी उपयोग करतात. [सं. लव-वा]

लव्हा वि. लहान. [सं. लघु]

लव्हा पु. मोठी तरवारः 'राया जाधव जप्तन-मुलुख लव्हा केला।'- ऐपो ३३५.१९.

लव्हागर्द स्त्री. तरवारींची खणाखणीः 'खना खना लव्हागर्द उडली।'- ऐपो २७१.

लशाकोड्या वि. कोड आणि लस असलेला; गलतकुष्ठ झालेला. (राजा.)

लष्कर(श्क,स्क)र, लश(ष,स)कर न. १. सैन्य; फौज. २. सैन्य जेथे राहते तो भाग; कँप; गोट. [फा. लश्कर्] (वा.) ० **उतरणे**-(उप. विनोद) लहान मुलाने शौच करणे. **लष्करच्या भाकरी भाजणे** - (पूर्वी सैन्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाई तेव्हा त्या-त्या ठिकाणच्या लोकांना शिपायांच्या भाकरी भाजण्यासाठी लावत. त्यावरून) निष्कारण दुसऱ्याच्या उठाठेवी करणे.

पु. १. नाखवा; खलाशी. २. लष्करातील नोकर; लास्कर.

लष्करगिरी स्त्री. १. सैन्यातील चाकरी; शिपाईगिरी. २. (उपजीविकेसाठी) लष्करासोबत जाणे; लष्करातील वाणी, शिंपी इ. चा धंदा.

लष्करभरती स्त्री. सैन्यात नवीन उमेदवार भरणे.

लष्करी वि. सैन्यासंबंधी.

लष्करी कायदा युद्ध किंवा बंडाळीमुळे नेहमीचा असलेला कायदा तहकूब होऊन लष्करी अधिकाऱ्यांचा बसलेला अंमल व त्यांचा कायदा. (इं.) मार्शल लॉ.

लष्करी बैदा १. वाहून नेण्यासारखे लष्करी सामान. २. बाजारबुणगे.

लष्ट(ष्टा)ण न. १. भूतबाधा. २. कुरूप व्यक्तीला उद्देशून योजण्याचा एक तुच्छतादर्शक शब्द. (व.,ना.)

लष्टन-म न. १. व्यसन. २. लचांड.

लस स्त्री. १. जखम, फोड इ. तून वाहणारे पाणी, द्रवांश; रक्ताच्या पाण्याचा स्राव. २. शरीराच्या उपजत रोगप्रतिकारक यंत्रणेला अधिक बलवान बनवण्यासाठी दिला जाणारा प्रतिबंधक द्रव पदार्थ.[सं. रस, लसिका]

लसणा पु. कुऱ्हाडीला वगैरे धार लावण्याचा दगड; निसणा.

लसणी स्त्री. १. लसणाची पाकळी, कुडी. २. तिच्या आकाराचा स्त्रियांचा कानातील एक अलंकार (जवा, तोडा इ.). याच्या कड्या लसणीच्या कुडीसारख्या असतात. ३. वैदूर्यमणी.

वि. १. लसणीच्या पाकळीच्या आकाराचा (मणी इत्यादी). २. लसणासंबंधीचा.

लसणी बिंब वेताची एक लहान जात. याला पिंगट फूल येते.

लसणे अक्रि . विलसणे; शोभणेः 'सुंदर सकल वधूतें कशी न लसतीच होय दमयंती ।'– र १.

लसणे अक्रि. डाचणे; बोचणे; मनाला लागणेः 'म्हणोनि परिहास हा सहज आजि केला लसे ।'– मोकृष्ण ६०.९. [सं.लस]

लसण्या–णा पु. १. एक रत्न; वैडूर्य; दुध्या काचमणी. याला बहिर्वक्र आकार दिला असता याचे बिडालाक्ष किंवा मार्जारनेत्री हे रत्न होते. त्याचे रंग धूम्र, पिवळट, पांढरट वगैरे. २. फणसाचा बारीक गरे असलेला एक प्रकार. [सं. लशुन]

लसत वि. उत्कृष्ट; शोभायमान; उज्ज्वल. [सं.]

लसती स्त्री. विलासी, सुंदर स्त्री.
वि. विलसणारी; सुंदर. [सं.]

लसफशी(सी)त वि. १. ढील; शिथिल; भोंगळ; घट्ट.

लसलशी(सी)त वि. १. अतिशय तप्त; फार खवळलेला; फसफसणारा (द्रवपदार्थ). २. झपाट्याने बुजबुजणारे (किडे इ.); बुजबुजाट असलेले. ३. लुसलुशीत; टवटवीत.

लसलस स्त्री. १. अतिशय वळवळ. २. उत्कंठा. ३. तारुण्याची धमक, तेज.

लसलस–सा क्रिवि. १. अतिशय तप्त व क्षुब्ध द्रवपदार्थांच्या,क्षतात किंवा नासलेल्या फळात बुजबुजणाऱ्या किड्यांच्या हालचालीचे दर्शक किंवा त्यांच्या आवाजाचे अनुकरण करून. २. टवटवीतपणे; टकमकीतपणे.

लसलसणे अक्रि. १. रसरसणे; सळसळणे; खळबळ करणे. २. जखमेत किडे वळवळत असणे; बुजबुजाट होणे. ३. भर येणे; भरज्वानी येणे. ४. लुसलुसणे; टवटवणे; तकाकणे; प्रफुल्लित होणे. ५. अति उत्कंठित होणे. ६. वखवखणे. [सं.लस् द्वि.]

लसाकफसाक क्रिवि. अघळपघळ. (कु.)

लसासणे अक्रि. हपापणे;वखवखणे; उतावीळ होणे.

लसिका स्त्री. पिवळसर रंगाचे, अभिसरणप्रक्रियेतील एक द्रायुरूप माध्यम;शरीरातील सर्व ऊतींमधून वाहणारा एक पारदर्शक द्रव.

लसी(शी)करण न.रोगप्रतिबंधक लस टोचण्याची क्रिया;प्रामुख्याने संसर्गजन्य रोगांना प्रतिबंध करण्याची प्रभावी उपचारपद्धती.

लसूण पु. स्त्री. नं. १. एक वनस्पती, कंद. याचा रोपा कांद्यासारखा असतो. ह्याच्या कांद्यातील पाकळ्या स्वादासाठी मसाल्यात, स्वयंपाकात वापरतात. याचे औषधी उपयोगही अनेक आहेत. २. या वनस्पतीचा कांदा किंवा त्यातील पाकळी. [सं. लशुन; प्रा. लशुण, लसण]

लसूण घास एक प्रकारचा चारा. (को.) [इं. ल्यूसर्न ग्रास]

लस्सी स्त्री. १. घट्ट ताक, साखर मिळून केलेले थंड पेय. २. दूधपाणी. ३. दूध व पाणी मिसळून केलेली थंडाई. [हिं]

लहज पु. क्षण, पळ; निमिष. [अर. लह्ज]

लहज स्त्री. ऐट; नखरा; शोभा :'इकडे कडे व तोडेवाले तिकडेहि तशीच लहज.'–ऐपो २.४७. [अर. लहज =डोळे अर्धवट मिटून पाहणे]

लहडणे अक्रि. (प्र.) लांगणे; लढणे; लगटणे.

लहणी हुंडी हुंडीचा एक प्रकार. उदा. 'अ'चे पैसे 'ब' जवळ आहेत. 'क' चे पैसे 'ब' जवळ नाहीत. तेव्हा 'ब' वर दिलेली हुंडी त्याने 'अ' पासून घेऊन स्वीकारावी म्हणून 'क' ने 'ब' कडे पाठवलेली हुंडी.

लहणे न. १. पहा : **लहणी हुंडी.** २. जम; मेळ (मनुष्यांचा, वस्तूंचा). ३. ममत्व; स्नेह; आपलेपणा; सामंजस्य.
वि. लाभदायक; धार्जिणे. [सं. लभन; प्रा. लहण]

लहर स्त्री. १. तरंग; लाट (पाण्याची). २. शरीरात उठणारा वेग, पेटका, झटका (मादक, विषारी पदार्थ, विषारी दंश, क्रोध, काम इ. पासून किंवा मरणकाळी येणारा). ३. शौचाच्या वेळी होणारी पोटातील खळबळ, ओसर; शौचाचा आवेग. ४. झगडा, वेदना इ. च्या वेळी होणारी क्रिया; धडपड. ५. वाऱ्याची झुळूक; मंद वारा. ६. हुक्की; एकदम होणारी इच्छा; प्रवृत्ती; कल (मनाचा). ७. विशिष्ट जातीच्या सापाच्या गळ्याखालच्या रेषा. (ह्या जितक्या असतात तितक्या तो साप चावलेल्या माणसाला विषाच्या लहरी येतात असा समज आहे.) ८. (कापडावरील विणकामातील, रंगकामातील) नागमोडी रेषा. ९. कापड इ. ची नागमोडी घडी. १०. आकस्मिक झडप; ग्रसण (झोपेची). ११. छाया; झाक. [सं. लहरी]

लहरदार वि. १. छांदिष्ट; लहरी; तबियती. २. नामी; सुंदर, लहर दाखवणारा (पोशाख, गाणे इ.). ३. पाण्याच्या लाटेप्रमाणे वर–खाली होणारे.

लहरपट्टिका स्त्री. (रेडिओ) ध्वनिलहरींचा पल्ला; तरंगपटल; तरंगपट्टा.

लहरबहर स्त्री. १. जोम; ज्वानी; भर; अत्युत्कर्ष. २. हुक्की.

लहरा पु. १. (संगीत) तालवाद्यांच्या (विशेषतः तबला/मृदंग) स्वतंत्र वादनाच्या वेळी पेटी, सारंगी, व्हायोलिन इ. वर तालाच्या आवर्तनाची वाजवली जाणारी धून; छाया; सूर (विशेषतः तंतुवाद्यावरील). २. तान; लकेर. (वा.) ० **मारणे–** छांदिष्टपणाने क्रीडा करणे; मौज मारणे.

लहरी स्त्री. १. लाट. २. शरीरात उठणारा वेग; पेटका :'लागला म्हणोनि लहरी। भांजेची ना ।' – ज्ञा २.७१. ३. चुनडीप्रमाणे नागमोडी रेघा असलेले, स्त्रियांचे नेसण्याचे वस्त्र.
वि. छांदिष्ट; तऱ्हेबाज;विलक्षण; चंचल; मनस्वी. (वा.) **लहऱ्या पिटणे–** कमालीची उत्सुकता लागणे, दाखवणे. (व.)

लहा पु. ध्यास. पहाः **लाहो**

लहा, लहालहा स्त्री. १. उसासा; धापा देणे. २. लखलख करणे; झळाळणे; चकाकणे. ३. (ल) स्पर्धेने धापा देणे; लाहडा होणे; स्पर्धेने होणारी तडफड. (क्रि. एखाद्याशी बांधणे.)
क्रिवि. १. (उष्णतेच्या तापामुळे) धापा देणे; उसासे टाकणे इ. चे अनुकरण करून. २. प्रखर सूर्यकिरणांमुळे हवेच्या हेलकाव्याचे, मृगजळाचे अनुकरण करून. ३. शेतातील लहरीदार पिकाच्या चकाकण्याचे अनुकरण करून; अत्यंत रुक्ष हवेत पिके जणू धापा टाकीत आहेत त्यावेळचे अनुकरण करून.

लहाई स्त्री. सागुतीचा किंवा माशांचा खंका किंवा फोडी. (को., कु.)

लहाकणे अक्रि. धापा टाकणे; जोराने श्वासोच्छ्वास करणे.

लहाडी स्त्री. राडी; विस्तवाची खाच. (मराठवाडा)

लहाणीव स्त्री. लहानपणा; कमीपणा : 'येणें काय लहाणीव आणिली आम्हां' – जना १४३.

लहाणे अक्रि. १. लाभणे; लहणेः 'स्वर्गू न लहाअे एकु कवडी ।' – शिव १३३. २. पात्र असणे : 'काव्यें जालीं मातवळीणे । तिए टाकों न लहती जवळी यासे गाउंवा ।'– शिव ८५. [सं. लभन; प्रा.लहण]

लहान वि. १. लघू; सान; अल्प (वय, किंमत इ. ने). २. आखूड; छोटा (आकार, प्रमाणे इ. नी). ३.अल्प; थोडा.[सं. लघु; प्रा. लहु] (वा.) ० **तोंडी मोठा घास घेणे** – आपला लहान दर्जा न ओळखता एखादी मोठी गोष्ट करणे; आपल्याकडून न होण्यासारखे काम करायला तयार होणे.

लहान आतडे साधारण पाच मीटर लांबीचा, पचनसंस्थेचा भाग. अन्नाचे रासायनिक अपघटन व अन्नातील पोषक द्रव्यांचे शोषण ही महत्त्वाची कार्ये.

लहानखुरी वि. १. लहान पायाची (गाय, बैल इ.). २. लहान बांध्याची; ठेंगणीठुसकी.

लहानगा वि. १. धाकटा; अधिक बुटका – आखूड इ.; (तारतम्याने) कमी (उंची, लांबी, वय इ. कांत). २. छोटा; बुटका; आखूड.

लहानथोर – मोठा वि. लहान आणि मोठा; प्रत्येक आकाराचा, वयाचा व जातीचा; एकंदर.

लहानपण – णा न. पु. १. लघुता; लहकेपणा. २. बालपण.

लहान मेंदू कवटीच्या मागच्या बाजूला असलेला, शरीराच्या विविध हालचालींवर नियंत्रण ठेवणारा व तोल सांभाळणारा मेंदूचा भाग.

लहानलहू–लोहू–लव पहाः **लहुलहान**

लहानवी स्त्री. १. (वयाचा, आकाराचा) लहानपणा. २. (ल.) हलकेपणा; लघुत्व; थोरवी, मान्यता, गौरव यांचा अभाव.

लहानवीथोरवी स्त्री. तुलना करताना दाखवले जाणारे दोन माणसांतील (मुख्यत्वे वयाचे) अंतर; दोन वस्तूंमधील तुलनात्मक अंतर; असमता.

लहानसर वि. लहानसा; काहीसा लहान.

लहानसहान वि. बारीकसारीक; लहान, हलका इ.

ल(ला)हानाव(ळ)णे अक्रि. १ कमी, अधिक लहान, अधिक अशक्त इ. होत जाणे; घटणे. २. क्षीण, बारीकबारीक होणे (विझणारा दिवा). ३. लहान प्रमाणात येणे; संकुचित होणे (जवळचे भाग सुजले असता डोळा).

लहानाळ वि. सामान्य प्रमाणापेक्षा लहान बांध्याचा (मनुष्य, पशू इ.).

लहानाळणे सक्रि. (शब्दशः व ल.) अधिक लहान, आखूड, अशक्त, मंद किंवा कमी करणेः 'आपण भ्रमें लाहानाळला ।' – दास ९.३४.

लहा(हां) बर वि. १. वाचाळ; बडबड करणारा. २. लुडबुड्या.

लहाय पु. १. मांसाचा तुकडा. २. काठीवर भाजलेले मांस. (कु.,को.)

लहारी स्त्री. १. तीन आण्यांचे एक जुने नाणे. २. तीन आणे (एकवट).

लहासे न. लहान डाग, व्रण; पहाः **लासे**ः 'उरी जयाचे मिरवे लहासें ।' सारुह ३.२३.

लहांगड स्त्री. धान्य, सामानसुमान वाहून नेण्याची दुचाकी हातगाडी, ढकलगाडी.

ल(लं)हिदवडी स्त्री. पळापळ;धांदलः'अहंममतेचिया लंहिदवडी । मातें न पवती चि बापुडीं ।' – ज्ञा. ९.६१.

लही स्त्री. लव्हाळे. (व.)

लही, लहीनपणा इ. पहा : **लीन** इ.

लहु–हू वि. लघू; लहान; बारीक.

लहु(हुं)डी स्त्री. एक शस्त्र; लोखंडाचे टोक बसवलेली काठी;लोहांगीः 'पाश लहुंडी चहड – चक्र ।' – मुआदि ३०.१६४.

लहुलहान वि १. लहान आकाराचे; बारीक. २. लहान व सुंदर.

लहुवी स्त्री. १. नाचणीची एक जात. २. श्रावणात निघणारे नाचणीसारखे एक हलके धान्य.

लहेजा – मा पु. क्षण. (व.)

लहू वि. आवडता; प्रिय; लाडकाः 'लाडकी सून माही । भ्रताराची मोठी लहू । कशी माहेरा पाठवूं.' – वलो. [सं. लघु]

लहूबंदी वि. किमती. लोसाको. (व.)

लळणे अक्रि. निश्चेष्ट पडणे.

लळणे अक्रि. पहा. **लळलळणे**

लळतलोंबत क्रिवि. १. फरफटत; खरडत. २. लोंबत; लोळत.

लळती–ते वि. क्रिवि. १. मन वळवणारे, सांत्वनपर (भाषण). २. हलक्या हाताने, हळू, सहज रीतीने (घेणे). [सं. लल्]

लळलळणे अक्रि. फेसासह लाळ बाहेर लोंबणे; इकडे – तिकडे हलणे; (जीभ) लळलळ करणे. [सं. लल्]

लळलळाट पु. लळलळ करणे; लळलळणे : 'तैसा जिभांचा लळलळाऊ देखिला । आवाळुलें चाटिंता ।'– ज्ञा ११.४२८.

लळवडी स्त्री. लाडिकपणे चालवलेली क्रीडाः 'तेथ राजकुमरा हातिची लळवडी' – रुस्व ८५३.

लळा पु. १. प्रीती;ममता (लालनपालन केलेल्या मूल, पशू इ. वरील). २. लाड; हट्ट. [सं. लल्-ड]

लळि(ळी)ता स्त्री. एक प्रकारचा दृष्टिक्षेपः 'लळिता रणीं उभी ठाकेः तरि एकांकी विरामासि नाहीं निकें' – मूप्र २१७१.

लळि(ळ)त्या वि. लळीत करण्यात निपुण (हरदास इ.).

लळि(ळ,ळे)वाड, लळेवड, लळवेडा पहा : **लडिवाळ**

लळी(ळि)त न. १. नवरात्र इ. उत्सवाच्या शेवटच्या रात्री उत्सवदेवता सिंहासनारूढ झाली असे कल्पून वासुदेव, दंडीगाण इ. ईश्वरभक्तांची सोंगे आणून त्या सोंगांनी स्वसंप्रदायानुरूप देवतेला प्रसाद मागून सभासदांना वाटण्याचा विशिष्ट समारंभ. २. (यावरून) उत्सवप्रसंगी सोंगे आणून नाटकाच्या प्रवेशाप्रमाणे खेळ करणे. ३. अशा प्रसंगांसाठी रचलेली व म्हटलेली गाणी, अभंग इ. कवनांचा ग्रंथ. ४. शेवटचे मंगलाचरण म्हणून मानलेल्या एका माळकेचा शेवटचा अभंग. पहाः **मंगल**. ५. (ल.) दुष्परिणाम; फजिती; दुःखान्त (राज्य, संसार इ. चा). [सं. ललित] (वा.) **लळ(ळि)तावर येणे** – वाद इ. च्या वेळी चिरडीला येणे, निकरावर येणे.

लळेया वि. हट्ट घेणाराः 'कां जे लळेयांचे लळे सरती ।' – ज्ञा ९.३.

लळ्तम् गळ्तम् न. अतिशय सख्य. (व.) [गळणे द्वि.]

लक्ष न. १. अवधान; भान. २. अनुसंधान.

लक्ष पु. शतसहस्र; लाख ही संख्या.

न. (ल.) आनंदाची, लाखाच्या योग्यतेची गोष्ट. [सं.]

लक्षक वि. पाहणारा.

लक्षण न. १. खूण; सूचक चिन्ह. २. गुणधर्म; ज्ञापकविशेष; ज्याच्या योगे एखादी गोष्ट ओळखली जाते अशी गोष्ट. ३. अभिधा; व्याख्या; तत्त्वाचा परिस्फोट करून (स्पष्ट करून) किंवा धर्म सांगून केलेले एखाद्या गोष्टीचे वर्णन. ४. (वैद्यक.) निदान; निदानाच्या पाच भागांपैकी तिसरा. ५. (यंत्रशास्त्र) गुण; उपाधी-जाती. ६. लवलक्षण; सौंदर्य. ७. अवलोकन; दृष्टी. [सं.]

लक्षणगीत न. एखाद्या रागासाठी आवश्यक स्वर, त्याची जाती, समय, वादी - संवादी स्वर वगैरे माहिती ज्या चीजेत सताल बांधली आहे, अशी त्याच रागात गाण्याची चीज. [सं.]

लक्षणसमन्वय पुं. १. व्याख्या किंवा वर्णिलेल्या गोष्टीची व्याख्येशी, वर्णनाशी योग्य, यथार्थ जुळणी. २. क्रियापदाचा कर्त्याशी दाखवलेला बरोबर संबंध. [सं.]

लक्षणहीन वि. सामान्यतः अपेक्षित लक्षणे नसणारी (वधू); शुभलक्षणे नसलेला (घोडा); विशेष गुण इ. नसणारी (व्यक्ती, वस्तू इ.). [सं.]

लक्षणा स्त्री. १. शब्दाचे किंवा शब्दसमुदायाचे अर्थलक्षण; भावार्थ; शब्दशः दाखवलेल्या अर्थापलीकडचा गर्भित अर्थ जिच्या योगे बाधित होतो ती वृत्ती. २. वाच्यार्थाहून निराळा पण तत्संबद्ध अर्थ; लाक्षणिक किंवा अलंकारिक गर्भितार्थ. [सं.]

लक्षणासंबंध पु. (तर्क.) शब्दाने किंवा शब्दसमुदायाने लक्षिलेली गोष्ट आणि मनातली गर्भित गोष्ट यांमधील संबंध; वाच्यार्थ व भावार्थ यांच्यातील संबंध.

लक्षणीक वि. सुलक्षणांनी युक्तः 'तैसें दिसे नाभिकमळ : सखोल लक्षणीक' - सव २४७.

लक्षणीय वि. १. दर्शनीय. २. मननीय; विचारणीय. [सं.]

लक्षणे पहाः **लक्षिणे**

लक्षदीप पु. अव. उत्सवातील रोषणाई.

लक्षपूजा स्त्री. १. (फुले, पाने, फळे इ. ची) लक्ष संख्या वाहून (देवाची) पूजा करणे. २. वरील पूजेसाठी जमवलेल्या वस्तूंची संख्या; लाखोली.

लक्षभोजन न. धर्मकृत्य म्हणून लक्ष ब्राह्मणांना भोजन घालणे. [सं.]

लक्षाधीश पु. लाखो रूपये जवळ असणारा, अतिशय श्रीमंत मनुष्य. [सं.]

लक्षानुलक्ष वि. लक्षावधी; असंख्यात. [सं.]

लक्षावधि-धी क्रिवि. लाखोगणती; लाखो. [सं.]

लक्षिणे सक्रि. १. पाहणे; अवलोकन करणे. २. (मनात) उद्देश, हेतू धरणे. ३. वाट पाहणे. ४. लक्षणे, चिन्हे किंवा आनुषंगिक सूचक गोष्टी यांवरून जाणणे, समजणे. ५. उमगणे; कळणे; ताडणे (गर्भित मत, अंतर्गत सत्य). [सं. लक्ष्]

लक्षित वि. १. लक्षिलेला; उद्देशित. २. पाहिलेला; दिसलेला. ३. उमगलेला; लक्षणांवरून इ. जाणलेला.

लक्षितार्थ पु. (त. शा.) शब्दांचा वाच्यार्थाच्या पलीकडे सूचित होणारा किंवा अभिप्रेत असणारा अर्थ.

लक्ष्मी स्त्री. १. विष्णूची पत्नी; संपत्ती, उत्कर्ष, वैभव, सौंदर्य इ. ची देवता. २. भाग्य; नशीब; सद्दी. ३. धन; संपत्ती. ४. श्री; शोभा; सौंदर्य; दर्शनीयता. ५. (कृषि.) शेतीच्या उपयोगाची जनावरे. ६. स्त्री; बायको. (खा.) [सं.] (वा.) ० **अवतरणे** - १. समृद्धी येण्याने शोभा वाढणे. २. घरभर पसारा असणे. ० **मोरीवाटे येणे** - गडगंज संपत्ती येणे; लयलूट होणे. **लक्ष्मीचा होरा** - भरभराटीचा काळ. **लक्ष्मीची मोठी बहीण** - अवदसा, दारिद्र्य, वाईट परिस्थिती येणे.

लक्ष्मीताल पु. गाण्यातील एक ताल. [सं.]

लक्ष्मीनारायणाचा जोडा एकमेकांना शोभणारे नवराबायको; आदर्श दांपत्य.

लक्ष्मीपति-ती पु. १. विष्णू. २. धनवान मनुष्य. [सं.]

लक्ष्मीपुत्र पु. श्रीमंत मनुष्य. [सं.]

लक्ष्मीपूजन न. १. गृहप्रवेश करून नवऱ्यामुलीला सासरी आणल्यानंतर नवदांपत्याकडून करवलेली लक्ष्मीची पूजा. २. आश्विन वद्य अमावास्येला घरात, तसेच दुकानात व्यापारी, धनिक लोक मोहरा, रुपये इ. द्रव्यावर करतात ते लक्ष्मीचे आवाहनपूर्वक पूजन.

लक्ष्मीबाईची दया लक्ष्मीची कृपादृष्टी; सांपत्तिक सुस्थिती.

लक्ष्मीराखण न. लक्ष्मीने कुटुंबात राहावे म्हणून लक्ष्मीसाठी निराळा काढलेला रोजच्या जेवणाचा भाग.

लक्ष्मीलीळ पु. लक्ष्मीचा पती.

लक्ष्मीवंत-वान. पु. १. संपत्ती असणारा. २. उत्कर्ष पावणारा. [सं.]

लक्ष्मीविलास पु. एक रसायन. हे विशेषतः क्षयावर देतात. [सं.]

लक्ष्मीविलास तेल गंधतेल. हे सर्वरोगनाशक आहे.

लक्ष्य न. १. लक्ष ठेवण्याची, नेम धरण्याची, वेध्य वस्तू; निशाण. २. अवधान; सावध चित्त. ३. ज्याच्या साहाय्याने वस्तू पाहायच्या असतात व दिशा निश्चित करायची असते ते लहानसे भोक (तुरीययंत्राचे इ.). ४. सावज.५.(तत्त्व.) ब्रह्मात्मस्वरूप.

वि.१ पाहण्यास, लक्ष देण्यास योग्य; जाणण्यास शक्य इ. २. समजलेला; सूचित किंवा उद्दिष्ट म्हणून ग्रहण केलेला; लक्षणेने कळणारा. [सं.]

लक्ष्यदर्शी वि. १. खोल दृष्टीचा; अचूक, योग्य दृष्टीचा. २. चांगला नेम साधणारा; निशाणबाज. ३. एका ठिकाणी स्थिर झालेला. [सं.]

लक्ष्यभेद-वेध पु. लक्ष्याचा अचूक नेम, वेध, भेद.

लक्ष्यशोधक न. रडारयंत्रः 'आधुनिक लक्ष्यशोधक (radar), शत्रूची लढाऊ विमाने...' - सैस्वा २६५.

लक्ष्यार्थ पु. लक्षणेने प्राप्त झालेला, गर्भित, वाच्यार्थाहून भिन्न अर्थ. [सं.]

लक्ष्यांश पु. १. जाणण्याची, ध्यानात घेण्याची गोष्ट. २. मनात आणलेली, समजलेली गोष्ट. ३. (तत्त्व.) वाच्यांशाचा त्याग झाल्यावर शेष राहिलेला अधिष्ठान ब्रह्मात्मा. [सं.]

लंका स्त्री. १. रावणाची राजधानी. २. सिंहलद्वीप; सिलोन बेट; श्रीलंका. ३. राक्षस, वानर, झाडे इ. च्या दारूच्या केलेल्या आकृती; दारूची झाडे; नळे, चंद्रज्योती इ. एकदम पेटवण्यासाठी त्यांची करतात ती रचना. ४. (विनोदाने, निंदेने) लहान मुलगी; केस पिंजारलेली, कुंकू नीट न लावलेली गबाळी मुलगी. ५. जारिणी, स्वैरिणी स्त्री. [सं.]

(वा.) ० **लुटणे** – अवाढव्य संपत्ती मिळणे. ० **होणे** – सौंदर्यवान, सालंकृत होणे. (गो.)

लंका स्त्री. तंबाखूची एक जात. कृष्णा आणि गोदावरी या नद्यांच्या दुआबातील तंबाखू.

लंकादहनसारंग पु. (संगीत) एक राग. गानसमय मध्यान्ह.

लंकालूट स्त्री. अगणित संपत्तीचा लाभ.

लंकिन काठ (नाशिक) जरीच्या काठाची जात. – ज्ञानप्रकाश ९.१.१९३१.

लंकेची पार्वती (लंकेला जाऊनही गोसाविणीच्या वेषात असणारी शिवपत्नी) १. अंगावर एकही दागिना नसलेली उंच व रोडकी स्त्री. २. (सामा.) अलंकाररहित सवाष्ण स्त्री.

लंकोदय पु. (ज्यो.) तारे, ग्रह, राशी यांचा श्रीलंकेतील उदयकाळ. (याला चरसंस्कार करून कोणत्याही ठिकाणचे त्या – त्या खगोलाचे उदयकाळ काढता येतात. कारण या शहरावरून पहिले याम्योत्तरवृत्त जाते असे मानतात. हे उज्जयिनीच्या याम्योत्तरवृत्तावर आहे.)

लंग न. लहान माशाचे जाळे.

लंग वि. लंगडा; पायाने अधू. [फा.]

लंग वि. अतिशय क्षीण व अशक्त झालेला. [सं. लङ्ग]

लंगचो पु. चिमटा. (कु.)

लंगड पु. पतंगाच्या मांजाला एका टोकाला एक दगड बांधून तयार केलेले खेळण्याचे साधन.

लंगडणी स्त्री. एक पाय अर्धवट किंवा न टेकता उड्या मारीत चालणे.

लंगडणे अक्रि. एक पाय अधू असल्यामुळे दुसऱ्या पायावर भार देऊन चालणे; पाय ओढत, वेडेवाकडे चालणे.
[सं. लंग – लग्; फा. लंगीदन; हिं. लंगडना]

लंगडदीन वि. (थट्टेने) लंगडणारा.

लंगडशाई–दी स्त्री. १. लंगडत चालणे. २. लंगडीचा खेळ.
वि. लंगडा.

लंगडा वि. १. एक पाय अधू किंवा आखूड असलेला. २. अधू; पंगू; विकल; व्यंगी. ३. (ल.) (एखाद्या आवश्यक घटकाच्या अभावामुळे) पंगू; कमजोर; निकामी (काम, यंत्र इ.). ४. अपुरा; तुटपुंजा; अप्रमाण; अयोग्य. [फा. लंग+ड]

लंगडी स्त्री. मर्यादित जागेत एकाने लंगडी घालत इतर पळणाऱ्या गड्यांना पकडायचे असा एक मैदानी खेळ.

लंगडी कोशिंबीर एक मुलींचा खेळ. – मखेपु २७१.

लंगणे अक्रि. लंगडणे.

लंगणे अक्रि. दुखणेकरी, रोड होणे; वाळणे. [सं. लंघन]

लंगधडक– धडंग वि. सडासोट; फकीर.

लंगर स्त्री. लांबण; मालिका. (व.)
वि. दीर्घसूत्री;चेंगट. (व.)

लंगर पु. १. गलबताचा लोखंडी नांगर. २. लोखंडाची मोठी साखळी. ३. (ल.) साधारण प्रमाणापेक्षा मोठी, अवजड वस्तू (दागिना, तोडा, साखळ्या, दोऱ्या इ.). ४. चुना, पोहे इ. कुटण्याचे एक यंत्र. ५. मोहरमच्या सणात फकिरांना वाटतात ते अन्न, शिधा. ६. मठ.
[फा.; सं. लाङ्गल]

लंगरखाना पु. १. अवाढव्य कारखाना. २. जेथे लवकर दाद लागणे कठीण अशी संस्था, प्रकरण इ. ३. अन्नछत्र.

लंगरखानी वि. १. अवाढव्य. २. अडाणी, आडदांड लोकांची (टोळी).

लंगरदोर पु.गलबताच्या नांगराचा दोर. [दें.]

लंगर हाडाचा वि. मोठ्या हाडाचा; जाडजूड; धट्टाकट्टा.

लंगरी काम (ल.) जंगी व बेडौल मनुष्य.

लंगरू वि. घोड्याची एक चाल. – अश्वप १.१९४.

लंगाड न. टवाळी. (गो.)

लंगोट, लंगुटा–टी पु. स्त्री. विशेषतः कुस्ती खेळताना किंवा व्यायाम करताना घालण्याचे अरुंद, लांब, नाडी असणारे व दोन्ही बाजूंना लेहानसा कपडा असणारे वस्त्र. [सं. लगपट्ट; क. लंगोटि; हिं.; पं. लंगोट] (वा.) **लंगोटी सोडून देणे** – (कमरेचे वस्त्रही) सगळे, उरलेसुरलेदेखील दान करणे.

लंगोटीयार पु.अगदी बालपणापासूनचा जिवलग मित्र.

लंगोवर स्त्री. घोड्याची धावण्याची एक चाल. – ज्योत्स्ना, ऑ.१९३७.

लंघणे अक्रि. १. क्षीण, अशक्त होणे. २. थकणे व वेंगणे (रोग, उपवास, श्रम यांमुळे). ३. आटणे; घटणेः 'तेणें पाक लंघलाः म्हणौनिः कठिण जालें की :'– लीच ३.
सक्रि.१. ओलांडणे; आक्रमणे. २.(ल.) अतिक्रमणे. [सं. लंघ्]

लंघन न. १. उपवास करणे (विशेषतः पथ्य म्हणून). २. ओलांडणे; आक्रमणे; वरून जाणे. ३. उल्लंघन; अवज्ञा. ४. क्षीण होणे. ५. (संगीत) एखादा स्वर रागालापांत टाळणे अगर त्याला फारच थोडा स्पर्श करून जाणे.

लंघले–लोपले पु. अव. दुखणेकरी व अशक्त; श्रांत व जर्जर.

लंच स्त्री. (खड्यांच्या खेळात) डाव; खेळाचा शेवट. (क.)

लंची स्त्री. पराजय. (तंजा.)

लंजा स्त्री. नग्न स्त्री; वेश्याः 'लंजा' म्हणजे नग्न स्त्री, वेश्या.' – लौकिक आणि अलौकिक, पृ. ३६.

लंजूर वि. कमजोर. (मुंबई)

लंड पु. १. (अश्लील) पुरुषाचे जननेंद्रिय; शिश्न. २. (ल.) लुच्चा व आतल्या गाठीचा मनुष्य. ३. दांडगा, उन्मत्त, बेगुमान मनुष्य. ४.आततायी मूल. ५. देवाधर्माला न जुमानणारा, पाखंडी, विषयासक्त मनुष्य.
वि. १. स्वच्छंदी; स्वैर. २. ठक ; पक्का धूर्त. ३. दांडगा; उनाड. ४. धीट; धिमा; बेगुमान; बेफिकीर. [फा. लन्द, लवन्द्]

लंडपण न. दांभिकपणा; दांडगाई; उन्मत्तपणाः ' म्हणवितो दास न करिता सेवा । लंडपणे देवा पोटभरी ।' – तुगा ८८८.

लंडपुच्छ वि. लांडा; शेपूट तोडलेला.
पु. (एका लबाड, शेपूटतुटक्या उंदराच्या) मुलांच्या टोळीचा नायक; लहान पुढारी.

लंडभारती पु. (निंदार्थी) नागवा असणारा गोसावी इ.

लंडा पु. (अश्लील) पुरुषाचे जननेंद्रिय; लंड.

लंडाई स्त्री. १. कावेबाजपणाची व लुच्चेगिरीची वर्तणूक. २. दांड; आततायी, झोटाईची वर्तणूक; दंडेली. ३. हट्टीपणा; खलेली.

लंडामुंडी स्त्री. भांडण (लंड, मुंड इ. शिव्या देण्यावरून). (कु.)

लंडी स्त्री. (निंदेने) भित्रा, बायक्या, नामर्द मनुष्य.
वि. १. भित्रा.२. लंड; दांडगा (मनुष्य).३. अविचारी; लबाड; लुच्चा.

लंपट वि. (स्त्रिया, संसार, प्रापंचिक सुखे यांसाठी) हपापलेला, आसक्त; कामुक; स्त्रीव्यसनी.

लंपट वि. लापट; लटपटीत; ढिला (स्क्रू, सांधा इ., त्याचे भोक इ.).

लंपास करणे पळवणे; (एखादी वस्तू) लांबवणे, नाहीशी करणे.

लंब पु. १. ओळंबा. २. (भूमिती) काटकोन करणारी रेषा. ३. (ज्यो.) जी रेषा पातळीला छेदत असून त्या छेदनबिंदूतून त्या पातळीत निघणाऱ्या एकंदर रेषांबर लंब असते, ती रेषा त्या पातळीवर व ती पातळी त्या रेषेवर लंब आहे असे म्हणतात. – सूर्य ७. ४. अक्षपूरण; अक्षकोठी.
वि. १. लांब.२. मोठा; बृहत. [सं.]

लंबक पु. १. ओळंबा. २. लंब; आंदोलक; खाली वजन असलेला, नळीसारखा व नियमितपणे डावीकडून उजवीकडे परत परत हलत राहणारा(घड्याळातला) लोलक.

लंबकर्ण पु. १. (सांकेतिक) गाढव, ससा, हत्ती इ. लांब कानाचा प्राणी. २. (विशेषतः) गाढव. ३. (ल.) मूर्ख मनुष्य. [सं.]

लंबगोल पु. लांबट वर्तुळाकार;लंबवृत्त; लंबवर्तुळ.

लंबच्च(चे, छो)ड वि. प्रमाणाबाहेर उंच किंवा लांब (मनुष्य, झाड, इ.).

लंबछडी वि. लांब पल्ल्याची (तोफ).

लंबज्या स्त्री. अक्षकोटिज्या. [सं.]

लंबमान वि. ओळंबणारा; लोंबणारा. [सं.]

लंबन न. १. ओळंबणे; लोंबणे; लोंबलेली स्थिती. २. (ज्यो.) भूपृष्ठावरचे स्थळ आणि भूमध्य ही सांधणाऱ्या त्रिज्येवर खस्थ पदार्थाच्या मध्याशी होणारा कोन. दृक्सूत्र व गर्भसूत्र यांमधील अंतर. (इं.) पॅरॅलॅक्स. ३. ग्रहण दिसायचे स्थानपरत्वे होणारे वेळांतील अंतर. [सं.]

लंबरेषा स्त्री. १. पहाः **लंब** २,३. २. (ज्यो.) उभी रेषा.

लंबवर्तुळ न. लंबवृत्त. [सं.]

लंबवृत्त न. १. दृग्मंडळ – वलय. (इं.) व्हर्टिकल. २. अंड्यासारखे लांबट गोल. [सं.]

लंबसंपात पु. त्रिकोणात शिरोबिंदूपासून समोरच्या बाजूवर टाकलेल्या लंबाचा समाईक छेदनबिंदू.

लंबसंस्था स्त्री. (गोलाची) यथार्थ स्थिती. [सं.]

लंबा वि. क्रिवि. १. पूर्ण लांबीत असलेला, ठेवलेला; जमीनदोस्त झालेला. २. फस्त; फन्ना; खर्च केलेला; उडालेला (पैसा, साठा). ३. खाली आडवा पडलेला (घर, भिंत, झाड कोसळल्यामुळे). [सं.लंब; हिं.] (वा.) ० **करणे** – चोप देणे. ० **कान करणे** – १. चोरून ऐकणे. २. कान पिरगाळून शिक्षा देणे.(अहि.) ० **चालनं** – पुढे –पुढे बोलणे; जास्तीचे बोलणे. **लंबं घालनं** – मारून टाकणे; नष्ट करणे. (अहि.)

लंबा चवडा वि. लांबलचक; पाल्हाळिक. [हिं.]

लंबाटा– ट्या–ड्या वि. उंच, सडपातळ व कृश.

लंबाण पहाः **लमाण**

लंबाणभाऊ पु. (विनोदाने) उंच, काटकुळा, बेडौल माणूस.

लंबायमान वि. प्रमाणाबाहेर, फार मोठ्या लांबीचा. [सं.]

लंबासन न. १. एक आसन; लांब पसरणे. २. (ल.) निजणे; पसरणे. [सं.]

लंबांतर न. (गणित) दोन समांतर रेषांपैकी एकीतील कोणत्याही बिंदूपासून दुसरीवर टाकलेला लंब.

लंबिका स्त्री. जीभ पडजिभेला लावणेः 'येक लंबिका करितीः निचेष्टिका काष्टी लाविती' – विद २०.

लंबी स्त्री. (जमीनमापणी) लांबी. (वा.) ० **ताणणे, लावणे, लागणे** – आळसाने हातपाय ताणून पसरणे.

लंबीत वि. लांबः'बहूसाल लंबीत होत्या विशेषा ।' – राक खं १ पा ८.

लंबू पु. (संकेत.) पुरूषाचे जननेंद्रिय; बंबू.

लंबे क्रिवि. लंबा. (वा.) ० **करणे** – मारणे : 'गिलच्यांनी गोखडींत दहा पांच बैरागी सत्पुरूष होते तेही बसले ठिकाणीं लंबे केले.' – भाब २८. ० **चालणे** – मर्यादा ओलांडणे. (व.)

लंबोदर वि. लांब पोटाचा; ढेरपोट्या. [सं.]

ला प्र. द्वितीयेचा प्रत्यय. [सं. लागयति]

लाइण–णी क्रिवि. व्यर्थ; उगाच; विनाकारणः'सूर्याची पिसाळ लाइणी गळा पडला...' – पेद ३१.८५.

लाइनमन पु. रेल्वेचा रस्ता, तारायंत्राची तार वगैरे दुरुस्त आहेत किंवा नाही याची पाहणी करणारा. याचे काम दररोज सर्व रस्ता चालून जाऊन पाहण्याचे असते. [इं.]

लाइन मारणे विशेषतः तरूण मुलामुलींमध्ये जवळीक करण्याच्या किंवा प्रेम जमवण्याच्या हेतूने छाप मारण्याचा केला जाणारा प्रयत्न.

लाइलाज वि. निरुपाय; नाइलाज. [अर. ला+इलाज्]

लाइस स्त्री. कापडी बोंब–नाळेवरचे शीड लाकडी बोंबावर ठेवल्यानंतर त्याला गुंडाळणारी दोरी.

लाइस करणे क्रि. उलटे वल्हवून होडीच्या गतीला अवरोध करणे.

लाक पु.स्त्री. एक धान्य. पहा : **लाख** [हिं. लंका]

लाक–ख पु.स्त्री. १. (माणसे, पशू, पदार्थ, वस्तू इ. ची दोरीने) जुळणी करणे; सांगड घालणे. (क्रि. घालणे) २. (वस्तू, माणसे वगैरेंची एखाद्या कामाच्या सोयीसाठी घातलेली) सांगड; जूट. ३. दोन जनावरे ज्या सैलसर दोरीने एकत्र बांधतात ती दोरी; लाकणदोर. ४.(सामा.) सांधा; बंधन. (क्रि. घालणे). ५. (ल.) मेळ; जूट; जोड.

लाक स्त्री. खेकड्याच्या पोटातील मगज. (गो.)

लाकड स्त्री. १. अति उंच वाढलेला ताड, माड. २. अति उंच मनुष्य.

लाकडाचे दोर लाकडामध्ये असलेल्या बारीक–बारीक रेषा.

लाकडी स्त्री. काठी; दंड. (खा.) [हिं. लकडी]

लाकडी वि. लाकडाचे; लाकडासंबंधीचे. [गु.]

लाकडी खेळ लाकडाच्या भातुकलीतील खेळण्याच्या वस्तू. (पूर्वी नव्या सुनेला श्रावणपाटीवर सासऱ्यांकडून देत असत.)

लाकडी घोडी पखवाज ठेवण्यासाठी वापरतात ती लाकडी घडवंची.

लाकड्या पु. नांगर (लाकडी असतो म्हणून). (खा.)

ला(लां)कण–न न. १. लाक; पहाः **बंधन**. २. मोटेच्या तोंडाच्या लोखंडी कडच्या ज्यांनी बांधलेल्या असतात त्या चामडचाच्या वाद्या (समुच्चयाने). [सं. लाक्षा]

लाकणदोर पु. दोन बैल वगैरे एकत्र बांधण्याची दोरी.

लाक(ख)णे सक्रि. १. (दोन पशू किंवा माणसे यांच्या माना) एकत्र बांधणे. २. (जनावरे, माणूस) खुंट्याला, खांबाला बांधणे. ३. एक दोरी दुसऱ्या दोरीमध्ये वळून किंवा गाठ मारून किंवा बिरडे, गुळखी यांच्या योगाने सांधणे, जुळवणे.४. (माणसाला, जनावराला) एखाद्या रक्षकाच्या, प्रशिक्षकाच्या हवाली करणे. ५. (सामा.) जोडणे; जुळवणे. ६. साखळी घालणे. [सं.लाक्षा, लग्]

लाक(ख)णे अक्रि. (दागिना, बांगडी इ. वर) लाख चढवणे; लाखटणे. [सं.लाक्षा]

लाकणो पु. वाघ वगैरेची शिकार करण्यासाठी लावलेला सापळा.

लाक रावोता पु. लक्षदळाचा प्रमुखः 'पंडित लाक रावोता' – उन्हंकदेव शिला १.१८. (कु.)

लाका पु. नफा. (नंदभाषा)

लाकीन उअ. पण; परंतु; लेकीन. [अर. लाकिन्]

लाकूड न. १. झाडाला आधार देणारा, पाणी व अन्न साठवणाऱ्या पेशींनी युक्त असा कठीण, तंतुमय झाडाचा भाग. २. लाकडाचा तुकडा; दांडका. ३. (ल.) ताठ, टणक, न लवणारे शरीर, गात्र, शेंग इ. कोणताही पदार्थ. [सं.लगुड; हिं.लकडी; प्रा. लक्कुड](लाकूड या शब्दाचा समासात पूर्वपदी 'लाकड' असा उच्चार होतो.) (वा.) **० पडणे, वळणे, होणे** – लाकडासारखे निर्जीव होणे. **लाकडास माकड लावणे** – विजोड वधूवरांचे लग्न लावणे; एखाद्या लग्नाला हपापलेल्या माणसाला कसलीतरी बायको मिळवून देणे. **जिभेचे लाकूड होणे** – जिभेला कोरड पडणे.

लाकूडतोड्या पु. लाकडे फोडून आणून, विकून निर्वाह करणारा.

लाकूडफाटा पु. अव. १. घर बांधण्यासाठी उपयोगी असणारे लाकडे, गवत, विटा इ. साहित्य.२. सरपणाच्या उपयोगी काटक्या इ. जळण.

लाकूडमदारी पु अतिशय रोड, कृश मनुष्य.

लाको(खो)टा पु. चिकटा :'लईलई लाकोटा । सांड चाळा । तो खोटा ।' – मध्व ३३७.

लाख वि. १. संख्यावाचक विशेषण; एकावर पाच शून्ये देऊन होणारी संख्या; शंभर हजार; लक्ष. २. (ल.) अतिशय उत्तम; फार महत्त्वाची; अनमोल. ३. (ल.) पुष्कळ; अनेक. [सं.लक्ष]

लाख स्त्री. १. रंग इ. च्या उपयोगी पडणारा बोर, पिंपळ इ. वृक्षांपासून निघणारा एक कृमिज पदार्थ. एक प्रकारच्या किड्यापासून होणारा पदार्थ. पत्रावर मोहोर करणे इ. कामी लाखेचा उपयोग होतो. हिच्यापासून रंग व राळ हे दोन पदार्थ होतात. २. एक पक्का रंग. [सं. लाक्षा; हिं.; गु.; फा. लाक; ते. लाका]

लाख स्त्री.१. एक हलके धान्य; कडधान्य. याचा वेल असून त्याला शेंगा येतात.२. डाळ : 'शेजारीनबाई उसनी देई लाख' – लोसाको.

लाखकाडी स्त्री. (सोनारी) कोणत्याही वस्तूच्या पोकळ भागात लाख भरण्यासाठी केलेली लाखेची लांबट सळई, कांडी.

लाखट वि. १. लाखलेले; लाख चिकटलेले;लाखेने माखलेले. २. आत लाख भरलेले(सोन्याचे दागिने);बेगड; सामान्य; हलका.

लाखटणी स्त्री. लाखेने माखण्याची, लाख लावण्याची किंवा भरण्याची कृती.

लाखटणे सक्रि. लाख भरणे; लाख माखणे.
अक्रि. दाटणे; बसणे; चोंदणे; आवाज बसणे.

लाखट बेगड वि. सामान्य, हलका दागिना; जस्तीपत्र्याची, रंग – मुलामा दिलेली वस्तू. पहा : **लाखट** २

लाखडी स्त्री. राखडी; डोक्यात घालण्याचा एक दागिना. (कु.)

लाखण – न– णी न. स्त्री. १. फासा; बंधन; लाकण. २. चाबकाची दोरी बांधण्यासाठी दांड्याला भोक पाडून अडकवलेली कातड्याची कडी.

लाखणे उक्रि. (क्व.) लक्ष्य करणे; उद्दिष्ट म्हणून ठरविणे.

लाखणे सक्रि. मडक्याला वगैरे लाख, राळ माखणे, लावणे.

लाखदाणा पु. चीन देशातून आलेली उत्तम प्रतीची लाख.

लाखदाणा पु. अखेरचा कापूस. [सं.लक्ष्य+धान्य]

लाखन न. (शिंपीकाम) जोडणी; उभारणी; कच्चा दोरा भरण्याचे काम.

लाखन अक्रि. धाप लागल्याप्रमाणे तोंडाने श्वास घेणे. (अहि.)

लाखपाड पु. १. अंगठीवर रत्नाचा खडा बसवण्यासाठी कोंदणात लाख भरणे. २. अशी लाख भरलेला दागिना; लाखेचा घाट.

लाखलिंप स्त्री. लिंपणे; गिलावा करणे;(खराब झालेल्या भिंती, जमीन यांची भोके बुजवून) दुरुस्त करणे.

लाखलोटके–गे, लाखलोटा–टे न. पु. लाखेने मढवलेले गाडगे.

लाखलोटा पु. लाख लावण्याचा धंदा.

लाखवण न. (लाख, राळ इ.) मढविण्याचा पदार्थ.

लाखळणे अक्रि. चिकटणे; मागे-मागे असणे; सारखे दिमतीला असणे (काही फायदा होण्याच्या आशेने).

लाखा पु.भेकाड; भिरड; अळू, पोफळ इ. वर पडणारा कृमिरूप रोग; ताका; टाका.

लाखा पु. (शिंपीकाम) कच्च्या शिवणकामाला घालावा लागणारा दोरा; धावदोराः 'ताण नाहींसा करून लाखा घालून घेतला पाहिजे.' – काकडे प्रश्नमाला ९.

लाखा पु. खूण; चिन्ह.

लाखा कातरणे मेंढराच्या कानाला खुणेसाठी ठरावीक जागी लहानपणीच घेतात तो कातरा. (यामुळे धनगराला आपल्या कळपातील मेंढरांना सहजपणे ओळखता येते.) (जुन्नरी)

लाखारव, लाखारबन न. लक्ष वृक्षांची राई : 'तया परियांतकांचे लाखारव : असम सहस' – शिव ३०७. [सं.लक्ष+रुह, लक्ष + वन]

लाखाजोहर पहा : **लाक्षाजोहर**

लाखाशाही स्त्री. एक तलवार. – प्रश ४५. (लखराज सरदारांनी केलेली तलवार.)

लाखी वि. तांबड्या रंगाचे. [सं.लाक्षा]

लाखी पुनीव (राखी पुनव) रक्षाबंधनाचा दिवस; श्रावण पौर्णिमा.(व.)

लाखै(खो)वा पु. लाख मोहरा असल्याचे सूचन करणारा दिवाः 'भीतरि कळियांचे लाखोवे कैसे। सोनेचांपयांचे ।' – नरुस्व ७७६.[सं.लक्ष्य]

लाखोटा पहाः **लखोटा**

लाखोणी, लाखोंडी स्त्री. राखोंडी; राख. (कु.)

लाख्या पु. गुरांचे नरडे सुजून त्यांना होणारा एक रोग.

लाख्या बारगीर दरसाल एक लाख रुपये वेतन मागणारा घोड्यावरील सैनिक.

लाग पु. १. संधी; वेळ; संभव; शक्यता. २. मनातील संधान; उमेदीची दिशा; प्रयत्न; नेम; खटाटोप; खटपटः 'राजदूत पावले लागा।' – मुआदि २५.६. ३. ध्येय; विषय; हेतू; उद्देश. ४. एखाद्यावर ओढवलेले संकट, दुर्दैवाचा प्रसंग; घाला. ५. हल्ला; झपाटा; तडाखाः 'आला कोपिष्टांचा लाग । पडेल पांग दुजयाचा ।'– एरुस्व ८.२३.६. पीक; बहार; बागा, शेती वगैरेंतून फळे, धान्य इ. ची प्राप्ती. ७. फळे आणि बहर येण्याचा वेळ, हंगाम; फळे उत्पन्न करण्याची वृक्षांची स्थिती. ८. दांडा; जहाज, होडी वगैरेंचा तळ जेथे जमिनीला लागतो ती जागा. ९. चोळीला काखेत ठुशीखाली देण्याचा जोड, तुकडा. १०. पकड; कैची; तिढा; टेकण; आधार; आश्रय; जागा; पाया; धर (जड वस्तू वर ठेवण्यासाठी). ११. पदार्थाचा मादक गुण; तंबाखू इ. चा अंमली, नशाकारक गुण. १२. जनावरांना एखाद्या अवयवाच्या ठिकाणी होणारा रोग. १३. मारा; स्पर्श; पोच; पल्ला. १४. शिकार; लूट; प्राप्ती; लग्गा. १५. पत्ता; शोध; तपास; पाठलाग. १६. विशिष्ट अवयव, इंद्रिय इ. ची विकृती. १७. स्थिती; अवस्थाः 'त्यासि नाही रागुविरागु । तैसा लागु ज्ञात्याचा।'– एभा ७.१२४. १८. संबंधः 'या प्रपंचाचा कठिण लागु।'– एभा ८.६८. १९. आवड; रुचीः 'तैसा जाहला प्रसंगु । जे ज्ञानी आम्हासि लागु ।' – ज्ञा १३.६४४. २०. अधिकारः 'एथ इंद्रियांचा पांगु । जया फिटला आहे चांगु। तयासीचि आथी लागु। परिसावया।' – ज्ञा ५.६६. २१. गवताच्या उत्पन्नासाठी राखून ठेवलेली डोंगराळ जमीन. २२. सामर्थ्य; मगदूर. २३. सोयः 'कडावरूनि पाहिला लाग।'–दावि २१८.२४. रीघ; वाट. २५. युक्तीः 'हा बाहेर निघोन येइल असा लागेच ना लाग तो ।' –ऋ ८१. २७. पशुपक्ष्यांचे मैथुन; कावळा, सर्प इ. ची रतिक्रिडा. २८. (जरकाम) तारेची दिशा बरोबर लावणारा रूळ. २९. (लोहारकाम) मोठा, अवजड हातोडा. रेबीट (रिव्हेट) फुलवताना एका बाजूने ठोकतात व दुसऱ्या बाजूला याचा जोर लावतात. ३०. (चर्म.) अपुऱ्या सागळीला लागलेला तुकडा. ३१ (संगीत.) एका स्वरावर थांबून मग दुसऱ्या स्वरावर उडी घेणे. [सं.लग् – लग्न; प्रा. लग्ग] (वा.) ० **दवडणे** – एखाद्या गोष्टीच्या सिद्धीसाठी आपल्या योजना चालू करणे. ० **लावणे** –१. प्राप्तीसाठी संधान जोडणे; वशिला खर्च करणे. २. माग काढणे; पाठलाग करणे. **(एखादे काम) लागास, लागावर येणे, मिळणे, जुळणे; लागी लागणे** – एखादे काम सुरळीतपणे सुरू होणे, सिद्धीच्या मार्गावर असणे.

स्त्री. उडी; उड्डाण. (क्रि. मारणे)

लागट पु. स्त्री. पहाः **लगट**

वि. १. लोचट; झिडकारले तरी लगट करणारा; कोडगा; निर्लज्ज. २. आसक्त; चिकटलेला. ३. प्रेमी; लोभी; लडिवाळपणे बिलगणारे. ४. कीड लागून खराब झालेले (धान्य, फळ, लाकूड). ५. जे खाल्ले असता घसा, जीभ रवरवतात असा (अळू, सुरण इ.पदार्थ). ६. जी खाल्ली असता छातीत बांध बसतो अशी लागणारी (सुपारी). ७. एखाद्याच्या मनाला लागेल असे, बोचणारे (बोलणे). ८. उत्सुकः 'या बोला श्री अनंतें । लागटां देखिलें तयातें।' – ज्ञा ९.२३१. ९. स्पर्शजन्य; सांसर्गिक (रोग). (ना.)

लागटा पु. १. सातत्य; अखंडपणा.२. माला; रांग; ओळ. (क्रि. लागणे, लावणे, करणे, होणे.)

लागण स्त्री. १. संसर्ग; एखाद्याला झालेल्या रोगाच्या विषाणूंमुळे दुसऱ्याला बाधा होणे.२. पिशाचबाधा. ३. रोगग्रस्तता; देवी, कॉलरा, प्लेग इ. रोगांनी पछाडलेली माणसे, जनावरे इ.

न. एकदा पीक घेऊन पुन्हा पीक घेण्यासाठी पहिल्या जाग्यावरून उपटून दुसरीकडे लावतात ते रोप.

लागण स्त्री. १. (ऊस इ. पिकाला दिलेले) पहिले पाणी. २. वहीत, लागडीखालची जमीन. ३. लागवड; जमिनीची वहिवाट. [सं.लग्]

लागणदार वि. १. जमिनीचा मालक; मिरासदार; ठिकाणदार. २. जमीन प्रथम लागवडीखाली आणणारा. ३. जमीन कसणारा; प्रत्यक्ष जमिनीत राबणारा.४. (ल.) उपकारबद्ध; ऋणको; मिंधा.

लागणी स्त्री. शेजार : 'म्हणाल लवे लागणीचाः तरि मध्ये लटिका वायाचा' – ऋव २६७.

लागणे अक्रि. (याचा संलग्न–संबद्ध–संयुक्त होणे, जुळणे, चिकटणे असा मूळचा एकच अर्थ आहे. परंतु अनेक नामांशी, शब्दांशी ते योजल्यामुळे त्याला अनेक भिन्न अर्थच्छटा आल्या आहेत. त्यांपैकी काही पुढीलप्रमाणे) १. स्पर्श करणे; शिवणे. २. लावणे; आत घालणे; (रोप, झाड) खुपसणे; लागवड, पेरणी करणे. ३. मूळ धरणे; रुजणे; (रोपाने) चांगला जीव धरणे. ४. मार बसणे; (शस्त्र इ. चा) आघात होणे. ५. (ल.) मनाला बोचणे; परिणामकारक होणे; अंत:करणाला भिडणे; मनाला वाटणे. (खा.) ६. बंद होणे; मिटणे; गच्च बसणे.(दार, झाकण इ.) ७. (शब्दशः व ल.) योग्य प्रकारे जुळणे, जोडणे. ८. बरोबर होणे; लागी बसणे; नीट सामावणे. ९. प्रचारात असणे (तऱ्हा, पद्धत, रीत) रूढ असणे. १०. चिकटणे; अंगवळणी पडणे; जडणे. ११. येणे; उत्पन्न होणे; आसक्ती वाटणे. १२. निघणे व चालू होणे (स्थळ व काळ यांतील पदार्थ व प्रसंग, विशिष्ट परिमाण किंवा प्रकार). उदा. येथून मावळ संपले व देश लागला, या अध्यायापासून ग्रंथ कठीण लागला. १३. बरेवाईट कळणे; विशिष्ट प्रकारचे किंवा जातीचे म्हणून समजणे, वाटणे. १४. प्राप्त होणे; (नोकरी इ.) मिळणे. १५. नाते किंवा संबंध असणे. १६. आढळणे; भेटणे; रस्त्यात, मार्गात येणे; पुढे येणे. उदा. वाटेने चार नद्या लागतात. १७. फळ धरणे; बहर येणे; वृक्ष फलोत्पादनाच्या स्थितीला येणे. १८. करपणे; बिघडणे; बुडाशी जळणे. उदा. भात तळाशी लागला. १९. खराब, घाण होणे; डागळणे; कुजणे.

२०. चिकटणे; चिकटून राहणेः 'उदंड उपाधी तरी थोडी, लागोंच नेदी।' – दास ९.१०.५. २१. बसणे; जडणे; (मन) बिलगणे. २२. दंश करणे (साप, विंचू.); झोंबणे (चिकट पदार्थ). २३. हल्ला, आघात होणे. उदा. ठेच लागणे. २४. पडणे; (मेकाड, मोवा इ. ची) धाड येणे. २५. परिणाम करणे; अनिष्ट, वाईट व उपद्रव होईल असे करणे. २६. जनावर, माणूस वगैरेंची पाठ, पाय इ. अवयवाला दुखापत होणे. २७. नेहमीच्या एखाद्या आजाराने (जनावर) पछाडले जाणे. २८. पूर्णपणे व योग्य रीतीने मिसळले जाणे. उदा. भाजीत मीठ बरोबर लागते आहे. २९. खर्च करण्याची गरज पडणे; पैसा, वेळ इ. चा व्यय होणे. उदा. प्रवासाला पाचशे रुपये लागले. ३०. पाहिजे असणे; गरज असणे; सुस्थितीसाठी आवश्यक असणे. ३१. योग्य स्वरात बसणे; (गळा, आवाज इ.) स्वरानुकूल असणे. ३२. पेटणे; दीप्तियुक्त होणे; चेतणे. ३३. प्रत्यक्ष आरंभ होणे; (लग्न, मुंज इ. विधीत) मुख्य विधी, संस्कार याला सुरुवात होण्याची वेळ येणे. ३४. (बोलताना) अडखळणे (माणूस, जीभ, शब्द). ३५. चालू होणे; (यंत्राला) गती मिळणे. ३६. चालणे; कार्यक्षम होणे. ३७. तीक्ष्ण, धारदार होणे. ३८. निश्चित, ठरलेले असणे; न सुटण्यासारखे जोडलेले किंवा पाठीमागे लागलेले असणे. ३९. सुरू होणे; एकसारखे चालू राहणे. ४०. मग्न, गुंतलेला असणे. ४१. अपेक्षित किंवा स्वाभाविक परिणाम होणे; यश येणे; उपयोग होणे. ४२. (प्राण्यांचे, पक्ष्यांचे) मैथुन चालणे; जुगणे; (निंदार्थी) स्त्री-पुरुषांचे मैथुन होणे. ४३. योग्य स्थितीला येणे; फलदायी होणे. (गाय, म्हैस इ. दूध देऊ लागणे, झाड फळाला येणे.) ४४. मालकीचा, संबद्ध असणे; अधिकारातील असणे. ४५. विवक्षित स्थितीत असणे; विवक्षित गुण, जात, धर्म असणे. ४६. लावणे; (गुन्ह्याचे कृत्य) अंगी लागू करणे किंवा करण्यासाठी एखाद्यावर लादणे, सोपवलेले असणे. ४७. सक्तीचे, आवश्यक, जरूर असणे. ४८. अडंकणे; गुंतणेः 'कोठें तुझा जाऊनि हेतू लागे ।' – सारुह २.९४. ४९. झपाटणे; पछाडणे; अंगात येणे; बाधा होणे. ५०. (शौच, मूत्रविसर्जन इ.) क्रियेची इच्छा होणे. ५१. (क्रियापदाला ऊ, आवयाला, आयला इ.प्रत्यय लागून त्यांच्या पुढे'लागणे' हे क्रियापद आले असता) क्रिया सुरू करणे; आरंभणे; घडणे; लागू होणे. उदा. तो मारू लागला. ५२. क्रियापदातील 'वे' ह्या प्रत्ययांपुढे 'लागणे' हे क्रियापद आले तर आवश्यक, अनिवार्य बनणे असे अर्थ होतात. उदा. करावे लागणे. ५३. बरोबर, सोबत, बाजूला असणे; मदत करणे. उदा. माझ्यासोबत तू हे करू लाग. ५४. नांगर टाकण्याच्या स्थितीत येणे; कडेला येणे; स्थिरावणे; गती खुंटणे. ५५. (ल.) अगतिक होणे; हालचाल बंद पडणे. ५६. हल्ला करणे. ५७. नेट धरून बसणे; वेढून बसणेः 'बोरसदेचें ठाणें पठाणानें सरकारचे घेतलें तेथें लागोन घेऊन त्याचे हवाला करावे.'– पेद ३६. २८९. ५८. फंदात पडणे; आहारी जाणे. [सं.लग्, लग्न; हिं., गु. लागना] (वा.) **लागला जाणे** – १. ऋणी, मिंधा असणे. २. जास्त परिचयाचा, आसक्त असणे. **लागून असणे** – १. (स्नेहामुळे, लोभामुळे) अगदी चिकटलेला असणे; तंत्राने किंवा मर्जीने वागणे. २. एखाद्या स्त्रीने नवरा सोडून दुसऱ्यापाशी राहणे. ३. मग्न, गुंतलेले असणे. **कानाला, कानी लागणे**– गुप्त गोष्टी बोलणे; कुजबुजणे. **पाणी लागणे** – १. एखाद्या ठिकाणच्या हवेचा, चालीरीतींचा मनावर, वागणुकीवर परिणाम होणे. २. एखाद्या ठिकाणची हवा बाधणे. ३. एखाद्याकडे येणे असलेली रक्कम बुडणे; नाहीसे होणे. **पायी लागणे** – नम्र होणे; नमस्कार करणे.

लागत न. कर; भाडे; खर्चः ' अगाऊ लागत भरून पावती मिळविली पाहिजे.' – (बडोदे) खानगी खातें, लागतीचें नियम ४.

लागतगुण पु. संगतीचा परिणाम, गुण; संबंध जडल्याने येणारा गुण.

लागता गुण माणूस, संपत्ती, उत्कर्ष, वस्तू जोडण्याचा गुण; संपादन करण्याचा, मिळविण्याचा गुण.

लागता जुगता वि. मार्गावर आणलेला; पायावर उभा केलेला.

लागता वळगता वि. संबंधी; संबद्धः' जबाबदार इसमानें आपले ताब्यातील व लागते वळगते नोकर लोकांस वरचेवर माहिती देत जावी.' – (बडोदे) आगीपासून बचाव ४. [गु.]

लागते(तें) न. संबंधः 'न बुझावितां मतें । न फिटे आक्षेपाचें लागतें ।' – ज्ञा १३. ३२७.

लागपाठ पु. स्त्री. १. लगबग; त्वरा; घाईः 'करा करा लागपाठ। धरा पंढरीची वाट ।' – तुगा २५६४. २. पाठलाग; पाठपुरावा.

लागपाळती स्त्री. पाठीला लागणेः 'किमर्थ अर्थीं माझियें पृष्ठीं । लागपाळती केली त्वां ।' – नव १३.१३८.

लागब(बा, भा)ग पु. उपाय; संबंधः 'पाईक तो जाणे या इक्रीचा भाव। लागबग ठाव चोरवाट।' – तुगा ३७५.

लागबंदी वि. जिला लाग लावले आहेत अशी (चोळी).

लागभाग पु. १. पहा : **लागब(बा, भा)ग.** २. पाठलाग. ३. चिन्ह; सान्निध्याचे दृश्य. ४. पुस्ती; विचारीपणा; शहाणपणा.

लागमाग पु. १. पहा : **लागब (बा, भा) ग.** २. अनेक गुप्त जागा; हल्ला करण्यासारखी जागा; भेदस्थानः 'कार्याचे लोक बोलावून आपले लागमाग ठीक केले.' – साब १६.

लागरा वि. पहाः **लागट** ४,६

लागलागवड – लगावण–लगा(ग)वड स्त्री. १. शेतीची मेहनत; मशागत; शेतकाम; नांगरणी इ. कामे. २. फळझाडे इ. लावणे; वृक्षसंवर्धन. ३. (विशेषतः शेवटचे तीन शब्द) डागडुगी; दुरुस्ती.

लागला(ली,ले)च क्रिवि. ताबडतोब; तत्क्षणी; तेव्हाच.

लागलाव्या वि. युक्त्या, बेत योजून काम साधण्यात कुशल.

लागलिगाड न. अडथळा; लचांड.

लागवड स्त्री. १. शेतकीसंबंधीची सर्व कामे. २. शेतीचा खर्च; जमीन लागवडीत आणणे, गोठे–सोपे इ. ची डागडुजी करणे, गाव वसवणे इ. कामासंबंधीचा खर्च. ३. शेते, बागा इ. मध्ये धान्ये, झाडे इ. लावणे. ४. धान्य, झाडे इ. लावलेली शेते, बागा. ५. (प्लेग इ. रोगांची) लागण. (कुलाबा) ६.(सामा.) पेरणी.(वा.) **लागवडीस आणणे** – उत्कर्षाला आणणे.

लागवडी वि. लागणारेः'चित्त्याचें लागवडी सामान बरोबर जपून ठेवणे.' – चिमा २८.

लागवण न.१. फांदी कलम करण्याची क्रिया. पहा :६ **कलम** १. २. शेतीसाठी, पेरणी – लावणीसाठी राखलेला जमिनीचा तुकडा. स्त्री. १. पहाः **लावणी.** २. गावाच्या हिशेबाचा प्रकार; कोणाकडून किती सारा यायचा असतो यासंबंधी नोंद. ३. वशिला; ओळखः 'त्याचें कारण माझी हुशारी नव्हे तर लागवण हेंच होय.' – सत्याप्र ११७.

लागवरी वि. गर्भधारणा झालेलीः 'हरिरता चपळा नारी । लागवरी न रिघती ।' – तुगा १४६.

लागसरि, लागशी क्रिवि. जवळ; जवळीकः 'म्हणोनी इये सभे। बोलकेपणाचेनि क्षोभें । लागसरूं न लभे। बोला प्रभू ।' – ज्ञा १३.३२१.

लागा क्रिवि. तात्काळः 'लागा पावैल तीपुरारी ।'– उषा ७२.१४.

लागाबांधा पु. संबंध; ऋणानुबंध; नातेगोते.

लागावळ स्त्री. रांग; ओळ (सांडलेल्या धान्याची, बंदुकीच्या दारूची इ.).

लागावळा स्त्री. १. संबंध; नातेगोतेः 'वित्त गोत पुत माया तुटली हे लागावळी।' – तुगा ३५०. २. शिवाशीव; विटाळ.

लागिजणे न. ऋणः 'आपुलें लागिजणें घेया' – लीचउ १५७.

लागिया पु. नातलग; संबंधीः 'आमुचा लागिया श्रीहरि' – नामा १४५४. [सं. लग्न]

लागी स्त्री. लाग; लागीर; भूतबाधाः 'सचकित म्हणताहे लागि कोठें पहा गे।' – सारुह२.८६.

लागी स्त्री. पाठलाग; हल्ला : 'परिं दुर्गासि लागी नाहीं केली' – उह ११०४.

लागी शअ.१. करिता; साठी; प्रप्तः'तुजलागी; तेथ कीजैल प्रबंधु। मुनिजनालागी।' – भाए ३६. २. जवळ; लगत. ३. ला; स. ४. कडे. उदा. घरालागीं जाई वेगीं । ५. प्रीत्यर्थ; कारणासाठी.

लागी वि.१. जोडलेले; अवलंबून असलेले; संबद्ध. २. योग्य; लायक.

लागीभागी, लागाभागास वि. शअ. क्रिवि. १. जवळ; शेजारी; समीप; आसपास. २. सदृश; जुळणारे. ३. आटोक्यातला; आवाक्यातला.

लागीर स्त्री. भूत-पिशाचादिकांची बाधा, त्रास; पछाडणी.

लागु(गू)नी क्रिवि. पहाः **लागी** शअ.

लागू वि १. सामील; संबद्ध. २. प्राप्त; स्पष्ट. ३. यशस्वी; परिणामकारक; गुणकारी. ४. योग्य; रीतसर.५. अनैतिक संबंध असलेला.

लागू गोष्ट (कायदा) मुद्द्याच्या गोष्टींशी कारण, परिणाम, उद्देश, तयारी, स्थळ, काळ वगैरेंमुळे संबद्ध असणारी गोष्ट. (इं.) रेलेव्हंट फॅक्ट.

लागो वि. खुशामत्या. (गो.)

लागोपाठ क्रिवि. एकामागून एक अशा क्रमाने; मध्ये खंड न पडता.

लागोभागो दिवाळी (लाभ होवो, नुकसान होवो, दिवाळी झालीच पाहिजे) कोणत्याही परिणामाकडे न पाहता उद्योग चालवणे.

ला(लां)गोर स्त्री. पहाः **लागीर**

लागोरणे अक्रि भुताटकीमुळे त्रास, पीडा होणे; पछाडले जाणे.

लागोरे न. वाईट चालीची स्त्री. (कु.)

लाग्या पु. स्त्रीचा जार, यार.

वि. १. पहाः **लागलाव्या.** २. युक्त्या, हिकमती करण्यात तरबेज.

लाघव न. १. (वजनाचा) हलकेपणाः 'आइकें देह होय सोनियाचें। परि लाघव ये वायूचें ।' – ज्ञा ६.२६८. २. (आकाराचा) लहानपणा; संक्षेपः 'लेखांत लाघव यावें म्हणून कितीएक संकेतानें खुणा लिहिल्या आहेत.' – मभाको (प्रस्तावना). ३. क्षुद्रता; लघुता; नीचपणाः 'प्रसाद मग काय ती जरि निवारिना लाघवा।' – केका ३६. ४. हळुवारपणा; नाजूकपणा; सुरेखपणा; कुशलता (कारागिरीची). ५. मऊपणा; तुळतुळीतपणा. ६. आर्जव; पुढे पुढे करणे; लाडीगोडी; खुशामत. ७. मायाः 'लाघव कळलें ब्रह्म यासी याचें । परब्रह्म साचें अवतरलें। – तुगा २७. ८. चमत्कार; लीला :'चित्रीचा हंस निर्जीव। परि तो काय करिता झाला लाघव ।'– शनि १५२. ९. कपट; लबाडी; फसवेगिरी : 'देवासी लाघव कामा नये रे ।' – दावि ४७९. १०. चापल्य; कौशल्य; चातुर्य : 'आमुच्या बाणांचे लाघव ।'– एरुस्व ८.५०. ११. मोह; कौतुकः 'माजि स्वर्गसंसाराचेनि लाघवें । झकवेना।' – ज्ञा ८.२५८. (समासात) हस्तलाघव = हातचलाखी, शब्दलाघव = भाषणातील चातुर्य.

लाघवट स्त्री. लघळपणा; फाजील सलगी.

लाघवी पु. नट; नाटकी; जादूगार; मांत्रिक : 'जैसीं लाघवियें वेडीं चाळविलीं।' – ऋ २९.

वि. १. लडिवाळपणा करणारा; आर्जवी; प्रेमळ. २. नम्र; सौम्य. ३. हांजी हांजी करणारा; लघळ. ४. चतुर; कुशलः 'ऋषि जात होते स्वाश्रमासी । त्यांते लाघवी हृषीकेशी। तीर्थमिषे समस्तांसी। पिंडारकासी स्वयें धाडी।'– एभा १.३१८. ५. धूर्त; ठकबाज; कपटी : 'न गुरू तो ठक दांभिक लाघवी ।' – वामन, भरतभाव ३७.

लाघावळ स्त्री. १. लागावळ. २. मार्ग; माग; अनुसरण्याची दिशा. ३. पुष्कळ वेळ चाललेल्या रिकाम्या गप्पा; लांबण.

लाच स्त्री. १. आपले काम बिनबोभाट होण्यासाठी एखाद्याला गुप्तपणे दिलेले धन. २. कुमार्ग. [सं. लंचा; क. लंच; गु.लंचा]

लाचकर-खाऊ-खोर वि. काम करून देण्याबद्दल अयोग्य रीतीने पैसा घेणारा; भाडखाऊ.

लाचकान पहाः **लचकंड**

लाचकोडगा पहाः **लतकुटा**

लाचलुतपत, लाचलूच स्त्री. (व्यापकार्थी) अप्रामाणिकपणाने घेतलेले द्रव्य; अयोग्य व गैरवाजवी बक्षीस; लाच.

लाचार वि. असाहाय्य; अगतिक; दीन; शरणागत. [हिं.; फा.]

लाचारी, लाचारगी स्त्री. अगतिकता; हीनदीन, निरुपायाची अवस्था.

लाचारी तोडी (संगीत) एक राग. गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर.

लाचावणे अक्रि. १. मोह होणे; सवकणे. २. आमिष दाखवणे; फितवणे. ३. लाच देणे. ४. पैसे खाण्याची वाईट सवय लागणे.

लाचुंगा वि. लाचखाऊः'लांचुगी बुद्धी सदा देवांसी । तैशी नाहीं तुम्हां साधूंसी ।' – एभा २.६४.

लाज स्त्री. १. संकोच; मर्यादा; विनय; भिडस्तपणा. २. काहीतरी चूक, अयोग्य वर्तणूक केल्याच्या जाणिवेने येणारी शरमेची भावना; लज्जा. ३. प्रतिष्ठा; मोठेपणाः 'इच्छा पुरवील महाराजा। त्यासी लाज नामाची।'

– भूपाळी गणपतिची. ४. लांछन; अपमान; अवहेलना. ५. शरम; बेअब्रू, अपमान यांची मनाला लागणारी टोचणी. ६. पदर; वस्त्र. [सं.लज्जा] (वा.) ० **काढणे** – निर्लज्ज ठरवणे. ० **लावणे** – लाजवणे. ० **वाटून पिणे** – अगदी निःसंग बनणे. ० **होणे** – लाज वाटणे; अपमानाचा प्रसंग येणे.

लाजकाज स्त्री. लाज; शरम; नम्रता.

लाजकोंबडा पु. फार लाजाळू; संकोची; भिडस्त.

लाजट वि. लाजणारा; भिडस्त.

लाजणे अक्रि. १. शरम वाटणे. २. संकोच, भीड वाटणे. ३. विनय दाखवणे. ४. (लाजाळू या वनस्पतीने) अंगसंकोच करणे. [सं. लज्ज्]

लाजन वि. मर्यादशील; लाजरी.

लाजबाब वि. १. निरुत्तर. २. अत्युत्तम. [फा.]

लाज(जी)म वि. योग्य. [अर. लाझिम्]

लाजमा पु. कर; हक्क. [अर. लाझिमा]

लाजमुडी वि. लाजून मुरकणारीः 'तीहि लाजमुडी उगा नखरा करायची' – भेटी ८३.

लाजरा–री वि. संकोची; भिडस्त; लाजणारा–री.

लाजलज्जा, लाजमर्यादा स्त्री. लाज; विनय.

लाजलावणा–ण्या, लाजलाव्या वि. लाज आणणारा; अब्रू घालवणारा.

लाजवट वि. लाजरा.

लाजवणे सक्रि. १. लाज आणणे. २. (गुणातिशयाने) मागे टाकणे.

लाजा पु. नित्य अव. लाह्या. [सं.]

लाजाहोम पु. विवाहविधीतील होमात वधूवरांनी लाह्यांची आहुती देणे. [सं.]

लाजाळू स्त्री. एक काटेरी झुडूप. याला स्पर्श केला असता पाने मिटतात.

लाजाळू वि. लाजरा.

लाजिमदार वि. शरमिंदा; घाबरलेला; दबलेला; ओशाळा; दुसऱ्याचा स्वतःवर लाजीम (= हक्क) असणारा.

लाजिमा–म्मा पु. १. धंदा; व्यवहार (विशेषतः अनिर्णीत, अपूर्ण). (क्रि. तुटणे, उलगडणे, राहणे, तोडणे.) २. मालकी; वहिवाट; संबंध. ३. जबाबदारी. ४. किंमतः 'ते पुरुषापासीं लाजिमा मागे' – पंचो ७६.२०. [अर. लाझिम]

लाजिरवाणा वि. १. शरमिंधा; ओशाळा. २. अपमानकारक; काळिमा लावणारे (कृत्य).

लाजिरवाणी–णे क्रिवि. लाजिरवाणेपणानेः 'मग बोलिली अंबिका। आम्हासि मूळ ना पत्रिका। तरी लाजिरवाणें त्र्यंबका। कैसें पुसावें ।' – कथा ३.८.१४.

लाजिंद्रा वि. १. ओशाळा; मिंधा; लज्जित. २. लाजरा.

लाजीम पु. हक्क; मालकी. पहाः **लाजिमा–म्मा** २

वि. १. आवश्यक. २. कर्तव्यतत्पर; योग्य. (क.) [अर.लाझिम]

लाट स्त्री. १. पाण्याचा तरंग; लहरी. २. बगाडाचे वरचे आडवे लाकूड. याला आकडा लावलेला असतो. ३. चुना, पोहे इ. कुटण्याचे, कांडण्याचे साधन. ४. तेलाची घाणी, उसाचा चरक वगैरे यंत्रांमध्ये फिरणारे उभे लाकूड. ५. उसाच्या चरकाचे तुळवट. बैल किंवा माणूस ते फिरवतो. ६.देवाच्या मूर्तीपुढे सोवळ्याची मर्यादा राहावी व दाटी होऊ नये म्हणून आडवे टाकलेले लाकूड. ७. घराच्या बांधकामात कड्यांखाली असणारी तुळई. ८. जमीन सपाट करण्यासाठी फिरवण्याचा दगडी, लोखंडी दंडगोल. ९. लाकडाचा मोठा ठोकळा. १०. स्तंभ; खांब. विशेषतः उत्तरेतील प्राचीन राजांचे वगैरे लेख कोरलेले दगडी, लोखंडी खांब प्रत्येकी. ११. (जरतारधंदा) कलाबतूच्या साच्यात ३०–४० तराक लावलेले लाकडी साधन. १२. रहाट व चाक यांना जोडणारे आडवे लाकूड. १३. देवळाच्या पटांगणात एका खांबावर एक आडवी बसवतात ती बहाळ. हिच्या टोकावर माणसे बसून फिरतात. ही खांद्यावरूनही मिरवत नेतात. [सं. लट् यष्टि; हिं. लाठी; प्रा. लट्ठी] (वा.) ० **उठणे, येणे** – १. वाद, चळवळ, टूम इ. निघणे. २. (नाविक) दर्यात खळबळ चालणे.

लाट पु. बडा मनुष्य; मोठा अधिकारी. (इं.) लॉर्ड याचा अपभ्रंश. उदा. लाटसाहेब इ. [इं. लॉर्ड]

लाट पु. १. भारा; गठ्ठा. २. विक्रीच्या वस्तूंचे विशिष्ट गट करून ते सवलतीने विकण्याची पद्धत; तसा गट. ३. सोडत. (इं) लॉटरी. ४. चंगळ; चैन; ५. फायदा. [इं. लॉट]

उद्गा. वाहवा; भले; शाबास.

लाट–ठ स्त्री. खोल विहिरीतून पाणी वर काढण्याचे एक साधन. (को.,कु.) पहा : **ओकती** [सं. यष्टि, लाष्टि]

लाटण न. पोळी, पापड इ. लाटताना चिकटू नये म्हणून त्याला खालून – वरून लावतात ते पीठ. [सं.लुंठ्]

लाटणी स्त्री. वाटोळे फिरणे; फिरवणे; लाटणे.

लाटणी–णे स्त्री. न. लाटण्याच्या उपयोगी, गोल, लाकडी किंवा धातूचे साधन.

लाटणे क्रि. १. (विशिष्ट आकार येण्यासाठी लाटण्याने) वाटोळे, गरगर फिरवणे. २. (पाणी वर येण्यासाठी रहाटगाडगे इ. यंत्र) फिरवणे, चालवणे. ३. लोकरीला खळ देऊन त्याची गुंडाळी करून तिचा बुरणूस इ.करण्यासाठी जमिनीवर ठेवून हाताने मागेपुढे फिरवणे. ४. (ल.) दपटणे; दामटणेः 'पुढें लाटोनि रहंवर । पार्थासमोर पातले ।' – मुआदि ४४.८८. ५. चेपणे; रगडणेः 'धनुष्यबळें हृदय लाटी ।' – वेसीस्व ४.१०१ ६. विटा पाडणे. – बदलापूर ६६. (कुलाबा) ७. (कुस्ती) आपल्या एका हाताने जोडीदाराच्या मांडीखालून हात घालून दुसऱ्या मांडीस धरून आपल्या दुसऱ्या हाताने जोडीदाराच्या गळ्याखालून हात घालून त्याच्या बाहुट्याला धरून आपल्या छातीने जोडीदाराला लाटल्यासारखे ढकलून पाडणे. [सं. रद्=विलेखणे; हिं. लटना]

लाटणे अक्रि. बळकावणे; उपटणे. [सं. ला, रा]

लाटण्या वि. धष्टपुष्ट व दांडगा; आडदांड व बेफिकीर; उसळणारा.

लाटण्यासारखी वि. लाटण्याप्रमाणे मोठ्या आकाराची व सुरेख (बाजरी).

लाटफळे न. पोळपाट. (कु.)

लाटा–ठा–डा–ढा पु. वांझ म्हैस– गाय; निपुत्रिक स्त्री.

वि. वांझोटी. [आ. लठा = पर्णरहित; बं. लठुया; हिं. लठ्ठर]

लाटा–टी–ठी पु. स्त्री. १. पापड इ. च्या पिठाची लाटण्याच्या सोयीची केलेली गोळी. २. लाटणे–णी. ३. लगड; पत्राः 'लाटा खुरा ही मायाच आकारही सुवर्णाचे' – यथादी १२.५१३. (वा.) **० फिरणे, फिरवणे** – (हिशेबात, कामात) कसेतरी दडपून नेणे; घालमेल करणे; गडबडगुंडा करून, लबाडीने रेटणे.

लाटा पु. १. (भातेणाचा, नाचणीच्या काडाचा वगैरे) भारा. २. नाचणीचे भूस. ३. भात झोडल्यावर उरलेले तण गुंडाळून करतात ती लोळी. ४. (सामा.) ढीग; भाराः 'दसऱ्याचे सुवर्णाचे लाटे । लोक म्हणती परी ते कांटे ।' – दास १४.१०.६.

लाटा–ट्या वि. १. दडप्या; बेफिकीर. २. धाडसी; धडाडीचाः 'तो पराक्रमी लाटा। राज्य करी अलोटा ।' – कथा १.२.६३. ३. दिसेल ते बळकवणारा.

लाटा(ट्या) गंगाजी–गोमाजी–कारभारी गंगाराम–पाटील वि. आडदांड; लुटारू; बेमुर्वतखोर; लुबाडणारा.

लाटानुप्रास पु. (साहित्य.) एक शब्दालंकार. त्याच अर्थाच्या पण निराळ्या ध्वनीच्या शब्दांची आवृत्ती यात होते.

लाटापिटी स्त्री. रणगर्जना; झोंबाझोंबी; मारामारी. (ना.)

लाटालाट स्त्री. १. दपटादपट; दडपादडप. २. लबाडीने घशात घालणे. ३. बेधडकपणा. [लाटणे द्वि.]

लाटी स्त्री. लाकडी तुळई, खांब. पहाः **लाट** ७

लाटीव वि. लाटलेली (पोळी इ.).

लाटू पु. पुरुषार्थः 'लाटू दोघा समाना' – गस्तो ४९.

लाटेगंगारामी स्त्री. चोरी.

लाटोरी स्त्री. दोन घड्यांची पोळी.

लाट्या पु. १. मुसळ; लाट; वरवंटा. २. लाटण्याच्या आकाराचा गोळा; (पीठ, माती इ. चा) लांबट गोळा.

लाट्याबाई लाट्या एक मुलींचा खेळ. – व्याज्ञा १.३८९.

लाठ–ठा वि. १. आडदांड व मजबूत; दांडगा; सशक्त व अगडबंब. २. माजलेलाः 'आधींच तारुण्यें अति लाठा। वरि धनमदें भरला ताठा।' – एभा २३.२७७.३. मोठा शूर; समर्थ; बलवान. ४. प्रचंड मोठाः 'हा लाठा जुंझारु म्हणोनि धनमाने अधिकु लोभ करी।' – पंच ४.४. ५. तेजस्वीः 'लाठा आईकीजे अग्नी।'–उषा ९५.६६. ६. अपरंपार; रेलचेलीचा (पाऊस, पीक, बहर इ.).

लाठाई स्त्री. १. दांडगाई; आडदांडपणा. २. जुलूम; जबरदस्ती.

लाठिव पु. लठ्ठपणाः 'आंगवणेचिया लाठिवा। न पाहे क्षेत्रिया सर्वां । – गीता १.४०१.

लाठी स्त्री. १. सोटा; काठी; दंडुका. (क्रि. चालवणे) २. तेल्याच्या घाण्यातील दाणे रगडण्याचा लाकडी दांडा. [हिं.; सं. यष्टि; प्रा. लट्ठि]

लाठीछूट स्त्री. अनेकांनी एकाच वेळी लाठी चालवणे व हल्ला परतवणे.

लाठीराज्य न. दंडुकेशाहीने, दडपशाहीने राज्य करणे.

लाठीवाला, लाठियाळ वि. लाठी वापरणारा; (ल.) लाठी खेळण्यात पटाईतः 'प्रक्षुब्ध लोकमत हा एक जहाल लाठियाळ.' – केले १.३०२.

लाठीवाले भरेकरी पु. अव. क्षेत्रोपाध्यायांचे दलाल. हे यात्रेकरूंपासून अव्वाचे सव्वा पैसे काढतात. – गांगा २८२.

लाठु,लाठेपणा पु. १. धैर्यः 'तंव म्हणे दानव सीरसाटु। उद्धव देवा न संडी लाठु।' – भाए २१९. २. महत्त्व. ३. दांडगेपणा. ४. सामर्थ्यः 'एवढ्या लाठेपणाचा उपावो। आनु नाहींचि म्हणे देवो।' – ज्ञा १६.५१.

लाठ्ठा पु. दरवाजा. (व.)

लाड पु.अव. मुलाबाळांचे प्रेमाने केलेले कोडकौतुक, लालनपालन; प्रेमाची भाषा, कृती. [हि.; सं.लड्; प्रा.लड्डिय]

लाड पु. १. एक जात व तीतील व्यक्ती. हे लोक विड्याची पाने, सुपारी इ. विकण्याचा धंदा करतात. २. एक राष्ट्र व जात. [प्रा.; सं. लाट]

लाड वि. (इं.) लॉर्ड. पहाः **लाट**

लाडकणे क्रि. १. लाड करणे. २. काळजी घेणे; पालन करणे.

लाडका–के वि. १. प्रेमाचा; प्रिय; आवडता. २. लाडिक; प्रेमळ; लडिवाळ (भाषा, बोलण्याची पद्धत इ.). ३. प्रेमाचे; गोडीगुलाबीचे. विलासी; स्वार्थी; मनोवेधक.४. अविनयी; धीट;दांडगा. ५.सौम्य; मन वळवणारे. [सं.लटति, लडति; बं.लेडका; हिं.,पं.लडका]

लाडझगडा पु. मित्रत्वाचे भांडण; प्रेमकलह.

लाडणे अक्रि १. लाडावलेला असणे; लाड, कौतुक होणे.२ लाडाने बिघडणे.

लाडन स्त्री. न. १. गूळ करण्याच्या कढईला लावण्याचे उडीद, राजगिरा इ. पिठाचे लुकण. २. राळेसारखा, पाने–फांद्या यांच्यापासून काढलेला चीक. [अर.,फा.लादन्]

लाड(डि,डे)ला वि. लाडका; प्रिय.

लाडसपणा पु. लडिवाळपणा.

लाडा वि. वांझोटी. पहाः **लाटा**

लाडाचा तांब्या विवाहानंतर मुलीच्या बापाने जावयाला दिलेले (विशेषतः मिठाईने भरलेले) पात्र.

लाडावणे, लाडकाव(वि)णे लाड करून बिघडवणे. लाड करणे.

लाडिकपणा पु. लडिवाळपणा.

लाडिस न.१. पत्त्यांचा एक डाव. २.आगगाडीच्या रस्त्याची पाहणी करण्यासाठी वापरण्यात येणारे वाहन. (इं.) लॉरी.

लाडी स्त्री. १. नवरी; वधू. २. लाडकी लेक. (अहि.)

लाडी करणे विस्तवावरून चालत जाणे.

लाडीगो(गु)डी स्त्री. एखाद्याकडून आपले काम करून घेण्यासाठी त्याच्याशी गोड बोलणे, लालूच दाखवणे; लाडिकपणा.

लाडुकपण–णा न. पु. लाडीगोडी; लाडकेपणा.

लाडू पु. १. एक पक्वान्न. धान्याचे पीठ भाजून त्यात तूप, साखर इ. घालून स्वादिष्ट बनवलेला गोळा. २. लाडवाच्या आकाराच्या गोळ्या.३. (उप.) मुष्टिमोदक; धबका; बुक्की. ४. (ल.) फायदा; लाभ. [सं.लड्डुक; हिं.लड्डु]

लाडूगडू पु. १. वरात घरी जातेवेळी नवरा–नवरी देवाला नमस्कार करायला जाताना, तेथे ठेवलेला गडू व लाडू. २. अशा विधीसाठी आणतात तो गडू, भांडे.

लाडूबाई वि. लाडावलेली, लाडात वाढलेली (मुलगी).

लाडू संत्रा संत्र्याची एक जात. हे देठाकडे निमुळते व खाली पसरट असते. याची लागवड आसाम, बंगालकडे करतात.

लाडेकोडे, लाडाकोडाने क्रिवि. लडिवाळपणे; लाडीगोडीने.

लाडैजणे क्रि. लडिवाळपणा करणेः 'तैसें संत माहेर माझें । तुम्ही मिनलिया मी लाडैजे।' – ज्ञा १५.५९७.

लाढण पहाः **लाडन**

लाढा पु. १. लगदा; लादा(गूळ इ.चा). २. अंगाचा चिकटपणा; दरदरून घाम येण्याने होणारी अवस्था.

लाण–णी स्त्री. १. (शेत, पीक याची) कापणी. २. (मेंढ्यांच्या लोकरीची) कातरणी.(जुन्नरी) [सं.लवन]

लाणी स्त्री. कापण्याचे हत्यार; कोयता.

लाणी स्त्री. १. शेवट; सीमा :'सकळां जाणणेंयां जे लाणी । '– ज्ञा ८.१००. २. स्थान; आश्रय : 'तैसा ईश्वरावांचूनि कांहीं । जिथें आणीक लाणी नाहीं ।'– ज्ञा २.२४२. ३. कालावधीः' तेथ बारां वरिखांचीय लाणी : बीजें करितील श्रीचक्रपाणी' – मूप्र ४५९.

लाणे न. अवधी; शेवट.

लाणे सक्रि. तोडणे; कापणेः 'निसाराचां रागीं लाणें । सिसचि जैसे ।' – ज्ञा १८.१७७. [सं. लू]

लाणे क्रि. घेणे. [सं. लाति; कु. लाणो]

लाणे न. प्राप्ती; लाभः 'तेही पाणियांचें लाणें पाहिले। मल्लिकारा लागी।' – शिव ५६७. [सं. लान; प्रा. लाण; हिं. लेना]

लातर स्त्री. माशांची एक जात. या माशांना ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये पकडतात. (को.)

लातिंबी स्त्री. पाला ठेचून – ठेचून केलेला चोथा, गोळी. (क.)

लाती स्त्री. एक प्रकारची वडी. तांदळाच्या पिठात शिजवलेल्या तुरी किंवा वाटाणे घालून त्याची वडी बांधून शिजवलेला पदार्थ.

लाती पहाः **लाटी**

लाथ–त स्त्री. पायाच्या तळव्याने केलेला प्रहार.[सं. लत्ता; फा. लत्] (वा.) ० **मारणे** –अनादराने त्यागणे; कस्पटासमान लेखणे. **लाथाबुक्क्यांनी तुडवणे** – फार अवहेलना करणे.

लाथझोपडे न. (लाथ मारली तरी पडेल असे) अगदी काडीमोडीचे घर.

लाथड–डा–रा, लाथिरा वि. पहा : **लाथाळ**

लाथबुक्की स्त्री. लाथा आणि बुक्क्या; जोराने बडवणे.

लाथंबा पु.द्रवाने भिजलेला कापूस, कापसाची घडीः'डोळ्यांवर दुधाच्या लाथंब्या ठेवाव्यात तसा वाटायचा.' – टेपी २९.

लाथाखाऊ वि. नेहमी लाथा खाणारा. पहाः **लतखोर**

लाथाड –डी न. स्त्री. लाथ.

लाथाडणे सक्रि. लाथ मारणे; लाथेने ढकलणे. [सं.लत्ता]

लाथा(ता)ळ–ळे न. १. दुगाण्या; लाथांचे प्रहार. २. गोंधळ; लडथडीचे, हमरातुमरीचे भांडण; कडाक्याचा वादविवाद.

लाथाळ–ळ्या वि. लाथा मारणारा; लाथड.

लाथाळणे सक्रि. १. लाथांनी तुडवणे. २. (ल.) तिरस्काराने झिडकारणे.

लाद स्त्री. अंगावर उठलेला लहान, तांबडा, चपटा फोड. (कु.)

लादडी स्त्री. अंथरूण; गादीः 'एक लादडी दोन गोधडी.' – जसा १४१.

लादणी स्त्री. १. धान्य किंवा काही वस्तू साठवण्यासाठी भिंतीत अगर जमिनीत केलेली खोलीसारखी जागा. २. बुरुजाच्या बाहेरच्या बाजूला किंवा किल्ल्याच्या भिंतीला घराच्या पडवीप्रमाणे युद्धाच्या सोयीकरता तयार केलेली जागा. मात्र या जागेवर पडवीप्रमाणे लाकडाची छावणी नसून विटा, रोडे वगैरेंची कमान असते. ३. तटाला बळकटी येण्यासाठी बांधलेली उतरती भिंत. ४. तळघर. ५. रस्ता किंवा कालव्यावरील मोऱ्या; पूल आच्छादणारे लांब दगड; खिडक्यांवरील छावणीचे आच्छादनांचे लांब दगड. ६. फरशी.

लादणी १. भारा; वजन; ओझे. २. (घोडे, उंट इ. वर कंठाळा, सलिता, ओझे) लादण्याची क्रिया.

लादणे उक्रि १. (बैल, गाडी, जहाज इ. वर) सामान चढवणे. २. एखाद्याला इच्छेविरुद्ध काम करायला भाग पाडणे; जबाबदारी टाकणे; दोष देणे इ. आरोपित करणे. ३. एकावर एक रचणे; वर जड ओझे घालणे. ४. (विटा, चुना, रंग, गिलावा इ. चा थर) भिंत, जोते इ. बांधताना वर लावणे, चढवणे.

[सं. रद्य, रद्; हिं. लादना; गु. लादवुं; दे., प्रा. लद्द; फ्रें . जि. लदव]

लादनी स्त्री. १. तळघर. (व., ना.) पहाः **लादणी** ६. २. पहाः **लदाव**

लादा पु. १. धुण्याच्या कपड्यांचा बोजा, ढीग. २. ओझे; भारा; लागेल त्याहून अतिशय जास्त प्रमाणात असणारा कोणताही पदार्थ. ३. (क.) गुंता; लगदा; एकमेकांत मिसळलेला जुडगा. ४. अशी गुंतागुंत झालेली स्थिती.

लादा पु. १. (कालवलेले पीठ, मळलेला चिखल, चुना इ. चा भिंतीवर वगैरे मारण्याजोगा) गोळा; (सामा.) चांगला भिजवून मळलेला गोळा. २. पाण्याचे बांध तयार करण्यासाठी पळीवाने खणून काढलेल्या मातीचे चौरस गोळे. ३. (पीठ, भात, गूळ इ. चे) पातळ स्वरूप, लिबलिबीत अवस्था. ४. पाणवट चिखल. [सं.रद्य; क. लोदु]

लादालाद वि. लादून ओझी बांधून तयारः 'तमाम कारखाने लादालाद जाले आहेत. '–पेद ६.२८.

लादी स्त्री. १. घडीव दगड (फरसबंदी इ. च्या उपयोगी); चीप; (शहाबादी इ.) फरशी. २. (सामा.) चौकोनी वडी, चिरा, घडण.

लाधणे अक्रि. १. लाभणे; मिळणे; प्राप्त होणे. २. लाभणे; मिळालेली वस्तू आपल्या सुखाची होणे; आपल्यापाशी टिकणे, वाढणे. [सं.लभ्–लब्ध; प्रा. लद्ध]

लान पु. व्यभिचार केल्याचा आरोप ठेवल्यास मागता येईल असा घटस्फोट.– घका ७५. [सं.ला=तोडणे]

लानी पहाः **लाणी**

लाप स्त्री. मृग नक्षत्राच्या आरंभी उगवणारे गवत. (बे.)

लापट पहाः **लंपट**

लापट वि. १. लंपट; ढिले, खिळखिळे झालेले (कुलूप, गाडा इ.). २. झिजल्याने सैल पडलेले (पेटीचे झाकण, मळसूत्र इ.). ३. कोडगा; लोचट; निर्लज्ज.

लापण वि. रेती आणि चिकणमाती यांचे प्रमाण समान असणारी (जमीन).

लापणि(ण्णि,नि)का, लाफण्णिका, लापटणिका, लापणीक स्त्री.(मूळ शब्द व अर्थ यासाठी पहा : **लापनिका**) (ल.) १. लांबलचक, कंटाळवाणी हकिकत; चऱ्हाट. २. लबाडीची मसलत; कपट; लपंडावः 'प्रपंच वाटे लटिका। माया वाटे लापणिका।'-दास१.९.९६. ३. कुभांड; थोतांड.
वि. मिथ्या; खोटेः 'सदा सर्वकाळ लटिका। बोले माईक लापणिका।'-दास ५.३.६०. [सं.लापनिका]

लापणी स्त्री. भाषण. [सं.लापन]

लापन न. १. लावणे; बंद करणे. २. रोवणे; स्थापणे; गच्च बसवणे. ३. अर्थबोध होईल अशा प्रकारे जुळणी करणे; अन्वय लावणे; योग्य क्रम ठेवणे (कविता, कूट, हिशेब इ. चा); व्यवस्थित रचना, योजना. बहुधा समासात उपयोग. जसेः-श्लोकलापन, ग्रंथलापन. [सं.]

लापनिका स्त्री. १. अन्वय; (कवितेतील, श्लोकातील शब्दांचा) संबंध, अर्थ लागेल अशी रचना; (श्लोक, वाक्य, कूट इ. चा) अर्थ लावणे. २. वाक्य, श्लोक इ. चा अर्थ समजावून सांगण्याची विशिष्ट धाटणी, शैली, सरणी; स्पष्टीकरण किंवा अनुवाद करण्याची रीत, पद्धत. ३. वादविवादाची, लेखनाची, संभाषणाची पद्धत, शैली, रीत; लेखनशैली. ४. शब्दपांडित्य. ५. विवेचन; स्पष्टीकरण. [सं.]

लाप(फ)शी स्त्री. दूध, ताक, नारळाचा रस वगैरेंना शिंगाडे, रताळी, तांदूळ वगैरेंचे पीठ, तवकील इ. लावून, कढवून करतात ते पेय; खीर; साबुदाणा पाण्यात धुऊन तुपाच्या फोडणीत मिरच्यांचे तुकडे टाकून फोडणीला टाकल्यावर त्यात ताक ओतून मीठ घालून करतात तो पदार्थ; साबुदाण्याची वगैरे खीर. [हिं. लपसी; प्रा. दे. लप्पसिया]

लापिका स्त्री. ग्रंथातील विषयवार अनुक्रमणिकाः 'अवघेया दृष्टांतां लापिका लाविलीया'-स्मृस्थ१७.

लाफ पु. दिवाः 'लाफांत तेल घालावयाची त्यांची पाळी आहे ना?'-खेड्यांतील स्वभावचित्रें. [इं. लँप]

लाफा स्त्री. फळीला बळकटीसाठी खिळे वगैरेंनी ठोकलेली पट्टी.

लाफा स्त्री. अव. १. अतिशयोक्ती; तिखटमीठ लावून, वाढवून, फुगवून सांगणे. २. बढाया; बाता; गप्पा.[सं.लप् = बडबड करणे; फा. लाफ]

लाफा पु. थप्पड.

लाफ्या वि. बाताड्या; गप्पीदास.

लाबरी स्त्री. टप्पा. (बे.)
वि. फुकट. (बे.)

लाभ पु. १. फायदा; प्राप्ती. २. धान्य वगैरे मोजताना बरकत यावी म्हणून एक अशा अर्थाने वापरतात. नंतर दोन, तीन असे म्हणून माप टाकतात. पहाः **बरकत**. ३. शेकड्यावर दिलेला जास्त माल (नारळ वगैरे).[सं.]

लाभणे क्रि. १. मिळणे; प्राप्त होणे; संपादन होणे. २. निष्पन्न होणे; उद्भवणे (फायदा). ३. उपयोगाचे असणे; उपयोगी पडणे. ४. शुभदायी होणे (एखादी वस्तू इ.). [सं. लभ्]

लाभदायक वि. १. ज्याच्या संग्रहाने संग्रहकर्त्याला धन इ. लाभ होतो अशी (वस्तू इ.). २. फायदेशीर.

लाभदृष्टि-ष्टी वि. केवळ लाभाची, फायद्याची इच्छा, अपेक्षा धरणारा.

लाभपद न. जे पद सांभाळण्याने सांभाळणाऱ्याला पैशाचा किंवा अन्य लाभ मिळतो असे पद.

लाभरा पहा : **लुब्रा**

लाभलोभ पु. १. एखाद्या कामामध्ये मला काही मिळेल असा असणारा लोभ. २. लाभ; प्राप्ती; फायदा (व्यापकार्थी व सामान्यपणे उपयोग). ३. प्राप्ती; स्नेह; लाभाची अपेक्षा; लोभाची भावना.

लाभवेळ-ळा स्त्री. १. शुभकाळ; लाभदायक काळ. २. दिवसाच्या किंवा रात्रीच्या आठ भागांपैकी एका वेळेचे नाव.

लाभहानी स्त्री. १. नफानुकसान. २. सुखदुःख.

लाभक्षेत्र न. एखाद्या योजनेचा ज्या विभागाला लाभ होतो तो विभाग. (उदा. धरणाचे पाणी ज्या जमिनीला मिळते तो प्रदेश.)

लाभाईत-गळी, लाभाचा वि. लाभदायकः 'घरीं येवोनिया आनंदे बोलतीं। कन्या आम्हाप्रती लाभाईत।'-ब ४; 'बोलती लीला लाभागळी।'-दावि १३१.

लाभागोभा पु. (व्यापकार्थी) नफा; फायदा. [लाभ द्वि.]

लाभाधिकारी वि. हक्काने नफ्यातला भाग मिळतो अशी व्यक्ती. (प्रत्यक्ष व्यवहार विश्वस्त किंवा अन्य अधिकृत व्यक्तींच्या हाती असतो.)

लाभालाभ पु. १. नफातोटा. २. नशीब; दैव. [सं.]

लाभालोभाचा वि. स्नेह किंवा लाभ यांमुळे जोडलेला.

लाभावळी स्त्री. अनेक लाभः 'तो चिन्हें शुभ पाहुनी नृप म्हणे लाभो न लाभावळी।'-र ३०. [सं.लाभ + आवली]

लामटे पु. अव. (प्र.) लांबटे; शेवया. (व.)

लामणदिवा, लाम(म्ह)णे पु.न. १. लांबणदिवा; लांबणे. दोरी, साखळी वगैरेला टांगून ठेवण्याजोगा लोखंडी, पितळी वगैरे धातूंचा दिवा. २. मध्ये साखळी लावलेला पितळी कंदील. [सं.लावण्य + दीप]

लामा पु. १. बौद्ध धर्माची तिबेटातील शाखा. २. या शाखेचा गुरू. ३. तिबेट किंवा मंगोलिया यातील बौद्ध भिक्षू.
[तिबेटी ल्हामा.ब्लाम 'ब' हा वर्ण अनुच्चारित आहे.]

लाय, लायलाय पहाः **लहालहा**

लायक वि. १. प्रसंगाला साजेसा. २. (एखादी वस्तू मिळवण्यास काम करण्यास) समर्थ; योग्य; पात्र. ३. सोयीस्कर; उपयुक्त; लागू पडणारा (जिन्नस, जागा). ४. (गंजिफाचा खेळ) उतारी करताना उतरण्याजोगा (हुकूम). [अर. लाइक्]

लायकी स्त्री. १. औचित्य; योग्यपणा. २. सामर्थ्य; योग्यता. ३. जुळतेपण; योग्य मिळणी (वस्तू, स्थळ इ. ची). [फा.]

लायकीचा दाखला योग्यतापत्र; शिफारसपत्र. (इं.) सर्टिफिकेट.

लायणे क्रि. लावणे. (को.)

लायनी स्त्री. अपशब्द; शिवीः 'रयतीस लायनी सिवीगाली न करणें व तश्वीस न देणे. '-मइसा १६.२९. [अर. लअन]

लायपेझ पु. अन्नातील चरबीचे पचन करण्यास मदत करणारा एक घटक.

लायरी स्त्री. मिजास. (मुंबई)

लायी स्त्री. लाळेरे. (अहि.)

लारांज न. साखरलिंबू. (गो.) [पोर्तु.]

लारी स्त्री. एक जुने चांदीचे नाणे. आकार लहान चिमट्यासारखा, किंमत साधारणपणे आठ आणे. साडेतीन मोठ्या लारींचा व चार लहान लारींचा एक रुपया होता. [अर. फा.]

लाल वि. प्रिय; आवडीचा (माणूस): 'या जगांत खरेखुरे सरस्वतीचे लाल कितीसे सांपडतील? '-विवि८.८.१४३. [सं.लालन] (वा.) ० **बनणे** - श्रीमंत, गब्बर बनणे, होणे.

लाल पु. १ एक रत्न; माणिक. २. एक पक्षी.
वि. १. तांबडा; रक्तवर्णी. २. अतिशय तांबडा (तांबडा या शब्दाला जोडून). ३. मूर्ख. [फा.] (वा.) ० **अंगार होणे** - अतिशय रागावणे.

लालकांगोणी पहाः **कांगु(गो)णी**

लालगंध न. वाङ्निश्चयाचे साक्षगंध.

लालच पहाः **लालूच**

लालचणे, लालचावणे अक्रि. १. लोभाविष्ट होणे. २. सवकणे.

लालची स्त्री. १. लालसा; लोभ. २. लाच; लालूच.
वि. लोभी.

लालचेल वि. १. लोभी; अभिलाषी. २. अति लालचावलेला.

लाल झगडा प्रेमाचे भांडण. [म. लाड + झगडा]

लालट वि. लालसर; तांबूस.

लालटि(टे)न,लालटेम स्त्री. पु. हातकंदील.(व., हिं.)[अप. इं. लँटर्न]

लालडी स्त्री. हलक्या जातीचे लाल रत्न; माणकाचा तुकडा. (नथीत घालतात.): 'राधा-कृष्ण लाल आम्ही लालडी त्या।'-रासक्रीडा २.

लालणी स्त्री. लाडकीः 'कोण्या गांवीं गेला लाल माझ्या लालणीचा।'-लोसाको.

लालणे क्रि. लालन, संगोपन, लाड, सांभाळ करणेः 'पाहुनि घेउनि सेउनि लालुनि पावनसंस्कृतिबंधनिवृत्ता।'-निरामायण ४.३०. [सं.लालन]

लालन न. १. मुलाबाळांनी मागितलेला खाऊ किंवा वस्तू देणे, हट्ट पुरवणे, त्यांना त्यांच्या इच्छेनुसार वागू देणे, माया करणे, जवळ घेणे, पापे घेणे इ. त्यांना आवडेल असे वागणे; लाड. २. संगोपन; पालन.

लालनपालन न. १. लाड; लालनाचे आधिक्यदर्शक रूप. २. सांभाळ; संगोपन.

लालपिशी स्त्री. गव्हाची एक जात.

लाल बावटा १. प्रतिकूल परिस्थिती. (क्रि. दाखवणे). २. समाजसत्तावादी मजुरांचे निशाण.

लालबुंद वि. लालभडक; अतिशय लाल.

लालबोर वि. विशिष्ट रंगाचा (घोडा).

लालभडक वि. अतिशय गडद तांबड्या रंगाचा; अतिगर्द तांबडा.

लालभुजःकड-ण, लालबुझक्कड पु. दीडशहाणा; स्वतःला हुशार समजणारा परंतु खरोखर मूर्ख व अज्ञानी असणारा मनुष्य. [फा. लाल् + हिं. भुलक्कड]

लालमुखी न. एक कबुतराची जात.

लालमो पु. एका माशाचे नाव. (कु.)

लालवा पु. लाल रंगाचे किमती कापड. - लोसाको.

लालस पु. १. औत्सुक्य; तत्परता. २. लडिवाळपणाः 'एके जनलीला विलासें। एके पालनशीले लालसें।'-ज्ञा११.१३०.
वि. तत्पर; उत्सुकः 'दासी तुझी परम लालस वाट पाहे।'-सारुह ५.१०३. [सं.]

लालसा स्त्री. अतिशय आवड; जबर इच्छा; अभिलाषा; आकांक्षा.[सं.]

लाला पु. १. मुलगा; पुत्र. २. पंजाबी हिंदू किंवा पठाण.
वि. (बहुमानार्थी) महाराज, साहेब या प्रकारचे विशेषण.

लालाई स्त्री. लाल रंगाची साडीः 'चाटीयाच्या दुकानी उंच मोलाची लालाई'-लोसाको.

लालाभाईचा चुरमा १. प्रत्येकाला प्रत्येक गोष्टीची चैन, रेलचेल, मुबलकता असणे. २. रंगविलासाची झोड; बेसुमार चैन. [लालाभाई = एका बैराग्याचे नाव + हिं. चुरमा]

ला(ल)लित वि. १. लाडका; आवडता. २. ज्याचे लालन केले आहे असा. [सं.]

लालित्य न. १. प्रेमभावामुळे स्त्रियांच्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या विशेष हालचाली, हावभाव. उदा. आळसाने अंग टाकणे, कोमल दृष्टीने पाहणे, नाजूक हावभाव करणे. २. सौंदर्य; शोभा; मोहकता; ललितपणा. ३. काव्य, प्रबंध, भाषण इ. मधील अर्थ, रचना इ. दृष्ट्या असणारे सौंदर्य. [सं.]

लालीप वि. लालजर्दः 'कपाळीचं कुंकू म्या लालीप पाहिलं'- लोसाको.

लालुचणे अक्रि. लालसा, हाव, अतिरेकी इच्छा धरणे.

लालुप्य न. आसक्ती. [सं. लोलुप्य]

लालूच स्त्री.१. लोभ; हाव. २. आमिष; प्रलोभन. [सं. लालसा;हिं. लालच]

लालूवाड स्त्री. एक तलवार. - प्रश ४१.

लाले न. मुकेपण. [फा. लाल्]

लाल्हात वि. सुंदर; रमणीयः 'जंव तारुण्याचा पडिभरु। तंव लाल्हात दिसे।'- ज्ञाप्र ७६०. [सं. ललित]

लाव अ. साहित्य; लवाजमा. (जमा किंवा लष्कर शब्दाला जोडून येतो.): 'लाव-लष्कर फौजेचा थाट।'-होपो १८.

लाव पु. निशाण. [अर. लीवा]

लाव पु. एक पक्षी; लावा. [सं.]

लाव पु. छंद; आवड : 'लाडक्या लेकीला पानाचा मोठा लाव, आंधण अंजनगांव'-लोसाको.

लाव स्त्री. १. एक राक्षसी; लास; जखीण; हडळ; पिशाच. काही जातींमध्ये हिची उपासना आहे. २. (ल.) ओंगळ, दुष्ट, घातकी स्त्री. ३. कोपिष्ट, कजाग स्त्री.

लावक पु. एक पक्षी; लावा. हा फार स्त्रीलंपट असतो.

लावक न. १. भांडण; तंटा. २. कुरापत; लावालावीः 'कांई लावकैआं केउतें।'- शिव ११६.

लावगण न. स्त्रियांनी आपल्या मागे यावे म्हणून पुरुषाने दाखवलेले आमिष.

लावगन-ण स्त्री. लागवण; लागवड; पेरणी.

ला(लां)वडा पु. कोल्हाः 'काळीए डोइके लांवडा : दारवठां लागता

होता'- लीचउ १९.

लावडीन स्त्री. स्त्रीचे भूत; हडळ. (झाडी)

लावण, लावणिक वि. खारट; क्षारयुक्त. [सं.]

लावणी स्त्री. एक प्रकारचे काव्य, गाणे. ही खास महाराष्ट्रीयन आहे. विषय- शृंगार, वैराग्य इत्यादी बहुधा पहाडी, काफी रागांत गायली जाते. [सं. लापनिका]

लावणी स्त्री. १. लागवडीचे व पेरणीचे काम; लावण्याचे काम (रोपे, ढाळ्या इ. जमिनीत). २. जमीन पिकायोग्य, वहीत करणे. ३. गणना; संख्या. ४. स्थापना; मांडणीः 'ऐसी देतां उलठणी। अनुराग रोपाची लावणी।'- शिव ६८१. ५. रतीब. ६. शृंगार; आरास; सजावटः 'अवघी जडिताची लावणी।'- ऐपो १५. (वा.) ० **लावणे** -१. तुलना करणेः 'कृष्णागरु आणि मलयानिल। लावणी लाविता मोल तुटे।'- भवि २.२४. २. व्यवहारात उपयोग करणेः 'वर्तल्यावीण शिकवी। ब्रह्मज्ञान लावणी लावी।' -दास २.१०.३६.

लावणी अळपणी (व्यापकार्थी) पेरणी-मळणी; सुरुवातीपासून ते अखेरपर्यंतचे सर्व शेतकाम.

लावणी उगवणी शेतपेरणी, सारावसुली इ. कामे.

लावणीचा वि. आपोआप न झालेला, लावणी करून उगवलेला (वृक्ष).

लावणी जु(टु)पणी १. नांगरणी, जुंपणी इ. लागवडीतील सर्व कामे. २. जडवणे; स्थापणे; जुंपणे; मार्गाला लावणे; साखळीत बसवणे.

लावणीपत्रक न. लागवडीखाली आणलेल्या जमिनीचा तक्ता; गावची खातेवारी वही.

लावणीमांडणी स्त्री. (व्यापकार्थी) लागवण; लागवडीला आणणे.

लावणे न. रोपांची लागवड.

लावणे न. पडदी; आडोसाः 'खातीः लावणी'-अली ६६.

लावणे क्रि. तोडणे; कापणेः 'शिसाराचें रागें लावणें। शिसचि जैसें।'- ज्ञा १८.१७९.

लावणे सक्रि. १. जोडून, लावून ठेवणे; जुळवणे; बसवणे; चिकटवणे. २. पाठवणे; धाडणे; मार्गावर सोडणे. ३. पगारपत्रक, बिल इ. रुजू, सादर करणे; पटवणे. ४. वसाहत, स्थापना करणे; बसवणे. ५. (दुकान) उघडणे. ६. (जहाज, बोट) नांगरणे. ७. कुळाला (जमीन) लागवडीला देणे. ८. (ल.) हाकलणे; बाहेर घालवणे. ९. पेटवणेः 'लाखेचें करावे दामोदर। त्यांत घालावे पंडुकुमर। कोणा नेणतां मंदिर। लावावे तुवां।'-कथा ५.११.९६७.१०. नाहीसे करणेः 'तैसें आत्मनाथाचिया आधी। लाऊनि विषय-विषाची बाधी।'-ज्ञा १६.१८८. ११. ओळीने मांडणे; जुळवणे. १२. व्यवस्थित, जागच्या जागी ठेवणे. १३. आरोप; माथी मारणे. १४. लावणी करणे; पेरणे. १५. देणे, करणे, योजणे. इ. अर्थीही वापरतात. उदा. धार लावणे, तजवीज करणे. १६. पहा : **लागणे** [सं. लागयति] (वा.) **लावून घेणे**-(वस्त्र) वेढून घेणे. **लावून पाहणे**-ताडून पाहणे; परस्परांची योग्यता ठरवणे. **लावून बोलणे**-टोमणे मारणे; झोंबेल असे बोलणे.

लावण्य न. १. सौंदर्य; रूप. २. शोभा; दिमाख. ३. खारटपणा; क्षारता. [सं.]

लावण्यखाणी-खनी स्त्री. (सौंदर्याची खाण) (ल.)अपरंपार सुंदर व मोहक स्त्री.

लावतोड स्त्री. १. आत्यंतिक घाई. २. घाईमुळे होणारी जिवाची त्रेधा. ३. कामातील धावपळ; धडपड; उतावळेपणा. ४. जोराची ओढाताण. ५. अतिशय कडाक्याचे भांडण.

लावपिसा पु. एक क्रूर प्राणी.

लावबाज वि. लाव्याकडील कामगार;लावा पक्षी धरणारा. [म.लाव+फा. बाज]

लावरा पु. लहान कोंबड्यासारखा एक जंगली प्राणी. याचे मांस खातात.

लावलद वि. निपुत्रिक. [फा.]

लावलिजाव वि. जुजबी; तात्पुरते. (क.)

लावलीव् स्त्री. हालचाल. (झाडी)

लावसट स्त्री. राक्षसी; डाकीण; जखीण.
वि. ढालगज.

लावसट(र)णे, लावारणे क्रि. लावसटीपासून बाधा, त्रास, पीडा होणे (फळ, दूध इ. ना). (नारळ, ताडफळ इ. फळासंबंधाने लावसरणे हेच क्रियापद बहुधा योजतात.)

लावा पु. एकसारखी तीच गोष्ट करणे; धोशा, तडाखा लावणे. (क.)

लावा पु. एक पक्षी; लाहूर. [सं. लावक]

लावा पु. (शोभा येण्यासाठी, खुलवण्यासाठी) पदरचे घातलेले शब्द; तिखटमीठ; मसाला.

लावा पु. मांसाचा तुकडा. (कु.)

लावा पु. खेळ; लीलाः 'लाविसि कां बोल? हें तुझे लावे।'- मोउद्योग १०.११०.

लावारिस वि. ज्याला कोणी वारस नाही असा; अनाथ. [फा.]

लावालाव-वी स्त्री. १. तुकड्याला तुकडा, वस्तूला वस्तू जोडणे; वाढवणे. २. नीट, व्यवस्थित मांडणी करणे. ३. (ल.) खुलण्यासाठी भर घालणे, मीठमसाला लावणे. ४. इकडची हकिगत तिकडे व तिकडची हकिगत इकडे सांगून आपापसांत भांडण लावणे; चुगली; चहाडी.

लाविरा वि. लावालावी करणारा.

लावूलड्डू वि. निरुपयोगी (जिन्नस, मनुष्य).

लाव्हर स्त्री. कोकरू; (एक वर्ष वयाच्या आतली) कोकरी.

लाव्हारस पु. ज्वालामुखीतून बाहेर पडणारा रस; शिलारस.

लाशा वि. १. लास (डाग) दिल्यासारखे चिन्ह असणारे (फळ). २. लासाच्या चिन्हाने युक्त असा (माणूस); डागलेला. [सं. लांछ]

लाशे-से न. काळा डाग.

लास पु. १. वायुविकृती किंवा अन्य रोगाच्या निराकरणासाठी त्वचेवर तापलेल्या सळईने दिलेला डाग, चटका; डागणी. २. अशाने पडलेला डाग. ३. जन्मापासून तोंडावर असणारा लाल, काळा वगैरे रंगाचा डाग; तीळ; वांग. ४. आंबा इ. फळांवर सडण्याने पडणारा डाग.
न. अंगावरील केसाळ तीळ. (ही मागील जन्माची खूण मानतात.)

लास पु. (नाविक) वल्ह्याचे टोक जमिनीवर टेकून होडी मागे ढकलणे. (क्रि. धरणे, करणे.)

लास स्त्री. १. लांडगी; कोल्ही. २. एक राक्षसी.

लास पु. (चर्म.) जोड्यात आकार येण्यासाठी घालण्याचा लाकडी ठोकळा; कलबूत.

लास स्त्री. रंग व मेण मिसळून करतात ती एक प्रकारची माती. (को.)

लास घालप लिलाव बोलणे. (गो.)

लासणी स्त्री. १. तापलेल्या लोखंडाने दिलेली डागणी. (क्रि. करणे) २. पहा : **लासन**

लासणे सक्रि. १. विस्तवात घालून तापून लाल झालेल्या लोखंडाने डाग देणे. २. त्वचेवर, वस्तूच्या पृष्ठभागावर कोणत्याही कारणाने भाजून, डागून खूण करणे. ३. पाजणीनंतर ताण्याला लासे लावणे, खुणा करणे. ४. भाजणे; जाळणेः 'मूर्खा, दीपा पतंग स्वमनिं जन्हि म्हणे 'हे खरें फूल' लासी।'-मोकृष्ण ५६.३९.

अक्रि. १. जळणे. २. बिघडणे; डागळणे (फळ इ.).

[सं.लांछ, लक्ष्मन् (चिन्ह)]

लासन न. (विणकाम) कापड किती विणले गेले हे मोजण्यासाठी शाई इ. ने त्याला दोन हातांवर करतात त्या खुणांपैकी प्रत्येक; लासणी.

लासरू न. (तुच्छतेने) लास; राक्षसी; लासी.

लासरू न. पु. केसाळ तीळ; वांग.

लासरू, लासूर न. एक नेत्ररोग.

लासला वि. डाग. (झाडी)

लासी स्त्री. १. डाकीण; राक्षसी; लास. २. मांजरीः 'अथवा लांसीचे दांत अति तीख। येरां दिसती परि पिलियां सुख।'-स्वादि १२.३.५६. ३. कोल्हीः 'तंवतंव डांडाति उठी। रसना लांसि।'- भाए १९७.

[सं. राक्षसी]

लासे न. १. डाग; वण. २. (विणकाम) लासणी. (क्रि. लावणे)

[सं. लांछ]

लास्य न. एक नृत्य. सुकुमार व शृंगाररसपोषक नृत्य. [सं.]

लाह पु. छंद; नाद. पहाः **लाहो**

लाह(हा)कणे क्रि. १. धापा टाकणे; तगमग करणे. (व.) २. शोक करणे. [सं. लष्]

लाहकी स्त्री. १. उकळी; अतिशय उष्णतेमुळे घालमेल, लहालहा होणे. (क्रि. मारणे, देणे, टाकणे.) २. अंगाचा दाह, तलखी होणे; राग किंवा त्रास होणे. ३. लाहा; एकसारखा ध्यास, हट्ट धरणे; जीव काढणे. ४. उत्कट इच्छा. ५. त्वरा; घाई (काम होण्याची).

लाहडा पु. तगमग; अतिशय जोर, भर. ताप, देवी, गोवर इ. शब्दांना जोडून येतो. उदा. तापाचा-ने लाहडा.

लाहडा पु. १. लगदा; राडा; गोळा (गूळ, चिखल इ.चा). २. गुंता; गुंतागुंत; मिसळ.

लाहडा वि. अत्यंत लालचावलेला; मागे लागलेला; आसक्त; अत्यंत शौकीन, नादी; हावरा (चांगल्या व वाईट दोन्ही अर्थी).

लाहणा पु. प्राप्ती; उत्पन्न; लाभः 'म्हणोनि इये अध्यायीं।... स्नेहो लाहणा।'-ज्ञा १६.४६.

वि. १. लाभदायकः'गुरू उपदेश नाहीं लाहणा।'- दावि १५०. २. प्राप्त होणारा; मिळणाराः 'येतुलेनि पंडुसुता। अनुभव लाहाणा आयिता।'-ज्ञा १३.१०४८. ३. आवडता; स्वाधीनः 'एवं भाविकू देवाचा लाहणा।'- एभा २५.६२०. [प्रा.लाह; सं. लाभ]

लाहणी स्त्री. कापणी. [सं. लापन]

लाहणी स्त्री. (दिव्याची) ठाणवई.

लाह(हा)णे अक्रि. १. धजणे; धैर्य करणेः 'परि अपराधु तो आणीक आहे। जें मी गीतार्थु कवळुं पाहे। ते अवधारा विनवूं लाहें। म्हणऊनियां।'-ज्ञा १.६६. २. शेवट होणे; फळ मिळणे. ३. (इतर सर्व अर्थी) पहाः **लाभणे** [सं. लभ्; प्रा. लह]

लाहयकी स्त्री. पहाः **लाहकी** (ना.)

लाह(हा)री पहाः **लारी**

लाहलाह(हा)त वि. लुसलुशीत : '...धर्म मोक्षाची शाखा पालवी। लाहलाहातनित्य नवी।'-ज्ञा १५.१९४.

लाहवा पु. लावा पक्षीः 'लाहवे रावे।'-दावि २४४.

लाहसी स्त्री. वाघीणः 'मोहादि व्याघ्र धांवतिः लाहसी अविद्येचिया'- वह ४४६.

लाहा स्त्री. अत्यंत इच्छा.

लाहा पु. नादारीः 'मुंबई, कलकत्ता, मद्रास वगैरे मोठ्या शहरांत लाहा घेण्याचा स्वतंत्र कायदा आहे.'- घका १३४.

लाहाक स्त्री. धाप.

लाहा(हां)कणे अक्रि. धाप लागणेः 'तेवींचि लाहांकेति'-गोप्रच २७८.

लाहाणा वि. १. पहाः **लाहणा** १. २. लाभ करून घेणाराः 'साधकहि येथ लाहाणा। जो या साधना साधूं जाणे।'-एभा ११.५०७.

लाहाणी स्त्री. प्राप्ती; लाभ. पहाः **लाहणा** पु.

लाहाणे उक्रि. १. इच्छा करणेः 'सुखें पुसों लाहासि।' - ज्ञा १४.३२४. २. मोल येणेः 'तुझें मोहाळु काइ लाहाति?'-गोप्रच १७२.

लाहाणे न.१. प्रेम; निष्ठाः ' ऐसें लाहाणें तया आम्हा। मज पुरुषोत्तमा वश केलें।'-एभा ११.१५५९. २. ऐक्य. ३. प्राप्ती.

लाहाते न. प्राप्ती; लाभः 'जीवा नाहीं कुडीचें लाहाते। ये भिन्नभिन्न पंचभूतें।'-तुगा ७१३. पहा : **लाहणा**

लाहानवति-ती स्त्री. गाळीव माती; वाळूः 'तयांची लाहानवती। मळिजे वातपीति।'-भाए ४०१.

लाहानीसिवनी स्त्री. लपंडावः'लाहानीसिवनी खेळत होते'-लीचपू २११.

लाहापाहा वि. तजेलदार; तेजदार. (व.)

लाहाबरा वि. कोणतेही काम हावरेपणाने, गडबडीने करणारा. (व.)

लाहास पु.१. घोडपागेचा तंबूः 'घोडेयांचे लाहास दीधले'-लीचपू ३१. २. घोडपागेच्या तंबूची दोरीः 'घोडेयांचेया लाहासांवरौनि....'-लीचपू ७४.

लाहासे पहाः **लासे** १

लाहि(य)री स्त्री. मिजास. (मुंबई)

लाहिरी स्त्री. चटणी. -बदलापूर १४८.

लाही स्त्री. १. तांदूळ, मका, जोंधळा इ. चा दाणा भाजून फुलवल्यावर होणारा पदार्थ. २. तुरटी, मोरचूद वगैरेंचा वरीलप्रमाणेच केलेला पदार्थ. ३. हल्लाः 'मोगल व भोसले यांची लाही येऊन मौजे मजकूर दरोबस्त लुटला.'-समा १.७. ४. अतिशय रागामुळे अंगाची होणारी तलखी;

आग; काहली; दाह. [हिं. लाई;सं. लाजा] (वा.) ० **उडणे** – १. (गोळ्यांचा, शिव्यांचा इ.) भडिमार, जोराचा वर्षाव होणे. २. (दाण्यांची, आंब्याची) तडकाफडकी विक्री होणे. ० **फुटणे** – मोठा मारा होऊन नाश होणेः 'अठरा घटका लाही फुटली.'–ऐपो २२४. ०**भाजणे** – १. गदमदणे; उबगणे. २. कडकडीत ऊन लागणे. ०**होऊन जाणे** – संतापणे. ०**लाही होणे** – रागाने अंगाची आग होणे.

लाहीसांडगे पु. अव. कोहळे सोलून किसल्यावर त्यात मीठमसाला घालून लांबट आकाराचे गोळे करुन वाळवतात व तळून उपयोगात आणतात.–गृशि ३६९.

लाहूर पु. न. लावा पक्षी. [सं. लावक]

लाहेलाहे क्रिवि. त्वरेने; लगबगीने; घाईनेः 'लाहेंलाहें तांतडी। पुढती पंक्ती बैसावया।'–हवि ३४.८४.

लाहो पु. १. छंद; नाद; हव्यासः 'राम राम स्मरा आधीं। लाहो करा गाठ घाला मूकबंदी।'–तुगा ३४४२. २. अत्यंत लोभ; हावरेपणा; अतृप्ततः 'भुलला भक्तिभावें। लाहो घेतला देहीं।'–भज ७५. ३. प्राप्ती; लाभ; फायदाः 'अश्रु–नीर पुशि, दे सुख–लाहो।'–वामन, भरतभाव ३०. [सं. लाभ; प्रा. लाह]

लाहो पु. १. त्वरा; घाई; जलदीः' तंव रसस्वादाचियां हांवा। लाहो केला।'–ज्ञा ७.१९१. २. टाहो; आक्रोशः 'मोठे मोठे खोरील भोजानी लाहो केला'–लोसाको (आदि).

लाहोजाळ पु. लोखंडी शस्त्रेः 'लवलवीत लाहोजाळ।'–उषा ४८.

लाहोटा पु. १. हावरेपणा; फार लोभीपणा. २. उत्कट इच्छा, आकांक्षा.

लाहोरी वि. लाहोरचा (साबण).

लाह्या, लाह्यालाह्या पहाः **लहालहा**

लाह्याकी स्त्री. घाई; लाहकी. (व., ना.)

लाह्या स्त्री. अव. मुलींचा एक खेळ.–मखेपु ३००.

लाह्लाणे क्रि. तळमळणे; लाहालाहा करणेः ' घेऊनि अज्ञानें उसंगिए। आर्ती लाह्लाति जियें।' – ऋ २.

लाळ स्त्री. १. काट्याचे बारीक टोक; कूस; तूस (धान्याचे). (क्रि. शिरणे, राहणे, काढणे.) २. विंचवाच्या नांगीचे टोक.

लाळ स्त्री. तोंडातील ग्रंथींमधून स्रवणारा, दातांनी बारीक केलेल्या अन्नाच्या कणांचे साध्या रासायनिक घटकामध्ये रूपांतर करणारा दाटसर द्रव. [सं.लाला] (वा.) ०**उठणे, सुटणे** – खाण्याची इच्छा, मोह होणे. ०**गळणे** – दृढ मैत्री असणे. ०**गाळणे** – अतोनात, फाजील स्तुती करणे. ०**घोटणे** – १. अभिलाषा धरणे. २. लांगूलचालन, खुशामती करणे. **लाळेने चणे भिजवून खाणे**– मिळणार अशी खात्री असणारा योग्य मान वगैरे मिळाला नाही तरी पुढे मिळेल अशा आशेवर राहणे; स्वतःच स्वतःचा गौरव करुन घेणे.

लाळखुरी स्त्री. विषाणूमुळे गुरांना होणारा एक भयंकर रोग. लक्षणे–लाळ सुटणे, खुरांना भेगा पडणे.

लाळघोट्या वि. खुशामतखोर; लोभी.

लाळणे अक्रि. १. लाळ गाळणे, पाझरणे. २. लाळ गळण्याचा आजार होणे.

लाळणे, लाळवणे क्रि. लाड करणेः 'तूं पिता जालासी। फुन लाळऊँनी कहीं न बोलाविसी।'–शिव १०२. [सं. लल्]

लाळणे अक्रि. (जीभ) बाहेर लोळणे, लोंबणेः 'डोलवी मस्तक जिव्हा लाळी।'–दास १.२.८८.

लाळे न. जनावरांना होणारा एक रोग.

लाळे न. घोड्याच्या सरोसरीला किंवा म्होरकीला खालच्या बाजूला असणारा एक भाग. याला जेरबंद किंवा दवासन बांधतात.

लाळेमुळे पु. अव. एक प्रकारचे मासे.

लाळेरे, लाळी न. स्त्री. लहान मुलाच्या तोंडातून गळणारी लाळ धरण्यासाठी गळ्यात अडकवलेला जाडसर फडका.

लाळ्यो पु. सारखी लाळ गाळणारा मनुष्य. (को.)

लाक्षणिक वि. १. लक्षणेने जाणण्याचा अर्थ; लक्षणासंबंधी. २. सांकेतिक; सांज्ञिक. ३. वैशिष्ट्यबोधक; विशेष सांगणारे. ४. अलंकारिक; औपचारिक. ५. अप्रत्यक्ष; गौण. [सं.]

लाक्षण्य वि. लक्षणांनी, गुणधर्मांमुळे ओळखता येणारे. [सं.]

लाक्षा स्त्री. लाख. [सं.]

लाक्षायणी स्त्री. लक्ष तीर्थांचे स्थानः 'लक्षतीर्थ जेथे मज्जना सर्वदां। लाक्षायणी सदां वास तेथें।'–ब २.५.

लाक्षारस पु. दहाभाग लोध्र, त्याच्या दहाव्या हिश्श्याने सज्जीखार, थोडी बोरीची पानें व सोळापट पाणी घालून केलेला काढा.–योग १.१८७.

लांग स्त्री. शेताच्या धुऱ्यावर काढलेला नालाः 'वनचराई माफ करण्यांत यावी व लांकूडफाटा व लांगी वगैरेसाठीं दगड मोफत मिळावे.'–के १४.५.३७, पृ. ५.

लांग स्त्री. समुद्राचा किनारा.

लांगड स्त्री. मोठा खटारा; बंडी. (व.)

लांगड स्त्री. एक कडधान्य.

लांगालुंगा वि. १. क्षुद्र; हलका; कमी; अपूर्ण; अर्धवट भरलेले (धान्याचे कणीस). २. (ल.) दुर्बळ; अशक्त; अयोग्य; नालायक. ३. अर्धवट; वेडसर. [लुंगा द्वि.]

लांगी, लाहांगी पु. (स्थापत्य.) नळ; नहर.

लांगूल न. १.शेपूट; पुच्छ. २. (नृत्य.) अंगठा, तर्जनी व मधले बोट ह्यांची अग्रे वाकवून एकमेकांना लावणे; करंगळी उभी व अनामिका थोडी वाकडी करुन ठेवणे. [सं.]

लांगूलचालन न. (कुत्र्याप्रमाणे शेपटी हलवणे.) १. लाडीगोडी. २. काही स्वार्थ साधण्यासाठी मोठ्या माणसांची खुशामत, हांजी–हांजी करणे; लाळघोटेपणा. [सं.]

लांच्छन न. १. खूण; डाग (विशेषतः चंद्रबिंबावरील); चिन्ह. २. कलंक; बट्टा; बदनामी. ३. नाव; अभिधान. [सं.]

लांच्छित वि. १. चिन्ह, खूण असलेला. २. कलंकित; डागाळलेला.[सं.]

लांजारणे गोंजारणे प्रेमाने तोंडावरून हलकेच हात फिरवणे.

लांझा–झ्या–जा, लाझ्या पु. १. अनिर्णीत, अपूर्ण धंदा, व्यवहार; (विशेषतः त्रासदायक, भानगडीची) देवघेव. (क्रि. तोडणे, न राहणे इ.) २. लडथड; लफडे; खरकटे. ३. वांधा; गुंताः' आतां लांझा। आमुचें पदरीं। राहिला नाहीं सर्वथा।'– भवि ५४.११६. ४. आरोप;

संबंधः'तर तुजकडे खुनाचा लाझ्या नाहीं.'-वाडशाछ १८.

लांडके न. कुत्र्यांची संभोगक्रिया. (गो.)

लांडगा पु. १. एक वनस्पती; आंबुटी. (वाई) २. एका वनस्पतीचे बी. ३. एक फळ. ४. तुरीच्या शेंगांतील दाण्यांची उसळ. (व.)

लांडगा पु. लग्नात एका विशिष्ट प्रसंगी नवरदेवाजवळ जेवायला बसणारे मुलगे प्रत्येकी. (व.)

लांडगा पु. कोल्हा, कुत्रा ह्या वर्गातला एक हिंस्र पशू; वृक.

लांडगी स्त्री. १. लांडग्याची मादी. २. कोळप्याची पात.

लांडगावे न. १. लांडग्यांची धाड; त्यांनी केलेली नासाडी. २. (ल.) लूट; लागवणूक.

लांडगेतोड स्त्री. शत्रूवर एकदम आवेशाने तुटून पडून त्याची कत्तल करणे; एकसारखी, सरसकट कापाकापी.

लांडरू न. १. (निंदार्थी) लांडोर. २. (बायकी) एक शिवी.

लांडा वि. १. ज्याचे शेपूट कापलेले आहे किंवा ज्याला शेपूट नाही असा (पशू, पक्षी इ.). २. कापलेले शेपूट. ३. थोटा; आखूड. ४. अपुरा; कमी प्रमाणाचा. ५. (निंदार्थी) (सुंता केलेली असते म्हणून) मुसलमान.

लांडा कारभार अधिकार, पात्रता नसताना, विनाकारण केलेली मध्यस्थी, ढवळाढवळ; नसती लुडबुड, उठाठेव.

लांडा बुच्चा वि. योग्य अलंकार नसलेला; भुंडा (हात, गळा इ.).

लांडाभुं(भों)डा वि. शेपूट, टोक तुटलेला.

लांडालटका वि. खोटा आणि लबाड; उणा; खोटा; कपटी.

लांडीलबाडी - लटकी स्त्री. चहाडी, चुगली इ. लहान मोठी लबाडी; फसवणूक; कपट.

लांडी स्त्री. रेल्वे - मजुरांची चाळ (एकमजली).

लांडोर स्त्री. मोराची मादी. (मोरासारखा लांब पिसारा नसून लांडा असतो म्हणून हे नाव.)

लांड्या पु. लावा पक्षी. (व.)

लांप(फ)ळ वि. लापट; लटपटीत; ढिले.

लांफाळ वि. लुब्ध; अधीन; लंपट. (वाईट अर्थाने उपयोग.) [दे.प्रा.]

लांब वि. १. दीर्घ; आखूड नाही असा. २. (स्थळ किंवा काळ या बाबतीत) दूर अंतरावरील; लांबचे. ३. विस्तारयुक्त; पाल्हाळीक.

क्रिवि. दूर; अंतरावर. क्वचित लंबा या अर्थी वापर. [सं.लंब] (वा.)

० करणे - पुष्कळ चोपणे, ठोकणे. **० बसणे** -विटाळशी होणे, असणे. **० लांब गोष्टी सांगणे** -१. पूर्वीची वाईट अवस्था विसरून उद्दामपणाच्या, बढाईच्या गोष्टी सांगणे. २. गप्पा, बाता मारणे.

लांबकान्या वि. गाढव.

लांबट वि. १. अपेक्षेहून अधिक लांबी असलेला. २. रुंदीपेक्षा लांबी अधिक आहे अशा घाटाचा, आकाराचा.

लांबडा पु. साप.

वि. लांबट.

लांबण स्त्री. १. बरेच मोठे अंतर; दूरपणा. २. सावकाशी; दिरंगाई. ३. जास्त लांबी, अंतर. ४. विस्तार; पाल्हाळ. [सं.लंबन] (वा.)

लांबणीवर टाकणे, लोटणे, घालणे -दूर मुदतीवर ढकलणे; पुढे ढकलणे.

लांबणदिवा पहाः **लामणदिवा**

लांबणी स्त्री. मोठी चंची. (हैद्राबाद)

लांबणे न. १. विहिरीतील पाणी दोरीने बाहेर काढण्याचे साधन (बादली, पोहरा इ.). २. लामणदिव्याची साखळी. ३. पडदांडी जू. (बे.)

लांबणे अक्रि. १. लांब होणे; (स्थळ, काळ इ. बाबतीत) वाढणे. २. (लांबी, विस्तार व काळ किंवा मर्यादा या बाबतीत वस्तू, व्यवहार, गोष्ट इ.) वाढणे. ३. भर घातल्याने प्रमाण वाढणे; अधिक होणे; विस्तार होणे. ४. (बातमी, गुप्त गोष्ट) अनेकांना माहीत होणे; जाहीर होणे. ५. (भाषण इ.) कंटाळा येण्याइतपत पाल्हाळीक होणे.

[सं.अवलंबते, रंबते, लंबते]

लांबता वि. क्रिवि. १. लवकर न करता हळूहळू केलेला, करून लांबवलेला. २. लांबलेला; बराच दूर गेलेला (आकाशात बराच वर आलेला)ः 'लांबतिअे सुरिअें। केवि लाजिजे नु!'-शिव ४७०.

लांबर वि. १. मध्ये तोंड घालणारा; लुतरा. २. (सामा.) लुडबुड्या; चोंबडा. [हिं. लहबर=पोपट]

लांबरा, लांबसर वि. लांबटः 'मोठाले कुच इंदुवक्र नयनें कर्णावधी लांबरे।'-कमं २.

लांबरुंद वि. प्रशस्त लांबी व रुंदी असलेला.

लांबलचक स्त्री. दिरंगाई; लांबणः 'तुम्ही लांबलचक न लागू देता किला खाली करून देवावा, हे चांगले.'-पेद ३९.७.

वि. १. चांगली लांबी, रुंदी, उंची असलेला. २. प्रशस्त, उंचनिंच; (सप्रमाण, पाहिजे तितका) लांब; अवाढव्य. ३. (ल.) दीर्घसूत्री; कंटाळवाणे (भाषण, गोष्ट).

लांबलेखा पु. (निंदार्थी) भारी लांबण, विस्तार; उगीच पाल्हाळ, वाद, चर्चा इ.

लांबवालांबव स्त्री. १. घाईने, कसेतरी दूर नेणे. २. लुबाडणी; पळवापळव.

लांबवि(व)णे सक्रि. (मालकाकडून) काढून नेणे; पळविणे; लुबाडणे.

लांबहस्त वि. विस्तीर्ण. (हिं.)

लांबा पु. डाग; दोषः 'सेखीं लांबा लागला पातकाचा।'-सिसं ८.१८४.

लांबा पु. भाताचे रोपः 'लांबा उगवे आगरीं। विभवश्रियेचां।'-ज्ञा ६.४४२.

लांबी स्त्री. लुकण; एक प्रकारचा चिकट पदार्थ. हा चुना किंवा सफेता आणि जवसाचे तेल एकत्र करून करतात. काचेची तावदाने घट्ट बसवण्यासाठी, गळकी भांडी दुरुस्त करण्यासाठी ही बसवतात.

लांबी स्त्री. १. लंबाई; दीर्घता. २. लांब बाजू. ३. अंतर; अवधी; मधली जागा किंवा वेळ; दूरता. ४. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतचा विस्तार; त्याचे माप. ५. उशीर; दीर्घकाळ. (गो.) ६. ओळः 'नवरत्नांचें विरढलें बीः तैसीं नानाविधें कमळे लांबी'-रुस्व ८२९.

लांबु(बो)डा, लांबुळा वि. वाटोळा, चतुष्कोण वगैरे आकारामध्ये लांबी हे प्रमाण अधिक असणारा; लांबट; दीर्घ वर्तुळाकार; अंडाकृती.

लांबोटा पु. (उप.) कुणबी. यांचा नेसूचा रुमाल लोंबत असतो त्यावरून. (ठाकरी)

लांबोडा वि. लुब्रा. पहाः **लांबर**

लांबोरा वि. लोचट; कंटाळा येईपर्यंत पाठीमागे लागणारा (भीक मागण्यासाठी, धन गोळा करण्यासाठी वगैरे).

लिक(का,की)चोरी स्त्री. १. चोरून केलेले काम; गुप्त कार्य. २. तसे काम करण्याची पद्धत.

लिकटणे अक्रि. चिकटणे; चिकटून राहणे.

लिकडे इ. पहाः **लिखडे** इ.

लिकण स्त्री. लपून बसण्याची, दब्याची जागा; दडी. [हिं.]

लिकणे अक्रि. लपणे; दडणे; छपणे. [सं. लिश्; हिं. लुकना]

लिकलिकणे,लिकलिकी पहाः **लुकलुकणे,लुकलुकी**

लिकंडाव पु. लपंडाव. (को.)

लिकून चोरून क्रिवि. लपून छपून.

लिखडे, लिखडे मिखडे न. लहान आकाराचा दागिना.

लिखणे सक्रि. लिहिणे. (कुण.) [सं. लिख्; हिं. लिखना]

लिखन न. १. लिहिणे; लेखन. २. लिहिलेला कागद; लिखाण. [सं.]

लिखा स्त्री. अव. उवेची अंडी. [सं. लिक्षा; प्रा. लिक्खा]

लिखा पु. १. लेख; दस्तऐवज. २. हिशेबाच्या, नोंदीच्या वह्या.

लिखाई स्त्री. १. लिहिणावळ; लिहिण्याबद्दल देण्याचे मोल. २. लेखन; लिहिणे. ३. हस्ताक्षर; अक्षर.

लिखाण न. लेख लिहिणे; लेखन.

लिखापटी स्त्री. वारंवार पडणारा पत्रव्यवहाराचा त्रास. (खा.)

लिखापढा–पुसा पु. १. कायद्याचे, फिर्यादीचे, सरकारी कामाचे कागद. २. दस्तऐवज; सनद; लेख. ३. लिखाण.
वि. सुशिक्षित; साक्षर. [हिं.लिखना+पढना]

लिखापढी स्त्री. लेखी व्यवहार; कागदावर लिहिले जाणे. [हिं.]

लिखावट स्त्री. लिखाई; लेख लिहिणे; लिपी.

लिखाळे–लिखी स्त्री. न. केसातील लिखा काढण्याची फणी. [सं. लीक्षा]

लिखित न. पत्र; चिठ्ठी; हाताने लिहिलेला मजकूर.
वि. १. लिहिलेले. २. काढलेले; रेखाटलेले. [सं.]

लिखितार्थ पु. पत्रात लिहिलेला मजकूर; एखाद्या मजकुराचा सारांश.

लिखे न. लिखाण; लेखनः 'बसोन ससांग लिखें करी।'–दावि २५१. [सं. लिख्]

लिखो स्त्री. उवा. (कु.)

लिखोट स्त्री. लिखावट; हस्तलेख; पत्र.

लिख्या वि. बारीक, लहान (डोळा). [सं. लिक्षा=खसखस]

लिगट(ड)णे पहाः **लिकटणे**

लिगडेझगडे न. खोट्या भांडणाने स्वार्थ साधणे. (कु.)

लिगाड न. १. लचांड; लटांबर; अडचण; पंचाईत; बंधन; संकट; त्रासदायक काम किंवा परिस्थितीः 'कैसें कराल तें नेणें। लिगाडाच्या गुणें।'– तुगा १२५४. २. चिकटा; चिकटपणा : 'तोही (गूळ) ठेवितां लिगाड धरी।'–एभा १६–१९. ३.एक कसरतीचा खेळ. (क्रि. टोचणे): 'लिगाड इत्यादि कसरतीचीं कामें बायकामुलें करून दाखवीत.'–स्वप ३१. [सं. नि + गड्]

लिगाडी–ड्या वि. लचांडखोर; खोडसाळ; उलाढाल्या; भयंकर भानगडी करणारा.
वि. वेळखाऊ.

लिच(च्च)क वि. चिकट; दिरंगाईचा; वेळमोड्या.

लिचक घणाणा कामाचा घातलेला घोळ; कामाची खोटी. (ना.)

लिचक्मडा पु. दिरंगाई. (झाडी)

लिचड पु. १. चिलट. २. पिसू.

लिचड वि. संथ. (झाडी)

लिचपिच क्रिवि. वेताची छडी, शिमटी वगैरेंना एकदम येणारा बाक दाखवणारा शब्द.

लिचपिचीत वि. १. लवचीक; बारीक; थोड्याशाही भाराने लवणारा. २. (ल.) दुर्बळ; अशक्त; क्षीण; निस्तेज.

लिचाड न. डोळ्याचे चिपड. (कु.)

लिची स्त्री. लहान, वाटोळ्या आकाराचे, जाड व खवलेदार सालीचे, मोठे बीज व त्याच्याभोवती रसाळ गर असणारे फळ. आंबट–गोड चव.
न. लिचीचे झाड. उंची १०–१२ मीटर. फांद्यांना फळांचे घोस लागतात.

लिची(चो,चों)डा पु. अंगाला घेतलेला चिमटा, चिमकोरा. (ना.)

लिचोड पु. पिसू; घाणेरडेपणामुळे माणसांच्या व ढोरांच्या अंगावर होणारा कीटक.

लिटकणे क्रि. चिकटणे; बिलगणे. [सं. लिष्टक; श्लिष=आलिंगणे]

लिटमस कागद एखादा द्रव आम्ल आहे की आम्लारी (अल्कली) आहे, हे पाहण्यासाठी वापरला जाणारा विशिष्ट प्रकारचा कागद.

लिटी स्त्री. अगदी लहान आंब्याची जात; लहान फळ; बिटकी. (को.)

लिटी स्त्री. ओळ (लेखन).

लिडबिडणे अक्रि. लडबडणे; हलणे; ढिलेपणाने झोके खाणे; ढिलावणे सक्रि. माखणे; शिडबिडीत होणे; लपेटलेले असणे. [सं. लिप्तविलिप्त]

लिडबिडीत वि. १. शेण, माती इ. नी माखलेले. २. ढिले; हलताना कुरकुर आवाज होणारे.

लिड्या वि. शरीराने रोड, अशक्त असणारे (मूल). (राजा.)

लितणे क्रि. माखणे; माखलेले असणेः 'घेइ आइ। आंतु तऱ्हीं लीतैल।'–दृपा ४४. [सं. लिप्]

लिथन न. दुसऱ्याकडून येणे येईपर्यंत त्याची वस्तू अडकवून ठेवण्याचा हक्क.

लिथाडणे अक्रि. बरबटणे; भरलेला असणेः 'कामक्रोधें लिथाडला। तो कैसा म्हणावा भला।'–दास १.१.२५.

लिथाडणे उक्रि. लाथाडणे; पायाखाली तुडवणेः 'थोरपणासि पाडिलें। वैभवासि लिथाडिलें।'–दास ५.९.३८. [सं. लत्ता]

लिथियम पु. एक धातुरूप रासायनिक मूलद्रव्य. गुणधर्म–रंग रुप्यासारखा. पाण्यापेक्षा हलका व हवेत गंजणारा धातू. लिथियमयुक्त पाण्याचा उपयोग संधिवात झालेल्या माणसाला औषध म्हणून देण्यासाठी करतात.

लिदड वि. पातळ; बुळबुळीत. (झाडी)

लिदवळ वि. १. घोड्याची लिद खाणारे (जनावर). २. (ल.) लाचखाऊ; भाडोत्री; हलकट; पैशासाठी घाणेरडी कामे करणारा.

लिदाड न. घोड्याच्या लिदीची रास; उकिरडा.

लिनन सुताचा तलमपणा दर्शवणारी एक पद्धत; अंबाडीच्या दोरांपासून बनवलेले तलम कापड.

लिनोलिअम न. जमिनीवर अंथरण्याचे, कॅन्व्हासला रोगण लावून तयार केलेले रंगीबेरंगी कापड.

लिपडा वि. अशक्त; कमकुवत; निष्प्राण.

लिपडे न. लुगडे (बागवानांत रूढ). (कर.)

लिपण न. काठ्यांच्या शिरांची वई; कुंपण. (कु.)

लिपण स्त्री. १. लपण्याची जागा. २. झाकण; आच्छादन.

लिपणी स्त्री. लपंडाव. (को.)

लिपणे अक्रि. लपणे; दडणे.

लिपाण न. चोरांना चढता येऊ नये म्हणून नारळीच्या झाडाला केलेले काटेरी फांद्यांचे वेष्टन (को.)

लिपापोती स्त्री. १. स्वच्छता. २. रंगरंगोटी. (झाडी) [हिं.; सं. लिंप्]

लिपि–पी स्त्री. १. लेखनपद्धती; हस्ताक्षर; अक्षरे. २. लीप; भाषेतील निरनिराळ्या ध्वनींचे पृथक्करण करून त्यापासून वर्णमालायुक्त अक्षरे तयार झाली. त्याला लिपी म्हणतात; ध्वनिरेखित करण्याची पद्धती. ३. रंग देणे, भरणे; चित्रे काढणे. ४. लेप; माखण; सारवण; लिंपण. ५. भाषा; लेख; लेखन. ६. कमरेषाः 'रायाचिया लल्लाटीं लिपीचीं पत्रें'–रुस्व २८५. [सं.]

लिपिक पु. कारकून; कार्यालयातील लिखाणाचे, हिशेबाचे काम करणारी नियुक्त व्यक्ती.

लिपिमात्र वि. निरर्थक, तथ्य नसलेले (पुस्तक, लिखाण).

लिपिलेखन न. कारकुनी; लिहिण्याचे काम.

लिपिशुद्धी स्त्री. हस्तलिखित मजकूर छापण्यासाठी सोयीस्कर व्हावा म्हणून सुचवलेले बदल.

लिप्त वि. १. माखलेले; सारवलेले. २. व्यापलेले; पूर्णपणे गुरफटलेले; (संकटात, अडचणीत) सापडलेला. ३. दूषित; गुन्ह्याचा आरोप असलेला; गुन्ह्यात सापडलेला. [सं. लिप्]

लिप्ताळणे अक्रि. दूषित होणे; बाधा पावणे; अंगावर येणे; शेकणे; आरोप होणे.

लिप्ताळा वि. १. पहाः **लिप्त** ३. २. ओशाळा; मिंधा; अंकित; अधीन.

लिप्यंतर न. एका लिपीतील मजकूर जशाच्या तसा दुसऱ्या लिपीत लिहिणे.

लिप्सा स्त्री. लोभ; मिळण्याची इच्छा; आकांक्षा. [सं.]

लिफाफा पु. लखोटा; पाकीट; पत्रवेष्टन; मलपृष्ठ. [अर.]

लिबलिबी स्त्री. एक खेळणे. (झाडी)

लिबा वि. १. दुबळा; अशक्त; कमजोर. २. सैल किंवा कमजोर बांधणीचा.

लिबाज पु. थाट; ऐश्वर्यः 'मोठ्या लिबाजानें गोरे कँपांत रेसिडेन्ट साहेबांच्या बंगल्यांत।'–गापो११८. [अर. लिबास]

लिबा(भा)स पु. १. वेश; पेहेराव; वस्त्रे; (समाज, दरबार यांतील दर्जा दाखवणारा) पोशाख. २. लवाजमा; डौल. [अर.]

लिबासी वि. खोटे; कृत्रिम; बनावट; तकलुबी; कपटाने बनलेलेः 'हे नक्कल लिबासी आहे.'–मइसा २०.६२.

लिमणे अक्रि. ढुंगण धुणे. (गो.)

लिमलेट न. लिंबू व साखर यांपासून केलेली मिठाई किंवा पेय. [इं. लेमोनेड]

लियाकत स्त्री. योग्यता; सामर्थ्य. [अर. लायक]

लिलाम–व पु. १. जाहीरपणे, सर्वाधिक किंमत देणाऱ्याला माल विकणे. २. (क्व.) अशा रीतीने विकलेला माल. [पोर्तु. लेइमॉव, निलामु; हिं. लिलाम]

लिवका वि. १. लवचीक; लवणारा; लवका. २. सैल; ढिला. ३. निर्जीव; अंगात बळकटी नसलेला. (राजा.)

लिवणे(णं) सक्रि. लिहिणे. (कुण.)
न. लिहिणे; विद्या. (कुण.)

लिवनापुसना पु. लेखी व्यवहार. (झाडी)

लिवलीव स्त्री. किड्यांची वळवळ. (झाडी)

लिसळी न. अस्वलः 'हौस केली लिसळीने गोंधलं मोंढ्या बैलाले बांशिंग बांधलं'–बगा.

लिसा स्त्री. बारीक कणांची दमट साखर.

लिसाळ वि. ढिसाळ; फोपशा.

लिसीपुसी स्त्री. नट्टापट्टा; नटणेः 'लिसीपुसी कीजे हे धर्म वेस्यांचे की'–लीचउ ३७५.

लिसेव न. विश्वविद्यालयः 'विद्यार्थ्यांचा लोंढा लिसेवमध्ये थडकला.'–अआगो ७१.

लिस्सा पु. नरम मांजा.–व्याज्ञा १.१६२.

लिहाज पु. छद्मीपणा; लबाडी; फसवेगिरी; ढोंगीपणा. [फा.]

लिहिणार पु. कारकून; लिहिण्याचा व्यवसाय करणारा मनुष्यः 'याचे हाती फतोरीचा लिहिणार दादाजी अनंत हे हि आम्हास भेटले.'–पेद १६.१२१.

लिहिणावळ स्त्री. लिहिण्याची मजुरी.

लिहिणे सक्रि. १. अक्षरे काढणे; लेखन करणे. २. रचना करणे (ग्रंथाची इ.). ३. चितारणे; आकृती, चित्रे, वेलबुट्टी काढणे. [सं. लिख्; प्रा. लिह्]

लिहिणे पुसणे लेखन, वाचन, हिशोब इ. विद्या.

लिहिता वि. ग्रंथकर्ता; लेखकः 'जनार्दनची ग्रंथ लिहिता। सत्य सर्वथा हे वाणी।'–एरुस्व १८.८२.

लिहिता वाचता येणे लेखन–वाचन येणे; सुशिक्षित होणे, असणे.

लिहिलेपुसले न. कायद्याचे किंवा सरकारी कागद, लेख, दस्तऐवज; सामान्यपणे लेखन; सनदा. [लिहिणे द्वि.]

लिही स्त्री. १. लेख; लिपी; शब्दोच्चारः 'जेथ शब्दाची लिही पुसे। तेथेंसी चावळों बैसे।'–अमृ २.२८. २. रेषा. ३. नोंदः 'दुःकृत लिही पुसी'–गरा १८८.

लिहीन् वि. बारीक (पीठ). [हिं. महीन]

लिळा स्त्री. खेळ; पहाः **लीला** १ [सं. लीला] (वा.) **०फिरणे, बदलणे, पालटणे** – (चांगल्यापासून वाइटाकडे किंवा त्याविरुद्ध) वळणे; दिशा, मार्ग बदलणे.

लिक्षा १. लीख; उवेचे अंडे. २. खसखशीचा दाणा. मोहरीच्या दाण्याच्या

एकषोडशांश वजनाइतके परिमाण. [सं.]

लिंक स्त्री.१.साखळीची एक कडी; एक इंग्रजी रेषाप्रमाण; एका साखळीचा शतांश; ७.९२ इंच. २. विचाराचे सूत्र. [इं.]

लिंग न. १. पुरुषाचे जननेंद्रिय; शिश्न. २. (व्या.) स्त्री-पुरुषभेद; पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग अशी तीन लिंगे आहेत. ३. शिवाची, महादेवाची विशिष्ट प्रतिमा; शिवलिंग; पिंडी. ४. आराध्यदैवतः 'तंव वैकुंठीचे लिंग। ....अंगच्छाया।'-ज्ञा १७.४६. ५. लिंगायत लोकांच्या नावांपुढील प्रतिष्ठावाचक शब्द. उदा. सदलिंग, दादलिंग. ६. लिंगायत लोकांच्या गळ्यात असतो तो शिवस्वरूप कवचासहित खडा. ७. खूण; चिन्ह; लक्षण. ८. (सांख्यमत) प्रकृती; सृष्टीतील चिच्छक्ती. ९. (ल.) अडथळा; उपाधी; ज्यामुळे मनुष्य बांधला जातो, त्याचे स्वातंत्र्य जाते अशी गोष्ट. (क्रि. लागणे, अडकणे, असणे.) १०. नावः 'तेचि शक्ति पैं गा। उदानु ऐसिया लिंगा। पात्र जाली'-ज्ञा १८.३३५. [सं.] (वा.)

० विभक्ती सांभाळून बोलणे - व्याकरणशुद्ध बोलणे.

लिंगगीत न. फॅलस या सृजनदेवतेला उद्देशून लिहिलेले अश्लील गीतः '... रूढ असलेल्या लिंगगीतापासून झाला.'-अॅका ५९.

लिंगड स्त्री. निर्गुंडी; एक वृक्षविशेष. (हेट.)

लिंगडणे अक्रि. (अडथळा, अडचण इ.) चिकटणे, मागे लागणे.

लिंगदेह, लिंगशरीर पु. न. मन, बुद्धी, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये व पाच प्राण या सतरा तत्त्वांनी बनणारा सूक्ष्म देह; वासनात्मक शरीर.

लिंगपात पु. जीवाने आपल्या स्वरूपावर धारण केलेले सर्व देवतांचे मळ गळून पडणेः 'लिंगपातें मोक्षु'-लीचउ ४४६. [सं.]

लिंगभद्र न. देवळांच्या प्रवेशद्वारावर कोरलेल्या कीर्तिमुखादी विशिष्ट आकृती; यंत्रः 'वोडविजेति लिंगभद्रें। नवीं नवीं।'-ऋ ७८.

लिंगभेद पु. १. उपास्यदैवताचा किंवा पूज्य व्यक्तीचा नाश : 'हें झुंज नव्हे प्रमादु। एथ प्रवर्तलिया दिसतसे साधु। हा उघडा लिंगभेदु। वोढवला आम्हां।'-ज्ञा २.३१. २. विषमता; फरक; भेदः 'तेथ मी नमस्कारा। लागिं उरों दुसरा। तरी लिंगभेद पन्हा। जोडूं जावों।'-अमृ १.५१.

लिंगव्रण पु. शिश्नाला पडणारे चट्टे; एक विकार.

लिंगशा वि. चेंगट्या; धिमा; थंड; मंदगती; आळशी.

लिंगस्ता(स्था)ई स्त्री. मंदपणा; आळस; थंडपणा.

लिंगाडी धिंगाडी लिंगायत. (ठाकरी)

लिंगाध्यास पु. वासनातादात्म्य.

लिंगाय(ई)त, लिंगवंत पु. शिवाचे उपासक. एक पंथ. या पंथाचे लोक गळ्यात लिंग घालतात. [का.]

लिंगी स्त्री. एक औषधी वनस्पती.

लिंगोरची स्त्री. (क्व.) लगोरीचा खेळ.

लिंग्या, लिंगडा पु. (निंदेने) लिंगायत.

लिंट न. मलमपट्टी करताना जखमेवर ठेवण्याचा निर्जंतुक कापूस.

लिंपण-णी न. स्त्री. १. धान्य नासू नये म्हणून कणगीला वगैरे शेण, चिखल इ. चे केलेले सारवण-लेप-आच्छादन. २. माखण; सारवण इ. ३. सारवलेली स्थिती; लेप लावलेली अवस्था. ४. (ल.) कुंभाड; किटाळ; बालंट; दोष; आळ. [सं. लिंप्]

लिंपणे न. पहाः **लिंपण १**

लिं(लि)पणे उक्रि. १. लेपाने बुजवणे; थापणे; चोपडणे; भोके, खळ्या इ. बुजून पडलेली भिंत, कूड, बीळ इ. चांगले होण्यासाठी शेण, चिखल इ. चा लेप देणे. २. चिखल, चुना इ. चे गोळे मारून चूल, ओटा इ. तयार करणे, रचणे. ३. भिजणे; माखले जाणेः 'जैसें न लिंपें जळीं जळें। पद्मपत्र।'-माज्ञा ५.५०. ४. (ल.) दोष लागणे. ५. गुंतणे. (तंजा.) [सं. लिंप्]

लिंब पु. १. कडुनिंब. २. बकाणा निंब. [सं. निंब; प्रा. निंब, लिंब]

लिंब खाणे गावगाड्यातील एक सामूहिक वहिवाट. गुढीपाडव्याच्या दिवशी मंडळी चावडीवर आल्यावर त्यांनी आपापसातील खाजगी भांडणे गावापुढे मांडायची व ती सर्वांनी मिळून सोडवून मिटवायची. भांडणे मिटल्यावर ग्रामजोशाने पंचांग वाचून नवीन वर्षाला आरंभ करायचा. मग न्हाव्याने आणलेला कडुनिंबाचा पाला गुरवाने आणलेल्या पत्रावळीवर ठेवून सर्वांना वाटला जातो. तो खाऊन मंडळी घरी जातात. सर्वांची भांडणे मिटल्याशिवाय पंचांगवाचन होत नाही.-गांगा.

लिंबड्या पु. कडुनिंब.

लिंबन्हाण न. नवऱ्या मुलाच्या किंवा नवरीच्या आजीला तांदळाच्या पिठाच्या लिंबाएवढ्या गोळ्यांनी व पाण्याने घालण्याचे स्नान. मुलाला लग्नाआधी व मुलीला लग्नानंतर वरातीच्या आधी हे स्नान घालतात. ही चाल हबसाणांत आहे.

लिंबलोण, लिंबा, लिंबारा, लिंबी, लिंबुनी, लिंबू, लिंबूण, लिंबूर, लिंबोटी, लिंबोणी, लिंबोर, लिंबोळी, लिमचा हे शब्द वापरात असले तरी ते निंबलोण, निंबा इ. शब्दांची अशुद्ध रूपे आहेत. म्हणून पहाः निंबलोण इ.

लिंबा(भा)रा पु. १. निंबारा. २. निंबाऱ्याहून वेगळ्या जातीचे एक झाड.

लिंबाळ न. वेश; पोशाख; पेहराव.-लोसाको. [अर. लिबास]

लिंबुऱ्यात येणे ताली असलेल्या रानातील बाजऱ्यांना मोहोर, फुले येणे-गांगा.

लिंबू न. रोजच्या वापरातले, लहान व गोलसर आकाराचे, जाड सालीचे, आत पाकळ्या असणारे आंबट फळ. कच्च्या फळाची साल हिरवी व पिकलेल्या फळाची पिवळी असते. फळाचा लोणच्यासाठी, जेवणात, सरबतासाठी, तसेच खाद्यपदार्थ टिकवण्यासाठी उपयोग होतो. यात सी जीवनसत्त्व पुष्कळ असते. [सं. निंबूक; फा. लेश्यून; हिं. लीमू, नीम्बू]

०फिरणे - भानामती करणे. पहाः **भानामती**

लिंबूर पु. अव. बाजरीचे भाजून खाण्यायोग्य झालेले कोवळे दाणे.-गांगा.

ली स्त्री. १. लिपी; लिखितः 'संसाराची ली पुसे'-लीचपू १२७. २. ओळ; रेषाः 'जयाचेया अवलोकनासरिसेः भवार्णवाची ली पुसे'-ऋम ७३२.

लीक-ख स्त्री. १. उवेचे अंडे. २. रेशीमकाठ इ. रेशमाच्या विणकामात मध्ये रेशीम घट्ट न भरले गेल्यामुळे मध्ये-मध्ये दिसणारा बारीक, पांढरा ठिपका. [सं. लिक्षा; फ्रेंचजि. लीख]

लीद स्त्री.१.घोडा, हत्ती इ.ची विष्ठा.२.एक वेल.[गु.; हिं., देप्रा. लद्दी]

लीन वि. १. मिसळून गेलेला; एकजीव झालेला; गुप्त; लय पावलेला. २. नम्र; आदरशील. [सं.]

लीनकरण न. (नृत्य.) हाताची पताकांजली करून वक्षस्थळावर ठेवणे, मान उन्नत करणे, खांदे किंचित वाकडे करणे.

लीप पहाः **लिपि–पी**

लीपवर्ष न. फेब्रुवारी महिन्याचे २९ दिवस असणारे वर्ष. हे चार वर्षांनी एकदा येते.

लीला–ळा स्त्री. १. क्रीडा; खेळ ; कौतुक; मौज; गुण. २. सहज घडणारी क्रिया; स्वाभाविक गोष्ट–कृती. ३. अवतार.

लीला(ळा)चरित्र न. १. सहज केलेला चमत्कार. २. परमेश्वराच्या अवताराच्या लीलांनी घडलेले त्याचे चरित्र.

लीलामुद्रा स्त्री. खेळकर किंवा आनंदी चेहरा (सामान्यतः कुत्सित अर्थी वापर).

लीलावतार पु. लीलेने, सहज धारण केलेला अवतार; विष्णूने केवळ लीला म्हणून घेतलेला अवतार.

लीलावती स्त्री. खेळकर, विलासी, चंचल स्त्री.

लीलाविग्रह पु. लीलेने, भक्तांच्या इच्छा पुरवण्यासाठी देवाने धारण केलेला देह.

लीली स्त्री. हिरवे केळे. –कृषि ९०. [गु. लीलुं = हिरवे]

लीळापंचक न. महानुभावांच्या मते परमेश्वराने केलेल्या पाच लीला–१. सहेतुक. २.अवलोकनरूप. ३. तात्कालिक. ४. येति–भविष्य. ५. आश्चर्यरूप.

लुइ स्त्री. १. मांसाचा बारीक तुकडाः 'लुइपाइ माहात्मे लुइ वेचिती'–लीचपू २०२. २. कीड.

लुकई पु. (सोनारी) गोळा.

लुकड–डा–ड्या वि. कृश; रोड; बारीक; सडपातळ.

लुकड–ण, लुंकण न. १. चिकटवणे; डिकवणे; एक चिकट पदार्थ; दगड, लाकूड इ. चा सांधा बसवण्यासाठी शेंदूर, राळ, चुना, मेण इ. पदार्थ एकत्र करून तयार केलेला रांधा; रोगण; तकाकी आणण्यासाठी लावण्याचा पदार्थ. २. रांध्याचा केलेला लेप, आवरण.[ते. अलुकु = घराची जमीन किंवा कूड शेणकाल्याने सारवण्याची क्रिया]

लुकमा पु. १. लाच. २. तुकडा. ३. भर; दुजारा. [अर.]

लुकलुकणे अक्रि. १. चकचकणे; चकाकणे; चमकणे; झळकणे. २. टिकटिकणे; (उजेड) लहान–मोठा होत राहणे; एकसारखा नसणे. ३. (चेहरा) तेजस्वी, टवटवीत होणे. [सं. लोक्,रूश् द्वि.]

लुकलुकी स्त्री. १. चकाकी; तेज; चमक; झळक. २. दिव्याचा चंचल प्रकाश; विझत आलेल्या दिव्याचा कमी–जास्त होणारा प्रकाश. ३. (ल.) मृत्यूच्या वेळची चंचल, तरल अवस्था. ४. (चेहरा, फुले इ.चा) तजेला; टवटवीतपणा; तरतरी.

लुकलुकी स्त्री. १. आठवण. २. लहर; इच्छा. (झाडी)

लुकलुकीत वि. १. प्रकाशणारा; चमकणारा; झळकणारा. २. लुकलुकणारा; फडफडणारा. ३. चकाकणारे; तेजस्वी (डोळे, चेहरा इ.).

लुकसान–नी पहाः **नुकसान–नी**

वि. अशक्त; निर्बल; रद्दी; किरकोळ; निःसत्त्व (प्राणी, पदार्थ). [अर. पुक्षान्]

लुका–क्का वि. १. रोडका; कृश; सडपातळ (माणूस); मरतुकडा. २. धूर्त; कपटी; लुच्चा. ३. कोणत्याही कामाला गेला असता ते न करता माघारी येणारा. [अर. लुक्का]

लुकाट लहान लिंबाएवढे, आंबट– गोड चवीचे एक फळ.

लुकान न. एक कुस्तीचा डाव. आपल्या मानेवर जोडीदाराने हात ठेवला असता त्याच बाजूच्या आपल्या हाताने जोडीदाराची कोपराची लवण आपल्या पंजाने धरून आपला दुसरा हात जोडीदाराच्या मानेवर ठेवून जोडीदाराच्या कोपराच्या लवणीत ठेवलेल्या हाताने त्याचे कोपर वर झटका देऊन फिरवून जोडीदाराला चीत करणे. [हिं. लुका = हरविणे]

लुकायणे सक्रि. लपवणेः 'कुंभे कुलाल लुकायिले'–चौपद्या २५.

लुकीचोरी स्त्री. १. गुप्तता. २. भाती. (झाडी)

लुकु(खु)लुकु–खु क्रिवि. हालणारा; डळमळीत; ढिला; (खांब, खुंटी, यंत्र, मनुष्य इ. च्या हळू, मंद, निःसत्त्व रीतीचा निदर्शक); लटपट.

लुक्कड वि. अशक्त; किरकोळ; रोड; सडपातळ; कृश.

लुक्कड(ण)पेच पु. कुस्तीतल्या एका पेचाचे नाव.

लुक्कड पहाः **लुकण**

लुक्णा, लुकाना वि. दडलेला; लपलेला. [हिं. लुकाना]

लुक्सी स्त्री. जुनेर; फाटके लुगडे . (झाडी) [सं. दुकूल]

लुख स्त्री. १. उन्हाचा तडाखा, तिरीप. २. (गरम पाण्याची) वाफ.

लुखलुख स्त्री. कुजबूजः 'काइ लुखलुख वर्तत असे?'–लीचपू ३८५.

लुगट न. १. (विशेषतः मुंबईत रूढ) लुगडे. २. मेणकापड; कपडा.(को.)

लुगटावुं(वों)कणे सक्रि. कापडावर वारणिसांतून रंग देणे; मेणकापड तयार करणे; कापड मेणाने मढवणे.

लुगडे न. १. बायकांचे वस्त्र; सोळा हात लांब व दोन हात रुंद काठपदर असलेले रंगीत वस्त्र; नऊवारी साडी. २. साधारणतः कोणतेही वस्त्र; धोतर; मानाचा पोशाखः 'ऐसे ठाकले मंडपातळीं। महापंडित भगवीं लुगडीं। तो बलदेवास म्हणे वनमाळी। कीं हे पांडव वोळखे।'–कथा ५.१३.१३. [सं. रुग्ण, दुकूल; गु. लुगडुं; सिं. लूगिडो]

लुगलुगीत वि. ओला किंवा दमट व मऊ; लिबलिबीत.

लुगाई स्त्री. बायको; स्त्री; नारीः 'गुजराथ किहो हिंदुस्थानापासुनि आणली लुगाई।'– सला ७२. [हिं.]

लुगारणे, लुंगाडणे सक्रि. लुटणे; लुबाडणे; नागवणे. [सं. लुञ्जाहर]

लुगारा–री, लुगारणी, लुंगाडणी स्त्री. लूट; नागवणूक; फसवणूक.

लुगारी–रू, लुंगाड्या वि. लुटारू; पेंढारी. विशेषतः टिपूकडील कानडी पेंढारी किंवा बाजारबुणगे. हे लोक शत्रूच्या लष्करात लुटालूट करत.

लुगारी स्त्री. लोळण; लोळणे. [सं. लुंठन]

लुगी वि. लहान.

लुगुलुगु क्रिवि. लगबगीनेः'पोराटोरांना हातीं धरून लुगुलुगु घरीं परतत होतीं.'–स्मगा, पृ. १४४.

लुघत स्त्री. १. जीभ. २. भाषण; भाषा; शब्द; शब्दकोश. [अर.लुघत्]

लुचई, लुचो स्त्री. भाताचे बारीक वाण. (झाडी)

लुचई पुरी पुरीचा एक प्रकार.–गृशि २.३६.

लुचक वि. लावालावी करणारा. (गो.)

लुचक पु. मोठमोठ्या माशांच्या पोटाला चिकटून त्यांना ठार मारणारा एक जीव. (गो.)

लु(लुं)चणे अक्रि. वासराने गाईच्या, म्हशीच्या (आपल्या आईच्या) स्तनातील दूध पिणे; स्तनपान करणे.

लु(लुं)चणे, लुचलुचणे सक्रि. १. चिमट्याने केस उपटणे; केस काढणेः 'केशश्मश्रू लुंचतां देखा। क्षपणिक तैसे भासती।'-मुआदि ६.५७. २. तोडणे; फाडणे; ओरबाडणे : 'बरे वाईट हे न म्हणेचि कांहीं। पापपुण्य तेंहि लुंचियेलें।' - निगा २६२. [सं. लुछ्]

लुचपणे अक्रि. लंगडणे.

लुचपत स्त्री. अन्यायाची, आडमार्गाने केलेली, लबाडीची मिळकत; चोरून खाल्लेला पैसा; लाच.लाचलुचपत याच शब्दात वापर.

लुचया स्त्री. अव. चिरोटे; एक पक्वान्नः 'फेण्या खाजी करंजी मृदुतर लुचया शर्करेमाजि घोळी।'-किंसुदाम ३४.

लुचर स्त्री. (आंबा इ. फळांमध्ये असणारे) तंतूचे जाळे, रेषा. (राजा.)

लुचाडणी स्त्री. लुबाडणूक; नागवणूक; लूट.

लुचाडणे सक्रि. लुबाडणे; दुसऱ्याची वस्तू बळजबरीने हस्तगत करणे; नागवणे; लुटणे.

लुचाबुचा-भुंडा-मुंडा वि. उघडा; अलंकाररहित; नेहमी असणाऱ्या दागिन्याविरहित.

लुची वि. रुचकर अन्न खाणारी (जीभ). [सं. रूचित]

लुचूपुचू क्रिवि. अस्पष्ट; असेतसे; भलते-सलते.

लुच्चा वि. लबाड; सोदा; असभ्य कर्म करणारा; कुकर्मी; बदफैली. [सं. लुञ्चक, लुचा]

लुच्चाई, लुच्चेगिरी-पणा-शाई स्त्री. धूर्तता; ठकबाजी; लबाडी; सोदेगिरी.

लुटकण-न-र, लुटकणे पहाः **लुडकण** इ.

लुटणे सक्रि. १. अपहार करणे; लुबाडणे; लूट, नुकसान, नाश करणे; बळजबरीने किंवा कायद्याच्या जोरावर एखाद्याला किंवा एखाद्याची वस्तू हरण करणे. २. एखाद्याला जिंकणे; एखाद्याचे सर्वस्व हरण करणे. [सं. लुंठन]

लुटणे अक्रि. लोळणे. पहाः **लुंठणे**

लुटपु(फु)ट स्त्री. (मुले, वासरे, खारी, उंदीर इ. ची) धावपळ; बागडणे; उड्या मारणे; धडपड. [ध्व.]

लुटपुट वि. थोडे; अपुरे; क्षुद्र; बारीकसे; वरवरचे; कमी महत्त्वाचे (काम). क्रिवि. क्षणभरात; झटपट.

लुटपुट स्त्री. भरगच्ची; अतिशय विपुलता; भरमसाटपणा : 'दागिन्यात खुप लुटपुट झाली लवली कर्दळी जशी।' - पला ४.३९. [लुद्वि.]

लुटपुटणे अक्रि. खिळखिळी, सैल, कमजोर होणे; फुटणे. [सं. लुठ्]

लुटपुटीचा वि. लटपटीचा; खोटा; नकली (लहान मुलांचा).

लुटफाट स्त्री. लूटमारः 'याच्या पाठीमागं दंगेधोपे, लुटफाट....यांचा मोठा कार्यक्रम आहे.'-जंगलातील छाया १३२.

लुटलुट-टु, लुटुलुटु क्रिवि. चटचट; झपझप, जवळ-जवळ परंतु हलके टाकलेल्या पावलांच्या आवाजाचा दर्शक शब्द. लहान मुलासारखी (चाल). [ध्व.]

लुटलुटीत वि. मध्यम लठ्ठ, पुष्ट, ठेंगणे, वाटोळे, पण जड व सुस्त नव्हे असे (शरीर).

लुटवणे सक्रि. (लुटणेचे प्रयोजक रूप.) भरभक्कम (लुटून नेल्याप्रमाणे) देणे; अति प्रमाणात देणे.

लुटवैया पु. चोर; उधळ्या. [हिं.]

लुटाऊ वि. लुटून आणलेला; लुबाडलेला; लुटीचा.

लुटार न. १. लुटारू लोकांची टोळी. २. लुटारूंची जात-वर्ग.

लुटारा-री-रू वि. लुटणारा; लुबाडणारा, दरोडा घालणारा.

लुटालूट स्त्री. सर्वत्र चाललेली लूट, नाश जाळपोळ इ. प्रकार.

लुटुपुटु-फुटु-वुटु-मुटु-फुट्या वि. (लहान मुलांच्या खेळात उपयोग) लटका; कल्पित; खोटा; कल्पिलेला; मानलेला; फक्त बतावणी केलेला.

लुटुलुटु पहाः **लुटलुट**

लुडकण-न-र क्रिवि. झटकन, झपकन पडणे; लुडकणे, निजणे, लवंडणे इ. क्रिया झटकन होताना होणाऱ्या आवाजाचे अनुकरण करून.[ध्व.]

लुडक(ग)णे अक्रि. १. आडवे होणे; हळूच निजणे. २. वरून हळूच पडणे; लवंडून पडणे; कोसळणे. ३. एखाद्याकडे प्रेमाने ओढला जाणे. [सं. लुडति; ध्व.]

लुडका पु. भाताचे जाड वाण. (झाडी)

लुडक्या वि. अडखळणारा; पडणारा; धडपडणारा; पडण्यासारखा.

लुडगी स्त्री. १. भांगेचा केलेला एक प्रकार. २. झोकांडी; हेलकावा.

लुडते न. नकसगाराचे एक हत्यार.

लुडतोड पु. अव. स्त्रियांच्या पायातील चांदीची कडी. (झाडी)

लुडथावणे अक्रि. लोळणे; उलटेपालटे होणे.

लुडबा वि. १. बोबडा. (राजा.) २. स्पष्ट वर्णोच्चार करायला असमर्थ (जीभ, ओठ, कंठ इ.). ३. अस्पष्ट, बोबडे, स्पष्ट उच्चार न करता बोललेले (भाषण, शब्द, अक्षर, बोलणे). ४. लुडबुड्या; ढवळाढवळ करणारा; नसते उपद्व्याप करणारा.

लुडबुड स्त्री. १. दुसऱ्याने बोलावले नसताना त्याच्या कामात पडणे; दुसऱ्याला मदत करण्यासाठी त्याच्या कामात केलेली ढवळाढवळ. २. एखाद्याला मूल इ. नी केलेली किरकोळ मदत. [सं. लुठ्+बृह]

लुडबुडणे अक्रि. १. दुसऱ्याला त्याच्या कामात मदत करू लागणे; दुसऱ्याला अडथळा, अडचण होईल अशी मदत, ढवळाढवळ करणे. २. इकडून तिकडे आणि तिकडून इकडे असे हेलपाटे घालणे.

लुडबुड्या वि. दुसऱ्याने न बोलावताही त्याला मदत करून त्रास देणारा; लुडबुड करणारा; उपदेश किंवा मदत करण्याच्या ऐटीने विनाकारण चुकीच्या मार्गाने कामात पडणारा.

लुडबेपणा पु. बोबडेपणा.

लुडमा वि. १. आखूड; तोकडा; लांडा (हात, पाय इ.). २. आखूड हात पाय इ. असणारा. ३. लुडबुड्या. ४. अशक्त, उंच. [लुरुमा=गिड्डा]

लुडवा वि. हातपाय नसलेला; थोटा व पांगा.

लुडाखुडा वि. १. थकलेला; अशक्त; म्हातारा. २. जरठ; मोडकळीला आलेला; सरासरी काम चालण्याजोगा; मोडका (नांगर, गाडा इ.).

३. लोळागोळा; फाटकातुटका.

लुडाबुच्चा वि. भुंडा; बोलका; उघडा बोडका; फांद्या, पाने इ. नसलेला (वृक्ष).

लुडि स्त्री. (फळाची किंवा चेंडूची) फेकाफेकीः 'तांबोळाची लुडिक्रीडा'-स्थापो ९८.

लुडी स्त्री. हुशारी. (गो.)

लुडुलुडु वि. १. हलत-डोलत चालणारा. २. ठेंगणा. (तंजा.)

लुढावणे सक्रि. धुडकावणे; उधळून देणे; उलटापालटा करणेः 'मान भिडावून देति लुढावून टोपीवाले नाहीं गणती।'-ऐपो २५३.

[सं. लुंठन; हिं. लुंढाना]

लुढिया पु. १. भांग घोटण्याचा दगड; विशिष्ट आकाराचा वरवंटाः 'गंगाकिनारीं ह्या लुढियाने छानलेल्या विश्वेश्वराच्या प्रसादाची लज्जत औरच आहे.'-भाऊ २१. २. भांग घोटणारा माणूस. [हिं.]

लुतकरी स्त्री. चिंधी; लुगडे, धोतर इ. फाटून त्याची लोंबत असलेली चिंधी; चिरफळी. [फा.]

लुतरा, लुत्रा वि. १. लघळ; बडबड्या; गप्पीदास. २. निंदक; चुगलखोर; पाठीमागे निंदा करणारा; चोंबडा; खोडसाळ. [हिं., फा. लुत्रा]

लुतिजणे सक्रि. गलत्कुष्ट व्याधी, त्वचारोग होणे.

लुती स्त्री. १. त्वचेला होणारा रोग; लूत; कोड. २. ओकारी; उलटी. (व.) ३. जननेंद्रिय; शिश्न.

लुतुफुतू न. कानगोष्टी. (गो.)

लुप्त वि. १. लोपलेला. २. लपलेला; अदृश्य झालेला. ३. रद्द पडलेला. ४. वहिवाटीतून गेलेला. ५. लिहिताना-बोलताना गळालेला. ६. विसरला गेलेला. [सं.]

लुप्तोपमा स्त्री. (साहित्य.) उपमा ह्या अलंकाराच्या उपमान, उपमेय, साधारण धर्म व उपमावाचक शब्द अशा चार अंगांपैकी एक किंवा अधिक अंगे ज्या उपमेत नसतात, तो उपमालंकाराचा एक प्रकार. हिचे आठ प्रकार होतात.

लुबकणे अक्रि. १. एखाद्या पदार्थासाठी टपून बसणे किंवा वाट पाहत बसणे; आशा धरून बसणे. २. चिकटणे. [सं. लुभ्]

लुबडो वि. लुडबे, बोबडे बोलणारा. (गो.)

लुबरा वि. मध्येच तोंड घालणारा; विनाकारण लुडबुड करणारा.

लुबलुब स्त्री. वटवट; बडबड; कंटाळवाणे भाषण; टुरटुरणे; मुलांचे भराभर बोलणे. [ध्व.]

लुबलुब-बा क्रिवि. १. लुबरेपणाने; पुनः पुन्हा मध्ये तोंड घालून. (दुसऱ्याचे बोलणे थांबवण्यासाठी रागाने उपयोगात आणतात.) २. शेळीने वगैरे मचमचा खाणे याचे अनुकरण करून; भराभर परंतु हलकी पावले टाकून चालण्याच्या आवाजाचे अनुकरण करून; जोराची दंगल किंवा बडबड दाखवणारा शब्द.

लुबलुबणे अक्रि. हलणे; लवलवणे.

लुबाडणी, लुबाडणूक स्त्री. लूट; नागवणूक.

लुबाडणे सक्रि. हरण करणे; लुटणे; नागवणे; एखाद्याची वस्तू त्याच्या इच्छेविरुद्ध हिसकावून घेणे.

लुबुधका स्त्री. पारध. [सं. लुब्धक]

लुब्ध वि. १. आसक्त; आशा असलेला. २. लोभी; लोभाविष्ट. ३. एखादी गोष्ट इच्छिणारा. ४. मोहित; लोलुप. [सं.]

लुब्धक पु. १. पारधी; शिकारी. २. लोभी. ३. रांडबाज; वेश्यालंपट. ४. गुदद्वार. ५. (ज्यो.) बृहल्लुब्धक ह्या तारकापुंजातील पहिल्या प्रतीचा तारा; मृग नक्षत्राजवळील व्याध हा तारा.

लुब्धणे अक्रि. लोभ सुटणे; एखाद्या वस्तूची अनावर इच्छा होणे; मोहित होणे; भुलणे.

लुब्रा-भ्रा, लुभरा पहाः **लुबरा**

लुमणी-णे स्त्री. न. नांगराचा दांडा. पहाः **रुमणी-णे**

लुमणे पहाः **लोढणे**

लुल(लु)पणे, लुलणे अक्रि. लोभ धरणे; आसक्त होणे; भुलणे; लोभाने आसक्त होणेः 'सदां इंद्रियार्थादिकांते लुलावें।'-उचा ६.

[सं. लोलुप]

लुलम्या वि. १. अशक्त. २. लुळा; बावळट. (झाडी)

लुला पहाः **लुळा**

लुलाणे सक्रि. लालसा धरणेः 'बापुडीं पितरें लुलातें असति'-लीचउ ९९.

लुलात वि. इच्छुक; आषकः 'तो विषया कारणें लुलातु असे'-आचारभाष्य १४.

लुलाय पु. रेडा; टोणगा; महिषः 'द्याया मज यश लोकां सुख गृधा तो लुलाय मांस मरे।'-मोभीष्म १.४८. [सं.]

लुलित वि. १. खिळखिळे झालेले. २. चिरडलेले; कुसकरलेले; कोमेजलेले. ३. रेंगाळणारा; कंपायमान; लोंबणारा. ४. ढवळलेले.

लुलीनम पु. खंजिराचा एक पवित्रा. -प्रश १८.

लुलु-लू स्त्री. लालूच; लोभः 'लुलु न धरावी देहातीत व्हावें।'-दावि ३९.

लुलुप(पु)त-तू, लुलुपुत्तू स्त्री. मनधरणी; हांजी हांजी; आर्जव; एखाद्याला वश करून घेण्यासाठी त्याला दादाबाबा करणे.

लुलुपु(ब)टी-मिठी स्त्री. आतुरता; उत्कट इच्छा; लालसा; लोभः 'कृष्णरूपीं पडे मिठी। होत लुलुबटी डोळ्यां।'-एभा १.२९०.

लु लु लु लु अवहेलनादर्शक उद्गारः ' सोळा सहस्र भोगिसी। ब्रह्मचारी म्हणविसी। लटिकेंचि ठकविसी । लु लु लु लु।'-नाम २७८.

लुलुवाना पु. भिकारी; दरिद्री; दीन; दुबळा. (व.)

लुलुसी वि. स्थूलः 'लुलुसी होइल म्हणी'-गोप्रच १७८.

लुल्ल वि. गुल्ल; दारू पिण्याने झिंगलेला.

लुवणी स्त्री. शेताची कापणी; लाणी. (गो.)

लुवणे सक्रि. कापणे. (गो.) - सह्या पा ३११. [सं. लु]

लुवलुवणे अक्रि . १. अंगावर उवा, मुंग्या, किडे चढणे, चालणे व त्यामुळे खाज सुटून त्रास होणे. २. बोलण्याची अनिवार इच्छा होणे. [ध्व.]

लुस-स्स वि. लुसलुशीत.

लुसणे सक्रि. १. लुटणे; आकर्षणे; ओढून घेणेः 'मज निद्रिस्थातें खाणौरियें। लुसौनि नेति।'-ऋ ५५. २. विसकटणेः 'सुनीळ काळिमा लुसीतः भ्रमरांतें जेवि'-नवि ६०. [सं. लुस्]

लुसलुशी-सी, लुसलुशीतपणा स्त्री. पु. (फळे, झाडे, चेहरा इ. वरील)

टवटवी; तजेला; ताजेपणा; तेजस्विता; पक्वतेचे तेज.

लुसलुशीत वि. मऊ; टवटवीत; अतिशय कोवळा; स्वच्छ व तजेलदार; कोवळेपणामुळे टवटवी, मृदुत्व आलेले (फळ इ.).

लुसलुस स्त्री. उत्सुकता; उत्कट, प्रबळ इच्छा. [ध्व.]

लुसलुसणे पहा : **लसलसणे**

लुसी स्त्री. लूट; लुटणेः 'चैतन्याची लुसीः घेतु आला हृषीकेशी'-शिव ६०९. [सं. लुस्]

लुसुलुसु, लुसलुस क्रिवि. उत्कट इच्छेने; उत्सुकतेने.

लुस्कान वि. अशक्त; कुचकामाचा; निरुपयोगीः 'तुरूंगाचीं दारें इतकीं लुस्कान आहेत कीं जातां जातां मोडतां येतील.'-आगरकर तुदि.

लुस्त वि. मारामुळे गलितगात्र झालेला. (झाडी)

लुह, लूक स्त्री. झळ. [हिं.]

लुहं(हां)गी, लुहांगीकाठी पहाः **लोहांगी**

लुळणे अक्रि. लोळणे.

लुळलुळणे अक्रि. लोंबणे; हलणे. [ध्व.]

लुळलुळीत वि. लुसलुशीत; कोमल; मृदु; लवचीक (जीभ, नुसते मांस इ.).

लुळा वि. १. जन्मतः किंवा रोगादी कारणांमुळे अशक्त, अपंग झालेला; पंगू; ताठपणा नसलेला; ढिला. २. अशक्त; कमजोर; निर्जीव. ३. म्हातारपणामुळे किंवा अन्य कारणामुळे आपले कर्तव्य करायला असमर्थ. ४. अपूर्ण; सदोष. ५. व्यवस्थित न चालणारा. [सं. लोल्=हलणारा]

लुळाखुडा वि. म्हातारा व अशक्त; जीर्ण आणि निकामी; फुटलेला-तुटलेला (मनुष्य, प्राणी, गाडी इ.).

लुळाखुळा वि. १. शरीराने व मनाने पंगू; अशक्त. २. (चुकीने) लुळाखुडा.

लुळावणे अक्रि. १. (शरीर, अवयव) अशक्त, आपले काम करण्यास असमर्थ, पंगू होणे. २. कमजोर होणे. ३. दुसऱ्याच्या कारभारात लुडबुड करून त्याला उपद्रवकारक होणे.

लु(लो)ळी स्त्री. १. श्रम, झोप, थकवा इ. मुळे मूल, माणूस वगैरेंना होणारी लोळण्याची इच्छा; लोळण; उन्हाळ्यामुळे आलेली सुस्ती. २. गुंडाळी; गाठः 'जानिवेयांची लुळी झळाळिली।'-शिव ४३. [सं. लुलित]

लुळे न. बाजारबुणगे; हलक्या-सलक्या लोकांचा समुदाय; वात्रट, टवाळ, मवाली लोकांचा समुदाय, दाटी; दुकानदार, गिऱ्हाईक, सट्टेबाज लोक वगैरेंची गर्दी; तमाशा, मारामारी, भांडण इ. चालले असताना गोळा झालेली दाटी.

लुंगणे अक्रि. १. निर्बळ होणे; निःसत्त्व, कमजोर, अशक्त होणे; हालताचालता न येण्यासारखी स्थिती होणे. २. त्रस्त होणे; कंटाळणे; दमणे; थकणे.

लुंग(घ)णे अक्रि. थकणे; अशक्त होणे; दमणे; गळून, दमून जाणे.

लुंगर स्त्री. उंबराच्या जातीचे एक मोठे झाड.

लुंगस न. १. खुरटलेले व बारीक असे कणीस. २. (कपडे, दोरखंड इ. ची) रास; ढीग. ३. कुंचला किंवा इतर केसांची वस्तू यांची टोके; झिजलेले टोक; झिजलेला, घासलेला दगडाचा किंवा लाकडाचा तुकडा. ४. पहाः **लुंगी**

लुंगा पु. १. (राळा, नाचणी, राजगिरा इ.) धान्याचे लहान कणीस. २. शिंगरू; घोड्याचे पिलू. ३. (चुकीने) लहंगा. [दे.]

लुंगा, लुंगापुं(सुं)गा वि. १. बारीक; क्षुद्र; निःसत्त्व; खुरटलेले (धान्याचे कणीस, पीक). २. (ल.) अशक्त; किरकोळ; सडपातळ; बारीकसारीक; बुटका; गरीब (मनुष्य, प्राणी): 'शिंद्याचा ज्यान बत्तीस फ्रेंच। ना लुंगा।'-ऐपो ४२३. ३. सामान्य; हलका; कमी योग्यतेचा.

लुंगा(घा)वणे सक्रि. चोरणेः 'एखादी चीजवस्तु लुंगावीत आहेत.'-स्वस्था ३०.

लुंगी स्त्री. १. चार-पाच हात लांबीचे, सामान्यतः गडद निळ्या किंवा लाल रंगाचे, चौकटीचे किंवा साधे, कमरेभोवती गुंडाळण्याचे मुसलमानांचे लहानसे वस्त्र. २. पंचा; धोतर; अरुंद व लांब कापडी पट्टी; लंगोटी; काचा; पायजमा; पटका. ३. न्हावी हजामतीच्या वेळी अंगावर केस पडू नयेत म्हणून वापरतो तो कपडा. (व.)

लुंगी स्त्री. बाजरीचे नाक; सजगुऱ्याच्या दाण्यावरील बोंड; भूस.

लुंगू न. पहाः **लुंगस, लुंगा**

लुंगूस स्त्री. चिंधी. (व.)

लुंघणे अक्रि. लूट होणे; लुटला जाणे; नासधूस होणे.

लुंचणे सक्रि. पहा : **लु(लुं)चणे** १

लुंचनीक वि.पु. केस उपटणारा (जैन साधू): 'खवणीक खपणीक लुंचनीक'-ज्ञागा ३९२.

लुंचित वि. टकल्या; डोक्यावर केस नसलेला.

लुंज वि. १. लुळा. २. संथ. (झाडी)

लुंझा वि. ढिला; सैल. (ना.)

लुंठणे अक्रि. १. लोळणेः 'तरंग सर्वांगीं तोय चुंबी। प्रभा सर्वत्र विलसे बिंबीं। नाना अवकाश नभीं। लुंठतु जैसा।'-ज्ञा १८.११४८. २. लोटांगण घालणेः 'देखिलिये वस्तु उजू लुंठिती। मीचि म्हणोनि।'-ज्ञा ९.२२२. [सं. लुठ्]

लुंठन-ण न. १. लूट; चोरी; लुबाडणे. २. नासधूस; नुकसान; झाड, वेल इ. ची सर्व पाने, फुले, फळे तोडून टाकणे.

लुंड-डो, लुंडुक न. डोके नसलेले शरीर; धड. (गो.) [सं. रुड]

लुंडमुंड वि. निश्चेष्ट पडलेला; कासावीस.

लुंडा वि. लुळा; पंगू; थोटा; पांगळाः 'शास्त्राचा केला लुंडा। तोंडीं पाडियेला धोंडा।'- तुगा ३१८१. [हिं.; क. लुण्ड; पं. लुण्ड-ण्डा]

लुंधळणे अक्रि. घुटमळणे; एखाद्याच्या मागे-मागे फिरणे. (व.)

लुंबडे न. बैलाच्या मानेवरील वशिंड; पोळे. [दे. प्रा. लुम्बी; हिं. लूमना]

लुंबी स्त्री. लोंबी; लोंगर; लोंबट; लोंब; घोस; कणीस.

लू स्त्री. उन्हाळ्यात, विशेषतः वालुकामय प्रदेश व त्याच्या अवतीभोवतीची जमीन तापून हवा विरळ होते व वर जाते. तिची जागा घेण्यासाठी कमी उष्णतेचे वारे वाहू लागतात. त्यामुळे वादळ होऊन मातीचे व वाळूचे कण वरती उडतात . सूर्य झाकला जाऊन पाऊसही पडतो अशी स्थिती.

लू न. लोकर; बारीक केस; लव. [सं. लोम]

लूट स्त्री. १. लुटण्याची क्रिया. २.लुटून आणलेले धन वगैरे. ३. सढळपणाने

केलेला खर्च (गरिबांना घातलेले जेवण, दिलेले दान इ.). ४. विपुलता; समृद्धी; लयलूट; भरमसाटपणा. ५. पाच वर्षांपर्यंतच्या बाळाचा संक्रांतीला करण्याचा आनंदोत्सव. (झाडी)
[सं. लोतृ-प्तृ-त्र; हिं; क. लूठ]

लूड स्त्री. शेतात करण्याचा राब(दाढ). -बदलापूर.

लूड पु. स्त्रियांच्या पायातील कडे. (झाडी)

लूत स्त्री. १. मनुष्य, कुत्रा इ. प्राण्यांना होतो तो त्वचारोग. २. सुरणाच्या झाडासारखे एक औषधोपयोगी झाड. याच्या फुलांना शेवाळे म्हणतात.
[सं. लूता]

लूता पु. कोळी; कांतीणः 'बहुधा बद्ध करीलचि लूतेचें जिष्णुवारणा सूत।'-मोविराट ४.३६.

लूनिया पु. मीठ पिकवणारा वाणी. [हिं.; सं. लवण]

लूप पु. कुटुंबनियोजनासाठी गर्भाशयात बसवण्याचे प्लॅस्टिकचे वेटोळे. - आआआ ४९९.

लूव स्त्री. प्रबळ इच्छा; रुचीची परमावधी. (गो.)

लूसि स्त्री. चिमटी; बचकः 'या परिमळाची लूसि घेववा। चंडवाता करवीं।'-नरुस्व ६००.

ले चतुर्थीचा प्रत्यय; ला. उदा. रामाले. (खा.)

लेइणे पहाः **लेणे**

लेक पु. १. मुलगा; पुत्र. २. पादपूरणार्थक बुवा इ. अर्थी उपयोगः 'आतां तिकडे जाणार तरी कोण लेक.'-मृ ४४. ३. हीनतादर्शक, तुच्छता - तिरस्कार - निंदाव्यंजक शब्द.
स्त्री. मुलगी; कन्या.

लेकपु(पू)त-बाळ पु.न. मुलगा; मूल; मुलगा-गी.

लेकरालेकरी क्रिवि. १. वाडवडिलांपासून (चालत असलेले वतन, हक्क इ.); मुलापासून त्याच्या मुलाकडे अशा क्रमाने; वंशपरंपरागत. २. मुलांत; मुलांशी; मुलांमध्ये. [लेकरू द्वि.]

लेकरू न. मूल; बालक; बाळ (मुलगा किंवा मुलगी).

लेकरेबाळे न. अव. मुलेबाळे.

लेकवळा पु. १. अनौरस मुलगा. २. मुलेबाळेः 'विठोबारायाचा लेकवळा'-जना ७३.

लेकविता पु. बाप; पिता.

लेकाचा, लेको पु. निंदा किंवा तिरस्कार दर्शवणारा शब्द.

लेकार वि.पु. धारण करणाराः 'दापाति जवादिये कांतिय-लेकार'-रुस्व ७४८.

लेकि(की)न अ. पण; परंतु; शिवाय. [फा. लेकिन; अर. लाकिन्]

लेकुरछंद पु. १. लहान मुलांसारखे वागण्याचा छंद; मुलांमध्ये मिसळण्याची हौस. २. पोरकटपणाचा नाद; बालिश हट्ट.

लेकुरडा वि. लहानसा; पोरकट.

लेकुरपण-णा न. पु. १. लहान वय; बालपण. २. पोरपणा; बालिशपणा.

लेकुरवाळा वि. १. मुलेबाळे असलेला. २. ज्याला आडवे कोंब किंवा बारीक फाटे आहेत असे (हळकुंड).

लेकुरसमजूत स्त्री. पोरबुद्धी; लहान मुलांचे ज्ञान.

लेख पु. देवः 'गुरूपुत्र हा तूं न समान लेखी। जयाचा असे फारसा मान लेखीं।'-वामन, विराट ७.१२३.

लेख पु. १. जे लिहिले किंवा लिहिण्यात आले ते; अक्षरः 'नाना नुठितां लेख। पुसिलें जैसें।'-अमृ ७.७०. २. दस्तऐवज; लिहिलेला कागद. ३. गणना; हिशेब; मोजदादः 'थेंबीं धरूं ये लेख।'- अमृ ५.९. ४. प्रतिष्ठा. ५. तुलना. ६. पर्वाः 'खांडे थोवेकारू असमसासु। एरां लेख नाहीं।'-शिव १०२२. ७. प्रत्यय; पटणे; पडताळाः 'औचिता करौनि धरा। मग लेखा येईल।'-शिव ६९६. ८. एखाद्या विषयाच्या अनुरोधाने लिहिलेला, विवरणात्मक, मर्यादित मजकूर. ९. आकार; मोल; किंमतः 'या स्त्रियांसि न ये लेखाः ऐसा कवणु असे?' - उगी ४६५.
न. मुले एक, दोन इ. जे पाढे शिकतात त्यांपैकी प्रत्येक.[सं. लिख्]

लेखक पु. वि १. लिहिणारा; नकला करणारा; लिहिण्यावर उपजीविका करणारा. २. स्वतंत्रपणे ग्रंथ रचणारा. ३. (सांकेतिक) कारभारी; कारकूनः 'नाना फडणवीस तेथील निखालसता लेखकमुखें.... दिसून आल्यावर.'-ऐलेसं २०८९. [सं.]

लेखकी स्त्री. लेखकाचा धंदा; लेखकाचे काम; कारकुनी.
वि. कारकुनाने लिहिलेला.

लेखणी-ण स्त्री. १. शाईने कागद इ. वर लिहिण्याचे साधन; बोरू; (इं.) पेन. २. दगडी पेन्सिल. (व.) ३. गणतीः 'जेथ स्वर्गसुख लेखणिये नाहीं।' -ज्ञा २.३६४. [सं. लेखनी; क. लेक्कणि] **लेखणीस चंग बांधणे** - उत्तम, वळणदार अक्षर लिहिणे; सुंदर लिहिण्याचा धंदा करणे. **लेखण्या करणे** - १. तुकडे करणे. २. (सैन्याच्या) तुकड्या पाडणे. ३. ठार मारणे.

लेखणीचा धड, पुरा, बहादर वि. अति उत्तम तऱ्हेने लिहिणारा; वळणदार व बिनचूक लिहिणारा; लेखनकलेत निष्णात.

लेखणीसंप पु. बैठा संप; (इं.) पेन डाऊन स्ट्राइक; कार्यालयात उपस्थित राहायचे पण काम करायचे नाही.

लेखणीहाक्या वि. कसेतरी आणि काहीतरी लिहिणारा; वाटेल ते लिहिणारा; मूर्ख संपादक.

लेखणे सक्रि. १. मानणे; समजणे; गणणे. २. पर्वा करणे; चाहणे; आदर करणे. ३. लिहिणे. ४. विचार करणेः 'पैं गा भक्तीचेनि नांवें। फूल मज एक द्यावें। तें लेखें तरि म्या तुरंबावें। परि मुखींची घालीं।'-ज्ञा ९.३८४.
[सं. लिख्]

लेखन न. १. लिहिणे. २. लिहिण्याची धाटणी; शैली. ३. जे लिहिले ते. ४. चित्र, नकाशा इ. काढणे किंवा रेखादिकांनी निर्मिणे. [सं.]

लेखनकला स्त्री. लिहिण्याची, मूळ ग्रंथांच्या नकला करण्याची कला.

लेखनकामाठी स्त्री. १. हलक्या प्रतीचे लेखनः 'एखादा लेखक केवळ द्रव्यासाठीं लेखनकामाठी करीत असला.'-प्रतिभा ४.१५. २. लेखनकलाः 'आपली लेखनकामाठी भाव्यांना चांगल्या प्रकारे सजविता आली असती.'-निवृ ७.१.१९४०.

लेखनप्रशस्ति-स्ती स्त्री. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या आज्ञेवरून सरकारी कागदपत्रे लिहिण्याचे ठरावीक मायने वगैरे लिहिण्याची बाळाजी

आवजी चिटणीस यांनी तयार केलेली पद्धती.

लेखनसीमा स्त्री. पत्राचा शेवट; मजकुराची अखेरी. यापुढे दुसरा मजकूर लिहिता येत नाही. पेशवाईत हा एक शिक्का होता.

लेखनस्वातंत्र्य न. वर्तमानपत्रांमधून लेख लिहिण्याचा, आपले विचार किंवा मते लेखांमधून जाहीरपणे सांगण्याचा नागरिकाचा मूलभूत हक्क.

लेखनामा पु. लेखाचा सारांश; लेखाचा मथळा; लेखातील महत्त्वाचा भाग.

लेखनिक पु.वि. तोंडाने सांगितलेला मजकूर लिहून घेणारा.

लेखनीय, लेख्य वि. १. लिहिण्यायोग्य. २. खिजगणतीतीलः 'पार्था नवल हें पाहीं। जेथ स्वर्गसुख लेखनीय नाहीं।'– ज्ञा २.३६५.

लेखपट पु. अधिकार दिल्याची सनदः 'इंग्रजाकडून जाग्याचे लेखपट नानासाहेबांचे नांवे प्रथम झाले.'–ऐको.

लेखपट्टक न. मजकूर लिहिलेला, गुंडाळी करून ठेवता येण्यासारखा, जाड किंवा कापडावर चिकटवलेला कागद.

लेखपत्र–पढा–पूस न. पु. पहाः **लिखापढा** १

लेखप्रमाण न. लेखी, लिखित पुरावा, आधार; प्रमाण दस्तऐवज.

लेखप्रमाणक पु. (कायदा.) दस्तऐवज अस्सल असल्याचा दाखला देणारा पदनिर्देशित अधिकारी.

लेखया पु.वि. लिहिणारा.

लेखा पु. १. हिशेब; गणती; मोजणीः 'जाती लवपळ घटिका काळ लेखा करितो।'–दत्तपदें, पृ.५५. २. पर्वा; खिजगणती; पाड; किंमत. ३. लिखित प्रमाण; दस्तऐवज. ४. विचार; भाषाः 'द्वैताचा हा लेखा हारपला'– निगा ६३. ५. निवाडा; निर्णयः 'दों अक्षरीं (= राम) लेखा केला तेणें'– निहरि ४. ६. अवस्थाः 'ब।। महमूदासारखा लेखा करावा....'–ऐको.

लेखा छायाचित्र फोटोपद्धतीने मुद्रित केलेले चित्र.

लेखादेवी स्त्री. कर्जखत.

लेखापाल पु. जमा–खर्चाचे, हिशेबाचे काम पाहणारा अधिकारी.

लेखापुशी क्रिवि. लिहिण्यात; लेखामध्ये; लिहून ठेवून.

लेखा(षा)वळी स्त्री. गणतीः 'तया सैन्या कवण जाणें। पाईचया नाही लेखावळी।'–उह ६८.

लेखावेगळा वि. असंख्य; मोजता न येणारा; अगणितः 'नाना दृष्टीचे उमाळे। उठती लेखावेगळे।'–अमृ ७.१४३.

लेखाशास्त्र न. जमाखर्च कसा लिहावा या विषयाचे शास्त्र.

लेखांक पु. लेखाचा भाग; एखाद्या मोठ्या लेखाच्या पाडलेल्या भागांपैकी प्रत्येक.

लेखी वि. लिहिलेला.

क्रिवि. १. मताने. २. तऱ्हेने; परीने; सारखे. ३. दृष्टीने. (वा.) ० **लागणे** – १. सार्थकी लागणे; कृतार्थ होणेः 'तो काळ लेखीं लागैल'–निवेंद ६९. २. हिशेबात धरले जाणेः 'परि गोसावीयांचा लेखी एकीही उडी न लगेचि'–लीचउ १२७.

लेख्यशाला स्त्री. दप्तरखाना. – पेंकृपु. [सं.]

लेगुटी स्त्री. लंगोटी. (खा., भिल्ली)

लेचणे अक्रि. खचणे; दबणे; मनणे; दबकणे; बाक येणे; कबूल करणे. [सं. लीयते]

लेचापेचा वि. अशक्त; कमजोर; निर्वीर्य; निर्बळ; निःसत्त्व; कच्चा. [सं. लिश्+पिश्]

लेजणे सक्रि. घातला जाणे; धारण केला जाणेः 'कां हीर कंकण न लेजति बायकांहीं।'–आसु ५८. [सं. लि (कर्मणि)]

लेझर प्रिंटर प्रकाशकिरणांच्या साहाय्याने त्वरित मुद्रण करणारे यंत्र.[इं.]

लेझी(जी)म स्त्री. न. लाकडाच्या दांड्याच्या दोन टोकांना धातूच्या चकत्या ओवलेली साखळी बसवून केलेले व्यायामाचे तसेच खेळण्याचे साधन. [फा. लेझम्]

लेटणे अक्रि. १. जमिनीवर वगैरे अंग आडवे करणे; पडणे; निजणे; झोपणे. २. कबूल करणे. [हिं. लेटना; सं. लुट्]

लेटी स्त्री. हादग्याचे झाड; अगस्त्याचे झाड. (व.)

लेटी(ट्यू)स स्त्री. एक भाजी. हिचे दोन प्रकार–कॅबेज व कास. [इं.]

लेडकटर पु. (छाप.) शिशाच्या पट्ट्या कापण्याचे यंत्र. [इं.]

लेडघनाना पु. कटकट. (झाडी)

लेडबया वि. १. बावळट. २. एक शिवी. (झाडी)

लेडवा पु. सुगरण पक्षी. (झाडी)

लेडसणे सक्रि. एखाद्याची कणीक तिंबणे; एखाद्याला बेदम मार देणे. (ना.)

लेडीस हंबर (चर्म.) एक प्रकारची हातोडी. [इं. लेडीज हॅमर]

लेड्या पु. १. एक शिवी. (व.) २. नपुंसक. (झाडी)

लेढ न. १. रेत; वीर्य. २. एक शिवी. (व.) (वा.) ० **पाडणे** – सक्त मेहनत करून घेणे.

लेणदेण स्त्री. देणे घेणे; देवघेव; देण्याघेण्याचा व्यवहार.

लेणार–रा, लेता पु. धारण करणारा; घालणारा.

लेणारत न. ब्राह्मणांत बोडणाच्या वेळी करण्यात येणारे कणकेचे पाट्याच्या आकाराचे सिंहासन व वरवंट्याच्या आकाराचा लोड. – बदलापूर २१९.

लेणारीन वि. लेणे, दागिना म्हणून मिरवणारीः 'चुड्याची लेनारीन सासरी गेली काल'–लोसाको.

लेणे, लेइणे सक्रि. १. डोळ्यात (काजळ) घालणे; कपाळावर (कुंकू) लावणे; अंगावर (यथास्थानी) दागिने घालणे; धारण करणे. २. (वस्त्र) नेसणे; परिधान करणे. ३. घेणे. [हिं. लेना]

लेणे न. १. शरीराला शोभा देणारी वस्तू. उदा. दागिना, कुंकू इ. २. चैत्र महिन्यात गौरीच्या उत्सवात भिंतीवर गोपुर इ. चे काढतात ते चित्र; मंगळागौरीच्या वेळी देवीला वाहण्याचे कणकेचे दागिने. ३. पांडवकृत्य; डोंगर पोखरून त्यात सभामंडप, देवादिकांच्या मूर्ती इ. कोरून तयार केलेली गुहा. [सं. लेपन]

लेणेपण न. अलंकारावस्थाः 'लेणेपणें उणें नव्हेचि हेम।'–एभा २८.२६३.

लेत वि. अंगावर धारण करणारेः 'दोन्हीं (रत्न आणि सोने) जालीं तरि न जोडे। लेतें आंग।'– ज्ञा १७.२६७.

लेथडणे सक्रि. शेण, माती, खरकटे इ. नी (भांडे, अंग इ.) माखणे. [सं. लिप्]

लेन्स स्त्री. प्रकाशकिरण एकत्रित करण्यासाठी किंवा विखुरण्यासाठी वापरण्यात येणारे वक्रगोल असलेले भिंग. [इं.]

लेप–फ पु. खाडीत सापडणारा, काळ्या पाठीचा व पांढऱ्या पोटाचा एका

जातीचा मासा.

लेप पु. १. सारवण; माखण. २. अंगाला लावण्याची चंदन इ. ची उटी. ३. चुना, चिखल इ. चा भिंतीवर केलेला गिलावा. ४. भिंत इ. वरील रंगाने किंवा चुना इ. नी काढलेले, लिंपलेले चित्र. ५. भात, भाजी इ. चा हात, भांडे यांना चिकटून राहिलेला अंश. ६. बाधा; दोष; विटाळ; मळ. ७. रंग; वरचा रंग; मुलामा. ८. ओढा; सारवण; ओढा घालण्याचे द्रव्य; दुखणाऱ्या अवयवावर झाडाची पाने इ. चा बांधण्याचा ठेचा. ९. बाहुली. (तंजा.) [सं. लिप्]

लेप पु. न. अंथरण्या-पांघरण्याजोगे, कापूस भरून केलेले वस्त्र; दुलई; रजई.

लेपड न. हलक्या जातीचा, बारीकसा व खराब असा लेप.

लेपडी स्त्री. अंथरण्याची दुलई किंवा लहान गादी.

लेपडी पु. चिकटू पाहणाराः 'दारसूणा । लेपडी । भातवंकुड'-कला ८.

लेपडीची टोपी लेपाची खोळ (चहादाणीतील चहा थंड होऊ नये म्हणून त्यावर घालण्याची); (इं.) टीकोझी.

लेपणे, लेपटणे सक्रि. १. लेप देणे; माखणे; ओढा घालणे. २. लिंपून आकृती तयार करणे; लिंपणे. ३. एखाद्या पदार्थाचा लेप, दोष दुसऱ्याला लागणे.

लेपन न. १. ओढा घालणे; लेप देणे; लिंपणे. २. लेप देण्याचा पदार्थ.

लेपवणी न. १. खरकटी भांडी, हात धुतलेले अन्नांशयुक्त पाणी. २. गुरांना देण्याचे पाणी; पेज वगैरे मिश्रित कदान्न. (कु.)

लेपवळ न. खरकटे; जेवण झाल्यानंतर ताटात राहिलेले अन्नाचे अवशेष; खरकट्याचा पसारा. (राजा.)

लेपसट वि. लेचापेचा; शिळपट; स्त्रैण. (ना.)

लेपाट न. वापरलेल्या, जुन्या दोन-तीन कापडांना दोरा घालून तयार केलेले पांघरूण.

लेपाटा पु. औषध, चिखल इ. चा वेडावाकडा व जाडा लेप.

लेपाटी स्त्री. १. विशिष्ट प्रकारचे नळकांडे; ठाकर लोकांचे पाखरांच्या शिकारीचे साधन. २. दांडगाईने केलेली सारवासारवः 'एखाद्यावर जप्तीचा दाव दिला आहे. लेपाटीच चालली आहे.'-ऐको.

लेपाळणे सक्रि. लेप लावणे; माखणे.

लेपाळा पु. भांडी, हात इ. वर जमलेला तेल, तूप इ. चा थर.
वि. लेप देण्यायोग्य; लिंपण्याजोगा.

लेपि(पी)व वि. चित्रस्थ; तटस्थः 'कीं कुळदेवता लेपिवां । रती मदनांचिया'-रुस्व ७८.

लेप्य न. चित्रः 'जैसे सप्तरंग भरोनि जाण । लेप्य काढिले चिताऱ्यानें ।'-कथासारामृत ७.४२.
वि. लिंपलेला ; लिंपून तयार केलेला : 'लेप्यालेख्या ज्या मूर्ति जाण। ... यथाविधान करावें ।' - एभा २७.१२२.

लेफडा पु. सारवणाचा पट्टा किंवा रेघ; वाकडा-तिकडा पट्टा. (को.)

लेबक पु. पुत्र; मुलगा. (व.)

लेबडा, लेभडा-ळा वि. १. नेभळट; दुर्बळ. २. अस्ताव्यस्त; अव्यवस्थित; घाणेरडा (मनुष्य, कपडे). (लेभडा हा शब्द 'घाणेरडा' या अर्थानेच फक्त वापरतात.)

लेभागू वि. उचल्या; एखादी वस्तू घेऊन पळणारा.[हिं. लेना + भागना]

लेभाशा, लेंभाळ्या वि. नेभळट; पुळचट; कुचकामी; अशक्त. (व.; ना.)

लेभे न. वाद; तंटा; लडथड; खटले; खरकटे.

लेमडी झड पाल्हाळ. (झाडी)

लेलाम-व पहाः **लिलाव**

लेलिहमुद्रा स्त्री. चौसष्ट हजार तंत्रमुद्रांपैकी एक. उजवा तळहात डाव्या उलट्या हातावर धरावा व बोटे नागाच्या जबड्याच्या उघडमिटीप्रमाणे खालीवर करावी. [सं.]

लेलूत स्त्री. उसने आणणे व परत न करणे. [सिं.]

लेलेमजनू पु. गरीब, कीव करण्याजोगा, भित्रा माणूस. (लैलामजनूच्या जोडीच्या (शिमग्यातील) सोंगात मजनू शेळपट दाखवला जातो, त्यावरून रूढ.)

लेलेमजूर पु. अशक्तपणामुळे काम करायला असमर्थ मनुष्य.

लेवचे, लेवप क्रि. चाटणे. (गो.) [सं. लिह्]

लेवट न. मैथुनासाठी संयुक्त झालेले जोडपे. (को.)

लेवट पु. भाजावळीसाठी गोवरी, कवळ, जाडे गवत इ. पसरल्यानंतर त्यावर पसरतात ते फार बारीक गवत किंवा भातेणाचा चुरा. (राजा.)

लेवट न. पु. जाड व मजबूत अशी कापसाची वस्तू.

लेवठावचे क्रि. देतो म्हणून न देणे. (गो.)

लेवणा-णू वि. तीन चतुर्थांश; पाऊण. (नंदभाषा)

लेवणी स्त्री. कवळावर गवत इ. पसरण्याची कृती.

लेवणे न. पहाः **लेवट** पु.
सक्रि. भाजावळीसाठी कवळावर गवत, काड्या इ. पसरणे.

लेवदेव, लेवादेवा-वी स्त्री. पु. स्त्री. देवघेव; व्यापार ; धंदा. [गु.]

लेवव(वि)णे (लेणेचे प्रयोजक) घालणे; धारण करवणे.

लेवा पु. लेप; पूटः 'जैसे लेवे दिधले तमा । काजळाचे ।'-ज्ञा १६.३९०.

लेवा स्त्री. हलकी अफू व पसेवा यापासून तयार केलेली चिक्की.

लेवाडा-ड्या वि. रोड दिसत नसूनही तितकीशी शक्ती नसलेला; मजबूत बांध्याचा नसल्यामुळे अशक्त; कमजोर.

लेश पु. १. अल्प अंश; सूक्ष्म भाग; कण. २. शेष, अवशिष्ट भाग.

लेश-स वि. एखादे काम करण्यासाठी तयार, तत्पर, हुशार.

लेश(स)पंड, लेसट न. त्रासदायक होणारी अनिश्चित गोष्ट; घोटाळ्यात पाडणारी गोष्ट; त्रास; अडचण; लचांड.

लेस वि. तयार; उत्कृष्ट सामान वगैरे भरपूर तयारीने असलेला; जराही उणीव नाही अशा तयारीचाः 'छत्र्यांच्या थैल्या लेस करून ठेविल्या आहेत.'-ऐलेसं ४३०९.

लेस स्त्री. १. किनार; फीत; जाळीदार पट्टी; नक्षीपट्टी; जोडण्याचे काठ; बुटाचे बंद. २. (चर्म.) गिरणीतील तुटलेला पट्टा शिवण्यासाठी काढलेले सल. [इं.]

लेस पु. हातरूमाल. (गो.)

लेसट न. १. पहाः **लेपाळा** पु. २. अपूर्णता; उणेपणा; कमतरता. ३. पहाः **लेशपंड**

लेसा क्रिवि. १. तयारीने; बऱ्या रीतीने; जपूनः 'वेगें आणि लेसां। दिठी घालुनि आंविंसा। जळीं बकु जैसा। पाउल सोये।'-ज्ञा १३.२४६. २. सहजः 'मग प्रमेयांचिया गांवा। लेसां जाइजे।'-ज्ञा ७.२०४.

लेसाटा वि. शेलाटा; काटकुळा; उंच व बारीक.

लेह, लेहीय पु.न. चाटून खाण्याचा पदार्थ, औषध; चाटण. [सं.]

लेहडा वि. खादाड; चटावलेला. (ना.)

लेहणे सक्रि. लिहिणेः 'लेहोनि पत्रा खिळिलें प्रतापीं।'-अकक २. गजगौरीव्रत ३३.

लेहन न. १. चाटण्याची कृती. २. (नृत्य.) जिभेने ओठ चाटणे; दुसऱ्याच्या नजरेला न पडण्यासारखी गोष्ट दुसऱ्याने पाहणे, मुलीचे लाजणे ह्या गोष्टी हा अभिनय दाखवतो.

लेहाजा अ. म्हणून; सबब; यासाठी. [अर. लिहाझा]

लेहेडना क्रि. १. खाण्यासाठी भटकणे. २. वखवखणे. [सं. लेहा]

लेहेडना स्त्री. १. पाल्हाळ. २. दीर्घउच्चारी. (झाडी)

लेहेरना अक्रि. १. पाण्याने माती वाहून जाणे. २. कानाचे टोचलेले भोक मोठे होणे. (झाडी)

लेळूपेळू वि. लुळा; पांगळा. (व.)

लेंगडलेंगड स्त्री. पिरपीर.

लेंगो पु. खेकड्याचा पाय. (गो.)

लेंची स्त्री. एक प्रकारचे झाड.

लेंज्या वि. पाल्हाळ लावणारा. (झाडी)

लेंझा वि. ढिला; भोंगळ; सैल; ताठपणा नसलेला. (व.)

लेंड स्त्री. पु. १. विटीदांडूच्या खेळातील दोन या अर्थाची संज्ञा. २. विटीचा एक प्रकारचा टोला. विटीचे एक टोक हातात धरून व दुसरे जमिनीवर सोडून जमिनीवर पडण्यापूर्वी मधल्यामध्येच तिच्यावर टोला मारून ती फेकणे. -मखेपु १८. [ते. रोंडू]

लेंड न. लेंडूक; विष्ठेचा लहान गोळा. (वा.) **लेंडसुखास येणे** - आपले लाडके मूल वगैरेचे प्रेम करताना अत्यंत तल्लीन होऊन देहभान विसरणे.

लेंडओ(वो)हळ, लेंडी, लेंडिया पु. स्त्री. लहान ओघळ, ओढा; पऱ्हा.

लेंडकी स्त्री. चरकातून पिळून काढलेला ऊस; चिपाड.

लेंडक्या,लेंड(ड्)कवळ्या पु. एकदा चरकातून पिळून निघालेले कांडे पुन्हा चरकात लावणारा.

लेंडपटाऱ्या वि. बेशरम; निर्लज्ज. (व.)

लेंडपेंड पु. न. दागदागिने; नटण्याच्या उपयोगाच्या वस्तू. [लेंड द्वि.]

लेंडा पु. घोड्याच्या खोगिराला असलेला शेपटीखालून घेण्याचा पट्टा किंवा दोरी.

लेंडा(ढा)र न. लटांबर; प्रवासात बरोबर नेण्याची मुलेमाणसे, गुरेढोरे इ. भरपूर व त्रासदायक सामानसुमान. (वा.) **० लागणे** - पुष्कळ मुले होणे.

लेंडारगो पु. गिधाड. (कु.)

लेंडावर्त पु. घोड्याच्या दाढेखाली असणारा केसांचा भोवरा. हे अशुभ लक्षण मानतात.

लेंडी स्त्री. गुंडी; रेशमी वस्त्र. -लोसाको. (धा.)

लेंडी स्त्री. १. (शेळी, मेंढी, उंट इ. ची) विष्ठेची लहान गोळी. २. मळाचा जमलेला खडा; लेंड. ३. पहाः **लेंडा**. ४. खोगिराला पुढच्या बाजूला असणारा घोरबंद. ५. वांझोट्या अगर नर जातीच्या ताडाला शेंगेसारखा येणारा अवयव. ६. एकेरी मखमलीचे फूल. (वा.) **लेंड्या गाळणे, टाकणे, हगणे** - भीतीने गर्भगळित होणे; फार घाबरणे.

लेंडी स्त्री. पांघरण्याचे लोकरीचे वस्त्र. [सिं.]

लेंडी च्याक धनधान्याची समृद्धी, भरभराट.

लेंडी तलाव गावातून घाण पाणी वाहून बनलेला तलाव. (व.)

लेंडी पिंपळी उंदराच्या लेंडीच्या आकाराची एक शेंग. ही औषधी आहे.

लेंडीप्रसाद पु. चाबूक किंवा छडी मारताच हगणारा घोडा; वाईट घोडा.

लेंडुरी, लेंडीनाला स्त्री. फक्त पावसाळ्यात वाहणारा नाला.

लेंडूक न. पहाः **लेंड** न.

लेंडूर पहाः **लेंडा(ढा)र**

लेंडोर-रा-रे न. लेंड्याचा समुदाय.

लेंढीकुरवाळा वि. पुष्कळ मुलेबाळे असणारा. (तंजा.)

लेंबटा वि. आशाखोर. (गो.)

लेंभड स्त्री. रोडकेपणा; कृशता; अशक्तपणा. (को.)

लेंभडणे, लेंभणे अक्रि. १. क्षीण होणे; रोडावणे; वाळणे. २. (उपवास, आजार, श्रम वगैरेंमुळे) गळून जाणे; दमणे.

लॅच न. अंगचे कुलूप. [इं.]

लॅपटॉप पु. (संगणक.) मांडीवर ठेवून वापरता येण्यासारखा छोटा संगणक. [इं.]

लॅपरोस्कोपी स्त्री. (वैद्यक.) शरीराच्या आतील अवयव दुर्बिणीच्या साहाय्याने पाहण्याची पद्धती. [इं.]

लैसा वि. मोठाः 'मी एक पंडित मी एक वैदिक। मी एक ज्ञानी लैसा।'-अमृत १२०.

लैंगिक वि. जननेंद्रियविषयक.

लैंगिकता स्त्री. लैंगिकतेचा प्रादुर्भाव व त्याचे मानसिक आणि शारीरिक बाबतीत दिसून येणारे वैशिष्ट्यपूर्ण आविष्कार.

लैंगिक प्रजनन पुं-युग्मक आणि स्त्री-युग्मक यांच्या संयोगातून युग्मनज तयार होणे आणि त्याच्या विभाजनातून व वाढीतून नवीन जीव तयार होणे ही क्रिया.

लैंगिक शिक्षण प्रजोत्पादक इंद्रिय, लैंगिक प्रेरणा व वर्तन याची सत्याधारित माहिती मुलांना शालेय शिक्षणाबरोबर देणे.

लो पु. नाद; छंद; व्यसनः 'पुढें लो लागला खेळाया।'-दास ३.२.२२.

लो पु. लय; लोपः 'लोः अवस्थाः आनंदुः आवेशु'-अली ११५. [सं. लय]

लो(लों) पहाः **लव**

लोइली पहाः **लोयली**

लोई स्त्री. पांघरण्याची धाबळी; पांघरूण. (व.) [हिं. लव]

लोक पु. १. मनुष्य; जन; मानवजात; जनता; समाज. २. वर्ग; विशिष्ट समाज, संघ; जात (या अर्थी पूर्वशब्दाशी समास होऊन उपयोग). ३. राष्ट्र; देश; राज्य; प्रांतः 'प्रौढ होतां संपूर्ण लोक आले खरेच

उदयाला।'-ऐपो ३०४. ४. राजे, सरदार वगैरेंजवळ किल्ल्याच्या इ. संरक्षणासाठी ठेवलेली माणसे, कुमक; सैन्य. ५. जग; भुवन. ६. परका माणूस; तिऱ्हाईत, अनोळखी मनुष्य. ७. माणूस; इसमः 'जो दाखवील मजला कृष्णार्जुन तो न लोक सामान्य।'-मोकर्ण २६.१८. ८. जगाचे, विश्वाचे भाग. उदा. त्रिभुवने, सप्तलोक. ९. सद्गती; स्वर्गलोक; मरणोत्तर चांगली अवस्था. १०. प्रदेश; ठिकाण.[सं.] (वा.) **लोकांची घरे, दारे पुजणे** - सारखे लोकांच्या घरी किंवा या घरातून त्या घरात असे भटकणे.

लोकऋण न. कर्जरोख्यांच्या द्वारे सरकारने लोकांकडून घेतलेले कर्ज.

लोककथा स्त्री. १. दंतकथा; लोकांत प्रचलित असलेली, पण ऐतिहासिक आधार नसलेली गोष्ट; कल्पित, परंपरागत गोष्ट. २. एक प्रकारचे वाङ्मय. पूर्वकाळापासून लोकांच्या तोंडी असणाऱ्या गोष्टी, कहाण्या.

लोकगंगा स्त्री. लोकसमुदाय; समाजः 'जातगंगेला व लोकगंगेला भ्यालें पाहिजे.'-भाऊ १९.

लोकगान-गीत न. खेडवळ लोकांचे गाणे; मौखिक परंपरेने जतन केलेले गीत.

लोकडी स्त्री. एक सदाहरितपर्णी झुडूप. (झाडी) [सं. लोह]

लोकतंत्र न. लोकमत; जनतेचा कल, प्रवृत्ती.
वि. लोकानुवर्ती; लोकांना जबाबदार, लोकांनी चालवलेले.

लोकत्रय न. तीन लोक; स्वर्ग, मृत्यू व पाताळ.

लोकधार्जिणा वि. १. लोकमताला मानून वागणारा (परंतु स्वतःच्या किंवा धन्याच्या हिताबद्दल निष्काळजी); स्वतःपेक्षा, स्वकीयांपेक्षा लोकांच्या हिताला जपणारा. २. लोकाभिमुख; लोकांची काळजी करणारा.

लोकनाट्य न. उघड्यावर, रंगमंचाशिवाय आणि पडदे, विंग्ज न लावता लोकांनी केलेले नाटक.

लोकनीति(ती)-परी पहाः **लोकरीत-ति**

लोकनुत वि. लोकांकडून प्रशंसा केला गेलेला.

लोकनृत्य न. परंपरागत समूहनृत्य.

लोकपण न. लौकिकत्वः 'म्हणौनि न जूझणें। म्हणसी तें वायाणें। ना मानूं लोकपणे। लोकदृष्टीसि इहीं।' - ज्ञा १८.१२७७.[सं. लोक + म.पण]

लोकपक्ष पु. लोकांची बाजू; प्रजापक्ष. याविरुद्ध राजपक्ष, सरकारपक्ष.

लोकपाल-ळ पु. १. राजा; प्रजेचा पालनकर्ता. २. इंद्र, यम इ. लोकांचा स्वामी. ३. नागरिकांच्या उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्यांविरुद्धच्या तक्रारींसंबंधी चौकशी करण्यासाठी सरकारने नेमलेला अधिकारी.

लोकप्रवाद पु. लोकांत पसरलेली वदंता, बातमी (वाईट अर्थी).

लोकप्रवाह पु. सर्वसाधारण चालरीत, वागणूक; लोकरीत.

लोकबंधु-धू पु. १. लोकांचे हित करणारा. २. सूर्य.

लोकबाह्य वि. १. (लोकांच्या सामान्य वागणुकीहून किंवा समजुतीहून निराळा) विचित्र; विलक्षण; चमत्कारिक. २. लोकांना प्रिय नसणारे.

लोकभाषा स्त्री. १. सामान्य जनतेची भाषा, बोली. २. वाक्प्रचार; बोलण्यातील भाषा. ३. अडाणी भाषाप्रयोग; असंस्कृत, व्याकरणाचे नियम नसणारी भाषा.

लोकमत न. सामान्य जनसमूहाचा अभिप्राय.

लोकमर्यादा स्त्री. १. जनरूढी; पडलेली वहिवाट, पद्धती. २. लोकलज्जा. ३. लोकांविषयीचा आदरभाव.

लोकमान्य वि. १. लोकांना मान्य, प्रिय. २. लोकांचा पुढारी.

लोकर स्त्री. १. बकरी, मेंढरे इ. च्या अंगावरील मऊ केस. २. शरीरावरील लव. ३. आंब्याच्या बाट्यावरील काथ्यासारखा भाग, रेषा.

लोकराजक, लोकराज्य पहाः **लोकशाही**

लोकरीत-ति स्त्री. लोकांची वागण्याची पद्धत; जनरीतीरिवाज; सामान्य वागणूक. [सं. लोम]

लोकल वि. स्थानिक; ठरावीक मर्यादेच्या आतील. [इं.]
स्त्री. मोठ्या शहरातून लोकांची ये-जा करणारी स्थानिक आगगाडी.

लोकलज्जा-लाज पहाः **लोकमर्यादा**

लोकलेखा पु. रिझर्व्ह बँक व स्टेट बँक अशा बँकांतून असणारे सरकारी खाते.

लोकलोकपाळ पु. अव. १. देशाचे किंवा समाजाचे पुढारी लोक. २. राजा व त्याचे अधिकारी (लवाजम्यासह). ३. फौज; शिपाई.

लोकवस्ती स्त्री. गावात वस्ती करून राहणारे लोक.

लोकविद्या स्त्री. १. समाजशास्त्र.-मसाप २.२१९. २. अलिखित, पण लोकांत परंपरेने चालत आलेल्या दंतकथा, गाणी, नृत्ये, चालीरीती इ. चा अभ्यास.

लोकशाही स्त्री. लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी लोकांच्या हितासाठी चालवलेला राज्यकारभार.

लोकसत्ताक वि. लोकांची सत्ता असलेले; राजा नसून लोकांकडून राज्यकारभार चालवणारी (शासनपद्धती).

लोकसभा स्त्री. लोकांनी प्रत्यक्ष निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे संसदेतील कनिष्ठ सभागृह .

लोकसमजूत स्त्री. १. सर्वसाधारण समजूत. २. (एखाद्या वस्तू किंवा व्यक्तीविषयीचे) लोकांचे यथायोग्य ज्ञान. ३. केवळ लोकांचे समाधान पाहणे.

लोकसमूह पु. (मा.शा.) एका ठिकाणी राहणारा, एक धर्म-एक संस्कृती किंवा एक देश मानणारा समाज.

लोकसंख्या स्त्री. एका विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या लोकांची संख्या.

लोकसंख्या आरेखन लोकसंख्येत होणारे बदल, तसेच परिवर्तनांचा संख्याशास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणारी विज्ञानशाखा; (इं.) डेमोग्राफी.

लोकसंख्येची घनता विशिष्ट क्षेत्रातील प्रत्यक्ष लोकसंख्येची दर चौ. कि.मी. ची सरासरी.

लोकसंगीत न. सामान्य लोकांमध्ये परंपरेने चालू असलेले संगीत.

लोकसंग्रह पु. समाजव्यवस्थेचे, लोकसंस्थेचे रक्षण; अनेक अनुयायी मिळवणे; स्वतःला निराळ्या रीतीने वागण्यास अडचण वा निर्बंध नसतानाही लोकांनी आचारभ्रष्ट होऊ नये म्हणून स्वतःच्या इच्छेपेक्षा आचारांना प्रमाण म्हणून स्वीकारून लोकांची एकजूट राखणेः 'तया लोकसंग्रहालागीं। वर्ततां कर्मसंगी। तो कर्मबंधु आंगीं। वाजेलना।'-ज्ञा ३.१७५.

लोकसंपादणी स्त्री. लोकांची मने अनुकूल करून घेणे; लोकांची खुशामत.
लोकसाहित्य न. लोकांच्या तोंडी परंपरेने असणारे कथात्मक किंवा गीतात्मक वाङ्मय. उदा. ठकसेनाच्या गोष्टी, कहाण्या इ.
लोकसिद्ध वि. लोकांमध्ये रूढ असलेले; प्रचलित; वहिवाटीत असणारे.
लोकसेना स्त्री. नेहमीच्या सैन्याला पूरक अशी नागरिकांची तयार केलेली फळी.
लोकसेवक पु. सरकारी नोकर.
लोकसेवा आयोग सरकारी नोकरीत भरती करताना अर्जदारांपैकी योग्य व्यक्तींची निवड करण्यासाठी नेमलेले मंडळ.
लोकाचार पहाः **लोकरीत**
लोकाट न. एक झाड. हे मूळचे चीन व जपानमधील आहे. याची लागवड उत्तर हिंदुस्थानात होते. फुले सुवासिक व फळे आंबटगोड असतात.
लोकातीत वि. लोकावेगळे; अलौकिक.
लोकाधिकार पु. केंद्र सरकार, राज्यसरकार, स्थानिक सरकार व जनता यांच्यातील परस्परात्मक संबंधांविषयीचा कायदा.
लोकान्त पु. चार लोकांत असणे ('एकान्त'चा विरुद्ध): 'एथ कवणु गा लोकान्तु असे?'-लीचउ १. [सं.]
लोकापवाद पु. लोकांनी केलेली निंदा; लोकप्रवाद.
लोकायत न. (तत्त्व.) चार्वाक दर्शन; भौतिकवाद. [सं.]
लोकालोक पु. सप्तद्वीपात्मक पृथ्वीला तटबंदीप्रमाणे असणारा पर्वत.
लोकालोकी क्रिवि. १. तिऱ्हाइताकडून; तिऱ्हाइतामार्फत. २. विशेष पुरावा नाही अशा प्रकारे लोकांच्या तोंडून ऐकलेले.
लोकांतर न. परलोक; मृत्युलोकाहून निराळा (स्वर्गादी) लोक.
लोकांती क्रिवि. लोकांमध्ये; जाहीर रीतीने.
लोकी पु. दुध्या भोपळा. (माळवा) [हिं. लौकी]
लोकेषणा स्त्री. १. लोकांनी आपल्याला चांगले म्हणावे अशी इच्छा. २. स्वर्गादी लोकांच्या प्राप्तीची इच्छा. २. लोकांमधील चांगली किंवा वाईट प्रसिद्धी. [सं.]
लोकोक्ती स्त्री. १. म्हण. २. वाक्प्रचार; ज्यांचा रूढ अर्थच घ्यायचा, शब्दशः अर्थ घ्यायचा नाही असे शब्द समुच्चयाने. ३. (साहित्य.) ज्या वाक्याला वाक्प्रचाराने चारुता आली आहे असे वाक्य.
लोकोत्तर वि. अलौकिक; असामान्य.
लोकोद्धार पु. १. मानवजातीचा उद्धार, तिची प्रगती. २. मानवांची जननमरणाच्या फेऱ्यातून केलेली सुटका, सोडवणूक; मोक्ष.
लोकोपकार पु. केवळ लौकिक जपण्यासाठी करण्याचा शिष्टाचार; केवळ लोकांची मर्जी राखण्यासाठी केली जाणारी कृती.
लोखंड न. एक कठीण, चिवट, उष्णतावाहक धातू; लोह. रंग गर्द करडा किंवा काळा. याचे तापवून ठोकून पत्रे व तार काढतात. याला हवापाण्याने गंज चढतो. [सं. लोहखंड; फ्रेंजि. लोलो] (वा.) **लोखंडाचे चणे खाणे** – खडतर तपश्चर्या करणे; फार कष्ट सोसणे. **लोखंडाचे चणे खावविणे, चारणे** – आत्यंतिक जुलूम करणे.
लोखंडकाम न. १. घर, यंत्र इ. मध्ये लागणारे लोखंडाचे भाग समुच्चयाने; लोखंडी सामान. २. लोहारकाम.
लोखंडाची फणी वस्तराः 'तिच्या डोक्यावर लोखंडाची फणी फिरवावी.'- आगर ३.१९७.
लोखंडी स्त्री. १. लोखंडाची कढई; काहील. २. एक वेलीसारखे झुडूप. वि. १. लोखंडाचा बनवलेला. २. (ल.) कठीण; लोखंडासारखा टणक, मजबूत (शरीराचा बांधा, हाडपेर इ.). ३. गाठी असणारे व कठीण (लाकूड). ४. फार आग करणारा, कमी न होणारा (ताप). ५. जाडाभरडा; कठीण; मजबूत; टिकाऊ.
लोखंडी कडबा अरगडी जातीच्या जोंधळ्याचा कडबा.
लोखंडी छाप छापण्यासाठी केलेले शिशाचे ठसे. याउलट शिळाछाप.
लोखंडी तगर तगर या फुलझाडाची एक जात. याच्या फुलाला वास नसतो व फुले ताठ असतात.
लोखंडी लास (चर्म.) चामडे ठोकण्याची ऐरण.
लोखंडी हळद कठीण व तांबड्या रंगावर असलेली हलकी हळद.
लोच स्त्री. लाच. (गो.)
लोच स्त्री. मधुरता; गोडवा; आकर्षकता.
लोचका पु. भाताचे एक वाण. (झाडी)
लोचट-ड वि. १. लवकर न तुटणारा; चिवट; वातड; तुटता तुटत नाही अशी (भाकरी, पोळी इ.). २. लवचीक; वाकणारा. ३. (ल.) कितीही झिडकारले, रागावले तरी लगट करणारा किंवा बोलायला येणारा निर्लज्ज माणूस.
लोचण स्त्री. न्हाव्याचा केस उपटण्याचा चिमटा. [सं. लुच्]
लोचदार वि. मधुर; गोड; आवडणारा.
लोचन पु. डोळा. [सं.]
लोचनावर्त पु. घोड्याच्या भुवईखाली असणारा भोवरा.
लोचा पु. बनावट रेशमाचा गाळ.
लोचा पु. निकालात न निघालेला व त्रासदायक होणारा वाद, हिशोब इ.
लोट पु. १. पाणी, वारा इ. चा (आणि यावरून माणसे, प्राणी इ. चा) एकदम आणि जोराने आलेला मोठा प्रवाह, लोंढा, समुदाय किंवा टोळी; जोराची पुढे येणारी लाट. २. गतिमान पदार्थाच्या गतीचा जोर; गतिमान वस्तूने दिलेला धक्का. ३. हरएक प्रकारची कामे, काळज्या इ. चे मनावर आलेले दडपण. ४. वक्तृत्वाच्या ओघाचा जोर. ५. (ल.) (आंबे, फणस इ. ची) समृद्धी; विपुलता; लयलूट. ६. लोटांगण; नम्र होणे. (क्रि. घेणे) ७. लहान ओढा, नाला; प्रवाह. (व.,ना.)
लोट, लोहट पु. पोहरा; विहिरीतून पाणी काढण्याचे तांब्याचे भांडे. (को.) [सं. लोहघट]
लोटका-के पु. न. मातीचे लहान मडके, भांडे.
लोटगाडा पु. सामान भरून ढकलत नेण्याची हातगाडी. (सातारा)
लोटण पु. एक प्रकारचे कबूतर. [हिं.]
लोटण स्त्री. सांबराची जंगलातील लोळण्याची जागा. (झाडी) [सं.]
लोटण पु. जमिनीवर लोटत-लोटत जावे अशी शिक्षा झालेला मनुष्य.
लोटणचाल स्त्री. एक प्रकारची घोड्याची चाल.
लोटणदिवा पु. कितीही हलला, डोलला तरी न पडणारा किंवा न विझणारा असा सांगाड्यात बसवलेला दिवा.

लोटणा पु. खराटा; झाडणी; केरसुणी.

लोटणे सक्रि. १. (एखादी वस्तू) ढकलणे, जोराने पुढे रेटणे. २. जमिनीवरून (चाक इ.) त्याच्या आसाभोवती फिरवत ढकलणे किंवा पुढे दडपणे. ३. बंद करणे; (दार) जोराने लावणे. ४. (दिवस, काळ इ.) जाणे, घालवणे; कष्टाने काळ कंठणे. ५. (खाद्य, पेय, औषध नाखुषीने, कष्टाने) घशाखाली घालणे. ६. (हत्ती, घोडे, सैन्य इ. चा) शत्रूवर एकदम घाला पडणे; हल्ला करणे. ७. दूर करणे, सारणे (केर इ.).

अक्रि. १. ढकलले जाणे. २. जोराने घुसणे, वाहणे; पुष्कळ प्रमाणात जमणे. ३. (काळ, वेळ) निघून जाणे, संपणे. ४. (भिंत, घर) कोसळणे; ढासळणे. ५. सर्व शक्ती एकवटून जोराने (शत्रूवर) तुटून पडणे. ६. (अश्रू) जोराने वाहणे, येणे; (नदी, लोंढा इ.) दुथडी भरून वाहणे. ७. काळेकुट्ट व वावटळीचे ढग येणे; जोराचा पाऊस येणे. ८. (धान्य, फळे, पीक इ.) भरपूर येणे; अतिशय पिकणे; लयलूट होणे. ९. अंथरूणावर पडणे, लवंडणे; निजणे. १०. लोटांगण घालणे. ११. तोडून टाकणे; तोडणेः 'आणि नित्यादिक जें असें। तें येणें फळत्यागें नासे। शिर लोटलिया जैसें। येर आंग।'-ज्ञा १८.१२८. १२. पालटणे; बदलणेः 'परी मनोधर्मु न लोटे। विकारविलाहि।'-ज्ञा २.४१. १३. मोजणे; मोजून टाकणेः 'बाप दुःखाचें केणें सुटले। जेथ मरणाचे भरे लोटले।'-ज्ञा ९.४९६. १४. मरणे; जाणेः 'येवढें अहोरात्र जेथिंचे। तेणें न लोटती जे भाग्याचे। देखती ते स्वर्गींचे। चिरंजीव।'-ज्ञा८.१५७.

[सं. लुठ्; प्रा. लोट्ठ; हिं.]

लोटपोट स्त्री. १. लोळण. २. बेसुमार मौज; आनंद; हशा; खिदळणे इ. चाळे किंवा क्रीडा. ३. पूर्ण तृप्ती किंवा समाधान. ४. कसेबसे काम रेटण्याची क्रिया. ५. वैपुल्य; चंगाळी. ६. नृत्य, गीत, वक्तृत्व इ. पाहून किंवा ऐकून होणारी तल्लीनता, एकाग्रता किंवा करमणूक. ७. एखाद्या वस्तूच्या दोन्ही बाजू. (वा.) **०करणे, होणे** - हसून-हसून मुरकुंडी वळणे, पोट दुखू लागणे.

लोटलोट स्त्री. लोटणे; गडबडणेः 'होत लोटलोट आपटले।'-दावि १२३.

लोटा पु. घराचा ओटा. (हेट., कु.)

लोटा-ट्या पु. १. रहाटगाडग्याच्या माळेला बांधण्याचे मातीचे भांडे. २. विशिष्ट आकाराचे तांबे, पितळ इ. धातूचे भांडे, तांब्या, गडवा, तपेली इ.; मोठी लोटी. [क. लोटो; हिं.; सं. लोहघट]

लोटाबाडगी-बासन स्त्री. न. १. गरिबाघरची स्वयंपाकाची भांडीकुंडी. २. स्वयंपाकाची तयारी. उदा. चुली सारवणे इ.

लोटालोट-टी स्त्री. १. एकमेकांनी एकमेकांना लोटणे, ढकलणे. २. (ल.) एकमेकांवर कामांची कोलवाकोलवी. ३. काम, उद्योगधंदा कसाबसा करणे.

लोटाळण-णे, लोटणे न. लाटणे (पोळी इ. लाटण्याचे). (व.)

लोटांगण न. १. देवापुढे, साधुपुरुषापुढे किंवा राजा इत्यादींच्या पुढे नम्रपणाने लोळणे; साष्टांग नमस्कार. २. ईश्वरादी प्रीत्यर्थ आडवे पडून चक्राकार लोटत जाणे; असे लोटत जाताना होणारा फेरा. (असे लोटत तीर्थक्षेत्री गेल्याने पुण्य लाभते अशी समजूत आहे.) ३. एखादी वस्तू उंचावरून ढासळून गडगडत खाली येताना तिचा स्वतःभोवती होणारा प्रत्येक फेरा. [सं. लोट+अंकन]

लोटिंगो पु. झाडांचे हात-हात तुकडे करून जंगलातून शहरात आणणे. (गो.)

लोटी स्त्री. १. तपेली; लहान तांब्या, लोटा; विशिष्ट आकाराचे तांबे, पितळ इ. धातूचे पाणी ठेवण्यासाठी किंवा पिण्यासाठीचे भांडे. २. तीर्थकुंड.

लोठा-ठ्या १. वि. लठ्ठ; अगडबंब; धष्टपुष्ट; मजबूत; धिप्पाड (माणूस, लाकूड, पशू इ.). २. लट्ठू; लुब्धः 'देवमुनी सर्व ब्रह्मादिक लोठे। पंढरीये पेठे प्रेमपिसे।'-निगा २१९.

लोठाश्रम पु. १. कोणीही अगडबंब, लठ्ठ व मूर्ख मनुष्य; धटिंगण; उच्छृंखल, आश्रमहीन माणूस. २. सडेसोट, ज्याच्यामागे बायका-मुले असा व्याप नाही असा मनुष्य.

लोड-ढ न. पु. १. टेकण्यासाठी केलेला लांब आणि वाटोळा तक्क्या. २. तुरपून शिवले असता होणारी वळकटी; तुरपून घातलेली शिवण; गोट. ३. सुताराच्या सामत्याची मूठ.

न. पाभर, कुळव इ. औताचाच भाग असणारे लाकूड. यात जुंबाचा दांडा अडकवतात; वखर, कुळव यांचे दिंड. [सं. लोट; क. लोडु]

लोडणी स्त्री. दवडणे; घालवण्याची क्रियाः 'सात घटिकां पुढें तयांची लोडणी। इंद्रियें गोठणी सर्वं येती।'-ब ११२.

लोडणे न. सुतारांचे कोरण्याचे, खोदण्याचे किंवा कातण्याचे हत्यार.

लोडमदान् वि. लोढण्यासारखा असणारा मनुष्य. (व.)

लोडलोडी स्त्री. वराच्या गळ्यातील गाठी असलेली कापडाची माळा. (झाडी)

लोडा वि. लोखंडी. (खा., भिल्ली)

लोडिगा पु. लाकडाचा ओंडा. (को.)

लोडी पु. (सोनारी) सफाई, पॉलिश करण्याचा दगड.

लोडेलूट पहाः **लवडेलूट**

लोढणे सक्रि. (कापसातून) सरकी काढणे; कापूस विंचरणे.

लोढणे-णा न. पु. १. ओढाळ गुराच्या गळ्यात अडकवलेले लाकूड. २. (ल.) प्रतिबंधक गोष्ट; लचांड; जोखीम. ३. बेढब व जड असा दागिना. ४. मालाच्या ओझ्याने गाडी उलथून पडू नये म्हणून देतात ते टेकण. (व.) [सं. रोधन]

लोढणे सक्रि. १. पुष्कळ अभ्यास, परिशीलन करणे; शिकणेः 'तो न पढो कां ब्रह्मसूत्र। न लोढो सर्वं शास्त्र।'-ज्ञा १७.८५ २. ढवळणे. [सं. आलोडन]

लोढा पु. वरवंटा; चटणी इ. वाटून बारीक करण्याचा गोल, लांबट दगड. (काशी) [सं. लुठ्]

लोढा पु. गुळणी; घोटः 'मुखी रक्त लोढे खोटी।'-वेसीस्व १०१.

लोण न. एक कापडाची जात.-मुव्या १२३.

लोण स्त्री. १. खाऱ्या पाण्याच्या आश्रयाने खाडी इ. च्या काठी रुजणारे एक प्रकारचे गवत. २. लवण; मीठ. ३. जमिनीतील क्षाराचा अंश. ४. सिंध प्रांतातील उमरकोट व शहाबंदर येथील एका विशिष्ट झाडाच्या राखेपासून तयार केलेला पापडखार. ५. (ल.) उतारा; ओवाळणी.

[सं. लवण; प्रा. लोठ; गु. लुण; सिं. लूणु; प. लूण] (वा.) ० **उतरणे, करणे** – दृष्ट काढणे; मीठ-मोहऱ्या ओवाळून टाकणे.

लोण न. आट्यापाट्यांच्या खेळात सगळ्या पाट्यांतून निघून जाऊन पलीकडची थोडीशी माती परत आणणे; अशी परत आणलेली माती. (क्रि. आणणे, देणे, येणे). अशी माती आणली म्हणजे डाव जिंकला असे समजण्यात येते. [सं. लवण] (वा.) ० **बारगळणे** – एखादा नियम उल्लंघिल्यामुळे निरुपयोगी होणे किंवा फुकट जाणेः 'ती शास्त्रोक्त मर्यादा उल्लंघिली कीं लोण बारगळलें.' – चिपळूणकर. **मागून आलेले लोण पुढे पोचविणे**– (आट्यापाट्यांच्या खेळात एखादा गडी सगळ्या पाट्यांतून पार जाऊन परत यायला निघाला म्हणजे तो लोण घेऊन येऊ लागला असे म्हणतात. हे लोण तो वाटेतील गड्यांना शिवून देतो. त्यावरून) मागून आलेली चाल पुढे चालवणे.

लोणकढा वि. ताजा; अगदी नवा; कोरा करकरीत; नवीन (अगदी ताज्या कढवलेल्या लोण्याप्रमाणे).

लोणकढी, लोणकढी थाप-वार्ता-गोष्ट, लोणकढे वर्तमान वेळेनुसार ठेवून दिलेली थाप; खोटी बातमी; गमतीखातर आणि गंभीर मुद्रेने सांगिलेली खोटी गोष्ट.

लोणकढे तूप शुद्ध लोणी कढवून तयार केलेले ताजे, साजूक तूप.

लोण(णी)काप्या वि. बोथट, धार नसलेला (चाकू, सुरी इ.).

लोणचे न. १. आंबे, लिंबे इ. चिरून त्यात मीठ, मोहरी, हिंग इ. घालून खारवून केलेले तोंडीलावणे. २. दोन्ही बाजूंकडून खेळणारा गडी; लोणसान. (खा.) [सं. लवण]

लोणच्या वि. सालीला जाड व आंबट असा (आंबा). (याचे लोणचे जास्त दिवस टिकते.)

लोणट वि. लोण्याच्या चवीचे किंवा वासाचे.

लोणट न. ज्या ठिकाणी लोण नावाची झाडे पुष्कळ होतात ते ठिकाण.

लोणणे सक्रि. घोटणे; घाटणे; डाळ शिजल्यावर लोण्यासारखी मऊ करणे.

लोणपाट्या (स्त्री. अव.), **लोणप(पा)ट** न. १. आट्यापाट्या; मृदंगपाट्या. २. (फक्त शेवटचा शब्द) खेळातील सरशी; जय.

लोणमांस न. मांसापासून शिजवून तयार केलेला पदार्थ.-गृशि २.९७.

लोणमांसाचा रस्सा सागोती बारीक चिरून त्यापासून तयार केलेले मांस.-गृशि २.५०.

लोणवाण न. लग्नापूर्वी केला जाणारा एक शुभविधीः 'लोणवाण केळवाण मूळ न्हाणेंयाची आइती करीति'-मधपू ७४.

लोणवी स्त्री. लवणाची खोलगट जागा. समुद्राचे पाणी पूर्वी भरत असून नंतर गाळाने भरून आलेली जागा. हीत मीठ पिकते.

लोणस वि. १. कसदार; ज्यात लोण्याचा अंश पुष्कळ आहे असे (दूध, दही). २. जिच्या दुधापासून पुष्कळ लोणी मिळते अशी (गाय, म्हैस इ.).

लोणसणे न. लोणचेः 'भाकरीः तुरीः लोणसणें'-लीचपू ५७१. [सं. लवण+अशन]

लोणहरामी स्त्री. नमकहरामी; कृतघ्नताः 'लोणहरामी करावयाचें नाहीं.'-शिदि ४७.२१०. [सं. लवण+फा. हराम]

लोणा पु. १. एक प्रकारचा तांदूळ. २. जमिनीतील वगैरे क्षारांश. ३. अंगकांती; चेहऱ्यावरील टवटवी; जनावरांना यथेच्छ खाणे-पिणे इ. मिळाल्यामुळे त्यांच्या अंगावर येणारा तजेला. ४. ओलीसारखा जमिनीवर येणारा मिठाचा विकार. (जमीन किंवा माती यांतील क्षारांशामुळे जमीन, भिंत कधीच खडखडीत वाळत नाही अशी स्थिती.)

लोणार न. मिठागर.

लोणारणे अक्रि. भिंत, जमीन यांना लोणा चढणे.

लोणारी पु. लाकडे जाळून त्यांचे कोळसे किंवा चुनकळ्या करण्याचा धंदा करणाऱ्यांची किंवा लाकूड, कोळसा, चुनकळ्या विकणाऱ्यांची जात; त्या जातीतला मनुष्य.

लोणांबा, लोणां(णं)बी पु. स्त्री. आंब्याच्या कैऱ्या उकडून व मिठाच्या पाण्यात मुरवून केलेले तोंडीलावणे; उकडांबा; खारवलेल्या कैऱ्या. [सं. लवण + म.आंबा]

लोणिया स्त्री. लहान आंबोती; चांगेरी; अंबष्टा; चुका ही पालेभाजी.

लोणी न. दूध, दही घुसळले असता निघणारा स्निग्धांश. [सं. नवनीत; प्रा. नोणीअ; पं. नौणी; हिं. नौनी] (वा.) ० **खाऊन ताक देणे** – स्वतःचा स्वार्थ साधून मग परार्थ पाहणे; मुख्य भाग आपण घेऊन निःसत्त्व व किरकोळ स्वरूपाचा भाग उदार होऊन दुसऱ्याला देणे. ० **लावणे** – खुशामत, मनधरणी, मिनत्या करणे. **लोण्याची कढी करणे** – लोणी वाटेल तितके किंवा विपुलतेने वाढणे. **लोण्याची सवत न साहणे** – शांत आणि लोण्याप्रमाणे मऊ अशीही सवत असह्य होणे; विरोध सहन न करणे. **लोण्याच्या पुऱ्या तुपात तळणे** – अशक्य गोष्टी शक्य होणे; न घडणाऱ्या गोष्टीची चिकित्सा करणे. **लोण्यात दात फुटणे** – अत्यंत सौम्य स्वभावाचा मनुष्य असभ्य, रागीट व कठोर होणे. **लोण्याला-स दात फुटणे** – आपण ज्याचे लालन, पालन, पोषण केले त्याने आपणाशी कृतघ्नपणे किंवा अमर्यादपणे वागू लागणे.

लोण्याचे आयसिंग लोण्यापासून चोटी चुरम्याची तुकडे पाडून केलेली बर्फी.-गृशि १.४४४.

लोत स्त्री. एक औषधी झाड व त्याचे मूळ. याच्या फुलाला शेवाळे म्हणतात.

लोथ-ध स्त्री. १. मुडदा; प्रेत; शव. २. माजून पुष्ट झालेले शरीर; धूड; अवजड, स्थूल शरीर; अगडबंब मनुष्य, पशू. ३. फार मोठे फळ (फणस, चिबड, भोपळा इ.). ४. मोट; गाठोडे; पिशवी; कोथळा. ५. ओझे. ६. मोठा ठोकळा; फत्तर. [हिं. लोथाह] (वा.) **लोथी पाडणे** – १. समूळ नाश करणे; सैन्याचा धुव्वा उडवणे. २. मृतप्राय होईपर्यंत एखाद्याला खूप कुबलणे.

लोथा पु. तिफण जड व्हावी म्हणून पोत्यात ढेकळे भरून ठेवलेले ओझे. -लोसाको.

लोथेला, लोथ्या वि. स्थूल शरीराचा; दोंद सुटलेला; गलेलठ्ठ. (व.)

लोद-ध पु. (ढोरांचा धंदा) कोकणातील एका झाडाची साल. (लाखेचा रंग पक्का व चमकदार होण्यासाठी लोद टाकतात.) [सं. लोध्र-ध]

लोदळणे क्रि. भरपूर पीक येणे; असे पीक जमिनीत सांडून त्यावर पाऊस

पडल्यामुळे दाण्याला मोड येणे.

लोदा–दू पु. उत्तम अन्नाचा घास; पिंड; गोळा.

लोदी स्त्री. पठाणांची एक जात.

लोदु वि. नीच.–राव्य २.२६.

लोद्या वि. नको असलेला; मनातून उतरलेला; तिरस्कृत; ज्याच्यावर राग आहे असा (मनुष्य). [सं. लुब्धक]

लोद्या वि. एक प्रकारची नाचणी.

लोध पहाः **लोथ**

लोधट वि. चिघळलेला; पातळ; लिबलिबीत (गूळ, कणिक, साखर इ.).

लोधडा, लोधा–दा पु. अगडबंब, धिप्पाड मनुष्य, पशू.

लोधणे अक्रि. १. लुब्ध होणे; चिकटणे; गुंतणेः 'संसारसुखाचेनि पढतमूर्ख। लोधोन पडती।'–दास ३.१०.३०. २. सवय लागणे; चटक लागणे; लालचावणेः 'अत्यंत लोधला पापिणी। अविद्येनें भुलविला।'–दास३. २.४०. ३. (ल.) घडणे; बनणे; तद्रूप होणेः 'जिव्हा लोधली रसें। कमळ सूर्यपर्णे।'– अमृ ९.३. ४. गाढ निजणेः 'तेथेंचि येक लोधले।'– गीता २.१३९८. [सं. लुब्ध]

लोधलेपणाने क्रिवि. लोभाने; लुब्ध होऊन.

लोधा पु. १. प्रेत; मुडदा. २. प्राण्याचे तोडून किंवा ओरबाडून काढलेले मांस; लचका.

लोधा पु. चिकट व मऊ गोळा; पातळ व चिघळलेला पदार्थ– गूळ, पातळ भात, कणीक इ.

वि. चिघळलेला; पातळ; बिलबिलीत; पाझरलेला. [सं.लोष्ट; सिं. लोदा]

लोध्या वि. पहाः **लोद्या**

लोध्र पु. न. एक वृक्ष व त्याची साल. हे वृक्ष कोकण, महाबळेश्वर, बंगाल व नेपाळ या प्रदेशात होतात. पाने बकुळीच्या पानांएवढी. उपयोग रंग व औषधे बनवणे या कामांत. याच्या तांबडा व पांढरा अशा दोन जाती आहेत. याला 'हुरा' असेही म्हणतात.

लोन, लोनचे कापड तागाचे किंवा कापसाच्या धाग्यापासून बनवलेले सुबक व टिकाऊ कापड.

लोनावळे न. ज्यापासून मीठ मिळते असे तळे.

लोनीया स्त्री. मीठ तयार करणारी जात.

लोप पु. १. गळणे; नाहीसे होणे; अभाव; नाश. २. प्रचारातून जाणे; रद्द होणे, पडणे. ३. बोलताना किंवा लिहिताना अक्षर, शब्द इ. गळणे, गाळणे इ.

लोपक वि.घातक; द्रोहीः 'जो गुरुलोपकाचा। पापी घडला।'–ज्ञा१३.६७४.

लोपणे अक्रि. १. लुप्त, नाहीसे, दिसेनासे होणे. २. प्रचारातून गळणे, जाणे. ३. लीन, एकरूप होणे; मिळून जाणे.

लोपविभ्रम पु. अनुल्लेखाची चूक.

लोपाचार पु. कोंबडे वगैरे बळी देणे. (कु.)

लोप्तुवाय स्त्री. कळकळ; अगत्य. (गो.)

लोफर वि. लफंगा; आवारा; लफडेबाज; गैरशिस्त. [इं.]

लोबान, लोबान–नी ऊद एक सुगंधी द्रव्य; ऊद; एका झाडाचा चीक. [हिं. लोबान]

लोबा(भा)नदाणी स्त्री. धुपाटणे.

लोभ पु. १. एखाद्या वस्तूच्या प्राप्तीची उत्कट इच्छा. २. हातचे जाऊ नये अशी इच्छा. ३. हाव; अधाशीपणा. ४. चिक्कूपणा. ५. प्रीती; कृपादृष्टी; ममता; मेहेरबानी.

लोभडचे क्रि. लोभ, प्रेम करणे. (गो.)

लोभणे अक्रि. लोभ करणे, सुटणे; एखाद्या वस्तूच्या प्राप्तीची इच्छा होणे.

लोभणे, लोभ(भा)वणे अक्रि. १. (मनुष्य, वस्तू इ. विषयी) प्रेम असणे; प्रेमाने ओढला जाणे. २. उत्कट आकांक्षा असणे; प्राप्तीची इच्छा होणे; एखाद्या वस्तूने आकृष्ट होणे.

लोभनीय वि. लोभ करण्यासारखा; स्पृहणीय; आकर्षक.

लोभापर वि. लोभयुक्त; ममताळू; कृपाळूः 'त्याज्यालागीं नोहावें। लोभापरीं।'–ज्ञा १८.१३३. [सं. लोभपर]

लोभाविष्ट, लोभाळू, लोभिष्ट, लोभी वि. १. हावरा; अधाशी; फार लोभ असलेला; एखादी वस्तू मिळण्याची व आपली एकही जाऊ न देण्याची आत्यंतिक इच्छा ठेवणारा. २. चिक्कू; कंजूष; कृपण; कवडीचुंबक.

लोभिया पु. लोभी मनुष्यः 'लोभिया दूरि जाये। परि जीउ ठेवांचि आहे।'– ज्ञा १३.४८६.

लोभी पु. व्याध तारा. पहाः **लुब्धक**

लोम न. पु. लव; अंगावरील केस. [सं.]

लोमपाद पु. केसाळ किंवा केसांसारखे पाय असलेला प्राणी. उदा. कोळी, माशी इ.

लोममाती स्त्री. चिकणमाती आणि वाळू यांच्या कणांच्या मधील आकाराचे कण असणारी माती.

लोमविलोम पु. वर्णसंकर.

लोमश वि. १. केसाळ (जनावर, अंग). २. लोकरीचे, केसांचे बनवलेले (वस्त्र, शालजोडी इ.).

लोमसा पु. १. विणलेल्या कापडाचे निघणारे धागे. २. आर्द्रतेमुळे मातीच्या भिंतीचे वर आलेले पोपडे किंवा खपल्या. (अहि.)

लोमहर्षक वि. रोमहर्षण; अंगावर रोमांच उठवणारे; पुलकित करणारे.

लोमूर न. एक लोखंडाचा प्रकार.– लोखंडीकाम. मॅरट२१.

लोयली स्त्री. गलबताचा एक प्रकारचा लहान नांगर; लंगर.

लोरन पु. सशाने मळलेली जागा. (झाडी) [सं.]

लोरी पहाः **लोळवडी**

लोल वि. १. हलणारा; अस्थिर; चंचल; झुलणारा; कापणारा. २. (ल.) अतिउत्सुक; अधीर; उतावीळ; आतुर. ३. लंपट; अधाशी; लोलुप; आसक्त; लुब्ध. ४. क्षणभंगुर; नाश पावणारे. ५. क्षुब्ध; अस्वस्थ. ६. लोळागोळा झालेला; पंख उपटल्यासारखा; असाहाय्य : 'रयत बिचारी लोल झाली उपटली पराला।'–ऐपो ४१२. [सं.लोल]

लोलक पु. दागिन्यांतील लोंबता मणी. हा बहुधा खाली जाड व वर निमुळता आणि लांबट असतो. [सं.]

लोलं(लिं)गत वि. आसक्त; लोभी; हावराः 'त्यासी कैचें समाधान।

लोलंगतासी।'-दास ३.१०.६२.

लोलं(लिं)गता स्त्री. १. आसक्ती; लोभ; हाव. २. चंचलताः 'लोलंगता नसे ज्ञानें धालेपणें।'-रामदास, अभंग (नवनीत, पृ.१६७).

लोला वि. १. निर्जीव होऊन लोंबत राहिलेला (अवयव, पान इ.). २. लुळा; अशक्त; निर्जीव; थोटा (मनुष्य, पशू). ३. (ल.) परतंत्र; असाहाय्य. ४. लंगडा; लुळापांगळा; अर्धांग झालेला.

लोला-ळा पु. १. घंटेचा लोढणा. हा घंटेच्या आतील बाजूवर आपटून आवाज होतो. २. घड्याळाचा लंबक. ३. घशात लोंबणारी पडजीभ; उपजिव्हा. ४. लचका.

लोलावणे अक्रि. आसक्त होणे.

लोलितकरण न. (नृत्य.) एकदा डाव्या बाजूला व एकदा उजव्या बाजूला अंचित हस्त करून रेचित करणे व त्यावेळी हात जिकडे असेल तिकडे डोके वळवणे. [सं.]

लोलितशीर्ष न. (नृत्य.) डोके चारी बाजूंना हलवणे. वेड, क्रोध, देहभान नसणे, रोगग्रस्तता, मद्यपान केलेली अवस्था, ग्रहबाधा ह्या गोष्टी झाल्याचे दर्शविण्यास हा अभिनय करतात. [सं.]

लोलुप वि. अति उत्सुक; आसक्त; लुब्ध; उत्कंठित. [सं.]

लोलुपत्व, लोलुप्य न. लोभ; आसक्ती; लंपटपणा.

लोलो पु. १. बोंब. २. शब्दांच्या उच्चाराचा शुद्धपणा, योग्य ठिकाणी आघात देणे, विराम इ. कडे लक्ष न देता केलेले घोकणे, भाषण, वाचन, पठण वगैरे; सरासरी ग्रंथ घोकीत, पढत असणे. (क्रि. घालणे) (वा.) **० करणे** - भांडणे. **० घालणे** - भिकाऱ्याने लोचटपणाने तगादा करून भीक मागणे, उद्धटपणाने किंवा जोराने भीक मागणे.

उद्गा. गुरांना पाणी पाजताना गुराखी उच्चारतात तो शब्द. [ध्व.]

लोलो पु. छंद; नाद. पहाः **लो**

लोल्फ न. उनाड जनावराच्या गळ्यात बांधलेले अवजड लोढणे. (व.)

लोव पहाः **लव**

लोवथा पहाः **लोधा**

लोवसपण न. १. अजाणपण. २. कृपणता. ३. कुटिलपणाः 'कीं भीतरीं औदार्ये वसें। तेथ लोवसपण कांइसे।'-ऋ ९१.

लोवसू-स वि. कृपाळू; ममताळू: 'तो देव हृषिकेशू। जीवाकरणें लोवसूं।'-ज्ञाप्र ४४७.

लोवा(हा)ळ वि. दाट लोकरीचा; केसाळ.

लोवोंग स्त्री. पहार. (गो.)

लोष्ट पु. न.१. मातीचे ढेकूळ. २. लोखंडाचे कीट; गंज. [सं. लोष्ठ]

लोष्ठाशौच न. मलविसर्जनानंतर पाण्याच्या अभावी मलद्वार ढेकळाने पुसून स्वच्छ करणे. [सं.]

लोह न. १. लोखंड. २. लोखंडाचे केलेले शस्त्रः 'लोहाचे काळवखें पडिलें। फररां आकाशु गवसिलें।'-शिव ५८५. ३. लोहभस्म. ४. रक्तः 'राया राणिएंचा जाला। जरि घे लोहाचा कांटाळा।'-शिव ४७१. ५. सोने; सुवर्णरूप धन.

वि. १. तांबडा. २. लोखंडी. [सं.]

लोह पु. दगडी पाटी; लिहिण्याचा फळा, तक्ता. [अर. लौह]

लोहकार पु. लोहार. [सं.]

लोहकांत न. पु. १. पहाः **लोहचुंबक**. २. लोखंडाची एक जात. ३. ह्या जातीच्या लोखंडाचे औषधासाठी केलेले भस्म; तिख्याचे भस्म.

लोहकिट्ट न. १. लोखंडावरचा गंज; जळलेले लोखंड. २. मंडूर नावाचे औषधी द्रव्य. [सं.]

लोहचुंबक पु. लोखंडाच्या वस्तूला आकर्षित करणारा दगड; चुंबकीय क्षेत्र प्राप्त झालेल्या धातूचा तुकडा.

वि. (ल.) हट्ट धरून बसणारा; अनेक युक्त्या करणारा; दुसऱ्यापासून अपेक्षित गोष्ट घेतल्याशिवाय न सोडणारा (माणूस). [सं.]

लोहट-टी स्त्री. दगड, तुळया इ. जड सामान वाहण्याचा भक्कम गाडा.

लोहतुला-ळा स्त्री. १. लोखंडाची तागडी, तराजू. २. लोखंडी गज.

लोहदंड पु. १. लोखंडी गदा; पातकी लोकांना मारण्याची यमाची गदा. २. यम, शनी यांच्या शांतीसाठी ब्राह्मणाला देण्याचा लोखंडी सोटा, गज. [सं.]

लोहनाळी मोहनाळी प्रेमळपणा; मायाळूपणा; मार्दव; कोमलता.

लोहबंद-ध वि. सोनेरी. -शर.

लोहबंदी-भान-भाजी ऊद पहाः **लोबान**

लोहभस्म-मंडूर न. पु. लोखंडाच्या गंजापासून केलेले रसायन; लोखंडाचे प्राणिद्.

लोहमय वि. १. लोखंडाचा बनवलेला; लोखंडी. २. भयंकर; क्रूर.[सं.]

लोहमार्ग पु. आगगाडीसाठी घातलेला लोखंडी रुळाचा मार्ग.

लोहयुग न. इसवी सनापूर्वी १६०० ते १०४० पर्यंतचा लोखंडी शस्त्रे इ. बनवण्यास सुरुवात झाली तो काळ.

लोहव वि. लाल रंगाचे; तांबडेः 'लोहवीं वस्त्रें'-गोप्रच१२२.[सं. लोह]

लोहंकर पु. शेतीचे लोखंडी अवजारः 'लोहोः लोहंकरू घेववीला असे'-लीचउ १. [सं. लोह+कर]

लोहं(हां)गी, लव्हांगी, लोहंगी काठी लोखंडाचे खिळे व कड्या जागोजाग वसवून मारामारीसाठी केलेला सोटा, पहार.

लोहाभिसारिक न. विजय इच्छिणाऱ्या राजाने आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून अष्टमीपर्यंत करण्याचे एक कर्म. यात सर्व राजचिन्हे, शस्त्रे व अस्त्रे मंडपात ठेवून त्यांची स्थापना केल्यानंतर होम करायचा असतो. [सं.]

लोहार पु. लोखंडाचे खिळे, कोयते वगैरे बनवणारा कारागीर.

लोहारकाम न. लोखंडाच्या अनेक वस्तू करण्याचे लोहाराचे काम.

लोहारकी स्त्री. लोहाराचा धंदा.

लोहारसाळ-शाळा, लोहारकामठा स्त्री. १. लोहाराची काम करण्याची जागा; लोखंडी कामाचा कारखाना. २. लोहाराची भट्टी. [सं. लोहकार+शाला]

लोहित न. १. रक्त. २. लाली; तांबूसपणा.

वि. रक्तासारखे लाल; आरक्त; तांबूस. [सं.]

लोहितज्वर पु.गंभीर स्वरूपाचा सांसर्गिक रोग. खराब घसा, ताप, अंगावर लालसर पट्टे ही प्रमुख लक्षणे.

लोहिवा वि. तांबड्या रंगाचा; तांबडा; लाल.

लोहिवी स्त्री. तांबूसपणाः 'पुढां उपरति रागें लोहिवी। धर्ममोक्षाची शाखा

पालवी।'-ज्ञा १५.१९४.

लोही वि. तांबडे लाल; लोहित.

लोही स्त्री. पाणी तापवण्याचे लोखंडाचे भांडे; लोखंडी कढई: 'कनक गंगाळें निघालीं। लोह्या हांडे तपेली।'-वेसीस्व१४.३९.

लोही स्त्री. १. एक प्रकारचे रेशमी कापड. २. पहाट.[हिं.; सं. लोहित]

लोही स्त्री. १. मोहोर; सोन्याचे नाणे. २. द्रव्याची कढई.

लोहु, ल्हव-वु, लोव क्रिवि. हळूहळू. [सं. लघु]

लोहुलहान पहा : **लहुलुहान**

लोहे स्त्री. १. पेटी; तिजोरी: 'जैसी लोभियाचे हातीं। सांपडे अवचितीं धनलोहें।'-एभा ७.५७०. २. लोखंडी पात्र. [सं.लोह]

लोहो पु. लोभ; स्नेह; प्रेम; आकर्षण; लाहो. (देवीचा गोंधळ घालताना याचा उपयोग होतो.) [सं. लाभ]

लोहोदक न. ज्यात लोखंडाचा अंश आहे असे पाणी.

लोहोलोखंड न. लोखंडांची भांडी, हत्यारे इ. वस्तू.

लोहोंगरा पु. १. शिंतोडा. २. गळती. (झाडी)

लोळ पु. १. आगीचा झोत; जोराने पेटलेला आगीचा कल्लोळ; उसळलेला आगीचा डोंब; अग्नीच्या ज्वाळांचा भडका; गर्जत येणारी अग्नीची ज्वाळा. २. (मुंग्या, माशा इ. चा) दाट थवा, समुदाय, गोंगाट. ३. जळमट. (व.)

लोळ पु. १. लोळण्याची क्रिया; लोळण; दुःखातिशयाने गडबडा लोळणे. (याअर्थी रडण्याचा किंवा रडून लोळ घालणे किंवा घेणे असा शब्दप्रयोग करतात.) २. (ल.) (ताप, लोकांचा उपद्रव इ. मुळे) एखाद्याची झालेली दुरवस्था; थकवा; अतिशय दमल्याची स्थिती; भागोटा. ३. (लोथ-ध या शब्दाऐवजी असण्याचा संभव) लठ्ठ पोटाचे पोर; अगडबंब माणूस; घूस, उंदीर इ. मोठा प्राणी; धूड. ४. अव्यवस्थितपणे बांधलेला गठ्ठा; अव्यस्थित वस्तू, चिरगुटे, पोथ्या इ. ची रास. ५. काम, कारभार, कारखाना वगैरेंचा व्याप, पसारा. ६. चाळा; वेडेवाकडे कृत्य, वर्तन: 'वदवती न कवीसहि लोळ ते।'-वामन भामाविलास (नवनीत, पृ.९९).

लोळआकांत पु. १. मोठमोठ्याने ओरडणे; प्रचंड व भयंकर गर्जना; आक्रोश. २. जोराचा प्रयत्न; धडपड; अविरत श्रम. ३. आरडाओरड; क्षोभ; एखाद्या गोष्टीविषयीची सार्वत्रिक तक्रार; पटकी, अतिवृष्टी, दरोडे, महागाई इ. मुळे उत्पन्न झालेली परिस्थिती.

लोळकंड-कण स्त्री. १. लोळण; जमिनीवर गडबडा लोळणे (विशेषतः जरुरीचे काम असताना, बळजोराशी प्रतिकार करताना). २. एखाद्याचे मन वळवण्यासाठी त्याच्यापुढे लोटांगण घालणे. (क्रि. घेणे, मारणे.) ३. कुत्री, मांजरे इ. नी बागडताना एकमेकांवर उड्या मारणे, एकमेकांच्या अंगावर लोळण घेणे.

लोळकं(कुं)बणे, लोळकं(कुं)बा पहा: **लोंबकळणे, लोंबकळा** इ.

लोळगा पु. वायंगणे (उन्हाळी) भात करणें असल्यास त्यासाठी केलेल्या रोहापैकी निरूपयोगी रोह (रोप).-कृषि २३०.

लोळघोळ पु. १. (कागद, चिरगुटे, खाद्यपदार्थ इ. ची) कालवाकालव, कुसकरणी; घोटाळा; मिश्रण. २. हिशेब, जमाखर्च, कारभार इ. ची अव्यवस्था; घोटाळा. ३. मनाची अस्वस्थता. ४. पहा: **लोळण** १

लोळण-णी स्त्री. १. हट्टी, द्वाड मुलाने जमिनीवर लोळून व हातपाय आपटून केलेला गोंधळ. २. लोटांगण. ३. जबरदस्तीने ओढून नेले जात असता त्या माणसाचे जमिनीवर लोळणे; अव्यवस्थितपणे हातपाय आपटणे.

लोळणघोळण स्त्री. (रागाने किंवा उतावीळपणाने) गडबडा लोळणे.

लोळणफुगडी स्त्री. मुलींचा एक खेळ. यात मुली पायाचे अंगठे दोन्ही हातात धरून गडबडा लोळत जातात.-मखेपु २२०.

लोळणी स्त्री. श्वापदे लपण्याची जागा: 'भवती लोळणी पाहों लागली: ते लोळणी कांही देखती ना'-लीचउ ७५.

लोळणे अक्रि. १. जमिनीवर वगैरे वरचे अंग खाली व खालचे वर होईल अशा तऱ्हेने गडबडणे. २. अंथरुणावर निजलेल्या मनुष्याने निजलेल्या ठिकाणापासून अव्यवस्थितपणे कुशीवर वळून-वळून दूर जाणे. ३. नेसलेल्या वस्त्राचे सोगे जमिनीवर फरफटणे. ४. उपयोगी पडण्याच्या स्थितीत असून (वस्तू किंवा माणूस) काही उपयोग न केला जात असल्याने किंवा उद्योगधंदा न मिळाल्यामुळे रिकामा, पडून राहणे.

लोळणे घोळणे (खटला, कज्जा, गोष्टी, बेत इ. चा) सर्व बाजूंनी किंवा साधकबाधकपणे विचार करून वाटाघाटी, खल करणे; जोराने आपले मत मांडणे.

लोळपट, लोळपाटणी स्त्री. लोळणे; आजारामुळे आलेली पडून राहण्यासारखी स्थिती; अंथरुणावर पडून लोळणे; एखाद्या साथीने पुष्कळांना दुखणे येऊन लोळत पडण्याची स्थिती; आजारामुळे आलेली दुर्बलता; हीनदीनपणाची अवस्था.

लोळवडी स्त्री. निरनिराळ्या डाळींच्या चुरीच्या पिठाची लांबट वळवटी करून ती उकडल्यानंतर तिची केलेली वडी.

लोळव(वि)णे सक्रि. १. एखाद्याला लोळायला लावणे. २. (ल.) पाडणे; मारणे; चीत, पराभूत करणे. ३. लंबे करणे; अंगावर चाल करून आलेल्याला आपल्या ताकदीने ढकलून देऊन किंवा चोप देऊन जमिनीवर आपटणे. ४. लडबडवणे; माखणे; बुडवणे.

लोळसा पु. वेटोळे; कडे: 'उगा लोळसा घोळ मोठा करीतो।'-राक १.४.

लोळसावि(व)णे सक्रि. माती, वाळू इ. मध्ये वाटेल तसे किंवा दुखापत होईल अशा रीतीने लोळवणे. (को.)

लोळा पु. १. घड्याळ, घंटा इ. चा लंबक. २. पडजीभ. ३. पीठ, मांस इ. चा तोडून काढलेला लचका; लांबट गोळा.[सं. लोल] (वा.) ०**तोडणे** - १. आईबापांनी मुलीचे लग्न करून देऊन तिला दुसऱ्याच्या स्वाधीन करणे. २. (कृपणाने) पैसा खर्चणे. ३. एखाद्यावर खेकसून धावणे.

लोळी स्त्री. १. लहान घंटेचा लहान बारीकसा लोळा; लहान लंबक. २. डूल, झुंबर वगैरेचा लोंबणारा मणी; लोलक. ३. शेंबूड इ. चा घट्ट आणि लोंबता गोळा. ४. तोंडातील पडजीभ. ५. बैल, गाय यांच्या गळ्याखालचे लोंबते व पातळ कातडे. ६. लांबट आणि सारखा भरलेला फणस. ७. गूळ, मेण, पापडाचे भिजवलेले पीठ इ. पदार्थांची लांबोडी गोळी.

लोळी स्त्री. शेंबडाची धार. [क. लोळ = लाळ]

लोळी स्त्री. १. गाढवांना वगैरे येणारी लोळण्याची लहर; त्यांनी घेतलेली

लोळण. २. आळसामुळे, गुंगीमुळे, पेंग आल्यामुळे झालेली लोळण्याची इच्छा; पडून राहण्याची इच्छा.

लोळी स्त्री. मुलाचे लिंग. [क. लूली; पं. लुल्ल]

लोळी स्त्री. गलबताचा लहान नांगर.

लोळी स्त्री. कुदळ, खोरे इ. चे नेढे करण्यासाठी लागणारे लोखंड.

लोळुले न. मुलांच्या हाताच्या बोटात घालण्याचा दागिना.

लोळेबोळे पु. अव. लचके.

लोंग-गी-घ पहाः **लोंब**

लोंग स्त्री. लाख नावाचे धान्य. (को.)

लोंगर न. पु. १. केळ्यांचा घड, घोस; केळवंड. २. मोठी लोंग, मोठे कणीस. (राजा., कुण.)

लोंघळावि(व)णे सक्रि. चिखल, माती, राख वगैरेंत वस्त्र लोळवणे.

लोंच पु. उचलून पाय टाकण्याचा प्रकारः 'शिंगराच्या पुढील पायांत लोंच असा सिकवावा.'-अश्वप १.१९०.

लोंजारणे गोंजारणे लाड करणे; पाठीवरून हात फिरवणे.

लोंटी स्त्री. लहान तोंडाची मासोळी. (झाडी)

लोंढा पु. १. अकस्मात येणारा पाणी इ. द्रवपदार्थांचा लोट, प्रवाह; पूर. २. मोठी व जोराची पाण्याची लाट. ३. (ल.) धान्य, फळे इ. कोणत्याही वस्तूंची बाजार, शेत इ. मध्ये एकदम झालेली समृद्धी; अतिवैपुल्य. ४. गाव, देश इ. वर धाड घालण्यासाठी परगावाहून किंवा परदेशाहून आलेली लुटारूंची टोळी; यात्रा इ. प्रसंगाने एखाद्या स्थळी एकदम गोळा झालेले लोक. (वा.) **लोंढ्याबरोबर-सरसे वाहात जाणे** - समाजात मान्य असणाऱ्या रीतीने वागणे.

लोंदा (अहि.) पहाः **लोमसा** २

लोंपाट पु. शिवाशिवीचा खेळ.

लोंब, लोंबट-र-न स्त्री. भात, गहू, वरी, राळा, राजगिरा वगैरेचे कणीस; धान्याचा तुरा. [सं. लंब]

लोंबकळणी, लोंबकळा स्त्री. पु. लोंबकळत राहण्याची स्थिती; झोला; लोंबण.

लोंबक(का)ळणे अक्रि. १. लोंबणे; लटकणे; ओळंबणे; अधांतरी राहणे; लोंबत राहणे; वरच्या आधाराशी संबद्ध असा पदार्थ किंवा अशी वस्तू खालच्या भागाला आधार नसल्यामुळे अधांतरीच लटकत असणे; निराधार स्थितीत राहणे. २. (काही काम, कारभार) शेवटाला न जाता अपूर्ण अवस्थेत पडणे; अनिश्चित अशा मनःस्थितीत असणे.

लोंबट-ड स्त्री. १. नारळ, पोफळे इ. फळांचा घड, झुपका; समुदाय. २. उपद्रव; त्रास; झेंगट. ३. संकट; त्रास; अडचण. (को.)

लोंबण स्त्री. फळे, फुले लोंबणारा घड, घोस, बोजा; लोंबकळत असणारा समुदाय; नेसलेले लुगडे, धोतर इ.चा लोंबकळणारा भाग.

लोंबणी स्त्री. १. लोंबकळणी. २. कुचंबणा; संशयित अवस्था.

लोंबणे अक्रि. १. पहाः **लोंबकळणे** १,२. २. एखाद्या कामाविषयी साशंक असणे; एखादे काम धरता येत नाही व सोडताही येत नाही अशा कुचंबलेल्या अवस्थेत असणे. [सं. लंब; क. तोंगल]

लोंबती दरी मुख्य हिमनदीच्या तळावरून पाहिले असता उपनदी लोंबत असल्यासारखी दिसणारी दरी.

लोंबत्या वि. एखाद्याच्या मागे-मागे घोळ धरून फिरणारा; लोंबणारा; एखाद्याच्या अन्नावर पोसला जाणारा. (व.)

लोंबर (राजा.) पहा : **लोंबी**

लोंबी स्त्री. लोंबते कणीस; ओंबी; तुरा.

लोंबीझोंबी स्त्री. झटापट; जोराचा प्रयत्न; अनेक प्रकारांनी केलेली खटपट; आवेश; एखाद्या कामासाठी सोसलेले कष्ट.

लोंभे न. वाद; तंटा.

लॉकर पु. मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवण्याची जागा. [इं.]

लॉज न. पैसे देऊन, थोड्या दिवसांसाठी राहण्याची सुविधा असणारी खोली. [इं.]

लॉबी स्त्री. १. इमारतीच्या प्रवेशद्वारासमोरची बांधलेली पण चारही बाजूंनी खुली अशी जागा. २. विधिमंडळाच्या सदस्यांना लोकांना भेटण्यासाठी ठेवलेली जागा. ३. ठरावावर मतमोजणीसाठी ठेवलेल्या सभागृहातील दोन कक्षा. ४. महत्त्वपूर्ण व्यक्तींचा किंवा विधिमंडळातील सभासदांचा पाठिंबा मिळवण्यासाठी त्यांच्यावर प्रभाव टाकणाऱ्या लोकांचा गट.

लौकिक पु. १. कीर्ती; प्रसिद्धी; नाव; बोलबाला; एखाद्याच्या संबंधाने लोकात रूढ असणारे मत. २. चांगल्या किंवा वाईट रीतीची लोकांमधील वाच्यता. ३. सामाजिक व्यवहार, काम. ४. समाजातील लोकांची व्यवहारात वागण्याची पद्धत; प्रपंच. [सं.] (वा.) **लौकिकात येणे** - मुलगा वयात येऊन संसार करू लागणे; घर, व्यवसाय इ. ची जबाबदारी वाहू लागणे. **लौकिकावर येणे** - वादात पराभव झाल्यामुळे, अंगावर डाव उलटल्यामुळे चिरडीला येऊन अद्वातद्वा बोलू लागणे.

वि. १. लोकांविषयीचे; या लोकातील; ऐहिक; अवैदिक; केवळ लोकप्रसिद्ध. २. सामान्य; नेहमीचे. ३. रुढ; प्रचारातील. ४. लोकाचाराला अनुसरून असलेले; शिष्ट. ५. उघड; जाहीर.

लौकिक ऋण लोकांचे, समाजाचे कर्जः 'पूर्वीच्या ऋषींनी वरील श्रुतींत अनुक्त असें जें एक नवीन लौकिक ऋण उपस्थित झालेलें आहे...'-टि २.१.

लौकिकाग्नि-ग्नी पु. स्मार्ताग्नी किंवा श्रौताग्नी यांच्याहून वेगळा अग्नी; ज्यावर स्वयंपाक करतात तो विस्तव.

लौकिकी वि. १. लोकांत रूढ असलेले; पुष्कळ दिवसांपासून लोकांत चालत, प्रचलित असलेले. २. व्यवहारचतुर-कुशल; प्रपंचात हुशार.

लौगट न. मैथुनाची क्रिया; त्यासाठी एकत्र आलेले जोडपे.

लौल्य न. १. लोभ; हाव. २. चंचलता [सं.]

लौह वि. लोखंडी; लोखंडाविषयी.

लौंजी स्त्री. आंब्याचे लोणचे. [हिं.]

लौंडा, लौंडीचा पहाः **लवंडा, लवंडीचा**

लौंद वि. १. अगडबंब. पहाः **लोथ-ध** : 'टोणपा लौंद धट उद्धट।'-दास २.३.३२. २. मूर्ख; हलकटः 'ऐसे लौंद बेइमानी। कदापि सत्य नाहीं वचनी।' - दास १८.६.५.

लौंधट वि. स्वेच्छाचारी; उच्छृंखल.

ल्याणे, ल्याइणे पहाः **लेणे**

ल्याहणे सक्रि. मिळवणे; घेणे; स्वीकारणेः 'जरी ल्याहीन पति, तरी जाईन मागुतीं।' – वसा ६५.

ल्याहाडा वि. गोडखाऊ. (व.)

ल्योक, ल्येक पु. पहाः **लेक**

ल्हाड स्त्री. १. जमीन खोदून तयार केलेली मोठी चूल. २. जळजळीत निखारे भरलेला लांबट खड्डा. (अहि.)

ल्हातणे अक्रि. राहणे; संगतीने असणे; सोबत राहणेः 'जे तुझी हे बुत्थि ईंद्रियसंगतीच ल्हातसे ते श्रवणमननेमागुती स्वरूपीं स्थिरावे जैं।'– शिगीता ७२.

ल्हाद पु. आनंद; हर्ष; आल्हाद. [सं.]

ल्हाव पु. लोभ; लाहो.

ल्होड पु. औताचे मुख्य लाकूड. (अहि.)

ल्होवा पु. उन्हाळ्यात पिकणारी नाचणी किंवा भात; गिमवा. (राजा.)

ल्होवी पहाः **लहुवी**

ल्हौंडे न. भाला : 'खांडी ल्हौडी भुसंडी'–गरा१२७. [सं. लगुड]

■■■



व मराठी वर्णमालेतील चव्वेचाळिसावा वर्ण व एकोणतिसावे व्यंजन.

'व' मध्ये न आढळणारे शब्द 'ओ' मध्ये पाहावेत.

व उअ. आणि. 'आणि' आणि 'व' या दोन उभयान्वयी अव्ययांत असणारा फरक असा की, एका विधानात असणारी दोन किंवा अधिक पदे या दोघांनीही जोडले जातात. परंतु भिन्न गोष्टी दाखवणारी एक किंवा अधिक वाक्ये जोडताना 'व' ऐवजी 'आणि'चाच उपयोग करतात. [अर. तुल.; सं. उत-उअ-व, या प्रमाणे संस्कृतसदृश प्राकृतातून 'व' फार्शीत गेला.-भाअ १८३५]

वइ, वाई प्रमुख; प्रवीण. [सं. पति; प्रा. वइ]

वइ-ई पासून सुरू होणारे शब्द इथे न आढळल्यास 'वै' मध्ये पहावेत.

वइलिया क्रिवि. लवकर; तातडीने : 'आम्हां धाडिलें वइलिया दुरी'- नाम २९१. [दे. वहिला]

वई स्त्री. १. कुंपण : 'वईवरलं कार्लं।'-मसाप २.१. २. अटकाव; प्रतिबंध. (क्रि. घालणे) [सं. वृत्ति] (वा.) **०निघणे-** कुंपणातून येणे; कुंपणात असणे.

वई स्त्री. कडबा, भूस इ.ची वाटोळी, कडब्याच्या पेंढ्या लावलेली रास.

वई देणे ओ देणे; हाकेला प्रतिसाद देणे.-लोसाको.

वईराळ पु. कासार; बांगड्या विकण्याचा धंदा करणारा मनुष्य.

वईस न. विणलेल्या मालावरील निरुपयोगी म्हणून कापून टाकण्यात येणाऱ्या दशा, कुरळ्या, निरुपयोगी कापूस, चिंध्या इत्यादी. [इं. वेस्ट (कॉटन)]

वकट न. स्त्री. (विटीदांडूचा खेळ) एक या अर्थाची संज्ञा; वकट पायावर विटी ठेवून मारतात. याला 'पांव' असेही म्हणतात. [ते. वकटु]

वक(ख)र पु. स्त्री. मान; प्रतिष्ठा; अब्रू; पत : 'अन्नास संदेह तुम्ही पाडोन वकर गमावला म्हणोन... कलह आरंभला आहे.'- पेद ६.२०३. [अर. वकार्]

वकरा पु. घोड्याच्या पायाचा एक रोग.- अश्वप २.२७३.

वकल न. १. पत्नी. २. कुटुंब; खटले : 'जोंवरि मिळविशि पैसा तोंवरी कुटुंब सारें तुझें वकल।'- राला १०. ३. आप्तपरिवार; नातेगोते. (व.) ४. रांड; वेश्या. ५. भडवा; कुंटण्या.- व्यनि २५. ६. खाते; क्षेत्र; शाखा; प्रकरण. ७. हंगामावर धान्य घेण्याच्या बोलीने काम करणारे, भाडोत्री कूळ. [अर. वक्ल्]

वक(कि)लात, वका(कि)लत, वकिली स्त्री. १. वकिलाचा धंदा, पेशा. २. शिष्टाई. ३. मुख्यत्यारी; प्रतिनिधित्व. ४. राजदूताचे कार्यालय व निवासस्थान. ५. (ल.) शहाणपणा. ६. पक्षपात; पाठराखण. [अर. वकिली, वकालत्]

वकसणे अक्रि. खरचटणे; घासटणे; सालटे जाणे.

वक(का)ळा पु. बैलाच्या पाठीवरील धान्याच्या गोणींचे ओझे.

वकाई-या स्त्री. बातमी; वृत्तान्त : 'पासा वकायाच्या फर्दा रोजच्या पाठविल्या.'- दिमरा १.१२४. [अर. वकिआ-वकाइअ]

वकाय(ये)निगार पु. वृत्तान्तलेखक; वाकनीस. [फा. वकाइअ+निगार्]

वकालतनामा पु. वकीलपत्र.

वकील पु. १. प्रतिनिधी; मुखत्यार; एखाद्यासाठी अधिकाराने बोलणारा, वागणारा माणूस. २. न्यायसभेत एका पक्षाचे म्हणणे पुढे मांडणारा, एक बाजू घेऊन तिच्या तर्फेने पुरावे मांडणारा अखत्यारी माणूस. ३. एका राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्राच्या दरबारी असलेला प्रतिनिधी. ४. कायदेपंडित. ५. मुनीम; अडत्या; (इं.) एजंट. ६. सल्लागार; मंत्री. ७. देशमुखाच्या हाताखालचा; मदतनीस. हा वंशपरंपरागत असे. [अर.]

वकीलपत्र न. विशिष्ट कामात एखाद्याला वकील म्हणून नेमल्याबद्दल दिलेले अधिकारपत्र.

वकूफ-ब पु. १. हुशारी; अक्कल; शहाणपणा. २. सामर्थ्य; हिंमत; ताकद; कुवत. ३. कर्तृत्वशक्ती; प्रभाव. [अर. वुकूफ्]

वक्क(ख्ख)ण्या स्त्री. अव. विपरीत, प्रतिकूल टीका. (तंजा.) [गु.वखाण=स्तुती; सं. व्याख्यान]

वक्कर पु. स्त्री. १. पहा : **वक(ख्ख)र.** २. चेष्टा; नखरे. (व.)

वक्कल न. अर्पणपत्रक.

वक्टा वि. १. वाईट. २. कुरूप. (झाडी)

वक्त पु. १. कालावधी; कालमर्यादा; ठरावीक मुदत. २. विशिष्ट वेळ, घडी. ३. घडण्याचा एक प्रसंग, वेळ; संधी. ४. कठीण, खडतर वेळ; आणीबाणी. (क्रि. गुदरणे) ५. अनुकूल, योग्य काळ. [अर.]

वक्तव्य न. १. वचन; उक्ती. २. नियम; अनुशासन. ३. (सामा.) भाषण; बोलणे.
वि. बोलायला योग्य, क्रमप्राप्त, आवश्यक असलेले. [सं.]

वक्तशीर वि. वेळ पाळणारा.
क्रिवि. १. वेळ, प्रसंग पाहून, अनुसरून. २. वेळेवर; वेळच्यावेळी.

वक्ता पु. १. बोलणारा; व्याख्याता. २. भाषणपटू; श्रोत्यांवर छाप पाडून बोलणारा. [सं.]

वक्तृत्व न. १. बोलण्याचे सामर्थ्य, शक्ती. २. चांगले, परिणामकारक बोलण्याचे सामर्थ्य; आपल्या मनातील विचार व भावना दुसऱ्याला उत्तम रीतीने पटवून आपल्या विचाराने भारून टाकण्याची कला.

वक्त्र न. १. तोंड; मुख. २. चेहरा. [सं.] (वा.) **०उजळ करणे-** काळिमा घालवणे; कलंक दूर करणे.

वक्फ पु. १. दानधर्म; देणगी. २. मुस्लीमधर्मियांत पवित्र स्थानाचे जतन करण्यासाठी कायमची दिलेली स्थावर किंवा जंगम मालमत्ता. [अर.]

वक्र वि. १. वाकडे; वाकलेले; बाकदार. २. नागमोडी चालीचा; वळणावळणाचा. ३. प्रतिगामी; उलट दिशेने जाणारा (ग्रह). ४. (ल.) कपटी; अप्रामाणिक स्वभावाचा, वागणुकीचा; कुटिल.
क्रिवि. शत्रुत्वाने; वाकड्या नजरेने.

वक्रता स्त्री. १. वाकडेपणा. २. (संगीत) मान वाकडी करून गाणे.

वक्रतुंड-मुख वि. १. वाकड्या तोंडाचा. २. तोंड आंबट केलेला. ३. तोंड एकीकडे फिरवलेला. [सं.]

वक्रदृष्टि-ष्टी स्त्री. १. वाकडी, तिरपी दृष्टी; तिरळेपणा. २. (ल.)

अवकृपा; विरुद्ध, दुष्ट भावाने पाहणे.
वि. १. तिरळ्या डोळ्याचा; चकणा; काणा. २. मत्सरी; हेवादावा करणारा; बरे न पाहणारा.

वक्रपातळी स्त्री. जिचा थोडाही भाग सरळ पातळीत नसतो अशी पातळी.

वक्रपुरशीस स्त्री. (विचित्र समास) उलटतपासणी; सवालजवाब. [सं. वक्र+फा. पुरशीस]

वक्रसंस्था स्त्री. वाकडी असण्याची (पृथ्वीची) स्थिती.

वक्रस्वर पु. (संगीत) आरोह-अवरोह करताना ज्या स्वरावरून मागील स्वरावर गायक फिरतो तो स्वर.

वक्रिय वि. वाकडा.

वक्री वि. १. (ज्यो.) विरुद्ध गतीने (मेषेकडून मीनेकडे) जात आहेसा दिसणारा (ग्रह). याउलट मार्गी. २. मत्सरी; वक्रदृष्टी.

वक्रीक्रमण न. (ज्यो.) ग्रहाने उलट, वक्री होणे, जाणे.

वक्रीभवन न. (पदार्थ.) प्रकाशकिरण एका पारदर्शक वस्तूतून दुसऱ्या पारदर्शक वस्तूत जात असताना थोडेसे वाकडे होणे. (इं.) रिफ्रॅक्शन.

वक्रोक्ति-क्ती स्त्री. १. वाकडे, लावून बोलणे. २. एक शब्दालंकार. यात बोलणाऱ्याचा अर्थ एक असावा व दुसऱ्याने त्याचा वेगळाच, विपरीत अर्थ घ्यावा असा प्रकार. [सं.]

वखट्या तोंडाचा वि. तोंडावर देवीचे वण असलेला. (माण.)

वखडा पु. घिसाडघाई. (ना.)

वखर-रा पु. न. १. शेतकीचे एक हत्यार. याने शेतातील तण, गवत मुळासकट उपटून काढतात. २. जमीन करण्याचे औत; कुळव. [सं. विकृ-विकिर]

वख(खा)रणे उक्रि. १. वखराने तण इ. काढून टाकून साफ करणे. २. नांगरल्यानंतर जमीन सारखी करणे.

वखवख स्त्री. १. खा खा सुटणे; तृप्त न होणारी भूक. २. (ल.) प्रचंड लोभ; हव्यास. ३. (भिकारी, मुले, तगादेदार इ. कडून) छळणूक; त्रास. ४. पोटात तुटणे (भूक, पित्त यामुळे). ५. (काळजीने) खंगणे. ६. तगादा; दपटशा. ७. वरील प्रकारची स्थिती. ८. (व्यापक) उपहास; छळ; दुर्लौकिक. ९. उपहासाची स्थिती. [ध्व.; सं. वष्-वख]

वखवखणे अक्रि. १. प्रचंड भूक लागणे; कितीही खाल्ले तरी तृप्ती न होणे. २. भयंकर हाव, लोभ सुटणे; वासना भडकणे.

वखवख्या वि. १. वखवखलेला; अतिशय खा खा सुटलेला. २. हावरा; लोभी. ३. त्रास देणारा; छळ करणारा; उपहास करणारा.

वखा पु. १. शेर; शिधा; रतीब; भत्ता (रोजचा इ.). २. नियमितपणे ठरावीक शेर घेणे.

वखा पु. गोट्या खेळण्यासाठी केलेला खळगा; गल. (ना.)

व(वा)खार स्त्री. १. विक्रीचा माल साठवण्यासाठी बांधलेली जागा; गोदाम. २. धान्य साठवण्यासाठी केलेले भिंतीतील बळद. ३. मोठा साठा; कोठार. [हिं.; क. वखारु; देप्रा. वक्खार]

वखारदार, वखारी पु. वखारीचा मालक.

वग स्त्री. १. कृपादृष्टी; मेहेरबानी; (मोठ्या लोकांचा) आश्रय. २. ओळखदेख; स्नेहभाव; वळण. ३. वशिला, शिफारस. ४. प्रतिष्ठा; पत : 'जगजीवनाची बहीण खांसा सुंद्राबाई दमाजीच्या भावास (दिली) आहे. तिकडे यास वग मोठी आहे.'-ब्रच २४७. [अर. वक्अ]

वग न. मुख; चेहरा : 'ते ज्वलित वगाची वास पलाउनि राओ जुहारिला'- कला १५. [सं. वक्त्र]

वग पु. तमाशात नाटकरूपाने सादर करण्याचे किंवा होणारे कथानक.

वगड स्त्री. असडीक तांदूळ. (व.) पहा : **बगड**

वगणे अक्रि. भडकणे; राग अनावार होणे : 'विषादें वगलें तोंड । मनीं शोक काढी उदंड ।'- सिसं ३.१८१. [सं. वग्-वंगन = हालणे]

वगर वि. अपक्व; तुरट (सुपारी). (तंजा.)

वगर शअ. शिवाय; बिगर.

वगरमासा पु. सुसर; मगर. (बे.)

वगळ स्त्री. १. निवडक अंश काढून घेतल्यावर खाली राहिलेला भाग; गाळ. २. (ल.) गाळसाळ; टाकाऊ माल. ३. गवतासाठी मुद्दाम राखून ठेवलेली जमीन. (को.)
वि. १. वगळलेला; खाली राहिलेला. २. (ल.) टाकून देण्यायोग्य; वाईट; टाकाऊ (पदार्थ).

वगळणी स्त्री. गाळणे; सोडणे; बाहेर टाकणे.

वगळणे उक्रि. १. बाहेर ठेवणे; सोडणे; टाकणे; अनादर दाखवणे; डावलून जाणे. २. ओघळणे; ओलांडून जाणे; वघळणे. [त. वळुक्कु-दल्; सं. अव+गल्/स्खल्]

वगळसगळ स्त्री. गाळसाळ.

वगळी पु. अव. ओघळ; ओहोळ : 'जसे वगळी वाहती जात असे दरारा.'- ऐपो २.१९४.

वगार-रू स्त्री. न. म्हशीची पारडी; रेडी. (खा., व.) [ते.]

वगारना क्रि. भाजीला फोडणी देणे. (झाडी) [ते. वगारु; क. बगारु]

वगारा पु. वापर; रहदारी : 'ती जागा बायका मुलांच्या वगाऱ्याची होती.'- आआल.

वगी स्त्री. (जरतारधंदा) बारीक व जास्त जवळ-जवळ तारा असलेली जर.

वगैरे-रा अ. आणखी; आणि दुसरे; व इतर; इत्यादी. [अर.; फा. वघैरा]

वघळ पु. स्त्री. घळ; दरड : 'किनाऱ्यास मोठमोठ्या वघळी फार आहेत.'- धर्माजी १५०.

वघळणे सक्रि. ओलांडून जाणे; वगळणे.
अक्रि. १. पहा : **ओघळणे.** २. खरडून जाणे; (पाण्याच्या प्रवाहाखालील जमीन, माती) खरकणे. ३. (रागाने) अंगावर धावून जाणे.

वच न. १. बोलणे; भाषण. २. बोल; शब्द.

वचक पु. १. दरारा; भीती; धाक. २. धसका; दचका; धस्स होणे. ३. कल्पना; विचार; अंदेशा. [हिं. भचक]

वचक वि. घोड्याचा एक रंग.- अश्वप १.२८.

वचकणे अक्रि. १. वचक बसणे; भीती, धास्ती वाटणे. २. एकदम भयचकित होणे; धक्का बसणे. [सं. अवचकन्]

वचकन-कर-दिशी पहा : **वसकन-कर-दिशी**

वचकने न. (चर्म.) लहान मुलांचा जोडा.

वचकवचक क्रिवि. घाईने खाणे, पिणे, बोलणे, गवत वगैरे तोडणे इ. क्रियांच्या शब्दांचे, आवाजाचे अनुकरण करून.

वचका पु. १. पहा : **वचक.** २. ध्यास. पहा : **ओचका.** ३. बदला. (व.)

वचका वि. १. वसवस करणारा; खेकसणारा. २. वाचाळ; तोंडाळ. ३. हलका; क्षुद्र; मूर्ख; फुसका. [ध्व. वच]

वचकाणा पु. वचपा. (कर.)

वचणे अक्रि. १. जाणे : 'यालागीं न वचें कौंडिण्यपुरा।'-एरुस्व १४.५. २. नाहीसे होणे : 'परि देह न वचे'- ज्ञाप्र २९४.[सं. व्रज्; प्रा. वच्च]

वचणे अक्रि. वाचणे : 'एऱ्हवीं न वंचसि निभ्रांत।'- उषा १८०८.

वचन न. १. भाषण; बोललेली गोष्ट. २. शब्द; भाष; निश्चयपूर्वक सांगणे. ३. विधान. ४. उक्ती; सूक्त; सुभाषित. ५. प्रमाणभूत आधार; प्रामाण्य : 'मुख्य प्रभुंचे लक्षण प्रत्यक्ष ज्यास वचन भारती।'- ऐपो ३२०. ६. (कायदा) करार; प्रतिज्ञा. ७. अवतरण; ग्रंथातील उदाहरण; उद्धृत. ८. नामाच्या ठिकाणी एकरूपाने किंवा अनेकरूपाने असलेली अर्थाची उपपत्ती. ९. सूत्र : 'तीनि पदांचें सूत्र तें वचन बोलिजे'- पंव ८९.[सं.] (वा.) **वचनाचा खरा, धड** – वचनाप्रमाणे, दिल्या शब्दाप्रमाणे वागणारा. **अर्ध्या वचनात असणे, राहणे** – अतिशय आज्ञाधारक, विनीत असणे; आज्ञेत राहणे.

वचनचिठ्ठी स्त्री. कर्ज घेताना लिहून दिलेला रोखा; (इं.) प्रॉमिसरी नोट.

वचनभाक स्त्री. तोंडी करार, व्यवहार.

वचनसुपारी स्त्री. वाग्दान; वधूवर निश्चित करण्याचा एक विधी.

वचनाभी स्त्री. बचनाग. [सं. वत्सनाभ]

वचनीय वि. १. बोलण्या-सांगण्यासारखे. २. शब्दांनी व्यक्त करण्यासारखे; वर्णनीय.

वच(ज)पा पु. १. एखाद्या गोष्टीत काही कमी-अधिक झाल्यास त्याची बरोबरी त्या सारख्याच दुसऱ्या गोष्टीत करण्यासाठी केलेला कमी-अधिकपणा. २. समतोलपणा; भरपाई; कमी-अधिक असणारी गोष्ट बरोबर करणे. (क्रि. निघणे)

शअ. क्रिवि. मोबदल्यात; कमी-अधिकपणा घालवण्यासाठी म्हणून. [अर. वझा; म. वजा]

वचपी पु. जाणारा. (गो.) [गो. वच=जाणे; सं.व्रज्=जाणे]

वचवच स्त्री. बडबड.

वचवच-चा क्रिवि. १. विसकटून, चिवडून वगैरे प्रकाराने; डुकराप्रमाणे किंवा अव्यवस्थितपणे (अन्न खाणे.) २. निरर्थक व मूर्खपणाने.

वचवच्या वि. बडबड्या. [ध्व. वच]

वचवाच्या वि. आळशी; लक्ष न देणारा. (व.)

वचविणे सक्रि. जाता किंवा शिरता येणे. पहा : **वचणे** १

वचा-ज स्त्री. वेखंड. [सं.]

वच्छात पु. दांडीवाल्यांना, दलालांना माल पुरवणारा शेतकरी, कूळ. पहा : **बिछायत** ४ [गु. वछियत]

वच्छावंगी स्त्री. तोंडी लावण्याची तांदळाची फेणी. (बे.)

वछाड न. घोड्याचे स्वारीचे सामान.

वज, वजच, वजवज-जा, वजेने, वजेवजे क्रिवि. हळू; सावकाश; धीमेपणे.

वज स्त्री. १. काळजी; व्यवस्था; ओज. २. सोय. (व.) [सं. ओजस्; क. ओजे; म. ओज]

वज स्त्री. सवय; पद्धत; रीत. (कर्ना., कु., को.) [अर. वज्ह्]

वज न. वेखंड.

वज अ. पादपूरणार्थक अव्यय. (कु.)

वजडी-डे स्त्री. न. (मांसाहार) पोटातील मांसाचा भाग.

वजणे अक्रि. १. निगा राखली जाणे. २. टवटवीत होणे. पहा : **ओजणे**

वजणे अक्रि. जाणे. पहा :**वचणे**

वजन न. १. पदार्थाच्या, वस्तूच्या ठिकाणचा जडपणा; भार; गुरुत्व. २. याची इयत्ता, प्रमाण समजण्यासाठी वापरतात ती (मासा, तोळा, धडा, मण इ.) ठरावीक वस्तू. ३. अशा वस्तूने भाराचे प्रमाण समजण्यासाठी करण्याचा तोल; तोलण्याची कृती. ४. ओझे; भार. ५. इभ्रत; प्रतिष्ठा; मान. ६. महत्त्व; किंमत. ७. (शाप.) भार, प्रतिबंधाचे अतिक्रमण करण्यास लाविलेली शक्ति.- यंस्थि ३. ८. वशिला; वर्चस्व; छाप. ९. (लोहारकाम) दोरी सोडताच भात्याची पिशवी बंद व्हावी व हवा बाहेर सोडली जावी म्हणून त्या भात्याला मागच्या बाजूला टांगलेला वजनदार दगड वा लोखंडी तुकडा. [अर. वझ्न्]

वजनकशी पु. वजन-माप तपासणारा अधिकारी.-वाडमा १.१२०.

वजनदार-शीर वि. १. विशेष जड; जास्त वजन असलेला. २. (ल.) प्रतिष्ठित; तोलदार; छाप पडेल असा (माणूस).

वजनदारी स्त्री. १. प्रतिष्ठा; महत्त्व; सत्ता. २. परिणामकारकता; चांगला बांधीवपणा.

वजनी वि. १. तोलण्याचा; मापण्याचा नव्हे असा (शेर, खंड इ. प्रमाण). २. वजन करून देण्याघेण्याचा (तूप, गूळ इ. पदार्थ). [फा. वझ्नी]

वजनीज पहा : **वज**

वजपा-बा पहा : **वचपा**

वजमजुरी स्त्री. शेता-रानातील काबाडकष्टावर मिळणारा रोजमुरा. (ना.)

वजर पु. खोल डोह. (कु.)

वजरबटू, वजरावळ, वजरी पहा : **वज्रबटू, वज्रावळ, वज्री**

वजरी-रे पहा : **वजडी-डे**

वजह् पहा : **वज्ह-झ**

वजा-जे स्त्री. तऱ्हा; प्रकार.

वि. तुल्य; सदृश; ह्या प्रकारचा. (समासात) बातमीवजा इ.

क्रिवि. प्रकारे; प्रमाणे. [अर. वज्ह्]

वजा स्त्री. वजाबाकी; उणे, कमी करणे; काढून टाकणे.

वि. उणा केलेला; काढून टाकलेला; कमी केलेला. [अर. वझ्आ]

वजा स्त्री. पाठवणे; रवानगी : 'गडाखालेंच जाबसाल देऊन वजा करीत जावें.'- मइसा ८.९१. [अर. विदाअ; म. वजणे]

वजा पु. १. लोहारकी व सुतारकी असे दोन्ही धंदे करणारा माणूस. २. अशा माणसासाठी सन्मानाची पदवी.- आडिमहा ११. (राजा.)

वजा स्त्री. स्वरूप; आकार; तऱ्हा : 'रेल्वे स्टेशन झाल्यापासून त्यास शहरी वजा आली होती.'- मशा, जानेवारी १९३७. [अर. वजह]

वजाई स्त्री. १. वजा केलेली, सूट दिलेली रक्कम. २. न्यून; उणीव. ३. पदावनती.

वजाबाकी स्त्री. १. (गणित) मोठ्या संख्येतून लहान संख्या कमी करून बाकी काढणे. २. हिशेबात उरलेली बाकी. ३. वजा करून आलेले उत्तर. [अर. वझ्आ+बाकी]

वजावणे अक्रि. सवय होणे.

वजावाजवी-बी-ब, वजावाजीब वि. क्रिवि. योग्य; न्याय्य; वाजवी. [वाजवी द्वि.]

वजावाट स्त्री. १. देणेघेणे चुकते करून, बाकी काढून हिशेबाचा केलेला उलगडा. २. उधळपट्टी. ३. एकंदर रकमेतून विशिष्ट रक्कम वजा घालून काढलेली बाकी. [सं.]

वजाशिरस्ताबाद पु. शिवाजीच्या काळात जमाबंदीत दर बिघ्याला ३ पांड जमीन वजा टाकण्याची असलेली पद्धत.

वजासूट स्त्री. वजनामापांमध्ये दिलेली विशिष्ट प्रमाणातील सूट.

वजिरी,वजिरात स्त्री. १. वजिराचा हुद्दा; दिवाणगिरी; प्रधानकी. २.(गंजिफा) वजिराला द्यावी लागते ती तलफ. पहा : **तलफ** [अर. वझारत्]

वजीफा पु. सरकारी तैनात, जहागिरी. [अर.; हिं.]

वजीर पु. १. मुख्य प्रधान; दिवाण; सामंत. २. बुद्धिबळाच्या खेळातील राजाच्या खालचे मोठे मोहरे; प्रधान. [अर. वझीर]

वजु-जू-ज्जू न. (मुसलमानांच्यात) हात, पाय, तोंड धुणे. [अर.]

वज्जीवाज्ज पहा : **वजावाट**

वज्र न. १. इंद्राचे शस्त्र; (सामा.) अमोघ शस्त्र. २. हिरा : 'पाचि वैडूर्य वज्र नीळ।'- दास ८.६.३४. ३. वीज; विद्युत. ४. पहा : **वज्रतुंड** पु. १. सत्तावीस योगांपैकी पंधरावा योग. २. दहशत बसवणारा (माणूस, योद्धा).

वि. १. कठीण; तीक्ष्ण. २. घट्ट. ३. दृढ; निश्चित; अभेद्य इ. ४. फार तीव्र; जुना (द्वेष). ५. कट्टर (वैरी). ६. फार अवघड, कठीण (पथ्य). ७. कठोर; दृढ.

वज्र अंगठी त्रिकोणाकृती कोंदणात हिरा व तीन कोनांवर तीन रत्ने बसवलेली अंगठी.- देहु ४९.

वज्रकपाट न. वज्राचे, हिऱ्याचे कवाड, दार : 'मुक्तिचें वज्रकपाट। कामीनि हे।'- भाए ७५६.

वज्रकीट न. खवले मांजर.

वज्रगर्भ स्त्री. एक प्रकारची भिकबाळी. - देहु ४५.

वज्रगाठ स्त्री. पक्की, न सुटणारी गाठ.

वज्रचु(चू)डेमंडित वि. १. हिऱ्याच्या कंकणांनी शोभणारे (हात). २. पत्रात सुवासिनी स्त्रीला लिहिण्याचा मायना; अक्षय टिकणारे चुडे हातात असणारी; अखंड सौभाग्यवती.

वज्रजिव्हा स्त्री. खोचदार, कडक भाषा, बोलणे.

वज्रटीक-टिका स्त्री. कापडाच्या अरूंद पट्टीवर सोन्याचे वगैरे मणी जडवून केलेला, गळ्याभोवती बसणारा स्त्रियांचा एक दागिना.

वज्रतडक पु. वीज.-ख्रिपु.

वज्रतुंड पु. वज्राचा एक जातीचा दगड. स्फटिक, चंद्रकांत व अभ्रक या पदार्थांच्या कणांच्या अनियमित मिश्रणाने हा तयार होतो. (इं.) ग्रॅनाईट.

वज्रपरीक्षा स्त्री. १. हिऱ्याची पारख. २. कठीण कसोटी, तपासणी.

वज्रपंजर पु. १. (वज्राचा पिंजरा) दुर्भेद्य किल्ला, आश्रयस्थान. २. पालखीवरील अभेद्य छत : 'वरि वज्रपंजरु वाळेयाचा'-रुस्व ४५८.

वज्रपात पु. १. वज्राचा आघात. २. वीज कोसळणे. ३. (ल.) अचानक व प्रतिकार करण्यास व सहन करण्यास कठीण असे संकट येणे.

वज्रप्रयोग पु. १. फार अवघड उपाय. २. मांत्रिक जादूगाराचा विशिष्ट मंत्रप्रयोग.

वज्रप्राय वि. १. वज्रासारखा कठीण. २. वज्राप्रमाणे अमोघ म्हणजे निष्फळ न ठरणारा (बाण इ.) ३. अतिशय वजनदार; खंडण करण्यास कठीण (मुद्दा). ४. झोंबणारे; मर्मभेदी; सलणारे (भाषण इ.).

वज्रबटू पहा : **बजरबट्टू**; एक झाड व त्याचे फळ.

वज्रबुद्धी स्त्री. १. खंबीर मन. २. उत्कृष्ट ग्रहणशक्ती.

वज्रमिठी स्त्री. फार घट्ट मिठी.

वज्रमुष्टि-ष्टी, वज्रमूठ स्त्री. मल्लाचे एक आयुध. हे मुठीला लावतात. स्त्री. पु. १. लोखंडासारखी कठीण मूठ. २. एक खेळ. (बडोदे) ३. लुतीचा कांदा.

वि. १. लोखंडासारखी कठीण मूठ असणारा. २. वज्रमुष्टी या हत्याराने लढणारा.

वज्रमूली-ळ स्त्री. एक झुडूप; रानउडीद.

वज्रयोग पु. वज्रासन; हठयोग.

वज्रलेप पु. १. चुन्यामध्ये कात, गूळ इ. घातल्यामुळे दृढता आलेला चुना. २. याचा मूर्ती इ. वर करतात तो लेप. ३. (ल.) अक्षयता; चिरंतनपणा. ४. (ल.) दृढता आणणारा पदार्थ. [सं.] (वा.) ० **होणे**- कायम, पक्के होणे.

वज्रवाट स्त्री. वज्राचे वेष्टण : 'काळ लोहे डवरिलें। वज्रवाटीं बांधिले।'- शिव. [सं. वज्र + वृत्त; प्रा. वट्ट]

वज्रवाणी पु. कठोर भाषण.

वि. कठोर, झोंबणारे बोलणारा.

वज्रवीर्य न. वानराचे वीर्य (शुक्र). हे अत्यंत उष्ण असते.

वि. १. अमोघ, पराक्रमी वीर्याचा (माणूस-ज्याची मुले फार सशक्त आहेत असा). २. उत्साही; पराक्रमी; निश्चयी; सहनशील.

वज्रशलाका स्त्री. घरावर वीज पडू नये म्हणून लावतात ती तार.

वज्रशील वि. वरिष्ठ; वरचढ. (व.)

वज्रसांखळ-ळी स्त्री. अभेद्य, अखंड कोटिक्रम : 'तार्किकांचिया वज्रसांखळा।'- शिव २५.

वज्रक्षार पु. एक औषधी क्षार. मीठ, शेंदेलोण, पादेलोण, टाकणखार, बागडखार, जवखार, सज्जीखार या खारांचे विशिष्ट कृतीने केलेले औषध.

वज्राग्नि-ग्री पु. १. मूलबंधापासून उत्पन्न होणारी उष्णता; वज्रासनरूप

अग्नी. २. विजेमुळे उत्पन्न होणारा अग्नी.

वज्राघात पु. १. वीज पडणे. २. (ल.) भयंकर संकट, आपत्ती.

वज्राधिकार पु. अनेक पिढ्यांपासून एका कुटुंबात असलेला अधिकार.

वज्रानल पु. वीज; विजेचा लोळ.

वज्राभ्यास पु. गुणाकाराचा एक प्रकार.

वज्रावळ, वज्राळे स्त्री. न. एका वेलाच्या बियांची, मण्यांची माळ. मुलाला दृष्ट लागू नये म्हणून त्याच्या गळ्यात बांधतात.

वज्रासन न. १. (योग.) एक आसन. पाय गुडघ्यात दुमडून टाचांवर ताठ बसून गुडघ्यांवर दोन हातांचे तळवे, श्वास स्वाभाविकपणे घेणे. २. मूलबंध; आधारबंध. ३. स्थिर, दृढ आसन. ४. दृढपणे धारण करणे. [सं.]

वज्रांगी स्त्री. चिलखत; कवच : 'वज्रांगी लेहला तैशी प्रलयमेघांची।'- शिव १००१.

वज्रिका वि. (संगीत) दहाव्या श्रुतीचे नाव.

वज्री स्त्री. पाय घासण्याच्या उपयोगी असा कठीण, खरखरीत दगड, वीट, धातूचा पदार्थ इ.

वज्रोळी स्त्री. योगशास्त्राची एक परंपरा : 'वज्रोळी : अमरोळी : सिद्धोळी: दिव्योळी : इया च्याऱ्ही ओळी नाथाचिया'- लीचउ ४८६. [सं. वज्र+आवली]

वज्ह-झ स्त्री. १. रूप; चेहरा. २. पद्धत; चाल. ३. स्थळ; जागा. [अर.]

वट पु. वड; वडाचे झाड. [सं.]

वट स्त्री. १. दोरी; दोरा; बट. २. रक्षाबंधन; गंडा : 'कशीवट कडा दोरा ऋषि तथा दीजे।'- वसा १०. [सं.]

वट स्त्री. १. कच्चे रेशीम धुताना निघून जाणारे दोरे, तंतू, गाळसाळ. २. त्यामुळे येणारी तूट. [क. ओट्टुसु = घटणे]

वट न. लोह; पोलादाचा एक प्रकार. - प्रश २४.

वट पहा : **वट्ट**

वट स्त्री. ऐट; डौल; मिजास. (दादर)

वटक पु. डाळीच्या पिठाचा वडा.

वटक पु. १. मळाचा, विष्ठेचा खडा, गोळा. २. न पचणाऱ्या अन्नाचा पोटात होणारा गोळा. ३. अशा तऱ्हेचा होणारा रोग, विकार. ४. लहान मूल दूध प्याल्यानंतर लहान-लहान गोळ्या ओकते तो विकार; लहान मुलांची ओकारी. [सं.]

वटक(ग)ण-न न. १. टेकण; टेकू. (पंढरपूर) २. (ल.) दाब; दडपण; अडकवण्याची किल्ली. ३. (ल.) अहंमन्यतेचा ताठा, हट्टीपणा.

वटका स्त्री. वाटी. [सं. वाटिका]

वटका पु. रिकामी बडबड; गुऱ्हाळ; चऱ्हाट. (क्रि. मारणे, लावणे इ.) [ध्व. वटवट]

वटकापैका पु. पैसाअडका.

वटके वि. वठलेले; शुष्क.

वटछपन्नी स्त्री. वजनावरील कर.

वटणे उक्रि. कापसातील सरकी निघण्यासाठी तो लोखंडी किंवा लाकडी दांड्याने लाटणे; लोढणे. [सं. वठ्यन्ते; हिं.बटना; सिं. वटणु]

वटणे उक्रि. रचणे; गंज घालणे (गवताचे भारे, दगड इ.ची). [वैसं. वत्; क. वोट्टु]

वटणे अक्रि. मनात येणे; वाटणे : 'गज धाडुं असें न वटे मनिं इंद्रा।'- वस्वलिंग, गजगौरीव्रत ४६.

वटणे न. उटणे. (गो.)

वटपट्टी स्त्री. एकूण आकार, हिशेब.

वटपौर्णिमा-पुनव-सावित्री स्त्री. ज्येष्ठी पौर्णिमा. या दिवशी सुवासिनी स्त्रिया अक्षय सौभाग्यासाठी वडाची पूजा करतात.

वट(ट्)ला पु. ओटा. (खा.)

वटली स्त्री. चुलीसमोरचा विस्तव पुढे ओढून भाकरी शेकतात तो भाग; भानसी.

वटवट स्त्री. १. अकारण, कंटाळवाणी बडबड; टकळी. २. रिकामी कटकट. [ध्व. वट]

वटवटणे अक्रि. निरर्थक, कंटाळवाणी बडबड करणे.

वटवट्या वि. वटवट, कटकट करणारा; बडबड्या.

वटवट्या वि.१. मोठे, गरगरीत, वटारलेले (डोळे). २. असे डोळे असणारा. [सं. वृत्त; प्रा. वट्ट द्वि.]

वटवणीगृह न. बँकांनी एकमेकांवर काढलेल्या धनादेशांची वजावट करून नक्त रकमांचा हिशेब चुकता करण्याचे स्थळ; समाशोधनगृह. (इं.) क्लिअरिंग हाऊस.

वट(टा)व(वि)णे उक्रि. (पैशाचा) मोबदला घेणे; एका प्रकारची नाणी (रुपया, हुंडी इ.) देऊन मोबदल्यात कमी-जास्त किंमतीची तसल्याच प्रकारची दुसरी घेणे. पहा : **बटावणे** [सं. वट् पृथक्करण; वृत्-वर्तन]

वटवाघू(गू)ळ न. १. एक पक्षी; वाघळ. २. पाकोळी. [सं. वट + वल्गुली]

वटव्रत पहा : **वडवत**

वटश्राद्ध न. गेलेला वडाच्या झाडाखाली करण्याचे श्राद्ध.

वटहुकूम पु. १. सर्वांना, सर्वत्र दिलेला हुकूम. २. ताबडतोब अंमलात येणाऱ्या कायद्याचे फर्मान; जादा हुकूम.

वटारणे अक्रि. रागाने डोळे वासून पाहणे; धाक, भीती दाखवण्यासाठी डोळे मोठे करून टक लावणे. [सं. अव + स्तृ; प्रा. वट्ट]

वटाव पु.१. नाण्याचा मोबदला. २. असा मोबदला करण्याबद्दलचा आकार. पहा : **बटाव, बट्टा**

वटाक्ष पु. वडा : 'म्हणे माते वटाक्ष झडकरी। माझें पदरीं घाल आतां।'- भावि २२.१००. [सं.]

वटां(टं)ग न. १. (सोनारी) बिलवर ठोकण्यासाठीची ऐरण. २. (लोहारी) एक ऐरण.

वटांगण न. आधार. पहा : **उटिंगण**

वटिका पु. बुद्धिबळातील प्यादे : 'वाटे त्या चेष्टविलें कोपानें युद्ध-केली वटिकांतें।'- साधुदास [सं.]

वटिका, वटी स्त्री. १. वाफा; मळा (बागेतील). २. गोळी. ३. वडी; थापटी (साबण, लोणी इ.ची). ४. वडा; सांजोरी : 'ताटी तेचि गगनु।

वटिका पूर्णचंद्राचें मानु ।'– ऋ ८२. ५. गोलाकार दगडी चीप.[सं.]

वटीव वि. लाटलेला, सरकीरहित (कापूस).

वटेखोसी स्त्री. भांडण; झगडा. (व.)

वट्ट वि. एकूण; एकत्र. उदा. वट्ट आकडा. [क. ओट्टु]

वट्टी–ट्टी पु. धोबी; परीट. (व., ना.) पहा : **वरठा–ठी**

वठणे अक्रि. नरम, मऊ येणे (मर्दन इ. प्रकाराने). [सं. वृत्, व्यथ् भयसंकोचनयोः] (वा.) **वठणीवर येणे** – १. नरम होणे. २. वश होणे; ताब्यात येणे : 'तद्दुर्दशा न करितां निस्तेज मज वठेल काय मही ।'– मोसभा ३.३५.

वठणे अक्रि. १. उमटणे; ठळक होणे; उठावदार दिसणे (शिक्का, रंग). २. फलद्रूप होणे; खरा ठरणे (शाप इ.). ३. (व्यापक) भरभराटीला येणे; फोफावणे; तरारणे (वनस्पती). ४. उग्र, खमंग असणे. ५. दरवळणे (वास). ६. वाळणे; शुष्क होणे. ७. (ल.) उतरणे; बनणे. [सं. उठ् उपघाते, वठ् स्थौल्ये]

वठणे सक्रि. करून दाखवणे (भूमिका इ.).

वठम पु.१. आवड; हौस. २. खटपट; प्रयत्न. (व.)

वठाण न. घरातील खोली किंवा खोल्यांचा एक गाळा; विशिष्ट व्यक्तीला किंवा कार्याला दिलेला घराचा भाग. उदा. गावठाण, स्वयंपाकघर इ. [सं. अवस्थान; सिं. वथाणु]

वठार पु. १. गावातली एक पेठ; मोहल्ला. २. पहा : **वठाण**

वठूर वि. राठ; खरखरीत. (व.)

वठ्ठ्या–ठ्या, वठ्या(ठ्ठो)बा वि. लठ्ठ्या, गलेलठ्ठ; आळशी. [सं. वठ् = लठ्ठ होणे]

वठ्ठ्याचे न. (निंदार्थी, संकेताने) पोटभर जेवण.(वा.) **वठ्ठ्या मारणे** (पदार्थावर) ताव मारणे. (क.)

वड पु. एक झाड; वट. हे झाड पवित्र मानले जाते व औषधी आहे. याच्या स्त्री व पुरुष अशा दोन जाती आहेत.[सं.] (वा.) **०पिकणे–** अनेकांसाठी नोकरी व उपजीविकेचे साधन निघणे, तयार होणे. **वडाची साल पिंपळाला लावणे** – १. खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे करणे. २. नसता, भलता संबंध जोडणे. ३. वळणे; कपटाने फिरणे.

वड स्त्री. (साप चावल्यावर येते ती) लहर; वेग.

वड पु. (सराफी) मोत्यांचे वजन करण्यापूर्वी सारख्या आकाराचे मोती वेगळे करणे.– जनि १३.

वडकाळिका स्त्री. वटवाघूळ. [सं. वट + कालिक]

वडग न. मरायला टेकलेले किंवा मेलेले जनावर. (गो.)

वडग–गे न. टोपले. (चंद्रपुरी, ना.)

वडगण न. अटकण (दगड, लाकूड इ.चे दार, चाक इ.ला); टेकण; वटकण.

वडज पु. कृष्णाचा एक सोबती; (त्यावरून ल.) विद्रूप, कुरूप माणूस. वि. कुरूप; हिडीस.

वडजखीण, वडावरची जखीण वडाच्या झाडावरील स्त्रीपिशाच; (तिरस्कारार्थी, रागाने) अडाणी व्यक्ती.

वडणे न. ओढणी : 'झगड्यांत पुढें भिडणें म्हणुनी धरियेलीच कंचुकि कीं वडणें ।'– अकक २ हरिराजकृत राधावर्णन ८.

वडप न. १. वर्षाव; वृष्टी : 'वरिखतु रसाचें वडप ।'– दाव १३७. २. मळभ; अभ्र : 'दिशांवरी पडलें वडप ।' – कृमुरा ६८.४. [दे. प्रा. वडप्प + निरंतर वृष्टी]

वडपड वि. योग्य; पात्र : 'वडपड जाहाली येमकोंडासी ।' – ख्रिपु २.२९.७५.

वडपिंपळ वि. (वडापिंपळाला फळे धरत नसल्यामुळे निरुपयोगी मानतात. त्यावरून) ब्रह्मचारी; फटिंग (निंदार्थी उपयोग).

वडलाई, वडलाबाई स्त्री. (निंदार्थी) लहान भावंडांवर अधिकार गाजवणे.

वडलावडली वि. वाडवडलांच्या वेळचे; परंपरागत; प्राचीन. क्रिवि. वंशपरंपरेने; वाडवडलांपासून.

वडलांचा अडकित्ता (ल.) सुपारी फोडण्यासाठी घेतलेले दगड.

वडलो स्त्री. पारधी. (व., पारधी)

वडलोबा पु. लहान भावंडांवर अधिकार गाजवणारा मुलगा; दादा.

वडव स्त्री. न. ज्यात मोटेचे चाक बसवतात ते विहिरीवरचे आडवे लाकूड; मोटवण.

वडवडणे अक्रि. १. (संकट इ.) ओढवणे : 'हार नवता मधीं सहात कसें आज संकट वडवडलें ।'– होला ११२. २. मध्ये-मध्ये येणे.

वडवडिता, वडवा क्रिवि. त्वरित : 'कृपावंता आतां वडवडित पावेसि मजला ।'– सारुह ६.११०; 'मला धीर धरवेना वडवा । दृष्टीला दावा तरी ।'– पला ४.९.

वडवडी स्त्री. अस्वस्थता : 'पाळेगनीं वडवडी मगधादिकांचा'– गरा १२३.

वडवत न. अव. नवीन लग्न झालेल्या स्त्रियांनी वटपौर्णिमेच्या दिवशी वाणे वाटून करण्याचा समारंभ.

वडवा स्त्री. घोडी. [सं.]

वडवा पु. सेवक : 'तंव वडवेनि आनिले । हरिचंदनाचें वाटें ।'– उह ७९. [सं. बटुक]

वडवा स्त्री. पाणधरण; पाणबंध.

वडवानल, वडवाग्नि–ग्नी पु. समुद्रातील अग्नी. [सं.]

वडवार तोल सारख्या आकाराचे मोती एकत्र तोलणे.

वडवाळी स्त्री. १. घास; ग्रास : 'मांसाची वडवाळी । ओरागूं लागे ।'– ज्ञा ६.२३०. २. आहुती.

वडवो पु. दानाध्यक्ष : 'तंनिरूपित वितहवाडी वडवो श्रीसोमदेवें दत्त लाषीलीए ग ?'– नागदेव शिला आय.३. [सं. वाणटक]

वडस पु. डोळ्याचा एक रोग. बुबुळावरील पांढरा कवडा.

वडा पु. विविध डाळींच्या पिठांचा, भाज्या किंवा कडधान्यांचा मीठ, मिरची, वगैरे मसाला घालून तळून केलेला पदार्थ. [क. वडे; हिं. वडा, बोंडा; सं. वटक; प्रा. वडग] (वा.) **वड्याचे तेल वांग्यावर काढणे** – एकावरचा राग दुसऱ्यावर काढणे.

वडागरमीठ न. समुद्रमीठ; सैंधव (याचे मोठे खडे असतात.)

वडाण न. पहा : **उडुाण** : 'तयातं चित्रगीउ वडाण घेऊनि डोंगरा एक पैलाडि गेला ।'– पंच २.२.

वडार–री पु. १. दगड फोडणे, विहीर खणणे इ. कामे करणारी एक

भटकी जात. २. या जातीतील व्यक्ती. [क. ओड्डु; प्रा. वड्डर]

वडांग स्त्री. कुंपण; वई (विशेषत: काटेरी फांद्यांची).

वडांगळे न. वडाचे फळ.

वडिपडि वि. उत्कंठित; उत्सुक : 'तें ऐकावेया सकळै जनु। वडिपडि जाहाले।'– ख्रिपु २.१६.४२.

वडि(ड)लोपार्जित वि. वाडवडलांपासून मिळवलेले, ठेवलेले (धन वगैरे).

वडी स्त्री. १. लहान चपटा तुकडा (साबण इ.चा); थापटी. २. (ल.) अळिता वगैरेत कापूस भिजवून करतात ती पोळी. ३. शेत, जमीन इ. ठिकाणी जाळण्याच्या उद्देशाने किंवा लवकर वाळावे म्हणून विरळ पसरतात ते शेण; गोवऱ्या थापणे. ४. सांडगा. (तंजा.) ५. पीठ, रवा, शेंगदाणे इत्यादींचा साखर, गूळ इत्यादीच्या पाकात घालून थापून करतात तो पदार्थ. [सं. वटी; दे. प्रा. वडी]

वडी स्त्री. चुरमुरे ठेवण्याची टोपली. (झाडी)

वडीचा वि. शेवटचा. (वाई)

वडीम स्त्री. गंजी. (व.)

वडील पु. बाप; तीर्थरूप.

वि. १. बाप, आजा, पणजा इ. पूर्वज; वाडवडील. २. वयाने मोठा. ३. विद्या, मान इ. ने श्रेष्ठ, मोठा. ४. (सामा.) श्रेष्ठ; थोर. ५. विस्तृत; लांबलचक; मोठा : 'हा आहे वडील वृत्तांत।'– वसा ७३. ६. फार; अतिशय : 'च्याऱ्ही दीस भरले वडील उछायें।'– धवळेउ ४०. [सं. वृद्ध; प्रा. वड्ढिअ; देप्रा. वड्ढिल]

वडीलकी स्त्री. १. घराण्याचा कारभार पाहण्याचा अधिकार. पेशवाईत देणे यादीवर मालक पेशवे 'द्यावं' असा शेरा व वडीलकीचा अधिकार असलेले त्यांचे कारभारी 'देवावें' असा शेरा मारीत.– अधिकारयोग ५२.५३. २. वडीलपणा.

वडीलधारा–रे पु. न. (वडील आणि लहान) घराण्यात शिस्त राखण्याचा अधिकार असलेली व्यक्ती; घराण्यातील वडील माणूस.

वडुवा पु. घास : 'वडुवे काळु बैसला असे'– लीचउ ५०.७. [सं. वटक]

वडूवा पहा : **वडवा**

वडूसा स्त्री. इच्छा. (क्रि. धरणे) (माण.)

वडेल न. वड्याचे तेल. (गो.)

वडौरी स्त्री. लहान वडा : 'घृतपर वडे वडौरीया'– मूप्र २२७२.[सं. वटक]

वड्डर स्त्री. पु. पहा :**वडार**

वड्डरखोरे न. खांदणे, माती भरणे, भराव घालणे वगैरे कामाला उपयोगी असलेले हत्यार.

वड्डावने क्रि. ओरडणे. (व.)

वड्डी स्त्री. चार चिंचोक्यांचा एक गट (मुलींच्या खेळात रूढ). [क. ओड्डु]

वढम स्त्री. नाद; आवड. (व.)

वढरी पु. प्रेतयात्रेत भाग घेणारा मनुष्य : 'कंसाते नेत माडी सखिजन वढरी गूढरी घालुनिया।'– गस्तो ३२. [सं. वह् ग्रंथे]

वढाय वि. १. ओढाळ. २. उनाड; बदमाष. (व.)

वढाळ न. ओढाळ गुरू.

वढी स्त्री. शेतात घातलेला लहानसा बांध. (व.)

वढे–डे न. १. सूड; उट्टे : 'पण मी आतांच ह्यांचें वडें काढीन.'– बाळ २.१५४. २. मोबदला; भरपाई. (क्रि. घेणे, काढणे.)

वढ्ढी पु. धोबी; परीट : 'जाते सिताबाई वना। देव भार वढ्ढिणीला।'– वलो १०. (व.)

वण पु. न. देवी, गळू, क्षत इ. बरे झाल्यानंतर त्या जागेवर राहणारे चिन्ह; डाग; व्रण; घट्टा. [सं. व्रण; प्रा.]

वण स्त्री. वेताळ, म्हसोबा इ. देवतांना देतात तो पशू इ.चा बळी. (राजा.)

वणज स्त्री. व्यापारासाठी प्रवास, फेरी. [सं. वाणिज्य]

वण(णि)जणे अक्रि. व्यापार करणे.

वणजारा–री पु. एक जात व तीतील व्यक्ती; लमाण. हे लोक परगावाहून धान्य, गुरे इ. आणून विकतात.

[गु. वणजर; सं. वाणिज्यकार; फा. बिरिंजारी = धान्यव्यापारी]

वणजारा–र पु. न. वणजारी लोकांचा तळ, समुदाय.

वणत–ती स्त्री. भिंत. (व., कारवारी)

वणधा स्त्री. कोठे दुखत असले म्हणजे सांध्यात येणारी गाठ. (को.) पहा : **अवधणा**

वणमस–म्हैस न. वनचराईचा आकार : 'हल्लीं वणमस (म्हशीमागें एक रुपाया...) भरूनसुद्धां श्रावणापासून जनावरें घरीं बांधून ठेविलीं आहेत.'– खेया.

वणवण, वणवणवाणा–णी स्त्री. १. दमणूक; व्यर्थ श्रम; कुत्तेघाशी. २. भगभग; गांजणूक.

क्रिवि. २. उगाच पुष्कळ दमणूक करून. (क्रि. हिंडणे, फिरणे.) [सं. वन् याचने, वद्]

वणवणणे अक्रि. धडपड, कष्ट करणे.

वणवणा क्रिवि. वणवणचा अतिशय.

वणवणे अक्रि. वणव्याने होरपळून जाणे.

वणवा पु. डोंगर, अरण्य इ. ठिकाणी लागलेली आग; दावानल. [सं. वन; प्रा. वण; देप्रा = वणव]

वणवा घेणे १. खांदा देणे. २. मानेवरचे जू काढल्यावर जनावर खाली पडणे. (बे.)

वणवी स्त्री. रास; गंज : 'जैसे तृणाचे वणवीसी। अग्निस्पर्श होता नाशी।'– गुच ३६.२३८.

वणसावणे न. स्वप्नातील बरळणे. (मुंबई, को.)

वणिज स्त्री. १. पहा : **वणज.** २. व्यवहार : 'ऐसा वणिजेसाठीं जागेश्वरा। विकिलासि आम्ही।'– ज्ञा ११.५४२. [सं. वणिक् – ज् वाणिज्य]

वणिज–क् पु. १. व्यापारी. २. वाणी; बनिया. [सं.]

वणिज न. (ज्यो.) १. सहावे करण. २. तूळ रास. [सं.]

वणी पु. घाव घालणारा; मारणारा : 'रणीं जुझारू घायेवाटे। तरि वणियां न बंधिजाति पाटे।'– भाए २४१.[सं. व्रणिन्; प्रा. वणि] (वा.) **वणी देणे** – वनात नेऊन मारणे.– लोक २.३१. (को.)

वणी स्त्री. गुरे कुरणात चारण्याबद्दल देण्याची रक्कम; चरणावळ.[सं. वन]

वणी समासात पाणी या अर्थाने हे रूप येते. उदा. गुळवणी, आंबवणी इ. [सं. वन; प्रा. वण = पाणी]

वणोटा पु. रंगाचा पट. [सं. वर्ण]

वण्खा पु. विळखा.– लोसाको. (व.)

वत–ती स्त्री. बाजू. वती, वतीने या विभक्तीत उपयोग.

वत पु. शेताभोवतालचा कुंप.– चित्रकृषि २.७.

वतणे अक्रि. उतू जाणे. पहा : **उतणे**

वतन न. १. वंशपरंपरेची चाकरी, धंदा, अधिकार, नेमणूक, उत्पन्न, उपजीविकेचे साधन. २. मालकीची जागा; जन्मभूमी; घर. ३. इनाम; बक्षीस. ४. वंशपरंपरागत हक्क (जमीन वगैरेचा). [अर.] (वा.) **०गाडणे** – एखाद्या जागी मालकी, सत्ता असणे. (नेहमी अभाव दर्शविण्यासाठी उपयोग).

वतनगाडले न. जुनी किंवा फार दिवस ताब्यात असलेली मिळकत.

वतनदार पु. १. वतन असलेला; वतन सांभाळणारा. २. (कायदा) वंशपरंपरेने सरकारी काम करण्याचा हक्क असणारा इसम : 'तीर्थोपाध्याय, मंदिरवाले, दरगेवाले, फिरस्ते, हुन्नरी व मनोरंजनाचा धंदा करणारे, भिकारचोरटे वगैरे वतनदार स्वत:ला म्हणवितात... सर्व गावकऱ्यांना मग ते कोणत्याही धंद्यावर पोट चालवोत वतनदार ही सामान्य संज्ञा आहे.'– गांगा. [फा.]

वतनदारी, वतनदारकी स्त्री. वतनाचा हक्क, मालकी.

वतनदारीकरी पु. फार जुना शेतकरी. (को.)

वतनपत्र न. वतनाची सनद.

वतनबंधु(धू)–भाऊ पु. १. वडिलोपार्जित मिळकतीत हक्क असणारा; भागीदार. २. सह–अधिकारी (वंशपरंपरागत); देशमुखबंधू.

वतनवाडी स्त्री. वतन, वतनी शेत, वाडी इ. जमीनजुमला.

वतनी वि. १. वडिलोपार्जित किंवा विकत घेतलेली (जमीन, मालमत्ता इ.). २. वतनासंबंधी (कागदपत्र वगैरे). ३. वतनाचे किंवा जन्म झाला ते (ठिकाण).

वतबळी स्त्री. कांकण घट्ट बसावे म्हणून मध्यभागी खाच पाडून तयार केलेले पत्र्याचे कांकण. [सं. वृत्त + वलय]

वत(ता)रणे अक्रि. १. (पिशाच अंगात) संचारणे. २. त्यामुळे (माणूस, प्राणी) पछाडला जाणे.

वतर्ना क्रि. १. मडके फुटणे. २. सपाट होणे. (झाडी)

वतल न. वैल; अवेल. (व., है.) पहा : **ओतल**

वतवत स्त्री. १. रिकामे भटकणे, फिरणे. २. वटवट; बडबड. ३. बदलणे. [ध्व.]

वतवत–ता क्रिवि. १. बडबड, वटवट करून. २. भ्रमिष्टपणाने (बोलणे).

वतवतणे अक्रि. १. वटवट करणे; बडबडणे : 'तें नाहीं तरीं किती। वतवतु।'– अमृ ७.८४. २. तणतणणे; रागाने चडफडणे.

वतवाया करनं काकुळतीला येणे; आर्जव करणे. – लोसाको. (अहि.)

वताणा पु. (चर्म.) सागळ आणि अस्तर यांमधील भाग.

वताळ पु. वार; जखम.– मनको.

वताळणे अक्रि. १. बडबडणे. (व.) २. गर्जना करणे : 'गजारूढ वताळे भाट।'– कृमुरा २५.७२.

वती, वतीने क्रिवि. तर्फे; बाजूने; बद्दल.

वत्त न. ओत; नदीला पूर आल्यावर पाण्याला येणारा फुगवटा. (बे.) [क. ओतु]

वत्तर स्त्री. १. हंगाम; योग्य संधी. २. विपुलता; समृद्धी. (व.,ना.)

वत्रणे क्रि. कापून काढणे. – ऐको.

वत्स न. पु. १. गाई–म्हशीचे वासरू. २. बाळ; मूल (लहानांसाठी प्रेमाचे संबोधन).

वत्सद्वादशी पहा : **वसुबारस**

वत्सनाभ पु. एक प्रकारचे विष; बचनाग. [सं.]

वत्सपद न. वासराच्या पायाच्या खुराने झालेल्या खळग्यात साठलेले पाणी.

वत्सर न. वर्ष; संवत्सर. [सं.]

वत्सल वि. प्रेम करणारा; दयाळू; कृपाळू. [सं.]

वत्सलता स्त्री. स्नेह; प्रेमळपणा; मायाळूपणा.

वथ स्त्री. व्यथा (कुंथण्याची). (व.) [सं. व्यथा]

वथणे अक्रि. १. मूर्खपणाने नको ते बोलणे. २. वटवट करणे.

वथारा पु. वाकडी नजर. (व.)

वथून्याणे अक्रि. झोपेत बडबडणे; बरळणे. (कु.)

वथ्थल न. पु. पाणी तापवण्याचे भांडे. (व.)

वद,वदाड न. दव. (व.)

वदणू(नू)क स्त्री. १. स्पष्ट, उघड करणे; सांगणे; वर्णन देणे. २. कबुली; मान्यता. ३. पंचाकडून इमान करवणे.– भाअ १८३२.

वदणे अक्रि. १. उघड कबूल करणे; मनातले, लपवून ठेवलेले बोलू लागणे. २. जाहीर करणे; सर्वांना मोठ्याने सांगणे. [सं. वद्]

वदन न. १. मुख; तोंड. २. (गणित.) श्रेणीतील पहिले पद.

वदर स्त्री. भीती; कदर : 'ठेऊन चित्तामध्यें वदर भिऊन या जना।'– होला १०६.

वदर पु. थर. (व.) [सं. दृ–दर]

वदरणे क्रि. आश्चर्य, अभिमान वाटणे.–लोसाको. (व.)

वदरणे अक्रि. १. विरणे; फाटणे. २. गळून पडणे; ओघळून जाणे.

वदव(वि)णे उक्रि. बोलावयास लावणे; बोलते करणे; तोंडातून काढणे.

वदळ पहा : **वर्दळ**

वदळ पु. समुद्राच्या लाटांमुळे किनाऱ्यावरील वाळूमध्ये होणारा उंचसखलपणा; उंचसखल रेषा, वळ्या.

वदंता स्त्री. बातमी; बोलवा. [सं. वदंती]

वदंती स्त्री. १. भाषण; बोलणे. २. वचन; वाक्य; विधान. ३. वार्ता; बोलवा. ४. उपदेश; उच्चार : 'जे अक्षरा एकाची वदंती।'– ज्ञा १०.१२६. ५. वटवट; बडबड. [सं.]

वदाड पु. सर्दी; पडसे. (व.)

वदान्य वि. १. उदार; दाता. २. वाक्पटू; वक्ता. [सं.]

वदी स्त्री. माती काढलेली जागा. (झाडी) [सं. वृद्धी]

वद्य पु. कृष्णपक्ष; चांद्रमासाचा दुसरा पंधरवडा.
वि. या पक्षातील.

वध पु. १. मारणे; घात; नाश; संहार. २. (गणित.) गुणाकार; घात. [सं.]

वधघट स्त्री. चढउतार; वाढघट; कमी-अधिक होणे. [सं. वृध्-वर्ध+घट्]

वध(धा)णा पहा : **वाधणा**

वधणे सक्रि. ठार मारणे; नाश करणे.

वधणे सक्रि. तुटलेली दोरी वाख वगैरे लावून पुन्हा वळणे; वाढवणे. (व.) [सं. वृध्; सिं. वधणु; गु. वधवुं]

वधस्तंभ पु. देहान्तशिक्षा देण्यासाठी पुरलेला खांब.

वधारणे अक्रि. वाढणे; मोठा होणे.

वधारा स्त्री. वाढ : 'केलेल्या प्रमाणांत परिस्थित्यनुरूप वधारा करण्याची आवश्यकता वाटल्यास...'-बडोदे, सत्कारनियम ८. [गु. वधारो; सं. वृध् - वर्धय]

वधू स्त्री. १. नवरी; जिचे लग्न ठरले आहे, चालले आहे अशी स्त्री. २. पत्नी. ३. उपवर मुलगी. [सं.]

वधूटी स्त्री. अर्धवट प्रौढ स्त्री.

वधूप्रवेश पु. १. विवाहानंतर नवरीने नवऱ्याच्या घरी समारंभाने येणे. २. या वेळचा विधी; घरभरणी.

वधूवस्त्र न. लग्नाच्या वेळची वधूची साडी; अष्टपुत्री.

वन न. पाणी : 'अति-सहवासि-वच मना कतक कलुषिता वना निवळतील।'- मोविराट ३.१६. [सं.]

वन न. १. रान; अरण्य; जंगल. २. ओसाड, निर्जन प्रदेश. ३. (समासात) पान या अर्थी उपयोग : 'तरी बद्धमूळें अज्ञानें। महादादिकीं शासनें। वेदांचीं थोरवनें घेऊनियां।'- ज्ञा १५.१४७. ४. (समासात) वन्य, रानातला, जंगली या अर्थी. उदा. वनगाय, वनवृक्ष इ.

स्त्री. १. चराई. २. गुरचरण; गायरान. ३. कणसे खुडण्याबद्दलचा मोबदला. [सं.]

वन पु. गोसाव्यांचा एक पंथ व त्यातील व्यक्ती. [सं.]

वनई स्त्री. निरगुडी. - बदलापूर ६९.

वनकर पु. वनरक्षक.

वनगाय स्त्री. १. गायींची एक जंगली जात. हे जनावर भात खाते. २. कोचिनीलचा किडा.

वनचर पु. १. पौराणिक नाटकांतील विदूषक. २. माकड. ३. (ल.) इंग्रज; टोपीवाले : 'वनचर हातें पृथ्वी केली निक्षेत्री।'- ऐपो ४०४.

वि. १. वनात राहणारा; वनवासी. २. जंगली; रानवट. [सं.]

वनचराई स्त्री. गुरांना सरकारी माळरानावर चारण्याबद्दल देण्याची पट्टी; चारणावळ.

वनदेवता, वनदेवी स्त्री. वनाची अधिष्ठात्री देवता. [सं.]

वनपशु-शू पु. जंगलातला, न माणसाळलेला प्राणी. [सं.]

वनपाल पु. जंगलातील देखरेख करणारा अधिकारी.

वनप्रस्थ न. वानप्रस्थाश्रमातील माणसांना राहण्याचे जंगलातील ठिकाण; एकांतवास. [सं.]

वनबंदी स्त्री. एक वाद्य : 'घड्याळ वनबंदी झडूं लागली।'- पाळणे संग्रह (शाहूमहाराजांचा पाळणा) ६. [सं. वन् स्तुतौ]

वनभोजन न. अरण्य, उद्यान अशा ठिकाणी केलेला जेवणाचा समारंभ.

वनमाला स्त्री. १. रानातल्या फुलांची माळ. २. विष्णूच्या, देवांच्या गळ्यातील फुले, तुळशी इ.ची गुडघ्यापर्यंत लोंबणारी माळ.

वनमाशी, वनमक्षिका स्त्री. जंगली माशी. हिमालयात अशा माश्या असून त्या चावल्या की गळवे येतात.

वनवणे अक्रि. करपणे; जळणे : 'तापानलें कवळलें। भूतजात वनवलें।'- ऋ ३३. [सं. वन्हि]

वनवलिया वि. वणव्यात सापडलेला : 'कीं मळयागिरीचां माथां। वनवलिया चंदनलता।'- शिव ७५१.

वनवा पु. १. वणवा. २. त्रास; जिवाची आटापीट. (खा.)

वनवाशा-शी वि. १. हालअपेष्टा काढणारा; अभागी. २. वाईट पायगुणाचा; सत्यानाश, नासाडी करणारा. (व.)

वनवास पु. १. अरण्यात राहणे; जंगलातील वस्ती. २. आयुष्याला स्थैर्य नसणे; भटकत राहणे. ३. प्रवासातील हाल, दु:ख. ४. वाईट दिवस; संकटकाळ.[सं.] (वा.) **०आणणे-** १. छळून, त्रास देऊन घराबाहेर काढणे. २. फार सतावणे; गांजणे.

वनवासवन-वाडी न. स्त्री. सोयीचे आश्रयस्थान म्हणून पत्करलेला अरण्यवास.

वनवासी वि. १. अरण्यात राहणारा. २. पहा : **वनवाशा**

वनशाई-ही स्त्री. वनवास : 'कैकयीच्या कलहानें तदुपरी वनशाई।'- राला ९.

वनसरणी स्त्री. रानातील मार्ग : 'चित्राश्व म्हणे दयिते गमली वन-सरणि काय कोमळ ती।'- मोवन १३.४१.

वनसे, वन्से-न्सं न. स्त्री. अव. (नित्य अव. प्रयोग) नवऱ्याची बहीण. [सं. भगिनी + सा; पतिस्वसा - वइससा - वइंसा - वयन्स - वन्सं.- भाअ १८३३.]

वनस्थली स्त्री. १. जंगलातील कोरडी जागा. २. जंगलातील रस्ता. [सं.]

वनस्पति-ती स्त्री. १. वेल, वृक्ष, झुडूप इ. २. औषधी झाड.

वनस्पतितूप न. गळिताचे धान्य किंवा इतर वानस्पतिक तेले यांपासून तयार होणारा घट्ट व पांढरा तुपासारखा पदार्थ. तेलबियांपासून काढलेल्या तेलावर रासायनिक प्रक्रिया करून तयार केलेला स्निग्ध खाद्यपदार्थ.

वनस्पतिशास्त्र न. वनस्पतीविषयी संपूर्ण ज्ञान करून देणारे शास्त्र.

वनस्फुरा वि. विस्तारूप : 'समीप वनस्फुरा। ते म्हणों भक्ति क्षेत्रिचा धुरा।'- ऋ ८७.

वना स्त्री. वनौषधी : 'तयासि वना नाहीं, पाटा नाही'- लीचउ १६१.

वनाई स्त्री. वनचराई.

वनाड्ना क्रि. ओढणे. (झाडी)

वनापाटा पु. औषधी उपचार; मलमपट्टी : 'जिएचिया घायासि वनपाटाचि नाहीं.' - सव ३४६.

वनाळी स्त्री. झाडांची रांग; झाडी; राई. [सं. वन + आली]

वनिता स्त्री. स्त्री; नारी; ललना. [सं.]

वनिया पु. वैद्य : 'रणीं जुझारु घायवटे : तरि वनियां ने दिजे पाटे'- उगी २४१.

वने न. फुलपत्री; लहान फांदी : 'देवतेचिये डोइवरि वनें ठेविलें ।'– लीचपू. [सं. पर्ण]

वनेर पु. मुंगसाच्या जातीचा एक प्राणी. पहा : **कांडेचोर**

वनौक, वनौकस न. वन्य प्राणी : 'अटवियेमाझि जैसा ।... वनौकें तिये'– ज्ञा १८.१५२१. [सं. वन + ओकस्]

वन्की, वंडकी स्त्री. रानबदक. (झाडी)

वन्निक पु. (मुद्रण.) ग्रेटपायमरपेक्षा थोडा मोठा टाईप. [इं.]

वन्य वि. १. वनातील; वनात राहणारे, वाढणारे. २. जंगली; रानवट. ३. वनवासी. ४. रानटी, असंस्कृत मनुष्य; वृक्ष, प्राणी वगैरेंची पूजा करणारा. [सं.]

वन्हि–न्ही पु. अग्नी. [सं.]

वन्हियंत्र न. तोफ : 'त्याभोंवतीं केवळ वन्हियंत्रें ।'– सारुह ८.५३.

वन्हार, वनहार पु. एक नीच जात; महार. (व.)

वपणी स्त्री. ओप देण्याचे हत्यार.

वपन न. १. बी पेरणे; पेरणी. २. (सामा.) हजामत; श्मश्रू; डोके इ. चे केस काढणे. ३. (विशेषत:) विधवा स्त्रीचे क्षौर करणे. [सं.]

वपा, वपाट स्त्री. पु. १. हाडामांसाचा चिकचिकीत रस. २. हाडातील मज्जा. ३. काळजावरील केळीच्या कोवळ्या पानासारखा असणारा पापुद्रा. ४. चरबी. [सं.]

वपारी स्त्री. पाळी; आवृत्ती. (व.)

वपिन न. (शाप.) चरबीचा मुख्य घटक. याच्या मेणबत्त्या करतात. (इं.) स्टिअरिन.

वपु पु. न. १. देह; शरीर. २. त्वचा : 'मृदु आणि कठिण । हे स्पर्शाचे दोन्ही गुण । जे वपूचेनि संगें कारण । संतोषखेदां ।।'– ज्ञा २.११५. [सं.]

वफा, वफादारी स्त्री. नेकी; इमानीपणा; निष्ठा. [अर.]

वफात स्त्री. मृत्यू. [अर. वफात्]

वमक–न न. वांती; ओकारी : 'दिवसंदिवस वमक वाढे ।'– दावि ३०. [सं.]

वमणे अक्रि. ओकणे. [सं. वमन]

वमथणे अक्रि. प्रगट होणे; आकार घेणे : 'आंगे काजळ डोंगरु वमथला ।'– गरा ७९. [सं. उद्+मथ]

वय न. १. आयुर्मान; जन्मापासूनचा काळ; आयुष्य. २. तरूणपणा; ज्वानी. ३. उतारवय; वृद्धत्व. [सं. वयस्] (वा.) **वयात येणे–** १. तारुण्याच्या भरात येणे. २. विवाहयोग्य होणे. ३. (कायदा) सज्ञान होणे; व्यवहारालायक होणे.

वय स्त्री. आजी (वडिलांची आई). (व.)

वय स्त्री. वई; कुंपण.

वयचणे, वयरण–णे, वयरा, वयला, वयलाठी इ. पहा : **वैचणे, वैरण** इ.

वयनाट स्त्री. वळचण. (व.) [सं. वलभिस्थान]

वयवाडा पु. घर, शेत इ. भोवती असणारे कुंपण. (को.)

वयसा स्त्री. १. वय; आयुष्य : 'सार्थकेविण वेची वयसा । तो येक मूर्ख ।'– दास २.१.५४. २. तारुण्य : 'एकीं वयसेचें जाड बांधलें । मग मन्मथाचिये कासे लागले ।'– ज्ञा ७.८५. [सं.]

वयस्कर, वयस्क–स्थ वि.१. प्रौढ; बरेच वय उलटलेला; पोक्त. २. तरूण; वयात आलेला. ३. वयाने मोठा; वडील. ४. वय असलेला. समासात उपयोग. उदा. समवयस्क.

वयस्य पु. (सारख्या वयाचा) मित्र; सखा. [सं.]

वयातीत वि. वृद्ध; म्हातारा.

वयाळा–ळे पु. न. पाण्यातला एक बिनविषारी साप.

वयी, वयीन वि. वय असलेला; वयाचा. समासात उपयोगी. उदा. अल्पवयी.

वर पु. आशीर्वाद; इच्छित गोष्ट मिळेल, मनोकामना पूर्ण होईल असे ऋषी, देव, पुण्यशील लोक वगैरेंनी दिलेले शुभदायक वचन; प्रसाद.

वर वि. १. श्रेष्ठ. २. अत्युत्कृष्ट; अतिसुंदर. ३. पहिला; अग्र. (समासात) द्विज–देव–तरुवर. ४. वरवरचा; खोटा; दिखाऊ.

वर पु. १. (लग्नातील) नवरा मुलगा. २. पती; नवरा. [सं.]

वर क्रिवि. १. पर्यंत; काळ; मर्यादा किंवा प्रमाण यापर्यंत. २. उंच; उच्चप्रदेशी; उपरी. ३. नंतर; मागून. ४. अधिक; जास्त. ५. शिवाय; आणखी. ६. मुळे; कारणाने. ७. अनुरोधाने; लक्ष्य विषय करून. ८. परंतु : 'हे सारि ते वर थोडे । आणीकही साधील गाढे ।'– ज्ञा १६.३५२. [फा.; क. वरम; सं. उपरि] (वा.) **०पडणे–** तत्परतेने करू लागणे. **०पाहणे –** लज्जा, शंका, भीती न वाटणे; धीटपणा असणे.

वरई स्त्री. १. एक प्रकारचे धान्याचे गवत. २. एक धान्य; वरी. [देप्रा. वरइअे; सं. वरक]

वर(रा)ई स्त्री. एक सोन्याचे नाणे. [सं. वराह]

वरकट–ड वि. इतर; बाकीचे; राहिलेले.

वरकडी स्त्री. वर्चस्व; वरचढपणा.

वरकरणी वि. बाह्य; औपचारिक; कृत्रिम; दिखाऊ; पोकळ.

वरकर्मी वि. १. पहा : **वरकरणी.** २. बाहेरचा; आत ज्याचा प्रवेश नाही असा (रोग, औषध). ३. मूळचा झरा नसलेले (पाणी इ.). ४. मूळ नसलेला; उपरी; स्थिरपणा, कायमपणा नसलेला.

वरक(को)ल पु. स्त्री. न. सोन्याच्या कसोटीचा दगड (हा पितळी कोंदणात बसवला असतो); कसोटी. [क. ओरेकल्लु; ते. ओरेगल्लु; सं. परिकल्]

वरकशी वि. वरकस धान्याच्या पिकालाच योग्य अशी (जमीन). [वर + सं. कृष्]

वरकस वि. १. तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, जोंधळा इ. मुख्य धान्ये व तूर, हरभरा, वाटाणा, मूग, मटकी ही कडधान्ये सोडून इतर हलके (नाचणी, वरी इ. धान्य). २. अशा हलक्या धान्याला योग्य (जमीन); नापीक; माळरानाची. ३. (विशेषत:) भातशेताभोवतीची गवताळ (जमीन).

वरकस पु. वर्चस्व; अधिकार; सत्ता; अंमल.

वि. १. श्रेष्ठ प्रतीचे, कसाचे (सोने). २. (सामा.) सर्वश्रेष्ठ; सर्वोत्कृष्ट : 'वरकसा जिणता जिणवेना ।'– दावि ३७९. ३. सर्वांवर सत्ता

गाजवणारा; ताब्यात ठेवणारा; देखरेख करणारा.

वरकसदार वि. अंमल चालवणारा; तपासनीस.

वरकसल वि. वरकस धान्ये, कडधान्ये यांना सामान्य संज्ञा.

वरकाम न. मुख्य कामाला साधनीभूत, पूरक असणाऱ्या गोष्टी, तसे काम.

वरकारी स्त्री. (बुरुड) दुरडी, सूप यांना गोठ घालण्यासाठी वापरतात ती जाड कांबीट.

वरकांती, वरकांतीचा वि. १. दिखाऊ; सुंदर; सुरेख दिसणारा. २. पहा : **वरकरणी**

वरकोट पु. थंडी, पाऊस इ. पासून संरक्षणासाठी कोटावर घालण्याचा लांब कोट; (इं.) ओव्हरकोट.

वरख–ग पु. न. आडनाव. (को.; कुण.) [सं. वर्ग]

वरख पु. १. पान (पुस्तकाचे). २. पान; पातळ पत्रा; वर्ख (सोने किंवा इतर धातूचा). ३. कपटा; अर्धा तुकडा (कागदाचा). ४. अर्धा बंद; चौबंदी घडी घातलेल्या देशी कागदाचा एक अष्टमांश भाग. [अर. वरक]

वरखत न. बी पेरण्यापूर्वी जमिनीत खत न घालता पीक उगवल्यावर देतात ते खत.

वरखता–त्या पु. भात कापून काढल्यावर त्याचे भारे बांधण्यासाठी, पेंढ्यास पीळ घालून वावभर लांब करतात तो दोर. पहा : **बरकता–त्या**

वरखर्च पु. १. ठरवलेल्यापेक्षा जास्त खर्च. २. इतर किरकोळ खर्च.

वरखशी, वरखशील, वरखस, वरखसल इ. पहा : **वरकशी**

वरगण न. भटकंती; हिंडणे. [सं. व्रजन]

वरगणे क्रि. वाकडे होणे. (बे.)

वरगत स्त्री. वर्गणी; पट्टी; चंदा : 'मुलीस ज्ञातिवाले पैका वरगत करून देऊन सोडवितात.'– पेद ४२.३.

वरगु वि. वर्गातील; जातीचा : 'हल्ली जफ्तीवाले तुटपुंजीक सबब वरगु फुटकळ बारा घरचे जमा झाले.'– पेद ३६.२९७.

वरघट–टी स्त्री. १. भरभराट; उत्कर्ष : 'धंद्या वरघटीला आणणे.'– केसरी २९.९.३०. २. पुनरुज्जीवन.

वरघडी स्त्री. १. वस्त्राची घडी करताना दर्शनी चांगला भाग यावा म्हणून जरा बारीक विणून काढलेला पट्टा; वरची चांगली बाजू. २. (शिंपीकाम) बाहेरच्या बाजूला असलेली दुमड.

वरघडीचा वि. १. बाह्य; वरचा. २. वरघडी असलेले (वस्त्र). ३. (ल.) दिखाऊ; भपकेदार. ४. कृत्रिम; खोटे.

वरघाट पु. १. बाहेरचा आकार, घडण; बाह्य स्वरूप. २. घाटावरचा प्रदेश; सह्याद्रीच्या पूर्वेकडील मुलूख.

वरघाटी वि. वरघाटासंबंधी; वरघाटावरील (माणूस, वस्तू इ.).

वरघाला पु. जोराचा हल्ला : 'षड्रिपूवरता वरघाला।'– दावि ३७९.

वरघोडा पु. १. वरात (नवरा–नवरीची, मुंजा मुलाची). २. नवरा मुलगा लग्नाला जाताना त्याची पालखी, घोडा, गाडी इ. तून वाजतगाजत काढलेली मिरवणूक.

वरचढ वि. सरस; श्रेष्ठ; जास्त, वरच्या दर्जाचा.

वरचढपणा, वरचवढा पु. सरसपणा; श्रेष्ठपणा; वर्चस्व : 'सास्वांचे वरचवढ्याचें वर्तन त्यास मान्य नाहीं.'– साभ ४४.

वरचणे क्रि. कापूस वठणे. (व.)

वरचश्मा–ष्मा पु. १. वरचढपणा; वर्चस्व. २. देखरेख करणारा; तपासनीस; वरचा अधिकारी. ३. वर्चस्व गाजवणारा; अधिकार चालवणारा.

वरचा वि. जागी; ऐवजी; वाटचा.

वरचा–ता वि. पश्चिमेकडचा; पाश्चिमात्य.

वरचिले–चील वि. १. इतर; अन्य; बाकीचे; उरलेले; अवांतर : 'जन्मासवें श्रम वरचिलही गेले।'– ज्ञा ९.४०४. २. वरील; वर सांगितलेले : 'आतां येणेंसि कवण भिडे। हें पांडवसैन्य कीर थोडें। वरचिले निपाडें दिसत असे।'– ज्ञा १.११९. ३. आणखी. ४. किरकोळ; सामान्य : 'संसप्तक ते राक्षस अर्जुन तो रघुपती न वरचील।'– मोकर्ण २.१२. पहा : **वरकड**[सं. उपटि; प्रा. उवटिल्ल]

वरचे दूध लहान मुलाला आईच्या दुधाऐवजी देतात ते गाई–म्हशीचे दूध.

वरचे(च्या)वर क्रिवि. १. (खाली न येता, पडता) वर; अधांतरी. २. जसे होते, असावे तशा स्थितीत; अलगद; हातचे हाती. ३. वारंवार; पुनः पुन्हा. ४. झटदिशी; चलाखीने.

वरजन वि. वरचढ; श्रेष्ठ; विशेष ज्ञानी : 'वरजनपर पानी चिद्धउ स्वामि माझा'– गस्तो २१४.

वरजाळी स्त्री. भोवरा फेकण्याची एक पद्धत.

वरजी वाकडा वि. (वरजी आणि वाकडा असे कृष्णाचे दोन विरूप गोपगडी होते त्यावरून) अत्यंत बेडौल; विद्रूप; कुरूप. पहा : **वडजा**

वरजोर वि. श्रेष्ठ : 'सीरजोर वरजोर जोर हा।'– दावि ३१०.

वरटा–ठा–ठी–डे स्त्री. १. हंसी. 'निर्मळ वरठी गे। तयाचे दारीं मी घाली घरटी गे।'– मध्व ३९८. २. गांधील माशी; गंधोली. [सं. वरटा]

वरठा–ठी पु. धोबी; परीट. (व., को.)

वरडगला पहा : **वरकोट**

वरडे(ढे)ल न. तळणाचे उरलेले तेल. याचा वास फार उग्र असतो. पहा : **ओरडेल**

वरडोळ्या–ळा वि. १. उलट्या बाहुल्या असणारा; नेत्ररोगी. २. आढ्यतेखोर; रागीट. ३. टक लावून पाहणारा; वर दृष्टी असणारा (निंदार्थी).

वरढाण स्त्री. दुर्गंधी; वाईट वास. पहा : **ओरटघाण**

वरढो(ढों)क पु. भातखाचरातील एक मोठा पक्षी.

वरण न. १. डाळीचे कालवण. याचे दोन प्रकार – आंबट व गोड. २. शिजवलेली डाळ पातळ करून त्यात हळद, हिंग इ. घालून भातावर वाढतात तो पदार्थ; वरान्न. [सं. वर + अन्न]

वरण न. प्रांत : 'दक्षिणवरणासि वीजेयापूरी वडिल मषिती करविली'– विजापूर शिला आय.३.

वरण न. १. लग्न; विवाह : 'पट्ट महिषीचें वरण। भौमासुराचें निर्दळण।'– एभा ३१.३८३. २. नेमणूक; निवड; पसंती. [सं.]

वरणभात पु. १. नुसतेच वरण आणि भात; साधे जेवण. २. (ल.)

नवऱ्यापेक्षा बायको वय, उंची, बांधा इ.त मोठी असलेले जोडपे : 'आतां अंमळ मुलगा आहे बसक्या बांध्याचा आणि पोरीची जात पडली उफाड्याची म्हणून वरणभात व्हावयाची भीति!'– गडकरी (वेड्यांचा बाजार).

वरणा पु. एक कडधान्य; पावटा; कडवे वाल.

वरणी स्त्री. १. वधूवस्त्र; अष्टपुत्री : 'ती पिवळी वरणी नेसली होती.'– झांमू ८१. २. क्रमाने अनेक ब्राह्मणांनी करण्याचे अनुष्ठान. (क्रि. देणे, घेणे.) ३. अशा अनुष्ठानाची पाळी, वेळ, खेप. ४. (दैवज्ञ) वरातीच्या वेळी लागणारे – पाच नारळ, साडी व खण इ. सामान. ५. (दैवज्ञ) तेलफळाच्या वेळचे सामान (नारळ, खारका, खजूर, बदाम इ.). बदलापूर २३६, २४०. (वा.) **०लावणे–** १. सोय करणे; पाळी देणे. २. नोकरी, मिळकतीचे साधन मिळवून देणे.

वरणीय वि. निवडण्याचा; वरण्याला, निवडीला योग्य. [सं.]

वरणे न. सक्रि. पहा : **वैरण, वैरणे**

वरणे उक्रि. १. लग्न लावणे; विवाह करणे. २. नेमणे; अधिकृत करणे. ३. पसंत करणे; स्वीकारणे. ४. धारण करणे; घेणे. ५. अंगीकारणे; स्वीकारणे.

वरत स्त्री. शिडी : 'वरता लागति आकाशी । यागाचिया ।'– ज्ञा १८.४७०. [सं. वर्ति]

वरतगड न. दागिन्यावरचा तगडाचा (इतर धातूचा) अंश.

वरतनी स्त्री. रतीब. (बे.) [सं. वृत्त; वर्तन]

वरत(ता)वळा, वरतळा पहा : **वर्तावळा**

वरता–ती–ते शअ. क्रिवि. पहा : **वर** (सर्व अर्थांसाठी)

वरताणा पु. (सोनारी) सोनाराचे एक हत्यार. याने दागिन्याला गोल आकार येतात. पहा : **काकणता** [सं. वर्तन]

वरतावा पु. हल्ला; चढाई. – शर.

वरती, वरतीकडे क्रिवि. पश्चिमेला.

वरत्रा स्त्री. दोरी; कातड्याची वादी. [सं.]

वरद, वरप्रद वि. १. इच्छिलेले, प्रार्थिलेले देणारा. २. वर देणारा. ३. कल्याणकारक; प्रासादिक ४. कृपाळू; दयाळू.

वरदचतुर्थी, वरदचौथ स्त्री. भाद्रपद शुद्ध चतुर्थी; गणेशचतुर्थी.

वरदवाणी स्त्री. आशीर्वाद; शुभचिंतन.

वरदहस्त पु. १. वर देण्यासाठी उचललेला (देवांच्या मूर्तीचा) हात; औदार्य दर्शवणारी ठेवण असणारा हात. २. शिष्यांना विद्या देणारा गुरू; सर्व संबंधितांना, आश्रितांना उन्नतीला नेणारा किंवा ज्याचा आशीर्वाद खरा ठरतो असा माणूस. [सं.] (वा.) **०ठेवणे, असणे –** १. पूर्ण कृपा करणे. २. (बहुतेक वेळा निंदार्थी) स्वत:सारखे करून सोडणे.

वरदळ न. भाजीबरोबर चव येण्यासाठी शिजवलेली डाळ; व्यंजन.

वरदळ न. १. घरावर कौले, गवत इ. घालण्यापूर्वी घालतात, पसरतात ते वासे, पांजण इ. २. वरचे कवच, साल : 'येक वरदळ बरें असतें । कठिण अंतर्त्यागि दिसतें ।'– ज्ञाप्र ८३४; वरचा भाग : 'अंग साजिरें नाकहीन । वरदळ चांग चरण क्षीण ।'– एभा ११.१२८५. ३. मुलामा : 'हावभावाचेनि वरदळें ।'– भाए ३४५. वि. १. वरचा; बाहेरचा. २. दांभिक.३. हलके; नीरस; किरकोळ. ४. जास्तीचा (खर्च).

वरदळ स्त्री. न. १. उपयोगात, वहिवाटीत असलेले जिन्नस. २. नफा; वर मिळणारा फायदा.

वरदळ, वरदाव पहा : **वर्दळ**

वरदळा–ळे क्रिवि. वरून; बाहेरून. [सं. वृत्]

वरदक्षिणा स्त्री. १. वधूचा पिता कन्यादानाची सांगता करण्यासाठी वराला देतो ती दक्षिणा; हुंडा; शुल्क. २. चोरी इ. मध्ये गेलेला पैसा, वस्तू परत मिळवण्यासाठी व्यर्थ खर्चलेला पैसा.

वरदान न. १. वर, आशीर्वाद देणे; देणगी; कृपेने केलेले दान. २. एखाद्याच्या हातून हटकून घडणारी, नेहमीची रूढ गोष्ट.

वरदानी, वरदी वि. वर लाभलेला; भाग्यवान (वंश, कुळ, व्यक्ती).

वरदोळणे उक्रि. रगडणे : 'चाणोरे वरदोळि मुष्टिक ।'– गस्तो ८०.

वरधणी पु. न. शिजणाऱ्या पदार्थावर ठेवलेले झाकण. (राजा.) [सं. वर्धनी = विशिष्ट भांडे]

वरधवा पु. नवरदेव .

वरधावा पु. १. नवऱ्या मुलाला लग्नासाठी घेऊन येण्यासाठी व वधूगृही खबर देण्यासाठी वाजतगाजत निघालेला मुलीचा भाऊ वगैरे. २. नवऱ्याला विवाहासाठी निमंत्रित करणे. ३. (ल.) आनंदाची बातमी.

वरधाविणे उक्रि. खूश करणे; खुलवणे; गोंजारणे. [सं. वृध्–वर्ध]

वरन (व.) पहा : **वैरण**

वरनट क्रिवि. वरून; वरकांती.

वरनदोरी स्त्री. तिफणनळ्या, चाडे योग्य पद्धतीने बांधून पेरण्यासाठी सज्ज करण्यासाठी वापरली जाणारी दोरी.

वरपट वि. खच्ची केलेला. (माण.)

वरपट्टी स्त्री. (विणकाम) मागावरील कापड गुंडाळण्याच्या लाकडाला घालण्याची खीळ. या दोन असतात.

वरपड–डा, वरिपडा वि. १. प्राप्त : 'पांडवां वरपड न व्हावें ।'– मुवन १२.४७. २. स्वाधीन; वश : 'वरपढा होसि तू काळा ।'– देप ७१. ३. आसक्त; ताबेदार : 'जैसा योगी होय आत्मज्ञाना । वरपडा पै ।'– कथा ४.६.११२. ४. व्याप्त; मग्न : 'दु:ख वरपडा होता जाला ।'– दास ३.१.४८. ५. विव्हळ; दु:खी : 'तै वरपडा होय अरण्यशोकें ।'– मुसभा ८.१६३. ६. पात्र; योग्य : 'म्हणोनि स्वधर्मु हा सांडसील । तरी पापा वरपडा होसील ।'– ज्ञा २.२०१.

वरपत्र न. (जप्तीचा) सरकारी हुकूम : 'मी तों महाराजाचा देशी जफ्तीदार । धाडिलेति वरपत्रासह ।'– दावि ३७७. (इं.) वॉरंट.

वरपंग–क वरपांगी, वरपंगी–की, वरपंगतीचा, वरपंगीचा–पंकाचा क्रिवि. वि. वरवरचा; बाह्यात्कारी (देखावा) : 'अवघा वरपंग सारा । पोटीं विषयाचा थारा ।'– तुगा २८३२.

वरपा पु. दरोडा; लुटीचा हल्ला : 'ठकु सिंतरु वरपेकरी । वरपा घालिती ।'– दास ३.७.४९.

वरपिके–पीक वि. झाडावरच पिकलेले (फळ).

वरप्रसाद पु. कीर्तनाच्या शेवटी परमेश्वराजवळ मागतात तो प्रसाद, आशीर्वाद.

वरप्रस्थान न. जानवसघरातून वराचे लग्नासाठी निघणे; वरघोडा निघणे.

वरबट्टा पु. नाणे मोडताना पडणारा बट्टा. पहा : **बाजारबट्टा**

वरम स्त्री. १. शेत पेरल्यानंतर शेतात उठणाऱ्या मातीच्या उंच रांगा. २. पाणी जाण्यासाठी बागायतीत केलेल्या मातीच्या वरवंड्या. (व.)

वरमणे अक्रि. १. नाजूक भागाला धक्का लागणे. (ल.) मनाला लागणे; मर्मभेद होणे. २. वर्मावर बोट ठेवल्याने ओशाळणे; शरमणे. ३. खिन्न होणे. [सं. वि + परि + नम्, वर्म]

वरमणे अक्रि. दबले जाणे; बसणे (गळू, ठुसठुस, धडधड इ.).

वरमाडा-ज पु. सूड; खरंडपट्टी.-लोसाको. (अहि.)

वरमुठी वि. वरचढ; प्रतिष्ठित.- लोसाको.

वरमूठ स्त्री. १. लग्नात वधूवरांच्या वस्त्रांना एकत्र मारलेली गाठ सोडवणाऱ्या मेहुणी वगैरे वधूपक्षीय स्त्रीला दिलेली देणगी. २. वधूच्या पित्याने मुलगी वराला देताना दिलेली देणगी; हुंडा; शुल्क.

वरयिता-यतु वि. वरणारा (नवरा); भर्ता : 'इया लागीं इये वरयितु हा।'- ज्ञा १३.१०२४. [सं. वरयितृ - ता]

वरला(ले)कडे-कडून क्रिवि. पश्चिमेकडे; वरती : 'वरिलेकडून मंदानिळ। लोटोनि आणी दिव्य परिमळ।' - मुआदि २३.३.

वरलाशी न. अव. (सांकेतिक) स्त्रीचे स्तन. (एव.) वरलासे.

वरली स्त्री. तांदूळ धुण्याची (बांबूची) रोवळी. (गो.)

वरले न. १. राख साठवण्यासाठी भिंत घालून केलेली खोलगट जागा. २. माती वाहून जाऊ नये म्हणून घातलेला चौरस बांध. ३. दोन गावांमधील सीमेची खूण. (कु.) [सं.]

वरव स्त्री. १. एखाद्या पदार्थाचे वैपुल्य असल्यामुळे वारंवार तेच खर्चण्याचा, वापरण्याचा प्रकार (तांदूळ, इतर धान्य, भाजी इ. बाबत). २. तांदूळ, पीठ इ. मुख्य पदार्थाला भाजी, कालवण इ.च्या साहाय्यामुळे किंवा काही कारणाने येणारा ऊर; शिल्लक. ३. सारखा वापर, सेवन, खर्च : 'लोभें आर्शीचीचि न मणिराशींची बरी वरव राया।'- मोसभा ६.४४. ४. पुरवठा; साठा; संग्रह. ५. रेलचेल; समृद्धी : 'वरव घरामधें ढेकूण पिसा कुठवर देऊ मी धिरा।'- पला ८३. ६. तृप्ती, पुरवठ्यामुळे समाधानाची स्थिती. [सं. उर्वरितम्]

वरव पु. १. प्रवाह; उतार. २. पाझर.

वरवटी स्त्री. चवळी. (व.) पहा : **बरबटी**

वरवड न. माणसाची, वस्तूची बाहेरील बाजू : 'वरवडाची क्रिया भीतरा येइल.'- स्मृस्थ २४३.

वरवणी न. (कृषि.) १. पावसाळा संपल्यावर (उसाला वगैरे) वरचे देतात ते पाणी. याने पावसाचे पाणी धुवून टाकतात. २. सटवणीचा पाऊस.

वरवणे उक्रि. १. (सोनारी) वर ठेवणे (छील, फासा इ. वस्तू). २. उंच करणे : 'या कोपभरें किति मान वरवत अससी हें सांग खरें?'- र ६०.

वरवता पु. खाटारा; प्रेताची तिरडी. (ठाकरी)

वरवर, वरवरचा-ता वि. क्रिवि. १. आत प्रवेश न करता, न होता. २. अंतर्यामी नाही असा; फार खोल नाही असे. ३. वरपांगी; कृत्रिम; खोटे.

वरवळा पु. वर्चस्व; बलाधिक्य : 'देखोनि वैरियांचा वरवळा। कांपिन्नली भीमकबाळा।'- एरुस्व ८.५१.

वरवंचा स्त्री.बाह्य भपक्यावरून झालेली फसवणूक.

वरवंट पु. १. साडी नेसण्याचा एक प्रकार. पहा : **परवंटा**. २. पहा : **वरवंटा** [सं. परिवर्तन]

वरवंट-टा वि. सुंदर; शुद्ध.

वरवंटा स्त्री. सुंदर स्त्री; पहा : **बरवंटा** : 'ऐसा विचार करूनि गोमटा। जात्या झाल्या त्या वरवंटा।'- नव १४.१५०. [सं. वर + वर्त]

वरवंटा-ट पु. १. चटणी, औषधे इ. पदार्थ पाट्यावर वाटण्यासाठी केलेला उभट वर्तुळाकार घडीव दगड. २. मोटेच्या विहिरीवरचे वरील आकाराचे बांधकाम. ३. (वरवंट) पेटका; स्नायूंमध्ये वरवंठयाप्रमाणे गोळा उठणे, आल्यासारखा वाटणे. ४. जाणाऱ्या-येणाऱ्याने एकेक दगड टाकल्याने झालेला दगडाचा एक लांबट आकाराचा ढीग. [वर + सं. वृत्त; सं. परिपंथ] (वा.) **०फिरवणे** - (एखाद्या वस्तूचा, घराचा) नाश करणे.

वरवंटी क्रिवि. वरवर; वरकरणी.

वरवंड-डा-डी स्त्री. पु. १. बांध. पहा : **वरंड-डा-डी**. २. तटाची भिंत.

वरवंडणे क्रि. कुरवंडी करणे.

वरवा पु. नांगर टाकणे. : 'हिंदुस्थानला जाणाऱ्या एका गलबतानें वरवा केला.'- पाव्ह ८५. पहा : **ओरवा**

वरवाग स्त्री. लगाम वर खेचणे : 'तळवागे वरवागे निर्वाळला।'- शिव १००१. [सं. उपरि + वल्गु]

वरवाळी स्त्री. उंच ढीग : 'धडांची वरवाळी जाली ते आवसरी : महावीरांसी' - रुस्व २३६८.

वरवेष-श पु. बाह्य वेश; बुरखा; ढोंग.

वरशिका-शीक वि. ज्याला वर्षाच्या आत बी येत नाही असा (माठ). (राजा.) [सं. वार्षिक]

वरशेर-सर-सांड स्त्री. भरपूरपणा; महामुरी; तुडुंब होऊन सांडणे. वि. तुडुंब; भरपूर.

वरसल स्त्री. वतन इ. चा उपभोग घेण्याची पाळी.

वरसं(सुं)दा क्रिवि. (चुकीने) सरसंदा; एकसारखा बसेल अशा रीतीने : 'उदीं उमटल्या नूतन गरसा झांकी पदर वरसुंदा।'- पला ४.३५.

वरसाडा पु. तुषार. पहा : **वसाडा, ओसाडा**

वरसार, वरसा-पारसार स्त्री. संसारोपयोगी सामानसुमान, चीजवस्तू.

वरसुणी वि. वर्षाला विणारी. (बे.)

वरसोस पु. श्वास; ऊर्ध्व. (क्रि. लागणे)

वरळा-ळी पहा : **रोवळा-ळी**

वरळा-ळे पु. न. तिसऱ्याने वारवल्यानंतर राहिलेले खळ्यावरचे धान्य; हलके धान्य व भुसा याचे मिश्रण; वरुळे. यावर महाराचा हक्क असतो : 'जया कस्तुरीएची बुडवती वरळाभूस।'- तुगा २१६६.

वरळी स्त्री. बांध; पाळ : 'जया कस्तुरीएची बुडवती : कापुराची वरळी भवंती' – शिव ३०८.

वरंगल–ळ पु. भाताची एक जात. ह्याच्या साधा, दुद्या व शेप्या अशा तीन पोटजाती आहेत.

वरंग(घ)ळ स्त्री. उतार; उतरण; घसरण.

वरंग(घ)ळणे, वरग(घ)ळणे अक्रि. १. ओघळणे; घरंगळणे; खाली घसरणे. २. कोसळणे; गडगडणे; ढासळणे. ३. धो धो खाली पडणे (पाण्याचा प्रवाह इ.). ४. पुष्कळसे खाली, बाहेर पडणे; भसदिशी बाहेर येणे, वाहणे. उदा. कणसातून दाणा, पोत्यातून साखर इ. ५. पाटावरून घरंगळत खाली सोडून मूग वगैरे धान्यातील खडे वगैरे निवडून काढणे.

वरंट पु. पेटका; वळ. (राजा.) पहा : **वरवंट**

वरंटा पहा : **वरवंटा**

वरंड स्त्री. १. डोक्यावर घेण्यासाठी बांधलेला गवताचा भारा. २. धान्याची रास. ३. कापणी केलेल्या ताटांचा भारा.

वरंड–डा–डी, वरांडा स्त्री. पु. १. कठड्याची, कडेची भिंत (रस्ता, व्हरांडा याची). सज्जा; छप्पर असलेली गॅलरी. २. दोन शेतांमधील बांध, हद्दीची भिंत; पाळा. ३. ज्याच्या भेंडा पाडतात ती मळलेली माती (तिच्या लांबट ढिगाच्या आकारावरून). ४. भिंतीची मुंढेरी; वरवंड. ५. छप्पराचे आढे; पाटेस. [सं. वरंड]

वरंड गवत कापून आणलेल्या ताटांचा भारा. असा भारा कुळाकडून दरवर्षी मिळण्याचा खोताचा हक्क असतो. [सं. वरंड]

वरंडा पु. उच्च कार्यासाठी देह ठेवणाऱ्या थोर पुरुषाच्या मृत्युस्थानी असलेले दगडांच्या ढिगांचे स्मारक.– सह्याद्री १६०. (गो.).

वरंबा–भा, वरभा पु. १. बांध (वाफा, धरण इ.तील). २. पाण्याचा पाट. ३. टेंगूळ. ४. पहा : **वरंडी**

वराटक–टिका पु. स्त्री. कवडी. [सं.]

वराटी स्त्री. (संगीत) एक राग. गानसमय सायंकाळ.

वराड न. १. पहा : **वऱ्हाड.** २. बिऱ्हाड : 'दुजें नाहीं काम गेला कुळोच्या वराडा।'– राला ४६.

वराडिक, वरांड न. लग्न : 'तेथ द्वेषेंसीं मांडिली। वराडिक।'– ज्ञा ७.१६६.

वरात स्त्री. १. झोपाळा, पाळणा इ. टांगण्याची जाड दोरी, लोखंडी साखळी, सळई इ. २. वादी; दोर. [सं. वरत्रा]

वरात स्त्री. विवाहानंतर वराच्या बिऱ्हाडी वधूवरांनी मिरवत जाणे हा समारंभ. [सं. व्रात = समुदाय किंवा वरयात्रा; हिं. बारात] (वा.) ०**काढणे** – धिंड काढणे; हाकलून लावणे.

वरात स्त्री. १. मामलेदार वगैरेंकडून येण्याच्या पैशाबद्दल सरकारकडून करतात ते मागणीपत्र किंवा हुंडी : 'सरकारची वरात व ऐवज पावल्याचे कबज.'– वाडसमा १.२७०. २. (सामा.) हुंडी; चेक; बिल. [अर. बरात्]

वरातदार पु. १. सरकारची वरात घेऊन मामलेदार वगैरेंकडे वसुलासाठी येणारा शिपाई, स्वार इ. २. (ल.) मामलेदार, खोत वगैरेंकडून कुळाकडे येणारा तगादेदार. [फा. बिरात्दार्]

वराती–त्या वि. १. वरातीसंबंधी. २. वरातीबरोबर चालणारा.

वरान न. लवण; वलाण : 'मग गोसावी आउचि वरान उतरलें।'– गोप्रच.

वरानी वि. ओलावा सोडलेली (जमीन). (झाडी)

वरान्न न. १. पक्कान्न : 'अन्न वरिष्ठ वरान्न।'– एरुस्व १४.१२५. २. पहा : **वरण** [सं.]

वराम न. वरा; नावेचा मागील भाग.

वराय–यी पहा : **वराई**

वरावर, वरकेज स्त्री. लग्न जमवणे, जुळवणे.

वरावरी क्रिवि. १. वरचेवर; वारंवार. २. झपाट्याने; निमिषात.

वरावर्द स्त्री.१. गणित, हिशेब करणे; त्याची रीत, गणना. २. मागील महिन्याच्या जमाखर्चावरून केलेले अंदाजपत्रक (कमाविसदाराच्या खात्याबाबतचे इ.). ३. (सामा.) अंदाज. [फा. बरावर्द्]

वरावर्दीचे सामान किरकोळ सामान.

वराह पु. १. डुक्कर. २. विष्णूचा एक अवतार. [सं.]

वरा(र्या)ळी, वरिआळी स्त्री. बडीशेप; एक औषधोपयोगी बीज. [गु.]

वरांडा पु. (को.) पहा : **वरांडा–ड**

वरांदूळ न. वऱ्याचे तांदूळ.– कृषि २९२.

वरि–री क्रिवि. पहा : **वर**

वरिक पहा : **वरील**

वरिकरनी पु. पती मिळवून देणारा : 'कीं रतीचा वरिकरनी'– रुस्व ७३४. [सं. वर + कृ]

वरिपडणे अक्रि. १. प्राप्त होणे : 'तेथ शब्दांकुर वरिपडी। श्रोत्रावाढी देव्हडी।'– ज्ञा १५.१००. २. गुंतणे; वरपडा होणे : 'वरिपडलें भवपाशे।'– दावि ८४. ३. गोंधळणे; काही कळेनासे होणे. ४. बुडणे; मग्न होणे : 'सेवटी होए तापा वरिपडे। दु:खाग्निमाजि।' – ऋ ५४. ५. वरून खाली पडणे : 'जो वरिपडौनि देवा : देत परमानंदु।'– ऋव २१७. [सं. उपरि + पत्]

वरिपडी स्त्री. १. मिठी. २. उडी; झडप; लुब्ध होणे : 'ऐशी डोळ्यां आवडी। म्हणोनि कामिनी वरिपडी।'– एभा १.२९४. ३. गर्दी : 'ब्रह्मादिकांचिया वरिपडी। बखलुनि कवणाचे ताट काढी।'– भाए १३२. ४. पूर्वपद; आश्रयस्थान : 'तया सन्निधानाची बेडी। जया नव्हेचि वरपडी।'– भाए ५०.

वरिय वि. श्रेष्ठ : 'आग्रहाचिया उजरिया। श्रेष्ठ देवता वरिया।'– ज्ञा १७.९८. [सं. वरियस्]

वरियाणे न. उत्तरीय वस्त्र : 'नेणों केडतें वरियाणें।'– अली ६९.

वरिल पु. परमेश्वर : 'वरिलाचा हाकारा आला होइल'–लीचउ ८२. [सं. उपरि]

वरिवट पु. उच्च स्थान; शिखर : 'जळदाचिये सुपवतिये वरिवटीं'– रुस्व ५६६. [सं. उपरि]

वरिवंडणे अक्रि. कष्ट करणे; सफळ होणे : 'वरिवंडलें जयाचिया। अनुज्ञा कां।'– अमृ २.१७.

वरिवा पु. १. वरचढपणा; श्रेष्ठपणा : 'जियें आपुलिया वरवां। नंदनवनातें मागती वरिवां।'– शिव २४९. २. शोभा; उत्कृष्टपणा.

वरिष्ठ वि. विद्या, वय वगैरे दृष्टीने श्रेष्ठ; सर्वांत मोठा.

वरि(री)स–ष न.वर्ष; संवत्सर. [प्रा.;सं. वर्ष]

वरिसखंड्या वि. वर्षाच्या बोलीने ठेवलेला (नोकर). (को.)

वरी स्त्री. एक तृणधान्य. हे उपवासाला खातात. पहा : **वरई**

वरी स्त्री. (नाविक) अंकणीला बांधलेली एक दोरी.

वरीयान, वरीव वि. श्रेष्ठ (मनुष्य, प्रश्न इ.); अत्युत्तम; अत्युत्कृष्ट. पु. (ज्यो.) अठरावा योग.

वरील वि. वरचा; वरच्या भागासंबंधी.

वरु–रू पु. मनुष्य; वर : 'संपूर्ण सींहुं ना वरु । देवता अंगीचि वीभिचारु ।'– ऋ ७२.

वरुण पु.१. जलाची अधिष्ठात्री देवता; समुद्रदेवता; पश्चिम दिशेचा स्वामी. २. सूर्यमालेतील एक ग्रह. (इं.) युरेनस. ३. (शाप.) एक उपधातू. (इं.) युरेनियम.

वरु(रौ)ता–ते क्रिवि. वि. पहा : **वर, वरता**

वरुळे न. पहा : **वरळे**

वरुंबा पु. मातीचा लहानसा बांध. (माण.) पहा : **वरंबा**

वरू स्त्री. १. अत्युच्चता; थोर पात्रता. २. (सामा.) पहा : **वरव** १ [सं. वर]

वरूटा पहा : **वरवंटा**

वरून शअ. १. वरच्या भागापासून. २. साहाय्याने; साधनाने; कारणाने. ३. परिणामतः; प्रसंगाने; मुळे. उदा. तू सांगितल्यावरून मी गेलो. ४. पुढून; समोरून; जवळून. उदा. तो माझ्या गावावरून गेला. ५. पृष्ठभागाला धरून. ६. नंतर; मागाहून (कालसापेक्ष प्रयोग). ७. वर; उपरी. ८. प्रमाणे : 'आपणांवरून दुसऱ्याला । राखीत जावें ।'– दास १२.१०.२४. ९. वरील बाजूला; बाह्यप्रदेशी.

वरे(रें) न. नावेचा मागचा भाग. पहा : **वरा, वराम**

वरेकज्या पु. लग्न जुळवणारा; मध्यस्थ मनुष्य.

वरेण न. वरी धान्याचे काड.

वरे(रै)त पु. वरणारा; भर्ता; नवरदेव. (गो., ख्रि.) [सं. वृ–वर]

वरो स्त्री. १. अन्नसामग्री; एक दिवसाचा शिधा. पहा : **ओयरा** : 'कुटुंबा वरोचि विनवणी । एर काई सांघो ।'– भाए ७२५. २. पोटगी; नित्याचे अन्न : 'बीजचि वरोसि वेंचे । तेथ वाढती कुळवाडी खांचे ।'– ज्ञा २५८. ३. धान्य : 'बाइलपासी तें वरो वोपी ।' – लीचउ ५८.

वरो पहा : **वरू**

वरोजा पु. सुरूच्या झाडाचा चीक. तंतुवाद्यांच्या तारांना लावण्याकडे याचा उपयोग होतो.

वरोटा पु. मोटेच्या विहिरीपुढची कुंडी; मोटवण.

वरो(रों)टा पहा : **वरवंटा**

वरोरू स्त्री. सुंदर स्त्री; रंभोरू; आकर्षक मांड्या असणारी स्त्री. [सं.]

वरोळा पु. पहा : **रोवळा**

वरोळी स्त्री. १. पहा : **रोवळी**. २. मोजणी कामदाराने घालून दिलेली शेताची हद्द; बांध. ३. मातीचे लहान टेकाड. (व.) [क. आरोळी]

वरोळे न. पहा : **वरळे**

वर्के न. ३० हात लांब व ७।। हात रुंद (किंवा ५० फूट बाय १२।। फूट) जमिनीचा तुकडा. (उत्तर को.)

वर्ख–र्क पु. पान; तगट. पहा : **वरख**

वर्खर पु. एक हत्यार; वस्तरा : 'सुरिया वर्खर परजिती । सिंह दांत नखें विदारिती ।'– खिपु १.१.१०५.

वर्खी–र्की वि. १. वर्ख लावलेले, सोन्याने मढवलेले (पान). २. मुलाम्याची; खोटी : 'ब्रह्म सबाह्याभंतर भरलें परि भक्ति नसो वरखी ।'– देप ७३.

वर्ग पु. १. तुकडी; संघ; समुच्चय; गट; जात; एका संज्ञेखाली येणारे अनेक प्राणी किंवा वस्तू. उदा. मध्यम–नोकरदार–धान्य इ.– वर्ग. २. (शालेय) इयत्ता; अभ्यासक्रमाचा विभाग. ३. (व्या.) वर्णांचा, अक्षरांचा समूह. उदा. कवर्ग, चवर्ग इ. ४. (गणित) गुण्यांक व गुणकांक एकत्र कल्पून गुणल्यावर होणारी संख्या. एका संख्येला त्याच संख्येने गुणले असता येणारी संख्या.उदा. ८ चा वर्ग (८x८=) ६४. ५. प्रत; दर्जा. ६. ग्रंथातील प्रत्येक लहान–लहान प्रकरण. ७. ऋग्वेदातील अध्यायांतील पोटविभाग; विशिष्ट ऋचांचा गट. ८. थवा; रास. [सं.]

वर्ग पु. १. बदली; स्थानांतर. २. (कायदा) योग्य कारणास्तव एका न्यायाधीशापुढील खटला दुसऱ्या न्यायाधीशाकडे पाठवणे.

वर्गघन पु. (गणित) घनाचा वर्ग.

वर्गणी–त स्त्री. १. वाटा; हिस्सा; विभाग (समुदायातून एका व्यक्तीचा).२. दर; किंमत; पडणारे पैसे; आकार; पट्टी. ३. पट्टी करून जमा झालेला पैसा; निधी; फंड. [क. वर्गणि]

वर्गणीदार पु. १. हिस्सेदार; भागीदार; वाटा उचलणारा. २. वर्गणी, आकार, किंमत देणारा; ग्राहक; सभासद.

वर्गमूळ न. (गणित) ज्याचा वर्ग केला असता मूळ संख्या येते ती संख्या. उदा. ९ चे वर्गमूळ ३.

वर्गवस्तू स्त्री. पहा : **वर्ग** १

वर्गसमीकरण न. (गणित) ज्या अव्यक्त पदाचा दुसरा घात म्हणजे वर्ग असतो ते समीकरण.

वर्गावर्गी स्त्री. १. विशिष्ट तत्त्वानुसार लावलेला क्रम, परंपरा, मालिका वगैरे. २. वाढ (पगार, दर्जा इ.त). ३. बदली; अदलाबदल. ४. वर्गीकरण.

वर्गित वि. वर्ग केलेली (संख्या).

वर्गी पु. वर्गातील, कुटुंबातील घटक– गोमांतकातील रीतीभाती ९. (गो.)

वर्गीकरण न. वर्ग पाडणे; निरनिराळे भाग करणे; प्रतवारी.

वर्गीय वि. १. वर्गाचा; वर्गासंबंधी. २. वर्गीकृत.

वर्चस्, वर्चस्व न. स्त्री. १. विद्या, अधिकार इ. परत्वे महत्त्व; प्रामुख्य; श्रेष्ठपणा. २. तेज; प्रभा; सामर्थ्य. ३. (निंदार्थी) वरचढपणा. [सं.]

वर्चस्वी वि. १. वर्चस्व असणारा. २. वरचढ; अरेराव.

वर्चील वि. पहा : **वरकट–ड, वरचिले**

वर्ज(र्जि)णे उक्रि. १. वगळणे; समावेश न करणे. २. एकटाच राहू देणे; लक्ष न देणे. ३. बाहेर टाकणे; टाकून देणे. ४. त्याग करणे; सोडणे. ५. परिपाठ सोडणे; बंद करणे. ६. मनाई, प्रतिबंध करणे. ७. निषेध,

निर्भर्त्सना करणे : 'तव राजपत्नी येऊनि जवळी । वर्जी आपुले पतीतें ।'- गुच ७.२४. [सं. वर्जन]

वर्जन न. वर्जण्याची, त्यागण्याची क्रिया.

वर्जनीय वि. त्याज्य; वर्ज्य.

वर्जित वि. वर्ज्य केलेला; टाकलेला.

वर्जिता वि. निवारण करणारा : 'कोणी वर्जिता नाहीं सबळ ।'- कथासा २.२६.

वर्ज्य वि. १. वगळलेला; वगळावा असा; समाविष्ट न केलेला. २. टाकून दिलेला; फेटाळलेला. ३. (संगीत) विवादी (स्वर). ४. धार्मिक आचार, संस्कार इ. साठी निषिद्ध (दिवस); प्रयाण, मंगलकार्य, नवीन कामाची सुरुवात इ. महत्त्वाच्या गोष्टींसाठी अशुभ, प्रतिकूल (दिवस). [सं.]

वर्ण पु. १. रंग; छटा. २. हिंदू समाजातील वर्ग, जात (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र). ३. (सामा.) संघ; समूह; पंथ; पक्ष. ४. कंठातून निघणारा स्वर; ध्वनी. याचे चार प्रकार - स्थायी, आरोही, अवरोही व संचारी. ५. (व्या.) भाषेतील स्वर व व्यंजनांच्या मालिकेतील प्रत्येक अक्षर. ६. कसोटीवरील उठवलेल्या सोन्याचा रंग. यावरून सोन्याची प्रत कळते. ७. (अंकगणित) गुणक; पट दाखवण्यासाठी अक्षर किंवा अंक यापूर्वी घातलेला अंक किंवा अक्षर; (इं.) को-इफिशंट. ८. (फज्यो.) गुणधर्मांवरून राशींच्या केलेल्या ब्राह्मण, क्षत्रिय इ. चार वर्गांपैकी प्रत्येक. [सं.]

वर्णक पु. १. एक अर्थालंकार; यात उपमानाहून उपमेय हीन असते. २. त्वचा, केस यांतील नैसर्गिक रंगद्रव्य. ३. रंग देण्यासाठी वापरले जाणारे व विरघळणारे रंगद्रव्य.

वर्णक्रम पु. अक्षरांचा क्रम; अकारविल्हाचा क्रम.

वर्णचिकित्सा, वर्णजलचिकित्सा स्त्री. निरनिराळ्या रंगांच्या बाटल्यांमध्ये ठेवलेल्या पाण्यावर सूर्यकिरणांचे कार्य झाल्यावर ते पाणी औषधासारखे वापरण्याची पद्धत; (इं.) क्रोमोपॅथी.

वर्णणूक स्त्री. वाहवा; वर्णन; शिफारस; गुणगौरव.

वर्णणे उक्रि. १. वर्णन, गुण-प्रसंग इ. कथन करणे; वाखाणणे. २. गुणधर्म, स्वरूप, खाणाखुणा इ.ची माहिती देणे; हकिकत सांगणे. [सं. वर्णन]

वर्णद्वेष पु. काळ्या-गोऱ्या लोकांमधील विद्रोह; भिन्नवर्णीयाबद्दल तिरस्काराची भावना.

वर्णधर्म पु. १. ज्या त्या जातीला योग्य असा आचार, व्यवहार. २. समाजाचा एक घटक या नात्याने मनुष्याचे त्यातील स्थान व तदनुसार त्याची कर्तव्ये, हक्क व जबाबदारी यांचा विचार ज्यात येतो तो.

वर्णन-ना स्त्री. १. स्तुती; प्रशंसा; गौरव. २. गुणधर्म, माहिती, विशेष गोष्टी सांगणे; शब्दचित्र. [सं.]

वर्णनीय वि. वर्णन, प्रशंसा करण्यायोग्य (पदार्थ, प्रसंग, वस्तू इ.).

वर्णपट पु. १. ज्यांच्या मिश्रणाने पांढरा रंग तयार होतो ते इंद्रधनुष्याचे सात रंग. २. भिंगातून प्रकाशकिरण गेल्यास दिसणारा विविध रंगांचा पट्टा.

वर्णमाला स्त्री. मूळाक्षरे; अक्षरमाला; मातृका.

वर्णलेखनशास्त्र न. ठरावीक वर्णांना किंवा ध्वनींना ठरावीक संज्ञा किंवा चिन्हे असावीत व ठरावीक संज्ञांचे किंवा अक्षरांचे ध्वनी ठरावीकच असावेत हे मत प्रतिपादित करणारे शास्त्र.

वर्णवलय न. सूर्याच्या पृष्ठभागापासून निघणारा आणि सूर्याभोवती वलय करणारा प्रकाशाचा, पातळसा वायूचा थर.

वर्णविचार पु. (व्या.) वर्णाचा विचार ज्यात केला जातो तो व्याकरणाचा भाग.

वर्णविपर्यय-विपर्यास, वर्णव्यत्यास-व्यत्यय पु. (भाषा.) शब्दांतील वर्णांची अदलाबदल, त्यांचे स्थानांतर. उदा. डोचके-डोकचे, महशूर-मशहूर इ.

वर्णविपर्यास पु. १. रंगांची विरुद्धता, विरोध. २. रंग उडत, कमी होत जाणे.

वर्णव्यवस्था स्त्री. वर्णांची कर्तव्ये, अधिकार, व्यवहार, उच्चनीचत्व, परस्परावलंबित्व, परस्परपूरकत्व वगैरे गोष्टींचा विचार करून धर्मशास्त्रकारांनी समाजाचे व्यवहार सुरळीत चालण्यासाठी पूर्वी हिंदू समाजाची ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार वर्णात विभागून निर्माण केलेली व्यवस्था. पहा : **वर्णधर्म**

वर्णशः क्रिवि. १. जातवार; वर्गवार; वर्णाप्रमाणे. २. अक्षरशः; अक्षरानुक्रमाने.

वर्णषष्ठि-सट-सठ स्त्री. श्रावण शुद्ध षष्ठी. या दिवशी स्त्रिया ब्राह्मणांना वरण्यांचे वायन देतात.

वर्णसंकर पु. १. हिंदू धर्मातील भिन्न वर्णांचे परस्पर मिश्रण. याचे दोन प्रकार. रक्तसंकर (भिन्नवर्णीय स्त्री-पुरुषांच्या संबंधातून संतती उत्पन्न होणे) आणि वृत्तिसंकर (एका वर्णातील व्यक्तीने दुसऱ्या वर्णाला विहित असे कर्म करणे). २. भ्रष्टाचार; सबगोलंकार. [सं.]

वर्णसंधि-धी पु. एकापुढे एक येणाऱ्या दोन अक्षरांचा संयोग.

वर्णहीन वि. वर्णव्यवस्थेत समाविष्ट नसलेला; जातिहीन. [सं.]

वर्णानुप्रास पु. तेच तेच अक्षर, व्यंजन पुनः पुन्हा येणे. [सं.]

वर्णावरण न. सूर्याभोवतीच्या तीन आवरणांपैकी मधले, मुख्यतः हायड्रोजन असणारे, तुलनेने कमी जाडीचे तेजस्वी आवरण.

वर्णाश्रम पु. अव. हिंदू धर्मातील व्यक्तींच्या जीवनातील चार वर्ण (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र) व चार आश्रम (ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व संन्यास). [सं.]

वर्णाश्रमधर्म पु. ज्या त्या वर्णांनी पाळावयाचे नियम; वर्णाश्रमाचे नियम पाळण्याविषयी आज्ञा करणारा धर्म.

वर्णांधता स्त्री. दृष्टीच्या दोषामुळे रंग न ओळखणे.

वर्णिक न. स्तुतिपर काव्य : 'गगनीं वर्णकीं गायिला वटैआ हा.'- वेळापुर शिला ४.१.१८. [सं. वर्णक]

वर्णित वि. १. वर्णन केलेले; प्रशंसा केलेले. २. चित्रित; निवेदित. [सं.]

वर्णी पु. ब्रह्मचारी. [सं.]

वर्त पु. १. मार्ग; वाट : 'जिणौनि मनातें । जे वळघले ज्ञानाचिया वर्ते ।'- भाए १६४. २. बंधन; नाडा : 'अव्यक्ताचा वर्तु सारी । महंतत्वाची खुलि धरी ।'- भाए ६०२. ३. दोरीवरून चालणे : 'तियेसि वर्त साधे.'- लीचपू २०४. [सं. वृत्-वर्त]

वर्त स्त्री. पाण्यातील भोवरा : 'तैसा चांदिणेयाचा निडारू : जेथ रत्नें वर्तेचीं.'– रुस्व ५१२. [सं. आवर्त]

वर्त स्त्री. उटी; उटणे : 'चालेविण पाउलीं। कर्माचिया वर्ते वरि।'– भाए ६०५. [सं. वर्ति]

वर्त स्त्री. वार्ता; गोष्ट : 'सर्व बाष्कळचि वर्तवितो गे।'– वामन, बाळक्रीडा ३८. [सं. वृत्]

वर्तक पु. १. बेलिफासारखा एक गावकामगार. २. ग्रामपंचायतीच्या ठरावांची अंमलबजावणी करणारा अधिकारी. २. सरकारी वजने-मापे पाहणारा अधिकारी. ४. जमाबंदीचा कारकून. ५. व्यापारी.
वि. विद्यमान : 'वरतकु कोश'– नागाव शिला १.१२.२२. [सं.; क.]

वर्तकांडी स्त्री. रंगाची कांडी. [सं. वर्ति+कांड]

वर्तकी स्त्री. वर्तकाचा अधिकार.

वर्तणीया पु. जागल्या; रखवालदार : 'चौकी पहाऱ्याकरितां पोलिसचे लोक व गांव नोकरापैकीं वर्तणीये वगैरे लोक हजर ठेवावे.'– वाघसिंहाची शिकार २४. [गु. वर्णणीयो]

वर्तणु पु. वर्तन : 'जैसा वर्तणु जैसीं आकृती।'– दाव २२. [सं. वर्तन]

वर्तणूक स्त्री. १. वर्तन; वागणूक; राहणी. २. जीवन; आयुष्यक्रम; दिवस कंठणे.

वर्तणे अक्रि. १. वागणे; आचरण करणे. २. राहणे; (आत, वर इ.) असणे. ३. अमलात असणे; चालू, रूढ असणे. ४. घडणे; होणे; उद्‌भवणे : 'ज्याला वर्तली चिंता।'– ऐपो ४१. ५. ऋणात असणे : 'मज बहुत भीष्मद्रोणाचें वर्ततसे।'– ज्ञा २.३४. [सं. वृत्]

वर्तन न. १. वागणूक; आचरण. २. राहणे; नांदणे; अस्तित्व. ३. धंदा; व्यवसाय; उपजीविकेचे साधन : 'यज्ञा ऐसें वर्तन। जीविकें केलें।'– ज्ञा १३.३५६. ४. हालचाल : 'रुक्मिणीदेवीसि कैसी वर्तन असैल.'– श्रीकृच ६२. [सं.]

वर्तनीय वि. (एखाद्या कामधंद्याला) लावण्याजोगा; कामात गुंतवण्याजोगा.

वर्तबान पु. ('मर्तबान'बद्दल चुकीने) बरणी; रांजण. [अर. मर्तबान्]

वर्तमान न. १. वस्तुस्थिती. २. बातमी; हकिकत. ३ वृत्तान्त; कथा. ४. वर्तमानपत्र.
वि. १. चालू, विद्यमान, हयात; अस्तित्वात असलेला. २. अमलात असलेले; रूढ. ३. (व्या.) चालू, सांप्रतचा (काळ).

वर्तमानकाळ पु. (व्या.) विद्यमानी चालत असणारा काळ; प्रस्तुत काळ.

वर्तमानणे सक्रि. योजणे : 'मीया एक वर्तमानलें असे.'– रुस्व १९.३६.

वर्तमानपत्र न. बातमीपत्र; वृत्तपत्र.

वर्तमानभविष्य (व्या.) पु. एक काळ. कर्त्याच्या मनात क्रिया, कृती करण्याची इच्छा आहे पण त्याने क्रियेला प्रारंभ केलेला नाही असा बोध होणाऱ्या क्रियापदाचा काळ.

वर्तमानभूत पु. (व्या.) एक काळ. भूतकाळात आरंभलेली क्रिया वर्तमानाकाळापर्यंत चालत आहे असा अर्थ उत्पन्न होणारा काळ. उदा. मी केले आहे.

वर्तवणे उक्रि. १. वर्तणेचे प्रयोजक रूप. २. (ज्यो.) गणित करून निश्चित करणे (ग्रहण, संक्रांत वगैरे). ३. (खलात तपकीर इ.) घोटणे.

वर्त(र्ता)वळा, वर्ताळा पु. १. एका शिक्क्याचे नाणे देऊन दुसऱ्या शिक्क्याचे घेताना पडणारा वटाव, वरबट्टा. २. विवक्षित प्रमाणाने मोजल्यावर येणारा वाढावा. ३. व्यवहार केल्यानंतर हाती राहणारा नफा किंवा भरावा लागणारा तोटा; शिल्लक बाकी. ४. पुरे माप दिल्यावर वर आणखी थोडा घालतात तो जिन्नस.

वर्ति-र्ती स्त्री. १. दिव्याची वात; बत्ती. २. (वैद्यक.) सळई; बत्ती. हिचा उपयोग स्त्रियांच्या गुह्येंद्रियात औषध घालण्यासाठी होतो. ३. (गर्भाशयाचे इ.) छिद्र रुंदावण्यासाठी केलेली कापसाची वळी; विस्तारक. [सं. वर्ती]

वर्तित वि. चालवलेले; वर्तवलेले; व्यवस्था केलेले. [सं.]

वर्तित(करण) न. (नृत्य.) दोन्ही हातांची मनगटे आकुंचित करणे व दोन्ही हातांची बोटे व्यावर्तित-परावर्तित करून हात मांड्यांवर टाकणे.

वर्तु(र्त)ळ न. (भूमिति.) ज्या आकृतीची मर्यादा एकाच वक्ररेषेने दाखवली जाते व जिच्यामध्ये असा एक बिंदू असतो की त्यापासून त्या वक्ररेषेपर्यंत कितीही सरळ रेषा काढल्या तरी त्या समान असाव्यात अशी आकृती.
वि. वाटोळे; गोल. [सं. वर्तुल]

वर्तुळदीप पु. गोल दिवा. (इं.) स्पॉटलाईट.

वर्तुळपाद पु. व्यासावर लंब असणाऱ्या त्रिज्येने अर्धवर्तुळाचे जे दोन समान भाग होतात त्यांपैकी प्रत्येक; पाव वर्तुळ.

वर्तुळमध्य पु. पहा : **मध्यबिंदू**

वर्तुळमय वि. गोलाकृती; गोलीय. (इं.) स्फेरिकल.

वर्तुळाकार पु. १. पूर्ण नाश; फन्ना. २. पूर्णपणे खलास, खर्च; पैसे अजिबात नसण्याची स्थिती, अकिंचनता.
वि. वाटोळे; गोल.

वर्त्म न. पु. १. मार्ग; वाट. २. डोळ्याची पापणी. [सं.]

वर्त्मरोग पु. (आयुर्वेद) पापण्यांचे रोग.

वर्त्मावबंध पु. पापण्यांचा ताठरपणा.

वर्‌थेंबी वि. कोरडवाहू. (झाडी)

वर्दळ स्त्री. १. (रस्ता, जमीन, वस्त्र-पात्र इ.वर) नासधुशीची क्रिया; धुडगूस; तुडवातुडव; जोराने; निष्काळजीपणे वापर; राबता. २. त्रास देणे; छळणे. ३. अडचण; त्रास; उपसर्ग. ४. वाद; भांडण. ५. बैठकीची वापराची जागा. [सं. परि + दल् विशरणे]

वर्दावर्द-र्दी स्त्री. १. हातातोंडाशी गाठ; जेमतेम उदरनिर्वाह. २. देवघेव; प्रसार; व्यापार.

वर्दावळ स्त्री. (चर्म.) पायात वहाणा अडकण्यासाठी पायाच्या घोट्यावरची रुंदट पट्टी. ही वर्दावळीची दोन्ही टोके कातड्यामध्ये घालून शिवतात. (को.)

वर्दी स्त्री. १. लष्करी पोशाख. २. सरकारी गणवेश. [इं.]

वर्दी स्त्री. १. भेटीला आल्याचा निरोप. २. बातमी; खबर. ३. हुकूम; आज्ञा. ४. तैनात; शुश्रूषा. [हिं.; क. वरदि]

वर्दीपुस्तक न. हुकूम लिहून ठेवण्याचे पुस्तक; (इं.) ऑर्डरबुक.

वर्धक वि. १. वाढवणारा. २. उत्कर्ष, भरभराट करवणारा. [सं.]

वर्धट स्त्री. वाढ. [सं. वृध् - वर्ध्]

वर्धणे अक्रि. वाढणे.

वर्धन न. १. मोठे होणे; वाढणे; वाढ. २. भरभराट; उत्कर्ष; प्रगती. ३. (वैद्यक.) अंगाची उष्णता वाढवणे. पहा : **सप्तोपचार**
वि. (समासात) वाढविणारा; आधिक्य करणारा. [सं.]

वर्धनीय वि. वाढण्यास योग्य, लायक; वाढवता येण्यासारखा. [सं.]

वर्धमान वि. १. वाढता; मोठा होणारा. २. भरभराटणारा; उत्कर्ष पावणारा.

वर्धमान पिंपळी एक औषधी-योजना. पहिल्या दिवशी एक भाग, दुसऱ्या दिवशी दोन भाग अशा प्रकारे पिंपळी खाण्याचे काही दिवस चढवून तशाच क्रमाने उतरवीत जाणे. श्वास, खोकला, क्षय इ. रोगांवर हा उपाय करतात.

वर्धमान संयुक्तहस्त (नृत्य.) हंसपक्ष हात पाठीला पाठ लावून ठेवणे.

वर्धमानांतर वि. (शाप.) फाकणारा; पसरणारा (किरण). (इं.) डायव्हर्जंट.

वर्धापन न. १. वाढदिवस. २. या दिवशी करण्याचा विधी. [सं.]

वर्धाव-वा पहा : **वरधावा** ३

वर्धित वि. वाढलेला. [सं.]

वर्धिष्णु वि. वाढणारा. [सं.]

वर्ना अक्रि. १. लाटणे. २. बैल थकणे. ३. लाकूड वाकडे होणे. ४. उकळत्या पाण्यात पीठ किंवा डाळ टाकणे. (झाडी)

वर्पडा पु. ओरखडा. (झाडी)

वर्म न. चिलखत; कवच. [सं. वर्मन्]

वर्म-र्मा प्र. क्षत्रिय जातीच्या नावापुढे लावण्यात येणारा प्रत्यय. उदा. कृष्णवर्मा. [सं.]

वर्म न. १. नाजूक, हळवा, दुखरा भाग. २. (ल.) नाजूक जागा, मर्म. ३. ज्याचा उल्लेख केला असता राग येतो अशी गोष्ट; बिंग; जिव्हार. ४. रहस्य; तत्त्व; सार. ५. मख्खी; खुबी; गुह्य. ६. बळी पडण्याचे, वश होण्याचे साधन : 'बायकांचें वर्म म्हणजे दागिने'- शारदा ३२. ७. महत्त्वाची गोष्ट : 'चुकलिया वर्म व्यर्थ जाती।'- रामदास, स्फुट अभंग (नवनीत पृ. १५१.). ८. न्यून; व्यंग : 'आड मी वर्मीं बोलावित'- वह २१७.[सं. मर्मन्] (वा.) **वर्मे चर्मे छेदणे** - एखाद्या विषयाला आतपर्यंत भिडणे, आरपार जाणे.

वर्म न. गळू; दुखणे. [अर. वरम]

वर्मकर्म न. १. उखाळीपाखाळी : 'हांसोनियां काढिति वर्मकर्मा।'- आ उमारमासंवाद १. २. व्यंग; छिद्र (बहुधा अनेकवचनी प्रयोग).

वर्मचक्र न. दाते असलेले चाक.

वर्मणे सक्रि. वर्म जाणणे.

वर्मी वि. १. मर्मभेदक; बोचक; टोचणारे (भाषण इ.). २. मर्मे, बिंगे, व्यंग, दोष जाणणारा. ३. गूढ, मर्म, रहस्य जाणणारा (एखाद्या धंद्याचे, यंत्राचे इ.); तज्ज्ञ. ४. मर्मज्ञ; मार्मिक; आतला अर्थ, रहस्य जाणणारा (ग्रंथ, विधान इ. तील). ५. काही गुह्य गोष्टी, बिंगे असणारा; वर्म काढलेले खपत नाही असा.

वर्य वि. १. निवडण्यास योग्य, लायक. २. मुख्य; प्रधान; श्रेष्ठ. [सं.]

वर्या वि. स्वयंवर करणारी (स्त्री) : 'जे तुया वर्यवर्या सगुणगुण-मया आत्मसा-धुर्य धुर्या।'- मुरा अयोध्या १०१. [सं.]

वर्शिली स्त्री. नेम; व्रत. (बे.)

वर्ष न. १. संवत्सर; बारा महिन्यांचा काळ; साल. २. सांवत्सरिक श्राद्ध; वर्षश्राद्ध. [सं.]

वर्ष पु. आर्य पुराणकथेप्रमाणे खंडाचा विभाग. हे पुढीलप्रमाणे नऊ आहेत : कुरु, हिरण्मय, रम्यक, इलावृत्त, हरि, केतुमाला, भद्राश्व, किन्नर, भारत. [सं.]

वर्ष, वर्षन पु. न. १. वर्षाव; वृष्टी. २. पाऊस पडणे : 'सांगे वातवर्ष आतपु घरे। ऐसे अभ्रच्छायाचि जरी सरे।'- ज्ञा ५.११४. [सं.]

वर्षगणना स्त्री. वर्ष मोजण्याची पद्धत. ही सौर व चांद्र अशा दोन प्रकारची आहे.

वर्षगाठ स्त्री. वाढदिवस. (पूर्वी दरवर्षी जन्मदिवशी दोरीला एकेक गाठ देऊन त्या गाठीवरून वय मोजण्याची चाल होती.)

वर्षधात स्त्री. वर्षाचे सामर्थ्य; वर्षफल (मानवी व्यवहारावर परिणाम करणारे). (क्रि. जपणे, सांभाळणे.)

वर्षप्रतिपदा स्त्री. चैत्र शुद्ध प्रतिपदा; गुढीपाडवा.

वर्षफल न. ज्योतिषशास्त्राच्या आधारे वार्षिक फल.

वर्षवीण वि. वर्षाला विणारी (गाय, म्हैस).

वर्षवृद्धी स्त्री. एकाच राशीत गुरू ग्रह राहतो ते वर्ष.

वर्षसण पु. लग्नाला वर्ष पूर्ण होते त्या प्रसंगी जावयला दिलेली मेजवानी, आहेर इ.

वर्षा स्त्री. सहा ऋतूंपैकी एक ऋतू; पावसाळा. हा श्रावण व भाद्रपद या चांद्र महिन्यात येतो.

वर्षाचा दिवस, सण १. वर्षश्राद्धाचा दिवस. २. वाढदिवस. ३. सणाचा दिवस (हा वर्षातून एकदाच येतो म्हणून).

वर्षान काळ, वर्ष क्रिवि. १. प्रतिवर्षी. २. अनेक वर्षे (टिकणे इ.).

वर्षायु वि. एक वर्ष टिकणारी (कापसाची एक जात). (खा.)

वर्षाव पु. १. पाऊस. २. वृष्टी; फेकणे; भडिमार (फळे, फुले इ.चा).

वर्षासन न. वार्षिक नेमणूक; उदरनिर्वाहासाठी प्रतिवर्षी देण्याचे धन, धान्य इ. (याबद्दल चाकरी करावी लागत नाही.)

वर्षोगणती स्त्री. वर्षात, वर्षांनी मोजणे.
क्रिवि. वर्षांनी (मोजणे).

वर्षोवर्ष क्रिवि. १. प्रत्येक वर्षी. २. कित्येक वर्षांपर्यंत.

वऱ्हा पु. गुळाचा रांधा निवळण्यासाठी जमिनीत केलेल्या ज्या खाचेत तो ओततात ती खाच.

वऱ्हा, वऱ्हाय पु. (अपभ्रंश) वराह, डुक्कर. [सं. वराह]

वऱ्हाटा पु. दगडी मुसळी.

वऱ्हाड न. १. लग्न : 'सप्त वर्षे जार्ती तत्वतां। चिंतित होती मातापिता। वऱ्हाड केवीं करावें।'- गुच ३५.१२०.- जगन्नाथ, शके १६६९ ग्रंथमाला. २. लग्नाची मिरवणूक. ३. लग्नासाठी जमलेली मंडळी. ४. (ल.) मुंग्यांची रांग. [सं. वर + हाट किंवा आड]

वऱ्हाड न. १. जनावराने सकाळच्या वेळी उकिरडा फुंकत फिरणे; इरड करणे. २. (ल.) व्यसनीपणाचा क्रम.

वऱ्हाडगोष्टी स्त्री. अव. १. लग्नासंबंधीच्या गोष्टी, गप्पा, हकिकती. २. पोकळ प्रेमाच्या, सेवेच्या गोष्टी, बढाया.

वऱ्हाडघर न. लग्नघर; वऱ्हाड उतरलेले घर.

वऱ्हाडटक्का पु. लग्नावरचा कर.

वऱ्हाडणे अक्रि. १. लग्न होणे; विवाहसंस्कार होणे. २. विवाह समारंभात वऱ्हाडी लोकांनी मग्न होणे. ३. (ल.) मेजवानीत, आनंदाच्या गोष्टीत तल्लीन होणे.

वऱ्हाडी वि. (लग्नाच्या) वऱ्हाडातील, वऱ्हाडाकडला (पाहुणा, वस्त्र इ. वस्तू).

वऱ्हाडी वि. १. वऱ्हाड प्रांतातील (मनुष्य, वस्तू इ.). २. मोठमोठ्या, बढाईच्या (गोष्टी).

वऱ्हाडीक-का स्त्री. सोयरीक; लग्नसंबंध : 'तयेनें बोधिला अनिरुद्ध। म्हणे आतां करूं संबंध। वऱ्हाडिकेचा।'- कथा १.६.११४.

वऱ्हाडीक पु. बोलावणे; आमंत्रण : 'पैं परिसतु आहासि निकियापरी। तेंचि वक्तृत्वा वऱ्हाडीक करी।'- ज्ञा ९.२३८.

वऱ्हाडीण स्त्री. लग्नासाठी आलेली स्त्री.

वऱ्हाडीण स्त्री. धान्य उपणताना भुसा झाडण्याची केरसुणी. (व.)

वऱ्हे शअ. वर : 'परिसाचे कसवटीवऱ्हें। जें जें तें तें साडेपंधरें।'- एभा २.४४१.

वल स्त्री. १. खणाची घडी; खणाळे. २.पांघरण्याचे लांब पांढरे कापड. ३. हात टेकून पाय वर करून मारलेली उडी. (क्रि. टाकणे) (व.) [सं. वल्]

वलकट स्त्री. पांघरण्याची पासोडी. (जुन्नरी)

वलखरणे अक्रि. १. विसकटणे; विखुरणे (विशेषत: केस इ.). २. अस्ताव्यस्त पसरलेले; पडलेले असणे. (प्रां.)

वलगणे पहा : **वल्गणे** : 'वृथा वेडीं वलगती।'- एरुस्व १५.११६. [सं. वल्गना]

वलण न. चिरगुटे ठेवण्यासाठी असलेली पालखीच्या दांडयाच्या आकाराची वेळूची दांडी. (को.)

वल(ल्ल)द पु. (चा)मुलगा. माणसाचे नाव लिहून संबंधार्थ बापाचे नाव लिहायचे झाल्यास मध्ये घालतात : 'सूरज वल्लद बापू जोशी ज्योतिषी वतनदार जुन्नर.'- वाडसनदा ८५.

वलन न. १. वळणे; हलणे; चलन. २. (ज्यो.) खगोलाच्या ठिकाणी दोन बृहद्वर्तुळाद्वारे होणारा कोन. याचे अयन, अक्ष, स्पष्ट इ. प्रकार आहेत. [सं.]

वलनऊरु-रू पु. (नृत्य.) अग्रतलपाद करून जानू आतील बाजूस घेऊन उरु वळविणे.

वलनतारा पु. (नृत्य.) डोळ्यांची बुबुळे बाजूस वाकडी वळवणे.

वलभा स्त्री. आवड.- मनको.

वलभी स्त्री. घराच्या छपराला आधार म्हणून लावलेला वासा, कडणी इ.: 'वलभीवरी गोलांकुळ। अतिविचित्र शोभती।'- मुसभा २.४२. [सं. वलभी]

वलम्ना क्रि. लोंबकळणे. (झाडी) [सं. लंब्]

वलय न. १. कंकण; कडे; बांगडी. २. वर्तुळाकार; गोल आकार. ३. (प्राणि.) पृष्ठवंशाचा मणि-मणका. - प्राणिमो ९७. [सं.]

वलय पु. तोल. (बे.)

वलयरोग पु. घटसर्प.

वलयांकित वि. भोवताली वर्तुळ असलेले; वेढलेले.

वलवटा पु. वहिवाट; वळण : 'ही गोष्ट जालियास बदनक्ष होऊन आमलाच वलवटा मोडतो.'- पेद २०.१४२.

वलवटी स्त्री. वळी; सुरकुती. [सं. वल् + वटी प्रत्यय]

वलवणी स्त्री. देवीचा कौल घेणे. - अडिवऱ्याची महाकाली १५०. [सं. लप्, आलपन]

वलव(वि)णे सक्रि. ओझे डोक्यावर घेण्यासाठी मदत करणे; हात लावणे. (को., कुण.)

वलवल्हा पु. गोंगाट; आवाज.- ऐको.

वलसाव स्त्री. दिव्याखाली पडणारी सावली.- लोसाको. (व.)

वलंगे न. लगाम; वागुरा. [सं. वल्गा]

वलंज पु. एक मासा. हा एक फुटापेक्षा मोठा असून त्याच्या सेकर व शिलन अशा दोन जाती आहेत.

वलंदेज पु. हॉलंड देशातील लोक; डच. [गु. वलंदा; इं. हॉलंड]

वलाट-टी-ठी न. १. किनाऱ्यापासून सह्याद्रीच्या पायथ्यापर्यंतची चढती जमीन. याउलट खालाटी. २. कोकणात या जमिनीच्या पूर्वभागाला वलाटी म्हणतात व समुद्रालगतच्या भागाला खालाटी असे म्हणतात. ३. वरचे गाव. (कु.)

वलाटकर वि. वलाटीचा रहिवासी.

वलाटा पु. जहाजाच्या मार्गाचा तक्ता; जलमार्गाचा नकाशा.

वलाणी स्त्री. बांधणी; चढवणी : 'जाली पलाणा वलाणी।'- उषा ७३.१९. [सं. वलन]

वलावदार पु. १. दुसऱ्या गलबताला समुद्रात संरक्षण, मदत देऊन नेणारे गलबत. २. (ल.) साहाय्यक; पाठपुरावा करणारा; संरक्षक.

वलावा पु. १. माणसांचा किंवा गलबतांचा तांडा सुरक्षितपणे इच्छित ठिकाणी पोचावा म्हणून अधिकाऱ्यांकडून घेतलेला शिपाई, लवाजमा इ. पाठबळ. पहा : **पावणी.** २. त्याबद्दल अधिकाऱ्याला द्यावे लागणारे शुल्क, धन. ३. वलवणी.

वलित(करण) न. (नृत्य.) उजवा हात अपविद्ध करणे व उजवा पाय सूची करणे.

वली पु. १. साधू; संत; सत्पुरुष. २. मालक; धनी; पालक. ३. प्रांताचा अधिकारी. [अर.]

वलीत न. (गुरे इ.) वळवून नेणे : 'मिरजेचा मोगल इसलामपुरास गुराचें वलीत करावयास आला होता.'- वाडशाछ ५. [सं. वलित]

वलीस वि. इवलासा; थोडासा : 'लघु लघु वलीसी ।'- कृमुरा ७६.१३. [सं. अल्पीयस]

वल्क न. पु. १. झाडाची साल, त्वचा. २. माशाचा खवला. [सं.]

वल्कपर्ण पु. (शाप.) खवला; खपली.

वल्कपक्ष पु. पंखांना खवले असणाऱ्या प्राण्यांचा वर्ग. यात फुलपाखरे

रेशमाचे किडे इ. येतात.–प्राणिमो ११२.

वल्कल न. १. झाडाची साल, अंतस्त्वचा. २. त्यापासून तयार केलेले वस्त्र. [सं.]

वल्गणे, वल्गिजणे अक्रि. १. वल्गना, व्यर्थ बडबड करणे : 'इयें वायांचि सैन्य पाहीं। वल्गिजत आहातो।'–ज्ञा ११.४५८. २. प्रौढी; बढाई; फुशारकी मारणे. [सं. वल्गना]

वल्गना स्त्री. १. बडबड; पोकळ भाषण. २. बढाई; फुशारकी. [सं.]

वल्गा स्त्री. लगाम : 'या टोपा कवचाच्या भीमा वल्गा उगेचि आटोपा।'–मोकृष्ण ८६.२५. [सं.]

वल्मीक न. पु. १. मुंग्यांनी केलेले वारूळ. २. वातदोषाने मान, गळा, हात–पाय इ. ठिकाणी उत्पन्न होणारा गाठीचा रोग. [सं.]

वल्ल पु. वाल : 'जो भगवदुक्ति जिवती धरिल न पावेल बाळ वल्ल भया।'–मोमंभा २.११८. [सं.]

वल्लकी स्त्री. पावा; मुरली. [सं.]

वल्लफ पु. पांढरा दगड. सफेतीसाठी हा उगाळून भिंतीला लावतात. (व.)

वल्लभ पु. १. प्रियकर. २. नवरा. ३. प्रिय, आवडता माणूस : 'ब्राह्मण भोजन द्वादशीसी। भगवंताशीं वल्लभ।'– एरुस्व ४.२०. [सं.]

वल्लभणे अक्रि. प्रिय होणे; आवडणे. [सं. वल्लभ]

वल्लभपंथ पु. वल्लभाचार्यांनी गुजरातेत स्थापन केलेला कृष्णभक्तीचा, वैष्णव पंथ; पुष्टिमार्ग.

वल्लभा स्त्री. १. प्रेयसी. २. पत्नी. ३. (सामा.) प्रिय, आवडती स्त्री. ४. उपस्त्री; रखेली. [सं.]

वल्लरी स्त्री. वेल; लता. [सं. वल्ली]

वल्ली–ल्ही पु. १. वली; साधू : 'वल्ली पीर पैगंबर।'– दावि ४७४. २. विक्षिप्त, विचित्र, स्वच्छंदी माणूस; वेडा पीर. [अर. वली]

वल्ली स्त्री. १. वेल; लता. २. (गणित.) श्रेणी; माला. [सं.]

वल्ली स्त्री. खळी. (गो.)

वल्ली घोळती हिलसा ही वनस्पती; हिलमोचिका; मुळा.

वल्हटे, वल्हे न. गवताची गंजी : 'मग वल्हटेया आठ लपालीयें'– लीचउ १५२.

वल्हव(वि)णे सक्रि. १. वल्ह्याने (नाव) चालवणे. २. (ल.) पुढे ढकलणे. ३. व्यवस्था पाहणे (कामाची).

वल्हा पु. (प्र.) वल्हे.

वल्हा–ल्हे, वल्हेवल्हे उद्गा. लवकर; चटदिशी. आटोपा, चला याअर्थी प्रेरकत्वाने प्रयोग.[प्रा. लहु–वल्हा वर्णव्यत्यासाने] (वा.) ० **करणे** – भाग पाडणे; आग्रह करणे.

वल्हाटे न. प्राणी; गुरू : 'वोढाळ गुरुं असे'– लीच ३ पृ. ६५.

वल्हाण न. सैन्य : 'कामक्रोधांचीं वल्हाणें : संतांवरि उठती'– मूप्र १०११.

वल्हाणे अक्रि. निवणे; थंड होणे. (व.)

वल्ही स्त्री. लहान वल्हा. ही बहुतेक चिव्याच्या काठीला पात बांधून करतात.

वल्हे न. १. नाव, होडी चालवण्याचे लाकडी साधन. २. लहान अवले; दांडा. ३. पोहताना वगैरे हात, पाय इ. अवयव. [सं. वल्]

वल्है वि. चलाख : 'चाकवी बैठलीया वल्हे.'– कला १६.

वल्हो–ल्हे पु. वळू : 'तया तोचि आवृत्ति सेवी तरी वल्हो आंतु पडे।'– दृपा ७७.

ववानी येने शेतीला पावसाची गरज असणे. (व.)

वव्हण न. वाहणी; वाहणे : 'उष्ण ना शीतल ऐसें। मृगजल वव्हणीं असे।'– गीता २.७१३. [सं. वहनि]

वश वि. १. आधीन; अनुकूल केलेला; ताब्यात, कह्यात आणलेला. २. मंत्रतंत्रांनी मोहून, भारून टाकलेला, भुरळ पाडलेला. [सं.]

वशट पहा : **ओशट**

वशणे सक्रि. इच्छिणे : 'यजिलेयाहि मातें चुकउनि। स्वर्गु व शांति'– ज्ञा ९.३०५. [सं. वश्]

वशता स्त्री. अधीनता.

वशंगत वि. स्वाधीन झालेला; शरण आलेला; हुकमाखाली असलेला.

वशंवद वि. आज्ञा, स्वामित्व मानणारा.

वशा पु. शेतकामावर देखरेख करणारा मनुष्य; शेतावरचा रखवालदार. [अर. वशी]

वशाट शिजवलेला मांसाहारी पदार्थ.

वशाड स्त्री. पाण्याच्या लाटा जेथे आपटतात ती जागा. (कु.)

वशात्–तं शअ. (समासात पूर्वपदी दुसरा शब्द असता उपयोग) वश असल्याकारणाने; स्वामित्वामुळे; सत्तेने; (सामा.) योगाने; मुळे. उदा. कालवशात, दैववशात इ.

वशारणे न. (विणकाम) (समुच्चयाने खळ लावण्यासाठी पसरलेली) ताण्याची सुते.

वशारन न. सुतांना खळ लावण्याची क्रिया.

वशिता, वशित्व स्त्री. न. शिवाच्या अष्टमहासिद्धींपैकी एक. गूढ संस्कारांनी ही प्राप्त होते.

वशियत स्त्री. १. मृत्युपत्र. २. आदेश; आज्ञा; हुकूम. [अर. वसीयत]

वशिला पु. १. फायद्यासाठी मोठ्या माणसांशी जोडलेला संबंध; मोठ्यांचा पाठिंबा, आधार. २. पुढे येण्यास मध्यस्थ होणारा मोठा, वजनदार माणूस; मध्यस्थ. ३. शिफारस; ओळख. [अर. वसीला; त. शलावणि]

वशिलावग स्त्री. मध्यस्थी; शिफारस.

वशिलेदार वि. वशिला असणारा.

वशिष्ट पु. १. एक प्रसिद्ध ऋषी; वसिष्ठ. २. (ल.) शास्त्रे व रूढी यांनी सांगितलेल्या सर्व गोष्टींकडे बारीक लक्ष देणारा मनुष्य.

वशिष्टवामदेव पु. (ल.) व्यवहारी, तसेच अभ्यासू माणूस.

वशिं(शं)ड न. बैलाच्या मानेजवळील उंचवटा; आवाळू; कोळे. [सं. वृषस्कंध]

वशी वि. १. इंद्रिये स्वाधीन असलेला; संयमी. २. अधीन; परतंत्र. [सं.]

वशीकरण न. १. मंत्रादी साधनांनी वश करण्याची क्रिया. २. कोणी आपल्याला वश व्हावा म्हणून करण्याचे मंत्रतंत्र इ.

वशे पहा : **वशात्**

वशेद् न. औषध. (कु.)

वशेळी वि. वाशेळा; वासाळ.

वशेळी स्त्री. १. नेमनिष्ठ, व्रताचरण करणारी स्त्री. २. लग्नानंतर पहिली पाच वर्षे मंगळागौरी इ. व्रताचा वसा असलेली स्त्री.

वश्य वि. १. पहा : **वश** १. २. (फज्यो.) प्रत्येक राशीला वश असणारा (प्राणी).

न. वधूवरांच्या वगैरे राशींचे आनुकूल्य; पत्रिका जमणे.

वषट्कार पु. १. हवन; यज्ञ. २. अग्नीत आहुती देताना म्हणण्याचा एक मंत्र; वौषट् शब्दाचा उच्चार. ३. (ल.) जाळपोळ; लुटालूट; निर्वंश, सर्वस्वी नाश. (गो.) [सं.]

वष्णेवणे पहा : **वसणणे, वसण(णा)वणे**

व(वँ)स पु. १. पूर्वज. (कु.) २. वंश.

वस अ. पादपूरणार्थी अव्यय. (कु.)

वसई स्त्री. ओसरी; सोपा; ओटा.- लोसाको.

वसकण-कन-कर-दिशी क्रिवि. वस् असा अंगावर येण्याचा, ओरडण्याचा, रागावण्याचा आवाज करून, होऊन; चिडखोरपणाने.

वसकणे अक्रि. चिडून, चवताळून, खसकन अंगावर येणे, रागाने बोलणे.

वसका, वसकणे पहा : **वचका, वचकणे**

वसकाडे देणे हिडिसफिडीस करणे. (व.)

वसड स्त्री. वळचणीतून पाणी जमिनीवर पडताना वाऱ्यामुळे उडणारे तुषार; ओसाडा. [सं. उत्+सृ]

वसण न. नदी-ओढ्याच्या पुराबरोबर वाहून येणारा गाळ.

वसणणे, वसण(णा)वणे अक्रि. झोपेत किंवा वातात बरळणे. [सं. अव्/उत्+स्वप्, अव+स्वन्]

वसणे अक्रि. १. राहणे; मुक्काम, वस्ती करणे. २. जागी, ठिकाणी असणे; स्थित, स्थानापन्न असणे (गाव इ.). ३. वस्तीने युक्त होणे (गाव, देश इ.). [सं. वस्]

वसणे उक्रि. काही धार्मिक व्रत आचरणे (विशेषत: बायकांनी). [सं. उप+आस्]

वसतकरू पु. स्त्री. उतारू; प्रवासी; वाटसरू.

वसता वि. १. वस्तीचा; लोक असलेला. २. राहणारा.

वसति-ती, वसन वस्ती स्त्री. न. स्त्री.१. रहिवास; मुक्काम. २. राहण्याची जागा.

वसतिगृह न. १. निवासस्थान; घर. २. (विद्यार्थी, वाटसरू इ.ना) राहण्याजेवण्याची सोय असणारी जागा.

वसन न. १. कापड; वस्त्र. २. कपडा; प्रावरण; चिरगूट.

वसन शअ. १. मताने; मते. २. पासून; कडून.

वसनवात पहा : **उसनवार**

वसनागर न. जामदारखाना.-ऐको.

वसनावणे, वस्नावणे (व.) पहा : **वसणणे**

वसपय स्त्री. सावली; काळोख. (कु.)

वसमरणे-मारणे पहा : **वस्मरणे**

वसला पु. १. जमीन-मोजणीच्या सोयीसाठी शेताचा, जागेचा केला जाणारा प्रत्येक तुकडा : 'वसले म्हणजे ऐक साचार। जैसा जैसा भूमीप्रकार। तुकडे योजीती पैमायषदार। जेणें मोजणी पुरी होय।'- पैमा ६.१४. २. (सामा.) कोणत्याही जमिनीचा तुकडा; (इं.) प्लॉट. ३. (चांगले कापड इ.चा) धडपा; तुकडा; रखट; चिंधी. (बहुधा अनेकवचनी प्रयोग). (क्रि. करणे, उडवणे.)[अर. वसली=तुकडा]

वसलात-द स्त्री. आनुवंशिक स्वभाव, गुण; वंशातील, घराण्यातील एक विशिष्ट चिन्ह, प्रकृती. [अर. वस्ल्]

वस(सु)ली-ल्या वि. वसुली करण्यासाठी ठेवलेला (शिपाई इ.).

वसवईया पु. गावकऱ्यांनी वतने देऊन वसवलेले न्हावी, धोबी इ. कसबी लोक.

वसवटा पु. वास्तव्य; वसणूक; वसती : 'पवनाचिया नेटा। सर्वेंद्रियां वसवटा।'- सिसं ३२.

वसव(वि)णे सक्रि. १. स्थापन करणे; रचणे. २. वस्ती करवणे. ३. नेऊन ठेवणे. ४. ठेवणे; देणे : 'त्याचि चारी भुजा शोभती। आयुधें वसविलीं हातीं।' - एरुस्व १.४६. ५. वसती करणे; राहणे.

वसवणे सक्रि. लुटणे; लुटवणे : 'मोगरसूल ओवसा वसवणे'- स्थापो ९८.

वसवस-सा क्रिवि. ओरडण्याच्या, चिडून बोलण्याच्या, तुसडेपणाच्या उत्तराच्या आवाजाचे अनुकरण करून; वसकन.

वसवस, वसवसणे पहा : **वखवख, वखवखणे**

वसवसणे अक्रि. ओरडणे; दरडावणे; रागाने बोलणे; अंगावर येणे.

वसवसा पु. १. दरारा; भीती; धास्ती : 'म्हणजे शेट्ये महाजन वसवसा न धरितां पेठीची अबादानी करितील'- वाडबाबा २.८५. २. संशय; भीतियुक्त शंका : 'नमन पुरे संकोचासह अंजलि वसवसाहि सोडावा।'- मोउद्योग १३.१७४. ३. कल्पना; विचार; तर्क. ४. चाहूल. (मुंबई) ५. पर्वा. [अर. वस्वास, वस्वसा]

वसवा पु. १. सावली; छाया; सावट. २. प्रकाशाच्या आड येऊन सावली पाडणारी वस्तू. [सं. छाया]

वसवास पु. भीती; शंका.

वसवासी वि. संशयी; शंकेखोर.

वसवी-वे स्त्री. न. कोयता, मुसळ, फाळ इ. ला बसवण्याची मांडळ, कडे.

वसवो, वसा पु. संगत; सहवास. (कु., गो.) [सं. वास]

वसंत पु. १. एक ऋतू. चैत्र आणि वैशाख या दोन महिन्यांचा किंवा मीन आणि मेष या दोन संक्रांतीचा काळ. २. या ऋतूची अधिष्ठात्री देवता. ३. (संगीत) एक राग. गानसमय रात्रीचा तिसरा प्रहर व वसंत ऋतूत सार्वकालिक. ४. आर्यवैद्यकातील एक औषध; सुवर्णमालिनीवसंत. [सं.] ०**खेळणे** - रंग खेळणे.

वसंतकुमार, वसंतकुसुमाकर पु. एक औषधी रसायन. अनेक भस्मे, फुले, चंदन इ. पासून हा तयार होतो. याने सर्व रोगांचा नाश होतो.

वसंततिलका स्त्री. एक वृत्त. याच्या प्रत्येक चरणात १४ अक्षरे आणि त, भ, ज, ज, ग, ग असे गण असतात.

वसंतपंचमी स्त्री. माघ शुद्ध पंचमी.

वसंतपूजा स्त्री. वसंत ऋतूत वसंतमाधवाप्रीत्यर्थ समारंभपूर्वक ब्राह्मणांची केली जाणारी पूजा; मंत्रजागर.

वसंतमुखारी पु. (संगीत) एक राग. गानसमय प्रात:काळ.

वसंतसंपातबिंदू पु. सूर्याचा भासमान परिभ्रमणमार्ग (क्रांतिवृत्त) विषुववृत्ताच्या उत्तरेस जाताना विषुववृत्ताला ज्या बिंदूत छेदतो तो छेदनबिंदू.

वसंतारंभपात पहा : **उत्तरायणपात**

वसंती वि. वसंत (ऋतू-रागा) संबंधी.

वसा पु. सुताचा धागा. (व.)

वसा स्त्री. १. मज्जा; मगज. २. चरबी. ३. अंतस्त्वचा. [सं.]

वसा पु. एक माप, प्रमाण (१६ आणे = विश्वासी, २४ विश्वासी = १ वसा); लाकूड मोजण्याचे कोष्टक.- मुंव्या ११४. [अर. बसली]

वसा, वोवसा पु. १. (बायकी) स्वत: लावून घेतलेला नेम, व्रत. २. बाण (संक्रांतीचे); सुघड. [सं. उप+आस्-उपासना]

वसाटा पु. १. उतार; लवण. २. वस्ती.-लोसाको.

वसाड न. धावती मोठी लाट. (को.)

वसाडा पु. तुषार; शिंतोडा; ओसाडा. [सं. उत्सृ-उत्सर]

वसान वि. ओसाड; उजाड. (व.)

वसार पु. अरुंद जागेतून जाताना बाजूला होऊन दुसऱ्याला जाण्यासाठी वाट मोकळी करून देणे.

वसाहत स्त्री. १. वस्तीचा देश, ठिकाण. २. देशात, लोक असल्याची स्थिती; वस्ती. ३. परक्या प्रदेशात जाऊन राहिलेले लोक; देशशाखा. (इं.) कॉलनी. [सं. वस्]

वसाहतवाद पु. एका देशाने दुसऱ्या देशाला जिंकून त्यावर आपली सत्ता चालवण्याची व देशातील राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेवर ती सत्ताधारी देशाला हितकारक ठरेल अशा रीतीने नियंत्रण ठेवण्याची प्रक्रिया.

वसिगत स्त्री. वसाहत; वस्ती : 'राजश्री तुळाजी आंग्रे याणी ते गड बांधोण वसिगत केला.'- पेद २४.२०.

वसीठा, वसैठ-ठा पु. वसतिस्थान : 'जो ब्रह्मविद्येचा वसीठा : कीं विचाराचा चाहटा.'- मूप्र ४९५. [सं.वसति+स्थ, वसथ]

वसु-सू न. संपत्ती; धन.

वि. (वसू नावाच्या आठ प्रकारच्या देवता आहेत, त्यावरून) आठ ही संख्या. [सं.]

वसु पु. पुनर्नवा ही वनस्पती.

वसुजणे अक्रि. सूज उतरणे, ओसरणे.

वसुधा, वसुंधरा, वसुमती स्त्री. पृथ्वी. [सं.]

वसुधारा स्त्री. १. (अव.) धार्मिक संस्कारात भिंतीवर पातळ तुपाने काढतात त्या पाच किंवा सात रेषा. २. पूर्णाहुतीच्या वेळी अग्निकुंडात धरतात ती तुपाची अखंड धार; वसोधीरा.

वि. समृद्ध; अखंड. [सं.]

वसुबारस स्त्री. आश्विन वद्य द्वादशी. गोवत्सद्वादशी. या दिवशी एकाच रंगाची गाय व वासरू यांची पूजा करतात.

वसुला-ली पु. स्त्री. तासणी; वाकस. [सं.]

वसुली स्त्री. उगराणी.

वि. १. वसुलासंबंधी. २. चांगला वसूल येण्याजोगे (गाव, शेत इ.).

वसुली-ल्या पु. वसूलदार.

वि. पु. वसुली करणारा.

वसुली आकार कमाल आकारात कमी-जास्त करून सालोसाल करतात ते ऐन वसूल.

वसुली गल्ला वसुलीचे धान्य; धान्याचा खंड.

वसुली जमा प्रत्यक्ष उत्पन्न, जमा. याउलट आकारजमा.

वसुली बेरीज देणे वगैरे देऊन राहिलेला वसूल; निव्वळ वसूल.

वसुवा(आ)र न. निवासस्थान; मंदिर : 'ना तें वसुवारू । अनंग रायाचें ।'- शिव ६४५.

वसू-सु पु. डाग देऊन मोकळा सोडतात तो गोहरा, बैल; पोळ. [सं. वृष; प्रा. वस]

वसू-सु पु. स्त्री. मायणी; कडे.

वसू-सूं स्त्री. पु. न. गाडीचे चाक, नांगराचा फाळ, मुसळ इ.च्या तोंडाशी बसवतात ते लोखंडी कडे.

वसूल पु. १. उत्पन्न; आवक. २. सरकार, सावकार वगैरेंना शेतकरी, कुळे यांच्याकडून येणारा कर, पैसा, खंड, भाडे. ३. शेतसारा. ४. उगवणूक; येण्याकडे जमा झालेला पैसा. ५. हप्त्यांनी येणारी उगवाणी. ६. किंमत; मोल : 'गुलामगिरी व तिचें भावंड ही पुस्तकें कोणत्या वसुलाची आहेत.'- नि ४७२. [अर. वुसुल]

वसूली स्त्री. पाथरवटाचे एक हत्यार. (झाडी.) [हिं.]

वसे स्त्री. विस्तार : 'किल्ल्याची वसे पाहून खुद्द आले.'- ऐलेसं ११.६१३२. [सं. वस्आ]

वसे न. (रूढ) पहा :**वसू**

स्त्री. वशिंड.

वसै(सैं)ए स्त्री. १. वस्ती; आश्रय. २. जैन मंदिर.

वसैठा, वसौट-टा-टे पहा : **वसीठा**

वस्त स्त्री. १. वस्तू; जिन्नस : 'अपूर्व जे का वस्त । आणून मातापितरांसी देत ।'- ह २७.१२२. २. चांदी-सोन्याचा दागिना; (सामा.) अलंकार; (अव.) वस्ता याचाच विशेष प्रयोग. [सं. वस्तु]

वस्तबांध वि. वस्ती करणारा.

वस्तभाव-वानी स्त्री. १. (व्यापक) दागदागिने; अलंकार. २. घरातील, किरकोळ सामान; चीजवस्तू : 'बयाबाईची वस्तवानी वगैरे...'- वाडसमा ३.६४. ३. प्रवासाचे सामान. [सं.]

वस्तर न. वस्त्र. (व.)

वस्तर, वस्तारा पु. केस काढण्याचे एक शस्त्र, साधन. [अर. अस्तुरा; फा. उस्तरा]

वस्तरे न. ठसका. (गो.) (वा.) **वस्तऱ्या, वस्ते जाणे-** पातळ पदार्थ पिताना घशात अडकणे; उलटून पडणे.

वस्ता वि. वस्तीचा.

वस्ताद पु. १. विद्या, कला यांमध्ये निष्णात, पटाईत, वाकबगार. २. शिक्षक; गुरुजी; अध्यापक (विशेषत: गायन, नृत्य, व्यायाम या कलांचा). ३. तोडीस तोड असणारा माणूस. ४. कावेबाज; धूर्त मनुष्य. [अर. उस्ताद्]

वस्तादगिरी स्त्री. १. वस्तादाचे, गुरूचे काम, धंदा. २. चातुर्य; कौशल्य. ३. धूर्तता; लबाडी.

वस्तादी वि. वस्तादापासून मिळालेली (गायनादी विद्या).
स्त्री. १. प्रावीण्य; मर्मज्ञता : 'पीळ पेच अर्घ अक्षरांत वस्तादीचे।'- प्रला ६२. २. धूर्तता; कावेबाजपणा. [फा. उस्तादी]

वस्ति-स्ती स्त्री. १. ओटीपोट. २. मूत्राशयाच्या चर्माची पिचकारी. [सं.]

वस्ती-स्ता स्त्री. १. वास; राहणे; वसती. २. निवास; घर. ३.माणसे राहात असलेली , ओसाड नसलेली स्थिती (गावाची). ४. लोकसंख्या. [सं. वसति] **वस्तीस राहणे** - एखाद्या ठिकाणी मुक्काम करणे; प्रवासात उतरणे.

वस्तीकर-रू वि. प्रवासी; रात्रभर वस्ती करणारा वाटसरू.

वस्तीवाडी स्त्री. १. लोकांची वस्ती असणे. २. संतती; प्रजा.

वस्तु-स्तू शअ. कडून; हस्ते. पहा : **वस्त**

वस्तु-स्तू स्त्री. १. पदार्थ; जिन्नस; चीज. २. काम; व्यवहार; गोष्ट. ३. परब्रह्म; ब्रह्म. ४. नाटकाचे कथानक, विषय. ५. (संगीत) चीज. ६. खरी हकिकत. [सं. वस्तु]

वस्तुचित्रलेखन न. चित्रकलेचा एक प्रकार; समोर ठेवलेल्या पदार्थाचे चित्रण. (इं.) मॉडेल ड्रॉइंग.

वस्तुजात न. पदार्थमात्र; प्रत्येक वस्तू.

वस्तुतत्त्व न. (तत्त्व.) कल्पना.- साक्रेसं २८१.

वस्तुनिर्माण न. कारखान्यात वस्तू तयार करण्याची क्रिया. (इं.) मॅन्युफॅक्चरिंग.

वस्तुनिष्ठ वि. प्रत्यक्षाला धरून असलेला; वास्तवावर आधारित.

वस्तुनिष्ठपद्धती स्त्री. (शि.क्षे.) पदार्थ, वस्तू, चित्रे इ. साधने वापरून मुलांना शिक्षण देण्याची पद्धती.

वस्तुपाठ पु. १. आदर्श नमुना, उदाहरण. २. वर्गात धडा कसा शिकवावा याचा आदर्श म्हणून घेतलेला तास. ३. एखाद्या मोठ्या इमारतीची किंवा प्रकल्पाची लहान प्रमाणावर तयार केलेली हुबेहूब प्रतिकृती.

वस्तुप्रभा स्त्री. परब्रह्माचा आविष्कार : 'जग असकी वस्तुप्रभा.'- अमृ ६७७.

वस्तुमात्र न. १. आराखडा; सांगाडा (संवाद, निबंध इ.चा). २. वस्तुजात.

वस्तुलाभ पु. (लग्नात) चांगली वधू मिळणे.

वस्तुवाद पु. (तत्त्व.) वास्तववाद. (इं.) रिॲलिझम.

वस्तुविनिमय पु. चलनाच्या अभावी होणारी वस्तूंची देवाणघेवाण वा त्याद्वारे होणारा व्यवहार.

वस्तुशक्ती, वस्तुस्वभाव स्त्री. पु. नैसर्गिक गुणधर्म.

वस्तुसत्ता स्त्री. खरे, सत्य अस्तित्व; स्वतंत्र वस्तू (ब्रह्म, परमेश्वर).

वस्तुसंग्रहालय न. जुन्या ऐतिहासिक वस्तू जपून संग्रह करण्याची व त्यांचे प्रदर्शन व माहिती मिळण्याची प्रशस्त वास्तू. (इं.) म्युझियम.

वस्तुसिद्धी स्त्री. (कायदा) झाले ते सशास्त्र हा न्याय. (इं.) फॅक्टम व्हॅलेट.

वस्तुस्थिती स्त्री. खरी परिस्थिती, गोष्ट.

वस्तूक स्त्री. खेळणे; खाऊ (मुलाला खेळण्यासाठी दिलेला).

वस्तूपपाद्य न. सिद्धांत.

वस्त्र न. १. कापूस, रेशीम, लोकर इ. चे कापड. २. कपडा; अंगावर घेण्याची, नेसण्याची वस्तू; प्रावरण; चिरगूट. ३. पोशाख. [सं.]
(वा.) ० **आड करणे**- लज्जारक्षणासाठी नेसणे. **वस्त्रे देणे** - एखाद्या पदाचा अधिकार देणे. **वस्त्रे होणे** - १. अधिकार मिळणे. २. (विपरीत ल.) अधिकारावरून दूर होणे. **एका वस्त्राने निघणे, काळी वस्त्रे देणे** - पदच्युत करणे; काढून टाकणे.

वस्त्रगाळ वि. कपड्यातून गाळून घेतलेले.

वस्त्रगोपन न. एक कला; वस्त्रे नेहमी नवी राहतील अशा युक्तीने ठेवणे.

वस्त्रप्रावरण न. (व्यापक) कपडालत्ता; वापरण्याचे कपडे.

वस्त्रप्रासाद, वस्त्रागार न. पु. तंबू : 'वस्त्रप्रासादीं शुभशयनीं जातांचि भागला पहुडे।'- मोकर्ण ३९.४.

वस्त्रभूषा स्त्री. समयोचित व सुंदर वस्त्रे परिधान करण्याची कला.

वस्त्रविलासी वि. नटवा; उंची, पोशाख करण्यात आनंद मानणारा.

वस्त्रहरण न. १. वस्त्र, कपडे फेडणे. २. वस्त्रे चोरून नेणे.

वस्त्रा पु. १. पहा : **वस्तरा**. २. (ल.) कडकडीत विद्वान, पंडित. ३. नि:स्पृही मनुष्य. ४. तिखट, झोंबणारे भाषण; मर्मभेदी, जहाल शब्द. [फा. उस्तुरा]

वस्त्राचा ताणा वाळत घातलेल्या कपड्यांची रांग.

वस्म(स्मा)रणे अक्रि. १. तक्रार करणे; काही दु:ख, अडचण यांविषयी बोलणे; आठवण करून उगाळीत बसणे. २. वथणे; वदणे; फाजीलपणे बोलणे. ३. फोडणे; तोंडाळणे. ४. झोपेत बरळणे.
उक्रि. सारखे आठवणे; पुढे आणणे. [सं. उत्+स्मरण]

वस्वसा, वस्वास, वस्वासी इ. पहा : **वसवसा, वसवास** इ.

वह पु. न. मान व खांदा यांमधील अंतर.- अश्वप १.६२.

वहचणी स्त्री. वाटणी.- मौज २.६.३०. [गु.]

वहडास पु. नवरा. - बदलापूर १२८. (कातोडी)

वहन न. १. वाहून नेणे; एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे. २. (पदार्थ) उष्णता, वीज इ. वाहणे, जाणे. (इं.) कंडक्शन. [सं.]

वहन काढणे पुष्कळ चोप देणे. (व.)

वहनपत्र न. वाहतुकीसाठी मिळालेल्या मालाची पोचपावती व तो नमूद केलेल्या ठिकाणी पोचवण्याचा करारनामा.

वहनीय वि. वाहून नेण्यालायक; नेण्यास शक्य, योग्य. [सं.]

वह(हि)मा पु. १. शंका; संशय; किंतु. २. धाक; भय : 'करवीरच्या राजकारणाचें दृढीकरण जाहलें म्हणजे यजमानास वहमा पडेल कीं यांस भारी आसरा जाहला.'- ऐलेसं १.१७२. ३. (लोकांची) समजूत; कल्पना (चांगल्या किंवा वाईट दोन्ही अर्थी). [अर. वहम्]

वहाट(ट्)ळ स्त्री. वावटळ. (व.)

वहाण-ळ स्त्री. १. नदी इ. चा प्रवाह; पाट. २. ओढा; नाला.

वहाण स्त्री. पायताण; चप्पल; पादत्राण. [सं. उपानह; प्रा. वाहणा]

वहाणधर वि. जोडेउचल्या : 'जीवें संतांचें होत वाहणधरू।'- ज्ञा १३. ११३२.

वहाणी स्त्री. (नाविक) संकटाच्या वेळी माल समुद्रात फेकणे. (कु.) [सं. वहन]

वहाणी, वहाणे, वहाता, वहाती कूस, वहावट, वहावटळ, वहावण, वहावणी, वहावणे, वहावरा, वहाळी पहा : **वाहणी, वाहणे** इ.

वहाणे क्रि. (माडी) काढणे व विकणे.– मसाप ४.४.२५३.

वहादन न. तुफान वारा. (व.)

वहाफ स्त्री. बैल वाहण्यासाठी, नांगरटीसाठी देण्याचे बैल वगैरेचे भाडे.

वहारी स्त्री. सून. (खा.) [सं. वधू; म. वहू]

वहाविणे उक्रि. १. पहा : **वाहवणे.** २. लागवड करणे : 'मग अहंकारासि एकलांधी। करूनि जीवितावधी। वहाविलें बुद्धी। चराचर।'– ज्ञा १३.४९.

वहाळ वोहळ लहानमोठे नाले; ओढे.

वहित वि. १. वाहिलेले; नेलेले. २. (कृषि.) लागवडीखाली आणलेली. न. लागवड. [सं.]

वहितदार पु. शेत करणारा; कूळ.

वहित्र न. वाहून नेण्याने साधन; (इं.) मोटार.

वहिनक स्त्री. नवऱ्याची थोरली बहीण.

वहिनी स्त्री. (आदरार्थी संज्ञा) वडील, थोरली भावजय. [दे. प्रा. वहुण्णी; सं. वधू; प्रा. वहू; सं. भगिनी]

वहिन्स स्त्री. नवऱ्याची बहीण. पहा : **वन्स**

वहिमी वि. ज्यावर वहीम, संशय आहे असा; संशयास्पद वर्तनाचा.

वहिलवान पु. सारथी. – राव्य ५.३८.

वहिला–ली–ले वि. क्रिवि. (जुन्या काव्यांतून हा शब्द अनेक ठिकाणी येऊन त्याचे अनेकविध अर्थ संभवतात.) १. सत्वर; लवकर; तातडीने : तरि वहिला। धावै जंव आहे। कंठीं प्राणु।'– ऋ ३३. २. आधी; अगोदर; प्रथम : 'टाटाओनी बांधा वहिला। एऱ्हवी जाइलु हा।'– शिव १३१. ३. एकदा : 'याजी द्युत खेळों वहिलें। अवश्य म्हणे कृष्णाग्रज।'– ह ३२.६५. [सं. प्रथम; दे. प्रा. वहिल्ल; गु. वहेल्लो; म. पहिला]

वहिला–ले वि. क्रिवि. खरोखर; निश्चयाने.

वहिला वि. १. स्वतंत्र; निराळा; वायला : 'करी माळा घेऊनि रडे बाळा। कृष्ण झाला सांग हो काय वहिला।'– ब ५५३. २. सुंदर; चांगला : ' दाखवी वहिली ऐसी मूर्ती।'– तुगा ८२८.

वहिली स्त्री. बुरख्याची गाडी; मेणा; डोली.

वहिलीमहाल पु. रथशाळा; गाडीखाते.– भाअ १८३४.

वहिलेपण न. वाहण्याचा वेग : 'तया पाणियाचेनि वहिलेपणें। अझुनी न धरिती बोभाणें।'– ज्ञा ७.८१.

वहिवाट स्त्री. १. कारभार; व्यवस्था; (कामधंदा इ.) चालविण्याची क्रिया. २. कारभारातील, व्यवस्थेतील कौशल्य, हातोटी. ३. कारभाराचा अहवाल; कामाची नोंद; वहिवाटपत्र. ४. व्यवहार; धंदा; दळणवळण. ५. उपभोग; वापर; भोगवटा. ६. चाल; रिवाज. ७. जाणे–येणे; परिचय; सहवास. [सं. वह्+वृत्त; प्रा. वहवट्ट]

वहिवाटणे अक्रि. १. सहवास, संबंध, वहिवाट ठेवणे; व्यवहार करणे. २. पार पडणे; निभावणे. ३. वहिवाटीखाली चालणे; ताब्यात, दिमतीत असणे. ४. सवय होणे.

उक्रि. १. कारभार पाहणे; व्यवस्था करणे, चालवणे : 'सरकारी हुद्देही त्याने सचोटीने वहिवाटल्यावरून त्याचा लौकिक वाढत चालला.'– नि २८२. २. वापरणे; उपभोग घेणे. ३. ठेवणे; कामाला लावणे; सरावाचा करणे. ४. निवारणे; बाजूला सारणे. ५. उपभोग घेणे (स्त्रीचा).

वहिवाटदार पु. १. कारभारी; व्यवस्थापक. (इं.) मॅनेजर. २. मुखत्यार; (इं.) एजंट; मालकासाठी जबाबदारीने काम पाहणारा. ३. (वतनी कायदा) वतनदारांपैकी प्रत्यक्ष काम पाहणारा. ४. मामलेदार; वसुली–कामगार. ५. (कायदा) कोर्टाने नेमलेला कारभारी; (इं.) रिसीव्हर.

वहिवाट हक्क (कायदा) चालू वहिवाटीने; भोगवट्याने प्राप्त.

वहिवा(व)टी वि. रोजच्या उपयोगात असलेला (दागिना इ.).

वही स्त्री. १. जमाखर्च, नोंद इ. ची चोपडी. २. काही कागद एकत्र टाचून बांधलेली चोपडी; कोरे पुस्तक. ३. पुस्तक; लघुग्रंथ. ४. दफ्तर : 'सिसे वचि तया मविली। वही जेवीं।'– ज्ञा १८.९१२. ५. हिशेब; व्यवहार : 'अर्जुना जिये ठायीं। न सरे द्वैताची वही।'– ज्ञा १३.९३८. [दे.प्रा. वहिया; हिं. वही; क. वहि]

वही स्त्री. १. (लग्नात) बोहल्याभोवती उतरंडी रचण्यासाठी आणतात तो मडक्यांचा संच. २. त्यातील एक मडके. [सं. वृत्ति] (वा.) **वहीवरून आंबट होणे–** (बोहल्याच्या चार कोपऱ्यांत प्रत्येकी पाच–पाच मडक्यांच्या चार उतरंडी असतात. लग्नानंतर त्यांपैकी दोन वरपक्षाकडे जातात. त्यावेळी होणारे भांडण. त्यावरून) क्षुल्लक कारणासाठी भांडणे.

वही पहा : **वई**

वहीत वि. लागवडीत असलेली, आणलेली (जमीन, शेत इ.).

वहीन, व्हैन न. उखळ. (बे.)

वहीम पु. पहा : **वह(हि)मा**

वहुळ्या स्त्री. अव. लग्नात रांजण भरणाऱ्या बायका. (ठाकूर)

वहू स्त्री. १. बायको; नवरी. २. सून.[सं. वधू; प्रा., गु. वहू; हिं. बहू]

वहूवरजत्रा, वहूवरभरणी स्त्री. लग्नानंतर कुलधर्माप्रमाणे जोडप्याने देवदर्शनाला जाणे.

वहेमा पु. कळवळा; जिव्हाळा. (व.)

वह्कर् वि. १. लाडावलेले. २. शेवटचे (अपत्य). ३. गाईच्या मागे धावणारे (वासरू). (झाडी)

वह्याताड, वह्या वि. वेडा; पागल. (व.)

वह्याली स्त्री. पिशवी; बटवा; चंची.– लोसाको. (अहि.)

वह्या स्त्री. अव.भगत अंगात येऊन घुमू लागल्यावर इतर लोक म्हणतात ती स्तुतिपर गाणी.

वह्याळ–ळी स्त्री. खेळ; क्रीडा : 'तिहीं अवस्थाचिया वह्याळी। दावी जें जीवा।'– ज्ञा १८.५४१.

वळ पु. १. मांड्या, काखा, कान इ.च्या सांध्यात असणारे लांबट उठाणू. २. हात, पाय इ. अवयवात वातविकाराने उत्पन्न होणारी व्यथा; वांब. ३. काठी इ. मारल्याने अंगावर उठणारे त्या आकाराचे चिन्ह; वण.

४. गुह्येंद्रियावर गाठ येण्याचा गुप्तरोग. [सं. वल्]

वळ पहा : १ **वळू**

वळ पु. १. दोरी, सूत वगैरेंना असणारे पीळ. २. (बुरूडकाम) टोपलीच्या तोंडाला देतात तो तीन कामठ्यांचा गोठ. ३. वळवळ; तळमळ; अतिशय उत्कंठा. [सं. वल्]

वळ स्त्री. १. ओळ; पंक्ती; रांग. २. लेखणीने काढलेली रेघ. ३. (ल.) तऱ्हा; रीत; वहिवाट. ४. (शेती) नांगरटीच्या बारा-चौदा तासांचा समूह. बारा-चौदा पराटीच्या तासांनंतर एक तास तुरीचा घालतात, त्यावेळी प्रयोग. [सं. आवली]

वळ एक मूल्यार्थी प्रत्यय. उदा. दळणावळ, धुणावळ इ.

वळई स्त्री. जमीन करणे. (को., कुण.) [सं.]

वळई स्त्री. माजघर. (हेट.) [दे. प्रा. वलय = घर]

वळई स्त्री. १. भूस ठेवण्यासाठी करतात ती वाटोळी, भोवतालून बंद केलेली जागा. २. भूस इ.ची वाटोळी, भोवतालून कडब्याच्या पेंढ्या लावलेली रास. ३. कडबा, गवत, कणसे न खुडलेली ताटे इ. ची रास, गंजी. ४. वळी; वळकटी.

वळक(कु, को)टी स्त्री. १. गुंडाळी (कागद, अंथरुण, कपडा इ.ची). २. गुंडाळलेली वस्तू. २. घडी; दुमड; मोड; सुरकुती.

वळकं(कुं)बणे, वळकं(कुं)बा, वळख, वळखण-णे इ. पहा : **ओळकंबणे**

वळखर वि. पीळ घातलेली; पिळदार (दोरी, सूत इ.).

वळग-गा-घ-घा स्त्री. पकड; घट्ट मिठी; वेंघ. [सं. अव+लग्]

वळ(ळं)ग(घ)णे उक्रि. १. मिठी मारणे; पकडणे; झटून पडणे. २. लोंबकळणे; ओलंबणे : 'कीं वळघोनि झाडा। एरझारा करी माकोडा।'- ऋ ३०. ३. चढणे; आरूढ होणे : 'पवनवारू वळंघला। आणि गगनामार्जीं पैं उडाला।'- सिसं ४.१२८. ४. (व्यापक) आश्रय करणे, धरणे; पकडणे (एखादा प्रदेश, प्रांत) : 'बुद्धीतें सांडोनि ज्ञान। भेणें वळघलें।- ज्ञा ११.६६४. ५. भटकणे; हिंडणे; भ्रमणे; फिरणे : 'मग वळगत वासुदेव।'- भज १९. ६. वळणे; ओढणे : 'अंतर्गोल म्हणजे आंतल्या बाजूनें वळंगलेले असून...' - मपु ६.१८७५, पृ. २४०. ७. सेवा करणे : 'वळगताति ऋद्धिपुरी : देवरायातें.'- ऋव ८७.

अक्रि. १. पोचणे; जाणे : 'जयजयकार त्रिलोक करी। नाद वळघला सत्य शिरीं।'- निमा १ (निर्वोष्ट राघव ४१). २. चिकटून राहणे; लोंबणे. ३. वर चढणे; भोगणे.

[सं. अव +लग्; प्रा. वलग्ग = चढण; गु. वळगवुं]

वळघी स्त्री. १. चाल; हल्ला : 'साहे बोलाची वळघी। ऐसी अविद्या असे जगीं।'- अमृ ६.२७.

वळचण स्त्री. १. घराच्या मूळ पायाच्या बाहेरचा, पागोळ्यांच्या आतील भाग. (को., राजा.) २. पागोळी; पावळी. [सं. वलभिस्थान, वळवि] (वा.) **वळचणीचा वासी** - खेटून असलेला शेजारी. (विशेषत: ऋण, उसने वगैरेसंबंधी योजता) **वळचणीची पाल** - आडून कानोसा घेणारी व्यक्ती. **वळचणीचे पाणी आढ्याला जात नाही, गेले- चढले नाही** - (पाणी खालून वर जात नाही यावरून) लहानाला मोठे होणे अशक्य असते.

वळण न. १. आकारभेदाचे प्रकार (अक्षर, चित्र, शरीर, अवयव इ.चे प्रत्येकी); तऱ्हा; मोड. २. वागण्याची रीत, पद्धती, व्यवहार. ३. कल; प्रवृत्ती; झोक (अंत:करण, मन इ.चा). ४. शिक्षण; शिस्त; व्यवस्था. ५. देणे, घेणे, जाणे, येणे इ. व्यवहार व त्यामुळे येणारा संबंध; दळणवळण. ६. वक्रता; सरळपणा नसणे, (नदी, रस्ता, काठी इ.चा) बाक. ७. डोंगराचे वाकण. ८. नद्यादिकांचे पाणी विशिष्ट जागी नेण्यासाठी बांधतात ते धरण; बांध; माती, दगड वगैरेचा वळ. ९. वशिला; वजन. १०. वेढा; वळसा : 'दुर्मोच्य काळपाशासम याच्या होय वळण वळयाचें।'- मोवन ६.२०.[सं. वलन] (वा.) ०**बांधणे** - मैत्री करणे; संधान बांधणे. **वळणावर जाणे** - अनुसरणे; - प्रमाणे चालणे, वागणे.

वळण (व.) पहा : **वळचण**

वळण न. मोबदला, भत्ता.

वळण वि. अर्धे जळलेले. (गो.) [सं. ज्वलन]

वळणदार वि. १. चांगला आकार, वळण असलेले; नीटनेटके. २. एकसारखे, व्यवस्थित, शुद्ध (लेखन).

वळणशुद्ध-सूद वि. प्रमाणशीर; वळणदार.

वळणी स्त्री. १. वळचण. २. गोल आकाराचे भांडे.

वळणी स्त्री. वळणे, वळण. (वा.) **वळणी, वळणीस आणणे, येणे** - वठणीस आणणे : 'तव विक्रमाविणें पळभरिहि न येतींच खळ बळें वळणी।'- मोनामरसायन.

वळणुचे क्रि. अर्धेमुर्धे जळणे (गो.)

वळणे उक्रि. १. दिशा बदलणे; फिरवणे. २. राखणे; सांभाळणे. ३. बनवणे; घडवणे. उदा. लाडू वळणे.४. अंकित करणे; वश करणे. ५. वळवून, परतवून आणणे. ६. वळता करणे. ७. गुरे चरायला नेणे.

अक्रि. १. घोटले जाणे; चांगले तयार होणे (अक्षर). २. वळणदार होणे; योग्य रूप घेणे (चित्र, प्रतिमा यांनी). ३. वाकणे; कलणे; दिशा, रूप, आकार इ. बदलणे. ४. अवयव वाताने आत ओढला जाणे, त्याला वेदना होणे; पेटका, वांब येणे. ५. अनुकूल, वश होणे. ६. प्रसन्न होणे : 'म्हणे सोसिका नृपा ! वळलों।'- मोअश्व १.३५. ७. फिरणे; विशिष्ट दिशेने जाणे. ८. सोडणे; टाळणे : 'हा अर्थ वळले या पक्षाचा जाणावा.'- आचारभाष्य १३. ९. फुगणे : 'ऐसा तो गाढउ मोटा जाला : मांस वळलें।'- पंचो १५४.१५. १०. आखडणे : 'आदीचि तुझे हातपाय वळले।'- गरा १५१.

वळतर न. १. मोबदला. २. परतफेड : 'दिलेला इजारा... रद्द होईल तर वळतर देणें.'- खाअं १२०.[गु.](वा.) **वळता देणे** - परत करणे. (उसनी वस्तू, पैसे). **वळते करणे** - वजा करणे.

वळती स्त्री. १. रानात गेलेली गुरे परत वळवून आणणे. २. गुरे वळवून आणण्याची पाळी. (गुराखी मुले खेळत असताना ज्याच्यावर डाव येतो, त्याने गुरे वळावी असा संकेत): 'वासुरें चारितां गोविंदा। वळत्या न देसी तूं कदा।'- ह ३६.५६. ३. एकदम, एकाएकी आगमन, फेरी. ४. उलट चाल, जाण्याचा रोख, वळण; फेरी. ५. (जुगार) विशिष्ट

दान पडले असता घेण्यासाठी मांडलेले धन. ६. छपराचा सुरुवातीचा, तळचा भाग. ७. हल्ला; चाल. ८. धरपकड; धराधर : 'सरकारनें गुन्हेगारांची वळती करण्यास सुरवात केली.'- के १४.२.१९४१.

वळय स्त्री. माजघर. (कु.) [देप्रा. वलय = घर]

वळ(ळं)व न. ओबडधोबड, मोठा धोंडा. शेताचा बांध, पाया इ.ला लावतात.

वळवट न. खिरीसाठी पिठाचा वळून केलेला बोटवा; शेवयांचा एक प्रकार. [सं. वल्+वटिका]

वळव(वं)टी स्त्री. गुंडाळी; वळकटी.

वळवणी स्त्री. एक हत्यार; पकड.

वळवणी न. वळवाचा पाऊस.

वळवणे (वळणेचे प्रयो.) १. आकार देणे; घडवणे. २. फिरवणे; (केस इ.) कलते करणे. ३. गिरवणे; घटवणे; वळण देणे (कित्ता, खरडा, हस्तव्यवसाय इ. ला). ४. तयार करणे.

वळवळ–ळा–ळी स्त्री. १. साप, किडा वगैरेंचे अंगाला वळणे देत होणारे चलनवलन. २. (ल.) एका कुशीवरून दुसऱ्या कुशीला वळावे, लोळावे इ. हालचाल. ३. चुटपुट; अस्वस्थ करणारी उत्कंठा; तळमळ. ४. चडफड; धुसफुस. ५. कंड; खाज (गळू इ.ची). ६. तंटा; कुरापत. ७. चपळाई; सततचे चलनवलन; हालचाल. ८. रग. (कु.)

वळवळ–ळा क्रिवि. १. नागमोडीने, किड्याप्रमाणे हालचाल करून. २. गडगडत; लोटांगणे घालत. ३. भरभर; घाईघाईने; तोंडाला येईल तसे; वचावचा.

वळवळणे अक्रि. १. अंगाला आळोखे-पिळोखे देणे. २. वेदनांनी तडफडणे; तळमळणे; विव्हळणे. ३. (दुःख, उत्कंठा इ. मुळे) अस्वस्थ किंवा अत्युत्सुक होणे.

वळवळाट पु. अतिशय चळवळ, चुळबुळ.

वळवळ्या वि. १. गडबड्या; धांदरट. २. अस्वस्थ; बेचैन.

वळवंजी स्त्री. गोमेची एक जात. हिच्या अंगाला चिकट मळ असून तो रात्री चमकतो. (राजा.)

वळवा स्त्री. अव. १. (वारा, पाऊस पूर्वेकडे जाऊन पुन्हा पश्चिमेकडे वळतो त्यावरून) पावसाची पूर्वा ते स्वातीपर्यंतची नक्षत्रे. २. या नक्षत्राचा पाऊस.

वळवाचा पाऊस, वळीव १. पूर्वेकडून येणारा पाऊस. २. (ल.) कोणीकडे वळेल, काय करील याचा नेम नसलेला, लहरी माणूस.

वळवाणे न. वळ; वण; खूण.

वळवास पु. माशाची एक जात. हे ऑक्टो.-नोव्हें. महिन्यांत पकडतात.

वळविंच–ज स्त्री. १. घोण. (को.) २. एक प्रकारचा मुंगळा.

वळशिंगटी स्त्री. माशाची एक जात.

वळशेण–णी, वळशिणी न. स्त्री. गोवरी (थापलेली). याउलट रानशेणी.

वळसणे अक्रि. वळसा घेणे; भोवती फिरणे. [सं. वल्+स्]

वळसरा पु. दुष्काळ; पावसाचा तुटवडा : 'टोळखाद व वळसरा होऊन...'- ऐलेसं ४२६०.

वळसा पु. १. वेढा; भोवती, मागेपुढे फेरा. २. वळण; प्रदक्षिणा. ३. बंधन : 'उडाला देहबुद्धीचा वळसा। तुटला फांसा कर्माचा।'- एभा १८.७७. ४. भोवरा : 'संता ठाया ठाव पूजनाची इच्छा। जीवनींच वळसा सांपडला।'- तुगा २४४३. ५. संकट; त्रास; अनर्थ : 'निद्राकाळीं ढेकूणपिसा। नाना प्रकारीं वळसा। तोचि वाढवी बहुवसा।'- दास १५.६.१४. ६. सहाणेवर एक वेळ मागेपुढे घासणे (मात्रा). ७. गोंधळ; गलबला : 'बाहेर फुटली मात। वळसा होत नगरांत। लोक दुःखें वक्षःस्थळ पिटीत। राजकिशोर आठवुनि।'- शिली १४.१७१. ८. काही संकटामुळे लोक गावातून झुंडीच्या झुंडींनी बाहेर पडणे. (वा.) **०करणे** – जोराने धाव घेणे.

वळसाल न. पेरणी केल्यानंतर शेतात फिरवण्याचे कुळवापेक्षा हलके हत्यार. (क्रि. घालणे, करणे) (बे.)

वळसाव(वि)णे उक्रि. (नवीन मडके) निरढावणे; रापवणे; पक्के करणे. अक्रि. सरावणे; पकडणे.

वळसे(शे)णी स्त्री. वळलेली, गोळा केलेली शेणी, गोवरी.

वळसे वेलांट्या फाटे; फिरवाफिरव.

वळहाणी,वळाण स्त्री. समूह : 'आपेपर विसरती वळहाणी : सर्व दोखांची'- मूप्र १०११.

वळही, वळ्हई स्त्री. गंज. पहा : **वळई**

वळंत स्त्री. भिंत. (गो.)

वळंदी स्त्री. माजघरात वस्त्रे ठेवण्यासाठी बांधलेली काठी. (हेट.) [देप्रा. वलय=घर]

वळंबणे, वळंबा पहा : **ओळंबणे** इ.

वळाण न. शेताची वाफ; शेतात पाऊस पडल्यानंतर शेत कोरडे होणे; वाफसा. (व., ना.)

वळाणसार, वळाणी–नी वि. पाणी धरून न ठेवणारी व वहितीस लवकर योग्य होणारी (जमीन.) (व.)

वळार पु. बांगड्या भरणारा कासार. (गो.)

वळावळी पु. पद्धत; परंपरा; रूढी; वहिवाट.- ऐको.

वळित न. गुहा : 'असावें वळिताचिये संदीं' – मूप्र २३७२.

वळितिय पु. संचालक; चालवणारा : 'अधिकारिया वळितियान पाळाव।'- वांदोडे शिला १.३४. [सं. वल्]

वळिंबा पु. १. पहा : **ओळंबा.** २. खळ्याच्या मेढीभोवतालचे दोरीचे कडे.

वळी स्त्री. १. रांग; ओळ : 'जेथें वळी धरूनि पंचबळी बसे ते।'- र ४६. २. लिहिण्यासाठी ओढलेली रेघ. ३. (ल.) तऱ्हा; पद्धत; वळण; धोरण. ४. सुरकुती; वळकटी (शरीरावरील). ५. वाफा. (कु.) [सं. आवली]

वळी स्त्री. १. जनावराच्या पाठीला लागू नये म्हणून खोगिराखाली शिवतात त्या दोन उशा : 'ठेवितां वरि पळैक वळीते। घाबरोनि धरणी कवळी तें।'- किंगवि २५. २. वळकटी; गुंडाळी. ३. रास; गंज : 'वळी पोथ्यांच्या ह्या तुम्हि असुर रीती शिकवितां।'- वामन नृहरिदर्पण १.३७. ४. सुरकुती; घडी; दुमड. ५. (विणकाम) तातूला तातू जोडणे.

वळीत न. पहा : **वळती** स्त्री.

वळीमूठ पु. १. वळी आणि मूठ. खोगीर समुच्चयार्थी : 'चवकीदाराने वळीमूठ नेली उचलून हक्काची।'– पला ७०. २. गोणी. ३. लग्नात वधूमातेला देण्यात येते ते खणलुगडे.

वळू–ळ्हू–ळ पु. प्रजोत्पादन करण्यासाठी राखलेला घोडा किंवा बैल; खच्ची न केलेला, न बडवलेला घोडा, बैल. (वा.) **०दाखवणे** – फळविणे; घोडी, गाय यांना गर्भधारणा करवणे.

वळे न. अपूर्व; नवलविशेष : 'देशीं काइ वळें वर्ते.'– शिव १२४.

वळे न. १. बोटात घालण्याचे सोन्या–चांदीचे वेढणे; लहान कडे; अंगठी; जोडवे. २. नारळाचा अर्धा भाग; वाटी. (कु.) ३. शिगर, करण्यासाठी माडाच्या पिड्याचे काढलेले पातळ भेत. पत्रावळ लावण्यासाठी काढण्याच्या बारीक काड्या. (कु.) ४. नारळ. (गो.), ५. झाड मारण्यासाठी त्याभोवती ठोकायचे घट्ट कडे.
[त. वळि=वाटोळेपणा; सं. वलय]

व(व्ह)ळे स्त्री. जात्याची टाकी. (बे.)

वळे भरणे घोड्याचा एक रोग.– ऐको.

वळेसर पु. फुलांचा गजरा, वेणी. (कु., गो.)

वळोंची–जी स्त्री. एका जातीची गोम, वळविंच. (को.)

वळ्या पु. शंखासारखे एक कवच. हे वळावर घासतात.

वक्ष, वक्षस्थळ न. १. छाती; ऊर. २. (नृत्य.) एक अभिनय. हा वक्षस्थळाने दाखवला जातो. सम, निर्भुग्न, अभुग्न, प्रकंपित व उद्वाहित अशी पाच प्रकारची वक्षस्थळांची ठेवण असते. [सं. वक्षस्; वक्षःस्थल]

वक्षोज, वक्षोरुह न. स्तन; कुच : 'उठेत वक्षोरुह हे उठाणे।'– सारुह २.५६.

वक्षःस्वस्तिककरण न. (नृत्य.) पाय स्वस्तिक करणे, हात रेचित करणे व छातीवर ठेवणे, छाती आकुंचित करणे.

वंक, वंकट वि. वाकडा; वक्र : 'तैसे भृभंग वंकट। मिरवताति।'– ऋ ९७. [सं. वंक, वक्र]

वंकणे सक्रि. एकत्रित करणे : 'जें एकोळ एक वंकोनियां। सांघावें ज्ञान।'– ज्ञा १८.१३३८.

वंकद्वार न. देवडीजवळील दार; दिंडीदरवाजा : 'निगतां वंकद्वाराबाहिरीं : येती देखिली मंगळार्ती करीं'– रुस्व ६९२.

वंकनाळ स्त्री. १. गर्भाला अन्नरस पोहोचवणारी नाळ; नाळद्वार : 'रस उपाय वंकनाळें। होत असे।'– दास ३.१.१२. २. सर्पाकार कुंडलिनी : 'प्राण – आपान – संधी – स्थिती वंकनाळी क्षयो करी.'– विद ४.
[क. वंक(=दान)+सं. नाल]

वंका पु. वाफा.

वंकी स्त्री. मोठी, बिनतट्ट्याची गाडी (भरतीची). (खा.)

वंग न. १. कथील. २. शिसे; जस्त. ३. पोलादाचा एक प्रकार. [सं.]

वंग पु. वांगे. [सं.]

वंग पु. कलंक; मळ; घाण : 'तुज म्यां अज्ञानपणें वंग। समतेचा लादिला।'– स्वानु ४.१.१६. [देप्रा. वंक]

वं(वां)गडी स्त्री. (लोखंडकाम) मध्ये रुंद असलेले, पसरट, उतरते लोखंडी चाक. खोलगटपणा देण्यासाठी याचा उपयोग करतात.

वंगण न. चाके, दरवाजे, यंत्रे यांची झीज कमी व्हावी व घर्षणाने उत्पन्न होणारी उष्णता कमी व्हावी म्हणून वापरण्यात येणारा तेलकट पदार्थ.
[सं. व्यंजन, स्त्रक्षण, स्त्रक्ष्]

वंगणे उक्रि. १. वंगण लावणे. २. (ल.) नरमणे; भिऊन वागू लागणे : 'शिवा जर इतका वंगला होता.'– सूर्यग्र २५८. ३. वठणीवर येणे.

वंगभस्म न. कथिलाचे प्राणिद; एक औषधी रसायन.

वंगव(वि)णे उक्रि. १. वंगण लावणे. २. चामडे मऊ करण्यासाठी रापीने घासणे. ३. एखाद्याला ताळ्यावर आणण्यासाठी खूप मार देणे. ३. नामोहरम करणे. ४. पैसे द्यायला लावणे.
[वंगणेचे प्रयोजक; सिं. वंगणु=गाईचे दूध काढतेवेळी मागचे पाय बांधणे.]

वंग(गा)ळ संग(गा)ळ वि. घाण; अमंगळ, पहा : **ओंगळे**

वंगारी स्त्री. वंगण लावण्याची काडी; सळई.

वंगू स्त्री. पोळ्याच्या दिवशी गुराख्याची ओटी भरणे. (झाडी)

वंगून्या वि. गलिच्छ. (झाडी) [सं. वमु]

वंचक वि. फसवा; लबाड; ठक; सोदा. [सं. वञ्च्]

वंचणू(तु)क स्त्री. फसवणूक.

वंचणे उक्रि. १. फसविणे, फसणे. २. दुर्लक्ष करणे : 'वाटेचा न वंचे आलेया। रुखु जैसा।'– ज्ञा १६.८५. ३. मुकणे; अंतरणे : 'वंचलो रे आम्ही भक्तिसुखा।'– नाम ९५४. [सं. वञ्च्]

वंचन–ना न. स्त्री. प्रतारणा; फसवणूक; लबाडी.

वंचित वि. १.फसलेला. २. अंतरलेला; दुरावलेला.

वंच्य–च्यु वि. कृपण : 'ऐसाही दीनु वंच्यू। कहीं नव्हेचि तुज।'– ऋ ४७. [सं. वञ्च्]

वंज स्त्री. स्वारी : 'भावाची वंज बहीण पाहिली।'– मनोरंजन जुलै १९३२. (चंद्रपुरी)

वंजणे उक्रि. तेल, बिब्बे इ.च्या मिश्रणाने (मातीची घागर) माखणे, घासणे.

वंजन न. (घागरी इ. ना) घासण्या–चोपडण्याची द्रव्ये (तेल, बिब्बे इ.).
[सं. अंजन; म. वंगण]

वंजन पहा : **व्यंजन** ६

वंजा स्त्री. रोवण्याचा समारंभ. (झाडी)

वंजाभरनी स्त्री. पोळ्याच्या रात्री गोठ्यात करण्याचा विधी. (झाडी)

वंजार–रा–री पहा : **वणजारा–री**

वंजारदांड वि. वंजाऱ्याप्रमाणे दणगट, दांडगा.

वंजीभारा पु. कांबट्यांचा भारा. (क.) [सं. वंश+भारा, वंजुल=वेत]

वंजुळ पु. वेत; एक वेल : 'प्रवाळ वंजुळ नारिकेळ घन।'– नरहरितनय (मार्कंडेयचरित्र). [सं. वंजुल]

वंठाओ पु. उणीव : 'या बोला न पडे वंठाओ। आणिचा हा।'– ज्ञा १३.७५१.

वंडा स्त्री. वांझ स्त्री, मादी. (अप.) [सं. वंध्या]

वंडी स्त्री. अव. घरावरील धाब्याच्या बाजूस असलेल्या भिंती; वरवंडी.

वंडी स्त्री. मोठ्या बायका परकरावरून नेसतात ती साडी. लहान मुलींच्या साडीला फडकी म्हणतात. (खा.)

वंत-थ पु. वाटा; हिस्सा (वडिलार्जित मिळकत इ.) : 'माझा ज्येष्ठपणाचा वंतु। वेगळा करी पा यज्ञदत्तु।'- कथा ५.१५.१०.

वंत प्र. बाळगणारा, धरणारा, धनी या अर्थी नामांना जोडून येणारा प्रत्यय. उदा.विचारवंत. [सं. वत्, वान्]

वंतसे पहा : **वनसे**

वंदक वि. पूजा, भक्ती करणारा; भक्त. [सं.]

वंदट न. वांबळ; अभ्राच्छादित आकाश. (क.)

वंदण पहा : **ओंदण**

वंदणे उक्रि. १. नमस्कार करणे. २. सत्कार, पूजा, भक्ती करणे. ३. आदर बाळगणे; मानणे. [सं. वंदन]

वंदन न. १. नमस्कार. २. आदर दाखवणे; मान्यता; सत्कार. ३. सेवा; पूजा. ४. नवविधा भक्तीपैकी एक. [सं.]

वंदन न. १. चिवडाचिवड; कालवाकालव (जेवणात अन्नाची). २. अस्ताव्यस्त पसरणे; उधळणे; फेकणे.

वंदनीय, वंद्य वि. वंदन करण्यायोग्य; पूज्य; सेव्य. [सं.]

वंदारुता स्त्री. वंदन करावे अशी इच्छा; आदर; भक्ती : 'वांछा सज्जनसंगमीं गुरुकुळीं वंदारुता नम्रता।'- वामन स्फुटश्लोक (नवनीत पृ. १३७). [सं.]

वंधा पु. पीळ; गुंफणी. (व.) [सं. बंध]

वंध्य वि. १. फळे न धरणारा (वृक्ष); अनुत्पादक; वांझ. २. निष्फळ; व्यर्थ (प्रयत्न इ.). [सं.]

वंध्या स्त्री. वांझ स्त्री. [सं.]

वंध्यापुत्र पु. (वांझेचा मुलगा.) (ल.) अशक्य कोटीतील, असंभाव्य गोष्ट.

वंध्यामैथुन न. (वांझेशी रतिक्रीडा.)(ल.) अनुत्पादक, निष्फळ श्रम, प्रयत्न.

वंब स्त्री. वाचाळता; बडबड. (तंजा.)

वंश पु. १. विशिष्ट शारीरिक लक्षणांनी युक्त असा मानवसमूह. २. कुल; गोत्र; वर्ग; जाती; कुटुंब. ३. प्रजा; संतती. ४. वेळू; बांबू.

वंशकांती न. एक प्रकारचे माणिकरत्न. दुरून हे पेटलेल्या आगीसारखे दिसते.

वंशज वि. १. वंशात, कुळात जन्मलेला. २. कुळात मागाहून होणारा, येणारा. ३. कुलीन.

वंशजाल-वन पु. न. वेळूचे बेट.

वंशधर्म पु. कुळधर्म; कुटुंबपद्धती.

वंशपरंपरा स्त्री. १. पहा : **वंशावळ.** २. कुळाची रीत.

वंशपात्र न. बांबूची परडी, टोपली इ.; झाल : 'भवऐरणी संपादन। कृष्णासी वंशपात्रदान।'- एरुस्व १६.१५८.

वंशरोचना-लोचन, वंशक्षीर-री स्त्री. न. वेळूच्या पोटातील पिठासारखा औषधी पदार्थ.

वंशानुचरित न. १. वंशावळ. २. वंशपरंपरेने चालू पद्धत.

वंशावळ-ळी-ली स्त्री. वंशात पूर्वीच्या पिढ्यांपासून विद्यमान पिढीपर्यंतच्या (क्रमशः) व्यक्ती; त्यांची सूची. [सं. वंश+आवली]

वंशि(शी)क वि. १. वंशासंबंधी; वंशातील. ३. वंशपरंपरागत (चाल,रोग इ.)

वंशी, वंशवाद्य स्त्री. पावा; मुरली; वेणू; अलगुज.

वंश्य वि. १. वंशाचा; वंशिक. २. कुलीन. [सं.]

वा उभअ. १. पक्षांतरबोधक अव्यय; नाहीतर; अथवा; किंवा. २. व; आणि : 'हिराजि वा केसव मलह वा माळि.'- मंगळवेढेचा शिलालेख, ग्रंथमाला.

वा उद्गा. आश्चर्यदर्शक उद्गार; वाहवा.

वा स्त्री. आई. (गो.)

वाइ(ई)चाळ वि. अश्लील; वात्रट; वाईट : 'माजिऱ्यासारखें वाईचाळें'- तुगा ३०८७.

वाइ(ई)चाळणे अक्रि. बरळणे; असंबद्ध, वाईट बोलणे.

वाइणे सक्रि. वाजवणे : 'नारदतुंबर वाउनी ब्रह्मवीणा।'- दावि ३४१. [सं. वाद्]

वाइलपण न. रिकामपण. (व.)

वाई स्त्री. वेळ : 'धोडीक वाईनें तिया डेडिम दुवां लाग्यो.'- भिल्ली २५. (भि.) [सं. वेला]

वाईट वि. अनिष्ट; गुणहीन; अयोग्य; अशुभ. सामान्यतः चांगला याच्या उलट फार व्यापक अर्थाने वापरला जातो. [सं. वि+अय्+ट] (वा.) **०करणे** – नाश, अहित करणे. **वाइटावर असणे** – द्वेष करणे; अहित चिंतणे.

वाईटविडूळ वि. १. निरुपयोगी; कुचकामाचा. २. कुरूप; विद्रूप.

वाईटसाईट-वाकटे वि. अपथ्यकर; निरुपयोगी, सामान्यतः वाईट.

वाईण-न न. उखळ. (को.) [सं. वह्]

वाईन स्त्री. फुले, द्राक्षे यांपासून तयार केलेले मद्य. [इं.]

वाईनसळ न. उसाच्या चरकाची मुसळे बसवण्याची खालची लाट; काटवट. [सं. वाहन+शलाका]

वाईल पु. आवेल; चुलीशेजारचा भाग; वैल. [त. वालुरै]

वाईलचूल स्त्री. वैल असलेली चूल.

वाउर-ळ वि. व्यर्थ; वावगे; निरर्थक : 'कायिसया ते असुर। संपत्ति पोषिति वाउर।'- ज्ञा १६.४२; 'ऐसी तूं महापुंश्चली। आतां काय स्फुंदसी वाउळी।'- कथा ३.१६.५२.

वाऊ-ए-ओ वि. क्रिवि. व्यर्थ; वावगे; वाईट : 'धरितासि ममत्वें करून। परंतु वाऊ।'- गीता १३.३७४; 'हें काईं वो माये। कैसें वायाचि वाए।'- शिव ६७; 'तंव देखिलें तें जालें वाओ।'- दाव ३८२.

वाऊळ न. दोरीला माडाच्या पात्या लावलेले एक औत. याचा मासे धरण्यास उपयोग करतात.

वाऊळ न. कातळीवरील खळग्यात माती साठून झालेले शेत. (राजा.)

वाक-ख पु. ताग, अंबाडी, घायाळ वगैरेंच्या सालीचा दोर, तंतू.

वा(वां)क न. १. होडीची फासळीसारखी लाकडे; रोजापासून वऱ्यापर्यंत ठोकण्याची कमानदार लाकडे. २. रहाटाला आढ्यांच्या दोन बाजूंना बसवतात ती बाकदार लाकडे.

पु. १. वक्रता; वाकडेपणा. २. (ल.) कल; ओढा; तोल. ३. (ल.) द्वेष; तेढ; मत्सरबुद्धी. ४. (ल.) दोष; चुकी : 'ह्यांत शिवबाचा कांहीं वाक नाहीं'- सूर्यग्र २. ५. तथ्य; अर्थ. (व.)

वाकई वि. दुरुस्त; यथायोग्य : पैसा मजकूर करार वाकई याणी सांगितला.'– पेद ६.१९.

वाकट वि. वाकलेले; वक्र : 'हे आसू वांकट.'– गोप्रच ५४.[सं. वक्र]

वाकटावचे क्रि. चोरी करणे. (गो.)

वाकटी स्त्री. चोरी. (गो.)

वाकड–डी–डे स्त्री. न. पावसाची झड, सर; सतत वृष्टी : 'अति वृष्टीची वाकडी लागली।'– दावि १४१.

वाकड वि. वाकडा; वक्र : 'देऊनि वाकड करूनि मुख।'– दावि ११५.

वाकडकोका, वाकडमुसका वि. कुबडा; वाकडा.

वाकडणे अक्रि. १. वाकणे; वाकडे होणे; आखडणे; कलणे. २. वाकडे बोलणे.

वाकडवाद पु. तंटा; बखेडा.

वाकडा वि. १. वाकलेला; वक्र; कललेला; लवलेला; वळलेला; सरळ नव्हे असा. २. (ल.) विरुद्ध; तेढ असलेला; प्रतिकूल. ३. वाईट; चुकीचा; अनैतिक; अयोग्य. ४. अप्रत्यक्ष. [सं. वक्र] (वा.) **वाकडी मान करून पाहणे** – अवज्ञेने पाहणे. **वाकडे दाखवणे**– वेडावणे. **वाकडे पडणे** – भांडण होणे; वितुष्ट येणे.

वाकडा पु. १. मुलाच्या हातातील दागिना. २. स्त्रियांच्या पायातील दागिना.

वाकडा ताईत गळ्यातील ताइतासारखा अर्धचंद्राकृती व घागऱ्या लावलेला मुलांचा एक अलंकार.

वाकडातिकडा–देहुडा वि. वाकलेला; कुबडा; सरळ नसलेला.

वाकडाविचुका वि. वेडावाकडा : 'कां वाकडा विचुकां पाडलीं।'– ज्ञा ९.६.

वाकडी पगडी (ल.) अवज्ञासूचक वर्तणूक; विरुद्धाचरण.

वाकडी, वाकी म्हैस १. वाकड्या शिंगाची म्हैस. २. (ल.) चिंच.

वाकडे न. १. वैर; द्वेष. २. नकोसे वाटणे.

वि. १. प्रतिकूल; न आवडणारे; निष्ठुर. २. अयोग्य.

वाकडे तेरा तिफाशी सोंगट्यांतील एक दान (६+५+२).

वाकडे पाऊल (ल.) दुर्वर्तन; दुराचरण; व्यभिचार.

वाकण न. पहा : **वळण** ६,१०. [त. वाक्कु]

वाकणे क्रि. १. कलणे; वाकडे, तिरपे होणे. २. पोक येणे. ३. (ल.) नम्र होणे; शरण येणे; नमणे. [सं. वंक्=वाकणे]

वाकणे न. समुद्राची खाडी : 'तेथिकालौ खडकें विस्तीर्णें वाकणी।'– कला १६. [सं. वक्र]

वाकती स्त्री. पदराची वगैरे खोळ; झोळी.

वाकन(नि)वीस, वाक(के)नीस पु. १. लेखक; वृत्तांतलेखक; रोजची दैनंदिन माहिती लिहून ठेवणारा. २. (रूढ) मोठ्या घराण्यांतील खासगीकडील हिशेब, कागदपत्र, भोजन वगैरे सर्व कामे करणारा कारभारी. [अर. वाकिआ+नवीस्]

वाकब–फ, वाकीफ, वाकबगार वि. १. जाणता; हुशार; तज्ज्ञ; माहीतगार; अनुभवी. २. माहीत; ठाऊक : 'त्याची अवस्था काय हे वाकफ.'– मइसा ५.१६८. [अर. वाकिफ]

वाकर पु. बैलाने शिंगाने पाडलेला ओरखडा, वळ. (कु.)

वाकल न. उपटून रचलेल्या हरभऱ्याच्या झाडांचा ढीग; कडगा : 'मार्गीं सेतीं चणेयांची वांकलें देखिली।'– लीचउ १५.

वाकव(ब)ट–ट्टी स्त्री. वाखाचा गुंजडा, गुंडा.

वाकवणे क्रि. (वाकणेचे प्रयोजक) १. वाकायला लावणे. २. मानहानी, पराभव करणे.

वाकस न. सुताराचे लाकूड तासण्याचे हत्यार; तासणी.

वाकसणी–नी स्त्री. भांडी घासण्याची काथ्याची, वाखाची गुंडी. (व.)

वाकसणे सक्रि. वाकसाने तासणे.

वाकसणे क्रि. दशादशा होणे; वाकासारखा पिंजला जाणे. (व.)

वाकसला वि. शिळा; वातड; लवकर न तुटणारा. (व.)

वाकस(सा)ळ स्त्री. भाताची एक जात.

वाकळ स्त्री. न. १. गोधडी; अनेक चिंध्या शिवून केलेले वस्त्र. २ जीर्ण, फाटके वस्त्र. ३. (ल.) वृद्ध, जख्खड स्त्री. ४. गलिच्छ, अजागळ, अव्यवस्थित पेहराव केलेली स्त्री. [सं. वल्कल]

वाकळगुंडी स्त्री. वाकळ गुंडाळलेला बागुलबुवा किंवा बाई. (वा.) **०फाडणे** – व्यर्थ बडबड करणे. (व.)

वाका पु. हकिकत; वर्तमान; घटना; म्हणणे : 'बोललेप्रमाणें वाकाहि लिहिला.'– चिंत्र १३७.

स्त्री. मृत्यू : '२७ जिल्कादी पादशहाची वाका फौत जाली.'– मइसा ११.५५. [अर. वाकिआ]

वाका पु. वाजवण्याचे शिंग.

वाकाईत, वाकेकरी पु. शिंग वाजवणारा.

वा(वां)काड–ण–डी न. स्त्री. पहा : **वाकण**

वाकारणे क्रि. १. रस्ता सोडून बाजूने जाणे (टाळण्यासाठी); चुकवून जाणे. २. संबंध टाळणे; दूर राहणे; बाजूला सरणे.

वाकाळा पु. रहाटाच्या प्रत्येक बाजूला दोन वाके कमी लावून तेथे बांधतात तो सुंभाचा दोर.

वाकांडी स्त्री.१. घायपात; वाकंडी. २. स्त्रियांचे कमरेभोवती नेसण्याचे वस्त्र.

वाकी–क स्त्री. १. दंडात घालण्याचा स्त्रियांचा एक दागिना. २. पायातील दागिना : 'वांकीचा श्रीचरणु गुढयासि लावीति।'– गोप्रच २५८. [क. ओकि, वंकि; सं. वक्र]

वाकीव वि. वाकवलेला; वळवलेला; वाकडा केलेला.

वाकुडणे पहा : **वाकडणे**

वाकुडपण–णा न. पु. १. तीड; तेढ; वक्रता. २. द्वेष; वितुष्ट.

वा(वां)कुडी स्त्री. झड; वृष्टी; मेघाच्छादन : 'जेंवी वांकुडी घाली घन।'– मुविराट ५.१११.

वाकुदणे अक्रि. मनस्वीपणे नाचणे, उडणे, बागडणे, हसणे.

वाकु(को)रे न. स्त्री. वाफा; पाणी देण्याच्या सोयीसाठी पाण्याच्या दंडाजवळ पाडलेला लहान वाफा.

वा(वां)कु(को)ली स्त्री. (बहुधा अनेकवचनी उपयोग) विडंबन; चेष्टा; वेडावणे; तोंडे वेडीवाकडी करणे.

वाकुवा पु. पहा : **वाकी** १

वाके न. १. रहाटाची अढेकड; चाकाच्या परिघाचा भाग. २. बाकदार लाकडाचे खुंटाळे. ३. हत्यारे, पळ्या इ. ठेवण्याचे बाकदार लाकडाचे साधन. ४. बावकडाच्या तिन्ही लाकडांपैकी प्रत्येक.

वाकेरी स्त्री. एक सागरगोटीसारखी औषधी वनस्पती.

वाकेसिर वि. वाकडा; कुब्ज : 'वाकेसिर पांगुळ थोटे।'– दावि ४७४.

वाकोण पहा : **वाकण**

वाको(खो)रणे क्रि. वाकोऱ्याने तास पाडणे.

वाकोरा पु. ओरखडा; ओचकारा; करकोचा.

वाकोरी पु. न्हावी; नापित. (कुण., कर.)

वाको(खों)रे न. १. दाराच्या फळीचा खालचा वात्या, वाता–था. २. लहान तास पाडण्याचे औत; नांगरी.

वाक्–ग् स्त्री. वाणी; भाषण; आवाज; वाचा; बोलण्याची शक्ती किंवा इंद्रिय. [सं. वाक्]

वाक्पथ पु. संभाषण; भाषणाचा ओघ : 'नुसधीच शांतिकथा। आणिजेल कीर वाक्पथा।'– ज्ञा १३.११५५.

वाक्पंडित पु. (उप.) ताडकन,तडकाफडकी उत्तर देणारा मनुष्य.

वाक्प्रचार पु. भाषेतील संप्रदाय; म्हणी; विशिष्ट शब्दसमूह विशिष्ट अर्थी वारंवार वापरल्यामुळे विशिष्ट अर्थ येण्याचा प्रकार; रूढी.

वाक्य न. १. एक संपूर्ण विधान करणारा शब्दसमूह; पूर्ण अर्थ होईल इतका शब्दसंघ; लहान परिच्छेद. २. उक्ती; वचन; नियम; सूत्र; विधान. ३. सिद्धान्त. ४. (महानुभाव तत्त्व.) सहा वचनांचे सूत्र. [सं.]

वाक्यखंडन न. १. सिद्धान्ताची असिद्धता प्रस्थापित करणे; एखादे मत खोडून काढणे. २. वाक्यातील दोष दाखवणे; वाक्य चुकीचे ठरवणे. ३. वाक्याचे अवयव पाडणे.

वाक्यपद्धति–ती स्त्री. वाक्यरचनेसंबंधी नियम; वाक्यरचनेची रीती.

वाक्यपृथक्करण न. (व्या.) वाक्यातील उद्देश – विधेयादी निरनिराळे भाग सांगून त्यांचा परस्परसंबंध दाखवणे.

वाक्यार्थ पु. १. विधान; सिद्धान्त; वाक्याचे उद्दिष्ट; भाव. २. कथा : 'समर्थसेवकें वाक्यार्थ लिहिले।'– सप्र ३.२.

वाक्यालंकार पु. वाक्यातील निरर्थक शब्द; केवळ शोभेसाठी वापरलेले शब्द; वाक्यातील मोकळी जागा भरण्यासाठी किंवा खंड पडू नये म्हणून वापरलेला शब्द. उदा. जेहेत्ते.

वाक्यांश पु. मोठ्या संयुक्त किंवा मिश्र वाक्यातील लहान वाक्य; (इं.) क्लॉज.

वाक्सिद्धि–द्धी स्त्री. बोललेला शब्द खरा होण्याची शक्ती; वाचासिद्धी.

वाक्सुकृत न. वचन.

वाक्सृष्टि–ष्टी स्त्री. बोलण्यातील चातुर्य, वैविध्य, कौशल्य : 'हे वाक्सृष्टि एके वेळे। देखतु माझे बुद्धिचे डोळे।'– ज्ञा १४.२०.

वाक्स्तंभ पु. बोलताना अडखळणे, थांबणे; गहिवर इ. मुळे बोलताना कुंठित होणे.

वाख पु. धागा; तंतू; वाक. पहा : **वाक**

वाख, वाखती पु. स्त्री. १. खळगा; खड्डा : 'वेचेना परी कुसी। वाखा न पडे।'– अमृ ७.२६७. २. शिदोरीची पिशवी : 'वाखतीए तांबीया घातला'– लीचउ ९२.

वाखर पु. १. वस्तरा : 'प्रभुतेजें नुरे वज्रें तेजस्वी पर वाखर।'– मोरामायणें ५. २. खुरपे : 'राम तो सदसि प्रशस्त महागमे पर वाखर।'– मोरामायणें ५. वि. वाखासारखे पांढरे; शुभ्र (केस) : 'जाहाले केश सकळ वाखरो।'– राला २९.

वाखल स्त्री. पोटाची खळगी; भुकेमुळे पोटात पडलेली खळी.

वाखलणे अक्रि. १. वाखा होणे. २. अतिशय आजारी पडणे. ३. गर्भपात होणे.

वाखा पु. १. दुःख; पीडा; उपद्रव; नाश; संकट : 'पद प्रणामी बहु होति वाखे।'– सारुह ५.२५. २. महामारी, पटकी वगैरेची साथ : 'आकांत वाखा प्रळये।'– दास ३.७.८२. ३. अकाली गर्भपात. ४. संहार; मारामारी; युद्ध : 'बेलोलखानाचा थोर वाखा केला.'– सभासद ४९. [अर. वाकिआ]

वाखाडी स्त्री. तोफा सोडणारे जहाज. (गो.)

वाखाण–णा न. पु. १. स्तुती. २. चर्चा; ऊहापोह; व्याख्यान; विवरण; स्पष्टीकरण; वर्णन. [सं. व्याख्यान; हिं. बखानना]

वाखाणणी स्त्री. नावाजणी; प्रशंसा; स्तुती.

वाखाणणे क्रि. १. नावाजणे; स्तुती करणे. २. वर्णन; विवरण; स्पष्टीकरण करणे : 'सुचिलें तेंहि पुढें प्रशस्ते। वाखाणिजले प्रसंगे।'– रास ५.७००.

वाखार–री स्त्री. दुकान; कोठी. पहा : **वखार**

वा(वो)खारी स्त्री. १. नाण्यांची थैली, पिशवी. २. भांडारातील नगद शिल्लक : 'भांडार फोडोनि वाखारी। ने तें नुपसाहे।'– दृपा ८१.

वाखांडी पहा : **वाकंडी**

वाखील न. अस्वल. (गो.)

वाखे न. १. जाळे. २. दिवाळे. (गो.)

वाखोर पहा : **वाखर**

वाखोरा पु. घर. पहा : **वाखार**

वाखोरा पु. १. उत्तरीय वस्त्र : 'साऊले वेढुनि पोफळ गांठी। वाखोरेया देऊनि वायगाठी।'– नरुस्व ८४२. २. चोळीच्या बाहीची दुमड; वस्त्राचा पदर : 'चोळीचेया वाखोरां दोन्ही आसु आहाति.'– अस्मृ २०. [दे. वक्खर]

वाखोरी स्त्री. साठा : 'भक्तिनवरत्नांची बुडाली वाखोरी'– नाम १३९५. [दे. वक्खर]

वाखोरे न. खिसा; कप्पा : 'न्हाणवी तंव आपण चोळीचें वाखोरें पाहिलें।'– नागदेवस्मृति ३६.

वाग स्त्री. १. रहदारी; चाहूल; वापर; वागणूक. २. नेण्या–आणण्यासाठी, वाहतुकीसाठी सोईस्करपणा. उदा. आठकीचा वाग = आठ माणसांचे ओझे.

वाग स्त्री. लगाम; दोरी : 'वाग धरून मारामारा राऊताला.'– ऐपो २.२६.

वागटी स्त्री. १. एक प्रकारचा मासा. २. रानमांजराची एक जात. (मावळ)

वागणूक स्त्री. वर्तन; चालचलणूक; राहणी; व्यवहार.

वागणे क्रि. १. राहणे; संबंध, व्यवहार असणे; ये–जा करणे. २. (मनात

विचार, कामक्रोधादी विकार) घोळत असणे; वाटणे; चालू असणे. ३. (ग्रंथ, पद्धती, तऱ्हा, मत, चाल) चालू, प्रचारात, व्यवहारात असणे. ४. प्रकृती नीट राहणे. (ना.) (वा.) **वागायला निघणे –** आजारी मनुष्य हिंडू-फिरू लागणे.

वागदार न. ज्यातून पुष्कळ ये-जा होते असे दार; वापराचे दार.

वागबारस स्त्री. पहा : **वसुबारस**

वागरजाळ न. फडकी व वागाळी यांचे जाळे. (कु.)

वागरु-रू पहा : **वागुर-रा**

वागवटी स्त्री. उक्ती; भाषण; बोलणे : 'ऐसा प्रेम होतसे कष्टि। आल्या पुसे वागवटी।'– नव १५.१४.

वागव(वि)णे (वागणेचे प्रयोजक) १. भार सांभाळणे; निभावून घेणे; सांभाळणे; खपवून घेणे; जोपासना करणे. २. (ल.) लांबवणे; उडवणे; लबाडीने घेऊन जाणे.

वागळ पहा : **वागूळ**

वागळ-ळी-ळे, वाघली-ळी स्त्री. एक प्रकारचा मासा. याची शेपटी करवतीसारखी असते. याचे खत झाडांना घालतात.

वागा पु. स्त्री. १. करगोटा; कडदोरा : 'जयजय तिमया कोनेरी। तुझा वागा सोनेरी।'– मध्व २७१. २. दोरे; लगाम : 'डोळेयांचिआं वागा ओढोनि।'– शिव ६०८. ३. एक प्रकारचा अंगरखा; पोशाख.

वागा पु. वाङ्निश्चय : 'उदारे वागा केला श्री गजमोहनु।'– मातृकी रुस्व ९५.

वागाबुंद वि. उडाणटप्पू. (गो.)

वागारा पु. पहा : **वाग**

वागा(घा)रा पु. चाहूल.

वागाळ न. (कु.) पहा : **वाघूळ**

वागी पु. घोडेस्वार; लगामधारी : 'वरी राउत चढले चांगा : वागीये बळभद्राचे'– रुस्व १४०६. [सं. वल्ग]

वागी पु. झिंगा मासा. (गो.)

वागुजास्त स्त्री. सोपवणूक : 'ठार्णी वागुजास्त करावी।'– मइसा ५.१३२. [फा. वा-गुझास्तन्]

वागुर-रा, वागोरा-रे-ऱ्या स्त्री. पक्ष्यांना पकडण्याचे जाळे; पाश; बंधन : 'तंव पांगितु जाळातें। चिरितु वागुरतें।'– भाए ४०.३१८.

वागुरी स्त्री. घोड्याची चाल.– अश्वप १.१८८.

वागु(गो)ऱ्या स्त्री. अव. चिंध्या; लक्तरे; चिरफळ्या.

वागू(ग-गा)ळ स्त्री. न. १. वटवाघूळ. २. पाकोळी. [सं. वल्गुली, वाग्गुद]

वागूळ स्त्री. रवंथ. (नाशिक)

वाग्जल्प, वाग्जल्पना पु. स्त्री. वल्गना; बडबड; वटवट.

वाग्दत्त वि. १. वाङ्निश्चय झालेला; शब्दांनी दिलेला; विवाह वचन दिलेला. २. तोंडी वचन दिलेला; शब्दांनी संमत केलेला; वचनांकित.

वाग्दंड पु. १. धमकी; खरडपट्टी. २. वाचेचा संयम; भाषणावर नियंत्रण.

वाग्दान न. १.पहा : **वाङ्निश्चय** २. तोंडी करार; वचन.

वाग्दोष पु. १. वाणीची अशुद्धता; चुकीचे उच्चार. २. अपशब्द; निंदा; अश्लीलता. ३. चुकून वेगळा, अनपेक्षित शब्द बाहेर पडणे.

वाग्ध्वज, वाग्धज पु. १. वाणीरूप पताका. २. प्रसिद्धी; दवंडी : 'स्वधर्मु वाग्धजीं। बांधी नेणे।'– ज्ञा १३.२०७.

वाग्बाण पु. कठोर शब्द; टोचणारे, बोचणारे, कटू बोलणे.

वाग्ब्रह्म न. वेद.

वाग्भव वि. वाचिक; वाचेपासून होणारे : 'वाचे वसे तें वाग्भव। तप जाणावें।'– ज्ञा १७.२२३.

वाग्मिता स्त्री. वक्तृत्व.

वाग्मी वि. १. बोलण्यात पटाईत; चतुर; वक्ता. २. बोलघेवडा; बोलका.

वाग्विलास पु. १. शब्दकौतुक; शाब्दिक करमणूक; वाणीची क्रीडा; वाणीचा प्रभाव. २. भाषाविनोद.

वाघ पु. १. एक क्रूर, मांसाहारी, जंगली प्राणी. याचा रंग पिवळा असून त्यावर काळे पट्टे असतात. २. एक उडत्या मारणारा कीटक. ३. बुद्धिबळातील शेळ्या-मेंढ्या खेळातील हत्ती. ४. एक मुलांचा खेळ. वि. (ल.) जागरूक; भयप्रद. [सं. व्याघ्र; हिं., पं. बाघ] (वा.) **०डांभणे –** गाऱ्याजवळ (वाघ आल्यास त्यावर मारा करील अशी) बंदूक बांधून ठेवणे.

वाघउडी स्त्री. वज्रमुष्टीचा व्यायाम. एका जागेवर बसून तेथून ४-५ हात पुढे उडी मारून बसणे व पुन्हा तोंड फिरवून पहिल्या जागी उडी मारून बसणें.– व्याज्ञा ४.११४.

वाघचबका पु. एक फुलझाड व फूल; बचनाग.

वाघचवडा-डे पु. न. (वाघाचे मांस लावल्याने बरा होणारा रोग) तळहाताला होणारा रोग.

वाघजोर पु. (व्यायाम) एक प्रकारचे दंड काढण्याची पद्धती.

वाघट न. लहान वाघ; (तिरस्कारार्थी) वाघ.

वाघड पु. कापसाची एक जात. याचा कापूस बोंडातून ओढून काढावा लागतो.

वाघडोळ्या वि. मोठ्या, बटबटीत, पाणीदार डोळ्यांचा.

वाघनख न. १. वाघाची नखे सोन्यात मढवलेला दागिना. २. वाघाच्या नखांच्या आकाराचे पोलादी हत्यार. ३. वाघाचा पंजा.

वाघनख साखळी मद्रासकडील महाराष्ट्रीयांत प्रचलित असलेला एक दागिना.

वाघनखी स्त्री. १. एक झाड. २. पहा: **वाघनख** २

वाघमान पु. मुख्य मान : 'तुम्ही आपला जो वाघमान करावा तो करून घेतला.'– भाव ६८.

वाघमाऱ्या वि. १. वाघाला मारणारा. २. (ल.) अतिशय बळकट, शूर, धाडसी. ३. अतिशय लागणारा (हरिक, सुपारी इ. पदार्थ).

वाघमुंगी स्त्री. भयंकर दंश करणारी मुंगी.

वाघमेंढी-ढ्या स्त्री. बुद्धिबळातील खेळाचा एक प्रकार.

वाघयी स्त्री. सुंगट जातीचा मोठा मासा.

वाघरी पु. जाळ्यात पशुपक्षी पकडणारी एक जात व तीतील व्यक्ती; फासेपारधी.

वाघरू न. वाघासाठी तुच्छतादर्शक शब्द.

वाघवळ स्त्री. गळफास : 'सुरी : पाटी : वीख : वाघवळ...'– लीचउ ६२६.

वाघ(घा)वे न. १. वाघांचा उपद्रव. २. (ल.) त्रास; पीडा; काहूर : 'आमच्या विरूद्ध काय वाघवं उठलंय ते तूं पहातच आहेस.'– झांमू १७७.

वाघ(घू)ळ स्त्री. न. उडते खोकड; वटवाघूळ. [सं. वल्गुली, वाग्गुद]

वाघळी, वाघाळे पहा : **वागळ**

वाघंटी स्त्री. एक झुडूप.

वाघंटे न. वाघंटीचे फळ; गोविंदफळ. याची भाजी करतात. [सं. व्याघ्राटकी]

वाघा पहा : **वागा**

वाघाचा डोळा (संकेत) रुपया.

वाघाची मावशी (ल.) मांजर.

वाघाचे कातडे (ल.) अधिकार, सत्ता गेल्यावरही लोक ज्याला भितात असा मनुष्य. (वा.) ०**पांघरणे** – आव आणणे; पोकळ सत्ता, सामर्थ्य दाखवणे; ढोंग करणे.

वाघाट, वाघांटा–टी–टे पहा : **वाघंटी**

वाघाड्या पु. मंत्रसामर्थ्याने वाटसरूंचे वाघांपासून संरक्षण करणारा मांत्रिक.

वाघारणे सक्रि. तुपाची फोडणी देणे : '(भाताचें) नितळतें पाणी वाघारिती'– लीचपू ५८१.

वाघिन्सा (व.) पहा : **वाङ्निश्चय**

वाघी स्त्री. १. खंडोबाच्या भक्ताची भंडार ठेवण्याची वाघाच्या कातड्याची पिशवी. २. पुढचा आकार वाघाच्या तोंडाप्रमाणे असलेली, जलद चालणारी नौका, होडी. ३. वाघाच्या कातड्यासारखी पिवळ्या रंगाची, वर ठिपके असलेली घोड्याची झूल. ४. लाकूड तासण्यासाठी त्याच्या खाली ठेवण्याचा सुताराचा ठोकळा. ५. एक प्रकारचा सोनाराचा चिमटा. ६. दोन्ही टोकांना निमुळता होणारा खिळा; सुरसा.
वि. १. वाघासारखा; वाघाच्या रंगाचा. २. ठिपकेदार.

वाघीण, वाघणं स्त्री. आगगाडीचा मालाचा उघडा डबा. [इं. वॅगन्]

वाघुर–रा–री, वाघुर–रा पहा : **वागुर**

वाघुरडे न. ओढाताण; तगादा; मानहानी.

वाघुळासन न. (मल्लखांब) वेताच्या मल्लखांबावर हनुमान पकड बांधून केलेली उडी.– व्याज्ञा ४.४६.

वाघुळी स्त्री. कडीमध्ये दोन्ही पायांचे चवडे अडकवून लोंबकळत राहण्याचा डाव.– व्याज्ञा ३.४१०.

वाघूळ न. वटवाघूळ; वाघोळे. (गो.)

वाघूळ स्त्री. रवंथ.

वाघे वि. न. वाघासारखी कातडी असलेले : 'एकें (वासरुवें) वाघीं चितलीं पुडीं'– वह २८१. [सं. व्याघ्र]

वाघेटी–टे पहा : **वाघंटी**

वाघेर पु. गुजरातमधील एक लुटारूंची जात; वाघरी.

वाघोडी स्त्री. एक खेळ : 'वाघोडी आणि आटापाट्या।'– भवि २७.२०.

वाघोणी स्त्री. गोम; घोण. (गो.)

वाघोबा पहा : **वाघ**

वाघोरा–रे पहा : **वाघुरडे**

वाघ्या–घा पु. (अव. वाघे) खंडोबाला वाहिलेला पुरुष; खंडोबाचा भक्त, उपासक. [क. वग्गे = भक्त]

वाङ्नियम पु. १. भाषेसंबंधी, बोलण्यासंबंधी नियम, विधी. २. भाषणबंदी; बोलण्यावरील नियंत्रण. ३. मौन; मूकत्व : 'वाङ्नियम सदैव विहित कां गमला।'– मोसभा ३.७.

वाङ्निरोध पु. १. गप्प करणे; बोलणे अडवणे. २. वाचेवरील संयम; निःशब्दता; शांतता.

वाङ्निश्चय पु. लग्नाचा करार; वरवधूयोजना; वधू व वर निश्चित करण्याचा विधी; साखरपुडा.

वाङ्मय न. साहित्य; भाषेतील ग्रंथसंपत्ती; गद्यपद्यादी ग्रंथसमूह.
वि. १. शब्दांना अनुसरून; मूळ वचनाप्रमाणे; वाणिरूप : 'विवरण जाला वाङ्मय। संपूर्ण पर्याय नवमिचा।'– ज्ञाप्र ७७९. २. वाचिक; शब्दमय : 'एवं शारीर जें तप। तयाचें दाविले स्वरूप। आतां आईक निष्पाप। वाङ्मय ते।'– ज्ञा १७.२१५.

वाङ्मयी स्त्री. वाणी; वक्तृत्व : 'जी एकमात्र भूषण पुरुषाप्रति तीहि वाङ्मयी देवी।'– गोविंदाग्रज.

वाङ्मात्रा स्त्री. क्षण; सेकंद.

वाङ्मुख न. आरंभीचे शब्द; सुरुवातीचे वाक्य.

वाचक पु. शब्द; भाषणाचा विभाग, तुकडा, अवयव, वाक्य; शब्दसमूह.
वि. १. दर्शक; दाखवणारा; अर्थाचा. उदा. काल–देश इ. वाचक. २. वाचणारा. ३. महारांचा धर्मगुरू. [सं. वच्]

वाचकरावाचकर स्त्री. उलटापालट; विसकटणे.

वाचणी स्त्री. १. वाचन; लिहिलेल्या अक्षरांचे उच्चारण. २. वाचण्याचा धडा; पाठ.

वाचणे क्रि. लिहिलेली अक्षरे उच्चारणे; पठण करणे. (गो.)

वाचणे अक्रि. १. जगणे; जिवंत राहणे; जिवाचा सांभाळ, संरक्षण करणे. २. निभावणे; बचावणे; पार पडणे; धोक्यातून निसटणे. ३. गंभीर आजारातून बरे होणे. (वा.) **वाचता पंथ दिसून येणे** – प्रकृती सुधारू लागणे.

वाचन न. पठणक्रिया; वाचनाची क्रिया; अभ्यास.

वाचनालय न. ग्रंथालय; ज्या जागेमध्ये वाचण्यासाठी पुस्तके इ. ठेवलेली असतात ती जागा.

वाचनिक वि. १. उच्चारित; जाहीर; साक्षात; प्रतिपादित; निर्दिष्ट; स्पष्ट केलेला; घोषित (विधिनिषेध, नियम इ.).२. मूळ ग्रंथातील; उल्लिखित; मूळ ग्रंथातील वचनात असलेला.

वाचा स्त्री. १. वाणी. २. भाषण; बोलणे; शब्द; वचन; बोल. ३. आकाशवाणी. ४. अवसरणी.[सं.] (वा.) ०**उकटणे, पालटणे, परतणे, फिरणे, मुरडणे** – बोलणे खुंटणे; बोलणे खोटे पडणे; बोलणे मागे घेण्याची वेळ येणे. ०**नरकात घालवणे** – खोटे बोलणे; बोलणे मागे घेणे. ०**फुटणे** – १. बोलण्याची शक्ती येणे. २. गुप्त गोष्ट, गुन्हा इ. उघडकीस येणे. ०**बसणे** – बोलण्याची शक्ती नष्ट होणे; बोबडी वळणे. ०**विटाळणे** – १. खोटे बालणे; वचन न पाळणे. २. व्यर्थ भीड घालणे; निरर्थक शब्द खर्चणे.

वाचाट–ळ वि. बडबड्या; बोलका; वटवट करणारा.

वाचारंभण न. स्पष्टपणे वाचेने, बोलून निदर्शन; बोलण्यात रूढी : 'राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेला वाचारंभण किंवा नामधेय अजून मिळालें नव्हतें!'– टिळकचरित्र १. [सं.]

वाचाविदळ वि. वाचाट; वात्रट. (बो.)

वाचाशक्ती स्त्री. १. वक्तृत्व; बोलण्यातील चातुर्य. २. (रूढ) वाचण्यातील कौशल्य, स्पष्टपणा. ३. वाचाळपणा.

वाचासिद्धी स्त्री. बोललेले खरे होण्याचे सामर्थ्य.

वाचाळता, वाचाळ पंचविशी, वाचाळी, वाचाळपंचांग पहा : **बडबड**

वाचाळवाणा–णी वि. बोलका; बडबड्या.
क्रिवि. चावटपणे, वाचाटपणे.

वाचांश पु. (चुकीने वाच्यांश) १. शब्द; चकार शब्द; उच्चार. २. चर्चा; बोलणे; उल्लेख. ३. लावालावी. ४. वचन; करार.

वाचिक न. वृत्त; बातमी; हकिकत; वर्तमान.
वि. वाणीसंबंधी; बोलण्याने; शब्दाने घडलेले; तोंडाने केलेले; शाब्दिक.

वाची वि. वाचक; दर्शक; दाखवणारे. उदा. गुण–धर्म इ. वाची.

वा(वां)चून, वाचौनि, वाचौनिया क्रिवि. शिवाय; खेरीज; सोडून; विना.

वाचे वाचा शब्दाची सप्तमी. वाचेमध्ये; तोंडात : 'सदा सर्वदा नम्र वाचे वसो दे।'– राम २४.

वाचेदयाळ वि. वाचाळ. (कु.)

वाचेवाद–ध स्त्री. शब्दाने दर्शवलेली क्रिया. (कु.)

वाच्य न. १. उद्दिष्ट; बोलण्याची, सांगण्याची गोष्ट; व्याख्यानाचा विषय. २. (व्या.) प्रयोग. उदा. कर्तृवाच्य (कर्तरी); कर्मवाच्य (कर्मणी).
वि. १. बोलण्यास, उल्लेख करण्यास योग्य, शक्य, इष्ट. २. कर्तृविषयक; विधेयात्मक; गुणवाचक; शक्यतावाचक वगैरे (शब्द). ३. विशेषणाप्रमाणे विभक्तिरूपे होणारे. ४. दूषणीय; अश्लाघ्य : 'जो आपल्या धर्मातील वाच्यस्थलें दाखवील तो पाखंडी!'– आगर ३.२८. [सं.]

वाच्यता स्त्री. चर्चा; गवगवा; प्रसिद्धी; सांगत फिरणे.

वाच्यार्थ पु. १. शब्दश: अर्थ; स्पष्टार्थ. २. जे बोलायचे ते; बोलण्यातील उद्दिष्ट.

वाच्यालंकार पु. भाषणातील, वाक्यातील सौंदर्यदर्शक स्थळ; (सामान्यत:) अर्थालंकार.

वाज स्त्री. म्यान; खोळ : 'एक वाज मढीव मखमली लाल नवी,' – समारो ३.२४९. [सं. वज्=जाणे]

वाज न. बोलणे; प्रवाद : 'अगा प्रकृती परौता। एकु आथी पांडूसुता। ऐसा वाजु तो तत्त्वता।'– माज्ञा १३.१०२९.

वाज पु. आघात : 'मज भक्तीचा वाजु : वरि तुं आत्मा निजु'– उगी ८२.

वाज पु. एक मादक व विषारी पांढरा कंद. हा खातात.

वाज पु. १. श्रम. २. आळस; कंटाळा. (गो.)
वि. पुष्कळ : 'मनामध्यें आले वाज।'– दावि १८१. [अर. वजअ्=दु:ख]

वाजगस्त स्त्री. गस्तीचा एक प्रकार. या गस्तीच्या वेळी बाजा वाजवून पहारा देतात. याउलट चोरगस्त.

वाजगस्त, वाजगुदस्त वि. परत दिलेले; परावृत्तादाय.– राव्य. [फा. बागुझाश्त=मुक्त, परत केलेले]

वाजघट वि. उघडाउघड (व.) [फा. वाझ्=उघडा]

वाजट न. प्रसिद्धी; डंका; गवगवा; बभ्रा; बोभाट. जाहिरात; प्रसिद्धी; प्रसार.
वि. १. प्रसिद्ध; बोभाटा झालेला. २. जाहीर झालेला. ३. वाचाट; व्यर्थ बडबड्या; वाद घालणारा : 'चाट चावट वाजट।'– दास २.३.३०. ४. वाजणारा; आवाज करणारा : 'सरत्न वर मेखळा लसित घंटिका वाजटा।'– निमा चिद्बोध–रामायण सर्ग ३ श्लोक १८. ५. पोकळ; निष्फळ : 'हें असो आतां वाजटा।'– ज्ञा १४.२६.
क्रिवि. प्रसिद्धपणे; उघडपणे. [सं. वाचाट्]

वाजणे अक्रि. १. शब्द करणे; नादणे; आवाज करणे. २. चर्चेचा विषय होणे; प्रसिद्ध होणे. ३. बाचाबाची, भांडण होणे. ४. लागणे (थंडी); विषय होणे : 'माथां वाजती घाये।'– एरुस्व ८.४१. ५. शिवशिवणे; आवाज करू लागणे. ६. वाहणे; सुरू होणे (वारा) : 'वाजतिया वायूतें जरी होकारी।'– ज्ञा ९.१२५. ७. आदळणे; चिकटणे; बाधणे; उद्भवणे : 'परी पाखंडता अंगीं वाजे।'– एभा २०.४८. ८. चिरकणे; पिंजणे (वासा, कळक इ.). (राजा.) ९. (घड्याळ) ठोके पडणे; घटिका, तास भरणे. उदा. आठ वाजले. [सं. वद्; प्रा. वज्ज; हिं. बजना] (वा.) **बारा वाजणे** – नाशाची वेळ येणे; नाश होणे.

वाजणे गाजणे १. गर्जना, गडगडाट, कडकडाट इ. होणे. २. गाजावाजा, प्रसिद्धी, बोभाटा, बभ्रा होणे.

वाजत गाजत क्रिवि. वाद्ये वाजवत, घोषणा देत किंवा गाणी म्हणत इ. थाटामाटाने; डामडौलाने.

वाजत वारा १. वावटळ. २. (ल.) वावटळीसारखे कोसळणारे संकट : 'तुम्हांवरि एथौनि वाजत वारा धरिजैल'– लीचउ १८५.

वाजता वि. आवाज करणारा; खणखणीत.

वाजता नारळ पाणी असलेला नारळ.

वाजता पुडा, वाजते पूड जिकडून थाप मारायची ती मृदंगाची बाजू.

वाजती घाट (ल.) फार वटवट करणारी व्यक्ती.

वाजते वारे, वाजत वारा संकट; आपत्ती; त्रास : 'उभयतांस मी वाजतें वारें।'– अफला १.४.

वाजप न. वाद्य; वाजंत्री. (गो.)

वाजपूस–पुशी स्त्री. चौकशी; शोध; तपास. [फा. बाझ+पुर्स]

वाजपेय पु. एक यज्ञविधी. सप्तसोमसंस्थांपैकी एक सोमसंस्था. [सं.]

वाजब–बी–वी, वाजि(जी)ब–बी, वाजावाजवी वि. न्याय्य; रास्त; उचित; योग्य; आवश्यक; कायदेशीर. [अर. वाजिब्]

वाजबमिति, वाजीबमिती स्त्री. ज्या दिवशी विशिष्ट गोष्ट घडली किंवा घडायची ती दस्तऐवजात नमूद केलेली तिथी, दिवस.

वाजरुक पु. गोव्याकडील पूर्वीचे एक नाणे. [क. बडग; फा. बुझुर्ग+रुका]

वाजवणा पु. वाद्य वाजवणारा.

वाजव(वि)णे सक्रि. १. शब्द, आवाज काढणे (वाद्य वाजवून). २. जाहीर करणे; डंका, दवंडी पिटणे. [क. वजायिसु; वाजणे प्रयोजक]

वाजवी वि. योग्य; रास्त; न्याय्य. [अर. वाजिब्]

वाजंत्री-त्रे-ते, वाजं(जां)तर न. वाद्य; सूर, सनई इ. वाद्यसमूह. [क. वजंतरि; गु. वाजिंत्र; सं. वादित्र]

वाजंत्री पु. वाजंत्री वाजवणारा.

वाजा वि. नीट.

वाजा शेतीचा किंवा शिपाईगिरीचा पेशा असणारी काठेवाडातील एक जात.- ऐको.

वाजा, वाज्याच्या शेंगा गोवारीच्या शेंगा; बावच्या. (माण.)

वाजागाज़ा-वाजा पु. गाजावाजा; प्रसिद्धी.

वाजिवाह न. अश्वशास्त्र; शालिहोत्र.

वाजी स्त्री. गोवारी. (व.)

वाजी वि. खराब झालेले (कापड वगैरे). [अर.]

वाजी स्त्री. १. अपवाद; निंदा : 'म्हणून देहा एवढेपणाची वाजी।'- विपू ७.५१. २. बोभाटा; बभ्रा : 'याची करु काय वाजी ।'- राला.

वाजी स्त्री. कंटाळा; त्रास; दुःख : 'कामाचिये वेळेमाजीं। आणुं नको मज वाजी।'- आपद ८०. [अर. वाजअ्=दुःख]

वाजी पु. १. घोडा. २. घोडेस्वार : 'वाजिए खंड सावासिए पढियार।'- रुस्व ३९२. [सं. वज्-जाणे]

वाजीकरण न. १. मंत्र-तंत्र-औषध वगैरेंनी कामवासना वाढवण्याची क्रिया. २. कामेच्छा वाढवणारे रसायन, औषध. [सं.]

वाजीतळ न. घोड्याची टाप, पाऊल : 'वाजीतळांची थडथड.'- वेसीस्व ६.७४.

वाजीपुसी स्त्री. वास्तपुस्त; विचारपूस; चौकशी.

वाजेवप, वाजेवुंक, वाजौचे अक्रि. कंटाळणे; आळसणे. (गो.) [अर. वाजअ्=दुःख]

वाजौटी-ठी स्त्री. वांझ : 'निराहार तेचिया वाजौठी।'- भाए १९७.

वाज्य क्रिवि. मेटाकुटीला; दुःखाप्रत : 'बहुवीस तेणें गुणें वाज्य आलें।'- राराभा १५.२६६. [अर. वाजअ्]

वाट स्त्री. १. रस्ता; मार्ग. २. (ल.) वागण्याची, पद्धत, रीत, तऱ्हा : 'पहिली जी नीट वाट वाहो ती।'- मोआश्रम १.९. ३. (ल.) उपाय. ४. (ल.) परिणाम; गती; निकाल. ५. बेंबीच्या खाली पोटात वाटीच्या आकाराचा येणारा उंचवटा. (ही सरली तर पोट दुखू लागते.) [क.] (वा.) ० **करणे, लावणे** – नाहीसा, दूर करणे. ० **खाणे** – पळून जाणे. ० **चालवणे** – कसाबसा मार्ग काढणे. ० **चुकणे** – आकस्मिक भेटणे. (अनेक दिवसांनी घरी आलेल्याला म्हणतात.) ० **धरणे** – १. वाट अडवणे, रोखून धरणे. २. वाट पाहणे. ० **पाडणे, पडणे, उठणे, मारणे** – वाटेत चोरी करणे; लुटणे. ० **पाहणे** – प्रतीक्षा करणे; खोळंबून राहणे. ० **लागणे** – निकाल लागणे; खलास होणे; दुर्दशा होणे. ०**लावणे** –१.विल्हेवाट लावणे; २.खाऊन टाकणे; संपवणे. ३. मोडून तोडून टाकणे; नाश करणे. ० **वावरणे** – निरर्थक खेप घालणे; हेलपाटा घालणे. ० **वाहणे** – रहदारी असणे; चालू असणे; वाटसरू, प्रवासी वगैरेंनी गजबजलेले असणे. ० **वाहती करणे** – १.वाट मोकळी करणे.२. घालवून देणे; वाटेस लावणे. ० **सुधारणे** – पळणे; चालते होणे; पाय काढणे. **वाटा घेणे** – लुटणे; लुबाडणे : 'तुजकारणें चोर घेती वाटा। तूं झुंजविली वीरा सुभटा।'- कालिका १४.६६. **वाटा लावणे** – पहा : **वाटे, वाटेस लावणे. वाटेचा पाय, वाटेचे पाऊल आडवाटेस पडणे** – वाईट, चुकीच्या मार्गाला लागणे. **वाटे जाणे** – खोडी करणे; कुचेष्टा करणे. ० **वाटे, वाटेस लावणे** – १. हाकलणे. २. निरोप देणे; पाठवणी करणे. **वाटेवर आणणे** – ताळ्यावर आणणे; सुधारणे. **वाटेवर पडणे** – सहज मिळण्यासाखे, सुलभ, सुसाध्य असणे.नकारार्थी उपयोगी. **वाटेस जाणे** – खोडी, कुरापत काढणे. **वाटेस लागणे** – १. चालू होणे; योग्य मार्ग चालू होणे. २. नाहीसे होणे.

वाट पु. डोळ्यातील बुबूळ : 'भोंवती डोळ्यांचे वाट'- उह २००३.

वाट पु. तोलण्याचे (सुमारे पाच शेराचे) वजन.

वाट स्त्री. पाट : 'डोयीसि पांच वाटा म्हणतु बरवंटा लाग एकुचि तूं रे'- गरा १७२. [सं. पट्ट]

वाट पु. वाटिका; आश्रम : 'गोमतीच्या तटीं वाट वल्मिकीचा।'- मोरामायण १.२५७.११७.

वाट स्त्री. (प्र.) वांट. रेडी; रेडकी; म्हशीचे वासरू.

वाट-टं,वाट(ड)गा-गे न. पु.न.मोठी पसरट वाटी. याचा ताटासारखा उपयोग करतात. (व.)

वाटक पु. वाडी; वसती : 'दत्त : वाटक दक्षिणत:'- लोनाद शिला १.९. [सं.]

वाटक वि. वाकडी : 'हे आंसु वाटक'- लीचपू ७८. [सं. वक्र]

वाटकरी-कादू-काढ्या पु. वाटाड्या.

वाटकुळे वि. वाटोळे; गोल. (गो.) [सं. वृत्त]

वाटकोळ-खोळ-कूळ-खूळ पु. उशीर; पुष्कळ वेळ; वाढवेळा. क्रिवि. पुष्कळ वेळेपर्यंत; उशीर होईपर्यंत.

वाटखर्च-र्ची पु. स्त्री. प्रवासात खर्चण्यासाठी लागणारा पैसा; प्रवासखर्च.

वाटगे न. शिदोरी; पांथेय.

वाटघाट स्त्री. १. खल; बारीक चूर्ण करणे; चिरडणे; ठेचणे; चूर्ण करून मिसळणे (औषधे, पदार्थ वगैरे). २. (ल.) बोलाचाली; खटंपट; वाटाघाट. ३. (ल.) खल; वादविवाद; चर्चा.

वाटघेणा पु. वाटमाऱ्या; लुटारू.

वाटचा क्रिवि. ऐवजी; बद्दल; बदली; जागी; जागचा.

वाटचा चोर, पोर कोणीही अनोळखी मनुष्य; उडाणटप्पू.

वाटचाल स्त्री. प्रवास.

वाटचालन न. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी वधूस वरगृहीं नेतात त्यावेळी वाटेत देण्यात येणारी दारू.- बदलापूर ११९.

वाटण न. १. वरवंट्याने बारीक करण्याची क्रिया. २. अशा रीतीने बारीक केलेला पदार्थ.

वाटणी स्त्री. १. विभागणी; हिस्सेरशी. २. पृथक्करण; निरनिराळे भाग पाडण्याची क्रिया. ३. हिस्सा; वाटा; भाग. ४. (पत्ते) पिसल्यानंतर

सर्व खेळणाऱ्यांना विशिष्ट संख्येइतके पत्ते देण्याची क्रिया व पाळी.

वाटणीपत्र न. ज्या लेखांवरून सहमालक किंवा भागीदार आपले हिस्से निराळे करून घेतात तो लेख; विभागणीपत्रक; यादी.

वाटणे सक्रि. १. निरनिराळे विभाग करून भागीदारांना देणे; हिस्से, तुकडे करणे; भाग पाडणे. २. निरनिराळ्या लोकांना योग्य प्रमाणात देणे. ३. वेगळे काढून ठेवणे : 'जें महर्षी वाटले । विरक्तां भागा फिटलें ।'– ज्ञा ५.१४७. [सं. वंट्=विभागणे]

वाटणे सक्रि. १. वरवंट्याने घासून बारीक चूर्ण करणे; चक्काचूर करणे. २. (ल.) घासाघीस, चर्चा, खल, छाननी, खोदून चौकशी करणे. [सं. अवघट्ट]

वाटणे अक्रि. १. भासणे; भावना होणे; समजणे. २. मनात येणे; इच्छा होणे; सुचणे.

वाटतीट स्त्री. मार्गातील संभाव्य विघ्ने इ.

वाटप न. १. विभागणी; मालमत्तेची हिस्सेरशी. २. पहा : **वाटण**

वाटपण न. घासाघीस. (गो.)

वाटपाडी स्त्री. दरोडा.

वाटपाडो–डू–ड्या–डा, वाटपाडिया पु. वाटमाऱ्या. लुटारू; चोर.

वाटपिठाचा वि. वाटून केलेल्या पिठाचा (उंडा, वडा इ.).

वाटपी वि. वाटप करणारा.

वाटमाणूस पु. सामान्य मनुष्य; कोणत्याही दर्जाची व्यक्ती.

वाटमार स्त्री. १. रस्तालूट; रस्त्यावरील हल्ला. २. रस्त्यावर मित्रत्वाने थांबवणे, अडवणे. ३. (बुद्धिबळ) प्यादे दोन घरे जात असताना मध्येच एक घर आल्यासारखे धरून मारणे. ४. मुलांचा एक खेळ.

वाटमार्ग पु. रस्ता; मार्ग; रीत; पद्धती; सामान्य नियम; साधारण व्यवहार, क्रम इ. वाचक सामान्य शब्दप्रयोग. (वा.) **०करणे, घालणे, दाखवणे, पाडणे, शिकवणे, सांगणे** – सामान्यतः दिशा दाखवणे, सांगणे; उपदेश करणे; सल्ला देणे. **वाटमार्गी लागणे** – १. योग्य दिशेने जाणे; मार्गावर येणे. २. मृत्युपंथाला लागणे.

वाटमुशी स्त्री. मुशी नावाच्या माशाची एक जात.

वाटरू न. म्हशीचे रेडकू; पारडे.

वाटला अ. भोवती. [सं. वृत्त, वर्तुल]

वाटली स्त्री. वाटी; पेज पिण्याचे भांडे; वाटगा (गो.)

वाटली डाळ चणाडाळ भिजवून, वाटून, कैरी घालून केलेला चटणीसारखा प्रकार. (वा.) **० करणे** – १. संपवणे; नाहीसे करणे. २. उगाच चवीपुरते खाणे.

वाटव न. पोते; गोणता. (व.)

वाटवणी न. १. वाटेतील पाणी; गटारातील, रस्त्यात वाहणारे पाणी. २. (सांकेतिक– स्त्रियांमध्ये रूढ) मूत्र; लघवी करणे.

वाटवणे क्रि. थोडा वेळ थांबून पुन्हा चालायला लागणे.

वाटव(वि)णे उक्रि. १. मार्गात बाजूला किंवा मागे टाकणे; पलीकडे जाणे; बाजूने पुढे जाणे; वळसा घालून जाणे. २. ओलांडणे; उल्लंघून जाणे; मागे टाकणे; टळणे (काळ, समय इ.).

वाटवधा पु. वाटमाऱ्या : 'किंबहुना ते चुकले । वाटवधेया ।'– ज्ञा ७.१७४.

वाटवधे न. १. वाटमारी; वाटमारीचा धंदा. २. वाटेतील अडथळा, विघ्न : 'तया इंद्रादि पदें । करिताति वाटवधें ।'– ज्ञा १२.६१.

वाटवा पु. १. बटवा; वाटोळी सरकबंदाची पिशवी; सराफाची नाणे ठेवण्याची पिशवी : 'काच वाटव्यामाजी घालून । तोंड बांधून टाकिती ।'– जै १६.११. २. कप्पे, खण असलेली पिशवी; मोठी चंची. ३. पोते. (ना.)

वाटवा पु. भोवतालचे पाण्यासाठी केलेले थाळे.[सं. वृत्त; प्रा. वट्ट–ट्टि]

वाटवा क्रिवि. बद्दल; ऐवजी; वाटचा.–शर.

वाटशेक क्रिवि. रस्त्याच्या बाजूने; दुतर्फा; वाटेने.

वाटसरू–सारू–सुरू पु. प्रवासी; पांथस्थ; वाटेने जाणारा.

वाटा पु. १. हिस्सा; भाग; विभाग. २. सहभाग. ३. योगदान.[सं. वंट]

वाटा पु. वाडगा.

वाटा, वाटाउ पु. वाटसरू : 'तेथ भीये तरि वाटाउवांजवळि । ग्रामप्रांती ।'– भाए ४९३.

वाटाखाना पु. सर्वनाश. (अहि.)

वाटाघाट स्त्री. १. सारांश समजण्यासाठी घोळून केलेली चौकशी; चर्चा; खल; विचारविनिमय; वादविवाद. २. कसून प्रयत्न; परिश्रमपूर्वक काम; त्रास; मेहनत. ३. श्रांत स्थिती; थकवा. ४. दुर्दशा; कष्टप्रद स्थिती (ऋणकोची सावकाराने, मजुराची मालकाने केलेली).

वाटाडी–ड्या पु. रस्ता दाखवणारा; मार्गदर्शक.

वाटाणा पु. एक द्विदल धान्य; कडधान्य; मटार.[क. वटाणि, सं. वटधान्य; वटदाण.–भाअ १८३३] (वा.) **वाटाण्याच्या अक्षता लावणे** – साफ नकार देणे; विनंती अमान्य करणे (वाटाणे कपाळाला लावल्यास चिकटत नाहीत यावरून).

वाटारणे पहा : **वटारणे**

वाटाव–वो पु. १. उणीव; कमीपणा : 'न पडेगा वाटावो । आणिकांचा ।'– ज्ञा १३.७५२. २. भाग; वाटा.

वाटावणे उक्रि. संकटातून पार पडणे.

वाटावाट पहा : **वाटाघाट**

वाटावाट स्त्री. अनेकांना (वस्तू इ.) वाटण्याची कृती.

वाटांदुळा–दूळ पु. सडीक तांदळातील जाड कणी.

वाटिका, वाटी स्त्री. १. फुलझाडे इ. चा बाग; लहानसे उद्यान. २. वाडी; वस्ती : 'पाटन वाटिकामध्ये'– ठाणे शिला १.९. [सं.]

वाटि(टी)व स्त्री. १. अंश : 'ते तुझिया प्रकाशाची वाटिव'– विउ ३.११. २. पुरुषार्थ; पराक्रम : 'वाटिवावीण हांव । बांधिती झुंजी ।'– ज्ञा १.१७२. ३. प्रशंसा : 'कीजे भारिव थोर वाटिव तुझी गंधर्व विद्याधरीं ।'– आयज्ञरक्षण ७.४.

वाटी स्त्री. १. लहान वाडगा; बशीसारखे खोलगट भांडे. २. नारळाचा अर्धा भाग; एक कवड. ३. गुडघ्यावरील गोलाकार हाड. ४. गुडघी रोग. ५. सामान्यतः खोलगट भांडे; फुलाचा पेला; पोकळ गोळ्याचा अर्धा भाग. ६. रत्न बसवण्यासाठी केलेले कोंदण. ७. डोळ्याची खाच. [क. बट्टलु; त. वट्टि; सं. वर्तिका]

वाटीपान न. साखरपुडा.–लोसाको. (व.)

वाटीमेलती स्त्री. एक वेल; बला; वाद्बालक.–मसाप ४५.४.

वाटीव वि. वाटलेले; पीठ केलेले.

वाटु, वाटु(टो)ली, स्त्री. वाट; प्रतीक्षा : 'कैसी अवस्था भूतळी । वांटु पातां ।'– शिव १७१; 'वाटुली पाहतां सिणले नयन ।'– तुगा ६१३.

वाटूळ वि. गोलाकार. [सं. वर्तुळ]

वाटे न. मोठी वाटी : 'प्रसादाचें वाटें'– लीचउ १३३. [प्रा. वट्टु]

वाटेकर–री, वाटेदार, वाटेलदार, वाटेली पु. भागीदार; हिस्सेदार.

वाटेकार, वाटेचा, वाटेचा चोर, वाटसरू 'वाट' पासून सुरू होणाऱ्या शब्दामध्ये पहा.

वाटेचे सोवळे (बायकी) सोवळे वस्त्र नेसून प्रवास केल्यास सोवळ्याला दोष लागतो. यावरून असे वस्त्र.

वाटेपत्र पहा : **वाटणीपत्र**

वाटेय पु. विषय.– हंको.

वाटोगर–रा–रे पु. न. बटमोगरा : 'ते नवे वाटोगरें उमलतांती ।'– शिव ३०१.

वाटोणी–णे पहा : **वाटवणी**

वाटोवा पु. पहा : **वाटवा**

वाटोळा वि. १. गोल; वर्तुळाकार; गोलाकार; चेंडूसारखा. २. दीर्घवर्तुळाकार; लांबट व गोल; नळकांड्यासारखा. [सं. वर्तुल; त. वट्टम्; प्रा. वट्टुल] (वा.) **वाटोळे, वाटोळे लांबोळे करणे –** समूळ नाश करणे.

वाटोळा वि. वाटोळे, नाश करणारा : 'उदंडचि घरें बुडविलीं वाटोळ्या ।'– ब ४९६.

वाटोळा खूर १. अतिशय खर्चिक घोडा. २. (ल.) उचल्या; भामटा; सोदा.

वाटोळा गोटा, गोळा, धोंडा (ल.) बोलण्यामध्ये वगैरे कधी सापडणार नाही असा मनुष्य; सर्वांशी जमवून घेणारा, गोड बोलणारा मनुष्य.

वाटोळे न. नाश. [सं. अव+द्वालन]

वा(वां)ठ–ठी स्त्री. म्हशीची रेडी.

वाठ वि. चकित; तटस्थ; आश्चर्ययुक्त : 'ऐसा महिष घनवट । गंगा तैसी चोखट । जया देखी जगीं सुभट । वांठ जहाली ।'– ज्ञा २.२१३.

पु. पराक्रम; पुरुषार्थ : 'तो अभिळाखाचा वांठु : विचारा न दाटे धीटु'– मूप्र.

वाठणे, वाठरणे अक्रि. (थंडी, वांब इ. मुळे) आखडणे; वाकडे होणे.

वाठरू न. रेडकू.

वाठाण न. पहा : **वठाण** : 'कीं वाठाणीं नलगे दीपु ।'– गीता १२.९२.

वाठि–ठी स्त्री. उत्सव : 'वाठि निमित्यें मिरिदेसां...'– कालवार शिला १.१०.

वाठि(ठी)व पु. पहा : **वाटिव**

वाठी–ठ्ये न. गवताचा, पेंढ्याचा मुडा.

वाठीचा पिता (वाठीचा म्हणजे म्हशीचा पिता = रेडा, यावरून संकेत) मूर्ख; जड बुद्धीचा.

वाठुजगे न. मोठे पोते : 'बाइसीं कणिकीचें पोते : तांदुळांचें पोतें : एकवट वाठुजगा घातलें'– लीचउ २२१.

वाड स्त्री. १. मोकळी, रिकामी जागा. २. रिकामपण; फुरसत.

वाड वि. निष्फळ; व्यर्थ : 'त्याचें जन्म जालें वाड'– नाम १८५३. [सं. वृथा]

वाड वि. १. थोर; मोठे; पुष्कळ; प्रचंड : 'परि भीमकाचें भाग्य वाड । पुरत परमार्थाचें कोड ।'– एरुस्व १४.८४. २. अफाट; विस्तीर्ण; अवाढव्य; अमर्याद: 'कपी वीर तो वाड ज्याला उडाला ।'– राक १.८. ३. भव्य; बलिष्ठ; भयंकर; आश्चर्यकारक : 'अभ्रीं वाढुनि वाड धाड पडली तेणें थरारी धरा ।'– आपूतनावध ४१. [सं. वृध्]

वाडकर–री पु. १. वाडीकर; वाडीचा मालक. २. वाडीत राहणारा; सावंतवाडीचा मनुष्य. ३. गावढा.

वाडकुले न. लहान वाडी; लहानसे आवाड, परसू. (को.)

वाडकोड न. कौतुक; लडिवाळपणा; आवड.

वाडखो(हो)ळ क्रिवि. पहा : **वाढवेळ**

वाडगा पु. मोठी वाटी.

वाडगा–गे पु. न. मेंढरे इ. पाळीव प्राणी कोंडण्याची जागा.

वाडगी वि. म्हातारा; वृद्ध; वाढलेला. (को.)

वाडगे न. १. आवार; परसू; घराभोवतालची मोकळी जागा. २. घर नसलेली किंवा पडक्या घराभोवतालची कुडलेली जागा. ३.(व.) पहा : **वाडगा–गे** [सं. वाटक]

वाडजतन न. वृद्धीचा प्रयत्न : 'म्हणौनि तेंचि सम्यग्ज्ञान । कैसेनि होये स्वाधीन । जालेयां वाडजतन । केवि निफजे ।'– ज्ञा १६.५५. [सं. वृद्धि+यत्न]

वाडपण, वाडा न. पु. विस्तार; मोठेपणा; भव्यपणा; अधिकपणा : 'वाडपणाचा डांगोरा । तो दंभु ऐसा ।'– ज्ञा १६.२१७.

वाडबैल पु. खेळण्यातला लहान बैल : 'सण पोळ्याचे दिवशीं । मातीचे वाडबैल ।'– वलो २४. (व.)

वाडव पु. पहा : **वडवानल** : 'दुर्वार वाडशिखेसि न मानिजेले ।'– र ३९.

वाडवडील पु. अव. पूर्वज; बापजादे; वडील माणसे इ. [वडील द्वि.]

वाडवळ पु. एक जात व तीतील व्यक्ती; बागवान.

वाडवळ न. शेतकरी लोकांतील एक विधी; डवरा.

वाडसणे, वाडणे सक्रि. (वाढलेला भाग) छाटणे, तोडणे, कापणे : 'बेत आंगलें ती वाडी टाकी.'– भिल्ली. (को.)

वाडा पु. १. भव्य व मोठी इमारत; प्रासाद; थोरामोठ्याचे घर; राजवाडा; सरकारवाडा. २. शहरातील पोटविभाग; आळी; वसती. उदा. गौळवाडा, ब्राह्मणवाडा. ३. खेडेगावाचा, मौजाचा भाग; कोंड. ४. पहा : **वाडगे २, वाडगा–गे.** ५. शेळ्या-मेंढ्यांचा बसलेला कळप. [सं. वाट; क. वाडे; प्रा. वाड]

वाडाचार पु. १. वंशविस्तार. (कर.) २. आचारविचार : 'बहुत नाहीं वाडाचार ।'– दावि १०.

वाडाळणे सक्रि. वारवणे; आसडणे; पाखडणे.

वाडि–डी स्त्री. वाट : 'मज निघावा खिंडियेरे वाडि पाहों दे ।'– पंच ५.७.

वाडी स्त्री. १. कुंपण घातलेली लहान बाग; बगीचा; राई. २. वाडगे; आवार; वाडकुले; मळा. ३. मोठ्या गावाजवळची लहान वस्ती;

झोपड्यांचा समूह; लहान गाव. [सं. वाटिका; गु.; हिं.; बं. वाटी] (वा.) ० **घालणे** – उघडपणे निशाण लावून बंडाळी करणे.

वाडी स्त्री. पिशाचांसाठी वगैरे काढून ठेवलेले थोडे अन्न; काकबली; भिकाऱ्याला देण्याची उंडी; गोग्रास. (राजा., गो.)

वाडी भरणे पाठारे प्रभू लोकात गरोदर स्त्रीला (पहिल्या गरोदरपणात) पाचव्या महिन्यापासून चढवतात तो शृंगार. विशेषत: तिच्या गालावर व कपाळावर रंगीत कटोऱ्यांची चित्रे किंवा नक्षी काढतात.

वाडुवळ पु. वाद घालायला प्रवृत्त करणारे भाषण; बोलणे : 'उरोधु वाडवळु। प्राणुतापढाळु।'– ज्ञा १३.२७०. [सं. वाद+बल]

वाडू(डो)ळ पहा : **वाढवेळ**

वाडे न. पहा : **वाडी** ३ [सं.]

वाडे न. १. वाढे; उसाचा शेंडा. २. खजुराचे आखे; अर्धे ओझे.

वाडे, वाडेकोडे क्रिवि. १. कौतुकाने; लाडाने. २. सहज; अनायासपणे.

वाडेहुडे पु. अव. घरे व बुरुज; घरेदारे; मालमत्ता.

वाडोवाड वि. मोठमोठा. पहा : **वाड** [वाड द्वि.]

वाड्डीक पु. लग्नसमारंभ. (गो.)

वाड्या पु. वाडीचा वतनदार; वाडीवाला; घरंदाज; शेतीवाडीचा मालक.

वाढ स्त्री. १. शरीराची उत्तरोत्तर होत जाणारी वृद्धी; आकार मोठा होणे; जाड, लठ्ठ होणे. २. आधिक्य; प्रमाणात, मापात, संख्येत अधिक भरणे; वाढावा. ३. व्याज (उसने धान्य वगैरे परत देताना अधिक देतात ते).

स्त्री. न. मोड येण्याची जागा; डोळा; अंकुर फुटण्याचे धान्य.

न. उसाचा अग्रभाग; शेंडा.

वि. उंच; थोर; मोठा : 'कवी उपासकांची वाढ कीर्ति। विस्तारली।'– दास १.७.१३. [सं. वृद्धि; सं. वृध्–वर्ध्; प्रा. वट्ढ]

वाढआविंज, वाढाविंज स्त्री. भातलावणीची अखेर, शेवट. पहा : **आविंज**

वाढई, वाढी पु. सुतार; पहा : **बढई** : 'देवदत्त नामें वाढई।'– पंच १.४०. [सं. वर्धकि]

वाढकाम न. सुताराचे काम, धंदा.

वाढण–णे न. १. भांड्यांवर अन्नादी ठेवणे; जेवणाऱ्या मंडळींना अन्नादी पदार्थ पुरवणे, देणे; पानावर घालणे; असे वाढलेले अन्न. २. न्हाणवलीसाठी आप्तादिक वाढून आणतात ते पान; जेवायला न आलेल्या व्यक्तीसाठी पाठवतात ते अन्न वाढलेले पात्र, ताट. ३. नोकरचाकर वगैरे लोकांना वाढून देतात ते अन्न. [क. बडिसु]

वाढणी स्त्री. १. अन्न वाढण्याचे भांडे; पात्र; वेळणी. २. वाढप, वाढण्याची क्रिया.

वाढणी पहा : **वाढवण**

वाढणी स्त्री. वाढ; मोठे, उंच होणे; वाढीस लागणे.

वाढणे उक्रि. १. (जेवणाऱ्यांना अन्न) देणे, पुरवणे, घालणे. २. (दिव्यात तेल, झाडाला पाणी वगैरे) घालणे, टाकणे. ३. (भिक्षेकऱ्याला भिक्षा) घालणे. ४. सोडणे; टाकणे; लोटणे : 'समय हा मज काळाच्या मुखांत वाढील।'– मोकर्ण २८.४८. [सं. उप+पाद्य] (वा.) ० **वाढून ठेवणे, वाढून ठेवलेले असणे** – तयार असणे. **वाढून येणे** – एकामागे एक येणे (आजार, त्रास, संकट इ.).

वाढणे अक्रि. १. मोठे होणे; आकार, उंची, संख्या इ. अधिक होणे. २. वय, काळ वगैरे दृष्टीने प्रगत होणे; परिपक्व होणे. ३. पुढे जाणे; हल्ला करणे; समोर जाणे; चालून जाणे : 'राउळांपुढें वाढत। राजवाहन पुआळित।'– शिव ५३०. ४. (प्रत्यक्ष उच्चाराने येणारे अशुभ टाळण्याकरता स्त्रियांमध्ये रूढ) कमी होणे; नाहीसे, खर्च होणे; संपणे (कुंकू इ.). ५. (धान्य) वारवले जाणे. ६. अंगात येणे; (भूत, देव इ. चा) संचार होणे. [सं. वृध्; हिं. बढना; ते. विडुदल्]

वाढता वि. १. वाढत जाणारा; पूर्णतेला जाणारा; मोठा होणारा. २. अधिक होत जाणारा; वृद्धी पावणारा. ३. शुभदायक, मंगलदायक म्हणून वर्तालो दिलेला.

वाढता वि. वाढपी.

वाढता चुडा बांगड्या भरल्यावर शुभदायक म्हणून कासार भरतो ती अधिक बांगडी.

वाढती स्त्री. १. मुलांच्या उचकीसाठी शुभदायक शब्द (अमंगल टाळण्यासाठी). २. वाढदिवस : 'कीं वाढती करिती उल्हासें। उभविती गुढिया।'– ज्ञा ९.५१२.

वाढते, वाढदिवस न. पु. जन्मदिवस; जन्मदिनी करण्याचा विधी, समारंभ.

वाढया पु. १. सुतार. २. सुताराच्या नावापुढे लावण्याचा आदरार्थी शब्द. [सं. वर्धकि; हिं. बढई]

वाढवण स्त्री. १. वाढण्याची, अधिक होण्याची क्रिया. २. वाढ; बढती; वृद्धी. ३. संपणे; खलास होणे; खुंटणे; फुटणे. (अभाव, नाश वगैरेचा प्रत्यक्ष निर्देश अशुभसूचक मानून त्याअर्थी उलट, वृद्धिवाचक शब्द वापरतात.) ४. केरसुणी; खराटा. [सं. वर्द्धनी]

वाढव(वि)णे (वाढणे प्रयोजक) १. मोठे, अधिक, विस्तृत करणे. २. वाढीस लावणे; पालनपोषण करणे; सांभाळणे. ३. फुटणे (बांगडी वगैरे); संपणे; खुंटणे; नाश पावणे (अशुभ निर्देश टाळण्यासाठी कुंकू, बांगड्या वगैरेसंबंधी). ४. आसडणे; पाखडणे, वारवणे (धान्य). [सं. वर्धापन]

वाढवय न. प्रौढ, वाढलेले वय.

वाढवा पु. वाढ; वाढलेला भाग; जास्तीपणा.

वाढवावाढव स्त्री. १. विस्तार; आधिक्य; वृद्धी करणे (औत्सुक्य, पुरस्कार, नेट, प्रगती इ. ध्वनित होतात).२. (ल.) चेतवणी; भडकवणे; वाढवणे (कलह, भांडण, आग इ.). [सं.]

वाढवीस पु. वाढदिवस; जन्मदिवस; वर्षगाठ.

वाढवेळ, वाढोळ पु. उशीर; दीर्घकाळ; पुष्कळ काळ : 'वाढवेळ बहु झाला येई सख्या मला भेटे।'– देप ३३. [सं. वृद्ध + वेला]

वाढ(ढा)ळ, वाढाळू वि. जलद वाढणारे, वाढलेले (झाड, रोप, प्राणी); भारीची (जमीन). [सं. वर्द्धालु]

वाढा पु. वीण; प्रजा; संतती; अवलाद; बिजवट; विस्तार (गुरेढोरे, प्राणी यांचा).

वाढा पु. शिल्पकार : 'कोकसवाढ्याचें लेणें'– स्थापो २७. [सं. वर्धकी]

वाढाघरचा वि. नांदत्या घरातील; मुले, लेकरे बरीच असणाऱ्या घरातील : 'संपूर्णाला काय करावें वाढाघरची सून जेवूं घालावी ।'– धरित्रीची कहाणी.

वाढाचार पु. पाल्हाळ; विस्तार.

वाढाळ वि. क्रिवि. १. वाकडे; समप्रमाण नसलेले; सरळ रेषेत न चालणारे. २. वाकड्या स्वभावाचा.

वाढिन(नि–न्न)णे पहा : **वाढणे**

वाढिले न. अन्न वाढलेले ताट : 'तीए दीसीं आउसां एक वाढिलें आलें'– लीचउ १७२. [सं. वर्धित]

वाढी स्त्री. १. वाढ; वृद्धी. २. उसना घेतलेला धान्य इ. पदार्थ परत करण्याच्या वेळी अधिक देण्याचा पदार्थ. ३. पातळ पदार्थ वाढण्याचे तोटीचे भांडे; झारी.

वाढी पु. १. सुतार; पहा : **वाढई**. २. सुतार नावाचा पक्षी.

वाढीदिढी स्त्री. उसना घेतलेला पदार्थ दीडपटीने परत देण्याचा करार, रिवाज, रीत.

वाढीमोडी स्त्री. चढउतार.

वाढे न. १. वाढ; उसाचा शेंडा. अग्र. २. आचळ्या; दशा; दोन लुगड्यांमधील न विणलेला भाग. (वा.) **उसात जाऊन वाढे आणणे** – समृद्धीच्या स्थळातून क्षुद्र वस्तू आणणे.

वाढै पु. सुतार : 'तंव वाढै गावाआंतु जेवावया गेला'– पंचो ४.२१. [सं. वर्धकि]

वाढोळ–ळा पहा : **वाढवेळ**

वाण–णी, वाणीतिणी स्त्री. नवस; लाड. – लोसाको.

वाण पु. १. वर्ण; रंग : 'साजत मेघा ऐसा वाण ।'– कीर्तन १.७५. २. नमुना; प्रकार; तऱ्हा; लुगड्याचे वाण. ३. बाजू : 'तेया क्रुसाचा येणे वार्णीं ।'– खिप्रु २.४४.४१. [सं. वर्ण; प्रा. वण्णा] (वा.) ०**मारणे** – कलाहीन, निस्तेज, फिके होणे.

वि. भिन्न वर्णांचे, रंगांचे : 'ऐसीं तीयें वस्त्रें वार्णीं'– ऋव ४३२.

वाण न. पु. विक्रीचा माल; किराणा माल.

वाण न. वायन; व्रताच्या सांगतेसाठी ब्राह्मणाला देतात ते सूप, खण, तांदूळ वगैरे साहित्य.[सं. उपायन; क. वायिन] (वा.) ०**आणणे** – तक्रार, चहाडी करणे.– ऐको. ० **वाटणे** – एखादी गोष्ट सगळ्यांना सांगत सुटणे. **सुन्या घरी वाण देणे** – निरुपयोगी ठिकाणी सामर्थ्य वेचणे, दिमाख दाखवणे.

वाण वि. ओसाड : 'यमपुरी घालूं वाण'– नाम १४६६. [सं. उन]

वाण–णि–णी स्त्री. उणीव; तूट; टंचाई; कमतरता. [सं. उन]

वाण आमंत्रण सर्वसाधारण निमंत्रण.

वाणका वि. धडधाकट; दणकट; धडोतीच्या उपयोगी (वस्त्र).

वाणकी वि. लहान : 'तगायास तूझी तनू वाणकी रे ।'– वामन, विराट७.१५५.

वाणकूट–गट–गंड पु. (तिरस्कारार्थी) वाणी.

वाणगी पहा : **वानगी**

वाणचोर वि. आपले खरे रूप लपवणारा; ढोंगी.

वाणजिन्नस पु. वाण्याकडचा, किराणा माल.

वाणढाळ वि. विटका; रंग, चेहरा उतरलेला; निस्तेज; फिका (रत्न, मोती).

वाणणे क्रि. वर्णन, स्तुती करणे; वाखाणणे : 'ते कवि वाणिजे बोलीं। श्रीकृष्ण मूर्ति ।'– शिव ३६७.

वाणणे क्रि. बाणणे; ठसणे; प्रवेशणे : 'योगियाचें परम भाग्य। आंगी वाणे तें वैराग्य ।'– दास १.१.३१.(धुळे प्रत)

वाण धरणे कुणब्यांनी पाऊसकाळ संपल्यावर पहिल्यांदा जाळे टाकून मासे धरून वेताळाला परडीचा नैवेद्य करणे. (राजा.)

वाणपण न. व्यापार.

वाणपसारा पु. १. वाण्याच्या दुकानातील माल; वाणजिनसांचे प्रदर्शन. २. (ल.) तऱ्हेतऱ्हेची व विस्तृत मांडणी; प्रदर्शन; रचना. ३. अव्यवस्थित रचना; गोंधळ. ४. (बायकोचा) प्रसूतिसमयी घोटाळा, कठीण प्रसंग.

वाणपालटण स्त्री. १. वस्त्रपालट : 'श्रीकृष्णासी वाणपालटण। नामरूपाचें वास संपूर्ण ।'– एरुस्व १६.१५४. २. रंग, चर्या, छटा बदलणे (चेहरा, सोने, मोती, हिरे यांचा).

वाणमाऱ्या वि. निस्तेज; उतरलेल्या चेहऱ्याचा; दुर्मुखलेला.

वाण(णे–न)लग वि. अनेक रंगांचे; भिन्नवर्णी; पंचवर्णी : 'वानलगां वस्त्राचे वोसाडे ।'– ऋ १.४.२३.

वाणवती स्त्री. वर्ण; छटा : 'ना तरी पव्हरेयां वाणवती ।'– शिव २९.

वाणवसा पु. व्रत; नियम; उपासना : 'अनन्य भावें शरण तुला स्वधर्म अमचा वाणवसा ।'– प्रला ११४.

वाणशी स्त्री. माजघर. (कु.)

वाणसी स्त्री. वेश्या : 'वाणसियेचे उभले । कोण न रिगे ।'– ज्ञा १३.७००. [सं. वणिक्+स्त्री]

वाणसौदा पु. हिंगजिरे इ. वाण्याच्या दुकानातील जिन्नस; किराणा माल.

वाणा पु. वस्त्रातील आडवा दोरा, सूत; बाणा. [सं. वाणि=विणणे, माग]

वाणा पु. पावटा; वाटाणा. – चित्रकृषि २.७.

वाणा पु. क्रुसाचा एक हात, बाजू.

वाणाताणा पु. वस्त्राचे आडवे-उभे तंतू.

वाणिज्य न. व्यापार; उदीम.

वाणिज्य विधी पु. व्यापार सुरळीत चालावा व तंटेबखेडे योग्य प्रकारे निकालात निघावे म्हणून प्रचलित चालीरीतींवर आधारित असा कायदा.

वाणिया पु. वाणी; व्यापारी.

वाणिया वि. अहित करणारा; गमावणारा : 'वायां आपुलांचि सुखी वाणिया ।'– ज्ञा ७.१४७. [सं. उन]

वाणिव स्त्री. स्तुती : 'आलिया जवळा भक्तिसुख देखे। पालव पोखे, वाणिव भोगी ।'– ज्ञागा ७८.

वाणिसार न. उत्तम रंगाचे वस्त्र : 'तियें वाणिसारें वरीचिया वरी मी झेली'– मूप्र २११९. [सं. वर्ण]

वाणी स्त्री. वाहण्याची दिशा : 'कीं वारेया घापत आहाति वाणी ।'– ज्ञा ९.२०.

वाणी पहा : १ **वाण** २

वाणी स्त्री. रंग; तेज; वाण.

वाणी स्त्री. १. वाचा; भाषण. २. जिव्हा; रसना. ३. भाषा. [सं.]

वाणी स्त्री. कौतुक; अपूर्वता; अतिप्रियता : 'माझे दोघे भाऊ। मला ते वाणीचे। देवाच्या दारीचे। कडुनिंब।'– स्त्रीजी २४.

वाणी स्त्री. जोंधळ्याची एक जात. याचा हुरडा नरम असतो.

वाणी, वाणी उदमी–बकाल पु. व्यापारी; वैश्य; दुकानदार. [सं. वणिक्]

वाणीकि(ति, दे)णीचा वि. बहुमोल; महागाईचा; दुर्मीळ.

वाणी बैलकरी बैलावरून वाहतूक करणारे.

वाणी व्यवहार (सांके.) कर्ज.

वाणीशाई–ही वि. वाण्याच्या पद्धतीचे, तऱ्हेचे.

वाणे क्रि. वाजणे; वाजवणे : 'वाती सिंगे पांवे।'– तुगा २३०. [सं. वान] (वा.) **०वाखाणणे** – भाटाकडून दवंडी देणे.– ऐको.

वाणे क्रि. वाहणे; अर्पण करणे : 'सवर्गा वाती वांकुलिया।'– ज्ञा ७.१९०. [सं. वप्]

वाणे न. प्रकार : 'तयांचें ब्रह्मविद्येसारिखें वाणें : वरदळें दिसें।'– ज्ञाप्र ५८२. [सं. वर्ण]

वाणे न. वाहन : 'टंका मयूराचें वाणे।'– उषा १२२.८१.

वाणेउमट पु. नाना प्रकार. पहा : **वाण**

वाणेपण न. न्यून; कमतरता.

वाणेरा पु. कर्ज : 'मुद्दल देउनि वाणेरा फेडिला।'– ज्ञागा २१७.

वाणेलग वि. वेगवेगळ्या रंगांचे : 'वरि शिराजाळ उमटे : वाणेलग'– उगी २०२. [सं. वर्ण]

वाणोवाण पु. वाणजिन्नस.

वात पु. १. वायू; वारा; हवा. २. शरीरातील तीन धातूंपैकी एक; त्रिदोषांपैकी एक. ३. संधिवात; पेटका; वळ वगैरे. [सं.] (वा.) **० चढणे** – वाताचा झटका येणे; वातोन्माद होणे. **वातहरण करणे** – काटा काढणे; पराभव, गर्वभंग करणे.

वात स्त्री. १. बत्ती; दिव्यातील कापसाची, सुताची पेळू; देवापुढे लावण्याच्या निरनिराळ्या फेऱ्यांच्या वळ्या. २. कोवळे, बारीक पडवळ, शेंग, काकडी इ. ३. (ल.) (नाविक) गुंडाळलेले शीड. ४. दिव्याचे नाक, निमुळता भाग; समईतील वाती ठेवण्याची जागा. ५. तेलवात या शब्दाचे संक्षिप्त रूप; नंदादीपासाठी लावून दिलेली जमीन. ६. (ल.) दिवा : 'रश्मि वातीविण न देखती।'– ज्ञा ९.३०१. [सं. वर्त्ति]

वातकंटक पु. वातविकाराचा प्रकोप; मुंग्या येणे; हुळहुळणे.

वातकोश पु. (शाप.) माशांच्या शरीरातील पिशवी. (या पिशवीमुळे माशांना पोहता येते.)

वातगुल्म पु. १. संधिवात. २. पोटातील वायू; पोटशूळ. [सं.]

वातचक्र न. १. झंझावात; वावटळ; भोवरा. २. वातावरण. ३. अंतरिक्ष.

वातज्वर पु. वातदोष कुपित झाल्यास येणारा ज्वर.

वात(ता)ट–ड वि. १. चिवट; चिकट; लोचट; लवकर न तुटणारा. २. (ल.) हेकट; हट्टी; लागट.

वातट(ड)णे क्रि. १. वातड होणे. २. लोचट होणे.

वातडला वि. कृश; सडसडीत. (ना.)

वातणे क्रि. वाजणे : 'सुताल ताल घोळ मोहरा। वातांती।'– दाव ३५४. [सं. वा–वाति]

वातदोरा पु. गाभण प्राण्याच्या योनीतून स्रवणारा चिकट द्रव.

वातनलिका स्त्री. (शाप.) अपृष्ठवंशीय प्राण्यांच्या शरीरातील वायुवाहक नळ्या.

वातनौका स्त्री. समुद्रावर जाणारे विमान.

वातपूरकयंत्र न. (शाप.) जोराने हवा भरण्याचे यंत्र.

वातपोत पु. (दिव्याची वात व देवीचा पोत) (ल.) सरळ, सडसडीत, किरकोळ, बारीक व लांब वस्तू : 'अवयव आकृति खिली वातपोतसारखी। निवडणार निवडील असे जो रत्नाचा पारखी।' – पला ४.३४.

वातप्रकृति–ती स्त्री. वातूळ; वातप्रधान; वातधातूचे आधिक्य असणारे शरीर.

वातरक्त न. १. तीव्र संधिवाताचा विकार; दूषित वायूच्या योगाने संचित रक्ताचा विकार. – योग २.२. २. रक्तपिती; महाव्याधी : 'वातरक्त कफरक्त।'– गीता १३.२४९७.

वात(ते–त्ये)रे न. १. समईतील वाती लावण्याची खोबण. २. वाती करण्याच्या उपयोगी फडके. ३. (ल.) फाटके वस्त्र; लक्तरे; चिंध्या.

वातरोग–विकार पु. संधिवात; पेटके.

वातलणे क्रि. बातलणे; बाता मारणे. (व.)

वातविध्वंस पु. वातविकारावरील रसायन; वायूची मात्रा.

वातविलेपतुषार पु. हवेत तुषार उडवण्यासाठी दाबून भरलेला वायू साठवलेले विशिष्ट प्रकारचे भांडे. (अशा भांड्याला बारीक छिद्र असते. बटण दाबल्याने ते मोठे होते व द्रवपदार्थ जोराने तुषाररूपाने बाहेर पडतो.)

वि. वायू भक्षण करणारा. [सं.]

वातशूल–ळ पु. पोटशूळ; वायगोळा; पेटका.

वातश्वासी वि. (शाप.) वायूने श्वासोच्छ्वास करणारे (प्राणी).

वातसाखळी स्त्री. दरवाजाची फळी व चौकटीचे उभे लाकूड यांचे खालचे भाग एकमेकांना जोडणारी साखळी.

वातंग पु. वैल (चुलीचा). (को.) [सं. वात + अंग]

वाता–त्या पु. दाराचे कुसू.

वाताकर्षकयंत्र न. वायू ओढून घेणारे यंत्र.

वाताकृति–ती वि. चपळ; वेगवान : 'अश्व मिरवले वाताकृती।'– नव ११.६३.

वाताडे न. अचानक लाभ; वाऱ्याने येऊन पडलेले. (वा.) **० पडणे** थोड्या किमतीत पुष्कळ मिळणे; अचानक लाभ होणे. [इं. विंडफॉलला प्रतिशब्द]

वातानुकूलन न. मर्यादित, बंदिस्त जागेचे तापमान नियंत्रित करणे.

वातानुकूलित वि. तापमान नियंत्रित ठेवलेली (जागा).

वातायन न. खिडकी; झरोका; गवाक्ष. [सं.]

वातावरण न. १. पृथ्वीच्या भोवतालचे वायूचे वेष्टण. २. (ल.) परिस्थिती;

सभोवतालची स्थिती. [सं.]

वातासन न. एक योगासन. डाव्या पायाचा चवडा उजव्या मांडीवर चढवून खुब्यावर टेकून उभे राहणे. [सं.]

वातासि पु. सर्प : 'वातासि सेवी भला'– गरा ७९. [सं. वाताष]

वाताहा(ह)त स्त्री. दाणादाण; नाश; धुव्वा; सत्यानाश; उधळपट्टी; फाटाफूट.

वि. क्रिवि. विसकळीत; नष्ट; उधळलेले. [सं.]

वाताळ वि. वाचाळ; बडबड्या; वात्रट. (व.)

वातिक वि. वातजन्य; वातदोषांमुळे उत्पन्न होणारा.

वाती स्त्री. दिवा : 'पतंगा नावडे वाती ।'– ज्ञा १६.२३२.[सं. वर्तिका]

वातूल न. वावटळ; वादळ; भोवरा.

वातूल–ळ वि. १. वातकारक; ज्यामुळे वातविकार उत्पन्न होतो असा. २. वातप्रकृतीचा; फोपशा; वाताने फुगलेला.

वाते न. निरी; उंचवटा; ओटी.

वातेर–रे, वातेरपट्टी–फळी न. स्त्री. दरवाजाच्या फळीचा वात्या फिरण्यासाठी वरती फळ्यांत बसवलेला तुकडा.

वातेरे न. १. समईतील वाती लावण्याची खोबण. २. दिवा, कंदील यांचा वातीसाठी असणारा भाग. ३. कुसू ठेवण्याचा खोलगट भाग.

वातोदर न. वातयुक्त उदररोग; गुबारा.

वातोन्मान न. वायुभारमापक यंत्र.

वात्या पु. वादळ; वावटळ : 'जसा पट टिकों न दे वात्या ।'– मोकर्ण ११.५४.

वात्या, वात्येरे पु.न. १. पहा : **वाता.** २. वात्या फिरण्याचे भोक. (कारवारी.)

वात्रट वि. १. पहा : **वातट–ड.** २. (ल.) निरर्थक; पाचकळ.

वात्रटिका स्त्री. खिल्ली उडवणारी छोटी कविता.

वात्सल्य न. मुलांविषयीचे प्रेम, कौतुक, आवड, स्नेह, लाड. (सामा.) ममता; प्रेम. [सं.]

वात्सी, वाथसी स्त्री. बस्ती; ओटीपोट; पोटाखालचा भाग. [सं. बस्ती]

वाथरणे क्रि. पसरणे; अंथरणे. (चित्पा., राजा.) [सं. वि+आ+स्तृ]

वाथंग–ग्या पहा : **वादंग**

वाथा–थ्या पु. ओटीपोट; पहा : **वात्सी** : 'वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षण । चिरगुटें घालून वाथयाला ।'– तुगा २८७५. [सं. बस्ती]

वाथ्या पु. स्त्री. अव. (काथा या शब्दाऐवजी वापरतात.) निरर्थक वाटाघाट.

वाद पु. १. चर्चा; खल; विरुद्ध मत असणाऱ्या दोन पक्षांतील बोलाचाली. २. भांडण; तक्रार. ३. संभाषण; मुलाखत; वाटाघाट. ४. वदंता; वार्ता; ऐकीव बातमी; प्रवाद. ५. फिर्याद; दावा; कज्जा. ६. (ल.) गुन्हा; अपराध : 'तुमचा काय वाद केला ।'– ऐपो ३४. ७. संज्ञा; नाव : 'ऐसी कोण्ही एकी दशा । तिये वाटु अज्ञान ऐसा ।'– ज्ञा १४.७९. [सं.]

वाद स्त्री. पहा : **वादी**

वाद पु. बधिरता; जाड्य (अंगाला आलेले).

वाद स्त्री. आठवण; स्मरण. (खा.) [सं.]

वादक वि. वाद करणारा; वादी; द्वंद्वी. [सं.]

वादक वि. १. वाद्य वाजवणारा. २. आवाज करणारा; बोलका. [सं.]

वादगार–री वि. स्मरणीय; आठवणीचा : 'जो उपकार आपण करितील तें आपलें नांव राहील वादगारी.'– मइसा ६.६०२.[फा. यादगार–री]

वादग्रस्त वि. १. ज्यासंबंधी फिर्याद चालू आहे असे. २. वादातील तंट्यातील; भानगडीचे.

वादघाई पहा : **वाद्यघाई**

वादचंचु–चू वि. वाद करण्यात चतुर, निष्णात.

वादट वि. वाद घालणारा; भांडखोर.

वादट–ड वि. दमट; ओलसर हवेने दूषित.

वादडणे उक्रि. १. धूर्तपणाने एखादी गोष्ट मिळवणे; लाटणे. २. चलाखीने, धाडसाने एखादी गोष्ट करणे. [सं. अद्=खाणे]

वादडा पु. थप्पड; धपाटा; चापटी; रट्टा.

वादणा पहा : **वाधणा**

वादन न. १. वाजवणे; शब्द काढणे. २. वाद्यातून वगैरे सूर काढणे : 'गाण्याची साथ करणे. गायनाची निर्जीव पदार्थापासून तयार केलेल्या यंत्राने केलेली नक्कल.'– संगीत शास्त्रकार व कलावंतांचा इतिहास.

वादप्रतिवाद पु. १. उलटसुलट बाजूंनी चर्चा; पूर्वपक्ष व उत्तरपक्ष करून होणारा वादविवाद. २. संभाषण; संवाद; बोलणे.

वादबळ पु. भांडणाला उत्तेजन.

वादले न. (जरतार.) चपटे केलेले धातूचे सूत.

वादविवाद पु. चर्चा; खल; वादप्रतिवाद; भांडण.

वादळ न. १. वावटळ; झंझावात; तुफान. २. (ल.) संकट. [सं. वातुल, वर्दलिका; हिं. बादल]

वादळणे अक्रि. क्रोधाने रागाने मोठ्याने बोलणे; उसळणे; अंगावर घसरणे; शिवीगाळ करणे.

वादंग पु. न. १. झालेल्या गोष्टीविषयी विनाकारण धुसफुस; कुरबुर; आढेवेढे; कुत्सितपणाची टीका.२. भांडण. ३. वादविवाद; चर्चा.

वादा पु. रोगाची साथ; गुराचा भयंकर आजार; मरी. [सं. बाधा]

वादा पु.१. चाबकाचा फटकारा. २. चामड्याचा मोठा पट्टा; मोठी वादी.

वादाडणे सक्रि. गट्ट करणे; खाणे; फन्ना करणे. [सं. अद्]

वादाडा पु. हल्ला; धाड; दरोडा; घाला.

वादानुवाद पु. १. वादविवाद. २. (कायदा) फिर्याद आणि प्रतिपक्षाचे उत्तर; मूळ तक्रार व तिला उत्तर.

वादावाद–दी पु. स्त्री. वादविवाद.

वादाळ पहा : **वादग्रस्त**

वादा(द)ळणे अक्रि. १. दमट हवेने ओलचट होणे; सर्द होणे. २. तुफानात सापडणे; झंझावाताने नाश होणे; वादळाने पडणे वगैरे.

वादित वि. १. वाजवलेले. २. म्हटलेले; सांगितलेले.

वादित्र न. वाद्य; वाजंत्री. [सं.]

वादी स्त्री. चामड्याची पट्टी, दोरी, नाडी; चाबकाच्या शेवटी लावण्याची चामड्याची पट्टी; तबला, डग्गा आवळण्याची पट्टी. [सं. वार्धी; प्रा. वद्धी]

वादी पु.१. तक्रारखोर; वाद घालणारा. २. वादाविषयी उत्सुक; वादात

कुशल. ३. फिर्यादी; कोर्टात प्रथम कज्जा मांडणारा; दावा मांडणारा. ४. वैरी; शत्रू. ५. मांत्रिक; मंत्रवादी : 'वादी म्हणेल उरविल बाधा घालीन रामरक्षे मी ।'– मोविराट ६.६९. ६. विशिष्ट तत्त्व, मत इ. चा पुरस्कार करणारा. ७. बोलका; बोलण्यात चतुर; वक्ता. ८. (संगीत) रागातील मुख्य स्वर. [सं.]

वादीक न. (चर्म.)वाद्यांचे काम; वहाणेचे शिंके; वहाणेचा वाद्यांनी केलेला वरचा भाग.

वादीक(कु,को)डे न. चामड्याचे वेटोळे; वादीचे कोडे; सच्छिद्र वादीचा जुगार : 'नाडेल जो वादीकोडें ।'– अमृ ७.११६.

वादे पहा : **वादा**

वादेली वि. १. वाद घालणारा; वादी. २. एका बाजूचा, पक्षाचा. (कु., को.)

वाद्य न. मानवी कंठाव्यतिरिक्त संगीतोपयोगी आवाज काढण्याचे साधन. याचे प्रकार – तत, सुषिर, अवनद्ध, घन. [सं.]

वाद्यघाई स्त्री. अनेक वाद्यांच्या आवाजाचा नाद; वाद्यांची झड; झुंबड; गर्दी.

वाद्या वि. १. भांडखोर; हुज्जत घालणारा : 'वाद्या अथवा भेद्या ऐसा सेवक काशाला ।'– स्फुट पदे (नवनीत पृ. ४५१). २. शत्रू.

वाधणा पु. अवधणा; दुखापतीमुळे, गळू होऊन सांध्यात येणारी गाठ.

वाधणे सक्रि. वाहणे : 'पीली पाठी पालेटीं वाधौनु'– कला ९. [सं. वह्]

वाधा पु. मूग, उडीद, चवळी इ. च्या कोवळ्या शेंगा.

वाधावणे न. १. वरधावा; वराच्या आगमनाच्या वेळी वाजवण्याची मंगलवाद्ये, आगमनाची सूचना : 'उभविलीं गुडितोरणें । नगरीं जाहलीं वाधावणें ।'– कथा १.१०.१९०. २. आमंत्रण; बोलावणे : 'कळलें पांडवांचें वाधावणें ।'– गीता १.११९०.

वाधावना पु. दवंडी पिटणारा मनुष्य : 'लोक वाधावनयातें पुसति'– उह २२२७.

वाधावनी, वाधावा स्त्री. पु. १. वरधावा; वरागमनाची सूचना. २. शुभवर्तमान; वार्ता. ३. आगमनाच्या वेळी वाजवण्याचे मंगलवाद्य.

वाधावी–वा पु. १. वार्ताहर; बातमी आणणारा : 'तये वेळीं वाधवियातें । राये हार दिधला उचितें ।'– कथा ७.१०.१३९. २. शुभ वार्ता : 'वाधावा सांगों रुक्मिणीए'– मधपू २९.

वान न. उखळ; वाईन. (को., गो.)

वान न. घटकद्रव्य (औषधातील, मिश्रणातील) : 'कांहीं कषायांच्या वानांच्या यादी घोकून पाठ केल्या.'– व्यनि ७६.

वानकस पु. वर्णाचा, रंगाचा कस : 'जैसा सोनयाचा वानकसु : तया अळंकारत्वें नाहीं नासु'– ज्ञाप्र ६१०. [सं. वर्ण + कष]

वानकी स्त्री. चिंचोळे तारू. (गो.)

वानगी स्त्री. १. नमुना; मासला. २. कोणत्याही पदार्थाचा चवीसाठी घेतलेला थोडासा अंश. ३. जकातीच्या नाकेदाराने जकातीशिवाय कोणत्याही मालाचा नमुना म्हणून, चव पाहण्यासाठी घेतलेला अंश; शेतात पिकलेल्या धान्याचा खंडकऱ्याकडून मालकाला मिळणारा नमुन्याचा अंश. ४. भेट म्हणून आणलेली दूरदेशीची अगर दुर्मीळ वस्तू. [सं. वर्णि]

वानणा स्त्री. वर्णन : 'हें जाणें म्हणौनि मी लाजें । वानणां इही ।'– ज्ञा १८.१२. [सं. वर्णन]

वानणे उक्रि. वर्णन, स्तुती, प्रशंसा करणे. [सं. वर्ण]

वानती स्त्री. (सोनारी) उजाळा; लेप. (गो.)

वानप्रस्थ पु. चार आश्रमांपैकी तिसरा आश्रम (गृहस्थाश्रमानंतरचा वनात राहण्याचा काळ). [सं.]

वानर पु. न. काळ्या तोंडाचा, लांब शेपटीचा माकड, मर्कट. [सं.]

वानरकिवण, वानरखत–खट–दु:ख–क्षत न. (वानराला एखादी जखम झाली असता त्याचे सर्व जातभाई येतात व त्याला सहानुभूती दाखवतात. पण प्रत्येक जण ती जखम उघडून पाहतो, त्यामुळे ती बरी न होता अधिक दुखून चिघळते. यावरून) उपद्रवकारक, अपायकारक सहानुभूती; दु:ख कमी होण्याच्या ऐवजी वाढायला कारण होणारे प्रयत्न.

वानरखाद् स्त्री. वानरांची धाड; (ल.) लुटालूट; नासाडी; उपद्रव.

वानरचेष्टा–थेर स्त्री. १. वानराप्रमाणे केलेल्या खोड्या. २.अविचाराच्या गोष्टी.

वानर–री तेल (पंचतंत्रातील (५.९) चंद्रराजाच्या कथेवरून प्रबळाच्या आश्रयाने स्वत:ला निर्भय समजून अविचाराने वागणाऱ्यावर आपत्ती येते. यावरून.) सर्वनाश.(वा.) **वानरतेलाचा प्रकार होणे** – जिवलग वाटणाऱ्या व्यक्तीकडून घात होणे; अविचाराने घात होणे.

वानरतोंड्या वि. कुरूप; विद्रूप.

वानरदृष्टि–ष्टी स्त्री. सूक्ष्म व काळजीपूर्वक पाहणी, निरीक्षण करणे. वि. सूक्ष्म दृष्टीचा.

वानरभोजन न. वानरासारखे प्रथम तोंडात अन्न भरून घेऊन सावकाश खात, चावत बसणे.

वानरलकडी स्त्री. (वानर शेकोटीसाठी लाकडे जमवतात, पण ती पेटवता न आल्याने त्यांना शेक लागत नाही त्यावरून) न पेटता धुमसणारी लाकडे; त्यातील अग्नितत्त्व वानर नजरेने खेचून घेत असावेत.– पाखरमाया २१

वानरविचका पु. अनेकांचा सल्ला घेतल्याने कामात होणारा बिघाड.

वानरविचकल्या–वेंचकुल्या स्त्री. अव. वानराप्रमाणे वेडीवाकडी तोंडे करून केलेल्या चेष्टा; वाकुल्या दाखवणे.

वानरशेक, वानरशेकणी, वानरशेकणीची लाकडे पहा : **वानरलकडी**

वानरी स्त्री. घागर : 'गोसावी वानरीयाचें पाणी पाजविलें' – लीचउ १६.

वानऱ्या वि. वानरतोंड्या; वानरासारख्या चेष्टा करणारा.

वानवटे न. भाजकट बी : 'परी शेती वानवटें । पेरूं नये ।'– विउ ७.६४.

वानवणे सक्रि. चिरणे. (ना.)

वानवती स्त्री. उजळा. पहा : **वानती**

वानवसा–से पु. न. १. माजघर; मध्यगृह : 'तें वानवसां आंधळें । जैसें ठाके ।'– ज्ञा १७.१०२. २. भोजनशाळा.

वानवळा पु. प्रथमच पिकणाऱ्या फळांवर, भाजीपाल्यावर, पिकावर वगैरे घेण्याचा कर.

वानवा पु. स्त्री. १. अनिश्चितता; संदिग्धता; शंका; संशयित स्थिती. २.

होय किंवा नाही याची निश्चिती नसणे. ३. कमतरता.[सं. वा न वा]

वानवा स्त्री. वर्णन; वाखाणणी.

वानश्री स्त्री. रंगशोभा. [सं. वर्ण+श्री]

वानसरा पु. सतेज रत्न : 'आंगुळियां तेजांचे वानसरे।'- शिव ४०३. [सं. वर्ण]

वानसी स्त्री. जास्वंदीचे फूल : 'वरि सेंदुरे विनायक वानसीयाचे'- शिव ७६४.

वाना पु. १. वाण; विक्रीचा माल, जिन्नस. २. (औषधातील) घटकद्रव्य. पहा : २ **वान**

वानासिक न. वाण्याचे दुकान : 'वानासिकीं मंडप - चौबारां : कीं भूमिशैय्या'- सव ४७३.

वानिवसे क्रिवि. अकस्मात; दैववशात : 'जैसा घरीं आपुला। वानिवसें वन्ही लागला।'- ज्ञा १.२५८.

वानी स्त्री. कमीपणा; उणेपणा : 'तरी कामनेची कां तेथें। वानी कीजे।'- ज्ञा ३.२२.

वानी स्त्री. कस; शुद्धाशुद्धपरीक्षा : 'तेयां परिमळाची वानी धवधविली।'- शिव ६१३.

वानी(ने)र स्त्री. पाणवेत; एक जंगली झुडूप.

वानेपरी वि. नाना प्रकारची; तऱ्हेतऱ्हेची.

वानोळा पु. पहा : **वानगी**

वान्हियारा पु. फिरता व्यापारी : 'वान्हियारे देसाउरीहुनि आले'- लीचउ ४७. [सं. वाणिज्य+चार]

वाप स्त्री. १. नुकतेच पेरलेले शेत; ज्यामध्ये पेरलेले धान्य उगवले आहे असे शेत. (को.) २. पेरा; पेरणी; धान्य रुजत घालणे. [सं. वप्] (वा.) ० **धाणे**- पेरणी संपल्यावर औताची पूजा करून सर्वांना जेवण देणे.

वापणे क्रि. उगवणे; फुटणे. (ना.)

वापणें क्रि. १. व्यापणे. २. मरणे. (व.)

वापर पु. उपयोग; वहिवाट; राबता. [सं. व्यापार]

वापरणे उक्रि. १. उपयोग करणे; उपयोगात आणणे; पांघरणे; नेसणे. २. वहिवाट, राबता, सराव, अभ्यास असणे. [सं. वि+आ+पृ]

वापस क्रिवि. परत; माघारा; उलट; फिरून. [फा.]

वापसणे अक्रि. १. (जमीन) वाफ येऊन पेरण्यास योग्य होणे. २. (वासरे वगैरे) बिथरून बेफाम होणे. ३. (ल.) मनाला लावून घेणे; हळवे होणे; क्षुल्लक गोष्टीवरून भलतीच कल्पना करून घेणे.

वापसे न. शरद ऋतू. (व.)

वापा पहा : **वाफा**

वापारी पु. धान्य पेरणारा; कुशल पेरा करणारा. (कु.) [सं. वाप]

वापिक पु. कुळधर्म.

वापित वि. १. पेरलेले. २. वपन, हजामत केलेले. [सं.]

वापी स्त्री. विहीर; पायऱ्यांची विहीर; बारव; पुष्करणी.

वापी स्त्री. लहान वाफा. [सं. वप्=पेरणे]

वाप्य वि. १. पेरण्यायोग्य; पेरण्याचे. २. वपन करण्यायोग्य. [सं.]

वाफ स्त्री. १. वापसा; पेरणीची घात; पेरण्यायोग्य जमीन. २. (ल.) शुद्ध भूमी; योग्य संधी : 'तेथ केवळ जाली वाफ। निजबोधाची।'- ज्ञा १७.२३१.

वाफ स्त्री. १. पाणी किंवा द्रवपदार्थ यांना उष्णता लागल्यामुळे त्याचे बनणारे वायुरूप. २. गरम हवा. उदा. आगीची वाफ. [सं. बाष्प; हिं. भाप]

वाफ न. नांगरणी इ.साठी तात्पुरत्या (भाड्याने) घेतलेल्या बैल वगैरेंबद्दल देण्याचा मोबदला.

वाफडणे अक्रि. भिणे; दचकणे : 'पान खडफडितां वाफडें। मरणा भेण चौकडे।'- भाए ६७१.

वाफणे अक्रि. १. (गाय, म्हैस) गर्भधारणेस योग्य होणे; फळणे, त्यांना गर्भधारणा होणे. (को.) २. धान्य उगवणे, रुजणे.
उक्रि. धान्य मुठीने उडवून पेरणे. [सं. वप्]

वाफणे अक्रि. वाफेने शिजणे, उकडणे. [सं. बाष्प]

वाफधाणी-नी, वाफधावनी स्त्री. पेरणी संपल्यावर औताची पूजा करून करतात ते जेवण वगैरे.

वाफबंद वि. वाफ बाहेर पडणार नाही अशा रीतीने बंद केलेले (पात्र).

वाफ(फो)र न. वाफेने चालणारे जहाज. (गो.) [पोर्तु. वापोर; तुल. इं. व्हेपर]

वाफरे न. कापरे; शिरशिरी; काटा; थरकाप.

वाफलणी स्त्री. वाफ देण्याची, वाफेने सुकवण्याची क्रिया.

वाफलणे उक्रि. १. वाफेने सुकवणे. २. वाफ देणे.

वाफव(वि)णे सक्रि. रुजवणे; पेरणे; उत्पन्न करणे.

वाफवा स्त्री. अफवा.

वाफसा पु. १. जमिनीची पेरण्यायोग्य स्थिती; पाऊस पडल्यानंतर जमीन दमट, उबदार होण्याची स्थिती. २. पावसानंतर जमिनीतून निघणाऱ्या वाफा.

वाफसांडा वि. वाफ गेलेला; निवलेला.

वाफा पु. १. अळे; लहान खाचर; वांगी, मिरच्या वगैरे लावण्यासाठी पाणी देण्याच्या सोईचा तयार केलेला जमिनीचा तुकडा; जित्रपासाठी केलेले अळे. २. कढवलेला उसाचा रस ओतण्यासाठी तयार केलेला खड्डा; ढेपेचा खड्डा. ३. मोटेच्या पाण्यासाठी बांधलेला हौद; थारोळा. ४. भातखाचर. [सं. वप्]

वाफारा पु. गुबारा; फुगारा.

वाफारा पु. वाफेचा शेक; औषधीयुक्त पाण्याच्या वाफेने दिलेली उष्णता. [सं. बाष्प]

वाफोळे न. तांदळाच्या पिठाचें उकडून केलेलें खाद्य.- गृशि ३९५.

वाभरू न. तुफान; वादळ.

वाभळ स्त्री. भराभर वाढलेले पण पोलकट भात.

वाभळणे अक्रि. वाभळ होणे; अतिशय जलद वाढल्यामुळे भाताच्या लोंब्या पोल होणे.

वाभा, वाभाडा-रा पु. १. मोठी चीर, भेग; धस लागल्यामुळे निघणारा वस्त्राचा फाळा; धांदोटी. २. (ल.) कडक टीका.

वाभाडणे क्रि. निर्भत्सना करणे; निंदणे. [सं. अवा+व्रश्च]

वाम वि. १. डावा; उजव्याच्या उलट. २. सुंदर : 'परवामलोचनेच्या ऐकों न शकेंचि या विलापरवा।'– मोसभा ५.३५. ३. (ल.) कठीण; वाईट : 'ना सारथी म्हणुनि फारच वाम लागे।'– वामन, विराट ५.११६. ४. उलट; विरुद्ध; वाकडा. [सं.] (वा.) **वामवस्त्र करणे** – डोक्यावरील वस्त्र बाजूला करणे (मानदर्शक) : 'गोसावीयांसि वामवस्त्र केलें'– लीचउ ४७५.

वाम न. कर्ज शब्दाला जोडून त्याच अर्थी वापरतात; देणे; ऋण.[अर.]

वाम स्त्री. पेटके. पहा : **वांब**

वामक वि. वमनकारक; ओकारी आणणारे (औषध). [सं.]

वामकणे सक्रि. रक्षण करणे : 'फरे दांडे सरले अर्द्धउर्ध्वा भूमि वामकौं लागलें'– कला १५.

वामकुक्षि–क्षी स्त्री. (शब्दशः) डावी बाजू. (ल.) दोनप्रहरी जेवल्यानंतर (डाव्या कुशीवर पडून) घेण्याची विश्रांती.

वामणे अक्रि. दुखावणे; नाखूश होणे : 'तें पाहूनि विराट आदि जन तो चित्तामध्यें वामला।'– वामन, विराट.

वामत्व न. ठेंगणेपणा; हीनता.

वामदाम पु. कर्जदार; धनको. (गो.)

वामन पु. १. विष्णूचा पाचवा अवतार. २. वामनद्वादशीच्या दिवशी जेवायला बोलावलेला बटू, मुलगा.[सं.] (वा.) **वामनाची पदे** – हळूहळू वाढत जाणारी गोष्ट; दीर्घसूत्री कारभार.

वि. १. (ल.) खुजा; बुटका; ठेंगू (मनुष्य). २. (विष्णूने वामनावतारात बळीला फसवल्यावरून)लबाड; ठक; फसव्या.

वामनाक्ष न. खड्ग; तलवार. [सं.]

वामनूर पु. पांढऱ्या वाळवीने केलेले वारूळ. – ऐको.

वाममार्ग पु. (डावा, वाकडा रस्ता) १. सामान्य पद्धतीच्या विरुद्ध उपासनामार्ग; मद्यमांसादी उपचारयुक्त पूजापद्धती; अभिचारकर्म; शाक्त वगैरे पंथ. २. आडमार्ग; वाकडा, कपटी मार्ग. [सं.]

वाममार्गी पु. अभिचारक; वाममार्गाचे अवलंबन करणारा; शाक्त. [सं.]

वाममूर्ति–र्ती स्त्री. ठेंगणा मनुष्य. (विशेषतः एखाद्या लहान, खुज्या पण पराक्रमी पुरुषाबद्दल वापरतात.)

वि. ठेंगणा; खुजा.

वामविरयी स्त्री. वागळ; वागूळ; जाऊका; अनितपत्रा.– मसाप ४५.५.

वामसव्य वि. डावा-उजवा. [सं.]

वामहस्तभुजासन न. डावा पाय डाव्या खांद्यावर चढवून डाव्या हाताने मान धरणे.– संयोग ३२९.

वाम(मा)ळ पहा : **वांबळ**

वामा स्त्री. सुंदरी; स्त्री.

वामाचार पु. शाक्तपंथापैकी एक उपासनाप्रकार. [सं.]

वामावर्त–र्ती वि. डाव्या बाजूला वळलेला (शंख, जिना, भोवरा, मळसूत्र).

वामांग–गी न. स्त्री. १. डावी बाजू. २. (नवऱ्याचे डावे अंग) पत्नी; बायको.३. सुंदर स्त्री.

वामी वि. वाममार्गी : 'वामी आम्हीं मुक्त असेचि होतों।'– कमं १.३५.

स्त्री. घोडी.

वामोग पु. कौतुक व प्रेम; माया. (कु., गो.)

वाय पु. वायू; वारा. (समासात)उदा. वायगोळा. [सं. वायु]

वाय क्रिवि. व्यर्थ; निरर्थक; निष्फळ; मिथ्या : 'ते वेळीं तुझा आक्षेप वाय।'– विपू ७.७. [सं. वि+अय, वृथा]

वायआभाळ न. पोकळ अभ्र; बिनपावसाचे मळभ; ढग.

वायक(ख,खो)र वि. वातूळ; वातप्रकोप करणारे. (गो.)

वायकरणी वि. व्यर्थ; निष्फळ; पोकळ : 'कासया होसी घामघूम। वायकरणी बैदा हा।'– अफला १४.

वायकळ वि. १. शुष्क; पोकळ; निरर्थक; कुचकामाचे (भाषण, कृत्य). २. अनिर्बंध; बेकायदा; स्वैर. ३. दंगा; कटकट.

वायक(च)ळणे अक्रि. १. चळणे; भ्रमिष्ट होणे; बेफाम, वेडे होणे. २. स्वैर, मोकाट वागणे; चंगीभंगी होणे.

वायकळा स्त्री. संधिवाताच्या वेदना.

वायकांड पु. निष्फळ बाण : 'काय पिनाकपाणीचिया भाता। वायकांडीं आंहाती।'– ज्ञा ११.२०७.

वायकोळी–ळे क्रिवि. वृथा; निरर्थक : 'तो मिथ्या मानु उठवी वायकोळी'– ऐलेसं ६२६. [सं. वृथा]

वायगाठ स्त्री. अंतर्गाठ; आतील पदराला घातलेली गाठ. [सं. वात+ग्रंथी]

वायगोळा पु. आतड्यात वायू धरल्यामुळे येणारी कळ, होणारा रोग.

वायघोय न. कळपातील मेलेले जनावर. (को.)

वा(वां)यच वि. थोडेसे. पहा : **वाईंच**

वायचणे सक्रि. वेचणे; पाखडणे. [सं. व्या+विच् (=वेगळे करणे)]

वायच(चा, क)ळ पु. वातभ्रम; वायू झाल्यामुळे होणारा उन्माद, बुद्धिभ्रंश.

वि. वेडा; भ्रमिष्ट; बडबड्या.

वायच(क)ळणे अक्रि. १. चळणे; भ्रमिष्ट; बेफाम, वेडे होणे. २. स्वैर, स्वच्छंदी वर्तणूक करणे; चंगीभंगी होणे; अनिर्बंध, मोकाट वागणे.

वायजाळ न. उन्हाळ्यात उष्णवाताने हातापायात भेगा पडणे.

वायट वि. १. वाईट; दुःखकारक. (गो.) २. निष्फळ; व्यर्थ : 'इया दोनी दशा वायटा'– अमृ ६३२. [सं. वृथा]

वायटकार वि. दुखणेकरी.

वायट(टू–टो)ळ पहा : **वावटळ**

वायडोया पु. डोळ्याखालील व कानाकडील खेटून असणारा भाग. (अहि.)

वायण–न न. उखळ. पहा : **वाईन**

वायदमन न. एक वातरोग; वायूचा गोळा छातीत बसणे. (गो.)

वायदा पु. १. करार; मुदतीचा ठराव; वचन; ठरावीक वेळ; नेमलेली वेळ. २. (व्यापार) ठरावीक मुदतीने होणारा खरेदी-विक्रीचा व्यवहार. ३. शेतसारा; सरकारी महसूल; काळीचा वसूल. (व.)[अर. वअदा]

वायदेचिट्ठी–रोखा स्त्री. पु. १. मुदतबंदीचा लेखी करारनामा; मूळच्या मुदतीत अंतर पडल्यास पुन्हा दुसरी मुदत ठरवून लिहून देतात ती चिट्ठी. २. मागाल त्या वेळी कर्जफेड करण्याचे बिनशर्त वचन दिलेला

बिनसाक्षीचा लेख. ३. (ल.) ताबडतोबीचा तात्पुरता इलाज, औषध.

वायदेबंदी स्त्री. मुदतशीर ठराव.

वायदेबाजार पु. भविष्यात माल पोचता करण्याच्या करारांचा क्रय-विक्रय होतो असा बाजार.

वायदेशा वि. घरदार, ठावठिकाणा नसलेला; भटक्या; फिरस्ता; उपरा. [सं. वायु+देश]

वायधळ पहा : **वायकळ**

वायधूळ न. वावटळ; वादळ; झंझावात.

वायन पहा : २ **वाण** [सं.उपायन]

वाय(यी)न, वाय्न, व्हायी(ई)न न. दगडी उखळ. पहा : **वाईन** [फा. हावन]

वायनरी स्त्री. वाईन तयार करण्याचा कारखाना. [इं.]

वायना स्त्री. अवाई.

वायपट-वट वि. व्यर्थ; मिथ्या : 'तैसा आत्मा भूंजे वायवटु। संसारू हा।'- भाए ५९९.

न. भूत; पिशाच; वारे. (ठा.)

वायपोय-ळ स्त्री. न. गुरेढोरे मरणे; नुकसानी होणे; नासाडी. (राजा.)

वायफट वि. १. निष्फळ; निरर्थक. २. स्वैर; स्वच्छंदी; हट्टी; तऱ्हेवाईक; लहरी; हूड; उनाड. ३. क्षुद्र; फुकट; क्षुल्लक (काम).

वायफली-फूल वि. फळे, फुले न येणारे, वांझ (झाड).

वायफळ वि. १. पोकळ; फोल; अर्थशून्य; रिकामे; वावगे (बोलणे इ.). २. असे बोलणारा. [त. वायपट्टि]

वायबार पु. वांझ, फुसका बार; गोळी न घालता नुसती दारू भरून उडवलेला बंदुकीचा बार.

वायबुद्धी स्त्री. चुकीची, व्यर्थ, भ्रामक समजूत.

वायबुंथी स्त्री. बुरखा; भ्रामक आवरण : 'तरी नामाची वायबुंथी। सांडीचि ना।'- अमृ २.३२.

वायबेर स्त्री. भातखाचरातील चिखलाच्या वेळची तिसरी नांगरट.- कृषि २२५.

वायभरक वि. वायू झालेला; भलतेच बोलणारा, वागणारा. (व.)

वायर स्त्री. १. धातूची तार. २. पोस्टाने त्वरित पाठवण्याचा संदेश. (इं.) टेलिग्राफ.

वायरिंग न. इमारतीत इ. वेगवेगळ्या ठिकाणी वीजपुरवठा होण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या तारा बसवण्याचे काम. [इं.]

वायरी स्त्री. सून. - वशाप ८.५१.२४५. (व.)

वायल, वैल पु. चुलीच्या बाजूला जाळ जाऊन वर भांडे ठेवण्यासाठी केलेली रचना.

वायला वि. क्रिवि. १. वेगळा; अलग; विभक्त; निराळा. २. भिन्न; पृथक. ३. एकीकडे; बाजूला.

वायवट-स वि. निरुपयोगी; वाईट.

वायवरणा पु. एक औषधी वृक्ष; हाडवर्णा; वाटवर्णा. याला पांढरी फुले येतात. हा वातहारक आहे.

वायवस वि. लटिका; मिथ्या.

वायवसा पु. वातभ्रमात केलेली चेष्टा; चाळा; व्यर्थ गोष्ट : 'म्हणोनि वायांचि वायवसे।'- विपू १.३३.

वायवाट, वायवाटणे पहा : **वहिवाट** इ.

वायवाय क्रिवि. व्यर्थ; वाया; निष्फळ : 'ऐकुनि मोकलुनी धाय रूदन करीत वायवाय।'- अमृत, ध्रुवचरित ३.

वायव्य स्त्री. वायव्य, उत्तर व पश्चिम दिशांच्या मधली दिशा.

वि. वायूसंबंधी; वायुदेवताधिष्ठित. [सं.]

वायशी-शो-सी, वायसट वि.तारतम्य नसणारा; फाजील. (व.)

वायस पु. कावळा. [सं.]

वायसर पु. स्क्रू किंवा बोल्ट घट्ट बसावा म्हणून मध्ये द्यावयाची चामड्याची किंवा लोखंडाची चकती. [इं. वॉशर]

वायसा वि. अल्प; थोडा.

वायसी स्त्री. खंजिऱ्याचा पवित्रा. - प्रश १८. [सं.]

वायसे वि. लटके.

वायंगण-णा-णे न. पु. न. उन्हाळ्यातील एक भातपीक.

वाया पु. (सोनारी) सोन्या-चांदीची अर्धवर्तुळाकार तार.

वाया वि. क्रिवि. व्यर्थ; पोकळ; मिथ्या; फुकट. [सं. वि+अय्; अर. झाया]

वाया(वा)ची अवटी सोन्याचांदीची अर्धवर्तुळाकार तार काढण्याचा ठसा.

वायाणी-णे, वायाविण वि. व्यर्थ; लटके : 'तैसे सर्व कमी असणें। तें फुडे मानूनि वायाणें।'- ज्ञा ४.९८.

वायु-यू पु. १. वात; हवा; वारा; रूपरहित परंतु स्पर्शज्ञात असे एक द्रव्य; पंचमहाभूतांपैकी एक. २. वायुदेवता. ३. शरीरातील प्राण (पाच मिळून किंवा स्वतंत्रपणे). ४. शरीरातील एक धातू; वात. ५. वातधातूच्या विकृतीमुळे होणारा एक रोग. [सं.] (वा.) ० **सरणे, मोकळा होणे** – पाद येणे; अपानवायू बाहेर पडणे.

वायुगोल पु. १. फुगा. २. जाहिरातीसाठी आकाशात उंच उडवण्याचा फुगा.

वायुग्रस्त वि. १. वाऱ्याने फुगलेला; फोपशा; वायू भरलेला. २. वातरोगाने पछाडलेला; वातूळ. ३. वाताचे झटके, फेपरे, झीट येणारा.

वायुचक्रशास्त्र न. वातावरणातील निरनिराळ्या व्यापारांचा विचार करणारे, हवेतील घडामोडी स्पष्ट करणारे शास्त्र.

वायुधारणा स्त्री. प्राणायाम; वायू धरून, कोंडून ठेवण्याची क्रिया; योगमार्ग.

वायुपात्र, वायुधारक न. पु. वायू साठवून ठेवण्याचे भांडे; वायू बाहेर पडणार नाही असे भांडे; (इं.) गॅस होल्डर.

वायुभारमापक, वायुदाबमापक न. (शाप.) वातावरणाचा दाब मोजण्याचे यंत्र. (इं.) बॅरोमीटर.

वायुमापक न. (शाप.) वायू मोजण्याचे यंत्र. (इं.) इंडिओमीटर.

वायुवाहिनी स्त्री. (शाप.) हवा वाहून नेणारी नळी. (इं.) ब्रॉंकिओल.

वायुविश्लेषण न. (शाप.) वायूचे पृथक्करण. (इं.) ॲटमॉलसिस.

वायुवीजन न. घरात प्रकाश यावा व हवा खेळती राहावी म्हणून केलेली योजना, रचना.

वायुस्थितिशास्त्र न. (शाप.) हवेचा, वातावरणाचा अभ्यास करणारे

शास्त्र. (इं.) मीटिऑरॉलॉजी.

वाये–यें–ए वि. क्रिवि. पहा : **वाया**

वायेकल स्त्री. निष्कारण बोलाचाल; अकारण क्रोधाचे बोलणे.

वार पु. १. दिवस; अहोरात्र; आठवड्यातील प्रत्येक दिवस. २. ठरावीक दिवस; आठवड्यातील ठरावीक दिवस; ब्राह्मणाला, विद्यार्थ्याला जेवायला घालण्याचा ठरीव दिवस.३. नियमित, पाळीचा दिवस. (वेश्येला यजमानाकडे जाण्याचा वार. यावरून वारांगना, वारस्त्री इ. वेश्या या अर्थाचे शब्द बनले.) ४. आठवडा (तोच वार पुन्हा येण्यासाठी लागणारा काळ. यावरून). उदा. तो गेल्याला आज दोन वार झाले. ५. आठवड्याच्या हप्त्यांनी फेडण्याचे कर्ज. उदा. मी बुटीचा वार काढला आहे. [सं.] (वा.) **०करणे** – नियमित वारी उपवास करणे. क्रिवि. वेळा; आवृत्तिवाचक अव्यय. उदा. एकवार, त्रिवार इ.

वार स्त्री. भात भरडल्यानंतर तुसापेक्षा तांदळामध्ये दिसून येणारी वाढ (तांदूळ कांडल्यावर तांदूळ व कोंडा निमेनिम होतात. त्यात जर कोंड्यापेक्षा तांदूळ अधिक भरले तर ती वार, वाढ. (को.)

वार पु. १. गारांचा वर्षाव.२. पावसाची वृष्टी; पावसाळा. (व.)

वार पु. १. जखम; दुखापत; तडाखा; मार (शस्त्राचा). २. (ल.) दोष; भार. [फा.]

वार स्त्री. १. फुरसत; सवड; रिकामपण : 'तुज मज वार येथें कोण म्हणजे किर।'– ब ५९३. २. विलंब; उशीर; वेळ.

वार पु. लांबी मोजण्याचे माप; तीन फूट लांबीचे प्रमाण; गज; (इं.) यार्ड.

वार स्त्री. मूल जन्मतेवेळचे त्याच्यावरील आवरण; वेष्टण. [सं. वृ]

वार पु. (चुकीने) वारसा; हक्क.

वार पु. समुदाय; रास; ढीग; जमाव : 'कीं मथिला ज्यांतरस्थ अरिवार।'– मोवन १३.१५.

वार अरबी, फारशी शब्दांना लागणारा प्रत्यय १. सादृश्य, पद्धती, रीती इ. बोधक प्रत्यय. उदा. तपशीलवार. २. साहचर्य, संबंध इ. बोधक प्रत्यय. उदा. किफायतवार.

वारकर–री पु. १. ठरावीक वारी जेवायला येणारा विद्यार्थी, ब्राह्मण, खंडोबाचा भक्त, कार्यकर्ता इ. २. ठरावीक वारी वसूल करण्याचा हप्ता उगवण्यासाठी फिरणारा सावकाराचा मनुष्य, कारकून.

वारकरी पु. १. वारी करणारा. २. नित्यनेमाने ठरावीक दिवशी आपल्या दैवताच्या क्षेत्री (विशेषत: पंढरपूर) जाणारा भक्त. ३. सैन्यासोबतचे बिनलढाऊ लोक; बाजारबुणगे.

वारकरी संप्रदाय पांडुरंगाची भक्ती करणारा एक संप्रदाय. गळ्यात तुळशीची माळ, नित्य हरिपाठाचे वाचन, 'रामकृष्ण हरि' या मंत्राचा जप, एकादशी उपास व किमान आषाढ व कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशीला पंढरपूरला पायी वारी हे या संप्रदायाचे मुख्य नियम आहेत.

वारकोंड वि. कोंदट; बंदिस्त; मोकळी नसलेली (जागा).

वारगं न. १. मानसिक असंतुलन. २. आजार; ताप. ३. पक्षाघात; अर्धांगवायू.

वारगोळा–गुळे–गोळे, वारंगुळा पु. न. बदला; सर्कत; आळीपाळी, इरजीक; डोळे; एकमेकांचे काम सहकार्याने करण्याची शेतकऱ्यांची पद्धती; आलटापालट.

वारघस स्त्री. वाऱ्यावरील, उघड्यावरील जागा; पडवी.– लोसाको.

वारचा वि. क्रिवि. ऐवजी; जागी; वाटचा; पाळीचा.

वारट पु. अंत; शेवट.– मनको.

वारडे न. शिळे अन्न.

वारण पु. हत्ती. [सं.]

वारण न. १. परतवणे; प्रतिकार; मागे फिरवणे. २. टाळा; चुकवणे : 'दया प्रकट दाखवी कवण सांग त्या वारणीं।'– केका ६. ३. रक्षण : 'मी आजि साग्रजानुज शक्रसुताचें करीन वारण गा।'– मोभीष्म ४.१०. [सं.]

वारणी स्त्री. (कायदा) न्यायालयात फिर्याद दाखल केल्यावर हितसंबंधी व्यक्तीने आपले म्हणणे ऐकल्याशिवाय फिर्याद परस्पर निकालात काढू नये अशा अर्थाची केलेली विनंती; (इं.) कॅव्हिअॅट.

वारणे उक्रि. १. परावृत्त होणे, करणे; प्रतिबंध करणे; प्रतिकार करणे; टाळणे; चुकवणे; बाजूला करणे, सारणे. २. हात वगैरे हलवून घालवून देणे, दूर करणे; (माशा इ.) हाकणे. ३. फेडून टाकणे (कर्ज इ.). ४. फिरवणे; हलवणे; ढाळणे (चवरी, मोरचेल इ.). ५. सांगणे; कथन करणे : 'वैद्य पथ्य वारूनि जाये।'– ज्ञा ३.८. ६. वाटेस लावणे; संभावना करणे : 'भाटातें उचितीं वारितू।'– शिव ५२१. ७. व्यवस्था; तजवीज. – ऐको.

अक्रि. १. (सांकेतिक) मरणे. २. संपणे; नाहीसे होणे; दूर होणे; टळणे; निभावणे : 'हळू हळू त्यांचें पुण्य जातें वाड। वारतें हें जाड तिमिराचें।'– तुगा ४०. [सं. वार, वाल, वा]

वारणे उक्रि. हाक मारणे; पुकारणे. (को.) [सं. व्याहर]

वारती स्त्री. १. झोपाळ्याची कडी; पाळण्याची दोरी; कातड्याचा दोर, वादी इ. : 'जननिया बाळकारे घातलें पाळणा। पंचतत्त्वीं जडियेल्या वारतिया चहुकोणा।'– तुगा २६५. २. शिडी; दोर (चढण्याचा) : 'वारत्या लाविजती आकाशीं। यागांचिया।'– ज्ञा १८.४८२. [सं. वरत्रा]

वार(री)द वि. दाखल; प्रविष्ट; प्राप्त : 'शिरावर बरसात वारद झाली.'– होकै १२. [अर. वारिद]

वारदानी पु. (नाविक) पावसाळ्यातील दक्षिणवारा.

वारधट पु. वारा. (माण.)

वारधाटी क्रिवि. मोकळ्या हवेत; उघड्या वाऱ्यावर.

वारधुंद स्त्री. खूप जोराची वावटळ; वादळ; झंझावात. (व.)

वारन न. ओढा; नाला : 'तेथ आडचि वारन उतरणे'– स्थापो ९३. [सं. वारि]

वारनळणे, वारसटणे अक्रि. वारा लागणे.

वारनीस न. रोगण; एक प्रकारचा तेलकट पदार्थ : 'लाकडांस वारनीस द्यावें'– मॅरट ७७. [इं. व्हर्निश]

वारपार क्रिवि. आळीपाळीने : 'सरकारच्या कोठ्या नेमणुकेप्रमाणें सनदेबरहुकूम वारपार चालतात...'– थोमारो २.८७.

वारभोग पु. वर्ज्य दिवस : 'मग तीये वारभोगीचि निगाली'– लीचउ

५४२. [सं. वृ-भाग]

वारया वेधणे वायुचक्रात सापडल्यामुळे मन भ्रमणे : 'तेणें जीव वारया वेधला।'- दास ३.२.६३.

वारली पु. उत्तर कोकण, ठाणे जिल्हा यातील एक आदिवासी जात व तीतील व्यक्ती.

वारले न. बहुल्याभोवतीच्या वहीतील मडके. पहा : **वही**

वारवण-णे न. मेंढ्या चारण्याबद्दलची मजुरी, वेतन.

वारव(वि)णे सक्रि. उफणणे; वाऱ्याने धान्यातील भूस उडवून लावणे.

वारवधू-नारी, वारयुवती-योषिता, वारस्त्री, वारविलासिनी स्त्री. वेश्या; वारांगना.

वारवंडा पु. एक औषधी वृक्ष; वायवरणा.

वारवा पु. घेवड्याची एक जात.

वारवो पु. जननेंद्रियाचा वरचा भाग. (गो.)

वारशी स्त्री. महार जातीत मोहतुराचे वेळी वधूच्या पहिल्या नवऱ्याच्या वारसास दिले जात ते पाच रुपये.

वारस-सी पु. स्त्री. न. एक इमारती लाकडाचे झाड.

वारस पु. उत्तराधिकारी; वडिलार्जित संपत्तीचा हक्कदार, मालक. [अर. वारिस्]

वारसट न. भयंकर वादळ. (हेट.)

वारस(से)दार पु. हक्कदार; वारस.

वारसनामा पु. मृत्युपत्र.

वारसंडणे सक्रि. वारवणे.

अक्रि. वाऱ्याने, उघड्यावरील हवेमुळे फळीला, लाकडाला चिरा, भेगा पडणे.

वारसा पु. दोर (जू वगैरे बांधण्याकरता).

वारसा पु. १. वडिलोपार्जित मालमत्तेवरील हक्क; मालकी; पैतृक हक्क. २. वंशपरंपरागत आलेली मालमत्ता, संपत्ती; पित्रादी नातलगांकडून मिळालेले धन. [अर. वर्सा] (वा.) **०करणे** – हमी घेणे; मदत करणे.

वारसान पु. अव. वारस; हक्कदार.

वारसी स्त्री. वृष्टी; पाऊस. [सं. वर्षा]

वारसुळ पु. घातवार : 'वारसुळु चुकवूनि नांवाचा : शिशुपाळाचेया'- रुस्व ६४३. [सं. वार]

वारंवार क्रिवि. पुन्हा पुन्हा; वरचेवर; सतत; नेहमी. [सं. वारम् द्वि.]

वारंवारिता स्त्री. १. कंपता; पुनरावृत्ती. २. गोळा केलेल्या माहितीत एक गोष्ट पुन्हा पुन्हा येण्याचे प्रमाण.

वारा पु. १. वात; चलित वायू; हवा; न दिसणारे परंतु स्पर्शाने समजणारे महाभूतांपैकी एक तत्त्व. २. (ल.) स्फुरण; वीरश्री : 'शिंद्यांना भरला वारा।'- संग्रामग्रीते ७३. ३. संचार; अंगात येणे. ४. (ल.) खोटी, पोकळ गोष्ट; बाता. [सं. वा=वाहणे] (वा.) **० खाणे, पिणे** – १. (वासरे वगैरे) मोकाट सैरावैरा पळू लागणे; उड्या मारू लागणे. २. निर्बंध झुगारून देऊन स्वैर वागणे; मोकाट सुटणे; अद्वातद्वा बोलणे. **० न घेणे, न पडू देणे** – अगदी अलिप्त, दूर राहणे. काहीही संबंध येऊ न देणे. **० पडणे** – वारा वाहायचा बंद होणे. **वारापाणी करणे** – १. झिडकारणे; मनावर न घेणे. २. निरवानिरव, विल्हेवाट करणे. **० पिणे** – दुःखी, उदासीन, खिन्न, उद्विग्न होणे. **० फिरणे** – मत बदलणे; स्थिती पालटणे. **० मोकळा करणे** – अपानवायू सोडणे. पादणे. **० होणे** – वाताहात होणे : 'हळहळ बहु झाली होय संसार वारा।'- सारुह ३.७३. **० वाजेल, वाहेल तशी पाठ करणे-ओढणे-देणे, ० पाहून पाठ देणे, ० वाहेल तसे करणे, पाठीवर घेणे** – वेळ पडेल तसे, प्रसंग ओळखून वागणे. **वाऱ्याचा बुंद** – (बहुधा अभावार्थी) बारीकशी झुळूक. **वाऱ्याची मोट बांधणे** – अशक्य गोष्ट करू पाहणे. **वाऱ्याचे घोडे** – (वाऱ्यावर चालणारे) जहाज; गलबत; नौका. **वाऱ्याबरोबर, वाऱ्याशी भांडणे** – अतिशय भांडखोरपणा करणे; नसते कलह उकरून काढणे. **वाऱ्याला लाथा मारणे** – निष्फळ काम करणे. **वाऱ्यावर टाकणे** – अजिबात सोडून देणे; हयगय, दुर्लक्ष करणे. **वाऱ्यावर भारे बांधणे** – मनोराज्य करणे. **वाऱ्यावर वरात, भुसावर चिठी, भूसपर ठेंगा** – बेजबाबदारीचे, निष्काळजी काम (वरात = पैसे देण्याविषयीची चिठ्ठी. ती वाऱ्यावर देणे म्हणजे काहीतरी करणे); ताळमेळ नसलेली गोष्ट. **वाऱ्यावर सरणे** – कुठेतरीच भटकणे; आडदांडपणा करणे; स्वैर वागणे. **वाऱ्यावर सोडणे** – आधार काढून घेणे; निराधार अवस्थेत टाकणे. **वाऱ्यास-ला उभा न करणे, उभे राहू न देणे, न राहणे** – संबंध येऊ न देणे. **वाऱ्यास देणे** – उफणणे; वारवणे. **कर्जाचे वारापाणी करणे** – कर्ज फेडणे. **वाजता वारा लागू न देणे** – किंचितही त्रास न सोसणे; त्रास टाळणे.

वारा वि. बावरा; उतावळा. - लोसाको.

वाराणी स्त्री. वाऱ्याची झुळूक : 'तिया नावेक वाराणीं बैसति'- लीचउ १२३. [सं. वा]

वि. हवेशीर; वाऱ्याची. (व.)

वारापाणी न. १. (वारा व पाणी यांच्या सुलभतेमुळे क्षुल्लकत्वदर्शक) दुर्लक्षित, उपेक्षित स्थिती; अवहेलना; उपेक्षा; हेटाळणी; हेळसांड. २. दाणादाण. (क्रि. होणे.)

न. स्त्री. १. निरवानिरव; सारवासारव; फेड; भागवाभागवी. २. निरास; निवारण. ३. हवापाणी; मोकळी, स्वच्छ हवा; एखाद्या ठिकाणचे हवामान.

वारा(रां)व पु. खिडकीचा गज. (गो.) [इं. बार]

वारावणे सक्रि. १. पहा : **वार(वि)वणे**. २. वाऱ्यावर धरून वाळवणे.

वारावा(सा)र स्त्री. १. निरवानिरव; व्यवस्थित मांडणी; आटोपाआटप. २. कर्जफेड.

वारि, वारिया शअ. ऐवजी; बद्दल : 'तुझीया वारिया मज नाचोंनये।'- भाए २४२.

वारि-री न. उदक; पाणी. [सं.]

वारिक-के न. १. वाहन : 'पवनाचां वारिकां वळघे।'- ज्ञा ६.२७०. २. शिंगरू; घोडे; तट्टू : 'दांडियांचा सरकौनि वारिकेआंवरी।'- शिव ५५२.

वारि(री)क पु. न्हावी : 'धनाशें वारिक पोरगी आणूनी।'- दावि २९२. [सं. वृ]

वारिका स्त्री. १. वेग; गती. २. डोली : 'धाकुटिया चढेति वारुवां वारिकां'– रुस्व ३८५. [सं. वृ]

वारिजणे अक्रि. वर्ज्य, बंद होणे; मिटणे; लागणे : 'जेथ काळा वारीजती दारवंठे।'– भाए ६३. [सं. वर्ज]

वारी स्त्री. १. यात्रा; नियमित फेरी; विशेषत: आषाढी व कार्तिकी एकादशीला नित्यनेमाने पंढरपूरला जाऊन पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी केलेली यात्रा. २. पाळी; खेप; क्रम; वाटा : 'आतां कर्मठां कै वारी। मोक्षाची हे।'– ज्ञा १८.६८. ३. गती; जाणे : 'सरली द्वैताची वारी।'– ज्ञा १४.५६. ४. देवाच्या नावाने मागितलेली भिक्षा : 'वारी मागतां पोट भरेना बहु श्रम पावली हो।'– भज ५९. ५. वेळ; प्रसंग; सवड : 'गरुडास जातो म्हणून नाहीं पुसाया वारी।'– पला. [सं. वार] (वा.) **वारीस येणे** – वाट्याला येणे; क्रमप्राप्त होणे; उरणे.

वारी स्त्री. नाश : 'विचाराची होते वारी। देखत देखतां।'– दास ११.४.९.

वारी–रीं शअ. १. ने; साहाय्याने; साधनाने; तृतीयाबोधक अव्यय. : 'तें तें भगवत्सेवे वारीं। स्वयें कृष्णार्पण करी।'– एभा ३.५६५. २. सारखा; प्रमाणे; अनुलक्षून; रीतीने. ३. बरोबर; सह; म्हणून; पोटात; खाली; मुळे; योगाने. ४. ऐवजी; जागी; वाटचा. ५. साठी; करता.

वारीचा वि. क्रिवि. बदली; वाटचा; ऐवजीचा : 'माझ्या वारीचें सर्वज्ञास विनवावें.'– विचारसिंधु ९९.

वारी(रि)दत वि. १. हजर; उपस्थित; आलेला; प्रविष्ट झालेला; दाखल. २. हाती आलेला; मिळालेला. [अर.वारिद]

वारी सोडवणे ग्रामदेवतेसमोर महाराने तरवार हातात घेऊन ती आपल्या पोटावर स्वत:ला इजा न होता आपल्याच हाताने मारून घेणे. याला तोडून घेणे असेही म्हणतात. अशा वेळी देवीपाशी गाऱ्हाणे होते. या दिवशी महाराला उपवास करावा लागतो. या कृत्याबद्दल महाराला देणगी देतात.

वारु–रू पु. घोडा; अश्व.
वि. उत्तम; सुंदर [सं.]

वारुडा पु. घोडेवाला; अश्वपाल; खासदार : 'वारुडे नी मेळविला। झडकरौनि।'– शिव ५११. [सं. वाह]

वारुणी स्त्री. १. पश्चिम दिशा. २. मद्य; दारू. ३. एक अस्त्रविद्या.
वि. वरुणदेवतेसंबंधी. [सं.]

वारूळ न. १. मुंग्यांचे घर; सापाचे बिळ. २. एक व्रणरोग. [सं. वल्मीक; म. वाळू+घर]

वारूळ न. वाळा; एक सुगंधी गवत.

वारे न. १. वारा; विशेषत: वाहणारा, हलणारा वारा. २. साथ; प्रसार; प्रादुर्भाव (रोग वगैरेचा). ३. संचार; अंगात येणे; पिशाच्चबाधा. ४. झाक; छटा; चर्या; सूरत. ५. लहर; लाट; कल; प्रवृत्ती. ६. जोम; उत्साह; सामर्थ्य; आनुवंशिक तेज, रग वगैरे. ७. सामान्यत: एखादी चमत्कारिक कल्पना, वेड, खूळ इ. ८. स्पर्श; वास; संसर्ग. ९. अंश; भाग : 'त्यातलें बिलकुल वारें ऐन साठीच्या अंमलातहि प्रस्तुत ग्रंथकाराचं ठिकाणीं आढळत नाहीं'– नि. १०. आविर्भाव; देखावा; आव; अवसान. ११. पक्षवात; अर्धांगवायू : 'वारीं अंगावरून जातीं।'– दास ९.८.२९. [सं. वा] (वा.) **०फिरणे** – बदल होणे; पालटणे. **०सुटणे** – एखादी विशिष्ट परिस्थिती, वातावरण उत्पन्न होणे.

वारे वि. वारीचे; वारावर मागून आणलेले : 'आपली भिक्षा सोडूं नये। वारें अन्न खाऊ नये।'– दास १४.१.५६.

वारे न. सूत व रेशीम यांच्या मिश्रणात असणारे रेशीम.

वारेघशी क्रिवि. उघड्यावर; वाऱ्यावर; हवेवर : 'रसाची घागर तुळशीपाशीं उतरली व वारेघशीं ठेविली.'– खरादे ६९.

वारेजणे अक्रि. वारा खाऊन तडकणे. (व.)

वारेमाप क्रिवि. १. प्रमाणाबाहेर; भलतीकडे; बेछूट. २. बेताल; विसंगत; असंबद्ध.

वारेसा पु. एक इमारती लाकडाचे झाड.

वारेसूत्र न. पिशाच्चाचा फेरा. (गो.)

वारेहळक वि. वारा लागून वाळलेले; वाऱ्यावर टाकून वाळलेले.

वारेळू न.वाळा; एक प्रकारचे सुगंधी गवत व त्याची मुळी. (राजा.)

वारेंग वि. रंगहीन; रंग उडालेले : 'रंग आणि वारेंग।'– दावि ११५.

वारेंगणे अक्रि. रमणे; रममाण, गुंग होणे : 'संसारदु:खें विसरलें। विषयेरंगीं वारेंगलें। श्रीरंगरंगीं।'– दास ३.१०.३५.

वार्ता स्त्री. १. वृत्त; बातमी; हकिकत. २. वदंता; ऐकीव बातमी. ३. संवाद; संभाषण. ४. राजनीतीचे तिसरे अंग; अर्थविचार किंवा अर्थानर्थविचार. ५. गोष्ट; संबंध. ६. अल्पांश; किंचितही भाग : 'धरूं नका संशय वार्ता।'– रत्नकांता १५. ७. प्रसिद्धी; ख्याती; लौकिक. ८. वाता; गप्पा. [सं. वृत्]

वार्ता स्त्री. दोरी; रज्जू : 'मग कोता खेंव देणें। वार्तेवरील धांवणें। सांडीं पडे खेळणें। नागिणीचें तें।'– ज्ञा १८.६५. [सं. वर्त्ती, वस्त्रा]

वार्ताहर पु. १. बातमीदार; दूत. २. निरोप सांगणारा जासूद.

वार्तिक पु. बातमीदार; बातम्या लिहिणारा; दूत; भाट : 'देखिलें वर्तमान वार्तिकें लेहावें।'– सप्र १२.४०.

वार्तिक न. १.एक टीकाप्रकार; भाष्यातील गुणदोष दाखवून केलेले विवेचन. २. (संगीत) चार मात्रा प्रमाण.
पु. टीकाकार; वार्तिक लिहिणारा मनुष्य. [सं. वृत्ति]

वार्द्धकी पु. सुतार : 'हें किंकरे दैत्यांचिया वार्द्धकीचे'– श्रीकृच १६. [सं. वर्द्धकी]

वार्धक्य न. म्हातारपण; वृद्धपण; उतारवय. [सं.]

वार्धुषिक पु. व्याजबट्ट्यावर उपजीविका करणारा; सावकार. [सं.]

वार्धुष्य न. व्याज; नफा; वाढ; मिळकत. [सं.]

वार्याब वि. भेटीची, प्रवेशाची परवानगी मिळालेला. [फा.]

वार्याबी स्त्री. भेटीची परवानगी; राबता. [फा.]

वार्वा पु.१. सुगावा. २. गुप्त बातमी. (झाडी) [सं.]

वार्षिक–की न. स्त्री. १. दर वर्षीचे वेतन. २. दर वर्षीचा उत्सव, व्रत, समारंभ. ३. वर्षाचा आढावा घेणारे पुस्तक; (इं.) इअरबुक.
वि. १. दरवर्षीचा; प्रतिवार्षिक. २. पावसासंबंधी; पावसाळी; पावसाळ्यात होणारे.

वार्षिया, वार्षी, वारिषी पु. पावसाळा; वर्षाऋतू.

वार्षी, वारिषी स्त्री. 'वार्षियेचे उभळें । कोण न रिगे ।'– माज्ञा १३.७०१.

वाऱ्हाव पु. डुक्कर : 'शेषकूर्म वाऱ्हाव जाले ।'– दास २०.८.२१. [सं. वराह]

वाल पु.१. तीन गुंजा भार वजन. व्यवहारात हे दोन किंवा अडीच गुंजाभार धरतात. २. कडवा; एक द्विदल धान्य; वरणा. ३. चिल्हारीची बी; फताड्या गुंजेची बी. [सं. वल्ल; क. आवरे]

वाल पु. न. १. वेल. (गो.) २. गलबतावर उपयोगात आणावयाचा काथ्याचा मोठा दोर. – कृषि ७५१. ३. धनुष्याकृती आसन. (कर.) [क. वल्ले=दोर]

वाल प्र. वाला; संबंधदर्शक प्रत्यय. उदा. पोरवाल, अग्रवाल, खंडेलवाल.

वाल पु. पडदा. [इं. व्हॉल्व्ह]

वालकफा पु. घाटावरील एक वृक्ष. याच्या तांबडा, जांभळा व पांढरा या तीन जाती आहेत.

वालका, वालॉ–लो पु. पंचा. (कु., गो.) [सं. वल्कल्]

वालखिल्य (स्वामी) पु. अंगुष्ठमात्रप्रमाण अशा साठ हजार ऋषींपैकी एक. न. लहान मुलांचा समुदाय.

वालखिल्यस्वामी पु. लहान मुलांत वावरणारा वयस्कर मनुष्य.

वालथर वि. १. दुर्बळ; पुळपुळीत; पोकळ (भाषण, ग्रंथ). २. फुसके; निर्बळ; कमजोर (प्रयत्न, उपाय).

वालदाणी–नी स्त्री. वालुकापात्र; वाळू ठेवण्याची डबी; रेतीदाणी; वाळुदाणी. [म. वाळू+फा. दान]

वालपापडी स्त्री. घेवड्याचा एक प्रकार. त्याचा वेल व शेंगा.

वालभ न. १. प्रेम; आवड; प्रीती : 'अहिंसेचे परमवालभ ।'– स्वादि १.६.१६. २. तादात्म्य. [सं. वल्लभ]

वालभणे अक्रि. लोभावणे : 'रूपाचिआं भूली । जेआं लक्ष्मी वालभैली ।'– शिव ३६९.

वालय, वाल स्त्री. एक जातीचे भात.

वालरस पु. समुद्रात राहणारा, मासे खाणारा एक प्राणी.

वालशीट–शेट न. मेणबत्तीचा दिवा; मेणबत्तीची ठाणवी. [इं. वॉलशेड]

वालंबा स्त्री. लाडकी.– लोसाको.

वाला वि. वायला; वेगळा : 'माझा राम झाला मजहुन वाल ।'– आपद ६९. (ना.)

वाला संबंधबोधक प्रत्यय कर्ता, विक्रेता, मालक, रहिवासी, तज्ज्ञ इ. अर्थांनी हा नामाला किंवा क्रियापदाला लागतो. उदा. पैसेवाला, अब्रूवाला, करणेवाला इ.

वाला पु. दोरी; चऱ्हाट.

वाला–ल्हा वि. आवडता; प्रिय : 'विसरू हा तीस कैसा याचा जाला । जीवाहूनी वाल्हा दिसतसे ।'– तुगा २०. [सं. वल्लभ]

वाला वि. थोर; मोठा; उच्च. [फा.]

वालाई स्त्री. श्रेष्ठता; मोठेपण.

वाली पु. १. त्राता; रक्षण करणारा; कैवारी; आश्रयदाता. २. धनी; मालक; पती; प्रियकर. [अर.]

वाली वि. १. वेडा. २. आश्चर्यचकित. ३. प्रेमवेडा. [अर. वालीह्]

वाली स्त्री. हातोड्याचे चापट टोक. (खा.)

वालीद पु. पिता; बाप. [अर.]

वालीदवारस पु. नातेवाईक : 'त्यांच्या वालीद–वारसांच्या रक्षणाची जबाबदारी घेतली काय ?'– दुर्दैवी मोहरे.

वालीप–फ वि. (वस्त्राच्या) तंतूंचा झिरझिरीतपणा, बारीकपणा, नाजूकपणा.

स्त्री. झिरझिरीत आच्छादन; गवसणी; ओढणी; बुरखा; कौपीन : 'आंगिचेनि गौरपणें रंगली । वालीप जाली पींवळी ।'– शिव २७५.

वालुका स्त्री. रेती; वाळू. [सं.]

वालुकातैल न. (वाळूचे तेल निघू शकत नाही यावरून) खपुष्प, शशशृंग इ. प्रमाणे अशक्यप्राय गोष्ट. या अर्थी हा शब्द वापरतात.

वालुकायंत्र न. १. वाळूचे घड्याळ; आत वाळू घातलेली दोन काचपात्रे उलट–सुलट बसवून केलेले घटिकायंत्र. २. (वैद्यक.) एक रसायन करण्याचे काचेचे पात्र.

वालुसरा पु. पिकांवरचा एक रोग.

वालुसरा पु. बारीक वाळूचा ढीग : 'गगनगंगे मोतियाचा वालुसरा'– रुस्व ५०२. [सं. वालु+शिरस्]

वालुंकी स्त्री. वाळुक; काकडीची एक जात; कर्कटी.– गाथासप्तशती.

वालूग न. लक्ष्मीच्या किंवा बहिरोबाच्या नावाने पुष्कळ माणसे मिळून ढोल वाजवून करतात तो नाच. (माण.)

वाले न. औताला जू बांधण्याची दोरी.

वाले(ल्हे)टुले(ल्हे) वि. प्रिय; आवडते; जिवलग; अपूर्व; नाजूक.

वालेवाल क्रिवि. नि:शेष; समूळ; सर्व; अजिबात.

वाल्साडी स्त्री. चंदेरी पैठणी. (झाडी)

वाल्हा पु. प्रेम करणारा. [सं. वल्लभ]

वाव पु. वायू; वारा; हवा : 'लागतां श्रीकृष्णाचा सुवावो । अवघा संसारचि होय वावो ।'– एभा १.२५१.

पु. स्त्री. १. जागा; अवकाश; रीघ. २. सवड; अवसर; फुरसत; स्थान, वेळ. ४. शिरकाव; प्रवेश; रिघाव.

न. तण; निरुपयोगी गवत. [सं. वायु]

वाव स्त्री. न. १. दोन्ही हात पूर्ण पसरले असता होणारे अंतर; लांबी मोजण्याचे एक परिमाण; पाच हात. २. बाहू. [सं. व्याम]

वाव क्रिवि. व्यर्थ; निष्फळ; मिथ्या; निरुपयोगी : 'देह मुळींच केला वाव ।'– दास १९.५.८. [सं. वि+अय्]

वाव पु. बिनखवल्याचा मासा. – बदलापूर १३२.

वाव स्त्री. विहीर; बाव. (गो.) [सं.वापी]

वावकळ, वायकळणे पहा : **वायफळ, वायफळणे**

वावगा वि. १. व्यर्थ; रिकामा; पोकळ; निरुपयोगी. २. स्वैर; स्वच्छंदी, विपरीत; अनिर्बंध; गैरशिस्त; गबाळ (मनुष्य, काम इ.).

वावझड स्त्री. वाऱ्यामुळे पावसाचे येणारे तुषार; शिंतोडे.

वावझडी स्त्री. १. पहा : **वावझड.** २. वावझडीने येणारी शिरशिरी, हुडहुडी; गारठा.

वावट (ड) णे अक्रि. १. विश्रांती घेणे: 'शिणली कमळा जेथ वावटे।' – ज्ञा ११.२१९. २. लीन होणे; निवृत्त होणे : 'तें सुषुप्तिकाळीं वावटें। जेथें ज्ञान।' – माज्ञा १८.४६५. [सं.]

वावटळ स्त्री. १. वाऱ्याचा भोवरा. २. वादळ; तुफान; सोसाट्याचा वारा. ३. वावगे, चंचल, लहरी वर्तन, बोलणे इ. ४. स्वैर वागणारी, भटकणारी स्त्री.
न. (ल.) किटाळ; आळ; तोहमत. [सं.वातुल]

वावड वि. ओढाळ; नाठाळ; उनाड (मूल, जनावर).

वावडकी स्त्री. उनाडकी; भटकेगिरी.

वावडणे अक्रि. १. वावरणे; भटकणे; फिरणे (मुले, गुरे इ. चे) : 'सद्गुरू कृपा न जोडे। आणि भलतीकडे वावडे।' – दास ५.१.३७. २. बडबडणे : 'तें तें वाचा वावडे' – अमृ ७२०.
उक्रि. फिरवणे; परजणे (शस्त्र वगैरे).

वावडा वि. १. अपथ्यक; बाधक; अपायकारक; वर्ज्य. २.वायुप्रकोप करणारा. ३. (ल.) प्रतिकूल, विरुद्ध जाणारा.[सं. व्यावृत्ति, वातट]

वावडा पु. (नाविक) मोठा लोखंडी नांगर.

वावडिंग स्त्री. पुरुषभर उंचीचे एक झाड. पाने लांबट.
न. या झाडाचे बी. हे कृमिनाशक, मसाल्यांत उपयोगी.
[सं., बं. विडंग; हिं. वायविडंग; गु. वावढींग; क. वायुविडंग]

वावडी स्त्री. १. पतंग; आकाशात वाऱ्याने उडवण्याचे कागदाचे एक खेळणे. २. धान्य वारवण्यासाठी केलेली तीन पायांची उंच घडवंची. ३. (ल.) फजिती; अफवा; रेवडी.

वावडी स्त्री. लहान विहीर; बावडी. [सं. वापी]

वावडे न. १. वातरोग; संधिवात; पेटके; गोळे. २. अपथ्यकारक पदार्थ; कुपथ्यापासून झालेला रोग. ३. (ल.) वर्जनीय, त्याज्य हानिकारक गोष्ट.

वाव(ण्ह)णे–ने न. धुराडे; धारे : 'वावनाचा उजियेडु पडे।' – वृद्धा संगम – लीळा ११. (व.)

वा(वां)वणे अक्रि. शरसंधान करणे : 'एयां कौरवांवरि वांवें।' – ज्ञा १.२०७.

वावदळ पहा : **वादळ**

वावदळणे अक्रि. सैरावैरा धावणे : 'घोडा इकडे तिकडे वावदळत चालला।' – लोकमित्र १८९६.

वावदूक वि. बोलका; वाचाळ; बडबड्या; बहुभाषी. [सं.]

वावध (धा) ण – न, वाउधाण, वावधणी, वावधूळ न. स्त्री. वावटळ; वादळ; तुफान.

वाव(ण्ह)न चप्पल.

वावनी पु. घोर. – मनको.

वावन्स न. खद्रासारखा पण फार मोठा मासा.

वावभिडंग न. स्त्री. वावडिंग.

वावर न. शेत; मळा; कुरण; लागवडीची जमीन; रान. [सं. व्यापृ]

वावर पु. १. राबता; वापर; वर्दळ; हालचाल. २. उद्योग; व्यवहार; काम. [सं.व्यापार]

वावरणे उक्रि. १. कामधंदा, उद्योग करणे; काम करणे; हिंडणे; फिरणे. २. उपयोगात येणे, आणणे; काम करणे; वापरणे. ३. राहणे; व्यवहार करणे. ४. भटकणे. ५. व्यापून असणे : 'आंतबाहेरी निजसुख वावरे' – नाम २७५. ६. शिरणे : 'नवनिसितीं सरीं। वावरुनि येयांचां जिव्हारी।' – ज्ञा २.४८. ७. सुटणे : 'कौमोदकी वावरे' – गरा २२२. [सं. व्या + पारय]

वावरभारा पु. कणसाड कडबा गोळा करताना महार ठेवत असे तो एक भारा. (माण.)

वावरमोड स्त्री. फाल्गुनापासून ज्येष्ठापर्यंत (मृगापर्यंत) कुळवून वगैरे पावसाळ्यात जमीन पड ठेवणे. (क्रि. राखणे)

वावराडी स्त्री. मोलकरीण. (गो.)
पु. शेतमजूर.

वावरिजे(जै) णे अक्रि. व्यवहार करणे; वापरणे : 'तेथ नादासळु नुठी। मा वावरिजैल ओठीं। हे कें आहे।' – अमृ ५.६३.

वावरी स्त्री. शेतातील, वावरातील काळी माती. घटस्थापनेच्या वेळी उपयोगी.

वावरी, वावरीचे जाळे एक खूप लांब जाळे. बुरीच्या जाळ्याप्रमाणे याला नांगर नसतो. हे खुंट्याला बांधतात. (को.)

वावरूल – ळ न. वारूळ : 'कोल्हे येणे वावरूलि।' – पंच ३.१३.

वावरे क्रिवि. व्यर्थ; फुकट; निष्फळ : 'तान मान हें तुफान वेवधान वावरें।' – दावि १२२.

वावरे न. रहू करून शेतात पेरलेले भात.

वावरे न. एक लहान जाळे.

वावली स्त्री. १. विडी. (गो.) २. केळीचा दोर.

वावली स्त्री. विस्तार. – मनको.

वावली स्त्री. विहीर. (खा.) [सं. वापी]

वावशी स्त्री. १. डोळ्यांतील शैत्य, थंडी, सारा. (क्रि. धरणे) (को.) २. डोळ्यांतील फूल, डाग, ठिपका. (क्रि. येणे) [सं. वायु]

वावसळणे अक्रि. बावचळणे; भ्रमिष्ट होणे; चळ लागणे. [सं. वात + सल्]

वावसंडणे अक्रि. वारवणे; वाऱ्याने कोरडे होणे.

वावसा वि. १. भ्रमिष्ट; मूर्ख; वेडगळ : 'तेथें वावशासारखी नजर टाकून ती माजघरांत गेली.' – कोरकि ३००. २. अनिश्चित; चंचल; अस्थिर. ३. अव्यवस्थित; गबाळा; अस्ताव्यस्त; गैरशिस्त.

वावसाव स्त्री. पु. कामधंदा; उद्योग; व्यापार. [सं. व्यवसाय]

वावसी वि. निष्फळ; फुकट.

वावसे न. वेड; भ्रम. (क्रि. भरणे)

वावसे न. तीन कोपऱ्या सुंभाचे गुंडाळे. (को.)

वावहणे अक्रि. पळणे; पळून जाणे : 'देखोनि ईला हरि वावहाला।' – सारुह १.७४.

वावळ स्त्री. पुष्कळ गऱ्या एकत्र रांगेने ओवून केलेले मासे पकडण्याचे साधन. (गो.)

वावळ–ळा पु. एक इमारती लाकडाचा वृक्ष. याची पाने नाण्याच्या पानांसारखी लांबट व दर्पयुक्त असतात.

वावळी स्त्री. केळीचा दोर. (गो.)

वावळे न. पड, गवताळ जमीन. (राजा.)
वावंडा न. रिकामा; मोकळा; सुना; कोरडा; फुकट; निष्फळ.
वावंदणे, वावदळ न. वावटळ : 'वावंदर्णे पाडुनु पाए। सबळु डाहारला ठाये।' – ज्ञा १७.१४२.
वावाची माशी १. गबाळी, ओंगळ स्त्री. २. वेश्या; जोगतीण; पोतेरे; माभळभटीण. ३. सोनकिडा.
वावी स्त्री. खिडकी; झरोका.
वावीर न. १. भाताचे निकस शेत; निकस मांडीव. यात भात वरकशीप्रमाणे पेरतात व लावणी करत नाहीत. २. मोड आलेले भात (पेरण्यासाठी). ३. तण; निरुपयोगी गवत, झाडे-झुडपे.
वावून न. धारे; वावणे.
वावोवावी क्रिवि. जेथे-तेथे; सर्वत्र. [वाव द्वि.]
वाव्सड स्त्री. घरात उडणारे पावसाचे तुषार. (झाडी) [सं. वर्षा]
वाशिंग न. (विणकाम) नकशीच्या खोबळ्याला व चकाच्या दोरीच्या ताणाला मध्ये असणारी दोरी.
वाशील वि. उणे; कमी; वजा. (क्रि. करणे, होणे, पडणे.) [अर. वासील]
वाशीलबाकी स्त्री. शिल्लक; शिल्लक काढणे. (क्रि. करणे)
वाशेरा-ळा, वासट वि. वाईट वास येणारा; घाणेरा; बुरसट.
वास पु. १. घ्राणेंद्रियाला जाणवणारी संवेदना; घ्राणेंद्रियाचा विषय. २. फुले, अत्तर इ. गोष्टींचा चांगला-वाईट गंध; परिमळ. ३. (ल.) झाक; छटा; स्वाद; अंश. ४. सुगावा; खूण; एखादी गोष्ट एखाद्या ठिकाणी असल्याचे दाखवणारा अंश. ५. उरलेला भाग; अल्पांश. ६. हिंग (रात्रीच्या वेळी घेण्याचे सांकेतिक नाव). [सं. वास् = गंध सुटणे]
वास पु. स्त्री. कपडा; वस्त्र. [सं.]
वास पु. वस्ती; वास्तव्य; रहिवास; राहणे; निवास; मुक्काम; वर; आश्रय; स्थान. [सं. वस= राहणे]
वास-श स्त्री. १. वाट; मार्ग; प्रतीक्षा : 'आज्ञा कृतांता वास पाहो नर।' – ऋ ७. २. चर्या; चेहरा; मुद्रा : 'तंव देवें हास्य केलें उद्धवदेवाची पाहिली वास।' – धवळेपू ४५.४. ३. क्रम; रीत. [सं. वस्]
वासकट, वासट पहा – **वाशेरा**
वासकसज्जिका स्त्री. नायिकेचा एक प्रकार. प्रियकराच्या भेटीसाठी, मीलनासाठी शृंगार करून तयार, उत्सुक असलेली स्त्री. [सं.]
वासकूट न. बिनबाह्यांचा आखूड अंगरखा; जाकीट. [इं. वेस्टकोट]
वासणे उक्रि. उघडणे; पसरणे; मोठे करणे; फाडणे.
अक्रि. १. विद्रूप दिसण्याइतपत, प्रमाणबाह्य उघडणे, विस्तारणे (तोंड, डोळे, भोक, तंगड्या, बोटे इ. २. (ल.) दिवाळे निघणे; नाश होणे; बसणे (धंदा, व्यापार). [सं. वि + अस् = फेकणे]
वासन न. १. कापडाचे दिंड ज्या वस्त्रात बांधतात ते वस्त्र, गाठोड्याचे फडके. २. सामान्यत: कोणतेही वस्त्र; कपडा. [सं. वसन]
वासन न. सुवासित करण्याची क्रिया; सुगंधित करणे. [सं. वास्]
वासन न. निवास; वस्ती. २. ध्यानाची स्थिती; आसन. [सं. वस्]
वासनवेल स्त्री. तान्हीचा वेल; भुईपाडळ; पातालगरुडी. या वेलीच्या टोपल्या करतात. – वगु ५.६७.
वासना स्त्री. १. मनाचा कल; प्रवृत्ती; स्वभाव. २. इच्छा; वांछा. ३. परिचय; अभ्यास; प्रावीण्य; संस्कार; पारंगतता. ४. मृत्युसमयीची इच्छा; हेतू; आकांक्षा . ५. लक्षण; चिन्ह : 'गीतेमाजिं च्यारि पुरुष बोलिले : तयाचिया वासना कैसिया?' –लीचउ ५९६. ६. (ज्यो.) ग्रह स्पष्ट करण्याचा एक संस्कार. [सं.]
वासना स्त्री. १. पाठभेद. २. तऱ्हा; प्रकार.
वासनि(नी)क पु. (महानुभाव तत्त्वज्ञानानुसार) परमेश्वराचे अनुसरण करण्याची इच्छा बाळगणारा बोधवंत : 'तैसें सेजीया म्हणीजति वासनिक' – दृपा ५९.
वासपणे अक्रि. भिणे.
वासपूस स्त्री. वास्तुपुस्त; चौकशी.
वासर पु. १. दिवस. २. वार. [सं.]
वासरमणि-णी पु. सूर्य. [सं.]
वासरा पु. रहिवासी : 'राषसभुणीचा वासरा ओवीकारू' – बिडकीन शिला १.१ [सं. वास + कर]
वासरी स्त्री. ओसरी; ओटी; पडवी; माजघर. (गो.) [सं. वस्]
वासरी स्त्री. दैनंदिनी.
वासरू न. १. गाईचे पारडू, बछडे. २. (लाडिकपणे) लहान मूल. [सं. वत्स]
वासरू न. १. (नाविक) शिडाच्या दोरखंडाच्या टोकाला बांधलेला एक लाकडी दांडा. २. (नाविक) दमान बांधलेली दोरी.
वासला पु. (सुतारकाम) लाकूड तासण्याचे हत्यार; वाकस.
वासलात-द, वासलत स्त्री. १. वसूल; जमा; उत्पन्न व त्याचा हिशोब, जमाखर्च. २. हिशोब लिहिताना काढण्याची रेघ. (हिच्या सुरुवातीला मोडी वा हे अक्षर असते.) ३. हकिगत; गोष्ट; खटला; कज्जा; काम. ४. निकाल; शेवट; फैसला. ५. व्यवस्था; तजवीज. ६. परिणाम.
वासली स्त्री. लहान वासा. (गो.)
वासवी शक्ती (इंद्राकडून ही शक्ती कर्णाला मिळाली होती व ती हटकून परिणामकारी होणार होती. त्यावरून ल.) अमोघ शस्त्र, उपाय; हटकून परिणाम घडवणारी गोष्ट.
वासवारा पु. अत्यंत अल्प अंश; केवळ वास. (निषेधात्मक उपयोग)
वासळणे अक्रि. गंध पसरणे; दरवळू लागणे.
वासंतिक वि. वसंत ऋतूतील.
वासा पु. १. दांडी; काठी; सोट; वेळू; बांबू; घराच्या आढ्यापासून वळचणीपर्यंत जोडलेला तीर, दांडा. २. (ल.) पाठीचा कणा. ३. (ल.) नाकाचे हाड. ४. (ल.) मोठी लेखणी. [सं. वंश]
वासाचे पोते १. अगोदर श्रीमंत असून नंतर दारिद्र्यावस्थेला पोहोचलेला मनुष्य. २. ज्याला लोक श्रीमंत समजतात असा मनुष्य. ३. श्रीमंत मनुष्य.
वासाळ पहा : **वाशेरा-ळा**
वासित वि. सुगंधित; वास लावलेले. [सं.]
वासिप-पु पु. न. भय; भीती; वचक : 'जो मी काळाचियाही तोंडा। वासिपु न धरी।' – ज्ञा ११.३८७.

वासिपणे अक्रि. भिणे : 'समुद्र जरी वासिपे।' – विपु ७.४७. [सं. वत्सप्राय]

वासि(सी)ल, वासि(सी)लबाकी, वासिलात पहा : **वाशील, वाशीलबाकी, वासलात**

वासी वि. बसणारा; राहणारा; वस्ती केलेला. (समासात) वनवासी इ.

वासी वि. व्यर्थ; निष्फळ.

वासुदेव पु. मोरांच्या पिसांची उंच टोपी घालून भिक्षा मागणारी एक जात.

वासुरकरीण स्त्री. १. पिते वासरू असणारी गाय किंवा म्हैस. २. पान्हा येण्यासाठी जिला वासरू लागते (आंबोणाने पान्हवत नाही) अशी गाय किंवा म्हैस.

वासुरटे न. (चर्म.) वासराचे चामडे, कातडे.

वासुरू, वासुरुवे, वासरे पहा : **वासरू**

वासे न. लांब बांसाला – बांबूला लाकडी करवतीसारखे कोयते जोडून केलेले हत्यार.

वासेबी न. कळकाचे, वेळूचे बीज; एक उपधान्य. [सं. वंशबीज]

वासोंडी स्त्री. खरडपट्टी. (व.)

वासोंडी–ळी स्त्री. लहान वासा; निरुपयोगी, निकामी वासा.

वास्ट वि. वाईट; वाकडे. (गो.)

वास्त–स्ता स्त्री. विचारपूस; चौकशी; अगत्य; काळजी. (क्रि. टाकणे, सोडणे.)

वास्तपुस्त स्त्री. विचारपूस; चौकशी. [सं. पृच्छ; हिं. पुछापाछा]

वास्तव वि. १. प्रत्यक्ष; खरोखरीचे; वास्तविक; मूळचे; खरे. २. भरीव; मुख्य. ३. पोकळ; दिखाऊ. [सं. वस्तु – वास्तव]

वास्तववाद पु. सत्यसृष्टीचे (साहित्य इ. त) यथातथ्य चित्र रंगवणे.

वास्तवशास्त्र न. वस्तू आणि शक्ती किंवा तेज यांविषयी विवरण करणारे शास्त्र. यांत उष्णता, प्रकाश, ध्वनी, वीज इ. चा समावेश होतो.

वास्तव क्षितिज दृश्य गोलार्धापासून अदृश्य गोलार्धास निराळे करणारे वर्तुळ. – मपु ६, पृ. १३४. [सं.]

वास्तवान पु. रहिवासी; वास्तव्य करणारा; राहणारा : 'अकळ कलेनें असतोसी। वस्तींत वसतोसि वास्तवान।' – ज्ञानप्रदीप ३३७.

वास्तविक वि. १. यथार्थ; प्रत्यक्ष; खरोखर; सत्य. २. वस्तुस्थितीला धरून; योग्य; न्याय्य; बरोबर; रीतसर.

वास्तव्य न. १. वसती; राहणे; निवास. २. वसतिस्थान. ३. वस्तुस्थिती. वि. राहण्यायोग्य. [सं. वस्]

वास्तुअभियांत्रिकी, वास्तुविद्या स्त्री. घरे इ. सर्व प्रकारच्या इमारती बांधण्याचे शास्त्र; गृहनिर्माणशास्त्र. [सं.]

वास्तुकला स्त्री. (विशेषत: सौंदर्यपूर्ण) घरबांधणीतील कौशल्य.

वास्तुदेवता–पुरुष स्त्री. पु. १. निवासस्थानाची, घराची अधिष्ठात्री देवता. २. गृहदेवतेची लहानशी प्रतिमा.

वास्तुविधान न. १. घर. २. वास्तव्य.

वास्तुशास्त्र न. घर बांधण्याचे शास्त्र; स्थापत्यशास्त्र.

वास्तुशांत–ति–ती, वास्तुप्रवेश स्त्री. पु. नवीन घरात राहण्यास जाण्यापूर्वी करण्याचा धार्मिक विधी.

वास्तुसौंदर्यशास्त्र न. सुंदर इमारती इ. बांधण्याचे, वस्तू सजवण्याचे शास्त्र; गृहमंडनशास्त्र.

वास्तेकार शुभेच्छू. – ऐको.

वास्तेय वि. ओटीपोटासंबंधी. [सं. बस्ती]

वाह उद्गा. प्रशंसादर्शक उद्गार; ओहो! शाबास! भले! [फा.]

वाह स्त्री. नांगरट; मशागत : 'करूनि कामक्रोधाची डाही : नवल पीक आवडीचां वाहीं' – ऋव ७९. [सं. वह]

वाह पु. १. स्वभाव; मार्ग : 'परिसातें आपुलेनि वाहें : लोहो निवटुं जाए' – ७१. २. बाजू : 'करीन सातही पाताळें हरी वाहीं – शिव ९११.' [सं. वह]

वाह पु. गती : 'अधोरंध्राचेनि वाहे।' ज्ञा १८. ३३८. [सं. वह]

वाह, वाहक पु. १. नेणारा; वाहून नेणारा; हमाल. २. प्रवाह वाहून नेणारा. ३. बसमध्ये तिकिटे देणारा व चालकाला घंटा वाजवून सूचना देणारा; (इं.) बस–कंडक्टर.

वाहकत्व न. उष्णता, विद्युत इ. वाहून नेण्याचा पदार्थाचा धर्म.

वाहकपट्टी स्त्री. कारखान्यात, खाणीत माल वाहून नेण्यासाठी असलेला फिरता पट्टा.

वाहकविद्या स्त्री. १. वाहन चालवण्याची कला. २. अश्वविद्या.

वाहट (टू–टो–डू)ळ पहा : **वावटळ**

वाहडणे पहा : **वाढणे**

वाह(हा)ण स्त्री. चप्पल; पादत्राण; चामड्याची चप्पल. [सं. उपानह]

वाहणधरू पु. जोडे उचलणारा : 'जीवें संतांचें होत। वाहणधरू।' – ज्ञा १३.११३२.

वाहणावळ स्त्री. माल वाहून नेण्यासाठी द्यावा लागणारा खर्च; वाहतूकखर्च.

वाह(हा)णी, वाहण–णे स्त्री. न. १. प्रवाह; ओढा; ओघळ; लोंढा : 'कां वसंताचिया वाहाणीं।' – ज्ञा १६.१६४. २. पीक वगैरे वाहून नेण्याची क्रिया; नेणे. [सं. वह]

वाह(हा)णी–ण स्त्री. न. (ल.) मार्ग; प्रकार; रीत; पद्धत; क्रम : 'म्हणोनि इया वाहणी। केली म्यां उपलवणी।' – ज्ञा १३.८५२. [सं. वह]

वाहणे उक्रि. १. उचलून नेणे; एका जागेवरून उचलून दुसऱ्या जागी नेऊन ठेवणे. २. भार सहन करणे, सोसणे; आधार देणे. ३. मनात बाळगणे; धरणे. ४. चालू ठेवणे; पुढे चालवणे. ५. अर्पण करणे; पूजेत देणे; पुढे ठेवणे. ६. (शपथ) घेणे. ७. देऊन टाकणे; टाकून देणे; त्याग करणे. ८. काढून देणे; पुढे करणे. ९. चढवणे; बसवणे; सज्ज करणे (धनुष्याला दोरी इ.) : 'जो या धनुष्या वाहील गुण।' – रावि ७.५४. १०. (जमीन) कसणे; लागवडीस आणणे; पेरणे; मशागत करणे: 'काय जाहालें न वाहता भुई पेरिजे।' – ज्ञा ११.१६२. ११. धारण करणे; नेसणे; वापरणे : 'वाहे वल्कल जटा।' – मोरामायणे २३. १२. चालवणे; उपयोग करणे : 'जेती घाणे वाहती।' – पाटण शिलालेख. १३. हल्ला करणे : 'मग तेणे विक्रमसेनु प्रौढवर्धनावरि सबळु वाहौनु आला।' – पंच १.३२. [सं. वह]

वाहणे अक्रि. १. वारा, पाणी हलणे, एका जागेवरून दुसऱ्या जागी जाणे; सरकणे; पुढे जाणे; गतिमान असणे (जमाव, प्राणी–मनुष्य–गाड्या

वगैरेंची रांग). २. (नाक, व्रण, गळते भांडे वगैरेतून) पाणी, पू वगैरे बाहेर येणे; स्रवणे; पाझरणे; गळणे; ठिबकणे. ३. एका दिशेने जाणे; लांबवर पसरणे; रांगेने असणे (रस्ता, किनारा, डोंगररांग). ४. चालू असणे; कार्य करीत राहणे (यंत्र, हत्यार, साधन). ५. तीक्ष्ण असणे; उपयोग होण्याच्या स्थितीत असणे; धार असणे (शस्त्र, हत्यार इ.) ६. प्राप्त होणे; चालू असणे. [सं. वह्]

वाहतवणा पु. रानातून चालणारा; प्रवासी : 'आणि जन्मशतांचा वाहतवणा।' – ज्ञा ७.१२९.

वाहत वाटोळे १. जुजबी किंवा तात्पुरती व्यवस्था, दुरुस्ती, उपाययोजना; मिटवामिटव; (वाद, भांडण, रोग यांसंबंधी) कामचलाऊ योजना. २. आरंभ; सुरुवात; (काम, धंदा इ.) चालू होणे. ३. पूर्ण नाश; वाटोळे.

वाहता–ती–ते वि. १. मोकळेपणाने वावरणारे, हलणारे, फिरणारे, वागणारे; तीक्ष्ण धारेचे; कुशाग्र. २. चालू; काम, कार्य सुरू असणारे; उपयोगात असलेले. ३. अनुकूल; भरभराटलेले; संपन्न. ४. रहदारीचा (रस्ता). ५. व्यवहारात वापरले जाणारे (नाव).

वाहती, वाहतीस स्त्री. १. प्रारंभ; सुरुवात. २. चाल; वहिवाट; शिरस्ता; प्रघात.

वाहती कूस, वाट (ल.) गर्भधारणेसाठी, मुले होण्यासाठी योग्य असणारी गर्भाशयाची अवस्था; मुले होत असणारी कूस.

वाहतुरा वि. वाहती; तीक्ष्ण (शस्त्राची धार).

वाहतूक स्त्री. रहदारी; ने–आण; जा–ये; वापर.
पु. वाहणारा; लाकडाची ने–आण करणारा.
न. स्त्री. वाहतुकीची मजुरी.

वाहते वि. उपयोगात असलेले; तीक्ष्ण धारेचे.

वाहदणे अक्रि. वाहणे. – लोसाको.

वाहन न. गाडी, घोडा इ. प्रवासाचे साधन; यान. (समासात) गरुड वाहन इ. [सं. वह्]

वाहन न. उखळ. (को.) [फा. हावन]

वाहनकाटा पु. (विशेषत: माल वाहून नेणाऱ्या) जड वाहनांचे वजन करण्याचा काटा.

वाहनतळ पु. वाहने काही काळासाठी सोडून जाण्याची ठेवण्याची जागा.

वाहनभत्ता पु. कार्यालयाच्या कामासाठी किंवा कार्यालयात येण्या-जाण्यासाठी वाहनावर होणारा खर्च भरून काढण्यासाठी देण्यात येणारा भत्ता.

वाहनांतरण न. नियोजित स्थळी एकाच वाहनातून माल पोचवता येत नसल्यास वाटेत दुसऱ्या वाहनावर चढवण्याची क्रिया.

वाहर स्त्री. पीडा; दु:ख; बाधा : 'आतां हे जोहरवाहर दुसरी। चैतन्यासकट।' – ज्ञा ११.६०.

वाहल स्त्री. ओढा : 'टाकलीएचिए वाहले पस्चिमे कामतसेतु' – पैठण शिला १.५. [सं. ओघ]

वाहली स्त्री. ओहोळ; वाहाळ. – देशीनाममाला. [सं. वह्]

वाहल्कड पु. पुढे आलेले टोक : 'याच स्तूपाच्या...पूर्वेच्या वाहल्कडावर गणांची एक रांग कोरलेली आहे.' – केसरी २२.९.३६.

वाहवट स्त्री. प्रवाह; ओघ; पात्र; मार्ग : 'तैसे इंद्रियांच्या वाहवटीं। धांवतया ज्ञाना जेथ ठी।' – ज्ञा २८.४७६.
वि. प्रवाहाने वाहून गेलेला; धुवून गेलेला. [सं. वह्]

वाहवटक स्त्री. १. प्रवाह; ओघ; धार. २. वावटळ; तुफान; वादळ. [सं. वह्]

वाहवण स्त्री. १. प्रवाह; ओघ; लोंढा. २. प्रवाहासोबत वाहत जाणे.

वाहवणी न. १. वाहते पाणी; पाण्याची धार; प्रवाह. २. वाहत जाणारे पाणी (याउलट जिरवणी); पाणी वाहण्याइतका पाऊस.

वाहवणे अक्रि. १. प्रवाहासोबत वाहात जाणे; लोंढ्यात सापडणे. २. झिरपणे; पाझरणे; थेंब–थेंब गळणे. ३. (ल.) बोलताना विषय सोडून भलतेच बोलणे; बहकणे. ४. (प्रयत्न, योजना, कल्पना इ.) निष्फळ होणे, फसणे. ५. सैरावैरा जाणे; भलतीकडे जाणे. [सं. वह्]

वाहवरा वि. १. वाहणारा; वाहण्याजोगा; अर्धवट पातळ (गूळ, गाळ, चिखल इ.); ठिसूळ; शिथिल; थलथलीत; लिबलिबीत (शरीर). २. (ल.) स्वैर; विषय सोडून; मुद्द्यांवेगळे – खेरीजचे (भाषण); बेशिस्त; अनुसंधान नसणारे (बोलणे). [सं. वह्]

वाहवा उद्गा. शाबास! भले! उत्तम! (प्रशंसापर उद्गारवाचक अव्यय.)
स्त्री. प्रशंसा; वाखाणणी; शाबासकी; स्तुती. [फा. वाह्वाह्]

वाहवाह उद्गा. वाहवा : 'करणी केल्यानें वदों जी वाहवाहा।' – दावि १९६.

वाहवि(व)णे सक्रि. घालवून देणे; मोडणे; घालवणे : 'कां धर्म व्यर्थ तुवां, गांजुनी हा निरपराध वाहविला।' – मोआदि २.३.

वाह(हा)ळ, वाहळी पु. स्त्री. ओढा; नाला; ओहोळ. [सं. वह्]

वाहळी स्त्री. तेरड्याची एक जात. [सं. वह्]

वाहाटळ–टूळ, वाहाडणे, वाहाणी–णे–न–र–ल, वाहावट–ण–णी–णे–रा इ. पहा : **वाहटळ, वाहडणे** इ.

वाहाण पहा : **वहाण**

वाहाण, वाहातवणे स्त्री. न. ओढा; नाला; ओहोळ. [सं.वह्]

वाहातवणा पु. प्रवास : 'जन्मशतांचां वाहातवणां।' – ज्ञा ७.१२६.

वाहार स्त्री. पीडा; उपद्रव : 'ऐसी वसंतवाहार : तीय वनी जाली थोर – उगी ४३८.

वाहारी स्त्री. सून. (खा.) [सं. वधू]

वाहावळ पु. शेती करणारा : 'आवघेया वाहावळांचा वापु जालासि' – लीचउ ३७३. [सं. वह्]

वाहाळ वि. लागवड केलेली; वहित. [सं. वह्]

वाहाळी स्त्री. शिकार.

वाहितगारी स्त्री. वहिवाटीचा हक्क.

वाहि(हे) द वि. एक; एकटा. – मपु ६, पृ. २१६. [अर. वाहिद]

वाहिनी स्त्री. १. सेना; सैन्य. २. शरीरातील रक्त द्रव इ. वाहून नेणारी नलिका. ३. प्रकाशकिरण, ध्वनिलहरी वाहून नेणारा चॅनल (टी. व्ही.).

वाहिला वि. वेगळा; निराळा. [सं. व्यवहित + ल]

वाहिला पु. भोपळा; पोहणाऱ्याची सांगाडी. [सं. वह्]

वाहिली स्त्री. वाहण्याचे साधन.

वाहि(ही)वा पु. स्त्री. शेताची लागवड; वहिवाट; कारभार.

वाही स्त्री. १. नाला; ओढा. (ना.) २. मार्ग; रीत; ओघ; क्रम : 'घ्यावें त्याचें देणेंचि नाहीं। येचि वाही देखतसों।' – तुगा ३६७. ३. शेताची मशागत; औताची पाळी; लागवड. [सं. वह्]

वाही, वाहीक वि. नेणारा; वाहणारा. [सं. वह्]

वाहीत वि. वहित; लागवड केलेली.

वाहीद वि. एकमेव; विशेष वाकबगार.[अर. वहीद = एकटा, अद्वितीय]

वाहीन न. उखळ; वाहन. (को.) [फा. हावन]

वाहीम वि. खोटे : 'तेथें द्विजावांचुनि देव नाहीं। वाहीम वाटे नवयौवना ही।' – वामन, विराट १.३९.

वाहीम न. नांगर, रहाट वगैरे ओढणारे जनावर; ओढकामाचे, ओझ्याचे जनावर. [सं. वह्]

वाही(हे)ल स्त्री. मशागत; लागवड; नांगरट वगैरे शेतकाम.
न. १. पोकळ, वांझा नारळ. २. पोहणाऱ्याची सांगड.

वाहुटा पु. मुलाची हातातील वाक. (व.)

वाहुटी स्त्री. वाऱ्याच्या प्रवाहाबरोबर वाहाती; वाहत जाण्याची क्रिया.

वाहुटी पहा : **वहिवाट**

वाहुडणे क्रि. वाहवणे. – लोसाको.

वाहुदार पु. जमीन कसणारा मनुष्य : 'वाहुदारांनी जमीनीचें उत्पन्न देऊ नये.' – के १६.४.३०.

वाहूट न. वाळवंट; मोकळी जागा. – लोसाको.

वाहेर पु. खवळ्या मासा. – बदलापूर १३२.

वाहो पु. १. मशागत; लागवड : 'पैं प्रतिवर्षीं क्षेत्र पेरिजे। पिके तरी वाहो नुबगिजे।' – ज्ञा १०.५५. २. प्रवाह;ओघ; धार : 'स्वप्रतीति धारेचा वाहो। करील तैसें।' – ज्ञा १५.२६४. ३. मार्ग; रूढी; प्रघात; गती : 'चालीचाचि वाहो बहुतेक।' – तुगा ९३१ . [सं. वह्]

वाहोजंत्र न. फुंकून वाजवण्याचे वाद्य : 'वाहोजंत्रें सुसरें वाति' – रुस्व १७७. [सं. वायु + यंत्र]

वाहोळ–ळी, वाहोळदारी स्त्री. लागवड; शेतकाम; मशागत.
वि. लागवडीची; वहित; नांगरटीची. [सं. वह्]

वाहोळकर–करी–दार पु. शेतकरी.

वाह्या वि. उचलून नेण्याजोगे; नेण्या–आणण्याच्या सोईचे. [सं.]

वाह्या, वाह्याची अवटी पहा : **वाया, वायाची अवटी**

वाह्यात, वाहीयात वि. व्रात्य; खोडकर; त्रासदायक.[अर. वाहियात्]

वाळ स्त्री. कुंडीत लावण्याची एक वेल. (को.)

वाळ न. पुच्छ; शेपूट; शेपटीचे केस : 'वाजीवाळ धवळ कैसें। तें मज दाखवी डोळसे।' – मुआदि ५.१९. [सं. वाल]

वाळ स्त्री. १. प्रचारातून, चलनातून जाणे (नाणे). (क्रि. पडणे, पाडणे.) २. जातिबहिष्कार; जातिभ्रष्टता; समाजभ्रष्टता. (क्रि. काढणे, निघणे, पाडणे, घालणे, पडणे.) ३. नाश; कुजकेपणा; जीर्णता; सुकेपणा. (क्रि. पडणे, होणे, असणे.) ४. लोप; प्रचारातून जाणे; रद्द होणे.
वि. १. प्रचारबाह्य; बंद पडलेले (नाणे). २. जातिबाह्य. ३. (ल.) बेकार; प्रचारातून गेलेली (चाल, रीत, प्रघात, नियम). ४. भाकड (म्हैस इ.). [सं. वृ – वारव]

वाळ स्त्री. १. मासे मारण्यासाठी तयार केलेली जागा. २. ओढा. (गो.)

वाळई स्त्री. खडपात राहणारा चपट्या जातीचा मासा. (कु.)

वाळका, वाळकुंजा–कुडा–कुंडा वि. १. कोरडा; शुष्क; नीरस; रुक्ष; सुका; सुकट. २. किडकिडीत; बारीक; कृश; रोडका; काटकुळा.

वाळकी स्त्री. वाळुकाचा वेल.

वाळखो पु. वेळ. – वशाप ५२.१. (व.)

वाळगणे अक्रि. शिजवताना, भाजताना लागणे, करपणे; जळणे. [सं. ज्वल्; गु. बळणे = जळणे]

वाळगष्टाण स्त्री. करपट दुधाची घाण.

वाळटी स्त्री. वाळवी. (गो.)

वाळण स्त्री. १. भातातून पेज काढणे. २. ती काढण्याचे भांडे. (कु.)

वाळणे अक्रि. १. सुकणे; नीरस, रुक्ष होणे; रस, रक्त इ. आटून आर्द्रतारहित होणे. २. कृश होणे; रोडणे; रोडावणे; क्षीण होणे. [क. वाडु; सं. ज्वल्]

वाळणे सक्रि. खिळा वगैरे उपटून येऊ नये म्हणून वळवणे; बोळवणे. [सं. वल्]

वाळणे उक्रि. १. वर्ज्य करणे; टाकणे; त्याग करणे : 'वस्तु घेऊनि वाळिजे। जैसें रत्नासि दूषण ठेविजे।' – ज्ञा ११.६४२. २. वाळीत टाकणे; बहिष्कार घालणे, टाकणे : 'कुळें वाळिती जातिभ्रष्टातें।' – मुसभा ३.८७. ३. वजा करणे; परत करणे; निकालात काढणे : 'तसलमात टाकून वाळणे.' – (बडोदे) खानगीखाते पृ. १५६. ४. उपाशी राहणे.

वाळती–टी पहा : **वाळवी**

वाळवट–सर वि. वाळुयुक्त; वाळूचे; वाळूमिश्रित; रेताड.

वाळवट न. घोड्याच्या किंवा जनावराच्या केसांचे केलेले चऱ्हाट. (व.)

वाळवण न. १. वाळण्यासाठी उन्हात घातलेले धान्य. २. वाळल्यामुळे कमी होणारा अंश.

वाळवण स्त्री. पेज काढण्यासाठी भाताच्या तपेल्याच्या तोंडावर लावण्याची मूठ असलेली फळी.

वाळवणे सक्रि. १. सुकवणे. २. कृश करणे.

वाळवत न. केळीचे वाळलेले पान. (को.)

वाळवंट–वंठ–वट–सरा न. पु. वाळूचे मैदान; रण.

वाळवांगी पहा : **बेलवांगी**

वाळवी स्त्री. १. लाकूड खाणारा एक किडा; उधई. २. लाकूड इ. वाळवीने खाल्ल्याप्रमाणे ज्यामुळे दिसू लागते तो रोग. ३. (ल.) चिंता; काळजी, भीती इ. शरीर कृश होण्यासाठी कारणीभूत होणारी गोष्ट.

वाळवेणे अक्रि. वाळवी लागणे. (को.)

वाळशिंगटी स्त्री. शिंगटी माशाची एक जात.

वाळसारा पु. पुळण. पहा : **वालुसरा**

वाळंजी स्त्री. बिनखवल्याचा मासा. – बदलापूर.

वाळंबा पु. १. चाचड; एक प्रकारची तांबड्या मुंग्यांची जात. २. वाळवी.

वाळा पु. एक सुगंधी मुळ्याचे गवत; त्याच्या मुळ्या; खस. [सं. वल्लुर]

वाळा पु. केस. [सं. वाल]

वाळा पु. १. पायातील एक दागिना; पदभूषण. २. हातात घालण्याचा दागिना; कडे; लहान कडे. ३. भांड्याच्या भोवती असणारा फुगीर कंगोरा; तांब्या, चंबू वगैरेचा फुगीर भाग. ४. सापाच्या जातीचा एक प्राणी; सापाचे पिल्लू; जिवाणू. ५. खोबऱ्याच्या वाटीची कापलेली वाटोळी कड; खोबऱ्याचे वाटोळे तुकडे. ६. एखाद्या कड्याने वगैरे दिलेला वाटोळा डाग. ७. वळ; वाटोळी गाठ. ८. सामान्यत: वाटोळा उंचवटा, वळ; उदा. उसाच्या चुलाणावर कढई बसवण्यासाठी केलेला वाटोळा उंचवटा. [सं. वल्, वालक]

वाळागीर वि. वाळ्याचे : 'वाळागीर पडदे आणव।' – पला ४.२२.

वाळाव पु. तरस. (गो.)

वाळियेणे सक्रि. (नाविक) वाऱ्याच्या दिशेने चालवणे; वाऱ्यात ठेवणे (गलबत).

वाळी स्त्री. १. बाळी; नाकातील किंवा कानातील एक सोन्याच्या तारेचे भूषण; सुंकले; नथ (कु.). २. वेलबोंडी नावाची वेल.

वाळीत न. जातिबहिष्काराची क्रिया; जातिभ्रष्टता. (क्रि. टाकणे).
वि. जातिबहिष्कृत.

वाळु(ळू)क न. १. एक प्रकारची काकडी; चिबूड; सुरती काकडी. २. आवाळू [सं. वालुक]

वाळुं(ळूं)ज स्त्री. पु. एक झाड; वाळंजीचे झाड.

वाळू स्त्री. १. पुळण; बारीक रेती. २. कंकर; बारीक खड्यांची रेती; जाड रेती. [गु.; हिं. वालू; सं. वालुका] (वा.) **वाळूची भिंत** – न टिकणारी गोष्ट. **वाळूत, वाळूवर, वाळूमध्ये मुतणे** – निरर्थक गोष्ट करणे; निष्फळ काम.

वाळू, वाळोय पहा : **वाळवी**

वाळू स्त्री. जेवणी. (गो.)

वाळेरू–स, वाळो न. वाळा (गवत). (गो.)

वाळ्याचा तांब्या वाटोळे स्वतंत्र बूड (बैठक) बसवलेला तांब्या.

वाक्षण स्त्री. लज्जा. (गो.)

वांग पु. १. सोने, रुपे वगैरेला मोरचूद इ. मुळे पडलेला डाग. २. धातूच्या पत्र्यावर दिसणारे हातोड्याचे ठोके. ३. तोंडावरील मुरमाच्या पुटकुळ्या. [सं. व्यंग]

वांग पु. बधिरता; जडपणा; शैथिल्य (भारामुळे येणारे).

वांग पु. भलारी; शेतकाम करताना म्हणण्याचे गाणे.

वांग पु. पाड; कथा; महत्त्व : 'कविराय चमकला हीर, लोक जाहीर इतर शाहीर काजवे वांग.' – मोच ४८.

वांगड–डा–डी पु. स्त्री. १. सोबती; सहचर. (गो., कु.) २. कुल; वेटाळे : 'भारद्वाज गोत्राच्या मंडळीला जसे ह्या वांगडांत घेतलें.' – हिंदु ११.२.३०.

वांगडे क्रिवि. बरोबर; संगती.

वांगली वि. स्त्री. वाईट : 'कान्हा, तुझी घोंगडी चांगली। आम्हासि कां दिली वांगली।' – ज्ञगा १०५०. [सं. व्यंग]

वांगवांग क्रिवि. कसकस; वखवख; किरकिर; अंग, जीव, प्रकृती वगैरे बरोबर न चालणे; कुथुकुथु करणे.

वांगा वि. तिरपा; चकणा; तिरवा–ळा. [सं. व्यंग]

वांगी स्त्री. एक फळभाजीचे झाड.

वांगे न. वांगीचे फळ.

वांगेलिसा पु. (अप.) प्रेषित. (इं.) इव्हांजेलिस्ट. – ख्रिपु.

वांगेसट स्त्री. चंपाषष्ठी; मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी.

वांछनीय वि. इच्छा करण्याजोगे.

वांछा स्त्री. इच्छा; मनीषा; हेतू. [सं.]

वांछिणे क्रि. इच्छा करणे.

वांछित वि. इच्छित; इष्ट.

वांजट वि. वांझ.

वांजेल वि. वांझ; निष्फळ. (गो.)

वांझ स्त्री. १. वंध्या; निपुत्रिक, मूल नसलेली स्त्री. २. निपुत्रिक, प्रजननक्षमता नसणारा पुरुष. ३. (ल.) निष्फळ बिनफायद्याचा धंदा.
वि. निरर्थक; निष्फळ; फोल. [सं. वंध्या; प्रा. वंज्झा; हिं. बांझ]

वांझखडा पु. गर्भधारणा होऊ नये यासाठी घेण्याचे औषध.

वांझट, वांझटोळी स्त्री. (उपहासार्थी) वंध्या; वांझ.
वि. व्यर्थ.

वांझ–झी तिथी ज्या दिवशी कोणतेही कर्म, विधी विहित नसतो असा दिवस.

वांझा वि. १. पहा : **वांझ**. २. ज्या फुलापासून फळ उत्पन्न होत नाही असे. ३. गरे नसलेला (फणस); दाणे नसलेली (शेंग, कणीस वगैरे). ४. ज्याला फुले येतात, पण फळे येत नाहीत असा (वृक्ष– पपई, बकुल इ.). ५. बिनपाण्याचा, पाऊस न आणणारा (ढग). ६. सुकत आलेला, बिनपाण्याचा नारळ. (को.) ७. खोबरे नसलेला नारळ. (गो.)

वांझी पुनव–पौर्णिमा पौष पौर्णिमा. या दिवशी पुष्कळ मुले असणाऱ्या स्त्रीला सुवासिनी म्हणून बोलावतात.

वांझे वि. निष्फळ; व्यर्थ.

वांझे–झा न. पु. वांधा; हिशोबसंबंधाने भानगड, गुंता : 'हें वांझें नाना फडणीसच काढून टाकील.' – अस्तंभा १६४.

वांझोटा–टी–डा–ळा वि. (उप.) वांझ.

वांझोले–ळे–ळ, वांझौळ–ळे न. वांझ फूल : 'म्हणोनि वांझोळें न लगती देखा।' – ज्ञा १०.३३३.
वि. व्यर्थ; निष्फळ.

वांड वि. व्रात्य; हूड; खोडकर; उनाड. [क. उंडिग; सं. वंड]

वांडे न. विक्रीचा माल; मालाचा साठा. [सं. वाणिज्य]

वांडे न. रहाटाच्या माळेचा लोटा, मडके.

वांडे न. १. अचानक लाभ; घबाड. (कु.) २. रखेली; उपस्त्री.

वांड्याचे वांडे सगळा माल; पूर्ण साठा.

वांत–ती स्त्री. १. ओकारी; ओक; ओकलेला पदार्थ. २. ओकण्याची क्रिया. [सं. वम्]

वांदर, वांदरखट, वांदरतेल इ. पहा : **वानर** इ.

वांदे वि. वद्य (पक्ष) : 'कार्तिक २ वॉदे' – बांदोडे शिला १.१०. [सं. वद्य]

वांधा–धे पु. न. देण्याघेण्यासंबंधीचे वादविवाद, तंटा; तक्रार; भानगड.

वांधा पु. मिरचीवरील एक रोग. – कृषि ५७०.

वांधे न. १. बांडगूळ. २. तक्रार; वांधा. (को.)

वांब स्त्री. नदीच्या काठी वाढणारी एक कडू पानांची वेल.

वांब पु. स्त्री. (भारामुळे येणारी) बधिरता; जडत्व; पेटके; वळ; गोळा.

वांब पु. एक बिन कल्ल्याचा, गोड्या पाण्यात सापडणारा मासा. – प्राणियो ७६. [हिं. बाम]

वांब वि. दोन किंवा अधिक वेताची (गाय, म्हैस).

वांबणे पहा : **ओंबणे**

वांब(बा)ळ, वामळ स्त्री. मळभ; अभ्र; कुंद, दमट हवा. (क्रि. असणे, जाणे, पडणे इ.)

वांभेरे न. सापाला टोचून सांधी बिळातून बाहेर काढण्याचे काटेरी हत्यार. पहा : **कांबेरू**

वांशिक वि. १. वंशासंबंधी; कुळासंबंधी; घराण्याविषयी. २. बांबूचे; कळकासंबंधी.

न. घरावरील वाशांची रचना; घराच्या छपराचा सांगाडा. [सं. वंश]

वि उपसर्ग १. वियोग, असंधान (उदा. विगत, विघटन); प्रतिकूलता, पराङ्मुखता (उदा. विमनस्क); जाती, भेद (उदा. विभाग); विपरीतभाव, विरुद्धता (उदा. विलोम). २. केव्हा–केव्हा स्पष्टीकरणासाठी किंवा निरर्थकही जोडतात. ३. वैशिष्ट्य; आधिक्य. उदा. विनिपात, विहित : 'विनिर्मिलें झांकण अज्ञतेचें।' – वामन, स्फुटश्लोक ४ (नवनीत पृ. १३३). [सं.]

वि पु.स्त्री. १. पक्षी. २. गरुड : 'इच्छी कुलहितं नाग वि भाग न अर्पूनि संधि करवीना।' – मोउद्योग ३.४१.

वि–वि पासून सुरू होणारे शब्द इथे न आढळल्यास इ–ई मध्ये पहा.

विकच वि. १. उमललेले फूल. २. पसरलेले, वासलेले तोंड. ३. विखुरलेले केस. ४. स्पष्ट; प्रकट. ५. उज्ज्वल. [सं.]

विकच पु. १. बौद्ध भिक्षू. २. (ज्यो.) केतू हा ग्रह.

विकट वि. १. मोठे; प्रचंड. २. भयंकर; भयानक. ३. मोडलेला; छिन्न : 'तोचि सहस्रार्जुन साचार। विकटबाहो।' – कथा ३.१७.१९. ३. हिडीस स्वरूपाचे; कुरूप : 'पूजिती विकट दोंद। पशु सोंड गजाची।' – तुगा ४१६. ४. विरुद्ध; अघटित : 'क्षीराब्धी काळकूट। हें येकि परीचे विकट।' – अमृ ७.२८६. ५. अशुभ; अमंगल. (गो.) ६. कंटाळवाणे : 'सारखें सुख मनुष्यास विकट वाटतें.' – (लोहोकरेकृत) विसांवा ४४. ७. तीव्र : 'विकट केला मारू' – उह १७०१. ८. विशाल : 'ऐसा गणराज विकटु : देखता जाला' – रुस्व ९४३. (वा.) **विकटान्त, विकटोपर्यंत अध्ययन–** (देवपूजेच्या आरंभीचा 'सुमुखश्चैकदन्तश्च कपिलो गजकर्णक:। लम्बोदरश्च विकटो विघ्नराजो गणाधिप:।।' हा श्लोकही 'विकटो' पर्यंतच म्हणजे अर्धवट येणे. यावरून ल.) अगदीच थोडे, तोकडे, अपुरे अध्ययन, ज्ञान.

विकटोपशास्त्री वि. मठ्ठ; दगड; ठोंब्या.

विकडी स्त्री. चातुर्यपूर्ण, आलंकारिक भाषण, बोलणे : 'आतां असो हे विकडी।' – ज्ञा १०.६०. [सं. विकत्था]

विकण, विकणवा वि. १. कणरहित. २. (ल.) धान्याचा एकही कण जवळ नसलेला (शेतकरी) : 'मग फिटे दु:खाचा ठावो। तंव राहटवी रात्रीदिवो। विकणवातें कां रावो। जया परी।' – ज्ञा १८.५०४. [सं. विकण]

विकणाऊ पहा: **विकाऊ**

विकणे सक्रि. १. मोल घेऊन, किंमत घेऊन देणे. २. अर्पण करणे. ३. अंकित होणे.

अक्रि. १. काही किंमत घेऊन दिला जाणे; विनिमय होणे. २. (ल.) पटणे; मान्य होणे; चांगला व योग्य म्हणून चालणे. [सं. वि. + क्री; प्रा. विक्कणय] (वा.) **विकलेला असणे –** १. एखाद्याच्या अधीन, आज्ञेत असणे. २. (प्रेम किंवा कृपा यांनी) खुशीचा गुलाम असणे.

विकत–ता क्रिवि. मोल, किंमत, पैसा देऊन. (वा.) **विकत, विकतचा–ची–चे आळ, कज्जा, कलागत, कुरापत, खरुज, खोकला, घोर, पाप, पीडा, फजिती, मौत, रोग, लचांड, विघ्न, श्राद्ध –** आपल्या हट्टाने, मूर्खपणाने, पैशाने वगैरे ओढवून घेतलेला त्रास. **विकत घेणे** – प्रेमाने किंवा उपकाराने एखाद्याला गुलाम करणे. **विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करणे** – (मृताची उत्तरक्रिया, श्राद्ध करण्यासाठी वारस नसल्यास कोणीतरी त्या वेळेपुरता वारस होतो यावरून) आपल्यामागे काहीतरी उपद्व्याप, लचांड लावून घेऊन त्रास भोगत बसणे.

विकता १. पहा : **विकत.** २. विकणारा. ३. विकाऊ.

विकताईचा वि. विकत घेतलेला : 'गुरें विकताईच्या पेंढ्यांवर पाळावीं लागतात.' – बदलापूर २२.

विकतेकरी पु. स्वत: शेती न करता केवळ रोजच्या खाण्याचे, खर्चाचे जिन्नस विकत घेऊन निर्वाह करणारा मनुष्य.

विकथन न. बदनामी; निंदा; एखाद्याविषयी वाईट बोलणे. [सं.]

विकर पु. जिवंत पेशीत निर्माण होणारे आणि जैविक क्रिया जलद घडवणारे एक रासायनिक पाचक द्रव्य; वितंचक.

विकरण न. १. विकार; बदल. २. (व्या.) (संस्कृत भाषेत) गणाचा प्रत्यय. ३. उष्णतेचे, प्रकाशाचे किरण बाहेर टाकले जाण्याची क्रिया. [सं.]

विकरणे अक्रि. १. विकार पावणे; क्षोभणे : 'येरी ते दुर्मती जे। बहुधा असे विकरती।' – ज्ञा २.२४३. २. बिघडणे; मोडणे : 'ज्याचे हृदयींचे न विकरे ध्यान।' – एभा ३.८२५.

सक्रि. १. बिघडवणे. २. विकार, बदल उत्पन्न करणे.

विकरणे पहा : **विखुरणे**

विकरलेपण न. बदल; बदलाचा अनुभव :'मग जीवांचेनि मेळें : विकरलेपणाचें आठांगुळें केलें' – शिव ९०. [सं. वि + कृ]

विकरविणे सक्रि. प्रवृत्त करणे : 'ते अविक्रियातें विकरवी' – ज्ञाप्र ३८६. [सं. वि + कृ]

विकरा–री पु. स्त्री. १. विक्री. २. विकलेपणा; विकलेली स्थिती. ३. विक्रीचे उत्पन्न. [सं. वि + क्री – क्रय]

विकराल–ळ, विक्राळ वि. भयंकर; भयानक; हिडीस. [सं. वि + कराल]

विकर्तन न. (संगीत) आकर्षण करून ताणलेली तार तिच्या पहिल्या जागेवर आणणे.

विकर्षण न. ओढणे. [सं.]

विकल वि. १. असमर्थ; अधू; हीन; मोडका; विकृत; विरूप; क्षीण; व्यंग असलेला . २. विव्हल; शोकाकुल. ३. अपुरे; असंपूर्ण; साधनाच्या अभावी हीन अवस्थेला पोहोचलेले. ४. (फज्यो.) जन्मकुंडलीत अस्तंगत असलेला (ग्रह).

विकलता स्त्री. १. न्यूनत्व; वैकल्य. २. (संगीत) गाण्यात कमी-जास्त श्रुती लावणे. [सं.]

विकला स्त्री. १. चंद्रकलेचा साठावा अंश. २. वेळेचे एक परिमाण; अर्धी काष्ठा. ३. वर्तुळाच्या अंशाचा साठाव्या भागाचा साठावा भाग. [सं.]

विकलांग वि. १. विकृत; (शरीर इ. त) व्यंग असलेला. २. (ल.) अपुरा; उणीव असलेला; अपूर्ण. [सं.]

विकलेपण–णा न. पु. शरणागती.

विकल्प पु. १. भेद; फरक. २. विरोध; मतभेद. ३. विरुद्ध, प्रतिकूल, भिन्न मत. ४. अंदेशा; कुतर्क; आशंका; वाईट, चुकीचा तर्क. ५. संशयितपणा; संशय; अनिर्णय; मताचा, हेतूचा दुटप्पीपणा. ६. विचार; कल्पना; तर्क. ७. भ्रम. ८. (व्या.) एकापेक्षा अधिक रूपांचा किंवा नियमांचा स्वीकार. [सं.]

विकल्पणे अक्रि. संशयाने, भेदबुद्धीने विचार करणे : 'संकल्पित सृष्टी घडी। सवेंचि विकल्पुनि मोडी.' – ज्ञा १३.११४. [सं. वि+क्लृप्]

विकसणे अक्रि. उमलणे; उकलणे; फुलणे. [सं. विकसन]

विकसन न. उमलण्याची क्रिया. [सं.]

विकसित वि. १. उमललेले (फूल). २. विकास, भरभराट, प्रगती झालेले.

विकसितदृष्टि–ष्टी स्त्री. (नृत्य.) वरच्या पापण्या वर व खालच्या खाली ठेवणे व बाहुल्या स्थिर ठेवणे. हा अभिनय गर्व, राग, क्रूरपणा इ. चा दर्शक आहे. [सं.]

विकळ वि. १. दुःखित; गलितगात्र; दुःखी; विव्हळ; अधू. पहा : **विकल**. २. विसकटलेला; अस्ताव्यस्त : 'विकळ देखोनि दळभार। मागधवीरीं केला मार।' – एरुस्व १०.४२. ३. हतबुद्ध; असाहाय्य; हीन दशेला पोहोचलेला : 'भीमकी घेऊन गेला गोपाळ। ऐकोन विकळ पडियेला।' – एरुस्व १२.१.४. निस्तेज; निःसत्त्व : 'विकळ करि शिखंडीतें गुरुसुत...।' – मोभीष्म ८.२१. ५. उलट; विपरीत : 'तंव ग्रह नव्हता सानुकूळ। म्हणोनि तव बुद्धि विकळ।' – शनि ३७१. ६. उणा; अपूर्ण : 'जो साम्यचि परी विकळ। तो दृष्टांत नव्हे निर्मल।' – विपू ७.३३. ७. विसंगत; संबंधशून्य : 'मग इंद्रियांचें चेष्टित। विकळु दिसे।' – ज्ञा ५.५७. ८. जड; अस्पष्ट : 'यंयाती म्हणे वाचा विकळ। सांगो जातां होतसे।' – मुआदि २०.१३७. [सं. विकल]

विकळणे अक्रि. १. बुद्धीची ग्रहणशक्ती जाणे (म्हातारपण, विकार इ. मुळे). २. बारगळणे; भ्रम होणे; वेड्यासारखे चाळे करणे, बडबडणे. ३. अतिशय जेरीला येणे. ४. (दूध, दही, ताक) नासणे व फुटणे.

विकळा वि. विवर्ण; निस्तेज; फिकट (वर्ण, चेहरा).

विकळाप स्त्री. १. हातवारे. २. शारीरिक हालअपेष्टा. ३. विलाप. (गो.)

विकळी, विकळूत स्त्री. चिळस; किळस; शिसारी.

विकंपित वि. कापणारा; कंप पावणारा. [सं. वि + कंप्]

विकाऊ वि. विकण्यासाठी ठेवलेला, मांडलेला

विकार पु. १. बदल; स्थित्यंतर; पदार्थाचे, वस्तूचे बदललेले रूप. २. दुखणे; व्याधी; रोग; अस्वास्थ्य. ३. भाव; जिवाची साधी, नैसर्गिक स्थिती जाऊन आलेला कसलाही क्षोभ, बदल. उदा. मनोविकार इ. ४. विनाश : 'ब्रह्मयाचा हेत भवानी सुंदर। अंगुष्ठें विकार आणियेला।' – ब १२८. ५. विस्तार. – हंको. ६. भेद; प्रकार : 'आणि विकारांची जे वारी। ते विपरीत ज्ञानाची परी।' – ज्ञा १५.५२१. ७. परिणाम. – ज्ञा १७.५९. [सं.]

विकारक, विकारी वि. १. (रसा. शाप.) विकार करणारा. २. रासायनिक क्रिया घडवणारा. (इं.) ॲक्टिनिक. २. (तर्क.) ज्यांची क्रिया दुसऱ्यावर घडते ते. (इं.) एजंट. – न्यायप २९.

विकारणे अक्रि. आकाराला येणे; वेगळे रूप धारण करणे; विकसणे.

विकारवणे सक्रि. विकारवश करणे : 'बहु प्रकारें विकारवावें, चित्त तयाचें तपोवित्त हळु जपुनि घ्यावें। – अमृत, शुकचरित्र २१.

विकारी पु. साठ संवत्सरांपैकी तेहतिसावे संवत्सर.

विकारी वि. १. विकारयुक्त; दुखणेकरी; आजारी; रोगाने किंवा मानसिक क्षोभाने पिडलेला. २. बाधक. ३. बदलणारे; परिवर्तनशील. ४. नाशवंत. [सं.]

विकार्य वि. रूपांतर किंवा बदल करण्यायोग्य. [सं.]

विकाल पु. अपराह्न; भलती वेळ; विलंब; अवेळ. [सं.]

विकास, विकासन पु. न. १. उमलणे. २. प्रफुल्लितता. ३. विस्तार; वाढ; परिणती. [सं.]

विकासणे अक्रि. १. उमलणे; फुलणे; उकलणे. २. शोभणे : 'वात्सल्य मोठें तुजला विकासे।' – सारुह १.३. ३. प्रगती होणे.

विकासवाद पु. १. अनुक्रमाने होणारी वाढ; गुणोत्कर्ष; गुण-परिणामवाद. २. प्राणी हीन अवस्थेपासून उच्च अवस्थेपर्यंत जातात असे मत; उत्क्रांतिवाद. [सं.]

विकासित वि. उमललेला; विकसित. [सं.]

विकासी वि. प्रफुल्लित करणारे, होणारे. उदा. चंद्रविकासी कमळ.

विकिर पु. १. श्राद्धविधीत ब्राह्मणभोजनानंतर पिंडदानाच्या वेळी ब्राह्मणांच्या उष्ट्या पानाजवळ देतात तो घासभर बळी. २. प्रसरण; पसरणे.

विकि(की)रण न. १. पसरणे; विखुरणे. २. फैलावणे. ३. (शाप.) पृथक्करण. उदा. प्रकाशविकिरण. [सं. वि + कृ]

विकिरणे १. पसरणे; विखुरणे. २. उडवणे; फेकणे. [सं. वि + कृ]

विकि(की)रपिंड पु. १. धर्मशास्त्रदृष्ट्या अनधिकारत्वामुळे असंस्कृत मृत पितरांना उद्देशून श्राद्धाच्या वेळी विकिरलेली भाताची मूठ.

२. (निंदार्थी) विकृत, कुरूप मूल. [सं.]

विकि(की)रवत् क्रिवि. १. विकिरलेल्या भाताच्या मुठीसारखा. २. (ल.) अनादराने; उपेक्षेने. [सं.]

विकीर्ण वि. पसरलेला; विखुरलेला. [सं. वि + कृ]

विकुंचित(करण) न. (नृत्य.) डावा हात आकुंचित करून बाजूला ठेवणे व उजवा हात नाकाच्या शेंड्यासमोर आणून ठेवणे. [सं.]

विकूणन (अधर) न. (नृत्य.) खालचा ओठ वळवणे. हा अभिनय वेदना, मत्सर, अपमान, आळस इ. दाखवताना करतात. [सं.]

विकूणित (नासिका) स्त्री. (नृत्य.) नाकपुड्या संकुचित करणे. हा अभिनय दु:ख, मत्सर यांचा द्योतक आहे. [सं.]

विकृत न. १. वीट; किळस; चिणका. २. पहा : **विकृती**

वि. १. रूपांतर, बदल झालेला. २. तिटकारा, वीट आलेला. ३. मन उडालेला; विन्मुख झालेला; तोंड फिरवलेला. ४. दुर्दर्श; विक्राळ. ५. बिघडलेला. ६. खाडाखोड केलेला (धनादेश).

विकृत जाति–ती (संगीत.) ज्या स्वरावरून एखाद्या जातीला तिचे नाव दिलेले असते व जिच्यात तोच न्यास स्वर असून बाकीच्या स्वरांबद्दल नियम नसतो ती जाती. या अकरा आहेत. [सं.]

विकृतणे अक्रि. विकार, बदल, बिघाड होणे.

विकृत स्वर (संगीत.) शुद्ध स्वरापेक्षा ध्वनीने कमी किंवा अधिक असलेला स्वर.

विकृति–ती स्त्री. १. दुखणे; आजार. २. बिघाड; विकार. ३. राग. ४. शंका; संशय. ५. मनातली खळबळ, खवळलेली वृत्ती; मनोविकार. ६. कुबुद्धी. ७. त्रास; दु:ख; आणि : 'आणि संसारदु:ख मूळवणें। विकृती विणें। – ज्ञा ४.२२२. ८. तिटकारा; किळस. ९. चोविसाव्या संवत्सराचे नाव. १०. प्रकृतीपासून पुढे होणारे पदार्थ; मूलभूत द्रव्याचे विकार. ११. द्रव्याचा रूपभेद; रासायनिक रूपांतर; कोणतेही पालटलेले रूप. १२. विपाक. (इं.) फर्मेंटेशन. १३. कंटाळा : 'संसाराची उपजे विकृती' – ज्ञाप्र ६८४.

वि. अक्राळविक्राळ; विकृत. [सं.]

विकृती वि. १. विकत घेतलेला (पदार्थ); घरी केलेल्याचा उलट. २. विक्रीसाठी ठेवलेले; विकण्याचे. [सं. विक्रीत]

विकृष्ट वि. ओढलेला; आकृष्ट. [सं.]

विकृष्टनासिका स्त्री. (नृत्य.) नाकपुड्या फुगवणे. वरील अभिनय तीक्ष्ण वास, भय, दु:ख, राग, जोराने श्वास सोडणे ह्या भावांचा द्योतक आहे.

विकेंद्रीकरण–भवन न. (शाप.) मुख्य ठिकाणापासून फाटाफूट; ऐक्य, एकाग्रता यांचा भंग.

विकोप पु. १. संताप; क्षोभ. २. अनर्थ; वाईट परिणाम. [सं.] (वा.) **विकोपाला–स जाणे–** १. अतिशय राग येणे. २. कुपथ्याने, विरुद्धोपचाराने अधिक बिघडणे (रोग, गाठ इ.). ३. चिरडीला जाणे (वाद, तंटा). ४. फाजील, बेसुमार होणे (किंमत, मोल). ५. अतिशय वरच्या दर्जाला पोहोचणे. ६. नष्ट होणे; नाश पावणे (मैत्री, प्रेम). ७. बिघडणे; नासणे (मसलत, बेत, उपाय, गोष्ट).

विक्या वि. विकणारा. (समासात) फळ–पान–भाजी इ. – विक्या .

विक्रतणे पहा: **विकृतणे** [सं. विकृति]

विक्रम पु. १. शौर्य; पराक्रम; मर्दुमकी. २. पूर्वीच्या खेळाडू, विद्यार्थी, कलाकार इ. पेक्षा अधिक केलेला पराक्रम.

विक्रम संवत्, शक १. विक्रमादित्याने स्थापलेला शक. याचा आरंभकाळ इ. स. पूर्व ५६. बंगाल वगळता उत्तर भारतभर हा शक चालू आहे. याचा वर्षारंभ कार्तिक शुद्ध प्रतिपदेला होतो. २. चौदाव्या संवत्सराचे नाव.

विक्रमा स्त्री. गतिप्रकार; विक्रांति. – अश्वप १. १८५. [सं.]

विक्रय, विक्रयण पु. न. विकणे; विकरा; मोल घेऊन देणे. [सं.]

विक्रयकर पु. घाऊक व किरकोळ विक्री व वायदा यांवर बसवलेला कर.

विक्रयकला स्त्री. माल खपवण्याची कला.

विक्रयानुशय पु. (कायदा) परतीच्या बोलीने केलेली खरेदी; जांगड. [सं.]

विक्रयालय न. प्रदर्शनाचे व विक्रीचे दुकान; (इं.) एम्पोरियम.

विक्रा पहा : **विकरा**

विक्राळ वि. भयंकर; भयावह. [सं.विकराल]

विक्राळनामा वि. खालच्या व वरच्या जबड्याचे दात लांब असणारा (घोडा). घोड्याचे एक अशुभ चिन्ह.

विक्रांत वि. प्रतापशाली; शूर; पराक्रमी. [सं.]

विक्रिया स्त्री. १. बदल; विकार. २. चित्तक्षोभ. ३. विकर्म (थट्टा इ.). [सं.]

विक्रीडित न. लीला; खेळ. [सं.]

विक्रेता वि. विकणारा. [सं.]

विक्रेय वि. विकला जाण्यायोग्य; विकाऊ. [सं.]

विख पहा : **विष**

विखण वि. विषम; विजोड; अपूर्ण. (गो.) [सं.विषम]

विखणे न. विषार; विष.

विखणे–णं न. एक हत्यार. पहा: **विखंड**

विखमोगरा–री पु.स्त्री. मोगरीची, जाईची एक जात.

विखर वि. विषारी.– शर.

विख(खु)रणी स्त्री. इकडे-तिकडे पसरणे इ.

विखरणे उक्रि. १.अव्यवस्थित रीतीने इकडे-तिकडे पसरणे; उधळणे. २. निष्काळजीपणाने पसरणे; नीट विंचरलेले नसणे (केस इ.). ३. चेंदामेंदा, तुकडे करून फेकून देणे.

विखरवणी न. १. विषाचे पाणी. २. (ल.) पावसाळ्यातील अगदी पहिली वृष्टी. (हिने पीक खराब होते, तेव्हा हिच्यानंतर लगेच दुसरी चांगली वृष्टी पाहिजे असते.)

विखरा पु.१. विखरलेली स्थिती. २. पसारा; अस्ताव्यस्त पसरलेल्या वस्तू. ३. उधळपट्टी; खर्च : 'ओटीभरणाचा गजर पुढे आहे । द्रव्याचा विखरा ।' – पला ९२.

विखळ वि. अति दुष्ट; दुराचारी : 'मीच विखळ मीच विखळ । येर सकळ बहु बरें।'– तुगा ३९४७.

विखळणे पहा : **विखुरणे**

विखंड न. स्त्री. औत; हत्यार (शेतकामाचे इ.). [सं.वि + खंड]

विखंडणे सक्रि. १. फोडणे; तुकडे करणे; तोडणे. २. ताटातूट.

विखंडन न. १.अणुकेंद्रकाचे विस्फोटन. २. स्फोटकाभोवती धातूचे आवरण असल्यास त्याचे तुकडे होऊन ते जोराने फेकले जाण्याची क्रिया. ३.तुकडे-तुकडे होणे.

विखार पु. १. विषांश; विषारी गुण (सापाचा, वनस्पतीचा). २. विषाचा विकार, उपद्रव; विषबाधा. ३. साप; सर्प : 'परपीडेविषयीं तत्पर। जैसे विंचू आणि विखार ।'- दास ५.३.९१. ४. विषारी पदार्थ; विषासारखी वस्तू : 'चंदन आगरु नाना उपचार । गमती विखार हरिवीण ।'- ब १६०. [सं.विषार]

विखारणे अक्रि. विष चढणे; विषबाधा होणे.

विखारा पु. तालीमखाना; विषारी औषध.- बदलापूर ३४०.

विखारा-री वि. विषारी (प्राणी, औषध इ.).

विखाहार पु. साप. पहा : **विखार**

विखी शअ. विषयी. [सं.विषये]

विखुरणी, विखुरी स्त्री. पखरण; इतस्ततः पसरणे.

विखुरणे क्रि. १. पसरणे. २. तळमळणे : 'आम्हां नाहीं त्याचा घडला आठव । त्याचा बहुजीव विखुरला ।'- तुगा ६०६. ३. फुटणे : 'ऐकोनि पाषाण । विखुरतसे ।'- गुच १.१३८.

विखु(खू)री स्त्री. १. प्रसार. २. पसारा : 'चांदाचियां दोंदावरी। होत चांदणियाची विखुरी ।'- अमृ १.५६.

विखो पु. विषय : 'हा प्रकृतीविखो आघवा । तुवां मागां परिसिलासे पांडवा ।'- ज्ञा ९.९९. [सं.विषय अप.]

विखोचणे सक्रि. टोचणे : 'हें असो, पर्वताचिये हृदइचें। पर्जन्यधारी न विखोचे ।'- ज्ञा ९.१२५.

विखोरा पु. गाठोडे : 'कुंपीचा विखोरा घेतला'- गोप्रच १७४.

विख्ख न. १. विष; विख. २. अतिशय कडू पदार्थ. ह्याअर्थी 'कडू' या शब्दासह येतो.

विख्यात वि. सुप्रसिद्ध; नामांकित. [सं.ख्या=सांगणे]

विख्याति-ती स्त्री. प्रसिद्धी; कीर्ती. [सं.]

विख्यापन न. १.विवरण; स्पष्टीकरण. २. जाहीर करणे. [सं.]

विगटणे अक्रि. भिडणे : 'त्यास विगटले ।'-ऐपो २६९.

विगडणे सक्रि.बिघडणे; मोडणे. [सं.वि + घट्]

विगडणे क्रि. मोकळा, उघडा करून ठेवणे, करणे : 'विगडुनि ठेविति मद झगड्या।'- आ गोरसक्रीडा २. [सं.वि. + घट्ट]

विगत वि.१. गेलेला; गत. २. वेगळा केलेला; वियुक्त. ३.(समासात) ज्याचे गेलेले आहे असा. जसे : - विगतप्राण-स्त्री-संपत्ती इ. [सं.]

विगत न. अहवाल; तपशील. (गुज.) [सं., युक्त]

विगतवार क्रिवि. साद्यंत; तपशीलवार. (सिं.गुज.) [गु.]

विगतविषय वि. विरक्त. [सं.]

विगतश्रीक वि. १. भिकेला लागलेला. २.दुर्दैवी. [सं.विगत + श्री]

विगमन न. (तर्क.) ज्यात एक किंवा अनेक विशेष गोष्टींच्या निरीक्षणाने सामान्य नियम स्थापित करण्यात येतात ते अनुमान. थोड्या गोष्टींचे निरीक्षणावर आधारित सर्वसामान्य निष्कर्ष काढण्याची पद्धत. [सं.]

विगर्हणा स्त्री. निंदा; तिरस्कार. [सं.गर्ह्]

विगलित वि. १. पडलेले; गळलेले; टाकलेले; सांडलेले (फूल, फळ). २. [अ] (समासात उत्तरपदी) ज्यांचे पडलेले आहे असा. उदा. दंत-केश इ. - विगलित. [आ] (समासात पूर्वपदी) विगलित-धैर्य -पर्ण इ. ३. शिथिल; ढिला झालेला; खचलेला; अशक्त व थलथलीत; ताजेपणा, कडकपणा गेलेला. ४. घट्ट; दृढ. (वि =विरुद्ध असा अर्थ घेऊन): 'विगळित मन माझें तूं करी देवराया।'-दावि ४८२.[सं.]

विगीत न. गायन; गाणे. [सं.]

विगीत वि. नीच; हलकट; दुष्ट; अधम; वाईट. [सं.]

विगुण पु. १. विरुद्ध किंवा न जुळणारा गुणधर्म इ. २. दोष; अपराध. वि. १. भिन्न गुणांचा २. विरुद्ध; प्रतिकूल गुणांचा. ३. ज्याचा गुण दूषित, भ्रष्ट आहे असा; गुणहीन. [सं.]

विगुं(गु)तणे क्रि. १. गुंतणे; अडकणे. २.गढणे; मग्न असणे. ३. स्पर्श करणे; भिडणे : 'पारंब्या भेदूनियां धरा । धराधरा विगुंतल्या।' - एभा १२.१५. ४.जडणे: 'चीत चैतन्यी वीगुतले...।'- धवले ६२.

विगोवा वि. गुंत्यातून सोडवणारा : 'सिहाणेआंदेवां विगोवा ।'- शिव १५३.

पु. गुंत्याची सोडवण : 'विगोवा जान जाना '- गरा २५२. [सं.वि + ग्रंथ]

विग्रह पु. १. युद्ध; लढाई; भांडण. २. परमात्म्याचा अंश; स्थूल देह, शरीर. ३. (व्या.) समासान्तर्गत शब्दांचा संबंध व्यक्त करून दाखवण्याची रीत; समासाची किंवा शब्दाची फोड. याउलट संधी. ४. अवतार. ५. (महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणे) ब्रह्मांडस्थ देवतांनी सृष्टीत घेतलेला अवतार.

विग्रही वि. १. करणारा; पसरवणारा; मांडणारा या अर्थी: 'लीलाविग्रहि अवतारी हा।'- उद्धवचिद्धन, नागनाथचरित्र १५. २. भांडण करणारा, लावणारा. [सं.]

विघटक पु. मृत शरीरांचे व टाकाऊ पदार्थांचे विघटन करणारे.

विघटणे सक्रि. पहा : **बिघडणे**

अक्रि. तुटणे : 'सवधुर वीघडिली।परब्रह्माची ।'- भाए ९०. [सं.वि + घट्]

विघटन न. १. मोडून, फाडून, फोडून, आपटून तुकडे करणे. २. सामान्यतः फट; फूट; भेग; फाटणे. ३. (रसा.) पृथक्करण.

विघटनात्मक वि. (शाप.) मूळ पदार्थाचे पृथक्करण होऊन तो मूळ स्वरूपात नाहीसा होईल असे.

विघटित वि. १. फोडून तुकडे केलेला. २. भग्न. ३. दूर केलेला. [सं.]

विघड पु.१.(श.व ल.) भाग, अवयव यांची फूट; भेद; पृथक्करण. त्यामुळे होणारी अव्यवस्था, बिघाड (यंत्रे, अनेकावयवी रचना, संस्था, पक्ष इ. मध्ये). २. वियोग; ताटातूट; बेकी. ३. विकलता; विरूपता: 'कळां वोहट चढु । परि चंद्रि नाहीं विघडु ।'- भाए २९४. [सं.विघट]

विघडणे-ना न. स्त्री.बिघाड; भांडण : 'भणती शंभूसी विघडणें । एणेंची केलें।'- शिव १३०.

विघडणे उक्रि. १. नाश करणे; फोडून तुकडे करणे. २. बिघाड, खराब

करणे; नासणे. ३. ताटातूट, वियोग करणे : 'मंजुळ वदनीं बचनागाची कांडी । शेवटीं विघडी जीव प्राण ।'- तुगा ३००१. ४.सोडणे; टाकणे; दूर करणे : 'स्त्री कारणें विघडिलीं। सकळहीं जिवलगें।'- दास ३.२.५०.

विघडविणे सक्रि. शिथिल करणे : 'नाहीतें सोडवी । गात्रांतें विघडवी।'- ज्ञा ६.२१९.

विघडाविघड स्त्री. १. मोडून-तोडून टाकणे; नाश करणे; मोडतोड. २. बिघडविणे; खराब करणे. ३.बिघडवलेली, खराब केलेली स्थिती.

विघ(घु)रणे अक्रि. १.द्रवणे; वितळणे; विरघळणे; पातळ होणे. २. कमी होणे : 'पुष्टि लागे विघरों। कांति पाहे निसरों ।'- ज्ञा १३.७५६. ३. (ल.) गर्भगळित होणे : 'म्हणे, मागे जाय, द्रुत परिभवें शत्रु विघरे।'- मोरामायणे युद्धकांड. [सं.वि + घृ क्षरणे]

विघस पु. न. अतिथी इ. कांनी जेवून उरलेले. [सं.]

विघाटणे, विघाटित पहा : **विघटणे** इ.

विघात पु. १.मोडणे; फोडणे. २. मोडून-तोडून टाकलेली स्थिती. ३. नाश; बिघाड (कामाचा, मसलतीचा). ४. विघ्न. ५. पृथक्करण.- यंस्थि १४. [सं.]

विघातक, विघाती वि. नाशकारक. [सं.]

विघोटाई स्त्री. जमिनीचे क्षेत्र व कस पाहून त्या मानाने कर उगराणीची एक जुनी पद्धत. (बडोदे)

विघ्न न. १. अडचण; प्रतिबंध; अडथळा. २. संकट; आपत्ती. ३. (ल.) भूत: 'प्रहररात्रीसी विघ्न येईल येथें।'- रामदासी २.६६. ४. अपमृत्यू, उत्पात या अर्थी योजतात. [सं.]

विघ्नसंतोषी वि. दुसऱ्याच्या कामात विघ्न आल्याने आनंद वाटणारा.

विचकट वि. १. बीभत्स; अश्लील; वेडेवाकडे (भाषण). २. अश्लील स्वभावाचा.

विचकटणे सक्रि. १. ओढणे व फाडणे; जोराने, घाईने, वेडेवाकडे, अव्यवस्थित इकडे-तिकडे फेकणे किंवा ढवळणे, चिवडणे; ओरबाडून इ. छिन्नभिन्न करणे; विदारणे. २. पहा : **विसकटणे** ३. पहा : **उचकटणे** [सं.विष्कंदन]

विचकणी स्त्री. १. उघडणे; दोन्हीकडे करणे; विदारणे इ. २.('तोंडविचकणी'चे संक्षिप्त रूप) तोंड वेडेवाकडे करून वेडावणे.

विचकणे उक्रि १.उघडणे; दोहीकडे करणे, होणे; मोठ्याने किंवा विरूप व किळसवाण्या रीतीने पसरणे; वासणे. २.(ल.) उघडे करणे, पाडणे; जाहीर होणे, करणे (गुप्त दोष, व्यंगे). ३. (ल.) नासणे; मोडणे; भंगणे; बिघडणे. ४. (शब्दश:) पाकळ्या, पाने ओढून काढणे. ५. पहा : **विचकटणे** [सं.विक] (वा.) (विचकणे शब्दापूर्वी नाम जोडून अनेक वाक्प्रचार होतात. जसे :- **तोंड विचकणे** – १. बोलणे. २. वेडावणे; वाकुल्या दाखवणे. **दात, बत्तिशी विचकणे** – (उप.) हसणे.) (त्याचे) **विचकले–** (तो) नाश पावला; धुळीस मिळाला. **विचकून पाहणे** – सूक्ष्म दृष्टीने, बारकाईने पाहणे.

विचका पु. १. अव्यवस्थितपणाने इकडे-तिकडे फेकलेला, रचलेला किंवा कालवलेला ढीग (अन्न वगैरेचा). २. (ल.) विसकळलेली, नासलेली, भंगलेली, बिघडलेली स्थिती (कामाची इ.). ३. बिघाड; (नावाची, अब्रूची) विसकळलेली, उघडी पडलेली स्थिती. ४. घोटाळा; गोंधळ. ५. वाईट गोष्टीचे प्रदर्शन. [सं.विच्]

विचका पु. १. पांढरे फूल येणारा एक प्रकारचा गाठीचा वेल, वनस्पती. २. (प्र.इचका) शिंक्याचा एक साधा प्रकार.

विचकु(खु)रणे सक्रि. ओरखडणे; चिमटा घेणे; बोचकरणे; हातानखांनी ओढून फाडणे. [सं.वि + स् + कृ]

विचकु(को–खु)रा पु. १. नखांनी धरणे, तोडणे, ओढणे; ओरखडणी. २. चिमटा. ३. नखांनी ओरबडून केलेला व्रण; ओरखडा. [सं.विस् + कृ]

विचकोपा पु. ओरबाडलेली, विदारित, छिन्न अवस्था.

विचबंद वि. मध्ये दोरा बांधलेली (विडी). [हिं.बीच + बंद]

विचरण न. आचरण; वर्तन; चलन. [सं.]

विचरणे अक्रि. १. फिरणे; हिंडणे; भ्रमंती करणे; भटकणे. २. अनिर्बंध रीतीने वागणे. ३. संचार करणे. ४. वावरणे; व्यवहार करणे : 'निजाकारें विचरत । रविप्रकाशें असे वर्तत ।'- विपू ३.२७.[सं.वि + चर्]

विचळणे अक्रि. १. बावचळणे; भ्रमिष्ट, वेडे होणे: 'न निघे हा नंद विचळला म्हातारा।'- मोकृष्ण ३९.३१. २. मोडणे; सोडणे; सोडून जाणे : 'शास्त्रांचिये सोयरिके । विचळिजे येणेंचि एकें।'- ज्ञा १३.१६. [सं.वि.+ चल्]

विचक्षण वि. १. ज्ञाता; जाणता; दूरदृष्टी; शहाणा; बुद्धिमान. २. चिकित्सक; सूक्ष्मपणे व खोलवर चौकशी करणारा. [सं.]

विचक्षणा स्त्री. चिकित्सा; बारकाईची चौकशी; परीक्षा.

विचंब–बु पु.१.संकट : 'साधुसज्जनां विचंबु अडी ।'- एभा २३.३९८. २. गरज; चाड : 'मज काय तीर्थी विचंबु ।'- एभा २९.८०१.

विचंबणे न. श्रम; त्रास; कष्ट.

अक्रि. १. श्रम पावणे; कष्टात पडणे; कुचंबणे: 'तैसेनि आग्रहाचा पाइकु। विचंबे वायां ।'- ज्ञा ६.४९. २.विटंबना होणे : 'मग अनेगी जाच कणुका । विचंबिजे हा ।'- भाए ५०९. ३.विघ्न येणे.

विचार पु. १.कल्पनाशक्ती, बुद्धी यांचा व्यापार; शोध; अभ्यासपूर्वक चिंतन; खलबत; चर्चा; तारतम्य; विवेक; तर्क; मनन. २. विवेक; चिंतन; मनन करून केलेला निश्चय, निकाल, निर्णय, मत. ३. विधिनिषेध; महत्त्व : 'तुझं तुज नव्हे शरीर । तेथें इतरांचा काय विचार ।'-दास ३.१०.५३. ४.घोटाळा; विवंचना; त्रास; कटकट :'पृथ्वीप्रलय होतो तैसा विचार जाहला.'- भाब १५. ५. गोष्ट; हकिकत; खरी स्थिती : 'कळतां तेथिचा विचार।'- दास ८.८.४३. ६. मत; अभिप्राय; बेत :'परंतु पुजूं नये हा विचार । कोठेंच नाहीं।'- दास १.६.१३. ७. युक्ती; उपाय; मनसुबा; मसलत : 'दयानिधि ऋषेश्वरू। सांगता झाला विचारू।'- गुच ३४.१६. ८.वर्णन : 'याहीं वेगळे आणीक गुरू । ऐक तयांचा विचारू।'- दास ५.२.६९. ९. इच्छा; मर्जी; मनोदय. [सं.]

विचारक वि. विचार करणारा; विचारी; शोधक.

विचारण न. शोध; चिकित्सा; विवेक.

विचारणा स्त्री. १. शोध; चौकशी; विचार; तर्क; कल्पना. २. पंचाईत; चिंता; काळजी; गूढ. ३. व्यवस्था; तजवीज : 'लग्नविचारणा न पुसता मांडिली ।'– सप्र २.३७. ४. सप्तभूमिकांपैकी दुसरी भूमिका.– हंको.

विचारणीय वि. १. विचार करण्याजोगे; शोध, तपास, चिकित्सा करण्यासारखे. २. विचारण्यासारखे; माहिती मिळवण्याजोगे.

विचारणे उक्रि. १. प्रश्न करणे; चौकशीसाठी पुढे मांडणे; चर्चा करण्यासाठी प्रस्तावना करणे. २. परामर्श घेणे; विचारपूस करणे; परिस्थिती वगैरेसंबंधी सहानुभूतिपूर्वक, मदत करण्याच्या दृष्टीने चौकशी करणे. ३. आदर दाखवणे; आज्ञा पाळणे; काळजीपूर्वक लक्ष देणे. ४. महत्त्व देणे; पर्वा करणे; किंमत देणे. ५. विचार, चौकशी, तपास, चर्चा करणे. ६. चालवणे; चालू करणे : 'याचेनि वीर्यें स्त्रियेच्या पोटीं। संतती विचारूं गोमटी ।'– मुआदि २४.३४.

विचारणे अक्रि. चिंतन, मनन, विचार करणे : 'विचारिल्यावीण करूं नये तें।' – सारुह ३.२. [सं.विचार]

विचारपूस स्त्री. १. वास्तपुस्त; चौकशी; शोध. २. परामर्श; कुशलप्रश्न.

विचारवंत–वान–शील, विचारी वि. सुज्ञ; विचार करून वागणारा.

विचारशास्त्र न. चक्रधरप्रणीत तत्त्वज्ञान; ब्रह्मविद्या.

विचारसंक्रांति–ती स्त्री. विचारांचे परिवहन; एक विचार दूरस्थ व्यक्तींच्या मनात एकाच वेळी येणे. (इं.) टेलेपॅथी.– नीतिशास्त्रप्रवेश. ३९०.

विचार्य वि. विचार करण्याजोगे.

विचिकित्सा स्त्री. १. बारीक चौकशी. २. शंका; संशय. [सं.]

विचित्र न. आश्चर्य.

वि. १. चित्रविचित्र; अनेक रंगांचा; नानारंगी; रंगीबेरंगी. २. आश्चर्यकारक; अचंबा वाटण्यासारखा. ३. अनेक, नाना प्रकारचा; तऱ्हेतऱ्हेचा. ४. विलक्षण; तऱ्हेवाईक; लोकविलक्षण. [सं.]

विचित्रवाडा पु. वैचित्र्य.(व.,ना.)

विचुक–का, विचूक वि. क्रिवि. असंबद्ध; भलभलते; अडखळणारे. [सं.वि. + चुक्]

विचुंबा पु. अचंबा; आश्चर्य; बुचकळा : 'विचुंबा पडला देखोनी दृष्टि।'– मुक्तेआदि ३०.१०८.

विचेतन वि. बेशुद्ध. [सं.वि + चेतना]

विचेष्टित वि. कृत्य; हावभाव; कृती. [सं.]

विच्छाय वि. पांढरे; फटफटित; फिक्कट; फिके : 'मुखकमल तियेचें स्वच्छ विच्छाय झाले।'– सारुह ३.५७. [सं.वि + छाया]

विच्छिन्न वि. १. तुटलेले; विभागित; भाग अलग झालेले. २. छिन्नभिन्न; पूर्ण मोडलेले; चुराडा झालेले; नष्ट. ३. (ल.) मोडलेला; उल्लंघन, अतिक्रमण केलेला (नियम, विधी इ.). ४. बंद पडलेला; स्थगित; लुप्त; खंडित; बाधित; प्रतिबंध, हरकत आलेला (वंशपरंपरेचे वतन, हक्क, व्यवहार, धंदा, स्थिती इ.). [सं.]

विच्छिन्नकिरण पु. पृथक्कृतकिरण.(इं.) स्पेक्ट्रम.

विच्छिन्नकिरणदर्शक पु. प्रकाशपृथक्करणयंत्र. (इं.) स्पेक्ट्रॉस्कोप.

विच्छेद पु. १. विभागणी; वियोग; भेद; विभाजनक्रिया किंवा विभाजित स्थिती; निरनिराळे भाग करणे. २. मोडतोड; फोडाफोड; चुराडा. ३. खंड; लोप. ४. पृथक्करण. (इं.) डिकाँपोझिशन. [सं.]

विच्छेदक वि. विच्छेद करणारा.

विच्छेदन न. भेद, छेद, पृथक् करणे.

विजन न. एकांतवास.

वि. लोकवस्ती नसलेले; ओसाड; निर्जन. [सं.]

विजना वि. कृश; बारीक; सडपातळ : 'सडक पातळ विजना कंबर पीतांबर नेसली।'– पला ४.३५.

विजय पु. १. जय; यश; जिंकणे. २. विष्णूचा एक द्वारपाल. ३. सत्ताविसावे संवत्सर. ४. अर्जुन. [सं.]

विजया स्त्री. १. भांग. २. तृतीया, अष्टमी व त्रयोदशी या तिथींना नामाभिधान. ३.आश्विन शुद्ध दशमी. या दिवशी दसरा हा सण असतो. ४. पार्वती; दुर्गा.

विजयाख्य वि. कर्णमूळस्थानीं दोन भोवरे असलेला घोडा. – अश्वप २५. [सं.]

विजयावर्त वि. कर्णमूळाचे ठिकाणी एक व उरावर एक असे भोवरे असलेला (घोडा).– अश्वप १.८८. [सं.]

विजयी वि. जेता; यशस्वी. [सं.]

विजरे पु. प्रांताधिकारी; पोर्तुगीज गव्हर्नर : 'गोवेकर विजरे यांचा व स्वामींचा स्नेह झाला आहे.'– शारो १.९२. [पोर्तु.इं.व्हाइसरॉय]

विजवटा वि. व्रात्य; हूड; खोडकर; दुर्गुणी. [सं.वीज + वत्, विद्या + वत्, विद्योतिन्]

विजवा स्त्री. अव. वीज याचे अनेकवचन : 'स्वरूपाचे तुटती तारे कडारे कड विजवा पडतील तुटून।'–पला ४.१७. [सं.विद्युत्]

विजळणे अक्रि. बिलबिलीत, चोथापाणी होणे; नासणे.[सं.वि + चल्]

विजाती, विजातीय वि. १. भिन्न जातीचा, वर्गाचा, प्रकारचा, कुळाचा; अन्य. २. विलक्षण; अपूर्व; नवीन व आश्चर्यकारक; तऱ्हेवाईक. ३. बहुविध; नानारूपी : 'परमेश्वराचे विजातीय चातुर्य, उपकारबुद्धी व अपारशक्ती हे गुण दिसून येतात.'– मपु ६, पृ.७७. [सं.]

विजार स्त्री. पायजमा. [फा. इझार]

विजावळी स्त्री. वेगळेपणा; भिन्नता: वेगळीक: 'तैं तरी गा सुवर्मा । विजावळी आत्मया कर्मा ।'– ज्ञा १८.२६९.

विजित वि. १. पराभूत; जिंकला गेलेला. २. युद्धात, द्यूतात मिळवलेला.

विजु–जू–जु,विजुका स्त्री. वीज.

विजुरेल पु. एक फिरंगी लष्करी अधिकारी; (इं.) व्हाइसरॉय.

विजुळी स्त्री. सायीसहित दही : 'विजुळी सोले आरोगणा केली–' गोप्रच २२६. [सं.विज्जल]

विजृंभणे अक्रि. १. जांभई देणे. २. प्रकट होणे; दिसू लागणे : 'आनंदसमुद्रीं संक्रीडत घडिघडि रोमांच विजृंभती।'– आविश्वा. [सं. वि + जृम्भ्]

विजोगत स्त्री. अपघात; आपत्ती; अनर्थ; दुःखकारक घटना. [सं. वि + युज्]

विजोगाचा दिवा (ल.) विचित्र, विलक्षण व्यक्ती.(व.)

विजोड वि. १. विशोभित; विषम; न शोभणारे; विसंगत. २. न जुळणारे;

न बसणारे किंवा जमणारे. [सं.वि + युज्]

विज्वर वि. भयंकर; प्राणान्तिक; दुर्धर; वाईट : 'संभाजी महाराज औरंगजेब यार्णी नेऊन विज्वर प्रसंग गुजरला.'- मराचिथोशा २.

विझण न. विझवण्याची, मालवण्याची स्थिती.

विझणे अक्रि. १. मालवणे; शांत, थंड होणे. २. (ल.) थंडावणे; शांत होणे; मिटणे; (भांडण, राग)दबणे. [सं. वि + शम्; सिं.उझणु]

विझणे उक्रि. भोक पडणे; छेदणे; टोचणे : 'विझती शस्त्रांचे घायटे।'- दास ३.७.४. [सं.विध्]

वि(विं)झणे न. सुताराचे छेद पाडण्याचे हत्यार. [सं.विध्]

विझला वि. विजेप्रमाणे चमकणारी : 'भूषण सकळ विझळांचा सांग।'- योसं २.५८.

विट पु. १. जार; उपपती. २. लुच्चा मनुष्य; ठक; सोदा; धूर्त व व्यसनी, छंदी मनुष्य. ३. गांडू; गांडभराऊ. ४. जावई. - हंको. ५. (नाट्य.) राजाचा मित्र; रंगेल मनुष्य. [सं.]

विटक-का-र, विटकर वि. १. नासलेले; विटलेले: 'आंबट तिखट विटक जाणोनि । करी त्याग स्वीकार ।'- स्वादि ५.२.३४. २. विटणारा; उडणारा; फिका पडणारा (रंग, कपडा).

विटक न. विड्याचे पान; विडा : 'करधृ विटका (रुक्मिणी)'- गरा ९१. [सं.वितक]

विटकणी स्त्री. १. वेडावणी; विचकणी; वाकुली. २. टवाळी; थट्टा.

विटक(कू)र स्त्री. १. वीट; विटेचा तुकडा; रोडा; टोला. २. विटेची पूड.

विटकरी वि. विटेसारख्या, विटेच्या पुडीसारखा (रंग).

विटकळणे अक्रि. सुटे होणे; फाकणे.

विटकुली स्त्री. लहान विडी.

विटगळला वि. विटका; वेडाविंद्रा; किळसवाणा. (व.)

विटणे अक्रि. १.निस्तेज, मळकट, फिके होणे; तजेला नाहीसा होणे. २. शिळे होणे; आंबणे; नासणे. ३. कोमेजणे; मलूल, म्लान होणे (एखादे झुडूप वगैरे अकाली किंवा अति वृष्टीमुळे); शिळपणे. ४. (ल.) कंटाळणे; तिरस्कार वाटणे; नकोसे होणे. [सं. विट = घाण, विट् = ध्वनी करणे, शाप देणे] (वा.) **विटण्यात येणे** - निकाल न लागता उलट चीड येणे.

विटप-पी पु. वृक्ष; झाड. [सं.]

विट(टे)बंदी वि. विटांनी बांधलेले.

विटवणी न. हानिकारक पाऊस; अकाली वृष्टी; अतिवृष्टी.

विटविट स्त्री. बिघाड; नाश; विसकटलेली अवस्था.

क्रिवि. किड्यांच्या बुजबुजाटाप्रमाणे; किडे घोंघावू लागतात तसे. [विट द्वि.]

विटंक न. घरटे; खुराडे : 'कपोत हुंकार करी विटंकीं ।'- सारुह ५.१४.

वि. १. घनदाट व उंच; निबिड; अवाढव्य. २. नकली : 'वोडवीली विटंकें बीकें'- गरा १९७. [सं.]

विटंब, विटंबना-णा पु. स्त्री. फजिती; मानहानी; अपमानकारक चेष्टा; विडंबन.

विटंबणे-बिणे उक्रि. १. उपहास, थट्टा, फजिती करणे; अपमानकारक चेष्टा करणे; लाजवणे. २. कुरूप करणे; बिघडवणे.

विटंबवाणे वि. अपमानकारक; मानहानीचे.

विटा पु. एक प्रकारचा भाला.

विटावणे सक्रि. वेडावणे : 'हरिदासासी विटावी ।'- एभा २३.२५८.

विटावीट स्त्री. फटफजिती : 'तेथ विटावीट आघवी । होइजे जे स्वभावीं।'- सिसं ४२.१०१.

विटाळ पु. १. दोष; अपवित्रता; अशुद्धता; विशिष्ट प्राणिमात्र, वस्तुजात यांमध्ये असणारी अशुचिता. २. अपवित्र, अशुद्ध वस्तूच्या संपर्काने निर्माण होणारा, लागणारा दोष; अस्पृश्य वस्तू, व्यक्ती इ. च्या स्पर्शाने लागणारा दोष. (क्रि. कालवणे) ३. स्त्रियांचा ऋतुस्राव; रज:स्राव. ४. अभाव, अलिप्तता इ. दाखवण्यासाठी हा शब्द योजतात : 'आम्हा विषयांचा विटाळु सदा ।'- शिव २०१.[सं. विष्ठा; प्रा. विट्ठा; विट्टाल] (वा.) ० **करून घेणे** - विधवेने केशवपन करून घेणे.

विटाळचंडाळ पु. नाना प्रकारचा, सर्वसामान्य विटाळ.

विटाळणे उक्रि. १. अशुद्ध, अपवित्र, दूषित, भ्रष्ट होणे, करणे. २. केवळ स्पर्श होणे; नाममात्र संबंध येणे.

विटाळशी स्त्री. रज:स्वला, ऋतुस्नात स्त्री.

विटाळी स्त्री. विटकर; विटेचा भुगा. (व.)

विटाळे न. विटा पाडण्याचा लाकडी साचा. [सं. इष्टकालय्]

विटी स्त्री. विटीदांडूच्या खेळात दांडूने उडवण्याचा लाकडाचा लहान तुकडा. [सं.यष्टि]

विटी स्त्री. विडा : 'मंदस्मित मुखभर विटी ।'- लक्ष्मीनारायण कल्याण, ग्रंथमाला. [सं.वृत् = वळणे, वीटिका]

विटीदांडू पु. विटी आणि दांडू घेऊन खेळण्याचा एक खेळ.

विटेकरी पु. वीट नावाचे विटेच्या आकाराचे शस्त्र धारण करणारा.

विटोरिया पु. बुरखुंडा; भुट्टा : 'जैसे दाणे काढी कणसाचे । मग काय प्रयोजन विटोरियाचें।'- अफला २९.

विटोला पु. तात्पुरता घातलेला चुला. (ना.)

विट्ट पु. १. अतिशय वीट. २. बेरंग; पाणउतारा; तेजोभंग; फटफजिती.

विठी स्त्री. तिफणीच्या दांडीला लावलेले लाकडाचे तुकडे.

विठीव स्त्री. पौरुष : 'आंगीं कस धरिती पण विठिवेवीण.'- गीचं २३.

विठोबारखमाई (विठ्ठल व रुक्मिणी.) (ल.) समवयस्क वधूवर; योग्य जोडपे.

विठ्ठल सवाशीण, सवाष्ण जिला विठ्ठल हाच एक आधार आहे अशी स्त्री; विधवा; विकेशा विधवा : 'गतभर्तृकेच्या मनांत तसला झोंक पाहिजे असेल तर तिने अगोदर विठ्ठलसवाष्ण झालें पाहिजे.'- आगर ३.११.

विडकुली स्त्री. लहान विडा; पट्टी.

विडवर न. निकृष्टावस्था; पूर्ण विनाश; फजिती; गाळण; हबेलंडी.

वि.क्रिवि. अव्यवस्थित; हिडिस; ओंगळवाणा; भ्रष्ट; निकृष्ट : 'राज्य झालें असें बहु विडवर। उपद्रव फार प्रजेसी ।'- कथासारामृत २७.७५.२५.४७. [सं.विट]

विडंब पु. डौल; थाटं; तऱ्हा; ठेवण : 'जेवीं आरिशाचें प्रतिबिंब ।...

सम विडंब दोहींचा ।'- एभा २४.३०९. [सं.]

विडंबन-ना न. स्त्री. १. उपहास; फजिती; टवाळी; थट्टा; चेष्टा. एखादी गोष्ट आहे त्यापेक्षा भिन्न स्वरूपात दाखवून तिची टवाळी करणे. (यात कुचेष्टा हा एकच हेतू नसून ती गोष्ट सुधारण्याचाही हेतू असतो.) २. नक्कल; सोंग; बतावणी. ३. दुसऱ्याचे रूप धारण करणे. [सं.]

विडंबित वि. १. फजित; उपहास केलेला, झालेला. २. ज्याची नक्कल, अनुकरण, बतावणी केली आहे असा.

विडा पु. १. नागवेलीच्या पानाची सुपारी, कात, चुना, लवंग, वेलदोडे इ. घालून केलेली पट्टी. २. विड्याचे साहित्य, पानसुपारी वगैरे. [सं.वीटिका; प्रा. वीठिआ; क. विडा; त. वीडि] (वा.) ०**उचलणे** - (पूर्वी एखादे बिकट काम करण्याचा प्रसंग आला असता दरबारात विडा मांडून ज्याला ते काम पार पाडण्याची इच्छा, ईर्षा असेल त्याने तो उचलावा अशी पद्धत होती. त्यावरून) कार्याची जबाबदारी घेणे; पण लावणे; प्रतिज्ञा करणे. ०**देणे** - १. निरोप देणे; पाठवणी, बोळवण करणे. २. कामावरून कमी करणे.

विडापाऊड पु. विडादक्षिणा; विडापैसा : 'विडा पाऊड भीतरां । घेऊनि रिघती गाभारां ।'- ज्ञा १८.४६.

विडाल-क, विडालक पु. न. मांजर. पहा : **बिडालक**

विडाळू न. पोटातील आतड्याचा भाग : 'विडाळू बोलिजे जवळीं । दोन अंगुळें ।'-कथा ५.७.१७५.

विडिंग न. वावडिंग. [सं. विडंग]

विडी-डि स्त्री. १. विडा; तांबूल : 'विडि करूनि समर्पि महासती ।'- नरहरि, दानव्रत १७. २. तंबाखू घालून केलेली पानाची सुरळी. ३. लग्नसमारंभात वधूवरांना तोडण्यासाठी देण्यात येणारी पानाची सुरळी, लवंग, खोबऱ्याची काचळी इ. ४. वसवी; शेंबी; मांडळ; वलय; कडे; लोखंडाची वाटोळी चापट कडी. (ही मुसळ, काठी, दिवटी यांच्या शेवटी, नांगराचा फाळ बसवण्यासाठी, चाकांच्या तुंब्याभोवती व तुंब्याच्या आतील भागाला रहाटाचा आस फिरण्यासाठी, जात्याच्या मायणीत, हत्याराच्या मुठीला वगैरे बसवावी लागते.) ५. वर्तुळ : 'विद्युल्लतेची विडी'- ज्ञा ६.२२४. [सं.वीटिका] (वा.) **विडिया मोडीत जाणे** - अभिमानाने पान खात-खात जाणे.

विडुळणे अक्रि. (एखादे फळ अति पिकल्याने, नासल्याने) बिलबिलीत, लिबलिबीत, थलथलीत होणे; (दूध,दही इ.) नासणे, चोथापाणी होणे. [सं.विड्वल]

विडूळ वि. १. आंबलेले; नासलेले; बेचव; पांचट; कुबट (दूध, दही, फळ इ.). २. निस्तेज; फिका; उतरलेला (चेहरा, मुद्रा). ३. मुळमुळीत; रुक्ष; पाणचट; नीरस (भाषण). ४. किळसवाणा; घाणेरडा; तिरस्करणीय (मनुष्य, कृत्य).

विडो(ढो-ढू)ळ, विढोळणे पहा : **विडूळ** इ.

विढार न. बिऱ्हाड. पहा : **बिढार**

विढाळ वि. तेज:पुंज; देदीप्यमान; चकचकीत : 'कीं मुक्ताफळांचा गोळा विढाळ ।'- रावि ४.

वि(वी)ण शअ. वाचून; शिवाय. पहा : **विना**

विणकर स्त्री. वीण; पोत; विणण्याची तऱ्हा; सफाई.

विणकर-री पु. विणणारा; कोष्टी; साळी.[हिं.बुनकर; त. वेदकारन्]

विणकाम न. विणण्याची कला, कृती. [क.नेवण]

विणचा(चां) क्रिवि. संध्याकाळी; सुमारे चार घटका दिवस. (राजा.)

विणची वेळ संध्याकाळची, तिन्हीसांजेची वेळ.

विणणावळ स्त्री. विणण्याची मजुरी.

विणणे उक्रि. १. गुंफणे; तंतू वगैरे एकमेकांत गुंतवून कापड, वस्त्रपट तयार करणे. २. पलंग, माचा, खाट इ. नवार, सुंभ, दोरी वगैरेंनी जाळीसारखे काम करून भरणे. ३. टोपली, चटई, वेणी वगैरे गुंफणे; तंतू, दोरे, पेड एकत्र गुंफणे. ४. तुणणे; दोरा भरणे; जाळीकाम करणे. [सं. वे; सिं.उणणु; गो. विणय; क. हेणे; हिं.बुनना]

विणत(क)र स्त्री. विणकाम; जाळी; वीण. (बडोदे)

विणती स्त्री. १. देवाला फूल, तांदूळ, सुपारी इ. चा लावलेला कौल. २. अशा कौलाला देवाने दिलेले उत्तर. [सं. विनति]

विणपी पु. विणकर. (गो.)

विणवणी स्त्री. कव्हणे, कुंथणे, वेणा देणे या क्रिया.

विणवणे अक्रि. कण्हणे; कुंथणे; कळा देणे.

विणसरणे सक्रि. छेदणे; विद्ध करणे : 'वेगें तुरकें आला तरि विणसरिला ।'- कला १५.

विणावणी स्त्री. १. उपाधी. २. यातायात : 'प्रपंचाचिया विणावणी ।'- विपू १.४३.

विणावणी स्त्री. वीण; विणकाम.

विणी स्त्री. वीण; प्रसव; निर्मिती : 'नवल रागरंगाची विणी'- रुस्व ३४७.

विणी पहा : **वेणी**

विणीव वि. १. विणलेले. २. वेणी घातलेले.

विणुढणे अक्रि. रुजणे; अंकुर येणे : 'अध्यासें बीज विणुढलें ।'- गीता १३.१७७.

विणू-णा-णे शअ. वाचून; खेरीज; शिवाय. पहा : **विना**

विणे अक्रि. १. प्रसवणे; जन्म देणे; उत्पन्न करणे (प्राणी, पशू, पक्षी, किडे यांच्या बाबतीत वापरतात. तसेच तिरस्कारार्थी मानवी स्त्रीच्या बाबतीतही योजतात.) २. (केळ वगैरे) प्रसवणे; कोका बाहेर येणे. ३. (डोळ्यांतून) पू येणे. ४. उत्पन्न, तयार करणे. [सं.वी]

विणे न. विणकाम केलेली बैठक : 'विणें गुढर दुसें : घालिताति' - मारुस्व ४५. [सं.वे]

विणेकरी पु. (गायन, कीर्तन इ. च्या वेळी). वीणा, तंबोरा धरणारा.

वितकळणे अक्रि. नासणे (दूध, दही, ताक). पहा : **विडुळणे**

वितणे अक्रि. घडून येणे; वर्तणे; गुजरणे: 'नवल वितलें पहा काई ।'- रास २.५५३. [सं.वृत्]

वितणे अक्रि. वितुळणे; पातळ होणे; विरणे. (को.)

वितत वि. पसरलेले; ताणलेले; ओढलेले. [सं.]

वितथ वि. असत्य; खोटे; अप्रमाण; निराधार; मिथ्या. [सं.वि + तथा]

वितरण न. १. देणगी; बक्षीस; लाभ. २. वाटप. [सं.]

वितरणे सक्रि. देणे; बहाल करणे.

वितरेक पहा : **व्यतिरेक**

वितर्क पु. १. विचार; कल्पना; अंदाज; युक्ती; योजना; बेत; तरंग. (या शब्दाचा बहुधा अनेकवचनी उपयोग करतात व अशा ठिकाणी त्यामध्ये अफाटतेची, भ्रमणाची, दूरान्वयाची झाक असते.) २. सविस्तर विचार; सर्व बाजूंचा, शक्याशक्यतेचा, परिणामांचा वगैरे विचार.

वितर्कण न. चर्चा; वाटाघाट; वादविवाद; साधकबाधक विचार.

वितर्कणे अक्रि. दूरवर तर्क चालवणे; काहीतरी अचाट कल्पना करणे; विलक्षण विचार करणे.

सक्रि. मोकळेपणाने चर्चा करणे; कसून वाद घालणे; साधकबाधक सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करणे. (गो.)

वितर्कित वि. सर्व बाजूंनी चर्चा, विचार केलेला.

वितर्कितदृष्टि–ष्टी स्त्री. (नृत्य.) खाली पाहणे, बुबुळ उंच करणे, डोळे वटारून पाहणे. (आठवण व विचार दर्शवणारा अभिनय.)

वितल न. सप्तपाताळांपैकी दुसरे पाताळ. [सं.]

वितवितणे अक्रि. चरफडणे; धुसफुसणे; आरडाओरड करणे.

वितवितला वि. क्रिवि. १. गैरशिस्तपणे; अजागळपणे; चिवडाचिवड करून (खाणे वगैरे). २. अजागळ; बावळा; गबाळ (मुद्रा, वर्तणूक इ.).

वितस्ती स्त्री. वीत; अंगठ्याच्या टोकापासून करंगळीच्या शेवटापर्यंत अधिकतम अंतर. [सं.]

वित(तु)ळणे अक्रि. १. विरघळणे; विघरणे; पाझरणे; द्रवणे. २. कोमेजणे; फिके पडणे; निस्तेज होणे. ३. (ल.) फाटाफूट, पांगापांग होणे; अस्ताव्यस्त पसरणे (आभाळ, सैन्य, ढग, राजकारण, पंचाईत, जमाव, अज्ञान वगैरे). ४. विरणे; फिसकटणे; मध्येच मोडणे; नाहीसे होणे; जिरणे (बेत, मसलती, युक्ती, कल्पना). ५. दयेने, करुणेने मन आर्द्र होणे; अंत:करण पाझरणे. [त.वेदल्; सं. वि + ताल]

वितंड वि. १. प्रचंड; विशाल; मोठे; प्रशस्त : 'भव्यरूप वितंड।'– दास १.२.१०. २. मिथ्या; खोटे : 'नियोजिली वितंडें । ताळासि येती ।'– ज्ञा १३.२१.३. विचित्र; अघटित; चमत्कारिक : 'यम वर देतसे वितंड कीं तूं सुख पावसी उदंड ।'– कथा ६.१६.१०५.

क्रिवि. कुटिल बुद्धीने; विनाकारण; अट्टाहासाने : 'येणें मांडिलेसे पाखांड । ऐसा निर्भर्त्सितां वितंड ।'– एभा २३.५१९. [सं.वि + तड्]

वितंडणे क्रि. १. वेगवेगळे करणे : 'ताट ताटांतु घाली । परजु परजांतु घाली । ऐसी वितंडौनि सांडी ।'– दृपा ४०. २. दूर सारणे : 'तप त्रसातें वितंडी'– मूप्र २९३४. ३.विरोध करणे : 'तो कवीस्वरबासी वितंडिला'– स्मृस्थ २०४. [सं.वि + तड्]

वितंडवाद पु. अट्टाहासाने खोटा पक्ष, खोटी बाजू स्थापन करण्यासाठी केलेला वादविवाद.

वितंडा स्त्री. (न्याय.) व्यर्थ काथ्याकूट, वादविवाद. [सं.]

वि(विं)ताणी पु. कोरकाम करणारा; शिल्पकार : 'विताणी नोवरा जोइया '– आंबे. शिला . १.२८. [सं.विद]

वितान, वित्ताण न. १. छत; चांदवा; छत्र; आच्छादन; मंडप. २. विस्तार; पसारा: 'विविध याग वितानें। – ज्ञा १५.१८९. ३. आकाश; शून्य. [सं.]

वितापात्र वि. उद्धट; वात्रट. (गो.)

विताल–ळ वि. बेताल; विसंगत : 'चालतां बैसे विताळाचा येऊनि धका।' – दावि २३.२.

विताळ वि. मोठ्या ताळूचे : 'एके दीर्घकंठे विताळें। विकटे एकें ।'– ज्ञा ११.१३९.

वितिगी स्त्री. फोडणी : 'पळीए वितिगी करी '– लीचउ ५०५.

वितुटणी स्त्री. ताटातूट; वियोग; फाटाफूट : 'तरी विषयेंद्रियमिळणी । करूनि घाये वितुटणी ।'– ज्ञा १६.८९.

वितुष्ट न. वैमनस्य; वाकडीक; बेबनाव; भांडण. [सं.]

वित्त न. १. द्रव्य; धन. २. मालमत्ता; संपत्ती; ऐवज. [सं.]

वित्तेषणा स्त्री. धनाचा लोभ, हव्यास. [सं.]

वित्रास पु. १. भय; भीती. २. दरारा.

वित्रिभलग्न न. (ज्यो.) पहा : **त्रिभोनलग्न**

विथर पु. पांगापांग; गोंधळ; विस्कटलेली अवस्था; (काम इ.चा) अस्ताव्यस्तपणा.

वि. १. ओळंब्यात नसलेली (भिंत, दगड, वीट).२.मिश्र; भेसळीचा; भलत्याच प्रकारचा (कपडा, वस्तू इ.). ३.(ल.) विचित्र; अनियमित; गैरशिस्त; असंबद्ध (वर्तन, भाषण, कृत्य). [सं.वि + त्सर्]

विथरणे अक्रि. अनिर्बंध, बेताल होणे.

विथविथ पु. कंडू; खाज. – मसाप २.३६७. (चित्पा.)

विथान(नी)क वि. १. उपद्रवकारक, द्वाड. २. दु:खाने गांजलेला.

विथानकणे अक्रि. भूतबाधा होणे.

विथानकैला वि. भूतपीडित; भुताचा संचार झालेला.

विथापाक पु. बिघडणे; (तयार होत असलेला पदार्थ, घटना) नासणे; बिघाड; नाश.

विद वि. जाणता; ज्ञानी.

विदगुडणे अक्रि. लचकणे; उसण, करक भरणे; मुरगळणे. (को.) [सं.व्यथ् + घुड्]

विदग्ध धावि. १. करपलेले; जळलेले. २. अर्धे कच्चे किंवा अर्धवट शिजलेले, करपलेले. (अन्न). ३. उत्तम शिजलेले; चांगले भाजलेले. ४. (ल.) कुशल; चतुर; हुशार; निष्णात. [सं.]

विदटणे अक्रि. दर्शन देणे : अवघ्या विदटे'– ज्ञागा ९२.

विदद्धी वि. आततायी; विक्षिप्त व खोडसाळ. (ना.) [अप. विदग्ध]

विदरा वि. कुरूप : 'शडांगुळें गेंगाणें विदरें ।'– दास ३.६.४२.[सं.विरूप]

विदरू न. लहान छिद्र, भोक.(को.) [सं.विध्]

विदविदणे अक्रि. १. मऊ, बिलबिलीत होणे (फळ इ.). २. चरफडणे; वितवितणे. [सं.व्यथ्]

विदविदा वि. बिलबिलीत झालेला; अविकलेला; अधिक झालेला; उतरलेला (आंबा इ. फळ).

विदळ वि. १. डाकलग; डाक लावलेले; हिणकस : 'विदळ बहु चोखा।

मीनलिया वाला एका ।'– ज्ञा १३.१००८. २. ज्यात दळ, गर, सार नाही असे (फळ इ.). [सं.वि + दल]

विदळणे सक्रि. नाश, निर्दालन करणे; मारणे. [सं.विदलन]

विदळा पु. माघात पिकणारा कुळीथ. – कृषि ३२७.

विदा पु. १. पाठवणूक; रवानगी. २. आशीर्वाद; शुभचिंतन. [अर.बिदाअ]

विदाई स्त्री. १.निरोप; पाठवणी. २. पाठवणी करताना दिलेली भेट.

विदारक वि. फाडणारा; चिरणारा.

विदारण–णा–णी न. स्त्री. विदारण्याची, फाडण्याची क्रिया (सर्व अर्थी).

विदारणीय, विदार्य वि. फाडण्यासारखे.

विदारणे उक्रि. १. फाडणे; चिरणे. २. फोडणे; तोडणे; तुकडे करणे. ३. ठार मारणे; कत्तल करणे : 'हिरण्यकश्यप विदारिला । भक्त प्रल्हाद रक्षिला ।'– तुगा २५२७. ४. (ल.) चिकित्सा करणे; उकलणे; उघडणे; फोड करून सांगणे. ५. पांगापांग, फाटाफूट, फाकाफाक करणे; पळवून, हुसकावून लावणे : 'जैसा गज घटा आंतु । सिंह लीला विदारितु ।'– ज्ञा १.१६२. [सं.वि + दृ]

विदारणे अक्रि. स्वैर, स्वच्छंदी होणे; उधळणे; व्यसनी होणे; अनिर्बंध वागणे. (कु.) [सं.वि + दृ]

विदारण्या वि. भांडण, चुगली लावणारा; चहाडखोर.

विदारित धावि. फाडलेले.

विदाह पु. १. ज्वलन; पेटणे. २. भयंकर आग, उष्मा. [सं.]

विदाहक, विदाही वि. १. जाळणारे. २. (ल.) पाचक; खाणारे. ३. (धातूला) गंज चढवणारे; नाशकारक.

विदित धावि. १. ज्ञात; माहीत; ठाऊक; प्रख्यात. २. कळवलेले; जाहीर केलेले; सूचित. [सं.]

विदिशा स्त्री. पूर्व, दक्षिण पश्चिम, उत्तर या चार मुख्य दिशांतील प्रत्येकी दोहोंपैकी उपदिशा; आग्नेय, नैर्ऋत्य, वायव्य व ईशान्य या दिशा.

विदीर्ण वि. फाडलेले; भग्न.

विदुर पु. १.धृतराष्ट्राच्या धाकट्या भावाचे नाव. २. अनौरस मूल; मिश्र संततीची एक जात. [सं.]

वि. ज्ञानी; शहाणा; माहितगार; अनुभवी. [सं.]

विदुर पु. एक अल्कमृत्तिका धातू. (इं.) बेरिलियम.

विदुषी वि.विद्वान स्त्री. [सं.]

विदुळान्न न.कदान्न; पातळ अन्न : 'वातळे : पीतळे: विदुळान्न: तांबोळ इतुके वर्जिजे'– विद २१. [सं.विहत + अन्न]

विदू वि. जाणता; जाणणारा; ज्ञानी : 'भावे क्रीडा सर्व विदूंस माजी ।' – मंगीश राधाविलास ३. [सं. विद्]

विदूषक पु.नाटकातील एक विनोदी पात्र; खुषमस्कऱ्या. [सं.]

विदूसणे सक्रि. तोडणे; फोडणे; नाहीसे करणे; खराब करणे; बिघडवणे : 'हिऱ्यारत्नाची जोडी विदूसलि ।'– ऐपो १४४. [सं.वि+ ध्वंस्]

विदेश पु. परदेश; भिन्न, अन्य देश. [सं.]

विदेशी वि.परदेशी; परदेशातून आलेला. [सं.]

विदेह–ही वि. १. देहरहित; अशरीर: 'विदेहासि देहधर्म । आरोपिती ।'– ज्ञा ९.१५६. २. देहातीत; देहाचा विसर पडलेला : 'तैसा देहींच जो असे । विदेह दृष्टि ।'– ज्ञा १८.४३५. [सं.]

विदेहमुक्ती – स्थिती स्त्री. १. ब्रह्मलोकातील अखेरची मुक्त अवस्था. २. देह व मी निराळे असे मानण्याची प्रवृत्ती, मनाची अवस्था. ३. देहाची जाणीव, स्मृती नष्ट झालेली अवस्था; ज्ञानी पुरुषाची निर्विकल्प स्थिती, समाधी. ४. (महानुभाव संप्रदायाच्या तत्त्वज्ञानानुसार) मायेने लावलेला आदिमळ.

विदेही वि. १. देहातीत; देहभान विसरलेला. २. ऐहिक किंवा शारीरिक विषयांची आसक्ती नष्ट झालेला. [सं.]

विदोर पु. हातमागावरचा ताणा आवळण्यासाठी हातखुंट्याला बांधलेली दोरी. [सं.]

विदो(द्दो,धो)शा वि. विध्वंस, नाश करणारा; उधळ्या[सं. विध्वंस]

विद्‌गद वि. 'विदग्ध'चे उच्चारांतर. – ज्ञा १०१.[सं. गद् = भाषण]

विद्ध धावि. १. वेधित; सच्छिद्र; भोक पाडलेला; टोचलेला. २. आकर्षित; गुंग केलेला. ३. दुखावलेला. [सं.]

विद्‌बावळी स्त्री. खरडपट्टी. (गो.)

विद्धोग पु.दैन्यावस्था.(गो.)

विद्यमान स्त्री. न. साक्षी; समक्षता; हजेरी.

धावि. १. अस्तित्वात असलेला; हयात असलेला. २. वर्तमान; सांप्रतचा.

शअ. देखत; समक्ष; हजेरीत; मार्फत; कडून. [सं.]

विद्या स्त्री. १. ज्ञान; विद्वत्ता. २. ब्रह्मज्ञान; ब्रह्मात्मैक्य–ज्ञान. ३. उपासनामार्ग; ज्ञानप्राप्तीचे साधन. ४. कला (चित्र, शिल्प इ.) ५. (महानुभाव तत्त्वज्ञानानुसार) देवतेने दिलेली विद्या. [सं.]

विद्यागुरु–रू पु.१. शिक्षण, शास्त्रादी ज्ञान, लौकिक विषयांचे ज्ञान देणारा गुरू. २. अध्यापक; कोणत्याही विषयात प्रावीण्य मिळवलेला विद्वान मनुष्य. [सं.]

विद्याधन न. १. ज्ञानरूपी धन, संपत्ती. २. अविभक्त कुटुंबातील भागीदाराने स्वत:च्या विद्येपासून मिळवलेले धन. हे स्वकष्टार्जित असल्याने खाजगी समजले जाते.

विद्याधर पु.एक देवयोनी. [सं.]

विद्यापीठ न. पहा : **विश्वविद्यालय** [सं.]

विद्यामार्ग पु. (महानुभाव तत्त्वज्ञानानुसार) देवतांच्या विद्या; त्यांच्या प्राप्तीचे मार्ग.

विद्यार्थी पु.१. शिकणारा; अभ्यास, विद्यार्जन करणारा. २. (ऐतिहासिक कागदपत्रांत) शागीर्द. ३. चेला; शिष्य; विद्येसाठी गुरूची सेवा करून राहणारा. [सं.]

विद्यालय न. शाळा.

विद्यावंत पु.१. भाट; स्तुतिपाठक : 'पटिसाळें विद्यावंतें होतीं'– लीचउ १६२. २. महानुभाव तत्त्वज्ञानानुसार, ज्याला देवतेची विद्या प्राप्त झाली आहे असा सिद्धपुरुष. [सं.]

विद्यावेतन न.शिष्यवृत्ती; विद्यार्थ्याला (विद्यार्जन काळात) दिली जाणारी आर्थिक मदत.

विद्युच्चक्र, विद्युत्प्रवाहमंडल न. वीजप्रवाहाचा वाटोळा मार्ग, (इं.) सर्कीट.

विद्युच्चुंबक पु.विजेच्या प्रवाहामुळे ज्यात चुंबकीय शक्ती निर्माण होते असा लोखंडाचा तुकडा; (इं.) इलेक्ट्रोमॅग्नेट.

विद्युज्जागृती स्त्री. विजेचे परिणाम दिसून येणारी स्थिती; (इं.) इलेक्ट्रिफिकेशन

विद्युत्–त स्त्री. वीज; एक नैसर्गिक शक्ती.

विद्युत्कण पु.विद्युच्छक्तियुक्त अत्यंत सूक्ष्म परमाणू; (इं.) इलेक्ट्रोन.

विद्युत्गतिशास्त्र न. विजेच्या गतीसंबंधीचे शास्त्र; (इं.) इलेक्ट्रोडायनामिक्स.

विद्युद्दर्शक पु. विजेचे अस्तित्व दाखवणारे यंत्र; (इं.) इलेक्ट्रोस्कोप.

विद्युद्दृक्शास्त्र न. विजेचा आणि दृष्टीचा संबंध अभ्यासणारे शास्त्र. (इं.) इलेक्ट्रोऑप्टिक्स.

विद्युद्धातुशोधनशास्त्र न. विजेच्या धातूंवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणारे शास्त्र; (इं.) इलेक्ट्रोमेटॅलर्जी.

विद्युत्पृथक्करण न.विजेच्या साहाय्याने पदार्थाचे पृथक्करण; (इं.) इलेक्ट्रोलिसिस.

विद्युत्प्रवाहमंडळ न. विद्युच्चक्र; (इं.) इलेक्ट्रिक सर्कीट.

विद्युत्संग्राहक, विद्युत्संचालक पु.वीज साठवून ठेवण्याचे पात्र. (इं.) अक्युम्युलेटर.

विद्युत्क्षेत्र न.विजेने व्यापलेली विद्युतभरित जागा; (इं.)इलेक्ट्रिक फील्ड.

विद्युन्मानसशास्त्र न.मनुष्याच्या चेहऱ्यावरून त्याच्या मनातील रहस्य शोधून काढण्याची विद्या.

विद्युद्वहन न. वीज वाहण्याची, जाण्याची क्रिया; (इं.) कंडक्शन.

विद्युद्वाहक वि.वीज वाहून नेणारा. (इं.) कंडक्टर.

विद्युद्विच्छेदन, विद्युत्पृथक्करण न. विजेच्या साहाय्याने पृथक्करण करणे, (इं.) इलेक्ट्रोलिसिस.

विद्युन्मापक पु.वीज मोजण्याचे यंत्र. (इं.) इलेक्ट्रोमीटर.

विद्युल्लता स्त्री. चमकणारी वीज. [सं.]

विद्योत पु. प्रभा; तेज; चकाकी. [सं.]

विद्रधि पु.क्षत; चरणारा व्रण; गळू; पूयुक्त फोड; काळपुळी. [सं.]

विद्रा,विद्रूप वि. विरूप; कुरूप. [सं.विरूप]

विद्रावक वि. वितळणारा; विरघळणारा.

विद्राव्य वि. वितळण्यासारखा; विरण्यासारखा; पाण्यात विरघळणारा. (इं.) सोल्यूबल.

विद्रुत वि.विरघळलेले; द्रवरूप झालेले. (इं.) डिझॉल्व्हड.

विद्रुम न.पोवळे; प्रवाळ. [सं.]

विद्रोह पु. शत्रुत्व; वैर. [सं.]

विद्वत्ता स्त्री. ज्ञान. [सं.]

विद्वाट स्त्री. नासाडी. (गो.)

विद्वान, विद्वांस वि. ज्ञानी; जाणता; पंडित; पारंगत; व्युत्पन्न. (समासात याचे विद्वत् असे रूप होते.) [सं.]

विद्वेष पहा : **द्वेष**

विध पु. प्रकार; तऱ्हा; जात; घाट; आकार. उदा. द्विविध, बहुविध इ. [सं.]

विध पु. पहा: **विधी**

विधडणे क्रि. बिघडणे; नासणे : 'प्रचीतिविण औषध घेणे । तरी मग धडचि विधडणें।' – दास १०.८.६. [सं.विघटन, वि + घट्]

विधणू स्त्री. अकाली झालेल्या प्रसूतीमुळे प्राण्यांच्या गर्भाशयात निर्माण होणारी शुष्कता. [सं. विदहन]

विधरणे क्रि. छिन्नभिन्न, घायाळ होणे : 'विधरे वृंद जितांचा दुःखभरे ।'– विक ३८. [सं. वि + ध्वर्]

विधर्मी वि. १. अन्य धर्माचा. २. अधर्माने वागणारा; पाखंडी.[सं.]

विधवरा पहा : **विजवटा**

विधवा स्त्री. जिचा नवरा मेलेला आहे अशी स्त्री. [सं.]

विधवार स्त्री. नाश; फडशा; उधळपट्टी. [सं.विविध +म. वाट; सं. वि + ध्वर्]

विधाता पु.१.निर्माणकर्ता; व्यवस्थापन, नियमन, स्थापना करणारा; सृष्टिकर्ता. २. ब्रह्मदेव. [सं.]

विधान न. १. स्थापना; आधान; स्वाधीन करणे; ठेवणे; २. कर्तव्य : 'पलंगीं पुतळ्याचें करा ग विधान ।' – प्रला १३९. ३. सांगणे; कथन; होकारार्थी व नकारार्थीपक्षी म्हणणे मांडणे. ४. आदेश देणे, नियम घालणे; स्थापित करणे. ५. आज्ञा; नियम; अनुशासन : 'मनुष्यावाचूनि विधाना । विषय नाहीं।' – ज्ञा १५.१७८. ६. (कामाला) लावणे; नेमणूक; योजना : 'जे ते वैदिक विधानीं। योग्य म्हणौनि ।'– ज्ञा १८.८१९. ७. विधी; पद्धती. उदा. व्रतविधान, दत्तकविधान. ८. (व्या.) उपसर्ग, प्रत्यय लावणे. [सं.]

विधायक, विधायी वि.१. स्थापना, नियमन, योजना, नेमणूक, व्यवस्था, उभारणी, जोडणी, आखणी करणारा. २. प्रत्यक्ष कृतिरूप; दृश्य परिणामी; कार्यकारी; चांगला परिणाम घडवणारे. [सं.धा]

विधारणे क्रि.वितळणे. – लोसाको.

विधि–धी पु. १. नियम; शास्त्राची आज्ञा; वेद-विहित क्रिया, कर्म इ. २. पद्धती; कर्म करण्याची रीत; धार्मिक कृत्याचा प्रयोग. उदा. दानविधी, स्नानविधी इ. ३. सामान्यतः नियम; आज्ञा; विधान; अनुशासन; आदेश; कल्प. ४. दैव; नशीब; प्रारब्ध : 'स्थिर न राहे माझी बुद्धि । तरी हा आपुलाचि विधि । सुजाण राया ।' – कथा ६.१९.१५९. ५. ब्रह्मदेव. ६. शास्त्रवचन; धर्मग्रंथातील वाक्य, आधार; प्रमाण. ७. तऱ्हा; प्रकार; रीत : 'गऱ्हवारे हा विधी । पोट वाढविलें चिंधी ।'– तुगा ६२५. ८. योजना; क्रिया : 'कवण कार्याचिये विधि ।'– एरुस्व ३.४३. [सं.]

विधिकारी पु. कायदा, नियम यांची अंमलबजावणी करणारा; शासक.

विधिनिषेध पु. अमुक बरे, अमुक करावे किंवा करू नये यासंबंधी नियम; बंधन. [सं.]

विधिपक्ष पु. एखादे मत स्थापन करून त्याचे मंडन करणारी बाजू; पूर्वपक्ष. [सं.]

विधिपूर्वक वि. शास्त्रात सांगितल्याप्रमाणे; यथासांग.
विधिभंजक वि.(व्या.) नियम मोडणारा; सामान्य नियमांत न येणारा; अपवादभूत.
विधिमंडळ न. कायदे, नियम करणारी संस्था, सभा.
विधिवाक्य, विधिलिखित, विधिलिपी न. स्त्री. नशीब; ब्रह्मलिखित. [सं.]
विधिवाचक धातुसाधित कर्तव्यबोधक, नियम घालून देणारे धातुसाधित. उदा. करावे, धरावे इ.
विधिविशेषण न. (व्या.) क्रियापदाबरोबर योजलेला गुणवाचक शब्द; विशेषणाचा एक प्रकार.
विधिवृत्ती स्त्री. प्रत्यक्ष कृती, क्रिया करण्यासाठी आज्ञा करण्याची पद्धती, रोख, तऱ्हा, स्थिती, नियमन.
वि. प्रत्यक्ष नियम, कृती, कार्य सांगणारे; अनुज्ञापक.
विधिसंकोच पु.अपवाद.
विधु–धू पु.१.चंद्र. २. (लेखनात अक्षरसंख्या) एक ही संख्या.[सं.]
विधुर पु.ज्याची पत्नी मेलेली आहे असा पुरुष.
न. दुःख; संकट : 'सर्वहि हेतु सुखाचा स्वापत्यांचा तसा न विधुराचा।'– मोआदि ३५.८. [सं.विधुर]
वि.व्यंग; अपूर्ण.
विधुराग्नि–ग्नी पु.बायको मेली तरीही ठेवलेला स्मार्ताग्नी.
विधुळणी स्त्री.धुळधाण; विध्वंस; नाश. [सं.विधूलन]
विधुळणे उक्रि.धुळीस मिळवणे; नाश करणे, होणे : 'आहाळी ते पूजा विधुळे ।'– ज्ञा १७.७. [सं.वि + धूलन]
विधूम वि. धूम्ररहित; धूर नाही असा. [सं.]
विधेय न.१. विधीने सांगितलेली गोष्ट; कर्तव्य. २. (व्या.) उद्देश्याविषयी वाक्यात जे सांगितले असते ते. [सं.]
विधेयक न. कायदेमंडळात मंजूर करून घेण्यासाठी मांडण्याचे एखाद्या धोरणात्मक नियमाचे प्रारूप.
विधेयवाचक वि.(व्या.)कर्मवाचक; उद्देश्यासंबंधी सांगणारे.
विधेयविस्तार पु. (व्या.) विधेयासंबंधीचा वाक्यातील अधिक भाग; वाक्यांश.
विध्यर्थ पु.(व्या.) धर्म, शक्यता, योग्यता इ. अर्थाचा क्रियापदाच्या रूपापासून होणारा बोध.
विध्वंस, विध्वंसन पु.न. मोडतोड; भंग; चुराडा; स्फोट; नाश.[सं.]
विध्वंसक वि. नाश करणारा.
विध्वंसणे उक्रि. नाश करणे; मोडणे, तोडणे इ.
विन–ना शअ.वाचून; शिवाय.
विनक–य न. पु. छावणी; तळ; राहुटी; तंबू : 'सेनेसमीप निवांत स्थान पाहून । विनक दीधलें आपुलालें।' – जै ७६.२९.
विनट न. चिन्ह : 'जेणें उरीं हालासि पांपरा । तेयाचें विनट वाहसी दातारा ।' – ज्ञा ११.१०५. [सं.]
विनट पु. १. प्रीती; आवड : 'मज कीरूं तुझाचि विनटु।'– भाए ८३. २. मित्र; खेळगडी; प्रेमाची, आवडीची व्यक्ती : 'संकल्पु ययाचा इष्टु। अहंकारू विनटु ।'– ज्ञा १४.११४.
विनटणे अक्रि.१. रंगून जाणे; मग्न, गर्क, तल्लीन, आसक्त, रममाण होणे; रमणे : 'कलत्र भावें विनटलीं।' – एरुस्व ३.४७. २.तन्मय होणे : 'विट्ठल हे नामीं विनटलों।'– नाम २०२५. ३. नटणे; शोभून दिसणे. [सं. वि + नट्]
विनटणे सक्रि. शरण जाणे : 'नामासि विनटला शिव' – ज्ञागा १६१.
विनदणे अक्रि. आवाज करणे : 'विनदत सुखशब्दें'– गरा १३७. [सं.वि + नद]
विनपाउली क्रिवि. अनवाणी : 'उपानहौ कीं विनपाउलीं : बीजें करीतु' – सव ४४६.
विनय पु. नम्रता; लीनता; सौजन्य; मृदुता; भलाई. [सं.]
विनयाधान न. कायद्याची अंमलबजावणी; नियमांचे पालन.
विनयी, विनयशील, विनत वि. १. नम्र; २. वाकलेला; नमलेला; कललेला. ३. नम्र; गरीब; लीन. [सं.]
विनवण–णी, विनवणूक स्त्री. प्रार्थना; विनंती; मिनतवारी.
विनव(वि)णे उक्रि. प्रार्थना, विनंती, आर्जव करणे. [सं. वि + ज्ञप्; प्रा. विण्णव; गु. विनवुं]
विनवणे अक्रि. कण्हणे; कुंथणे; विव्हळणे.
विनविले न. विनंती :'आतां माझें विनविलें : अवधारिजे' – शिव १४६. [सं. विनमित]
विनष्ट वि. नष्ट, नाश केलेला; नाहीसा केलेला. [सं.]
विनंती पहा : **विनवणी**
विना शअ. वाचून; शिवाय; खेरीज. [सं.]
विनाकारण क्रिवि. निष्कारण; व्यर्थ. [सं.]
विनाणी पु. सुतार : 'विनाणियाचे विदेसी। बांदावेना मंदिरासी ।'– खिपु १.३.८७.
विनाभाव पु. दुजाभाव; मतभेद; बिघाड.
विनायकी चतुर्थी प्रत्येक हिंदू महिन्यातील शुद्ध चतुर्थी. या दिवशी गणपतीचे व्रत करतात.
विनाश पु. उच्छिन्नता; नायनाट; विध्वंस; सत्यानाश. [सं.]
विनाशी वि. १. नाश पावणारे; जे नासते, कुजते, बिघडते ते . २. नाश करणारे; बिघडवणारे. [सं.]
विनास वि. नकटा; नाक नसलेला. [सं. वि. + नासा]
विनिगम पु. निश्चय; ठराव; निर्धार. [सं. वि + नि + गम्]
विनिगुहन न. (नृत्य.) ओठ लांब ओढून घेण्याची क्रिया. हा अभिनय अतिश्रमाचा द्योतक आहे.
विनिभ्रंशणे अक्रि. अपमान करणे : 'विनिभ्रंशौनि ऐसी दशेते पाववीले'– पंचो ९४.१४. [सं. विनि + भ्रंश्]
विनिमय पु. अदलाबदल; देवघेव; फेरमोबदल्याचा व्यवहार. [सं.]
विनियुक्त, विनियोजित वि. नेमलेला; योजलेला; लावलेला; ठेवलेला (नोकरी, काम इ. साठी). [सं.]
विनियोग पु. नेमणूक; योजना; आरोपण; उपयोग; व्यवस्था (काम,

कारण, उपयोग यावर).

विनियोगणे क्रि. खर्च, व्यवस्था करणे; योजणे.

विनिर्मुक्त वि.मोकळा; स्वतंत्र; बंधमुक्त.

विनीत वि. १. नम्र; लीन; निगर्वी.२. नियम, शिस्त वगैरे पाळणारा, मानणारा; ताब्यात, आटोक्यात राहणारा. ३. मनोविकार ताब्यात ठेवलेला; निग्रही. ४. शिकवलेला; शिस्त लावलेला (पशू वगैरे).

विनेता वि. मार्गदर्शक; उपदेशक; शिक्षक; पुजारी. [सं.]

विनोद पु. १.खेळ; क्रीडा; करमणूक. २. थट्टा; मस्करी; उपहास; चेष्टा. ३. कौतुक; चमत्कार : 'तैसा भला जाहला विनोदु। कथेचा इये ।'- ज्ञा ४.३. ४. (साहित्य.) गंभीर व खेळकर अशा दोन मनोवृत्तींचे मिश्रण. ५. सहजता. [सं.]

विनोदणे क्रि. विनोद करणे. [सं.]

विनोदी वि. गमती; थट्टेखोर; चेष्टेखोर; करमणूक करणारा; हसवणारा.

विन्मुख वि. १. पाठमोरा; तोंड फिरवलेला. २.(ल.) प्रतिकूल; अनिष्ट; अप्रसन्न (दैव इ.). ३. फजीत; लज्जित; गोंधळलेला. [सं.]

विन्यस्त धावि. ठेवलेला; स्थापित; निश्चित केलेला. [सं.]

विन्यास पु.१. ठेव; अनामत ठेवलेली रक्कम. २. व्यवस्था; रचना; स्थिती : 'तेंचि मऱ्हाटेनि विन्यासें ।' - ज्ञा १५.५९३. ३. विवेचन; प्रतिपादन; निरूपण; विस्तार: 'तैसेनि सांगों सोलिवें । विन्यासें गा।' - ज्ञा १५.६६. [सं.]

विन्हणे न. सुताराचे किंकरे. (गो.) पहा : **विंधणे**

विपक्वद्रव पु. (शाप.) ज्याचा विपाक झाला आहे असा द्रवपदार्थ; कुजलेले, नासलेले द्रावण. (इं.) फर्मेंटेड लिकर. [सं.]

विपचार पु. अनादर; अपमान; जिगजिग; त्रास; बिघाड. [सं.वि + आचार]

विपच्य वि. (शाप.) कुजलेला; नासलेला; विपाक झालेला. (इं.) फर्मेंटेड. - सेंपू २.४३.

विपट पु. स्त्री. न. वितुष्ट; वैषम्य; तेढ; वैर; वाकडे : 'कलिनें दाटूनि पाडिलें विपट।' -मोवन ४.९८. [सं.]

विपणन न. खरेदीविक्रीचा करार. [सं.]

विपणी स्त्री. बाजारपेठ. [सं.]

विपणे अक्रि. संपणे. लोपणे : 'संकल्पाची सांज जैं विपे ।'- ज्ञा ९.७२. [सं. वि + पद्]

विपतर वि.व्रात्य; खोडकर; दुर्गुणी; वेडपट.

विपति-ती पु. गरुड. [सं.]

विपत्-द् स्त्री. संकट; अडचण; आपत्ती. (समासात) विपत्काल-अवस्था इ.

विपत्ति-त्ती-त्य पहा : **विपत्-द्** [सं.] (वा.) **विपत्य करणे**- बेअब्रू करणे.

विपत्नीक वि. विधुर. [सं.]

विपथ पु. कुमार्ग; वाईट मार्ग.

विपदा स्त्री. अडचण; संकट. [सं.वि + पद्]

विपनणे क्रि. शास्त्रदृष्ट्या पाहणे. - शर. [सं.]

विपन्न वि. संकटात सापडलेला, पडलेला. [सं.]

विपराळ वि. उखर; जलशून्य; रुक्ष.

विपरिणमन न. बदल; फरक; रूपांतर. [सं.]

विपरीत वि. १. वस्तुस्थितीच्या उलट; विरुद्ध; उफराटे; विचित्र; भलता, २. मिथ्या; खरे किंवा आहे असे भासणारे (तत्त्व.) [सं.]

विपरीत भावना १. विरुद्ध किंवा भिन्न रूप, आकार, स्थिती वगैरे. २. प्रकृतीमध्ये पडलेला फरक. ३. एखाद्यासंबंधी बदललेली वृत्ती, कल्पना वगैरे. ४. (तत्त्व.) देहात्मबुद्धी; जीव व ब्रह्म यांमध्ये भेद आहे किंवा देह हाच आत्मा आहे अशा प्रकारची उलटी समजूत.

विपरीत लक्षणा व्याजोक्ती; औपरोधिक वर्णन.

विपर्यय पु. विपर्यास; विरुद्धता; उफराटेपणा. विरुद्ध, प्रतिकूल अवस्था; संकट; चूक; गैरसमज; उलटापालट वगैरे. [सं.]

विपर्यस्त पहा: **विपरीत**

विपर्यास पु.१. पहा : **विपर्यय**. २. बदल; फरक; अवनती. [सं.]

विपल-ळ न. पळाचा साठावा अंश; दोन पंचमांश सेकंद.[सं.विपल]

विपला(ळा)प पु. शोक; रडारड; हलकल्लोळ. [सं. विप्रलाप]

विपला(ळा)पणे अक्रि.१. शोक करणे. २. विडंबन करणे. न. उपहास : 'गीत विपलाणे'- गोप्रच १४१. [सं. विपर्यय]

विपसळा-ळ, उपसळ वि. द्वाड; व्रात्य; खोडकर.

विपसळो पु. उपद्रव; पीडा; त्रास (उंदीर, कुत्री इ. चा).[सं. उपसर्ग]

विपस्टा स्त्री. हालअपेष्टा; त्रास. (गो.) [सं. अपेष्टा]

विपक्ष पु. १. शत्रू; प्रतिस्पर्धी. २. विरुद्ध बाजू; प्रतिवादी. ३. विरुद्ध मत, अर्थ, गोष्ट. ४. (न्याय.) विरुद्ध उदाहरण; ज्यात प्रतिपादित वस्तूचा अभाव असतो अशी वस्तू. उदा. जलाशयात अग्नी असणे संभवनीय नाही कारण तेथे धूर नसतो.
वि. १. विरुद्ध; प्रतिकूल; प्रतिपक्षीय. २. निराधार; अप्रमाण; अप्रतिपादित (तत्त्व); निराश्रित (व्यक्ती). [सं.]

विपंची स्त्री. वीणा.

विपाइला वि. विरळा; क्वचित; एखादा; थोडा; अल्प: 'परि ऐसे भक्त विपाइले । बहुवस नाहीं।'- ज्ञा ७.१०२.

विपाक पु. १. परिणाम; शेवट; पूर्णत्वाला गेलेली स्थिती. (समासात) अन्न - कर्म इ. विपाक. २. पूर्ण वाढ; परिपक्वता. ३. कुजण्याची क्रिया; पदार्थाचे मद्यात रूपांतर होण्याची क्रिया. (इं.) फर्मेंटेशन. [सं.]

विपाड पु. भिन्नपणा.

विपाय-व पु. १. अपाय : 'तरी कैसा घडला जी विपावो । सुरतप्रसंगीं।'- कथा ५.११.१. २. दुर्मीळ योग, मेळ; असंभव : 'परि कैसे नीहि विपावो । असणियाचा ।'- अमृ ८.७. [सं. वि + अप + इ]

विपाये क्रिवि. क्वचित; कदाचित; दैवयोगाने : 'विपायें उमजलें होय निदें ।'- अमृ १.१४.

विपारणे अक्रि. खोडकर, व्रात्य होणे; स्वैर वागणे. [सं. वि + आ + पृ]

विपारा वि. १. हूड; हट्टी; द्वाड (मूल). २. कुरूप; विद्रूप; विकल; वेडपट; मूर्ख. ३. पायाळू; पायाकडून जन्माला येणारा; एक अपशब्द. [सं.विपरीत]

विपाश वि. बंधमुमक्त; फासातून सोडलेला. [सं.]

विपाळ पु. गंधर्व; अंतरिक्षातील राजा. [सं. वि + पाल]

विपिन न. अरण्य; रान; जंगल. [सं.]

विपुल वि. पुष्कळ; भरपूर. [सं.]

विपुलता, विपुळात स्त्री. समृद्धी; रेलचेल.

विप्र पु. १. ब्राह्मण. २. (सांके.) पैसा; द्रव्य, धन : 'विप्र रवाना जाला आहे तो पावलाच असेल.'- ऐलेसं ३२२५. [सं.]

विप्रकर्ष पु . अंतर; दूरपणा. [सं.]

विप्रकीर्ण (संयुक्तहस्त) पु. (नृत्य.) स्वस्तिकाकार हात मनगटावरून खाली सोडणे. [सं.]

विप्रकृष्ट वि. दूरस्थ; दूर अंतरावरील. [सं.]

विप्रतिपत्ति–त्ती स्त्री. मतभेद; भिन्न मतांतील वादविवाद. [सं.]

विप्रतिपन्न वि.१. विवादित; ज्याबद्दल मतभेद, वाद आहे असे. २. मतांचे खंडन करणारे; विरुद्ध किंवा भिन्न मताचा.

विप्रन्यास पु. जमिनीची आखणी; (इं.) ले-आऊट.

विप्रलंभ पु. (साहित्य.) शृंगाराचा एक प्रकार. यात नायक-नायिकेच्या विरहाचे वर्णन असते. [सं.]

विप्रलाप पु.१. आरडाओरड; भांडणतंटा; कोलाहल. २. वटवट; बडबड; टकळी. [सं.]

विप्लावणे अक्रि. प्रकट करणे : 'अर्थाचेनि अनाने । विप्लावलीं ।' - अमृ ८.१३. [सं. वि + प्लव]

विफल–ळ क्रिवि. निष्फळ; व्यर्थ; निरर्थक; फुकट.[सं. वि + फल]

विफळणे अक्रि. व्यर्थ, निष्फळ करणे.

विबुध पु. १. देव. २. पंडित; ज्ञानी पुरुष. [सं.]

विबुधप्रिया स्त्री. एक समवृत्त. चरणात अक्षरे १८. र, स, ज, ज, भ, र हे गण.

विबोध पु.जागेपणा; जागृती. [सं.]

विभक्त वि. १. पृथक, वेगळा केलेला; वाटणी झालेला; निराळा. २. दुष्ट; भक्ती नसलेला (भक्त).

विभक्ति–क्ती स्त्री. १. वेगळेपणा; तुटकपणा : 'विभक्ती सांडूनि भक्तीचें। मूळ शोधावें ।' - दास ४.१.३४. २.(व्या.) वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांचा इतर शब्दांशी असणारा संबंध दाखवणारा नामाला किंवा सर्वनामाला लागणारा प्रत्यय किंवा त्यांच्यात होणारा फरक, बदल. ३. भाग; वाटणी. ४. भावार्थ; रोख; तात्पर्य. [सं.]

विभक्तिकार्य न. विभक्तिप्रत्यय लावताना नामाच्या अन्त्यस्वराला होणारा विकार.

विभव न. १. ऐश्वर्य; भाग्य; संपत्ती; मोठेपणा; थोरपणा. २. साठ संवत्सरांपैकी दुसरे संवत्सर. ३. (विशिष्टाद्वैतमत) अवतारात ईश्वराची होणारी अभिव्यक्ती. [सं.]

विभाग पु.१. अवयव; पृथक् भाग; वाटा; हिस्सा; अंश. २. भाग केलेली, वाटलेली स्थिती. [सं.]

विभागगुणन न. मूळ रकमेच्या निरनिराळ्या अवयवांनी गुणणे.

विभागणी स्त्री. वाटणी; हिस्से करणे; भाग पाडणे.

विभागणे उक्रि. भाग पाडणे; हिस्से, वाटे, तुकडे करणे.

विभागदार पु. हिस्सेदार; वाटेकरी.

विभागभाक् पु. वडिलार्जित मालमत्तेतील वाटेकरी; वंशपरंपरागत मालमत्तेत हिस्सा मिळण्याचा हक्क असणारा. [सं.]

विभागी पु. हिस्सेदार; वाटेकरी; भागीदार; पातीदार.

विभाजक पु. भागणारा; भाग पाडणारा.

विभाजत्व न. भाग जाण्याची स्थिती, पात्रता.

विभाजन न. १. भाग करणे. २. भेदक तत्त्व; विभागण्याचे गमक. [सं.]

विभाजा पु. नाश; चेंदा; रगडा; विध्वंस : 'रणीं कांडिला विभाजा । दैत्यदळाचा।' - कथा ५.६.८७. [सं. वि + भज्]

विभाज्य वि. १. हिस्से पाडण्याजोगी; जिचे हिस्से करायचे आहेत अशी. २. (गणित.) ज्या संख्येला दुसऱ्या संख्येने पूर्ण भाग जातो अशी संख्या.

विभाव पु. १. काव्यहेतूच्या प्रकारांपैकी एक; काव्यस्फूर्तीचे कारण; उद्दीपक गोष्ट. २. निमित्त कारण. [सं.]

विभावन–ना न. स्त्री. १. विचार; संशोधन; तपासणी. २. कल्पना; तर्क; भावना; समज. [सं.]

विभावना स्त्री. साहित्यशास्त्रातील एक अलंकार.

विभावनीय वि.१. विचार करण्याजोगे; संशोधन करण्याजोगे. २. कल्पना करण्यास योग्य, शक्य.

विभावित धावि. १. विचार केलेले; शोधून पाहिलेले. २. कल्पिलेले; मानलेले; गृहीत धरलेले.

विभाषा स्त्री. विकल्प; ऐवजी, बदली गोष्ट; दुसरा मार्ग. [सं.]

विभां(भा)डणे सक्रि. १.जिंकणे; पराभव करणे; जेरीस आणणे : 'अरिराअे विभांडावे। मग राजसूय यागां यावें।'- शिव ४६३. २. फोडणे; छेदणे; नाश करणे : 'पादरेणूंचेनि कुलिशें। पापपर्वत विभांडिती।'- मुआदि ५.७४. [सं. वि + भण्ड्]

विभांडू वि. भांडणारा; शत्रू : 'मागदराअे विभांडू ।'- शिव ५१८.

विभिन्न वि. १. विभाग, तुकडे केलेले; तोडलेले. २. विस्कटलेला; उधळून, पसरून टाकलेला. ३. मिसळलेला. [सं.]

विभीतक पु. १. (विरू.) बिब्बा. २. बेहेडा. पहा : **बिभीतक** [सं.]

विभीषणकाल–वेला पु.स्त्री. (ज्यो.) एक विशिष्ट काळ; संकटकाळ; अशुभ वेळ.

विभु–भू पु. परमेश्वर; प्रभू.
वि. सर्वव्यापी; व्यापक; महान; चिरंतन. [सं.]

विभुटणी स्त्री. वियोग; ताटातूट : 'तरि विषयां इंद्रियांचे मिळणीं। जो उदैजत सुये, विभुटणी ।'- ज्ञा १६.८८. [सं. विभक्ति]

विभू पहा : **व्यूह**

विभूत–ति–ती स्त्री. १. भस्म; रक्षा; राख; अंगारा. २. ऐश्वर्य; तेज; शोभा; यश; कीर्ती; भव्यता : 'नाना विभूति छंद बंद । नाना खाणीं ।'– दास १६.४.१९. ३. अणिमादी अष्टसिद्धी. ४. ईश्वरांश; महापुरुष; ऐश्वर्यवान पुरुष; पुण्यवान माणूस. [सं.]

विभूषण न. अलंकार; शोभा; दागिना. [सं.]

विभूषित वि. अलंकृत; शोभायमान; सजवलेला.

विभेद पु.१. वेगळेपणा; भिन्नता; विभागणी. २. मिश्रण; मिसळ. [सं.]

विभो पु. पहा : **विभु–भू**

विभ्रम पु. १. चूक; दोष. २. भ्रम; भ्रांती; गोंधळ. ३. स्त्रियांचा प्रेममूलक हावभाव, चाळा, चेष्टा, विलास. पहा : **भाव** [सं.]

विभ्रमण न. प्रकाशकिरणांच्या गतीतील स्खलन, मार्गच्युति. – सूर्य २६. [सं.]

विभ्रांत पु.गोंधळ, गडबड दाखवणारा अभिनय.
वि. गोंधळलेला; घोटाळलेला; चुकलेला. [सं.]

विमत वि. नापसंत; उलट; विरुद्ध; प्रतिकूल. [सं.]

विमति–ती स्त्री. १. बुद्धी चळलेला; भ्रमिष्ट; खुळा; वेडा. २. नापसंती; असंमती; प्रतिकूलता. [सं.]

विमनस्क, विमना वि. १. उद्विग्न; खिन्न; त्रस्त; गोंधळलेला. २. मन उडालेला; विमुख; विरक्त; प्रेमभंग झालेला. [सं.]

विमर्द पु. फुरसत; उशीर; कालांतर; दीर्घकाळ. (को.)

विमर्द, विमर्दन न. १. घर्षण; घासणे; कुटणे; दळणे. २.(ल.) मारणे; ठार करणे; नाश. [सं.]

विमर्श पु. विचार; तपास; शोध; बुद्धी चालवणे. [सं.]

विमल–ळ वि. १. स्वच्छ; शुद्ध; निर्दोष. २. मंगल; शुभ. [सं.]

विमा पु.१. एखाद्या वस्तूची, आयुष्याची, घराची इ. ठरावीक काळापर्यंत सुरक्षिततेची ठरावीक रक्कम भरून घेण्याची हमी; ठरावीक हप्ते भरून ठरावीक काळी अमुक रक्कम मिळेल अशी तजवीज. २. अशा तऱ्हेने भरण्याची ठरावीक रक्कम, हप्ता. ३. सहा. [फा., हिं. बीमा]

विमाता स्त्री. सावत्र आई. [सं.]

विमान न. १. आकाशातून प्रवास करण्याचे साधन.२. लिंगायत लोकांत विशेषत: एखादा श्रेष्ठ पुरुष मृत्यू पावला असता त्याचे प्रेत नेण्यासाठी केलेली रचना. ३. उंच मनोऱ्यासारखी बांधणी. [सं.]

विमार्ग पु. १. भलतीच वाट; आडमार्ग. २. अनीतीचा, स्वैर मार्ग; स्वैर वर्तणूक. [सं.]

विमुख वि.१. पाठमोरा; पराङ्मुख. २. प्रतिकूल.

विमुक्त वि. मोकळा; स्वतंत्र.

विमोचन, विमोक्षण न. सुटका; मोकळीक; मुक्तता. [सं.]

वियत् न. आकाश. [सं.]

वियुक्त, वियोजित वि. वेगळा, अलग केलेला. [सं.]

वियुक्तपत्र वि. (शाप.) निरनिराळ्या पाकळ्या असलेला (हिरवा चाफा, रामफळ). (इं.) डायलिपेटॅलस.

वियुति–ती स्त्री. (गणित.) अंतर; फरक; वजाबाकी; कमी-जास्तीपणा.

वियोग पु. १. वेगळे होणे; विरह; ताटातूट; वेगळेपणा. २. वियुति–ती.

वियोगी वि. १. वेगळा; पृथक; अलग. २. विरही.

वियोजक वि. १. (गणित) वजा करण्याची संख्या. २. पृथक, वेगळे करणारा.

वियोजन न. वियोग, वेगळे, पृथक्करण करण्याची क्रिया.

वियोज्य वि. (गणित) ज्यातून वजा करायचे ती संख्या. [सं.]

विर पहा : **वीर** १ [सं.]

विरईपुरी स्त्री. मांसयुक्त पुरीचा एक प्रकार.–गृशि २.१९.

विरका वि. १. विरणारा; चूर होणारा; कांडताना तुटणारा, मोडणारा (तांदूळ). २. विरघळणारा.

विरक्त वि. उदासीन; अनासक्त; निरिच्छ; भोगेच्छेपासून पराङ्मुख; वासनारहित.

विरक्ति–क्ती स्त्री.१. वैराग्य; अनासक्ती; निरिच्छा. २. उदासीनता; बेफिकीर वृत्ती.

विरखंड न. १. पोफळीच्या विरीचा तुकडा. २. (याची घडी घालून पोथीला गुंडाळीत असतात यावरून) पोथी गुंडाळण्याचे साधन, पुष्टिपत्र. (को.)

विरखुडी स्त्री. रेघ; रेघोटी; ओरखडा. [सं. वि + रेखा]

विरघळणे अक्रि. १. द्रवणे; वितळणे; विघरणे; पाघळणे. २. (ल.) विरणे; जीर्णतेमुळे पातळ, विरविरीत, झिरझिरीत होणे. ३. (ल.) (भीती, दु:ख, अनुकंपा इ. विकारांनी) गळणे; ओशाळणे; मऊ पडणे; द्रवणे (मन, हृदय). [सं. विघरण]

विरचणे उक्रि. व्यवस्थितपणाने मांडणे; रचणे. [सं. वि + रच्]

विरचित वि. जुळवलेले; रचलेले; ग्रथित; केलेले.

विरज वि. १. शुद्ध; निर्मळ; पांढरे : 'शुद्ध सत्त्वाचें विरजांबर । – एरुस्व १४.८७. २. पूरक; साहाय्यक. [वै.सं.इरज्य]

विरज न. संघ; डाळे; पहा : **इरजिक** : 'पेरावयासि घेतलें बीज । गांवकरी करूनि विरज ।' – भवि ५४.१७६. [सं.]

विरजण न. १. दुधाचे दही होण्यासाठी त्यात घातलेला पदार्थ. २. घट्ट झालेले, दही झालेले दूध. ३. दही करण्याचे भांडे. (को.) ४.(ल.) (विद्वत्ता, शहाणपणा, सद्गुण, पावित्र्य वगैरेला) कलंक लावणारे वर्तन; निष्फळ करणारी गोष्ट. [सं. वि + रज्](वा.) ० **घालणे** – १. उत्साह घालवणे; मनोभंग, रसभंग करणे. २. एखाद्याचे मन कलुषित करणे. ३. निष्फळ बनवणे.

विरजणी–णे स्त्री.न. विरजणाचे भांडे. [सं.]

विरजणे उक्रि. दुधाचे दही करणे.
अक्रि. (भांडणानंतर) शांत होणे; तडजोडीने भांडण मिटणे.

विरजना स्त्री. शोक; दु:ख. – लोसाको.

विर(रि)जा, विरजिया पु. मित्र; साहाय्यकर्ता; मदतगार : 'मग वडवानळु तैसे याही । विरजा जैसा ।'– ज्ञा १.११७.

विरजाहोम पु.संन्यास घेण्याच्या वेळी करण्याचा होम.

विरजी पु. साथीदार; मदतनीस : 'मी पाणिया विरजी वेलाऊ.' – उच १६.

विरजे पु. अव. इरजिकांतील लोक.

विरड स्त्री. उतवडा; गौण पीक; मोगण. पहा: **इरड**

विरड स्त्री. १. अर्धा दिवस; एक वेळ; पूर्वा किंवा अपराण्ह. २. कामाची लाकडे इ. साठवण्याचा माचा. ३. ओझ्याची खेप. ४. वरंड. (कु.)

विरडणे अक्रि.पुरळ उठणे; खरूज येणे.

विरड(ढ)णे अक्रि. उगवणे; अंकुर फुटणे : 'जियाचिये भूमिकेसि विरढे ।'- भाए २३३. [सं. वि + रुह्]

विरडा–ढा पु. लहान रोप; माडा.

विरडी–ढी–डे–ढे पहा : **बिरडी**

विरढे न.बिरढे; गुळखी; बूच; बांध.

विरणा पहा : **विरका**

विरणे अक्रि. १. पहा : **विरघळणे** १,३. २. चुरणे; मोडणे; कणी होणे (तांदूळ कांडताना वगैरे).३. उडून जाणे; पातळ होणे; नाहीसे होणे (ढग इ.); जिरणे; लयास जाणे; दबून जाणे (संशय, इच्छा इ.). ४. तृप्त होणे; भागणे; शमणे; उडून जाणे (तहान, भूक इ.) ५. पांगापांग, फाकाफाक, दाणादाण, पळापळ होणे; नष्ट होणे. ६. मन उडणे; दुःखित होणे; खेद करणे : 'कपि देखुनि सर्व मनीं विरती।' - आ सेतुबंध २९.१३. [सं.विरल. वैसं. विरिणीते]

विरणे सक्रि. भाताचे रोप करण्यासाठी असणाऱ्या जमिनीवर, भाजावणीवर गोबर पसरणे. (को.) [सं. विकिर्]

विरत वि. १. विराम पावलेला; स्तब्ध; थांबलेला; बंद पडलेला. २. विरक्त; निवृत्त; त्याग केलेला. [सं.]

विरति–ती स्त्री.१. विराम; विश्रांती; बंदी; थांबण्याची, सोडण्याची, बंद पडण्याची स्थिती. २. विरक्ती; इच्छा, आसक्ती, वासना यांचा क्षय; अनासक्ती.

विरतिक पु. वृत्तिकर; वृत्ती चालवणारा. (कु.) [सं. वृत्तिकर]

विरथ वि. १. रथहीन; रथातून उतरलेला. २. तुल्यबळ नसणारा. ३. शस्त्रास्त्रहीन. [सं.]

विरधाळे न. सुवेर; जननाशौच. [सं. वृद्धि+ आलय्]

विरपणी स्त्री. बेणणी; निंदणी.

विरपणे उक्रि. तण काढणे; बेणणे; निंदणे; भांगलणे. (को.)

विरपल स्त्री. शेताच्या दाढेपैकी राहिलेला चोथा; नांगरणीच्या वेळी काढून टाकले जाणारे रान. (राजा.)

विरमणे अक्रि. थांबणे; बंद होणे; थबकणे; विश्रांती घेणे. [सं. वि + रम्]

विरमणे पहा : **वरमणे**

विरय स्त्री. कोकणी देवदार वृक्ष. (कु.)

विरल पहा : **विरळ**

विरलपक्ष वि. विशिष्ट जातीचे प्राणी (इं.) हिमेनोप्टेरा.

विरवणे सक्रि.(विरणे प्रयोजक) जिरवणे; नाहीसे करणे : 'बहु भाग्य शिखंडीचे मोठ्याच्याही मदासि ज विरवी ।'- मोभीष्म ११.५१.

विरवदी–धी–ली स्त्री. स्त्रियांच्या पायांच्या बोटात घालण्याचा चांदीचा दागिना.

विरवाळे न.विरजीक.(राजा.) पहा : **इरजीक**

विरविरणे अक्रि. रवरवणे; मिरमिर लागणे. [ध्व.]

विरविरी–वीर स्त्री. चुरचुर; मिरमिर. [ध्व.]

विरविरीत वि. झिरझिरीत; जीर्ण; विरळ.

विरस पु. बेरंग; मनोभंग.

वि. १. नीरस; बेचव; गोडी नसणारे. २. रुक्ष; कोरडा; पचपचीत; कवकवीत. ३. (ल.) निरुत्साही. [सं.]

विरसणे अक्रि. निरुत्साह होणे; थिजणे.

विरह पु. १.वियोग; ताटातूट. २. वियोगामुळे होणारे दुःख. ३. वाण; अभाव; रहितता. [सं.]

विरहण न. आळ; आरोप: 'ज्याहीं चोरिलें त्यांसी सोडिलें । विरहण आलें मजवरी ।' - ह १.१८६.

विरहिणी स्त्री. पतीचा, प्रियकराचा वियोग झालेली स्त्री.

विरहित वि. शिवाय; वेगळा; खेरीज; वाचून.

विरही वि. १. प्रेयसीचा, पत्नीचा वियोग झालेला. २. उणीव, वाण असलेला.

विरळ वि. १. दूर दूर; अंतरा-अंतरावरचा. २. झिरझिरीत. ३. दुर्मीळ; क्वचित आढळणारा; असामान्य; केव्हातरी घडणारा.

क्रिवि. क्वचित; विरळा. [सं. विरल]

विरळणे उक्रि. विरळ होणे.

विरळा वि.दुर्मीळ; दुर्लभ; दुष्प्राप्य.

क्रिवि. क्वचित; प्रसंगवशात.

विरंग पु.विरस; विसंवादी गोष्ट.

वि. १. वाईट रंगाचे; विटके; रंग उडालेले. २. मोकळा; रिकामा; लोकरंजनाशिवाय : 'विरंग जाऊं नेदी क्षण ।'- दास १८.४.१०.

विरंगुळणे अक्रि. काही काम करताना रेंगाळणे; विसावा घेणे; करमणूक करणे. [सं. वि + रज् / रञ्ज्]

विरंगु(गो)ळा पु.१. विसावा; विश्रांती; विश्रांतिस्थान. २. करमणूक; खेळ; वेळ घालवण्याचे साधन; मन रमवणे. ३. हरकत; अडचण; आळस : 'वरील कोंड्याचा गुंडाळा। झाडूनि केलिया वेगळा । कणु घेतां विरंगुळा । असे काईं ।'- ज्ञा १५.४६६.

विरंबणे अक्रि. १. ओशाळणे; लाजणे; खाली पाहणे; थिजणे; विरमणे. २. पचपचीत, बेचव होणे. [सं. वर्म]

विरा पहा : **विरी**

विराग पु. विरक्ती; वैराग्य; आसक्ती, इच्छा नसणे. [सं.]

विरागी वि. विरक्त; बैरागी.

विराजणे अक्रि. शोभणे; प्रकाशणे; सुंदर दिसणे. [सं. वि + राज्]

विराजमान, विराजित वि.शोभिवंत; तेजस्वी; भव्य.

विराट–ट् पु.न. १. विश्वव्यापी ईश्वरस्वरूप; चराचर व्यापणारा पुरुष : 'कीं हे विराटाची योगस्थिति ।'- दास १.७.३२. २. ब्रह्मांड.

वि. भव्य; प्रचंड; अवाढव्य; विश्वव्यापी. [सं.विराट्]

विराण, वैराण वि. ओसाड; उजाड.

विराणी स्त्री. दाढ, जमीन भाजण्यापूर्वी आग पसरू नये म्हणून तिच्या भोवतीची भाजली जाणारी जागा.

विराणे न.एक वाद्य. - मब ३६.

विरादस स्त्री. बडीशेप. (गो.)

विराम पु. १. विश्रांती; विसावा. २. थांबणूक; मध्येच बंद पडणे; स्थिरता. ३. लय; नाश; अंत; शेवट. ४. टप्पा; थांबण्याची जागा. [सं.]

विराम वि. शून्य; ज्यात राम, तेज, पराक्रम किंवा अर्थ, सार नाही असे : 'रामेवीण विराम भासत सभा कोणी न दीसे उभा ।'- दावि ४९७.

विरामचिन्ह न. थांबण्याची खूण; वाक्य संपल्यावर अगर मध्येच कमी-जास्त थांबावे यासाठी वापरण्याची खूण. उदा. (,/; इ.)

विराम(व)णे अक्रि. रममाण होणे; विश्रांती घेणे : 'मग राओ उर्वसीयेसि। विरावला तो ।'- भाए ७६४.

विरायणी स्त्री. रणभूमीवरील वीरांची आरोळी : 'लखलखीत खांड्यामाजी । तेथे वाजताए विरायणी '- उह ९५९. [सं.विर]

विरालेपण न. शून्यत्व; सर्व नाहीसे झाल्यासारखी स्थिती.

विरावणे अक्रि. विरमणे; सर्व विरल्यासारखे होणे. (व.)

विरावा पु. अडचण; खोळंबा : 'मध्यस्त विरावा कशास.' - शिदि २८१.

विरावे, विरी न. स्त्री. १. चुन्यातील, पिठातील कस. 'जन्म क्रोधाचें विरावें ।'- दास ३.१.७; २. शौर्य; वीर्य, तेज: 'पृथ्वीनें विरी सांडिली।'- दास १३.४.१०. [सं. वीर्य]

विरी स्त्री. १. पोफळीच्या झावळीला बुडाशी असणारा सुपासारखा भाग. २. विरीचा द्रोण. [सं. आ + वृ = आवरण घालणे]

विरी, वेरी शअ. पर्यंत : 'वेलिअें वाटोगरी। गुंफिजेती सिरोविरीं।'- शिव ६३२. [सं. पर्यंत]

विरु-रू न.वैर; वाकडीक : 'काई माझें घेतलें विरूं ।' - भाए ७७. वि. विरुद्ध; उलट; आड : 'मग जाणतया जें विरू । तयाची वाट वाहती करूं।' - ज्ञा १६.५७. [सं. वैर, वि + ऋ = जाणे]

विरुद्ध न. अकल्याण; अभद्र; वाईट : 'जें वडिला यां चिंतावें । विरुद्ध मनें ।'- ज्ञा १.२१४.

वि. प्रतिकूल; उलट; विपरीत; विघ्न, अडथळा आणणारे. [सं.]

विरुद्धभले वि. शुभाशुभ.

विरुळा पु. पाणसर्प :'विरुळेआं रोखेंसी सरीसीं ।' - दाव ३८८. [सं. व्याल; क. नीरु + उळि, ओळ्ळे]

विरूढ(ड)ण न. १. मूळ धरणे. २. (ल.) परिणामकारक, प्रभावी होणे. [सं. वि + रुह् = वाढणे]

विरूढणे अक्रि. १. वाढणे; मोठे होणे : 'पुत्रांकुर विरूढला चोखें।'- मुआदि ३.३३. २. अंकुर फुटणे; रुजणे : 'तरी न विरूडती लिंचिर्ली । आवडे तैसी । - ज्ञा २.६६.

विरूढी स्त्री. वाढ; अंकुर : 'तंव बाहेरी विरूढी करपे। रोमबीजांची ।'- ज्ञा ६.२३४.

विरूप वि.१. विद्रूप; कुरूप; बेडौल. २. भिन्न; वेगळा; निराळा. [सं.]

विरे(रें) पहा : १ **विरी**. २. **विरी**

विरेक पु. १. रेच; मलविसर्जन; ढाळ. २. मल; विष्ठा. [सं.वि+रिच्]

विरेचन न. १. मलशुद्धी; पहा : **विरेक** १. २. रेचक, मलशुद्धिकारक औषध. [सं.]

विरे(रें)वीर पु.१. मुख्य वीर; वीरश्रेष्ठ. २. असंख्य वीर; वीरांचा समुदाय : 'विरेंवीर राक्षेस सर्वे बुडाला ।'- राक १.४.३०.

विरोदी-ली पहा : **विरवदी**

विरोध पु. १. प्रतिकूलता; वैधर्म्य; विरुद्ध मत; प्रतिबंध; वैर; शत्रुत्व; द्वेष. २. भेद; अंतर; असमानता. [सं.]

विरोधणे अक्रि. विरोध करणे.

विरोधभक्ती स्त्री. देवाशी वैर करून त्याकडून आपला वध करवून घेऊन मोक्ष मिळवण्याचा मार्ग.

विरोधी पु. साठ संवत्सरांपैकी विसावे संवत्सर.

विरोधी वि. विरोध करणारा; प्रतिकूल; प्रतिपक्षी.

विरोळा पहा : **विरुळा**

विरोळा पहा : **वरोळी**

विर्जुमाळ वि. समाईक.- पहाणी खर्डा सातारी. (को.) [अर. विरासत् = वडिलार्जित मिळकत]

विर्तिक वि. वृत्तिवंत; इनामदार.

विव्हडणे अक्रि. दुःखी, विव्हळ होणे. [सं. विरह + ढ]

विव्हा पु. ओढा; नाला; प्रवाह; पऱ्हा . (को.)[सं. वि + प्र + वह्]

विलग पु.न. १. वैगुण्य; उणेपणा; व्यंग; विसंगती; विपरीतता; अंतर. २. उपद्रव; त्रास : 'कामक्रोधांचे विलग। उठावती अनेक ।'- ज्ञा १२.६२

वि. १. अलग; भिन्न; विसंगत; अयोग्य; तुटक. २. आसक्त; जडलेले : 'कामाचें विलग आवरावें चित्त'- चोखा १५०.

विलगट वि. वेगळा; अलिप्त; भ्रष्ट.

स्त्री. फार लगट; विशेष जवळीक : 'विलगट हट नाहीं चाट मोकाट नाहीं ।'- दावि ७.२.

विलगणे अक्रि. दूर होणे, नाहीसा होणे; धुवून निघणे: 'पदी श्रीरामाच्या दृढतर महादोष विलगे।' - सारुह ६.१६३. (वा.) **विलगेस लावणे** दूर करणे; बंदोबस्त करणे.

विलग्न वि. जुळलेले; जोडलेले; चिकटलेले. [सं.]

विलज्ज वि. निर्लज्ज; उद्धट. [सं.]

विलट न. कापसातील जंतू.

विलपणे अक्रि.शोक, विलाप करणे; रडणे. [सं. वि + लप्]

विलय पु. १. शेवट; नाश; प्रलय; अंतकालीन प्रलय. २. अंतर; विलंब; खंड : 'मिनलेयां वनमाळीं । वैदर्भींची अवच्छा विवर्तैली । ते सांधितां बोली । कथें विलयो पडेल ।'- शिव ८५६. [सं.]

विलसणे अक्रि. १. शोभणे; विराजणे; चमकणे; प्रकाशणे; चकाकणे; झळकणे. २. वागणे; वर्तणे; असणे. [सं.वि+लस्]

विलसित वि. शोभायमान; प्रकाशमान; तेजस्वी; सुंदर.

न. विलास; चेष्टा. [सं.]

विलक्षण वि. १. लोकोत्तर; चमत्कारिक; अलौकिक; असामान्य; विचित्र; नावीन्यपूर्ण. २. भिन्न; निराळा; वेगळ्याच प्रकारचा, गुणाचा. ३. विपरीत : 'वचनभंग करितां विलक्षण ।' - दास ६.७.१०.[सं.]

विलंगी स्त्री. एक प्रकारचे कोळपे.

विलंघ वि. घोर; भयंकर; महान : 'ऐशा गर्वोक्तीनें वदुनी पण करित ते

विलंघ सती ।' - कीर्तन १.१७.

विलंघणे उक्रि. १. उल्लंघन करणे; ओलांडणे; पलीकडे जाणे. २. (ल.) अतिक्रमण करणे; मर्यादेबाहेर जाणे. [सं. वि + लंघ्]

विलंची वि. कपटी; कुढ्या मनाचा.

विलंब पु. उशीर; अवकाश; मध्यांतर; दीर्घकाळ. [सं.]

विलंबिका स्त्री. पटकी किंवा महामारीच्या विकारातील तिसरी व अखेरची अवस्था.

विलंबित वि. १. उशीर लागलेले; लांबणीवर पडलेले; लांबवलेले, पुढे ढकललेले (काम). २. सावकाश, मंद (ताल).

विलंबी पु. साठ संवत्सरातील बत्तिसावे संवत्सर.

वि. दीर्घसूत्री; दीर्घकाळ लागणारे; लांबण लावणारे; उशीर करणारे.

विला स्त्री. प्रसंग; वेळ; काळ; संधी; हंगाम. [फा.]

विलाचे जाळे मासे पकडण्याचे, समुद्रात टाकण्याचे जाळे. पहा : **बुरीचे जाळे**

विलात पहा : **विलायत**

विलाप पु. शोक; दुःख; आरडाओरडा; रडारड. [सं.]

विलापणे अक्रि. मोठ्याने शोक, आकांत करणे; आक्रंदणे.

विलापी वि. रडणारा; शोक करणारा.

विलायची स्त्री. वेलची. (गो.)

विलायत स्त्री. १. मूळ देश; स्वदेश. २. उत्पत्तिस्थान; मूळचा प्रदेश (प्राणी, वनस्पती वगैरेचा). ३. (रूढ) परदेश; परकीय देश. ४. प्रांत; परगणा, प्रदेश; जनपद. ५. वस्ती असणारा प्रदेश. - ऐको. [अर.विलायत्]

विलायती वि.१. परदेशी; इंग्लंडचा; युरोपीय. २. धूर्त; बिलंदर; कावेबाज; हुशार. ३. चमत्कारिक; लक्ष्यवेधी; असामान्य. (याअर्थी कोणत्याही विचित्र, सुंदर, अजब, कौशल्यपूर्ण वस्तूला लावतात.) ४. (ल.) उनाड; उंडगा; खोडकर.

विलायती कोंबडा टर्की; गिनी फाउल.

विलायती सन ओरिसा, ओढ्या व बंगालचा काही भाग यात चालणारा एक शक. इ.स. ५९२ मध्ये सुरू झाला. सौरवर्ष व चांद्रमास.

विलास पु. १. क्रीडा; खेळ; करमणूक (विशेषत: स्त्रिया, नर्तकी, गाणारणी वगैरेंबरोबर). २. चैन; रंगेलपणा; स्वैर भोग. ३. स्त्रियांचा प्रेमदर्शक हावभाव; कामचेष्टा; नखरा (कटाक्ष, लाजणे, मुरडणे वगैरे). [सं.]

विलासी वि. १. चैनी; कामुक; विषयासक्त; भोगी; गुलहौशी. २. खेळकर; आनंदी. ३. वेश्यागमनी. [सं.]

विलाहाळ,विलाळ पहा : **विल्हाळ**

विली स्त्री. सायंकाळ : 'ज्वरु गेलियांही विलीचीए पाहारावर...' - विविस ६. [सं. वेला; क. इळि]

विलुप्त(दृष्टि) स्त्री. (नृत्य.) पापण्यांची सारखी उघडझाप करणे व बाहुल्या दिसू न देणे. हा अभिनय मूर्खपणा, उन्माद, दुःख, पीडा यांचा द्योतक आहे.

विलेप, विलेपन पु.न. १. सुगंधी पदार्थ अंगाला लावणे; उटणे, उटी अंगाला लावणे, माखणे. २. उटणे; उटी; सुगंधी द्रव्य; चंदन इ. ३. अंगाला लावणे; चोपडणे. [सं.]

विलेपित वि. माखलेले; चर्चित.

विलोकणे उक्रि. १. पाहणे; अवलोकणे. २. चिंतणे; जाणणे. [सं. वि + लोक्]

विलोकन न. पाहणे; अवलोकणे; दृष्टी टाकणे; टेहळणी. [सं.]

विलोकनीय वि. पाहण्यासारखे; दर्शनीय; चिंतनीय. [सं.]

विलोकितदर्शन न. (नृत्य.) पाठीमागील वस्तू पाहणे.

विलोकितपुट न. (नृत्य.) पापण्यांची उघडझाप.

विलोभन न. फसवणूक. - नि ५३७. [सं.]

विलोम वि. १. अंगावरील केसांची वाढ वरून खाली असते. त्याउलट. २. विपरीत; उलटा; माघारा; विरुद्ध दिशेचा. ३. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या उतरत्या क्रमाच्या उलट पुरुष व स्त्री असताना होणारा संबंध; हलक्या वर्णाचा पुरुष व वरच्या वर्णाची स्त्री यांचा संबंध व त्यातून जन्मलेला; संकरज. [सं. वि + लोम (केस)]

विलोमक्रिया-विधी स्त्री.पु. (गणित) दिलेल्या प्रमाणातील संख्या उलट करण्याची क्रिया.

विलोल-ळ वि. चंचल.

पु. विजयोत्कर्षाचा भर : 'राजादेश जयाचां विलोळीं '- रुस्व २८४. [सं. विलोल]

विल्कल वि. मूर्ख; अजागळ : 'कितीयेक ती माणसे विल्कलेंसीं ।'- दावि २८४. [सं. विकल]

विल्लाउळ न. १. घर; आश्रयस्थान. २. स्पष्ट; सुंदर.

विल्हन न. पातळ, झिरझिरीत वस्त्र : 'सोनें सेंदूर विल्हना तदुपरी क्षीरोदकी जो फूटा ।'- प्रसादमालिका ५.

विल्हय-णा-णे स्त्री. पु.न. वंश; कूळ; गोत्र. [सं. विल्हा]

विल्हळ पु. लळा; कौतुक : 'तीया वाढविलें बहुतीं विल्हळीं'- शिव ९१. [सं. वेल्लाहल]

विल्हा-ल्हे पु.स्त्री. १. वर्ण; भाग; खाते (मूळाक्षरांचे). २.(सामान्यत:) प्रकार; दर्जा; विभाग. ३.(किल्ला, भाग याला) जोडलेला, समाविष्ट केलेला भाग; अंकित प्रदेश; प्रांत. [अर.विल्हा](वा.) **विल्हे करणे, लावणे-** १. निकालात काढणे. २. लिहिणे; व्यवस्थित मांडणे. ३. उत्तरक्रिया करणे. - ऐको. **विल्हेस लागणे-** व्यवस्था लागणे; वर्गवारीने, प्रतवारीने लागणे.

विल्हा(ल्ह)ळ वि. १. दीनवाणे; करुण, दुःखपूर्ण (कथन, रडगाणे इ.). २. अभद्र बोलणारा; अपशकुनी. ३. झिरझिरीत; विरळ. [सं.विव्हल]

विल्हाळक स्त्री. काकळूत; पिरपिर; कुरकुर; रडगाणे.

वि. व्यर्थ; निष्कारण :'तुका म्हणे असें हातीचें कंकण । तपासी दर्पण विल्हाळक।' - तुगा २७८१. [सं.]

विल्हाळगौर पहा : **विव्हळगौर**

विल्हाळणे अक्रि.१. रडगाणे गाणे; किरकिर, शोक करणे. २.(ल.) वाचताना, बोलताना रडका सूर, आवाज काढणे, हेल काढणे.

३. नेहमी मनात अशुभ विचार आणणे, करणे. [सं. वि + लल्]

विल्हा(ल्ह)ळ्या वि. १. रडतोंड्या; किरकिऱ्या; रड्या; तक्रारखोर. २. अशुभ, अभद्र बोलणारा.

विल्हेवाट स्त्री. १. उधळपट्टी; फडशा; धुळधाण. २. व्यवस्था; रचना; मांडणी; योग्य योजना.

विल्होर पु. बिलवर. (व.)

विवज न. फोड; स्पष्टीकरण : 'सावज रूपाचें विवज जाणवेना।' - दावि ४१९. [सं. वि + वच्]

विवटणे अक्रि. स्पष्ट करणे.

विवदणे अक्रि. १. वादविवाद, चर्चा, खल, तक्रार करणे; भांडणे. २. वाखाणणे; स्तुती करणे: 'लीळा निरंतर परमेश्वरू विवदना ।'- गस्तो ८३. ३. वर्णन करणे. [सं. वि + वद्]

विवदमान वि. भांडखोर; चर्चा करणारा.

विवद्धी वि.खोडकर; व्रात्य; भांडखोर.

विवर-रु-रू पु. १. तपशील :' नगर समस्त मेळलेयाचा विवरु'- खाटेग्राम CPI. २.प्रकार; विस्तार; अंतर (गणित) : 'ते पात्रा राओ पात्रां गुरू : दावी हस्तकाचा विवरु'- उगी ४५४. ३. उकल; स्पष्टीकरण विवरण: 'तेणें वरप्रसादें विवरु : बुधीसि जाला'- ज्ञाप्र ११.९६.

विवर न. १. छिद्र; गुहा; बीळ; भोक; पोकळी; भुयार. २. अवकाश; जागा : 'देवो देव भक्तालागीं । जिये विवरू देखे आंगीं ।' - ज्ञा १८.१५९२. ३. (ल.) दोष : 'छात्रीं नुरवीतिळहि खळदृष्टिसि गुरुराज कारुणिकविवर।' - मोआदि २.२४. ४. प्रवेशद्वार. [सं.वि + वृ]

विवरण न. स्पष्टीकरण; सविस्तर निरूपण; फोड; उलगडा. [सं.]

विवरणे उक्रि. १. विवरण करणे. २. विचार करणे.

विवर्जन, विवर्जित पहा: **वर्जन, वर्जित**

विवर्ण वि.रंग गेलेला; विटलेला; शुभ्र केलेला. [सं.]

विवर्त पु. १. भोवरा. २. भास; भ्रम; भ्रांती; माया : 'माया ब्रह्मांचा विवर्त ।'- विपू ३.२४. [सं.]

विवर्तरूप वि. भासमात्र; मायावी.

विवर्तवाद पु. मायावाद; प्रकृती ही स्वतंत्र नसून एकमेवाद्वितीय, निर्गुण ब्रह्मावर अज्ञानाने सगुण देखाव्याचा आरोप केलेला असतो असे मत.

विवर्तन न.१. भ्रमण. २. (नृत्य.) डोळा एका बाजूस फेकणे; शृंगारद्योतक अभिनय.

विवर्त उरू (नृत्य.) टाच आत घेऊन जंघाक्षिप्त मांड्यांची होणारी स्थिती.

विवर्तितकरण न. (नृत्य.) हात पुढे करणे, त्रिक विवर्तन फेकणे व डावा हात रेचित करणे.

विवर्तितपार्श्व पु. (नृत्य.) एकाच पायाच्या चवड्यावर उभे राहून कटी विवृत्त केली असता वरचा सर्व भाग फिरवण्याची क्रिया.

विवर्तितपुट न. (नृत्य.) खालच्या व वरच्या पापण्या जवळ आणून फिरवणे.

विवश वि.पराधीन; परतंत्र. [सं.]

विवशी-सी, विंवशी स्त्री. १. विघ्नदेवता; राक्षसी; भूत; डाकीण; हडळ : 'कीं लोटलेया विवसी । देखे निधान जेवि ।' - ऋ१९. २. अपशकुनी, विघ्न आणणारी, दुर्दैवी स्त्री. ३. दुर्दैवाचा फेरा. ४. चिळस; शिसारी; कंटाळा; खंत : 'तया घायांची घेओनि विवशी । पळाला चैद्य तो ।'- शिव १०७३. (वा.) ० **लागणे** - लावसटणे; सडणे; लागोरणे. ० **लावणे** - नाश करणे; त्रास देणे.

विवसा पु. उद्योग; धंदा; काम; व्यवहार. [सं. व्यवसाय]

विवसा स्त्री. इच्छा; कल. [सं. वि + इष्]

विवस्कंध पु. सप्तस्कंधातील पाचवा, नक्षत्रमंडळापासून शनिमंडळापर्यंतचा स्कंध.

विवस्त्र, विवसन वि. वस्त्ररहित; नग्न; अंगावर कपडे नसलेला.[सं.]

विवस्वत-स्वान पु. सूर्य. [सं.]

विवळ वि. १. स्पष्ट; सुगम; सोपे : 'तरी बोलिले तेंचि सांगावें। विवळ करूनि ।'- ज्ञा १५.१६४. २. सविस्तर : 'पुष्प तांबोल विवळी । पूजा अनुक्रमें चालविल्या।' - वेसीस्व ४.४०.

विवळखोर वि. नेहमी दुःख करणारा; तळमळणारा.

विवळणी स्त्री. दुःख; शोक; तळमळ.

विवळणे उक्रि. १. उदयास येणे; उगवणे; प्रकाशणे :' एकां वैराग्य रवि विवळे।'- ज्ञा ४.१२८. २. स्पष्ट होणे; समजणे : 'म्हणोनि नेणणें जया विवळे ।' - परमा ६.४. ३. उत्पन्न करणे; प्रसवणे : 'सूर्य सूर्यासी विवळे । कां पळ आवणयां फळे।'- अमृ ४.२१. [सं. वि + वल्ह् प्रकाशने]

विवळणे अक्रि. तळमळणे; कण्हणे; कुंथणे : 'हानी झाली विवळे ।' -दास ३.७.३९. [सं. विव्हल]

विवळी स्त्री. एक पालेभाजी.

विव(वि)क्षा स्त्री.१. बोलण्याची इच्छा, हेतू, गरज; उद्देश; पुढे मांडण्याचा मुद्दा, मत; मनातील धोरण, अनुसंधान. २. इच्छा; हेतू; गरज; जरुरी. ३. व्याख्यान; वर्णन. [सं.]

विवक्षित वि. १. वक्त्याने इच्छिलेले, उद्देशिलेले; निर्दिष्ट; वक्त्याच्या मनात असलेले. २. विशिष्ट; महत्त्वाचा; प्रसिद्ध; प्रमुख; इतरांहून श्रेष्ठ (व्यक्ती).
न. पहा : **विवक्षा**

विवंचना स्त्री. १. चिंता; घोर; काळजी; घोटाळा. २. सूक्ष्म, सारासार विचार; विवेचन; विचारणा; विचार : 'लिंगत्रयांची विवंचना । विचारितां जीए सर्वस्वी ना ।'- ऋ ४१. ३. भेद; निवड : 'तैसी वासनांतराची विवंचना । मग आपैसी पारुखे अर्जुना ।'- ज्ञा ५.१५५. ४. अडचण.

विवाद पु. १. चर्चा; खल; खंडनमंडन. वाद; पूर्वपक्ष- उत्तरपक्ष. २. कज्जा; खटला; फिर्याद; कायदेशीर भांडण. ३. अपील; फेरतपासणी: 'अंमलदारांच्या फैसल्यावर विवाद जिकडे चालू शकेल...' - खानगी खाते नियम १३१. [सं. वि + वद्]

विवादणे अक्रि. वाद करणे; भांडणे; तंडणे.

विवादी वि. १. भांडखोर; तक्रारी; वाद करणारा; फिर्यादी. २. फेरतपासणी मागणारा.

विवादी स्वर रागाची गोडी वाढवण्यासाठी गायक कुशलतेने रागाला

त्यातील नियमित स्वरांहून निराळा लावतात तो एखादा स्वर.

विवार पु. १. विस्तार; प्रसरण; विकास; खुलावट. २. स्वर व ऊष्मवर्ण यांचा उच्चार होण्याइतका वागिंद्रियाचा विस्तार, विकास. [सं.]

विवास पु.हद्दपारी; गृहत्याग; देशत्याग. [सं.]

विवाह पु. लग्न; स्त्री-पुरुषांमध्ये दांपत्यसंबंध निर्माण करणारा विधी, संस्कार, पद्धती. याचे ब्राह्म, आर्ष, दैव, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस व पैशाच असे आठ प्रकार आहेत. [सं.]

विवाहणे उक्रि. १. लग्न करणे. २. लग्न लावणे; लग्नात देणे (मुलगी).

विवाहमेळ-ळा पु. विवाहप्रसंग; लग्नसमारंभ.

विवाहहोम पु. विवाहाच्या प्रसंगी गृह्याग्नी सिद्ध करून करण्याचा होम.

विवाहित वि. लग्न झालेला.

विवाही पु. व्याही; आपल्या मुलीचा किंवा मुलाचा सासरा.

विवाह्य वि. लग्न होण्यायोग्य, करण्यालायक; लग्नाच्या वयाचा.[सं.]

विविक्त न. एकांतस्थान.

वि. १. विशिष्ट; निर्दिष्ट; स्पष्ट व वेगळा विचार केलेला. २. पृथक; अलग; एकांत; आडवळणाची, बाजूची (जागा). [सं.]

विविक्तपणे क्रिवि. एकीकडे; अलग; निराळे : 'आणि विविक्तपणे बसून कारभार करणें.' - राजे संभाजी- चरित्र ६.

विविदिषा स्त्री. जाणण्याची इच्छा. [सं.]

विविध वि. नाना प्रकारचे, तऱ्हेचे, परिमाणांचे. [सं.]

विवृत धावि. विवरण, स्पष्ट केलेले, उलगडा, फोड केलेले. [सं.]

विवृत पु. (व्या.) वर्णोच्चार होण्याकरिता वायूसंबंधी प्रयत्न, क्रिया. पहा : **प्रयत्न**

विवृतकटि-टी स्त्री. (नृत्य.) एका पायाच्या चवड्यावर उभे राहून दुसरा पाय अंतराळी ठेवून अर्धी गिरकी मारणे.

विवृति-ती स्त्री. विवरण; स्पष्टीकरण; फोड; उलगडा.

विवेक पु. १. विचार; चांगले-वाईट, हित-अहित कळण्याची शक्ती; तर्कशक्ती; बुद्धी. २. संयम; समंजसपणा; चित्तवृत्तींचा निरोध. ३.(वेदान्त.) नित्य-अनित्य, सत्य-असत्य यातील भेद जाणण्याचे ज्ञान; साधन चतुष्टयातील पहिले साधन. ४. वाटाघाट, चर्चा वगैरेमुळे होणारा समेट, तह. [सं.]

विवेकवादी पु. बुद्धिवादी; विचाराला पटेल तेच मानणारा. (इं.) रॅशनॅलिस्ट.

विवेकसभा स्त्री. पंडितांनी चर्चा करण्याची जागा.

विवेकी,विवेचक वि. विचारी; तारतम्याने विचार करू शकणारा.

विवेचन न. १. तारतम्य; भागशः पृथक्करण करून, विभाग करून केलेला विचार; सर्व बाजूंनी केलेला विचार; योग्यायोग्यविचार. २. स्पष्टीकरण; फोड; उलगडा.

विवेचित वि. तारतम्य जाणले आहे असा.

विव्हल-ळ वि. व्याकूळ; दुःखी; त्रस्त. [सं. वि+ह्वल्]

विव्हळगौर स्त्री. नेहमी रडकथा गाणारी, कुरकुरणारी स्त्री.

विव्हळा स्त्री. यातना; दुःख; पीडा.

विशकल वि. मोडून तुकडे झालेला.

विशद वि. १. स्पष्ट; प्रांजळ; स्वच्छ; प्रकट; दिसण्यासारखे. २. उघडे; ऐसपैस; मोकळे; विस्तृत. [सं.]

विशय पु. विषयाविषयी संशय.- धर्मशास्त्रविचार, काणे. [सं.]

विशरण न. सडकेपणा; कुजणे; विध्वंस; विघात; विच्छेद. [सं.]

विशंक वि. क्रिवि. निर्भय; शंकारहित; निःसंशय.

विशाखा स्त्री. सोळावा नक्षत्रपुंज. [सं.]

विशानणे अक्रि. चवताळणे; चिडून सरसावणे : 'यादव रणीं विशानला मारितां'- गरा १५७.

विशाप वि. शापातून मुक्त झालेला; उःशाप मिळालेला.

विशारद पु.प्रवीण; निपुण; विद्वान; पटाईत. [सं.]

विशाल-ळ वि. लांबरुंद; भव्य; मोठा; अवाढव्य; विस्तृत; अफाट.

विशालकोन पु. (भूमिति.) काटकोनापेक्षा मोठा व सरळकोनापेक्षा लहान (९०° ते १८०° मापातील) कोन.

विशाळणे अक्रि. मोठे होणे.

वि(ई)शाळू वि. विषयी; विषयासक्त.

विशिख वि. शेंडी नसलेला.

पु. १. यवन. - ऐलेसं ५४७९. २. इंग्रज. - पया १७५. ३. बाण. [सं.]

विशिष्ट वि. १. काहीतरी ठळक गुण असणारा; काही असामान्य गुणामुळे उठून दिसणारा; विशेष लक्षणांनी युक्त. २. युक्त; संबद्ध; अंगी असणारा; अंतस्थ किंवा अधिष्ठित असलेला. उदा. जलविशिष्ट पात्र इ. ३. असामान्य; असाधारण; श्रेष्ठ; निराळा. [सं.]

विशिष्ट उष्णता (शाप.) पदार्थाचे एक अंश तापमान वाढविण्यास लागणारी उष्णता.

विशिष्टगुरुत्व न. (शाप.) पदार्थाचे पाण्याशी तुलनात्मक भारमान.

विशिष्टाद्वैत न. (तत्त्व.) रामानुजाचार्यांचे मत. चिदचिद्विशिष्ट ईश्वर एकच होय व ईश्वरशरीरातील या सूक्ष्म चिदचिदापासून पुढे स्थूल चित व अचित किंवा अनेक जीव व जगत निर्माण होतात हे मत.

विशी स्त्री. १. वीस वर्षांचे वयोमान. २. वीस वस्तूंचा समुदाय, गट. [सं.विंशति] (वा.) **विशी बाविशी, एकुणविशी** - किंचित चढउतार; थोडा फरक.

विशी शअ. पहा : **विषयी**

विशीर्ण वि. जीर्ण; सगळे भाग, अवयव वेगवेगळे झालेला; चुराडा झालेला. [सं.]

विशुद्ध धावि. शुद्ध; स्वच्छ; निर्मळ; धुतलेला. [सं.]

विशुद्धचक्र न. (योग.) कंठाच्या ठिकाणी असणारे षट्चक्रांपैकी एक कमळ.

विशुद्धी स्त्री. १. स्वच्छता. २. शुचिर्भूतपणा; पावित्र्य. ३. निर्दोषता; अचूकता; बिनचूकपणा. [सं.]

विशृंखल वि. बंधमुक्त; अनिर्बंध; स्वैर; मोकाट. [सं.]

विशेष पु. १. असामान्य गुण, धर्म, लक्षण, चिन्ह; वैशिष्ट्य; वैलक्षण्य; एकदेशीयता; असाधारणपणा; निराळेपणा; श्रेष्ठता. २. विशिष्ट गोष्ट, व्यक्ती; विशिष्ट गुणधर्माने युक्त पदार्थ. ३. अपवाद. ४. (गणित.)

अंतर; फरक; विवक्षित प्रमाणापेक्षा अधिक. ५. माहूर व गंगातीर या दोन तीर्थस्थानांतील दगडाला महानुभाव लोक विशेष म्हणतात. ६. (वैशेषिक दर्शन) सप्तपदार्थांतील एक पदार्थ.

वि. असामान्य; असाधारण; सुप्रसिद्ध; बराच मोठा; अधिक; वरचढ.

क्रिवि. मुद्दाम; प्रामुख्याने; बहुतकरून. [सं.]

विशेष पु. धूप; एका वृक्षाचा रस, चीक.

विशेषक न. एकच कल्पना व्यक्त करणाऱ्या लागोठ येणाऱ्या श्लोकांचा समूह.

विशेष गुण पंचमहाभूतांचे शब्दादी पाच गुण.

विशेषण न.(व्या.) १. गुण किंवा संख्या दाखवणारा शब्द; नामाबद्दल अधिक माहिती देणारा शब्द. २. कर्त्याविषयी विशिष्ट विधान करणारा शब्द; विधेय. ३. विशेष वर्णन. [सं.]

विशेषणे अक्रि. विशेष वर्णन करणे.

विशेषत: क्रिवि. मुख्यत्वेकरून; प्राय; मुद्दाम.

विशेषनाम न. (व्या.) वस्तूचे, स्थानाचे, व्यक्तीचे नाव; ज्या नामाने विशिष्ट वस्तूचा, व्यक्तीचा, प्राण्याचा वगैरे बोध होतो ते नाम.

विशेषलिंग न. विशेष, महत्त्वाच्या, प्रमुख विभूती : 'तेवीं माझिया विशेषलिंगां । नाहीं मिती ।'- ज्ञा १०.३०१.

विशेष ज्ञान ब्रह्मज्ञान; जीवाचे, चैतन्याचे ज्ञान.

विशेषात्कार पु. असामान्यत्व; चमत्कृती; वैशिष्ट्य; निराळेपणा.

विशेषित वि. प्रसिद्ध; विशेष गुणधर्माने ज्ञात; निर्दिष्ट. [सं.]

विशेषोक्ति-क्ती स्त्री. एक अर्थालंकार. कारणसमुच्चय असून कार्योत्पत्ती होत नाही अशा ठिकाणी हा अलंकार असतो.

विशेष्य न. (व्या.) १. विशेषण ज्याचा गुण दाखवते ते; नाम; द्रव्यवाचक शब्द. २. कर्ता; उद्देश्य. [सं.]

विशेष्यनिघ्न वि. (व्या.) विशेषण; विशेष्याच्या, नामाच्या लिंगवचनाच्या अनुषंगाने असणारे.

विशो-षो पु.विषय.

विशोक वि. दु:ख, मानसिक त्रास यापासून अलिप्त. [सं.]

विशोधित वि. शुद्ध केलेले. [सं.]

विशोभित वि. शोभा, सौंदर्य, डौल नसलेले; बेढब.

विश्रंभ पु. विश्वास; मैत्री; दृढ स्नेह. [सं.]

विश्राम पु. १. विश्रांती. २. विश्रांतिस्थान. [सं.]

विश्रामणे, विश्रांतणे अक्रि. विसावा घेणे.

विश्रांत वि. १. श्रम, काम यापासून मुक्त; स्वस्थ. २. दमलेला भागलेला; थकलेला.

न. १. आश्रयस्थान; विश्वासाचे ठिकाण. २. समाधान. - ऐको. [सं.] (वा.) ० **करणे** - संपवणे; नष्ट करणे.

विश्रांतचैतन्य न. महानुभाव मतानुसार परमेश्वराच्या अवताराच्या शरीरात विसावलेले चैतन्य.

विश्रांती स्त्री.१. विसावा; आराम; सुट्टी; फुरसत; स्थिरता. २. करमणूक; (श्रमानंतरचा) आराम; मनोविनोदन. ३. करमणुकीचे साधन (खेळ इ.). ४. (विनोदाने) काम, श्रम इ. पासून सुटका. ५.पर्यवसान; शेवटची, परिणामीची स्थिती; अंतिम स्थिती; मोक्ष. ६. भरवसा; अवलंबन. [सं.]

विश्रुत वि. प्रसिद्ध; प्रख्यात; नावाजलेला. [सं.]

विश्लेष पु. १. वियोग; विरह; ताटातूट. २. वेगळे करणे; अलग, ताटातूट इ. करणे. ३. (गणित) वजाबाकी.

विश्लेषजाति-ती स्त्री. उणे संख्यांची बेरीज.

विश्लेषण न. (शाप.) पृथक्करण; विघटन.

विश्व न. जग; सृष्टी.

पु. (वेदान्त.) देहाला, अन्नमय कोशाला 'मी' मानणारा जीव.

वि. १. सर्व; सगळे. २. अचाट. ३. अगणित. ४. सार्वत्रिक; सगळ्याला लागू होणारे. ५. व्यापक. [सं.]

विश्वकर्मा पु. १. ब्रह्मदेवाचा पुत्र व देवांचा शिल्पकार; सुतार; कारागीर. २. हुशार कारागीर; शिल्पी.

विश्वकुटुंबवादी पु. सर्व जग हे एक कुटुंब असून सर्व लोक त्या कुटुंबातील भागीदार आहेत असे मत असणारा.

विश्वकोश पु. सर्व विषयांचे ज्ञान देणारा मोठा ग्रंथ; ज्ञानकोश.

विश्वजनीन-य वि. सर्व जगाला योग्य, सोयीस्कर, हितकर, लाभदायक.

विश्वजित पु. १. यज्ञाचा एक प्रकार. यात यजमानाने सर्व संपत्तीचे दान करायचे असते. २. जग जिंकणारा.

विश्वतोभय पु. सर्व बाजूंनी भय उत्पन्न करणारा.

विश्वत: क्रिवि. सर्व ठिकाणी; सर्वत्र. [सं.]

विश्वतश्चक्षु-क्षू पु. ज्याला सर्वत्र डोळे आहेत,सगळीकडचे ज्याला दिसते असा; परमेश्वर.

विश्वदुनी स्त्री. सर्व जग; सर्व सृष्टी; अलमदुनिया याप्रमाणे.

विश्वब्राह्मण पु. सुवर्णकार; देवशिल्प करणारी जात.

विश्वभेषज न. सार्वत्रिक औषध; सुंठ : 'मध आणि विश्वभेषज हे पदार्थ दारूंत मिसळून द्यावेत.'- अश्वप २.१३४.

विश्वरूप वि. १. सृष्टीतील सर्व वस्तूंची रूपे धारण करणारा; सर्व चराचरात असणारा; ब्रह्माचे उपपद. २. व्यापक; महत्त्वाचा.

विश्वविद्यालय न. विद्यापीठ; अनेक विद्यांचे अध्ययन- अध्यापन इ. करणारी संस्था. (इं.) युनिव्हर्सिटी.

विश्वसनीय वि. खात्रीलायक; विश्वास ठेवण्याजोगे; विश्वासू; प्रामाणिक; पतदार. [सं.]

विश्वसंस्था स्त्री. (ज्यो.) सूर्य, चंद्र, ग्रह, तारे व इतर आकाशस्थ ज्योती ज्या आकाशाच्या प्रदेशात कार्य करतात तो प्रदेश. (इं.) युनिव्हर्स.

विश्वसित धावि. ज्यावर विश्वास, भरवसा ठेवलेला आहे असा.

विश्वस्त वि. १. विश्वासून राहिलेला; ज्याने भरवसा ठेवलेला आहे असा. २. विश्वासू; खात्रीचा. ३. एखाद्या व्यक्तीची अथवा संस्थेची मालमत्ता सुरक्षितपणे ताब्यात ठेवणारा. (इं.) ट्रस्टी.

विश्वा-स्वा पु. विसावा अंश; निश्चित प्रमाणाचा विसावा भाग; रुका किंवा रति यांचा विसावा भाग.[सं. विंशति] (वा.) **अठरा विश्वे दारिद्र्य असणे** - पूर्ण दारिद्र्य म्हणजे वीस विश्वेपैकी अठरा विश्वे

म्हणजे जवळ-जवळ पूर्ण दारिद्र्य असणे.

विश्वा घाट घाटातील विश्वा नाण्यांतील जकात; बाजारावरील कर.

विश्वामित्र पु. १. एक प्रसिद्ध ऋषी; श्रीरामाचे गुरू. २. (संकेताने) अत्यंत त्रासदायक मनुष्य.

विश्वामित्रसृष्टी स्त्री. विश्वामित्राने निर्माण केलेली सृष्टी, उत्पन्न केलेल्या वस्तू. ब्रह्मदेवाशी स्पर्धा करून विश्वामित्राने प्रतिसृष्टी निर्माण केली अशी कथा आहे. त्यापैकी मनुष्याच्या डोक्यासारखा नारळ, गाईऐवजी म्हैस, घोड्याऐवजी गाढव ही उदाहरणे देतात.

विश्वामित्री स्त्री. म्हैस (विश्वामित्र सृष्टीतील म्हणून संकेताने) : 'विश्वामित्री पोटीं तयाचा अवतार। नांव महाखर चांडाळाचें ।'- तुगा २८४५.

विश्वावसु-सू पु. एकोणचाळिसावे संवत्सर.

विश्वास पु. १. भरवसा; खात्री; निश्चय; इमानदारी. २.श्रद्धा; मनाचा अनुकूल ग्रह. [सं.]

विश्वासघात पु.१. विश्वास दाखवून केलेली फसवणूक; खोटेपणा; दगलबाजी; बेभरवसा. २. (कायदा) विश्वासाने ताब्यात दिलेल्या मालाचा लबाडीने गैरशिस्त उपयोग करणे.

विश्वासघातक-की वि. बेइमान; लबाड; खोटा; कृतघ्न.

विश्वासजामीन-प्रतिभू पु. खात्रीसाठी जबाबदार; विश्वासूपणाबद्दल हमी, हवाला देणारा.

विश्वासणे अक्रि. १. भरवसा, स्वाधीन ठेवणे. २. अवलंबून राहणे; भरवशावर राहणे; हवाली, स्वाधीन करणे. ३. खरे, सत्य मानणे.

विश्वासला पु. ज्याने विश्वास ठेवला आहे असा : 'विश्वासला आतुडवीजे चोरा ।'- ज्ञा १६.२६०.

विश्वासू, विश्वासि(सु)क, विश्वासी वि. प्रामाणिक; विश्वास ठेवण्यालायक; भरवशाचा.

विश्वेदेव पु. अव. स्वर्गातील दहा देवतांचा एक समूह. श्राद्धाच्या वेळी याला आवाहन करतात.

विश्वोदयपंथ पु. माया.

विष न.१. जे पोटात गेल्यास जीव जातो असे, शरीरात गेल्यास प्राणघातक ठरते असे द्रव्य. याचे नऊ प्रकार आहेत. २. (ल.) अत्यंत कडू पदार्थ; घातक, मारक, बाधक, अहितकारक पदार्थ. ३. (ल.) ज्यापासून अपाय, घात होण्याची शक्यता आहे अशी वस्तू, संपत्ती इ. [सं.](वा.) ० **मानणे** – अत्यंत तिटकारा, तिरस्कार करणे. **विषाची परीक्षा पाहणे** – एखादा भयंकर, जिवावर बेतणारा प्रयोग, साहस करणे.

विषकट वि. अवाढव्य; विशाल; विस्तीर्ण; राक्षसी; प्रमाणाबाहेर मोठे. [सं. विष्]

विषघटी स्त्री. अव. (ज्यो.) नक्षत्रांच्या अशुभ मानलेल्या चार घटिका.

विषण्ण वि. खिन्न; दुःखी; म्लान; निरुत्साही. [सं.]

विषण्णदृष्टि-ष्टी स्त्री. (नृत्य.) बुबुळे इकडे-तिकडे हलवून मध्येच स्तब्ध करणे व अधोगत पाहणे.

विषदग्ध-दिग्ध वि. विष लावलेले.

विषप्रयोग पु. विषाचा उपयोग; विष देऊन, चारून, घालून मारण्याची क्रिया; विषाची योजना.

विषम न. संकट; अडचण : 'सांभाळा जी माझीं विषमें अनंता । जवळी असतां अव्हेरू कां।' -तुगा १५८८.

पु. १. भेदभाव.

वि. १. सम, सारखे नव्हे ते; दोनाने भाग न जाणारी (संख्या); कमी-जास्त; लहान-मोठे; व्यस्त. २. असमान; एका पातळीत, सरळ नसणारे; उंचसखल; वाकडातिकडा; भिन्न; नसणारे. ३. अशुभ; विरुद्ध; प्रतिकूल; उलटा; उफराटा. ४. कठीण; अवघड; त्रासदायक; मनाविरुद्ध; दुष्कर: 'अगा आपुला हा स्वधर्मु । आचरणीं जरी विषमु ।'- ज्ञा १८.९२३. ५. बिनतोड; अतुलनीय; अपूर्व. ६. अनियमित; प्रमाणाबाहेर; अवेळी केलेले; पचायला कठीण (भोजन, अन्न इ.). ७. वाकडा; तिरपा. ८. भिन्न. [सं.]

विषम अपूर्णांक (गणित.) छेदापेक्षा अंश अधिक असलेला अपूर्णांक.

विषमकेंद्र वि. १. दीर्घवर्तुळाकृती. २. केंद्रापासून हललेले, दूर झालेले; केंद्र सोडून फिरणारे. (इं.) एक्सेंट्रिक.

विषमग्रह पु. (संगीत) गान व ताल यांचा आरंभ व सम यांचा मेळ न बसणे.

विषम चिकित्सा पाश्चात्यवैद्यक; (इं.) ॲलोपॅथी.

विषम छाया सूर्य संपातात असताना शंकूची दुपारी पडणारी कमी-जास्त सावली.

विषमज्वर पु. १. ज्याची येण्याची व उतरण्याची वेळ निश्चित नाही असा, मुदतीचा ताप. २. अनियमितपणे येणारा ताप. [सं.]

विषम पाचन अपथ्यकर पदार्थ पचवणारे किंवा त्याचा दोष नाहीसा करणारे औषध किंवा पदार्थ; विषमज्वरावरील औषध.

विषमभाव पु. १. मनाचा कलुषितपणा; अंदेशा. २. दुजाभाव; आपपरभाव; कमी-अधिक लेखणे. ३. शत्रुत्व; वैर. ४. कमी लेखणे; कमी प्रतीचा, हीन मानणे. ५. असमानता; विषमता; भेद.

विषमवात पु. कुपित वात.

विषम(य)वासना स्त्री. पापेच्छा; विषयी, कामुक, लोभी आशा, इच्छा.

विषमस्थ वि. १. अडचणीत, संकटात सापडलेला. २. वाकडा, तिरपा उभा राहिलेला.

विषमक्षुरी वि. प्राण्यांचा एक वर्ग. या वर्गातील प्राण्यांच्या खुराला तीन गेळे, खूर असतात. उदा. गेंडा.

विषमज्ञान न. भेदज्ञान; समस्थिती ढळल्याचे ज्ञान.

विषमालंकार पु. एक अर्थालंकार. अपेक्षित, इच्छित वस्तू मिळवण्यासाठी प्रयत्न करत असता ती न मिळता भलतीच गोष्ट मिळाली असता हा अलंकार होतो.

विषय पु. १. इंद्रिये किंवा मन यांस ज्ञात होणारी वस्तू; ज्ञानाच्या कोणत्याही साधनाने माहीत होणारी गोष्ट. (समासात) विषय - भोग - त्याग - ज्ञान इ. २. एखाद्या क्रियेचा कर्ता किंवा कार्य; एखादा विकार अथवा भावनेशी संबद्ध गोष्ट; (कर्ता, करण, शक्ती अथवा

कार्याचा) प्रदेश, टप्पा, आटोका, स्थान वगैरे. (या अर्थी समासात) वर्णन-विचार - धर्म - निषेध इ. विषय. ३. कार्य; कर्तव्य; कार्यक्षेत्र; अधिकार; व्यवसाय; योग्य धंदा, काम. उदा. रफू करणे हा दाभणाचा विषय नव्हे. ४. उद्देश; हेतू; ध्येय; मनातील गोष्ट. ५. मुद्दा; प्रकरण; बाब; संबंध. ६. द्रव्य; ऐवज; माल. ७. महत्त्व; पर्वा; दरकार : 'स्वामीचा आशीर्वाद असतां इतरांचा विषय मानीत नाहीं.' - मइसा ३.३२४. ८. कामेच्छा : 'जैसें थोर विषय सुभगे अंगीं। अंगसानें।' - ज्ञा १६.२५३. ९. महानुभाव मतानुसार स्वर्ग, अंतराळ, आठ देवयोनी आणि कर्मभूमी या स्थानांतील देवतांचे मळ. [सं.]

विषयद्वार न. इंद्रिय.

विषयसुख न. १. इंद्रियजन्य सुख; सृष्टीतील विविध भोगांपासून विविध इंद्रियांना मिळणारे सुख. २. रतिसुख.

विषयासक्त, विषयी वि. १. भोगाला, विषयसुखाला लालचावलेला; कामी; गोडघाश्या. २. इंद्रियांना अगोचर, न कळणाऱ्या वस्तूंचे अस्तित्व न मानणारा. ३. ज्या गोष्टीचे एखादी वस्तू कार्य अथवा कर्ता असतो ती (गोष्ट).

विषयी शअ. संबंधी; बद्दल; अनुसरून; अनुलक्षून.

विषयीकरण न. इंद्रियांकडून स्वविषयाचे ग्रहण; इंद्रियाकडून त्या विषयाचे ज्ञान होणे.

विषवल्ली स्त्री. १. विषारी वेल. २. (ल.) दुष्ट मनुष्य.

विषवृक्षन्याय पु. स्वत: लावलेले झाड विषारी निघाले तरी ते तोडण्याची इच्छा होत नाही, त्याप्रमाणे एकदा आपला म्हटल्यावर मनुष्य वाईट निघाला तरी त्याला दूर लोटणे बरे नाही.

विषाचे घर ज्याने नाश किंवा संकट ओढवेल अशी गोष्ट.

विषाण न. १. शिंग. २. सुळा; सुळका. [सं.]

विषाद पु. १. खेद; दु:ख; निरुत्साह; निराशा. २. विरक्ती; कंटाळा; तिटकारा. [सं.]

विषादणे अक्रि. खेद मानणे; दु:खी होणे.

विषादी स्त्री. खेद, दु:ख वाटण्यासारखी स्थिती.

वि. १. खिन्न; निराश; म्लान. २. लवकर निराश होणारा; निरुत्साही; लवकर कंटाळणारा, विटणारा. [सं.]

विषानैनी वि. सापासारख्या लाल डोळ्याचा (घोडा). घोड्याचे एक अशुभ लक्षण.

विषार पु. १. विषबाधा; विषापासून पीडा, उपद्रव. २. विषारीपणा; विषयुक्तता. ३. साप.

विषारणे अक्रि. विषबाधा, विषप्रयोग होणे.

विषारी स्त्री. शेतात उगवणारी एक काटेरी वनस्पती. ही औषधी आहे.

वि. विषयुक्त.

विषालु-ळू वि. विषारी.

विषु न. मेष व तूळ राशींचा आरंभीचा बिंदू. यांत सूर्याने प्रवेश केला असता संपात होतो.

विषुपद न. शरत्संपात. - मपु ६, पृ. २९८.

विषुव, विषुवत्, विषुवद्वलय, विषुवन्मंडल, विषुववृत्त, विषुचक्र, विषुमंडल न. (ज्यो.) १. नाडीमंडळ; ज्या महावृत्ताची पातळी भूगोलाच्या अक्षाशी लंबरूप असते ते वलय. २. भूमध्यवृत्त; दोन्ही ध्रुवापासून सारख्या अंतरावरून, भूमध्यावरून जाणारे वृत्त; भूमध्यरेषा.

विषुव, विषुवत् न. सर्व पृथ्वीत दिवस व रात्र यांचे कालमान सारखे असते तो काल; संपात.

विषुवच्छाया, विषुवती स्त्री. सूर्य विषुववृत्तावर असता मध्यान्ही पडणारी शंकुच्छाया.

विषुवदिन पु. दिनमान व रात्रिमान समान असणारा दिवस.

विषुवांश पु. खगोलस्थ पदार्थाचे याम्योत्तरवृत्त विषुववृत्ताला ज्या बिंदूत छेदते त्या विषुवापासून म्हणजे संपातापासून अंतर.

विषूचिका स्त्री. पटकी किंवा महामारीतील पहिली अवस्था; हगओक.

विष्कंभ पु.(ज्यो.) सत्तावीस योगातील प्रथम योग. [सं.]

विष्कंभ पु.(नाट्य.) दोन अंकांच्यामध्ये पुढील कथाभागाची सूचना देणारा प्रवेश. [सं.]

विष्कंभ अंगहार (नृत्य.) एक हातापायांचा अंगविक्षेप.

विष्कंभकरण न. (नृत्य.) उजवा हात अपविद्ध करणे; उजवा पाय सूची करून जमिनीवर आपटणे व डावा हात वक्षस्थळावर ठेवणे.

विष्कंभापसृत अंगहार (नृत्य.) कृदित व भुजंगत्रासित करून उजवा हात रेचित करणे.

विष्टप पु. देव. [सं.]

विष्टर पु. मधुपर्काच्या वेळी अतिथी वगैरेंना आसनासाठी द्यावयाची दर्भांची विशिष्ट आकाराची मूठ; दर्भासन.

विष्टंभ, विष्कंयम पु. अडथळा; प्रतिबंध; अटकाव; अडचण. [सं.]

विष्टि स्त्री. १. वेठ; मजुरी न देता करून घेतलेले काम. २. वाहतूक : 'चतुरंग दलाशिवाय फौजेचीं आणखी चार महत्त्वाचीं खातीं होतीं. तीं विष्टि, नौका, हेर आणि देशिक अशीं सांगितलीं आहेत.'- हिंइइ ९. ३. (ज्यो.) सातवे करण. [सं.]

विष्ठा-ष्टा स्त्री. मल; गू. [सं.]

विष्णु-ष्णू पु.१. त्रिमूर्तींपैकी एक देवता; विश्वाचा पालनकर्ता. २. (संगीत.) एका ताल. यात मात्रा सतरा व विभाग पाच आहेत. [सं.]

विष्णुक्रांत-ता पु.स्त्री. एक औषधी वनस्पती. हिची फळे काळसर तांबूस रंगाची असतात.

विष्णुक्रांतकरण न. (नृत्य.) उजवा पाय चालण्याच्या बेतात पुढे करून कुंचित करणे व रेचित करणे.

विष्णुपुरी स्त्री. (संगीत.) बंगालमधील विष्णुपूर या गावावरून पडलेले एका गायनपद्धतीचे नाव.

विष्णुबलि-ली पु. १. सोळा संस्कारांपैकी एक संस्कार. गर्भधारणेला प्रतिबंधक अशा प्रेताच्या प्रेतत्वनिवृत्तीसाठी हा करावयाचा असतो. २. संन्याशाच्या मृत्यूनंतर तेराव्या दिवशी करण्याचा विधी.

विष्णुवात स्त्री. १. चार बोटे रुंदीची, पाचपदरी, कापसाची, सुताची वात. २. चौदापदरी वात.

विष्णुशयन न. चातुर्मास्य. (आषाढी एकादशीपासून कार्तिकी

एकादशीपर्यंत देव निद्रिस्त असतात यावरून.)

विष्णुशृंखलायोग पु. वामनद्वादशीच्या आदल्या दिवशी एकादशीविद्ध द्वादशी आणि श्रवणनक्षत्र आल्यास हा योग मानतात.

विष्णूची तीन पदे दोन भुवयांमधील प्रदेश.- योर १.२६.

विस न. पीस : 'मोरविसांचिए निहटीं : मिरवे सुढाळा मोतियांची वेठी' - वह २४४.

विसकट पु. दाणादाण; अस्ताव्यस्त स्थिती; विसकळित अवस्था : 'जेंवि महावात करी अभ्रांचा न लावितां पळ विसकट।'- मोभीष्म १०.११४.

विसकटणे उक्रि. १. अस्ताव्यस्त करणे; हलवाहलवी करणे; उधळून टाकणे. २. (ल.) गोंधळ, घोटाळा करणे. [सं. वि + शकलन]

विसकटाविसकट-टी स्त्री. ओढाताण; गोंधळ; घोटाळा; पसारा.

विसकणे अक्रि.१.(दुभते जनावर) दूध देण्याचे बंद होणे, आटणे. २. आटणे; वाळणे. [सं. वि + सच्]

विसकरणे उक्रि. विसकटणे.

विसकळ स्त्री. १. (शब्दशः) पसरलेली, विलग स्थिती. २. (ल.) अव्यवस्थित, घालमेलीची, घोटाळ्याची, गोंधळाची स्थिती.

वि. १. (झाडे, घरे, वस्तू यांची) मोकळी, दूरदूरची, पातळ, बिनदाटीची (स्थिती). २. ऐसपैस; लांबरुंद; उघडी; बंदिस्त नसणारी (जागा इ.). ३. स्पष्ट; घळमळीत; मोकळेचाकळे; काठीण्यरहित.

विसकळणे उक्रि. अस्ताव्यस्त, गैरशिस्त, घोटाळ्याचे, पांगापांग होऊन पडणे; गोंधळ माजणे.

विसकळित धावि. १. अस्ताव्यस्त होऊन, पांगून पडलेले. २. अव्यवस्थित, घोटाळ्याचे, गुंतागुंत झालेले.

विसका वि. आटलेले; उडालेले; भाकड (जनावर).

विसकुस-से स्त्री. न. १. बिघाड; गोंधळ; अस्ताव्यस्तपणा. २. कासाविशी.

विस(सु)कुसणे उक्रि. विस्कटणे; गोंधळणे; घोटाळणे; बिघडणे : 'एवं द्वैतासी उमसों। नेदी ऐक्यासी विसकुसों ।'- अमृ २.६९. [सं. विकुस्त + कुस्म्, वि + संम् + उत् + कुष्]

विसकूस वि. गोंधळलेली; विसकटलेली.

विसड वि. सडलेले.

विसडानि स्त्री. दुर्गंधी : 'तेथ विसडानि उठिली थोर : तेणें कांटाळे देतीं आसुर' - रुस्व २२७९.

विसडावणे सक्रि. तिरस्कार करणे.

विसण न. गरम पाण्याची उष्णता कमी करण्यासाठी त्यात घालण्याचे थंड पाणी. [सं. वि + शमन, अनुष्ण]

विसणणे क्रि. गरम पाण्यात थंड पाणी घालणे.

विसणणे अक्रि. आवेशयुक्त होणे; सरसावणे; चिडणे; उसणणे. [सं. आवेशन, वि + क्षन्]

विसणैल वि. आवेशात आलेला : 'आवेसें भुजा त्राहाटिति । विसणैले हांका देती'।- ज्ञा १.१३३.

विसनखी वि. १. वीस पाय असणारा विषारी, क्षुद्र प्राणी. २. (सांके.) स्त्री-संगीत घोटाळा ११. ३. वीस बोटे असलेला (कुत्रा इ. प्राणी). ४. गरमीचा रोग.

विसनखीचा उपद्रव, पीडा, बाधा, दुःख १. संसर्गजन्य रोग; उपदंश; गरमी. २. (बायकी) गर्भारपण; गरोदर राहणे : 'कसला रोग अन कसलें काय ? वीस नखांची बाधा झालेली.'- झांमू. ३. व्यभिचाराचे व्यसन.

विसप-ब पु. इसब; एक प्रकारचा त्वचारोग. [सं. विसर्पिका]

विसबंद स्त्री. मेंदी : 'माळ्याला ताकीद । विसबंदीच्या रोपांची।' - स्त्रीगी ३८.

विसर पु. १. विस्मरण; आठवण नाहीशी होणे. २. विसराळूपणा; स्मरशशक्तीतील दोष, व्यंग. ३.स्मृतिभ्रंश; भ्रम; भूल; भुरळ; धारणाशक्तीचा ऱ्हास. [सं. विस्मरण]

विसरणे अक्रि. १. आठवण न राहणे. २. हयगय, हेळसांड करणे.

विसरभोळा-शील, विसराळू वि. विसरण्याचा स्वभाव असणारा.

विसरसांड स्त्री. १. हेळसांड; हयगय. २. क्षमा (अपराधाची).

विसरी-रा स्त्री. पु. विस्मरण; विसर.

विसर्ग पु. मृदू महाप्राण; हकार; हा ':' चिन्हाने दाखवतात. हा स्वरांच्यापुढे किंवा क, ख, प, फ, श, ष, स हे वर्ण पुढे आले असता पूर्वव्यंजनातील अन्तस्थ अ स्वरापुढे येतो. तसाच शेवटी येतो. प्रत्ययाच्या अंती असणाऱ्या स, र या व्यंजनांबद्दलही याचा प्रयोग होतो. [सं.]

विसर्ग पु. १. त्याग; विसर्जन; सोडणे; टाकणे. २. पाद. ३. कावळ्याचे कोकावणे : 'कागे... पीडिलें ज्या विसर्गे'- गरा ९. [सं.]

विसर्जणे उक्रि.१. त्याग करणे; सोडणे; टाकणे. २. मुक्त करणे; निरोप देणे; समाप्त करणे; बोळवण, पाठवणी करणे. [सं. वि +सृज]

विसर्जन न. १. त्याग; सोडणे; मुक्त करणे; टाकणे; उत्सर्ग. २. पाठवणी; बोळवण; निरोप देणे. ३. शरीरातून बाहेर टाकण्याची क्रिया. (इं.) रेडिएशन.

विसर्जित वि. १. व्यक्त; मुक्त; सोडलेला; टाकलेला. २. बोळवण, पाठवणी केलेला.

विसर्प,विसर्पिका पु.स्त्री. इसब; धावरे; एक त्वचारोग. [सं.]

विसवटा पु. विसावा; विश्रांती.

विसवणे उक्रि.थंड, शांत करणे. पहा : **विझवणे**

विसवा, विस्वा पु. विसावा भाग. पहा : **विश्वा**

विसवाट न. घराभोवतीचे आवार; कुंपण.

विसवाविसवी क्रिवि. आळीपाळीने; विसावा घेऊन.

विसविशीत वि. मऊ; पातळ विणीचे; पिळदार नसणारे.

विसळणे उक्रि. धुणे; खळबळणे; पाणी घालून खळखळून टाकणे. [सं. विक्षालन]

विसळवणी, विसुळणी न. विसळण्याचे पाणी.

विसंगत वि. असंबद्ध; विजोड; बेताल; भरमसाट. [सं.]

विसंच पु. बिघाड; घोटाळा; नाश : 'विसंच बहु जाला तरी लाज ।'- दावि २६४.

वि. बिघडलेले; नष्ट; नाहीसे : 'जेणें दृश्य केलें विसंच । तयास कैचा

होय प्रपंच ।'- दास ८.९.३२.

विसंचणे अक्रि. १. बिघडणे; नासणे; विकार पावणे. २. त्रासणे; पीडित होणे. ३. विसकळीत होणे. [सं. वि + संच् गत्यर्थक]

विसंधित वि.१. सांधा, जोड उखळलेले; निखळलेले. २. (ल.) असंबद्ध; विसंगत (बोलणे वगैरे). [सं.वि + संध्]

विसंब पु. १. विश्रांती; विसावा. २. विस्मरण. ३. त्याग.

विसंब(भ)णे, विसमणे अक्रि. १.विश्रांती, विसावा घेणे; भार, विश्वास टाकणे; थांबणे. २. विसरणे; सोडणे; टाकणे; दूर ठेवणे. [सं. वि + श्रम्]

विसा स्त्री. वीस; खंडी; वीस संख्येचे माप. [सं.विंशति]

विसाड न. १. नांगराचा दांडा. २. कलम.

विसाणणे उक्रि. विसण घालणे.

विसाप-ब पहा : **विसर्प**

विसार-रा पु. बयाणा; आगाऊ घेतलेला पैसा; सचकार; इसारा : 'होतें गोविलें विसारें। माप जालें एकसरें ।'- तुगा १९६०.

विसारणे सक्रि. दूर लोटणे; दूर करणे; विसरवणे : 'आपुला मधुर स्वरीं । हे सदां कोकिळांतें विसरी ।'- शिव ८०३.[सं. वि + सृ]

विसावण पहा : **विसण**

विसाव(वि)णे अक्रि. १. विसावा, विश्रांती घेणे. २. क्षणभर थांबणे; स्थिरावणे. ३. (एकाच स्थितीत किंवा फार वेळ स्थिर राहिल्यामुळे अवयव, गात्र) स्तंभित होणे; ताटकळणे; सवय, सराव नाहीसा होणे. ४. आळसावणे; ढिलावणे; मंदावणे; शिथिल होणे (मनुष्याचे शरीर, उत्साह, गात्र वगैरे). ५. पडणे; खचणे; मोडणे (भिंत इ.). न. विश्रांतिस्थान : 'जे आदिप्रकृतीच विसवण ।'- ज्ञा ६.१२. [सं. वि + श्रम्]

विसावा पु.१. विश्रांती; आराम. २. श्रमपरिहार; स्वास्थ्य; करमणूक. ३. श्रमपरिहाराचे, करमणुकीचे साधन. ४. विश्रांतिस्थान; आश्रय : 'विसांवा मोडला । साधुजनांचा।'- भाए १००. [सं. विश्राम]

विसाळ-ळा पु. १. ईर्षा; स्पर्धा; द्वेष : 'विसाळाचेनि नेटें। विष घ्यावस वाटे ।'- दास २.६.१३. २.एक प्रकारची बाधा; पिशाचबाधा.

विसि(सी)फ पु. गुरे बसण्याच्या जागेत आढळणारा किडा; विसाप : 'विसीफ भोवर गोचिड जाणा।'- दास ३.७.७. [सं. विसप]

विसुगी स्त्री. बडबड :'ऐसी विसुगी लावा'- लीचपू २०८.

विसुरा पु. चमत्कार; विस्मय. [सं. वि + स्मृ]

विसुरा पु.१. विचार; अभिप्राय; तात्पर्य : 'परिणामाचा हि विसुरा । सांगितला ।'- ज्ञा १७.१५२. २. चमत्कार; विस्मय; आश्चर्य : 'अनंगा केउता हाथिएरु । फुन सदा विसुरा करी थोरू ।'- शिव २६५. ३. समुदाय : 'जे ते विश्वाळंकाराचे विसुरे ।'- ज्ञा ६.१८. ४. चित्र. ५. भ्रांती; भ्रम. [सं. वि + चर]

विसुरा पु. १. विस्तार. २. ऐश्वर्य; समृद्धी. [सं. विस्तार]

विसूचिका पहा : **विषूचिका**

विसूत्र वि. सरळ सुतात नसलेले; वाकडेतिकडे; अनियमित; अपवादभूत; असामान्य; स्वैर. [सं.]

विसृत पहा : **विस्तृत**

विसोरा-रे पु. न. विसरा : 'अनलें घेतल्या मंदिरा । माजि ठेवा विसोरा ।'- गीता २.१४४.

विसोळ न. बागायताभोवतालची नंबरातील जमीन. (गो.) [सं. वि + शाली]

विसोळा पु. घरटे. [सं. वि + शाला]

विस्कटणे, विस्कटाविस्कट, विस्कळ, विस्कळणे, विस्कळित पहा: **विसकटणे** इ.

विस्तर पहा : **विस्तार** १,२

विस्तरणे अक्रि. १. पसरणे. २. लांबण, पाल्हाळ लावणे. [सं. वि + स्तृ]

विस्तव पु. अग्नी; आग; जाळ. [सं. वैश्वानर, इष्टावह] (वा.)(**मधून**) **विस्तव न जाणे** – वितुष्ट, वैर असणे.

विस्तवणे सक्रि. (शब्दशः व ल.) जाळणे.

विस्तार पु.१. प्रसार; पसारा; फैलाव. २. (ल.) पाल्हाळ; लांबण; विकास; वाढ; विवेचन; प्रपंच (विषय, मुद्दा, गर्भ इ.). ३. रुंदी. ४. झाडाच्या फांद्या, पालवी वगैरेचा व्याप. ५. प्रजा; संतती.[सं.]

विस्तारणे उक्रि. पसरणे; वाढ होणे; वाढवणे.

विस्तारणे सक्रि. निरनिराळे करणे. उदा. सागुती इ. (कु.)

विस्तारी स्त्री. पत्रावळ. [सं. वि + स्तृ]

विस्तावा पहा : **इस्तावा**

विस्तु-स्तो, विस्तू(स्तो,स्ते)व पहा : **विस्तव**

विस्तृत धावि. विस्तार पावलेले, केलेले; अफाट; विस्तीर्ण; लांबरुंद; ऐसपैस; पसरलेले. [सं.]

विस्तृति-ती स्त्री. विस्तार; प्रसार; वाढ.

विस्फुलिं(ल्लिं)ग पु. अग्नीची ठिणगी. [सं.]

विस्फोट पु. फोड; गळू; उठाणू; बेंड; करट. [सं.]

विस्फोटक तूल ज्वालाग्राही, स्फोटक कापूस; नत्रिकाम्लात भिजवलेला कापूस. (इं.) गनकॉटन.

विस्मय पु. आश्चर्य; चमत्कार; अचंबा; नवल. [सं.]

विस्मयजनक, विस्मयावह, विस्मापक वि. आश्चर्यकारक.

विस्मर,विस्मरण, विस्मृती पु.न. स्त्री. १. विसर. २. भूल; भ्रम. [सं. वि + स्मृ] (वा.) **विस्मृतीखाली पडणे** – सवयीचे होणे.

विस्मावणे अक्रि. आश्चर्य पावणे; चकित होणे.

विस्मित धावि. आश्चर्यचकित.

विस्मृत धावि. विसरलेले; आठवणीतून, लक्षातून गेलेले.

विस्मृती पहा : **विस्मर**

विस्रगंध पु. कच्च्या मांसाचा वास; कुजकट घाण. [सं.]

विस्वर पु. बेसूर, कर्कश आवाज; बदसूर. [सं.]

विस्वाद वि. अरुचिकर; स्वाद नसणारे; बेचव.

विह(हं)ग, विहंगम पु. न. पक्षी; पाखरू.

विहट पु. पीछेहाट : 'वीरा विहटु जाला'- उह २०२७. [सं. वि + घट्]

विहनन न. हत्या. [सं.]

विहरण, विहार न. पु. १. क्रीडा; खेळ; करमणूक; गंमत; मजा; मौज. २. आनंदाने फिरणे, चालणे, भटकणे. ३. बौद्धांचा मठ; बौद्ध भिक्षूंची राहण्याची जागा. ४. राहण्याचे ठिकाण, स्थान : 'किं महाबोधें विहार। केले जैसे ।' – ज्ञा ५.१३८. ५. संभोगक्रीडा : 'ओव्हारीएतें विहरणीचीया खुणा पुसिविलीया।' – लीचपू १७. [सं.]

विहरण न. आळ; अपयश; निमित्त :'गणेश गेला लाडू घेऊन । मजवरि आलें विहरण।' – ह ८.३०. [सं.]

विह(हा)रणे अक्रि. विहार, क्रीडा करणे. [सं. वि + हृ]

विहरा पु. पहा : **विहि(ह,ही)रा** ३

विहसित न. स्मितहास्य, हसित यांहून अधिक स्पष्ट हसणे. [सं.]

विहंगममार्ग पु. १. (योग.) त्वरित समाधी साधण्याचा मार्ग. याउलट पिपीलिकामार्ग. २. (ल.) कोणतेही काम लवकर साधण्याची रीत.

विहार पहा : **विहरण**

विहारी वि. १. विहार, क्रीडा करणारा. २. रंगेल; चैनी; इष्कबाज; छंदी. [सं.]

विहा(ह्या)ळी स्त्री. १. विहार; क्रीडा: 'विचरे कामविहाळी । विषमपणेंचि निहाळी।'– आपद ५१.२. २. शिकार.

विहिणे सक्रि. विधान करणे; सांगणे; उपदेश करणे : 'आम्हीं हा स्वधर्मुचि विहिला असे ।'– ज्ञा ३.८८. [सं. वि + धा]

विहित धावि. १. शास्त्राने सांगितलेला, निर्दिष्ट केलेला, उपदेशिलेला. २. योग्य; उचित; रास्त. ३. ठेवलेला; दिलेला; स्वाधीन केलेला.

विहितत्व न. १. कर्तव्यता; कार्यप्रवणता; २. नियतत्व.

विहि(ह,ही)रा पु. १. मोठी विहीर; कुवा; बाव. २. झरा; पाझर: 'डुरे विहीरे पाझर।' – दास १६.४.७. ३. नदीच्या पात्रातच खणलेला खोल खड्डा. [सं. विवर]

विहीण स्त्री. आपल्या मुलाची किंवा मुलीची सासू.

विहीत (को.) पहा : **वीत**

विहीन वि. रहित; विरहित; उणीव किंवा अभाव असलेले; शिवाय, वाचून असलेला; शून्य; (समासात) प्राण-जल इ. विहीन. [सं.]

विहीर स्त्री. आड; कूप; कुवा; बाव. [अर.वीर]

विहीरवणी न. विहिरीतले पाणी.

विहीरहुंडा पु. बागाईत किंवा पाटस्थळ जमिनीवरील सारा, कर : 'नंतर धूर्त विशाळमती । सांगे विहीरहुंडा ठरोती ।'– पैमा.

विहेवराडे विवाह; वऱ्हाड; लग्नकार्य. – ऐको.

विह्न पहा : **व्यूह**

विह्वल, विह्वलित, विह्वलगौर इ. पहा : **विव्हळ** इ. [सं.]

विळ पु. १. ब्रह्मदेवाचा दिवस : 'जै चौकडिया सहस्त्र जाये। तैं ठायेठायो विळुचि होये ।'– ज्ञा ८.१५६. २. काळ; वेळ : 'तुजपार्शी आम्ही बसतो सारा विळ ।'– होला ८५. [सं. वेला]

विळखा–का पु. वेढा; वळसा; वेटोळे; मिठी; पकड; फेरा; लपेटा. [क. ओळगु; सं. विश्लिक्षा]

विळखा अढी (मल्लखांब) मल्लखांबाला हाताचा विळखा घालून मारण्याची उडी.

विळखा अढी फरारा (मल्लखांब) विळखा अढी घेऊन केलेला तोल.

विळचण न. विसण; विसावण. (को.)

विळत स्त्री. १. कुदळ्याचे शेवटी लावण्याचे लोखंडी अग्र. (को.) २. वखराला वगैरे चिकटलेली माती काढण्याचे हत्यार; तुत्या. (व.)

विळपणे क्रि. शोधणे; धुंडणे : ' विळपतां सांपडे जवळींच ।' – दावि १८.

विळवणे पहा : **विवळणे**

विळवणे उक्रि. १. वळवणे; (ओझे वगैरे) वर उचलून देणे; डोक्यावर चढवणे. २. (ल.) ठपका ठेवणे, लादणे; दोषारोप करणे.

विळवणे उक्रि. वेळणे; वेळवणे; हलवणे.

विळविळणे अक्रि. (साप, किडा वगैरे प्राणी अंगावरून) वळवळत जाणे; मऊ, गुळगुळीत स्पर्श करत जाणे. [सं. वलन]

विळविळीत वि. गिळगिळीत; मऊ; थिलथिलीत.

विळसण न. विसण. (व.)

विळा पु. कोयता; कापण्याचे हत्यार; विशेषत: पिके कापण्याची तीक्ष्ण धार असलेली कोयती. [क. ईळिग]

विळाखिळा पु. मोडतोड; मोठी वस्तू मोडून लहान करणे.

विळाभोपळा पु. (ल.) वाकडे; वैमनस्य.

विळास पु. भक्तिप्रेम; त्याचे प्रकार : 'नमस्करीतिः मोमे देति : ऐसे विळास करिती'– निलिपु ६.८.

विळासणे अक्रि. तन्मय होणे; रंगून जाणे : 'विळासली श्रीकृष्णचरणीं' – शिव १०८२.

विळी स्त्री. भाजी चिरण्याचे एक साधन. अर्धलंबगोलाकार धारदार पात्याचे एक टोक, लाकडी वा धातूच्या फळीवर स्क्रूने घट्ट बसवून हे तयार केलेले असते. [क. इळिगे]

विक्षा स्त्री. पाहणे; टेहळणी : 'विक्षा विक्षा भक्तिमार्गेचि विक्षा ।'– दावि ४६९. [सं. वीक्ष्]

विक्षिप्त वि. १. टाकून, फेकून दिलेला. २. पसरलेला; विसकटलेला. ३. भ्रमिष्ट; खुळा; चळलेला; बावसलेला (मंत्रतंत्र, भूतबाधा वगैरेमुळे). ४. (ल.) तऱ्हेवाईक; विचित्र; लहरी. [सं.]

विक्षिप्तकरण न. (नृत्य.) हात व पाय पुढच्या किंवा मागच्या बाजूला जसे एकदा टाकले असतील तसेच पुन्हा टाकणे.

विक्षिप्त–आक्षिप्तक करण (नृत्य.) हातपाय हवे तसे दूर करून पुन्हा जवळ आणायचे ही क्रिया.

विक्षे(क्षो)प पु.१. (शब्दशः) वर, बाजूला, इकडे-तिकडे टाकण्याची क्रिया. २. चित्ताची व्यग्रता; लक्ष्य न लागणे; विचारांचा, मनाचा गोंधळ, गडबड. ३. विषाद; आश्चर्य; अचंबा. ४. बुद्धिभ्रंश; भ्रम; भ्रांती (जादूटोणा, मंत्रतंत्र, भूतबाधा वगैरेमुळे). ५. (वेदान्त.) विपरीत ज्ञान; भ्रम उत्पन्न होण्याचे एक कारण. ६. (ज्यो.) शर; ग्रहाचे याम्योत्तर अंतर. ७. अडथळा; विघ्न. [सं.]

विज्ञ वि. विद्वान; जाणता; विशेषज्ञ; ज्ञानी पुरुष. [सं.]

विज्ञप्त–प्ति–प्ती स्त्री. विनंती; विज्ञापना. [सं.]

विज्ञप्त वि. विनंती केलेले; सांगितलेले.

विज्ञात धावि. विशेष माहितीचा, ओळखीचा; ठाऊक असलेला; कळलेला; समजलेला. [सं.]

विज्ञाता वि. जाणता; जाणणारा. [सं.]

विज्ञान न. १. विशेष ज्ञान; शास्त्रीय ज्ञान; तत्त्वज्ञान. २. ब्रह्मज्ञान; ईश्वरविषयक सत्यस्वरूपाचे ज्ञान; अपरोक्षज्ञान. ३. सामान्य ज्ञान; माहिती; ओळख; परिचय. ४. अनुभव; जाणीव. ५. प्रपंच; जग: 'जें ऐसेंही परि विरुळें। इये विज्ञानाचिये खोळे । हालविलेंही गळे । तें परब्रह्मो।'- ज्ञा ८.१७. ६. (बौद्धदर्शन) आत्मा; आत्म्याच्या पाच स्कंधांपैकी पाचवा स्कंध. [सं.]

विज्ञानबळ न. चमत्कार करण्याचे सामर्थ्य : 'येक विज्ञानबळें विजय होति '- रुस्व ११९. [सं. विज्ञान + बल]

विज्ञानमय कोश आत्मा अथवा चैतन्यावरील आवरणभूत पाच कोशांपैकी बुद्धिरूप चौथा कोश.

विज्ञानशास्त्र न. ज्ञानाचे, तसेच स्वरूप व उत्पत्ती यांचे शास्त्र. (इं.) एपिस्टोमॉलॉजी.

विज्ञानस्थिती स्त्री. सिद्धावस्था; ब्रह्मस्वरूपाचे ज्ञान झाल्याची स्थिती, अवस्था.

विज्ञापक वि. ज्ञान देणारा; उपदेशक; शिक्षक. [सं.]

विज्ञापणे उक्रि. १. ज्ञान देणे, सांगणे; कळवणे; ठाऊक, माहीत करणे. २. विनंती करणे. [सं. वि + ज्ञा]

विज्ञापन न. ज्ञानदान; शिक्षण; उपदेश; शिकवण. [सं.]

विज्ञापना स्त्री. १. मोठ्या, थोर व्यक्तीला नम्रपणे केलेली विनंती; माहिती देणे; ठाऊक करणे. २. वरप्रमाणे केलेली विनंती, दिलेली माहिती, सांगितलेली गोष्ट; खुलासा; तक्रारअर्जी. ३. सामान्यत: ज्ञान देणे; शिकवण; उपदेश; दिग्दर्शन. ४.वडीलधाऱ्या माणसाला पत्र लिहिताना विनंतीवजा वापरण्याचा शब्द, मायना.

विज्ञापनीय, विज्ञाप्य वि. सांगण्यासारखे; माहिती देण्यासारखे;

विज्ञापित धावि. १. आदरपूर्णक सांगितलेले, कळवलेले, सुचवलेले. २. ज्याला विज्ञापना सांगितली आहे तो.

विज्ञेय वि. जाणण्यायोग्य; माहीत करून घेण्यायोग्य.

विंग (व.)पहा : **वेंग**

विंच स्त्री. तडा; चीर; भेग; फट. (को.)

विंच-चे न. संध्याकाळ. (चित्पा.)

विंचडा पु. मोठा विंचू.

विंचणे अक्रि. चकणे; खेळण्याचा अनुक्रम ठरवण्यासाठी गोट्यांच्या खेळात बदीकडे लाखोट्या फेकणे. - व्याज्ञा १.१५२.

विंचमोरा पु. स्त्रियांच्या पायातील (विंचवासारखा) दागिना. [म. विंचू + मोहरा]

विंचरणी स्त्री. १. फणी; कंगवा. २. केस इ. विंचरण्याची क्रिया.

विंचरणे सक्रि. १. फणीने केस साफ करणे; केसांतील जटा मोडून केस मोकळे करणे. २. पिंजणे; कापसातील सरकी काढून साफ करणे.

विंचवी स्त्री. १. (सोनारी) तारेची कडी; तारेची उभ्या नामाच्या आकृतीची जोडणीची कडी. २. एक त्वचारोग; इसब.

विंचवी खरूज विंचू उकळलेल्या तेलाने बरी होणारी खरूज.

विंचा पु. (सोनारी)दुबेळकी बारीक खिळा; नक्षी उठवण्याचे साधन. (राजा.)

विंचांचे, विंचवांचे घर (ल.) त्रासदायक वस्तू.

विंचू पु. १. एक अष्टपाद विषारी प्राणी. हा नांगीने दंश करतो. २. कृत्तिकानक्षत्र (विंचवासारख्या आकारावरून). ३. बाजले विणताना गातावरील दोऱ्या पुढे सरकू नयेत म्हणून वापरतात ते गाठ दिलेले काथ्याचे तुकडे. [सं. वृश्चिक; हिं. बिछु; सिं. विछु]

विंचू स्त्री. हिमालयात सापडणारी एक वनस्पती. हिला स्पर्श केल्यास विंचू चावल्याप्रमाणे वेदना होतात.

विंचूकाटा पु.विंचू किंवा इतर दंश करणारा प्राणी.

विंजणवारा पु. पंख्याचा वारा.

विंजणा-ना-णे पु. न. पंखा : 'चवरी हन विंजणा । तेथ लयो प्राणां।'- ज्ञा १३.४३४. [सं. व्यंजन; प्रा. विंजण; गु. विंजगो]

विंजणे सक्रि.पंखा ढाळणे; वारा घालणे. [सं.]

विंजणेकार पु . पंख्याने वारा घालणारा सेवक; मनुष्य.

विंझण-णा-ना, विंझवणा, विंझणवारा, विंझुणा-णे इ. पहा: **विंजण-णा** इ.

विंदणी स्त्री. सून. - बदलापूर २८३. (ओसवाल)

विंदाण-न न. १. कौशल्य; कारागिरी; लाघव: 'वेर्गी विंदान पाहे माझें ।'- एरुस्व ९.१४. २. कपट; कारस्थान; युक्ती; व्यूह; कावा : 'आटु वेगु विंदाणु। आशा शंका प्रतारणु ।'- ज्ञा १३.२७१. ३. निग्रह; वेध; लक्ष: 'जैं इंद्रियां विंदाण लागे।'- ज्ञा ६.३६५. ४. लीला; चमत्कार; चरित्र; करणी; गती :'मायेचें परम विंदाण ।'- रावि ६.६७. ५. चातुर्य. [सं. विज्ञान]

विंदा(धा)नी-णी वि. पु. कुशल; कारागीर: 'ऐसा व्यासें विंदाणिये । गीता प्रासादु सोडणिये।' - ज्ञा १८.४४.

विंदा(धा)री पु. १. मणी किंवा मोती यांना वेज, छिद्र पाडणारा. २. क्षत्रिय माता व वैश्य पिता यांची संतती. [सं. विंध्]

विंदो पु. (विणकाम) ताणा ताठ करण्यासाठी हातखुंट्याला बांधलेली दोरी.

विंधन वि. पु. बाण मारणारा : 'सोहजा विंधनु: होए अर्जुनु' - शिव ८९५. [सं. व्यंध]

विंधी स्त्री. १. भोक; छिद्र; वेज. २. खोबण; कुसूंचे घर. (को.) [सं. विध्]

विंधुका, विंधू, विंधूक पु. लहान छिद्र. (को.)

विंशति-ती वि. वीस. [सं.]

वी पु. विणे, प्रसवणे या क्रियापदाचे रूप : 'खरा जनक तूं जना इतर कोण हो देव वी।'- केका ४.२६.९३.

वी पु.स्त्री. १. गमन. २. पक्षी. [सं. वीक]

वीकर वि. चंचल : 'होत करकर चित्त वीकर ।'- दावि ८१.[सं. विकृत]

वीख पहा: **विष**

वीखी, विखया पहा: **विषयी**

वीचि-ची पु. लाट; तरंग. [सं.]

वीचितरंगन्याय पु. पाण्यात एक लाट उत्पन्न होते. तिला मागची लाट पुढे ढकलते. क्रमाने सर्व लाटा किनाऱ्यावर आपटून फुटत असतात. त्याप्रमाणे एका पिढीची माणसे मरण पावतात. त्याच्यामागून त्यांच्या जागी दुसऱ्या पिढीची माणसे येतात. अशी चालणारी ही जगरहाटी.

वीज स्त्री. १. घर्षणाने उत्पन्न होणारी एक निसर्गशक्ती. २. मेघगर्जना; विजेचा कडकडाट. ३. वज्र; वीज पडणे. [सं. विद्युत्; प्रा. विज्ज] (वा.) ० **चमकणे, विजेचे चमकणे** – क्षणिकता; क्षणभरच टिकणे.

वीजण-णे, वीजन-ण-णा पहा : **विंजण** इ.

वीजन न. बैठक; आसन: 'भिक्षुकांचीं वीजनें । तेणें डोळे धाती ।'- ऋ १५. [हिं. बिछाना]

वीट पु. १. कंटाळा; तिरस्कार; शिसारी. २. मेकाड; मोवा; एक रोग. ३. अनादर; अपमान; वाईट प्रकारे वागवणे; बिघाड, विचका झालेली स्थिती. ४. खेद : 'कां दरिद्रलिये बुद्धी वीट। तोही नाहीं।'- ज्ञा १४.३२८.

वीट स्त्री. इमारतीच्या बांधकामासाठी मातीची भाजलेली किंवा कच्ची चतुष्कोनी वस्तू. [क. इट्टिके-गे; सं. इष्टिका; प्रा. इट्टा; हिं. ईंट]

वीटा स्त्री. विटी (खेळातील दांडूबरोबरची) : 'वीटाहस्तीं ओपिली ।'- मुआदि ३०.१११.

वीटा पु. एक प्रकारचा भाला. पहा : **इटा**

वीटि-टी, वीटिका स्त्री. विडा. [सं.]

वीड पु.न. १. मनगटाचे माप (बांगडी इ. साठी). २. माप; नमुना. ३. जात; प्रकार.

वीड स्त्री. ईड; ईडलिंबू.

वीडी पहा : **विडी-डि** १,२

वीण स्त्री. १. निपज; जन्म; वेत; खोप; जनन. २. विण्याचा काळ; निपज होण्याचा काळ; हंगाम.

वीण स्त्री. १. सणंग; थान; विणलेली वस्तू. २. विणण्याची धाटणी, प्रकार, बनावट; विणकाम.

वीणा स्त्री. एक प्रकारचे भोपळ्याचे तंतुवाद्य; तंबोरा. याचे पुष्कळ प्रकार आहेत. [सं.](वा.) ० **उभा करणे** – भजन करणे.

वीणाकाव्य न. विणेच्या नादाबरोबर गाण्याची कविता; रसात्मक, भावपूर्ण काव्य; भावगीत. (इं.) लीरिक. [सं.]

वीत वि. गेलेला; नाहीसा झालेला. [सं.]

वीत पहा: **वेत**

वीत स्त्री. करंगळी व अंगठा ताणले असता त्यामधील अंतर; बारा अंगुळांचे माप.[सं. वितस्ति] (वा.) ० **काढणे**– (पेरण्यासाठी जमीन भाजताना) गवत वगैरे काढून आग पसरू नये म्हणून भाजण्याच्या व न भाजण्याच्या जमिनीच्यामध्ये अंतर सोडणे, फट पाडणे. **वीतभर पोट** -पोटाचा आकार फार मोठा नसतो. त्याला फार काही लागत नाही या अर्थाने वापरतात. **आपल्या पुरती, भोवती ० काढणे**– (निंदार्थी). (संकटाच्या वेळी) फक्त आपल्या पुरतीच सावधगिरी व काळजी बाळगणे; दुसऱ्याविषयी बेपर्वाई दाखवणे.

वीतका पुंजी मुलींचा एक खेळ. – मखेपु ३४२.

वीतणे क्रि. वर्तणे; घडणे : 'तें कवतिक वीतलें आइका। शरीरौनीं निगाली ज्योतिकळिका।' – शिव १०८३. [सं. वृत् – वर्त्]

वीतराग-गी वि.१. विरागी. ज्याच्या इच्छा, आकांक्षा नाश पावल्या आहेत किंवा ज्याने विकार ताब्यात ठेवले आहेत असा. २. विरक्त; वैराग्यशील.

पु. विरक्ती; वैराग्य. [सं.]

वीतरेक पहा : **व्यतिरेक**

वीती स्त्री. प्रसूत होणारी स्त्री: 'रण मृत्यु नच रुचे जरि बहुहित तरि जेंवि बोळ वीतीतें।'- मोद्रोण २३.६३.

वीतुटि-टी स्त्री. वियोग: 'देवेसीं जालेयां वीतुटि । आपणेया नाणावी जीविताची कुटी।'- भाए १४४.

वीद स्त्री. उकिरडा. (व.) [सं. वीथी]

वीद स्त्री. दुर्बुद्धी. (गो.)

वीध पु. १. लग्नानंतर पहिल्या वर्षी करण्याचे मानपान, सणवार इत्यादी एकमेकांकडे मिठाई, फराळाचे जिन्नस इ. पाठवणे. २.असे पाठवलेले जिन्नस, केलेला मानपान. ३. (सामा.) विधी. ४. मंत्र; प्रयोग; उतारा; विधान: 'वीध केलिया प्रेतें। सावध होती ।'- दास ९.८.२०.

स्त्री. उत्सव; समारंभ; कोणताही विशेष प्रसंग. [सं. विधि]

वीधवाट पहा : **विल्हेवाट**

वीधोळणे क्रि. उधळणे; नाहीसे होणे : 'तेणें वीधोळले मेघ ।'- उषा १५४.

वीप स्त्री. लाज : 'कां चालितां गति विलासीं। इआं वीप लाविली राजहंसी।'- शिव ८०४. [सं. व्यप्]

वीप्सा स्त्री. १. सर्वत्र व्याप्ती; अवयवांच्या, घटकांच्या बरोबर सबंध गोष्टीचा समावेश. २. द्विरुक्ती (आज्ञा, भाषण, शब्द इ. ची). [सं.]

वीभाडणे क्रि. पराभव करणे : 'वीभाडीलें भुमासुरातें।'- उषा ७३. [सं. वि + भंड्]

वीभिचारु पु. संचार; अवतार : 'संपूर्णसींहुं नावरु। देवता अंगीचि वीभिचारु ।'-ऋ ७२. [सं. व्यभिचार]

वीर स्त्री. १. ईर; शक्ती; जोम; रग; (ल.) पर्वा; भीडभाड : 'माठे मनुष्य पळू लागल्यावर कोणाची वीर कोणास नाहींशी होते.'- भाब ८४.२. तेज; गुण; प्रभाव. ३. श्रेष्ठता; उत्कृष्टपणा. (बुद्धिबळाचा खेळ) अधिकाराचे क्षेत्र, टापू. ४. (बुद्धिबळाचा खेळ) राजाला बचावण्यासाठी एखादे मोहरे मध्ये घालणे. (क्रि. सोडवणे)[सं. वीर्य] (वा.) **वीरेत घालणे** – मध्ये घालणे, टाकणे.

वीर पु. १. योद्धा; लढवय्या; शूर पुरुष; उत्साही मनुष्य (लढाईत, दुसऱ्यावरचे संकट दूर करण्यात, दान करण्यात). २. नवरसांपैकी उत्साह, शौर्य, पराक्रम दाखवणारा भाव, रस. ३. ज्याचा कोणी पूर्वज लढाईत मेला असून जो फाल्गुन वद्य प्रतिपदेला योद्ध्याच्या समारंभाने देवदर्शनासाठी जातो असा मनुष्य. ४. वरील मृत मनुष्याचा

देवांमध्ये बसवलेला टाक : 'वीर बैसविला देव्हारां।'– दावि ६३. ५. मोठ्या मनुष्याची मरणोत्तर दशा. – बदलापूर ४९२. ६. विशेषनाम, हुद्दा किंवा वर्णनपर नाव याला जोडून येतो. त्या वेळी त्याचा अर्थ पुढारी, प्रमुख, श्रेष्ठ असा होतो. उदा. रघुवीर. ७. एक पदवी. कोणतेही धाडस, उत्साह, औदार्य, परोपकार, जनकल्याण इ. गुणांविषयी प्रसिद्ध असलेल्या पुरुषाला लावतात.

वि. १. शूर; पराक्रमी. २. वैराग्यशील. [सं.]

वीरकंकण न. वीरपुरुषाचा मान म्हणून पराक्रमाचे द्योतक असे मनगटात घातलेले कडे.

वीरकन्या स्त्री. युद्धप्रिय, धाडसी, खंबीर मनाची स्त्री.

वीरकल्लु–गळ–क्कल पु. वीराचा दगड. (गो.) [सं. वीर + क. कल्लु]

वीरगाठ–गुंठी स्त्री. विशिष्ट प्रकारची गाठ; वीराला शोभण्यासारखी डोक्यावरील केसांची गाठ: 'बार्सींगे हीरेयाची जोती मीरबती वीती वीरगांठी ।'– धवळेपू ६९; 'सरसावुनी वीरगुंठी।'–मुसभा ७.१७.

वीरघंटा स्त्री. १. दवंडी पिटण्याचे साधन, घंटा, वाद्य : 'डौंडीची ढवंस ढोला । वीरघंटा तांबकिया।' – शिव १०२६. २. वीरांना स्फुरण देणारी हत्तीच्या गळ्यात बांधलेली मोठी घंटा.

वीरजयंतिका, वीरजयंती स्त्री. युद्धात विजय मिळाल्यावर योद्ध्यांनी केलेला नाच.

वीरठाण न. वीरासन. [सं. वीरस्थान]

वीरढे न. पालवी : 'तुझे या अनुरोगाचें वीरढें।' – भाए २३३.

वीरदृष्टि–ष्टी स्त्री. (नृत्य.) डोळे लाल करणे, बुबुळे उंच नेणे; डोळ्यांचा मध्यभाग विकसितकरणे. (वीररसाचा अभिनय).

वीरपट्ट पु. वीराचे कपाळावरील पदक, शिरताज.

वीरपाण–न न. युद्धापूर्वी किंवा युद्ध चालू असताना जोर येण्यासाठी वीरांनी चैतन्य वाढवणारे पेय पिणे. [सं.]

वीरपीर वि. १. बोंबल्या; अरेराव, रगडमल्ल; धटिंगण. २. (प्रशंसार्थी) उत्साही, धाडसी माणूस.

वीरभद्र पु. १. दक्षयज्ञाचा विध्वंस करण्यासाठी शंकरांनी जटेपासून निर्माण केलेला वीरपुरुष; अकरा रुद्रांपैकी एक. २. (ल.) उग्र स्वरूपाचा व विनाशक प्रवृत्तीचा मनुष्य. ३. शिवगणांचा एक वर्ग. ४. लिंगायत लोकांमधील एक विशेष दीक्षा. ५. रागीट, हट्टी व सुधारणार नाही असा मुलगा. [सं.]

वीरमाल पु. पोवाडा.

वीरमुष्टी पु. तामिळनाडूतील एक लिंगायत भिकाऱ्यांची जात. हे लोक शारीरिक कसरतीचे खेळ करून पैसे मिळवतात.

वीररस पु. वीराला योग्य अशी भावना, विकार; नवरसांपैकी एक. याचे विद्या, युद्ध, दया, दान असे चार विभाग होतात.

वीरवाटव पु. बिरुद; बाणा; पराक्रम. [सं.]

वीरवाद पु. वीराने प्रतिपक्षाला दिलेले आव्हान. [सं.]

वीरवैष्णव पु. १. वैष्णवांचे आचार कडकडीत पाळणारा एक वर्ग. २. कट्टर, थोर वैष्णव. [सं.]

वीरशय्या स्त्री. (ल.) रणभूमी.

वीरशैव पु. लिंगायतांचा एक वर्ग.

वीरस पु. स्नेहाचा पान्हा. पहा : **ओरस**

वीरक्षेत्री पु. क्षत्रिय वीर : 'वरी विराजे वीरक्षेत्रीं। हरिश्चंद्र नृपनाथ।'– मुहरिश्चंद्राख्यान, नवनीत पृ. १८३.

वीरंग पु. बेरंग : 'लोभे जाहला वीरंग।'– रामदासी अभंग, नवनीत पृ.१४९.

वीराशंसन न. युद्धातील वीरांना प्रिय अशी जागा; प्राणावर बेतण्याचा प्रसंग येतो अशी धोक्याची जागा. [सं.]

वीरासन न. १. डावा गुडघा मोडून व उजवा उभा करून किंवा दोन्ही गुडघे जमिनीला टेकून बसणे; आसनाचा एक प्रकार. २. (युद्धात बाण सोडताना, दरबार इ. ठिकाणी बसताना) योद्ध्याची बसण्याची रीत. ३. वीराची बसण्याची जागा, आसन. ४.रणभूमी. [सं.]

वीरेवीर क्रिवि. एकूणएक वीर : 'वीरेंवीर बुडाला । अवघा हलकल्लोळ जाला।'– दावि ४९६.

वीर्य न. १. पुरुषाच्या, नराच्या शरीरातील सप्तधातूंपैकी शेवटचा धातू; शुक्र; रेत. २. पराक्रम; प्रभाव; सामर्थ्य; जोम; श्रेष्ठता. ३. वस्तूच्या, पदार्थाच्या ठिकाणी असणारी एखादे कार्य करण्याची शक्ती. ४. कस; रग; बळ; निश्चय; चिकाटी; धैर्य.(समासात) हतवीर्य, नष्टवीर्य. ५. शौर्य; वीरता.

वीर्यशुल्का स्त्री. पण जिंकून स्वयंवरात, पराक्रमाने प्राप्त होणारी स्त्री. [सं.]

वीर्यावीर वि. शूरत्वाने शूर : 'तुका म्हणे वीर्यावीर। संतधीर समुद्र ।'– तुगा १८१४.

वीलु स्त्री. वेळ : 'येक पदमात्र योजितां । वीलु न पुरे ।'– गीता २.३४५४. [सं. वेला]

वीवा उद्गा. नमस्कार करताना व 'चिरंजीव' या अर्थी म्हणण्याचा शब्द. (गो.) [इं., पोर्तु. व्हीव्हा!]

वीस वि. २० ही संख्या. [सं. विंशति; प्रा.]

वीसदेओ,वीसादय पु. विस्तव: 'कां गा ओंबीया बाजा ना कां जी जि: वीसदेओ नाहि. – लीच. [सं. विश्वदेव]

वीसनखी, वीसनखीचा पहा : **विसनखी** इ.

वीसाहाणी स्त्री. विसावणी; विसावा: 'फुण वीसाहाणींचे राऊंतु परितिलें। तें साहातीचि ना ।'– शिव ९६३. [सं. वि + श्रम्]

वीसुर न. मोती; नथीचा एक प्रकार. – लोसाको. (घा.)

वीळ पु. दिवसाचा वेळ, सबंध दिवस, सकाळ किंवा दुपार, समय, काळ या अर्थी वापरतात.

स्त्री. समुद्राला येणारी भरती. [अप.म.वेळ.]

वीक्षण न. १. अवलोकणे; पाहणे. २. पाहण्याचे साधन (डोळे इ.). [सं.]

वीक्षणे क्रि. पाहणे; बघणे; दर्शन घेणे; अवलोकणे. [सं. वीक्ष्]

वीक्षित वि. पाहिलेले; अवलोकिलेले. [सं.]

वु, वू ही अक्षरे मूळ मराठी शब्दाच्या सुरुवातीला आढळत नाहीत. काही ठिकाणी ही अक्षरे बोलण्यात व लिहिण्यातही आढळतात.

परंतु तसा उच्चार व तसे लेखन हे व्याकरणशुद्ध नाही. हे उ,ऊ यांचे चमत्कारिक व कटू उच्चार होत.

वुइल न. मृत्युपत्र. [इं.]

वुगदा पु. भुगा; चुरा. (व.)

वुंड–डी पहा : **उंड–डी**

वुंब स्त्री. ओळ. (बे.)

वृक पु. लांडगा. [सं.]

वृकयुद्ध न. गनिमी लढाई; लपून हल्ला करणे.

वृकोदर पु. भीम.

वि. (लांडग्याचे पोट किंवा लांडगा पोटात असलेला) फार खादाड; अधाशी. [सं.]

वृक्क पु. मूत्रपिंड; गुर्दे; (इं.) किडनी. [सं.]

वृजिन न. १. दुःख; क्लेश: 'निस्तरणें पडे वृजिन।'– रास १.३३१. २. पाप; दुराचरण : 'असंख्य गोवधांचें वृजिन ।'– रंयोवा ४.३३०. [सं.]

वृत्त न. १. भाकित : 'घरोघरीं बोलवी वृत्तें ।'– विपू ७.४७. २. आचरण; वर्तन; पद्धत; वहिवाट; शिरस्ता : 'शील त्याचें अत्युच्चरम्य वृत्त।'– टिक ६९.३.उद्योग; धंदा; निर्वाहाचे साधन; व्यवसाय. पहा : **वृत्ति**. ४. बातमी; वार्ता; हकिगत; माहिती. ५. छंद; कवितेच्या प्रत्येक चरणात किती अक्षरे असावीत याचे मापन. ६. वर्तुळ; मंडळ; गोलाला कोठेही सरळ पातळीने कापले असता होणारा गोल आकार. ७. गोल पदार्थ; गोळा.

वि. वर्तुळाकार; वाटोळे. [सं.]

वृत्तखंड पु.न. (गणित.) वर्तुळाचा अर्धा भाग; वृत्तांश. (इं.) सेक्टर.

वृत्तचिति–ती स्त्री. वर्तुळस्तंभ; नळ; पंचपात्र यांच्यासारखा आकार. (इं.) सिलिंडर.

वृत्तपत्र न. वर्तमानपत्र.

वृत्तपाली स्त्री. परीघ. [सं.]

वृत्तमध्य पु. वर्तुळाचा केंद्र. [सं.]

वृत्तांत पु. वृत्त; बातमी; वार्ता; माहिती. [सं.]

वृत्तांश पहा : **वृत्तखंड** [सं.]

वृत्ति–त्ती स्त्री. १. आचरण; वृत्त; शिरस्ता; वहिवाट. २. रीत; ओळ; पद्धत; वर्तनक्रम. ३. धंदा; पेशा; निर्वाहाचा उद्योग; चरितार्थाचे साधन. ४. आवृत्ती; नेहमी उपयोग, वापर (विशिष्ट अर्थाने एखादा शब्द किंवा वाक्प्रचार याचा). ५. मनाची स्थिती, भावना (राग, करुणा, भीती, काळजी इ. ची). ६. मनोव्यापार. ७. टीका; विवरण; स्पष्टीकरण. ८. वर्तुळ; वर्तुळाचा परीघ; वृत्त. ९. स्फूर्ती; स्फुरण. १०. वाचकता, व्यंजकता, लक्षणा इ. अर्थबोधाचे प्रकार प्रत्येकी. ११. शेत; इनाम जमीन; वतन; दरसाल मिळणारी रक्कम. १२. स्वभाव; गुणधर्म. [सं.]

वृत्तिक, वृत्तिमंत–मान–वंत पु. १. वतनदार : 'अगा मानस हें एक। माझ्या स्वरूपीं वृत्तिक।'– ज्ञा १२.९७. २. स्थिर; स्थायिक.

वृत्तिशास्त्र न. व्यापार, धंदा इ. चा विचार, चर्चा करणारे शास्त्र; अर्थशास्त्र; (इं.) इकॉनॉमिक्स.

वृत्तिस्थिती स्त्री. समस्थिती; दोन्ही बाजूंना वजन व तोल सारखे राहतील अशी स्थिती. (इं.) इक्विलिब्रियम.

वृत्ती स्त्री. वृत्त; वार्ता.

वृत्त्यनुप्रास पु. अनुप्रास अलंकाराचा एक पोटभाग. एकच अक्षर फिरून–फिरून येणे.

वृत्त्यंश पु. संपत्ती, हक्क, निर्वाहसाधन यांतील भागी.

वृथा क्रिवि. व्यर्थ; विनाकारण; निष्फळ. [सं.]

वृथादान न. निष्फळ, बिनफायद्याची देणगी (वेश्या, खुशामत्या, मल्ल इ. ना दिलेले बक्षीस, खेळात घालवलेला पैसा). [सं.]

वृथापुष्ट पु. (फुकट खाऊन माजलेला) १. आळशी; निरुद्योगी; निरुत्साही. २. फुकटखाऊ; भोजनभाऊ. [सं.]

वृद्ध वि. १. वय उलटलेला; म्हातारा; जरठ. २. पूर्ण वाढ झालेला; योग्य विकास पावलेला. ३. मोठा (गुण वगैरेंनी); (शहाणपण, ज्ञान इ.त) प्रगती झालेला. उदा. ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध. ४. श्रेष्ठ : 'तरी अवघाचि गुणीं वृद्ध।'– ज्ञा १०.९२. ५. वाढलेला; जमून, साठून वाढलेला. ६. मावळता (सूर्य इ.). ७. परंपरागत (रीत इ.); मागच्या पिढीकडून पुढे चालत आलेली (गोष्ट); प्रमाणभूत. [सं.]

वृद्धकपि–पी पु. १. जख्ख, अत्यंत म्हातारा. २. (ल.) चांगला अनुभवी; मुरलेला; मुरब्बी. ३. (विशेषत: अनादराने) वृद्ध गृहस्थ. [सं.]

वृद्धकाक पु. (म्हातारा कावळा. यावरून ल.) टणक, निरोगी, वृद्ध गृहस्थ; काटक म्हातारा.

वृद्धापकाळ, वृद्धाप्य, वृद्धावस्था पु. म्हातारपण; वार्धक्य.

वृद्धि–द्धी स्त्री.१. वाढ; विस्तार; प्रमाणाधिक्य; वाढलेली अवस्था (आकार, वय, संपत्ती, दर्जा इ.) ची. २. व्याज; वाढ; (उसना दिलेला पैसा, धान्य इ. ची) वाढी. ३. सोयेर; घरात कोणी प्रसूत झाले असता येणारे अशौच. ४. चंद्र व सूर्य यांच्या कलांची वाढ; चढती दशा. ५. सूर्योदयापूर्वी सुरू होऊन दुसऱ्या सूर्योदयानंतर संपणारा चांद्रदिवस किंवा तिथी. नक्षत्र, योग यांचे आधिक्य. ६. अंडवृद्धी. ७. (व्या.) अ, इ(ई), उ (ऊ), ऋ यांच्याबद्दल संधी होताना आ, ऐ, औ व आर हे वर्ण येणे.

पु. (ज्यो.) सत्तावीस योगांपैकी अकरावा योग. [सं.]

वृद्धिप्रमाण न. (गणित, भूमिति.) वाढीचे प्रमाण. [सं.]

वृद्धिश्राद्ध न. नांदीश्राद्ध.

वृद्धिंगत वि. वाढीस लागलेले; प्रगत होणारे. [सं.]

वृद्ध्याजीव पु. सावकारी करणारा, पैसे व्याजाने लावून, वाढीदिढी करून उपजीविका करणारा माणूस.

वृय वि. १. संतुष्ट : 'दाऊनि गुरुराजा वृय कीजे।'– दावि ४५७. २. श्रुत:.'वृय दंडक त्याचा ऐसा असे ।'– दावि ४५८.

वृश्चिक पु. १. विंचू. २.(ज्यो.) आठवी रास. [सं.]

वृश्चिककरण न. (नृत्य.) दोन्ही हात वर नेऊन डोक्याच्या वर वाकडे करून ठेवणे, उजवा पाय पाठीकडे उंच नेणे व पाठ खूप वाकवणे.

वृश्चिकनिकुट्टितकरण न.(नृत्य.) उजवा पाय पाठीकडे डोक्यावर उंच नेऊन दोन्ही हात जमिनीवर टेकवणे व त्यांची बोटे जमिनीवर आपटणे.

वृश्चिकरेचितकरण न. (नृत्य.) उजवा पाय वृश्चिक करून हाताचे स्वस्तिक करणे व हात एकमेकांपासून दूर करून रेचित करणे.

वृश्चिकापसृत(अंगहार) पु.(नृत्य.) वृश्चिककरण करून उजवा हात लताख्य करणे; नंतर तोच हात नाकासमोर आकुंचित करून उद्वेष्टित करणे. नंतर नितंब फिरवून करिहस्त आणि कटिच्छिन्न ही करणे.

वृश्चिकासन न. १. (मल्लखांब) मल्लखांब बगलेत धरून वर पायांचा आकार नांगीसारखा करणे. २. जमिनीवर कोपरापर्यंत हात टेकून पाय वर करून ढोपरे वाकवून नांगीप्रमाणे वर धरणे.

वृष पु. १. बैल; वृषभ. २. साठ संवत्सरांपैकी पंधरावे संवत्सर. ३. कुंतीपुत्र कर्ण. ४. पुरुषाच्या चार जातींपैकी एक. [सं.]

वृषण पु. अंडकोश; अंड. [सं.]

वृषदुमा पु. बैलासारखा एक प्राणी; बैलाची एक जात : 'रेडे बोकड येडके वृषदुमे सौगांधिकें मांजरें।'- सारुह ३.४७. [सं. वृष + फा. दुय्यम]

वृषभ पु. १. बैल; नंदी. २. (ज्यो.) बारा राशींतील दुसरी रास. ३. (समासात उत्तरपदी) श्रेष्ठ व्यक्ती. [सं.]

वृषभक्रीडितकरण न. (नृत्य.) आधी टाळी देऊन दोन्ही हात रेचित करणे व मग ते वाकवून वक्षस्थळासमोर नेणे.

वृषल पु. १. शूद्र. २.कुणबी. ३. चंद्रगुप्त राजा. ४. बहिष्कृत झालेली, अधार्मिक, दुराचारी व्यक्ती. [सं.]

वृषली स्त्री. १. शूद्र स्त्री. २. व्यभिचारिणी. ३. उपभोगासाठी ठेवलेली दासी. ४. लग्नापूर्वी रजोदर्शन होत असलेली स्त्री. [सं.]

वृषलीपती पु. ज्याने उपभोगासाठी शूद्र स्त्री बाळगली आहे असा ब्राह्मण. [सं.]

वृषस्कंध पु. बैलाचे वशिंड.
वि. बैलासारखे रुंद व पुष्ट खांदे असणारा; (ल.) पराक्रमी. [सं.]

वृषा पु.लगामाचा एक प्रकार.- अश्वप १.१८५.

वृषिन् वि.(शाप.) बैलाचे; (इं.) टॉरीन.- सेंपू २.

वृषोत्सर्ग पु. मृताप्रीत्यर्थ वसू सोडणे; विशेषत: उत्तरक्रियेत कामनाप्रीत्यर्थ गोऱ्हा आणि कालवड सोडणे. [सं.]

वृष्टि-ष्टी स्त्री. १. पाऊस; पावसाचे बरसणे. २. (ल.) (कोणत्याही गोष्टीचा) वर्षाव, सतत प्रहार, पुष्कळ पतन. ३. (शिव्या, शाप, उपमा, मुद्दे, वचने इ. चा) भडिमार. [सं.]

वृक्ष पु.झाड; मोठे झाड. [सं.]

वृक्षायुर्योगवेद पु. वृक्षांचे आयुष्य वाढवण्यासाठीचे शास्त्र. [सं.]

वृक्षासन न. (मल्लखांब) बोंडावर हात टेकून पाय वर ताठ करून थोडे तिरपे राहणे.

वृक्षासादक, वृक्षापवेशक पु. झाडावर बसणारा एक पक्षिवर्ग. असे पाच वर्ग आहेत. चटक पक्षी. - मपु. ६.१८७५. पृ.२१९. [सं.]

वृंत न. देठ; फूल किंवा फळ ज्याला लागलेले असते असा वृक्षाचा अवयव. [सं.]

वृंताक न.पु. वांगे (फळ व झाड). [सं.]

वृंद न. १. सभा; समाज; मंडळी; जमाव; माणसांचा समुदाय. २. मोठी रास; ढीग. ३. नावाजलेले प्रस्थ; प्रसिद्ध माणूस. [सं.]

वृंदारक पु.१.देव; अमर. २. नेता; पुढारी.
वि. १. सर्वोत्तम; श्रेष्ठ; सर्वोत्कृष्ट. २. आदरणीय; सन्मान्य; सुप्रसिद्ध.

वृंदावन न. १. ज्यात तुळशीचे झाड लावतात असे दगडमातीचे लहान चौकोनी विशिष्ट बांधकाम; तुळशीची कुंडी. २. गोकुळाशेजारील एक पौराणिक वन. ३. एक झाड. [सं.]

वे जुन्या मराठीतील तृतीयेचा प्रत्यय; ने: 'निरूपणी येऊन बैसला। तो विंचुवें फणकाविल।' - दास १८.१०.२३. [ऐ. प्रत्यय]

वेउळी पु.एक हिंस्र पशू; चित्ता: 'मग तया सिंहें आपुले सेवक । वाघु वेउळु कोल्हा कोउळा। तयातें म्हणितलें ।'-पंच ३९.४१. [सं. व्याल] स्त्री. १. वाघीण. २. इंगळी : 'कां आयुष्य जातिये वेळे । शेळिये सात वेउळी मिळे।' - ज्ञा १६.२५९.

वेकली पहा : **बेहकळी**

वेकावल्या स्त्री. अव. वाकुल्या.

वेखसे, वेखाशे-से वि. १. विरुद्ध; वाकडे : 'परी धर्मासि वेखासें। जावों नेदी ।'- ज्ञा ७.४७. २. वाईट : 'तेवीं वेखासें अंतरीं। राहों नेणें ।'- ज्ञाप्र १०१. ३. व्यर्थ. [सं. द्वेष, विसद्वश; प्रा. वेस]

वेखंड न. एक औषधी. [सं. वच + खंड]

वेखंडणे अक्रि. वेखंडासारखे किटण चढणे.

वेग पु. १. गतीचा जोर; जोराची गती; गतिमान पदार्थाचा जोर. २. त्वरा; गडबड; घाई; झपाटा; सपाटा; जलदी. ३. आवेश; जोर; उत्साह : 'आटुवेगु विंदाणु । जिया वाचा ।'- ज्ञा १३.२७१. ४. वेदना; कळ; अंगात भिनत असलेल्या विषाच्या लहरी किंवा वेदनेच्या उसळ्या; पेटका. ५. मलमूत्रविसर्जनाची घाई, आवेग; जुलाब; ढाळ. ६. हल्ला : 'कपीवीर चौताळला वेग केला ।'- राक १.६. ७. एखादे काम करण्याची आकस्मिक उसळी; मनाने एकदम घेतलेले वळण; जोराचा उमाळा; मानसिक शक्तीचा एकदम झालेला उद्रेक; उसळी. ८. आधिक्य. [सं.]

वेगमान न. वेगाचे प्रमाण; भ्रामकत्व; (इं.) मोमेंटम.

वेगमोड स्त्री.वेग कमी करणारी वस्तू; ढकली; खर्डी; घोरपड.

वेगलवार वि.वेगाने संचार करणारा. - राको.

वेगवती-संधी स्त्री. घोड्याच्या गतीचे निरनिराळे प्रकार. - अश्वप १.१८५.

वेगवत्तर, वेगत्तरू क्रिवि. अतिवेगाने; मोठ्या जलदीने: 'घेऊनि निघाला बाहेरि । वेगत्तरु।' - गीता २.३३५५. [सं. वेगवत् + तर]

वेगळचार (व.) पहा: **वेगळेचार** १

वेगळणे सक्रि. १. वेगवेगळे करणे; भाग पाडणे. २. वगळणे.

वेगळवाणे वि. भिन्न; वेगळे असणारे : 'केलें मनचि वेगळवाणें। भोगावया।'- ज्ञा ६.११४.

वेगळवेंटाळी स्त्री. निरनिराळ्या पदार्थांचे एकीकरण : 'ना अशक्तपणें आंगिकें। वेगळवेंटाळी न टके ।'- ज्ञा १६.३००.

वेगळा वि. १. विभक्त केलेला; अलग; अंतरावर ठेवलेला; विभिन्न. २. निराळा; विधर्मीय; अन्य. ३. विभिन्न झालेला किंवा केलेला. ४. एखादी गोष्ट कमी असलेला; न्यून असलेला. (समासात) दृष्टीवेगळा; ज्ञानावेगळा. ५. एखादी गोष्ट न केलेला. उदा. जाण्या-येण्या वेगळा. क्रिवि. सोडून; शिवाय; खेरीज; विना.
[क. हिग्गलिसु; त. वेरु; सं. विगल; गु. वेगळु]

वेगळाला वि. निरनिराळा; पृथक-पृथक.

वेगळावा पु. भेद; भिन्नता; वेगळेपणा. (को., गो.)

वेगळीक-व स्त्री. १. भिन्नता; वेगळेपणा. २. विभक्तपणा; कुटुंबातील माणसांनी वेगळे राहणे. ३. वरच्या दर्जाच्या माणसांना वागवताना दाखवलेला फरक; मानाप्रमाणे भेदभाव करणे.४. (क्र.) निवडून वेगळी करणे; वर्गीकरण.

वेगळेचार पु.१. विभक्तपणा (विशेषत: कुटुंबातील माणसांचा); वेगळी झालेली स्थिती; वेगळे राहणे. २. वेगळे होण्यासाठी कारण झालेले वर्तन. ३. मते, आचार-विचार, हिताहित इ.तील. भिन्नता, फरक, अंतर. ४. विभक्त राहण्याचे विचार. (गो.)

वेगळेपण-णा न. पु. भिन्नभाव; निराळेपणा.

वेगा-गी-गे, वेगावत क्रिवि. वेगाने.

वेगाघात पु. जिने चलनयुक्त पदार्थ दुसऱ्या पदार्थावर आपटतो ती शक्ती. हा वेगाघात पदार्थाचे प्रकृतिपरिमाण आणि वेग यांच्या गुणराकाराबरोबर असतो.- यंमू २१९.

वेगाडा-ढा-ढे वि. वेगवान : 'वारेआं पासौनि वेगाडे। पर्वताहौनि दळवाडे ।'- शिव ९३४.
क्रिवि. वेगाने; जोराने :'यादव उठिले वेगाढे।' - एभा ३१०.

वेगाडेपण न. वेगवान, अतिगतिमान असण्याचा गुण.

वेगाळ वि. वेगवान.

वेगे(गें) न. कड; कंगोरा : 'खुपति कांकणार्चीं वेगीं।' - उह २७०.

वेच पु. १. खर्च : 'परि न योग्य हा असा वेच ।' - मोउद्योग ८.१४. २. क्षय; नाश : 'तरी तें पद गा नाहीं। वेंचु जया ।'- ज्ञा १५.३०६.
[क.वेच्च; सं. व्यय]

वेच(चि)क वि. खर्चिक; सढळ हाताने खर्च करणारा. (वा.) **० विल्हेस लागणे** - खर्च भरून निघणे.

वेचक-का-की, वेचीक वि. १. निवडक; निवडून वेगळा काढलेला; वेचलेला. २. (ल.) उत्कृष्ट; उच्च प्रतीचा. ३. खर्चिक.

वेचकर वि. बाजारहाट करणारा.

वेचकुली स्त्री. वाकुली; वेडावणे.

वेच(चा)ण स्त्री. विक्री.
वि. विकलेला: 'परगणे मजकूरची जमीन गहाण व वेचण जाली असेल...' - वाडसमा २.२६७.

वेचणी स्त्री. लहान टोपली. (को.)

वेचणी स्त्री. भाजी काढणे, तोडणे; तोड; गोळा करणे.

वे(वें)चणे सक्रि. १. एकेक टिपणे, गोळा करणे; एकत्र जमा करणे. २. जमवणे; साठवणे. ३. निवडणे; पसंत करून वेगळे, बाजूला काढणे. ४. वजा करणे : 'एका एकु वेंचला। शून्य बिंदू शून्ये पुसिला ।'- अमृ ७.१७८. [सं. विच्/ वि +चि]

वेचणे उक्रि. १. खर्च करणे. २. नाहीसा होणे; कमी, क्षीण होणे; संपणे : 'साहित्यस्वारस्य समस्त वेंचे।'- सारुह १.४६. ३. अर्पण करणे; सोडणे; गमावणे; कामी लावणे. उदा. सर्वस्व वेचणे.४. योग्य कारणासाठी उपयोग करणे; योजणे; खर्च करणे; देणे. ५.विकणे : 'वृथा आसक्ती केले अभाग्य । शिश्नोदरा सांग वेचले।' - एभा ७.६३८. ६. शरण जाणे. [क. वेच्च; प्रा. विच्च; सं. व्यय]

वेचता वि. क्षीण होणारा : 'लिंगदेह कमळाचा । पोटी वेचतया चित्भ्रमराचा ।' - ज्ञा १६.४.

वेचला वि. १.वेचक; निवडलेला. २. विचारात घेतलेला; विचारपूर्वक निवडून योग्य ठरवलेला (विषय, मुद्दा). ३. नियमित; प्रमाणशीर; योग्य (खर्च इ.).

वेचवी, वेचवीण स्त्री. खरजेचा प्रकार. ही मनगटे, घोटे यावर होते.

वेचा पु. १. निवडक भाग; उतारा; एखाद्या ग्रंथातून निवडून काढलेला उतारा, काही श्लोक इ. २. सारांश; संक्षेप. ३. (बहुधा अनेकवचनी उपयोग) सारसंग्रह; विविध ग्रंथांतील मुख्य भागाचे उतारे एकत्र करून झालेला ग्रंथ. ४. शेतातून कापूस गोळा करून आणल्यावर केलेली मोजणी. (ना.) [सं.विच्/ वि + चि](वा.) **वेचे-वेचे बोलणे** - १. निवडक शब्दांत किंवा निवडक शब्द, वाक्प्रयोग इ. योजून बोलणे. २. विचार करून, योग्य तेवढेच बोलणे. ३. शहाणपणाने बोलणे.

वेचुकरी वि. १. खर्चिक. २. खर्चाचा विभाग सांभाळणारा; व्ययाधिकारी : 'सेनवै दिनकरू । वेचुकरी सुधाकरु।' - शिव ५२.

वेचू पु. विंचू. (राजा., कुण.)

वेज-जे-झ-झे न. १. मोती, मणी, रत्न वगैरेंना पाडलेले भोक; छिद्र. २. सुई, दाभण इ. चे भोक; नेढे. ३. छिद्र; भोक. ४. वर्म; लक्ष्य; केंद्र : 'चुकलिया त्यागाचें वेझें।'- ज्ञा १८.१३४. [क. वेज्ज; प्रा. वेज्झ; सं. वेध] (वा.) **वेजी उतरणे, पडणे** - मोती, माणिक इ. चे भोक तार, रेशीम इ.च्या सततच्या घर्षणाने मोठे होणे. (वेज मोठे झाल्यास किंमत कमी होते.)

वेजटिकली स्त्री. (सोनारी) लोखंडी पट्टीला तिच्यातून तार ओढून घेण्यासाठी पाडलेले भोक.

वेजीत वि. पराभूत; पराजित. [सं. विजित]

वेझपट्टी स्त्री. (सोनारी.) चांदी-सोन्याचे सूत अगर तार ओढण्यासाठी भोके असणारी पट्टी; जंतरपट्टी.

वेझुटी वि. ओझरती : 'निंबालकर यासी तिराची जखम मानेस वेझुटी लागली आहे.'- पेद ३८.६०.

वेट, वेंट पु.स्त्री. १. (पेंढा, गवत, झाडाची साल, कापड इ. चा) वळून केलेला दोर; दोरी : 'आणि सिकतेचें वेंट वळून हातें।'- ह १४.२३२. २. वाताच्या विकृतीमुळे किंवा प्रेमाच्या असोशीमुळे आतड्यांना पडणारा पीळ; पीळ पडल्याची भावना. ३. एखाद्या वस्तूभोवती घातलेला दोरी इ.चा वेढा, वळसा, फेरा. ४. अंबाडीची तीन पदरी

दोरी. ५. एक वेल. (हिचा पाला गुरे खातात.) ६. चाकाची लोखंडी धाव. (व.,ना.) ७. पहा : **वेठ** [सं. वेष्ट; प्रा. वेट्ठ] (वा.) **०वळणे–** १. एखाद्या कारणासाठी एकमत, एकजूट होणे. २. गर्दी, खेचाखेच करणे; (भीती इ. ने गोंधळ माजून माणसे, प्राणी) एकावर एक पडणे. ३. हैराण करणे.

वेटण न. १. जुवाच्या मधोमध असणारे जुंपणे. २. वेष्टण; गाठ. (बे.) [सं. वेष्टन]

वे(वें)टणे उक्रि. (कणसे, फुले, कापूस इ.) वेचणे; खुडणे; तोडून गोळा करणे. [सं. व्यव + कृत्]

वेटणे सक्रि. लाटणी फिरवून कापसातून सरकी काढणे.

वे(वें)टणे सक्रि. जोराने वेढा देणे; आवळणे.

वेटली–ळी, वेटणे स्त्री. न. १. पीठ घालून वळलेली गवताची दोरी; वेटाळी. २. (मूल हगलेले काढण्यासाठी घेतलेली गवतकाड्यांची) गुंडाळी. ३. वेढण; वेष्टन.

वेटवण, वेटावण न. वेडावणे; वाकुल्या. तोंड वेडेवाकडे करून केलेली चेष्टा. [सं. विटंबन]

वेट(टा)वण उक्रि. वेडावणे; वाकुल्या दाखवणे.

वेटाळ पु. पुरा; पेठ; मोहल्ला. (व.) [सं. वेष्ट]

वेटाळणी स्त्री. १. वेढा; विळखा; फेरा. २. कापलेल्या पिकाच्या पेंढ्याची बांधणी; कापून ठेवलेले पिकाचे कवळे एकत्र बांधणे.

वे(वें)टाळणे उक्रि. १. (एखाद्याभोवती हात, दोरी इ. नी) वेढा देणे; गराडा घालणे. २. (दोरी इ.) गुंडाळणे. ३. जोराने गुंडाळणे, आवळणे, वेढा घालणे. ४. गोळा करणे; एकत्र करणे : 'तेथ आपलेनि बळें । भोगिजे जें जें वेटाळें ।'– ज्ञा १६.२९९. ५.लुबाडणे. ६.कवटाळणे; (ल.) व्यापणे : 'हा ठायवरी लोभु । करी स्वैरत्वाचा राबु । वेंटाळितां अलाभु । तें तें उरे ।' – ज्ञा १४.२३०. [क. वळसु, वेट्टिसु]

वेटाळसंबंध पु. शेजारसंबंध. (ना.)

वेटाळा–ळी–ळे,वेटोळे पु.स्त्री. न. १. वर्तुळ; वेढा. २. साप किंवा दोरी यांची गुंडाळी; वळकटी; सुरळी.

वेटी स्त्री. १. गवताची बारीक दोरी; बारीक वेट. २. मुडा बांधण्यासाठी भातेणाची पीळ घालून केलेली दोरी. ३. वेष्टण : 'मस्तकीं मुगुट आणि किरिटी । सभोंवतीं झिरमिळ्यांची दाटी । त्यावरी मयूरपिच्छांची वेटी । ऐसा जगजेठी देखिला ।' – व्यं ६९.

वेठ स्त्री. १. बिगार; रोख मेहनतान्यावाचून करावे लागणारे काम. मजुरी न देता अंमलदार, जमिनीचा मालक, खोत इ. नी करवून घेतलेले काम. (कायदा) एखाद्याकडून त्याच्या संमतीशिवाय काम करून घेणे (इं.) कंपल्सरी लेबर. २. पैसे न देता खोत, सरकारी अंमलदार वगैरेंनी कुळे किंवा जनता यांच्याकडून अधिकाराच्या जोरावर घेतलेले जिन्नस; खोतवेठ.३. जुलमाने मनुष्य किंवा जनावर यांच्याकडून वाहून नेलेले ओझे. [सं. विष्टि; ते. वेट्टि; प्रा. वि(वे) ट्ठि] (वा.) **०करणे, वळणे, काढणे–** कसेबसे, कसेतरी, निष्काळजीपणाने एखादे काम उरकणे. **वेठीस धरणे–** आपले काम करायला एखाद्याला भाग पाडणे; ताबडणे.

वेठ स्त्री. जुनी भांडी मोडीत घालून नवीन भांडी विकत घेताना अधिक द्यावा लागणारा पैसा.

वेठ स्त्री.पेठ; उतारपेठ : 'की धर्माची उत्तर वेंठ ।'– ऋ ११.

वे(वें)ठ पु. १. पहा : **वेट.** २.वळलेल्या चऱ्हाटाचे जे अनेक पेड असतात ते प्रत्येक.

वेठकरो, वेठ्या, वेठी पु. १. वेठीला धरलेला माणूस; बिगारी. २.(सामा.) हमाल :'राबेत तेथें कितियेक वेठे ।'– सारुह ३.३१.

वेठण–न न. १. नांगराचे जोखड टेरूजवळ इसाडाला जोडण्याचा दोर; जुंपण व इतर दोर; विणकऱ्याच्या रहाटाचा दोरखंड; तेगार. (सामा.) सर्व औतांना एटक घालण्यासाठी लागणारी दोरी. २. सुंभाची जाड दोरी; चऱ्हाट. (को.) ३. बैलगाडी कामासाठी जोडणे; गाडीवर सरंजाम घालणे. ४. वेष्टन. ५. घोड्यावरील मांड. [सं. वेष्टनम्]

वेठण–न न. खुबी; सफाई; हातोटी; कसब; उद्योगधंद्यांतील कौशल्य.

वेठणे क्रि. वेठीला धरणे; आपल्या कदरेत घेऊन मर्जीप्रमाणे काम करायला लावणे.

वेठणे उक्रि.१. गाडी, नांगर, कुळव इ. ला वेठण बांधणे; जोखड आणि इसाड वेठणाने एकत्र बांधून गाडा, नांगर इ. कामाला तयार करणे. २. (दोऱ्या, जोखड इ.) एकत्र जोडणे, बांधणे. ३. (सामा.) सज्ज, तयार होणे.

वेठणे अक्रि. उठणे; निघणे : 'आवेशें सरिसा वेठिला । गांजिवां हातु घातिला ।'– शिव ९७८. [सं.उत्+स्था]

वेठणे अक्रि. १. मूर्त होणे; आकाराला येणे: 'तरी मज पाहतां तें मागील उणें । फेडावया गीतापणें। वेदु वेठला भलतेणें । सेव्य होआवया ।' – ज्ञा १८.१४५९. २. वठणे; उमटणे : 'तेयां मुरारीचें सैन्य पालाणिलें । जैसें मूर्तिसंहारू तेजे वेठलें । – शिव १०१५. ३. दिसणे; वाटणे: 'चोरू साधुत्वें नटे । लटिका साचा वेठे ।'– ऋ १०३.

वेठबिगार–विरळा पु.स्त्री. १. वेठीने करवलेले काम; पहा : **वेठ.** २. वेठीने काम करवून घेण्याचा खोत इ.चा हक्क.

वेठी स्त्री. १. वळलेली दोरी; वेट. (कु.) २. झूल; झुली; तुरा; भूषण : 'मिरवे सुकाळीं मौक्तिकांची वेठी ।'– दाव २४३. ३. कोंदण; वेटी.

वेड स्त्री. मंडळीतील म्हणजे गंजीतील गव्हाच्या पेंढ्या चोरांना उपसून काढता येऊ नयेत म्हणून त्याच्या ताटांच्या मुळांची गंजीभोवती घातलेली वेणी – गुंफण.

न. स्त्री. पहा : **वेढ** १, **वेढणे** १ [सं. वेष्टन]

वेड स्त्री. ईडलिंबाचे झाड.

न. ईडलिंबू.

वेड न. १. मेंदूमध्ये झालेल्या बिघाडामुळे होणारा आजार; बुद्धिभ्रंश. मेंदूचा विकार व त्याचा परिणाम; खूळ. २. मूर्खपणा; मूर्खपणाचे कृत्य. ३. (ल.) अत्यंत, अत्युत्कट, फाजील आसक्ती, इच्छा; छंद; नाद; लहर. ४. सबळ कारणाशिवाय मनात ठाम बसलेली समजूत. ५. अविचार; अज्ञान. ६. एकदम पुष्कळ कामे करायची असताना काय करावे, कसे करावे अशी मनाची भ्रमिष्ट अवस्था. [सं. वैधेय; क. यडगनु](वा.) **०पांघरून, घेऊन पेडगावास जाणे** –आपला

मतलब साधण्यासाठी वेड दाखवणे. **०पिकणे, वेडाचा पाऊस पडणे** – १. एखाद्या गोष्टीबद्दल अवास्तव कुतूहल उत्पन्न होणे. २. असमंजसपणा, अविचार वाढणे; एखाद्या वस्तूचा ध्यास लागणे. **०भरणे, लागणे** – वेडे होणे. **० लावणे** – १. एखाद्याला मोहित करणे, त्याचे मन आकृष्ट होणे. २. घोटाळ्यात घालणे. ३. वेड लागण्याइतपत एखाद्याला छळणे.

वेड स्त्री. दोन बाजूंना दोन काठ्यांत अर्धवर्तुळाकार लावलेले मासे धरण्याचे जाळे. (कु.)

वेड न. कुडे. (गो.)

वेडगळ–गेला–सर, वेडका वि. वेड्यासारखा; अर्धवट मूर्ख; खुळचट.

वेडगळणे अक्रि.१. वेडे होणे. २. वेडेचार, छांदिष्टपणा, आडदांडपणा, मूर्खपणा करणे.

वेडझवा वि. १. व्यवहारशून्य; खुळचट; मूर्ख; बेअकली; विक्षिप्त; चमत्कारिक; विलक्षण; अडाणी. २. भ्रमात, गोंधळात पडलेला; भ्रमिष्ट; काय करावे ते सुचत नसलेला.

[देप्रा. अड्डज्झियँ=विपरीत मैथुन; क. एड्ड]

वेडण (राजा.) पहा: १ **वेढणे** १

वेडथर, वेडदु(धु)ल्ली, वेडबंबू पहा : **वेडगळ**

वेड(डा)वणे अक्रि. १. मूर्ख किंवा वेडा होणे; खुळावणे. २. वाकुल्या दाखवणे. ३. मुकी, जड, स्तब्ध होणे (वाणी) :'वेडावेलचि रसना, न करी सिंहापुढें शिवा चाळा।' – मोकर्ण २८.८१.

वेड्व(वि)णे सक्रि. (वेड लागण्याइतके) छळणे; सतावणे; गांजणे.

वेडा वि.१. ज्याला वेड लागले आहे असा; ज्याच्या मेंदूत बिघाड झाला आहे व त्यामुळे जो भलतेसलते बोलतो किंवा करतो असा; खुळा; भ्रमिष्ट. २. मूर्ख; ज्याला व्यवहारचातुर्य नाही असा. ३. बेताल; फाजील; मूर्खपणाचे; असंबद्ध; विसंगत (वर्तन, भाषण इ.). ४. आसक्त; आकृष्ट झालेला; मोहित. ५. छांदिष्ट; नादी; एखाद्या गोष्टीचा ज्याने ध्यास घेतला आहे असा. [त. वेळ्ळै]

वेडा ऊस रानऊस; खुळा ऊस. याचा औषधासाठी उपयोग करतात.

वेडाखुळा–पिसा–गोळा, वेडा धोतरा वि. वेडा; पिसाट; विरह इ. मुळे वेड्यासारखा वागणारा.

वेडा पीर १. छांदिष्टपणे, बेताल वागणारा, बोलणारा, आतयायी मनुष्य. २. अजागळ, वेडगळ मनुष्य. [म. वेडा + फा. पीर]

वेडाबागडा वि. १. अनेक ठिकाणी व निरनिराळ्या प्रकारांनी वाकलेला; वाकडा–तिकडा. २. (ल.) पहा : **वेडा पीर** १

वेडा मधुरा एक प्रकारचा दोषिक ताप. यात शीतोपचार झाला तर वात होऊन वेड लागल्यासारखी स्थिती होते.

वेडा राघू एक चिमणीएवढा पक्षी. शरीराचा रंग हिरवा, डोक्यावरचा बाजूचा रंग सोनेरी, चोचीखालचा बाजूचा भाग तकतकीत निळ्या रंगाचे असतात.

वेडावणे न. वाकुल्या; चिडवणे.

वेडा(ड)वणे अक्रि. मोह पाडणे; एखाद्या गोष्टीच्या भरी भरणे.

वेडावाकडा वि. १. पहा : **वेडाबागडा.** २. (ल.) कुटिल; सरळ स्वभाव नसणारा. ३. असंबद्ध; भरमसाट; जसे सुचेल तसे; वाईटही नाही व वाखाणण्यायोग्यही नाही असे. (वा). **वेडेवाकडे होणे**– अनपेक्षित संकट येणे. **(एखादीचे) वेडेवाकडे होणे** – वैधव्य येणे; संसार विसकटणे.

वेडाविपारा, वेडावि(विं)द्रा वि. १. वेडा, कुरूप व कुस्वभावी; भीतिदायक; भेसूर; हेंगाडा. २. वेडावाकडा.

वेडाळ–ळ्या, वेडाळवाणी वि. वेडा; अर्धवट; वेडसर.

वेडाळणे अक्रि. वेडे होणे.

वेडीव स्त्री. वेडेपणा; अजागळपणा; नेणीव : 'वायां वेडीव घेइजे चतुरें । शस्त्रास वाखाणिजे शस्त्रधरें ।'– मुसभा ७.६९.

वेडी हळद १. जाड खोडाची किंवा मोठी कुडी असणारी हळद. २.(ल.) वेडसर मुलगी. ३. (ल.) वेडे पीक.

वेडेचार, वेडेचाळे १. मूर्खपणाचे वागणे, करणे; वेड्यासारखी कामे. २. वेडातील हावभाव.

वेडे पीक १. मशागतीवाचून विपुल येणारे पीक. २. आले तर पुष्कळ व नाहीतर मुळीच नाही असे पीक. ३. (सामा.) पुष्कळ भरभराट; फाजील पीक, प्रचार, उत्पादन इ. ४. (ल.)लहरी, वाटले तर हवे ते देईल पण नाही तर कवडीही देणार नाही असा दाता. ५. (ल.) क्षुल्लक कारणावरून कधी–कधी अतिरेक, आततायीपणा करणारा, पण एरवी फार त्रास दिला तरी अगदी शांत राहणारा मनुष्य. ६.(ल.) छांदिष्ट, हास्यास्पद वागणे.

वेडे भाग्य नादान, अपात्र, कर्तृत्वशून्य माणसाला प्राप्त झालेले भाग्य; कोणत्याही प्रकारची योग्यता नसताना आलेले भाग्य.

वेडे ज्ञान खूळ; चळ; पिसे; मूर्खपणा.

वेडैणे अक्रि. आसक्त होणे : 'प्रेमभरें वेडैली ।' – शिव ६०६.

वेड्यांचा बाजार विचार न करता एखाद्या गोष्टीच्या नादी लागणाऱ्या माणसांचा जमाव.

वेढ न.स्त्री. १. चांदी–सोन्याचे हाताच्या किंवा पायाच्या बोटात घालण्याचे वळे; वेढणे. २. कानातील मोत्याची कुडी. (गो.)

पु. (किल्ला, घर, कमर इ.चा) घेर. (को.)

[प्रा.; बं.बेड; हिं. बेढ; सं. वेष्ट]

वेढणी स्त्री. उडदाच्या वगैरे पिठात तिखटमीठ घालून केलेले धिरडे किंवा तोंडीलावणे.

वेढणे न. १. बायकांचे पायाच्या मधल्या बोटात घालण्याचे वळे; वेढे; विरोली. २. भातझोडणीसाठी हातात घेतलेल्या पेंढीला बांधलेली भातेणाची (पेंढ्याची) दोरी.– कृषि २३९.

वेढणे उक्रि. १. घेरणे; गराडा, वेढा घालणे. २. एखाद्या वस्तूभोवती (दोरी इ.) गुंडाळणे; लपेटणे; वळसा, विळखा घालणे. ३. (ल.) (अडचणी, संकटे इ.) सर्व बाजूंनी अंगावर कोसळणे. ४. (सामान्यत: वेढून घेणे) कसेतरी नेसणे; कमरेभोवती कसेबसे गुंडाळणे (आंघोळ करताना, कपडे बदलताना). ५.नेसणे; परिधान, धारण करणे. ६. (ल.) पादाक्रांत करणे; (प्रदेशाचा) पूर्ण ताबा, कब्जा घेणे : 'तें जयाचिये यशा धाकुटें। वेढूं न पुरे।' – ज्ञा ६.१०९.

अक्रि. १. (कागद, भिंत इ.) चित्रे, अक्षरे यांनी व्यापला जाणे, भरून जाणे. २. (एखादा मनुष्य) कामाखाली दडपून गेलेला असणे. [क. वेडयिसु; सं. वेष्टन; प्रा. वेढण]

वेढा पु. १. गराडा; फेरा; घेरा. २. (एखाद्या वस्तूभोवती घातलेला दोरी इ. चा) विळखा; फेरा. ३. मळसूत्र, भोवरा इ. चा स्वत:च्या आसाभोवती होणारा एक पूर्ण फेरा; गिरकी. मध्यबिंदूभोवती किंवा स्वत:भोवती फिरणाऱ्या वस्तूची एक फेरी, गिरकी. ४. मात्रा इ. सहाणेवर उगाळताना होणारा तिचा एक वळसा ५. तेढ; तिढण; आडवळसा; फेरा. [सं.वेष्ट्] ०**रिग(घ)णे** – भ्रमण करू लागणे: 'भ्रामकाचेनि संगें। जैसें लोही वेढा रिगे।'– ज्ञा १८.१३११. ०**लावणे** वेड लावणे; भुलविणे; फसविणे : 'म्हणोन दृश्य मिथ्या झालें। परंतु वेढा लाविलें। सकळांस येणें।' –दास ९.७.४४.

वेढाळणे उक्रि. वेढणे; वेष्टणे; वेढला जाणे.

वेढिता वि. नेसणारा.

वेढी स्त्री. तोटी असणारे भांडे.

वेढे न. वेढणे; वळे; जाड अंगठी.

वेण–णा स्त्री. १. प्रसववेदना; प्रसूतीच्या वेळी स्त्रीला पोटात येणारी कळ, तिडीक. (विशेषत: अव. प्रयोग) (क्रि. देणे, येणे, होणे). २. स्त्रीच्या प्रसूतीचा प्रकार (उशिरा, सहज, नैसर्गिक, त्रास होऊन वगैरे). ३. आमांश झाला असता किंवा अन्य कारणाने मलविसर्जनाच्या वेळी पोटात येणारी वेदना, कळ. [सं. वेदना; प्रा. वेअणा] (वा.) **वेणा–ण्या देणे–** परमावधीचा प्रयत्न करणे; एखाद्या कामात अति कष्ट, श्रम सोसणे.

वेण स्त्री. नदीत थोड्या पाण्यात मासे पकडण्याचे जाळे. (कु.)

वेण स्त्री. विहीण. (कु., गो.)

वेणा–णे वि. घरटात घालून भरडून काढलेला (तांदूळ); न सडलेला; असडी (विशेषत: तांबडा व हलक्या प्रतीचा तांदूळ).

वेणाटणे, वेणवणे अक्रि. प्रसूतीच्या वेदना होत असणे.

वेणी स्त्री.१. डोक्याचे केस, वाख इ. चे तीन किंवा अधिक पेड एकात एक विशिष्ट प्रकारे गुंतवून केलेली सर्पाकार रचना, बांधणी. २. गुंतागुंत: 'तिहीं पुसली योगाची वाहाणी। ताता हें गुण चीत्ताची वेणी ।' – भाए ६७०. ३.पाण्याचा अरुंद ओहळ; प्रवाह. ४. नद्यांचा संगम. ५.रांग; ओळ; पंक्ती. ६. फुले वेणीप्रमाणे दोऱ्यात गुंफून केलेला (बायकांनी खोपा, आंबाडा या भोवती घालण्याचा) गजरा. ७. पहा : **वेणीफणी.** ८.करवतीची वेणीसारखी दिसणारी धार. [त.वेणि; हिं. वेनी]

वेणीदंड पु.वेणीचा पट्टा, शेपटा.

वेणीदान न. प्रयागक्षेत्रात सुवासिनींनी आपल्या वेणीची दोन बोटे लांबीची टोके कापून त्रिवेणी संगमावर केलेले दान, त्याचा विधी. (या क्षेत्रात शास्त्रानुसार सर्वांना मुंडन सांगितले असून सुवासिनींनी फक्त वेणीची टोके कापून अर्पण करायची असतात.)

वेणीदार वि. वेणीच्या आकाराचा (खिळा इ.).

वेणीफणी स्त्री. केसांना तेल लावणे, ते विंचरणे, त्यांची वेणी घालणे, कुंकू लावणे, डोळ्यांत काजळ घालणे इ. स्त्रियांचा प्रसाधनविधी.

वेणु–णू पु. १. वेळू; बांबू; कळक. २. वेळूची मुरली; बासरी. [सं.]

वेणुबीज–यव न. वेळूचे बी. हे अठरा उपधान्यांपैकी एक आहे.

वेत न. १. विणे; जनावरांची प्रसूती. २. प्रसूतीची खेप, पाळी. ३. वीण. [सं. वी = प्रसवणे]

वेत,वेतस–सी पु. १. एक बोरूच्या जातीची वनस्पती, वेल. याच्या सालीच्या परड्या, खुर्च्या इ. करतात. २. या वेताची काठी, छडी. [हिं. बेत; त. वेत्तिरम्; सं. वेत्र]

वेत स्त्री. वीस (हाताची); विशिष्ट रुंदी. (गो.)

वेत स्त्री. स्थावर मालमत्तेच्या एका भागावर सारा कमी चढल्यास दुसऱ्या एखाद्या भागावर बसवतात तो अधिकचा सारा.

वेतन न. १. मजुरी; पगार; केलेल्या कामाचा मोबदला; बिदागी. २.वार्षिक नेमणूक (विशेषत: पूर्वी पुराणिक, पोतनीस, फडणीस इ. ना देत ती). [सं.]

वेतनगुरु–रू पु. भाडोत्री, निव्वळ पगारी मास्तर.–टिव्या.

वेतनी वि. १. वेतन ठरवून काही कामाला लावलेला (गडी, मजूर, पुराणिक, आश्रित इ.). २. काही कामाबद्दल एखाद्याला रोख पैसे किंवा पगार न देता मोबदला म्हणून बक्षीस दिलेला (गाव, हक्क, अधिकार इ.). पहा : **वतन.** ३. वेतनासंबंधीचा (तंटा, हिशेब इ.). ४. भाडोत्री; पगारी.

वेत(तू)स न. शरीरातून रक्त काढण्याचे एक साधन; तुंबडी.

वेतसरी स्त्री. खुर्ची इ. विणण्यासाठी काढलेली वेताची साल.

वेतस(सी)वृत्ति–त्ती स्त्री. १. (वेत जसे पाण्याच्या प्रवाहात लवते तसे) वाकण्याची, नम्रपणाची, लीनपणाने वागण्याची पद्धत, रीत. २. प्रसंगानुसार वागण्याची पद्धत. ३. लवचीकपणा; ताठरपणाचा अभाव.

वेतसी स्त्री. वेत.
वि. वेताचा; वेतापासून बनवलेला. [सं.]

वेतंड पु. हत्ती : 'वेतंड ऐशा चरती रसाळा । वनांत गौ सुंदर गोरसाला।' वामन, विराट ५.८५. [सं.]

वेताचा मल्लखांब १. मल्लखांब खेळण्याकरता छताला टांगण्यासारखा केलेला १०–१२ फूट लांबीचा वेत. २. अशा मल्लखांबावरचा खेळ.

वेताटी स्त्री. १. वेताची काठी, छडी : 'वेताटी घेऊन ते वेळा । ताडन करावया उदित।' – जै ५२.५०. २. हातात धरण्याची काठी : 'वेताटी धरून प्रत्ययाची।'– दावि १३९.

वेतारी वि.१. वेत्रधारी; भालदार. २. अधिकारी.

वेताळ पु. १. पिशाचांचा राजा; भूतनाथ. २. भूतपिशाचातील एक उच्च जाती किंवा त्या जातीतील एक व्यक्ती. ३. द्वारपाळ; वैतालिक : 'भाट वेताळ बंदीजन । भांडनटवे कुलालगण ।'– जै १०.४१. ४. एक क्षुद्र देवता; ग्रामदेवता. [सं.वेताल] (वा.) ०**पूर्वस्थळी येणे** – १. एखादी व्यक्ती पूर्वकर्मानुसार वागू लागणे; (वेताळ पंचविशीतील गोष्टीवरून) नियंत्रण गेल्यावर पुन्हा पूर्वीचा पेशा पत्करणे. २. (बिथरलेला मनुष्य) सज्जड दम, मार दिल्यावर वठणीवर येणे.

वेताळाची स्वारी स्मशानात दलदलीत दिसणारा देखावा. स्मशानात कधी-कधी दलदलीच्या जागेतून वायू बाहेर येऊन पेट घेतल्यामुळे निघणारा आगीचा लोळ.

वेताळाच्या चुड्या स्मशान, रणभूमी वगैरे ठिकाणी अस्थींमधून निघणाऱ्या फॉस्फरसमुळे दिसणारा उजेड.

वेत्ता वि. ज्ञाता; जाणता; एखाद्या विषयात पारंगत; तज्ज्ञ. [सं.]

वेत्र पु. १. वेताटी; वेताची छडी. २. (राजा किंवा मोठा अधिकारी यांच्या) चोपदाराच्या हातातील काठी. [सं.]

वेत्रधर-धारी-पाणी पु. भालदार; चोपदार; द्वारपाल. [सं.]

वेत्रवती स्त्री.स्त्री द्वारपाल; राजाच्या जवळ असणारी दासी. [सं.]

वेत्रासन न. वेताची बैठक, खुर्ची. [सं.]

वेथी स्त्री. तुरा. - नागाको.

वेद पु. अव. १. भारतीयांचे पवित्र आद्य धर्मग्रंथ. श्रुती हे जगातील अत्यंत प्राचीन वाङ्मय आहे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद असे चार वेद आहेत. २.ज्ञान. ३. (महार जातीतील लोकांत रूढ अर्थ) मंगलाष्टके. - बदलापूर १६९. [सं.] (वा.) **एखाद्याचे वेद हरणे** - सर्व युक्त्या, बेत, इ. फसून कर्तव्यमूढ होणे; काय करावे ते न सुचणे; तंत्रमंत्र हरणे.

वि. चार ही संख्या.

वेद न.कपट; कारस्थान :'म्हणोन ईश्वर पाप भृत्याचें ।वेद दवडील लोकनिंदेचें ।'- मुआदि १६.१४८. [सं. वेध]

वेद पु. वेध; नाद; छंद.

वेदक पु. ज्ञाता; जाणता.

वेदखंडिका स्त्री. वेदशाळा. [सं.]

वेदणे सक्रि.जाणणे. [सं. विद्]

वेदत्रयी स्त्री. १. धर्म, अर्थ व काम ह्यांचा समुच्चय. २. संहिता, ब्राह्मण व आरण्यके मिळून होणारे ग्रंथ. ३. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद हे तीन वेद.

वेदना स्त्री. १. तीव्र दुःख; कळ; तिडीक; यातना. २. कळवणे; जाणीव देणे; दिग्दर्शन; ज्ञान; समजावणी. [सं.]

वेदमूर्ति-र्ती, वेदशास्त्रसंपन्न पु. वि. (मूर्तिमंत वेद) शास्त्रपुराणादी जाणणारा प्रतिष्ठित ब्राह्मण; वेदविद्यासंपन्न, विद्वान भिक्षुक, शास्त्री इ.च्या नावामागे लावण्याची सन्मानदर्शक पदवी.

वेदवती स्त्री. पृथ्वी; वेद म्हणजे अन्न उत्पन्न करणारी पृथ्वी : 'जयाचेनि सौरभ्ये जीवित जोडे । वेदवतीये ।'- ज्ञा ११.२२४. [सं.]

वेदवाक्य न. वेदातील वचन. (ल.) प्रमाणवचन.

वेदाध्ययन न. वेद शिकणे; पंचमहायज्ञातील एक यज्ञ.

वेदान्त पु. १. तत्त्वज्ञान, ब्रह्मज्ञान सांगणारा, वेदांच्या शेवटी असणारा, साररूपी भाग; उत्तरमीमांसा; षड्दर्शनातील सहावे दर्शन; उपनिषदांतील तत्त्वज्ञान. २. प्रपंचाचे, ऐहिक सुखदुःखांचे मिथ्यात्व व ब्रह्माचे सत्यत्व यांचे प्रतिपादन करणारा उपदेश; ब्रह्मज्ञान. ३. ब्रह्म हेच सत्य आहे, बाकी जग हा केवळ भास आहे असे सांगून ब्रह्माच्या सच्चिदानंद स्वरूपाचे निरूपण करणारे मत; जीवात्मा व परमात्मा यांचे ऐक्य दाखवणारे अद्वैतमत. [सं.]

वेदान्ती वि. १. उपनिषदांतील ब्रह्मज्ञानाचा अभ्यास करणारा, त्याप्रमाणे वागणारा; ब्रह्मज्ञानी; वेदान्तमताचा. २. ज्ञानमार्गी. याउलट धादांती.

वेदाभ्यास पु. १. वेदपठण; वेदाची आवृत्ती, वारंवार म्हणणे. २.ॐकाराचा जप.

वेदांगे न.अव.वेदांचाच भाग म्हणून गणलेली शास्त्रे; उपवेद; वेदानुषंगी शास्त्रे. ही शिक्षा, कल्प, व्याकरण, छंद, ज्योतिष व निरुक्त अशी सहा आहेत.

वेदि-दी, वेदिका स्त्री. १. उंच आसन. २. यज्ञकुंडाची वरची, भोवतालची बाजू. आहवनीय, गार्हपत्य व दक्षिणाग्नी या तीन अग्निकुंडांची विशिष्ट आकृतीची दर्भाच्छादित जागा. यज्ञपात्रे, उपकरणी इ. ठेवण्याची स्वतंत्र जागा (देऊळ, मंडप इ. ठिकाणी) ३. लग्न; मुंज इ. विधीत घातलेले बहुले; देवळातील देवांच्या मूर्ती असणारा उंचवटा. [सं.]

वेदित वि. जाणलेले; कळलेले; उघड केलेले. [सं.]

वेदोक्त वि. १. वेदांमध्ये कर्तव्य म्हणून सांगितलेले. २. वेदमंत्रोच्चारपूर्वक. ३. वेदमंत्रोच्चारपूर्वक करण्याचा (धार्मिक विधी).

वेद्य वि. जाणण्यायोग्य; जाणून घेण्याजोगे (जगत, ब्रह्म इ.). (समासात) तर्कवेद्य, इंद्रियवेद्य इ. [सं.]

वेध पु. १. मोती, माणिक इ. ना भोक पाडणे. २.छिद्र; भोक; वेज. ३. भेद; दृष्टी, बाण, गोळी इ. नी एखाद्या लक्ष्यावर केलेला परिणाम; लक्ष्य वस्तूवर झालेला परिणाम. ४. सूर्यग्रहणापूर्वी चार प्रहर आणि चंद्रग्रहणापूर्वी तीन प्रहर अशी धर्मशास्त्राप्रमाणे असणारी ग्रहणासंबंधी दोषाची व्याप्ती. या काळात भोजन इ. निषिद्ध असते. ५. (ज्यो.) खस्थ पदार्थाचे क्षितिजापासून किंवा खस्वस्तिकापासून असलेले कोनात्मक किंवा कालात्मक अंतर. ६. (ज्यो.) मुख्य तिथिनक्षत्राला त्या दिवशी सकाळी किंवा संध्याकाळी दुसऱ्या तिथिनक्षत्राच्या असणाऱ्या अंशात्मक भागाने येणारा गुणदोषप्रयोजक संबंध. ७. (ज्यो.) एक नक्षत्र दुसऱ्या नक्षत्रासमोर येण्याने होणारा परिणाम. (हे अशुभ मानतात. यावरून) ८. अटकाव; अडचण; विरोध; उपसर्ग; पायबंद; अडथळा. ९.एखाद्यावर असलेल्या कार्याच्या भारामुळे, काळजीवेदनांमुळे त्याला स्वतंत्रपणे वागता न येणे. १०. चालू कामात अडथळा आल्याने होणारा खोळंबा. ११. काळजी; निकड; चिंता; घोर; पुढे करण्याच्या गोष्टीचे आधी लागलेले व्यवधान. १२. ध्यास; छंद; नाद; आकर्षण; चटका; ओढा. १३. तळे, विहीर इ. चा खोलपणा. १४. प्रवेश; शिरकाव. १५. नेम (बाण इ. चा). १६. सूक्ष्म, लक्षपूर्वक अवलोकन. (क्रि. घेणे) १७. चित्ताकर्षकता : 'वेधे परिमळाचें वीक मोडे । जयाचेनि ।'- ज्ञा ६.१५.१८. चिंतन. १८. (क्रि. घेणे) दुर्बीण इ. साधनांनी खस्थपदार्थाची स्थिती, गती इ. मापणे किंवा ठरवणे, निरीक्षण करणे. [सं. विध् = छिद्र पाडणे]

वेधक वि.१. भोक पाडणारा. २. (ल.) झोंबणारा; बोचणारा; तिखट; कडक. ३. हृदयस्पर्शी; शहारे आणणारा; ठाव घेणारा. ४. आकर्षक; चित्तहारक. (समासात) मनोवेधक. [सं.]

वेधणे उक्रि. १. भोक पाडणे; भोसकणे. २. मारणे; टोचणे; विद्ध करणे. ३. एकाग्र करणे; (मन). स्थिर ठेवणे. ४. आकर्षून घेणे; गुंतविणे. ५. क्षत पाडणे; अंत:करण विद्ध करणे; भेदणे. ६. परिणाम करणे; व्याप करणे : 'एन्हवीं दिठी वेधली कवळें। तैं चांदणियांते म्हणे पिवळें।' – ज्ञा ९.१४१. ७. तोडणे. [सं. वेधन]

वेधन न. १. छिद्र, भोक पाडणे; टोचणे. २. गिरमिट; भोक पाडण्याचे एक हत्यार. [सं.]

वेधनीय वि.वेध पाडण्यास योग्य, इष्ट. [सं.]

वेधवती स्त्री. १. वेधकता; आकर्षकता : 'ते कांई वाणौ वेधवती ।' – शिव ६०९. २. प्रेमशक्ती : 'आतां वेल्हाळ वेधवती।'– भाए ९२. वि. वेध लावणारी; आकर्षक.

वेधवस पु. वेध लागणे : 'ईश्वराचेनि वेधवसें।'– ज्ञा १८.९१५. [सं. वेध + वंश]

वेधशास्त्र न. आकाशस्थ ज्योतींचे अवलोकन करून त्यांच्या गती, स्थिती इ. निश्चित करणारे शास्त्र.

वेधशाळा स्त्री. ग्रहांचे वेध घेण्याचे ठिकाण.

वेधा स्त्री. (प्र.) विद्या; ज्ञान : 'तै अब्रह्मापलीकडे । ज्ञानसूर्य उजियेडे । शुद्ध वेधा तव जोडे । कैवल्यविधि।'– ज्ञाप्र ३.

वेधित वि. १. विद्ध करणारे; भेदणारे. २. वेध करण्यात कुशल.

वेध्य वि. वेधण्यायोग्य; वेधण्यासाठी ठरवलेला. [सं.]
पु. वेधा; गुंता; विरोध : 'प्रतिनिधीकडील वेध्य चुकलियावरी अंजनवेलीस मोर्चे देतो.'– पेद ३.४३८.

वेन्नी स्त्री. मासळी विकणारी मंडळी. (गो.)

वेपथणे अक्रि.चळचळा कापणे : 'वातहतें कर्दळीपत्रें। तैसीं वेपथें सर्व गात्रें । ' – ऋ ६४. [सं. वेप्- वेपथु]

वेपथु पु. कंप. [सं.]

वेमा–म पु. न. १. (विणकाम) मागावर बाणा दाबण्याचे साधन; फणी. २. माग. [सं. वेम]

वेय (गो.) पहा : **व्याही**

वेर स्त्री. १. करवतीच्या धारेची वेणी. २. करवतीने पाडलेली चीर. ३. भेग; चीर.

वेरजा(झा,धा)र पहा : **येरझार**

वेरणे सक्रि.चिरणे : 'लांकडाचा भुसा लांकूड वेरून पडतो.' – अश्वप १.१२७.

वेरा पु. कर; खंडणी : 'मातबर गांव येथे दो लक्षाचा वेरा घातला आहे.'– पेद ३६.२८९.

वेरी–न्ही शअ. १. पर्यंत; पावेतो (कालस्थलवाचक) : 'पदीहुनि मुगुटवेन्हीं । राममूर्ति देखिली साजिरी।'– स्वादि १.२.२५. २. कडून; वारी :' धुधुवार्ते कुठारे वेन्ही। बानभुजांचीं करौनी कांडौरीं।'– शिव ४५५. [सं. उपरि]

वेरुल पु. लांडगा : 'हर्षामर्ष वेरुल चोहीं । दिशा धावताति ।' – ज्ञाप्र २७०. [सं. व्याल, वेउल]

वेरुळचा निचाड्या (क.) अतिशय कृपण, कद्रू.

वेरे(र)वाळी पहा : **वेळेवारी**

वेल पु.स्त्री. १. लता; झाडावर, झाडाचा किंवा खांब इ.चा आधार घेऊन वाढणारी, किंवा जमिनीवर पसरत वाढणारी वनस्पती. २. वेलीचे रोप. – शिव २२. ३. नागवेल. ४. कुडूक, काप इ. कानातल्या दागिन्याला लावण्याची सोन्यामोत्यांची साखळी. ५. वंश; वंशज. ६. वेलाच्या आकाराची नक्षी. ७. सोललेल्या झाडाचे पातळ वेष्टन, साल (भारा बांधण्याच्या उपयोगी). [सं.वल्लि;प्रा. वेल्ली; गु.; पं.] (वा.) ०**मांडवास जाणे, वेलविस्तार वाढणे** – वंश वाढणे; कुटुंबविस्तार होणे.

वेल स्त्री. तुळई. – भात्रै ७.१.४.(खा.)

वेल स्त्री.घोड्यांना होणारा क्षयासारखा एक रोग.

वेलइत पु. साहाय्यकर्ता : 'तूं पांडवांचा वेलइतु'–निर्वेद ८६.

वेल करणे (लाठी) लाठी आपल्या अंगाभोवती फिरवणे व परित्र करून मधून मधून शत्रूवर वार करणे.

वेलगुंडी स्त्री. गवताच्या घरावर टाकण्यासाठी तुऱ्हाट्याचे वेट दूरदूर लावून केलेला कडा.

वेलची,वेलदोडा स्त्री. पु. १. उष्ण कटिबंधात आढळणारी, दाणेदार फळ असलेली औषधी वनस्पती. खाद्यपदार्थाला विशिष्ट वास देण्यासाठी, मसाल्यात फळातील दाणे किंवा त्याची पूड वापरतात. २. केळीची एक जात. [त. इलाज्जि; फा. लाची; सं. एला]

वेलबुट्टी–बुटी–बूट–बुट्टा–पत्ती स्त्री.पु. भिंत, कागद, छीट इ. वर काढलेली वेलाची नक्षी.

वेलरी स्त्री. वेल. [सं. वल्लरी]

वेलवटी स्त्री.कुंपण: 'तेणें वाचेस पडली वेलवटी। बोलों उफराटी विसरली।' – एभा ९.४२४.

वेलवाक पु. (समुच्चयाने) वेली. (ना.)

वेला–ळा स्त्री. १. समुद्रकिनारा: 'दर्पसागरू वेळा । सांडुनि उते ।' – ज्ञा १६.३९३. २. वेळ. ३. सीमा; मर्यादा. [सं.]

वेलाउळ न. १. किनारा; आश्रयस्थान : 'कीं भवार्णवाचें वेलाउळ। मुक्तांचें तें ।'– ऋ ३८. २. बंदर; उतारपेठ : 'जें परिमळाचें वेलाउळ। सारग्राहिकांसीं।' – ऋ ९६.

वेला(लां,ल्हां)टी–डी स्त्री. १. व्यंजनाला इ, ई, हे स्वर जोडताना योजण्याच्या चिन्हांची (ि , ी)संज्ञा. २. वृद्धी; विस्तार : 'पै जेथुनी हे एवढी। विश्वपरंपरेची वेलांडी ।' – ज्ञा १५.२८१.

वेलावणे पहा : **वेल्हावणे**

वेलांतर न.(फज्यो.) मध्यम व स्पष्ट सौर दिनमानांत पडणारे अंतर; उदयांतर

वेलित न. प्रांत : 'आठगाव वेलितांतर्वर्ति अग्रहार'– जालगाव ताम्रपट १.५–६.

वेली स्त्री. १. वेल. २. लांब गाणे : 'एकु हामामा घालीति हुंबळी । एकु वेली गातांती।' – दाव ८५. ३. वंश.

वेली स्त्री. घोड्याचा गांठीचा रोग. – अश्वप २.१८०.

वेले न. नांगराचा मधला दांडा व जू यांना बांधण्याचा कातडी दोर. (वाई)

वेले न. माणसांचे कडे : 'भगतजनीं वेलें लाविलें'- गोप्रच १०३. [सं.वलय]

वेलोणी वि. विड्याच्या पानांची एक जात. (ना.)

वेल्ली, वल्ली,विली–ल्ह स्त्री. घराणे; वंश; कूळ; गोत्र; आडनाव. [सं. वल्ली]

वेल्हवणी स्त्री. विस्तार; पाल्हाळ : 'तैसी प्रकृतीच्या गुणीं । जया कर्माची वेल्हावणी ।'- ज्ञा १८.८२७.

वेल्हा(ल्ह)वणे क्रि. १. विस्तारणे : 'सत्वाचेनि वोलांसे । बोधतरु वेल्हावतु दिसे ।' - भाए १८४. २. सुखावणे; आनंदणे : 'ब्रह्मानंदे जी डुलत। निजसुखें वेल्हावत।' - एभा ७.२६९. ३. डोलणे; लोळणे : 'आपुलेनि समीरणें । वेल्हावतीं विंझणें।' - अमृ ९.२. [सं. वेल् = हलणे]

वेल्हाळ पु. १. काव्यात्मक मंडण, विस्तार. २. अतिशयोक्ती; तिखटमीठ. ३. वाढ; विस्तार.
स्त्री. गप्पिष्ट स्त्री.
वि. फोफावलेले; विस्तारलेले.

वेल्हाळ पु. लळा; लाड.
वि. १. लाडका; प्रिय: 'पंच वर्षाचा चिलया बाळ । बत्तीस लक्षणी वेल्हाळ ।'- शिली (नवनीत पृ.२३४). २. सुंदर : 'डोळस आंगें वेल्हाळ ।'- दाव ६४. ३. नाजूक : 'कंठांतून पिक दिसे अशी वेल्हाळ ।'- अफला ५४. [देप्रा.वेल्लहल]

वेल्हाळपणा पु. विस्तार : 'देती वैराग्यशाखा कवळिया । वेल्हाळपणें ।'- ज्ञा १५.१९०.

वेल्हाळा–ळी–ळ स्त्री. पु. १. पत्नी, प्रेयसी इ. २. सुंदरी; प्रिय स्त्री. ३. (निंदार्थी) नगरभवानी; विलासिनी.

वेल्हाळ्या–ळी वि. अतिशयोक्ती करण्याची, एखादी गोष्ट रंगवून सांगण्याची खोड असलेला.

वेव पु. आश्रय. - मनको.

वेव न. मागाचे सूत गुंडाळण्यासाठी लागणारे सरळ लाकूड : 'कव्हणी एक साळी हाटासि वेंव घेयावेया जाए ।'- दृपा ११. [सं. वेम]

वेवट न. संकट; त्रास : 'पांडवांच्या बाचें मी काय लागें। त्यांचीं वेवटें सोशी अनेगें ।'- एभा २४.३८३. [सं. विवेष्ट]

वेव(वं)तणे उक्रि. १. वेढा घालणे व लगटणे, नेट करणे. २. भंडावणे; त्रास देणे; जिकीर करणे (भिकारी वगैरेंनी). [सं. विवेष्टन]

वेवदरणे क्रि. विवाद करून भंडावणे : 'दुर्जनीं वेवदरून घेतला।'- दास १८.१०.४०.

वेव्हाणी–नी स्त्री. व्यवस्था; रचना : 'करिता जाला वेव्हानी : चातुरंगाची'- शिव ७२९. [सं. विधान]

वेश पहा : **वेष**

वेश्या स्त्री. १. पैशासाठी वाटेल त्याला शरीर विकणारी स्त्री; रांड; कसबीण. २. नायकीण; कलावंतीण; नर्तकी. [सं.]

वेश्यागमन न. रंडीबाजी.

वेश्याचार्य पु. वेश्यांचा मालक; वेश्या बाळगणारा.

वेष पु. १. पोशाख; कपडे; पेहराव. २. पोशाखाची तऱ्हा, प्रकार, रिवाज. ३. बुरखा; सोंग; मिष. ४. रूप : 'मी सूर्याचेनि वेषें । तपें तैं हें शोषे।'- ज्ञा ९.२९६. [सं.]

वेषभूषा स्त्री. वस्त्रालंकार घालणे; प्रसाधन. [सं.]

वेष्टक वि. वेढा, वळसा, आवरण इ. घालणारा. [सं.]

वेष्टण–न न. १. घेरणे; वेढणे. २. आवरण; आच्छादन. ३. पिशवी; म्यान; गवसणी. ४. कुंपण; तट; कोट. ५. वळसा; फेरा (रस्त्याचा पर्वताभोवती). ६. नृत्यातील एक प्रकार, हावभाव. ७. वेढण्याचे वस्त्र; धोतर. [सं. वेष्टन]

वेष्टणे उक्रि. १. वेढणे; घेरणे : 'वेष्टित उभे देखोनि करें। येरी वृत्तांत विचारी।' - मुआदि ४.१४३. २. भोवती गुंडाळणे; लपेटणे. [सं. वेष्टन]

वेष्टनीय वि. वेढण्यासाठी, भोवती गुंडाळण्यासाठी, झाकण्यासाठी योग्य. [सं.]

वेष्टा पु. वेढा; घेरा : 'वेष्टा धनंजयाला आत्मयशें सत्य पांड वेष्टाया।'- मोद्रोण २.२०.

वेष्टित वि. वेष्टिलेला; ज्यावर वेष्टण, आवरण केले आहे असे.

वेष्टी स्त्री. १. धोतर; लुंगी. (तंजा.) २. आतडी गोळा होणे. पहा : **वेट** २

वेस स्त्री. १. गावकुसाचा दरवाजा; नगरद्वार. २. परसाचे, कुंपणाचे दार. ३. घराचे मुख्य (दिंडी दरवाज्यासह) दार. ४. सरकारी पट्टी, सारा भरणे (गावचे दरवाजे लावून ती वसूल करीत यावरून). [सं.विश्] (वा.)**वेशीवर, वेशीला बांधणे, टांगणे** – जाहीर करणे; सर्वांना कळवणे. **वेशीवरचा आरसा** - सार्वजनिक, कोणीही वापरावी अशी वस्तू.

वेसकट–ड स्त्री. कुंपणाच्या दाराची कवाडी, फाटक.

वेसकर–री पु. वेस राखणारा महार. (पूर्वी गावाच्या वेशीवर महारांचा पहारा असे.)

वेसज पु. अन्नधान्याची सामग्री : 'म्हणौनि जग हें वेसजे। पोंसें तया '- ज्ञा ६.११०.

वेसजी स्त्री. १. शुद्धी. २. प्रकाश : 'जयाचेनि आंगिकें तेजें । आ ॐ रविशशिचिये वणिजे । म्हणऊनि जग वेसजे - । पोसे तया ।'- ज्ञा ६.११०. [सं. विशुद्धि; प्रा. विसुज्झि]

वेसण स्त्री. १. बैल, रेडा इ. ताब्यात, आटोक्यात रहावीत म्हणून त्यांच्या नाकात ओवलेली दोरी; नथणी. २.(ल.) पकड; छाप; वर्चस्व; बंधन. ३. नाकातला एक अलंकार; बुलाख. ४. (कुस्ती) आपल्या जोडीदाराला खाली धरून आपली बोटे जोडीदाराच्या नाकपुडीत घालून वर ओढून जोडीदाराला चीत करणे. [क.वेसरि; देप्रा. अवयासिणी = नासारज्जू]

वेसणी पहा : **वेसण** १

वेसर पु. खेचर : 'तो तूं खराचा सांगाती। वेसर उत्पत्ति भारवाही ।'- भार अर ११.११-१२. [सं.]

वेसर पु. मीठमिरची इ. स्वयंपाकाचे साहित्य; वाणसामान : 'बाइसांतें वेसरू मागति।'- लीचपू ४११.

वेसवा स्त्री. १. वेश्या; कसबीण. २. गरती असून व्यभिचार करणारी स्त्री. ३. (सामा.) छचोर, बेढंगी स्त्री. ४. एक शिवी; निर्लज्ज स्त्री. [सं. वेश्या.; त.वशवि]

वेसवाटी पु. घर राखणारा मूळपुरुष (सर्प किंवा देवता). हा घराला भुताखेतांची बाधा होऊ देत नाही असे मानतात. (को.)

वेसवार पु. १. दोन-तीन प्रकारच्या डाळी, धने, हळद, मिरच्या इ. पदार्थ तळून किंवा भाजून केलेले कूट. २. मेतकूट. ३. कच्चा मसाला. (को.) [सं. वेशवार]

वेसवारा, वेसारा पु.मेतकूट विकणारा. -लोसाको.

वेसंगणे अक्रि. दुर्बळ होणे; व्यंग पावणे. (व.)

वेसंद स्त्री. विसंधी; फूट; विजोड; बिघाड.

वेसाज न. शेतीचे उत्पन्न : 'वेसाज ना १७ सत्रा ।'- कोप्राड शिला १.९.

वेस्त(स्ती)वेस्ता, वेस्त-स्ती पहा : **व्यस्त**

वेह(हं)कळी स्त्री. एक लहान झाड; विकळी.

वेहणे अक्रि. राहणे : 'जिया हांकीं जीव खुस वेहतो.' -भि ३१. (भिल्ली)

वेहरण न. आळ; दोष : 'याणें टाकिली ममतामाया । मजवरी वेहरण आलें वाया।' - भवि ४.२१०.

वेहळा पु. बेहडा हे झाड; त्याचे फळ.

वेह(हे)ळा पु. ओढा; नाला. पहा : **वहाळ**

वेहायली स्त्री. लगामाचा एक प्रकार. - अश्वप १.१८५.

वेहाळ स्त्री.उष:काल : 'वेहाळीचे वारे वांतां।'- उषा ७३.२१.

वेळ पु.स्त्री. १.कालविभाग; काळ. २. आताचा किंवा चालू काळ व काही होण्याचा काळ यांतील अंतर. ३. फुरसत; न गुंतलेला, रिकामा वेळ. ४.अपेक्षित किंवा योग्य कालावधीपेक्षा जास्त काळ; उशीर. स्त्री. १. समय; हंगाम; विशिष्ट काळ. २. दिवसाचा अर्धा भाग; सकाळ किंवा दुपार. ३. तीस घटिकांच्या (रात्री किंवा दिवसा) आठ विभागांपैकी एक (अमृत, उद्योग, काळ (मृत्यू), चंचळ (चोर), रोग, लाभ, शुभ किंवा स्थिर वेळ. याशिवायही पुष्कळ प्रकार आहेत.) [सं. वेला] (वा.) ० **मारून नेणे** -प्रसंगी कमीपणा येऊ न देणे; युक्तीने प्रसंग निभावून नेणे. ० **वाहणे**- बरे किंवा वाईट होण्यास काळ अनुकूल होणे.

वेळ स्त्री. समुद्रकिनारा. [सं. वेला]

वेळ पहा : **वेळू**

वेळ न. जीभ खरवडण्याची (सोने-चांदीची) पट्टी. (गो.)

वेळ स्त्री. वळी (गंध इ.ची) : 'ज्याच्या कपाळाची वेळ । सुर सकळ वांछिती।'- भारा बाल ६.५६.

वेळअवस स्त्री. पंढरपूर येथील मार्गशीर्ष अमावस्या व तेव्हाचे भोजन.

वेळअवेळ स्त्री. योग्य, अयोग्य किंवा अनुचित, अनुकूल किंवा प्रतिकूल असा काळ, प्रसंग.

वेळक(कू)ट-कूट न. कळकाचा तुकडा.

वेळकाठी स्त्री. कळक; बांबूचा वासा.

वेळकाळ पु. योग्य, अनुकूल काळ.

वेळटी स्त्री. विळी (मराठे लोकांत रूढ). (क.)

वेळण स्त्री. न. १. पेज : 'वेळिलें वेळण भाताचं।'- ययादि १७.१३३. २. वेळवण. ३. आधणाचे पाणी.

वेळणी स्त्री. १. वेळण काढण्यासाठी केलेले तव्यासारखे खोलगट पितळी भांडे. २.मडक्यावर झाकण ठेवण्याचे मातीचे भांडे. (व.) ३. झाकणी, वाढणी : 'कां घडे गाडगें वेळणी ।'- एभा १३.३२४. ४. वाडगा; थाळी. [सं.विल्]

वेळणे उक्रि. १. (शिजलेला भात, भाजी इ.चे) पेज, पाणी निथळून काढणे. २.गव्हले, शेवया इ.उकळवून हलक्या हाताने हालवून पाणी निथळून काढणे. ३. गाळणे. ४. तांदूळ इ. शिजायला घालणे.

वेळणे उक्रि. पहा : **वेळावणे**

वेळप्रसंग पु. काळकल्ला; वेळअवेळ.

वेळभर क्रिवि. १. सारा दिवस; वरचेवर. २. अर्धा दिवसपर्यंत. ३. बराच वेळपर्यंत.

वेळमाऱ्या वि. प्रसंगावधानी; समयसूचक.

वेळवण-णी न. भाजी, डाळ, पुरण वगैरेंचे वेळून काढलेले पाणी.

वेळवाक पु. वेळू वगैरे झाडे : 'लोकांस कौलपत्रें देऊन वेळवाक करावलें ते उंटे घालून सारली.'- पेद ९.४४.

वेळसाधू वि. १. संधी साधून काम करणारा. २. वक्तशीर.

वेळा-ळ-ला स्त्री. दंडात घालण्याचा एक अलंकार : 'दंडी वेळा वांकड्या गुजऱ्याचा झणत्कार ।'- अफला ५५. [सं. वलय]

वेळा स्त्री. अव. वेलची : 'लवंगा वेळांनीं समरसच रामा मुखरणी ।'- किंसुदाम ३८. [सं. एला]

वेळा पहा : **वेला**

वेळा स्त्री. १. हंगाम; विशिष्ट काळ. २. आवृत्तिवाचक गणनाकाळ. क्रिवि. संख्यावाचक किंवा गुणवाचक उपसर्ग लावून आवृत्ती दाखवण्यासाठी योजतात.

वेळाईत वि. वेळेवर, संकटप्रसंगी साहाय्य करणारा.

वेळापत्रक न. १. आगगाड्या, आगबोटी, शाळा इ. ठिकाणी कार्याच्या वेळा दाखवणारा तक्ता. २. कोणत्याही कामाच्या निश्चित वेळा लिहिलेला तक्ता.

वेळाप्रकाशक पु. (गणित.) पट दाखवणारी संख्या; वार संख्यांक; गुणक.

वेळावणे अक्रि. गरजेच्या गोष्टी वेळेवर न मिळाल्याने खंगणे (पीक, जनावर, मूल इ.); आबाळणे.

वेळा(ळ)वणे उक्रि. १. सैल सोडून हलवणे. २. वळवणे. उदा. मान वेळवणे. [सं. वेल्लन]

वेळीप पु. गोव्यातील एक हिंदू शेतकरी जात. (गो.)

वेळील पहा : **येळील**

वेळू पु. बांबू; कळक; वंश; बांस. [सं. वेणु; प्रा. वेळु]

वेळूजाळ न. वेळूचे बेट : 'दैवें वायूच्या कल्लोळी । परस्परें वेळूजाळीं।'- एभा १३.१८९. [सं. वेणु + जाल]

वेळेवारचा वि. वेळेवर असलेला.

वेळेवारी क्रिवि. योग्य वेळी; वेळ टळण्यापूर्वी.

वेंकट वि. वाकडा : 'भृकुटी वेंकट वेंकट पाहे ।'– दावि ७७५. [सं. व्यंकट]

वेंकावणे सक्रि. वेडावणे; चिडवणे.

वेंकावल्या स्त्री.अव. तोंडे, बोटे वेडीवाकडी करून वेडावणे; वाकुल्या.

वेंग स्त्री. १. दोन्ही हात अंगापासून लांब करून त्यांच्यात एखादी गोष्ट पकडण्यासाठी घातलेली मिठी; कव; कवळा; कवळी; कवटळा. २. आलिंगन. (क्रि. मारणे, घालणे.)

वेंग(गा)टणे सक्रि. १. वेंगेत धरणे; हातांनी कवटाळणे. २. उराशी धरणे; आलिंगन देणे; मिठी मारणे.

वेंगड–डी स्त्री. १. स्नायू आखडण्याची क्रिया (थंडीने, भीतीने इ.). (क्रि. वळणे): 'वळे विवेकाची वेंगडी । पडे शब्दाची बोबडी ।' – दास १.५.१०. २. गठडी; मुरकुंडी : 'तंव वळली वेंगडी । जेथील तेथ ।'– स्वादि १०.५.१०. ३. तिढा; पायात पाय अडकणे : 'पळतां पडती वेंगडी ।'– एरुस्व ११.५१. ४. वाकडी गती : 'देखोनि मृत्युची धाडी । पाया वळतसे वेंगडी ।' – एभा ९.२७१. [सं. व्यंकट]
(वा.) **०पडणे–** वाईट मार्गाकडे वळणे.

वेंगणी स्त्री. वर चढणे. (ना.)

वेंग(घ)णे अक्रि. अति कष्ट, चिंता, उपास इ. मुळे थकणे; ग्लानी येणे; गळणे.

वेंगणे सक्रि. १. वळसा, प्रदक्षिणा घालणे. २. पहा : **वेंघणे**

वेंगलण–णे न. पोटाशी पोर बाळगणारी, अंगावर पिलांना पाजणारी माकडी, वानरी. (राजा.)

वेंगाट(ड)णे सक्रि. (नेहमी तोंड या शब्दाशी जोडून) दीनपणाची मुद्रा करून एखाद्यापाशी काही याचना करणे; याचनेसाठी तोंड पसरणे. [ध्व.वेंवें; सं.व्यंकट]

वेंघणे अक्रि. करू की नको अशा विचाराने साशंक होणे, कचरणे.

वेंघणे उक्रि. १. पर्वत, झाड, जिना, घोडा इ. वर आरोहण करणे, चढणे : 'शृंगारिला हय तयावरि भूप वेंघे ।'– र. २.लोंबकळणे; (फांदी इ. वर लोंबकळून) खाली ओढणे; वाकवणे. ३. मिठी मारणे; वेंगणे. ४. ओलांडणे. [सं. वि + अंघ्]

वेंचवी, वेंचवीण पहा : **विंचवी खरूज**

वेंडा पु. मातीचे भांडे; मडके; कुंभ : 'या प्रतिमेपुढें पांढरा रंग लावलेला वेंडा। ठेवतात.'– ऐरापुविवि ८१. (बडोदे)

वेंधळा वि. १. मंद आणि अव्यवस्थित; बावळट व गचाळ. २. गोंधळलेला; गोंधळ घालणारा.

वै स्त्री. कुंपण. पहा : **वई**

वै स्त्री. (विणकाम) ओवी; प्रत्येक ताणा जिच्यातून ओवला जातो व जिच्यामुळे विणताना तो खाली–वर केला जातो ती वही.

वै स्त्री. बहुल्याभोवतीच्या मडक्याची उतरंड. पहा : **वही**

वैकल्पिक वि. १. ज्याविषयी मतभेद आहे असा (मुद्दा, सिद्धांत). २. ज्याविषयी विकल्प सांगितला आहे असा (नियम, विधी); ऐच्छिक. ३. अनिश्चित; संशयित. [सं.]

वैकल्य न. १. वैगुण्य; पंगूपणा; विकलता; अवयवांची मोडलेली, नासलेली, व्यंग पावलेली स्थिती. २. व्याकूळता. ३. अपूर्णता; कमतरता (धंदा, प्रयोग इ.)तील. [सं.]

वैकळ पहा : **वायकळ**

वैकाठी स्त्री. (विणकाम) वैची पट्टी, कांबटी.

वैकार पु.बदल; फेरफार : 'आपणचि वैकारु । सुची आक्षेपु परिहारु ।' – उह ११०६.

वैकारिक पु. (वास्तु.) दाब; ताण. (इं.) स्ट्रेस.

वैकुंठ न. पु. १. विष्णू या देवतेचे निवासस्थान; विष्णुलोक. २. विष्णू; कृष्ण. [सं.]

वैकुंठ चतुर्दशी कार्तिक शुद्ध चतुर्दशी.

वैकुंठवासी वि. १. वैकुंठात राहणारा. २. मृत्यू पावलेल्या विष्णुभक्तांच्या नावामागे लावले जाणारे विशेषण.

वैकुंठसमाराधना स्त्री. वधूपक्षाने वरपक्षाला दिलेली मेजवानी.

वैकृत वि. (आकार किंवा घटना यांत). पहा : **विकृत**
पु. (वास्तु.)ताण; नेट. (इं.) स्ट्रेन.

वैक्रांत न. एक रत्न. एक प्रकारचा हिरा. [सं.]

वैखरी स्त्री. १. जिच्या योगाने शब्द बाहेर पडतात ती चार प्रकारच्या वाणीपैकी एक. २. वाचा; वाणी. ३. वाग्देवता; वाचाशक्ती. ४. जीभ : 'घातल्या मुखामध्यें प्रेमानें वैखरा । वाटतो आतां तो हृदयांतरीं खरखरा ।' – प्रला २००. ५. भाषा. [सं.]

वैगुण्य न. १. गुणांमधील फरक, विरोध; गुणधर्मांचा विरोधीपणा. २. व्यंग; उणीव; दोष. [सं.]

वैचणे उक्रि. सुपाने पाखडून, घोळून जाड–बारीक वेगळा करणे :' नंतर तो रवा वैचावा' – पाकशास्त्र. २३. [सं. विच्= भिन्न होणे]

वैचपाखड स्त्री. (व्यापकार्थी) घोळणे– पाखडणे.

वैचक्षण्य न. १. नैपुण्य; पारंगतता. २.संशोधनातील प्रावीण्य. [सं.]

वैचंदी स्त्री. एका कंदाच्या वाळलेल्या चकत्या. या तळून उपासाला खातात. (व.)

वैचा पु. १. (जरतार धंदा) निरनिराळ्या आकाराचे व आकृतीचे जरीचे ठसे उमटवणे. २. (विणकाम) ताणा दुप्पट करणे. (क्रि. घेणे)

वैचित्र्य न.१. विविधता; भिन्नता (रंग इ.ची). २. विलक्षणपणा; आश्चर्य. विशेष गुण. [सं.]

वैचित्र्यवादी वि. रम्याद्भुत; (इं.) रोमॅन्टिक.

वैज पु. वैद्य. (कु.,को.) [सं. वैद्य; प्रा. वेज्ज]

वैजयंती स्त्री. १. काळी तुळस. २. एक फुलझाड. ३.विष्णूच्या गळ्यातील माळ. हीत पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पाच तत्त्वांची दर्शक नीळ, मोती, माणिक, पुष्पराज व हिरा अशी पाच रत्ने असतात. – ज्ञा ११.६३. [सं.]

वैजात्य न. १. जातीची भिन्नता; वर्ग, प्रकार, तऱ्हा या संबंधात भेद. २. त्यासंबंधीचा परकेपणा. [सं.]

वैजी स्त्री. १. स्त्रीवैद्य. २. दाई; सुईण : 'तंव आणियेकु प्रबंदु करितु । दोगी वैजी होतिया देशांतु ।'– ख्रिपु १.१५.१२.

वैडालव्रतिक पु. बोकेसंन्यासी; धर्मनिष्ठा, सद्गुण यांची बतावणी करून

मत्सर, लोभ, कठोरपणा करणारा. [सं. बिडालव्रत]

वैडूर्य न. एक रत्न; नीलोत्पल. [सं. वैदूर्य]

वैण पु. वणवा. (गो.)

वैणव वि. बांबूचा केलेला; बुरुडी (टोपली इ.). [सं. वेणु]

वैणिक न. वीणागीत; भावगीत. (इं.) लीरिक. [सं.वीणा]

वैणुचे अक्रि. वणव्यात सापडणे. (गो.)

वैतरणी स्त्री. १. यमलोकातील एक नदी. २. मृताला ही नदी तरून जाता यावी म्हणून उत्तरक्रियेच्या वेळी ब्राह्मणाला दान दिलेली गाय. ३. एक नदी. [सं.]

वैताग पु. संताप, तिरस्कार यापासून वाटणारी विरक्ती; उद्वेग; वीट (जगाविषयी,-वस्तू मनुष्य इ. विषयी). [सं. वै + त्याग]

वैतागणे अक्रि. १. तिटकारा वाटणे; त्रासून जाणे. २. रागाने निर्भर्त्सना करून संबंध सोडण्याच्या गोष्टी करणे.

वैतागवाडा पु. कोपगृह; राणीला रुसून बसण्यासाठी बांधलेला वाडा.

वैताद पु. एक तृतीयांश तोळा. (गो.)

वैतालिक पु. प्रात:काळी गायनवादनाने राजाला जागे करणारा भाट, स्तुतिपाठक; बंदी. [सं.]

वैद पु.(विटीदांडू) खेळातील सहावा डाव; हात दुणून कोपरावर विटी ठेवून ती थोडी उडवून दांडूने मारणे. [क., ते. अयिदु = सहा]

वैद पु. 'वैद्य' शब्दाचा अपभ्रंश; वैदू. [सं. वैद्य]

वैदग्ध्य न. १. सुसंस्कृतता; वाङ्मयातील उच्चता. २. कुशलता; कौशल्य; चातुर्य. [सं.]

वैदर्भी स्त्री. १. विदर्भराजकन्या रुक्मिणी. २. (साहित्य.) एक काव्यरीती. हिच्यात समास बहुधा नसतात व माधुर्य हा गुण असतो. [सं.]

वैदिक वि. १. वेदासंबंधी; वेदापासून घेतलेले, निघालेले; वेदोक्त. २. वेदाध्ययनशील; वेद अभ्यासलेला (ब्राह्मण, पंडित). [सं.]

वैदिक स्त्री.वैद्यकी; वैद्यक : 'मी जाणती असे वैदीक ।' - उषा २८.७.(गो.) [सं. वैद्यक]

वैदिकी वि. वैदिकाचा आचार, विधी इ. संबंधी.
स्त्री. वैदिकाची वृत्ती, धंदा; वैदिकपणा.

वैदुगिरी स्त्री. (वैदू वैद्याचे सोंग करून औषधे देतो व लोकांना फसवतो. त्यावरून ल.) लबाडी; फसवेगिरी.

वैदू पु. १. जडीबूटी - झाडपाल्याची, वनस्पतींची औषधे देणारी, रानावनात राहणारी एक भटकी जात व तीतील व्यक्ती. २. अडाणी, न शिकलेला वैद्य. [सं. वैद्य; ते. वैदू]

वैदूर्य पहा : **वैडूर्य**

वैदेह पु.१. विदेह देशाचा. २. ब्राह्मण स्त्री व वैश्य पुरुष यांचा मुलगा.

वैद्य पु. रोगावर आयुर्वेदानुसार औषधेचार करणारा तज्ज्ञ.
वि. १. औषधी; २. वैद्यकासंबंधी. ३. वेदांसंबंधी. [सं.]

वैद्यक न. १. औषधीशास्त्र; वैद्याचे शास्त्र. २. औषधोपचारावरचा ग्रंथ, शास्त्र, शास्त्रोक्त औषधे इ. करण्याचे वैद्याचे काम. [सं.]

वैद्यकी, वैद्यकगिरी स्त्री. वैद्याचा धंदा, व्यवसाय.

वैद्यवाणी पु. (व्यापक) औषधोपचार; इलाज.

वैद्युत्-त वि. (शाप.)विद्युतासंबंधी; विजेचे. [सं.]

वैध वि.१. विधिसंबंधी, संस्कार, नियम, पद्धत इ. विषयीचे. २. नियमांना, कायद्याला अनुसरून असणारे; कायदेशीर. [सं. विधि]

वैधता स्त्री. १. शास्त्रीयता; २. विधिग्राह्यता कायदेशीरपणा.

वैधर्म्य न. गुणविभिन्नता; विजातीयता. [सं.]

वैधव्य न. १.विधवापण. २. विधवेची दशा. [सं.]

वैधृत-ति पु.स्त्री. पोटातील भयंकर शूळ.

वैधृत-ति पु.(ज्यो.) सत्ताविसावा योग. [सं.]

वैधृतिपात पु. (फज्यो.) रवि-चंद्र क्रांतिवृत्ताच्या विरुद्ध बाजूला असून समक्रांतियोग झाल्यास होणारा योग. [सं.]

वैन न. ज्ञान; बुद्धी.

वैनजाबि(ब)ता पु. दोषनिर्णयपत्र. - राव्यको ८.८.

वैपरीत्य न. १. विपरीतता; उलट प्रकार. २. स्पर्धा; वैमनस्य. [सं.]

वैपुल्य न. विपुलता; सुकाळ; समृद्धी. [सं.]

वैफल्य न. १. विफलता; नैराश्य; एक मानसिक रोग. २. निष्फळता; निरुपयोगिता; नापिकी; अनुत्पादकता. [सं.]

वैभव न.१. ऐश्वर्य; थाटमाट; श्रीमंती. २. महिमा; प्रताप; थोरवी. [सं.]

वैमत्य न. मतांतर; मतभिन्नता. [सं.]

वैमनस्य न. १. विमनस्कता; उदासीनता. २. मानसिक व्यग्रता; मनाची चलबिचल, गोंधळ. ३. न पटणे; कुरबुर; वैर; विरुद्ध भाव. [सं.]

वैमात्र-त्री, वैमात्रेय-यी वि. सावत्र; वेगळ्या आईच्या पोटचा (भाऊ किंवा बहीण) [सं.]

वैमानिक पु. विमान चालवणारा.
वि. विमानासंबंधी; विमानाचे (शिक्षण इ.). [सं.]

वैयधिकरण न. निरनिराळ्या विषयांचे, आधारांचे इ. अधिष्ठान, अस्तित्व; व्यधिकरणत्व. [सं.]

वैयर्थ्य न. व्यर्थत्व; वैफल्य. [सं.]

वैयाकरण पु. व्याकरणशास्त्राचा ज्ञाता, शास्त्री पंडित. (चुकीने) वैयाकरणी.

वैयात्य न. उद्धटपणा; निलाजरा धीटपणा. [सं.]

वैर न. शत्रुत्व; प्रतिकूलभाव. [सं.]

वैरण स्त्री. लग्नात नवरीच्या दोन चिरड्यांपैकी अंगावर घेण्याची चिरडी. न. पांघरण्याचे वस्त्र; शेला : 'उत्तम वैरणं विराजत ।' - वेसीस्व ९.१४५. [सं. आवरण]

वैरण स्त्री.१. गुरांसाठी चारा, ओले गवत, वाळलेला कडबा इ. २. गोठ्यांतील चारा घालण्याची जागा; गव्हाणी. [सं. अव + इरणम्]

वैरण न. स्त्री. १.दळण्यासाठी जात्याच्या पाळीत, भाजण्यासाठी खापर, कढई इ.त किंवा कांडण्यासाठी उखळात एका वेळी घालण्याचे धान्य; वैरा. २. (सामा.) भर; पुरवण : 'कां ताथुवाचां ताणारं । ताथु घालिता वैरणा । तंतु तोचि विचक्षणा । होय पट ।'-माज्ञा १८.३६०. [सं. वि + ईर् = फेकणे]

वैरणे न.१. पहा : **वैरण** १; वैरा. २. ज्यातून जात्यात, उखळात धान्याची वैरण घालतात ते भांडे. ३. आच्छादन : 'कांबळेयाचे वैरणें घे म्हणे'

– गोप्रच १२५. [सं. आवरण]
उक्रि.१. शिजणे, भाजणे, दळण इ. कारणांसाठी तपेले, खापर, जाते इ. त धान्य ओतणे, घालणे. २.(ल.) लोटणे; ढकलणे. ३. (सामा.) अर्पण करणे; देणे : 'झाला द्रुपदमदार्ते स्वशर शिखिमुखांत वैरिता पार्थ।'– मोआदि २५.१४. [सं. अव + ईर्]

वैरफेरा–भाव, वैराचार पु. शत्रुत्व; द्वेष; वैर करणे.

वैरल्य न. १. विरळपणा (वस्त्रांतील धाग्यांचा); वीण घट्ट नसणे. २. मनमोकळेपणा; ढिलेपणा (कामाचा). ३. भोंगळपणा (कामाचा). ४. (ल.) दुर्भिक्ष; टंचाई; कमतरता. [सं.]

वैरस्य न. १. नीरसता; शुष्कपणा. २.(ल.) कोरडेपणा; फिकेपणा; पाणचटपणा. [सं.]

वैरा पु. १. रस नसणे; एका वेळचा (डाळ, तांदूळ इ.चा) शिधा; ओयरा. २. स्वयंपाकाचे (शेगडीजवळ मांडलेले, कच्चे) साहित्य. ३. पहा : २. **वैरण** १. [सं. वि+ईर] (वा.) **मणाचा वैरा घरी असणे** – मोठे कुटुंब, परिवार असणे.

वैरागर न. १. हिऱ्यांची खाण : 'वैरागरापुढें ठेविली गार ।' – रावि ३४.१६७.२. (सामा.) रत्नांची खाण : 'सभाग्यें खणितां वैरागर। रत्नांहूनि रत्नें परिकर ।'– कथा १.१२.१. ३.(ल.) खाण; साठा : 'ऐकें त्रैलोक्य सुंदरा । सकळ सौंदर्य वैरागरा ।'– एरुस्व ४.४. ४. स्पर्शमणी; चिंतामणी; स्पर्शाने हिरा करणारा मणी. [सं. वैदूर्याकर/वज्राकर]

वैरागी पु. १. संन्यासी; साधू; वैराग्य प्राप्त झालेला पुरुष. २.बैरागी; धर्माच्या नावाने भिक्षा मागणारा. [सं. वि + राग]

वैराग्य न. १. प्रापंचिक इच्छा, आकांक्षा यांपासून निवृत्ती; अनासक्ती. २. वैषयिक सुखांचा त्याग; विषयाचा कंटाळा. [सं.]

वैराट वि.१. ब्रह्माने उत्पन्न केलेल्या विराट पुरुषासंबंधी. २. विराटराजासंबंधी. ३. वाई गाव, प्रांत यासंबंधी. [सं.]

वैराण–ळ पु. एक जात व तीतील व्यक्ती. हे लोक बांगड्या इ. विकतात. लावण्या, पोवाडे, बायकी बोली यातून हा शब्द आढळतो.

वैराण–न वि.१. ओसाड; उजाड; पडित; उद्ध्वस्त. २. (भूगोल.) वालुकामय; निर्जल (प्रदेश). [फा.वैरान्; सं. विरिण = शून्य]

वैराणी–नी स्त्री. नासाडी; ओसाडी. [फा. वैरानी]

वैरूप्य न.विद्रूपता; विद्रूप आकार, घाट. [सं.]

वैल पु.न. चुलीचा बाजूचा भाग; अवेल. [सं. विलग]

वैलक्षण्य न.१. विलक्षणपणा; विचित्रपणा; नेहमीच्या गुणांहून, प्रकाराहून वेगळा गुण. २. वेगळेपणा; भिन्नता. [सं.]

वैला वि. वरच्या, बाहेरच्या बाजूसंबंधी. (गो. वैलो)

वैलाटी–ठी स्त्री. वरचा, उंचावरचा प्रदेश; वलाटी. [सं.]

वैवर्ण्य न. १. रंग जाणे, खराब होणे; विवर्णता. २.गुणधर्मांत भेद; विजातीयता. [सं.]

वैवस्वत पु. १. एका मन्वंतराचे नाव. हे मन्वंतर सध्या चालू आहे. २. सातवा मनू (विवस्वानाचा पुत्र); चालू मन्वंतराचा अधिकारी. [सं.]

वैवंथ(त)णे उक्रि. निकड लावून त्रास देणे; खनपटीस बसणे.

वैवाट, वैवाटदार, वैवाटणे पहा : **वहिवाट** इ.

वैवाडा पु. घराभोवतालचे परस. (को.) पहा : **वई, वयवाडा**

वैवाहिक वि. १. विवाहासंबंधी. २. नवराबायकोसंबंधी, दांपत्यधर्माचा. [सं.]

वैव्हानी स्त्री.आवाहन; जमवाजमव (सैन्याची) : 'करितां झाला वैव्हानी। चातुरंगांची।' – शिव ७३०. [सं. आवाहन]

वैशद्य न. १. स्पष्टपणा; साधेपणा; विशदपणा (भाषा इ.चा). २. मोकळेपणा; विस्तार (जागा, भाडे इ. चा). [सं.]

वैशाख पु. दोन पावलांमध्ये तीन वितींचे अंतर ठेवून उभे राहणे. – व्याज्ञा १.५१.

वैशाख पु. हिंदू महिन्यांतील दुसरा महिना. [सं.]

वैशाखनंदन पु. गाढव; खेचर.

वैशाखरेचित(अंगहार) पु. (नृत्य.) सर्व शरीर रेचित करणे, हात अपविद्ध करणे व आखंडलस्थान करणे, नंतर शरीर उंच करून कटिहस्त व कटिच्छिन्नही करणे.

वैशाखरेचित(करण) न. (नृत्य.) हातपाय रेचित करणे; मान व कंबर रेचित करणे व दोन्ही पाय वाकडे करून त्यांची बोटे दोन्ही बाजूंना होतील अशी पावले आडवी ठेवणे.

वैशाखस्थान न.(नृत्य.) दोन्ही पाय वाकडे करून आडवे ठेवणे, म्हणजे त्यांची बोटे समोर न राहता डाव्या व उजव्या बाजूला जातील. चक्र सोडणे वगैरे गोष्टी या स्थानात उभे राहण्याने सूचित होतात.

वैशाखस्नान न. चैत्री पौर्णिमेपासून वैशाखी पौर्णिमेपर्यंत वसंतमाधवाप्रीत्यर्थ प्रात:स्नान करण्याचे व्रत.

वैशाखी स्त्री. वैशाखातील पौर्णिमा.
वि. वैशाख महिन्यासंबंधी.

वैशिष्ट्य न.१. निराळा गुण; विशेषता. २. फरक; भिन्नता; निराळेपणा; पृथक्करण. ३. (सामा.) बाळगण्याचा, धारण करण्याचा गुण. [सं.]

वैशी स्त्री. नशीब; दैव. (कु.,कुण.)

वैशी(सी)क वि. वश करणारा : 'ओळखिला वैशीक।' – भाए ७४६. [सं. वशीकृ]

वैशेषिक न. षड्दर्शनांपैकी एक मत; कणादमत. 'विशेष' म्हणून एक नवीन पदार्थ मानून कणादाने त्याला या दर्शनात महत्त्व दिले आहे. पु. वैशेषिकमताचा अनुयायी. [सं.]

वैशेष्य न. १. निराळेपणा; विशिष्टपणा. २. अलौकिकता; अत्युच्चता. [सं.]

वैश्य पु. १. हिंदूंच्या चार वर्णांतील तिसरा वर्ण; व्यापारी उदिमांचा वर्ग. २. या वर्णांतील व्यक्ती; व्यापारी; वाणी. ३. एखाद्या वस्तूचे गुणानुक्रमाने चार प्रकार कल्पिले असता त्यातील तिसरा प्रकार दर्शविण्यासाठी हा शब्द योजतात. [सं.]

वैश्वदेव पु. रोज भोजनापूर्वी अग्नीला आहुती देण्याचा विधी; पंचमहायज्ञांपैकी एक यज्ञ. [सं.]

वैश्वानर पु. १. अग्नी. २. एक औषधी पाक. [सं.]

वैषम्य न. १. विषमता; द्वैत; भेद. २. एकसारखेपणाचा अभाव; कमी-जास्तपणा . ३. असमता; अनियमितपणा. ४. विरोध; विषमभाव; प्रतिकूलता. ५. दुःख; मत्सर; हेवा. [सं.]

वैषयिक वि. विषयासंबंधी; (विशेषत:) लैंगिक (सुख).

वैष्णव पु. विष्णुभक्त; विष्णुभक्तिसंप्रदायाचा अनुयायी.
वि. विष्णूसंबंधी; विष्णूचे. [सं.]

वैष्णवस्थान न. (नृत्य.) एका पायाची मांडी किंचित वाकडी करून पाय ताठ ठेवणे, दुसरा पाय जमिनीपासून किंचित उचललेला व बोटे बाजूला वळलेला असा पहिल्या पायापासून अडीच ताल अंतरावर ठेवणे, कमरेवरील भाग सरळ ठेवणे. अशा प्रकारे उभे राहण्याची तऱ्हा. नमन,- अश्वारूढ होणे या गोष्टी ह्या स्थानात उभे राहण्याने सूचित होतात.

वैष्णवास्त्र न.१. पिशाचांना मारक असे विष्णूसंबंधी अस्त्र.

वैष्णवी स्त्री. एक मातृका.
वि. वैष्णवांसंबंधी (आचार इ.).

वैष्णवी भात वैष्णवांच्या गंधाप्रमाणे वरती अक्षता म्हणजे कच्चा, मध्ये गोपीचंदन म्हणजे मऊ व खाली रक्षा झालेला भात.

वैस्वर्य न. १. स्वरांचा बेसूरपणा. २. बेतालपणा. [सं.]

वैहाळी स्त्री. क्रीडा; विहार : 'तेथ राजकुमारां हातिची लळवडि । पांतवास सांची वैहाळी कोरीं।'- नरुस्व. [सं. विहार]

वैंगणे न. उन्हाळ्यात होणारे भात. - कृषि १९०. पहा : **वायंगण**

वो या अक्षराने सुरू होणारे, काव्य इत्यादीमध्ये येणारे शब्द 'ओ' मध्ये पहावेत.
(देशावर, अशिक्षित लोकांच्या तोंडी 'वो' ने सुरू होणारे शब्द आढळत असले, तरी 'ओ' ने सुरू होणारे रूप जास्त शुद्ध आहे.)

वो उद्गा. ओ! हाकेला उत्तर.

वो अ. आदरार्थी संबोधन; अहो: 'जयजय वो शुद्धे।' - ज्ञा १२.१.

वोकल पु. चष्मा. (को.) - लोसाको. [पो. लोकल = डोळ्यासंबंधी]

वोकुठा पु. कंटाळा; उबग : 'वोकुठा आला संसाराचा ।'- चोखा ३९.

वोखारणे अक्रि. रागावणे. (व.)

वो(वा)खारी स्त्री. भांडारातील नक्त शिल्लक. [सं. अव +क्षर्]

वोगडचे अक्रि. गहाळ होणे. (गो.)

वोगडावचे उक्रि. उधळणे; हरवणे. (गो.)

वोगमान पु. मानपान : 'व्याही जावइयासी वोगमान । धनलोभें जाण कदा न करी।' - एभा २३.९७. [सं.]

वोगर पु. १. भात; अन्न : 'जो संतोषाचां गाभारा। आत्मबोधा । चेया वोगरा ।'- ज्ञा ४.१०६. २. वाढपी: 'वोगरीं अन्नें प्रवर्तली ततक्षेणी'- उह २५६. [क. ओग्गर]

वोगो पु. कलम करण्यासाठी योजण्यात येणारी आंब्याची फांदी.(कु.)

वोचकणे पहा : **वचकणे**

वोच्या वि.उथळ स्वभावाचा. (झाडी) [सं.वृथा]

वोज स्त्री. १. रीत; मार्ग : 'तेजाची वोज दावित । इंद्रनीला।'- ज्ञा ११.६००. २. चांगली रीत; व्यवस्था. ३. चांगुलपणा. [सं. ओजस्; क. ओजे=व्यवस्था]

वोजणे अक्रि. १. आचरणे; वागणे. २. योग्य असणे : 'आमुचा बापाभाउवां वोजैल तें हें करील'- गोप्रच १३८.

वोजा वि. चांगला.
क्रिवि. १. व्यवस्थितपणे; चांगल्या रीतीने : 'तया बैसवी आसनीं राम वोजा ।' - माधवरामायण अयोध्या ४६. २. सहज; सोप्या रीतीने : 'कैसे बंधन तोडिजेल वोजां ।'- विपू १.९५. ३. सवयीने : 'प्रवर्ते वोजा श्वान जैसा ।'- रंयोवा १.६९७.

वोजावणी स्त्री. रीत; वोज : 'अनंत तयाच्या सेवावोजावणी '- नाम ४६५.

वोजावणे क्रि.१. रीत, मार्ग दाखवणे; सुव्यवस्थित करणे : 'दाऊं वेल्हाळे देशी नवी । जे साहित्यातें वोजावी ।' - ज्ञा १३.११५६. २. नीट होणे; सावरणे : 'ऐसा अतिबळु संग्रामु झाला । न दिसे कोठही वोजावला।'-कालिका २५.१५.

वोजे पहा : **वोजा**

वोटंग न. उत्तरीय वस्त्र : 'वोटंग नेसुनि कटिप्रदेश नावेक उंचविजे'- वैवसं ६३. [सं. उत्तर + अंग]

वोठि-ठी स्त्री. मार; हल्ला : 'ब्रह्मशस्त्र घेऊनि करी । वोठि भरली झडकरी ।'- उह १८५२.

वोडक वि. खोडकर. - ऐको.

वोडव न. मोटेचे चाक : 'तेथे ही मोट फुटे कां नाडा तुटे । वोडव पडे बैल अवचटे।' - एभा ११.१५३२.

वोडव स्त्री. योग्यता : 'तेही अधिकाराचे वोडवेणि । काय सिद्धि जाय ।'- ज्ञा ६.३३९.
पु. आदरसत्कार.
वि. नृत्याचा एक प्रकार : 'वोडव तांडवाची कुसरी । लावियेली। यंत्रकारी ।'- कथा ३.८.५८.

वोडव, वोडौ पु. उद्गार; अवतरण : 'तो अळाप करी परावाचा । वोडवो वोडवी नवारसाचा ।'- आदिपर्व (कृष्णदास) १.२.

वोडवन स्त्री. मांडणी; रचना: 'प्रमेयाची वोडवन ।'- भाए १२.

वोडसे न. मोठा कोयता. (को.)

वोडियाना-णा पहा : **उड्डियान**

वोढ पु. १. तरवारीचा किंवा पट्ट्याचा ओढलेला हात. २. जाच; त्रास. ३. संकट. (वा.) ० **काढणे** - माघारे परतून येणे.

वोढखोडे पु. अव. १. ओढे, घळी इ. रस्त्यातील अडथळे. २. अडचणी.

वोढदाम पु. वाण्याच्या बैलावरील एक कर. - मसाप २.५२.

वोढवी स्त्री. नवोढा कन्या.(गो.)

वोढाकाढ स्त्री. खटपट; श्रम. पहा : **ओढाओढ** [सं.]

वोढा घेणे, बांधणे पोट बांधणे. (महानुभाव भिक्षुक पोटात अन्न कमी जावे म्हणून पोटावर पट्टा बांधतात. त्यावरून) अल्प आहार घेणे.

वोढाळणे अक्रि.ओढाळपणा करणे; भटकणे : 'वोढाळितां लाविलें । ते तैसेंच कान पूंस वोलें।' - ज्ञा १३.७२९.

वोणा पु. ओहोळ : 'बुंदेस्वरापासौनि तळेयांचा वोणा।'-ऋ ११६. [सं. वह् - उप - वहन]

वोतटी स्त्री. फार परिचय, संघटन : 'कां तुझा बोल न मनणें । हे वोतटीचेनि दाटणें।'- माज्ञा ११.५५४.

वोतणे अक्रि. अवतरणे : 'माया घटाकारें वोते ।'- चक्रधर. सिसूत्रे २३.६. [सं. अवतार; प्रा. ओतरवोतर- वोत]

वोतपली स्त्री. १. पह : **ओतपली.** २. थोडा शेक, ताप. [सं. आतप-ओतप-वोतप+ली (प्र.)]

वोतवर वि. उतू जाण्याइतके; भरपूर : 'वोतवर सुख तारुण्याचा भोगु ।'- धवळे मास्व १०६. पहा : **ओतवर** [क.ओत्तु = पूर]

वोतवरा पु. जिल्हई; मुलामा : 'सोनेआ रुपेआचा वोतवरा । दिधला चांगु ।'- ख्रिपु १.२६.७४.

वोतंबर वि. ओथंबलेला; वाकलेला : 'वोतंबरू फलपुष्पी।'- एभा १२.४२३.

वोथरणे अक्रि.घाबरणे : सहस्त्र व्याघ्र गर्जना वनीं । जेवी हरणी वोथरे।'- मुसभा ९.७६.

वोथरणे अक्रि.१. नाहीसा होणे :'तेणें वोथरे विस्मयो।' - एभा १३.६७३. २.ढिला पडणे; मंदावणे : 'उठावला वोथरे वंका।'- अमृ ६.४६. [सं. उत् + स्थिर]

वोथिजणे उक्रि. १. पातळ करणे : 'आइका पाणी वोथिजावें नलगे।'- ज्ञा ९.२१. २. विस्तारणे.

वोदरणे क्रि. (थर फुगून) कोसळणे; ढासळणे; उमळून पडणे : 'वोदरे तेथ मध्यें टेंका सुति।' - दृपा १०. [सं. अव + ह]

वोनवळी स्त्री. सोन्याची चीप : 'मग कसवटी काढीति : वोनवळीया काढीति ।' - गोप्रच ३०६. [सं. वर्ण]

वोप स्त्री. न. १. तेज. पहा : **ओप.** २. भूषण; दागिना : 'गोवें नगराचें वोप'- खाडेग्राम २८.३०.

वोपडानी स्त्री. दुर्गंधी : 'वोपडानी एतु असे'- लीचपू ३३३.

वोपण पहा : **वपन**

वोपसळे न. उजाळा : 'कनकप्रभा सोलिजेती । वरी वोपसळें दीजती।' - पूजावसर ११.

वोबण न. घराच्या छपरावर आडव्या रचलेल्या कारव्या, रिफा, कामट्या इत्यादी; गवत किंवा छप्पर घालण्यासाठी पांझरण.-ऐको. [सं.]

वोबणे क्रि. पहा : **ओथंबणे**

वोबार पु. खटपट; उद्योग : 'कालौनि आंधारें। लिहों येति अक्षरें । तरि मसीचेनि वोबारें। झके कोण ।' - अमृ ३२३. [सं. व्यवा]

वोमथणे अक्रि. लोंबणे : 'भंवईचीं पडळे । वोमथती शिनसाळें।'- ज्ञा १३.५६०.

वोमाय स्त्री. (प्र.) वधूमाय; नवऱ्यामुलीची आई.

वोरप स्त्री. १. खाखा; उत्कंठा : 'बुजाली वैराग्याची वोरप।'- ज्ञा १७.२३१. २. ओरखडा.

वोरंग वि. बेरंग : 'विषय वोरंग करी ।'- दावि १४६.

वोराड न. घर : 'एक दिही एका को ओरडा पांगवात आथी।' - भिल्लीभाषा २५. (भि.) [गु.वोरडी.म. ओरडीं]

वोराब(बा)रा-र पु.श्रम; खटपट :' निळा म्हणे म्हणोनि जागा। सांडोनि वोरबार वाउगा।' - निगा १८९.

वोरे पहा : **वैरा**

वोलंबा-बे पु.स्त्री. वाळवी. पहा : **वाळंबा**

वोली स्त्री. ओढणी; उपरणे : 'तदुपरि जरतारी मंदिले उंच वोली ।'- सारूह ३.३९. [सं. पल्लव]

वोवसी वि. वसा घेतलेला; व्रतस्थ.

वोवा पु. १. केळफूल. २. गाईचे आचळ, कास. (झाडी)

वोवांडणे अक्रि. १. फिरून परत येणे : 'मग वोवांडिती स्वर्गस्थ । पूर्व पुरूष।' - बंज्ञा १.२५३. २. पार पाडणे : 'ऋतुकोटि वोवांडित।' - ज्ञा १२३.१६४. ३. उपेक्षा करणे : 'आइकोनिचि वोवांडिले । कोण्ही जरी ।' - ज्ञा १३.२६४. ४. उघडण्याचा प्रयत्न करणे : 'हे घनगर्जना सरिसा । मयूर वोवांडे आकाशा।'- ज्ञा १८.४७४. ५. झुकणे; कल जाणे.

वोस स्त्री. चरबी; वसा. (गो.) [सं.वसा]

वोसक पु. विषय. - मनको.

वोस(सा)ण न. केरकचरा; वाहून आलेले जिन्नस.

वोसणणे पहा : **ओसंडणे**

वोसन क्रिवि.फुकट; व्यर्थ : 'तेथे शस्त्रें जातीं वोसन।'-रावि २८.६६.

वोसपणे अक्रि. भयभीत होणे : 'तैसें वोसपले जीव।'- तुगा ३८३९.

वोसरा पु. मागे सरणे; सौम्यता; सबुरी : 'तैसा रजाचा जो वारा । नावेक धरी वोसरा'- ज्ञा १५.१६३.

वोस(सा)रा पु.न्यूनता; कमताई.

वोसल-ळ, वोसाळ वि. ओस पडलेले; शून्य : 'तैसें जें वायाणें वोसळ दिसे जाणणें' - ज्ञा १८.५७५. [सं. उदास]

वोसंगळा स्त्री. मांडी : 'घेती वोसंगळां नामदेव। ज्ञानदेव स्वस्थ देवा वोसंगळां नामं १०७३. [सं. उत्संग]

वोसंतणे उक्रि. १. आचारणे; करणे : 'वोसंतिता रात्रि-दिवसें। नाराणुक जया।' - ज्ञा १६.९२. २. आक्रमण करणे : 'होतों अज्ञानाच्या आंधारा । वोसंतीत जन्म बाहरा ।'- ज्ञा १७.४२९.

वोसाड पु. पडदा.

वोसि स्त्री. खिन्नता : 'न मिळतां आहारीं। काहीं वोसि न धरी ।'- भाए ३३४.

वोसी स्त्री. उदासीनता; खिन्नता : 'न मिळतां आहारी कहीं वोसी न धरी ।'- उगी ३३४.

वोसे न. उणेपणा; कमीपणा : 'धात्रेयाही आणावें वोसें ।'- ज्ञा १८.१७६६.

वोस्तर पु. शरीराचा मध्यभाग : 'लपौनि राहिला माजि वोस्तरा: जघनद्वइं'- ऋव ५६४. [सं. अपस्तर]

वोहर पु. कुणबी जातीच्या लोकांमध्ये श्राद्धपक्षाच्या वेळी देवस्थानी ज्याला बसवतात तो.(व.)

वोहरता वि. उतरता; निमुळता. [सं. वि + हर]

वोहरी स्त्री. शून्य; पोकळ जागा.

वोहरी स्त्री. निद्रा : 'देविये येवों द्यावो वोहरी । सिनली असे।'– नरुस्व ४०६.

वोहा क्रि. आज्ञा. बसा : 'वोहा बा, जाहूं आमी रामराम ।'– भिल्लीभाषा ३२. (भि.)

वोहारा वि. वाईट पायगुणाचा.(व.)

वोहारी स्त्री. सून : 'वोहारी काइ गा रुसली?'– लीचउ ३३८. [सं. वधू]

वोळग स्त्री. सेवा; पहा : **उळिग** : 'होईन पुरेपण। वोळगेचें।'– ज्ञा १३.४२४.

वोळ(ळं)ग स्त्री. सभा; बैठक: 'वोळग वीसर्जली तया ततक्षेणीं।'– धवळेपू २०.

वोळणे (व.) पहा : **वाळणे**

वोळवणे १.(तहान) भागणे; वोळणे : 'करपात्रें प्राशितां देख । तृषा समूळ वोळवते ।'– जै १.३०. २. उदित होणे : 'गगनीं वोळवितु गभस्ति ।'– मुवन १.२२.

वोळंब पु. सोंग : 'सुखें वोळंब दावी गोहा। माझें दु:ख नेणो पाहा ।'– तुगा २९५७.

वोळंबा पु.१. वाळवीचा किडा. २. वारुळ करणारी मुंगी.

वोंग स्त्री. टोक; कोना : 'डोळेयाचीया वोंगा ओडवुनि ।'– शिव ६०७.

वौजणे सक्रि. चांगल्या मार्गावर येणे. [सं.ऋजु]

वौसर पु. पुडा; गड्डी.

व्यक्त वि. १. इंद्रियगोचर; स्वतंत्र अस्तित्व असलेला. २. उच्चारता येणारा (वर्ण, शब्द). ३. स्पष्ट; उघड; दिसण्यासारखे; समजण्यासारखे. ४. दृश्य. ५. साकार : 'वोळी लिही व्यक्तु। आपणचि।'– ज्ञा १३.३०७. ६. ज्ञात; ज्ञातसंख्येचे (गणित, अंकगणित). याउलट अव्यक्त (बीजगणित). ७. (तत्त्व.) नाशिवंत; क्षर. [सं.]

व्यक्ति–क्ती स्त्री. १. प्रत्यक्ष गोष्ट, वस्तू; विशेष (मनुष्याचा, पदार्थाचा). २. स्पष्टपणा; उघडपणा; प्रगटता. ३. आकार; स्थिती. ४. स्पष्ट उच्चार. ५. असाधारण, अलौकिक पुरुष; कोणताही मनुष्य; इसम. ६. (ल.) अट्टल लबाड, बदमाष माणूस. ७. आविष्करण; दिग्दर्शन. ८. 'अ'चा लोप झाल्याची अक्षरापुढील ऽ खूण. [सं.]

व्यक्तिगत वि. खाजगी; वैयक्तिक; व्यक्तिविषयक; व्यक्तिवाचक.

व्यक्तिचित्रण न. १. (चित्र.) विशिष्ट व्यक्तीची शरीरवैशिष्ट्ये तसेच अवस्था व मनातील भाव रेषा व रंग यांचा उपयोग करून दर्शवण्याची क्रिया. २. (साहित्य.) अभिप्रेत व्यक्ती डोळ्यांसमोर उभी राहील अशा रीतीने व्यक्तीच्या वैशिष्ट्यांचे आणि हावभावांचे वर्णन करणे.

व्यक्तिदर्शन न. (लेखनकला) लेखनावरून लिहिणाऱ्याचे, लेखकाचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यासारखे वाटणे; लेखकाच्या वर्णनाने वर्ण्य व्यक्ती वाचकापुढे मूर्तिमंत उभी राहणे.

व्यक्तिभंग पु. महानुभाव मतानुसार, प्रसादाच्या वस्तूची मोडतोड.

व्यक्तिवाचक वि. १. वैयक्तिक; व्यक्तीसंबंधी. २. (व्या.) एखादे उदाहरण दाखवणारे, सिद्ध (नाम). याउलट जातिवाचक.

व्यक्तिस्व न.(मा.शा.) व्यक्तिमत्त्वाची निश्चित आणि स्पष्ट ओळख; आपण कोण आहोत, आपले गुण–मर्यादा –उणिवा काय आहेत याची जाणीव.

व्यक्तिस्वातंत्र्य न. व्यक्तीला निर्वेध वागण्याची मोकळीक; संविधानाने व्यक्तीला आपले स्थान, धर्म निवडण्याची, विचार व्यक्त करण्याची, बोलण्याची, उद्योग करण्याची दिलेली मुभा.

व्यक्तिस्वातंत्र्यवाद पु. (तत्त्व.) व्यक्तीला स्वातंत्र्य देण्याबद्दलचे मत.

व्यक्तीकरण न. १. स्पष्टीकरण; विवरण; फोड. २. चित्रकलेतील एक अंग; साधनक्रिया.

व्यग्र वि. शोक, भय, चिंता इ. नी क्षुब्ध, अस्वस्थ, व्यापलेले (मन इ.)

व्य(व्यं)जन न. पंखा; विंझणा. [सं.]

व्यतिकरण न. (शाप.) अडथळा. [सं.]

व्यतिक्रम पु.१. उलटा, विपरीत क्रम. २. विरुद्ध, उलट वर्तन. ३. विरुद्धता; विपरीतता. [सं.]

व्यतिक्रांत वि. उलटा; उफराटा; विपरीत झालेला. [सं.]

व्यतिपात पु. १. (ज्यो.) विष्कंभ, प्रीति इ. २७ योगांपैकी १७ वा योग. हा अशुभ व आपत्तिसूचक आहे. २. अपशकुन, अरिष्टसूचक चिन्ह. ३. (ल.) खोडकर, उपद्व्यापी मुलगा. [सं.]

व्यतिरिक्त वि. १. निराळा; भिन्न. २. विरहित; विहीन; विना. शअ. खेरीज; वाचून; शिवाय. [सं.]

व्यतिरेक पु. १. असंबद्धपणा; वेगळी, भिन्न स्थिती. २. अभाव. ३. अव्याप्ती. ४. अभावाचा नियम; परस्पराभाव. ५. अपवाद. ६. एक अर्थालंकार. जेथे उपमान व उपमेय यांपैकी एकाचे अधिकत्व व दुसऱ्याचे न्यूनत्व वर्णिलेले असते तो अलंकार. [सं.]

व्यत्यय पु. १. विरुद्ध, विपरीत भाव. २. उलटा प्रकार; विपर्यास. ३. उलटा क्रम. ४. (व्यापक) अडथळा; आडकाठी. [सं.]

व्यत्यास पु.१. विरुद्धता; विपरीतता. २. विपर्यास; उलटापालट. [सं.]

व्यथक वि. व्यथा, दु:ख देणारा. [सं.]

व्यथा स्त्री. दु:ख (शारीरिक, मानसिक); क्लेश; आधिव्याधी. [सं.]

व्यथान(नी)क वि. १. रोगी; दु:खी; नादुरुस्त. २. त्रासदायक; पीडादायक (मूल.)

व्यथित वि. पीडित; दु:खित; आर्त. [सं.]

व्यथिष्ट वि. फार दिवसांची व्यथा, दुखणे असणारा; दुखणेकरी.

व्यधिकरण वि.१. निरनिराळे विषय, अधिष्ठान, भूमिका इ. संबंधी किंवा त्यात असणारा. २. (ल.) विसंगत; अनुकूल नसणारे; स्नेहविरहित. ३.दुटप्पी; संदिग्ध; शिथिल (मत, तर्क इ.). न. आडफाटा; विरोध. [सं.]

व्यधिकरण बहुव्रीहि–ही विग्रहवाक्यात दोन्ही पदांना भिन्न विभक्ती असणारा समास. [सं.]

व्यपगत वि. काही कारणाने रद्दबातल झालेले (विमा, करार, सेवा इ.).

व्यपदेश पु.१. विशिष्ट नावाने दिग्दर्शन, व्यवहार. २. नाव; संज्ञा. ३. कपट; अप्रामाणिकपणा. ४. बहाणा; सबब. [सं.]

व्यपेक्षा स्त्री. १. उणीव; न्यूनता. २. (व्या.) (दोन नियमांचा) परस्पर–विनियोग. ३. परस्परसंबंध. [सं.]

व्यभिचरणे अक्रि. १. एकनिष्ठ, अनुकूल नसणे : 'तरी उचित काय आम्हां। जें व्यभिचरेना धर्मा।'– ज्ञा २.६३. २. सोडून जाणे; बदलणे. ३. भलतीकडे जाणे; योग्य मार्गापासून दूर होणे.

व्यभिचरित वि. अपवाद करून मोडलेला; ज्यापासून च्युती झाली आहे असा (नियम).

व्यभिचार पु.१.सामान्य नियमाचा भंग; अपवाद. २. दुराचार; व्यवहार सोडून, योग्य मार्ग सोडून वागणे. ३.परक्या स्त्री-पुरुषाशी असलेले, अनैतिक संबंध. ४. एकनिष्ठतेचा अभाव; कृतघ्नपणा : 'जेथिचिया कृपा लाभिजे वरु। तेथेंचि मनें व्यभिचारू।'– ज्ञा २.३८. ५. वेगळेपणा; फरक : 'जे प्रकृतीचेनि आधारें। गुणाचेनि व्यभिचारें।'– ज्ञा ४.७८. [सं.]

व्यभिचारी वि. १. अपवाद, भंग झालेला (नियम, शिरस्ता). २. व्यभिचार, अनैतिक संबंध करणारा, केलेला. ३. दुराचारी; दुर्वर्तनी; व्यसनी. [सं.]

व्यभिचारी भाव (साहित्य.) रसाच्या उत्पत्तीला साहाय्यकारी असणारा, संचारी भाव. याचे ३२ प्रकार आहेत.

व्यय पु. १. खर्च; वेच. २. नाश. ३. एका संवत्सराचे नाव. ४. (ज्यो.) कुंडलीतील बारावे स्थान.
वि. नश्वर. [सं.]

व्यर्थ वि. निरर्थक; निष्फळ; फुकट.
क्रिवि. वृथा. [सं.]

व्यलीक स्त्री. खोटेपणा; फसवेगिरी; लबाडी : 'ऐशा तुझ्या व्यलीका समजुनि न कळे कोण जाणेल तूतें।'– निगा १. [सं.]

व्यवकलन न. वजाबाकी; उणे करणे. [सं.]

व्यवच्छिन्न वि. १. निराळा, वेगळा केलेला. २. विशेष, भिन्न मानलेला. [सं.]

व्यवच्छेद पु. १. निराळेपणा; विशिष्टीकरण. २. अपवाद. ३. पृथक्करण; वेगणे करणे. ४.छेदन; कर्तन. [सं.]

व्यवच्छेदक वि. वेगळे, विशेष, पृथक करणारा (गुण, लक्षण इ.).

व्यवच्छेदन न. (वैद्यक.) फाडाफाडी; शस्त्रक्रिया. [सं.]

व्यवधान न.१. आड येणे, असणे. २. मध्यवर्ती अवकाश; अंतर. ३. आड येणारी वस्तू; अडचण. ४. अडथळा; प्रतिबंध (अडथळा करणारी वस्तू किंवा कारण). ५. खंड; थोडा विराम; गतिरोध (सुरू असलेल्या कामात). ६.दुर्लक्ष : 'पत्रिका पहावी सावधान। विलंब न करावा व्यवधान । प्रातःकाळीं आहे लग्न। ऐशिया समयीं पावावें ।'– एरुस्व १५.६१. ७. उशीर : 'नाहीं लग्नासी व्यवधान । वेगी करा फळार्पण।'– एरुस्व १५.६१. [सं.]

व्यवधायक वि.१. आड येणारा; मध्ये येणारा. २. प्रतिबंध, अडथळा करणारा.

व्यवसाय पु. १. धंदा; व्यापार; व्यवहार. २. प्रत्यक्ष वस्तूचे उत्पादन नव्हे, पण आपल्या बुद्धीचा, शिक्षणाचा, अनुभवाचा शुल्क घेऊन इतरांना उपयोग करून देणाऱ्यांचे कार्य. ३. खात्री; निश्चय. ४. श्रम; खटाटोप; सतत काम : 'तरी कीर्तनाचेनि नटनाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्तांचे।'– ज्ञा ९.१९७. [सं.]

व्यवसायपेटी स्त्री. व्यावसायिकांना त्यांची हत्यारे, साधने, कागदपत्र सोबत नेण्यासाठी लागणारी पेटी; (इं.) ब्रीफकेस.

व्यवसायात्मक वि. (तत्त्व.) निवड, निश्चिती, निश्चय करणारे.

व्यवसायी वि.१. व्यापारी; धंदा करणारा. २. खटपट्या; उद्योगी.

व्यवसायोपचार पु. अपघात किंवा अन्य कारणाने कामगार आपली पात्रता हरवून बसला तर काही व्यायाम व मानसिक उपचार करून त्याची गमावलेली पात्रता त्याला मिळवून देणे.

व्यवसित वि. निश्चित केलेले; ठरवलेले. [सं.]

व्यवस्थणे उक्रि. ठरवणे; निश्चित करणे : 'जें अतींद्रिय म्हणोनि व्यवस्थिलें।'– ज्ञा ११.१५९.

व्यवस्था स्त्री. १. योजना; तजवीज. २. निर्णय; निकाल; शेवट. ३. कायदा; कायद्याचे मत. ४. मत : 'तरी अझुनिवरी पार्था । सांडी सांडी हे व्यवस्था ।'– ज्ञा ११.६३१. ५. रचना; प्रकार : 'या लागीं तया पार्था । विश्वतोमुख हे व्यवस्था ।'– ज्ञा १३. ८८०. ६. गणती; मोजदाद : 'पैं महोदधीचिया तरंगा । व्यवस्था धरूं नये जवीं गा।' – ज्ञा १०.३०१. ७. वर्णनसंगती : 'तैसें टणकोनी सर्वथा । हें तें ऐंशीं व्यवस्था।'– अमृ ७.११८. [सं.]

व्यवस्थापक वि. पु. व्यवस्था करणारा, लावणारा; चालक; कारभारी; (इं.) मॅनेजर.

व्यवस्थापत्र न. आपल्या मरणानंतर आपल्या मिळकतीची व्यवस्था कशा प्रकारे लावावी याबद्दलचा लेख; मृत्युपत्र.

व्यवस्थापन न. व्यवस्था करणे; तजवीज; रचना.

व्यवस्थापित वि. व्यवस्था, रचना केलेले.

व्यवस्थित वि. १. नीट; चांगले ठेवलेले, रचलेले, योजलेले. २. यथायोग्य; खरे. ३. पद्धतशीर; शिस्तीचा; बेतशीर (माणूस). [सं.]

व्यवहार पु.१. कार्य; क्रिया; व्यापार. २. वहिवाट; पद्धत; रीत. ३. धंदा; देवघेव; व्यापार. ४. व्यवसाय; उद्योग; काम. ५. न्यायालयाची रीत, वहिवाट. ६. खटला; चौकशी : 'कोणत्याही व्यवहाराचा निर्णय करतांना सात सभासदांचे सल्ल्यानें निकाल करावा.'– टि १.१६०. ७.न्यायालयात निर्णयासाठी येणारी गोष्ट; दावा. ८. योग्य वर्तन; रोजच्या वागण्यात कसे बोलावे, कसे करावे याची अंगीभूत जाणीव. ९. भांडवल : 'कृतघ्ना उपेगु केला । कां चोरा व्यवहारू दिधला।' – ज्ञा १३.७२८. १०. संज्ञा : 'मग उत्तम ओघ सिंधु । हा नुरेचि व्यवहारभेदु।' – ज्ञा १६.१३९. ११.सामाजिक चालीरीतींविषयीचे नियम. [सं.]

व्यवहारणे उक्रि. योग्य कामी लावणे; उपयोजणे.

व्यवहारदर्शन न. न्यायतत्त्वशास्त्राचा अभ्यास.

व्यवहारपत्र न. करार.

व्यवहारपद न. १. खटला होण्यासारखी गोष्ट. २. खटला; कायदेशीर इलाज.

व्यवहारयात्रा स्त्री. व्यवसाय; व्यवहारक्रम.

व्यवहारशुद्ध वि. योग्य वर्तनाचे, व्यवहाराचे, चोख.

व्यवहारशून्य वि.व्यवहार, रीतभात यांचे ज्ञान नसणारा.

व्यवहारज्ञ वि. १. वयात आलेला. २. (कायदा) सज्ञान. ३. व्यवहारात तरबेज असणारा.

व्यवहारा पु. सावकार : 'वासनाएक ते व्यवहारे'- लीचउ ४०१. [सं. व्यवहारक]

व्यवहारी वि.१. व्यवसायात, धंद्यात गुंतलेला, धंदेवाईक. २.व्यापारी.

व्यवहारी अपूर्णांक (गणित.) एका संख्येचे वाटेल तितके भाग पाडून त्यांपैकी काही घेणे.

व्यवहारी ज्योतिषी मुंज, लग्न इ. चे आह्निक चालवणारा. काही ठिकाणी याच्याकडे धर्माधिकाऱ्यांचेही हक्क असतात.

व्यवहारी बस्तानी (गणित.) रुपयाचे पैसे कितीही असले तरी १६ गंडे (खुर्द्यातले) म्हणजे १ रुपया असा हिशेब करणे.

व्यवहार्य वि. १. उपयोगाला, व्यवहाराला योग्य, आवश्यक, शक्य (मनुष्य, वस्तू, निर्णय). २. अनुसरण्याला, करण्याला योग्य(धंदा, उद्योग). ३. कायदेशीर इलाज करण्याजोगा.

व्यवहित वि. अडथळ्यामुळे थांबलेले; प्रतिबंधित. [सं.]

व्यवहृत वि. उपयोजिलेले; व्यवहारविषय केलेले.

व्यवाय पु.संभोग; रती : 'तिने गर्भारपणी आनंदयुक्त व भ्रतारापासून निराळें म्हणजे व्यवायाशिवाय रहावें.' - बाचि. २. [सं.]

व्यवायी वि. (आयुर्वेद.) पचन न होता सर्व शरीरात पसरणारे (औषध).

व्यष्टणे क्रि. व्यापणे : 'मी माझिया विभूति । आणि व्यष्टिलिया व्यक्ति।'- ज्ञा १०.१०७.

व्यष्टि-ष्टी स्त्री.१. एकेकश; व्यक्तिश: व्याप्ती; अवयवभूत; विभाजित स्थिती; एखाद्या समुच्चयाचा मिश्रणाचा अंश किंवा व्यक्ती. याउलट समष्टी. २. देह; पिंड. [सं.]

व्यष्टिरूप वि. वैयक्तिक.

व्यसन न. १. एखाद्या गोष्टीचा आत्यंतिक नाद; छंद; चटक; आसक्ती. २. वाईट सवय; खोड. ३. अडचण : 'सांगें पैलतीरा जावें । ऐसें व्यसन कां जेथ पावें।'- ज्ञा ३.४७. ४. पाप; गुन्हा; दुराचरण. ५. तन्मयता; एकसारखे लक्ष. ६. संकट; आपत्ती. [सं.]

व्यसनी, व्यसनाईत वि. १.खोडी, चटक,वाईट सवय असलेला; दुराचरणी. २.नादी; छांदिष्ट. ३. (ल.) अभिलाषी : 'आम्ही व्यसनाईतु आवघे । काहीं जाणौचिना।'-ऋ २८.

व्यसुता स्त्री. मरण; मृत्यू : 'मुनि सांगे वर्षांतीं येइल त्या भूप - पुत्रका व्यसुता ।'- मोवन १३.२०. [सं. वि + असु +ता]

व्यस्त वि.१. वेगळा; पृथक; भिन्न. २. उलट्या, विपरीत क्रमाचा. ३. गोंधळलेला; बावरलेला; अस्वस्थ. ४. सर्वत्र पसरलेला; वाटलेला. ५. (गणित) दोन परिमेयांचा परस्परांशी एक वाढताना दुसरे कमी होत जाण्याचा संबंध; विपरीत. ६. (एखाद्या कामात)गढलेला, गुंतलेला; (इं.) बिझी. [सं.]

व्यस्तचित्र न. फोटो काढलेल्या वस्तूची काळी बाजू पांढरी व पांढरी बाजू काळी दाखविणारी काच, ऋणचित्र. [सं.]

व्यस्तप्रमाण न. (गणित.) एक कमी झाले असता दुसरे वाढणारे प्रमाण.

व्यस्ती वि. उफराटे; व्यस्त : 'बहु असत्क्रिया व्यस्ती । या नांव बद्ध।'- दास ५.७.३५. [सं.]

व्यहाळ न. अरण्य.

व्यहाळी स्त्री. पारध; शिकार : 'तया तैशाकाळीं शबरहि व्यहाळीस उटिला।' - आमृगीचरित्र २.

व्यंकट-णा वि. वाकडा; वक्र; कुटिल; वेंक. [सं.वक्र, वंक; आ. वंक, वंकुड]

व्यंकटी स्त्री. वक्रता; कुटिलता.

व्यंग न. १. विकलता; पंगुत्व. २. अपूर्णता. ३. लंगडी बाजू; बिंग. ४. कातडीवरचा तीळ; वांग.

वि. १. न्यून, उणेपणा असलेला (एखादा अवयव). २. एखाद्या अवयवात न्यून, उणेपणा असणारा (माणूस); पंगू; विकलांग. ३. अपूर्ण; खंडित (वस्तू). ४. कमीपणा येणारी, अपमानाची (गोष्ट).

व्यंगणे १. अपूर्ण राहणे; यथासांग न घडणे. २. वेंगणे.

व्यंगित वि. पहा : **व्यंग**

व्यंगुल-ली वि. बोटतुटका.

न. स्त्री. अंगुलाचा साठावा अंश; एक माप. [सं. वि + अंगुल]

व्यंग्य वि. आडपडद्याने, अप्रत्यक्षपणे; अलंकारिक शब्दाने सांगण्याचे, दिग्दर्शित करण्याचे; सूचक तऱ्हेने, हावभावाने किंवा कृतीने गुप्त गोष्टीबद्दल कळवण्याचे; व्यंजक; गर्भित.

न. १. छद्मी, सूचक भाषण; वक्रोक्ती. २. अलंकारिक भाषण. [सं.]

व्यंग्यचित्र न. थोड्या रेषांनी मूळ वस्तूचे वैशिष्ट्य दाखवणारे चित्र; टीकात्मक चित्र; (इं.) कार्टून.

व्यंग्यव्यंजकसंबंध पु. (न्याय.) वाच्य आणि गर्भित वस्तूंबधील संबंध.

व्यंग्यार्थ पु. (साहित्य.) शब्दांच्या वाच्य, लक्ष्य, व्यंग अशा तीन अर्थांपैकी शेवटचा अर्थ. हा इतर दोहोंपेक्षा खोल, अधिक सूचक असतो.

व्यंग्योक्ती स्त्री. १. औपरोधिक, छद्मी बोलणे. २. व्यंग्यार्थसूचक भाषण.

व्यंजक वि. सूचक; ज्ञापक; व्यक्त करून दाखवणारा. [सं.]

व्यंजन न. १.(व्या.) स्वररहित ककारादी वर्ण प्रत्येकी. २. अनुस्वाराचे किंवा अनुनासिकाचे अक्षरावरील चिन्ह. ३. चटणी, लोणचे इ. तोंडीलावणे. ४. औपरोधिक भाषण. ५. खूण; चिन्ह; अभिज्ञान. ६. भाजीला चव येण्यासाठी घातली जाणारी डाळ.

वि. व्यक्त; चिन्हित : 'एके अंगीं भिन्नपर्णी। जीव शिव वादिन्नले दोनी । तेणें झाली व्यंजन स्तनी ।'- एरुस्व ७.४०.

व्यंजना स्त्री. औपरोधिक, गर्भित अर्थ; ध्वनी; सूचन. [सं.]

व्याकरण न. १. भाषेचा व्यवहार कोणत्या नियमांनुसार होतो हे सांगणारे शास्त्र. यात शब्दसिद्धी-जाती-संबंध इ. चे विवेचन केलेले असते. २. विस्तार करणे. [सं.]

व्याकरणकार, व्याकरणी पु. वैयाकरण.

व्याकरणे क्रि. विस्तार, विवेचन करणे.

व्याकु(कू)ळ, व्याकुलित वि. १. शोक, आनंद, भीती इ. भावांनी आर्त, ग्रस्त झालेला. २. शारीरिक, मानसिक वेदनांनी पीडित झालेला;

बेचैन; विव्हळ. ३. मग्न; लुब्ध आपन्न या अर्थी आनंद, काम, चिंता, क्षुधा इ. शब्दांशी जोडून वापरतात. ४. (ल.) चंचल. [सं.व्याकुल]

व्याकुळणे अक्रि. व्याकूळ होणे.

व्याकृत वि. १. विवेचन, फोड केलेले. २. स्पष्ट; उघड; ज्ञात. [सं.]

व्याक्रोश पु.मोठ्याने केलेला आक्रोश, शोक. [सं.वि + आक्रोश]

व्याख्या स्त्री.१. विवेचन; स्पष्टीकरण; ऐक्य. २. टीका; भाष्य; अर्थाची फोड, छाननी. २. एखादी गोष्ट इतर सर्वांहून कोणत्या बाबतीत भिन्न आहे ते निश्चितपणाने सांगणे. ३. सविस्तर वर्णन; लक्षणे, गुणधर्म, प्रयोजन इ. चे निरूपण. ४. (गणित.) संज्ञार्थ; निरुक्ती. ५. (व्यापक) गुप्त गोष्टीचा बोभाटा. ६. हेटाळणी; औपरोधिक वर्णन; टिंगल.

व्याख्यात वि. १. ज्याची व्याख्या केली आहे असा; फोड केलेला. २. बोललेला; म्हटलेला. [सं.]

व्याख्याता पु.१. व्याख्या करणारा; टीकाकार. २. वक्ता; व्याख्यान देणारा. [सं.]

व्याख्यान न.१. ग्रंथ, वाक्य, श्लोक इ. ची फोड, विवरण करणे, त्यांच्या अर्थाचे विवेचन करणे. २. विवरण; प्रवचन. ३. जाहीर भाषण, विषयप्रतिपादन; कीर्तन. ४.(ल.) सबबी; अळंटळं.

व्याग पु.(कुंभारी) उत्तरक्रिया. - बदलापूर ७७. [सं. याग]

व्याघात पु.१. खंड; विराम; थांबणूक. २. अडथळा; प्रतिबंध; आडकाठी. ३. आघात; तडाखा. ४. (ज्यो.) (सत्तावीस योगांतील) तेरावा योग. ५. एक अर्थालंकार. ज्या साधनाने एकजण कार्य करतो, त्याच साधनाने दुसरा त्याच्या उलट व यशस्वी कार्य करतो असे वर्णन. (वा.) **वदतो व्याघात्**- अगोदरच्या आपल्याच बोलण्याच्या विरुद्ध, विसंगत बोलणे.

व्याघ्र पु. वाघ हा प्राणी. [सं.]

व्याघ्रनख न. १. ज्याची मूलतत्त्वे हस्तगत होण्यास कठीण पडते असे शास्त्र, कला. २. दुर्बोध, घोटाळा करणारे कोणतेही शास्त्र, ग्रंथ, वाक्य.

पु. खंजिराचा पवित्रा. - प्रश १८. [सं.]

व्याघ्रमुखी वि. तोंडाशी रुंद असून मागे निमुळता होणारा जमिनीचा तुकडा.

व्याघ्रांबर न. (पांघरण्यासाठी वापरण्याचे) वाघाचे कातडे. [सं.]

व्याघ्रांबरी स्त्री. १. एक क्षुद्रदेवता. २.(ल.) डाग पडलेली, जळकी भाकरी (वाघाच्या अंगावरील ठिपक्याप्रमाणे डाग दिसतात त्यावरून). ३. एक वस्त्र.

व्याज न.१. पैशाच्या वापराबद्दल द्यावी लागणारी किंमत. वृद्धी ही पैशाचा पुरवठा व मागणी यावर अवलंबून राहते. २. (गणित) मुद्दलावर मुदतीप्रमाणे होणारी वाढ. [हिं.ब्याज; सं.वृद्धि]

व्याज न. १. निमित्त; कारण : 'जें धर्मालय म्हणिजे। तेथ पांडव आणि माझे। गेले असती व्याजें। जुझाचेनि।'- ज्ञा १.८६. २. मिष; कपट; ढोंग : 'व्याज न जेथें नसे वक्रता, उपचारांची पीडा।'- टिक २८. ३. रूप; वेष; बुंथी. ४. सबब; बतावणी : 'पितृवचनाचें करूनि व्याज । वना आलास तू रघुराज।'- रावि २२.१८. [सं.]

व्याजकटावणी स्त्री. कटमितीने व्याजाचा आकार करण्याची पद्धत.

व्याजखाऊ-खोर वि. १. फार व्याज घेणारा. २. व्याजबट्ट्याचा व्यवहार करणारा. ३. व्याज असणारे (कर्ज).

व्याजनिंदा स्त्री. १. एक अर्थालंकार. खोटी निंदा; बाहेरून निंदा दिसावी पण गर्भितार्थ स्तुतिपर असावा. २. एकाच्या निंदेने दुसऱ्याची निंदा करणे. [सं.]

व्याजफैलावणी स्त्री. १. जमेकडील आणि नावेकडील व्याज वेगवेगळे काढून कमी असेल ते अधिकात वजा करून बाकी काढणे. २. सबंध मुदतीचे किंवा वर्षाचे व्याज आकारण्याचा प्रकार.

व्याजबट्टा पु. (व्यापकपणे) सराफी व्यवहार (कर्जाऊ रकमा देणे, नाणी वटावणे, हुंड्यापाड्या देणे-घेणे इ.).

व्याजभरी वि. कर्जाच्या व्याजावारी ज्याचे पूर्ण उत्पन्न जाते आहे असा.

व्याजस्तुती स्त्री. एक अर्थालंकार. स्तुती करण्याच्या मिषाने निंदा किंवा निंदा करण्याच्या मिषाने स्तुती करणे.

व्याजोक्ती स्त्री. १. एक अलंकार. मनातली गोष्ट स्पष्ट न बोलता आडवळणाने, निमित्तांतराने बोलून त्याला स्वत:ला अभिप्रेत अर्थ आणणे. २. गुप्त गोष्ट, स्वरूप प्रगट झाले असता काही सबबी सांगून लपवणे.

व्याज्य न. चिंता; घोर : 'काय तुला रे लागलें व्याज्य।'- दावि ४३२.

व्याड न. दातांमधील फट : 'तिये रत्नें दातांचा व्याडी।'- ज्ञा ११.४११.

व्यादेश पु.न्यायालयाचा आदेश, हुकूम.

व्याध पु.१. पारधी; शिकारी.२. एक नक्षत्र; लुब्धक. [सं.]

व्याधि-धी स्त्री. १. शरीराला झालेला रोग, आजार, दुखणे. २. रक्तपिती; महारोग. ३. (व्यापक) संकट; आपत्ती. ४. पीडा; त्रास; लचांड. ५. अर्वाच्य, त्रासदायक पोर, मूल. [सं.]

व्याधित वि.रोगी; आजारी. [सं.]

व्याधिष्ट-ष्ठ वि. रक्तपिती, क्षय, शूल इ. मोठा आजार जडलेला; व्याधिग्रस्त. [सं.]

व्यान पु.पंचप्राणवायूंपैकी एक. हा सर्व शरीर व्यापून असतो. [सं.]

व्याप पु.१. सतत वास, लक्ष, व्यग्र असणे; एकसारखे कामात निमग्न असणे. २. प्रापंचिक उद्योग व त्रास; आयुष्यातील हालअपेष्टा, कष्ट. ३. पसारा; विस्तार; मोठा व्यवहार.४. उपद्व्याप. [सं.]

व्यापक वि. १. व्यापणारा; आच्छादणारा; सर्व विस्तार आपल्यात घेणारा. २. पूर्णपणे भेदणारा व आक्रमणारा. ३. अंतर्भाव, समावेश करणारा; सर्व पोटात घेणारा. ४. पसरणारा; विस्तार पावणारा. ५. मोठ्या, उदार विचारांचा (मनुष्य). [सं.]

व्यापणे उक्रि. आच्छादणे; समाविष्ट करणे; पोटात घेणे.

अक्रि. १. पसरणे; व्यापृत होणे. २. भिनणे; फैलावणे (विष इ.).

व्यापदणे क्रि. मारणे; नाश करणे. [सं. व्यापादन]

व्यापन न. १. आक्रमण; प्रसरण. २. समावेशन; व्यापणे. [सं.]

व्यापार पु.१. काम; कर्म; कृत्य : 'कां निमिषोन्मेषांचे व्यापार।'- एभा

२.४३३. २. क्रिया; व्यवहार; कार्य; उद्योग. ३. हालचाल; चलनवलन; चळवळ.४. धंदा; व्यवसाय; देवघेव; व्यवहार. [सं.]

व्यापारक पु. (शाप.) योगवाही साधन; (इं.) कॅटॅलिटिक एजंट.

व्यापारचिन्ह न. धंद्याचे विशिष्ट नाव, खूण, निशाणी इत्यादी. विशिष्ट उत्पादकाचा माल इतरांच्या मालापेक्षा वेगळा दाखवण्यासाठी वापरलेले चिन्ह.

व्यापारणे उक्रि. कामाला लावणे; वापरणे; ज्याच्या-त्याच्या विशिष्ट, योग्य कारणाला लावणे.

अक्रि. क्रिया करणे : 'निष्कर्म्युही व्यापारे। निरंतर।'- ज्ञा ३.६२

व्यापारी पु. १. व्यापार, धंदा करणारा; दुकानदार; देवघेव करणारा. २. उपयोग करणारा; चालना देणारा. ३. कर्मकर्ता; क्रियावान.

वि. व्यापार - वाणिज्य यासंबंधी; उदीमधंद्याचे .

व्यापी वि. व्यापणारा; पसरणारा; समावेश करणारा. [सं.]

व्यापृत वि. १. उद्योगात, उपयोगात असलेला; योग्य मार्गी लावलेला. २. गुंतलेला; मग्न.

व्याप्त, व्यापित वि.१. व्यापलेला; आच्छादलेला. २. जिरलेला; मुरलेला. ३. परिपूर्ण; भरलेले. ४. लब्ध; प्राप्त. [सं.]

व्याप्ति-प्ती स्त्री. १. आक्रमण; सर्वत्र विद्यमान असणे. २. विश्वव्यापकता; शिवादी देवतेचे एक अभिधान. ३. विस्तार; पसारा; व्याप. ४. प्राप्ती; मिळकत. ५. (शाप.) वर्गीकरण; विभागणी. ६. (शाप.) स्थान; अस्तित्वाचे, मिळण्याचे ठिकाण. ७. (तर्कशास्त्र) निकट व अविभाज्य साहचर्य; निश्चित अनुमानकारण.

व्याप्य वि.१. व्यापण्याचे किंवा व्यापलेले; आक्रमित. २. समाविष्ट, अंतर्भूत झालेले. ३. (तर्क.) अनुमानविषय असलेले. [सं.]

व्याप्यकोटि-टी स्त्री. अंतर्भूत वर्ग; गौण विषय; पोटविषय. [सं.]

व्याप्यवृत्ति-त्ती स्त्री. (तर्क.) निरंतर साहचर्य; व्यापन.

वि. नेहमी बरोबर, चिकटून असणारे. अनुषक्त असणारे.

व्याम पु. सहा फूट (एक पुरुष) लांबीचे माप; वाव. [सं.]

व्यामिश्र वि. १. संदिग्ध; दुटप्पी. २. (शाप.) संकीर्ण; मिश्र - सेंपू १.३. [सं.]

व्यामोह पु.१. भ्रम; मोह. २. विस्मरण; स्मृतिनाश. [सं.]

व्यायत स्त्री. करार; तडजोड : 'व्यायेत केली आणि थोडे रुपये करार केले.'- पेद २०.९२ [सं. वि + आयत]

व्यायाम पु. १. दंड काढणे, जोडी फिरवणे इ. शरीराला मेहनत देणारी क्रिया, खेळ. २. कसरत; मेहनत. ३. (सामा.) शरीराला चलनवलन होईल अशा प्रकारचा उद्योग. ४. वाव. पहा : **व्याम** [सं.]

व्याल पु. १. हत्ती. २. साप; सर्प. [सं.]

व्यालनकुलन्याय पु. (साप आणि मुंगूस एकमेकांचे शत्रू आहेत. यावरून) हाडवैराचा संबंध.

व्याली स्त्री. १. नुकतीच बाळंत झालेली स्त्री. २. विणारी, मूल प्रसवणारी स्त्री. ३. जन्मदात्री आई.

व्यावर्तक वि. १. वगळणारा; दूर करणारा. २. निरनिराळा. [सं.]

व्यावर्तित(अंगुली) स्त्री. (नृत्य.) एका हाताने दुसऱ्या हाताच्या कनिष्ठिकेपासून आरंभ करून त्या हाताच्या आतल्या बाजूने बाहेरील बाजूस वेढा घालणे.

व्यावर्त्य वि. वगळणारा; वेगळे करण्यास शक्य, योग्य, जरूर. [सं.]

व्यावहारिक वि. १. व्यवहारासंबंधी (भाषा, लिपी इ.). २. रूढ; सामान्य; नेहमीचे. ३. व्यवहारोपयोगी; व्यवहारयोग्य. ४. धंद्याविषयी. ५. प्रत्यक्षात करता येण्याजोगे (केवळ तात्त्विक नसणारे).

व्यावहारिक दिवस (ज्यो.) मध्यम सौरदिवस. हा रात्री १२ पासून दुसऱ्या रात्री १२ पर्यंत धरतात.

व्यावहारिक नाव, नाम १. प्रचारातील, परिचयाचे नाव. २. नक्षत्रनामाखेरीज ठेवलेले मुलाचे-मुलीचे नाव.

व्यावहारिक वर्ष कायद्याप्रमाणे ठरलेले, सरकारी वर्ष (३६५ दिवसांचे).

व्यावृत्त वि.१. अलग; केलेला. २. बाहेर टाकलेला; वगळलेला. [सं.]

व्यावृत्ति-त्ती स्त्री. १. वेगळेपणा; उच्चाटन; वगळणूक. २. निराळेपणा; भिन्नपणा. ३. व्यतिरेक; नाहीपणा. ४. त्याग; खंडन. ५. निरास. ६.(कायदा.) अपवाद. [सं.]

व्यावृत्ति-त्ती स्त्री. १. मनाचा गोंधळ; गडबड; अस्वस्थता. २. संकट; आपत्ती. ३. त्रास; दगदग; लचांड. ४. अडचण; किंतु; आक्षेप [सं.]

व्याश्लेषण न. मूत्रपिंड निकामी झाल्यास कृत्रिमपणे रक्त शुद्ध करण्याचे तंत्र; (इं.) डायलिसिस.

व्यास पु. १. (भूमिति) वर्तुळाच्या परिघाच्या एका बिंदूपासून निघून मध्यबिंदूतून समारेच्या बिंदूपर्यंत जाणारी सरळ रेषा; ही त्रिज्येच्या दुप्पट असते. २. विस्तार. [सं.]

व्यास पु.१. एक ऋषी. महाभारत व पुराणे यांचा कर्ता. २. ज्याने वेदांच्या संहिता केल्या तो ऋषी; कृष्णद्वैपायन. ३. पुराणिक; प्रवचनकार. [सं.]

व्यासज्यवृत्ति वि. १. एकापेक्षा अधिक विषयाशी संबद्ध, विषयात अंतर्भूत (गुणधर्म, अनुबंध इ.) २. (ल.) दुटप्पी; तडजोड करण्याच्या वृत्तीचा, स्वभावाचा. [सं.]

व्यासपीठ न. १. जेथे बसून पुराणिक पुराण सांगतो ते पुराणिकाचे आसन. २. ज्यावर पोथी, पुस्तक वाचण्यासाठी ठेवतात ती घडवंची. ३. उच्चासन.

व्यासपूजा स्त्री. १. पुराण सांगून झाल्यावर पुराणिकाची केली जाणारी पूजा. २. नेहमीच्या पुराणिकाची कार्तिक पौर्णिमेला केली जाणारी पूजा. ३. आषाढी पौर्णिमेला गुरू, संन्यासी यांची केली जाणारी पूजा.

व्यासपौर्णिमा स्त्री. आषाढी पौर्णिमा.

व्यासंग पु. १. एकसारखा परिश्रम, उद्योग (विद्या, कला इ. विषयी). २. काळजीपूर्वक अभ्यास. ३. नाद. [सं.]

व्यासंगी वि. व्यासंग, नाद, अतिशय ध्यास असलेला; उद्योगी; (विशिष्ट विषयात) लक्ष घालणारा. [सं.]

व्याहत वि. १. अडवलेला; प्रतिरोध झालेला. २. परावृत्त; प्रतिहत. ३. आघात केला गेलेला. [सं. वि + आहत]

व्याहार पु. भाषण : 'व्याहार व व्यवहार.'- पकोघे (टीका कोल्हटकर ६१). [सं.]

व्याहाळ, व्याहाळी पहा : **व्यहाळ, व्यहाळी**

व्याही पु. स्वत:च्या मुलाचा किंवा मुलीचा सासरा. (मुला-मुलीचे वडील परस्पर-व्याही असतात; परस्परांच्या विहिर्णीचेही व्याही होतात.) [सं. वैवाहिक; प्रा. वेवाहिअ; गु. वेवइ; बं. वेहाइ]

व्याहृती स्त्री. गूढ स्वर; मंत्र. भू:, भुव:, स्व:, मह:, जन:, तप:, सत्यम् या सात व्याहृती आहेत. वेदमंत्राला आरंभ करण्यापूर्वी ओंकारपूर्वक यांचा उच्चार करण्यात येतो; घोष. [सं. वि+आ+हृ]

व्याळी स्त्री. रात्रीचे भोजन. [देप्रा. विआलिल = सायंकाळचे भोजन; हिं.व्यालु; प्रा. विआल= संध्याकाळ; सं. विकाल]

व्याक्षेप पु. १. विघ्न; अडथळा; आडकाठी. २. खोळंबा. ३. मनातली अढी. ४. अस्वास्थ्य. [सं. वि + आक्षेप]

व्याक्षोभ पु. क्षोभ; अस्वास्थ्य; खळबळ (मनोविकारांमुळे). [सं. वि + आ + क्षोभ]

व्युत्क्रम,व्युत्क्रांत पु.१. उलट, विरुद्ध प्रकार; विपरीत, प्रतिगामी व्यवस्था. २.गोंधळ; अव्यवस्था.३. (गणित.) उलट मांडणी. उदा. १/५ चा व्युत्क्रम ५.
वि. १. उलट; विरुद्ध; व्यस्त; विपरीत. २. अव्यवस्थित.

व्युत्थान न. उत्थान; उठणे; समाधि-अवस्थेतून बाहेर येणे. [सं.]

व्युत्पत्ति-त्ती स्त्री. १. नैपुण्य; प्रावीण्य (विशेषत: शास्त्रात); शास्त्रवाङ्मयाशी परिचय, ज्ञान : 'अश्वविद्येची व्युत्पत्ती । करी तेथें ।'- कथा १.१०.२२. २. (शब्दाचे विशिष्ट जागी) अर्थज्ञान; विशिष्ट पदार्थाला अनुगुण असणारी अर्थकल्पना. ३. शब्दाची घटना, उगम; निरुक्ती. ४. विद्वत्ता. ५. ज्ञान. ६. उत्पत्ती; स्वरूप. ७. हातोटी; युक्ती : 'स्वधर्म घडूं भगवद्भक्ती । ऐसी अति गुह्य आहे व्युत्पत्ति ।' - एभा १८.३६७. ८. परिस्फुटता; व्याख्यान; स्पष्ट करून सांगणे : 'इतर स्तोत्रीं ब्रह्म व्युत्पत्ती ।' - एभा ८.१०१. ९. ज्ञानाचा गर्व; अभिमान : 'एथ व्युत्पत्ति आघवी विसरिजे । जैं जगा धाकुटे होइजे ।'- ज्ञा ९.३७८. [सं.]

व्युत्पन्न वि. १. शास्त्र आणि वाङ्मय यांत प्रवीण; विद्वान. २. साधित, सामासिक (शब्द). ३. (पासून) निघालेला; उत्पन्न झालेला. [सं.]

व्युत्पादक वि. ज्याच्या योगाने व्युत्पत्ती समजते, दाखवली जाते असा (ग्रंथ, भाषण इ.).

व्यूह पु. १. सैन्याची रचना. याचे दंड, भोग, मंडल, चक्र इ. अनेक प्रकार आहेत. २. शत्रूच्या पराजयासाठी केलेली युक्ती, मसलत. ३. कट; कारस्थान. ४. मूर्ती; शरीर : 'पूजिला जी श्रीपती । चतुर्मूर्ती व्यूहरूपें ।' - एभा ६.११६. ५. (योग.) शरीराची किंवा इंद्रियांची विशिष्ट रचना. [सं.]

व्योम न. आकाश. [सं.]

व्रज पु. १. गवळीवाडा; गोकुळ. २. समुदाय; जमाव. [सं.]

व्रजबंबू वि.गलेलठ्ठ. (व.)

व्रजांगना स्त्री. गोपी; गवळण. [सं.]

व्रण पु.१. क्षत; छिद्र; एक रोग. २.जखम; दुखापत; भेग. [सं.]

व्रणित, व्रणी वि. व्रणविशिष्ट; क्षत पडलेला; जखमी.

व्रत न.१. स्वत:ला लावून घेतलेला एखादा धार्मिक नियम, नेम; देहदंडाचा एक मार्ग. २.असा नेम पाळण्याची केलेली प्रतिज्ञा, पण. ३. ब्रीद; बाणा. [सं.]

व्रतबंध पु. मुंज; यज्ञोपवीत धारण करणे. हे एक प्रकारचे व्रत व संस्कार आहे. [सं.]

व्रतभिक्षा स्त्री. व्रतबंधाच्या आनुषंगिक कर्मांपैकी एक; भिक्षा मागणे.

व्रतवैकल्य न.१. व्रताची अपूर्णता; त्यातील न्यूनता, कमीपणा. २. लहानसहान व्रते, नेम इ.

व्रतसंग्रह पु. व्रत घेणे; व्रतस्थ असणे.

व्रतस्थ, व्रती वि. १. व्रत पाळणारा; व्रताप्रमाणे काही नेम करणारा. २. स्त्रीसंग न करणारा; ब्रह्मचर्य पाळणारा.

व्रात पु. समूह; जमाव. [सं.]

व्रात्य पु.१. योग्य काळी उपनयन न झालेला द्विज. २. ज्ञातीचे धर्म, कर्तव्य न पाळणारा, बहिष्कृत माणूस. ३. अनार्य.
वि. अर्वाच्य; द्वाड.

व्रात्यस्तोम पु. १. व्रात्य, व्रतबंध न केलेल्यांना पुन्हा जातीत घेण्याचा संस्कार, विधी. २. अनार्य लोकांना आर्य समाजात घेण्याचा संस्कार, शुद्धिसमारंभ. [सं.]

व्रीडा स्त्री.लज्जा; संकोच. [सं.]

व्रीहि-ही पु. तांदूळ; भात; साळी. [सं.]

व्हअेल वि. १.झालेला. २. म्हातारा. (खा.)

व्हकला पु. लाकडाचा तुकडा. (बे.)

व्हकाल,व्होकल स्त्री. नवरी. (कु.,गो.) [सं.]

व्हकालपावणी वरात.

व्हगळणे क्रि. चहाडी करणे. (बे.)

व्हग्ग पु. हंगामी गवत कापण्याचा धंदा करणारा. (बे.)

व्हग्गाल न. एकच खोल गेलेली चाकोरी. (बे.)

व्हट्ट न. द्विदल धान्य मळून वेगळे काढल्यानंतर मळणीतून उरणारा पाला. (बे.)

व्हट्टी स्त्री. गाईम्हशीची ओटी, कास. [क. होट्टे = पोट]

व्हट्टीकिच्च न. द्वेष; मत्सर. (बे.) [क.]

व्हड वि. मोठा. (गो.) [सं. वृद्ध; प्रा. वड्ढ]

व्हडले घर १. मोठे, थोरले घर. २.(ल.) यमाचे घर. (गो.)

व्हणजे-से स्त्री. व्हंजी; नवऱ्याची बहीण; वनसे.

व्हनाक स्त्री.भावजय.- लोसाको. (व.)

व्हन्नोरा पु.सोनामुखी. (बे.)

व्हरचे-प क्रि. नेणे.(गो.) [सं.हृ-हर]

व्हरवई स्त्री. उतावळेपणा; घाई. (गो.) [सं.]

व्हलस वि. वाईट. (बे.) [क.]

व्हल्यार पु. महार.

व्हळे पु. भक्कल. (बे.)

व्हंडा पु. चारी बाजूंनी बांध असून मध्ये असणारी जमीन; चोंढा. (बे.)

व्हंडागणे क्रि.फेकणे.(बे.) [सं.]

व्हाइन, व्हैन न. (लहान दगडी) उखळ. (राजा., कुण., बे.)

व्हाईसराय पु. राजप्रतिनिधी. हिंदुस्थानच्या गव्हर्नरला ही पदवी होती. [इं. व्हाईस (=दुय्यम) + रॉय (=राजा)]

व्हान (ग्रा.) पहा : **वहाण**

व्हानवड न.(चर्म.) वहाणेवरचा, ज्यावर पाय ठेवतात तो तुकडा. [सं.]

व्हानी करणे समुद्रात टाकणे.(हेट.)

व्हाय स्त्री. (सोनारी) एक हत्यार. (गो.) पहा : **अवटी**

व्हायोली(लि)न न. एक युरोपीय तंतुवाद्य. याला चार तारी असून त्या म, सा, सा, प या स्वरांत लावतात. याला पडदे नसतात. हे गजाने वाजवतात. [इं.]

व्हावटां, व्हायकाट न. पाण्याचे वाहून जाणारी जमीन. (गो.,कु.)

व्हावस वि. विसंगत; बेफाट; गैर (भाषण इ.). (गो.)

व्हावळा वि.हावरा; अधाशी; वखवखलेला.

व्हावा क्रि. पाहिजे. (लिंगानुरोधाने) व्हावा, व्हावे अशी रूपे होतात: 'तो सकळ जनासी व्हावा।'-१९.३.५.

व्हास पु. (क., जैन) (सूर्य मावळण्यापूर्वी) संध्याकाळचे जेवण.

व्हाळ पु. ओढा; नाला.

व्हाळकट पु. लहान ओढा.

व्हाळी स्त्री. १. लहान ओढा, ओहोळ. २. झरा; ओहळी.

व्हाळी-ळ स्त्री. वेलबोंडीचे झाड.

व्हिक्टोरिया स्त्री. एक प्रकारचे वाहन; बगी. तीन माणसे बसतील अशी एका घोड्याची गाडी. [इं.]

व्हिसा पु. परकीय लोकांना देशात प्रवेश करण्याच्या वेळी पारपत्रावरील मजकूर पडताळून पाहून मारलेला परवानगीदर्शक शिक्का. [इं.]

व्हीर पु. नारळाच्या झावळीची काडी. (गो.)

व्हेल पु. महासागरात आढळणारा प्रचंड आकाराचा, मागे सरळ शेपटीसारखी रचना असणारा व हवा घेण्यासाठी डोक्यात भोक असणारा मासा. [इं.]

व्हेंटुरीमीटर पु. प्रवाहाचा वेग मोजण्यासाठी वापरले जाणारे उपकरण.[इं.]

व्होल्ट पु. एक ओहम विरोध असलेल्या मंडळातून एक ॲम्पिअर प्रवाह पाठवण्यासाठी लागणारे विद्युतदाबाचे एकक. [इं.]

व्होवळीक स्त्री. लग्नाचे आमंत्रण. (कु.)

व्होळसा पु. पाण्याचा मोठा लोटा. (गो.)

व्हॉलीबॉल पु. सहा-सहाच्या दोन गटांमध्ये लावलेल्या जाळ्यावरून मोठा चेंडू हाताने मारून खेळण्याचा खेळ. [इं.]

■■■



श मराठी वर्णमालेतील पंचेचाळिसावा वर्ण व तिसावे व्यंजन.

श शंभर. (तंजा.)

शउर, शऊर पु. १. विवेक; तारतम्य. २. प्रज्ञा; चातुर्य. [अर. शुऊर]

शक–क्क पु. १. शंका; संशय; संदेह. २. भीती; कुशंका; कुतर्क. [अर. शक्क]

शक पु. १. एक कालगणना. २. या गणनेचा संस्थापक राजा कोण व कुठे होऊन गेला याबाबत विद्वानांत मतभेद आहेत. तथापि अनेक संशोधकांच्या मते तो कुशाणवंशी कनिष्क असावा. ३. इसवी सनाच्या पहिल्या शतकात शालिवान (किंवा सातवाहन) नामक राजाने सुरू केलेल्या (व सध्या हिंदूधर्मीयांत प्रचलित असलेल्या) कालगणनेस शालिवाहन म्हणण्याची परंपरा आहे. ४. एक लोकराष्ट्र; शाक. ५. राज्य; राजाची कारकीर्द. ६. अधिकार; आधिपत्य; अधिकाराचा हुकूम; आज्ञा. ७. श्रेष्ठपणा; वर्चस्व; वरचढपणा. ८. हुकमत; दरारा. ९. शकणे (सामर्थ्य असणे); शक्ती. १०. एका जातीचे परकीय लोक; सिथियन. [सं.]

शकअंदेशा पु. संशय; भय : 'कोणे विशीं शक-अंदेशा न धरणे.'- मइसा १५.६४.

शककर्ता पु. १. वर्षगणना ज्याच्या नावे सुरू होते असा मनुष्य. २. धर्म, पंथ, संप्रदाय इ. चा संस्थापक.

शकट पु. १. गाडा; गाडी. २. रोहिणी नक्षत्रातील पाच ताऱ्यांनी झालेली शकटाची आकृती. ३. (ल.) खोडा; लोढणे; अडथळा करणारा मनुष्य, काम. [सं.]

शकटभेद पु.१.मसलत; विचार; कारस्थान. २.लांड्यालबाड्या; युक्त्या. ३. रोहिणी या शकटाकृती नक्षत्रातून एखादा ग्रह जाणे. ४. शकटाकृती सैन्य रचनेतून, व्यूहातून भेद करून जाणे. ५. (यावरून ल.) फूट पाडणे. [सं.]

शकटास्य (करण) न. (नृत्य.) खाली बसल्यासारखे करून तलसंचर पाय खूप पुढे पसरणे व वक्षस्थळही पुढे करणे. [सं.]

शकटास्य (भौमीचारी) (नृत्य.) नुसत्या चवड्यावर उभा ठेवलेला पाय शक्य तितका पुढे सरकवणे म्हणजे कमरेच्या वरील शरीराचा भाग मागच्या बाजूस खाली वाकेल व छाती वर येईल अशा प्रकारची स्थिती.

शकड न. साकडे; संकट. पहा : **शकट** ३

शकणे अक्रि. समर्थ असणे, होणे; काही एक करण्याविषयी कोणा एकामध्ये शक्ती असणे. [सं.शक्-शक्य]

शकदील वि. साशंकचित्त : 'रयत शकदील होऊन तजावजा खाली झाली आहे.'- ब्रच २७.

शकल न. तुकडा; फाक; खंड . [सं.]

शकल पहा : **शिकल**

शकशूभ पु. शंका; संशय : 'शकशूभ दिलांत न आणितां करार मोजीब खातरखा सजा करावी.'- पया ४६६. [अर. शक+शुब्ह]

शक(ख)स पु. मनुष्य : 'एक मातबर शकस रवाना करितों.'- ऐलेसं ७.३५६९. [अर. शख्स्]

शकार पु. १. राजशालक; राजाच्या रखेलीचा भाऊ.- मृ. २. (ल.) मूर्ख, आढ्यताखोर माणूस.

शकावली स्त्री. कालक्रमानुसार घटनांची नोंदणी; सनावली. [सं.]

शकी वि. दुर्दैवी; विपन्न : 'लढाई होऊन बाराभाई यांची फौज गारत होऊन पांडुरंग शकी.'- पया ३८५. [अर. शक]

शकुन पु. न. १. शुभाशुभ चिन्ह; भविष्यसूचक चिन्ह किंवा वस्तू; (शब्द, दर्शन इ. रूप) लक्षण. २. ज्या लक्षणचिन्हावरून - गोष्टीवरून ज्योतिषी भविष्यकथन करतो ती. ३. कौल; देवाने दिलेले उत्तर. ४. अनुकूल गोष्टी होण्याबद्दल केलेली प्रार्थना, स्तोत्र, मंत्र. ५. एक पक्षी. [सं.]

शकुन पु. माशाच्या आकाराचे पिठाचे केलेले चित्र. याला काकडीच्या बिया टोचतात : 'धूपारतीनंतर कुंभारानें एका ताटांत शकुन व दिवा घेऊन यावयाचें.'- आडिवऱ्याची महाकाली. [सं.]

शकुनउंडा पु. पुरणाचा वडा.

शकुनगाठ–ग्रंथी स्त्री. १. एखादी पुढे होणारी किंवा देशांतरी झालेल्या गोष्टीची (तिच्या विषयीची) शकुनाची आठवण राहण्यासाठी पदरास बांधलेली खूणगाठ; शकुनाला मान्यता देणे. (क्रि. बांधणे) २. शुभदायक, हितकारक घटना, बनाव, प्रसंग; मंगलकारक, शुभचिन्ह, लक्षण. ३. लग्नात वधूवरांच्या पदरास वराच्या मेहुणीने बांधलेली शुभगाठ. (वा.) **०बांधणे, घालणे** – १. मनावर अगदी पूर्ण बिंबणे; पक्के ध्यानात ठेवणे. २. खात्री असणे; चांगला, बरोबर अजमास करणे.

शकुनपोते पु. शकुनाबाबतचा एक सरकारी कर.

शकुनलाडू पु. प्रयाणकाली शुभदायक म्हणून पदरात बांधला जाणारा लाडू.

शकुनवंती वि. भविष्य सांगणारी.
स्त्री. भविष्यग्रंथ.

शकुनिचतुष्टय न. १. दुर्योधन, दुःशासन, शकुनी व कर्ण हे चौघे. २. (ल.) दुष्ट इसमांची टोळी, कंपू; चांडाळचौकडी.

शकुनी पु. १. गिधाड. २. गांधार; दुर्योधनाचा मामा. ३. (ल.) कष्टी; कारस्थानी; बदसल्ला देणारा आप्त मनुष्य. ४. (ज्यो.) बवादी करणातील आठवे करण.

शकुनी वि. समर्थ; शक्त : 'साहे महापराधहि, दंड खळाला करावया शकुनी।'- मोसभा ४.५८. [सं. शक्-शन्कु]

शकुंत पु. १. एक पक्षी; चाष. २. सामान्यत: पक्षी. [सं.]

शकुंतल न. घोड्याच्या कानाचे मूळ.

शकून पु. १. शब्द; भाषण; बोलणे; उच्चार. २. सल्लामसलत. ३. हुकमत. ४. भविष्य. (वा.) **शकुनात असणे, चालणे, वागणे**– आज्ञेप्रमाणे वागणे. **शकुनात घेणे**– एखाद्याशी संबंध ठेवणे, बोलणे, असणे, बसणे. (निषेधार्थी वारा न घेणे यासारखा प्रयोग होतो.)

शकृत न. घाण; मैला; विष्ठा. [सं.]

शक्कल स्त्री. १. युक्ती; कल्पना; तोड; उपाय; योजना. २. हेतू; मुद्दा;

मसलत; विचार; पर्याय.
न. स्त्री. स्थिती; प्रकार; स्वरूप (एखाद्या कामाचे, वस्तूचे) : 'इकडून ही हे शक्कल जलद नमूदांत यावी म्हणोन पत्रें जातात.'– पया ४७७. [अर. शक्ल्]

शक्त स्त्री. सामर्थ्य; बल; पराक्रम; जोर; ताकद. पहा : **शक्ति–क्ती**

वि. १. समर्थ; कार्यक्षम; योग्य; लायक; तरबेज. २. पराक्रमी; प्रबळ; शक्तिमान. ३. (व्या.) सूचक; दर्शक; विशेष अर्थदर्शक (शब्द, वाक्प्रचार); संज्ञीक. [सं.शक् = योग्य, समर्थ]

शक्ति–क्ती स्त्री. १. सामर्थ्य; योग्यता; लायकी; पराक्रम; प्राण. २. बळ; ताकद; प्रभाव. ३. अर्थकक्षा; मर्यादा; सीमा; व्याप्ती (शब्द वगैरेची). ४. स्त्री देवता; ईश्वराची स्त्रीरूप सामर्थ्यप्रतिमा (पार्वती, लक्ष्मी इ.) : 'गणेश शारदा नाना शक्ती।'– दास ४.६.१०. ४. माया; परमेश्वरशक्ती. ५. प्रेरणा. ६. एक आयुधविशेष; अस्त्र. उदा. वासवशक्ती. ७. कुंडलिनी : 'तैसी वेढियातें सोडिती। कवितकें आंग मोडिती। कंदावरी शक्ति। उठली दिसे।'– ज्ञा ६.२२७. ८. स्त्री व पुरुष मिळून होणाऱ्या मिथुनातील स्त्री. ९. शिवलिंगाला प्रतिरूप म्हणून असलेली योनी; प्रकृती; तंत्रमताची देवता. १०. अमुक शब्द उच्चारला असता अमुक अर्थाचाच बोध व्हावा असा शब्दाच्या ठिकाणी असलेला संकेत. ११. भाला. १२. स्थित्यंतर, चलनवलन घडवून आणणारी क्षमता. १२.राजाच्या प्रभु, मंत्र, उत्साह या तीन शक्ती. १३. घटना, रचना संबंधातील त्रिगुणांचे सामर्थ्य. [सं.]

शक्तिग्रह पु. १. शब्दाचे विशेष अर्थी ग्रहण; अर्थज्ञान. २. शब्द, लक्षण इ. वरून बोध, मत; एखाद्याच्या संबंधाने झालेला ग्रह. ३. अस्तित्वात असलेल्या वस्तूंचे अस्तित्वरूपी ज्ञान, ग्रहण, बोध; वास्तविक ज्ञान; यथार्थ ज्ञान. [सं.]

शक्तिग्राहक वि. शब्दाच्या अर्थाचा निर्णय करणारा; निर्णायक. उदा. व्याकरण, कोश, रूढी, पद्धती. [सं.]

शक्तिचक्र न. मायारूप विश्व; मायाचक्र.

शक्तिचालन मुद्रा अपानवायू रोखून मूलाधार चक्रातील कुंडलिनी शक्ती जागृत करण्याची क्रिया.

शक्तिदेवता स्त्री. सामर्थ्य, पराक्रम, प्राण यांची अधिष्ठात्री देवता.

शक्तिनित्यत्व न. (शाप.) शक्ती केव्हाही नष्ट होत नाही, तिचे फक्त रूपांतर होते हा सिद्धान्त. [सं.]

शक्तिपंथ–मार्ग पु. ज्यात देवतोद्देशाने मद्यप्राशनादी करावे असे सांगितले आहे तो तंत्रोक्त मार्ग. पहा : **वाममार्ग** [सं.]

शक्तिपात पु. १. मंत्राचा उपयोग करण्याचे गुरूने शिष्याला दिलेले सामर्थ्य. २. शक्तिक्षय; दुर्बलता; दुबळेपणा. ३. सद्गुरूकडून आपल्या ध्यानसंपन्न शिष्याकडे विशेषत: स्पर्शाच्या माध्यमातून होणारे आत्मशक्तीचे संक्रमण.

शक्तिमान–मंत–वंत वि. १. सामर्थ्यवान; कार्यक्षम; लायक; योग्य. २. बलवान; जोरदार; प्रबळ. [सं.]

शक्तिमापक न. (शाप.) यंत्राचे सामर्थ्य, गती मोजण्याचे यंत्र. (इं.) डायनामोमीटर.

शक्तिवर्धक वि. १. ताकद देणारे. २. गेलेली शक्ती परत मिळवून देणारे (औषध).

शक्य वि. १. होण्याजोगे; संभवनीय; सामर्थ्याच्या आटोक्यातील, साध्य, संभाव्य; करता येण्याजोगे. २. ऐकण्याजोगे; अर्थ; मतलब, उद्देश; शब्दाने ज्याचा बोध होतो असा.

शक्यरूप, शक्यार्थ पु. १. संभाव्य अर्थ; ग्राह्य होण्यासारखे वाक्य. २. (व्या.) शक्यता दाखवणारे क्रियापदाचे रूप; विधिलिङ्.

शक्स, शखस पु. मनुष्य; माणूस; व्यक्ती. [अर. शख्स्]

शखोट वि. पहा : **शाखोट**

शगूफ पु. फूल; कळी. [फा.]

शटर न. १. प्रकाश आत येऊ नये म्हणून खिडक्यांवर लावण्यात आलेली पट्ट्यापट्ट्यांची झडप. २. कॅमेऱ्यातील 'लेन्स'वर जरूर तेवढा प्रकाश घेण्यासाठी उघडझाप करता येणारे आच्छादन. ३. मोठे दरवाजे उघडबंद करण्यासाठी लावले जाणारे व गुंडाळता येणारे दार, ढापणी. [इं.]

शठ वि. १. लबाड; कपटी; लुच्चा; ठक. २. तिरस्कारार्ह; अमंगल; अघोरी; कुत्सित; कंजूस; कदर्यू. ४. दु:शील; दु:स्वभावी. [सं.]

शठता, शाठ्य स्त्री. १. धूर्तता. २. कापट्य. [सं.]

शठाई स्त्री. १. लबाडी; कपटीपणा. २. कवडीचुंबकपणा; कृपणता. ३. दुष्टपणा; खटपणा. पहा : **शठ**

शडावचे क्रि. (वृक्षाची) आतली साल काढणे. (गो.) [सं. छाल]

शड्डू पु. डावा हात कोपरापासून वर करून उजव्या हाताने डाव्या हातावर काढलेला आवाज; दंड थोपटणे. [ध्व.] ०**ठोकणे** – आव्हान देणे.

शण पु. ताग; सण; वाख; अंबाडी. [सं.]

शणपो पु. भात मोजण्याची मोठी ओंजळ; पसा. (को.)

शणोपण न. शेणबीपण; लेखकाचे काम.

शत वि. शंभर. [सं. शतम्]

शतक न. शेकडा; शंभराचा समुदाय. [सं.]

श(शा)तकुंभ न. सोने : 'जैसा दीप आणि ज्योति। की शातकुंभ आणि कांति।' – ह २०.१०३.

शतकूट वि. शेकडो तुकडे झालेला; शतधा भिन्न.

शतकृत्य न. १. शंभर अश्वमेध यज्ञ करण्यासारखे अचाट कृत्य; शंभर यज्ञांचे कार्य. २.पहा : **शतक्रतु–तू** ३. ३. पुण्य; चांगली गोष्ट.

शतकृत्य न. विशिष्ट प्रकारची चटणी, रायते

शतक्रतु–तू पु. १. इंद्र. २. शंभर अश्वमेध यज्ञ केले असता यजमानाला इंद्रपद मिळते. ३. (ल.) मोठा विजय, पराक्रम; मोठे शौर्य; अचाट कृत्य.

शतगुण वि. शंभरपट : 'शतगुणें स्नेहो वाढला तिसी।'– एभा ७.६०१. [सं.]

शतघृत न. शंभर वेळा धुऊन स्वच्छ केलेले तूप (औषधासाठी). [सं.]

शतघ्नी स्त्री. १. (शंभराची हत्या करणारा) लोखंडी भाले, खिळे बसविलेला एक ठोकळा; कारले; शेकडो लोक मारण्याचे एक जुने आयुध. २. एक प्रकारची तोफ.

शतच्छंदी वि. (शंभर छंद असणारा) फंदी; बेढंगी; वाईट चालीचा.

शतत स्त्री. धास्ती. [फा.]

शततंत्री वीणा एक वाद्य. पहा : **सारमंडळ**

शततारका स्त्री. १. सत्तावीस नक्षत्रांपैकी चोविसावे नक्षत्र. २. (ल. थट्टेने) एखाद्यास झालेल्या अनेक मुली.

शतधा क्रिवि. १. शंभरदा; शंभरवेळा. २. शेकडो प्रकारांनी. [सं.]

शतधौत वि. शंभरवेळा धुतलेले (तूप इ.). [सं.]

शतपत्र न. १. कमळाची एक जात. २. सेवतीचे फूल.
वि. शंभर पाकळ्या, पाने असलेले (कमळ). [सं.]

शतपद–दी स्त्री. घोण; गोम.

शतपावली स्त्री. अन्नपचन लवकर, सुलभपणे व्हावे म्हणून जेवणानंतर थोडेसे चालणे.

शतफळ न. बैलाचे आतडे. (गो.)

शतभाग वि. (शाप.) ज्याचे शंभर भाग पाडले आहेत असे; (इं.) सेंटिग्रेड.

शतभीष्म पु. (शंभर भीष्म, भीष्मासारखे अनेक, एकापेक्षा एक बलवान इ.) (ल.) १. (निंदार्थी) सामर्थ्याची बढाई मारणारा पुरुष. २. वृद्ध, ज्ञानी पुरुष.

शतमर्दी स्त्री. पहा : **शर्तमर्दी**

शतमान वि.१. शंभराचे माप, मोज; शंभर संख्या भरणारे. २. (सांकेतिक) शंभर रुपये दक्षिणा.

शतमारी वि. १. शंभर रोगांवर रामबाण उपाय करणारा निष्णात (वैद्य). २. (ल.) शंभर रोग्यांना मारक किंवा त्यांची हत्या करणारा (वैद्य).

शतमी स्त्री. जाहिरात; जाहीरनामा; प्रसिद्धीपत्रक; पहा : **सतमी** २

शतमूर्ख वि. अत्यंत मूर्ख; महामूर्ख.

शतरंज, शत्रंज स्त्री. बुद्धिबळे; बुद्धिबळाचा खेळ. [अर. शत्रंज]

शतवर्ष–वार्षिक वि. १. शंभर वर्षे टिकणारे, चालणारे; शंभर वर्षांच्या मुदतीचे. २. शंभर वर्षांतून एकदा येणारे. ३. शंभर वर्षांचा; शतायुषी; शंभर वर्षे जगलेला. ४. शंभर वर्षांसंबंधी. [सं.]

शतवेधी स्त्री. एक पालेभाजी. पहा : **चुका**

शतशास्त्र वि. (शंभर फांद्या, अंगे, विभाग असलेला) विविध प्रकारचा; बहुविध; नानाविध; असंख्य प्रकारांनी युक्त.

शतशः क्रिवि. शेकडो; शेकड्याने; शंभर-शंभर अशा संख्येने मोजले जाणारे. [सं.]

शतसांवत्सरिक वि. शंभर वर्षांनी येणारा.

शतंजीव अ. (शंभर वर्षे जग असा) एक आशीर्वाद.

शताब्दी स्त्री. १. शंभरावे वर्ष. २. शंभर चर्षांचा काळ.

शतावरी स्त्री. एक औषधी वनस्पती. हिला कोकणात 'अस्वली' व देशावर 'दिवसमावळी' म्हणतात. हिचे शतमूली व सहस्रमूली असे दोन भेद आहेत. [सं.शतावली]

शती स्त्री. शेकडा. (समासात) द्विशत, त्रिशत इ. [सं.]

शती वि. शंभराचा मालक.

शत्रु–त्रू पु. १.अरी; दुष्मन; वैरी; रिपू; अपकार करणारा, नाश करणारा माणूस. २. मारक; मोड करणारा पदार्थ. [सं. शत्]

शत्रुकात्रू वि. दुष्ट; नीच; हलकट; पाजी; डंख धरणारा, गुप्त शत्रू; दीर्घद्वेषी; आकसी. [सं. शत्रु द्विरुक्ति]

शत्रुजिणे न. शत्रूकडून जिंकले जाणे.

शत्रुंजय पु. १. हत्ती. २ हिंदुस्थानातील जैनांचे एक पवित्र स्थान.

शनपत वि. श्रावण महिन्यात येणारा शनिवार.

शनवनी पु. घोड्याचा एक रंग. –अश्वप १.२८.

शनि–नी पु. १. सूर्यमालेतील, नवग्रहांतील सातवा ग्रह. २. (ल.) प्रतिस्पर्धी; वैरी; सावकार; तगादेवाला किंवा सारखा पाठीस लागणारा माणूस. ३. (ल.) जुलूम; त्रासदायक गोष्ट; पीडाकारक कृत्य. ४. मंदबुद्धी; अंगात जोर, प्रभाव, उद्योग, हुन्नर नसणारा पोर. ५. नीळ नावाचे रत्न. [सं.] (वा.) **०उदरी येणे–** (जन्मराशीस शनी असणे) मोठा लाभ होणे; दैव फळफळणे; नशीब उदयास येणे. **०दृष्टीस येणे–** बारावा शनी येणे. **०लत्तेस येणे–** जन्मराशीच्या पुढील राशीस येणे.

शनिवार पु. मंदवार; आठवड्यातील सातवा वार.

शनीचा फेरा शनिग्रहाचे अशुभ राशीस येणे; शनीची वारी; साडेसाती; संकटांची उपपत्ती लावताना योजला जाणारा शब्द.

शनिश्चरता स्त्री. मंदपणा; हळूपणा; दिरंगाई; विलंब.

शनै(ने)श्च(श्च)र पु. १. शनिग्रह; शनिदेव. २. (ल.) त्रासदायक माणूस. ३. मंदगती. [सं. शनैस्+चर]

शनैः शनैः क्रिवि. हळूहळू; मंदगतीने; मंदतेने; सुस्तपणे. [सं.]

शपथ–थी–थे स्त्री. १. प्रतिज्ञेवर सांगणे – बोलणे; आण; भाक; वचन. २. दिव्य. [सं. शप्=शपथ घेणे] (वा.) **० वाहायला, शपथेला मोकळा होणे–** एखादे काम मुळीच केले नाही असा दोष ठेवता येऊ नये म्हणून कसे तरी (हलगर्जीपणे वा थोडेफार काम) करणे. **०सोडणे–** वचनातून मोकळे होणे, करणे.

शपथपत्र न. प्रतिज्ञालेख; शपथलेख; क्रियापत्र; शपथपूर्वक लेखी जबानी.

शफ पु. १. (गाय, म्हैस, घोडा इ. पशूंचा) खूर. २. या खुराचा विभाग. [सं.]

शफताळू पु. (प्र.) पहा : **सप्ताळू**

शफबंध पु. घोड्याच्या घोट्यास बांधला जाणारा चामड्याचा पट्टा.

शफर–री पु. स्त्री. माशाची एक पांढरी जात; सहरी. [सं.]

शब स्त्री. रात्र. [फा.]

शबनम स्त्री.दव. [फा.]

शबनम स्त्री. खांद्याला लावावयाची पिशवी.

शबय स्त्री. १. धांगडधिंगा. (कु.) २. शिमग्यात मागावयाचे पोस्त. ३. ते मागण्यासाठी उच्चारला जाणारा शब्द.

शबर पु. एक जात; भिल्ल; कोळी. [सं.]

शबल–ळ वि. १. चित्रविचित्र; निरनिराळ्या प्रकारचे; रंगीबेरंगी. २. गढूळ; मिश्र; प्रदूषित; अमंगळ; अशुद्ध : 'उठता शुद्धासि करी शबल।'– एभा १३.४३२. ३. एकात एक मिसळून गेलेले; गुंतागुंत झालेले. ४. (वेदान्त.) मायोपाधिक; मायिक.
न. मिसळण; संकर; गुंतागुंत. [सं. शबल]

शबल, शंबळ स्त्री. न. शिदोरी; प्रवासातील अन्नसामग्री. [सं. शंबल]

शबिना पु. पहा : **छबिना** [फा. शबीना]

शबिना पु. (चुकीने) तंबूच्या मागील किंवा पुढील पडदा; चांदणी. [फा. शामियान]

शब्द पु. १. आवाज; उच्चार; कोणत्याही प्रकारचा ध्वनी; श्रोत्रेंद्रियाचा विषय. २. एखाद्या वस्तूचा, कल्पनेचा, दर्शक किंवा व्यंजक असा अक्षरसमूह. ३. (व्या.) प्रथमादी विभक्ती ज्यावरून होतात अशी वर्णानुपूर्वी (नाम, सर्वनाम इ.). ४. बोल; वाईटपणा; ठपका. (क्रि. लागणे, येणे, ठेवणे, लावणे, आणणे.) ५. आज्ञा; हुकूम. (क्रि.झेलणे).६. प्रतिज्ञा; वचन; वाचा. ७. वेद : 'त्यासि शब्दपर निष्णातू।'– एभा १०.३४९. ८. शास्त्र : 'शब्दाचिया आसकडी। भेद नदीची दोही थडी। आरडते विरह वेडी। बुद्धिबोध।'– माज्ञा १६.५. ९. पंचमहाभूतांपैकी आकाशाचा गुण. १०. (तत्त्वज्ञान) ज्ञानाचे एक साधन. [सं. शब्द्=नाद करणे] (वा.) **०खाली पडू न देणे**– उत्तरास प्रत्युत्तर देणे; वादविवादात किंवा भांडणात माघार न घेणे. **०टाकणे**– १. मागणी, विनंती करणे; एखादी गोष्ट सांगून बघणे. २. शिफारस करणे. **०फिरविणे**– मत बदलणे; दिलेले आश्वासन न पाळणे.

शब्दकळा स्त्री. भाषाशैली; शब्दशैली.

शब्दकाठिण्य न. (अलंकार.) शब्दाचा कठोरपणा, कर्कशता.

शब्दकुल न. शब्दांची आधारभूत कल्पना एकच असलेले शब्द. उदा. अधीक्षक, निरीक्षक, परीक्षक इ. [सं.]

शब्दकोश–ष पु. १. शब्दसंग्रह; शब्दांचा अर्थासह संग्रह. २. शब्दांचे अर्थ, व्युत्पत्ती, व्याकरण वगैरे सांगणारा ग्रंथ. [सं.]

शब्दगुण पु. शब्दांचे गुण, लक्षण. हे एकूण चोवीस आहेत. (श्लेष, प्रसाद, समता, माधुर्य, सुकुमारता इ.)

शब्दचित्र न. १. शब्दांनी केलेले चित्रासारखे हुबेहूब वर्णन. २. (साहित्य.) चित्रकाव्याचा एक प्रकार; शब्दचमत्कृती. [सं.]

शब्दचोर पु. दुसऱ्याचा लेख चोरून तो स्वत:चा म्हणून दडपून देणारा.

शब्दजाल–ळ न. १. शब्दांचे जाळे; अनंत शब्दांचा नुसता समूह; शब्दावडंबर; शब्दभारूड. २. वायफळ भाषण; बडबड. [सं.]

शब्दत: क्रिवि. शब्दामुळे : 'शब्दत: अर्थत: अगाध खोली।'– एभा २१.३६७.

शब्ददोष पु. १.शब्दातील व्यंग, उणेपणा. हे श्रुतिकटु, च्युतसंस्कृती इ. १३ आहेत. २. दोषारोप; बोल; ठपका; आळ.

शब्दपरीक्षा स्त्री. (वैद्यक.) शब्दाच्या उच्चाराच्या स्पष्टास्पष्टतेवरून किंवा जड–हलकेपणावरून व्याधिनिदान करणे. [सं.]

शब्दपांडित्य न. १. वक्तृत्व; भाषापांडित्य. २. कृती न करता उगीच कोरडे व डौलाचे वाक्पाटव करणे; वृथा बडबड; प्रौढी. [सं.]

शब्दब्रह्म न. वेद : 'हें शब्दब्रह्म अशेष।'– ज्ञा १.३. [सं.]

शब्दभेदी–वेधी वि. १. आवाजाच्या अनुरोधाने बाण मारण्यात पटाईत, तरबेज, निष्णात. २. (ल.) थोडक्या शब्दावरून एखाद्याचे अंतरंग, मतलब, बेत जाणणारा; चांगला तर्कबाज. ३. दशरथ, अर्जुन यांचे विशेषण; अभिधान. ४. केवळ मंत्रोच्चाराद्वारे शत्रूचा नाश करणारा.

शब्दयोगी अव्यय (व्या.) व्याकरणात नाम आणि नामाप्रमाणे योजलेले इतर शब्द यांना जोडून येणारे अव्यय. उदा. वर, खाली, पुढे, मागे इ.

शब्दवाहक यंत्र विजेच्या साहाय्याने दूर अंतरावरून बोलण्याचे यंत्र; (इं.) टेलिफोन.

शब्दविचार पु. १. शब्दसाधन विचार; प्रत्यय प्रकरण;(इं.) इटिमॉलॉजी. २. (व्या.) वाक्यातील निरनिराळ्या शब्दांचा परस्परांशी असणाऱ्या संबंधाचा विचार.

शब्दविणे क्रि. बोलवणे : 'मीचि शब्दातें शब्दविता।'– एभा १३.३४४.

शब्दविता पु. परमात्मा.

शब्दवित्पत्ती स्त्री. शब्दाचे ज्ञान.

शब्दवेध पु. १. वेदातील गूढ स्थळे. २. शब्दांचे कूट, जाळे, अवडंबर. ३. आवाजाला अनुसरून बाण, गोळी वगैरे मारणे.

शब्दवैपरीत्य न. (बोलणाऱ्याच्या हेतूशी) विरुद्ध, विपरीत शब्दयोजना; भलतीच शब्दयोजना; चुकीची पदयोजना. [सं.]

शब्दशक्ति–क्ती स्त्री. १. शब्दाचा जोर; शब्दाचा वास्तविक, अगदी बरोबर असा अर्थ; शब्दांचा यौगिक अर्थ. २. (साहित्य.) अभिधा, लक्षणा, व्यंजना इ. शब्दार्थबोधक वृत्ती. [सं.]

शब्दशासन न. शब्दांचा अर्थ, त्यांची योजना वगैरे संबंधी; व्याकरणशास्त्र, शब्दविचार इ. नियम. [सं.]

शब्दशास्त्र न. १. शब्दविज्ञान; शब्दांचे संपूर्ण विवरण करणारे शास्त्र; व्युत्पत्तिशास्त्र. २. व्याकरणशास्त्र. [सं.]

शब्दशुद्धि–द्धी स्त्री. १. व्याकरणाच्या नियमाप्रमाणे निर्दोष अशी शब्दयोजना; शब्दांची अचूक मांडणी. २. शब्दातील दोष काढून टाकणे; शब्दांची तपासणी; दुरुस्ती. ३. परकीय शब्द न वापरणे; भाषाशुद्धी.

शब्दसाधनिका स्त्री. १. शब्दविचार; शब्दांची बनावट; व्युत्पत्ती. २. शब्दांची फोड; उकल; व्याकरण चालविणे. [सं.]

शब्दसाधित न. शब्दापासून, नामापासून साधलेला शब्द.
वि. (व्या.) नामापासून बनलेले. [सं.]

शब्दसृष्टि–ष्टी स्त्री. १. शब्दांचा संग्रह; शब्दांची रचना. २. (ल.) काव्य; ग्रंथ; प्रबंध : 'आतां वंदूं कवेश्वर। शब्दसृष्टीचें ईश्वर।'– दास १.७.

शब्दस्फुरण न. (शब्दांचे फुरफुरणे, थरथरणे) ज्यात जोडाक्षरे व ट वर्गातील अक्षरे एकसारखी पुष्कळ वेळा येतात अशा कठोर, कर्णकटू प्रबंधाबद्दल म्हणतात.

शब्दानुप्रास पु. (साहित्य.) शब्दाचा अनुप्रास. एक यमकरचना. ज्यात त्याच त्या शब्दाची पुन:पुन्हा आवृत्ती होते असा अलंकार.

शब्दानुशासन पहा : **शब्दशासन**

शब्दालंकार पु. (साहित्य.) शब्दाच्या रूपावरून साधलेला अलंकार; काव्यातील अनुप्रास; यमकादी अलंकार.

शब्दित न. भाषण; आवाज; बोलण्याचा स्वर; ध्वनी.
वि. १. उच्चारलेले; बोललेले; घोषित केलेले. २. शब्दाने युक्त केलेले (वाद्यादी); वाजवलेले; निनादलेले.

शम पु. १. शांतता; शांती; स्थिरता; स्तब्धता. २. (राग आणि विकार या संबंधी) इंद्रियदमन; मनोनिग्रह. ३. आत्यंतिक सुख; मोक्ष; निर्वाण. ४. औदासीन्य; संन्यस्तवृत्ती; निवृत्ती. ५. योगसिद्धी : 'कर्म हेच शमाचे कारण होते.'– गीर ६९६. [सं.]

शमखाल स्त्री. लांब नळीची बंदूक.

शमणे अक्रि. १. शांत होणे; स्थिर, स्तब्ध, निश्चल होणे; संतुष्ट होणे; समाधान पावणे. २. ओसरणे; कमी होणे. ३. मरण पावणे; मरणे. ४. दमणे; थकणे : 'शमले मद्बंधु बहु।'– मोभीष्म १०.१३. [सं. शम्]

शमदमादी न. (वेदान्त.) मोक्षाची इच्छा धरणाऱ्या साधकाच्या चार साधनांपैकी एक साधन; शम, दम, तप, तितिक्षा, श्रद्धा, समाधान यांची पूर्णता.

शमन न. १. शांती; शांतता; स्वस्थता; स्तब्धता. २. (वैद्यक.) उपशम; तीव्रता कमी करणे; थंडावा आणणे. पहा : **समोपचार**. ३. उपशामक; उपशांतक; उपशमन करणारे, दु:खहारक औषध. ४. शांत होणे; स्तब्ध होणे. ५. यम.

शमनाबीर पु. एक क्षुद्र दैवत; मुसलमानी समंध. (वा.) **शमनाबीराची कांडी फिरविणे**– हातचलाखी करणे; लबाडी, कपट, लुच्चेगिरी करणे.

शमनीय वि. शांत होणारे; शांत करण्यासारखे. [सं.]

शमल न. १. विष्ठा; घाण; मळ; मैला; गाळ. २. पाप; अपराध.
वि. पातकी. [सं.]

शमला पु. डोक्यावरील फेट्याचा किंवा कमरबंदाचा सोडलेला सोगा. पहा : **समला** [अर. शमला]

शमस–उल्–उलेमा पु. मुसलमानातील शास्त्री, पंडित, महामहोपाध्याय. [अर. शम्स=सूर्य]

शमा स्त्री. ज्योत. [फा.]

शमादान पहा : **शामदान**

शमित वि. १. शमलेले; शांत झालेले. २. कमी झालेले; दबलेले. ३. संतुष्ट; उपशम पावलेले. [सं.]

शमिना पु. १. तंबूच्या पुढील किंवा मागील भागाचा पडदा; चांदवा. २. शामियाना; डेरा; मोठा तंबू. [फा. शामियाना]

शमी स्त्री. एक काटेरी झाड. (दसऱ्याच्या दिवशी शमीची पूजा करतात.) या झाडाचा पाला. (विशेषत: गणपतीस वाहतात.)

शमी वि. सौम्य; शांत; स्तब्ध; स्थिर; सौम्य स्वभावाचा.

शमीधान्य न. शेंगेत उत्पन्न होणारे तूर, मूग, वाटाणा इ. धान्य.

शम् अव्यय १. कल्याण; सुख. २. समाप्ती; शेवट. [सं.]

शय पु. हात : 'अर्पीन अर्जुना जो दाविल तया न आवरीन शय।'– मोकर्ण २६.१०. [सं.]

शयन न. १. झोप; नीज; निजणे. २. बिछाना; मंचक; चटई; माचा; खाट; पलंग; अंथरूण; शय्या; शेज. ३. आडवे होणे; अंग टाकणे; अंगाखाली घेणे.

शयनयान न. ज्याच्यात झोपून जाण्याला जागा मिळते असा आगगाडीला जोडलेला डबा.

शयनशाला स्त्री. अनेकांना स्वतंत्र बिछाने असलेली खोली; अशा खोल्या असलेल्या वसतिगृहातील जागा.

शयनी एकादशी आषाढ शुद्ध एकादशी. ह्या दिवशी विष्णू झोपी जातात आणि चातुर्मास संपेपर्यंत उठत नाहीत असे मानले जाते. [सं.]

शय्या स्त्री. १. बिछाना; अंथरूण. २. खाट; पलंग. पहा : **शयन**. [सं.]

शय्यादान न. मृताची शय्या ब्राह्मणास देणे; उत्तरक्रियेतील दान. (वा.) **० करणे**– सती जाणे : 'शय्यादान करणे मला आणून द्या शिर।'– पला ४०.१०४.

शर पु. १. बाण; तीर. २. मृग नक्षत्रातील शिवाच्या तीन ताऱ्यांचा आकाशातील बाण. पहा : **लुब्धक** ५
वि. (ज्यो.) पाच ही संख्या (मदनाचे पंच शर यावरून). [सं.]

शर पु. (ज्यो.) १. ताऱ्यांचे क्रांतिवृत्तापासून अंतर; याम्योत्तर अंतर; खगोलीय अक्षांश. २. (गणित) व्युत्क्रमजा.

शर पु. १. (स्थापत्य.) कमानीची चढ, उंची. २. (गणित) कंसाची दोन टोके सांधणाऱ्या त्रिज्येच्या मध्यापासून तिजवर लंब काढून तो त्या कंसाला मिळेतोपर्यंत वाढविला असता, त्याला त्याच कंसाचा शर म्हणतात.

शरकांड पु. न. बाणाची काठी; दांडी; कामटी. [सं.]

शरग पु. पातेरा; पाचोळा; वाळलेली पाने. (तंजा.) [त. शरगु]

शरट–ठ पहा : **सरडा** [सं. शरट]

शरण न. रक्षण; संरक्षण; सांभाळ; आश्रय.
वि. १. संरक्षक; सांभाळ करणारा इसम. २. आश्रय, संरक्षण मागणारा. [सं. शृ]

शरणागती स्त्री. पराभव; हार. [सं.]

शरण्य वि. १. रक्षणीय; रक्षण करण्यास योग्य. २. अनाथ. ३. रक्षण करण्यास समर्थ.
न. आसरा; आश्रयाची जागा. [सं.]

शरत्–द्–द पु. स्त्री. १. सहा ऋतूंपैकी चौथा ऋतू. वैदिक महिने भाद्रपद व आश्विन, पण पुराणाप्रमाणे आश्विन व कार्तिक या महिन्यांतील ऋतू. २. वर्ष. [सं.]

शरत्काल, शरदृतु पु. हिवाळा.

शरधि पु. भाता; बाणांची पिशवी. [सं.]

शरपंजर पु. १. बाणांचा पिंजरा, पलंग. २. (काव्यात अतिशयोक्तीने वर्णन करताना) एखाद्याच्या अंगात पुष्कळ बाण शिरले म्हणजे योजला जाणारा शब्द.[सं.] (वा.) **शरपंजरी पडणे**– ज्यातून बाहेर पडण्यास कोणताच उपाय नाही अशा संकटात सापडणे.

शरपात पु. शरवृत्ताचा क्रांतिवृत्ताशी होणारा पात. [सं.]

शरपुंखा स्त्री. बाणाची पिसे; बाणाचा पिसे लावलेला मागचा भाग.

शरपुंखा–खी स्त्री. उन्हाळी; सर्पविषावर औषधी वनस्पती.

शरफूल न. बाणाचे टोक; अग्र; बाणाचे धातूचे पाते. [सं.]

शरबत न. १. पहा : **सरबत**. २. सुधा. [फा.]

शरबतखोरी स्त्री. शरबतपान; वाङ्निश्चयाचा फलाहार : 'सैफन्मुलूक यांची कन्या साहेब–जादे यास देण्याचा निश्चय होऊन शरबतखोरी जाली.'– मइसा ७.१४८.

शरभ पु. १. हिमालय पर्वताच्या भागातील आठ पायांचा एक काल्पनिक प्राणी. हा सिंहाहून बलिष्ठ असतो असा समज आहे. २. हत्तीचा छावा. ३. टोळ. ४. एक किडा. ५. उंट. [सं.]

शरम स्त्री. लाज; लज्जा. [फा. शर्म]
शरमणे क्रि. लाज, लज्जा वाटणे; लाजणे; वरमणे; ओशाळणे.
श(शि)रमिंदा–धा वि. १. शरमलेला; लाजलेला; खजील; ओशाळलेला. २. उपकाराच्या भाराने किंवा भिऊन दबलेला; गोगलगाय बनलेला. [फा.]
शरसंधान न. बाणाचा नेम; बाणाने नेम धरणे, साधणे, मारणे. [सं.]
शरसुटी स्त्री. बाणांची वृष्टी.
शरह पु. शेरा; विवरण. [अर.]
शरा पु. १. मुसलमानी कायदा; इस्लाम धर्मशास्त्र. २. शास्त्रनिर्णय. [अर. शर्अ]
शरा स्त्री. पगाराचा दर. [हिं. शरह]
शराकत–दार–नामा–कती पु. पहा : **सरकती, सरकत**
शराब पु. स्त्री. पिण्याची दारू; मद्य. [अर. शराब्]
शराबखाना पु. सुरागार; दारू पिण्याचे स्थान. [फा.]
शराबपाणी न. दारूबाजी; अंमल; नशा.
शराबी वि. मद्यपी; दारूबाज. [फा.]
शरायणी गज जमीन मोजण्याचा गज; लांबीचे एक माप.
शरायती स्त्री. काकपद; लिखित मजकुरात मागाहून घातलेला शब्द दाखविण्याकरिता करावयाची अशी खूण. [अर. शराइत]
शरारत स्त्री. १. द्वेष; हेवा; मत्सर. (ना.)२. दंगा; दांडगाई. ३. खट्याळपणा; हूडपणा. [फा.]
शरारती वि. १. हेवेखोर; मत्सरग्रस्त; द्वेषी; मत्सरी. २. खट्याळ; खोडकर; मस्तीखोर. [फा.]
शरारू वि. घातुक : 'प्रकटि खरा रूपा, पी जें गगनाला असें शरारू पापी।'– मोकृष्ण १८.१५. [सं.]
शराव–वी पु. स्त्री. वेळणी; जोगली; ताटली; परळ नावाचे मातीचे भांडे; उथळ भांडे. [सं. शराव]
शरासन पु. धनुष्य. [सं.]
शरांटी स्त्री. बाणाची कामटी; कैची.
शरीक पु. १. वाटेकरी; पातीदार; साथीदार. २. दोस्त : 'तेव्हां जिवानसीं शरीक आहो.'– मइसा ८.१६८. [अर्. शरीक्]
शरीयत पु. १. इस्लाम धर्मशास्त्र.२. मुस्लीम धर्मशास्त्र, कायदा. ३. ईश्वरी मार्ग. ४. राजमार्ग. [फा. शरीअत्]
शरीयतपन्हा पु. इस्लाम धर्माचा पंडित, काजी.
शरीर न. १. देह; काया; वपू. २. (संकेतार्थी) गुह्येंद्रिय. [सं.] (वा.) **०कमावणे–** शरीर सुदृढ, बलिष्ठ करणे. **०वेचणे–** परोपकारार्थ देह झिजवणे.
शरीरपाटव न. शरीराचा निरोगीपणा; सुस्थिती; आरोग्य; सुदृढता. [सं.]
शरीरभोग पु. १. शारीरिक कष्ट; यातना, रोगपीडा इ. (सामा.) दुखणे; दुखापत. २. शारीरिक विलास; करमणूक; ऐषाराम. (क्रि. भोगणे) ३. प्रारब्धप्राप्त देहपीडा. ४. शरीराला होणारे सुखदुःख. [सं.]
शरीरयष्टी स्त्री. शरीर; अंगकाठी; शरीराची ठेवण, घडण. [सं.]
शरीररक्षक पु. अंगरक्षक;(इं.) बॉडीगार्ड.
शरीरसंबंध पु. १. सोयरिकीमुळे जडणारा संबंध; आप्तपणा; सोयरीक; सोयरगत; नाते. २. विवाहसंबंध; लग्न. ३. हातघाई; मारामारी; धक्काबुक्की. ४. संभोग; लगट. (क्रि. येणे)
शरीरी वि. १. देही; देह धारण करणारा; देहधारी (आत्मा). २. शरीरासंबंधी; शरीराचे; शारीरिक.
पु. देहधारी सजीव प्राणी. [सं.]
शर्करा स्त्री. १. साखर. २. वाळू; रेती. ३. मूतखडा (रोग). [सं.]
शर्करिन न. साखरेपेक्षा अतिशय गोड पदार्थ. मधुमेहाचे रोगी साखरेऐवजी हे वापरतात. (इं.) सॅकरीन.
शर्ट पु. एक विशेष प्रकारचा सदरा; खमीस. [इं.]
शर्त–र्त्त–र्थ स्त्री. १. अट; करार; नियम. २. कसोशी; पराकाष्ठा; कमाल; कळस; सीमा. ३. एखाद्या गोष्टीचा बेसुमारपणा; आधिक्य; अतिशयता (आश्चर्य, कौतुक वाटण्याजोगी). ४. पराकाष्ठेची समृद्धी; बाहुल्य. ५. पाणी; तेज; पराक्रम. ६. शिरस्ता; वहिवाट. [अर.] (वा.) **० बांधणे–** विडा उचलणे; पैज, होड लावणे.
शर्तनामा पु. तह; करारनामा. [फा.]
शर्तमर्दी स्त्री. अचाट पराक्रम; महनीय कृत्य, प्रयत्न, साहस इ. बद्दल कौतुकाने योजावयाचा शब्द : 'सेवा शर्त-मर्दीनें केली.'– ऐलेसं ४.१८०८.
शर्ताशर्ती क्रिवि.प्रतिज्ञापूर्वक; निश्चयाने.
शर्धा स्त्री. पाद; अधोवायुनिस्सारण. (क्रि. करणे) [सं.]
शर्फ वि. मोठा.
शर्म न. सुख; कल्याण. [सं. शर्मन]
शर्म, शर्मणे, शर्मिंधा, शर्मिंदा पहा : **शरम**
शर्मा अ. ब्राह्मणाच्या नावापुढे लावण्याचे जातिवाचक उपपद. [सं.]
शर्मिन्दगी स्त्री. लज्जा; ओशाळगत. [फा. शर्म]
शर्मिष्ठा स्त्री. १. नक्षत्रपुंज; उत्तर ध्रुवाजवळचा सहा ताऱ्यांचा एक पुंज; (इं.) कॅसिओपिआ. २. ययातीच्या एका पत्नीचे नाव. [सं.]
शर्यत स्त्री. १. पैज; पण; होड. २. चुरस; स्पर्धा; एकमेकांवर ताण. [अर. शर्त, शरायत]
शलक–ख स्त्री. भडिमार; ताशेरा; झड; पाऊस; वृष्टी. [अर. शलक्]
शलगम पु.न. एक फळभाजी; सलगम. [तु.;फा.शलघम्]
शलभ पु. १. टोळ. २. दीपपतंग; दिव्यावर झडप घालणारा किडा.[सं.]
शलभासन न. जमिनीवर बसलेल्या टोळासारखी शरीराकृती करणारे योगासन.
शलल न. १. साळशिंदर; साळूच्या अंगावरील काटा. २. (ल.) कंटक; काटा : 'तें भीमवपु विनाशर, शल्यवपु जसें विनाशलल, नाहीं।'– मोद्रोण १२.४२. [सं. शल्य]
शलाका स्त्री. १. सळई; लांब बारीक खिळा; टाचणी; तारेचा तुकडा. २. काड; भात्याण; पेंढा. ३. कामटी; काठी; वेत. ४. लांब बारीक, अणकुचीदार पदार्थ. उदा. छत्रीची काडी, गज इ. [सं.]
शलाकापरीक्षा स्त्री. एखाद्या विषयाचा अभ्यास केलेल्या इसमाची त्याने अभ्यासलेला ग्रंथ एखाद्या सळईने उघडून कोणत्याही निघालेल्या

पानावरील भागाचे स्पष्टीकरण करण्यास सांगण्याची परीक्षा.

शल्य न. १. काटा; टाचणी; कुसळ; टोचणारा पदार्थ. पहा : **शलाका.** २. न वाढता पोटात राहिलेला गर्भ, सल. ३. (ल.) टोचणारे दुःख; सत्त्व; मनाला लागून राहिलेला अपमान; सलणी; तापदायक, दुःखदायक व्यथा; पीडा; मनाला टोचणारी गोष्ट. ४. बांधत असलेल्या इमारतीखालील जागेतील प्रेत, केस, हाडे इ. अशुभ पदार्थ. (हे तिथे राहिल्यास बाधक ठरतात असा समज.) ५. बाणाग्र. ६. शरीरात राहिलेला (काटा, सुई, बाण इ.चा) अंश. [सं.]

शल्यकर्म–क्रिया न. स्त्री. रोगावर उपचार म्हणून शरीराचा काही भाग कापून तो दुरुस्त करणे.

शल्यचिकित्सक पु. शस्त्रक्रिया करणारा डॉक्टर; (इं.) सर्जन.

शल्यचिकित्सा स्त्री. १.शरीरात घुसलेली वस्तू बाहेर काढण्याची उपचारपद्धती. २. शस्त्रक्रिया करून रोगोपचार करण्याची पद्धत.

शल्यतंत्र–शास्त्र न. वैद्यकीय शस्त्रविद्या; शरीरात असलेला दुसरा पदार्थ कसा काढायचा या विषयीचे शास्त्र; शरीरव्यवच्छेदनशास्त्र. [सं.]

शव न. प्रेत; मृतदेह; मढे. [सं.]

शवघर, शवागार न. विल्हेवाट लागेपर्यंत प्रेत ठेवण्याची रुग्णालयामधील खोली.

शवपेटिका स्त्री. प्रेत वाहून नेण्यासाठी वापरतात ती विशिष्ट प्रकारची पेटी.

शवविच्छेदन न. तपासणीसाठी प्रेताची केली जाणारी चिरफाड.

शवासन न. शवाप्रमाणे निपचित व रिकाम्या मनाने पडून राहण्याचे एक योगासन.

शश, शशक पु. ससा. [सं.]

शशविषाण–शृंग न. (सशाचे शिंग). (ल.) न मिळणारी वस्तू; अप्राप्य पदार्थ; अशक्य कोटीतील गोष्ट.

शशिनी स्त्री. चांदणी रात्र. [सं.]

शशी पु. १. चंद्र. २. इडा या नाडीतून वाहणारा वारा. ३. इडानाडी. ४. कापूर : 'येला कंकोल पूगीफल खदिर शशी जायपत्री लवंगा।'– सारुह ३.४८.

शशीसिरणे हातात हात धरून वर्तुळाकृतीने धरलेल्या हातातून शिरणे. एक खेळ : 'खेळां आदरिलें गोपाळीं । शशीसिरणे चेंडुफळी।'– मसाप १८१.

शशोपंज पु. संकट; अडचण : 'राजाजीही शशोपंजांत आहेत.'– मासा ५.१००. [फा. शशोपज्ज]

शष्कुली स्त्री. करंजी : 'मांडा साखरपांडा गुळवरी। शष्कुल्या अमृतफळें क्षीरधारी।'– एभा २७.२९. [सं.]

शष्प न. १. कोवळे गवत. २. शरीराच्या गुह्य भागावरील केस; शेटं. [सं.]

शष्पित वि. कोवळ्या गवताने आच्छादलेली जागा; कोमल तृणयुक्त.

शस्त स्त्री. १.अंगुस्तान; अंगुष्टत्राण. २. अंगठ्याचा अलंकार. ३. नेम. [फा. शस्त्]

शस्त्र न. १. हत्यार; आयुध. २. (ल.) ज्यात एखाद्याचे सामर्थ्य साठविलेले आहे असे साधन, पदार्थ, गोष्ट इ. जसे : – विद्या, सौंदर्य, पावित्र्य, लेखणी इ. ३. (ल.) नाशक, हारक, मारक वस्तू, औषध इ. [सं.] (वा.) **० तळणे, तोळणे–** १. योग्य स्थितीत, बरोबर रीतीने हत्यार धरणे. २. शस्त्र चालविण्यास उद्युक्त होणे; शस्त्र परजणे. **०धरणे–** १. त्याचे वाईट करण्याविषयी कंबर बांधणे. २. हल्ला करणे.

शस्त्रकार पु. हत्यारे तयार करणारा.

शस्त्रक्रिया स्त्री. पहा : **शल्यकर्म**

शस्त्रक्रियागार न. शस्त्रक्रिया करण्याची विशिष्ट व सुसज्ज खोली.

शस्त्रत्राण न. शस्त्रसंरक्षक कवच; म्यान, चिलखत, टोप इ. [सं.]

शस्त्रपूत वि. युद्धात मरण पावलेला.

शस्त्रमार्ज पु. शिकलगार.

शस्त्रसंधी पु. युद्ध चालू असता ते तात्पुरते थांबवण्यासाठी केलेला करार.

शस्त्राभ्यास पु. लष्करी शिक्षण, हत्यारे वापरण्यात तरबेज होणे. [सं.]

शस्त्रि–स्त्री स्त्री. तलवार; कट्यार; सुरी.

शस्यक न. एक उपरत्न. [सं.]

शह पु. १. बुद्धिबळाच्या खेळातील एक संज्ञा. विरुद्ध पक्षाच्या सामान्य मोहऱ्याने केलेली राजाची अडवणूक, हल्ला; राजास येणारा वेध. २. एखाद्याचा पाडाव करण्यासाठी धरलेला रोख, योजलेला डाव. अशा स्थितीत लागणारा वेध; धाक; दरारा; जोर; दाब. ३. (ल.) योग्य संधीची वाट पाहून, अनुकूल काल पाहून मनोगत सिद्धीस नेण्यासाठी केलेले प्रयत्न. (क्रि. देणे, बसणे, येणे.) ४. (ल.) सूचना; ताकीद; इशारा. [फा. शह्-राजा] (वा.) **०देणे–** १. दुसऱ्याला हुसकावून लावणे. २. जेथून प्रतिपक्षावर हवे तेव्हा तुटून पडता येईल अशा ठिकाणी बसून त्याला भीती दाखवणे. **शहास गुंतणे–** (वचन, लेख इ.ने) बद्ध होणे; बांधले जाणे; न सुटणाऱ्या संकटात सापडणे.

शह(हा)जादा पु. युवराज; राजपुत्र.

शह(ही)त अ. तपशील; जवाहिरी दागिन्याचे पोटचे अवयव लिहावयाचे प्रसंगी त्या दागिन्याचे नावापुढे लिहितात : 'जगो, घाट साधा किंमत रुपये ४०२ शहत.'– समारो १.७१.७२. [अर.]

शहतखाना पु. १. शिकारखाना. २. दारूखाना.

शहमात स्त्री. (बुद्धिबळाचा खेळ) शह लागल्यानंतर राजाचा बचाव न होण्याची स्थिती; (इं.) चेकमेट.

शहर न. मोठे गाव; नगर. [फा.]

शहरग स्त्री. कानाच्या बाजूला गळ्यावर असणाऱ्या मोठ्या शिरा. [फा.]

शहरगुंडा पु. १. (गावगुंडा या शब्दाप्रमाणे) निष्णात; अट्टल; लबाड; सोदा. २. सर्व जगाची माहिती असणारा; मोठा धूर्त आणि व्यावहारिक. ३. कोणत्याही कामात वाकबगार; हरहुन्नरी; चौरस.

शहरपन्हा–न्ना पु. १. शहराची तटबंदी; कोट. २. शहराचा पहारा; बंदोबस्त. ३. असा बंदोबस्त ज्याच्याकडे आहे असा अधिकारी.

शहरबटाऊ पु. शहरातील गुंड; अट्टल सोदा.

शहरी वि. १. शहरासंबंधी; नगरासंबंधी; नागरिक; नागर. २. (ल.) लबाड,

लुच्चा.

शहरीकरण न. औद्योगिकीकरणामुळे खेड्यांचे महत्त्व कमी होऊन शहर व त्याचे महत्त्व वाढणे.

शहा पु. राजा; अधिराज; बादशहा.

शहा वि. कृष्ण; काळे. [फा. सियाह्]

शहा पु. १. सावकार; शेट. २. सावकाराची पदवी; पत असलेली असामी; पैशांची देवघेव करण्यास अगदी विश्वासाचे कूळ. ३. जकातदार; करवसुली करणारा अधिकारी.

शहा उद्गा. कान्होबाचे वगैरे वारे अंगात शिरल्यावर झाडाच्या तोंडून निघणारा उद्गारवाचक शब्द.

पु. साक्षात्कार. [ध्व.]

शहागडी वि. शहागड या पेठेसंबंधी (पागोटे, शेला इ.).

शहाजण पु. न. मोठा नगारा; मंगलवाद्ये. पहा : **शादियान** [फा. शादयाना]

शहाजंग पु. १. युद्धसम्राट. २. एक पदवी. [फा.]

शहाजानी–दानी वि. शहाजहान बादशहाचा, संबंधाचा, वेळचा (रुपया, राज्य इ.).

शहाजिरे न. जिऱ्याचा एक प्रकार. मसाल्यात वापरतात. [फा. शाहजरिह्]

शहाजोग वि. १. विश्वसनीय. २. भरवशाचा आव आणणारा.

शहाजोर पु. मोठी सत्ता; सामर्थ्य.

वि. सुरेख; भव्य; बादशाही; उत्कृष्ट; प्रबळ.

क्रिवि. सुरेखपणाने; भव्य रीतीने; राजेशाही पद्धतीने. [फा.]

शहाडा पु. १. डोंगरमाथा; कडा; कणा. २. कड्यावरील अरुंद वाट. [सं. संहृत]

शहाडा पु. १. होलारांचे एक वाद्य; मोठा डफ. २. होलारांची हे वाद्य वाजवण्याची पद्धत.

शहाडा पु. १. मोठा वृक्ष. २. सिंह.

शहाणपण, शहाणीव, शाहणीव न. स्त्री. हुशारी; धूर्तता; अक्कल; चातुर्य; चांगली समजूत.

शहाणा वि. धूर्त; हुशार; बुद्धिमान; अक्कलवंत; समजूतदार; चतुर. (वा.) **शहाणी होणे** – न्हातीधुती, ऋतुमती होणे; वयात येणे.

शहाणा पु. (संगीत) एक राग. गानसमय मध्यरात्र.

शहाणासुरता वि. १. हुशार व देखणा; बुद्धिमान व सुरेख. २. (सामा.) चांगला हुशार.

शहाण्णव वि. ९६ ही संख्या. [सं. षण्णवति]

शहातूत स्त्री. १. एक फळझाड; तुती. २. त्या झाडाचे फळ. [फा. शहतूत्]

शहात्तर, शाहत्तर, शेहत्तर वि. ७६ ही संख्या. [सं. षट्सप्तति]

शहानवीस पु. तहसिलीतील खजिन्याचा हिशेबनीस. (व.)

शहानामा, शहाना पु. पोलीसदलाचा प्रमुख.

शहानिशा पु. स्त्री. १. निश्चित मत; निकाल; संशयाचे निराकरण. २. चांगल्या वाइटाचा, खऱ्या-खोट्याचा निर्णय, निकाल; दोहोंपैकी एक मार्ग ठरवणे; सोक्षमोक्ष; निश्चित स्थिती. ३. चौकशी; तपास. (क्रि. करणे) [फा. शहनशह]

शहापुरी वि. शहापूर गावचा, गावासंबंधी (धोतरजोडा, पंचा, वस्त्र इ.).

शहाबादी फरशी शहाबाद येथील पातळ सपाट दगड.

शहामत स्त्री. १. धाडस; साहस; पराक्रम. २. चातुर्य; हुशारी; करामत (एखादे काम करण्यात). [फा. शहामत्]

शहामुसळी स्त्री. काळ्या जातीची मुसळी (एक औषधी). [फा. सियाह्+मुसली]

शहामृग पु. एक मोठा,उंच लांब पायांचा, बाकदार मान असणारा, वेगवान, पिसे-पंख असणारा, पण न उडणारा पक्षी. हा मूळ आफ्रिका व अरबस्तान येथील आहे.

शहारणे क्रि. शहारे येणे.

शहारा–रे, शारे पु. न. १. रोमांच; कंप. २. हीव; हिमज्वर. [सं. सोत्कार]

शहाळू पु. रबीचा जोंधळा; शाळू.

शहाळे न. कोवळा नारळ; खोबरे घट्ट बनण्यापूर्वीचा नारळ.

शहांगी–ग्या वि. किरकोळ शरीरयष्टीचा-ची; सडपातळ. [सं.]

शहीद पु. हुतात्मा; युद्धात मरण पावलेला; स्वधर्मार्थ किंवा स्वमतार्थ मेलेला वीर.

शहेनशहा पु. राजाधिराज.

शळी स्त्री. १. सळई. २. साळपीस; साळिंदर.

शंकणे क्रि. संशय येणे, वाटणे; कुतर्क करणे; भीती वाटणे. [सं. शक्]

शंकनीय वि. संशययुक्त; शंकास्पद; विवादनीय; वादग्रस्त. [सं.]

शंकपाळ पु. (अप.) शकपाल; शककर्ता; शकारंभ : 'शंकपाळ शिवाजी महाराजानें केला.'– ऐपो २३. [सं. शकपालन]

शंकर पु. १. शंखासुराचे झाड. (को.) २. एक देव; महादेव.

वि. शुभ; मंगल; सुखदायक; क्षेमकर. [सं. शम्+कर]

शंकर करणे पत्राच्या शीर्षभागी 'श्री शंकर' असे लिहिणे.

शंकर कोरा मध खाणारा एक जांभळा पक्षी.

शंकरपट पु. संक्रांत वगैरे प्रसंगी होणारी बैलगाड्यांची शर्यत; बैलांची शर्यत. [सं. संगरपट]

शंकरपाळा–ळे पु. न. एक खाद्यपदार्थ; साखर किंवा गूळ, तूप, कणिक यांचा तळीव गोड पदार्थ. [सं. शंकरपाळ]

शंकरमत पु. १. (संगीत) पहा : **नोहारवाणी.** २. अद्वैत तत्त्वज्ञान; मायावाद.

शंकरा, शंकराभरण पु. (संगीत) एक राग. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर.

शंकराचार्य पु. १. वेदान्ततत्त्वज्ञानप्रवर्तक आचार्य; एका धर्मगुरूची पदवी. २. (ल.) मठाधिपती; धर्मगुरू; पीठाधिष्ठित व्यक्ती. ३. स्वामी. [सं.]

शंका स्त्री. १. संदेह; भय; अविश्वास; खात्री नसणे; आशंका; किंतु. २. आक्षेप; हरकत; विरुद्ध मताचा प्रश्न. ३. कल्पना; सूक्ष्म संस्कार : 'तैसी या विषयांची शंका। मनीं वसती देखा।'– ज्ञा २.३२०. ४. (संगीत) गाण्यात घाई करणे. ५. अडचण; अडथळा; गुंता; आडकाठी; व्यत्यय: 'शंका होती पहिली तिसी। नि:शंक झाली व्यथिताचारासी।'– गुच ७.१५६. ६. लाज; भय. [सं. शंक्=संदेह वाटणे]

शंकाशील–ळ वि. साशंक; संशयखोर; शंकित मनाचा. [सं.]

शंकासूर पु. राजतुरा; एक फुलझाड व त्याचे फूल; शंखासूर.

शंकित वि. १. साशंक; भीतियुक्त; दिक्कत बाळगणारा. २. भीती बाळगलेला; शंकिलेला; शंकास्पद (विषय).

शंकित दृष्टि–ष्टी (नृत्य.) दृष्टी आजूबाजूस वळवणे व बाहुल्या गोंधळल्यासारखे करणे असा अभिनय. [सं.]

शंकी वि. संशयी; साशंक.

शंकु–कू पु. १. अणकुचीदार वस्तू; खिळा; सळई; शूळ; टाचणी; काटा; खुंटी; गज; मेख; काठी इ. २. मोजणी करताना काटकोन पाहण्याचे एक साधन; (इं.) स्केअर स्टाफ. ३. छायायंत्राची सूची, काटा. ४. एक्कावर चौदा शून्ये देऊन होणारी संख्या; दहा हजार अब्ज. ५. (भूमिति.) सूची; सुळक्याच्या आकाराची वस्तू; (इं.) कोन. ६. (ज्यो.) तारे, ग्रह इ.ची लंबोन्नतीची किंवा उंचीची ज्या. [सं.]

शंकुपात्र न. प्रयोगशाळेत वापरले जाणारे, शंकूच्या आकाराचे काचेचे भांडे.

शंकुपेशी स्त्री. रंगांतील फरक समजण्यास साहाय्यभूत होणाऱ्या दृष्टिपटलावरील पेशी.

शंकुयंत्र न. छायायंत्र; दिनमान पाहणे किंवा प्राचीसाधन यासाठी त्याचा उपयोग केला जातो. [सं.]

शंकेश्वर पु. पहा : **शंकासूर**

शंक्वाकार वि. १. शंकू किंवा सुळका या आकाराचे; (इं.) कोनिकल. २. मळसूत्राकार; (इं.) स्पायरल.

शंख पु. १. समुद्रात राहणारा एक प्राणी. २. अशा प्राण्याचे घर; त्याचे अस्थिरूप शरीर, कवच. ३. एक प्रकारचे वाद्य. ४. बोटावर असणाऱ्या शंखाकृती रेषा; रेघा. ५. बोंब; ओरडा; आरडाओरडा; शंखध्वनी : 'शंख करी आक्रोशे।'– रावि ३१.१६१. ६. नवनिधीतील एक. ७. एक संख्या; शंकू. ८. कानशिलाजवळचे कपाळावरचे हाड; आख. ९. घोड्याचा विशिष्ट अवयव. १०. चौदा रत्नातील एक रत्न; पांचजन्य. ११. (ल.) अभाव. १२. शंखासूर (राक्षस). [सं.] (वा.)**०वाजणे–** १. संपणे; न उरणे. २. पराभूत होणे.

वि. १. मूर्ख; अडाणी; ठोंब्या; निरक्षर. २. रड्या; बोंबल्या; अपयशी. ३. स्वच्छ; निर्मळ; पारदर्शक गुण दाखवणाऱ्या विशेषणापुढे अधिक्यार्थी योजतात. उदा. निर्मळ शंख पाणी इ.

शंखजिरे न. पहा : **संगजिरे**

शंखतीर्थ न. १. देवपूजेत अभिषेकानंतर देवावर शिंपडले जाणारे शंखातील पाणी. २. (ल.) फाल्गुनवाद्य; बोंब.[सं.] (वा.) **०घेणे–** बोंब मारणे.

शंखद्राव पु. १. शंखापासून काढलेला द्रव, रस. २. ज्यात शंख इ. विरघळवतात असा द्रावक रस. ३. (शाप.) लवणजाम्ल.

शंखधारी पु. दोन शिंपले एकावर एक बसून झालेली शंखाकार कवचघटना. [सं. शंखधृ]

शंखध्मा पु. (शंख वाजवणारा) (ल.) १. उद्धट; आडदांड माणूस. २. निरक्षर; शंखोबा. [सं. शंख+ध्मा=वाजवणे]

शंखध्वनी पु. (शंखाचा आवाज) दु:खोद्रेकामुळे बोंबलणे; बोंब.

शंखपाल–ळ पु. १. सापाची एक जात . २. (ल.) नवनागांपैकी एक नाग; पाताळातील सर्प.

पु. स्त्री. पालीच्या जातीचा एक प्राणी; गणपत; पाल; सरडा. [सं. शंखपाल]

शंखपुष्पी स्त्री. एक प्रकारचे गवत; विष्णुकांता. [सं.]

शंखभस्म न. शूळनाशासाठी शंखापासून केलेले रसायन; शंखाचे प्राणिद.

शंखमणि–णी पु. १. शंखाचा मणी, मोती. २. (ल.) दिसण्यात गोरागोमटा परंतु अक्कलशून्य मनुष्य. ३. पुरुषाचा कंठमणी; गळ्याजवळील मणका. [सं.]

शंखवटिका–वटी स्त्री. शंखापासून केलेले एक औषध. हे संग्रहणी व शूल यावर उपयुक्त असते.

शंखवणी न. १. शंखातील पाणी. २. स्वच्छ; निर्मळ पाणी. ३. (ल.) पाणी घातलेले दूध किंवा ताक.

शंखवलय, शंखावळी न. शंखाची बांगडी. [सं. शंखवलय]

शंखशिरोमणि–णी पु. मूर्ख; ठोंब्या; अक्कलशून्य माणूस.

शंखश्वेत पु. घोड्याची एक जात.

शंखस्फुरण न. १. शंखनाद. २. (ल.) बोंब; आरडाओरड.

शंखळा–ला स्त्री. साखळी. पहा : **शृंखला**

शंखावाती स्त्री. बोंब : 'न पेरितां जाण शेती। शिमग्यावीण शंखावाती।'– मुरंशु ८०.

शंखिनी, शंखीण स्त्री. १. स्त्रियांच्या चार जातींपैकी एक. उंच, सडक केसांची, तामसी, कामुक स्त्री. २. (निंदार्थी) थोडे दूध देणारी गाय. ३. गोगलगाय.

शंखोबा पु. ठोंब्या, मूर्ख मनुष्य.

शंख्या पु. १. अपयशी माणूस. २. शंखोबा.

शंड पु. सांड; अंडील बैल. [सं.]

शंत पु. केळीच्या पानाचा सुकलेला तुकडा. (गो.)

शंपा स्त्री. वीज; विद्युल्लता; विद्युत : 'होती उभी द्रुपद-जा जैसी शंपा नवांबु-भृद्वारीं।'– मोवन ९.२.

शंब(भ)र पु. सांबराची एक जात; रोही. [सं.]

शंभर वि. शत; शंभर (१००) ही संख्या. (वा.) **०बुड्या मारून अंग कोरडे दाखविणारा–** ज्याची लबाडी किंवा लुच्चेगिरी दुसऱ्यास सिद्ध करता येत नाही असा; अनेक लांड्यालबाड्या करून त्यात न सापडणारा. **०रुपये तोळा बोलणे–** मितभाषण; अगदी थोडे बोलणे. **०वर्षे भरणे–** एखाद्याचा मरणकाल, विनाशकाळ जवळ येऊन ठेपणे. **०हातात न देणे–** अगदी दूर राहणे; अलिप्त असणे.

शंभर नंबरी वि. उत्कृष्ट प्रतीचे; अत्यंत शुद्ध; भेसळ नसलेले (सोने इ.).

शंभू पु. १. शिवाचे; शंकराचे नाव. २. (ल.) सरळमार्गी, भोळा माणूस. ३. (ल.) मूर्ख माणूस.

शंसक, शंसा, शंसणे, शंसित, शस्त काव्यात नित्य येणारे शब्द, नेहमीच्या प्रचारात 'प्र' हा उपसर्ग लावून येतात. उदा. प्रशंसक. [सं. शंस्=स्तुती करणे]

शाइणे क्रि. उभारणे; आच्छादणे : 'मंडप शाइले केतकीतळीं। स्तंभीं लाविल्या कर्पूर कदळी।'– मुरंशु १८८. [सं. छाद्]

शाइ(य)दी स्त्री. पुरावा; साक्ष. [अर. शाहिदी]

शाई स्त्री.१. मषी; लिहिण्यासाठी बनवलेला रंगीत द्रवपदार्थ. २. लोखंडाच्या किसापासून तयार केलेले तबला, पखवाज, मृदंग इ. स लावण्याचे लुकण, रोगण. [फा. सियाही] (वा.) **० घालणे** – नाश करणे. **०देणे**– कराराप्रमाणे वागण्याची निश्चितता दाखवण्याकरिता आगाऊ काही पैसे देणे.

शाई–ही वि. १.ताबा, अंमल यासंबंधी; गुण, स्वभाव, नाव धारण करणारा; मालकीचा. उदा. पुणेशाई, मुंबईशाई इ. २. कडून प्रस्थापित; संबद्ध; वाच्य-वाचक. ३. नाणी, चाली, रीतीरिवाज, पद्धती, कायदे वगैरे. उदा. शिवशाही; आदिलशाही इ. ४. विशिष्ट जाती गुणवाचक. उदा. ब्राह्मणशाही, शूद्रशाही, लबाडशाई, सोदेशाही इ.

स्त्री. १. अंमल; सत्ता; अधिकार; आमदानी; कारकीर्द. २. (गाव, राज्य, लष्कर इ. मध्ये राहणारा विवक्षित) जनसमूह, समाज इ. उदा. शिंदेशाही, होळकरशाही. ३. राजमंडळ; राज्य. ४. आणखी निरनिराळे संकीर्ण उपयोगाचे प्रकार. उदा. ढपळशाही, फुकटशाही, लंगडशाही इत्यादी. [फा. शाही]

शाईदान–नी न. स्त्री. दौत; शाई ठेवण्याचे साधन, पात्र.

शाईन पु. ससाणा पक्षी. [सं. श्येन]

शाईपुडा–डी पु. स्त्री. शाई किंवा लुकड लावलेली मृदंगाची बाजू.

शाईपूरण न. (मुद्रण.) कोरीव मजकुराला शाई लावण्यासाठी वापरण्यात येणारा रूळ.

शाईपैसा पु. एक तांब्याचे नाणे. हा बिनशिक्क्याचा तांब्याचा तुकडा असतो.

शाईभरणी स्त्री. शाईच्या (फाउन्टन) पेनमध्ये शाई भरण्याचे साधन; (इं.) इंकफिलर, ड्रॉपर.

शाईशिरस्ता पु. १. सार्वजनिक किंवा सर्वसाधारण चालरीत; पद्धत; रिवाज; जनरीती. २. राजशिरस्ता; राजरीत : 'चांगले माणूस मिळऊन शाई शिरस्त्याचें मर्द माणूस पाहून...'– समारो १.१३.

शाईशिरे न. शिऱ्याची शाई. – मइसा ८.२१.

शाईशोक–सोक पु. टीपकागद; (इं.) ब्लॉटिंग पेपर.

शाईस्ताखान वि. सुसंस्कृत.

शाऊ वि. लहान. (व.)

शाऐंशी वि. ८६ ही संख्या. [सं. षडशीति]

शाक पु. १. सात द्वीपांपैकी सहावे द्वीप; जगाच्या सात भागांपैकी एक (सहावा) भाग. २. शक लोकांचा प्रदेश. [सं.]

शाक स्त्री. पाडाला असलेला आंबा. (अहि.)

शाक–ख स्त्री. १. फळे, बिया, मुळे इ. कोणतीही भाजी करण्याजोगी पाने; भाजीपाला; भाजी. २. मांस; शिजवलेले मांस. (व.,बा.) ३. (देशावर) फळभाजी (पालेभाजीस भाजी म्हणतात); आमटी; तोंडीलावणे.

शाकटा वि. धूर्त; कावेबाज; बनवाबनवी करणारा. (अहि.)

शाक बेश(शा)क–बे–शक स्त्री. न. १. अनिश्चितपणा, शंका-कुशंका; डळमळीतपणा; अनियमितपणा; चुका; दोष. २. विलक्षणपणा; अद्‌भुतता; अलौकिकता (एखादी गोष्ट, विधान, दस्तऐवज यासंबंधी). ३. शंकानिरसन; खात्री; निश्चय; निकाल. ४. चर्चा; ऊहापोह : 'ते याद तुम्हाकडे येणार; त्याजवर शाक-बे-शाक होय नव्हे होऊन सलाह जाणार.'– राज ७.८२.

वि. क्रिवि. १. डळमळीत; अनिश्चित. २. निश्चित; निःसंशय. [अर. शाक्क द्वि.]

शाक(का)व्रत न. चातुर्मासात चार भाज्या सोडण्याचे व्रत. प्रत्येक महिन्याला एकेक पदार्थ सोडण्याचे व्रत.

शाकंबरी स्त्री. १. दुर्गा; एक देवी. २. पौष पौर्णिमेस दुर्गादेवीस अनेकविध भाज्यांचा नैवेद्य दाखवण्याचे व्रत.

शाका स्त्री. कत्तल; जिवे मारणे; तुकडे करणे : 'आता गनीम मागतील ते रुपये द्यावे– किंवा बायकामुले यांची शाका करून चालून-घेऊन मरावे.'– भाब ४. [अर. सक्का=चाकू, सुऱ्या करणारा]

शाकान्न न. शाकमिश्रित अन्न : 'क्षुधेते शाकान्नें अवचट सदन्नें निवटिनो.'– नवनीत १३४७.

शाकाय लवणाय करणे देऊ दिलाऊ करणे; नरो वा कुंजरो वा करणे.

शाकार पु. १. वृक्षाच्या लहान-डहाळ्यांचा विस्तार; शाकारण्यासाठी गवत; झाड इ. २. पाऊस आत येऊ नये म्हणून घरावर घातलेले आच्छादन.पहा : **शेकार**

शाकारणी–णे स्त्री. न. छपरांची आच्छादणी; गवताने शिवणे; कौले घालणे, चाळणे. [सं. छादन कृ:]

शाकारणे उक्रि. घरावर छप्पर घालणे, कौले चाळणे इ.

शाकाहार पु. भाजीपाला, फळे इ. खाणे. याउलट मांसाहार.

शाकिनी स्त्री. गौण स्त्री – देवतांचा वर्ग; दुर्गा व शिव यांच्या सेविका. एक पिशाच जाती. [सं.]

शाकुनिक न. शकुन; दुश्चिन्ह; उत्पात; अद्‌भुत गोष्ट.

वि. शकुनासंबंधी; अद्‌भुतकारक; अरिष्टकारक; अवलक्षणीय.[सं.]

शाक्त पु. १. शक्तीदेवतेचा उपासक. २. शक्तीउपासना पंथ. ३. वाममार्ग.

वि. शक्तीसंबंधी (पूजाविधी, पंथ इ.). पहा : **शक्ति** [सं.]

शाक्तमार्ग पु. एक तंत्रोक्त मार्ग. पहा : **शक्तिपंथ**

शाखा स्त्री. दुर्वा, शमी वगैरे पल्लव एका पानात गुंडाळून, ते कच्च्या धाग्याने वेष्टित करण्याची क्रिया.

शाखा स्त्री. १. फांदी; डहाळी; खांदी. २. भाग; प्रकरण; विभाग; अवयव; वर्ग (पुस्तक, विषय इ.चा). ३. खाते. ४. पंथ; संप्रदाय; पक्ष; गण. ५. वेदांचे पोटविभाग प्रत्येकी. [सं. शाख्=व्यापणे, पसरणे]

शाखा स्त्री. शंखाची बांगडी. [बंगाली]

शाखाचक्रमण न. (माकड या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारते त्याप्रमाणे)१. उडत उडत केलेले वाचन, अध्ययन, अभ्यास; अप्रस्तुत, अर्धवट अभ्यास. २. विषयांतर; अवांतर भारूड; अप्रस्तुत विषयांचे प्रतिपादन. [सं.]

शाखापाठी वि. वेदाच्या विवक्षित शाखेचा अभ्यास केलेला; वेदाभ्यासी लोकातील आणखी भेद. जसे: – क्रमपाठी, घनपाठी, जटापाठी इ. [सं.]

शाखामृग पु. (झाडावरचे जनावर) वानर, खार इ. : 'शाखामृगराज महाप्रताप विख्यात जो अनेकबळ।'– मोरा १.५६. [सं.]

शाखारंड–डी पु. स्वशाखेऐवजी दुसऱ्या शाखेचे अध्ययन करणारा ब्राह्मण.

शाखावळी स्त्री. पालेभाज्या.

शाखी वि. १. शाखेचा; पंथाचा; पक्षाचा. २. शाखा, फांद्या असलेला (वृक्ष). ३. एक कान मोठा असून तो घट्ट उभा असतो असा (घोडा). [सं. शाखा]

शाखी(खो)ट वि. पतीचा; पत असलेला; विश्वासू; खरा.

शागिर्त–र्द, शागीर्द, शाग्रीत पु. १. उमेदवार; छात्र; विद्यार्थी; शिष्य (विशेषत: कला शिकण्यासाठी राहिलेला). २. देवपूजेचे साहित्य मांडणे, धोतर धुणे, पाणी भरणे इ. कामे करणारा ब्राह्मण नोकर. [फा. शागीर्द]

शाटी स्त्री. १. छाटी; संन्यासाचे भगव्या रंगाचे वस्त्र. पहा : **छाटी.** २. (सामा.) पांघरावयाचे किंवा नेसावयाचे वस्त्र. [सं.]

शाठि(टि)का स्त्री. पैठणी; साडी : 'भरजर अवघी हे शाठिका नेसविली।'–सारुह ८.७४. [सं. शाटी, शाटिका]

शाठ्य न. १. लबाडी; लुच्चेगिरी; शठपणा. २. दुष्टपणा; नीचता.[सं.]

शाड न.फणसाचा वेगळा केलेला भाग.

शाडवट वि. १. शाडू असलेली जमीन इ. २. शाडूची केलेली (मूर्ती वगैरे).

शाडवळ वि. खेडवळ; गावंढळ; ओंगळ; घाणेरडा; साधा; अज्ञानी; अडाणी; अकुशल.

शाडवळ–ल, शाड्वळ वि. हिरवागार; कोमल; कोवळा (धान्यांकुर); ताजे; लुसलुशीत (गवत इ.) : 'हा उर्ध्वमूल आहे। परी उन्मूळिला नोहे। येणेचि हा होये। शाड्वळ्गा।'– ज्ञा १५.५६. [सं. शाद्वल]

शाडू स्त्री. पांढऱ्या रंगाची, कमी अशुद्ध चिकणमाती; खडू.

शाण पु. १. पहा : **सहाण.** २. धार लावण्याचा दगड; निसणा. [सं.]
(वा.) ० **धरणे**– धार लावणे. (तंजा.)

शाद पु. न. शेवाळे.

शादियान, श्यादान न. शहाजण; मोठा नगारा. [फा. शाद्यान]

शादी स्त्री. मुसलमानाचे लग्न; लग्नसमारंभ; विवाह; निका. [फा.]

शाद्वल–ळ न. कोवळे; नाजूक गवत. पहा : **शाडवळ**

शान स्त्री. १. प्रतिष्ठा; डौल; छानदारपणा; थाटमाट; सुरेखपणा; शोभा; उत्कृष्टता; भव्यपणा (माणूस, चेहरा,व्यवस्था, समारंभा यांविषयी). २. नटवेपणा; छानछोकी. ३. तजेला; पाणी; जिल्हई.
वि. छानदार; शोभिवंत. [अर. शअन्]

शानगुमान वि. नष्ट; शून्यवत; बेपत्ता. (क्रि. करणे) [अर. शान+फा.गुमान्]

शानदार–री वि. सुंदर; उत्कृष्ट; तजेलदार; छानदार. पहा : **छानदारी**

शानभोग पु. १. कुलकर्णी. २. (क.) ब्राह्मण शणै.

शानशुकी– शोकी स्त्री. १. छानछुकी–छोकी; नट्टापट्टा; नखरा. २. ऐट; डौल; नखरेबाजपणा.

शानशूक–शोकी वि. फाकडा; कुर्रेबाज; नखरेबाज.

शानशौकत स्त्री. १. प्रतिष्ठा; थोरवी. २. डामडौल; भपका. [फा. शान्–उ–शौकत]

शाना न. लोखंड तोडण्याचे एक पोलादी हत्यार; छिनी. (कु.)

शाने, शान, शानी अ. धातुसाधितांना ऊन व क्रियाविशेषणांना ऊन, हून प्रत्यय लावल्यावर होणाऱ्या अव्ययार्थी खेडवळ लोकांच्या प्रचारातील प्रत्यय.उदा. करूनशान. [सं. सत्]

शाप पु. एखाद्याचे वाईट व्हावे म्हणून केलेला वाक्प्रयोग; अभिशाप; अनिष्टचिंतन; तळतळाट. [सं.]

शापगुण पु. शापाचा परिणाम; शापफल. (जाती, कुल, समुदाय इ.तील व्यक्तींमधील जे काही स्वभावसिद्ध दोष असतात ते पुरातन ऋषींच्या शापामुळे असतात अशी समजूत.)

शापणे क्रि. शाप देणे; अनिष्ट चिंतणे. [सं. शाप्]

शापवर वि.रग्गड; भरपूर. (माण.)

शापादपि शरादपि वि. १. शाप देण्यास व युद्ध करण्यासाठी समर्थ (ऋषी व योद्धा). २. (ल.) व्यवहारात, शास्त्रात, विद्येत पारंगत; धर्म आणि कर्म यात सारखाच निपुण; गृहस्थाई व भिक्षुकी या दोन्हींत निपुण.
क्रिवि. १. धर्मश्रेष्ठता आणि सामर्थ्य यांच्या जोरावर. २.कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारे. [सं.]

शापित वि. १. शापलेला; तळतळाट घेतलेला. २. शपथ घ्यावयास लावलेला; शपथ घेतलेला. [सं.]

शापी स्त्री. चिलमीचा फडका; छापी. (कु.)

शाबर न. जादू; चेटूक; टाणाटोणा; मंत्रतंत्र. [सं. शबर]
वि. १. रानटी. २. नीच; पापी. ३. शबरस्वामिकृत. ४. शबर जातीसंबंधाचे.

शाबरी वि. शाबरसंबंधी; ऐंद्रजालिक; जादूसंबंधी.
स्त्री. एक प्राकृत भाषा.

शाबान पु. मुसलमानी, अरबी वर्षाचा आठवा महिना.[अर. शअबान्]

शाबास उद्गा. वाहवा; भलेभले; फार चांगले; भलेबहाद्दर; धन्य.
स्त्री. धन्यता; प्रशंसनीयता. [फा. शाबास्, शाद्बाश्]

शाबासकी, शाबाशी–सी स्त्री. प्रशंसा; स्तुती; वाहवा; पाठ थोपटणे; धन्यवाद. [फा. शाबाश]

शाबिती स्त्री. १. सिद्धता; प्रस्थापना. २. समर्थन.

शाबीत वि. सिद्ध; प्रस्थापित. [अर. साबित्]

शाबुडी (को.) पहा: **साबणी**

शाबुती स्त्री. सुरक्षितपणा; व्यवस्थितपणा; नीटपणा. [फा.]

शाबूत–द वि. १. मजबूत; टिकाऊ; बळकट; दुरुस्त. २. न मोडलेले; न तुटलेले; व्यवस्थित; अभंग. २. पहा : **शाबीत** [अर. सुबूत्]

शाम १. नाश. २. संधान; खून. (क्रि. जोडणे)

शाम स्त्री. रात्र; संध्याकाळ.

शाम स्त्री. मेणबत्ती.

शामक वि. शमविणारे; थंड करणारे; तीव्रता कमी करणारे. उदा. पित्तशामक. [सं.]

शाम(म्म)त स्त्री. हिम्मत; धैर्य. पहा : **शहामत**

शामदान न. उभट दिवा; मेणबत्तीची ठाणवी; ठाणवाई; वालशीट; चिराखदान. [फा. शामदान्]

शामल पु. १. सावळा. २. हबशी; सिद्दी; जंजिरेकर. [सं. श्यामल]

शामशाखा स्त्री. तरवड्याची भाजी.

शामळू वि. नेभळट. (को.) [गु. सांभळो]

शामाटे न. कसे तरी भांडण मिटवणे; कशीबशी तडजोड. [गु. शामाटे]

शामाठ्या वि. अगदी मठ्ठ; ठोंब्या; निर्बुद्ध; मूर्ख; टोणपा; शुंभ.

शामियाणा–ना, शामाना–णा पु. १. तंबूच्या पुढील किंवा मागील बाजूस लावलेले कापड, पडदा. २. सायवान. ३. मोठा डेरा, तंबू. [फा. शाम्याना, शामियाना]

शायिका स्त्री. प्रवासात (आगगाडी व बसयांमध्ये) झोपण्यासाठी दिलेली जागा; (इं.) बर्थ.

शायी वि. निजणारा; आडवा होणारा; टेकणारा. उदा. शेषपायी. [सं. शी–शय्]

शार पु. शेराचे झाड; हुरा. (व.)

शार न. भोक पाडण्याचे हत्यार; सामता. (व., खा.)

शारद, शारदीय वि. १. शरद ऋतूसंबंधी. २. वार्षिक. [सं.]

शारद पु. १. वर्ष. २. आश्विन महिना.

शारदी स्त्री. कोजागिरी.

शारा–री–रे पु. स्त्री. न. १. भय; कंप. २. हीव; थंडीताप : 'दूत सांगती श्रीहरी। वन्हाटणीसी लागली शारी।'– एरुस्व १४.६८.

शारि–री पु. सोंगटी. [सं.]

शारिका स्त्री. १. मैना. २. तंतुवाद्य वाजविण्याची धनुकली. ३. द्यूत. [सं.]

शारी स्त्री. मंत्रतंत्राच्या साहाय्याने दुसऱ्याच्या घरातील अन्न किंवा इतर वस्तू आणविणारी स्त्री.

शार्ङ्ग न. १. विष्णूच्या धनुष्याचे नाव. २. शिंगाचे धनुष्य. [सं. शृंग; अप. शारंग]

शार्दूल पु. चित्रक नावाचे एक झाड. [सं.]

शार्दूल पु. १. वाघ; व्याघ्र. २. राक्षस. ३. (समासातल्या उत्तरपदी) श्रेष्ठ पुरुष. उदा. नरशार्दूल इ.

शार्दूलविक्रीडित न. एक वृत्त. याचे चार चरण असतात. चरणात अक्षरे १९. गण म, स, ज, स, त, त, ग. [सं.]

शार्मण्य वि. जर्मनदेशीय. [सं.]

शाल पु. १.कुंपण; तट. २. एक झाड; साल. [सं.]

शाल स्त्री. पांघरण्याचे लोकरीचे उंची वस्त्र. [फा. शाल्]

शालक पु. मेहुणा; बायकोचा भाऊ किंवा बहिणीचा नवरा; साला. [सं.श्यालक]

शालजोडी स्त्री. १. दुहेरी शाल; शालीचे दोन फर्द मिळून झालेले जोडवस्त्र. पहा : **दुशाल.** २. शाल. (वा.) **शालजोडीतून–तला मारणे–देणे–** एखाद्याची व्यंगोक्तीने निंदा, कुचाळकी करणे; उपरोधिक शब्दांत टोचणे, टोमणा देणे.

शालनफा पु. अंगावर नक्षी, वेलबुट्ट्या असलेली शाल. [फा.]

शालमुदी स्त्री. लग्नाच्या आधी दोन महिने नवरदेवाला नवरीच्या बापाने आहेर करताना केला जाणारा विधी. (व.)

शाला–ळा पु. १. शास्त्र, विद्या, कला, व्यायाम इ. शिकविण्याची जागा; शिक्षण मंदिर; विद्यागृह; आखाडा. २. ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे मुलांना सामान्यत: १० वी पर्यंतचे शिक्षण देणारी संस्था. ३. घर; दालन; सर्वसामान्य जागा; गृह. ४. विवक्षित आचार्याने प्रतिपादिलेली तत्त्वपद्धती; शिक्षणाची विवक्षित रीत, पद्धती, शास्त्र. ५. एका तत्त्वाने, धोरणाने किंवा विचाराने एकत्र जमलेली मंडळी; संप्रदाय; मंडळ; गट. ६. एखादे वैशिष्ट्य; एकसारखी चालरीत इ. असलेला पक्ष, कुल, समाज. ७. व्यवसायाची जागा; लोहाराचे दुकान. [सं.शाला]

शालि–ली स्त्री. साळ; भात; व्रीही जातीचे धान्य. [सं.]

शालिका स्त्री. स्थान; भूमी : 'जे महदादि विश्राम। शालिका हे।'– ज्ञा १४.६७. [सं. शाला]

शालि(ळि)ग्राम पु. (अप. शाळ–शाळिग्राम) १. गंडकी नदीतील विष्णुरूप मानलेला काळा गुळगुळीत व वाटोळा गोटा. २. (ल. उप.) कांदा; कंदर्प.
वि. अगदी काळा कुळकुळीत. [सं. शालग्राम]

शालिनी स्त्री. एक वृत्त.चरणात अक्षरे ११. गण म, त, त, ग, ग.

शालिवन–क्षेत्र न. भाताचे, साळीचे शेत.

शालिवाहन शक दक्षिण भारतात प्रचलित असणारी एक कालगणना. हिचा आरंभ इसवी सनाच्या ७८ व्या वर्षी झाला. पहा : **शक**

शालिहोत्र पु. १. अश्वशास्त्रकर्ता; कपिलमुनीचा पुत्र. २. घोडा.

शाली वि. १. चमकणारा, चकाकणारा; तेजस्वी. २. नावाजलेला; कीर्ती असलेला. ३. (समासान्ती) संपन्न; समृद्ध; परिपूर्ण. [सं. शालिन]

शालीन वि. लाजाळू; नम्र; विनीत. [सं.]

शालीनता स्त्री. सभ्यता; विनय; समजूतदारपणा. [सं.]

शालुक–की स्त्री. एक बायकी खेळ; चार वा अधिक मुलींमध्ये खेळला जाणारा, दोघींनी पाठीस पाठ लावून व दोघींनी त्यांच्यासमोर उभे राहून टाळ्या देण्याचा खेळ : 'शालुक शालकी। तुझी माझी पालखी।' यासारखी गाणी म्हटली जातात.

शालू पु. १. उत्तम, उंची, रेशमी, जरीचे लुगडे. २. बैलावरील झूल. [हिं. सालू]

शालेतील, शालेचे शिंगरू–लेकरू परंपरेप्रमाणे, बापाप्रमाणे वाईट मार्गाला लागलेला मुलगा.

शाल्मल–लि–ली पु. स्त्री. सावरी; शेवरीचे झाड. [सं.]

शाल्योदन पु. १. शिजवलेला भात. २. (ल.) उत्तम, चमचमीत जेवण. [सं.]

शाव–शावक वि. शवासंबंधी.

शाव, शावक पु. छावा; बच्चा; बालक (मृग, सिंह इ.चा). [सं.]

शावक पु. जैन यतींचा एक वर्ग; (प्र.) श्रावक , (सामा.) पाखंडी : 'मग त्या दैत्यीं सांडिलें हवन। संप्रदाई जाहले नानावर्ण। ते हे जी शावक जन। बोलिले भारता।'– कथा २.१७.९८. [सं. श्रावक]

शाश्वत वि. १. अनश्वर; चिर; अखंड. २. कायम टिकून राहणारे. [सं.]

शाश्वत–ति–ती स्त्री. टिकाऊपणा; चिरंतनता.

शासक वि. १. शासन करणारा; दंड करणारा. २. राज्य चालवणारा, हाकणारा; राज्यकर्ता. ३. व्यवस्था पाहणारा अधिकारी. [सं.]

शासणे क्रि. १. शासन, दंड, शिक्षा करणे. २. अधिकार चालवणे; व्यवस्था पाहणे. [सं. शासन]

शासन न. १. शिक्षा; दंड; सजा. २. राज्यकारभार, सत्ता चालवणे. ३. हुकूम; आज्ञा . ४. आज्ञापत्र; निर्णयपत्र. ५. राजाज्ञा; सनद; शासनपत्र. उदा. 'अशोकाची शिलाशासने.' ६. सत्ता; अंमल; कारकीर्द. [सं.]

शासनपत्र न. अधिकारपत्र; सनद; हुकूम (कागद, ताम्रपट, शिला वगैरेवर लिहिलेले). [सं.]

शासनशास्त्र न. राजकीय व्यवहारांचा विचार करणारे शास्त्र; (इं.) पॉलिटिक्स.

शासनीय पहा : **शास्य**

शासित वि. १. सजा दिलेले; शिक्षा केलेले. २. अधिकार, अंमल, सत्ता गाजवलेले; हुकमत, आज्ञा केलेले; आस्थापित. [सं.]

शास्त–स्ति स्त्री. शासन; शिक्षा; दंड. [अर. सियासत्; सं. शास्]

शास्ता पु. १. दंड, शिक्षा करणारा; शासक; शासन करणारा (न्यायाधीश, गुरू इ.). २. अधिकार, अंमल चालवणारा; अधिपती; राज्यकर्ता. [सं. शास्]

शास्तृत्व न. १. चुकीच्या मार्गावरून सरळ मार्गावर आणणे; शिक्षा, सजा करणे. २. सत्ता; अधिकार; अंमल. [सं.]

शास्त्र न. १. (दैवी) धर्म, विधी, नियम, विद्या यासंबंधी वचन, आज्ञा. हे ईश्वरी किंवा अपौरुषेय मानण्यात येते. २. धर्म; वाङ्मय; विज्ञान, कला इ. संबंधी नियम. उदा. वेदान्तशास्त्र, शिल्पशास्त्र, कामशास्त्र, न्यायशास्त्र, व्याकरणशास्त्र इ. ३. प्रबंध; ग्रंथ. ४. नियमबद्ध, सिद्धान्तमय रचना असलेला विषय. [सं.] (वा.) **शास्त्रास, शास्त्राचा, शास्त्रापुरता, शास्त्रार्थास असणे, नसणे–** केवळ नावाचा असणे, नसणे.

शास्त्रदर्शी–वेत्ता–विद, शास्त्रप्रवीण–अभिज्ञ–संपन्न, शास्त्रज्ञ वि. शास्त्रांत निपुण, कुशल; चांगला शास्त्री. [सं.]

शास्त्रसंख्याक वि.(सहा शास्त्रे यावरून सांकेतिक) सहा : 'खदिर वृक्षांचे शास्त्रसंख्याक । पळसांचे ऋषि संख्याक । ऐसियापरी सम्यक । यज्ञक्रिया अवलंबिली ।'– जैअ ९२.४९.

शास्त्रज्ञ वि. १. शास्त्र जाणणारे.२. वैज्ञानिक; कोणत्याही शास्त्राचे शास्त्रीय पद्धती वापरून संशोधन करणारा. ३. धर्मशास्त्राचे जाणकार.

शास्त्रार्थ पु. शास्त्रातील किंवा विधिनिषेधरूप वचन, अभिप्राय, शास्त्र यांची सांगणी; शास्त्रातले वचन; शास्त्राज्ञा; विशिष्ट बाबतीत शास्त्राने घालून दिलेला नियम वा दाखवलेला मार्ग.

शास्त्री पु. १. शास्त्रांचा अभ्यास केलेला गृहस्थ; शास्त्रवेत्ता पंडित. २. ज्या शास्त्राचे अध्ययन ज्याने केले आहे, त्या शास्त्राचा शास्त्री. उदा. न्यायशास्त्री, धर्मशास्त्री. ३. कोणत्याही एखाद्या शास्त्रविद्येत निपुण असलेल्या ब्राह्मणाच्या नावापुढील बहुमानार्थी पदवी.

शास्त्रीबाणा पु. विशिष्ट धंदा किंवा व्यासंग म्हणून केल्या जाणाऱ्या पुढील सहा शास्त्रीय विद्यांना योजला जाणारा शब्द. सुवर्णकार, ज्योतिषी, धर्मशास्त्री, नैय्यायिक, वैद्यकी, वैयाकरणी–बाणा.

शास्य वि. १. शासन करण्यास, शिक्षा करण्यास युक्त, योग्य, शक्य, जरूर; सरळ मार्गावर आणण्यास योग्य, जोगते, सारखे. २. अधिकार, हुकमत चालवण्यासारखे; आज्ञा करण्याजोगे.

शाह–हं ने सुरू होणारे शब्द येथे न आढळल्यास 'श' खाली पाहावेत.

शाहगोष पु. रानमांजर. [फा. सियाह्+गोश]

शाहतीर पु. जासूद.

शाहा पु. गुन्हा; अपराध; मुद्दा.

शाहिदी, शाहिदीदार, शाहीद पु. साक्षीदार; साक्ष देणारा; गवाह : 'आम्हीं ईश्वरास शाहीद देऊन कर्तव्यार्थ तो करितो.'– मइसा ६.६१९. [फा. शाहीद्]

शाहिदीनामा पु. साक्षीपत्र; साक्षीदाराची जबानी, लेख.

शाही–ई स्त्री. राज्य; सत्ता; अंमल; कारकीर्द.

शाहीर पु. १. पोवाडे, लावण्या व ह्या धर्तीची कवने करणारा कवी. २. कवने रचून ती म्हणून दाखवणे यावर चरितार्थ चालवणारा कवी, भाट. ३. तमाशा करून उपजीविका करणारा माणूस. ४. (सामा.) राष्ट्रीय किंवा वीरवृत्तीची कविता करणारा कवी. [अर. शाइर]

शाहीरकी, शाहीरगिरी, शाहिरी १. कवित्व. २. शाहिराची वृत्ती, पेशा.

शाहीरू पु. वेतनव्यय.

शाळंका–खा, शाळांक, शाळुंका–खा, शाळोंका–खा स्त्री. १.महादेवाचे लिंग बसवण्यासाठी केलेली पाषाणादिकांची बैठक. २.लिंगाची अडणी; योनी.

शाळा पहा : **शाला**

शाळिका स्त्री. वसतिस्थान : 'जे महदादि विश्राम । शाळिका हे ।'– ज्ञा १४.६७.

शाळिग्राम पहा : **शालिग्राम**

शाळू पु. १. हिवाळ्यात येणाऱ्या जोंधळ्याची एक जात. २. हिवाळ्यातील लहान दिवस. ३. गुराढोरांसाठी उत्तम, चवदार गवत.४. पावसाळ्यात उगवणारे बारीक जातीचे गवत.

वि. (ल.) क्षणिक; नश्वर; थोडा वेळ राहणारा. [सं. शीतकाल]

शाळू स्त्री. अन्याय झालेल्या इसमाने आगळीक करणाऱ्याला धाक दाखवण्यासाठी व न्याय्य गोष्ट करण्याला भाग पाडण्यासाठी रात्री निर्जन स्थळी उच्चारलेले तळतळाटाचे शब्द, शाप. (क्रि. पुकारणे)

शाळूसोबती १. ज्याचा सहवास थोडे दिवसच लाभावयाचा आहे असा माणूस; शेवटपर्यंत सोबत न ठेवता मध्येच सोडून जाणारा माणूस. २.लाभ असेपर्यंत टिकणारा मित्र.

शाळोत्री पु. घोड्यांचा वैद्य. [सं. शालिहोत्र=घोडा]

शांकरी स्त्री. भांगेची गोळी.

शांखळा स्त्री. साखळी : 'शांखळा खाडौनिआं । एकें वेळें केलियांति राणियां ।'– शिव ६८०. [सं. शृंखला]

शांत पु. १. नवरसांपैकी एक रस. संसाराची नि:सारता, उपरती, सत्संग इ. वर्णनात योजतात. २. (नृत्य.) डोळ्याच्या पापण्या अर्धवट मिटणे. हा शांतरसाचा अभिनय होय. ३. पहा : **शांति** ७,१२

वि. १. शांतियुक्त; क्षुब्ध नसलेला; निर्विकार; निर्द्वेषी. २. संतुष्ट; समाधानी. ३. सत्त्वगुणी; सुशील. ४. थंड; गार; शमलेला; विझलेला (अग्नी, दिवा इ.). [सं. शम्=शांत होणे]

शांतता स्त्री. १. शांती; संतोष; समाधान. २. स्थिरस्थावर; राग, लोभ, क्षोभ इ.चे प्रदर्शन नसणे. ३. निवांतपणा; गडबड नसणे. पहा : **शांति**

शांतवन न. १.शांती. २.सांत्वन. [सं. सांत्वन]

शांतविणे क्रि. शांत करणे; सांत्वन करणे.

शांति–ती स्त्री. १. थांबणे; शमन; उपशमन. २. शांतता; स्थिरता; थंडपणा. ३. स्थिर, स्तब्ध अशी स्थिती; नि:स्तब्धता; स्वस्थता. ४. मंदता; सौम्यत्व; मृदुता. ५. वैराग्य; विरागीपणा; निर्विकारता. ६. समाधान; संतुष्टपणा. ७. दुष्ट पिशाच, ग्रह वगैरेंची पीडा दूर व्हावी म्हणून करावयाची जप, पूजा, मंत्रपठण वगैरे कर्मे, अरिष्ट शांती. ८. धार्मिक समारंभातील आकस्मिक उद्भवणारी संकटे व अशुभ गोष्टी टळाव्यात म्हणून आगाऊ केलेले कर्म. ९. (ल.) संसारापासून मुक्तता; जीवित कष्टापासून सोडवणूक; मृत्यू. १०. शांत रस. ११. मोक्ष; ब्रह्म; अंतिम साध्य. १२. पीडा, त्रास वगैरेपासून सुटका; एखाद्या पीडाकारक मनुष्याची केलेली समजूत; तृप्ती; पीडेचे निवारण; शांत. [सं.]

शांतिक, शांतिकर्म न. १. अरिष्ट, त्रास, पीडा यांच्या निवारणासाठी शास्त्रात सांगितल्याप्रमाणे करावयाचा विधी; शांती. २. फलशोभन–विधी; गर्भाधान. (व., गो.)

वि. १. शांतिकारक; शांतता प्रस्थापक; प्रशमन; उपशमन करणारे. २. आराधणारा; आळवणारा; प्रसन्नकारक; शांतिकर–कारक–दायक.

शांतिपुष्टिक, शांतिपाठ पु. १. बाळ–बाळंतिणीला कसलीही बाधा होऊ नये म्हणून किंवा मांगल्यासाठी केला जाणारा वेदमंत्रपाठ, मंत्रांचे पठण. २. (ल.) एकसारखे जोरजोराने रागे भरणे, शिव्या देणे.[सं.]

शांतिब्रह्म–मैंद न. १. अतिशय शांत वृत्तीचा मनुष्य; धीरगंभीर आणि शांत माणूस. २. (उप.) वरून शांत पण आतून द्वेषाने जळफळणारा माणूस. [सं.]

शांतिमंत्र पु. उपासनेपूर्वी व नंतर म्हटला जाणारा मंत्र.

शांतिमंदिर न. पारशांची स्मशानभूमी; (इं.) टॉवर ऑफ सायलेन्स. [सं.]

शांतोदक वि. प्रशांत; प्रसन्न; संथ.

शांबरी स्त्री. चेटकीण; जादूगारीण. [सं.]

शांभव वि. शंभूसंबंधी; शंकराचे; शंकरापासून प्राप्त झालेले. [सं. शंभु]

शांभवी स्त्री. १. पार्वती. २.(शंकराचे आवडते पेय म्हणून संकेताने) भांग; घोटा. ३. कुंडलिनी जागृत करणारी विद्या. [सं.]

शांमुख वि. लाल तोंडाचे.

शिऊळ स्त्री. जोखडाची खुंटी. पहा : **शिवळ**

शिऊळ स्त्री. पहा : **शीळ**

शिक स्त्री. १.शिक्षा; शिकवण : 'शिक लावुनियां घालिती बाहेरी।'– तुगा १६.२. अद्दल. ३.रीत. [सं. शिक्ष्]

शिक (अहि.) पहा : **शीग**

शिकणाऊ वि. १. शिकणारा; शिकाऊ; विद्यार्थी; अभ्यासक. २. (उपजत नसणारे पण) अभ्यासाने संपादन केलेले.

शिकणे क्रि. १. विद्या, कला, शास्त्र यासंबंधीचे धडे घेणे; विद्या मिळवणे. २. अभ्यास करणे. [सं. शिक्ष्]

शिकम न. पोट; मर्यादित जागा; पोटविभाग; हद्द; क्षेत्र : 'फुल्वरीचे मकान फरासिसांचे सिकमांत आहे ते घेऊन बंदोबस्त करावा.'– मइसा ७. [फा. शिकम्]

शिकमीदार पु. पोटहिस्सेदार.

शिकर पु. बहिरी ससाणा; ससाणा. [फा.]

शिक(ख)रण, शिक्रण न. स्त्री. केळी, खरबूज इ. दुधात कुसकरून व गूळ किंवा साखर घालून तयार केलेला खाद्यपदार्थ.

शिकरणी स्त्री. शिंकाळी. [सं. शिक्य]

शिकरी स्त्री. पहा: **शिकारी** १

शिक(की)ल, शिक्कल स्त्री. १. (घासून पुसून) साफसुफी; उजाळा; जिल्हई देणे (हत्यारे, शस्त्र इ.ना). २. तेज; शोभा; चकाकी. ३. मान; अब्रू. (क्रि. चढणे, उतरणे, जाणे, गमावणे.) : 'पूर्व क्रमास शिकल राहील.'– होकै ७३. [अर. सैकल]

शिकलका(गा)र पु. शिकल करण्याचे कसब करणारा; हत्यारे साफसूफ करून धार लावणारा, उजळविणारा. [फा. सैकल्गर]

शिकला पु. लहान नथ; सुंकले.

शिकली स्त्री. सोन्यावर पडलेले चरे घासून साफ करण्याचे हत्यार. (गो.)

शिकवण–णी स्त्री. १. शिकवण्याची पद्धत; रीत. २. फूस लावणे; वाईट गोष्टीकडे प्रवृत्त करणे. ३. उपदेश; बोध; मार्गदर्शन. ४. शिष्यवृत्ती; शिक्षणाचे वेतन.

शिकवणी स्त्री. शाळेव्यतिरिक्त खाजगी शिक्षक, वर्ग यांच्यातून दिले जाणारे शिक्षण.

शिकव(वि)णे सक्रि. १. शिक्षण देणे; एखादी गोष्ट कळण्यासाठी, येण्यासाठी मार्गदर्शन करणे. २. उपदेश देणे. ३.(वाईट अर्थाने) फूस लावणे.

शिकस्त वि. १. पराजित; पराभूत : 'गनिमानीं कधीं मोंगलाशीं युद्ध करून मोंगल शिकस्त केला नव्हता.'– भाब ८१. २. मोडके; तुटके; भग्न; मोडकळीस आलेले (घर, विहीर इ.). ३. निरुपयोगी; कुचकामी. स्त्री. १. पराभव. २. मोडतोड; दुर्दशा; भग्नदशा; नष्ट स्थिती. [फा.] (वा.) ०**करणे–** (कागद, ताव, तक्ता इ.) घडी घालून चार रकाने पाडणे.

शिकस्त स्त्री. कमाल; पराकाष्ठा; अत्युच्चता. [फा.]

शिकळ स्त्री. पाने किंवा फळे दोऱ्यात ओवून केलेली माळ. (कु.)

शिकं(क)जी स्त्री. एक प्रकारचे सरबत; थंडाई. लिंबू आणि साखर किंवा मध घालून त्याला गुलाबाचा वास लावतात.[फा. सकंजबीन्]

शिकंदर पु. मॅसिडोनियाचा जगज्जेता राजा अलेक्झांडर. हा धूर्त व पराक्रमी होता. (यावरून)

वि. १. (ल.) धूर्त; शहाणा; भाग्यशाली, महाबलाढ्य व पराक्रमी.

२. (उप.) पुंड; गुंड; पक्का हरामी; सोदा (माणूस.)
[अर. इस्कंदर; फा. सिकन्दर; इं. अलेक्झांडर]

शिकंदराची दिवाल–र १. याजूज व माजूज या रानटी लोकांपासून संरक्षण व्हावे म्हणून शिकंदराने बांधलेली भिंत. २.(ल.) अढळ, अभेद्य गोष्ट.

शिकंदरी गजाची काठी जमीन मोजणीचे शिकंदरने सुरू केलेले काठीचे परिमाण.

शिकंबी पु. हातोड्यासारखे एक शस्त्र.

शिका पु. पहा : **शिक्का**

शिकायत स्त्री. तक्रार; फिर्याद; कागाळी. [अर. शिकायत्]

शिकायी स्त्री. शिंकाळी. (अहि.)

शिकार स्त्री. १. पारध; मृगया; (सावजाचा) पाठलाग; शोध. २. सावज; मृग; पारध करावयाचा प्राणी. ३. (ल.) लग्गा; संधान (बहुधा निंदार्थी). (क्रि. साधणे). ४. अचानक मोठा लाभ; टावके. ५. घर : 'देव कुंडलिकाचं मधभागाला शिकार.'– जसा.

शिकारखाना पु. पारधी पशुपक्ष्यांचा भरणा; रानटी पशुपक्षी ठेवण्याची जागा; प्राणिसंग्रहालय; तत्संबंधीचा कारखाना. [फा.]

शिकारगाह पु. १. शिकारीची जागा. २. शिकार .

शि(शिं)कारणी स्त्री. १. टोपली, भांडे टांगण्यासाठी बांधलेली दोरी. २. शिंक्याची बांधलेली टोपली.

शिकारदार पु. शिकारी; पारधी. (ना.)

शिकारबंद पु. शिकारी स्वाराच्या खोगिराला मागेपुढे लावलेले बंद प्रत्येकी. [फा.]

शिकारबाज पु. पारधी; शिकारी.

शिकारा पु. काश्मिरातील नाव; बोट; नावेतील घर.

शिकारी पु.शिकार करणारा.
वि. पारध करण्यासंबंधी; मृगयेसंबंधी. [फा.शिकारी]

शिकारी स्त्री. १. शिकरी; रहाटाच्या माळेला लोटा बांधावयाचा दोर वा दोरी. २. पहा : **शिकारणी.** ३. आंबे किंवा नारळ उतरावयाची टोपली. ४. नारळाच्या झाडावर चढण्यासाठी केलेला दोरीचा पायंडा. [सं. शिक्य]

शिकारोखा पु. वर्चस्व; अधिकार; स्वामित्व.

शि(शं)काळणे उक्रि. १. शिंके करणे; शिंक्याला लावणे (भांडे, टोपली इ.). २. लोंबत असणे, राहणे (एखाद्याचा धंदा, वृत्ती सोडून).

शिकी स्त्री. (नाविक) १. गलबताचे शीड गुंडाळून काठीस बांधण्यासाठी शिडास जोडलेला दोरीचा तुकडा. २. शिडाची गुंडाळी; घडी.

शिकीळे न. चिमणी. (को.)

शिकेक(का)ई स्त्री. एक प्रकारचे झाड व त्याच्या शेंगा. या शेंगांची पूड न्हाताना केस स्वच्छ करण्यासाठी वापरतात.
[ते. शिगा=बुचडा; क.काई=शेंग;सं.शिखा]

शिकोरा पु. स्त्री. खापराचे झाकण; खापराची पणती; चिकोरी.खापरी; (व., अहि.)

शिक्कल स्त्री. १. चेहरा; तोंड. २. बिशाद; हिकमत. ३. आकार; स्वरूप. [अर. शक्ल्]

शिक्का पु. १. नाण्यावरील छाप, चिन्ह, मुद्रा; ठसा. २. राजघराण्यातील राज्यकर्त्याचा छाप; राजमुद्रा; सरकारी मुद्रा; मोहोर. ३. शिक्क्याचा ठसा, उठाव. ४. कापडावरील, फळावरील, शरीरावरील खूण, चिन्ह, डाग, छाप. ५. अंगावर (देवी इ.) टोचलेल्याची खूण, व्रण. ६. नावाचा, अक्षरांचा छाप; (इं.) सील.

शिक्का–मोहोर पु. बायकांच्या बोटात घालण्याची अंगठी.[फा. शिक्का]

शिक्केकटा(ट्या)र स्त्री.१.(शिक्का आणि कट्यार या) राजचिन्हांबद्दलचा व्यापकार्थी शब्दप्रयोग; अधिकारचिन्हे; राज्याधिकाराची चिन्हे. २. (ग्राम्य) प्रेतापुढे तिकट्यावर विस्तव घालून नेले जाणारे मडके.

शिक्केदाणी स्त्री. सरकारी शिक्के ठेवण्याची डबी. हिला पुडे असून ही बहुधा चांदीची असते.

शिक्केनवी(नी)स पु. राजाचा शिक्का सांभाळणारा, शिक्का मारणारा अधिकारी; राजमुद्राधारी; मुद्राधिकारी. [फा.]

शिक्केबरदार पु. राजचिन्हे बाळगण्याकरिता नेमलेला अधिकारी.[फा.]

शिक्ची, शिक्केची पु. शिक्के करणारा.

शिक्य न. मेण; मधमाश्यांच्या पोळ्याचे मेण. [सं.]

शिक्री स्त्री. १. हौस; उत्सुकता. (व.) २. दहशत; धाक.

शिक्वा पु. तक्रार; कागाळी. [अर. शक्वा]

शिखर न. १. डोंगराचा किंवा पर्वताचा माथा, शिरोभाग; झाडाचा शेंडा; देवालय, घर इ. चा शिरोभाग. (सामा.) वरचे अग्र, टोक, कळस. २. सुळका; मनोरा. ३. (ल.)(मोठेपणा, सद्गुण किंवा दुर्गुण यांचा) अतिरेक; पराकाष्ठा; कमाली. ४. (ल.) (व्यवहाराचा) शेवट; अखेरी. ५. (संगीत) एका तालाचे नाव. (वा.) **शिखरास हात पोचणे–** कृतकृत्य होणे; मनोरथ पुरतेपणी सफळ होणे; महत्त्वाकांक्षा तृप्त होणे. **शिख(क)रापुरीस जाणे –** (विनोदाने) 'ग'ची, अतिशय गर्वाची बाधा होणे. **शिखरी काठ्या लागणे–** (जेजुरी किंवा मढी येथे खंडोबाचे भक्तगण उंच काठ्यांना पताका लावून वाजत–गाजत जाऊन खंडोबाच्या देवळाच्या शिखराला सदर काठ्या लावतात. यावरून ल.) हाती घेतलेले काम शेवटास नेणे; ध्येय, उद्दिष्ट गाठणे; कृतकृत्य होणे. **शिखरी पोट लागणे–** (आकंठ भोजन, पान, रोग किंवा गर्भारपण यांमुळे) पोट वाढणे, फुगणे.

शिखरक न. खड्ग; तलवारीचा एक प्रकार.

शिखर(रा)मणि पु. पहा : **शिरोमणी**

शिखरिणी स्त्री. एक वृत्त.चरणात अक्षरे १७. गण य, म, न, स, भ, ल, ग.

शिखरी वि. कळसाचा; शिखर असलेला (पर्वत, डोंगर). [सं.]

शिखंड पु. १. मोराचे शेपूट; मयूरपुच्छ. २. मोराच्या डोक्यावरील तुरा. ३. लहान मुलाच्या डोक्यावरचे जावळाच्यावेळी राखलेले दोन्ही बाजूंचे कल्ले; झुलपे. [सं.]

शिखंडी पु. मोर. [सं.]

शिखा पु. पावसाची लहान सर.(व.) [सं.सिच्]

शिखा स्त्री. १. शेंडी. २. केसांचा झुबका; डोक्यावरचे केस (कोंबडा, मोर इ.च्या); (सामा.) तुरा; शेंडी. ३. घोड्याच्या डोक्यावरचा तुरा; कलगी. ४. अग्नीची ज्वाळा; दिव्याची ज्योत . ५. पीडा; छळ. [सं.]

(वा.) ० **मागे लागणे**– काही तरी त्रास, आपत्ती यांनी एखाद्याचा पिच्छा न सोडणे.

शिखानष्ट वि. १. शेंडी नसलेला. २. (ल.) मुसलमान; यवन.

शिखामणि–णी पु. १. मुगुटातील मणी. २. उत्तम जातीचे रत्न.

शिखावल पु. अग्नी. [सं.]

शिखासूत्र न. शेंडी व जानवे. [सं.] (वा.) **शिखासूत्रावर येणे**– (शिखा व यज्ञोपवीत तोडून टाकण्याची तयारी करणे.) अत्यंत क्रोधाविष्ट होणे.

शिखिनी स्त्री. लांडोर.

शिखी वि. १. शेंडी, तुरा असलेला (पक्षी इ.). २. शिखरी.

पु. १. मोर. २. अग्नी : 'शिखी स्थापिला दाटला धूम्र व्योमीं। जपे रावणूं मंत्र व्हाया अरामी।'– मुरायुद्ध २८७. [सं.]

शिग स्त्री. धातूची सळई.

शिगडी–री, शिगा स्त्री. पु. नारळाच्या झापाचे किंवा पातीचे टोक (को.)

शिग(गा)र न. चोई; पत्रावळ लावण्याच्या बारीक काड्या प्रत्येकी.[शीग]

शिगरी स्त्री. १. कोवळा मोड; अंकुर; मिटलेल्या पानाची सुरळी. २. भांडे ठेवण्याचे, नेण्याचे दोरीचे शिंकाळे.

शिगानशीग क्रिवि. थोडीसुद्धा जागा शिल्लक न ठेवता.

शिगाला पु. मांजराच्या तोंडासारखे तोंड असणारा मासा.

शिगाव पु. साग. (माल.)

शिगाळी स्त्री. एक प्रकारचा हलक्या प्रतीचा मासा.

शिगोशीग, शिगोर अ. अगदी भरून; सांडेतोवर.

शिग्राम पु. धमणी; बैलाची गाडी; विशिष्ट आकाराची घोड्यांची गाडी.

शिग्रू पु. शेवगा. [सं. शेगुल; शिंग्रु]

शि(शे)घळ स्त्री. मुंडावळ; बाशिंग. [सं. शीर्ष+गल?]

शिजणे क्रि. १. पाण्यात उकळून मऊ होणे; उकळत असणे; रांधले जाणे. २. पक्व, तयार होणे. ३. त्रासणे; संताप होणे. ४. (ल.) विचारात असणे; घाटत असणे; तयार होत असणे. ५. चालणे; घडून येणे; उष्मा, उकाडा होणे. [सं. सिध्]

शिजदा पु. नमन; वंदन; जमिनीवर डोके टेकून वंदन. [अर. सिज्दा]

शिजवक न. भात, भाकरी असे शिजलेले पण उरलेले अन्न. (राजा.)

शिजाळू वि. लवकर शिजणारे (डाळ, अळू इ.).

शि(शिं)ट स्त्री. पक्ष्यांचा मल, विष्ठा. पहा : **शीट**

शिटकळ स्त्री. शिसारी.

शिटणे क्रि. १. विष्ठा टाकणे (पक्ष्यादिकांनी); मल थोडा पडत असेल तेव्हा लहान मुलासंबंधीही उपयोग करतात. २. घोडीने उनाड सुटून हलक्या प्रतीच्या घोड्यापासून मैथुन करून घेणे.

शिटवा पु. वटवाघळाची, पाखराची विष्ठा, शीट. (राजा.)

शिटा पु. शिंतोडा. पहा : **शिंट**

शिटाऊ, शिटाव,शिटवा वि. (ग्राम्य) १. एखाद्या मरतुकड्या घोड्यापासून झालेले (शिंगरू); शिटलेल्या घोडीपासून झालेला वाईटसाईट (घोडा इ.). २. (ल.) क्षुद्र, अकुलीन, हरामी इसमाबद्दल वापरावयाचा अपशब्द; छाकटा; हलकट; पाजी; हीन; नीच. ३. धूर्त; हुशार; लबाड; बिलंदर; सोदा अशा अर्थाने लहान मुलाबद्दल योजतात.

शिटावणे अक्रि. लबाड, लुच्चा बनणे; खोड्या करण्यास प्रवृत्त होणे; बिघडणे.

शिटी–ट्टी स्त्री. तोंडातून किंवा नळीतून हवा सोडून केलेला एकसुरी आवाज

शिटुक वि. चलाख; हुशार; चपळ; टिकाऊ. (को.)

शिट्टी–ट्टो पु. स्त्री. एक प्रकारचे भात. (गो.)

शिडकणे क्रि. सडकणे; काठीने, छडीने मारणे, बडवणे.

शिडकणे, शिडकावणे उक्रि. शिडका टाकणे; शिंपडणे; शिंपणे. [हिं. छिडकना]

शिडका वि. चिडणारा; चिडका. (तंजा.) [द्रा. सिडुकु]

शिडकाव–वा शिडका; छिडकाव; शिंपडा. [हिं. छिडकाव]

शिडशि(शी)ड, शिडशिडी क्रिवि. १. हा हा म्हणता येऊन, पडून (पावसाने).२. तिरसटपणाने, चिडीने (बोलणे, वागणे, हडहड, छिटफिट, हिडीसफिडीस करणे). [ध्व.]

शिडशिडा वि. १. थकलेला. २. खिळखिळा. (व.)

शिडशिडीत वि. (प्र.) सडसडीत. १. सडपातळ; कृश; पातळ शरीराचा. २. मोकळा व रुक्ष (शिजवलेला भात वगैरे); फडफडीत. (राजा.)

शिडंब पु. एक जंगली झाड.

शिडा, शिडासाटा वि. सडा. (राजा.) पहा : **सडासाटा**

शिडाइती वि. कलम लावून झालेले; कलम केलेले (आंबा इ. झाड).

शिडाईत न. कलम; पैवंद.

शिडी–ढी स्त्री. १. दोन लांब उभ्या लाकडांना मध्ये–मध्ये आडवी लहान लाकडे जोडून उंच चढण्यासाठी बनवलेले साधन; पायऱ्या; निसण. २. सोपान; जिना; दादर. [सं. श्रेढी]

शि(शी)ण बांधा.

शिण(णी,न)क स्त्री. चमक; ठणका; तिडीक; कळ; वेदना (हात, पाय इ. अवयवांतून निघणारी). (क्रि. उठणे, निघणे).

शिणकणे क्रि. ठणकणे; ठणका लागणे; शिणकांनी व्यथित होणे.

शिणगार, शिणगारणे, शिणारणे पु. पहा : **शृंगार**

शिणणे अक्रि. १. थकवा, शीण येणे; दमणे; थकणे; भागणे; श्रमणे. २. त्रास घेणे; श्रम करणे; कष्टणे.

शिणत शिणत क्रिवि. अतिशय काकुळतीने.

शिणवटा, शिणोटा पु. अतिशय शीण; थकवा; ग्लानी; भागवटा; अशक्तपणा. (क्रि. येणे, होणे.)

शिणा पु. छातीच्या हाडांना लपेटलेला मांसल भाग; छातीचे मांस.

शिणा(ना)रणे अक्रि. शीण येणे.

उक्रि. १. शीण, चीण, चीर भरणे; फटी बुजवणे. २. चिणणे; दारात दगड वगैरे घालून पक्के करणे; खांब वगैरे जमिनीत चिपा घालून घट्ट बसवणे.

शितम पु. खाडीतील एक जातीचा लहान, पांढरा मासा.

शितर–री न. स्त्री. लहान झोपडे; छायेकरिता केलेले छप्पर.

शित(ता)रणे उक्रि. पहा : **चितरणे** [सं. चित्र]

शि(शिं)तरणे क्रि. छिनाविणे; फसवून नागविणे. [सं. श्वर्त]

शितरपाड वि. चपळ; चलाख; तीक्ष्ण; हुशार; तडफदार.
शितरी स्त्री. निरगुडीची विणलेली झाप, टोपली. (अहि.)
शितरे न. बांबूच्या तट्ट्या; चटई (गाडीतील सामान बाहेर पडू नये म्हणून लावण्यात येणारी). (खा.)
शितळचंद वि. मद्दड; मठ्ठ; रेंगाळणारा; सुस्त (मनुष्य).
शितळचिनी स्त्री. एक झाड; कंकोळ.
शितळपाटी स्त्री. शीतला झाडापासून केलेली मऊ, गार चटई.
शितळशिमगा पु. १. शिमगी पौर्णिमेच्या पुढील दिवस; धुळवडीचा दिवस; होळी थंड करण्याचा दिवस. २. शिमग्यामध्ये (वसंतपंचमीस) गाठ्या, बसंती रंगाची आंगडी-टोपडी मुलास द्यावयाचा सण.
शितळाई स्त्री. थंडपणा; थंडावा. [सं.शीतल]
शितळान स्त्री. सूर्य उतरू लागणे; ऊन कमी होणे; शितळाई.[सं. शीतल]
शिता पु. स्त्रियांचा केसांचा भांग; भांगातील उभी रेघ. (को.) [सं.सीता=नांगराचे तास]
शिताप-पी-फ न. कौशल्य; चपळाई. [फा. शिताप्]
शिताफळ-ळी स्त्री. एक फळझाड. पहा : **सीताफळ** न. त्या झाडाचे फळ. [सं. शीतफल]
शिताब वि. १. चपळ; चलाख; तडफदार. २. उत्साही; हौशी; कळकळीचा. [फा. शिताब्]
शितिकंठ पु. १. मोर. २. शिव; शंकर. [सं.]
शिती स्त्री. एकविटी भिंत; पडभिंत; पडदी.
शिथड स्त्री. (विणकाम) हातमागाचा एक भाग; शीत; ओवीच्या बाहेर सांधेच्या शेवटी असणारी आडवी दोन लाकडे.
शिथिल वि. १. सैल; ढिले; मजबूत, बळकट नसलेले. २. नेभळट; मंद; मठ्ठ; निरुत्साही; निर्बल. [सं.]
शिद(दी)ड-शिदोड पु. गांडूळ; काडू.
शिद(र)लाडू पु. अव. कणकेत गूळ घालून त्यांचे उकडून केलेले लाडू.(व.) पहा : **सिद्धलाडू**
शिदी-द्दी पु. ॲबिसीनियातील रहिवासी; हबशी; हबसाण देशाचा; सिद्दी.
शिदो(धो)री स्त्री. १. शेतात जाताना, वाटेत खाण्यासाठी गाठोड्यांत बांधून घेतलेले अन्न; प्रवासात बरोबर घेतलेले खाद्यपदार्थ. २. चातुर्मासात बायकांनी ब्राह्मणांना दान दिलेला शिधा, अन्नपाणी. ३. पुण्य संपादण्यासाठी परक्या मुलाला दिलेले अन्नपाणी. ४. गुराखी, मजूर शेतात किंवा कामावर बांधून नेतात ते अन्न. [सं. सिद्ध]
शिधा पु. १. स्वयंपाकासाठी लागणारे सामान; पाकसाहित्य (तांदूळ, डाळ, पीठ, तेल,तूप इ.). २. एक दिवसाच्या भोजनास लागणारे सामान. [सं. सिद्ध]
शिधापत्रिका स्त्री. ज्या पत्रिकेच्या साहाय्याने सरकारी नियंत्रित दुकानाद्वारे ठरावीक परिमाणाने धान्य मिळते अशी पत्रिका;(इं.) रेशनकार्ड.
शिधोट वि. १. सरळ व लांब जाणारे (नदी, पर्वताची रांग इ.). २. (ल.) प्रांजळ; प्रामाणिक : 'गुणी राजाचे शब्द शिधोटे।'- ऐपो २२७. [हिं. सीधा]
शि(शी)न पु. आजारानंतर ओठावर उभरणारी लस. (अहि.)
शिनजोड स्त्री. बरोबरी; सामर्थ्य.
शिनसाल-ळ स्त्री. जुनी साल. [सं. शीर्ण+छाल]
शिनहाळ वि. विधवा; गतवधा; पतिरहित.
शि(शिं)नळ व यापासून सुरू होणारे शब्द शिंदळ इ. मध्ये पहा.
शिना वि. निराळा. [सं. शीर्ण]
शिनाजोरी स्त्री. धैर्य; सामर्थ्य; धाडस; ताकत. [फा. सीना-झोरी]
शिनारणे उक्रि. ठोकून पक्का करणे (खांब इ.). (व.)
शिनास १. हुशार. २. अकील. ३. धाडस.
शिनीसाफ वि. निर्दोष; निष्कलंक. (व.)
शिनु(बु)टले न. शिपतर; टोपले; परडे; शिबोळी. (को., कु.)
शिनेल न. चिरा. (कु.)
शिप(ब)का पु. १. हपका; तडाखा; हबका; पाण्याचा पातळ पण जोराचा मारा. २. शिंपणी; सडा. [सं. सिच्]
शि(शिं)पट-टी-टे न. १. पोफळाचा तुरा; लोंगर. २. पोफळाचा घड. (को.)
शिपटणे क्रि. काठीने, छडीने, फोकाटीने मारणे.
शिपटी स्त्री. फोकाटी; शिरडी; फोक; छडी; बारीक काठी.
शि(शिं)पतर न. कळकाच्या चिपटांची केलेली पसरट परडी; उथळ टोपली.
शिपर स्त्री. ढाल. [फा. सिपर्]
शिपा पु. मोठ्या माशाचे तेल.
शिपाई पु. १. सैन्यातील सैनिक; योद्धा. २. पट्टेवाला; चपराशी; हरकारा; जासूद; चाकर. ३. (ल.) वाद, तंटा, अडचणीचे प्रसंग इ. वेळी धीटपणे पुढे होऊन तोंड देणारा माणूस. [फा. सिपाही]
शिपाई पु. १. पालखी, डोली इ. ची दांडी; गाडी, दिवटी इ.कांस आधारभूत कैचीसारखी उभी करण्याची लाकडी घोडी. २. एक पक्षी.
शिपाईगिरी स्त्री.१. शिपाइकी; शिपायाचा धंदा. २. (ल.) क्षात्रधर्म; शौर्य; मर्दुमकी.
वि. शिपायासंबंधी; लष्करी; सैनिकासंबंधी. [फा. सिपाहगरी]
शिपाईशाई स्त्री. लढवय्यांचे मंडळ; शूर लोक.
शिपायडा-डे, शिपुरडा पु. न.(निंदार्थी) शिपाई.
शिपा(फा)र स्त्री. १. गलबतास खालून पाण्याचा उपद्रव होऊ नये म्हणून केलेला डांबर, रोगण इ.चा लेप. २. हा लेप लावण्याची क्रिया.
शिपिला वि. पोटाखाली पुढीलभागी तंगापाशी भोवरा असलेला (घोडा).
शिपिस्ता पु. पहा : **बाळ आंबा**
शिपोटी स्त्री. पोटाचा वरचा शिंपेसारखा भाग; शिंपा.
शिप्पा पु. संधान. (ना.) [हिं. सिप्पा]
शिफटे न. सुपारीचा घड. (कु.) पहा : **शि(शिं)पट**
शिफारस स्त्री. १. (दुसऱ्याजवळ केलेली) तारीफ; प्रशंसा; गुणगौरव. २. वशिला; तारीफपत्र; हिमाईत. ३. प्रशंसा करण्यालायक कृत्य. [फा. सिपारिश्]
शिफारशी वि. आश्रय दिलेले; वशिल्याचे; हात दिलेले; उचलून धरलेले.
शिफारशी तट्टू स्वत:च्या गुणावरून नव्हे, तर केवळ वशिल्यामुळे पुढे

आलेला मनुष्य.

शिफ्ला वि. नीच; हलकट. [अर. सिफ्ला]

शिबरा पहा : **शिमरा**

शिबरी वि. स्त्रीलंपट; कामी. (कु.)

शिबरी करणे (बैलाने) गाईचे मलमूत्र हुंगून उन्मादित, विकारयुक्त होणे.

शिबला पु. (चांभारी) खापराचे आडवे लांबट व मोठे कुंड.

शिबंदी स्त्री. कागदाचे एक पान (विशेषत: दौलताबादी); (इं.) हाफशीट.

शिबंदी स्त्री. अनियमित शिपाई; वसुलीच्या कामासाठी, किल्ले, शहरे, परगणे इ. च्या रक्षणाकरिता व बंदोबस्ताकरिता ठेवलेली फौज; हंगामी, विशिष्ट कामासाठी ठेवलेली फौज. [फा.सिहबंदी]

शिबाड स्त्री. न. ग़लबतातील एक प्रकार; मोठा मचवा; सुवाल्यापेक्षा मोठी होडी.

शिबाळी–ळे स्त्री. १. उकळत्या रसावरील मळी काढण्यासाठी कळकाच्या दांडीला लावलेला शिपतरवजा झारा; गुऱ्हाळात कढत रस गाळण्याची गाळणी. २. आंबे वगैरे फळे झाडावरून उतरण्यासाठी टोकाला जाळीची टोपली बांधलेली लांब काठी; झेला.(कु.)

शिबिका स्त्री. पालखी. [सं.]

शिबिर न. १. रणांगणावर असताना लष्करी तळावरील राजा, सेनापती इ.कांचे निरनिराळे गोट. २. सैन्याची छावणी; तळ. ३. (सामा.) तंबू. ४.इंग्रजी कॅम्प याचा प्रतिशब्द. [सं.]

शिबुटले न.टोपले; परडे. (को.)

शिबे न. जाळे; घोसाळे किंवा दोडका निबर झाला असता त्यात होणारे तंतुमय जाळे.

शिबे न. १. एक सौम्य कुष्ठरोग; त्वचारोग. २. मनुष्याच्या अंगावर उठणारे पांढरे, हिरवे डाग.

शिबे न. १. मध्ये खोलगट असणारे वेळणी, तसराळे इ. भांडे. २. चाळणी; रोवळी. ३. भाताची पेज गाळण्याचा बांबूचा झारा. (हेट.) ४. पहा : **शिबाळी–ळे** १

शिबेमांड स्त्री. भात वेळतेवेळी मडक्याच्या तोंडावर धरावयाची लाकडी फळी. (कु.)

शिबोळी स्त्री. लहान पाटी; शिपतर (कु.)

शिमगा पु. १. होळीचा सण; होळीचे दिवस. २. फाल्गुन महिना. ३. (ल.) अश्लील, अचकट विचकट बोलणे, भाषण. ४. गोंधळ; कल्लोळ. [सं. शृंगार] (वा.) **शिमग्याचा मंत्र जपणे, म्हणणे, वाचणे; ० करणे–** निंदा करणे; एखाद्याच्या नावाने शिव्या देणे.

शिमग्याचा सण १. वधूपक्षाने वरास बोलावून शिमग्याचा सण साजरा करणे. २. या सणात विशेषत: रंगपंचमीस दिलेला अहेर, बहुमान.

शिमटी स्त्री. शिपटी; फोक; झाडाची फांदी; छडी.

शिमधडो पु. सीमेची हद्द. (कु.)

शिमधड्या, शिमशेजारी पु. शीवशेजारी; शिवेवरचा शेजारी.

शिमरा वि. १. नकटा (मनुष्य): 'नागवी मांथां मोत्याची जाळी। शिमरी सुपाणी दाणा ल्याली।'– एभा ३.३.९३. २. बसकट; विशोभित (नाक). (को.)

शिमाल पु. उत्तर. [अर.]

शिमेळ न.ताशांसारखे, दोन काड्यांनी वाजविण्याचे वाद्य. (गो.)

शिया पु. एक मुसलमानी धर्मपंथ.

शियारी स्त्री. शहारे; कापरे : 'परी येतुलियाही वेगळा। जो केवळ आनंदैक कळा। तया अंतरात्मयाही निश्चळा। शियारी आली।'– ज्ञा ११.३६९. [सं. सीत्कार; शिशिर]

शियाळ पु. कोल्हा. [सं. शृगाल]

शियाळे न. कोवळा नारळ; शहाळे. (गो.)

शिर न. १. डोके; माथा; मस्तक; शीर्ष. २. झाडाचा माथा; शेंडा; टोक. ३. सैन्याची आघाडी; बिनी. ४. डोई; व्यक्ती; घोड्यांची संख्या मोजताना वापरली जाणारी संज्ञा. [सं. शिरस्] (वा.) **०हातावर घेणे–** १. धाडसाचे काम करण्यास सिद्ध असणे; अत्यंत शूर असणे. २. जिवावर उदार होऊन एखादे कार्य करण्यास उद्युक्त होणे; जिवाकडे न पाहणे. **शिरावर उभे राहणे, जागे राहणे; शिरावर–शिरी असणे–** एखाद्याच्या संरक्षणासाठी, कल्याणासाठी तत्पर असणे; पाठ राखणे : 'श्रीरामा तूं स्वामी अससी माझ्या शिरावरी जागा।'– मो केकाआर्या. **शिरावर घेणे, शिरी भार वाहणे –** (एखादे कार्य) जबाबदारीने स्वीकारणे, पत्करणे.

शिर, शिरा स्त्री. नाडी; नस. पहा : **शीर** [सं. शिरा]

शिर स्त्री. फास; पेच. (कु.)

शिर, शिरा वि. चांगले; उत्तम; सुरेख. [अर. शिरा]

शिर उद्गा. शुकशुक; मांजरास हाकलण्यासाठी केला जाणारा आवाज. [ध्व.]

शिरई पारिजात. (अहि.)

शिरकणे क्रि. लोकर किंवा कापूस साफ करणे, निवडणे, कचरा व सरकी काढून स्वच्छ करणे. (राजा.)

शिरकणे अक्रि. १. घुसणे; शिरणे; प्रवेश करणे; (विरोध, अडथळा दूर करून) वाट करून घेणे. २. हाती लागणे; सापडणे : 'देव उठावले झुंझारी। परी अमृत शिरकलें असुरकरीं।'– मुआदि ४.१२५.[सं. श्रिक्]

शिरकंबा पु. १. पडसे. २. पडशामुळे डोके दुखणे. (ना.)

शिरका, शिर्का पु. आसव; अम्लासव : 'करवंदाचा शिरका–शूल व पाणथरीची वाढ यावर फार लाभदायक आहे.'– फलाहार चिकित्सा. [फा. शिर्का]

शिरकाटणे क्रि. प्रवीण होणे; गती होणे; प्रवेश होणे. (व.)

शिरकाण न. १. शिर्के आडनावाच्या लोकांचा प्रदेश, मुलूख. २. शिर्क्यांचे निर्मूलन. ३. सत्यानाश; नायनाट; समूळ उच्छेद . [सं. शीर्ष+खंड]

शिरकाव पु. रिघाव; प्रवेश; वाट.

शिरकी स्त्री. सरकी; कापसातील बी.

शिरकुटी स्त्री. शिमटी. पहा : **शिपटी**

शिरके न. शिंकाळीचा हातात धरण्याचा भाग, मूठ, कडी.

शिरगणती स्त्री. खानेसुमारी; जनगणना.

शिरगीर स्त्री. कोंबड्याच्या डोक्यावरील तुरा.

शिरगोम वि. कपाळावर गोमेच्या आकाराचे केस असलेला (घोडा).

शिरगोळा पु. रांगोळीचा दगड.

शिरघोसाळी–ळे स्त्री. न. दोडक्याचा वेल व फळ; दोडका. पहा : **शिराळी–ळे**

शिरचष्मा, शिर्चष्मा पु. १. (डोके व डोळा) लावणीतील प्रियजनांविषयीची संज्ञा; प्रियजन; प्रियकर. २. झरा. [फा. सर्चश्मा]

शिरच्छेद पु. डोके उडवणे; वध.(क्रि. करणे, होणे.) [सं.]

शिरजोर, शिर्जोर वि. १. हेकट; हेकेखोर; तिरसट; हट्टी; ढोंगी. २. खलेल; उर्मट; अवखळ. ३. डोईजड; वरचढ. [फा. सर्झोर]

शिरजोरपणा, शिरजोरी पु. स्त्री. १. हेकटपणा; हेकेखोरपणा; तिरसटपणा. २. दांडगेपणा; वरचढपणा; बंडखोरी.

शिरट–टी–डी न. १. बारीक छडी; फोक; शिरे; डाहळी; फांदी. (गो., को.) २. पोफळीचे शिंपूट.

शिरटांवचे क्रि. छडी मारणे. (गो.)

शिरटोप पु. १. कानटोपी; माकडटोपी; घरात घालण्याची टोपी; टोपडे; टकोचे. २. शिरस्त्राण.

शिरड–डे स्त्री. न. पाला झडलेल्या शिऱ्यांचा समुदाय; काट्याकुट्यांचा भारा; झाडाची साल. पहा : **शिरे**

शिरड स्त्री. चिरड; चीड.

शिरडी वि. चिडखोर : 'भीम विवेकी भला, न तो शिरडी।'– मोविराट १.१५७.

शिरडी स्त्री. तांदळाची एक जात, प्रकार.

शिरडी स्त्री. चिरडी; लहान मुलींचे नेसावयाचे वस्त्र. [सं. चीर]

शिरणी स्त्री. एक त्वचारोग. (ना.)

शि(शी)रणी नजर.

शिर(व)णी स्त्री. १. खिरापत; प्रसाद. २. काप; फोड; तुकडा (प्रसादाचा).

शिरणीगार, शिर्णीगार पु. शेरणीगार; हलवाई.

शिरणे अक्रि. आत जाणे. पहा : **शिरकणे**

शिरताज, शिर्ताज पु. डोक्यावरचा एक दागिना; मुकुट. [फा. शिर्ताज]

शिर(रो)ती स्त्री. केळीचे कापलेले, टोकाकडचे पान; आगोतली. (कु.,गो.) [सं. शिरस्, शीर्षवर्ति]

शिर(री) द न. एक माप; पावशेर; चिपटे.

शिरदाली स्त्री. लगामाचा मुख्य भाग; सरदारी; मोहोरकी. [फा. सर्दवाल्]

शिरदोख पु. बुरखा : 'कासे कासयला शिरदोख कशिला।'– वसा १३१. [फा.]

शिरधाया पु.दूध पाजण्यासाठी ठेवलेली दाई.

शिरप न. पायास किंवा अंगास लागणारा धस; ठोंब.

शिर(रो)पाव, शिर्पाव पु. १. राजा किंवा सरदार यांनी कृपावंत होऊन दिलेले पागोटे, पायघोळ अंगरखा, वस्त्र इ. बहुमानाचा पोशाख : 'मान पान, टिळा विडा व सिरपाव...'– वाडबाबा ३४.१५. २. जमाबंदीचे कतबे होण्याच्या वेळचा देशपांडे इ.चा हक्क. [फा. सरोफा]

शिर(ल)पुट–टी स्त्री. बारीक वाळलेली काटकी; शिपटी; बारीक डहाळी; छडी; फोक.

शिरपुटणे क्रि. काठीने, छडीने, फोकाटीने बडवणे, मारणे.

शिरपेच पु. पागोट्यात खोवण्याचा जडावाचा मोत्यांचा तुरा; एक अलंकार. [फा. सर्पेच]

शिरफिरेल वि. माथेफिरू; तापट.

शिरफोड्या वि. भिक्षा मिळविण्यासाठी डोक्यावर हाणून घेणारा, डोके फोडून घेणारा (भिकारी); भिकाऱ्यांची एक जात; त्यातील व्यक्ती.

शिरबंद, शिर्बंद, शिर्बस्ता पु. पागोटे; पगडी. [फा. सर्बन्द्]

शिरबारणे क्रि. गर्वाने फुगणे; शेफारणे. (बे.)

शिरभारी स्त्री. डोक्यावर वाहून नेण्याजोगे ओझे.

शिरयाणी पहा : **शिराणी**

शिर(रि)याळे न. डोक्याचा आधार; डोक्याची बैठक : 'उभऊनि करतळें। पडिघाये कपोळे। पायाचे शिरियाळें। मांडूं लागे।'– ज्ञा १४.१८५.

शिरलट न. केस.

शिरवत न. १. डोंगरमाथ्याची जमीन. २. या जमिनीवरील सारा. (को.)

शिरवती न. (कु.) पहा : **शिरती**

शिरवळ पु. स्त्री. पहा : **शिरोळ**

शिरवा पु. थोडाच वेळ पडलेला जोराचा पाऊस; शिडकावा. (व.)

शिरवाळ स्त्री. मळभ; ऊन पडले असता मध्येच ढगाआड होण्याची सूर्याची स्थिती. [सं. शिशिर+वेला]

शिरवाळ्या स्त्री. अव. एक पक्वान्न. शेवयांसारखा एक खाद्यपदार्थ. (कु.)

शिरशिरणे क्रि. थंडीने कुडकुडणे; थरथर कापणे; शिरशिरी येणे.

शिरशिरी स्त्री. न. थरथरणे; हुडहुडी; हीव; कापरे.

शिरशिला पु. वहिवाट; प्रघात. पहा : **सिलसिला**

शिरशी स्त्री. दांदोळी; शिरसासारखे एक भाजीचे झाड. [सं. सरसु]

शिरशी–स–सु, शिरीस पु. एक प्रकारची मोहरी; अठरा उपधान्यातील एक धान्य. [सं. सर्षप]

शिरस पु. शिरीष वृक्ष. (कु.) [सं. शिरीष]

शिरसावंद्य–धार्य–मान्य वि. अतिशय पूजनीय; आदरणीय. [सं.]

शिरस्ता पु. चाल; रीत; पद्धत; नियम; दंडक; वहिवाट. [फा. सरिश्ता]

शिर(रि)स्तेदार पु. १. जिल्ह्याचा एक अधिकारी; मुलकी अधिकारी. २. न्यायकचेरी; मामलत; कचेरी इ. तील मुख्य कारकून.

शिरस्तेवाईक वि.क्रिवि. रूढ; शिरस्त्याचे; ठरावीक पद्धतीप्रमाणे; नेहमीप्रमाणे.

शिरस्त्राण न. डोक्याचे रक्षण, आच्छादन करणारे टोपी, पागोटे इ. टोप; जिरेटोप. [सं.]

शिरळक स्त्री. १. पहा : **शि(सि)लक.** २. सल; धस. (क्रि. भरणे, जाणे, शिरणे.)

शिरळक पहा : **शिलका**

शिरळक स्त्री. शीळ; शिटी. [ध्व.]

शिरळी समई (ओतकाम) जाड व फुगीर खांब असलेली समई.

शिरा पु. सीमा; मर्यादा; कड; हद्द; गावची हद्द. [सं. शिरस्]

शिरा पु. १. रवा तुपात भाजून नंतर त्यात गूळ अथवा साखर घालून केलेले पक्वान्न; गोड सांजा. २. पाक; औषधी रांधा. ३. अर्क; सत्त्व;

काढा. ४. रेवाचिनी; ज्येष्ठमध. ५. खजुराच्या अंगचा साठविला जाणारा द्रवांश.५.काळ्या खजुराची एक जात.

शिरा वि. उत्तम; उत्कृष्ट; सुरेख; छानदार; चांगले.

शिरा पु. उखळ. (तंजा.)

शिरा स्त्री. नाडी; रक्तवाहिनी; नस. पहा : **शीर** [सं.] (वा.) **०ताणणे–** जोराने, मोठ्याने बोलणे; वाद घालणे; रागाने बोलणे. **० तोरा असणे–** एखाद्याच्या वरचढ असणे; एखाद्याचा अधिकारी असणे. **०निघणे–** अशक्त होणे. **० लावणे,दाखविणे,मिरविणे–** शेखी मिरवणे; वरचढपणा गाजविणे.

शिराई स्त्री. केरसुणी.

शिराजणे अक्रि. शोभणे; सुंदर दिसणे; विराजणे : 'नागबंद झळके कटितटी। मणि शिराजे।'– कथा १.१.११. [सं. सु+राज् इ.]

शिराजी वि. १. शिराजचे; शिराजसंबंधी (मद्य). २. एक प्रकारचे कबूतर.

शिरा(रां)टा पु. शिऱ्यांचा, काटक्यांचा खराटा. (को.)

शिराड न. १. काटेरी फांदी. २. तोडलेल्या झाडाची सुकलेली फांदी. पहा : **शिरड**

शिराडा पु. चुराडा : 'यदुवंती केला कीर्तीचा शिराडा।'– राला ४६.

शिराणी स्त्री. १. अपूर्वत्व; दुर्मीळता; अलभ्यत्व; थोर लाभ; दुर्लभता : 'तया ब्रह्मसुखाची शिराणी।'– विपू ५.७. २. आनंद; सुख; समाधान; विशेष आवड; उत्कट इच्छा; कौतुक : 'आणि पुत्रें मी सर्वगुणीं। जिणावी हे बापा शिराणी।'– ज्ञा १८.१६५२. ३. महत्त्व; मातबरी; किंमत: 'इतरांची ठेविना शिराणी।'– ऐपो २१८. [सं. शिरस्]

शिरामे न. जनावरांच्या तोंडाचे कातडे; टाळके.

शिरालपक्ष पु. किड्यांचा एक वर्ग. या किड्यांच्या पंखास शिरा असतात.

शिरावळ पु. स्त्री. पहा : **शिरोळ** किंवा **शिळावेळ**

शिराळ वि. १. ज्याच्या शरीरावर किंवा बाह्यांगावर शिरा उठून दिसतात असा (इसम, पदार्थ); मोठ्या, फुगीर शिरा असलेले शरीर. २. रेखांकित; पट्टेदार.

शिराळ न. मळभ.पहा : **शिरवाळ**

शिराळशेट पु. १. विशेषनाम. दुर्गादेवीच्या दुष्काळात अनेक लोकांचे प्राण वाचविणाऱ्या एका वाण्याला साडेतीन घटका विजापुरास राज्य करण्याची संधी मिळाली. तो राजा. २. (ल.) रंगेल; चैनी; कोणतीही ददात नसणारा इसम.(वा.) **शिराळशेटचे राज्य** – क्षणभंगुर ऐश्वर्य, वैभव; अल्पकालीन पण वैभवयुक्त सत्ता; पाण्यावरचा बुडबुडा.

शिराळी स्त्री. १. शिराळ दोडकीची वेल. २. एक रानवेल.

शिराळे न. दोडका; एक फळभाजी.

शिरिशिरी स्त्री. पावसाची भुरभुर; बारीक तुषारयुक्त पाऊस. [ध्व.]

शिरी स्त्री. १. (हत्ती, घोडा इ.च्या) डोक्यावरील नक्षीचे, शोभिवंत कापड. २. हत्तीचे खोगीर नीट राहावे म्हणून घालावयाचे, दोहो बाजूस खारवे लावलेले बुरणूस.

शिरी स्त्री. शोभा; श्री. (गो.) [सं. श्री]

शिरी न. बांबूच्या काड्यांचे केलेले मासे धरण्याचे जाळे.

शिरीम न. एक प्रकारचे कुष्ठ, कोड; अंगावरील पांढऱ्या डागांचा रोग.

शिरीष पु. एक सुवासिक फुलझाड. [सं.]

शिरे न. १. काटेरी फांदी; कुंपणासाठी, मांडवावर घालण्यासाठी तोडून आणल्या जाणाऱ्या फांद्या; डहाळ्या. (कु.) २. प्रेतयात्रेहून परत येताना प्रेत परत येऊ नये म्हणून टाकले जाणारे काटेरी डहाळे.

शिरे न. बाजू; कड. (व.)

शिरेकचेरी स्त्री. प्रकट दरबार; भर दरबार.

शिरोग्रह पु. डोके धरणे; शिरोवेदना होणे (रोग, विकृती इ.ने); डोके धरणारा, डोक्यावर परिणाम करणारा (रोग इ.). [सं.]

शिरोदीप पु. अंधारात समोरचे दिसावे म्हणून वाहनांच्या पुढे बसवलेला प्रकाशझोत टाकणारा दिवा; (इं.) हेडलॅम्प.

शिरोबिंदू पु. (भूमिति.) अक्षाच्या समांतर टोक, कोन, बिंदू.

शिरोभाग पु. १. मानेपासूनचा वरचा भाग; डोक्याचा भाग. २. (एखाद्या समाजाचा, संघाचा) नायक; गुणात योग्यतेने उत्तम.

शिरोमणी पु. १. डोक्यावरील दागिना; मुगुटमणी. २. मुख्य, श्रेष्ठ इसम. उदा. संगीतशिरोमणी.

शिरोरेघा–खा स्त्री. देवनागरी लिपीत शब्दातील अक्षरे जोडण्यासाठी अक्षरांच्या वर काढलेली रेघ.

शिरोलेख पु. (वृत्त.) मथळा; मायना; शीर्षक; लेखारंभी लिहिलेले वाक्य; (इं.) हेडिंग.

शिरोस पु. चमकदार पांढऱ्या रंगाचा घोडा.

शिरोळ पु. स्त्री. थंड वेळ; शिळोपा.

शिर्पो पु. डुकराची आतडी. (गो.)

शिल पु. घोड्याचा एक रोग.

शिल न. कापणी केल्यानंतर शेतामध्ये सापडणारी कणसे. [सं.]

शिलक–ख स्त्री. बत्ती; सरबत्ती; फैर : 'त्या वेळेस इकडून दोन शिलका म्हणजे फैरा एका क्षणांत केल्या.'– मइसा ३.१९१. [अर. शल्क]

शिलक स्त्री. चमक; उसपा; लचक; कळ. (क्रि. मारणे)

शि(सि)लक स्त्री. चोय; पत्रावळी लावण्याची कामटीची बारीक काडी : 'सल सिलका आणि सराटे।'– दास ३.७.४. [सं. शलाका]

शिलक(ग)णे अक्रि. पेट घेणे; पेटणे; आग लागणे; चेतणे.

शिलका–की वि. शेलका; निवडक; उत्तम; सुंदर; वेचक (पदार्थ, वस्तू, वस्त्र, अलंकार इ.).

शिलका(गा)वण–णी स्त्री. १. पेटवण्याची, आग लावण्याची क्रिया. २. (ल.) साऱ्यासाठी तगादा करावयास पाठवलेल्या मनुष्याने स्वत:करिता जबरीने काही रक्कम घेणे. ३. अशा प्रकारे घेतलेली रक्कम. ४. मुदतीत काम न केल्यामुळे दररोज द्यावयाचा दंड. ५. वसूल केलेला पैसा जवळ ठेवल्याबद्दल, अफरातफर केल्याबद्दल द्यावयाचा दंड.

शिलकी वि. १. राहिलेला; बाकी; उर्वरित. २. संग्रहातील; जपून ठेवलेला; राखीव.३.जुना; विश्वासू; पिढ्यान पिढ्याचा (नोकर).

शिलकुंधा पु. कुंध्याच्या मधून-मधून कुठे-कुठे निघणाऱ्या शिलका, अंकुर.

शिलतास क्रिवि. दुथडी; एका तीरापासून दुसऱ्या तीरापर्यंत तुडुंब; पूर्णपणे भरून.

शिलदा पु. बैलाच्या शिंगाभोवती बांधलेली दोरी; कपाळावर लोंबणारा गोंडा.

शिलपट पहा : **शिळपट**

शिलवंत (प्र.) पहा : **चिलवंत**

शिलशिला–ल्ला पु. १. साखळी; सूत्र; रांग; ओळ. २. संबंध; परंपरा; वहिवाट; ऋणानुबंध : 'मोहबतजंग याजकडे वर्तमान कळविण्याचा शिलशिला जारी असावा.'– ऐलेसं ८.४३५०. [अर. सिलसिला]

शिलशिलाटा पु. ससेमिरा; छेडणे.

शिलंगण न. सीमोल्लंघन; दसऱ्याच्या दिवशी सीमेबाहेर जाण्याचा विधी. [सं. सीमोल्लंघन]

शिला–ळा स्त्री. १. मोठा दगड; पाषाण; खडक. २. पाटा; पदार्थ वाटण्याचा सपाट दगड. ३. उंबरा; उंबरठा. ४. शीळ. [सं.]

शिला पु. चिलखत; चिलखताचा भाग. [अर. सिलाआ]

शिलाई स्त्री. शिवणावळ; कपडे शिवण्याची मजुरी. [सं. शिल्प]

शिलाजित–जतु पु. एक औषधी वनस्पती.

शिलाण न. कापून, चिरून वगैरे तयार केलेली भाजी.

शिलाणे न. स्वभाव; वर्तन; वृत्ती; शील. [सं. शील]

शिलाधातू पु.ॲल्युमिनियमयुक्त पांढरी माती; एक प्रकारचा खडा.

शिलापुत्र पु. दगडी रूळ; चुन्याच्या घाणीचे चाक.

शिलावरण न. खडक व खनिजांनी बनलेला भूकवचाचा भाग.

शिलावर्त पु. घोड्याच्या गुडघ्यावरील भोवरा.– अश्वप १.९७. [सं.]

शिलारस पु. एक सुगंधी चिकट पदार्थ.

शिलालेख पु. दगडावर कोरलेली अक्षरे.

शिली स्त्री. झिली; भुंगरटी; मुरकुट.

शिलीमुख पु. बाण : 'निर्दय काम शिलीमुखविद्धहृदय राम पावला कंपा।'– मोरामायण १.२९. [सं.]

शिलेखाना पु. शस्त्रागार; शस्त्रास्त्रे, दारूगोळा ठेवण्याची जागा. [अर. सिलाह्खाना]

शिलेजोर पु. शस्त्रसामर्थ्य; शस्त्रास्त्रांचे बळ. [सं.सिलाह्+जोर]

शिलेटोप पु. जिरेटोप; शिरस्त्राण.

शिलेदार पु. हत्यारी; पदरचे घोडे घेऊन सैन्यात चाकरी करणारा. [अर. सिलाह्दार]

शिलेदारी स्त्री. शिलेदाराचा धंदा, चाकरी.

वि. १. शिलेदारासंबंधी. २. (ल.) गर्विष्ठ; ऐटबाज; नोकझोकाचा. ३. उधळ्या; बेताल; अनिर्बंध; स्वैर इ. ४. ढंग, ढोंग, डौल, रीत, चाल, बाणा, कारभार, बोलणे, चालणे, गोष्ट, आदर इ. शब्दांशी जोडून योजतात. उदा. शिलेदारी ढंग.

शिलेपाट पु. आगगाडीच्या रुळाखाली घालावयाचे लाकडी चौरस, आयताकृती ओंडे; (इं.) स्लीपर.

शिलेपोस–स्त वि. १. चिलखती; हत्यारबंद; कवचयुक्त : 'महागिरी शिलेपोस'– वाडसमा १.९. २. (ल.) तयार; सज्ज; सडा; मागे पाश नाही असा; विनापाश. [अर. सिलाह्+पोश]

शिलेपोस न. एक प्रकारचे जहाज.

शिलेमान, शिलेमणी पु. पहा : **शिवधातू**

शिलोच्चय पु. पर्वत.

शिलोञ्छवृत्ति–ती स्त्री. शेत कापून नेल्यानंतर जे धान्यादी कण राहतात ते वेचून त्यावर निर्वाह करण्याची वृत्ती.

वि. अशा वृत्तीने राहणारा (तपस्वी, मुनी). [सं.]

शिलोत(त्त)रा–री, शिलोत्री पु. स्त्री. १. जमिनीच्या इजारदाराने खंडकाराकडून घ्यावयाचा हक्क (सामान्यत: एका बिघ्यास एक मण). २. पहा : **शिळोत्तरी**

शिलोतरीदार पु. शिलोतरी हक्काचा मालक. [सं. शिला+उत्तर]

शिल्प न. कोणतेही कलाकौशल्याचे, कुसरीचे, यांत्रिक वगैरे काम; हुन्नर; कला; हस्तकौशल्य. (प्रामुख्याने मूर्तिशिल्प व वास्तुशिल्प). [सं.]

शिल्पकला स्त्री. कलाकौशल्यासंबंधी शास्त्र, ज्ञान.

शिल्पकार, शिल्पी, शिल्पिक पु. दगडावर कोरीव काम करणारा; यंत्रशास्त्रज्ञ; कलाभिज्ञ; यंत्रकलाविशारद; पुतळे घडविणारा.

शिल्पा वि. दातोड; मोठे दात असणारा. (अहि.)

शिल्पा पु. लाकडाची खपली. (अहि.)

शि(ल)ल्लक स्त्री. बाकी; खर्च वजा जाता उरलेली रक्कम; अवशेष; शेष (द्रव्य, धान्य, पदार्थ इ.). [अर. सल्ख्]

शिल्लकल स्त्री. एक फूट लांबीची, एका टोकाकडे निमुळती होत गेलेली पहार. (कैकाडी) [सं. शिला+त. कल्ल=दगड]

शिल्ल(ल)क साखळी १. दररोज किंवा महिनेवार हिशेब पुरे करून काढीत आणलेली बाकीची परंपरा. २. जमाखर्च तपासून काढलेला पडताळा; जमाखर्चाची तपासलेली तोंडमिळवणी; बिनचूकपणा; हिशेबाची खात्रीशीर मिळवणी. (क्रि. मिळवणे, नेसवणे, मिळणे, जमणे.)

शिल्ला पु. भिंत बांधताना मध्ये घातलेला आडवा लांब दगड; बंद; (इं.) हेडर. [सं. शिला]

शिल्ली स्त्री. सरड्याची एक जात. (गो.)

शिव पु. खाडीतील एक प्रकारचा मासा.

शिव पु. १. शंकर; महादेव; संहारकर्ती देवता. २. चैतन्य; आत्मा; जीवापासून निराळे चित्तत्व. ३. (ज्यो.) सत्तावीस योगांपैकी एकविसावा योग. ४. मोक्ष. ५. (द्विरुक्तीने शिवशिव) तिरस्कार; नापसंती; खेद; उद्वेगवाचक उद्गार. [सं.] (वा.) **शिवावरचा बेल उचलणे, काढणे, घेणे–** शपथ घेणे; एक प्रकारचा शपथविधी. **शिवावरचा बेल चुकेल पण हे चुकणार नाही–** एखादी न टळणारी गोष्ट दर्शविणे.

न. मंगल; कल्याण.

वि. मंगलदायी; कल्याणकारी; सुखदायक.

शिवक–टी स्त्री. शिलक; चोय (पत्रावळीची). (व.)

शिवकळ–ळा स्त्री. १.संचार; अंगात येणे. २. राग. (कर.)

शिवका पु. दागिना. (नंद.)

शिवचतुर्दशी स्त्री. माघ वद्य चतुर्दशी; महाशिवरात्र.

शिवटणे सक्रि. शेवटणे; हत्यारास धार, टोक काढणे. [सं. शा, शी+वर्ध्]

शिवड–डा पु. मोठे सुंगट; एक मासा. (गो., कु.)

शिवण स्त्री. १. दोरा घालणे; सुई-दोऱ्याने जोडणे; टाके घालणे; जोड;

सांधा; दूण. (क्रि.शिवणे) २. ढुंगणाच्यामधील शिवणीप्रमाणे रेषा. ३. शिवावयाचे, शिवलेले कपडे, कापड, जिन्नस; शिवणकाम. ४. घरावरील गवताची शाकारणी. [सं. सीवम]

शिवण–णी–नी, शिवणमूळ स्त्री. इमारती लाकडाचे झाड. (को.)

शिवणकर पु. शाकारी; शाकारणी करणारा.

शिवणकाम न. शिंपीकाम; शिवण्याची क्रिया; शिवण्याचे कपडे इ.

शिवणी स्त्री. सांधा; जोड.

शिवणे, शिंवणे अक्रि. १. टाके मारणे; दोरा घालणे. २. शाकारणे.

शिवतणे अक्रि. शिवणे; स्पर्श करणे.

शिवदिनी स्त्री. एकादशी; शिवरात्र.

शिवदीक्षा स्त्री. (थट्टेने) अंगाला राख फासणे, रुद्राक्ष घालणे वगैरे शिवोपासनेचा व तपस्येचा अंगीकार करणे.

शि(शिं,शी)वधडा पु. हद्दीबाहेरचा, दुसऱ्या प्रदेशातला, गावातला मनुष्य.

शिवधातू पु. गोमेद; गोमूत्राच्या रंगासारखे एक रत्न; वैडूर्य.

शिवधार स्त्री. (सांकेतिक) तुपाची बारीक धार.

शिवनक पु. भातातील, साळीतील एक जात.

शिवना स्त्री. आदेश. (अहि.)

शिवपदी स्त्री. १. ज्यामध्ये कल्याणमय शब्द आहे असे वाङ्मय. २. शंकराची स्तुतीपर पदे. ३. शिवाजी महाराजांवर रचलेली पदे.

शिवपंडित पु. खेडेगावातील माहितीगार इसम; खेडेगावातील लोक ज्याचा सल्ला घेतात असा अर्धवट ज्ञान असणारा खेडवळ ब्राह्मण; अडाणी, रानवट मनुष्य.

शिवपाहणी स्त्री. गावच्या जमिनीची मोजणी, तपासणी.

शिवभैरव पु. (संगीत) एक राग. गानसमय प्रातःकाळ.

शिवमुहूर्त पु. सूर्योदयाबरोबरचा पहिला मुहूर्त; साडेतीन घटकांचा काळ.

शिवर स्त्री. भेग. (गो.)

शिवरडोली स्त्री. श्रावड; श्रावडे; अच्छूक; आऊल. एक झाड. (याला काही हिरवी व काही पांढरी पाने येतात.)

शिवरस पु. भातावरील पातळ पेज किंवा शिजवलेल्या डाळीवरील पाणी.

शिवरा पु.तुषार; बारीक थेंब.

शिवराई स्त्री. शिवाजीने पाडलेले नाणे; शिवकालीन नाणे, पैसा.

शिवरात्रवात स्त्री. कापसाच्या सुताचे १८७ ।। फेरे अथवा ३७५ पदरांची वात. ही दर शिवरात्रीस लावतात.

शिवराभि(भे, बि)वरा शेती; (मूळ अर्थ पिके, जमीन. सीना व भीमा या नद्यांच्या काठची शेती.)

शिवरांवचे अक्रि. बारीक भेगा पडणे. (गो.)

शिवरी वि. कुष्टी; शेंबडा.

शिवरू स्त्री. बंदुकीची दारू.

शिवरेत न.पारा.

शिवलग्न न. (शुभमुहूर्त) दसरा. [अप. सीमोल्लंघन]

शिवशितळ वि. १. थंड; ताजे; शुद्ध (हवा, पाणी वगैरे). २. सौम्य; कडक नव्हे ते. ३. भूतपिशाचादींच्या बाधेपासून सुरक्षित (रस्ता, भाग, प्रदेश). ४. सौम्य; सुलभ; सोपे; सुसाध्य; लवकर प्रसन्न होणारे (दैवत, मूर्ती, देव). ५. भूतपिशाचादी पीडेपासून कुरी देऊन, शांती वगैरे करून मुक्त केलेले (धान्याची रास वगैरे). ६. शांत; कोमल (मन, जीव वगैरे). [सं. शिव + शीतल]

शिवशिवणे अक्रि. शिरशिरी येणे; कापणे; फुरफुरणे; झणझणणे; थंडीने दुखणे (दात, कान, हात, पाय, शरीर वगैरे). [सं. सिमसिमाय]

शिवशिव शिमगा शीतल शिमगा; धुळवडीचा दिवस.

शि(शिं)वसर पु. सिंह राशीत सूर्य असण्याचा काळ; सिंहस्थ.

शि(शिं)वसरणे अक्रि. सिंहस्थामध्ये गाय विणे.

शिवस्व न. शिवास अर्पण केलेले, ज्याचा अपहार करणे महापातक समजले जाते असे द्रव्य.

शिवस्वैपाक पु. १. शेतातील हुरडा, ओंब्या वगैरे अन्न. २. शेतातील पदार्थांचे तयार केलेले अन्न, जेवण.

शिवळ, शिवळ(ळा)ट–टी स्त्री. जोखडाचे दोन भाग असल्यास त्यास जोडणारी खुंटी; जोखडाची बैलाच्या मानेजवळची खुंटी; बिरडी बांधावयाची खुंटी; शिऊळ.

शिवळ स्त्री. शीळ; शीट. (क्रि. वाजवणे, घालणे.)

शिवळणे पहा : **शिवशिवणे**

शिवळवट पु. रव्याचा भिजवून केलेला उंडा; पदार्थ बनविण्यासाठी कणकीचा केलेला लांबट गोळा.

शिवा स्त्री. १. पार्वती. २. कोल्ही. [सं.]

शिवाई स्त्री. शिवराई पैसा.

शिवाई(य)जमा स्त्री. अवांतर वसूल, मिळकत; शेतसाऱ्याशिवाय इतर खंड; गुन्हेगारी, नजर इ. निरनिराळ्या बाबींच्या वसुली रकमा.

शिवाई(य)दोऱ्या स्त्री. अव. तंबूच्या मधील खांबाच्या वरील भागाला बांधून ठोकण्याच्या दोऱ्या.

शिवाजी पु. १. काठी व परबान यास बांधलेला मोठा दोर. २. जिवा एकत्र करून त्यांचे शेवट (पदर) एकात एक मिळवून जरूर असतील तितके फेरे घेऊन दोन बाजू बारीक दोरीने गुंडाळून केलेला दोर. (हेट.)

शिवाण न. हद्द; सीमा.

शिवाय शअ. १. विना; वाचून; खेरीज; सोडून. २. हे असून आणखी; हे धरून वर; आणि; वर. [अर. सिवाअ]

शिवारा–ऱ्या स्त्री. अव. भात झोडण्यासाठी खळ्यात डांबे रोवून घडवंचीवजा केलेली माचण.

शि(शिं)वारो पु.शिवाराची देवता. (गो.)

शिवालय न. १. महादेवाचे मंदिर, देवालय. २. स्मशान.

शिवालिखित न. पार्वतीने लिहिलेले, प्रवास वा अन्य कार्यासाठी वापरले जाणारे शुभाशुभ मुहूर्ताचे कोष्टक.

शिवी, शिवीगाळ–ळी स्त्री. अपशब्द; दुर्भाषण; अभद्र वाक्य. [सं. शप्]

शिव्या पु. भात ठेवण्याचे रुंद तोंडाचे लाकडी पात्र. (गो.)

शिश–ष–स न. मस्तक.

शिशिर पु. सहावा ऋतू; मकर व कुंभ या सौरमासांचा किंवा माघ व

फाल्गुन या चांद्रमासांचा कालावधी. [सं.]

शिशी स्त्री. लहान कुपी; बाटली. [फा.]

शिशी स्त्री. १. शिसवी; शिसव नावाचे झाड. २. शिसपेन्सिल.

शिशु–शू पु. १. बालक; लहान मूल; लेकरू. २. प्राण्याचे पिल्लू. [सं.]

शिशुधानी स्त्री. सस्तन प्राण्यात पिलांना वाढविण्यासाठी पोटावर असणारी पिशवी. उदा. कांगारू.

शिशुर वि. लहान; छोटा.

शिशुवर्ग, शिशुविहार पु.१. बालवर्ग, पहिलीच्या आधीचा लहान मुलांचा वर्ग. २. लहान मुले. ३. पाच वर्षांखालील मुलांसाठी थोडे शिक्षण, खेळ, आहार व दिवसभराची देखभाल असणारी संस्था.

शिश्न न. पुरुषाचे गुह्येंद्रिय. [सं.]

शिश्नोदरपरायण वि. केवळ विषयसुख व पोट भरणे यातच आनंद मानणारा, केवळ याकडेच लक्ष देणारा.

शिश्वी स्त्री. मनुष्याचे अथवा प्राण्याचे स्त्रीजातीय बालक, पिल्लू.

शिष्ट वि. १.(शब्दश:) शिस्तीचा; व्यवस्थित; नियमित; सरळमार्गी; नियमाप्रमाणे चालणारा; शिक्षित; विद्वान; सभ्य; संभावित. २. उत्कृष्ट; वरिष्ठ; श्रेष्ठ; आदरणीय; पूज्य. ३.(ल.) घमेंडखोर. [सं.]

शिष्ट न. वि. उरलेले; उर्वरित; शेष. उदा. यज्ञशिष्ट. [सं.]

शिष्टमंडळ न. प्रेषित किंवा प्रतिनिधी मंडळ; विनंती करण्याकरिता, भेट देण्याघेण्यासाठी, शिष्टाई करण्याकरिता पाठवलेली मंडळी.

शिष्टसंप्रदाय पु. संभावित, श्रेष्ठ, पूज्य लोकांची रीत, मार्ग, चाल, पद्धती, वागणूक.

शिष्टाइ(य)की, शिष्टाई स्त्री. १. श्रेष्ठपणा; मोठेपणा; मान; पूज्यता; आदरणीयता. २. नियमितपणा; व्यवस्थितपणा; शिस्त; चोखपणा. ३. संभावितपणाची मध्यस्थी; विवाहादी कार्ये जुळवून आणण्याकरिता केलेली मध्यस्थी, सांगितलेल्या समजुतीच्या गोष्टी वगैरे; दोन पक्षात ऐक्य घडवून आणण्याकरिता केलेली मध्यस्थी. ४. बोधपर कथन वगैरे.

शिष्टागम, शिष्टाचार पु. १. परंपरागत आलेली सभ्यपणाची, संभावित रीत, पद्धती, चाल. २. विवाहादी प्रसंगी यजमानास केलेला आहेर, देणगी वगैरे. ३. शास्त्रात प्रत्यक्ष न सांगितलेले परंतु रूढ, आचार, नियम, रीत, पद्धती.

शिष्टावणे अक्रि. श्रेष्ठत्वास चढणे; मान्यता पावणे; उगाच मोठेपणा अंगी आणणे; योग्यता नसता स्वत:स मोठे समजणे.

शिष्य–ष्या पु. १. विद्यार्थी; चेला; शागीर्द; अनुयायी; पठ्ठ्या. २. उमेदवार; विद्यार्जनाकरिता सेवा करून राहिलेली व्यक्ती. [सं.]

शिष्यवृत्ति–त्ती स्त्री. १. विद्यार्थिदशा. २. विद्यार्थिदशेत मिळणारे वेतन, द्रव्य; विद्यावेतन; (इं.) स्कॉलरशिप.

शिस न. डोके; कपाळ; शरीर: 'अर्धखांड अर्धमिशी । पाचपट काढिलें शिर्सी ।'–एरुस्व १२.१४९. ७८. [सं. शीर्ष]

शिसकारी स्त्री. पहा : **शिसारी–टी, शिंसाटी–री**

शिसनेकड न. रहाट बाजूला तोलू नये म्हणून रहाटाच्या गाड्याला ज्या दोन काठ्या बांधतात त्यापैकी प्रत्येक. (को.)

शिसपेन स्त्री. (शब्दश:) शिशाची पेन्सिल; लाकडी पेन्सिल; शाईशिवाय लिहावयाची लेखणी.

शिसफूल न.स्त्रियांचे शिरोभूषण; डोक्यातील एक दागिना; शीसमणी.

शिसली स्त्री. शिशी; लहान कुपी; बाटली. [फा.]

शिसव–वी, शिसा पु. स्त्री. शिसवीचे झाड. याचे लाकूड काळे व कठीण असते. याचे सामान व कोरीव काम उत्तम होते.

शिसा पु. १. मोठी बाटली; कुपी; काचेचे मोठे उभट भांडे. २. (शिसा) मधाचे मोहोळ (आकारावरून). [फा. शीशा]

शि(शिं)सा पु.ओळंबा.

शि(शिं)साबा(भा)सा–स पु. १. फुटतुट; नुकसान; अपघात; दुखणे; भूतपिशाचादी बाधा; मोडतोड. २. चीजवस्तू; मालाची जबाबदारी.

शिसार, शिशाळ स्त्री. मस्तकरोग; अर्धशिशी; डोकेदुखी : 'शिसाराचें रागें लावणें । शिसचि जैसे ।'– ज्ञा १८.१७९.

शिसारी–टी, शिंसाटी–री स्त्री. १. तिटकारा; वीट; कंटाळा. २. दुर्गंधीमुळे येणारी मळमळ; ओकारी.

शिसाशोध पु. शिसे घालून अशुद्ध रुपे शुद्ध करण्याची रीत.

शिसाळ न. डोके.

शिसी स्त्री. (चांभारी) भोक; छिद्र. (चामडे टांगून पक्के झाल्यावर त्यातील पाणी बाहेर जाण्याकरिता पाडलेले.)

शिसे न. एक काळसर जड धातू. [सं. शिसम्]

शिस्त वि. योग्य; लायक; शोभेसे; बिनचूक; बरोबर. [फा. शुस्त धुतलेले]

शिस्त स्त्री. १. नेम; निशाण; वेध; संधान. (क्रि. धरणे, बांधणे.) २. कुळाकडील वसूल करण्यासाठी केली जाणारी कुळवार यादी; बंदोबस्त. ३. विवक्षित पद्धतीनुरूप, संप्रदायानुरूप वर्तन. ४. व्यवहार; जाबसाल; शिरस्त; पद्धती; रीत. [फा. शिस्त]

शिस्तबाकी स्त्री. वसुली; येणे राहिलेली रक्कम; थकबाकी.

शिस्तवार वि. पद्धतशीर; योग्य प्रकारचे; शोभेसे; साजेसे; नियमानुसार.

शिळई, शिळी स्त्री. शीळ; शीट; शिऊळ.

शिळकंबा, शिळकोपा पहा : **शिळोपा**

शिळघाटा पु. ओल्या हरभऱ्याचा एक खाद्यपदार्थ.

शिळट–टी स्त्री. १. गारठा; सर्दी; हवेतील थंडपणा; शैत्य. (क्रि. पडणे, लागणे.) २. जमिनीतील ओल; गारवा; ओलावा. [सं. शीतल]

शिळटणे अक्रि. १. हवेतील गारठा बाधणे; थंडीने (पिकास) इजा होणे. २. शिळे होणे.

शिळणधार, शिळं(ळा)धार वि. क्रिवि. अतिजोराचा, झपाट्याचा (पाऊस, सर वगैरे). [सं. शिला+धारा]

शिळपट वि. १. घासलेले (नाणे, पैसा, ठसा). २. बोथट; बोजड, बसलेली (शस्त्रांची धार, टोक वगैरे). ३. (ल.) ढिळा; नेभळट; पुळपुळीत; नि:सत्त्व; भोंगळ (मनुष्य, कारभार, व्यवहार वगैरे).

शिळबुडा वि. गारठा मोडलेले; कोमट; उबट (पाणी, पदार्थ इ.).

शिळवड–ण–ट–रे, शिळावट न. जुने, शिळे; आदल्या दिवशीचे अन्न, पाणी इ.

शिळा वि. १. पारोसा; जुना; नि:सत्त्व. २. थंड; निवलेला. ३. (ल.) थंडा; ढिला; मंद (कारभार, व्यवहार, धंदा, स्वभाव). [सं. शीतल/

शैतल] (वा.) **शिळ्या कढीला ऊत आणणे, येणे** – विसरलेली, जुनी झालेली गोष्ट उकरून काढणे; मागाहून अवसान आणणे.

शिळाचुंबी पु. लोहचुंबक.

शिळाछाप पु. हस्तलिखित मजकूर शिलेवर उठवून छापण्याची पद्धती.

शिळाबाजार पु. बाजाराचा दिवस होऊन गेल्यावर उरतात ती दोन-पाच दुकाने.

शिळा बिब्बा एखाद्या कामात पडला असता ते काम लवकर संपवायचे नाही व सोडावयाचेही नाही व कोणी बोलले तरी रागावयाचे नाही असा फारच धिमा, मंद, चेंगट मनुष्य; थंड, उदासीन, जड प्रकृतीचा माणूस.

शिळावन, शिळान स्त्री. मळभ.पहा : **शिरवाळ** [सं. शीतल]

शिळासप्तमी स्त्री. १. श्रावण शुद्ध सप्तमी. स्त्रियांचा वाण देण्याचा दिवस. २. (ल.) शिळ्या अन्नाचे सेवन करण्याचा दिवस.

शिळिका स्त्री. फांदी; फांटी; काडी.

शिळी ओटी गर्भाधान विधीनंतर दुसऱ्या दिवशी सकाळी मुलीच्या आईकडून मुलीच्या शय्यागृहात भरण्याची ओटी.

शिळेपाके न. आदल्या दिवशीचे, उरलेले अन्न; शिळवण.

शिळोत्तर पाटिलकी खार धरावयाची असता अथवा मिठागर करताना समुद्राचे किंवा खाडीचे पाणी अडविण्याकरिता बंधाऱ्याला असलेले द्वार. तेथे एक शिळा बसवीत. या द्वाराची वा शिळेची देखभाल, देखरेख करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीस दिले जाणारे वेतन वा वेतनाचा हक्क.

शिळोत्री पु. वरील शिळोत्तरा पाटिलकीचा वतनदार.

शिळोपा पु. दिवसातील दुपारची थंड वेळ; रिकामा वेळ; शिळा वेळ.

शिळोरी स्त्री. पणती. (अहि.)

शिक्षक पु. १. पंतोजी; गुरुजी; अध्यापक; विद्या वगैरे शिकवणारा. २. (लुप्त) चोरास शिक्षा करणारा. [सं. शिक्ष्]

शिक्षण न. १. अध्ययन; शिकवणूक. २. दंडन; शिक्षा करणे; पारिपत्य; शासन. ३. अध्यापन; शिकवणी.

शिक्षणशास्त्र न. शिक्षणविषयक प्रश्नांचा शास्त्रीय दृष्टिकोनातून शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणारी ज्ञानशाखा.

शिक्षणीय वि. १. शिकण्यास, अध्ययन करण्यास योग्य, शिकण्यासारखा. २. दंडनीय; शिक्षा करण्यास पात्र.

शिक्षणे उक्रि. १. शिकवणे; समजून सांगणे. २. दंड, शिक्षा,ताडन करणे.

शिक्षा स्त्री. १. शिक्षण; अध्ययन; अध्यापन. २. दंड; पारिपत्य; शासन. ३. वेदाचे पहिले अंग; वर्णोच्चार शिकवणारे शास्त्र. [सं.]

शिक्षापिणे पहा : **शिकवणे**

शिक्षावारी स्त्री. शिक्षांप्रमाणे केलेले पत्रक.

शिक्षित वि. १. शिक्षण मिळालेला; शिकलेला; निपुण; पंडित. २. शिक्षा, सजा दिलेला; शासित; दंड झालेला. ३. शिस्तीचा; सुव्यवस्थित; वळण लावलेला. ४. अध्ययन केलेला; वाचलेला; पढलेला; अभ्यासलेला (ग्रंथ, विषय, पुस्तक).

शिक्ष्य वि. १. शिकवावयाचा; शिकवण्यास योग्य. २. शिक्षा करण्यास पात्र; दंडनार्ह.

शिं(शीं)क स्त्री. शैत्यामुळे नाकातून वायूचे जोराने होणारे सशब्द निःसरण. [हिं. छींक; सं. छिक्का]

शिंककार पु. शिंकेचे शुभाशुभ सांगणारा; शिंकेवरून शकुन पाहणारा.

शिंकण न. गवत, दोरी वगैरेचे भांड्याखाली ठेवण्याचे वेटोळे; चुंबळ; निवणे. [सं. शिक्य]

शिंकणी स्त्री. हुंगले असता शिंक आणणारी औषधी वनस्पती; नाकशिंकणी; शिंकणे.

शिंकणे क्रि. शिंक येणे; शिंकेने युक्त होणे.

शिंकरणे क्रि. नाक धरून जोराने हवा सोडून शेंबूड काढून टाकणे.

शिंकाळ-ळी, शिकाळी स्त्री. १. भांड्याला शिंक्याप्रमाणे बांधावयाची दोरी. २. भांडे सर्व बाजूंनी सारखे उचलले जाऊन नेण्यास सोयीस्कर पडावे म्हणून त्याच्या गळ्याभोवती दोरीचा फास घालून वर हाताला धरता येईल अशी योजना. ३. पाणी ओढण्याची दोरी. (व.)

शिं(शि)काळणे उक्रि. १. शिंके करणे; शिंक्याला लावणे (टोपली, भांडे इ.). २. लोंबत असणे, राहणे.

शिंकाळणे न. शिंकाळे असलेले भांडे.

शिंके न. १. वस्तू टांगून ठेवण्यासाठी दोरी विणून केले जाणारे जाळे; पाश; अधांतरी साखळीसारखी केलेली विशेष प्रकारची योजना. २. जड वस्तू उचलून नेण्याकरिता वाशास टांगावयाकरिता केलेली दोऱ्याची योजना; जाळी. ३. तराजूच्या दोऱ्या. [सं. शिक्य, शिक्या] (वा.) **शिंक्याला हात पुरणे** – मुलगी ऋतुस्नात होणे, वयात येणे. (व.)

शिंग न. १. शृंग; विराण; जनावराच्या डोक्यावरील स्वसंरक्षणार्थ असणारा एक टोकदार अवयव. २. या आकाराचे एक वाद्य; कर्णा. [सं. शृंग] (वा.) **शिंगे असणे** – भेद असणे. **शिंगे फुटणे** – वेडेपणा, अति शहाणपणा करणे. **शिंगे मोडून वासरात शिरणे** – १. जाणत्या माणसाने पोरकटपणा करू लागणे. २. अज्ञपणाचे ढोंग करणे; शहाणपण दडवून मुलाप्रमाणे मूढ बनणे. **शिंगावर घेणे** – टक्कर घेणे; चांगले तोंड देणे, लढणे.

शिंगट न. १. (तिरस्कारार्थी) शिंग; शिंगाचा तुकडा; मेलेल्या जनावराचे शिंग. २. बंदुकीच्या दारूने भरलेले शिंग (दारू उडविण्याकरिता).

शिंग(गा)टणे क्रि. १. शिंगाने मारणे; शिंगावर घेऊन फेकणे. २. (ल.) अतिशय रागे भरणे; खरडपट्टी काढणे. ३. (ल.) ठकवणे; फसवणे.

शिंगटा न. काळविटाच्या शिंगाचे बनविलेले एक लढाऊ हत्यार.

शिंगट्या पु. बिनखवल्यांचा मासा.

शिंग(गा)डा पु. १. पाण्यातील एक वेल व तिचे फळ. २. गोड्या पाण्यातील एक मासा. ३. बंदुकीची दारू भरून ठेवण्याचे शिंग, पात्र. ४. खिळे व भांडी घडवावयाची एक प्रकारची ऐरण (साधी आणि संदान ह्यापेक्षा जरा भिन्न). ५. खणाची त्रिकोणी घडी. ६. शिंगांच्या आकाराचे खुंटाळे. [सं. शृंगाटक]

शिंगडी-डे स्त्री. न. वाळलेल्या शेंगांची रास (पावटा, तूर इ. द्विदल जातीच्या धान्याची). (को.)

शिंगडे न.बैलाच्या शिंगावरील एक दागिना.

शिंगण न.धनुष्य; कमान : 'गळा घातली शिंगण। रुस्तुमराव पाडाव

केला।'- ऐको २.२६.

शिंगदोरी स्त्री. मध्ये घुंगूर घालून शिंगाभोवती बांधलेली दोरी.

शिंगरवट वि. वयात न आलेले (शिंगरू).

शिंगरू न. घोडे, खेचर, गाढव इ. चे लहान पिल्लू.

शिंगरूप वि. बच्चा; छोटा (घोडा).

शिंगरूप-ब पु. हिंगूळ; रससिंदूर. [फा. शंगर्फ]

शिंगऱ्या, डिंगऱ्या स्त्री. अव. मुळ्याच्या शेंगा.

शिंगशिंगोटी स्त्री. १. जनावरांची, गुराढोरांची शिंगे, हाडे इ. २. (व्यापकपणे) शिंगे असलेले जनावर; पशू. ३. शिंगाडच्या जनावरांच्या विक्रीवरील सरकारी पट्टी; शृंगादाय.

शिंगस्त न. सिंहस्थ. (ना.)

शिंगाटणे न. बैलाच्या शिंगदोरीला बांधलेला हस्तिदंताचा तुकडा.

शिंगाडा-डी-ड्या पु. शिंग वाजविणारा, फुंकणारा.
वि. मोठ्या व लांबलचक शिंगाचा.

शिंगाडा-डी स्त्री. १. शिंगाड्याचा वेल. २. गाडीच्या पुढे असणारे उभे दांडे. ३. जोडा सैल करण्याकरता चांभार वापरत असलेले शिंगाच्या आकाराचे हत्यार.

शिंगाडी स्त्री. एक तिरस्कारार्थी शिवी. (अहि.)

शिंगाडे न. पोळ्याच्या दिवशी बैलाला तेल पाजण्यासाठी, इतर वेळी औषध पाजण्यासाठी वापरले जाणारे भोकाचे शिंग.

शिंगाडो पु. सांबर. (कु.)

शिंगाळ-ळू वि. १. लांब शिंग असलेले. २. मारकट; शिंगे मारणारा (बैल). ३. शिंगे फुटू लागलेला (बकरा, मेंढा, काळवीट इ.). ४. (ल.) आसपासच्या सर्व माणसांना त्रास देणारा किंवा त्यांच्या खोड्या करणारा उपद्रवी इसम.

शिंगाळ-ळा पु. समुद्रातील एक जातीचा काळ्या रंगाचा मासा. (को.)

शिंगाळणे क्रि. शिंगाने मारणे; शिंगारणे.

शिंगाळे न. (जनावराला धरण्यासाठी त्याच्या) शिंगाभोवती बांधलेली दोरी.

शिंगाळ्या वि. मोठ्या, लांबलचक शिंगाचा.

शिंगी स्त्री. (कानफाट्या गोसाव्याचे) वाजविण्याचे लहान शिंग.

शिंगी स्त्री. १. लहान मादी शिंगरू. २. (ल.) छबेली; छोकरी.

शिंगोटी स्त्री. १. जनावराची आखूड शिंगे. २. बैलाच्या शिंगांना बांधलेली दोरी. ३. पहा : **शिंगशिंगोटी** ४. शिंगे असणारे जनावर.

शिंगोटी पु. भुंगा; भोंगुळ. (व.)

शिंचा पु. (संक्षेप) शिंदळीचा; एक शिवी; छिनाल स्त्रीचा मुलगा.

शिंट स्त्री. शिंतोडा; सडा; पाण्याचे उडणारे बारीक थेंब; पर्जन्यतुषार.

शिंतडणे सक्रि. शिंपडणे; सडा टाकणे.
अक्रि. थेंब थेंब पडणे; उगीच भुरभुरणे.

शिंतडा पु. शिंतोडा; सडा; उडालेला थेंब.

शिंतरणे क्रि. अंतरणे.

शिं(सिं)तरू वि. फसविणारा : 'शठ शुंभ कातरू। लंड तर्मुंड सिंतरू।' - दास २.३.२९.

शिंतोडणे सक्रि. शिंपणे; शिंपडणे; सिंचन करणे.

शिंतोडा पु. १. सिंचन; प्रोक्षण; शिडका. २. सेक; सडा.[सं. सिच्] (वा.) **० टाकणे, उडविणे** - थोडासा कलंक लावणे; जाता जाता एखाद्याविषयी लहानसे कुत्सित विधान करणे.

शिंद स्त्री. खजुराच्या जातीचे एक जंगली झाड. [हिं. सेंध]

शिंद स्त्री. १. व्यभिचारिणी. २. वेश्या.

शिंद-ध स्त्री. १. कुडाची भिंत; बांबूच्या चिपा, कारवी इ.ची गिलावा केलेली भिंत. २. असल्या प्रकारची भिंत रचण्याचे सामान.[सं. सौध]

शिंदणे क्रि. शेंदणे; विहिरीतून पाणी वर काढणे (यंत्राने वा हाताने).

शिंदपास देणे माडी काढण्यास नारळाचे झाड देणे.

शिंदळ वि. जारकर्मी; बाहेरख्याली; बदफैली; छिनाल; दुराचरणी; व्यभिचारी (स्त्री, पुरुष). [सं. छिद्-छिन्न]

शिंदळकी स्त्री. जारकर्म, व्यभिचार, दुराचरण, छिनाली, बदफैली.

शिंदळसोव पु. अव. व्यभिचारिणीप्रमाणे ढोंगी वर्तन; लाडिकपणा, चेष्टा इ. पहा : **सोव**

शिंदा पु. १. अनौरस संततीची एक जात किंवा त्यातील व्यक्ती. २. दासीपुत्र; लेकवळा.

शिंदाड न. कवळ; भातशेतीची जमीन भाजण्यासाठी लागणाऱ्या गवत, लाकडे इ.चा ढीग.

शिंदी-धी शिंद या झाडाचा मादक रस. शिंदीपासून तयार केलेली दारू : 'खंड्यायानं महार शिंदी पिऊन पडला.' - ऐपो ६८.

शिंदेशाई-ही वि. १. कापड, दागिने इ. संबंधी विशिष्ट तऱ्हा, घड्या असणारे. २. शिंद्याचे राज्य, दरबार इ. संबंधी; शिंद्यांच्या अंमलातील.
स्त्री. शिंद्याचे राज्य, अंमल, सत्ता.

शिंदो पु. नारळ पाडणारा. (को.)

शिंदोली स्त्री. शिंदीचे फळ. (ना.)

शिंप-पी स्त्री. १. जलचर प्राण्याच्या अस्थीचे सुपलीच्या आकाराचे आवरण. याची दोन पुडे असतात. त्यांपैकी प्रत्येकी. २. पोकळ काठी, नळी इ. चा तासताना होणारा वरीलसारखा आकार (लेखणी, अलगूज, पावा इ. च्या टोकास करतात त्यासारखा). (क्रि. मारणे, तोडणे, घेणे, पाडणे.) ३. शिंपेच्या आकाराची छातीची खळगी. [सं. शुक्ति]

शिंपट-टी-टे, शिंपूट न. १. पोफळाचा तुरा. २. पोफळांचा घड.

शिंपट्टली स्त्री. (झाडाला) पाणी देणारी कुणबीण.

शिंपडणी स्त्री. शिंपण; सिंचन; सेक; सडा; शिंपणी.

शिंपडणे क्रि. सिंचणे; शिंपळे; प्रोक्षणे; सिंचन करणे.

शिंपणपंचमी स्त्री. रंगपंचमी.

शिंपणे क्रि. १. सिंचणे; वर उडविणे; सडा टाकणे; प्रोक्षण करणे; अभिषिक्त करणे. २. रंगपंचमी : 'शिंपण्या दिवशी हल्ला नेमिली कुंप झाले तयार।'- ऐपो ३५२. ३. दांड्यातून पाणी वाहून नेऊन ते झाडास देण्याची रीत.

शिंप(पु)ला पु. १. मोठी शिंप. हिच्यामध्ये मोती उत्पन्न होतात. पाठीवर रेषा असणारी शिंप. २. शिंपेच्या आकाराची लाकडात घेतलेली खाच. (क्रि. घेणे, मारणे, पाडणे.) ३. उगाळलेले गंध ठेवण्याकरिता शिंपेच्या आकाराची धातूची तबकडी, पात्र.

वि. उतरता; उतरट; ढाळता.

शिंपा पु. नारळाच्या पोगीतून बाहेर येणारा अवयव, कणीस; शिंपट.

शिंपी पु. एक जातीचा मासा. याला तिसऱ्या असेही म्हणतात.

शिंपी पु. एक पक्षी. हा कुंपणाच्या कडेने हिंडून किडे खातो.

शिंपी पु. शिवणकाम करणारी एक जात; त्यातील व्यक्ती; दर्जी. [सं. षिंव; प्रा. सिप्पी = सुई]

शिंबरी वि. नकटी.

शिंबी–बा स्त्री. पु. १. एक वनस्पती. २. शेंग. [सं. शिबा]

शी अ. कालवाचक क्रियाविशेषणास लागणारा एक निरर्थक प्रत्यय. उदा. केव्हाशी, जराशी, कधीशी इ. याप्रमाणे दोन आणि शीक हेही प्रत्यय लावतात.

शी स्त्री. घाण; विष्ठा.

शी(शीं) स्त्री. थंडी; सर्दी; शैत्य. (गो.)

शी उद्गा. तिरस्कारदर्शक, तिटकारा दाखविणारा उद्गार.

शीक पहा : १ **शिक**

शीख पु. नानकपंथी मनुष्य; हिंदू धर्मातील एक पंथ व त्यातील व्यक्ती. [सं. शिष्य]

शीग स्त्री. १. धान्याने माप भरले असता मापाच्या वर येणारी निमुळती रास. २. जमिनीवर धान्याची अगर इतर पदार्थांची रास केली असता वर दिसणारा निमुळता भाग. ३. शिखर; उंचवटा. ४. (ल.) अखेर; शेवट; मर्यादा; अवधी. ५. सपाट जमिनीवरील उंचवटा. [सं. शीर्षकश्] (वा.) **शीगमाप देणे** – १. चांगले माप घालणे. २. एखाद्याची चांगली भरपाई करणे. **शिगेस चढणे** – शिखरास, पूर्णत्वास जाणे.

शीगलोट–टा वि. १. आतील धान्यादिकांची शीग लोटून सपाट केलेले (माप, पात्र). २. (शिगेच्यावर गेलेले) अतिशय समृद्ध, संपन्न; गडगंज.

शीगवर–लोट क्रिवि. अगदी शीग लागेल इतक्या प्रमाणात; अति समृद्धतेने.

शीघ्र वि. त्वरायुक्त; चलाख; त्वरितगती.
क्रिवि. त्वरित; सत्त्वर; लवकर; जलद; ताबडतोब. [सं.]

शीघ्रकवी पु. कोणत्याही विषयावर ताबडतोब काव्य करणारा मनुष्य.

शीघ्रकोपी वि. एकाएकी, तत्काळ, एकदम यत्किंचित कारणावरून रागावणारा.

शीघ्रबुद्धी वि. तीक्ष्ण, तरतरीत बुद्धीचा; चलाख; कुशाग्र बुद्धीचा.

शीघ्रोच्च न. (ज्यो.) ग्रहाच्या कक्षेतील सूर्यापासून सर्वांत दूरचा बिंदू; (इं.) लोअर ऑप्सिस.

शीट स्त्री. पक्ष्याची विष्ठा.

शीट न. चीट; रंगीबेरंगी कापड; (इं.) चिट्स.

शीट स्त्री. शिटी; शीळ. [ध्व.]

शीड न. १. गलबताचे अवजार; वारा धरण्याकरिता गलबतावर वापरण्यात येणारे कापडाचे केलेले साधन. २. (ल.) पाणीदार घोड्याचा मानेचा बाक. [सं. श्रेढि] (वा.) ० **अर्या करणे** – शीड पाडणे, उतरणे. ० **उतरणे** – मानहानी होणे; कमीपणा होणे; अपयश येणे. ० **उभारणे**– १. वारा धरून गलबत चालू करणे; शीड मोकळे सोडणे. २. भरभराट होणे; उत्कर्ष होणे.

शीडकाठी स्त्री. डोलकाठी; शीड बांधावयाची मोठी काठी.

शीडबंद पु. शीड फाटू नये म्हणून त्याच्या काठास शिवलेला जाड दोर.

शीण पु. १. थकवा; ग्लानी; भागवटा; अति श्रमांमुळे होणारी दमणूक. २. कंटाळा; तिटकारा; खेद, तिरस्कार. ३. व्यर्थ श्रम; निष्फळ यत्न : 'रामदास स्वामीविण। केला तितुकाही शीण।' – नवनीत १४७. [सं. क्षीण, शीर्ण]

शीण पु. स्त्री. वय; उमर; वयोमान; वयोमर्यादा. [अर. सिन्न = वय, काळ] (वा.) **शीणभीण फिटणे** – वयातील अंतरामुळे वाटणारा आदरयुक्त दरारा कमी होणे, भीती नाहीशी होणे.

शीण न. उसने वाण. (गो.)

शीणभाग पु. थकवा.

शीत न. १. शिजलेल्या भाताचा कण, दाणा. २. ग्रामदेवतांस दाखवावयाचा (वार्षिक) नैवेद्य; बली. (को.) [सं. सिक्थ]

शीत न. १. (विणकाम) ताण्यामधील खालचे-वरचे दोरे अलग करणारी आडवी काठी. २. शिमग्यामध्ये सहाणेवर पुरण्याकरिता आणला जाणारा सुरमाचा किंवा इतर झाडाचा शेंडा. ३. धनुष्याची दोरी; प्रत्यंचा.

शीत न. थंडी; शैत्य; सर्दी.
वि. १. थंड; गार. २. (ल.) मंद; उदासीन; आळशी. [सं. शीत]

शीतक पु. पदार्थ थंड करण्याचे, थिजवण्याचे यंत्र; (इं.) कन्डेन्सर.

शीत कटिबंध ध्रुव व ध्रुववृत्ते यामधील प्रदेश.

शीतकपाट न. पदार्थ टिकण्यासाठी कृत्रिम गारवा निर्माण करणारे साधन.

शीत काळ १. हिवाळा; हेमंत व शिशिर ऋतूंचा काळ. २. हिवाळा व पावसाळा यांतील मिळून सहा महिन्यांचा काळ.

शीतगृह न. नाशवंत शेतमाल अधिक काळ टिकवून ठेवण्यासाठी शीतकरणाच्या तंत्रासहित असलेले गोदाम.

शीतज्वर पु. थंडीपासून होणारा ताप; हिवताप. [सं.]

शीतपित्त न. १. एक प्रकारचे कोरडे कुष्ट. २. पित्तदोषामुळे येणारे पडसे, होणारी सर्दी; शैत्यविकार. [सं.]

शीतमंगल वि. दोन्ही कुशीखाली दोन भोवरे असणारा (घोडा). [सं.]

शीतयुद्ध न. प्रत्यक्ष युद्ध नाही, पण सतत तीव्र संघर्ष चालू असणारी स्थिती.

शीतल–ळ वि. १. थंड; गार. २. मऊ; सौम्य; सुखकारक. ३. शिथिल. [सं. शीतल]

शीतला–ळा स्त्री. १. देवी; अंगावर उठणारा फोड्यांचा रोग. (क्रि. येणे, निघणे, मावळणे, कानपणे.) २. या रोगाची देवता.

शीतवड स्त्री. भाताच्या शितांचा पसारा; भाताची सांडलेली शिते.

शीतवास पु. थंडीच्या वेळी पाण्यात उभे राहणे; एक प्रकारची तपस्या.

शीतवीर्य वि. ज्याचे गुणधर्म थंड आहेत असा; शैत्यकारक; सर्दी उत्पन्न करणारा.

शीतळशाई स्त्री. मुलांचा एक खेळ.

शीताचवरी स्त्री. शतावरी; नारायणी; एक वनस्पती.

शीद न. आपट्याचे झाड.

शीन वि. जुने; मोडके; जीर्ण; मोडकळीस आलेले. [सं. शीण]

शीन बागडं थकवा; कंटाळा.

शीनबाज पु. गावचिमण्यांपेक्षा लहान असणारा पक्षी. याचा रंग गडद उदी व छातीवर पांढरे ठिपके असतात.

शीप स्त्री. शिंप; शिंपी; शुक्ती. [सं. शुक्ति]

शीम स्त्री. शीव; सीमा; मर्यादा; हद्द. [सं. सीमा]

शीर स्त्री. न. एका बाजूस पात्या वळलेला माडाचा झाप.

शीर स्त्री. १. शरीरातील नाडी; अशुद्ध रक्तवाहिनी; धमनी; नस; सामान्यत: रक्तवाहिनी. २. मज्जातंतू; स्नायू; मांसदोरक; आंत्रदोरक. ३. पान, फळ वगैरेतील रसवाहक तंतुसदृश भाग. ४. लाकडातील रेषा; लकीर; रेघ, (यावरून) पाळी, खांब, लाकूड यांची कड. [सं. शिरा] (वा.) **शीर-रा तोडणे**-घोडा खच्ची करणे. **शीर फुटणे** - (गाय, म्हैस, घोडी, स्त्री यांना) दूध वाहू लागणे. **शिरा किंवा शिर घेणे, काढणे** - शीर तोडून रक्त काढणे. **शिरा ताणणे**-मोठ्याने, जोरजोराने हाका मारणे, बोलणे, भांडणे, ओरडणे; शोक करणे; वादविवाद करणे. **शिरा निघणे** - कृश, रोड झाल्यामुळे शरीरावर सर्वत्र शिरा दिसणे. **शिरा फुगवणे** - रागाने, क्षोभाने शिरा तटतटून उठणे.

शीर न. डोके; मस्तक; शरीराचा खांद्यापासून वरचा भाग; मुंडके. [सं. शिरस्, शीर्षम्] (वा.) **शीर मुंडणे** - संन्यास घेणे.

शीरदळ न. रक्तपेशींचे जाळे; रक्तपेशींचा, शिरांचा समुदाय; डोके.

शीरबाला वि. ज्याच्या शिरा, रेषा उठून दिसतात असा; खारकेसारखा (हिरडा वगैरे).

शीर्ण धावि. १. विसकळीत; मोडकेतोडके; अवयव निखळलेला; विकलगात्र. २. बिघडलेला; नासलेला. ३. सुकलेले; कृश; रोड; वठलेले. [सं.]

शीर्ष न. मस्तक; डोके; शीर. [सं. शीर्ष]

शीर्षदीप पु. बोटीवर पुढच्या भागी, उंच जागी असणारा, मोठा प्रकाशझोत टाकणारा दिवा.

शीर्षपादी पु. जठरपादी वर्गातील प्राणी. या प्राण्याच्या डोक्याभोवती आठ किंवा दहा भुजा असतात.

शीर्षासन न. (योग.) डोके खाली आणि पाय वर ताठ करून उभे राहणे.

शील न. १. स्वभाव; अंगभूत गुणधर्म; उपजत गुण; देहस्वभाव. २. वर्तन; वर्तणूक; चारित्र्य; सद्वर्तन.

वि. (समासात) युक्त; संपन्न; स्वभावत:च असलेला; उपजत कल असलेला; प्रवृत्तीचा. [सं. शीलम्]

शील पु. धार लावण्याचा दगड.- बदलापूर १०३. [सं. शिला]

शील स्त्री. चिलखत; हत्यार बख्तर : 'शीलचा राउत' - इपुस्त्रीपो १०. [अर. सिलाह]

शीलवंत-वात पु. वि. १. सुस्वभावी; सद्वर्तनी; सुवृत्त. २. उमदा; उत्तम जातीचा; जातवान; पाणीदार (घोडा).

शी(शीं)व स्त्री. सीमा; हद्द; मर्यादा. [सं. सीमा] (वा.) **शिवाणी उभा न करणे, न राहू देणे** - दूर अंतरावर ठेवणे; जवळ येऊ न देणे.

शीवड पु. माशाची एक जात. (गो.)

शीवपूजन न. पहा : **सीमांतपूजन**

शीस पहा : **शिस**

शी(शीं)स न. फुलांच्या मागे दिसणारा फळाचा दोडा; काकडी, भोपळा वगैरे वेलावर फुलाबरोबर दिसणारी फळाची लहान आकृती.

शी(शी)सफूल-ली वि. फळे धरणारे, वांझ नव्हे असे फळझाड.

शीळ स्त्री. तोंडाचा चंबूसारखा आकार करून त्यातून हवा बाहेर सोडत काढलेला आवाज. [क. सिळ्ळ]

शीळ स्त्री. दगड; विशेषत: मऊ गुळगुळीत व सपाट दगड; दगडाची चीप; पाटा; धार लावण्याचा, स्नान करण्याचा, कपडे धुण्याचा, उंबऱ्याचा दगड. [सं. शिला]

न. पहा : **शिळोत्तर पाटिलकी** [सं. शिला]

शीळ वि. श्लील; शुद्ध; पवित्र; सात्त्विक : 'त्यांची शीळ बुद्धि कैसी। सकाम मानसीं स्पर्शेना।' - भारा अर ४.५ [सं. श्रीर]

शीळवंत पु. जंगमातील एक वर्ग व त्यातील व्यक्ती.

शुक पु. १. पोपट; राघू; रावा. २. व्यासपुत्र; श्रीमत्भागवताचा वक्ता.

शुकतुण्ड (हस्त) पु. (नृत्य.) अंगठा, तर्जनी व अनामिका तळहाताकडे वळवणे व मधले बोट व करंगळी ताठ उभी ठेवणे.

शुकपाठ पु. प्राथमिक पाठ; ओनामा; प्रारंभ : 'पहिल्या पिढींत सुधारणेचा शुकपाठ झाला तो पुरा झाला.' - भाबं १.

शुकशुकाट पु. स्तब्धता; शांतता; निर्मनुष्यता; शून्यता.

शुकस्वामी पु. (ल.) अत्यंत कृश मनुष्य; पाप्याचे पितर.

शुका-क्का-की पु. आज्ञापत्र; फर्मान; हुकूम; राजाज्ञापत्रिका. [अर. शुक्क]

शुकाचार्य पु. १. शुक नावाचे ब्रह्मचारी ऋषी. २. (ल.) ब्रह्मचारी; व्रतस्थ.

शुकूर वि. कुशल. [फा.].

शुक्-शुक् उद्गा. मांजरास हाकलून लावण्यासाठी उच्चारला जाणारा शब्द. [सं. षुक्=जाण](वा) ० **असणे, होणे** - शून्य, स्तब्ध, शांत असणे. ० **करणे** - निवारण करणे; प्रतिबंध करणे.

शुक्ति, शुक्तिका स्त्री. १. शिंपली; शिंपी. २. मोत्याचा शिंपला.

शुक्तिमान पु. सात कुलाचलांपैकी एक पर्वत. पहा : **सप्तपर्वत**

शुक्र पु. १. आकाशातील एक तेजस्वी ग्रह. २. दैत्यगुरू. [सं.]

शुक्र एक सौरमास (३२ दिवस, ग्रीष्म).

शुक्र न. वीर्य; रेत; धातू. [सं.]

शुक्र, शुकर पु. आभार; प्रार्थना; कृतज्ञता; आभारप्रदर्शन : 'ईश्वरें पुनर्जन्म केला त्याचा शुक्र कोठवर करावा.'- मइसा ६.६२१. [अर. शुक्र]

शुक्रगुजार वि. कृतज्ञ; आभारी.

शुक्रगुजारी स्त्री. कृतज्ञता; आभारप्रदर्शन.

शुक्रपेशी, पुंबीज स्त्री. पु. लैंगिक प्रजनन-प्रक्रियेत पुरुषाकडून निर्माण होणाऱ्या पेशी, ज्यात मुख्य गुणसूत्रे असतात; (इं.) स्परमॅटोझून.

शुक्रपेशी पेढी शरीराबाहेर काढलेल्या शुक्रपेशींची सजीव रूपात साठवण करण्याची प्रणाली. या पेशी पोषक द्रावणात निर्जंतुक अवस्थेत आणि अतिशीत वातावरणात ठेवल्या जातात. कृत्रिम गर्भधारणेसाठी याचा उपयोग केला जातो. (इं.) स्पर्मबँक.

शुक्रवार पु. शुक्रग्रहाचा दोष; सात वारांपैकी गुरुवार व शनिवार यामधील दिवस.

शुक्रस्तम्भन न. वीर्यपात थांबवण्याची, रेतस्खलन न होऊ देण्याची क्रिया.

शुक्राचार्य पु. १. दैत्यांचा गुरू. हा एका डोळ्याने आंधळा होता. २. (यावरून ल.) एकाक्ष; एका डोळ्याने अंध इसम; अपशकुनी व्यक्ती.

शुक्राणा १. स्तुतिवाद. २. पोच झाल्याची मान्यता. ३. आभार. ४. नजर किंवा देणगी.

शुक्री वि. पांढऱ्या फिकट रंगाचे पाणी असलेली (माती).

शुक्ल पु. १. फक्त ब्राह्मणांच्याचकडे याज्ञिक, पौरोहित्य करणारा, ब्राह्मणांकडीलच भिक्षा घेणारा ब्राह्मणांचा वर्ग; गुजर ब्राह्मणातील एक वर्ग, त्यांचा उपाध्यायं. २. (ज्यो.) सत्तावीस योगांपैकी चोविसावा योग. [सं.]

शुक्ल न. डोळ्यातील फूल; डोळ्यांचा रोग. [सं.]

शुक्ल वि. १. पांढरा; श्वेत; शुभ्र. २. चांदण्यांचा; ज्यामध्ये चंद्रकला वाढत जाते तो (महिन्याचा पक्ष, पंधरवडा); या पक्षातील तिथी. ३. निर्दोष; सत्य. ४. वर्धमान.

शुक्लकाष्ठ न. (अप. शुष्ककाष्ठ) १. नसती ब्याद; अडगळ; अडचण; टुमणे; ससेमिरा; झेंगट; लचांड; लिगाड. २. पुरुषांचे गुप्तेंद्रिय; शिश्न. ३. खोडा. ४. ओढाळ गायीच्या गळ्यात बांधले जाणारे लोढणे.

शुक्ल बिलावल (संगीत) एक राग. गानसमय दिवसाचा पहिला प्रहर.

शुक्लवृत्ति–त्ती स्त्री. १.ब्राह्मणांकडेच पौरोहित्य करून किंवा प्रतिग्रह घेऊन निर्वाह करणे. २. शुद्धाचरण.

शुचा स्त्री. चिंता; काळजी; शोक; दु:ख : 'अगा जगाही परौती। शुचा वाहे पै चित्तीं।' – ज्ञा १८. ६८७. [सं. शुच्]

शुचि–ची पु. १. आषाढमास; एक सौरमास (३१ दिवस). २. शृंगार.
वि. पवित्र; शुद्ध; स्वच्छ; निर्मळ. [सं. शुच्]

शुचित्व, शुचिष्मता न. स्त्री. शुद्धता; पवित्रता; स्वच्छता.

शुचिर्भूत वि. निर्दोष; शुद्ध; पवित्र; स्वच्छ.

शुचिष्मंत, शुचिष्मान वि. पवित्र; शुद्धाचरणी.

शुचिस्रुवा स्त्री. पु. अग्निहोत्र्याच्या पळ्या : 'पेशजी शुचिश्रुवे सोन्याचे विसाजी आपाजी याणी नेले.' – पेद ४.४४. [सं.]

शुजा वि. शूर; पराक्रमी. [अर. शुजा = शूर]

शुजाअत, शुजात स्त्री. १. शौर्य; पराक्रम. २. शौर्यनिधी; एक पदवी. [अर. शुजाअत्]

शुणे–ने न. कुत्रे; सुणे. (गो.) [सं. शुनस्]

शुतर, शुतुर पु. उंट. [फा. शुतुर]

शुत(तु)रनाल स्त्री. उंटावरून वाहून न्यावयाची तोफ.

शुतरबान, शुत्तरवार पु. उंट हाकणारा; सांडणीस्वार.

शुतु न. पायातील जोडवे. [त.]

शुद्ध स्त्री. शुद्धी; अपभ्रंश. पहा : **शुद्धि**

शुद्ध न. ब्रह्म; चैतन्य : 'शुद्धीं अहंकार अळुमाळ। उठतां शुद्धासि करीं शबळ।' – एभा १३.४३२.
धावि. १. निर्मल; पापरहित; दोषरहित; पवित्र; स्वच्छ; निष्पाप. २. शोधित; संस्कारादिकांनी पवित्र, निर्मळ केलेला; पावन केलेला. ३. निर्दोष; बिनचूक; चोख; बरोबर; अव्यंग (व्यक्ती, लेखन, भाषण, वर्तन, क्रिया वगैरे). ४. एकाकी; साध्य; विशेषणरहित. ५. केवळ; फक्त; नुसता; निवळ : 'त्याची फ्रान्सच्या रणांगणावर शुद्ध लांडगेतोड चालली होती' – अस्पृ २. ६. शुक्ल; पांढरे; प्रतिपदंपासून पौर्णिमेपर्यंतचा (पक्ष). ७. चांगला; शुभ; दोषरहित; पवित्र (दिवस, तिथी). ८. योग्य; न्याय्य; बरोबर; संमत : 'कीं नृपशुद्ध शुद्ध हा करितो।' – मोकर्ण १३.१७. ९. अव्यंग; निरोगी; सुदृढ; धडधाकट. १०. साक्षात; मूर्तिमंत : 'सुमनें तीच्या रतीच जी शुद्ध।' – कर्म २. [सं. शुध्]

शुद्धकल्याण पु. (संगीत) एक राग. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर.

शुद्ध जाति–ती (संगीत) शुद्ध स्वरावरून तयार झालेली जाती.

शुद्ध तान (संगीत) सप्तस्वरांच्या क्रमात बदल न करता घेतली जाणारी तान.

शुद्ध द्वैती एक संप्रदाय. मायाविरहित म्हणजे शुद्धजीव व परब्रह्म ही एकच आहेत हे मानणारा संप्रदाय.

शुद्धबुद्ध स्त्री. शुद्धी व बुद्धी; ज्ञान; स्पष्ट जाणीव.
वि. १. (ल.) पहा : **शुद्ध स्फटिक** २. २. खलास; निकाल; शून्यवत: 'घृत नवनीत दधिदुग्ध। खाऊन केले शुद्धबुद्ध।' – ह ६.११७.

शुद्ध मल्लार (संगीत) एक राग. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर.

शुद्ध मार्ग सनातनधर्म; परंपरागत मार्ग; पवित्र, सत्य; ऋजुमार्ग.

शुद्धमुखी वि. पांढऱ्या कपाळाचा; गंध न लावलेला.

शुद्ध राग (संगीत) आपल्या नियमबद्ध स्वरांनी रंजक होणारा राग.

शुद्धलेखन न. व्याकरणाच्या नियमांनुसार लिहिलेले, लिहावयाचे लेखन.

शुद्ध वृत्ति–त्ती १. योग्य, अधिकारानुरुप व्यवसाय, धंदा; भिक्षाटन. २. निष्कपट; निष्पाप; सरळ स्वभाव–वर्तन.
वि. निष्कपट; सरळ; निष्पाप.

शुद्ध सामंत पु. (संगीत) एक राग. गानसमय दिवसाचा पहिला प्रहर.

शुद्ध सारंग पु. (संगीत) एक राग. गानसमय माध्यान्ह.

शुद्ध स्फटिक १. (शब्दश:) निव्वळ; स्वच्छ, पांढरा स्फटिक. २. (ल.) निरक्षर; निष्कांचन; अक्षरशत्रू; ढ माणूस. ३. सर्वस्वी नागवलेली व्यक्ती; कफल्लक माणूस.

शुद्ध ज्ञान ब्रह्मज्ञान; अपरोक्ष ज्ञान.

शुद्धि–द्धी स्त्री. १. स्वच्छता; पावित्र्य; निर्मलता; निर्दोषता. २. शोधन, स्वच्छ, निर्मल, पवित्र करण्याची क्रिया. ३. बरोबर, बिनचूक, निर्दोष करण्याची क्रिया किंवा तशी स्थिती; निर्दोषता; निष्पापता; बिनचूकपणा. ४. ऋजुता; सरळपणा; चांगलेपणा. ५. शुद्ध; देहभान; जागरुकता; सावधानता; स्मृती; चेतना; आठवण; सावधपणा. ६. शोध; तपास; विचारणा; खबर; बातमी; वार्ता. [सं. शुध्]

शुद्धिपत्र न. १. ग्रंथातील चुकांची दुरुस्ती दर्शविणारे पान, पत्रक; शोधपत्र. २. एखाद्या मनुष्यास पातकक्षालनार्थ प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घेतल्याचा दाखला; परधर्मातील गृहस्थास प्रायश्चित्तादी विधीने शुद्ध करून स्वधर्मात अगर जातीत घेतल्याबद्दलचे प्रमाणपत्र.

शुद्धीकरण न. १. भेसळ काढून टाकणे. २. धर्मांतर केलेल्यांना पुन्हा

स्वधर्मात घेणे.

शुनक न. कुत्रे : 'शौरि म्हणे राजेंद्रा यद्यपि बलवान् तथापि शुनकानें।' – मोउद्योग नवनीत ३०६. [सं. शुनस्]

शुनक पु. खंजिराचा पवित्रा.

शुफा पु. (कायदा) प्रथम खरेदीचा हक्क; अग्रक्रयहक्क; शेजाऱ्याच्या लगतची जमीन विकत घेण्याचा प्रथम हक्क. [अर. हक्क इ – शुफा]

शुभ न. १. सुदैव; कल्याण; अभ्युदय; ऐश्वर्य; सुखकारक स्थिती. २. (ज्यो.) अनुकूलता; कृपादृष्टी; कल्याणकारकता (तिथी, युती वगैरेची). ३. हितकारकता; लाभदायकता.

पु. (ज्यो.) सत्तावीस योगांपैकी तेविसावा योग.

वि.-१. मंगलदायक; लाभदायक; सुखकारक; सुदैवी; सुपरिणामाची (कृत्य, विधी, शकुन, चिन्ह, योग). २. मंगल; उत्सवरूपी; समारंभाचे (विधी, प्रसंग, संस्कार वगैरे). ३. सामान्यत: चांगले; बरे; हवेसे. [सं. शुभ् = शोभणे, प्रकाशणे]

शुभ(भं)कर वि. शुभदायक; मंगलकारक; हितकर; सुखकर.

शुभगा स्त्री. एक प्रकारची लगाम.– अश्वप १.१८५.

शुभवर्तमान न. १. सुवार्ता; मंगलवार्ता; शुभसंदेश. २. (ख्रि.) बायबलच्या नव्या कराराचे भाग.

शुभा स्त्री. १. पार्वतीचे नाव. २. गोवर रोग. ३. (सांकेतिक) (अशुभ सूचना टाळण्याकरिता) गोवऱ्या, शेणी (यांस उद्देशून वापरला जाणारा शब्द).

शुभेच्छा स्त्री. १. ज्ञानी जीवाच्या सप्तभूमिकांतील पहिली भूमिका. हिच्यामुळे अनुताप होऊन साधनचतुष्टयसंपन्नता येऊन गुरूपदेशाची पात्रता येते. २. चांगली मंगलदायक इच्छा.

शुभ्र वि. १. पांढरे. २.दिव्य. [सं.]

शुभ्रा पु. (सांकेतिक) रुपया.

शुभ्रीकरण न. १. पांढरे करणे. २. ओपविणे. ३. रंगहीन करणे.

शुभ्रोष्णता स्त्री. घनपदार्थ शुभ्र होईल इतकी उष्णता.

शुमारी स्त्री. मोजणीचे काम; गणना. [फा.]

शुरका पु. अव. भागीदार; पातीदार; वाटेकरी. [अर. शिर्क = भागीदारी]

शुरत, शुरा पु. स्त्री. कीर्ती; नाव. [अर. शुहरा = कीर्ती]

शुरू पु. १. प्रारंभ; आरंभ. २. अरबी सन.

वि. आरंभलेले; चालू झालेले. पहा : **सुरू** [अर. शुरू = आरंभ]

शुल्क पु. सत्तावीस योगांपैकी एक.

शुल्क न. १. मुलीबद्दल वराकडून घेतलेले द्रव्य; हुंडा. २. जकात; कर; दस्तुरी. ३. आहेर; (कायदा) विवाहप्रसंगाखेरीज मिळालेले स्त्री धन. ४. घरगुती काम; घरची भांडी वापरल्याबद्दल, दुभत्या जनावराची चाकरी केल्याबद्दल मिळणारा मोबदला. ५. अवांतर प्राप्ती. ६. सेवेचा मोबदला म्हणून आकारली जाणारी रक्कम. [सं. शुल्क]

शुल्ली स्त्री. जळाऊ काटक्या; ढलपी. (तंजा.) [त. शुल्ली]

शुशुमार पु. सुसर, मगर.

शुश्रूषण, शुश्रूषा न. स्त्री. १. सेवा; चाकरी; परिचर्या. २. श्रवण करण्याची इच्छा. [सं. श्रु = ऐकणे]

शुश्रूषालय न. जेथे रोग्यांची काळजी घेतली जाते ते स्थळ; (इं.) नार्सिंग होम.

शुषिरवाद्य न. पोकळ वाद्य; पावा, अलगुज, मुरली, सनई इ. [सं.]

शुष्क वि. १. कोरडे; वाळलेले; सुकलेले. २. (ल.) रोड, कृश (शरीर). [सं. शुष्]

शुष्क ऊर्ध्वपात (शाप.) कोरड्या पदार्थास उष्णता देऊन केलेले ऊर्ध्वपातन.

शुष्कक न. (र.शा.) विशिष्ट रसायने वापरून पदार्थांतील आर्द्रता काढून टाकण्याचे साधन; (इं.) डेसिकेटर.

शुष्काशुष्की क्रिवि. रिकामपणी; निष्फळ; बेकायदा; निरुपयोगी (श्रम करणे, काम करणे, यातायात करणे, परिश्रम घेणे).

शुष्केष्टि स्त्री. अभ्यासाकरिता, शिकण्यासाठी, प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी करावयाच्या संस्कार, विधी अथवा प्रयोगाची तालीम, मांडणी; पूर्वप्रयत्न.

शुष्कोपचार पु. अव. १. कोरडे, निष्फळ, व्यर्थ उपाय, योजना; बेकायदा तरतूद. २. (ल.) निरर्थक, पोकळ प्रतिकार, आश्वासन; शुभेच्छा प्रदर्शन; शुभचिंतन.

शुहदा पु. शठ; सोदा; लुच्चा; हरामी; उडाणटप्पू. [अर. शहीद = धर्मवीर]

शुहूर पु. अरबी सन; एक कालगणना.

[फा. शुहूर = महिने, शहर् = चंद्रमास याचे अनेकवचन; सं. सौर]

शुंट–ठ पु. स्त्री. न. मठ्ठ; मद्दड; ढ; निर्बुद्ध.[सं. शुंठ् = आळस करणे]

शुंठ–ठी स्त्री. सुंठ; वाळवलेले आले. [सं. शुंठी]

शुंडा, शुंडादंड स्त्री. सोंड (हत्तीची). [सं. शुण् = चालणे]

शुंडायंत्र न. अर्क काढण्याचे यंत्र; आसुतिपात्र; बकयंत्र; बकनळी.

शुंभ पु. १. एका राक्षसाचे नाव. यास दुर्गादेवीने मारले. २. (ल.) मठ्ठ, मद्दड, मूर्ख मनुष्य; बुद्धिहीन, मतिमंद पुरुष. [सं. शुंभ = शोभणे]

स्त्री. एक वाद्य; शिंगी.

वि. १. शिंग असणारा. २. शिखर असलेला. ३. ज्याच्या शेंडीत किंवा कानाच्या मधील भागात मांसाचा खिळा दिसतो असा (घोडा).

शूक पु. न. १. कुसळ; कूस (गवत, धान्य याचे). २. सड; कंटक; काटा. ३. सुरवंट; एक कुसळाचा किडा. [सं.]

शूकदोष पु. १. ज्यामध्ये कळा, शिलक, चमक, टोचणी लागते असा रोग. (कुष्ठरोगाची पूर्वावस्था). २. सुरवंट घातलेला लेप, मलम वापरल्यामुळे होणारा रोग.

शूद्र पु. १. चातुर्वर्ण्यातील चौथा वर्ण व त्या वर्गातील व्यक्ती. हा वर्ण विराटपुरुषाच्या पायापासून उत्पन्न झाला अशी समजूत आहे. २. (ल.) हा शब्द उपसर्गरूपाने दुसऱ्या शब्दास लावला असता त्या शब्दाने व्यक्त होणाऱ्या पदार्थाचा काळसर, धूसर असा प्रकार दर्शविला जातो. [सं.]

शूद्रमुखी वि. १. पांढऱ्या कपाळाचा; कपाळास गंध नसलेला. २. पांढऱ्या पायाचा व कपाळास कोणतीही खूण, चिन्ह नसलेला.

शून्य न. १. अभाव; राहित्य; नास्तित्व; रिक्तता; पोकळी. २. संख्येचा अभाव दाखवणारे चिन्ह; पूज्य. ३. अनुस्वार; विसर्गदर्शक चिन्ह.

४. आकाश; अवकाश; पोकळी. ५. परमतत्त्व; उपाधीरहित अनुभव; योगसाधनेतील प्रथमावस्था. ६.(वेदान्त.) निराकार ब्रह्म : 'आपुलिया साटोवाटीं। शून्य घेती उठाउठी।' – ज्ञा १२.५८.

वि. १.अभावात्मक; रिक्त; रिकामे; खाली; विरहित. (समासात) द्रव्य-ज्ञान-युक्ती-अर्थ-जल-शक्ती इ. २. नग्न; उघड; निर्वस्त्र; पात्रादिविरहित; वस्तुरहित; पोकळ; उघडे बोडके. ३. भकास; ओसाड; उजाड; निर्जन; सुने; बेचिराख. ४. बधिर; चेतनारहित; संज्ञाविरहित.[सं. शुन् = जाणे]

(वा.) **शून्यस्थानी पडणे** – निष्फल, निरर्थक होणे; वाऱ्यावर जाणे.

शून्य स्त्री. माया.

शून्यतुल्य वि. निरुपयोगी; निर्माल्यवत.

शून्यदृष्टि–ष्टी स्त्री. १. निर्विकार; चेतनारहित दृष्टी. २. (नृत्य.) एक अभिनय. डोळ्यातील बुबुळे स्तब्ध व एका रेषेत ठेवणे, पापण्या निश्चल ठेवणे. हा चिन्तादर्शक अभिनय होय.

शून्यपरिकर्माष्टक न. (गणित) शून्यासंबंधी बेरीज, वजाबाकी, गुणाकारादी आठ क्रिया.

शून्यमस्तक–की वि. ज्याचे तीन किंवा चार पाय पांढरे असून डोक्यावर (किंवा कानाजवळ) भोवरा वगैरे कोणतेही चिन्ह नसते असा (घोडा).

शून्यलब्धी स्त्री. १. भाज्यापेक्षा भाजक मोठा असल्यास येणारा शून्य भागाकार. २. (अर्वाचीन) अत्यंत सूक्ष्म संख्यांचे गणित.

शून्यलिंग न. निराकार परमात्मा; त्याची खूण : 'जे शून्यलिंगाची पिंडी। जे परमात्म्याची करंडी।' – ज्ञा ६.२७३.

शून्यवाद पु. जग हे केवळ अभावात्मक आहे, म्हणजे काही नाही म्हणजेच ब्रह्म असे मत.

शून्यवादी पु. १. शून्यवादाचा पुरस्कर्ता. २. नास्तिक पुरुष.

शून्यवेला–वेळ स्त्री. (ज्यो.) मध्यान्ह, मध्यरात्र व संध्याकाळ या वेळांना म्हणतात. कारण या वेळी केलेली कृत्ये निष्फळ होतात.

शून्यशे(से)ज स्त्री. माया.

शून्याकार वि. १. अभावरूप; ओसाड; निर्जन; उद्ध्वस्त. २. स्थलकालादी मर्यादा नसलेला; निराकार; सर्वव्यापी (प्रसरणशीलतेने); सर्वनाशी (आवरणशीलतेने) (ब्रह्म). ३. समाधी अवस्था.

शून्याकृति–ती वि. नाकर्ता : 'लॉर्ड लान्सडौनसारखे शून्याकृति व्हाइसरॉय आले की...' – टिले १.१.२८६.

शून्यालय न. मशीद.

शूर पु. वीर, पराक्रमी, योद्धा, लढवय्या (पुरुष).

वि. १. पराक्रमी; शौर्ययुक्त; युद्धकुशल. २. धीट; धाडसी; साहसी; निर्भय; उदार. ३. कोणत्याही गुणात अग्रेसर; विशेषत्वाने एखादा सद्गुण असलेला. उदा. (समासात) दानशूर, कर्मशूर, आरंभशूर इ. [सं.]

शूर्प न. सूप; धान्य पाखडण्याचे बांबूपासून तयार केलेले साधन. [सं. शूर्प = मोजणे]

शूर्पण(न)खा स्त्री. १. रावणाची बहीण. २. (ल.) कुरूप, कजाख स्त्री.

शूल–ळ पु. १. भाल्यासारखे एक हत्यार; शूळदंड. २. तीक्ष्ण अग्राचा लोहस्तंभ (अपराध्यांना मारण्यासाठी); सूळ. ३. तीक्ष्ण, तीव्र वेदना; तिडीक; कळ. ४. मेख; खिळा; टोचणी (लोखंडी). ५. (ज्यो.) सत्तावीस योगांतील नववा योग. ६. भातशेतीत उगवणारे एक तण; बेण. (आगरी) [सं.]

शूलगव पु. एक स्मार्त पशुयज्ञ.

शृगाल–ळ पु. कोल्हा; जंबूक. [सं.]

शृंखला–ळा स्त्री. साखळी; बेडी; लोखंडी कड्यांची बनविलेली माळेसारखी दोरी. [सं.]

शृंग न. १. (जनावराचे) शिंग. २. पर्वताचे शिखर. ३. चंद्राच्या कोरेचा निमुळता भाग; उभे टोक. ४. (ल.) भांडण करण्याकरिता केलेले चिडखोर, टोचणीवजा भाषण-कृत्य; उपस्थित केलेला मुद्दा इ.; तंट्याचे निमित्त. ५. शिंग; एक वाद्य. [सं.]

शृंगग्राहिकान्याय पु. (न्यायशास्त्र) समुदायाचे एकदम ग्रहण न करिता प्रत्येक पृथक व्यक्तीद्वारा समुदायाचे ग्रहण. एखाद्या गोष्टीने व्यक्त होणारी सर्वसाधारण सामुदायिक कल्पना घेण्याऐवजी तीत व्यक्त होणारे निरनिराळे महत्त्वाचे मुद्दे पृथकपणे विचारात घेणे.

शृंगाटक पु. चौक : 'समस्त शृंगाटक नोप देती।'– सारुह ६.३०.[सं.]

शृंगापत्ति–त्ती स्त्री. (न्यायशास्त्र) दोन वैकल्पिक गोष्टींपैकी कोणतीही स्वीकारल्यास अनिष्ट घडून येण्याची परिस्थिती; (इं.) डायलेमा.[सं.]

शृंगार पु. १. नवरसांपैकी एक रस. २. अलंकार; भूषण; शोभा; थाट. ३. (स्त्रियांनी केलेले) प्रेमदर्शक हावभाव, आविर्भाव; लज्जादी प्रदर्शन; नखरा, चाळे इ. ४. स्त्री-पुरुषांचा कामुक व्यवहार. [सं.]

शृंगारणे स्त्री. सुशोभित करणे; सजविणे; नटविणे; शोभविणे; भूषविणे.

शृंगारपट्टी स्त्री. घराच्या पुढील दरवाजाच्या चौकटीच्या वरच्या बाजूस गणेशपट्टीच्या वर बसवलेली कोरीव काम केलेली पट्टी.

शृंगारमराळिका–मराळी स्त्री. सुंदर स्त्री; रूपमती. [सं. शृंगार + मरालिका = हंसी]

शृंगारमुरड पु. शृंगारोपभोग.

शृंगारवेली स्त्री. एक जात (वादक, नर्तक) : 'वाद्यधारी शृंगारवेली।' – नव ११.७०.

शृंगा(घा)रिक वि. १. शृंगारासंबंधी. २. शृंगारी; शृंगाराचा भोक्ता.

शृंगारित वि. सजवलेला; नटवलेला; शोभायमान; सुशोभित.

शृंगारी–क वि. १. शृंगारशास्त्रात निपुण. २. कामुक; वैषयिक; प्रेमासक्त; कामी. ३. शृंगारासंबंधी; प्रेमविषयक.

शृंगारी, शृंगारिक वि. घराच्या बांधणीचा एक प्रकार. (को.)

शृंगिका स्त्री. अव. कीटकांच्या मिशा.

शृंगी पु. शिवाचा अनुचर; गण.

शे क्रि. आहे. (खा.) [गुज. छे; सं. अस्ति]

शे वि. १. शंभर; शत. २. शतकवाचक शब्दापुढे योजतात. उदा. दोनशे, तीनशे....नऊशे इ.

शेऊर स्त्री. १. एक झाड. (राजा.) पहा : **शेवरी**. २. शेवाळ. (कु.)

शेऊळ स्त्री. शीळ.

शेक पु १. धग; झळ; विस्तवाची उष्णता; ऊब; कपड्याने, गरम पाण्याने, पानांनी, औषधांनी वगैरे शरीराच्या एखाद्या भागास दिलेली ऊब, उष्णता

वगैरे. २. शेकोटी; आगटी. ३. शेती वगैरेच्या वहितीसाठी दिलेल्या बैल वगैरे जनावराबद्दल घ्यावयाचे भाडे; मोबदला. (को.)[सं. सेक] (वा.) ० **लागणे** - नुकसान होणे; पैसा खर्च होणे.

शेक स्त्री. भाजी. (राजा.) पहा : **शाक**

शेकडा पु. शंभर वस्तूंचा गट, समुदाय.

शेकडू वि. कडवट; कडसर; किंचित कडू.

शेकडो-श:-शा क्रिवि. शतश:; शंभरांनी; शेकड्यांनी.

शे(शें)कणी स्त्री. शेक देण्याची क्रिया.

शेकणे उक्रि. १. शेक देणे, घेणे; ऊब देणे, घेणे. २. (ल.) अंगावर बाजू उलटणे; एखाद्या व्यवहारात नुकसान येणे. [सं. श्रिष्]

शेकणे अक्रि. १. इजा करणे. २. स्पर्श करणे. [सं. शिष्]

शेकदार-री पु. स्त्री. (प्र.) पहा : **शेखदार-री**

शेकरा-री-रू पु. स्त्री. न. खारीच्या जातीचा एक प्राणी.

शेकले न. नाकात घालण्याचा स्त्रियांचा सोन्याचा दागिना; सुंकले. (गो.)

शेकशेगडी स्त्री. (सामान्यपणे) बाळबाळंतीण, आजारी मनुष्य वगैरेंना शेक देणे, उपचार.

शेकाटणे अक्रि. शेक घेणे; शेकाटा घेणे.

शेकाटा पु. शेक; उबारा; धग.

शेकाटा-टी पु. स्त्री. लांब बांबू; लांब काठी (कळकाची).[सं. शाखा]

शेका(कु-को)टी स्त्री. शेक; आगटी शेकट्याकरिता पेटवलेला काटक्या, गवत वगैरे पानांचा विस्तव, जाळ, आग; चुलीखेरीज इतरत्र भूमीवर पेटवलेला अग्नी. [सं. शकटिका]

शेकार पु. १. घराचे छप्पर; पेंढा, गवत वगैरे घालून घरावर केलेले आच्छादन. २. छपराचे सामान; गवत, झाप वगैरे. ३. कौले; छपराचे इतर सामान.

शेकारणी, शेकारणे पहा : **शाकारणी, शाकारणे**

शेकावणे अक्रि. १. पोळणे; भाजणे; जाळ लागणे; अंगास ज्वाला वगैरेची इजा होणे. २. (ल.) बाजू अंगावर येणे; नुकसान होणे; चट्टा बसणे.

शेकी क्रिवि. पहा : **शेखी**

शेक्रे न. कोंबड्याचा तुरा. (गो.) [सं. शेखर]

शेख पु. पीर; वृद्ध; साधू; विद्वान. [अर. शैख]

शेखचिल्ली पु. वेडापीर; उल्लू माणूस.

शेखदार पु. खेड्यावरील वसुली कामदार; तर्फेचा अधिकारी; महाल जमेदार.

शेखदारी स्त्री. शेखदाराचे काम, हुद्दा.

शेखर पु. डोक्यावरचा, मुकुटावरचा तुरा, झेंडा. [सं.]

शेखरू स्त्री. (भीमाशंकरजवळ आढळणारी) उडणारी खार.

शेखसल्ली विचार (ल.) मनोराज्य.

शेखी स्त्री. प्रौढी; बढाई; ऐट; तोरा; फुशारकी. [फा. शैखी]

शेखी क्रिवि. शेवटी; अखेरीस; पर्यवसानी. [सं. शिखा, शेखर]

शेखीशोखी स्त्री. गर्विष्ठपणा; चढेलपणा; उन्मत्तपणाची वागणूक.

शेग स्त्री. रांग; ओळ. (राजा., कुण.)

शेगट-टी स्त्री.पु. एक झाड; शेगवा; लांब शेंगा येणारी शेगव्याची जात; शेवगा. [सं. शिग्रु]

शेगटवणी स्त्री. शेगव्याच्या झाडाचा पाला किंवा शेंगा उकळून काढलेले पाणी.

शेगडा-रा-रे पु. न. (लोहार., सुतार.) घासण्यासाठी वस्तू घट्ट धरून ठेवण्याचे साधन, हत्यार; पक्कड.

शेगडी स्त्री. १. शेक घेण्यासाठी विस्तव ठेवण्याचे पात्र; कंगरी; आगटी. २. स्वयंपाकासाठी वापरण्याची कोळशाची किंवा गॅसची चूल. [सं. शकटी]

शेगवा, शेंगूल पु. शेगट; शेवगा.

शेगाडा-डी पु. स्त्री. लांब बांबू; वेळू; काठी. (कु.) पहा : **शेकाटा**

शेगाडी क्रिवि. (सरळ रेषेने) वर-खाली.

शेज स्त्री. न. १. रांग; ओळ; बाजू; क्रम : 'धर्माशी नीतिशीं। शेज घरीं।' - ज्ञा ४.५३. २. मळवट; विवाहादी प्रसंगी कपाळावर (अक्षता लावण्यासाठी) लावला जाणारा गंध, दही, कुंकू इ.चा लेप. (क्रि. भरणे, लावणे.) ३. शय्या; अंथरुण; बिछाना. ४. मोहरमातील मखर.[सं. शय्या](वा.) ० **घेणे** - (चर्म.) जोड्याच्या कडेचा भाग छाटणे; व्यवस्थित करणे. ० **पडणे, लागणे** - रांगेस लागणे; क्रमप्राप्त होणे; सुरू होणे. **शेजेस घालणे** - नवरा नवरीस एकत्र झोपविणे.

शेजओटी स्त्री. ब्राह्मणांमध्ये गर्भधानप्रसंगी रात्री मुलीच्या माहेरच्या मंडळींकडून मुलीची भरली जाणारी ओटी.

शेजघर न. झोपण्याची खोली.

शेजरं-रे न. १. लहान ढीग. (व.) २. खळ्याच्या भोवती मंडलाकार कडब्याच्या पेंढ्या उभ्या करणे. ३. बियांची कणसे ठेवण्याकरिता केलेला लांबट मुडा. ४. पेरणीचे बी वेगळे मळण्याकरिता मुख्य खळ्याच्या शेजारी केले जाणारे छोटेखानी खळे.

शेजा पु. दिंडी दरवाजावर, घराच्या गच्चीवर बांधलेली लहान खोली; सज्जा. [सं. छाया]

शेजार पु. १. निकटवर्तित्व; लगतचे घर, जागा, आवार; सामीप्य. २. लगतच्या घरात राहणारा.

शेजार न. १. शय्यागृह; झोपण्याची खोली. २. शय्या; बिछाना. [सं. शय्यगार]

शेजारधर्म पु. शेजाऱ्यासंबंधी वागणुकीची रीत, पद्धती, नियम इ.

शेजारपाजार पु. शेजार; जवळ वास्तव्य; सामीप्य.

शेजारी, शेजारीपाजारी पु. वि. लगत राहणारा.
क्रिवि. लगत; समीप.

शेजिया वि. जवळचा.

शेजी, शेजारीण शेजाऱ्याची बायको; शेजारी राहणारी स्त्री.

शेजी-जे क्रिवि. जवळ; समीप.

शेजुटणे न. विवाहप्रसंगी वधुवरांची शेज भरणे; त्यांनी सुपारी लपवणे, विडी तोडणे इ. विधी.

शेजोट पु. १५-२० माणसे बसू शकतील असा चौरंग.

शेट न. १. पुरुषाच्या जननेंद्रियावरील केस. २. (ल.) क:पदार्थ. (ग्राम्य)

शेट-ठ, शेटजी पु. १. सावकार; व्यापारी; उदमी; कारागीर; सोनार; कासार वगैरे स्वतंत्रतेने किंवा त्यांच्या नावापुढे लावायचा शब्द.

२. कलावंतीण बाळगणारा माणूस: 'त्यांच्या यारास मुंबईतील शेट असे म्हणतात.' - व्यनि १. [सं. श्रेष्ठ - श्रेष्ठिन्]

शेटकार पु. व्यापारी; सावकार. (गो.)

शेटकी स्त्री. शेट्याचा हक्क. बाजारात उपयोगात आणलेली धान्याची मापे सरकारी शिक्क्याची आहेत की नाहीत हे तपासणे, पेठेची व्यवस्था ठेवणे या कामाबद्दल दुकानदाराकडून येणाऱ्या मालावर शेट्यास मिळणारे उत्पन्न व ते मिळण्याचा हक्क.

शेटशाई स्त्री. शेठजीचा तोरा, ऐट, प्रतिष्ठा; सावकारीचा मान, दर्जा, हुद्दा. (क्रि. करणे, लावणे, मिरवणे, मोडणे, आणणे, दाखवणे.)

शेटाई स्त्री. दिमाख; डौल..

शेटाळणे क्रि. अनादर करणे; फसवणे.

शेटे-ट्या, शेटजी पु. स्त्री.१. पेठ; बंदर; गाव वगैरे ठिकाणची मापे, वजन, दरदाम इ.ची चौकशी, तपासणी करणारा अधिकारी. २. व्यापारी; जातीतील प्रमुख.

शेड स्त्री. १. फाक; फोड; चिरफळी; उभा लांबट कापलेला तुकडा (फळाचा). २. (माड, पोफळ, सुरमाड वगैरे झाडाची) तांत, तंतू; हिरका; चिरफळी; सोप; सोपट. [सं. च्छेद]

शेड स्त्री. (विणकाम) मागावरील कापड ताणण्याची धनुष्याकृती काठी.

शेड-डी-डू माती पिवळसर, पांढुरकी चिकण माती.

शेडगाव-पेडगाव न. वादी-प्रतिवादींचे मुद्दे पूर्णपणे ऐकल्याशिवाय अर्धवट केलेला निकाल अगर समेट; अनिश्चित; संशयास जागा असलेला निर्णय, समजूत.

शेडा पु. १. दोरीचा तुकडा; दोरखंड; देठ; बारीक साखळी; घड्याळाची साखळी. २. जाडा, बळकट दोर; मोठे दोरखंड. (को.)

शेडा पु. एक प्रकारचा रंग; दाट तपकिरी किंवा पिंगट रंग; भुरा रंग. वि. म्हैस, बकरे वगैरेंचा रंग; भुरकट; म्हैशीच्या रंगाचे.

शेडा पु. (अंधूक उजेडामुळे किंवा मंद दृष्टीमुळे दिसणारी) एखाद्या गोष्टीची छायारूप आकृती; काळसर झाक. [सं. छाया]

शेडा पु. एक प्रकारचे हरळीसारखे गवत; शेंडेगवत; जाड गवत.(व.) [सं. तृणाढ्य]

शेडा पु. निशाण; ध्वज.

शेडे न. भातावर पडणारा एक रोग.

शेडी स्त्री. बकरी; शेरडी; शेळी. (व., ना.)

शेण न. १. गाय, म्हैस, बैल इ. जनावरांची विष्ठा. २. पहा : **शेणखळा** स्त्री. १. शेणी. २. गुळाची ढेप. (बे.) [सं. शकृत्](वा.) ०**खाणे** - मूर्खपणाचे, निष्फळ, भलतेच कृत्य करणे. ०**विरणे** - राब करण्यासाठी शेतात शेण पसरणे. **शेणाचा दिवा लावणे**- दिवाळे काढणे. **शेणार काढप** - जमीनदोस्त करणे; नुकसान करणे. (गो.)

शेणक(का,ख,खा)ई, शेणकी स्त्री. १. शेण टाकण्यासाठी केलेली खाच, खड्डा; उकिरडा. २. (देशावर) शेणाची रास, ढीग.

शेणकुंडा पु. घरधंदा; घरकाम; रोजचे व्यवहारातील शेण गोळा करणे, सारवणे, दळणे, कांडणे इ. काम.

शेणख(खुं, को)ड न. शेणात भाताचे तूस किंवा कोंडा घालून केलेल्या गोवरी; गोवरीचे खांड; गोवर; गोवरी; शेणकट.

पु. (ल.) (निंदार्थी) शेणवी.

शेणखळा, शेणक(का)ला पु. १. सारवण्यासाठी पाणी घालून कालवलेले शेण. २. फळे, पाने, फुले इ. कुजून, नासून तयार होणारा गोळा.

शेणगा-गी पु. हवालदाराच्या हाताखालचा नाईक. [सं. सेना]

शेणगोटा-ठा पु. १. शेण. २. (सामान्यत:) शेणाने सारवणे, झाडलोट वगैरे कामास योजला जाणारा शब्द. यासारखे अन्य शब्द असे शेणपाणी, शेणसडा, शेणपोतेरे इ.

शेणगोळा पु. जेवताना सांडलेले खरकटे इ. उचलल्यावर मातीची जमीन स्वच्छ व्हावी म्हणून वरून फिरवतात तो शेणाचा गोळा. (वा.) **शेणगोळे घालणे** - अव्यवस्थितपणे केलेले काम तपासून दुरुस्त करणे.

शेणचे अक्रि. गहाळ होणे. (गो.)

शेणणे अक्रि. शेण टाकणे; विष्ठा करणे; लेंडी टाकणे. डोळ्यांत पू येणे; चिपडे धरणे.

शेणपा-पोह-पोहो-पोव, शेणाचा पोहो पु. १. शेणाचा गोळा. २. (ल.) लठ्ठ परंतु दुर्बल, जड, मद्दड जनावर; दुर्बल, नाकर्ता, नालायक मनुष्य; षंढ; नपुंसक.

शेणभोवर पु. शेणकिडा; शेणावरील माशी, भुंगा.

शेणमाती स्त्री. धुळवड. (ना.)

शेणवी पु. एक ब्राह्मण जात; सारस्वत; मुख्यत: लेखन व्यवसाय करणारी एक जात. शणै, शानई, शणई ही त्याची इतर रूपे. [सं. सेनापति; प्रा. सेणावइ, शाण्णवी]

शेणसाऊळ स्त्री. पोफळीची आळी खणून तिच्या मुळाशी घातले जाणारे शेण.

शेणामेणाचा वि. १. दुर्बल; नि:सत्त्व; अशक्त; हलका; पोकळ; वरपांगी; लिबलिबीत; मऊ वगैरे (इमारत, वस्तू, धंदा, पाणी, मनुष्य इ.). २. तिरस्कार, उपेक्षा दाखविण्यासाठी उपयोगात आणला जाणारा शब्द.

शेणारा पु. गोवऱ्यांचा लिंपलेला ढीग, रास.

शेणी स्त्री. १. गोवरी; थाबडा; शेणाचा वाळवलेला गोळा. २. शेणाचे वाळलेले पोहो. ३. अग्निहोत्राने होमाकरिता वाळवलेले शेणाचे गोळे. ४. (सांकेतिक) दुंडा पैसा; ढब्बू पैसा. (राजा.) (वा.) ०**वर शेणी रचणे**- नाहीसे करणे, जाळणे.

शेणी स्त्री.मासे धरण्याचे छोटे जाळे. (माल.)

शेणी(नी), शेणे स्त्री. न. (लोहार.) छिन्नी. (राजा.) [सं. छिद्]

शेणी थापणारा वि. पु.(ल.) १. आळशी, निरुपयोगी, रिकामटेकडा (मनुष्य). २. नाकर्ता, नपुंसक, षंढ (माणूस).

शेण्या पु.वि. डोळे आले असता कमी खुपणे, पण डोळ्यातील पू (घाण) बाहेर येण्याचा विकार.

शेण्या साप एक काळा, विषारी साप.

शेत न. १. धान्य वगैरे लावण्याची जागा, क्षेत्र; लागवड केलेली जमीन. २. पीक; उगवलेले, पिकलेले उभे धान्य. ३. शेतकाम; कृषिकर्म; शेती. ४. नवरात्रात किंवा चैत्रात घातले जाणारे रहू; भांड्यात रुजत

घातलेले धान्य व त्याचे अंकुर. ५. (ल.) उपजीविकेचे साधन; धंदा; व्यवसाय. [सं. क्षेत्र] (वा.) **०उतरणे–** कणसे चांगली बाहेर पडून दाण्यांनी भरणे. **०घरात ठेवणे, असणे, करणे–** शेती खंडाने न देता स्वत: कसणे; स्वत: शेती करणे. **०तोडणे–** कोवळ्या भाताच्या रोपावर रोग पडणे. **०सोसणे–** भातरोप्याचे केसर पांढरे पडणे; शेत सुकणे. [सं. शुष्]

शेतआडगरा पु. एक प्रकारची नाचणी.

शेतकरी पु. १. शेतीवर निर्वाह करणारा, शेताची मेहनत करणारा. २. शेताचा मालक. ३. खंडकरी; कर्दा; कूळ.

शेतकी स्त्री. १. शेतकाम; शेतकऱ्याचा व्यवसाय. २. पीक; उभे पीक.

शेतखाना पु. शौचाची जागा; संडास.[फा. सिह्हतखाना = आरोग्यगृह]

शेतकुट वि. शतचूर्ण.

शेतगणा स्त्री. शेतजमिनीचा समुदाय; लागवडीची जमीन.

शेतगी स्त्री. शेतकाम; जमिनीची मशागत; लागवड, काढणी वगैरे.

शेतघर न. १. शेतात तात्पुरते राहण्यासाठी बांधलेले घर. २. शहरी लोकांना मौज म्हणून थोडे दिवस राहण्यासाठी शेतजमिनीवर मुद्दाम बांधलेले व सर्व सुखसोयी असलेले घर; (इं.) फार्म हाऊस.

शेतपोत न. १. सामान्यत: शेती; शेतीखालील जमीन; शेतीवाडी; जमीनजुमला. २. शेतीची कामे.

शेतवड–डा पु. एक फुलझाड; दुधाणी. पहा : **कुंभा**

शेतवड, शेताड स्त्री. गावाभोवतीची लागवडीची जमीन..

शेतवळी स्त्री. चांभार लोकांत मामाने बाशिंग बांधल्यावर वराने शेजारच्या घरी जाण्याची रीत, रूढी.

शेतवार(री)पत्रक न. स्त्री. गावासंबंधी कुळकर्णी किंवा तलाठी याने जमिनीच्या शेतीच्या अनुक्रमाने ठेवावयाचे नोंदणीपत्रक, तक्ता.

शेतसनदी वि. लष्करी अथवा सरकारी कामाबद्दल पूर्वी सनदेसह शेत मिळत असे. तसे शेत धारण करून नोकरी करणारा.

शेतसारा पु. जमिनीवरील, शेतीवरील कर; महसूल.

शेती पु. शेताचा मालक.
स्त्री. शेतजमीन; शेतकी.

शे(श्ये)न पु. ससाणा पक्षी; बहिरी ससाणा. [सं. श्येन]

शेन पु. पावसाचा थेंब. (गो.)

शेनिश्चय पु. १. पक्का विचार; दृढनिश्चय. २. ठराव; निकाल; शहानिशा.

शेनोडी स्त्री. शिंदीच्या पात्याचे लहान टोपले. (व.)

शेनोत, शेनवत न. केळीच्या पानाचा विडी करण्याकरिता केलेला लहान तुकडा. (गो.)

शेन्नी, शेप स्त्री. बडीशेप; ओव्यासारखे एक धान्य; बी.

शे(शें)प स्त्री. शेपूट; पुच्छ; शेपटी. [सं.]

शेप–फ न. शिस्न; पुरुषाचे जननेंद्रिय. [वैसं. शेप]

शेप न. एक फळ. [फा. सेब = सफरचंद]

शेपकल्याणी वि. लंपट; कामातुर; विषयी (स्त्री).

शेपकिडा पु. शेपटासारखा भाग असणारा किडा. यास पाय नसून तो सरपटत चालतो.

शेपखळी स्त्री. विण्याच्या सुमारास जनावराच्या शेपटीजवळ पडणारी खळी.

शेपचौरी वि. शेपेचा चौरीसारखा गोंडा असणारी (मेंढी).

शेपट स्त्री. अतिशय जोराने हाकणे, पाठीस लागणे; दामटणे; धाव काढणे.

शेपट वि. बडीशेपेसारखा वास येत असलेले.

शेपटा, शेंपडा पु. लांब शेपटी; लांब, सुंदर केसांची वेणी.

शेपटी स्त्री. (ल.) फोकाटी; छडी; शिरपुडी; शिपटी.

शेपडावणे उक्रि. झोडपणे; मारणे.

शेपमोड्या वि. १. केवळ शेपूट पिळवटली असताना चालणारा. २. (ल.) मठ्ठ; आळशी; नालायक; कामचुकार.

शेपळा पु. १. एक किडा. २. मोठी ऊ.

शेपा–प्या वि. १. शोप्या; बडीशेपेसारखा वास येणारा (आंबा इ.). २. एक जातीचा तांदूळ.

शेपा पु. शेपटी. (ना.)

शेपाळ वि. पुच्छ असलेला; शेपटीचा.

शेपाळा–ळ्या वि. स्त्रीलंपट; कामी; विषयी; छंदी.

शेपाळू स्त्री. छिनाल; विषयी; कामुक स्त्री.

शेपू स्त्री. बाळंतशोपेचे झाड. याची भाजी करतात. [सं. शतपुष्प]

शेपूट न. १. पुच्छ; शेपटी. २. (ल.) टोक; अग्र; अखेरचा भाग. ३. (ल.) जनावर; पशू; गाय; म्हैस वगैरे : 'दर शेपटास तीन रुपये पडतात.'– के २५.३७. [सं. शेष.] (वा.) **०अडकणे–** एखाद्या अडचणीत गुंतून राहणे; भानगडीत सापडणे; तीतून बाहेर पडण्यास कठीण जाणे. **०घालणे–** भिऊन पळणे; भितरेपणा दाखवणे; घाबरून निसटून जाणे. **०ठेवणे–** (एखाद्या कामाचा, गोष्टीचा, क्रियेचा) अखेरचा भाग पूर्ण न करता अर्धवट ठेवणे; थोडीशी शिल्लक, बाकी ठेवणे. **०राहणे–** अवशेष, शेवटचा भाग, अखेरची गोष्ट मागे राहणे, पडून राहणे. **०लांबविणे–** लांबण लावणे; दिरंगाई करणे; मागची बाकी सारखी वाढवत राहणे. **०हालविणे–** लोभीपणा करणे; हावरेपणा करणे; खुशामत करणे.

शेपूटकल्याणी स्त्री. लंपट स्त्री.

शेप्या घुडा–ड्या एक जातीचा तांदूळ.

शेफ स्त्री. तरवारीचा एक प्रकार.

शेफ(फा)रणे अक्रि. फुगणे; चढून जाणे; मिजास करणे; फुशारणे; गर्व चढणे. [सं. शिभ्]

शेबया उद्गा. शाबास ! वा ! शिमग्यात पोस्त मागावयाच्या वेळी योजावयाचा शब्द.

शेम–शेम्ब स्त्री. चिकट पदार्थ; नाकातील मळ. [सं. श्लेष]

शेमट–टी पु. स्त्री. एक जंगली झाड. याची पाने आंब्यासारखी लांब असून यास चिंचोक्याहून लहान चपटी फळे येतात.

शेमणे, शेम्न न. लिंग; पुंजननेंद्रिय. [सं. शिस्न]

शेमला पु. डोकीला बांधावयाच्या पटक्याचा, रुमालाचा पदर; शेवट. [अर. शम्ला]

शेमेजणे अक्रि. थोडाथोडा घाम येणे; घामाने ओले होणे, भिजणे; घाम

बाहेर येऊ लागणे. [सं. स्विद्+मिद्]

शेर स्त्री. पक्ष्याची विष्ठा; शीट; छीट.

शेर पु. चिकाडा; काडेहुरा; निवली; कुंपणास लावावयाचे काड्याकाड्या असलेले चिकाळू झाड. [फा. शीर=दूध]

शेर पु. १. पदार्थ तोलावयाचे किंवा मापावयाचे एक प्रमाण, माप. याचे माप पूर्वी निरनिराळ्या भागात निरनिराळे असे. २. जासूद, शिपाई, बेगारी वगैरेस पोटाकरिता दिले जाणारे धान्य वा शिधा. ३. रोजचे अन्न; नित्यवृत्ती; उदरनिर्वाहाचे साधन. (क्रि. उडणे, उठणे, काढणे, चालणे, तुटणे, मिळणे, लागणे.) ४. आलुते बलुते.

शेर पु. १. वाघ. २. सिंह.
वि. जबरदस्त;-धृष्ट; धीर; पराक्रमी; धाडशी; सत्ता गाजवणारा. [फा. शेर=सिंह]

शेरका वि. १. शेरभर धान्य मावेल असा. २. शेरभर वजनात भरणारा. ३. शेरभर धान्य, तांदळाचा भात शिजेल असे.

शेरखोर वि. उन्मत्त.

शेरडी, शेरडुकी स्त्री. शेळी; बकरी.

शेरडी वि. (गुजरातमधील) एक जातीचा ऊस.

शेरडुक्या पु. धनगर; शेळ्या पाळणारा.

शेरडूक न. (तिरस्कार) बकरे; करडू; कोकरू.

शेरणी स्त्री. १. नदीकाठी वाढणारे एक झुडूप. २. दुसरे एक जातीचे झुडूप; थोर शेरणी.

शेरणी स्त्री. एक कुष्ठरोग. (व.)

शेरणी स्त्री. १. नवस फेडण्यासाठी वाटलेली मिठाई, प्रसाद, खिरापत. २. देवापुढे ठेवण्याकरिता किंवा भेट देण्याकरिता तयार केलेली गुळाची लहान ढेप. ३. नजराणा; दंड. [फा. शीरीनी-शिर्नी = गोडी, मिठाई; सं. श्रेणी-शेरणी]

शेरणीगार पु. हलवाई.

शेरताट-टी-ड स्त्री. शेराच्या झाडांची रांग, ओळ, कुंपण.

शेरपीठ-भत्ता न. पु. भत्ता; शिधा; शिपाई, बिगारी यास दिलेले धान्य.

शेरब न. एक प्रकारचे पिस्तुल.

शेरबाजी-जू स्त्री. सरशी; वर्चस्व : 'हे आपले ठायीं आपली बहुत शेरबाजी मानतात.'- जोरा ११५.

शेरवड न. बारीक पांढऱ्या पानांचे झाड. (कु.)

शेरवा पु. कोंबड्याच्या मांसाचा रसा; शिरवा.

शेरवान-नी पु. स्त्री. एक प्रकारचा अंगरखा. [फा. शेरवान]

शेरवी स्त्री. समुद्रातील माशाची एक जात.

शेरंडावणे अक्रि. शेफारणे; फुगणे; ताठा भरणे.

शेरा पु. दर; सरासरी; सामान्य प्रमाण; मध्यम प्रमाण. [अर. शराह्=दर; मात्रा]

शेरा पु. १. नियम; कायदा; पद्धती; घालून दिलेली रीत; रूढी; प्रचार; परंपरा; धारा. २. (कोर्ट दरबारी) पत्र, अर्ज वगैरेच्या खाली लिहिलेले उत्तर किंवा हुकूम. ३. नकल करून घेतल्यावर मूळ कागदावर तशा अर्थाचा लिहिलेला लेख. ४. तपासनिसाचा कागदावर आपले मत व्यक्त करणारा लेख. ५. कोणत्याही कामासंबंधी नियम, पद्धती वगैरे घालून देणारा लेख; दिग्दर्शक यादी; नियमावली. ६. टीका. ७. शिफारस : 'शेरे झटती लोकलोकांचे ।'- ऐपो २३८. [अर. शरआ=नियम]

शेरा पु. १. पिरावर बांधलेल्या माळांचा पुंज; चादर. २. हत्तीच्या माथ्यावरील झूल. [अर. शरआ = नियम]

शेरा पु. अखेरी; टोक; शेवट. [सं. शिरस्]

शेराईत वि. पटाईत.

शेरिखा पु. (विणकाम) दोन थोक, आठ कळ्या किंवा २४ फाळे इतक्या प्रमाणाचे रेशीम.

शेरिया स्त्री. अंबाडी. [गुज.]

शेरी स्त्री. बोळ; गल्ली; आळी; अरुंद गल्ली. [सं. शिरस्=शेक]

शेरी स्त्री. जमीन महसुलाकरिता घ्यावयाच्या धान्यावरती दरमणी दोन शेराप्रमाणे कमाविसदाराकडून आपला हक्क म्हणून घेतले जाणारे धान्य; सरकारी कामगारास अडशेरी वाटताना आपला हक्क म्हणून घेतले जाणारे धान्य.

शेरीकरी, शेरकर पु. शेरी जमिनीची लागवड करणारा; शेरीचा मक्तेदार; खंडकरी.

शेरीबाब पु. शेरी जमिनीपासून आलेला ऐनजिनसी किंवा नगदी वसूल.

शेरूक न. एका पक्ष्याचे नाव. (कु.)

शेरे न. नदीतील एक प्रकारचा मासा.

शेरेकरी पु. शेऱ्याप्रमाणे पगार, वेतन मिळणारा मनुष्य.

शेल न. टोक; शल्य : 'तैसा नोहाटे दुर्वाक्य शेलीं । सेलिला सांता ।'- ज्ञा १३.४९६. [सं.शल्य]

शेल न. (व.) १. काथ्याची लांब दोरी, कासरा. (गो.) २. नारळाचा घड; नारळाचा देठ. (हेट.) ३. (ल.) उच्च पद; उत्तम भाग; शिर; गळा. ४. शेवट; शेंडा; अखेरी. [सं.शैल, गु. छेल्ला]

शेल वि. समांतर. (खा.)

शे(से)लका वि. १. उत्तम; उत्कृष्ट; मुख्य; निवडक; श्रेष्ठ; वेचक; पसंत; सुरेख. २. सामान्यत: या अर्थी व्यापक अर्थाने व क्रियाविशेषणाप्रमाणे उत्तम रीतीने, बरोबर, नेमका, अचूक या अर्थी उपयोग होतो. [सं.शिल्=वेचणे]

शेलकाट न. (विशेषत:) मुस्लीम स्त्रियांची अंगावर घेण्याची पांढरी चादर.

शेलणे-ने न. झाडास पोंडातून पाणी उडविण्याचे सुपासारखे लाकडी साधन.

शेलणे सक्रि. वेचणे. [सं. शिल्]

शेलणे सक्रि. १. विंधणे; जखम करणे. २. सोलणे; शेंगा वगैरे फोडणे. [सं. शल्य]

शेलभर पु. बैलांना नियंत्रणात ठेवणारा दोर; लगाम. (अहि.)

शेलभेल स्त्री. मिसळ; मिश्रण; संकट; खिचड-मिचड; गिजगिंदा. [भेल द्वि.]

शेलवंट-टी स्त्री. १. एका जातीचे झाड. २. कोकणात सर्वत्र आढळणारी एक वेल.
न. वरील झाडाचे फळ.

शेला पु. नारळाची पेंड; नारळाच्या पोईचा देठ. (कु.) पहा : **शेल**

शेला पु. अंगावर घ्यावयाचे उंची वस्त्र. पूर्वी चारपट्टी एकत्र करून शेला तयार करीत. मानाच्या वस्त्रात याचा समावेश होतो. [सं. चैल] (वा.) **०घालणे–** दुखवट्याची वस्त्रे देणे.

शेलाटा–टी पु. स्त्री. उंच व सडपातळ; सडसडीत पण रेखीव व मजबूत (मनुष्य, झाड, काठी).

शेलाटी स्त्री. जोड जू. (पुणे)

शेलापागोटे न. १. शेला व पागोटे; बहुमानाची वस्त्रे; अहेराची वस्त्रे. २. सरकारी अधिकाऱ्यांचा एक हक्क, कर. ३. पहा : **फिशपाँड**

शेलारे न. कोरफड; घायपात वगैरे मधून येणारा तुरा, झुबकेदार दांडा.

शेलावाटी स्त्री. लग्न किंवा म्होतूर लावावयाचे वेळी पाटलास द्यावयाचा शेला व वाटीचा मान; एक हक्क; कर.

शेली स्त्री. पहा : न. **शेल**

शेली वि. सहा; ६ ही संख्या. (नंद.)

शेलू स्त्री. एक झाड.

पु. वरील झाडाचे हिरवा रंग करण्याकामी येणारे फळ.

शेलूक न. पाच अणकुचीदार लोखंडी गज बसविलेले, मासेमारीसाठीचे एक हत्यार.

शेले न. नारळाच्या पोयीतून येणारा फुलांचा घोस.

शेले न. १.जू; जोखड. (हे धुरीस पक्के केलेले असते.) २. (ल.) भार; ओझे; जबाबदारी. ३. बाजू; पक्ष; प्रतिपक्षी (खेळ, युद्ध यातील).

शेले सांबळीचा वि. शेला व शेमला असलेला; अकडबाज; ऐटबाज : 'शेले सांबळीचे झुंझार वीर। पांचशतें पैं।'– कथा ४.६.१७५.

शेव स्त्री. हरभऱ्याच्या डाळीच्या पीठाचा एक तिखट-मीठयुक्त खाद्यपदार्थ.

शेव स्त्री. भाजीपाला वगैरे विकावयास आला असता त्यावर घ्यावयाचा ऐनजिनसी कर.

शेव क्रिवि. १. उभ्या लंब रेषेत; सरळ खाली. (क्रि. चालणे, धरणे.) २. हलकेच; सौम्यपणे. (व.)

वि. ठेंगणे.

शेव पु. १. टोक; सीमा; अखेरीचा भाग; कड, शेवट (गाव, शेत, जाळे, वस्त्र इ.चा); शीव; शिवेवरचा आसमंताचा भाग. २. पदर; टोक; शेवटचा भाग (वस्त्राचा). ३. (ल.) संबंध; धागादोरा (तपास गुन्हा वगैरेचा). ४. माडी काढावयासाठी पोगीस पाडला जाणारा छेद. [सं. सीमा, शेप] (वा.) **०घालणे–** १. वस्त्राचा पदर हालवून बोलावणे. २. पदराने दिवा मालवणे. **०घेणे–** ओसरणे; कमी होणे; खाली जाणे. **०देणे,पोहोचवणे–** साथ करणे; सूर धरणे (गवयाची). **०बाधणे–** सहवासामुळे पीडा होणे; वाईट संगती लागणे. (कु.) **०लावणे–** अनुमोदन देणे; मदत करणे; साहाय्य करणे; हात देणे. **०लावणे–** जमीन उकरली न जाता वरवर खुरपणे. **०येणे–** स्त्री ऋतुमती होणे.

शेवई–य स्त्री. गहू किंवा तांदूळ यांचे पीठ भिजवून त्याची केलेली बारीक व लांब वळी. याची खीर करतात.

शेवक–ळ न. नारळाच्या पेंडीचे नारळ काढून घेतल्यावर राहणारा देठ.

शेवकं(कुं–खं)ड न. शेवेचा तुकडा.

शेवगा–गो पु. शेगट. याच्या फुलांची व शेंगांची भाजी करतात. [सं. शेगूल, शिग्रु]

शेवगा पु.सोऱ्या; चकली पात्र.

शेवगाठी स्त्री. गुजराथी शेवेचा प्रकार.

शेवट पु. अखेर; परिणाम; अंत; समाप्ती; अंतिम अवस्था.

न. १. टोक; अग्र; कड; कडेचा भाग; अंतिम भाग. २. बंदुकीचा तोडा.[सं. सीमन्=सीमा] (वा.) **०घेणे–** अखेरीस नेऊन पोचविणे; संपवणे; समाप्त करणे; अखेर करणे.

शेवटचा वि. १. अखेरचा; अंतिम. २. सर्वांत धाकटा.

शेवटचा आदितवार कधीही न येणारा दिवस.

शेवटणे अक्रि. १. टोक काढणे; बोथट झालेले टोक तीक्ष्ण करणे; धार लावणे. २. घोड्यास चाबकाच्या अग्राने किंचित मारणे. ३. चाटून, घासून जाणे.(राजा.) ४. शेवट लावणे; संपवणे; पूर्ण करणे (हिशोब, व्यवहार इ.). ५. शेवटी येणे; अखेरी होणे; घडून येणे.

शेवटता क्रिवि. निसटता; घासून जाणारा; चाटून जाणारा; चुटमुटका. (क्रि.लागणे, जाणे.)

शेवटा–टो पु. एक रुचकर मासा. (गो.)

शेवटा पु. कुंभाराचे चाक ज्यावर आधारलेले असते तो निमुळता भाग.

शेवटोर क्रिवि. शेवटपर्यंत; अखेरपावेतो. –तंजा. शिला.

शेवडा पु. शेव या नावाचा कर वसूल करणारा अधिकारी. [फा. शेव]

शेवडा वि. गावाच्या शेवटी राहणारा. (राजा.)

शेवडा पु. गोसाव्यांचा एक पंथ; जैन यती.[सं. सेवा; गु. शेवडो; सिं. सेविडो]

शेवडी स्त्री. चर्म; चामडी.

शेवडी स्त्री. नदीच्या पात्रात खोदलेली विहीर, झरा.

शेवडी स्त्री. सुपारीच्या किंवा नारळाच्या झाडाचे नुकतेच फुटलेले चुडत.

शेवडी स्त्री. टोक; अखेर.

शेवडे न. एक जंगली फूल.

शे(शें)व(वं)ती स्त्री. १. शेवंतीचे फूल. २. एक झाड. [सं. सेमंती]

शेवती स्त्री. (अप.)पहा : **सीमान्तपूजन**

शेवते न. १. शेवंतीचे फूल. २. शेवंतीच्या फुलासारखे डोक्यात घालावयाचे सोन्याचे फूल.

शे(शें)वते न. पु. तापविलेल्या बिब्याच्या तेलाचा दुधात अगर नुसता खाली पाडलेला थेंब (औषधासाठी). (क्रि. पाडणे, टाकणे.)

शेवते वाघळी तांबड्या पाठीचा मासा.

शेवत्रा पु. स्पर्श; संसर्ग; शिवाशिव.

शेवर पु. शेवतीचे झाड; शेवरीच्या जातीचे एक झुडूप. [सं. शाखोट]

शेवरा पु. नाचणीची एक जात. हिचा दाणा भुरा असून ही गर्वी आहे.

शेवरी स्त्री. १. एक झुडूप. २. मऊ कापूस येणारे एक झाड; सावरी. [सं. शालम्ली] (वा.) **शेवराइ जानं** – उंच वाढणे. (अहि.)

शेवरी स्त्री. शेवयाचा पुंजा, जुमडा.

शेवरे न. भुईछत्री; अळंबे.

शेवसबजी स्त्री. भाजीपाल्यावरील कर : 'शेवसबजी व वानगी देशमुखाचे निमे करार केली असे.'– वाडबाबा ३.३. [फा.]

शेवळ न. पहा : **शेल**

शेवा पु. करवंद वगैरे झाडाची कुंपणाकरिता लावावयास आणलेली काटेरी फांदी.

शेवा(व)ळ–ळी पु. न. स्त्री. १. पाण्यावर किंवा ओलसर जागेत उगवणारी हिरवी मऊ वनस्पती. २. पाण्यात उगवणाऱ्या शेवाळीसारख्या काही झुडपाचे सामान्य नाव. ३. शेवाड-य. (अहि.) [सं. शैवाल]

शेवाळणे अक्रि. १. शेवाळीने युक्त होणे; बुरसटणे; बुरशी येणे. २. (ल.) गुबगुबीत, गोंडस दिसणे.

शेवाळलेली वि. गाभण; गरोदर.

शेष पु. बाकी; उर्वरित भाग; अवशिष्ट भाग; अंश. [सं. शिष्]

शेषजाति–ती स्त्री. (गणित) बाकी सामील केलेली.

शेषफूल न. डोक्यात घालावयाचे सोन्याचे फूल.

शेषमणि–णी पु. १. शेषाच्या डोक्यावरील रत्न. २. पाचूच्या खाणीत सापडणारा पाचूपेक्षा फिका स्फटिक.

शेषाधिकारी पु. १. अविभक्त कुटुंबातील कर्त्या माणसानंतर ज्याच्याकडे कुटुंबाची मालमत्ता येते तो. २. संघसूची, राज्यसूची व समवर्ती सूची यांच्यामध्ये समविष्ट नसणाऱ्या विषयाबद्दल कायदे करण्याचा संसदेचा अधिकार.

शेष्य वि. शिल्लक ठेवावयाचे; उर्वरित; मागे ठेवावयाचे; बाकी राहावयाचे.

शेस स्त्री. अक्षत. (ना.)

शे(शें)स, शे(शें)सपाट स्त्री. १.(राजा.) पहा : **शेज**. २. देवदासीचे देवाबरोबर लग्न लावावयाचा विधी. (क्रि. घालणे)

शे(शें)सगाठ, शेसरगाठ, शेसरा स्त्री. पु. सरकगाठ; निसरगाठ; सरकफास; सुरगाठ.

शे(शें)सफूल न. पहा : **शीसफूल**

शेसमणे अक्रि. अर्धवट वाळणे; आंबट ओले होणे. [सं. शुष्]

शे(शें)समारप क्रि. संचार होणाऱ्या माणसाच्या अंगावर तांदूळ टाकणे. (गो.)

शे(शें)सवंत न. महार लोकात पाटाचे वेळी तीन वेळा कलश कपाळाला लावण्याचा विधी.

शेसविधी पु. १.वेश्याकर्माचा दीक्षाविधी. २. तरुण स्त्रीचा विधियुक्त कौमार्यभंग.

शेसावणे अक्रि. सोस वाटणे; उत्कंठा वाटणे. (व.)

शेसाळणे अक्रि. १. राग, द्वेष इ.मुळे संतापणे, जळफळणे. २. (ल.) खवळणे; क्षोभणे; जोरजोराने, सोसाट्याने येणे, वाहणे (वारा, पाऊस, आग). ३. शिवशिवणे; उतावीळ होणे; फुरफुरणे (मारावयास हात, चावावयास दात, बोलावयास जीभ इ.). ४. फुसफुसणे; फुत्कारणे; खेकसणे; धुसमुसणे (साप, मांजर, मनुष्य वगैरे).

शेसाळा पु. क्रोध; राग; क्षोभ; चेव; उत्कंठा; उतावीळ.[सं. ईर्षालु]

शे(शें)सूर, शे(शें)सूरणे पहा : **शिवसूर, शिवसुरणे**

शे(शें)सेवायत वि. शेसविधी केलेली (स्त्री).

शेहरा स्त्री. मुंडावळ. [फा.]

शेहेचाळीस वि. ४६ ही संख्या. [सं. षट् चत्वारिंशत्]

शेळ स्त्री. शीळ; सर्प, पाल वगैरेचा शिळीसारखा आवाज; फूत्कार; धुत्कार.

शेळ स्त्री. १. जिच्यामध्ये उन्हाळ्यातही ओलावा राहतो अशी भातजमीन. २. पाऊस पडल्याबरोबर लावता यावे याकरिता पाणथळ जमिनीत केलेले भाताचे रोप. (राजा., को.)

शेळ स्त्री. १. संध्याकाळची वेळ. (कु.) २. लहान मुलास थंडाईसाठी सकाळी घालावयाचे पाणी किंवा औषध. ३. थंडी; ओल. (गो.) [सं. शीतल]

शेळउंडी स्त्री. शिळा भात पाण्यात कालवून केले जाणारे खाद्य. (गो.)

शेळकाठी स्त्री. खेकडे पकडण्याचे एक साधन. (माल.)

शेळकुंड न. गोवरी. (कु.)

शेळणे अक्रि. शिळे होणे; गारठणे. (कु., को.) [सं. शीतल]

शेळमोडो वि. थंडपणा, गारठा मोडलेला, कमी झालेला. (गो.)

शेळवंडी स्त्री. १. सासरी अगर माहेरी आलेल्या मुलीवरून ओवाळून टाकली जाणारी तांदळाची अगर भाताची मूठ. २. ओवाळून टाकावयाची क्रिया.

शेळविणे क्रि. बोलविणे; बुडविणे; विसर्जन करणे.

शेळसभा स्त्री. विरोधी पक्षांच्या मित्रांची तडजोड करण्याकरिता भरवलेली सभा. (राजा.)

शेळा न. शहाळे; कोवळा नारळ. (कु.)

शेळी स्त्री. बकरी; एक लहान आकाराचा, चतुष्पाद, दोन शिंगे असणारा, केसाळ, शाकाहारी पाळीव प्राणी. [सं. छाग]

शेळी स्त्री. सहाण; वस्त्र्याचा धार लावण्याचा न्हाव्याकडील दगड. (गो.) [सं. शिला]

शेळीचा तरवा पाऊस पडताच पाणथळात लावण्यासाठी तयार केलेले भाताचे रोप व अशी जमीन. [सं. शीतल]

शेळीचा भाऊ १. बोकड. (को.) २. (ल.) उर्मट; मगरमस्त.

शेळीचे गलूल अजागळ.

शेळू स्त्री. शिवळ; जोखडाच्या टोकास असलेल्या भोकात घालावयाची खुंटी. (राजा.)

शेळू स्त्री. शिऊळ; शीळ; शेळ; शिटी. (राजा.)

शेळोंदरा–द्रा वि. काळुंद्रा; काळाकुळकुळीत; काळाकुट्ट.[सं. शिला]

शेळ्यामेंढ्या पु. (बुद्धिबळातील एक डाव) हत्ती हे वाघ समजून व इतर सर्व मेंढ्या समजून खेळावयाचा खेळ.

शेंकरे वि. कुजके; घाणेरडे : 'भेंकरें नि गांडीहारनें शेंकरें।'– लोक २.५७.

शेंग–घ स्त्री. अरुंद, लांबट, आत दाणे असलेले फळ; फळी.[सं. शिंबा]

शेंगटी–ळ–ळी, शेंडा पु.स्त्री. एका माशाचे नाव. (कु.)

शेंगोळी–ळे स्त्री. न. हरभऱ्याची डाळ, मुगाची डाळ, उडदाची डाळ यांच्या भरड्याचे तोंडी लावावयास केलेले मुटके, मुटकुळी.

शेंट(टा)ळणे अक्रि. १. गुह्येंद्रियावर केस उगवणे; वयात येणे; तारुण्यात येणे. २. अवज्ञा करणे; तिरस्कार, तिटकारा दर्शविणे; अवहेलना करणे; झिडकारणे. ३. बनवणे; फसवणे; चकवणे; चेष्टा करणे.

शेंड–डी स्त्री. मासे मारण्याचे (फेकण्याचे) जाळे. (कु.)

शेंडगलणे सक्रि. शेंडे, कणसे तोडणे. (बे.)

शेंडव(वे)ल स्त्री. पु. शेंगा येणारी एक प्रकारची वेल.

शेंडा पु. १. शेवट; अग्र; शिखर; टोक. २. झेंडा; निशाण. [सं. शिखंडक]

शेंडागोंडा पु. भाजी वगैरेच्या डिकश्या, झुबके, शेवटची पाने, कोवळ्या डिऱ्या. (वा.) **शेंड्यागोंड्यास येणे–** पोटरीस येणे; कणसे बाहेर पडण्याच्या स्थितीत असणे; पसवणे.

शेंडामोरा पु. लहान मुलाच्या टाळूवरील तोंडावर येणारे केस; पुढील जावळ.

शेंडी स्त्री. १. डोक्यावरील केसांचा तुकडा. २. डोक्यावरील तुरा; कल्ले; मोराच्या डोक्यावरील पिसे. ३. धूमकेतूची शेपटी. ४. घोड्याच्या टाळूवरील केस; झुलपे. ५. तेल्याच्या घाण्याच्या किंवा चरकाच्या मधल्या लाटेचा भाग; बोंड. ६. सोललेल्या नारळाच्या देठाकडील काथ्यांचा झुबका. ७. तडीस पागण्याचे जाळे. (कु.) ८. मक्याच्या कणसांवरील तंतूंचा झुबका. ९. (चर्म.) तजास मधोमध ठेवलेले टोक. [सं. शिखंडिका] (वा.) **०गुंतून राहणे–** काम अपूर्ण राहणे व थोडेफार पैसे अडकणे. **०ताठ होणे–** खूप संतापणे, चिडचिड करणे. **०फुटणे–** अंदाजापलीकडे खर्चाची रक्कम वाढणे; अपेक्षेपलीकडे कोणतीही गोष्ट जाणे, वाढणे; एका कामातून दुसरे, किरकोळ काम निघणे. **०राखणे–** लहान मुलास प्रथम शेंडी ठेवण्याचा विधी करणे; चौल करणे. **शेंडीस गाठ देणे–** १. गुरू, शिक्षक, वडील मंडळी यांच्यावर उलटणे; त्यांच्यावर कडी करू पाहणे; त्यास अक्कल शिकवणे; त्यांचा उपमर्द करणे, वरचष्मा करणे. २.दृढ प्रतिज्ञा करणे. **शेंडीस फूल बांधणे–** एखाद्याची स्तुती, खुशामत करून आपले काम साधणे. **(एखाद्याच्या हातात) शेंडी सापडणे, गुंतणे–** कचाट्यात, तडाख्यात सापडणे; अडचणीत येणे; दुसऱ्याच्या आहारी जाणे.

शेंडीधर्म पु. हिंदू धर्म.

शेंडीपालवी स्त्री. १. झाडांच्या शेंड्याची पाने; टिकशी; अग्राचा पानांचा झुबका. (क्रि. येणे, फुटणे.) २. (ल.) म्हातारपणात झालेले अपत्य.

शेंडीशृंगी वि. शेंडीखाली भोवरा असलेला (घोडा). हे अशुभ लक्षण होय.

शेंडीशेपटी स्त्री. १. (झाडाचा) अखेरचा भाग; अगदी शेवटची पाने. २. अखेरचा टाकाऊ भाग; गाळसाळ; करावयाचे कमी महत्त्वाचे, शेवटचे काम; आवराआवर; ऊरपूर.

शेंडे न. १. भातावर पडणारा एक रोग. २. एक प्रकारचे गवत.

शेंडेधान्य न. शेत कापून झाल्यावर फुटणारे धुमारे व त्यावर आलेले कणसाचे धान्य.

शेंडे(ड)फळ न. १. अखेरचे मूल. २. म्हातारपणात झालेले मूल. ३. अखेरची गोष्ट; सरता सरता करावयाची गोष्ट. ४. अखेरच्या बहराचे फळ.

शेंडेसलाम पु. अनोळखी माणसाने केलेला सलाम; दुरून केलेला नमस्कार.

शेंद स्त्री. १. नारळाचे बेले; डहू. २. बेल्याच्या आकाराचे फळ.

शेंद(दा)ड, शेंदणी स्त्री. चिबडीसारखा एक वेल.
न. शेंदाड; वरील वेलीचे फळ.

शेंद(दा)ड शिपाई पराक्रमाच्या गप्पा, पोकळ बाता, डौल मारणारा सैनिक; बाताड्या.

शेंदणी स्त्री. शेंदण्याची, पाणी ओढून काढण्याची दोरी. (को.)

शेंदणे न. १. पाणी काढण्याचा पोहरा, बादली इ. २. शेंदणी वेलाचे फळ.
उक्रि. १. पाणी किंवा एखादा जड पदार्थ खालून दोरीने वर ओढून घेणे. २. अडणे. (व.) ३. चिरा पाडणे; किंचित कापणे.

शेंदरी स्त्री. १. जोंधळ्याची एक जात. २. नाचणीचा एक प्रकार. ३. शिंदीच्या पानांची हातरी. ४. एक हलक्या किमतीचे लुगडे; तांबड्या अलवणाचे पातळ. ५. एक झाड (माकडाच्या तोंडासारखे). ६. तांबडी फुले येणारे एक फुलझाड.

शेंदरी–रा–ऱ्या वि. १. शेंदराच्या रंगाचा. २. या रंगाचा आंबा; त्याचे झाड.

शेंदव न. १. सैंधव; शेंदेलोण. २. खारटपणा; लोणा (जमिनीचा); खारट पाझर. ३. मीठ, गूळ इ.स सुटणारा पाझर.

शेंदाड–डे न. स्त्री. १. चिबूड; फूट : 'पाहेपां शेंदाडें पिकली.' – परामा १४.३. २. चिबडीचा वेल.

शेंदीव वि. शेंदून काढलेले (पाणी).

शेंदूर पु. शिसे व प्राणवायू यांच्या संयोगाने होणारा एक रंग. [सं. सिंदूर]
(वा.) **०उतरणे–** १. मूर्तीवरील शेंदराचे कवच सुटून पडणे. २. अपमान करणे; अवज्ञा, अवहेलना, अनादर करणे.

शेंदूर विकार घोगरा, बसलेला आवाज (शेंदूर खाण्यात आल्यामुळे).

शेंदे(दी–धे)लोण न. मीठ; शेंदेमीठ; एक क्षार; खाणीचे मीठ. [सं. सैंधव]

शेंप(पु)डी स्त्री. १. पुच्छ; शेपटी. २. जनावर (गाय, म्हैस इ.).

शेंब, शेम स्त्री. १. श्लेष्मा; शेंबूड; नाकातून होणारा स्राव; याचा रोग. २. आतड्यातील शेंबा, मळ; स्राव; विष्ठा; आम; आंब. ३. घोड्याच्या नाकातून होणारा स्राव, मल, निर्यास. [सं. श्लेष्मन्]

शेंब–बी स्त्री. धातूचे टोपण; टोकाला मजबुतीसाठी बसविलेली धातूची विडी, वेढे, मायणी, टोपण इ. (छत्री, काठी, खांब, पलंगाचा खूर, बाण इ.च्या). नरसाळ्याची निमुळती नळी.

शेंबडा वि. १. शेंबूड असलेले; शेंबडाने चोंदलेले (नाक). २. (ल.) अज्ञान; कळत नसलेला; अल्पवयीन.

शेंब(बा)रटी, शेंबी स्त्री. एक काटेरी वेल.

शेंबला पु. पहा : **शेमला**

शेंबा पहा : **शेंब** ३,४

शेंबा पु. (सोनारी) पत्र्याला कोच आणण्याचे साधन. (कु.)

शेंबाट्या वि. हलकासलका; कोणीतरी; कमी दर्जाचा. (चिपळूण)

शेंबी स्त्री. बैलांच्या शिंगांच्या टोकाला बसवलेले धातूचे टोपण.

शेंबूड पु. १. नाकातून वाहणारा श्लेष्मा. २. (ल.) दिव्याची काजळी. [सं.श्लेष्मोदक] (वा.) **शेंबडात लोळणे–** (ल.) संसारात गुरफटणे.

शेंबूडकिडा पु. गोगलगाय; पीक; पिकळी. (बे.)

शेंबे पु. अव. शेताच्या सरहद्दीचे दगड. [सं. सीमा]

शेंबे न. नासधूस; मोडतोड. (व.)

शैत्य न. १. थंडी; थंडपणा; गारठा; गारवा. २. हीव; सर्दी; थंडीचा विकार. [सं. शीत]

शैथिल्य न. शिथिलपणा; ढिलेपणा; सुस्ताई; हलकपणा.[सं. शिथिल]
शैल पु. पर्वत; डोंगर. [सं.]
शैली स्त्री. रीत; पद्धती; धाटणी; खुबी.(वागणे, लिहिणे, बालणे इ.ची)
शैली स्त्री. (एका प्रकारच्या बुद्धिबळाच्या खेळातील) राणी व प्रधानाची बायको.
शैलीबाजी स्त्री. एक प्रकारचा बुद्धिबळाचा खेळ. यामध्ये दोन शैली असून पटावर शंभर घरे असतात.
शैलूष पु. १. नट; नाडेभोरपी; दोरावर खेळ करणारा; कोल्हाटी.२. वाद्ये वाजविणाऱ्यांचा मुख्य. ३. ताल धरणारा. ४. बजवय्या. ५. ठग; लुच्चा. [सं.]
शैलेयक न. शिलेवर उगवणारी वनस्पती. [सं.]
शैव पु. शिवभक्त.
वि. शिवोपासक; एका विशिष्ट पंथातील. [सं.]
शैवाल भालान लोह; पोलादाचा एक प्रकार.
शैशव न. बाल्य; लहानपण; बालावस्था. [सं. शिशु]
शोक पु. १. दुःख; पीडा; खेद. २. आक्रोश; आकांत; रडारड; विलाप. (समासात) शोकाकूल, शोकातुर इ. [सं. शुच्]
शोकणे उक्रि. १. शुष्क करणे; सुकवणे; कोरडे करणे; शोषणे. २. शुष्क होणे; सुकणे; कोरडे होणे; वाळणे. [सं. शुष्क]
शोकणे अक्रि. सवकणे; शोक लागणे : 'तुझ्यारे मीं ममतेला शोकले।'- शेला ११५. [अर. शौक]
शोख पु. प्रेम; आवड; नाद. [अर. शौक]
शोखी स्त्री. १. ऐट पहा : **शेखी.** २. अमर्यादा; दांडगाई; जुलूम; औद्धत्य. ३. बंड; दांडगाई. [फा. शोखी]
शोचणे उक्रि. दुःख, खेद करणे. [सं. शुच्]
शोचनीय वि. दुःखदायक; दुःखप्रद; खेदकारक.
शोच्यता स्त्री. १. शोकाकुलता; खेद; दुःख. २. अयोग्यता; खेदकारकता.
शोण वि. रक्त; तांबडा. [सं. शो=रंगविणे]
शोणित न. रक्त; रुधिर. [सं.]
शोथ पु. सूज. [सं.]
शोथव्रण पु. सुजून आलेला फोड; गळू.
शोदा, शोदेगिरी, शोदेशाई पहा : **सोदा, सोदेगिरी**
शोध पु. १. धुंडाळणे; हुडकणे; पाहणे. २. चौकशी; तपास; विचारपूस. ३. परीक्षा; निरीक्षण; बारकाईने पाहणे. ४. निरीक्षणापासून बनलेला निश्चय; तपासाचे फळ, परिणाम; निकाल. ५. चुकीची दुरुस्ती, गाळलेला मजकूर घालून केलेली शुद्धी. ६. शुद्ध करणे; स्वच्छ करणे; दुरुस्त करणे वगैरे. पहा: **शोधन** [सं. शुध्=शुद्ध करणे]
शोधक वि. १. चौकस; शोधणारा; हुडकणारा; धुंडाळणारा. २. तपास; चौकशी करणारा; नजर ठेवणारा. ३. शुद्ध करणारा; दुरुस्त करणारा. ४. (गणित) बाद करावयाचा, ऋण (अंक).
शोधणूक स्त्री. शोध; तपास; परीक्षा.
शोधणे उक्रि. १. धुंडाळणे; हुडकणे; शोध करणे-घेणे. २. चौकशी, तपास करणे, निरीक्षण करणे; परीक्षा करणे. ३. शुद्ध करणे; निर्मल करणे. ४. दुरुस्त करणे; चुका काढून टाकणे; निर्दोष करणे.
शोधणे न. गाळण्याकरिता, पुसण्याकरिता, स्वच्छ करण्याकरिता वापरावयाचा कापडाचा तुकडा, हात पुसावयाचे फडके. [सं. शुध्]
शोधदीप पु. टेहळणीसाठी सर्व बाजूंना प्रकाशझोत टाकता येईल असा दिवा.
शोधन न. १. ऋणदान; कर्जफेड. २. जखम धुण्याची क्रिया. ३. शुद्ध करणे.
शोधनि(प्र)बंध पु. एखाद्या विषयावर संशोधनात्मक अभ्यास करून मत मांडण्यासाठी, पीएच.डी. पदवीसाठी इ. लिहिलेला अतिविस्तृत निबंध.
शोधनी स्त्री. वैद्याचे जखम तपासण्याचे उपकरण.
शोधनीय वि. शुद्ध करावयाचा; पवित्र करण्याजोगा.
शोधपत्र-पत्रक न. शुद्धिपत्र; ग्रंथातील शुद्धाशुद्ध दाखवणारे पृष्ठ.
शोधामणी स्त्री. १. कागदपत्र वगैरे शोधण्याची क्रिया. २. पूर्वीचे कागदपत्र शोधण्याकरिता द्यावा लागणारा पैसा, शुल्क;(इं.) फी.
शोधारणे सक्रि. शुद्ध करणे : 'पाठीं सात्त्विक धीरें तेणें। शोधारलीं तिथें करणें।'- ज्ञा १८.१०१८.
शोधाक्षम वि. दिवाळे निघालेला.
शोफ पु. १. सूज; शोथ. २. फोपशेपणा; थोथिल. [सं.]
शोफर पु. मोटार चालविण्यासाठी ठेवलेला खाजगी मोटारचालक.
शोभ स्त्री. शोभा; कांती : 'तेणें घनश्यामता शोभ। अतिसप्रभ साजिरी।'- एभा ३०.१९३.
शोभणे अक्रि. १. सुंदर, चांगले, सुरेख दिसणे; कांतिमान, तेजयुक्त, तेजस्वी, सौंदर्ययुक्त असणे. २. साजणे; योग्य, शोभायमान दिसणे; ठीक होणे; युक्त दिसणे. [सं. शुभ्]
शोभन न. १. विभूषण; सुंदर, तेजस्वी, कांतिमान दिसणे, असणे, करणे. २. मंगलकार्य; उत्सव; समारंभ : 'सिद्धी न पवेची गे शोभन। वायां गेलें वरमायपण।'- एरुस्व १२.६. ३. (सांके.) गर्भाधान; फळशोभन; मैथुन. ४. (सांके. शुभशब्द) इंधन; शुभकर्मासाठी, होमासाठी वगैरे वापरावयाचे सरपण, जळण इ.
पु. सत्तावीस योगांतील पाचवा योग.
शोभनपत्रिका स्त्री. लग्नचिठ्ठी; लग्नपत्रिका.
शोभनिक वि. शोभा देणारे.
शोभनिका स्त्री. गोवरी; शेणी. पहा : **शुभा ३**
शोभनी-णी स्त्री. १. देवी पार्वती अथवा गौरीचे नाव. २. विवाहादी मंगलप्रसंगी सजवलेली व आत दिवा असणारी रोवळी. ३. (सांके.) बाहेरख्याली, व्यभिचारी स्त्री. [सं. शुभ्]
शोभनीय वि. सुंदर; देखणे.
शोभमान वि. सुंदर; चकचकीत; तेजस्वी; तेज:पुंज; कांतिमान; दीप्तिमान.
शोभवणा वि. सुंदर; देखणा; दिखाऊ.
शोभा स्त्री. १. सौंदर्य; सौष्ठव; दर्शनीयत्व; देखणेपणा. २. तेज; कांती; तजेला; प्रभा; रूप. ३. सौंदर्यवर्धक वस्तू, अलंकार, भूषण, पदार्थ. (वा.) **०करणे, होणे-** फजिती, अपमान, अवहेलना करणे,होणे.

शोभाथिणे अक्रि. शोभणे; सुंदर दिसणे : 'म्हणोनि ते शोभाथिले।'– रास ४.५४.

शोभायमान धावि. (प्र.) शोभमान.

शोभांजन पु. एक झाड. याच्या पानाची, फुलांची व शेंगांची भाजी करतात. तसेच याच्या कोवळ्या मुळ्यांचीही भाजी करतात.

शोभित धावि. सुशोभित; भूषित; सजलेला; थाटलेला.

शोभिवंत वि. शोभायुक्त; सुंदर; देखणा; सुरेख; तेजस्वी.

शोर पु. आवाज; ओरड; गलबला; गलका. [फा.]

शोरा पु. १. सोरमीठ. २. सोरमिठाचे आगर; दलदलीची नापीक जमीन. [फा. शोर=खारट]

शोष पु.-१. कोरड; रुक्षता; कोरडेपणा; वाळले-सुकलेपणा. २. सुकणे; वाळणे. ३. शोषक गुण; आर्द्रता आकर्षित करण्याचा, ओलावा ओढून घेण्याचा धर्म, गुण. ४. अवर्षण; शुष्कता. ५. भयंकर तहान; तृष्णा; घशास पडणारी कोरड. ६. कफक्षय. ७. (ल.) लोभ : 'शरीर क्षीण झालें निःशेष। तरी वित्ताचा शोष शमेना।'– एभा २३.४१२. [सं. शुष्=कोरडे होणे, सुकणे]

शोषक वि. १. शोषून घेणारा. २. कोरडे करणारा; (इं.) ड्रायर.

शोषखड्डा पु. सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी खणलेला खड्डा.

शोषण न. १. शोषून घेण्याची क्रिया; कोरडे, शुष्क करणे. २. थोड्या मोबदल्यात फार जास्त काम करवणे.

शोषणपंप पु. नळीत चकती (दट्ट्या) बसवून ती ओढून त्यासोबत द्रव ओढून घेण्याचे साधन.

शोषणे सक्रि. १. शोषून घेणे; सुकविणे; कोरडे करणे. २. प्राशन करणे; घटाघट पिऊन टाकणे. ३. (ल.) ओढून घेणे; रिकामे, खलास करणे; आटविणे; संपविणे.
अक्रि. सुकणे; आटणे; संपणे; कोरडे, शुष्क होणे; वाळणे; रोड होणे (शरीर, जमीन, फळे वगैरे).

शोषनळी स्त्री. प्रयोगशाळेत तोंडाने द्रव वर ओढण्यासाठी वापरण्याची नळी.

शोषित धावि. १. शोषलेले; सुकलेले. २. (ल.) कोरडा केलेला; जवळचे सर्व नाहीसे झालेला; नागवलेला. ३. ग्रस्त झालेले; जिरवलेले; ओढून घेतलेले.

शोष्य वि. शोषण्यास योग्य, शक्य.

शो(शौ)हरत,शोहरा स्त्री.पु. प्रसिद्धी; कीर्ती; ख्याती.[अर. शुहरत्]

शौ उद्गा. कोंबड्यास हाकलताना उच्चारला जाणारा शब्द. (गो.)

शौक-ख पु. १. मनाचा कल; आवड; छंद; नाद. २. इष्क; विलास; विषयासक्ती. [अर. शौक]

शौकत स्त्री. ऐश्वर्य; भव्यपणा; मोठा दर्जा; मानसन्मान. [अर.]

शौकी वि. १. नादी; छंदी; छांदिष्ट. २. विलासी; विषयी; इष्कबाज. [अर.]

शौकीन वि. शौकी; हौशी.

शौच न. १.शुद्धी; दोष, मल याचे क्षालन; संमार्जन; प्रायश्चित्तादी विधीने दोष नाहीसे करणे. (आंतर किंवा बाह्य). २. स्वच्छता; पावित्र्य; शुचित्व. ३. मलोत्सर्ग; मलशुद्धी. [सं. शुच्=शुद्ध करणे]

शौचकूप पु. संडास; पायखाना; शेतखाना.

शौद्र पु. उच्चवर्णीयास शूद्र स्त्रीपासून झालेला मुलगा.
वि. शूद्रासंबंधी.

शौर पु. शहाणपण; विवेक; सुमार; धोरण. [अर. शुहरा]

शौरा वि. शूर; पराक्रमी : 'लोहांचा विसुरा। बलिभद्रु नव्हे शौरा।'– शिव ८९३.

शौर्य न. पराक्रम; शक्ती; सामर्थ्य; धैर्य; वीर्य. [सं.]

शौंड वि. समर्थ; योग्य; बुद्धिमान; हुशार; लायक. [सं.]

श्म(स्म)शान न. मसण; प्रेत जाळण्याची वा पुरण्याची जागा. [सं. श्मशान]

श्मशानकर्म न. प्रेतसंस्कार; उत्तरक्रिया; दहन-दफन विधी.

श्मशाननिद्रा स्त्री. मृत्यू; मरण.

श्मशानभाजन न. १. प्रेताभोवती पाणी फिरवण्याचे भांडे, मडके. २. (ल.) टाकाऊ, निरुपयोगी, क्षुद्र वस्तू.

श्मश्रू स्त्री. न. १. मिशा; दाढीमिशा; कल्ले वगैरे. २. सामान्यत: हजामत; तोंडावरचे केस.

श्मश्रूल वि. दाढीमिशा असलेला.

श्या शंभरास; 'शे' याचे सामान्यरूप.

श्याम पु. (संगीत) १. एक राग. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर. २. (नृत्य.) बीभत्स, भयानक, करुण या रसांचा अभिनय दाखविण्याच्या वेळचे तोंडावरील तेज.३. कृष्ण.
वि. सावळा; मेघवर्ण; काळा; निळा; अस्मानी. [सं.]

श्यामकर्ण पु. फक्त कान व पुच्छ काळे व बाकी सर्व पांढरे अंग असणारा घोडा. असा घोडा अश्वमेधास योग्य असतो.

श्यामकल्याण (संगीत) एक राग; कल्याण रागातील एक भेद.

श्यामचंद्र पु. शुक्ल पक्षातील द्वितीयेचा चंद्र.

श्यामल-क वि. गर्द निळा; काळा सावळा.

श्यामशबल पु. १. यमाच्या द्वाराचे दोन कुत्रे (श्याम व शबल). २. (ल.) दुष्ट लोकांची, चांडाळांची दुक्कल, जोडी. [सं.]

श्यामा स्त्री. सुंदर व तरुण स्त्री. [सं.]

श्यामाक पु. सावा नावाचे धान्य. [सं.]

श्यामिका स्त्री. १. काळेपणा; काळा रंग; नीलिमा; सावळेपणा. २. धातूमधील हिणकस भाग; रत्नातील दोष; काळेपणा.

श्याय न. चुन्याचा फरशीसारखा उपयोग करणे.

श्याल, श्यालक पु. बायकोचा भाऊ; साला; मेहुणा. [सं.]

श्येन पु. बहिरी ससाणा; एक शिकारी पक्षी. [सं.]

श्रद्धा स्त्री. १. तार्किक आधाराशिवाय, साधकबाधक चिकित्सा न करता ठेवलेला विश्वास; पूज्यबुद्धी; आदर; भक्तिभाव; निष्ठा. २. आस्तिक्यबुद्धी; विश्वास. ३. इच्छा; अभिलाष; हेतू : 'पहा हो भिकारिणीची चेष्टा। श्रद्धा करितसे राज्यपदा।'– कथा १.५.१२. [सं. श्रत्+धा=ठेवणे]

श्रद्धाजाड्य न. श्रद्धेबद्दलचा हट्ट; एखाद्या गोष्टीविरुद्ध प्रमाण दिसले तरी

विश्वास ठेवणे.

श्रद्धालु-ळू, श्रद्धावान वि. श्रद्धा ठेवणारा; भाविक; विश्वासी.

श्रद्धेय वि. श्रद्धा ठेवण्यास योग्य, विश्वसनीय; विश्वासाहार्य.

श्रम पु. १. कष्ट; आयास; मेहनत; राबणूक; दमणूक. २. दु:ख; खेद; त्रास; कंटाळा; कटकट : 'देवा होय श्रम दुर्जनांचा।'- तुगा १५. [सं. श्रम्] (वा.) **०टाकणे-** दु:ख परिहार होणे; कष्ट वाटेनासे होणे. **०मागून घेणे-** घडलेल्या श्रमाबद्दल क्षमा मागणे; खेद व्यक्त करणे.

श्रमकोडी पु. अतिश्रम.

श्रमण,श्रमणक पु. बौद्ध यती, संन्यासी. [सं.]

श्रमणे अक्रि. दमणे; थकणे; त्रासणे; कंटाळणे; कष्टी होणे. [सं. श्रम्]

श्रमित, श्रमी धाबि. थकलेला; दमलेला; भागलेला; त्रासलेला.

श्रवण पु. बौद्ध, जैन यती.

श्रवण न. १. ऐकणे; श्रुत होणे; ऐकण्याची क्रिया. २. कान; श्रवणेंद्रिय. ३. सत्तावीस नक्षत्रांतील बाविसावे नक्षत्र. [सं. श्रु=ऐकणे]

श्रवण न. कर्ण; काटकोन त्रिकोणाची कर्णरेषा. [सं.]

श्रवणपरीक्षा स्त्री. स्टेथॅस्कोप लावून रोगाबद्दलची माहिती मिळवणे.

श्रवणमापक पु. कानांनी किती चांगले ऐकू येते हे मोजण्याचे उपकरण.

श्रवणयंत्र न. कमी ऐकू येणाऱ्याला ऐकता यावे म्हणून कानाला लावण्याचे यंत्र.

श्रवणीय वि. ऐकण्यास योग्य.

श्राद्ध न. मृत पितरांस उद्देशून पुत्रादिकांनी करावयाचे पिंडदान कर्म इ.[सं.]

श्राप, श्रापगुण, श्रापणे, श्रापित पहा : **शाप इ.**

श्रामक वि. १. श्रम करणारा; कष्ट करणारा. २. तत्पर; दक्ष.

श्राव पु. (अप.) पाझर; झिरपा; टपकणे. पहा : **स्राव**

श्रावक पु. जैनधर्मी गृहस्थ; जैनमतानुयायी. [सं.]

श्रावड स्त्री. रुपेरी पानांचे एक झुडूप; मंगळागौरीस वाहिली जाणारी पाने.

श्रावण पु. हिंदू पंचांगातील पाचवा महिना. [सं.]

श्रावणकाकडी स्त्री. श्रावणात लागलेली काकडी. ही अपूर्व म्हणून प्रथम देवाला अर्पण करून नंतर खातात.

श्रावणघेवडा पु. घेवड्याची एक जात; अडीच मासा.

श्रावणपाटी स्त्री. १. विवाहानंतरच्या पहिल्या श्रावण महिन्यात वराकडून वधूकडे खेळ वगैरे भरून पाठवली जाणारी पाटी. २. श्रावणसण.

श्रावणसर-री, श्रावणपावळी स्त्री. १. श्रावण महिन्यात एका पाठोपाठ येणाऱ्या पावसाच्या सरी; झडीचा, थांबून थांबून सारखा पडणारा पाऊस. २. (ल.) मधून मधून वरचेवर सारखे होणारे भांडण.

श्रावणी स्त्री. १. श्रावण महिन्यात प्रतिवर्षी ब्राह्मणात करतात ती उत्सर्जन, उपाकर्म आणि नवीन यज्ञोपवीत घालणे इत्यादी कर्मे. २. श्रावणातील पौर्णिमा.

श्राव्य वि. श्रवण करण्यास, श्रवण्यास, ऐकण्यास योग्य; ऐकण्याजोगे; ऐकू येईल असे.

श्राव्यत्व न. ऐकण्याविषयी योग्यता : 'श्राव्यत्वें तरी माधुर्य। पार्यी घाली।'- ज्ञा १६.११८.

श्रांत वि. दमलेला; थकलेला; कष्टी; कंटाळलेला.

श्रांति-ती स्त्री. दमणूक; कंटाळा; शीण; थकावट. [सं.]

श्रिमाटु पु. मद; मस्ती. पहा : **श्रीमाठ**

श्रिंगार, श्रिंगारणे पहा : **शृंगार, शृंगारणे**

श्री स्त्री. १. लक्ष्मी. २. ऐश्वर्य; संपत्ती; कांती; शोभा. ३. जगातील तीन पुरुषार्थ - धर्म, अर्थ, काम समुच्चयाने : 'श्री हरील शकुनी ती'- मोसभा ३.४३. ४. देवता, तीर्थे, धर्मग्रंथ, गुरू वगैरेच्या नावापूर्वी आदरार्थ योजावयाचे उपपद; ग्रंथ, पत्र वगैरेच्या आरंभी लिहावयाचा शुभदर्शक 'श्रीगणेशायनम:' याचा संक्षेप. ५. ऐश्वर्य; वैभव; सौंदर्य वगैरेचा द्योतक म्हणून अनेक शब्दांपुढे जोडला जाणारा शब्द. उदा. जयश्री, यशश्री, धनश्री इ. ६. (सांके.) काशीक्षेत्र. ७. पराशक्ती; आदिमाया; दैवी संपन्नता; तेज. ८. पूर्णता.९.श्रीमंत, श्रीयुत, श्रीयुक्त, श्रीमती यांचा संक्षेप. [सं.]

श्री, श्रीराग पु. (संगीत) एक राग. गानसमय सायंकाळ.

श्रीक पु. (शाप.) एक धातू; (इं.) सिरियम.

श्रीकरण पु. लेखक; प्रधान; कुलकर्णी. [सं.]

श्रीकरणाधिप, श्रीकरणी पु. देशातील जमाबंदीचा मुख्य अधिकारी. [सं.]

श्रीकार पु. १.व्यापारी वगैरे लोकांत मालावर मंगलदर्शक 'श्री' अक्षराचे केले जाणारे चिन्ह. २. हिशोब, लेख वगैरेचे शीर्षक. [सं.]

श्रीखंड न. १. दह्याचा चक्का, साखर, केशर मिळून तयार केलेले पक्वान्न. २. गंध; चंदन : 'श्रीखंड खंडे बुका।'- सारुह ३.४२. ३. भांगेचा एक पदार्थ. [सं. श्रीखंड]

श्रीगणेशा पु. (ल.) कार्यारंभ; पहिला पाठ; सुरुवात.

श्रीगर्भ न. खड्ग; तरवारीचा प्रकार.

श्रीगिरि स्त्री. छत्र. पहा : **शिरगीर**

श्रीचक्र न. एक तांत्रिक चक्र. [सं.]

श्रीनिकेतन न. विष्णूच्या छातीवरील, लक्ष्मीच्या निवासाचे चिन्ह.[सं.]

श्रीपति-ती पु. १. विष्णु; कृष्ण. २. धनवान; श्रीमंत मनुष्य. [सं.]

श्रीपाद पु. संन्यासी : 'श्रीपाद जाले द्रव्याभिलाषी।'- स्वादि ९.१.८०.

श्रीफल-ळ न. १. नारळ; प्रसाद म्हणून दिलेला किंवा देवतेस अर्पण केलेला नारळ. २. एक विशिष्ट बंगाली फळ.[सं. श्रीफल] (वा.) **०देणे-** निरोप देणे; नोकरीवरून दूर करणे.

श्रीमंत पु. १. राजा; महाराज. २. पेशवे सरकार; गादीनशीन पेशवा. ३. संस्थानिक.
वि. धनवान; ऐश्वर्यवान; पैसेवाला. [सं.]

श्रीमंतपूजन न. सीमांतपूजन याबद्दल चुकीचा प्रयोग; शेवती पूजन.

श्रीमंती स्त्री. समृद्धी; ऐश्वर्य; संपत्ती; श्रेष्ठपणा.
वि. श्रीमंत लोकांसंबंधी; श्रीमंतात रूढ (चाल,रीत, पद्धती, भाषा इ.).

श्रीमाठ पु. संपत्तीचा, ऐश्वर्याचा गर्व, ताठा; अहंकार; अभिमान; आढ्यता : 'तैं मीचि का कर्मठ। ऐसा न ये श्रीमाठ।'- ज्ञा १४.३५८. [सं. श्रीमद्]

श्रीमान पु. वि. ऐश्वर्यवान; आदरणीय; वंद्य; मान्य; पूज्य; दैववान.

श्रीमुख स. १. भगवंताचे तोंड; तेज:पुंज कांतिमान चेहरा, चर्या. २. (उप.) थोबाड; मुसकट; तोंड.

श्रीमुद्रा स्त्री. वैष्णवलोक आपल्या चेहऱ्यावर उठवून घेतात ती विष्णुसंबंधीची चिन्हे (शंख, गदा, चक्र, पद्म व रामनाम).

श्रीरंजनी पु. (संगीत) एक राग. गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर.

श्रीवत्स पु. न. १. विष्णू. २. विष्णूच्या हृदयावरील पांढऱ्या केसांचा भोवरा. यालाच श्रीविष्णूच्या हृदयावरील भृगूच्या लत्ताप्रहाराचे चिन्ह म्हणतात.

श्रीवर्धनी वि. श्रीवर्धन गावची; श्रीवर्धन गावासंबंधी.

श्रीविद्या स्त्री. मंत्रतंत्रविद्या. [सं.]

श्रीवृकी वि. छातीवर चोहोकडे चार व कंठाचे ठिकाणी चार असे आठ भोवरे असणारा (घोडा). हा शुभ समजतात. [सं.]

श्रीवेष्टन न. वस्त्र. [सं.]

श्रीह(हा)ट न. (योग.) तालुस्थानचा मुख्य बिंदू; ब्रह्मरंध्र. [सं.]

श्रुत धावि. १. ऐकलेले; ज्ञात; प्रख्यात; प्रसिद्ध. २. ज्याने ऐकले आहे असा. ३. श्रुतीत, वेदशास्त्रात पारंगत. ४. श्रुतींनी, धर्मशास्त्राने विहित. ५. वेद; वेदादी विषयांचे श्रवण. [सं.श्रु=ऐकणे]

श्रुतकीर्ति–र्ती वि. प्रसिद्ध; प्रख्यात; विख्यात. [सं.]

श्रुतलेखन न. तोंडी सांगितलेला मजकूर लिहून घेणे (सामान्यत: लघुलिपीत).

श्रुताधीत वि. वेदाध्ययन केलेला; बहुश्रुत व पढीक. [सं.]

श्रुति–ती स्त्री. १. ऐकणे; श्रवण; ऐकण्याची क्रिया. २. श्रवणेंद्रिय; कान. ३. वेद : 'जे श्रुतित्रयातें जाणोनि । शतवरी यज्ञ करूनि ।'– ज्ञा ९.३१०. ४. वार्ता; बातमी; आवई. ५. (संगीत) स्वर; अखंड, स्पष्ट व मधुर या गुणांनी युक्त गायनोपयोगी नाद. एकूण २२ श्रुती आहेत. ६. काटकोन त्रिकोणाचा कर्ण. ७. (ल.) आधार; शासन; नियम. ८. वीणा : 'गर्जती गंभीर । टाळश्रुति मृदंग ।'– तुगा २६५८. [सं. श्रु=ऐकणे]

श्रूयमाण वि. ऐकण्यास योग्य; ऐकण्याजोगे. [सं.]

श्रेढी स्त्री. (गणित) मालिका; रांग; जेव्हा कोणा एका नियमाने एकसारख्या अनुक्रमाने संख्या वाढत वा कमी होत जातात, अशा ओळी. [सं. श्रेधी]

श्रेणी स्त्री. ओळ; रांग; मालिका; पंक्ती; पंगत. [सं.]

श्रेणी स्त्री. अधिकारयुक्त महाजन मंडळ; पेढी : 'गोवर्धनात राहणाऱ्या श्रेणीकडे दोन हजार कार्षापणांची रक्कम अनामत ठेविली .'– केसरी १८.५.३७. [सं.]

श्रेय न. १. शुभ; हित; लाभ; कल्याण; ऐश्वर्य; चांगुलपणा. २. पुण्य; फल; सुकृत. [सं.]

श्रेयस्कर वि. १. हितकर; लाभदायक; कल्याणकारक. २. पुण्यकारक.

श्रेयान वि. श्रेष्ठ; उत्तम; वरिष्ठ; मुख्य. [सं.]

श्रेयोर्थी वि. १. शुभेच्छा प्रदर्शित करणारा; कल्याण इच्छिणारा; चांगली इच्छा असणारा. २. पुण्याची इच्छा करणारा; शुभफलाकांक्षी; कर्मफळाची प्राप्ती इच्छिणारा. [सं.]

श्रेष्ठ वि. उत्कृष्ट; उत्तम; वरिष्ठ; मुख्य; ज्येष्ठ . [सं.]

श्रेष्ठार्धांग न. पत्नी; (इं.) बेटरहाफ.

श्रोणवी स्त्री. १. भूमी; पृथ्वी. २. जमीन; माती. [सं. क्षोणि]

श्रोणि–णी स्त्री. ढुंगण; कुल्ले; नितंब. [सं. श्रोण्=संचय करणे]

श्रोतव्य वि. ऐकावयाचे; ऐकण्यायोग्य; ऐकण्याजोगे. [सं. श्रु=ऐकणे]

श्रोता पु. ऐकणारा; ऐकावयास आलेला, बसलेला; श्रवण करणारा. [सं. श्रु]

श्रोत्र न. कान; श्रवण; श्रवणेंद्रिय; कर्ण; कर्णेंद्रिय. [सं.]

श्रोत्रि(त्री)य, श्रोती–त्री, श्रौती पु. १. वेदवेत्ता; वैदिक ब्राह्मण; श्रुतिपारंगत ब्राह्मण; वेदज्ञ. २. अग्निहोत्री; यज्ञ करणारा. [सं. श्रुति]

श्रौत वि. १. श्रुतिविहित; वेदविहित; वेदप्रोक्त. २. वेदासंबंधी; श्रुतिसंबंधी. [सं.]

श्रौतसमो पु. श्रुतीचा संकेत; श्रुतिसमय; वेदांचा सिद्धान्त. [सं. श्रुति+सम]

श्रौतादिक वि. श्रुतिस्मृतिपुराणोक्त, धर्मग्रंथांमध्ये सांगितलेले : 'निर्वाळलीं होमधर्मे । श्रौतादिकीं ।'– ज्ञा १६.४०३.

श्लथ वि. १. ढिला; शिथिल; सैल; लटपटीत. २. विखुरलेले; पिंजारलेले (केस वगैरे). [सं. श्लथ्]

श्लाघणे उक्रि. स्तुती करणे; धन्य मानणे; आनंद मानणे; वाखाणणे; मोठेपणास चढणे. [सं. श्लाघ्]

श्लाघनीय वि. स्तुत्य; वाखाणण्याजोगे.

श्लाघा स्त्री. स्तुती; बढाई; डौल; थोरवी; गौरव; प्रशंसा.

श्लाघ्यता स्त्री. गौरव; थोरपणा; मोठेपणा.

श्लाघ्यवाणा वि.१. योग्य; स्तुत्य; चांगले; लाभदायक. २. (चुकीने विपरीत अर्थी) गरीब; कीव करण्याजोगा; लाजाळू; लाजिरवाणा.

श्लिष्ट वि. द्व्यर्थी; श्लेष असलेले; धरसोडीचे; घोटाळ्याचे. [सं. श्लिष्]

श्लीपद न. फिलेरियाचे (तंतूसारखे लांब) जंतू शरीरात गेल्याने लसिका ग्रंथीच्या कार्यात बाधा येऊन शरीराचा एखादा भाग फुगण्याचा रोग. उदा. हत्तिरोग. [सं.]

श्लेष पु. १. द्व्यर्थी शब्द; शब्दांचे अनेकार्थत्व; द्व्यर्थी, अनिश्चितार्थी, अनेक अर्थ सूचित करणारी शब्द योजना.२. एक शब्दालंकार.

श्लेष आलिंगन; मिठी; कवटाळणे. (क्रि. घेणे)[सं. श्लिष्=आलिंगणे]

श्लेषार्थ, श्लिष्टार्थ पु. वाच्य अथवा उघड अर्थाहून निराळा अर्थ; द्व्यर्थी शद्वयोजना करून साधावयाचा अलंकार. (उदा. औषध न लगे मजला.)

श्लेष्मा पु. १. कफ; शेंबूड. २. कफविकार; कफाच्या आधिक्यामुळे होणारी व्याधी. ३. सर्दी; पडसे; शैत्य. [सं. श्लेष्मा]

श्लेष्मांतक पु. भोकरीचे झाड. [सं.]

श्लेष्मिक वि. कफकारक; कफासंबंधी.

श्लोक पु. १. पद्य; कविता; विशिष्ट प्रकारची पद्यरचना. २. स्तुती; कीर्ती. उदा. सुश्लोक; पुण्यश्लोक. [सं. श्लोक्=जुळणे]

श्वपच, श्वपाक पु. अंत्यज; चांडाळ; कुत्रा शिजवून खाणारा; क्षत्रियाला उच्च जातीच्या स्त्रीपासून झालेला (मुलगा) : 'तुका म्हणे खंडी देव भक्तपण । वरिष्ठ त्याहूनि श्वपच तो ।'– तुगा २८९१.

श्ववृत्ति–त्ती स्त्री. नीचसेवा.

श्वशुर पु. सासरा; पतीचा किंवा पत्नीचा पिता. [सं.]

श्वश्रू स्त्री. सासू; सासऱ्याची पत्नी. [सं.]

श्वसणे अक्रि. श्वास घेणे. [सं. श्वस्]

श्वान पु. न. कुत्रा. [सं. श्वन्]

श्वानपुच्छ न. (कुत्र्याचे शेपूट) (ल.) कधी सरळ न होणारी, नेहमीच वाकडी राहणारी वस्तू; ज्याचे मन कधी बदलत नाही असा पूर्वग्रहदूषित मनुष्य; वाकड्यात शिरणारा.

श्वानमैथुन न. (कुत्र्याचे झोंबट) (ल.) प्रारंभी सुखकर पण परिणामी दुःखकारक गोष्ट.

श्वानवृत्ति–त्ती स्त्री. (कुत्र्याची रीत) (ल.) १.पुढे पुढे नाचणे; तोंडपुजेपणा; हाजी हाजी; खुशामत. २. नीच सेवा; दुष्ट माणसाची चाकरी.

श्वानवैर न. (कुत्र्यासारखा द्वेष) नातलगांचा द्वेष, हेवा, शत्रुत्व.

श्वानशूरत्व न. (कुत्र्याचे शौर्य)(ल.) प्रतिकार नसेल तेथे जोराचा हल्ला करणे; शौर्याचा आव आणून चालून जायचे पण अंगावर आल्यास पळ काढायची वृत्ती.

श्वापद न. पु. १. हिंस्र पशू; मांसभक्षक पशू. २. सामान्यत: कोणतेही जंगली जनावर. [सं. श्वापद]

श्वास पु. १. नाकाने किंवा तोंडाने आत बाहेर घेतला-सोडलेला वायू. २. दम; सुस्कारा; धापा. ३. दमा; घरघर. [सं. श्वस्]

श्वासकास पु. दमा; कफविकाराने कोंडलेला श्वास.

श्वासनलिका स्त्री. घशापासून फुफ्फुसापर्यंत हवा नेणारी नळी.

श्वित्र न. कुष्ठ; कोड. [सं.]

श्वेत पु. सेतू; पूल.(सेतूचा अप.)

श्वेत वि. पांढरा; शुभ्र; धवल. [सं. श्वित्=पांढरे होणे]

श्वेतक न. एक प्रथिन; (इं.) अल्ब्युमिन.

श्वेतक्रांती स्त्री. देशातील दूध- उत्पादनात संख्यात्मक व गुणात्मक वाढीसाठी राबविण्यात आलेली शास्त्रशुद्ध कार्यप्रणाली; (इं.) व्हाईट रेव्होल्युशन.

श्वेतपत्रिका स्त्री. ठरावीक विषयावर माहिती देणारी किंवा धोरणात्मक प्रस्ताव पुढे ठेवणारी सरकारी पुस्तिका.

श्वेतप्रदर पु. पांढरी धुपणी; एक रोग. [सं.]

श्वेतमणि–णी पु. स्फटिक.

श्वेतांजनी वि. अंग एकरंगी पण फासोळ्या मात्र पांढऱ्या रंगाच्या असलेला (घोडा).

श्वेतांबर पु. जैनातील एक पंथ.

श्वेतेडा स्त्री. एक वनस्पती; तिगडी; त्रिपुटा; त्रिवृत्ता; त्रिमंडी. [सं.]

श्वेश्वे सना. आपापल्या : 'श्वे श्वे सदना गेले जन।'- दावि २३.६८. [सं. स्वे द्वि.]

श्व: क्रिवि. उद्या; उदयीक : 'तरी श्व: म्हणिजे उखा।'- ज्ञा १५.१११. [सं.]



ष मराठी वर्णमालेतील सेहेचाळिसावा वर्ण आणि एकतिसावे व्यंजन.

षटक न. सहांचा समुदाय.

षट् वि. सहा ही संख्या. याचा समासात उपयोग करतात. [सं.]

षट्कर्णी क्रिवि. (तीन इसमांच्या कानी गेलेली म्हणजे) प्रसिद्धीस, उघडकीस आलेली. (क्रि. होणे).

षट्कोन पु. सहा कोन असणारी आकृती.

षट्पद–दी पु.स्त्री. १. भ्रमर; भुंगा. २. ऊ. ३. (ल.) घोडेस्वार (घोड्याचे चार+स्वाराचे दोन पाय).
स्त्री. सहा चरणांचे कडवे असलेली कविता.
वि. सहा पायांचा (ऊ, टोळ, भुंगा इ.).

षट्प्रज्ञ वि. गुण, संपत्ती, सुख, ब्रह्मानंद, जगाची प्रकृती, ब्रह्मज्ञान जाणणारा. पहा : **पुरुषार्थ**

षड(डा)ब्द न. सहा दिवसांचे प्रायश्चित्त.

षडंग न. १. दोन हात, दोन पाय, कमर व डोके ही शरीराची अंगे. २. वेदांची व्याकरण, छंद, ज्योतिष, निरुक्त, कल्पसूत्र व शिक्षा ही उपांगे.
वि. सहा अवयवांचा, अंगभूत वस्तूंचा.
पु. हृदय, शिर, शेंडी, शरीर, नेत्र (संध्येतील न्यास).

षड्ग्रही स्त्री. एका राशीत सहा ग्रहांची युती.

षड्ज पु. (संगीत) सात स्वरांपैकी पहिला स्वर.

षड्जग्राम पु.(संगीत) आठ शुद्ध स्वरांचा समुदाय.

षड्भाव पु.अव.शरीराचे सहा विकार (जायते-जन्म,अस्ति-अस्तित्व, वर्धते-वाढ, विपरिणमते-प्रौढ होणे, अपक्षीयते- क्षीणता, नश्यति-मृत्यू).

षड्भांतर न. सूर्यचंद्रांचे अवरोधन; दोहोंमध्ये पृथ्वी येणे.

षण्मुखी, षण्मुद्रा स्त्री.(हटयोग) कानाची दोन भोके, दोन डोळे, दोन नाकपुड्या- हाताच्या बोटांनी दाबून करावयाची एक मुद्रा.

षष्ठी स्त्री. १. पंधरवड्यातील सहावी तिथी. २. सहावी विभक्ती. ३. दुर्गादेवी; सखी. ४. (ल.) फजिती.
वि. साठ; ६० ही संख्या.

षष्ठीपूजन न.प्रसूतीच्या सहाव्या दिवशी दुर्गा व इतर देवतांची करावयाची पूजा.

षष्ठी(ष्टि)हायन न. साठ वर्षे.

षंढ–ड पु. १. नपुंसक माणूस. २.क्लीब; खोजा,हिजडा. ३. वळू; बैल; सांड. [सं.]

षाडव पु. ज्याला सहा स्वर लागतात व एक वर्ज्य असतो असा राग.

षोडशी स्त्री. वि. १६ वर्षे वयाची मुलगी; तरुणी.

■■■



स मराठी वर्णमालेतील सत्तेचाळिसावे अक्षर व ३२ वे व्यंजन

स (नामाच्या पूर्वी 'स' आला असता) चा बरोबर सहित असा अर्थ. [सं. सह]

स प्र. नात्याचा, वडिलकीचा वाचक प्रत्यय. काही प्रांतांत रूढ. उदा. कोकणीमध्ये आईस, बापूस इ.

स (व्या.) द्वितीया व चतुर्थी विभक्तीचा प्रत्यय. [सं. स्य]

सइ(ई) पासून सुरू होणारे शब्द इथे न आढळल्यास 'सै' मध्ये पहावेत.

सइ–ई १. मनसुबी करणाऱ्या पंचांनी वादींकडून मान्यतेचा लिहून घेतलेला कागद. २. कबुली; तयारी; संमती. (व.) [अर. सहीह=निर्दोष]

सई क्रिवि. लागलीच.

सई स्त्री. सखी; मैत्रीण. [सं. सखी]

सई स्त्री. १. पहा : **सही**. २. प्रयत्न; खटपट; मेहनत : 'माझे कार्याविषयी मध्यस्तापासीं सई करावी.'– मइसा १०.१६०. ३. लहान मुलाला खेळवताना प्रेमाने त्याच्या कपाळाला आपले कपाळ लावून दिलेला लहानसा ठोसा.

वि. १. जिंकलेला; ताब्यात घेतलेला : 'येरवी वसई सई होती असें नवतें व टोपकर अग्निरूप होते.'– पया ४९. २. फाजील; जादा; पुरून अधिक उरलेला. ३. फालतू.

अ. १. खरोखर, बरोबर, बरेच या अर्थाने वापरतात. उदा. तो मूर्ख तर सई परंतु चोर नाही. २. कर तर खरा, पहा तर खरा या अर्थीही वापरतात. उदा. औषध खा तर सई मग गुण तर पाहतोच आहोत. ३. अर्थात, खचित, निदानपक्षी, बस, पुरे या अर्थानेही उपयोग.[अर. सहीह् = निर्दोष] (वा.) **०करणे** – १. सर करणे; कबज्यात, ताब्यात घेणे. २. आक्रमण करणे; एखाद्या ठिकाणी जाऊन पोचणे (एखादी वस्तू, माल). **०करणे, म्हणणे** – एखादी वस्तू, माल घेण्याचे ठरवणे, कबूल करणे.

सई स्त्री. खेळतांना बैदूल, (गोटी) टाकण्यासाठी केलेला खळगा; गल. (कर.)

सईभ पु. युक्ती; शक्कल; क्लृप्ती : 'अगर सईभाने मुलुख जप्त करून...'– थोमारो १.२४.

सईम वि. १. स्वत:च्या अंगचा, शरीरासंबंधीचा; नखशिखांत असा. २. अखंड; सलग. [सं. स्वयं]

सईल वि. सारखा. – नागा ११.२९.

सईस पु. मोतदार; घोड्याची चाकरी करणारा, चालू गाडीच्या घोड्यांपुढे धावणारा मनुष्य. [अर. साईस]

सईसुमार पु. एखाद्या गोष्टीविषयी, कार्याविषयी सारासार, ग्राह्याग्राह्य विचार. [अर. सहीह+फा. शुमार]

सईसूद वि. कायदेशीरपणा येण्यासाठी ज्यावर सही, साक्ष इ. घातली गेली आहेत असा (रोखा, खत, दस्तऐवज).

सउ(ऊ) पासून सुरू होणारे शब्द येथे न आढळल्यास 'सौ' मध्ये पहावेत.

सऊ वि. संपूर्ण; सर्व; सगळा.– भात्रै ७.१ ते ४. [गु. सउ]

सऊ वि. १. मृदु, सहज पचणारे, कोवळे (मांस). २. नाजूक.[सं. सुकुमार]

सऊळ वि. मचूळ; किंचित खारट (पाणी, पातळ पदार्थ).

सक–ख–के पु. सहांचा समुदाय; सहा ही संख्या. विशेषत: खेळायच्या फाशांवरील दानात व उजळणीसाठी पाढ्यात; क्वचित सके असे अनेकवचनीही रूप येते. उदा. तीन सके अठरा. [सं. षटक्]

सक वि. सर्व : 'सक राजे चालिले ते पराभविले।'– श्रीकृच ५६.

सकइणे क्रि. शकणे; शक्य होणे : 'आवडी न पुरे मायबापासीं। घडों का येविसीं सकईल।'– तुगा ९५८.

सकच्छ वि. कासोटा घातलेले (नेसणे); दक्षिणी स्त्रियांची सामान्यत: लुगडे नेसण्याची पद्धत.

सकट क्रिवि. १. सगळे; समग्र; सर्वच्या सर्व; एकंदर. २. (एखादा मनुष्य अथवा वस्तू या) सह; सहित; सुद्धा; बरोबर; मिळून : 'तेणे संग्रहे होय नाशु देहासकट।'– उगी ३६८. ३. निवड न करता जसे हाताला येईल तसे; सरसकट : 'की देवा सरस निरस न पाहतां सकट शरण उद्धरिजे।'– भक्तमयूरकेका १३३. ४. एकदम : 'त्वत्तात शरवात ध्वंसुनि सर्वांसही पळवि सकट।'– मोभीष्म १०.११४. [सं. सकृत् = एकवार]

सकट न. स्त्री. हुक्क्याची नळी. [हिं.]

सकटणे सक्रि. तुकडे करणे; छेदणे. [सं. सम्+कृत्]

सकटनिकट, सकटाखाली, सकटात, सकटामध्ये क्रिवि. सरसकट; निवड न करता; सरभेसळीने; हातास येईल तसे.

सकटमळ स्त्री. आखूड काडाच्या धान्याची काडासकट केलेली मळणी.

सकट(त)संक्रांत स्त्री. अपराधी, निरपराधी यांची चौकशी न होता सर्वांवर ओढवलेले संकट, झालेली शिक्षा. (क्रि. बसणे, बसवणे).

सकटा वि. समग्र; संपूर्ण; सर्व.

सकटाई पहा : **सकराई**

सकट्हुंडा पु. संपूर्ण एकत्रित किंमत. (झाडी).

सकडतर वि. विदीर्ण : 'रथुबाणी सकडतरू'– उह १५२८.

क्रिवि. आरपार; अंतर्भेद करून : 'खुडी वो च्यूतांकुर : हे खूपतील सकडतर' – शिव ८३७. – प्रामको.

सकडतरू पु. काटेरी झाड : 'खुडी वो च्यूतांकुरू। हे खुपती सकडतरूं'– शिव ८३८. – दाको. [सं. सकंटकतरु]

सकडा पु. सहांचा समुदाय. फळे वगैरेंच्या खरेदीविक्रीत वापरायचा शब्द. [सं. षट्क]

सकताळ पु. नागरमोथा. (व.)

सकनळी स्त्री. गाय, म्हैस इ. चारा खाणाऱ्या पशूंनी चारा खाल्ल्यावर तो पोटात उतरण्याची घशातली नळी. (गो.)

सकर पु. पहा : **सका(कि, के)रा** [सं. शर्करा]

सकरडी वि. भाकड; कोरडी : 'इया सकरडीया गाइ नकुळ–सहादेवो:'– शिव ८९६.

सकरबुवा पु. श्रावणमासातील श्रियाळषष्ठी - शिराळशेट हा सण.- लोसाको.
वि. दयाळू.

सकराई स्त्री. हुंडी स्वीकारण्याबद्दल द्यावे लागणारे व्याज किंवा बट्टा; हुंडणावळ.

सकरा(क्रा)ई नकरा(क्रा)ई हुंडी, खडी राहिल्यास त्याबद्दल नुकसान भरपाईदाखल हुंडी लिहिणाऱ्यापासून घेतली जाणारी रक्कम.

सकरात वेदना. -ऐको.

सकरेजा पु. दुफाशी खेळातील एक दान; एका फाशावर सहा आणि दुसऱ्यावर एक असला म्हणजे हे दान होते.

सकल वि. सर्व; संपूर्ण; सगळा; एकूण. परिपूर्ण. [सं.]

सकल वि. १. (प्र.) सखल; खोलगट (जमीन, जागा). २. ठेंगणा; खुजा. ३. आखूड.

सकल पु. खोटे नाणे पाडण्याकरता तयार केलेल्या साच्याचा अर्धा भाग; अर्धा छेद; एक भाग; तुकडा : 'खालच्या सकलांतील खळगा व पन्हाळी यांशीं मिळतें असें भोंक व पन्हाळी वरच्या सकलांत पाडतात.'- गुजा १४४. [सं. शकल]

सकलात-द स्त्री. लोकरीचे उंची, तलम व शेंदरी किंवा निळ्या रंगाचे कापड.[अर. सकलात, इं. स्कार्लेट या शब्दाचा अप. तु. सिक्लात]

सकल्या वि. मध्यम गोड आणि थोडेसे करकरीत गरे असलेला (फणस)

सकवार वि. सुकुमार; नाजूक; मृदू; हलका; सुंदर.
पु. एक प्रकारचा स्वादिष्ट तांदूळ. [सं. सुकुमार]

सकस वि. कसदार; दमदार; भरीव; पौष्टिक; सत्त्वयुक्त (अन्न, औषध, पदार्थ).

सकस वि. कठीण; मजबूत; घट्ट; कष्टाचे. [अर. सख्त]

सकळ, सकळवेळी, सकळा क्रिवि. १. सकाळच्या वेळी; सकाळीच; लवकर. २. वेळेच्या पूर्वीच; अगदी वेळेवर; योग्य अवधीत. [सं. उष:काल, सुकाल]

सकळीक वि. सर्व; अवघे; एकूण एक : 'उठा उठा हो सकळीक'- गणपतीची भूपाळी.

सकळै स्त्री. मिश्रण; एकत्र करणे : 'सामान्य आणि विशेषा । सकळै कीजैल देखा ।'- ज्ञा १३.३२२. - दाको.

सकंटकतनुसंघ पु. अपृष्ठवंश प्राण्यांच्या विभागाचा एक संघ. या प्राण्यांच्या शरीरावरील कवचाच्या तगटांना हालणारे किंवा अचल असे काटे असतात. या संघातील प्राणी समुद्रांत राहतात.- ज्ञाको

सका-क्का पाणी देणारा सेवक; भिस्ती. [फा.]

सकाम वि. १. वासना, इच्छा असलेला; विरक्त नसलेला. २. सहेतुक; स्वार्थी; लाभाची इच्छा धरून केलेले (काम, कृत्य). ३. विषयी; लंपट; कामी : 'जैसी सकामा न जिणवेची वनिता ।'- ज्ञा ७.९६.
क्रिवि. इच्छा धरून : 'हें परिसोन भीष्मकोत्तम दर्शना सकाम उठिला ।'- एरुस्व ६. [सं.]

सकार पु. १. हुंडी पत्करणे, पटणे, मान्यता. २. हुंडी पत्करल्याचा, स्वीकारल्याचा, पटल्याचा शेरा.(क्रि. मारणे). [सं. स्वीकार]

सकारणे उक्रि. हुंडी स्वीकारणे, मान्य करणे, पटवून घेणे.

सकारविल्हा-ल्हे पु. (सांकेतिक) सोदा; शठ; लबाड; कपटी.

सका(कि,के)रा पु. लहान खडा; वाळूचा खडा. (हेट.); रेव.

सकारा पु. फवारा. (व.)

सकाळ स्त्री. सूर्योदयापासून मध्यान्हापर्यंतचा काळ. [सं. उष:काल]

सकाळ वि. अतिशय काळे : 'एक अंजनवर्ण सकाळें । कृष्णवर्णें एकें ।'- ज्ञा ११.१३४.

सकाळ वकाळ, सकाळे क्रिवि. लवकर, झटपट; न रेंगाळता. (ना.) योग्य काळी; त्वरेने : 'अमर अमृतपान करितां । मरताती सर्वथा सकाळें ।'- एभा ११.१३१३.

सकाळव(वा)णी क्रिवि. लवकर; झटपट; उशीर होण्यापूर्वीच; अगोदरच.

सकी स्त्री. (कुस्ती) एक डाव. आपल्या एका हाताने जोडीदाराचा हात धरून व त्याच बाजूच्या पायात आपला पाय घालून झोक देऊन पाडणे.

सकी स्त्री. कवडी. (गो.)

सकीड वि. हिणकस : 'आट नव्हेचि जीवभांगारा : सकीड भणौनिया'- ऋव ६२४. [सं. स+कीट]

सकु क्रिवि. तात्काळ : 'तो (मोह) सकु गेला जी ठाओ ।'- ज्ञा १८.१५४४. [सं. सकृत]

सकु स्त्री. सत्ता. - शर.

सकुटन (को.) पहा : **साकटणे**

सकुली स्त्री. करंजी.- एभा. (पाठभेद) २७.२९१. [सं. शष्कुली]

सकृत क्रिवि. १. एकदा; एकवेळ; एकवार. २. ताबडतोब. [सं.]

सकृद्दर्शनी क्रिवि. १. पाहताक्षणीच. २. प्रथमच; प्रारंभीच.

सकेकरी पु. १. पाणी देणारा, पाणी शिंपडणारा नोकर; भिस्ती. २. केर काढणारा - स्वा. दि. ६/४/४१

सकेला पु. तरवारीचा एक प्रकार.

सकेशा स्त्री. विधवा पण केशवपन न केलेली स्त्री.

सकोटण-न एखादी वस्तू तोडण्यासाठी ज्यावर ठेवतात तो आधारासाठी घेतलेला लाकडी ठोकळा.

सकोडा पु. पुरीसारखा ज्वारीचा पदार्थ. (व.)

सकोली स्त्री. प्रेताची तिरडी.

सकोवत, सखावत स्त्री. औदार्य; दानधर्म : 'सकोवतीचा माल आहे.'- मइसा १५. [अर. सखावत्]

सक्करनाते न. १. जवळजवळच्या आप्तांमध्ये असलेली सलगी, दाट स्नेह; लोभ. २. पत्नीच्या आप्तांबद्दल वाटणारा लोभ, आपुलकी.

सक्करपारा-दा पु. जरदाळू. (व.)

सक्करिया न. रताळे- कृषि ५५०.

सक्त-ख्त वि. १. कठीण; मजबूत; कणखर. २. कठोर; कडक; जुलमी. ३. कष्टप्रद; दु:खकारक. [अर. सखत्]

सक्तागिरी सक्ती; दहशत.

सक्तगो वि. बोलण्यात निष्ठुर.

सक्तगोई स्त्री. निष्ठुरपणा; कठोरपणा.

सक्तपाठ्याळ वि. १. कणखर; मजबूत; सशक्त (पशु). २. (ल.) सोशीक; कष्टाळू; काबाडकष्ट करणारा.

सक्तमजुरी स्त्री. १. कष्टाचे, मेहनतीचे काम; तुरुंगात कैद्यांकडून करून घ्यायचे श्रमाचे काम. २. सश्रम कारावास; कैद; असे काम करण्याची शिक्षा.

सक्तिसंपुट न. मोत्याचा शिंपला : 'नरकपाळाचीया कवटी : तिया सक्तिसंपुटी : माणिक मोतीये दिसती गोमटी ।' – रुस्वन ५८९.
[सं. शुक्तिसंपुट]

सक्ती स्त्री. १. जबरी; जुलूम.२. कडकपणा; कठोरता; निष्ठुरता.
[फा. सख्ती]

सक्ती स्त्री. संयोग; आसक्ती; अधीनता; निमग्नता. [सं.]

सक्तु पु. १. एक धान्य; यव. २. सातूचे पीठ; सत्तू; सतवा. [सं.]

सक्याण न. कणसे काढून घेतल्यानंतरचे धाट; कडबा.

सक्रवक्र हिल्ला हरकत; अडथळा; आक्षेप : 'यासी कोण्ही सक्रवक्र करील तो देवाचा द्रोही.'– ऐको.

सक्रंदन न. १. कापाकापी; मारामारी; कत्तल. २. (ल.) धसकाफसकी; ओढाताण. [सं. सं+क्रंदन]

सक्रिय वि. क्रियाशील; क्रियात्मक; कृतिशील; विधायक.

सक्रोबा (व.) पहा : **शिराळशेट**

सक्लना क्रि. एकत्रित करणे. (झाडी). [सं. सकल]

सखई शअ. संबंधी; विषयी; करिता : 'तरी तैसाचि मदनेलेचा सखई। बोलिला होता ।'– खिप्रु २०.४०.७९.

सखया संबोधन. सख्या, मित्रा, प्राणनाथा.

सखर वि. १. चांगले; उपयुक्त. २. दाट, घट्ट विणीचे, पोताचे, ठाशीव.
[सं. स+खर]

सखरनिखर वि. उत्तम मध्यम; बरी वाईट; उंचसखल. (जमीन).

सखल न. १. उताराची, खोलगट जमीन; लवण. २. खळगी; खाच (जमीन, लाकूड, दगड वगैरेतील).
वि. १. खोलगट; उताराची; खड्ड्यातील; खोल (विहीर). २. कमी उंच; ठेंगणा.

सखलवट, सखलाट वि. १. थोडे सखल; खोलगट; उथळ (जमीन). २. खळग्याचा, कमी उंच. ३. खालची; तळची. (गो.)

सखलात–द स्त्री. पहा : **सकलात–द** [तु. फा. सक्लात]

सखळी स्त्री. देवालयाच्या सभोवारची भिंत व तेथपर्यंतची खोलगट जागा.

सखा पु. सोबती; मित्र; सहचर; स्नेही. [सं. सखिन्]

सखा–स्खा वि. प्रत्यक्ष संबंधाचा; जवळच्या संबंधाचा; चुलता, मामा, आत्या यांच्याकडून संबंधित नसलेला [सं. स्वकः]

सखान वि. प्रिय; आवडती. – लोसाको.

सखावो पु. १. सख्य; स्नेह. २. सल्ला. ३. मदत; साह्य; उपराळा.

सखिया पु. साक्षी; साक्षीदार : 'तरि तुं सखिया होसी, मुंचसी : भवदुखापासौनि:' – ऋम ५११. [सं. साक्षिन्]

सखी स्त्री. १. मैत्रीण; सोबतीण. २. शिमग्यातील शृंगारिक लावणी. ३. लावणीच्या प्रारंभी म्हणायचे श्लोक वगैरे गाणे. [सं.]

सखी वि. धर्मात्मा; उदार; दानधर्म करणारा. [अर.]

सखून पु. शब्द; वाणी; वचन; भाषण : 'ही दानाई ईश्वरांनीं ज्यास बक्षीस केली त्यांचे सखुनाची पास ठेवणें लाजीम.'– मइसा ५.८६.
[अर. सखन, सखून=भाषण]

सखोल वि. १. अतिशय,फार खोल. २. गंभीर; गूढ; खोल अंत:करणाचा.

सख्तगो पहा : **सक्तगो**

सख्ती पहा : **सक्ती**

सख्य न. १. मैत्री; स्नेह; मित्रत्त्व. २. देवाशी संघटन; नवविधाभक्तीपैकी एक प्रकार, सख्यभक्ती.

सगई स्त्री. सोयरीक; आप्तसंबंध.

सगट, सगटनिगट क्रिवि. पहा : **सकट**

सगटाई स्त्री. सरभेसळ; एकत्रितपणा; समूहावस्था.

सगत स्त्री. (गंजिफा) उजव्या हातच्या खेळगड्याकडून आलेली देणी.

सगभाऊ पु. जोडीदार; मित्र. (अहि.)

सगर पु. स्त्री. पाऊलवाट; सावजांचा मार्ग : 'भवाटवीचा सगरा। जीवाकरितां येरझारा ।'– ऋ६.

सगर, संगर स्त्री. न. वस्त्राचे अंग व काठाची रेशमी वीण यामध्ये विणली जाणारी निराळ्या रंगाची रेघ.

सगर्भ वि. भावपूर्ण; मनात काही हेतू ठेवून (केलेले भाषण, कृत्य इ.). २. (ल.) खोचदार कपटयुक्त (भाषण, कृत्य इ.). [सं.]

सगळमळ, सगटमळ, सगडमळ पहा : **सकटमळ**

सगळा वि. १. सर्व; सकल; एकूण एक. २. पूर्ण; पुरा; सर्वच्या सर्व.
[सं. सकल, गु. सगळो]

सगा पु.१. स्वकीय; नातेवाईक; आप्त.-२. मित्र सोबती.
वि. स्वकीय; जवळचा; सख्खा. [सं. स्वक, सखा]

सगा पु. सगुणी. पहा : **कवडी**

सगाई स्त्री. १. नाते. २. सोयरीक; विवाहसंबंध. [हिं.]

सगात्र वि. ठोसर; घट्ट; मजबूत; भरीव; पुष्ट : 'जैसे सगात्र सघन। होती पर्वतीचे पाषाण ।'– भाए ५४९. [सं.]

सगासो(इ)यरा पु. स्नेहीसोबती; नातेवाईक; आप्त; सोयराधायरा; इष्टमित्र.

सगी स्त्री. टाकणखार; कड्याखार; सोने वितळवण्यासाठी वापरतात तो क्षार.

सगी स्त्री. १. सख्य; सोबत; मित्रत्व. २. संगीत. (कुणबाऊ)

सगीर वि. अल्पवयीन असल्याने अज्ञान : 'नंबर दोन ते चार सगीर त्यांचे वाली न्यायाधिशाने नाजर यांस नेमले आहे'– के २८.३.१९३९.

सगुण वि. १. रूपगुणसंपन्न; साकार; सत्त्व, रज, तम या गुणांनी युक्त. २. सफल : 'परी ठेलियाहि सगुण जहाले। ऐसेंचि मानी ।'– ज्ञा २.२७०. ३. ज्याला दोरी लावून सज्ज केले आहे असे (धनुष्य).

सगुणी, सगुणीकवडी, सगुण्या स्त्री.पु. तळाशी सपाट व पृष्ठभाग फुगीर व गोलाकार असलेली कवडी. ही समईत घातली असता तेल कमी जळते अशी समजूत आहे.

सगुदा वि. संपन्न; सज्जड; समृद्ध; तयार : 'आपण सर्व गोष्टीने सगुदा आहो, यास्तव साधले प्रसंगास आळस न करावा.'– मइसा १.९.

सगुन्या पु. जहाजाला योग्य दिशेने वळवण्यासाठी असणारी फळी. (अहि.)

सगोत्र पु. एका गोत्रातील; आप्त; नातेवाईक; एकाच गोत्रातले वंशज.

सग्गड–न स्त्री. मोठी ढकलगाडी. (काशी)

सग्री पहा : **सगर;** पोत कोणताही, काठ रेशमी पण त्यात नक्षी नसून पिवळ्या अगर पांढऱ्या काड्या असणारे वाण.

सघणवट वि. सर्वव्यापक : 'सघणवट असणे । व्योम जैसे ।'– तसा ९९३. [सं.सघन]

सघन शेती खते, पाणी, निगा यांचे योग्य नियोजन करून कमीत कमी क्षेत्रात जास्तीत जास्त पीक काढणे.

सच वि. सत्य; खरे. [सं. सत्य]

सचकार पु. १. विसार; बयाणा; आगाऊ घेतलेली रक्कम. २. हुंडी स्वीकारल्याबद्दलची फी. [सं. सत्यंकार. क. संचकार]

सचकारणे क्रि. स्वीकारणे; घेणे; मान्य करणे.

सचणी स्त्री. १. कुळाना लागवडीसाठी उत्तेजन देण्याकरता खोताने द्यायची रक्कम. (को.). २. गवत, गोवऱ्या, कवळ वगैरे गोळा करण्याची खोताकडून सुरवात. ३. वसुली.–लोसाको. [सं. संचयन]

सचरणी स्त्री. १. सिद्धता; जमवाजमव. २. कूच.

सचाड वि. इच्छायुक्त; सकाम : 'कामिनी चरणालागी सचाडें ।'– शिव १३.५२४.

स्त्री. सचोटी; खरेपणा.

सचिव पु. १. प्रधान; मंत्री; सल्लागार. २. अष्टप्रधानातील एक अधिकारी; सुरनीस. ३. सहचर; सोबती; मित्र. ४. खाते, संस्था इ.चा कारभार पाहणारा. [सं. सचिव]

सचिवालय न. मंत्री, शासनाधिकारी व संबंधित कर्मचारी यांचे प्रमुख कार्यालय; मंत्रालय.

सचून न. रेशमाचा एक प्रकार.

सचेतन न. चित्त; आत्मस्वरूप : 'सचेतनी बाणे पणें । देहासकट आटणें ।'– ज्ञा १३.५०६.

वि. सजीव; जिवंत; चेतनायुक्त : 'लोहो करी सचेतन ।'– ज्ञा १३.१३९.

सचेष्ट वि. सजीव; जिवंत; चेतनायुक्त.

सचैल वि. पोषाख केलेला.

क्रिवि. अंगावरील वस्त्रासह; पोशाखासुद्धा.

न. सवस्त्र स्नान : 'मुखदेखोनि विरक्ताचें । सचैल करी ।'– ज्ञा १३.७०५. [सं. स+चैल]

सचोटी स्त्री. प्रामाणिकपणा; इमान; नेकी; खरेपणा; चोखपणा. [सं. सत्य क. सचोटि]

सच्चा वि. खरा; प्रामाणिक; विश्वासू; खात्रीचा. [सं. सत्य; हिं.]

सच्चित् न. चैतन्य. [सं.]

सच्चिदंश वि. प्राण्यातील चेतना; बौद्धिक, तात्त्विक भाग; जीवांश.[सं.]

सच्चिदानंद पु. सर्व विश्वव्यापी पुरुष; त्रिकाली असणारा पुरुष; सत्यज्ञान व आनंदयुक्त परमेश्वररूप; ईश्वराचे निर्गुण रूप; परमात्मा. [सं.]

सच्चिद्घन वि. छिद्रमय. (इं.) पोरस. – विशर

सजग वि. जागरूक; सावध.

सजग(गा)णी स्त्री. १. सहा रूके किंमतीचे जुन्या चलनातील एक नाणे; ढबू पैसा. २. तीस बिघे प्रमाणाचे माप. ३. (ल.) कसबीण.– मब.

सजगुरा, सज्गुरा पु. बाजरी. [क. छज्जे=बाजरी]

सजण–णा–न पु. प्रियकर; सखा; वल्लभ; मित्र; नायक; सोयरा; नातलग. [सं. स्वजन]

सजणी–नी स्त्री. सखी; मैत्रीण; विश्वासू स्त्री; नायिका; प्रिया.

सजणी स्त्री. तयारी; नट्टापट्टा; पोशाख वगैरे थाट.

सजणे उक्रि. १. तयार होणे, करणे; सर्व सामुग्रीसह सिद्ध होणे; पोशाख दागदागिने घालून व्यवस्थित असणे. २. व्यवस्थित, बरोबर होणे, असणे. ३. शोभणे; खुलणे; नटणे; शृंगारणे. ४. अनुकूल होणे; जमणे; योग्य होणे : 'पदातु संघात तुझें सजेना ।'– सारुह १.२४. [सं. सज्ज]

सजणे अक्रि. जुंपणे; भिडणे; जमणे; गाठ पडणे : 'त्यास फिरंगीयासी आम्हासी सजून येक प्रहर युध्ये बहुत कठीण जाहले.'– पेद २५.५८. (वा.) **सज येणे** – व्यवस्थित चालणे (घोडा) : 'घोडा... आडवा लगाम दिल्याने सज येईल असे सांगितले.'– ऐको ८४२.

सजदार वि. शोभिवंत; थाटामाटाचा; शृंगारलेला.

सजल स्त्री. १. व्यवस्था; रचना; जुळणी. (क्रि. करणे, लावणे, बसवणे, होणे, लागणे, बसणे). २. युक्ती; योजना; कल्पना; पद्धती. (क्रि. काढणे, योजणे, रचणे, पाडणे).

सजलिकरण न. पाण्याशी संयोग होऊन संयुक्त पदार्थ तयार होण्याची क्रिया. [अर.]

सजवज तरतूद; सिद्धता

सजा स्त्री. निद्रा : 'सजेचेनि मीसे चिरंजीवी निगौनि गेला'– पंचो १०५.१९. [सं. शय्या]

सजा–झा स्त्री. शिक्षा; पारिपत्य; दंड; ताडन; कैद. [फा. सझा]

सजाइती–ईत वि. किंमत न ठरवता, पसंत न पडल्यास परत करण्याच्या बोलीने आणलेला (जिन्नस); जांगड.

सजावचे सक्रि. खात्री पटवणे. (गो.)

सजावट, सजाई स्त्री. थाट; शृंगार; शोभा; व्यवस्था; रचना.

सजावल पु. वसूल, तगादा करणारा, ढालाईत : 'प्रस्तुत नबाबाचे सजावल येऊन त्याची सुटका होईल तर करणे.'– मइसा १५.४.

सजावली स्त्री. तगादा.

सजावार क्रिवि. योग्य रीतीने; पद्धतशीर. – मराचिथोरा.

सजावारी क्रिवि. सहज.

सजीखार पु. (विरू.) पहा : **सज्जा(ज्जी)खार**

सजीव वि. जिवंत; सचेतन; चेतनाक्षम; प्रजनन करणारे, वाढ होणारे व श्वसन करणारे (प्राणी). [सं.]

सजीवकोटी स्त्री. प्राणिवर्ग.

सजीवगृह न. जनावरांची पैदास करण्याचे ठिकाण.

सजीवणे अक्रि. उत्पन्न होणे; फुटणे : 'जयाचियें दृष्टीसवें : कावडी कोंब सजीवे ।'– ऋम २३२. [सं. सजीव]

सजु(जुं)दे सज्ज.

सज्ज–ज्य वि. १. तयार; सिद्ध; तत्पर. २. शृंगारलेला; सजवलेला; साधनयुक्त पोषाख केलेला. ३. जोडलेला; जोडून तयार (रथ, धनुष्य वगैरे). [सं. षस्ज्=जाणे]

सज्जक पु. चटया, गालिचे, पडदे इ. सजावटीचे सामान पुरवणारा.

सज्जड वि. मजबूत; घट्ट; भरपूर; ठोस.

सज्जणे उक्रि. १. सज्ज करणे, होणे; तयार करणे, होणे. २. जोडणे; सिद्ध करणे : 'भ्रूचाप सज्जूनि आकर्ण।'– मुआदि.

सज्जदनिशीन वि. पु. गादीवरील मठाधिपती; खानकामधील व्यवस्थापक.– घका ८२.

सज्जन पु. १. शीलवान, सात्त्विक, गुणी मनुष्य. २. सखा; मित्र : 'तू माझा सज्जन मी तुझी सांगाती।'– ब ५२५. [सं. सत्+जन]

सज्जा पु. १. घराच्या सर्वांत वरच्या मजल्यावर केलेली हवेशीर खोली, बंदिस्त जागा. २. खिडकीपुढे काढलेली उघडी जागा; गॅलरी. ३. नाटकगृहातील दुसऱ्या मजल्यावरील कठड्याजवळील जागा; गॅलरी. [सं. छाद्य; हिं. छज्जा]

सज्जा पु. १. लागवडीखाली असलेल्या शेतजमीनीचा लांबलचक पट्टा. २. जकातीकरता पाडलेला प्रांत, विभाग. उदा. पुणे सज्जा.

सज्जा(ज्जी)खार पु. टाकणखार; सिंधुकर्बनत्रित; एक अल्कली. [सं. सजिकाक्षार]

सज्जात स्त्री. तयारी; साज; शोभा; पोषाख; साधनसामग्री.

सज्जाद पु. १. मुस्लीम लोकात प्रार्थनेच्या वेळी बसण्यासाठी वापरला जाणारा गालिचा, चटई. २. गादीवर बसण्याचा अधिकार.– आफ.

सज्जासाहित्य न. सजावटीचे सामान (पडदे, गालिचे इ.).

सज्या(जा)वार (होणे) क्रिवि. शिक्षा झालेले; शिक्षा होणारे : 'मुरारजी घोरपडे व मुजफरखान यांनी हरामखोरी केली. तेणेप्रमाणे सज्यावार जाले.'– पेद २१.८६.

सट स्त्री. १. शुद्ध व वद्य पक्षातील सहावा दिवस; षष्ठी. विशेषत: मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी हा खंडोबाचा दिवस; चंपाषष्ठी. २. सठी; दुर्गा देवता. ३. या देवतेची उपासना, पूजा. [सं. षष्ठी]

सट पु. खुल्या तोंडाचे, झाकण असलेले, लहान आकाराचे, चिनी मातीचे भांडे.

सट वि. चकीत; थक्क. (झाडी)

सट पहा : **संच**

सटक स्त्री. सुताची दोरी. – चिमा २३.

सटकण–कन–कर–दिनी–दिशी क्रिवि. १. त्वरेने; एकदम; झटकन; पटकन. २. फळातून बी उडते त्याप्रमाणे आवाज करून. [ध्व.]

सटकणे अक्रि. झपाट्याने बाजूला होणे; चटकन दूर होणे; निसटणे; सुरवात करून मधूनच नाहीसे होणे. [ध्व. सट्]

सटकन क्रि. हजेरी घेणे; कानउघडणी करणे. (अहि.)

सटकपावली स्त्री. झटकन निघणे; निसटून जाणे. (क्रि. करणे.).

सटका पु. १. झटका; हिसका. २. जोराचा धक्का, फटका, तडाखा. ३. चित्त्याच्या कंबरपट्ट्यास बांधलेली दोरी.– चिमा ३२. (बडोदे).

सटकावणे सक्रि. झटकणे; ठोकणे; खरडपट्टी काढणे. [ध्व.]

सटक्याबटक्या वि. क्षुल्लक, कफल्लक (मनुष्य); असा तसा; कोणीतरी.

सटगळ स्त्री. मोठी घंटा. (व.)

सटप(क)ट स्त्री. जळफळाट; जोराची शिवीगाळ; खरडपट्टी.

सटप(फ)ट–टा क्रिवि. झटपट; जलदीने; लवकर; गडबडीने.

सटप(फ)ट्या वि. जोरजोराने, तावातावाने शिवीगाळ करणारा.

सटबट स्त्री. खटपट; व्यापार; उद्योग.

सटर, सटेल न. (विणकाम) धोटा. (इं.) शटल.

सटरफटर न. किरकोळ; बारिकसारिक; उरलेसुरले; लहानसहान जिन्नस.

सटल–ळी स्त्री. १. सटकणे; झुकांडी; झटकन निघून जाणे; वचन किंवा करारातून निसटणे. (क्रि. खाणे). २. सत्यापासून ढळणे; थापा; बाता; गप्पा. (क्रि. मारणे, हाकणे.). ३. हयगय (व.)

सट(टा)ली–ल्या वि. १. निसटणारा; झटका मारणारा. २. खोटे बोलणारा; थापाड्या.

सटव सं.वि. सहावे : 'सटवे रात्रीं मदनु शंभरे नेला'– नाम १२.

सटवणी न.१. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी अथवा चंपाषष्ठी. २.या सुमारास पडणारा पाऊस. ३. मुलाच्या जन्मापासून सहावा दिवस. [सं.षष्ठी]

सट(टा)वणे अक्रि.१. षष्ठी देवतेची बाधा होणे; मूल जन्मल्यापासून सहाव्या दिवशी मृत होणे, अगर आजारी पडून त्या योगाने पुढे मरणे. २. (ल.) नाश पावणे; क्षय पावणे. ३. गर्भपात होणे.

सटवला वि. सटवीने मारलेला; जन्माच्या सहाव्या दिवशी मेलेला.

सटवाई, सटवी स्त्री. १. षष्ठी देवता; सटी; एक क्षुद्र देवता; ही लहान मुलांना उपद्रव देते. मूल जन्मल्यानंतर सहावे दिवशी हिची पूजा करतात. २. (ल.) कुटाळ, दुष्ट स्त्री. ३. (ल.) सटवीची बाधा. (व.)

सटवामल्हारी पु. अर्धवट, बावळट मनुष्य.

सटवीची अक्षरे, सटवीचे लिहिणे न. अव. १. ब्रह्मलिखित. २. सटवीने मुलाच्या कपाळावर लिहिलेला लेख; प्रारब्ध.

सटसट–टा, सटाटा, सटासट क्रिवि.१. झटपट; जलदीने. २. पावसाच्या आवाजासारखा आवाज होऊन. [ध्व.]

सटसटीत वि. फळफळीत; फडफडीत; टणक; कडक (भात, डाळ इ.)

सटा स्त्री. अव. केसांचे सड; जटा; घोड्याची आयाळ : 'नृसिंहाच्या दीर्घा पिवळट सटा पिंगट पिशा.' – नृहरिदर्पण.

सटाबटा क्रिवि. घालमेलीने; गडबड, लटपट, धरसोड वगैरे करून : 'तेव्हां सटाबटा दावा करून यश रक्षावेच लागते.' – पेद ३.१०२.

सटारणा, सटारा वि. अवाढव्य, अचाट; भव्य; प्रचंड; विशाल.

सटार्ना क्रि. घाबरणे.

सटालणे अक्रि. निसटणे; झटकणे.

सटाळी क्रिवि. घाबरलेले. – (तंजा)

सटी पहा : **सट, सटवी**

सटी स्त्री.१. एक रोग. २. भाताची रानटी जात.(झाडी)

सटीक–प वि. टीका, भाष्य, व्याख्या, विवरण यांसह. [सं.]

सटी(ठी)सामाशी क्रिवि. १.कधीतरी; केव्हातरी. २. प्रसंगाने; क्वचित प्रसंगी. [सं. षष्ठ + षण्मास]

सटीसावत्र न. मत्सर; हेवा; द्वेष (विशेषत: स्त्रियांचा).

सटेगोपाळ पु. लबाड; धूर्त; फसव्या; केव्हाही हातावर तुरी देऊन निसटून जाणारा माणूस. [सं. शठ + गोपाळ]

सटोडिया वि. सट्टेबाज; सट्टा करणारा; जुगारी; दलाल; शेअरदलाल.

सट्टक स्त्री. खरडपट्टी; तासडपट्टी.

सट्टक पु. संस्कृत नाटिकेचा एक प्रकार.

सट्टल–ली पहा : **सटल**

सट्टा पु.१. सौदा; व्यवहार; विनिमय. २. जोखमीचा व्यापार, व्यवहार; पुढे मालाची किंमत चढेल अथवा उतरेल याचा अंदाज घेऊन केलेला व्यवहार.३. मक्ता; कंत्राट; ठेका. ४. हुंडी बाजारातला एक प्रकारचा जुगार. [दे.प्रा.सट्ट = विनिमय]

सट्टाबट्टा पु.व्यापारी व्यवहार; देवघेव; अदलाबदल; सावकारी.

सट्टी स्त्री. वशिला; शिफारस; संधान.

सट्टूबट्टू पु. अव. (तिरस्कारार्थी) स्नेहमंडळ; स्नेहीसोबती; मित्र. [सं. बटु द्वि.]

सट्टेबाजी स्त्री. सट्टा करण्याचे व्यसन, नाद.

सट्ट्यागट्ट्या पु. चीजवस्तु; पसारा.

सठ–ठी पहा : **सट**

सठवणे क्रि. पतन पावणे.

सठवा पु. साठ दिवसात तयार होणारा गुजराथेतील ज्वारीचा एक प्रकार.

सठी स्त्री.कचोरा; अंबेहळद.

सड पु.१. धस; ठोंब; खुंट; पीक वगैरे कापल्यानंतर शेतात राहणारा बुडखा; खुंटारा; धसाडी; शल्य. २.(ल.) (अश्लील) जननेंद्रिय; (बैल किंवा रेडा यांचे) लिंग. ३. (ल.) आंचळ; स्तन; थान. ४. (डुकराचे किंवा इतर प्राण्याचे) राठ केस. (वा.) ० **आवळणे** – कोकराने दूध पिऊ नये म्हणून शेळीचे स्तन बांधून ठेवणे.

सड स्त्री. १. पद्धत; तऱ्हा; वहिवाट; रूढ गोष्ट : 'ही सड कारकुनांनी मुसलमान ग्रंथकारांपासून घेतली आहे.' – विवि १८९६.८.१४८. २. साक्षीदाराची तोंडी अगर लेखी जबानी; पुरावा; दस्तऐवज; कागदपत्र; जुना पुरावा; 'कसबे पैठण येथील सड आली.' – वाडसमारो ६.३२५. ३. खोबण; खाच; कातरा; खाप. [फा.]

सड स्त्री. तांदूळ कांडण्याची क्रिया.

सड वि. सडा; बोजा नसलेला : 'भाऊचे घोडे सडबेधड गारदी पुढें बिनी धरती।'– ऐपो १८४.

सडक स्त्री. वाट; मार्ग; तयार केलेला रस्ता. [सं. शटक्य शकट (वर्ण व्यत्यास); अर. शरक]

सडक स्त्री. १. दोर; लांब व जाड दोर (गाडीवर ओझे वगैरे बांधण्याचा); मोजण्याचा, पाणी शेंदण्याचा लांब दोर; लोकरीच्या कापडाची पट्टी. २. जुगदान, बटवा वगैरेला लावलेली दोरी. ३. रेशमी गोफ; रेशमी गोंड्यासकट दोरी (तरवार, खंजीर वगैरेना लावलेली, पागोट्याची); चवरी. ४.लांब व सरळ तलवार : 'चाळीस हजार सडक करनाटकची चमकती।'– ऐपो १०७. ५. (ल.) उंच, सडपातळ मनुष्य. ६. पदराच्या दशा. ७. केसांच्या जटा, बटा; केसांची वेणी.[क.]

सडक वि. १. सरळ; थेट (रस्ता, रांग, ओळ). २. ताठ, उभा (मनुष्य, झाड, स्तंभ). ३. उघडउघड; स्पष्ट; खणखणीत; रास्त (उत्तर, आरोप, शिवी वगैरे). ४. कठीण. ५. बेधडक; एकदम.
वि.क्रिवि. बेधडक; एकदम; धडाक्यानें; बेपर्वाईने; मुद्दाम; (पिणे, जुगार खेळणे वगैरे व्यसन करणे). [सं.सरल]
वि. सरळ, लांब (केस).

सडकणी स्त्री. जोरजोराने चोप देणे, मारणे; दणकावणी; धपकावणी; घाव घालणे; कुटणे (धान्य वगैरे).

सडकणे उक्रि. १. गारा, पावसाचे मोठे थेंब, खडे वगैरेंनी मारणे. २. दोरी, छडी वगैरेनी मारणे. ३.लाथ, दुगाणी झाडणे. ४. लाकूड, दगड वगैरे साफ न करता सुमाराचा आकार येईल असे कुऱ्हाड किंवा सुतकी वगैरेनी सरासरी तासणे. ५. कपडा दगडावर जोरजोराने आपटणे. ६. मळ, कीट निघून जावे म्हणून धातूचा तुकडा ऐरणीवर घणाने जोराने ठोकणे. ७. सरासरी बारीक अंश वेगळा होईल असे जोराने पाखडणे. सामान्यत: कोणतीही गोष्ट सरासरी घाईघाईने, जोरजोराने, निष्काळजीपणाने करणे. [सं. सध्रि + अच्]

सडकबीजन न. रस्त्यातील लोकांची कत्तल: 'इंग्रज सरकारने... सडकबीजन करून बहुत लोक मारले.'– माप्र.

सडका पहा : **सडाका**

सडका वि.नासका; कुजका; सडलेला; बिघडलेला.

सडकाशी स्त्री. जमिनीच्या मशागतीचा एक प्रकार.

सडकीव वि. अर्धवट, साधारण–सरासरी घडलेला (दगड, दगडकाम, लाकूड, लाकूडकाम); ओबडधोबड पद्धतीने केलेले (काम इ.).

सडकून क्रिवि. रगडून; सपाटून, अतिशय, पुष्कळ. हे अव्यय क्रियापदाबरोबर जोर, तीव्रता, आवेश, अतिशयता वगैरे दाखवण्यासाठी योजतात. याअर्थी कचकावून, कचकून, खसाटून, दपटून, रपाटून वगैरे अव्ययेही जोडण्याचा प्रघात आहे.

सडकोळा वि. काटकोळा; रोडका; कृश.(राजा, को.)

सडगर पु. कष्ट; श्रम, त्रास. (कर.)

सडगर पु. १. नट्टापट्टा; शृंगार; भूषा. २. विनवणी; खुशामत; लघळपणा.

सडगल स्त्री. नवी लावणीची पानवेल; नागवेलीचे पान.

सडगळ वि. पु. मोठा धाटा.(व.)

सडगा पु. सोटा; टोणपा; सोडगा; काठी.

सडण न.१. कांडण्यासाठी, घाव घालण्यासाठी घेतलेले धान्य (तांदूळ, डाळ, वरई इ.).

सडणावळ स्त्री. सडण्याची, कांडण्याची मजूरी, मोल.

सडणी स्त्री. कांडण; कुटण्याची क्रिया.

सडणे उक्रि. धान्यावरील तूस, फोलकट, कोंडा वगैरे काढून टाकण्यासाठी, कांडणे, कुटणे. [सं. शट्]

सडणे अक्रि. कुजणे; नासणे; बिघडणे; खराब होणे. [सं.शद्. हिं. गु. सडना.] (वा.) **सडी पडणे** – सडून, झडून जाणे.

सडताळा पु. दोर; काढणी; सडक.

सडपणे सक्रि. झोडपणे; मारणे :'सडपिती वारुवांची मोहाळीं'– उह १८८६.

सडपातळ वि. किरकोळ अंगाचा; काटकुळा; रोडका; कृश; शेलाटा; सडसडीत.

सडशिंग पु. सडा मनुष्य; फटिंग; सडेसोट; अविवाहित.

सडसड–डा–टा, सडाडा क्रिवि. पावसाच्या आवाजाप्रमाणे आवाज करून (छडी वगैरेने मारणे, झोडणे).

सडसडणे अक्रि. सडसड आवाज करून पडणे; तडतडा मारणे, झोडणे. [ध्व.]

सडसडीत वि.१. फडफडीत; रुक्ष; मोकळा व फळफळीत (भात वगैरे). २. उंच व सडपातळ; अंगासरसा व पीळदार (मनुष्य); सरळ वाढलेला, फांद्या न पसरलेला (वृक्ष).

सडसाक्ष-क्षी स्त्री. लेखी किंवा तोंडी पुरावा; दस्तऐवज, दाखले, प्रतिज्ञालेख, जबान्या वगैरेना व्यापक संज्ञा. पहा : **सड**

सडसुध पु. शिडीची दोऱ्याची पायरी. -लोसाको.

सडा पु.१.शेणमाती, रंग वगैरेचा दाट वर्षाव. २.(ल.) पखरण; विखरण; उधळणी (फुले, फळे, रुपये, नाणी इत्यादींची). ३. शेणसडा. [सं.छर्दय किंवा सम् + वृष्]

सडा पु.डोंगरपठार; डोंगराच्या माथ्यावरील सपाट जमीन.

सडा पु.नाडा; रस्सी; वळलेली सुताची दोरी; सुतळी.

सडा वि. १. एकटा; मोकळा; वेगळा; स्वतंत्र; मागे काहीएक ब्याद नसलेला; सडा फटिंग. २. रिकामा; कामात न गुंतलेला; उपयोगात नसलेला. ३. ओझे नसलेला; भाड्याने न दिलेला (गाडा, जनावर वगैरे). [हिं.छडा = एकाकी]

सडाई स्त्री. सडणावळ; कांडणावळ.

सडाका पु. सडसड आवाज होईल असा दोरीचा फटकारा; पावसाचा वर्षाव, तडाका.

सडाकारभार पु. मोकळा, सरळ, उघड व्यवहार; बिनघोटाळ्याचा व्यवसाय, धंदा; धोपट मार्गी काम, देवघेव, व्यवहार वगैरे.

सडाधस वि.पु. १. एकदम पुढे घुसणारा, अविचारी, उतावीळ (मनुष्य). २. पहा : **सडासोट**

सडाफटिंग पु. (उप.) पहा : **सडशिंग**

सडाफोक वि. पहा : **सडसडीत**

सडामफलीस वि. अविवाहित, एकटा व परिस्थितीने गरीब; काबाडकष्ट करून एकटा राहणारा.

सडावणे सक्रि. वाटणी करणे : 'विकरि सडाउनि'- नागावशिला १.९.

सडासोट, सडासाटा-ट्टा-ठ वि. १. नि:संग; बायकापोरे नसलेला; एकटा. २. फांद्या नसलेला (वृक्ष)

सडिव वि. सडिक; कांडलेले; कुटलेले.

सडिवा पु. विकार; रोग. पहा : **सडी**

सडिवा पु. १. सडेपणाचा, अविवाहितपणाचा ठपका : 'तेव्हळे सडिवा फेडिला तुळसियेसी। अठवरपणाचा ।'- नरुस्व ३७२. २. भूतसंचार : 'तो अपर सुखाचा सडिवा । आपण यां लागों नेदीं।'- मूप्र १४१९.

सडी स्त्री. १. मनुष्य व पशू यांना होणारा एक रोग; क्षय. २. माशा जखमेवर बसून टाकतात तो पांढरा निर्यास.

सडी स्त्री. बांबूचे कुसळ; धसडी; खुंट. पहा : **सड**

सडी स्त्री. पहा : **सड** २

सडी स्त्री.(खडसा व रुमणी यात बसवलेली) इसाड घट्ट राहण्याकरता इसाडाबरोबर खालच्या बाजूने मारलेली खुंटी.

सडीक वि. १.कांडलेले; सडलेले (तांदूळ, डाळ वगैरे). २. सालासुद्धा शिजणारी (वालपापडी, मेहंदळ वगैरेची शेंग). ३. भीड, मुरवत ठेवण्याकरता पडदा ठेवून, संकेताने बोलावे तसे न करता स्पष्ट, शिवी, उत्तर प्रत्युत्तर वगैरे करून.

स्त्री. कांडलेल्या बियांपासून उत्पन्न झालेली गोवारीची शेंग.

सडेखडी-पठार स्त्री. डोंगरपठार : 'नैची मेर सडेखडियेची मेर'- मठ शिला १०६.

सडेतोड वि. १.जिथल्यातिथे, ताबडतोब, तडकाफडकी निकाल देणारा; कामाचा उरक असणारा. २. निराळा; एकटा; सुटा; नि:संग; नि:स्पृह. ३. फटकळ; भीडमुर्वत न ठेवता; रोख-ठोक; निखालस; जळजळीत; कर्णकटू.

सडेबासडे लढाऊ, धडधाकट लोक.

सडे सडून काढलेला कोंडा.(तंजा)

सडेमुंडली स्त्री. एक औषधी मुळी, कंद.

सडेलभात पु. १. बिघडलेली, पुवळलेली जखम. २. रक्तपित्तामुळे बिघडलेला मांसल भाग. ३.(ल.) ओंगळ, घाणेरडा मनुष्य.

सडेसोट पहा : **सडासोट**

सडेहुपट, सडेहुप्प्या पु. ज्यात सगळेच वानर नर आहेत, एकही मादी नाही अशा टोळीतील एक वानर. २. अविवाहित पुरुषांच्या गटातील एक व्यक्ती.

सडोळ वि. डोळस : 'ते तेथीचें सडोळपण।' -गीता २.६६०.

सडच्या पु.१.(सुतार) किंकरे; विंजणे; सुताराचे एक हत्यार. २. माशाचे जाळे. (झाडी) [सं. सटा]

सडच्या वि. १. क्षीण होत जाणारा; क्षयी; झिजत जाणारा. २. खपल्या पडणारी (जखम, क्षत).

सड्ल्लन न. धाब्याच्या घराच्या छताच्या उभारणीचे वेळी अंथरलेली आडवी उभी लाकडे; पटई. (अहि.)

सढळ वि. उदार; अघळपघळ; घळमळीत; सैल; मोकळा ढाकळा. [सं.शिथिल. क.सडि(डु)लु]

सढील वि.शिथिल; सईल; ढिले : 'सेना स्त्रियेचे धैर्यवस्त्र! सढील झालें झगडता।'- मुआदि २३.१४१. [सं. शिथिल]

सण पु. १. उत्सवाचा दिवस, प्रसंग. कौटुंबिक, सामाजिक, सामुदायिक उत्सव. २. उत्सवप्रसंगी केलेली चैन, मौज, जेवणावळ वगैरे. ३.सणाच्या दिवशी विशेषत: दसरा, दिवाळी वगैरे प्रसंगी आश्रितांना वाढून द्यायचे जेवण, शिधा वगैरे. ४. लग्नानंतर जावई आणि त्याचे इतर नातेवाईक यांना दिवाळी, होळी अशा दिवशी द्यायच्या मेजवान्या, भेटी, देणग्या, पोषाख वगैरे. [सं. क्षण]

सण पु. ताग. [सं. शण] (वा.) **०खोलणे** – दोरखंडे उकलून त्याचा ताग मोकळा करणे. हे काम तुरुंगात शिक्षा म्हणून करून घेत.

सणक स्त्री.कळ; वेदना; तिडीक; पहा : **शिनिक** [ध्व.]

सणक स्त्री.लहर; हुक्की. (ना.) [ध्व.]

सणकण-कन-कर-दिनी-दिशी क्रिवि. वेगाने जाणारी बंदुकीची गोळी, बाण, छडी किंवा चाबकाचा मार, दु:खाचा वेग, तिडीक, कळ वगैरेचा उद्रेक यांच्याप्रमाणे आवाज करून. [ध्व.]

सणकणे अक्रि. १. सणकन आवाज करून जाणे. २. शीळ घालणे, गाणे. ३. तिडीक निघणे. [ध्व.]

सणकरी पु.सणाच्या दिवशी ज्यांना वाढणे किंवा शिधा द्यायचा असतो ते कारू, बलुतेदार, आश्रित यांपैकी प्रत्येक.

सणकाडी-कांडी स्त्री. तागावरील वाख काढून घेतल्यावर राहणारी काडी; अंबाडी, भेंडी यावरील दोर काढून घेतल्यावर राहणारी काडी.

सणकी स्त्री. चारही पाय पांढरे असलेली मेंढी.(माण.)

सण(णं)ग,सनग न.विणलेले वस्त्र; वस्त्राचा तागा, नग; उंची वस्त्र.

सणगर पु.घोंगड्या विणणारी एक विणकर जात. [सं. शण + कृ]

सणगारणे सक्रि. (कुण.अप.) शृंगारणे.

सणगिरी होनाचा एक प्रकार.

सणडामर करणे गलबताच्या भेगा, फटी, चिरा किंवा सांधे भरून दुरुस्त करणे.

सणब स्त्री. अव. अळशी; जवस (गो.)

सणवई पहा : **सणकरी**

सणवळ लागवडीखालची जमीन.

सणवार -सूद पु. पहा : **सण** १, ४

सणसण-णा पहा : **सणकन-कर**

सणसणणे अक्रि. १. सणसण असा आवाज करणे. २. हाताला वगैरे झिणझिण्या, स्फुरण येणे (कठीण पदार्थावर आघात करताना, टोला मारताना). ३. तापाने फणफणणे. [ध्व.]

सणसणाट पु.सणसण असा अतिशय जोराचा आवाज; सणकारा.

सणसणीत वि. १. सणसण आवाज होईल इतके तापलेले, उकळते (पाणी, दूध, तेल वगैरे). २. झणझणीत, अतिशय तिखट (भाजी, पदार्थ). ३. घट्ट; दाट; भक्कम; दणगट; पीळदार (कापडाची वीण बांधलेला गठ्ठा, दोरा, मनुष्य, जनावर वगैरे). ४. स्पष्ट; खडखडीत; साफ; सडेतोड; खणखणीत (नकार, उत्तर, भाषण, वगैरे). ५. खडखडीत, चुरचुरीत (वाळलेले वस्त्र वगैरे). ६. खणखणीत, स्पष्ट आवाज करणारे; चोख (नाणे, भांडे वगैरे).

सणसर वि.१.कणखर; मजबूत; भक्कम; ताठ; पीळदार (दोरा, वस्त्र, मनुष्य, जनावर, गठ्ठा, ओझे वगैरे). २. खडखडीत; स्पष्ट; सडेतोड; साफ (भाषण, उत्तर वगैरे.). ३. जोरदार; भरीव; मुबलक (पाऊस, पीक वगैरे). ४. मजबूत; घणसर.

सणसरून क्रिवि. सडकून. (माण.)

सणंग, सण न.पु. वस्त्र; कापड; लुगडे. [सं.शण:]

सणाटा पहा: **सनाटा, सन्नाटा**

सणाण पु.बाण, बंदुकीची गोळी, गाणे, शीळ वगैरेचा आवाज. वि. तीक्ष्ण - ज्ञाशभां.

सणाणा-णे वि.तीक्ष्ण; तीव्र.

सणासणी स्त्री.शस्त्रांची खणाखणी; बाण गोळ्या वगैरेंचा भडिमार.

सणी स्त्री. १. ढबू पैसा; दोन पैसे; सहा रुक्याचे नाणे. २. जमीन-मोजणीचे एक माप-सहा रूके किंवा तीस बिघे. पहा : **सजगणी**

सण्णाटणे अक्रि. १. ताप चढणे. २. चोपणे. (ना.)

सत न. सत्य; देवाशपथ, देवावरचे फूल घेऊन सांगणे. (राजा.) [सं.]

सत अ.साताची पट दाखवण्यासाठी योजतात. उदा. तीना सते एकवीस.

सतका, सत्का, सदका पु. ओवाळून टाकलेली, कुरवंडी करून टाकलेली वस्तू, द्रव्य. [फा. सद्का]

सतकामतका पु. अमावस्येला अनिष्ट निवारणासाठी मांगास पीठ, मीठ, तेल, मिरच्या वगैरे वस्तू देण्याची प्रथा.

सतत स्त्री. तसदी; तगादा; टुमणे : 'सारे गढकरी व हकीम याणी सतत लावली आहे.'- पेद ६.८५.

स(सं)तत वि.नित्याचा; नेहमीचा; शाश्वत; कायमचा; टिकाऊ. क्रिवि. नेहमी; नित्य; एकसारखे; निरंतर; अखंड. [सं.]

सतत शतत; वैर; द्वेष किंवा ईर्षा.

सतनागत स्त्री. निरुपाय; नाइलाज; काही इलाज न चालणे.

सतपत स्त्री. (व्यापार) साख व पत; चांगला लौकिक, सचोटी व पत; विश्वासार्हता.

सतफळ न. समुद्रफळ. (कु.)

सतम पु.१. कहर, जुलूम; धुमाकूळ. धांगडधिंगा; जबरदस्ती; धडपड. २. रेलचेल; लयलूट. ३. अनर्थ; अतिरेक. [फा.सितम]

सतमी स्त्री.१. गलबतावरील मालाची नोंद केलेला अधिकाऱ्याच्या सहीचा दाखला, परवाना : 'सतमी न दाखवील तर ते जिन्नस, बारदान व गलबत जप्त होईल.' - न्यायाधिसेतू २३२. २.जाहिरनामा; पत्रक.

सतरंजी, सत्रंजी स्त्री. बिछाइतीचे जाड, रंगीबेरंगी, पट्टेदार कापड. २. (मल्लविद्या) कुस्तीतील एक डाव; हरणफास. जोडीदाराच्या पिंडरीवरून आपला एक पाय घालून दुसरा त्याच्या मानेवरून आणून दोन्ही पायांना तिढा देऊन त्याला चीत करणे. [फा.सत्रंजी; अर.फा. शतरंजी]

सतरा वि. दहा अधिक सात ही संख्या; १७. [सं.सप्तदश] (वा.) **० गुणांचा खंडोबा** - अनेक रोग किंवा दुर्गुण असलेला. **० जणांच्या डोक्यास पाणी लावून ठेवणे** - (न्हावी हजामत करण्यापूर्वी पाणी लावतो यावरून) अनेकांची खुशामत करणे; एखाद्या व्यवहारात अनेकांना गुंतवून ठेवणे. **० पंधरा गोष्टी सांगणे** - असंबद्ध, विसंगत बोलणे; भाकडकथा सांगणे.

सतरावी स्त्री. चंद्रबिंब; ज्यामुळे चंद्रबिंबावर त्याच्या सोळा कला अधिष्ठित होतात ती मूळ चंद्राची आकृती; बिंब : 'आंवसेचिये दिवसीं। सतराविये अंशीं।' - अमृ ७.१५३.

सत(ता)ल व्यवस्था किंवा निराकरणाचा मार्ग : 'सतल बसावी असा ठिकाण दिसेना.' - ऐको.

सतल-ले न.धातूचे उथळ, पसरट, रुंद असे मोठे भांडे. पहा : **सतेल**

सतलय क्रिवि. हारीने; अखंड रांगेने; एकाला लागून एक अशा प्रकारे.

सतवटी स्त्री. खरेपणा; प्रामाणिकपणा; सचोटी; इमान. [सं.सत्यवत्]

सतवंक वि.आवेशयुक्त : 'नीऱ्हा सतवंक राणे' - शिव ९१९.

सतवा पु. सातूचे पीठ. [सं.सक्तु]

सतसय क्रिवि.सारख्या; ओळीने; रांगेने; न तुटता; अखंड.

सतसल (विरू.) पहा : **सपसळ**

सतसारणे सक्रि.स्वच्छ करणे : 'हे (ताट) सतसारावे असे'-लीचपू ४७०.

सतंजय पु. एखादा मनुष्य शिंकला वगैरे म्हणजे हा शब्द वापरतात. याचा अर्थ खरे आहे, सत्य आहे, खरे होवो असा. किंवा शतायुषी हो, चिरंजीव हो असाही होतो. शतंजीव, सत्यंजो असेही पर्याय आहेत. [सं. सत्य + जय]

सतंबर वि. लालभडक : 'तैसे सतंबर पद्महस्त देखे'- मूप्र ६५९ [सं. सताम्र]

सता पु.सती या शब्दाचे पुल्लिंगी रूप : 'खरेंच निघल काय सता पाह्यला थेट घेतली प्रेतकळा। तेव्हां तो तिजला झोंबूं लागला । नार उघडून पाहे डोळा ।'- पला ८.१७.

सता स्त्री. अस्तित्व; स्थिती; जवळीक. - विसू ९. [सं.सत्]

सताड वि. ताठ; सरळ; उभे; अगदी सरळ. (राजा.)
क्रिवि. अगदी; साफ; पूर्णपणे; (उघडे किंवा उघडलेले डोळे, तोंड.)

सताप,सतापाचे झाड पु. न. एक औषधी वनस्पती. याचा पाला खोकल्यावर देतात.

सता(त)र वि. १. सरळ : 'दोहीं मुनै सरिसे सतार । जैसे अमृताचे परांकुर । -ऋ ८०. २. उज्ज्वल : 'तिक्ष्ण सतार तरळ नएन।'- आद्य मराठी कवयित्री उ.२११. [सं. स + तारा]

सतार स्त्री. सात तारांचे एक तंतुवाद्य. यातील तीन तांब्याच्या, चार पोलादी. पडदे १८ अगर २४. याशिवाय तरफेच्या तारा ११. या पडद्याखाली लावतात. [फा. सितारा = तीन तारांचे वाद्य]

सतार वि.तारांनी युक्त; गुंफलेली; जरतारी : 'वैराग्य सुकृताचे सरु। कैसे झळकती सतारू।' - ज्ञागा ८४०.

सतारी होनाचा एक प्रकार.

सतावणे उक्रि. त्रास, दु:ख, पीडा देणे; गांजणे; छळणे; उद्वेग आणणे. [सं.सम् + त्रस्,सं. संतापयति]

सतांबोळ वि. सर्व द्रव्यांनी युक्त (पानाचा विडा) [सं. सतांबूल]

सतिके क्रिवि. वास्तविकत:; खरेपणाने : 'म्हणौन संसाररूंख सतिकें। वावोचिगा ।'- ज्ञा १५.२२.

सती स्त्री.१. पतिव्रता; साध्वी; तपस्विनी. २. हिंदूंच्या पूर्वपरंपरेनुसार पती मरण पावला असता त्याच्या मृतदेहाबरोबर सहगमन करणारी स्त्री.३. पार्वती. ४. स्त्री; पत्नी : 'कशी नलसतीच होय दमयंती ।'- र २२. (सती गेलेल्या स्त्रीच्या चितेवर पहारा करणे याला 'सती जागवणे' असे म्हणतात.) [सं.] (वा.) ०**पळणे** -जीव टाकणे.

सतीचा लाल पु.१. शब्दश: पतिव्रतेचा पुत्र. २. (ल.) सत्पुरुष; पवित्र मनुष्य. सखीचा लाल या वाक्प्रचारावरून चुकीने.

सतीचे वाण सती जाणाऱ्या स्त्रीने त्या प्रसंगी दिलेले वाण. यावरून कधी न मोडता येणारे वचन; दृढ प्रतिज्ञा; प्राणावर बेतले असताही न मोडणारा निश्चय. (क्रि. घेणे, उचलणे, स्वीकारणे, अंगीकारणे). (वा.) ०**ठेवणे, मांडणे** - प्रतिज्ञा करायला सांगणे; पैजेचा विडा मांडणे.

सतीर्थ-र्थ्य पु. गुरुबंधु; सहाध्यायी. [सं.]

सतुक-के वि. क्रिवि. सत्य; खरोखरीचे : 'तेवीं अविद्याकाळीं सतुकें। अविद्या नाहीं।'-अमृ ६.३१. [सं. सत्य]

सतुवा पु.१. सातूचे पीठ. २. जोंधळे, बाजरी इ. च्या लाह्यांचे पीठ. [सं. सक्तु]

सतूप न. चेहरा तुळतुळीत दिसावा म्हणून नट वगैरे लावतात तो स्निग्ध पदार्थ; मवारी. [सं. स + म. तूप]

सतेल-ले न. रुंदट तोंडाचे व खोलगट मोठे भांडे; गिंडी.

सतोबा पु.सत्यवक्ता; खरे बोलणारा माणूस.

सत् पु. साधू; पवित्र पुरुष.
न. त्रिकालाबाधित अस्तिरूपी तत्त्व; ब्रह्म.
वि. १. वास्तविक; यथातथ्य; खरे; यथास्थित. २. योग्य; रास्त; उत्तम; गुणवान; खरे; चांगले; ऋजु; हा शब्द बहुधा समासात येतो. उदा. सत्कर्म, सत्कृत्य वगैरे.

सत्कण्या स्त्री.अव. भात कांडतांना अतिशय कण्या झालेले तांदूळ.

सत्कार पु.१. आदरातिथ्य; मानसन्मान; मानमरातब. २. आदर; पूज्यता. [सं.]

सत्कार पु.'ओम् तत् सत्' या मंत्रातील सत् हा शब्द; अस्तिवाचक शब्द : ' तो प्रणवो आदिवर्णुबुजा । आणि तत्कारू जो दुजा । तिजा सत्कारू।' - ज्ञा १७.३४२. [सं. सत्-अस् + कार]

सत्कारणे उक्रि. १. मानपान, आदरातिथ्य करणे. २. पहा : **(हुंडी) सकारणे**

सत्कार(र्य)वाद पु.कार्य प्रकट होण्याच्या पूर्वी त्याचे कारणामध्ये अस्तित्व मानणारे निरीश्वर सांख्य मत : 'मग सहजें सत्कारवादु । तो पद्मकरू वरदु ।'- ज्ञा १.१३.

सत्गत् स्त्री.अंत्यक्रिया (विधी). (झाडी) [सं.सद्गती]

सत्तम वि.सर्वश्रेष्ठ; सर्वोत्तम.

सत्तर वि. ७० ही संख्या. [सं. सप्तति]

सत्तळ गंगाळे. (तंजा.)

सत्ता पु. १. फाशावरील सातांचे दान. २. पत्त्यातील सात ठिपक्यांचे पान.

सत्ता स्त्री. १. अस्तित्व; असणेपणा; स्थिती. २.अधिकार; मालकी; अंमल. ३. शक्ती; सामर्थ्य; प्रभाव. समासात : कालसत्ता, प्रभुसत्ता. ४. जुलूम; करडा अंमल. [सं.]

सत्ताधारक-धारी, सत्ताधिकारी धाना.१. अधिकार, मालकी वगैरे असलेला मनुष्य. २. सत्ता गाजवणारा.

सत्ताधीश पु. प्रभु; राजा; अधिकारी; अंमलदार.

सत्ताप्रकाश पु.अस्तित्व व भास; सत्व आणि चेतना : 'तेवी सत्ताप्रकाशु जगा आपणचि जो ।'-ज्ञा १५.५५२.

सत्तावन वि. ५७ ही संख्या. [सं.सप्तपंचाशत्]

सत्तावीस वि. २७ ही संख्या. [सं. सप्तविंशति]

सत्तु-त्तू पु.१. सातु; जव. २. सातूचे पीठ; गहू, हरभरे, सातु यांचे भाजून केलेले पीठ. [सं. सक्तु]

सत्तूर पु.दोन्ही बाजूस धार असलेला कोयता.

सत्तेचाळ-चाळीस वि. ४७ ही संख्या. [सं.सप्तचत्वारिंशत्]

सत्तेवाईक वि. १. मालकीचे; स्वत:चे. २. अधिकारातील; कार्यक्षेत्रातील; अंमलाखालील.

सत्तोबा–पंत पु. (उप.) १. खरेपणाचा आव आणणारा; प्रामाणिकपणाचे ढोंग करणारा. २. चिक्कू, कृपण माणूस.

सत्रंज्या पु.पट्टेदार साप.(झाडी)

सत्त्व न.१. प्रत्येक वस्तुजातांत असलेल्या तीन गुण किंवा धर्म यांपैकी (सत्त्व, रज, तम) पहिला. हा सर्व सद्गुणांचा द्योतक आहे. २.अस्तित्व; स्थिती; भाव; अर्थत्व. ३.ज्याविषयी काही गुणधर्माचे विधान करता येईल असे द्रव्य, वस्तू. ४. कस; सार; अर्क; सारभूत अंश; तत्त्वांश : 'नराच्या ठायीं नरत्व । जें अहं भाविये सत्त्व ।'– ज्ञा ७.३५. ५. बल; शक्ती; तत्त्व; तेज; अभिमान; जिवंतपणा; पाणी : 'दिसते सत्त्व असें कीं पडतां न चळेल हेमनगहि वर।'– मोवन ४.२६०. ६. स्वभाव; स्वाभाविक गुणधर्म. ७. खरेपणा; सद्गुण; थोरपणा. [सं. अस्, सत्त्वम्] (वा.) **०घेणे,पाहणे** – कसून परीक्षा घेणे; एखाद्याचा बाणा किंवा अभिमान किती टिकतो याची परीक्षा पाहणे. **० सोडणे** – (जमीन, औषध, मंत्र, देव, मूर्ती वगैरेचा) बल, कस, जोर, भरीवपणा स्वाभाविक गुणधर्म नाहीसे होणे. **सत्त्वास जागणे** – अडचणीच्या प्रसंगीसुद्धा आपला मूळ स्वभाव, सद्गुण, सद्भाव यापासून न ढळणे.

सत्त्वधीर–निष्ठ–पर वि.सत्य, इमान, औदार्य, पातिव्रत्य इ. सद्गुण निश्चयाने राखणारा; सत्त्व कधीही न सोडणारा.

सत्वशील–ळ वि.१.सद्गुणी; प्रामाणिक; नीतिनियमाने वागणारा. २. ज्यातील कस किंवा गुणधर्म दीर्घकाल टिकतात असा (पदार्थ).

सत्त्वशुद्धी–शोधन स्त्री.न.१.औषधी, वनस्पती वगैरे स्वच्छ करणे; निकस भाग काढून टाकून सतेज करणे. २. अंत:करणशुद्धी.

सत्त्वस्थ वि. सद्गुणी; नीतिमान; सदाचार संपन्न. २. पथ्यकर; पुष्टिकारक; हितकर; शक्तिवर्धक (अन्न, पदार्थ वगैरे).

सत्त्वहरण न. सदाचाराविषयीच्या लौकिकाची हानी.

सत्त्वागळा, सत्त्वाथिला वि. सत्त्वगुणयुक्त; सात्विक.

सत्त्वात्मा पु. लिंगदेह.

सत्त्वापत्ति–त्ती स्त्री. ज्ञानी जीवाच्या सप्तभूमिकांतील चौथी भूमिका. – हंको.

सत्त्वाशुंठी स्त्री. १. निरनिराळी औषधी द्रव्ये घेऊन तयार केलेली एक प्रकारची सुंठ. २. आतील सर्व कस कायम राहील अशा प्रकारे बनवलेली आल्याची सुंठ. ३. ज्याला नेहमी औषधे द्यावी लागतात असे रोगट मूल. (विशेषणाप्रमाणे उपयोग).

सत्नामी पु. उत्तर हिंदुस्थानातील एक पंथ; हिंदूधर्मातील एक पंथ.

सत्पंथ पु.इमामशहाने स्थापन केलेला महाराष्ट्रातील एक पंथ.

सत्पाळ वि. कसदार दुधाची, चांगले लोणी येणारे दूध देणारी (गाय, म्हैस).

सत्पुत्र पु.१. गुणी, कर्तव्यदक्ष मुलगा. २. त्रैवर्णिक स्त्रीपासून झालेला मुलगा.

सत्पुरुष पु.पुण्यवान, उदार, धार्मिक मनुष्य; साधू; संत.

सत्य न.१. खरेपणा; सचोटी; प्रामाणिकपणा; नेकी. २. वास्तविकता; वस्तुस्थिती; अस्तिभाव. ३. प्रतिज्ञा; शपथ; दिव्य. ४. चार युगातील पहिले युग. याची वर्षसंख्या १७२८००० वर्षे आहे. ५. अस्तिपक्षी, होकारार्थी उद्गार. (खरेच, खरोखर, अवश्य, होय याप्रमाणे). (वा.) **० करणे** – दिव्य करणे.–ऐको.

वि. १. खरे; वास्तविक. २. प्रत्यक्ष; जिवंत; अस्तित्व, चेतना असलेले. ३. अस्सल; मूळ. ४. खरा; खरे बोलणारा. ५. सचोटीचा; प्रामाणिक; विश्वासू. [सं.]

सत्यउपाय वि. नेकीने चालणारा; सचोटीने वागणारा.

सत्यदर्शी पु. ब्रह्मज्ञान झालेला; ब्रह्मतत्त्व स्वात्मत्वे – आत्म्याच्या साहाय्याने पाहाणारा, अवलोकन करणारा.

सत्य(त्या)नाश–स पु.सर्वनाश; सर्वस्वहानी; उच्छेद; समूळ नाश.

सत्यप पु.ब्रह्मदेव; सत्यलोकाचा अधिपती.

सत्यप्रत स्त्री. (विधि.) मूळ लेखाबरहुकूम असलेली प्रमाणित प्रत. (इं.) ट्रू कॉपी.

सत्यंकार पु.१. खरे करणे; स्वीकार; मान्यता; रुजू करणे. २. सचकार.

सत्यंदारी स्त्री.कायम करारावी नोकरी वगैरे; एक मजूर पद्धती. यात वर्षानुवर्षाचा करार असून पोटगी, धडीपगडी, रोख मुशाहिरा वगैरे वेतन वार्षिक असे.

सत्या स्त्री. शपथ.

सत्या पु.एक प्राणी. – अश्वप २.५.

सत्याग्रह पु. १. आत्मिक बलाने अन्यायाशी झगडून सत्याची बाजू सांभाळणे; सत्य गोष्टीबद्दल कोणत्याही विरोधास न जुमानता सर्व मर्यादा सांभाळून सविनय मार्गाने झुंजत राहणे; एखाद्या हक्काबद्दल दुराग्रह धरून शांततेचा व नि:शस्त्र प्रतिकार. २. त्रागा; हट्ट.

सत्याण्णव वि. ९७ ही संख्या. [सं. सप्तनवति]

सत्यात्तर, सत्याह(हा)त्तर वि. ७७ ही संख्या. [सं.सप्तसप्तति]

सत्यापन न.(व्या.सं.) खरे आहे किंवा नाही हे तपासणे, पडताळणे. (इं.) व्हेरिफिकेशन.

सत्याय(यं)शी वि. ८७ ही संख्या. [सं.सप्त + अशीति]

सत्येचाळ–चाळीस–ताळ–ताळीस वि.४७ ही संख्या.

सत्योत्तर न.सरळ, खरे बोलणे; सत्याला, देवाला स्मरून सांगणे; दिव्य. क्रिवि शपथेवर; प्रतिज्ञापूर्वक; सत्याला स्मरून. [सं.]

सत्र न.१. बारापेक्षा अधिक दिवस चालणारा यज्ञ. २. नामसंकीर्तन; भजन; नामसप्ताह. ३. अन्नछत्र; ब्राह्मण, वाटसरू यांना अन्नदान व असे अन्नदान करण्याची जागा. ४. दानधर्म; भिक्षा वाढणे. ५.(ल.) यज्ञ. या अर्थावरून मारामारी, कापाकापी, कत्तल. ६. बराच काळ चालणारी सभा, बैठक.७. शालेय-शैक्षणिक अर्धे वर्ष. ३. चर्चा; परिसंवाद. [सं.सत्र=विस्तार करणे]

सत्रन्यायालय न.प्रत्येक जिल्ह्यातील सर्वांत वरिष्ठ फौजदारी कोर्ट.

सत्रप पु.१. यज्ञकर्ता. २.वेदकालीन मंडलाधिकारी; सुभेदार.

सत्राण पु.१.आवेश; जोर. २. अवशिष्ट त्राण; जोर; बल; शक्ती; दणकटपणा; घट्टपणा, कस; धमक; दम (जीर्ण वस्त्र, वापरलेल्या वस्तू, वय झालेली माणसे यांच्यातील) [सं.]

सत्राण–णे क्रिवि. आवेशाने; सर्वशक्ती एकवटून; मोठ्या दमाने : 'सत्राणें

उड्डाणें हुंकार वदनीं ।'–मारुतीची आरती. [सं. स + त्राण]

सत्वर वि.चपल; चलाख; तडफदार; वेगवान.

सत्वर–री क्रिवि. उत्सुकतेने; तडफेने, ताबडतोब; लवकर. [सं.]

सत्शूद्र पु. आपल्या धर्माप्रमाणे योग्य तो आचार पाळणारा शूद्र जातीतील मनुष्य. गवळी, न्हावी यांचे आचार इतर शूद्रांपेक्षा चांगले असतात. [सं.]

सत्संग पु.अध्यात्मिक मैत्रीचा सहवास. [सं.]

सत्ळी पु.स्त्री.सळई; शलाका : 'तो सुरणांतु सत्ळी घालावा.'– वैद्यकबाड ८१.८८.

सथाउ–वा वि:आवेशयुक्त; जोरदार; जलद; चपल : 'तो सथाउं धोटा । न साहै आंगा सानटा ।'–शिव ५७२; 'नीगतां सथावां गर्ती । आसूडितां दोहो हातीं ।'– शिव ५३२.

सद स्त्री.सभा; समुदाय.

सद वि. शंभर.–आदिलशाही फर्माने. [फा.]

सदका पहा : **सतका**

सद(दे)गा शिकारीचे रान किंवा स्थान. – ऐको.

सदट वि.१. बळकट; घट्ट; सुदृढ. २. मोठा; भारी; जड. ३. नि:संग; मोकळा; धाक नसलेला – (तंजा.)

सदतीस वि. तीस व सात ही संख्या. [सं. सप्तत्रिंशत]

सदन न. घर; वसतिस्थान; निवासस्थान; गृह. [सं.]

सदनिका स्त्री.(न.श.) एखाद्या मोठ्या इमारतीचा सर्व सोयींनी युक्त दोन किंवा त्यापेक्षा जास्त खोल्यांचा रहाण्यायोग्य भाग. (इं.) फ्लॅट.

सदर स्त्री. मुख्य सभा; राजसभा; मुख्य कचेरी; न्यायासन. (वा.) **सदरेस असणे** – नोकरीस,दिमतीस असणे.

न. रकाना; कलम (हिशोबातील). २. बाब; विल्हा; प्रकरण; खाते.

क्रिवि. सर्वसाधारण; सामान्यपणे; कोणतीही मर्यादा न घालता; पूर्णपणे; सरास. उदा. सदर परवानगी.

सदान पहा : **संदान**

सदाचार, सदाचरण पु.१. योग्य, नैतिक, सभ्यपणाची वागणूक. २. चांगली पद्धत, वहिवाट, रूढी; वागण्याची शास्त्रसंमत, शिष्टसंमत रीत, पद्धत, चाल, ३. (मनु) सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांच्या मध्ये–दुआबात राहणाऱ्या लोकांची वागण्याची रूढी, रीत, चाल वगैरे. [सं.]

सदापर्णी वि.पानांनी नेहमी आच्छादित असलेले (झाड.).

सदाफुली स्त्री. उष्णकटिबंधात सर्वत्र आढळणारे एक ते दीड फूट उंचीचे, सर्व ऋतूत फुले येणारे फुलझाड.

सदार वि. ऐपतदार; देऊ शकणारा. [सं. स+फा.दार]

सदारत अध्यक्षपद; सार्वभौमत्व; सर्वश्रेष्ठ स्थान; मुख्य प्रधानकी.[अर.]

सदावर वि. योग्य; ठीक.(व.)

सदावर्त न.अन्नछत्र; आल्या गेलेल्याला अन्न देणारी संस्था. कोरड्या अन्नाचा शिधा वाटणारी धर्मशाळा. [सं. सदा + व्रत किंवा वृत्ति]

सदी स्त्री. शंभर वर्षांचा कालखंड; शतक. [फा.]

सदी–दी स्त्री.भरभराट; अनुकूल काल; संपन्नता; सुदैव; यशस्विता.

सदी–दे वि. क्रिवि. शेकडा. उदा. दरसदे – दर शेकड्यास. [अर.]

सदी क्रिवि. नेहमी; नित्य; सतत; सदा. [सं.]

सदुते वि. सिद्ध; तयार : 'आरमारी प्रयोजनी सामान यथेष्ट व सदुते करावे.'– मराआ ३४. [सं. सिद्ध, फा. इस्तेदाद]

सदुसष्ट वि. ६७ ही संख्या. [सं. सप्तषष्टि]

सदृश वि. सारखा; सम; तुल्य. (समासात) पितृसदृश.

सदेव वि. १. दैववान; भाग्यशाली : 'आता ऐका सदेव लक्षण ।'– दास १९.४१. २.उत्तम शहाणा :'ऐका सदेवपणाचे लक्षण ।'– दास ११.३१४.

सदेस्तु वि. ताजे : 'एका भक्तजनाचा सदेस्तु उपहार आला'– लीचउ २४०. [सं. सद्यस्]

सदैव वि.दैववान; नशीबवान; भाग्यशाली : 'परी फळला मनोधर्म । सदैवांचा ।'– विपू ७.१५४. [सं. सदा + एव]

सदैव क्रिवि. नेहमी; सतत; नित्य; सर्वकाळ; सदोदित. [सं.सदा + एव]

सदोदि(दी)त क्रिवि. नेहमी; सतत; सदा.

वि. नाशरहित.

सद्गत स्त्री.(सद्गती याचा संक्षेप) उपाय; मार्ग; तरणोपाय; गत्यंतर; इलाज; सोडवणूक. पहा : **सतनागत**

सद्गति–ती स्त्री.१. चांगली गती; मरणोत्तर सुखावह अवस्था; मोक्षप्राप्ती. २. स्वर्गप्राप्ती; उच्च जातीत पुनर्जन्म; परलोकप्राप्ती.

सद्गद वि. कंठ दाटून आल्याची (स्थिती).

सद्गदित वि.दु:ख, शोक वगैरेमुळे गळा दाटून आलेला.

सद्गुण पु. विद्या, कला, शौर्य, सहिष्णुता, इत्यादिसारखा उत्तम गुण; चांगला गुणधर्म, तत्त्व. [सं.]

सद्जबाब पु.(कायदा) उत्तरपक्ष, कैफियत; सयुक्तिक प्रत्युत्तर. [सं.सत् + फा. जबाब]

सद्दा पु.मोहरमात ताबुताच्या पुढे नेतात ती निशाणे. [अर. शद्दा]

वि. चांगली बुद्धी, प्रवृत्ती, विचार, मन असलेला. [सं.]

सद्भाव पु. १. अस्तित्व; स्थिती : 'म्हणोनि अज्ञान सद्भावो । कोणे परी न लाहो।'– अमृ ७.२९३. २.साधुत्व; सुस्वभाव; सुशीलता. ३. श्रद्धा; सद्वृत्ती. ४. सत्य, योग्य अनुभव; प्रतीती. [सं.]

सद्म न. गृह; घर; सदन :'धरी सद्म मानी जया नित्य पद्मा'– वाभ. [सं.]

सद्मा–ध्मा १. धक्का. २. अनर्थ; दंगा.

सद्य–द्यः क्रिवि. १.तात्काल; त्वरित; क्षणात; ताबडतोब; सांप्रत; याक्षणी. २.(चुकीने) ताजे; अलीकडील; नुकतेच. [सं.सद्यः]

सद्यःप्रतीति स्त्री. मरणानंतर मोक्ष अथवा स्वर्ग मिळण्याऐवजी याच देही, याच जन्मी त्याचा अनुभव मिळणे.

सद्यस्क–स्त, सद्यस्काल, सद्यस्कालीन वि. सांप्रतचे; ताजे; नवे; आजकालचे.

सद्यःपक्ष पु.(विधीसंबंधी) १. मुख्य कर्माची उपांगे आधी किंवा मागून न करता त्या त्या प्रसंगी करावी असे मानणारा पक्ष. २.अशा तऱ्हेने

कर्माचा अपकर्ष किंवा एखादे कर्म मुख्य कर्मापूर्वी करण्याची क्रिया. वि. ताजे; अलिकडील; नवे.

सद्या क्रिवि.पहा : **सद्य** १

सद्री स्त्री. सूत व लोकर यांनी विणलेले कापड.

सद्वस्तु न. परमेश्वर; परब्रह्म.

स्त्री. न. चांगला मनुष्य, पदार्थ.

सद्विवेक, सद्सद्विवेक पु. १. सारासार विचार; न्यायबुद्धी. २. तारतम्य; योग्यायोग्य निवड करण्याची शक्ती.

सद्विवेकी वि. न्यायी; तारतम्य जाणणारा; सुज्ञ; समंजस, योग्यायोग्याची बरोबर निवड करणारा; विचारी.

सद्वृत्त न. चांगली वागणूक.

वि. १. सदाचरणी; चांगली वागणूक आहे असा. २. सुंदर, गोल आकाराचा.

सधट वि. १. सबंध; पूर्ण; सगळा; अविच्छिन्न; असगा (वस्त्र, लाकूड, दगड, वस्तू, शेत, मार्ग). २. (ल.) सरळ; अचूक; निर्दोष. स्पष्ट; रोखठोक; घट्ट (भाषण, वागणूक, योजना, काम).

क्रिवि. वि. १. सरळ; समोर; सीधा; थेट. २. स्पष्ट; रोखठोक; साफ; निक्षून (उद्दामपणे; उद्धटपणे). ३. घट्ट; मजबूत; दाट.

सधणे अक्रि. जखमी करण्याची इच्छा करणे : 'यां प्राणियांते वीरेषा । न सधीति गा ।।' - ज्ञा १६.३९५. [सं. संधू]

सधर वि. १. बळकट; न हालणारा; स्थिर. २. आधार मिळालेला: 'म्हणोनि बुद्धियोगु सधरु।' - ज्ञा २.७२६. [सं. स+धृ]

सधर्म वि. १. एकाच धर्माचे, पंथाचे, संप्रदायाचे. २. एकच गुणधर्म, लक्षण असलेले. [सं.]

सधर्मिणी स्त्री. विवाहित स्त्री.

सधवा स्त्री. सुवासिनी; सौभाग्यवती; पती जिवंत असलेली स्त्री. [सं.]

सधिन न. तूप. (व.)

सधिमिर वि. कामतप्त : 'हृदय(यें) सधिमिरें जर्जरें स्त्रीजनांची ।' - गरा२.

सध्या क्रिवि. याक्षणी; आत्ताच; त्वरित. [सं. सद्य; क. सध्या=तात्काळ]

सध्यान्न-न्ह न. शिजवलेले अन्न. [सं. सिद्धान्न]

सन पु. वर्ष; शक; साल. [अर. सना]

सनई स्त्री. पिपाणीसारखे एक मधुरवाद्य; नागसर; तुतारीसारखे वाद्य. [सं. स्वन; हिं. शहनाई फा. सुर्ना]

सनकन-कर-दिशी, सनकणे-सनका हे शब्द सणकन, सणकणे वगैरेमध्ये पहा.

सनकांडी स्त्री. आगपेटीतली काडी.

सनगर स्त्री. पु. कर्नाटकातील घोंगड्या, कांबळी विणणारी एक जात व तीतील व्यक्ती. [सं. सण-शण+कार]

सनतगार कारागीर; कामगार.

सनद स्त्री.१. अधिकारपत्र; प्रमाणपत्र; राजपत्र; शासनपत्र; मुखत्यारनामापत्र; विशिष्ट उद्योग, धंदा, व्यापार वा व्यवसाय यासंबंधी सरकारकडून दिला जाणारा अधिकृत परवानगीचा कागद. [अर.]

सनदशीर वि. क्रिवि. सनदी; राज्यघटनेच्या नियमानुसार; कायदेशीर; रुढ पद्धतीप्रमाणे.

सनदी वि. १. राजपत्राप्रमाणे अस्तित्त्वात आलेला. २. लेखाचा आधार असलेले; सरकारने नेमलेले; खरे (हक्कदार).

सनपणे क्रि. उपमेस येणे.

सनबात क्रिवि. सालवार; अनेक वर्षे थकलेला.

सनभात पु. भातुकली.

सनय स्त्री.१. पहा : **सनई**. २. घोड्याचे दात. - अश्वप १.११८.

सनर स्त्री.वाट; रस्ता. (व.)

सनला पु. चिरा, भेगा भरण्यासाठी, गिलावा चांगला व्हावा म्हणून मुद्दाम गाळून व घोटून तयार केलेला चुना; त्याची पूड.

सनसनाटी वि. खळबळजनक.

सनसनणे, सनसनाट, सनसनीत, सनसर हे शब्द सणसणणे वगैरे शब्दाखाली पहा.

सनवी वार्षिक.

सनागर वि. सुंदर; चांगला; गोड.

पु. शृंगार. - विशर.

सनाटा-ट पु. १. झणाटा; सपाटा; सोसाटा; जोराचा आवाज (वारा, पाऊस, गारा, उकळी वगैरेच्या आवाजासारखा). (क्रि. बसणे, लागणे, मारणे). २. आवेश;जोर; सपाटा; तडाखा (लिहिणे, पाठ म्हणणे इत्यादींचा). ३. सणसणाट; दणदणाट; टणत्कार; दणका (बंदुकीची गोळी, बाण, दगड इ. च्या आवाजाचा).

१. फार मोठा; अवाढव्य; विस्तीर्ण; दांडगा; प्रचंड (पर्वत, खडक, गलबत इ.) २. अफाट; बेफाम; राक्षसी (नाग, मनुष्य इ.). [सं. सम्-नाट;ध्व.]

सनातन वि. शाश्वत; चिरकाल; अव्याहत; अबाधित; पुरातन कालाचे; अनादिसिद्ध; नित्यनूतन. [सं.]

सनातनी वि. पु. जुन्या मताचा; परंपरानिष्ठ.

सनाथ वि. १. ज्यास धनी, आश्रय, संरक्षक, मित्र आहे असा. २. धन्य.

सनाद(द्ध)बध्द-ध वि. सज्ज; तयार : 'ऐसे सैन्य सनादबद्ध जाले' - उह ५६५.

सनानणे सक्रि. संतापणे.

सनाभ वि. ज्याच्या उजव्या व डाव्या दोन्ही समासांवर भाष्य, टीपा लिहिल्या आहेत असा (ग्रंथ).

सनाभि-भी पु. १. नातेवाईक; भाऊबंद; सपिंड. २. सहोदर; सख्खा भाऊ; एकाच आईपासून झालेला.

सनाव-ह पु. चिलखत : 'तो चैतन्यदुर्गिचा राओ : लेइला शसिक सनाओ' - शिव ९९६. [सं.]

सनावली-ळी स्त्री. ऐतिहासिक घटनांची कालक्रमानुसार जंत्री.

सनाह पु. नाथ; स्वामी : 'तो रायाचा बोलिजे सनाहो : दक्षिणे महिमेचेयां ।।' - नरुस्व २७५.

सनीज स्त्री. नवारीची बांधणी; पट्टा; बंद. [फा.]

सनीन पु. घोड्याच्या डोक्यावरील तुरा.

स्त्री. (प्र.) संगीन; बंदुकीच्या शेवटी जोडायचे अणीदार शस्त्र.

सनीहार पु. यज्ञार्थ दक्षिणा. [सं.]

सनुष्ण वि. प्रवीण : 'जो सकळकळी सनुष्णु।' – ज्ञा १७.३१.

सनकी स्त्री. १. ताटली; झाकणी. २. ढेकर. (झाडी) [सं.]

सन्नति–ती स्त्री. आदरपूर्वक नमस्कार; नमन. [सं.]

सन्नद्ध–ध वि. सज्ज, तयार; सिद्ध; सायुध : 'सन्नद्ध करता दळभार' – एरुस्व ५.१. [सं.]

सन्ना(न्न)टा पहा : १. **सनाटा–ट.** २. अतिशय शांतता; कुठलाही आवाज न होणे. (क्रि. पसरणे, होणे).

सन्नावणे अक्रि. तडाखा मारणे.

सन्नाह पु. १. साहित्य; सामानसुमान; सरंजाम : 'वर लिहिल्याप्रमाणे सन्नाहही बरोबर घेऊन युद्धास आला.' – मऐशि १५०७. (तंजा.) २. चिलखत; ढाल. [सं.]

सन्निध पहा : **संनिध**

सन्निधान न. १. सान्निध्य. २. परमेश्वरावताराच्या सान्निध्यात त्याच्या अधिनत्वाने राहणे : 'तरी (ज्वरु) सन्निधानीचि भोगूं': – लीचपू ११६.

सन्निपात पु. १. मिश्रण; मिसळण; एकंकार. २. एकत्र होणे; मिळणे; जमा, गोळा होणे; समाज; समूह; समुच्चय. ३. जोडणी; जुळणी; संबंध; मिलाफ. ४. पतन; अवतरण. ५. एक रोग; कफ, वात व पित्त यांचा एकत्र जोर. [सं.]

सन्निभ पु. गोमेद. – पदाव ७८. [सं.]

सन्निविष्ट धावि. १. पूर्णपणे प्रविष्ट झालेला; आत बसलेला. २. (ल.) मग्न; गुंग; गुंतलेला; गढलेला (अभ्यास, काम वगैरेमध्ये). ३. निष्णात; निपुण; पारंगत. [सं.]

सन्निवेश पु. १. अंत:प्रवेश; पूर्ण शिरकाव. २. पूर्ण व्यग्रता; मग्नता. ३. नैपुण्य; कौशल्य; पूर्ण ज्ञान. [सं.]

सन्मात्र न. ब्रह्म. [सं.]

सन्मान पु. आदर; सत्कार; मान. [सं.]

सन्मान्य वि. आदरणीय; आदर करण्यायोग्य. [सं.]

सन्मुख पु. (सांके.) न्हावी; हजाम. (हा नेहमी पुढे असतो म्हणून.) (कर.) वि. क्रिवि. पुढे; समोर. [सं. सम्मुख]

सन्मुखकाल पु. अनुकूल शुभकाल, वेळ, प्रसंग; उत्कर्षाचा काळ.

सन्या पु. अर्धा आणा. (व.)

सप पु. पूर्ण नाश. पहा : **सप्पा**

सपक वि. अळणी; बेचव; नीरस; पाणचट; तिखटमीठ नसलेले. [सं.; क. चप्पंग, सप्पे]

सपक पिठले न. दोडके व पडवळ यांचे वंजन घालून केलेली मुगाची आमटी. (तंजा.)

सपका पु. हबका; जोराचा शिंतोडा; शिटकाव. [ध्व.]

सपडप वि. क्रिवि. सुशोभित; सुभूषित; सजूनधजून : 'तैसीं निरर्थकें जल्पें। होऊनियां सपडपे।' – अमृ ६.१००.

सपतळ वि. पातळ : 'जैसे अवकाळी आभाळ। अळुमाळु सपतळ।' – ज्ञा ६.४३३.

सपत्न पु. १. सावत्र. २. (ल.) शत्रू; वैरी; विरुद्ध पक्षाचा मनुष्य : 'धनुस्पर्श केला सपत्नी कुभावीं।' – मुरा, बालकांड. [सं.]

सपत्नी स्त्री. सवत. [सं. समान + पति]

सपरवट वि. अंधूक; वरवर.

सपरिग्रही पु. गृहस्थाश्रमी : 'तुम्ही सपरिग्रही असा' – लीचउ २३.

सपर्‌दान पु. १. पसारा. २. वधूमातेने वरमातेला दिलेला आहेर. (झाडी) [सं. संपूर्ण दान]

सपर्या स्त्री. पूजा; उपचार :'नाना पुष्पें फळें सपर्या श्रीगुरुराया।' – सप्र १५.२३. [सं.]

सपल्लव वि. १. पानांसहित; पानांचे झुबके असलेला. २. सविस्तर; सभाष्य: 'तेथ विधिनिषेधीं सपल्लव। वेदवाक्यांचे अभिनव।' – ज्ञा १५.१५७. [सं.]

सपवास वि. मृतवत; सपाट : 'तुवां पुढे जाऊनि नदिचे तीरी सपवास पडावे' – पंचो ७९.१२.

सपशे(शै)ल–ला क्रिवि. १. पूर्णपणे; निखालस.२. विस्कळीतपणे; अव्यवस्थितपणे (क्रि. पडणे, कलंडणे, बसणे.) ३. अस्ताव्यस्त; विस्कळीतपणे. (क्रि उडणे, पसरणे). [अर.सफा]

सप(पा)सप(पा) क्रिवि. १. भरभर; झपझप; झपाट्याने; चपळाईने; पटापटा. २. निष्काळजीपणाने; हलगर्जीपणाने. [ध्व.]

सपळ पु.आवाज. (बे.) [क.सप्पळ]

सपक्ष वि १. पंख किंवा पिसे असलेला. २. एकाच बाजूला, फळीला असणारा; एकाच पक्षातील. ३. (न्यायशास्त्र) नेहमी अस्तिपक्षी, समवायी असणारा. उदा. महानस हें अग्नियुक्त सदोदित असते म्हणून सपक्ष. ३. साधार; ग्रंथात सांगितलेले; मागे आश्रय आहे असा (तत्त्व, व्यक्ती वगैरे). [सं.]

सपा, सपाइनि, सपाई क्रिवि. पूर्णपणे:'सर्वस्वी तवकृपेची दृष्टी असतां। सपा मिरवू सवे क्षमिता।'– नव २३.१११.

सपाई–यी वि. क्रिवि. यच्चयावत; संपूर्ण; सर्वथैव; साफ; सपशेल : 'तया देहा म्हणती भेटी । हे सपायी निर्जिव गोष्टी।'– ज्ञा १३.१०९७. [सं. सपाद]

सपाट वि.१. समतल; एका पातळीत असलेले; गुळगुळीत; खांचखळगे, उंचवटे नसलेले; समान; सारखे. २. काठाबरोबर सारखे केलेले; शीग मारलेले (धान्याचे माप वगैरे). ३.स्थिर; शांत; समपातळीत. ४. नष्ट; नाहीसे. [सं. सम + पृष्ठ; क. सप्पे] **० करणे** – नाश, नायनाट करणे; धुळीस मिळवणे. **० होणे** – साफ, नाहींसा होणे.

सपाटणे सक्रि. १. कोणतीही गोष्ट बेसुमार करणे. २. फाडणे.
अक्रि. समान पातळीवर येणे : 'आणि उदक साहाजें सपाटलें।'– ज्ञा २.१०७ [सं. सम् + पाठ्य]

सपाटा पु. १. पहा : **झपाटा.** २. चापट.
वि. १. अवाढव्य; अगडबंब; फार मोठा २.भरपूर; जोरदार. [ध्व. त. शोप्पु = धपाटा]

सपाटा(टे)बंद क्रिवि. जोराने; सपाट्याने; एकदम.

सपाटी स्त्री.१. समपातळी; सपाटपणा; सरळपणा; समपृष्ठत्व. २. सपाट मैदान; एका पातळीतील जमीन, पठार; ओटा. [त.शप्पट्टै]

सपाटून वि. क्रिवि. १. झपाट्याचा; जोराचा. २. झपाट्याने; आवेशाने.

सपात वि. सलग. (राजा.)

स्त्री. डोंगराच्या माथ्यापासून ओढ्याच्या काठापर्यंतची जमीन; डोंगराचा उतार.

सपाता स्त्री.वहाण; पादत्राण. [स्पॅ. झपट्स]

सपासपी स्त्री. झपाझपी; खसाखसी; जोराची, झपाट्याची क्रिया.

सपाळ वि. उत्तम व पुष्कळ दूध देणारी (गाय वगैरे).

सपिठी, सपीट–ठ न.गव्हाचे बारीक पीठ; गहू ओलवून, दळून करतात ते बारीक पीठ; मैदा. [सं. सपित, संपिष्ट]

सपिंड वि. भरीव; ठोसर; अखंड : 'जेथ चिंतामणीचे दळवाडें । उमाणुनि दिधिया सपिंडें।' – शिव ३४६. [सं.]

सपी(फी)ल–ली स्त्री.गावाभोवतालची भिंत, तट; परकोट; तटबंदी. पहा : **सफेली** १

सपील वि.गाय, म्हैस यांचे सर्व दूध पिणारे (वासरू); जिचे दूध मालक काढत नाही, सर्व वासराला पाजतो अशा गाईचे (वासरू). (को.)

क्रिवि. सर्व दूध पिण्याकरता. [सं. स–सर्व + पा–पील]

सपुट वि.जिवंत; सजीव; भरदार; भरलेली.

सपु(बु)दा वि.आधार; पाठिंबा; पुरवठा. (कर.) [सं.स + पुद्]

सपु(पू)र वि.१. बारीक; सूक्ष्म; निमुळता. २.भरदार; जाड; दाट विणीचा: 'बाइसें सपूर दाटणा ओळगावीति' – निलीपूजा ८.१३.

सपृष्ठवंश वि. (शाप.) ज्याच्या पाठीला कणा आहे असा (प्राणी). (इं.) व्हर्टिब्रेट.

सपेली पहा : **सफेल–ली**

सपोट–टी क्रिवि. जेवूनखाऊन (नोकर ठेवणे).

सपोल वि.१.पोकळ; निष्फळ; व्यर्थ. २.भ्रांत; गोंधळलेले : 'आता असो हे कीडाळा । बोली न करू पघळ । सांघतांचि सपोल । होतसे वाचा।'– ज्ञा १६.३११.

सपोळा पु. एक प्रकारची वावडी, पतंग.

सप्टेंबर पु. इंग्रजी वर्षाचा नववा महिना. [इं.]

सप्त वि. ७–सात ही संख्या. [सं.]

सप्त वि.लिखित; निश्चित : 'हा अहमदनामा सप्त जाहला आहे.' – पे ६१. [अर.सबत् = स्थैर्य]

सप्तक न.१. सातांचा समुदाय. २.(संगीत) सात सूर.

वि.सातवा.

सप्तकर पु. अग्नी.

सप्तक्या वि. सात, सात दिवसांची अगर वर्षांची मर्यादा धरून तप करणारा.

सप्तग(गा)णी स्त्री.दुंडा,ढबू पैसा.

सप्तति स्त्री.सत्तर ही संख्या. [सं.]

सप्तद्वीपवती, सप्तद्वीपा स्त्री. पृथ्वी. [सं.]

सप्तधातु–तू पु. शरीरातील रस, रक्त, मांस, मेद, मज्जा, अस्थि व स्नायू हे सात रस.

सप्तपदी–पदीक्रमण स्त्री.न.विवाहविधीमध्ये लाजाहोमानंतर वधूवरांनी एकमेकांबरोबर सात पावले जाण्याचा विधी; वधुवरांनी अग्निभोवती सात पावले चालून 'नातिचरामि' अशी प्रतिज्ञा करण्याचा विधी.

सप्तपर्ण पु.एक वृक्ष.

न. द्राक्षे, डाळिंब, खजूर यांचा रस व साखर, मध व तूप व इतर मसाला घालून केलेला एक खाद्यपदार्थ.

सप्तमी वि.१. पंधरा तिथींपैकी सातवी तिथी. २.(व्या.) सातवी विभक्ती.

सप्तर्षि–र्षी पु.अव. प्रत्येक मन्वंतरातील सात ब्रह्मर्षी. यांच्या नावाबद्दल एकवाक्यता नाही. सप्तर्षी अथवा ऋक्ष नक्षत्रातील हे सात तारे आहेत; आकाशात ध्रुव ताऱ्याभोवती दिसणारा सात तेजस्वी ताऱ्यांचा समूह.

सप्तस्कंध पु. अव. वायुमंडलाचे सात भाग.

सप्ता पु.१. तडाखा; सपाटा. २.पूर्ण नाश.

सप्ताल–लू–ळ–ळू न. एक विशिष्ट फळ.(इं.)पीच. [फा.शफ्ताळू]

सप्तास्र पु. सप्तकोन.

वि. सप्तकोनी.

सप्ताह पु.१.सात दिवसांचा काल; आठवडा. [सं.]

सप्ताहसमाप्ति–प्ती स्त्री.शनिवार तिसऱ्या प्रहरापासून सोमवार दोन प्रहरापर्यंतचा सुटीचा काळ. (इं.) वीकएंड.

सप्पय क्रिवि. पुरते, पूर्ण टेकून.

सप्पा–प्फा पु.१.सपाटा; तडाखा; थप्पड; चपराक. २. पूर्ण नाश; उध्वस्तता; ओसाडी; दाणादाण; रुक्षता; वैराणपणा (बंडाळी, जाळपोळ इत्यादींमुळे प्रदेशाचा); पार संपणे; खपून जाणे; सरणे (एखादा पदार्थ, संपत्ती–खाण्यामुळे, उधळपट्टीमुळे वगैरेमुळे).

क्रिवि. समूळ; पूर्णपणे; मुळीच. [अर.सफ्फ=रांग, ओळ; ध्व.]

सप्रतिबंधदाय पु. मुलगा, नातू किंवा पणतू नसल्यामुळे इतर वारसाकडे जाणारा वारसा.

स(सं)प्रवर वि. १. दोन किंवा अधिक घराण्यातील प्रवर (मूळ पुरुष, कुळातील श्रेष्ठ पुरुष) एक असणे. २. ज्यांच्या प्रवरांमध्ये एखादा प्रवर सामान्य आहे अशी (कुले) [सं.]

सप्री स्त्री. पडवी; ओसरी. (झाडी) [हिं.छपरी]

सफ पु.१. कत्तल; मारामारी; विध्वंस; नाश. २. एका मागून एक असे अखंड क्रमाने मरणे किंवा मारणे.

[अर.सफ्क = रक्तपात, हिंसा, कत्तल]

सफर न. मुसलमानी वर्षातील दुसरा महिना. [अर.]

सफर स्त्री. १. प्रवास, जलपर्यटन; गलबतावरील फेरी, खेप. २. खलाशांचा धंदा; दर्यावर्दी. ३. दर्यावरील फेरीबद्दल मजुरी, वेतन. [अर.सफर] ० **साधणे** – कार्यसिद्धी होणे.

सफर न. लहान मासा : 'तेथ काइ सफरें। पव्हों न ल्हांति।'– ज्ञा १८.१६९७. [सं.शफर]

सफरचंद–जंग न. शीत प्रदेशातील एक गोड, नारिंगाएवढे फळ; सेब.

सफरदायी पु. नायकिणीला सारंगीची साथ करणारा.

सफरा पु.१.घोड्याचा एक त्वचारोग. – अश्वप २.२३४.२. पित्त. (पण युनानी वैद्यकात हा अर्थ फक्त पित्तापुरता मर्यादित नसून सर्व चयापचयाच्या क्रियेशी असतो असे मानलेले आहे.)

सफरिन न.सुमारे आठ आणे किंमतीचे नाणे. [पोर्तु.]

सफरी पु. दर्यावर्दी; गलबतावरील नोकरी; खलाशी; जलपर्यटन करणारा.

सफल–ळ वि. फायदेशीर; यशस्वी; प्राप्ती देणारा (धंदा, व्यवसाय,काम). [सं. सफल]

सफा स्त्री. कत्तल. पहा : **सफ**
पु. रात्री घातलेला छापा.

सफा वि. शुद्ध; साफ; छान; सुंदर; पांढरे स्वच्छ :'दरखणास मेहेरप । काम काय सफा ।'– प्रला२२९. [अर.सफा = स्वच्छता]

सफाई स्त्री. १.तजेला; जिल्हई; तकाकी; चकाकी (घासून आणलेली); गुळगुळीतपणा. २. (ल.) स्वच्छता; शुद्धता; व्यवस्थितपणा; नीटनेटकेपणा. ३. कौशल्य; चलाखी; हातोटी. ४. समेट; दिलजमाई; अंत:करणशुद्धी (संशय, हेवादावा काढून टाकलेली); जुळणी; व्यवस्थित मांडणी; दुरुस्ती (हिशेब, परस्परांची समजूत, अटी इत्यादींबद्दलची).
क्रिवि. पूर्णपणे, सपशेल; अगदी; समूळ; अजिबात; साफ. [अर.]

सफाईबंद क्रिवि. साफ; समूळ; निर्मूळ; अगदी; अजिबात : 'जमीनीबरोबर कलमास जे फाटे फुटतील ते सफाईबंद कापून काढून टाकिले पाहिजेत.' – कृषि ३८९.

सफाचट क्रिवि. गुळगुळीत; साफ.

सफाप–फ स्त्री. काच; स्फटिक. [फा.]

सफाया १. काच. २. दुय्यम दर्जाचे रत्न. [फा.]

सफार वि. सपाट; समांतर.

सफारी स्त्री. शिकार किंवा शास्त्रीय निरीक्षण यासाठी काढलेली सहल.

सफेजंग–गी स्त्री.१. सैन्य; फौज; सज्ज सेना. २. निकराची लढाई; दारुण, घोर युद्ध. ३. उध्वस्तता; सत्यानाश. [अर. सफ + जंग]

सफेत–द वि. पांढरा; शुभ्र. [फा. सफेद; सं.श्वेत]

सफेता–दा पु.१. पांढरा रंग. २. शिशाचे कर्बनत्रित.

सफेती स्त्री.१. पांढरेपणा; शुभ्रता. २.घराला दिलेला पांढऱ्या रंगाचा हात, लेप.

सफेल–ली स्त्री.१. तटाची भिंत; परकोट : 'पलीकडील सफेल फोडून गोळा पार झाला.'– होकै २०. २. घराच्या पुढील किंवा वरील चुनेगच्ची,ओटा वगैरे. [अर.फसील]

सब–ब् वि.सर्व; समस्त; सगळे. उदा. सब घोडे बाराटक्के. [फा.सं.सर्व]

सबक(ख)ल वि.क्रिवि.बरोबर; ठीक; बेताचे; जोगते; जुळेसे. पहा : **चबखल** [सं.]

सबज वि. हिरवा, सबजासारखा (रंग): 'सबज पोशाख.'–पेद६.५८. [फा. सब्झ]

सबजा पु.१. एक तुळशीसारखे रोप. २. घोड्याचा रंग. ३. कस्तुरी. (तंजा.) [फा.सब्जा]

सबजाजर पु. कुरण; गायरान.

सबजी स्त्री.१.हिरवेपणा; हिरवळ; टवटवी. २.भाजी; भाजीपाला; पालेभाजी. ३.भाजीपाला, फळफळावळ वगैरेवरील कर. ४. भांग (पाला किंवा पेय). [फा.सब्जी]

सबज्या वि. काळे पांढरे ठिपके असलेला (घोडा). [सं.]

सबडबुडी क्रिवि.पूर्णपणे : 'बेडुक सापाचां तोडीं। जातसें सबडबुडी।' –ज्ञा १३.७२९.

सबत स्त्री.सिद्धता. [फा. सबूद]

सब(बा)त किल्ल्याला वेढा दिल्यानंतर किल्ल्यापर्यंत जाण्यासाठी काढलेले चर किंवा खंदक.

सबतुटी स्त्री. (सोंगट्यांचा खेळ) सर्व मरून एकटीच राहिलेली सोंगटी.

सबनीस पु.दरकदाराचा मुख्य कारकून; शिबंदी व सरकारी नोकर यांना पगार वाटून त्यांचा हिशोब करणे व त्याची नोंद करणे. [फा. सफ्नवीस]

सबब स्त्री. कारण; निमित्त; प्रयोजन; हेतू.
क्रिवि. कारणाने; म्हणून; मुळे. [अर. सबब]

सबर पु.धीर; सबुरी. [अर.सब्र]

सबर वि.कोरफडीची एक जात. . [अर.सब्र]

सबर वि.श्रीमंत; थोर.

सबरनिबर वि. चांगले–वाईट; निवडक नव्हे असे सरमिसळ.

सबराद पु.सोस; हव्यास.(व.)

सबल–ळ वि.१. सशक्त; सामर्थ्यवान; बलवान; जोमदार; बळकट; मजबूत. २.सैन्यासह. ३. पुष्कळ; अमित. [सं. स + बळ]

सबलता स्त्री.१.कायदेशीरपणा; विधिग्राह्यता. २.सप्रमाणता; साधारता.

सबलस वि. सपशेल लोटांगण घातलेला; दंडवत घातलेला : 'सबलस गौळणी गाऱ्हाणें देती हरीचें।'–भज ८.

सबसणीस क्रिवि. घट्ट; मजबूत; न हालेसा; पक्का; न उलटेल असा. (क्रि. बसवणे, ठेवणे, बसणे – एखादी वस्तू). (राजा.)

सबहाल पु. बित्तंबातमी.

स(सं)बळ स्त्री.शिदोरी; अन्नसामुग्री; 'सबळ उरे वेचें ठाउवें नव्हे।'– ज्ञा १८.५९१.

सब(ब्ब)ल–ळ, संबळ पु.स्त्री.१. तोंडाशी दुभागलेली मोठी पहार; सामान्यत: पहार. २. तोमर; छेळणे; भाल्यासारखे एक शस्त्र. काहींच्या मते संबळ हा शब्द पुल्लिंगी असून फक्त मोठी पहार हा अर्थ दाखवतो व सबळ हा स्त्रीलिंगी असून दुधारी पहार किंवा छेळणे दाखवतो.

सबळ वि.(प्र.) शबल; औपाधिक; मायिक; मिश्र; गढूळ : 'माया सबळ यैसे म्हणिजे' – विसिं ३.५०. [सं.सबल]

सबळी वि.(बुद्धिबळे) जोर असलेली मोहरी मारलेली चालतात असा बुद्धिबळे खेळण्याचा प्रकार; निजोरी.

सबंद–ध वि.१. बांधलेला; दोरीने आवळलेला. २ (ल.) अविभक्त; संपूर्ण; सगळा.

सबा वि. सात; मुसलमानी वर्षगणनेत योजतात. [अर.]

सबागी वि. सुलभ; सोपे.

सबाय स्त्री. (नाविक) शिडाची काठी सरकू नये म्हणून बांधलेली दोरी.

सबाह्य वि. कायिक व मानसिक, अंतर्बाह्य; आतून व बाहेरून.

क्रिवि. आतून व बाहेरून : 'जैसें सबाह्य जळडोहीं बुडालिया घटा।'- ज्ञा ७.१३३. [सं.]

सबाह्याभ्यंतर न. आतील व बाहेरील भाग; अंतस्थ हेतू व बाहेरील वागणूक.

क्रिवि. १. बाहेरून व आतून. २. प्रत्यक्ष व मनापासून; अंत:करणपूर्वक व बाह्यत:; उघड व मनापासून. [सं. स+बाह्य+अभ्यंतर]

सबांब वि. तेजस्वी : 'तेथ मेधारसें सगर्भा आस्थापत्रीं सबांब।'-ज्ञा १५.१८५.

सबील वरात; पैसे देण्याविषयीचा रोखा.

सबील स्त्री. रस्ता; मार्ग; पद्धती.[अर.] ० **करणे** – कसेही करून, भीक मागून अगर उसने घेऊन पैसा उभा करणे :'खर्च तोडून अदवानीवर सबील करावी.' -मइसा ५.१८७.

सबुडबुडी क्रिवि. समूळ; संपूर्ण; सहज : 'बेडूक सर्पाचिया तोंडीं। जातसे सबुडबुडीं।' - ज्ञा १३.७३०.

सबुचा दारूने भरलेले मडके. हे शत्रूवर फेकून मारीत.

सबुदा पु. बेगमी; पुरवठा; साठा. [फा.सबूद = टोपली]

सबुरी,सबूर स्त्री. शांती; धीर; दम; सहनशीलता; सहिष्णुता; तहकुबी : 'परंतु ते दिवशीं सबूर करविली.' - ऐलेसं ६.३१. [फा. सबूरी]

सबुऱ्या वि.धीराचा; दमदार; सहनशील.

क्रिवि. अवसान घेऊन; दम खाऊन; जोराने. (क्रि. डसणे, फेकणे, मारणे)

सबुली स्त्री. पुरावा. (व.)

सबूत पु. पुरावा.

सबूर वि. सधीर.-ऐटि ५.१.

सबे(वे)रे क्रिवि. सकाळी; प्रात:काळी. [सं. सुप्रहरे; हिं.]

सबै(ब्बै)न वि.सत्तर; अरबी वर्षगणनेत योजतात. [अर.सबईन]

सबोध वि.(मानस.) गोष्टींचे आकलन करता येते, उद्दीपकाला प्रशिक्षण देता येते, विचार करता येतो, भावना असतात, भविष्याची जाणीव असते अशी मानसिक जाणीव असलेली स्थिती. - व्यामको.

सबोंब वि.सुशोभित : 'तेथ मेधारसें सगर्भा आस्थापत्री सबोंब।'- ज्ञा १५.१८७.

सब्बा वि.सात. [अर. सब्अ]

सभर वि. सबर; गाभण; सगर्भ (घोडी किंवा गाढवी).

क्रिवि. भारासहित; जोराने; सपाट्याने; अवजडपणाने (पडणे, टोला बसणे). [सं.]

सभराभरित वि. जिकडेतिकडे पसरलेला; अंतर्बाह्य व्यापक : 'नभाचे परि सभराभरित।' -रंयो ५.१८२.

सभवता–ती, सभवताला क्रिवि. भोवती; सर्व बाजूंनी; सभोवार; सगळीकडे; चोहोकडे.

सभा स्त्री. व. १. ज्याठिकाणी विद्वान, पंडित, गुणीजन, राजे लोक वगैरे एकत्र येतात, बसतात अशी जागा; दरबार; मंत्रगृह. २. समाज; मंडळी; जमाव; समुदाय; बैठक; आखाडा; मेळा. ३. सभेसंबंधी गाणे : 'सभेमधिं तेचि सभा गातो'- पला २०.४० [सं.] (वा.)

०**जिंकणे** – वादविवादात यश मिळवणे; आपले म्हणणे खरे करणे.

सभाकक्ष पु.१. प्रेक्षकांसाठी ठेवलेली जागा; २. कौन्सिल हॉल, दिवाणखाना या शेजारची, भेटण्यास गेले असता बसायची खोली. (इं.) लॉबी.

सभागती क्रिवि. सहज.(ना.)

सभागी वि.रास्त; योग्य; बरोबर; ठीक. (व.)

क्रिवि. उताराने; सखल मार्गाने. [सं. सम + भाग]

सभागृह न.कचेरी; दिवाणखाना; सभेची, दरबारची जागा. [सं.]

सभाजणे उक्रि. सन्मान करणे; आदर-सत्कार करणे. [सं.स+ भाज्]

सभाजन न.१.पारितोषिक; देणगी; काम-सेवा इ. बद्दल बक्षीस; उपाहार. २.पूजन; सत्कार : 'विश्वामित्र सभाजन करी ।'- मोरामा १.२३४.

सभादीप–दीपक–दिवा वि.पु.१.श्रावणीच्या दिवशी सुवासिनींकडून ब्राह्मणाला अग्निसमक्ष दान केला जाणारा दिवा. २.सभादीप दान करण्याचा विधी. ३. (ल.) सभाभूषण; सभेचा अलंकार. [सं.]

सभापती पु. लोकसभेतील चर्चा, प्रश्नोत्तरे व मतदान नियमाप्रमाणे चालत आहे का नाही हे पाहण्याची जबाबदारी असलेला आणि जरूरीप्रमाणे निर्णय देणारा सभाध्यक्ष.

सभापांडित्य न. अंगात विद्वत्ता असो अथवा नसो पण सभेमध्ये भाषण करण्याचे सामर्थ्य, क्षमता. केवळ सभेमध्ये, वरकरणी ज्ञानाचे प्रदर्शन, विद्वत्तेचे प्रदर्शन.

सभामंडप पु.१. सभास्थान; सभेची जागा; मंत्रगृह; दिवाणखाना. २.मंदिराच्या गाभाऱ्यापुढे बांधलेली, कीर्तन-पुराणे जिथे होतात ती आच्छादित जागा. ३.गाभाऱ्यापुढची मोकळी जागा.

सभार वि. १. कायदेशीर बोजाच्या स्वरूपाचा; जोखमीचा; जबाबदारीचा. २. कायद्यातील तरतुदीमुळे त्रासदायक झालेले (काम). ३. कायदेशीर बोजा असलेले. [सं.]

सभाव क्रिवि. शृंगारिक हावभाव युक्त : ' देखोनि सभाव अस्थिरूपडे.' - शाप्र ७२८.

सभावी क्रिवि. सहज; स्वाभाविक. [सं.स्वभाव]

सभासद पु.१. सदस्य; सभेचा प्रत्येक घटक; सभेमध्ये बसलेली प्रत्येक व्यक्ती. २.(ल.) लोकांच्या फिर्यादी दाखल करून घेणारा कचेरीतील अधिकारी. ३. सभास्थान; सभामंडप; सभामंडळ; बैठक : तूं या विश्वाची अनादि आदी । बैसलीं जिये सभासदीं।' - ज्ञा ११.५४४. ४. पंच; न्यायदानाच्या कामात मदत करणारा अधिकारी.

सभासयित्री पु. सभासद : 'हंसाकार सभासयित्री आसती'- पंचो ४७.१५. [सं. सभा - शयितृ]

सभांगना स्त्री.वारांगना; कलावंतीण; नायकीण. [सं.]

सभीत क्रिवि. पुरतेपणी भिजलेले; थबथबलेले; चिंब भिजलेले. (क्रि.भिजणे, होणे).

सभोवता, सभोवताला, सभोवती, सभोवार क्रिवि. शअ. सर्व बाजूंनी; सगळीकडे; चोहीकडे. सर्व दिशांनी; सगळीकडून.

सभ्य पु.१. सभासद; प्रेक्षक; सभेतील योग्य मनुष्य : 'तैं गुणदोष सायिखेडें। सभ्युं जैसा।'- ज्ञा १४.३४३. २. पंचाग्नींपैकी एका अग्नीचे

नाव. ३. पंच : 'गोसावी सभ्य जाले' –लीचपू ७१.
वि. संभावित; प्रतिष्ठित; शिष्ट; सज्जन. [सं.]

सभ्याचार पु.(बाह्य) शिष्टाचार; थोरपणा; थोरवी.

सम स्त्री. तालाची पहिली टाळी; तालाच्या प्रारंभीचे मुख्य ठिकाण; गायनवादनाचे महत्त्वाचे स्थान.
न. १. कोणत्याही आकाशस्थ उभ्या वर्तुळाचा ज्या बिंदूत क्षितिजाशी छेद होतो तो बिंदू. २.(भूमिति.) मध्यमप्रमाण. ३. साम्य; सारखेपणा : 'ऐसें बोधा आलें जया सम । तया कर्तव्य तें नैष्कर्म्य ।'– ज्ञा ४.१२१. ४.ब्रह्म.–ज्ञा ६.४३.
वि. १. सारखा; तुल्य; समान; सदृश. उदा. समगती, समगोत्र इ. २. एका पातळीतील; सपाट; सरळ; नीट; एकरूप. ३. दोन या संख्येने नि:शेष भागली जाणारी. ४. नि:पक्षपाती; समदृष्टी; समान अधिकारी. ५. तटस्थ; मित्रत्व अगर शत्रुत्व नसलेला. ६. शांत. [सं.]

समई स्त्री. धातूचा उभा व एका वेळी अनेक वाती ज्यात लावता येतात असा दिवा; खाली बैठक वर चाडे व मध्ये नक्षीदार खांब असा दिवा; ठाणवई. [सं. संदीपिका; अर. शम्अ = दिवा]

समई स्त्री.लग्न. (ना.)

समउदर न.(नृत्य.) नृत्यप्रसंगी श्वासोच्छवास अजिबात बंद ठेवणे. [सं.]

समउपे क्रिवि. एकत्रितपणे : 'मज न कळे समउपे: काइ बोले?'– रुस्वन १८६३.

समएस्थान न.गर्दीचे ठिकाण : 'समएस्थानीं न बैसावें ।'– लीचउ २८२. [सं. समय स्थान]

समकपोल पु. (नृत्य.) गालांची स्वाभाविक स्थिती. [सं.]

समकरण न. (मुद्रण.) हलवाहलवी करून अक्षरातील अंतर सारखे करणे.

समकक्ष वि. समान; बरोबरीचे; सारखे; जोडीचे (इयत्ता, दर्जा इ.). [सं.]

समग्र वि.१.सर्व; प्रत्येकी सर्व. २. सगळा; संपूर्ण; सबंध; साग्र. [सं.]

समग्रह पु.(ताल) गाण्यास व ताल देण्यास जेथे एकदम सुरुवात होते ती संगीतातील जागा.

समघर न. माजघर; मध्यगृह; मधले दालन; वठार.

समचलन न.वस्तूंची अगर व्यक्तींची संख्या वाढली किंवा कमी झाली तर त्याच्याशी निगडित संख्या त्याच मानाने वाढणे किंवा कमी होणे.

समचित्त वि. १. समतोल स्वभावाचा; समदृष्टी; मनाचा कल ढळू न देणारा. २. तटस्थ; कोणत्याही विशिष्ट बाजूस मनाचा ओढा नसणारा; उदासीन.

समचिबुक पु.(नृत्य.) खालचे– वरचे दात मागेपुढे न होतील, हनुवटी सारखी राहील असे ठेवणे.

समज पु. १. बोध, ज्ञान, आकलन; उमज. २. ग्रहणशक्ती; आकलनशक्ती. ३. जाणीव; खातरी; समाधान; बरोबर आकलन. ४. शहाणपणा; हुशारी; अक्कल; बुद्धी. ५. (ल.) धाक; दपटशा; मारठोक; ताकीद. [सं. सम +मज्ज, संबुध्यते; हिं.समझ.]

समज पु. समुदाय; साठा; संग्रह; लोंढा :'चित्त समर्जी बुडौनि ठेलें। विस्मयाचां।' – ज्ञा ११.१८६. (वा.) **समजत जाणे** – जमणे; एकत्र होणे : 'लोक (गारदी लोक) तमाम वाड्यात समजत चालले.'– ऐको.

समजउमज स्त्री. पूर्ण जाणीव; पूर्ण ज्ञान; वास्तविक बोध.

समजणाई वि. समजूतदार; शहाणा; मुत्सद्दी.

समजणे सक्रि.१. जाणणे; बोध, आकलन होणे. २. माहीत, ठाऊक होणे; उघड, स्पष्ट दिसणे.
उक्रि. १. पटणे; खात्री होणे; समाधान होणे; शंकानिरसन होणे. २.एकसारख्या दिसणाऱ्या गोष्टींमधील सारखेपणा व फरक खात्रीशीरपणे सांगता येणे. [सं.सम् + मज्ज्, संबुध्यते]

समजदार वि. १. सुज्ञ; विचारी; शहाणा; हुषार. २. चलाख; चांगली ग्रहणशक्ती असलेला.

समज(जा)वणे अक्रि.१.समजूत घालणे; स्पष्ट करणे; फोड करून सांगणे; पटवून देणे. २. खातरी, समाधान करणे; मन वळवणे; ताळ्यावर आणणे.

समजाव(वि)शी, समजावीस, समजी स्त्री.१. योग्य प्रकारे समजूत पाडणे; वळणावर, ताळ्यावर आणणे; समाधान, खात्री करणे; शंकानिरसन करणे; एखाद्याविषयीचा गैरसमज दूर करणे : 'समजाविशीस अर्धे मारवाड काबीज केलें होतें तें दरोबस्त त्यांजकडे दिलें.'–भाब१८. २. शिलेदारांना हप्त्याने मिळणाऱ्या पगारापैकी एक हप्ता. – ऐको.

समजीक वि. विचारी; समजूतदार.

समजुती वि. ज्या फौजेची रोजमरा, नालबंदी वगैरे बाबतीत पूर्ण फेड झालेली आहे व जी चाकरी करावयास राजी आहे अशी (फौज) : 'यादी फौजे करितां राजश्री बाबूराव सदाशिव फौज आठ हजार सरंजामी समजुती तयार राखावी,'– पेद ३७.६

समजूत स्त्री.१. ग्रहणशक्ती; बुद्धी; आकलन शक्ती. २. पूर्ण ज्ञान; जाणीव. बोध; आकलन. ३. खातरी; समाधान; मनवळवणी. पहा : **समजावशी**. ४. हुकूम; ताकीद; आज्ञा : 'सरकारचे सल्ल्याने काम करण्यास त्यांस समजूत दिली.' – टिले १.१.१६०. (वा.) **० पाडणे** – तडजोड, एकमत, संधी करणे; समाधान करणे; खात्री करणे, पटवणे.

समजूनउमजून क्रिवि. जाणूनबुजून; मुद्दाम; हेतुपुरस्सर; बुद्धिपुर:सर.

समझोता पु. समजूत; तडजोड. [हिं.]

समट–ठ,संमठ वि.१. सर्व : 'समट संध्यारागाचें आंग:'– रुस्वन १६५. २. भरीव. [सं.समस्त]

समतळणे अक्रि.(सोनारी) सोन्याची कांब वगैरे, सारखी तोलून मध्यावर खूण करणे.

समता–त्व स्त्री.१. सारखेपणा; बरोबरी. २. अभेदबुद्धी; समबुद्धी; तुल्य मानणे. ३. नि:पक्षपातीपणा. ४. ब्रह्मरूपता; तादात्म्य.

समतुक वि.समतोल; सारख्या वजनाचे; सारखेच महत्त्व असलेले; एकसारखे : 'समतुके भार घेउं पावो उंच ठाव ।'– भज ३३.

समतोल वि. १. सारख्या वजनाचा; समभार. २. सारखा; सम; जोडीचा; बरोबरीचा; सारख्या गुणांचा, मोलाचा, रंगाचा, दर्जाचा. ३. शांत; सौम्य; क्षोभ न पावणारा (स्वभाव, प्रकृती); समाधानी. ४. सारख्या

शक्तीच्या (प्रेरणा).
क्रिवि. दोहीकडे सारखा भार, वजन असलेला.

समथळ न.मैदान; पटांगण; सपाटी.

समदं–दा–दे वि.१. सर्व; एकूणएक. २. संपूर्ण; सगळे. [सं. समस्त]

समदर्शन न.(नृत्य.) दोन्ही डोळ्यांची बुबुळे एका रेषेत ठेवणे.

समदर्शी वि.निःपक्षपाती; तटस्थ; कोणत्याही एका बाजूस मनाचा कल नसलेला. [सं.]

समदासी स्त्री. समजाविशी; समजूत. (तंजा)

समदुर पु.मोटेचा खालचा नाडा; दोर. (ना.) पहा : **सोंडदोर**

समदुरी न.मीठ;लवण.(व.) [सं. सामुद्रम्]

समदृष्टि–ष्टी स्त्री.समानवृत्ती; निःपक्षपातीपणा; निःस्पृहवृत्ती; तटस्थता. वि. मध्यस्थ; तटस्थ; त्रयस्थ; समवृत्ती; निःस्पृह; उदासीन. [सं.]

समध पहा : **समट–ठ**

समधात–तू वि. १.समशीतोष्ण; फार थंड नाही उष्ण नाही अशी; निरोगी. २. शांत; स्थिर.

समनख(करण) न.(नृत्य.) पाय जोडून नखे एका रेषेत ठेवणे.

समनर पहा : **समशंकू**

समन्वय पु.स्वाभाविक क्रम; एक सारखा व्यवस्थित क्रम; जुळणी; जोड; योग, मिलाफ. [सं.]

समन्वित वि. १. स्वाभाविक क्रमप्राप्त; संगतवार; संयुक्तिक; योग्य क्रमाप्रमाणे असलेले; जुळलेले; युक्त; संबद्ध. २. संबंधित पण अलग-अलग लोकांचा, खात्यांचा व गोष्टींचा मेळ घालून केलेला (कार्यक्रम, योजना इ.).

समन्वेषण न.नव्या क्षेत्राची पाहणी. (इं.) एक्स्प्लोरेशन. [सं.]

समन्स न.आव्हानपत्र; कोर्टात हजर राहण्यासाठी काढलेले आदेशपत्र. [इं.]

समन्स खटला ज्या गुन्ह्याला सहा महिनेपर्यंत कैद किंवा दंड आहे असा खटला.

समपहरण न.चुकीबद्दल एखादी गोष्ट (भरलेली रक्कम, हक्क) काढून घेणे, जप्त करणे.

समपाद न. (नृत्य.) पायांची स्वाभाविक ठेवण; जुळलेले पाय-पाऊले.

समपाद(स्थान) न.(नृत्य.) सर्व अंग सरळ, सारखे व सौष्ठवात ठेवून दोन्ही पाय एक ताल अंतरावर व एकाच रेषेत ठेवणे. [सं.]

समपादभौमिचारी स्त्री.(नृत्य.) दोन्ही पावलात अंतर न ठेवता ती एकमेकांना चिकटवून जमिनीवर एकाच रेषेत ठेवणे. [सं.]

समपादी वि.(प्राणि.) दोन्ही पाय दोहो बाजूस सारखे असणारा (प्राणी).

समपार्श्व पु.त्रिकोणाकृती लोलक.

समपुट न.(नृत्य.) पापण्यांची स्वाभाविक स्थिती.

समपृष्ठरज्जू प्राणी एकलिंगी किंवा उभयलिंगी, डोक्यात किंवा शेपटीत पृष्ठरज्जू असणारा प्राणी. (बेडूक, शार्क मासा इ.).

समफळी स्त्री.बरोबरी; स्पर्धा.
वि. समबल; समतोल.

समबंध पु.खेळामध्ये दोन्ही बाजूंना सारखे गुण मिळणे. (इं.) टाय मॅच.

समभ १. जरूरी; अगत्य. २. प्रत्यय; अनुभव. – ऐको.

समभाग–गी भागभांडवल उभारण्यासाठी बाजारात विक्रीसाठी केलेले सारख्या किंमतीचे भांडवलाचे भाग.

समभाव पु.१.सारखेपणा; समरूपता; साम्य; एकरूपता. २. बरोबरी; समता. ३. साधर्म्य; प्रकृति-प्रवृत्तिसाम्य.
वि. १. सारखा; एकरूप; सारख्या स्वभावाचा. २. सहमत; सहकारी; सारखा उद्देश असणारा.

सममंडल–वृत्त न.(ज्यो.) समवृत्त; खस्वस्तिक व पूर्व-पश्चिम बिंदू यामधून जाणारे वृत्त. [सं.]

सममात्र वि. सारख्या वजनाचा, आकाराचा, मापाचा.

सममान स्त्री. स्वाभाविक स्थितीत मान ठेवणे.

सममान वि. यथायोग्य प्रमाणात; समव्यापी.

सममिति–ती स्त्री.१. दोन मापांमधील काढलेले मध्यम माप. २. मापाचा सारखेपणा.

समय पु.१. वेळ; काळ; प्रसंग; संधी; महत्त्वाची, आणिबाणीची वेळ; हंगाम; मोसम. २. (ल.) संकट; कठीण वेळ, प्रसंग. ३. प्रतिज्ञा; शपथ; करार; ठराव : 'शांतनवें समय असा केला कीं करिन युद्ध कुरुपार्था।' – मोभीष्म ११.२४. [सं. सम् + अय् (= जाणे)] (वा.)**०काढून देणे** – वेळ निभावून नेणे.– ऐको.

समय पु.अपवाद; आरोप; आळ.

समय पु.मीलनस्थान; संकेतस्थान.

समयति–ती पु.(ताल) गायनाचा प्रारंभ, मध्य व अंत या तीन ठिकाणी लयीची गती सारखी ठेवणे.

समयति–ती स्त्री.(अर्थ.)कामाच्या तासांच्या प्रमाणात दिलेली मजुरी.

समयश्रेणी स्त्री.(न.श.) ठरावीक मुदतीनुसार कर्मचाऱ्यास दिली जाणारी पगारवाढ व पदोन्नतीची योजना. [सं.]

समयसारणी स्त्री.वेळापत्रक.

समयसूचकता स्त्री.योग्यवेळी, योग्य प्रसंगी योग्य उत्तर सुचण्याचा गुण.

समयोग पु.उत्तम योग; चांगला जुळून आलेला प्रसंग.

समर पु.न. युद्ध; संग्राम; लढाई. [सं.सम् + मृ]

समरस पु. ऐक्य; तादात्म्य; एकरूपता; बाह्यसारूप्य.
वि.१. समतोल वृत्तीचा, प्रकृतीचा, स्वभावाचा; शांत; गंभीर. २. सारख्या स्वभावाचा, गुणधर्माचा, वृत्तीचा.

समरसणे अक्रि. ऐक्य पावणे; तादात्म्य पावणे; विलीन होणे; तल्लीन होणे; एक होणे; मिसळणे; विरून जाणे; पूर्णपणे एकरूप होणे.

समरा बदला; सूड.

समरास स्त्री.१. शेतातील पिकांची अविभक्त रास. २. एकत्रित संपत्ती, मालमत्ता, जिंदगी.

समरां(रं)गण न.युद्धभूमी; लढाईची जागा.

समर्घ वि. स्वस्त; सवंग; सहज मिळेल असे :'कां समर्घींचि विकणें। महर्घी वस्तु।'–ज्ञा १८.८८१. [सं. सम्यक् + अर्घ]

समर्थ वि.१. सशक्त; बळकट. २. कार्यक्षम; लायक; पात्र. ३. श्रीमंत; धनवान; ऐश्वर्यवान. ४. समानार्थ; सारख्या अर्थाचे. [सं.]

समर्थणे सक्रि.प्रतिपादणे; बोलणे; सिद्ध करणे; बाजू घेणे : 'आतां मातें पावती हे कवण । समर्थणें ।'– ज्ञा ९.४८३.

समर्थन न.१. प्रतिपादन; पुष्टी देणे; पक्ष, बाजू घेणे. २. सिद्धता; व्यवस्थापन. [सं.]

समर्थनीय वि. प्रतिपाद्य; पोषणीय; प्रमाणांनी सिद्ध करण्यासारखे; स्थापनीय. [सं.]

समर्पक वि. योग्य; बरोबर; उचित; शोभेसे; जुळण्यासारखे; चपखल; यथास्थित; चोख. [सं.]

समर्पण न. दान; अर्पण. [सं.]

समर्प(र्पि)णे उक्रि. दान करणे; अर्पण करणे; देऊन टाकणे; सढळपणे देणे; ओपणे.

समला पु.पागोट्याचा, फेट्याचा, डोकीच्या रुमालाचा, कमरबंदाचा पाठीवर लोंबणारा पदर; घोस. [फा. शम्ला]

समलातीपत्र न.मदतीला बोलावण्यासाठी लिहिलेले पत्र. [अर. शामिलात]

समलिंगी वि.१. सारखे लिंग असणाऱ्या(व्यक्ती). २.पुरुषाला पुरुषाबद्दल आणि स्त्रीला स्त्रीबद्दल लैंगिक आकर्षण वाटणारी (व्यक्ती).

समवणे अक्रि.जखडणे. [सं. सम् + मव]

समवाद्य समूह पु.सहसंगीत; वृंदवादन; (इं.) कॉन्सर्ट. [सं.]

समवाय–ओ–व पु.१. समुदाय; जमाव; समूह : 'ऐसा सावध हा समवावो ।'– ज्ञा ८.२११. २. (न्याय.) नित्य, सतत संबंध; निकट संबंध; संयोग. ३. समष्टिरूप; व्यापकत्व. [सं.]

समवायी वि.अनेक अवयवांनी बनलेले, संमिश्र; मिश्रित.

समविषम न.विसंगती; अप्रयोजकता.

समवीर्य वि. १. सारख्या गुणाचे, तीव्रतेचे (औषध वगैरे). २. सारखे पराक्रमी, प्रभावी, शूर.

समवृत्तिता स्त्री.भिन्न अवयवांचा सारखेच कार्य करण्याचा गुण.

समवेत शअ.सह; सहित; बरोबर.

धावि.१.समवाय संबंधाने जोडलेला; संबद्ध; आनुषंगी; सहस्थित. २. जमलेले; एकत्रित; मिश्रित; युक्त.

समवेक्षक पु.कामावर लक्ष ठेवणारा; देखरेख करणारा.

समवे(वो)जा वि. समरूप.

समशंकु–कू पु.(ज्यो.) समवृत्तावर सूर्य असता पडणारी शंकुच्छाया किंवा त्याच्या अक्षांशत्रिज्या.

समशीतोष्ण वि. थंडी व उष्णता यांचे प्रमाण बहुधा समान असणाऱ्या हवामानाचा (प्रदेश). [सं.]

समशेर स्त्री.१. तलवार; खड्ग; एक शास्त्र. २. चंगकांचनी गंजिफातील आठवा रंग. [फा.शमशीर] (वा.) ०**करणे** – पराक्रम करणे.

समशेरी वि.१.चंगकांचनी गंजीफातील समशेर रंगाचे, बाजूचे. २.पुतळीचा एक प्रकार. या पुतळीच्या दोन्ही बाजूंवरील बाहुल्यांची डोकी एकाच दिशेस असतात.

समश्रुकित वि.धड; चांगला; सुरेख : 'समश्रुकीत असतां वाचा । घोष न करिसी कां नामाचा ।'–तुगा ४३८६. – दाको. [सं.]

समश्रुळित वि. श्रवणीय. – तुको.

समश्लोकी वि. मूळचे वृत्त कायम ठेवून (उदा. संस्कृतातून मराठीत) केलेला (अनुवाद).

समष्टि–ष्टी स्त्री.१. व्यष्टीचा समूह; सामग्र; समुदाय; अनेक घटकांगांनी संपूर्ण; संगृहीत, समाविष्ट स्थिती. २. ब्रह्मांड. [सं.]

समष्टिग्रह पु. संपूर्णत्वाने, एकत्वाने जाणीव, ज्ञान; समूहरूपाने ज्ञान.

सम(मा)सकी स्त्री.वि. सहा महिनेच दूध देणारी (गाय, म्हैस); दरवर्षी विणारी.

समसम स्त्री.१. कटकट; रुखरुख; निकडीचा त्रास; काळजी. २. व्यग्रता; अस्वस्थता; उद्वेग; चिंता. [ध्व.]

समसमान वि. १. अगदी सारखा; तुल्य. २. हुबेहुब; एकरूप.३. सपाट; सारखी; समतल.

समसमि(मी)त वि. खरमरीत; कडक; तीक्ष्ण : 'कैसी समसमित नवाई । भुकेलेपणाची ।'–ज्ञा ११.४२९.

समसरी वि. सारखे : 'राव प्रधान समसरी । दोन पुत्र दोघांसी ।'– शनि २८६.

समसा वि. सरळ; सम; सारखा :'वरि समसा उरू । जेथ कामु न लाहे क्रिया करूं ।' – ऋ ८८.

समसामत वि. कडक.

समसाळी स्त्री.भाताचा एक प्रकार.(बे.)

समसीम वि. ज्यांची सीमा, मर्यादा सारखी आहे असे; एकाच ठिकाणी संपणारे. [सं.]

समसूत्र न. (ज्यो.) समवृत्ताच्या ध्रुवबिंदूमधून जाणारे महावृत्त;क्षितीज.

समस्त वि.१. सर्व; सगळे; सर्वजण. २. सामासिक; अनेक पदांचा समास होऊन झालेला (शब्द). ३. संपूर्ण; सबंध; सगळा; असगा. ४. युक्त; मिश्र; समाविष्ट; अंतर्भूत; संगृहीत. [सं.]

समस्या स्त्री.१. आकांक्षा; अंदाज; अपेक्षा : 'न सांभाळवे समस्या आपुली ।'– ज्ञा ११.९२. २. पूर्ण करायला दिलेल्या श्लोकाचा अपेक्षित किंवा दिलेला भाग. ३. शंका : 'ऐसी केली द्विजाची पूर्ण । समस्या देवें ।'– कथा ६.२०.९८. ४. कूट; कोडे; साकडे; कठीण प्रश्न. [सं.]

समहर्तु पु.कर गोळा करणारा अधिकारी : 'प्रहस्तिकु : समहर्तुः संनिधाता'– पंचो ८३.६. [सं.]

समळट वि. सपाट; समपृष्ठ; सारखा :'तळीं पडती पर्वत गिरि । अवघें समळट होईल वसुंधरीं ।'–ख्रिपु १.३६.३३. [सं.समतल]

समक्ष शअ.प्रत्यक्ष; देखत; समोर.

क्रिवि. समोरासमोर. [सं. सम् + अक्षिन्]

समक्षता स्त्री.१. प्रत्यक्षता; समोरील स्थिती; दृष्टीसमोर असणे; उपस्थिती; हजेरी. २. रुजवात. – ऐको.

समक्षा स्त्री.१. समस्या या अर्थी त्या शब्दाचा अपभ्रंश. २. साक्षात्कार; देवाचे प्रकटीभवन; प्रत्यक्ष देखावा; दृश्य; भास; प्रचीती.

समंध पु.पिशाच्च; भूत; ब्राह्मणाचे भूत.

समा पु.१. एक पिशाच्च देवता; समंध. (को.) २. पूर्ण भरतीची वेळ; चंद्र

मध्यान्ही आला असता भरती पूर्ण होऊन १२ मिनिटे पाणी तसेच राहते ती स्थिती.(को.) ३. (ल.) भर; हंगाम; मोसम; शिखर; पराकाष्ठा. ४. मतैक्य; एकोपा; मेळ. [सं.]

समा पु.गायन ऐकणे; गाण्यामुळे लागणारी तंद्री (दरवेशी वगैरे लोकांची). [अर.समा]

समा स्त्री.वर्ष; संवत्सर. [सं.]

समा स्त्री.१. आकाश. २. लगामाचा एक प्रकार. [अर.]

समा वाण्यांनी काही निमित्ताने सर्व दुकाने बंद करणे. (तंजा.)

समाई स्त्री. सलोखा; समजूत; निःसंदेहता.

समाईक वि. १. अविभक्त; अनेकांच्या मालकीचा (माल, जमीन, वतन, हक्क). २. पातीचा; भागीदारीचा (धंदा, व्यापार). [सं. सम् + ई = जाणे]

समाकलन न. १. (कायदा) न्यायाधीशाने त्याच्यापुढे सादर झालेले साक्षी-पुरावे व प्रतिपादन यांचा न्यायदृष्ट्या दिशा दाखवणारा घेतलेला आढावा ('ज्यूरी'साठी). २. प्रदीर्घ कथनाचा घेतलेला आढावा.

समाकुल-ळ वि. समस्त; सर्व; सगळा; सबंध. एखादा समाज, जात, राष्ट्र या संबंधी विशेषत: हा शब्द योजतात. उदा. समाकुळ देश. [सं. समाकुल]

समाकु(कू)ळ वि. व्याकूळ; व्यग्र; हैराण. [सं.सम् + आकुल]

समाकृति-ती स्त्री.(मानस.) बाह्य आकार; समष्टी. (इं.) कॉन्फिगरेशन. [सं.]

समाक्रांत धावि. व्यापलेले; आक्रमण केलेले; पादाक्रांत, पराभूत केलेले.

समागत धावि. आलेला; येऊन पोचलेला; जवळ आलेला. [सं.]

समागम पु.१.सहवास; संगत; संयोग; संपर्क; सहस्थिती; भेट. २. अनुगमन; सती जाणे. ३.संभोग; मैथुन. ४.जमाव. - ऐको. [सं.]

समाघात पु. (मा.शा.) ढवळाढवळ; हस्तक्षेप; अडथळा. [सं.]

समाचार पु.१.चौकशी; परामर्श; विचारपूस; काळजी, देखरेख वगैरे. २. बातमी; वार्ता; हकीकत; वृत्त.(वा.) ० **घेणे** - मारणे; ठोकणे; खरडपट्टी काढणे.

समाचारपत्र न.सरकारी आज्ञापत्रिका.(इं.) गॅझेट.

समाज पु.१.समूह; जमाव; मंडळी; सभा; समान हितसंबंधांनी व विविध नात्यांनी एकत्र राहणारा लोक समूह. २. समुदाय; साठा; संग्रह; गर्दी.

समाजधारणा स्त्री.लोकांचे स्वास्थ्य; लोकसमुहाचे पोषण, रक्षण वगैरे.

समाजवाद पु.उत्पादन, विभाजन, विनिमय यांची साधने समाजाच्या मालकीची व्हावीत, सर्वांना समान संधी मिळावी आणि समाजाची संपत्ती सर्वांना न्याय्य पद्धतीने वाटली जावी असा राजकीय व सामाजिक सिद्धांत.

समाजशास्त्र-विज्ञान न.समाजाची उत्पत्ती, सुधारणा, परिस्थिती, इतिहास वगैरे विषयांचे विवेचन करणारे शास्त्र; समाजाची रचना, धारणा, त्यात होत गेलेले बदल, त्यातील घटकांचे परस्परांशी संबंध इत्यादींचा तात्त्विक स्वरूपाचा अभ्यास करणारे शास्त्र. [सं.]

समाजसत्तावाद पु.१. संपत्तीच्या उत्पन्नाच्या साधनांची मालकी लोकशाहीच्या तत्त्वानुसार बनलेल्या सरकारच्या हाती देऊन त्या साधनांचा सर्वांच्या न्याय्य फायद्याकरिता सहकारितेने उपयोग करावा असे प्रतिपादन करणारे मत. २. समाजाचे राज्यतंत्रावरील वर्चस्व प्रतिपादणारे मत.

समाटणे, समाटून घेणे अक्रि. परका व आपण एक समजणे; दुसऱ्याशी मिळते घेऊन कामे करणे. (माण.)

समाणे अक्रि.सामावणे; मावणे : 'प्रतिध्वनि न समातु । उपजतसे ।'- ज्ञा१.१२६.

समात्रता स्त्री.समोरासमोरच्या किंवा विरुद्ध बाजू एकसारख्या आकाराच्या असण्याची स्थिती (इं.) सिमेट्री. [सं.]

समादेश, समादेशाधिकार पु. १. आज्ञा; हुकूम. २. अधिकार. (इं.) कमांड.

समाधा स्त्री. कुरुंदाच्या दगडाची भुकटी. - प्रश ८६.

समाधान न.१. मनाची शांती; तृप्ती; मनाचा संतोष. २. विश्रांती; स्वास्थ; आराम; दुःखनिवृत्ती; चिंताहरण. ३. (न्याय.) शंकानिरसन; आक्षेपखंडन; समजून. ४. (वेदान्त) एकाकारवृत्ती; मनाने बाह्यगोष्टीपासून परावर्तन; ध्यानावस्था. [सं.]

समाधि-धी स्त्री.१. चित्त एकाग्र करणे - होणे, इंद्रियांचे दमन करून आत्मस्वरूपात लीन होण्याची स्थिती; एकतानता; तंद्री. योगातील आठवे व शेवटचे अंग. २. गाढ; झोप : 'समाधिचिये सेजेपासिं ।'- ज्ञा १३.५०८.३. संन्याशाने स्वत:ला जिवंतपणीच जलात बुडवून किंवा जमिनीत पुरून घेणे. ४. मृत संन्याशाला जलात बुडवण्याचा किंवा मातीत पुरण्याचा विधी, संस्कार. ५. थोर व्यक्तींच्या निधनानंतर त्यांच्या अस्थी पुरून त्यावर उभारलेले थडगे; वृंदावन. [सं.]

समाधिरोज स्त्री. समाधीसाठी आसन. - नागाको.

समाधिस्त-स्थ वि. समाधी अवस्थेत गेलेला; बेभान; बेहोश. [सं.]

समान पु.पंचप्राणांपैकी एक वायू; हा नाभिस्थ असून अन्नरसाचा सर्व शरीरात प्रसार करतो. [सं.]

समान वि. १. सारखे; तुल्य; बरोबरीचे; जोडीचे; एकाच योग्यतेचे. २. सपाट; एका पातळीतील; गुळगुळीत. ३. एकरूप; हुबेहूब; एकसारखे; तुल्यबळ; तसेच. [सं. सम, मा = मोजणे]

समान वि. आठ. अरबी वर्षगणनेत वापरतात. [अर.सामान]

समानक पु.१. समान लेखणारा. २. ज्याच्याशी तुलना करून इतर गोष्टी सांगितल्या जातात, असा आदर्श वा प्रमाण.

समानता स्त्री.तुल्यता; सारखेपणा; एकरूपता.

समानाधिकरण वि. १. ज्यांचा आधार, विषय, स्थान इ. एकच आहेत असे. २.(व्या.) एकाच विभक्तीतील. विभक्ती बहुव्रीही समासाचा एक प्रकार. ३. (ल.) ज्याचा आधार, पाया एकच आहेत असे; सुसंगत.

समा(म्मा)नीन वि. ऐंशी. अरबी वर्षगणनेसंबंधी योजतात. [अर.समानीन्]

समानोदक वि. सपिंडाहून दूरचा पण ज्याला तर्पणाचा अधिकार आहे असा (नातलग). यांचा संबंध सात ते चौदा पिढ्यांपर्यंत पोचतो.

समापक पु.अवसायक; (वा.ले.) दिवाळे निघालेल्या एखाद्या उद्योगाची समाप्ती करणारा; (उद्योग) गुंडाळून ठेवणारा; (इं). लिक्विडेटर.

समापत्र न. १. मान्यतालेख; अनुज्ञापत्र. २. कबुलीलेख. [सं. संमतिपत्र]

समापन न. पूर्णता; समाप्ती; शेवट; अखेर; उपसंहार. [सं. सम्+आप्]

समाप्त वि. १. संपलेले; पूर्ण झालेले; उरकलेले; शेवटास गेलेले. २. (विधि.) निर्णीत; निकालात काढलेले. [सं.]

समाप्ति–प्ती स्त्री. १. पूर्णता; शेवट; अखेर; संपलेली स्थिती. २. (ल.) मरण. [सं.]

समायत वि. पसरलेला; लांब रुंद; विस्तीर्ण.

समायिक पहा : **समाईक**

स(सा)मायिक वि. प्रासंगिक; प्रसंगोचित; प्रसंगप्राप्त; नैसर्गिक; कालानुकूल; कालसदृश. [सं. समय]

समायिणे अक्रि. मावणे; व्यापणे; प्रवेश होणे. [सं. सम्+मा]

समायोजन न. १. मिळतेजुळते घेणे. २. व्यवस्थापन. [सं.]

समायोजन शक्ती नाभीय अंतर आपोआप बदलण्याचा डोळ्यांचा गुणधर्म.

समायोज्य वि. १. आवश्यक ते बदल करता येतील असे. २. जुळवून घेण्यासारखे.

समार पु. १. (खा.) पहा : **संभार.** २. मसाला. ३. औत; हत्यार. गुठेफळी. – कृषि १५७.

समारंभ पु. १. उत्सव; सोहळा; (एखाद्या सार्वजनिक कार्याची मेजवानी, मिरवणूक वगैरेंची) व्यवस्था, उद्योग, खटपट, जुळणी, योजना, रचना, मांडणी, उदा. लग्नसमारंभ. २. (ल.) सत्कार; मान. (क्रि. राखणे, ठेवणे). ४. खटाटोप; आटाआट; आवेश : 'तैसा समारंभु सुणा गेलाचि तो।' – ज्ञा १७.४१८.

समाराधन न. १. व्रत, उत्सव, सोहळा वगैरे प्रसंगी घातलेले ब्राह्मणभोजन. यांची समारत्न, समाराज्ञा अशी रूपे प्रचारात आहेत. २. मनधरणी; संतोषविणे. [सं. सम्+आराधन]

समारोप पु. १. अग्निहोत्र बंद करण्याचा विधी. २. (यावरून) उपसंहार; शेवट; समाप्ती. [सं.]

समारोह पु. उत्सव; समारंभ. [सं.]

समालोचक पु. सामन्यांचे धावते, विवरणात्मक वर्णन करणारा. [सं.]

समालोचन–ना न. स्त्री. निरीक्षण; परीक्षण; सर्वांगाचे अवलोकन, विवरण : 'तुलसीदासाच्या चरित्रावर विस्तृत समालोचना या अंकात आली आहे.' – मनोरंजन १७.३ [सं.]

समावणे अक्रि. १. मावणे; व्यापणे; आत राहणे.२. प्रविष्ट, अंतर्भूत होणे; सुखाने प्रवेश करणे, शिरणे. [सं. सम्+आप्]

समावणे सक्रि. शांत करणे : ' हा उपद्रो समावा जी' – गोप्रच ३२२.

समावणे अक्रि. मरणे; गुजरणे : 'इनामपत्रें जळालीं व कालेंकरून गुरुहि समावले' –ऐको.

समावर्तन न. पहा : **सोडमुंज**

समावा पु. भांडे; पात्र : 'या चहाच्या समाव्यात उंदीर पडून मेला आहे.' – चहापान नाटक. [सं. समापक]

समाविष्ट धावि. १. मावलेला; अंतर्भूत. २. प्रवेश केलेला; व्यापलेला; आत राहिलेला (घर वगैरे). ३. शिरलेला; व्याप्त; ग्रस्त. [सं.]

समावेदन न. कोर्टाचा हुकूम मिळवण्यासाठी पक्षकाराने केलेला अर्ज.

समावेश पु. १. मावणे; अंतर्भाव; अंगभूतता; संग्रह (व्यक्ती, वस्तू, कामे, गोष्टी यांचा). २. प्रवेश; रिघाव; शिरकाव. [सं.]

समावेशक वि. ज्यात समावेश, अंतर्भाव होतो असे; समाविष्ट करून घेणारे; सामावून घेणारे.

समाशोधनगृह न. (अर्थ.) ज्या ठिकाणी पेढ्यांचे (बँकांचे) देणे–घेणे दिले–घेतले जाते ती जागा.(इं.) क्लिअरिंग हाऊस.

समास पु. १. शब्दांची जोडणी; शब्दसंयोग; शब्दांचे संयुक्तीकरण. २. संयुक्त शब्द; जोड शब्द; सामासिक शब्द. ३. (चुकीने) संयुक्त शब्दाचे स्पष्टीकरण, विग्रह. ४. लेखाच्या बाजूला कागदावर सोडतात ती मोकळी जागा; कडा; कूस; मोकळी जागा. (इं.) मार्जिन. ५. संक्षेप. ६. (गणित) बेरीज. ७. अध्याय; प्रकरण. [सं. सम्+अस्=टाकणे, फेकणे]

समासमीना पहा : **सम(मा)सकी**

समाहरण न. एकत्र आणणे; मिसळणे; जोडणे; गोळा करणे. [सं.]

समाहार पु. १. जमाव; समूह; समुदाय; मिश्रण; जुळणी. २. संक्षेप; सारांश. ३. शब्दांची अथवा वाक्यांची जोडणी, जुळणी; 'आणि' या उभयान्वयी अव्ययाचा अर्थ. ४. द्वंद्व समासाचा एक प्रकार. ५. सारखाच, एकाच प्रमाणात असलेला आहार. ६. निरोध : 'किजैल इंद्रियांचा मारू। प्राणापानाचा समाहारू।' – उगी २३२. [सं. सम्+आ+हृ]

समाहारक पु. १. संग्राहक. २. वसूल करणारा.

समाहार द्वंद्व द्वंद्व समासाचा एक प्रकार. या प्रकारात समस्त पदांच्या अर्थाशिवाय आणखी तशाच प्रकारच्या पदार्थांचा अंतर्भाव होतो. उदा. भाजीपाला, खाणेपिणे.

समाहित धावि. १. एकाग्र; समाधिस्थ; ध्यानस्थ; ध्यान लागलेला. २. इंद्रिये ताब्यात असलेला, जितेंद्रिय.३. एकत्र जुळवलेला, जोडलेला. ४. व्यवस्थित, नीटनेटके ठेवलेला; मांडणी केलेला. ५. पूर्ण केलेला; शेवटास नेलेला. ६. गोळा केलेला; जमा केलेला. ७. विचारासाठी घेतलेला. [सं. सम्+आ+धा–हित]

समांतर वि. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला; दोन रेषांच्या समोरासमोरच्या कोणत्याही भागात सारखे अंतर असलेल्या (रेषा).

समांडी स्त्री. समिधा : 'नाना द्रव्यांच्या समांडी : मिळौनि स्वर्गादिकाची नांदी :' – ऋम २२०. [सं. समिध]

समांश पु. मध्यान्ह अथवा खस्वस्तिकापासून क्षितिजापर्यंत कंस; समलव. [सं.]

समांशी पु. भागीदार; पातीदार; समान वाटेकरी. [सं. सम+अंश]

समिठी स्त्री. बुक्काबुक्की; हाताहाती; मारामारी : 'वज्रांगी वज्रमुठी निहनत समिठी होतसे।' – गस्तो ५९.

समिति–ती स्त्री. १. युद्ध; लढाई : 'त्यांहीं गुरू जिंकाया केली ती प्रणतिमिष महासमिती।'– मोभीष्म ११.२४.२. मंडळी; पोटमंडळ. ३.विशिष्ट हेतूने किंवा ठरावीक काम करण्यासाठी स्थापित केलेला गट. (इं.) कमिटी. [सं.]

समिधा स्त्री. होमाला उपयोगी उंबर, पिंपळ, खैर वगैरे लाकडाचा तुकडा,

ढलपा. [सं. सम्+इन्ध्=पेटणे] ० **शेकणे** – (स्मार्ताग्नीचा समारोप करताना त्यावर समिधा तापवून ठेवतात, त्यावरून) नावाला करणे; विधिनिषेध न मानणे; बंद ठेवणे.

समिना पु. चांदवा; मंडप; आच्छादन. [फा. शामियाना]

समीकरण न. १. सारखे, समान, सपाट करणे; बरोबर, तुल्य करणे. २. बेरीज; एकत्रीकरण. ३. (बीजगणित) दोन समान किंमतीची पदे समोरासमोर मांडणे; समोरासमोर मांडलेली तुल्य पदे. [सं.]

समीकृत धावि. १. बरोबर, सारखे, समान केलेले. २. बेरीज केलेले. ३. बीजगणितात समीकरणरूपाने मांडलेले.

समीचीन वि. १. वास्तविक; सत्य; प्रत्यक्ष. २. योग्य; न्याय्य; युक्त; उत्तम. ३. विपुल; भरपूर; परिपूर्ण. [सं.]

समीन वि. पुष्ट.

समीननिमीन वि. समविषम; कमी अधिक : 'तेथ सत्त्वें आपुल्या आंगी। समीननिमीन भागीं।' – ज्ञा १८.८२८. [सं.]

समीप वि. जवळचा; निकटचा; लगतचा; अलीकडचा.
क्रिवि. जवळ; निकट; शेजारी. [सं.]

समीपता स्त्री. १. जवळीक; निकटता; सान्निध्य. २. चार प्रकारच्या मुक्तींपैकी एक (देवाशी सान्निध्य, जवळीक).

समीर, समीरण पु. वारा; वायु; हवा. [सं.]

समीक्षण, समीक्षा न. स्त्री. १. सूक्ष्म शोध, तपास; छाननी; बारीक परीक्षा, तपासणी; अवलोकन; न्याहाळणे. २. आत्मविद्या; बुद्धी; संख्याशास्त्र. [सं.]

समुग्ध क्रिवि. कुजबुज करीत : 'तेथ सखिया बोलती समुग्ध' – रुस्वन ५८६.

समुचय पु. जनसमूह : 'एकवेळ बहुत समुचयो जाला' – स्मृस्थ ११०. [सं.]

समुचित वि. योग्य; रास्त; न्याय्य; उचित; युक्त. [सं.]

समुच्चय पु. १. साठा; समूह; समुदाय; जमाव; ढीग. २. सभेने दिलेला निकाल, केलेला ठराव, निश्चय. ३. (व्या.) शब्दसमूह; समास; वाक्यांचे किंवा शब्दांचे एकीकरण. व, आणि, तसेच – या उभयान्वयी अव्ययांचा अर्थ. ४. विचार; मसलत. – ऐको. [सं.]

समुत्थान न. १. उठणे; उभे राहणे. २. धंदा; उद्योग. [सं.]

समुत्पादन न. संपादन; उद्योग; उत्पन्न करणे.

समुदाय पु. १. जमाव; समूह; वर्ग; संघ. अनुयायी वर्ग; शिष्यवर्ग. २. समुच्चय; संग्रह. [सं.]

समुदायी पु. शिष्य; अनुयायी : 'समुदायी मग गुप्त झाला।' – देखसप्र ३.७७. [सं.]

समुदित धावि. १. जमलेले; एकत्र केलेले; जुळलेले. २. आनंदित; संतुष्ट. [सं.]

समुद्र(अधर) पु. (नृत्य.) ओठ वर उचलणे. [सं.]

समुद्भरण न. उठावाचे काम. (क्रि. करणे).

समुद्भव पु. उत्पत्ती. – एभा १०.६९. [सं.]

समुद्वृत्त तारा स्त्री. (नृत्य.) डोळे उचलणे. (वीर व रौद्र रसाचा अभिनय). [सं.]

समुद्र पु. १. पृथ्वीवरचा खाऱ्या पाण्याचा प्रचंड साठा. हा जमिनीपासून वेगळा झालेला आहे. सागर, दर्या; अर्णव. २. (ल.) अमर्याद साठा; विस्तीर्ण, अफाट, अगणित असा समूह, पदार्थ वगैरे. [सं.] (वा.) **समुद्राचे अर्घ्य समुद्रास** – मिळालेल्या देणगीपैकीच काही परत करणे. **समुद्राचे मीठ डोंगराचे आवळे (मिळणे)** – परस्परांविरुद्ध किंवा परस्परांपासून फार दूरच्या वस्तू एकत्र येणे. **समुद्रात जाऊन – पडून कोरडा – सुका असणे** – १. अमूल्य संधी मिळूनही ज्याला फायदा झाला नाही असा दुर्दैवी. २. दुष्कर्मात गढून पुन्हा उजळ माथ्याने हिंडणारा किंवा नीतीची बढाई मारणारा. **समुद्रात सुई पाहणे, शोधणे** – अशक्य किंवा अप्राप्य गोष्टीसाठी निष्फळ प्रयत्न करणे. **साता समुद्रापलीकडे ठेवणे** – अतिशय काळजीने जतन करणे; दुष्प्राप्य स्थळी ठेवणे; बहुमोल मानणे.

समुद्रकमळ–पुष्प न. समुद्रात आढळणारा फुलासारखा एक प्राणी.

समुद्रफळ न. एक औषधी फळ. याचे झाड समुद्रकिनारी असून पाने बदामाच्या पानांसारखी असतात.

समुद्रफेण–न–स, समुद्रमाणकी पु. स्त्री. माशाच्या शरीरातील एक औषधी हाड, पाठ.

समुद्राची दांडी समुद्रकिनाऱ्यावर जिथे लाटा फुटतात ती जागा; समुद्रकिनाऱ्याजवळ तयार होतो तो वाळूचा बांध.

समुपदेश, समुपदेशन पु. न. एखाद्या समस्येचा अभ्यास करून ती कशी सोडवावी याबाबत सल्ला. [सं.]

समुरी वि. शिमरी; नकटी.

समुव्व उंच. – ऐको.

समूठ वि. संपूर्ण : 'हा जळीं चांदु हान जैसा। समूठ गा।' – ज्ञा १५.२०.

समूल–ळ वि. क्रिवि. १. मुळासहित : 'तेथ समूळ उपडती जातिधर्म।' – ज्ञा १.२५०. २. (ल.) पाया, आधार, उगम, मूळ असलेले (ग्रंथ, वाक्य वगैरे). [सं. स+मूल]

समूह पु. जमाव; समुदाय; कळप; ढीग. [सं.]

समृद्ध वि. १. परिपूर्ण; भरलेला. २. संपन्न; भरभराटलेला. ३. वाढलेला; अधिक झालेला. [सं.]

समृद्धि–द्धी स्त्री. १. परिपूर्णता; चंगळ; वैपुल्य; रेलचेल. २. ऐश्वर्य; भरभराट; संपन्नता; सुकाळ. [सं.]

समेट पु. सलोखा; ऐक्य; तडजोड; मेळ; भांडण मिटणे. [सं. सम्+इ]

समेटणे सक्रि. १. तडजोड करणे; भांडणतंटा मिटवणे, आवरणे; समजूत, संधी, सलोखा करणे. २. एकत्र करणे; जमवणे; गोळा करणे. ३. दाबणे; गिळंकृत करणे. – ऐको.
अक्रि. १. संपणे; थांबणे; पुरे होणे; अखेर होणे; मिटणे (भांडण, तंटा, प्रकरण). २. एकत्र येणे; एकमत होणे; एकी होणे (विरुद्ध पक्षांची). ३. गोळा होणे; एकत्र जमणे. [सं. संवर्तयति]

समेत वि. जुळलेला; संलग्न; संबद्ध (विषय, गुण, क्रिया, कारक वगैरे). शअ. सह; बरोबर; सहित; समवेत; युक्त. [सं.]

समेळ न. (रूढ) संबळ – एक चर्मवाद्य.

समेळ पु. समूह; जमाव; एका मताची, विचाराची मंडळी.

समेळ्या पु. समेळ वाजवणारा.

समैक वि. १. उत्तम : 'तरि तप जें कां समैक । तेंहि त्रिविध आइक' – ज्ञा १७.१९९. २. पहा : **सम्यक.** – ज्ञाशभां.

समो पु. १. समता; मेळ; सारखेपणा; ऐक्य : 'शिष्यां देतां वाटे । अद्वैताचा समो फुटे ।' – अमृ ९.७०. २. समय : 'पाठीं रात्रीचा समो पावे ।' – ज्ञा ८.१६८. ३. समूह; समुदाय : 'तें सुकृत ऐसें म्हणे । श्रोत समो ।' – ज्ञा १४.२६०. [सं. समय]

समोच्चरेखा स्त्री. आकाररेषा; रूपरेखा.

समोर क्रिवि, शअ. १. पुढे; पुढल्या बाजूस, जागी; अग्रभागी. २. प्रत्यक्ष; देखत; समक्ष. ३. सरळ, थेट; नीट; उजू. ४. सरळ उंच; थेट वर; सरळ उभा. (को.) [सं. संम्मुख]

समोरी स्त्री. संमुखता; विरुद्धता; समोरील स्थिती; प्रत्यक्षता.

समोशी स्त्री. (सोनारी) सिंहाच्या तोंडाचा ठसा.

समोसरितपल्ली भौमिचारी (नृत्य.) तलसंचर. पाय क्रमाने आतल्या बाजूला फिरवून मागे टाकणे. [सं.]

समौर्य पु. न. केस; बालाग्र. – विशर.

सम् संस्कृत उपसर्ग. याचे अर्थ १. संयोग; मिलाफ; युक्तता; सहवास. उदा. संयोग, संमेलन. २. जमाव; समूह. उदा. संभार. ३. सौंदर्य; शोभन; उत्कृष्टता; ऋजूता. उदा. संमार्जन. ४. प्रकृष्टता; अतिशय्य; प्राचुर्य. उदा. समाराधन, संदीपन. ५. साहचर्य; एकसमयत्व. उदा. संगती, संमती. [सं.]

सम्त पु. १. भाग. २. मार्ग; दिशा. – आदिलशाही फर्माने. [अर. समृत]

सम्मत, सम्मतिपत्र, सम्मई, सम्मान, सम्मतित, सम्मार्जन, सम्मार्जनी, सम्मिश्र, सम्मिश्रण, सम्मुख, सम्मुखीन, सम्मेलन असे शब्द 'संमत' वगैरेमध्ये पहा.

सम्यक् वि. यथार्थ; योग्य; रास्त; नीट; उत्तम; चांगले : 'हा सम्यक् ज्ञानाचा रावो ।' – ज्ञा १६.५१.

क्रिवि. योग्य रितीने, तऱ्हेने, पद्धतीने, नीट; बरोबर; युक्त; चांगले; यथार्थतेने; उत्तम रीतीने. [सं.]

सम्यक् चरित्र (जैनधर्म) पंचमहाव्रतांचे पालन; योग्य आचरण.

सम्यक् ज्ञान १. जगाच्या स्वरूपाचे व आपल्यासंबंधीचे ज्ञान. २. सम्यक् चरित्र व सम्यक् दर्शन याविषयीचे योग्य ज्ञान.

सम्येक वि. निकट : 'अतिसम्येक वर्तत असे' – स्मृस्थ २५९.

सम्राट पु. सार्वभौम राजा, अधिपती. [सं.]

सम्राज्ञी स्त्री. मैत्रीण; सखी. [सं. सखी]

सय–ई स्त्री. स्मरण; आठवण. [सं. स्मृति]

सय स्त्री. खोबऱ्याचा कीस.

सय क्रिवि. मनासारखे; पसंत.

सयजन क्रिवि. खरेच; खरोखर. (खा).

सयल्या वि. नपुंसक. (झाडी)

सयसद, सतसय क्रिवि. सरळ ओळीत; रांगेने; थेट. (राजा.)

सयसुवाद पु. ताळतंत्र; धरबंद. (गो.)

सयंपाक, सयंपाकी इत्यादी शब्द स्वयंपाक, स्वयंपाकी इत्यादीखाली पहा.

सयार पु. चेटूक; कुयेडे; जादूटोणा; भुताटकी.

सयारा पु. चेटक्या.

सयारी, सयारीण स्त्री. डाकीण; चेटकी; जादूगारीण : 'म्हणे काम बागुल आइकैल । हे आशा सयारी देखैल ।' – माज्ञा १३.५०५.

स(सं)युक्तिक वि. योग्य; सुसंबद्ध; सारासार विचारास पटणारे.

सय्यद पु. मुसलमानी धार्मिक पदवी. [अर. सइयद=सरदार]

सय्या–ह्या पु. छक्का; पत्त्यातील सहा ठिपक्यांचे पान.

सर न. पु. १. डोके. २. (ल.) मुख्य; वरचढ; श्रेष्ठ. उत्तम; सर्वोत्कृष्ट : 'त्याणी तरवार बहु सर मिलवून ठेविली आहे.' – पेद २४.९७. ३. (गाय, म्हैस, इ. शब्दानंतर योजल्यास) संख्या (डोकी) दाखवतो. [फा.] (वा.) **० करणे** – (किल्ला, प्रदेश इ.)जिंकणे, पादाक्रांत करणे; फत्ते करणे. २. (काम) तडीस नेणे.

सर पु. बैलावरील कर. – बदलापूर ३६३.

सर पु. आवाज; ध्वनी; साद : 'सरींची गुंतलें चित्त । म्हणौनि मुकला जीविता ।' – उगी ३७२. [सं. स्वर]

सर पु. दह्याचा घट्ट व स्नेहयुक्त भाग. – योर १.१५५. [सं.]

सर पु. १. हार, फुले, मणी, मोती वगैरेंची दोऱ्यात ओवलेली माळ; कंठा. २. अनेक पदरी हाराचा पदर; वळलेल्या दोराचा पदर; वादीचा पदर. ३. फटाक्यांची माळ, लड. ४. बैलाची शिंगदोरी; शिंगाजवळ किंवा गळ्यात अडकवलेली साखळी. ५. लाकडाचा लांब सोट; वासा; लांब बांबू; मुसळाची सळई. ६. कणसाचा लांब देठ; सरगुंडे वळण्याची काडी. (व.) ७. पोटातली आतडी. (ना.)८. पाठीचा कणा; नाकाचे उभे हाड. (व.) ९. जय; सरशी. [सं.]

स्त्री. रांग; ओळ : 'बाबिलोनी नेला सरे धरुनु । युडे आंसवे ।' – ख्रिपु १.३०.९६.

सर पु. धान्य वारवण्यासाठी वरून सोडतात ती लांबट रास. [सं. सृ]

सर वि. योग्य : 'सर नव्हे तुझे कारण ।' – शिव १७९.

सर–री स्त्री. १. एकदम जोराचा लोंढा, सोसाटा, शिडकावा. उदा. पावसाची सर. २. आवेश; आवेग; उकळी; हुंदका, ३. झटका; झपाटा; फेरी. उदा. तापाची सर. ४. साथ; फेरा. ५. भ्रमाची, वाताची, वेडाची लहर; रागाचा झटका. [सं.सृ=सरणे]

सर–री स्त्री. बरोबरी; तुल्यता; योग्यता; साम्य.

सर स्त्री. (गंजिफा) तलफ; राजाकरता किंवा इतर हुकूम पडावा म्हणून केलेली खेळी.

वि. (पत्त्यांच्या डावात) हात होईल असे; हुकमासारखे (पान).

सर न. सरोवर; तळे. [सं.सरस्]

सर अ. १. अंश, किंचित छटा, सादृश्य वगैरे दाखवणारा, विशेषणास लागणारा प्रत्यय. उदा. काळसर, पिवळसर. २. पर्यंत; पुरेपूर; काठोकाठ.

सर न. आजार; दुखणे : 'लष्करांत कांही दिवस खाशास सर उद्भवलें.' – ऐको.

सर पु. १. महाराज; महाशय. २. शिक्षक. [इं.]

सर शअ. पर्यंत; पावेतो. उदा. थंयसर = तेथपर्यंत.

सरई स्त्री. जलद चालणारे जहाज; लढाऊ तिरकटी तारू. [ध्व.]

सरई स्त्री. लाकडाचा चौकोनी तुकडा.

सर(रा)ई स्त्री. धर्मशाळा; प्रवासात उतरण्याची जागा. [फा.]

सरक पु. फास; पाश. - राव्य ९.४०.

सरकगाठ स्त्री. मागेपुढे करून सैलआवळ करता येईल अशी निसरगाठ.

सरकचित्रे न. अव. पडद्यावर दाखवण्यासाठी खोबणीत घालून सरकवता येतील अशी निगेटिव्हच्या रूपातील चित्रे; (इं.) स्लाइडस्.

सरकट स्त्री. पावसाची लहान सर; पावसाची भुरभुर, थोडीशी झड. [ध्व.]

सरकटणे अक्रि. १. सरकणे; घसरणे; निसरणे. २. वस्त्राचे दोर वगैरे सरून विरविरीत होणे; विसकटणे; उसकटणे. [सं. सृ=सरणे]

सरकटणे अक्रि. १. सरसकट कोणतीही गोष्ट करणे; एकत्र करणे, मिसळणे; गोलाकार करणे. २. एकदम, एकत्र रगडणे, नाश करणे; सरसकट मारणे : 'आले देशोदेशींचे राये । तयांचें सांगावया जावों न लाहे । ऐसें सरकटित ।' - ज्ञा ११.३९३. ३. गिरबिडणे; लडबडणे : 'तैसें पिचडीं तोंड। सरकटिजेल ।' - ज्ञा १३.५६१. ४. सारवणे; चोपडणे : 'करुनि अस्थींचा मेळावा । वरि सरकटिला सावा :' - ज्ञाप्र ७४९.

सरकटवपणी स्त्री. घडीचे, पडते झडप.

सरकटा वि. निसरडा; घसरडा.

सरकटे न. निसरडेपणा.

सरकणे अक्रि. १. घसरणे; घरंगळणे; निसरणे. २. मागेपुढे होणे; हलणे; सरणे. दूर, बाजूला होणे; स्थानभ्रष्ट होणे; आजूबाजूस होणे. ३. सरसावणे; पुढे चालून जाणे; चाल करणे : 'दांडियांचां सरकौनि वारिके आंवरी ।' - शिव ५५२. [सं. सृ, शृंक; क. सरि]

सरकत स्त्री. पाती; भागी; बटई; वाटणी; हिस्सा. [अर. शिरकत]

सरकतदार, सरकती-त्या, सराकती पु. पातीदार; भागीदार; वाटेकरी.

सरकदंड पु. वज्रमुष्टीचा व्यायाम. प्रथम साधा दंड काढून हाताच्या जागी पाय आणून बैठक मारावी व पुन्हा तेथे हात आणून दंड काढावा. - व्याज्ञा ४.१०८.

सरकन-कर, सरदिनी-दिशी, सरकरि-करी क्रि. वि. सरकण्याचा, निसरण्याचा, घसरण्याचा सर असा आवाज करून. [ध्व.]

सरकबंद पु. चाप सरकवून उघडता किंवा बंद करता येण्यासारखी पट्टी; (इं.) झिप.

सरकश-ष वि. बंडखोर; अपराधी; आज्ञा मोडणारा. [फा.]

सरकळा वि. सरकीसारखा बुरा, पांढरेपणा आलेला (विशेषत: डोळा.)

सरका क्रिवि. सरळ; थेट; नीट; पुढे.

स(सि)रका पु. एक आंबट, पातळ रस; (इं.) व्हिनेगर. [फा. सिरका]

सरकानी स्त्री. बाजू : 'दोही सरकानी वेवसाइयाची दाटी : देखता जाला' - रुस्वन ९५०.

सरकार न. स्त्री. १. शासनसंस्था; राज्यसंस्था; देश, प्रांत, संस्थान वगैरेचा राज्यकारभार चालवणारी संस्था. २. राजा; राज्यप्रतिनिधी; राज्याधिकारी; शासनसंस्थेचा प्रमुख; सत्ताधिष्ठित व्यक्ती. ३. (व्यापक) कोणतेही कार्यालय; जिल्हा, प्रांत, तालुका वगैरेचे कार्यालय. कोणत्याही खात्याच्या अधिकाऱ्यास व त्याच्या कार्यालयास हा शब्द लावतात. ४. मालक; धनी; वरिष्ठ अधिकारी, व्यक्ती. ५. प्रांत; देशविभाग : 'कोठे कोठे सरकार हा सुभ्याचा किंवा प्रांताचा पोटविभाग आहे.' - गांगा ४२. ६. हिशेबनीस; घरचा कारभारी. (बं.) [फा.]

(वा.) **सरकारकामास येणे** - लढाईत मरणे.

सरकारअमली वि. सरकारवर अवलंबून; सरकारचा आश्रित; सरकारच्या ताब्यातील, अधिकारातील.

सरकारगुझश्त स्त्री. इतिहास; परिस्थितीचा आढावा; हकीकत. [फा.]

सरकारमहशूर वि. कुप्रसिद्ध; लहानापासून थोरापर्यंत सर्वांना माहीत झालेले; सर्वश्रुत; सर्वज्ञात.

सरकारवाडा पु. राजवाडा; राजाचे किंवा सरकारी अंमलदाराचे निवासस्थान; सरकारी कचेरी.

सरकारी वि. शासनव्यवस्थेसंबंधी; राज्यासंबंधी; राज्यव्यवस्था, राज्यकचेरी इत्यादी संबंधीचे.

सरकारी अभियोक्ता सरकारतर्फे फौजदारी खटले चालवण्यासाठी नियुक्त वकील; (इं.) पब्लिक प्रॉसिक्युटर.

सरकाळ-ळी-ळे पु. स्त्री. न. १. जोंधळा किंवा बाजरीच्या कणसाचा दांडा; कडब्याच्या ताटाचा अग्रभाग. २. (विणकाम) कांडी; सूतकांडी. ३. बोथट बाण.

सरकांडी स्त्री. सणकाडी.

सरकांडे न. बोरू.

सरकी स्त्री. कापसाची बी.

सरकी स्त्री. मोतीबिंदू; डोळ्यांवरील सुरकुत्या.

सरकुट न. चेंदामेंदा; चुराडा : 'मग नांगर मूशळ प्रजीले : तेव्हळी ते सरकुट केले : णीमिक्षामाजी' - रुस्वन २३४८.

सरक्या स्त्री. अव. (ल.) कापसाच्या बियांप्रमाणे पांढुरके झालेले बुरसलेले धान्य; म्हातारपणामुळे बुबुळावर आलेला पांढरेपणा : 'डोळे सरक्या झाले ।' - दावि १०.

सरक्या पु. सुतळी; दोरा; पतंगाची दोरी; तागाची दोरी.

सरखत न. १. सरकारकडे वेळोवेळी भरणा केलेल्या रकमांची क्रमाने केलेली नोंद; पावती; कौलनामा. २. विक्रयपत्र; सरकारने विकत घेतलेल्या मालाची पावती.

सरखेल पु. १. खास पथकाधिकारी; स्वारांच्या पथकावरील अधिकारी; ध्वजवृंदाधिकारी. २. मराठेशाहीतील एक पदवी.

सरग न. धान्याच्या राशीतील गाळसाळ राहिलेले अखेरचे बारीक धान्य.

सरग पु. वस्त्राचे टोक; ओचा; पदर : 'रुळतां वालिपेचा सरंगु दाटिला । मालगंठीवरी ।' - शिव ६२०.

सरगड पु. न. नुकताच लावलेला पानमळा; लावल्यानंतर एक वर्ष झाले आहे असा पानमळा.

सरगम पु. (संगीत) रागास लागणाऱ्या स्वरांची रागवाचक सताल रचना.

सरगरम वि. १. कोंबट; किंचित उष्ण; सोमट. २. संदिग्ध; अनिश्चित;

मोघम. ३. तत्पर; उद्युक्त; मोहीमशीर : 'पर्गणे मज्कुरीचे आबादानीस व मामुरीस सरगरम असणे.' – वाडसनदा १४०. ४. माहीतगार; तज्ज्ञ.

सरगावडा पु. खेड्यातील एक कामगार, अधिकारी; धनगरांचा मुख्य.

सरगुऱ्हो–रो पु. १. किल्ल्यावरील शिबंदीतील एक अधिकारी; जमादार. २. पंथांचा मुख्य; महंत. [फा.]

सरगुंडे पु. अव. १. सपीटाच्या बोटव्यांचा, गव्हल्यांचा एक प्रकार. (व.) २. ज्वारीच्या धांड्यांच्या सराला गुंडाळून वळलेला वळवटाचा एक प्रकार. (व.)

सरगोटा पु. एक लहान जातीचा सरडा.

सरगोड पु. अहंपणा; हाव; फुशारकी; बडेजाव.

सरघा, सरघाली स्त्री. मधमाशी : 'तो भीष्मावरि कोपे स्वमधुहराउपरि जेविं सरघाली।' – मोभीष्म ४.३७. [सं. सरघा+अलि]

सरचष्मा–श्मा पु. प्रमुख; अध्यक्ष; चालक; पुढारी; धुरीण; नायक (सभा, मंडळ, खाते वगैरेचा). [फा.]

सरजा पु. १. नथीच्या टीकेभोवती बसवलेला कळीच्या आकाराचा मोत्यांचा घेर. २.तोड्याच्या बंदुकीचा तोडा ठेवायचा लोखंडी आकडा. ३. (ल.) बैलांच्या दावणीतील मुख्य, म्होरक्या बैल.[फा. सराजह्]

सरजा पु. सिंह. [फा.]

सरजेदार वि. १. मोत्यांचा घेरा असलेली (नथ). २. जकातदार; कर वसूल करणाऱ्यांचा मुख्य.

सरट–ड पहा : **सरडा**

सरड पु. सुरमाडाचा तंतू, दोर; भिरलमाडाचा तंतू.

सरडा, सरडूक, सरडोका, सरढा पु. १. एक पालीसारखा, आजूबाजूच्या परिसराप्रमाणे रंग बदलणारा प्राणी. [सं. सरट] (वा.) **सरड्याप्रमाणे रंग बदलणे** – आपले स्वरूप, वागणूक प्रसंगानुरूप वरचेवर बदलणे.

सरड्या देवमण घोड्याच्या अंगावरील एक शुभलक्षणी भोवरा.

सरण न. चिता; प्रेत जाळण्यासाठी रचलेला लाकडांचा ढीग. [म. सरपण शब्दाचा संक्षेप]

सरण न. (मानस.) हालचाल. [सं.]

सरणि–णी स्त्री. १. मार्ग; रस्ता; वाट. २. सरळ रेषा; अखंडित रेघ; रांग; ओळ; साखळी; मालिका. ३. (ल.) पद्धत; रीत; चाल; रिवाज; रूढी; शैली, धाटणी (बोलण्याची, लिहिण्याची). ४. घशाला होणारा एक रोग. [सं. सृ–सरणे]

सरणे अक्रि. १. हलणे; चळणे; पुढे मागे होणे; बाजूला होणे; दूर होणे; निघणे; माघार घेणे; हटणे; जागा सोडून देणे. २. सरकणे; घसरणे; निसरणे; चळणे. ३. संपणे; खलास होणे; मरणे; खर्च होणे; कमी होणे; नाहीसे होणे. ४. चालणे; पुरे पडणे; प्रगती होणे; चालू राहणे. ५. शोभणे; योग्य दिसणे; साजेलसे असणे. ६. सरसावणे; उद्युक्त होणे. ७. कार्यभाग होणे; चालणे; पटणे; मान्य होणे.[सं. सृ–सरणे, सरति]

सरणे सक्रि. आठवणे : 'ध्यानेंचि सरे तेणेसीं वालभ तुज।' – ज्ञा १७.१३. [सं. सृ]

सरत–ता–ते–तु न. पु. सरकी पेरण्याची बांबूची नळी. (व. ना.)

सरतपासणी स्त्री. एखाद्या साक्षीदाराची हजर करणाऱ्या पक्षाने घेतलेली जबानी.

सरतना पु. जेवताना ताटाला लावायचा अडसर; टेकण. (अहि.)

सरता–त वि. १. वंद्य; श्रेष्ठ; मान्य; कृतकृत्य. भाग्यवान : 'तिहीं लोकीं सरतेआं होआवें।' – दाव ४६. २. ग्राह्य; चालण्याजोगे : 'जातींत सरता केला।' – महिबख ५८. ३. पूर्ण; योग्य; पुरेसे : 'म्हणे माझे सेवेप्रती। लक्ष्मीहि नव्हे सरती।' – रास १.८९२. ४. शेवटचा; अखेरचा : 'हे पहिली ना सरती।' – ज्ञा १८.११३३. ५. संपणारा; खर्च होणारा; आटोपणारा : 'जें सरतें जीविता वारी।' – ज्ञा ६.३६८.

सरताज पु. १. मुख्य; प्रमुख. २. मुकुटमणी; एक दागिना. – ऐको.[फा.]

सरता पालव १. अखेरची स्थिती; शेवटची पालवी; शेवट; शेवटचा भाग; हंगामाची अखेर. २. ऱ्हासाचा काळ.

सरतापुरता वि. पुरा झालेला; सगळा; भरपूर; पुरून उरण्याजोगा.

सरतेपुरते, सरतीपुरती, सरतासरती क्रिवि. १. पूर्णपणे; भरपूर. २. सरतेशेवटी; अखेरीस.

सरतेरीज न. हिशोबांचा संक्षिप्त सारांश; बाबवार एकंदर रकमा.

सरद स्त्री. १. सरहद्द; मर्यादा; सीमा. २. (ल.) दिशा; बाजू; प्रदेश. ३. (ल.) ताब्यातील, हद्दीतील प्रदेश; मर्यादित प्रदेश : 'अशास त्याचे सरदेंत त्याचा कौल' – वाडशाछ १.१०६. ४. (ल.) रांग; ओळ (झाडे, टेकड्या, घरे वगैरेंची). [फा. सरहद]

सरद वि. १. थंड; गार; ओलसर; आर्द्र; दमट; सर्द; शीत (हवा, जागा, बागा वगैरे). २. शीतल; थंडावा आणणारे; दाहशामक (औषध, खाद्यपदार्थ).[सं. शरद; फा. सर्द] (वा.) ० **होणे,(मनात) सरद होणे** – १. एखाद्यावर नाखूश होणे; खट्टू होणे; खप्पा मर्जी होणे; २. थंड पडणे; वरमणे.

सरदणे अक्रि. १. दमट, ओलसर, थंड होणे (जागा, वस्तू); ओल येणे. २. गारठणे. ३. थिजणे; शरमणे.

सरदगरमी स्त्री. १. सरदीने मिश्र उष्णता; मध्यम उष्णता; थंडाव्याने कमी उग्र भासणारी उष्णता (हवेतील, पाण्यातील वगैरे). २. प्रकृतीतील थंड–उष्ण असा होणारा फरक; एक व्याधी.

सरदमेंढा शीवशेजार; सरहद्दीला लागलेली सरहद्द.

सरदार पु. १. राजाच्या दरबारातील महत्त्वाचा मानकरी. २. बडा, मुख्य अधिकारी, प्रमुख; श्रीमंत व मातब्बर मनुष्य; पुढारी; मनसबदार, मानकरी; नेता. ३. (ल.) उपाध्याय. (काशी) ४. घराच्या कामावरील मुख्य गवंडी. [फा.]

सरदारी स्त्री. घोड्याच्या तोंडापासून डोक्यापर्यंतचा लगामाचा भाग; मोहरकी.

वि. सरदारासंबंधी; सरदार विषयक.

सरदावणे, सरदेणे अक्रि. दमट, ओलसर होणे. (राजा.)

सरदावरदी स्त्री. १. सरासरी; स्थूलमान; ठोकळमान; अनेक घटकांच्या मिश्रणामुळे उत्पन्न होणारे सामान्य गुणधर्म. २. पहा : **वरदावरी** [फा. सर+आवर्द]

सरदी स्त्री. १. थंडी; ओलावा; आर्द्रता; दमटपणा; ओलसरपणा; ओल. २. शैत्य; थंडावा; सर्दी (प्रकृतीत थंडीचा प्रादुर्भाव, प्रकृती थंड असणे).

सरधोपट वि. सरळ; समोर; बेधडक; नीट; वाकडा तिकडा नसलेला (मार्ग, नदी, भाषण, कृती, वागणूक).
क्रिवि. सरळपणे; उघडपणे; बेधडकपणे; खाडखाड; तडख; न अडखळता; न गुंतता (लिहिणे, वाचणे, वगैरे).

सरना पु. दलदल. (झाडी) [सं. सर]

सरनाठ्या पु. आट्यापाट्यासारखा एक खेळ.

सरनामा पु. १. पदवी; किताब; पत्रारंभीचा मायना; आडनाव. २. प्रास्ताविक मजकूर. [फा. सर्नामा]

सरनाल तरवारीच्या म्यानावर केलेले धातूचे कलाकुसरीचे काम किंवा म्यानावर बसवलेले टोपण इ. अलंकार.

सरनिखर क्रिवि. सरसगट; गोळाबेरीज करून; एकत्रपणे.

सरनो(नौ)बत–द पु. ज्याला स्वतंत्र नौबत (नौबतीचा मान) मिळाली आहे असा सैन्याधिकारी; सेनापती; सेनानी.

सरप न. रत्न.

सरपट स्त्री. सापाच्या सरपटण्यामुळे जमिनीवर उठलेला फरफटा; एखादा पदार्थ ओढला असता उठणारा फरकांडा, ओरखडा. [सं. सृप–सर्प]

सरपटणे अक्रि. १. पोटाने पुढे सरणे; पोटाने फरपटणे; जमिनीबरोबर सरकत जाणे; खुरडणे. २. (पदार्थांच्या पृष्ठभागावरून) घसरणे; निसरणे; हळूहळू सरकत जाणे; अलगद घसरत जाणे. ३. सरणे; घरंगळणे. ४. ढुंगणाने, कुल्ल्यांनी सरकत जाणे. [सं. सृप]

सरपण न. जळण; इंधन; जळाऊ लाकडे. [सं. शरपर्ण]

सरपरस्त पु. पालनकर्ता; पालक. [फा.]

सरपरस्ती स्त्री. पालकत्व. [फा.]

सरपंच पु. १. (वा. व्या. वि.) निवाडा देण्यासाठी, करण्यासाठी असलेला लोकनियुक्त प्रमुख मनुष्य. २. लोकांनी रीतसर निवडून दिलेला पंचायत समितीचा प्रमुख, मुख्य. [फा.सर+म. पच]

सरपाटील पु. जिल्ह्याच्या वसुलीवर देखरेख करणारा व त्याबद्दल शेकडा काही तरी रक्कम मिळणारा अधिकारी.

सरपाठ वि. सारखे.

सरपाड वि. कृश; क्षीण.

सरपेच पहा : **शिरपेच**

सरपोष पु. अब्रू; प्रतिष्ठा; दरारा.

सरपोस–श पु. १. आच्छादन; झाकण; वरून पसरलेले कापड, रुमाल (अन्नाचे ताट, पगडी वगैरे वरील). २. (ल.) गुप्तपणा; गुपित : 'आजपावेतो सरपोस राखिला.' – ऐलेसं ९.५०४२. [फा.]

सरफ पु. १. खर्च. २. काटकसर. [अर. सर्फ=खर्च]

सरफखाना पु. विड्याचे साहित्य ठेवण्याचे स्थान; तांबूलागार. [फा.]

सरफराज वि. १. कृपापात्र; आभारी. २. भाग्यवान. [फा.]

सरफराज–जी स्त्री. १. वाढ; बढती. २. प्रशंसा; स्तुती. [फा.]

सरफ(पो)ळी स्त्री. १. मुलांच्या कमरेत घालायची एक प्रकारची सर्पाकृती साखळी. २. गळ्यात घालायची एक प्रकारची साखळी. [सं. सर्प]

सरफा पु. लाभ; फायदा; नफा; प्राप्ती; हित [फा. सर्फा]

सरफेट वि. बेफाम, वाटेल तसा.

सरबटणे अक्रि. बरबटणे; लिडबिडणे.

सरबडणे अक्रि. फरपटणे; सरपटणे; सरकत; घसरत जाणे; चाटून जाणे.

सरबत न. लिंबू, आंबा, चिंच, साखर वगैरे पासून बनवलेले मधुर पेय; साखर पाणी (काशी); रुचकर फळांच्या रसात साखर घालून केलेले पेय. [अर. शरबत्]

सरबती वि. गव्हाची एक बुटकी जात.

सरबत्ती १. स्त्री. (तोफा, बंदुका, सुरुंग, फटाके इत्यादींना वरचेवर) बत्ती लावून, पेटवून केलेला धूमधडाका; वरचेवर पेटवणे. २. (ल.) जोराचा भडिमार; धूमधडाका; मारा; झड; ताशेरा. ३. (ल.) भांडणाचा, तंट्याचा स्फोट; कलह माजणे; जोराची बोलाचाली होणे. ४. (पानसुपारी देताना, तूप वगैरे वाढताना उडणारी) धांदल, धावपळ, गडबड. [फा. सर+बत्ती]

सरबमोहर वि. व्यवस्थित सही शिक्का असलेली.

सरबर–रा स्त्री. बरोबरी; स्पर्धा. [फा.सरबर=प्रमुख पुढारी]

सरबरणे सक्रि. पातळ करणे. [सं. सृ, भृ, सम्+परि+भृ]

सरबराई, सरबरा स्त्री. व्यवस्था; तरतूद; बंदोबस्त; पाहुणचार; (धंदा वगैरे) चालू करणे; गरजांची भागवणूक; व्यवस्था लावणे; निगा राखणे; आवरणे: ' जे काम सांगाल त्याची सरबरा करूं' – मइसा ६.५६४. [फा. सरबराह्=सामुग्री, प्रवासखर्च]

सरबरीत वि. पातळसर; फार दाट किंवा पातळ नव्हे असा (कालवलेला भात, चुना वगैरे). [ध्व. सर]

सरब(बा)सर वि. क्रिवि. १. सरासरी; एकंदर; लहान मोठे एकत्र केलेले : 'तिजाई सूट सरबसर पाहून द्यावी.' – वाडसमा १.२५७. २. मध्यम. ३. कमी–जास्त; थोडाफार फरक असलेला; बरावाईट; श्रेष्ठ–कनिष्ठ.

सरबस्त–स्ता वि. १. बंद; लपवलेले. २. काही ठराविक सारा देणारा; सर्व सारा न देणारा (जहागिरदार).

सरबारगिरी, सरबारगी स्त्री. आधिपत्य; सैन्यातील हुद्दा.

सरबांड पु. शेतात घातलेला बांध. (व.)

सरबुलंद वि. प्रमुख; कीर्तिमान; उच्चपदाधिष्ठित.

सरभरी वि. उपयोगी पडणारा; मदत करणारा; सहाय्यक : 'बापु धोंडिये गुण प्रसंगामधीं केवळ सरभरी।' – होला ७७.११२.

सरभंगी पु. मागचा पुढचा विचार न करता खूप जेवणाऱ्या गोसाव्यांचा एक पंथ.

सरम, सरमट–ड पहा : **सरमाड**

सरमकुकडी स्त्री. लाजाळूचे झाड.
वि. लाजाळू. (अहि.)

सरमजमु स्त्री. मुजुमदारांवरील अधिकाऱ्यांचे पद, अधिकार.

सरमणे अक्रि. विवेचन करणे; व्याख्यान करणे; विवरणे : ' ते सरमतां संतोषु आमां।' – ख्रिपु १.१.६८. [इं. सर्मन]

सरमर्दी स्त्री. विशेष बहादुरी, पराक्रम; धीटपणा; धारिष्ट; मर्दपणा.

सरमस स्त्री. गर्दी; गडबड; दाटी.

सरमंडलोईपण न. परगण्यावरील एका अधिकाऱ्याचे पद.
सरमा पडसे; सर्दी.
सरमाड न. कडबा; ज्वारी, बाजरीची कणसे काढलेली ताटे.
सरमाडी वि. सरमाड काढून झाल्यावरचे (शेत); अशा शेतातील (पीक).
सरमाळ स्त्री. समयांची, दिव्यांची माळ. (गो.)
सरमिसळ स्त्री. मिश्रण; एकत्रीकरण; मिसळणे.
वि. क्रिवि. मिश्रित; एकत्र मिसळलेले; मिश्र गुणांचे.
सरमो(मों)य क्रिवि. यत्किंचितही; थोडेसुद्धा.
सरय पु. लहान नांगर. (व.)
सरया वि. शुद्ध. - मनको.
सरर क्रिवि. बाण, तीर, गोळी वगैरे सोडली असता होणाऱ्या आवाजाप्रमाणे.
सररहा क्रिवि. मोकळेपणाने; अबाधितपणे; सावकाश; बिनधोक; सरळपणे (चाललेले काम). [ध्व.]
सररास पहा : **सरिरास**
सररास वि. निष्णात; निपुण; तरबेज; हुशार.
क्रिवि. एकंदरीने; सरसकट; सामान्यत:. [फा. सर-राहा]
सरल न. कोंडा; तूस; भातावरचे सालपट.
सरल-ला पु. भाताचा पेंढा; भात झोडल्यावर मळायचा पेंढा.
सरल पु. देवदाराच्या जातीचे एक झाड. [सं.]
सरलता स्त्री. ऋजुता; सरळपणा; निष्कपटता; निर्व्याजता; सोपेपणा; साधेपणा.
सरल(ळ)रेषा स्त्री. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत दिशा न बदलणारी रेषा; दोन बिंदूतील कमीत कमी अंतर दाखवणारी रेषा.
सरलष्कर पु. सेनाकर्ते; स्वत: सैन्य जमवून सेनापतीचे काम करणारा.
सरली स्त्री. सर्दी; चिरफळी; चिरी; लांबट तुकडा (कागदाचा). - देशी नाममाला.
सरली स्त्री. मोकळीक : 'सुखें तुज सरली दीन्हली असे।' - ज्ञा १२.११६.
सरवट न. १. पावसाची मोठी सर. २. (काही ठिकाणी) पावसाची लहानशी सर.
सरवट पु. १. सरवा करण्यासारखी जमीन. २. एक प्रकारचे भात. हे तांबडे असून उपटून न लावता केवळ पेरून करतात.
सरवत धन, संपत्ती. - ऐको.
सरवदा-द्या, सरोदा पु. १. पहा : **सर्वदा.** २. डाकोता; भविष्य सांगणारा; एक भिक्षेवरी जात : 'दिवटा सरवदा भाकूनि गेला।' - दास ३.७.२९.
सरवळा पु. बोटवा; गव्हल्यांचा एक प्रकार.
सरवळा पहा : **सारोळा**
सरवा पु. १. नुकतीच पिकाची कापणी केली आहे अशी जमीन; शेतातील कणसे गोळा केल्यानंतर मधून मधून चुकून राहतात ती कणसे; फळे, भाजीपाला वगैरे काढून घेतल्यानंतर पाठीमागे राहतो तो तुरळक वशिष्ट भाग. (क्रि. वेचणे). २. वरीलप्रमाणे अवशिष्ट राहिलेला, एकत्र गोळा करून ठेवलेला भाग. ३. झाडे, झुडपे काढून, साफ करून लागवडीस आणलेला जमिनीचा भाग. [गु.]
सरवा पु. पावसाची सर.
सरवाद्या पहा : **सरवदा**
सरवाद पु. गोंधळ; घोटाळा.
सरशी, सरशी बाजू स्त्री. १. वरचढपणा; श्रेष्ठता; जय; वर्चस्व. २. भरभराट; प्रगती; उत्कर्ष.
सरशी शअ. सह; बरोबर; सहित; जवळ; पाशी; सन्निध : 'वना आलीस सरशी।' - वसा ६२.
सरशी पु. ताऱ्यासारखा मध्ये तोंड व सभोवार फाटे असलेला प्राणी. - प्राणिमो १३६.
सरस वि. सारखे : 'दोन्ही रेखा सरसियाचि एति' - नीलपूजा ८.२३.
सरस पु. प्राण्यांची शिंगे, नखे वगैरेच्या रांध्यापासून बनलेला एक चिकट पदार्थ. [फा. सरेश]
सरस-सा वि. १. श्रेष्ठ; वरिष्ठ; उत्कृष्ट; उत्तम; सुरेख. २. वरचढ; वरच्या दर्जाचा; अधिक मोठा; आकार, गुण, संख्या वगैरेंनी अधिक. [सं. श्रेयस्]
सरसक(ग)ट, सरसट्टा क्रिवि. एकंदरीने; गोळाबेरीज करून; निवड न करता; एकत्रपणे; सगळे; सर्वसामान्य.
सरसणे सक्रि. करणे; कृतीत आणणे; रचणे : 'कथा ऐके ते तूं नवल ऋषिशृंगें सरसिलें।' - मोराबा.
सरसनीरस वि. चांगले वाईट; बरेवाईट; उत्कृष्ट व कमी प्रतीचे. [सं.]
सरसगिरी स्त्री. १. बरसात. २. वळिवाचा पाऊस पडणे. ३. चुन्याचा गिलावा. - ऐको.
सरसब्ज वि. १. ताजा; हिरवा. २. (ल.) तेजीचा; नशीबवान.
सरसम्त पु. तरफेचा मुख्य; एका बाजूचा, दिशेचा मुख्य.
सरसर-रा क्रिवि. १. साप वगैरे प्राणी सरपटत जाताना होणाऱ्या आवाजाप्रमाणे आवाज करून; निसरताना, घसरताना होणाऱ्या आवाजाचे अनुकरण करून. २. झरझर; त्वरेने; झटझट. [ध्व. सर]
सरसरणे अक्रि. सरसर आवाज करून पुढे जाणे; घसरणे; निसरणे; झरकन् त्वरेने पुढे जाणे. [ध्व. सरसर]
सरसलूख पु. विजय व तह; काबीज करून केलेला तह, शांतता वगैरे.
सरसहा क्रिवि. एकसारखा; भेद न करता; सरसकट; बिनधोक.
सर(रि)सा वि. सारखा; समान; तुल्य.
शअ. १. सन्निध; जवळ; समीप. २. (वेग, सपाटा, आवेश, झटका) यांच्यासह; बरोबर.
क्रिवि. १. बरोबर; सह; जवळपास. २. बाजूला ; एकीकडे, मार्गातून दूर. (क्रि. काढणे, करणे, घालणे, निघणे, होणे, जाणे). ३. तात्काल; लागलीच; झपाट्याने. ४. नीट; व्यवस्थित; सरसावून : 'पदर घे सरसा लाजून जरा।' - पला ३६.५. पुढे; अग्रभागी. [सं. सदृश]
सरसाव(वि)णे अक्रि. १. बाजूला होणे; निसटणे; सरकणे. २. पुढे जाणे; चालून जाणे; धिटाईने चाल करणे. ३. वाढणे; उभे होणे; अंगाने भरणे; जोमाने वर येणे. ४. उद्युक्त, तयार होणे; करावयास उठणे; आवेशाने पुढे होणे.
सक्रि. जवळ करणे, घेणे; २. बाजूला, दूर करणे; सरकवणे. ३. पुढे

करणे; सारणे. ४. तयार करणे; उर्जित दशेस आणणे. [सं. सृ, सर्व]

सरसिधा–शिधा पु. कच्चा शिधा; धान्य; शेर.

सरसुमार पु. (प्र.) सोईसुमार; सरासरी; अंदाज; तालमाल – ऐको.

सरसुं(सों)दा वि. जाणता; वयात आलेला; सज्ञान : 'येईन बरोबर म्हणालें राहूं घरीं कशी सरसुंदी।' – पला १८.४३. [सं. सरस+स्कंध]

सरसू स्त्री. मोहरी; एक गळिताचे धान्य.

सरसून शअ. बरोबर; जवळून; सह; लगटून; लागून.

सरसोवरशी–वर्षी क्रिवि. चढाई करून; कुरापत काढून; चाल करून; धिटाईने; आगळीक करून. पुढील वाक्प्रचाराला जोडून योजतात – कज्जया करणे, जबाबं देणे इ.

सरस्वती स्त्री. १. वाग्देवता; गायन, कला वगैरेची अधिष्ठात्री देवता. २. वेद, शास्त्रे वगैरे ग्रंथ; विद्या. ३. वाणी; वाचा; भाषा. ४. वर्षप्रतिपदा, दसरा वगैरे दिवशी पाटीपूजनाकरता मुले पाटीवर काढतात ती रेघांची आकृती. ५. पंजाबमधून वाहणारी एक नदी. ही प्रयाग येथील त्रिवेणी संगमामध्ये गुप्तरूपाने येऊन मिळते अशी समजूत आहे. ६. सुंदर व अस्खलित, मधुर बोलणारी स्त्री. ७. (सांकेतिक) गुप्तपत्र. [सं.]

सरस्वती अनध्याय आश्विन शुद्ध पक्षात मूळ नक्षत्र असता तेव्हापासून श्रवण नक्षत्रापर्यंतचा कालावधी.या वेळी सरस्वतीचे पूजन, आवाहन वगैरे करतात. या काळात अध्ययन करीत नाहीत.

सरस्वतीदान न. १. लेखी वाचन; लेखी करार; लिहून दिलेला लेख. २. तोंडी वचन; करार. (क्रि. देणे.)

सरहद्द–द स्त्री. सीमा; मर्यादा; शेवट. [फा. सर+हद्द]

सरहार बैल. – भाप्र.

सरळ पु. भांगातील मोत्याचा सर. –प्रामको.

सरळ वि. १. समोर; नीट; वाकडातिकडा, तिरपा नव्हे असा; थेट. २. (ल.) निष्कपट; प्रामाणिक; छक्केपंजे नसलेला (मनुष्य). ३. स्पष्ट; उघड; आडपडदा नसलेले (भाषण, शब्द). ४. सोपी; साधी; सुबोध भाषा.[सं. सरल] (वा.) ० **करणे** – वठणीवर आणणे. ० **सोडणे** – गाईला खोंड झाला असता तो सशक्त होण्यासाठी गाईचे सर्व दूध वासराला पाजणे. [सं. सरल]

सरळणे अक्रि. १. सरसावणे; धिटाईने पुढे येणे; सुळकणे. २. जोमाने वाढीला लागणे (रोप, मूल इ.).

सरळव्याज न. फक्त मुदलावर घेतलेले व्याज.

सरळसोट वि. सरळ व उंच; ताडमाड.

सरळी स्त्री. १. पाण्यात समोर मारलेली सुरकांडी; पाण्यात हातपाय न हलवता जोराने सरळ जाणे. २. मोकळीक; स्वातंत्र्य.

वि. स्त्री. ओघवती : 'केशवदेयासि संस्कृति सरळी : आणि पंडितांसि संस्कृति मऱ्हाटीया सरळी :' – स्मृस्थ ८८.

सरळी स्वर; गळा. (तंजा.)

सरळे न. हातातील कडे : 'सरळे साखळे पाटाउवे सुवर्णे :' – दृपा १३.

सरंग–गी पु. स्त्री. पतंग; विमान; वावडी.

सरंगा पु. विशिष्ट जातीचा घोडा.

सरंजाम पु. १. सामानसुमान; साधनसामुग्री; हत्यारेपात्यारे; उपकरणे. २. सैन्य, किल्ल्याचा बंदोबस्त वगैरे राखण्याकरता दिलेली इनामी जमीन; पालखी वगैरे मानमरातब दिला जात असल्यास त्याच्या खर्चाकरता दिलेले इनाम. ३. जुळवाजुळव; तयारी; सिद्धता : 'सरंजाम करून डेरे राहुट्या बाहेर दिले।' – ऐपो ३९६. [फा.]

सरंजामदार पु. ज्याच्याकडे सरंजामी इनाम आहे असा असामी.

सरंजामशाही स्त्री. इतिहासकालीन सरदारांचे, जमीनदारांचे राजदरबारी व समाजात वर्चस्व असण्याची पद्धत.

सरंजामी पद्धति–ती १. फौजेच्या अधिकाऱ्याला नक्त पगार वगैरे न देता फौजेच्या खर्चाकरता जहागीर देण्याची पद्धत. २. इंग्रज सरकारने एतद्देशीय राजास काही मुलुख अगर पैका घेऊन फौज पुरवण्याची पद्धत. ३. ज्यामध्ये स्वामिनिष्ठतेबद्दल मांडलिक राजे राजाकडून जमीनदारीचे हक्क मिळवीत असत, अशी एक व्यवस्था.

सरंजामी फौज इनाम जमीन, जहागीर वगैरे घेऊन सरकारकरता लष्करी अधिकाऱ्याने ठेवलेले सैन्य.

सरंदाज वि. डोकेबाज; हुशार.

सरंध्रता स्त्री. सच्छिद्रता; (इं.) पोरॅसिटी.

सरा–र पु. १. लांब, सरळ बांबू अथवा लाकूड; वासा; तुळई; लांब, सरळ सोट. २. गाड्याच्या साटीच्या बाजूची वरची आडवी लांब लाकडे. ३. (विणकाम) वस्त्रातील सरळ विणीची रेषा. [सं. सृ]

सरा पु. मद्य; दारू : 'स्त्रिया पुजुनि सरे देती।' – तुगा ४२७७.[सं. सुरा]

सरा (खा.) पहा : **सरवा**

सरा स्त्री. झरा; नदी : 'समुद्र होऊनि ओघु। सरे दाऊनि मागु। राहे जैसा।' – अमृ ५.२१. [सं. सृ = सरणे]

सरा पु. घोड्याला होणारा एक रोग. – ज्ञाको १७.

सराइ–ई स्त्री. सुगीचा हंगाम, काल; मोसम; पीक गोळा करण्याचा पावसाळ्यानंतरचा काळ; हिवाळा. [सं. शरद, शारदी]

सराइंदा पु. गायक; गवई. [फा.]

सराई–ए स्त्री. धर्मशाळा; मुसाफिरखाना; विश्रांतिस्थान. [फा. सराय]

सराई(इ)त वि. निष्णात; पटाईत; कुशल; पटू; तरबेज; दक्ष; सराव असलेला; अभ्यस्त; अनुभवी.

सराऊ पु. मातीचे झाकण; परळ. (झाडी) [सं. सराव]

सराए स्त्री. विपलता; चंगळ; तृप्ती : 'ऐसे गोसावी तृप्तपर्यंत आंबे खावविले : सराए केली:' – लीच ४१५.

सराकर्ता जमीनधारणेची एक पद्धत. यात मालक व सरकार यांचे वाटे ६ ते १० आणेपर्यंत असतात.

सरागणे अक्रि. शोभणे. [सं. स + राग – रञ्ज्]

सराटा पु. १. गोखरू; एक औषधी वनस्पती व तिचे बी. २. माड, पोफळ वगैरेंचा हीर, कुसपट; अणकुचीदार ढलपा. ३. आवाजातील कंप; गाण्यातील लांब तान; नादातील लहरी, हेलकावा, कंपन, आंदोलन, हिसका. (क्रि. घेणे, वाजवणे, वाजणे.). ४. खराटा; झाडणी. ५. तागाचे झाड; सणकाडी; पळहाटी. ६. कलथा; उलथणे.[सं. शर]

सराटी–ठी स्त्री. तीर; बाण; बाणांचे जाळे. [सं. शर]

सराडं न. पाण्याचे मोठे डबके. (व.)

सराडणे सक्रि. छपरावर गवत टाकण्याआधी ते काड्या, तट्ट्या, सराटे, पळहाट्यांनी आच्छादणे.

सराडा पु. ज्वारीचा धांडा : 'सराडेयाची दांडी करी घेति।' – लीचपू २००.

सराद स्त्री. ध्वनी : 'प्रभा घरात दाटली। एक सराद सुटली।' – जना१२९.

सरापा वि. आपादमस्तक.

सराफ पु. १. पैशाची देवघेव, हुंडीचा व्यवहार, व्याजबट्टा, सोनेचांदी वगैरेचा व्यवहार करणारा; पेढीवाला; सावकार. २. (ल.) कृपण; कंजूष. [अर. सर्राफ]

सराफकट्टा–काटा, सराफहट्टा, सराफा पु. सराफांच्या दुकानांची रांग; सराफगल्ली; सराफ बसतात ती जागा.

सराफाई, सराफी स्त्री. १. सराफांचा धंदा; सराफाचे काम, कसब. २. कंजूषपणा; काटकसर.

वि. सराफासंबंधी; सराफाच्या कामासंबंधी. सराफ बाजारात प्रचारात असणारे काही सांकेतिक शब्द. – रायडा = १. पैसा; समान रायडा = २ पैसे; रामदास = १ आणा; मानाजी = १ रुपया इ.

सरायत स्त्री. परिणाम. – मुधो. [अर.]

सरारणे अक्रि. सरसर आवाज करून जोराने सरकणे, घसरणे; निसरणे; सरपटणे. [ध्व. सरसर]

सराव पु. अभ्यास; सवय; राबता. [सं. सृ]

सरावणे अक्रि. अभ्यास, सवय होणे; रुळणे.

सरावले, सरावू न. पु. रुंद तोंडाचे मातीचे भांडे; परळ; भोजनपात्र. [सं. शराव]

सरावा पु. ताळेबंद; हिशोबाचा तक्ता.

सरासर क्रिवि. साद्यंत; पूर्ण; तमाम; एकंदर. [फा. सरासर]

सरासरी, सरासरीस, सरानसरी स्त्री. १. सामान्य प्रमाण; सरसकट पडणारे प्रमाण; सर्वांचे मिश्रण करून येणारे सामान्य गुणधर्म, लक्षण. (क्रि. करणे, बांधणे, होणे, बसणे, जमणे, मिळणे.) २. (गणित) अनेक सजातीय संख्यांच्या बेरजेस त्यांच्या संख्येने भागून येणारे प्रमाण.

क्रिवि. १. सामान्यत: साधारणत: सरसकटपणे; विशेष बारकाई, चिकित्सा न करता; कसेतरी. २. अजमासाने; कल्पनेने; साधारण अंदाजाने; ठोकळ मानाने; वरवर पाहता; बिनचूक निश्चय न करता. ३. मध्यम मानाने; सर्वांचा सम प्रमाणाने हिशेब करून; सर्वांवर सारखे वाटून. ४. सर्वस्वी; पूर्णपणे; एकंदरीत : 'आधी तुम्ही सरासरी हरामखोरी केलीत।' – मइसा १५.३७१.

वि. सामान्य, मध्यम प्रतीचे; चालचलाऊ. [सं. सर, सदृश; फा.]

सराळणी स्त्री. उसाकरता केलेली तिसऱ्या वेळची नांगरट.

सरांच लहान तंबू; राहुटी.

सरांचा पु.सुरूच्या झाडासारखे खांब असलेला मांडव.

सरांडणे अक्रि. माखून जाणे : 'तैसें पिचडिं तोंड। सरांडैल।।' – ज्ञा १३.५६०.

सरिता स्त्री. नदी. [सं.]

सरिपाड पु. तुलना; बरोबरी : 'सर्वज्ञा आणि मूढा : सरिपाडु नाहीं : ' – ज्ञाप्र ६६१.

सरिफा पु. लाभ; मिळकत; फायदा; नफा. [अर.]

सरिफेवार वि. लाभदायक; फायदेशीर.

सरिफि स्त्री. बंदुकीचा चाप; कळ.

सरिरास क्रिवि. १. लागोपाठ; एकसारखे; ओळीने. २. मोकळेपणी; सुखाने. [अर. सरूर = सुख, आनंद]

सरिवीणा स्त्री. एकतारी वाद्य : 'एकु महात्मा आणि माहात्मी सरिवीणा घेउनि आली:' – गोप्र १४१.

सरिश सिमेंट.

सरिसा वि. सारखा; समान; बरोबर; तुल्य.

क्रिवि. सारखे; दुरुस्त; नीट; पूर्ववत; समोर. [सं. सदृश]

सरिसा शअ. १. सह; बरोबर. २. जवळ; संनिध.

सरिसे प्रत्यय. सह; बरोबर : 'पव्हेयासरिसे बीजे केले :' – लीचपू २.२.

क्रिवि. तत्क्षणी : 'तिये ओळखीचि सरिसें। सुखाचां साम्राज्यीं बैसें।' – ज्ञा ६.३६७.

सरिसेपण न. सादृश्य; तुल्यता; सारखेपणा.

सरी स्त्री. तारेत गुंफलेला स्त्रियांचा सोन्याचा एक दागिना.

सरी स्त्री. १. धातूची तार. २. बांबूची बारीक लांब काडी; सड. ३. वाफ्यांच्या रांगेतील पाण्याचा पाट; बागेतील वाफ्यांची रांग, दंड. ४. विणकामात दोरे सरल्यामुळे पडणारी विरळ रेषा; दुस्ता. ५. भिंतीच्या माथ्यावरील रेषा, ओळ; रांग. ६. लग; खांबावरील सरा. ७. जात्याच्या वरच्या तळीवर वजन ठेवण्यासाठी केलेला दगडाचा किंवा मातीचा वाटोळा पेंड. ८. मानेचे हाड. ९. वाफ्यातील मातीचा बांध. वाफ्याचे भाग पाडण्याकरता घातलेला मातीचा वळ; पाटगा; चिरा. [सं. सृ–सर] (वा.) ० **मारणे** – गोल भांड्यास कड, किनार काढणे, खोदणे. ० **येणे** – गळ्याच्या हाडात दुखणे; हसळी येणे.

सरी स्त्री.नदी : 'जोडे अमृताची सुसरी । तें प्राणातें अमर करी।'– ज्ञा १७.२१८. [सं. सरित्]

सरी स्त्री.वडी : 'सरीयांचे चंदन उगाळिले:'– लीचउ २४.

सरी स्त्री.बरोबरी; स्पर्धा; तुल्यता; जोड; उपमा :'नाहीं मजसी सरी पावे। ऐसें कोण्ही।'–ज्ञा १६.३५९.

वि. सारखा; समान. [सं. सदृश]

सरी स्त्री. (व्यापारी) कर. (कर.)

सरी स्त्री.१. जनावरे जाण्याकरता ठेवलेली वाट. २. कांदा, लसूण इ. लावण्याकरता केलेला वरंबा.

सरीक पु.सरकती; भागीदार; पातीदार; वाटेकरी. पहा : **शरीक**

सरीकत स्त्री.शर्त; अट; तह.– शिदि २५.

सरीसुंदी क्रिवि. थेट; सरळ. (ना.)

सरुदाम पु.अर्धा दाम : 'भटोबासांचीए गांठी सरुदाम उरला होता'– लीचउ १२९.

सरू पहा : **सुरू** :'माझा तू लावण्याचा सरू।'–पला ४.११. [अर.]

सरू पु.थरू; दांडा; मूळ. (को.) [सं.त्सरू]

सरूडोरू करणे अनमान करणे; मागेपुढे पहाणे; काकू करणे. (ना.व.)

सरूप वि.१. सारखे; एकाच स्वरूपाचे; एकाच तोंडवळ्याचे; सदृश. २.(ल.) अब्रू; नावलौकिक : 'मग आपले वजन... सरूप यांची इच्छा धरावी.'– पेद ६.५६. [सं.]

सरूपता स्त्री.१. सादृश्य; सारखेपणा. २. चार प्रकारच्या मुक्तींपैकी एक; ईश्वरसादृश्य.

सरूप पदे (बीज.) ज्या पदांतील अक्षरी भाग सारखाच असतो अशी पदे. उदा. २ अब, ४ अब, ७०३ अब.

सरे क्रिवि. सत्वर; तातडीने; लगोलग : 'पूजा साधन: तांबूल सरें घेउनि आला:'– लीच १.१२.

सरेकरी, सरेकार कलाल; दारू विकणारा. [सं.]

सरेखोर वि. दारूबाज.

सरेगाऊ वि. सरळ : 'आलें मराठी सिंथितु । सरेगाऊ ।।'– शिव ९६४. [सं.गम]

सरेमो,सर्मोय केसभरही, रेसभरही. [अर. सरिय]

सरेसाल क्रिवि. वर्षभर; सबंध वर्षातून.

सरोक वि. कीड नसलेला; चांगला : 'आपपृथ्वी हे पांच फोक । महाभूतांचे सरोक। सरले होते।'–ज्ञा १५.९८.

सरोकार पु.दाट संबंध; सगेपण.

सरोज न.कमळ. [सं.]

सरोट पहा : **सरत**

सरोटा पु.उलथणे. (अहि.)

सरोता पु.अडकित्ता.

सरोत्तरी क्रिवि. बरोबरीने; उद्धटपणे; उद्दामपणे : 'बोल बोले सरोत्तरी।'– दास २.१.५२. [सं.]

सरोद–दा पु.एक तंतुवाद्य. यास सात तारा असतात. यास तर्फा असून हस्तिदंती तुकड्याने हे वाजवतात. [सं. शारदा; फा. सरोद्]

सरोदा पु.सलोखा; स्नेह : 'त्याच्या भेटी घेऊन सरोदा करून बंदोबस्ती केली आहे.' – पेद १३.११.

सरोदा–दी पु.भविष्य सांगणारा भिक्षेकरी; डाकोचा; सरवदा.

सरोदिया,सरोदी पु.सरोद हेवाद्य वाजवणारा.

सरोब(भ)री स्त्री.१. बरोबरी; तुलना; साम्य : 'तैं गुणागुणिया धरावी । सरोभरी कीं।'– ज्ञा १८.१९. २. स्पर्धा; चढाओढ; बरोबरी : 'सरोबरी करूं पाहे ।'– स्वादि ३.५.३९. ३. आवेग; उत्कर्ष; भर : 'भक्ताचेया सरोभरी । नव्हे चि काई' – ज्ञा १६.३८.

क्रिवि. १. सारखेच; बरोबर; सारख्या प्रमाणात; समानतेने : 'कीं दोहीं सिद्धी सरोभरी। निपजे यागु ।'– ज्ञा १६.९६. २. आदराने; आवेशाने; वेगाने; भरीस पडून : 'जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरी।'– अमृ १.२. [सं. सम् + परि + बृंह]

सरोरूह न.सरोवरात उगवणारे कमळ; पंकज. [सं.]

सरोवर न.मोठे तळे; मोठा जलाशय. [सं. सरस् + वर] (वा.)० **नहाणे** – सती जावयास निघालेल्या स्त्रीने विधिपूर्वक तळ्यात स्नान करणे.

सरोवरी पहा: **सरोब(भ)री**

सरोसर पु.१. एक शिरोभूषण; एक दागिना. २. घोड्याचा डोक्यावर घालायचा एक दागिना. [फा.]

सरोसरोसा होणे पुरेपुरेसा होणे; नकोसा होणे; थकून जाणे; कंटाळणे.

सरोळा पु.१. पहा : **सारोळा.** २. पहा : **सरवळा**

सरोळी स्त्री. तांदुळाच्या पिठात दूध, मीठ वगैरे घालून सारस्वत लोकात करतात ते एक पक्वान्न. (बे.)

सर्क पु. शिरकाव.

सर्कत, सर्कती, सर्खेल, सर्गरम, सर्गश्त, सर्चश्मा सर्ताज हे शब्द सरकत, सरकती, सरखेल, सरगरम,सरगश्त, सरचश्मा, सरताज या शब्दाखाली पहा.

सर्कस स्त्री. पशू, हिंस्र जनावरे आणि कसरत करणारी माणसे यांचे विविध खेळ दाखविणारी मंडळी. [इं.]

सर्का वि. सरळ; थेट. (झाडी) [सं.सरल]

सर्कावर्का क्रिवि. सरासरीने.(झाडी)

सर्केश वि. आडमुठा; समजुतीवर न येणारा.

सर्कोब तटबंदी किंवा भिंताडे पाडण्यासाठी उपयोगात आणली जाणारी तोफ. हिलाच दिवालतोडी तोफ म्हणतात.

सर्क्युलर न. सर्वांत फिरवावयाचे किंवा सर्वांपर्यंत पोचवावयाचे परिपत्रक. [इं.]

सर्ग पु.१. उत्पत्ती; जन्म; सृष्टी : 'सर्गस्थितिलयकर्ता ज्याचे घेतांचि नांव भवनाशी।'– नगर. २. अध्याय; खंड; प्रकरण. ३. स्वभाव. ४. त्याग. [सं.सृज्]

सर्गलेख पु.(इति.) सृष्टिवर्णन. (इं.) कॉस्मोग्राफी.

सर्ज पु.१. एक प्रकारचे लोकरी कापड. २. घोड्याचे जीन.– ऐको. [इं.]

सर्ज पु.शाल नावाचे झाड. [सं.]

सर्जक वि.निर्मितीला कारण होणारे; निर्मायक. [सं.]

सर्जन न.१. निर्मिती. २. निर्माण करण्याची क्रिया. [इं.]

सर्जन पु. शल्यचिकित्सक; शस्त्रक्रिया करणारा डॉक्टर. [इं.]

सर्जनशक्ती स्त्री. नवनिर्माण सामर्थ्य.

सर्जा पु.१. पहा : **सरजा.** २. एक दागिना; अलंकार; भूषण. ३. सिंह. [फा.शर्झा=गर्जणारा, उग्र (सिंह)]

सर्जा तलाठ्याची म्हणजे त्याच्या कामाच्या जबाबदारीची हद्द.

सर्जि, सर्जिका, सर्जिकाक्षार, सर्जिखार, सर्जेखार पु. सज्जीखार; एक प्रकारचा क्षार. याचा साबणाप्रमाणे उपयोग करतात.

सर्डी स्त्री.कागद; कागदाचे पान : 'रामा, खोलीतील पातळ सर्डी फाडून एक तुकडा आण पाहूं.'– सोमणकृत खेड्यांतील स्वभावचित्रे १५९.

सर्द, सर्द्द, सर्दगर्मी, सर्दार, सर्दी–र्दी हे शब्द सरद, सरदार इत्यादींमध्ये पहा.

सर्द न.खाजणातील पावसाळी भाताचे पीक.

सर्प पु. साप. [सं.]

सर्पटोळी स्त्री.सापटोळी; एक विषारी साप. हा झाडावर बसून मनुष्यावर उडी मारतो.

सर्पदार पु. राजापुढील वेत्रदंडधारी. – ऐको.

सर्पशीर्ष (हस्त) पु. (नृत्य.)हाताची सर्व बोटे एकमेकांना जोडून अंगठा तर्जनीस जोडणे व सर्व बोटे उभी करून थोडी वाकवून हात उभा करणे.

सर्पळी स्त्री.साखळी. (गो.)

सर्पासन न. शलभासनाप्रमाणे जमिनीवर साफ निजून दोन्ही हात छातीच्या बाजूला टेकलेले आहेत व डोके वर केले आहे असे आसन. – संयोग ३५३. [सं.]

सर्पिका स्त्री.खंजीराचा पवित्रा. – प्रश १८. [सं.]

सर्पित(करण) न.(नृत्य.) पाय अंचित करून मागचे बाजूस ठेवणे, हात रेचित करणे, डोके एकदा या बाजूस व एकदा त्या बाजूस वळवणे.

सर्पिल स्त्री.वाटोळी; चक्राकार; मळसूत्रासारखी.

सर्पी स्त्री.लता; वेल.

सर्पीण स्त्री.१. सापाची मादी. २. घोड्याची जीभ काढावयाची खोड.

सर्पोस, सर्फराजी, सर्फा, सर्फेवार, सर्बत इ. शब्द सरपोस, सरफराजी वगैरे शब्दाखाली पहा.

सर्बमोहर वि. मोहरबंद; सीलबंद. [अर.सर्बमुहर]

सर्बारी पु.हमाल; भारवाहक; ओझेकरी. [फा.]

सर्म स्त्री. बायकांची टोपी. (गो.)

सर्मदी वि.शाश्वत.

सर्यत स्त्री.शर्थ; पराकाष्ठा.

सर्रास क्रिवि. एकंदरीने; सरसकट. २.एकसारखे; ओळीने; लागोपाठ.

सर्व वि.१. सगळा; सगळे भाग मिळून. २. प्रत्येकजण मिळून. ३. पूर्ण; संपूर्ण; अवघा; सबंध.

सना. १. गट; जमाव; समूह. २. सगळा काळ, अवधी, विस्तार वगैरे. ३.न वगळता पूर्णांश. [सं.]

सर्वकर्ता वि. उत्पत्तिकर्ता; सगळ्याची रचना करणारा; ब्रह्मदेव.

सर्वकष वि.सर्वांना कसोटीला लावणारा.

सर्वक्रेता पु.(एकदम घाऊक) सट्टा घेणारा.

सर्वत संपत्ती; धन.

सर्वतंत्रस्वतंत्र वि. अनिर्बंध; स्वैर.

सर्वतोपरी क्रिवि.आटोकाट; सर्व प्रकारचे.

सर्वतोभद्र पु.न. १. देवतास्थापनेसाठी काढतात ते विशिष्ट मंडल. २. चारी दिशांना दारे असलेला राजवाडा, प्रासाद, मंदिर. ३. सैन्यरचनेचा एक प्रकार. ४. अनेक प्रश्नांना एकच उत्तर असणारे कोडे. ५. एक प्रकारचे चित्रकाव्य; कोणत्याही बाजूने वाचले तरी एकाच प्रकारची शब्दरचना व अर्थ येईल अशी रचना.

सर्वतोमुख पु. एक सोमयाग, यज्ञ.

वि. सर्व बाजूंनी तोंड असलेला; कोणत्याही बाजूने पाहिले तरी तोंड समोर येईल असा (देवता, पाणी, आकाश, गोल).

सर्वत्र क्रिवि. सर्व ठिकाणी, स्थळी, जागी.

वि. प्रत्येक; सगळे; सर्व.

सर्वथा,सर्वथैव वि.१.सर्व बाजूंनी; सर्व मार्गांनी, दिशांनी, उपायांनी. २. मुळीच; नि:शेष; निश्चित; खचित; केव्हाही : 'मना सर्वथा पाप बुद्धी नको रे।'– राम.

सर्वदा क्रिवि. नेहमी; सतत; सर्वकाळी.

सर्वदा पु. एक भिक्षेकरी. पहा : **सरवदा**

सर्वधन न.(गणित) श्रेढीतील सर्व पदांची बेरीज.

सर्वधर पु.ज्यात प्रवासाच्या सर्व गोष्टी, वस्तू एकत्र बांधता येतात अशी वळकटी. (इं.) होल्डॉल.

सर्वनमसे–स्य वि. सर्व करांमधून मुक्त : 'सर्वनमस्य करुनु दीधले'– पल्लिक ताम्रपट १३.

सर्वनमसेन न.वतन; अग्रहार; बक्षीस. [क. सर्वनमस्य = बक्षीस]

सर्वनाम न.(व्या.) वाक्यात नामाची पुनरुक्ती टाळण्यासाठी वापरण्यात येणारा शब्द.

सर्वनियंता पु.सर्वांवर नियंत्रण ठेवणारा; ईश्वर.

सर्वपाक पु. खीर.

सर्वपित्री अमावस्या भाद्रपद महिन्यातील अमावस्या. या दिवशी सर्व पितरांचे श्राद्ध करतात.

सर्वब्रह्मी वि.सर्व विश्व ब्रह्मरूप आहे असे केवळ तोंडाने बोलून एकंकार करणारा आचारभ्रष्ट.

सर्वमान्य इनाम सर्व कर माफ असलेले, सर्वांना मान्य असलेले इनाम. याबद्दल सनद नसते.

सर्वराष्ट्रीय कायदा राष्ट्राराष्ट्रांतील व्यवहार नियंत्रित करणारा नियम.

सर्वलिंगी पु.कोणताही विशिष्ट पंथ न अनुसरणारा बैरागी. [सं.]

सर्वली स्त्री.चिलखताचे शिरस्त्राण.

सर्वव्रण पु. गळू; करट.

सर्वश: क्रिवि. सर्व दिशांनी, बाजूंनी, मार्गांनी; पूर्णपणे; निखालस.

सर्वशाक–ख स्त्री.१. आले.२.सर्व भाज्या एकत्र करून केलेली भाजी.

सर्वसाधारण रजा नोकरी झालेल्या दिवसांच्या ठरवून दिलेल्या प्रमाणात मिळणारी रजा.

सर्वसोवळा वि. १. नेहमीच शुद्ध, सोवळा, पवित्र. जन्मसोवळा (एखादा मनुष्य स्नान न करताच सोवळे नेसला असता उपरोधिकपणे म्हणतात). २. नेहमीच पवित्र, शुद्ध सोवळे असलेले (रेशमी वस्त्र, धाबळी वगैरे कधीही धुतली नाहीत तरी सोवळी मानण्यात येतात, यावरून).

सर्वस्व न. सर्व धन, संपत्ती, मालमत्ता, चीजवस्तू वगैरे; स्वत:च्या मालकीचे सर्व. [सं.]

सर्वस्वी–स्वे क्रिवि. १. तनमनधनेकरून, सर्व वस्तुमात्रांसह. २. पूर्णपणे; पुरतेपणी; एकंदर; अगदी सर्व प्रकारे; निखालस.

सर्वळा पु. संक्षेप : 'सर्वळेन करीन विनंती : ते परिसा स्मी'–ज्ञाप्र ११४२.

सर्वज्ञ वि.सर्व जाणणारा; त्रिकालज्ञ; पूर्ण ज्ञानी; सर्वसाक्षी.

सर्वंकष वि. १. सर्वांना कसोटी लावणारा. २. समग्र; सर्वव्यापी; सर्वस्पर्शी; सर्वांगीण. ३. निरंकुश (सत्ता).

सर्वात्मना क्रिवि.१. मनोभावे करून; अंत:करणपूर्वक; तनमनधने करून: 'धन कामासि निजमुख सर्वात्मना नाहीं देखा।'– एभा २३.४३५. २. पूर्णपणे; सर्वस्वी; निखालस. उदा. हा सर्वात्मना लबाड आहे. ३. मुळीच; अगदी; केव्हाही, कोणत्याही तऱ्हेने; साफ (नाही–निषेधार्थ शब्दाबरोबर उपयोग) : 'मजपासून ही गोष्ट

सर्वात्मना घडावयाची नाही.'– मइसा ३.३०१.

सर्वात्मवाद पु. सचेतन, अचेतन गोष्टी व नैसर्गिक घटना यांना आत्मा असतो असे मानणारी तत्त्वप्रणाली.

सर्वाबद्ध वि. सर्व तऱ्हेने स्वतंत्र; मोकाट; स्वैर; पूर्ण स्वतंत्र; असंबद्ध; नियमांनी बद्ध नव्हे असे; विसंगत (मनुष्य, चाल, वागणूक, कार्य, काव्य, भाषण वगैरे).

क्रिवि. सर्व प्रकाराने; सर्वस्वी; हरतऱ्हेने; प्रत्येक दृष्टीने.

सर्वांगरोग–वात पु.पक्षघाताप्रमाणे सर्व शरीरास होणारा वातविकार.– योर १.७५५.

सर्वांगासन न.साफ उताणे निजून हात जमिनीवर टेकणे व त्यावर जोर घेऊन खांद्यापर्यंतचा भाग व पाय वर उचलून ताठ करून स्थिर होणे. – संयो ३५०.

सर्वांगीण वि.१. सर्व शरीर व्यापणारा. २. सर्व बाजूंनी विचार केलेला.

सर्वांतर वि. सर्वांच्या अंत:करणात राहणारा.

सर्वांशिक वि. सर्व भागांशी संबंध असलेले; एकदेशीयच्या उलट.

सर्वांशी क्रिवि. पूर्णपणे; सर्व प्रकारे, तऱ्हेने.

सर्वे न.अव. सगळे. (ग्रा.)

सर्वेश,सर्वेश्वर पु. १. परमेश्वर; जगदीश. २. सम्राट; सार्वभौम; सर्वाधीश.

सर्वेसर्वा वि. एकमेव; सर्वसत्ताधीश; सर्वाधिकारी.

सर्वेक्षण न.पाहणी.

सर्वोदयवाद पु.समाजातील यच्चयावत सर्व व्यक्तींची सर्व क्षेत्रांत (शारीरिक, मानसिक व बौद्धिक) उन्नती झाली पाहिजे, असे प्रतिपादणारी विचारसरणी.

सर्वोपरी वि. सर्वश्रेष्ठ; वरिष्ठ; उत्कृष्ट; उत्तम.

क्रिवि. श्रेष्ठपणे; उत्तम रितीने.

सर्वौषधि–धी स्त्री. शतावरी; एक औषधी वनस्पती.

सर्षप पु.१. एक प्रकारची मोहरी; राई. २. वजन करण्याचे सूक्ष्म प्रमाण; मोहरीइतके वजन. [सं.]

सल न.पु.१. शल्य; शस्त्र वगैरेचे टोक; काटा; मांसात रुतलेला अणकुचीदार पदार्थ; कूस. २. गर्भाशयात राहिलेला मृत गर्भ. ३.(ल.) मनात खुपत असलेले अपमान वगैरेचे दु:ख; त्रास, पीडा देणारी गोष्ट. ४. वठलेले झाड, शाखा. ५. पेरलेल्या बीतून फुटलेला कोवळा अंकुर. ६. साल; त्वचा. [सं.शल्य] (वा.) ० **चढणे** – विषाद वाटणे. **सली लागणे** – पोटात सल वाढल्यामुळे झिजून आजारी पडणे.

स्त्री. उसण; कळ; शिळक.

सल–ळ पु. कमरपट्टा; तरवारीच्या म्यानाची दोरी; कातड्याचा दोरा; वादी.– बदलापूर १८७.

सल न.ठाणे; पहारा; संरक्षण : 'तीयें सलें ठेविलीं मज पांतां: सत्ते सांकिकार्चीं:' –रुस्वन ४८३. [फा.;हिं. सलू]

सलक–ख स्त्री. १. सरबत्ती; फैर; शिलग (तोफा, बंदुका वगैरेची). २. पावसाची जोराची सर.

सलकडे न.१. सल अथवा उसण उतरावी म्हणून केलेले धातूचे मंतरलेले कडे. २. पुरुषाने हातात घालायचे सोन्याचे कडे.

सलकी स्त्री. खोरे; फावडे. [क.]

सलग–गी स्त्री. १. पहा : **सलगी**. २. एकसारखी रांग, ओळ. [सं. संलग्न]

सल(लं)ग वि.एकसंधी; जोड नसलेला; बिन सांध्याचा; अखंड; संपूर्ण. [सं. संलग्न]

सलगम न.तांबडा मुळा; मुळ्याच्या आकाराचे तांबड्या रंगाचे कंदमूळ.

सलगी स्त्री.१. मैत्री; दाट परिचय. २. लडिवाळपणा. [सं. संलग्न; क.सलिगे; त. शलिगै]

स(सं)लग्न वि.लागलेले; अखंड; चिकटलेले. [सं.]

सलणे अक्रि.१. बोचणे; टोचणे; खुपणे. २.(ल.) न खपणे; सहन न होणे; डोळ्यात खुपणे; मनाला टोचून, लागून राहणे; रुखरुख लागणे (केलेल्या चुकीची, दोषाची).

सलतन, सलतनत, सलतान, सल्तना स्त्री. न. पु. १. चतुरंग सैन्य; सुसज्ज सैन्य : 'बुणगे व सलतनत दोन कोशांवर उतरले.'– ऐलेसं ९.४७९५. २. राज्य; राजसत्ता; पातशाही; सुलतानी. ३. पसारा; सामानसुमान; रगाडा; बुणगे. [अर. सलतनत, सलतान]

सलद पु.न.१. संदूक; पेटी; तिजोरी. २. शवपेटिका.

सलद, सल(ळ)दे न. बुरणूस वगैरेची ताटी; काटक्यांचे झडप (कुंपण, फाटक याकरता केलेले). (को.)

सलपा पु.सरपण; पातळ लाकूड; लाकडाचा पातळ तुकडा. – लोसाको.

सलब समुद्रातून मोती काढण्याचा व्यवसाय. (तंजा.)

सलम वि.१. पूर्ण; सगळे; अखंड; बिनजोड; निर्दोष. २. ढिला; सैल; शिथिल. ३. धडधाकट; बळकट. – ऐको. [अर.]

सलमा पु.१. मखमल; उंची कापड. २. मऊ जरतार. [अर.सलीमी]

सलवार स्त्री. स्त्रियांच्या पंजाबी पोशाखातील कमरेपासून खाली पायात घालायचा कपडा.

सलंब वि.सलग; लांबच लांब : 'सलंबपणे मुक्तघोसी।'– भाराबाल २३.२७.

सला–ल्ला पु. बोटातील वेढे, वळे; अंगठी.

सला वि.(सांके) (भाजी बाजार) दहा.

सलागता स्त्री.आसक्ती; गुंतवणूक : 'निलाग वृत्तीची कुलकर्णी : सलागता आइके आपुला कानी'– मूप्र १०१८.

सलाअंदीस पु. उत्तम विचार करणारा.

सलाट वि.भरपूर, विपुल, समृद्ध : ' नारंगी सलाट लागल्या'– प्रला १५४.

सलाबत स्त्री. १. छाप; वचक; दरारा; धाक; धास्ती; जरब. २. वर्चस्व; प्राबल्य; उत्कर्ष; दैवाची अनुकूलता.

वि. मजबूत; सुरक्षित : 'तो दुर्ग असाध्य सलाबत.'–भाब ३. [अर.सलाबत]

सलाम पु.मुसलमान लोकात नमस्कार या अर्थी हा शब्द वापरतात.

सलामत स्त्री. सुरक्षितता. –मुधो.

वि. सुरक्षित. [अर.]

सलामाई स्त्री. दिलजमाई; सख्य.

सलामालकी, सलामतकी स्त्री.१. औपचारिक परिचय; नमस्कार-चमत्काराइतकी ओळख. २. नमस्कार-चमत्कार; कुशल प्रश्न.

सलामी स्त्री.१. नमस्कार-चमत्कार; परस्पर कुशल प्रश्न. २. साधारण ओळख; नमस्कारापुरती ओळख. ३. नाममात्र, सलाम करण्यापुरता कर, धारा, वसूल; मुजरा घेण्याइतका कर. ४. प्रथम सामना. ५. भेटीच्या वेळचा बहुमान. उदा. गायकवाड सरकारास एकवीस तोफांची सलामी आहे. ६. कुस्ती, दांडपट्टा वगैरे खेळताना प्रथम मंगलार्थ करायचा हात.

वि. खाली तोंड केलेली (तोफ); (यावरून) वाकलेली, कललेली (भिंत वगैरे).

सलावक्त वि.समयोचित; प्रसंगास योग्य.

सलावणी स्त्री.तमाशातील राधा किंवा नाच्या पोऱ्या. (मूळ शब्द - सलौनी प्रिया)

सलावनी स्त्री. पुटकुळी; लहान फोड. (व.)

सलासैल पु.फेरफटका; प्रवास; मुशाफरी; स्वारी.

सलाहमसला पहा : **सल्लामसलत**

सलिता–दा पु.उंटावरची गोणी; उंटाचे ओझ्याचे खोगीर; भारवेष्टन; बोज्याला बांधायची दोरी. [हिं. शलिता]

सलिल न.पाणी. [सं.]

सलीद–व वि.पातळ; सैल; ढिले. [सं. शिथिल]

सलीपा पु. (नाविक) गलबतातील पाणी (घमत) बाहेर उपसून टाकण्यासाठी केलेली पेटीसारखी जागा. (हेट.)

सलील वि. खेळकर; गमत्या; चेष्टेखोर. [सं.]

सलील वि.सोपे; सुलभ. [अर.]

सलीस वि. १. हलका; बेताचा; सहज झेपण्यासारखा, पेलण्यासारखा; सोसण्यासारखा. २. सोपा; सुलभ. [अर.]

सलुकी–खी वि. शांतताप्रिय.

सलू(लो)क–ख, सलुका–खा पहा : **सलोखा** [अर.सुलुक]

सलून पु.न. १. आगगाडीचा सुसज्ज व स्वतंत्र मोठा डबा. २. हजामतीचे न्हाव्याचे दुकान; केशकर्तनालय. [इं.]

सलेका साजन.- तंजा.

सलो पु. द्वेष; छळ. [सं.छल]

सलोकता स्त्री.चतुर्विध मुक्तींपैकी एक मुक्ती; देवलोकी वास्तव्य. [सं.]

सलोखा पु.१. समेट; मैत्री; सख्य; सरळ भाव. २. तह; शांतता; युद्ध तहकुबी. [अर. सुलुक्]

सलोणी वि. क्षारयुक्त; खारे : 'तक्र पात्र: घृतोदन: सलोणी'-गोप्रच २२.

सलोल वि.१. डोलणारे :'चौपसी चंदनशाखा सलोली:'- रुस्वन ४३३. २. भावुक; भावनाशील : 'हा आणिका भागवतांसारिखा नव्हे : हा सलोल'- लीचपू ४१८.

सल्फर न. गंधक; फिकट पिवळ्या रंगाचे, स्फटिकी आणि अनेक आकार असलेले, पेटल्यानंतर निळी ज्योत देणारे, बंदुकीची दारू, आगकाड्या इ. साठी वापरले जाणारे मूलद्रव्य.

सल्ला पु.स्त्री. १. समेट; तह; युद्धतहकुबी. २. उपदेश; हितवाद; मसलत. क्रिवि. बरे तर. [अर.सलाह]

सल्लागार पु.मंत्र, हितवाद सांगणारा; सल्ला देणारा.

सल्लामसलत स्त्री.विचारविनिमय; खलबत; हितवाद; उपदेश.

सल्ली ल्हेनं १. पैज लावणे; आव्हान स्वीकारणे. २. मैत्री प्रस्थापित करणे. (अहि.)

सल्लेखना विधी जैनधर्मीयाने करण्याचे आमरणांत उपोषणाचे व्रत.

सव पु.१. ऋतू. २. यज्ञ; याग. [सं.]

सव स्त्री.शपथ; आण. [फा.सूव]

सव स्त्री. (अप.) चव; रुची. पहा : **स्वाद** [सं.शेप]

सव–वा बरोबर; सह; सारखी : 'तैसी दशा माथें श्रवण वरि । सव लेहें ।।' - ज्ञा १३.५५७.

सव स्त्री. उत्तरदिशा. [सं. सव्य=डावा]

सवकटा वि. चारी बाजूंनी; भोवतालून: 'पांगरविला सवकटा: मीसें झळंबाचेनिं'-ऋव ४२६.

सवकणे, सवक्रावणे अक्रि.गोडी, चट लागणे; सवय होणे; आसक्ती उत्पन्न होणे; राबता पडणे. [सं.श्रक्]

सवका वि.संपूर्ण; पुरा. [सं.सर्व]

सवका पु.चटक; नाद; व्यसन; छंद; इष्क.

सवखण वि. सबंध; संपूर्ण.

सवगणी स्त्री. पिकाची कापणी.

सवगव माहिती; ओळखपाळख.

सवघड वि. सोपे; सहज होण्यासारखे; सुलभ.

स(सं)वचोर वि. सभ्य दिसणारा चोर; सावचोर.

सवड स्त्री. १. फुरसत; मोकळा वेळ; मोकळीक. २. अवकाश; मोकळी जागा; रिक्त स्थान : 'चक्रधारेचिया सवडी । माजी चंचरला तांतडी ।'- मुआदि ६.८०. ३. जागा; संधी; कूस; फट; छिद्र. ४. जागा; प्रदेश; क्षेत्र; बाजू. ५. (सांके.) सल.[सं. सु + वेला; क. सवडु = विश्रांती]

सवड–डे–ड्या शअ. समोर; पुढे; समक्ष. (राजा.)

क्रिवि. १. तोंडासमोर; समक्ष; अपरोक्ष. २. ताबडतोब; लागलीच. (व.)

सवड(ण)णे उक्रि. १. उरकणे; करून टाकणे; आटोपणे (काम इ.); जमवणे. २. येणे; पडणे : 'आंतुची परी बाहेर सवडें ।' - अमृ ७.११६. ३. समृद्धी येणे, होणे. [सं. सम् + ऋध]

सवडा पु. कातडी; त्वचा : 'सवडा जातु असे आंगिचा'- शिव ८३२.

सवडी स्त्री.१. पहा : **सवड.** २. देखावा; रीत : ' बोलिलों बाहिरसवडिया भंगीं ।'- ज्ञा १०.३०.

सवडी स्त्री. शेवट; अंत : 'म्हणोनि तृप्तीची सवडी । बोलतां न पडे ।'- ज्ञा १०.६०.

सवणे न.पाखरू.(गो.)

सवणे उक्रि. १. पहा : **सवाणणे.** २. देणे; पडणे. उदा. शिव्या सवणे. [सं. सू, सु]

सवत–ती स्त्री. १.सपत्नी; नवऱ्याची दुसरी बायको. २. (ल.) प्रतिस्पर्धी. [सं. सपत्नी; क. सवति]

सवतवणी माघवणी पावसाची लहानशी सर; पावसाचा शिंतोडा; भुरभुर.

सवत(ता)वळा पु.एका नवऱ्याच्या अनेक बायका.

सवत(ता)ळा पु.१. एकाच स्त्रीशी लग्न करू इच्छिणारे दोन किंवा अधिक पुरुष. २. जार; यार; प्रियकर.

सवता वि.वेगळा; निराळा; अलग; तुटक; स्वतंत्र :'तेनी धरला सवता घोर।'-ऐपो ३५२.

सवता क्रिवि. खुद्द; स्वत:. [सं. स्वत:]

सवता, स(सं)वतुकी वि. सारख्या वजनाचे; समतोल.

सवते सार्थक. - ज्ञा १३.५८२.

सवत्या स्त्री. प्रेतदहनानंतर तिसऱ्या दिवशी गंगार्पणासाठी जमा केलेल्या अस्थी. (अहि.)

सवदळणे अक्रि.केरकचरा काढून स्वच्छ करणे.

सवदा, सवदागर, सवदागरी, सवदागिरी, सवदागीर, सवदासूत हे शब्द सौदाखाली पहा. [सं.]

सवदे न.गलबताचा एक प्रकार.

स(सं)वधुर स्त्री.१. समतोल. २.समानता : 'संवधुर बिघडली परब्रह्माची।' -उगी

सवन न. स्त्री. स्वर; ध्वनीची तीव्रता; आवाजाची उच्चता, तारत्व.[सं.]

सवन न.स्खलन; स्रवणे. [सं.स्रवण]

सवनमुख्य वि. पहा : **सर्वनमसे-स्य** : 'व्रिति सवनमुख्य प्रतेपालियतु'- अकलूज शिला १.५.

सवना पु.छोटी खिडकी; झरोका. - लोसाको.

स(सं)वफळ-फळी-फळे पु.स्त्री.न. स्पर्धा; टक्कर; धडक; उडी : 'किंवा सरिसेपणें सूर्यमंडळी । खद्योत घेऊं पाहे संवफळी ।'- स्वादि ६.१.२१. [सं. सम+ फल्]

सवय स्त्री.गाडीची शिवळ.(खा.)

सवय स्त्री. १. अभ्यास; परिपाठ; राबता; सराव. २. आसक्ती; लालसा. ३. तयारी; नैपुण्य; प्रावीण्य. ४. स्वाभाविक वृत्ती. [सं.समय]

सवया स्त्री. समता; बरोबरी; तुलना : 'उपमा देतां सवयां हीणा।'- उषा ७. [सं. समयेन]

सवरणे उक्रि. या धातूचा वाक्यात स्वतंत्र उपयोग होत नाही. इतर धातूच्या रूपापुढे गौण शब्द म्हणून त्याचा उपयोग होतो. यामुळे त्या धातूचा अर्थ जास्त स्पष्ट किंवा पूर्ण होतो किंवा जास्त ठाशीव होतो. उदा. मी देऊन सवरून की हो चोर झालो. [सं. सम + वृ]

सवरणे उक्रि. सावरणे; आटोपणे; आवरणे; आटोक्यात आणणे. [सं. सम् + वृ]

सव(वा)रणे सक्रि.शृंगारणे; शोभिवंत करणे; नीट रचना करणे. [सं. सम् + वृ; हिं. सवारना]

सवरात-थ पु.वि.(अप.) स्वार्थ-स्वार्थी. (व.); सोस; हव्यास. [सं. स्वार्थ]

सवरी वि.उनाड; नि:संग. [सं.स्वैरिणी]

सवर्णन न.(गणित.)निरनिराळ्या जातीच्या पदांना एका रूपात आणणे; चढती किंवा उतरती भांजणी. [सं.]

सवल-ळ स्त्री. प्रात:काळ : 'सूर्यु उदैला देखौनि सवले ।'- ज्ञा १६.२३७. क्रिवि. उद्या; लवकरच; तात्काळ; ताबडतोब.

सवलत स्त्री. १.एकमेकांना सोयीस्कर अशी सवड, सूट. २. सोयीस्कर; सुखावह बाब, गोष्ट; सुरळीत चाललेला व्यवहार; साम. [अर.सुहलत्]

सवसरिसी स्त्री. बरोबर चालणारी; सहचरी : 'संवसरिसी दिवो राती । दोनी जैसी।'- ज्ञा १३.९५९. [सं. सम् + सृ - सर]

सवसा पु.१. साडू; बायकोच्या बहिणीचा नवरा. २.मेहुणा; बहिणीचा नवरा.

सवसाटी स्त्री.१. बरोबरी; साम्य; तुल्यता. २. अदलाबदल. क्रिवि. बदली; ऐवजी :'पागोट्या सवसाटी । दिली रगट्याची गांठी।'- तुगा १३५१. [सं.सम + सत्व, सम + स्था]

सवसाया स्त्री. प्रेतचिन्ह : 'तयाची सवसाया । सांघैन तुज ।'- उगी २०१.

सवसांज स्त्री.सायंकाळ.

सवळ पु.फासा : 'आणि सवळ घालोनिया नेली । आंगीमाजी।'- ख्रिपु २.४९.५१.

सवळ वि. मचूळ. [क.सवुळु]

सवंग वि.१. स्वस्त; थोड्या किंमतीचे. २.वरवरची, उथळ (लोकप्रियता, प्रसिद्धी). [सं. समर्थ]

सवंगाई स्त्री.स्वस्ताई : 'तांदूळ कमोदी तीसबत्तीस शेर याप्रमाणे सवंगाई त्यांजकडे होती.'- भाब ५६.

सवंदा पु.शेतीचे एकत्र काम : 'ढोल व थाळा वाजवून गवत काढण्याचे काम चालतें यास सवंदा म्हणतात.'-खेया. [सं. सम + धा]

सवंद्या पु. संकेत.

सवा पु. प्रकार; पद्धती; तऱ्हा :'म्हणौनि जिया तिया सवा। जीताचि येकी सेवा।'- ज्ञा १८.१६७४. [सं. समय]

सवा वि. पाव पटीनें अधिक; एक पूर्णांक एक चतुर्थांश. [सं. सपाद:; क.]

सवा स्त्री. बाजू; कड. [सं.सम]

सवा क्रिवि. बरोबर; सोबत; अनुसार; प्रमाणे : 'अनुसरलेयासि कर्मसवा भोगु नाहीं:'- लीचउ ३७२. [सं. समम्]

सवाई स्त्री. एक वृत्त, छंद.

सवाई वि. १. सवापट; एक चतुर्थांशाने अधिक. २. वरचढ; सरस.

सवाई निशाणावर लावण्याचे लहान निशाण.

सवाईकी स्त्री. सवाईचे पाढे.

सवाई गवत कागद तयार करण्यासाठी उपयोगी येणारे गवत.

सवाईची दोरी तंबूच्या मधल्या खांबाच्या माथ्याला बांधून दोन अथवा चार दिशांना मेखांना ताणून बांधलेली दोरी.

सवाईची मिती दरमहा, दरशेकडा सवा रुपयाप्रमाणे व्याजाचा करार.

सवाई जमा अवांतर जमा; शेतकरी व इतर गावकरी यावरील एक सालपट्टी अथवा जास्तपट्टी. - गांगा ५६. [सं.]

सवाईसूट–वजा–बाद स्त्री. साऱ्याच्या पंचमांशाची सूट.

सवाओ पु. साह्य: 'दुर्योधनु सवाओं मागों आला'– द्वाली–२८. [सं.सहाय]

सवागी स्त्री. एक क्षार; सुहागी; टाकणखार.

सवागी पु.कसबिणींचा गुरू (सौभाग्य देणारा); एक फकीर. [सं.सौभाग्य]

सवाड वि. १. पातळ; विरळ. २. सपाट; सम; सारखे.(व.)

सवाण वि.सपाट; समपातळीतील.(ना.)

सवाणणे उक्रि.चेंदणे; ठासणे; ठोकणे; खांबाचे नेम, बंदूक यात माती, दारू वगैरे ठासणे.

सवाणा पु.(सोनारी) एक प्रकारचा चिमटा; बारीक चिमटा. [त.शावणम्]

सवाद स्त्री.१. शिवार; गावाभोवतालची शेतजमीन. २. सीमा.[अर.]

सवाद पु.माहिती.(वा.) ०**दरवाडनं** – खोड मोडणे; हात दाखवणे. (अहि.)

वि. निष्णात.(व.) [सं. स्वाद]

सवादपत्र न.१. वादातील मुद्यांची यादी. २. कबुलीपत्र; सलोखापत्र.

सवाद्‌माऱ्या वि.१. खादाड. २. चिकित्सक. (झाडी)

सवान वि. साफ; सपाट, एका पातळीतील (जमीन). (व.)[सं.समान]

सवान स्त्री.स्वर; आवाज; बोलण्याची लकब: 'बाळाभाऊंची सवान स्त्री पार्टीला साजेशी कोमल... असून...'– गणपतराव जोशी १७७.

सवाय वि. (ल.) स्वस्त. (गो.)

सवाय क्रिवि. यथावकाश : 'तवं सवाय दुपाहारी भरली'– शिव ७२१.

सवार–री स्त्री. समा; भरतीची पूर्णावस्था. [सं.सम् + वृ]

सवारी स्त्री. १. पहा : **स्वारी.** २. कुस्तीचा एक डाव. ३. अनेक आसनांच्या वाहनातून जाणारा उतारू.

सवारी पु. १. गायनाचा एक प्रकार. २.तालाचा एक प्रकार.

सवारी स्त्री.मोहरमात पिराचा संचार झालेली व्यक्ती.

सवाल पु.१. प्रश्न; चौकशी; वादपृच्छा. २. खड्या सुरात म्हटलेला उर्दू भाषेतील दोहरा, श्लोक. [अर.सुआल]

सवाल पु.अरबी वर्षाचा दहावा महिना. [अर. सव्वाल]

सवाव वि. सवा, सव्वा. [सं.संपाद]

सवाशीण, सवाष्ण–ष्णी पहा : **सुवासिनी** [सं.सुवासिनी]

सवासा पु.१. सपत्नीक; सुवासिनीचा नवरा. २. मेहूण.– बदलापूर २६९.

सवासा वि.१. सरळ; सोईचा; सुरफाटा. २. अनुकूल. उदा. सवासा फासा पडला व आपल्या मनाजोगे काम झाले. ३. सव्य; उजवा. [सं.सव्य+म. सा]

सवास्या पु.नवरदेवाचा सोबती.(झाडी)

सवाहाती स्त्री.(खाटिक) मेंढीचे आतडे (हे सव्वा हात लांब असते यावरून).

सविकल्प समाधि–धी जाणीव न हरपता लागणारी समाधी; ज्ञानयुक्त अत्यानंदाची अवस्था. [सं.]

सविकार वि.१. कुशल; चतुर : 'भोई पाठविले सविकार।'– नरुस्व. २. विकार उत्पन्न करणारा; सुंदर :'गळां मोतियांचे लेणे सविकार।'– नरुस्व ९५. [सं.]

सविध वि. सजातीय; सधर्मीय; सवर्ण; एकाच जातीचा, प्रकारचा. [सं.]

सविनय कायदेभंग स्वत: अनत्याचारी राहून व प्रतिकार न करता सरकारचे जुलमी कायदे मोडण्याची कृती.

सविया क्रिवि. १. सहज; साहजिकपणे :'तये काशीपुरी जावया । तीन मार्ग योजिले सविया ।' – स्वादि १०.४.५८. २. आपोआप; तत्काल: 'आंग मन विरमे । सवियाची।'– ज्ञा ६.२१२. ३. स्वभावत: : 'आणि अनुष्ठिता प्रांजला। सवियांचि।'–ज्ञा ५.७. [सं.स्वयम्]

सविवळ–र,सविशेष वि. क्रिवि. सविस्तर; स्पष्ट; विस्तारपूर्वक; खुलाशासह; विवरणपूर्वक: 'आणि आर्धीचीं हीं मूळें । उपपत्ती परि सविली सविवळें।'– ज्ञा १५.२०९. [सं. स+ वि + वृ]

सविस्तर वि.क्रिवि. १. विस्तारासह; विस्तृत. २. तपशीलासह; बारीकसारीक माहितीसह.

सवे पु.समय; वेळ; काल. [सं. समय]

सवे स्त्री.सवय : 'सवे ते काइसेयाचीही न होआवी'– लीच ३४८१.

सवे,सवेच–चि शअ. क्रिवि.१. बरोबर; सह; समागमे. २. आपण होऊन; स्वत:च; आपोआप. ३. लगेच; लगोलग. [सं.सम, समेत, सहित, सम]

सवेच वि.खर्च होणारे; झिजणारे; नाशवंत :'रूप सवेंच नाम निर्वेच ।'– रवि १६.९९.

सवेण्या स्त्री. अव. रासन्हाणी; लग्नसमारंभात विहिणीबरोबर वराकडील स्त्रियांना वधूकडील स्त्रियांनी स्नान घालण्याचा समारंभ. (को.)

सवेशा–सा स्त्री. स्वत:ची इच्छा. [सं. स्व + इच्छा]

सवेळ, सवळ स्त्री. प्रात:काळ; सकाळ; प्रभात : 'न पहतां सवेळे । मानसरोवरीचीं कमळें ।'– शिव ७८६.

क्रिवि. तत्क्षणी; तत्काल : 'सवळैचि वियोग पडेल।'–ज्ञा १७.७७०. [सं. सु + वेला]

सवैल पु. सहचर; सोबती; शेजारी : 'सवैल गोवळे नानापरी।'– दाव ८३.

सवो पु.बोहले; वधूवरांना बसण्याकरता केलेली जागा. (गो.)

सव्य पु.१. डावा हात. २. (चुकीने) उजवा हात.

वि. १. डावा; उजवा नव्हे तो. २. उलट; विरुद्ध; मागचा. ३. दक्षिणेकडील. ४. (चुकीने रूढ) उजवा; दक्षिण. (वा.) ०**, सवीये घालणे** – प्रदक्षिणा घालणे; उजवीकडे ठेवून फिरणे. [सं.]

सव्य(व्या)गत क्रिवि. स्पष्टपणे; उघडपणे; स्वच्छपणे (दिसणारा).

सव्यय वि.(व्या.) विभक्त्यादी प्रत्यय लागतात असा (शब्द). याउलट अव्यय. [सं.]

सव्यसाची वि.डाव्या व उजव्या दोन्ही हातांनी सारखेच काम करणारा, युद्ध करणारा; (ल.) अत्यंत निपुण.

सव्यापसव्य न. श्राद्धाचे वेळी जानवे उलटसुलट करावे लागते यावरून उपद्व्याप; नसती उठाठेव; यातायात; खटपट. ०**लिहिणार** – मराठी व फारशी लिहिण्यात वाकबगार.

वि. डावा उजवा; उलटसुलट; शुद्ध अशुद्ध; बरोबर व चुकीचे : 'सव्यअपसव्य भोवंडी गदा ।'– एरुस्व ९.४८. [सं.]

सव्वा, सव्वाइकी, सव्वाई, सव्वाल इत्यादी शब्द सवा, सवाई इत्यादी खाली पहा.

सव्वाल पु.परशूप्रमाणे एक हत्यार. हे कुऱ्हाडीसारखे वापरतात.

सव्वाशी स्त्री. सरळ.

सव्वीस वि. २६; वीस अधिक सहा ही संख्या. [सं.षट् + विंशति]

सशक्त वि. बलवान; बलिष्ठ; मजबूत; समर्थ; बळकट; जोरदार. [सं.]

सशेमिरा पु. १. हक्क. २. हट्ट. पहा : **ससेमिरा**

सश्रीकता स्त्री.तेजस्विता; शोभा; सौंदर्य; वैभव. [सं.]

सश्रुषित पु. शुश्रूषा करणारा पुरुष सेवक : 'मज अक्षमासि सश्रुषित दे कां ओ'– श्रीकृच ५७. [सं. शुश्रूषक]

सष्ट वि. विपुल; पुष्कळ : 'पूर्वी सष्ट पुण्य केले'– विद २.

सष्टम वि. मोठा; सुंदर; सुरेख; ठळक (दागिना, भांडे, वस्तू); धड; मजबूत; बळकट (कापड, कागद अथवा इतर वस्तू).

क्रिवि. यथेच्छ; खूप; दोन्ही कुशी ताणेपर्यंत. (व.) [सं.सत् + तम्]

ससकर पु.१. रेव;वाळू; खडे (धान्य वगैरेमध्ये मिसळलेले). २. मिसळलेले धान्य; गदळ असलेले धान्य.

वि. मिसळलेले; गदळ असलेले; खडेमिश्रित.

ससग(गा)णी स्त्री.१. दुंडा, ढबू पैसा. पहा : **सजगणी.** २.सहा रूके; जमिनीचे एक माप.

ससणे अक्रि.झोपणे; निजणे : 'कां नीद ससौनी गेली। जाग्रती नाहीं चेइली ।' – अमृ जुनी पोथी ५७५.

ससत पु.वंश. (गो.)

ससनणे सक्रि.बोलणे. – मनको.

ससंबंधिक, ससंबंधी वि.परस्परांशी संबंध असलेले, निगडित.

ससा पु.१. विशेषत: पांढऱ्या रंगाचा, पुढच्यापेक्षा मागचे पाय लांब असलेला, केसाळ कातडीचा मोठ्या कानांचा, उड्या मारत चालणारा प्राणी. २. ससाण्याचे संक्षिप्त नाव. [सं.शशक] (वा.) ० **जा वशा–** सशाला कोणीही अपाय करू शकतो. तो सर्वांना वश असतो. याप्रमाणे मनुष्य आपल्या स्वाभाविक, नैसर्गिक प्रवृत्तीप्रमाणे काम करतो.

ससाकुत्रा पु.मुलांचा एक खेळ.

ससाणा पु.एक मांसाहारी शिकारी पक्षी; बहिरी ससाणा. [सं.श्येन:]

ससाणे वि. लखलखीत. – भा. अ १२ ओ ५८२.

ससेटा पु.लोट; प्रवाह : 'नीर ससेटे वाहती नेत्रास ।'– नव १५.१७.

ससेधोके न. सशासारखी, एकसारखी भीती वाटणे.

ससेमिरा पु.१. एक प्रकारचे वेड : 'माझ्या शापाने तुला ससेमिरा या अक्षरांचे वेड लागेल'– सिंहासनबत्तिशी. २. तगादा; शुक्लकाष्ठ. ३. काळजी; हुरहुर.

ससेहोलपट स्त्री.सशाची शिकार करताना चहूबाजूंनी कुत्री सोडून त्याला सळो की पळो करून टाकण्याची क्रिया; (शत्रूला नामोहरम करण्यासाठी) चहूबाजूंनी चढाई करणे.

ससोरा पु.घसा; गळा; मानगुटी.(क्रि.धरणे.) [सं.श्वस्]

सस्तन वि. स्तनयुक्त; ज्याला आंचूळ आहेत असे (प्राणी). [सं.]

सस्य न.१. सामान्यत: वृक्षाचे फळ, पण धान्य, पीक या अर्थाने जास्त रूढ; विशेषत: भात. २. धान्याचे रोप : 'कां फळीं सरे वाढणें। सस्याचें जेवीं।' – ज्ञा १८.७७५. [सं.]

सस्यू पु. वर्णाश्रम. – मनको.

सह वि.तीन. – आदिलशाही फर्माने. [फा.]

सह वि. सहन करणारा; सोसणारा. (या अर्थाने समासात उत्तरपदी योजतात.) उदा. दु:सह. [सं. सह]

सह उपसर्ग. याचे पुढील अर्थ आहेत. १. संगती; संबंध; साहचर्य. २. जोड; संयोग: योग. ३.वाढ; आधिक्य. ४. पूर्णता; पुरतेपणा; संपूर्णता.

क्रिवि. बरोबर, संगतीने; जोडीने. [सं.]

सहकार–कारिता– कार्य, पु.स्त्री.न. एका हेतूने प्रेरित होऊन एकमेकांना मदत करणे.

सहकारी पु.साहाय्यक; मदतनीस; सोबती; भागीदार; जोडीदार.

सहगमन न.१. सती जाणे; पतीबरोबर स्त्रीने त्याच्या चितेवर जाळून घेणे; पती दूर मरण पावल्यास त्याची पिंपळाच्या पानांची वगैरे प्रतिमा करून त्या प्रतिमेसह सती जाणे. २.(सामान्यत:) बरोबर, सोबत जाणे.

सहचर पु.१. सोबती; सांगाती;मित्र. २. नवरा.

वि. बरोबर जाणारा.

सहचारिणी, सहधर्मचारिणी,सहधर्मिणी स्त्री. धर्मपत्नी; लग्नाची बायको.

सहज वि.१. बरोबर झालेला; बरोबर निपजलेला, उत्पन्न झालेला; एकाचवेळी असलेला. २. सख्खा भाऊ; सहोदर; एकाच आईच्या पोटी जन्मलेला. ३. स्वाभाविक; जन्मजात; जन्मापासून असलेला; स्वभावज. ४. (ल.) सुलभ; सोपे; स्वाभाविक; निसर्गसिद्ध. [सं.]

क्रिवि.१. कोणताही हेतू, उद्देश मनात न धरता; काही विशेष कारण नसताना. २. विशेष प्रयत्न न करता. ३. विशेष प्रसंग नसता.

सहजकला–ळा स्त्री.स्वाभाविक शक्ती.

सहजता स्त्री.स्वाभाविकता; सहजपणा.

क्रिवि. स्वभावत: 'आपण सहजता पूर्णकाम।'– तुगा ६३०.

सहजशक्ती स्त्री.१. स्वाभाविक शक्ती. २.बुद्धीची ईश्वरी देणगी.

सहजसमाधि–धी स्त्री.मनाची समाधानी वृत्ती; स्वाभाविक आनंदी व समतोल मनोवृत्ती; मायिक उपाधीतही स्वरूपी लीन असण्याची अवस्था.

सहजीवन न. अनेक लोकांनी, गटांनी किंवा देशांनी एकमेकांशी भांडणतंटा, कलह किंवा युद्ध न करता शांततेने जीवन जगणे.

सहणि पु.सेनानी; मंत्री : 'स्रिमतु भायसहणि क्रिदान्त सोमैय सहणि'– अकलूज शिला १२.३फ [सं. सैन्य]

सहणे अक्रि. सहन करणे; सोसणे. [सं. सह]

सहनशील वि.सोशिक स्वभावाचा; सोसणारा; सहिष्णू.

सहपत्र न. मूळ कागदाला जोडलेले दुसरे पत्र. (इं.) एन्क्लोजर.

सहभाव पु.दुसऱ्याच्या भावना कल्पनेने जाणून घेऊन त्यात एकरूप होण्याची क्षमता.

सहभोजन न.पंक्तिव्यवहार; एकत्र जेवणे; एका पंक्तीत बसून जेवणे.

(जातिभेद मोडण्यासाठी मुद्दामहून आयोजित केलेल्या संमिश्र जातीच्या भोजन समारंभांना हा शब्द लावीत असत.)

सहमती स्त्री.अनुमती; स्वीकार; मान्यता.

सहम तीर; बाण. अनेकवचन- सिहम.

सहमंत्रण न.(मानस.) व्यक्तिमत्त्वाशी निगडित समस्यांचा अभ्यास करून योग्य तो सल्ला देणे; उपबोधन.

सहयात्रा पहा : **सहगमन**

सहयोग पु.१. संगती. २. साहचर्य. ३. सर्व प्रकारचे सहकार्य.

सहराजकता स्त्री. अनेकांचा अधिकार, राजवट असण्याची स्थिती.

सहल स्त्री. १. रपेट; फेरफटका; मोकळ्या हवेत मजेने हिंडणे-फिरणे. २. फेरी; चक्कर; दौड (घोड्याला दिलेली). [अर.सैर]

सहल वि. क्रिवि. सहज; सुलभ; सोपे; सोईस्कर; जुजबी. [अर.]

सहलशिकार स्त्री.मर्दानी खेळ.

सहवाणु न.संवाहन; पाय दाबणे, चेपणे, रगडणे : 'वीडा देऔनि श्रीचरण सहवाणु। करतांतीं।'-दाव ३०९. [सं. संवाहन]

सहवास पु.१. एकत्र राहणे; एका ठिकाणी राहणे. २. परिचय; मैत्री; संगत. [सं.]

सहविकार पु.(न्याय.) विगमनाचा एक प्रकार; एका वृत्तातील विकारावर दुसऱ्या वृत्तातील विकार अवलंबून असणे.

सहसंगीत न.गाण्याबाजवण्याची बैठक; जलसा. (इं.) कॉन्सर्ट.

सहसंवेदन न.दूर अंतरावर असलेल्या दोन व्यक्तींच्या मनात एकाच वेळी सारखाच विचार येणे, एकाच प्रकारची स्फूर्ती येणे; विचारांची देवाण घेवाण होणे;(इं.) टेलीपॅथी.

सहसा क्रिवि. १. एकाएकी; घाईने; अविचाराने. २. बहुशः; बहुतकरून; बहुधा; हजार हिश्यांनी; कदापि; किमपि; कधी. [सं.]

सहस्र वि.एक हजार. [सं.]

सहस्रचंद्रदर्शन न. वयाला एकोणऐंशी (७९) वर्षे पूर्ण झाल्यानंतर करण्यात येणारी सहस्रचंद्रदर्शन शांती. (७९ वर्षात सहस्र पूर्णचंद्र दर्शने कशी होतात याचा थोडक्यात हिशोब. ७९ X १२=९४८+२८ अधिकमासी + कमीत कमी २४ खग्रास चंद्रग्रहणे = १००० चंद्रदर्शन. - व्यामको.) सामान्यत: वयाची ८१ वर्षे पूर्ण झाल्यानंतर केली जाणारी शांती.

सहस्रदल न.१. कमळ. २. ब्रह्मरंध्र; ब्रह्मदल. [सं.]

सहस्रनाम न.१. हजार नावांचा संग्रह, यादी (विष्णू, शिव इत्यादी देवतांची हजार नावे एकत्रित केलेला श्लोकसंग्रह.). २. विष्णू, शिव वगैरे देवतेस तुळस, बेल, दूर्वा वगैरे वरीलपैकी एक एक नाव घेऊन वाहण्याचे व्रत.३.(ल.) अपशब्द; शिव्या.

सहस्रफळ न.एक दोडक्यासारखे भाजीचे फळ व वेल.

सहक्षेपण न.(आकाशवाणी) एखादा कार्यक्रम दोन किंवा अधिक केंद्रांवरून प्रसारित करणे.

सहा वि. ६ ही संख्या.

न. अव. सहा शास्त्रे : 'तो हा पंढरीचा राणा । पुसा सहा चौ अठरांजणां!'- तुगा २५३९. [सं.षट्]

सहाण स्त्री.१. गंध वगैरे उगाळण्याचा कुरुंदाचा दगड. २. शस्त्राला धार लावण्याचा दगड. [सं. शाण]

सहाण न. गाय, म्हैस वगैरे पशूंचे जननेंद्रिय. (व.) [सं.सृ=प्रसवणे]

सहाण वि.लहान. पहा : **सान**

सहान वि. स्वच्छ; निर्मळ.

सहान-की पहा : **सानक-की**

सहानुभूति-ती स्त्री. दुसऱ्याच्या सुखदुःखाची विशेषत: दुःखाची मनाला होणारी जाणीव. [सं.]

सहा महिन्यांची जांभई अतिशय विलंब लागणारी गोष्ट.

सहामासकी-मास्की स्त्री.१. सहा महिने टिकणारी माठ भाजीची एक जात. २. वर्षातून सहा महिने दूध देणारी म्हैस.

सहामाही स्त्री. सहा महिन्यांचा कालावधी.

सहाय-य्य,सहायता न.मदत; साह्य; हातभार. [सं.]

सहायक वि.१. मदत करणारा; मदतनीस. २. प्रत्यक्ष भाग न घेता सहायभूत असणारे. ३. एखाद्या वस्तूबरोबर येणारे किंवा कार्यक्षमता वाढवण्यासाठी लागणारे (इतर भाग किंवा वस्तू). [सं.]

सहाय्यकारी वि. पूरक.

स(सा)हारा पु.१. अवकाश; सवलत; फुरसत; वाव; धीमेपणा. २. आश्रय; आसरा.

सहावणे अक्रि.सहन होणे.

सहासष्ट वि. ६६ ही संख्या. [सं.षट्षष्टि]

सहित वि. १. बरोबर, संगतीत असलेले; जोडून असलेले.

शअ. संगत; बरोबर.

सहिष्णु-ष्णू वि.सहनशील; सोशिक; क्षमाशील. [सं. सह + स्नु]

सही स्त्री.सखी; मैत्रीण. [सं. सखी]

सही स्त्री. स्वाक्षरी; स्वत:च्या हाताने लिहिलेले स्वत:चे नाव; बरोबर असल्याबद्दलची निशाणी, दस्तखत. (वा.) **० करणे** - १.नक्की करणे : 'एकशें शिक्का रूपयास ग्रंथ कोतवाल यांनी सही केला असता...'-मइसा ७.२२. २. नियुक्त करणे. ३. मान्य करणे; ठेवून घेणे. ४. जिंकणे.

वि. योग्य; मान्य; खरे; बरोबर; अचूक; पूर्ववत.

क्रिवि. पुरेसे; लाभात. [अर. सहिह्]

सही 'खरे असे'. हा शब्द महजरादिकांच्या किंवा साक्षी-पत्रादिकांच्या शेवटी येतो.

सही स्त्री.गोट्यांच्या खेळात केलेला खड्डा; बदा; या खड्ड्यात गोटी टाकण्याची क्रिया.

सही सलामत वि. सुखरूप; सुरक्षित.

सही सही क्रिवि. १. तंतोतंत; हुबेहूब. २. हळूहळू; हलके हलके.

सहृदय वि. १. दयाळू; प्रेमळ. २. आवड, प्रवृत्ती असलेला. [सं.]

सहे वि. क्रिवि. मान्य; संमत.

सहेतू, सहेतुक वि. १. हेतुपुरःसर; सकारण केलेले. २. (मानस.) ऐच्छिक. ३. (समाज.) विवेकपूर्वक. (इं.) रॅशनल.

सहेली स्त्री. फकिरांच्या गळ्यातील माळ; सैली.

सहेली स्त्री. सखी; मैत्रीण. [सं. सहचरी; हिं.]

सहोक्ति–क्ती स्त्री.एक अलंकार; मुख्य गोष्टीबरोबर आनुषंगिक गोष्टींचा चमत्कारजनक उल्लेख.

सहोढ–द पु.विवाहाबरोबर येणारा मुलगा; आधीच्या पतीचा किंवा उदरात असणारा मुलगा; द्वादशविध पुत्रांपैकी एक.

सहोदर वि. एकाच आईच्या पोटी जन्मलेला; सख्खा; एकोदर; समानोदर.

सह्य वि. सहन करता येण्यासारखा; सहन करण्यास योग्य.

सळ पु. १. छळ; संकट; पीडा; गांजणूक. २. घडामोड; कटकट; सुखदुःख. [सं.छल्] (वा.) **सळो का पळोसे करणे** – अतिशय त्रासून सोडणे.

सळ पु. १. आग्रह; हट्ट; अभिमान. २. आवेश; उसळी; झपाटा; बळ.

सळ–ळा न.पु.द्वेष; वैर; दावा; वाकडेपणा.

सळ न.१. पहा : **सल** १. २. पीक कापल्यावर उरणारा धस; सड; कापलेला बुडखा किंवा त्याला फुटलेला अंकुर. [सं. शल्य]

सळ पु.१. पहा : **सळण** २. (सामान्य) बारीक वादी (कातडे शिवण्याची). [सं.शलाका]

सळ पु.स्त्री. घडीची दुमड; मोड, रेषा. [सं.शलाका]

सळ स्त्री. (सोनारी) सोन्याची लगड. [सं. शलाका]

सळई–य–यी स्त्री. १. सुई; बारीक तार; लोखंडाची वगैरे बारीक काडी; ताडी; टोचणी; भोसकणी. २. मुसळाचे गोल लांब लाकूड; लोखंडी गज, पहार. ३. मुगट्यातील विणीच्या रेषा. ४. कडबा, गवत, फळे वगैरे मोजताना दर शेकडा वगैरे ठरावीक मोजून झाल्यावर बाजूला काढून ठेवलेली पेंडी वगैरे. (यावरून एकंदर माप किती झाले हे ठरवता येते.) भात मोजताना आठवणीकरता ठेवलेली पुंजी. ५. कारूनारूंना आपल्या जातिविहित कसबानुसार केलेल्या कामाचा कुणब्यांकडून वंशपरंपरागा मिळणारा पिकाचा वाटा. [सं. शलाका; हिं. सलाई](वा.)**सळ, सळई धरणे** – गणती, हिशेब करणे; मोजणे.

सळक स्त्री. तोफांची सरबत्ती; बंदुकांची फैर; शिलग. [ध्व.सळ]

सळक स्त्री.शिलका; कळ; उसण. [सं. शल्य; क. सुळुक = वाताने आलेला गोळा.]

सळक स्त्री.हद्द; मर्यादा; रेषा : 'पर्वता भोवत्या सळक घालिजे।'– ख्रिपु१.१८.२९.

सळकण–कन–कर–दिन–दिनी–दिशी क्रिवि.सळसळ असा आवाज करून.

सळकणे अक्रि. १.सळसळ आवाज करणे; सापाप्रमाणे सर्रकन निघून जाणे. २. घसरणे; निसरणे. ३. गुपचूप निघून जाणे; सटकणे; निसटणे. [ध्व.]

सळका पु.१. सणका; शिवशिव; रवरव; खवखव; कंडू; खाज (दाताने चावण्याची, अतिशय खाजवण्याची वगैरे इच्छा होऊन सुटणारी). २. जोराची पावसाची सर. [ध्व.सळा]

सळडण न.घरावरील कुजके गवत.(व.)

सळणे अक्रि.१. सळसळणे; उकळी फुटणे; खतखतू लागणे. २. सळक लागणे; रवरवणे; खवखवणे; शिणक लागणे. [ध्व.]

सळणे अक्रि.१. छळणे; गांजणे; त्रास देणे. २. भिणे; भयभीत होणे : 'जयाचेनि नांवें सळे । महाभय।'– ज्ञा १६.४१८. [सं. छल]

सळदे न.शिऱ्यांचा झापा; कुंपणाकरता काट्याकुट्या बांधून तयार केलेले झडप.(को.)

सळनळीत, सळनळ वि. १. सरळ; थेट; ताठ; सीधा; संधिरहित. २. अगदी; निःशेष.

सळ(ळं)प न.स्त्री.लाकडाची ढलपी; किलची; चीप; कुळपटा. (राजा.) [सं. च्छाल]

सळपा पु.लाकडाचा ठोकळा; मोठा ढलपा; उसळपा.

सळय स्त्री.विटीदांडूच्या खेळातील एक संज्ञा.

सळवठा पु.खराटा; पहा : **सळाथी**

सळवंगी वि. कपटी; गर्विष्ठ; लबाड : 'सळवंगेआं देवांचां जगथापु ।'– शिव १५४. [सं. छल + अंगी]

सळसळ स्त्री.१. गवत, पान, रेशमी कपडा यांचा सळ असा आवाज; उकळी; खदखद. (क्रि. करणे, वाजणे.) २. शिवशिव; रवरव; कंडू (जखम, गळू वगैरेची); तडस; मुसमुस (भरलेले स्तन वगैरेची); चुरचुर; खवखव; शिवशिव (दात, जीभ वगैरेची). (क्रि. सुटणे). [ध्व.]

सळसळ–ळा–सळाळा,सळासळा क्रिवि. १. सळसळणारा आवाज करून (आधण, झाडांची पाने वगैरे). (क्रि.वाजणे, करणे.). २. थरथर, धडधड वगैरे आवाजासारखे. [सं.]

सळसळणे अक्रि.१. उकळणे; खदखदणे; उसळणे (पाणी, रक्त इ.). २. शिवशिवणे, रवरवणे; खाज सुटणे (खरूज, गळू इ.). ३. तटतटणे; हुळहुळणे; मुसमुसणे (भरलेले आचूळ, स्तन, स्तनाग्रे इ.). ४. शिवशिवणे; खवखवणे (दात, हात, पाय, जीभ – चावण्याकरता, मारण्याकरता, खाण्याकरता). ५. कुडकुडणे; थरथरणे; शिवशिवणे (थंडी, आंबट पदार्थ वगैरेमुळे – दात वगैरे). [ध्व.]

सळसळा पु. शिरीषाचे झाड (याच्या शेंगांचा आवाज होतो त्यावरून). (राजा.)

सळसळीत वि. गुळगुळीत; तुळतुळीत; तकतकीत.

सळा स्त्री.तारेची सळई. भोसकणी; लोखंडाची काडी, कळकाची वगैरे अणकुचीदार काडी, ढलपी. [सं. शलाका]

सळाक–ख स्त्री. सळई, गज. [सं. शलाका]

सळाथी स्त्री. हिरांची केरसुणी, झाडू. (को.)

सळाळ पु. १. द्रवपदार्थ उकळताना होणारा सळसळ आवाज. २. सरपटण्याचा आवाज. ३. फुत्कार; डुरकण्याचा वगैरे आवाज.[ध्व.]

सळाळणे अक्रि. सळसळणेपेक्षा अधिक तीव्र. १. उकळताना सळसळ आवाज करणे. २. जोराने, मोठ्याने फूत्कार टाकणे (सापाने वगैरे). ३. मोठ्याने डुरकणी फोडून, गर्जना करून अंगावर चाल करून जाणे. ४. जोराने म्यानातून काढणे (तरवार वगैरे); जोराने सरपटत जाणे; जोराने निसटून जाणे.

सळिवे, सळीव न. सरवळा, शेवई, गव्हला यासारखे खाद्यविशेष.

सळी पहा : **सळई**

सळी स्त्री. हाव; ईर्षा. [सं. शल्य]

सळी स्त्री. कुचाळी; कुभांड. [सं. छल]

सळे–ळा स्त्री. १. वादी; शिवायचा दोरा. २. मापाची पट्टी; वादी. ३. सळई. [सं. शलाका]

सळे क्रिवि. १. सत्वर; त्वरित; एकदम. २. आवेशाने; चिडीने; रागाने.

सळै पटवेकऱ्यांचा एक विशिष्ट हक्क.

सक्षम वि. कार्यक्षम; समर्थ; एखादे काम करण्यास योग्य.

सज्ञान वि. १. शहाणा; हुशार; जाणता. २. (कायदा) वयात आलेला; १८ वर्षे पूर्ण झालेला.

संकट न. अडचण; कठीण प्रसंग; प्रतिकूल परिस्थिती; विवंचना; आपत्ती; अरिष्ट; त्रास.[सं.] (वा.) **०घालणे** – एखादी वस्तू मिळावी यासाठी हट्ट धरणे; देवाला नवस करणे, साकडे घालणे.

संकट वि. अरुंद, संकोचित, अडचणीची (जागा, स्थल).

संकणे उक्रि. लाजणे; संकोचणे : 'गोसावी स्त्रीचरणीचा आंगुठा तयांचा निडली लाविला : आणि तीये संकली' – लीचउ

संकथन न. १. एकमेकांशी केलेले संभाषण; संवाद. २. (ल.) सभा; संमेलन. [सं.]

संकर पु. १. भिन्न जातींच्या अनेक पदार्थांचे मिश्रण; मिसळ; सरभेसळ. २. अनेक पदार्थ, वस्तू एकत्र होऊन बनलेला पदार्थ, जाती इत्यादी. (समासात) वर्णसंकर; जातिसंकर. भिन्न बीजपेशींचे मिश्रण. [सं.]

संकर अलंकार (साहित्य.) एकाच पद्यात दोन किंवा अधिक अलंकार येणे.

संकर क्रिया एखाद्या जातीचा चांगला गुणधर्म दुसऱ्या जातीत विशिष्ट पद्धतीने संक्रमित करणे.

संकर जाति–ती ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र या चार जातीतील अनुलोम-विलोम अशा प्रकारच्या संबंधापासून, विवाहापासून उत्पन्न झालेली जात.

संकरट, शेंक्रट न. वाळवंट. (गो.) [सं. शर्करा = वाळू]

संकरण न. (स. शा.) (मानवेतर प्राण्यांची) मिश्र पैदाशीचे जनावर जन्मास आणण्याच्या हेतूने एकाच जातीच्या पण भिन्न वंशाच्या नरमादींचा संभोग घडवून आणणे. (इं.) क्रॉसिंग. [सं.]

संकरावस्था स्त्री. आत्यंतिक गोंधळाची स्थिती.

संकर्ष पु. १. संबंध; संघटन; लगट. २. लढा; संघर्ष. ३. ओढ; ताण; आकर्षण. [सं.]

संकर्षक बिंदू–केंद्र वि. १. ज्या बिंदूकडे अनेक वस्तू आकर्षिल्या जातात असा बिंदू. २. ज्या बिंदूत अनेक किरण वगैरे एकत्र होतात असा बिंदू. (इं.) फोकस. [सं.]

संकर्षण पु. (योग.) चार व्यूहातील एक व्यूह.

न. १. आकर्षण;ओढ; खेचण्याची क्रिया. २. जमीन इत्यादी नांगरण्याची क्रिया. [सं. सम्+ कृष्]

संकलक पृष्ठ सौरऊर्जेचा मोठ्या प्रमाणावर वापर करताना सूर्याचे किरण संकलित करून परावर्तीत करण्यासाठी वापरतात तो पत्रा किंवा तसेच दुसरे साधन.

संकलन न. १. अनेक संख्यांचे, वस्तूंचे एकत्रीकरण; बेरीज; मिळवणी. २. मिश्रण. ३. अनेक वस्तू एका जागी रचून केलेली रास. ४. संचय; संग्रह. ५. (चित्रपट क्षेत्र) वेगवेगळ्या ठिकाणी चित्रित केलेले भाग सुसूत्रपणे व प्रभावीपणे एकत्र करणे. (क्रि.करणे) [सं.]

संकला पु. डोळे उष्णतेने लाल होण्याचा घोड्याचा एक विकार.

संकलित वि. १. एकत्र जमा, गोळा केलेले. २. मिसळलेले. ३. विस्तार कमी करून थोडक्यात आणलेला; संक्षिप्त; सारांश रूपाने थोडक्यात लिहिलेला (ग्रंथ, भाषण). [सं.]

संकल्प पु. १. मनोदय; हेतू; मनातील विचार, इच्छा. २. निश्चय; निर्धार; एखादी गोष्ट करून दाखवीनच असा ठाम निश्चय, प्रतिज्ञा : 'मारितो अरीला ...प्रभुजी संकल्प हा मनें वरिला।' – मोकर्ण ४३.४२. ३. एखादे व्रत, संस्कार, विधी इत्यादींना आरंभ करतांना अमुक एक फल मिळावे म्हणून मी हे कर्म करतो अशा प्रकारे त्या कर्माचा उच्चार करून हातात पाणी घेऊन ते सोडण्याची क्रिया; एखाद्या तीर्थाच्या ठिकाणी स्नान करताना, एखादी वस्तू दान करताना किंवा ब्राह्मण भोजनारंभीही असे उदक सोडतात. ४. मानसिक कर्मप्रवृत्ती; मनोविकार; वासना : 'घेऊनि विद्याशस्त्र लखलखित। संकल्प पशूचा करूनि घात।' – एभा १९.७६. ५. अंत:स्फूर्ती; स्फुरण : 'मूळ माया जाणीवेची। मूळींच्या मूळ संकल्पाची।' – दास १५.७.२. ६. (चुकीने) विकल्प; संशय : 'हें देखोनि संकल्पीं पडियला।' – दावि ७.२.२८. [सं.]

संकल्पचित्र न. १. चित्राचा आराखडा, रूपरेषा. २. ठळक मुद्दे; स्थूलवर्णन. ३. रेखाटन.

संकल्पना स्त्री. कृतीमागील अमूर्त व मूलभूत कल्पना.

संकल्प विकल्प शंकाकुशंका; मनाची डळमळीत स्थिती; कल्पना व संशय. [सं.]

संकल्पिणे सक्रि. १. बेत ठरवणे; निश्चित करणे. २. (एखादे काम, जबाबदारी एखाद्यावर) सोपवणे; माथी मारणे; हवाली करणे. ३. योजणे; कामी लावणे; अर्पण करणे : 'जिवित संकल्पिलें तुझ्या ठायीं।' – मोकर्ण ४२.३६.

संकल्पित धावि. १. योजलेले; ठरवलेले; ठरावीक. २. परमेश्वराने निश्चित केलेले, घडवलेले. ३. (विधि.) संकल्पचित्रित.

संकष्ट न. (अप.) पहा : **संकट**

संकष्ट वि. १. बिकट; श्रमाचे; अडचणीचे; पीडादायक; दु:खदायक (काम). २. कष्टाळू; सोशीक (मनुष्य). ३. त्रासलेला; अडचणीत असलेला. [सं. संकष्टन्]

संकष्ट चतुर्थी, संकष्टी चौथ, संकष्टी स्त्री. प्रत्येक मराठी महिन्यातील वद्य चतुर्थीचे व्रत, या दिवशी गणेशाचे व्रत करायचे असते.

संकळणे अक्रि. संक्षिप्त करणे; थोडक्यात आणणे; सारांश काढणे. [सं. संकलन]

संकळित वि. १. ज्याचे आकलन केले आहे असा; समजलेला : 'कीं जाति वेव्हारा परौता। जेया परिकर्म संकळितां।' – ऋ १४. २. संक्षिप्त; सारभूत. क्रिवि. सारांशाने; थोडक्यात. (वा.) **०बोलणे** – संदिग्ध बोलणे. (व.)

संका स्त्री. दाराच्या चौकटीचे उभे लाकूड : 'दोहीं श्रीकरें दोहीं दारसंका धरीति' – गोप्रच २५४.

संकासुर पु. १. शिमग्यात काढतात ते शंखासुराचे सोंग. २. एक झाड व त्याचे फूल; राजतुरा.

संकीर्ण पु. (ताल) पहिला विभाग नियमाने नऊ मात्रांचा असणारा दक्षिणेकडील एक ताल.

संकीर्ण धावि. १. एकत्रित; मिसळलेले; मिश्रित; गोंधळ झालेले. २. गर्दीचे; घोळका, गर्दी, दाटी झालेले (घर, खोली). ३. संकलित; एकवटलेले : 'आरंभी पडिलीं होतीं तया करीं। संकीर्ण त्या नारीनर लोक – तुगा ५४.४. आकुंचित; थोडक्यात आणलेले; संक्षिप्त : 'मूल संकीर्ण कृष्णवेणी।' – रावि २. ५. क्षीण झालेले; ऱ्हास पावलेले; अंधुक झालेले; अंतकाळचे (ज्योत, जीव प्राण). ६. अल्प; थोडे : 'अन्न वस्त्र संकीर्ण घरीं।' – भवि १८.१३४. ७. मिश्र जातीचा, रक्ताचा; संकर झालेला; कडू; अशुद्ध. ८. अन्य रागांच्या मदतीने रंजक होणारा (राग). ९. कृश; रोड : 'कुमरु साविधां संकीर्णु जाला' – लीचपू २०.

संकीर्तन न. स्तवन; स्तुती; गौरव; गुणवर्णन; परमेश्वराचे नामोच्चारण.

संकटन न. १. पहा : **सकोटण.** २. चेंदामेंदा; चुरा. [सं.]

संकु(को)चित वि. धावि. १. आखडलेले; आकसलेले; आकुंचित; दाटलेले; एकत्र आलेले. २. अरुंद; चिंचोळे; आवळलेले; अडचणलेले; दाटीचे. ३. निर्बंधित; नियंत्रित; रेखलेले. ४. दबलेला; भिडस्त; शरमिंदा; लज्जित; विनत. ५. (सामान्यत:) आशंकित; बुचकळ्यात पडलेले; साशंक; भीतिग्रस्त.

संकुल–ळ वि. दाट; गर्द; व्याप्त; संकीर्ण.
न. समूह. [सं. सं + कुल्]

संकुलित धावि. मिसळलेले; एकत्र केलेले; मिश्र. [सं.]

संकुळी स्त्री. समुदाय. [सं. संकुल]

संकेत पु. १. व्यवस्था; निश्चिती; स्थापना. २. सहमत; योजना; करार; कबुली; वायदा; बोली; ठराव. ३. पूर्वनिश्चिती; तरतूद. ४. खूण; इशारा; चिन्ह; अर्थगर्भ हालचाल; सूचक अंगविक्षेप, दृष्टिक्षेप वगैरे. ५. प्रेमीजनांचा बेत; निश्चित स्थान; योजना. ६. शर्त; अट; ठरविलेले कलम; गोष्ट. ७. शब्दाची विशिष्ट अर्थ व्यक्त करण्याची शक्ती.
[सं. सम् + कित]

संकेतकक्ष पु. बावटाघर (रेल्वे). (इं.) सिग्नल केबीन.

संकेतन न. सांकेतिक चिन्हांनी लिहिणे. (संगीत इ.) (इं.) नोटेशन.

संकेतलिपी स्त्री. खुणांची किंवा चिन्हांची लिपी; गुप्त लिपी; चित्रलिपी.

संकेतशब्द पु. (व्या.) नाम; पदार्थवाचक शब्द.

संकेतसमीकरण न. समीकरणात अज्ञात अक्षराबद्दल विशिष्ट एकच किंमत घातली असता बरोबर असणारे समीकरण. उदा. क्ष + ५ = १० म्हणजे क्ष = ५.

संकेतस्थळ न. (संगणक) विशिष्ट माहिती मिळण्याचे केंद्र; माहिती केंद्र; (इं.) साइट.

संकेताचार्य पु. १. ज्याला सर्व ज्ञान आहे असा. २. जरठ; म्हातारा.

संकेतार्थ पु. (व्या.) एका क्रियेची सिद्धी दुसऱ्या क्रियेवर अवलंबून आहे असा बोध करणारे क्रियापदाचे रूप. उदा. जर तो आला तर मी जाईन.

संकेतित धावि. निश्चित; योजलेले; ठरवलेले; नियोजित; दोघांनी किंवा अनेकांनी संगनमताने ठरवलेली (जागा/वेळ).

संकेंद्रक न. अशुद्ध धातू शुद्ध करून घेण्याचे यंत्र.

संकेंद्रण न. १. शुद्धीकरण. २. गुणवत्ता. ३. एकाग्रता.

संकेश्वर पहा : **संकासूर**

संकोच पु. १. आकुंचन; आखडणे; आकसणे; एकत्र ओढले जाणे; मिटणे; चिरमुटणे; अवटरणे. २. अरुंदपणा; निमुळतेपणा; जागेची दाटी; गर्दी; मोकळेपणाचा अभाव; निरुंदपणा; (जागा वगैरे) प्रशस्त नसणे; आवळपणा (भांड्याचा). ३. मनावर निर्बंध घातल्यामुळे विकारांची होणारी कोंडी; स्वातंत्र्याचा, मनमोकळेपणाचा अभाव; मनाचा खोलपणा. ४. लज्जा, विनय, भीड, मर्यादा वगैरेमुळे वागणुकीवर पडणारा निर्बंध, दाब; अडचणल्यासारखी वागणूक.[सं. सं + कुच्]

संकोचक पु. १. आकार लहान करणारा. २. दाबणारा. ३. घट्ट करणारा.

संकोचणे अक्रि. १. आकुंचित होणे; लहान होणे; आखडणे. २. दाब पडणे; प्रतिबंध वाटणे; अडचणणे. ३. मोकळेपणाने न वागणे; दुरुन असणे, बेताबेताने असणे; निर्बंधित वर्तन करणे. ४. भीड, मर्यादा, लज्जा यांनी मोकळेपणा न वाटणे; लाजणे. [सं. सम् + कुच्]

संकोची वि. भिडस्त; लाजाळू; मागे राहणारा; मनमोकळा नव्हे असा.

संक्रम, संक्र(क्रा)मण पु. न. १. गमन; पुढे जाणे; गती; प्रवास; स्थलांतर. २. एका राशीतून दुसऱ्या राशीत जाणे (सूर्य अथवा ग्रह); संक्रांती.

संक्रमण न. वेदपठणाची एक पद्धत, क्रम. [सं.]

संक्रमण, संक्रमणगणित न.दोन संख्यांची बेरीज व वजाबाकी दिली असता त्या दोन संख्या शोधून काढण्याची रीत, क्रिया.

संक्रमणरोधी वि. (वैद्यक.) रोगजंतूंच्या प्रसाराला प्रतिबंध करणारे. (इं.) ॲंटिइन्फेक्टिव. [सं.]

संक्रांत–ति–ती स्त्री. १. सूर्याचे (किंवा ग्रहाचे) एका राशीतून दुसऱ्या राशीत गमन. २. एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीत जाणे; स्थित्यंतर; स्थलांतर वगैरे.

संक्रांत–ति–ती स्त्री.१. (संक्रांत एका दिशेने येते दुसऱ्या दिशेकडे जाते व तिसऱ्या दिशेकडे पाहते. यावरून विनोदाने) विचित्रपणे वागणारा मनुष्य. २. (संक्रांत अशुभ फलदायी असते यावरून) अनिष्ट, वाईट घडवणारा मनुष्य.[सं.] (वा.) ० **बसणे** – (ज्या राशीतून सूर्यसंक्रमण होते त्या राशीस अनिष्ट फल मिळते या समजुतीवरून) अनिष्ट काल प्राप्त होणे. धावि. पुढे गेलेला; ओलांडून गेलेला; पलीकडे गेलेला.

संक्रांतफळ न. (ज्यो.) प्रत्येक राशीतून सूर्य गेला असता त्या त्या राशीस किंवा त्या कालास अनुसरून इतर राशींना मिळणारे शुभाशुभ फल.

संख न. पु. घाण; गाळ; साचा.

संखाद खते मैल्यापासून तयार केलेली खते.

संख्य न. युद्ध. [सं.]

संख्या स्त्री. १. अंक; आकडा; आंख. २. गणना; मोजदाद. [सं.]

संख्यान न. मोजण्याची क्रिया; गणन.

संग पु. १. सहवास; जोड; संगती; ऐक्य; सोबत; मैत्री; संयोग. (समासात) सत्संग; अंगसंग इ. २. स्त्री–पुरुष समागम. ३. संघ; सोबतीने प्रवास करणाऱ्या यात्रेकरूंचा समुदाय. [सं सम् + गम्]

संग पु. दगड; धोंडा; फत्तर. [फा.]

संगजिरे–रा न. पु. शंखजिरे; एक औषधी द्रव्य.

संगटणे अक्रि. एकत्र होणे; एकवटणे : 'दलबादल डेऱ्यांत श्रीमंतांसन्निध संगटले।' – ऐपो ३९५. [सं. सं + गम्; सम् + घट्]

संगणक पु. एकत्रित केलेल्या माहितीचा साठा करून व पाहिजे त्याप्रमाणे विश्लेषण करून ती माहिती त्वरीत पुरवणारे इलेक्ट्रॉनिक उपकरण; संगणित्र. (इं.) कॉम्प्युटर.

संगणक चाचे प्रत्येक माहिती-केंद्राचा (वेबसाइटचा) परवलीचा शब्द असतो व तो माहिती मिळवणाऱ्यांना व केंद्रसंचालकानांच फक्त माहीत असतो. तो परवलीचा शब्द कल्पकतेने वा अन्य मार्गाने शोधून काढून खोटे व्यवहार करणारे लोक. (इं.) हॅकर्स.

संगणन न. मोजणी; हिशेब करण्याची क्रिया.

संगत–ती स्त्री. १. संग; स्नेह. २. संयोग; मिलाफ; जमाव; मेळ. ३. ऐक्य; जुळणी. ४. अनुरोध; पूर्वापार संबंध.

वि. १. संबद्ध; बरोबर असलेले.२. सुसंबद्ध; युक्त. [सं. सं + गम्]

संगतरास–त्रास, संगरात पु. पाथरवट; दगड घडवणारा.

संगतवार वि. संबद्ध; अनुरूप; अनुसरून असलेला; काही एक क्रमाने परस्परांशी संबंध राखून केलेले (भाषण, लेखन इ.).

संगनमत न. १. परस्पर विचार करून केलेला निश्चय; परस्पर सहाय्याकरता केलेली, योजना; सहकार; संघटन. २. संकेत. ३. कट.[सं. संगमन:]

संगनमती पु. एखादे कार्य साधण्याकरता संकेत करणारा जमाव, संघ, पक्ष; विचार विनिमय करून एकत्र आलेली मंडळी.

संगफलाकन दगड मारण्याची गोफण.

संगबसरी पु. १. एक रसका नावाचा धातुविशेष. – राव्यको २.२२. पुष्कराज रत्न. – राको. २. डोळ्याच्या रोगावरील औषध म्हणून वापरला जाणारा एक दगड. – उर्दू-मराठी कोश.[फा. संगबुसराक]

संगम पु. १. एकत्र येणे; एका ठिकाणी मिळणे; एकत्र होणे (नदी); भेट; संयोग; मिलाफ. २. (ज्यो.) ग्रहांची युती. [सं. सम् + गम्]

संगम पु. (जरतार धंदा) हलक्या जरताराचा एक प्रकार.

संगमन न. (शासन.) संमती. [सं.]

संगमरवर पु. आरसपानी दगड; एक पांढरा विशिष्ट दगड.[फा. संग + मर्मर]

संगर पु. न. १. युद्ध; लढाई. २. खंदक : 'गोटानजीकच संगर खोदून उभे राहिले' – ऐको. [सं.]

संगर स्त्री. साडीच्या काठाखाली असणारी चित्रविचित्र रंगाची बारीक कोर. न. डोंगरातील लहान वाट.

संगरग पु. समुद्रातून प्रवास करणारा. (गो.)

संगरणे क्रि. गोळा करून घेणे. (अहि.)

संगराद दगड मारणारी एक तोफ.

संगव पु. दिवसाचे पाच विभाग केले असता त्यातील दुसरा भाग; सात घटिकांपासून बारा घटिकांपर्यंतचा काल; वासरे पिण्यास सोडण्याची वेळ. [सं. सं + गो = गाय]

संगवई–यी पु. १. बालपणापासूनचा मित्र; सहचर; संगी; सहकारी. २. वाटाड्या; मार्गदर्शक.

संगसंगा पु. १. तो करत नाही तर मी तरी का करावे अशा प्रकारे केलेली स्पर्धा, मत्सर, असूया. २. दुसऱ्याचे बघून केलेले कोणतेही सामाजिक, लौकिक कार्य.

क्रिवि. बरोबर; एकत्रित; सह; सोबतीने.

संगळणे अक्रि. साचणे; जमणे; एकत्र होणे. (व. ना.)

संगळा पु. ढीग; रास; गोळा. (ना.)

संगंदाज १. शत्रूवर ज्यातून दगड लोटून देता येतील असे किल्ल्याच्या तटबंदीत राखलेले उतरते झरोके, मोऱ्या. २. अशा मोऱ्यातून दगडांचा मारा करणारी माणसे.

संगाच क्रिवि. ताबडतोब. (झाडी)

संगितरंगित वि. सुसज्ज; सुखसोयींनी भरलेला; परिपूर्ण : 'महाल चोखट संगितरंगित।' – होला ५९.८७.

संगिनमाक पु. घोड्याच्या आयाळीतील भोवरा. – अश्वप १.१०३.

संगिनात स्त्री. १. लवाजमा; स्वारशिबंदी. २. मजबुती. ३. जमाव.

संगी पु. मित्र; स्नेही.

वि. १. संगती धरणारा; संबद्ध; युक्त. २. संगतवार; यथार्थ.

संगीक, संगीकारी वि. बरोबरचा; सहचर.

संगीत न. मनातील भाव स्वर, लय, ताल व नाद याद्वारे प्रकट करण्याची कला. त्यात वादन व नृत्य या उपांगांचाही समावेश होतो.

वि. ज्यात गाणे, पदे आहेत असे (नाटक). [सं.]

संगीतकार पु. गीतांना स्वरबद्ध करणारा, गीतांना चाली लावणारा, संगीताचे नियोजन करणारा; संगीत दिग्दर्शक.

संगीति–ती स्त्री. सूरमिलाफ; स्वरमेळ.

संगीन वि. १. जड; अवजड; भारी; वजनदार; मजबूत. २. दगडी; चिरेबंदी. ३. (ल.) यथास्थित; व्यवस्थित. ४. (ल.) पूर्ण; जय्यत; साग्र. ५. एकसारखा; अखंड; सतत. ६. सुंदर; उत्कृष्ट.[सं. संग = दगड]

संगीन स्त्री. बंदुकीच्या टोकाला लावलेले तीक्ष्ण हत्यार; बागनेट.[फा.]

संगू पु. १. भिडू; गडी; सोबती; जोडीदार (खेळातील). २. मित्र; सखा; प्रियकर.

क्रिवि. (खेळात) जोडीने; एकत्र.

संगोपणे सक्रि. पालन करणे; जपणे; सांभाळणे; पोसणे.[सं. सम् + गुप्]

संगोपन न. लालनपालन; जोपासना; सांभाळ; जपणूक; पालनपोषण. [सं. सं + गुप्]

संगोपिता पु. पालक; संरक्षक.

संग्रह पु. १. साठा; संचय; रास. २. एकीकरण; संघटण; एकत्र आणण्याची क्रिया. ३. धरणे; घेणे; पकडणे. ३. रीत; पद्धत; आचार : 'आता मढी करावी लागैल : ना तरि संग्रहो भंगैल' – स्मृस्थ. [सं.]

संग्रहण न. १. साठवण. २. (ग्रं. शा.) नवीन पुस्तक संग्रहालयात आल्यावर त्याची आवश्यक त्या तपशीलासह नोंद विशिष्ट पुस्तकात लिहून ठेवणे. [सं.]

संग्रहणी स्त्री. हगवण; अतिसार; मलसंग्रहामुळे होणारा रोग. [सं.]

संग्रहालय न. वैविध्यपूर्ण वस्तू जिथे एकत्र ठेवल्या आहेत असे ठिकाण, जागा. (इं.) म्युझियम.

संग्रही वि. १. संग्रह, साठा करणारा. २. लोभी; कृपण; हव्यास करणारा;

आशाळभूत.

संग्रहे क्रिवि. आवेगाने : 'संग्रहेचि रडीनली' – स्मृस्थ ७९.

संग्रहेण–न न. स्त्री. गृहिणी; घरातील कोठीची मालकीण : 'तेविची संग्रहेणु म्हणे' – गोप्रच १७२. [सं.]

संग्राम पु. युद्ध; लढाई.

संग्रामजित् वि. युद्धात जिंकणारा;विजयी.

संग्राह्य वि. संग्रह करण्यास योग्य; साठवण्याजोगे. [सं.]

संघ पु. समुदाय; समाज; समूह; जमाव (प्राणी अथवा वस्तूंची एकत्रित संख्या); जूट; एकी; एकमेकांनी एकमेकांना मदत करण्यासाठी एकत्र येणे; संस्था; व्यवस्था; विशिष्ट हेतूने एकत्र आलेला, नियमबद्ध असा लोकांचा समूह. [सं.]

संघट पु. समुदाय.

संघटक पु. संघटन करणारा. [सं.]

संघटण–न न. १. निकट संबंध; सलगीचे वागणे. २. भेट; एकत्र येणे; स्पर्श; जुळणी. ३. घट्ट मिठी; भीड; बिलगणे. ४. घासाघास. ५. समविचारासाठी व एकत्रितपणे काम करण्यासाठी संघ निर्माण करण्याचे काम. ६. (जीवशास्त्र) सजीवांमध्ये कार्यानुसार आढळून येणारी रचना.

संघटणे अक्रि. १. भिडणे; भेटणे; एकत्र येणे; बिलगणे. २. मावणे; सामावणे. [सं. सम् + ग्रंथ्]

संघटना न. स्त्री. १ विशिष्ट हेतूने लोकांना एकत्र करून त्यांना कार्यप्रवृत्त करण्यासाठी स्थापलेली संस्था. २. धंद्यातील व्यवस्था.

संघट्ट पु. घर्षण.

संघनन न. वायू अवस्थेतून द्रव अवस्थेत रूपांतर होण्याची क्रिया.

संघनित्र न. (विज्ञान व रसायन) द्रव पदार्थाचे घनावस्थेत रुपांतर करणारा.

संघराज्य न. निरनिराळ्या गटांचे मिळून होणारे राज्य.

संघराज्य पद्धती केंद्र आणि राज्य या दोन पातळ्यांवर स्वतंत्र शासनयंत्रणा असलेली पद्धत.

संघसत्तावाद पु. सर्व गोष्टी राष्ट्राच्या मालकीच्या करणे हे तत्त्व. (इं.) कम्युनिझम.

संघर्ष, संघर्षण पु. न. १. घासणी; घासाघास; घसट. २. (ल.) स्पर्धा; कलह; विरोध; झुंज. [सं.]

संघर्षणे अक्रि. १. खरडणे; घासणे; चोळवटणे. २. झगडणे; झटापट, स्पर्धा, कलह करणे. [सं. सम् + घर्ष]

संघवी पु. जैन संघास यात्रा घडवून आणणारा मनुष्य.

संघाटण न. युद्ध; द्वंद्व.

संघाटी स्त्री. १. सांगड. २. युगुल.

संघात पु. १. समुदाय; समूह; मेळा; जमाव; लोट. २. नरकाचा एक भाग. ३. वध. ४. एकत्र केलेला, एकत्र जुळून झालेला प्रबंध. (इं.) पॅटर्न. [सं. सम्+हन्]

संघातक पु. (नृत्य.) पाच करणांचा समूह. [सं.]

संघातित वि. घट्ट केलेले, गोठवलेले (दूध). (इं.) कन्डेन्स्ड

संघारणी स्त्री. झापड; झडप; झाकणी. [सं. सम्+हृ]

संघारणे सक्रि. मारणे; नष्ट करणे. [सं. सम्+हृ]

संघाराम पु. बौद्ध लोकांचा विहार; मठ.

संघारित्र न. (विद्युतक्षेत्र) वेगवेगळ्या विजेच्या तारातून वाहणारे प्रवाह साठवून ठेवण्याचे साधन.

संच पु. १. साधन; सामुग्री; जोड; साहित्य; उपकरणसंग्रह. २. संलग्न असणाऱ्या वस्तूंचा एकत्रित गठ्ठा. ३. संग्रह; साठा; ढीग. ४. आकार; बांधा; ठेवण : 'मग शरीरसंचु पार्था। अशेषहि सर्वथा।' – ज्ञा ६.१९८. ५. (ल.) मेळ; संगती; एकवाक्यता. ६. व्यवस्था; बेत. – ऐको.

संचक वि. साठवणारा; संचय करणारा; लोभी; चिक्कू.

संचणी स्त्री. मोजणीवरून ठरविलेली जमिनीची वर्गवारी; तरमबंदी; साऱ्याचा ठराव. [सं. संचयन]

संच(चि)णे उक्रि. १. साठणे; भरून राहणे; एकत्र जमा होणे. २. व्यापून राहणे : 'ब्रह्मांडी संचला, ब्रह्म साचे' – निगा ३७.

संचय, संचणी पु. स्त्री. साठा; संग्रह; रास; जमाव.

संचयन न. साठवण; संग्रहण; जमवणे.

संचयिका स्त्री. १. शाळेतील मुलामुलींच्या ठेवी घेणारी बँक. २. शाळेतील अल्पबचत योजना.

संचयी घट बाहेरील स्त्रोताकडून मिळालेली विद्युतउर्जा साठवण्याचे पात्र. – व्यामको.

संचरणशील वि. भलतीकडे जाण्याचा संभव असलेले.

संच(चा)रणे अक्रि. १. प्रवेश करणे; शिरणे; शिरकाव करणे. २. भिजणे; मुरणे; आत जाणे. ३. व्यापणे; भुतखेते इत्यादींचा शरीरात प्रवेश होणे; अंगात येणे. ४. संचार करणे; फिरणे. ५. चुकणे; भलतीकडे जाणे; स्खलन होणे; मार्गभ्रष्ट होणे. ६. कामोत्तेजित होणे : 'पुरुषेविण नारी संचरली शरिरी' – ज्ञागा १०७०. ७. आळविणे : 'मग संचरौनि धानाश्री : रायाते म्हणे अवधारी' – रुस्वन २०८. [सं. सम् + चर]

संचरित धावि. शिरलेला; व्यापलेला; प्रवेश केलेला.

संचलन न. १. कवाईत; एकाच वेळी अनेकांनी, एकसारखी केलेली शरीराची हालचाल; शिस्तबद्ध चाल. २. मानवंदना; सलामी. ३. प्रदर्शनीय मिरवणूक. [सं.]

संचळ, संचळखार न. पु. पादेलोण. [सं. सौवर्चल]

संचळ पु. स्थिरता : 'संचळु न मोडितु। पाणियाचा' – ज्ञा १३.२४५.

संचळ पु. वस्त्राचा पदर : 'कही न स्पर्शे संचळु : निजवाणीचा' – ऋव ४६५.

संचार पु. १. हिंडणे; फिरणे; भ्रमण; वावर. २. अंगात येणे; भूतपिशाचादिकांनी व्यापणे. ३. प्रवेश; शिरकाव; गती. ४. दूरान्वय; स्खलन; दोष; विस्तार; विषयांतर. ५. पाठांतरातील चूक, दोष. (क्रि. जाणे). ६. जारणमारणादी घाताचे उपाय; कारस्थान; कट.[सं. संचर्]

संचारक पु. वाटाड्या; मार्गदर्शक; पुढारी; अग्रणी; नेता; चिथावणारा.

संचारण न. (स.शा.) फिरवणे; दुसरीकडे पाठवणे. (इं.) ट्रान्समिशन.

संचारबंदी स्त्री. दंगलीच्या वेळी घराबाहेर पडण्यास केलेली मनाई.

संचारिका स्त्री. मध्यस्थ स्त्री; दूती.

संचारित धावि. १.गती दिलेले; भ्रमित. २. व्यापलेले; घुसलेले.

संचारी पु. (संगीत.) चीजेचा तिसरा भाग.

संचारी वर्ण (संगीत.) स्थायी, आरोही व अवरोही यांच्या मिश्रणाने झालेला वर्ण.

संचालक पु. उद्योगखाते, संस्था इत्यादींचे धोरण ठरवण्यात सहभागी असणारा व ते राबवणारा.

संचालन न. १. उद्योगधंदा, संस्था यांचे धोरण अमलात आणणे. २. उद्योगधंदा, कारभार, संस्थेचा व्यवहार इत्यादींना मार्गदर्शन करण्याचे कार्य.

संचालनालय न. संचालकाचे कार्यालय; सरकारी खाते (खात्याची जागा.).

संचिका स्त्री. १. घडी घालण्याचे उपकरण. (इं.) फोल्डर. २. सुटे कागद एकत्र ठेवण्यासाठी, नेण्यासाठी असलेले कार्डबोर्डचे किंवा प्लॅस्टिकचे साधन.

संचित न. पूर्वजन्मी मिळवलेले पाप व पुण्य; एकंदर कर्माचा साठा; अदृष्ट.
वि. साठलेला; साठवलेला; राखीव.

संचिती स्त्री. साठा; संचय; निधी.

संच्यार पु. बिघाड; फूट; विसंगती; मतभेद : 'कित्येक संच्यार गृहछिद्रे' – पेद ५.६४.

संची स्त्री. चंची; पानसुपारी ठेवण्याची, कप्प्यांची विशिष्ट आकाराची पिशवी.

संजाईत वि. १. पसंत पडल्यास घेण्याच्या अगर परत करण्याच्या बोलीवर नेलेला (जिन्नस). २. अनिश्चित. ३. अनियमित. ४. मोघम.

संजात वि. चांगला झालेला; उत्पन्न केलेला; पेरलेला.

संजाप–फ–ब पु. १. वस्त्राचा रंगीत काठ, किनार; नक्षीदार पट्टी. २. चोगा व तुमान याच्या शेवटी लावलेली पट्टी. – तंजा. ३. (ल.) शेंडीभोवतालचा घेरा. ४. (ल.) पुरण न भरलेला पोळीचा, सांजोरीचा काठ. [फा. संजाफ]

संजाप(ब)दार, संजापी–फी–बी वि. १. काठ असलेले; किनारीदार. २. घेरेदार.

संजाबी विडा सभोवती केळीच्या पानाचा घेर असणारा एक प्रकारचा दरबारी विडा.

संजिद वि. गंभीर; जड; वजनदार. [फा. संजीदा]

संजिदगी स्त्री. १. गांभीर्य. २. वजन; दाब.

संजीव वि. जिवंत : 'तिसरा म्हणे : 'मी संजीव करीन' – पंचो १५२.१६. [सं.]

संजीवन न. १. पुनरुज्जीवन; मेलेल्या प्राण्याला पुन्हा जिवंत करणे. २. जगणे. ३. मृताला जिवंत करण्याचे मंत्र, तंत्र, अमृत वगैरे साधन. ४. (ल.) पुन्हा ऊर्जित दशेला आणणे.
वि. सजीव; जिवंत; चैतन्ययुक्त : 'समाधिसाधन संजीवन नाम' – ज्ञागा ९७. [सं.]

संजीवन न. चौसोपी घर.

संजीवना वि. प्राणदानाची शक्ती असणारा.

संजीवनी स्त्री. १. मृताला जिवंत करण्याची विद्या, युक्ती, मंत्र. २. मृताला जिवंत करण्याचा गुण असलेली एक वेल, औषधी; अमृतवल्ली.

संजीवनी गुटिका वावडिंग, सुंठ वगैरेचे मिश्रण केलेले एक औषध,गोळी.

संजुक(ग)ता वि. १. योग्य; व्यवस्थित; बरोबर; जुळणारा; शिस्तशीर; पद्धतशीर (राज्य, संस्थान, कारभार). २. आटोपशीर; आटोक्यातील; प्रमाणशीर; नेमस्त (काम, धंदा, व्यवसाय). [सं. सम्+युज्]

संजुगणे क्रि. असेल त्यात चालवणे; समाधान मानणे; प्रमाणात, व्यवस्थित रीतीने काम करून घेणे. (माण.) [सं. सम्+युज्]

संजुतपत्र न. परस्पर विरुद्ध पक्षात समेट झाल्याबद्दलचा लेख, कागद. [सं. सम्+युति]

संजुति स्त्री. चिलखत : 'लेउनि वैराग्याची संजुती' – मूप्र २४७५. [सं. संयुक्त]

संजुदा, संजूद वि. तयार; जय्यत; सज्ज.

संजो स्त्री. संध्याकाळी खळ्यावर आग पेटवून बोंब ठोकण्याचा विधी. (झाडी) [सं. सम्+युज]

संजोक–ग पु. साठा; संचय. [सं. संयोग]

संजोग पु. १. परिस्थिती. २. बनाव; घटना.

संजोगणी स्त्री. १. स्थिरता; शांतता. २. सारवासारव. [सं. संयोजना]

संजोगणी–नी स्त्री. १. तयारी; तरतूद; जोडणी; पुरवठा; संचय; सामुग्री. २. संपादणी. [सं. सम्+युज्]

संजोगणे सक्रि. सिद्ध, सज्ज करणे; तयारी, तरतूद करणे : 'संजोगिले गुढरीले हस्ती।' – आद्य मराठी कवियित्री – ३४८.२
अक्रि. १. संपादणे; पुरवून घेणे; पुरवठ्यास येणे. २. (बायकी) सुग्रणपणे करणे; टापटीपीने वस्तू पुरवठ्यास आणणे.

संजोगी पु. यतिधर्म, अविवाहित राहण्याचे व्रत न पाळणारा साधू; घरभारी गोसावी.

संजोडा वि. जोडलेला; जुंपलेला : 'चतुरंगा परिवारा। संजोडिया रहंवरा।' – ज्ञा ११.३९७. [सं. सं+युज्]

संटणे उक्रि. मावणे; साठणे; साठवणे; आवरणे : 'ऐकोनि रंभेच्या वचना। हर्ष न संटे शक्रमना।' – मुरंशु १. [सं. श्वंठ]

संटोल वि. अडमुठ्ठा; आडदांड.

संट्या पु. सडा; नि:संग.

संडणे सक्रि. उडणे. [सं. सम+डी]

संडपडणे अक्रि. लठ्ठ होणे. (व.)

संडा वि. उंच व बळकट; धिप्पाड; दांडगा.

संडास पु. पायखाना; शौचकूप; शेतखाना.

संढाल पु. सरकारी सारा, दंड वगैरे कोणताही बोजा योग्य प्रमाणात नसेल आणि तरीही देणे अवश्य असेल अशा वेळी लोकांनी तो आपसात प्रमाणशीर वाटून घेऊन तयार केलेले खाजगी पत्रक.

संत पु.१. साधू; पुण्यपुरुष; सत्पुरुष; सज्जन. २. सामान्यत: धार्मिक आचारविचार पाळणारा सदाचारी मनुष्य; शुद्धाचरणी व्यक्ती.
न. ब्रह्म : 'सदा संत आनंदरूपी भरावें।'– राक १.११.३.
वि. १.नित्य; शाश्वत; स्थिर; अक्षय; टिकाऊ; त्रिकालाबाधित : 'असंत नव्हे ते संत।'– दास १७.२. २. अस्तित्वात असणारे : 'संत ना असंत होए । जे विचाराचे नांव न साहे '–ज्ञा १५.८०. [सं. सत्]

संत हानी; नाश. - तंजा. [सं. सन्न]

संतअसंत, संतासंत वि. बरेवाईट; सत्यमिथ्या; खरे खोटे : 'संत असंत कर्मे अर्जुनी।'- विपू ६.३.; शिष्य पाहिजे संतासंत विचार घेता ।'- दास ५.३.२७.

संतत वि. पहा : **सतत**; नित्याचा; नेहमीचा; टिकाऊ; चिरकालीन. क्रिवि. नेहमी; निरंतर; अखंड.

संततधार स्त्री.१. एकसारखा चालू राहणारा प्रवाह; पावसाची सारखी झड. २. देवावर धरतात ती अखंड अभिषेकाची धार. ३. पूर्वीपासून, सतत चालत आलेली रूढी, आचार, कल्पना.

संततसंपत स्त्री. मुलेबाळे व धनधान्यादी गोष्टींची संपन्नता.

संतति-ती-त स्त्री. १. मुलेबाळे; मुले, नातवंडे यांचा विस्तार. २. (ल.) परंपरा; विस्तार; माळ; रांग;ओळ : 'मग कोरडियेचि आशेची संतती । वाढऊं वाढऊं होती । कोशकिडे ।'-ज्ञा १६.३३८. [सं.]

संतप्त धावि.१. अतिशय तापवलेले, उष्ण केलेले. २. (ल.) संतापलेला; अतिशय रागावलेला; त्रासलेला; जळफळणारा; क्षुब्ध. ३. दुःखी; गांजलेला. [सं.]

संतमस न. १. सर्वव्यापी अंधार. २.महामोह.

संतर्पण न.१. इच्छातृप्ती; समाधान; अन्नादी देऊन तृप्त करणे. २. डाळिंब, द्राक्ष, खजूर साखरेसह पाण्यात कुसकरून भाताच्या लाह्यांचे पीठ व मध घालून केला जाणारा खाद्यपदार्थ.

संतान न.१. मूल; लेकरू; वंशवृद्धी. २. उत्पत्ती : 'तरी कोणाचे न संताने । निफजती या उन्मळणे ।' - ज्ञा १५.२२०.
पु. वृक्ष; पसरलेले झाड. [सं. सम् + तन]

संतानगोपाल पु. पुत्रप्राप्तीकरता जपावयाच्या एका मंत्राचे नाव.

संतानबीज न.१.वंशाचा मूळ पुरुष. २. अनेक वर्षे संततीशिवाय गेल्यावर झालेले प्रथम अपत्य. ३. दत्तक पुत्र. ४. वीर्य; रेत.

संतानमार्ग, संतानोपचार, संतानोपाय पु. १. पुत्रप्राप्तीसाठी योजावयाचा (देवधर्म इ.) उपाय. २. (उप.) व्यभिचार; जारकर्म.

संताप पु. १. अतिशय आग, उष्णता; ताप; दाह (अग्नि, ताप, क्रोध, तृष्णा वगैरे मुळे होणारा). २.क्रोध; राग; त्वेष; आवेश. ३. त्रास; यातना; दुःख; शोक; मनाची अस्वस्थता; उद्वेग. [सं.]

संतापणे अक्रि. १. आग दाह होणे; रागाने जळणे, क्षुब्ध होणे; कातावणे. २. त्रासणे; कंटाळणे; अस्वस्थ होणे; दगदग होणे. [सं. सम् + तप्]

संतापन न.१. संतापयुक्त होणे; आग होणे, जळणे. २. त्रास; पीडा; क्षुब्धता. [सं.]

संतापी वि.त्रासिक; चिडखोर; रागीट; तामसी.

संताव स्त्री.बागायती झाडांना फळे धरण्यासाठी पाणी बंद करून ऊन खाऊ देण्याची क्रिया.

संतावे-ळे न.१. बुवाबाजी; संसाराकडे दुर्लक्ष करून संतपणाकडे लक्ष देणे. २. साधूंचा मेळा, संघ. ३. ऐहिक गोष्टींच्या क्षणभंगुरतेबद्दल प्रवचन; व्याख्यान.

संतुलन न.१. तोल, वजन किंवा महत्त्व कमी अधिक न होऊ देण्याची क्रिया किंवा धोरण; समतोलपणा. २. (मा. शा.) शरीरातील प्रक्रियांचा सुयोग्य समतोल राखण्याची मुलभूत प्रवृत्ती.

संतुष्ट वि.तृप्त; समाधानी; खूष. [सं.सम्+तुष्]

संतुष्टाई, संतुष्टी स्त्री.तृप्ती; समाधान; आनंद; खुषी; संतोष.

संतूर पु.शंभर तारा असलेले, चौकोनी आकाराचे पूर्वी काश्मीरकडे प्रचारात असलेले आणि अलीकडे ज्याच्यावर हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत प्रस्तुत केले जाते, असे लोकप्रिय वाद्य.

संतृप्त वि. १. पूर्णपणे समाधान पावलेला; धालेला; तृप्त; संतुष्ट; आनंदी. २. (शाप.) एखाद्या द्रावणात एखादा पदार्थ शक्य तितका पूर्णपणे विरघळला आहे असे, संपृक्त (द्रावण).

संतोला पु. वजन उचलण्याचा अभ्यास करण्याकरता वापरण्याचे मुद्गलासारखे एक लाकडी साधन. [सं.सम्+तोल]

संतोष, संतोषण पु. १. आनंद; सुख. २.तृप्ती; समाधान. ३. आनंदी वृत्ती; प्रसन्नता. [सं.]

संतोषपट्टी स्त्री.पुत्रजन्मादीनिमित्त राजाने शेतकऱ्यांवर बसवलेला कर.

संतोषित, संतोषी वि. तृप्त; समाधानी; आनंदी; प्रसन्न. [सं.]

संत्यक्त वि.नीतिभ्रष्ट; पापभ्रष्ट; वाळीत टाकलेला.

संत्रस्त वि. त्रासलेला; वैतागलेला.

संत्री पु. हत्यारबंद पहारेकरी. [इं.सेंट्री]

संत्रे-त्रा न.पु. एक आम्लधर्मीय, नारिंगी रंगाचे, पाकळ्या असलेले आंबट-गोड फळ.

संथ वि. मंद; सावकाश चालणारा; धीमा; थंड. [सं.]

संथळ न.सपाट जमीन; मैदान; पठार; एका पातळीतील जागा, जमीन. [सं. सम+तल-स्थल]

संथा स्त्री.१. पाठ; दररोज अभ्यास करण्याचा थोडा थोडा भाग; पठण करणे; घोकंपट्टी. (क्रि. देणे, घेणे.) २. पाठ देण्याची एक पद्धत. [सं. सम् + स्था, संहिता]

संद स्त्री.सांधा; फट; चीर : 'जे मग षाळुन संद भरिजे'- वैद्यक बाड १०.८२. [सं. सम् + धा]

संद(दू)क स्त्री. पेटी.

संदण, सौंदण स्त्री. कपडे धुवायचे परटाचे भांडे. [सं.शोधनी]

संदर्भ पु.१.(घटना, काल, स्थल यांचा कथाभाग, कथानक, व्यक्ती यांच्याशी) संबंध, अनुसंधान, संगती. २. योजना; बेत; कल्पना; संधान (विवाहसंबंध जुळवून आणण्यासंबंधाने). ३. सूत्र; बोलाचाली; मसलत (तह वगैरे संबंधी). ४. गुंफण; जोडणी; रचना. [सं.]

संदल न.चंदन. [अर.]

संदल पु. पिराचा उरूस, उत्सव. [अर.]

संदली स्त्री. एक प्रकारची खुर्ची; संदोली.
पु. खोजा; षंढ.
वि. चंदनी रंगाचा (घोडा). - अश्वप १.२८.

संदष्टक पु. (नृत्य.) अधर चावणे. [सं.]

संदंश(हस्त) पु.(नृत्य.) अंगठा व तर्जनी यांची अग्रे जवळ आणणे व बाकीची बोटे उभी पसरून तळहात खोलगट करणे. [सं.]

संदाणी-न स्त्री.न. लोहाराची मायणी, विडी, कड्या वगैरे करण्याची

लहान ऐरण. शिंगडा व सामान्य ऐरणीहून वेगळी.

संदान न.१. दोरी; दावे. २. बेडी; बंधन.
पु. हत्तीचा गुडघ्याखालचा भाग.

संदाळणे उक्रि. घट्ट बांधणे; घट्ट ठेचून पुरणे, रोवणे; भोवती दगड, माती घालून ठोकून घट्ट बसवणे. [सं.सम् + दृभ्]

संदिग्ध वि. अस्पष्ट; अनिश्चित; संशयित; मोघम; शंकास्पद. [सं.सम् + दिग्ध]

संदिष्ट धावि. सांगितलेले; निवेदन केलेले; निर्दिष्ट केलेले; आज्ञा केलेले.

संदि(दे)सा क्रिवि.आत्ताच; यावेळी; याक्षणी; नुकतेच : 'वांझपण संदिसें गेलें।'- दास ३३.३९. [सं. सद्यः]

संदी स्त्री.सांद; कानाकोपरा; अडचणीची जागा; सांध्याची जागा : 'दोहो देवळांचिए संदी।'- ऋ ११५ [सं. संधि]

संदीकळासु स्त्री.सांध्याच्या जोडाची जागा; सांध्याची हाडे : 'संदीकळासु गडबडी।'-उगी २०४.

संदीपनी स्त्री. (संगीत.) सोळाव्या श्रुतीचे नाव. [सं.]

संदीसवड स्त्री. कोपरा; आडबाजू : 'कव्हणा एकाचीए संदीसवडी सुरी पडली असे'- लीचउ ५९.

संदेश-सा पु. निरोप; वार्ता; आज्ञा. [सं.सम् + दिश्]

संदेह पु. १. शंका; संशय. २. एक साहित्यालंकार. जेव्हा प्रकृत वस्तू (म्ह. उपमान) वेगळीच वस्तू (उपमेय) आहे की काय अशी शंका उत्पन्न होते त्या ठिकाणी हा अलंकार होतो.

संदेशवहन न. १. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी तार, दूरध्वनी, नभोवाणी, दूरदर्शन, उपग्रह इ.द्वारे मजकुराची ने आण. २. संपर्क यंत्रणा.

संदेशहर पु. दूत; जासूद.

संदोर पु.मोठा दोर; परित्यावर-मोटेच्या खालच्या चाकावर घातलेले तागाचे मोठे चऱ्हाट; सौंदर.

संदोरी स्त्री.मीठ. (व.)

संदोह पु. समुदाय; समूह; जमाव; रास; ढीग; निधी; साठा. उदा. आनंदसंदोह. [सं.]

संध स्त्री. १. मिलाफ; मिश्रण. २. सांधा. ३. शिवण. ४. फट; भेग; चीर. ५. मध्यंतरीचा कलावधी; अवकाश. ६. ऐनवेळ; अगदी योग्य वेळ. ७. आणीबाणीची वेळ. ८. बेबनावानंतर झालेला सलोखा.

संधन पहा : **संदाणी-न**

संधरेषा स्त्री. दोन शब्द जोडण्यासाठी काढलेली छोटीशी रेघ.

संध(द)ला पु.१. दरजा भरणे, गिलावा करणे वगैरे करता चांगला गाळून व घोटून तयार केलेला चुना. २. अशा चुन्याचे काम, गिलावा, अस्तर. [सं. सम्+धा]

संधाता पु.१. संधिविग्रही. २. तह घडवून आणणारा :'तो वाचौनि संधाता नाही आणिकु.' - रुस्वन ६४८. [सं. संधातृ]

संधान न. १. उपाययोजना; शक्ती, युक्ती, साधने यांची योग्य तरतूद व योजना; एखादे कार्य घडवून आणण्याच्या कामी प्रयत्न, बुद्धी व शक्ती यांचे योग्य एकत्रीकरण करून केलेली योजना. २.योग्य मार्ग, पद्धत (एखादे कार्य पार पाडण्यासाठी वापरलेली). ३. नेम; निशाण; लक्ष्य. ४. कल, प्रवृत्ती, रोख (मन, इच्छा, डोळा वगैरेचा). ५. मनाची धारणा; लक्ष्य; अवधान; ध्यान. ६. कावा; कपट; युक्ती. ७. घबाड; डबोले; ठेवा. ८. सुमार; समय; संधी. ९. वग; वशिला; सूत्र. [सं. सम्+धा]

संधान स्त्री. बैलगाडीची शिवळ. (कुलाबा)

संधानभेट स्त्री.गुप्त भेट.

संधानी वि.कावेबाज; धूर्त; युक्तिबाज.

संधायक पु.(पाण्याच्या) लोखंडी नळाच्या दोन तुकड्यांना जोडणारा आतून आटे असलेला लहान तुकडा. (इं.) सॉकेट.

संधारण न.सी.१. एकत्र सांभाळून ठेवणे; धरून ठेवणे. २. जमिनीची धूप थांबवण्याची क्रिया. ३. नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण व संवर्धन. ४. देखभाल; निगा. [सं.]

संधारणे न.टिकून राहणे; एकत्र सांभाळून ठेवणे. [सं. सम् + धृ]

संधि-धी पु.स्त्री.१. जोडणी; ऐक्य; मिलाफ. २. सांधा; जोड; शिवण; सांध्याची रेषा, बिंदू. ३. चीर; भेग; फट; खाच; खंड. ४. अवधी; मधला काळ; अवसर; अवकाश. ५. गाठ; पेर; कांडे; जोड. ६. स्वर किंवा व्यंजने यांचा जोड, मीलन; सामासिक शब्दाच्या अंत्य व प्रारंभीच्या वर्णांचे मेलन. ७. लक्ष्य; दृष्टी; डोळा; इच्छा; उद्देश. ८. युग; मन्वंतर, कल्प वगैरेपैकी एक संपूर्ण होऊन दुसरे लागण्याच्या आधीचा मध्यंतरीचा काल; संधिकाळ. ९. चोराने भिंतीला पाडलेले भोक, भगदाड. १०. अनुकूल, योग्य वेळ, समय; ऐन, आणीबाणीची, अनुकूल वेळ. ११. (ल.) समेट; तह; सलाह; ऐक्य; मिलाफ; तडजोड. [सं.सम् + धा] (वा.) ० **होणे** – १.एकात एक मिळून जाणे; एकत्र वाढणे. २. एकमेकात विलीन होणे.

संधिज्वर पहा : **संधिवात**

संधिपाद पु. शरीर खंडीभूत असून ज्यांच्या पायांत साधे असतात असे प्राणी. उदा. डास, ढेकूण, खेकडा इ. (इं.) अँथ्रोपोडा.

संधिप्रकाश पु. सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तानंतर दीर्घकाळ असणारा प्रकाश. [सं.]

संधिबंध-बंधन पु.न. सांध्यांना बांधणारे स्नायूंचे दोर.(इं.) लिगॅमेंट.

संधिसाधू वि. आलेल्या संधीचा फायदा उठवणारा; कष्ट न करता मिळवणारा.

संधिवात-वायू-संकोच पु. शरीरातील सांधे दुखण्याचा रोग.

संधृति-ती स्त्री. स्मरणशक्ती. [सं.]

संधेवी,संधेवीसा पहा : **संदिसा-से**

संध्य स्त्री.संधी; सवड; अवकाश; योग्य वेळा.

संध्या स्त्री.१. दिवस व रात्र यामधील संधिकाळ. २. त्रैवर्णिकांनी प्रातःकाळी, माध्यान्ही व सायंकाळी करण्याची दैनिक प्रार्थना, उपासना. ३. दोन युगांमधील संधिकाळ. ४. तिन्हिसांजा; उषःकाल. ५. कालावधी; अवकाश. [सं.]

संध्याकाळी स्त्री.एक फुलझाड व त्याचे फूल; गुलबक्षी.

संध्याभट पु.१. न्यायशास्त्राचा मुतालिक. २. जप करण्यास ठेवलेला ब्राह्मण.

संनावणे अक्रि.जोराचा तडाखा मारणे.

संनाह पु. १. ढाल. २. सामानसुमान; साहित्य; सामग्री. [सं.]

संनिकर्ष पु. सान्निध्य; जवळ असणे. [सं.]

संनिकर्षण न.जवळ ओढणे, करणे, आणणे.

संनिकृष्ट वि.जवळचे : 'कार्य कारणांचे परंपरेत अखेरचें जें कार्य त्याच्या संबंधानें उपांत्यास संनिकृष्टकारण असे म्हणतात.'– न्यायपद्धति १२७.

संनिध, सन्निध, सनीध क्रिवि. शेजारी; जवळ.

संनिधान, सन्निधान न.सान्निध्य; शेजार; जवळीक.[सं. सम् + नि + धा]

संनिरीक्षण न. संशयितावर ठेवलेली पाळत.

संनिविष्ट क्रिवि. अंतर्भूत; सामील.

संन्यस्त वि.१. विरक्त; त्यक्त; टाकलेला. २. संन्यास घेतलेला. ३. अर्पिलेला. [सं.]

संन्यास पु.१. सर्वस्वाचा त्याग. २. चतुर्थाश्रम. यात संसाराचा त्याग करून विरक्त वृत्तीने आयुष्य कंठायचे असते. [सं.]

संन्यासणे सक्रि. त्याग करणे : 'संन्यासूनि कर्मे नाही करिती।'–ज्ञा १२.७८.

संन्यासी पु.१. ज्याने सर्वस्वाचा त्याग केला आहे असा मनुष्य. २. संन्यास घेतलेला.

संप पु. १. आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी कामगार किंवा कर्मचारी यांनी एकत्रितपणे काम सोडून जाणे, काम बंद करणे. २. एकजूट; संघटन. [सं. षप्– समवाये]

संपजणे अक्रि.१.एकत्र करणे : 'संपजति ते लोकीं। संपत्ति म्हणिजे।'– ज्ञा १६.६५. २. पूर्ण होणे. [सं. सम् + पद्]

संपणे अक्रि. १. खर्च होणे; सरणे; शेवट होणे. २. मरणे; निकाल लागणे. [सं. समापन]

संपत्ती स्त्री. १. धन; संपदा. २. कमाई; प्राप्ती; मिळकत. ३. ऐश्वर्य; उत्कर्ष. [सं.]

संपत्तीकर पु.विशिष्ट मालमत्तेपेक्षा अधिक मालमत्तेवरील कर.

संपदा स्त्री.१.धन; दौलत; पैसा; द्रव्य. २. ऐश्वर्य; वैभव; श्रीमंती; उत्कर्ष. [सं.]

संपन्न धावि. १. युक्त; सहित; (समासात) ज्ञान–धन–संपन्न. २. श्रीमंत; ऐश्वर्ययुक्त. ३. अर्जित; मिळवलेले : ' आतां देहें वाचा चित्तें। यथासंपन्ने वित्तें।'– ज्ञा १६.८५. [सं.]

संपर्क पु.१. स्पर्श; संसर्ग; संबंध: 'मग ज्ञानाग्निसंपर्कें कडसिलें विवेकें।' – ज्ञा १.५२. २. संयोग; मिश्रण; सहवास; एकत्रितपणा.३. मैथुन. [सं. सम् + पृच् = स्पर्श करणे.]

संपल पु.१.(जरतार) (मर्सराइज् सिल्कचा) कृत्रिम रेशमाचा चौकोनी विणलेला गोफ. २.नमुना. [इं.सँपल]

संपात पु. झपाटा; हल्ला; तडाखा; प्रहार. [सं. सम् + पत्]

संपात पु.१. संयोग; संमीलन; भेट; संगम. २. टक्कर; तडाखा; धडाका; प्रहार. ३. विषुववृत्त क्रांतिवृत्तास ज्या ठिकाणी छेदते तो प्रत्येक बिंदु; सूर्याचे या छेदबिंदूशी गमन. उदा. मेषसंपात. ४. अग्नीला आहुती दिल्यानंतर हवनीय पात्रात राहणारा अवशेष. ५. अनेक घटना एकाच वेळी घडणे. [सं. सम् + पत्] (वा.) **संपाती होणे** – १.एकमत असणे; जुळणे. २. एकमेकांशी जुळणे.

संपातबिंदू पहा : **संपात** ३

संपातरेषा–खा स्त्री. १. स्पर्शरेषा; वर्तुळास चाटून जाणारी रेषा. २.क्रांतिवृत्ताच्या पातळीस विषुवाची पातळी ज्या रेषेत छेदते ती रेषा. – सूर्यमाला १२.

संपादक पु. वर्तमानपत्रे, मासिके, मोठा ग्रंथ यांची मांडणी, जुळणी करणारा, त्यासाठी लेखनसाहित्य जमवून, निवडून, संस्करण करून ते प्रसिद्धीयोग्य करणारा जबाबदार लेखक; एखादा जुना ग्रंथ प्रती तपासून, टीपा देऊन तयार करणारा.

वि. १. मिळवणारा; कमवणारा; वतन, जहागीर हक्क वगैरे प्रथम मिळवणारा. २. एखाद्या कार्यक्रमाचा, समारंभाचा व्यवस्थापक, कारभारी.

संपादकीय न.संपादकांनी लिहिलेला अग्रलेख.

संपादणी–नी, संपादणू(नू)क स्त्री.१. मिळवणे; पैदास; कमाई; साधना; सिद्धी. २. वेळ मारून नेणे, निभावणे; बतावणी; सोंग पार पाडणे : 'आपुलेचि बोल वाउगे। त्याची संपादणी करणें लागे ।' – दास १.६.२१.३. नक्कल; सजावट (हरिदास एखाद्या गोष्टीची करतो तशी); योग्य तऱ्हेने उभारणी. ४. पात्राचे सोंग; सोंगाची बतावणी; हुबेहूब नक्कल; भूमिकेस अनुसरून हावभाव. ५. योग्य तऱ्हेने कार्य पार पाडणे; व्यवस्था. ६. पुरस्कार. [सं. सम् + पद्]

संपादणे उक्रि. १. मिळवणे; प्राप्त करणे. २. सिद्धीस, तडीस नेणे; पार पाडणे; उरकणे. ३. बतावणी करणे. ४. देणे; अर्पण करणे : 'एथ अठरा घास संपादा।' – लीचपू ४३७. [सं.सम् + पद्]

संपादन न.१. संपादणे; मिळवणे. २. साधना; कार्यपूर्ती. ३. बतावणी; निभावणी. ४. मिळवलेल्या साहित्य कृतीवर, लेखांवर केलेले संस्करण.

संपुट न.१. दोन्ही तोंडे एकावर एक ठेवून मिटावयाची करंडी; करंडा; देवाची उपकरणी ठेवायची वेताची करंडी; शिंपला. डबी. २. मिटलेली ओंजळी; एक उताणा व त्यावर एक उपडा हात ठेवून केलेली पोकळ मूठ. ३. उभा जांब; प्याला. (व.) ४. पाणी भरण्याचे पंचपात्र. (खा.) ५. ज्याच्यात अनेक बिया असतात असे बोंड.

संपुट यान, अवकाशयान न.अवकाशातील ग्रह, तारे व वातावरण यांची माहिती गोळा करण्यासाठी, उपकरणे व काही वेळा माणूस किंवा जनावर यांच्यासह अवकाशात पाठविण्यात येणारे, लांबट नळीच्या आकाराचे वाहन.

संपुटिका स्त्री.१. बीजकोश; बोंड. २. औषधाची लांबुडकी गोळी. (इं.) कॅपसूल. ३. अवकाशयानातील खोली.

संपुटीकरण न.दोन पदार्थांच्या पोकळीत बंद करणे, पकडणे.

संपुष्ट पहा : **संपुट.** [सं. संपुट] (वा.) **संपुष्टात येणे** – १. संकोच पावणे; आखडणे; कमी होणे. २. ताब्यात, कबजात सापडणे, येणे. ३. संपणे. **संपुष्टात घालणे** – १. ताब्यात घेणे; २. महत्त्वहीन करणे. – ऐको.

संपूरक वि.पूर्ण करणारे. (इं.) कॉंप्लिमेंटरी. [सं.]

संपूर्ण न.एखाद्या विधीची समाप्ती व त्यावेळचा समारंभ; उद्यापन.
वि. १. सर्व; सगळे; प्रत्येक; एकूण एक; सकल. २. पूर्ण; सर्वच्या सर्व. ३. समाप्त; पूर्ण झालेले; संपलेले. [सं.]

संपोला सापाची वावडी.- तंजा.

संपृक्त वि.(शाप.) ज्या द्रवामध्ये एखादा पदार्थ शक्य तितका पूर्णपणे विद्रावित केला आहे, विरघळला गेला आहे असा (द्रव). (इं.) सॅच्युरेटेड. [सं.]

संप्रति क्रिवि. सांप्रत; सध्या. [सं.]

संप्रदान न.१. अर्पण करणे; प्रीत्यर्थ करणे; स्वाधीन करणे. २.(व्या.) चतुर्थी विभक्तीचा अर्थ, कारक. कर्ता स्वनिष्ठ क्रियेच्या कर्माने किंवा स्वनिष्ठ क्रियेने ज्या कारकरूप अर्थाचे अभिसंबंध करतो असे कारण. [सं.]

संप्रदाय पु. १. चाल; रीत; वहिवाट; शिरस्ता; प्रघात. २.प्रचार; वाक्प्रचार; बोलण्याची रूढ पद्धत; म्हण. ३. परंपरागत अथवा प्रमाणभूत तत्त्व. ४. (धर्म, तत्त्वज्ञान) मार्ग; पंथ; मत. उदा. शैवसंप्रदाय. [सं. सम् + प्र +दा]

संप्रदायी वि. विशिष्ट पंथास अनुसरणारा; विशिष्टमताभिमानी; विशिष्ट मार्गाचा अवलंब करणारा.

संप्रधार,संप्रधारणा पु. स्त्री. विचार; निश्चय; निर्णय; विचारविनिमय : 'गोसावी यांसि संप्रधारू करिती'- लीचउ २१. [सं. संप्रधारण]

संप्रयोग पु. जोड; प्राप्ती : 'संप्रयोगु होइल म्हणौनि आधिली दिसीं अवघेंचि वेंचिलें।'- लीचपू १०४.

संप्रसारण न.(व्या.) य, व, र, ल यांच्या जागी अनुक्रमे इ, उ, ऋ, ऌ या स्वरांचा आदेश होणे ही क्रिया. [सं.]

संप्रज्ञात वि.सविकल्प (समाधी). [सं.]

संप्राती पु.जमीनदाराच्या पदरी असलेला हिशेबनीस व मुखत्यार (चोळ, पांड्य राज्यातील).

संप्राप्ति-प्ती स्त्री.१. शारीरिक विकारांचे ज्ञान; विकृतेंद्रिय विज्ञान. २. पूर्ण प्राप्ती, सिद्धी; पूर्णता; स्वाधीनता; (रोग इ. विकारांचे) ज्ञान. [सं.]

संप्रेषण न.संदेश पाठवणे (कोणत्याही साधनाने).

संबद्ध धावि. जोडलेले; निगडीत; नाते असलेले.

संबळ पु. गोंधळी वगैरेंचे एक मृदंगासारखे वाद्य. याचे दोन भाग असतात- एक पडगा किंवा पडगी अथवा झील. हे लहान असून उच्च स्वर काढते व दुसरे बंध, धूम किंवा धम. हे मोठे असून खालचा स्वर काढते. [क.सब्बळ]

संबळी स्त्री. देव व देवाची उपकरणी ठेवायची वेताची करंडी, पेटी. [क. संबाळिगे = टोपली]

संबंध पु.१. संयोग; नाते; योग; धागादोरा. २. स्पर्श : 'एकेका अवेवाचा संबंधु देति'- लीचउ १७. ३.(ल.) विवाह; लग्न. ४. संभोग : 'संबंधु दीधला : गर्भसंभुति जाली'- लीचउ ६५.५९९. [सं. सम् + बन्ध्]

संबंधन न. संयोग; संयोजन; परस्परांना जोडणे. [सं.]

संबंधिया पु.पती.

संबंधी पु. आप्त; नातेवाईक; नातलग.
वि. संबंधाचा; नात्याचा; निगडित; तद्विषयक; युक्त.

संबंधीक वि. १. संबंधाचा; विषयीचा; संयोजित. २. राक्षसी स्वभावाचा. ३. पिशाच्च, समंध विषयक.

संबंधीन स्त्री.संबंधी याचे स्त्रीलिंगी रूप; संबंधिनी.

संबंधी सर्वनाम सर्वनामाचा एक प्रकार; दुसऱ्या नामाशी अथवा सर्वनामाशी संबंध असणारे किंवा दाखवणारे सर्वनाम.

संबार पु.१. चटणी. (खा.) २. मसाल्याच्या पदार्थाचा वाटून तयार केलेला गोळा. [सं. संभार]

संबाहणे उक्रि. संवाहणे; चोळणे; मर्दन करणे. [सं. संवाहन]

संबुद्धि-द्धी स्त्री. ऐकमत्य; सहमत. [सं.]

संबो(मो)खणे अक्रि. १. हाक मारणे; पुकारणे. २. समजूत करणे; सांतवन करणे; आश्वासन देणे. [सं. सम् + बुध्, सम् + वोच्]

संबोधणे उक्रि. हाक मारणे; उद्देशून बोलणे; बोलावणे.[सं. सम् + बुध्]

संबोधन न. १. हाक मारणे; उद्देशून भाषण, आमंत्रण. २. (व्या.) आठवी विभक्ती. संबोधन विभक्तीचा अर्थ हे, अरे, अहो. ३.विशेषण; उपपद; पदवी. ४. (चुकीने) उदाहरण. ५ चिन्हांकन; (इं.) ब्रँड. [सं.] (वा) ० **देणे** – दोष किंवा ठपका देऊन बोलणे.

संबोधित वि. उद्दिष्टित; उद्देशिलेला; संदर्भित. [सं.]

संभउ-हु पु. साठा; संभव; भर. 'तवंचि आदरू बहु । जवं सुकृताचा संभउ' - ऋव १७१. [सं.]

संभरण न. पोषण. [सं.]

संभरणे अक्रि. जबाबदारी घेणे. [सं. सम्+भृ]

संभव पु.१. अस्तित्वाची शक्यता, योग्यता, पात्रता; शक्यता; संभवनीयता. २. अंदाज; शंका; संशय; ३. अनुसंधान; धोरण; धरबंद; सुमार. ४. जन्म; उत्पत्ती; निपज; अस्तित्वात येणे. (समासात) गर्भसंभव. ५. मिश्रण; संमेलन; समाहार; एकीकरण. [सं. सम्+भू = होणे]

संभवणे अक्रि. १. शक्यता असणे, असण्याचे सामर्थ्य, पात्रता, योग्यता असणे. २. अनुबद्ध, अनुयोगी असणे. ३. उत्पन्न होणे; प्रसवणे; जन्म होणे. अस्तित्वात येणे, असणे. [सं. सम्+भू]

संभ(भा)वनीय, संभवी, संभाव्य वि. शक्य; होण्यासारखे.

संभववारस पु. उत्तराधिकारी. हिंदू कुटुंबातील विधवेच्या पश्चात तिच्या पूर्वीच्या पुरुष वारसाचा वारस होणारी व्यक्ती; (इं.) रिव्हर्शनर.

संभवी वि. उत्पन्न करणारा, होणारा.

संभार पु. १. सामग्री; साहित्य. २. संग्रह; साठा; समुदाय. (समासात) गजसंभार, शस्त्रसंभार. ३. कोथिंबीर (व.). ४. लोणच्याचा वगैरे मसाला. [सं. सम्+भृ]

संभावणे उक्रि. संभावना करणे; आदर करणे; मान देणे; सत्कार करणे.

संभावना स्त्री.१. संभव; शक्यता; साहजिकता. २. धोरण; समज; शक्यतेसंबंधी अनुमान, कल्पना. ३. अंदाज; अनुमान; तर्क; कल्पना; अटकळ. ४. समज; गृहीतार्थ.५. बतावणी; आव. ६. आदरसत्कार; बहुमानाची वागणूक; बिदागी; देणगी; दक्षिणा; गौरव; प्रतिष्ठा.

७. औचित्य; सुसंगतता; योग्यपणा; सुसंबद्धता. ८. (व्या.) शक्यतार्थ. ९. अनिश्चित घटना. [सं.]

संभावनीक वि.संभावित : 'ये रामाइसे संभावनीके' - लीचउ ३१०.

संभावनीय वि. आदरणीय; सत्कारार्ह; सन्मान्य.

संभावित वि. १. शक्य; संभवनीय, होण्यासारखे. २. सुसंगत; सुसंबद्ध; योग्य; युक्त. ३. सभ्य; पतीचा; सन्मान्य; वजनदार; कीर्तिमान; प्रतिष्ठित. ४. कल्पिलेले; तर्किलेले.

संभाव्य वि.शक्य होण्यासारखे; संभवनीय.

संभाव्यता स्त्री. भविष्यकालीन क्षमता. (इं.) पोटेन्शिआलिटी.

संभाव्य विभ्रम (वास्ा.) शक्य असणारी चूक. (इं.) प्रॉबेबल एरर. [सं.]

संभाषण न.संवाद; बोलाचाली; खलबत; चर्चा. [सं.]

संभाळी स्त्री. संभावना; दक्षिणा.

संभाळू स्त्री. निरगुडी : 'काळे दाणे, कालोंजी, संभाळूची पानें एरंडेलांत द्यावी.' - अश्वप २.१०४.

संभूत वि.१. सुसंबद्ध; योग्य; सुसंगत; सयुक्तिक; शक्य. २. उत्पादित; जन्मलेले. [सं.]

संभूत-ति, संभूतवार्ता स्त्री. संभव; शक्यता; यत्किंचित सुगावा; माहिती; दखलगिरी; काहीतरी बोलवा वगैरेवरून शक्यता वाटण्यासारखी स्थिती.

संभूति-ती स्त्री.१. सुसंगतता; सयुक्तिकता; सुसंबद्धता; जुळणी. २. जन्म; उत्पत्ती; पैदास; निपज.

संभूयस मुत्थान पातीदारीचा धंदा; भागीदारी; संयुक्त भांडवलाचा व्यापार. [सं.]

संभृत वि.१. जमवलेले; एकत्र केलेले. २. संपादित. ३. सज्ज किंवा सिद्ध केलेले. ४. पूर्ण. ५. युक्त; सहित.

संभोग पु. १. उपभोग; विषयोपभोग; रतिसुख; मैथुन. २. उपयोग; वापर; सेवन : 'जो श्रद्धेचेनि संभोगें । सुखिया झाला ।'-ज्ञा ४.१८८.३. (साहित्य.) शृंगाररसाचा एक प्रकार.[सं.सम् + भुज्]

संभोगणे उक्रि.उपभोगणे (विशेषत: स्त्रीसुख); सेवन करणे. [सं. सम् + भुज्]

संभोगी वि.१. उपभोक्ता; भोक्ता; सेवन करणारा; उपयोग करणारा; वापरणारा. २. विषयी; लंपट; चैनी; रंगेल.

संभ्रम पु.१. गोंधळ; घोटाळा; गडबड; मोह; भ्रांती. २. औत्सुक्य; तीव्र इच्छा; आकांक्षा; उत्कंठा : 'मग संभ्रमें दिठीसेने । घालितसे ।'- ज्ञा १.१६७. ३. सादर; सन्मान; स्तुती : 'अथवा संभ्रमाचिया आयती । स्नेहा जैसा ये व्यक्ति ।'- ज्ञा १३.१८१. ४. डौल; नट्टापट्टा; ऐट. ('नावडे लौकिक संभ्रम।'-यावरून). ५. भ्रमण; गरगर फिरणे; भोवरा; चक्राकार गती. ६. पसारा; अवडंबर : 'आणिकही नाना संभ्रम । व्रतांचे ते ।'- ज्ञा १८.९९.७. चूक; हयगय; गोंधळ; गैरसमज. ८. (प्र.) समारंभ : 'हाचि हवन संपदेचा संभ्रमु।'- ज्ञा ८.५१. [सं.]

संभ्रमी वि.सन्मान्य; सत्कारित; आदर केलेला. [सं.]

संभ्रांत वि.१. गोंधळलेला; गडबडलेला; घोटाळा उडालेला; भ्रांतिष्ट. २. व्यग्र; उत्कंठित; आवेशपूर्ण त्रस्त.

संभ्रांत अहंकार (नृत्य.) विक्षिप्तकरण पुढच्या बाजूस हात फेकून करणे. मग डावा पाय सूची करून डावा हात विक्षिप्त करणे व वक्ष:स्थलावर ठेवणे नंतर त्रिक फिरवून नूपुर, आक्षिप्त, अर्धस्वस्तिक, नितंब, कटिहस्त व कटिच्छिन्न ही करणे क्रमाने करणे.

संभ्रांतकरण न.(नृत्य.) मांडीच्या मागे हात वळवून ठेवणे, नंतर त्याच हाताने मांडीस विळखा घालणे.

संमत, सम्मत वि. अभिमत; मान्य; पसंत; कबूल. [सं.सम् + मत्]

संमत, सम्मत स्त्री. तरफ; दिशा; बाजू. [अर. सम्त्]

संमति-ती-त, सम्मति-ती-त स्त्री.१. मान्यता; कबुली; पसंती. २. ऐकमत्य; सहमती; अनुमती; रुकार. [सं.]

संमर्द पु. दाटी; गर्दी; तुडवातुडव; घर्षण. [सं.सम्+मृद्]

संमान, सम्मान न.कोर्टाचे बोलावणे. (इं.) समन्स.

संमार्ग पु.दर्वी, स्तुवा वगैरे यज्ञीय पात्रे दर्भाने साफ करणे. [सं. सम् + मुज्]

संमार्जन न. १.झाडणे; पुसणे; साफ करणे. २. सडासारवण करणे; धुणे. [सं.]

संमार्जनी स्त्री. केरसुणी; खराटा; झाडू.

संमिती स्त्री.पाठीतील कण्याच्या दोन्ही बाजूंना असलेली समसमान रचना. (उदा. दोन फुप्फुसे, दोन मूत्रपिंडे.)

संमिश्र वि.मिसळलेले; मिश्रित. [सं.]

संमुख, सम्मुख क्रिवि.अभिमुख; समोर; पुढे; तोंडासमोर. वि. विरुद्ध; विरोधी. [सं.सम् + मुख]

संमूढ वि. १. उन्मत्त; प्रेमांधळा; मदांध. २. बुद्धिभ्रंश झालेला.

संमेय वि.एकच आकार असलेल्या (आकृती). [सं.]

संमेलन न.१. जमाव; मेळा. २. मिश्रण; मिलाफ; भेसळ. ३. संमिश्रण. ४.विशिष्ट हेतूने निमंत्रित केलेली भव्य सभा.

संमोह पु.१. भ्रम; भ्रांती; अविवेक; अज्ञान. २. मूर्छा. [सं.]

संमोहक वि.संमोहिनी विद्या जाणणारा व तिचा प्रयोग करणारा; संमोहनकारी.

संमोहन न.१. आमिष; भुलवण्याचे साधन; वशीकरण. २. ज्यामध्ये संमोहित व्यक्ती संमोहकाच्या सांगण्याप्रमाणे वागते अशी कृत्रिम निद्रावस्था. [सं. सं+मुह् - मोहन]

संमोहर क्रिवि.पुढ्यात, पुढे आलेले; प्रत्यक्ष : 'क्षराक्षरत्वे संमोहर जालें। ते पुरुषत्वें वालिलें।'-ज्ञा १५.४४१.

संयत धावि. मर्यादित; आवरलेला; स्वाधीन ठेवलेला; संयमित. [सं. सम्+यम्]

संयतशील वि.(काव्यशास्त्र) अभिजात (वाङ्मय, कला इ.). (इं.) क्लासिकल.

संयति-ती स्त्री.इंद्रियदमन; संयमन; नियमन.

संयम-न पु.न.१. निर्बंध; बंधन; मर्यादा. २. निग्रह; दमन; आवर; आळा; दाब. ३. व्रत; नियम.४.(योग.) ध्यान, धारणा व समाधी मिळून होणारा निग्रह. [सं. सम्+यम्]

संयमी पु. ज्याने आपले विकार ताब्यात ठेवले आहेत असा निग्रही पुरुष; तपस्वी; योगी.

संयंत्र न. अनेक साध्या यंत्रांची गुंतागुंत असलेले महायंत्र.

संयान न. १. बरोबर, सोबतीने जाणे. २. आगगाडी. [सं.]

संयाव पु. सांजा; रवा व साखर यांचा तुपात केलेला पदार्थ. [सं. सम् + या]

संयुक्त–त धावि.१. जोडलेले; संलग्न; सांधलेले; संबद्ध. २. मिश्र; मिसळलेले; एकत्र केलेले. ३. संपन्न; सहित; युक्त. [सं. सम् + युज्]

संयुक्त सूक्ष्मदर्शक अतिसूक्ष्म वस्तूंचे निरीक्षण करण्यासाठी, नेत्रिका व पदार्थिक भिंग अशा दोन पदार्थिक भिंगाचे तयार केलेले उपकरण.

संयुक्त स्वर दोन स्वर एकत्र होऊन झालेले ए, ऐ, ओ, औ हे स्वर.

संयुक्ताधान न.दोन भिन्न जातीच्या किंवा वंशाच्या प्राण्यांचा संकर.

संयुक्तिक वि. योग्य; सुसंबद्ध; सारासार विचारास पटणारे. [सं.]

संयुग न. दोन किंवा अधिक मूलद्रव्यांवर रासायनिक अभिक्रिया करून, घटकांपेक्षा भिन्न गुणधर्माचा तयार होणारा पदार्थ.

संयुजा स्त्री.१. अणूंच्या सर्वात बाहेरील कक्षेत इलेक्ट्रॉन संख्या आठ राहिली पाहिजे म्हणून इलेक्ट्रॉनची जी देवघेव होते, त्या इलेक्ट्रॉनची संख्या. २. हायड्रोजनबरोबर संयोग पावण्याची क्षमता.

संयुति–ती स्त्री.१. सांधा; जोड; मीलन; एकत्रीकरण. २. (ज्यो.) दोन ग्रह एका राशीत येणे; युती. [सं. सम् + युति]

संयोग पु.१. निकट संबंध; संघटन; मिलन; एकत्र करणे. २. मिश्रण; एकत्रीकरण; बेरीज. ३. जोड; सांधा; एकोपा. [सं. सम्+ युज्]

संयोगप्रीति–ती स्त्री.(रसा.) पदार्थातील परस्पराकर्षण; एकत्र होण्याची प्रवृत्ती. (इं.) ॲफिनिटी.

संयोगी पु.ब्रह्मचर्यव्रताचा त्याग करून ज्याने विवाह केला आहे असा गोसावी किंवा बैरागी; घरभारी.
वि. जोडलेला; जुळलेला.

संयोजक वि.१. जुळवाजुळव करणारा; योजना करणारा; नीट व्यवस्था लावणारा. २. सभेचा आमंत्रक; सभेचे कार्य करणारा. ३. (रसा.) योग्य परिस्थिती निर्माण करणारा. (इं.) अडॉप्टर.

संयोजन न.१. जुळवाजुळव; व्यवस्थापन. २. सांधणी; जोड; मिलाफ; संयोग. ३. जुळणे; एकत्र करणे. ४. आमंत्रण देणे. [सं.]

संयोजित वि. जोडलेले; सांधलेले; एकत्र केलेले.

संरक्षक वि.१. रखवालदार; पहारेकरी. २. रक्षणकर्ता; काळजी घेणारा. [सं.]

संरक्षण न.१. सांभाळ; रक्षण; राखण; निगा; जपणूक; काळजी घेणे. २. पालनपोषण. ३. सुरक्षा. ४. बचाव करणे. ५. सौरस्य. ६. मैत्री. [सं.]

संरक्षण जकात स्वदेशातील उद्योगधंद्याची वाढ व्हावी म्हणून आयात मालावर बसवलेली जकात, पट्टी.

संरक्षिका स्त्री. १. घडण; बनावट; रचना (यंत्र, दागिना इ.). २. अभिव्यक्तीची मांडणी. (भाषा).

संरक्षिका स्त्री.कोवळ्या वनस्पतींची नीट वाढ व्हावी, रोगापासून बचाव व्हावा म्हणून केलेली बंदिस्त जागा किंवा घर.

संरूपण न. १. अवयवांच्या आकारावरून झालेले सापेक्ष स्वरूप, बाह्यस्वरूप. २. (खगोलशास्त्र) ग्रहांची सापेक्ष स्थिती.

संलग्न वि. जोडलेले; चिकटलेले. [सं.]

संलक्षण न.१. गुणसूत्रातील किंवा रंगसूत्रातील दोषामुळे उत्पन्न होणारी विकृती. २. भावना; वर्तन. ३. वैशिष्ट्यपूर्ण लक्षणसमूह.

संलक्षिणे क्रि. जाणणे. – एभा २३.६२.

संलेख पु. करारनामा; दस्तऐवज. (इं.)डीड. [सं.]

संवत् पु. १. वर्ष; साल. २. विक्रमादित्याने स्थापन केलेला शक.

संवत्सर न. साठ वर्षांच्या कालचक्रातील एक वर्ष.

संवदड, सौंदड स्त्री. शमीवृक्ष : 'संवदड आपटा रानचारा हा तो दसऱ्याचा तुरा ।' –तुगा ४३७७

संवदृष्टि स्त्री. दृष्टादृष्ट : 'शिशुपालासि आणि श्रीकृष्णचक्रवर्तीसि संवदृष्टि जाली'– श्रीकृच ४३. [सं. सम– दृष्टि]

संवधुर स्त्री. स्वयंसिद्ध श्रेष्ठता : 'संवधुर विघडली : परब्रह्माची'–उगी ९०. [सं.]

संवरण न.आवर; नियमन : 'प्रत्याहारें मनाचें संवरण'– विद २१.

संवरणे सक्रि.आवरणे; सावरणे : 'म्हणौनि विश्व संवरलें। यऱ्हविं युगान्त होतें ओडवलें।'– ज्ञा १.१६०.

संवर्ग पु. ज्याचा प्रसंगानुसार विस्तार करता येतो असा सरकारी खात्यातील कायमस्वरूपी विभाग.

संवर्त, संवर्तक पु.१.मेघ; ढग. २.प्रलयमेघ; जगाच्या अंताच्या वेळी भयंकर वृष्टी करणारा ढग; जलप्रलय; महापूर.

संवर्तिका स्त्री.१. कमळ इ. चे कोवळे पान. २. दिव्याची ज्योत. [सं.]

संवर्धक वि.१. वाढणारे; उत्कर्ष पावणारे. २. उत्कर्षास नेणारे; पोषक; वृद्धिकारक.

संवर्धन न.वाढ; सुधारणा; उत्कर्ष; भरभराट; पोषण.

संवसरा पु. भांडवल:'मी संवसरेनि तेणे । संतांसि करी कर्णभूषणें।'– ज्ञा १४.१८

संवसाटी–ठी स्त्री. १. साम्य; तुल्यता. २. अदलाबदल; बरोबरी : 'मग माझिया संवसाठी । तुकसी जगीं।'–ज्ञा १८.१४९९.
क्रिवि. बदली; ऐवजी.

संवसारा पु. विस्तार; पसारा : 'कैसा वासनेचा संवसारा । देहा हो नेदी उजगरा।' – ज्ञान ५.५४.

संवहन न. विद्युत, उष्णता वाहून नेण्याची क्रिया.

संवहयंत्रणा स्त्री. विद्युतचुंबकीय लहरीचे प्रक्षेपण व परावर्तन यांचा उपयोग करून विमान, जहाज, पाणबुडी यांची दिशा, अंतर इ. ठरवण्याचे साधन; रडार.

संवाद पु.१. प्रश्नोत्तररूप संभाषण, चर्चा, परस्पर भाषण. २. अनुरूपता; जुळणी; मेळ. [सं.]

संवादणे उक्रि.१. विवेचन करणे; सांगणे; संभाषण करणे. २. एकमेकांशी बोलणे; चर्चा करणे. [सं. सम् + वद्]

संवादी वि.१. संभाषण कुशल; वादविवादपटू.२. अनुरूप; जुळणारा. ३.अनुक्रमानुसार.

संवादी स्वर (संगीत.) रागातील महत्त्वाने दुसऱ्या स्थानावरील स्वर; वादी स्वराशी जुळणारा स्वर. वादीपासून संवादीस्वर चौथा किंवा पाचवा असतो.

संवार पु.१. दाटणी; आकर्षण; संकलन. २. आकुंचन; (उच्चार करताना) ओठांचे बाह्य प्रयत्न. [सं.]

संवाहन न.१. वाहून नेणे; आणणे; नेणे; आरोहण. २. साह्य; साधन. ३. अंगमर्दन; रगडणे; चेपणे. [सं.]

संविति–ती–त्ति स्त्री.१. पूर्ण ज्ञान; योग्य समज; जाणीव. २. स्नेह; मैत्री; मित्रासंबंधी चांगली भावना. [सं. सम्+विद्]

संविदा स्त्री.करार; संमती. [सं.]

संविधा स्त्री. जुळणी; साहित्य.

संविधान न.१. संदर्भ; अनुसंधान; धागादोरा (इतिहास, कथा वगैरेचा); संबंध; जुळणी. २. व्यवस्था; तयारी; तजवीज.[सं. सम् + वि + धा]

संविधान न.(विधि.)घटना; संस्था चालवण्याचे उद्देश, नियम इ.

संविधानक न.कथासूत्र; गोष्ट; कथानकाची रचना.

संविधान तक्ता एखाद्या इमारतीचा तपशीलवार आराखडा. (इं.) ब्लूप्रिंट.

संविधि–धी पु.कायदा; परिनियम. (इं.) स्टॅट्यूट.

संवृद्धि–द्धी स्त्री. १.वाढ; विस्तार. २. सुबत्ता; विपुलता; समृद्धी; रेलचेल. ३. अभ्युदय; उत्कर्ष; भरभराट. [सं.सम् + वृध्]

संवेग पु. गतिप्रेरणा; वस्तुमान व वेग यांचा गुणाकार.(इं.) मोमँटम्.

संवेदक वि.ज्ञान देणारे; बोध करणारे. [सं. सम् + विद्]

संवेदन न.(मा.शा.) इंद्रियांना झालेल्या अनुभूतींचे अर्थपूर्ण जाणिवेत रूपांतर करण्याची प्रक्रिया; प्रत्यक्षज्ञान; वस्तुबोधन.

संवेदना स्त्री. ज्ञान; बोध; जाणीव.

संवेदनाग्र न.स्पर्शक; दूरदर्शन केंद्रावरून येणाऱ्या विद्युत चुंबकीय मॅग्नेटो लहरी ग्रहण करण्याचे साधन. (इं.) ॲन्टेना.

संवेद्य वि. स्वत:स कळणारे, जाणता येणारे (पण दुसऱ्याला सांगता न येणारे आत्मानुभव, दु:ख, कळ इ.).

संव्हरणे अक्रि. भंगणे : 'ते योग निद्रा न संव्हरे । तया योगिरायासि ।'– विसिं १.१०५. [सं. सम्–ह]

संशय पु.१. शंका. संदेह; मनाचा डळमळीतपणा; मनाचा अनिश्चय. २. वहीम; अंदेशा; विकल्प; अविश्वास; विपरीत भाव. ३. भय; धास्ती. [सं. सम् + शी = निजणे]

संशयवाद पु.परस्परविरोधी दोन मतांपैकी सत्य कोणते याचा निर्णय करता येत नाही अशी मन:स्थिती; जगाच्या उत्पत्तिलयासंबंधी, ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल वगैरे अनिश्चितता प्रतिपादन करणारे मत.

संशयार्थ पु. (व्याक.) क्रियापदाच्या ज्या रूपावरून संदेहात्मकबोध होतो ते त्याचे रूप.

संशयी वि.शंकेखोर; अनिश्चित मनाचा; घोटाळलेला.

संशुद्धि–द्धी स्त्री. स्वच्छता; साफसफाई; शुद्धता; पवित्रता. [सं.]

संशृ(श्रि)त धावि. आधार, आश्रय असलेले; रक्षित. [सं.संश्रित]

संशृति स्त्री. संसार; प्रपंच : 'नेदिजें चि संशृति । माथा उधों ।'–ज्ञा १४.४९.

संशोधक पु.१. शोध लावणारा; नवीन गोष्टी शोधून काढणारा. २. शुद्ध पवित्र करणारा; दुरुस्त करणारा. ३. एखाद्या विषयाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून निष्कर्ष काढणारा वा कार्यकारणभाव ठरवणारा. [सं. सम् + शुद्ध]

संशोधन न.१. नवीन शोध लावण्याची क्रिया. २. शुद्धी. ३. तपासणी; चौकशी. ४. दुरुस्तीची सूचना (सभेतील प्रस्तावाबाबत).

संशोधित धावि.शोधलेले; शुद्ध केलेले; तपासलेले.

संश्रय, संशृति–ती पु.स्त्री. आधार; आश्रय; आसरा. [सं.सम्+श्री]

संश्लिषता स्त्री.१.संलग्नता; संयोग; चिकटून असणे. २.अभ्यासाच्या चार भूमिकांतील तिसरी भूमिका. [सं.]

संश्लिष्ट धावि.चिकटलेला; कवटाळलेला; संलग्न.

संश्लेष पु. आलिंगन; मिठी; कवटाळणे; संलग्नता. [सं.]

संश्लेषण न.एकत्रीकरण; एकजीव करणे.

संसक्त धावि.१. जोडलेला; चिकटलेला; संलग्न; बद्ध. २. आसक्त; तत्पर; पाठीमागे लागलेला; अनुरक्त. ३. निकटचा; सुपरिचित; घनिष्ठ संबंध असलेला. [सं.सम् + सिच्]

संसक्ति–क्ती स्त्री.१. संबंध; निकटता. २. आसक्ती; अतिशय प्रवृत्ती; दृढ व्यासंग. ३. दाट परिचय; घसट. [सं.]

संसणे सक्रि. इच्छिणे : 'तरी हे (निर्वाणपद) ही ना संसी' – स्मृस्थ १६५.

संसद स्त्री. सभा; पार्लमेंट; राष्ट्रपती, राज्यसभा आणि लोकसभा यांचा समावेश असलेले लोकनियुक्त मंडळ; सर्वोच्च लोकप्रतिनिधीगृह. [सं. षद्= बसणे]

संसर पु. १. संचार; गमन; ये–जा; वापर. २. पसारा; संगती. ३. चूक; च्युती; प्रमाद : 'तेथ संसरेवीण जाय । बुद्धि तयाची ।'– ज्ञा ६.४५९. [सं.]

संसरण न. १. गमन; जाणे; पुढे सरणे; संचार. २. जन्म, स्थिती, लय वगैरे; जगातील अस्तित्व; आयुष्यातील व्यापार. ३. आत्म्याचे आगमन–बहिर्गमन; जिवाचा फेरा; जन्ममरणाचा फेरा. [सं.]

संसरणे अक्रि.१. जगणे व मरणे; जन्म, स्थिती, लय यातून जाणे. २. सावरणे; आटोपणे : 'तेणें संसरले निकरी। आपु विश्व ।'– ज्ञा ७.१३५.३. सरसावणे; उद्युक्त, प्रवृत्त होणे : 'वागोरे सांवरावया गोविंदा । संसरलिया।'– ज्ञा ११.२९६. [सं. सम + सृ]

संस(सा)रा पु.१. स्थिती; उद्भव; प्रादुर्भाव :'मोक्षाचा संसारा। उणा नोहे।' – ज्ञा १४.२८४; 'श्रीरामा आणि दिनकरा। वेगळिकेचा संसरा।'– स्वादि १.२.९०. २.पसारा; विस्तार : 'कैसा वासनेचा संसरा।'– ज्ञा ५.५४.३. लाभ; संगती; जोड; योग : 'कां स्नेहा, सूत्रा, वैश्वानरा । जालियाहि संसारा।'– ज्ञा १७.३५१.

संसरिसु क्रिवि.एकदम; तात्काळ : 'कीं अग्नी घातला पोतासु । ऐसें नव्हे संसरिसु । वेंच झाला ।'– अमृ ७.१७७.

संसर्ग पु.१. संबंध; संयोग; संगती. २.संघटन; परिचय; दळणवळण; व्यवहार. ३. स्पर्श; सान्निध्य; निकटता. ४.(आ.वे.) कफ, वात, पित्त यांपैकी कोणत्याही दोहोंचा क्षय किंवा प्रकोप. [सं.]

संसर्गरोधशाळा स्त्री.देशाबाहेरून येणारे प्रवासी व प्राणी साथीच्या व

संसर्गजन्य रोगाच्या प्रदेशातून आले असल्यास व योग्य ती लस टोचून घेतलेली नसल्यास देशात रोग पसरू नये म्हणून त्यांना अलग ठेवण्याची जागा. (इं.) क्वारंटाइन .

संसर्गित धावि.संबद्ध; युक्त. [सं.]

संसर्गी वि.१. संबद्ध; निगडित; निकटचा; जवळचा. २. परिचित; ओळखीचा वगैरे.

संसर्प पु.१. ज्यावर्षी क्षयमास असतो त्यावर्षी येणारा अधिकमास. २. सौम्यगती; हळूहळू सरणे, हलणे (साप, झरा इत्यादींप्रमाणे). [सं. सम् + सृप्]

संसर्पण न. पाणी तापत असतांना त्याच्या अणूंमध्ये उत्पन्न होणारी चक्राकार गती. पाणी तापले असता ते वर जाऊन वरचे थंड पाणी खाली येते. हा पाण्याचा गुणधर्म. [सं.]

संसंग पु. एकाच पदार्थाच्या रेणूंमध्ये असलेले आकर्षण.

संसाटी पहा : **सवसाटी** [सं.]

संसाधन न. (अर्थ.) १. उगमस्थान. २. साधन. [सं.]

संसार पु.१.प्रपंच; व्यवहार; कुटुंबपोषणादी कार्य; गृहकृत्य; घरकाम. २. जग; विश्व; सृष्टी; इहलोक; मानवी जीवित, अस्तित्व; जगाची स्थिती. [सं. सम् + सृ] (वा.) **संसाराची मात्रा करणे**- सर्व प्रपंचाचा बिघाड, नाश करणे.

संसार करणे ताडाचे पान कापून ताडी मोघ्यात पाडणे. (बे.)

संसारणे अक्रि.सरसावणे; पुढे होणे; उद्युक्त होणे. [सं. संसृ]

संसारा पु. १. समृद्धी; पसारा : 'असे सुकृताचा संसारा : तो हिरौनि नेति'- ज्ञाप्र ३४०. २. संयोग. [सं. संसार]

संसारिक-च्या वि. १. प्रपंचातील व्यवहार योग्य रीतीने करणारा. २. प्रपंचातील; प्रपंचासंबंधी. ३. प्रपंचात गढलेला. ४. केवळ ऐहिक गोष्टीचा विचार करणारा.

संसिद्धी स्त्री.१. नैसर्गिक स्थिती; स्वाभाविक स्थिती; सहजगुण; स्वाभाविक गुणधर्म; जातिस्वभाव. २. पूर्णता, पुरतेपणा; साध्यता; समाप्ती; फलप्राप्ती. ३. वैराग्य; विरक्ती; पूर्णज्ञान; आत्मज्ञान; यौगिक सिद्धी. [सं. सम् + सिध् - सिद्धि]

संसृति-ती स्त्री.१. सृष्टी; जग; विश्व; मानवी जीवित; सृष्टीची घडामोड; विश्वपरंपरा; संसार. २. प्रवाह; ओघ. [सं. सम् + सृ]

संसृष्ट धावि. संयुक्त; निगडित; सांधलेले; जोडलेले. [सं.]

संसृष्टत्व न. १. (कायदा) एकत्रपणा; अविभक्तता; विभक्त झाल्यानंतरचा पिता-पुत्र, अगर भाऊ वगैरेचा एकत्रपणा. २. एकी; मिलाफ; संयोग; जोड; संगती. [सं.]

संसृष्टि-ष्टी स्त्री. १. जुळणी; जोड; मिलाफ; संयोग. २. संग्रह; जमावाजमव; गोळा होणे. ३. विभक्त मालमत्तेचे निरनिराळे भाग पुन्हा एकत्र आणणे; ४.(अलं.) रूपकांचे मिश्रण; मिश्र रूपक. [सं.]
पु. एकदा विभक्त झालेला, पण पुन्हा आपला पिता, भाऊ किंवा चुलता वगैरेंबरोबर एकत्र राहणारा समायिक कुटुंबातील भागीदार. [सं.]

संस्करणे न.१. संस्कार करणे; प्राथमिक अवस्थेत असलेल्या गोष्टीवर प्रक्रिया करून ती अधिक उपयुक्त किंवा टिकाऊ करणे. २. अशुद्ध धातू धुऊन स्वच्छ करणे. ३. लेखनाची मूळ संहितेतील त्रुटी, दोष काढून निर्दोष करणे. [सं.समस्कृ]

संस्कार पु.१. हिंदू धर्मातील काही आवश्यक विधी. २. शुद्धीकरण; पवित्र करणे; कोणत्याही गोष्टीचे, शुद्धीकरण - दोष घालवून गुण आणण्यासाठी करण्याचा विधी. ३. (स्वयंपाक, औषधी रसायन वगैरे) तयार करण्याची क्रिया, कृती. ४. उजाळा देणे; साफ करणे; विशदीकरण करणे. ५. रूपांतर करणे; विशेष गुण उत्पन्न करणे; कोणतेही कार्य करणे. ६. एखाद्या गोष्टीचा ठसा उमटणे; परिणाम दिसणे. [सं.]

संस्कारणे सक्रि. अंत्यविधी करणे : 'लेकरू सरलें : तें संस्कारिलें'- लीचउ ५१३. [सं. संस्-कृ]

संस्कार्य वि.ज्याचा संस्कार करायचा आहे तो; संस्कार करण्यायोग्य.

संस्कृत स्त्री.न.गीर्वाण; ईश्वरी भाषा; व्याकरणनियमांनी बद्ध अशी भाषा.
धावि. १.ज्यावर संस्कार, कृती, क्रिया घडली आहे असा. २. शुद्धीकृत; पक्व. ३. अलंकृत; व्याकरणशुद्ध; उजाळा दिलेले; विद्वत्तापूर्ण.

संस्कृति-ती स्त्री.१.संस्कार; मनुष्याचे जात, राष्ट्र रूपी जे संघ आहेत त्यांचे भाषा, शास्त्र ज्ञानादी रूपाने होणारे स्वरूप. मानवी समाजाची बौद्धिक, धार्मिक, नैतिक, सामाजिक, कलात्मक दृष्टीने सुधारलेली परिस्थिती. २. मान्य आचारविचारांची व्यवस्था. ३. प्रकृतीत (निसर्गात) विकृती (विकार/बिघाड) होऊ नये म्हणून करण्याचा संस्कार. - भासंको. [सं.]

संस्थ वि.१. राहणारे; थांबणारे; अधिष्ठित. २. कडे शेवट होणारे; पसरवणारे; दिशेकडे असणारे. [सं.]

संस्था स्त्री.१. घटना, नियम इत्यादींनी बद्ध अशी संघटना. २. अनेक अवयव मिळून एखादे कार्य करणारी संरचना. उदा. पचनसंस्था, श्वसनसंस्था. ३.स्थिती; स्थान : 'पृथ्वी सूर्याभोवतीं फिरत असतांहि तिची आकाशांतील संस्था बदललेली दिसत नाही.'- मसापू ३१९. ४. शेवट; अंत. ५. थांबणे; रहाणे. [सं.]

संस्था स्त्री.सोय; बेगमी; तरतूद; तजवीज; व्यवस्था : 'कोकणामध्ये एखादी सेवा सेवकास योजावी म्हणजे कुटुंबाची संस्था होईल.' - पेद २५.७७. [सं.]

संस्थान न. १. लहानसे राज्य; राजाचा गाव; मांडलिक राजाचे राज्य. २. देवता, साधुसंत, पंडित वगैरेना नेमून दिलेले स्थान; ज्याला सरकारातून उत्पन्न मिळते असे देऊळ, मठ वगैरेसारखे स्थान; देवाला, मठाला उत्पन्नासाठी नेमून दिलेला गाव. ३. देवता, साधुसंत यांच्याकरता केलेली नेमणूक. [सं.सम्+स्थान +न]

संस्थानिक पु. संस्थानाचा मालक; मांडलिक राजा; ज्याच्या चरितार्थाकरिता एखादे गाव, प्रदेश नेमून दिले आहे अशी व्यक्ती. [सं.]

संस्थापक वि. पु. स्थापना करणारा; सुरू करणारा; योजक; प्रवर्तक. [सं.]

संस्थापणे उक्रि.१. स्थापना करणे; एखादी योजना सुरू करणे; घटना

घडवून आणणे. २. (धर्म, विधी) ठरवणे; निश्चित करून स्थापन करणे. ३. अधिष्ठित करणे; मांडणे. (राजा, मूर्ती). [सं.सम् + स्था]

संस्थापन–ना न. स्त्री. योजना; निश्चिती मांडणी; बसविणे; चालू करणे (राजा, मूर्ती, धर्म इ.). [सं.]

संस्थापित वि. ठरवलेले; योजलेले; स्थापन, रूढ केलेले. [सं.]

संस्थित धावि.१. निश्चित; स्थापित; पूर्णत्वास नेलेले. २. राहिलेले; आश्रित.

संस्थिति–ती स्त्री.१. पूर्णावस्था; शेवट; अखेर; निर्णय. २. कायम स्थान. ३. टिकाव; स्थिरता; एकाग्रता. ४. मुक्तता; वास. [सं.]

संस्पर्श पु. संबंध; संसर्ग; शिवाशिव; योग. [सं.]

संस्पृश्य वि. स्पर्श करण्यास योग्य, शक्य; स्पर्शसुलभ. [सं.]

संस्पृष्ट धावि. संबद्ध; स्पर्श केलेला; एकत्र आलेला; निगडित; युक्त.

संस्फीति–ती स्त्री. (अर्थशा.) (यथायोग्य स्थिती आणण्यासाठी मुद्दाम केलेल्या चलनसंकोचानंतर पुन्हा झालेला) चलनफुगवटा. (इं.) रिफ्लेशन; मंदी संपून तेजीला सुरवात होऊन पूर्वस्थिती प्राप्त होईपयतच्या काळातील भाववाढ.

संहत धावि. १.संघटित; गुंफलेला. २.एकत्र गोळा केलेला.

संहति–ती स्त्री.१. संघ; समुच्चय; एकत्रितता. २. जोड; मिलाफ.

संहरणे उक्रि. नाश पावणे, करणे; नष्ट करणे; लय करणे, पावणे. [सं. सम् + हृ]

संहर्ष, संहर्षण पु. न. संघर्षण; एकत्र घासणे; घासाघीस; उगाळणी; घोटणी. [सं.]

संहार, संहारण पु. न.१. नाश; लय; क्षय; विनाश; प्रलय. २. नि:पात; विध्वंस; मोडतोड; लोप (आकार,रूप, स्थिती वगैरेचा); उच्छेद. [सं.सम् +हृ]

संहार पु.१. गोळा करणे; जमवाजमव; एकत्र करणे; २. संक्षेप. ३. संकोच; आकुंचन. [सं.सम् +हृ]

संहारक, संहारिता वि. नाश, क्षय, उच्छेद करणारा.

संहित धावि. १. जोडलेले; सांधलेले; युक्त. २.एकत्रित; जमवलेले; गोळा केलेले. ३. संक्षिप्त; आकुंचित; संकोचित. [सं. सम् + धा]

संहिता स्त्री.१. (व्या.) सान्निध्य; अनुबंध; विना अडथळा योग. (दोन वर्णांचा संधी होण्यापूर्वीची स्थिती). २. वेदांची एकत्रित मांडणी, ग्रथन; वेदांची विशिष्ट शाखा. ३. ग्रंथाची रचना, मांडणी, एकत्रीकरण; शास्त्रादिकांचे मूळ ग्रंथ; पुराणादी ग्रंथ. ४. संग्रह.

संहिता शाखा १. सुधारित आवृत्ती. २. सुधारित आवृत्तीच्या आधारे तयार केलेले पाठ्यपुस्तक.

संक्षय पु. विनाश; विलय; प्रलय; (सामा.) नाश; नायनाट; मोडतोड. [सं.]

संक्षिप्त धावि. लहान, आखूड केलेले; सारांश रूपाने, मांडलेले. [सं.]

संक्षेप पु.१. सारांश; थोडक्यात मांडणी. २. (गणित) अंश व छेद यातून साधारण गुणक कमी करणे. [सं. सम् + क्षिप्]

संक्षेपण न. एकत्र आणणे; थोडक्यात मांडणी करणे. [सं.]

संक्षेपणे उक्रि. संकोचन, आकुंचन करणे; एकत्र आणणे; ओढणे; खेचणे. [सं. सम् + क्षिप्]

संक्षेपाक्षर न. केवळ अक्षरांनी केलेला संक्षेप. (इं.) शॉर्टफॉर्म.

संक्षेपत: क्रिवि. थोडक्यात; साररूपाने.

संज्ञक वि.नावाचा, नामेकरून. उदा. गुणसंज्ञक, विष्णुसंज्ञक.

संज्ञा स्त्री.१. नाव; आख्या; संकेत शब्द. २. संकेत; खूण; इषारा; चिन्ह. ३. गायत्री. ४. (व्या.) पारिभाषिक, शास्त्रीय नाव. ५. शुद्धी; चेतना; ज्ञान; बुद्धी. ६. मूलद्रव्याच्या पूर्ण नावाचे इंग्रजी अक्षराने दाखवलेले संक्षिप्त रूप. उदा. O = ऑक्सिजन; C = कार्बन इ. [सं. सम् + ज्ञा = जाणणे]

संज्ञातंतू पु. मज्जातंतू; ज्ञानतंतू.

संज्ञापत्र न.मुखपृष्ठ; नामपत्र.

संज्ञापन न.सजीवांची आपल्या मनातले दुसऱ्याला कळवण्याची प्रक्रिया. एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे माहिती, विचार, कल्पना, वृत्ती, भावना, जाणिवा अनुरूप माध्यमाद्वारे पोहचविण्याची कला, शास्त्रे व कौशल्य.

संज्ञाप्रवाह पु.(मानस.) व्यक्त होण्याच्या आधी मनात येणारे विचार, भावना इ.

संज्ञावली स्त्री.ग्रंथांच्या शेवटी पारिभाषिक वा महत्त्वाच्या शब्दांची दिलेली सूची; संज्ञासूची.

संज्ञीक वि.(सांके.) विशिष्ट चिन्हांनी दर्शित; विशिष्ट खुणांनी, हावभावांनी दाखवलेला; विशिष्ट संकेत, ठरावीक चिन्हे यांच्या योगाने जाणण्याचा.

संज्ञू वि.चालताना गुडघ्यास गुडघा लागणारा; ढोपरघाशा. [सं.]

संज्ञेय वि.दखलपात्र.

सा असा याचे संक्षिप्त रूप; सदृश, सारखा याअर्थी विशेषणे, क्रियापदे इत्यादींना हा प्रत्यय लागतो; हा प्रत्यय लागून तयार होणारा शब्द (वाक्यात) विशेषणाचे किंवा क्रियाविशेषणाचे कार्य करतो. उदा. बरासा, जाईसा, येईसा. कधी विधानाला जोर येण्यासाठी वापरतात : उदा. 'अरे, मीच सा काय'– मोर ६.

सा असा याचे संक्षिप्त रूप; सदृश, सारखा याअर्थी विशेषणे, क्रियापदे इत्यादींना हा प्रत्यय लागतो; हा प्रत्यय लागून तयार होणारा शब्द (वाक्यात) विशेषणाचे किंवा क्रियाविशेषणाचे कार्य करतो. उदा. बरासा, जाईसा, येईसा. कधी विधानाला जोर येण्यासाठी वापरतात. उदा. 'अरे, मीच सा काय'– मोर ६. [सं.]

सा स्त्री.१. लक्ष्मी; पार्वती; देवी. २. स्त्रियांच्या नावापुढे लागणारा प्रत्यय. उदा. रेणुसा, बाईसा. [सं.]

साअ(ई)त स्त्री.घटिका; मुहूर्त; क्षण. [अर. साअत्]

साइख(क)डे न.कळसूत्री बाहुली. [सं. सूत्रकृष्ट]

साइद मदतगार.–मुधो. [अर.]

साइदी साक्षी; साक्षीदार.

साइपण स्वत:; खुद्द.

साइल वि.निजलेले; झोपी गेलेले : 'उभळीचा उजगरा: सेजिया साइलेयां घरां।'– ज्ञा १३.५७३.

साइला पु. देवासाठी मारलेले जनावर. (को.) [क.साय=मारणे]

साइली स्त्री.सावली :'एथौनि तल्हाताची साइली की जैल'- लीचपू २१९.

साइलो पु. पुढारी : 'गोपाळांमध्ये साइलो तो एकु जाणता:'- लीचउ ४५९. [सं. स्वामिन्]

साई स्त्री.१. छाया; सावली. २.(ल.) आश्रय; छत्र: 'सकळ गोताचिच साई।'- तुगा ६९३.
वि. खिन्न : 'जरि तुझें हें चित्त साई ।'- शिगीता ६९. [सं.च्छाया]

साई स्त्री. स्वाती नक्षत्र. [सं. स्वाती]

साई पु.१. धनी, मालक, मोठा माणूस इत्यादींना सिंधी समाजात तसेच कर्नाटकात आदराने संबोधण्याचा शब्द; स्वामी (अप.). २. गोसावी; साधू. [सं.स्वामी]

साई स्त्री.१. आई. २. गर्ती. ३. छत्र. -लोसाको.

साईतसुईत न. साहित्य; सामान वगैरे : 'साईतसुईत काय लागावयाचे तें तयार कर, जा.'- बाळ २.१०६.

साईर पु. वसुलीचा किंवा कराचा एक प्रकार.

साईर स्त्री.१. ओळ; रांग (मुंग्या इत्यादींची). २. थवा; झुंड; झाक (पक्ष्यांची). ३. घोळका; घोंगाट; घोळ (माश्या इत्यादींचा). ४. कळप; झुंड (डुकरांची). ५.टोळके; समुदाय; यूथ (वानर व इतर जनावरे यांचा). [अर.]

साईर, साईरबाब पहा : **सायर,सायरबाब**

साईल स्त्री.मैत्रीण : 'मग सेजीया साइलीया असति तीया म्हणेति।'- दृपा ४४. [सं.सखी+ ल]

साईवान तंबूच्या चांदणीसभोवतीची उतरती बाजू.

साईस पहा : **सईस**

साउजी वि. सालस; गरीब. [सं. साधु;हिं.]

साउपा वि. पहा : **सावपा**

साउमा-मी-मे-मेया वि.क्रिवि. १. समोर; पुढे; सामोरा; सन्मुख : 'नागांबा साउमीं येति।'- पूजावसर. २. प्रत्यक्ष; साक्षात : 'तेथ साउमा घेयावा उवावो।'- ज्ञा १६.६२. [सं. सम्मुख]

साउमील वि.पुढील काळातील; भविष्यकालीन : 'दिसांचे राय आइकैं निरुते : साउमील आतां: '- रुस्वन २३५.

साउले न.एक प्रकारचे वस्त्र, लुगडे : 'काळें साउलें नेसली।'- कथा ६.१०.६३ [दे.प्रा.साउली]

साउळ स्त्री. पांढरेपणा : 'दाढी साऊळ धरी।'- ज्ञा १३.७५७.

साऊळ स्त्री.न. माड, पोफळी इत्यादीची झावळी; सावली.

साऊळशीर वि. चांगली वाढलेली; झुपकेदार.

साक स्त्री. शिजवलेली भाजी : 'रुचिकरे साकें वानिती:'- वह २०९.

साक स्त्री. पसा; एका हाताची ओंजळ (पाणी, धान्य इत्यादी घेण्यासाठी केलेली).

साक स्त्री.१. साक्ष; पुरावा. २. टेहळणी, पहारा, शोध यासाठी बसवलेला माणूस, माणसे. [सं. साक्ष्य]

साक स्त्री.१. व्यापारी पत, अब्रू. २. (सामा.) नेकी; शील. पहा : **साख**

साक, साकव, साकु पु. किल्ल्याच्या खंदकावर घातलेला लाकडी पूल. तात्पुरता लाकडी पूल.

साकखाणी वि. अब्रूचा; लौकिकवान.

साकटण-णे, साकटा न.पु. वस्तू ज्यावर ठेवून तोडतात तो लाकडी ठोकळा.

साकटणे उक्रि.१. साकटणावर ठेवून तुकडे करणे, तोडणे. २. (ल.) नाश करणे; धुव्वा उडवणे (सैन्य इत्यादीचा).

साकटी स्त्री.कळकाची काठी.

साकड-डा वि.१.अरुंद; आकुंचित; लहानसा. २. घट्ट; आवळ. ३. आखूड; थोटके (वस्त्र, पादत्राण इ.). ४. कठीण : 'तेवीं स्वधर्मु सांकडु।'- ज्ञा १८.९२६. [सं.संकट=अरुंदवाट]

साकड-डी स्त्री.न. १.अडचण; संकट.२ खड्डा; गर्ता. ३. कोडे; विचार. ४. ओझे; भार. [सं. संकट]

साकडणे क्रि.१. संकटात सापडणे.२. अवघडणे; अडचणीत येणे.

साकडा पु. गाडीची बैठक. [सं.सांगाडा]

साकण स्त्री. न. गाडीची आख व आखरी यांना बांधणारी दोरी; धूर व जू यांना एकत्र बांधणारी दोरी.

साक(ख)णे अक्रि.गोठणे; बोळणे; घट्ट होणे; थिजणे. [सं.सम्+कल्]

साकपाक स्त्री. अब्रू; पत; साख.

साकर पु.१. पाट, मोरी इत्यादीतील प्रवाह अडवणारा केर, पातेऱ्या, काटक्या वगैरे गाळ. २. गाताना किंवा बोलताना आवाज स्वच्छ न येण्याचे कारण असलेला गळ्यातील कफांश, बेडका, खाकरा. [सं. संकल्]

साकरू न.रताळे; कंद.(खा.)

साकल्य न.१. सकलता; संपूर्णता; नि:शेषता. २. सर्व समुदाय; एकंदर आकार, जमा, गोष्ट. [सं.]

साकवती स्त्री.भाजी :'बाइसे तेया (बोरा-) ची साकवती करूनि गोसावीयांचा ताटी ओळगवीति'- लीचपू ३५७.

साकसुरत वि.नीटनेटका; व्यवस्थित. पहा : **साखसुरत**
क्रिवि. उघडपणे; राजरोस; सर्वांदेखत.

साकळ स्त्री. १. पहा : **साखळ** १,३.२. बांध; कुंपण; सीव. [सं. शृंखला]

साक(ख)ळक पु. साकळण्याची, घट्ट करण्याची क्रिया करणारा घटक.

साकळकर पु.भिक्षेकऱ्याचा एक पंथ व त्यातील व्यक्ती. यांच्याजवळ एक साखळी असून ती ते स्वत:ला मारून घेतात. [सं.]

साकळण स्त्री. प्रतिबंध; मना करणे.

साक(ख)ळणे उक्रि.१. साखळीने बांधणे. २. नियंत्रण करणे.

साक(ख)ळणे अक्रि. १. गोठणे; घट्ट होणे; बोळणे; पहा : **साकणे.** २.बद्धकोष्ठाने युक्त असणे (आतडी, माणूस). [सं.सम्+कल्]

साक(ख)ळा पु. १. घट्टपणा; घनता. २. गोळा; गाठ. ३. बद्धकोष्ठता. ४. खडा (मलाचा).

साकळी स्त्री.पुराचा पाट, लोंढा (नाल्यात, खड्ड्यात घुसणारा).

साकळी स्त्री.१. गळ्याची लोंबती कातडी; पोळी. (को.) २. साखळी.

साका पु.१. दागिन्याला डाक लावण्यासाठी केलेले मिश्रण (तांबे व चांदी किंवा सोने यांचे). २. सोन्याच्या दागिन्यात लबाडीने घातलेला दुसरा हिणकस धातू किंवा एखादे मिश्रण. ३. पाण्याच्या प्रवाहातून वाहून आलेला गाळसाळ; पुलीन. ४. पहा : **साकळ.** ५. द्रवात न विरघळल्याने खाली-तळाशी बसलेला पदार्थ; अविद्राव्य पदार्थ. ६. (शिवणकाम) उरलेले कापड.

साका-खा सैन्याची पिछाडी.

साकाटा पु.१. पहा : **सांगाडा.** २.सापळा.

साकाटो पु. गोणपाटाचा तुकडा.(गो.) [इं.स्करिएट]

साकारणे अक्रि. आकार, देह धारण करणे; मूर्तिमान होणे. [सं. साकार]

साकांक्ष वि.१. उत्सुक; इच्छा असलेला; कामनायुक्त : 'योगादिकें साधनें। साकांक्ष आराधनें।'- ज्ञा ३.९०. २. श्रध्दाळू : 'राजा परमार्थे साकांक्ष'- एभा ३.३१. ३.संशयमुक्त : 'तुझा बोलु आम्हां । साकांक्षु पै जी ।'- ज्ञा १७.३४.

साकि(की)न १. राहणारा. २. वस्ती. [सं. स+आकांक्षा]

साकी पु.व्यापारी पत. पहा : **साक**

साकी स्त्री.एक मराठी वृत्त. यात दोन चरण असून शेवटी यमक असते. प्रत्येकात चार मात्रांचा एक असे सात गण असतात.

साकी वि.मागचे दोन पाय घोट्याखाली पांढरे असणारी (मेंढी). (जुन्नरी.)

साकी पु.दारूचा प्याला भरून देणारा मद्यालयातील पोऱ्या; मद्यगृहातील सेविका. [अर.]

साकीबाकी स्त्री.बाकी; शिल्लक.

साकुवे न.अंड : 'सांकुवें गाळिलें आकासी : रूपे चंद्राचेनि ।'- नरुस्व ४९६. [अर.सम् + कल्]

साकूळ पहा : **साका** ३

साकू(खू)ळ स्त्री.१.(शेतकी) भाजावळ केल्यावर न जळता अर्धवट राहिलेला राब, केरकचरा. २. चेंदामेंदा. (वा.) ०**काढणे** – अर्धवट जळलेला राब पुन्हा जाळणे.

साके(को)रा पहा : **साकर**

साको(कु)ली स्त्री.पाणथळ; दलदलीची जागा. (कर.)

साखबाज वि.पतीचा(माणूस); प्रामाणिकपणाचा (व्यवहार).

साखर स्त्री.ऊस किंवा बीट यापासून तयार केलेला शुभ्र कणीदार आणि रोजच्या उपयोगातला गोड पदार्थ. [सं. शर्करा;अर. सुक्करे; फा. शकर] (वा.) ०**खावप** – साखरपुडा करणे; लग्न ठरवणे.(गो.) ०**पेरणे, पसरणे** – १. गोडगोड बोलून वश करण्याचा प्रयत्न करणे. २. तोंड देखल्या गोड बोलणे. **साखरेची साल काढणे** – अतिशय सूक्ष्म व बारीक परीक्षा, छाननी करणे; नसता कीस काढणे. (निंदार्थी वापरतात). **साखरेने तोंड भरणे,तोंड भरून साखर घालणे** – चांगले, गोड बक्षीस देणे; तोंड गोड करणे.

साखरगोटी स्त्री.लहान पण गोड अशी आंब्याची एक जात.

साखरचौथ स्त्री. (महारी) भाद्रपद वद्य चतुर्थी.

साखरजांब पु. आतून गुलाबी असणारा पेरू.

साखरझोप स्त्री.पहाटेची झोप.

साखरनाते न. सासुरवाडीच्या नातेवाईकाबरोबरचे संबंध.

साखरनिं(लिं)बू-निबू न. गोड लिंबू; नारिंगाएवढे औषधी फळ.

साखरपाड्या पु. मुलांचा एक खेळ.

साखरपाणी न. १. पाहुण्याला आतिथ्य म्हणून देत असत ते साखर घातलेले पाणी; लिंबाचे सरबत. २. (व्यापक) फराळाचे पदार्थ.

साखरपारा पु.तूपसाखर व रवा यांच्या वड्या. [फा. शकर-पारा]

साखरपुडा पु.वधूच्या घरी जाऊन विवाह निश्चित करण्याचा विधी. यावेळी वधूला साखरेचा पुडा देण्याची पद्धत होती.

साखरपेंढ्या स्त्री.अव.गवताच्या पेंढ्यानी खेळायचा खेळ. हा भाद्रपद-आश्विन महिन्यात खेळतात.

साखरपोळी स्त्री. पुरणाऐवजी साखर भरून केलेली पोळी. [सं.]

साखरफुटाणा पु. वेलदोड्याचा दाणा, फुटाणा इत्यादींवर साखरेचा पाक चढवून करवंदाएवढी करतात ती साखरेची गोळी.

साखरफेणी स्त्री. साखरेचा मोठा बत्तासा.

साखररंगी वि. गुळी,खांडसरी साखरेच्या रंगाचे (वस्त्र).

साखरशेला पु.आखूड व लहान शेला.

साखरेची सुरी वरून गोड पण मर्मभेदी भाषण करणारा, गोड बोलून मान कापणारा (मनुष्य).

साखरोळी स्त्री.मोहन घालून केलेले रवा किंवा तांदळाच्या पिठाचे पुरीसारखे पक्वान्न. - गृशि ३९३.

साखसुरत वि.१.टुमदार; प्रमाणशीर. २.सुरेख; नीटनेटके. ३. पद्धतशीर; सशास्त्र; योग्य. ४. पटेल असे तयार केलेले, बांधलेले, रंगवलेले (जागा, भाषण, लेखन इ.).

क्रिवि. १. उघडपणे; राजरोस. २. प्रत्यक्ष; साक्षात.- ख्रिपु १.१५.

साखळ स्त्री.१. मोठी साखळी. २. रांग; ओळ. ३. बेडी; बंधन. ४. संबंध; जोड. ५. कडी(दाराची). (खा.) [सं.]

साख(खु)ळणे अक्रि.१. पहा : **साकळणे.** २. (कृषि.) राबातील गाळसाळ काढणे. [सं.संकलन]

साखळी स्त्री.१. अनेक कड्या एकमेकात अडकवून केलेली एक दोरीसारखी रचना. २. चांदी-सोन्याच्या कड्यांचा एक दागिना (पायात, कमरेत किंवा गळ्यात घालण्याचा). ३. दाराची कडी.(व.) ४. खेळाचा एक प्रकार.५.(पैमाष) जमिनीची मोजणी करण्याचे ६६ फूट लांबीचे व शंभर कड्यांचे एक माप. [सं.शृंखला; हिं.सांकल.]

साखळी स्त्री.१. नदीला पाणी चढले असता तिला फुटणारा पाट. २. नदीला घातलेला बांध; उतारासाठी नदी अडवणे.

साखळे न. साखळी; माळ :'कंठी शब्दवेधाचे साखळे ।'-शिव १११.

साखा, साखारा पहा : **साका** ३,५. [सं.संकलन]

साखाळा स्त्री.शाळा : 'साखाळाचिया उंचिया । पांता दृष्टी टांचिया।'- ऋ १६. [सं. शिक्षालय]

साखेय वि.स्नेहशील; मित्रभावाचा. [सं.]

साख्त स्त्री.१.संबंध; सख्य:' कोणाचें म्हणणें राव शिंदे यांसी साख्त आहे.'- मइसा ७.१९५.२. बजावणी :'आपला जिम्मा साख्त करीत जाईल.' - मइसा ८.२१७. [फा.साख्तन् =करणे]

साग, सागवान पु.इमारती कामासाठी उपयुक्त असे, कठीण लाकूड असलेले झाड. [सं.शाक]

सागर पु.१. समुद्र. २. मोठा साठा; खाण; आगर.

सागरगोटा पु.सागरगोटी वेलीचे बी; गजगा; मुलींच्या खेळण्याचे एक साधन. [त.उट्टै]

सागरगोटी स्त्री. एक औषधी वेल. हिला काटे असून पिवळी फुले येतात.

सागरा पु. घागरीसारखे भांडे. (कु.)

सागरी स्त्री. मुळ्याची शेंग; डिंगरी.

सागरी मैल समुद्रावरील अंतर मोजण्याचे एकक (१८५२ मीटर = १ सागरी मैल); (इं.) नॉट.

सागलाग पु. १.मनाचा कल. २. पाठलाग; प्रयत्न; बेत; योजना. ३.हेतू; ध्येय; उद्देश. ४.नेम; लक्ष्य. [लाग द्वि.]

सागवडा पु. अळूवडी; शाकवडा. (झाडी) [सं.]

सागवली स्त्री.लागवडीखालची जमीन. [क.सागिसु = लागवड करणे]

सागळ स्त्री. १.बकऱ्याचे कमावलेले कातडे. हे मऊ असून पादत्राणाच्या वरील बाजूस लावतात. २. पखाल; पाण्याची पिशवी; भांडे; जाड कापडाची किंवा कातड्याची पाणी शेंदण्याची पिशवी.

सागळा पु. पाण्याची झारी धरणारा नोकर; शागीर्द.

सागळी पहा : **सागळ** २

सागील पु. बायकोच्या बहिणीचा नवरा; साडू. (झाडी) [सं.सगोत्र, शालक]

सागु(गो)ती स्त्री. खाण्यायोग्य प्राण्याचे, बहुधा बकऱ्याचे मांस. [सं.]

सागू पु.१. एक झाड. २. याच्या सत्त्वाची गोळी; साबूदाणा. [मलायी]

सा(सां)गूळ स्त्री.१. फणसाच्या गऱ्याभोवती असणारा तंतू; पाती; चार. २. अठळ्यासकट फणसाची भाजी.

सागोनी वि.दगडी; चिरेबंदी.

साग्या,साग्या(गा)लाग्या(गा) वि.१.एखादी योजना, घटना घडवून आणणारा; युक्तिबाज. पहा : **लागलाव्या.** २.लबाड्या, कारस्थाने यात ज्याची बुद्धी चालते असा.

साग्र वि.१. तीक्ष्ण, अणकुचीदार टोक असलेला. २.समग्र; सगळा. [सं. स+ अग्र]

साग्रसंगीत वि.थाटामाटाने, वाजतगाजत पार पाडलेला (कार्यक्रम, समारंभ).

साच वि.१. सत्य; खरा : 'सर्व जाणे एक विष्णु साच खरा।'– तुगा ११. २. वास्तविक; खराखुरा; 'ठाव नाही बापाचा। अकुळी साचा श्रीकृष्ण।'– एरुस्व २.३. ३. समर्थ; बलवान : 'येणें दळभारू आघवा । साचु आमुचा ।'– ज्ञा १.१२४.
न. ब्रह्म : 'मग साचाचेंचि रूप होऊनि ठेलें।'– ज्ञा ५.१६०. [सं.सत्य]

साचणे अक्रि. १. जमणे; एकत्र गोळा होणे; थोडा थोडा जमून साठा होणे (पाणी, धान्य इत्यादीचा). २. संवर्धित, प्रज्वलित होणे : 'विपरीत ज्ञानदीपिका सांचली जे।'– ज्ञा १५.८२. ३. गोळा करणे; जमवणे; साठवणे : 'कृपणा ऐसा सांची अर्थ ।'– दास २.१०.३५. [सं. संचयन]

साचणे सक्रि.हलवणे. [सं. सम् + चल]

साचर (बांधकाम.) पहा : **सांड** [इं.स्लुइस]

साच(चा)ल–ळ पु. स्त्री.पावलांची चाहूल; आवाज, हालचालीचा आवाज.

साचवणी स्त्री.साचलेले, साचवलेले पाणी (विशेषत: फारसा उपसा नसलेले).

साचा पु.१. ठसा; मूस; एकाच प्रकारचे अनेक पदार्थ तयार करण्यासाठी केलेली विवक्षित घडण, यंत्र. २. एकाच जातीच्या पदार्थांचा समुदाय. ३. नमुना; कित्ता. ४. (कुंभारी) कोळंबे वगैरे करण्यासाठी मातीचा गोळा ज्यावर घेतात ती फळी. ही शेवटावर बसवलेली असते. ५. (मुद्रण.) आठ, सोळा पानांचा एक भाग; फर्मा. ६. संचय; साठा : 'उपरि सकंटक साचे परंतु सांचे जयांत सुरसाचे ।'–र८. [क. सञ्चु]

साचार वि.क्रिवि.१. खरा; सत्य : 'तैसी बोली साचारी । अवतरो माझी माधुरी।'– ज्ञा १४.३१. २. खरोखर. ३. अकृत्रिम; खराखुरा.

साचारिव–रैव, साचार्येपण स्त्री. खरेपणा.

साचीव वि. साचलेले; तळे, हौद इत्यादीत साठवलेले(पाणी).

साचेकाम न. १. ठसा, मूस तयार करणे. २. ठशात, मुशीत धातुरस घालून वस्तू तयार करणे. (इं.) मोल्डिंग.

साचेकार पु. ठसा, मूस करणारा. (इं.) मोल्डर.

साचेबंद वि. १. एकसारखे; ठरीव; साचीव; साच्यातून बाहेर काढल्यासारखे. २. कडक; ताठर.

साचोकार वि.यथार्थ. – भाप्र.

साचोकारेपण न.यथार्थ स्वरूप : 'हा डसु जंव न यें हाता । तंव माझे साचोकारेपण पार्था । न संपडे गा सर्वथा ।'–ज्ञा ९.१३५.

साचोल–ला–ळ पहा : **साचल–ळ**

साज न.एक प्रकारचे गवत; बेर. (को.)

साज वि.ताजे; टवटवीत : 'कां भूमीवेगळी झाडे, पाणी घेता कोण्हीकडे । न दिसती आणि अपाडे । साजी आथिण'– अमृ ४७९.

साज पु.१. लागणारे सामान; साहित्य; साधने; सरंजाम; कार्यासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी (समुच्चयार्थी). २. पोवाडेवाले, तमाशेवाले, जादूगार, नाचणारणी, गायिका यांना लागणारे साहित्य, वाद्ये, उपकरणे इ. ३. नाचगाणे करताना पायात बांधतात तो घुंगराचा चाळ. ४. जामानिमा; शृंगार (कलावंतीण, नट, शिपाई इत्यादींचा); नटण्यासजण्यासाठी लागणारा पोषाख, वस्त्रे इ. ६. पखवाज. ७. गळ्यातील एक दागिना. [सं. सज्ज]

साजक वि.पोटगी; ताट :'पांच महाल साजक दुधास म्हणून दिले.'– मराचिथोशा ५. पहा : **सानक**

साजक पु. एक धान्य; सावा. [सं. श्यामाक]

साजकरी पु.वाजंत्री, गवई, तमासगीर, गोंधळी इत्यादींच्या ताफ्यातील इसम.

साजकरोटी स्त्री.शपथेचा एक प्रकार.

साजकार पु.सोनार; अलंकार तयार करणारा.

साजगरी गवताळ माळ (जमीन).

साजगिरी–रा पु.(संगीत.) एक राग. गानसमय सायंकाळ.
साजण पहा : **सजण** [सं.सजन]
साजणी–नी स्त्री. १. पहा : **सजणी.** २. सखी; मैत्रीण. [सं. स्वजन]
साजणे न.१.मैत्री; सख्य. २. सौजन्य; प्रेम.
साजणे उक्रि.१.शोभणे; योग्य दिसणे. २. चांगले, योग्य प्रकारे समावणे. [सं. सज्ज]
साज(जि)रा वि.१.सुशोभित; शोभिवंत; अलंकृत. २. सुंदर; गोजिरवाणा; छान; देखणा; सुंदर. ३. सुस्थित : 'सर्वांग साजिरी आहेती इंद्रियें' – नाम ६७४. [सं.सज्जन] (वा.) ० **करणे** – एखादा प्रसंग, उत्सव सामुदायिकरित्या घडवून आणणे.
साजवार वि. लायक.
साजरेपण न.सौंदर्य; शोभा.
साजसरंजाम, साजसामान पहा : **साज** १ [सं.]
साजा वि.१. प्रसन्न : 'म्हणियाचेनि दाटपणें। साजा होय।' – ज्ञा १३.४३८. २.परिपूर्ण; भरलेला: 'कायि जलार्णव पाऊसें । साजा होय।'– ज्ञा १४.३३३.
साजा–जी–जे वि.१. नवा; साजूक. – हंको. २. ताजा; टवटवीत. ३. तयार; सज्ज.
साजात्य न. १. सावर्ण्य; साधर्म्य; सजातीयता. २. कुटुंब, जात, वंश इत्यादींचा सारखेपणा; आप्तपणा.
पु. सजातीय व्यक्ती, वस्तू.
साजापेजा वि.ताजातवाना; धट्टाकट्टा : 'साजापेजा असतां एकाएकींच वारला.'– राद १२४.
साजावणे क्रि.शोभिवंत दिसणे; खुलणे : 'परि तो पूर्णमेसीच पूर्णत्वासी ये। आणि कळंके साजावला होय ।'–स्वानु ६.१.३२.
साजाविंझा स्त्री. अव. डोंगर दऱ्या : 'राजा पीडिलीया प्रजा साजाविंझा सरण जातील.' – लीचउ ४४८. (को.)
साजिरा पु. एक मोठा वृक्ष. याची लाकडे इमारतीला उपयोगी असतात.
साजिवंत वि.जसेच्या तसे; हुबेहूब.
साजिंदा पु. १. कलावंतिणीच्या मागे राहून नाचताना वाद्य वाजवून तिची साथ करणारा. २. बजवय्या; वादन कुशल. [फा. साझंदा]
साजिंदी स्त्री.१. कळवंतिणीची मदतनीस स्त्री; साथीदारीण. २. व्यभिचारी, बेढंगी स्त्री. ३. साजिंद्याचे काम.
साजीखार पु. एक क्षार; पापडखार. पहा : **सज्जीखार**[सं. सर्जिकाक्षार]
साजीवणे अक्रि. मूर्च्छेतून सावध होणे : 'एणें नामामृतें साजीवली : क्षेणु एकु सावध जाली:'– शिव ८४७. [सं.सजीव]
साजीश–स स्त्री.१. संगनमत; सख्य. २. फसवणूक; कपट; मसलत. ३. हुन्नर; युक्ती. [फा.साझिश्]
साजीसी स्त्री.१. आर्जव. २. अब्रू; महत्त्व; मैत्री; सामीलकी. ३. पक्षपात; कारस्थान.
साजू पु. विशिष्ट वेळी किंवा विशिष्ट पेशा स्वीकारताना धारण करण्याचा उंची पोशाख. यालाच गोपाळवस्त्रे म्हणतात.
सा(जु)जूक वि.१. ताजा; नुकताच तयार केलेला (खाद्यपदार्थ). २. मूळ ठिकाणाहून नुकतेच आणलेले (पाणी, फूल वगैरे). ३. (सामा.) ताजे; टवटवीत; नवे.
साजूक तूप लोणी कढवून केलेले तूप. [सं. सद्यस्क]
साजे न. लहान देवळी; देऊळ : 'की तें ब्रह्मसुखाचें साजे सोहजळ'– मूप्र ३९१.
साजेसा वि.चपखल बसेल असा; शोभेल असा.
साझा पु. स्त्री. भागी. (ना.) [हिं.]
साट पु. माळा; गलबत इत्यादींवर कामट्या किंवा काटक्या टाकून केलेली तक्तपोशी; कामट्यांची तक्तपोशी, जमीन.
साट–ठ न.फणसपोळी; आंबा, फणस इत्यादीची पोळी.
साट पु.१. चाबूक; कोरडा; आसूड. २. तडाखा; फटकारा. ३.जोर; वेग : 'पवनाचा साटु । उचललेया नीटु। आगेसि बोभाटु । सांडिती मेघ।'– ज्ञा.१८.७३१. [क.काटी=चाबूक]
साट पु.स्त्री.१.अवकाश; जागा; वाव. २. पहा : **साठ.** (वा.) ० **घेणे** – दब्याची जागा धरणे. – ऐको.
साट पु.जमाव; संघ; संचणी.
साट भय.
साटकाविटका वि.मळलेला; खराब झालेला. [विटका द्वि.]
साटगी स्त्री.लहान चौकट; साटी.
साटण स्त्री.१.बढाई; निष्फळ बडबड. २. खोटीनाटी बातमी; गप्प.
साटणे क्रि.बढाई मारणे; निष्फळ बडबड करणे. (कु.)
साटणे अक्रि. एकत्र गोळा होणे; जमणे.
साटणे उक्रि.बाजारात आलेला माल एकगठ्ठा सर्व घेणे; माल घाऊकपणे खरेदी करणे. [हिं. सट्टा]
साटणे अक्रि. अडखळणे; प्रतिबंध होणे :'ते नेणो कैसे पाइक लाठे : पाखाणी खांडे न साटे'– शिव ९६१. [सं. शठ]
साटणे क्रि.भेटणे; छेदणे : 'कृष्णाचा शर साटवू जरि दिसे।'– गस्तो ८१.
साटप वि.१.पहा : **साटोप.** २. लवकर उरकणारा; जलद काम करणारा.
साट(टो)पा पु.१. साठवण. २. सामानसुमान. ३. कोठार; संग्रह.
साटबंद पु. धुरांडीला साटी बांधण्याचा दोर.
साटबाव स्त्री. साटीची दोन्ही बाजूची लाकडे.
साटभाऊ पु. साडू.
साटमार–री स्त्री.१. राजेरजवाड्यांचा खेळ. यात हत्ती रिंगणात सोडून त्याला चाबूक, काठ्या इत्यादींनी मारून पळवतात. २. हत्तींची झुंज.
साटमाऱ्या पु. साटमार खेळासाठी नेमलेला माणूस.
साटमोट स्त्री.गाठोडे : 'साटमोट माझी मोट बांधली'– ज्ञागा ५७८.
साटल्यामोटल्या स्त्री. अव. अनेक प्रकारच्या मोटळ्या, गठड्या; कपडे, दागदागिने, गुरेढोरे, चीजवस्तू इत्यादींबद्दल समुच्चयाने वापरतात. [मोटली द्वि.]
साटवा पु. साठा :'साटवा जाणोनि सकृत अंशेचा'– दावि २०.
साटा पु.१.(प्र.) छाटा; शिंतोडा. २.चिरोट्यासारखे पक्वान्न करताना लाटलेल्या पोळीवर, त्यांच्या घड्यात पसरून लावतात ते तूप, तेल इत्यादीसारखे मोहन.

साटा-टी पु.स्त्री. मोबदला; प्रतिदान : 'हरिनें जीवें केली साटी । पाडिली तुटी सकळांसी ।'- तुगा १२३.

साटा-टे, साटारा पु.न.पु.१. सांगाडा; चौकट. २. शिडी. (खा.) ३. पोकळी; छिद्र : 'तेथ पाणिवारेयां न बसे साटे'- रुस्वन ८६८.

साटा पु.ऊस.(व.,माळवा) [हिं.]

साटारणा, साटारा पहा : **सटारणा**

साटारा पु.रास; ढीग.

साटी-टे स्त्री.सट्टा; खरेदीचा करार. [गु.साटुं = खरेदी-विक्रीचा करार]

साटी-ठी स्त्री. १. आश्रय; संगत. २. साहाय्य. [सं. सति]

साटी स्त्री.१. गाडीची बैठक, तळचा भाग. २. साट; सांगाडा. ३. होडी झाकण्याची कामट्यांची हाथरी. ४.(सामा.) बांबूच्या कामट्यांची जाड हाथरी; पडदा. [सं. शकट]

साटी-ठी स्त्री.१. बरोबरी; सारखेपणा. २. स्पर्धा : 'साटी करी म्हणे होडा। महान् कवि रत्नाशी ।'- मुआदि १.६९. [सं.साटिका, सार्थे]

साटी-ठी स्त्री.नाश: 'जिवाची केली साटी।' - अकक २. शिवराम मुद्रिका.

साटी स्त्री.धडपड. [सं.साति]

साटीण न.एक प्रकारचे मऊ कापड. [इं.साटिन]

साटीश्राप (व.)पहा : **शाप**

साटेलोटे न.१. आपल्या घरची मुलगी दुसऱ्याच्या घरी व त्या घरची आपल्या घरी आणण्याची रीत, पद्धत; परस्पर शरीरसंबंध. २. मोबदला; देवाणघेवाण :'पुण्य कोणाला कोणे द्यावें। साटेंलोटें देवाकडे असे ।'- दावि ३८७. [क.साट-टि = अदलाबदल]

साटोप वि.१. व्यवहारदक्ष; व्यवहार, व्यवस्था यांची चांगली माहिती असणारा. २. आटोपशीर; थोडक्यात मावणारे; बेतशीर (कामकाज इ.). पु. खटपट; प्रयत्न; आटोप. [सं. स + आटोप]

साटोप वि.अहंकारयुक्त : 'परी साटोपु नोहे शरीरीं ।'- ज्ञा ६.४६. [सं.]

साटोप पु.१. अति नेट; खटपट : 'महा साटोप जो मांडी ।'- एभा १३.१११. २. चेव; आवेश :'मुळींच नाहीं बीजारोप । मा कैचा कामसाटोप तयासी ।'- एभा २१.३४२. ३. उत्साह.

वि.१. आवेशयुक्त. २. उद्युक्त : 'पुसोनियां होये । साटोप कर्मी ।'- ज्ञा १८.६२३. ३. धीट; उन्मत्त.

साटो(ठो)री स्त्री.सारण घालून केलेली पुरी.

साटोवाटी स्त्री.१. अदलाबदल. २. मोबदला. [क.साटी]

साठ वि.६० ही संख्या. [सं.षष्टि]

साठ पु.१. मावेल इतकी जागा; पुरेशी जागा (राहण्यासाठी, ठेवण्यासाठी). २. (ल.) क्षमाशीलता; क्षमा. ३. साठा; संचय. ४. आश्रय; दबा :'आम्ही मलंगडचे रानांत साठ म्हणजे दबा घेउं...' - वसईची मोहीम. [सं. सं + स्था]

साठण, साठवण न.स्त्री. १. साठवण्याचे भांडे. २. संचय; संग्रह. [सं.]

साठणी स्त्री. टेकण्यासाठी साटीवर बसवलेले लाकूड.

साठणे अक्रि. १. साचणे; जमणे; गोळा होणे. २. मावणे; राहणे. [सं. संस्था]

साठणे अक्रि. संकट सोसणे. [सं.]

साठबंद पु. साठी आवळून बसावी म्हणून ज्या दोन खिळी (सुरसे) धोडक्यातून आरपार घालून दोरीने बांधतात त्यापैकी प्रत्येक.

साठवणी न.(तळे, हौद, टाके इत्यादींत) साठवलेले पाणी.

साठवणे उक्रि.१. भरून ठेवणे; साठवण करणे. २. जमवणे.

साठवणे क्रि.रेखाटणे.

साठळणे अक्रि. म्हातारचळ लागणे; फार वय झाल्याने बुद्धिभ्रंश होणे.

साठा पु.१. संग्रह; संचय; ढीग; रास. २.संचित कर्म : 'तुटलासे साठा वासना चोखाळा । दिननिशी फळ राम जाला ।'- सोपान ७.

साठी शअ.१. करिता; स्तव. उद्देशवाचक किंवा हेतुवाचक अव्यय. २. मुळे; योगाने :'लिखितासाठीं जरी मी सांपडें ।'- एरुस्व ५.५४. ३. ऐवजी:'कां विटेसाठीं परीस जोडे ।'- एभा १९.४९४. [सं.सार्थे]

साठी स्त्री. १. साठाचा समुदाय, संच. २. साठ ही संख्या. ३. साठ वर्षांचे वय. ४. या वयात होणारी अवस्था; म्हातारचळ. ५. तांदूळ, नाचणी यांची एक जात. ६. ढीग : 'साखरेची साठी । तेथे मुंगी मुखवटी ।'- नाम १६९०.

साठी स्त्री. सहवास; संगत. [सं. सति]

साठी स्त्री. तुलना; बरोबरी. [सं. साटिका]

साठे न.साठ दिवसांनी पिकणारे भात. (कु.)

साठे(टे)खत न. साठे ठरवून करतात तो कागद. ठरवलेली सर्व रक्कम न देता काही थोडा विसार देऊन अमुक मुदतीत बाकीची देऊ असा करतात तो दस्तऐवज.

साठेबाजी स्त्री. वस्तूंची कृत्रिम टंचाई; साठा करून वस्तू दुर्मीळ करणे व ती अतिशय जास्त भावाने विकणे.

साठेरा-री वि.१.साठ दिवसात तयार होणाऱ्या तांदळाची एक जात. २.नाचणीची एक जात.

साठोपा पु. संग्रह; संचय.

साड पु. गाभा; मर्मस्थान (लाकूड, झाड इत्यादींचे). पहा : **नार**

साडंबर वि.शृंगारलेला : 'तो (गणेश) सेंदुरे साडंबरु :' - रुस्वन १. पु. शृंगारलेला नट : 'नाटारंभी साडंबर नाचत दीसती'- शिव ३३५. [सं. स + आडंबर]

साडादिडा वि. धड एकेरीही नाही व धड दुहेरीही नाही; बेतापेक्षा कमी अधिक; वेडीवाकडी (वस्त्रादिकांची घडी).

साडिया पु. सांडणीस्वार.

साडी स्त्री.१.स्त्रियांचे साडेपाच, नऊ मीटर लांबीचे वस्त्र; २. भारी वस्त्र; पैठणी.(ना.) [सं.शाटी;हिं. साडी; त. शोडल्, शाडी]

साडी स्त्री.(नाविक) काठी पारात बसवण्यासाठी अस्तमानावरून माल आड्याच्या खालच्या अंगाला भिडवलेले लाकूड.

साडू पु. बायकोच्या बहिणीचा नवरा. बहिणी बहिणीच्या नवऱ्यांचे परस्परांशी असलेले नाते. [सं. श्यालीवोढृ; गु. साडु]

साडे पु.अव.१. लग्नानंतर चवथ्या दिवशी ऐरणी पूजनाच्या वेळी वधूवरांना वस्त्रे देण्याचा सोहळा. २. याप्रसंगी देतात ती वस्त्रे. ३. (ल.) समाप्ती; शेवट. (वा.) **०करणे-** १. खलास करणे; खाते बंद करणे. २. (ल.)

काढून लावणे; गचांडी देणे. ३. खरडपट्टी काढणे. ० **चालणे** – हाल होणे : 'महाराजांच्या हुकुमाने त्याच्या मुलाचे साडे चालले आहेत.' – विक्षिप्त २.१०९.

साडे पु. अव. साडा (अर्धा) याचे अनेकवचन.१. आणखी अर्धा याअर्थी तीन पासून पुढच्या संख्यांना लावतात. उदा. साडेतीन. २. शिवी, अपशब्द. यापुढे आणखी, भरीस अर्धा याअर्थी वापरतात. उदा. साडेशिनळीचा मात्रागमनी. [सं.स+अर्ध]

साडे पन्हरे–पंधरे अगदी शंभर नंबरी नसलेले, कमी कसाचे सोने. (यामध्ये रुपयाच्या किंमतीचा संबंध नाही).

साडेभावार्थी वि. (उप.. निंदाव्यंजक) वरून भोळा पण आतून पक्का लबाड.

साडेसातकी स्त्री. साडेसात बिघे जमीन.

साडेसाती, साडेसातीचा फेरा स्त्री.१.एखाद्याची जन्मरास आणि तिच्या मागची व पुढची रास या तीन राशी क्रमण्याला शनिग्रहाला लागणारा साडेसातवर्षाचा काळ. २. (हा काळ कष्टाचा जातो यावरून ल.) वाईट, संकटांचा काळ; दुर्दैवाचा फेरा.

साड्यामाड्या पु. मुलींचा एक खेळ. हा खेळ खेळतांना पायांवरून हात फिरवत – 'साड्यामाड्या पापुड्या । गंगणीची लेकर माकुड्या ।' – हे गाणे म्हणतात.

साड्वळ न. कोवळे गवत : 'अथवा करूं साड्वळ । प्रसन्ना वृष्टी ।'– ज्ञा १८.४३१. [सं.शाद्वल]

साण स्त्री. होळी देवतेची पालखी ठेवण्याची जागा; देवतास्थापनेची जागा, कोनाडा (होळीच्या दिवशी लागणारा). [सं. स्थान, छादयति]

साण–णा स्त्री.पु.(प्र.)१.सहाण. २. निसणार. [सं.शाण]

साणपट्टी स्त्री.१. जात्याचे पाळे. २.पाळ्याचा दगड.

साणा पु.१. तरीचे नाके; उतारजागा. २. तर; नाव.

साणा पु.१. भागीदारी जमिनीत आपल्या भागाचे, मालाचे रक्षण करण्यासाठी ठेवलेला माणूस. २. कुळावर देखरेख करण्यासाठी जमिनीच्या मालकाने ठेवलेला माणूस. (वा.) **साणा–ण्या बसणे** – पीक काढून होईपर्यंत मालकाने हजर राहणे. (मक्तेकऱ्याने बोलावल्याशिवाय मालकाला साणा बसता येत नाही). (को.)

साणीलाणी स्त्री. सीमेची खूण (दगडात कोरलेली). (को.)

साणे–णी न. स्त्री. १. धूर जावा, उजेड, हवा यावी म्हणून भिंतीत किंवा छपरात ठेवलेली खिडकी; धारे. २. मूस; भातखाचरातील पाणी बाहेर जाण्यासाठी ठेवलेले दार.

साणे न. कोनाडा. (राजा.)

साणे न. फर्मान किंवा फर्मानाने दिलेले बक्षीस.

साणेपण न. पिकाची समक्ष झोडणी, मळणी.

सात वि.१.७ ही संख्या. २. (ल.) संख्येने मोठा; परिपूर्ण. उदा. सात ताड उंच, सात पडद्यात बसणे. [सं. सप्त] (वा.) **साता जन्माचा वैरी** – पिढ्यान् पिढ्याचा वैरी; हाडवैरी. ० **जानं पाच न्हानं** – घाबरणे; घाबरगुंडी उडणे. (अहि.)

न. सहा शास्त्रांच्या पलीकडील सातवे आत्मस्वरूप : 'साहीं पाठवणी करूनि । सातावरी घातु मांडिला ।'–ज्ञागा २६.

सात स्त्री.तिरकमठ्याला बांधतात ती बांबूची बारीक कांब.

सात स्त्री.१. क्रम; आवृत्ती; सातरे (विशेषत: साथीच्या रोगाचे). २. एकाच प्रकाराची, पद्धतीची, पदार्थांची पुनरावृत्ती. उदा. भाकरीची सात. मुलांची, मुलींची सात. (बायकोला) [सं. सतत]

सात मुहूर्त.

सात–थ स्त्री. (दसऱ्याला किंवा आवणीपूर्वी भगताने)ग्रामदेवतेपुढे नारळ फोडणे. – बदलापूर.

सा(सां)त स्त्री. १. बाजार; हाट. २. जत्रा; मेळा. ३. आठवड्याचा बाजार. (गो.) [सं.]

सातके न. लुगडे. (नंदभाषा) [क.]

सात(ता)डे न.१. कातडे; चामडे (माणसाचे किंवा इतर प्राण्याचे). २. कातड्याचा लोंबता पट्टा; वाभाडा. (क्रि. काढणे, निघणे.) ३. झाडाची, वनस्पतीची साल. [सं. स + आंत्र]

सातत्य न. सततपणा; शाश्वतता; अखंडितता. [सं.सतत]

सातपाच वि.१. पंच्याहत्तर. २. सात (धातू) व पाच (महाभूते) : 'सातापांचाचें गोठलें । प्रारब्धें आकारले ।'– तुगा २००४. (वा.) ० **करणे** – पुष्कळ विसंगतीनी भरलेली गोष्ट सांगणे; ताळमेळ नाही असे बोलणे.

सातपाणी पु.भिंतीवर चेंडू मारून तो झेलण्याचा खेळ; भिंतपाणी.– मखेपु ५१.

सातपात्र वि. अनेक. [सं.]

सातपानी वि.उगवल्यापासून सात पाने आली म्हणजे ज्याला फळ येते असा (दुधभोपळा, काकडी इत्यादींचा वेल).

सातपुडी स्त्री.(खाटिकी शब्द) आतड्याचे वेष्टन.

सातपुती स्त्री.१. घडघोसाळीचा वेल. २.सात मुलगे असणारी बाई.

सातपुते न. घडघोसाळ्याचे फळ.

सातफिरक न. एक शोभेच्या दारूचे झाड. याला सात फेरी (फिरती चक्रे) लावतात. ती पेटल्यावर फिरू लागतात.

सातबदी–दे स्त्री.न. पाच किंवा जास्त गड्यांनी चेंडूने खेळायचा खेळ.

सातबाराचा उतारा 'गाव नमुना सात व बारा' या नोंद वह्यातून उतरून घेतलेली – जमिनीचे क्षेत्र, सर्व्हे नंबर, मालकी, खरेदी विक्री, गहाण इ. माहिती.

सातभाई पु. शेतातील किडे वेचून खाणारा पक्षी.

सातमी स्त्री. (नाविक) गलबत हाकारणे; गलबत हाकारण्याचा परवाना. (हेट.)

सातयनी स्त्री. फोडणी. (व.)

सातरणे अक्रि.चहूकडून सारखा विस्तार होणे (झाडाचा); चांगले बहरणे, फैलावणे. [सं. सम + स्तृ]

सातर(रा)स, सातरवारा पु.(नाविक) ईशान्येकडील वारा; सप्तर्षिभागाकडून येणारा वारा. [सं. सप्तर्षी]

सातरा पु. १. भिक्षेसाठी पसरलेले वस्त्र : 'एथ सातरा पसरा गा:' – लीचउ २४९. २.अंथरूण : 'गोसावी पसाभरि धुळी सातरां घातली'–

गोप्रच १६. [सं.वस्त्र]

सात(थ)री,सात्री स्त्री. अंथरूण; बिछाना. (व.ना.)

सातरी स्त्री.१. सात दिवसांचा काल. २. सप्तक; सातांचा समुदाय.

सातरी स्त्री. घोड्याची एक विशिष्ट चाल.

सात(ते)रे न. पावसाचा वर्षाव.

सात(ता)रे न.१.सात दिवस आणि रात्र न थांबता पडणारा जोराचा पाऊस व वारा. २. सहा दिवसामध्ये जाऊन सातव्या दिवशी येणारा हिवताप. ३. (ल.) कधीमधी मिळणारी चांगली-वाईट गोष्ट सतत काही दिवस मिळत गेल्यास म्हणतात. ४. सात दिवसांचा काल; सप्ताह.

सातरना क्रि. भाजी फोडणीला टाकणे. (झाडी) [सं. सम + स्तृ]

सातलणे क्रि. संचणे. - मनको.

सातली स्त्री. भिरल माडाच्या झावळीची इरल्यासारखी शिवलेली पण वाटोळी छत्री; सतरी. (गो.)

सातव पु. (सामा.) सातू. [सं.सक्तु]

सातवडा पु.(आठवडा, पंधरवडा याप्रमाणे ८०-९० वर्षांपूर्वी बनवलेला शब्द). १. सात दिवसांचा काल. २. सात दिवसांचा एकंदर हिशेब.

सातव(वी)ण स्त्री. पु. न. एक झाड. याच्या एका डेखास सात पाने असतात; सप्तपर्णी. [सं.सप्त - छत्रपर्णी]

सातवळा-ळी, सातोळा वि. सातव्या महिन्यात जन्मलेले (मूल); सातव्या महिन्यात प्रसूत झालेली (स्त्री).

सातवाकडी स्त्री. सात दिवस एकसारखी पावसाची झड. [सं. सप्तवर्ष]

सातवेउळी स्त्री.सात नांग्यांची इंगळी.

सातसटी संवि.शहात्तर : 'पांचास्था सातसटी हा पूर्वपक्ष'-इप्र १३.५.

सातसडका स्त्री.अव. उष्णतेने हत्तीच्या गंडस्थळातून वाहणारा मदाचा स्राव. (क्रि. सुटणे). (वा.) **० सुटणे** - १. माजणे; उन्मत्त होणे. २. स्वच्छंदी, स्वैर बनणे.

सातसवाई वि.अतिशय वरचढ.

सातसाझ घड्याळ दुरुस्त करणारा.

सातसी स्त्री.१. नागवेल. २. नागवेलीसारखी सडपातळ स्त्री:'सातसीया परवडी वेढुनि बैसलीया असति' - लीचउ १०२.

सातळणे सक्रि.तळणे; फोडणी देणे; कमी तुपात, तेलात भाजणे किंवा तळणे किंवा परतणे. (इं.) शॅलो फ्राय [सं. सम् + तल्]

साता-ती,ते धावि. असता या अर्थी : 'जे योगु यागु न करितीचि । जन्मले साते।' - ज्ञा ४.१५४. [सं. सत् + सति]

सातारी स्त्री. १. मुंग्यांच्या वारुळाची जागा. २. या जागेवर बांधलेले देऊळ (नागाचे). (को.)

साताळ पु. सात दात असलेला बैल.(व.)

साती स्त्री. छत्र; छत्री; झुबका. पहा : **सातरणे** :'झळंबती पालव सातिया पाखेयांचिया' -उगी ४४१. [सं. सम् + स्तृ]

साती-ते अ. साताने गुणून; सातपट (पाढ्यात उपयोग).

सातू पु.१. गव्हासारखे एक धान्य. २. भाजलेले सातू, गहू व हरभरा यांचे पीठ.

साते न. बाजार.

सातेपोते चिंधी चिरगूट. (तंजा.) [सं. सक्तु]

सातेरू,सामिव न.एक विशिष्ट प्रकारचे मधाचे मोहळ.हे वारुळात असते व याला सात तोंडे असतात.

सात् अ.एक तद्धित प्रत्यय. १. रूपांतर पावलेला. २. सर्वस्वी आधीन. उदा. अग्निसात्; भस्मसात्.

सात्रक घोड्याची चार पायांवर एकदम होणारी दौड.

सात्रा स्त्री.पत्रावळ : 'एका सात्रेयाची पाने घेऊनि या'- लीचउ ५७७. [सं.]

सात्त्विक पु.सात्त्विकभाव. (काव्य, नाटकातील) भाव किंवा मनाची एक अवस्था; ही स्थायी आणि व्यभिचारी या भावांमधील असून हिच्या ठिकाणी सहज, अकृत्रिम, सत्य अशा भावना व्यक्त असतात.
वि.१. सत्य; पवित्र; प्रामाणिक; उत्कृष्ट; सत्त्वगुणांनी युक्त. २. सौम्य; हितकारक; रोगनिवारक (औषध, पथ्य इ.). ३. अर्थयुक्त; भरीव; ससत्त्व. ४. उत्साह, चैतन्य, बल, तेज इ. गुण असलेला. ५. अस्तित्व असलेला; वास्तवपूर्ण. [सं.]

सात्त्विक भाव सुखादी भावाने भावित होणाऱ्या अंत:करणापासून उत्पन्न होणारे भाव. हे आठ आहेत. [सं.]

सात्मीकरण, सात्मीभवन न.(शाप.) १. रक्तातील साधे, विद्राव्य अन्न घटक पेशीपर्यंत पोचवून त्याचे पेशींच्या विविध घटकांत रूपांतर होण्याची क्रिया. २.आत्मसात करण्याची-होण्याची क्रिया. ३.परिपाक; एकरसता; एकजीवपणा; समरसता. (इं.) ॲसिमिलेशन.

सात्वत पु. भक्त; भागवत धर्मानुयायी. [सं.]

सात्वती स्त्री. नाटकाच्या चार मोठ्या प्रकारांपैकी एक. यात सौम्य व सात्त्विक भावना दिग्दर्शित केलेल्या आहेत. [सं.]

साथ स्त्री. १. सोबत; संगत; सहवास. २. सोबती; स्नेही; जोडीदार. ३. मदत; ठेका (गाणेबजावणे, भाषण इ. वेळी). (क्रि.करणे) [सं. सार्थ किंवा स्वस्ति]

साथी, साथीदार पु.१. जोडीदार; सोबती. २. कामात मदतनीस; दुय्यम.३. (वाईट अर्थी) हस्तक; साहाय्यक.

साद पु.१. खचणे; २.थकवा. ३. थांबणे. ४. कृशता. ५. नाश; शेवट.

साद पु.स्त्री. १. हाक; येण्याविषयी बोलावणे. २. हाकेला उत्तर, ओ देणे. (क्रि. सादणे). ३.प्रतिध्वनी; पडसाद. ४. शब्द; ध्वनी : 'तंव त्या बैलाचा सादु आईकोनि।'- पंच. ५. (ल.) इच्छा : 'साद जाली तरी परियेसा । बोलिजेल।'- ज्ञा १०.१११. [सं. शब्द] (वा.) **० धरणे**- पडल्यामुळे किंवा भीतीमुळे रडण्याचा आवाज तोंडातून न निघणे (लहान मुलाचा); श्वास धरणे. **० परतणे** - पिकलेली अवस्था (फळाने, विशेषत: फणसाच्या) बदलेल्या आवाजावरून दाखवणे.

सादट वि.१. तिखट. २. मळका. - मनको.

सादढ क्रिवि. जोराने : 'ऐसा तो संजीवकु...चहुंकडे चरे : सादढ डरे' - पंचो ८.४. [सं.सदृढ]

सादत स्त्री. नशीब; सुदैव.

सादपरका वि.१.बदललेल्या आवाजाचा. २. पिकलेला (फणस इ.).

सादर वि. १. आदरयुक्त; मान, शिष्टाचार ठेवणारा. २. तत्पर; तयार;

सज्ज : 'तैसाचि गुरुभजनीं सादर ।'- एभा १७.३३१. ३. उत्सुक; आतुर : 'कां चंद्रकिरणी चकोर । जेवीं अत्यंत सादर ।'- एभा ७.१५६. [सं.]

सादर-रे क्रिवि. १.आदरबुद्धीने; पूज्यभावाने; नम्रतायुक्त. २. कौतुकाने : 'मैथुनभूत जे प्राणी । सादर न पहावे नयनीं ।'- एभा १७.३५०. ३. विचारपूर्वक : 'तो सादरें निरीक्षिता जाण । होय त्या सर्पाचें निरसन ।'- एभा २०.४६. [सं.]

साद(दी)र धावि.१. आलेला; आगत; उपस्थित; प्रविष्ट (पाठवलेले पत्र किंवा वस्तू). २. हजर केलेला; निघालेला; पावलेला : 'हुकूम सादर जाहला आहे तो पाहून मेहेरबानी संपादून घेणे.'- चित्रगुप्त ८. ३. प्रकाशित; संपादित (हुकूम, जाहीरनामा, शासनपत्र). [अर.सादिर]

सादरा पु. झपताल किंवा सूलताल ह्या तालात बसवलेले गीत.

सादरीकरण न.प्रस्तुतीकरण (नृत्य, नाट्य, गायन इ. कलांचे).

साद(दा)विणे अक्रि.१. साद घालणे; हाक मारणे. २. ताल धरणे; टिमकी वाजवून साथ करणे. (कर्ना.) ३. दवंडी पिटणे.

सादळ वि.सर्द; ओलसर. [सं. स + आर्द्र]

सादळणे अकि.सरदणे; ओलसर होणे.

सादापत (अशिष्ट) पहा : **साधनपत्र** (अप.)

सादिता स्त्री. आरंभ; आरंभत्व :'ऐशी सादिता बोलतां । होईल शास्त्रविरुद्ध ।'-एभा १०.७४६. [सं. स + आदिता]

सादिलवार-री, सादिरवारिद स्त्री.१. गावचा नैमित्तिक, आगंतुक खर्च (उत्सव, धर्मादाय, भत्ता इत्यादींसाठी). हा जादा पट्टी बसवून भागवला जाई. २. आगंतुक, आकस्मिक खर्च.

वि. नैमित्तिक; आगंतुक (खर्च, पट्टी, जमा इ.). [अर. सादिरवारिद]

सादी वि. १. बसणारा; आरोहण करणारा. (समासात) तुरंग-रथ सादी. २. (गौरवार्थी) घोडेस्वार; सैनिक; योद्धा. -मोकर्ण १०.१८. [सं. सद् -सादी]

सा(सां)दुकणे अक्रि. पेटणे; प्रज्वलित होणे; भडकणे : 'नातरी वडवानलु सांदुकाजा'- ज्ञा १.९०. [सं. संधुक्षण]

सादुकपणा पु.पेटवण; भडका.

सादुकार वि. आवाज, शब्द करणारा.

सादृश्य न. सारखेपणा; सदृशता; समानता. [सं.]

सादैणे अक्रि. साद देणे; शब्दांनी आळवणे : 'म्हणौनि मदनु सादैजे : लेकुरपणालागि:' - शिव ३७०.

साद्यंत वि. अवघा; साग्र; संपूर्ण.

क्रिवि. आरंभापासून शेवटपर्यंत; साकल्याने. [सं.स + आदि + अंत]

साद्रव-उ वि. १. ओला; हिरवागार : 'वणवा लागला साद्रव डोंगरा:'- सव ४३८. २. भावयुक्त : 'परमेश्वर संनिधानी पुरुषु साद्रउ ऐसा दिसे:'- दृपा २७. [सं.]

साधक वि.१.(कार्य इ.)सिद्धीस नेणारा; घडवून आणणारा; पुरे करणारा (माणूस, पदार्थ इ.). २.कार्यसिद्धीविषयी उपयुक्त; साधनभूत; उपकारक (लेख, वचन, पदार्थ इ.). ३. मोक्षसाधनासाठी जपतप, व्रतवैकल्ये, देहदंड इत्यादी करणारा (योगी, मांत्रिक); मुमुक्षू. ४. मदतनीस; शिष्य.

साधकता स्त्री.१. एखादी गोष्ट साध्य करण्याची हातोटी; सिद्धी. २. प्रसंगमान जाणणे.

साधक साजक वादी प्रतिवादी.

साधणी, साधणूक स्त्री.१. साधण्याचा व्यवहार; साध्य करून घेणे; संपादणे; मिळवणे. २. सिद्धीचा योग्य मार्ग, संधान. ३. साधन, उपाय, योजना, युक्ती (साध्य करण्याची); घडवण्याचे कौशल्य. [सं.]

साधणे सक्रि.१.(कार्य) सिद्ध होईल असे करणे; सिद्धीस नेणे. २. करणे; संपादणे. ३. मिळवणे; जिंकणे. ४. अनुकूल करणे : 'एकातें साधूनि मारिती ।'- ज्ञा १६.३४४. ५.पाळणे (व्रत, विधी इ.); साजरा करणे (सण, सुट्टी). ६. व्याकरण करणे, सांगणे; व्याकरणाप्रमाणे शब्दसंयोगाने बनवणे (शब्द).

साधणे सक्रि. मारणे; नाश करणे : 'हे मारले ते परथोडे । आणीकहि साधीन गाढे ।' - ज्ञा १६.३५२. [सं. सध्]

साधणे अक्रि.१. सिद्ध होणे, तडीस जाणे. २.यशस्वी होणे; भरभराटणे. ३. सुरळीत चालणे. [सं.साध् - साधन]

साधन न. १. साधण्याचा व्यापार; संपादन; प्राप्ती. २. करणे; बजावणे; उरकणे. ३. कारणभूत अंगे, पदार्थ; साहित्य; सामग्री; उपकरणे. ४.अवयव; अंगे; घटक. ५. योजना; क्लृप्ती; उपाय. ६. मध्यस्थ; अडत्या; गुमास्ता. ७. धार्मिक व्रतवैकल्ये (मोक्षप्राप्तीसाठी); मंत्रतंत्र, दानधर्म इत्यादी अनुष्ठान. ८. (न्याय.) निर्णयाला प्रमाणभूत गोष्ट. पुरावा; प्रतिज्ञा. ९. (कायदा) स्थापित करणे; सिद्ध करणे. १०. (औषध, किमया यासाठी) धातूंवर रासायनिक क्रिया, संस्कार (विशेषत: पाऱ्यावर). ११. जोड; संपादणी : 'आपल्याकरितां मी नरकाचं साधन केलं.' - इंप २९. १२. नाश; पराभव :'त्रिपुर साधन करावयासी ।'- गुच १.९. १३. मार. (व.) १४. तूप. (व.) १५. जेवणास रुची आणणारे मीठ, मिरची, ताक इ. पदार्थ : '(अन्न) रुक्ष असे : साधन काहीं नाहीं: '- लीचपू १५७. [सं.]

साधनद्वादशी स्त्री. सकाळी थोडावेळ असणारी द्वादशी. (पुढे त्रयोदशी लागत असल्याने एकादशीचा उपास थोड्या वेळात सोडण्याची व्यवस्था करावी लागते.)

साधनसंपत्ती स्त्री. माणसाला जीवनासाठी उपयोगी पडणारा निसर्गातील वस्तूंचा साठा.

साधनसूत्र न.१. कार्याचे, सिद्धीचे साधन, उपाय. (क्रि. करणे, लावणे.) २. (हक्क इ.) शाबीत करण्याचा पुरावा, साधन; खतपत्र; दस्तऐवज. ३. कार्याचा, संपादणीचा मार्ग, पद्धत.

साधना स्त्री. साध्यासाठी घेण्यात येणारे अपार कष्ट.

साधनिका स्त्री. १. तयार करण्याचे, कृतीचे शास्त्र, पद्धत, कला. २. (व्या.) व्याकरण करणे; वाक्यपृथक्करण. [सं.]

साधनी-णी स्त्री. १. गवंडी, सुतार इत्यादींचे जमिनीची सम पातळी पाहण्याचे साधन, हत्यार. (इं.) लेव्हल. २. अंगठी वगैरेच्या कोंदणाभोवतीची किनारी.

साधनी वि.१. सिद्धीच्या, संपादणीच्या कामी साधने, उपाय, योजना इत्यादी लावण्यात, शोधण्यात वाकबगार, हुषार, मेहनती; संपादन करणारा; साध्य करून घेणारा. २. संपादण्याच्या, तडीस नेण्याच्या

कामी योजलेले, साहायक, कारण असलेले (साधन, शस्त्र इ.). ३. सिद्ध, प्रस्थापित करणारे (लिखाण, खत).

साधनुक स्त्री. रचनाकौशल्य : 'जें घडितां साधनुक सरें : विश्वकर्मे याची' - शिव ३२८. [सं. साधन]

साधर्म्य न. सादृश्य; सारखेपणा (स्वभाव, गुण इत्यादींचा).

साधलाद स्त्री. दैवगती; नशीब; योगायोग.

साधवणे क्रि. वश करणे. (व.)

साधा वि.१. नक्षी, जर, रेशीमकाठ इत्यादी नसलेले (पागोटे, धोतरजोडा, कापड इ.). २. छानछोकी, अक्कड, ऐट नसलेला (माणूस). ३. वक्रता, अन्योक्ती, अलंकार इत्यादी नसलेले (भाषण, लेखन). ४.निष्कपटी; अकृत्रिम; गैरहिकमती; सरळ वृत्तीचा; गरीब. ५. मूळ रूपात, निर्भेळ, स्वच्छ असलेले; भेसळ नसलेले. [फा.सादा]

साधापिधा वि.१. पहा : **साधा**. २.(देशावर उत्तर भागात) गुबगुबीत; लठ्ठ व निरोगी (चेहरा, देह इ.).

साधाभादा वि. प्रौढ असून साधा व सरळ; प्रौढ व पवित्र.

साधारण वि.१. सामान्य; सर्वांना लागू पडेल असे. २. समाईक; सार्वत्रिक. ३. उत्कृष्ट नव्हे पण टाकाऊही नव्हे असे; मध्यम प्रतीचे.

न. १. सर्वसामान्य नियम, रीत. २. एका वर्गातील सर्व वस्तूंना, व्यक्तींना लागू पडणारा त्यांच्या ठिकाणचा गुणधर्म.

पु.१. चवेचाळीसावा संवत्सर. २. सामान्य लोक. - एभा २३.३१६. [सं.]

साधारण अवयव (गणित.) दोन किंवा अधिक संख्यांमध्ये असणारा एकच अवयव.

साधारण स्त्री. वेश्या; हलकी स्त्री; अकुलीन, भाडोत्री स्त्री.

साधारणे अक्रि.सुधरणे; उमजणे : 'परि बाइसा साधारे चि ना:' - लीचउ ३६५.

साधित वि.१. साधलेला; मिळवलेला; तडीस नेलेला. २.(व्या.) गुणधर्म युक्त; मूर्त. ३. (व्या.) उद्भूत; संभूत; प्रत्यय लावून बनवलेला. ४.(व्या.) यौगिक; संस्कारित; घटित. ५. (व्या.) दोन किंवा अधिक अवयव एकत्र येऊन बनलेला. [सं.]

साधु-धू वि.१. सरळ; योग्य; शुद्ध. २. पवित्र; सात्त्विक; सद्वर्तनी. ३. धर्मनिष्ठ; ईश्वरभक्ति-परायण. ४. विवक्षित दोषांपासून अलिप्त व विवक्षित गुणांनी युक्त. (वाक्य, भाषण, ग्रंथ, कर्म इ.) ५. हितकर; भले : 'ते आ ही वैर साधु न घडे । अचेतनासी ।' - शिव ४७२. ६. चांगला; व्यवस्थित; पूर्ण : 'वृषरूप दैत्य मारूनि तच्चर्मे साधु मढविले होते ।' -मोसभा १.९०.

पु. १.सज्जन माणूस; पवित्र पुरुष. २. संत; भगवद्भक्त. ३. योगी; ऋषी; मुनी. ४. महारांचा धर्मगुरू.

उद्गा. (द्विरुक्तीने) शाबास! भले बहाद्दर! : 'तों साधु! साधु! ऐसें वदले सुरनर म्हणोनि तो खवळे ।' -मोभीष्म ९.५२. [सं.]

साध्य वि. १. साधण्यास, मिळण्यास शक्य, योग्य. २.प्रतिकार करता येण्यासारखे, निवारण करता येण्यासारखे; जिंकता येण्यासारखे (रोग, शत्रू इ.). ३. तयार करण्याचे. ४.(तत्त्व.) अनुमान, निर्णय करण्यासारखे. ५.(कायदा) सिद्ध, प्रस्थापित करण्याचे; सिद्ध करून दाखवण्याचे. ६. (चुकीने) संपादित; प्राप्त; सिद्ध.

न. १. प्रमेयाचा भाग. २. उद्दिष्ट;हेतू.

पु. १.(ज्यो.) बाविसावा योग. २. १२ देवांचा एक वर्ग आहे. [सं.]

साध्यसाधन न.मिळवायचे ते मिळणे; सिद्धी लाभणे; हेतुपूर्ती.

साध्वस पु.भय; भीती : 'येणें प्रवर्तला साध्वसें । पार्थु बोलों ।' -ज्ञा ११.३८. [सं.]

साध्वी स्त्री.१.साधूची पत्नी. २. पतिव्रता; सती.

सान वि. १. लहान; बारीक; छोटे. २.थोडे; अल्प. ३. हलका; कनिष्ठ. ४. वयाने लहान. [सं.सूक्ष्म, श्लक्ष्ण]

सान-न्न स्त्री. केसुरणी; झाडणी. (गो., कारवारी)

सानक स्त्री.१. जेवणाचे लहान ताट; ताटली : 'सानक वाढोनी रुमालें झाकोनी ।' - रामदासी २.१२२. २. रोटी; अन्न. ३.निर्वाहासाठी दिलेली इनामजमीन (ही परत घ्यायची नसते). [अर. सहन्]

सानकरोटी स्त्री. शपथेचे अन्न; अन्नाची शपथ; बेलभंडारा.

सानट वि. चिमुकले; लहान; सान; बुटका; ठेंगणा.

सानणे क्रि. लहान होणे, करणे.

सानना पु. स्वयंपाकाचे भांडे.

क्रि. गाळणे. (झाडी)

सानपट्टी स्त्री. रंध्याला धार लावण्याचा दगड.

सानवणे क्रि. मुरणे; मुरू देणे.

सानसान क्रिवि.मंदपणे; मंजुळपणे : 'सानसान धृपदें गाति' - उह १०४.

वि. मंजुळ : 'तेथ सानु सानु स्वर । दोहिलें अंबर' - ज्ञागा २७. [सं.श्लक्ष्ण]

सानसून स्त्री. नि : शब्दता. (व.,ना.) पहा : **सामसूम**

साना पु. १.कोनाडा. २. गवाक्ष. (को.)

सानिल न.बहुतेक सजीवांमध्ये श्वसनाची क्रिया होताना प्राणवायूच्या सहभागामुळे होणारी प्राणिदीभवनाची प्रक्रिया.

सानीनहाल क्रिवि.नंतर; पुढे : 'सानीन हाल त्याची प्रती निघाली;' - मइसा २०.६७. [अर.सानील् हाल्]

सानुनय वि.१. नम्र; विनीत. २. सभ्य; मर्यादशील.

सानुनासिक, सानुस्वार वि. अनुस्वार असलेला; नाकात उच्चारायचा.

सानेजणे अक्रि.लहान होणे : 'दांतही आन होंती । परि अपाडे सानेजति ।' - ज्ञा ६.२६३. [सं. सम्+निज्]

सानेबा(वा)णे वि. थोडे बहुत. - शर.

सान्न न.तांदुळाच्या कण्यांचे एक पक्कान्न; सांदणे.(गो.कु.)

सान्निध्य न. जवळीक; शेजार; समीपता. [सं. सन्निध]

सान्निपातिक वि.१. सन्निपातासंबंधी. २. संकीर्ण. [सं.]

सान्ने-न्ये न. पिशाचबाधा झालेल्याच्या अंगावरून उतरून पिशाचाला दिलेला बळी (भात, कोंबडे इ.). (क्रि. देणे, टाकणे, उतरणे.)

सान्हाओ पु. आधार; कवच : 'मना होये सान्हाओ । धैर्याचा ।' - ज्ञा ६.१६५. [सं.सन्नह]

साप न.१. सरपटत जाणारा, दात असलेला, विषारी - बिनविषारी प्राणी;

सर्प; जिवाणू; किरडू. २. घोरपड; गार. (गो.) [सं. सर्प] (वा.) ० **खाई तोंड रिते** – (साप चावतो पण त्याच्या तोंडात काही येत नाही) एखाद्या कृत्याचा निष्फळपणा दाखवणे. ० **म्हणून भुई धोपटणे, दोरखंड झोडपणे** –नसता दोष लावून बोभाटा, शिक्षा करणे.

साप स्त्री. वर्तमान(काल) : 'महंत तंव बहुतां काळांचा आणि कौसिके जन्म सापेचा:'– ऋम १७२. [सं. सम्प्रति]

सा(सां)पई वि.कुबट; बुरसलेल्या धान्याच्या घाणीप्रमाणे घाण येत असलेले. (राजा.)

सापकंद–कांदा पु.एक विषारी कंद.

सापका पु.१. आणिबाणीची वेळ; ऐन संकटाचा प्रसंग; भयंकर संकट; धोका. २. स्वप्न; अपेक्षेच्या, विचाराच्या तीव्रतेमुळे (स्वप्नात किंवा जागेपणी) होणारा भास, दृष्टांत. [सं. स्वाप]

सापजीभ स्त्री.अगदी लहान शस्त्र. [सं.]

सापट स्त्री.फट; भेग; चीर(सांध्यास वगैरे असलेली). [सं.]

सापट–ड पहा : **सापई**

सापटी स्त्री. जाळीदार दोरी. ही बैलाच्या मानेखालून घेऊन जोखडाला बांधली जाते.

सापटे न. जीर्ण वस्त्र. [सं.संपुट]

सापटोळी स्त्री.सापाची एक विषारी जात.

सापड–डी, सापूड स्त्री.१. बारीक लांब लवचिक काडी, काठी. २.झाडाचा रोपटा.(राजा.) [सं.संपुट]

सापड पु.१. एकाने दुसऱ्याला गुंतवून किंवा बंधन घालून पकडणे, धरून ठेवणे; गुंतणी; अडकणी. २. शेतातील लावणी, बेणणी इत्यादी कामे लवकर व्हावीत म्हणून पुष्कळ कामकऱ्यांनी एकत्र येऊन गाण्याच्या तालावर, नादावर ईर्षेने कामे करणे.

सापडणे अक्रि. १. आढळणे. २. ताब्यात, हातात जाणे. ३. अडकणे (सापळा, संकट, पाश). ४. लाभणे; मिळणे; आकळणे. ५. येणे; मिळणे (संधी, फुरसत, वेळ इ.). [सं. संपतति]

सापडा–ळा पु.१. काठ्या, वासे इत्यादींचा केलेला माळा, मांडव, साट; साकाटा. (राजा.) २.छपर बांधणी; गवत पाने इत्यादींच्या खालवर घातलेल्या कामट्या. (राजा.) ३. पहा : **सापड–डी** [सं. संपुटा]

सापण न. वाटून तयार केलेले मिश्रण : 'जोन्हळे... सोंडीएवरि वाटिले...: वेसरू मागीतला : मग सापण करूनि ठेवले. '–लीचपू ५८२.

सापता वि. संपूर्ण.

सापती १. पहा : **सापटी.** २. टांग्याला घोडा जुंपण्यासाठी वापरली जाणारी कातड्याची पट्टी.

सापत्न वि. सावत्र.

सापत्नसंबंध पु.(कायदा) एका पुरुषाच्या दोन किंवा अधिक विवाहित स्त्रियांचा व त्यांच्या मुलांचा परस्परसंबंध.

सापत्न्य न.१. सवतपणा. २.(ल.) मत्सर; द्वेष; स्पर्धा. [सं.]

सापन न.फेस : 'तोंडेहुनि सापन निगे :'– लीचपू ५३९.

सापयंद–ध स्त्री. एक औषधी वेल. काळी व पांढरी अशा दोन जाती. याची पूड सापाच्या तोंडात टाकल्यास तो निर्बल होतो. – वगु ६.४५.

सापले न. सापाचे बीळ–२६७.

सापशिडी स्त्री.चौक असलेल्या बोर्डावर सापशिडीची चित्रे काढून व फासे टाकून खेळण्याचा खेळ.

सापशीण स्त्री. एक औषधी वेल.(कु.)

सापसारणी स्त्री. सुधारण्याची क्रिया.

सापसारणे उक्रि.१. सारांशाने व्यवस्थित मांडणे; उपसंहार करणे; तत्त्व काढणे (चर्चा, भाषण इत्यादींचे). (को.) २. दुरुस्त करून, जुळवून नीट करणे; साफसफाई करणे; सुधारणे (भोंगळ, अव्यवस्थित भाषण, बहकलेली, घसरलेली गोष्ट. इ.). (को.) ३. आवरून, आटपून ठेवणे (पसारा इ.). (को.) [सं.संप्रसार]

सापसिंप स्त्री.पावसाचा थोडा शिडकावा. [सं.सिंच्–द्वि.]

सापसुरळी, सापसोळी, सापाची मावशी स्त्री.सरड्याची एक विषारी जात. ही दिसायला सरड्यासारखी तर चालायला सापासारखी असते.

सापळा पु. १. नारळीचे सुकलेले पान; सुकी साऊळ. २. सुक्या साउळाची खोपट शाकारण्याकरता केलेली जुडी. पहा : **सावळ**

सा(सां)पळा पु.१. उंदीर, घूस, वाघ इ. प्राणी धरण्याकरता केलेले यंत्र; पिंजरा. २. अस्थिपंजर; हाडांचा सांगाडा. ३. किडकिडीत, बारीक माणूस. ४. (ल.) अडचण; षड्यंत्र; कारस्थान. [प्रा. संपल]

सापळा पीक मुख्य पिकाबरोबर लावलेले, मुख्य पिकावर पडणारे रोग, किडे आपल्याकडे आकर्षित करून घेणारे पीक.

सापाले न. जिथे अतिशय रान वाढले आहे, जिथे साप वगैरे हिंडतात असे निर्जन ठिकाण. (राजा.)

सापिका स्त्री.१. एक तांब्याचे नाणे. ।। शिवराई. २. दीड रुक्याचे जमिनीचे माप. साडेसात बिघे.

सापिंड्य न. १. सपिंडता. २.(कायदा) वर, वधू, यांचा बाप, आजा, पणजा इत्यादी एखादा पूर्वज अथवा मूळ पुरुष संबधित असणे.

सापेजणे अक्रि.कुबट, कुजट वास मारणे; नासणे (धान्य, पीठ इ.).

सापेक्ष वि. १. अपेक्षा, गरज असलेला. २. तुलना, तारतम्य, बरोबरी पाहून केलेले; संबद्ध. ३. अनुबद्ध; तत्तत्प्रमाणानुरूप; अवलंबून असलेले. उदा. कालसापेक्ष. [सं.]

सापेक्षत: अ.तारतम्यबुद्धीने. [सं.]

सापेक्षतावाद पु.सर्व गती सापेक्ष असून प्रकाशाची गती स्थिर असते अशा सिद्धांतावर आधारलेली पदार्थ विज्ञानाची उपशाखा; सृष्टीतील नैसर्गिक घटना या स्वतंत्र नसून परस्परसापेक्ष आहेत हा सिद्धांत.

सापेक्षा स्त्री. इच्छा; गरज; आवश्यकता असणे.

साप्ता पहा : **सापती–त्ती**

साप्ताहिक वि. आठवड्याचे.

न. आठवड्यातून एकदा प्रकाशित होणारे (नियतकालिक, वृत्तपत्र इ.). [सं.]

साफ वि.१. स्वच्छ; निर्मळ. २. निर्दोष; पवित्र; निष्कलंक; निष्कपट. ३. रोगांश, अपूर्णत्व, व्यंग इत्यादींपासून मुक्त; अव्यंग; निरोगी (शरीर, अवयव, प्राणी, पदार्थ इ.). ४. गुळगुळीत, एकसारखा, सरळ,

नीटनेटका (काष्ठपाषाण, बांधकाम, तयार केलेली वस्तू इ.). ५. सरळ; गूढार्थ, वक्रोक्ती, संदेह इ. दोष नसलेले (भाषण, लेख, प्रबंध). ६. उघड; स्पष्ट.
क्रिवि. १. निखालसपणे; बेधडक; स्वच्छपणे; उघडपणे (बोलणे, उत्तर देणे). २. पुरते; सर्व; एकंदर; अगदी (जळणे, भिजणे, करणे). ३. मुळीच; बिलकूल. ४. स्वच्छ; चांगल्या प्रकारे. [अ.साफ]
० करणे – छाटून टाकणे : ' जो आढळेल त्यास पाहताच त्याचे कान व नाक साफ करीत जावे.'– मइसा ५.६६.

साफल्य न. १. सफलता. २. फायदेशीरपणा; लाभ.
वि. सफल. [सं.]

साफसफा वि.१. स्वच्छ आणि निर्मळ. २.गुळगुळीत आणि तजेलदार. ३. नीटनेटका.

साफसफाई, साफसुफी स्त्री.१.तजेला; चकाकी; मऊपणा. २. स्वच्छता; टापटीप.

साफा पु. रुमाल; फेटा; पटका (डोक्याला बांधायचा). [अ.साफ]

साफी स्त्री.१. स्वच्छता; पावित्र्य; निर्दोषता. २. मऊपणा; सारखेपणा. ३. पहा : **सफाई.** ४. भांग, औषध इ. गाळण्याचे फडके. ५.चिलमीची छापी. ६. कत्तल; नाश.
वि. निवळ; अन्नवस्त्राशिवाय; नक्त; रोख : 'नॉनशिलेदारी पद्धतीत सर्वच सरकार पुरवते; फक्त त्यांस साफी पगार देण्यात येतो.'– हिंलइ ३३२.

साफोटी स्त्री. स्फोट. [सं. संस्फोट]

साब(बी)क वि.अ.१. पूर्वी; मागे. २.मागील.–ऐको.[अर. साबिक्]

साबका पु.नाव; पत; अब्रू; लौकिक.(को.)

साबड–डा वि.१. साधी; अलंकृत, प्रगल्भ नसलेली (कविता इ.) : 'साबड्याचीं कवनें ही कथा ।'– दावि ४०८. २. भोळा; गरीब; निष्कपटी : 'हा सदां पाणि बुडा । युधिष्ठिरू साबडा ।'– शिव ८९४. ३. एकनिष्ठ; अकृत्रिम : 'एका पाहिजे केवळ साबडी भक्ती ।'– मइसा ७.९.५३. ४. सरळ; शुद्ध; थाटमाट नसलेले.

साबण, साबू पु. मळ धुवून काढण्याचा एक रासायनिक पदार्थ, एक साधन. [अर. फा. साबून]

साबण माती कपडे स्वच्छ करण्याची खारी माती; मुलतानी माती.

साबणी स्त्री.एक प्रकारची मिठाई; साखरेच्या पाकाची कांडी.

साबर न. जादू; मंत्र तंत्र. [सं. शाबर]

साबर, साबरकांडे, साबर–री निवडुंग स्त्री. न. पु. त्रिधारी निवडुंग. [सं. शात्मली]

सा(सां)बर–री मीठ सांबर सरोवरातून, खाऱ्या जमिनीपासून काढलेले मीठ; एक क्षार.

साबरे न. ताटवा; कुंज; क्रीडागृह : 'तैसे माझेनि वीरहज्वरें । नावडे भोगाचें साबरें ।'– उगी १७४. [सं. शाल्मली]

सा(सां)बरे न. पाणी : 'जेथ चंद्र शिंपे सांबरें ।'– ज्ञा ९.३२४. [सं. शबर]

साबळ पु.पहार; गदेसारखे एक शस्त्र :'एका हातीं साबळ कोंतें'– उह १०७८.

साबळा वि.१. साधा; सौम्य; शांत; धीमा. २. पहा : **साबडा** २ [सं. शबल]

साबळे न. भाला. [दे.प्रा.सब्बल; क. सबळ]

साबाडी वि. मांत्रिक.

साबान पु. (प्र.) शाबान; अरबी वर्षाचा आठवा महिना. [अर.श+अबान]

साबीत कदम दृढप्रतिज्ञ.

साबिल १. रस्ता. २.मोहरमच्या सणात रस्त्यावर सरबते वाटणारा. ३. अशी सरबते ठेवण्याचे पाल.

साबूचे झाड रिठा.

साबूदाणा, साबूचे तांदूळ पु. सागू झाडाच्या सत्त्वाच्या गोळ्या; उपासाचा एक पदार्थ. [त.शवबु; हिं. सागूदाना]

साब्दी वि.ऐकीव; फक्त ऐकलेले : 'ते पुरुखांची साब्दी प्रसिधी आइकौनि... आली:'–लीचपू १६.

साभारी पु. आश्रयदाता; रक्षक; त्राता. [सं. स+आभृ]

साभिप्राय वि.क्रिवि.१. अर्थ असलेले; अर्थपूर्ण. २.हेतुपूर्ण. ३.मत व्यक्त करणारे. [सं. स+अभास]

साम वि.(वैद्यकी)आव, अपचन यापासून होणारा (रोग). [सं.]

साम न.पु.चार वेदांपैकी तिसरा वेद; सामवेद. यातील ऋचा गायच्या असतात. [सं. सामन्]

साम न.१.गोड, सामोपचाराचे बोलणे; सलोखा, तडजोड, समेट होईल असे भाषण, कृती. २. शत्रू, प्रतिस्पर्धी याला वळवण्याच्या चार उपायांपैकी पहिला.३. मैत्री; सख्य. [सं.]

सामक न. कर्जरकमेतील मुद्दल, मूळ देणे. [सं.]

सामका शअ. क्रिवि. समोर; पुढे. (राजा.)
वि. सरळ; नीट; योग्य. [सं. सन्मुख]

सामका(की)र (गो.) पहा : **सामका**

सामखोर पु. मित्र; सलोखा किंवा एकनिष्ठता राखणारा.

सामग्री स्त्री.१.सामान; साहित्य; एखाद्या कार्याला साधनभूत गोष्टी, पदार्थ यांचा समुदाय; शस्त्रास्त्रे; उपकरणे. (अर्थ.) आवश्यक वस्तूंची सज्जता. २. बौद्धिक ज्ञान : 'गोसावी अद्‌भुत सामग्री स्वीकारिली :' – लीचपू १५. [सं. समग्र]

सामग्र्य न. १. एकंदरी; समग्रता. २. अखंडता; पूर्णता. [सं.]

सामट स्त्री. बोळ; गल्ली. (व. ना.)

सामता, साम(मं)था पु. (सुतारी) भोक पाडण्याचे एक हत्यार; गिरमिट; बरमा. [सं. सम् + मंथ्]

साम(मा)दस्तक, सामदस्तखत न. धनकोच्या वहीवर ऋणकोने पैसे पावल्याची – कर्ज घेतल्याबद्दल करायची सही, लेख.

सामदी स्त्री. स्वयंपाकाचे साहित्य : 'बाइसाचीए हातीं अवघी सामदी दीधली :' – लीचपू ३२९.

सामधी स्त्री. तयारी; सज्जता; सिद्धता : 'राया म्हणे सामधी करा वहिले ।'– कालिकापुराण २२.४. [सं. सम+धा]

सामना पु. १. समोरासमोर असणे. २. विरुद्धता; प्रतिरोध. ३. युद्ध; लढा. ४. अनेक खेळाडूंमध्ये होणारा चुरशीचा खेळ; लढत. [हिं.]

सामनावीर पु. सामन्यात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारा खेळाडू.

सामनी–ने क्रिवि. समोर; देखत.

सामयिक वि. १. समयास अनुसरून असलेले. २. समयोचित; यथाकाल. ३. प्रासंगिक; नियमितकालिक. ४. नियुक्त; ठराव, रूढी याला अनुसरून असलेले. [सं. समय]

सामरस्य न. १. एकजीव, समरस होणे. २. ब्रह्मानंद; ब्रह्ममय होणे. ३. ऐक्यता. [सं.]

सामरिक वि. युद्धविषयक; समरासंबंधी (वाद्य, शास्त्र इ.). [सं. समर]

सामर्थ्य न. १. बल; शक्ती; जोर. २. लायकी; पात्रता; क्षमता. ३. गुण; शक्ती. ४. (व्या.) शब्दप्रभाव. ५. शब्दांतील परस्परसंबंध. [सं.]

सामलात स्त्री. १. भागी; हिस्सा; वाटणी (पैसा, माल, धंदा इत्यादीत). २. सामील, संयुक्त होणे; साहाय्य : 'भाऊसाहेबांच्या सामलातीत...चार पलटणे तोफासुद्धां द्यावी.' – ऐलेसं ११.५९०९. ३. शत्रूशी सख्य; कट : 'जागले पाटलांची कसूर किंवा सामलात दिसून आल्यास त्यांचे इनाम काढून त्यांच्या बिरादरांना देण्यांत येते.' – गांगा ५९. ४. समाइकी; संयुक्त मिळकत : 'एक रुईखेडें मात्र सामलातीत आहे.' – रात १०.२५०. [अर.शामिल चे अव शामिलात्]

सामवणीक्षम वि. शोषून घेण्याचा गुण असलेला.

सामवायिक वि. १. संघ, सभा, मंडळ यांतले. २. संघ, जमाव यासंबंधी. ३. समवाय संबंध असलेले. [सं.]

सामसाक स्त्री. तरवड्याची भाजी : 'परितीये सामसाके सदैवे :' – ऋव ५३७. [सं. श्यामशाक]

सामसूम न. स्त्री. शांतता; स्तब्धता; गडबड, हालचाल इत्यादींचा अभाव. क्रिवि. मुकाट्याने; गुपचूप. [सं. शांत+शून्य; हिं. सुनसान]

सामक्षा स्त्री. दृष्टांत; साक्षात्कार (देवतेचा). [सं. समक्ष अप.]

सामंत पु. जहागिरदार; प्रांताधिपती, मांडलीक राजा; हाताखालचा राजा. वि. १. मर्यादा घालणारा; सीमा, हद्द ठरविणारा. २. सीमेवरील; जवळचा; सन्निध. [सं.]

सामा पु. १. माल; सामान. २. सामग्री; तयारी; साहित्य. (व.) [फा.]

सामाजिक वि. १. समाजासंबंधी; समाजाची. २. सामुदायिक.
पु. सभेत बसणारा; सभासद; समाजातील व्यक्ती : 'स्वरचित कवनें जेव्हां तो म्हणे तेव्हां सामाजिकांच्या मनावर त्याचा प्रभाव होत असे.' – नि ३१५. [सं.]

सामान न. १. उपकरणी; हत्यारे; साधने. २. चीजवस्तू; माल; प्रपंचातील वस्तू. ३. (मुद्रण.) फर्मा जुळवून आवळताना सर्व पानांमध्ये सारखे अंतर पडण्यासाठी भरीस घालायचे लाकडी तुकडे.
पु. पोषाख; चिलखत. [फा. सामान्]

सामानपूर वि. समृद्ध.

सामानाधिकरण्य न. १. एकत्र राहणे; एकत्रता. २. वृत्तीची, कार्याची समानता. ३. (न्याय.) एकदेशीयत्व; एककालिकत्व [सं.]

सामानुक स्त्री. सामावणूक; समावेश : 'तेथ भीतरि भरलेल्या आनंदा। सामानुक सायासु।' – ऋ ९१.

सामान्य न. १. सर्वसाधारणपणा; समानता; अनेक व्यक्ती किंवा जाती यांच्याशी संबंध. २. जातीचा, प्रकारचा धर्म, गुण. ३. साहित्यातील एक अलंकार. एखादी वस्तू इतर तत्सदृश वस्तूंच्या सान्निध्यात असल्याने जेव्हा ओळखू येत नाही तेव्हा हा अलंकार होतो.
वि. १. सर्वसाधारण; सर्वांना लागू पडणारे; सर्वांचे. २. साधारण प्रतीचा; मध्यम; चांगला आणि वाईट, उच्च आणि नीच यांमधला. [सं.]

सामान्यतः क्रिवि. १. साधारणप्रकारे; सामान्य रीतीने. २. सर्व जातीला धरून; व्यक्तिशः नव्हे अशा प्रकारे. ३. सार्वत्रिकपणे. ४. व्यापक रीतीने; बहुसंख्येला, मोठ्या भागाला धरून. ५. बहुशः; नेहमी. ६. एकंदरीने; एकूण.

सामान्यनाम न. (व्या.) वस्तुमात्राचे किंवा पदार्थमात्राचे नाव; एकाच जातीच्या पदार्थातील सारखेपणामुळे दिले जाणारे सर्वसाधारण नाम.

सामान्य रूप (व्या.) नामाला विभक्तीप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागण्यापूर्वी बनते ते नामाचे रूप. उदा. घोडा, लाकूड यांना चा, ने, स, ला इत्यादी प्रत्यय लागताना किंवा पासून, पाशी ही शब्दयोगी अव्यये लागताना घोड्या, लाकडा, अशी रूपे होतात.

सामान्य लिंग ज्या नामाचे (पुरुषवाचक किंवा स्त्री वाचक) लिंग निश्चित करता येत नाही तेव्हा त्याचे लिंग सामान्य समजतात.

सामान्य, सामान्या स्त्री. वेश्या, बटीक: 'पात्रे भाट नागारी। सामान्य स्त्रिया काजुवारी।' – ज्ञा १७.२९६.

सामान्यीकरण न. जे सर्वांना लागू नाही ते लागू करणे; व्यापक करणे.

सामापसर्पित (करण) न. (नृत्य.) पायांचे स्वस्तिक करून त्यातून एक पाय काढून घेणे; शिर परिवाहित करणे व हात रेचित करणे. [सं.]

सामाव(य)णे अक्रि. १. प्रवेशून व्यापणे; मावणे. पहा : **समावणे.** २. एकरूप होणे; ऐक्य पावणे; मिसळून जाणे. [सं. सम् + आ + मा]

सामाशी, सामासकी स्त्री. दरसाल विणारी, म्हणून वर्षातून सहा महिनेच दूध देणारी (गाय, म्हैस इ.).

सामासिक वि. १. संयुक्त; जोडलेला; समासयुक्त. २. सामुदायिक. [सं.]

सामिक तान (संगीत) तीन स्वरांची तान. पूर्वी सामे तीन स्वरात म्हणत असावेत. [सं.]

सामिष वि. ज्यात मांस, मच्छी इ. आहे असे (भोजन).

सामीपत्र, सामीलनामा न. स्वत:ला सरकारची चाकरी करण्याचे सामर्थ्य नसले म्हणजे त्या कामासाठी भाऊबंद उभा करून त्याजपासून लिहून घेतलेला करार. – शर. [सं. स्वामीपत्र]

सामीप्य न. १. समीपता; सान्निध्य; निकटवर्तित्व. २. मुक्तीच्या चार प्रकारांपैकी एक. [सं.]

सामील वि. १. सहाय्यक; मदतनीस; जोडीदार. २. (हिशेब) समाविष्ट; अंतर्भूत; प्रविष्ट. ३. (शत्रूला) फितूर. [अर. शामिल्]

सामु(मो)ग्री स्त्री. १. (प्र.) पहा : **सामग्री.** २. (ल.) सामर्थ्य, ऐश्वर्य: 'ऐसी सामुग्री माझ्या अंगी।' – ज्ञा ३.१६२. [सं. सामुग्री]

सामुदायि(ई)क वि. १. समुदाय, एकंदर संख्या, रास यासंबंधी. २. जमाव, समाज, संघ यासंबंधी. [सं. समुदाय]

सामुद्र वि. समुद्रासंबंधी. [सं.]

सामुद्र न. शरीरावरील चिन्ह, खूण. [सं. सम + मुद्रा]

सामुद्रक पु. वि. १. दर्यावर्दी; खलाशी; नाविक. २. समुद्रतीरावर राहणारा.

सामुद्रधुनी स्त्री. (भूगोल.) दोन समुद्रांना जोडणारी पाण्याची अरुंद पट्टी, प्रवाह. [सं. सामुद्र + धुनि = नदी]

सामुद्रांड पु. समुद्रकाठचा एक माशासारखा प्राणी.

सामुद्रिक न. मीठ.

सामुद्रिक न.१. हात, पाय इत्यादी अवयवांवरील शास्त्राप्रमाणे असलेले शुभाशुभ चिन्ह. २. शरीरावरील चिन्हे पाहून शुभाशुभ वर्तवणे. ३. याचे शास्त्र, शास्त्रग्रंथ.

पु. हे शास्त्र जाणणारा; भविष्यवादी.

वि.१. शरीरावरील चिन्हांसंबंधी. २. या शास्त्राविषयीचे.

सामू न. १. जमिनीतील क्षाराचे आणि अल्कलीचे प्रमाण दाखवणारी प्रमाणपट्टी. २. आम्लविम्ल निर्देशांक.

सामूहिक वि. संघ, समूह, जमाव, समुदाय यासंबंधी. [सं.]

सामोपचार, सामोपाय पु. १. विशेष त्रास, दु:ख न देणारा औषधोपचार; सौम्य उपचार. २. सामाचा, गोडीगुलाबीचा प्रकार; सौम्य, शांत शब्दांनी एखाद्याचे मन वळवणे.

सामोरा क्रिवि. सन्मुख; पुढे (जाणे, येणे, होणे. आगत-स्वागतासाठी).

सामोसा पु. पुरीचा एक प्रकार. हिचा आकार त्रिकोणी असून आंत पुरण, सारण भरलेले असते. [फा. समोस:]

साम्ना पु. दिंडी दरवाजा. (झाडी) [फा.;हिं.]

साम्य न. १. सारखेपणा; सादृश्य; तुल्यता; समपातळी; बरोबरी. २. समता (संख्येची). ३. भेदाभेद नसणे; समभाव; तटस्थपणा. ४. (गणित) तुलना. ५. ऐक्य : 'द्वैताचा दुकाळू पाहे । साम्याचें सुयाणें होये ।' - ज्ञा १३.१७०. ६. (ल.) सुख: 'वैषम्य साम्याची वाखती ।'- ज्ञा १३.८०६. [सं.]

साम्यवाद पु. (राज्य.) समाजातील विषमता नष्ट केल्याने राष्ट्र सुखी होते हे मत. सर्व मालमत्तेवर समाजाची मालकी असावी, व्यक्तीने क्षमतेनुसार उत्पादन करावे व गरजेनुसार व्यक्तीला वेतन मिळावे, असे प्रतिपादन करणारी विचारप्रणाली.

साम्राज्य न. १. सार्वभौम राज्य; सम्राटाचे राज्य, सत्ता. २. निष्कंटक राज्य. ३. ज्या राज्यात चोरी, चहाडी, गांजणूक इत्यादी नाहीत, प्रजा सुखी आहे असे राज्य. [सं.]

साम्राज्यवाद पु. (इति.)१. सार्वभौम, एकछत्री राजाची सत्ता उत्तम असते असे मत. २. अन्य देशात वसाहती प्रस्थापित करून, त्यांच्या आर्थिक व अन्य शोषणाने स्वदेशाचे सामर्थ्य व संपन्नता वाढवायची अशी विचारसरणी.

साय, सायटी-टे स्त्री. १. दूध तापवले असता दूधावर येणारा स्नेहयुक्त पापुद्रा; दुधावरची मलई. २. उकळून घट्ट होणाऱ्या उसाच्या रसावरचा सायीसारखा पदार्थ, मळी. ३. नदीतील गाळ; खळमळ; साका. ४. सार; सत्त्वांश. ५. तात्पर्य; सारांश. [सं. सार, छाया; फा. साय]

साय स्त्री. १. सावली; छाया. २. रक्षण. ३. रक्षणासाठी आवश्यक गोष्ट; आश्रय, आडोसा, झाडी इ. [सं. छाया]

साय-या पु. साग; सागवानवृक्ष. [सं. साग]

सायक पु. बाण. [सं.]

सायकल स्त्री. पायांनी चालवण्याची दोन चाकी गाडी; दुचाकी.

सायकवाटी स्त्री. कन्यानिरीक्षणविधी. (खा.)

साय(यि)खडा, सायखड्याचे बाहुले पु. कळसुत्री बाहुले. [सं. सूत्र + काष्ठ, छाया + काष्ठ]

सायड-ळ पु. भागीदार. (व.)

सायन, सायनखेट, सायनग्रह पु. १. मेषसंपात बिंदूपासून गणलेला ग्रहाचा रेखांश. २. सौरवर्ष. [सं.]

सायनपद्धति-ती स्त्री. ग्रहांचे स्थान मोजतांना अयनगती हिशेबात घेण्याची पद्धती.

सायबर कॅफे संगणकाद्वारे संदेश पाठवण्याचे व माहिती मिळवण्याचे ठिकाण.

सायबाणी वि. रेशमाची एक जात; बेंगनवाडी. - मुंव्या ९७.

सायर स्त्री. रांग; ओळ.

सायर तोफखान्याकडील सामान्य शिपायाच्या दर्जाचा नोकर.

साय(ये)र न. १. मालावरचा कर; जकात; पट्टी, जमिनीवरील सोडून इतर कर. २. जकातनाके. [अर. साइर्]

साय(यी)र पहा : **साईर**

सायर पु. झाडझाडोरा : 'तुझीय जाळे आंतु सायेर थोर आसति.' - पंचो ४६.२३.

सायरा पु. पातळ थर, पापुद्रा, तवंग (पाणी, डोळा इ.वर येणारा.).[सं.]

सायरी स्त्री. एक झाड. यापासून तेल काढतात.

सायल (को.) पहा : **साइला**

सायवा(बा)न न. १. छत; चांदवा; मंडपी. २. मंडपाच्या बाजूचा पडवी सारखा भाग. ३. सोपा; पडवी. ४. छप्पर. (व.) ५. तंबूच्या चांदणी सभोवतीच्या उतरत्या बाजू. [फा.]

सायवानदार, सायवानी वि. मंडपीसह पाखी, छपरे असलेली; ज्याच्या बाजूने छपरे उतरली आहेत असा (मंडप इ.).

सायवीण स्त्री. देवी. (गो.)

सायसंगीत वि. १. तंतोतंत जुळणारे; पूर्ण ऐक्य असलेले. २. अगदी खरे, रास्त.

सायसंगीन वि. १. सुसज्ज; सर्व साधनांनी युक्त; तयार; संपूर्ण.२. पहा : **सांग**

सायं, सायंकाल-ळ स्त्री. पु. १. संध्याकाळ; सूर्यास्ताची वेळ. २. दिवसाच्या पाच भागातील शेवटचा काल.

सायंकाळी स्त्री. एक फुलझाड.

सायंकाळे न. संध्याकाळच्या वेळी फुलणारे एक फूल.

साया स्त्री. मार्ग.

सायार पु. जाळी : 'मोतियांचा सायारू बांधिला ।' - शिव ७१५. [सं. छाया]

सायास पु. अतिशय आयास; फार कष्ट; मेहनत.

सायासी वि. १. कष्ट करणारा; मेहनती. २. साहसी.

सायाह्न, सायान्ह पु. सायंकाळ. [सं.]

सायाळ स्त्री. अंगाला लांब लांब काटे असणारा प्राणी; साळू. [सं. शल्य]

सायुज्य न.१. चतुर्विध मुक्तीतील एक; हीत ईश्वर आणि जीव यामध्ये अभेद असतो. २. ऐक्य; संमीलन. [सं.]

सायुज्यता स्त्री. सायुज्य मुक्तीची अवस्था.

सार न. चिंच, अमसूल इत्यादी आंबट पदार्थ पाण्यात कोळून त्याला हिंग, मसाला इत्यादी लावून करतात ते कालवण. [द्रा. साऊ; सं.]

सार, सारकांड न. नावेचे परबाण शिडाला ज्याने जोडतात ते कडे, वादी, दोरी इत्यादी.

सार न. सोंगट्या, द्यूत याअर्थी टार, गार, नार (घोडा, जवाहीर, स्त्री) या शब्दांबरोबर वापरतात. या गोष्टींवर पैसा उधळला जातो.

सार स्त्री. सुरुंगाची दारू भरण्यासाठी केलेले छिद्र, खाच, पोकळी.

सार पु. न. १. सत्त्व; तथ्यांश; तात्पर्य; गाभा. २. साय; लोणी; अर्क. ३. सत्य. ४. बल; शक्ती. ५. एक अलंकार. एखाद्या वस्तूचा उत्कर्ष किंवा अपकर्ष चढत्या किंवा उतरत्या पायऱ्यांनी झाला आहे, असे वर्णन असल्यास हा अलंकार होतो. ६. गाभा; नार (झाडाचा). [सं.]
(वा.) ०**करणे** – पाठवणी, बोळवण करणे; निरोप देणे. (व.)
वि. १. श्रेष्ठ; प्रधान; मुख्य. २. उत्कृष्ट; अतिशुद्ध. ३. शाश्वत; नित्य : 'सार म्हणिजे शाश्वत। यास होईल कल्पांत। ते सार नव्हे।' – दास १४.९५.

सार(रू)क न. १. सुरमाडाची झावळी, फांदी. (को.) २. सुरमाडाचा लोंगरासारखा भाग. (को.)

सारक वि. १. जुलाबाचे, मलशुद्धीकरणाचा गुण असलेले (औषध). २. पुढे ढकलणारा, सारणारा.

सारक(के)त पु. राख : 'भरला धुळि सारकेते : निलेख उपखी देहातें।' – ज्ञाप्र ८५.

सारकी स्त्री. सुरमाडाच्या फांदीचा लहान झेला.

सारकू(के)त, सारखवट–टा न. पु. स्त्री. पु. सारखेपणा; सादृश्य.

सारखा वि. १. सम; सदृश; जुळता. २. समान; एक रूप. ३. सपाट; समपातळीचा, प्रकारचा; एक गुणी – वर्णी. ४. समभाव असलेला; समदृष्टीतला; आपपरभाव नसलेला. ५. योग्य; जोगता. ६. समभाग – प्रमाण : 'खनिज संपत्ती सारखी वाटलेली नसते.' – मदाव १.
क्रिवि. कमीजास्त न होता; एकसारखे; सतत. [सं. सदृश]

सारगार वि. घेण्यासारखे – टाकाऊ; चांगले वाईट; सत्त्वसंपन्न – निःसत्त्व.

सारगी स्त्री. (कोष्टी.) सूत वाळवण्याची जागा. (कर्ना.) [क. सारे]

सारगी स्त्री. खेप. (बे.) [क. सारिणी.]

सारघम, सारघुमव स्त्री. काळ्या रंगाची जोंधळ्याची एक जात. (माण.)

सारजवारी स्त्री. खराबी; नाश.

सारढेकर पु. करपट ढेकर. (राजा.)

सारण–णी स्त्री. लहान जाळीतून झाडावरून उतरलेले आंबे साठवण्याचे मोठे जाळे.

सारण न. १. सारणे; ढकलणे. २. करंजी, पुरी इत्यादी पक्वान्नात भरण्याचा गूळखोबऱ्याचा किंवा इतर मसाला; पुरण. ३. भाकरी थापण्यासाठी, पोळी लाटण्यासाठी तिच्याखाली घालतात ते पीठ.
स्त्री. १. पाट; कालवा; सारणी. २. कळक इत्यादीची बारीक कांब, चिपारी; सरी. ३. केरसुणी. (को., गो.) [सं. सृ = सरणे]

सारणिक वि. रस्ता, प्रवास यासंबंधी.
पु. तक्ता तयार करणारा; कोष्टककार. [सं.]

सारणी स्त्री. १. ग्रह, पंचांग इत्यादी सिद्ध करण्याचे गणिती कोष्टक; तक्ता; अंकजाल. २. रीत; मांडणी; विधी. (इं.) फॉर्म्युला. ३. सूत्र; सिद्धांत. ४. (रसा.) संकेत; चिन्हरूपाने, संख्येप्रमाणे लिहिलेली पदार्थाची घटना. ५. लहान नदी; ओढा. ६. पाट; नहर. ७. बैलांना मोट ओढता यावी म्हणून केलेला उतार; मोटेचा उतार. ८. (विणकाम) भेंडळ टांगून ठेवण्याची दोरी.

सारणे उक्रि. १. पुढे करणे; ढकलणे; दूर करणे. २. लोटणे; पलीकडे करणे. ३. निरास करणे; घालवणे : 'त्याक्षणें सकळ ताप सारिला।' – मोरा १.४६३. ४. खलास करणे; शेवट करणे; संपवणे. ५. आटोपणे; उरकणे. ६. काढणे; उपसणे (आंघोळीला पाणी इत्यादी). ७. सारवणे : 'पोळी केली : मग चुना सारीला :' – लीचपू ६२. ८. करणे : 'नित्य सारू हरिकथा :' – जना २१७. [सं. सृ]

सारत: क्रिवि. १. थोडक्यात पण जसेच्या तसे, मूळ स्वरूपात किंवा मूळ शब्दात. २. मुख्यत:.

सारथि–थी पु. १. रथ हाकणारा; गाडीवान. २. (ल.) सूत्रधार; कार्यवाह; प्रमुख. ३. साहाय्यक; संकट निवारक; पाठीराखा. [सं. सारथिन्]

सारथ्य न. १. सारथ्याचे काम, पेशा; रथ चालवणे. २. (ल.) साहाय्य; मदत. [सं.]

सारन् स्त्री. १. रांग. २. कळप. ३. उतार. (झाडी) [सं. सारण]

सारनुरी स्त्री. राळ्याचे पीठ व गूळ यांचे सारण घालून केलेली पोळी. (कर.)

सारनेटा क्रिवि. वेगाने; त्वरेने. – शर.

सारनोळी स्त्री. डाळीचे गोड पुरण घालून केलेली पुरी.

सारपणे सक्रि. ओरपणे; भुरकणे. (ना.)

सारपा पु. ढलप्यांचा ढीग.

सारफळी स्त्री. एक अलंकार; सरफळी.

सारभागी वि. शहाणा; गुणज्ञ : 'म्हणसी सारभागीजे जना' – रास ३.२७८. [सं. सार + भज्]

सारभुंकन–भूकण वि. नाकपुडीच्या आतील बाजूस पांढरा ठिपका असणारा (घोडा). हे अशुभ चिन्ह मानतात.

सारमंडळ न. एक तंतुवाद्य. हे लाकडी पेटीसारखे असून याच्या ३६ खुंट्यांना तारा गुंडाळलेल्या असतात. यात ३ सप्तके असतात.

सारमेय न. कुत्रा. [सं.]

सारल्य न.१. सरळपणा. २. (ल.) प्रामाणिकपणा; अकृत्रिमता; ऋजुता. ३. निर्भीडपणा; स्पष्टपणा (बोलण्याचा). ४. साधेपणा; स्वाभाविकपणा (रचना, पद्धती इत्यादींचा). [सं.]

सारवट–टी स्त्री. बैलगाडीचा एक प्रकार. (को.); दोन बैलाची धमणी. (बे.)

सारवण न. १. शेणखळ्याने लेपणे; सारवणे (जमीन, भिंत इ.). २. सारवण्याकरता तयार केलेला शेणखळा; शेण. ३. सारवलेली स्थिती (जमिनीची). [सं. समास्वन]

सारवणे उक्रि. सारवण करणे; लिंपणे. [क. सारणे, सारिसु = शेण लावणे]

सारवत न. १. जून कडकडीत असे विड्याचे पान. (को.) २. विड्याच्या पानाला होणारा रोग. (को.)

सारवत्ता स्त्री. श्रेष्ठता; योग्यता.

सारवळा, सारोळा, सर्वाळा पु. बेरजेचा एक ताळा. [गु. सर्वाळा]

सारवा पु. सारसंग्राहकातून वायू निघून गेल्यानंतर राहणारा अवशिष्ट भाग.

सारवान् वि. तथ्य, सार असलेला; सरस; भरीव.

सारवान पु. उंटहाक्या; उंटाची देखभाल करणारा. [फा.]

सारवासारव स्त्री. दोष झाकण्याचा प्रयत्न, मखलाशी.

सारस, सारसक पु. चक्रवाक पक्षी. [सं. सरस्]

सारस न. कमळ. [सं.]

सार(री)स न. सुरमाडाच्या झावळीचा बुंध्याकडील भाग. हा पन्हाळासारखा असून झाडांना पाणी देण्यासाठी उपयोग होतो. पहा : **सारक**

सारसई पहा : **सायाळ**

सारसक पु. चक्रवाक.

सारसर्वस्व न. संपूर्ण गोष्टीचे सार; स्वत: जवळचे सर्व.

सारसंग्रह पु. संक्षेप; सारांश.

सारसी स्त्री. हत्तीचा चित्कार : 'जेथ भद्रजाति सारसी: निहे विसंवति आकाशी:' - रुस्वन २२२.

सारसुवी स्त्री. साफसुफी.- शर.

सारसुसर स्त्री. १. सामानसुमान; चीजवस्तू. २. घरातल्या, प्रवासाला लागणाऱ्या लहानसहान जिनसा; किरकोळ वस्तू.

सारसे पहा : **सरसा**

सारसे न. सुधारस.

सारस्वत वि.१. सरस्वतीसंबंधी. २. भाषेसंबंधी. ३. विद्वान; अभ्यासक.
पु.१.सरस्वती नदीकाठचा प्रदेश. २. एक ब्राह्मण जात.
न. सर्व विद्या; वाङ्मय; साहित्य; सरस्वतीचा कृपाप्रसाद : 'ना तरि मूढ नेणते। प्राज्ञ होति सारस्वते।'- ज्ञाप्र ४०. [सं.]

सारळी क्रिवि. नेहमी; जेव्हा पाहावे तेव्हा.

सारंग पु. १. (संगीत.) एक राग. २. भुंगा.- ज्ञा १८.१६३५. ३. हरीण. ४. मोर. ५. साप. ६. सिंह. ७. चातक. ८. हत्ती. ९. हंसक. १०. वृक्ष. ११.वस्त्र. १२. कामदेव. १३ धनुष्य. १४. कमळ. १५. रत्न. १६. सोने. १७. चंदन. १८. पुष्प. १९. प्रकाश. २०. ढग. २१. कापूर. [सं.]

सारंग पु.१. खलाशी; नावाडी. २. खलाशांवरील प्रमुख.३. कोकणातील नावाड्यांची एक जात.
[फा.सरंग = सैन्यातील अधिकारी; सं. सारंग = सैन्यातील अधिकारी]

सारंग वि.१. चित्रविचित्र; शबल; बहुरंगी. २.तांबूस काळसर रंगाचा.
पु. घोड्याचा तांबूस काळा रंग. [सं.]

सारंग स्त्री. आंब्याचे मोठे जाळे. पहा : **सारण**

सारंगगाठ स्त्री. एक जननेंद्रियविषयक अंतर्गळासारखा रोग.

सारंगप(पा)ट पु.१. पटावर सोंगट्या, फाशांनी खेळायचा खेळ. २. सोंगट्या आणि पट; सारीपाट.

सारंगी स्त्री. झाडाचे खोड खोदून तयार केलेले साधारण दोन-अडीच फूट लांबीचे, खुंट्या असलेले, खालच्या भागावर चामड्याचे आच्छादन असलेले, चार मुख्य तारा व पंधरा ते वीस तरफा असलेले, धनुकलीने वाजवायचे सुस्वर वाद्य. [सं.]

सारंगी सारंगाचा अधिकार किंवा दरक.

सारा पु. १. जमिनीवरील कर, पट्टी. २.खंड. ३. भाडे. ४. देवघेव; व्यवहार : 'सारा करिता थोडे आपण राखीति'- गोप्रच २४९. [अर. साइर]

सारा पु. डोळ्याचा एक रोग; डोळ्यावरचे पटल.

सारा पु. डोक्यावरचे केस. (व.,ना.) [सं. सारा = दूर्वा]

सारा पु. धान्यपिकाचा मोठा वाफा.

सारा वि. अवघा; सर्व; सगळा; एकंदर (संख्या परिमाण); सारभूत. [सं.सर्व]

सारा पु.संकट; अडचण. - लोसाको.

सारादोरा पु.१.धागा; जोड; बंध. २. स्नेहबंधन. [दोरा द्वि.]

सारादोरा पु. सारा, कर, पट्ट्या वगैरे.

सारावार स्त्री. बंदोबस्त; आवरसावर; मोजदाद.

सारासार पु.वि. सत्यासत्य; नित्यानित्य; श्रेष्ठकनिष्ठ; योग्यायोग्य; बरे वाईट.

सारासारी वि.एकसारखे; सतत : 'तें घरीं सारासारीं वीळुवेन्हीं म्हणियें करी : '-लीचउ ५२३.

सारांश पु.१. सार; तत्त्व; अर्क (शब्दश: व लक्षणेने). २. तात्पर्य; मथितार्थ; गोषवारा. ३. (कायदा) निर्णय; निकाल (न्यायाधीश, पंच यांचा). ४. हुकूमनामा; निवाडापत्र.

सारि-री पु.द्यूतकार; सोंगट्या, फासे खेळणारा.
स्त्री.१. सोंगटी. २. सारीपाट.

सारि-री स्त्री. तिसरे दिवशी भरण्याची चितेची राख. (हेट., गो.)

सारिका, सारी स्त्री.साळुंकी; मैना. [सं.]

सारी स्त्री. खेप. (बे.) [क.]

सारूक्के सहाचा भाव.- भाप्र.

सारू(रो)ख वि. १.पतीचा; अब्रूदार.(राजा.) २. वाईट काम करूनही आपण नामानिराळा, असे दाखवण्यात पटाईत; आपली बाजू पटेल अशा रीतीने मांडण्यात हुशार.

सारूख, सारोखी स्त्री. १. पत; अब्रू; लौकिक. २. आपला चांगूलपणा दाखवण्याची शिताफी, शहाणपणा (चोर, लबाड माणसाचा). ३. शहाणपणा; हुशारी.

सारूप्य न.१. एकरूपता; सारखेपणा; एकजिनसीपणा. २. मुक्तीच्या चार प्रकारांपैकी एक; सरूपता. [सं.]

सारे न.१. माशांचे खत (शेतासाठी). (गो.) २. जिभेवरचा पांढरा थर, साका.

सारे क्रिवि. नेहमी; सर्वकाळ.(व.)
वि. सगळे.

सारेगम स्त्री. (संगीत.) गायन, वादन लिखित स्वरूपात देण्याची क्रिया.

सारेपट्टी स्त्री. शेतजमिनीचे वार्षिक भाडे; लगान. (हिं.)

सारोक पु. तीव्र आविष्कार : 'महाभूतांचे सारोक । सरळे होति ।'- ज्ञा १५.९७.

सारोदा(धा-द्धा)र क्रिवि. सदासर्वदा; सतत : 'वारंवार खेद करून सारोद्धार झुरत बसणें...'- रत्न११.

सारोधार पु. सारांश : 'तयांचा सारोधारू । आतां आइक तुं ।'- उगी ६९५. [सं. सार + उद्धृ - उद्धार]

सारोळा बेरजेचा ताळा.

सारोळी स्त्री. केरसुणी.(व.)

सार्जंट पु. १. सैन्यात सार्जंट मेजरच्या खालचा अधिकारी. २. पोलीस निरीक्षकाच्या खालचा अधिकारी. [इं.]

सार्थ पु. १. व्यापारी संघ; तांडा; पेढी. २. (सामा.) समूह; जमाव. [सं.]

सार्थ वि.१. अर्थयुक्त; अर्थ देणारा (ग्रंथ). २. सत्य; अन्वर्थक; यथार्थ. ३. सफल; सत्त्वयुक्त. ४.संपन्न; सधन. [सं.]

सार्थक-क्य न. १. समाप्ती; सांगता; शेवट. २. सफलता; सिद्धी. ३. कृतकृत्यता; इतिकृत्यता; इतिकर्तव्यता; चीज; साफल्य. ४. उत्तरक्रिया: 'त्याचे सार्थक करणे मला अवश्य आहे, असें म्हणून त्यानें स्मशानांत तात्काळ चिता रचिली ।'- कीर्तन १.५७.
वि.१. सफल. २.(वा. व्या. वि.) मान्य. [सं. सार्थक]

सार्थवाह पु. लमाणांचा नाईक; तांड्याचा मुख्य. [सं.]

सार्लक करणे मदत करणे; हातभार लावणे. (व.)

सार्व वि. अखिल; सबंध; एकंदर.

सार्वकालिक वि. सर्व काळ लागू असणारे, शाश्वतचे.

सार्वजनिक-जनीन-लौकिक वि. सर्व लोकांसंबंधी (आचार इ.); सामान्य; सामुदायिक. [सं.]

सार्वजनिक वि.(अर्थशा.) सरकारी; (इं.) पब्लिक. [सं.]

सार्वत्रिक वि. १. सर्वत्र विद्यमान; प्रसिद्ध. २. सर्व ठिकाणचा; सर्वत्र संबंध असलेला.

सार्वत्रिकता स्त्री.सर्व ठिकाणी लागू पडण्याचा गुण, स्थिती.

सार्वभौम पु.सम्राट; सर्व पृथ्वीचा राजा; चक्रवर्ती.
वि. सर्व पृथ्वीसंबंधी; जागातिक.

सार्वभौमिकता स्त्री.जागतिकता; जगात कोठेही लागू पडण्याची स्थिती;(इं.) युनिव्हर्सलिटी.

सार्वमत न. राज्यातील सर्व लोकांचे प्रत्यक्ष मत; (इं.) प्लेबिसाइट.

सार्ष्टिता, साष्ट्र्य न.पंचधा मुक्ती मानतात, तेव्हा चौथी मुक्ती; बुद्धी, बल, ऐश्वर्य इ. सर्व गुणात परमेश्वराशी साम्य; एक प्रकारचा मोक्ष. [सं.]

साल न. १. वर्ष; संवत्सर. २. वर्षासन; वार्षिक वेतन, पगार. [फा. साल्]

साल स्त्री. १. त्वचा; वरचे जाड आवरण (झाड, फळ इत्यादींचे). २. घासल्याने, चोळवटल्याने निघालेले कातडे (माणूस, जनावर यांचे).
न. १. बारीक त्वचा; फोल; तूस; टरफल (धान्य, दाणे इत्यादींवरचे). २. कोकंबीचे टरफल; आमसूल. ३. भातजमीन नांगरल्यानंतर तिच्यातील ढेकळे फोडून जमीन साफ करण्याकरता जमिनीवर फिरवण्याचा लाकडी जाड ओंडा, गुंठे. [सं. छाल,दे.प्रा. सालण क्षद्,]
० (पाठीचे)जाणे - चट्टा लागणे; नुकसान होणे, येणे. **साली काढणे** - नाश करणे. [सं.]

साल न. दिवाणखाना; दालन. - सह्याद्री ३१४. (गो.) [पोर्तु.;इं.सलून]

सालकडू पु. जातगंगेने पांक्त ठरवलेला इसम.

सालकरी पु.१. जोसपण, कुळकरण इ. वृत्ती-पेशा करणारे जे अनेक भागीदार त्यातून विशिष्ट सालची वहिवाट करण्याचा अधिकार असलेली व्यक्ती. २. एका सालाकरिता नेमलेला माणूस. ३. वर्षाचे वेतन देण्याचा करार करून ठेवलेला माणूस.

सालखादे न. दंश करणारी एक प्रकारची माशी. (को.) [सं.]

सालखाद्या वि.१. चांगले असेल तेवढे घेणारा; लोणी, मलई खाणारा. २. फायदा मिळतो आहे तोपर्यंतच राहणारा (धंदा, नोकरी जागा इत्यादींवर).

सालट वि. १. ज्याच्यावर थोडेफार साल, टरफल शिल्लक आहे असा (डाळ, तांदूळ, लाकूड इ.). २. आंब्याचा एक प्रकार.
न. १.फोल; टरफल (धान्य, बी इत्यादींचे). २. पोकळ शेंग (आत दाणा नसलेली). सालटे असा अनेकवचनी प्रयोग शक्यतो वापरतात.

सालटी-डी-टे स्त्री. १. सबंध कातडे (मनुष्य, जनावर यांचे). २. खरचटून, घासून निघालेले कातडे. ३. (तुच्छतार्थी) एखाद्या माणसाचे कातडे. ४. (सामा.) साल; त्वचा; पातळ कवच. [सं.छल]

सालढाल स्त्री.चालढकल; निष्काळजीपणा.

सालदार पु.सालाच्या बोलीने नेमलेला नोकर; शेत्या; सालकरी.(खा.)

सालदोडा पु. १. जाड साल असणारा आंबा. २. अतिशय जाड साल असणारे शेंदाडाचे फळ.

सालन-म पु. मांसाचा रस्सा; तोंडीलावणे. (व.) [हिं.]

सालपट न.१. साल (वृक्ष, मनुष्य, धान्य, फळ इ.ची). २. घासून, खरचटून निघालेला कातड्याचा तुकडा. पहा : **साल** ३. कोंडा; तूस; फोल.

सालपा पु ढलप्यांची रास.

सालपाडो पु. वर्षअखेर झाडांवरची सर्व फळे काढणे; वार्षिक तोड. (गो.)

सालपापड न.फेणी; एक पक्वान्न.

सालपापडी स्त्री. ओल्या तांदळाचे पीठ दळून, त्यात मीठ व जिरे घालून, त्याचे पातळ मिश्रण करून ते ताटलीवर किंवा फणसाच्या पानावर घालून, ते वाफवून उन्हात वाळवून तयार केलेला पदार्थ.

सालबंदी स्त्री. १.(जमाबंदी संज्ञा) कौल, खत इत्यादींसंबंधी लागोपाठ वर्षांसाठी ठराव, योजना; जास्त हप्ते द्यायचे किंवा घ्यायचे असतील, तर त्यासंबंधीचा त्या कागदांवर लिहिलेला वर्षक्रम. २. वृत्ती इत्यादींच्या वहिवाटीविषयी अमुकांनी अमुक साली वहिवाट करावी असा सालकऱ्यांमध्ये झालेला ठराव; सालउत्पन्नाचा करार.

सालभाड्या पु. सालअखेरचा हिशेब घेणारा अंमलदार, अधिकारी.

सालभुक-पाडरी वि.कानावर पांढरा ठिपका असणारा (घोडा).- म. सा. प. २.१.१७.

सालभेंडा-डी वि. पु. स्त्री. १. साल जाड पण आत सत्त्वांश मात्र थोडा असा (नारळ, पोफळ, केळे इ. फळ). २. अशी जाड सालीची फळे

धरणारे (झाड). अशा सालाचे लाकूड वजनाला हलके असते.

सालमाल पु. तांबोळ्याचा धंदा करणारी एक हलकी हिंदू जात.

साल(लं)मिश्री स्त्री. एक औषधी मूळ. [अर.सालबि+मिस्री]

सालवणी न. अमसूलाचे सार; सोलकढी.

सालवारी स्त्री. वर्षात घडलेल्या गोष्टींची नोंद, टाचण. [सं.]

सालस वि.१.प्रामाणिक; सज्जन; निरागस. २. गरीब; खोडकर नसणारे (माणूस, जनावर). [अर.सालिस्]

सालसाई,सालशी–सी स्त्री.प्रामाणिकपणा; सरळपणा; साळसूदपणा.

साला पु. १. बायकोचा भाऊ; मेहुणा. २. बहिणीचा नवरा. ३.एक शिवी.

सालाधाला वि.१. अल्पसंतोषी. २. सुखी समाधानी.[सं. श्यालक, स्याल्]

साला(लि,ली)ना क्रिवि.वर्षाकाठी; वर्षाला; सर्व सालाचे मिळून.

सालाबाद वि. वार्षिक; दरसालाचा (खर्च, पैसा, पट्टी).

क्रिवि. दरवर्षी.

सालार वि.सेनापती; नाईक.

सालिम वि.सगळा; तमाम. (व.) [अर.सालिम्]

सालिवा पु. सायाळ : 'सालिवेयाची झडप:'– कला १५.

सालीम संपूर्ण; समग्र.

सालू न.पागोटे. (व.) [हिं.]

सालोत्र न.१. पशुविज्ञान. २.पशुवैद्यक.

सालोत्री पु. पशुवैद्य. [सं. शालिहोत्र]

सालोरी स्त्री. एक वनस्पती. हिचे मूळ सार्सापरिल्याच्याऐवजी देतात.

साव वि.सर्व; अवघा : 'बरें पांडुरंगा कळलें सावें।'– तुगा ४०८२. [सं. सर्व]

साव पु.आदर; मान : 'बाणासि (शिवे) दीधला सावो।'–उह ६२.

साव पु.१.सावकार; पेढीवाला. २. श्रीमंत; भरभराट असलेला व्यापारी, धंदेवाला. ३. प्रामाणिक, पतीचा माणूस. [सं. साधु]

साव स्त्री.१.नाडी; शीर; स्नायू. अनेकवचनी उपयोग. जसे – सावा ओढतात, तुटतात. २. बकरा इत्यादीच्या आतड्यांचा लांब तंतू, शिरा. पहा : **नाडी**

साव–वी साक्ष. [सं.स्नायु]

सावकार पु.१. व्याजाने पैसे देणारा श्रीमंत माणूस; पेढीवाला. २. व्यापारी; धंदेवाला; साव. [सं. साधुकार; क. सावुकार, सार्थकार]

सावकारकी स्त्री. चोंबडेपणा; लुडबूड. (ना.)

सावकारा पु.१. सावकार आणि सावकारी, व्यापार–व्यापारी, धंदे आणि धंदेवाले यासंबंधी व्यापकपणे बोलताना योजतात; (सामा.) उद्योगधंदा. २. अनेक श्रीमान पेढीवाले.

सावकाराचा नातू जवळ पैसा नसून श्रीमंताप्रमाणे राहणारा. [सं.]

सावकारी स्त्री. १. पैशाचा व्यवहार; देवघेव. २. सावकाराचा धंदा.

वि. १. सावकारासंबंधी. २. व्यापारी; धंदेवाईक.

सावकाश पु. न. आराम; स्वस्थता: 'महाराज श्री स्वामीस सावकाश वाटले.' – वाडशा ३७.

क्रिवि. घाई, गोंधळ न करता; स्वस्थ, शांतपणे. [सं. स + अवकाश]

सा(से)वके क्रिवि.(बायकी) घालून पाडून; टोमणे मारून; लावून (बोलणे).

सावगणी वि.मूर्त; देहधारी : 'मन्मथनाथु गातां अनुरागें: दिसा होति सावगणी।'– ज्ञा १३.३९.

सावघड वि. सोपी; सुलभ.

सावचित–त्त वि. १. दक्ष; सावधान. २. एकचित्ताने; लक्षपूर्वक. ३. सजग; हुशार. ४. जिवंत; शुद्धीवर आलेले. [सं. स + चित्त]

सावज न. १. रानटी पशू. २. शिकारीचे जनावर. ३.मगर. [सं. श्वापद]

सावजिरा पु. पहा : **संगजिरे**

सावट न. १. सावलीची जागा, विशेषत: जेथे नेहमी झाडाझुडपांचे आच्छादन असल्याने पीक येत नाही अशी जागा. २.(सामा.)सावली; प्रतिबिंब.(माण.) ३. शीतलता; सावलीची स्थिती.[सं. छाया, छायावट]

सावट क्रिवि.एकदम.(खा.)

वि. सर्व; मिळून; एकत्र : 'सावटे न उडाल तरि मराल.'– पंचो ६४.१९.

सावड स्त्री.शेतकामात एकमेकांना जनावरे इत्यादींची मदत करणे. पहा : **इरजिक**

सावड स्त्री.न. १. रानातील फांद्या वगैरे राबासाठी तोडणे. २.राब जाळून धान्य पेरणे (डोंगरावर कडधान्य). ० **मारप** – रानातील झाडी तोडून शेतजमीन तयार करणे.

सावडणे उक्रि. १. गोळा करणे; एकत्र करणे (अस्ताव्यस्त वस्तू). २. एकदम नेण्यासाठी एका जागी करणे; ढीग करणे. राख सावडणे असा प्रयोग रूढ आहे. ३. साचवणे; जमवणे (पैसा). ४. चिवडणे : 'येक विष्टा सावडिती।'– दास ६.९.९. ५. (काही अर्थी) सावरणे.

[सं. सम् + आ + वृत्त; क. संदणिसु = एकत्र, गोळा करणे]

न. पीठ गोळा करण्याचे कापड. (तंजा.)

सावडी स्त्री. भाला : 'पुन येंही सावडी वाइले : आणि येर ठाइचेचि होते तुटले: – रुस्वन २४२३.

सावण न.सावा मळल्यानंतर उरणारे गवत, पेंढा.(बे.)

सावणे क्रि. १.साहाय्य करणे. २. सहन करणे.

सावता सामसूम; शून्यता.

सावते वि.सारखे. – शर. [सं. सम]

सावतोल पु.दागिन्यांचे रेशमी गोंडे वगैरेसह वजन. [सं. सर्व;ग्रा.साव + तोलणे]

सावत्र पहा : **सापत्न** [सं.सापत्न्य]

सावत्राई वि.दोन सावत्र भावांना राहणे सोयीस्कर होईल असा घराच्या बांधणीचा प्रकार.

सावध वि.१. भानावर, शुद्धीवर असलेला; जागृत. २.दक्ष; हुशार; सावधान, ३.(ल.) दुखण्यातून, विपन्न दशेतून, अज्ञानावस्थेतून बाहेर पडलेला; ऊर्जित दशेला आलेला. [सं.]

सावधान वि.दक्ष; सावध; जागृत.

न.१. लग्न, मुंज लावताना मंगलाष्टकांनंतर 'सुमुहूर्त सावधान' असा या शब्दाचा प्रयोग करतात. २. (ल.) लग्न; विवाह. ३. अवधान : 'सावधान देयाल हा धौविसा : उपनला मज:' – क्रम ८२६. ३. कवायतीतील आज्ञा.

सावधानता स्त्री. १. एकाग्र चित्त. २.दक्षता; हुशारी.

सावधारा वि. पु. सावत्र:'ते जैसें चंद्राचे भाऊ सावधारे:'– रुस्वन ८१.

सावधि, सावधिक वि.१. मर्यादित; ठरावीक; परिमित. २.अवकाश,

अवधी असलेले; अजून योग्य संधी, वेळ आली नाही असे; ज्याची मुदत संपली नाही असे. ३. (लांब अंतरावरील वस्तूसाठी वापर) मधले अंतर पार करायचे राहिले आहे असे.४. विशिष्ट; सामान्य, सर्व साधारण नव्हे असे; मर्यादित अर्थकक्षा असलेले. उदा. झाडासंबंधात फुलझाड हे विशिष्ट. ५.सापेक्ष; संबद्ध. [सं. स + अवधि]

सावन वि.सौर; सूर्यासंबंधी (कालमान).

पु.१. पहा : **सावनमास.** २. श्रावण महिना.

सावनदिन न. १.ग्रह क्षितिजावर एकाच ठिकाणी लागोपाठ येण्याचा काळ किंवा एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंतचा काळ. २. सूर्य एकदा मध्यान्ही आल्यापासून पुन्हा तेथे येईपर्यंतचा काळ.

सावनमास पु.सूर्याचे तीस वेळा उगवणे व मावळणे याला लागणारा काळ.

सावनी स्त्री. सीमा : 'लंघिती स्वर्गिची सावनी'– उह १७०४.

सावनी कल्याण (संगीत)एक राग. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर.

सावपण न. दांभिकता.

सावपा वि.सावध झालेला; शुद्धीवर आलेला. (को.)

सावर स्त्री.न. पहा : **साव** स्त्री.

सावर स्त्री. नाडी; शीर; स्नायू. (अनेकवचनी उपयोग)

सावर पु.१. शक्ती, जोम, उत्साह परत येणे (दुखणे, संकट इत्यादींनंतर). २. सत्ता, संपत्ती, मान इत्यादी पुन्हा प्राप्त होणे. ३.बळकटी; दाब. ४. स्थिरस्थावर. [सं.सम+व्याहर]

सावर–री स्त्री. शेवरी; एक प्रकारचे कापसाचे झाड.[सं. शाल्मली]

सावरचिन्ने न. एक प्रकारचे रताळे.(बे.)

सावरणी स्त्री. केरसुणी; झाडू. [गु.]

सावरणे–णा न.पु.(सोनारी, कासारी) एक प्रकारची हातोडी. [सं.]

सावरणे सक्रि. १. गोळा करणे; एकत्रित आणणे; आवरून ठेवणे. २. सांभाळून धरणे; पडू न देणे; (घसरलेला माणूस, वस्तू) उचलून धरणे. ४. दुरुस्त करणे; सुधारणे (चूक, खोटी वागणूक इ.). ५. शाबूत राखणे; धक्का लागू न देणे; जसाच्या तसा ठेवणे. ६. काळजीपूर्वक, आदर ठेवून सांभाळणे, निगा राखणे, रक्षणे. ७. पार पाडणे; तडीस नेणे.

अक्रि. १. पुन्हा पूर्वस्थितीवर येणे (दुखणे, विपत्ती, नुकसान इत्यादीनंतर); सशक्त होणे. २.आदर, विनय दाखवून वागणे : 'तो धांवला सावरोन । चरणीं मिठी घातलीं ।' –जै ८५.२२. ३.अंग धरणे; लठ्ठ होणे. [सं.सम् + आ + वृ; क. सावगि(रि)सु]

सावर्ण्य न. १. रंगाचा सारखेपणा; एकवर्णत्व. २.सजातीयत्व; वर्ग किंवा जाती समान असणे.

सावली स्त्री. १. छाया; प्रतिबिंब. २. प्रतिमा. ३.अनुसरणारी वस्तू, व्यक्ती. [सं. छाया;फा.साय:] ० **पडणे** – १.आगामी गोष्टीचा प्रभाव दिसू लागणे, चिन्हे दृग्गोच्चर होणे. २. आगामी गोष्टीचा परिणाम दिसू लागण्याइतका त्याच्या आटोक्यात असणे.३. (वाईट) संस्कार होणे. ० **पायाखाली येणे, असणे** – माध्यान्ह होणे. **सावलीस उभा न राहणे** – अजिबात टाळणे, संबंध येऊ न देणे. **सावली करणारा** – दिव्य करणाऱ्याचा प्रतिस्पर्धी.

सावले–ळे न.१. एक प्रकारचे लुगडे; वस्त्र. २.(सामा.) स्त्रीचे वस्त्र, कपडा, पेहराव. [देप्रा. साउली=वस्त्र]

सावळ स्त्री.पाश; फास.

सावळ स्त्री.न.माड, ताड, सुरमाड, पोफळ इत्यादींची मोठी फांदी; झावळी.

सावळ स्त्री. पहाट. (को.) [सं.शाखा]

सावळगोंदा वि. १. मलीन; घाणेरडा. २. अनाचारी; दुर्वर्तनी.

सावळगोंदे पहा : **सावळेगोंधळे**

सावळणे अक्रि. १. मावळणे; वाळणे; नाहीसा होत जाणे (गोवर, कांजिण्या, देवी इत्यादी). २. काळ्या पडणे, होणे (मावळताना देवी इ.). ३. काळवंडणे; करपणे. ४. उजळणे (काळाकुट्ट वर्ण, चेहरा). [सं.शम्]

सावळा वि. १.निमगोरा; साधारण गोरा. २. जांभळ्या रंगाचा; श्यामल; काळा आणि तांबडा यामधील रंगाचा (बैल, जनावर). ३. (सामा.) काळसर. ४. मेघयुक्त. [सं.श्यामल]

सावळा गोंधळ १.खालच्या दर्जाचा गोंधळ; तमाशा. २.सावपणाच्या पांघरुणाखाली चाललेला अनिष्ट प्रकार; गुप्त अनाचार, व्यभिचार. ३.पहा : **सावळेगोंधळे** [सं.शांभलिक:]

सावळी स्त्री. तरुण स्त्री : 'सिंपणे खेळती सांवळीया : रसवृत्तीसी:' – शिव २६. [सं.श्याम]

सावळी स्त्री.वेडसरपणा. (गो.)

सावळेगोंधळे न.१. काही निर्णय न होता गोंधळात, अधांतरी राहणे; अशी त्रिशंकू अवस्था (देणे,घेणे, वाद इत्यादींची); गोंधळाची स्थिती. २. तात्पुरती सारवासारव, तडजोड करणे. ३. सोवळे ओवळे, आचार, पंक्तीविचार इत्यादींविषयी परंपरागत व्यवस्था न राखणे; संकर; धर्मबाह्य वर्तन.

सावंका पु. साक्षी : 'कीं सहस्रकरें निगतां : आंधारू सिथिला साताइता : तीयें सले ठेविली मज पांतां : सावंकेयाची:' –रुस्वन ४८३.

सावंत पु. मांडलिक नृप, राजा :'ते ओळगे सावंत राणे । श्रीकृष्णरायाचीए।' – शिव ३५६. [सं. सामंत]

सावा पु. कांग; एक तृणधान्य. याचा भात करतात. [सं.श्यामाक; क. सावे]

सावा वि.१. काटे नसलेले. २. गोडा. (उदा. सावे पाणी = गोडे पाणी.) (कु.)

सावा पु. झाडलोट करणारा सेवक : 'तंव दारवंठ्या तो सावा उभा राहिला असे.'– पंचो १४.१७.

सावाइके न. १. इतिकर्तव्यता (मृत्युलोकीची). – माज्ञा १८.१७२५. २. अडचण. – बंज्ञा १८.१७२४.

सावाई स्त्री. घर शाकारण्याची मजुरी. (झाडी)

सावाई स्त्री. सांगता; संपूर्णता. [सं. सर्व]

सावाओ–वो पु.साहाय्यक : 'जेआ संयमू चि होये सावाओ।'– ज्ञा ६.४१५.

सावाद न.शिकार. [सं.श्वापद]

सावाधावा पु.१.साहाय्यासाठी धावून येणे. २. धावाधाव; धावपळ.
सावाबिवड स्त्री.जमीन खतावण्यासाठी सावा, तीळ यांचा बिवड घेण्याकरता जमिनीची नांगरणी करणे. [सं.]
सावाय-व पु. १. साहाय्य; मदत. २. साहाय्यकर्ता. [सं.साहाय्य]
सावाय पु. सायाळ : 'भारी बहु सावायांचे असिवार:' - रुस्वन ७४८.
सावाय(यि)णे, सावावणे अक्रि. १. संयुक्त होणे; संग लाभणे.२. साहाय्य करणे.
सावारे पु.अव. पहा : **साव** स्त्री.
सावासिनी स्त्री. सखी; दासी. [सं. सहवासिनि]
सावित्रीसूत्र न.जानवे; यज्ञोपवीत.
साविया वि. सरळ.
क्रिवि. १. सहज. २. अकस्मात. ३. सर्वथा. [सं.सव्य]
सावुली वि.सहावी. (भि.)
सावेरी पु.(संगीत) एक राग. गानसमय प्रात:काल.
सावेसा स्त्री. स्वेच्छा; अभिलाषा. [सं.स्वेच्छा]
साव्याण न. साव्याचा पेंढा.
साशन न. दान किंवा वृत्ती निर्दिष्ट करणारे आज्ञापत्र : 'रांजलीचा आराम साशान प्रदत्त' - रांजली शिला १.१०.
साशंक वि. १. भित्रा; बुजणारा; शंकेखोर. २. खात्री, विश्वास नसलेला; कचरणारा.
साशिवटा पु. साक्षात्कार. (मुंबई)
साष्टकोष्ट न. साटेलोटे. (ना.)
साष्टांग वि. १. अष्टांगासहित (नमस्कार, प्रणाम). २. (ल.) संपूर्ण; सपशेल (लोटांगण, शरणागती).
पु. साष्टांग नमस्कार; जमिनीवर पडून आठ अंगे टेकून केलेला नमस्कार. [सं. स + अष्ट + अंग]
सास वि. सत्य; खरे. [सं. सत्य]
सासणाय, सासाय पु. साक्षात्कार; प्रचीती. (गो.)
सास(सि)णे क्रि. मुक्त करणे. -लोसाको.
सासन न.साधन; उपकरण.
सासन(ण)णे, सासि(सी)न(न्न)णे क्रि. १.तयार होणे; पिकणे. २. बहरणे; फोफावणे.
सासनणे क्रि. विभक्त होणे; वाटले जाणे. -व्युको [सं. सन्]
सासपणे सक्रि. १. चाचपणे. २. हुडकणे; शोधणे. ३. कुरवाळणे; अंगावरून हात फिरवणे.
अक्रि. १. (अंधारात) चाचपडणे. २. रेंगाळणे. [सं. संस्पृश्]
सासर-रे न. पतीचे, त्याच्या आईवडिलांचे घर.
सासरमाहेर १. सासरी पाठवणे व माहेरी आणणे; लग्न झालेल्या मुलीची विचारपूस करणे. २. संक्रांतीच्या वेळी दोन विवाहित मुली - एक माहेरवाशीण व एक सासुरवाशीण म्हणून दोन-तीन दिवस राहण्यासाठी आणून त्यांना चोळीबांगडी करून किंक्रांतीनंतर त्यांची पाठवणी करणे. ३. भांगाचा एक प्रकार.
सासरा पु.१. नवऱ्याचे किंवा बायकोचे वडील. २. सासऱ्याच्या स्थानी मानला गेलेला नवऱ्याचा किंवा बायकोचा नातेवाईक. उदा. आजेसासरा, चुलतसासरा इ. [सं. श्वशुर]
सासव, सासू स्त्री. मोहरी.(गो.) [सं. सर्षप]
सासवेल, सासेल न. मोहरीचे तेल. (गो.)
सासान न.अंदण.-शर.
सासिक वि. सशस्त्र. [सं.]
सासिनणे अक्रि. उत्तम भिजणे, बहरणे. [सं.सम् + आ + सिन्व]
सासु-सू वि. जिवंत; सप्राण : 'पावुनि भवत्प्रसादें निजपद बहुकाळ सासु राहो तो।'- मोवन १३.६८. [सं.सं+असु]
सासु स्त्री.शेकोटीसाठी लागणारे जळण. (ना.)
सासुरवड, सासुरवाडी स्त्री. १. बायकोच्या वडिलांचे घर; बायकोचे माहेर. २. सासर.
सासुरवाट स्त्री. स्त्रियांचा डावीकडचा भांग.
सासुरवाशी-सी,सासुरवाशीण स्त्री. १. सासरी राहणारी, परतंत्र मुलगी; सून. २.(ल.) एखाद्याच्या धाकात असणारी, स्वतंत्रपणे वागू न शकणारी व्यक्ती.
सासुरवास, सासूपण पु.न. १. सुनेचे सासरी राहणे. २. सासरच्या मंडळींकडून बाईचा होणारा जाच, छळ. ३.(ल.) एखाद्याचा होणारा छळ, जाच, परतंत्रपणा.
सासू, सासूस स्त्री. नवऱ्याची किंवा बायकोची आई; सासऱ्याची बायको. [सं.श्वश्रू]
सासोला पु.घोड्यापुढे धावणारा सेवक : 'भाटी सासोलां म्हणितले:'- लीचपू ६१.
सास्ति-स्ती स्त्री.शासन; शिक्षा :'दीवीं लागली तरि सास्ति करी : आपणे या आपण:'-शिव १९४. [सं.शास्ति]
सास्ना स्त्री.गाय, बैल इत्यादी जनावरांच्या मानेखालची पोळी.
साहचर्य न.१. बरोबर असणे, जाणे; जोडगट्टी; संबंध. २. सहवास; मैत्री; संगत. [सं.]
साहजिक वि. १. सुलभ; सोपे; सहज साधणारे. २. सहज, तत्काल, एकदम घडून येणारे; स्वाभाविक. ३. आगंतुक; आकस्मिक.
क्रिवि. स्वाभाविकरित्या; सहज.
साहटे,साहटणे पहा : **सायटी-टे**
साहणे उक्रि. सहन करणे; सोसणे. [सं.सहते]
साहणे पहा : **साणे** [सं.]
साहती स्त्री.१.घर. २.वेस. ३. एरंड.
साहनक पहा : **सानक**
साहनट, साहनवट स्त्री. (प्रां.) रिकामी, मोकळी, ज्यावर इमारत वगैरे बांधली नाही अशी गावातील जागा.
साहरा पु.साहाय्य; मदत. [सं.सहकार]
साहरा पु.थर; पापुद्रा. पहा : **सायरा** (को.)
साहस न. १. धाडस; धैर्य; अचाटपणा; मोठा झपाटा. योद्ध्याला आवश्यक अशा सहा गुणांपैकी एक. २. अविचार. ३. धाडसाचे, अविचाराचे कृत्य; कोणतेही झपाट्याचे, धडाक्याचे काम.

साहसि वि.लौकर : 'पद साहसि करी । निरोपण ।।'-ज्ञा १३.६४५. [सं.]

साहसिक, साहसी वि. धाडसी; अविचारी; साहसाचे काम करणारा. (अर्थ) हानीचा धोका पत्करूनही लाभासाठी पैसे गुंतवणारा.

साहस्त्र न. हजारांचा समूह.
वि. हजारांसंबंधी, विषयी. [सं.सहस्र]

साहान न. १. साधन; सामग्री. २.परिवार.

साहा(ह)न-ण न. घोडदळ; सैन्य :'ते आं घोडेआचे साहान ।'-शिव ५०६. [सं. सेना]

साहान(नु)क वि.शाश्वत; अक्षय :'साहानुक सत्यलोकु भोगिती।'-दाव २६८. [अर.सहनक]

साहानक स्त्री. उदरनिर्वाहासाठी करविरहित जमिनीची देणगी, इनाम.

साहाय्य न. १. पाठिंबा; मदत; जोड. २. स्नेह; संगत. [सं.]

साहित्य न. सामग्री, साधने; उपकरणे (एखाद्या वस्तूच्या, कार्याच्या उत्पादन - निर्मिती-उभारणी इत्यादींसाठी लागणारी). २.सहवास; संगत; स्नेह : 'साहित्य भंगले येणे बोले ।'- दास ८.२.३९. ३. संबंध; ऐक्य; संघ. ४. साहाय्य; मदत. ५.(सांकेतिक) तेल (विशेषप्रसंगी, पहाटेच्या वेळी इ.). ६. अलंकारशास्त्र; अलंकार. - ज्ञा १.६. ७. काव्य, नाट्य, कथा, लालित्य यांचा समावेश असलेली वाङ्मयशाखा. ८.(व्यापक) वाङ्मय. [सं.]

साहित्यशास्त्र न. ललितवाङ्मयाचे गुणदोष, अलंकार, पद्धती इत्यादींचे विवेचन करणारे शास्त्र; अलंकारशास्त्र.

साहित्यिक वि. पु.वाङ्मय निर्माण करणारा.

साहुकार, साहू पहा : **सावकार** [सं.]

साहेती स्त्री.साहाय्य; मदत.

साहेब पु. १. स्वामी; धनी; मालक. २. अधिकारी; वरिष्ठ. ३.टोपीवाला; इंग्रज; युरोपियन. ४. प्रतिष्ठाबोधक संज्ञा, शब्द. महाराज, श्रीमंत याअर्थी. ५. (समासात गौरवार्थी) नाव, हुद्दा, टोपणनाव इत्यादींपुढे योजतात. ६. स्त्रियांच्या प्रतिष्ठानामापुढे उपयोग. केव्हा केव्हा हा नपुंसक बहुवचनी होतो...उदा.बाईसाहेब, ताईसाहेब इ. ७. देवीला भक्तिपूर्वक लावतात. उदा. जगदंबेस आईसाहेब म्हणण्याचा प्रघात आहे. [अर.साहिब]

साहेबनौबत स्त्री. राजे वगैरेंच्या स्वारीत पुढे हत्तीवर घालून चालवलेली नौबत, डंका.

साहेबमुलूख-क पु. खुश्कीवरील - जमिनीवरील मालक, राजा.

साहेबी स्त्री.१.सत्ता; स्वामित्व. २. मोठेपणा; सर्वांनी साहेब म्हणावे असा प्राप्त झालेला अधिकार, दर्जा.
वि. १. साहेब, युरोपियन याविषयी-संबंधी (वेष,रीत, अधिकार इ.). २. द्राक्षाची एक जात. ही लांबट, पांढरी व फार मधुर असते.

साहोत्रा पु.१. दरमहा किंवा दरसाल शेकडा सहा असा व्याजाचा दर. २. शंभरात सहावा हिस्सा घेण्याचा मालकी हक्क. (मालक, सरकारी नोकर इत्यादींचा एखाद्या ठिकाणी). ३. उत्पन्नाचा एकषष्ठांश. हा राजाचा असे.- गांगा ८. ४. चौथाईपैकी पंतसचिवाचा हिस्सा. पहा : **चौथ** [सं. षट्,सहा + त्र]

साळ स्त्री. भात.(दे.) [सं. शालि]

साळ स्त्री. १.(प्र.) पहा : **शाळा.** २. सुतार, लोहार, कासार इत्यादींच्या कामाचा कारखाना, ठिकाण; धंद्याचे स्थान. [सं.शाला]

साळ पहा : **साळी.** (वा.) **० घालणे** - (रेशीम, सूत इत्यादिकांची) जितके लांब सणंग विणायचे असेल, तितक्या अंतरावर खुंट्या मारून त्यांच्याभोवती सूत गुंडाळून तितका लांब ताणा होईल असे करणे.

साळ, साळई स्त्री. साळू, सायाळ; अंगावर लांब काटेरी पिसे असणारे जनावर. यालाच साळजिवाद, साळशी, साळिंदर, साळिंद्र-द्री-द्रे, साळी-ळू असे म्हणतात.

साळई पहा : **साळवणी**

साळकाई-माळकाई स्त्री. (बहुधा अनेकवचनी प्रयोग) कोणीतरी फालतू, सटरफटर बाई. निंदार्थी वापरतात. [सं. श्यालिका + मालिका]

साळके न. (सोनारी) कमळाच्या आकाराचा दागिना. (गो.)

साळकोजी माळकोजी, साळकागोळका पु. गोमागणेश; फुकट रुबाब दाखवणारा, कोणीतरी फालतू माणूस. (निंदार्थी उपयोग)

साळखादे न. एक प्रकारची गांधीलमाशी.

साळढाळ वि.१. साधा; सरळ; निगर्वी; मनमिळाऊ. २. प्रांजळ; मोकळा; खुल्या दिलाचा. ३. सौम्य प्रकृतीचा; विचारी. ४. कपट, कारस्थान न करणारा; सालस. ५. दुसऱ्याच्या दोषांकडे दुर्लक्ष करणारा; उदार मनाचा.

साळढोकपणा पु.दुर्लक्ष; उपेक्षा; चालढकल; ढिलाई.

साळणी स्त्री.छाटणी; कापणी; तासणी. - कृषि ७०२.

साळणे उक्रि.१.तासणे. २. साफ करणे; मऊ, गुळगुळीत करणे. ३. छाटणे; काटणे (फांद्या, झाडे). ४. सोलणे; साल काढणे. [सं.शो; हिं. छालना]

साळमाळ वि. अतिशय, विलक्षण लांब (इमारत, खोली, रस्ता इ.); लांबच्या लांब.

साळवण न.१.भाताचा पेंढा. २. झाडाच्या साली. ३. एक वनस्पती.

साळवणी स्त्री. शालपर्णी; एक झाड. [सं. शालपर्णी]

साळसूद-ध वि.१. साधा; निष्कपटी; प्रामाणिक. २. छक्केपंजे माहीत नसलेला; सरळमार्गी.

साळस्त्री पु. पशुवैद्य; साळोत्तरी. [सं. शालिहोत्री]

साळंखा स्त्री. तटाची भिंत; पौळी : 'देखौनि नगरसाळंखा : वंदणुक आदि पुरुखा:' - ऋम ७६.

साळावळीस येणे हितकर होणे. (गो.)

साळांक-ग न.मृत्युलोकातील गायन : 'ऐसा साळांक मार्गु दाविला' - रुस्वन १८६.

साळांका-खा स्त्री.सळई; शलाका : 'कीं ज्ञानांजनाची साळांका:'-शिव ३१.

साळिवन न. भातशेती : 'साळिवनाआंतु दाटुनि म्हैसी सूदलिया'- इप्र ५५. [सं. शालिवन]

साळिवा पु.निर्दालन करणारा : 'तुं असुरकुळ - साळिवा निन्हा नितंकु:'- मूप्र २६०४.

साळिंदर पु.घुशीच्या जातीतील त्वचेवर केसांबरोबर काटे असलेला प्राणी.

साळी पु.विणकर जात व तीमधील व्यक्ती.

साळी स्त्री.वृक्षविशेष; शालवृक्ष.

साळी(ळु)क न. १. कमळ. २. कमळासारखा डोक्यातील दागिना. [सं. शालूक = कमलकंद]

साळुं(ळों)की-खी स्त्री.मैनेप्रमाणे गाणारा एक पक्षी. [सं. सारिका; दे. प्रा. सालुंकी]

साळू स्त्री.१. साळुंकीचे संक्षिप्त रूप. २.(लावण्यातून रूढ) प्रियकरीण; छबेली.

साळू पहा : **सायाळ**

साळेगोंदे न. १. अनिर्णित धर्मबाह्य वर्तन. २. भ्रष्टाचार.

साळोक स्त्री.तिफण ओढणारी जोडी.

साळोतणे अक्रि.झाडणे; केर लोटणे.(कर.)

साळोता, साळुती पु. स्त्री. केरसुणी; झाडणी. (कर.बे.) [सं. शल्]

साळोत्तरी,साळोत्री पु.घोड्यांवर उपचार करणारा वैद्य; पशुवैद्य. [सं. शालिहोत्री]

साळोरी (गो.) पहा : **साळुंकी**

साळ्या वि. रब्बीच्या वेळी होणाऱ्या तिळाचा एक प्रकार. [सं. शीतल]

साक्ष-क्ष्य पु. घडलेली घटना ज्याने प्रत्यक्ष पाहिली आहे असा इसम; साक्षीदार.

स्त्री. १. साक्षीदाराची जबानी; पुरावा. २. पहा : **साक्षा** [सं.] (वा) ०**घालणे** - (एखाद्या कागदाची) समक्ष पाहिल्याची हमी पटवणे; त्यासाठी सही करणे.

साक्षगंध न. लग्न ठरल्याचा समारंभ; साखरपुडा. [सं.]

साक्षर वि.१. अक्षरओळख असलेला; लिहिता वाचता येत असलेला; साधारण शिकलेला. २. सुशिक्षित; विद्वान. [हिं.] ३. (थट्टेने) ज्याला (सा) साहा अक्षरे - काही येत नाही - फक्त माहिती आहेत असा; निरक्षर; अक्षरशून्य. [सं.]

साक्षा स्त्री.१. अनुभव; प्रचीती. २.प्रत्यक्ष प्रमाण. ३. साक्षात्कार (देव, मंत्र, प्रश्न, शकुन इत्यादींचा). ४. पहा : **साक्ष** [सं.साक्ष]

साक्षात् शअ. समोर; पुढे; प्रत्यक्ष.

क्रिवि. १.धडधडीत; उघडपणे; स्पष्टपणे. २. स्वत:; जातीनिशी.

वि. क्रिवि. १. मूर्तिमंत; प्रत्यक्ष. २. (शाप.) अपरोक्ष; प्रत्यक्ष; सरळ. [सं.]

साक्षात्कार पु.१.प्रत्यक्ष ज्ञान; प्रतीती; अनुभव. २. ब्रह्मात्मैक्य. ३. ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन. ४. स्वत: प्रचीती घेणे; खरेपणा पाहणे, घेणे, दाखवणे. [सं.]

साक्षांकन न.मूळ प्रतीसारखी नक्कलप्रत आहे हे ताडून पाहिले आहे या अर्थाने केलेली सही.

साक्षिणी एकादशी कार्तिक वद्य एकादशी. ही केली असता वर्षातील सर्व एकादशा केल्याचे पुण्य मिळते.

साक्षी पहा : **साक्ष**

साक्षीदार पहा : **साक्षी** १,२.

साक्षेप पु. १. नेट; चिकाटीचा उद्योग; निष्ठापूर्वक कार्य. २. आस्था; अगत्य; अतिशय आवड; व्यासंग. ३. मनाचा तीव्र कल; बळकट निष्ठा; मनाचा निश्चय, निर्धार. ४. आग्रह; अगत्य. ५. दीर्घोद्योग; मोठी खटपट. ६.संक्षेप; सार : 'शिष्याचे गुणदोष लक्षण, साक्षेपे केले कथन ।'- विसिं १.८८. [सं. स+आ+क्षेप]

साक्षेप, साक्षेपाने, साक्षेपे क्रिवि. १.मुद्दाम; जाणूनबुजून. २. यत्नाने; कष्टाने.

साक्षेपी वि.१. काम, अभ्यास, संशोधन यात गढलेला; तन्मय. २.निश्चयाने, चिकाटीने मागे लागलेला. ३. आग्रही, निश्चयी स्वभाव असलेला. ४. दीर्घोद्योगी; प्रयत्नवादी.

साङ्ग वि. शास्त्रोक्त; वेदोक्त : 'अर्जुना एवं यज्ञु । सर्वत्र जाण साङ्गु ।'- माज्ञा १६.९९.

सांकल्पिक वि. ठरवलेले; योजलेले.

सांकशा पु. कासाराचे एक हत्यार. - बदलापूर ९६.

सांक(ग)शी स्त्री. गवत, वेत, बांबूच्या काड्या यांनी बनवलेली करंडी; संबळी. हिला बहुतेकदा झाकण नसून वीणही घट्ट नसते.

सांकुव-वे न.अंडे :'सांकुवे गाळिले आकासी: रूपें चंद्राचेनि:'- रुस्वन ४९६.

सांकू न. कोंबडीचे अंडे. (कातकरी)

सांकेतिक वि.१. संकेतासंबंधी. पहा : **संकेत.** २. विशिष्ट खुणा, चिन्हे, हावभाव इत्यादींनी युक्त, दर्शवलेला. ३. पारिभाषिक; सांज्ञिक. [सं. संकेत]

सांक्रामिक वि. सांसर्गिक. . [सं.]

सांखळ-ळा-ळे स्त्री.न. साखळी. [सं.शृंखला]

सांख्य न.पु.१. ज्ञान; तत्त्वज्ञान. २. विचार; मत.३.षड्दर्शनांपैकी एक दर्शन: 'जै हें आणिसील सांख्याचिया गांवा ।'-ज्ञा ७.४३. ४. विशिष्ट संन्यासमार्ग. [सं.]

सांख्यिक पु.(वाणिज्य) संख्याशास्त्रज्ञ; आकडेशास्त्र जाणणारा. [सं.]

सांख्यिकी स्त्री. १.विशिष्ट हेतूने जमा केलेली व पद्धतशीरपणे मांडलेली आकडेवारी. २. सांख्यिक माहितीवर प्रक्रिया करून निष्कर्ष काढण्याची पद्धती.

वि. आकडेशास्त्रविषयक.

सांग पु१. संपूर्ण लोखंडी गजासारखा, शेवटी भाल्याप्रमाणे टोक असलेला भाला; सबंध लाकडी भाला. २. भाल्यासारखेच परंतु दोरीने लांब फेकून मारायचे हत्यार. [हिं.]

सांग वि.१. सर्व अंगांसहित; एकूणएक गोष्टींसह. २. समग्र; संपूर्ण. ३. यथास्थित; पुरेपूर. ४. अव्यंग; निर्दोष. [सं.]

सांग स्त्री. धा.ना. १. सांगणे; सांगणी; निरोप. २. आज्ञा; हकूम.

सांगकाम्या वि.१. स्वत:ची बुद्धी न चालवता नुसते सांगितलेले काम करणारा; वेळेप्रमाणे वागण्याची अक्कल नसणारा. २. ज्याने नुसते सांगितलेले काम करायचे आहे असा; तंतोतंत हुकूम पाळणारा.

सांगटा पु.सांगाडा; साटा. [सं.सम् + घट्]

सांगड–डी पु.स्त्री.दोन होड्या किंवा नावा एकत्र करून केलेले जलयान. स्त्री.१. दोन किंवा अधिक भोपळे, नारळ इ. फळे एकत्र बांधून केलेली रचना. २.(सामा.) तरून जाण्याचे साधन; नाव; होडी. ३. जोडी; सोबत; मैत्री. ४. काताऱ्याच्या हत्याराचा एक भाग; लाकूड कातण्याची बैठक. [सं. सम् + घट्ट, संघाट] (वा.) ०**घालणे** – मेळ घालणे; संबंध जोडून देणे. ०**तोडणे** – ग्रामदेवतेस बळी देणे. (राजा.) वि. सारखे; समान :'वांचूनि सोने सोनेया सांगडें। सोनेचि जेवि ।'– ज्ञा १३.८९१.

सांगड पु.भांडे :'मग तुपाचे सांगड उलवीले' – गोप्रच २२४.

सांगड पु. समुदाय : 'तरु गिरिज सडा सांगडा उपमा ना'– गरा २१६. [सं.संघात]

सांगडणी स्त्री.एकत्र गुंतवणे, जोडणे; एकत्र बांधणी.

सांगडबाहुली स्त्री. कळसूत्री बाहुली; पुतळी.

सांगडा वि. सारखा; सदृश: 'म्हणौनि सूर्य सूर्याचि येवढा । चंद्र चंद्राचि सांगडा।'– अमृ ७.२८८.

सांगडी–ड्या वि.सांगड नेणारा; व्यापारी.

सांगडी स्त्री.विहीर खोदण्याच्या उपयोगाची लोखंडी पहार. हिच्या एका बाजूस अणकुचीदार टोक व दुसऱ्या बाजूस आकडा असतो. [गु.]

सांगणा वि.निरोप्या; बोलावणेकरी.

सांगणी स्त्री.१.शिकवण; आदेश; सूचना. २. सांगणे; बोलणे; निरोप. ३. शिकवण्याची, समजून देण्याची पद्धत.

सांगणीचा वि.१. वधूपक्षीयांनी वधूकरता द्रव्य किंवा काही मोबदला न घेता तिचा केलेला (वाङ्निश्चय, विवाह). २. अशा प्रकारे विवाहित (कन्या).

सांगणे अक्रि. १. कळवणे; कथणे. २. करण्यासाठी आज्ञा देणे; सुचवणे. ३.बोलावणे; निमंत्रण करणे (भोजन, समारंभ इत्यादीसाठी). ४. शिकवणे; समजावणे. ५. म्हणून दाखवणे. [सं. सम् + ख्याति; प्रा. संघई] (वा.) **सांगून येणे** – विवाहासाठी मुलीच्या घरून प्रस्ताव येणे.

सांगणोवांगणी, सांगा(गी–गो) वांगी, सांगासांगी स्त्री.१.प्रत्यक्ष प्रमाण नसता एकाने दुसऱ्यास, दुसऱ्याने तिसऱ्यास सांगण्याची परंपरा; ऐकीव गोष्ट; गप्पा. २.गप्पा छाटणे; बकबक करणे. ३. एखादी गोष्ट अनेकांना सांगणे; बभ्रा करणे.

सांगता स्त्री. १. पूर्तता; संपूर्णता; यथास्थितपणा (सर्व साधनासहित, सर्व संस्कार होऊन – एखाद्या धार्मिक कार्याची). २. (ल.) कर्माची पूर्ती करण्यासाठी घातलेले ब्राह्मणभोजन व दिलेली दक्षिणा.

सांगसरभरा स्त्री. एखाद्याची शिफारस करून, त्याच्याबद्दल चांगले बोलून त्याला केलेली मदत.

सांगसुगरण वि.आपण स्वत: काहीच काम न करता लोकांकडून कामे करून घेण्यात पटाईत; बोलून छाप पाडणारी (व्यक्ती, स्त्री). [सं.]

सांगळा पु.गाळ.

सांगळ्या वि. सहा बोटांचा; सांगठ्या.

सांगा पु. तात्पुरता पूल.

सांगाडा पु.१. वस्तूच्या आकारास आधारभूत असलेली रचना. २. मोठी अवजड वस्तू; प्राणी; धूड. [सं. सम् + घट्]

सांगाडी स्त्री.१. विहिरीच्या भिंती ढासळू नयेत म्हणून तळाशी घालतात ती आधार चौकट. २. कातण्याचे यंत्र.

सांगात पु.संगत; सोबत. [सं.संगत]

सांगाती पु.सोबती; मित्र.

सांगाती–ते शअ.बरोबर; सह. पहा : **संगती**

सांगी स्त्री.एक शस्त्र :'विचाराचीया सांगीं। विखयांचीया नाइकवडी भंगी'– मूप्र २४८६.

सांगोपांग वि.संबंधित सर्व तपशिलांसह; तपशीलवार; सविस्तर.

सांघणी–नी स्त्री. धाड; चाल. [सं. संघात किंवा सहन्]

सांघात पु. १. संयोग; मिलाफ. २. समूह; समुदाय : 'या आठांचा सांघातु बांधा प्रपंचाचा।' – ज्ञाप्र ५७५. [सं. सांघात]

सांघिक वि. समूहाचा; समूहासंबंधी. [सं.]

सांच पु. आत पदार्थ मावेल एवढी जागा; अवकाश; पोकळी.[सं. संचय]

सांज स्त्री.१. नवे धान्य निघाल्यावर ते खाण्यापूर्वी बऱ्यावाईट देवतांना अर्पण करण्याची रीत, चाल. (क्रि. धरणे, असणे.) २. जमिनीच्या पिकाच्या अंदाजाचा खरेपणा; अंदाजाप्रमाणे पीक येण्याची खात्री, तशी जमिनीची योग्यता, कसदारपणा. ३. अंदाजलेले, अपेक्षिलेले उत्पन्न, पीक.

सांज, सांजवण–णी स्त्री. १.अस्तमान; संध्याकाळ. २. संधिप्रकाश, (सायंकालचा किंवा प्रात:कालचा).[सं. संध्या] (वा.) ०**धरणे** – संध्याकाळी काढलेल्या दुधाचे तूप करून त्यात वात बुडवून देवापुढे दिवा लावणे; दीपव्रत, दिपत करणे.

सांजवणी स्त्री. गाईची धार काढण्याची वेळ : 'सुटला सांजवणी। वत्सुचि पां।' – ज्ञा १८.४७८.

सांजवणे न. दुधाणे; दुधाचे भांडे : 'दुधाविण सांजवणे। भरलें दिसें।' – ज्ञागा १०८४.

सांज(जा)वणे, सांज(झ)ळणे अक्रि. संध्याकाळ होणे.

सांजवात स्त्री. १. सांजदिवा. २. (सामा.) संध्याकाळी लावण्यात येणारा दिवा; दिवाबत्ती. ३. (ल.) मंद, मिणमिण ज्योत असलेला दिवा.

सांजा पु. १. गहू दळून, भरडून त्याच्या काढलेल्या कण्या; कोणत्याही धान्याच्या कण्या. २. या कण्यांचे केलेले गोड किंवा तिखट खाद्य; शिरा (गुळाचा).

सांजा पहा : **संजाफ**

सांजी स्त्री. समृद्धी; वाढ.

सांजे न. दृष्ट काढण्यासाठी माणसावरून ओवाळून टाकण्याचे पदार्थ.

सांजे न.१. शपथ; वचन. २. व्रत. ३. पिकाच्या अंदाजाचा खरेपणा. [सं. संज्ञा]

सांजोरी, सांजवरी स्त्री. १. सांजाची पुरी. २. सांदणे; इडली. (क.)

सांजोळ स्त्री. संध्याकाळ : 'कां नुरेचि सांजोळे। मृगतृष्णिका।' – ज्ञा १५.२८३.

सांड पु. १. देवाच्या, धर्माच्या नावाने मोकळा सोडलेला बैल, पोळ. २. वळू; उत्पत्तीचा बैल. ३. (ल.) नुसता पोसलेला गलेलठ्ठ माणूस; उनाड, रिकामटेकडा मुलगा (निंदार्थी). [सं. षंढ, साण्ड]

सांड, सांडण, सांडिणी स्त्री. उंटीण; मादी उंट. [दे. प्रा. संडी]

सांड स्त्री. १. जास्त झालेले पाणी काढून देण्याचा मार्ग (बांध, भिंत इत्यादींतून). २. पाणी सोडण्याचा दरवाजा; उघडी; सांडवा. ३. बांध फुटून पडणारी फट. (राजा.)

सांड स्त्री. १. उपेक्षा; विस्मरण : 'सांड कर माझी दोन दिवस स्वस्थ निजल्यानें।' – प्रला १६३. २. सोडणे; टाकणे; त्याग. ३. हरवण्याची, गमवण्याची खोड. ४. नाव सोडणे; वाटेल ते करण्याची मुभा देणे. (क्रि. देणे, करणे.) ५. टाकलेली बायको. (क्रि. करणे, देणे.)

न.१. हरवलेली वस्तू. २. दृष्ट, बाधा इत्यादींसाठी ओवाळून टाकावयाचा पदार्थ.(वा.) **सांडी पडणे, धरणे** – हार खाणे, मागे राहणे.

वि. रस्त्यात पडलेली; बेवारशी (वस्तू).[सं. छर्द्, शद् – शन्न]

सांड स्त्री. कोपरा; सांध. [सं. संधि]

सांडई स्त्री. तांदळाच्या, ज्वारीच्या पिठाचे कुरडईसारखे एक खाद्य. (अव. सांड्या)

सांडउप(ब)ड स्त्री. सांडलवंड; नासधूस. (ना.)

सांडगा पु. कोहळा, भोपळा, काकडी इत्यादींच्या किसात तिखटमीठ घालून वाळवून नंतर तळून केलेले तोंडी लावणे. [क. संडिगे]

सांडघ(व)र वि. घर सोडून जाणारी; नवरा टाकलेली. (स्त्री.)

सांडण–णी–णे न. स्त्री. न.१. पहा : **सांड.** २. दृष्ट, भूतबाधा काढणे. ३. ओवाळून टाकणे; कुरवंडी; तुच्छ असणे.

सांडण, सांडण(णी)स्वार पु. सांडणीवर बसून डाक, बातमी इ. पोचवण्याचे काम करणारा शिपाई.

सांडणी स्त्री. पहा : **सांडस**

सांडणी स्त्री. १. सांडण्याची क्रिया; त्याग. २ उपेक्षा. ३. विरणे; लय. (क्रि. टाकणे, घालणे, पाडणे).

सांडणे उक्रि. १. बाहेर पडणे, पाडणे; लवंडणे; उपडे होणे. २. हरवणे; गहाळ होणे, करणे. ३. सोडणे; टाकणे; त्याग करणे.

सांडणे सक्रि. सांधणे; जोडणे : 'साहे रे साहे भणौनि धनुखी : सरसांडी :' – मूप्र २२०८.

सांडणे सक्रि. कापणे; तुकडे करणे : 'मग देह अहंतेचे दलें। सांडूनि एके वेले।' – ज्ञा १५.२३५. [सं. सम् + दो]

सांडपाणी न. धुणे, भांडी घासणे इ. केल्यामुळे सांडलेले मोरीचे पाणी.

सांडरा वि. १. उधळ्या; उडव्या. २. हरव्या; नेहमी सांडणारा, हरवणारा. ३. निष्काळजी; विसरभोळा.

सांडरू, सांडवर न. (तिरस्कारार्थी) सांड; उंटीण.

वि. नवऱ्याने टाकलेली; घरदार सोडलेली (स्त्री. शिवीप्रमाणे उपयोग); सांडिणी.

सांडलवंड, सांडासांड स्त्री. सांडणे, पालथे करणे, नासणे याअर्थी व्यापक शब्द; नासधूस; उधळमाधळ.

सांडवणी स्त्री. १. सिंक; स्वयंपाकघरातील भांडी, हात धुणे वगैरेची सोय. २. खरकटी, हातपाय धुणे इ. चे पाणी वाहून जाण्यासाठी केलेली व्यवस्था.

सांडवणे अक्रि. १. क्षीण, जर्जर होणे; खंगणे. २. मुकणे; आचवणे.

सांडवा, सांडा(डो)वा पु. १. धरणाचे दार; सांड. २. पाण्याचा निकाल; जास्त पाणी काढून देण्याची वाट. ३. कालवा; पाट. ४.धरणावरची वाट (यावरून पावसाळ्यात पाणी वाहते.); नदीवरचा पायरस्ता.

[दे. प्रा. संदेह = पाण्यातील पाय ठेवण्यासाठी असलेला दगड]

सांडशी स्त्री. लहान सांडस.

सांडस पु. (सोनारी, लोहारी) विस्तवातील पदार्थ उचलण्याचा चिमटा; (सामा.) पकड; चिमटा; आकडे असलेला चिमटा. [सं. संदंश]

सांडसूट स्त्री. येण्याच्या रकमेत दिलेली सूट.

सांडा पु.घटस्फोटित पुरुष.

सांडाक्रम पु. योगविद्येतील षट्चक्रभेदनाचा मार्ग : 'तेया सांडाक्रमु पुसों :' – लीचपू २०७.

सांडीमांडी स्त्री. १. घेण्या–टाकण्याचा व्यापार. २. यातायात; त्रास; धरसोड.

सांडीविखुरी क्रिवि. सांडण्यालवंडण्यात; इकडेतिकडे; व्यर्थ; फुकट : 'तरि ते (बी) सांडीविखुरी गेले। म्हणों ये काइ।' – ज्ञा ९.३९.

सांडोर पु. कोकराला न पाजणारी (मेंढी). (जुन्नरी)

सांडोवा पु. कुरवंडी; सांडणे; उतारा : 'यालागीं शरीर सांडोवा कीजे।' – ज्ञा ९.३८१.

सांडोसांड क्रिवि. काठोकाठ; भरून वाहील अशा रीतीने.

सांत वि. ज्याला शेवट आहे असा; परिमित.

सांतवणे सक्रि. समाधान करणे. [सं. सांत्व]

सांत्वन–ना न. स्त्री. १. अतिशय दुःख, राग इत्यादींमुळे झालेला मनःक्षोभ नाहीसा करून मन पुन्हा पूर्वस्थितीवर आणणे. २. धीर देणे; समाधान करणे. [सं.]

सांद–ध स्त्री. खोपट; संधी; कोपरा. [सं. संधि]

सांद स्त्री. १. बोळ. २. अंगण; परसू. ३. आडबाजू; सांधीकोपरा.

सांद–ध पु. जोड; मिळणी. [सं. संधा]

सांद, सांदकाम, सांदणे, सांदीकोंदी इत्यादी शब्द 'सांध' ने प्रारंभ होणाऱ्या शब्दामध्ये पहा.

सांदड पु. नळ भिंतीत बसवतात तो सांधा.

सांदण–णे न. तांदळाचे एक पक्वान्न; फणसाच्या गऱ्यात साखर व तांदळाच्या कण्या घालून वाफेवर शिजवलेले गोड पक्वान्न.

सांदण न. (विणकाम) तातूला तातू जोडणे.

सांद्र वि. १. अगदी जवळ जवळ; दाट. २. गच्च; घट्ट. ३. निबिड; दाट (अंधार). ४. घट्ट विणीचे दणकट (कापड). ५. मऊ; कोमल; अनुकूल.

सांद्रण–न न. पदार्थाच्या द्रव अवस्थेतून स्थायू अवस्थेत रूपांतर होण्याची क्रिया.

सांद्रीकरण–भवन न. (शा. प.) १. दृढीकरणभवन; (इं.) कन्डेम्नेशन. २. संपृक्त हवेचे तापमान कमी होऊन हवेतील जादा बाष्पाचे सूक्ष्म जलकणात रूपांतर होणे.

सांध स्त्री. १. जोड; सांधा; सांध्याचा बिंदू, रेषा. २. भेग; फट; चीर; तडा; खाच; खिंड. ३. पेरे; ग्रंथी; खीळ; सांधा. ४. (विणकाम) हातमागातील ताण्याचा तिडा, वेढा, कातरा. (क्रि. पडणे) [सं. संधि] (वा.) **सांधीस बसणे, सांधीत पडणे** – १. एकांतात राहणे, पडणे (पतिमरणानंतर विधवा स्त्रीने एक वर्षपर्यंत). २. (सामा.) मागे पडणे; लोकांच्या स्मरणातून जाणे. [सं.]

सांधक वि. सांधकाम करणारा (शिवण इत्यादीतील).

सांधकोंद स्त्री. कानाकोपरा; खाचखळगा; बीळ; फट; (सामा.) आजूबाजूच्या सर्व बारीकसारीक जागा. (अनेकवचनी उपयोग).

सांधण–णे पहा : **सांदण–णे**

सांधणी, सांधणूक स्त्री. जोडणी; जुळणी; एकीकरण (शिवणे, झाळणे, चिकटवणे इत्यादींने).

सांधणे उक्रि. जोडणे; एकत्रित करणे; संयुक्त करणे.
अक्रि. एक होणे; जडणे; जुगणे.

सांधन न. जोडणी; सांधणूक.

सांधम पु. सांधण्याचा व्यापार. पहा : **सांधण** (राजा)

सांधमोड स्त्री. (बांधकाम करताना) एका थरातील दगड किंवा विटा यांचे सांधे वरच्या थरातील दगड विटांच्या सांध्यांशी सरळ रेषेत न येतील असे करणे.

सांधरुख पु. एक झाड. याचे लाकूड चिरले तरी पुन्हा सांधले जाते. अस्थिभंगावर औषधी.

सांधला पहा : **संधला**

सांधा पु. १. ग्रंथी; पेरे; सांध; हाडांची जुळणी. २. जोड; संधिरेषा – बिंदू; दरज. ३. जोडलेला तुकडा; जो जोडला असता वस्तू लांब होते, वाढली जाते असा तुकडा. ४. मिलाफ; एकी. ५. (नाविक) खाडीतील होड्या लावण्याची सोईची जागा. ६. (ढोरधंदा) दोन तुकडे एकत्र जोडणे; लाग. [सं. संधि] ०**बसणे** – जम बसणे; जुटणे; जमणे; बेतशीर, सोईचे होणे.

सांधासांध स्त्री. १ अनेक वस्तू एकत्र येणे; जुळणे; अनेक लोकांना एकत्र करणे, जोडणे. २. (ल.) समेट; तडजोड. ३. दुरुस्ती; सुरळीत चालणे.

सांधी पहा : **सांध**

सांधीचा, सांधीतला वि. १. कोपऱ्यातला; आडबाजूचा. २ अज्ञात; क्षुद्र; हलका. ३. कोपऱ्यात, आडबाजूस, खाजगीत, गुप्त जागी ठेवण्यास योग्य. ४. वेगळा काढून ठेवलेला, नैमित्तिक प्रसंगी वापरण्यात येणारा (कपडा, दागिना इ.). ५. खाजगी; गुप्त (व्यवहार).

सांधीव वि. १. सांधलेले; जोडलेले (विभाग, तुकडे). २. तुकडे जोडून केलेली, विभागांची बनलेली (वस्तू, गोष्ट).

सांधोरी स्त्री. १. मोठा किंवा अव्यवस्थित सांधा; चीर. २. गल्ली; बोळ.

सांप्रत क्रिवि. आता; यावेळी; हल्ली; आज.

सांब पु. १. शिव; शंकर. २. (ल.) भोळा माणूस. ३. विळ्याच्या मुठीचा विशिष्ट आकार.

सांब(फ)ट स्त्री. बोळ; अरुंद रस्ता; फट. (व.)

सांबता पहा : **सामता**

सांबर पु. न. हरणासारखे पण फाटे फुटलेली शिंगे असणारे जनावर; हरणाची एक जात. [सं. शंबर]

सांबरभोपळी स्त्री. एक वेल. सांबराच्या पोटदुखीवर याचा पाला चारतात.

सांबर–री मीठ सांबर सरोवरापासून, खाऱ्या जमिनीपासून काढलेले मीठ.

सांबरी स्त्री. एक मिठाई; साबणी; साखरेच्या पाकाची कांडी.

सांबरी वि. मिश्र रंगाची (मेंढी). (जुन्नरी) [सं. शब्बल]

सांबरे करणे क्रि. आजूबाजूच्या काड्या गोळा करून त्या विस्तवात किंवा ढोरापुढे टाकणे.

सांबळ बरची; एक हत्यार.

सांबळी स्त्री. वेताची, झाकण नसलेली करंडी.

सांबापुढचा वि. नंदी; (ल.) मूर्ख.

सांबार पु. कोथिंबीर. (व.)

सांबार पु. १. सांबारे, भाजी इत्यादीत घालण्यासाठी तयार केलेला मसाला. २. इडली, दोसा इत्यादींबरोबर खाण्यासाठी करण्याचा तुरीच्या डाळीचा, दाक्षिणात्य पातळ पदार्थ.

सांबारे न. ताकाचे पातळ कालवण; ताकातील पातळ भाजी.

सांभववेधु पु. विश्व (ईश्वर) चैतन्याची विद्या.

सांभळणे सक्रि. ऐकणे. [सं. सम्+भल्]

सांभारगाठा स्त्री. अव. सांभारासाठी आळूच्या पानांच्या वळलेल्या गाठी.

सांभाळ पु. रक्षण; पालन; प्रतिपाळ; संगोपन. (वा.) **सांभाळी करणे, लावणे** – एखाद्याच्या हवाली करणे; ताब्यात देणे.

सांभाळणे सक्रि. १. रक्षण करणे; पाळणे; पोसणे; संगोपन करणे; आश्रय देणे; काळजी घेणे. २. धारण करणे; सोसणे; सहन करणे; वाहणे (भार, कार्याचा बोजा, ओझे).
अक्रि. १. जपणे; काळजी घेणे; सावध राहणे. २. जाणीव असणे, वाटणे; समजणे. [सं. सम्+भालय]

सांसर्गिक वि. स्पर्शजन्य; संसर्गामुळे, एकापासून दुसऱ्याला लागणारा, बाधणारा (रोग).

सांसारिक वि. १. संसारासंबंधी; ऐहिक; प्रापंचिक. २. प्रपंचातील व्यवहार योग्य रीतीने करणारा.

सांसिद्धिक वि. स्वाभाविक; स्वयंभू; मूळची.

सि–सी पासून सुरू होणारे शब्द इथे न आढळल्यास 'शि–शी' मध्ये पाहावेत.

सिकता स्त्री. १. वाळू; रेती. २. मुतखडा. [सं.]

सिकतातेल न. (ल.) अशक्य गोष्ट.

सिकल वि. पुढील उजवा पाय व मागील डावा पाय पांढरा असलेला (घोडा). असा घोडा वाईट समजतात. – अश्वप १.१०४.

सिकल स्त्री. साफ, स्वच्छ करणे; झिलई देणे; पाजळणे (हत्यारे, शस्त्रे). [अर. सैकल]

सिकल स्त्री. तऱ्हा; पद्धती; शक्कल.

सिक(क्क)लकर, सिक(क्क)लग (गा) र पु. हत्यारे साफसूफ करणारा; त्यांना उजळून धार लावणारा, शिकलगार.

सिकंजा पु. १. दाबाचे यंत्र; चाप; लाकडाचा सांधा जोडताना लाकडे आवळून धरण्यासाठी वापरण्याचे यंत्र. २. (ल.) पेच; संकट. [फा. शिकन्जा]

सिकं(किं)दा वि. हैराण; त्रस्त; उद्ध्वस्त. [फा. सिकज्जा]

सिकार पु. १. सुरतोपभोग; विषयसुख; कामसेवन. २. श्रुतिधर; सूर धरणारा.

सिकारा पु. चटई विणण्याचे गवत. (झाडी)

सिकाल वि. कपाळावर दोन अंगुळाएवढा रुंद व लांबट पट्टा असलेला (घोडा). हे शुभलक्षण आहे. – अश्वप १.१०५.

सिकोपा संशय; अंदेशा; तर्क.

सिख स्त्री.शिक्षा : 'वीयेळां सिख लावितां नुबगसी' – गरा १४९.

सिगार पु. तंबाखूच्या पानात बांधलेला तंबाखूचा दंडगोल.

सिगारेट स्त्री. तंबाखूवर प्रक्रिया करून त्याचा बारीक चुरा करून तो कागदात गुंडाळून तयार केलेली सुरळी.

सिग्गूर न. पदार्थ भाजण्याचे चाळणीसारखे भांडे.

सिचडी स्त्री. जिज्ञासा : 'ऐसी ज्ञानाची गोडी। वानिली दैव आवडी। तेंविचि पार्था सिचडी। लावावेया।' – ज्ञा १४.६०.

सिजर स्त्री. चिरुट. (व.)

सिजील स्त्री. दाखला; (दप्तरी) नोंद. [अर. शिजिल्ल]

सिटचोरी स्त्री. संभावितपणे केलेली चोरी.

सित–त्त वि. सहा; ६. [अर. सित्त]

सित पहा : **सीत**

सित वि. शुभ्र; पांढरे; सतेज.

सितणे क्रि. शिवणे; स्पर्श करणे. (व.)

सितधातू पु. खडू. [सं.]

सिताड न. (विणकाम) फणीत असलेल्या वशारण्याचे फिरके धरणारी कामटी.

सितादही करणे कापूस वेचण्याचा शुभारंभ करणे. (व.)

सिताब क्रिवि. ताबडतोब; त्वरेने; जलदीने; लवकर. [अर. षिताब; फा.; हिं.]

सितारा पु. १. तारा. २. दैव; नशीब. [फा.]

सितासवाती स्त्री. चित्रा आणि स्वाती नक्षत्रे. (शेतकरी लोकांत रुढ)

सिती स्त्री. एकविटी, अरुंद भिंत; पडदी.

सितोपल पु. १. स्फटिक. २. खडीसाखर.

सिदणे उक्रि. छेदणे; कापणे [सं. छिद्]

सिद्दी–द्धी पु. हबशी; शामल; आफ्रिकेतील एक जमात व तीतील व्यक्ती.

सिधाव पु. वसूल; वसूलझाडा.

सिधोट वि. सरळ स्वभावाचा; सरळसोट.

सिद्ध पु. १. ईश्वराच्या प्रेरणेने लिहिणारा ग्रंथकार, लेखक. २. भूत, भविष्य, वर्तमान यांचे ज्ञान असलेला; द्रष्टा; साधू. ३. अणिमादी सिद्धी प्राप्त झालेला; योगी. ४. मुक्त पुरुष. ५. एक उपदेवांचा वर्ग व त्यातील व्यक्ती. ६. (ज्यो.) एकविसावा योग. [सं.]

वि. १. संपवलेले; पुरे केलेले. २. स्थापित केलेले; सत्य म्हणून दाखवून दिलेले; पुराव्याने खरे केलेले; प्रस्थापित. ३. निकाल केलेले; तोडलेले (भांडण, खटला). ४. बनवलेला; तयार केलेला; रचलेला (नियम, घटना, कायदा). ५. शिजवलेले (अन्न). ६. घेण्याजोगे; तयार केलेले (घोटून, द्रव्ये मिसळून – औषध). ७. तयार ठेवलेला, असलेला (कामासाठी माणूस, जनावर इ.); मुद्दाम खोळंबलेला, वाट पाहत असलेला; राखून ठेवलेला; सज्ज; तयार. ८. कुशल; निष्णात. ९. शाबूत; धडधाकट. १०. प्रत्यक्ष; मूर्तिमंत : 'जरी प्रकटे सिद्ध सरस्वती।' – ज्ञा १.७८. ११. अकृत्रिम; सहज असणारा. १२. पूर्णावस्था प्राप्त झालेले. १३. (व्या.) गुणधर्मयुक्त; मूर्त. १४. (भाषा) मूळ, अव्युत्पन्न (शब्द). [सं.]

सिद्धणे अक्रि. १. सिद्ध करणे. २. सिद्धीस जाणे; फळास येणे; निष्पन्न होणे. ३. संपणे : 'एरु तर तेधवांचि सिद्धता :' – श्रीकृच ३ (२). [सं.सिध्]

सिद्धतत्त्व न. ब्रह्म.

सिद्धता स्त्री १. सर्व तयारी पूर्ण असणे. २. स्पष्टीकरणाची तर्कशुद्ध व्यवस्थित मांडणी.

सिद्धधातू (व्या.) मूळ धातू. उदा. जा, ये, कर.

सिद्धप्रज्ञा स्त्री. या जन्मी मिळणारी पूर्वजन्मातील बुद्धी.

सिद्धरस पु. १. अमृत. २. पारा.

सिद्धलाडू पु. संकष्टी चतुर्थीला करावयाचे कणकेच्या उकडीचे लाडू.

सिद्धसाधक पु. अव.(उप.) एकाच कपटकारस्थानातील मंडळी. आपले ऐक्य बाहेर समजू न देता, संगनमताने दुसऱ्याला फसवण्यासाठी एकमेकांचा पुरस्कार करणारे. (एकाने सिद्ध पुरुष बनायचे व दुसऱ्याने त्याचे स्तोम माजवायचे).

सिद्धसाधन न.१. सिद्धीचे अद्भुत चमत्कार दाखवणे; जादू; किमया. २. सिद्ध असलेली वस्तूच परत सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे. तर्कशास्त्रातील एक दोष.

सिद्धहस्त वि. ज्याच्या हातात हमखास कौशल्य आहे असा; पारंगत.

सिद्धाई पहा : **सिद्धि–द्धी** १, ३.

सिद्धार्थी पु. त्रेपन्नावे संवत्सर.

सिद्धांत पु. १. प्रमाणानुरोधाने ठरलेला निर्णय; संशोधनादिकांचे फल. २. प्रतिपादित तत्त्व; प्रस्थापित सत्य. ३. तत्त्वाचे कथन; परमतत्त्व. ४. निश्चय; निर्णय. ५. नियम; प्रमेय; सारणी. ६. ज्योतिषग्रंथ. उदा. सूर्यसिद्धांत. ७. (ल.) पक्की, वज्रलेप गोष्ट. ८. शास्त्रीय भूमिका. [सं.]

सिद्धांतन न. सिद्धांत काढण्याची क्रिया.

सिद्धांती वि. १. सिद्धांत ग्रंथांचा अभ्यासक. २.प्रयोग करून पाहणारा; सिद्धांत ठरवणारा. ३. कोणतेही सत्य, तत्त्व वगैरे प्रस्थापित करणारा.

सिद्धि–द्धी स्त्री. १. दैवी शक्ती; अणिमा इत्यादी अष्टमहासिद्धी. २. आश्चर्यकारक, अपूर्व सामर्थ्य, कौशल्य. ३. तपश्चर्येचे किंवा देवताभक्तीचे फल. ४. परिपूर्णता; समाप्ती; संपादन; उद्दिष्ट साध्य होणे. ५. पुराव्याने संस्थापित होणे (मुद्दा, आरोप इ.). ६. निर्णय; निकाल; तडजोड (भांडण, खटले इत्यादींची). ७. घटना; मांडणी (कायदा, नियम इत्यादींची). ८. सिद्धता; तयारी (अन्न, औषध इत्यादींची). ९. सज्ज असणे (बदली काम करण्यास माणूस, जनावर इ.). १०. कौशल्य; नैपुण्य; वाकबगारी (योगसामर्थ्य, किमया इत्यादींत). ११. मुक्ती; ब्रह्मस्थिती; निर्वाण. १२. जय; विजय; उत्कर्ष. १३. सामग्री, साहित्य. [सं.] **सिद्धीस नेणे** – तडीस, शेवटास नेणे; पूर्ण करणे.

सिद्धीविनायक पु. साधारणत: उजव्या सोंडेचा गणपती. (वा.)

सिद्धिस्थान न. मूळ ठिकाण.

सिधाय पु. ठरावीक उत्पन्न : 'आनेवडि सिधाय प्रदत्त' – अगाशी शिला १.१३.

सिधावा पु. सिद्धता; तयारी. [सं. सिद्ध]

सिधोट वि. सरळ; साधा, छक्के पंजे न जाणणारा; निष्कपटी.

सिन पु. निराळे; भिन्न: 'नरनारायणां सिने नाही।' – ज्ञा १५.४२५

सिनसाळ वि. १. जीर्ण; छिन्नसाल असलेला. २. क्षणिक; भासमात्र. [सं. शीर्णशाल]

सिनल वि. पहा : **शिंदळ** [हिं. छिनाल]

सि(सी)ना(ने)जोरी स्त्री. १.छातीचे बळ; धाडस. २. पराकाष्ठेचे बल; बळजबरी. ३. सामर्थ्य; प्रताप.[फा. सीना (= हृदय) + जोरी]

सिनाझना प्रेतयात्रेत किंवा मोहरमात छाती पिटून रडण्याकरता भाड्याने आणलेल्या बायका.

सिनान–ने वि. निराळा; भिन्न; वेगळा.

सिनार पु. १. वेगळेपणा; भिन्नत्व: 'अगा पूर्वापर सागर । या नामासीचि सिनार। येर आघवें तें नीर। एक जैसें।' – ज्ञा १८.१५८८. २. वेगळा साठा, संचय; गुप्त संग्रह : 'ऐके देखे परि सिनार। न सोडी पै।' – सिसं ४९. (को.)

सिनारणे क्रि. मारणे; पिटणे; ठोकणे. (व.)

सिनाल स्त्री. खूण; बावटा. (गो.) [इं. सिग्नल;पोर्तु.]

सिनीवाली स्त्री. अमावास्या (विशेषत: चतुर्दशीयुक्त). [सं.]

सिनेदराजी स्त्री.१. छाती. २.पराक्रम; धैर्य; हिंमत.[फा. सीना+अर. दरज]

सिनेपटी स्त्री. बंदुकीच्या एका भागाचे नाव.

सिनेपान न. छातीइतक्या उंचीचा कोट.

सिनेमा पु. चलत्चित्रपट. [इं.]

सिनॅगॉग न. ज्यू लोकांचे प्रार्थनागृह. [इं.]

सिन्नाबार न. ज्याच्यापासून पारा मिळतो असे चकचकीत तांबड्या रंगाचे धातुक.

सिप देनं मृत व्यक्तीच्या तोंडात अंत्यक्रियेपूर्वी पाणी सोडणे. (अहि.)

सि(शि)पर स्त्री. ढाल. [फा.]

सिपलक पु. घोड्याच्या अंगावरील एक भोवरा. हा एका कुशीवर असल्यास वाईट, दोन्हींवर असल्यास उत्तम.– अश्वप १.१०२.

सिप्पा पु. वशिला; संधान. (झाडी)

सिफला वि. क्षुद्र; अधम; नीच. [अर. सिफ्ल]

सिफारत स्त्री. वकिलातीचे ठिकाण. [अर. सिफारत्]

सिबटी फोक. (तंजा.)

सिबत पु. करार. [अर. सब्त्]

सिब्ब भात वेळायची परडी. (तंजा.)

सिबुर, सिबे पहा : **सबुरी**

सिमुरा पहा : **शिमरा**

सिमुर वि. मुरलेले; रुळलेले.

सिमुरी स्त्री. शेंबडी नकटी पोर : 'दोघी एकी सिमुरी मेळवीलीया:' – लीचपू २०१. [सं. श्लेष्मा = कफ]

सिमेंट न. चुनखडीची भाजून केलेली विशिष्ट पूड; एक संधानद्रव्य. हे बांधकामास उपयोगी पडते. [इं.]

सिय न. शीत; हीव; थंडी.

सियादत स्त्री. मोठेपणा. [अर.]

सियारी स्त्री. डाकीण; चेटकी. [अर. साइर=मांत्रिक]

सियालु न. कोल्हा. [सं. शृगाल]

सियाळ स्त्री. साल; आवरण. – शिव २७६. [सं. छाल]

सियाळा पु. हिवाळा : 'सियाळीये रितु भटोबासांसि सकाळी चि भोजन जालें.'– स्मृस्थ १५३.

सिर १. पहा : **शिर.** २. जंबियाचा एक हात. चीर मारल्यानंतर हात फिरवून डोक्यावर मारणे.

सिरकणे अक्रि. १. घसरणे : 'तो (वसु) एकु दीसु नीगता सीरकला : ' – लीचपू १०. २. अडकणे : 'आपणचि वीउनि दुहिता। न मम म्हणे पिता। कीं तो सुटे, येरू घेता जावाई सिरके।।' – ज्ञा १८.२३२.

सिरकंबा पु. आसव; अम्लासव. [फा. शिरका]

सिरकुंभा पु. सर्दी, पडसे. (व.)

सिरगिरी स्त्री. छत्र : 'सिरगिरी धरी वारिणी : मयूरिका :' – रुस्वन १०२.

सिरचोट स्त्री. तगादा; नेट; लकडा.

सिरड स्त्री. जळाऊ लाकडाचा साठा. (जुन्नर)
न. अनेक फांद्या फुटलेली काठी; काटेरी फाट्यांची काठी.

सिरणी स्त्री. उत्कट इच्छा : 'जियाविया ही सिरणीया। (तपें) करिती गा।।' – ज्ञा १७.२६१. [सं. शिरस]

सिरणे सक्रि. १. चिरणे : 'वाहाना भटी खांडा सिरिलीया :' – इप्र ३११. [सं.चिरि]

सिरणे अक्रि. १. सारणे; सरकवणे : 'हातांतु हात, सिरूनि नीरांजन करिती :' – निलीपूजा १५.१६. २. गळणे; झरणे : 'कोंदले असत न सिरे। कव्हणी काळीं।'– ज्ञा ८. १४. [सं. सृ.]

सिरनामा पु. लिहिणेचा मर्तुबा. (तंजा.)

सिरनाहाणी स्त्री. मानसन्मान; प्रशंसा. [फा. सिर+सं. स्ना]

सिराळे न. उशी : 'पायांचे सिराळे। मांडूं लागे।।' – ज्ञा १४.१८४. [सं. शिरस् + आलय]

सिरीखेत अखंड रांग.
सिलगावणे सक्रि. पेटविणे.
सिलसिला गलबताचा एक प्रकार.
सिलसिला पु. १. वळण; परंपरा; वहिवाट; प्रघात; संबंध. २. योजना; तजवीज. ३. काम; हुद्दा; दरक. – ऐको. [फा. सिलसिलाह्]
सिलसिली स्त्री. टेहळणीची, पहाऱ्याची नाव, गलबत.
सिलारपेसानी वि. कपाळावर चक्रासारखा लहान वाटोळा टिळा असणारा (घोडा). हे शुभलक्षण आहे. – अश्वप १.१०४.
सिलावट, सिलाट वि. पाथरवट. [सं. शिला]
सिलावणे सक्रि. ठेवणे.
सिलिक स्त्री. पेटवणी; बत्ती देणे. [अर. शल्क]
सिलिका स्त्री. गारगोटी; वाळू.
सिलीकबंद वि. हिशोब बंद करून शिल्लक काढून तयार केलेले.
सिले न. १. हत्यार; शस्त्र. २. कवच – ऐको.
वि. हत्यारबंद. [अर. सिलह्]
सिलेपोस १. चिलखत. २. एक प्रकारचे गलबत.
सिलेंडर न. १. इंधन म्हणून वापरला जाणारा गॅस साठवण्याची टाकी. २. नळकांडे; पंचपात्रे. [इं.]
सिवणी स्त्री. चिमणी : 'सिवणियांसि पाणी घालितां त्यासि काइ तुमचा उपदेसु असे?' – स्मृस्थ १३८.
सिवणी स्त्री. गुद आणि शिस्न यांना जोडणारी शिवण, यामधला भाग. पहा : **शिवणी**
सिवनचिंचना स्त्री. चिमण्या चिवचिवायला लागण्याची वेळ; पहाट : 'सिवनचिंचना आपला मोटळा गांवाबहिरि घालिजे :' – लीचपू २८२.
सिवना न. स्वप्न. – नरुस्व ६६६. [सं. स्वप्न]
सिवाडे न. शेत : 'माइ सेणवैयासि कुरुपांगु सिवाडे रुवो कुळाग्र. –' बांदोडे शिला १.२४.
सिवार न. शेराचे झाड.
सिविंतणे सक्रि. स्वीकारणे; मानणे : 'आपुलें म्हणोनि सिविंतले होतें ।' – मुआदि १०.१२०. [सं. संविद्]
सिशाळे न. धडविरहित मस्तक : 'भौमासुराचेनि सिशाळे : रणदेवतां ढवसाड केले:' – शिव ४४९.
सिसकारी स्त्री. लहान जागेतून वाफ बाहेर पडताना होणारा आवाज.
सिसनी स्त्री. प्रेत जळताना होणारा सिण् सिण् असा आवाज : 'पोरु जीवु आगीं रिगो जाए : आणि सीसनीए भीए:' – लीचउ ५३२.
सिसार पु. अर्धशिशी; एक मस्तकरोग.
सिसेभासे न. दुखणे बहाणे (माण.).
सिस्ट(ष्ट)कृत्य न. समाप्ती; अखेर; शेवट. (कोणत्याही धर्मकृत्याच्या वेळी होम करायचा असल्यास, मुख्य आहुती देऊन झाल्यावर स्विष्टकृत अग्नी वगैरे देवतांना आहुती देऊन होम पूर्ण करतात. त्याला स्विष्टकृत् होम असे म्हणतात. त्यावरून लक्षणेने.) [सं. सु+इष्ट + कृत्य]
सिस्तबस्त जोखमीच्या वस्तू.
सिहतखाना पु. १. शेतखाना. २. आरोग्यखाते. [अर. सिहत्खाना]
सिहाड न. मोठा आर्त स्वर.
सिहाडा पु. देवळाच्या द्वारासमोरील सिंहमुखी, सिंहाकृती कठडा : 'गोसावीयांसि बाहीरिला सिहाडेनिसी आसन असे :' – लीचउ ५७१.
सिहार पहा : **सीहार**
सिंकोना पु. काडे चिराइत; उष्ण कटिबंधातील सदापर्णी वृक्ष. यापासून क्किनाईन – कोयनेल तयार करतात.
सिंगण न. शृंगाकार धनुष्य : 'मोडले साबळ सिंगणी :' – शिव १०४५.
स्त्री. जनावराच्या शिंगाचे केलेले तीक्ष्ण हत्यार : 'संयमाची या सिंगणी: कामक्रोधादिक भेदावे रणीं : ' – मूप्र २४९०.
सिंगन पु. घोड्याच्या अंगावरील एक भोवरा. हे दोन्ही कानाच्या आत असल्यास वाईट – अश्वप १.१०२.
सिंगरो पु. कारवारच्या रानात आढळणारी पिंगट रंगाची मोठी खार. (को.)
सिंगा स्त्री. मांस भाजण्याची सळई; शीग.
सिंगाडा पु. बंदुकीची दारू ठेवण्याचे शिंगासारखे भांडे. [सं. शृंग]
सिंगाडा पु. ढीग :'त्यावरी सिंगाडे ठेविली वेगे : चोळीयाचे:' – रुस्वन १६५६.
सिंचणे सक्रि. शिंपडणे; तुषारांनी भिजवणे. पहा : **शिंपणे** [सं. सिच्]
सिंचन न. १. शिंपण्याची क्रिया; वर्षाव. [सं.]
सिंचवणी न. शिंपडण्याचे पाणी, द्रव.
सिंचाई स्त्री. (कृषि.) (झाडांना किंवा पिकाला) पाणी देणे.
सिंजा स्त्री. तोरड्या, पैंजण इ. चा ध्वनी; नुपुरांचा ध्वनी :'सिंजारवे व्याकुळ सौध झालें ।' – सारुह ७.५९. [सं. ध्व.]
सिंतर पु. भूल : 'पडिला शहाणिया सिंतरा ।' – मुआदि ७.८१.
सिंतरू वि. फसव्या; ठक.
सिंथणे सक्रि. विंधणे; नेम धरून मारणे : 'हे ससेयाचे कान : असे म्हणौनि (श्री चरणींची पदमें) सिंथिली :' – द्वाली ३८. [सं. सिध्]
सिंदु(धु)वारु न.निर्गुडी; एक वनस्पती.
सिंदू(धू)र पु. न. पहा : **शेंदूर** [सं.]
सिंद्रक पु. (रसा.) ज्यापासून साखर तयार होते असा एक रासायनिक पदार्थ; (इं.) डेक्सट्रिन.
सिंधभैरवी स्त्री.(संगीत) एक राग; गान समय दिवसाचा दुसरा प्रहर. सार्वकालिकही आहे.
सिंधु–धू–ध पु. १. समुद्र. २. एक मोठी नदी, नद. ही पंजाबातून वाहत येऊन अरबी समुद्राला मिळते. ३. या नदीकाठचा प्रदेश; सिंध.४. हत्तीच्या गंडस्थळातून वाहणारा मद. ५. (रसा.) एक धातू; (इं.) सोडियम.
स्त्री. (सामा.) नदी. [सं.]
सिंधुपुष्प न. पु. शंख. [सं.]
सिंधुर पु. हत्ती. [सं.]
सिंधुलवण न. सेंदेलोण; खाणीतील मीठ.
सिंधूरा पु. (संगीत) एक राग. गानसमय सार्वकालिक.
सिंनस्थळी स्त्री. नदीकाठची कपार : 'गोसावीयांसि सिंनस्थळी आसन असे' – लीचउ ९७.
सिंपणा(ना)रे न. १. धोटा; पिचकारी. २. कारंजे : 'सिंपनारे डावे

घातले :' – शिव ६४२.

सिंप(पु)टी स्त्री. शिपटी; छडी.

सिंबुर न. शांतता.

सिंह–व्ह पु. १. हिंस्र, मांसाहारी, आयाळ असलेला, ताकदवान, रुबाबदार वन्य प्राणी; मृगराज. २. (समासात उत्तरपदी) श्रेष्ठ, वरिष्ठ व्यक्ती. उदा. पुरुषसिंह. ३. (ज्यो.) बारा राशीतील पाचवी रास. [सं.] (वा.) **सिंहाचा वाटा असणे** – कार्यात एखाद्याचा सर्वांत मोठा वाटा असणे.

सिंहकंपित(करण) न. (नृत्य) पाय सरपटत पाठीमागचे बाजूस नेऊन दोन्ही हात आकुंचित करणे.

सिंहतल पु. पसरून जोडलेले दोन हात.

सिंहद्वार न. (राजवाडा, किल्ला इत्यादींचे) मुख्य प्रवेशद्वार, दरवाजा; दिल्ली दरवाजा.

सिंहधार स्त्री. लिंगायताचे जानवे.

सिंहनाद पु. १. सिंहाचे ओरडणे. २. (ल.) युद्धाची आरोळी; युद्धाचे आव्हान. ३. मोठा, भयंकर आवाज, ओरडा; गर्जना. ४. देवळात कोणीही नसतानासुद्धा, एखाद्या वेळी आतून निघणारा गंभीर, खोल आवाज.

सिंहविक्रीडित(करण) न. उजवा पाय पुढल्या बाजूस अलात करून, डावा पाय मागच्या बाजूस वळवून कनिष्ठिकेच्या बाजूने मंडल करून टाचेवर टेकवणे.

सिंहशय्या स्त्री. उजव्या कुशीचे कोपर जमिनीवर टेकवून त्यावर डोके ठेवून व पाय ताठ करून केलेले शयन. – योगशास्त्र. [सं.]

सिंहस्थ पु. गुरू सिंह राशीत येण्याचा काल. हा सुमारे १२ महिन्यांचा असतो. हा बारा वर्षांनी एकदा येतो. ही पर्वणी शुभ, पुण्यप्रद समजतात.

सिंहाडा पु. १. मोठा भयंकर सिंह. २. सिंहमुखी दगडी कठडा.

सिंहानक पु. घोड्याचा एक रोग; शिंगाडा.

सिंहावतार पु. १. (ल.) अतिशय राग, क्रोध यामुळे उग्र दिसणारा चेहरा. २. (चुकीने) नरसिंह अवतार.

सिंहावलोकन न. १. मागचा इतिहास पाहणे; सिंह मागे वळून पाहतो त्याप्रमाणे काम, घटना घडून गेल्यावर त्याचा आढावा घेणे. २. एक न्याय. समालोचन पद्धती. [सं.]

सिंहासन न. १. देव, राजा इत्यादींचे बसण्याचे आसन, पीठ, गादी; तक्त. २. राजधानी, प्रांत, परगणा. ३. एक योगासन.

सिंहिका स्त्री. राहूची माता; एक राक्षसी.

सिंहीण, सिंही स्त्री. सिंहाची मादी.

सी न. १. भाजी : 'तुम्ही भाजीचेया सिंया जाल – लीचउ ६३७. २. बी : 'आगपें आगपें तीयें सी सुदलेयां दाढे दिसती:' – लीचउ ५१०

सी वि. तीन. [फा.सिह]

सीगटोक वि. अद्वातद्वा; अपरंपार; बेहिशेबी.

सीगा पु. दर्जा; वर्ग; कोटी. [अर. सीगा = धंदा, व्यापार वर्ग]

सीझर, सीझरी शस्त्रक्रिया पोटावर छेद घेऊन मूल बाहेर काढण्याची शस्त्रक्रिया. (सीझरचा जन्म असा झाला होता असे सांगतात. त्यावरून हे नाव पडले.) [इं.]

सीड स्त्री. कुंपण तोडून केलेली पायवाट.' (झाडी)

सीत वि. सहा. – मुधो. [अर.]

सीत न. १. सर्व अर्थी पहा : **शीत;** थंडी. २. ज्या; धनुष्याची दोरी : 'सीत लाऊन सोडिला बाण।' – जै २०.११९. (वा.) **सीतापुढे मीठ खावप** – कामाच्या आधीच त्याविषयी बोंब मारणे. (गो.)

सीतरणे क्रि. फसवणे; ठकवणे.

सीता स्त्री. १. रामपत्नी; रामायणातील नायिका; पंचकन्यांपैकी एक. २. स्वर्गातून मेरूपर्वतावर पडल्यानंतर गंगेचे जे चार प्रवाह झाले त्यापैकी पूर्वेचा प्रवाह. ३. वृक्ष, वनस्पतिदेवता. ४. (सांकेतिक) अर्धा रुपया; अधेली; पन्नास पैशांचे नाणे.

सीतादेवी स्त्री. पीक काढताना महारासाठी तसाच राखून ठेवलेला पिकाचा भाग. काही ठिकाणी खळ्यावरची रास नेल्यानंतर तेथे राहणारे धान्य. या धान्यावर महाराचा हक्क असतो.

सीतादेवीची पूजा जोंधळा उपटण्यापूर्वी 'पाट' (दहा तिफणीइतका भाग) सोडतात. तिथे शेतकरी गळ्यात पागोट्याचा वेढा घेऊन कोरभर भाकरी व एक तांब्या पाणी टाकून, पाया पडून करतो ती पूजा.

सीताफळ–ळी न. स्त्री. उष्ण प्रदेशात आढळणारे, खपल्या असलेल्या जाड सालीचे, पुष्कळ बिया व त्याभोवती गर असणारे चविष्ट फळ. [सं. शीतफलम्]

सीतेचा पोल्हारा एक प्रकारची मोठी कवडी, कवडा.

सीतेचेपोहे एका जातीच्या गवताचे बी.

सीत्कार पु. सस् असा ध्वनी; दु:खाचा हलका ध्वनी; दात मिटले असता आत वारा ओढून काढलेला आवाज.

सीत्कारणे क्रि. फेकणे; धुडकावणे

सीदता स्त्री. पुष्टता : 'देहाचि सीदता तेया खेदु होईल ।' – ज्ञा १८.६४. [सं. सिद्धता]

सीधा वि. १. सरळ. २. प्रामाणिक; निष्कपटी. ३. संकट नसलेले. [हिं.]

सीधाजनेऊ स्त्री. डाव्या खांद्यावरून उजव्या कमरेपर्यंत केलेला वार. – मवि ९.११.

सीधू पु. (आ. वे.) उसाच्या रसापासून तयार केलेले मद्य.

सीनसाळ वि. १. जीर्ण; छिन्नसाल. २. क्षणिक; भासमान. [सं. छिन्नसाल]

सीना पु. (जंबिया खेळ) आपल्या हातातील जंबियाने जोडीदाराच्या छातीत मधोमध मारणे. [फा. सीना = छाती]

सीम वि. १. तिसरा. २. तिसरी (प्रत); कनिष्ठ (जमीन). ३. तिसऱ्या दर्जाचे. न. १. रेशमाची एक जात. २. (विणकाम) जरीच्या काठाची एक जात. [फा. सिवुम्]

सीमंत, सीमंतक पु. १. केसांचा भांग; स्त्रियांची विशिष्ट केशरचना. २. सीमादर्शक चिन्ह; सीमेचा शेवट. [सं.]

सीमं(मां)तपूजन–पूजा न. स्त्री. १. नवरदेवाची गावच्या सीमेवर किंवा देवळात किंवा वधूपक्षाच्या घरी, मांडवात केली जाणारी पूजा; श्रीमंतपूजन. २. ज्येष्ठ अमावास्येला बारा बलुतेदारांनी गावसीमांना

द्यायची भेट.

सीमंतोन्नयन न. एक गर्भसंस्कार. सोळा संस्कारांपैकी एक. [सं.]

सीमा–म स्त्री. १. मर्यादा; हद्द; अवधी (देश, ग्राम, काल इत्यादींचा). २. (ल.) आधिक्य; अतिरेक; कळस; पराकाष्ठा. ३. (ल.) अतिशय समृद्धी, रेलचेल. ४. पराक्रम – ऐको. [सं.]

सीमासूत्र न. (भूमिती) परिमिती; परीघ.

सीमांकक पु. हद्द दाखवणारा खांब, रेघ वा खूण.

सीमांतपथ पु. (जंगलखाते) घोडरस्ता; (इं.) रायडर.

सीमांतशुल्क न. जकात; आयात कर.

सीमित वि. १. मर्यादा असलेले. २. मोजके.

सीमूर–रे वि. उद्धट (स्त्री). – दृष्टांतपाठ १६.

सीमोल्लंघन न. १. गावसीमा ओलांडणे; गावाबाहेर जाणे. २. विजयादशमीला सीमा ओलांडण्याचा अवश्य करण्याचा विधी.

सीयाळी स्त्री.१. थंडी; हीव. २. हिवाळा. [सं. शीतकाल]

सीरणे न. १. साम्य; बरोबरी. 'कोवळीक घाली सीरणे । शिरीष पुष्पांसी ।' – उगी २६. २. भीती; थरकाप.

सील पु. पाटा. [सं. शिला, हिं.]

सील पु. ध्रुव प्रदेशातील एक जलचर प्राणी. [इं.]

सील–ल्ला न. चिलखत. [अर. सिलाह्]

सील न. मोहर; पाकीट, पिशवी इ. बंद करून वर लाख लावून उमटवला जाणारा खुणेचा ठसा. [इं.] (वा.) ० **ठोकणे** – कायमचे किंवा विशेष परवानगीशिवाय उघडता येणार नाही अशा रीतीने बंद करणे.

सीलद्री स्त्री. एक प्रकारचे भारी लुगडे; शेलारी. – धवळे पू ७६.

सीलोदक न. तीर्थ.

सीवकारा–रू पु. शिडकावा; शिंपडणे.

सीवणा पु. स्वप्न. [सं. स्वप्न]

सीवणि स्त्री. शिवून तयार केलेले अंतर्वस्त्र : 'कविस्वरबास...संग्रहें सीवणि आंतु घालूनि परावर्ण पांगुरनि:' – स्मृस्थ १२२.

सीवन न. शिवणे; दोरा घालणे.

स्त्री. शिस्नमण्याच्या कातड्यावरील शिवण. [सं.]

सीवा स्त्री. तिफणीच्या दात्यांच्या मधली जागा. (व.)

सीवीधुळा पु. शिवेचा दगड : 'तू प्रतापीया रायाचा आमोला : दापातीया रायाचा सीवीधुळा:' – रुस्वन १६००.

सीशा पु. तह; सलोखा.

सीसवेटी–ठी स्त्री. (विहिरीच्या) भोवतालचा कट्टा : 'विहिरी चिरेबद्ध केली : पर सीसवेटी बांधली नाही :' – गोप्रच १६५.

सीहार न. शेराचे लाकूड.

सीळका स्त्री. काडी; शलाका : 'तंव सूर्योदये दंतपंक्ती : वक्र सी(ळ)का (करूनि) फेडिती जीह्वामळ' – पूजावसर १५. [सं. शलाका]

सीळाडी स्त्री. दगडांचा ढीग : 'सीळाडीया वरीली सेवटी करवता होता :' – गोप्रच २९७.

सीक्षा स्त्री. १. नाथपंथाची दीक्षा : 'जुगुति नाही : सीक्षा नाही : आदेसु नाही :' – लीचपू २०६. २. नाथपंथी जोग्यांचा भोजनपूर्व धार्मिक विधी : 'आउसी गोसावीयाचां श्रीकरीं भाताचे पात्र ओळगविले : सीक्षा केली :' – लीचपू ५८४.

सींगट न. १. (तिरस्काराने) शिंग; शिंगाचा तुकडा; मेलेल्या जनावराचे शिंग. २. बंदुकीची दारू भरण्याचे शिंगाचे बनवलेले भांडे. [सं. शृंग]

सींगवट स्त्री. (महानु.) शृंगाररचना; थाटमाट. [सं. शृंग+वट]

सु अव्यय. चांगला, बरा, उत्तम याअर्थी नामादिकांच्या मागे लागणारे अव्यय. जसे :- सुपुत्र, सुदृढ. [सं.]

सुअणी स्त्री. पायरी; टप्पा : 'आयुष्यपंथे प्राणिगणी । करुनि अहोरात्राची सुअणी ।' – ज्ञा ११.४.

सुअर्थ पु. कल्याण.

सुआड वि. सुलभ; सोपे : 'होते भेदाचे कवाड । ते फेडोनि केले सुआड ।' – ज्ञा १८.१५८८.

सुआर पु. आचारी; स्वयंपाकी. [सं. सूदकार]

सुआर पु. वस्त्रे देणारा.

सुआवणे सक्रि. सेवन करणे; खाणे.

सुआळमुआळ पु. आघाडीचा स्वार: 'पुढील सुआळमुआळ वाढिनले:' – शिव ९६२.

सुइजणे, सुजणे सक्रि.१. कार्यप्रवृत्त होणे, करणे. (जमिनीत नांगर वगैरे) घालणे. २. माड, पोफळ इत्यादी झाडांतून पानाचा कोंब निघणे. [सं. सु=प्रसवणे, सू=प्रेरणे]

सुई स्त्री. १. कपडे वगैरे शिवण्याचे साधन. २. होकायंत्रातील दिशा दाखवणारे बाणाचे टोक; इंजक्शन शरीरात सोडण्यासाठी वापरतात ती धातूची पोकळ सूक्ष्म नळी.

सुईण(णी) स्त्री. बाळंतपणाच्या वेळी मुलाच्या जन्मासाठी मदत करणारी व पुढील काळजी घेणारी स्त्री. [सं. सु = प्रसवणे]

सुईदोरा पु. (मल्लखांब) मल्लखांबावरील वेलाचा एक प्रकार. हातातून क्रमाने पाय काढून घेणे. – व्याज्ञा ३.२०२.

सुईसुंद्री स्त्री. फुलबाज्या. (अहि.)

सुएर पहा : **सुवेर**

सुकट स्त्री. वाळलेला मासा, बोंबील.

वि. १. सुकलेले; वाळलेले. २. रोड; टवटवी नसलेले. [सं. शुष्क]

सुकटी स्त्री. वाळलेल्या माशांचा चुरा, भुगा.

सुकणे अक्रि. १. वाळणे; शुष्क होणे. २. रोडावणे; निस्तेज होणे.

सुक(ख)ड स्त्री. पुरा झालेला व सुकलेला नारळ.

वि. सुकलेला. [सं. शुष्कल]

सुकडा पु. अंगावर खवले नसलेला हिरवट रंगाचा मासा.

सुकडी स्त्री. कस्तुरी.

सुकडी पुष्टीवर्धक आरोग्यदायी खाद्यपदार्थ.

सुकडी स्त्री. १. कस्तुरी : 'सर्वांगे बाहाकाति परिमळें । सुकडिचेनि ।' – ऋ ७१. २.

सुकणे अक्रि. १. वाळणे; शुष्क होणे; ओलावा नाहीसा होणे. २. नदी, खाडी इत्यादींमधील पाणी कमी होणे. ३. आजारीपणामुळे शरीर क्षीण होणे, वाळणे. [सं. शुष्=वाळणे; त. शुक्कुदल]

सुकणावळ स्त्री. सुकण्यामुळे द्रवपदार्थाची झालेली, आलेली घट.

सुकतळ न. जोडचात पावलाचा घाम शोषून घेण्यासाठी घातलेला चामड्याचा तुकडा; घामोळे; खोगिराच्या खालचे घामोळे; अंगरखा इत्यादीमध्ये अशा प्रकारे काखेत लावलेले जोडकापड.

सुकताव पु. (सोनारी) भट्टीत तापवलेले सोने हवेवर थंड होऊ देणे.

सुकती स्त्री. नदी, समुद्र इत्यादींची आहोटी.

सुकर वि. करायला सोपे; सहज मिळवण्यासारखे.

सुकरणे क्रि. आनंद होईल असे करणे; शांत करणे. [सं. सम्+कृप्]

सुकर्मा पु. १. सत्तावीस योगातील सातवा योग. २. देवांचा एक कारागीर.

सुकवडा पु. उडदाच्या पिठात मिरे, हिंग, सुंठ इ. घालून तळलेला वडा.

सुकवण न. १. धान्ये इ. वाळवणे, सुकवणे. २. वाळवण्याची मजुरी.
स्त्री. जीर्ण स्थिती; अशक्तता.

सुकवणी स्त्री. १. क्षयरोग; क्षीणता. २. एक प्रकारची गवती चटई. (व.)

सुक(ख)वत स्त्री. न. वाळलेले केळीचे पान.

सुकवे न. करपलेले पीक; वाळलेले शेत.

सुकसुक स्त्री. सुगावा. (ना.)

सुकळास क्रिवि. वि. सहजगत्या; सहज; मोकळेपणे; आपोआप. [सं. सु+क्लेश]
वि. पहा : **सुकर**

सुका पु. तंबाखू.

सुका वि. १. सुकलेले; वाळलेले. २. (ल.) लाभ नसलेला; काही उत्पन्न नसलेला; पोकळ; निरर्थक; अर्थहीन; कसहीन. ३. कोरडा, जेवणाशिवाय (पगार, वेतन). [सं. शुष्क]

सुकाड पु. १. पहा : **सुकडा**. २. पाखरांनी भिऊन शेतात येऊ नये म्हणून उभे केलेले बुजगावणे.

सुकाण–णू न. गलबत विवक्षित दिशेला वळवण्याचे, त्याच्या मागच्या बाजूस असलेले पाण्यातील एक साधन; कर्ण. [सं. सुकर्ण; अर. सुक्कान]

सुकाणदा(गी)र, सुकाण्या–न्या पु.१. सुकाणू धरणारा; कर्णधार. २. (ल.) पुढारी; मुख्य; नायक.

सुकाणूसमिती धोरण ठरल्यानंतर कार्याची आखणी करण्यासाठी नेमलेली समिती; मार्गदर्शक कार्यसमिती.

सुकाताव पु. १. भुकेमुळे पोटात होणारा भडका; भुकेमुळे व्याकूळ होणे. २. शुष्क पाहुणचार. ३. निरर्थक फेरफटका. ४. साफ नाकबुली. ५. खरडपट्टी; धसमुसळेपणा. (क्रि. देणे, बसणे.) ६. पहा : **सुकताव**

सुकामेवा पु. काजू, बदाम, खारीक, खोबरे, खडीसाखर इ. मिसळून केलेला पदार्थ.

सुका लफडा निरर्थक ब्याद, भांडण.

सुकाळ पु. १. चांगला, वेळेवर पाऊस पडल्याने भरपूर धान्य आलेले दिवस. २. समृद्धी; विपुलता; स्वच्छता. [सं. सु+काल]

सुकाळसौदा पु. अत्यंत स्वस्त मालाची देवघेव. (विशेषत: नुकसानीचा दर्शक म्हणून योजतात.)

सुकाळे न. सुके तळे.

सुकाळ्या, सुकाळीचा वि. १. अत्यंत विषयासक्त; कामोत्सुक (पुरुष, स्त्री). २. सुखार्थ दुसऱ्या व्यक्तीकडून वारंवार मैथून करून घेत असावे अशा स्वभावाचा (पुरुष, स्त्री, नंपुसक).

सुकांबा पु. आंब्याच्या वाळलेल्या फोडी, उसरी. [सं. शुष्क+आम्र]

सुकी काकडी फऱ्यामऱ्याच्या खेळात प्रतिपक्षाचे एकही फरे होऊ न देता सर्व मरी घेऊन खाऊन टाकणे.

सुकी पु. मेहुणा; बायकोचा भाऊ : 'येणे आपुला सुकीचा मानु घेतला : ऐसे रामु बोलिला :' – रुस्वन २५३४.

सुकुडदुम अक्रि. घाबरणे; गडबडणे; सर्द होणे; पाचावर धारण बसणे. (ना.)

सुकुमार वि. नाजूक; कोमल; कोवळा. [सं.]

सुकुरउंडो पु. शकुनउंडा. (गो.)

सुकृत न. १. पुण्याईचे कृत्य; सत्कृत्य; पुण्यकार्य; देवता संतुष्ट होण्यासाठी करण्याचे कर्म (यज्ञ, याग इ.). २. पुण्य; सद्गुण.

सुकृत–ती वि. पुण्यवान; धार्मिक कृत्ये करणारा; नीतिमान.

सुकृत्या स्त्री. एक दैवी शक्ती : 'सुदक्षिणे सुकृत्या निफजउनि पुरा द्वारके पाठवीली' – गरा १९८.

सुकेड स्त्री. वाळलेली बाजू, जागा.

सुकेळ न. सोलून तूप लावून वाळवलेले केळे.

सुक्का पु. पत्र; चिठ्ठी; हातरोखा. [फा. सुका]

सु(सू)क्तासु(सू)क्त वि. भलेबुरे; बरेवाईट; न्याय्यअन्याय्य; वेळावेळ; सद्असत्; शब्दाशब्द; सव्यापसव्य. [सं. सूक्त+असूक्त]

सुक्ती, सुपती स्त्री. पाथरवटाचा दगड फोडण्याचा लहान हातोडा. पहा : **सुतकी**

सुक्यो पोळ्यो हवेतले बंगले; मनोराज्य. (गो.)

सुक्सुक् स्त्री. सुगावा; वार्ता. (झाडी)

सुख न. १. मनाला आनंद, स्वस्थता, समाधान देणारी भावना. २. निद्रा; विश्रांती : 'सुख करून उठली असली तर सत्वरी उत्तर पाठविणें.' – पेद २६. [सं.]

सुखड स्त्री. भिंतीवर चुन्याने काढलेली आकृती.

सुखद वि. आल्हाददायक; सुखावह; सुखकारक.

सुखनासी स्त्री. पोपटाच्या चोचीसारखे तोंड असलेली दगडी पन्हाळ : 'सुखनासीचीया साउलाया एकां वांटलीया : ' – लीचउ ३४४. [सं. शुकनासिका]

सुखपती स्त्री.गाढ निद्रा : 'निद्रा : स्वप्न: सुखपती : तूर्य अवस्था चौथी:' –मूप्र २७१६. [सं. सुषुप्ति]

सुखरूप वि. सुखी; खुशाल; संकटरहित.
क्रिवि. काही त्रास किंवा अडथळा न होता; सुखाने; सुरक्षितपणे; सुखेनैव.

सुखवाद पु. ऐंद्रिय सुखाची पाठराखण हे जीवनाचे ध्येय मानणारे तत्त्वज्ञान.

सुखवासी स्त्री. बसण्याची गवती चटई. (व.)

सुखशय्या स्त्री. परलोकी सुख व्हावे म्हणून ब्राह्मणाला दान करण्याचा पलंग, बिछाना इत्यादी.

सुखाड न. सुख.
वि. सुखकारक.

सुखाड–डी स्त्री. १. कोरडी जागा. २. कोरडेपणा; वाळलेली स्थिती.

सुखात्मिका, सुखांतिका स्त्री. शेवट गोड असणारी कथा, कादंबरी, नाटक.

सुखा(खो)पा–वा पु. सुख; शांती.

सुखापुरी पु. १. गोसाव्यांचा एक पंथ.२. (निंदार्थी) आनंदी, चैनी, सुखी इसम.

सुखावणे, सुखा(खां)डणे अक्रि. सुखांची चट लागणे व त्यामुळे आळस उत्पन्न होणे.

सुखासुखी क्रिवि. उगाच; निष्कारण.

सुखिया वि. १. सुख भोगणारा; सुखी. २. समाधानी; संतोषी, आनंदी; चैनी; मजा मारणारा.

सु(स)खून पु. शब्द; वचन. [सं. शकुन; फा. सुखून]

सुखूस वि. रुचकर; चवदार. (गो.)

सुग(घ)ड न. १. लहान मडके. २. मातीच्या बुडकुल्यावरील वाटीसारखे झाकण. (ग्रा.)
वि. चांगला घाट असलेला. [सं.सु+घट]

सुग(घ)ड–डा–र वि. चतुर; कुशल; शहाणा.

सुगम वि. १. सोपे; साध्य करण्यास, मिळवण्यास सोपे. २. फारसा त्रास न देणारे (औषध). ३. समजण्यास सोपे.
पु. शुभमुहूर्त. (व.) [सं.]

सुगर(री)ण स्त्री. १. एक प्रकारचा पक्षी. डोके पिवळे, मुखवटा काळा, वरच्या भागावर गर्द. तपकिरी, लालसर रंगाच्या रेषा, खालच्या भागावर रेषा नसतात.२. एक जंगली झाड. ३. खळवाडीतील गवताच्या काडांची केरसुणी, खराटा.

सुगरण, सुग्रण वि. १. चांगला स्वयंपाक करणारी (स्त्री). २. सुगर; निष्णात. (चुकीने पुरुषासही लावतात.)

सुगर(रा)वा पु. १. बोलबाला; मोठेपणाची प्रसिद्धी : 'तेया गुरुमार्ग टेके : जेयाचा सुगरवा देखे।' – ज्ञा १३.८११.२. थाटमाट.

सुगरात पु. स्वार्थ. (गो.)

सुगरावणे क्रि. उत्तम होणे.

सुगंध पु. सुवास; चांगला वास. [सं.]

सुगंध मार्जार न.जवादी मांजर.

सुगंधी, सुगंधिक वि. सुवासिक.

सुगंधी पु. १. सुवास. २. सुवासिक वस्तू, अत्तरे इ. विकणारा; गंधी.

सुगंधेल न. अत्तर.

सुगाड न. वटपौर्णिमेस, संक्रांतीस द्यावयाचे सुगडाचे वायन. [सं. सुघट]

सुगावणे अक्रि. अनुकूल होणे; इच्छेप्रमाणे होणे; सुलभ प्रकारे आढळणे.

सुगा(दा)वा पु. शोध; तपास; तलास; हरवलेल्या वस्तूंचा पत्ता.

सुगी स्त्री. १. पिकाचा हंगाम. २. समृद्धी; सुकाळ; संपन्नता. २. पहा : **सोंगणी** [सं. सुगति; क. सुग्गी]

सुगुरवा पु. पायगुण. (गो.)

सुगूर वि. सावध. (गो.)

सुग्रावा १. चातुर्य. २. पायगुण.–भाप्र.

सुग्रावो, सुगुर्वो पु. शुभशकुन.

सुग्रास पु. उत्तम प्रकारचे अन्न; मिष्टान्न. [सं.]

सुघट–टित वि. १. चांगल्या आकाराचे, चांगले घडवलेले, बनवलेले. २. बनवण्यास सोपे. ३. चांगले जोडलेले. ४. चांगल्या मांडणीचे. [सं. सुघट]

सुघटन न.विघटित वा नादुरुस्त झालेली गोष्ट व्यवस्थित करणे. उदा. सुघटन शल्यचिकित्सा, सुघटन शस्त्रक्रिया इ.

सुघटी स्त्री. टाच. – ज्ञा ६.१९३.

सुचणे अक्रि. मनात स्फुरणे, येणे; आठवणे; मनात आणणे. [सं. सूच्, शुध्यति]

सुचना स्त्री. व्यवस्था; बंदोबस्त : 'ऐसा आपुलाली सुचना केली:' – गोप्रच ७०.

सुचवणे सक्रि. सूचना करणे; कळवणे; इशारा देणे; माहीत करून देणे; काय करावे यासंबंधी सल्ला देणे.

सुचावणे अक्रि. सूचना मिळणे; सावध होणे.

सुचित–त्त वि. शांत; स्वस्थ; बिनत्रासाचे; निश्चित.
क्रिवि. सावधपणे : 'आपुलाले म्हणिये सुचित रहाटता:' – ज्ञागा ३९६.

सुचित्रक पु.खंड्या पक्षी.

सुचे न. सूचना; जाणीव; माहिती; ज्ञान; ओळख; 'राजकोटाचे राजकारण केल्या अनुसंधानाप्रमाणें साधावें परंतु सुचें जालें याजमुळें साधलें नाहीं.'– पेद २४.

सुजगर वि. जागृत; जागा. [सं. सु + जागर]

सुजट, सुजकट, सुजीर, सुजमीर वि. किंचित सुजलेले; फुगीर.

सुजणी स्त्री. लांबट निमुळते मोती.

सुजणे अक्रि. १. फुगणे; फुगीर दिसणे. २. अत्यंत उत्सुक, लुब्ध होणे. ३. घालणे. ४.खोळंबणे. [सं. शुयते, श्वज]

सुजणे अक्रि. १. समजणे; उमगणे; दिसणे : 'आपुला परावा न सुजे रणीं :' – शिव १०५०. २. शोभून दिसणे : 'ते इंद्रायणीही इयेपुढां न सुजे :' – रुस्वन १९४. [सं. सुच्]

सुजना पु. दाभण; टोच्या. [फा. सोझन् = सुई]

सुजनी स्त्री. १. गभरेशमी सुती कापड. २. पांघरण्याची दुलई.

सुजम(मि)रणे अक्रि. थोडेसे सुजणे.

सुजरा–ला, सुजलेला वि. १. फुगीर, सुजणारा. २. अत्यंत आसक्त, लुब्ध.

सुजलेभूत न. पहा : **सुजरा** २

सुजाण वि. सुज्ञ; बुद्धिमान; तडफदार; चलाख.

सुजाणी वि. डौलदार : 'बोलती मुहुरवाणी। चालती सुजाणी।' –राजमती [सं. सुज्ञनि]

सुझणे अक्रि. १. सुचणे, समजणे. २. दिसणे. ३. राहणे. – शर

सुटकण–न–र, सुटदिनी–शी क्रिवि. सुट असा आवाज होऊन; झटकन; फटकन; तडकाफडकी; झटदिशी. [ध्व.]

सुटका पु. १. मुक्तता; मोकळीक. २. प्रसूती; बाळंत होणे. [दे.प्रा. छुहक्का]

सुटणूक स्त्री. मुक्तता.

सुटणे अक्रि. १. मोकळे, स्वतंत्र होणे; बंधन, करार, दाब, त्रास, घोटाळा इत्यादींतून मुक्त होणे. २. अलग होणे; विभाग पडणे; गाठ, संबंध, संगत इत्यादींतून मोकळे होणे; विलग, वियुक्त होणे. ३. भंगणे; फुटणे. ४. उद्‌भवणे; फुटणे; बाहेर पडणे (घाम, कंप, कंड).५. पाझर फुटणे; वास येणे, पसरणे; भीती, राग, जुलूम, रोग, अरिष्ट इत्यादींचा प्रादुर्भाव होणे; वारा, पाऊस इत्यादी सोसाट्याने वाहणे; आग, वणवा पेटणे : ६. बैल, घोडा अनावर होणे, भरधाव पळणे; दाब, बंधन नसणे; मोकाट धावणे; स्वैरपणे संचार करणे. ७. एखादे काम, धंदा करण्यासाठी, पार पाडण्यासाठी मागेपुढे न पाहता तुटून पडणे; मनमुराद व बेमुर्वतपणे एखादे कृत्य करीत सुटणे. ८. बार होणे, उडणे; स्फोट होणे (तोफ, बंदूक इत्यादींचा). ९. मर्यादेबाहेर मोठे होणे; वाताने फोपसे होणे (पोट, अंग). [सं. चुद् (चोद्य)]

सुटरा वि. १.आगंतुक. २.अधाशी.

सुटला वि. फालतू. (व.)

सुटवंग वि. मुले मोठी झाल्यामुळे मोकळी असलेली (स्त्री).

सुटसुटीत वि. चपळ; मोकळाचाकळा; नीटनेटका; आखूड व बांधेसूद; हलका व मजबूत; तडफदार व चलाख (माणूस, शरीराचा बांधा); टुमदार व छोटे (घर); सोईस्कर व मर्यादित; आटोपशीर (काम, धंदा); लहान पण व्यवस्थित; बोजड नसलेले.

सुटंक न. सुचिन्ह.
वि. १. शुभकारक : 'ब्रह्मचर्य अति सुटंक।' – एभा ३. ४४९. २. पाणीदार; तीक्ष्ण; जहाल : 'अति सुटंक दळभार।' – एरुस्व ५.४०.

सुटा वि. १. ढिला; मोकळा; अलग; न गुंतलेला. २. बंधनरहित; घट्ट न बसवलेला; लोंबता; हालत असलेला. ३. गर्दी नसलेला, विरळ; फट, अंतर पडलेला. ४. एकटा; वेगळा; निराळा. ५. कामात न गुंतलेला. ६. मुक्त; सुटलेला (कर्ज इत्यादीमधून).

सुटारु स्त्री. वाईट चालीची स्त्री. (कु.)

सुटावणे अक्रि. १. सुटणे; मोकळे होणे; विसकळीत होणे; ढासळणे (गवताचा भारा, गंज इत्यादी). २. ओळीने फुगवटा येणे (मातीच्या भिंतीला वगैरे); वाढणे; सुजणे; मोठे होणे (पोट इत्यादी); चैनीने शरीर फोपसे, लठ्ठ होणे. ३. जागेवरून घसरणे (तुळई इत्यादी).

सुटा स्वर ज्या स्वरावर थांबून गायक रागाची रंगत वाढवतो तो स्वर.

सुटिक न. सोडवणारे; मोक्ष देणारे : 'असो हे भवबंदिखानिचे जे सुटिक:' – ऋव १८१.

सुटिक–का स्त्री. १. सुटणूक, सुटका. २. वर्षाव; वृष्टी : 'पर्जन्याची सुटिका जैसी।' – ज्ञा ११.६८६.

सुटी मिरास. (को.)

सुटी स्त्री. वर्षाव : 'डोळे नाराजांची सुटी।' – ज्ञा १६.२४१.
वि. १. निवडक : 'ए वेळेचे पदार्थ सवंग : आणि सुटी:' – लीचउ १२८. २. उदार : 'ऐसा वैद्य नसे सुटी : जो देखत खेवो दिठी : दोषा रूप करी :' –ज्ञाप्र ३६९. ० **करणे** – नीट करणे; निवडणे (धान्य). (कु.) [सं. चुट]

सुटी–ट्टी स्त्री. मोकळीक; रजा; रिकामा दिवस. [हिं. छुट्टी]

सुटीवळ न. एक प्रकारचे चर्मवाद्य : 'वाजती पडो भेरी काहाळा : तुरतुरीया सुटीवळा :' – रुस्वन १३१०.

सुटुक न. लचांड. (व.)

सुटुबुटु,सुडबुड स्त्री. निरर्थक हालचाल; रिकामी चुळबुळ.
क्रिवि. आळसाने; मागेपुढे करून; निरर्थक प्रकारे.

सुट्टा क्रिवि. पहिल्याने; प्रथम. (व.)
उद्‌गा. पहा : **सुट्ट्यो** उद्‌गार.

सुट्ट्यो न. १. देणेघेणे पूर्ण करणे; कर्जफेड; ऋणमुक्तता.२. (उद्‌गा.) मुलांच्या खेळातील अटीतून मोकळीक करण्याविषयी, (खेळात) आंधळ्याचे डोळे सोडण्याविषयी एक संज्ञा.

सुडकणे अक्रि. सटकणे; झटकन निघून जाणे.

सुडका–के पु. न. १. जुन्या वस्त्राचे फडके; पटकूर; चिंधी. २. (निंदेने) म्हातारा मनुष्य. ३. फक्त लंगोटी जवळ असलेला माणूस. [सं. सम+उत्+अश्नलम]

सुडबुडणे अक्रि. लुडबुडणे; चुळबुळ करणे; गोंधळ उडवणे (उंदीर, मुले यांनी).

सुडबुडाट पु. गोंधळ; लुडबुड.

सुडंस पु.मर्मज्ञ: 'तेथ अर्जुनु सुडंसु । चमत्कारला ।'– ज्ञा ५.१६०.

सुडा पु. १. अडकित्ता. (व.) २. लोणच्याच्या कैऱ्या फोडण्याचा अडकित्ता. (अहि.) [हिं. सरोता]

सुडावणी स्त्री. १. गर्जना; ध्वनी; गजर. २. सुरवात. ३. मुक्तता. – ज्ञा १२.५४. [सं. सूद्]

सुडावणे अक्रि. १. कठीण काम करण्यासाठी धाडसाने पुढे होणे, सरसावणे. २. वाजवणे : 'वाद्यंत्रे सुडाविली:'– दृपा ७६.

सुडी स्त्री. १. कणसांसह जोंधळा, सजगुरा इत्यादी धान्यांच्या ताटांचा रचलेला ढीग, गंज, गूड. २. गवताची गंजी, भारा, पेंढी. [सं. शंड]

सुडौल वि. डौलदार; सुंदर; सुबक.

सुढावलासा होणे चढेल होणे; चढून जाणे.

सुढाळ वि. १. चांगल्या घडणीचे – रचनेचे; सुरेख; सुंदर. २. तेजस्वी; चकचकीत; पाणीदार (मोती इ.). ३. सुखकर : 'कापुरी परिमळु दिसे वो अळुमाळू। हळुहळु सुढाळु पवनपंथे' – ज्ञागा ८२.

सुणगार पु. चुना भाजणारा. (बे.)

सुणागाठ स्त्री. कुत्र्याचे हेंडगूळ, मैथुन.

सुणे अक्रि. १. शिरकाव करणे; घालणे. २. देणे; ठेवणे; लावणे :'दृष्टी सुए पायेतळी:' – ज्ञाप्र ९५.३. पुढे करणे : 'सुत जडैची वोडणे : पळति तपोधन:' – उगी ४३५.

सुत पु. १. पुत्र; मुलगा. २. (ल.) राजपुत्र–कुमार; शिष्य.

सुत पहा : **सूत** [सं. सु.= बाळंत होणे]

सुतक न. अशौच; मृत माणसाबद्दल जवळच्या व्यक्तींनी धरण्याचा विटाळ. [सं. सूतक:]

सुतकतुला, सुतकाळा–ळ्या, सुतकी, सुतकील, सुतकाडो वि. सुतक आल्यामुळे अपवित्र झालेला.

सुतकाडी, सुतकी स्त्री. पाथरवटाचे दगड फोडण्याचे एक हत्यार.

सुतकुडे न. सुताचे गुंडाळे.

वि. १. उदास, दु:खी (चेहरा, वातावरण इ.) २. सुतक असलेला.

सुतणे अक्रि. निजणे : 'शेजे तो मी सुतलों।' – तुगा १४२९. [सं. शी–शय, शस् हिं. सोना]

सुतणे अक्रि. १. एखाद्या वस्तूभोवती सूत गुंडाळणे. २. (ल.) मारणे; ठोकणे.

सुतपुती–पुतळी स्त्री. १. कापसाचा (जखमेवर लावायचा) मणी. (कर.) २. स्त्रिया मंगळागौर, शिवामूठ इत्यादी पूजेमध्ये देवाला वाहण्यासाठी वस्त्र म्हणून करतात ती कापसाची विशिष्ट आकाराची माळ; गेजावस्त्र.

सुतर(ता)रनाल–ळ, सुत्रनाल स्त्री. उंटावर वाहून नेण्याची तोफ. [फा. शुतुर्नाल]

सुतरफेणी स्त्री. एक गुजराथी खाद्यपदार्थ.

सुतरमुरुग पु. शहामृग. – तंजाशिला २९. [अर. शुतरमुरुग]

सुतरा वि. १. शहाणा; धूर्त. २. तीक्ष्ण.

सुत(ता)राम क्रिवि. १. (मूलार्थ) पलीकडे, पुढे, अतिशयपणे. २. अगदी, सर्वथा, सर्वस्वी, सर्व तऱ्हेने. ३. मुळीच नाही, कधीही नाही – नकारार्थीच उपयोग.

सुतल–ळ न. सप्तपाताळांपैकी तिसरे पाताळ. [सं.]

सुतला स्त्री. चोरी. (गो.)

सुतलावप क्रि. चोरी करून नेणे. (गो.)

सुतवणी स्त्री. विणकर; माळी : 'सुतवणीयांचा मढु' – स्थापो ८३.

सुतवणे अक्रि. १. सुतात गुंफणे; ओवणे; गोवणे. २. सूत गुंडाळणे. (संक्रांतीची सुगडे, वधूवर, पिंपळ, रुखवतातील लाडू इत्यादींभोवती.)

सुतसणे सक्रि. घालणे; ठेवणे.

सुतळी–ळ स्त्री. तागाची वा सुताची जाड दोरी.

वि. सुतासारखे बारीक; नाजूक : 'तूप पुरणाची पोळी। दूध सेवया सुतळी।' – वलो ३५. (व.) [सं. सूत्र]

सुता स्त्री. मुलगी.

सुताई स्त्री. मार; चोप. (झाडी) [सं. सूद; हिं.]

सुताचा तोडा पु. १. सुताचा, दोऱ्याचा तुकडा. २. (ल.) क:पदार्थ; अत्यंत हलक्या किमतीची वस्तू.

सुताटी स्त्री. खांद्यापासून मान वर निघते तो भाग : 'राणोजी जाबूलकर मानेच्या सुताटीजवल गोली जखम भारी.' – पेद २१.७७.

सुताड पुनव स्त्री. श्रावणी पौर्णिमा. (गो.)

सुताडा पु. १. कापसाच्या सुताचे विणलेले जाडेभरडे वस्त्र (लुगडे इ.); झोऱ्या, बोऱ्या. २. जाड्याभरड्या सुताची मोठी सतरंजी. [सं. सूत्र]

सुताडे न. १. (निंदार्थी) सुताडा. २. फार दूरचे नातेगोते, आप्तसंबंध; नात्यागोत्याचे जाळे; घरोबा; निकटचा संबंध.

सुताडेगु(गो)ताडे न. १. पहा : **सुताडे** २. २. दूरचे व्यापारी संबंध; एकमेकांचे गुंतागुंतीचे व्यवहार किंवा संबंध. ३. सुतांची गुंतागुंत.

सुतार पु. १. लाकडाचे काम करणारी एक जात व त्यांतील व्यक्ती. २. लाकूड कोरणारा एक पक्षी. ३. पतंगाला दोरा बांधण्याचा फासा.(कर.) [सं. सूत्तकार; त. शुत्तिरन]

सुतारमेट–पिढ्या–नेट न. सुताराचे दुकान, अड्डा.

सुतारा पु. (कोष्टी) मागाचा एक भाग; गुलड्याशी समांतर असणारी काठी.

सुतारी येने ठसका बसणे. (व.)

सुताळ स्त्री. एक प्रकारचा तांदूळ.

सुताळ वि. उंच : 'पूतळिया सुताळा' – गरा १८१.

सुताळी स्त्री. शोध; थांग; पत्ता. – तुगा २८३. [सं. सूत्र]

सुतिणे अक्रि. मारणे. [सं. सूत्र]

सुती वि. (मंडई) वीस या संख्येचा सांकेतिक शब्द.

सुती स्त्री. १. प्रवेश; विस्तार. २. एखाद्यावर वजन, दाब पाडणे; एखाद्याच्या धाकाने निमूटपणे वागणे, ऐकणे.

वि. १. कापसाच्या सुताचे केलेले, विणलेले. २. (ल.) सरळ; नीट; बिनचूक; पद्धतशीर; चोख. ३. ओळीने, सम पातळीत असलेले, कुशलतेने मांडणी केलेले; आवाक्यातील. ४. (संख्यावाचक शब्द जोडून समासात) कापडाचा पोत, वीण, तलमपणा दाखवणारा. जसे :– एक सुती, दोनसुती.

सुती स्त्री. १. गाईचे जननेंद्रिय. २. आई; जननी. ३. जन्मस्थान; उत्पत्तिस्थान. [सं. सू = बाळंत होणे]

सुती स्त्री. नाद; छंद; लोभ.

सुतीव वि. पहा : **सुती** २, ३.

सुतेरा पु. १. कोळी नावाचा किडा व त्याच्या गुदापासून उत्पन्न होणारा तंतू, दोरा. २. एक तंतुवाद्य.

सुतोवाच उद्गा. सांगण्यास किंवा बोलण्यास सुरवात करणे या अर्थी योजतात. बहुतेक पुराणे सूताने शौनकादिक ऋषींना सांगितली आहेत. त्यामुळे त्यातील अनेक अध्यायांच्या आरंभी 'सूत उवाच' असे शब्द असतात त्यावरून. [सं. सूत+उवाच]

सुत्ताले न. तटाची भिंत : 'श्रींगंगराजे सुत्ताले करवियले' – श्रवणबेळगोळ शिला १.२. [क.]

सुत्थी स्मरण. – भाप्र.

सुत्रा–त्री पहा : **सुतरा**

सुदगत स्त्री. शोध; विचारपूस; तपास; चौकशी. [सं. शोध + गति]

सु(सू)दणे सक्रि.१. देणे; घालणे; ठेवणे; लावणे. २. ठार मारणे. – ऐको. [सं.स्थूत, सूद्]

सुदती वि. सुंदरी. [सं.]

सुदम वि. माणसाळण्यास सोपा. [सं. सु+दमन]

सुदमुद वि. हुबेहुब. (ना.)

सुदर्शन न. १. विष्णूचे चक्र. २. (ल.) ब्याद; अरिष्ट; पाठी लागलेले लफडे. ३. चक्रांकित शाळिग्राम. ४. अमरावती.

वि. सुंदर. [सं.]

सुदर्शनचूर्ण न. अनेक औषधे कुटून केलेली एक भुकटी.

सुदर्शनफिरकी स्त्री. (मल्लखांब) नसीकसाचे हात बांधून दोन्ही हातात मल्लखांब दाबून पाय उचलून घड्याळाच्या काट्याप्रमाणे फिरवणे.' – व्याज्ञा ३.१८०.

सुदंभु वि. ज्ञाता; अस्तिक. – ज्ञा ५.१६१.

सुदंश वि. पहा : **सुडंस** : 'तेथ अर्जुनु सुदंशु । म्हणोनि चमत्कारिला ।' – ज्ञा ५.१६१. [सं.]

सुदाम–मा, सुदामदेव पु. रोड, अशक्त, दरिद्री मनुष्य.(वा.) **सुदाम्याचे पोहे** – दात्याने आपण दिलेल्या देणगीचा विनयाने करण्याचा उल्लेख.

सुदा(धा)मत क्रिवि. सरळ; सरळपणे; सुखसंतोषाने; सुरक्षितपणे; सुस्थितीत; नुकसान न पावता; इजा न होता; बिनधोक (असणे, पोहाचणे, पावणे इत्यादींचे विशेषण). २. विनात्रास; विनाखटपट; नियमितपणे, पूर्वीपासून; पूर्ववत; बिनहरकत (वागणे, नांदणे, देणे, बोलणे, चालणे इ.).

स्त्री. १. चाल;.प्राचीन वहिवाट. २. सलोखा. [फा. शुदामद्]

सुदामे पु. अव. पोह्यांना सांकेतिक शब्द.

सुदावा पहा : **सुगावा**

सुदि पु. शुद्ध पक्षातील दिवस : 'भाव संवत्सरे चैत्र सुदि १५ रवी' – पांढरशिला ।। ६.१८.

सुदिन– सुदिवस–दीस न.पु. १. शुभदिवस. २. सणाचा दिवस. ३. इष्ट वस्तू मिळणे, संकटातून सुटणे इ. घडण्याचा दिवस . [सं.]

सुदिष्ट वि. चांगला सल्ला मिळालेला; योग्य मार्गदर्शन मिळालेला.

सुदीर पु. बाट्या कुणबी, शूद्र. (गो.) [सं.शूद्र]

सुदृढ वि. १. फार बळकट, मजबूत, गच्च बसवलेले; कठीण. २. कणखर; सशक्त व मजबूत. [सं.]

सुद्धा शअ. सहित; बरोबर; संगतीने; सकट.

क्रिवि. देखील. [सं. सार्द्ध]

वि. शुद्ध; साधा; एवढाच. (को.)

सुधराई स्त्री. १. सुधारणा. २. नगरपालिका. (बडोदे)

सुधा स्त्री. १. अमृत. २. फुलामधील मध. ३. चुना. ४. रस, पाणी. ५. वीज. ६. शेर. ७. हरितकी. [सं.]

सुधा वि. बरोबर; योग्य; बिनचूक; शुद्ध; सरळ. [सं. शुद्ध]

सुधाकर, सुधांशु पु. चंद्र.

सुधाकरी स्त्री. चंद्राची सतरावी कला.

सुधार पु. १. दुरुस्ती; दोष नाहीसे करणे. २. चांगला बदल; सुधारणा. [सं. सु + धृ]

सुधारक पु. १. दोष नाहीसे करू पाहणारा. २. समाजामध्ये नवीन गोष्टी आणू पाहणारा; परंपरेस सोडून नवीन आचारविचारास अनुसरणारा.

सुधारगृह–शाळा न. बालगुन्हेगारांना सुधारण्यासाठी जेथे ठेवतात ती इमारत; (इं.) रिमांड होम.

सुधारणा–णूक, सुधारा स्त्री. पु.१. योग्य, व्यवस्थित मांडणी; दुरुस्ती; अधिकाधिक पूर्णत्वाकडे जाण्याची किंवा नेण्याची क्रिया. २. परंपरा डावलून नवीन गोष्टींची समाजात प्रस्थापना; पुराणप्रियतेविरुद्ध बंड.

सुधारणे सक्रि. बरोबर, व्यवस्थित करणे, रचणे, ठेवणे; सरळ, नीट, बरोबर, योग्य दुरुस्त करणे; योग्य व व्यवस्थित रीतीने पुरे करणे, संपवणे.

अक्रि. सरळ, बरोबर, योग्य होणे; अधिक चांगले, टापटिपीचे होणे; सभ्य बनणे. [सं. शुद्ध; हिं. सुधारना]

सुधारस पु. १. अमृत. २. लिंबाचा रस साखरेच्या पाकात घालून केलेले एक पक्कान्न.

सुधि–धी स्त्री. १. शोध : 'तेही काउळा मृगाचे सुधीसि पाठविला.'– पंचो ७८.२०. २. पत्ता; बातमी : 'ते तुझिया नार्देळाची सुधि सांगती :' – लीचउ २७७. ३. आठवण. ४. शुद्धी : 'जीये मीयां केली पापे : तेयांचीए सुधी प्रवर्तलेति :' – लीचउ ६००. [सं. शुद्धि]

सुधी पु. पंडित, विद्वान, शहाणा मनुष्य; तीक्ष्ण, उत्तम बुद्धीचा मनुष्य.

वि. बुद्धिवान; शहाणा. [सं.]

सुधीर वि. मजबूत; बळकट; धाडशी; निर्भय; दृढ; खंबीर मनाचा.[सं.]

सुधोट वि. सरळ.

सुनका पहा : **सुना**

सुनट न. कुत्तरडे; कुत्रे (हीनार्थी). [सं. शुनक]

सुनबहि(ह्या)री स्त्री. १. त्वचेचे स्पर्शज्ञान नाहीसे होणे. २. रगतपिती; महारोग.

सुनमुख न. लग्नात वरातीच्या अगोदर करण्याचा एक विधी. यात सासू आपल्या सुनेच्या व मुलाच्या मध्ये बसून आरशात तिघांचे तोंड पाहते.

सुनसान स्त्री. सामसूम. [हिं.]

वि. निर्मनुष्य (जागा, रस्ता).

सुना–ने वि. १. रिकामा–मे. २. ओका; नागवा उघडा; निष्फळ; ओसाड; मोकळा. ३. उदास; शून्य; अभावयुक्त. [सं. शून्य] **सुनावा पडणे** – मोकळा पडणे.

सुनाट वि. १. सुना. २. स्वैर. ३. व्यर्थ : 'तैसा निर्णयो सुनाट पडे ।' – अमृ ५०४.

क्रिवि. स्वैरपणे; सुसाट.

सुनामी पहा : **त्सुनामी**

सुनावणी स्त्री. स्पष्टीकरण; कथन; न्यायाधीशापुढचे फिर्यादीचे वाचन; वादी–प्रतिवादींचा जबाब.

सुनावणे उक्रि.१. ऐकवणे. २. कानउघाडणी करणे. [हिं. सुनाना]

सुनावा पु. एकांत. (अहि.)

सुनीत न.इंग्रजीतून आलेला काव्यप्रकार. चौदा ओळींची कविता. मराठी कवितेचे एक वृत्त. [इं. सॉनेट]

सुनील वि. निळ्या, ढगाच्या रंगाचा.

सुने वि. छिद्रान्वेषी.

सुने न. कुत्रे. [सं. श्वान]

सुनो क्रिवि. शून्यरूपाने.

सुन्न वि. बधिर (कातडी, अवयव); जड; संवेदनारहित.(वा.) **० होणे** – थक्क होणे. (व.)

सुन्याळी मंत्रतंत्र, जादूटोणा करणारी स्त्री. – तंजा.

सुपडू न. चंपारा; पाणी काढण्याचे एक साधन.

सुपडे–ली न. स्त्री. लहान सूप.

सुपतळ पहा : **सुकतळ**

सुपती स्त्री. शिक्षा; सजा. (व.)

सुप(पे)ती, सुपवती स्त्री. निजण्याचा बिछाना, चटई. [सं. स्वप्]

सुपत्ते स्त्री. सुबत्ता; विपुलता : 'पूर्वी सुपत्ते होते तेव्हां केले नाही.' – पेद ४.४६४. [सं. सु + पूर्ति]

सुपथ निर्धोक.

सुपरीत वि. सरळ; व्यवस्थित; अनुकूल : 'विपरीत सुपरीत तुमचीये घरी।' – चोखा १६१. [सं.]

सुपर्ण पु. गरूड. [सं.]

सुपली स्त्री. १. गोकर्णीचा वेल व फूल. २. लहान सूप. ३. अहेव गेलेल्या बाईच्या नावाने केलेला देवातील टाक. – तंजा.

सुपलीपकड स्त्री. (मल्लखांब) आपले दोन्ही तळहात जोडून सुपलीसारखे करून त्यांनी बाजूंनी मल्लखांब धरून मारावयाची उडी. – व्याज्ञा ३६६.

सुपाणी–नी स्त्री. नाकातील एका मोत्याची नथ; सुंकले.
वि. पाणीदार.

सुपारी स्त्री. पूगीफल; पोफळीचे बी; पोफळ व त्याचे फळ. [सं. सु + पारी = खोबरे] (वा.) ० **देणे** – १. मंगलकृत्य, गोंधळ इत्यादी प्रसंगी ब्राह्मण, गोंधळी इत्यादींना त्याचा प्रारंभ करण्यासाठी सुपारी देऊन (पुन्हा फिरणार नाही याअर्थी) निश्चित करणे, नेमणे; आमंत्रण देणे. २. एखाद्याला ठार मारणे, जागा बळकावणे. ३. अवैध कृत्यांसाठी पैसे देऊन माणूस निश्चित करणे; पैसे देऊन मारेकरी घालणे. [क. सुफोरी; कु. सुपारी] ० **सोडणे** – (बायकी) लग्नातील एक विधी. लग्नात वधूने मुठीत धरलेली सुपारी वराने सोडवणे किंवा वराने चिमटीत धरलेली सुपारी वधूने सोडवणे.

सुपारीचे फूल सुपारीचे काप बिब्ब्याच्या तेलात तळून केलेले एक औषध.

सुपी स्त्री. एक फुलझाड; सुपती.

सुपीक न. चांगला हंगाम; सुगी.
वि. चांगली पिकाऊ (जमीन).

सुपुर वि. सूक्ष्म : 'तयाचे भिन्न भाव सुपुरः' – मूप्र ६९०.

सुपूर्द–र्त, सुप्रत क्रिवि हवाली; ताब्यात; स्वाधीन. [फा.]

सुप्त वि. १. निजलेला. २. प्रकट न झालेला, अव्यक्त (गुण इ.). ३. बधिर; स्पर्शाची जाणीव न होणारा. [सं.]

सुप्तात्मा पु. (मानस.) सहज प्रवृत्तीने निर्माण झालेली प्रबळ इच्छा; (इं.) इड.

सुप्ति–प्ती स्त्री. १. झोप, निद्रा. २. गुंगी; ग्लानी; बधिरता.

सुफराटणे, सुफारटणे अक्रि. सुलटे, योग्य, सरळ, उजू करणे. [सं. सुपरीत]

सुफराटा, सुफारटा वि. सुलटा; सरळ.

सुफल न.१. बाण, सुई इत्यादींचे टोक, अग्र. २. खाच, खाप, खोंगा.

सुफल–ळ वि. चांगले फळ, शेवट देणारे, येणारे; चांगले फळ आले आहे असे (झाड); लाभकारक; फायदेशीर (धंदा, उद्योग). ३. सुपरिणामकारक; फलदायक (उपाय, योजना). [सं.]

सुफी पु. मुसलमानातील एक गूढवादी पंथ. [फा.]

सुफेदठग वि. पक्का लबाड. [हिं.]

सुफेदसुरमा पु. डोळ्यात घालण्याचे औषध.

सुफेन पहा : **समुद्रफेस** [सं.]

सुबक वि. १. लहान पण चांगल्या घाटाचे; छानदार; सुंदर; नीटनेटके; बांधेसूद, आटोपशीर शरीर, ओझे, गठ्ठा. २. हलके; बिनमहत्त्वाचे : 'बाबांचे मर्जीप्रमाणे पत्र आले तर सहजच माझे बोलणे सुबक पडले!' – ऐको. [फा. सबक]

सुबकाई शरीरातील लाघव. – तंजा.

सुबत्ता स्त्री. १. शांतता व समृद्धी; वैपुल्य; स्वस्थता. २. सुरक्षित मार्ग : 'तेथून पुढे सुबत्ता नाहीं. यास्तव हैदरखान माघारा फिरोन उडगणीस आला.' – ऐको. [हिं.; सं. सुभिक्षं]

सुबरा, सुब्रा पु. एक रुपया. (नंदभाषा) [सं. शुभ्र]

सुबंत न. नामसाधित क्रियापद.

सुबाईक न. सुबत्ता; स्वस्ताई; सुकाळ. [सं. सुभिक्ष]

सु(सुं)बारा, ल्या पु. १. सोंगट्याच्या खेळातील एक शब्द. २. फसवून पळून जाणे; निसटणे; दूर पळून जाणे.

सुबाळ न. एक गलबताचा प्रकार.

सुबिकी स्त्री. कमीपणा; हलकेपणा; अप्रतिष्ठा. [फा. सुबकी]

सुभग वि. १. दैववान; नशीबवान. २. सुंदर. [सं.]

सुभट वि. चांगल्या घाटाचे, मोठे भव्य. [सं.]

सुभणे सक्रि. घालणे : 'डोलां अंजणें न सुभतिः' – वह ११.
अक्रि. विपुल, भरपूर आहे असे वाटणे. [सं. सम् + उत् + भा]

सुभ(भि)ता पु. सोय; मोकळेपणा; सुरक्षितता, सुगमता. [सं. सु+ विधा]

सुभद वि. सुखी; संतुष्ट. [सं. सुभद्र]

सुभर वि. दाट; भरदार : 'की सर्वगुणी सुभरु : विणिला तोः' – मूप्र ६१५. [सं.]

सुभा पु. १. प्रांत; देश. २. प्रांताधिकार. ३. प्रांताधिकारी. ४. काही महालांचा मिळून केलेला शिवकालीन प्रशासकीय विभाग. ५. (सांकेतिक) विटाळशी स्त्री. [फा. सूबा]

सुभावणा वि. दिसायला सुरेख; देखणा; सुंदर.

सुभाषित न. १. चांगले भाषण, वक्तृत्व. २. बोधपर सूत्रवचन. [सं.]

सुभिक्ष न. स्वस्ताई; सुबत्ता; समृद्धी (धान्य इ. ची).
वि. स्वस्त; मुबलक. [सं.]

सुभेदार पु. १. सुभ्यावरील अधिकारी. २. इंग्रज सैन्यातील देशी अधिकारी.

सुभ्र पु. रुपया : 'राजगड...आपले नांवे करून घेतला त्यास वीसपंचवीस सुभ्रे खर्च जालें' – मइसा १५.२६२.

सुम वि. कंजूष; कद्रू. [अर. शूम]

सुम–म्म वि. मंद; आळशी; सुस्त; वेडा; मठ्ठ. [सं. सौम्य]

सुमधुम क्रिवि. १. तडक; सरळपणे; दोरीसूत (रस्ता, रांग). २. स्पष्ट; उघड; स्वच्छ. [धूमद्वि.]

सुमन पु. १. गहू. २. देव. ३. फूल. ४. धोत्रा. – सको. [सं.]

सुमसाम स्त्री. शांतता; स्तब्धता.
क्रिवि. मुकाट्याने; शांततेने. [सं. शून्य]

सुमंत पु. अष्टप्रधानांपैकी एक प्रधान. परराज्यसंबंध अखत्यारीत असणारा शिवकालीन अष्टप्रधान मंत्रिमंडळातील एक प्रधान. [सं. सुमति]

सुमार पु. १. अजमास; अंदाज; साधारण संख्या; तर्क. २. (नकारार्थी) बेसुमार; अंदाज करणे शक्य नाही एवढी. ३. किमान मर्यादा; मध्यम प्रमाण. ४. निकटता. उदा. 'पौर्णिमेच्या सुमारावर या.' ५. मर्यादा, काळ. ६. भान; शुद्धी. ७. प्रमाण; नेम; बेत. ८. रोख.
वि. मध्यम प्रकारचे; दर्जाचे; वाईट. [फा. शुमार]

सुमारणे अक्रि. १. मर्यादीत येणे, असणे. २. अंदाजापेक्षा जास्त होणे; भरभराटणे (पीक, धंदा). ३. किंचित फुगवटी येणे.

सुमारास अ. जवळपास (कालदर्शक).

सुमारी वि. संख्येने मोजता येण्यासारखे; संख्यावाचक.
स्त्री. पहा : **सुमार** १, २, ५, ६, ७, ८. २. गणना, गणती. उदा. खानेसुमारी.

सुमारे क्रिवि. शोधार्थ : 'श्रीमंतांनी बाळोजी पलांडे यास दारूच्या सुमारे पाठविले.' – ऐको.

सुमारे क्रिवि. अंदाजे.

सुम्म ऊन रखरखीत ऊन. (माण.)

सुयटा–टी–रा पु. स्त्री. पु. केळी – नारळीचा कोंभ; पानाची लहान सुरळी.

सुय(या)रणे अक्रि. केळी, नारळीचा कोंभ एखाद्या रोगाने जळून जाणे.

सुयाण–णे न. सुकाळ. – ज्ञा ११.३३८.

सुयाणा–ळे पु. न. सुई दोरा ठेवण्याची डबी. (कर.)
न. सुया ठेवण्याचे पात्र; जुगदान.

सुयुक्त वि. ज्याच्या घटकांची रचना योग्य प्रमाणात आहे असे; (इं.) ऑप्टिमम.

सुयेर, सुयेरणे पहा : **सुवेर, सुवेरणे**

सुर पु. वर्ष. [सं. सौर]

सुर पु. देव; देवता. [सं.]

सुर पु. वस्तरा : 'गोसावीयांचे क्षौर जेणे सुरे करी तेणे आणिकांचे न करी :' – लीचपू ३८५. [सं. क्षुर]

सुर पु. स्वर; कौल; शकुन. [सं. स्वरः]

सुरई स्त्री. चंबू; खुजा; उभे, चिवळ मानेचे पाण्याचे भांडे. [सं. सुरा]

सुरई स्त्री. कट्यारीसारखे कमरेत खोचण्याचे एक शस्त्र. [अर. सुराही]

सुरई, सुरई पीक, धान्य, धान, भात कोकणी खलाटीतील सर्व प्रकारचे पीक. लवंग, वेलदोडे, जायफळ, केशर इत्यादी सुवासिक वस्तूंचे पीक प्रत्येकी.

सुरईभात–तांदूळ उकडे नसलेले, साधे तांदूळ.

सुरकण–न, सुरदिनी–न–शी क्रिवि. झटकन; भरदिशी (उडवायची दारू, पोहण्यातली सुरकांडी इत्यादींना अनुलक्षून).

सुरकणे अक्रि. १. सुर, फुर्र असा आवाज करणे. २. (ल.) गर्दीतून झटकन निसटून जाणे; मुसंडी मारणे. [ध्व.]

सुरकणे अक्रि. संकोच पावणे : 'रोमांच जंव फरके । तंव तंव आंग सुरके ।' – ज्ञा १८.१५८५.

सुरक(को)नी स्त्री. बाजू : 'दोही सुरकोंनी दिवे लागले असतिः' – लीचपू ३०२.

सुरकरी पु. १. तमाशातील गाणाऱ्याला सुरांची साथ देणारा. २. सूर नावाचे वाद्य वाजवणारा; सुरक्या, सुरत्या.

सुरकवडी स्त्री. एक खेळ :'दुर्योधने सुरकवडी जळकेळी खेळतां पांडवांचेआ घाता टेकलाः' – श्रीकृच ३८(१).

सुरकं(कां,कुं)डी स्त्री. १. माशासारखा आकार करून पाण्यात बुडी मारणे; गर्दीत मुसंडी मारणे. २. द्रव पदार्थाची एकदम वर आलेली धार, सुरळी.

सुरकांड स्त्री. ओळ; रांग. (व.)

सुरकी स्त्री. भाजलेली ताजी वीट. – मॅरट [फा. सुर्ख = तांबडा]

सुरकुडी स्त्री. हुलकावणी. (क्रि खेळणे). [सं.]

सुरकुती स्त्री. वस्त्र, त्वचा इत्यादीवरील चुणी, वळी, चिरमी; आकुंचन.(क्रि. सुरकुतणे). [क. सुर्कु, सुक्कु]

सुरक्या पु. १. सूरवाद्य वाजवणारा. २. (आट्यापाट्याच्या खेळात) मुरदुंग्या; मूयदंड.

सुरक्या–ख्या पु. (गंजिफा) ज्या चित्रापासून खेळाचा प्रारंभ होतो ते चित्र. हे दशावतारांपैकी दिवसा रामाचे व रात्री कृष्णाचे मानतात.

सुरखा–मुरखा पु. अफूच्या, खसखशीच्या झाडावरील एक किडा.

सुरखाई, सुरखी स्त्री. १. तांबड्या रंगाची चकाकी; तेज कपडा, त्वचा इत्यादींमुळे डोळ्यात आलेला तांबूसपणा. २. फूल, वनस्पती इत्यादींचा तजेला. [फा. सुरखी = तांबडेपणा]

सुरखाई स्त्री. सुंदरपणा; सुरेखपणा.

सुरखाब न. लहान पाणबदक.

सुरखुर पहा : **सुर्खरू, सुरुखरू**

सुरगाठ स्त्री. सहज सुटण्यासारखी गाठ; निसरगाठ. [क. सरगुणिके]

सुरजनि–नी स्त्री. खराटा.

सुरट पु. शेताच्या बांधात पाणी येण्यासाठी ठेवलेले लहानसे भोक.

सुरड स्त्री. १. सर्पणाची गाडी; सर्पण. (व.) २. गवताची एक जात.

सु(सू)रण पु. मोठ्या आकाराचा, काळसर, दाट व खडबडीत सालीचा, खाजट, खाण्यायोग्य कंद. [सं. त. शेजै]

सुरत–ति–ती न. १. मैथुन. २. (ल.) ऐक्य. [सं.]

सुरत स्त्री. १. चेहरा; प्रतिमा; पुतळा; रुपरेषा. २. हकीकत; तऱ्हा; स्थिती; प्रकार. ३. गाठ. ४. (ल.) हिंमत; स्वरूप. ५. रंग; रोख; आविर्भाव. – ऐको.[अर. सुरत] (वा.) ० **करणे** –अर्जी करणे; माहिती देणे. – लोसाको. ० **घेणे** – १. मुकाबला घेणे; भिडणे. २. अब्रू घेणे; बलात्कार करणे. ० **बांधणे** –हिंमत धरणे. ०**सांभाळणे** – शरीर सांभाळता यावयास लागणे, म्हणजेच वयात येणे.

सुरतपाक वि. सुंदर व तेजस्वी चेहऱ्याचा; सुस्वरूप; देखणा.

सुरतमहाल मिळकतीच्या वर्णनाची यादी.

सुरतरु–रू पु. देवदार; सरळ वृक्ष. – दाव १००. [सं.]

सुरतहाल पु. हकीकत; कैफियत.

सुरत्या, सुरदास, सुरनीस वि. गाण्यात सूर देऊन साथ करणारा.

सुरदार वि. सुरूच्या झाडाप्रमाणे उंच व सुंदर.

सुरनळी स्त्री. कागद गुंडाळून तयार केलेली बारीक नळी.

सुरना पु. तपास; पत्ता; बातमी. (व.)

सुरनीस, सुर्नीस पु. सरकारी सनद, वरात, कौल इत्यादींवर 'सुरू, सुद, बार, हे तीन शब्द लिहिणारा एक सरकारी कामगार; सचिव.

सुरपणे अक्रि. (भात इ.) भुरले किड्यांनी खाल्ल्यामुळे पोकळ होणे.

सुरपाटी स्त्री. (आट्यापाट्या) मधली थेटपर्यंत जाणारी मुरदुंग्याची पाटी.

सुरपाट्या पु. मुरदुंग्या.

सुरपारंबी–बा–ब्या पहा : **सूरपारंबी**

सुरफाटणे, सुरफाटा पहा : **सुफराटणे, सुफराटा** इ.

सुरफुरे वि. १. भरपूर : 'ऐसें प्रेमरसें सुरफुरें । – ज्ञा १५.६८. २. सूचक.

सुरबंद स्त्री. एक औषधी वनस्पती. ही पोटदुखी, जंत यावर देतात.

सुरबुरणे, सुरबुर, सुरबुराट पहा : **सुडबुड**

सुरबुसाण पु. स्वादिष्टपणा. (गो.)

सुरभि–भी वि. १. सुगंधी; सुवासिक. २. संतोषदायी .
स्त्री. कामधेनू. [सं.]

सुरम–मा, सुरम(मा)ई स्त्री. एक लहान, लांब आकाराचा मासा.

सुरमट वि. १. खमंग; स्वादिष्ट. २. सुरमई घालून तयार केलेला (पदार्थ).

सुरमणि–णी वि. रमणीय; सुंदर : 'सुरमणि मथुरा उग्रसेनासि दिल्ही' – गरा ३२.

सुरमा, सुर्मा पु. १. मोत्याच्या चुराचे केलेले डोळ्यात घालायचे अंजन. २. शिबे नावाचा शरीरावर पांढरे चट्टे पडणारा एक रोग. (क्रि. फुटणे, पसरणे).

सुरमाड पु. एक जातीचे माडाचे झाड; भेरळ; याच्यापासून दारू तयार करतात; याच्या खोडाचे पन्हाळ करतात. याच्या बियांना सुरमाडाची सुपारी म्हणतात.

सुरमी स्त्री. फार जेवण झाल्याने येणारी सुस्ती, झोपण्याची सुरसुरी.

सुरल न. (नाविक) पाण्यातील खेकड्याने गलबताच्या तळास पाडलेले बारीक भोक.

सुरवं(विं–वें)ट पु. बारीक, खाजरे केस असलेली अळी; घुला; कुसरूड.

सुरवा पु. मांस, हरबरे, भाजी यांचा रस्सा. [फा. शुर्बा]

सुरवा पु. १. केळी, नारळी इ. झाडांना फुटणारी नवीन सुरळी, कोंब. २. शेव करण्याचे पात्र; सोऱ्या.

सुरवाड स्वाधीनपण.

सुरवाड–डे न. सुख; अनुकूलता; सुकाळ.

सुरवाडणे अक्रि. बहरास येणे; विस्तार पावणे; सुखी होणे : ' तैसें भारतीं सुरवाडलें । अर्थजात ।।' – ज्ञा १.४०.

सुरवाडिक वि. सुखदायक; प्रशस्त : 'जैसें भागलें ढोर । पावे सुरवाडिक बिढार' – विसिं २.४. [सं. सुख]

सुरवार–री स्त्री. कमरेजवळ सैल व खाली निमुळता होत गेलेला, पोटरीपासून तंग बसणारा पायजमा, विजार; पायचोळणा. [फा. शुल्वार]

सुरवारी हिरडा लांब व मोठा औषधोपयोगी हिरडा.

सुरस वि. १. चवदार; रसाळ; स्वादिष्ट; रसभरित; मधुर; मिष्ट. २. चित्तवेधक; मजेदार.

सुरसा पु. १. दोन्ही बाजूस टोके असलेला लांब खिळा. २. बांबूची केलेली खीळ.

सुरसा पु. डाळिंबाच्या फळावरील एक रोग.

सुरसाबीज न. सबज्याचे बी.

सुरसिंघार रबाबाप्रमाणे असलेले एक तंतूवाद्य. [सं. सुरशृंगार]

सुरसी स्त्री. प्राप्ती. – शर.

सुरसुर–रा क्रिवि. स्फोटक दारू फुटण्याच्या वेळी होणाऱ्या आवाजाप्रमाणे.

सुरसुर–री स्त्री. १. भुईनळ्याच्या शोभेच्या दारूचा एक प्रकार. २. पहा : **सुरमी** ३. हातापायाला मुंग्या येणे. (क्रि. सुरसुरणे).

सुरसुरा–रे पु. न. गोवरासारखा एक रोग.

सुरसुरी स्त्री. तल्लफ; तीव्र इच्छा; लहर.

सुरसेप पु. स्फोटक द्रव्य भरलेला गोळा.

सुरसोटा पु. तंबोऱ्यासारखे पण बिनभोपळ्याचे, सोट्यासारखे तंतुवाद्य.

सुरहावल्ली स्त्री. मोरवेल; गोकर्णी.

सुरळ पहा : **सुलार**

सुरळी स्त्री. १. कागद, वस्त्र इत्यादींची वळकटी. २. बायकांचे एक रेशमी वस्त्र. [क.]

सुरळीत वि. १. सरळ; बिनधोक; व्यवस्थित; अडचण नसलेला. २.ज्यात वक्रोक्ती, गूढ नाही असे (भाषण, श्लोक इ.).
क्रि. व्यवस्थितपणे; मोकळेपणे; निष्कपटपणे (क्रि. जाणे, चालणे, वर्तणे). [सं. सरलित]

सुरक्षा दीप कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्यांना धोक्याची सूचना देणारा दिवा.

सुरक्षित वि. सुखरूप; व्यवस्थित; चांगले, सांभाळलेले; निर्धास्त. [सं.]

सुरक्षित ठेवघर मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवण्याची जागा. (इं.) सेफ डिपॉझिट व्हॉल्ट.

सुरंग वि. सुंदर; सतेज. [सं.]

सुरंग पु. भुयार, विवर, किल्ल्याचा तट इ. उडवून देण्यासाठी जमिनीच्या पोटात भुयार खणून त्यात स्फोटक दारू भरून तयार करणे, किंवा तसले भगदाड; तटाखालून बाहेर जाण्यायेण्यासाठी तयार केलेला चोरमार्ग, भुयार. [सं.]

सुरंगणे सक्रि. सुरकणे; वस्त्राचा पदर लोंबता सोडणे : 'एकु साउला सुरंगोनि दोन्ही सोगे पुष्टि विभागावरि पडति ऐसे घातले:' – लीचउ १४३.

सुरंग धातू गेरू. [सं.]

सुरंगी स्त्री. १. खाणीच्या कामातील पहार. २. भुयार.

सुरंगी स्त्री. देवपुन्नाग नावाचा एक सुवासिक फुलांचा वृक्ष. त्यापासून काढलेले अत्तर. [क. सुरगी]

सुरंगी स्त्री. झारी.

सुरंज–ग पु. १. सुरंजी झाडाचे मूळ, रंगकामात याचा उपयोग होतो. २. रक्तचंदनाचे लाकूड.
वि. रक्तचंदनाच्या रंगाने रंगवलेले. [सं.]

सुरंबी सुरमा – तंजा.

सुराख पु. १. शोध; पाळत.२. बातमी; सूचना. ३. भोक; छिद्र. [फा. सुराघ]

सुराणा पु. आवाज. (व.) [सं. स्वर]

सुराणी स्त्री. १. आवड; उपभोग. २. (चुकीने) शिराणी; दुर्मिळता. ३. संकट; त्रास; अडचण. – ऐको.

सुराप पु. सुरी. [सं. क्षुर]

सुरालय पु. १. स्वर्ग. २. मेरू पर्वत; पृथ्वीच्या अक्षाचे टोक. ३. देऊळ. [सं.]

सुरी स्त्री. मोठा दुधारी किंवा एकाच बाजूला धार असलेला चाकू; लहान तलवार. [सं. छुरिका]

सुरुवात स्त्री. आरंभ; प्रथम उपक्रम. [अ. शुरूअ]

सुरू स्त्री. १. पेजेवरची जाड साय. २. अडसर नारळातील कोवळे खोबरे.

सुरूक स्त्री. डुक्कर वगैरेची मुसंडी.

सुरुंग पु. १. पहा : **सुरंग** (भुयार इ.). २. नायट्रोग्लिसरीन या द्रवरूप स्फोटकाचे मातीत शोषण करून तयार केलेले स्फोटक. [सं. सुरुङ्गा] (वा.) ० **लावणे** – (योजना, बेत इ.)उद्ध्वस्त करणे; निकालात काढणे.

सुरू पु. खाली फुगीर व वर निमुळता असा सरळ उंच वाढणारा वृक्ष. याला लांब बारीक सळईसारखी पाने असतात. [फा. सर्व्]

सुरू पु. वळू (घोडा).
वि. सुरवात केलेले; चालू झालेले (काम).

सुरूख पु. पहा : **सुरक्या**

सुरूट पु. सुरवंट. [त. शुरुट्ट = वेटोळे]

सुरेख वि. नीटनेटका; रेखीव; ठीक; योग्य. [सं.]

सुरेल वि. गोड गळ्याचा; सुस्वर.

सुरोव पु. सांडस नावाचा किडा. (गो.)

सुर्खरू(रो)ई स्त्री. १. बहुमान; आब : 'त्याजकडून घडलें नाहीं इतकी सुर्खरोई आहे.' – मइसा ५.१७०. २. सुटका. ३. निःस्पृहता.[फा.]

सुर्खरू, सुरुखरू वि. १. उजळ तोंडाचा; मुक्त : 'भगवान सुर्खरू करील तोच सुदिन समजावा.' – मइसा ६.३९५. २. (ल.) निर्लज्ज; बेशरम; बेमुर्वतखोर; कोडगा; बेगुमान; वाईट कर्मे करून प्रतिष्ठेने वागणारा. [फा. सुर्ख = तांबडे + रु = चर्या]

सुर्खाई स्त्री. लाली.

सुर्खी स्त्री. १. लाली; तजेलदार, गुलाबी छटा. २. लाल शाई. [फा.]

सुर्याबान पु. इंद्रधनुष्य. (झाडी) [सं. सूर्यबाण]

सुर्वा स्त्री. संध्येची पळी; तिच्यातील पाण्याचे आचमन. [सं. स्रुवा]

सुलग वि. दाट; भरपूर : 'तेही (नीळोत्पळीं) सुलगु उधळा सुदला :' – शिव ८०५.

सुलगणे १. पहा : **शिलगणे**. २. पेटणे.

सुलग्न न. १. लग्न, मुंजीतील बोहल्यावरील ओवाळणी. २. वधुवरांची मस्तके एकमेकांना लावून गंगाळात पैसा टाकणे.

सुलट–टा वि. सरळ; योग्य प्रकारचा; सोईचा; उजू; अनुकूल; योग्य दिशेचा व बाजूचा.

सुलटणे अक्रि. पुन्हा सरळ रस्त्यावर येणे; अनुकूल होणे; उलटलेल्या स्थितीतून पुन्हा पूर्वस्थितीत येणे; सरळ होणे, करणे.

सुलतान पु. १. बादशहा. २. अनियंत्रित सत्ता चालवणारा जुलमी राजा.[फा.]

सुलतानढवा पु. अचानक, निकराचा हल्ला : 'या उपर याही सुलतानढवा करावा म्हणून विचार केला आहे.' – पेद १६.५४.

सुलतानी स्त्री. बादशहाचा अंमल; सरकारचे हातून घडणारे जुलमाचे अगर इतर वाईट कृत्य; दडपशाही; फौजेने केलेली लूट.

सुलतानी वि. द्राक्षाची एक जात.

सुलतानी कोस टिपू सुलतानाने ठरवलेला ५ मैलांचा एक कोस.

सुलभ वि. सहज मिळणारे; करण्यास सोपे; स्वल्प. [सं.]

सुलह पु. सलूख; सख्य. [अर. सुल्ह]

सुललित वि. श्रवणमधुर. [सं. सुललित]

सुलाख, सुलाखताई पु. सोन्याचांदीच्या दागिन्या – नाण्यातील धातूच्या शुद्धतेची परीक्षा पाहण्यासाठी त्याला पाडलेले भोक. [फा. सुराघ्]

सुलाखणी स्त्री. १. वरीलप्रमाणे भोक पाडणे. २. असे भोक पाडण्याचे हत्यार.

सुलाखणे–णी सक्रि. १. वरीलप्रमाणे भोक पाडणे. २. (ल.) अंतर्बाह्य परीक्षा करणे.
अक्रि. दागिन्यात भरलेली लाख बाहेर, उघडकीस येणे.

सुलाखिवार अंगास झोंबणारा वारा. – तंजा.

सुलार वि. मागे झुकलेली (ओझ्याची गाडी). पहा : **सुरळ**

सुलीन वि. तन्मय; एकरुप.

सुलीनता स्त्री. पूर्णपणे लीन होण्याची अवस्था.

सुलुक–ख पु. १. स्नेहभाव; सलोखा; मैत्री. २. तह; समेट.[अर. सुलूक]

सुले न. मुलांच्या पोटात होणारा डबा नावाचा रोग.

सुलेख वि. सुंदर; रेखीव; सुरेख : 'कमळापासौनि डोळे सुलेख।' – नरुस्व ३२१. [सं. सुरेखा]

सुलेमानी दगड–पत्थर पु. मुसलमान लोक ज्यांची गळ्यात माळ घालतात असा अकीकाच्या जातीचा दगड; त्याचे मणी.

सुवट वि. १. सुंदर; सुबक; वर्तुळाकार : 'सुवटा मांडियां भरिवां।' – नरुस्व ३२३. २. टोकदार. (झाडी) [सं. सु+वृत्त]

सुवण पु. जन्म. (सं. सू = प्रसवणे) [सं. सवन]

सुवणे सक्रि. घालणे. [सं. सू]

सुव(व्व)र पु. डुक्कर. [फा.]

सुवरा पु. १. केळीचा कोंब; सुयरा. २.सुई.

सुवर्ण न. १. सोने–धातू. २. सोळा माशांचे एक वजन – परिमाण; साधारण ८० गुंजांचा एक तोळा. ३. चांगला रंग. (वा.) **सुवर्णदर्शन घेणे** – लाच खाणे.
वि. चांगल्या रंगाचे, जातीचे, कुटुंबाचे. [सं.]

सुवर्णकार पु. सोनार.

सुवर्णकीटक पु. कोंजवा; चकाकणारा कोणताही किडा.

सुवर्णखोटी स्त्री. सोन्याची लगड.

सुवर्णगणित न. (अंकगणित) मध्यम सरासरी.

सुवर्णधातूचा मार्ग किमया : 'कां सुवर्णधातूचा मार्ग। दृष्टिबंधणें लागवेग।'–दास ५.२.३.

सुवर्णनिधी पु. मध्यवर्ती बँकेने कागदी चलनाच्या एकूण मूल्याच्या ठरवून

दिलेल्या प्रमाणात ठेवावयाचा सोन्याचा साठा.

सुवर्णपंथी पु. किमयागार.

सुवर्णपाद वि. छाती व पाय यावर अतिशय केस असलेला (घोडा.).

सुवर्णमध्य पु. दोन परस्पर विरुद्ध गोष्टीतून काढलेला मधला मार्ग; तडजोड; एरंडोली न्याय.

सुवर्णमहोत्सव पु. एखाद्या घटनेला किंवा संस्थेला पन्नास वर्षे पूर्ण झाली म्हणून करण्यात येणारा समारंभ, सोहळा.

सुवर्णयुग न. अतिशय भरभराटीचा व सुबत्तेचा कालखंड. [सं.]

सुवर्णस्तेयी पु. सोनार.
वि. सोन्याची चोरी करणारा.

सुवर्णाभिषेक पु. लग्नात सोन्याचा तुकडा ठेवलेल्या पाण्याने वधुवरांना केला जाणारा अभिषेक.

सुवर्म वि. मर्मज्ञ; रसिक. [सं.]

सुवह वि. १. वाहून नेण्यास सोपे; सोसण्यास सुलभ. २. सोशिक.

सुवा पु. मोठी सुई; दाभण. [हिं.]

सुवाड वि. सुरेख.

सुवाड दुवाड, सुवाण वि. लहरी; चंचल. (कु.)

सुवाण न. सुकाळ : 'साम्याचे सुवाण होये।' – ज्ञा १३.१७०.

सुवात स्त्री. जागा. (गो.)

सुवार–रू पु. पाककर्ता; आचारी. – शर.

सुवारा पु. (बायकी) सुखाचा शब्द; आनंदाची बातमी, वार्ता, खबर. [सं. सुवार्ता]

सुवारा पु. खळ्यातील भात झोडण्याचा दगड. (को.)

सुवारी स्त्री. छत असलेली छकडी; गाडी. (कु.)

सुवारी स्त्री. गोड पोळी. (झाडी)

सुवाला पु. गलबताचा सुकाणूकडील चपटा भाग.

सुवाव पु. अनुकूल वारा : 'म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे।' – ज्ञा ९.२८. [सं. सु + वायू, सुवात]

सुवाव पु. सहवास – शर.

सुवावणे सक्रि. घालणे; घेणे (मुठीत) : 'गगन मुठी सुवावें। मशकें केवी।' – ज्ञा १.७४.

सुवासिक–त वि. सुगंधी; सुंगधयुक्त; सुगंधित केलेले.

सुवासिनी, सुवासीन–ण स्त्री. सवाष्ण स्त्री; नवरा जिवंत असलेली, सौभाग्यवती स्त्री. [सं.]

सुवाळा पु. साधारण फत्तेमारीसारखा १०० ते १५० खंडी वजन वाहून नेईल एवढा मचवा.

सुविद्य वि. सुशिक्षित; सुज्ञ; पंडित; विद्यासंपन्न; बहुश्रुतय हुशार; बुद्धिमान. [सं.]

सुविधा स्त्री. १. सोय. २. सवलत. [सं.]

सुवेचपण न. (वस्तू) उपयोगात आणण्याची योग्य रीत. [सं. सुव्यय]

सुवेनसी स्त्री. सामर्थ्य.

सुवेर पु. सुएर; वृद्धी; जननाशौच.

सुवेरणे अक्रि. वृद्धी असणे.

सुशी स्त्री. १. एक प्रकारचे पट्टेदार सुती कापड; गादीचे कापड. २. स्त्रियांचे एक प्रकारचे पातळ. – ऐको. ३. लहान मुलांच्या पोटात होणारा रोग.

सुशीत वि. सचिंत (माण.)

सुशेल स्त्री. कोवळ्या फणसाची भाजी. (कु.)

सुश्रब्ध वि. सुखदायक; प्रेममय.

सुश्लोक वि. सफल:'वासना सुश्लोक गुरुनामें।'– निगाथा ९४.

सुषिर वि.१. पोकळ. २. भोके पाडलेला.

सुषिरवाद्य न. तोंडाने फुंक मारून वाजवण्याचे वाद्य.

सुषुप्ति–ती स्त्री. गाढ झोप; जागृती व स्वप्न या दोहोंहून भिन्न अशी तिसरी अवस्था. हीत अंत:करणवृत्तीचा अज्ञानात लय झाल्यामुळे कोणत्याच विषयाची स्फूर्ती असत नाही; ज्ञानशून्य अवस्था. [सं.]

सुषुम्ना स्त्री. (योग.) शरीरातील इडा व पिंगला या दोन नाड्यांमधली एक नाडी. [सं.]

सुष्ट वि. रुचकर; गोड. [सं. स्वादिष्ट]

सुष्ठ–ष्ट चांगले; शुभ. [सं. सुष्ठु]

सुसकार–रा, सुसकारणे पहा : **सुस्कारा, सुस्कारणे** इ.

सुसज्ज वि. १. आवश्यक गोष्टी असलेले. २. अत्याधुनिक शस्त्रांनी तयार असलेले.

सुसणे अक्रि. इच्छा करणे : 'आतां(मन) प्रमई खूतले : न सुसेः मागुते निगावेया:' – ऋव ५५४.

सुसवणे सक्रि. हुसकावणे; उधळून लावणे.

सुसमारणे क्रिवि. अंगावर सूज चढणे.

सुसर स्त्री. मगर. [सं. सुशिर, शिंशुमार; फा. सुस्तमार]

सुसर वि. चांगल्या वर्तनाचा; सुव्यवस्थित चाललेला.

सुसरवाति–ती स्त्री. लपाछपीचा खेळ. डोळे झाकून जळती वात उचलून भोज्याला शिवायचा खेळ.– प्रामको

सुसवणे सक्रि. हुसकावणे; उधळून लावणे.

सुसवो पु. पिकाचा एक रोग. यात पीक पिवळे होऊन सुकू लागते.

सुसंबद्ध, सुसंगत वि. मागच्या पुढच्याशी उत्तम मेळ असलेले; चांगले जोडलेले (भाषण इ.). [सं.]

सुसा पु. १. जनावरांचा एक रोग. २. (सोनारी) तोटी असलेली कासंडी. हिच्यात पाणी भरून बागेसरी (शेगडी)त ठेवतात व तोटीतून येणाऱ्या वाफेच्या सहाय्याने विस्तव टिकवतात.

सुसा वि. बारीक; निमुळता. (व.)

सुसाइणे अक्रि. चांगली सावली पडणे : 'सुसाइलीं नाखिवें एके। कवणा साध्ये तें नाटकें।' – ऋ ६९. [सं. सु + च्छाया]

सुसाचणे अक्रि. दम घेणे; उसासा टाकणे.

सु(सुं)साट–टा, सुसु १.आवाजयुक्त जोराची गती, गर्जना, गाणे, वाऱ्याचा जोर; गतिमान वस्तूचा आवाज (बाण, बंदुकीची गोळी, पक्ष्याची भरारी इ. चा); जोराचा शिडकाव, तडाखा, झपाटा, सोसाटा. २. जोराचा श्वास.
क्रिवि. वरील प्रकारच्या आवाजाने; सू सू आवाज करीत. [ध्व.]

सुसाटणे अक्रि. वरील प्रकारे आवाज करून घुसणे; वेगाने व आवेशाने जाणे; अंगावर चालून जाणे. [सं. सम+उत्+ श्वंठ्]

सुसास पु. अवकाश.

वि. १. सांगण्याजोगे. - शर. २. उत्कृष्ट; निवडक : 'बरवा सवंगु सुसासु हाटवका दीधला :' - लीचपू १४४.

न. सुसह्य : 'येकपण नव्हे सुसास।' - अमृ ७७. [सं. सुसह्य]

सुसुअंत पु. सुसर. -प्रामको. [सं. शिशु+अंतक]

सुसुंद्रो स्त्री. चिचुंद्री. (व.)

सुसूत्र, सुसूत्रक वि. १. पहा : **सुसंबद्ध.** २. (ल.) छानदार; गोंडस; देखणा.

क्रिवि. व्यवस्थितपणे; बरोबर.

सुस्कारणे अक्रि. वरीलप्रकारे उसासा टाकणे; सोडणे.

सुस्कारा-र पु. हृदयातल्या खोल जागेपासून वेगाने व शब्द करीत बाहेर पडणारा उच्छ्वास; उसासा. [ध्व.]

सुस्त-स्ता वि. मंद; आळशी; रेंगाळणारा; मद्दड; धिमा; थंड; ढिला.

क्रिवि. थंडपणे; रेंगाळत. [फा.]

सुस्ताई स्त्री. आळशीपणा; ढिलाई; थंडपणा; दिरंगाई; हयगय. [फा.]

सुस्तावणे अक्रि. सुस्त, उत्साहहीन होणे.

सुस्थिति-ती स्त्री. १. सोईस्कर, सुखदायक अवस्था. २. आर्थिकदृष्ट्या चांगली अवस्था. [सं.]

सुस्मार स्त्री. घोरपड. [अर.]

सुहणे सक्रि. सेवन करणे; अनुभवणे : 'तिये न सुहता जिये जाणती जे कां।'- ज्ञा १८.७१७.

सुहा पु. गायनातील एक राग. गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर.

सुहा पु. द्वेष, वैर.

सुहागी स्त्री. सवागी; टाकणखार. [हिं.]

सुहाड पु. १. उत्तम योद्धा; राजा : 'आइके द्वारकापुर सुहाडा।' - ज्ञा ११.६७०. २. मित्र : 'साम्य तेचि सुहाडा। वेदि जाणे।' - ज्ञा ९.२४१.

वि. १. सुज्ञ; शहाणा : 'अगा आत्मपरपीडा। बीज तमक्षेत्रीं सुहाडा। पेरिती मग पुढां। तेचि पिके।' - ज्ञा १७.९९. २. शोभिवंत; मनोरम : 'वरि वैराग्याचिया पाखरा सुहाडा।' - स्वादि ७.३.३९.[सं. सुभट]

सुहाडणे वि. शोभिवंत करणे, शोभविणे. [सं. सुभ्राज्]

सुहाव, सुहावणा-ना पु.१. आवड; प्रीती; प्रेम : 'एकु सुहावे पवाडे पढतु।' - दाव ८४.२. (ल.) ब्रह्मसुख - शर.

वि. सुशोभित; आल्हादकारक; मधुर : 'आणि शब्दादिक सुहावे।' - ज्ञा १५.१६१. [सं. शुभ]

सुहावणे क्रि. १. सुशोभित करणे. २. रचना, उभारणी करणे : 'वरि मंडप सुहाविला।' - स्वादि १०.१.२. ३. तयार करणे : 'जन्ममृत्यूची सुरंगी। सुहाविली निलागी।' - ज्ञा १३.४८.[सं. शुभ, सम् + उत् + भावय]

सुहृत-द पु. १. प्रेमळ मित्र; सोबती. २. (ल.) लढाईतील दोस्त राष्ट्र. [सं.]

सुहेर, सुहेरणे, सुहेरतुला पहा : **सुवेर** इ.

सुळकन-कर-दिनी-दिशी क्रिवि. सुळ् अशा आवाजाने गुळगुळीत, बुळबुळीत पदार्थावरून घसरणे, निसरणे किंवा त्या वेळी होणाऱ्या आवाजाप्रमाणे आवाज होऊन. [ध्व.]

सुळकणे अक्रि. १. बाजूने-मधून-आतून हळूच घसरणे, निसटून जाणे; मुकाट्याने निघून जाणे. २. बारीक, निमुळते होणे. (व.) [सं. श्वल्]

सुळकंडी पहा : **सुरकंडी**

सुळका पु. १. डोंगराचा, खडकाचा, कड्याचा शुळाप्रमाणे खाली रुंद व वर क्रमाक्रमाने निमुळता होत गेलेला माथा; शिखर; शंकूप्रमाणे निमुळता होत गेलेला एखाद्या वस्तूचा भाग. २. सुळा; दात. ३. पीक कापल्यावर राहिलेला खुंट. ४. दाराच्या चौकटीचा एक भाग; चौकटीच्या बाहीच्या उलट बाजू; सुळकेपट्टी.(वा.) ५. नारळ सोलण्याचे निमुळते अग्र; उत्कड. [सं. शूल]

सुळकांड्या स्त्री. अव. येरझाऱ्या; हेलपाटे.

सुळकी स्त्री. १. खुंटी, दांडा इत्यादींचे निमुळते अग्र. कोणतीही निमुळती वस्तू. २. सूर; पोहताना खाली डोके करून सरळ मारायची उडी.

सुळकी अढी मल्लखांबापासून दूर बसून एकदम उंच उडी मारून मल्लखांबावर करायची अढी. - व्याज्ञा ३.८३.

सुळकुं(कं)बा-खांब-खुंबा पु. १. बैलरहाटाचे कणेकडाचे खाली आत तुंब भरून उभा केलेला निमुळता खांब, तुंब्याचा आधार. २. सुळका.

सुळकेपट्टी स्त्री. दाराच्या बाहेरच्या बाजूस माथ्यावर जशी गणेशपट्टी किंवा कपाटपट्टी असते तशी आतल्या चौकटीची वरची पट्टी.

सुळबुळीत वि. पूर्णपणे : 'भीतरीं सुळबुळीतु अविद्या भरला असे:' - लीचपू २३८.

सुळसुळ स्त्री. चुळबुळ; वळवळ.

सुळसुळणे स्त्री. अक्रि. १. सुळकणे; चुळबुळणे; चळवळणे. २. मागे मुंगळा लागणे; धांदल उडणे.

सुळसु(बु)ळाट, सुळसुळ पु. १. अतिशय मोठी चुळबुळ, गर्दी, वळवळ; धांदल, गडबड (मुले, उंदीर, पक्षी, भिकारी लोकांचा जमाव इत्यादींचे आत बाहेर येणे जाणे वगैरेंची); छपरातून उंदीर, साप इत्यादींची येरझार. २. फार त्रास. ३. विपुलता.

सुळसुळीत वि. १. बुळबुळीत; निसरते, हातातून चटकन निसटणारे. २. जीर्ण झाल्यामुळे उतरलेले (धोतर इ.).

सुळा पु. १. पुढच्या पटाशी दाताच्या शेजारचा अणकुचीदार दात; तोंडातील सुळ्याचा दात. हत्तीचा पुढचा दात; डुक्कर, साप, वाघ, मांजर यांचे अणकुचीदार दात.२. अणकोचीचा खुंटा; चालताना पायास खुपणारा जमिनीतून वर आलेला खडा इत्यादी. ३.मांस इ. भाजण्याची एक प्रकारची लोखंडी सळई. ४.कसई, कशेट गवताची बी. ५. पशूच्या अंगावर गोचिडाप्रमाणे पडणारा एक जंतू. ६. (क्रि. पडणे). ७. मोटेचे चाक ठेवण्यासाठी विहिरीच्या काठावर उभ्या केलेल्या झुकत्या खांबांपैकी प्रत्येक. [सं. शूल]

सुळागीर वि. घरातील फार उताराचे छप्पर.

सुळावरची पोळी अत्यंत धोक्याचे व कटकटीचे काम; ज्याकरता जीव

धोक्यात, संकटात घालावा लागतो असा लाभ.

सुळी स्त्री. देवदासी; कलावंतीण; नायकीण. (तंजा.)

सुक्षम वि. सूक्ष्म; नाजूक; काळजी करण्यासारखे. [क. सुळे = वेश्या, देवदासी]

सुज्ञ वि. विद्वान; समंजस; बुद्धिवान; जाणता; शहाणपणा असलेला.[सं.]

सुंकले न. लहान मुलगा, मुलगी यांचे कान, नाक टोचून त्यात अडकवायचे लहानसे, सोन्याच्या तारेचे वेटोळे. [सं. शुल्क]

सुंकी पु. जकात वसूल करणारा अधिकारी : 'मी उभये मार्गींचा सुंकी :' - लीचपू ३००. [क. सुंक]

सुंग(घ)णे क्रि. हुंगणे; वास घेणे. [सं. शिंघति]

सुंटदेव पु. निर्बुद्ध मनुष्य : 'गोसावी परमेश्वरू : एर आवघे सुंटदेव :' - लीचपु १७१. [सं. शोठदेव]

सुंट(ठ)र-रू-रे, सुंठार न. सुंठीच्या आगीसारखी आग होणारे गळू.

सुंटारा पु. घाण्याची सवय लावण्यासाठी, बैलाला ज्या खांबाभोवती गरगर फिरायला लावतात तो खांब.

सुंठ स्त्री. वाळवलेले आले.[सं.शुंठी] (वा.) **(साठा वर्षी) ० फुलणे** - नशीब फळफळणे. क्वचित प्रसंगी चांगली गोष्ट करणे. (सुंठेच्या झाडाला साठ वर्षांनी फुले येतात यावरून) **(गांडीत) ० फुंकणे** - एखाद्याचे मन फिरवणे; कान भरणे; बिचकावणे.

सुंठवडा पु. बाळंतिणीस खाण्यासाठी किंवा जन्मोत्सवाच्या शेवटी वाटण्यासाठी केलेले सुंठ, गूळ, साखर इ. चे मिश्रण.

सुंठवणी स्त्री. सुंठेचा काढा.

सुंता स्त्री. शिश्नत्वचेचा छेद करण्याचा मुसलमानातील एक धार्मिक विधी. [अर. सुन्नत्]

सुंद वि. १. मंद, मंद वाहणारा. २. सुस्त. (तंजा.) ३. (चुकीने) सुगंधित : 'साहाजे मलयानीळु सुंदु।' - ज्ञा ४.२१७. ४. कोंदटलेली (हवा)

सुंदडणे, सुंदणे उक्रि. पायाखाली तुडवणे, चिरडणे. (को.)

सुंदर बि. देखणा; दिसायला चांगला. [सं.]

सुंदरा-री स्त्री. १. सुंदर स्त्री. २. लहान, आठ ते दहा इंच लांबीची सनई. ही मोठ्या सनईच्या दुप्पट तीव्रतेने वाजते. ३. सतार, रुद्रवीणा इ. वाद्यांच्या दांडीला विवक्षित स्वरानुसंधानाने जे पडदे बांधतात ते प्रत्येकी.

सुंदल स्त्री. लुडबुड. (व.)

सुंदोपसुंदी स्त्री. आपासातील कलह; वर्गकलह. (सुंद व उपसुंद यांचा तिलोत्तमेवरून कलह झाला होता यावरून.)

सुंब-भ न. पु. नारळाच्या कवचीवरचे तंतू; काथ्या, ताग, अंबाडी, मोळ इ. च्या तंतूंची विणलेली दोरी. [सं. शुल्ब, क. सुंबु]

सुंब(भ)णे अक्रि. खाट, पाळणा इ. सुंबाने विणणे.

सुंब-म पु. घोडा, गाढव यांचा खूर. [हिं. सुम]

सुंबा-भा पु. १. दगडी शिळा फोडण्याचा जंगी लोखंडी घण. २. तोफ ठासण्याची ठोकणी. ३. घोड्यांचा खूर. [सं. शुंभ]

सुंबाल्या पहा : **सुबारा**

सुंबी चाक चार जाड आरे असलेले चाक.

सुंभ पु.१. एक दैत्य. २. (ल.) आळशी, कंजूष, मूर्ख माणूस.[सं. शुंभ]

सू स्त्री. शिवण्याची सुई.

सू क्रिवि. १. जोराने व वेगाने बाहेर पडल्याने होणाऱ्या आवाजाप्रमाणे (सापाचा फुस्कारा, बाणाचा वेग, वादळाचा आवाज इ.). २. सुरपारंबीच्या खेळात तोंडाने उच्चारण्याच्या शब्दाप्रमाणे आवाज करून. (क्रि. करणे). ३. (बालभाषा) लघ्वी. शू.

स्त्री. वरीलप्रमाणे होणारा आवाज व क्रिया. [ध्व.](वा.) **सूबाल्या करणे** -वेगाने निसटणे; पळून जाणे.

सू वि. (समासात उत्तरपदी) जन्म देणारी. उदा. वीरसू.

सू स्त्री. न उघडलेली कोवळी झावळी, पान; सुथरा. (हेट.)

सू स्त्री. बाजू.

सूइणे सक्रि. टाकणे; घालणे; ठेवणे : 'ते अंजन पायातळीं सूइजे। चंद्रिका मंत्रे।' - ज्ञरुस्व ५४७.

सूकर पु. १. डुक्कर. २. एका जातीचे हरीण. [सं.]

सूकि पु. मेहुणा; बायकोचा भाऊ.

सूक्त न. वेदातील काही ऋचांचा समूह.

वि. चांगले म्हटलेले, बोललेले; चांगले; बरे; योग्य; प्रशस्त (भाषण, वर्तन इ.). पहा : **सुक्तासूक्त** [सं.]

सूक्ती स्त्री. चटकदार बोधवाक्य, म्हण, सुभाषित.

सूचक न. खूण; निदान; तर्क.

पु. १. हेर; बातमीदार. २. सभेपुढे ठरावाची सूचना मांडणारा.

वि. १. सूचना, माहिती, कल्पना, ओळख, बोध इ. करून देणारा. २. चहाडी करणारा. ३. भेद, छेद पाडणारा.४. सांकेतिक (शब्द)[सं.]

सूचना-न स्त्री. न. १. इशारा; इशारत; अप्रत्यक्ष रीतीने कळवलेली गोष्ट. २. सभेच्या विचारार्थ पात्र सदस्याने योग्य वर्दी देऊन मांडलेली योजना, कल्पना. ३. माहिती. [सं.]

सूचनिका स्त्री. आडवळणाने केलेली सूचना. (इं.) हिंट.

सूचा स्त्री. जीव, देवता, प्रपंच, परमेश्वर हे चारही पदार्थ सूचित करणारे ज्ञान :'सत्ता बोलिजे : सूचा बोलिजे :' - लीचउ ३७२.

सूचिका, सूची स्त्री. १. सुई; अग्र. २. अनुक्रमणिका; विषयांची यादी. ३. प्रस्तावना. ४. (ज्यो.) पृथ्वीच्या गोलाची कोनाकृती छाया. हिच्यात चंद्र प्रवेश करतो म्हणून चंद्रग्रहण होते. ५. सुळका; पिरामीड; शंकू; हत्तीची सोंड; अणकुचीदार खांब. [सं.]

सूचिका-सूची कटाहन्याय पु. एक अत्यंत मोठे व एक अत्यंत लहान अशी दोन कामे एकदम करण्याचा प्रसंग आला असता प्रथम लहान काम केले जाते. हा लोकव्यवहार समजवण्यासाठी सुई आणि कढईचा दृष्टांत दिला जातो. सुई आणि कढई या दोन वस्तू एकाच वेळी बनवण्याचा प्रसंग आल्यास प्रथम सुई बनवली जाते.

सूचिकाभरण न. (इं.) इंजेक्शन.

सूचित वि. सुचवलेले; दर्शवलेले; इशारा दिलेले; ओळख करून दिलेले.

सूचित वि. भोसकलेले; टोचलेले; छिद्र केलेले.

सूचिपत्र न.किंमतीसह वस्तूंची यादी. (इं.) कॅटलॉग.

सूचीपर्णी वि. अरुंद व टोकदार पाने असलेला व फांद्या जमिनीकडे

झुकलेला (वृक्ष).

सूची वि.सुचवणारा. उदा. भविष्यसूची.

सूझ्या स्त्री. झपाट्याने पळणे; सूबाल्या (क्रि. करणे). (सू=पारंबीच्या खेळातील शब्द + झ्या = घोड्याला हाकतांना म्हणायचा शब्द.)

सूट स्त्री. १. कर्ज इत्यादीतून माफ केलेली, सोडलेली रक्कम. २.(गुलाम, बंदी इत्यादींची) बंधनातून मुक्तता, सुटका; सोडवणूक. ३. रांगेत पडणारा खंड; ओळीत पडणारी फट; दोन पदार्थातील अंतर, फट. ४. वीर्यस्खलन. (ना.) ५. वाळलेली मिर्ची. (व.)
[वै. सं. श्रुष्टि = विनवणी ऐकणे]

सूट पु. १. इंग्लिश पद्धतीचा, पुरुषांचा कोट, पँट व कोटाच्या आतून शर्टाच्या वर घालायचे जाकीट असा पोषाख. २. स्त्रियांचा सलवार कमीझ. [इं.]

सूटपत्र न. सोडचिठ्ठी; सांडपत्र; सांडखत.

सूटमोकळ, सूटसाट-सांड-तूट स्त्री. १. काही काळापुरती केलेली सुटका. २. कर, दस्तुरी, कर्ज इत्यादीतून मिळालेली सूटरकम. पहा : **सोडमोकळ**

सूड पु. १. शोध; तपास; चौकशी; विचारपूस. (क्रि. काढणे, लावणे, लागणे). २. बदला, परतफेड; उट्टे; वचपा; अपकाराची प्रतिक्रिया. (क्रि. काढणे, उगवणे, घेणे). ३. खतावणीतून काढलेला हिशेबाचा उतारा. उदा. पहाणीसूड. (व.) ४. हिशोब उघडकीस आणणे. ५. नगारा, तबला इत्यादी वाद्ये वाजवण्याचा विशिष्ट गतीप्रकार. (क्रि. मारणे). (त्यावरून) खंड न पडता चाललेले कोणतेही कार्य; अखंड क्रिया. ६. अनेक कलमे लिहिलेला कागद. ७. खेड्यांची, शेतांची कूळवारीने अथवा नंबरवारीने तयार केलेली यादी. ८. ढोल इत्यादी वाजवू लागल्यापासून मध्ये अवसान घेईतोपर्यंत वाजवण्याचा व्यापार. ९. विशेष प्रकारचा गीतसमूह. (व.) १०. ताण देऊन काम करणे.
[सं. शोध; क. सूडिंच = तिरस्कार, सेडु]

सूड स्त्री. १. न फोडलेले सर्पण; लाकडे. २. पलिता; गवताची दिवटी.
[क. सूड = जळणे; तेल]

सूडकरी वि. सूड घेणारा.

सूडदायी वि. द्वाड; त्रासदायक.

सूणे सक्रि. १. घालणे; ठेवणे : 'तूं धरुनि देहाभिमानातें। दिठी सूनि एया शरिरातें।' - ज्ञा २.१३७. २. देणे; लावणे. 'हे चंद्रकीरण : मज सूती आहाण:' - शिव ८२१.३. (रांगोळी) काढणे : 'रांगोळीया सूति राणिया:' - शिव ५९०. [सं. सू]

सूत न. १. धागा; दोरा; तार, रेषा, तंतू (विशेषत: कापसाचा). २. (ल.) संधान; संबंध (आश्रय, आधार इत्यादींचा); मार्ग; उपाय (मिळवण्याचा, साध्य करण्याचा); नात्यागोत्याचा संबंध. ३. नासके फळ. ४. जखमेत आढळणारा धाग्यासारखा एक जंतू. ५. कापडाचे विणकाम, वीण. ६. (ल.) समेट; स्नेहभाव; मित्रत्वाचा संबंध. ७. अगदी थोडी लांबी दाखवणारे माप; एक अष्टमांश इंच. ८. लाकूड कापताना त्यावर खूण करण्याची दोरी. ९. चातुर्य; शहाणपण.[सं. सूत्र] (वा.) **(नाकाशी) ० धरणे** - (मरणोन्मुख अवस्थेत श्वासोच्छवास चालला आहे की नाही हे पाहण्यासाठी नाकाशी सूत धरतात यावरून) मरणोन्मुख अवस्था होणे. **(मूठभर) ० बांधणे, देणे** - (मैत्री, प्रेमाचे चिन्ह म्हणून) पागोटे देणे. **सुताने सूत लागणे** - एका गोष्टीच्या शोधाने दुसरीचा शोध लागणे. **सुताने स्वर्गास जाणे - स्वर्ग गाठणे** - किंचित सुगावा लागताच त्यावरून तर्काने एकंदर सर्व गोष्टींचे स्वरुप ओळखणे. **सुतास (सुती) किंवा सुतीपाती लागणे** - सुरळीतपणे चालू लागणे; नीट व्यवस्था लागणे.

सूत खापरसूत; जस्त; एक धातू. -ऐको.

सूत पु. १. क्षत्रिय पुरुष व ब्राह्मण स्त्री यांची संतती; त्या संततीची जात; त्या जातीतील व्यक्ती. यांचा धंदा सारथ्याचा. (त्यावरून) २. सारथी. ३. सुतार. ४. भाट. ५. पुराणिक. [सं. सूत:]

सूत पु. (संगीत) एका स्वरावरून दुसऱ्या स्वरावर अतूटपणे जाण्याची क्रिया; घसीट; मींड.

सूत वि. जन्मलेला; झालेला. [सं.]

सू(सु)तक न. १. जननाशौच; सुवेर. २. ग्रहणातील अशौच. ३. मृताशौच. [सं. सु = प्रसवणे]

सू(सु)तकाडी स्त्री. (कोष्टी) जिच्याभोवती सूत गुंडाळलेले असते ती काडी; गणा; रिकांडी.

सूतपणे अक्रि. तन्मय होणे.

सूतपाड पु. सणंगाची वीण व किंमत.

सूतशेखर पु. पित्तशामक औषधी मात्रा. [सं.]

सूति-ती स्त्री. १. जन्म; बाळंतपण. २. संतती. ३. प्रवेश.
वि. दु:खाला जन्म देणारी. [सं. सू = प्रसवणे]

सूतिका स्त्री. १. नुकतीच बाळंत झालेली स्त्री. २. बाळंतरोग.

सूतिकागृह न. बाळंतिणीची खोली, प्रसूतिगृह.

सूती स्त्री. अभिमान : 'ममत्वाची सूती। घे ना जंव।' - ज्ञा १४.१४५.

सूत्याशौच न. सुखरुप झालेल्या बाळंतपणाचे १० दिवसांचे सुयेर; गर्भपात झाल्यास गर्भारपणाचे जितके महिने झाले असतील तितक्या दिवसाचे सुयेर.

सूत्र न. १. सूत; धागा; तंतू; दोरा. २. कळसूत्री बाहुलीची दोरी, तार. (यावरून) एखाद्या यंत्रातील किंवा भानगडीच्या धंद्या-उद्योगातील मख्खी, चावी, किल्ली, युक्ती, संधान, फिरकी; तसेच त्या रचनेची युक्ती, पूर्वी करून ठेवलेली योजना; यंत्राच्या कृतीची पद्धत, रीत. ३. नियम, कायदा, तत्त्व; सूचना, शिकवण यांची ठरीव पद्धत, ठराविक रीत. ४. व्याकरण, तर्क इ. शास्त्रातील नियम; शास्त्रप्रवर्तक आचार्यांनी त्या त्या शास्त्रावर लिहिलेले मूलग्रंथ; त्यातील सुटी वाक्ये. ५. (कायदा) हुकूमनामा; निर्णायक मत. ६. जानवे. ७. ओळंबा. ८. वात (कापसादिकांची). ९. (ल.) सरळ ओळ; रांग : 'तैसें दिसें सैन्य सूत्र।' - एरुस्व ६.५५. १०. (ल.) मैत्री; संधान. ११. कौशल्य : 'जेणें (पिलूं) न सुटें तें सूत्र ते वानरीचि जाणे :' - लीचउ ३७२.७५ .

सूत्र न. १. पदार्थाचे रेणुरुप दाखवणारी संज्ञा. उदा. पाणी H_2O. २. धागा; दोरा; सूत. ३. कायदा, तत्त्व, शिकवण यांची ठरीव पद्धत. ४. संधान.

सूत्र न. संबंधित व माहितगार व्यक्ती.

सूत्रक वि. १. बिनचूक; सरळ; सुतामध्ये; निश्चित; बरोबर. २. एका रेषेत, समपातळीत असलेला. ३. बरोबर; नियमित; (त्यावरून) नीटनेटका; छानदार.

सूत्रकाठी स्त्री. (विणकाम)मागाच्या हात्यास लावलेली किंवा जोडलेली काठी.

सूत्रकृमि–मी पु. (वैद्यक) नारू या रोगाच्या सूताप्रमाणे असणाऱ्या कृमी.

सूत्रधार पु. १. नाटकाध्यक्ष; नाटकासंबंधी माहिती करून देणारे मुख्य पात्र; नाटकाच्या कथानकावर अधिकार, हुकमत असणारा. २. कळसूत्री बाहुल्यांच्या खेळात ज्याच्या हातात बाहुल्यांच्या दोऱ्या असतात तो माणूस. ३. मंडळ, समाज, संघ इ. चा मुख्य चालक. ४. शिल्पकार : 'बापु विस्वकर्मा सुत्रधारी :' – उह ११५८. ५. सुतार : 'ऐसा तो सुत्रधारु मुर्ख.' – पंचो १३२.१६.

सूत्रधारी पहा : **सूत्रधार** २, ३.

सूत्रपर्ण न. काडीसारखी पाने असणारे झाड.

सूत्रपात पु. १. प्रारंभ; सुरुवात : 'रंगभूमीवरील नवीन सुखमय प्रवेशाचा सूत्रपात कसा झाला...' – सयाजी १.११०. २. पंथ, पक्ष, विचारसरणी अशांसारख्या गोष्टीत समाविष्ट करून घेणे; दीक्षा देणे. (इं.) इनिशिएट.

सूत्रा–त्री वि.१. पहा : **सूत्रक.** २. शहाणा; तरबेज; चतुर; चलाख; निष्णात; धूर्त; तीक्ष्ण बुद्धीचा. [सं.]

सूत्रात्मा पु. हिरण्यगर्भ; संपूर्ण दृश्य विश्वाला व्यापून असणारी जाणीव; सर्व सृष्टीस समान असणारा जगदात्मा.

सूत्री पु. शिल्पकार. [सं. सूत्रिन्]

सूद व्याज. – तंजा.

सूदणे क्रि. १. मारणे; ठार मारणे; वध करणे. २. रिघवणे; घालणे; ठेवणे : 'नयनीं सूदलें अंजन।' – एरुस्व ७.२४. [सं. सूद = ठेवणे, मारणे]

सूद्रसेव पु. १. पलंगपोस; चादर. २. मच्छरदाणी. (गो.)

सून स्त्री. मुलाची, पुतण्याची किंवा मुलासारखा मानलेल्या पुरुषाची बायको. [सं. स्नुषा]

सून पु. पौष महिना. (कु.) [सं. शून्य]

सूनमुख न. पहा : **सुनमुख**

सूना पु. घोड्याच्या जिभेखालचा भाग.

सूना आश्लेषा नक्षत्र.

सूना स्त्री. झाडणे, कांडणे, दळणे, चूल पेटवणे, पाणी भरणे या पाच घरकामांच्या वेळी किडे वगैरेंच्या घडणाऱ्या हत्यांपैकी प्रत्येक. [सं.]

सूनु–नू पु. पुत्र; मुलगा.

सूनृत वि. खरे; सत्य; गोड (भाषण).
पु. खरे व मधुर भाषण. [सं.]

सूप न. १. धान्य पाखडण्याचे बांबू, धातू किंवा प्लॅस्टिकचे केलेले एक साधन. २. ओढा, डबके यातील पाणी शेतास देण्याचे एक साधन. [सं. शूर्प] (वा.) **सुपाएवढे काळीज होणे** – आनंदाने हृदय प्रफुल्लित, मोठे होणे, फुगणे. **सूप फडफडणे, वाजणे** – एखादे मंगलकार्य पार पडले, मांडव परतणे झाले म्हणजे हे मंगलकार्य समाप्त झाले असे दर्शविण्यासाठी उपाध्यायाने एखाद्या समिधेने सूप वाजवणे. यावरून एखादा समारंभ संपणे.

सूप न. १. वरण. २. पाश्चिमात्त्य पद्धतीच्या जेवणात सुरुवातीला दिला जाणारा पातळ पदार्थ; भाजी, कडधान्य इ. शिजवलेल्या पाण्याचे गरम पेय. [इं.]

सूपकर्म न. स्वयंपाक; पाकक्रिया.

सूपकार पु. स्वयंपाकी.

सूपर(रा)म पु. मरण : 'रडोनि त्या सांगती सूपरामो।'–वामन भरतभाव.

सूपवती स्त्री. १. आसन. – ऋ १३५. २. गादी – व्युको. [सं. स्वापवत्]

सूफ स्त्री. लोकर; भीस.

सूफी संप्रदाय परमेश्वर प्रेममय आहे आणि भक्ती व प्रेम यांनी ईश्वरप्राप्ती होते, अशी श्रद्धा असलेला मूळचा इराणी पंथ.

सूम पहा : **सुमं**

सूय स्त्री. १. पहा : **सुई.** २. केळ्यांचा घड. ३. एक प्रकारचे पक्वान्न. [सं. सूचि]

सूर पु. १. गाण्यातील स्वर; आवाज; मधुर ध्वनी. २. नाकातून बाहेर सोडण्यात येणारा श्वास. (क्रि. वाहणे, चालणे, जाणे, बंद होणे). ३. सनई, पावा इ. वाद्यांच्या स्वरांचे सामान्य स्वरुप धरून सतत एकसारखे वाजणारे लांब सनईसारखे वाद्य. याने सुरांचा भरणा होतो. [सं. स्वर] (वा.) **० बंद होणे** – १. थंडी वगैरेमुळे श्वासोच्छवासास अडथळा होणे. २. श्वास बंद होऊन मरणे. **० वाहणे** –(एखाद्या कामाची) शक्यता दिसणे; मनाचा कल होणे. **० सापडणे** – कृतीत सहजता येणे; सहज कल्पना सुचून त्याप्रमाणे कृती घडणे.

सूर पु. १. सूरपारंबीच्या खेळातील फेकायची काठी. २. आट्यापाट्याच्या खेळातील मुख्य पाटी.

सूर स्त्री. नारळापासून बनवलेली पिण्याची दारू, मद्य. (को.) [सं. सुरा]

सूर पु. दिशा; ताळतंत्र; पद्धत.

सूर पु. अंगाचा आकार माशासारखा करून पाण्यात उडी मारणे.

सूर पु. सूर्य : 'उदयापूर्वीच हरी तेजोलेशेंचि जेंवि सूर तमें।' – मोकर्ण ७.१८. [सं. सूर्य]

सूरकरी–दास–नीस वि. गाणाऱ्याचा साथीदार.

सूरकाठी पहा : **सूरपारंबी**

सूरकांडे न. आट्यापाट्यांमधील दोन पाट्यांच्या मधील सूरपाटीचा भाग. – व्याज्ञा १.२२०.

सूरतपणे क्रिवि. ज्ञानबुद्धीने : 'शेखमहंमद द्रवे सूरतपणे। ऐकाजी सद्गुरू तोतरीं वचनें।' – योसं ५.४१.

सूरपाटी आट्यापाट्यांमध्ये सर्व पाट्यांस मध्ये छेदणारी उभी पाटी. – व्याज्ञा १.२२०.

सूरपारंबी स्त्री. झाडावर सरसर चढायचे, खाली धावत उतरायचे आणि 'सूर' नावाची काठी फेकायची असा मुलांचा एक खेळ.

सूरमदी पु. (नाविक) आग्नेयेकडील वारा.

सूरमल्हार पु. (संगीत) एक राग. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर. [सं.]

सूर्त न. सूर धरण्याचे वाद्य. (गो.)

सूर्य पु. १. ज्याच्याभोवती पृथ्वी फिरते आणि ज्याच्यापासून तिला ऊर्जा व प्रकाश मिळतो असा तारा. याच्या उदयास्ताने दिवसरात्र होतात. २. सूर्यदेव; कुंडलीतील एक ग्रह. [सं.] (वा.) **सूर्याची हरणे, पिले दाखवणे** - मुलाच्या कानाच्या पाळ्या अंगठ्याने जोराने दाबून उचलण्याचा खेळ. **हा सूर्य आणि हा जयद्रथ** - एखाद्याचा दोष पुराव्यासकट त्याच्या पदरी घालणे. **सूर्यापोटी शनैश्चर** - (शनि हा सूर्याचा मुलगा यावरून) चांगल्या बापाच्या पोटी वाईट मुलगा जन्मणे. **सूर्यावर थुंकणे** - एखाद्या थोर व्यक्तीची निंदा करून स्वत:चे हसे करून घेणे.

सूर्यकन्या स्त्री. पहा : **सूर्यसंतान** ३

सूर्यकमल-ळ पुं. सूर्य उगवल्यानंतर उमलणारे व सदोदित सूर्याकडे तोंड असणारे एक कमळ. [सं. सूर्यकमल]

सूर्यकांत पु.१. सूर्य किरणांचे एका केंद्रात परावर्तन करून उष्णता उत्पन्न करणारा एक विशेष प्रकारचा स्फटिकमय मणी. याची पंचायतनात सूर्य म्हणून पूजा करतात. २. सूर्यफूल. [सं.]

सूर्यग्रहण न. पृथ्वी व सूर्य यांच्यामध्ये चंद्र आल्याने सूर्याचा काही किंवा सर्व भाग दिसेनासा होणे; जुन्या हिंदू शास्त्राप्रमाणे सूर्याचा केतू ग्रहाने केलेला ग्रास. हे ग्रहण अमावास्येला होते. [सं.]

सूर्यचूल स्त्री. सूर्याच्या ऊर्जेचा उपयोग करून अन्न शिजवण्यासाठी तयार केलेले उपकरण; सौर कुकर.

सूर्यदर्शनव्रत न. चातुर्मासात स्त्रियांनी करण्याचे एक व्रत. सूर्य मेघांनी झाकला गेला असता त्याचे दर्शन होईपर्यंत उपोषण करण्याचे व्रत.

सूर्यनमस्कार पु. व्यायामाचा एक प्रकार.

सूर्यनक्षत्र न. ज्या नक्षत्राजवळ सूर्य असेल ते नक्षत्र. [सं.]

सूर्यपत्र-पान न. अब्दागीर.

सूर्यपर्व न. सूर्यग्रहण, व्यतिपात, सूर्यसंक्रांत, अमावास्या इ. पर्वांपैकी प्रत्येक. (स्नान, ध्यान, दान, जप इत्यादीस योग्य काळ.) [सं.]

सूर्यपिल्लू न. लहान दिवा.

सूर्यफूल न. गळिताच्या बिया असणारे, पिवळ्या रंगाचे, गोल आकाराचे फूल. हे नेहमी सूर्याच्या दिशेने तोंड करून असते.

सूर्यभक्त पु. (थट्टेने) दिवाळखोर. (सूर्योपासकाप्रमाणे, हात वर करून दिवाळे वाजल्याचे जाहीर करण्याच्या रीतीवरून).

सूर्यमाला-मंडल स्त्री. न. सूर्याभोवती विवक्षित कक्षेतून परिभ्रमण करणारे ग्रह, त्यांचे उपग्रह, धूमकेतू, अशनी पाषाण इत्यादींचा समूह. [सं.]

सूर्ययंत्र न. १. सूर्याच्या पूजेसाठी तांब्याच्या पत्र्यावर कोरलेली एक विशिष्ट रेखाकृती. २. ग्रहांचा वेध घेण्याचे एक यंत्र.

सूर्यवंशी वि. सूर्योदय झाल्यावर निजून उठणारा; उशीरा उठणारा.

सूर्यसंतान न. १. सूर्याची प्रजा, वंश, मूल. २.(शनी हा सूर्यपुत्र पण खोडकर म्हणून) चांगल्या माणसाचा वाईट मुलगा.३. भाकरी.

सूर्यसूर पु. उजव्या नाकपुडीतून निघणारा श्वास.

सूर्यावर्त पु. अर्धशिशी दुखण्याचा एक प्रकार; ही सूर्याच्या उदयापासून वाढत जाऊन सूर्यास्तास बंद होते.

सूल पु. (संगीत) एक प्रकारचा ताल; यात मात्रा दहा व विभाग पाच असतात.

सूळ पु. १. पहा : **शूल.** २. एक प्रकारचे हत्यार. [सं. शूल] (वा.) ० **घेणे** - अत्यंत कष्टप्रद काम करणे. **सूळावरची पोळी** - जीव धोक्यात घालण्यासारखे काम.

सूळघेणा-ण्या वि. कठीण, अवघड, दु:साध्य (काम).

सूळबांध पु. चढाचा व अरुंद रस्ता; सुळक्या सारखा बंधारा, बांध.

सूक्ष्म न. ब्रह्म (सर्व विश्वाला व्यापून राहिलेले पण सूक्ष्माहून सूक्ष्म).

पु. १. अणू. २. साहित्यातील एक अलंकार.

वि. १. बारीक; लहान; थोडे; अणुप्रमाण. २. साधारण; किंचित. ३. सुरेख; नाजूक ४. विरळ; विरविरीत. [सं.]

सूक्ष्मजंतु-तू पु. (वानस) वनस्पतीचा एकपेशी व अतिसूक्ष्म अवयव. त्यात हरितद्रव्य नसते व विभागून वाढ होते. (इं.) बॅक्टेरिया.

सूक्ष्मजीवशास्त्र न. डोळ्यांना न दिसणाऱ्या सूक्ष्म कीटकांच्या जीवनपद्धतीचा अभ्यास करणारे शास्त्र.

सूक्ष्मदर्शक यंत्र नुसत्या डोळ्यांना न दिसणारे अतिसूक्ष्म पदार्थ पाहण्याचे यंत्र.

सूक्ष्मदर्शी-दृष्टी-द्रष्टा-बुद्धि-द्धी वि. बारकाईने पाहणारा; मर्मज्ञ.

सूक्ष्मदेह-शरीर पु. लिंगदेह; वासनात्मक शरीर.

सूक्ष्ममान न. १. अगदी बरोबर व सूक्ष्म माप; बिनचूक मोजमाप. २. सविस्तर व तंतोतंत अंदाज. ३. (विपल, पल, विकला, कला इ. निमिषांपासून संवत्सरापर्यंत) कालविभागाचे मोजमाप.

सूक्ष्मवाद पु. परमाणूवाद; परमाणूपासून जग बनले आहे असे मत.

सूक्ष्मसंचयन गणित अतिसूक्ष्म संख्यांची किंवा परिमाणांची बेरीज करणारे गणितशास्त्र. (इं.) इंटीग्रल कॅल्क्युलस.

सूक्ष्मसंयोग पु. रसाकर्षण. (इं.) ओस्मोसिस.

सूक्ष्मक्षेप पु. तालीमखाना; कोलिस्त; कोकिलाक्ष; इक्षुगंधा; इक्षुर. - मसाप ४५.४.

सृजणे उक्रि. १. उत्पन्न होणे; बनणे. २. उत्पन्न करणे; बनवणे. [सं. सृज]

सृजन न. १. उत्पत्ती. २. सृष्टी. [सं.]

सृति-ती स्त्री. मार्ग. [सं.]

सृष्ट वि. १. उत्पन्न केलेले; निर्माण केलेले. २. जोडलेले; संलग्न; बनवलेले. [सं.]

सृष्टि-ष्टी स्त्री. १. निर्माण, उत्पन्न करणे; जोडणे; लागणे; संलग्न होणे. २. ब्रह्माचा विश्वातील सर्वव्यापीपणा. ३. जगाची उत्पत्ती. ४.(समासात) जग; विश्व. उदा. स्वप्नसृष्टी. [सं.]

से स्त्री. १. सय; आठवण, स्मृती : 'देख ऋद्धिसिद्धि तयापरी आली गेली से न करी।' - ज्ञा २.३६३. २. त्यावरून छंद; स्फूर्ती : 'म्हणोनि यया वाखाणा। पासीं से आली चौगुणा।' -ज्ञा १३.६४४. (पाठभेद). ३. अनुमान; हेतू : 'ऐसी पुढील से घेतु।' - ज्ञा १.१७९. ४. (ल.) रोष; असंतोष; क्रोधयुक्त स्मृती; दंश : 'तेवींचि येरू से घेईल। म्हणोनि बिहे।' - ज्ञा ६.७. [सं. स्मृति]

सेअणे अक्रि.१. जाणे : 'म्हणौनि यया वाखाणा - । पाठिं सेअली

चौगुणा।' - ज्ञा १३.६४४. [सं. सेक्; याकाम. सेअ् -व्युको.]
२. पहा : **सेइणे**

सेइणे अक्रि. (घर) शाकारणे; (घर) गवताने शिवणे. [सं. च्छादन]

सेइणे सक्रि. स्मरण होणे; आठवणे : 'म्हणौनि याया वाखाणा-। पाठीं सेइली चौगुणा।' - ज्ञा १३.६४४. [सं. स्मृ]

सेक-ख पु. १. शिल्लक बाकी : 'ज्वर सेख होते तेंही गेले'- लीचउ १२८. २. निष्कर्ष; तात्पर्य. ३. शेवट. [सं. शेष]

सेक पु. शिंपडणी; सिंचन; सडा. [सं. सिच्]

सेकला तलवार किंवा इतर हत्यार घासून त्याला चमक आणणे.

सेकंद न. मिनिटाचा साठावा भाग. [इं.]

सेकोदा पु. प्रचंड विराट विस्तार असलेला व शंभर मीटरपर्यंत उंच वाढणारा वृक्ष.

सेचन न. शिंपडणी. [सं.]

सेचनी स्त्री. पोहरा; बादली; झारी.

सेज स्त्री. १. पहा : **शेज**. २. क्रम; रांग; ओळ. [सं. शय्या]

सेजरे न. कणसे ठेवण्यासाठी केलेले कडब्याच्या पेंड्यांचे वर्तूळ.

सेजवळा स्त्री. शय्या तयार करणारी दासी : 'तेथ सेज झाडिली बटकीं। सेजवळेया।' - नरुस्व ३८८. [सं. शय्या - शेज + वल]

सेजसाळ स्त्री. शयनघर : 'शून्य सेजसाळिये। सुलीन तेचिये तुळिये।' - ज्ञा १३.४२. [सं. शय्याशाला]

सेजा क्रिवि. शेजारी.

सेजा पु. सज्जा; गॅलरी. (गो.) [हिं. छज्जा]

सेजार न. शयनगृह : 'तो सेजारीं एकला निजैला होता :' - लीचपू २६०.

सेजुळा वि. सोज्वळ : 'मुक्ताई संपन्न मुक्त पै सेजुळे।' - मुक्ता २१.

सेटाडना क्रि. झिडकारणे; घालवणे. (झाडी)

सेत पु. शेंबूड. (गो.)

से(सै)ती आखूड लांबीचा भाला.

सेतु-तू पु. १. पूल; बांध; धरण. २. रामेश्वर येथील समुद्रावरील वाळू. ही काशीला नेऊन गंगेत टाकतात. [सं.]

सेतुप्रणाल पु. १. नदी, दरी यावरून जाणारा पाण्याचा मोठा नळ. २. नळाकरता बांधलेला पूल.

सेद तंदुरुस्ती; प्रकृतिस्वास्थ्य. -ऐको.

सेन पु. ससाणा. [सं. श्येन]

सेनगाठ पु. घोड्याच्या फऱ्याजवळील भोवरा.

सेना स्त्री. सैन्य; फौज. [सं.]

सेनापति-ती पु. सैन्याचा मुख्य नायक.
स्त्री. सेनापतिपद. सैन्याधिकार : 'महाराजास भेटऊन सेनापती देवितील तर उठोन येईल.' - पेद १०.७३.

सेनापति-ती पु. १. विवाहमंडपात विघ्ननिवारणार्थ स्थापन केलेली एक देवता. २. मंडपाच्या ईशान्य दिशेस मुहूर्तमेढ रोवून त्याला बांधतात ती पांगाऱ्याची काठी.

सेनाभार पु. सर्व सैन्य; फौज.

सेनामुख न. तीन पत्ती इतके सैन्य.

सेनासरखेल पु. फौजबंद सरदाराची पदवी.

सेनास्तंभ पु. युद्धक्षेत्रावर आघाडीपासून पिछाडीपर्यंत लढाऊ तुकड्यांची बांधणी. एका रांगेत चार ते सहा शिपाई अशी रचना असते. (इं.) मिलिटरी कॉलम.

सेनांग न. गज-अश्व-रथ-पदाती हे सैन्याचे चार भाग, त्यापैकी प्रत्येक. [सं.]

सेनोड्या वि. गलिच्छ; अस्वच्छ. (झाडी)

सेन्नी सेंदणी - भाप्र.

सेप्टिक टँक मलमूत्रादी पदार्थांचे जीवाणूंच्या सहाय्याने विघटन करण्यासाठी जमिनीखाली बांधलेली टाकी. [इं.]

सेब-व सफरचंद.

सेमिनार न. विशिष्ट विषयाची चर्चा करण्यासाठी, काही दिवसांसाठी एकत्रित आलेले लोक; अभ्यासगट. [इं.]

सेयारी स्त्री. चेटकी; डाकीण; पिशाची. [अर. साहिर = जादूगार, मांत्रिक]

सेरि स्त्री. तृप्ती; समाधान. - शर.

सेरी स्त्री. गटार; नाली. (अहि.)

सेरीक पु. सरकारी शेरी जमिनीवरील अधिकारी.

सेरू पु. लाकडी पळी. [सं. स्रुवा]

सेल पु. १. बैलगाडीच्या जुवाचा समतोलपणा. २. एकाच उंचीची बैलजोडी. ३.बांधा : 'दोघे सेला समाना' - गरा २०३. [सं. शैल]

सेल पु. १. शेवट; टोक : 'बैसला गुरुत्वाचे सेले।' - अमृ २.२०. २. टोकदार हत्यार : 'तैसा नोहोटे दुर्वाक्यसेली। सेलिला सातां।'-ज्ञा १३.४९५.
वि. शेलका; निवडक, उत्तम (वाटा) : 'तो दुष्कृताचा कीर सेल वाटा।' - ज्ञा ९.४१६. [सं. शैल = टोक]

सेलघर पु. १. दुकानदार. २. शेवटचे घर. (झाडी)

सेलणे सक्रि. १. (पाणी) तोडणे; कापणे; टोचणे : 'ते उपरतीच्या वावी सेलत।' - ज्ञा ७.१०१. २. दुष्ट, वाईट शब्द बोलणे. ३. आकाशात भरारी मारणे : 'कीं म्हणिजे गरुड हा सेलत पतंगासारिखा।' - स्वादि १.२.१६.

सेलणे सक्रि. जिंकणे : 'तियें सेलीत सप्त स्वरांशीं शस्त्रें। कानाचेनि निरोपें।' - नरुस्व ५२२. [सं. शैल]

सेलतणे अक्रि. भासणे. - शास्त्रीको.

सेलबैल स्त्री. बैलजोडीवरी कर. पहा : **सेल**

सेलवन न. डोंगराच्या उतारावरील जमीन : 'अंबेदसि महाकुमार श्रीसिंघणदेवे सेलवन दीले' - कनै शिला १.८.

सेलसांड स्त्री. हेळसांड. (व.)

सेला पु. गर्दी; जमाव; लोंढा : 'तो इकडील फौजेचे सेले तोंडसन्मुख येत.' - भाब ६३. [फा. सैलाब]

सेला पु. बाण : 'पुढीली अणीय भाले। जवळी पांच पांच सेले।' - उषा ७३.८२४.

सेलाटक न. भोकरीचे झाड.

सेलार-रा पु. बाण तयार करणारा कारागीर : 'सेलारा फणिमौळी। उर्णनाभि झीलि। या चोविसा गुरुंची वोळि। सांघितली तुज।' - उगी

२६८. [अर. सिलह् = शस्त्र]

सेली स्त्री. हार; दोऱ्याची कंठी. [सं.]

सेलू वि. (व्यापारी सांके.) सहा : 'सेलू पोकू आणि ढकार।' – भवि ४२.

सेव पु. बायकांचा डोक्यावरील पदर. (व.)

वि. थोडा ढाळ; उतार असलेले. (व.)

सेवक पु. नोकर. हाताखाली काम करणारा, हलके काम करणारा चाकर. [सं.]

सेवकै स्त्री. चाकरी; सेवाधर्म.

सेवडी स्त्री. कातडे; चामडे : 'वरी चोखट मृगसेवडी।' – ज्ञा ६.१८२. [सं. छाल + कृत्ति; हिं. छालडी]

सेवणे सक्रि. १. उपयोग करणे; कामावर योजणे; सेवा-चाकरी करणे; पूजा करणे; आदर दाखवणे. २. उपभोग घेणे; भक्षण करणे; सेवन करणे. ३. स्वीकार करणे : 'मग देठु न सांडितां सेवी। आदरेसी।।' – ज्ञा ९.३७९. [सं. सेव्]

सेवती स्त्री. सीमांत; गावाची शीव : 'वऱ्हाड मुहुर्ताची वेळ होए तंव सेवतीएसि बैसलें होते :' – लीचपू ३९.

सेवन न. १. चाकरी. २. उपयोग; उपभोग; स्वीकार; अनुभव घेणे; कामी लावून पाहणे (वस्तू, उपाय, योजना, औषध, अन्न इ.). ३. पूजा, उपासना करणे.

सेवन न. शिवणे; दोरा घालणे.

सेवनीय वि. पूजा करण्यास, आज्ञा पाळण्यास, सेवा करण्यास उपयोगात आणण्यास, उपभोगण्यास योग्य.

सेवसबजी स्त्री. भाजीपाल्यावरची पट्टी, कर. [फा. सेव = फळ + सब्जी = भाजी]

सेवळी स्त्री. १. शेवाळ. २. पाण्याची कळशी. – लोसाको.

सेवा स्त्री. १. चाकरी; दास्य. २ पूजा; मान; आदर. ३. देवाची उपासना. ४. उपयोग; दृश्य स्वरुपात नसलेले पण ज्याच्या उपयोगाचा क्रयविक्रय होऊ शकतो, अशी सेवा. [सं.]

सेवाचाकरी स्त्री. १. सरकारी कचेरी, बँका, हॉस्पिटल अशा ठिकाणी केले जाणारे काम. तसेच वकील, डॉक्टर, शिक्षक यांच्यासारख्यांचे काम. २. मुलाच्या आईवडिलांनी मुलीच्या घरी राहून त्यांच्या घरची कामे करणे, ही शिकलगारांकडील पद्धत.

सेवादल न. स्वयंसेवकाचे पथक.

सेवाधार–री पु. सेवेकरी.

सेवान स्त्री. गोवरी.

वि. मळकट. (व.)

सेवानिवृत्ती स्त्री. सेवेची मुदत संपल्यामुळे नोकरीतून मुक्त होणे.

सेवापुस्तक न. नोकराची नियुक्ती, बढती, पगारवाढ, रजा इ. ची नोंदवही. (इं.) सर्व्हिस बुक.

सेवासंविदा स्त्री. (विधि.) नोकरीचा करारनामा.

सेवाक्षेत्र न. (अर्थ.) तिसऱ्या श्रेणीचे क्षेत्र.

सेवामुद्रांक पु. पावती देताना, करार करताना लावण्याचे तिकीट. (इं.)

सेविका स्त्री. १. स्त्री स्वयंसेविका. २. हॉस्पिटलमध्ये रोग्याची शुश्रूषा – सेवा करणारी स्त्री; (इं.)नर्स.

सेवेकरी पु. चाकर; विशेषत: देवळात देवाची पूजा अर्चा करणारा पुजारी.

सेष(स)पाट पु. पट्टाभिषेक.

सेस–श पु. सौभाग्यसूचक मळवट. [सं. शिरस्]

सेहत स्त्री. प्रकृती; स्वास्थ्य; आरोग्य. [अर. सिहत्]

सेहाडा पु. १. सिंहगर्जना. २. पहा : **सिहाडा**

सेहेचाळीस वि. ४६ ही संख्या. [सं. षट्चत्वारिंशत्]

सेळंद्री स्त्री. सैरंध्री; दासी. – नरुस्व २१९.

सेंजी स्त्री. (कृषि) गुरांची एक खाद्य वनस्पती; (इं.) इंडियन क्लोव्हर.

सेंट न. विशिष्ट प्रकारे काढलेले अत्तर; सुगंधी अर्क. [इं.]

सेंटरिंग न. १. स्लॅब टाकण्यासाठी लावलेले पत्रे. २. बांधकामात कमान, घुमट इ. ना देण्यात येणारी आधारचौकट. [इं.]

सेंटिग्रेड वि. ज्याचे शंभर अंश केलेले आहेत असे (उष्णतामापक) [इं.]

सेंतोई स्त्री. छत्री. (व.)

सेंटिमीटर पु.लांबी मोजण्याचे माप. मीटरचा शंभरावा हिस्सा. [इं.]

सेंदणी स्त्री. कापूर ठेवण्याची हस्तिदंती डबी; करंडा.

सेंद्रिय वि. १ (रसा.) कार्बनी. २. आंगिक; ऐंद्रिय; जैव; प्राणीज; प्राणी व वनस्पतीजन्य; सजीव.

सेंद्रिय सिद्धांत समाजाचा विकास जैविक पद्धतीने होतो असे मानणारा दृष्टिकोन.

सैग अ. सहज; स्वयंभू; नैसर्गिक.

सैताडला, सैताडल्या वाणाचा वि. लहरी; पिसाट. (व.)

सैतान पु. १. बायबलमधील ईश्वरविरोधी व्यक्ती; इब्लिस. २. भूत; पिशाच्च; वेताळ. पिशाचांचा राजा. ३. (ल.) घोर कर्म करणारा, आचरणारा पुरुष; पापमूर्ती माणूस. ४. (ल.) भयंकर वादळ; तुफान. [अर. शैतान]

सैतावणे अक्रि. जोरावणे; आवेश येणे : 'तेणे रवसे सैतावली : देव्हडेनि आंगे मुरडली :' – शिव ७०५.

सैति–ती स्त्री. दोरी जोडलेली लांब बर्ची. [सं. शीत=तीक्ष्ण]

सैतुक न. तुतीचे फळ; हे लाल असून सुरवटांसारखे असते.

सैन न. १. एक प्रकारचे विलायती कापड. २. सुती जाडेभरडे कापड. (अहि.)

सैनिक पु. सैन्यातील शिपाई.

वि. सैन्यासंबंधी.

सैनिकसंधि–धी स्त्री. तात्पुरती युद्धबंदी.

सैन्य न. फौज; लष्कर; परचक्राचे निवारण करण्यासाठी किंवा दुसऱ्या देशावर आक्रमण करण्यासाठी जमिनीवर, समुद्रात व आकाशात प्रशिक्षण देऊन तयार ठेवलेले सैनिक. [सं.]

सै(सैं)पाक, सैपाकघर इ. शब्द स्वयंपाक शब्दाखाली पहावेत.

सैफ स्त्री. एक प्रकारची तरवार. [अर. सैफ्]

सैर पु. चोरांची एक जात व तीमधील व्यक्ती.

वि. स्वच्छंदी; मनाला येईल तसे वागणारा. [सं. स्वैर]

सैर, सैरणी स्त्री. सहल; निसर्गनिरीक्षण. [अर. सैर]

सैर(रा)ट वि. स्वच्छंदी; हट्टी; हेकेखोर; दांडगा; आडदांड; कठोर; कर्कश.
सैरट भैरट वि. १.अर्धवट; खुळसट. २. नीट ऐकू न येणारा. ३. स्वच्छंदी.
सैरफाजील न. कोरडवाहू व बागायत यांच्या उत्पन्नाची नोंद व उत्पन्न. [अर.सायर = इतर]
सैरभैर वि. अस्वस्थ; चंचल.
सैरंध्री स्त्री. १. अंत:पुरातील दासी; श्रीमंतांच्या घरच्या स्त्रियांची केशरचना करणे, त्यांना वस्त्रालंकार चढवणे इ. कामे करणारी, वेतन घेऊन राहणारी कुलीन स्त्री. २. द्रौपदी. [सं.]
सैरा, सैरावैरा क्रिवि. ज्याला जिकडे वाट फुटेल तिकडे; दाही दिशांनी; (भीतीने धावणे, पळणे); मोकाटपणे; स्वच्छंदाने. [सं. स्वैर द्वि.]
सैराटणे अक्रि. लहरीप्रमाणे वागणे. [सं. स्वैर्याढ्य]
सैराण पु. भान; आठवण. (कु.)
सैरिक, सैर वि. नांगरासंबंधी, नांगरटी – शेतकीविषयक. [सं. सीर = नांगर]
सैरिय पु. रेडा; हेला.
सैल स्त्री. कंगणी इ. दागिने घडवण्याचा दांडा.
सैल वि. ढिला, अघळपघळ; पोकळ; लटपटीत. [सं. शिथिल क. सैलु त. शोर्दल्] ०**सोडणे** – वचक न ठेवणे; दाबात न ठेवणे.
सैलदोरी स्त्री. ढिला, लटपटीत वचक, दाब. (क्रि. देणे, सोडणे).
सैलपाटी स्त्री. खळ्यावरील धान्याची पहिली पाटी.
सैलावणी स्त्री. मोकळीक; ढिलेपणा.
सैलावणे, सैलणे अक्रि. १. ताण कमी होणे; ढिले, मोकळे होणे. २. लटपटीत होणे.
सैली स्त्री. १. फकीराच्या गळ्यातील सुताची माळ. २. फुलांची माळ. (तंजा.) ३. सामान्यत: माळ. [हिं.]
सैवार न. १. आधार; सोबत; आसरा. २. कडा; बाजू.
सैंग स्त्री. सोपा; पडवी – ऋ ११६.
सैंग–घ पु. समूह.
वि.१. पुष्कळ; सर्व : 'घापे पटामार्जी तंतूची सैंघ सृष्टी।' – ज्ञा ६.१००. २. स्वत: सिद्ध.
क्रिवि. १. केवळ. २. एकदम : 'तया धर्गी सैंघ पळिपे। क्रोधाग्नि तो।' – ज्ञा १६.३९४. ३. सर्वत्र : उद्दंडे सैंघ वाजते।' – ज्ञा १. ४. सरळ : 'पारिके संसारले : सैंग धाविनले :' – शिव ८७४. ५. स्वैरपणाने : 'मग सेळियेचेनि तोंडे। सैंघ चारी।' – ज्ञा १४.२२७. ६. सहज; नैसर्गिक. [सं. संघ]
सैंचळ पहा : **संचळ**
सैंधव न. पु. शेंदेलोण.
वि. समुद्रासंबंधी; सिंधुनद अगर सिंधदेश यासंबंधी. [सं. सिंधु]
सैंधव पु. घोडा. [सं.]
सैंभ न. लष्कर; फौज.
सैंभ वि. अखंड; संपूर्ण : 'ते दिसे जैसी आइतीं। रेख सैंभ' – ज्ञा १५.१३६. २. स्वयंभू. ३. मूर्तिमंत; साकार : 'जो या मार्गासि आधारस्तंबु : की कणवेचा सैंभू :' – मूप्र ४९२.
सोइ स्त्री. बाजू : 'तें (बाजुले) घराचां कोणटां एकी सोइचि घालावे की :' – लीचपू ३३१.
सोइरा व त्यापासून होणारे सर्व शब्द सोयरामध्ये पहावेत.
सोए स्त्री. १. आधार; लाभ : 'किंबहूना सोए। जीउ आलेयांची लाहे।' – १३.१३१. २. अस्तित्त्व; माहिती : 'याची आम्ही सोए नेणों : भाख नेणो।' – लीचपू ३१.
सोएर, सोयेर इत्यादी शब्द सुवेरखाली पहावेत.
सोक सिंह – तंजा.
सोक पु. शोष; कोरड.
सोकट पु. कोष्ट्याचा कापड विणण्याचा माग.
सो(सों)कटी–ठी–टे स्त्री. न. पहा : **सोंगटी**
सोकर–री पु. १. जागल्या; राखणदार; रक्षक. २. मुलगा. छोकरा : 'सोकरू लागे पाठीं नंदरायाचा गो माझीया।' – ज्ञागा २५०. (वा.) **सोकरा धरणे** – काळजी वाहणे. (व.) [सं. शावक]
सोकरणे सक्रि. १. राखणे; रक्षण करणे. – शर. २. हुसकून लावणे; हाकलणे : 'सोकरताति तुरुंबिआंवरी। पूंसेंयाते।' – शिव २५५.
सोकळ वि. ठिसूळ (दगड इ.).
सोकाजी वि. छाकटा; गावगुंड. [अर. शौक् = नाद, छंद]
सोकाटणा–णे न. लाकूड फोडताना त्याखाली आधारासाठी ठेवायचा ओंडका.
सोकारी पु. शेताचा राखणदार.
सोकावणे अक्रि. सवकणे; नाद लागणे; गोडावणे; आवड, चट, लज्जत, शोक, आसक्ती लागणे; चटावणे. [क. सोक्कु]
सोकी(के)ल, सोकीव वि. चटक लागलेला; सवकलेला.
सोक्त–ख्त वि. १. (गंजिफाचा खेळ) कोणत्याही रंगाच्या बारा पानातून एकही पान दुसऱ्याच्या हातात राहत नाही असा (डाव, खेळ). २. दग्ध; जळालेला. ३. जुने, जीर्ण (वस्त्र). – ऐको.
सोख पु. शोष; घशाला पडलेली कोरड.
सोखणे इत्यादींसाठी शोष, शोषणे इ. पहावेत.
सोगई स्त्री. विवाहसंबंध; सोयरीक.
वि. नात्याचा; सगेपणाचा. [गु. सगई]
सोगण, सोगंद स्त्री. शपथ. [फा. सोगंद]
सोगल न. हिवाळ्यातील शेतातील तण.
सोगळा वि. ढिला; सैल.
सोगा पु. नेसलेल्या वस्त्राचा लोंबता भाग, पदर. [क. सोगे; त. शुंगु]
सोगा, सोगयाचे अंजन पु. डोळ्यांत घालण्याचा सुरमा : 'नयनीं सोगयाचें अंजन।' – एभा१.३४८.
सोगी पु. एक लहान मासा. (गो.)
सोगौर पु. हंसासारखा एक पक्षी : 'शब्दासवें विधानके। सोगौराचेया।' – नरुस्व ५३१. [सं. स + गौर]
सोच्यपण न. गरीबी; रंकपण; शोचनीय अवस्था : 'जिए साउलिए वीणे। आमुचे सोच्यपणें।' – ऋ ७७. [सं. शुच् = शोक करणे]
सोजाळणे सक्रि. (ऊस) निर्मळ व स्वच्छ करणे.
सोजी स्त्री. १. जिरे, हळद घालून तुपाची फोडणी करून त्यात तांदूळ

परतून, त्यावर आधणाचे पाणी घालून केलेला भात. हा आजारी, अशक्त माणसाला देतात. २. सपीट; मैदा; गव्हाचा रवा. ३. गव्हाची किंवा तांदळाची खीर. [सं. शुचि-शोध्य; प्रा. सोज्झ]

सोजीर पु. पलटणीतील गोरा शिपाई. [इं. सोल्जर]

सोज्वल-ळ, सोज्वलित वि. १. चकचकीत; चमकणारा. २. तुळतुळीत; निर्मळ. ३. पापरहित; निष्पाप. [सं. सोज्ज्वल]

सोट पु. हिरव्या रंगाचा, लांबट, पीक खाणारा किडा; हिरवे पंख असलेला बाजरीवरील भुंगा.

सोट पु. १. लांब, सरळ व जाड लाकूड (तुळई, कडी, खांब इत्यादींसाठी); उंच, सरळ झाड; उंच केळीचा कोका. २. उंच मनोरा; उभट जिना, दादर; पर्वताची सरळ सोंड; सरळ रस्ता. ३. सुमारे २० पायली धान्य भरून तोंड शिवलेले पोते. ४. (ल.) आडदांड, धश्चोट, राकट माणूस; फटिंग; मूलबाळ किंवा कुटुंब नसलेला पुरुष किंवा स्त्री. ५. उंच व धिप्पाड माणूस. [हिं. सोटा]

सोट(ड)गा-गे पु. न. दांडके; सोटा; दंडुका; बडगा.

सोटबहिरी-भैरव पु. गलेलठ्ठ व आडदांड माणूस; फटिंग; सडेतोड पुरुष. पहा : **सोट** ४

सोटमूळ न. (वानस) मुख्य, प्रधान मूळ; जमिनीत खोलवर जाणारी पाळेमुळे.

सोटवाव पु. फोक (झाडाचा इ.).

सोटशिंग पु. सडेसोट, अविवाहित पुरुष.

सोट(टा)ळणे अक्रि. गाय, म्हैस यांच्या जननेंद्रियातून शेंबडाच्या लोळीसारखा स्राव होणे.

सोटा पु. १. लांबट लाकूड (खांब, शिडाची काठी यांच्या उपयोगी); पहा : **सोट; सोटगा.** २. गाय, म्हैस यांच्या जननेंद्रियातून-योनीतून शेंबडाच्या लोळीसारखा गळणारा स्राव. [त. शोट्टे]

सोटादुपट्टा पु. प्रवासातील वस्त्रपात्र, काठी-दांडके इ. जरुरीचे सामान.

सोटे वि. न. तोटके; अपुरे : 'म्हणौनि वरिया निन्हां ठेली सोटी :'- शिव ६५७.

सोटेदरबार, सोटेबरदार पु. सोटा बाळगणारा मनुष्य; भालदार; चोपदार.

सोटेबाजी-शाई स्त्री. काठ्यांची मारामारी; दंडुकेशाही.

वि. आडदांड, आडदांडपणे हल्ला करणारा.

सोट्ट वि. १. वांझ. (कर.) २. पोकळ. (बे.)

सोड स्त्री. १. कर्ज इ. ची सूट; अशी सूट दिलेली रक्कम. २. मोकळीक देणे; अटकाव न करता जाऊ देणे; उपेक्षेची मोकळीक; सवलत; मुक्तता. ३. परवानगी. ४. काडीमोड; सोडचिठ्ठी (लग्नाची).

सोडकिंमत स्त्री. विम्याचे हप्ते पूर्ण होण्याच्या आधी विम्याचे पैसे मागितले तर मिळणारी रक्कम.

सोडखत-चिठ्ठी-पत्र न. स्त्री. न. १. सोडवणुकीचे पत्र; आपला मालकी हक्क ज्यावरून सोडून दिला आहे अशा गाव, शेत इत्यादींच्या मोकळिकेविषयीचे आज्ञापत्र; सूटपत्र. २. वैवाहिक संबंध तोडल्याबद्दलचा लेख.

सोडगादी स्त्री. पालखीच्या दांड्याला जोडलेली लहानशी गादी.

सोडण न. १. नारळाचे चोड; नारळातील तंतूमय आवरण. २. (ल.) हट्टी, चिकट माणूस.

सोडणी स्त्री. १. सोडवणूक. २. (ल.) मोक्ष. - ज्ञा १८.४

सोडणूक स्त्री. १. मुक्तता; २. ताटातूट; वियोग; संबंध तोडणे. ३. जाऊ देणे. ४. पळवाट; सुटण्याचा मार्ग.

सोडणे उक्रि. १. मोकळे, खुले करणे; बंधन, करार यातून मुक्त करणे; वचक, घोटाळा, त्रास, संकट यातून वाचवणे. २. वेगळे विभक्त होणे, करणे; ताटातूट करणे; गाठ, बंधन इ. खुले करणे; संबंध, जोडणी, मांडणी इ. विजोड करणे. ३. सामान्यत: जाऊ देणे; असू देणे; राहू देणे; सूट देणे (कर्ज, दोष, गुन्हा इ.); हात काढून घेणे; मुक्त करणे; माफ, क्षमा करणे; सहन करणे; शरण येणे. ४. टाकणे; फेकणे; ओतणे (घाण इ.); गाळणे; निथळणे (घाम इ.). ५. शिलगावणे (तोफ, बंदूक इ.); पहा : **सुटणे.** ६. धावणे; पळवणे; दमवणे (घोडा इ.). ७. कोणत्याही धातूच्या ऊन प्रत्ययांत रूपापुढे हे क्रियापद योजल्यास ती क्रिया पूर्णपणे करणे असा अर्थ होतो. उदा. करून सोडणे, देऊन सोडणे इ. ८. प्रगट करणे : 'विश्वविकासित मुद्रा। जया सोडी तुझी योगनिद्रा।' - ज्ञा १७.१. [सं. छोट्यति; हिं. छोडन; त. वीडु]

सोडत स्त्री. शर्यत; लॉटरी, जुगार; एखाद्या वस्तूची किंमत अनेकांनी मिळून भरावी व पूर्वसंकेताप्रमाणे ज्याच्या नावे ती वस्तू निघेल त्याने ती घ्यावी असा व्यवहार; अनेकांकडून थोडे थोडे पैसे जमा करून त्यातील काही भाग चिठ्ठ्या टाकून थोड्या भागीदारांना देण्याची पद्धत. [अर. शर्ती; पोर्तु. सोर्ट]

सोडपेंढी स्त्री. गवत इ. च्या मोठ्या भाऱ्यातून विक्रीसाठी बांधलेली लहान पेंढी.

सोडमुंज स्त्री. मुलाच्या उपनयनाच्या वेळी त्याच्या कमेरला जी मुंज (गवताची दोरी) बांधलेली असते ती सोडण्याचा विधी; समावर्तन विधी; गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याची मोकळीक.

सोडमोकर स्त्री. घटस्फोट. (झाडी)

सोडमोकळ स्त्री. १. सोडून मोकळा करणे (गवताचा भारा इ.). २. काम इ. ची साधारण मोकळीक, सोडवणूक; पशू, नोकर यांच्यावर फारसा दाब न ठेवणे. ३. कर्ज, सारा इ. पैकी काही रक्कम सोडून देणे. ४. मोकळीक दिलेली विसाव्याची, फुरसतीची स्थिती.

सोडवण-वणी-वणूक स्त्री. १. मुक्तता; मुक्त होणे; सुटका; मोकळीक; स्वतंत्रता. २. मुक्ततेचा कोणताही उपाय. ३. पळवाट; छिद्र; अपवाद. ४. मळ्यातील पाटातून वाहणारे पाणी (शेलण्याने शिंपलेले नव्हे). (वा.) **सोडवून ठेवणे** – हातचा राखून ठेवणे; पळवाट काढून ठेवणे; सुटण्याच्या उपायांची तरतूद पूर्वीच करून ठेवणे.

सोडवणी स्त्री. ओळंबा : 'निवृत्तिसूत्र सोडवणियां। सर्वशास्त्रपुरवणिया। आवो साधिला मांडणियां। मोक्षरेखेचा।' - ज्ञा १८.३८.

सोडवणे हिसकावून घेणे.

सोडवणे उक्रि. १. विशेष प्रसंगी भिंतीवर आकृती, चित्रे किंवा रेघोट्या ओढणे. २. मालकाकडून काढून घेणे; मुक्त करणे. ३. उखाणा, गणित यांचे बरोबर उत्तर देणे.

सोडविणे अक्रि. वाजविणे : 'अनुहाते सोडविली जंत्रें । तीये वारेनी वाजताति विचित्रें ।।' - नरुस्व १०.३४.

सोडसांड स्त्री. कर्ज इ. ची सूट; या सुटीची रक्कम.

सोडा पु. १.सोडे. सुकवून ठेवलेला मासा. (कु.) २. पोरकिडा; अरण्यमक्षिका.- मसाप ४५.६.

सोडा पु. सुपारी वाळत घालण्यापूर्वी तिच्या दोन तीन ठिकाणी काढलेल्या पातळ साली, प्रत्येकी.

सोडा पु. एक क्षार. [इं.]

सोडावॉटर न. पाण्याच्या दबावाने 'कर्ब-द्वि-प्राणिद' मिसळून तयार केलेले फसंफसणारे पेय. [इं.]

सोडियम पु. हलके, पांढऱ्या रंगाचे, सोडा, क्षार इ. पासून नैसर्गिकरित्या मिळणारे, उद्योगधंद्यात भरपूर वापरले जाणारे व सजीवांच्या शरीरात महत्त्वपूर्ण असलेले आम्लारी मूलद्रव्य. (Na) [इं.]

सोड्याळ वि. १. चोखंदळ; खोडी काढणारा. २. ज्याचा लवकर कंटाळा येतो असा.

सोणवी स्त्री. पृथ्वी; रणभूमी : 'जैसी कां सोणवी । संग्रामी तैसा ।।' - ज्ञा [सं. क्षोणि]

सोणे सक्रि. घालणे; देणे : 'धालेया दिव्यान्न सोआवें ।' - ज्ञा १८.१४८३. अक्रि. खुपसणे; प्रवेश करणे : 'जळीं बकु जैसा । सोए' - ज्ञा १३.२४६.

सोत-ती स्त्री. गाय, म्हैस इत्यादी मादी पशूंचे जननेंद्रिय. [सं. सू = प्रसवणे]

सोत स्त्री. छडी. (गो.)

सोतरणे, सोताड(र)णे अक्रि. छडीने, फोकाने झोडपणे, मारणे. (को.)

सोत्कंठा स्त्री. कळकळ.

सोद(ध)णे सक्रि. गाळणे. (बे.) [सं. शोधन]

सोद(ध)ने न. स्वयंपाक्याचे हात पुसण्याचे फडके. [सं. शोधन]

सोदरपोट्या वि. ढेरपोट्या; मोठ्या पोटाचा. (व.)

सोदव्खार पु. विलायती मीठ; सोडा खार. - मुंव्या १७२.

सोदा-द्या-धा-ध्या, सोदडा वि. १. बदमाश; लुच्चा. २. रंगेल; स्वैर. ३. जार. (गो.) ४. लष्करातील एक लुटारू जमात. - ऐको [फा. हिं. शोहद:]

सोदाई, सोदे(धे)गिरी-शाई, सोदावे स्त्री. न. १. उडाणटप्पूपणा; लुच्चेगिरी; बदमाशी. २. रंगेलपणा; स्वैरपणा.
वि. सोद्यासंबंधी.

सोद्रा (व.) पहा : **सोदा**

सोधणी-नी स्त्री. शोध. [हिं. सोध]

सोनओळख स्त्री. दसऱ्याच्या दिवशी सोने देण्यास जेवढी ओळख पुरते तेवढीच तोंडओळख.

सोनक पु. खाटीक : 'सोनकानें उरगुढें घेतलें वैकुंठीचें ।' - शिव १६०. - महाराष्ट्र शब्दकोश. - दाते. [सं. सूना = हत्या]

सोनकळी स्त्री. सोनचाफ्याच्या कळ्यांसारखा केलेला सोन्याच्या हार.

सोनका, सोनगादी, सोनदोर-रा, सोनवादी हे शब्द 'सोंड' ने सुरू होणाऱ्या शब्दांखाली पहावेत.

सोनकाने वि. न. सोन्याचे शिखर असलेले : 'सोनकाने उरगुढें घेतलें'- शिव १६०.- प्रामको.

सोनकावळा पु. १. कुक्कुटकुंभा; भारद्वाज. २. कृष्णकावळा. (को.) ३. पांढरा कावळा.

सोनकिडा पु. काजवा; कोणताही चमकणारा किडा.

सोनकेळ स्त्री. एक उत्तम जातीची केळ.
न. सोनकेळीचे फळ. हे पिवळेधम्मक, गोड, आकाराने लहान असते.

सोनख(खा)त न. माणसाच्या विष्टामूत्राचे खत.

सोनचड-डी, सोनचि(चे)डी स्त्री. १. डोंबाऱ्याची (कोल्हाट्याची) चिमणी; खेळ करणारी बायको, बाहुली. (को.). २. एक प्रकारची चिमणी. ३. जास्त वय होईपर्यंत कुवारी राहिलेली मुलगी. (गो.)

सोनचाफा-पा पु. चाफ्याचे एक प्रकारचे झाड. त्या झाडाचे फूल. फुलाचा रंग पिवळा व वास मधुर असतो.

सोनजुई स्त्री. पिवळसर फूले येणारी जुई व तिचे फूल.

सोनटका-क्का पु. १. एक फुलझाड व त्याचे पिवळसर फूल. २. एक जुने सोन्याचे नाणे; (त्यावरून) सोन्याचा तुकडा. ३. आवडत्या मुलाला हाक मारण्याचा शब्द. ४. (विणकाम) आरसड व गोल यांच्यामध्ये अडकवलेला एक दगड.

सोनतरवड पु. पिवळ्या व तांबड्या रंगाचा तरवड. पहा : **शंकासूर**

सोनताव पु. १. घोड्याचा पाय दुखावला असता, तापलेल्या तव्यावर त्याचा तो पाय ठेवून वर पाणी ओतून दिलेला डाग. २. सोने तावावून पाण्यात न बुडवता निवू देणे. ३. खरडपट्टी काढणे; शिव्या देणे.

सोनपापडी स्त्री. तूप, साखर व बेसन यांच्या मिश्रणाने तयार केलेला गोड खाद्यपदार्थ.

सोनपावडा वि. (कुत्सितार्थी) गरीब, दुर्दैवी (माणूस).

सोनफळ स्त्री. एक प्रकारचे भात, साळ.

सोनमळी स्त्री. उसाचा रस कढविताना ढोरमळीच्या नंतर येणारी मळी.

सोनवणी न. तापवलेले सोने बुडवून तयार केलेले पाणी. हे बाळंतिणीस किंवा आजारी माणसास देतात.
पु. सोनार.

सोन(ना)वी स्त्री. निशाण; झेंडा.

सोनवेल स्त्री. १. भाताची एक जात. २. अमरवेल; आकाशवेल; दाभणाएवढी जाड, वृक्षावर पसरणारी, सोन्यासारखे पिवळ्या रंगाचे बारीक धागे असणारी, शेरावर वाढणारी वेल इ.३.(ल.) शेळी, मेंढी (यांच्या व्यापाराने बराच पैसा मिळतो यावरून). ४. नागवेल (हिच्या पानांच्या व्यापारानेही बराच पैसा मिळतो यावरून).

सोनसळा वि. १. सोनेरी रंगाचे पट्टे असलेले, रेशमी किंवा जरतारी (वस्त्र). २. पिवळसर (केस, गहू, घोडा इ.).

सोना-न्या, सोनुला, सोनुला, सोनुकला वि. लाडका (मुलगा).

सोनामुखी स्त्री. १. भुईतरवडीचा पाला. हा रेचक असतो. ढाळ होण्याकरता याच्या पाल्याचा काढा घेतात. २. सुवर्णमुखी - माक्षिक.

सोनार पु. १. सोन्याचे अलंकार घडवणारा माणूस. त्यांची एक जात. २. (ल.) लोभी, चिकू माणूस. ३. सोनाराने मारलेल्या हातोडीच्या आवाजासारखा ज्याचा आवाज असतो असा एक पक्षी. ४. एक

लहानसा सपक्ष जंतू. [सं. सुवर्णकार] (वा.) **सोनाराने कान टोचणे** – योग्य माणसाने कानउघडणी करणे.

सोनारकळी–ळ स्त्री. सोनाराचे खोटे भांडण; बहाणा; सबब.

सोनारकी स्त्री. १. सोनाराचा धंदा. २. (ल.) चौर्य करण्याचे कसब.

सोनारा वि. कबऱ्या रंगाचा (बैल इ.). (व.)

सोनारी कावा, मत सोनाराचे दागिन्यातील सोने चोरण्याचे कसब; फसवेगिरी.

सोनारी निलख भर्जरी कपडा.

सोनावणे अक्रि. सुंदर, बहुमोल होणे : 'स्वयें सोनेंपणें सोनावलासी ।' – यासं ९१८.

सोनी स्त्री. लहान मुलाचे जननेंद्रिय. (कु.)

सोने न. १. पिवळ्या रंगाचा मौल्यवान धातू. २. दसऱ्यादिवशी संध्याकाळी इष्टमित्रांना वाटतात ती आपट्याची पाने. [सं. सुवर्ण] (वा.) **काही सोन्याचा तर काही सवागीचा गुण असणे** – सोने उजळताना सवागीचा उपयोग करतात. त्यावरून एखादे महत्कृत्य घडवून आणण्यात महत्त्वाच्या गोष्टींप्रमाणेच अनुषांगिक गोष्टीचेही सहाय्य होणे, आवश्यक असणे. थोराप्रमाणे हलक्याचेही सहाय्य लागणे. **बावनकशी सोने** – १. उत्तम, ज्यात मुळीच हीण नाही असे सोने. २. उत्तम, शुद्ध वर्तनाचा, प्रामाणिक मनुष्य किंवा वस्तू. **० लागणे** – महत्त्व येणे; मोल वाढणे. **० होणे** – मरणोत्तर उत्तम गती प्राप्त होणे; चांगले, चांगल्या परिस्थितीत मरण येणे. **सोन्याचा धूर निघणे, पाऊस पडणे, सोन्याने दात किसणे** – अतिशय श्रीमंत असणे.

सोनेखैर वि. पिवळसर ताम्रवर्णी.

सोनेग्वत न.गुप्त बेत; कूटमंत्र; मेतकूट. (कु.)

सोनेरी वि. सोन्याच्या रंगाचे; सोन्याचे; आत सोने असलेले (वर्ख, शाई, कलाबूत, मुलामा, रंग, वेलबुट्टीचा कागद इ.).

सोनेरी टोळी दुसऱ्याला हरतऱ्हेने फसवून लुबाडणारी धाडशी लोकांची टोळी.

सोनेवख पु. सुवर्णपक्षी; पिवळा पक्षी : 'तैसी सोनेवखीयांची पिलीं। मधुकेसरावरी बैसली ।' – नरुस्व ७९२. [सं. सुवर्ण + वर्ख]

सोनोग्राफी स्त्री. दर सेकंदास ३५ लाखांपेक्षा जास्त तीव्रतेच्या कंपनसंख्या असणाऱ्या ध्वनिलहरी शरीरात पाठवून त्यांच्या माघारी येणाऱ्या प्रतिध्वनींच्या सहाय्याने तयार केलेले चित्र. [इं.]

सोन्नारिंग न. मोसंबे.

सोप, सोपट पु. न. १. केळ, चवेणी या झाडाची साल. २. बैलांच्या गळ्यातील घंटांचा पट्टा. (हा पूर्वी केळीच्या सोपटाचा करीत यावरून). ३. केळीचे सबंध पान, डांग. ४. दाणे नसलेले कणीस. ५. उसाचे चिपाड. ६. बाजरी किंवा ज्वारी यांच्या पिकावर पडणारी कीड.

वि. फोल; निष्फळ; व्यर्थ : 'तरीं वोसणताही बोलु तयाचा। परी सोपु वचे।' – ज्ञा ८.६. [क. सोप्पु = साल, आवरण]

सोपट वि. सडपातळ.

सोपटणे अक्रि. अशक्त होणे; झडणे; दुबळे होणे.

सोपटे पहा : **सोकटी**

सोपट्या वि. चरकातील उसाच्या चोयट्या काढणारा.

सोपणे, सोपविणे सक्रि. हवाली करणे; ताब्यात देणे; स्वाधीन करणे, दुसऱ्याकडे देणे. [सं. सम् + अर्प्]

सोपणे अक्रि. १. पहा : **संपणे**. २. मरणे. (कु.)

सोपरा वि. रोगातून बरा होण्यासारखा. 'सोपरा दिसेल तऱ्हि प्राणी : घेइजैल तो ।'– रकौ ३५१.

सोपरी वि. निमुळती.

सोपल पु. आट, पीळ दिलेला ताग, अंबाडी.

सोपवणे सक्रि. एखादे काम पुरे करण्याची जबाबदारी टाकणे. (वा.) **सोपीव काम करणे** – १. पैसे मिळवण्याच्या हेतूने काम स्वीकारणे. २. नोकरी करणे. ३. ठरवून दिलेले काम करणे.

सोपस वि. नाजूक, कोमल (स्त्री, प्राणी इ.). (राजा.)

स्त्री. हाव; लोभ; इच्छा.

सोपस्कार पु. १. अन्न, घर, शरीर इत्यादींना विशेष रुची, शोभा इत्यादी यावी म्हणून करतात ते अनेक प्रकारचे उपचार, उपाय इत्यादी; एखाद्या गोष्टीच्या पूर्णतेला लागणाऱ्या साधनांची सिद्धता, संस्कार. २. अतिशय जपणूक (बहुधा अव. प्रयोग).

वि. सर्व आवश्यक वस्तू व साधने यांनी युक्त; सर्व साहित्यांनी भरपूर. [सं.]

सोपा पु. १. घराची ओवरी, ओटी, पडवी, ओसरी; चौकाच्या बाजूची उंच जागा, लांब पडवी. २. कोठा; कोठार. ३. गोठा. [अर. सुफ्फा]

सोपा–पे वि. सुखावह; भानगडीचे नसलेले; सुलभ; अवघड नसलेले. [सं. स्वल्प]

सोपा–पे पु. न. शाईत बुडवून ठेवलेली चिंधी.

सोपाधिक वि. (चिंता, माया, संसार इ. ची) उपाधी असलेले. [सं.]

सोपाधिक दाय (विधि.) मूळ शुल्क; मर्यादित शुल्क. (इं.) क्वालिफाईड फी.

सोपान स्त्री. पायरी; जिन्याची पायरी; जिना; शिडी. [सं.]

सोपान वि. पोकळ : 'हे आसु सोपान :' – गोप्रच ५४.

सोपान परंपरा (समाज) धार्मिक कल्पनांवर आधारलेली समाजातील उच्चनीचता; धर्मगुरूंचे वर्चस्व. (इं.) हायरार्की.

सोपानमार्ग पु. सुलभ असा मार्ग, रीत; आचरणास सोपा उपाय.

सोपार वि. सुलभ; सोपे : 'तें नाम सोपारें : कृष्णगोविंद :' – ज्ञा हरि २६.

सोपारे स्वल्प. – तंजा.

सोपु वि. व्यर्थ.

सोफ वि. लटके; फोल. – ज्ञा ८.६. [हिं.]

सोफणे अक्रि. कोरडा पडणे.

सोफा पु. १. वेताने विणलेला पलंग. २. कोच. [इं.]

सोबकणे सक्रि. १. दगड इ. वर कपडा धुताना हलकेच आपटणे; चुबकणे; २. जमिनीवर दाणदिशी आपटणे; हबकणे. (ल.) माणसाला धोपटणे, मारणे, बडवणे. [ध्व.]

सोबणी स्त्री. ताटातील पातळ पदार्थ पसरू नये म्हणून त्याखाली ठेवायचे लाकडी टेकण; वटकण. [फा.]

सोब(भ)णी स्त्री. हडळीच्या बाधेमुळे शरीराला येणारी कृशता; लागीर.

सोबत स्त्री. १. मैत्री; संगत; बरोबर असणे. २. मित्र; सवंगडी. [अर. सोहबत.]

सोबतदेण्या स्त्री.अव. नवरदेवाला श्रीवंदनास नेण्यापूर्वी त्याला मांडवात आंघोळ घालण्याकरता, न्हाव्याबरोबर जाऊन पाणी आणणाऱ्या पाच कुवार मुली.

सोबती पु.१. स्नेही; मित्र; बरोबर येणारा मनुष्य; सवंगडी. २. प्रतिस्पर्धी; दडपता, दाबता मनुष्य, व्यक्ती; गोहो.

सोबनशेरा पु. जोगवा. (व.)

सोम पु. १. चंद्र. २. सोमवल्ली; तिचा रस. ३. धुपणी रोग. ४. (ल.) अमृत. वि. चुकीने (सौम्यपासून) थंड. [सं.]

सोमट–ळ, सोमाळा वि. १. कोंबट. २. सोमाल; नाजूक. [सं. सीष्मन, स + ऊष्मन् + म. ट]

सोमते–तेच क्रिवि. लागलेच; ताबडतोब; त्वरेने.

सोमरस पु. सोमवल्लीचा रस; सामान्यपणे मद्य.

सोमप वि. सोमरस पिणारा (यज्ञकर्ता, देव इ.).

सोमयाग पु. एक प्रकारचा यज्ञ. यात सोम हे मुख्य हवनीय द्रव्य असते. यात सोमरसपान होते.

सोमल, सोमलखार पु. एक प्रकारचा विषारी क्षार; याचे पांढरा व तांबडा असे दोन प्रकार. रसकर्मात श्रेष्ठ. (इं.) आर्सेनिक. [हिं. अर. सुंबुल]

सोमलता–वली–वेल १. पहा : **सोम.** २. (विनोदाने) भांगेचे झाड; भांगेपासून केलेले पेय.

सोमवती, सोमवारी वि. सोमवारी आलेली (अमावास्या). स्त्री. बायकांचे एक व्रत यात १०८ फळे ब्राह्मणाला देतात. (वा.) **०घालणे** – पुष्कळ संख्या असणे.

सोमवार–दिन–वासर पु. रविवारच्या पुढील दिवस; सोमाचा वार; दुसरा वार. – तंजा

सोमवाऱ्या तेली शंकरभक्त तेल्यांचा वर्ग. हे सोमवारी घाणा चालवत नाहीत.

सोमसूत्र न. शिवाचे तीर्थ गाभाऱ्याबाहेरील ज्या कुंडात पडते ते कुंड; गायमुख.

सोमसूत्री प्रदक्षिणा शंकराला प्रदक्षिणा घालताना वरील कुंडापर्यंत येऊन परतायचे व उलट दिशेने येऊन परत त्या कुंडापर्यंत यायचे अशी कुंड न ओलांडता केलेली प्रदक्षिणा.

सोमा(मो)सा पु. कंठी, चंद्रहार इ. अलंकारांचे निरनिराळे पदर जिथे एकत्र येतात ते टोपण, जाड तुकडा; बिरड्या जवळची जागा.

सोमासा पु. १. विड्यात ठेवलेला सुपारीचा पुडा. २. गव्हाच्या रव्याचे खाजे – सारण घालून केलेला मोठा कानवला – करंजी. – तंजा.

सोमीगोमी पु. (बायकी खेळ) फुगडीप्रमाणे दमछाकीचा खेळ; नेसलेल्या साडीच्या पदराची दोन्ही टोके दोन हातात धरून, पदर पाठीकडून डोक्यावरून पुढे घेऊन डाव्या, उजव्या बाजूस दोघींनी नाचत नाचत लवायचे व तोंडाने 'सोट मी गोट मी। छानी छकुली मथ्थुली।' – असे म्हणायचे. [गोमद्वि.]

सोय स्त्री. ओल्या नारळाच्या चवातून (किसातून) रस पिळून काढल्यावर राहिलेला चोथा. (कु.)

सोय स्त्री. १. परिस्थितीची अनुकूलता; कामधंदा, व्यापार, उदीम इत्यादींचा फायदा, फुरसत, समाधान ज्यात लाभेल अशी परिस्थिती. २. अनुक्रम, व्यवस्था लावणे; रचना करणे. ३. अनुकूलतेचे, व्यवस्थेचे साधन; उपजिविकेचे, धंद्याचे (चाकरी, वतन, शेत इ.) सुखदायक साधन, मार्ग. ४. आश्रय, आधार; विश्रांतिस्थान. – ज्ञा १७.२२९. ५. लाभ; प्राप्ती : 'किंबहूना सोये। जीव आत्मयाची लाहे।' – ज्ञा १३.१२१. ६. मेळ; जुळणी : 'आंबुला आंबुलिये। संगती ना सोये।' – ज्ञा १३. ७९. ७. अस्तित्व : 'नाहीं रूपाची जेथ सोये। तेथ दृष्टिचें कांहींचि नोहे।' – अमृ २.५०. ८. सवय : 'दिननिशी सोय मना लावणे।' – नाम ७७१. ९. गुणधर्म: 'सोय कापुरीचि माय।' – ज्ञागा ५३६. [सं. सु = चांगले + ईर = जाणे; क. सोयि] (वा.) **० करणे** – सरळ करणे; ठोकणे; चोप देणे; बडवणे. (व.) **० धरणे** – संगत धरणे. **० बसवणे** – खोडकी मोडणे. **सोयीवर येणे** – ताळ्यावर येणे.

सोयधाय स्त्री. नातेगोते. (गो.)

सोय(ये)र न. अपत्यजन्मामुळे येणारे अशौच; सुवेर.

सोयरगत स्त्री. विवाहसंबंधामुळे आलेला आप्तपणा.

सोयरा पु. लग्नसंबंधामुळे झालेला नातेवाईक; आप्त. [सं. सोदर, सहोदर]

सोयरा पु. वेश्या, बटीक इ. चा भाड्या; संभोगार्थ ठेवलेला कायमचा माणूस, जार. [सं. सहचर]

सोयरीक स्त्री. १. विवाहसंबंध; सोयरगत. २. लग्नात नवरीला दागिने घालण्याच्या वेळचा विधी.

सोयाबीन न. एक पौष्टिक धान्य. याचे तेलही निघते. [इं.]

सोर स्त्री. मातीची लहान तांबली (को.); सोरकुल (हेट).

सोर पु. डुक्कर; रानडुक्कर : 'रागद्वेषादिक सोर।' – ज्ञाप्र २६७. [सं. सूकर]

सोर(रा)गणे अक्रि.दमणे; श्रमणे. (बे.)

सोरट–ठ पु.१. अलिकडचा सौराष्ट्र, काठेवाड देश. २. (संगीत.) गाण्यातील राग. वि. काठेवाडी (माणूस); दांडगा; आडदांड. [सं. सुराष्ट्र, सौराष्ट्र]

सोरट न.१. माळ; रांग. २. चक्र. ३. गोंधळलेला समूह.

सोरट पु. सुरवंट. (वा.) **सोरटाचा काळ** – सुरवंटाची धाड आल्यामुळे पिकांचा नाश झाल्यामुळे पडणारा दुष्काळ.

सोरटा(ठा)ई स्त्री. दांडगाई; छातीठोकपणा; धिटाई.

सोरमीठ, सोरा न. पु. नायट्रिक ॲसिड व पोटॅश यांच्या मिश्रणाने बनलेला शोभेच्या दारूच्या उपयोगी क्षार. [सं.सूर्यक्षार; फा. शोरा]

सोरा–ऱ्या पु.चकल्या, शेव, कुरडया करण्याचा साचा. [क.सोर=गळणे]

सोरा पु.होमिओपॅथीतील तीन प्राकृतिक दोषांपैकी सर्वात महत्त्वाचा दोष. रोगाचे फक्त बाह्य स्वरूप वा लक्षणे नाहीशी केल्याने वा दाबून टाकल्याने निर्माण होणारा शरीरातील चिरकालीन दोष.

सोराळे न. एक भांडे; सोऱ्या (?) : 'मग निपजलीं गंगाळें । अर्धनारी सोराळें।' – कालिका २८.२८.

सोरी स्त्री. खेळातील डाव : 'हातीं सापडलें उभें बैसो नेदी कोणी । सोरीमागे सोरी घेती ओणवें करूनीं ।'–तुगा २०३.
सोरेल न सुवरतेल; डुकराचे तेल.
सोरो पु. पिण्याची दारू. (कु.) [सं. सुरा]
सोऱ्या पु. मापटे. (झाडी)
सोऱ्याबल्ल वि. अत्यंत दारूबाज.
सोल पु. अमसूल; कोकमसोल; वाळलेली साल. [क. सुलि]
सोलकढी स्त्री. आमसूलापासून केलेले थंड पेय.
सोलखंड न. नाडा; दोराचा जुंबाडा.
सोलणे सक्रि. वरील पापुद्रा, साल, कातडी इ. काढून टाकणे; टरफल, फोलपट काढणे; शेंगांतील बीज काढणे. [सं. शुल्क. क. सुलि]
सोलत स्त्री. १. सोहलत. २. रहस्य; ३. दोस्ती; जीवश्च- कंठश्च.
सोलद स्त्री. मोठी टोपली. (कु.)
सोलनारिंग न. नारिंगाची एक जात.
सोला, सोलाणा पु. हरभरा, पावटा इत्यादींच्या ओल्या शेंगातील सोलून काढलेला दाणा; शेंगदाणा.
सोलाट वि. (ल.) फटिंग; सडासोट.
सोलावा पु. गाभा.
सोलीव वि. १. वरील आवरण सोलून काढलेले. २. स्वच्छ; अंतर्गाभ्यातील; अस्सल : 'सोलींव निर्वचूं। फलितार्थुचि ।' – ज्ञा १६.१३.
सोले न. पायातील एक अलंकार. (कर.)
सोले मीठ लावून वाळवलेले मांस – तंजा.
सोलोग पृ. वृषण कापलेला डुक्कर. (कु.)
सोल्दाद पु. शिपाई. [ज. सोल्हाट; इं. सोल्जर]
सोल्याचे तेल करडईचे, भुईमुगाचे तेल.
सोव पु. अव. दुखणे, दारिद्र्य इत्यादीचे सोंग, ढोंग. (राजा.)
सोवन–ने–सोने न. पहा : **साणे**
सोवनहाट पु. सराफकट्टा; सराफा.
सोवनी पु. सोन्याचा व्यापार करणारा; सोने चांदी विकणारा.
सोवळ वि. १. नाजूक; कोमल. (को.). २. शुद्ध; पवित्र. [सं. सोमल]
सोवळा वि. १. स्नान इ. केल्याने पवित्र होणारा; शुद्ध, पवित्र, स्वच्छ, देवकार्यासाठी योग्य (वस्त्र, मनुष्य, वस्तू). २. (ल.) मोकळा; शुद्ध (लाच, गुन्हा इत्यादींपासून). ३. स्वच्छ; सुंदर (रस्ता, गाव इ.). ४. कौटुंबिक व्यवहारापासून स्वतंत्र, अलिप्त (मनुष्य). ५. सप्रवर नसलेले (लग्न इ.). (याशिवाय त्या स्त्रीने केलेला स्वयंपाक घरात चालत नसे.) [सं सुमंगल, समुज्वल]
सोवळा पु. एक प्रकारचे व्यापारी जहाज.
सोवळी स्त्री. वि. केशवपन केलेली विधवा स्त्री.
सोवळे न. १. संध्या, पूजा इ. कर्माच्या वेळी शुद्ध राहण्यासाठी नेसण्याचे इतर अमंगल पदार्थापासून दूर ठेवलेले धूत, रेशमी किंवा लोकरीचे वस्त्र.२. सोवळेपणाची स्थिती. [सं. सुमंगलम्] (वा.) ० **घेणे** – (बायकी) बाळंतिणीने महिना दीड महिन्याने सोवळे नेसून देवाचे तीर्थ घेऊन देवधर्मास योग्य होणे. ० **सोडणे** – (बायकी) रुखवताचे वेळी वराकडून वधूच्या आईला खण व लुगडे देणे.
सोवळेकरी पु. आचारी; ब्राह्मण स्वयंपाकी .
सोवा स्त्री. मनातील गोष्ट; मनसुबा.
सोवाण पु. आसन; बैठक : 'इंद्रनीळाचां सोवाणीं। वरि बैसोनि पद्मासनी' – वह १४५. [सं. सोपान]
सोवाणी स्त्री. १. पायरी; सोपान : 'करोनि अहोरात्रीची सोवाणी।' – ज्ञा ११.४२४. २. आसन.– प्रामको. [सं. सोपान]
सोवाणी ना. गणना. –ज्ञा ११.४२४.–हंको.
सोवाळे न. खिडकी: ' की द्यावा – पृथ्वीचिए पोकळी : कापुराची सोवाळी:'– रुस्व ५११.
सोवे न. दु:ख.
सोवो पु. ध्यास : 'दृष्टी फिटला संदेहो, लागे कांबळीचा सोवो।' – ज्ञागा २४८.
सोशा पु. (सोनारी) एक प्रकारचे तांब्याचे भांडे.
सोशा–सा वि. पु. सोऽसो करीत, अकस्मात येणारा, वाहणारा (वारा). [ध्व.]
सोशीक वि. सहनशील; सहिष्णू; सोसणारा; धीराचा.
सोस पु. (सोनारी) तार ओढताना, चपडाई करतांना निघालेला बारीक तंतू.
सोस पु. सहनशीलता; संयमन; सोसणे; सहन करणे. (क्रि. धरणे, करणे).
सोस पु. १. जबर हाव; तीव्र इच्छा; हव्यास . २. तहान. ३. तीव्र यत्न. – शास्त्रीको [क. सोसु]
सोसणूक स्त्री. १. पहा : **सोस**. २. जाचणूक; हालअपेष्टा भोगणे.
सोसणे अक्रि. सुकणे; कोरडे होणे : 'कां खळाळ मोटका सोसे।'– ज्ञा १५.४६६.
सोसणे सक्रि. साहणे; सहन करणे.
अक्रि. मानवणे; पचनी पडणे; प्रतिकूल न होणे (अन्न, औषध इ.) [सं. सह्=सोंसणे, च्युस्; क. सोसु]
सोसाट्याचा वि. जोराचा, वेगाने वाहणारा (वारा, प्रवाह इ.).
सोसायटी स्त्री. सभासदांना विविध कार्यकारी सेवा उपलब्ध करून देणारी सहकारी संस्था. [इं.]
सोसाळे न. सोने; धातू.–मनको.
सोसोणे उक्रि. पुन्हा पुन्हा खुपसणे. [सं.सु]
सोस्क न. मस्ती; धांगडधिंगा.
सोस्ती वि. कमाल दर, भर सारा असणारी, जिच्यावर साऱ्याची पूर्ण आकारणी करण्यात येते अशी (जमीन).
सोस्ती–स्ते स्त्री.न. भरसारा; साऱ्याची पूर्ण आकारणी.
सोह पु.संशय; दंश: 'त्यांनी आपले मनात सोह ठेवला.'– ऐको.
सोहनी पु. (संगीत) गायनातील एक राग. गानसमय रात्रीचा चौथा प्रहर.
सोहने पहा : **साणे**
सोहरणे अक्रि. योजणे; वापरणे : 'अविंधें मोतियें तेजे सुढाळें । सोहरूं जाणे तें सिहाणे।'– ज्ञागा १०८९.
सोहलत स्त्री.१.सवलत; परस्परांना सोइस्कर अशी सवड. २. सोइस्कर, सुखावह बाब, गोष्ट; सुरळीत चाललेला व्यवहार; साम. [अर.सुहलत्]

सोह(हा)ळा पु. १. आनंददायक प्रसंग; उत्सव; समारंभ. २. विवाह, मुंज इ. आनंददायक प्रसंग खेळ, मेजवानी इत्यादींनी पार पाडणे. ३.मानवी जीवनात भोगावे लागणारे, पार पाडावे लागणारे बरेवाईट प्रसंग किंवा संस्कार. [सं.सौहार्द, शुभकाल]

सोहं न. १. तो मी आहे हे ज्ञान. २. सोऽहं - हा मंत्र. [सं.सः अहम्]

सोहंकरणे सक्रि.शेतातील पिकाचे रक्षण करणे.

सोहागा-गी पु.स्त्री.सवागी क्षार; टाकणखार.

सोहागा पु. दैववान मनुष्य.-व्युको.

सोहाव वि.मधुर : 'स्वरांमाझि सोहावा । पंचमु जैसा ।'- ज्ञा १८.८३८. [सं.सुभग]

सोहे स्त्री. चर्या : 'ओळखिली बंधूची सोहे ।'- खिपु ७३.४७.

सोहोरत स्त्री. सोय; सोपेपणा; सुलभता.

सोह्यरा व त्यापासून झालेले शब्द सोयरा व त्यापासून झालेल्या शब्दांखाली पहावेत.

सोळका-क्या पु. (गुऱ्हाळ) फडातील उस आणून त्यांची पाती काढून ते चरकात लावण्यास योग्य करणारा.

सोळकी स्त्री. कामकऱ्यांचा सोळा जणांचा जथा, संच, टोळके.

सोळकीचा वि. ज्या कामाला सोळाजण लागतात असे मेहनतीचे (दगड उचलणे इ. काम).

सोळन्हाण-णे, सोळंवदण न. लग्नापासून सोळाव्या दिवशीचे वधू-वरांचे स्नान व त्यादिवशी जावयाचा करायचा मानपान.

सोळबांड(बाण)चक्रबांड(बाण) वि. उडाणटप्पू; आडदांड; अडमुठा; रानवट; खुशालचंद; निरक्षर; दांडगेश्वर. (व.)

सोळभोक-ग पु.सोळबांड.

सोळवंड-डी स्त्री. फळे, फुले यांचा १६ चा संच. स्त्रियांनी १६ ब्राह्मणांना देण्याचे एक दान. [सं.वृंद=वंड]

सोळा वि.१६ ही संख्या. [सं.षोडश-सोलह-सोला] (वा.) ० **कळी तपणे** - चंद्र सोळा कळांनी युक्त असणे; त्यावरून हातात हुकमत व पैसा भरपूर असणे. (व.) **सोळावा संस्कार करणे** - नाश करणे; अखेर करणे.-ऐको.

सोळा आणे पु. १. अव. पूर्ण रुपाया.२. (ल) सर्वश्रेष्ठ; सर्वात चांगला. वि. भरपूर; पक्के; उत्कृष्ट (माणूस, वस्तू, गोष्ट).

सोळाकिर्ली स्त्री. साळुंकी (पक्षी). (कु.)

सोळाके वि.डौलदार; वजनदार; सुढाळ : 'पाहुनि सोळाके मुक्ताफळ।' नरुस्व ३३.

सोळु(ळो)ला-ली वि. सोळा पायल्यांचा (मण, खंडी).

सोळ्या स्त्री. गोड पुरी.(अहि.)

सोक्षमोक्ष पु. काही गुंतून पडलेल्या, भिजत पडलेल्या व्यवहाराचा अनुकूल किंवा प्रतिकूल काही तरी कायमचा निकाल लावून टाकणे; सुटणूक; मृत्यू; मोकळीक; मुक्तता. [सं.मोक्ष,सोक्ष हा प्रतियोगी ध्वनिशब्द]

सोंग न. १. नाटकात घेतलेली भूमिका, वेष. २. ढोंग; बनावट वेष; नक्कल; आविर्भाव. ३.पोकळ देखावा, थाटमाट; निरुपयोगी व व्यर्थ अडचण करणारी गोष्ट. ४.लोकविलक्षण, चमत्कारिक वस्तू, प्राणी. [सं.स्वांग, समाङ्ग] (वा.) ० **आणणे, करणे** - १. हुबेहुब नक्कल, अनुकरण करणे. २.ढोंग करणे.

सोंगटी स्त्री.१. सोंगट्यांच्या खेळातला, पटावर मांडण्याचा, लहानसा, लांबट, लाकडी किंवा हस्तिदंती ठोकळा; नरद. २. कॅरमच्या डावातील काळ्या व पांढऱ्या चकत्या. [सं.सारी + काष्ठ; त. शूदु]

सोंगढोंग पु.न. १. सामान्यपणे सोंग. २. खोडसाळपणा. ३.बतावणी.

सोंगणी स्त्री. १. पिकाची कापणी, लाणी. २. कापलेल्या पिकाची पेंढी बांधणे; वेटाळणी. [सं.सम्+ संग्रह]

सोंगणे अक्रि.शेताची कापणी करणे; पीक गोळा करणे.

सोंगन स्त्री. शेताची कापणी; हंगाम.

सोंगळ वि. १. नाजुक; कोमल; सुबक. २. मृदू, सुकुमार. ३. मलीनपणाची खंत असलेला; चोखंदळ; काटेकोर. [सं. सुमंगल]

सोंगाडी-ड्या, सोंगाळ्या, सोंगी-ग्या वि.१.सोंग घेणारा; बहुरूपी. २.ढोंगी.

सोंड स्त्री.१.हत्तीचा खाण्यापिण्यासाठी वापरला जाणारा नाकासारखा लांब अवयव. २. पर्वत, दगड, ढग यांचा सोंडेच्या आकाराचा भाग; नदीचा घाट, जोते इ.च्या पायऱ्यांच्या बाजूच्या उतरत्या बंदिस्त वरवंड्या प्रत्येकी. ३. देवालयाच्या बाहेरचा, द्वारपालाच्या दोन्ही बाजूचा ओटा;अलंग. ४. मोटेचा पुढील चिंचोळा भाग. [सं. शुण्डा]

सोंडका पु.१. ओझ्याच्या जनावराच्या पाठीवरील ओझ्याखालील पोतडी, गादी. २. पहा : **सोंडगादी** २

सोंडगादी स्त्री. १. पालखीच्या दांड्याला खांद्यावर ठेवायच्या जागी जोडलेली लहानशी गादी. २. खोगीरावरील सोंडेसारखे चार कोपऱ्यांचे एक जीन.

सोंडदोर-रा-सोल पु.मोटेच्या सोंडेचा दोर; नाडा; सौंदर.

सोंडा, सोंडाळ, सोंड्या वि.सोंड असलेला (हत्ती, सोंडकिडा, मुस्कूट, टोळ); मोठे व कुरूप नाक असलेला.

सोंडी-ढी स्त्री. १.घराच्या मुख्य दरवाजाच्या दोन्ही बाजूंच्या पडव्यांपैकी प्रत्येक; देवडी : 'उत्तम दक्षिण सोंडिया दोन्ही।'-ऋ१०६. २. मुख्य दरवाजाला दरवाज्याइतकी उंच बांधलेली दोन हात लांबीची मातीची जागा, ओटा. (ना.)

सोंदडी सवदडी. - भाप्र.

सोंबट वि.कोमट.

सौकट पु. कोष्ट्याचा माग. [सं. चौकट]

सौकर्य न. सुकरता; सुलभता. [सं.]

सौकर्यत्व न. सौंदर्य :'तूं वस्त्र दसीयांचाचि पांघुर : सौकर्यत्वे दिसतोसि :'- स्मृस्थ १२२.

सौख्य न. सुखीपणा; समाधान. [सं.]

सौगंद स्त्री. शपथ. [फा.]

सौचिया पु. लहान कोयता; कोयती.

सौजन पु. सुजन व्यक्ती. (पूर्वी देशमुख, देशपांड्यांना लिहायच्या पत्रातील मायना). [सं.सज्जन, सुजन]

सौजन्य न. १. चांगुलपणा; सभ्यपणा, उत्तम वर्तणूक. २. प्रेम : 'सहसा

करू नये प्रपंचीं सौजन्य ।'-तुगा २५००. ३. विनय. [सं.]

सौदंड पु. शमीवृक्ष; शिता. - मसाप ४५.३.

सौदा पु. (नाविक) होडीच्या खालचा भाग.

सौदा, सौदासूत पु.न. १.व्यापार; व्यवहार; देवघेव; बाजारहाट; क्रयविक्रय. २. खरेदी विक्रीचा माल; जिन्नस; स्वयंपाकात वापरण्याच्या मसाल्यातील जिन्नस एकत्र. [फा.जुर्की]

सौदागर पु. व्यापारी; उदमी. [फा.]

सौदाम(मि)नी स्त्री. वीज. [सं.]

सौदावणी पहा : **सौदा** १

सौध, सौधव पु.न. राजवाडा; चुनेगच्चीचा मोठा वाडा; चुनेगच्चीचे भव्य मंदिर. [सं.]

सौधणी मोरीचे पाणी साठवण्यासाठी केलेली गार- खड्डा.- तंजा.

सौधा स्त्री. व्यभिचारिणी : 'लाठा, सौधा, सुभटा'- गरा १९.

सौनंद न. मुसळ : 'सौनंदे कामपाळे अति अतुलबळें ।'-गस्तो ५३.

सौब स्त्री.तर्क; बाजू. [अर.सौब्]

सौभाग्य,सौभ(भा)ग न. १.सौंदर्य. २. भाग्य; नशीब. ३.ज्यामुळे आपल्याला मान्यता, शोभा, प्रतिष्ठा, तेज इत्यादी लाभते असा अधिकार, विद्या, वतन, सामर्थ्य इ. ४. सवाष्णपणामुळे काजळ, शेंदूर, कुंकू, मंगळसूत्र, बांगड्या इ. वस्तू धारण करण्याचा बायकांचा अधिकार. ५. कुंकू; शेंदूर. [सं.] ०**संन्यास घेणे** – सोवळी होणे. विधवा स्त्रीने इतर सर्व सौभाग्य चिन्हांबरोबर डोक्यावरचे केसही काढणे.

सौभाग्यतंतु–तू पु.१.मंगळसूत्र. २.(ल.)नवरा.

सौभाग्यवती स्त्री.सुवासिनी स्त्री.

सौभाग्यशुंठी–सुंठ स्त्री.ज्यात प्रामुख्याने सुंठ घातलेली असते असा औषधी पाक.

सौमनस्य न.मनाचा चांगुलपणा, खंबीरपणा. [सं.]

सौमास न.(बायकी) शरीराचा नाजूक भाग.

सौम्य पु.१. सोमाचा, चंद्राचा पुत्र बुध (देव व ग्रह). २. नवखंड पृथ्वीतील एक खंड. ३. ४३ वे संवत्सर.

न. मृगनक्षत्र.

वि. १.मृदू; नरम; हलके; तीक्ष्ण नसलेले; साधे (औषध, स्वभाव, कृती, उपाय). २. शांत; स्थिर; स्तब्ध; समाधानी. ३. चंद्रासंबंधी. [सं.]

सौम्यगोल पु. उत्तरेकडील एक प्रदेश.

सौम्या स्त्री.उत्तरदिशा.

सौर पु.१. सौरमास. २. शनिग्रह.

वि. १. सूर्यासंबंधी (पूजा, उपासना इ.). २. सूर्याच्या गतिवरून गणना केलेला (दिवस, महिना वर्ष इ.). ३. सूर्याच्या उष्णतेवर, शक्तीवर चालणारे. [सं. सौर्य]

सौरदिवस पु.कोणत्याही एका स्थानाच्या याम्योत्तरावरून सूर्याच्या लागोपाठ होणाऱ्या दोन फेऱ्यांच्या मधला काळ.

सौरफलक पु. सौरऊर्जेचा उपयोग करून वीज निर्माण करताना किंवा पाणी तापवताना वापरण्यात येणारा व मुख्यत: ऊर्जेचा साठा करण्याचे कार्य करणारा मोठा फलक.

सौरभ्य न.१. सुगंध. २. कीर्ती.

सौरमान न.सूर्याच्या गतीवरून काल मोजण्याची पद्धत.

सौरमास पु.सूर्य एका राशीतून दुसऱ्या राशीत जाईपर्यंतचा काळ.

सौरराशी स्त्री.अव. राशी चक्रातील सम क्रमांकाच्या वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर व मीन अशा सहा राशी.

सौरवर्ष न.पृथ्वीला सूर्याभोवती एक प्रदक्षिणा घालण्यासाठी लागणारा काल - ३६५ दिवस, ५ तास, ४८ सेकंद.

सौरस पु.१. गोडी; प्रसाद : 'म्हणउनि मागे कंठीचा सौरस ।'-तुगा ८७८. २. संबंध :'हे कल्पनेचेनि सौरसें ।' - ज्ञा ९.९१.३.सामर्थ्य. - ज्ञा १०.६. ४. अभिप्राय : 'आता अदंभाचिया वोळखीसी सौरसु देवो ।'- ज्ञा १३. २०१. ५.योग्यता : 'तेथ सौरसेवीण जाया बुद्धि तयाची ।'- ज्ञा ६.४५९. ६. आसक्ती; हेतू; इच्छा : 'पुरवी सौरस मनींचा ।'- एभा १५६५. ७. यत्न. ८.प्रवेश : 'वनीं सौरसु नाहीं सूर्येकरा ।'-नरुस्व ८०४. [सं.]

सौरस्य, सौरहस्य न. १. सुरसता; प्रेमभाव. २. चवदारपणा. ३. मैत्री; स्नेहभाव; उत्तम प्रकारचे दळणवळण. [सं.]

सौराष्ट्र न.अफाट विस्तार; साम्राज्य; 'रात्रीच्या कदीम सौराष्ट्रात काही हात लांब पोचला आहे.'-स्यूत २६.

सौरा पु.स्वैर पुरुष: 'कर्मास्तव जालों सौरा'- ज्ञागा २९९.

सौरी स्त्री. १. स्त्रीवेषातील हिजडा. २. बेशरम, स्वैर स्त्री. ३. मुरळी. वि. निर्लज्ज. [सं. स्वैरिणी]

सौरात अतृप्तता.-तंजा.

सौर्य न.तेज.

सौवीर न.(वैद्यक) जवाची पेज आंबवून तयार केलेले पेय; कांजी.

सौष्ठव न.१.सौंदर्य; प्रमाणबद्धता; उत्कृष्टता. २. चपलता. [सं.]

सौष्ठा(ष्टा)ई स्त्री.गोडी; समेट; सलोखा : 'सारांश हे सौष्ठाई आपसांत करून योशितेस सांगावे.'-मइसा १०.११०. [सं.सुष्ठु= योग्य, चांगले]

सौहृद, सौहार्द न.मैत्री; स्नेह; आत्मियता; जिव्हाळा. [सं.]

सौळ वि.मचूळ; सवळ. (राजा.); खारट - भाप्र.

सौंगण स्त्री. स्मृतिचित्रे.

सौंदड–र–ळ पु.मोटेचा सोंडदोर.

सौंदण–णी स्त्री.१. पाणी साठवून त्यात कपडे धुण्याची, धोब्याची दगडी किंवा धातूची दोण. २. नदी; सरोवर.

सौंद(दु)री स्त्री.मीठ. (व.) [सं.सिंधु]

सौंदर्य न.सुंदरता; लावण्य; देखणेपणा; उत्कृष्ट रूप. [सं.]

सौंदर्यप्रसाधन न.१. वेषभूषा; नटणे. २. यासाठी आवश्यक गोष्टी.

सौंदर्यशास्त्र न.कलेचा सौंदर्यात्मा, कलेची तत्त्वे व सौंदर्याचे रसग्रहण यांचा अभ्यास करणारे शास्त्र.

सौंदळ, सवंदळ न.सैन्य : 'सौदळीं भांडतां मग कणकीला मीठ किती ।'- ऐपो ९२. [सं. सम + दल]

सौंधव न.सैंधव.

स्कंध पु.१. खांदा. २. झाडाची फांदी; शाखा. ३.पुस्तकाचे प्रकरण, भाग. ४. ज्ञानाच्या पाच शाखा. ५. सैन्याचा व्यूह. ६. समूह;

समुदाय. ७. एक वृत्त. ८. राज्यारोहणास आवश्यक असलेली कोणतीही वस्तू (चवरी, गंगोदकाचा घट). ९. (वा. व्या. वि.) ठेव. [सं. स्कंध् = जाणे]

स्कंभ पु.(वा.वे.) रकाना; खाना.

स्कूटर स्त्री. पेट्रोलवर चालणारे दुचाकी यांत्रिक वाहन. [इं.]

स्क्रीन पु.१. सिनेमा, दूरदर्शन, संगणक अशा ठिकाणी चित्र किंवा आकृती दाखवणारा पडदा. २. आडोशासाठी पडदा. [सं.]

स्क्रू पु.आटे पाडलेला खिळा; मळसूत्र. [इं.]

स्खलदगी स्त्री.तोतरेपणा; अडखळण्याचा दोष : 'माधवराव यांचे वाणीस लहानपणापासून स्खलदगी होती.'- विंचू इ. २३२.

स्खलन न.१. अडखळणे; घसरणे. २. ठिबकणी; पडणे; गळून पडणे. ३. वीर्यपात. ४. (ल.) बोलताना अडखळणे; तोतरे बोलणे. ५. नीतिबाह्य, धर्मबाह्य वर्तन करणे. [सं.]

स्खलित वि.१.दोषी; पापी; दुर्वर्तनी. २.चुकलेला; अडखळलेला. [सं.]

स्छान, स्छानह न. विश्वस्त : 'स्छानहापासौनि वेष्टि घेणे नाही'- पातोडा शिला १.२-३. [सं.]

स्टुडिओ पु.१. छायाचित्रकार किंवा चित्रकार यांची काम करण्याची जागा. २. चित्रपट चित्रित करण्याची व त्यावर इतर सर्व तांत्रिक प्रक्रिया करून तो पूर्ण करण्याची जागा. [इं.]

स्टूल न. तिपाई; उंचावर ठेवलेल्या वस्तू काढण्यासाठीचे साधन. [इं.]

स्टेनलेस स्टील ७३% लोखंड, १८% क्रोमियम, १% कार्बन, ८% निकेल असलेला, न गंजणारा, डाग न पडणारा मिश्र धातू. [इं.]

स्टेन्सिल स्त्री.ज्यावर इष्ट आकृती खोदून (कापून) काढल्या आहेत असा धातूचा पातळ पत्रा किंवा कागदाचा तुकडा. [इं.]

स्टेपनी स्त्री.आयत्यावेळी उपयोगी पडावे म्हणून गाडीत ठेवलेले जास्तीचे चाक. [इं.]

स्टँप पु.पोस्टाचे वा महसुली तिकीट. [इं.]

स्टँप पेपर पहा : **मुद्रांकित करारपत्र**

स्टँपव्हेंडर पु. मुद्रांकित करारपत्र विकणारा व मजकूर योग्यप्रकारे लिहूनही देणारा मनुष्य. [इं.]

स्टोव्ह पु.तेल किंवा गॅस यासारख्या इंधनावर चालणारी चूल, शेगडी. [इं.]

स्ट्रायकर पु.कॅरमच्या खेळात सोंगट्या पॉकेटमध्ये घालण्यासाठी वापरतात ती गोल गुळगुळीत चकती. [इं.]

स्ट्रेचर पु. रोग्याला उचलून नेण्यासाठी वापरतात ते दोन दांड्याना कापड जोडलेले साधन. [इं.]

स्ट्रॉ पु.पेल्यातील किंवा बाटलीतील पेय तोंडात ओढून घेण्यासाठी वापरतात ती कागदाची किंवा प्लॅस्टिकची नळी. [इं.]

स्ट्रॉबेरी स्त्री. एक वनस्पती व तिचे फळ.

स्तन पु.१.स्त्रीच्या शरीरातील दूध देणारा अवयव; थान; आमा. २. सड; आचळ. [सं.] (वा.)० **देणे** – थानातील दूध पाजणे.

स्तन्य न.थानातील दूध. [सं.]

स्तपन न.१. तर्पण.२. अभिषेक : 'देवतेसि स्तपन केले:'-लीचपू ४२४.

स्तबक पु.१.घोस; झुबका. २.ग्रंथाचा विभाग. [सं.]

स्तब्ध वि.१. थांबलेला; गती बंद पडलेला; स्थिर; अडथळा आलेला किंवा केलेला; निश्चल; नि:शब्द; खोळंबून राहिलेला. २. मनाचा कणखर; निश्चयी; न नमणारा. ३. ताठरलेला; अवटरलेला. ४. मन, शरीर यांची गती, शक्ती कुंठित झालेला. [सं. स्तंभ्= रोध करणे]

स्तब्धक, स्तब्धकर वि. थक्क करणारी गोष्ट.(इं.) स्टंट.

स्तर पु.१.थर; पडदा. २. अति पातळ थर. [सं.]

स्तरफलक पु. पातळ फळ्यांचे एकावर एक थर चिकटवलेली फळी, तक्ता. (इं.) प्लायवुड.

स्तव शअ. साठी; करिता; कारण; मुळे; बद्दल. [सं.]

स्तव, स्तवन पहा : **स्तुति–ती** [सं.स्तु]

स्तवणे सक्रि. स्तवन, वर्णन, वाखाणणी करणे. [सं. स्तु]

स्तवणे अक्रि. अस्त पावणे : 'हा वैरिया मीनला दिसु : केधवां स्तवैल:' – रुस्वन ४४५. [सं. अस्त]

स्तवनीय, स्तव्य पहा : **स्तुत्य**

स्तंब पु.१. घोस; झुबका; घोसदार झाड. २. समूह; कांड. ३. अणुरेणू. [सं.]

स्तंभ पु.१. खांब; सोट. २.थांबलेली स्थिती; स्तब्धता : 'सूनिस्तंभु चालया।'- ज्ञा १८.१५५४.३.लघवी, वीर्य यांचा अटकाव; भीती वगैरेमुळे स्तब्ध होणे; मती, जाणीव गुंग होणे. ४. अडथळा; अटकाव; जडता. ५. वृक्षाचे खोड. ६. अष्टसात्विक भावांपैकी एक भाव. ७. वर्तमानपत्रातील रकाना, सदर. ८.एक अढळ तारा : 'खलाशांच्या मते ध्रुवताराही किंचित विचल असून स्तंभ मात्र पूर्ण अविचल आहे.'- चित्रमयजगत एप्रिल १९३७. [सं.]

स्तंबणे अक्रि.वाढण्याचे थांबणे : 'हटे वय स्तंबे:'- लीचपू १९५.

स्तंबा स्त्री.खिळवून टाकणारा दृष्टिक्षेप :'स्तंबेते न विसंबे नेत्र विळासु :'- मूप्र २१७०.

स्तंभक न.मलादिकांना बंद करण्याची क्रिया; अशी क्रिया करणारे औषध. वि.(रेच, प्रवाह इ.) थांबवणारे (औषध). [सं.]

स्तंभणे सक्रि.आवरून धरणे.

स्तंभन न.१. थांबवणे; अटकविणे; गती बंद पाडणे; प्रतिबंध. २. पहा : **सप्तोपचार.** मंत्र, जादूटोणा यांनी गती बंद पाडणे; इंद्रियांचे चलन वलन बंद पाडणे; नियमन; निग्रह. ३. बंद पाडण्याचे कोणतेही साधन. ४. वीर्य लवकर न पडणे; वीर्यस्खलन होऊ नये म्हणून घेण्याचे औषध, साधन.

स्तंभरोपण न.विवाहमंडपात विधिपूर्वक मुहूर्तमेढ रोवण्याचा विधी. – लविसो १३.

स्तंभविणे सक्रि. उचकावणे; रागास आणणे. [सं. स्तंभ]

स्तंभालेख पु.आकड्यात दिलेली माहिती आलेखकागदावर खांबासारख्या आकृतींनी दाखवणे.

स्तंभिका स्त्री.१.पृष्ठभागावर पडलेल्या प्रकाशकिरणाच्या आपाती बिंदूपाशी काढलेली लंबरेषा. २. जमीन भुसभुशीत असते तेव्हा पाया

पक्का करण्यासाठी तळाशी घातलेले सिमेंटचे मोठे ठोकळे (ब्लॉक्स).

स्तिमित वि.मंद; आळशी; स्थिर; मठ्ठ; मद्दड; जड.
क्रिवि. चकित. [सं.]

स्तिमिताई स्त्री.मंदपणा; जडपणा; मद्दडपणा.

स्तुति–ती स्त्री. वर्णन; गुणवर्णन; प्रशंसा; स्तोत्र. [सं.स्तुति]

स्तुतिपाठक पु. १. भाट; प्रशंसा करून श्रोत्यांच्या अंगी धैर्य उत्पन्न करणारा माणूस; वैतालिक. २. खुशामत करणारा.

स्तुत्य वि.स्तुती करण्यास योग्य; प्रशंसनीय; वाखाणण्याजोगे. [सं.]

स्तूप पु. बुद्धाच्या अवशेषांवर बांधलेली विशिष्ट आकाराची इमारत. [सं.स्तूप = ढीग घालणे]

स्तूपक पु.१.टेकाड. २. थडगे.

स्तेय न.चोरी; उचलेगिरी. [सं.]

स्तोता वि.स्तुती करणारा. [सं.]

स्तोत्र न.१. स्तुती; स्तवन. २. देवता, गुरू इ. च्या प्रशंसापर रचना.

स्तोम पु.१. रास; ढीग. २.संच; जमाव. समुदाय (चराचर वस्तूंचा). न. मंडळ; समाज; टोळी; संघ; समूह. [सं.ष्टुभ् = थांबवणे]

स्तोम पु.१. बडेजाव; पोकळ अभिमान; गर्व; स्तुती. २.एक संस्कार. उदा. व्रात्यस्तोम. [सं.स्तु = प्रशंसा करणे]

स्त्री स्त्री.१.बायको; मादी. २.पत्नी; स्वत:ची बायको; भार्या. ३. स्त्रिलिंगी शब्द, वस्तू. ४. फळे येणारी वेल, झाड इ.[सं.] (वा.) **स्त्रीचे सोने होणे** – उतारवयात स्त्रीने पतीच्या आधी मरणे.

स्त्रीकोश पु.(कृषि) फलधारणेस आवश्यक असे वनस्पतीचे भाग.

स्त्रीधन न.१.स्त्रीची हक्काची मालमत्ता; लग्नाचे वेळी मिळालेले दागदागिने किंवा आईवडिलांकडून मिळालेले धन इत्यादी. याच्यावर तिचा पूर्ण हक्क असतो. २. पतिनिधनानंतर पत्नीला तिच्या मृत्यूपर्यंत असलेला मालमत्तेचा हक्क. [सं.]

स्त्रीधर्म पु. १. स्त्रीची मासिकपाळी. २. लज्जा, विनय इ. स्त्रीचे गुण.

स्त्रीपिंड पु. फुलाच्या पुंकेसरातील परागाशी पुनरुत्पत्तीसाठी एकजीव होणारा स्त्रीकोशातील पदार्थ.

स्त्रीमुक्ती स्त्री.समाजात स्त्रियांना मिळणारी कमी दर्जाची व असमान वागणूक यामुळे होणाऱ्या अन्यायापासून मुक्तता.

स्त्रीयुग्मक न. प्रजजनात सहभाग घेणारी मादीपेशी.

स्त्रीरोग पु.प्रदररोग; धुपणी; निरंतर रज:स्रावाचा विकार.

स्त्रीलिंग न.(व्या.) नामाच्या तीन लिंगांपैकी ज्या नामार्थाचा परामर्ष ती, ही इ. सर्वनामाने होतो ते नाम.

स्त्रैण न. स्त्रीत्व.
वि. १. बायक्या. २.स्त्रीसंबंधी (व्यवहार). [सं.]

स्थ प्रत्यय. राहणारा; वास करणारा. उदा. गर्भस्थ,ग्रामस्थ.

स्थगन न. तहकुबी.

स्थगित वि.कुंठित; दिरंगाईवर पडलेले; लांबलेले; पुढे, लांबणीवर टाकलेले; आहे त्याच परिस्थितीत ठेवलेले.

स्थल–ळ न.१. जागा; ठिकाण. २. मोबदला; ऐवज. ३.मुद्दा; प्रयोजन : 'एथ अविद्यानाशु हें स्थळ ।'– ज्ञा १८.१२४३. ४. शेतांचा एक डाग. ५. हुद्याची, कामाची, अधिकाराची जागा. ६. जमीन. ७.उपवर मुलीला देण्यायोग्य वर, ठिकाण. [सं.ष्टल् = थांबणे; स्था + थांबणे.]

स्थलअभियंता पु. विमानतळावर विमानांची देखभाल व दुरुस्तीचे काम करणारा तंत्रज्ञ. (इं.) ग्राऊंड इंजिनिअर.

स्थलचर वि. जमिनीवर राहणारा, वावरणारा (मनुष्य, पशु इ.).

स्थलशुद्धी स्त्री.१.अपवित्र जागा मंत्रादिकांनी पवित्र करणे; सडासंमार्जन. २. प्रवासातील तळशोधणी. [सं.]

स्थलसेना स्त्री. जमिनीवर युद्ध करणारी सेना, सैनिक.

स्थलांतर न.एका जागेवरून दुसऱ्या जागेवर रहायला, व्यवसाय करायला जाणे; दुसरी जागा पहाणे; थारेपालट. [सं.]

स्थविर वि. म्हातारा; वृद्ध. [सं.]

स्थळप्रत स्त्री.आपल्याजवळ ठेवण्याची प्रत; कार्यालयीन प्रत.

स्थाणु पु. न.१.खांब. २. खुंटा; काठी; झाडाचे खोड; मेढ. ३. दहावा रुद्र.
वि. भक्कम; स्थिर; गच्च. [सं.]

स्थातव्य न.थोडा वेळ मुक्काम, वस्ती.
वि. ठेवण्याजोगा; नेमण्याजोगा; गच्च बसविण्यास, निश्चित करण्यास, ठरविण्यास योग्य. [सं.स्था = राहणे]

स्थाता वि. १. उभा राहणारा; थांबलेला. २. व्यापलेला. [सं.]

स्थान न.१. जागा; स्थळ; ठिकाण; राहण्याची जागा. २. दिशा; स्थानिक परिस्थिती. ३. योग्य काळवेळ; हंगाम; प्रसंग; संधी. ४. एखाद्याच्या ऐवजी असणे. ५. (व्या.) जेथून वर्णोच्चार होतो तो तोंडाचा भाग. ६. (महानु.) तीन, सात किंवा पंधरा दिवस वस्ती. ७. शेत जमीन : 'खंडपला स्थानिचा भाग १'–रनवड शिला १८.८. राजसभा. [सं.स्थानम्, स्था]

स्थानक न. १. देऊळ; देवालय. २. मठ; उपाश्रय. ३. आगगाडीचा थांबा, स्टेशन; ठाणे; वाहने थांबण्याची जागा.

स्थानच्युत–भ्रष्ट वि. जागा, अधिकार यापासून ढळलेला, काढून टाकलेला.

स्थानपती पु.मिरासदार.

स्थानबद्ध वि.(कायदा) एकाच ठिकाणी डांबून ठेवलेला; ज्याला ते स्थान सोडून कुठेच जाता येत नाही असा; (इं.) डिटेन्ड.

स्थानसंख्या स्त्री.गणित किंवा भूमिती श्रेढीतील पदांची संख्या.

स्थानापती पु. स्थानाचा स्वामी; इष्टदेवता.

स्थानापन्न वि.स्थानावर बसवलेला, बसलेला. (क्रि. होणे).

स्थानिक, स्थानीय वि.१.स्थळ, जागा, हुद्दा, स्थिती इत्यादीं संबंधी. २. त्या त्या ठिकाणी होणारा, पिकणारा; काही विशिष्ट स्थानासंबंधीचा.

स्थानिक वेळ आपण जेथे राहतो, तेथील रेखावृत्तावर सूर्य डोक्यावर आला म्हणजे दुपारचे बारा वाजण्याची वेळी.

स्थानिक स्वराज्य नगरपालिका; गावसभा.

स्थानी स्त्री.सभा. [सं. अस्थानी, स्थान]

स्थापक वि.१. ठेवणारा; स्थापन करणारा; बांधणारा; दगड, खूण वगैरे घालणारा. २. स्थापना, उभारणी करणारा, पाया घालणारा, रचणारा. ३. नियमन करणारा; आज्ञापक; ठरविणारा; निश्चित करणारा. ४. सिद्ध, खरे, शाबित करणारा.

स्थापणे अक्रि.१.ठेवणे; लावणे; रचणे; गच्च बसवणे. २. उभारणे; व्यवस्था लावणे. ३. सिद्ध करणे. ४. एकाग्र करणे (मन, चित्त वगैरे). ५. रचणे; पाया घालणे. [सं.स्था = राहणे]

स्थापत्य न. बांधकाम.

स्थापत्यशास्त्र न. इमारती, पूल, सडका वगैरे बांधण्याचे शास्त्र; गृहशिल्पशास्त्र.

स्थापना–न स्त्री. न. १. रचाई; उभारणी, संस्थापन; व्यवस्थित योजना. २.निश्चय; शाबिती. ३.नियमन; आज्ञापन; निश्चिती. ४. प्राणप्रतिष्ठा (देवतेची); उपास्य दैवतावर चित्ताची एकाग्रता; मनाची स्थिरता, दृढता. ५.गर्भारपणातील एक विधी. ६. पुंसवन संस्कार.

स्थाय पु. (संगीत) रागाचा अंश; स्वरयुक्त थोडा स्वरसमूह. [सं. स्था=थांबणे]

स्थायिक,स्थायी वि.१. राहणारा; मुक्काम किंवा वस्ती करणारा; टिकाऊ; कायमचा; स्थिर. २. रागाचे स्वरूप व्यक्त करणारा (चीजेचा पहिला भाग). (वा.) **स्थायिक होणे** – एखाद्या देशात, प्रदेशात, गावात कायमची वस्ती करणे.

स्थायिभाव पु. १. (साहित्य) विभाव, अनुभाव व व्यभिचारी भाव यांच्या योगाने व्यक्ततेप्रत आल्यामुळे ज्या मनोविकारास रस ही संज्ञा प्राप्त होते तो मनोविकार. २. कायमची स्थिती.

स्थायीदान न. नेमणूक; वर्षासन.

स्थायी वर्ण (संगीत)रागातील थांबून थांबून पुन्हा पुन्हा म्हटला जाणारा स्वर.

स्थायी समिती महानगरपालिकेची सर्वात महत्त्वाची, आयुक्त आणि महानगरपालिका यांच्यातील दुवा असणारी, कार्यकारी मंडळासारखे स्वरूप असणारी समिती.

स्थायू पु. निश्चित आकार व आकारमान असलेला पदार्थ.

स्थाली स्त्री. थाळी; थाळा; ताट; अन्न शिजवण्याचे भांडे. [सं.]

स्थालीपाक पु.गृहस्थाश्रमी त्रैवर्णिकाने गृह्याग्नीवर करावयाचा याग; होमाकरता भात शिजवणे.

स्थालीपुलाकन्याय पु. शितावरून भाताची परीक्षा करणे. थोड्याशा नमुन्यावरून संपूर्ण वस्तूचा, घटनेचा अंदाज बांधणे.

स्थावर न. न हालविता येणारी मालमत्ता; घर वगैरे स्थिर संपत्ती. वि.१. न हालणारे; स्थिर; खिळलेले; निश्चल; हलविण्यास अशक्य. २.(वैद्यक.) वनस्पतीजन्य. [सं.]

स्थावरणे अक्रि. १. स्थिर, कायम राहणे; आधार, पाया, आश्रय मिळवणे. २. गेलेली पत, शक्ती परत मिळवणे; प्रस्थापित करणे.

स्थावरविष न.खनिज किंवा वनस्पतींचे विष.

स्थित वि. असलेले; थांबलेले; उभे असलेले, राहिलेले; बसलेले. [सं.स्था = राहणे]

स्थितप्रज्ञ वि. ज्याची बुद्धी स्थिर झाली आहे असा; सिद्ध; जो सुखामुळे किंवा दु:खामुळे विचलित होत नाही असा.

स्थितांबर पु.भूपृष्ठापासून सुमारे ५० किलोमीटरपर्यंत असलेला, वाफेचे प्रमाण कमी असलेला व ओझोनवायूयुक्त असलेला थर. [सं.]

स्थिति स्त्री. हकिकत.

स्थिति–ती स्त्री.१. राहणे; उभे राहणे; थांबणे; अवस्था; दशा; रीत; तऱ्हा; परिस्थिती; वास. २. विश्वाच्या उत्पत्ती, स्थिती, लय यातील अवस्था; मधली अवस्था. ३. स्थिरपणा; सातत्य; अस्तित्व. ४.(ज्यो.) ग्रहणाचा स्पर्शापासून मोक्षापर्यंतचा काळ. ५.रक्षण. – हंको. [सं. स्था = राहणे] (वा.) **स्थितीवर येणे–असणे** योग्य स्थानी, ठिकाणी, जागी, अवस्थेपर्यंत येणे, असणे.

स्थितिरीती स्त्री.चालचलणूक; वागणूक; आचरण; नीतिमर्यादा. [सं.]

स्थितिशास्त्र न.पदार्थांच्या स्थिर अथवा चर अवस्था आणि पदार्थांना गतिमान किंवा गत्युन्मुख करणाऱ्या शक्ती यांचे विवेचन करणारे शास्त्र; विशिष्ट परिस्थितीत अन्य परिस्थिती स्थिर राहून एकच घटक बदलल्यास काय परिमाण होतील याचा अभ्यास करणारे शास्त्र. (इं.) स्टॅटिक्स. [सं.]

स्थितिस्थापक वि. लवचिक; ताणल्याने लांब होऊन ढिला सोडल्यावर पुन्हा पूर्वस्थितीवर येणारा.

स्थित्यंतर न.अवस्थांतर; उलथापालथ; परिस्थितीतील बदल; फेरबदल.

स्थिर वि.१. कायम; निश्चित; स्तब्ध; शांत; न हालणारे; मजबूत; बळकट. २. एकाच ठिकाणी कायम राहणारा. ३. विश्वासू; नेहमीचा. ४. शांत; थंड; समाधानी वृत्तीचा. ५.अचंचल; फरक न पडणारा (दिवस, नक्षत्र); जी नक्षत्रे, राशी किंवा वार चालू असता हाती घेतलेले कार्य लवकर पूर्ण होत नाही व पूर्ण झाल्यास लवकर नष्ट होत नाही, असे नक्षत्र, रास किंवा वार, उदा. रोहिणी नक्षत्र, वृषभादिराशी, रविवार इत्यादी. ६. पहा : **स्थावर** [सं.]

स्थिरग्रह पु. शनी. याची गती फार मंद असल्याने तो स्थिर वाटतो. [सं.]

स्थिर चित्र न. (छायाचित्रण व चित्रकला) वस्तूंचे चित्रीकरण; (इं.) स्टिल लाईफ.

स्थिर चिन्ह न. सर्वेक्षण करताना किंवा बदलांचा अभ्यास करण्यासाठी जी गोष्ट, स्थिती आधारभूत धरतात आणि जिच्या संदर्भात पुढील बदलांची तुलना केली जाते, अशी स्थिती वा गोष्ट.

स्थिरता स्त्री. निश्चलता; शाश्वतता; स्थैर्य; मजबुती; निर्धास्तपणा; पक्केपणा; विश्वासूपणा; थंडपणा; शांतपणा (मनाचा). [सं.]

स्थिरनाट्य न.मोठ्या चित्रांच्या सहाय्याने उभी केलेली ऐतिहासिक किंवा महत्त्वाची घटना.

स्थिरबुद्धि–द्धी स्त्री.१. मन, स्वभाव यांचा कायमपणा, समतोलपणा, स्थिरता; दृढबुद्धी. २.(ल.) मंदबुद्धी; जडबुद्धी. वि. अशी बुद्धी असलेला.

स्थिरवार पु. शनिवार.

स्थिरभाष पु. वि. ज्याचा जोड जमिनीखालून घेतलेला असतो असा दूरध्वनी.

स्थिर भांडवल उत्पादन क्रियेत पुन: पुन्हा वापरता येणारी व दीर्घकाळ टिकणारी अशी मानवनिर्मित साधने. (उदा. यंत्रे, इमारत, फर्निचर इ.); स्थायी भांडवल; स्थिर पुंजी.

स्थिरवृत्ति–त्ती स्त्री. कायम टिकणारा मनोभाव. (इं.) ॲटिट्यूड.

स्थिरवेळ–ळा स्त्री. एखाद्या कामाला आरंभ केला असता ते मंदगतीने चालते व कायम टिकून राहते अशी वेळ. रात्रीच्या किंवा दिवसाच्या ३० घटिकांच्या आठ विभागांपैकी आठवा विभाग. पहा : **वेळ** ७

स्थिरस्थावर न. शांतता; स्तब्धता.
वि. शांत; सामसुम; स्वस्थ; स्तब्ध; गडबड संपून शांत झालेले.

स्थिरावणे अक्रि.१.स्तब्ध, शांत, निश्चल होणे. २.थांबणे; खंड पडणे.३. विसावा घेणे; राहणे; टिकणे.
सक्रि. १.स्थिर, शांत करणे; मजबूत करणे. २. बंद पाडणे; प्रतिकार करणे. [सं.स्थिर]

स्थीत पहा : **स्थित** [सं.]

स्थूणा स्त्री. (उ.यं.शा.)एक टोक निमुळते असलेला खांब. (हा पुलाला आधार देण्यासाठी नदीच्या पात्रात रोवतात.)

स्थूल–ळ वि.१. मोठा; जाडा; थोर. २.ओबडधोबड; अगडबंध; अगडबंब; मोठा व खडबडीत, लठ्ठ. ३. ठोकळ; ढोबळ. ४.दाट; गर्द. ५. जड; मंद; मूर्ख. ६.जड दृश्य; साकार. [सं. स्था = राहणे]

स्थूलदृष्टी स्त्री. मनुष्यदृष्टी; अज्ञानदृष्टी; मायिकदृष्टी : 'स्थूलदृष्टीची जवनिका फेडिली।' – ज्ञा ११.१२१.२. देहच आत्मा असे मानणे; जड दृष्टी.

स्थूलमान न.१. ढोबळ माप, अंदाजी मोजमाप; तर्क. २. दीर्घ कालमर्यादेने मोजणे, गणना करणे. ३. पहा : **आकारमान;** ठोकळमान.

स्थूलवाद पु.आत्मा हेच शरीर असा वाद.

स्थूलसूक्ष्म न.१. विश्व; सृष्टी; जगत् : 'ते कर्ता कर्म कर्मफळ। ये त्रिपुटी येकी केवळ। वांचूनि कांहीचि नसे स्थूळ-। सूक्ष्मीं इये ।'– ज्ञा १८.८११. २.पंचभूतात्मक जड व वासनात्मक लिंगशरीर.
वि. थोर व लहान; जड व अजड.

स्थैर्य न. पहा : **स्थिरता**

स्नपन न. स्नान.

स्नव न. तवकील.

स्नात वि. स्नान केलेला. उदा. सुस्नात.

स्नातक पु.१. सोडमुंज झालेला, ब्रह्मचर्याश्रमात विद्या संपादन करून गृहस्थाश्रम घेण्यास तयार झालेला पुरुष. २.पदवीधर.

स्नान न.१. अंग धुणे; आंघोळ; न्हाणे. २. अभ्यंग स्नान करणे. [सं.स्ना=अंगधुणे] (वा.) ० **सांगणे** – जेवणाची वेळ झाली म्हणून निमंत्रितांना स्नानाची सूचना देणे. (को.)

स्नानसंग्रह पु.विधियुक्त स्नान. [सं.]

स्नानसंध्या स्त्री. १. स्नान, देवपूजा, तर्पण इ. २.(ल.) लाचलुचपत. [सं.]

स्नायु–यू पु.अवयवांच्या चलनवलनास उपयोगी पडणारा शरीरातील मांसल भाग; प्राण्याला गती, चलनवलन यांची शक्ती देणारा व वाटेल तेव्हा संकुचित किंवा ढिला करता येण्यासारखा शरीरातील तंतुयुक्त भाग. [सं.]

स्निग्ध वि. १. तेलकट; चरबीयुक्त; तुपट; ओशट. २. चिकटणारा; तुळतुळीत. ३. मृदुत्व, मऊपणा आणणारे (औषध). ४. सौम्य; प्रेमळ; स्नेहाळ. [सं.]

स्नुषा स्त्री. सून. [सं.]

स्नेह पु. १. तेल, चरबी इ. ओशट पदार्थ. २.एकत्र, एकजीव होण्याचा धर्म; स्निग्धता. ३. मैत्री; प्रेम. [सं. स्निह्= चिकटणे]

स्नेहन न.१. मर्दन; चोळणे. २.(वैद्यक) तेलकट पदार्थ चोळणे.

स्नेहबुद्धी स्त्री. १. शीघ्र स्मरणशक्ती. २. मित्रत्व; प्रेम.
वि. १. तीव्र स्मरणशक्ती असलेला. २. मायाळू; दयाळू; प्रेमळ.

स्नेहवस पु. स्नेहशीलता: 'तुझा पाहुनि स्नेहवसु : कैचा उपपती पैसु:'– ज्ञाप्र ११०२. [सं. स्नेह+वश]

स्नेहाकर्षण न. एकाच प्रकारचे दोन परमाणु एकत्र ठेवणारी शक्ती.

स्नेहाळ–ळू वि.१.तेलकट, चरबीयुक्त पदार्थ जास्त असलेला.२. ममताळू; प्रेमळ.

स्नेहांकित वि. (पत्रलेखनात) स्नेही; मित्रत्व असलेला.

स्नेही पु. मित्र; सखा.
वि. १. मित्रत्वाचा; मैत्री असलेला; प्रेम असलेला. २. तेलकट; चरबीयुक्त.

स्पर्धक पु. ईर्षेने बरोबरी, चढाओढ करणारा.

स्पर्धणे अक्रि. चढाओढ, वरचढपणा, मत्सर करणे; ईर्षेने बरोबरी करणे. [सं. स्पर्ध]

स्पर्धा स्त्री. मत्सर; ईर्षा; वरचढ होण्याची इच्छा; चढाओढ.

स्पर्धारोधन न.एखाद्या खेळाच्या स्पर्धेत गुणक्रमाने एकामागून एक खेळाडू गळत जाणे– स्पर्धेतून बाहेर जाणे.

स्पर्श पु.१. शिवाशीव; संसर्ग; भिडणे. २. स्पर्शाने जाणून घेण्याची क्रिया. ३. संपर्क; संसर्गाची जाणीव. ४. वस्तूतील संसर्गाचा गुण; संयोग. ५. 'क, ख'पासून 'भ, म' पर्यंत पहिल्या पाच वर्गातील कोणतेही व्यंजन. ६. परीस; स्पर्शमणी. ७. लवलेश; भाग; अंश. ८. हवा; वारा. [सं.स्पृश]

स्पर्शणे सक्रि. शिवणे; धक्का लागणे, लावणे.

स्पर्शरिषा, स्पर्शिका स्त्री. वर्तुळाच्या परिघाला एका बिंदूत मात्र स्पर्श करणारी सरळ रेषा;वर्तुळाच्या प्रतलातील वर्तुळाचा एक व फक्त एकच बिंदू समाईक असतो, अशी रेषा.

स्पर्शवर्ण पहा : **स्पर्श** ४

स्पर्शस्नान न.ग्रहण लागण्याच्या वेळची आंघोळ.

स्पर्शास्पर्श पु.सोवळेओवळे किंवा सामाजिक उच्चनीच यांची परस्पर शिवाशिव.

स्पष्ट वि.१. स्वच्छ; साफ; उघड; असंदिग्ध; रोखठोक. २. तंतोतंत; बिनचूक (भविष्य, जमाखर्च इ.). [सं.स्पश् = व्यक्त करणे]

स्पष्टग्रह पु. राशिचक्रातील ग्रहाचे राशिचक्रारंभापासून अंतर काढणे. (क्रि. करणे.)

स्पष्टपरिधि–धी पु.पृथ्वीची अक्षांशरेखा.

स्पष्टीकरण न.विवरण; उघड करणे; अर्थ व उदाहरणे देऊन पटवणे. (एखादा विचार, सूत्र इ.).

स्पंज पु. न. १. समुद्रातील किड्यांपासून उत्पन्न झालेला, सच्छिद्र, मऊ, स्थितिस्थापक पदार्थ. २. भिंतीच्या प्लॅस्टरवर शेवटचा हात फिरवण्यासाठी वापरतात तो पदार्थ. [अर.इस्फंज;फा.इस्पंज]

स्पंद पु.१. थरकाप. २. नाडी. ३. (विज्ञान) एका मागून एक येणाऱ्या लहरी. उदा. नादलहरी.

स्पंदणे अक्रि.हालणे; थरथरणे; फुरफुरणे. [सं.]

स्पंदन न.१. थरथरण्याची, हलण्याची क्रिया. २. श्वासामुळे होणारे हृदयाचे आकुंचन व प्रसरण. [सं.स्पन्द]

स्पिरिट न. १. एक प्रकारची गाळलेली दारू. २. एक जंतुघ्न औषध. दिव्यात इंधन म्हणून वापर. [इं.]

स्पीकर पु.१. ध्वनिवर्धक. २. वक्ता. ३. निम्नस्तरीय विधिमंडळाचा अध्यक्ष. [इं.]

स्पीड पोस्ट त्वरित पत्र पाठवण्याची सोय. [इं.]

स्पृश्य वि.१.स्पर्श करण्यास योग्य. २.उच्चवर्णीय. [सं.]

स्पृहणीय वि.१. इच्छा करण्यास योग्य; इच्छिण्याजोगे. २. प्रशंसनीय; स्तुत्य. [सं.]

स्पृहा स्त्री.इच्छा; आकांक्षा. [सं. स्पृह् = लोभ धरणे]

स्पेस स्त्री.(मुद्रण)१. सूट: दोन शब्दात अंतर येण्यासाठी योजण्याचा खिळा. २. अंतर. ३. अवकाश. [इं.]

स्प्रिंग स्त्री.स्थितिस्थापकत्वाचा गुण अंगी असलेली कमान किंवा सर्पिल तार. [इं.]

स्फटिक पु.१. पैलूदार खडा; कांतियुक्त, पारदर्शक दगडाचा एक प्रकार. २. बिलोरी काच. ३. (रसा.) ज्या पदार्थाचे कण सम प्रमाणात रचित आहेत असे पदार्थ, वस्तू. [सं.]

स्फटी स्त्री.तुरटी. [सं.]

स्फारणे सक्रि. स्फुरणे : 'तो शब्द स्फारला ।'– गीत १.१२८९. [सं.स्फुर्]

स्फालन न. कंप; चलन; घर्षण; थोपटणे.

स्फीत–ति–ती स्त्री.१. स्तुती; प्रशंसा; मान; शिफारस. २. मोठेपणा; मान्यता; प्रतिष्ठा; थोरपणा; वैभव; उत्कृष्टपणा. (क्रि.सांगणे): 'दंभस्फीति भलत्या भावें ।'– तुगा ११७९. ३. दंभ; ऐट. [सं.]

स्फुट वि. १.उघड; विस्तृत. २. फुटलेले; विकसित. ३. स्पष्ट; स्वच्छ; स्पष्ट विवरण केलेले. ४. मोकळा; किरकोळ; सुटा; फुटकळ; अलग (कविता, कथा, वाक्य). ५. (ज्यो.) स्पष्ट. [सं. स्फुट् = फुलणे]

स्फुटफल न.(भूमिती) नक्की, निश्चित क्षेत्रफळ.

स्फुटि–टी स्त्री. स्फोट; चमक; तेज; कडकडाट; गडगडाट :' मार्जी कल्पांतविजूंचिया स्फुटी ।' – ज्ञा ११.२०४. [सं.]

स्फुरण न.१. फुरफुर; कंप (डोळा, कातडी, अवयव यांचा). २. लखलखाट (वीज, तरवार इ. चा); चमक; लुकलुक (तारा, रत्न इ.ची).३. आवेश, राग इ. चा झटका; संचार; स्फूर्ती (युद्ध, वाद यातील); थरथराट, कंप (राग, भीती इ.मुळे). ४. एखादी गोष्ट एकदम आठवणे; मनात येणे; उद्भवणे. ५.धडधड; धक्का. [सं.]

स्फुरणे उक्रि. १. कंप पावणे.२. एकाएकी मनात येणे; सुचणे. [सं. स्फुर्]

स्फुरद, स्फुरद्रव्य पु.न. फॉस्फरस; एक अतिज्वालाग्राही पदार्थ.

स्फुरदीप्ती स्त्री.पिवळ्या फॉस्फरसचा अंधारात चमकण्याचा गुणधर्म.

स्फुरस स्त्री. आवड : 'अंडज खाणीमध्यें राजहंस । त्यास मोतियांचा असे स्फुरस ।'– योसं २.७५.

स्फुलिं(लिं)ग पु.१.विस्तवाची ठिणगी. २. (ग.) एक आण्याचा १/२५६ वा किंवा शिवराईचा १/६४ वा भाग. [सं.]

स्फुंज पु.फुंज; गर्व. [सं.]

स्फुंद, स्फुंदन पु.न. स्फुंदणे; हुंदका. [सं.]

स्फुंद(ज)णे अक्रि.हुंदके देऊन रडणे; मुसमुसणे. [सं.स्फुंद्]

स्फूर्ति–र्ती–र्त स्त्री. १. पहा : **स्फुरण,** एकाएकी प्रादुर्भाव. २. थरकाप. ३. मनात उत्कटतेने प्रगट होणारी शक्ती; प्रतिभा. ४.आठवरूप वृत्ती. ५. माया. [सं.स्फूर्ति]

स्फोट पु.१. फुटणे; तुटणे; मोठा आवाज होऊन फुटणे; धमाका. २. व्रण; फोड; चट्टा. ३. फूल उमलणे. ४. एखाद्या गोष्टीची अचानक वाच्यता होणे. ५. दारू वगैरेचा भयंकर आवाज होऊन होणारा भडका. [सं.स्फुट् = फुटणे]

स्फोटक पु. फोड : 'स्फोटक एक उद्भवला ।'– गुच ५.२८.
वि. एकदम फुटणारे; भडका होऊन फुटून उडणारे (दारूसारखे द्रव्य).

स्फोटन न.फुटणे; मोडणे; फाटणे. [सं.]

स्फोटवाद पु.स्फोटामुळे शब्दातून अर्थाचा बोध होतो अशी विचारप्रणाली.

स्मय स्वत:विषयी धन्यता वाटणे. हा आत्मोन्नतीतील अडथळा होय.

स्मर पु.१. मदन; काम : 'स्मरादि रिपुमन्मनीं अहि न काळ भेका कसे ।'– केका २१. २. स्मरण; आठवण. [सं.]

स्मरगृह न.स्त्रियांची योनी. [सं.]

स्मरण न.१. आठवण; चिंतन. २. मनात उद्भवणे. ३. पुन्हा उपस्थित होणे. ४. स्मरणशक्ती. ५. पहा : **स्मरणे.** ६. आठवणी दाखल ठेवलेली वस्तू (अलंकार इ.). ७. एक अर्थालंकार.पूर्वी अनुभवलेल्या पदार्थासारखा दुसरा पदार्थ पाहिल्यावर त्या पूर्वानुभूत पदार्थाची जशीच्या तशी आठवण झाली असे कविप्रतिभा निर्मित वर्णन. ८. उल्लेख. [सं.]

स्मरणशक्ती स्त्री. आठवणींचा साठा करून आयत्या वेळी योग्य ती आठवण बाहेर काढण्याचे कसब किंवा नैसर्गिक सामर्थ्य.

स्मरणी स्त्री.सामान्यत: तेरा मण्यांची जपाची माळ. (वा.) **० घेणे –** ध्यास, चिंतन करणे.

स्मरणे सक्रि. १. आठवणे; आठवण होणे, करणे; मनात आणणे, येणे. २. उपास्य देवतेचे चिंतन, ध्यान करणे. ३. वारंवार आठवण करणे; न विसरणे.

स्मशान,स्मशानभूमि–मी न. प्रेते जाळण्याची, पुरण्याची जागा; मसणवट. [सं. स्मशान]

स्मशाननिद्रा स्त्री. अखेरची झोप; मरण; मृत्यू.

स्मशानभाजन न.१. प्रेताभोवती ज्या भांड्याने पाणी फिरवतात ते भांडे, मडके. २. टाकाऊ, निरुपयोगी, क्षुद्र वस्तू.

स्मशानभोजन न.प्रेतसंस्काराच्या वेळी स्मशानात करण्याचे जेवण; उत्तरक्रियेच्या अथवा और्ध्वदेहिकाच्या वेळी ब्राह्मणांना घालण्याचे

मृताच्या प्रीत्यर्थ जेवण. [सं.]

स्मशानरु(रो)दन न.१.वायफळ, वृथा केलेला शोक. २. वरवर केलेला शोक. तात्कालिक शोक. [सं.]

स्मशानवैराग्य–विरक्ती–क्ति स्त्री.एखाद्याच्या मरणामुळे येणारी तात्कालिक विरक्ती.

स्मशानसाधन न. पिशाच्चादिक वश व्हावेत म्हणून स्मशानात केलेले जपजाप्य, मंत्रप्रयोग इ.

स्मारक न.एखाद्या प्रसंगाची, व्यक्तीची आठवण कायम रहावी म्हणून बांधलेले मंदिर, उभारलेला स्तंभ, काढलेले चित्र, प्रसिद्ध केलेला ग्रंथ इ.

पु. स्मरण करणारा : 'एवं स्मरणास्मरण नाहीं । तरि स्मारके काज काइ?' – अमृ ३०५. [सं.]

स्मार्त वि.१. स्मृतींना अनुसरणारे (व्रत इ.); स्मृतिशास्त्र जाणणारा. २. स्मृतीने मान्य केलेले. ३. आठवणविषयक; स्मरण करण्याचे. [सं.]

स्मार्तकाल पु.स्मृतीने, कायद्याने ठरवलेली (१०० वर्षांची) मुदत. [सं.]

स्मार्ताग्नि पु. विवाहानंतर ज्यामध्ये गृहप्रवेशनीय होम करायचा तो अग्नी पुढे कायम ठेवून त्यावर नित्य होम करण्याचे व्रत; स्मृतिधर्मास अनुसरून पाळण्याचे अग्निव्रत. [सं.]

स्मित न.१. गालातल्या गालात हसणे; हलकेच हसणे. २. फूल उमलणे.

वि. हसलेले. [सं.ष्मि = गालात हसणे]

स्मृति–ती स्त्री.१. आठवण; स्मरण. २.हिंदू धर्मशास्त्रासंबंधी मनू इत्यादी ऋषींनी घालून दिलेले नियम; ह्या नियमांना आठवणीच्या, स्मृतीच्या आधारे दिलेले ग्रंथरूप; त्या ग्रंथातील वचन; हिंदू कायद्यासंदर्भातील ग्रंथ. [सं.स्मृ=स्मरणे]

स्मृतिविभाग पु. संगणकातील आदान माध्यमाद्वारे पुरवलेली माहिती व सूचना संग्रहित करणारा विभाग. (इं.) मेमरी.

स्मृतिविरोध पु. धर्मशास्त्रास येणारा बाध; धर्मशास्त्राविरुद्ध गोष्ट.

स्यंदन न.ठिबकणे; पाझरणे.

पु.रथ: 'रमेश रथिं सारथी चतुर वागवी स्यंदना।'– भीष्मप्रतिज्ञा.

स्याई पु. स्वामी; पती. [सं. स्वामी]

स्यारा–री पु.स्त्री. १. भीती; थरकाप. २. थंडी; हीव. [सं.शितकार]

स्यास्ती इनाम, पौरोहित्यादी वृत्ती.

स्याळी स्त्री.थंडी; शीतकाल : 'स्याळीएचे आंगी टोपरें लेउनि ।'– लीच ३. [सं. शीतकाल]

स्रग्धरा स्त्री. अक्षरगण समवृत्त. याच्या चरणात २१ अक्षरे आणि म, र, भ, न, य, य, य हे गण असतात.

वि. माळ धारण करणारी (स्त्री.). [सं.]

स्रजणे सक्रि.उत्पन्न करणे; बनवणे; निर्माण करणे : 'तरी जगहें स्रजिलें अवघें।'– व्यं. [सं.सृज = निर्मिणे]

स्रवण न.१. पहा : **स्राव**. २.घाम, लघवी, पू वाहणे. [सं.]

स्रवणे अक्रि.गळणे; ठिबकणे; पाझरणे; वाहू, पाझरू देणे. [सं. स्रु]

स्रष्टा पु.ब्रह्मदेव; जगनिर्माता.

वि. उत्पन्न, निर्माण करणारा. [सं.]

स्रा(स्र)व पु. १. ठिबकणी; गळती; पाझर; प्रवाह; झरा. २. पाझरलेला पदार्थ. ३. गर्भपात (पाच महिन्यांच्या आतील). [सं. स्रु= पाझरणे]

स्रियाणी स्त्री. महत्त्व : 'ऐसी जालेपणाची स्रियाणी।'– ज्ञा ६.१४२.

स्रुक न. एक पळीसारखे लाकडी यज्ञीय पात्र. [सं.]

स्रुष्टी स्त्री. जन्म; जीवन. [सं.]

स्रोत–त्र पु. प्रवाह.

स्लंप न. कॉंक्रीट ओतताना ते मोजण्यासाठी उपयोगात येणारे परिमाण. [इं.]

स्लीपर पु.१. एक प्रकारची चप्पल. २. आगगाडीच्या रुळाखालील लाकूड. ३. आगगाडीच्या डब्यातील झोपण्यासाठी ठेवलेली जागा. [इं.]

स्लॅब स्त्री.सिमेंट, खडी, वाळू व लोखंडी सळया यांचा जाड थर. [इं.]

स्व सना. आपले; आत्मविशिष्ट.

न.पु. स्वत:; आपण.

न. स्वत:ची मालकी; मिळकत.

स्त्री. (बीजगणित) अधिक रक्कम.

वि. आपले; स्वत:चे. [सं.]

स्वकर्म–कार्य न.स्वजातीचे नियुक्त काम, कर्तव्य, उद्योग.

स्वकीय वि. स्वत:चे; स्वत:च्या मालकीचे; कुटुंबातील; घराण्याचे.

स्वके क्रिवि.आपोआप : 'कर्दमु सोखिला स्वके'– विसिं ४.३९.

स्वक्रिये वि.व्यवस्थित; टापटिपीची :'एकाइसे तीएं बरवी स्वक्रिये:'– लीचउ ४७०.

स्वगत वि.स्वत:चे, स्वत:शी बोलणे.याचे प्रकार : (अ) रंगभूमीवर एकट्याच पात्राने केलेले भाषण. (आ.) रंगभूमीवर दुसऱ्या पात्राशी संवाद चालू असता त्याला ऐकू न जाता प्रेक्षकांना ऐकू जाईल असे केलेले भाषण. (इ.) रंगभूमीवर अनेकांशी संवाद चालू असता मध्येच काही संवाद फक्त एकाच व्यक्तीस ऐकू जातील असे बोलणे. इ.

स्वच्छ वि.१. शुद्ध; पवित्र; उत्तम; चांगले; निर्मळ. २. स्पष्ट, साफसाफ (बोलणे इ.). [सं.]

स्वच्छता स्त्री.पावित्र्य; शुद्धता; निर्मळपणा.

स्वच्छंद पु. स्वत:ची इच्छा, हट्ट, हुक्की, लहर.

स्वच्छंदी–द वि.हट्टी; लहरी; नादिष्ट; स्वत:च्या इच्छेप्रमाणे वागणारा.

स्वच्छा बुबुळ; बुबुळाच्या बाहुलीवरील पडदा.–शब्दानंद.

स्वजन–नी पु.स्त्री.स्वत:च्या घराण्यातील, जातीतील इसम; आप्त; सखा.

स्वजात नाम. सार्थक.– ज्ञा. १२.११९.–हंको.

स्वज्योति–ती वि.स्वयंप्रकाशित.

स्वतंत्र वि.१.अवलंबून नसलेला; अनियंत्रित; मोकळा; स्वैर; स्वत:च्या इच्छेप्रमाणे चालणारा (यावरून पूर्ण वाढ झालेला). २. (निंदार्थी) हट्टी; लहरी; मोकाट; नाठाळ. ३. वेगळा; निराळा; बाजूचा. [सं.]

स्वतंत्रता स्त्री.१. स्वाधीनता; एखादी गोष्ट करण्याचा पूर्ण अधिकार. २. स्वच्छंदीपणा; स्वैरवृत्ती.

स्वत: क्रिवि.आपण होऊन; आपणामुळे–पासून–कडून; स्वभावत:; आपोआप; जातीने; व्यक्तिश:.

स्वत:सिद्ध वि.१.स्वयंभू; स्वत:च तयार झालेले, साध्य झालेले (ब्रह्म). २. स्वयंप्रमाण; सिद्ध करण्याची जरूर पडत नाही असे. [सं.]

स्वता पु.(बायकी) नवरा.

स्वतानिक पु.संस्थानिक.

स्वत्व न.१.मालकी; धनीपणा; मालकी हक्क. २. अस्मिता. ३. व्यक्तित्व, व्यक्तिवैशिष्ट्य.

स्वत्वबोधन न.मालकी हक्क प्रस्थापित करणे.

स्वदस्तूर न.१. स्वत:ची सही; स्वाक्षरी. २.(कागद,पत्र इ.) स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिणे; स्वत: लिहिलेला मजकूर.

स्वदेश पु.स्वत: रहातो तो देश; मायभूमी; मूळ गाव, जागा.

स्वदेशपरिधि–धी पु.पृथ्वीगोलावरील स्थानिक अक्षांशाचे वर्तुळ.

स्वदेशी वि.स्वदेशात तयार झालेली, उत्पन्न झालेली (वस्तू, पदार्थ इ.).

स्वधर्म पु.१. स्वत:चा वर्णाश्रमधर्म, कर्तव्य, व्यवसाय. २. पदार्थांचा गुण; नैसर्गिक प्रवृत्ती; स्वभाव.

स्वधा उद्गा. पितरांना उपचार अर्पण करतांना अथवा अन्नदान, पिंडदान करताना म्हणायचा मंत्र. [सं.]

स्वन–नि पु.आवाज. [सं.]

स्वनातीत वि.आवाजाच्या गतीपेक्षा अधिक वेगाने जाणारे (विमान). (इं.)सुपरसॉनिक.

स्वनित–क न.१. आवाज. २. १४ ओळींचा कवितेचा प्रकार; सुनीत.

स्वनीम पु.शब्दाच्या उच्चाराचा मूलध्वनी.

स्वपरागण न.एकाच झाडावरील फुलातील पुंकेसर त्याच झाडाच्या फुलांच्या स्त्रीकेसरावर पडण्याची क्रिया.

स्वप्न न.पु. १.झोपेत प्रत्यक्ष घटना घडत आहेत असा होणारा भास; सुप्त मनाच्या जाणिवेची एक स्थिती. २. आकांक्षा; ध्येय. [सं. स्वप्=झोप घेणे] (वा.) ० **पाहून जागा होणे** – अनुभवावरून शहाणा होणे. **स्वप्नी नसणे** – न आढळणे; मुळीच नसणे. **स्वप्नी नेणणे** – मुळीच माहीत नसणे. **स्वप्नी पुऱ्या, मांडे खाणे** – मनोराज्य करणे.

स्वप्नदर्शी वि.पुढच्या गोष्टी पाहू शकणारा, भावी घटना ओळखणारा; द्रष्टा.

स्वप्नदोष पहा : **स्वप्नावस्था** २

स्वप्नाकार वि. भ्रामक; मिथ्या; क्षणिक; बदलणारे.

स्वप्नावस्था स्त्री.१. चार अवस्थांपैकी दुसरी; स्वप्न पडणे. २. झोपेत वीर्यपात होणे. ३. मायिक जगत् किंवा जीवित.

स्वप्नाळू वि.अवास्तव गोष्टीत गुंतून राहणारा.
वि. स्वत:च प्रकाशमान होणारा.

स्वप्रभ वि. स्वयंस्फूर्तीने शिकलेला. [सं.]

स्वभाव पु.१. प्रकृती; प्रकृतिगुण; सहजधर्म; स्वाभाविक अवस्था; उपजत गुण; नैसर्गिक धर्म; वस्तूचा मूळ भाव. २. तहान, भूक इत्यादी आठ देहधर्म. [सं.]

स्वभावचित्र न. एखाद्या व्यक्तीच्या वैशिष्ट्यांची मनात भरण्यासारखी लिहिलेली, वर्णन केलेली माहिती, स्वभाववर्णन.

स्वभावत: क्रिवि. नैसर्गिक गुणामुळे; सहजपणे; मोकळेपणाने.

स्वभाववाद पु.१.(वेदांत) आधिभौतिक किंवा जडवाद; प्रकृतिवाद. २. जसे आहे तसे रंगवणे.

स्वभावे, स्वभावाने क्रिवि. १. स्वत:; खुद्द. २. आपोआप; साहाजिकपणे.

स्वभावोक्ति–क्ती पु.साहित्यातील एक अलंकार – अर्थालंकार. बाल, स्त्री, मुग्ध, कातर भ्रांत इत्यादिकांच्या विशिष्ट क्रियांचे किंवा रूपांचे, जसेच्या तसे चित्र शब्दांनी उभे करणे; कोणत्याही प्राण्याच्या हालचालींचे चित्र वर्णनाने उभे करणे.

स्वयं, स्वयम्, स्वयमेव क्रिवि.स्वत: होऊन; जातीने; खुद्द; स्वत:च्या प्रेरणेने. [सं.]

स्वयंचलित वि.आपोआप चालणारे; स्वत:च गतिमान होणारे (यंत्र); यांत्रिक उर्जेवर, स्वयंनिर्मित उर्जेवर चालणारे (यंत्र).

स्वयंदत्त पु.आईबाप जिवंत असताना, वयात आल्यावर, आपण होऊन दत्तक गेलेला (मुलगा).

स्वयंपाक पु.१. स्वत: अन्न शिजवणे; सामान्यत: अन्न शिजवणे, तयार करणे. २. शिजवलेले अन्न.

स्वयंपाकी पु.स्वैपाक करणारा; आचारी.

स्वयंप्रकाश पु.१. पहा : **स्वज्योती.** २. स्वत: ज्ञान मिळवलेला; स्वयंज्ञानी. [सं.]

स्वयंभू–भ पु.१.ब्रह्मा; ब्रह्मदेव; विष्णु; शिव.२. काल. ३.प्रेम. ४.पर्वत. वि. १.मूळचा; स्वत: उत्पन्न होणारा. २. एखाद्या पाषाणात आपोआप उत्पन्न झालेला, किंवा दृष्टांत झाल्यामुळे लोकांना समजलेला (देव,देवी इ.). [सं.स्वयंभू]

स्वयंवर न.पित्याने ठरवलेला पण पूर्ण करणाऱ्याबरोबर मुलीने विवाह करण्याची प्रथा. [सं.]

स्वयंशासित वि.(राज्य.)आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडून होत असलेले (शासन).

स्वयंसत्ताक वि.एकाधिकार शासनपद्धती असलेला.

स्वयंसेवक पु.स्वेच्छेने, सेवाभावाने लोककार्य करणारा.

स्वये क्रिवि.स्वत: होऊन; आपण होऊन; स्वयंस्फूर्तीने.

स्वयोनि–नी वि.आईच्या बाजूने संबंध असलेला.

स्वर पु.१.(राग) गायनोपयोगी नाद, श्रुती. या सात आहेत. याचे शुद्ध, विकृत,अचल, उद्वृत, तीव्र, कोमल असे प्रकार आहेत. २. वेदमंत्रातील उदात्त अनुदात्त दाखवणाऱ्या त्या त्या अक्षरांवर दिलेल्या खुणा. ३.(व्याकरण) दुसऱ्या वर्णाच्या साह्यावाचून स्वतंत्रपणे उच्चारला जाणारा वर्ण. ४. साधारण आवाज, ध्वनी. ५. नाकपुड्यांवाटे वाहणारा वायू. ६. शब्द उच्चारताना त्याच्या विशिष्ट अवयवावर पडणारा जोर.[सं.स्वृ = ध्वनी करणे] ० **देणे** – गाण्याची साथ करणे. ० **भजणे,वाहणे** – कल दर्शवणे, झुकणे (मन, इच्छा इ.चा); कोणत्याही कार्याला आरंभ करण्यापूर्वी कोणत्या नाकपुडीतून स्वर वाहतो, तो कार्यास अनुकूल आहे की प्रतिकूल हे पाहणे; यावरून अनुकूल मत होणे.

स्वरक पु. विशिष्ट पट्टीचा स्थिर आवाज.

स्वरकरण न. सा, रे, ग, म, प, ध, नी या अक्षरांची हवी तशी रचना करून बनवलेले गाणे. [सं.]

स्वरकोश पु.ज्याच्यामुळे आपण बोलू शकतो तो गळ्यातील भाग; कंठमणी; स्वरयंत्रपेटी.

स्वरणे सक्रि.सावरणे; आवरणे : 'खोंचले वारू न स्वरती:' – उह १४५४.

स्वरतंतू,स्वररज्जू पु.अव. घशातील स्वरेंद्रियातील तारेसारख्या पट्ट्या; स्वररज्जू.

स्वरनाल पु.स्वरयंत्र; पेटी.

स्वरमंडल–ली न.स्त्री. एक प्रकारचे तंतुवाद्य; छत्तीस तारांचे, चौकोनी आकाराचे, खुंट्या असलेले तंतुवाद्य.

स्वरयंत्र न. अन्ननलिका आणि श्वासनलिका यांमधील दुवा; यातील स्वरतंतूंमधून हवा जाऊन आवाज निर्माण होतो.

स्वरलिपी स्त्री.(संगीत) संगीत लिहून ठेवण्यासाठी विशिष्ट अक्षरे व चिन्हे यांनी युक्त लिपी. [सं.]

स्वरशास्त्र न.नाकातून वाहणाऱ्या श्वासाचे लक्षण, गती इ. वरून प्रश्न पाहण्याचे शास्त्र.

स्वरादी पु.अव. वर्णाच्या आधी येणारे अनुस्वार आणि विसर्ग. [सं.]

स्वराज्य न.१. स्वत:चे, स्वतंत्र राज्य. २. स्वराज्यातील चौथाईचा कर. ३. गोदावरीपासून कृष्णेपर्यंतचा प्रदेश. ४. हिंदूपतपादशाही. ५. लोकांच्या हितासाठी लोकनियुक्त अधिकाऱ्यांनी लोकमतास अनुसरून चालवलेली राज्य पद्धती. ६.(वेदांत) ब्रह्मत्रैक्य : 'ऐसेनि ब्रह्मत्रैक्यासारिखें । स्वराज्य येतां जवळिखें – ज्ञा १८.१०७२. ७. आत्मसत्ता.

स्वरांतर तान चार स्वरांची तान.

स्वरूप न.१. स्वत:चे रूप, आकार, ढब, चेहरा. २. मुद्रा; तोंडवळा; हुबेहुब रूपरेषा. ३. प्रकृती; स्वभाव. ४. लावण्य; सौंदर्य. ५. आत्मस्वरूप : 'आंतु मीनलेनि मनोधर्मे । स्वरूप प्राप्तिचे नि प्रेमें ।'– ज्ञा १८.९३. ६. खरी योग्यता, महत्त्व; थोरपणा : 'हे भट आमचे पुरातन आश्रित यांचे स्वरूप तुम्ही चित्तात आणले नाही.'– आठ इति ९६. क्रिवि. स्वत:; प्रत्यक्ष: 'स्वामींचे आगमन श्रीकृष्णातीरी स्वरूपच काले करून होणार.' –पेद २४.९२. [सं.]

स्वरूपता स्त्री.१. चार मुक्तींपैकी एक. २. सौंदर्य. ३. तद्रूपता. [सं.]

स्वरूपलक्षण न. स्वाभाविक लक्षण. म्हणजे ज्या लक्षणास उत्पत्ती व लय नाही असे सत्, चित् आणि आनंद लक्षण.

स्वरूपी वि. सत्सदृश; तल्लक्षणवान; तदाकार.

स्वर् न.१. आकाश. २. स्वर्गलोक. ३. इंद्रलोक. [सं.]

स्वर्ग पु. इंद्राचा लोक; देवाचे वसतीस्थान; पुण्यकर्मे करणाऱ्यास मृत्यूनंतर मिळणारा लोक. [सं.] (वा.) ० **दोन बोटे उरणे** – गर्वाने फुगणे. **स्वर्गास हात पोचणे, स्वर्गी ध्वज लावणे** – ज्या उच्चपदाची इच्छा केली ते मिळणे; कृतकृत्य होणे.

स्वर्गगति–ती,स्वर्गवास स्त्री. मृत्यू (पावणे). वि. स्वर्गात जाणारा.

स्वर्गीय, स्वर्ग्य वि.१. स्वर्ग लोकातील. २. स्वर्गासंबंधी. ३.(ल.) अत्यंत उत्कृष्ट (गाणे, सौंदर्य इ.).

स्वल्प वि.१. फार थोडे; किंचित. २. क्षुल्लक; सोपे. [सं.]

स्वल्पविराम पु.१.(व्या.) एक विरामचिन्ह. वाचतांना अगदी थोडवेळ थांबण्याचे सूचक चिन्ह. २.(वानस.) स्वल्पविरामाकार सूक्ष्म जंतू. (इं.) कॉमाज्.

स्वसंवेद्य वि.१.आपण होऊन जाणले जाणारे ज्ञानरूप. २. स्वत:च स्वत:ला जाणणारा. [सं.]

स्वसा स्त्री. बहीण. [सं.]

स्वसो नाम संशय. ज्ञा.११.२९९. – हंको.

स्वस्त–स्ता वि.सवंग; महाग नसलेला.

स्वस्ता पु.जरदाळूच्या बीमधील मगज.

स्वता(स्था)ई स्त्री.सर्व जिन्नस कमी किंमतीत व भरपूर उपलब्ध असणे.

स्वस्ति वि. बरे; चांगले; कल्याण; उत्कर्ष; क्षेम. आशिर्वादाचा एक प्रकार; कल्याणवाचक शब्द. [सं.]

स्वस्तिक न.१. शुभदायक चिन्ह. हे जैनांच्या सातव्या तिर्थंकराचे निदर्शक आहे. २. एक विशिष्ट बांधणीचे देऊळ. ३. कोणताही शुभ, मंगल पदार्थ. ४. स्वस्तिवचन; शुभाशिर्वाद; शुभ असो ही भावना. [सं.]

स्वस्तिवाचन; स्वस्तिवाद,स्वस्त्ययन न. पु.व्रत, शांती इ. मंगलकार्याच्या आरंभी करण्याचा एक विधी; पुण्याहवाचन.

स्वस्थ–स्त वि.१. सुखी; समाधानी; तृप्त; निरोगी. २. स्तब्ध; शांत (शारीरिक, मानसिक दृष्ट्या). ३. निश्चयी; करारी. [सं.स्था = राहणे]

स्वस्थता स्त्री.फुरसत; शांतता; निवांतपणा; सुख.

स्वस्थावणे अक्रि.शांत होणे; स्थिरावणे.

स्वागत न. पाहुण्याचा उत्तम आदरसत्कार करणे; आतिथ्य. [सं.]

स्वाड वि.चांगले; शुभ, उत्तम (नेहमी द्वाड शब्दाबरोबर उपयोग). उदा. 'बाहेर निघतांच स्वाडद्वाड शकुन पहावा.'

स्वातंत्र्य न.स्वाधीनता; मुखत्यारी; दुसऱ्यावर अवलंबून नसण्याची स्थिती. पहा : **स्वतंत्रता**

स्वाति–ती स्त्री.सत्तावीस नक्षत्रांमधील पंधरावे नक्षत्र. [सं. स्वाति]

स्वातीचा पाऊस या नक्षत्रावर पडणारा पाऊस. या पावसाने समुद्रात मोती तयार होतात अशी लोकसमजूत आहे.

स्वात्वानुभव पु.ब्रह्माचा अनुभव; ब्रह्मसाक्षात्कार. [सं.]

स्वाद पु.१. चव; लज्जत; गोडी. २. चव घेणे; गोडी चाखणे. ३. वास सुवास – विशेषत: खाद्यपदार्थाचा. [सं.]

स्वाद पु.अनुमोदन; संमती; सही :'जाटाने यादीवर स्वाद करून दिला कीं गोहद खाली करून देतो.'–ऐको.

स्वादिष्ट–ष्ठ–क वि.चवदार; रुचकर.

स्वादु–दू वि.१. गोड. २.चविष्ट; मधुर.

स्वादुकलिका स्त्री. ज्यांच्या कडेला असलेल्या संवेदक नसांद्वारे रुची कळते ती जिभेवरील व तालूवरील सूक्ष्म छिद्रे.

स्वादुपिंड पु.जठरातील एक पाचकरसस्रावक ग्रंथी.

स्वाधिष्ठान न.१.गुदद्वार. २.(योग) षट्चक्रातील दुसरे चक्र. ३. स्वत:चे स्थान. [सं.]

स्वाधीन वि.१. आपल्या इच्छेप्रमाणे चालणारा; परस्वाधीन नसलेला. शअ. अंमलाखाली; ताब्यात; आज्ञेत; देखरेखीखाली. [सं.]

स्वाधीनता स्त्री.स्वावलंबन; स्वातंत्र्य.

स्वाध्याय पु.१. वेदपठण; वेदाध्ययन; वेदांचा अभ्यास; तो सुरू करण्याचा दिवस.२. स्वत: करावयाचा अभ्यास. [सं.]

स्वानंद पु.आत्मानंद; ब्रह्मानुभव.
वि. आत्मसुखाच्या आनंदात मग्न झालेला. [सं.]

स्वानुभव, स्वानुभूती पु.स्त्री. १. तूर्यावस्था; जागृती, सुषुप्ती व स्वप्न या पलीकडील समाधीरूप चौथी अवस्था. २. आत्मानुभव; स्वत:चा अनुभव. [सं.]

स्वाभावि(वी)क वि.नैसर्गिक; साहजिक; जन्मजात.
क्रिवि. आपोआप; साहजिकपणे; बाह्यकारणाशिवाय.

स्वाभिमान पु.१. स्वत:च्या कर्तृत्वाचे भान. २. अपमानाची चीड; तेजस्विता.

स्वामि–मी पु.१.धनी; मालक. २. देवता; ईश्वर; राजा. ३. नवरा; गुरू; साधू; संन्यासी; गोसावी. ४. लिंगायतातील जंगम.
वि. मुख्य; श्रेष्ठ. [सं.स्वामिन्]

स्वामित्व न.१. धनीपणा; मालकी; ताबा. २. मालकी हक्क; त्याबद्दल द्यावयाची रक्कम.

स्वामित्वधन न.लेखन, पेटंट, खाणीची मालकी इत्यादीचे बाबतीत दुसऱ्याने ती वापरल्यास मालकाला द्यावयाचे पैसे.

स्वामिनी स्त्री.धनीण; मालकीण. [सं.]

स्वामिभाव पु.मालकी. (इं.) ओनरशिप.

स्वायत्त पहा : **स्वाधीन**

स्वार पु.घोड्यावर बसलेला मनुष्य; राऊत; कोणत्याही दुचाकी वाहनावर बसलेला मनुष्य. [फा.सवार्]

स्वार न.(नाविक) सुकती अगर भरती पूर्ण झाली असता पाणी काही वेळ स्थिर राहण्याची अवस्था.

स्वारस्य न.१. स्वाभाविक, नैसर्गिक गोडी; चव; रसाळपणा; अभिरूची; माधुर्य (काव्य, भाषण इ.). २. उत्कृष्टता; चांगलेपणा. ३. मर्म ; खुबी. [सं.]

स्वारी, सवारी स्त्री.१. घोड्यावर बसणे. २. घोड्यावर बसलेली व्यक्ती. ३. मोहीम; दौड; धावणी. ४.वाहन. ५. (बहुमानार्थी) आपण स्वत:. ६. मोठ्या माणसाचा लवाजमा, परिवार, सरंजाम, मिरवणूक. ७. हत्यारी लोकांची टोळी; तिचा हल्ला. ८. कोणत्याही वाहनावर आरूढ झालेला मनुष्य. ९. राजा; सरदार इ. थोर व्यक्ती. १०. (ल.) प्रेतयात्रा. ११. (बायकी) नवरा.१२.(कुस्ती) एक प्रकारचा पेच. यामध्ये खालच्या गड्याला वरचा गडी दोन पायांच्या पकडीमध्ये पकडतो. (क्रि. घालणे, भरणे). १३. मध्यरात्री निघणारी वेताळाची फेरी. १४. संचार; अवसर. १५. मोहरमात मुसलमानांमध्ये होणारा पीर वगैरेंचा संचार. १६. प्रवासी. [फा. सवारी; त. शवारी]

स्वारीपेच पहा : **स्वारी** १२

स्वारीशिकारी स्त्री.(व्यापकार्थी) मिरवणूक; लवाजमा; स्वारी करणे; शिकारीला जाणे; मोहीम.

स्वार्थ पु.१. स्वत:चा फायदा, लाभ, मतलब. २.वाच्यार्थ; मुख्य अर्थ; मुद्दा (भाषण इत्यादीतील). ३. स्वत:ची मालमत्ता. ४.(व्याकरण) जेथे क्रियापदाने एखाद्या गोष्टीचे विधान साक्षात होते म्हणजे एखादी गोष्ट आहे किंवा नाही इतके मात्र समजते तेथे असणारा अर्थ. [सं.]

स्वार्थी, स्वार्थपर–परायण वि.स्वत:चेच हित पाहणारा; आपमतलबी.

स्वार्थी क्रियापद तिन्ही काळांत क्रिया करण्याचा हेतू असणारे क्रियापद उदा. मुलगा नियमित अभ्यास करतो.

स्वास्त न.मालमत्ता; मिळकत :'पुणे आदीकरून स्वल्प स्वास्ता स्वतंत्र मागून घेऊन स्वल्प मात्र स्वास्तेचा उद्योग केला.'– दप्तर १.९७. [सं.स्वत्व, स्व + अस्तित्व]

स्वास्तक न.स्वत:चे घर; स्थानिक मिळकत. [सं.]

स्थास्थ्य न.१. प्रकृति; धंदा इ.त सौख्य; समाधान. २. उपजीविकेचे साधन (इनाम, जमीन इ.).३. आत्मविश्वास. ४. आरोग्य; आराम. [सं.]

स्वाहपी वि.शांत; संतुष्ट; समाधानी. [सं.स्वाहा = अग्नीची ज्वाला]

स्वाहा अ.१.देवाला हवी देण्याचा मंत्र; देवांना देण्याची अन्नाची आहुती. २. आधाशीपणे खाणे. ३.(ल.) दुसऱ्याने विश्वासाने ठेवलेली वस्तू उपटणे; अपहार करणे. [सं.]

स्वाहाकार पु.देवतांना अग्नीच्याद्वारे हविर्भाग देणे. [सं.]

स्वाक्षर–री न.स्त्री. १. स्वत:च्या हातचे लिहिणे. २. स्वत:ची सही. (वा.)**स्वाक्षरी करणे** – (विधि.) मान्य करणे; स्वीकारणे; सही करणे; मंजूर करणे.

स्विच पु.वीज सुरू किंवा बंद करण्याची कळ (बटण). [इं.]

स्विष्टकृत स्त्री.१.मुख्य होम झाल्यावर देण्याची आहुती. २.(ल.) शेवट; अखेर; समाप्ती. ३.(ल.) समूळ नाश; उच्छेद. [सं.]

स्वीकार, स्वीकरण न.पु. १. कबूल करणे; हक्क बजावणे; पत्कर घेणे. २. स्थिती, वाद इ. कबूल करणे, संमती देणे. ३. अंगीकारणे. [सं.]

स्वीकारक पु.माध्यमाच्याद्वारे पाठवलेला संदेश स्वीकारणारा, घेणारा. (इं.) रिसिव्हर.

स्वीकारणे सक्रि.घेणे; हक्क सांगणे; अंगीकार करणे; मान्य करणे.

स्वीकृत वि.अंगिकारलेले; मान्यता, कबुली दिलेले; घेतलेले.

स्वीय वि.स्वत:चा, स्वत:संबंधी; वैयक्तिक.

स्वीयकरण न.(वानस.)पोषक द्रव्याचे रूपांतर शरीरभागात करणे; पचविणे; आत्मसात करणे. (इं.) ॲसिमिलेशन.

स्वीय सहायक उच्च पदावरील अधिकाऱ्यांसाठी नेमण्यात येणारा वैयक्तिक मदतनीस. स्वीयसचिव (इं.) पी.ए.

स्वेच्छ वि.१. स्वैर; स्वत:च्या मनाप्रमाणे वागणारा. २. उनाड; अवखळ; आडदांड; मोकाट; उच्छृंखल.

क्रिवि. यथेच्छ; आपल्या मनाप्रमाणे. [सं.]

स्वेच्छा स्त्री. १. स्वत:ची मर्जी. २. आडदांडपणा; उनाडपणा.

स्वेच्छामरण न. रोगी बरा होण्याची आशा संपली असेल आणि त्रास असह्य होत असेल, तर रोग्याच्या संमतीने त्याचे आयुष्य संपवणे.

स्वेटर पु. छाती, पाठ, पोट झाकणारा उबदार, लोकरीने विणलेला कपडा. [इं.]

स्वेत–तु पु.(अप.) सेतु; पूल. [सं.सेतु] (वा.) ०**बांधणे** – सूत्र लावणे; संबंध जोडणे.

स्वेद पु.१.घाम. २.वाफ. [सं.]

स्वेदज वि.घामापासून उत्पन्न होणारा (प्राणी, ऊ इ.). [सं.]

स्वेदन न. शेक; उष्णता देणे.

स्वैर–री वि. पहा : **स्वेच्छ;** स्वच्छंदी; उनाड; आडदांड. [सं.]

स्वैराचार पु.स्वच्छंद; अनिर्बंध वर्तन.

स्वैरिणी स्त्री.उनाड स्त्री; व्यभिचार करणारी बाई; स्वच्छंदी स्त्री; वेश्या.

स्वैंपाक पहा : **स्वयंपाक**

स्वैंपाकघर न. जिथे स्वयंपाक होतो, केला जातो ती जागा.

स्वैंपाकी पु. दुसऱ्याच्या घरी मोलाने-पैसे घेऊन स्वयंपाक करणारा; आचारी.

स्वोदय पु.(ग्रह, नक्षत्र इत्यादींचा)उदय; उगवणे; उदयाचा ठराविक काल.पहा : **लंकोदय, चर** इ.

स्वोदित वि. उपजत; उत्स्फूर्त. (इं.) स्पाँटेनियस.

■■■



ह मराठी वर्णमालेतील अठ्ठेचाळिसावा वर्ण व तेहतिसावे व्यंजन.

हइ–ई पासून सुरू होणारे शब्द है मध्ये पहा.

हउ–ऊ पासून सुरू होणारे शब्द हौ मध्ये पहा.

हक, हकटक, हकदार इ. पहा : **हक्क, हक्कदार** इ.

हक मृत्यू; मरण : 'नजबखानास राजयक्ष्या रोग होऊन चौदावे रबिलाखरीं हक जाला.' – मदबा १.११८. (वा.) ० **करणे** – देहान्ताची शिक्षा देणे.

हकताला पु. श्रेष्ठ ईश्वर. [अर. हक्क्–तआला]

हकनाक, हकनाहक क्रिवि. नाहक; विनाकारण; अन्यायाने.

हकपरस्ती स्त्री. १. सत्यनिष्ठा. २. कृतज्ञता.

हकम पु. १. गाव – जिल्हा अधिकारी; मालक. २. न्यायाधीश. ३. पंच.

हकमहकमात स्त्री. राज्यकर्ता वर्ग; अधिकारी वर्ग.

हकरा पु. वळसा : 'जे द्वेषाचां आवर्ती दाटत। ते मत्सराचे हकरे पडत।'– ज्ञा ७.७०.

हकराई वि. हक्कदार; हक्क असलेले.

हकराजिमा पु. न्याय मिळण्याचा हक्क. (मालवणी)

हकळो धाड. (तंजा.)

हका(क्का)टका(क्का) पु. स्त्री. कबजा; ताबा; आटोका. (वा.) ० **येणे**– १. तावडीत, सपाट्यात सापडणे; आटोक्यात येणे; अधिकारात येणे. २. मर्जीस येणे. ३. हिशेबात बसणे.

हकालपट्टी स्त्री. काढून लावणे; घालवून देणे; हद्दपारी.

हकाहक पु. सत्यासत्य.

हकिक(ग)त स्त्री. १. बातमी; वृत्तांत; वर्णन; अहवाल. २. घडलेले वर्तमान; गोष्ट; प्रसंग; वाका. [अर. हकीकत्]

हकिकतनामा पु. घडलेल्या गोष्टींचा लेखी अहवाल, वृत्तांत. [फा.]

हकिमाई, हकिमी स्त्री. हकिमाचा धंदा, काम; (युनानी) वैद्यकी.

हकिमी, हकीम पहा : **हकम**

ह(हा)कीम पु. १. वैद्य; युनानी वैद्य. २. वैद्यकी. [अर. हकीम्]

हक्क पु. न. १. अधिकार; मालकी; वारसा. २. देशमुख, देशपांडे, महाजन इ. पिढीजात महाल–गाव–अधिकाऱ्यांचा गाववसुलीतला किंवा पिकाचा वाटा, हिस्सा, वर्षासन. ३. (ल.) धंदा; उद्योग; काम. ४. पगार; मिळकत : 'ज्याजती होईल तितकी किंमत करून त्याच्या हक्कात धरावी.'– सभासद २३. ५. नेमणूक : 'पाटील कुलकर्णी यांसी हक्क बांधून दिला.'– सभासद २५. ६. सत्य. [अर. हक्क्]

हक्कट(टा)क पु. पहा : **हक्क**

हक्कदस्तुरी स्त्री. १. हक्क आणि वहिवाट; हक्क आणि ठरलेली बलुती, वतन. २. (सामा.) हक्क.

हक्कदार वि. १. वार्षिक वसुलाचा किंवा पिकाचा अंशत: मालक. २. वारस; वाटेकरी. [फा.]

हक्कर(रु)सूम–लाजिमा पु.अव. देशपांडे, कुलकर्णी इ. पिढीजात अधिकाऱ्यांचे हक्क आणि विशेष अधिकार; वतनदारी हक्क वगैरे. हक्क व भोगवटा; विशेषाधिकार; कायदेशीर हक्क व प्रस्थापित मालकी.

हक्कविलेख पु. मालकी हक्कासंबंधीचे दस्तऐवज; हक्कलेख.

हक्कहराम–हरामाचा, हक्कहलाल–हलालाचा वि. वाजवी व न्याय्य; बरोबर; कायदेशीर.

हक्कहवाल पु. सुस्थिती; भरभराट (पीक, बाजारभाव, व्यक्ती इ.ची).

हक्कार पु. हाकार; हाकाटी; हाक मारणे; ओरडणे. [सं.]

हक्का हरामाचा वि. १. भल्याबुऱ्या मार्गाने केलेला (पैसा). २. अन्याय्य; अप्रामाणिक; लबाडीचा (धंदा, काम, पैसा इ.).

हग पु. मल; विष्ठा; गू (मनुष्य, पशू इ.चा). [सं. हद्]

हगओ(व)क स्त्री. (पटकीतील) जोराचे ढाळ; ओकारी वगैरे.

हगटणे अक्रि. (क्रोध वा तिरस्काराने) हगणे.

हगणदारी, हगंदारी स्त्री. सार्वजनिक शौचाची उघडी–मोकळी जागा.

हगणवट न. जनावरांचे गुदद्वार.

हगणे उक्रि. १. मल, विष्ठा शरीराबाहेर टाकणे; मलविसर्जन करणे. २. बाहेर टाकणे, पडणे (डोळ्यातील घाण, चिपडे, पू इ.). ३. वर येणे–टाकणे (समुद्रातील घाण). ४. वर, बाहेर फेकणे, येणे (जात्याचा खिळा ढिला झाल्यामुळे पीठ).

हगदोडी स्त्री. प्रातर्विधीची जागा. (झाडी)

हगरड स्त्री. १. ढेंडाळी; हगवण. २. विष्ठा, घाण इ. चा ढीग.

हग(गि–गु)रडा–डे वि. १. शौचाहून आल्यावर ढुंगण न धुतलेला. २. (ल.) अपुरा; अर्धवट राहिलेला; मध्येच बंद पडलेला (काम, धंदा इ.). ३. बिघडलेले; खराब झालेले (काम इ.). ४. घाणेरडे; ओंगळ; किळसवाणे. ५. क्षुल्लक; निरुपयोगी; बिनकिमतीचे.

हगरा वि. १. सतत शौच होणारा. २. (ल.) भित्रा; भ्याड. ३. (व्यापक) वाईट; ओंगळ; घाण; किळसवाणी (व्यक्ती, वस्तू, गोष्ट इ.). ४. क्षुद्र; गबाळ; निरुपयोगी; कुचकामाचा.

हगरी–रे स्त्री. न. १. शौचासाठी केलेली व्यवस्था. २. शौचाची लाकडी घडवंची; गलबतावरील मलविसर्जनाची जागा. ३. या घडवंचीचे भोक. ४. (गुऱ्हाळ) चुलाण्यातील राख ज्या थारोळ्यातून खाली पडते त्याचे भोक. ५. शेतात ठिकठिकाणी ठेवलेल्या खताच्या राशी – प्रत्येकी. ६. शेतात खत न्यावयाच्या गाडीत खत भरण्यासाठी असलेल्या कुरकुलाचे मागील दार, झडप.

हगरे न. (अशिष्ट) १. सोरा; यवक्षार. २. टाइप पाडण्याचे यंत्र.

हगली(ले)–मुतली(ले) स्त्री. न. १.(ल.) क्षुद्र; बारीक–सारीक गोष्ट; लहान सहान चुका, अपराध; गैरवर्तन (दुसऱ्याजवळ गाऱ्हाणी केलेले). २. (ल.) एखाद्याच्या साध्या, स्वाभाविक, खाजगी गोष्टी. (क्रि. सांगणे, कानावर घालणे, पाहणे.) ३. (लहान मुलाच्या) हगण्याने भरलेले कपडे; गुवेले.

हगवण स्त्री. अतिसार; वारंवार शौचास होणे.

हगव(वि)णे सक्रि. १. शौचास बसविणे (मूल इ.). २. (ल.) ओशाळे करणे; लाजविणे; घाबरून सोडणे; रडकुंडीस आणणे; बिघडविणे (सल्ला, युक्ती, धाडसाचे काम). ३. जबरदस्तीने परत देण्यास भाग

पाडणे (पैसा इ.).

हगाड स्त्री. पहा : **हगणदारी**

हगिया, हग्या वि. १. शौचास बसलेला, निघालेला. २. शौचास नेण्याचा (तांब्या, जोडा इ.) : 'दुराणी हगियांसी (जोड्यांनी) मारूं लागले.'- भाब १४०. ३. हगावयास लावणारा. ४. (ल.) अतिशय जोराचा (मार इ.).

हगिरडे न. फुरसे; सापाची एक जात.

हगीर वि. पहा : **हगरा**

हगुरणे अक्रि. १. शौचास घाई होणे, लागणे. २. हगणे; पहा : **हगटणे**. ३. (ल.) गर्भगळित होणे. ४. घाबरगुंडी उडणे; उगीच घाईत असणे.

हगूट पु. शौचाची घाई; गुदद्वारावाटे नुकताच बाहेर पडलेला किंवा पडत असलेला मळ; विष्ठा.

हगूर वि. हलका.

हगेरा, हगोला–ले वि. न. गुवाने भरलेला, बरबटलेला (कपडा).

हगोडा वि. १. ढुंगण न धुतलेला. २. घाणेरडा. (झाडी). ३. अव्यवस्थित; अपूर्ण(काम).

हगोनगी स्त्री. ऐक्य; स्नेह.

हज(स)बी स्त्री. जनावराच्या पाठीवरून पैसे नेण्यासाठी केलेली, मध्ये तोंड असलेली, लांब पडशीसारखी दुहेरी पिशवी.

हजमाई स्त्री. पचनशक्ती.

हजर वि. उपस्थित; विद्यमान. [अर. हाझिर]

हजरजबाब पु. त्वरित उत्तर; समयसूचक उत्तर. [फा.]

हजरजबाबी वि. समयसूचकपणे त्वरित उत्तर देणारा.

'हजर' ने सुरू होणारे शब्द येथे न आढळल्यास हाजीर इ.मध्ये पहा.

हजरत–ती पु. स्त्री. स्वामी; महाराज; धनी. (राजा, पैगंबर अगर इमामादी श्रेष्ठ आणि वंद्य पुरुष यांना हा शब्द लावतात.) [अर. हझ्रत]

हजाम पु. न्हावी; नापित. [अर. हज्जाम्]

हजामत स्त्री. १. हजामाचे काम; (डोक्यावरील) केस काढण्याची क्रिया. २. (ल.) ताशेरा; खरडपट्टी; बोडंती; शिव्या देऊन केलेली कानउघाडणी. ३. लुटणे; लुबाडणे; नागवणूक. (क्रि. करणे.)[अर.]

हजार वि. १००० ही संख्या; सहस्र. [फा. हझार्] (वा.) **०पाचशे पाऊस पडणे** – थोडासा पाऊस पडणे; शिंतोडे येणे.

हजारा पु. (सोंगट्या) तीन फाश्यांनी नऊ किंवा सात हे (छ तीन नऊ, पाच चार नऊ किंवा पाच दोन सात) पडलेले दान. [फा.]

हजारी पु. वि. तोफखान्यावरील प्रमुख अधिकारी; (इं.) कॅप्टन.

हजारी स्त्री. १. पुष्कळ छिद्रे असलेले नळाचे, कारंजाचे तोंड. २. हजार सैनिक बाळगण्याची मन्सबी.

वि. १. हजारासंबंधी. २. असंख्य. [फा. हजार्]

हजारी पान पहा : **जनीचे पान**; एक प्रकारचे विड्याचे पान.

हजारी मोगरा अनेक फुलांचा गुच्छ येणारे एक फुलझाड.

हजिमा(म्मा), हजिंबा पु. १. अतोनात गर्दी; दाटी; झिम्मड; खेचाखेच. २. अतिरेक; अमर्यादपणा; पराकाष्ठा (चैन, रंगतमाशा, भांडण, युद्ध, वैर, पाऊस, पीक, सामग्री इ. ची). (क्रि. माजणे, जमणे, होणे). ३. फजिती; टर; धुव्वा. (क्रि. होणे, उडणे.) : 'पुढें डौल कसा होतो पहावें, परंतु हजिमा आहे.' – ऐलेसं ९.४८.७४. [अर. हझीमा]

हजूरहराम पु. राजाचे खास शरीरसंरक्षक शिपाई.

हजेरी स्त्री. १. हजर असणे; प्रत्यक्षता; विद्यमानता; उपस्थिती. २. उपस्थितीची नोंद. (क्रि. घेणे). [फा.]

हजेरीखरडा–पट–पत्रक–बंद–याद पु. न. स्त्री. हजेरी नोंदण्याची वही. (इं.) मस्टर, रजिस्टर.

हजेरीची फौज नेहमीचे खडे सैन्य.

हजो अ. फजिती. (झाडी)

हट–ट्ट पु. बाजार; मंडई; विशेषत: फिरता बाजार; जत्रा.[सं. हट्ट] **हटास ओघळ जाणे** – रेलचेल, समृद्धी असणे.

हटक स्त्री. १. हाक मारणे; बोलावणे. २. (रस्त्यात) अडथळा; खोळंबा करणे. (क्रि. लागणे, लावणे).

हटकण–णी स्त्री. १. हाक; हटक; ओरड; आव्हान. (क्रि. करणे, लावणे.) २. चौकशी; विचारपूस (क्रि. लावणे, लागणे)

हटकणे उक्रि. १. हाका मारणे; बोलावणे. २. आव्हान देणे. ३. चौकशी करणे; विचारणे. ४. विरोध करणे; अनादरणे. ५. आमंत्रण देणे. ६. संबोधणे; उद्देशून बोलणे. ७. थांबविणे. [हिं. हटकना; सं. हठ]

हटकरी–करीण पु. स्त्री. बाजारात विक्री करणारा माणूस, दुकानदार.

हटकून–हटी, हटकोरी क्रिवि. १. न चुकता; काही झाले तरी; खचित; नि:संशय. २. निश्चयाने; कशास न जुमानता. ३. मुद्दाम; मनस्वीपणे.

हटकोर–खोर वि. हट्टी; हेकाड; हेकेखोर; न जुमानणारा.

हटणे अक्रि. १. हट्टी बनणे; हट्ट करणे; न ऐकणे. २. माघार घेणे; परतणे; मागे जाणे-येणे; पराभव पावणे.

हट(टा)तट पु. स्त्री. १. अतिशय हट्टीपणा; हेका; आपलेच खरे करण्याची धडपड. २. चिकाटी. ३. स्पर्धा; चढाओढ; चुरस.

हटतट न. पखवाजासारखे एक वाद्य.

हटनिग्रह पु. अत्यंत चिकाटी; आग्रह; हेका.

हटवट स्त्री. फळे, भाजीपाला विकण्याची जागा; भाजीबाजार.

हटवाद पु. अतिशय हट्ट; हेकेखोरपणा. (क्रि. करणे, घेणे, धरणे.)

हटवादी पु. अत्यंत हेकेखोर; हट्टी.

हटविलासिनी स्त्री. वेश्या; बाजारबसवी. [सं.]

हटहट, हटहटणे पहा : **हडहड, हडहडणे**

हटाऊ वि. १. बाजारासंबंधी; बाजारी. २. हलका; क्षुद्र; नीच.

हटावने सक्रि. क्षुब्ध होणे.-एभा.

हटावले वि. हट्टी.

हटिया वि. १. हट्टी. २. हटयोगी : 'म्हणोनि हटियांते जिणिजे। इहींचि जगीं।'- ज्ञा ३. २६६.

हटू वि. आग्रही; हट्टी. [सं. हठ]

हटूनतटून, हटेतटे क्रिवि. १. हट्टाने. २. चिकाटीने; निश्चयाने.

हटेल–ला पहा : **हट्टी–टी**

हट्ट पु. १. हेका; दुराग्रह; खणपट. २. मत्सर; चुरस; आकस. ३. विचार;

चिंता. ४. (सामा.) आग्रह. [सं. हठ] (वा.) **०जिरणे** – हट्टीपणा जाणे, समजूत पडणे. **हट्टास पेटणे** – हट्ट धरून बसणे.

हट्टी स्त्री. १. लहान बाजार; जत्रा. २. एकाच जातीच्या किंवा धंद्यातल्या माणसांच्या घरांचा समुदाय. ३. गावापासून थोडक्या अंतरावरील भिल्ल, रामोशी इ. ची घरे, वस्ती. ४. भिल्ल, रामोशी इ. लोकांचा मोठा अड्डा; बालेकिल्ला. ५. असल्या लोकांचा जमाव, टोळी, कंपू. [सं. हट्ट]

हट्टी–टी, हट्टीखोर–बाज वि. हटेला; हेकेखोर; दुराग्रही.

हठ पु. हट्ट; दुराग्रह. पहा : **हट–ट्ट** [सं.]

हठयोग पु. १. प्राणवायूचा निरोध करून चित्तवृत्तीची एकाग्रता करण्याचा योगातील एक प्रकार. २. सतत एका पायावर उभे राहणे, अधोमुख होऊन धूम्रपान करणे, हात वर करून उभे राहणे इ. प्रकारचे घोर तप.

हठौंते वि. अधोमुख : 'षट्चक्रावरौतें । सहस्रदळ असे हठौंतें ।'– विसिंधु ८.५४. [प्रा. हेट्ठ]

हड उद्गा. कुत्रा हाकलताना, बैल पळविताना उच्चारावयाचा शब्द. [ध्व.]

हड स्त्री. तळी, डबकी, खंदक इ. तून उगवणारे जाड, लांब गवत; लव्हाळे.

हड पु. पाणमांजर.

हडकणे उक्रि. (मागावरील कापड, चटई, वेणी इ.) घट्ट आणि अटस होण्यासाठी हाताने किंवा काही साधनाने झटकणे, ठोकणे, आवळणे.

हडकणे, हडंगणे, हडणे अक्रि. १. वाळणे; कडकडीत होणे (ओले कापड इ.) सुकणे. २. रोडावणे.

हडकणे क्रि. सपाटा मारणे.

हड(ट)कता वि. (चुकीने) १. अडकाव, प्रतिबंध करणारा. २. विचारणारा; अडकता.

हडगरी वि. हडगर गावासंबंधी कापड इ.

ह(हं)डगा वि. १. बायकांत वावरणारा; बायल्या; रांड्याराघोबा. २. पहा : **हिडगा**

हडगा पु. तांबडी कुर्ली. (को.)

हडगी स्त्री. मोठी टोपली.

हडगे न. तप्त ज्वाला : 'पंचाग्नीची हडगी । खोलविजति शरीरलागि ।' – ज्ञा १७.२५४. [दे. हडहडो= उष्णता]

हडद–दा–दे स्त्री. पु. न. १. (ल.) गुंता; पायखोडा; बेडी (कुटुंब, नोकरी, धंदा, काम इ.ची). (क्रि. बसणे, येणे, करणे, टाळणे). २. बैदा; त्रास; कष्ट; खस्ता (लहान मुले, आजारी लोक, फार पाहुणे, मोठे समारंभ इ. प्रसंगीची). (क्रि. काढणे, सोसणे, भोगणे, पुरविणे.)

हडप न. १. जामीन; ओल; तारण; गहाण (यावयाच्या पैशासाठी). २. नोकरी बजावल्याचा दाखला म्हणून ठेवलेला जिन्नस. ३. आरोपी किंवा एखादा माणूस वेळेवर हजर ठेवण्यासाठी द्यावयाचा जामीन; जामीनकीची रक्कम.

हडप न. १. पानदान; पानपुडा : 'हडप मी वोळगेन ।'– ज्ञा १३.४१९. २. न्हाव्याची धोकटी. (गो.) ३. लहान पिशवी. [क. हडप]

हडप पु. गहाळ; गुप्त; नाहीसा; गिळंकृत.

हडपणे अक्रि. वारा घालणे. पहा : **झडपणे**

हडपत्ता पहा : **अडपता**

हडपा पु. १. मोठी पेटी; मांदूस; संदूक; धान्य वगैरे ठेवण्याची मोठी पेटी. (को.) २. जिन्याच्या तोंडावरचे दार, झाकण. ३. झडपे असलेले भिंतीतील फडताळ. [क. हडप]

हडपी–पु, हडपेकरी पु. राजे, मोठे लोक इ. च्या जवळ असलेला, लागेल तेव्हा विडा देणारा नोकर : 'जाइलीं सुनी देखे आंधरीं । तरि म्हणे हडपु कवणाचा ।'–उगी ३८४. [क. हडपिग]

हडबड, हडबडाट स्त्री. पु. गडबड; गोंधळ (दंगा, धांदल इ. मुळे).

हडबडणे अक्रि. १. गोंधळून जाणे; गडबडणे; खडबुडणे. २. आकांड–तांडव करणे; बेचैन होणे. [हिं. हडबडना]

हडबडीत वि. (प्रां.) खडबडीत; ओबडधोबड.

हडबा पु. धिंगाणा.

हडवंग पु. क्रोधयुक्त स्पर्धा; मत्सरपूर्वक भांडण. (राजा., को.)

हडवं(वां)गणे अक्रि. खराब, अशक्त, क्षीण होणे; हडकणे.

हडवंगी वि. हट्टी; हेकेखोर.

हडविणे उक्रि. खालून जोर लावून वाकविणे; खाली करणे (झाडाची फांदी, मान इ.).

हडस वि. कणखर; निरोगी; मजबूत; धट्टाकट्टा.

हडसण स्त्री. एक औषधी वनस्पती.

हडसणी स्त्री. १. हडसून करण्याची क्रिया; झटका; हिसडा. २. ढकलणी; घोळणी. ३. झडपणी.

हडसणी स्त्री. मागावरील कापड ठासण्यासाठी असणारी एक फळी; फणी.

हडसणे सक्रि. १. हिसकणे; झटकन ओढणे; झटका मारणे; एकदम जोराने ओढणे. २. गिऱ्हाइकाला देण्यापूर्वी लाभ, बरकत येवो अशा बुद्धीने कापड इ. माल जमिनीवर, फळीवर, पेटीवर आपटणे. ३. निक्षून, बजावून सांगणे, बोलणे. ४.पहा : **हडकणे** [सं. हट]

हडसणे उक्रि. हडपणे. पहा : **झडपणे**

हडसून खडसून क्रिवि. १. हाडसण्याची क्रिया करून; झडकून; हिसडून; जोराने ओढून. २. ठोकून ठाकून; हलवून. ३. निक्षून; बजावून. ४. रोखठोक; स्पष्टपणे; धडधडीत; तोंडावर; निर्भीडपणे. ५. उघडपणे; राजरोस; बिनदिक्कत. ६. सरळपणाने; उघडपणाने; हमखास; मनावर बिंबेल अशा रीतीने.

हडहड स्त्री. १.दगदग. २. धुडकावणी; झिडकारणी.

हडहडणे पहा : **हडकणे**

हडहडीत वि. १. रोडावलेला; कृश. २. हुडहुडी भरवणारा.

हडळ–ळी, हडोळ स्त्री. १. एक स्त्री पिशाच; पहा : **जखीण**. २. (ल.) वाईट, दुष्ट स्त्री.

हडाडलेला वि. व्याकूळ, कासावीस झालेला. (माण.)

हडी स्त्री. चर; चुलाण. (कु.)

हडुती–तीं क्रिवि. खाली : 'सारंग पंडिती हडुती मान घातली ।'– गोप्रच ६.२०७.

हडुं(डों)ग न. पु. १. अडथळा; मोडा; विघ्न. (क्रि. घालणे, पडणे.) २. अडचणीची स्थिती. (क्रि. करणे, होणे.)

हडेलहप्पी स्त्री. दांडगाई; धटिंगणपणा.

हडौती स्त्री. गळ्याखालील हाडांचा खड्डा : 'मग कंठनाळ आटे। हनुवटी हे हडौती दाटे।'– ज्ञा ६.२०७.

हड्डी स्त्री. हाड. (वा.) ० **नरम करणे** – चांगले, बेदम चोपणे, मारणे.

हड्डे न. छाती; स्तन. (गो.)

हड्ड्या पु. कुत्रा, कावळा इ. पशू; हाडके खाणारा, चघळणारा.

हड्या पु. बैलगाडी खाली टेकण्याचा धुरीला जोडलेला खुंटा.

हण पु. हूण लोक व त्यांचा देश. [सं. हूण]

हणगे न. हिणगे; एक प्रकारची कळकाची टोपली. (को.)

हणगोबा पु. १. हनुमान. २. मूर्ख, अडाणी माणूस; सुस्त, आळशी माणूस. २. (निंदार्थी) दुसऱ्याच्या तंत्राने वागणारा मनुष्य. [सं. हनुमान्] (वा.) ० **करणे** – परदेशी गेलेला माणूस परत येईल की नाही हे ठरविण्यासाठी त्याची शेणाची प्रतिमा करणे. **मारून मुटकून हणगोबा करणे** – एखाद्याकडून बळेच विशिष्ट काम करून घेणे.

हणभर वि. दणकट (माणूस). (गो.)

हणम वि. १. (प्रा.) मोठ्या व उभ्या शिंगाचे (जनावर). २. (ल.) मोठ्या शरीराचा, थोराड, धिप्पाड (माणूस).

हणमंतभोवरा एक फुलझाड व त्याचे फूल.

हणवटली, हणवटी, हणू, हणची स्त्री. हनुवटी; हनू. [हिं. हणा]

हणंबार पु. गाई-गुरे राखणारा.

हणा स्त्री. घोड्याच्या जिनाची सोंड.
[हिं. हणा; क. हणे=बुंधाचा वरचा भाग]

हणेफणे पु. हुतुतूचा खेळ. (बे.)

हत वि. १. तडाखा लागलेला, ठोकलेला. २. ठार मारलेला. ३. (ल.) नाश पावलेला; लोपलेला; खुरटलेला इ. अर्थाने समासात उपयोग. [सं. हन् = मारणे]

हतणे क्रि. ठार मारणे : 'ब्रह्महत्या ते ब्राह्मणु हतिलेयावीन कैसी घडे ?'– अली १०१.

हततूक स्त्री. अटकळ; अदमास.

हतदैव–भाग्य वि. कमनशिबी; हीन भाग्य; दुर्दैवी; हतभागी.

हतमाय उद्गा. इश्श; अगं बाई.

हतरकी स्त्री. जमीन भाजण्याचे टहाळे वगैरे. (को.)

हतरूं, हतरूड न. (तिरस्काराने) हत्ती.

ह(हा)तवसणे सक्रि. हस्तगत करणे.

हतवा पहा : **हातवा**

हतवीर्य वि. दुर्बळ; नामर्द; ताकद, सामर्थ्य नाहीसे झालेला (मनुष्य, प्राणी, औषध).

हतश्री वि. संपत्ती, भरभराट, वैभव नष्ट झालेला; कंगाल, गरिबी असलेला.

हतायू वि. आयुष्याचा नाश करणारा.

हताश वि. निराश; आशानष्ट; दुर्बल. [सं.]

हतासन न. (शर.) निमित्त; मिष.

हतास्थ, हतोत्साह वि. आस्था नसलेला; निरुत्साही.

हतिरूं न. हत्तीचे पिल्लू : 'हतिरुएं सिहेंसिं खेळत' –वह १८६.
[सं. हस्तिन्+रूप]

हत्ता शअ. पर्यंत.

हत्ता पु. १. तालमीत दंड काढावयाचे वेळी हात टेकण्यासाठी केलेले दगडाचे, विटेचे, लाकडाचे, मातीचे ठोकळे किंवा ओटे. २. चेंडू, कवड्या इ. खेळताना जेथून खेळावयाचे ती जागा, मर्यादा. ३. हाताचा ठसा. पहा : **हातवा**

हत्तापद्धत स्त्री. धोतराच्या सोग्यात किंवा उपरण्यात हात घालून बोटांच्या साहाय्याने भाव ठरविण्याची जुनी पद्धत.

हत्ती पु. १. सोंड असलेले एक प्रचंड जनावर. २. नक्षत्रमालिकेतील तेरावे नक्षत्र; हस्त. ३. (जरतार) तूर-कोष्ट्याची दांडी ज्यात फिरते तो खांब. ४. बुद्धिबळातील एक मोहोर [सं. हस्तिन्] (वा.) ०**दारात झुलणे** – अत्यंत श्रीमंती असणे. **हत्तीच्या आहारात लाखो मुंग्यांचा आहार चालणे** – थोरांच्या खर्चात अनेक गरिबांचा आपोआप समावेश होणे. **हत्तीच्या गंडस्थळी बसणे** – थोर वैभवास चढणे. **हत्तीच्या दातासारखे दात असणे** – दुटप्पी धोरण, वर्तन असणे. **हत्तीवर बसणे** – मदांध होणे; दारूने मत्त होणे. **हत्तीस ओढाळ कोण म्हणेल** – थोरांचे बिंग बाहेर कोण काढेल ?

हत्तीचा अंकुश (ल.) चोपून काम करून घेणारा.

हत्तीचा पाय १. (ल.) ज्याच्या औदार्याने, श्रीमंतीने अनेकांचा संसार चालतो अशी व्यक्ती, काम, धंदा, नोकरी, इस्टेट इ. २. एक खेळ.

हत्तीचे उथाण हस्त नक्षत्राच्या वेळचा भयंकर उकाडा.

हत्तीचे मढे–प्रेत १. अवाढव्य, बोजड, न पेलणारे काम. २. फार कंटाळवाणे, त्रासदायक काम. (क्रि. पुरणे, उचलणे.)

हत्तीपगी न. पोलादाचा एक प्रकार.

हत्तीपाव न. पांढरे रेशीम.

हत्तीभूमी स्त्री. देह टाकण्यासाठी हत्तीने ठरवून ठेवलेली जागा.

हत्तीभोग पु. जाड तांदळाचा एक प्रकार.

हत्तीरोग पु. फिलेरिया जंतूपासून होणारा व शरीराचा एखादा अवयव (बहुधा पाय) फार मोठा करणारा रोग.

हत्तीवार पु. हस्तनक्षत्राच्या पावसाने येणारे पीक.

हत्तीसेला पु. रंग बदलणारा सरडा. (झाडी)

हत्या स्त्री. १. हिंसा; खून; वध; एक फौजदारी गुन्हा. २. (निंदार्थी) मरतुकडा, रोगट, अशक्त माणूस किंवा पशू. [सं.]

हत्या पु. १. (विणकाम) हात्या; मागाच्या फणीचा दांडा; हात. २. उभे दोरे जीत ओवले आहेत अशी, फणी बसविलेली लाकडी चौकट. ३. रहाटाच्या चाकाचा दांडा.४. पहा : **हत्ता**

हत्याण न. गाढवी, घोडी इ. स्त्री जनावर माजावर येणे; त्यास संभोगाची इच्छा होणे.

हत्यार न. १. शस्त्र; आयुध. २. अवजार; साधन; उपकरण (लोहार, सुतार, गवंडी इ. चे). [सं. हन्=मारणे]

हत्यारबंद, हत्यारी पु. सशस्त्र शिपाई; लष्करी माणूस.
वि. शस्त्रधारी; सशस्त्र.

हत्यारा वि. हत्या करणारा; खुनी. [सं. हत्याकार]

हदन न. परिमाण; प्रमाण.
स्त्री. १. योग्य रीत, क्रिया (एखादी गोष्ट करण्याची). (को.) २. योग्य वेळ. (गो.) [क.]

हदहदणे न. पहा : **हादरणे**

हदाल-ळ वि. थोराड; प्रचंड; मोठा; स्थूल (प्राणी, वस्तू).[क. हदुल]

हदाली फुदाली-ळी स्त्री. पहा : **पुदडा, पुदाडा**

हदाळपार्वती स्त्री. अतिशय स्थूल, फोफशी बाई.

हदी पु. वाटाड्या : 'आपणांपासीहि हे स्थलाचे हदी ज्याणी स्थल पाहिले असेल ते विदीत करतीलच.'- पेद ३.१८३. [अर. हादी]

हदीस स्त्री. पैगंबराचे वाक्य. [अर. हदीस्]

हदेरा वि. घाणेरडा; ओंगळा; हगरा. [सं.हद=विष्ठा]

हद्द स्त्री. १. मर्यादा; बांध; काठ. २. शेवट; पराकाष्ठा; तड. [अर.]

हद्दनामा पु.१. गावशिवेचे टाचण; शेतसीमेची नोंदवही. २. इनाम किंवा वहित शेतांचे सीमापत्रक.
पु. स्त्री. पहा : **हद्दा** २

हद्दा पहा: **हेला**

हन अ. १. अन्; आणखी. २. पादपूरणार्थक शब्द : 'अथवा नावें हन जो रिगे।'- ज्ञा ४.९७.

हनन न. १. वध; हिंसा; ठार मारणे. २. मारणे; ताडन. ३. काटणे; छाटणे. [सं.]

हननीय वि. ठार मारण्यास योग्य.

हनपट्टी स्त्री. गाडीच्या साट्यातील पुढची लाकडी पट्टी. (बे.)

हनव सोन्याचे एक नाणे.

हनवट पु. स्त्रियांच्या पायाच्या बोटात घालावयाचा एक दागिना. पहा : **अणवट, अनवट**

हनुग्रह-स्तंभ पु. दातखीळ बसणे. [सं.]

हनु(न)वटी, हनु स्त्री. तोंडाच्या खालच्या जबड्याचा पुढचा भाग; चिबुक. [सं. हनु]

हनू वि. वरच्या जबड्याच्या हाडासंबंधी.

हपका पु. अपका (चुलीवरचा पदार्थ इ. वर दिलेला); जोराने पाणी इ. शिंपडणे; शिपका. (क्रि. मारणे, टाकणे, देणे). [ध्व.]

हप(ब)शी पु.१. अबिसीनिया देशातील माणूस; सिद्दी. २. श्यामल; जंजिरेकर. [अर.हबशी]

हपाप पु. १. शिव्याशाप; तळतळाट. (क्रि. घेणे, देणे.) २. जुलूम; त्रास; छळ. (क्रि. लावणे, देणे, लागणे, बसणे इ).
स्त्री. हाव; अनावर इच्छा.

हपापणे (क्वचित) जुलूम सोसणे; जुलमामुळे तळतळणे, हाकाटी करणे. [सं. हा ! पापम्]

हपापणे अक्रि. १. हाव करणे; फार लोभ सुटणे. २. अतिशय उतावीळ, उत्कंठित होणे. (वा.) **हपापाचा माल गपापा करणे** – जबरीने किंवा लबाडीने घेतलेला पैसा हाती न लागणे.

हपापी स्त्री. भय; भीती; धडकी. (क्रि. घेणे, सुटणे, बसणे.)

हपाळ न. रिकामे पोट.

हप्ता, हफ्ता पु. १. पैसे (पगार, मजुरी इ.) देण्याची ठरावीक दिवसांची मुदत. २. मुदतीत दिलेला किंवा द्यावयाचा पैसा एकदम न देता येणाऱ्या रकमेच्या ठरावीक मुदतीने थोडा-थोडा देण्याकरिता ठरविलेला भाग; किस्त. ३. आठवडा; सप्ताह.

हप्तेबंदी स्त्री. १. हप्त्याहप्त्याने रक्कम फेडण्याचा ठराव. २. हप्त्याने करावयाची फेड.

हबक, हबा उद्गा. खंडोबाच्या भक्तांच्या अंगात येताना उच्चारला जाणारा शब्द.

हबक-की स्त्री. १. धक्का बसण्याची जागा; नुकसानीचा व्यवहार. २. आलेले नुकसान, तोटा. (क्रि. येणे, बसणे.) ३. वाईट प्रसंग; अडचण; त्रास; लचांड; कटकट. ४. धक्का; आचका; हिसका. (क्रि. बसणे) [ध्व.]

हबक पु. १. जस्ताचे भस्म किंवा लाही. २. एक पांढरा रंग.

हबकणे उक्रि. १. जोराने हलविणे; धक्का देणे, बसणे; हिसकणे. २. (ल.) लुबाडणे; लुटणे; बुचाडणे. ३. जोराने खाली आदळणे; आपटणे.

हबकणे अक्रि. १. भक्ष्यावर उडी मारताना वाघ इ.नी डरकाळी फोडणे. २. हबा ! हबा ! असे ओरडणे (वाघ्या-मुरळीतील वाघ्याने).

हबका पु. १. धक्का. २. तोटा. ३. पहा : **हपका**

हबस १. कैद. २. तुरुंग. ३. कैदी. ४. बंड म्हणजे बांध घालून केलेला जलाशय.

हबसाणी वि. लिहिण्याच्या कागदाचा एक प्रकार.

हबळी स्त्री. चरवी; पातेले. [क. हबुली]

ह(हं)बा स्त्री. १. ओरडा. पहा : **हंबरडा.** २. (मुलांच्या भाषेत) गाय इ. जनावर.
क्रिवि. गुरांच्या ओरडण्याप्रमाणे.

हबा(वा)र पु. ढेकळे फोडून शेतजमीन सारखी करून घेणे.
वि. सपाट; समपातळीत.

हबासणी स्त्री. जोराने ओरडणे; खेकसणे.

हबू पु. बाऊ. (गो.)

हबेधुबे स्त्री. आदळआपट.

हबेरा पु. खेच; ओढ.

हबेलंडी स्त्री. १. घाबरगुंडी; दुर्दशा; गाळण; पच्ची. २. पंचाईत; अडचणीची स्थिती; फजिती. [हिं. हा+बे+लंडी]

हमखास-खास्त क्रिवि. १. प्रसिद्धपणे; जाहीर रीतीने; लहान-मोठ्या सर्वलोकांसमक्ष-करिता-बरोबर. २. निश्चयपूर्वक; खात्रीने; हटकून. ३. सर्वसामान्य. [अर.आम+खास]

हमगी वि. सर्व : 'खानगौडा दत्तक घेतलेला व तिघी बायका हमगीस आणून ठेविले.'- ऐलेसं ९.४६९८. [फा.]

हमचौरस वि. चारी बाजू सारख्या असलेला.

हमजात स्त्री. सर्व प्रकारच्या जाती-जमातीच्या लोकांचा समुदाय.
वि. १. त्याच, एकाच जातीचा (माणूस, जनावर). २. सारख्या वयाचा.

हमतामी वि. कर्तबगार. (गो.)

हमदम पु. सोबती. [हिं.]

हमदार पु. शेजारी. (मालवणी)

हमन(ण)गोळा पु. (बायकी) १. ओबडधोबड गोळा (कणीक, शेण, चिखल इ.चा). २. फोफशी; लठ्ठ व्यक्ती. ३. वेडावाकडा ढीग, रास. ४. (निंदार्थी) ढेरपोटे, आळशी मूल.

हमरस्ता–रहा पु. रहदारीचा, सार्वजनिक रस्ता; राजमार्ग.

हमरंग पु. (गंजिफा) एकच रंग; तोच रंग.
वि. एकाच रंगाचा.

हमरा वि. लायक; समर्थ; बरोबरीचा हमराह.
क्रिवि. संगती; बरोबर; सामील. [फा. हमराह]

हमराई स्त्री. १. हुशारी; लायकी. २. संगत; जूट : 'ज्यांजबर रुपया येतो त्यांजला जखम लागली असतां हळदफटकूं मिळणं कठीण. तेव्हा फौजेची हमराई राहते कशी ?'– हौके ३०. [फा. हमराह]

हमरा(री)तुमरी स्त्री. अरेतुरे; एकेरीची भाषा; जोराचे भांडण. [हिं.]

हमरू पु. किनारीदार रेशमी वस्त्र. [फा. आमरू]

हमरो पु. उंबरठा. (गो.)

हमला पु. आक्रमण; चढाई; जोराचा हल्ला.

हमलो पु. तांबडी मुंगी. (गो.)

हमशा, हमशाधुमशा पु. १. धुडगूस; धांगडधिंगा. २. बाचाबाची; ओढाताण.

हमशाई स्त्री. १. शेजार; शेजारसंबंध. (क्रि. लागणे, असणे.) पहा : **शाई**. २. शेजारहक्क; समाईक भिंतीचा वगैरे हक्क.
वि. शेजारील : 'त्या प्रांतीचे वतनदार हमशाई गांवीचे.'– ऐलेसं १५.८०. [फा. हम्साया]

हमशाईदार वि. शेजारी.

हमसर पु. ग्रामस्थ.

हमसाहमशी क्रिवि.हुंदके देऊन; ओक्साबोक्शी.

हमा(मि)णी–नी, हमी(मे)ण स्त्री. पु. १. पैसे ठेवण्याची लांब पिशवी; कसा : 'कंबरेस हमिन्या द्रव्याच्या.'– मदरु १.६४. २. कोडबोळे. [फा. हम्यानी]

हमाम पु. उखळ; खल. [फा. हावन्; हिं.]

हमाम तेलाने मर्दन करून केलेली अंघोळ, स्नान.

हमामखाना पु. न्हाणीघर; स्नानगृह. [अर. हमाम्+फा. खाना]

हमामा पु. १. गुराख्यांचा एक खेळ. २. (ल.) धुमश्चक्री; धुडगूस; धांगडधिंगा (खेळातील). ३. अस्ताव्यस्त ढीग रास; गडगा (माती, चिखल इ.चा); ओबडधोबड रचना.

हमामो पु. निवळीचे बी.

हमाल पु. १. ओझे वाहणारा मनुष्य; मजूर. २. पालखी इ. वाहून नेणारा माणूस; भोई. ३. अफूच्या बोंडातील रसाचा घट्ट घोळा होण्यासाठी तो रस तांब्याच्या पत्र्यावर तुडवून मळण्याचे काम करणारा इसम.[अर. हम्माल्]

हमाली स्त्री. १. हमालाचा पेशा, धंदा, काम. २. हमालीची मजुरी. ३. बिनडोक काम; केवळ शारीरिक कष्ट.

हमिचा पु. तांब्याचे पैसे वगैरे ठेवण्याची, चारी पाय शाबूत आहेत अशा कोकराच्या कातड्याची पिशवी.

हमी स्त्री. जामीनकी (तिऱ्हाईत माणसाने भरण्याची); खात्री. [अर. हामी]

हमीधुमीचा वि. दिखाऊ; डौलाचा; थाटामाटाचा; डामडौलाचा; दिपविणारा; झगमगीत; उठून दिसणारा (लग्न इ. समारंभ).

हमीन स्त्री. खरतुडीचे मूळ, कांदा.

हमीबंधपत्र न. जामीनकीचा करार; हमीपत्र.

हमीर पु. (संगीत) कल्याण रागाचा एक प्रकार. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर.

हमी(मे)श–शा क्रिवि. नेहमी; सतत; वारंवार. [फा. हमिराह]

हमु पु. अहंकार. [सं. अहम्]

हमरू पु. घोडा फिरवणारा. [फा.]

हय पु. घोडा; अश्व. [सं.]

हयकत स्त्री. हाल; अपेष्टा; तारांबळ. (माण.)

हयकुंडी वि. मानेवर भोवरा असलेला घोडा. हे घोड्याचे शुभचिन्ह मानतात.

हयकोल पु. सरी; बायकांचा गळ्यातील दागिना. [अर. हैकल्]

हयगई–य–यी, हैगई स्त्री. १. दुर्लक्ष; हेळसांड. २. ढिलाई; दिरंगाई; चालढकल. ३. बेफिकिरी; अनादर बुद्धी. [हिं.]

हयपत–ती, हयवत–ती पहा : **हैबत**

हयभंग वि. पोटावर पांढरे ठिपके असणारा घोडा. हे घोड्याचे अशुभ लक्षण मानतात.

हयवदन वि. घोड्याचे तोंड असलेला; अश्वमुखी.

हयवान पहा : **हैवान**

हयवासी वि. स्वार्थी. (कु.)

हया स्त्री. लज्जा; विनय. [अर.]

हयात–ती स्त्री. १. आयुष्य; जिंदगी; जिवंतपणा. २. वय.
वि. जिवंत. [अर. हयात्]

हयासा पु. घोड्याच्या तंगास लावण्याचा वादी किंवा दोरीचा तुकडा; जेरबंद. [फा.]

हर पु. अजगर. (गो.)

हर वि. कठीण; टणक. (व.) (वा.) **०हालणे** – नरम होणे; थोडेफार शिजणे (अन्न).

हर वि. प्रत्येक; दरएक. उदा. हरघडी, हरगाव, हरवखत. इ. [फा.]

हर वि. १. हिरावून नेणारा; उचलून नेणारा; पळविणारा. (समासात) धन–कीर्ती–सुख–कफ–वात–ज्वर–हर. २. (गणित) भाजक. ३.(गणित) अपूर्णांकाचा छेद. [सं. हृ=हरण करणे]

हरक न. एक प्रकारचे पांढरे कापड.

हरक पु. चोर; लुटारू.
वि. हरण करणारा. पहा : **हर १** [सं.]

हर(रि–री)क(ख)णे अक्रि. हुरळणे; खूश, आनंदी होणे. (क.)

हरकत स्त्री. १. अडथळा; आडकाठी; विरोध; अडकविण्याचे, थांबविण्याचे कोणतेही कृत्य, प्रकार. (क्रि. करणे) २. प्रतिकूल वर्तन (देणे–घेणे–चाकरी इ. व्यवहारात); अयोग्य कर्म.३. खोटी; विलंब. [अर. हरकत्]

हरकत स्त्री. (संगीत) विशिष्ट स्वरांची तान. [सं.]

हरकतखोर, हरकती वि. हरकत करणारा, घेणारा.

हरक(को)ल, हरकलपटणी स्त्री. एक प्रकारचा तांदूळ; साळ.

हरकशी वि. कशीबशी; हरएक : 'हरकशी निभावणूक करून तंजावरपर्यंत आले.'– पेशवे महाराष्ट्र २४४.

हरका पु. घोड्याच्या पाठीच्या कण्यास होणारा रोग.

हरकामी–म्या वि. १. कोणतेही काम करण्यास तयार असलेला; अशा बोलीने ठेवलेला (माणूस). २. कोणतेही काम करण्यास ज्याचे हात वळतात असा.३. अनेक प्रकारे उपयुक्त होणारी (वस्तू).

हरकारा पु. १. दूत; निरोप्या; जासूद; बोलावणेकरी. २. हेर; टेहळ्या. [फा. हर्कारा]

हरकारागिरी, हरकारगी स्त्री. हरकाऱ्याचे काम, धंदा; जासुदी.

हरकी, हर्की स्त्री. १. वादात ज्याचा जय होतो, त्याने हर्ष झाल्याबद्दल सरकारात द्यावयाचे द्रव्य; नजराणा : 'कुंभार खरे झाले त्याजपासून हरकी घेतली.'– वाडसमा ३.२६५. २. हरवलेली वस्तू आणून देणारास दिलेली बक्षिशी. ३. चांगली नोकरी केल्याबद्दल, एकदम लाभ झाला असता, एकाएकी मित्रभेट झाली असता, कोणतेही आनंददायक कृत्य चालू असता वाटावयाचे बक्षीस. [सं. हर्ष]

हरकी शि(शे)रिणी १. आनंदाचे प्रसंगी वाटलेली मेवामिठाई. २. पहा : **हरकी** १

हरकूल वि. साग्र; समग्र; तपशीलवार; संपूर्ण.

हरकेंड न. १. हरीक धान्याचा पोकळ दाणा; तूस. २. (निंदार्थी) हरीक.

हरकोणी–ण्ही वि. १. भलतासलता, कोणीही. २. प्रत्येक जण; दरएक.

हरख पु. आनंद; हर्ष. [सं. हर्ष]

हरखी पहा : **हरकी**

हरगा, हरगेचार, हरगेभाई पहा : **हिडगा**

हरगी(घी)ज–स क्रिवि. १. हरहमेशा; नेहमी. २. मुळीच; बिलकूल.

हरजाण वि. मृदू; कोमल.

हरजुरी स्त्री. आंब्याच्या झाडावरील एक औषधी बांडगूळ. (बे)

हरडफुंक्या पहा : **हुरडाफुंक्या**

हरडभरड क्रिवि. आटापिटा; धडपड.

हरडा पु. घोड्याचे खिंकाळणे.

हरडा न. (सोनारी) कमरेच्या गोफाचा एक भाग.

हरडी स्त्री. १. एक जंगली झाड. २. (दातांची) हिरडी .

हरडे न. अंत:करण; छाती. (कु.) [सं. हृदय]

हर(रि)ण पु. न. मृग; एक जनावर. (वा.) **०फाशात सापडणे – पडणे** – अडचणीत सापडून हताश होणे. **०फाशात घालणे** – एखाद्याला मुद्दाम अडचणीत आणणे, टाकणे. [सं.]

हरण न. १. जबरदस्तीने नेणे; लुटणे; अपहार. २. नाश, घात करणे; दूर करणे; नाहीसे करणे (पाप, रोग, भास इ.). ३. (गणित) भागाकार. ४. फेडणे (वस्त्र). [सं.]

हरण स्त्री. सोनार, लोहार यांची ऐरण. [हिं. अहरन]

हरणकाळजी स्त्री. अतिशय काळजी (विशेषत: हरवलेल्या गोष्टीबद्दलची).

हरणटोळ स्त्री. भयंकर विषारी, हिरव्या रंगाची, झाडावर चढणारी सापाची एक जात.

हरणदोडी स्त्री. एक वनस्पती; वेल.

हरणवी(वे)त–वेण न. स्त्री. तात्काल, सुलभ प्रसूती.

हरणवेल स्त्री. फार वाढणारी, फळातून रेशमासारखा कापूस निघणारी, एक वेल; हाणदोडी. हिच्या पानांची भाजी करतात.

हरणाळे न. (चांभारी) हरणाचे कातडे.

हरणी स्त्री. (बैलगाडी) बैलास चाक लागू नये म्हणून चाकाचे पुढे आडवे जोडलेले लाकूड.

हरणे उक्रि. १. जबरदस्तीने, अन्यायाने नेणे, घेऊन जाणे; उपटणे; अपहार करणे; हिरावून घेणे; शमन करणे. २. दूर करणे; नाहीसे करणे; निवारणे (दु:ख, शोक, पाप, त्रास, अडचण, दोष, रोग इ.). ३. जिंकणे; जितणे.

अक्रि. १. पराभव पावणे (युद्ध, खेळ, वाद इ.). २. अपुरे पडणे; कामास न येणे; निष्फळ होणे (बुद्धी, प्रयत्न, शक्ती, शहाणपणा इ.). ३. (ल.) फसविणे; भुलविणे : 'लाघवी हरी मेखळे । लोकु जैसा।'– ज्ञा १५.२४१. [सं. हरण]

हरतलेपण न. अभाव; नसलेपणा : 'हें अथी तरी कायसें हरतलेपण ।'– अमृ ७.१०४.

हरताळ स्त्री. पु. एक पिवळे विषारी द्रव्य. हे पूर्वी हस्तलिखितातील नको असणारा मजकूर खोडण्यासाठी वापरत.[सं. हरिताल] (वा.) **० लागणे–फासणे** – दोष देणे, लावणे. **० लागणे** – चुकीचा ठरणे; खोटा ठरणे; रद्द होणे.

हरताळ पु. बाजार, व्यवहार बंद असणे; काम बंद पडणे. [क.हड्डताल] (वा.) **०पडणे** – दुर्मीळ होणे; अत्यंत उणीव असणे; वाण पडणे. **० फासणे** – धक्का लावणे.

हरताळ(ळि)का स्त्री. १. भाद्रपद शुद्ध तृतीयेस सुवासिनींनी गौरीची, पार्वतीची करावयाची पूजा; त्या दिवशीची तिथी. पूजेची पार्वतीची मूर्ती; हरितालिका. [सं. हरितालिका]

हरतु(तू)ल–ळ न. पुण्यतिथी; स्मृतिदिन. (गो.)

हरद पु. पाण्याचा डोह. [सं. ह्रद]

हरदम क्रिवि. हरघडी; नेहमी; सतत.

हरदमख्याली पु. १. प्रत्येक क्षणी नवीन कल्पना, लहर, ख्याल. २. (अल.) अनेक युक्त्या, यत्न, बेत, योजना, साहसे, श्रम. ३. शोधकता; कल्पकता; हिकमत.

वि. १. फार उलाढाल्या करणारा, चळवळ्या; उद्योगी; युक्तिबाज. २. (ल.) लहरी. ३. लबाड. ४. नटवी; नटरंगी; बदफैली. (माण.)

हरदर्हाल क्रिवि. केव्हाही : 'हरदर्हाल मोहिब्बाचे कामामध्ये तफावत तजावज करणार नाही.'– ब्रूप २००. [फा.]

हरदावळ पु. घोड्याच्या छातीवरील भोवरा. हा अशुभ असतो. [सं. हृदावर्त]

हरदावळी वि. छातीवर भोवरा असलेला घोडा.

हरदाशी–सी वि. हरदास विषयक; हरदासाचा (पोशाख, वाद्य इ.).

हर(रि)दास पु. १. कथेकरी; कीर्तनकार. २. (सा.) कोल्हाट्याप्रमाणे कसब करणारी एक शूद्र जात.

हरदासवळ स्त्री. शाहिरातील एक पक्ष. हे देवास प्रकृतीपेक्षा श्रेष्ठ मानून तुरा–लावणी गातात.

हरदासी घोडा–तट्टू हडकुळे, ठेंगणे, जुलमाने चालणारे तट्टू.

हरदू वि. १. (खतपत्रात) दोघेही; दोन्ही पक्षाचे : 'हरदू असाम्यांचे घराची जप्ती करतील.'– वाडसमा १.१९०. २. दोहोंपैकी प्रत्येक; जोडी. [फा. हर्दो]

हरदू, हरदुसर स्त्री. (गंजिफा) हुकमाची अनुक्रमे दोन पाने. जसे– राजा–राणी, राणी–गुलाम, एक्का–दुव्वा इ. वरच्या रंगातील. [फा.]

हरद्र न. १. अर्थ; उद्देश; मनाचा कल; झोक. २. मजकूर; अभिप्राय; मुद्दा; मतलब (भाषण, क्रिया इ.चा) : 'शामलाकडील वकील बोलाऊन आणून त्याचे हरद्र मनास आणून पक्का तह करणें.'– वाडसमा १.३११. [सं. हार्द]

हरप–फ, हर्फ पु. १. (कागदपत्रात) अक्षर; वर्ण (विशेषत: अरबी, फार्सी) : 'तहनाम्यांत कांहीं हर्फ नीट करावयाचे ते करून...'– मइसा ५.३३. २. दोष; ठपका. (क्रि. लावणे, ठेवणे, लागणे, येणे इ.) ३. (कारकुनी) घड्या पाडलेल्या कागदात दुसऱ्या रकान्याच्या मध्यापासून पुढील रकान्यापर्यंत ओढलेल्या रेघेचे नाव. [अर. हरफ्]

हरपणे उक्रि. हरविणे; गमाविणे.
अक्रि. सांडणे; जाणे; नाहीसे होणे; नष्ट होणे.

हरपनहल्ली होनाचा एक प्रकार.

हरपररेवडी स्त्री. एक प्रकारचा लहान आवळा आणि त्याचे झाड; रायआवळा. [सं. हरिपर्वरि]

हरपळ वि. चपळ.

हरब(भ)क–की स्त्री. खादाडपणा. (कु.)
वि. खादाड; हावरा.

हरबटणे अक्रि. लडबडणे; बरबटणे (माती, चिखल इ.नी अवयव किंवा स्वयंपाकाची भांडी इ.). (को.)

हरबडणे क्रि. ऐन वेळेवर इकडे–तिकडे शोध करणे. (ना.)

हरब(भ)रा पु. एक द्विदल धान्य; चणा; घोड्यास खावयास घालण्याचे एक कडधान्य. [सं. हरि=घोडा+भरक]

हरभा(भां)स वि. फार हुशार; अष्टपैलू; सर्व गोष्टींत निपुण; बहुगुणी.

हरभा(भां)स वि. सर्व प्रकारचा; जातीचा; तऱ्हेचा; नानाविध.

हरमळ स्त्री. पहा : **हरमाळ**

हरमळ वि. (दु:ख; आजार इ. ने) अस्वस्थ; बेचैन.

हरमळणे अक्रि. १. तळमळणे; तडफडणे. २. परिचित होणे; ओळख होणे. पहा : **हरमाळ** ३

हरमंथ हरभरा.–व्युप्र.

हरमा(मो)ळ स्त्री. १. माणसे, गुरे इत्यादींची चालणारी रांग, ओळ, जाणाऱ्या येणाऱ्यांची मालिका. २. नेमलेली, ठरविलेली वेळ. (क्रि. सांभाळणे, पाळणे, साधणे, चुकणे.) ३. परिचय; घसट; वावर.

हरराजी, हरा(रां)जी स्त्री. लिलाव. [अर. हर्राज्, हाराज्]

हरल–ला–ली पु. स्त्री. १. लहानसा प्रवाह; ओढा; ओघळ (विशेषत: पावसाळ्यातील); त्याचे पात्र, मार्ग. २. पाण्यासाठी खोदलेला चर; पाट; लहान कालवा. (कु., को.)

हरला पु. बांबूची लहानशी वाटोळी टोपली; लहान झरा.

हरव(वि)णे उक्रि. १. घालवणे; गमावणे; सांडणे (संपत्ती, कीर्ती, नाव, प्रकृती, सद्गुण, मान इ.). २. गमवावयास लावणे; नुकसान सोसावयास लावणे; लुबाडणे. ३. प्रतिपक्ष हरेल असे करणे; पराभव करणे (वाद, लढाई, खेळ इ.त). (वा.) **हरवस करणे** – हरवून घेणे; आपत्ती ओढवून घेणे. (माण.)

हरवळ वि. उग्र. (दादर)

हरवळ स्त्री. हयगय. (दादर)

हरवळ स्त्री. प्राण्यांची किंवा माणसांची रांग.

हरव(बा)ळ वि. १. खेळकर; आनंदी (मूल). २. चपळ. (माण.)

हरवार–ळ वि. अरुवार; हलके व मऊ; खुसखुशीत (अनारसा इ.).

हरवेल स्त्री. हरणटोळ नावाचा हिरवा साप. (गो.)

हरस पु. बैलगाडीचा कणा. (बे.)

हरसट स्त्री. चंपाषष्टी. पहा : **सट**

हरसाव–ळ न. चोर, शत्रू इ. धाडीवर, सर्व प्रकारची शस्त्रास्त्रे घेऊन उठलेला शेतकऱ्यांचा समूह, थवा. (क्रि. उठणे, मिळणे.)

हर!हर! उद्गा. शिव, शिव; वाईट वाटले असता निघणारा शब्द. [सं.]

हरहर महादेव उद्गा. (आवेश, औत्सुक्य दर्शविणारा उद्गार) १. निकराचा हल्ला करताना मराठ्यांची लढाईत करावयाची गर्जना. २. पंगतीत जेवायला सुरुवात करताना म्हणावयाचा शब्द. ३. सर्वस्वनाश; नायनाट.

हरहरला क्रिवि. १. हटकून; खात्रीने; बिनचूक. २. सतत; नेहमी.

हरहरा, हरारा पु. पातळसर शिरा. (व.)

हरळ–ळी स्त्री. एक प्रकारचे गवत; दूर्वा. [सं. हरिताली]

हरळ पु. न. १. डोळ्यास त्रिकाळ पाणी सुटण्याचा व खुपण्याचा एक रोग. २. डोळ्याचा एक विकार; खुपऱ्या. (क्रि. येणे)

हरळ पु. लहान दगड; बारीक खडे; कण; गार; केर; धूलिकण : 'आणि घासाआंतील हरळु। फेडितां लागे वेळू।'– ज्ञा १३.३३६.
स्त्री. वाळू. [क. हरळु]

हरळ वि. सैल; विरळ; फटी, भेगा असलेला. पहा : **अरळ**

हरळ–ळा पु. १. (वांगी, मिरची इत्यादींचे) रोप लावण्यासाठी जमिनीत खोदलेली लांबट खळी, खांच, चर. २. पाणी नेण्याचा पाट; कालवा. पहा : **हरल.** ३. पाणी वाहण्याने पडलेला ओघळ; चर.

हरळगा पु. एक प्रकारचा तांदूळ. (बे.)

हरळणे अक्रि. १. फट ठेवणे, पाडणे. २. दूर, विरळ असणे (दात, झाडे इ.) : 'दांत कस्करे आणि हरळे।'– दास ३.७.२३.

हरळा स्त्री. गारगोटी.
पु. ओहोळ; चर.

हरळी स्त्री. १. आरोळी; मोठ्याने मारलेली हाक. २. आक्रोश; दु:खाने

फोडलेला हंबरडा; किंकाळी; बोंब. (क्रि. फोडणे, मारणे). ३. (नाट्य.) राक्षसपात्रांची आरडा-ओरड.

हरळीची मुळी १. (दूर्वा उपटली तरी तिचा बीजांश जमिनीत राहून ती पुन: पुन्हा उगवते, यावरून) अनेक प्रकारचे छळ, त्रास इ. सोसूनही टिकाव धरणारी जात, कुळी, समाज. २. जमीन, अधिकार, हुद्दा, मान इ. कोणत्याही रीतीने काढून घेतला असता तो पुन्हा परत मिळविणारी व्यक्ती; विशेषत: वतनदार इसम. ३. अनेक औषधादिकांनी दबविला तरी पुन्हा उचल घेणारा रोग, आजार.

हरळीप्रसाद पु. (ल.) १. हरदासी तट्टू; किमतीत उतरलेला घोडा; नुसत्या गवतावर राहणारा (चंदी न मिळणारा) घोडा. २. कुचकामी नोकर.

हरंबळ स्त्री. हयगय.

हरंबळणे अक्रि. तळमळणे : 'तेणें दु:खें प्राणी हरंबळे।'- दास ३.७.३९.

हरंबंकी अंत:पुराच्या दरवाजावरील एक पहारेकरी. [अ.र.हरं + क. बंकी - राजकोश]

हरंमहाल पु. अंत:पूर; राणीवास; राजाच्या स्त्रियांचे वसतिस्थान.[अर.]

हरागोविंदा उद्गा. काही उत्तर नाही, कृती नाही अगदी तटस्थता आहे असे दर्शविणारा शब्द. जसे : - रामाशिवा गोविंदा !

हराडा पु. तापाची कसर; अंग मोडून येणे. (व.)

हराम वि. १. बेकायदेशीर; असमान; विषम; दुष्ट; वाईट; अन्यायी; गैरशिस्त; निंद्य (व्यक्ती, काम). २. निषिद्ध (अन्न). [अर. हराम]

हरामखोर वि. १. स्वामिद्रोही; लुच्चा; बेइमान. २. निषिद्ध अन्न सेवन करणारा. ३. लाचखाऊ; अप्रामाणिक. [फा. हराम्खुर्]

हरामखोरी स्त्री. १. बेकायदेशीर कृत्य; अप्रामाणिकपणा; स्वामिद्रोह; लुच्चेगिरी. २. निषिद्ध अन्न सेवन. ३. लाच खाणे; अन्यायाची प्राप्ती. [फा. हरामखुरी]

हरामजादगी पहा: **हरामखोरी** १, ३

हरामजादा वि. १. अनौरस; जारज. २. स्वामिद्रोही; लबाड; बेइमान. ३. धूर्त; दुष्ट; कपटी; बदमाश; ठग. [फा. हराम्झादा]

हरामनमकी स्त्री. नमकहरामी : 'पादशहाशी ज्यानें हरामनमकी बे- अदा केली.'- पया २१.

हरामी वि. लबाड; लुच्चा; कपटी. पहा : **हराम**

हरारा पु. हळदीचा काढा. (झाडी) [सं. हरिद्रा]

हरावणे अक्रि. नष्ट होणे; नाहीसे होणे; उतरती कळा लागणे.

हरावल पु. हरोल; सैन्याची आघाडी. [फा. हरावुल्]

हराशिवा उद्गा. स्पष्टपणे नाकबुली; नकार देताना उच्चारण्याचा शब्द.

हराष पु. तोटा; नुकसान; हानी. [सं. ऱ्हास]

हरास पु. लिलाव; विक्री.

हराहोरा पु. पहा : **हरेंवारें**

हरांजनी वि. एक विशिष्ट रंगाचा घोडा.

हरि-री पु. १. विष्णू; कृष्ण. २. इंद्र. ३. जुन्या संस्कृत व प्राकृत वाङ्मयात 'हरि'शब्द घोडा; सिंह; माकड, बेडूक, सूर्य, यम, वायू, चंद्र, प्रकाशकिरण, पोपट, सर्प इत्यादी अर्थाने येतो. ४. पृथ्वीच्या नऊ वर्षां(भागां)पैकी एक वर्ष (हे निषध व हेमकूट यांच्यामध्ये आहे).[सं.]

हरिकअम्ल न. (शाप.) क्लोरिक ॲसिड.

हरिचंदन पु. पिवळा चंदन.
न. केशर.

हरिजन पु. महार, मांग, भंगी इ. अस्पृश्य जाती व त्या जातींतील व्यक्ती.

हरिजागर पु. एकादशीच्या रात्रीचे जागरण.

हरिणी स्त्री. १. हरणाची मादी. २. स्त्रियांच्या चार जातींपैकी एक. ३. (छंद) एक वृत्त. चरणातील अक्षरे १७, गण न, स, म, र, स, ल, ग. [सं.]

हरित वि. हिरवे.

हरितक्रांती स्त्री. संकरित व सुधारित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके व जंतुनाशके, यांत्रिक साधने यांचा वापर केल्याने शेती करण्याच्या पद्धतीत झालेला बदल व उत्पादनात झालेली लक्षणीय वाढ.

हरि(री)तणे सक्रि. हिसकावून घेणे; काढून घेणे; नाहीसे करणे.

हरितद्रव्य न. वनस्पतीच्या पेशींमधील अन्न- उत्पादक हिरवा घटक.

हरिदिन-नी पु. स्त्री. एकादशी.

हरिद्रा स्त्री. हळद.

हरिद्रा राग वि. १. हळदीच्या रंगाचे. २. (ल.) चंचल; अस्थिर वृत्तीचा.

हरिनाख-ग वि. १. एकरंगी पण पाठ पांढरी असणारा (घोडा). २. दोन्ही कानात आणि डोक्याच्या केसात भोवरा असलेला (घोडा).

हरिपद न. मेषसंपात; महाविषुव. [सं.]

हरिपी-प्या वि. धाडसी; साहसी; धाडसाच्या कामात पुढे असणारा.

हरिपी-फी, हरिफाई स्त्री. १. वैर; शत्रुभाव. २. धाडस; साहस; धैर्य; धाडसी कृत्य. ३.धूर्तता; चतुराई; कावेबाजी.

हरिम(मे)खळ पु. दैवी चमत्कार : 'हे लाघव की हरिमेखळ।'- लीचपू ५६२.

हरियळ-ह्याळ पु. मधमाश्या खाणारा प्राणी.

हरियाळ स्त्री. कोवळे गवत; हरळी.

हरिरंगण न. देवापुढील भजन, नृत्य करण्याची जागा.

हरिवासर पु. १. द्वादशीचा प्रथम पाद; निशिवासर. (यात भोजन करावयाचे नसते.) २. आषाढ, भाद्रपद, कार्तिक या महिन्यांतील शुद्ध द्वादशीचा व अनुक्रमे अनुराधा, श्रवण, रेवती या नक्षत्रांचा योग; नक्षत्रवासर.

हरिविठ्ठल उद्गा. १. भजनातील नामोच्चार. २. (ल.) सत्यानाश.

हरी स्त्री. हार; ओळ; रांग (झाडे, पिके इ.ची). [सं.]

हरी स्त्री. पराभव; हार.

हरी क्रिवि. दिशेने; ओळीने.

हरीक पु. कोदू नावाचे हलके, नाचणीसारखे धान्य. याचा आकार राईसारखा व रंग पिवळा असतो.

हरीचा लाल वि. १. चैनी,रंगेल मनुष्य. २. कोणीतरी, कोठलातरी माणूस.

हरीतकी, हर्तकी स्त्री. पिवळा हिरडा. [सं.]

हरीप-फ पु. १. शत्रू; वैरी; बलाढ्य प्रतिस्पर्धी. २. शौर्यादी गुणांमुळे दुसऱ्याचे दमन करणारा माणूस. ३. लबाड, धूर्त माणूस; कावेबाज शत्रू : 'मराठे हरीफ बहुत आहेत, असे बोललों'- सभासद ४९. ४. गोहो; घोव.५. वस्ताद; तोडीस तोड देणारा, तुल्यबळ माणूस. [अर. हरीफ्]

हरीरा पु. औषधीयुक्त गोड सांजा; गाय, म्हैस वगैरेंना व्याल्यानंतर द्यावयाचा खुराक.

हरीला पु. हळदीचा काढा. (वैदर्भी) [सं.]

हरुख-ष, हर्ख पु. (अप.) पहा: **हर्ष**

हरेंवा(हो)रे न. (ख्यालीखुशाली, चैन इ.ची) अस्थिरता; चंचलता; क्षणभंगुरता; पोकळपणा. पहा : **हरा** [सं. होरा = भविष्य + म. वारे]

हरोल-ळ-ली स्त्री. १. सैन्याची आघाडी, बिनी : 'जाधवराव पुढें हरोलीस आले.'- पेद १.२२. २. (ल.) पुढारी माणूस; नायक : 'तुम्ही या मनसबियास हरोल होऊन मनसुबा सिद्धीस जाय तें करणें.'- वाडशाछ ३०. ३. पहा : **हरवळ** [फा. हरबुल्]

हरोह(हा)र विक्रि. पहा : **हारोहार**

हरोळी स्त्री. आरोळी; भाकर; लहान पोळी, भाकरी.

हर्क पु. हरिख; हर्ष : 'तर्कांत तर्कला किं तर्क । तर्कांत हर्कला किं हर्क ।'- ज्ञाप्र ३६०. [सं. हर्ष]

हर्कंड्या वि. कंजूष. (झाडी) [सं. हरिद्राखंड]

हर्कारा पु. १. सर्व कामे करणारा नोकर. २. जासूद; टेहळणी करणारा. [फा.]

हर्ता वि. १. हरण करून नेणारा; बळजबरीने घेऊन जाणारा; पळवून नेणारा. २. निवारण करणारा (संकट इ.); हरिता. [सं.]

हर्तृत्व न. १. पळविणे; हरण; अन्यायाने संपादन. २. लुबाडण्याची इच्छा.

हर्म्य पु. प्रासाद; राजवाडा. [सं.]

हर्यळ पु. पहा : **हरियळ**

हऱ्याळ पु. लहान हिरवट साप.[सं. हरित्=हिरवे. अहार-आर=अजगर]

हर्वजेने क्रिवि. कोणत्याही रीतीने, पद्धतीने; काही झाले तरी : 'शिकंदरि-याहून शादल निघाला म्हणजे मार्गीच हर्वजेने शिक्षा करितो.'- मइसा ६२३. [फा. हर्वजह्]

हर्ष पु. आनंद; उल्हास; सुख. [सं.]

हर्षक वि. आनंद देणारा.

हर्षण न. आनंद करणे-देणे; आनंदावस्था.

पु. (ज्यो.) चौदावा योग.

न. पु. डोळ्यांचा एक रोग.

हर्षणे अक्रि. आनंदणे; आनंद पावणे.

हर्षमाण वि. आनंदित; उल्हसित; आनंद उपभोगणारा.

हर्षवायू पु. आत्यंतिक आनंदाने होणारा वातविकार.

हर्षामर्ष-र्षा पु. १. तंटाभांडण; अरे तुरे; शिव्या देणे; चुरस : 'त्यांचा तुमचा हर्षामर्ष पहिलेपासून लागला.'- वाडशाछा २४. २. आनंद व क्रोध; रागलोभ: 'हर्षामर्ष ठेलें । दुजेनविण ।'- ज्ञा १२.१६८. [सं. हर्ष+ अमर्ष]

हर्षित वि. आनंदित; आनंदलेला; आनंदित झालेला, केलेला.

हल-ळ पु. नांगर.

हलक स्त्री. गवयाचा गळा; आवाज; फिरकी. [अर. हल्क्]

हल(ल्ल)क, हलाक-ख वि. १. नि:शक्त झालेला; दमलेला; क्षीण (दुखणे, श्रम इ.ने). २. गरजू; निष्कांचन; दरिद्री. [अर.]

हलकट वि. पहा : **हलका**

स्त्री. दंगाधोपा; हाणामारी; लुटालूट.

हलकटणे अक्रि. दंगा चालू असणे.

हलकडी स्त्री. १. नथीचे लोंबते मणी; झिरमिळ्या. २. मोती गुंफण्यासाठी दुफाशी नथीला जोडला जाणारा तुकडा. ३. पाळणा, झोपाळा टांगण्याचा आकडा, कडी. [अर. हलका]

हलकथील न. चित्रे इत्यादी रंगवण्याच्या उपयोगी एक पदार्थ. हा जस्तापासून करतात. [अर. हल्ला(=विरघळणे)+कथील]

हलकलणे अक्रि. १. (दंगाधोपा, आग, दुष्काळ इ.नी देश, गाव, जनसमुदाय इ.) गडबडणे; गोंधळणे. २. अस्वस्थ; बेचैन; फार प्रक्षुब्ध होणे.

हलकल्लो(ल्हो)ळ-कालोळ पु. आरडा-ओरड; बोंबाबोंब; गडबड; गोंधळ; मोठा बेसूर आवाज.

हलकल्हाई स्त्री. जस्तापासून तयार केलेला मऊ व हलका पदार्थ.

हलका-गा पु. दिवा, झोपाळा, पाळणा इ. च्या दोऱ्या, कड्या, छतास टांगण्यासाठी केलेले विशिष्ट आकाराचे आकडे, प्रत्येकी : 'लावून रुपेरी हलके हिंदुळे बांधिले ।'- प्रला. [अर. हलका]

हलका पु. एक वाद्य. याला हलका व धूम नावाची दोन डफडी असतात. पहा : **संबळ**

हलका वि. १. वजनात कमी; जड नसलेला. २. लहान; न्यून (प्रमाण, वजन, लांबी इ. मोजताना). ३. कमी प्रतीचा; कडक नसलेला (गुण, प्रभाव इ.त). ४. सौम्य, मंद, कमजोर (थंडी, पाऊस इ.). ५. पचण्यास सोपे, जड नसलेले (अन्न). ६. शरीरास गुणकारी. ७. सहन करण्याजोगा, फारसा मोठा नसलेला; क्षुल्लक (रोग, विकार, काम). ८. कमी महत्त्वाचे, किरकोळ (काम, बाब). ९. कमी दर्जाचा, अधिकाराचा (माणूस). १०. कमी किमतीची (वस्तू). ११. बेताची, प्रमाणशीर, कमी (किंमत, घट). १२. क्षुल्लक, गौण (विषय). [सं. लघु, क्षुल्लक]

हलकाई वि. तत्परता; उरक.

हलका भार कमी पत, नाव.

हलका(क)रगिरी स्त्री. हलकाऱ्याचे काम व हुद्दा.

हलका(क)रत-ती स्त्री. १. आत दिवे (कापूर इ.) लावून देवास ओवाळावयाचे एक लांबट व चपटे असे धातुचे पात्र. २. आरती.

हलकावणे विनीत, नम्र होणे.

क्रि. १. हलके करणे, होणे. २. (एखाद्याचा ताठा, गर्व) उतरविणे, खाली करणे; विनीत, नम्र होणे.

हलकिस्त रक्कम वसुलीसाठी ठरवून दिलेला हप्ता.

हलकी-गी स्त्री. एक चर्मवाद्य; खंजिरी; डफडी.

हलकूत-द वि. मऊ व नाजूक; हलकी (वस्तू, प्रकृती, व्यक्ती).

हलकूम-न पु. (कुस्ती) हातखोडा; आपला हात जोडीदाराच्या पलीकडच्या बरगडीवरून घालून, अलीकडच्या आपल्या हाताच्या कोपऱ्याच्या सांध्यात आपल्या हाताचे मनगट धरून, जोडीदाराच्या पोटास दाब देऊन घुसमटून चीत करणे.

हलकूम उलटा (जंबिया) आपल्या जंबियाने जोडीदाराच्या गळ्याच्या घाटीजवळ उजवीकडे मारणे. [अर. हल्क-हलकूम्=गळ्याची घाटी]

हलकूम साधा (जंबिया) वरील डावाच्या उलट.

हलके न. १. लहान हलका-की (कडी, डफडे). २. लहान हलकरती.

हलकेफूल वि. साधे, बिनत्रासाचे (काम, धंदा).

हलक्याने क्रिवि. हळू; कमी प्रमाणात; सावकाश (बोलणे, चालणे इ.).

हलख स्त्री. वि. पहा : **हलक**

हलखु(खू)द अ. आहे त्या स्थितीत; आहे त्या ठिकाणी.

वि. हलके; सहज व्यवस्था करता येणारे; अवघड नसलेले; बिनत्रासाचे (काम, शरीर इ.). [फा. खुर्द=लहान]

हलगरजी-जू वि. निष्काळजी; सुस्त; मंद; बेफिकीर. [फा. अहल्-इ-गरझ्=स्वार्थी]

हलगूज न. एक तंतुवाद्य; (इं.) व्हायोलीन. (व.)

हलगो मालगो टंगळमंगळ; कां कू; चालढकल. (क्रि. करणे)

क्रिवि. कां कूं करीत. [ध्व.]

हलद(दि)वा वि. पिवळा (गडद). (को.)

हलदाइ वि. नांगरास जुंपलेले : 'हलदाइया बैला सिद्धवै' - पाटण I शिला २३. [सं. हल]

हलन्त वि. (शब्दाच्या) शेवटी स्वर नसून व्यंजन असणारा शब्द.

हलपटणे सक्रि. फेकणे. (बे.)

हलफिलाल क्रिवि. आत्तां; या क्षणी; त्वरित. [अर्. हाल, फिलहाल]

हलबेलंडी-बालंडी-बेलंडे गाळण; तारांबळ; तिरपीट पहा : **हबेलंडी** [हिं. हे+बे+लंड]

हलमस्त वि. दरिद्री परंतु गर्विष्ठ. पहा : **हालमस्त**

हलमा दांडू वि. आडदांड. (व.)

हलयाणे सक्रि. हलासिणे; हाणणे.

हलरू न. १. अंगाईगीत. २. गाणे.

हलवा पु. १. एक मिठाई. २. तीळ, लवंगा, वेलची दाणा इ. साखरेच्या पाकात घोळून त्यावर काटा आणून तयार केलेली मिठाई; संक्रांतीचा तिळगूळ. ३. एक जातीचा मासा. [अर. हल्वा]

हलवाई पु. सर्व प्रकारची मिठाई तयार करून विकणारा मनुष्य; मिठाईवाला. [फा. हल्वाई]

हलवान न. कमी किमतीच्या शालीचे एक पान; एकेरी वस्त्र. पहा : **अलवान**

हलवान न. पेल्यासारखे भांडे.

हलवांग पु. खुशामत्याचा अंगविक्षेप. (गो.)

हलसूद पहा : **हलखूद**

हलह(हा)लणे अक्रि. राग इ. विकाराने अंगाचा थरकाप होणे. [हिं. हलहलाना]

हला पु. होला; कपोतपक्षी.

हलापला वि. चपळ; दक्ष; भरभर काम करणारा. (क.)

हलायक वि. पाच ते दहा अंगुळेपर्यंत पांढरे पाय असलेला (घोडा).

हला(ल्ला)ल वि. १. योग्य; विहित; न्याय्य; अनिषिद्ध (खाद्य वस्तू, दान देण्याचे पदार्थ इ.); विधिपूर्वक मारलेल्या पशूचे (मांस). २. रास्त; योग्य; प्रामाणिक; उत्तम; कायदेशीर (धंदा, नेमणूक, काम, फायदा, मिळकत). [अर. हलाल]

हलालखोर पु. १. स्वत: श्रम करून खाणारा माणूस. २. भंगी; झाडूवाला: 'क्षेत्र मजकूरच्या गल्ल्या हलालखोरांकडून झाडवून निर्मळ राखणे.' - वाडसमा ३.१२. ३. हलके काम करणारा. ४. धन्याची तत्परतेने सेवा करणारा. [फा. हलालखुर्]

हलालखोरी स्त्री. १. हलालखोराचा धंदा, स्थिती. २. हलका धंदा. ३.प्रामाणिकपणा; इमानीपणा.

वि. बरे वाईट; भलाबुरा.

हलालणे अक्रि. अतिशय हलणे; हलहलणे.

हलालाचा वि. योग्य मार्गाने, न्यायाने मिळविलेला, संपादलेला.

हलाली हरामी प्रामाणिकपणा व अप्रामाणिकपणा; बरेवाईट.

वि. बरेवाईट; भलाबुरा.

हलासणे अक्रि. अतिशय हलणे; हलहलणे.

ह(हा)लास(सि)णे क्रि. हाणणे.

हलासन न. योगासनातील हलाच्या आकृतीसारखे दिसणारे आसन.

हलाहल, हला(ल्ला)ळ न. १. समुद्रमंथनातून निघालेले भयंकर विष. २. सापाचे जहाल विष; जहर.३. सहन करण्यास कठीण असे दु:ख.

हलिक-प, हली पु. नांगऱ्या; शेतकरी : 'जेंवि भजे शस्त्रपाणि हलिक वडा।' - मोवन ४.९२. [सं. हल]

हलीमवाली पु. अव. लहानमोठे; उच्चनीच; गरीबश्रीमंत; सरसकट सारेजण.[अर. अहालीमवाली(=धर्माप्रमाणे हत्या केलेला प्राणी.)]

हलीहरामी स्त्री. ठकबाजी, लुच्चेगिरी यांचा अतिरेक.

वि. लुच्चा; लबाड; अप्रामाणिक; भामटा.

हलुवट वि. हलके. पहा : **हळुवट**

हलुस्वार वि. हौशी. (कु.)

हलूमालू स्त्री. पहा : **हलगोमालगो**

हलेणे सक्रि. बडविणे; मारणे : 'साउलियेते साबळें। हालया भोय आदळें।' - अमृ ६.४४.

हलेसा पहा : **पतिंगा**

हलो-ल्या पु. रेडा; टोणगा; (ल.) मंद. [सं. हल्य; हिं. हेला] (वा.) **हल्या हल्या करणे** - टुमणे लावून काम करून घेणे. (कर.)

हलोह(हा)ल क्रिवि. हलफिलाल. पहा : **हालोहाल**

हल्या पु.निरुपयोगी मनुष्य; एक शिवी. [क. होलये (=कमी)]

हल् पु. १. व्यंजन. २. अर्धाक्षर, व्यंजन दर्शविणारी अक्षराचे खालील पाय तोडायची (-्) अशी खूण. (क्रि. देणे, करणे). ३. असल्या खुणेचे अक्षर. [सं.]

हल्य वि. नांगर, नांगरटीसंबंधी. [सं.]

हल्लर पु. न. पहा : **हलरू**

हल्ला स्त्री. पु. १. चढाई; छापा; एलगार. २. (ल.) आवेशाने झटणे; जोमाने, निश्चयाने एखाद्या कामास लागणे. [अर.]

हल्लाहरकत स्त्री. १. अडथळा; त्रास; विघ्न; तंटाबखेडा. २. (चुकीने) हिल्ला हरकत - असेही रूप आढळते.

हल्लाळी वि. मारलेल्या जनावराचे काढलेले (कातडे). पहा : **हलाली**

हल्ली क्रिवि. सांप्रत; आता; यावेळी. पहा : **हाली**

हल्लीसक नृत्य रासक्रीडेचा एक प्रकार.

हल्संधि पु. व्यंजनाशी होणारा संधी. उदा. महान्+अहं=महानहम्.[सं.]

हव(वा)ई–यी स्त्री. १. मोठी चंद्रज्योत (शोभेच्या दारूची). २. एक प्रकारचा बाण (दारूचा) : 'हवया गगनातें भेदिती। देव पाहती विमानीं।'– ह २४.१३४. ३. उंच स्वरातील तान. [फा. हवाई]

हवडा पु. कपटाने गिळंकृत करणे; डल्ला.

हवणे सक्रि. होम करणे; आहुती देणे.

हवन पु. होम; अग्नीत आहुती टाकणे.

हवनी स्त्री. होमकुंड.

ह(हा)वर, हवळा वि. लोभी; अधाशी.

हवरा–री पु. स्त्री. पांढरे तीळ.

हवळा पु. हुळा; हिरव्या हरभऱ्याचे भाजलेले घाटे. [सं. होलक]

हवळा वि. नाजूक; कोमल (व्यक्ती, रचना, प्रकृती, शरीर, झाड इ.).

हवळा पु. धुडगूस; धिंगाणा; उपद्रव. (तंजा.)

हवळा (अप.) पहा : **होवळा**

हवा स्त्री. १. वारा; वायू; पंचमहाभूतांपैकी एक. २. हवेचे शीतोष्णमान; प्रकृतीवर परिणाम करणारा गुणधर्म. ३. आकाशाची पोकळी; अंतराळ. ४. हवापाणी. ५. खेळण्याची जागा. ६. धुंदी : 'उतरली भरजवानीची हवा।'– पला. [अर. हवा] (वा.) ० **असणे – लोकांत विशिष्ट प्रकारचा बोलबाला, समज असणे.** ० **खाणे** – सहल करणे; फिरावयास जाणे. ०**खेळणे** – घरात हवेचा प्रवाह सर्वत्र मोकळेपणाने वाहणे. **डोक्यात हवा जाणे** – गर्व चढणे.

हवाई वि. हवेसंबंधी.

हवाई स्त्री. छापा; हल्ला : 'तेथून सडे होऊन रोज फौज येत चालली म्हणजे त्याजवरी हवाई करावयास येईल.'– ऐलेसं १.२०७.

हवाई छत्री विमानातून उडी मारल्यानंतर सुरक्षिततेसाठी काही काळ हवेत तरंगतां यावे व सुखरूप जमिनीवर उतरता यावे म्हणून वापरले जाणारे मोठ्या छत्रीसारखे साधन; (इं.) पॅराशूट.

हवाई रज्जूमार्ग उंच ठिकाणी सहज जाण्यासाठी हवेत उभारलेला, लोखंडी दोरखंडावरून विजेच्या साहाय्याने जाणाऱ्या वाहनाचा (विजेच्या पाळण्याचा) मार्ग; (इं.) रोप वे.

हवाईसुंदरी स्त्री. विमानातील प्रवाशांची देखभाल करणारी स्त्री.

हवाडी स्त्री. सुकाणूची मूठ.

हवादोज वि. उंच; गगनचुंबी.

हवापूरक पु. हवा भरण्यासाठी (फुगा, टायर इ. मध्ये) वापरण्याचे साधन.

हवार वि. सपाट.

हवारू वि. दोन ही संख्या. (नंदभाषा) पहा : **अवारू**

हवालणे उक्रि. सोपविणे; सुपूर्त करणे; स्वाधीन करणे, जबाबदारीवर टाकणे; हवाला देणे (कर्ज, काम इ.चा).

हवालत स्त्री. सोपवणूक; जबाबदारी; भिस्त. पहा : **हवाला**

हवा(व)लदार पु. १. सुभेदाराच्या हाताखालचा मुलकी अधिकारी. २.किल्ल्याचा रखवालदार अधिकारी. ३. इंग्रजी सैन्यातील सार्जंटच्या तोलाचा अधिकारी. ४. एक पोलीस अधिकारी. [फा.]

हवालदिल–ली वि. घाबरलेला; धीर सुटलेला. [फा.]

हवाला पु. १. ताबा; काळजी; भिस्त; दुसऱ्याकडे सोपविणे. २. हमी; जामीनकी. ३. रखवाली; राखण; टाकलेला विश्वास. ४. मुखत्यारी; जबाबदार ताबा किंवा अधिकार. (क्रि. देणे, घेणे.) [अर.]

हवाला कपाला–टवाला (सामान्यतः) हमी, हवाला इ.

हवाला–ली–ले क्रिवि. (रक्षणासाठी वगैरे) स्वाधीन. (क्रि. करणे, होणे.)

हवाव स्त्री. शोभा; तेज; रंग : 'सहज रंगे हवावें।'– ज्ञा १५.१६१.

हवावी स्त्री. धावल्याने लागलेली धाप, दमा; ऊर्ध्व.

हवि–वी न. होमात टाकावयाचे (तूप, भात इ.) द्रव्य, पदार्थ; बली. [सं. हविस्]

हवित्रि–त्री स्त्री. होमकुंड.

हविष्य न. १. हवन करण्यास योग्य वस्तू; हवी. २. व्रतादि दिवशी खाण्यास योग्य असा शुद्ध पदार्थ (गहू, गाईचे दूध इ.). ३. (ल.) वरील पदार्थ खाण्याचे व्रत, नियम, बंधन. ४. (उप.) नेहमीची लोकाचाराविरुद्ध किंवा स्वैर वागणूक; वहिवाट, नेम, प्रघात, व्यसन. [सं.]

हविष्यान्न पु. पहा : **हविष्य** १–३

हवी स्त्री. माहिती; बातमी.

हवेज न. धणे; कोथिंबिरीचे बी. (तंजा.)

हवेली स्त्री. १. मोठा वाडा; राजवाडा; मंदिर; मोठे व सुशोभित घर. २. जिल्ह्याचे ठिकाण; राजधानी. (प्रांत, जिल्हा याच्या मुख्य शहराच्या नावापुढे किंवा मागे जोडून हा शब्द येतो). ३. राजधानीच्या भोवतालचे भाग; गिर्द. [फा. हवीली]

हवेशर वि. माहीतगार.

हव्य न.१. पहा: **हवि–वी**. २. यज्ञयागादी कर्म. [सं.]

हव्यकव्य न. (देवांसाठी ते हव्य, पितरांसाठी ते कव्य) देव व पितर यांना हविर्भाग अर्पण करावयाचा विधी, होमहवन, व्रत; पूजा; श्राद्धपक्ष इ.

हव्यवाट् पु. अग्नी. [सं.]

हव्या स्त्री. अव. आश्रयाच्या जागा.

हव्याशा–सी वि. १. सकाम; सतृष्ण. २. नादी; छंदी; सोसबाहुला.

हव्यास पु. १. उत्कट इच्छा; तृष्णा; हाव; छंद; नाद. २. सोस. (क्रि. घेणे, लागणे.) ३. उत्साह. [अर. हवस्]

हश(शा)म,हशमत न. लवाजमा; परिवार; नोकरचाकर; शिपायी–प्यादे; अनुयायी (मोठ्यांचे). [अर. हशम्]

हशमदस्तगाह–पन्हा वि. ऐश्वर्यसंपन्न. [अर.]

हशमनवीश–स–नीस पु. किल्ल्यावरील किंवा सैन्यातील सैन्याची हजेरी, हिशेब इ. ठेवणारा अधिकारी. [फा. हशमनवीश्]

हशमनिशी–सी स्त्री. हशमनिसाचे काम; हुद्दा.

हशा पु. कापडाची किनार, काठ (शाल, गालिचा, दुलई इ.चा). [अर. हाशिया]

हशा पु. १. मोठ्याने खो खो हसणे; हास्य. २. पहा : **हंशी**. ३. लहान

मुलांचे हसणे-खिदळणे. [सं.हस्]

हशीरखुशी स्त्री. प्रसन्नवृत्ती; राजीखुशी.

हशीरखेळी स्त्री. मजा; चैन; हसणे-खेळणे.

ह(हं)शील न. (प्र.) हाशी(सी)ल. १. सरकारी कर, आकार; सरकारी देणे. २. हेतू; उद्देश; अर्थ; तात्पर्य. ३. टपाल इत्यादीचा खर्च, आकार, किंमत, फी. ४. प्राप्ती; लाभ; नफा : 'साहुकारीमुळें जकातीचेंच हशील होईल.' - मराआ ३७.

वि. प्राप्त : 'पुढें मुद्दे हशील होतील.' - ऐलेसं २.५४८. [अर. हासिल्]

हशीश न. अंबाडीच्या वाळलेल्या पानांपासून बनविलेले, कैफ आणणारे मादक द्रव्य. [अर.]

हसकार-रा पु. (बायकी) (डोळ्यांत अश्रू, विहिरीत पाणी, घरातील तूप इ. संबंधी योजतात.) पूर्ण अभाव, नकारघंटा या अर्थी अभावात्मक प्रयोग.

ह(हं)सडणे उक्रि. १. जोराने हिसका देणे; आचका मारणे; ओढणे; झटकणे. २. (ल.) (एखाद्यापासून) द्रव्य इ. काढणे; धुतारणे; लुबाडणे. ३. भोसडपट्टी काढणे; खडसावणे; खडसणे.

ह(हं)सडा पु. १. जोराचा हिसका, झटका, आचका (तंगडी इ.चा). २. मृत्युसमयीचा जोराचा श्वास, घोर. ३. (ल.) खरडपट्टी, खडसणी. (क्रि. काढणे) पहा : **आसडा**

हसणे उक्रि. १. आनंद किंवा गंमत वाटल्याने फुप्फुसातील हवा तोंडातून जोरात बाहेर टाकणे व त्या वेळी काही शब्दहीन आवाज काढणे. २. (ल.) एखाद्यास नावे ठेवणे; खोड्या काढणे; उपहास करणे. ३. (ल.) फुटणे; उलणे (करंजी, गुरवळी, लाडू इ.). [सं. हसनं]

(वा.) **हसून गोड (साजरे)करणे** - १. दुसऱ्याचा राग, विषाद शेवटी गोड शब्द बोलून घालविणे. २. गोड बोलून फसविणे.

हसतशिंदळ वि. १. नखरेबाज; चटकं चांदणी (परंतु प्रत्यक्षात व्यभिचारी नसलेली स्त्री). २. मोठमोठ्याने हसण्याची खोड असलेला (पुरुष). ३. हसवून फसविणारा, भ्रष्टविणारा, भुरळ घालणारा; गोड बोलून केसाने गळा कापणारा.

हसता-रा वि. १. हसणारा. २. (ल.) हौशी; रंगेल; आनंदी; खेळकर.

हसती स्त्री. हास्यविनोद.

हसबी पहा : **हजबी**

हसया पु. (चर्मकार.) चामडे ठोकण्याचा बत्ता. (को.); हस्ती.

हसळी स्त्री. १. गळ्यातील एक दागिना. २. गळ्याजवळील हाड.

हसंती स्त्री. शेगडी; आगटी. [सं.]

ह(हां)साबाजी स्त्री. १. हास्यविनोद; थट्टा. २. मस्करी; टिंगल; उपहास.

हसास वि. सारखे; समान.

हसित न. (नृत्य.) मुख, नेत्र व गाल हे किंचित विकसित होऊन काहीसे दात दिसतील असे हसणे.

हसोक पु. अशोकाचे झाड; त्याचे फळ, बी. (कर.) [सं. अशोक]

ह(हं)सोळी स्त्री. एक रानवट फळझाड.

न. हसोळीचे फळ. (वा.) **० खाणे** - बेफाट हसणे.

हस्त पु. १. हात; कर. २. कोपरापासून मधल्या बोटाच्या टोकापर्यंतची लांबी; तितक्या लांबीचे माप; चोवीस अंगुळांचे परिमाण. ३. हत्तीची सोंड. ४. तेरावे नक्षत्र. ५. खांबाचा वरचा भाग व त्यावर पेलले जाणारे ओझे किंवा पाखाडी यामधील ठोकळा. लाकडी चापट तुकडा. ६. (बुद्धिबळ) एखाद्या प्याद्यास हात लावला की ते खेळलेच पाहिजे अशी असणारी खेळाची रीत, प्रकार. [सं.]

हस्तक पु.१. हात. २. मदतनीस, हाताखालचा आज्ञांकित माणूस. ३. एखाद्याच्या सांगण्यावरून, चिथावणीने काम करणारा इसम, गुमास्ता, अडत्या, दलाल; (इं.) एजंट. ४. नृत्यातील हाताची क्रिया. [सं.]

हस्तकौशल-ल्य, हस्तकला न. स्त्री. हाताने सुंदर वस्तू बनवण्याची कला, कसब.

हस्तक्या पहा : **हस्तक** २,३

हस्तगत वि. हातात, ताब्यात गेलेला; स्वाधीन झालेला; हाती आलेला; काबीज केलेला.

हस्तदोष पु. लेखात हाताच्या दुर्गुणाने आलेली अशुद्धता; असावधानतेमुळे हातून घडलेली चूक.

हस्तपगदस्त-स्ता वि. (बुद्धिबळ) एकदा प्याद्यास हात लावला की ते खेळलेच पाहिजे किंवा एखादा एका जागी मोहरे हलविले की ते तेथेच ठेवले पाहिजे असा नियम पाळून खेळावयाचा (खेळ).

क्रिवि. वरील नियमाप्रमाणे. (क्रि. खेळणे).

हस्तपाव पु. खांबाखालील व वरील भाग; पिढे आणि तळखडा.

हस्तपुस्तिका-पत्रक स्त्री. मार्गदर्शन करणारे लहान पुस्तक.

हस्तमद पु. हत्ती माजला असता त्याच्या गंडस्थळातून वाहणारा रस.

हस्तमात्रा स्त्री. हातातील कडी, तोडा इ. अलंकार : 'हस्तमात्रा कर्णमात्रा। कृष्णासी वोपिल्या विचित्रा।' - एरुस्व १५.१४९. [सं.]

हस्तलाघव न. हस्तकौशल्य; हाताचा हलकेपणा; हस्तचापल्य.

हस्तव्यवसाय पु. हाताने (यंत्राशिवाय) कलाकुसरीची कामे करण्याचा उद्योग.

हस्तसंकोच पु. (हात आखडणे) कृपणपणा; चिक्कूपणा.

हस्तसामुद्रिक न. हातावरील रेषा पाहून भविष्य सांगणारे शास्त्र.

हस्ताक्षर न. १. स्वत:च्या हातचे, स्वत: लिहिलेले अक्षर. २. स्वाक्षरी; स्वत:ची सही. ३. लिहिण्याचे वळण.

हस्तांतर न. हाताचे अंतर; (ल.) भिन्नपणा. (वा.) **० करणे** - एका व्यक्तीचा अधिकार, त्याच्या मालकीची वस्तू दुसऱ्या व्यक्तीकडे देणे.

हस्तांदोलन न. भेटताना स्वागतासाठी, शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी हात हातात घेणे.

हस्तिनी स्त्री. १. हत्तीण. २. स्त्रियांचा वर्ग. या वर्गातील स्त्रिया खादाड, लठ्ठ व कामुक असतात. ही स्त्रियांची कनिष्ठ जात.

हस्ती पु. (चर्मकार.) चामडे ठोकण्याचे साधन.

हस्ते क्रिवि. १. हाताने. २. तर्फे; मार्फत; करवी (देणे, घेणे इ.).

हस्तेपरहस्ते क्रिवि. स्वत:च्या हाताने किंवा दुसऱ्याकडून; प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष.

हस्तोदक न. १. हातावर घ्यावयाचे पाणी. २. जेवणाच्या वेळी संन्याशाच्या हातावर घालावयाचे पाणी. ३. दान देताना उदक सोडण्यासाठी हातात

घ्यावयाचे, हातावर सोडावयाचे पाणी. ४. हस्तनक्षत्री पडलेला पाऊस.

हस्तोना पु. प्रेत ठेवण्याच्या जागेवरील धोंडा. (कातकरी)

हस्मासुस्मी स्त्री. गर्दी; कोंडमारा. (क्रि. होणे) (क.)

हहह उद्गा. हा, हा करून मोठ्याने हसण्याचा ध्वनी. [ध्व.]

हळ स्त्री. कढत वाऱ्याचा झोत; झळ; अग्नीचा किंवा सूर्याचा ताप.

हळ पु. १. हाळ; लांबट चर. २. विहिरीजवळील गुरांची पाणी पिण्याची लांबट टाकी, हौद. ३. पाण्याचा ओहोळ; पहा : **हाळ**

हळ पु. १.मोठा हारा. २. नांगर. –व्यामको.

हळआयी, हळई स्त्री. अंगाईगीत.

हळकणे अक्रि. हडकणे; वाळणे; सुकणे; कोरडे, हलके होणे. (को.)

हळकंड्या वि. (वैद्यकी) दात बाहेर आलेला.

हळका, हळकावणे पहा : **हलका, हलकावणे**

हळकुं(खुं)ड न. हळदीच्या मुळाची कुडे, हळकुटा. (गो.) (वा.)

हळकुंडासाठी लग्न मोडणे – एखादी क्षुल्लक बाब न जुळल्याने जुळत आलेले मोठे कार्य मोडले जाणे.

हळखळ स्त्री. हळहळ. (गो.)

हळजणे अक्रि. बाळंत होणे : 'सूना हळजती तरी लेकच होती।'– अज्ञातच ५७. (व.)

हळद स्त्री. एक झाड, त्याचे मूळ; या मुळांपासून तयार केलेली पूड; हळकुंड. [सं. हरिद्रा](वा.) ०**उतरणे** – लग्नात वधूवरांस लागलेली हळद मंगलस्नान घालून समारंभाने काढून टाकणे. ०**काढणे** – बाळंतपण, लग्न इ. उरकल्यानंतर त्यातून मोकळीक देण्यासाठी स्नान घालणे. ०**कुटणे** – विवाहसमारंभास लागणाऱ्या साहित्याची जमवाजमव करण्यास प्रारंभ करणे; उखाळ्यापाखाळ्या काढणे. ०**खेळणे** – विवाहात नवरा–नवरींनी स्नानाच्या वेळी एकमेकांवर हळद उडविणे. ०**लाग(व)णे** – १. (विवाहाच्या वेळी वधूवरांस प्रथम हळद लावून मंगलस्नान घालतात, त्यावरून) विवाह होणे. २. वैभवास, मानमान्यतेस चढणे; भाव वाढणे. ३. (ल.) दुर्मीळ होणे. **हळदीचा डाग लागणे, विटाळ होणे** – लग्न झाल्यावर थोड्याच दिवसांत नवरा किंवा बायकोचे निधन होणे.

हळद(दा)कुंकू–विडे न. पु. अव. चैत्रात किंवा नवरात्रात स्त्रियांनी परस्परांना व कुमारिकांना वाटावयाचे सौभाग्यदर्शक हळद–कुंकू आणि विडे देण्याचा व ओट्या भरण्याचा समारंभ.

हळदि(दु)वा वि. हळदी रंगाचा; पिवळा.

हळदीचा गाभा (ल.) अत्यंत सुंदर रंग, अंगकाठी.

हळदीघाटी हळदीचे मिश्रण.–प्रामको.

हलदुटणे, हळदुष्ण न. सूनमुखानंतर वधूवरांनी परस्परांस हळदकुंकू, पानसुपारी देण्याचा समारंभ. (तंजा.)

हळदुली स्त्री. १. हळद लावण्याचा समारंभ : 'उटिलीं वधूवरें हळदुली स्वानंदे।'– एकनाथ. २. हळद.

हळदू पु. निलगिरी पर्वतावर व हिमालयात आढळणारा एक सूचिपर्णी जातीचा वृक्ष.

हळद्या पु.१. काविळीसारखा एक रोग (झाडास वा माणसास होणारा). २. विषाचा एक प्रकार. ३. मधाच्या पोळ्यातील पिठासारखा एक पिवळा पदार्थ.

हळब पु. सनदी शिपायी. (बे.) [क. हळब=म्हातारा शिपाई]

हळबळा वि. गोड व मनमिळाऊ स्वभावाचा; गोडबोल्या.

हळवट वि. १. हळवे; लवकर पिकणारे, तयार होणारे (धान्य). २. मऊ, गोड (व्यक्ती, स्वभाव). ३. नाजूक; कोमल (प्रकृती, शरीररचना). ४. भिकार; खराब; हलकी (शेतजमीन.). ५. उथळ; वरवरची (बुद्धी, जाण इ.). ६. एखादी गोष्ट सहन न होणारा.

हळवा, हळा, हळवे पहा : **हळवट**

हळवा पु. खाऱ्या पाण्यातील माशाची एक जात.

हळ(ळु)वार वि. १. अरुवार; नाजूक; कोमल; फार श्रम सोसण्यास असमर्थ; हलका; मृदू. २. हलका; खुसखुशीत; उंची; श्रीमंती (कणीक, तूप इ. पदार्थ, पक्कान्ने).

क्रिवि. नाजूकपणे.

हळ(ळु)वारणे अक्रि. नाजूक होणे; हलके होणे : 'जें यमदमीं हळुवारलें। आइतें होतें।'– ज्ञा ४.१३५.

हळ(ळु)वारपण न. हलकेपणा; सूक्ष्मपणा.

हळवी अंबणी–गौरी नाचणीची एक जात.

हळ(ळी)स पु. न. नांगराचा दांडा. [सं. हल+अंस=आस]

हळसांदे न. चवळीसारखे तांबूस रंगाचे एक धान्य; अळसुंदा. (गो.) [क. अळसंदी]

हळह(हा)ळ स्त्री. १. हुरहुर; चित्ताची अस्वस्थता; मोठी काळजी (शारीरिक, मानसिक इ.). (क्रि. लागणे, वाटणे, करणे.) २. खेद; पश्चात्ताप (क्रि. होणे, करणे.) ३. चिंता; त्रास; दगदग.[सं. हलहल]

हळहळ वि. कोमट (पाणी, शरीर इ.). (व.)

हळहळणे अक्रि. हुरहुर वाटणे; खेद, शोक करणे; त्रस्त असणे.

हळहळाट पु. हाहाकार; थयथयाट.

हळहळीत वि. १. अस्वस्थ; चिंताग्रस्त; त्रस्त. २. कडकडीत उष्ण.

हळा पु. पोफळीची विरी; सावळीच्या बुडख्याचे विरविरीत वेष्टन. (कु.)

हळाखळ–कळा स्त्री. १. अस्वास्थ्य; बेचैनी. २. तळतळाट; जुलूम झालेल्या लोकांचे शिव्याशाप.

हळाहळ, हळाळ न. हालाहल विष; कालकूट. [सं. हालाहल]

हळी स्त्री. १. टोपली; रोवळी; हाळ. २. स्त्रियांचा डोक्यात घालण्याचा एक दागिना. ३. मोगरीच्या फुलांची वेणी. (गो.) ४. हाक.[क. हळि]

हळु–ळू वि. क्रिवि. १. हलका. २. हळुक; मोकळे. (इतर अर्थी) पहा : **हलका.** ३. मंदपणे.

हळुवट वि. १. साधारण हलके; मऊ; नाजूक; सौम्य. २. क्षुद्र; क्षुल्लक; तिरस्करणीय. ३. पहा : **हळवट.** ४. लहान; लघू. ५. उणे; न्यून.

हळुवार,हळुम(मा)ळ वि. नाजूक; मऊ; कोमल. पहा : **अरुवार**

हळुवारणे अक्रि. हलके होणे.

हळुवे वि. हलके.

हळूहळू क्रिवि. १. सावकाश; हलकेच; आस्ते; मंद–संथ गतीने. २. सहज; सौम्यपणे.

हळौंदा पु. पहा : **हळसांदे**

हळ्या पु. एक प्रकारचा तवा.

हळ्ळीगाडा पु. मोठ्या चाकांचा गाडा. (बे.)

हं उद्गा. लक्ष वेधणे, सूचना देणे, संमती, पसंती दर्शविणे इ. चा दर्शक शब्द.

हंकार पु. धाप. (क्रि. लागणे) : 'कंथ हंकार एकां।'- गरा ५०.[ध्व.]

हंकारणे सक्रि. हाकारणे; हुंकार करून जवळ बोलाविणे.

हंगर कट्यारीचा एक प्रकार.

हंगवणे, हंगून काढणे केलेल्या उपकाराची वारंवार वाच्यता करणे.

हंगाम पु. मोसम; ऋतू; सुगी (पीक-पाणी इ.ची); योग्य काळ (एखाद्या व्यवहाराचा); ऐन सराई (उद्योग धंदा इ.ची). [फा. हंगाम्]

हंगाम यौवन; होरा (प्राबल्य). (तंजा.)

हंगामशीर क्रिवि. हंगाम चालू असता (विकणे, विकत घेणे इ.).

वि. ऋतुला योग्य; वक्तशीर : 'या गांवावरी हंगामशीर प्रजन्य पडला नाही'- मइसा ६.१८५.

हंगामा पु. १. धुमाकूळ; गडबड; धिंगाणा; धुडगूस; धुमश्चक्री. २.आरडाओरड करून केलेला हल्ला, गर्दी. ३. दंगा; बखेडा. ४. (सामा.) नाश. ५. कुस्त्यांची दंगल. [फा. हंगाम्]

हंगामी वि. १. हंगामापुरता; तात्पुरता. २. हंगामासंबंधी; हंगामाच्या वेळेचा; हंगामशीर.

हंगेतंगे न. उडवाउडवीचे भाषण; टंगळमंगळ; टाळाटाळ. (क्रि. करणे, लावणे, म्हणणे, चालविणे.)

क्रिवि. विसंगतपणे; काहीतरी बोलून; टोलवाटोलवी करून; टाळाटळीने. (क्रि. म्हणणे, बोलणे, करणे.) [हंगे द्वि.]

हंचत्वंच, हंचात्वंचा न. स्त्री. १. मी-तू; अरे-तुरे. २. एकेरीवर येणे; हमरीतुमरी करणे. [सं. अहम्+च+त्वम्+च]

हंजी अ. पहा : **हांजी**

हंडरी मडकी न. अव. (सामा.) पहा : **हंडीमडकी**

हंडा पु. १. मोठ्या तोंडाचे, पाणी वगैरे साठविण्याचे धातूचे भांडे. २. गर्भसुती व बारा हात लांबीची साडी. [सं. हंड]

हंडापळी स्त्री. (ल.) नवऱ्यापेक्षा दिसण्यात मोठी नवरी असणारे जोडपे. पहा : **वरणभात**

हंडाल-हंडूल न. १. लहान हंडा. २. (तिरस्काराने) हंडे; हंडी.

हंडी स्त्री. १. लहान हंडा किंवा मडके. २. मोठ्या पेल्याच्या आकाराचा काचेचा टांगावयाचा दिवा. [सं. हंड](वा.) **हंडीशी हंडी फुटणे** - अत्यंत खचाखच गर्दी होणे.

हंडीबाग पु. १. गारुडी, नजरबंद इ. लोकांचा हस्तक, पोऱ्या. २. (ल.) चलाख, प्रौढबुद्धी, चाणाक्ष पोरगा. ३. नेहमी स्वयंपाकघरात खाण्यासाठी घुटमळणारे मूल. ४. अन्न मिळविण्याच्या कामी खटपट न करता नेहमी खाण्याकडे लक्ष ठेवणारा आळशी माणूस. [हिं.]

हंडीमडकी न.अव. (व्यापकपणे) स्वयंपाक इत्यादीची भांडीकुंडी .

हंडे न. १. स्वयंपाकाचे लहान-मोठे भांडे. २. (हेटाळणीने) हंडी.

हंडोरे न. हंडा.

हंतरण, हंतरी, हंतरूण पहा : **अंथरणे, अंथरी**

हंता वि. १. तडाखा, ठोसा मारणारा. २. ठार करणारा. [सं.]

हंदा पु. शेतमजुरीच्या कामात शेतकऱ्यांनी परस्परांना करावयाची मदत; इरजीक.

हंदु(द)ळणे, हंद(दु)ळ हिंद(दु)ळ पहा : **हांदुळणे**

हंदोळ विंदोळ स्त्री. चळवळ.

वि. चळवळ्या.

हंफर न. पेटी; (इं.) क्रेट : 'तो व्हिस्कीची व ब्रँडीची हंफरे मागवू लागला.'- परेपा.

हंबर पु. गळफास : 'तैसा प्रपंच हंबरु'- उगी ५९६. [क. हंबु]

हंबर पु. महावस्त्र, विवाहप्रसंगी वापरण्याचे स्त्रियांचे उंची वस्त्र. (वा.) ० **गाजणे** - वैभव असणे; श्रीमंती नांदणे.

हंब(बा)रडा पु. १. गाई-बैलांचा शब्द; डुरकणे. २. (ल.) आक्रोश; दीनवाणे रडणे. (क्रि. फोडणे) [सं. हंभ]

हंब(बा)रणे अक्रि. गाईबैलांचे 'हम्मा!' असे ओरडणे. [ध्व.]

हंबरातुंबरी स्त्री. पहा : **हमरीतुमरी**

हंबलणे सक्रि. गिळणे.

हंबि(बी)र पु. १. थोर पुरुष; सरदार; अमीर. २. योद्धा.[अर. अमीर्]

हंबेतुंबे न. स्त्री. अरेतुरे; हमरीतुमरी.

हंस पु. १. एक पक्षी. बदकापेक्षा मोठा, पांढऱ्या रंगाचा, बाकदार मान असणारा, जलाशयाच्या आश्रयाने राहणारा, जबर उडणारा, पोहणारा पक्षी. २. (ल.) जीवात्मा : 'हंसाविणे कुडी।'- वसा. ३. संन्याशातील एक भेद; परमहंस. ४. ब्रह्म; परमात्मा. ५. विष्णू, सूर्य इ. देव. [सं.]

हंसकंकणी पु. (संगीत) एक राग. गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर.

हंसगति-गामिनी वि. हंसाप्रमाणे डौलदार चाल असणारी (स्त्री).

हंसध्वनी पु. (संगीत) एक राग. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर.

हंसनाक पु. पक्षीशाळेचा व्यवस्थापक; पक्षीरक्षक.-ऐको.

हंसपद न. काकपद (लिखाणात केलेले) : 'हंसपद देवोनी ओळी। उणे अक्षर रेखिजे मौळी।'- मुआदि २५.५९.

हंसपक्ष(हस्त) पु. नृत्यातील एक अंगविक्षेप. अंगठा व करंगळीशिवाय सर्व बोटे मिटणे (तळहाताला न चिकटतील अशी वाकवणे), अंगठा कोणत्याही बोटाला न चिकटवता थोडा वाकवणे व करंगळी उभी ठेवणे.

हंसपुतळी स्त्री. गळ्यातील पुतळीचा (अलंकाराचा) एक प्रकार.

हंसबुद्धि-द्धी स्त्री. (एकत्र केलेले दूध व पाणी वेगळे ओळखण्याची हंसाची बुद्धी त्यावरून) तारतम्यबुद्धी; तीव्र बुद्धी .

वि. अशा बुद्धीचा.

हंसमुख(हस्त) पु. नृत्यातील एक अंगविक्षेप. अंगठा, तर्जनी व मधले बोट या तीन बोटांची अग्रे एकत्र जुळवणे, करंगळी व अनामिका ही उभी ठेवणे.

हंसली उलटी (जंबिया) आपल्या जंबियाने जोडीदाराच्या गळ्याच्या उजव्या बरगडीजवळील खड्ड्यात वार करणे.

हंसली सीधी (जंबिया) वरील डावाच्या विरुद्ध (उलटा) डाव.

हंस(सो)ळी स्त्री. चांदी-सोन्याची लहान सरी; (लहान मुलांच्या) गळ्यातील एक दागिना. [हिं. हसली]

हंसळे न. हंसाचे चित्र काढलेले अगदी पांढरे स्वच्छ कापड : 'गौर्वी मुरळे हसळें।'- प्रमा ८.

हंसात्मा पु. प्राण्याचा जीवात्मा.

हंसासन न. योगशास्त्रातील एक आसन.

हंसी स्त्री. १. हंसाची मादी. २. तिच्याप्रमाणे चालण्याची गती.

हंसोदक न. स्वच्छ पाणी : 'गुळुळा करविला हंसोदकें।'- रुस्व ३९५. [सं.]

हं हं स्त्री. उद्गा. अवधानदर्शक उद्गार; हो! हो!

हा सना. १. पुल्लिंगी दर्शक सर्वनाम. व्यक्ती किंवा वस्तूस उद्देशून वापरला जाणारा शब्द. २. वेळ न दवडता, तत्काळ क्रिया दर्शविण्यासाठी योजले जाणारे सर्वनाम. ३. स्वत:, खुद्द या अर्थी. [सं. एस्; प्रा. एसओ-अप अहो]

हा उद्गा. १. एकदम; एकाएकी प्रतिबंध, विरोध करताना निघणारा उद्गार. २. शोकदर्शक उद्गार; हाय, हाय !

हाइहुई उद्गा. पहा : **हायहुय**

हाईस येणे पहा : **हायास येणे**

हाउली-ळी स्त्री. थवा; समूह : 'जिणौनि अन्य साधनांची हाउळी।'- ज्ञाप्र ७३९.

हाऊ पु. बाऊ : 'पडयाची तान्हा हाऊ आला।'- तुगा ३५५७. (कु.) [ध्व. आऊ]

हाऊर पु. बाण : 'तीया मदनाचा हाउरी विभांडिलीया' - शिव २७०.

हा(हां)क स्त्री. १. आरोळी; नावाचा मोठ्याने उच्चार; बोलावणे. (क्रि. मारणे). २. मोठ्याने ओरडणे; बोंब, आरडाओरडा करणे : 'सभेमाजिं रायापुढें हाक गेली।'- राक १.४. ३. दुर्लौकिक; सार्वजनिक चर्चा; बभ्रा; हाकाटी. ४. आरोळी ऐकू जाईल एवढे अंतर. ५. विकणाऱ्याने आपल्या मालाची पुकारलेली किंमत. ६. (ल.) उपदेश : 'बा ! हाणिती सुरभिला जेंवि तुज्या तेंवि लात हांकेला।'- मोशल्य १.१०.७. बडबड; आरडाओरड.[प्रा. हक्का; हिं.] (वा.) **०देणे** - मदतीसाठी बोलावणे; मदत करायला जाणे. **०फोडणे** - टाहो फोडणे. **०मारणे** - १. कार्य करणे; पाड लावणे : 'मद्गति हे अन्यायें येथें मारील काय हाक बळ।'- मोवन ६.३. २. केलेल्या चुकीबद्दल दु:ख भोगत बसणे. ३. दुसऱ्याच्या नावाचा बभ्रा करीत बसणे. ४. मोठ्याने तक्रारी करीत सुटणे. ५. चरफडत बसणे. ६. काम अपुरे पडून राहणे; प्रगती खुंटणे; बेत, कार्य इ. फिसकटणे.

हाकटणे उक्रि. १. मोठ्याने बोलावणे; एकाने किंवा अनेकांनी इतरांना जोरजोराने हाक मारणे. २. डांगोरा पिटणे; बोभाटा करणे.

हाकट्याचा वि. विद्वत्ता, धन इ. असण्याबद्दल प्रसिद्ध; नाव, कीर्ती झालेला.

हाकणे उक्रि. १. पशूंना पिटाळणे, योग्य ठिकाणी नेणे इ. करिता शब्द, काठी इ.नी नेटाने चालविणे, त्यांना काढून लावणे; पिटाळणे; पुढे ढकलणे. २. संसाराचा गाडा कसाही करून चालविणे, रेटणे. ३. अतिशयोक्ती दिसण्याजोगी किंमत, बातमी, गप्प सांगणे, झोकणे.

हाक ना बोंब १. बिनबोभाट; तक्रार, नाखुशी इ. न दर्शविणे. २. केलेली ओरड, तक्रार एखाद्याचे कानावर जावयाची मुश्कील, अशक्यता.

हाकबोंब-म स्त्री. आरडाओरड; हाकाटी; गलबला.

हाकम, हाकमाई, हाकमी पहा : **हाकिमी**

हाक(का)रणे क्रि. १. गलबत, नाव इ. चालू करणे, त्यास गती देणे. २. गलबत चालू करण्याकरिता त्याचे शीड वाऱ्यावर पसरणे. ३. बैलांचा तांडा, प्रवासी यांना प्रवास करण्यास सांगणे. ४. एखाद्या कामगिरीवर जासूद, नोकर पिटाळणे; दवडणे. ५. घोडा इत्यादींना जलद चालण्यासंबंधी इशारा देणे; भरधाव काढणे. ६. हाक मारणे.

हाक(का)लणे उक्रि. १. काढून देणे - लावणे, घालवून देणे. २. पहा : **हाकणे**. ३. पहा : **हाकारणे** १-४.

हाकहूल स्त्री. आरडाओरड; हाकाटी; दंगा. [हिं.]

हाका पु. शिकारीचे जनावर दडलेल्या ठिकाणाहून हुसकविण्यासाठी केलेली ओरड; हाकाटा. (क्रि. करणे)

हाकाक, हाकाहाक स्त्री. १. पहा : **हाकहूल**. २. तक्रार; ओरड.

हाकाटा-टी पु. स्त्री. १. अनेक हाकांचा, आरोळ्यांचा आवाज; गलबला; गोंधळ. २. एखाद्याच्या विरुद्ध ओरड; बोभाटा; तक्रार. ३. हव्या असलेल्या वस्तूसाठी जोराची मागणी. ४. दंगा; ओरड; गोंधळ; कल्ला. ५. कुप्रसिद्धी; डांगोरा.

हाकारणी स्त्री. चालू करणे; चालविणे (गलबत, नाव); ढकलणे; शीड उभारणे.

हाकारणे उक्रि. १. किनाऱ्यापासून पुढे आत-समुद्रात ढकलणे, चालवणे, नेणे, हाकणे (नाव, बोट). २. जोराने सोडणे; वेग देणे (वल्ही मारून - नाव इ.स.). पहा : **हाक(का)रणे**

हाकारा पु. १. पहा : **हाकाटा**. २. दवंडी. ३. दरारा. ४. बोभाट.

हाकाल-ळ क्रिवि. अद्याप; आत्तापर्यंत; यावेळेपर्यंत, मर्यादेपर्यंत. पावेतो, वरी इ. शब्दाशी जोडला जाणारा शब्द.

हाकाहाक-की स्त्री. १. अनेक हाकांचा मिळून झालेला आवाज, याने त्याला, त्याने याला याप्रमाणे हाक मारणे; यामुळे झालेला गोंधळ. २. सर्वत्र ओरड; हाकाटी. ३. बाजारातील जिन्नसांची चढीची किंमत, जिन्नस संपणे इ. मुळे होणारी अवस्था; दुर्भिक्ष.

हाकाहुका स्त्री. आरडाओरड-डा.

हाकिमी, हकिमाई, हाकी(कि)म स्त्री. नगराचे-परगण्याचे अधिपत्य; हाकिमाचा हुद्दा व काम. पहा : **हकम**

हाकीमशरा पु. धर्मशास्त्री.

हाकेकरी पु. शिकारीत सावज बाहेर यावे म्हणून आरडाओरडा करणारा.

हाग, हागओ(व)क इ. 'हाग' ने सुरू होणारे शब्द पहा : **हग, हगओक** इ.

हागदोडी स्त्री. उकिरडा. (व.)

हागे पु. अव. लुटारू.- हरिवंशाची बखर.

हाचवांगेपणा पु. बढाई; उच्छृंखलपणा.

हाज स्त्री. पर्वताच्या कड्याखालील जागा, रस्ता.

हाज, हज्ज स्त्री. मक्केची यात्रा. [अर. हज्ज्]

हाजी पु. मक्केची यात्रा करून आलेला मुस्लीम. [अर. हज्ज्]

हाजीर जामीन नेमलेल्या वेळी आरोपीस (न्यायालय इ.त) हजर करण्यासाठी घेतलेला ओलीचा माणूस; हमीदार.

हाजीरनीस पु. सैन्याची हजेरी घेणारा व तत्संबंधी कामे करणारा अधिकारी. [फा.]

हाजीरमजाल(ली)स १. खटला ऐकावयाची दिवाणाची कचेरी; न्यायमंदिर; दरबार. २. अशा ठिकाणचे सभासद. ३. कोणत्याही प्रसंगी हजर असलेली सर्व मंडळी, समाज. ४. मामलेदार, मुन्सफ वगैरे तक्रार ऐकणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याकडे केलेली लेखी तक्रार, अर्ज.

हाट पु. स्त्रियांचा मासिक रज:पात; विटाळ. (बे.) [क. हाटु]

हाट पु. बाजार; विशेषत: फिरता बाजार; हट्ट [सं. हट्ट]

हाटक न. सोने; सुवर्ण. [सं.]

हाटकर–री वि. बाजारकरी; व्यापारी; बाजारचा.

हाटकेवा पु. बाजारातून आणलेला माल : 'हाटासि गेली होती. हाटकेवा घेतला' – लीचउ ५४६. [सं. हट्ट+ क्रय]

हाटण न. पु. बाजार : 'हाटणीं नाही तें पाटणीं नाही।'–ज्ञागा ९२८.[सं.]

हाटणे उक्रि. घाटणे. पहा : **आहाटणे**

हाटधारण स्त्री. बाजारभाव :'कीं संभोगसुखाचीए हाटधारणे... मन्मथाचे' – शिव ४७. [सं.हट्ट+धारणा]

हाटवका पु. बाजारात घेतलेले सामान.

हाटवट पु. स्त्री. बाजार; बाजारातील दुकान; बाजारपेठ.

हाटसात पु. आठवड्याचा बाजार : 'मग विभ्रम जालें चित्त : च्याऱ्हीं हाटसांत धावत' – ऋम ४७५. [सं.हट्ट+सप्त]

हाटाऊ वि. बाजारी; भाडोत्री.

हाटाडी वि. कठीण.

हाटिका पु. लाल मिरचीचा वाटलेला गोळा.

हाटील, हाटेला वि. हट्टी; आडदांड; कडवा; बेपर्वा.

हाटू–टू वि. हट्टी.

हाटुशापाणी पु. मुलींचा एक खेळ.

हाटेल वि. हाटून केलेला (पदार्थ). (अहि.)

हाठाय(वो)वरी क्रिवि. येथवर : 'हाठावोवरी वियोगा भेटे।'– अमृ १.६.

हाठोट पठोट क्रिवि. कसाबसा; कसातरी.

हाड न. १. अस्थी; हाडूक. २. (ल.) मूळ जात; उत्पत्ती. ३. अंगकाठी; शरीररचना; बांधा. [सं. हड्ड] (वा.) **हाडकी हडुकळी करणे** – मांसाहार करणे. **हाडाची काडे करणे, हाडाचे पाणी करणे, हाडांच्या फुंकण्या करणे** – शरीर झिजविणे; फार परिश्रम करणे, रोडावणे. **हाडाचा खंबीर, खबरदार असणे** – शरीराने मजबूत, कणखर असणे. **हाडाला, हाडी खिळणे** – सर्व अंगात मुरणे, शिरणे, दृढमूल होणे.(रोग). **हाडाला, हाडी लागणे** – १. जिव्हारी, वर्मी लागणे. २. त्रासदायकपणे चिकटणे. ३. मूल, कर्ज, धंदा इत्यादीबद्दल काळजीचा विषय होणे. **हाडाला, हाडी फासण्या घालणे, मारणे** – जिव्हारी लागेल असे टोचून बोलणे. **हाडावर, हाडी घाव घालणे** – १. वर्म- मर्मच्छेद करणे. २. कडक रीतीने, कठोरपणे वागविणे. **हाडावर चोट असणे** – तोशीस लागणे. **हाडाशी लग्न लावणे** – म्हाताऱ्या किंवा अत्यंत रोडक्या माणसाशी मुलीचे लग्न लावणे. **हाडी विसावणे** – हाडी शिरणे, तिथेच विसावणे. **हाडे उजविणे, भाजणे, शेकणे** – कसे तरी लग्न करणे, होणे. **हाडे घुसळणे** – १. अतिशय काम करणे. २. सतावणे; गांजणे; जर्जर करणे. **हाडे निघणे, पडणे** – अतिशय रोड, अशक्त होणे. **हाडे मोडणे, खिळखिळी करणे** – अतिशय गांजणे; निष्ठुरपणे छळणे; त्रास देणे.

हाडकपाळी–ळ्या वि. १. हेकट; शिरजोर; बेपर्वा; सैरट; न जुमानणारा (उपदेश, ताकीद इ.ना). २. दुर्दैवी; कमनशिबी; कपाळकरंटा.

हाडकी स्त्री. १. लहान हाड. २. मेलेल्या जनावरांची हाडे इ. ठेवण्यासाठी महारांना दिलेली जमीन.

हाडकुरकुटी स्त्री. हाडीज्वर.

हाडकुळा–ळी–ळे वि. हाडे निघालेला; अशक्त; रोड.

हाडके काडके न. अव. १. शेतीची जनावरे व अवजारे. २. झिजलेले व हाडे उरलेले शरीर.

हाडखाईर न. हाडवैर : 'म्हणोनि समर्थेसीं वैरा। जया पाडिलें हाडखाईरा।'– ज्ञा १३.५५०.

हाडखाऊ वि. (तिरस्कारार्थी) मांसाहारी; मांसभक्षक.

हाडगदले, हाडगळ वि. रोडका; हाडे वर निघालेला; कृश.

हाडगात न. शरीरयष्टी; बांधा.

हाडगी स्त्री. तिफणांची पाभर.

हाडजर पहा : **हाडीज्वर**

हाडणे सक्रि. आणणे. (को., गो., कु.)

हाड(डौ)ति–ती स्त्री. गळ्याखालच्या अर्धचंद्राकार हाडावरील खळगा : 'मुख मळिण वदन उभा हाडतिये घोणे।'– तुगा १२२.

हाडदा पु. १. खलिता; पत्र. २. काम. – लोसाको. [सं. हार्द]

हाडपक पु. भाद्रपद महिना. (व.)

हाडपरब पु. पितृपक्ष.

हाडपेकरी पु. विडा देणारा सेवक : 'नामा हाडपेकरी, देतसे विडिया।'– नाम ५४६.

हाडपेर न. अंगकाठी.

हाडबा पु. भाला. (जुन्नरी)

हाडबोड पु. मासळीचे डोके इ. टाकाऊ भाग. (गो.)

हाडभाऊ पु. भाऊबंद; जवळचा नातेवाईक.

हाडमोडी स्त्री. बांडगुळासारखी एक वेल. हिला पाने नसून शेराप्रमाणे कांड्या असतात.

हाडवळा पु. पहा : **हाडोळा**

हाडवैर न. अत्यंत तीव्र व फार जुने वैर.

हाडशिंगारी–सांधण स्त्री. एक वेल.

हाडसणी–णे पहा : **हडसणी–णे**

हाडसंध–संधी स्त्री. त्रिधारी कांडवेल. ही ठेचून तीन दिवस मोडलेल्या हाडांवर बांधल्यास ते बरे होते.

हाड(डो)हाड क्रिवि. प्रत्येक हाडात.

हाडळ वि. पहा : **हाडकुळा**

हाडा पु. पहा : **हंडा**

हाडी स्त्री. चर. (कु.)

हाडीज्वर पु. अंगात मुरलेला ताप.

हाडूक न. लहान हाड. (वा.) ०**दाराशी रोवणे, लावणे** – जाती बहिष्कृत करणे. **गळ्याशी, दाराशी हाडूक बांधणे** – १. एखादी बाई, रखेली ठेवणे, राखणे. २. त्रासदायक काम अंगावर ओढून घेणे.

हाडू बायल्या, हांडोण्या वि. रांड्या राघोजी; भेकड. (ना.)

हाडोळा–ळी पु.स्त्री. १. पूर्वी मेलेली गुरेढोरे ओढून नेणाऱ्या महारांना इनाम दिलेली जमीन. २. अशा जमिनीचे उत्पन्न.

हाड्या पु. १. कावळा : 'जाय उडून रे हाड्या। नको करूं काव काव।'– कोलते. (खा., व.) २. गाडी जमिनीवर टेकण्याचे जुवाखालील लाकूड, खुंटा. (खा.)

वि. १. हाडकुळा. २. फार हट्टी; हेकड.

हाड्या वर्ण–व्रण हाडात खोल गेलेला व्रण.

हाण स्त्री. १. हानी; तोटा; नुकसान. २. घात; इजा; दुखापत.

हाणणे उक्रि. १. काठी इ. ने मारणे; ठोकणे. २. छाटणे; काटणे; कापणे. ३. ठार मारणे. ४. हाकणे; हाकून लावणे. (व.) ५. ताव मारणे. [सं. हन्=मारणे] (वा.) **हाणून पाडणे** – १. जमीनदोस्त करणे. २. (ल.) निष्फळ करणे; मोडून काढणे; बिघडवून टाकणे (कारस्थान, प्रयत्न, बेत इ.).

हाणता वि. ठोकणारा; मारणारा; धोपटणारा; बडविणारा; कापणारा.

हाण(णा)मार–री, हाणाहाण–णी स्त्री. एकमेकांनी परस्परांस मारणे; आवेशाने ठोकणे; मारामारी.

हात पु. १. खांद्यापासून बोटापर्यंतचा शरीराचा भाग; कोपरापासून बोटापर्यंतचा भाग; बाहू. २. कोपरापासून मधल्या बोटाच्या टोकापर्यंतचे माप. ३. उजवी किंवा डावी बाजू; तरफ. ४. ताबा; आटोका; अधिकार; खाते. ५. स्वत:; व्यक्तिश: मनुष्य. ६. स्वामित्व; कबजा; मालकी; ताबा. ७. हाताने वाजविण्याच्या वाद्यावर मारलेली हाताची थाप. ८. खेळ (काठी, लाठी, पट्टा इ. शस्त्रांचा). ९. कर्तृत्वशक्ती; अंग; हस्तकौशल्य. १०. कुलपाची किल्ली, चावी. ११.सोंगट्या, पत्ते इ. खेळातील डाव, खेळण्याची पाळी, खेळ; खेळणारा गडी. १२. हस्तक; मदतनीस; साहाय्यक; हाताखालचा मनुष्य. १३. ज्यावर दंड, जोर काढायचे तो लाकडी, दगडी ठोकळा; हत्ती. १४. (रंगकाम) हाताने दिलेला थर, लेप; वरून हात फिरविणे. १५. ठोसा; तडाखा; हस्तक्रिया (भिन्न-भिन्न प्रसंगी त्या-त्या अर्थाने). १६. (तेली-घाणा) कात्रीस जोडलेला वाकडा लाकडी तुकडा. १७. हात टेकण्यासाठी, हाताने धरावयाचा पदार्थाचा कोणताही भाग. १८. हाताच्या आकाराची कोणतीही वस्तू. १९. (सोनारी) हातातील दागिना सैल करण्याचे हत्यार. २०. (नृत्य.) दोन हातांनी मिळून करावयाचे अभिनयाचे प्रकार. २१. (शिंपी) कापड मोजण्याचे बारा तसूंचे एक माप; गज. २२. पाना (नट बोल्ट फिरविण्याचा). [सं. हस्त] (वा.) ० **आखडणे** – देण्यासाठी पुढे केलेला हात मागे घेणे; देण्याचे प्रमाण कमी करणे, बंद करणे. ० **आटोपणे** – मारणे इ. हाताने करावयाची क्रिया बंद करणे. ० **आवरणे** – १. हात आटपणे. २. कोणत्याही कृत्यापासून परावृत्त होणे. (व.) ० **उगारणे, उचलणे** – (एखाद्यास) मारावयास प्रवृत्त होणे. ० **उचलणे** – १. स्वयंस्फूर्तीने आपण होऊन बक्षीस देणे. २. हाती घेणे (काम, धंदा). ० **ओढविणे** – १. घेण्यासाठी झाप टाकणे. २. विटंबना करण्यासाठी, तुच्छता दर्शविण्यासाठी तोंडापुढे हात करणे. ० **ओले करणे** – १. जेवणे. २. लाच देणे. ० **ओवाळणे** – तुच्छता दर्शविणे. ०**करणे** – १. हात टाकणे. २. पट्टा, बोथाटी वगैरेचे डाव करणे; फिरविणे. ३. वादविवाद, युद्ध करणे. ०**कापून देणे, गुंतणे** – लेखी करार करून स्वत:स बांधून घेणे. ०**गहाण ठेवणे** – १. उजवा हात देवास वाहून अन्य कोणत्याही कामी त्याचा उपयोग करावयाचा नाही असा नवस करणे. २. कोणत्याही कामास हात न लावणे. ०**घालणे** – १. (एखादे काम) पत्करणे; करावयास घेणे. २. एखादी वस्तू घेणे, धरणे, शोधणे – यासाठी हात पुढे करणे : 'मग विभु वनवासी त्याचिया हात घाली।'– आनंदतनय. ३. (एखाद्या कामात, व्यवहारात) ढवळाढवळ करणे; आत पडणे. ०**घेणे** – (पत्त्यांचा खेळ) हुकूम अगर भारी पान मारून दस्त करून घेणे. ० **चढणे** – प्राप्त होणे : 'अनुताप चढलिया हात। क्षणार्ध करी विरक्त।'– एभा २६.२७. ० **चालणे** – १. हातात सत्ता, सामर्थ्य, संपत्ती असणे, मिळणे, मिळविणे. २. एखादी गोष्ट करता येणे. **हातचा पाडणे** – एखाद्याला त्याच्या ताब्यातील वस्तूस मुकविणे. **हाताचा फोड असणे**– अतिशय प्रिय असणे. **हातचा मळ असणे** – सहज शक्य असणे. ०**चालविणे** – १. हत्यार चालविणे. २. एखादे काम भराभर करणे. ० **चेपणे** – लाच, पैसे, मुकाट्याने एखाद्याच्या हातात देणे. ०**चोळणे** – फार राग आला असता तळहात एकमेकांवर घासणे, कुंठित गती होऊन स्वस्थ बसावे लागणे. ० **जोडणे** – १. नमस्कार, प्रार्थना, विनंती करणे. २. शरण जाणे, येणे. ३. नको असलेला पदार्थ हात जोडून आर्जवाने अव्हेरणे. ०**झाडणे** – १. झिडकारणे; नापसंत ठरविणे. २. निराशेने सोडून देणे. ३. एखादे काम उरकून मोकळे होणे. ०**टाकणे** – १. पोहताना पाण्यावर हात मारणे. २. (एखाद्यावर) प्रहार करणे; मारणे. ०**टेकणे** – १. काम करण्यास असमर्थ असल्याने पराभूत झाल्याचे कबूल करणे. २. म्हातारपणामुळे अशक्त होणे. ३. दमणे; थकणे; टेकीस येणे. ०**तोडणे** – पहा : **हात कापून देणे, गुंतणे** ०**थावरणे** – हात आवरणे; आटोपणे. ०**दाखविणे, दावणे**– १. हस्तसामुद्रिक जाणण्यासाठी जोशापुढे (ज्योतिषापुढे) तळहात करणे. २. अहितकारक परिणाम करणे. ३. स्वत:ची शक्ती, सामर्थ्य दाखविणे. ४. नाडीपरीक्षा करण्यासाठी वैद्यापुढे हात करणे. ५. हाताने एखादी वस्तू दर्शविणे. ६. बडवून काढणे; पारिपत्य करणे; सूड घेणे; उट्टे काढणे. ०**दाबणे** – लाच देणे. ०**देणे**

– १. मदत करणे; तारणे. २. चोरणे; उचलेगिरी करणे. ३. खाद्यपदार्थांवर ताव मारणे. ४. (बायकी छप्पापाणी) छप्पू घातलेल्या मुलीस इतर मुलींनी (तिने उठावे म्हणून) हस्तस्पर्श करणे. **०धरणे** – १. अडविणे; हरकत करणे; स्पर्धा करणे; बरोबरी करणे. २. लाच देणे. **०धरून जाणे** – विवाहित स्त्रीने एखाद्या परपुरुषाबरोबर पळून जाणे. **० धुणे** –(ल.) एखाद्या कामातून आपले अंग काढून घेणे. **०धुवून पाठीस लागणे** – एखाद्याचा नाश करण्याविषयी हट्टाने प्रवृत्त होणे; चिकाटी धरून एखाद्याचा पाठलाग करणे. **०न बनणे** – १. गुंता येणे. २.विटाळशी होणे. **०नाचविणे** – चेष्टा करण्यासाठी दुसऱ्याचे तोंडापुढे हातवारे करणे. पहा : **हात ओवाळणे. ०पडणे** – १: एखादे काम अनेकांनी कष्ट करून संपविणे; एखादा खाद्यपदार्थ अनेकांनी एका वेळी खाऊन संपवणे. २. जिवंतपणी भेट नाही पण दहनापूर्वी प्रेताचे तरी दर्शन होणे. (ना.) **०पसरणे** – भीक मागणे. **०पाय खोडणे** – १. अवयव आखडणे; विव्हल होणे. २. एखाद्यास प्रतिबंध, अडचण करणे. **०पाय गळणे, गाळणे** – १. अशक्त होणे; रोडावणे. २. खचून जाणे; नाउमेद होणे; गलितधैर्य होणे. **०पाय गुंडाळणे** – १. अंतकाळच्या वेदनांनी हातपाय आखडणे, क्रियाशक्तीरहित होणे. २. हरकत, अडथळा करणे. **०पाय चोळणे** – १. सूड घेण्याची प्रतिज्ञा करणे; चरफडणे. २. रागाने शिव्याशाप देणे. **०पाय झाडणे** – १. पहा : **हातपाय गुंडाळणे** १. २. सुटकेसाठी हातापायाचा उपयोग करणे. ३. धडपड करणे; चरफडणे. **०पाय ताणणे** – सुखाने, निष्काळजीपणाने हातपाय पसरून पडणे. **०पाय धोडावप** – आटापिटा करणे. (गो.) **०पाय पसरणे** – १. पहा : **हातपाय गुंडाळणे** १. २. मर्यादेच्या, आटोक्याच्या बाहेर जाणे; जास्त-जास्त व्याप वाढविणे; पसारा वाढविणे. ३. काम होत नसल्यास सबबी सांगणे, कामात आळस करणे. ४. मागणी वाढत जाणे; अधिकाधिक आक्रमण करणे. **०पाय पाखडणे** – अंतकाळच्या वेदनेने, फार संतापाने हातपाय झाडणे. **०पाय पांघरून, पोटाळून बसणे** – आळशासारखे, जेठा मारून बसणे. **०पाय फुटणे** – १. उधळपट्टी सुरू होणे; संपत्ती खर्च होणे. २. लुच्चेगिरी करण्यात तरबेज होणे. ३. थंडीने हातापायास भेगा पडणे. **० पाय फोडणे, लावणे, फुटणे, लागणे** – १. मूळ गोष्टीत, अंदाजात भर घालणे; वाढविणे. २. नटविणे; अलंकृत करणे. ३. मागाहून वाढविणे (काम, दर, खर्च इ.). ४. लबाडपणा करून सजवून उजळून दाखविणे. **०पाय मोकळे करणे** – फेरफटका करून हातपाय सैल, हलके करणे; फिरणे; सहल करणे. **०पाय मोडणे, मोडून येणे, टाकणे** – १. तापापूर्वी अंग मोडून येणे; निरंगळी येणे. २. बलहीन, नि:सत्त्व करून टाकणे; हरकत घेणे. **०पाय सोडणे** – अंतकाळच्या वेदनांनी हातपाय ताणणे, ताठ होणे. **०पाय हलविणे** – उद्योग, परिश्रम, कष्ट इ. करणे; स्वस्थ न बसणे. **०पोचणे** – कृतकृत्य होणे. (ढुंगणाला हात पोचणे असा मूळ प्रयोग.) **०फाटणे** – रुची वाढणे : 'जेथें जिव्हेचा हातु फाटे ।'– ज्ञा १८.२४९. **०फिरणे** – लक्ष जाणे; व्यवस्थित ठेवण्याची काळजी घेणे; साफसफाई करणे. **०फिरविणे** – १. लहान मुलाला प्रेमाने कुरवाळणे. २. उजळणी करणे. **०बसणे** – १. एकसारखे लिहीत, वाचीत इ. राहणे. २. अक्षराचे वळण पक्के होणे. ३. एखादे काम उत्तम प्रकारे करता येणे; मनात ठसणे; विशिष्ट क्रिया करण्याची हातास सफाई प्राप्त होणे. **०बांधणे** – १. मर्यादा घालणे; स्वैर होऊ न देणे. २. अडथळा आणणे. **०भिजणे** – १. दक्षिणा मिळणे. २. लाच मिळणे. **०मारणे** – १. बळकावणे (पैसा इ.). २. अधाशीपणाने खाणे; ताव मारणे. ३. एखाद्या वस्तूवर विविध क्रिया करणे. **०मिठ्ठीला येणे** – हाताहाती येईपर्यंत भांडणे. (माण.) **०मिळवणे** – १. घाव घालणे : 'तस्करानें जलदी करून हात मिळविला जाऊन ।'– ऐपो ३९०. २. (कुस्ती) सलामी घेणे. **०मोडणे** – १. असाहाय्य, मित्रहीन होणे. २. मिळत असलेली देणगी, बक्षीस नाकारणे. **०राखणे** – कुचराई करणे. **०राखून खर्च करणे** – काटकसरीने खर्च करणे. **०लागा ना** – विटाळशी होणे. (गो.) **०लावणे** – मदत करणे. **०वहाणे** – १. हत्यार चालविणे. २. प्रवृत्त होणे; कार्य करणे. **०वळणे** – १. सराव, परिपाठ इ.ने हातास सफाई येणे. २. (एखाद्या गोष्टीस, कृत्यास) प्रवृत्त होणे. **०सैल सोडणे** – सढळपणे खर्च करणे. **० सोडणे** – १. पूर्वीप्रमाणे कृपा, लोभ न करणे. २. संगती, ओळख सोडणे. **०हातात देणे** – लग्न लावणे. **०हालवीत येणे** – काम न होता रिकामे परत येणे. **हाताखाली घालणे** – देखरेखीखाली, अमलाखाली, कबजात, ताब्यात घेणे. **हाता चढणे** – प्राप्त होणे. **हाताचे पायावर लोटणे** – आजची अडचण उद्यावर ढकलणे; संकट लांबणीवर टाकणे. **हाताचे लाडू होणे** – खरजेने हाताच्या मुठी वळणे, त्या न उघडणे. **हाताच्या धारणेने घेणे** – मारणे; बुकलणे. **हातात कंकण बांधणे** – एखाद्या गोष्टीची प्रतिज्ञा करणे; चंग बांधणे. **हातात नरोटी (नारळाची आई) देणे** – भिक्षा मागावयास लावणे.**हातात हात घालणे** – १. लाच देणे. २. मैत्रीच्या भावाने वागणे; प्रेम करणे. ३. विवाहसंबंध घडवून आणणे. ४. विवाहित स्त्रीने परपुरुषाशी संबंध ठेवणे; निघून जाणे. **हातातोंडाशी गाठ पडणे** – १. घास तोंडात पडणे; खावयास सुरुवात करणे; जेवणाखेरीज इतरत्र लक्ष न जाणे. २. एखाद्या कार्यास घाईने आरंभ होणे. ३. बोंब मारणे. **हातातोंडास येणे** – १. तारुण्यावस्था प्राप्त होणे; मिळवत्या वयात येणे; लग्नाच्या वयाला येणे; वयात येणे. २. फळ देण्याच्या स्थितीस येणे. **हातापायाचा चौरंग होणे** – पेटके वगैरेमुळे हातपाय आखडणे; हातपाय तोडण्याची शिक्षा होणे. **हातापायांचे डगळे होणे, पडणे, मोडणे** – अशक्तपणाने अंगास कंप सुटणे; अंग शिथिल होणे. **हातापायाच्या फुंकण्या होणे** – अशक्तता, निर्बलता येणे. **हाता(ती)पाया(यी) पडणे** – १. गयावया करणे; प्रार्थना करणे. २. शरण जाणे; नम्र होणे; दया दाखविणे. **हाताला लागणे** – हरवलेल्या, फुकट गेलेल्या, नासलेल्या, बिघडलेल्या वस्तूतून अल्पअंश मिळणे. **हाताला हात लावणे** – १. पुण्यवाचनादी धर्मकार्याचे वेळी पतीच्या हातास नुसता हात लावणे. २. स्वत: काहीही न करता दुसऱ्याने केलेल्या कामाच्या यशात वाटेकरी होणे; दुसऱ्याच्या कार्यास अनुमती देणे. **हातावर देणे, आणणे,**

काढणे – तारण वा गहाण म्हणून न ठेवता पैसे उसने आणणे, काढणे, देणे. **हातावर तुरी देणे, देऊन पळून जाणे** – फसविणे; डोळ्यांदेखत फसवून पळून जाणे; देखत देखत भुलविणे. **हातावर दिवस काढणे, लोटणे** – मोठ्या कष्टाने संसार चालविणे. **हातावर पिळकणे** – लाच देणे. **हातावर येणे** – जवळ येऊन ठेपणे. **हातावर शीर घेऊन असणे** – कोणतेही धाडसाचे कृत्य करण्यास सदैव सिद्ध असणे. **हातावर हात चोळणे** – रागाने तळहात एकमेकांवर घासणे; चरफडणे. **हातावर हात मारणे**– १. एखादी गोष्ट, सल्ला पटला म्हणजे दुसऱ्याचे हातावर आपला हात मारणे. २. वचन देणे. **हातास हात लावणे (देणाऱ्याच्या वा घेणाऱ्याच्या)**– द्रव्यलाभ होणे. **हाती धरणे** – १. स्वत:च्या देखरेखीखाली घेणे; एखाद्यास आपल्या आश्रयाखाली घेणे. २. निरंकुशपणे मोकाट सोडणे (जीभ, तोंड, पोट इ. इंद्रिये). **हाती धोंडे घेणे** – १. विरुद्ध उठणे. २. वेड्यासारखे करणे.**हातीपायी उतरणे, सुटणे, मोकळी होणे** – सुखरूपपणे बाळंत होणे. **हातीपायी (अन्न इ.) धावणे, येणे, रेवणे**– १. जाड्य, सुस्ती येणे. २. शिव्या देण्यास तयार होणे. **हाती भोपळा घेणे, देणे**– भिक्षा मागणे, मागावयास लावणे.

हात स्त्री. सवय; खोड : 'तरुणपणाची ऐट आणण्याची विलक्षण हात होती.'– महाराष्ट्रशारदा नोव्हें.१९३६.

हातअनार पु. शोभेच्या दारूचा एक प्रकार.

हातइंद न. खेकडे पकडण्याचे जाळे. (को.)

हातई स्त्री. लग्न. – लोसाको.

हातउगावा पु. १. एखाद्या किचकट, अडचणीच्या कामातून, धंद्यातून अंग काढून घेणे. २ सूड; पारिपत्य. (क्रि. करणे). ३. कर्जाची उगराणी; घेतलेले भांडवल परत मिळविणे.

हातउचल स्त्री. १. पेढीतून स्वत:ची रक्कम थोडी थोडी, थोड्या थोड्या अंतराने खर्चण्यास घेणे. २. मूळ भांडवल, मुद्दल. पहा : **उचल**

हातउचला वि. १. आपखुशीने, हात उचलून दिलेला (पदार्थ). २. ज्याचा स्वत: करण्याबद्दल पत्कर घेतला आहे असा (व्यवहार, उद्योग इ.).

हातउसणा–ना वि. थोड्या वेळासाठी उसना घेतलेला; त्वरित परतीच्या बोलीवर घेतलेला (त्यामुळे कोणताही लेखी व्यवहार नसलेला).

हातकरीण स्त्री. अचळाला हात लावताच (वासरू न सोडता वा आंबोण न ठेवता) पान्हा सोडून दूध देणारी (गाय, म्हैस इ.).

हातकापे न. लांडी, बिनबाह्याची बंडी. (गो.)

हातकैची–कचाटी स्त्री. आलिंगन; मिठी.

हातखंड वि. मधून-मधून कामात सोडवणूक करणारा; मदतनीस (मूल, मित्र, शेजारी); अडल्यावेळी उपयोगी पडणारा.

हातखंडा पु. एखादे काम हमखास पार पाडण्याचे कौशल्य अंगी असणे.

हातखुरपणीचे लोणी हातखुरप्या नारळाचे खोबरे.

हातखुरपा वि. हातानेच आतील खोबरे खरवडून काढण्याजोगा (कोवळा नारळ).

हातखुरपे न. १. हातखुरपा नारळ. २. गवत काढण्याचा लहान विळा.

हातखुंट–टा पु. (विणकाम) वशारन पसरलेल्या लांबीपाशी असलेल्या समोरच्या खांबापासून मागापाशी बसण्याच्या जागेजवळ उजवीकडे बांधावयाची खुंटी.

हातखे(खो)रणे न. कलथा; उलथणे; झारा.

हातखेवणे न. १. हातवल्हे. २. मदतनीस; हाताखालचा माणूस.

हातखोडा पु. हात अडकविण्याचा लाकडी सापळा; बेडी.

हातगुण पु. (बरेवाईट करण्याचा) योग, गुण; हाती (काम, माणूस) धरणाराचा प्रारब्ध योग.

हातगुंडा–धोंडा पु. १. हाताने फेकण्या-उचलण्याजोगा दगड. २. असला दगड हाताने जेथवर फेकला जाईल तितके अंतर.

हातघाई स्त्री. १. हाताने वाजवावयाचे वाद्य जोरजोराने, आवेशाने वाजविणे. २. (ल.) उतावळेपणा; जोराची हालचाल.

हातचलाख वि. चोर; उचल्या.

हातचलाखी–की स्त्री. हस्तचापल्य; लपवाछपवी; नजरबंदीचा कारभार.

हातचा वि. १. हाताने दिलेला; स्वाधीनचा; हातातला; हाताने निर्मिलेली, दिलेली (वस्तू, काम, उत्पादन इ.). २. (गणित) पूर्णांकाची बेरीज करतांना बेरजेच्या संख्येतला अंक ज्या स्थानाचा त्या स्थानी मिळविण्याकरिता उरलेला अंक. (क्रि. येणे, घेणे, राहणे, ठेवणे). ३. लवकर हाती येणारे; अवसानातील. ४. ताब्यातील; कबजातील.

हातचा पड–धड–नीट वि. नीटनेटके काम करणारा (लेखक, कारागीर).

हातचाळा पु. १. हाताचा अस्थिरपणा; चुळबुळ. २. त्याने होणारे नुकसान (क्रि. करणे) ३. सदोदित हात गुंतलेला असणे. ४. देवघेवीचा मोठा उद्योग.

हातचिठी–टी–ट्टी स्त्री. १. अधिकाऱ्याने शिक्कामोर्तब न करता आपल्या हाताच्या निशाणीनेच पुरी केलेली चिठी, हुकूम. २. कोणाच्या हातून पाठविलेली चिठी-चपाटी.

हातजुळणी, हातजौळ स्त्री. (ठाकूर) लग्न लागल्यानंतर मुलाने मुलीचे दोन हात धरणे.

हातझालणा पु. हातजाळे; हातविंड.

हातझुलाई स्त्री. गाडी-घोड्यावरील कर. (माळवी)

हातणी–नी स्त्री. १. घोडा वगैरे धुताना हातात घालण्याची काथ्याची पिशवी; खरारा. २. खळ्यातील खराटा; केरसुणी. ३. (चांभारी) चामडे ठोकण्याचे हत्यार. [सं. हस्त]

हातणी स्त्री. धान्यातून कचरा बाहेर काढण्याची आडणी.

हातणी–नी स्त्री. विहिरीच्या काठावर बैलरहाटाचे पाणी पन्हाळीतून जिथे पडते, त्या ठिकाणी बांधलेली उंच जागा; बांधावरून (पाटाचे) पाणी नेण्यासाठी केलेली वाट.

हातणे क्रि. सारवणे.

हाततुक न. १. हाताने केलेले वजन : 'नव्हती हाततुके बोल।'– तुगा ३४२३. २. अटकळ; अजमास : 'मग त्यागु कीजे हाततुकें।'– ज्ञा १८.१३१.

हातधुणी स्त्री. १. राजाचा हात धुणाऱ्याला दिलेले इनाम इ. २.स्वयंपाकघरातील मोरी.

हातधुलाई स्त्री. घाटा; मेलेले जनावर ओढून नेण्यासाठी मजुरी म्हणून

महारास दिले जाणारे धान्य. (गागा)

हातनळा पु. शोभेची दारू भरलेला, हातात धरून सोडण्याचा नळा.

हातनळी स्त्री. चपटे कौल.

हातपडतं–पात वि. हाती असलेले, जवळ असणारे; लगेच मिळणारे.

हातपंप पु. पाणी काढण्यासाठी टाकी, विहिर इ.वर बसवलेला, दट्ट्या असलेला आणि दट्ट्या वर-खाली करण्यासाठी दंड असलेला पंप.

हात(तो)पा पु. अंगरख्याची बाही.

हातपाटिलकी स्त्री. १. हाताने ठोकणे, चोपणे, बदडणे. २. बोलण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती, काम. ३. हस्तचापल्य; उचलेगिरी.

हातपाणी न. १. लग्नात रासन्हाणीचे वेळी वधूच्या सासूने तिच्या हातावर ओतण्याचे पाणी. २. लग्नात मांडव परतण्याचे दिवशी सासूने सुनेची बोहल्यावर ओटी भरून किंवा मांडवात न्हातेवेळी नवऱ्याने केशरी रंगात बुडवून तिच्या हातात घालावयाची अंगठी. ३. लग्नात मुलाच्या हाताखाली मुलीचा हात ठेवून त्यावर समंत्रक पाणी घालणे. (बदलापूर)

हातपान पु. कोका पडण्यापूर्वीचे केळीचे पान.

हातपेटी स्त्री. १. हाताने भाता चालवून वाजवायची बाजाची पेटी; (इं.). हार्मोनियम. २. सरकारी कामाची कागदपत्रे ठेवण्याची पेटी.

हातपोळी स्त्री. एक प्रकारचा चेंडूफळीचा खेळ.

हातप्रसी, हातपरसी स्त्री. सांगोवांगी : 'नव्हे हातप्रसीची वार्ता : उधारें न बोलति सर्वथा'– ऋम २९६. [सं. हस्त+परि+श्रु]

हात(तो)फळी क्रिवि. हातोहाती; लवकर.

स्त्री. हातावर हात मारून चुकविणे.

हात बांधून डंकी (मल्लविद्या) जोडीदारास खाली आणल्यावर त्याने आपला एक पाय धरला तर आपण दुसऱ्या पायाने जोडीदाराच्या पाठीवरून झोका घेऊन उडी मारून त्यास चीत करणे.

हातबोने न. १. हातात घेतलेले भक्ष्य : 'बुद्धीचेनि शाके । हातबोनें निकें ।'– ज्ञा ६.२८२. २. नैवेद्य. [सं. हस्त+क. बोन]

हातबोळवण स्त्री. हातांनी मार्गाला लावणे.

हातभार पु. मदत; साहाय्य.

हातमली स्त्री. (बुद्धिबळ) प्रतिपक्षाचा हत्ती व राजा आणि आपला हत्ती, राजा व एकच प्यादे राखून प्यादी करणे.

हातमात स्त्री. हात टेकणे.

हातमांडणी स्त्री. पैसे मिळाल्याची पोच म्हणून नेणाऱ्याची खतावणीवर घेतलेली सही.

हातमुंडा वि. भरतकाम केलेला. (वैदर्भी)

हातमेटी, हेटीमेटी क्रिवि. आळसात; निरुद्योगीपणाने; हातावर व गुडघ्यावर टेकून रमत गमत (दिवस घालविणे).

हातरगाडा पु. उसाचा हातचरक.

हातरिती वि. विधवा; बांगड्याविरहित हातांची.

हातरुमाल पु. १. तोंड वगैरे पुसण्याचा लहान कापडी रुमाल. २. नित्योपयोगी कागदपत्रे ठेवण्यांचा लहान रुमाल; त्यातील कागदपत्रांचे बंडल.

हातरोखा पु. दस्तक; चिठ्ठी; आज्ञापत्र : 'पाराजीपंत वाघ यास हातरोखा वरचेवर पाठवून अति आग्रहें अंतरवेदींत घालविलें.'– भाब १०२.

हातलाग पु. हाताचा टप्पा; कक्षा; आवाका; आटोका; अवसान.

हातलागा–ग्या वि. अनुकूल : 'तुमचे हातलागे लोक असतील.'– वाडबाबा १.६.

हातलावणी स्त्री. १. वेश्येचा चिरा उतरणे; कौमार्यभंग. (क्रि. करणे) २. लागवण; हाताची पेरणी.

वि. हातपेरणीचे.

हातलावा–व्या वि. हाताळ; चोरटा.

हातवणी न. १. हात धुतलेले पाणी. २ हातरहाटाचे पाणी पन्हाळीतून जेथे पडते तेथील जमिनीचा उंचसखल भाग; हातणी.

हातवरा वि. हस्तगत.

हातवशी स्त्री. हात उगारणे. – शर.

हातवसणे क्रि. हस्तगत होणे : 'ते ज्ञाननिष्ठा जेथे हातवसे ।'– ज्ञा १८.१२४८.

हातवसी स्त्री. साहाय्य; मदत; हात देणे.

हातवळा, हातोळी पु. पहा : **हातोटी**

हातवा पु. १. गौरीपूजनाच्या सणात हळदी-कुंकवाने भरलेल्या हातांनी भिंतीवर उठवलेले छाप. २. लग्नात नवऱ्याच्या मागे धरावयाचा कणकेचा दिवा. ३. घोड्याचा खरारा साफ करण्याचा काथ्याचा पंजा. ४. काडवात. – मनको. ५. न्हाणवली बसविताना, मखर बांधावयाच्या ठिकाणी कुंकू पाण्यात भिजवून हाताने पाच उलटे पाच सुलटे ठसे उमटविणे. (कराड)

हातवारे पु. अव. हातांनी केलेले हावभाव; हाताची हालचाल.

हातविरजा–विरंगुळा वि. कामात मदत करण्यास योग्य; योग्य झालेला (पुत्र, शिष्य, उमेदवार इ.).

हातविंड न. (राजा.) पहा : **हातझालणा**

हातशिंपणे न. सोडवणी न देता शेलणे इ. साधनाने भाजीपाल्यास उडवून द्यावयाचे पाणी; असे पाणी शिंपणे.

हातशेकणे न. (उसाचा चरक) चुलाण्यात जाळ घालणारास त्याच्या मेहनतान्याबद्दल द्यावयाचा गूळ.

हातसर न. बायकांच्या हातातील एक दागिना, गजरा : 'हे पाटल्या हातसरांस ल्याली ।'– सारुह ६.२६.

हातसा पु. पाणी काढण्याचा पंप.

हातसाहना–णी पु. हत्तीदळाचा प्रमुख. [सं. हस्त + साधनिक]

हातसुटका स्त्री. १. एखाद्या व्यवहारातून, धंद्यातून स्वतः अंग काढून घेणे; मोकळे होणे. २. पहा : **हातविरजा.** ३. औदार्य : 'हे हातसुटी क्षीरसागरा । वांचौनि नाही ।'– उगी ७६९.

हातसुतकी स्त्री. पाथरवटाचे दगड फोडण्याचे हत्यार.

हातहालवणी स्त्री. प्रवाशांवरील एक जुना कर.

हातळ स्त्री. धुऱ्यांवर जोखड बांधण्याची दोरी. – बदलापूर २८७.

हातळ, हाताळ–ळू वि. चोरीची सवय असलेला; चोर; भामटा.

हात(ता)ळणे उक्रि. १. हात लावणे; चोळवटणे; चिरडणे. २. हाताळ माणसाने वस्तू चोरणे.

हातळी–ळे स्त्री. न. १. घोड्याचा काथ्या इ.चा खरारा. २. भात्याची बोटात, हातात अडकवण्याची वादी. ३. भाकरी. (कर.)

हाता पु. पहा : **हत्ता** १

हाता पु. हातात राहील इतका जिन्नस, पसा. (फळे, फुले यांचा पाच-सहा अशा संख्येचा संच एकेक वेळ हातात घेऊन बाजूला ठेवतात.)

हाता पु. केतकी; केवडा; सोनकेवडा; त्याचे कणीस. (को., गो.)

हातागळ वि. हस्तकुशल : 'कीं ते मदनाचे राउळ हातागळे।'– मूप्र २२०७. [सं.]

हाताचा बाण वर्चस्व; पगडा; वजन पाडणारे कृत्य, गोष्ट.

हातानिराळा–वेगळा वि. पूर्ण; पुरा; सिद्ध केलेला; पुन्हा हात लावण्याची जरूरी राहिली नाही असे (काम, धंदा इ.).
क्रिवि. एकीकडे; बाजूस.

हातापद्धती स्त्री. दलालाची माल घेणाऱ्याच्या हातावर रुमाल टाकून त्याच्याकडून गुप्त रीतीने मालाची किंमत आजमावण्याची पद्धत.

हाता(तो)फळी स्त्री. गुद्दागुद्दी; मारामारी; कुस्ती; हातझोंबी; धक्काबुक्की.
क्रिवि. पट्कन; चट्दिशी; तत्काळ; हातावर हात मारून.

हातावीती क्रिवि. पहा : **हातोहात**

हातासन न. १. हातोटी; कौशल्य. २. व्यापारातील सांकेतिक खूण.

हातासरसा क्रिवि. त्याच हाताने, प्रकाराने; तसेच; त्याचबरोबर.

हातिणे अक्रि. मारणे.–मनको .

हाति(थि)वा स्त्री. काडवात : 'विश्व प्रकटितेया गभस्ती। हाथिवेन कीजे काइ आरती।'– ज्ञा ९.१३. [सं. हस्त+वर्ति]

हातिसाहानी पु. बाजारहाट करणारा अधिकारी : 'फुलबडुवे हातिसाहानी'– शिव ३५५. [सं. हट्ट=बाजार]

हातुल्यो उद्गा. मुलांच्या खेळात अटीतून सुटण्याचा शब्द.

हातुवसीया वि. एक हात अंतरावरील.

हाते(त्या)ण न. (घोडी, गाढवी) माजावर येणे; वाफ; माज.

हातेर न. पाटील, खोत यांच्या शेतीमधील कुळांनी किंवा रयतांनी करावयाची बिगार.

हातोटी स्त्री. १. हस्तकौशल्य; हस्तचातुर्य. २. (सामा.) कसब; नैपुण्य; चलाखी. २. विशिष्ट पद्धत, रीत, प्रकार.

हातोडा पु. सोनार, कासार इ.चे ठोकण्याचे हत्यार; घण; ठोकण्याचे साधन.

हातोडी स्त्री. लहान हातोडा. [सं. हस्त+ताड; प्रा. हत्थाड]

हातोणी पहा : **हातपा**

हातोपात–ती, हातोफळिया पहा: **हातोहात**

हातोवा पु. अंजली; ओंजळ.

हातोसा पु. मदत; हातभार. (क्रि. देणे)

हातोसा पु. कापूस पिंजण्याची धनुकली. (अहि.)

हातोहात–ती क्रिवि. १.हाताचे हाती. २. चटकन; भरदिशी. (क्रि. येणे = मारामारी करणे).

हातोळा पहा : **हातवळा**

हातोळी स्त्री. लग्न.

हाथरणे, हाथरुण पहा : **आंथरणे, आंथरूण**

हादरणं–नं न. स्वयंपाकघरात भांडी धरण्यासाठी वापरले जाणारे फडके. (अहि.)

हादरणे अक्रि. १. हालणे; कंप पावणे; थरथरणे; लटपटणे. २. धक्क्यामुळे, भीतीमुळे क्षुब्ध होणे; मनास धक्का बसणे.
उक्रि. धक्का देणे; गदागदा हालविणे. [ध्व.]

हादरा पु. धसका; धक्का; गदगदा हलणे.

हादाल, हादालपार्वती पहा : **हदाळ** इ.

हादी पु. वाटाड्या.–पेद. ३.१८३ . [अर.]

हादोशी स्त्री. हाव; लोभ. (कु.)
वि. लोभी.

हानजा पु. (नाविक) यारी.

हानम पु. खिल्लारी बैल. – लोसाको.

हानवडी स्त्री. घाव; मारा : 'प्रेत्नाची हानवडी : इंद्रियें जाणताति फुडीं'– मूप्र १००५. [सं. हन्]

हानाव पु. (नाविक) तिरपा सांधा.

हानि–नी, हान(ण) स्त्री. १. नुकसान; तोटा; बूड. २. घात; दुखापत; धोका; बिघाड; नाश. [सं.]

हानिपंचक न. (ज्यो.) एक कुमुहूर्त. पहा : **चोरपंचक**

हापाहाप स्त्री. कष्टाविना खाण्याची वृत्ती.

हाफीज पु. कुराण तोंडपाठ म्हणणारी मुस्लीम व्यक्ती. [फा. हाफिझ्]

हाब न. विरोबासाठी बकरे मारून त्याच्या मांसाचे घातलेले जेवण. (माण. धनगर)

हाबक स्त्री. कटकट; त्रास. (व.)

हाबकणे उक्रि. पहा : **हबकणे**

हाबका पहा : **हबका**

हाबड स्त्री. तोटा; नुकसान. (ना.)

हाबशी पहा : **हप(ब)शी**

हाबसाहुबशी, हामसाहामशी स्त्री. स्फुंदणे; हुंदका.
क्रिवि. ओक्साबोक्शी. [ध्व.]

हाबळणी–णे पहा : **हेबा(ब) ळ(ल)णी, हेबाळणी.**

हाबासणी स्त्री. जोराने ओरडणे; खेकसणे. (दादर)

हाबू न. बुजगावणे. (अहि.)

हाय, हा बहुवचनाचा फारशी प्रत्यय. हा बहुधा निर्जीव वस्तू दर्शविणाऱ्या नामांना लागतो. पण मराठीत प्रादेशिक नामांनाच लागतो. उदा. देहेहाय, जिल्हेहाय. [फा. हा]

हाय पु. १. पाण्याचा मोठा हौद. २. जमीन खोदून तयार केलेली मोठी चूल. (अहि.)

हाय स्त्री. हयात; आयुष्य. [अर. हइ]

हाय उद्गा. १. सुखानुभवाचा उद्गार. २. शरीर, मन यास दुस्सह वेदना झाली असता निघणारा सुस्कारा, दुःखोद्गार.(वा.) **०खाणे, घेणे–** १. जिवास लावून घेणे, धास्ती घेणे, घाबरून जाणे. २. (तापाची, खाण्याची) भीती वाटणे, धडकी घेणे. **हायास येणे–आणणे** जीव

मट्ट्यास येणे; थकणे; भागणे; अशक्त करणे. **०घालणे** – ध्यास घेणे; धोसरा काढणे. **०पत्करणे, मोकलणे** – पश्चात्ताप करणे; चुकीबद्दल दु:खोद्गार काढणे. **०सोडणे, देणे, घालणे**– उसासा टाकणे.

स्त्री. (बालभाषा) तिखट, विस्तव, दिवा, तीक्ष्ण शस्त्र, क्षत इ.[ध्व.]

हायकू पु. एक जपानी काव्य प्रकार.

हायकोर्ट न. वरिष्ठ न्यायमंदिर. [इं.]

हाय तोबा जिवापाड मेहनत करणे. (अहि.)

हायदो(स)स्त दु(धु)ल्ला उद्गा. मुस्लीम लोक ताबुतापुढे हसन व हुसेन हे त्यांच्या लग्नानंतर लवकरच लढाईत मरण पावले. म्हणून 'हाय ! मित्रा ! नवरदेवा !'– अशा अर्थाचा काढतात तो दु:खोद्गार.

हायन न. वर्ष : 'तेरा पळेंहि नसती माता हें हायन चवदावे हो।'– मइसा ५.१५७. [सं.]

हायवडा पु. हव्यास. (व.)

हायसराफ पु. शिव्याशाप; तळतळाट. (व.)

हायसा क्रिवि. हाय ! असा समाधानाचा, आनंदाचा उद्गार उच्चारावयाच्या स्थितीत असलेला; दु:खकारक स्थितीतून सुटका झाल्यामुळे सुखी झालेला. (क्रि. होणे)

हायस्कूल न. इयत्ता ८–१० वीच्या शिक्षणाची शाळा. [इं.]

हायहुपस स्त्री. खूप कष्ट करणे. (अहि.)

हायहूय दु:खोद्गार.

स्त्री. करुणोद्गार; वेदनांमुळे विवळणी.

हार स्त्री. १. नुकसान; तोटा; खोट. (क्रि. येणे, बसणे). २ पराभव; डाव अंगावर येणे, लागणे (युद्ध, जुगार इ.त).

पु. १. अपहार; हरण; लूट. २. (अंकगणित) भाजक; छेद. [सं.हृ=हरण करणे]

हार स्त्री. अखेर.

हार पु. १. गळ्यातील कंठा; माळ (फुले, रत्ने इ.ची). २. रेशमाच्या लड्या एकत्र ओवून माळेसारखा केला जाणारा आकार.

स्त्री. ओळ; रांग; पंक्ती. [सं.]

हारक वि. १. हरण करणारा; लुबाडणारा; लुटणारा. २. निवारण करणारा; नाहीसे करणारा. जसे : पित्तहारक. ३. (गणित) भाजक.

हारकी स्त्री. हरवलेली वस्तू आणून देणारास दिले जाणारे इनाम.

हारडा पु. साखरेची गाठी; साखरेच्या पदकांची माळ. [सं. हार]

हारणे उक्रि. १. जिंकणे. २. पहा : **हरणे** ३

हारतणे १. हरण करणे. २. गमावणे; नाहीसे करणे, होणे.

हारतलेपण न. हरवलेपण; नसतेपण; नाहीपणा : 'हे आथी तरी कायिसें। हरतलेपण।'– अमृ ७.१०४.

हारफ न. अक्षर; वर्ण : 'पारसी हारफ लखोट्यावर लिहिले आहे.'– पेकासाआप.

हारव(वि)णे उक्रि. पहा : **हरपणे**

हारसड(र)णे अक्रि. पराभव कबूल करणे; हार खाणे; शरण जाणे.

वि. १ पहा : **हारक.** २. मोहक; आकर्षक.

हारसडणे उक्रि. आटोक्यात येईल इतपत कमी होणे, करणे; सामावणे. (राजा.)

हारा, हरा पु. बांबूची मोठी पाटी.

हाराकिरी स्त्री. १. पोटातील कोथळा बाहेर काढून जपानी पद्धतीने केलेली आत्महत्या. २. आत्मघात. ३. घाई; गडबड.

हाराडेरा पु. १. मंगळागौरीच्या पूजेच्या वेळी पुरण भरून देवीजवळ ठेवला जाणारा कणकेचा डेरा . २. विवाहात वराच्या घरी वरात आल्यावर एकावर एक तीन तपेली ठेवून त्यात काय आहे म्हणून वधू वरास विचारते व वर (वधूला) उत्तर देतो की, "नवरत्नाचा हार आहे."– हा प्रकार म्हणजे हाराडेरा. ३. वरातीबरोबर न्यावयाचा वधूकडील कलश; करादिवा. (व)

हाराष–स पु. तोटा; नुकसान; खोट. [सं. ऱ्हास]

हारिद्र वि. हळदीचे; पिवळे. [सं. हरिद्राचे भाववाचक]

हारी स्त्री. हार; पराभव; तोटा. पहा : **हार**

वि. १. पहा : **हारक.** २. मोहक; आकर्षक.

हारी स्त्री. रांग. [सं. हार]

हारी क्रिवि. १. कडे; दिशेस; बाजूस. २. कडे; हाती; जवळ. ३. इतर अर्थी पहा : **कडे.** ४. जवळ; पाशी.

हारेमोहरे, हारेमोहरेस, हारेम्होरे–स, हाऱ्यामोहऱ्यास क्रिवि. जवळ; आसपास; समोर; पुढे; आजूबाजूस.

हारोशर अ. ओळीने; मागोमाग.

हार्णाळ स्त्री. ओघ; प्रवाह : 'केली हार्णाळां आंघोळी।'– तुगा ४१२५.

हार्द–र्द्र न. १. इंगित; हृद्गत; कल. २. उद्देश; आशय; अभिप्राय; झोक.

वि. मनातील. [सं. हार्द]

हार्मोनियम स्त्री. बाजाची पेटी; संवादिनी. [इं.]

हाल पु. जलदी; त्वरा. [हिं.]

हाल पु. आपदा; कष्ट; दैना; तारांबळ. [अर. हाल]

हाल स्त्री.१. निश्चय; हट्ट; निर्धार; पण. (क्रि. बांधणे, सोडणे.) २. पैज; होड; प्रतिज्ञा; स्पर्धा; चढाओढ; शर्यत; ध्यास : 'ऐसा गजानन महाराजा। त्याचे चरणीं हालो लागो माझा।'– तुगा ४३५८.

हाल पु. वेश. (तंजा.)

हाल पहा : **हालत** : 'लस्कर पायमालाने रयतीचा हाल राहिला नाहीं.'– मइसा १८.५३.

हाल वि. हल्लीचा.

क्रिवि. १. सध्या; हल्ली; वर्तमान. २. सतत; नेहमी; एकसारखे : 'हालवसूल'– वाडथोमा १.९३.

हालउंडा पु. तांदूळ, साखर इ.चे एक पक्वान्न.

हालकडी स्त्री. पहा : **हलकडी**

हालका क्रिवि. जलदीने : 'चार हजार घोडा। हालका धराया चालला।'– ऐपो १४. [अर. हाल=आता]

हालखुद–द्द क्रिवि. आहे त्या स्थितीत; ठायीचे ठायी.

हालखुशामती वि. नेहमी नव्याने हांजी हांजी करणारा. पहा : **खुशामती**

हालचाल स्त्री. १. सजीव अवस्थेची द्योतक क्रिया. २. चळवळ; चालना; उद्योग; वळवळ.

हालणे अक्रि. १. सरणे; ढळणे; गती येणे; सरकणे; चळणे. २. गडबडीत, दंगलीत, गोंधळात असणे (देश, गाव, घर). ३. हलकलणे.

हालत स्त्री. सुस्थिती; जोर; दम; हाल : 'मुलकांत हालत कांहीं राहिली नाही.'– मदबा १.२१३. [अर. हालत्]

हालपा पु. मेंढरांच्या गळ्यास होणारा एक रोग. (जुन्नरी)

हालबं(बिं)ड्या–हालबा(बे)लंडी–डे पहा : **हलबेलंडी** इ.

हालबोंदरा–बोंद्रा–बेंद्रा वि. १. घाणेरडा; अजागळ; मूर्ख. २. वेडगळ; हेकाड. ३. नालायक; कुचकामी; नपुंसक; दुर्बळ मनाचा. ४. एक शिवी (हेट.); चिंध्या लावणारा.

हालमस्त वि. गरीब पण गर्विष्ठ. [अर. हाल+फा+मस्त]

हालविणे सक्रि..सरकविणे; गती देणे; सारणे; धामधूम करणे; जागृत करणे; चेतविणे. (वा.) **हालवून जागा करणे** – १. आयास-प्रयासाने प्रवेश करणे. २. उठविणे; चेतविणे. ३. भानावर आणणे.

हालवे वि. पातळ : '(दही) हालवे पाणी ऐसे होए।'– गोप्रच २६. [सं. ह्वल्]

हालहवाल पु. हकिगत; वर्तमान; सद्य:स्थिती : 'रयतीचा हालहवाल जाहीर केला.'– मइसा १८.५३. [फा.]

हालहवाल पु. स्त्री. दुर्दशा; हालअपेष्टा; कैफियत.
वि. संकटग्रस्त; दुर्दशा असलेला.

हालहूल स्त्री. गडबड; गोंधळ; आरडाओरड; धिंगाणा.

हालाळवील्हळी क्रिवि. ओक्साबोक्शी : 'हालळवील्हळी रडो लागली:' – गोप्र ३२३.

हालाल्खोर पु. १. झाडू. २. भंगी; हलकी कामे करणारा. [फा. हलल्खूर]

हालीमवाली वि. उच्चनीच; गरीब-श्रीमंत. [अर. अहाली+मवाली]

हालीमाली स्त्री. क्रांती; बखेडा. [फा.]

हालीवाली स्त्री. थापा; आज -उद्या करणे.

हालोहाल अ. तत्काळ; ताबडतोब; या क्षणी; हातोहाती. [हिं.]

हाव स्त्री. गप्प; वदंता. [अर. हवा]

हाव पु. १. कामोद्दीपक चेष्टा; नखरा; नट्टापट्टा. २. (अव.) शृंगारचेष्टा; प्रेमकला. ३. (अव.) हावभाव. [सं.]

हाव स्त्री. १. तीव्र इच्छा; औत्सुक्य; बळकट आशा. (क्रि. भरणे, लागणे, धरणे.) २. हिंमत; धमक; धाडस; दम. ३. तेज; प्रभा. ४. हव्यास; लोभ . [अर. हवा = आयुष्य, वारा] (वा.) **०करणे** – मिळविण्यासाठी धडपडणे; घाबरे होणे. **०घालणे** – आशा धरणे. **हावेस–ने, हावे भरणे** – १. उत्सुकतेने पत्करणे (असामान्य, विक्षिप्त योजना). २. मन घालून पाठपुरावा करणे; चिकाटी धरणे. ३. फार महत्त्वाकांक्षी बनणे, होणे. ४. हट्टास पेटणे.

हावडे न. अतिशय कष्ट, श्रम. पहा : **खरड**

हावबोर पु.बचल्याचे बी. – मुंव्या ११३.

हावभाव पु. अव. १. भावनादर्शक अभिनय; भाव, चळवळ आणि हातवारे; आंतरभावदर्शक क्रिया. २. नखरे; चेष्टा. ३. अनुमान; अंदाज; तर्क. (क्रि. बांधणे)

हावर–रे पु. स्त्री. न. अतिशय इच्छा; लोभ; हव्यास. (क्रि. सुटणे, भरणे.)

हावर पु. स्त्री. गळू, फोड इ. फुटल्यानंतर पुन्हा धरणारा गुबारा. (क्रि. धरणे)

हावरा, हांवरा वि. १. अत्यंत लोभी. २. उतावळा; हळवा; असहनशील.

हावरी–रा स्त्री. पु. पांढरा तीळ. (व.)

हावरू पु. हट्ट; नाद; छंद : 'शब्द आइकलेया रडते लेकरू हावरू सांडी।' – स्मृस्थ २१९.

हावसा पु. हाय; भीती; धाक.

हावळा पु. हिरवा वाटाणा, हरभरा यांचा केलेला हुरडा. पहा : **हुळा**

हावाव स्त्री. शोभा.

हा(हां)वाळी स्त्री. १. दमा; श्वास. २.रोगाची साथ. (कु.)

हा(हां)शा–शी पु. स्त्री. हशियाहशी; बारतोंडी; (कु.) एक झाड.

हाशा, हासीया पु. वस्त्राची दशी; किनार. [अर. हाशिया]

हास स्त्री. गळ्यातील सरी; हासळी.

हासडणे, हासडा, हांसणे, हांसडा, हांसळी पहा : **हसडणे इ.**

हासभास पु. १. सराव; अभ्यास. २. अंदाज; कल्पना.

हासळीक्रम पु. नाथपंथी योगातील पाच करणांपैकी एक करण किंवा सिद्ध.

हासी स्त्री. हसे; उपहास.

हासीन(न्न)णे अक्रि. हसणे : 'तेव्हेळीं विस्तिममुखें हासीनली।'– शिव १९०.

हास्ती स्त्री. (चर्मकार.) खिळे ठोकण्याचे चांभाराचे हत्यार; मुसळी. (अहि.)

हास्य न. १. हशा; हसे. २. आनंदाचे हसू; सुखाची भावना. २. नवरसांपैकी एक रस. ४. थट्टा; उपहास. ५. विनोद; मौज.

हास्यक न. हास्याला कारणीभूत होणारी गोष्ट; विनोदविषय.

हास्यकारक वि.१. हसे उत्पन्न करणारे. २. उपहास होण्यासारखे.

हास्यास्पद वि. हसण्यासारखे. [सं. हास्य+आस्पद(=जागा)]

हाहा उद्गा. दु:खोद्गार; अरेरे ! हाय, हाय !

हाहाकार, हाहा:कार, हाहाक्कार पु.१. मोठा शोक; विलाप. २. एखाद्या पदार्थाचा अभाव, हाकाटी पडणे.

हाहाट पु. ओरड; आक्रोश.

हा हू, हां हूं स्त्री. न. १. भय, सावधान, जागृतपणा इ. सांगण्यासाठी काढलेला उद्गार; खाकरणे इ. २. तळमळ; विवळणे. ३. कां-कू; साशंकता; अनिश्चितपणा. [ध्व.]

हाळ स्त्री. १. हारा; टोपली. २. (त्यावरून) विक्रीचे जिन्नस घेऊन परगावी जाणे किंवा खेडोपाडी विक्री करीत हिंडणे. ३. अशा तऱ्हेने विक्री करावयाचा माल, जिन्नस. ४. या मालाचा विक्रीचा पैसा, नफा. [सं.]

हाळ पु. लागवड करताना जमिनीतून काढलेल्या किंवा पूर्वी असलेल्या झाडाची खूण.

हाळ पु. १. गुरांसाठी बांधलेला पाण्याचा मोठा हौद, टाकी. २. लांब व खोल चर; लांबट-खोल चूल; विस्तवाची खाई; चंपाषष्ठीच्या दिवशी खंडोबाचा गोंधळ चालू असता त्याचे भक्त ज्या विस्तवावरून चालत जातात तो विस्तव; खाई; पहा : **आहार–ळ.** ३. डोंगरावरून वाहणारा ओढा, झरा. त्याचे बनलेले खडबडीत पात्र. (क.)

हाळ पु. नाश. [क. हाळु] (वा.) ०**करणे** – गमावणे; उधळणे.
हाळकरी पु. हाळात मोटेचे पाणी भरणारा माणूस.
हाळजणे अक्रि. बाळंत होणे. (माण, व.)
हाळा पु. वार; आघात.
हाळी स्त्री. एक प्रकारची पळी : 'हाळीया पाळीया ।'– सिद्धान्तसूत्र.
हाळी स्त्री. अगदी लहान वस्तीचे खेडे. [क.हळ्ळी]
हाळी स्त्री. हाक; आरोळी.
हाळीज–स न. नांगराची धुरा; आडवी दांडी; इसाड. (व.)[सं. हलिज]
हाळीव न. पहा : **अहाळीव** (धान्य).
हांग उद्गा. छान ! वाहवा : 'आनंत्या बोलिला हांग असा माझा भाई ।'– ऐपो ७०. [ध्व.]
हांगाडेंगी स्त्री. हयगय; दुर्लक्ष. (व.) [हांगा द्वि.]
हांग्राहिंग्री स्त्री. वादविवाद. (झाडी)
हांजा पु. पहा : **लांझा**
हांजा पु. (नाविक) लाकडी बोंबास शीड अडकविण्यासाठी त्याचे शेंड्यावरील भोकात भरून घेतलेली दोरी.
हांजी हांजी खुशामत; पुढे पुढे करणे.
हांडक–के पु. लहान मडके. (व.)
हांडगा, हांडवन्या वि. बायकात वावरणारा; बायक्या (पुरुष). (व.)
हांडी, हांडीबाग, हांडीमडकी, हांडेभांडे, हांडेमडके पहा : **हंडी, हंडीमडकी** इ.
हांडी स्त्री. १. (नाविक) गलबताच्या पाण्यावरील सुकाणूकडचा काहीसा भाग. २. कमर; कडा. (गो.)
हांडूल, हांडोरे न. लहान हांडा. (को.)
हांडोन्या वि. १. ऐतखाऊ. २. भित्रा. (गो.) (झाडी)
हांडोरिया वि. अडाणी : 'जाणवूनि गेला हांडोरिया पोरां ।'– तुगा ३२२६.
हांतर–री पु. स्त्री. बांबूची मोठी चटई.
हांतरणे, हांतरूण पहा : **अंथरणे**
हांदकळणे अक्रि. डचमळणे. (बे.) पहा : **हिंदकळणे**
हांदा पु. पैरा; इरजीक; परस्परांना मदत करण्याची शेतकऱ्यांची रीत.
हांदुळ, हिंदू(द)ळ स्त्री. झोका; आचका; झोकाझोकी.
हांदु(द)ळणे उक्रि. १. पहा : **आंदुळणे.** २. फळे पाडण्यासाठी झाड गदगदा हालविणे. ३. झोके देणे; पुढे मागे करणे.
अक्रि. हालणे; डोलणे; झोका खाणे. [सं. आंदोलन]
हांदेकरी, हांदेलेकरी पु. हांदा करण्यासाठी दिलेला माणूस, बैल इ.
हांपा पु. धाप; दमा; श्वास. (क्रि. भरणे, टाकणे, देणे, खोडणे.) [हिं. हापना; ध्व.]
हांबडणे क्रि. गुरे हाकणे. पहा : **आंबडणे** २
हांबर पु. लोढणे : 'प्रपंचाचा हांबरू ।'– मुप्र २६५९.
हांबेट उद्गा. खेळ थोडावेळ बंद करावयाच्या सूचनेचा शब्द; थुथुल्ल्यो; थुश्यो. [ध्व.]
हांयस न. आमिष; आविस. (गो.) [सं. आमिष]
हांसळाफासळा क्रिवि. आनंदित, उल्हासित.
हांसिरू आच्छादन.
हां हां उद्गा. थांब ! खबरदार ! मागे सर ! असे बजावणारा उद्गार.
हां हां म्हणता–म्हणेतो क्रिवि. हातचे हाती; चट्दिशी; त्वरेने; पटकन.
हि अ. देखील; आणखी.
हिक स्त्री. घाण. (व.)
हिकडचा–ला–ली, हिकडणे, हिकडील, हिकडून, हिकडनं – तिकडनं, हिकडे, हिकडे–तिकडे पहा : **इकडचा**
हिकणे उक्रि. (अश्लील) संभोग करणे.
हिकमत स्त्री. १. शहाणपण; चातुर्य. २. कावा; मसलत; जादू; युक्ती. [अर. हिक्मत्]
हिकमती–त्या वि. १. हुन्नरी; कसबी; हुशार. २. कावेबाज; लबाड.
हिकाती स्त्री. (क्र.) अयोग्य, खोटी सबब; फालतू कारण; तक्रार; आडफाटे.
हिकाती–त्या, हिकात्याखोर वि. सबबी सांगणारा; आडफाटे आणणारा; तक्रारी करणारा. [अर. हिकायत]
हिकायत स्त्री. कथा; गोष्ट; कहाणी. [अर. हिकायत]
हिकायती स्त्री. चार रकान्यापर्यंत ओढलेली रेघ. पहा : **रेघ**
वि. १. पहा : **हिकाती.** २. गोष्टी सांगणारा.
हिक्का पु. पहा : **हेका**
हिक्का स्त्री. उचकी : 'ज्वरान्ती हिक्केसरिसे जाति प्राण ।'– रकौ ३३३.
हिचक–का, हिचकाविणे, हिचडणे, हिचडा पहा : **हिसडणे**
हिचमिचणे अक्रि. (कसेतरी, मोठ्या कष्टाने) थोडा विसावा घेणे; थोडेसे हातपाय हालविणे; चलनवलन करणे; हातपाय ताणून अंग मोकळे करणे; इकडे तिकडे हलणे. [ध्व. हिच्+मिच्]
हिजड(र)णे अक्रि. रागाने वसकन अंगावर जाणे; रागावणे. (व.)
हिजडा पु. १. पुरुषवेषधारी नपुंसक; षंढ; यांची विशिष्ट जात. २. (ल.) निर्लज्ज, बीभत्स हावभाव, भाषण करणारा माणूस. ३. नि:सत्त्व, दुबळा, पौरुषहीन माणूस.
हिजडी स्त्री. स्त्रीवेषधारी नपुंसक.
हिजरा–री, हिजरीसाल पु.स्त्री. एक अरबी वर्ष; मुहम्मद पैगंबर मक्का सोडून मदिनेकडे गेला त्या दिवसापासून म्हणजे १६ जुलै ६२२ पासून सुरू झालेला शक. [अर. हिजरा=वतनत्याग]
हिजरात स्त्री. सामुदायिक देशत्याग.(वा.)
हिजरी वि. हिजरासंबंधी.
हिजे करणे उपहास करणे. (व.)
हिटक वि. दांभिक. (तंजा.)
हिटगा वि. मनाचा हलका; क्षुद्र बुद्धीचा. (व.)
हिटगेपणा पु. हलकेपणा.
हिड पु. गुरांचा कळप.
हिडक स्त्री. घिरत, जाते यातील टाकीची वाटोळी खाच, शीर.
हिडगा पु. १. छंदिष्ट, लहरी माणूस; शौकीन; हौशी. २. भटक्या, उनाड माणूस. ३. व्यसनी, फंदी, टवाळ माणूस. ४. आळशी, दुर्लौकिक असलेला, अव्यवस्थित माणूस.

हिडगेचार पु. अव. स्वैर वर्तन; गर्ह्य वर्तणूक.

हिडशा–शी–सी वि. घाणेरडा; किळसवाणा; ओंगळ; बीभत्स; हिडीस (व्यक्ती, वस्तू इ.). [सं. हिड्=धिक्कारणे]

हिडसणे उक्रि. धिक्कारणे; अपमान करणे; विटंबना करणे; कस्पटासमान लेखणे; हिडीस फिडीस करणे.

हिडसावणे उक्रि. १. झिडकारणे; धुडकाविणे. २. घाण करणे; मळविणे.

हिडी(ड)स न. उकिरडा; घाण; मातेरे.
वि. पहा : **हिडशा**

हिडीस फि(पि)डीस न. अनादराची, तुच्छतेची वागणूक.
क्रिवि. धिक्कारून; धुडकावून; तिरस्काराने.

हिण–णे न. पहा : **हीण** [सं. हीन]

हिणकस–कट–वट–कसी वि. पहा : **हीणकट**

हिणगे न. बांबूची एक प्रकारची टोपली. (को.)

हिण(णा)वणी स्त्री. मानखंडना.

हिण(णा,ण्या)व(वि)णे उक्रि. १. दोष, अपराध, चूक इ. दाखवून मानखंडना करणे; हीनपणा दर्शवून लाजविणे. २. कमी करणे; उतरविणे.

हिणवर पु. १. प्रथम लग्नाचा, बिजवर नसलेला नवरदेव. (कर.)

हिणसुंदा पु. थकवा. (व.)
वि. फार श्रमलेला, थकलेला, दमलेला. (व.)

हिणाव–वो पु. फजिती; लाज; हलकेपणा : 'तें अगाधपण जाईल। हिणावो अंगा येईल।'– ज्ञा २.२१७.

हित न. लाभ; कल्याण; बरेपणा; फायदा. (क्रि. शोधणे)
वि. उपयुक्त; फायद्याचे; योग्य; रास्त. [सं.]

हितकर वि. कल्याणकारी; फायदेशीर.

हितगुज न. १. स्वत:च्या कल्याणाची गोष्ट. २. आपल्या मनातील गोष्ट; गुप्त गोष्ट; कानमंत्र. (क्रि. सांगणे, बोलणे, राखणे).

हितचा, हितपर्यंत, हितवर, हितून पहा : **इथचा, एथचा** इ.

हितचिंतक वि. १. कल्याण चिंतणारा; हितेच्छू. २. सार्वजनिक संस्थेस विशिष्ट रक्कम (वर्गणी) देणारा सभासद.

हितबुद्धि–द्धी वि. हित चिंतणारा; करणारा.

हिताळ–ळा–ळू वि. हितकर्ता; उपकारकर्ता.

हितेच्छू, हितैषी वि. कल्याण इच्छिणारा; हितचिंतक.

हिदहिदणे अक्रि. बिलबिलीत होणे (फळ, गळू इ.).

हिदहिदीत, हिदहिदा वि. १. बिलबिलीत झालेला. २. खिळखिळा; डळमळीत; विसकळीत.

हिनसुदा वि. हिरमुसलेला. – मनको.

हिना स्त्री. १. फजिती. २. सुंदर स्त्री.

हिना स्त्री. मेंदी. [फा.]
वि. मेंदी लावणारा. [फा.]

हिफाजत स्त्री. संरक्षण. [अर. हिफाझत्]

हिम न. १. धुके. २. बर्फ. ३. थंडी; थंडपणा; गारठा. ४. हीव; सर्दी.
पु. न. १. औषधी पदार्थ भिजत घालून त्याचे प्यायचे पाणी. २. थंड पदार्थाचा स्पर्श.
पु. १. चंद्र. २. हिमालय पर्वत. ३. चंदनाचे झाड. ४. कापूर.
वि. थंड. [सं.]

हिमकर पु. चंद्र.

हिमकरणी वि. हिमटा; कृपण. (व.)

हिमजी पु. सुरवारी हिरडा. – मुंव्या १७२.

हिमट, हिमटतांड्या वि. हिंपुटा; खिन्न. [हीमटी=ही! असा आवाज] (वा.) **हिमटी काढून रडणे** – ओक्साबोक्सी रडणे. (कु.)

हिमटा–ट्या वि. चिक्कू; कृपण.

हिमटाण पु. कंजूषपणा. (गो.)

हिमतल न. नारळाच्या रसावर थंडीच्या दिवसात येणारा मलईसारखा थर. हे तेल मस्तकव्याधीवर गुणकारी असते.

हिमनग–वंत–वान पु. हिमालय पर्वत; बर्फाचे पर्वत.

हिमवान वि. थंड; गार; बर्फमय.

हिमवृत्त न. (भूगोल.) ज्या उंचीवर नेहमी बर्फ असते ती उंची अथवा असा प्रदेश दर्शविणारी भौगोलिक रेषा.

हिमसाण पु. मासळीची घाण. (कु.)

हिम(मू)ळ वि. १. बेचव; नि:सत्त्व; घाणवट. २. कोंबट.

हिम्य वि. थंडीचे; बर्फाचे.

हिमाइ(य)ती–त्या, हिमाइतीचा, हिमाईतदार–गार वि. १. आश्रित; संरक्षित. २. आवडता (दोस्त).

हिमाईत–यत स्त्री. १. संरक्षण; मोठ्यांचा आश्रय; आधार; मदत : 'पेंडारी यांची हिमाईत करून स्वामींचा क्रोध होऊन स्वामी उपोषणें करितात कीं काय?'– ऐलेसं ९.४५४८. २. जोरावारी; दंडेली : 'आऊंधकर हिमायेतीने आऊते धरितात.'– मइसा ६.१३. [अर. हिमायत्]

हिमाईल तलवार अडकविण्याचा पट्टा.

हिमायल पु. (जंबिया) आपल्या जंबियाने जोडीदाराच्या गळ्याजवळील बरगडीच्या खड्ड्यात केलेला वार. [अर. हिमायल=ताईत]

हिमार न. पु. ऊन. [सं. हिम+अरि]

हिमांशू, हिमभानू पु. चंद्र.

हिमोग्लोबीन न. रक्तातील पेशींना लाल रंग प्राप्त करून देणारा द्रव. [इं.]

हिमोढ पु. अव. हिमनदीत वाहून आलेले व निक्षेपित झालेले मिश्रपदार्थ.

हिमोफिलिया पु. रक्त गोठण्यासाठी लागणाऱ्या जनुकांमध्ये उत्परिवर्तन होऊन रक्त न गोठण्याचा आनुवंशिक दोष. [इं.]

हिम्म(म)त स्त्री. १. धाडस; धैर्य; शौर्य. २. निग्रह; हिय्या; उत्साह; उमेद; धमक; अवसान. (क्रि. करणे इ.)[अर. हिम्मत] (वा.) **०हरणे** – धैर्य, अवसान, उत्साह नाहीसा होणे; गडबडणे.

हिम्मतदार, हिम्मती, हिम्मतीचा वि. धाडशी; धैर्यवान; निधड्या छातीचा.

हिम्मतबहाद्दर वि. १. शूर; वीर. २. एक पदवी. – स्वप १३२.

हियार पु. हिवाळा : 'सेवंते हियारीं। नोहंति फुलें' – ज्ञा १६.१२५.[सं.हिम]

हिये न. १. छाती; हृदय : 'तेणें दु:खें हियें फुटेल।'– ज्ञा १.२३४. २. धैर्य.[सं. हृदय] (वा.) **०घालणे** – दु:खाने अत्यंत घाऱ्हमेल होणे. **०फोडणे** – अंत:करण खुले करून गुप्त गोष्ट सांगणे.

हिय्या पु. हिंमत; धैर्य; अवसान; छाती.

हिय्यो–यो उद्गा. नांगरणीच्या वेळी बैलांना द्यावयाचा इशारती शब्द.[ध्व.]

हिर पहा : **हीर**

हिरक स्त्री. घिरट, जाते यातील टाकीची खाच, शीर.

हिरका पु. १. ताड, माड, पोफळ इ. च्या झावळीतील, लाकडातील रेषा. २. सुपारीतील रेषा. पहा : **हीर.** ३. खापरपोळी इ. च्या पोटी रेघांनी भिन्नभिन्न झालेला अवयव.

हिरकूट न. पु. (तिरस्कारार्थी) १. पहा : **हीर** . २. केरसुणीची काडी.

हिरगण न. खांब व तुळई यांच्यामधील +अशा आकाराचा तुकडा; पिढे.

हिरडा पु. १. हरडा; एक औषधी फळ. याचे जंगली, रंगारी, चांभारी, बाळ, सुरवारी इ. अनेक प्रकार आहेत. २. (ल.) हिरड्याच्या आकाराची वस्तू. [सं.हरीतकी]

हिरडी स्त्री. वाळलेला बारीक कोवळा हिरडा.

हिरडी स्त्री. ज्यांच्यामुळे दात परस्परांशी संबद्ध असतात व ते ज्यात बसविलेले असतात तो तोंडातील मांसल भाग; दाताची खोबण; घर.

हिरणे उक्रि. हरण करणे; बलात्काराने छिनविणे; हिरावून घेणे : 'तो ही मी कोल्हावा हिरें। मग तमचि होती एकसरें।'– ज्ञा १६.४१६. [सं.]

हिरण्य न. १. सोने. २. (ल.) लाच. [सं.]

हिरण्यकेशी पु. एक सूत्रकार.
वि. यजुर्वेदाची एक शाखा व सूत्र; त्या शाखेचा (ब्राह्मण).

हिरण्यगर्भ पु. ब्रह्मदेव.

हिरण्यश्राद्ध पु. अन्नदानाऐवजी हिरण्यदान करून केलेले श्राद्ध.

हिरतणे सक्रि. हिरावून घेणे : 'जेणें भ्रांतिपासूनि हिरतलें।'– ज्ञा ५.३४. [सं. हृ]

हिर(हे)बोर स्त्री. टेहळणी; येरझारा.

हिरभरणे क्रि. लचकणे.

हिरमुशी–मुष्टी–हिरमूस–हिरमोडी वि. निराश; उत्साहहीन; हतबल; धीर खचलेला.

हिरमुसणे अक्रि. निराश होणे; धीर सुटणे; विरस होणे.

हिरमोड पु. निराशा; धैर्य खचणे; उत्साहभंग; मनोभंग.

हिरमोड वि. हिरवट रंगाचा; गडद हिरवा नव्हे असा.

हिरया वि. हिऱ्याप्रमाणे.

हिरली–ले पहा : **इरली–ले**

हिरवट वि. साधारण, किंचित हिरवा.

हिरवट, हिरवा. १. किंचित अपक्व; कच्चा. २. तंबाखूसह गांजा ओढणारा. ३. (ल.) अडाणी; रानवट; अशिक्षित. ४. अविचारी; तापट; एककल्ली; चिडखोर; तिरसट : 'मृत्यू ऐसा व्याघ्र। मुख पसरोनि समोर। तेथें हिरवटाचार। देहधेनूतें केंवि रुचे।'– मुरंशु २८२.

हिरवटाण स्त्री. हिरवा चारा, फळ इ. ची घाण; हिरवा असल्याची घाण.

हिरवस वि. हिरवंडा.

हिरवसान पु. हिरवटपणा; कच्चेपणा.

हिरव(वा)ळ, हिरावळ स्त्री. ओले, हिरवेगार गवत, वनस्पती इ.चा समुदाय.

हिरवळणे अक्रि. हिरवा पाला फुटणे; पाल्हेजणे : 'वाळलें काष्ठ हिरवळे ना।'– दास ९.७.२९.

हिरवंडा वि. १. हिरवट. २. हिरवट घाण येणारे; हिरवट असलेले (फळ, वीट इ.).

हिरवा वि. पाचू, शेवाळ, कोवळे गवत इ.च्या रंगाचा; निळा आणि पिवळा यांचे मिश्रण करून बनवलेला (रंग). [सं. हरित]

हिरवाकंच–गार–चार वि. अतिशय हिरवा; गर्द हिरवा.

हिरवानिळा–पिवळा वि. काळानिळा (राग, मत्सर, विष इ. मुळे झालेला चेहरा, मुद्रा). (वा.) **०भाजला खाणे** – सदानकदा, काहीही झाले तरी अतिशय छळणे, त्रास देणे.

हिरविणे पहा : **हिराविणे**

हिरवी तंबाखू (सांके.) गांजा.

हिरशी, हिर्शी–सी वि. १. लोभी; खादाड. २. चिडखोर; अवहेलना करणारा; शिडशिडा. [अर. हिर्साहा]

हिरस स्त्री. १. (क्र.) लोभ; लोभीपणा; हाव. २. मत्सर; ईर्ष्या; स्पर्धा. (ना.) [अर. हिर्स]

हिरसा वि. १. खिंकाळण्याची सवय असणारा (घोडा). २. उन्मत्त; नाठाळ.

हिरसा तट्टू (खिंकाळणारे, नाठाळ तट्टू.) बढाईखोर माणूस.
वि. स्त्रीलंपट; व्यभिचारी; दुर्व्यसनी (माणूस).

हिरहिरी स्त्री. १. पहा : **हिरिरी.** २. हल्ला : 'अशा पांच सात हिरहिऱ्या जाल्या.'– भाब १४७.

हिरा पु. पांढऱ्या रंगाचे महारत्न. [सं.हीरक, हीर]

हिरा पु. नदीच्या पात्रात पाणी साठविण्यासाठी केलेला खड्डा.

हिराकस स्त्री. पु. शाई, रंग वगैरे करण्याच्या उपयोगाचा एक खनिज पदार्थ; लोहगंधकित. [हिं.]

हिराटा पु. गिधाड. (गो.)

हिरा दिवा अगदी मूर्ख.

हिरा बोळ एक प्रकारचा बोळ; कातबोळ.

हिरामण पु. पोपटाची एक जात. [हिं.]

हिरावणे उक्रि. जबरीने दुसऱ्यापासून घेणे; हिसकावणे. [सं. हृ=हरणे]

हिरावळी स्त्री. बायकांची पांघरण्याची ओढणी. [तुर्की हिरावळ]

हिरा हिंग चकाकणारा उत्कृष्ट हिंग.

हिरिरी स्त्री. १. वेग; आवेश; सपाटा; झपाटा. २. निकराचा हल्ला; आवेशाने तुटून पडणे. [सं. वीर्य]

हिरीस स्त्री. हाव; अधाशीपणा. [अर. हिर्स]

हिरुती, हिरीत, हिरोती न. स्त्री. कुटलेले लाल तिखट. (व.)

हिरून फिरून क्रिवि. पहा : **हेरूनफेरून**

हिरे दिवे मकरसंक्रांतीस ब्राह्मणास स्त्रियांकडून दिले जाणारे दोन दिवे व दोन आरशाचे वाण.

हिरो पु. १. नायक. २. नाटक, चित्रपट इ. तील प्रमुख अभिनेता. [इं.]

हिलगड स्त्री. १. (देणे-घेणे इ. व्यवहारातील) भानगड; लचांड. (क्रि. घालणे, ठेवणे, पडणे, होणे.) २. अडथळा; गुंताडा; गुंतागुंत.

हिलगडणे उक्रि. लोंबकळत ठेवणे; शेवटपर्यंत पुरे न करणे (काम इ.); उगीचच रेंगाळणे.

अक्रि. निकाल न लावता अनिश्चितपणे लोंबत राहणे.

हिलगडा, हिलगण, हिलंगवण पु.स्त्री. हिलाल.

हिलगणे, हिलगाव(वि)णे उक्रि. ढिले बांधणे; लोंबत ठेवणे; सरासरी जुडणे; टाचणे (कागदाचे गठ्ठे इ.); अडकविणे; हिलगडणे.

अक्रि. १. लोंबकळत पडणे; लोंबत राहणे. २. गुंतणे; अडकणे. ३. एखाद्या कामात गुरफटून जाणे. [हिं. हिलगन]

हिलणे पहा : **हालणे** [हिं. हिलाना]

हिलफिरकी स्त्री. (चर्मकार.) बूट घोटण्याचे एक हत्यार. [इं. हिल=टाच]

हिलामत न. अव. लग्नातील वरातीचे चवरी, अब्दागीर इ. साहित्य. (गो.)

हिलायल, हिल्लाळ, हिलाल पु.१. दिवटी; टेंभा; पलिता; मशाल : 'सोयऱ्यांचे मंडपांत पुरुष व बायका रात्रीचे जाण्या येण्यास हिलाल दिवट्या अगोदर बातमी राखोन सिद्ध करून ठेवाव्या.'- पया २८८. २. चंद्रकोर; चंद्रज्योत. [अर. हिलाल्]

हिलारी, हिलारणी स्त्री. १. हल्ला. पहा : **हिरिरी.** २. दौड; चाल (घोड्याची). (क्रि. देणे)

हिलाल्या वि. मशालजी.

हिल्ला पु. वर्ण; रंग. [अर.]

हिल्ला पु. १. लबाडी; युक्ती; कारवाई; ढोंग; बतावणी; सबब; टाळाटाळीची युक्ती; खोटी अडचण. २. निर्वाहाचे साधन (आश्रय, उद्योग, धंदा, रोजगार). [अर. हीला]

हिल्लारी स्त्री. आरोळी; हाक. पहा : **हुल्लड** : 'एकचि हिल्लारी करा म्हणती.'- निगा ४८. [ध्व.]

हिल्लाहरकत स्त्री. १. युक्तिप्रयुक्ती; सबबी; बतावण्या (कर्ज, पगार, निकडीचे काम इ. टाळण्यासाठी). २. विरोध; हरकत. ३. हल्ला. [अर.]

हिल्लेबाज वि. छट; दंगेखोर; हरकत्या.

हिव न. १. थंडी; वस्तू, हवा यातील गारवा; गारठा. २. सर्दी; शिरशिरी. ३. हिवताप. ४. थंडीच्या कडाक्याने खराब झालेले पीक. (क्रि. जाणे, फिरणे). [सं. हिम]

हिवडी स्त्री. थंडीची हुडहुडी. (को.)

हिवत, हिवत जमीन पु. स्त्री. १. हिवाळ्यात नांगरून पावसाळ्यापर्यंत तशीच ठेवलेली पड जमीन. २. एकवेळ पड टाकून पहिल्या हंगामात लागवडीस आणलेली माळजमीन. (डांगी.)

हिवताड न. (तिरस्काराने) हिवत.

हिवताळा पु. हिवाळा. (व.)

हिवर पु. मोठे काटेरी झाड.

हिवली स्त्री. १. थंडी : 'हिंवली जैसी आंगिकें। हिंवो नेदी। निजांग।'- ज्ञा १७.२२९. २. हिवाळा.

हिवशी स्त्री. थंडी. (व.)(वा.) **हिवश्या पाण्याच्या भाकरी खाणे** - काळजी नसणे. (व.)

हिवशी पटक फार थकवा. (व.)

हिवस स्त्री. १. सर्द हवा. (को.) २. शीत तुषार.

वि. थंडगार.

हिवसणे अक्रि. १. थंडीची, सर्दीची बाधा होणे. २. (ल.) निराश होणे; हिरमुसणे; म्लान, मलूल होणे; निरुत्साही होणे.

हिवसा वि. १. थंड, सर्द (पाणी, हवा इ.). २. रागीट नसलेला, शांत सौम्य (माणूस).

हि(हिं)वसाण स्त्री. सर्द झालेल्या व खराब झालेल्या वस्तूंची घाण.

हि(हिं)व(वा)ळणे, हिवळावणे अक्रि. पहा : **विवळणे**

हि(हिं)वळाण स्त्री. मासळीची घाण. (गो.)

हिवाडी पहा : **हिवडी**

हिवार न. बर्फाचे घर.

हिवारे न. हिवताप : 'जळसोस आणि हिंवारे।'- दास ३.६.२६.

हिवावचे सक्रि. पसरणे; वासणे. (गो.)

हिवाळा-ळी पु. स्त्री. थंडीचा ऋतू.

हि(हिं)वाळे न. बिनविषारी साप. (कु.) पहा : **वयाळे**

हिशे(शो)ब पु. १. अंक, आकडे, व्यावहारिक जमाखर्चाचे, आवकजावकाचे गणित; गणती; मापन; संख्याफळ. २. गणना; अंक गणिताप्रमाणे मेळ पाहणे. ३. गणित करून रक्कम निश्चित करणे; गणिताने निघालेली रक्कम. ४. कागदावर टिपलेला जमाखर्च; कर्ज इ. चे टिपण. ५. जमाखर्चातील एखादी बाब. (क्रि. धरणे) ६. (ल.) सरळपणा; न्यायीपणा; वाजवी रीत, सरळ मार्ग. ७. (ल.) पर्वा; महत्त्व; लौकिक. [अर. हिसे(सा)ब्]

हिशे(शी)बी वि. १. हिशेब, गणित, जमाखर्च इ. संबंधी. २. हिशोबाच्या कामात वाकबगार; कुशल; दक्ष; व्यवस्थित; सरळ. ३. न्याय्य; योग्य; रास्त; बरोबर. ४. चोख; व्यवस्थित (माणूस). ५. काटेकोर; पै न् पै हिशेब ठेवणारा.

हिस स्त्री. कदर; मान. (क्रि. वाटणे, मानणे.) (व.)

हिसकणी स्त्री. हिसडा; झटका. पहा : **हिसकणे**

हिसकणे उक्रि. १. जोराने, झटक्याने, जबरदस्तीने ओढून घेणे; झटकणे; हिसडणे. २. फिसकटविणे; बिघडविणे (काम, योजना, मसलत). ३.(ल.) उपटणे; उकळणे; हासडणे (पैसा इ.).

हिसका पु. १. हिसकणी; झटक्याने ओढणे व त्यापासून झालेली अवस्था. (क्रि. देणे, बसणे.) २. अकल्पित बसलेला तडाखा; झपाटा; सपाटा; आचका; हिसडा आणि त्यापासून उद्भवलेला त्रास, होणारा परिणाम. ३. (ल.) (चालू काम, धंदा) एकदम बंद पडणे; तूट ; विघ्न; अडथळा. ४. (ल.) निष्फळ व दगदगीचा प्रवास; खेप; हेलपाटा. [हिं.]

हिसकावणी स्त्री. जोराने ओढून घेणे; हिसडणी.

हिसकाविणे अक्रि. पहा : **हिसकणे**

हिसकाहि(कि)सक स्त्री. (अनेकांनी केलेली) ओढाताण; झटापट; ओढाओढी.

हिसडणे उक्रि. हिसकणे; हिसडा देणे.

हिसडा-डी पु.स्त्री. हिसका; झटका.

हि(हिं)सणे अक्रि. (घोडा) खिंकाळणे. [सं. हेष्; ध्व.]

हि(हिं)सळणे अक्रि. १. उसळणे; उसळी खाणे; हिंदकळून सांडणे (भांड्यातील द्रवपदार्थ). २. (ल.) भरधाव, बेफाम पळणे; उधळणे (घोडा, बैल). ३. शिंतोडे उडणे.

हिस(सा)ळा पु. कणसावर पडणारा एक रोग.

हिसा वि. थंडगार (पाणी, वस्तू). पहा : **हिवसा**

हिसाण न. खिंकाळणे : 'बाऊ करिती हिंसाण।'- गीता १.४८४.

हिसार पु. किल्ला; गड : 'बजानब कारकुनानी हिसार जावळी.'- मइसा २०.१५९. [अर. हिसार्]

हिसाळ पु. हिरिरी; चेव.

हिसेमिरे न. कंकोळ. (तंजा.)

हिस्टेरिया पु. भ्रम होणे, रात्री झोपेत चालणे आणि वर्तनात एक तऱ्हेची बधिरता येणे अशी लक्षणे असलेली मानसिक विकृती. [इं.]

हिस्सा-सा पु. वाटा; भाग; अंश; पाती. [अर. हिप्सा]

हिस्सेदार वि. पातीदार; भागीदार; वाटेकरी. [फा. हिस्सा+दार]

हिस्सेरशी-रसीद स्त्री. १. (गणित) वाटावयाचे द्रव्य व वाटेदाराची संख्या हेच भाज्य-भाजक मानून त्रैराशिकाच्या रीतीने विभाग करण्याचा प्रकार. (क्रि. घालणे) २. हिशेबाने काढलेला वाटा, पाती. (क्रि. येणे, बसणे.) : 'मशारनिले याच्या विद्यमानाची शिबंदीची हिसेरसीद बेहड्याच्या अजमासे निवडून पाठविली आहे.'- पया ९२. [फा. हिस्सा+रसीद्]

हिहिहि, हीही स्त्री. उपहास; फिदीफिदी; हसणे.
क्रिवि. निंदार्थी, कुत्सित हसण्याच्या आवाजाचे अनुकरण करून. [ध्व.]

हिळणे, हिळणे-मिळणे अक्रि. वठणीस येणे; कह्यात येणे; रुळणे; माणसाळणे. [हिं. हिलाना]

हिळभर न. नांगराची मूठ. (बे.) [सं. हल]

हिंकृण्वती स्त्री. दुर्भिक्ष; दारिद्र्य.

हिंग पु. अति उग्र वासाचा एक चीक. हा मसाला, फोडणी इ. त घालतात. (वा.) ० **लावून विचारणे** - मानणे, मोजणे. ० **दाखविणे** - चकविणे; फसविणे; चोंदी देणे. ० **लावणे** - (नकारार्थी प्रयोग) मानणे; आदर होणे; महत्त्व देणे. (हिंग महाग असल्याने महत्त्वाच्या पदार्थांतच व थोडा वापरतात, त्यावरून प्रयोग.) ० **हगणे** - रोग इ. नी झिजणे, रोडावत जाणे, पिचत पडणे.

हिंगडा पु. १. हलक्या प्रकारचा हिंग; वाईट हिंग.२.(निंदार्थी) हिंग.

हिंगण-णा-णी पु.स्त्री. एक झाड. [सं. इंगुदी]

हिंगणबेट-मिठा न.पु. वरील झाडाचे फळ. याच्यापासून तेल काढतात. यात बंदुकीची दारू भरून आपटबार इ. करतात.

हिंगणवारा पु. भटकावयास लावणारा वारा : 'हिंगणवारा कोरडा । तैसा जेया ।' - ज्ञा १३.६८८.

हिंगतूप-धूप पु. अव. नेहमी होणारा संसाराचा किरकोळ खर्च (विशेषत: देवधर्म, जेवणखाण इ.चा).

हिंगरावांगर स्त्री. (लहान मुलांची) झोंबाझोंबी; भांडण; तंटा. (व.)

हिंगळी लाख हिंगूळ मिसळलेली लाख.

हिंगा पु. एक किडा; भुंगा. (माण.)

हिंगारी स्त्री. रब्बीचे पीक. (माण.) [क. हिंगु]

हिंगुल-गूळ, हिंगोळ, हिंग(गु)ळूक पु. पारा व गंधक यांचे मिश्रण; पाऱ्याचा अशोधित धातू. [सं. हिंगुळ]

हिंगुळी वि. हिंगुळासंबंधी (रंग, रसायन, पाख इ.).

हिंगे क्रिवि.१.हंगे; इकडे; इथे. (ग्रामीण) २. आता. [क.हीगे = या प्रकारे]

हिंगेतिंगे, हिंगोतिंगो स्त्री. न. (इकडे तिकडे) असंबद्ध व टाळाटाळीचे भाषण; टोलवाटोलव. (क्रि. करणे)
क्रिवि. १. असंबद्धपणे; दुटप्पीपणाने. २. अदमासे ; सरासरी; उणेपुरे. (क्रि. म्हणणे, बोलणे, करणे.)

हिंगो वि. विषयासक्त.

हिंचण पु. वन्य पशूचा सुळा, दात.

हिंचुटा पहा : **हिंपुटा**

हिंडणे अक्रि. भटकणे; फिरणे; भ्रमण करणे. [सं. हिंडन]

हिंडण्या, हिंडफिऱ्या वि. १. भटक्या; प्रवासी. २. (ल.)जुजबी; उडत उडत असलेले: 'या पिटुकल्या हिंडग्या लिहिण्याची किंमत मोजू लागल्यास काडीचीही नाहीं.'- खेया.

हिंडन न. फेरी; भटकी; भ्रमण.

हिंडळणे उक्रि. उचकळणे; हिचमिचणे. पहा : **हिंदळणे** [ध्व.]

हिंडार न. शेतातील ढेकळे फोडण्याच्या औताचा एक प्रकार. (बे.) [क.हेंडे= ढेकूळ]

हिंडा(डो)ळा पु. पहा : **हिंदोळा**

हिंडी स्त्री. भ्रमंती; प्रवास : 'हारिचिया साकडी । ते मायबाप बाहीरी हिंडी।'-उगी ४७६. [सं.]

हिंताल पु. एक प्रकारचे खजुराचे झाड.

हिंद पु. १. हिंदुस्थान; भारत देश. २. या देशातील लोक.

हिंदकळणे, हिंदळणे उक्रि. डचमळणे; हिसळणे; हेलकावे खाणे, देणे. [सं. हिंदोल]

हिंद(दा,द्या)ण-न न.१. नेम मारण्यासाठी केलेले चिन्ह; लक्ष्य. २. आणीबाणीची वेळ. ३. नेम. (क्रि. धरणे, बांधणे.) पहा : **विंधण** [सं.विंधन]

हिंद(दा)ण-न न. १. युक्ती; चातुर्य. पहा : **विंदान.** २. शिकवण. (ना.)

हिंदवानी, हिंदवी वि १. हिंदू; हिंदुस्थानासंबंधी. २. हिंदी.

हिंदी स्त्री. उत्तर भारतातील लोकांची भाषा.
वि. हिंदुस्थानचा.

हिंदु-दू पु. भरतखंडातील परंपरागत सनातन धर्म व त्याचा अनुयायी.

हिंदुस्थानी स्त्री. ऊर्दूमिश्रित हिंदी भाषा.
वि. हिंदुस्थानासंबंधी.

हिंदुळा, हिंदोल(ळा), हिंदाळ पु.१.पाळणा; चोपाळा; झोका; झोपाळा. २. हिसका; धक्का. [सं.हिंदोल]

हिंदोळणे सक्रि. हालविणे : 'म्या हिंदोळला कैलास.'- वेवीस्व ४.९३.

हिंदोळा पु.(संगीत) एक राग. गानसमय रात्रीचा चौथा प्रहर. [सं.]

हिंद्यान न. नेम. (व., घाटी) पहा : **हिंदण**

हिंपुटा–पूट वि. खिन्न; खेदयुक्त; कष्टी : 'बहू हिंपुटा होईजे मायपोटी ।'– मनाचे श्लोक २०.
स्त्री. १. शून्य. – शर. [सं. हीन+पुट; अर. हम्म्=चिंता]

हिंपुटी स्त्री. हिरमुसणे. [क. हिम्मेटटु=मागे सरणे]

हिंमत, हिंमतदार इ. पहा : **हिम्म(म)त, हिंमतदार इ.**

हिंवडणे, हिवणे अक्रि. थंडीने कुडकुडणे; हुडहुडी भरणे; गारठणे; कापणे : 'एकां उभयांचि प्राण गेले। चांगाचे दांत बैसले। बिरुदांचे दादुले। हिंवताती ।'– ज्ञा १.१३५.

हिंवस स्त्री. १. सर्द हवा. (को.) २. थंड तुषार.
वि. थंडगार. (व.)

हिंवसणे अक्रि. १. थंडीची, सर्दीची बाधा होणे. २. (ल.) निराशा होणे; हिरमुसणे; म्लान-मलूल होणे; थिजणे; उत्साहहीन होणे.

हिंवसा वि. १. थंड, सर्द (पाणी, हवा इ.). २. सौम्य, रागीट नसलेला (माणूस).

हिंसणे उक्रि. हिंसा, खून करणे; इजा करणे; ठार मारणे. [सं. हिष्कन]

हिंसक, हिंस्र वि. १. खुनी; हत्यारी; घातक. २. (ल.) क्रूर; उग्र; भयंकर (प्राणी).

हिंसा स्त्री. १. हत्या; खून; ठार मारणे. २. इजा; पीडा; दुखापत.

ही अ. १. देखील; सुद्धा. २. तसेच; आणखी. पहा : **हि**

ही पत्नी, बायकोचा उल्लेख करताना वापरला जाणारा शब्द.

हीट न. तांदळाच्या पिठाचे एक पक्वान्न. (गो.)[क. हट्टु=पीठ; सं. पिष्ठ]

हीड स्त्री. वळचण. (को.)

हीण–न न. १. हलक्या प्रतीचा धातू. २. (ल.) क्षुद्रता; हलकटपणा. ३. (हिणवण्याजोगे) व्यंग; दोष; उणीव.
वि. १. क्षुद्र; हलका; नीच. २. उणा; रहित. पहा : **हीन.** ३. कमी प्रतीचा; गौण. [सं. हीन]

हीण(न)कट–कस–वट–कसी वि. १. भेसळीचे; मिश्रित. २. आत हीण (कमी किमतीचा धातू घालून बनविलेले). ३. कमी कसाच्या सोन्या-चांदीचे (नाणे, अलंकार).

हीण कौल भर आकारापेक्षा कमी साऱ्याने जमीन देण्याचा लेखी करार.

हीन वि. १. न्यून; रहित (विवक्षित गुणधर्मादिकांनी); उणा. २. क्षुद्र; गौण; हलका.
पु. मध्यवेळ; मधला वेळ.

हीनदंती वि. पाच दात असणारा (घोडा).

हीनयान पु. बौद्ध धर्मातील एक पंथ.

हीनवाद पु. (कायदा) अयोग्य, अस्वीकारणीय साक्ष.

हीनांग वि. व्यंग असलेल्या शरीराचा, विकलांगी.

हीर पु. १. माड, पोफळ इ.च्या पातीतील काडी. २. पहा : **हिरका.** ३. शिजलेल्या भातातील न शिजलेला तांदूळ, कणी. ४. हिरकूट; कुसळ; धस; सडी. (क्रि. भरणे, शिरणे, सलणे, उपटणे). (वा.) **०भाजणे** – (सडीचे टोक जाळून बोथट करणे, पेरण्याच्या दाण्याचे डोळे, मोड इ. भाजणे यावरून) शौर्य, तेज इ. चा नाश करणे, मऊ आणणे.

हीर स्त्री. ईर्ष्या; चढाओढ.

हीर पु. प्रकाशकिरण; कीळ : 'तया रंगाचे हीर।'– उगी ६४५. [सं.]

हीर, हीरक पु. हिरा; रत्न. [सं.]

हीरक महोत्सव सामान्यत: कोणत्याही संस्थेला ६० वर्षे पूर्ण झाल्यावर करण्याचा उत्सव, समारंभ.

हीळ स्त्री. झावळीची काडी. (हेट.) पहा : **हीर** १

हुएल स्त्री. आरोळी; ओरड; बोंब. (कु.,गो.) [ध्व.; इं. येल्]

हुकचूक स्त्री. १. चूकभूल; फसगत; विसर. २. (सामान्यपणे) चुकणे; कार्यसिद्धी न होणे.

हुकणे अक्रि. १. दगड, गोटी इ. बरोबर नेमाने न लागणे; नेम, मार चुकणे. २. असा नेम मारता न येणे, मारण्यास चुकणे. ३. चुकणे; भुलणे; न साधणे (वेळ, गाडी). [हिं. हुकना]

हुकमत स्त्री. १. अधिकार; सत्ता; ताबा; अंमल; छाप. २. (कायदा) कोर्टाचा अधिकार. [अर. हुक्मत]

हुकमतपन्हा पु. १. हुकमाखालच्या प्रजेचा रक्षणकर्ता; सत्ताधीश. २. एक पदवी.

हुकमती वि. ताब्यातील, अंमलाखालील अधिकारी; सत्ताधीश : 'मोगलाईंत हुकमती केसांची टोळी दाढीखालीं लोंबत होती ती मराठशाहींत कवटीवर चढली .'– राजसंन्यास २०.

हुकमा क्रिवि. १. आज्ञेबरहुकूम; जसा हुकूम मानावा त्याप्रमाणे. २. खात्रीने; हटकून (मनाई केलेल्या गोष्टीसंबंधाने).

हुकमाचा वि. आज्ञेतील; ताब्यातील; हुकमी.
क्रिवि. खात्रीने; हटकून; अचूक.

हुकमी वि. १. पहा : **हुकमाचा.** २. अचूक. जसे :- हुकमी गोळा-तीर-निशाण = अचूक लागणारी गोळी इ.; हुकमी पाऊस-फासा-मात्रा-पुडी-लढाई-शिस्त-हत्यार इ. ३. मंजूर केलेले; आज्ञा दिलेले; संमत. ४. अवलंबून असलेला; आज्ञेतील; नियमाखालील उदा. हुकमी कारभार. ५. हुकमासंबंधीचे; आज्ञानोंदणीचे. उदा. हुकमी राज्य,चाकर=घालून दिलेल्या नियमाप्रमाणे ज्याचा कारभार चालतो असे राज्य, चाकर.

हुकमेहुकूम (पत्ते) हुकूमपत्ता; एकसारखी हुकमाची पाने टाकून दस्त (हात) करणे.

हु का(की)चू, हुचू न. कुरकुर; निषेध; अवाक्षर (नकारार्थी प्रयोग). [ध्व.]

हुकामुका,हुकाक्का पु. (ल.) स्त्री-पुरुषांचा स्वैर संबंध, विलास.

हुकार पु. पत्र इ. च्या आरंभी लिहिण्याचा ('श्री' प्रमाणे)मंगलवाचक असा अरबी, फारशी भाषेतील शब्द. [अर. हू-तो=देव, परमेश्वर]

हुकावणे अक्रि. १. नादी लागणे; उतावीळपणे मागे लागणे. २. अतिशय निमग्न होणे; गढून जाणे.

हुकीर न. उकीर; उंदीर वगैरेंनी बिळातून उकरून काढलेली माती. (कु.)

हुकूम, हुक्म पु. १. आज्ञा. २. अनुरोध; सांगी. ३. (गंजिफा) सर पान; ज्यास वरचढ दुसरे पान नाही असे पान. ४. डावापुरता ठरलेला जोरावर रंग, त्या रंगाचे पान. [अर. हुक्म]

हुकूमखुदाई स्त्री. देवाज्ञा; मृत्यू : 'मल्हारभटास हुकूम खुदाई जालियावरी।'– मइसा २०.३४६. [खुदाई=ईश्वराचा]

हुकूमगारदाई स्त्री. सैन्याचे (राजसत्तेविरुद्ध) बंड. पहा : **गारदाई**

हुकूमत पु. सेनाप्रमुख. [अर.]

हुकूमदान वि. आज्ञा करणारा : 'हुकूमदान तुका। येथे कोणी फुंदो नका।'– तुगा ३२५५.

हुकूमनामा पु. १. दिवाणी खटल्याचा निकाल झाल्यानंतर खरे ठरलेल्या पक्षास मिळणारे कोर्टाचे निर्णयपत्रक; दाव्यात मागितलेल्या दादींपैकी सगळ्या किंवा कोणत्याही दादीसंबंधाने पक्षकाराच्या हक्कांचा निरुत्तर रीतीने दिलेला निर्णय; अंमलबजावणीच्या दृष्टीने कोर्टाने दिलेला हुकूम; (इं.) डिक्री. २. (सामा.) लेखी हुकूम; आज्ञापत्र.[अर. हुक्मनामा]

हुकूमबरदार वि. आज्ञाधारक.

हुकूमबंदा पु. हाताखालचा इसम.
वि. आज्ञाधारक. पहा : **हुकमती** [फा.]

हुकूमशहा पु. (दुसऱ्यांचा विचार न करता) आपलाच अंमल चालवणारा नेता.

हुकूम हाकमत स्वामित्व व ताबा; अंमल व अधिकार; सार्वभौम सत्ता. [अर.]

हुकेरी वि. रुपयाचा एक प्रकार.

हुक्क स्त्री. पहाटेचे तांबडे; उष:काल. (क्रि. फुटणे)

हुक्क स्त्री. पहा : **हूक**

हुक्का–का पु. १. गुडगुडी. २. ज्वालाग्राही द्रव्यांनी भरलेले पात्र; बाँब : 'दारूगोळा बाण, हुक्के।'– मराआ ५. [अर. हुक्का]

हुक्कापाणी न. खाणेपिणे इ. व्यवहार. (वा.) **०बंद करणे** – जातिबहिष्कृत करणे; वाळीत टाकणे.

हुक्काबाज पु. नजरबंदीचा खेळ करणारा; बाजीगर.

हुक्केबरदार पु. गुडगुडी तयार करून देणारा चाकर. [फा. हुक्कबर्दार]

हुक्केबाज वि. गुडगुडीचे व्यसन असणारा.

हुगडाधूत वि. उघडाबंब. (अहि.)

हुगी स्त्री. समाराधना; जेवणावळ. [क.]

हुग्गी स्त्री. गव्हाची खीर. (बे.)

हुच उद्गा. बकरे इ.स किंवा लोकांस पुढे जाण्यास प्रोत्साहन देताना उच्चारावयाच्या शब्दाचे अनुकरण. [ध्व.]

हुचम(मु)ल्ली स्त्री. (बुद्धिबळ) प्यादेमातीचा एक प्रकार. प्रतिपक्षाचे उंट व राजा आणि आपला उंट व राजा एकच प्यादे राखून प्यादेमात करणे.

हुचेदिवाणी, हुचभाई वि. बेफामपणे हुरळून जाऊन साहसाचे काम करणारी व्यक्ती; हूड.

हुच्च–च्चा वि. १. प्रपंचाकडे लक्ष्य न घालता ख्याली खुशाली, कुचेष्टा इ. त काळ घालविणारा. २. हलकट; नीच. [हिं. हुच्च; क. हुच्चा=वेडा]

हुजत–ती स्त्री. पत्र; पावती.

हुजरा एक छोटी खोली; एकांतात ध्यान करण्यासाठीची मशिदीतील खोली.

हुजरात स्त्री. १. खुद्द राजाची खडी फौज; राजाचे खाजगी घोडदळ, फौज. २. दासदासी, पशू, पक्षी इ. खटले. [अर.]

हुजरात–ती वि. १. हुजुरात सैन्यासंबंधी. २. सरकारी मंत्री, अधिकारी, राजाचे खास नोकर, शरीररक्षक इ. संबंधी.

हुजराहु(ह)जूर स्त्री. परस्परांसमोर असण्याची स्थिती; प्रत्यक्ष विद्यमानता. (क्रि. करणे, होणे.)
क्रिवि. समक्ष; विद्यमाने.

हुजऱ्या पु. निकटवर्ती सेवक; खिजमतगार; शागीर्द; शिपाई.

हुजूर पु. १. राजदरबार; राजसभागृह. २. स्वत: राजा; राज्याधिकारी; सरकार; हजरत. ३. जिल्ह्याची मुख्य कचेरी.
क्रिवि. मुख्य सरकारात.

हुजूर कामगार १. खुद्द राजाचा सेवक; खास अधिकारी. २. राजाचा चिटणीस.

हुजूरनवीस राजाने दिलेल्या सनदा व आज्ञा नोंदून ठेवणारा अधिकारी; राज्याचा चिटणीस.

हुजूर नेमणूक १. राजाच्या खर्चासाठी ठेवलेला पैसा. २. राजाची नेमणूक. ३. सरकारी नोकरी.

हुजूर पक्ष विधिमंडळ इ.तील सरकारपक्षीय सभासद; सरकारी पक्ष.

हुजूर बाजार मुख्य पेठ; त्या पेठेवरील अधिकारी.

हुजूर मामला राजाने सरदार वगैरेंना इनाम दिलेल्या गावांत सरकारचा अंशत: असणारा अंमल.

हुजूर मोकदमा राजसभेने, राजन्यायाधीशाने निकाल देण्यास योग्य असा खटला; बाब.

हुजूर सनदी थेट राज्यातून मिळालेल्या सनदेवरून ताब्यात असलेली (जमीन).
पु. असली जमीन मोजणारा इनामदार.

हुजूरसाब पु. नांदेड येथील शिखांचे गुरुद्वार.

हुजूर हशम राजाचा खास अंगरक्षक, सैनिक, शिपाई.

हुज्ज(ज)त, हुज(जु)ती स्त्री. १. वितंडवाद; घासाघीस. २. अडथळा; विघ्न; अडचण. ३. टाळाटाळीची सबब; तक्रार; बहाणा. (क्रि. घालणे) ४. पोत्यास ऐवज जमा झाल्याची पावती : 'जमा असत म्हणोन हुजत लिहून दिल्ही असे.'– वाडबाबा २.४४. [फा. हुज्जत]

हुज्ज(ज)तखोर–खाऊ–त्या वि. १. तक्रारी, घासाघीस करणारा; वितंडवादी. २. सबबी सांगणारा.

हुट(ट्ट) न. बेणण्याचे औत; कोळपा. (क्रि. मारणे) (बे.) [क. हुट्ट]

हुटकणी स्त्री. १. हिसका; झटका. २. घाई; निकड; टोचणी.

हुटकणे उक्रि. १. झटकणे; हिसडणे; जोराने हालविणे. २. (ल.) स्मरणशक्तीस चालना देणे. ३. उतावीळ, घाई करणे; निकड असणे.[ध्व. हुट] (वा.) **हुटाहुट करणे** – हुसकावून लावणे. (माण.)

हुटका स्त्री. उकळी. (तंजा.)

हुटहुट–टी स्त्री. १. तीव्र इच्छा; उतावळेपणा; उत्सुकता. (क्रि. भरणे, येणे.) २. हुरहुर; चित्ताची उद्विग्नता. ३. घाई; निकड. (क्रि. करणे, लावणे.) ४. घमेंड : 'कां तपें हान जे हुटहुटी।'– ज्ञा ९.३६५.

हुटहुटणे, हुटाटणे अक्रि. उतावीळ, अधीर होणे; डौल करणे; गर्व, अभिमान बाळगणे : 'अथवा यज्ञदानादि किरीटी। कां तपे हन हुटहुटी।'– ज्ञा ९.३६९.

हुटाट–टा पु. (क्रि. भरणे, येणे.) पहा : **हुटहुट** १.

हुड उद्गा. १. पशू इ. ना हाकलण्यासाठीचा शब्द. २. तिरस्कार, धिक्कारदर्शक उद्गार; हड्.

हुडक, हुडुक–क्क पु. न. डमरू (सरोदे, कुडबुडे जोशी, माकडवाले इ. च्या हाती असणारा). [ध्व.]

हुडकणी स्त्री. शोध; तपास; थांग; चौकशी; माहिती काढण्याचे काम.

हुडकणे उक्रि. शोधणे; धुंडणे; तपास काढणे, लावणे (वस्तू, जागा इ.चा). [क. हुडुकु]

हुडका पु. धुडका; तुकडा; चिंधडी.

हुडकावणे, हुडकावा पु. हुडकणी. (कर.)

हुडकी पु. डोंगरातील नाला. (चांदा)

हुडकीनजर बारीक नजर; भेदक दृष्टी.

हुडगी स्त्री. टोपली. (कु.)

हुडदी स्त्री. दंगा; त्रास; गोंधळ; गोंगाट. (क्रि. घालणे) (कर., बे.)

हुडपारणे अक्रि. भीतिदायक आवाज करणे : 'अभिलाखाचे आसवल असुर : हुडपारताति'– मूप्र ५९६.

हुडबा पु. शेणींचा, गोवऱ्यांचा ढीग.

हुडसाम, हुडसुदुदु स्त्री. १. हुतुतूचा खेळ. २. हा खेळ खेळताना तोंडाने म्हणावयाचा शब्द. ३. धाड; जोराची चाल; झुंड. (क्रि. घालणे)

हुडहुड–डी स्त्री. १. (थंडी, थंडीतापाचे) कापरे (भरणे, भरून येणे). २. (ल.) उत्कट इच्छा; अधीरता. (क्रि. भरणे, येणे, मोडणे, जिरविणे इ.). पहा : **हुकी** ३.

हुडहुडणे अक्रि. १. (थंडी, ताप इ.ने) कापणे; लटलटणे. २. फार अधीर होणे.

हुडा पु. देवतेची जत्रा. (वा.) ०**करणे** – जिवाचा आटापिटा करणे.(व.)

हुडा पु. १. कळस; बुरूज; तट; कोट : 'जैसे पन्नासिले गगनाचे हुडे ।'– ज्ञा ७.८०. २. शेणामातीने लिंपलेला गोवऱ्यांचा ढीग, गंज; कडब्याची गंज; रास. ३. धाब्यावरील, गच्चीवरील लहानशी खोली. [क. हुडा=किल्ला]

हुडुक–क्क न. आमटीसारखे एक तोंडीलावणे.

हुण(नू)क स्त्री. १. मुद्दाम गैरसमज करून देणारे भाषण; हूल. (क्रि. करणे, दाखविणे.) २. चिन्ह; खूण (ओळखीची).३. रीत; पद्धत; चाल. (क्रि. साधणे, येणे.) पहा : **चुणूक**

हुत वि. १. अग्नीत हवन केलेले; होमात टाकलेले; जाळलेले. २. जाळून राखरांगोळी केलेले (वस्तू इ.). [सं.]

हुत न. वारूळ. (तंजा.)

हुत वि. निमंत्रित; बोलविलेला. [सं.]

हुतक न. हवनीय द्रव्य; आहुती : 'आणि हुतक वस्तु जें जें । ते ही मीचि ।'– ज्ञा ९.२६८.

हुतका,हुतकाड पु. न. १. (उवा, पिसवा, किडे इ.चा) बुजबुजाट; वळवळाट. २. (ल.) घरातील मुलाबाळांचा सुळसुळाट; गर्दी; भिकारी; याचक इ.ची सभोवती दाटी. ३. खरजेची कंड, खाज. (क्रि. येणे, सुटणे.) ४. माशा, ढेकूण इ.चा सुळसुळाट व चावा. ५. उत्कंठा; अधीरता; पुळका (बोलणे, गाणे, मारणे, धावणे इ.चा). (क्रि. येणे).

हुतकाड पु. लहानसा भाग. (ना.)

हुतवह पु. अग्नी. [सं.]

हुताट–टा, हुताटकी पु. स्त्री. पराकाष्ठेचा उतावीळपणा. पहा : **हुटहुटी**

हुताटणे अक्रि. उतावीळ होणे; हुटहुटणे.

हुताट्या वि. उतावळ्या.

हुताश–स, हुताशन पु. अग्नी. [सं.]

हुताशनी स्त्री. होळी.

हुती स्त्री. वावटळ; वातचक्र. (को.)

हुतुतू, हुतुतू हमामा पु. १. एक खेळ. यात 'हुतूतू' असा शब्द म्हणावयाचा असतो. २. (ल.) अभ्यास इ. सोडून मुलांनी घातलेला गोंधळ, धिंगाणा. (क्रि. घालणे).

हुदक(ग)णी, हुदकणे स्त्री. १. हालचाल; हबका; हुडकी. २. कुरकुर; किरकिर; निकड; टुमणे.

हुद(दु)क(ग)णे सक्रि. १. हालविणे; चालविणे; झडपणे (पंखा, कापड इ.). २. जोराने हाकणे.

अक्रि. १. दुडक्या चालीवर चालणे (घोडा इ.). २. हबके खाणे; बसणे (घोडेस्वाराने). [ध्व.]

हुद्गणे न. जुंझणे : 'सन्निपातु उपचारी त्येया वैद्यासि मृत्युसि हुद्गणें । म्हणौनि तो यमाचा हुद्गार म्हणिजे' –विविस १९.– विविसं १९. [सं. युध्]

हुदडणे क्रि. दंगा करणे.

हुदा स्त्री. शस्त्राची पेटी.

हुदा रुमाल म्यानासह तलवार जाड मोठ्या पिशवीत घातल्यावर, पिशवीच्या तोंडास बांधावयाचा रुमाल. हा चवरीप्रमाणे देवीवर ढाळावयाचा असतो.

हुदुक–हुदुक, हुदडुक–हुदडुक, हुद्रुक–हुद्रुक, हुद्रुक चाल क्रिवि. घोडा, गाढव इ. प्रमाणे खुद्रक खुद्रक चालीने चालून.

हुदू पु. जिरेटोप; शिरस्त्राण.

हुद्दा पु. १. अधिकार; काम; जागा; पद; नोकरी; नेमणूक. २. ताशा, मरफा व ढोल ही तीन वाद्ये व ती वाजविणारे वादक. [अर. उहदा]

हुद्दा मामला कामकाज.

हुद्देदार–करी पु. १. (हुद्दा असलेला) अधिकारी; नोकर. २. शस्त्रवाहक कामदार.

हुनई स्त्री. रेशमाची एक जात.

हुनमुखा पु. विहिरीच्या वरवंडीवरील बाजूस बसविलेला दगड. (माण.)

हुन(न्न)र, हुनेर पु. १. कौशल्य; कला; कसब; कल्पकता; शोधकता. २. युक्ती; इलाज; योजना. [फा. हुनर]

हुनरबंद, हुन(ने)री, हुन्नरवंत–द वि. १. कल्पक; कलावंत; कुशल; कसबी; शोधक : 'समागमें शिल्पीकार हुनरबंद कारागर त्या देशींचे आणून'– मदरु १.२२. २. धूर्त; कावेबाज. ३. युक्तिबाज. [फा. हुनर्मन्द]

हुनरबंदी स्त्री. १. क्लृप्ती. २. कावेबाजपणा.

हुनुक स्त्री. हौस; प्रवृत्ती; योग्यता.

हु(हू)प स्त्री. १. उत्सुकता. २. धैर्य. पहा : **हुरूप**

हुपट, हुप्या पु. १. वानराच्या टोळीतील मुख्य पुढारी. २. (ल.) भटक्या व लबाड माणूस.

हुपन स्त्री. उकाडा : 'कोनाड पंख्यानं वारा घाली, स्वामी हुपन तुम्हा लय झाली।'- लोसामा १ लोगु ७८.

हुबकणे उक्रि. पहा : **हबकणे**

हुबर-री-ळी, हुंबल-ली-ले स्त्री. गुराख्यांचा सुरकावळीचा एक खेळ. (क्रि. घालणे, खेळणे.) : 'एकु हमामा घालिति हुंबली।'- दाव ८५.

हुबाडा, हुम्माडा पु. १. हुंदडा. (ना.) २. पहा : **हुंडका** २

हुबेहूब, हुबहु क्रिवि. (चुकीने हुबरहु असाही उल्लेख) सर्व प्रकारे एकसारखे; अत्यंत सादृश्य असल्यामुळे तोच हा असे वाटण्याजोगा. (क्रि. असणे, दिसणे, बोलणे इ.). [अर. हुबहू.]

हुब्बक पु. घोड्याचा एक रोग.

हुब्बेवतन न. स्वदेशप्रेम. [फा. हुब्बु-इ-वतन]

हुभ स्त्री. चिपडे (डोळ्यांतील).

हुमकलचे सक्रि. टांगणे; लोंबकळणे. (गो.)

हुमण स्त्री. मांसाची, माशांची आंबटी. (गो.)

हुमण पु. न. हुम, हुम असा आवाज करणारा पक्षी. यांचा आवाज अशुभ मानतात.

हुमणी स्त्री. झाडांच्या आळ्यात किंवा खतात होणारी कीड. ही कोवळे पीक खाते.

हुमणी स्त्री. थडक; ठोसा. पहा : **हुंडका** : 'मागध क्षोभोनि उफराटी। हुमणी हाणी मस्तकीं।' - मुसभा ७.२७.

हुम(मा)रडा, हुमरणे पहा : **हुंबरडा इ.**

हुमरणे, हुमारून येणे अक्रि. तापाने तोंड फुलून येणे; सुजणे; विद्रूप होणे.

हुमरी, हुम-ल्ल, हुम्मल स्त्री. (क्रि. घालणे, खेळणे.) पहा : **हुंबर**

हुमल-माल स्त्री. १. हुंबरप्रमाणे एक खेळ. (त्यावरून) २. सबबी; हुज्जत. (क्रि. घालणे).

हुमला पु. तांबडा मुंगळा; ओंबील; उंबील.

हुमला पु. हल्ला; चाल : 'सशस्त्र रजपूत लोकांनी चावडीवर हुमला करून...'- सयाजीराव चरित्र ४६८. [गु. हुमलो]

हुमा पु. मोती; नवरत्नांपैकी एक रत्न.

हुमाणा-णे, हुमणे, हुमान पु. न. उखाणा; कोडे; कूट.

हुमायून वि. १. पातशाही : 'फर्मान हुमायून'- मइसा २०.१०. २. शुभ. [फा. हुमायूनी]

हुमारडा पहा : **हुंबरडा**

हुम्मा-मा पु. १. एक काल्पनिक पक्षी. हा शुभकारक असतो. नेहमी आकाशात फिरणारा, आपलेच मांस खाणारा असून तो ज्याच्या डोक्यावरून जातो तो राजा होतो अशी समजूत आहे. २. घोड्याचा तुरा (पक्ष्यांचा पिसांचा). [फा. हुमा]

हुम्या-हुमा वि. १. (दुसऱ्याची कितीही घाई असली तरी संथ राहून नुसते हु म्हणणारा) घुम्या; तोंडातून अक्षरही न काढणारा. २. टोणपा; ठोंब्या; मठ्ठड. ३. शृंगी; घुबड पक्षी.

हुयल स्त्री. आरडाओरड. (कु.) [इं. हौल]

हुयलस्वार पु. आघाडीवरील स्वार. [फा.]

हुर उद्गा. अ. पहा : **हुर्र**

हुरडणे उक्रि. भाजणे; होरपळणे; वरवर जाळणे. [क. हुरि=भाजणे]

हुरडभाज स्त्री. १. हुरडा भाजणे. २. (ल.) कसेतरी, वरवर भाजणे. ३. राब, काट, कवळ इ. अपुरा पडल्याने जमीन कशीतरी भाजणे.

हुर(रु)डा पु. १. मका, जोंधळा, नाचणी इ.च्या कणसाचे भाजलेले दाणे. २. अशा भाजून खाण्याच्या स्थितीस आलेले दाण्याचे कणीस. याचे करड (जून) व बामणी (कोवळा) हे दोन प्रकार आहेत. पहा : **हुरडणे**

हुरडाफुंक्या वि. १. भाजलेले हुरड्याचे कणीस चोळून फुंकणारा (विशिष्ट कामाचा). २. (ल.) भित्रट; पळपुटा; लढाईस निरुपयोगी (शिपाई). ३. रिकामटेकडा; आडदांड; उद्धट.

हुरण न. १. मुंग्यांचा (किंवा ल. ने माणसांचा) समुदाय; थवा. २. मुंगीची एक जात. (राजा.)

हुरणी-णे स्त्री. न.होरणी. पहा : **होरणे**

हुरदंग-गा पु. गडबड; दंगा; अशांती; कल्ला; धुडगूस. (क्रि. घालणे, मांडणे, चालविणे, करणे.)

वि. १. अव्यवस्था, दंगा इ. ने युक्त. २. दंगेखोर; गोंधळ माजविणारा.

हुरदावळ पु.स्त्री. पहा : **हरदावळ**

हुरप(पा)ळणे उक्रि. १. वरवर भाजणे; आच देणे. २. व्यापारात तूट येणे.

अक्रि. १. वरवर जळणे. २. (शरीर, अवयव इ.) आग होणे; जळजळणे.

हुरपुरे-हुरे न. पु. गोवर रोग. (गो., कु.)

हुरभट वि. उर्मट. पहा : **हूड**

हुरमत, हुर्मत-ती स्त्री. अब्रू; पत; नावलौकिक : 'दिल्लीपतीची हुरमत राखावी.'- पाब १६. [अर. हुर्मत]

हुरमतखाऊ-घेऊ-घेणा वि. मानहानी करणारा; खाली पाहावयास लावणारा; अब्रू घालविणारा; लौकिक बुडविणारा (धंदा, मनुष्य इ.).

हुरमतदार, हुरमती, हुरमतीचा वि. अब्रूदार; पतदार; लौकिकवान.

हुरमू(मो)ज-श स्त्री. विशिष्ट प्रकारची कावेसारखी तांबूस माती; रंग. [अर. हुर्मुझ्= ओर्मझ् बंदर; अहुरमज्द शब्दावरून बनवलेले नाव]

हुरमो(मु)जी वि. हुरमूज रंगाचा; विटकरी रंगाचा; रंगासंबंधी : 'तुमचं रूप जसं हुर्मुजी दाणा जी।'- होला १६९. [फा. हुर्मुझी]

हुररा-री पु. स्त्री. ठोसा; शह. (व.)

हुररेवडी, हुर्रेवडा, हुरली, हुरवावडी स्त्री. १. फजिती; हुर्यो; फटफजिती; बचेरी. २. फजितीमुळे येणारी नामुष्की.

हुरशी स्त्री. उमाळा; उत्साह; उमेद; अवसान; उत्सुकता; स्फुरण; शिरशिरी;

हुरहुर स्त्री. १. चिंता; चुटपुट; फार काळजी. २. दुःख; शोक (चूक, आपत्ती, नाश इ. बद्दल). ३. पश्चात्ताप; दिलगिरी; अस्वस्थता. (क्रि. वाटणे, लागणे.)

हुरहुरणे अक्रि. १. दुःख, शोक होणे, वाईट वाटणे; काळजी, अस्वस्थता वाटणे; खेद करणे. २. आसुसणे; तळमळणे.

हुरळ स्त्री. १. भूल; भुरळ; इंद्रजाल; मोहिनी; मायाजाल. २. अविचारी उत्साह. [क. हुरि]

हुरळणे, हुराळ(व)णे उक्रि. उद्युक्त करणे; भरीस घालणे.
अक्रि. अविचारी उत्साहाने एखादी गोष्ट करण्यास प्रवृत्त होणे.

हुरळणे सक्रि. भाजणे : 'वरि हुरळलीया चंद्रकळा ।' – शिव ७४९. [क. हुरि = भाजणे]

हुरळा पु. (व.) पहा : **हुरडा**

हुरळे पु. अव. शेतात कापून ठेवलेल्या कणसासकट कडब्याच्या पेंढ्या. (माण.)

हुरा पु. १. एक प्रकारचा निवडुंग; शेर. २. एक कुड्यासारखे झाड.

हुराण न. मुंग्याचे झाडावरील घर. (कु.) पहा : **हुरण**

हुरावणे अक्रि. पहा : **हुरळणे**

हुराळा पु. पहा : **हुरपळा**

हुरूप पु.स्त्री. उत्साह; हुरशी; उमाळा. पहा : **हुरूम**

हुरूम स्त्री. चिकाटी; निश्चय; मनाची दृढता. [अर. हुरिम्=मन]

हुरूरू पु.स्त्री. पहा : **हुरेवडी**

हुर्द न. हृदय. (को.)

हुर्पाटणे क्रि. जोराने पळविणे (बैल, बैलगाडी इ.). (व.)

हुर्बड न. जूं जुंपण्याचे कातडी साधन. (व.)

हुर्भष्ट वि. रंगेल; बेपर्वा. (व.)

हुऱ्याण पु. मुंग्यांचा थवा व त्यांचे घर. पहा : **हुरण**

हुर्यो, हुरे, हुर्य स्त्री. पु. फजिती; पच्ची.
उद्गा. हाकलून, फेटाळून लावताना, फजिती करताना उच्चारावयाचा शब्द. (क्रि. करणे).

हुलक, हुलकी, हुली स्त्री. कोरडी ओकारी. (क्रि. लागणे) (व.)

हुलकट स्त्री. हुल्लड; गडबड; बंडाळी; दंगा.

हुलकरणे अक्रि. दंगा, बंडाळी करणे; बंड पुकारणे; भाजणे.

हुलकावणी स्त्री. खरे कळू न देणे; भाषण, हालचाल इ.ने भलतीकडे रोख दाखवून फसविणे; हूल; फसवणूक. (क्रि. दाखवणे).

हुल(लु)के न. हिव; हिवताप. (व.)

हुलको, हुलूक स्त्री. पिसू (किडा). (कु.)

हुलगा–गी, हुलवळा, हुलोळा पु. स्त्री. कुळीथ नावाचे धान्य.

हुलगूड पु. न. होला; भिलकवडे नावाचा पक्षी.

हुलचूतिया–चुत्या पु. (ग्राम्य) ठोंब्या; मूर्ख माणूस.

हुलप पु. १. जाळ. (गो.) २. आगीचा डोंब. (राजा., कुण.)

हुलपा–पो पु. शिधा. (गो., राजा.) पहा : **उलफा**

हुलरी स्त्री. खेळातील गलबला : 'ती मात होतसे भारी । माजली भली ही हुलरी ।' – रामला ३८.

हुलवप क्रि. वरवर भाजणे. (गो.)

हुलसरा पु. मुलकी खात्यातील एक अधिकारी.

हुलसार–स्वार पु. पहा : **हूलस्वार**

हुलहुल स्त्री. निकड; घाई; धांदल, (क्रि. लावणे, मांडणे, लागणे.) [हिं. हूलना]

हुलहुल्या वि. गडबड्या; धांदल्या.

हुला वि. वेडा; खुळा. पहा : **हुलचुतिया**

हुलावण पु. बळी (भोजनाचा, मेजवानीचा): 'घरला पावणा करू बकरा हुलावण' – लोसाको.

हुलिया पु. वेश; रंगरूप. (झाडी)

हुलुसवार वि. नाजूक; आरुवार (प्रकृती, वस्तू).

हुलूक पु. आवेश.
स्त्री. आठवण; लहर; इच्छा. [सं. हुलहुली]

हुल्ल(ल)ड स्त्री. १. गर्दी; ओरड; गडबड; हुलकट; बंडाळी; दंगा. २. (सामान्यतः) हल्ला; एखाद्या व्यक्तीने केलेला जोराचा हल्ला. ३. नेटाने कामास लागणे. ४. कामाची पाळी. [हिं. हूलड]

हुल्ला पु. हुरडा. (अहि.)

हुल्ला मारणे व्यर्थ मेहनत करणे. (व.)

हुल्लारा पु. कांदे इ. ठेवण्याचा हारा.

हु(हो)वळा वि. नेता; पुढारी; मार्गदर्शक.

हुवाला–ली वि. अडाणी. (कर.)

हुवास स्त्री. सून. – लोसाको.

हुश–श्श, हुःश, हुस्स उद्गा अ. १. विश्रांतीचा, ओझे उतरल्यानंतरचा, काम संपल्यानंतरचा सुस्कारा. २. अतिशय उष्ण, उकाडा वाटण्याचा दाटीचा, मानसिक त्रासाचा उद्गार. ३. पाखरांना हाकावयाचा शब्द. (वा.)
०करणे – एखाद्यास विवक्षित स्थान, पद यावरून दूर करणे; हुसकावणे.

हुशार वि. १. बुद्धिमान, चलाख; शहाणा. २. सावध; दक्ष; तत्पर; तयार. ३. ताजातवाना; उत्साहयुक्त; तरतरीत (दुखण्यातून उठल्यावर). [फा. हुश्यार्]

हुशारणे अक्रि. सावध, जागे होणे; शुद्धीवर येणे; ताळ्यावर येणे.

हुशारी स्त्री. १. चलाखी; बुद्धी; शहाणपणा. २. सावधानता; सावधपणा; सावधगिरी. ३. तकवा; तरतरी; उल्हास. [फा. हुश्यारी]

हुशी–सी स्त्री. १. उशी. २. आपटलेल्या चेंडूचे उडणे; हापटी. (क्रि. खाणे, उडणे, लागणे.)

हुसकचे क्रि. काळजी करणे. (गो.)

हुसकटणे उक्रि. १. झिडकारणे; घालवून देणे; तिरस्काराने हकालपट्टी करणे; हाकून लावणे. २. अस्ताव्यस्तपणे इकडे तिकडे फेकणे; उसकटणे. ३. मोडणे; फिसकटविणे.
अक्रि. घाबरणे; बुजणे; भिऊन थबकणे (पशू इ.); चुथडा होणे; बिघडणे (काम, धंदा, शेत इ.).

हुसकणे, हुसकावणे उक्रि. १. हाकणे; हाकलून देणे (पशू, पक्षी इ.स). २. चुकणे; हुकणे (नेम, शिस्त, निशाण, टोला). ३. बिघडविणे; नाश करणे; फिसकटविणे. ४. एकदम हिसकावून घेणे. ५. उसकटणे.

६. शोधणे. (माण.)

हुसका पु. मनाला सारखा लागलेला ध्यास; चिंता; हुरहुर. पहा : **उचका**

हुसकारणे, हुस्कारणे अक्रि. जोराने वारा, सुस्कारा सोडणे; उसासा टाकणे. पहा : **हुश्श**

हुसकावणी स्त्री. हाकलणी; धुडकावणी.

हुसकी स्त्री. (आट्यापाट्यांचा खेळ) कांडे चिरण्याच्या वेळी द्यावयाची टाळी.

हुसके मोकळा वि. निष्काळजी. (गो.)

हुसक्या वि. १. हुसकाविणारा; धुडकावणारा. २. विस्कटाविस्कट करणारा.

हुसने न. जळफळाट. (अहि.)

हुसहुस स्त्री. वारा सोडण्याचा, श्वास टाकण्याचा ध्वनी; सुस्कारा. (क्रि. देणे, सोडणे).

क्रिवि. हुश्श अशा आवाजाने; सुस्कारा टाकून.

हुसूक स्त्री. १. फुसूक (दारू इ.च्या फुसक्या बाराचा शब्द); हुस्स; फुस्स (फुसकट बार); चुकलेल्या टोल्याचा आवाज. २. (ल.) निष्फळ प्रयत्न; ओंफस. (क्रि. होणे, जाणे, करणे).

हुसेनी वि. १. हुसेनाविषयी. २. (सामा.) मुसलमानी. [फा.]

हुसेनी कानडा (संगीत) एक राग. गानसमय मध्यरात्र.

हुसेनी ब्राह्मण बाटून मुसलमान झालेला ब्राह्मण.

हुसैनी स्त्री. समुद्रातील एक मोठा काळा मासा.

हुस्कार–रा, हुसकार पु. सुस्कारा, उसासा, फुसकारा.

हुस्न न. १. सौंदर्य; लावण्य. २. चांगलेपणा : 'यातील हुस्न लिहिलें.'– मइसा ७. [अर. हुस्न्]

हुळ स्त्री. दाह; धाव.

हुळका वि. तोंडावर देवीचे वण असलेला. (बे.) [क. हुळकु]

हुळवाजणे अक्रि. १. माघार घेणे. २. उनाडणे; भटक्या मारणे.

हुळहुळ–चुळ स्त्री. गुदगुली; हुळहुळण्यासारखी खाज; कंड; शिरशिरी. (अंगावरून केस, माशी इ. फिरल्याने होणारी). परद्रव्याच्या किंचित स्पर्शाने नाजूक किंवा दुसऱ्या अवयवास वरील भावना होणे.

हुळहुळ, पुळपुंळ–चुळचुळ स्त्री. अतिशय घाई, गडबड, चुळबुळ.

हुळहुळणे अक्रि. १. वरील अवस्था, गुदगुल्या होणे. २. (ल.) अधीर, उत्कंठित होणे; खाजणे (हात, पाय, जीभ इ. मारण्यास, बोलण्यास).

हुळहुळा वि. १. नाजूक; कोमल; लगेच हुळहुळ होण्याच्या प्रकृतीचा (मनुष्य, कातडी, अवयव). २. तशा प्रकारची झालेली (प्रकृती, कातडी). ३. स्पर्श सहन न होणारा; प्रक्षुब्ध. ४. अविचाराने एखादी गोष्ट करण्यास प्रवृत्त होणारा.

हुळहुळा, हुळा पु. भाजलेल्या हरभऱ्याचे घाटे; भाजलेला ओला हरभरा. [सं. होलक]

हुळहुळाट पु. अतिशय हुळहुळ.

हुळहुळी स्त्री. पिसू. (गो.)

हुळहुळी स्त्री. आमटी करण्याचे एक भांडे. (गो.) [क. हुळी=आमटी]

हुळूम पु. वांगी, मिरची इ.च्या मुळास लागणारी कीड.

हुंका(की)चूं, हुंचूं, हुचू न. कुरकुर; निषेध; अवाक्षर. (नकारार्थी प्रयोग) [ध्व.]

हुंकार पु. १. प्रश्नकर्त्यास उत्तरादाखल, कथा सांगणारास अवधानदर्शक करावयाचा उच्चार. २. राग, धाक दर्शविणारा उच्चार. ३. हंबरणे.

हुंकारा पु. १. पहा : **हुंकार** १. २. धनुष्याचा टणत्कार; गर्जना.

हुंकीर पु. हुंकार करणारा एक मासा. (गो.)

हुंग स्त्री. वास; घेतलेला–आलेला वास; गंध. (क्रि. घेणे, येणे, काढणे.)

हुंगणे उक्रि. १. वास घेणे. २. गुप्त गोष्ट, मसलत इ.चा सुगावा काढणे; ती उघडकीस आणणे, शोधून काढणे. ३. नाकाने वास वर ओढणे; सुंगणे. ४. तुच्छतेने विचारपूस करणे.

हुंगाडा–ड्या, हुंग्या वि. गुप्त गोष्टीचा सुगावा काढणारा; हेर; गुप्त पोलीस.

हुंगेबाजी स्त्री. नखरेबाजी. चटोरपणा.

हुंड पु. १. मळलेला किंवा डांकी दागिना उजळ दिसावा म्हणून विटकर, मीठ इ.चा लेप करून मग त्यास आच देण्याचा संस्कार. २. त्यासाठी लागणारे विटकरीची पूड, मीठ इ. संस्कारित द्रव्य, त्याचा लेप.

हुंड(त)का पु. १. दूध सुटावे म्हणून वासरांकडून आईस मारली जाणारी दुशी; धडका. २. डोके, खांदा यांनी करावयाचा प्रहार; धडक; मुसंडी.

हुंडकी स्त्री. पहा : **हुंडका** १

हुंडगी स्त्री. आडदांड; उनाड. पहा : **उंडगी**

हुंडण न. १. ढुश्शी; धडक; धक्काबुक्की. (क्रि. मारणे) २. तालीमखान्यातील अशा प्रकारचा व्यायाम. ३. गर्दी; दाटी; घोळका; गोंधळ; झुंड (माणूस, शिपायी, गुरे, मुंग्या इ.ची). (क्रि. फुटणे, लोटणे, लागणे, जमणे.)

हुंडणावळ, हुंडावण स्त्री. हुंडीबद्दलचा बट्टा; कमिशन; वटाव.

हुंडणे अक्रि.दागिना हुंड लावून उजळणे.

हुंडणे अक्रि. इतस्ततः भटकणे; उनाडणे.

हुंडवा पु. १. व्यापार, विक्री इ. चा कुलमक्ता; त्याचा परवाना; ठरावीक रकमेस विकत घेतलेला हक्क; कंत्राट. २. खंड; कुळाने मालकास धान्य इ. देण्याचा केलेला ठराव; करार.

हुंडा पहा : **हुंड**

हुंडा वि. मुंडा; बिनशिंगाचा; शिंगे खाली, मागे वळलेली, वाकलेली आहेत असा (पशू).

हुंडा पु. १. वरदक्षिणा; वधूपक्षाने वरपक्षास लग्नात द्यावयाची रोख रक्कम, शुल्क. २. भाजून खाण्यासाठी जोंधळा, मका इ.चे पक्के नसलेले कणीस. ३. एका प्रकारचा भरीव बांबू. ४. मक्ता; पहा : **हुंडवा**. ५. विहीर हुंडा; बागाईत जमिनीवरील सारा. ६. तेलाच्या घाणीतील लाट. [सं. हुड्=स्वीकारणे]

हुंडाचाफा पु. मळलेल्या दागिन्यांना उजळा देण्याची कृती. (क्रि. देणे, लावणे.) पहा : **चपका**

हुंडा बैल (ल.) मूर्ख.

हुंडाभांडा, हुंडेभांडे पु. न. माल वाहून नेण्याचे एकंदर भाडे, मक्ता (यात जकात, सारा, नाकेपट्टी इ. धरतात); वाहतुकीचा ठोक करार.

हुंडारणे न. पाण्याची थडक सोसण्याकरिता घातलेला गडगा, बांध.

उक्रि. १. पशूने आपल्या डोक्याने पलीकडे लोटणे, झुगारणे, दूर करणे,

हुंदाडणे. २. (सामान्यत:) ढकलून देणे; झिडकारणे; धिक्कारणे. ३. लाथाडणे; भिरकावणे; हुंदडा मारणे. [हिं. हंडाना]

हुंडी वि. कंद; गड्डा.

हुंडी स्त्री. १. एका ठिकाणचे झाड दुसऱ्या ठिकाणी नेऊन लावायचे असले म्हणजे मुळास धक्का लागू न देता मातीसह उपटण्याची क्रिया; तयार केलेले झाडाचे रोपटे. २. बुधल्याच्या तोंडास दोरी बांधून व फडक्याने आच्छादून वर बसविलेले मातकापड-शेणाची लिंपण किंवा दट्ट्या.

हुंडी स्त्री. अव. जोंधळ्याची एक जात; उन्हाळी जोंधळा.

हुंडी स्त्री. जड्याचे हत्यार.- शर.

हुंडी स्त्री. वर्गणीची पेटी; मंदिरातील दानपेटी.

हुंडी स्त्री. १. परस्थळी पैसे पाठवावयाचे असता आपल्या ठिकाणच्या सावकाराला सदरची रक्कम देण्यासंबंधी दिले जाणारे सूचनापत्र. २. (ल.) अविवाहित मुलगी. ३. (ल.) दूरच्या ठिकाणी आपल्या गोत्राचा मनुष्य मरण पावल्याबद्दल वर्तमान, पत्र इ.; त्याच्या मरणाने आलेले अशौच. [सं. हुड्=स्वीकारणे] (वा.) ०**लावणे, देणे** – हुंडीपत्र नेऊन देणे.

हुंडु प. १. मोठा फोड. (व.) २. बूच.

हुंडुक-का, हुंडू पु. १. प्रबळ भावनेचा (शोक, करुणा, प्रेम इ.चा) आवेग. २. (क्रि. भरून येणे, भरणे, येणे.) पहा : **हुंदका**

हुंडेकरी वि. हुंडा घेतल्यावाचून कोणाची मुलगी न पत्करणारा प्रतिष्ठित (वर).

हुंडेकरी पु. १. कोठार इ.मध्ये ठरावीक वेतन घेऊन माल वाहून नेणारा इसम. (यात नाके, जकात इ. भरण्याचा पैसा तोच भरतो.) हुंड्याभांड्याचा व्यापारी, दलाल. २. मालाची स्टेशन-घर-परत स्टेशन अशी वाहतूक करणारा इसम.

हुंडेबंदी स्त्री. पाटस्थळ जमिनीवरील पाट, विहीर इ.

हुंड्या कपाळाचा वि. अरुंद कपाळाचा.

हुंदका-की पु. स्त्री. रडण्याचा उमाळा. पहा : **हुंडका-की**

हुंद(दा)डणे उक्रि. १. शिंगाने, डोक्याने हिसडा, दुश्शी मारणे; देणे. २. (ल.) घालवून देणे. ३. (ल.) दूर लोटणे; बाजूस करणे; खोडून काढणे (दोषारोप).

अक्रि. बागडणे; हुदडणे; नाचणे; धुडगूस घालणे. [क. हुडदि]

हुंद(दा)डा पु. १. पहा : **हुंडका** २. २. डोके, खांदा यांनी मारलेली दुश्शी; धडक. ३. जरीमरीसारखा एक रोग आणि त्याची देवता. ४. धसमुसळ्या, आडदांड माणूस; मार्गात कितीही अडचणी आल्या तरी धडाक्याने पुढे जाणारा माणूस. ५. (सोंगट्यांचा खेळ) एकच फिरती शेवटची सोंगटी.

हुंद(दा)डी स्त्री. पहा : **हुंडका** १

हुंदणे अक्रि. हुंदका देणे; रडणे.

हुंब वि. अडाणी. (माण.)

हुंबणे अक्रि. १. कण्हणे; विव्हळणे; कुंथणे : 'एक घाइं हुंबती' – शिव १०५७. २. घुसणे : ' एक स्यारेति हुंबताति' – गोप्रच ११५. [ध्व.]

हुंबते न. भांडण; वाद. पहा : **हुंबरी**

हुंबर-री पु. स्त्री. गुराखी मुलांचा एक खेळ.

हुंब(बा)रड-डा-डी स्त्री. गाईबैलांचे ओरडणे; हंबरडा.

हुंबरणे अक्रि. १.निस्तेज, फिकट होणे; पांढरे पडणे. २.पहा : **उबळणे**

हुंब(बा)रणे अक्रि. १. गाईबैलांनी ओरडणे; हंबरणे. २. (ल.) गर्वाने गुरगुरणे. ३. घुमणे : 'परमानंदेहि हुंबरे। सुखोद्गारें तुष्टोनि।'- एभा ३.६०१.

हुंबा-ब्या वि. रडका; रड्या : 'हुंब्यासी हुंबा लाऊन द्यावा। टोणप्यास टोणपा आणावा।'- दास १९.९.२९.

हुंबाडी स्त्री. जोर; ताकद; बळ; नेट; उत्साह; उभारी : 'मग मी हि बळ धरी. मला हुंबाडी येई.'- आशियाना ९०. (माण.)

हुंमैचें अक्रि. घाम येणे. (गो.)

हूक स्त्री. १. कमर, पाठ इ.त एकाएकी निघालेली उसण, चमक. (क्रि. भरणे, निघणे.) २. कोल्ह्याचे ओरडणे; कोल्हेकुई. ३. अफवा; उडत बातमी. (क्रि. उठणे, पडणे, निघणे, पसरणे.) ४. सूर्यकिरण; पहाटेचे तांबडे; तांबूस प्रकाश; पहाट (क्रि. फुटणे) : 'सूर्याची हूक देखिली.'- कालिका ६.९.

हूक पु. टांगण्याचा आकडा. [इं.]

हूड स्त्री. लीला.

वि. १. तापट; अविचारी. २. आडदांड; धाडशी. ३. खोडकर; अचपळ; धटिंगण.

हूड न. गाडीवरील कापडी, ताडपत्री इ. आच्छादन. [इं.]

हून अ. १. पासून. २. पेक्षा.

हूप न. वानराचा भुभु:कार; ओरड.

क्रिवि. वानराच्या ओरड्याप्रमाणे.

हूप स्त्री. १. धैर्य. २. उत्सुकता.

हूल स्त्री. (जंबिया) सिर मारल्यानंतर, जोडीदाराच्या डावीकडे बेंबीपासून बरगडीच्या शिंपीपर्यंत केलेला वार.

हूल स्त्री. १. पहा : **हुलकावणी.** २. लोकांची आरडाओरड; दंगा. ३. सोंगट्याच्या खेळातील एक संज्ञा. ४. खून. ५. आवई; भयदायक बातमी, गप्प. ६. बतावणी.

हूलक आवेश; उत्साह.

हूलस्वार पु. आघाडीचे स्वार (शत्रू चालून येत आहे अशी हूल करतात यावरून).

हूं हूं उद्गा. दु:खाचा उद्गार.

हृत वि. १. घेऊन जाणारा; हरून नेणारा. (समासात उपयोग) उदा. दु:ख-पाप-प्राण-हृत्. २. हरण केलेले, नेलेले. [सं. हृ]

हृत्स्पंदलेख पु. हृदयाच्या चलनवलनाचा आलेख; (इं.) कार्डिओग्राम.

हृद पु. पाण्याचा डोह.

हृदय न. १. हृदय; मन; अंत:करण. २. वक्ष:स्थळ; काळीज; छाती. ३. (ल.) मनातील हेतू; आशय. ४. उद्देश; खोच; मर्म (भाषण, वाक्य इ. तील). [सं.] (वा.) ०**भरून येणे, दाटणे** – गहिवरणे. ०**फुटणे** – अतिशय दु:ख होणे.

हृदयकोश पु. १. हृदयावरचे आवरण. २. हृदय व त्याचे आवरण (एकत्रपणे).

हृदयवान, हृदयालु, हृदयी वि. दयाशील; कोमल अंत:करणाचा.

हृदयविकार पहा : **हृद्रोग** १

हृदयशून्य वि. १. निर्दय; क्रूर. २. बुद्धी, मनाची शक्ती कमी असलेला. ३. उदासीन; विमनस्क.

हृदयस्थ वि. अंतर्यामी असणारा-री.

हृदयंगम वि. चित्ताकर्षक; मोहक; हृद्य; आवडता; सुंदर; मनोहर.[सं.]

हृदावर्त, हृदावळ-ळी पहा : **हरदावळ-ळी**

हृद्गत न. मनातील हेतू, आशय, अभिप्राय.
वि. १. मनात अंत:करणात ठसलेले. २. आवडते; प्रिय. ३. अंत:करणावर खोदले गेलेले.

हृद्य वि. १. मनासंबंधी. २. हृदयंगम; सुंदर. ३. मनापासूनचे; खरे; कळकळीचे. ४. प्रिय; आवडते.

हृद्रोग पु. १. हृदयाला होणारा रोग. २. (ल.) अत्यंत काळजी, चिंता, दु:ख.

हे उद्गा. सन्मानार्थी हाक मारण्याचे, संबोधनाचे अव्यय. अहो! अरे! 'हे राजा ! तुझे कल्याण असो.' [ध्व. सं.]

हे सना. हा चे अनेकवचन.

हेकणे अक्रि. खोकणे (गुरांचे). [ध्व.सं.हेक्का]

हे(हें)कट(ड),हेंक(ग)टी, हेकडवाईक, हेकड(ल) खार, हेकाड, हेकेखोर-बाज-करा, हेकेवाईक, हेंकाखोर -वाईक वि. आपल्याच हेक्याने चालणारा; हट्टी; दुराग्रही; एककल्ली; छांदिष्ट.

हेकणा वि. १. हिणकस. २. चुकार. (लोसाको)

हेकणा-ना वि. काणा; एका डोळ्याने आंधळा. (व .)

हेकरी स्त्री. हेका; हट्ट : 'स्वधर्म भूमीपति हा न सोडी । तो आपली हेकरि हो न मोडी '- सारुह ८.३५ .

हेकस,हेकोडा, हेकडा, हेकाड वि. १. तिरपा; वाकडा; वाकडातिकडा.२. एककल्ली.

हे(हें)का,हेंकाहेंकी पु.स्त्री. आपलेच म्हणणे धरून बसणे; हट्ट; अट्टाहास; आग्रह; छंद; नाद; दुराग्रह.

हेक्का स्त्री. उचकी. पहा : **हिक्का**

हेक्टर न. दहा हजार चौरस मीटर. २.४७१ एकर जमीन.

हेगतेग क्रिवि. टाळाटाळीचे; अर्धवट; काहीतरी; अनिश्चितपणाचे : 'तीन वेळा त्याचे येथे आम्ही व बाबुराव जाऊन साहित्याविसी बोलिलो त्यासी हेगतेग यैसे बोलतात' - पेद १६.१३९. [ध्व.]

हेजिबत, हेजिबी स्त्री. १. वकिली; शिष्टाई. २. दूताचे काम, व्यवसाय, वृत्ती.

हेजीब पु. १. जिल्हा अधिकाऱ्याचा मदतनीस; मदत कारकून; राजाचे निरोप, संदेश देणारा माणूस. २. चाकर; नोकर. ३. वकील. ४. दूत. [अर.हाजिब्]

हेजोडकरी मोठ्या हौसेने; आवडीने. (अहि.)

हेट स्त्री. (नाविक) दक्षिणदिशा. (हेटकरी)
वि. खालचा; दक्षिणेकडील; तळकोकणचा.
क्रिवि. १. खाली; खालच्या प्रांतात, प्रदेशी, भागी. २. किनाऱ्याच्या दक्षिणेस; दक्षिण दिशेकडे; विशेषत: कोकणातील सावित्री नदीच्या दक्षिणेकडे. [सं. अधस्थ; देप्रा. हेट्ठ; गु. हेठ]

हेटकरी पु. १. दक्षिणेकडील (हेट प्रांतातील) रहिवासी. २. तिकडील बरकंदाज, शिपायी. ३. मराठ्यांच्या पायदळात नोकरी करणारा तळकोकणचा मनुष्य.

हेटकी वि. पायांत पाय घालून चालणारी (गाय, व्यक्ती). (व.) [सं. हेठ]

हेट(ड)णे अक्रि. तुफानी वारा सुटणे. (कु.)

हेटधारे वि. लहान; खालचे : 'हेटधारे लोकांस इंग्रज काय करतो.' - मइसा १०.१५६. [हेट + धारे = लहान ; खालचे. दोन्ही शब्दांचा अर्थ खालचा, लहान असाच होतो.]

हेटबाहेरचा वारा नैर्ऋत्येकडील वारा.

हेटा-टी पु. स्त्री. १. हातगा. २. शेवगा (झाड). (व.,ना.)

हेटा, हेटाशेटा वि. हलका; क्षुद्र; दुर्लौकिकाचा (माणूस, व्यवहार इ.).

हेटाळणी-की, हेटाळी-ळा स्त्री. पु. अवहेलना; टवाळी; टर; तिरस्काराने वागविणे. [सं. हेडन्]

हेटाळणे उक्रि.अवहेलना करणे; धिक्कारणे; निंदा करणे; तिरस्काराने वागवणे.

हेटी स्त्री. १. गौळीवाडा; गायरान. २. रानातील वस्ती, तळ. [क. हट्टी]

हेटीमेटी स्त्री. १. हेटाळणी; पाणउतारा; अवहेलना; तिरस्कार. २. निष्काळजीपणा; बेफिकिरी; अगत्य नसणे. (क्रि. करणे)
क्रिवि. निष्काळजीपणे; बेफिकीरपणाने. (वा.)० **खाली(वारी)नेणे, घालविणे** - हलगर्जीपणाने दूर लोटणे, सारणे.

हेटुक लावणे वाकडे लावणे; तेढे बोलणे. (माण.)

हेटे-टो क्रिवि. खाली; जमिनीवर.

हेड स्त्री. जनावरांचा कळप.

हेड स्त्री. चढाओढ; स्पर्धा; पारख. (लोसाको)

हेडचे अक्रि. खिल्लार घेऊन फिरणे.(गो.)

हेडदारणे क्रि. झापणे.

हेडम न. तलवारीचा एक खेळ.

हेडमास्ट(स्त)र पु. शाळेतील मुख्य शिक्षक, अध्यापक. [इं.]

हेडली स्त्री. एक पिशाच; विधवा स्त्रीचे भूत. (को.)

हेडसाविणे,हेडा(ड)वि(व)णे उक्रि. पहा : **हेटाळणे, हिडसणे**

हेडंबा-बी स्त्री.१. भीमाची एक राक्षसजातीची पत्नी. २. (ल.) धिप्पाड व विद्रूप स्त्री. ३. ओंगळ, किळसवाणी स्त्री. [सं. हिडिंबा]

हेडा पु. (नाविक) मासे मारण्याचे एक आयुध.

हेडा पु. खाजणांत उगवणारे व गुरांना मानवणारे गवत.

हेडा पु. १. मन. २. तंद्री; समाधी. (अहि.)

हेडाउ पु. घोड्यांचा व्यापारी: 'हेडाउवांसि खेबु.'- गोप्रच १६१. [सं.]

हेडावणे अक्रि. दटावणे; धाक दाखविणे: 'मातेने बाळकास हेडाविले । तै अंगसंगेचि लिगटलें ।'- योसं २.१५. [सं. हेडन]

हेडाविणे क्रि. झिडकारणे; अवहेलना करणे.

हेडीमेडी वि. कुरूप.

हेडू पहा : **हेद-दू-द्रू**

हेड्या पु. वि. १. दलाल; प्रतिनिधी. २. खिल्लारी, हेडीचा व्यापार करणारा. ३. माहीतगार; धूर्त; पुष्कळ ओळखी असणारा.

हेत पु. १. पहा : **हेतू**. २.नजर ठेवणे.

हेतप्रीत स्त्री. १. मनातला उद्देश, इच्छा. २. कृपालोभ; प्रेम; मैत्री.

हेती स्त्री. तरवार; शस्त्र. [सं.]

हेती खडू. [सं.]

हेतुकपण न. अभिलाषा; इच्छा.

हेतुगर्भ वि. हेतू गर्भित असतो असा; अंतर्भूत कारण, अर्थ असलेले (भाषण, शब्द, कर्म इ.); सहेतुक.

हेतुग्रस्त वि. पक्षपाती; पूर्वग्रहदूषित.

हेतुतः, हेतुपुरस्सर, हेतुपूर्वक जाणूनबुजून; सकारण; सहेतुक. [सं.]

हेतुपद न. १. दोन पदांतील अंकगणितीय मध्य; मध्यपद. २.(तर्क.) संवाक्यातील तिन्ही विधानांत आढळणारा समान शब्द.

हेतू स्त्री. आठवण; स्मरण. (ना.)

हेतू पु.१. अभिलाषा; इच्छा; कामना. २. आधार; उद्देश. ३. कारण; निमित्त; बेत.

हेत्वाभास पु. १. भ्रामक हेतू; दाखविलेले चुकीचे कारण, हेतू. २. (न्याय.) व्यभिचार, विरुद्धता, असिद्धी, बाध व सप्रतिपक्षता या पाच दोषांनी युक्त असलेले विधान.

हेत्वाभासी वि. भ्रामक विधान खरे असल्याचे भासवणारा.

हेत्वारोप पु. कृतीच्या मागे अनिष्ट हेतू असल्याचा संशय घेणे.

हेद–दू–द्रू पु.स्त्री. कोकणातील एक मोठे, मोठ्या आणि वाटोळ्या पानांचे, इमारती लाकडाचे झाड. या लाकडावर लाखी रंग सुबक बसतो.

हेदर पु. (दगडी बांधकाम) बंद; भिंतीत अंतराअंतरावर बसविलेला लांब गळजोडीचा दगड. याने बांधकाम आवळून एकजीव होते. [इं.हेडर]

हेदाडा पु. दटावणी; रागे भरणे; दरडावणी; धसाडा. (ना.)

हेदावणे अक्रि. थकून जाणे; शिणणे. (व.)

हेद्रा वि. घाणेरडा, गचाळ, मूर्ख, अडाणी.

हेपडगुबड न. कपट; काळेबेरे.
वि. वाकडातिकडा, ओबडधोबड. (व.)

हेपणे, हेप(पा)लणे ,हेपल्या मारणे उक्रि. स्त्रीशी संभोगक्रिया करणे.

हेपतबल्ला वि. १. स्त्रीसंगासाठी उत्सुक झालेला. (ना.) २. (ल.) तारतम्य नसणारा; अर्धवट.

हेपल(ळ)णे सक्रि. खाणे; पुख्खा झोडणे; गट्ट करणे. (व.)

हेपल्ल्याट्या वि. गचाळ. (व.)

हेपसलिं(लुं)गा, हेपुसलुंगा वि १. नपुंसक; गांड्या. २. दुर्बळ; क्षुद्र. ३. गरीब; कमकुवत.

हेबा(ब)ळ(ल)णी, हेंबाळणी स्त्री. ओढाताण; धसमुसळेपणा; हिसकाहिसकी.

हे(हें)बा(ब)ळणे, हेबालणे, हेबलणे उक्रि. १. दांडगेपणाने हाताळणे; धसकफसक, ओढाताण करणे. २. रेटणे; धक्का मारणे; चेंगरणे.
अक्रि. उसळणे; उचंबळणे; हेलकावे खाणे (नदीचे पाणी, लाटांत सापडलेली नाव इ.).

हेबे तेबे, हेबेतेबे पु.अव. दगदग; फुकट खेप, येरझार यांचा त्रास.
क्रिवि. नाहक; विनाकारण.

हेम न. सोने. [सं.]

हेम स्त्री. दुमडून घातलेली शिवण.

हेमकट वि. सोनेरी : 'दंत शुभ्र सदट । रत्नजडित हेमकट ।'– दास १.२.१५.

हेमकल्याण पु. (संगीत) एक राग. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर.

हेमगर्भ पु. सोने घालून केलेली एक औषधी मात्रा.

हेमटा वि. पहा : **हिमटा**

हेमटी स्त्री. दुशी; धडक. पहा: **हुंदका**

हेमंत(ऋतू) पु. मार्गशीर्ष व पौष हे दोन महिने मिळून होणारा ऋतू. या वेळी सूर्य वृश्चिक व धनू या दोन राशींत असतो. [सं.]

हेमाडपंती वि. हेमाडपंताने प्रचारात आणलेली (देवळांची बांधणी, लिपी इ.).

हेमाड्या वि. बावळट; मूर्ख.(व.)

हेय वि. त्याज्य; टाकून देण्यास योग्य. [सं.]

हेर वि. येर; इतर; क्षुल्लक; कुचकामाचे; क्षुद्र : 'नृपा तुला उत्तम कारि जाली । दैवें निघाले परि हेरि जाली ।'– सारुह ३.१०.

हेर पु. १. गुप्त दूत. २. बातमीदार.
स्त्री. टेहळणी; गुप्त पाहणी. [सं.हेरक; देप्रा. हेर, हिं.हेर,हेरना]

हेरगिरी स्त्री. दुसऱ्याच्या गोटातील गुप्त बातमी मिळविणे.

हेरणी,हेराहेरी स्त्री. टेहळणी.

हेरणे उक्रि. १. टेहळणे; पाळत ठेवणे; बारीक, गुप्तपणे चौकशी करणे; सूक्ष्म दृष्टीने पाहणे; न्याहाळणे. २. स्पष्ट दिसणे; सापडणे. ३. तर्क करणे; ध्यानात येणे; समजणे; अचूक ओळखणे.

हेरफेर, हेरी(र)फेरी, हेरीहेरी स्त्री.हिंडता हिंडता टेहळणी, पाहणी. (क्रि. करणे)

हेरफेर पु.१. थोडासा बदल; फरक; फेरबदल (परस्पर दोन वस्तूंत). २. विसंगती; तफावत; अंतर (हिशेब, जमाखर्च इ. मध्ये). ३. बदली (पहारेकऱ्यांची); आवजाव (सैन्याची); येरझार.
[हेर = क्षुल्लक + फेर किंवा फेर द्वि.]

हेराफेरा पु.चुरस; चढाओढ: ' मग आम्ही डोंगर हेऱ्याफेऱ्यानें उतरूं लागलो' – राणीचे पुस्तक ४५.

हेराफेरी स्त्री. फसवणूक.

हेरिंग पु. ॲटलांटिक महासागरात आढळणाऱ्या माशांची एक जात.[इं.]

हेरी स्त्री. १. हालहवाल. २. दृष्टी: 'तंव सांगो आरंभिली सगुणाची हेरी । ऐका श्रोते सावध ।'– योसं ५.७७.

हेरी,हेराफेरी स्त्री.१. प्रवास; फिरती. २. येरझार. ३. अदलाबदल करणे; इकडचे तिकडे करणे.

हेरूच वि. इतर; दुसराच.

हेरून फेरून क्रिवि. १. फेरफार करून; उलथेपालथे करून; इकडे तिकडे. २. पुनः पुन्हा; वारंवार.

हेरे–च्ये न. (नाविक) गलबताचे शीड बदलणे. (क्रि. घेणे)

हेरे स्त्री. परीक्षा; पारख; हेरणी : 'सारांश गजाची हेरे गजास'. –पेद २४.२७.

हेरेचोरे न. इतर मुले.

हेरेबोऱ्ये न. वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने गलबत हाकारणे.

हेऱ्या वि. हेर; गुप्त बातमी काढणारा; टेहेळ्या; न्याहाळणारा.

हेल पु.स्त्री. १. गावात जिथे नवीन मूल जन्मेल त्या घरी दहा दिवस पाणी, दूध पुरविणे (कुणबिणी किंवा इतर स्त्रिया थोरांच्या घरी या प्रकारे करतात). (क्रि. घालणे): 'हेल घालिती अठरा पगड जातीचया नारी।'– गापो ५.३५. २. असे पाणी, दूध इ. पदार्थ. ३. याच कारणासाठी अशा थोरा –मोठ्यांच्या घरापुढे काही दिवस पाण्याचा सडा टाकणे.

हेल पु. बोलणे, गाणे, रडणे इ. तील लांबट काढलेला सूर.
स्त्री. आट्यापाट्यातील डावाच्या शेवटाची एक संज्ञा. [ध्व.]

हेल न. पाण्याचे मडके.(चंद्रपूर)

हेल पु. स्त्री. १.ओझे वाहण्याचा धंदा. (क्रि. वाहणे). २. असले वाहावयाचे ओझे, गवत इ. ची ओझ्याची गाडी; ढीग. ३. ते वाहण्याची मजुरी; भाडे; हमाली.

हेलकरी पु. ओझे वाहणारा मजूर; हमाल.

हेलकरी पु. हेल घालणारा; पुत्रजन्मानंतर पाण्याच्या घागरी दारी ओतीत गीते म्हणणारा. – लोसाको.

हेलकावणे अक्रि. १. आंदोळणे; हेंदकाळणे; डोलणे (लाट इ.). २. लाटांच्या माऱ्याने तारू इ. खालीवर झोके खाणे. ३. इकडून तिकडे झुलणे (पाळणा इ.). ४. आचके बसणे; हिसका खाणे; मागेपुढे होणे; हबका सोसणे (घोडेस्वार, उंटस्वार यांनी चालताना). ५. (सामान्यत:) झोके खाणे.

हेलकावा पु. १. आंदोलन; झोका; लाट; मागे-पुढे होण्याची क्रिया (समुद्राचे पाणी, झाडाची फांदी इ. ची). २. माणूस, जहाज इ. चे हालणे; झुलणे; झोका खाणे (लाट, वारा इ. नी). ३. हिसका; धक्का; झोका ४.(ल.) (अर्जदार इ.चा) फुकट हेलपाटा; वृथा येरझार (क्रि. देणे) [सं. हेला = क्रीडा, खेळ]

हेलकाविणे सक्रि. १. हलविणे; डोलविणे; हेलकावा झोके देणे. २. ओढाताण करणे; पुढेमागे करणे. ३. हेलपाटा होणे; उगीच दवडणे. ४. धुडकाविणे; तिरस्काराने हाकलून लावणे; घालविणे.

हेलकी स्त्री. भटकी, उनाड स्त्री; गप्पिष्ट बाई.

हेलगठ पु. (तिरस्कारार्थी) हल्या; रेडा; हेला. [सं. हेला]

हेलगड स्त्री. पहा : **हिलगड**

हेलगा, हेला पु. रेडा; टोणगा; हल्या; म्हैसा.

हेलना स्त्री. अपमान; हेटाळणी; अनादर; तिरस्कार. [सं.]

हेलपा(प)टण–णी उक्रि.१. क्षुल्लक गोष्टीसाठी हेलपाटा, निष्कारण खेप घालावयास लागणे. २.बिघडविणे; फिसकटविणे; निरुपयोगी करणे (उपाय, मसलत, श्रम इ.).
अक्रि. १. वाऱ्याने उन्मळून पडणे; नाश पावणे (झाड, झोपडे). (को.) २. नासधूस होणे; चुराडा होणे. [सं. हेला = फेरा]

हेलप(पा)टा पु.१. फुकट खेप; येरझार; त्रासदायक फेरा; २. रस्त्याचे लांबचे वळण; चुकीची माहिती मिळाल्यामुळे या वळणाने जाणे; त्यामुळे झालेले श्रम; फिरकांडा.

हेलपाटी स्त्री. १. ओझे वाहण्याचा लहान हारा. २. हेलकऱ्याचे काम; हातमजुरीचा धंदा; मोलमजुरी.

हेलपायकी स्त्री. निष्कारण हेलपाटा. (कु.) पहा : **हेलपटनिशी**

हेलमी पु. (नाविक) तुफान; तुफानी वारा व पाऊस.

हेला स्त्री.१. खेळ; क्रीडा. २. फेटाळणी; अनादर; अपमान; हेटाळणी.

हेलाव(वि)णे, हेलावा १. पहा : **हेलकावणे.** २. अंत:करण द्रवणे. ३. आंदोलित होणे. ४. सद्गदित होणे.

हेला(ळा)वा पु. लाट; लहरी : 'पूर्ण सिंधु हेलावे । फुटती जै।'– ज्ञा १३.

हेलि–ळी–ळु पु. सूर्य. [सं.]

हेलिकॉप्टर न.वर पंखा असलेले व जमिनीवरून सरळ व थोडक्या जागेत वर जाणारे व उतरणारे विमान. [इं.]

हेलियम पु. हायड्रोजनपेक्षा हलका, उदासीन व सौम्य वायू. [इं.]

हेलेसें न. वल्हे. (क्रि. मारणे)

हेल्मेट न. दुचाकीवरून जाताना अपघातात डोक्याचा बचाव व्हावा म्हणून डोक्यावर घालायचे कठीण कवच असलेले साधन;शिरस्त्राण. [इं.]

हेव स्तन.(अहि.)

हेवड पु. गुंताडा : 'ढिलेपणे हेवड आले।'– दास १५.१.५.

हेवड वि. हेकड.(व.)

हेवड देवड स्त्री. १.पहा : **इरजीक.** २. अदलाबदल.

हेवरठी अ. त्याकाळी; तेव्हा.

हेवा,हेवादेवा पु. १. मत्सर; द्वेष; शत्रुभाव. २. स्पर्धा. [क.हेव]

हेवा,हेवादेवा पु.१. लोभ; ओढा; आसक्ती; हव्यास : ' धनधान्य हेवा। नाड कुटुंबाची सेवा।' – तुगा ३२२. २. हाव; सोस. ३. इच्छा; मनीषा. [अर. हवा = इच्छा]

हेवा(वे)खोर वि. द्वेषी; मत्सरी.

हेवाळ पु. विरोळा; पाणसर्प. (गो., कु.)

हेषा, हेषहीस स्त्री. घोड्याचे खिंकाळणे. [सं.]

हेस स्त्री. तुषार; वर उसळलेले पाण्याचे किंवा द्रवपदार्थाचे थेंब. (को.)

हेसळणे अक्रि.पहा : **हिंसळणे**

हेसा पु. काजळ–ळी. [सं.]

हेळ वि. तुच्छ; क्षुद्र : 'पूर्वी देखिलें तें हेळ वाटें.'– लीचपू ९६. [सं.]

हेळ पु. हारा; करंडा. – लोसाको.

हेळ स्त्री. १. गुरांना पाणी पिण्याकरिता बांधलेला हौद. २. पाण्यासाठी खणलेला खोल झरा; ओढ्यातील विहीर. (माण.) ३. पहा : **हाळ**

हेळ स्त्री. वेळ : म्हणे हरि हरि एकी हेळा. '– नाम ७६८.

हेळकांड पु. एक प्रकारचा बाण : 'आमोलेयाचा हेळकांडा, फोडीत पाखरा जोड.'– शिव ९८०. [सं.]

हेळण–णा–णी स्त्री. अवहेलना. पहा : **हेलना**

हेळणे,हेळसणे सक्रि. तिरस्काराने वागविणे; धिक्कारणे; अवहेलना करणे.

हेळणेमेळणे अक्रि. मिळूनमिसळून वागणे; घरोबा ठेवणे.

हेळसण, हेळा स्त्री. अवहेलना; हेलना.

हेळसांड स्त्री. १. अनादर; हयगय; दुर्लक्ष; हेलना. २. निष्काळजीपणा. [सं. हेला + म. सांडणे]

हेळंबी स्त्री. (नाविक) भयंकर वादळ. पहा :**हेलमी**

हेळा स्त्री.दृष्टी. – मनको.

हेळा स्त्री. क्षण. [दे.]

हेळा पु. बेहड्याचे झाड. (को.)

हेळीमेळी स्त्री. घरोबा; स्नेहसंबंध.

हेळू पु. पहा : **अळू**

हेंग(गा)ड–डा, हेंगडतिफड वि .१. ओबडधोबड; चमत्कारिक; वेडेविद्रे; कर्णकटू (भाषण, कामधंदा, बोली). २. राकट; कठोर; विद्रूप; विशोभित; रानटी; राक्षसी (रीत, वहिवाट, वर्तणूक, स्वरूप, अंग). ३. मूर्ख; रानवट; अडाणी ४. हट्टी; दुराग्रही. [क.हेंगस्= स्त्री]

हेंगडतट्टू पु. हेंगाड–डा माणूस.

हेंग(गा)डमत न. १. अडाणी मत; बुद्धी. २. हट्टीपणा, मंदपणा. ३. हेंगाड.

हेंगड(डु)मेंगड(डु),हेंगडा मेंगडा स्त्री. न. १. किरकोळ, क्षुल्लक माल, वस्तू. २. बडबड; गप्पा.
वि. १. हलका; क्षुद्र; घाणेरडा; मळकट; क्षुल्लक (वस्तू, प्राणी, दागिना). २. पहा : **हेंग(गा)ड–डा.** ३. विसंगत; असंबद्ध (भाषण). क्रिवि. विसंगतपणे.

हेंगडाविणे उक्रि. १. बावळट, हेंगाडा, हट्टी इ. ठरविणे; नावे ठेवणे (भाषण, कृती, व्यवहार इत्यादींना). २. अवहेलना, विटंबना, कुचेष्टा, कुचाळी करणे.

हेंगडी प्रधान १. मल्हारी (खंडोबा)चा प्रधान. २. (ल.) ढिला, अजागळ, रेंग्या माणूस.

हेंगल स्त्री. अडचण, सबब, अडथळा, तक्रार उपस्थित करणे. (क्रि. घालणे, घेणे, लावणे.)

हेंगलखोर, हेंगली(ल्या) वि. हुज्जती; तक्रारखोर. [क.हेंगे=कसे]

हेंगसा वि. बुळा; गांड्या; नपुंसक. (कर.) [क. हेंगसू = स्त्री]

हेंगाडेंगी स्त्री. तिटकाऱ्याने झिडकारणे; तिरस्कार; झाडणी. (क्रि. करणे) वि. निष्काळजी. (व.)

हेंगाळणी स्त्री. तिरस्कार; झाडणी.

हेंगाळणे उक्रि. धिक्कारणे; झिडकारणे; तिरस्कार करणे.

हेंगे क्रिवि. इकडे.

हेंगे वि. विद्रूप, ओबडधोबड.

हेंटाली स्त्री. हेटाळणी; तिरस्कार.

हेंड न. १. झोंबटपणा; झोंबी. २. मैथुन : 'श्वानांचें हेंड तत्काळ सुटे । मनुष्याचें आकल्प न सुटे ।'– एभा १३.२११.

हेंडगा पु. १. डोक्यावर घेतलेला भातण, चिपाड इ. चा भारा, बोना. २. वरील प्रकारची पांजरणाच्या कोपऱ्यात लावलेली पेंडी. (क्रि. बांधणे)

हेंडगूळ, हेंडूक, हेंडूकमेंडूक न.१. कुत्र्याचे गुप्तेंद्रिय. २. कुत्र्याचे मैथुन. (क्रि. गुंतणे, लागणे.)

हेंडगे न. चिपाड.

हेंडवा पु. गोणी; पोते. (व.)

हेंडा पु. मोठे ढेकूळ. (बे.)

हेंडाळणी, हेंडाळी, हेंडाळणे पहा : **शेंटाळणी**

हेंडाळू भाजीचा एक कंद; पहा : **गोराडू**

हेंडी वि. नरपशू.

हेंडेहोळ वि. रिकामपणी फिरणारा; भटक्या.

हेंडे होळकर पु. अव. १. पहा : **होळीचे होळकर.** २. (ल.) दंगेखोर; बंडखोर.

हेंदकाळणे, हेंदोल(व)णे उक्रि. हलणे; डुचमळणे; हेलकावणे (भांड्यांतील द्रवपदार्थ, समुद्रात तारू इ.): 'तारू सागरिचे अवचितें । हेंदोवलें आलें येथे ।'– तुगा ४१०६. [सं. हिंदोलन]

हेंदर वि. अडाणी; निर्बुद्ध : 'तुमचे गुरु होते : ते हेंदरे:'– लीचउ ८१. [क. हेदरु]

हेंदर, हेंदररेंदड स्त्री. न. घाण; केरकचरा; विष्ठा; घाणीची रास; उकिरडा.

हेंदरा(डा), हेंद्रा वि.१. घाणेरडा; गचाळ; ओंगळ; अमंगळ. २. मूर्ख; अडाणी; वेडगळ. ३. क्षुद्र.

हेंदोडा वि. (व.) पहा : **हेंदरा**

हेंबाड भुतऱ्या वि. मूर्ख; वेडगळ. (व.)

हैक,हैकहैक,हैकथैक उद्गा. गुरांना हाकलण्याचा शब्द.
स्त्री. टोचणी; दुमणी. [ध्व.]

हैकत,हैकोल, हैगई इ. पहा : **हयकत** इ.

हैजा पु.पटकी; कॉलरा. (ना.) [अर. हैसा]

हैदाना पु. दंगा.

हैदोस पु. गोंधळ; धुमाकूळ. पहा : **हायदोसदुल्ला**

हैप(ब)त स्त्री. धाक; धास्ती; भीती; दरारा. (क्रि. घेणे, खाणे, धरणे, बसणे.) : 'फौजेने हैबत खाल्ली आता तह ठरवावा.'– हौके १२. [अर. हैबत्]

हैप(ब)त खाल्ला– खाल्लेला वि. भ्याड; घाबरट.

हैबती वि. भीतिग्रस्त.

हैबतीगैबती वि. अजागळ; गबाळ. [गैबती द्वि.]

हैम वि. बर्फ, थंडी, हिवाळा इ. चे. [सं. हिम]

हैमवती स्त्री. १. पार्वती. २. पांढरे वेखंड.

हैयत–ती पहा : **हयात**

हैर पु. सापासारखा पिवळा मासा. याला धरून त्याच्या अंगावर चण्याचे पीठ चोपडून त्याच्या बोळाच्या गोळ्या करतात. या औषधी असतात.

हैरत स्त्री. पहा : **हैपत** [अर.हैरत्]

हैरत स्त्री. तारीफ; स्तुती; कौतुक. (व.) [अर.]

हैराण वि. १. त्रस्त; त्रासलेला; खंगलेला (आजार, शीण, दुःख इ. ने); व्याकूळ; आजारी; अस्वस्थ. २. हतबुद्ध; दंग; आश्चर्यचकित. [अर.हैरान्]

हैराणगत, हैराण(न)गी, हैराणी स्त्री. १. आजार; दुःख. २. दुर्दशा; व्याकुळता; आपदा. ३. गोंधळ; घोटाळा; मानसिक त्रासाची अवस्था. [फा. हैरानी]

हैवान पु. १. दुष्ट वृत्तीचा माणूस. २. अगदी सशक्त प्रकृतीचा माणूस. ३. (ल.) पशू; जनावर; निर्बुद्ध प्राणी.
वि. दुर्बळ; मूर्ख; पशुतुल्य. [अर. हयवान = सजीव प्राणी]

हैसा पु. तंग आवळण्याची वादी.

हो उद्‌गा. १. आदरपूर्वक हाक मारण्याचा शब्द; अहो ! २. थांबण्यास सांगण्याचा शब्द. ३. मान्यता, कबुली, परवानगीदर्शक शब्द; होय. ४. (काम इ. करण्यास सांगताना) हटकून करण्यासाठी, जोर देण्यासाठी, दिशा दाखवण्यासाठी किंवा लाडाने उच्चारावयाचा शब्द. [ध्व.]

हो उद्‌गा. १. होवो : 'सूतात्मज तेजोवध वर बहु तेणेंचि भद्र महिवर हो ।' - मोभीष्म १.९८. २. घडू देणे (आपण मध्ये ढवळाढवळ न करता). [सं. भू = होणे]

होईक न. १. होणारी गोष्ट; भविष्य. २. भवितव्य.

होऊन क्रिवि.१.होणे; धातूचे ऊन प्रत्ययान्त अव्यय. २. कोणाच्या प्रेरणेवाचून; आपले आपण (करण्यास प्रवृत्त होणे). जसे : - त्याने होऊन बोलाविले, आपण होऊन. ३. पासून : 'विजयनगराहोऊन.'- इमं ७. ४. स्वत; खुद्द; जातीनिशी. (वा.) **होऊन जाणे** -१. जवळ जवळ होणे. २. खलास होणे; थांबणे; चुकणे; बारगळणे.

होक न. भातातील तण; रान. (बे.)

होकरणे क्रि. आग्रहाने ठेवून घेणे.

होकल-ली, होकाल स्त्री. १. नवरी. (कु.) २. उपवर मुलगी.

होका पु. १. हुक्का. २. तोफेचे गोळे; बाण; सुरुंग, बॉम्ब : 'अगणित होके उडती भराभर।' - माधव-तारापूरचा संग्राम. [फा.]

होकार पु. रुकार; संमती; अनुज्ञा; परवानगी. (वा.) **हो ला हो म्हणणे** - १. दुसऱ्याला नुसता दुजोरा देणे. २. स्वतंत्रपणे विचार न करणे.

होकारणी स्त्री. मोठ्याने मारलेली हाक; हाकारणी.

होका(क)रणे अक्रि. १. मोठ्याने बोलावणे; हाक मारणे. २. संमती, होकार देणे : 'म्हणतात होकरा यास।'- मोशांति ३.४३. ३. थांबविणे : 'वाजतिया वायूतें जरी होकरी ।'- ज्ञा ९.१२५.

होकायंत्र न. दिशा ओळखण्याचे लोहचुंबकाचे यंत्र.

होकारात्मक, होकारार्थी वि. १. अस्तिभावदर्शक; सकारात्मक. २. रुकारात्मक. ३. विधायक.

होग(गा)ड(र)णे उक्रि. १. अधिकार इ. वरून हाकलून लावणे; घालवणे. (को.) २. संपत्ती, प्रतिष्ठा, आरोग्य इ. नासणे; अव्यवस्थितपणे आपले हातून जाईल असे करणे. ३. फेकून देणे; भिरकावणे. ४. हारवणे.

होगलणे अक्रि. उपेक्षा करणे : ' झालासि त्राताचि न होऊनि अधीन होगलिता ।'- मोद्रौवह १०३.

होगा वि. १. आडदांड; दांडगा; अत्याचारी; लुटारू. २. आळशी; मंद; सुस्त. ३. आवरशक्ती नसलेला. (को.) पहा : **हागे**

होगा पु. दहा बारा हात व्यासाचे मासे पकडण्याचे जाळे.

होटाकणे अक्रि. उभे राहणे; ओटाकणे.(तंजा.)

होड, होडत स्त्री. १. पैज; पण; शर्यत. २. करार; व्यवहार. [दे.प्रा.]

होडकार पु. होडीवाला.

होडकी-के-गे स्त्री. न. लहान नाव; होडी; मचवा; तीन ते पाच शिडे असणारे गलबत; नौका; होडकुली (गो.) [सं.होड् = जाणे]

होड(डं, डां, डिं)गा पु. सोटा; काठी. पहा : **होलपटा**

होडगा नडग, होडिक नाडिक स्त्री. १. मारामारी; हाणाहाणी. २. तोंडातोंडी; भांडणतंटा : 'ऐसा होता होडिक नाडिक।'- कथा ६.१८.१०.

होडले वि. मोठे; वडील. (गो.) पहा : **व्हडलो**

होडा पु. १. पैज. २. अहंकार; मोठेपण.

होडी स्त्री. नाव; नौका. [सं. होड् = जाणे]

होणजे-से स्त्री. नणंद; वन्स; पतीची बहीण. पहा : **व्हणजे-से**

होणसणे क्रि. टोचणे; भोसकणे. [सं.]

होणे अक्रि.१. घडणे; असणे; उत्पत्तीस पावणे; प्राप्त होणे; घडून येणे. २. रूपांतराने बदलून दुसरा एखादा गुण इ. येणे; बनणे. ३. घडून येणे; अस्तित्वात येणे. ४. संपणे; शेवट होणे; खलास होणे. ५. पार सत्यानाश पावणे; रसातळास जाणे. (वा.) **होता की नव्हता, होत्याचा नव्हता करणे** - समूळ नाहीसे करणे.

होणे याचा एक उपयोग सतत क्रियावाचक म्हणून केला जातो. उदा. देते व्हा, जेवते व्हा इत्यादी. याचा काव्यातही भूतकालीन उपयोग होतो. उदा. बोलता झाला, सांगता झाला इत्यादी. [सं.भू; भूत; प्रा. होत्था, होइ]

होणे क्रि. १. असणे, राहणे. २. जन्मणे. ३. पाहिजे असणे. ४. होला हो म्हणणे.

होतकर-रू वि. पुढे उत्कर्ष पावेल असे ज्याबद्दल वाटते असा; प्रगतिपर; आशादायक.

होतव्य न.१. भवितव्य. २. (ल.) दैव; नशीब.

होता,होतृ पु.१. यज्ञ करणारा; यज्ञात आहुती देणारा. २. ऋत्विज. [सं.]

होताया पु. पूजेचे साहित्य. - लोसाको.

होती वस्त-स्तू, होता माल वाढत्या प्रमाणात चांगुलपणा, लायकी, किंमत असणारी वस्तू.

होती वाट उघडलेली वाट, मार्ग; उघडा झालेला रस्ता. (विवाहित स्त्रीचे पोट (गर्भाशय) उघडण्याच्या वेळी म्हणतात.)

होती वेळ, काळ योग्य संधी; हंगाम.

होते वि. जागी; ऐवजी : 'तुझीया भर्ताराचे होते आम्ही दोघी जन जउनु-पंचो १५२.१९.(क.)

होत्र न. १. हवनीय द्रव्य; आहुती. २. होम; विधिपूर्वक आहुती देणे. [सं.]

होदार न. (नाविक) दोरी ताणून बांधण्याची क्रिया.

होन पु.मध्ययुगीन काळातील सोन्याचे एक नाणे. उदा. शिवराई, पादशाही, सणगिरी इ. [क. होन = सोने, सोन्याचे नाणे] (वा.) **होना पायली होणे** - फार महाग होणे.

होपट वि. पोल; पोकळ. [सं.]

होपळ, होपळसुती वि. १. अव्यवस्थित. मंद; मूर्ख. पहा : **भोपळसुती.** २. पोकळ; निरर्थक.

होपारी स्त्री. पाळी; वेळ. (व.)
होपा(प)ळी न. सकाळचे कोवळे ऊन. (कु.)
होबळकांदा पु. एक विषारी कंद (औषधी उपयोगाचा). (कु.)
होबाडके न. थोबाड; मुसकट. (व.)
होबास पु. लग्नापूर्वी नवरदेवास नवरीच्या वडिलांनी कपडे इ. देण्याचा विधी. (ना.)
होबासा पु. काम करून देण्याबद्दलचे आश्वासन, वचन, खात्री.
होबाळ स्त्री.१. लहान तळे. २. पाणी साचणारी भातशेतीची जमीन; खाचर.
होभाग स्त्री. ठराव; करार; संमती. (व.)
होम पु. १. यज्ञ; विधिपूर्वक अग्नीत (तूप, तांदूळ इ.ची) आहुती देणे; हवन. २. आहुती. [सं.]
होमकुंड न.यज्ञकुंड; होम करण्याची जागा.(वा.) **होमकुंडी घालणे, टाकणे, देणे, पडणे, सापडणे** – संकटात पडणे.
होमगार्ड पु. नगरसेना; नगरसैनिक. [इं.]
होमणे सक्रि. जाळणे; होम करणे.
होमरूल न. आपला राज्यकारभार आपण करणे; स्वशासन. [इं.]
होमिओपॅथी स्त्री. समचिकित्साशास्त्र; एक रोगचिकित्सापद्धती. ज्या पदार्थाने शरीरात रोगलक्षणे उत्पन्न होतात, तोच पदार्थ अतिसूक्ष्म प्रमाणात त्या रोगावर योजावयाची पद्धती. [इं.]
होमोसेपियन पु. आधुनिक मानव व त्याचे पूर्वज (मानवाच्या उत्क्रांतीत आधुनिक मानवाशी जुळणारे); मेधावी मानव. [इं.]
होय अ. रुकार दाखवणारा शब्द; हो.
होय उद्‌गा. बरे; संमतिदर्शक अव्यय.
होयबा पु. ज्याला स्वत:चे मत नाही असा; दुसऱ्याच्या होस हो देणारा.
होया, होयाचे वि. होणारा; होयाचे; होण्याचे; व्हावयाचे : 'जीणे... सृष्टि होण्याची।'– मोअनु १.३४.
होर स्त्री. १. पावसाने वाहून आलेली माती, केरकचरा इ. चा गाळ, खळमळ याने शेतातील खाचखळगे भरून शेतजमीन सारखी भरून येणे. २. वाहून, धुपून आलेली माती, गाळ इ.
होरट स्त्री. उग्र वास; घाण. पहा : **ओरट**
होरट स्त्री.पु.१. दुराग्रह; अतिशय हट्ट; हेकाडपणा. २. आरडाओरड; गोंगाट.
होरटी–ट्या वि. १. गोंधळ, गोंगाट करणारा. २. फार हट्टी; हटवादी; दुराग्रही.
होरणी स्त्री. १. वरील होरण्याची क्रिया. २. खड्डे, शेत इ. होरण्याकरिता तेथे घातलेली माती इ.ची भरती. ३. त्या भरतीच्या गाळसाळ इ. वस्तू; गाळ.
होरणे उक्रि. १. गाळसाळ इ. येऊन शेतजमिनीतील खाडीतील खाचखळगे भरणे. २. आच्छादणे; व्यापणे (दागिन्यांनी शरीर इ.).[सं. आवरण]
होरप(पा,फ)ळणे उक्रि. भाजणे; पोळणे; हुरपळणे; डागणे.
होरपा पु. कणसे भाजण्याची पहिली पाळी. (व.)
होरस स्त्री. लग्नात वधूपक्षाने वरपक्षास दिलेली मेजवानी. (गो.)
होरा स्त्री.१. (ज्यो.) मेषादी राशींचे लग्नाचे अर्ध. २. दिवसाचा २४ वा भाग; एक तास; अडीच घटका. ३. भविष्य; भावी घटना सांगणे. ४. मेषादी लग्न. ५. ज्योतिषाचा एक प्रकार. ६. मुहूर्त : 'भंगेल गुर्वपूजक, साधुनि देईल गर्ग होरा ज्या ।'– मोभीष्म १.७१.७. अंदाज; अजमास; अटकळ; कयास. (क्रि. चालणे, आत येणे, दिसणे, वाहणे.) [सं.]
होराकुंडली स्त्री. (फ. ज्यो.) सहा विषम क्रमांकांच्या (मेष, मिथुन, सिंह, तूळ, धनू व कुंभ) राशींतील पहिल्या होऱ्यावर म्हणजे १५° इतक्या क्षेत्रावर रवीचे प्रभुत्व व दुसऱ्या होऱ्यावर चंद्राचे प्रभुत्व असते, तसेच सहा सम क्रमांकाच्या राशींच्या पहिल्या होऱ्यावर चंद्राचे प्रभुत्व असते व दुसऱ्या होऱ्यावर रवीचे प्रभुत्व असते असे गृहीत धरून सिद्ध केलेली कुंडली.
होराबाजी स्त्री. जोराचा वाद.
होरावृत्त न. तासाचे चक्र.
होरी स्त्री. १. होळीच्या सणात गायले जाणारे वसंतोत्सवासंबंधी, कृष्णलीला वर्णन ते इतर शृंगार. या विषयावरील हिंदी भाषेतील गाणे. हे दीपचंदी किंवा धमार तालात गातात. २. (सामा.) शृंगारिक गाणे. [सं. होलि; हिं.]
होरी स्त्री. (जरतार धंदा) एक शेर वळलेले रेशीम. [क. होरलु=वळणे]
होरीबेरी स्त्री. येरझारा; मागेपुढे जाणे. पहा : **हिरबोर**
होरेत पु. बिजवर नवरा. (गो.)
होलकांडा पु. झोकांडा; झोकांडी; झोक. (क्रि. जाणे, खाणे.)
होलगट–ड न. (तिरस्कारार्थी) हेला किंवा होला पक्षी.
होलगट(ड)णे उक्रि. भिरकावून देणे; झोकणे; रागाने झिडकारून देणे. अक्रि. १. होलगाडणे; होलपणे; झोक जाऊन पुढे पडणे. (वा.) **होलगडून पडणे** – (गाय, बैल इ.) जोराने ठेचकाळून पडणे; अडखळून कोलमडणे. २. प्रेताच्या तिरडीपुढचे मडके स्मशानात नेऊन फोडल्यावर त्याच्या खापरातील पाणी पिऊन होला पक्षी एखाद्याच्या पाठीवर बसला किंवा पाठीवरून गेला असता त्या प्राण्याची कंबर किंवा पाठ मोडणे.
होलगडा पु. काठी; लहान दांडके.
होलगा, होला पु. एक पक्षी. [गु.होलो]
होलगा, होला पु. रेडा; हेला.
होलगे न. (तिरस्कारार्थी) होला पक्षी.
होलप(पा)टणे क्रि. (पत्त्यांचा खेळ) अखेरचे दोहोंपेक्षा अधिक हात सर्व एकदम घेणे. (क्रि. मागणे, घेणे, पाडणे.)
उक्रि. होलपटा (दांडके) फेकणे; फेकून मारणे (झाडावरून फळे पाडणे इ.साठी).
होलप(पा)टा पु.१. होलगडा. २. आचका; हिसका देऊन फेकणे. (क्रि. मारणे, देणे.)
होला पु. मोठ्या शिंगाचा.
होलाकोला पु. क्षुद्र; भित्रा, नेभळट, नालायक माणूस.
होलार पु.१. महार, मांग इ. जातीचे वाजंत्री वादक व त्यातील व्यक्ती. २. गोमांस न खाणारी एक जात.

होलाळा पु. लाट; वेग. – शर.

होलिका स्त्री. १. होळीची अधिष्ठात्री देवता; राक्षसी. २. पहा : **होळी** [सं.]

होवर पु.ओहर, वव्हर; वधूवराचे जोडपे.

होवरी स्त्री. १. सोपा; ओवरी. २. खोली. (कु.)

होवळणी स्त्री. १. होवळ्याचा धंदा. २. उपद्व्याप; नसता कारभार.

होवळा वि. १. पुढारी; सर्व बाबतीत पुढाकार घेणारा; तंटेभांडणे तोडणारा; लग्ने वगैरे जमवून देणारा. २. कारभार करणारा; उपद्व्यापी.(क.) ३. (चुकीने) हवळा.

होवळी स्त्री. करवली. (गो.)

होवळीक न.लग्नमुंजीचे आमंत्रण. (गो.)

होवासा पु. आश्वासन; वचन.

होवी स्त्री. १. स्तुती.(गो.) २. ओवी.

होश–ष–शा पु.१. उत्साह; कळकळ; उत्सुकता; जोम (कृत्य, धंदा, धाडस इ. संबंधी) : 'त्यांचे राजकारण विध्वंस जाहलें; त्यांचा होश गेला।'– मइसा १०.५९. २. शुद्धी; भान; अवसान. [फा.हुश्]

होश्य(ष्य)माण वि. पुढे होणारी; भविष्यकालीन. [होणे, सं.भू]

होसरणे पहा : **ओसरणे**

होहो पु. गोंधळ; गडबड : 'एकदम होहो होऊन गेली.'– विक्षिप्त १.७१. [हो द्वि.]

होळणी स्त्री. धुपणीचा रोग.

होळणे न. धुण्याचा जिन्नस.

सक्रि. पाझरणे; गळणे; स्रवणे; धुपणे; ओहोळणे.

उक्रि. १. धुणे; घोळणे. उदा. अंग होळणे (धुणे). २. सांडणे.

होळदो स्त्री. (तिरस्कारार्थी) होळी. (गो.) [क. होळु, होळे]

होळप अक्रि. अपुऱ्या महिन्यांची बाळंत होणे; धुपावणे. (गो.)

होळप(फ)णे उक्रि. पहा : **हुरपळणे**

होळबंदी स्त्री. नांगरावर बसविलेली शेतसाऱ्याची पद्धत. (बडोदे) [सं. हल्य, हल]

होळंबणी स्त्री. काळजी; चिंता; खेद; मनस्ताप. (क्रि. घालणे, करणे.)

होळा पु. पहा : **हवळा**

होळा पु. मोठी होळी.

होळाव पु. पालन.

होळी स्त्री. १. होळीचा सण; होळीची गोवऱ्या इ. ची रास, ढीग; होळी; हुताशनी. २. होळीत मध्ये पुरावयाचे एरंडाचे, पोफळीचे किंवा केळीचे झाड. (को.) [सं. होलिका] (वा.) ० **करणे** – जाळपोळ करणे; सर्वनाश करणे. **अंगाची होळी होणे** – राग, ताप इ.नी अंगाची आग होणे.

होळी स्त्री. झुंड; समुदाय; टोळी : 'शेजी तू आई बाई दंग उसना मला कळ्या, बंदसंग मैतबीराच्या होळ्या.'– जामामा २५३.

होळी स्त्री. गंज; रास. (क.)

होळीची पोळी १. होळीवर पोळी बांधण्याचा, ठेवण्याचा पहिला हक्क. हा मुखत्यार बहुधा पाटलाचा असतो. २. अशा तऱ्हेची पोळी.

होळीचे होळकर १. होळीच्या पुढे खेळ, गडबड, मजा करणारी मंडळी. २. अजागळ व अव्यवस्थित लोक. ३. (ल.) सटरफटर छंदी लोक; नुसते तमाशा बघण्यासाठी, खेळण्यासाठी जमलेले लोक.

होळी शिंपणे होळीच्या दिवसात पडणारा लहानसा पाऊस.

होंजी स्त्री. भावजय : 'बाळाईचा हट्ट, नगं मला पीतांबर – मला होंजीची कासई।' – घाश्रलो १२. (को.)

होंट्यो न. ओटीभरण. (गो.)

होंड न. पाण्याचे टाके. (क.)

होंडकी वि. शिंग मोडलेली (गाय, म्हैस इ.).

होंडगणे उक्रि. होडंगा, सोटा फेकणे, मारणे. (राजा.)

होंडा पु. खळगा. [सं. अधः]

होंडी स्त्री. जोंधळ्याची एक जात. पहा : **हुंडी**

हॉटेल न. भोजनाची आणि निवासाची सोय असणारे ठिकाण; उपहारगृह. [इं.]

हौज्या पु. फजिती; बेअब्रू; अपमान. (क्रि. उडणे, उडविणे, पाडणे.) [अर.हझ्झ]

हौतात्म्य न. थोर कामासाठी स्वतःचे प्राण देणे. बलिदान; प्राणार्पण; वीरमरण.

हौद पु.१. पाणी साठविण्यासाठी केलेले दगडचुन्याचे बांधीव, सिमेंटचे किंवा धातूचे पात्र. २. जमिनीत केलेला खड्डा; गुप्त जागा; टाके. [अर. हौझ्]

हौदा पु.१. हत्तीवर बसण्याकरिता असलेली उघडी कठडेदार अंबारी. २. कुस्तीसाठी केलेला चौकोनी हौदाप्रमाणे खळगा; आखाडा. [अर. हौदज]

हौर पु.१. नदीला एकाएकी आलेला पूर. २. ऊर्मी; सुरसुरी (बोलणे, खेळणे इ. तील). पहा : **और**

हौरा पु.(नासिक) लुगड्याचे (दोन्ही काठ सोडून) मधले पोत.

हौरा–री पु.स्त्री. पांढरे तीळ. पहा : **हवरा–री**

हौलदिली स्त्री.भीती; धास्ती; भयचकित होणे.

हौलादि(दी)ल वि. भयभीत. पहा : **हवालदिल**

हौशा–शी–सी वि. १.हौस बाळगणारा; उत्साही. २. ख्यालीखुशाली, गाणेबजावणे इ. नी आपल्या मनाची हौस पुरविणारा; रसिक.

हौशे(स)णे अक्रि. हौस, आवड असणे, बाळगणे; चटक लागणे.

हौस स्त्री. उत्कट इच्छा; महत्त्वाकांक्षा; उत्सुकता; गोडी; आवड; छंद; शौक; उत्साह; नाद; उमेद. [फा. होस; अर. हवस्]

हौसदार वि. १. शौकीन; लहरी; चैनी; विषयासक्त. २. महत्त्वाकांक्षी; तीव्र इच्छेचा; हौशा.

हौसला पु. १. इच्छा; हेतू :'त्याचा मानस – हौसला उत्तम आहे.'– मइसा १०.५९. २. कर्तृत्वशक्ती; उत्साह :'काम मोठे हौसला थोडा.'– मइसा ५.११. [अर. हौसला]

हौसा पु. भाद्रपदात अनुराधा नक्षत्र ज्या दिवशी असेल त्या दिवसापासून गौरीप्रमाणे तीन दिवस करावयाचा एक उत्सव.

हौसेहोसे क्रिवि. तीव्र इच्छेने; उत्सुकतेने.

हौळ स्त्री. अव्यवस्थित जमाव; टोळी; घोळका; झुंड. (व.)
हौळा पहा : **हुळा**
ह्यंगशा वि. हिजडा; नपुंसक.(बे.) [क. हेंगस् = बाई, स्त्री]
ह्यंज पु. ढेकूळ.
ह्यंबाडणे, ह्यांडी होणे अक्रि. कलंडणे; उलथणे (गाडी इ.). (व.)
ह्यस्तन, ह्यस्त वि. कालचा, कालच्या दिवसासंबंधी. [सं.]
ह्याच्यात येणे तारुण्यात (विशेषत: स्त्रिया)येणे.
ह्यासणे अक्रि. मट्ट्यास येणे. बेजार होणे.- मनको.



ळ मराठी वर्णमालेतील एकोणपन्नासावा वर्ण व चौतिसावे व्यंजन. हा वर्ण प्राकृतमध्ये नाही. पाली भाषेमध्ये होता, मराठीत आहे. हा कोणत्याही शब्दाच्या आरंभी येत नाही.

■■■



क्ष मराठी वर्णमालेतील पन्नासावा वर्ण व पस्तिसावे व्यंजन. 'क्ष' हे अक्षर क् आणि ष् या दोन व्यंजनांच्या संयोगाने झालेले आहे.
क्षकिरण न. काही पदार्थातून आपोआप बाहेर पडणारे, प्रकाशचित्राच्या फिल्मवर परिणाम करणारे किरण.
क्षण पु. १. एका मुहूर्ताचा बारावा भाग; चार मिनिटे; तीस कला. २. सूक्ष्म काळ; अगदी थोडा वेळ; पळ; निमिष. ३. श्राद्धाच्या आमंत्रणाकरता ब्राह्मणाच्या हातावर द्यायचे दर्भ, यावरून ब्राह्मणाला श्राद्धाचे दिलेले आमंत्रण. (क्रि. देणे, घेणे.)
क्षणणे सक्रि. श्राद्धाकरिता हातात दर्भ देऊन ब्राह्मणास आमंत्रण देणे.
क्षणन न. १. मारणे. २. जखमी करणे.
क्षणबुद्धी वि. चंचल, अस्थिर, अनिश्चित मनाचा, बुद्धीचा.
क्षणभर-रि-री क्रिवि. थोडा वेळ; एक क्षणकालापुरते; पळभर.
क्षणभंगुर वि. एका क्षणात नाश पावणारा, मोडणारा; नाशवंत; क्षणिक; अशाश्वत.
क्षणशक्ती स्त्री. मलोत्सर्गाची शक्ती.
क्षणिक वि. एक क्षण टिकणारे; अल्पकालीन.
क्षणिकवाद 'प्रत्येक वस्तूचे अस्तित्व हे क्षणभरापेक्षा अधिक नसते. कोणतीही वस्तू कोणत्याही दोन क्षणात समान रूपात असत नाही'- असे बौद्धमत.
क्षत न. जखम; व्रण; इजा.
वि. जखम झालेला; जखमी.
क्षतदृष्टि-ष्टी स्त्री. वैरभाव; प्रतिकूल नजर.
वि. अशा तऱ्हेचा भाव ठेवणारा; वैरी.
क्षतवृत्ति-ती वि. चरितार्थाचे साधन नसलेला; बेकार.
क्षतव्रत वि. व्रतभंग करणारा; शपथ मोडणारा; भ्रष्ट.
क्षति-ती स्त्री. १. तोटा; नुकसान; नाश. २. इजा; जखम; दुखापत. ३. (व्यापक) ऱ्हास; बिघाड; नागणूक.४. (ल.) चिंता; फिकीर; पर्वा; दरकार; किंमत या अर्थी (क्रि.धरणे, बाळगणे.) [सं.]
क्षत्ता पु. दासीपुत्र : 'धर्म मूर्ति गुणविधान । विदुर क्षत्ता जन्मला ।' - मुआदि ५०.
क्षत्र, क्षत्रिय, क्षत्री पु. १. चार वर्णातील दुसऱ्या म्हणजे क्षत्रिय वर्णाचा पुरुष. २. योद्धा; लढवय्या; वीर पुरुष.
वि. दुय्यम(प्रत). थोडासा हलकेपणा दाखविण्यासाठी काही शब्दांपूर्वी योजण्याचे विशेषण. उदा. क्षत्रिय हिरा.
क्षपण न. १. कोणत्याही प्राणिदामधून प्राणवायू काढून टाकण्याची क्रिया. २. गांधीक धातुके आणि कार्बीक धातुके यांच्या रूपांतरित प्राणिद धातुकापासून धातू मिळविण्याची पद्धत. ३. पदार्थाचे आकारमान कमी करणे किंवा होणे.
क्षपण(णि)क पु. १. जैन किंवा बौद्ध साधू. २. जैन किंवा बौद्ध मतानुयायी. [सं.]

क्षपणकवाद पु. बौद्धधर्म; एक नास्तिक मत.

क्षपा स्त्री. रात्र; सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचा काळ. [सं.]

क्षम वि. १. सोशिक; सहनशील; क्षमाशील; शक्त; समर्थ; लायक; योग्य. २. शक्य असलेला; व्यवहार्य; आचरणीय. [सं. क्षम्]

क्षमण न. क्षमा : 'क्षमण करिं कृपेनें सर्व तूं न्यायसारा ।' – वामन, विराट ८.६०.

क्षमणे अक्रि. समर्थ होणे. [सं. क्षम्]
सक्रि. क्षमा करणे.

क्षमा स्त्री. १. अपराध सहन करण्याची क्रिया, धर्म; सहनशीलता; माफी. (क्रि. करणे.) २. सोशीकपणा; शांती; स्थिरता; सहिष्णुता : 'असंमोहसहन सिद्धी । क्षमा सत्य ।' – ज्ञा १८.८३. ३. पृथ्वी; धरा.

क्षमापण न. शांतवन; सांत्वन (राग, दुःख इ. चे); समाधान.

क्षय पु. १. झीज; ऱ्हास; अवनती; नाश. २. नायनाट; लय; अस्तित्व नाहीसे होणे; लोप. ३. छाती/फुप्फुसाचा एक रोग. ४. सूर्य, चंद्र यांच्या बिंबांचा ऱ्हास. ५. (बीजगणित) ऋणसंख्या. ६. साठ संवत्सरातील शेवटचे संवत्सर.

क्षयकार पु. कफक्षय; क्षयरोगाचा खोकला.

क्षयतिथि- थी स्त्री. १. आज सूर्योदयानंतर सुरू केलेली व उद्या सूर्योदयापूर्वी संपणारी चांद्रमानातील तिथी. २. मृत माणसाची महिन्याची किंवा वर्षाची मृत्युतिथी. [सं.]

क्षयपक्ष पु. दर महिन्यातील दुसरा पंधरावडा; वद्य पक्ष. [सं. क्षम्]

क्षयमास पु. ज्या महिन्यात दोन संक्रांती येतात असा अमावस्यान्त मास. हा क्वचित येतो, आल्यास तो कार्तिक, मार्गशीर्ष व पौष महिन्यांतच येतो.

क्षयिष्णु वि. नश्वर; अशाश्वत; नाश, ऱ्हास पावण्याजोगे. [सं.]

क्षयी १. क्षयिष्णु. २. क्षयरोगी.

क्षर पु. १. सृष्टीतील सर्व नाशवंत पदार्थ. २. सर्व भूते: 'तेथ क्षराक्षर अरणी दोन्ही । गुरुमंत्रें दृढ मंथुनी ।'– एभा १९.७४. [सं.]
वि.१. गळणारे; ठिबकणारे; झिरपणारे. २. झिजणारे; ऱ्हास पावणारे. ३. नाशवंत; अशाश्वत. [सं. क्षर्]

क्षरण न. १. गळती; झिरपा; ठिबकणी. २. हळूहळू नाश; ऱ्हास.[सं.]

क्षरणे अक्रि. १. पाझरणे; ठिबकणे; गळणे; झिरपणे; हळूहळू नाहीसे होणे. २. भरून किंवा व्यापून राहणे : 'ऐसे रूप पहा क्षरे दाही दिशा।'– निगा १२८.

क्षरित वि. १. गळलेले; ठिबकलेले. २. गाळलेले.

क्षंतव्य वि. क्षमा करण्याजोगा; क्षम्य.

क्षंता वि. क्षमाशील; सहनशील; सोशीक.

क्षाती स्त्री. कीर्ती; नाव; ख्याती : 'पुत्रीने केली क्षाती ।'– वसा ७३.

क्षात्र वि. क्षत्रियासंबंधी. [सं.]

क्षात्रधर्म–व्रत–वृत्ति पुन. स्त्री.१. क्षत्रियाचा उद्योग, कर्म इ. २. शौर्य, धैर्य इ. गुण.

क्षानत न. अनिष्टसूचक घटना, कृती. (राजा.)

क्षाम पु. काळ; दुष्काळ : 'त्या दिवसात तंजावर देशाचे किल्ल्यांत ही केवळ क्षाम पडून दाणा मिळेना.'– तंजाशिला १०७.

क्षार पु. १. सहा रसातील एक. (सामा.) मीठ (खनिज किंवा कृत्रिम). २. खारटपणा. ३. केळीचे सोपट, आघाडा, हळदीचे पान इ. ची राख. (इं.) अल्कली. ४. सोडा इ. क्षार पदार्थ. ५. अम्ल व अल्कली यांच्या रासायनिक संयोगापासून बनवलेला पदार्थ. ६. क्षारांचे तीव्र मूलतत्त्व; (इं.) कॉस्टिक अल्कली.
वि. खारट. [सं.]

क्षार क्रिवि. दूर : 'फिरंग्यांनी हिंदू लोक बाटवून क्षार केले.' – पुरु डिसें १९३८.

क्षारता स्त्री. खारटपणा.

क्षारपंचक न. पळसाचा क्षार, तिळाच्या काड्यांचा क्षार, मोरव्याचा क्षार, सज्जीखार, व जवखार यांचे समप्रमाणातील मिश्रण.

क्षाल(ळ)णे उक्रि. स्वच्छ करणे; धुणे.

क्षालन न. धुणे; प्रक्षालन.

क्षांत वि. १. सहन केलेले; क्षमा केलेले. २. सोशिक; धीराचा; सहनशील. [सं. क्षम्]

क्षांति–ती स्त्री. १. क्षमा; माफी. २. शांती : 'उभय सहिष्णुता ते क्षांती। क्षांतीसी क्षिती गुरू केली।' – एभा ७.३६२.

क्षिणणे अक्रि. क्षीण, अशक्त, खराब होणे; झिजणे. [सं. क्षीण]

क्षित वि. खराब झालेले; ऱ्हास पावलेले; खालावलेले.

क्षिति–ती स्त्री. १. पृथ्वी : 'परब्रह्म क्षिती उतरले ।'– तुगा १०३. २. (संगीत) चौदाव्या श्रुतीचे नाव. ३. खराबी; नासाडी; क्षय. [सं.]

क्षितिज न. आकाश जेथे जमिनीला लागलेले दिसते ती वर्तुळाकार मर्यादा.

क्षितिजसमसूत्र वि. क्षितिजाच्या सरळ पातळीत असलेले; पृथ्वीच्या पृष्ठभागाशी सपाट असलेले.

क्षितिबाध पु. दुःखाची बाधा नसणे.

क्षिती स्त्री. (चुकीने) क्षति; चिंता; फिकीर; पर्वा.

क्षिती स्त्री. कमाल; मर्यादा; अखेर; अंत; शेवट. [सं. क्षति]

क्षिपण न. टाकणे; फेकणे. [सं.]

क्षिप्र वि. क्रिवि. घाईने. [सं.]

क्षिप्रा स्त्री.१. खीर. २. उज्जयिनीची शिप्रा नदी. [सं.]

क्षिमावणे क्रि. क्षमा मागणे.

क्षिरार न. गुरांचे खिल्लार. [सं.]

क्षीण वि. १. क्षयी; अशक्त; दुर्बल. २. नाश पावलेला; संपलेला; नाहीसा झालेला. ३. सडपातळ; बारीक; किरकोळ; कृश; रोडका. [सं. क्षि = क्षय होणे.]

क्षीणायू वि. मरणोन्मुख; विनाश जवळ आलेला; अल्पायू.

क्षीर न. १.दूध. २. पाणी. ३. झाडाचा पांढरा चीक, रस. स्त्री. खीर. [सं.]

क्षीरनीरन्याय पु. एकात एक पूर्णपणे मिसळून जाणे; पूर्ण विलीनता.

क्षीरस्फटिक पु. गोमे दरत्न.

क्षीरोदक न. उंची, रेशमी पातळ, साडी; पांढरेशुभ्र रेशमी वस्त्र.: 'शेले, शालू, साड्या क्षीरोदक लांब रूंद पाटावे ।'– मोसभा ५.८३.

क्षुत–त स्त्री. शिंक. (क्रि. येणे)

क्षुत स्त्री. क्षुधा; भूक. [सं.]

क्षुत्क्षाम वि. भुकेला; भुकेने व्याकुळ झालेला : 'क्षुत्क्षाम स्तनपाने सुतृषित नव्हतां ।'– गस्तो १२. [सं.]

क्षुद्र न. न्यून; उणेपणा; वैगुण्य; दोष.
वि. लहान (योग्यता, आकार इ. ने); हलके; क्षुल्लक. [सं.]

क्षुद्रदृष्टि–ष्टी स्त्री. क्षुल्लक दोष पाहण्याची प्रवृत्ती; अनुदार वृत्ती; कोते मन.
वि. उणेपणा काढणारा. [सं.]

क्षुद्रान्वेषण न. पहा : **क्षुद्रदृष्टी**

क्षुद्रान्वेषी वि. पहा: **क्षुद्रदृष्टी**

क्षुधा स्त्री. भूक. [सं.]

क्षुधित–स्त वि. भुकेला.

क्षुब्ध, क्षुभित वि. क्षोभ पावलेला; चवताळलेला; रागावलेला; चेतलेला; विकार झालेला. [सं. क्षुभ्]

क्षुर पु. १. वस्तरा. २. गुराच्या पायाचा खूर (विशेषत: घोड्याच्या). [सं.]

क्षुरप्र पु. बाण; इषू : 'कामाचे धनुचे क्षुरप्र मनसीं भूवाल्लनेत्रोत्पलें ।'– विठ्ठल रसमंजरी ११८.

क्षुल्लक वि. १. पहा : **क्षुद्र.** २. (ल.) हलके; कमी दर्जाचे; कवडी किमतीचे (किरकोळ माणूस, कृती, काम, बाब इ.). [सं.]

क्षेत्र न. १. शेत. २. तीर्थाची जागा; पवित्र व धार्मिक स्थळ; यात्रेचे ठिकाण. ३. जागा; स्थळ; स्थान; भूमिभाग. ४. (भूमिति.) लांबी, रुंदी, उंची या प्रमाणे मापन करता येणारा पदार्थ, आकृती; नकाशा. ५. बारा शाळिग्रामांचा संच. ६. ज्यात आत्मा राहतो असे प्राण्याचे शरीर; सजीव व सविकार मनुष्यदेह. ७. (संतती उत्पत्तीचे स्थल म्हणून) स्त्री; पत्नी: 'जेंवि पितृक्षेत्रीं मीं, मत्क्षेत्रींहि तसेंचि संतान ।'– मोआदि १९.३४. ८. लंघन; कडकडीत उपवास. (धार्मिक उपवास नव्हे) ९. चोवीस शाळिग्राम, अकरा बाण, नर्मदेतील एकवीस गणपती, बारा सूर्यकांत व आठ सुवर्णमुखी देवी इतक्या देवतांचा समूह. १०. युद्धभूमी; रणांगण: 'तो ना गवसेचि क्षेत्रीं ।'– कथा १.७.६९. ११. रेखागणित; भूमिती. [सं.]

क्षेत्रगणित न. भूमितिशास्त्र.

क्षेत्रज पु. स्वस्त्रीच्या ठायी स्वत:चा भाऊ किंवा भाऊबंद यांचेपासून झालेला पुत्र; नियोगापासून झालेली संतती; परवीर्यापासून स्वस्त्री (क्षेत्र)च्या ठायी उत्पन्न झालेले अपत्य. प्राचीनकाळी अशा संततीला हिंदुधर्मशास्त्रात कायदेशीर मान्यता असे.

क्षेत्रपाल–ल पु. १. स्थल, ग्राम रक्षक देवता; स्थानिक देवता. २. शेताचा राखणदार.

क्षेत्रफळ–ळ १. (भूमिति.) कोणतीही पातळी अथवा क्षेत्र एखाद्या क्षेत्रपरिमाणाने मोजले असता त्या परिमाणाची निष्पन्न होणारी संख्या. २. (ल.) निकाल; परिणाम; फळ.

क्षेत्ररक्षक पु. (क्रिकेट) क्षेत्राच्या बाहेर चेंडू जाऊ न देण्याचा प्रयत्न करणारा, चेंडू अडविणारा व झेल घेणारा खेळाडू.

क्षेत्ररक्षण न. (क्रिकेट) मैदानाबाहेर चेंडू जाऊ न देण्याची कामगिरी.

क्षेत्रराशी स्त्री. (भूमिति.) काही विशिष्ट आकाराची राशी, संख्या (भूमितीच्या आकृतीने दाखविली जाणारी).

क्षेत्रसंन्यास पु. मृत्यू येईपर्यंत एखाद्या पुण्यस्थळी वास्तव्य करून राहण्याचा केलेला नियम; संन्यास घेऊन तीर्थक्षेत्री राहणे.

क्षेत्रसंस्कार पु. क्षेत्राचा गर्भाधान, पुंवसन इ. संस्कार; संततिरूप फल उत्पन्न होण्यासाठी केलेला धार्मिक विधी.

क्षेत्रक्षेत्रज्ञ विचार स्वत:च्या पिंडाच्या, क्षेत्राच्या किंवा शरीराच्या व मनाच्या व्यापाराचे परीक्षण करून त्यावरून क्षेत्ररूपी आत्मा कसा निष्पन्न होतो याचे विवेचन.

क्षेत्रज्ञ पु. आत्मा; जीवात्मा; देहात बद्ध असणारा आत्मा.

क्षेत्राचार पु. युद्ध : 'तेथ होईल क्षेत्राचार:'– उह १७७०.

क्षेप पु. १. टाकणे; फेकणे; खर्च करणे; घालविणे. २. दूर पाठविणे. ३. खगोल अक्षांश. ४. क्षेपक; ग्रहादिकांचे सिद्ध झालेले गणित स्पष्ट व्हावे यासाठी त्यात मिळवावी किंवा वजा (उणा) करावी म्हणून सांगितलेली अंकराशी. ५. एखाद्या ग्रंथकाराच्या ग्रंथात इतरांनी घातलेले अभंग, श्लोक, वाक्य इ. प्रक्षिप्त मजकूर; क्षेपक. ६. एकच प्रसंग, वेळ, गोष्ट, क्रिया इत्यादीला लागलेला संबंध काळ; अवकाश. पहा : **खेप**. ७. विलंब. ८. अनादर. [सं.]

क्षेपक पु. पहा : **क्षेप** ४, ५.

क्षेपण न. पहा : **क्षेप** १, २.

क्षेपणास्त्र न. (नेमक्या ठिकाणी) फेकून मारावयाचे अण्वस्त्र.

क्षेपणी स्त्री. वल्हे; क्षपणी.

क्षेपणे उक्रि. १. टाकणे; फेकणे. २. दूर पाठविणे. ३. कालक्रमण करणे.

क्षेपनिक्षेप क्रिवि. न चुकता; खात्रीने; निश्चयाने; टाकोटाक; ताबडतोब; खास : 'तों भाऊसाहेब क्षेपनिक्षेप आले.' – भाब ८८.

क्षेपपात पु. (ज्यो.) दोन ग्रहांच्या कक्षा ज्या एका बिंदूतून एकमेकास छेदून जातात तो पात; ग्रहकक्षेचा आरोह छेदनबिंदू.

क्षेपवृत्त न. ग्रहांची कक्षा; विमंडल.

क्षेप्ता वि. १. क्षेपक; फेकणारा; टाकणारा. २. पाठविणारा.

क्षेम न. १. कल्याण; उत्कर्ष; सुख; हित. २. स्नेहालिंगन; भेट (क्रि. घेणे, ओढणे.)
वि. सुखी; हितकर; कल्याणप्रद.

क्षेमी वि. आनंदी : 'तो केवि मार्गीं इयें । क्षेमी होए ।'–ऋ ३१७.

क्षेव न. आलिंगन : 'तिया बाइया क्षेव सोडिले ।'– लीचउ ४७४.

क्षेव पु. ऱ्हास; क्षय : 'माझेया पापा क्षेवो करावेया आणिले जी ।'– लीचउ १.१६.

क्षेवणिक वि. कोंदणात बसविलेले : 'नारायण नाम अलंकृत । गरुडपाची क्षेवणिक ।'– उह ६८३.

क्षेवणे सक्रि. लावणे; रेखणे : 'वरि टिळा क्षेवणिला चोखटु ।'– ऋ ६४.

क्षोणी स्त्री. १. पृथ्वी : 'उघडवी देशियेचिया क्षोणी ।'– ज्ञा १२. १२. २. संख्या. [सं.]

क्षोणीप-पति पु. राजा; भूपती. [सं.]

क्षोद पु. १. चूर्ण; भुकटी; पूड. २. विचार; चर्चा. [सं.]

क्षोपनिशेष निश्चितपणे; ठामपणे; निखालस.

क्षोभ पु. १. राग; क्रोध; अतिशय संताप. २. खळबळ; व्यग्रता; प्रक्षोभ; मनाची चलबिचल; गडबड; त्रेधा. ३. लुब्ध होणे; विकारवश होणे. ४. मोहवश होणे : 'क्षोभे भूपति सर्वथा सकलही ताटस्थ्य सर्वाजना ।' - गस्तो ७३.८३.

क्षोभना स्त्री. स्फुरण. [सं.]

क्षोभिनी स्त्री. (संगीत.) बाविसाव्या श्रुतीचे नाव.

क्षौणणे सक्रि. कोंदणात बसविणे : 'आता भक्ति सुवर्ण कळसी क्षौणुनि । भावरंत्ने सरिसी ।'- ज्ञाप्र. ८४०. [सं.क्षिण]

क्षौणी स्त्री. विशिष्ट सैन्यसमूह. [सं.अक्षौहिणी]

क्षौद्र न. मध.

क्षौर पु. १. हजामत (डोक्याची); श्मश्रू. २. पैतृक कर्मात किंवा तीर्थाच्या ठिकाणी मिशांसह सर्व केस काढणे. [सं.क्षुर=कापणे]

क्षौरिक पु. न्हावी.

क्ष्वेड न. विष : 'कंठीं नीळमणीसमान बरवें तें क्ष्वेड साजें जया ।'- निमा- १. [सं.]

■■■

ज्ञ

ज्ञ मराठी वर्णमालेतील एक्कावन्नावा वर्ण व छत्तिसावे व्यंजन. संस्कृतमध्ये 'ज्ञ' हे ज आणि ञ या दोन व्यंजनांच्या संयोगाने बनले आहे. मराठीत त्याचा उच्चार द् आणि न् सारखा होतो.

ज्ञ पु. बुधग्रह.
वि. जाणणारा. समासात -शास्त्रज्ञ, रसज्ञ, मर्मज्ञ इ.

ज्ञपित, ज्ञप्त वि. १. जाणलेले. २. प्रसिद्ध केलेले. ३. शिकविलेले. [सं. ज्ञा = जाणणे]

ज्ञप्ति-प्ती स्त्री. १. बुद्धी; ज्ञान. २. माहीत असणे; जाणीव : 'म्हणितले या ज्ञप्ती । अर्वाचीना ।' - ज्ञा १३.४०. ३. ब्रह्मज्ञानामुळे झालेली जागृती; अंत:करणातील स्फुरण.

ज्ञात वि. समजलेला; जाणलेला; ठाऊक असलेला. [सं.ज्ञा=जाणणे]

ज्ञातव्य वि. जाणण्यास, समजण्यास, आकलन होण्यास योग्य, शक्य.

ज्ञातसिद्धान्त वि. शास्त्राशी पूर्ण परिचित असलेला.

ज्ञाता वि. १. जाणणारा; समजणारा; माहिती असलेला; तज्ज्ञ. २. शहाणा; विद्वान; सुज्ञ; ज्ञानी. [सं.ज्ञा=जाणणे]

ज्ञातार पु. १. ज्ञाता; जाणता : 'मूढी अथवा ज्ञातारी: स्तवावा श्रीमुरारी:'- ज्ञाप्र २.५१. २. जाती; धर्मकर्माप्रमाणे पडलेला भेद. [सं. ज्ञातृ]
वि. जातिविषयी- संबंधी.

ज्ञाति-ती स्त्री. १. जात; वर्ग; प्रकार. २. गोत्रज; बांधव : 'सार्थ म्हणे श्री धर्मावरि धरितिल जे असिप्रति ज्ञाति ।' - मोभी १०.१०.६.

ज्ञातृत्व न. १. ज्ञान; वृत्त; माहिती. २. बुद्धी; धारणाशक्ती.

ज्ञान न. १. बुद्धी; विषयाचे आकलन करण्याचे सामर्थ्य. २. मनोव्यापाराचा विषय, शास्त्र. ३. बातमी; माहिती. ४. विषयग्रहणाचा बुद्धीवर झालेला संस्कार; मनावरचा ठसा, समजूत. ५. ब्रह्मज्ञान; ब्रह्मात्मैकज्ञान; अध्यात्मविद्या. [सं. ज्ञा= जाणणे]

ज्ञानकमळ न. १. रांगोळी काढण्याचा एक प्रकार. २. (योग.) शरीराच्या ठिकाणी कल्पिलेल्या आठ कमळांपैकी प्रत्येक.

ज्ञानकोश पु. १. ज्ञानाचा संग्रह, साठा. २. विविध विषयांची माहिती ज्यामध्ये दिलेली असते असा ग्रंथ; विश्वकोश.

ज्ञानचक्षू-दृष्टि-ष्टी पु. बाह्येंद्रियांच्या विषयापलीकडील आत्मस्वरूप जाणण्याचे ज्ञान, बुद्धी.
वि. अशा प्रकारचे सामर्थ्य असणारा (मनुष्य).

ज्ञानमठ-मठी पु. स्त्री. १. चिंतनाची एकान्तातील जागा. २. तुरुंग; कैदखाना.

ज्ञानमार्ग पु. ईश्वरप्राप्तीचा वेदांचा शास्त्रोक्त मार्ग; निर्गुणाच्या उपासनेतील साधनावस्थेतील स्थिती दाखविणारी रीत.

ज्ञानयोग पु. जीव, जगत आणि परब्रह्म यांचे यथार्थ ज्ञान शास्त्राच्या अभ्यासाने व गुरूंच्या सहाय्याने करून घेऊन त्यावरून ब्रह्मैक्य जाणणे व अनुभवणे; ज्ञानाच्या सहाय्याने मुक्ती मिळवणे.

ज्ञानवल्ली स्त्री. (विनोदाने) भांग.

ज्ञानविज्ञान न. १. आध्यात्मिक ज्ञान आणि आधिभौतिक किंवा शास्त्रीय ज्ञान. २. अध्ययनापासून मिळालेले ज्ञान आणि अनुभवजन्य किंवा प्रत्यक्ष ज्ञान. ३. समाजशास्त्रे आणि भौतिक शास्त्रे. ४. परमात्म्याच्या निर्गुण-निराकार तत्त्वाचे यथार्थ ज्ञान ते ज्ञान आणि त्याचे चराचरातील अस्तित्व, तसेच त्याच्या दिव्य अवतारातील रहस्य, लीला, षड्गुणसंपन्नता यांचे यथार्थ ज्ञान म्हणजे विज्ञान.

ज्ञानशक्ति-क्ती स्त्री. १. ज्ञानेंद्रिय पंचक. २. बुद्धिसामर्थ्य.

ज्ञानसत्ताक पदार्थ ज्याचे अस्तित्व जाणण्यासाठी त्याचे प्रथम ज्ञान होणे आवश्यक आहे असा पदार्थ.

ज्ञानिया, ज्ञानी वि. १. शहाणा; सुज्ञ; जाणणारा. २. ब्रह्मज्ञानी. [सं.]

ज्ञापक वि. ज्ञान करून देणारा; माहिती, ओळख करून देणारा (लेख, चिन्ह). [सं.]

ज्ञापन न. १. माहिती करून देणे; दाखवणे; शिकवणे. २. निवेदन. [सं.]

ज्ञापित वि. १. स्पष्ट, उघड केलेला. २. परिचित; शिकवलेला. २. सुचवलेला. [सं.]

ज्ञेय वि. माहिती करून घेण्याचा, जाणण्याचा (विषय); समजण्यास, जाणण्यास योग्य.

ज्ञेयवाद पु. १. (तत्त्व.) अध्यात्मिक गोष्टींचा उलगडा एका गूढ तत्त्वज्ञानाने करणाऱ्या पाखंडी पंथाचे मत. २. शास्त्रीय ज्ञानच फक्त ज्ञेय असते असे मत.

■■■

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-४११ ००१.

महाराष्ट्र राज्य मराठी साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
प्रकाशित कोश वाङ्मय

१. गुजराती – मराठी शब्दकोश	श्री. भाऊ धर्माधिकारी
२. उर्दू – मराठी शब्दकोश	श्री. श्रीपाद जोशी, श्री. एन. एस. गोरेकर
३. कन्नड – मराठी शब्दकोश	श्री. पुंडलिकजी कातगडे
४. तमीळ – मराठी शब्दकोश	सौ. रमाबाई जोशी, श्री. पु. दि. जोशी
५. मराठी – कन्नड शब्दकोश	श्री. गुरुनाथ दिवेकर
६. मराठी – सिंधी शब्दकोश	श्री. लछमन हर्दवाणी
७. मराठी – गुजराती शब्दकोश	श्री. भाऊ धर्माधिकारी
८. पाली – मराठी शब्दकोश	श्री. बाबा भारती
९. मराठी वाङ्मय कोश : खंड – १	श्री. गं. दे. खानोलकर
१०. मराठी वाङ्मय कोश : खंड – २ भाग १	डॉ. गो. म. कुलकर्णी
११. मराठी वाङ्मय कोश : खंड – ४	डॉ. विजया राजाध्यक्ष
१३. आयुर्वेदीय शब्दकोश भाग १ व २ (संस्कृत–संस्कृत)	पं. वेणीमाधव शास्त्री जोशी, पं. ना. ह. जोशी
१४. आयुर्वेदीय शब्दकोश भाग १ व २ (संस्कृत–संस्कृत–मराठी)	श्री. वेणीमाधव शास्त्री जोशी, पं. ना. ह. जोशी
१५. इंग्रजी – मराठी स्थापत्य शिल्पकोश	श्री. रा. वि. मराठे
१६. ज्ञानोदय लेखन सार सूची : खंड – १ भाग १	डॉ. गंगाधर ना. मोरजे, प्रा. पद्मा मोरजे
१७. ज्ञानोदय लेखन सार सूची : खंड – १ भाग २	डॉ. गंगाधर ना. मोरजे , डॉ. स. वा. मुळे
१८. ज्ञानोदय लेखन सार सूची : खंड – २ भाग १	डॉ. गंगाधर ना. मोरजे, डॉ. स. वा. मुळे
१९. डॉ. माधवराव पटवर्धन – वाङ्मय सूची	श्री. सु. रा. चुनेकर
२०. वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा गणित शास्त्र, वास्तवशास्त्र, रसायन शास्त्र	डॉ. गो. रा. परांजपे
२१. साहित्य संहिता समीक्षा आणि पारिभाषिक संज्ञा	श्री. वसंत दावतर
२२. मराठी अनुवाद ग्रंथ सूची	डॉ. वीणा मुळे
२३. मराठी शब्दकोश: खंड – १, २, ३, ४, ५	प्राचार्य रामदास डांगे
२४. विज्ञान आणि तंत्रज्ञान कोश	डॉ. अ. पां. देशपांडे, डॉ. बाळ फोंडके

आह्मां घरीं धन शब्दांचीं च रत्नें । शब्दांचीं च शस्त्रें यत्न करूं ।
शब्द चि आमुच्या जीवाचें जीवन । शब्दें वांटूं धन जनलोकां ।
तुका म्हणे पाहा शब्द चि हा देव । शब्दें चि गौरव पूजा करूं ।।

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे – ४११ ००१.